# एम . ए . इतिहास

## द्वितीय वर्ष

## पेपर ः1

# विसाव्या शतकातील जग

# घटक १
## विसाव्या शतकातील जग

**अनुक्रमणिका**

**१.० उद्दिष्टे**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ विषय विवेचन**

**१.२.१ प्रबोधन आणि ज्ञानोदय**

**१.२.२ भांडवलवाद व साम्राज्यवाद यांचा विकास**

**१.२.३ समाजवाद आणि उदारमतवाद**

**१.२.४ राष्ट्रवाद**

**१.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**१.४ सारांश**

**१.५ पारिभाषिक शब्द**

**१.६ संदर्भ सूची**

## १.० उद्दिष्टे

**या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –**

१) युरोपातील प्रबोधनाची सविस्तर मिळेल.

२) भांडवलशाही आणि साम्राज्यवाद यांचा युरोपखंडात उदय आणि विकास कसा झाला हे जाणून घेता येईल

३) उदारमतवाद आणि समाजवाद आणि राष्ट्रवाद या संज्ञाचा परिचय होईल.

## १.१ प्रस्तावना

आधुनिक युगाची सुरुवात युरोपातील पुनरूज्जीवनाच्या चळवळी पासून झाली असे मानले जाते. युरोपीय राष्ट्रांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे आशिया-आफ्रिकाखंडात आधुनिक युगाचा प्रारंभ झाला. या आधुनिक युगाची सुरुवात प्रबोधनाच्या व धर्मसुधारणेच्या चळवळीने झाली.

पाश्चिमात्त्य जगात आधुनिक कालखंड १५ व्या शतकापासून सुरू होतो. परंतू पौर्वात्य देशांत १८ व्या शतकापर्यंत मध्ययुगच सुरू होते असे दिसते. जगाचा आधुनिक इतिहास घडविण्यात युरोपियन देशांनी पुढाकार घेतला. या कालखंडातील बहुतेक घटना प्रथम युरोपांत घडल्या व हळूहळू त्याचा प्रभाव जगातील इतर भागांवर पडत गेला. त्यामुळे 'आधुनिक जगाचा इतिहास' म्हणजेच 'आधुनिक युरोपचा इतिहास' असे समीकरण झाले.

जगावर प्रभाव पाडण्याचे सामर्थ्य ज्या घटनेमुळे युरोपांत प्राप्त झाले आहे त्याला 'प्रबोधन' असे म्हणतात. या प्रबोधन कालखंडापासूनच आधुनिक जगाच्या इतिहासाला प्रारंभ झाला.

पंधराव्या शतकापासून युरोपात भौगोलिक शोध, कॉन्स्टॅटिनोपालचा पाडावा, राष्ट्रराज्याचा उदय, प्रबळ राजेशाहीची निर्मिती आणि विचारवंत, संशोधक, कलावंत व धर्मसुधारकांच्या उदयामुळे जनजागृती होवून प्रबोधन चळवळीचा प्रारंभ झाला. प्रचलित संकल्पना व व्यवस्थेला धक्के देणारे विचारवंत व संशोधक पुढे आले रॉजर बेकन, बोकॅशिओ, शेक्सपिअर, व्हॉल्टेअर, रूसो, मॉन्टेस्क्यू, थॉमसवेन, जेफ र्सन, कोपनिर्कस, गॅलिलिओ, न्यूटन, ल्यूथर, लिओनार्डो, गेटनबर्ग, ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम, कबीर, नानक, राजाराम मोहनरॉय, रानडे, आगरकर, दयानंद, विवेकानंद, फु ले-आंबेडकर या शेकडो निर्भय विभुती जगातल्या नवयुगाच्या शिल्पकार होत्या. युरोप-आशिया खंडात नवविचारांचे वारे वाहू लागले व नवीन चिंतन सुरू झाले. या सुधारकांनी प्रचलित भ्रष्ट धर्म सत्तेवर व धर्मगुरूवर हल्ले चढविले त्यांनीच राजसभा, धर्मसभा, अर्थव्यवस्था, समाजजीवन, तत्त्वज्ञान, कला, शास्त्र, साहित्य व विज्ञानातील नवविचार नव संकल्पना मांडल्या, निद्रिस्त झालेला सनातनी, कर्मठ, अंधश्रद्ध, अकार्यक्षम समाजाला जागृत केले. समाजाला अस्मितेची, अस्तित्वाची जाणीव करून दिली. त्यातूनच मनुष्याच्या सर्वांगीण प्रगतीची प्रक्रीया जोमाने सुरू झाली. ही प्रक्रिया म्हणजेच 'प्रबोधन चळवळ' होय.

## १.२विषय विवेचन

### प्रबोधनाची व्याख्या :-

"Renaissance' -रेने-सान्स या इंग्रजी शब्दाला मराठी पर्यायी शब्द 'प्रबोधन' हा वापरला जातो. याचा अर्थ पुनर्जन्म, पुनरुज्जीवन, पुनर्बांधणी, विकासोन्मुख सुधारणा व नवनिर्मिती असा होतो.

१. प्रबोधन म्हणजे जनजागृतीची मोहिम, जिज्ञासेची वाढ, तर्कनिष्ठ विचार स्वातंत्र्यालाप्राधान्य व वैज्ञानिक दृष्टीकोनाचा विकास होय.
२. मध्ययुगीन स्थितीप्रिय अवस्थेचा त्याग करून मानवाने ज्या प्रेरणेमुळे गतिमानता धारण केली ती प्रेरणा म्हणजे प्रबोधन होय.
३. १५ व्या शतकाच्या मध्यानंतर विद्या-कला-साहित्य-विज्ञान व संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची जी लाट आली तिलाच प्रबोधनाचे युग असे म्हणतात.
४. युरोपला मध्ययुगीन निद्रेतून जागृत करणाऱ्या आणि नव्या प्रेरणा देणाऱ्या कालखंडाला प्रबोधनाचे युग असे म्हणतात.
५. प्रबोधन म्हणजे मुक्त व धाडसी विचारांचा पुनर्जन्म कारण मध्ययुगात हे विचार धर्ममार्तंडाच्या घरी पाणी भरत होते.
६. प्रबोधन म्हणजे वैचारिक परिवर्तन, घडविणारी बौद्धिक क्रांती होय.

प्रबोधनपर्वात मानवाचा विकास घडून आला म्हणून प्रबोधनास विकासाचे युग असेही म्हणतात. भारतीय विचारवंत एम्.एन्. रॉय यांनी प्रबोधन पर्वास मानवाचे बंड असे म्हटले

आहे. कारण या पर्वात मानवाने मध्ययुगीन कल्पनेला एक प्रकारचा धक्का देवून बंड पुकारले हाते. १३,१४,१५ व्या शतकांत मानवाच्या वैचारिक मुलात अमुलाग्र बदल झाला. या वैचारिक बदलाचे स्वरुप फारच व्यापक होते कारण या कालखंडात मानवाचा स्वत:कडे, परमेश्वराकडे, धर्माकडे, कला व विज्ञानाकडे पाहाण्याच्या दृष्टीकोनात फार मोठ्या प्रमाणावर बदल झाला. या बदलाला प्रबोधन म्हटले जाते. हे वैयक्तिक प्रबोधन प्रथम युरोपातील इटाली, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड या देशांत झाले त्यामुळे युरोप व प्रबोधनाचा जनक होय.

यूरोपांत मध्ययुगाच्या व आधुनिक युगाच्या संधीकाळात बौद्धिक प्रगती झाली, वैचारिक बदल घडून आले. मानवाचा जीवनाकडे पहाण्याचा दृष्टीकोन पूर्णपणे बदलला मध्ययुगीन अंधश्रद्धा व परंपरा यांचा त्याने त्याग केला. जीवनातील प्रत्येक बाबीकडे माणूस वस्तुनिष्ठ व तर्कशुद्ध दृष्टीकोनातून पाहू लागला. थोडक्यात मानव प्रबुद्ध झाला. मानवाने प्राप्त केलेली ही अवस्था म्हणजे प्रबोधन होय.

**प्रबोधनाची कारणे :–**

कोणतीही ऐतिहासिक महत्त्वाची घटना एकाएकी घडत नसते. तर तिच्या मागे फार मोठी ऐतिहासिक पार्श्वभूमी असते. ती विशिष्ट घटना घडण्यासाठी अनुकूल अशा वातवरणाची निर्मिती आधीच झालेली असते. प्रबोधनाच्या बाबतीतही हा सिद्धांत खरा ठरतो.

कॉन्स्टॅंटिनोपालचा पाडाव, जलमार्गांचे शोध, होकायंत्र, छापखान्याचा शोध, धर्मयुद्धांचे तांडव, भ्रष्टधर्मसत्ता, राजसत्तेची दुर्बलता, धर्मगुरूची दडपशाही, समाजाची रूढीप्रिय पापभिरूवृत्ती, राष्ट्र राज्याचा उदय, शहरांची निर्मिती, व्यापार, उद्योगांचा विकास, बुद्धीप्रामाण्यवादी वैज्ञानिक दृष्टीकोनाचा उदय, लेखक, विचारवंत, साहित्यिक, कलावंत, धर्मसुधारकांचे नेतृत्व या बाबी प्रबाधन चळवळीला कारणीभूत ठरला.

**१. लेखक व विचारवंत यांचे कार्य :–**

लेखक व विचारवंत हे समाजाचे मार्गदर्शक व प्रवक्ते असतात. मध्ययुगातील युरोपात सामान्य माणसावर ख्रिश्चनधर्माचा फार मोठा पगडा होता. मानवी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रांत धर्मसंस्थेचे वर्चस्व होते. त्यामुळे सामान्य माणूस अंधश्रद्धा व परंपराप्रिय बनला होता. या चाकोरी बाहेर जाण्याची त्यांची तयारी नव्हती. प्रचलित धर्म, चर्च, धर्मगुरू, धर्मग्रंथ किंवा प्रचलित व्यवस्थेविरद्ध बोलणे म्हणजे पाखंडीपणा व पाप समजले जाई. त्यामुळे 'बाबा वाक्यम् प्रमाणम' ही वृत्ती वाढीस लागली. ज्ञानार्जन, जिज्ञासुवृत्ती, चिकित्सक बुद्धीवाद लयास गेला होता. राजकीय अस्थिरता, आर्थिक दारिद्र्य व धर्मसभेची दडपशाही ह्या कारणांमुळे स्वतंत्रपणे विचार मांडणाऱ्यांना कठोर शिक्षा केली जात.

ख्रिश्चन धर्माची खरी तत्वे लोकांना समजत नव्हती. कारण 'बायबल' हा ख्रिश्चनधर्माचा ग्रंथ ग्रीक व लॅटीन भाषेत लिहीला गेलेला होता. त्या भाषा लोकांच्या मातृभाषा नसल्यामुळे

बायबलमध्ये काय सांगितले आहे. हे सर्वसामान्यांना कळत नव्हते. त्यामुळे धर्मसंस्थेने सांगितलेला धर्माचा अर्थच सामान्य जनतेला मान्य करावा लागत होता. जनता कोंडीत सापडली होती.

पीटर अॅबेलार्ड व रार्जर बेकन या दोन प्रमुख लेखकांनी ख्रिश्चन धर्मातील चमत्कार व ढोंगावर हल्ला चढविला जे बुद्धीला पटत नाही त्यावर विश्वास ठेवण्यास त्यांनी नकार दिला. रॉजर बेकनने घोषणा केली की, 'अमुक एका ग्रंथांत लिहिले आहे म्हणून एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यापेक्षा प्रयोगांती ती गोष्ट आपल्या बुद्धीला पटली तरच आपण तिचा स्विकार करावा' रॉजर बेकनची ही घोषणा म्हणजे युरोपातील बौद्धिक जागृतीचा प्रारंभ होय.

बेकनने पदार्थविज्ञान, गणित, शास्त्र, तत्वज्ञान या विषयांचा सखोल अभ्यास केला. ख्रिश्चन धर्मसंस्थेतील भ्रष्टाचारी कारभारावर त्याने जोरदार टिका केली त्याचे हे कार्य डान्टे, पेट्रार्क, बोकॉरीओ या लेखकांनी पुढे चालू ठेवले. त्यांच्या प्रयत्नामुळेच सामान्य माणूस जागा झाला. सत्य काय आहे ? ढोंग व अंधश्रद्धा कोणत्या ? हे जाणण्याची क्षमता त्याच्यात निर्माण झाली. ही चिकित्सकवृत्ती आणि वस्तुनिष्ठ दृष्टीकोन प्रबोधनाचे महत्त्वाचे कारण आहे.

## २. धर्मयुद्धे :-

११, १२, १३ व्या शतकांत युरोपातील ख्रिश्चन धर्मीय व पौर्वात्य तुर्क मुसलमान यांच्यात पॅलेस्टाईनच्या प्रश्नावरून ४ मोठी युद्धे झाली. त्यांनाच धर्मयुद्धे असे म्हणतात. पॅलेस्टाईन ही इस्लाम व ख्रिस्ती या दोन्ही धर्मांच्या दृष्टीने पवित्र भूमी असल्याकारणाने तिच्या प्राप्तीसाठी ख्रिश्चन व तुर्की मुसलमान आपआपसांत लढले या युद्धांत तुर्कांचा विजय झाला. युरोपातील ख्रिश्चन लोकांचा पराभव झाला. हा पराभव ख्रिश्चन लोकांच्या दृष्टीने वरदान ठरला.

या धर्मयुद्धांचा सर्वांत महत्त्वाचा परिणाम म्हणजे संस्कृती संगम होय. या युद्धात पौर्वात्य व पाश्चिमात्य या दोन संस्कृती एकत्र आल्या व त्यांची वैचारिक देवाण-घेवाण सुरू झाली. या धर्मयुद्धामुळे युरोपातील ख्रिश्चनांना पौर्वात्य संस्कृतीची ओळख पटली. तुर्की आक्रमणाला कंटाळून ग्रीक व रोमन साहित्यिक आपआपला साहित्यकृती सह युरोपांत आले व त्यांनी आपले साहित्य प्रकाशात आणले प्लेटो व ॲरिस्टॉटल या ग्रीक तत्ववेत्याचे तत्वज्ञान अरबी भाषेत भाषांतरीत केले होते. ते यूरोपात गेले. त्याप्रमाणे बीजगणित, संख्याशास्त्र इत्यादी शास्त्रांची माहिती अरबांनी युरोपियनांना करून दिली परिणामी आपले ज्ञान अद्ययावत आहे. ख्रिश्चनधर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे. या युरोपियन लोकांच्या कल्पनेला तडा गेला. इतर देशांच्या संस्कृतीतही काहीतरी आहे. हे युरोपियन लोकांच्या लक्षात आले. त्यामुळे त्यांची कूपमंडूकवृत्ती नाहीशी झाली. त्यांचा ज्ञान विषयक दृष्टीकोन विशाल बनला हा दृष्टीकोन प्रबोधनास कारणीभूत ठरला.

## ३. मुद्रणकलेचा शोध :-

प्राचीनकाळी प्रचंड वाङ्मयनिर्मिती झाली तरीही ग्रंथांची संख्या फारच कमी होती.

सुरुवातीला भूर्जपत्रावर, कातडी किंवा विटांवर लेखन केले जात असे. कागदाचा शोध लागल्यावर हस्तलिखीत ग्रंथांची निर्मिती झाली. परंतु हे काम वेळखाऊ स्वरूपाचे असल्याने ग्रंथांची संख्या मर्यादितच राहीली. ही अवस्था प्रबोधनकाळापर्यंत कायम होती.

प्रबोधनाचा प्रसार होण्यास मुद्रणकलेचा शोध हा अत्यंत कारणीभूत ठरला. छापखान्याच्या शोधाचे श्रेय जॉन गेटन बर्ग (इ.स. १२१५) याच्याकडे जाते. त्याने प्रत्येक अक्षराचा सुटा खिळा निर्माण करण्यात यश मिळविले. इंग्लंडच्या बॅकस्टनने इ.स. १४७७ मध्ये पहिले पुस्तक छापले. याच वेळी इटली जर्मनी व इंग्लंडमध्ये अनेक लेखक, विचारवंत व धर्म सुधारकांचा उदय झाला आणि त्यांचे हजारो ग्रंथ छापण्यात आले व ते साहित्य लोकांपर्यंत पोहचले.

मुद्रणकलेच्या शोधामुळे हस्तलिखितांच्या चुका टळल्या. खिळ्याद्वारा उमटविण्यांत आलेले अक्षर अधिक सुस्पष्ट होते. त्यामुळे वाचनास ते सुलभ होते. इंग्लंड, इटाली, हंगेरी, जर्मनी या देशांता छापखाने सुरू झाले त्यामुळे ज्ञानाचा प्रसार सर्वत्र जलद गतीने होण्यास मदत झाली. मुद्रणकलेच्या शोधामुळे ग्रंथनिर्मिती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली. वाचकवर्ग वाढल्यामुळे प्रबोधनाची प्रक्रिया गतिमान झाली

### ४. कॉन्स्टॅंटिनोपालचा पाडाव :-

कॉन्स्टॅंटिनोपाल हे शहर पूर्व रोमन साम्राज्याची ख्रिश्चन धर्माची अतिपूर्वेकडील राजधानी होती. १२ व्या शतकापासून तुर्कांनी आपल्या साम्राज्याचा विस्तार करण्यास सुरुवात केली. सम्राट कॉन्स्टॉन्टाईनने तुर्कांना विरोध केला. परंतु तो स्वत: या युद्धांत मारला गेला.

तुर्कांनी इ.स. १४५३ मध्ये कॉन्स्टॅंटिनोपाल हे शहर जिंकून घेतले. त्यामुळे युरोपांत तुर्कांचा उपद्रव वाढत गेला. या घटनेचे गंभीर परिणाम जगावर झाले. या शहरावर ३०० वर्षापासून तुर्कांचे हल्ले होत होते. आता हे शहर ऑटोमन तुर्काच्या साम्राज्याची राजधानी बनले. या शहरातून पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील देशांशी दळणवळण व व्यापार चालत होता. व्यापाराचे ते मोठे केंद्र होते. आशिया व युरोपखंडाचा व्यापार कॉन्स्टॅंटिनोपाल शहराच्या कूमार्गे चालत होता. तो व्यापार तुर्कांच्या वर्चस्वामुळे बंद पडला. युरोपिय लोकांना नवे मार्ग शोधण्याची गरज निर्माण झाली.

तुर्कानी हे शहर जिंकण्यासाठी या शहरावर जे हल्ले केले, अत्याचार केले. त्यामुळे या शहरातील विद्वान, पंडित, कलावंत, तत्वज्ञ, शास्त्रज्ञ व लेखक युरोपच्या आश्रयाला गेले. तेथे त्यांनी ग्रीकवाङ्मयाचे महत्त्व युरोपियन लोकांना कळाले आणि येथून पुढे युरोपांत प्रबोधनाची सुरुवात झाली.

### ५. भौगोलिक शोध :-

भौगोलिक शोधामुळेच नवीन जगाचा रंगमंच मानवी कर्तृत्वाला उपलब्ध झाला. नवनवीन ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या त्यामुळे प्रबोधन चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली. ह्या भौगोलिक शोधासाठी नवीन शहरांचा उदय, उद्योगधंद्याची वाढ व्यापारी क्षेत्राची गरज, धर्मप्रसाराची पूर्तता, मसाल्यांच्या पदार्थांची निकड, पूर्वेकडील देशांच्या संपत्तीचे आकर्षण,

धाडशी खलाशाचा उदय, राज्यकर्त्यांचे प्रोत्साहन व कॉन्स्टॅंटिनोपलचा पाडाव ह्या घटना कारणीभूत ठरल्या.

कॉन्स्टॅंटिनोपल हे शहर तुर्कांनी जिंकून घेतल्यामुळे पूर्वेकडील व पश्चिमेकडील व्यापार बंद पडला. युरोपातून येणारा खुष्कीचा व्यापारी मार्ग तुर्कांच्या ताब्यात गेल्याने युरोपियन लोकांना नवे भौगालिक मार्ग शोधून काढणे आवश्यक होते. इतिहासकार फिशर म्हणतो, ''१४५३ नंतर भूमध्य समुद्र व तांबडा समुद्र हा पूर्वेकडील मार्ग बंद झाला त्यामुळे आफ्रिका खंडाला वळसा घालून भारतात पोहचला होता.'' या कालखंडात पुढील प्रमाणे भौगोलिक शोध लागले.

१) इ.स. १४८६ मध्ये पोर्तुगीज प्रवासी बार्थोलोडायसने आफ्रिकेच्या दक्षिण टोकावरील 'केप ऑफ गुड होप' हे ठिकाण शोधून काढले.

२) इ.स. १४९८ मध्ये पोर्तुगीज प्रवासी वास्को-द-गामा याने भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील कालिकत हे बंद शोधून काढले.

३) इ.स. १४९२ मध्ये ख्रिस्तोफर कोलंबसने अमेरिकेचा शोध लावला होता.

४) इ.स. १४९७ ते १५०३ या दरम्यान अमेरिगो व्हेस्प्रुशी याने अमेरिकेस चार वेळा भेट देवून हा आशियायी भाग नसून नवीन भूभाग आहे हे सिद्ध केले व या भूभागावर एक ग्रंथ प्रकाशित केला.

५) इ.स. १५१९-२० मॅगलेन या पोर्तुगिज प्रवाशाने पाच जहाजे व २६७ खलाशांच्या मदतीने 'पृथ्वी प्रदक्षिणा' पूर्ण केली. परिणामी संपूर्ण जग मानवी कर्तृत्वाच्या हातात सामावले. या भौगोलिक शोधांमुळे युरोपचा आर्थिक फायदा झाला. वसाहतीसाठी त्यांना नवनवे भूप्रदेश मिळाले. आलेक्झांडर कॅमनने पूर्वीच होकायंत्राचा शोध लावलेल्या असल्यामुळे युरोपियन प्रवाश्यांना नवीन नवीन जलमार्ग शोधता आले. प्रबोधनाच्या प्रक्रियेस या भौगोलिक शोधांनी हातभार लावला.

### ६. राजाश्रय :-

प्रबोधनाची चळवळ यशस्वी करण्यात धनिक वर्गाचा व तत्कालीन समाधारी वर्गाचा मोठा वाटा आहे. फ्रान्सचा राजा पहिला फ्रान्सीस याने इटालीतील अनेक विद्वानाना फ्रान्समध्ये आणले आणि फ्रान्समध्ये प्राचीन विद्येच्या अभ्यासाला प्रोत्साहन दिले.

धर्मसंस्थानीही आस्था दाखविली प्राचीन कला व विद्यांच्या पुनरुज्जीवनासाठी पोप ५ वानिकोलस व पोप १० वा लिओ यांनी भरीव कार्य केले. फ्लोरेन्सच्या मेडिसी घराण्याने फ्लॉरेन्स येथे विद्यापीठ स्थापन केले व या विद्यापिठात प्लेटोच्या तत्वज्ञानाच्या अभ्यासाची सोय केली त्यामुळे नवविचारांना चालना मिळाली. याच घराण्याने जुन्या हस्त लिखितांचा संग्रह करून व जुन्या वस्तूंचे संग्रालय उभारून अभ्यासकांची वं सशोधकांची सोय केली. या घराण्याच्या राजाश्रयामुळेच प्रबोधन पर्वात अनेक कलावंत व साहित्यिक उदयास आले.

### ७. राष्ट्रराज्याचा उदय :-

मध्ययुगीन युरोपातील संरजामशाही राज्ये नष्ट होवून तेथे राष्ट्रराज्ये व नंतर अनियंत्रित

राजेशाही निर्माण झाली. राष्ट्रराज्याच्या मुळाशी असलेली राष्ट्रवादी भावना वाढीस लागली हे राजकिय परिवर्तन प्रबोधन प्रक्रियेला पोषक ठरले. अर्वाचिन काळात मोठमोठ्या क्रांत्या होवून ह्या अनियंत्रित समा नामशेष झाल्या व लोकशाही सरकारे निर्माण झाली या राजकिय उत्क्रांती मधील राष्ट्रराज्याची निर्मिती हा एक महत्त्वाचा टप्पा होता.

राष्ट्रराज्य ही अनियंत्रित राजेशाहीची पहिली अवस्था होती. पूर्वीच्या सरंजामी राज्याचे स्वरुप जहागिरी व जहागिरदार असे होते यातून पराक्रमी पुरुषांनी लहान मोठ्या स्वतंत्र राज्याची स्थापना केली. अशा राज्यांना प्रजेविषयी आस्था, आपले राज्य, भूमी व संस्कृती विषयी अभिमान होता. म्हणून या राज्यातील जनतेत आपण या राज्याचे नागरिक आहोत. हे राज्य व राजा आपला आहे. ही राष्ट्रवादी भावना नकळतपणे वाढीस लागली. राजा व जनता एकमताने राज्याचे रक्षण करू लागले. अशी राष्ट्रराज्ये फ्रान्स, इंग्लंड, हंगेरी, स्पेन, पोर्तुगाल येथे निर्माण झाली.

ह्या राजांना आपल्या प्रजेविषयी आस्था, आपल्या राज्याविषयी आणि संस्कृती विषयी अभिमान होता. आपला धर्म, भाषा, संस्कृतीच्या प्रसाराची त्यांच्या मनात जिद्द होती. राज्यकर्त्यांच्या या धोरणामुळे प्रजेच्या मनांतही आपल्या राज्याविषयी राज्यकर्त्यांविषयी आपुलकीची भावना निर्माण झाली. राजा व प्रजा एकदिलाने राज्य रक्षण करू लागले. हे राष्ट्र राज्याचे स्वरूप होते. अशा प्रकारच्या राष्ट्रराज्यांनी प्रबोधन चळवळीला व धर्मसुधारकांना आश्रय व पाठिंबा दिला, अनेक राज्यकर्त्यांनी तत्वज्ञ, कलावंत, शास्त्रज्ञ, साहित्यिक, धर्मसुधारक, दर्यावर्दी, संशोधक, व्यापारी व उद्योगपतींना आश्रय देवून भरपूर साध्य केले. ही राष्ट्रराज्य निर्मिती प्रबोधनास कारणीभूत ठरली.

## ८. उद्योगपती व व्यापारांचा उदय :-

प्राचीन काळापासून भारत, चीन, ग्रीक व रोम या साम्राज्यांचा व्यापार भरभराटीला आलेला होता. मध्ययुगीन कालखंडात रानटी टोळ्यांची आक्रमणे, धर्मयुद्धे व राजकिय अस्थिरतेमुळे व्यापार, उद्योगाची दुर्दशा झाली. मात्र राष्ट्रराज्ये अनियंत्रित राजेशाहीच्या निर्मितीमुळे व्यापार उद्योगाला प्रोत्साहन मिळाले. नवीन जलमार्गाच्या शोधामुळे धाडसी व्यापाऱ्यांना संधी मिळाली. इटली, फ्रान्स, इंग्लंड, रशिया इत्यादी देशात मोठ-मोठ्या शहरांचा उदय झाला. हे सर्व घटक उद्योगपती व व्यापारी वर्ग यांच्या उदयास कारणीभूत ठरले.

उद्योगपती व व्यापारी वर्गाने प्रचंड संपत्ती उद्योगात गुंतविली हा व्यापारी वर्ग संघटित, बुद्धीमान, धाडसी, महत्त्वाकांक्षी, राष्ट्राभिमानी, विद्या व कलेची कदर करणारा असा होता याच व्यापारी वर्गाने व त्यांनी स्थापन केलेल्या अनेक व्यापारी कंपन्यांनी आशिया-आफ्रिका खंडात व्यापार करून मोठमोठ्या वसाहती प्राप्त केल्या आणि त्यातून मोठमोठी साम्राज्ये निर्माण केली. त्यांनीच आधुनिक जगाचा इतिहास घडविला.

व्यापारामुळे युरोपचा अमेरिका, आशिया व आफ्रिका खंडाशी संबंध आला तसेच पौर्वात्य शास्त्रे, तत्वज्ञान, कला, धर्म व साहित्याची ओळख युरोपला झाली. युरोपातील संस्कृतीचा पूर्वेकडील देशांत प्रसार झाला. ह्या आंतरराष्ट्रीय संबंधांना या उद्योगपतींचे योगदान मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरले. या उद्योगपतींनी मोठमोठ्या शहरांची निर्मिती

केली. त्या शहरातील, शास्त्रज्ञ, साहित्यिक कलावंत व धर्मसुधारकांना मोलाचे सहकार्य केले. या वर्गाच्या प्रयत्नामुळेच युरोपात धर्मसुधारणा चळवळीला सुरुवात झाली. धर्मसुधारणेच्या चळवळीत हा वर्ग प्रबोधनकर्त्यांच्या पाठीशी उभा राहिला.

## ९. ग्रीक-रोमन संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाची संस्कृती

प्राचीनकाळी जगभर वैभवशाली संस्कृतीचा उदय झालेला होता. त्यामुळे तत्वज्ञान, शास्त्र, वाङ्मय व कलाक्षेत्रांत दैदिप्यमान प्रगती झालेली होती. परंतु हुण व इतर रानटी टोळ्यांच्या आक्रमणामुळे अनेक संस्कृतीचा विध्वंस झाला आणि आशिया व युरोप खंडात अंध:कारमय मध्ययुगाला सुरूवात झाली. मानवाच्या प्रगतीचे सर्व मार्ग बंद झाले. तो अस्तित्वशून्य बनला. परंतु काही निर्भय विचारवंत सुधारकांनी ही परिस्थिती बदलण्याचे प्रयत्न सुरू केले. सहाजिकच त्यांचे लक्ष युरोपातील प्राचीन ग्रीक रोमन संस्कृतीकडे गेले. या लेखक-विचारवंतांनी सुरुवातीलाच आपल्या संस्कृती मधील तत्वज्ञान, शास्त्रे, वाङ्मय व कलेचे श्रेष्ठत्व लोकांना पटवून दिले. संस्कृतीचा आदर्श लोकांच्या समोर उभा केला. आपआपल्या प्रादेशिक भाषेत प्राचीन ग्रंथांचे भाषांतर केले. याच वेळी निरनिराळे भौगोलिक शोध लागल्यामुळे, नवीन जलमार्ग सापडल्यामुळे त्यांचा पूर्वेकडील देशांशी संपर्क वाढला आणि युरोपियनांनी आपल्या संस्कृतीचा व धर्माचा प्रसार या नवीन नवीन देशांत करण्याची खटपट सुरू केली. ह्या सर्व प्रक्रियेमुळे ग्रीक-रोमन संस्कृतीला उजाळा मिळाला. त्यातून नवनिर्मितीच्या व प्रबोधनाच्या प्रेरणा युरोपियनांना मिळाल्या.

## प्रबोधनाचा प्रसार

प्राचीन काळातील मानवी जीवनाची प्रगतावस्था व मध्ययुगातील अप्रगतावस्था ही ऐतिहासिक पार्श्वभूमी प्रबोधन चळवळीच्या मुळाशी होती. त्यामुळे प्रबोधन कर्त्यांनी प्राचीन संस्कृतीच्या पुनरुज्जीवना बरोबरच विविध क्षेत्रांत नवनिर्मिती केली. मध्ययुगात सर्वच क्षेत्रात प्रगतीचा वेग मंद होता. बुद्धीप्रामाण्यवाद, तर्कसंगती, प्रयोगशीलता किंवा मुक्त विचाराला स्थान नव्हते. प्रबोधन चळवळीने मात्र धर्माचे जोखड झुगारून देवून विविध क्षेत्रांत नवनवीन ज्ञानाची भर घातली.

विद्येचे पुनरुज्जीवन प्रथम इटली या देशांत झाले आणि नंतर हळूहळू युरोपातील इतर देशांत त्याचा प्रसार झाला. धर्मसंस्थेचा प्रभाव नष्ट झाल्यामुळे विज्ञानाविषयी असलेल्या जुन्या समजुती मागे पडल्या. माणसांत चिकित्सक प्रवृत्ती निर्माण झाली. विज्ञानाच्या विविध शाखेत नवनवे शोध लागले. कला धर्माच्या बंधनातून मुक्त होवून मानवी जीवनाशी समरस झाली. कलेत मानवी जीवनाचे प्रतिबिंब उमटू लागले.

साहित्य, शास्त्र, कला, तत्वज्ञान, शिक्षण, संशोधन व विज्ञान क्षेत्रांत परिवर्तन घडून आल्यामुळे विविध प्रकारच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी सुरू झाल्या. याचा परिणाम म्हणून आशिया खंडातील राष्ट्रांमध्ये साम्राज्यवादाच्या विरोधात जनजागृती होवून राष्ट्रवादी चळवळीचे पर्व सुरू झाले. प्रबोधना नंतर युरोपांत व अमेरिकेत राष्ट्रवादी क्रांत्या घडून आल्या आणि अप्रगत मध्ययुगाला तिलांजली मिळाली. त्यामुळे सरंजामशाही नष्ट झाली आणि संपूर्ण जगात औद्योगिक क्रांत्या घडून आल्या. या क्रांत्या आणि औद्योगिकरणामुळे

मानवी जीवन ढवळून निघाले. नव्या विज्ञान युगाचा जन्म झाला. परिणामी राष्ट्राच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतीक जीवनांत अमुलाग्र बदल घडून आले. वैचारिक परिवर्तन होवून नवीन तत्वज्ञान व संकल्पना जन्माला आल्या.

नवीन भाषा उदयाला आल्या. मानवी जीवन विज्ञानमय झाले. या सर्व परिवर्तन पक्रियेतून जगात आधुनिक युगाची सुरुवात झाली. साहित्याच्या क्षेत्रांत इटाली, इंग्लंड, स्पेन, पोर्तुगाल, जर्मनी, फ्रान्स या देशांनी मोठ्या प्रमाणावर प्रगती केली. डान्टे, पेट्रार्क, बोकॅशिओ, अरिसॅस्थे, सर्व्हानो, चॉसर, सर थॉमस मूर, फ्रान्सीस बेकन, शेक्सपियर सारख्या लेखकांनी अजरामर कलाकृती निर्माण केल्या. चित्रकलेच्या क्षेत्रात लिओनार्डो-द-व्हिन्सी सारख्या चित्रकारांची 'लास्ट सफर' आणि मोनालिसा ही दोन चित्रे अमर ठरली. प्रबोधन काळात स्थापत्य कलेतही मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. उदा. जगातील सर्वांत मोठा घुमट रोम येथील सेंट पीटर्स चर्चवर आहे. लंडन येथील सेंट पॉलचे मंदिर, मेडिसी राजवाडा, रोम येथील फर्निस राजवाडा इत्यादी विज्ञानाच्या क्षेत्रांत कोपर्निकस, गॅलिलिओ, ऐझॅक न्यूटन, गिल्बर्ट आणि इतर शास्त्रज्ञ यांनी निरनिराळे शोध लावले.

प्रबोधन ही एक घटना नसून ती एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया तीन शतके चालू होती. प्रबोधनाचे क्षेत्र प्रारंभी मर्यादित होते. १५ व्या शतकांपर्यंत ही प्रक्रिया संपूर्ण युरोपभर सुरू होती.

## प्रबोधन चळवळीचे परिणाम :-

१५ व्या शतकांत युरोपात सुरू झालेल्या प्रबोधन चळवळीचा प्रभाव जगभर पडला. १९ व्या शतकांत आशिया खंडातील अनेक देशात युरोपच्या धर्तीवर प्रबोधनाला सुरुवात झाली. त्या त्या देशांत साहित्य, शास्त्र, कला, तत्वज्ञान, शिक्षण, संशोधन व विज्ञान क्षेत्रांत परिवर्तन घडून आले. नवनिर्मितीस सुरुवात झाली. त्यामुळे विविध प्रकारच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा घडून आल्या. या प्रक्रियेचा परिणाम म्हणून आशियाई राष्ट्रांत साम्राज्यवाद विरोधी जनजागृती होवून राष्ट्रवादी चळवळीचे पर्व सुरू झाले.

प्रबोधना नंतर खुद्द युरोपात आणि अमेरिकेत राष्ट्रवादी क्रांत्या घडून आल्या व अप्रगत मध्ययुगाला तिलांजली देण्यात आली. प्रबोधनामुळे सरंजामशाहीचा अंत झाला. युरोपात व जगात औद्योगिक क्रांत्या घडून आल्यामुळे मानवी जीवन ढवळून निघाले नवीन विज्ञान युगाचा अवतार झाला. परिणामी समाज व राष्ट्राच्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात आमूलाग्र बदल घडून आला. वैचारिक परिवर्तन होवून नवीन तत्वज्ञान व संकल्पना जन्माला आल्या. स्थापत्य, शिल्प, चित्र, संगीत कलांचा नवीन पद्धतीने विकास झाला. नवनवीन भाषा उदयाला आल्या. धार्मिक संकल्पना बदलल्या. तर्कनिष्ठ वैज्ञानिक दृष्टीकोन व बौद्धीक क्रांती झाल्याने मानवी विचार मुक्त झाला या सर्व परिवर्तन प्रक्रियेतून जगात आधुनिक युग अवतरले आणि त्यासाठी प्रबोधन चळवळ कारणीभूत ठरली.

### १. अज्ञान व अंधश्रद्धा यांचा शेवट :-

प्रबोधनामुळे मानवी जीवनात मोठा बदल घडून आला. मध्ययुगातील अज्ञान व

अंधश्रद्धा यांचा शेवट झाला. अज्ञान व अंधश्रद्धा दूर करण्यासाठी लेखक विचारवंत शास्त्रज्ञ यांना अपार कष्ट करावे लागले. प्रसंगी तुरुंगवासही भोगावा लागला. परंतु त्यांच्यामुळेच युरोपातील अंधकारमय अशा मध्ययुगाचा अंत झाला.

मध्येयुगातील सरंजामी राज्ये, अर्थव्यवस्था, भ्रष्टाचारी धर्म, मानवाची अवहेलना संपुष्टात आली. सनातनी व स्थितीशीलतेला तिलांजली देण्यांत आली. मानवाची अप्रगत अवस्था संपुष्टात येवून सर्वांगिण प्रगतीचा प्रारंभ झाला.

## २. समाजावरील धर्मसंस्थेचे सर्वस्व नष्ट झाले :–

मध्ययुगात मानवी जीवनाच्या सर्व अंगावर धर्मसंस्थेचा प्रभाव पडलेला होता. परंतु विचारवंत धर्मसुधारकांनी प्रचंड हालअपेष्टा सहन करून धर्मसभेलाच आव्हान दिले. विक्लिक, इरॅस्फस व ल्यूथरनी भ्रष्ट धर्म व धर्मगुरुवर टीका करून त्यांचा ढोंगीपणा व भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला आणि धर्माचे शुद्ध स्वरुप प्रगट केले. ह्या धार्मिक क्रांतीमुळे धर्मसभेचे राजसभा, समाज, तत्वज्ञान, शिक्षण, साहित्य, कला, विज्ञान व धर्मक्षेत्रातले प्राबल्य नष्ट झाले. सामान्य माणूस स्वतंत्रपणे विचार करू लागला. बुद्धीला जे पटेल त्याचा स्विकार करण्याची वृत्ती त्याच्यात निर्माण झाली. त्यामुळे धर्मसंस्थेचे प्रस्थ कमी झाले.

## ३. देशी भाषांना उत्तेजन :–

प्रबोधन कर्त्यांनी बौद्धिक क्रांती घडवून आणल्यामुळे साहित्य, शास्त्र, कला व शिक्षण क्षेत्राला चालना मिळाली. मध्ययुगीन कालखंडात शिक्षणाचा विकास झालेला नव्हता. शिक्षण हे चर्च आणि धर्ममार्तंडाच्या हाती होते. त्यांनी केवळ धार्मिक शिक्षणालाच प्राधान्य दिलेले होते. त्यामुळे अंधश्रद्धेचे प्रमाण फार मोठ्या प्रमाणावर वाढलेले होते.

प्रबोधनामुळे ही स्थिती पार बदलून गेली. नवनवीन ज्ञानाची दारे खुली झाली. जिज्ञासू व संशोधकवृत्ती वाढीस लागली. धर्मगुरूंच्या हातून शिक्षण काढून घेतले आणि स्वतंत्र शिक्षण संशोधन संस्था स्थापन करण्यात आल्या.

प्रबोधनपूर्व काळात ग्रीक व लॅटीन भाषेत साहित्य निर्मिती होत असे. परंतु प्रबोधन पर्वात मात्र इटालियन फ्रेंच, इंग्रजी व जर्मनी या भाषेमधुन साहित्य निर्मिती होऊ लागली. त्यामुळे या सर्व भाषांना वाङ्मय भाषांचा दर्जा प्राप्त झाला.

## ४. संशोधनास चालना :–

बुद्धीप्रामाण्यवाद व प्रयोगशीलतेची प्रगती झाल्यामुळे संशोधकांची जिज्ञासूनवृत्ती वाढीस लागली. नंतरच्या काळात धर्माचे दडपण कमी झाल्यामुळे विज्ञानाच्या विविध शाखात आश्चर्यकारक प्रगती झाली. शास्त्रज्ञांनी खगोलशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र इत्यादी शास्त्रात अनेक नवेनवे शोध लावले. युरोपियन माणसात वैज्ञानिक दृष्टीकोन निर्माण झाला. गणित, भूगोल, इतिहास, राज्यशास्त्र, अर्थशास्त्र व विविध भौतिकशास्त्राचीही प्रबोधनामुळे प्रगती घडून आली.

## ५. आधुनिक भाषांचा विकास :–

प्रबोधनाच्या काळात युरोपातल्या फ्रेंच, इंग्रजी, स्पॅनिश, इटालियन, जर्मन व इतर भाषेत प्रचंड प्रमाणांत ग्रंथनिर्मिती झाली याचवेळी गेटनबर्गने छापखानाचा शोध लावल्याने

एखाद्या ग्रंथाच्या हजारो प्रती अल्पकाळांत तयार होवू लागल्या. विविध भाषेतील साहित्यिकांनी मोठ्या प्रमाणावर वाङ्मयनिर्मिती केली. 'बायबल' या धर्मग्रंथाची अनेक भाषेत भाषांतरे झाली. परिणामी पारंपरिक हिब्रु, इराणी, अरबी व ग्रीक ह्या भाषा मागे पडून आधुनिक युरोपियन भाषांची प्रगती झाली.

### ६. राज्यसभेचे महत्त्व वाढले :-

मध्ययुगीन सरंजामशाही नष्ट झाल्याने राजसभेचे महत्त्व वाढले. प्रबोधन चळवळीचा हा राजकीय परिणाम होता. सरंजामी राज्ये नष्ट झाल्याने राजकीय अस्थिरता संपुष्टात आली. युरोपांत विशिष्ट प्रदेशांत राष्ट्रराज्याचा उदय झाला. त्यातून पुढे सामर्थशाली अनियंत्रित राजसभा फ्रान्स, प्रशिया, ऑस्ट्रिया, इंग्लंड, पोलंड, पोर्तुगाल, भारत, चीन, जपान, तुर्कस्थान निर्माण झाला. हे राजे वंशपरंपरागत होते. त्यांच्या हाती सभेचे केंद्रीकरण झालेले होते. उदा. इंग्लंड मधील ट्युडर राजसभा, फ्रान्सचा १४ वा लुई, रशियाचा-पिटर-द-ग्रेट, प्रशियाचा राजा दुसरा फ्रे डरिक.

सरंजामशाहीपेक्षा राजसभा बरी म्हणून लोकांनी राजसभा बळकट करण्यासाठी राज्यकर्त्यांना सहकार्य केले.

### ७. भौगोलिक शोध :-

प्रबोधन काळात निरनिराळ्या जलमार्गाचे शोध लागले. १४५३ मध्ये तुर्कांनी कॉन्स्टॉटिनोपल हे शहर जिंकून घेतल्यामुळे खुष्कीया व्यापारी मार्ग तुर्कांच्या ताब्यात गेला. व्यापार बंद झाल्यामुळे नवीन जलमार्ग शोधणे युरोपीयनांना आवश्यक झाले. पौर्वात्य वस्तूना युरोपांत मोठ्या प्रमाणावर मागणी होती. डायस, वास्को-द-गामा, कोलंबस, अमेरिगो व्हेस्पुशी, मॅगलेन यांनी भौगोलिक शोध लावले.

### ८. मानवतावाद व बुद्धीवादास प्रोत्साहन :-

मनुष्य हा राष्ट्र, संस्कृती व धर्माचा निर्माता असून याच मानवाला मध्ययुगीन जीवनपद्धतीत अजिबात स्थान नव्हते. धर्म व संस्कृतीने मनुष्याच्या सुखदुःखाचा, त्याच्या भौतिक प्रगतीचा फारसा विचार केला नाही. माणसाला क:पदार्थ मानले. परंतु प्रबोधन कर्त्यांनी मनुष्य केंद्रबिंदू मानून धर्म, साहित्य, शास्त्र, विज्ञान व कलेचा विकास घडविला. मानवी मन, मानवी भावना, मानवी विचार इत्यादीच्या अभ्यासाला महत्त्व मिळाले. मनुष्याच्या विचार स्वातंत्र्याला, व्यक्तीस्वातंत्र्याला व व्यक्तिमत्व विकासाला प्राधान्य दिले. त्यामुळे मानवाच्या कर्तृत्वाला व्यापक क्षेत्र उपलब्ध झाले.

### ९. मुद्रण कलेच्या शोधामुळे बौकद्धक व शैक्षणिक क्रांती :-

मुद्रण कलेच्या शोधामुळे मानवी जीवनात शैक्षणिक व बौद्धिक क्रांती झाली. मुद्रणकलेमुळे ग्रंथनिर्मिती मोठ्या प्रमाणावर शक्य झाली. वृत्तपत्रे निघू लागली. वाचक वर्गाच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. शैक्षणिक प्रगती मोठ्या प्रमाणावर होऊ लागली.

### १०. नौकानयन, वसाहतीकरण व व्यापार :-

चुंबककाटा असलेल्या होकायंत्राचा शोध लागल्याने नौकानयन क्रांती घडून आली.

धाडसी दर्यावर्दी, राज्यकर्त्यांचे प्रोत्साहन, पूर्वेकडील संपत्तीचे आकर्षण व मसाल्याच्या पदार्थांची गरज ह्या कारणामुळे युरोपचा आशिया-आफ्रिका खंडाशी व्यापार चालू होता. याचवेळी इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांतीला प्रारंभ झाल्यामुळे कच्चा माल व बाजारपेठेची गरज भासू लागली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला. ह्या व्यापार वादाला धर्म प्रसाराची जोड मिळाल्याने व्यापारवादाचे वसाहतवादात रूपांतर झाले. भारत, चीन, इंडोनेशिया, ब्रम्हदेश, फिलिपाईन्स, व्हिएटनाम व आफ्रिकेत यूरोपियन राष्ट्रांनी मोठ मोठ्या वसाहती मिळवून आपापली साम्राज्य थाटली.

## ११. आधुनिक युगाला सुरुवात :-

अप्रगत मध्ययुगाच्या पार्श्वभूमीवर प्रबोधनाची चळवळ सुरू झाली. अंधकारमय मध्ययुगातली राजसभा, समाज, अर्थव्यवस्था, प्रशासन, भाषा, साहित्य, शास्त्र, विज्ञान, कला व धर्मांत प्रबोधनामुळे अमुलाग्र परिवर्तन घडून आले. व्यापारवाद, भौतिकवाद, मानवतावाद, राष्ट्रवाद व व्यक्ती-स्वातंत्र्यवादाचा उदय झाला. नवीन मुल्यांच्या प्रस्थापनेसाठी युरोप-अमेरिकेत महान क्रांत्या घडून आल्या आणि त्यातून आधुनिक अर्वाचिन विज्ञानयुगाचा जन्म झाला. प्रबोधन चळवळ आधुनिक युगाची जन्मदात्री ठरली.

## १२. सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन :-

प्रबोधन काळातील धर्मसुधारणा, साहित्य निर्मिती, कलांचा विकास व वैज्ञानिक प्रगतीमुळे संपूर्ण मानवी समाज ढवळून निघाला. शिक्षण, संशोधन, विज्ञान व कला क्षेत्रातल्या प्रगतीमुळे माणसाची फार मोठी सांस्कृतिक प्रगती झाली. पूर्वीचा रूढीप्रीय अंधश्रद्ध मनुष्य सुसंस्कृत व सुधारलेला बनला. त्याचा अंतर्बाह्य विकास झाला. मानवी जीवनाच्या सर्व शाखा समृद्ध झाल्या.

इत्यादी परिणाम प्रबोधनाचे घडून आले.

## १.२.२. भांडवलवाद व साम्राज्यवाद यांचा विकास :-

आधुनिक साम्राज्यवाद ही अर्वाचीन इतिहासातील महत्त्वपूर्ण घटना होती. या घटनेने जगाच्या इतिहासात प्रचंड उलथा-पालथ घडविली. विशालकाय असे आशिया-आफ्रिका खंड एका शतकात परकीयांच्या पारतंत्रात गेले. अशा साम्राज्यवादाचे अर्ध्वयू युरोपातील राष्ट्रे होती.

वास्तविक पहाता साम्राज्यवादाची प्रक्रिया प्राचीन काळापासून चालू होती. एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्रावर प्रभुत्व हे साम्राज्य वादाचे मुळसुत्र होते परंतु विविध कालखंडात त्याचे स्वरूप बदलत गेले. विज्ञान व तंत्रज्ञानातील प्रगती यामुळे साम्राज्य विस्ताराला चालना मिळाली. औद्योगिक क्रांतीमुळे कच्चा माल व बाजारपेठा व नवीन वसाहतींची गरज निर्माण झाली. त्यातूनच व्यापार व वसाहतींची स्थापना यासाठी युरोपीय राष्ट्रांमध्ये स्पर्धा सुरू झाली. परिणामी जगात युरोपीयन राष्ट्रांच्या मोठमोठ्या वसाहती स्थापन झाल्या आणि त्यातूनच त्यांची बलाढ्य साम्राज्ये उदयास आली. आधुनिक साम्राज्ये, व्यापारवाद व वसाहतवादाचे अपत्य होते.

व्यापार, भांडवली गुंतवणुक, नफा व शोषण ह्या आर्थिक बाबींशी हा साम्राज्यवाद निगडीत असल्याने त्यास आर्थिक साम्राज्यवाद असेही म्हणतात. आशिया-आफ्रिका खंडातील मागासलेल्या लोकांत धर्मप्रसार व संस्कृती विस्तार करून त्यांना सुसंस्कृत व ख्रिश्चन बनविणे व वसाहतवादांचा हेतु होता.

भौगोलीक शोध व प्रबोधन चळवळीमुळे युरोपात सुबुद्ध व महत्त्वांकांक्षी समाजाचा उदय झाला. उष्ण कटीबंधातील निरनिराळ्या प्रकारच्या रोगराईवर नवी-नवी औषधे निघाली. आरोग्याचे व स्वच्छतेचे नियम ज्ञात झाले. त्यामुळे गोऱ्यांचे उष्ण कटीबंधांतील जीवन फारसे धोक्याचे राहीले नाही. नाविक क्षेत्रातील नव्या शोधामुळे जलमार्गाने होणारी वाहतूक गतिमान व सुलभ झाली. तारायंत्रे, दूरध्वनी, विद्युत संदेश रज्जू यामुळे दूरच्या प्रदेशांशी संपर्क साधणे शक्य होऊ लागले. रेल्वेमार्ग तयार झाले. त्यामुळे वाहतुक सुलभ होवून दूर अंतरावरील शहरे परस्परांशी जोडली गेली. आर्थिक कारणा बरोबर याही सुविधांमुळे युरोपियन राष्ट्रे साम्राज्यवादाच्या स्पर्धेत उतरली. युरोपातील पोर्तुगाल, हॉलंड, स्पेन, इंग्लंड व फ्रान्स हे देश साम्राज्यवादी स्पर्धेत आघाडीवर होते. डच व पोर्तुगिजांनीच धडपड करून नवीन जलमार्गाचे शोध लावले आणि त्यांनीच वसाहतवादाचा शुभारंभ केला.

## साम्राज्यवाद म्हणजे काय ?

साम्राज्यवाद, नवसाम्राज्यवाद व वसाहतवाद हे असे शब्दप्रयोग साम्राज्यवादाविषयी केले जातात. वास्तविक पाहता शब्द वेगवेगळे वाटत असले तरी त्यांचा अर्थ मात्र एकच आहे. साम्राज्यवादाची पहिली पायरी वसाहतवाद होय. वसाहतवाद म्हणजे एखाद्या राष्ट्राशी व्यापार स्थापन करण्यासाठी तेथे वसाहत करणे. एकदा वसाहत झाली म्हणजे तेथे आपली राजकीय सभा प्रस्थापित करणे म्हणजेच वसाहतवादाचे रूपांतर नंतर साम्राज्यवादात होते.

राज्यांच्या सीमांचा विस्तार करणे व विभिन्न राज्यांना एका शक्तीशाली केंद्रीय सभेच्या अधिपत्याखाली आणणे म्हणजे साम्राज्यवाद होय. साम्राज्यवाद हा शब्द लॅटिन भाषेतील Imperialism या शब्दापासून तयार झालेला आहे. या शब्दाचा अर्थ अधिकार किंवा सभा असा होय.

साम्राज्यवाद म्हणजे एका प्रगत राष्ट्राने दुसऱ्या अप्रगत राष्ट्रावर वर्चस्व प्रस्थापित करणे होय. भिन्न वंश, भाषा व संस्कृती असलेल्या समाजावर राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक वर्चस्व प्रस्थापित करणे या क्रियेला साम्राज्यवाद असे म्हणतात.

कच्च्या मालाची आयात करणे, पक्क्या मालाची बाजारपेठ मिळविणे. आपल्या राष्ट्राच्या वैभवात भर घालणे, आपले वर्चस्व वाढविणे, धर्मप्रसार करणे, आपली राजकीय किंवा आर्थिक विचारप्रणाली दुसऱ्या राज्यावर लादणे यातील एका किंवा निरनिराळ्या कारणास्तव एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्रावर स्वामित्व गाजविणाऱ्या प्रक्रियेला साम्राज्यवाद असे म्हणतात.

भिन्न वंश, भिन्न धर्म, भिन्न संस्कृती प्राप्त असलेल्या राष्ट्रावर दुसऱ्या राष्ट्राने राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, वैचारिक किंवा धार्मिक वर्चस्व कायम करणे म्हणजे साम्राज्यवाद होय.

प्रो. एम. जे. बॉन यांच्या मते साम्राज्यवाद हे एक धोरण आहे. त्याचा उद्देश एक साम्राज्य निर्माण करणे व त्याचे संघटन आणि अस्तित्व कायम ठेवणे हा होय. साम्राज्य म्हणजे असे विशाल राज्य की ज्यात विभिन्न राष्ट्रांचा समावेश केला जातो व ही राष्ट्रे एका केंद्रीय सभेच्या नियंत्रणाखाली असतात.

साम्राज्यविस्ताराचे मार्ग भिन्न असले तरी मूलभूत भावना, प्रभुत्वाची, वर्चस्वाची असते. त्याचप्रमाणे आर्थिक हितसंबंध, लष्करी महत्त्व, धार्मिक उद्दिष्टे, राजकीय हेतू इ. गोष्टी साम्राज्य स्थापनेत दिसून येतात.

**साम्राज्यवादाचे स्वरूप :-**

युरोपियनांनी आशियायी देशाचा शोध लावल्यावर विविध व्यापारी कंपन्यांची स्थापना करून त्यांच्याशी व्यापार सुरू केला. स्थानिक सम्राटांना नजराणे देऊन त्यांच्याकडून व्यापारी सवलती मिळविणे, बंदरे व बाजारपेठ ताब्यात घेऊन तेथे आपला व्यापार सुरू करणे, व्यापारी वटवारी (गोदाम) वसाहती स्थापना करणे, त्यांच्या संरक्षणासाठी सैन्य बाळगणे व प्रसंगी युद्ध करून स्थानिक सत्तांना पराभूत करणे आणि तो प्रदेश आपल्या ताब्यात घेऊन आपले राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे हे आधुनिक साम्राज्यवादाचे स्वरूप होते.

एकोणिसाव्या शतकात ज्या राष्ट्रांचे साम्राज्य मोठे अथवा ज्यांच्या वसाहती जास्त ते राष्ट्र प्रतिष्ठित व सर्वश्रेष्ठ समजण्यात आले. यासाठीच वसाहतकार व्यापाऱ्याबरोबरच मोठमोठे महत्त्वाकांक्षी सम्राट साम्राज्यवादाच्या स्पर्धेत उतरले. अशा अत्यंतिक राष्ट्रवादानेही साम्राज्यवाद धष्टपुष्ट बनला. ह्या आधुनिक प्रभुत्ववादाला आशिया-आफ्रिकेतील अज्ञान, अंधश्रद्धा, धर्मभेद, भाषाभेद, सरंजामी पद्धती, जाती भेद, आधुनिकतेचा अभाव, मागासलेपणाचा प्रभाव इत्यादी गोष्टी कारणीभूत ठरल्या.

१८८०-१९१० हा आधुनिक साम्राज्यवादाच्या उत्कर्षाच्या कालखंड समजला जातो. युरोपातील बहुतेक राष्ट्रे या साम्राज्यवादी भावनेच्या आहारी गेली. साम्राज्यवादामुळे युरापियन देशात वारंवार संघर्ष झाले व त्यातून पहिले महायुद्ध उद्‌भवले. आधुनिक काळातील साम्राज्यवाद उग्र व आक्रमक स्वरूपाचा आहे.

आधुनिक साम्राज्यवादात केवळ राजकीय वर्चस्व प्रस्थापित करणे अभिप्रेत नव्हते. तर राजकीय वर्चस्वाबरोबरच आर्थिक, औद्योगिक, सामाजिक व सांस्कृतिक वर्चस्वही प्रस्थापित केले जाते. १९ व्या शतकातील साम्राज्यवाद हा प्राचीन व मध्ययुगीन साम्राज्यवादाच्या तुलनेत वेगळा आहे. या साम्राज्यवादात जेत्यांना (साम्राज्यवाद लादणाऱ्या राष्ट्रास) जीत राष्ट्रांविषयी (साम्राज्यवाद लादला गेलेली राष्ट्रे) मुळीच सहानुभूती नव्हती. आपला धर्म, संस्कृती, जीवनपद्धती, जीत राष्ट्रांवर लादण्याचा प्रयत्न जेत्या राष्ट्रांनी केला. ह्या साम्राज्यवादामुळे त्या त्या देशातील समाज सर्वार्थाने परतंत्र झाला.

## आधुनिक साम्राज्यवादाच्या विकासाची कारणे :-

### १. औद्योगिक क्रांती :-

अर्वाचीन साम्राज्य विस्ताराचे मुळे १७५० ते १८५० या काळात झालेल्या औद्योगिक

क्रांतीत आहे. ही क्रांती प्रथम इंग्लंड मध्ये होऊन नंतर सर्व युरोपभर या क्रांतीचा प्रसार झाला आणि यातूनच भांडवलशाही समाजरचनेचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन आणि उत्पादनाच्या साधनात क्रांतीकारक बदल घडून आला. घरगुती उद्योगधंदे बंद पडून त्यांचे रूपांतर मोठमोठ्या कारखान्यांमध्ये झाले. कच्चा माल मिळविण्यासाठी नवीन बाजारपेठा मिळविण्याची स्पर्धा युरोपातील राष्ट्रात निर्माण झाली. युरोपियन राष्ट्रांनी कमकुवत असलेल्या आशिया-आफ्रिका खंडातील देशात आपल्या वसाहती स्थापन केल्या. कच्चा मालाचे पक्क्या मालात रुपांतर केल्यानंतर तो विकण्यासाठी युरोपियन राष्ट्रांना हक्काच्या बाजारपेठा हव्या होत्या. कारण उत्पादित मालाची विक्री करण्यासाठी युरोपियन देशांत मोठ्या संख्येने ग्राहक उपलब्ध नव्हता. आशिया-आफ्रिका खंडाच्या तुलनेत युरोपियन देशांची लोकसंख्या कमी होती. तर यंत्राच्या सहाय्याने उत्पादीत केलेल्या वस्तूंचे उत्पादन अधिक होते. तेव्हा कच्चा मालाची उपलब्धता आणि पक्क्या मालाची विक्री यासाठी बाजारपेठा या 'गरजेतून साम्राज्यवादाचा विकास' झाला. औद्योगिक क्रांती हेच साम्राज्यवादाचे प्रमुख कारण होते.

## २. अतिरिक्त भांडवलाची वाढ :-

औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून युरोपखंडात भांडवलशाहीचा मोठ्या प्रमाणावर उदय झाला. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या राष्ट्रांमध्ये भांडवलशाहीचा झपाट्याने उदय झाला. युरोपियन समाजातील भांडवलदारांचा वर्ग अधिक श्रीमंत झाला. त्यांच्या जवळ अतिरिक्त भांडवल जमा होऊ लागले. हे अतिरिक्त भांडवल त्यांना कोठेतरी गुंतवणे आवश्यक होते. त्यासाठी नवीन वसाहतींची आवश्यकता होती. कारण युरोपिय देशांत भांडवल गुंतवणुकीस फारसा वाव नव्हता. वसाहती स्थापन करून तेथे कारखाने, कापड गिरण्या, आगबोटी, रेल्वे, खाणी इत्यादी उद्योगधंद्यात त्यांनी भांडवल गुंतवले.

युरोपियन राष्ट्रांच्या तुलनेत चीन, भारत व इतर राष्ट्रात यांत्रिकी उत्पादनाला नुकतीच सुरुवात झाली होती. अशा प्रकारे भांडवलशाहीचा विषय असा विकास होत गेला. जेव्हा भांडवलशाहीचा विषयम विकास होतो, तेव्हा विकसित भांडवलशाही राष्ट्रे अविकसित राष्ट्रांना मागासलेले ठेवण्याचा प्रयत्न करतात. अशा राष्ट्रांना पक्का माल विकण्यासाठी आणि कच्चा माल मिळविण्यासाठी बाजारपेठ बनविली जाते. यालाच वसाहतवाद असे म्हणतात. या वसाहतवादातूनच साम्राज्यवाद निर्माण झाला.

## ३. बाजारपेठा मिळविणे :-

औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनात मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. अतिरिक्त उत्पादन विकण्यासाठी बाजारपेठांची गरज निर्माण झाली. शिवाय युरोपातील राष्ट्रे एकमेकांचा माल विकत घेत नव्हती. स्वरक्षणात्मक जकातीच्या तत्वामुळे युरोपातील व्यापार ठप्प झाला होता. अशा परिस्थितीत युरोपाबाहेरील राष्ट्रात भांडवलशाहीचा अजून उदय झालेला नव्हता. या देशातील बाजारपेठा युरोपातील राष्ट्रांना खुल्या होत्या. या देशांमध्ये युरोपातील भांडवलदार व्यापाराच्या निमित्ताने गेले व त्यांनी तेथे सुरुवातीला आर्थिक व नंतर राजकीय साम्राज्यवाद प्रस्थापित केला.

युरोपातील राष्ट्रांमध्ये बाजारपेठा मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाली आणि या स्पर्धेचे रूपांतर साम्राज्यवादात झाले. बलवान राष्ट्रांनी सर्वांत जास्त बाजारपेठा काबीज केल्या. उदा. इंग्लंड

## ४. वाढल्या लोकसंख्येवर उपाय :-

युरोपियन राष्ट्रे भौगोलिक दृष्टीकोनातून लहान होती. त्यामानाने तेथील लोकसंख्या सातत्याने वाढत होती. युरोपातील जवळ जवळ सर्व देशांमध्ये लोकसंख्या वाढीचा प्रश्न उद्भवला. तसेच अनेक वैज्ञानिक आणि वैद्यकीय शोधामुळे औषधोपचार सुरू झाले. त्यामुळे मृत्यूचा दर घटला. लोकसंख्या वाढू लागली त्यामुळे दारिद्र्य, उपासमार, बेकारी, गुंडगिरी वाढत गेली. सामाजिक शांतता धोक्यात आली. त्याला देशातील राज्यकर्त्यांना लोकसंख्येचा प्रश्न भेडसावू लागला. इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, इटाली व जपान या देशांची लोकसंख्या भरमसाठ वाढली. उपलब्ध असलेल्या अन्न, वस्त्र, निवारा या गरजा कमी पडू लागल्या. हा प्रश्न सोडविण्यासाठी युरोपिय देशांनी आशिया आफ्रिका खंडात वसाहती स्थापन करून आपापल्या वसाहतींमध्ये काही लोकसंख्येचे स्थलांतर करावे असे ठरविले. उदा. इंग्लंडने अनेक इंग्रज कुटुंबियांना कॅनडा, ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेत कायमची वस्ती करण्यासाठी पाठविले, जपानने चिनचा मांचूरीया हा प्रदेश जिंकून त्या प्रदेशांत जपानी कुटुंबाची वस्ती घडवून आणली. याशिवाय आशिया-आफ्रिका खंडात इंग्रजांचे जेथे जेथे राज्य होते. तेथे प्रशासन व लष्करी यंत्रणेत ब्रिटीश माणसे होती.

अशा रितीने साम्राज्यवादी राष्ट्रांनी वाढत्या लोकसंख्येचा प्रयत्न सोडविण्याचा प्रश्न केला. त्यासाठी वसाहती स्थापन करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे सहाजिकच साम्राज्यवादाला पाठबळ मिळत गेले.

## ५. दळणवळणांच्या साधनांत वाढ :

वाफेच्या यंत्राचा शोध लागल्यामुळे जहाजे व आगगाडीचे इंजिन व वाफेवर धावू लागले. त्यामुळे दळणवळणांच्या साधनात क्रांतीकारक असे बदल घडून आले. दळणवळणाच्या सुलभतेमुळे युरोपखंडातील पक्का माल जगाच्या कोणत्याही भागात जाऊ लागला. त्यामुळे साम्राज्यवादास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. प्रबोधन काळापासून सुरू झालेली वैज्ञानिक शोधाची परंपरा पुढे सातत्याने चालू राहिली. विविध यंत्रे व शक्ती या साधनांच्या शोधामुळे उत्पादनाचा विकास दर वाढला. आगबोटी, आगगाडी, तारायंत्रे, मोटारी, टेलीफोन इत्यादी साधनामुळे दळणवळण सुलभ झाले. आंतरराष्ट्रीय व्यापार वाढला. विज्ञानामुळे आधुनिक शस्त्रास्त्रात प्रगती झाली. वैज्ञानिक शोधांनी माणसाला युद्धप्रिय बनविले. महत्त्वाकांक्षी युरोपीय राष्ट्रांना साम्राज्यवादासाठी उद्युक्त केले.

## ६. आर्थिक लाभ :-

कच्चा माल प्राप्त करून पक्का माल विकण्यासाठी युरोपियन राष्ट्रात स्पर्धा निर्माण झाली. औद्योगिक क्रांतीमुळे साम्राज्य वादाचा जन्म झाला. युरोपियन राष्ट्रांनी वस्तूंना स्पर्धा नसलेल्या बाजारपेठा शोधल्या. कच्चा माल प्राप्त करण्यासाठी त्यांच्यात संघर्ष सुरू झाला. आशिया, आफ्रिका खंड व इ.स. १७७६ पूर्वीच्या अमेरिका खंडातील देश हे राजकीय

दृष्ट्या दुर्बल होते. त्या देशांत खनिज संपत्ती विपुल होती. प्रामुख्याने सोने, चांदी, हिरे, कोळसा, तेल इत्यादी या खनिज संपत्तीशिवाय आशिया खंडातील देश नैसर्गिक संपत्तीने समृद्ध होते. आग्नेय आशियायी देशात मसाल्यांच्या पदार्थांचे उत्पादन घेत असे. फिलिपाईन्समध्ये तंबाखूचे तर मलेशियात रबराचे उत्पादन होत असे. युरोपियन देशांनी कच्च्या मालासाठी, खनिज संपत्तीसाठी व नैसर्गिक संपत्तीच्या हव्यासापोटी आशिया, आफ्रिका खंडात वसाहती स्थापन केल्या. त्या ठिकाणी आपले भांडवल गुंतविले.

लेनीन म्हणतो, भांडवलवाद आपल्या विकासात शेवटी साम्राज्यवादाचे स्वरूप ग्रहण करतो.

## ७. डार्विनचा सिद्धान्त :-

योग्यतम माणसाचा विजय व जीवनासाठी संघर्ष डार्विनच्या या सिद्धान्ताचा उपयोग आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक राष्ट्रांनी केला. साम्राज्यवाद हा मात्र न्यायावर आधारलेला आहे. लहान मासा मोठ्या माशाचे भक्ष असतो. मोठ्या व शक्तीशाली राज्याने लहान व दुर्बल राज्यास गिळंकृत करावे असे बलशाली राज्यांचे प्रतिपादन असते.

## ८. पाश्चात्य संस्कृती व ख्रिश्चन धर्म प्रसार :-

आपल्या धर्माचा व संस्कृतीचा प्रचार मागासलेल्या राष्ट्रात करणे हे पुढारलेल्या राष्ट्रांना आपले कर्तव्य वाटते. गोऱ्या लोकांनी आशिया व आफ्रीका खंडातील मागासलेल्यांचा व दुर्दैवी बांधवांचा उद्धार करावयाचा या नैतिक कल्पनेनुसार काही धर्म प्रसारकांनी खरोखरच घनदाट जंगलात हालअपेष्टा सहन करून आपले प्रचार कार्य प्रामाणिकपणे पार पाडले. जोफेस चेंबर लेन म्हणतात, 'आफ्रिकेतील सांस्कृतिक विकासाचे कार्य हाती घेणे हे आपले कर्तव्य आहे.'

पाश्चात्य संस्कृती हीच सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे व तिचा युरोपच्या बाहेर प्रसार झाला पाहिजे, असे युरोपातील राज्यकर्त्यांना व विचारवंतांना वाटत होते. ख्रिश्चन धर्मप्रसारासाठी त्यांनी नवीन सिद्धांत पुढे आणले ते म्हणत, - 'येशू ख्रिस्ताचा संदेश चोहोकडे पसरविणे' हा सिद्धान्त गोऱ्या लोकांवरील ओझे (Burdon on white Man) या नावाने ओळखला जातो. मागासलेल्या लोकांचे कल्याण करण्याचे काम ईश्वरानेच आपल्यावर सोपविले आहे आणि ते काम त्याच्या इच्छेप्रमाणे योग्य प्रकारे व्हावे म्हणून राजकीय सत्ता प्रस्थापित करण्याशिवाय गत्यंतर नाही. अशी भूमिका युरोपियन राष्ट्रांची होती. ख्रिश्चन धर्माच्या मिशनरी संघटनांनी ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराच्या निमित्ताने आशिया, आफ्रिका खंडात प्रवेश केला. धर्म प्रचारकानंतर सैनिक आले, राज्यकर्ते आले. म्हणजेच धर्मप्रसार धार्मिक परोपकार या गोंडस नावाखाली युरोपियन राष्ट्रांनी साम्राज्य विस्ताराचे धोरण स्विकारले.

## ९. राष्ट्रीय संरक्षण :-

राष्ट्राच्या संरक्षणार्थ व परकीय आक्रमणापासून राष्ट्राला वाचविण्यासाठी स्वरक्षणाच्या नावाने शेजारच्या लहान व दुर्बल राष्ट्रात जाऊन आपले सैन्य तेथे ठेवण्याचे कार्य अनेक साम्राज्यवादांनी केले. संरक्षण व्यवस्थेच्या दृष्टीने आवश्यक तो कच्चा माल आणि इतर

वस्तुचा साठा उपलब्ध होतो. तसेच वसाहतीमधून इतरांशी युद्धासाठी मनुष्य बळ उपलब्ध होते. पहिल्या महायुद्धात फ्रान्सने वसाहती मधून ५,००००० लोक सैनिकी कामासाठी पाठविले तर दोन लाख मजूर म्हणून इंग्लंडने जवळ जवळ ४ लाख भारतीयांना लढण्यासाठी नेले होते.

साम्राज्यवाद्यांनी वसाहतीमधून मिळणाऱ्या तेल, रबर व इतर कच्चा मालाचा फार मोठ्या प्रमाणात स्वत:च्या संरक्षणाच्या दृष्टीने उपयोग करून घेतला. अशा रितीने एकाच वेळी आर्थिक आणि लष्करी हेतु साध्य करून घेतले. तसेच युद्ध काळात वसाहतींचा उपयोग लष्करी तळ आणि छावण्या टाकण्यासाठी केला जात असे. युद्धाची पूर्व तयारी करण्यासाठी वसाहतींचा वापर केला जात असे. युद्धात स्वत:चे राज्य गमावले तर वसाहतीमधून युद्ध चालू ठेवता येत असे.

## १०. राष्ट्रीय प्रतिष्ठा :-

स्वत:च्या राष्ट्राची प्रतिष्ठा व राष्ट्राभिमानामुळे बढ्या राष्ट्रांनी साम्राज्याचा प्रसार केला. ज्या देशांच्या वसाहती किंवा साम्राज्य मोठे ते राष्ट्र श्रेष्ठ व प्रतिष्ठीत मानले जात होते. साम्राज्यवाद हे राष्ट्रीय प्रतिष्ठेचे लक्षण समजण्यात आले. ब्रिटीशांच्या साम्राज्यावर सूर्य कधी मावळत नाही, याचा ब्रिटिशांच्या अनेक पिढ्यांना अभिमान वाटत होता. आपले आरमार सर्व महासागरामधून दिमाखाने फिरते याचा त्यांना अभिमान वाटे.

वसाहती नसलेल्या देशांना क्षुल्लक ठरविण्यात आले. अमेरिकेसारख्या संपन्न व बलाढ्य देशाला युरोपीय राष्ट्रे किंमत देत नव्हती. शेवटी अमेरिका देखील साम्राज्यवादाच्या स्पर्धेत सहभागी झाली. आधुनिक काळातील वसाहतवाद व आर्थिक साम्राज्यवाद यांच्या मुळाशी राष्ट्रीय प्रतिष्ठावादाचा हेतू प्रभावीपणे कार्यरत होता. त्याला लढावू राष्ट्रवादाने खतपाणी घातले. हा अर्वाचीन प्रभुत्ववाद राष्ट्रीय प्रतिष्ठेचे द्योतक बनला आणि जगातील समर्थ राष्ट्रे साम्राज्यवादाच्या मागे धावू लागली. ही साम्राज्यवादी राष्ट्रे अहंकारी होती. त्यांना आपला धर्म, भाषा, तत्वज्ञान, कला, विचारसरणी, राज्य पद्धती व संस्कृती सर्वोत्तम व सर्वश्रेष्ठ वाटत होती.

आशिया-आफ्रिकेतील देश असंस्कृत मागासलेले असून त्याचा उद्धार व प्रगती करण्यासाठीच ईश्वराने आम्हाला ह्या मागासलेल्या देशात पाठविले आहे. धर्मप्रसार व संस्कृती प्रसाराच्या माध्यमातून त्याची प्रगती करणे हे आमचे आद्यकर्तव्य आहे. साम्राज्यवादाची ही अहंकारी भूमिका प्रभुत्ववादाला कारणीभूत ठरली.

## ११. युरोपातील नव्या राष्ट्रांचा उदय :-

१५ व्या १६ व्या शतकापासून युरोपियन देशांनी आपल्या साम्राज्यविस्तारास प्रारंभ केला. सुरुवातीला स्पेन, पोर्तुगाल हे देश वसाहतवाद प्रस्थापित करण्याच्या कामी आघाडीवर होते. त्यानंतर १८,१९ व्या शतकात इंग्लंड, फ्रान्स या देशांनी आशिया-आफ्रिका खंडात आपल्या वसाहती स्थापन केल्या. इ.स. १८७० मध्ये युरोपात इटली आणि जर्मनी ही दोन नवी राष्ट्रे उदयाला आली. या दोन्ही राष्ट्रांनी एकीकरणानंतर वसाहती मिळविण्याचे प्रयत्न सुरू केले.

१९ व्या शतकाच्या शेवटी ज्या देशांच्या वसाहती जास्त ते राष्ट्र मोठे असे समीकरणच तयार झाले. त्यामुळे जास्तीत जास्त वसाहती प्राप्त करण्याची युरोपियन राष्ट्रात स्पर्धा निर्माण झाली.

### १२. लष्करी सामर्थ्यातील वाढ :-

१९ व्या शतकात युरोपातील देशांमध्ये लष्करीदृष्ट्या मोठी परिवर्तने घडून आली. १८७१ मध्ये जर्मनीचे एकिकरण झाल्यावर तो देश लष्करीदृष्ट्या संपन्न बनला. जर्मनीच्याच पावलावर पाऊल टाकून फ्रान्सने आपल्या लष्करात मोठे परिवर्तन केले. रशिया, इटाली, इंग्लंड, अमेरिका, जपान सर्वच देशांनी आपापले लष्करी सामर्थ्य वाढविले. या देशांनी वसाहतीमधून अत्यंत कमी खर्चात लष्कर उभे केले व हेच लष्कर वसाहती स्थापन करण्यासाठी वापरले. त्यामुळे आधुनिक साम्राज्यवादास चालना मिळाली.

अशा निरनिराळ्या कारणांनी युरोपिय राष्ट्रात साम्राज्यवाद निर्माण झाला आणि या साम्राज्यवादाने आशिया व आफ्रिका हे दोन खंड गिळंकृत केले.

### साम्राज्यवादाचे परिणाम :-

भौगोलिक जलमार्गाच्या शोधानंतर आशिया-आफ्रिका खंडातल्या साम्राज्य विस्ताराला प्रारंभ झाला. वसाहती प्राप्त करून घेण्याची साम्राज्यवादी प्रक्रिया इ.स. १५६५-१९२० पर्यंत चालू होती. इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, स्पेन, पोर्तुगाल, रशिया, अमेरिका व जपान ही राष्ट्रे आधुनिक साम्राज्यवादात अग्रेसर होती. युरोपियन राष्ट्रांच्या विस्तारवादी धोरणामुळे आशिया-आफ्रिका खंडातील राष्ट्रांना आपले स्वातंत्र गमवावे लागले. या घटनेचे जगावर दूरगामी राजकीय, आर्थिक, धार्मिक सांस्कृतिक व सामाजिक परिणाम झाले.

### १. आशिया व आफ्रिका खंडातील देशांवर प्रभुत्व :-

युरोपियन साम्राज्यवादाचा परिणाम म्हणून आशिया व आफ्रिका खंडातील देशांना आपले राजकीय स्वातंत्र्य गमवावे लागले. जगातील ४०%भागावर त्यांचे प्रभुत्व निर्माण झाले. भारत-चीन सारखे बलाढ्य देश त्यांच्या वसाहतवादाचे बळी ठरले. साम्राज्यवादी राष्ट्रांच्या वर्चस्वामुळे आशिया-आफ्रिका खंडातील देशांना वर्षानुवर्षे पारतंत्र भोगावे लागले. फिलिपाईन्स ४०० वर्षे, इंडोनेशिया ३०० वर्षे, भारत २०० वर्षे परकीयांच्या गुलामगिरीत खितपत पडला होता. केवळ राजकीयच नव्हे तर देशांना आर्थिक, धार्मिक व सामाजिक पारतंत्रही भोगावे लागले. कारण साम्राज्यवादी राष्ट्रांनी त्यांची व्यापार आणि करांच्या माध्यमातून प्रचंड लूट केली. सक्तीचा धर्मप्रसार केला. आपली संस्कृती त्यांच्यावर लादली, वर्णद्वेषापोटी अमर्याद तिरस्कार केला. पारतंत्र, शोषण, तिरस्कार, मानहानी, भय, निराशा, चिंता व दारिद्र्यामुळे या राष्ट्रांची दयनीय अवस्था झाली. या राष्ट्रांची ही दुरावस्था साम्राज्यवादाने निर्माण केली.

### २. अत्याचारी राजवटी :-

आशिया व आफ्रिका खंडात युरोपियन साम्राज्यवादी राष्ट्रांनी आपल्या वसाहती स्थापन केल्यानंतर आपल्या गुलाम प्रजेवर त्यांनी नाना प्रकारचे अत्याचार केले. परतंत्र राजव्यवस्थेत परकियांची एकाधिकारशाही होती, स्थानिक लोकांचा शासनात सहभाग नव्हता. आशिया

खंडातील लोक रानटी नसल्याने तेथे साम्राज्य विस्तार करतांना त्यांनी आशिया खंडातील तत्कालीन राज्यकर्त्यांशी युद्धे केली. ब्रिटिशांनी भारत व ब्रह्मदेशांत आपला साम्राज्यवाद प्रस्थापित करतांना अनेक युद्धे केली. १८५७ चा उठाव मोडून काढताना ब्रिटिशांनी दडपशाही मार्गाचा अवलंब केला होता. 'जालियनवाला बाग हत्याकांड' ही घटना ब्रिटिशांच्या अन्यायाचे व जुलमाचे प्रतिकच आहे. डचांनी इंडोनेशियातील जनतेवर तर फ्रेंचांनी–इंडोचिनी जनतेवर अत्याचार केले. त्यांचे विविध मार्गांनी आर्थिक शोषण केले. स्थानिक जनतेने त्यांना केलेला विरोध मोडून काढला. त्यामुळे साम्राज्यवादी राष्ट्रांच्या बद्दल परतंत्र राष्ट्रांच्या मनात राग–द्वेष–तिरस्कार निर्माण झाला.

### ३. वसाहतींचे आर्थिक शोषण :–

साम्राज्यवादी राष्ट्रांची आर्थिक धोरणे अत्यंत घातक होती. या राष्ट्रांनी जमेल त्या मार्गाने वसाहतींची लूट केली. भांडवली गुंतवणूक, शेतमळे, महसुल, कर, कच्चा माल, व्यापार ह्या मार्गांनी त्यांनी स्थानिक लोकांच्या संपत्तीचे अपहरण केले. नियोजनबद्ध पद्धतीने परतंत्र देशांचे शेती, व्यापार, उद्योग–धंदे नष्ट केले. वसाहतीमधून मोठ्या प्रमाणावर कच्चा माल कमी किमतीत खरेदी केला व या कच्चा मालाचे पक्क्या मालात रुपांतर करून तो माल पुन्हा वसाहतीमधील जनतेला जास्त किंमतीत विकला त्यामुळे वसाहती मधील जनतेचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण झाले. याशिवाय साम्राज्यवादी राष्ट्रांनी वसाहतीमधील नैसर्गिक संपत्ती, खनिज संपत्ती व मनुष्यबळ यांचा हवा तसा उपयोग करून घेतला. वसाहतीमधील हस्त व्यवसाय, कुटीरोद्योग बंद पाडले कारण युरोपियन माल स्थानिक मालाच्या तुलनेत उत्तम असल्यामुळे तसेच त्या मालाची प्रत स्थानिक मालापेक्षा जास्त चांगली असून किंमत कमी रहात असे. त्यामुळे स्थानिक बाजारांत युरोपियन लोकांचा माल अधिक विकला जात होता. या सर्व कारणांनी वसाहतीमध्ये बेकारी वाढली. दारिद्र्य वाढले, त्यांचे जीवनमान खालावले, परकियांच्या जुलमी राजवटीमुळे परतंत्र राष्ट्रांतील समाज त्रस्त व असहाय्य झाला.

### ४. ख्रिश्चन धर्मप्रसार :–

साम्राज्यवादी युरोपियन राष्ट्रांनी वसाहतीमध्ये ख्रिश्चन धर्माचा प्रसार मिशनऱ्यांच्या माध्यमातून केला. आफ्रिका खंडात धर्माचा उदयच झालेला नव्हता. आशिया खंडात हिंदू, बौद्ध, जैन, इस्लाम हे धर्म अप्रगत व रानटी आहेत. त्यांच्या तुलनेत ख्रिश्चन धर्म आधुनिक व मानवतावादी आहे, असा युरोपियन साम्राज्यवादी राष्ट्रांचा समज होता. ही भूमिका मनाशी बाळगून त्यांनी आपापल्या वसाहतींत ख्रिश्चन मिशनऱ्यांच्या माध्यमातून धर्म प्रचार सुरू केला. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी औषध, धान्य, शिक्षण इ. गोष्टी मोफत पुरवून वसाहती मधील गरीब जनतेच्या मनांत स्थान निर्माण केले. काही ठिकाणी तर या ख्रिश्चन मिशनऱ्यांनी ख्रिश्चन धर्माची दिक्षा घेण्याची लोकांवर सक्ती केली. फिलीपाईन देशांत ९६% लोकांनी ख्रिश्चन धर्म स्विकारला होता. सक्तीने व अमानुष पद्धतीने लोकांनाख्रिश्चन बनविण्याचा सपाटा सुरू केला. ह्या धर्मांतरामुळे जनता भयांकित झाली. साम्राज्यवादी युरोपियन राष्ट्रांचा हा धर्मप्रचार स्थानिक धर्मावरील आक्रमणच होते. परंतु अशा धर्मप्रचारामुळेच भारतासारख्या अनेक देशांतल्या सनातनी धर्मांत सुधारणा होण्याची प्रक्रिया सुरू झाली.

## ५. वसाहतीमध्ये भौतिक सुधारणा :–

साम्राज्यवादी काही अनुकूलही परिणाम घडून आले. पाश्चात्तीकरणामुळे शैक्षणिक विकास झाला. सामाजिक सुधारणा झाल्या. प्रशासन व्यवस्था, न्यायव्यवस्था, कायदे यांच्यात सुधारणा झाल्या. रस्ते, रेल्वे, आगबोटी, धरणे, कालवे, सार्वजनिक इमारती, तारायंत्रे, इत्यादी दळणवळणाच्या सोयी उपलब्ध झाल्या. उदा. ब्रिटिशांच्या राजवटीत भारतात ४०,००० मैल लांबीचे रेल्वेमार्ग टाकले गेले. अर्थात या सुधारणा शासनकर्त्यांनी त्याच्या सोयीसाठी केल्या तरी त्यांचा लाभ वसाहतीमधील लोकांना झाला. वसाहतीमधील लोकांचे आदान–प्रदान सुरू झाले. एकमेकांशी त्यांचा 'संवाद' साधला जाऊ लागला. त्यामुळे वसाहतीत राष्ट्रवादाचा उदय होवून स्वातंत्र लढे सुरू झाले.

## ६. पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार :–

साम्राज्यवादी राष्ट्रांनी वसाहतीमध्ये शाळा–महाविद्यालये सुरू केली. पाश्चात्य राष्ट्रांच्या धर्तीवर वसाहतीमध्ये विद्यापीठेही स्थापन झाली. उदा. भारतात प्रथम १८५८ मुंबई, कलकत्ता, मद्रास येथे विद्यापीठे स्थापन झाली. वसाहती मधील माणसांना आपल्या भाषेत शिक्षण देऊन त्यांना कमी वेतन देऊन वसाहतीमध्येच कनिष्ठ जागेवर नोकरीस ठेवले. पण याच शिक्षणामुळे वसाहतीमधील लोकांना जगाचा इतिहास समजला, भूगोल समजला, पाश्चात्य विचारवंतांची ओळख झाली, युरोपियन देशांचे सामर्थ्य लक्षात आले. या शिक्षणामुळे वसाहतीमधील लोकांचा दृष्टिकोन विशाल झाला.

## ७. स्वातंत्र्य चळवळीचा उदय :–

साम्राज्यवादी राष्ट्रांनी वसाहतीमध्ये अनेक प्रकारे दडपशाही केली. 'फोडा व झोडा' ही राजनीती अवलंबली वसाहतीमध्ये ज्या विविध जाती–जमाती होत्या त्यांच्यात भांडणे लावली. त्यांच्यात द्वेष भावना निर्माण केली. वसाहतीमधील पूर्वीचे सुखी व समाधानी जीवन, सामाजिक सामंजस्य युरोपियन राष्ट्रांनी नष्ट केले. असे असले तरी पाश्चात्त्यांच्या भौतिक सुधारणा व आधुनिक विचारांच्या प्रभावामुळे आशिया–आफ्रिका खंडात हळुहळू जनजागृती झाली. युरोपियनांच्या दडपशाही विरुद्ध लोक एकत्र आले. त्यांच्यात एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेचा उदय झाला. त्यांनी आपला धर्म, जात, भाषा, पंथ, प्रदेश विसरून आपण एक आहोत. साम्राज्यवादी राष्ट्र परकीय असल्यामुळे त्याची आपल्या देशातून हकालपट्टी केली पाहिजे अशी राष्ट्रवादी भावना वसाहतीमधील लोकांमध्ये निर्माण झाली आणि ते परकीयांची गुलामगिरी झुगारून देण्यांस सिद्ध झाले. युरोपातल्या राष्ट्रवादी क्रांत्या, स्वातंत्र्य, समता, नागरी हक्क व लोकशाही विचार याचा प्रभाव वसाहतीतल्या जनतेवर पडला. पाश्चात्त्य शिक्षण घेतलेले तरुण संघटीत होवू लागले. त्यातून राष्ट्रव्यापी संघटनांची स्थापना झाली. त्या संघटनांनी त्या त्या देशात राष्ट्रवादी चळवळी सुरू केल्या.

## ८. वसाहतींचे औद्योगिकरण :–

आशिया–आफ्रिका खंडातील आधुनिक साम्राज्यवादाचा हा एक चांगला परिणाम आहे. साम्राज्यवाद प्रस्थापित होण्यापूर्वी आशिया व आफ्रिका खंडातील देशांत औद्यागिकरण झालेले नव्हते. उत्पादनाचे तंत्र व पद्धती या जुन्याच होत्या. परंतु युरोपात साम्राज्यवादी

राष्ट्रांनी वसाहतीमध्ये कारखाने उभारले. आधुनिक उत्पादन प्रगत अशी यंत्रणा उभी केली. भारत, ब्रह्मदेश, इंडोचीन, इंडोनेशिया व आफ्रिकेतील अनेक राष्ट्रांच्या औद्योगिकरणाचा पायाच या साम्राज्यवादी पर्वात घातला गेला.

## ९. साम्रज्य वादाच्या स्पर्धेतून पहिल्या जागतिक महायुद्धाची पार्श्वभूमी तयार झाली:-

युरोपियन देशात साम्राज्यवाद प्रस्थापित करण्यासाठी स्पर्धा निर्माण झाली होती. त्यामुळे त्यांच्यात वारंवार युद्धे उद्‌भवली. उदा. तुर्कस्थानातील बाल्कन युद्धे, रशिया-जपान युद्ध या युद्धांमुळे जागतिक राजकारणात तणाव निर्माण झाले व त्याचे पर्यावसान शेवटी पहिला जागतिक महायुद्धात झाले. तसेच जर्मनी व इटाली ही दोन राष्ट्रे नव्याने जन्मास आली. त्यांनाही आपण साम्राज्य वादाच्या स्पर्धेत मागे का रहावे असे वाटू लागले ही दोन राष्ट्रे साम्राज्यवादांच्या स्पर्धेत उतरल्याने जागतिक राजकारण गढूळ व संशयास्पद होऊन त्याचा परिणाम पहिल्या महायुद्धात झाला.

## १०. अनिष्ट रूढी-परंपरांचे निर्मूलन :-

साम्राज्यवादी राष्ट्रांनी आपापल्या वसाहतिक देशांतून ज्या अनिष्ट रूढी, परंपरा चालू होत्या. त्याचे कायदेशीर उच्चाटन केले. उदा. भारतातील सतीची चाल ब्रिटिशांनी कायदा करून बंद केली. विधवांच्या पुर्नविवाहाचा कायदा केला. गुलामगिरीची प्रथा बंद केली. पाश्चात्त्य राष्ट्रांच्याच प्रभावामुळे चीनमध्ये सुधारणावादी चळवळी झाल्या. तुर्कस्थानातही (किमालपाशाच्या) राजवटीत अनेक सामाजिक चळवळी घडून आल्या.

## ११. भाषिक प्रभाव :-

युरोपियन साम्राज्यवादाचा परिणाम भाषेच्या संदर्भात झालेला दिसतो. इंग्रजी भाषेचा प्रभाव ब्रिटिशांचे राज्य असलेल्या भारत, ब्रह्मदेश, मलेशिया या देशावर पडला. तर डच भाषेचा प्रभाव इंडोनेशिया, फ्रेंच भाषेचा प्रभाव इंडोचायनात पडला. कारण साम्राज्यवादी युरोपियन देश जेव्हा वसाहतवादी देशामध्ये राज्य करत होते. तेव्हा तेथील प्रशासनाची भाषा व परीक्षणाचे माध्यम म्हणून आपल्या देशांची भाषा त्यांच्यावर लादली स्वातंत्र्यानंतरही वसाहतवादी आशियायी देशांत युरोपियन देशांचा भाषिक प्रभाव काही प्रमाणात कायम राहिला.

## १२. संघर्ष पर्वाचा भस्मासूर :-

साम्राज्यवादाच्या पोटी महायुद्धाची क्रूर अपत्ये जन्मास आली. आशिया-आफ्रिका खंडात परकीय सत्तांची जीवघेणी स्पर्धा चालू होती. त्यांच्यात अनेकदा लहान-मोठे संघर्ष झाले. परस्परांशी गुप्त तह करून जगाची दोन गटात विभागणी झाली. परस्पराविषयी वाटणाऱ्या भीतीपोटी ह्या राष्ट्रांनी शस्त्रास्त्र व लष्करांत बेसुमार वाढ केली. जर्मनी-फ्रान्स, रशिया-जपान, अमेरिका-जपान, इंग्लंड-जर्मनी, ऑस्ट्रिया-बोस्निया, राहीया तुर्कस्थान या राष्ट्रातील वैमनस्य पराकोटीला पोचले. मोरोक्को, बाल्कन प्रश्नांवरून महायुद्ध भडकण्याचे प्रसंग निर्माण झाले. ही स्फोटक परिस्थितीसाम्राज्य वादाच्या स्पर्धेतून निर्माण झाली. शेवटी १९१४ मध्ये पहिला महायुद्धाचा भडका उडाला. युद्धातील पराभवाचा सूड घेण्यासाठी

आक्रमक हुकूमशाहींचा उदय झाला आणि शेवटी दुसऱ्या महायुद्धाचे तांडव सुरू झाले. अशा रितीने विसाव्या शतकातल्या संघर्षपर्वाचा उदय साम्राज्यवादाच्या असुरी महत्त्वाकांक्षेतून झाला.

इत्यादी परिणाम साम्राज्यवादाचे घडून आलेले दिसून येतात.

**भांडवलशाही :-**

भांडवलशाही ही विशिष्ट प्रकारची अर्थव्यवस्था आहे. पुढील काळात तिला राजकीय, सामाजिक व आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले. आधुनिक कालखंडात भांडवलशाही अर्थव्यवस्था व राजव्यवस्था अस्तित्वात आली. मार्क्सने ह्या भांडवलशाहीच्या विरोधात आपले साम्यवादी व्यवस्थेचे विचार मांडले. स्थुलमानाने सरंजामशाहीच्या अस्तानंतर भांडवलशाहीचा उदय झाला. तिचा संबंध उत्पादन विक्री, व्यापार व भांडवलाशी आहे.

मध्ययुगाच्या शेवटी औद्योगिक क्रांती झाली आणि उत्पादन व विक्रीत आश्चर्यकारक बदल झाले. लक्षावधी रुपयाची मोठमोठी यंत्रे विकत घेवून श्रीमंत व्यक्तींनी भव्य कारखाने उभारले. तेथे हजारो मजूर काम करू लागले. प्रचंड उत्पादन व व्यापार वाढला. कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल व तयार झालेला पक्का माल यांचा मोठ्या प्रमाणावर आयात-निर्यात व्यापार सुरू झाला. त्यासाठी धनिक वर्ग पुढे आला व त्यांनी व्यापार करणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापारी कंपन्या स्थापन केल्या. प्रचंड संपत्ती कारखान्यात व व्यापारात गुंतविणारा जो धनिक वर्ग निर्माण झाला त्यास भांडलवदार म्हणत. याच वर्गाने पुढील काळात अर्थव्यवस्था, शासन, समाज व राष्ट्रावर आपला पगडा बसविला. अनेक राज्यकर्त्यांनी भांडवलशाहीला प्रोत्साहन व पाठिंबा दिला. जपान, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स ही राष्ट्रे भांडवलशाही राष्ट्रे बनली.

युरोपातील अनेक देशांनी व्यापार व व्यापारासाठी आंतरराष्ट्रीय वसाहतीच्या माध्यमातून मोठमोठी साम्राज्ये निर्माण केली. हा भांडवलशाहीचाच परिणाम होता. अमेरिकेने Dollar Diplomacy च्या आणि अरब राष्ट्रांनी तेल संपत्तीच्या माध्यमातून आपले प्रभाव क्षेत्र निर्माण केले. कारखान्यात काम करणाऱ्या कामगारांचे शोषण करून भांडवलवाद नफा मिळवित असतो. तो संपत्तीच्या बळावर राज्य काबीज करतो.

औद्योगिक क्रांतीचा परिणाम म्हणून युरोप खंडात भांडवलाचा मोठ्या प्रमाणावर उदय झाला. इंग्लंड, अमेरिका, जर्मनी या राष्ट्रांमध्ये भांडवलशाहीचा उदय झपाट्याने झाला तर याच्या उलट आशिया व आफ्रिका खंडातील देशांमध्ये यांत्रिकी उत्पादनाला नुकतीच सुरुवात झाली. जेव्हा भांडवलशाहीचा विषय विकास होतो. तेव्हा विकसीत भांडवलशाही अविकसीत भांडवलशाहीला मारक ठरते. अशा राष्ट्रांना कच्चा माल मिळविण्यासाठी आणि पक्का माल विकण्यासाठी बाजार पेठ बनविली जाते.

प्रबोधन चळवळ व राष्ट्रराज्याच्या उदयामुळे मध्ययुगीन सरंजामशाही अर्थव्यवस्था मोडीत निघाली. जमीनदार व भूदासांचा वर्ग नष्ट झाला. पूर्वीच्या जमिनदारांनी जमीनी विकून मोठमोठे कारखाने सुरू केले तर काहींनी मोठमोठ्या कंपन्या स्थापन करून परदेशी

व्यापार सुरू केला. सरंजामशाही नष्ट झाल्याने भूदासवर्ग बेकार झाला व तो शहरात कामगार म्हणून वावरू लागला. थोडक्यात सरंजामशाहीच्या ऱ्हासातून श्रीमंत भांडवलदार उद्योगपतीचा वर्ग उदयाला आला. आधुनिक व्यापार, औद्योगिकरण व वसाहतवादाचा केंद्रबिंदू हाच भांडवलदार वर्ग होता.

'मध्य युगातल्या, सरंजामशाहीचा आधुनिक अवतार म्हणजे ही भांडवलशाही आहे' असे प्रतिपादन करून मार्क्सने भांडवलशाहीचा धिक्कार केला. त्याला आर्थिक प्रभुत्ववाद मंजूर नव्हता. त्याच्या मते पाश्चात्याची उदारमतवादी लोकशाही ही भांडवलशाही लोकशाहीच आहे. कारण तेथील शासनावर भांडवलदाराचा पगडा आहे. हे भांडवलशाहीचे समर्थन करणारे शासन आहे. भांडवलशाहीत मुक्त अर्थव्यवस्थेला व स्वैर स्वातंत्र्याला प्राधान्य असते आणि त्यात कमालीची आर्थिक विषमता असते. भांडवलशाही मुक्त अर्थ व्यवस्थेने वसाहतीचे आर्थिक शोषण केले, तेथील जनतेला दरिद्री बनविले. त्यांना हीन प्रकारची वागणूक देवून त्यांच्यावर दडपशाही केली. वसाहतवाद हा भांडवलशाहीचा अपरिहार्य परिणाम होता.

### १.२.३ समाजवाद आणि उदारमतवाद :-

विसाव्या शतकास एकोणीसाव्या शतकाने दिलेली महत्त्वाची देणगी म्हणजे 'समाजवाद' होय. अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांती' व फ्रेंच राज्यक्रांती या दोन महत्त्वपूर्ण घटनांनी एकोणिसाव्या शतकांत सर्वस्वी एका नव्या विचार सरणीस जन्म दिला ती म्हणजे 'समाजवादी विचारसरणी' होय.'

जर्मनीतल्या कार्लमार्क्सच्या तत्वज्ञाने संपूर्ण जग ढवळून निघाले त्याने प्रचलित विचार सरणीला धक्के देणारे पर्यायी तत्वज्ञान मांडले. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादन तंत्रात अमुलाग्र बदल घडून आल्याने अर्थव्यवस्थेचे स्वरुप पालटले. नव्या अर्थ व्यवस्थेतून भांडवलवाद व भांडवलशाही उदयास आली. भांडवलवादामुळे अनेक प्रकारच्या आर्थिक समस्या निर्माण झाल्या. व्यक्तीस्वातंत्र्याचा आविष्कारामुळे मालमत्तेची मालकी काही व्यक्तींकडे गेली. भांडवल वृद्धी झाली. परंतु त्या भांडवलाचे समान वाटप झाले नाही. त्यामुळे समाजात मालमत्ता असलेला व मालमत्ता नसलेला असे दोन वर्ग उदयास आले. ज्यांच्याकडे मालमत्ता, भांडवल आहे त्यांनी आपल्या सत्तेचा उपयोग मालमत्ता नसलेल्या वर्गाची पिळवणुक करण्यासाठी केला. पिवळणुक होणाऱ्या वर्गासाठी काहीतरी करण्याची गरज भासू लागली. याचवेळी फ्रेंच राज्य क्रांतीतून जन्मास आलेले 'समता' हे तत्व युरोपात अत्यंत प्रभावशाली ठरले. या तत्वाचे सरळ रूप म्हणजे 'समाजवाद' होय.

समाजवाद हा केव्हा आणि कोठे सुरू झाला हे सांगणे कठीण आहे. काही लोक समाजवाद ग्रीक तत्ववेत्ता प्लेटो याच्या रिपब्लिक या ग्रंथात शोधतात. काही लोक बायबलमधील 'माझे-तुझे' या वचनात शोधतात. तर काहींच्या मते 'प्रबोधन काळात संपत्तीवर आधारलेला विषमतेला होणारा विरोध म्हणजे समाजवाद होय.' विल्यम एबनस्थेन यांच्या मते एक आधुनिक राजकीय शक्ती म्हणून समाजवादाचा उदय औद्योगिक भांडवलप्रधान अर्थव्यवस्थेतून झाला.

## समाजवादाची वैशिष्टे :-

औद्योगिक क्रांतीनंतर निर्माण झालेल्या भांडवलशाहीची विविध रूपे होती. ज्या व्यक्तीकडे उत्पादनासाठी आवश्यक भांडवल होते. त्या व्यक्तीच्या स्वभावानुसार त्या भांडवलाचा उपयोग झाला. त्यामुळे उत्पादनास हातभार लागलेल्या कामगार वर्गावर स्थल-काल परत्वे परिणाम झाले. त्यामुळे आर्थिक विषमतेचे स्वरुप वेगळे होते. त्यावरील उपाय योजनाही वेगळी होती. आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी जे उपाय सुचविले गेले ते ही वेगळेच राहिले. आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी समाजवादी विचार सरणी पुढे आली. या विचारसरणीची वैशिष्ट्ये कोणती हे स्पष्ट करण्यासाठी अनेक राजकीय विचारवंत भिन्नभिन्न प्रकारे समाजवादाचा अर्थ स्पष्ट करू लागले. त्यामुळे समाजवादाची व्याख्या करणे कठीण झाले. 'पानी तेरा रंग कैसा, जिसमें मिलावे वैसा' या प्रमाणे समाजवादाचे रूप राहीले.

समाजवादाची रूपे अनेक दिसत असली तरी त्याचे गुणधर्म मात्र आहेत.

१) समाजवाद व्यक्ती हितापेक्षा समाजहितावर जास्त भर देतो.

२) समाजवाद भांडवलशाही नष्ट करू इच्छितो.

३) उत्पादनावर नियंत्रण ठेवून अवास्तव नफा कमावणाऱ्या भांडवलदारास समाजवाद विरोध करतो.

४) आर्थिक उधळपट्टीतून निर्माण होणारी स्पर्धा समाजवाद नाहीशी करतो.

५) आर्थिक समता प्रस्थापित करण्यासाठी समाजवाद कटिबद्ध आहे.

६) जमिनीच्या स्वरूपात असलेली खाजगी मालमत्ता समाजवादाला नाहीशी करावयाची आहे.

७) व्यक्तीला अर्निबंध स्वातंत्र न देता आवश्यक तेवढे स्वातंत्र देवून समाजवादाला सामाजिक एकता अभिप्रेत असते.

८) राज्य हे पिळवणुकीचे एक साधन असते.

म्हणून समाजवादी व्यवस्थेत राज्याची आवश्यकता रहात नाही. अशी समाजवादाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## 'उत्क्रांत समाजवाद', क्रांतीकारी समाजवाद :-

१९ व्या शतकांत युरोपात समाजवादी विचारसरणीचा प्रसार झाल्यानंतर समाजवादाचा अनेक अंगांनी विचार होऊ लागला. भांडवलशाही प्रवृत्ती असलेला भांडवलदारांनी कामगार व श्रमिकांची पिळवणूक करून पैसा आणि सत्ता प्राप्त केली व पुन्हा पैसा व सत्ता यांचा दुरुपयोग करून श्रमिकांची शोचनीय अवस्था केली. या श्रमिकांना वाचविण्यासाठी व भांडवलशाही नष्ट करण्यासाठी समाजवादी विचारवंतांनी निरनिराळे प्रयोग सुरू केले. त्यातूनच सामाजिक बदल हळुहळू उत्क्रांतीच्या मार्गाने करणे आवश्यक आहे असे काही विचारवंतांचे मत होते. त्यांच्या या समाजवादी विचारसरणीस 'उत्क्रांत समाजवाद' असे म्हटले जाऊ लागले.

काही समाजवाद्यांनी सामाजिक बदल संथ गतीने न करता, भांडवलवादाच्या मुळावरच घाव घालून केला पाहिजे, असे प्रतिपादन केले. या समाजवादास 'क्रांतीकारी समाजवाद' असे म्हटले जाऊ लागले.

उत्क्रांत समाजवादाचे अनेक प्रकार १९ व्या शतकांत अस्तित्वात होते. आदर्शवत समाजवाद, फेबियद समाजवाद, लोकशाही समाजवाद, राज्य समाजवाद, व्यवसाय संघ समाजवाद, मध्यम वर्ग विरोध श्रमिक संघीय समाजवाद, अराज्यवादी समाजवाद असे समाजवादाचे प्रकार होते.

क्रांतीकारी समाजवादात कार्लमार्क्सचा समाजवाद प्रमुख होता. कालमार्क्सने आपल्या समाजवादास 'साम्यवाद' असे नाव दिले आहे. उत्क्रांत समाजवादापेक्षा मार्क्सचा समाजवाद सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी निरनिराळे मार्ग सुचवित असला तरी तो मुळात समाजवादच आहे. असे राजकीय विचारवंत मानतात व मार्क्सवादाचे वेगळेपण स्पष्ट करण्यासाठी ते मार्क्सच्या समाजवादास 'शास्त्रीय समाजवाद' असे नाव देतात.

**समाजवादाचे प्रणेते :–**

सेंट सायमन (१७६० ते १८२५) चार्लस फुरियर (१७७२ ते १८३७) लुई ब्लॅक (१६११ ते ११८२) रॉबर्ट ओवेन (१७७१ ते १५५८) आणि प्रौढात (१८०९ ते १८६५) हे समाजवादाचे प्रमुख प्रणेते होते.

फ्रेंच राज्य क्रांतीच्या समकालीन हे विचारवंत असल्याने या राज्यक्रांतीतून निर्माण झालेल्या स्वातंत्र्य, समता या तत्वांचा त्यांच्यावर फार मोठा प्रभाव होता. तत्कालीन युरोपातील समाजवादी संस्था, समाज व्यवस्थेबद्दल अत्यंत असमाधानी होत्या. तत्कालीन अर्थव्यवस्था बदलून टाकण्याची त्यांची इच्छा होती. औद्योगिक क्रांतीमुळे निर्माण झालेली आर्थिक व्यवस्था बदलल्याशिवाय समाज सुखी होणार नाही. असे त्यांचे मत होते. त्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेवर सडकून टिका केली. परंतु क्रांतीकारी समाजवाद्यांप्रमाणे हा बदल केवळ क्रांतीकारी कारवायांनी किंवा राजकीय उलथापालथ केल्याने होणार नसून त्यासाठी समन्वयाचा व सहकार्याचा मार्ग स्विकारावा लागेल असे त्यांना वाटत होते.

रॉबर्ट ओवेन या अदर्शवादी समाजवाद्याने इंग्लंडमध्ये फॅक्टरी ॲक्ट प्रमाणे कायदे करण्याची व लोकशाही मार्गाने कामगारांच्या परिस्थितीत बदल करण्याचे प्रत्यक्षदर्शी अनुभव देण्यासाठी इंग्लंडमध्ये न्यूलॅडमार्क येथे १८०० मध्ये एक आदर्श कारखाना उभारून राज्यकर्त्यांना एक पाठच दिला. युरोपियन समाजवाद्यांचा कामगारांच्या परिस्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी मानवतावादी भूमिकेतून कार्य करण्यावर जास्त भर होता.

**राज्य समाजवाद :–**

हा समाजवाद राज्य या संस्थेला सामाजिक बदलांचे साधन मानतो. उत्पादनाच्या साधनांची खाजगी मालमत्ता नष्ट करणे, सर्व उद्योगधंदे व सेवा राज्याने आपल्या मालकीच्या करून त्यावर नियंत्रण प्रस्थापित करणे, समाज कल्याणासाठी खाजगी नफेखोरीला आळा घालून उद्योगधंद्याचे राष्ट्रीयकरण करणे, संपत्तीचे समाधानकारक वाटप करणे, कामगारांना समाजकामासाठी समान वेतन देणे, किमान वेतन निश्चित करणे, सर्वांना काम देवून बेकारी नष्ट करणे इत्यादी राज्य समाजवादाची उद्दिष्ट्ये होती.

**लोकशाही समाजवाद :-**

लोकशाही मार्गाला आर्थिक विषमता कमी करून सामाजिक व आर्थिक समता निर्माण करणे असे लोकशाही समाजवादात अभिप्रेत असते. सहकार्य, समान संधी, मूलभूत हक्क, लोकशाहीचा व्यापक पाया इत्यादी उद्दीष्ट्ये लोकशाही समाजवादाला अभिप्रेत असतात.

**फॅबियन समाजवाद :-**

लोकशाही मार्गाने मंद गतीने, उत्क्रांती करीत समाजकल्याण साधले जाते. प्रसिद्ध नाटककार जॉर्ज बर्नार्ड शॉ, ग्रॅहम वालास, ह्यूबर्ट ब्लॅड, ॲनी बेझंट, सिडने वेब, रॅम्से मॅव-डोनल्ड इत्यादी थोर विचारवंतांनी फेबियन सोसायटी स्थापन करून फॅबियन समाजवादाचा प्रसार केला.

**श्रमिक संघीय समाजवाद :-**

हा समाजवाद कार्ल मार्क्सने सांगितलेल्या साम्यवादाची सुधारित आवृत्ती होता. भांडवलवाद आणि मध्यम वर्ग यांना सिंकिर्कॅलिझम शत्रु स्वामी मानत होता. श्रमिकांच्या संघटना उभ्या करून त्या संघटनाद्वारे नवी समाजव्यवस्था स्थापन करण्याचा त्याचा प्रयत्न होता.

**व्यवसाय संघ समाजवाद :-**

समाजातील जे अनेक व्यवसाय-उद्योगधंदे आहेत. त्या प्रत्येक व्यवसायाची संघटना स्थापन करून, त्या सर्व संघटनांचा एक महासंघ उभा करण्यात येईल व त्याद्वारे नवी समाजव्यवस्था निर्माण करणे हे या समाजवादाचे उद्दिष्ट होते.

**अराज्यवाद :-**

समाजवादी विचार सरणीची ही एक वेगळी विचारसरणी आहे. क्रोपोरकिन, प्रौढान, बकुनिन इत्यादी विचारवंतांनी या समाजवादाचा पुरस्कार केला आहे. सर्व औपचारिक संघटना बरखास्त करून स्वयंप्रेरणेने आपोआप संघटना स्थापन होण्याची लोकांना संधी देवून त्याद्वारे नवीन स्वयंस्फूर्त समाज व्यवस्था निर्माण करण्याचे अराज्यवादाचे उद्दिष्ट होते.

**कार्ल मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद किंवा साम्यवाद :-**

कार्ल मार्क्सचा समाजवाद हा क्रांतीकारी समाजवाद मानला जातो. प्रस्थापित समाज व्यवस्था बदलून टाकण्यासाठी क्रांतीच्या मार्गाचा अवलंब केला पाहिजे असे कार्ल मार्क्सचे मत होते.

एकोणिसाव्या शतकातील समाजव्यवस्था, शासन, कामगार, भांडवलदार, जमीनदार इत्यादींचे बारकाईने निरीक्षण करून कार्ल-मार्क्सने सुसंगत तर्कनिष्ठ पद्धतीवर आधारलेला साम्यवाद 'कम्युनिस्टांचा जाहीरनामा' व दास कॅपिटल' या ग्रंथामध्ये मांडला. त्याने मानव जातीच्या इतिहासाचा भौतिक अर्थ स्पष्ट करून 'जाती पर्यंतचा मानव जातीचा सर्व इतिहास म्हणजे वर्ग कलह होय असे प्रतिपादन केले. या वर्ग कलहाच्या मुळाशी आर्थिक समस्या

असते. समाजातील एका वर्गाच्या हाती उत्पादनाची साधने असतात व दुसरा वर्ग कामगारांचा असतो. त्यांच्याकडे श्रमशक्ती शिवाय इतर काही नसते. दुसरा वर्ग गरीब, दबला, पिळला जाणारा कामगारांचा असतो. अशा दोन वर्गाचा कलह अटळ असतो. मार्क्स यालाच वर्गकलह असे म्हणतो. वर्गकलहाचे विश्लेषण करतांना मार्क्सने अतिरिक्त श्रम मूल्य सिद्धांत' प्रतिपादन केलेला आहे.

वर्ग कलह तीव्र झाल्यानंतर धनिकांचा वर्ग कामगारांकडून नष्ट केला जाईल व त्यानंतर समाजात 'कामगारांची हुकूमशाही' स्थापन होईल. कालांतराने राज्य ही संस्था निरूपयोगी ठरून नष्ट होईल व राज्य विहीन समाज निर्माण होईल.

१९ व्या शतकात जगाच्या आर्थिक विकासात औद्योगिक क्रांतीने जितकी महत्त्वाची भूमिका बजावली. तितकीच भांडवलवाद व समाजवाद यांनीही मोलाची कामगिरी बजावली १९ व्या शतकाच्या शेवटी समाजवादी विचारसरणीने जग इतके भारावून गेले होते की, विसाव्या शतकात समाजवादाच्या विविध विचारसरणीवर आधारलेल्या शासन व्यवस्था निर्माण झाल्या. साम्यवादाची विचारसरणी सर्वांत प्रभावी ठरली होती. या साम्यवादानेच रशियात राज्यक्रांती घडवून आणली.

## उदारमतवाद :-

एकोणिसाव्या शतकांत ज्या अनेक विचार प्रणाली उदयास आल्या त्यापैकी समाजवाद, उदारमतवाद आणि राष्ट्रवाद या प्रमुख विचारसरणी होत्या. विसाव्या शतकांत या विचारसरणींचा प्रभाव वाढत गेला.

आधुनिक युरोपच्या व जगाच्या इतिहासात फ्रेंच राज्यक्रांती ही घटना युगप्रवर्तक मानली जाते. या क्रांतीने स्वातंत्र, समता व बंधुता ही महान तत्वे जगाला दिली. औद्योगिक क्रांतीनेही या तत्वांना हातभार लावला. एकोणिसाव्या शतकात या तत्वांची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर जे वैचारिक परिवर्तन घडून आले, त्याच्याशी समाजवाद, उदारमतवाद व राष्ट्रवाद यांचा निकटचा संबंध आहे.

स्वातंत्र्याच्या संकल्पनेतून उदारमतवादाची निर्मिती झाली आहे ही संकल्पना राजकीय स्वातंत्र्याशी संबंधित आहे. स्वातंत्र्यातून उदारमतवाद विकसित होत गेला. उदारमतवादाचा आश्रय घेतल्याशिवाय खरे राजकीय स्वातंत्र्य अशक्य असते. हे एकोणिसाव्या शतकात राजकीय राजेशाहीला शह देऊन घटनात्मक प्रजासत्ताक स्थापन करण्याच्या घटनेवरून स्पष्ट होते.

औद्यौगिक क्रांतीमुळे व्यापार, उद्योग व व्यवसायाची वाढ होऊन, त्यात काम करणारा एक नवीन वर्ग निर्माण झाला. उदारमतवादी व राष्ट्रवादी विचारधारेला बळ देण्याचे कार्य या वर्गाने केले. या उच्च मध्यम वर्गाने उदारमतवादी कार्यक्रमांना पाठिंबा दिला व त्यांनीच चळवळीचे नेतृत्वही केले.

## उदारमतवादाची विचारधारा :-

उदारमतवादाला इंग्रजीत Liberalism असे म्हणतात. Liber या शब्दापासून Liber-

alism हा शब्द तयार झाला आहे. त्याचा अर्थ स्वतंत्र असा होतो. व्यक्ती स्वातंत्र्याचे समर्थन करणारा विचार प्रवाह म्हणजे उदारमतवाद होय.

गेल्या चार शतकाहून जास्त काळ पाश्चात्य देशात उदारमतवादाचे तत्वज्ञान इतर तत्वज्ञानाच्या अग्रभागी राहिले आहे. उदारमतवाद ही एक अशी विचारधारा आहे की, ती सातत्याने प्रवाही राहीली आहे आणि अनेक विचारवंतांनी त्यात भर घातली आहे.

काही विचारवंतांच्या मते उदारमतवाद हा सहिष्णु विचार आहे. तर काही विचारवंतांच्या मते उदारमतवाद ही आध्यात्मिक बाब आहे. तर काहींना ती एक बौद्धिक प्रगती वाटते. काही जण उदारमतवादाचा संबंध व्यक्ती स्वातंत्र्याशी जोडतात. काहींच्या म्हणण्यानुसार उदारमतवाद लोकशाहीशी निगडीत आहे. राजकीय विचारवंत हॅरॉल्ड लास्की म्हणतात. उदारमतवादाची व्याख्या करणे तर सोडाच त्याचे वर्णनही करता येणे अशक्य आहे. वस्तुत: उदारमतवाद हे तत्वज्ञान नसून ती एक मानसिक प्रवृत्ती आहे. उदारमतवादात स्वातंत्र्याची आस असते. त्यासाठी सहिष्णुतेची शक्ती असावी लागते.

उदारमतवादाच्या संकल्पनेची पूर्ण कल्पना समजून घेण्यासाठी तिची सामाजिक, आर्थिक व राजकीय पार्श्वभूमी जाणून घेतली पाहिजे. सामाजिक दृष्ट्या, उदारमतवाद व्यक्ती स्वातंत्र्यावरील कोणत्याही प्रकारच्या बाह्य नियंत्रणास किंवा बंधनास विरोध करतो.

आर्थिक दृष्ट्या उदारमतवाद म्हणजे खुला व्यापार व उत्पादन व्यवस्था असते. त्यात मालाच्या आयात-निर्यातीवर बंधन नसतात. व्यक्तीला नैसर्गिक साधन संपत्ती वापरण्याचा आणि त्यातून लाभांश वितरीत करण्याचे स्वातंत्र्य असते.

राजकीय दृष्ट्या उदारमतवाद म्हणजे राजकीय स्वातंत्र्याची पूर्ण हमी असते. राजाने सभेचे विकेंद्रीकरणाच्या सिद्धांतानुसार संसदीय कार्यकारी व न्यायविषयक कार्ये यांच्यावर कोणतही बंधन आणू नये तसेच शासनाने नियमानुसार ठराविक कालावधी नंतर निवडणुका घेवून नागरिकांना शासकीय कामकाजात सहभाग घेऊ दिला पाहिजे. शासन शेवटी नागरिकांना जबाबदार असते. असे उदारमतवादात अपेक्षित आहे.

## उदार मतवादाच्या उदयाची पार्श्वभूमी :-

उदार मतवादाचा उदय आणि विकास प्रामुख्याने इंग्लंडमध्येच घडून आला. इंग्लंडच्या राजाने (जॉन) १२१५ मध्ये 'मॅग्ना चार्टा' ही सनद मान्य केली आणि तेव्हापासून इंग्लंडमध्ये लोकशाही सुरू झाली होती. अनियंत्रित राजसभेचे रुपांतर मर्यादित घटनात्मक राजेशाहीत करण्यात इंग्लंडची जनता यशस्वी झाली होती. त्या काळापासूनच इंग्लंडमध्ये उदारमतवादी विचार सरणीला चालना मिळाली. इंग्लंडमधील जनतेला मिळालेले 'व्यक्ती स्वातंत्र्य' हा उदारमतवादी विचारांचाच एक आविष्कार होता.

औद्योगिक क्रांतीनंतर व्यक्ती विकासासाठी व्यक्तीस्वातंत्र्यात अंतर्भूत असलेली मूलभूत हक्कांची मागणी इंग्लंडमध्ये जोरदार झाली. औद्योगिक क्रांती नंतर इंग्लंडमध्ये कामगारांच्या संघटना अस्तित्वात आल्या. या संघटनांना आपल्या हक्कांची जाणीव झाली व या संघटना आपल्या हक्कासाठी संघर्ष करू लागल्या. त्यांच्या मागण्या मान्य होण्यासारखी परिस्थिती इंग्लंडमध्ये नव्हती. कारण राजकीय सभा राजाकडून ज्या पार्लमेंटच्या हाती आली होती,

त्या पार्लमेंटमध्ये जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सरदार-सरंजामदार यांच्या हाती होती. जनतेचे खरेखुरे प्रतिबिंब पार्लमेंटमध्ये दिसत नव्हते.

लोकशाहीमध्ये जनतेच्या हाती खरी सत्ता असायला हवी असते. परंतु इंग्लंड मधील पार्लमेंटसाठी मतदान करण्याचा हक्क सर्व जनतेला नसून अत्यंत मर्यादित लोकांना होती. सहाजिकच सर्वसामान्य जनतेला मतदान करण्याचा मूलभूत हक्क प्राप्त करून घेण्यासाठी संघर्ष करणे अपरिहार्य होते.

एकोणिसाव्या शतकात युरोपात उदारमतवादाचा प्रभाव वाढत होता. राजकीय हक्कांची जाणीव असणाऱ्या मध्यमवर्गाची संख्या ही वाढत होती युरोपातील औद्योगिक क्रांतीत जी राष्ट्रे पुढे आली होती. त्या राष्ट्रामध्ये प्रजासत्ताक शासन पद्धती आणण्याचे प्रयत्न सुरू झाले होते. फ्रान्समधील १८३० ची जुलै क्रांती, १८४८ ची प्रजासत्ताक राज्यक्रांती फ्रान्समधील क्रांत्यांची प्रतिक्रिया सर्व युरोपभर उमटली व उदार मतवादाला जोर चढला. इंग्लंडच्या पार्लमेंटने मतदानाच्या हक्कात वाढ करण्यासाठी १८३२ मध्ये पहिला सुधारणा कायदा पास केला. त्यानंतर १८६७, १८८४, १९१८ व १९२८ असे सुधारणा कायदे मंजूर झाले. या सुधारणा कायद्यांमुळे इंग्लंडमध्ये २१ वर्षांवरील सर्व स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार मिळाला.

विधायक उदारमत वादाच्या या यशामुळे राज्य या संस्थेची उद्दिष्टे लोककल्याणकारी असली पाहिजे, हे सिद्ध झाले. उदारमतवादी विचारसरणीमुळे विसाव्या शतकातील लोकशाहीची संकल्पना बळकट झाली.

अनियंत्रित राजसत्ता, धर्मसत्ता व सरंजामदारांचे वर्चस्व झुगारून देण्यासाठी उदारमतवादाचा उदय झाला. राजाला अनियंत्रित सत्ता बहाल केल्याशिवाय व्यक्ती विकासास अत्यावश्यक असलेली सामाजिक शांतता व सुरक्षितता लाभणे शक्य नाही म्हणून राजाने मुक्त व्यापाराला आणि खाजगी मालमत्तेला संरक्षण द्यावे असे उदारमतवादात अभिप्रेत होते. जॉन लॉक, माँटस्क्यू, थॉमस पेन, हॉब्स, रूसो इत्यादी राजकीय विचारवंतांनी पुरस्कृत केलेला उदारमतवाद आदर्शवादी किंवा नकारात्मक स्वरूपाचा होता.

मनुष्य मुळातच चांगला आहे. त्याच्यावर कोणत्याही प्रकारची कृत्रिम बंधने लादली जाऊ नये. त्यास जगण्याचा, खाजगी मालमत्ता बाळगण्याचा हक्क कोणत्याही नियंत्रणा शिवाय दिला गेला पाहिजे. राज्य ही एक कृत्रिम व्यवस्था असून ती लोकांनी एका करारान्वये निर्माण केली असून राज्यकर्त्याने लोकांचे हक्क देण्यांत कुचराई करून कराराचा भंग केल्यास, सरकार बदलण्याचा लोकांना हक्क आहे. अशा नकारात्मक विचारांचा उदारमतवाद समावेश होता.

१९ व्या शतकात नकारात्मक उदारमतवादाची जागा विधायक (Positive) उदारमतवादाने घेतली. कारण व्यक्तीला दिलेला अर्निबंध स्वातंत्र्यामुळे समाजव्यवस्थेत भांडवलवादी अर्थव्यवस्थेचा शिरकाव झाला. त्यामुळे समाजात मोठ्या प्रमाणावर विषमता निर्माण झाली. या अर्थव्यवस्थेने भांडवलदारांनी भांडवलाच्या बळावर कामगार वर्गाची पिळवणूक करून अमाप सत्ता आपल्या हाती घेतली.

समाजवादी आणि साम्यवादी विचारसरणीच्या कार्ल मार्क्स सारख्या राजकीय विचारवंतांने आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठी कामगारांची पिळवणूक थांबली पाहिजे असे प्रतिपादन केले. साम्यवादी विचार सरणीच्या प्रभावामुळे उदारमतवादी विचारवंताना आपल्या तत्वज्ञानांत बदल करणे भाग पडले.

जेश्मी बेन्थॅम, स्टुअर्ट मिल, लास्की, हॉब हाऊस, टी.एच. ग्रीन, मॅक आयव्हर इत्यादी उदारमतवादी विचारवंतांनी या तत्वज्ञानास विधायक वळण दिले. त्यांनी विधायक उदारमतवादात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेचा अंतर्भाव केला. समाजाचे कल्याण साधण्यासाठी आर्थिक जीवनाचे नियमन आणि नियंत्रण केले. व्यक्तीला देण्यात येणाऱ्या सर्व मूलभूत हक्कांचा सामाजिक संदर्भात विचार केला गेला पाहिजे. व्यक्तीला मिळालेल्या अर्निबंध स्वातंत्र्यामुळे व हक्कामुळे समाज जीवनाला धक्का पोहोचता कामा नये असे विचार विधायक उदारमतवादांत प्रतिपादन करण्यात आले आहे.

**उदारमतवादाचे परिणाम :-**

प्रबोधनामुळे व्यक्ती आणि व्यक्ती स्वातंत्र्य यांना असाधारण महत्त्व प्राप्त झाले. धर्मसंस्थेचे समाजावरील वर्चस्व कमी झाल्याने परमेश्वराशी संपर्क साधण्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची आवश्यकता उरली नाही. युरोप खंडात धर्मगुरूच्या विरोधात जी मोहीम उघडली गेली त्यामुळे चर्चचे, धर्मसंस्थेचे महत्त्व आपोआप कमी होत गेले. व्यक्ती आणि व्यक्तीस्वातंत्र्याला अतिशय महत्त्व प्राप्त झाले.

सुधारणा चळवळी युरोपातील अनेक देशांत बदल घडून आले. जमीनदार आणि कुळे यांचे संबंध बदलले राजकीय व्यवस्थेतील महत्त्वाच्या जागा व्यापारी वर्ग, लष्करातील धाडशी लोक वैज्ञानिक, साहित्यिक, सामाजिक विचारवंत यांना देण्यात येवू लागल्या. याच काळात राष्ट्र-राज्य या संकल्पनेचा उदय झाल्याने देशाच्या कायदा व्यवस्थेत, व्यक्ती व्यक्तीच्या संबंधात बदल घडून आले.

प्रबोधन कालखंडातील सर्वांत महत्त्वाचा परिणाम म्हणजे युरोपांत मध्यम वर्गाचा उदय झाला. मध्यमवर्गाच्या मार्फतच उदारमतवादी विचार समाजातील तळागाळा पर्यंत नेण्याचा प्रयत्न केला गेला. १६ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत विज्ञानाच्या क्षेत्रांत मोठे मोठे शोध लागले. या मध्यम वर्गाने स्वत:चे उद्योग व्यवसाय सुरू केले. इत्यादी परिणाम उदारमतवादाचे घडून आले.

## १.२.४ राष्ट्रवाद :-

'राष्ट्रवाद' ही अर्वाचीन काळातील महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. राष्ट्रवादी विचारसरणीला महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले असले तरी ती विचारसरणी फार पूर्वीपासून चालत आलेली आहे असे म्हणता येत नाही. आधुनिक राष्ट्रवादाचा उगम युरोप खंडात १८ व्या शतकांत झाला आणि १८ व्या शतकाच्या द्वितीयार्धात राष्ट्रवादाची वाढ झपाट्याने झाली.

प्रो. हॅम्स कोहन यांच्या मते 'राष्ट्रवाद' हा १८ व्या शतकाच्या द्वितीयार्धापेक्षा जुना नसून त्याचा प्रभाव फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात मोठ्या प्रमाणावर पडला असे आढळून येते.'

मध्ययुगीन काळांत रोमन सम्राट आणि रोमनचर्च ह्यांचे वर्चस्व प्रस्थापित झाले होते. त्यामुळे राष्ट्रवादी विचार सरणीला पोषक अशी परिस्थिती निर्माण होऊ शकली नाही. सरंजामशाहीत स्वामीभक्ती आणि आज्ञापालन ह्यांच्या प्रभावामुळे राष्ट्रीयत्वाची जाणीव झाली नाही. परंतु राजेशाही प्रस्थापित झाल्यानंतर आणि राजे लोकांनी विशिष्ट प्रदेशांत स्वत:ची सत्ता स्थापन केल्यानंतर राजनिष्ठा वाढीस लागली. त्यातूनच कालांतराने व्यक्तीनिष्ठेऐवजी विशिष्ट प्रदेशाबाबत निष्ठा निर्माण होऊन राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रीयत्व, राष्ट्राचे सार्वभौमत्व इत्यादी संकल्पना प्रभावी ठरू लागल्या. इंग्लंड, फ्रान्स, स्पेन इत्यादी देशांनी आपण इतरांपासून वेगळे आहोत आणि वेगळे राहू असे स्पष्ट केले आणि स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवले. त्यामुळे ही राष्ट्रे राष्ट्रराज्ये बनली. ह्याच आत्मियतेच्या भावनेचा उल्लेख राष्ट्रीयत्व असा केला जाऊ लागला.

फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाल्यामुळे आणि लोकांची सत्ता प्रस्थापित होऊ शकल्यामुळे, राष्ट्रवादाचा विकास होण्यास मदत झाली. रॉयल इन्स्टिट्यूटने प्रकाशित केलेल्या 'नॅशनॅलिझम' या ग्रंथानुसार – 'राजनैतिक' शक्ती ह्या दृष्टीने विचार करता राष्ट्रवाद हा फ्रेंच राज्यक्रांतीने निर्माण केलेल्या परिस्थितीचा परिपाक आहे.

## राष्ट्रवाद म्हणजे काय ?

'एक राष्ट्र एक राज्य' या सिद्धांतातूनच राष्ट्रवादाची कल्पना उदयास आली. राष्ट्रवाद हा देशभक्ती, देशभक्ती, देशप्रेम, जातीय व धार्मिक एकता आणि भौगोलिक एकतेच्या धारणेतून निर्माण झाला आहे. एकत्वाची भावना असलेला समाज राष्ट्रक बनतो आणि अशा राष्ट्रकाने राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने कार्य करण्यास सुरुवात केली किंवा असे स्वातंत्र्य मिळवून राज्य स्थापन केले म्हणजे ते राष्ट्र बनते ही आत्मीयतेची भावना म्हणजेच राष्ट्रीयत्व होय. ही एक आध्यात्मिक भावना असते.

राष्ट्रीयत्वा प्रमाणेच राष्ट्रवाद ही सुद्धा एक भावनाच असल्यामुळे राष्ट्रवादाची निश्चित आणि सर्वमान्य अशी व्याख्या करणे अवघड आहे. एकता परंपरा आणि इतिहास ह्या बाबतचा अभिमान राष्ट्रासाठी जास्तीत जास्त त्याग करण्याची तयारी ह्या भावनेमुळेच राष्ट्रवादाची निर्मिती होते. प्रो. स्नायकर यांच्या मते राष्ट्रवाद म्हणजे इतिहासातील एका विशिष्ट कालखंडांत आढळून येणाऱ्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व बौद्धिक व्यवहारांचा परिणाम होय. राष्ट्रवाद ही अशा मानव समुदायाची मनस्विनी व भावना आहे. जो एका भौगोलिक भागात रहातो. एक भाषा बोलतो व एकाच साहित्यातून इच्छा-आकांक्षा व्यक्त करतो. ज्याला आपल्या वीरपुरूषांबद्दल आदर असतो. असा समुह बहुदा धार्मिक दृष्ट्या एक असतो.

आल्फ्रेड डी ग्राझीया यांच्या मते राष्ट्रवादामध्ये स्वदेशाबद्दलचे प्रेम आणि परकीयां बद्दलची साशंकता या दोन्हींचे एकत्रीकरण झालेले असते.

खऱ्या अर्थाने पहाता, राष्ट्रवाद म्हणजे अशी ऐतिहासिक प्रक्रिया की ज्यामुळे राष्ट्रकाचे राजकीय घटकात रूपांतर होत असते आणि कायदेशीर हक्क टिकविण्यासाठी राष्ट्र स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवीत असते.

राज्यातील जुलमी सत्तेविरुद्ध स्वत:चे हक्क टिकविण्यासाठी आणि बाह्य आक्रमणापासून आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी विशिष्ट प्रदेशातील समाजाला एकत्र ठेवणारी शक्ती अशी राष्ट्रवादाची व्याख्या केली जाते. प्रो. हॅन्स कोहन यांच्या मते 'राष्ट्रातील बहुसंख्य लोकांच्या मनात झिरपणारी आणि सर्वांच्या मनात असल्याचा दावा करणारी भावना म्हणजे राष्ट्रवाद होय.' एका विशिष्ट भू-प्रदेशात राहणाऱ्या लोकांच्या निष्ठा, भावनेला आव्हान करून केंद्रीत करण्याचे कार्य राष्ट्रवादाने केलेले असून वर्ग, जाती, धर्म ह्यामुळे पडणाऱ्या मर्यादा ओलांडून लोकांमध्ये ऐक्य निर्माण करण्यास राष्ट्रवादी विचारसरणीच कारणीभूत झालेली आढळून येते. एकदा राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण झाली म्हणजे असा राष्ट्रवादी समाज इतर समाजाचे वर्चस्व मान्य करण्यास तयार नसतो.

राष्ट्रवाद ही एक भावना आहे. ती प्रत्येकाला आपल्या देशावर प्रेम करायला शिकविते, परंतु दुसऱ्या राष्ट्राची घृणा करावयास सांगत नाही. राष्ट्रवादाच्या प्रभावामुळे प्रत्येक राष्ट्र जगात स्वत:स श्रेष्ठ मानत असते. स्वत:च्या मुलांना जपत असते. राष्ट्रवाद ही आजच्या जगातील सर्वांत महत्त्वपूर्ण धारणा आहे. राष्ट्रवादाच्या प्रसाराची साधने मुख्यत: शिक्षणसंस्था, मुद्रणालये व आकाशवाणी ही होय.

राष्ट्रवादाचा प्रसार प्रामुख्याने राष्ट्रीय तत्वावर आधारलेली घोषवाक्ये, राष्ट्रगीत, राष्ट्रीय ध्वज, राष्ट्रीय पोषाख, ऐतिहासिक स्मृती, तीर्थक्षेत्रे इत्यादी द्वारा होते.

### राष्ट्रवादाचे घटक :-

### १) भौगोलिक एकता :-

राष्ट्रवादाची भावना एखाद्या समाजात निर्माण होण्याचे महत्त्वाचे साधन म्हणजे भौगोलिक एकात्मता होय. एकाच भू-प्रदेशांवर रहाणाऱ्या जनसमुदायात आपण सर्व एक आहोत ही भावना लवकर वृद्धींगत होते. इटलीचे एकीकरण हे भौगोलिक एकतेच्या आधारावरच झाले. भारतात जरी विभिन्न जाती-जमातींचे लोक रहात असले तरी 'भारतीय' ही भौगोलिकता त्यांना एकत्र बांधून ठेवण्यास कारणीभूत ठरलेली आहे.

### २. वांशिक एकता :-

समान वंशाच्या लोकांमध्ये परस्पर आपुलकीची भावना निर्माण होऊन राष्ट्रवादी चळवळी वृद्धींगत होण्यास मदत होते. परंतु आज कोणतेही राष्ट्र एकाच वंशाच्या लोकांनी निर्माण केलेले दिसून येत नाही. राष्ट्रनिर्मितीचे एकमेव गमक वांशिक एकता हेच मानले तर आज जगातील अमेरिका, रशिया ह्या सारखे देश 'राष्ट्रे' होऊ शकणार नाही. इंग्लंडमध्ये सुद्धा वांशिक एकता आढळून येत नाही. अमेरिकेत अनेक वंशाचे लोक असले तरी त्यांनी अमेरिकन राष्ट्रवाद निर्माण केला. हे लक्षात घ्यावे लागते.

वांशिक एकता खरी किंवा काल्पनिक असली तरी तिच्यावरील श्रद्धेमुळे राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागते आणि वांशिक एकतेच्या कल्पनेतूनच भाषा, इतिहास, परंपरा, साहित्य संस्कृती यांच्या एकतेची जाणीव वाढीस लागते. हिटलरने आर्यवंश हाच जगातील सर्वश्रेष्ठ वंश असल्याचे सांगून जर्मनीची प्रतिष्ठा प्रस्थापित करण्यासाठी आर्यवंशीय जर्मनीचे राज्य निर्माण केले.

### ३. भाषिक एकता :–

एक भाषिक लोकांमध्ये एकमेकांचे विचार आणि भावना यांची देवाण–घेवाण भाषेमार्फतच करता येत असल्यामुळे त्याच्यात भावनात्मक ऐक्य लवकर प्रस्थापित होते.

राष्ट्रवादाच्या दृष्टीने भाषेचे महत्त्व मान्य होण्यासारखे असले तरी, राष्ट्रीयत्वाची तीच एक कसोटी होऊ शकत नाही. कारण भाषिक एकता असली तरच राष्ट्रीयत्व निर्माण होऊ शकते असे नाही. एकच भाषा बोलणारी अनेक राष्ट्रे असली तरी अनेक भाषा बोलणारे एक राष्ट्र असल्याचे दिसून येते. उदा. स्विर्त्झलंड, भारत.

### ४. धार्मिक एकता :–

ऐतिहासिक काळापासून समान धर्मियांमध्ये नैसर्गिकरित्या ऐक्याची भावना निर्माण होत असलेली दिसून येते. काही देशांत तर धर्म हीच राष्ट्रीयत्वाची मूलभूत आधारशीला आढळून येते. त्या देशात कितीही अंतरीक मतभेद असोत त्यांच्या एकच धर्मामुळे त्यांचे एक राष्ट्र बनलेले दिसते. याच भूमिकेतून इ.स. १९४७ मध्ये पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र निर्माण झाले. परंतु राष्ट्रीयत्वाची भावना म्हणजे धर्म असे आपणास म्हणता येणार नाही. प्रो. गार्नर म्हणतात, जरी काही परिस्थितीत धर्म हा ऐक्यास कारण ठरला तरी तोच पुढे त्याच कारणाने राज्याचे विघटनही घडवू शकतो. उदा. शिया–सुन्नी पंथ भेदाने बांगला देश पाकिस्तानातून अलग झाला.

### ५. आर्थिक समानता :–

समान आर्थिक हितसंबंधातून राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागते व त्यातून राष्ट्र निर्माण होते. उदा. स्वित्झर्लंड या देशांत निरनिराळ्या वंशाचे निरनिराळी भाषा बोलणारे लोक रहात असून केवळ व्यावसायिक समता आणि आर्थिक समानता या संबंधामुळे स्विर्त्झलंडचा उदय झालेला आहे.

### ६. सांस्कृतिक एकता :–

परंपरा, रुढी, संस्कृती इत्यादी बाबतीत साम्य असलेला समाज लवकर संघटीत होतो आणि दुसऱ्या समाजापासून वेगळा होण्याच्या प्रयत्नातून राष्ट्र निर्माण करतो. रूसो या विचारवंताने राष्ट्रीयत्वाच्या दृष्टीने रूढी आणि परंपरा ह्यांना असलेले महत्त्व प्रथमत: स्पष्ट केलेले आढळून येते.

### ७. समान राजकीय आकांक्षा :–

परकीय अमलाखाली असलेले लोक पारतंत्र्यातून मुक्त होण्यासाठी एकत्र येतात आणि त्यातून राष्ट्रवादाची भावना दृढ होते. अनेक धर्माचे, अनेक भाषा बोलणारे लोक राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याच्या दृष्टीने एकत्र येवू लागले म्हणजे राष्ट्राची निर्मिती होते. उदा. अमेरिकेतील वसाहती

राष्ट्रीयत्व ही एक आध्यात्मिक स्वरूपाची भावना आहे. समाज, वंश, धर्म, परंपरा,

भाषा, इतिहास, राजकीय आकांक्षा इत्यादी अनेक कारणामुळे ती निर्माण होते. राष्ट्रीयत्वाची भावना ही सर्वस्वी नैसर्गिक अशी नसते. फक्त त्यातील काही घटक नैसर्गिक असतात. ती सतत विकसित होत जाणारी भावना असते आणि भावनिक ऐक्य हाच राष्ट्रवादाचा व राष्ट्रजीवनाचा आधार असतो.

## राष्ट्रवादाचे प्रकार :-

### १. मानवतावादी किंवा उदारमतवादी राष्ट्रवाद

सुरुवातीच्या राष्ट्रवादाला मानवतावादी राष्ट्रवाद म्हणतात. १७-१८ व्या शतकातील लेखक व विचारवंत व्हाल्टेअर, रूसो, मॉन्टेक्सू, लॅक, जैफ, रसन इत्यादींनी राज्याच्या दैवी सिद्धांतास व सामन्तशाहीला आव्हान देवून लोकसत्ता व वैधानिक शासन पद्धतीवर भर दिला. त्यांच्या लिखाणातून मानवतावादी व उदामतवादी राष्ट्रवादाचा उदय झाला.

१९ व्या शतकात मध्यम वर्ग व व्यापारी वर्ग यांनी उदारमतवादी राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. जर्मनी, इटली या राष्ट्राचे एकीकरण याच राष्ट्रवादातून झाले. मध्यम व व्यापारी वर्गाने आर्थिक आणि राजकीय सत्ता ताब्यात घेवून, धर्म गुरूचा प्रभाव नष्ट करून या राष्ट्रवादाला महत्त्व प्राप्त करून दिले. धनवान व प्रभावी मध्यम वर्ग, शक्तीशाली शासन, खाजगी संपत्ती व खुला व्यापार ही त्यांची साधने होती. याच काळात वसाहती व साम्राज्यवादाचा प्रसार झाला.

फ्रेंच राज्यक्रांतीनंतर फ्रान्समध्ये राष्ट्रीय सरकार स्थापन झाले. या सत्तेचे स्वरूप क्रांतीकारी लोकशाहीचे होते. राष्ट्रीय हित हेच त्यांचे उद्दिष्ट होते. याच सरकारने स्वयंनिर्णयाचे तत्व प्रथम प्रस्थापित केले. राष्ट्रीयत्वाचा आविष्कार होईल, अशा सर्व गोष्टी फ्रेंच राज्यक्रांतीने केल्या. राष्ट्रीय निशाण, राष्ट्रगीत, राष्ट्रीय सण ही सर्व राष्ट्रीयत्वाची निदर्शक चिन्हे फ्रेंच राज्य क्रांतीतून निर्माण झाली. राष्ट्रीय शिक्षणाचा प्रसार करण्यात आला.

फ्रेंच राज्यक्रांती ज्याप्रमाणे आदर्श राज्यक्रांती समजली जाते. त्याचप्रमाणे तिच्यातून निर्माण झालेला राष्ट्रवादही आदर्श समजला जातो. फ्रेंच राज्यक्रांती ही उदारमतवादी राष्ट्रवादाचे उदाहरण आहे. फ्रेंच राज्यक्रांती राष्ट्रवादाची जननी आहे.

### २. आक्रमक राष्ट्रवाद :-

पहिल्या महायुद्धानंतर जागतिक शांततेसाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. व्हर्सायच्या तहानंतर इटलित फॅसिस्ट व जर्मनीत नाझीवाद उदयास आले. हिटलर व मुसोलिनी यांनी राष्ट्रवादात द्वेष, वैमनस्य निर्माण करून द्वितीय महायुद्धास प्रारंभ केला.

इतर राष्ट्रांना गुलाम करून आपल्या देशाचे साम्राज्य वाढविणे यात काही वाईट आहे असे नसून उलट अशा तऱ्हेने बलिष्टांनी दुर्बलांवर राज्य करणे हा बलिष्ठांचा नैसर्गिक हक्कच आहे असे प्रतिपादन हा राष्ट्रवाद करतो. नेपोलियनच्या स्वाऱ्यांमुळे जर्मनीमध्ये राष्ट्रीय एकीकरणाच्या प्रयत्नांना जोर आला व त्यानंतर बिस्कार्कच्या प्रयत्नांनी जर्मनीचे एकीकरण

घडून आले. या मागे राष्ट्रीय एकी जिच्यामध्ये फलद्रुप होईल अशी बळकट केंद्रवर्ती राजसत्ता यांचा उदो उदो करण्यात आला. इंग्लंड आणि फ्रान्सच्या राष्ट्र वादावर मानवाच्या नैसर्गिक हक्काच्या तत्वज्ञानाचे व विशेषत: लोकशाहीचे जे संस्कार झालेले दिसतात. तसे जर्मन राष्ट्रवादात दिसत नाहीत.

## ३. लोकशाहीवादी राष्ट्रवादी :-

१६ व्या १७ व्या शतकापासून इंग्लंड मधील लोकांनी अमेरिकेमध्ये जाऊन वसाहती स्थापन करायला सुरुवात केली. त्यांच्या मागोमाग युरोपातील अनेक देशांतील लोक अमेरिकेत येवू लागले. अमेरिकेत मुबलक जमीन मिळत असल्याने व सरंजामी वर्ग नसल्याने युरोपातील बऱ्याच गरीब लोकांनी अमेरिकेकडे धाव घेतली. निरनिराळ्या देशांतून आलेल्या या लोकांमध्ये एकोप्याची भावना निर्माण झाली.

शेती व्यवसाय करून संपन्न झालेल्या अमेरिकेतील लोकांनी व्यापार सुरू केला, लहान लहान उद्योगधंदे सुरू झाले आणि अमेरिकेत व्यापारी-कारखानदारांचा वर्ग निर्माण झाला. अमेरिकेची बाजारपेठ आपल्या हाती असावी असे त्यांना वाटू लागले. त्यामुळे त्यांना इंग्लंडच्या व्यापाऱ्यांशी आणि कारखानदारांशी झगडा करावा लागला. या लढ्याला अमेरिकन स्वातंत्र्य युद्धाचे स्वरुप प्राप्त झाले.

अमेरिकेतील मध्यम व्यापारी वर्गाला या लढ्यात यश संपादन करून अमेरिकेत आपले स्वतंत्र राष्ट्र स्थापन केले. यावरून अनेक देशांचे, अनेक भाषांचे, अनेक सांस्कृतिक परंपरा असलेले लोक आर्थिक, राजकीय व इतर परिस्थितीजन्य कारणांनी एकत्र येवून स्वत:चे राष्ट्र स्थापन करतात हे स्पष्ट होते.

## ४. एकीकृत राष्ट्रवाद :-

२० व्या शतकात या राष्ट्रवादाचा उदय झाला. दुसऱ्या महायुद्धानंतर या राष्ट्रवादाचा प्रभाव जाणवू लागला. जहाल राष्ट्रवादातून या राष्ट्रवादाची निर्मिती झाली. संरक्षणाची पूर्ण व्यवस्था, राष्ट्रशक्तीचा चिरंतन विकास व राष्ट्रीय विस्तार हे या राष्ट्रवादाचे आधार होत. हा राष्ट्रवाद घृणा व द्वेष यांच्यावर आधारित आहे. आपली प्रतिष्ठा वाढविणे, गरज असल्यास सैन्य शक्तीचा उपयोग करणे यावर हा राष्ट्रवाद भर देतो.

स्वतंत्र कर व्यवस्था आर्थिक तत्वे या राष्ट्रवादात आढळतात. मॉर्गेन्था यांनी या राष्ट्रवादास राष्ट्रीय विश्ववाद असे नाव दिले आहे. परंतु सर्वच राष्ट्रांना ही संज्ञा लागू होणार नाही. केवळ रशिया आणि अमेरिका पुरती ही संज्ञा मर्यादित आहे.

दुसऱ्या महायुद्धामुळे झालेली हानी लक्षात घेवून जागतिक शांतता टिकावी आणि आक्रमक राष्ट्रवादाला पायबंद घालावा ह्या दृष्टीने जागतिक लोकमत बदलू लागते आहे. आंतरराष्ट्रीयवादी विचारसरणीचे महत्त्व वाढत आहे. विश्व-राज्य किंवा विश्वसंघराज्य स्थापन व्हावे या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत तरीसुद्धा आक्रमक राष्ट्रवादाला अजून पायबंद बसलेला नाही.

## १.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-

**१) थोडक्यात उत्तरे द्या.**

१. प्रबोधनाचा जनक असे कोणत्या खंडाला संबोधले जाते.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

२. रॉजर बेकनने कोणती घोषणा केली होती.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

३. कोणत्या ग्रीक तत्ववेत्त्याचे तत्वज्ञान अरबी भाषेत भाषांतरीत केले गेले.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

४. मुद्रण कलेचा शोध कोणी लावला.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

५. पहिले पुस्तक कोणी व केव्हा छापले.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

६. रोमन साम्राज्याची अतिपूर्वेकडील राजधानी कोणती.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

७. युरोपियनांना नवीन जलमार्ग शोधण्याची आवश्यकता का भासली.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

८. केप ऑफ गुड होप कोणी व केव्हा शोधून काढले.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

९. कोणत्या पोर्तुगिज प्रवाशाने भारतात येण्याचा नवीन जलमार्ग शोधून काढला.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

१०. अमेरिकेचा शोध कोणी व केव्हा लावला.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

११. कोणत्या पोर्तुगिज प्रवाशाने पृथ्वी प्रदक्षिणा पूर्ण केली.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

१२. अलेक्झांडर कॅमनने कोणत्या यंत्राचा शोध लावला होता.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

१३. मानवी जीवन कशामुळे ढवळून निघाले.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

१४. लिओनार्डो–द–व्हिन्सी याच्या प्रसिद्ध कलाकृती कोणत्या.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

१५. साम्राज्यवादाची कोणतीही एक व्याख्या सांगा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

१६. उदारमतवाद म्हणजे काय ?

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

१७. राष्ट्रवाद म्हणजे काय ?

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

## २) दिर्घोत्तरी प्रश्न

१. प्रबोधनाचा अर्थ सांगून व्याप्ती स्पष्ट करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

२. प्रबोधन चळवळीची कारणे स्पष्ट करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

३. प्रबोधन चळवळीचे परिणाम सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

४. साम्राज्यवादाचे स्वरूप स्पष्ट करून विकासाची कारणे सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

५. साम्राज्यवादाचे परिणाम स्पष्ट करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

६. उदार मतवादाच्या उदयाची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

७. राष्ट्रवादाचे घटक सांगून राष्ट्रवादाचे प्रकार विशद करा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

**३) टिपा लिहा :-**

१. भांडवलशाही

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

२. समाजवादाची वैशिष्ट्ये

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

३. कार्ल मार्क्सचा शास्त्रीय समाजवाद (साम्यवाद)

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

४. उदारमतवाद

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

## १.४ सारांश :-

युरोपात १५ व्या शतकापासून प्रबोधन चळवळीची सुरुवात झाली आणि प्रबोधन चळवळीचा लवकरच जगभर प्रभाव निर्माण झाला. जगाचा आधुनिक इतिहास घडविण्यासाठी युरोपियन देशांनी पुढाकार घेतला. आधुनिक जगाचा इतिहास म्हणजेच आधुनिक युरोपच इतिहास असे समीकरण दृढ झाले.

१९ व्या शतकात युरोपच्या धर्तीवर आशिया खंडातल्या देशात प्रबोधनाला सुरुवात झाली. त्या त्या देशात साहित्य, शास्त्र, कला, तत्वज्ञान, शिक्षण, संशोधन व विज्ञान क्षेत्रांत परिवर्तन व नवनिर्मितीस प्रारंभ होऊन विविध प्रकारच्या सामाजिक व धार्मिक सुधारणा

घडून आल्या. या प्रक्रियेचा परिणाम म्हणून आशियायी देशात साम्राज्यवादाविरूद्ध जनजागृती होऊन राष्ट्रवादी चळवळीचे पर्व सुरू झाले.

प्रबोधन कालखंडात निरनिराळे भौगोलिक व वैज्ञानिक शोध लागले. प्रचलित व्यवस्थेला व संकल्पनांना धक्के देणारे विचारवंत व संशोधक पुढे आले त्यामुळे संपूर्ण युरोपखंडात नवविचारांचे वारे वाहू लागले. राजसत्ता, धर्मसत्ता, विज्ञान, अर्थव्यवस्था, तत्वज्ञान कला-वाङ्मय-साहित्य सर्वच क्षेत्रांत नव संकल्पना दृढ झाल्या. युरोपात व अमेरिकेत राष्ट्रवादी क्रांत्या घडून आल्या. अप्रगत अशा मध्ययुगाचा अंत झाला.

राजक्रांत्या आणि औद्योगिक क्रांत्या यामुळे मानवी जीवन ढवळून निघाले, नवीन विज्ञानयुगाची सुरुवात झाली. परिणामी समाज व राष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक जीवनात अमुलाग्र बदल घडून आला. बौद्धिक क्रांतीने मानवी विचार मुक्त झाला. या सर्व परिवर्तन प्रक्रियेतून आधुनिक युग अवतरले.

प्रबोधन चळवळीतूनच भांडवलवाद, वसाहतवाद, साम्राज्यवाद, समाजवाद, उदारमवाद, राष्ट्रवाद या नवनवीन संकल्पना उदयाला आल्या. त्यांच्या विचारसरणीने संपूर्ण जग व्यापले.

## १.५ पारिभाषिक शब्द :-

१. प्रबोधन - पुनर्जन्म, पुनरुज्जीवन, पुनर्बांधणी, नवनिर्मिती.

२. व्यापारी वखारी - गोदाम.

३. माग्ना चार्टा - ऐतिहासिक दस्तऐवज.

## १.६ संदर्भ सूची :-


| | |
|---|---|
| १. डॉ. जोशी पी. जी. | आधुनिक जग |
| २. डॉ. वैद्य सुमन | आधुनिक जग |
| ३. शरावती शिरगांवकर | आधुनिक युरोप |
| ४. कदम य. ना. | जागतिक घडामोडीचा इतिहास |
| ५. डॉ. साहेबराव गाठाळ | आधुनिक जगाचा इतिहास |
| ६. डॉ. भोळे भास्कर लक्ष्मण | पाश्चिमात्य राजकीय विचारवंत |
| ७. डॉ. पाटील वा. भा. | आंतरराष्ट्रीय संबंध |
| ८. रायपूरकर वसंत | आंतरराष्ट्रीय संबंध |
| ९. शैलेंद्र देवकातकर | आंतरराष्ट्रीय संबंध |
| १०. फाडीया बी. एल. | आंतरराष्ट्रीय राजनिती |
| ११. आठवले सदाशिव | आधुनिक युरोप |

# घटक २
# पहिले जागतिक महायुद्ध

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्तावना

२.२ विषय विवेचन

- २.२.१ पहिले महायुद्ध – पार्श्वभूमी व कारणे
- २.२.२ पॅरिस शांतता परिषद – १९१९
- २.२.३ महायुद्धाचे परिणाम

२.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.४ सारांश

२.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

* पहिल्या महायुद्धाची पार्श्वभूमी विशद करून कारणे स्पष्ट करता येतील.
* पहिल्या महायुद्धाच्या अभ्यासाने युरोपातील दोन गटातील राजकारणाची माहिती मिळविता येईल.
* पहिल्या महायुद्धापूर्वी युरोपातील राष्ट्रातील अस्थिरतेच्या वातावरणाविषयी परिस्थितीची माहिती होईल.
* १८७०–१९१४ या कालखंडातील आंतरराष्ट्रीय स्पर्धा व वेगवेगळ्या कराची माहिती मिळविणे.
* पहिल्या महायुद्धाची वाटचाल स्पष्ट करता येईल.
* पहिल्या महायुद्धाचे जगावरील प्रामुख्याने युरोपातील परिणामाची नोंद घेता येईल.

## २.१ प्रास्तावना

विसावे शतक हे मानवी जीवनाच्या इतिहासातील अत्यंत महत्वाचे शतक मानले जाते कारण या शतकात अनेक क्रांतीकारी घटनांनी मानवाचे जीवन अक्षरश: ढवळून निघाले.

राजकारणापासून ते समाजकारणापर्यंत अशी अनेक परिवर्तने या महायुद्धाने घडून आलीत म्हणूनच २० व्या शतकाला संघर्षाचे शतक असेच म्हटले जाते १९१४ ते १९१८ या काळात घडून आलेले हे पहिले महायुद्ध ही घटना २० व्या शतकातील दुसऱ्या दशकातील अत्यंत महत्वाची घटना मानली जाते. कारण मानव जातीच्या इतिहासातील हा पहिलाच जागतिक स्तरावरील आजपर्यंतचा सर्वांत मोठा संघर्ष ठरले या युद्धाने सर्व युरोपमध्ये अशांतता निर्माण झाली होती. पहिल्या महायुद्धामुळे संपुर्ण मानवी जीवनावर भयंकर स्वरुपाचे परिणाम घडून आलेत.

पहिल्या महायुद्धात युरोपातील २८ राष्ट्रांनी आणि साडेदहा कोटी सैन्याने भाग घेतला. सुमारे २७,००० कोटी पौंड खर्च झाला. म्हणजेच सर्व दृष्टीनी हे महाभयंकर होते. ४ वर्ष ११ महिने हे युद्ध लढले गेले. युद्धात विजयी राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांना जबाबदार धरून त्यांच्यावर जबरदस्त युद्धखंडणी लादली व युद्ध समाप्तीनंतर जबरदस्तीने वसूल केली. पराभूत राष्ट्रांवर अपमानास्पद अटी लादल्या. या महायुद्धामुळे जागतिक शांतता, सुरक्षितता व विश्वकल्याण या कल्पनाच दूर राहिल्यात त्यामुळे युद्धोत्तर समस्या सोडविण्यात मानव जातीपुढे असंख्य अडचणी निर्माण झाल्या. पहिल्या महायुद्धाचा वणवा हा राजपुत्रांच्या हत्येने भडकला. परंतु ती घटना केवळ निमित्तमात्र ठरली. युरोपीय राजकारणात ज्या अनेक घडामोडी वर्षानुवर्ष घडत गेल्या त्या सर्वांचा परिपाक म्हणजे पहिले महायुद्ध होय. युद्धाची खरी कारणे तत्पूर्वीच्या अर्ध शतकाच्या राजकारणात दडलेली होती. या युद्धांच्या भीषण छायेतून एकही राष्ट्र सुटू शकले नाही. अशा या महायुद्धाची झळ प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या जगातील राष्ट्रांना सोसावी लागली. अशा या युद्धाची कारणे कोणती होती व त्या युद्धाचे परिणाम काय झालेत हे आपण पाहणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ पहिले महायुद्ध, पार्श्वभूमी व कारणे :-

''आम्ही लढत आहो ते परिणामी जगात शांतता नांदावी आणि जर्मन जनतेसह सर्व लोक मुक्त व्हावेत म्हणून, राष्ट्र लहान असो की मोठे त्याला आणि सगळीकडच्या सगळ्या लोकांना आपल्या जीवनाचा व शासनाचा जो मार्ग पसंत असेल तो निवडण्याचा अधिकार असावा म्हणून लोकसत्तेला जगात निर्भयपणे वावरता यावे म्हणून.''

**– विड्रो विल्सन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष**

जगात आज पर्यंत लढल्या गेलेल्या महायुद्धापेक्षा पहिले महायुद्ध सर्वकष होते. जर्मनीच्या लष्करातील व नौदलातील प्रचंड सामर्थ्यवाढीमुळे इंग्लंडसारख्या अलिप्त राष्ट्राला सुद्धा आपले सैन्य व नौदल वाढविणे भाग पडले. त्यातूनच पुढे जगातील इतर राष्ट्रातही सैन्य व शस्त्रास्त्र वाढीची भयानक तीव्र स्पर्धा निर्माण झाली. एका बाजूला जर्मनी ऑस्ट्रीया हंगेरी, बलेरिया, तुर्कस्तान तर दुसऱ्या बाजूला फ्रान्स, रशिया, इंग्लंड, सर्बिया व अमेरिका होती. अशा प्रकारे युरोपीयन राष्ट्रांची दोन गटात विभागणी झाली. प्रत्यक्ष महायुद्धापूर्वी युरोपमध्ये ज्या घटना घडत होत्या, त्यांचा एक अटळ परिणाम युद्धात होणे अगदी नैसर्गिक होते.

महायुद्ध घडून येण्यापुर्वी अनेक लहान लहान लढाया झाल्यात पण त्यांचा सर्वंकष परिणाम पहिल्या महायुद्धासारखे दिसून आले नाहीत. युरोपातील प्रत्येक राष्ट्राला आपल्या महत्वाकांक्षेच्या पुर्ततेकरिता युद्ध करणे आवश्यक झाले. युरोपमध्ये परस्परांविरुद्ध अविश्वासाचे व स्पर्धेचे वातावरण निर्माण झाले. त्यातूनच पुढे प्रत्येक राष्ट्रामध्ये शस्त्रस्पर्धा वाढीस लागली. या शस्त्रस्पर्धेचा परिणाम पुढे महायुद्धात घडून आला. या महायुद्धास कारणीभूत परिस्थिती/कारणांचा आढावा खालीलप्रमाणे :-

## अतिरेकी राष्ट्रवाद :-

एकोणिसाव्या शतकात युरोपात राष्ट्रवादी भावनेची खूपच वाढ झाली होती. अमेरिकन व फ्रेंच राज्यक्रांतीतून आदर्शवादी राष्ट्रवादाला चालना मिळाली होती. परंतु एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात तो अतिरेकी व आक्रमक बनला. त्याने साम्राज्यवादी स्वरूप धारण केले. स्वत:च्या देशाला सर्वश्रेष्ठ ठरवून इतरांना कनिष्ठ मानले होते. स्वत:चा देश आर्थिकदृष्ट्या बलवान व्हावा. म्हणून आर्थिक राष्ट्रवादांचा पुरस्कार त्या देशांनी केला. त्यामुळे राष्ट्राराष्ट्रात द्वेषाची भावना वाढीस लागली. पहिल्या महायुद्धापुर्वी युरोपात राष्ट्रवादाने आत्यंतिक स्वरुप धारण केले होते. स्वदेशाभिमान याचा अर्थ परराष्ट्रांचा द्वेष असाच केला जात असे. विशेषत: जर्मन नागरिकांची अशीच मनोवृत्ती तयार करण्यात येवून त्याने फ्रान्सचा द्वेष व इंग्लंडशी शत्रुत्व केले पाहिजे. याउलट फ्रान्स, इंग्लंडमध्येही अशीच भावना रुजविण्यात आली. सर्बिया व ऑस्ट्रीया यांच्यातील राष्ट्रवादाचे स्वरुप शत्रुत्व निर्माण करणारे होते. या देशप्रेमापायीच फर्डिनंडचा खून करण्यात आला व पहिल्या महायुद्धाला सुरूवात झाली.

## वसाहती मिळविण्यासाठी स्पर्धा :-

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि पहिल्या महायुद्धापूर्वी युरोपियन राष्ट्रांमध्ये जी साम्राज्य स्पर्धा वाढीस लागली होती. ती जागतिक परिस्थिती स्फोटक करण्यास खरी जबाबदार होती. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात त्या राष्ट्रांचे झपाट्याने औद्यौगिकीकरण घडून आले. कच्चा मालाचा पुरवठा करण्यासाठी आणि पक्का माल विकत घेणाऱ्या वसाहती अधिकाअधिक मिळविण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, स्पेन, जर्मनी, इटली, रशिया इत्यादी राष्ट्रात स्पर्धा सुरू होती. ज्या राष्ट्राकडे मोठमोठ्या वसाहती ते राष्ट्र समर्थ आणि श्रीमंत बनते हे समीकरण पाहून जर्मनी व इटली ही राष्ट्रेही वसाहती मिळविण्याची धडपड करीत होती. तथापि इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रांनी जगातील बऱ्याच भूभागावर मालकी प्रस्थापित केल्यामुळे या नवोदित राष्ट्रांच्या वाट्याला फार कमी प्रदेश येत होतो. स्वाभाविक ही राष्ट्रे अशांत व संतप्त बनलेली होती. जेथे महायुद्धाची ठिणगी पडली त्या बाल्कन प्रदेशामध्ये रशिया व ऑस्ट्रीया या दोघांनाही आपापले वर्चस्व प्रस्थापित करायचे होते. त्यातूनच पहिल्या महायुद्धास सुरूवात झाली.

## आंतरराष्ट्रीय कायद्याचा अभाव :-

आज जसे राष्ट्राराष्ट्रामधील व्यवहार नियमित करणारे आंतरराष्ट्रीय कायदे आहेत तसेच कायदे हे पहिल्या महायुद्धापुर्वी नव्हते. राष्ट्राराष्ट्रांमध्ये करारमदार अस्तित्वात होते तथापि ते

कायदे मोडल्यास अगर सामर्थ्यशाली राष्ट्राने दुबळ्या राष्ट्रांवर अतिक्रमण केल्यास अन्याय झालेल्या राष्ट्राला कोणाकडे दाद मागता येत नव्हती. जे काही आंतरराष्ट्रीय संकेत अथवा परंपरा होत्या. त्याचे उल्लंघन झाल्यावर त्याचा न्यायनिवाडा करणारी कोणतीही आंतरराष्ट्रीय संघटना त्यावेळी अस्तित्वात नव्हती. प्रत्येक राष्ट्र स्वत:ला सार्वभौम आणि पटेल त्या पद्धतीने वागण्यास मोकळे रान समजत असे स्वाभाविकच आंतरराष्ट्रीय कायद्याचा अभाव असल्यामुळे पहिले महायुद्ध घडून आले.

### गुप्त करार पद्धती :-

पहिल्या महायुद्धापूर्वी फ्रान्सच्या संभाव्य आक्रमणापासून जर्मनीचे संरक्षण करण्यासाठी बिस्मार्कने १८८२ साली जर्मनी ऑस्ट्रिया-हंगेरी आणि इटली या तीन राष्ट्रांचा करार-त्रिराष्ट्र मिगकरार (Triple Alliance) घडवून आणला होता. यांचा परिणाम कालांतराने का होईना परंतू दिसून आला. फ्रान्स, इंग्लंड व रशिया ही राष्ट्रे परपरस्परांमधील हेवेदावे विसरून जर्मनीच्या आक्रमक धोरणाविरुद्ध एक झाली आणि सन १९०७ साली या राष्ट्रांचा त्रिमिगसंघ (Triple Entente) अस्तित्वात आला. याशिवाय जगातील इतर दुसरी राष्ट्रे बड्या राष्ट्रांशी इतर अनेक करारमदारांनी बांधली गेली होती. या एकमेकांना बांधून टाकणाऱ्या करारामुळे एक राष्ट्र युद्धात अडकले की दुसरेही राष्ट्र आपोआप अडकण्याची फार मोठी शक्यता निर्माण झाली होती. दुसरे असे की युरोपात हे जे संघ प्रतिसंघ निर्माण झाले होते त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात दोन लष्करी गटच तयार झाले होते. हे गट परस्परांविषयी संशयी असल्याने त्यांच्यात समजूतदारपणा निर्माण होणे अशक्य होते. त्यातूनच पहिले महायुद्ध घडून आले.

### अतिरेकी लष्करीकरण :-

पहिल्या महायुद्ध काळात युरोपातील राष्ट्राराष्ट्रात भीती आणि संशय यामुळे सर्वत्र लष्करीकरणाची जोरदार तयारी सुरू झाली होती. युरोपातील प्रत्येक राष्ट्र भूदल आणि आरमार यांची संख्या व सामर्थ्य वाढवू लागले होते. ब्रिटिश आरमाराशी जर्मन आरमाराची स्पर्धा चालली होती. तथापि जर्मनांनी एक जहाज बांधले की ब्रिटिश दोन जहाजे बांधत. महायुद्धापूर्वी मध्यवर्ती राष्ट्रांकडे १२,३९,००० सैन्य होते. तर फ्रान्स आणि रशिया यांच्याकडे ५०,७०,००० आणि जर्मनी आणि ऑस्ट्रीयाकडे ३३,५८,००० इतके प्रचंड लष्कर राखीव म्हणून तयार केले होते. युरोपातील इतर राष्ट्रांचे लष्करी बळही असेच वाढले होते. लष्कराची ही वाढ आपल्या देशांच्या सुरक्षिततेसाठी आहे. असे प्रत्येक देशांच्या सरकारचे म्हणणे होते. तथापि या लष्करीकरणातूनच सर्वांचीच सुरक्षा धोक्यात आली. त्यातूनच त्या देशातील लष्करी सेनानींनाही महत्व प्राप्त झाले व त्यांच्या त्या देशांच्या राजनितीवर पगडा बसू लागला. युद्धाची साधने तयार करणाऱ्या कारखानदारांनीही युद्धाच्या भावना कशा भडकतील यासाठीच प्रयत्न केलेत. कारण युद्ध सुरू झाल्यास त्यांचा धंदाही तेजीत चालणार होता. अशा प्रकारे अतिरेकी लष्करीकरणातूनच पहिले महायुद्ध सुरू झाले.

### युरोपातील वृत्तपत्रांचा विषारी प्रचार :-

युरोपमधील वातावरण दूषित करण्यास वर्तमान विषारी प्रचार कारणीभूत ठरला. जागृत

लोकमत तयार करण्याच्या बाबतीत वृत्तपत्रांची कामगिरी मोलाची असते. तथापि वृत्तपत्रांनी ही कामगिरी जबाबदारीने व संयमाने पार पाडायची असते. पहिल्या महायुद्धापूर्वी युरोपातील वृत्तपत्रे अतिरेकी राष्ट्रवादांच्या आहारी जावून आपापल्या देशातील लोकमत युद्धाला अनुकूल बनवत होती. प्रतिस्पर्धी राष्ट्रांसंबंधी विकृत व अतिरंजीत बातम्या देवून वृत्तपत्रांनी आपल्या वाचकांच्या भावना भडकविण्याचा केलेला मोठा प्रयत्न युद्धाच्या वातावरण निर्मितीसाठी पोषक ठरला.

## इंग्लंड व जर्मनी यांची स्पर्धा :–

एकोणीसाव्या शतकात इंग्लंड हे युरोपातील औद्योगिक दृष्ट्या पहिल्या क्रमांकाचे राष्ट्र होते. परंतु आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सन १८८० नंतर जर्मनी हे राष्ट्र इंग्लंडशी स्पर्धा करू लागले. जर्मनीच्या औद्योगिक प्रगतीचा वेग मोठा होता. त्याचे तंत्रज्ञानही प्रगत होते. परिणामी जगातील अनेक देशात जर्मन मालाची मागणी सतत वाढत चालली. ती इतकी वाढली की खुद्द इंग्लंडमध्येही जर्मन मालाची मागणी वाढू लागली होती. त्यामुळे इंग्लंडला जर्मनीच्या या प्रगतीबद्दल भीती वाटत होती. याच सुमारास इंग्लंडने पुढे केलेला मैत्रीचा हात जर्मनीने नाकारला एवढेच नव्हे तर ब्रिटीश आरमाराच्या तोडीचे आरमार बांधावयास सुरूवात केली. स्वाभाविकच इंग्लंड व जर्मनी यांच्यातील संघर्ष वाढत गेला. त्यातूनच पहिले महायुद्ध घडून आले.

## कैसर विल्यमची महत्वाकांक्षा :–

जर्मन सम्राट कैसर विल्यम दुसरा यांची महत्वाकांक्षा पहिल्या महायुद्धास बऱ्याच प्रमाणात कारणीभूत ठरली व हे महायुद्ध कैसर विल्यम दुसरा यांच्या आत्यंतिक महत्वाकांक्षेतूनच घडून आले होते. तो महत्वाकांक्षी, तापट, हट्टी, अहंकारी होता. जगात जर्मनी एक सामर्थ्यशाली राष्ट्र बनले पाहिजे अशी त्यांची इच्छा होती. जर्मनी सर्वश्रेष्ठ व्हावे किंवा नष्ट व्हावे असे तो म्हणत असे. इंग्लंड सारख्या श्रेष्ठ आंतरराष्ट्रीय दर्जाचा त्याला हेवा वाटत होता. असा दर्जा मिळवून सर्व जगात जर्मन राष्ट्र श्रेष्ठ व प्रबळ व्हावे ही त्यांची महत्वाकांक्षा होती. ही महत्वाकांक्षा पूर्ण करायची असेल तर इंग्लंडशी संघर्ष अपरिहार्य आहे. मग त्या संघर्षात जर्मनीचा पराभव झाला तरी चालेल असे त्यांचे मत होते. स्वाभाविकच इंग्लंडशी मैत्री नाकारून कैसरने त्यांच्याशी शत्रुत्व चालू ठेवले. जर्मनीचा उदय झाला तेव्हा त्यांच्याजवळ आरमार फारसे नव्हते. परंतु पहिल्या महायुद्धापर्यंत महत्वाकांक्षी कैसरने जर्मनीचे आरमार जगातील नंबर दोनचे आरमार बनविले. त्यातूनच महायुद्धास आवश्यक ती परिस्थिती निर्माण झाली.

## युरोपातील वंशवाद :–

एकोणिसाव्या शतकात युरोपात अनेक प्रदेशातील वंशामध्ये राष्ट्रवादाचा फैलाव होवून काही वंशामध्ये वंशश्रेष्ठत्वाची भावना निर्माण झाली होती. उदा. ब्रिटिश, जर्मन, इटालियन, फ्रेंच इत्यादी लोकांना आपण वांशिकदृष्ट्या श्रेष्ठ आहोत असे वाटत होते. विशेषत: ब्रिटिश आणि जर्मन या दोन समाजांना इतर वंशावर अधिकार गाजविण्याचा आपणास जन्मसिद्ध हक्क आहे असे वाटत होते. याशिवाय युरोपात स्लाव बल्गर्स, पोलीथ इत्यादी वंशाच्या

लोकांनाही युरोपात आपले असे वैशिष्ट्यपूर्ण स्थान असावे असे वाटत होते. युरोपाशिवाय तुर्कस्थान व जपान या देशांमध्ये ही वंशवाद जागृत झाल्याचे दिसून येत होते. परिणामी जगातील अनेक वंशवादानी आंतरराष्ट्रीय राजकारण गुंतागुंतीचे व स्फोटक करून टाकले होते. त्यातूनच महायुद्ध घडून आले.

**तात्कालिक कारण :–**

सर्बिया व ऑस्ट्रीया यांच्यातील संघर्ष शिगेला पोहोचला होता. स्लाव्ह वंशीयाचे एक राष्ट्र बनविण्याच्या उद्देशाने गुप्त संघटना स्थापन करण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी ब्लॅक हॅन्ड ही संघटना जिंकू किंवा मरू या विचाराने दहशतवादी कृत्ये करित होती. या संघटनेने बोस्नीयांच्या गव्हर्नरला ठार करण्याचा कट रचला होता. परंतु ऑस्ट्रीयाचा युवराज एक समारंभ आटोपून परत येत असताना २८ जून १९१४ रोजी आर्च ड्यूक फर्डिनंड व त्याची पत्नी सौफिया यांच्यावर गोळ्या झाडल्या. या भयंकर खुनाची बातमी वाऱ्यासारखी युरोपभर पसरली. सर्व बड्या राष्ट्रांनी या घटनेचा निषेध केला. परंतू पुढे युरोपातील या घटनेने महायुद्ध घडून येण्यास खूपच महत्वाची भर घातली. या सर्व परिस्थितीतूनच व वरिल कारणातूनच २८ जुलै १९१४ रोजी सर्बिया विरुद्ध युद्ध जाहीर केले व पहिल्या महायुद्धास सुरुवात झाली.

सर्बियातील स्लाव्ह वंशीय लोकांचे संरक्षण करण्याची आपली जबाबदारी आहे असे रशियाला वाटत होते. त्यासाठी रशियाने सर्बियाला मदत करण्यासाठी हालचाली सुरू केल्यात, रशियाने सर्बियांच्या सीमेवर आपल्या फौजा पाठविल्यत, जर्मनीने रशियाला आपल्या फौजा सर्बियन सीमेवरून माघारी घेण्यास सांगितले. रशियाने जर्मनीला कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे १ ऑगस्ट १९१४ रोजी रशिया विरुद्ध युद्ध पुकारले. जर्मनीने फ्रान्सलाही धडा शिकविण्यासाठी बेल्जियममधून फ्रान्समध्ये सैन्य पाठविण्याचे ठरविले. बेल्जियमच्या तटस्थतेचा भंग होण्याची जी वेळ आली. त्यावेळी इंग्लंड बेल्जियमच्या मदतीला धावून आला. अशा रितीने इंग्लंडने युद्धात भाग घेतला. पहिल्या महायुद्धाला सुरूवात झाल्याबरोबर इंग्लंड–फ्रान्स–रशिया यांच्याविरुद्ध ऑस्ट्रीया जर्मनी असे गट निर्माण झालेत. तुर्कस्थान जर्मनीला जावून मिळाला. जपान इंग्लंडच्या गटात सामील झाला. इटलीने त्रिपुरी संघाचा त्याग करून इंग्लंड फ्रान्स यांच्याशी युती केली. पहिल्या जागतिक महायुद्धात हळुहळू युरोपातील बहुतेक सर्व राष्ट्रे ओढली गेली. त्यामुळेच या पहिल्या महायुद्धाला जागतिक स्वरुप प्राप्त झाले.

**गोषवारा = ३**

**पहिले महायुद्ध : पार्श्वभूमी व कारणे**

* पहिल्या महायुद्धाचे बीजारोपण आर्थिक साम्राज्यवादात
* युरोपियन राष्ट्रांची विभागणी दोन गटात
* अतिरेकी शस्त्रास्त्र स्पर्धेतून युरोपात अविश्वासाचे वातावरण

**कारणे :**

* अतिरेकी राष्ट्रवाद
* वसाहती मिळविण्यासाठी स्पर्धा
* आंतरराष्ट्रीय कायद्याचा अभाव
* गुप्त करार पद्धती
* अतिरेकी लष्करीकरण
* युरोपातील वृत्तपत्रांचा विषारी प्रचार
* इंग्लंड व जर्मनी यांच्यातील स्पर्धा
* कैसर विल्यमची महत्वाकांक्षा
* युरोपातील वंशवाद
* तात्कालिक कारण

## २.२.२ पॅरिस शांतता परिषद १९१९

११ नोव्हेंबर १९१८ रोजी महायुद्ध समाप्त होवून ४ वर्षापेक्षा जास्त काळ चाललेल्या युद्धाची अखेर झाली. जर्मन सेनापती फील्ड मार्शून हिंडेनबुर्ग याने दोस्त राष्ट्रांचा सेनापती फो यांच्याकडे शरणागती पत्करून युद्धबंदी तहनाम्यावर स्वाक्षरी केली. ३५ कलमे असणाऱ्या या युद्धबंदी तहनाम्यातील करारात काही प्रमुख अटी होत्या.

१. जर्मनीने जिंकलेल्या सर्व प्रदेशावरील आपला हक्क सोडावा.
२. १४ दिवसाच्या आत आपल्या सर्व फौजा बेल्जियम फ्रान्स लक्झेबर्ग आल्सेस व लॉरेन्सच्या प्रदेशातून काढून घ्याव्यात.
३. जर्मनीने आपल्या ताब्यातील युद्धसाहित्य दोस्त राष्ट्रांच्या हवाली करावे.
४. रशिया बरोबर केलेला ब्रेस्टलिटोव्हस्कचा तह रद्द करावा.

पहिल्या महायुद्धात जर्मनी व त्यांच्या मित्र राष्ट्रांचा पराभव झाला होता. युद्धोत्तर शांतता स्थापन करण्यासाठी व युरोपचे भवितव्य ठरविण्यासाठी युद्धात भाग घेतलेल्या सर्व राष्ट्रांची शांतता परिषद पॅरिस येथे १८ जानेवारी १९१९ रोजी भरली. एकंदरीत ३२ राष्ट्रांच्या प्रतिनिधींना आमंत्रणे पाठविण्यात आली होती. प्रदेश वाटणीच्या प्रश्नांवरून जी परिषद भरविण्यात आली. तिलाच पॅरिस परिषद असे म्हणतात. या परिषदेचे खरे सुत्रधार अमेरिकेचे अध्यक्ष विड्रो विल्सन, ब्रिटनचे पंतप्रधान लॉईड जॉर्ज, फ्रान्सचेक्लेमेन्सो व इटलीचे ऑर-लॅडो या चौघांनी सर्व तपशील ठरविला. पॅरिसच्या शांतता परिषदेपूर्वी युद्ध थांबविण्याचे शांततेचे प्रयत्न केले गेले होते. फेब्रुवारी १९१६ मध्ये अमेरिकेचे अध्यक्ष विड्रो विल्सन यांनी तडजोडीसाठी आंतरराष्ट्रीय परिषद भरविण्याबाबतची सूचना जर्मनीला केली होती. पण जर्मनीने त्याकडे लक्ष दिले नाही. त्यानंतर कौसरने १२ डिसेंबर १९१६ रोजी दोस्त राष्ट्रे व

गट्टीराष्ट्रे यांच्यात संधी घडवून आणण्याचे अमेरिकेस आवाहन केले होते. परंतु दोस्तांनी जर्मनीचे आवाहन फेटाळले. जर्मनीने विल्सनच्या १४ तत्वावर आधारित शस्त्रनिर्मिती काही प्रमाणात कमी करण्याचे धोरण स्वीकारले व १४ तत्वांवर शांतता तह केला जावा अशी जर्मनीची अपेक्षा होती.

## प्रेसिडेंट विल्सनची चौदा कलमे/तत्वे :

विल्सनने शांततेचा शेवटचा प्रयत्न करण्याच्या उद्देशाने आपली सुप्रसिद्ध चौदा कलमी योजना ८ जानेवारी १९१८ रोजी जाहीर केली. या चौदा कलमांमध्ये काही मूलभूत तत्वांचा समावेश असल्यामुळे जागतिक शांततेच्या प्रयत्नात या चौदा कलमांना विशेष महत्व दिले जाते ती चौदा कलमे :-

१. जर्मनीने व्यापलेले सर्व प्रदेश मुक्त करणे.

२. फ्रान्सला अल्सेस व लॉरेन परत देणे.

३. पोलंडला स्वातंत्र्य समुद्र प्रदेशासह देणे.

४. इटली व बाल्कन राष्ट्रांची पुर्नरचना करणे.

५. वसाहती संबंधीचे तंटे मोकळ्या मनाने व निपक्षपाती भूमिकेतून सोडविणे.

६. ऑस्ट्रीया हंगेरी यांच्या प्रदेशांची राष्ट्रीयत्वाच्या तत्वावर पुन्हा मांडणी करणे.

७. समुद्रावर सर्वांना सारखेच संचार स्वातंत्र्य देणे.

८. गुप्त करारमदाराचे धोकेदायक व्यवहार बंद करणे.

९. आर्थिक अडसर दूर करणे.

१०. शस्त्रकपात चालू ठवणे.

११. सर्व राष्ट्रीय स्वयं निर्णयाचा हक्क मान्य करणे.

१२. रशियातून दोस्त राष्ट्रांनी आपले सैन्य काढून घ्यावे.

१३. आंतरराष्ट्रीय व्यापाराला बंधनकारक असे कर व जकाती काढून टाकणे.

१४. आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करणे.

## परिषदेतील महत्वाच्या व्यक्ती :

### १. फ्रान्सचा पंतप्रधान –क्लेमेन्शू :-

पहिल्या महायुद्धातील योगदानाबद्दल क्लेमेन्शूला परिषदेचे अध्यक्षपद देण्यात आले होते. अतिशय धूर्त व तीक्ष्ण बुद्धीचा अतुलनीय धैर्य, धूर्तपणा अनुभव चिकाटी व प्रचंड आत्मविश्वास यामुळे पराभवाच्या छायेत असणाऱ्या व शरणागतीची भाषा बोलणाऱ्या फ्रान्सला त्याने जर्मनीपुढे निर्धाराने उभे केले. फ्रान्सचा वाघ म्हणून तो ओळखला जात असे. आपल्या देशाचे नेमके हित कसे साध्य करावे हे तो पूर्णपणे जाणत होता.

### २. अमेरिकेचे अध्यक्ष विल्सन :–

परिषदेतील सर्वांत महत्वाची व्यक्ती म्हणून विल्सनकडे पाहिले जाते. आदर्शवादी स्वत:च्या न्यायबुद्धीवर पुरेपुर विश्वास असलेला लोकशाहीचा पुरस्कर्ता व्लिसन या परिषदेचे भूषण होते. जगात शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापना करावी ही त्यांची आग्रही भूमिका होती.

### ३. इंग्लंडचे पंतप्रधान लाईड जॉर्ज :–

लॉईड जॉर्ज हे वयाने लहान असूनही या परिषदेवर त्यांचा प्रभाव होता. इंग्लंडचा पंतप्रधान असलेली ही व्यक्ती विल्सन इतकीच लोकशाहीवर प्रेम करणारी ओवशपुर्ण वक्तृत्व शैलीची मुरब्बी मुत्सद्दी असलेली होती. स्वत: उदारमतवादाचा पुरस्कर्ता असूनही जर्मनी विरुद्ध सुडाने पेटलेल्या लोकमतापुढे त्याला खाली मान घालावी लागली.

### ४. इटलीचे पंतप्रधान ऑरलॅडो :–

विद्वता, वक्तृत्व व कायद्याचे ज्ञान असूनही या परिषदेवर ऑरलॅडो यांना विशेष प्रभाव पाडता आला नाही. याने अत्यंत संकुचित वृत्तीने आपल्याच देशांचे हित साध्य करण्याचा प्रयत्न केला.

### पॅरिस शांतता परिषदेचे कामकाज :–

फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे फ्रान्सचे अध्यक्ष रेमंड पाईनकेअर यांनी १८ जानेवारी १९१९ रोजी केले परिषदेचे अध्यक्ष जॉर्जीक्लेमेन्थू हे होते. परिषदेचे कामकाज एप्रिल अखेरपर्यंत चालले तहाचा कच्चा मसुदा जर्मन शिष्टमंडळाच्या हाती ७ मे रोजी सोपविला क्लेमेन्शूने या तहावर त्वरित निर्णय घेण्यासंबंधी जर्मनीला कळविले. जर्मनीने २८ जून १९१९ रोजी ज्या ठिकाणी बिस्मार्कने आपला विजय १८७१ साली जाहीर केला होता त्याच व्हर्सायच्या राजवाड्यातील ऐतिहासिक आरसे महालात तहावर स्वाक्षरी केली म्हणून त्यास व्हर्सायचा तह असे म्हणतात. तसेच ऑस्ट्रीयाशी सेंट जर्मेनचा तह १० सप्टेंबर १९१९ हंगेरीशी ट्रायनॉनचा तह ४ जून १९१९ बल्गेरियाशी नियालीचा तह २७ नोव्हेंबर १९१९ तुर्कस्थानशी सेंव्हर्सचा तह १० ऑगस्ट १९२० असे वेगवेगळे तह करण्यात आले.

*** पॅरिसच्या तहाची प्रमुख कलमे :– पॅरिसच्या तहात १५ विभाग व ४४० कलमे असून सुमारे २० पेक्षा जास्त परिशिष्ठे त्यात जोडलेली आहेत.**

### अ. प्रादेशिक पुनर्रचना :–

१. फ्रान्सला अल्सेस लॉरेन हे प्रदेश परत देण्यात आले.

२. कील कालव्यांचे निलष्करीकरण करण्यात येवून तो सर्वांना खुला करण्यात आला.

३. ऱ्हाईत लॅंडचे निर्लष्करीकरण केले व दोस्त राष्ट्रांचे सैन्य या प्रदेशात ठेवण्याची परवानगी देण्यात आली.

४. आंतरराष्ट्रीय महत्वाची जर्मन बंदरे रेल्वेमार्ग व जलमार्ग यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी आंतरराष्ट्रीय मंडळ नियुक्त करण्यात आले.

५. जर्मनीकडे हॉल्टेन व दक्षिण स्लेसविंग हे प्रांत देण्यात आले.

६. विस्तुला नदीच्या मुखावरील डॅझिग हे मुक्त बंदर करण्यात येवून त्याचे नियंत्रण आंतरराष्ट्रीय मंडळाकडे सोपविण्यात आले.

७. हंगेरीचा प्रदेश वेगळा करण्यात आला पण त्यांचा बराचसा प्रदेश हा युगोस्लाव्हिया व रुमानिया यांच्यात सामील करण्यात आला.

८. ऑस्ट्रीयाचा आकार हा लोकसंख्येच्या दृष्टीने खूपच लहान करण्यात आला.

९. सर्बिया मॉन्टेनिग्रो, बोस्नीया, हर्जेगोविना, क्रोशिया व डाल्मेशिया या प्रदेशांचे मिळून युगोस्लाव्हिया हे नवीन राष्ट्र निर्माण करण्यात आले.

१० लक्झम्बर्गला स्वातंत्र्य देण्यात येवून बेल्जियम आणि लक्झेबर्ग यांना तटस्थ राष्ट्रांचा दर्जा देण्यात आला.

११. इटलीत टायरोल देण्यात आला.

### ब. जर्मन वसाहती :–

जर्मनीच्या आफ्रिका व आशिया खंडातील वसाहती काढून घेण्यात आल्या त्याचप्रमाणे मोरोक्को सयाम आणि चीनमध्ये जर्मनीचे आर्थिक हक्क नष्ट करण्यात आले. तुर्कस्थानच्या वर्चस्वाखालील प्रदेशही काढून घेण्यात आले. काढून घेतलेले सर्व प्रदेश राष्ट्रसंघाच्या आज्ञांकित योजनेकडे सोपविण्यात आले.

### क. युद्ध खंडणी :–

जर्मनीने नागरी मालमत्तेची पुर्नस्थापना करून उद्ध्वस्त प्रदेशांचे पुर्नवसन करावे. त्याचप्रमाणे युद्धात कामी आलेल्या वीरांच्या विधवांना निवृत्तीवेतन जर्मनीने द्यावे. युद्धखंडणीची रक्कम व आदा करण्याची पद्धत ठरविण्यासाठी एक मंडळ नेमण्यात आले. पहिल्या महायुद्धास जर्मनीच जबाबदार आहे असे ठरवून जबर युद्धखंडणी जर्मनीवर लादली.

### ड. शस्त्रास्त्र कपात :–

जर्मनी पुन्हा आक्रमण करण्यास तयार होवू नये म्हणून जर्मन सैन्यसंख्या एक लाखापर्यंत ठेवण्यात आली. शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर कडक नियंत्रण ठेवण्यात आले. लष्करी अधिकाऱ्यांची संख्याही कमी करण्यात आली. सक्तीचे लष्करी शिक्षण रद्द करण्यात आले. जर्मन नौदल बऱ्याच प्रमाणात कमी करण्यात येवून जर्मनीला पाणबुड्या ठेवण्यास बंदी घालण्यात आली. खडे सैन्याबाबत ऑस्ट्रीयास तीस हजारपर्यंत, हँगेरीस पस्तीस हजारापर्यंत व बल्गेरियास वीस हजारापर्यंत मर्यादा ठेवण्यात आली. महायुद्धातील सर्व शत्रु–राज्यातील सक्तीचे लष्करी शिक्षण रद्द करण्यात आले.

### इ. राष्ट्र संघ :–

या तहाच्या शेवटी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी राष्ट्रसंघ ही आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याविषयी एक कलम घालण्यात आले.

### * शांतता तहाचे महत्व :-

पॅरिसच्या शांतता तहावर कठोर टीका झाली असली तरी काही मूलभूत तत्वाचा उदय या तहामुळे झाला. राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचे तत्व प्रथमच उपयोगात आणल्यामुळे युरोपातील अनेक छोट्या जमातींना राष्ट्रे-राज्ये मिळाली. परकीय जोखंडापासून ही जनता स्वतंत्र झाली. तसेच अविकसित देशांचा विकास करण्याचे पहिले पाऊल देखील या योजनेमुळे टाकले गेले. शेवटी अत्यंत महत्वाची गोष्ट म्हणजे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता निर्माण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय अशा राष्ट्रसंघाची ही स्थापना या शांतता तहामुळे झाली. सहकार्य व सहजीवन सामोपचाराने व तडजोडीने शक्य आहे. हे जागतिक तत्व या संघटनेच्या स्थापनेमुळे उदयास आले.

## २.२.३ महायुद्धाचे परिणाम

सन १९१४-१८ या दरम्यान जगात पहिले महायुद्ध घडून आले. या युद्धात जगातील २८ देशांनी भाग घेतला. या युद्धामुळे जगाचा चेहरा मोहराच बदलून गेला. या युद्धात फार मोठ्या प्रमाणात जीवित आणि वित्तहानी झाली. तसेच त्यांचे जुन्या व्यवस्थेवर दूरगामी परिणाम घडून आलेत. अशा या भयंकर विनाशकारी महायुद्धाचे जगावरील परिणाम दीर्घकालीन स्वरुपाचे घडून आलेत या युद्धाने जगाचे अपरिमित नुकसान तर केलेच परंतु भविष्यातील हुकूमशाहीची आणि द्वितीय महायुद्धाची पायाभरणीही केली. विजयी आणि पराभूत राष्ट्रांना या महायुद्धाच्या घातक परिणामांना सामोरे जावे लागले. सामाजिक दृष्ट्या तर या युद्धाचे अत्यंत घातक परिणाम आपल्याला दिसून येतात. साऱ्या जगाची या युद्धाने घडीच विस्कटीत करून टाकली. महायुद्धाच्या रणक्षेत्रापासून हजारो मैल दूर असणाऱ्या राष्ट्राला व त्यातील निरपराध नागरिकांनाही या युद्धाच्या घातक परिणामांना सामोरे जावे लागले. त्या विनाशकारी महायुद्धाचे परिणाम -

### * जीवित आणि वित्त हानी :-

पहिल्या महायुद्धात प्रचंड प्रमाणात जीवित व वित्तहानी घडून आली. प्रचंड मनुष्य संहार घडून आला. ३० दशलक्ष सैनिक ठार झालेत. युद्ध सुरु असताना दररोज ६ हजार सैनिक मारले जात होते. तसेच महायुद्धात २० दशलक्ष सैनिक अपंग अथवा जबर जखमी झालेत. सैनिक व्यतिरिक्त निरनिराळ्या देशातील युद्धात मरण पावलेल्या नागरिकांची संख्याही लाखांच्या घरात होती. युद्धात मारल्या गेलेल्या एकूण सैनिकांची संख्या २७ लाखाहून अधिक होती. युद्धामध्ये भाग घेतलेल्या राष्ट्रांची, लष्करी साहित्याची, शहरांची, खाणीची, कारखान्याची प्रचंड नासधूस झाली. युद्ध सुरु असताना दर तासाला १० दशलक्ष डॉलर्स संपत्तीचा चुराडा होत होता. एवढी प्रचंड मनुष्य शक्ती व संपत्ती जगातील राष्ट्रांनी आपापल्या जनतेच्या कल्याणासाठी वापरली असती तर मानवाचे जीवन किती पटीने सुखी झाले असते. उदाहरणार्थ या संपत्तीच्या जोरावर युरोपातील व अमेरिकेतील सर्व शहरातील निवासस्थाने अद्ययावत करता आली असती. लाखो माणसांचे रोगराईपासून व दुष्काळापासून त्यांचे प्राण वाचविता आले असते. परंतु तसे न होता प्रचंड प्रमाणात जीवित व वित्तहानी घडून आली.

### * शस्त्रास्त्र निर्मितीला चालना मिळाली :-

महायुद्ध संपल्यानंतर या काळातील जगातील युद्धखोर राष्ट्रानी आपआपल्या देशातील शास्त्रज्ञांना व संशोधकांना युद्धसाहित्याच्या संशोधनाच्या कामाला जुंपले अधिकाधिक मनुष्यसंहार करणारी शस्त्रे संशोधक तयार करू लागलेत. तोफखान्याच्या निर्मितीत जर्मनीने एवढी प्रगती केली की त्यांचे सैनिक सत्तर मैल अंतरावरून पॅरिस शहरावर हल्ले करू शकत होते. तसेच विमाने रणगाडे विषारी वायू जहाजे बुडविणाऱ्या विनाशकारी यांच्या तंत्रात सतत सुधारणा होत गेल्या. अशा साधनाचा प्रतिकार करणारी तंत्रेही शोधून काढण्यात आली. पहिले महायुद्ध हे पारंपरिक शस्त्रांनी लढले गेले नाही. मानवाने विज्ञानास आपल्या मदतीस घेतल्याने तो आपल्याच बांधवाचा प्रचंड विनाश करू शकला.

### * समाजाचा नैतिक ऱ्हास झाला :

पहिल्या महायुद्धासारखे युद्ध यापूर्वी पृथ्वीवर कधीच खेळले नाही. सतत पाच वर्ष जगातील अनेक युद्ध आघाड्यांवर मनुष्यसंहार होत होता. लक्षावधी सैनिक मारले गेलेत, परंतु त्यांच्या कुटुंबियांचे जीवन उद्ध्वस्त झाले. लाखो लोकांना अपंगत्व आले. लाखो लोकांच्या घरात निराशेचा अंधार पसरला या घटना फक्त पराभूत राष्ट्रातच झाल्यात असे नाही तर विजयी राष्ट्राचे नागरिकही असेच होरपळून निघालेत. हे युद्ध सर्व स्पर्शी झाले आघाडीवरील सैनिकांप्रमाणे शेतावर राबणारा शेतकरी कारखान्यात राबणारा कामगार आणि ऑफीसात काम करणारा कारकून हेही या युद्धप्रयत्नात राबविले गेले. कारण प्रत्येक नागरिकांकडून अधिकाधिक कष्ट व त्याग यांची अपेक्षा प्रत्येक सरकार करित होते. एवढे करूनही युद्धानंतर बेकारी नैतिकमूल्यांचा ऱ्हास रोगराई व व्यक्ती स्वातंत्र्याचा नाश ही कटू फळे नागरिकांच्या पदरात पडली. एकंदरीत या युद्धाने सामान्य माणसाचे जीवन वाईट बनले. राष्ट्रांबरोबर व्यक्तीच्या वाट्यालाही आर्थिक व सामाजिक समस्या आल्या.

### * युद्धप्रचार तंत्राचा विकास :

महायुद्धानंतर आपल्या बाजूच्या राष्ट्रांतील व जगातील लोकमत सतत आपल्या बाजूने राहावे. यासाठी उभयपक्षांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केल्यामुळे युद्ध प्रचार हे एक तंत्र म्हणून उदयास आले. या तंत्राचा वापर दोन्ही पक्षांनी बेजबाबदारपणे केला. आपल्या लष्कराच्या विजयाची महती सांगत असताना प्रतिपक्षाला मोठ्या प्रमाणात बदनाम केले जाई. खोटे वृत्तांत दिले जात असे. तसेच हे युद्ध म्हणजे लोकशाही व अनियंत्रित राजसत्ता यांच्यामधील संघर्ष आहे, हा दोस्त राष्ट्रांचा प्रचार ही चुकीचा होता. हा एक महत्वपुर्ण परिणाम या महायुद्धाचा घडून आला.

### * चार साम्राज्य नष्ट झाली :-

पहिल्या महायुद्धाने जगातील रशियन, जर्मन, ऑस्ट्रियन व तुर्की अशी चार साम्राज्य नष्ट करून टाकली जर्मनीच्या ताब्यातील सर्व वसाहती काढून घेण्यात आल्या. अल्सेस-लॉरेन फ्रान्सला देण्यात आले. याशिवाय बेल्जियम डेन्मार्क, पोलंड इत्यादी राष्ट्रांनाही काही प्रदेश जर्मनीचे तोडून देण्यात आले. ऑस्ट्रिया-हंगेरी साम्राज्यातील काही प्रदेश

झेकोस्लोव्हाकिया व युगोस्लाव्हिया या राष्ट्रांना मिळाला. रशियन साम्राज्यातून तोडून काढलेल्या प्रदेशातून फिनलंड, इस्टोनिया, लॅटेव्हिया इत्यादी राष्ट्रे तयार करण्यात आली. युरोपियन, आ फ्रकन व आशियाई प्रदेशांवर असलेले तुर्की साम्राज्य पूर्णपणे बरखास्त करण्यात आले फक्त तुर्कस्तानचा प्रदेश तेवढाच तुर्कीच्या ताब्यात राहिला. पहिले महायुद्ध हे एका अर्थाने साम्राज्यासाम्राज्यां मधीलच युद्ध होते. त्यातून जागतिक साम्राज्याला जबर तडाखाच बसलेला होता.

*** जर्मनीवर झालेले परिणाम :–**

पहिल्या महायुद्धानंतर दोस्त राष्ट्रांनी जर्मनीवर व्हर्सायिचा तह लादला. व्हर्साय तह स्वीकारण्याची जर्मनीला धमकीच दिली व जर्मन सरकारने तो तह स्वीकारला. कैसर विल्यमच्या उद्दाम व आक्रमक धोरणांमुळे युद्ध भडकले असे दोन राष्ट्रांना वाटत होते. पुढे जर्मनीतून पळून जावून हॉलंडला गेला व जर्मनीमध्ये प्रजासत्ताक राज्य स्थापन झाले होते. त्यातून फ्रान्सला जर्मनीचा सूड घ्यावयाचा होता. व्हर्सायिच्या तहाने जर्मनीचा भाग प्रदेश काढून घेण्यात आला. हा प्रदेश खनिज संपत्तींनी युक्त व औद्योगिकदृष्ट्या अत्यंत प्रगत असा होता. जर्मनीचे जवळ जवळ सर्व व्यापारी व लष्करी आरमार विजयी राष्ट्रांनी हिसकावून घेतले. जर्मनीने विमाने व रणगाडे जवळ बाळगू नयेत. सक्तीची लष्करभरती करू नये. लष्कराची संख्या एक लाखापर्यंत ठेवावी. नुकसान भरपाई म्हणून ३३,०००,०००,००० डॉलर्स एकढी रक्कम द्यावी. या अपमानास्पद अटीमुळे जर्मनीची जगात मोठी अवहेलना झाली. संपुर्ण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त झाली. लोकशाहीचा प्रयोग अयशस्वी झाला आणि जर्मन लोकशाहीच्या नाशातून हिटलरसारखा हुकूमशहा उदयास आला.

*** एक बलाढ्य शक्ती म्हणून अमेरिकेचा उदय :–**

पहिल्या महायुद्धाचा सर्वांत महत्वाचा परिणाम म्हणजे जागतिक राजकारणात अमेरिकेचा एक बलाढ्य शक्ती म्हणून झालेला उदय, युद्धाच्या काळात अमेरिका तटस्थ राहिली परंतु जर्मनीच्या आक्रमक धोरणामुळे अमेरिकेला तटस्थ धोरणाचा त्याग करून दोस्तांच्या बाजूने युद्धात उडी घ्यावी लागली. अमेरिकेसारखे लोकशाहीवादी व सामर्थ्यशाली राष्ट्र दोस्तांच्या बाजूने महायुद्धात येताच युद्धाचे रंग पालटले व दोस्त राष्ट्रांना विजय मिळू शकला. अमेरिकेने महायुद्धाच्या काळात व्यापारी धोरण स्वीकारून अमेरिकेत कारखानदारी व उद्योगधंदे यांचा मोठा विकास झाला. अमेरिका हे युरोपातील अनेक राष्ट्रांना कर्ज देणारे सावकार राष्ट्र बनले. इंग्लंड व फ्रान्स ही बडी साम्राज्यवादी राष्ट्रे विजयी झाली असली तरी महायुद्धाने त्यांची शक्ती क्षीण झाली होती. साहजिकच जगाचे नेतृत्व करण्याची संधी अमेरिकेला या महायुद्धाने मिळाली व एक जागतिक महासत्ता म्हणून अमेरिकेचा उदय घडून आला.

*** रशियन राज्य क्रांतीस हातभार :–**

रशियाने दोन राष्ट्रांच्या बाजूने महायुद्धात प्रवेश केला होता. परंतु औद्योगिकदृष्ट्या रशिया हा इंग्लंड किंवा फ्रान्स यांसारखा प्रगत देश नव्हता. रशियन लष्करही अकार्यक्षम होते. परिणामी युद्धात रशियन लष्करांचा अनेक आघाड्यांवर पराभव झाला. युद्धातून घडून

येणारे सर्व वाईट परिणाम रशियन जनतेला भोगावे लागले. अनियंत्रित व जुलमी झारशाही भ्रष्ट राज्यकारभार आणि मोडकळीस आलेली अर्थव्यवस्था यांच्याबरोबर आता लष्करी पराभवाचे चटकेही रशियन जनतेला बसू लागलेत. १९१७ साली रशियन झारशाही विरुद्ध लोकांनी उठाव केला याचे प्रमुख कारण महायुद्धातील रशियाचा मोठा लष्करी पराभव हे प्रमुख कारण होते. त्यातूनच रशियात राज्यक्रांती घडून आली.

*** राष्ट्रसंघाची निर्मिती :–**

हिल्या महायुद्धात प्रचंड मनुष्य हानी व आर्थिक वित्तहानी घडून आली. अशा प्रकारचे युद्ध पुन्हा होवू नये. राष्ट्राराष्ट्रामधील मतभेद सामोपचाराने मिटविले जावेत. मग सुरक्षित राहावे यासाठी अमेरिकन राष्ट्राध्यक्ष विल्सनच्या तत्वज्ञानानुसार बड्या राष्ट्रांनी राष्ट्रसंघाची निर्मिती डेली राष्ट्रसंघाच्या निर्मितीपासूनच त्यांच्यात काही दोष राहून गेले त्यामुळे त्याला पुढे दुसरे महायुद्धही टाळता आले नाही. हे जरी खरे असले तरी अशा स्वरुपांच्या आंतरराष्ट्रीय संघटनेची जगाला अत्यंत आवश्यकता आहे ही कल्पना जागतिक राजकारणात महत्वाची वाटली व जगात कायम स्वरुपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी, राष्ट्रसंघाची निर्मिती झाली.

*** हुकूमशाही राजवटीचा उदय :–**

पहिल्या महायुद्धानंतर राजेशाही नष्ट झाल्यामुळे सर्वत्र लोकशाहीचा प्रसार झाला. अशातला भाग नव्हता. काही ठिकाणी हुकूमशाहीमुळे लोकशाहीच्या प्रगतीत अडथळा निर्माण झाला. प्रत्येक राष्ट्रांत वेगवेगळ्या समस्या निर्माण झाल्याने महागाई, बेकारी, वस्तूची टंचाई इत्यादी समस्या तेथील शासनास हाताळणे शक्य झाले नाही. त्यातून जर्मनीत हिटलर इटलीत मुसोलिनीची हुकूमशाही प्रस्थापित झाली. तसेच स्पेन, पोर्तुगाल, तुर्कस्तान येथे सुद्धा हुकूमशाह्या अस्तित्वात आल्या. रशियात कामगारांची हुकूमशाही आली हा पहिल्या महायुद्धाचा सर्वांत महत्वाचा परिणाम होय.

जगात पहिले महायुद्ध खेळले जावून जग हे सुरक्षित राहू शकले नाही. कारण पुढे अवघ्या २० वर्षांनंतर पहिल्या महायुद्धाहून भयंकर संहार करणारे दुसरे महायुद्ध सुरू झाले. याचे प्रमुख कारण म्हणजे युद्ध संपले तरी युद्धाची मूळ कारणे बड्या राष्ट्रांना नष्ट करता आली नाहीत उलट त्यांनी पराभूत राष्ट्रांना सूडाच्या भावनेने वागविल्यामुळेच भावी युद्धांच्या बीजांचे रोपण त्यांनी स्वत: आपल्या हातानी केले असेच म्हणावे लागेल.

**गोषवारा – २**

**पहिल्या महायुद्धाचे परिणाम**

- जीवीत आणि वित्तहानी
- शस्त्रास्त्र निर्मितीला चालना मिळाली
- समाजाचा नैतीक ऱ्हास झाला
- चार साम्राज्य नष्ट झाली

* जर्मनीवर झालेले परिणाम
* एक बलाढ्य शक्ती म्हणून अमेरिकेचा उदय
* रशियन राज्यक्रांतीस हातभार
* राष्ट्रसंघाची निर्मिती
* हुकूमशाही राजवटीचा उदय

## २:३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. पहिल्या महायुद्धात जगातील राष्ट्राची दोन गटात झालेल्या विभागाची नावे सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

२. पहिल्या महायुद्धाची चार कारणे सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

३. पहिल्या महायुद्धाचे चार परिणाम सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

४. पॅरिस परिषदेतील चार प्रमुख व्यक्तींची नावे सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

५. विल्सनच्या चौदा तत्वांपैकी चार कलमे कोणती.

६. पॅरिस परिषदेची उद्दिष्ट्ये सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

७. पहिल्या महायुद्धानंतर जगात झालेल्या आर्थिक महामंदीचे संकट-कारणे सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

८. पहिल्या महायुद्धाने रशियात साम्यवादी क्रांतीस हातभार लावला ते सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

## २.४ सारांश

२० व्या शतकातील दुसऱ्या दशकात युरोपात पहिले महायुद्ध घडून आले. हे महायुद्ध सर्वकष होते. या महायुद्धाची पार्श्वभूमी मागील अनेक वर्षांपासून युरोपात घडत असलेल्या घटनेतून निर्माण झाली होती. पहिल्या महायुद्धासाठी प्रामुख्याने जी कारणे कारणीभूत झालेली होती. त्यात प्रामुख्याने आत्यंतिक राष्ट्रवाद. आर्थिक साम्राज्यवाद युरोपीयन राष्ट्रांची दोन गटात झालेली विभागणी आत्यंतिक लष्करवाद शस्त्रास्त्र स्पर्धा तत्कालीन वृत्तपत्रांचा विषारी प्रचार जगात कायम स्वरुपी शांतता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेचा असलेला अभाव जर्मन सम्राट कैसर विल्यम दुसऱ्याची असलेली महत्वाकांक्षा बाल्कन समस्या, ऑस्ट्रीयाच्या राजपुत्राचा झालेला खून इत्यादी तात्कालिक कारणे यातूनच पहिले महायुद्ध घडून आले. हे महायुद्ध प्रदीर्घ काळ जगात चालले त्यातून त्यांची परिणती वाईट घडून आली.

अमेरिकेच्या युद्ध प्रवेशाने महायुद्ध काळात इटली हे राष्ट्र जर्मनीच्या गटातून बाहेर पडून इंग्लंड या दोस्त राष्ट्रांच्या गटात सामील झाले. तसेच १९१७ मध्ये रशियात झारशाही विरुद्ध क्रांती घडून आल्यामुळे रशियाने महायुद्धातून अंग काढून घेतले. त्यामुळे दोस्त राष्ट्रांची बाजू थोड्या फार प्रमाणात कमकुवत झाली. परंतु दोस्त राष्ट्रांच्या सुदैवाने व जर्मनीच्या दुर्दैवाने अमेरिकेने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने महायुद्धात प्रवेश केला. बलाढ्य अमेरिकेच्या युद्ध प्रवेशाने युद्धा निर्णायक ठरले. पहिल्या महायुद्धात शत्रु राष्ट्रांचा संपुर्ण पाडाव झाला. (जर्मनी, ऑस्ट्रीया, तुर्कस्तान व बल्गेरिया) यानंतर दोस्त राष्ट्रांनी पॅरिस शांतता परिषदेत पराभूत राष्ट्रावर प्रामुख्याने जर्मनीवर अन्यायकारक असा व्हर्सायचा तह लादला. या अन्यायी, जुलमी अशा तहाने जर्मन जनतेच्या भावना दुखावल्या गेल्या. संपूर्ण जर्मनी बेचिराख होवून जर्मनीच्या आर्थिक उत्पन्नाची सर्व साधने दोस्त राष्ट्रांनी आपल्या हातात घेतलीत. त्यातूनच दोस्त राष्ट्रांविषयी सूडाची भावना जर्मनीमध्ये निर्माण झाली व त्यामुळेच अवघ्या २० वर्षात जगात दुसरे महायुद्ध घडून आले.

*** महायुद्धाचे परिणाम :-**

जगात घडून आलेले महायुद्ध हे जवळ जवळ ४ वर्ष ११ महिने चालले या प्रदीर्घ

काळात या महायुद्धाचे जगावर अनेक वाईट व दूरगामी परिणाम घडून आलेत. त्यामध्ये प्रामुख्याने प्रचंड जीवित व वित्तहानी घडून आली. नैतीक मूल्यांचा ऱ्हास झाला. जगावर आर्थिक मंदीचे संकट आले. जर्मनी, इटली, स्पेन, पोर्तुगाल येथे हुकूमशाह्याचा उदय झाला. आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या आणि सामोपचाराच्या मार्गाने सोडविण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना पोलंड झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया फिनलँड हंगेरी इत्यादी नवीन राष्ट्रांचा उदय इत्यादी अनेक महत्वपुर्ण परिणाम पहिल्या महायुद्धाचे घडून आलेत.

## २.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

* आत्यंतिक राष्ट्रवाद : आपल्या राष्ट्रांवर प्रेम व्यक्त करताना शत्रु व प्रतिस्पर्धी राष्ट्रांबद्दल तिरस्कार व्यक्त करणारा राष्ट्रवाद
* आर्थिक राष्ट्रवाद : आर्थिक विकासाचा दृष्टीकोन ठेवून राष्ट्रवादाची केलेली मांडणी म्हणजे आर्थिक राष्ट्रवाद
* आर्थिक साम्राज्यवाद : साम्राज्यवादातून आर्थिक हितसंबंध सांभाळणे आर्थिक विकास घडवून आणणे वसाहतींचे शोषण करून आर्थिक साम्राज्यवाद विकसित करणे.
* स्लाव्ह : रशियातील एक वंश सर्बियातही या वंशाचे लोक आहेत.
* त्रिराष्ट्र करार : जर्मनी, ऑस्ट्रीया व इटली यांच्यातील करार
* त्रिमित्र करार : इंग्लंड, फ्रान्स व रशिया यांच्यातील करार
* चॅन्सलर : जर्मनीतील राष्ट्रप्रमुखाचे पद
* व्हर्साय : फ्रान्सच्या राजाचा राजवाडा असलेले गाव
* दोस्त राष्ट्र : पहिल्या महायुद्धात इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका या राष्ट्रांच्या संयुक्त युतीला दोस्त राष्ट्रे म्हणून संबोधण्यात येत असे.
* वंश : काही ठळक अशी समान शारीरिक वैशिष्टे असलेला मानवगट
* संयुक्त युरोप : नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपची पुनर्रचना करण्यासाठी मेटरनिकने संयुक्त युरोप स्थापन केला.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. पहिल्या महायुद्धाच्या कारणाची सविस्तर चर्चा करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. पहिले महायुद्ध घडून येण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली. त्यासंबंधी माहिती द्या.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. पहिल्या महायुद्धास कारणीभूत विविध घटकांचे वर्णन करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. पहिल्या महायुद्धाचे जगावर घडून आलेल्या परिणामाची चर्चा करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५. पहिल्या महायुद्धाच्या परिणामात दुसऱ्या महायुद्धाची बीजे रोवली गेली तुम्हास काय वाटते ते सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## आ) टिपा लिहा.

१. पॅरिस शांतता परिषद – १९१९

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. व्हर्साय तहाची कलमे

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. विड्रो विल्सनची चौदा कलमे

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. विड्रो विल्सन

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## २:७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. आठवले सदाशिव, अर्वाचीन युरोप, म.वि.ग्रं.मं. नागपूर - १९७५

२. शिरगावकर शरावती, आधुनिक युरोप, म.वि.ग्रं.मं. नागपूर - १९८८

३. कोलारकर शं.गो. - युरोपचा इतिहास इ.स. १७८९ ते १९४५ आनंद प्रकाशन, नागपूर - १९६७

४. वैद्य सुमन - आधुनिक जग, नागपूर - १९७६

५. वैद्य सुमन - आधुनिक जगाचा इतिहास, नागपूर - १९७६

६. कुलकर्णी अ. रा. कडके, श्री. रा. आधुनिक युरोप, देशमुख आणि कंपनी, पुणे - १९७६

७. Gooch G.P. History of Modern Europe 1878-1919

८. Hayes Caritoh J.H. Contem Porary Europe Since 1870 Macmilion co, New York-1958

९. Taylor A.J.P. - The first world war Har mondas worth - 1976

# घटक ३
# रशियन राज्यक्रांती

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्तावना

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ रशियन राज्यक्रांती

  ३.२.२ रशियातील साम्यवादी क्रांती, १९१७

  ३.२.३ लेनिन व स्टॅलीन यांची भूमिका

३.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.६ संदर्भ सूची

३.७ सरावासाठी प्रश्न/उपक्रम/क्षेत्रीकार्य


## ३.० उद्दिष्टे

आधुनिक जगाच्या इतिहासातील एक महत्त्वाची घटना म्हणून आपल्याला रशियन राज्यक्रांतीकडे पहावे लागते. दीर्घ काळापासून चालत आलेल्या जुलमी राजवटीच्या विरोधात शेतकरी व कामगारांनी एकत्र येऊन केलेला उठाव या अर्थाने रशियन राज्यक्रांतीची ओळख असली तरी साम्यवादी विचारधारेतून जगाला एक नवी दिशा देण्याचा झालेला प्रयत्न या हेतूने सुद्धा आपल्याला रशियन राज्यक्रांतीकडे पाहावे लागते. म्हणूनच प्रस्तुत प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपल्याला यातून खालील बाबी कळण्यास मदत होते.

१. रशियाची भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय पार्श्वभूमी जाणून घेत३ा येते.

२. रशियन राज्यक्रांतीच्या कारणांचा शोध घेत येतो.

३. पहिल्या महायुद्धाचा रशियाच्या समाज व अर्थकारणावर झालेल्या परिणामाचे अध्ययन करता येते.

४. रशियातील साम्यवादी विचार धारेची माहिती जाणून घेता येते.

५. रशियात इ.स. १९१७ मध्ये घडून आलेल्या राज्यक्रांतीचा सविस्तर आढावा घेता येतो.

६. राज्यक्रांतीनंतर लेनीन व स्टॅलीन यांनी रशियाच्या विकासात दिलेल्या योगदानाचा आढावा घेणे शक्य होते.

## ३.१ प्रास्तावना

इ.स. १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धाला प्रारंभ झाला. या युद्धाने जगातील वसाहतवादी देश दोन गटांमध्ये विभागले गेले. एकमेकांवर वर्चस्व मिळविण्याचे त्यांचे प्रयत्न सुरू असतांनाच त्याचे परिणाम जसे जागतिक पातळीवर दिसत होते तसे ते अंतर्गत पातळीवरही समोर आले. पहिल्या महायुद्ध ऐन मध्यात आलेले असतांना मित्र राष्ट्राच्या गटातील एका विशाल देशाला अंतर्गत प्रश्नामुळे धुमसून निघावे लागले आणि त्यातूनच इ.स. १९१७ मध्ये राशियात क्रांतीचे एक नवे पर्व सुरू झाले. इ.स. १९१७ हे वर्ष रशियातील क्रांतीवर्ष म्हणून ओळखले जाते. या वर्षी रशियात दोन क्रांत्या झाल्या. पहिली फेब्रुवारी–मार्च १९९७ ची क्रांती, तिला बुझर्वा क्रांती म्हणूनही ओळखले जाते तर याच वर्षात ऑक्टोबर १९१७ मध्ये दुसरी क्रांती झाली ती समाजवादी क्रांती किंवा बोल्शेविक क्रांती या नावाने परिचित आहे. बोल्शेबिक क्रांती ऑक्टोबर महिन्यात झाल्याने काही ठिकाणी तिचा उल्लेख ऑक्टोबर क्रांती म्हणूनही केलेला आढळून येतो. उपरोक्त नमूद या दोन्ही क्रांत्या या जरी इ.स. १९१७ मध्ये घडून आल्या असल्या तरी या क्रांतीची धग इ.स. १९०५ पासूनच सुरू झाली होती. त्यामुळे आपल्याला तिथपासून आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ रशियन राज्यक्रांती –

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला युरोपातील सर्वात मागासलेला देश म्हणून रशियाची गणना केली जात होती. प्रादेशिक दृष्ट्या अफाट पसरलेल्या रशियाचा साम्राज्या विस्तारही मोठा होता. मात्र हा साम्राज्य विस्तार सांभाळण्यास येथील राजसत्ता तेवढी सक्षम व समर्थ नव्हती. किंबहुना या अवाढव्य रशियाची शासनप्रणाली अपरिवर्तनशील व गतीविरोधी बनली होती आणि येथील सामाजिक व आर्थिक विषमता ही पराकोटीला पोहचली होती.

प्रादेशिक दृष्ट्या रशिया हे जगातील एक अफाट भूप्रदेश असलेले राष्ट्र आहे. जगातील एकूण भूमीच्या १/६ भाग एकट्या रशियाने व्यापलेला आहे. युरोपचा अर्धा आणि आशियाचा १/३ भाग रशियात सामावलेला असल्यामुळे रशिया हे जसे युरोपीय राष्ट्र आहे तसे ते आशियाई राष्ट्र म्हणूनही ओळखले जाते. रशियाच्या भौगोलिक सीमेचा वेध घेतल्यास आपल्याला असे लक्षात येते की, रशियाच्या उत्तरेला आर्क्टिक समुद्रापासून दक्षिणेला काळा समुद्र व चीनपर्यंतचा टापू सुमारे तीन हजार मैलांचा आहे. तर पूर्वेला पॅसिफिक समुद्रारपासून पश्चिमेला बाल्टिक समुद्रापर्यंतचा पूर्वपश्चिम विस्तार हा जवळपास सहा हजार मैलाचा आहे. त्यामुळे एवढ्या प्रचंड विस्तारामुळे रशियाच्या पूर्वेकडे उगवलेल्या सूर्याला पश्चिमेकडे पोहोचायला जवळपास अकार तासांचा कालावधी लागतो. थोडक्यात ज्यावेळी सूर्य पूर्वेकडील रशियाच्या ब्लादिवस्तोक येथे उगवतो, त्यावेळी पश्चिमेकडील मॉस्को येथे सायंकाळ झालेली असते. त्यामुळेच एवढ्या अफाट प्रादेशिक विस्तार असलेले हे राष्ट्र अनेक राष्टांशी जोडले गेले असून रशियाची भू–सीमा सुमारे दहा राष्टांच्या सीमेशी निगडीत झालेली असल्याचे आपणास दिसून येते.

विशालकाय प्रादेशिक विस्ताराबोबरच रशियाच्या निरनिराळ्या भागांची भूरचना व तेथील हवामान यातही पुष्कळ तफावत जाणवते. रशियाच्या उत्तरेला असलेल्या आर्क्टिक महासागरानजीकचा प्रदेश हा जवळपास वर्षभर बर्फाच्छिदित असतो. पर्यायाने तेथे काहीच उगवत नाही. त्यामुळे लोकवस्ती अत्यंत विरळ स्वरूपात असल्याचे आढळून येते. आर्क्टिक महासागराच्या प्रदेशाकडून थोडे दक्षिणेला उतरले की, बर्फाचे प्रमाण काहीसे कमी असल्याने तेथे उंच वृक्ष असलेले घनदाट अरण्ये आढळून येतात. या अरण्याच्या खाली पुन्हा दक्षिणेला सुमारे दोनशे दशलक्ष एकराचा प्रदेश हा अतिशय सुपिक व संपन्न आहे. या भूभागात रशियाचे धान्याचे कोठार म्हणून प्रसिद्ध असलेला युक्रेनचा अतिसुपिक भाग यात समाविष्ट होतो. रशियाच्या दक्षिण सीमेलगतच्या मध्य आशियाचा भाग प्रचंड उष्ण व वाळवंटी आहे. त्यामुळे विशालकाय रशियाचा जेमतेम १/३ भूभाग हा शेतीच्या लागवडीला उपयुक्त असल्याचे निदर्शनास येते. पर्यायाने अन्नधान्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी रशियाला विशेष प्रयत्न करावे लागतात.

रशियावर निसर्गाने नैसर्गिक संपत्तीची मुक्त हस्ताने जणू उधळण केली असून नद्या ही या प्रदेशाची मोठी संपत्ती आहे. येथे जवळपास एक लाख लहानमोठ्या नद्या आहेत. त्यामुळे जलवाहतूक अत्यंत सोयीची झाली आहे. जगातील सर्वात लांब ९ नद्यांपैकी चार नद्या एकट्या रशियात आहेत. वोल्गा नदी ही तर युरोपीय रशियाची जीवनदात्री मानली जाते. किंकिंबहुना तिच्या काठाकाठानेच युरोपीयन रशियातील संस्कृती बहरली आहेत.

परदेशी व्यापाराच्या दृष्टिने मात्र रशियाची भू-सीमा तेवढी सोयीची नाही. उत्तरेकडील आर्क्टिक महासागर सतत हिमाच्छादित असल्यामुळे आणि पॅसिफिक किनाऱ्यालगतच्या जलमार्गावार १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात परकीय सत्तेचे अधिपत्य असल्यामुळे रशियाच्या परदेशी व्यापारात काही प्रमाणात बाधा निर्माण झाली होती. त्यामुळे भूमध्य समुद्राकडे जाणारा जलमार्ग ताब्यात घेण्याचा रशियाने १९ व्या शतकात सतत खटाटोप केला होता.

रशियन समाजाची घडण अनेक अर्थाने वैशिष्ट्यपूर्ण आहे. येथे भिन्न वंशी, भिन्न भाषिक व भिन्न धार्मिक गट मिळून येथील समाज बनलेला आहे. रशियात जवळपास १५० प्रकारचे भिन्न राष्ट्रीय गट वास्तव्यात असून येथे मंगोल, तुर्क, ज्यू यासारखे इतर काही गट ही त्यांचे अस्तित्व टिकवून आहेत. त्यामुळे येथील समाज हा कधीही एकसंघ जाणवत नाही. प्रतिकूल हवामानामुळे येथील लोकांना उपजिविकेसाठी अपार कष्ट करावे लागत असल्याने ते शारीरिक दृष्ट्या दणकट, कणखर, कष्टाळू, खंबीर व चिवट बनले आहेत. रशियन लोक सामान्यतः शांतताप्रिय वाटत असले तरी, अन्यायाविरुद्ध लढण्याची बंडखोर्श्री वृत्ती त्यांच्यात ठासून भरलेली आहे.

### ३.२.१.१ झार वंशाचा पूर्वइतिहास

भौगोलिक दृष्ट्या अफाट पसरलेल्या रशियाचे अनुशासन झार वंशीय राजाच्या हाती होते. इ.स.च्या बाराव्या शतकात रशियातील मस्का नदीच्या काठावर असलेल्या एका लहानशा भुप्रदेशावरील मस्कोवीच्या शासनकांनी परिसरातील इतर सरदारांचे पारिपात्य करून त्यांचे वर्चस्व प्रस्थापित केल व स्वत=ला झार हा किताब लावून घेतला होता. याच झार राजवंशीय राजांनी पुढे त्यांच्या विश्वासातील सरदारांना सरंजाम देऊन त्यांच्या

अधिपत्याखालील प्रदेशात कायदा व सुव्यवस्था टिकविण्याचे त्यांना अधिकार प्रदान केले होते. इ.स. च्या सतराव्या शतकाच्या प्रारंभी पोलंडने मस्कोवीवर आक्रमण करून मस्कोवीचे राज्य जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. मात्र येथील शेतकरी व सरदारांनी एकत्र येऊन पोलीश सैन्याचा मुकाबला करून त्यांना त्या प्रदेशातून हुसकावून लावले. या घटनेनंतर इ.स. १६३१ मध्ये रोमानेव कुटुंबातील मायकेल नावाच्या मुलाला राजगादीवर बसविण्यात आले आणि तेव्हापासून १९१७ पर्यंत म्हणजेच झारची सत्ता लयाला जाईपर्यंत राजपदावर रोमानेव कुटुंबाचाच अधिकार होता.

आठराव्या शतकात रशियाला पहिला झार पीटर (१६९६-१७२५) व राणी दुसरी कॅथरीन (१७६२-१७९६) हे दोन अतिशय कर्तबगार राज्यकर्ते लाभले. या दोघांच्या कारकिर्दीत रशियाचा बराच प्रादेशिक विस्तारासोबतच भौतिक, सांस्कृतिक क्षेत्रात प्रगती आणि भरभराट झाली. पहिला झार पीटर याच्या काळात रशियाची पश्चिम सीमा ही वायव्येकडील बाल्टिक समुद्रापर्यंत व पश्चिमेला काळ्या समुद्रातील क्रीमियाच्या त्रिपकल्पापर्यंत जाऊन भिडली होती. पोलंडचा मोठा भूप्रदेश व फिनलँड हे रशियन साम्राज्यात अंतर्भूत झाले होते. याच फिनलँडच्या आखातजवळ नेवा नदीच्या किनाऱ्यावर झार पीटरने एक नवी सुंदर राजधानी स्थापन केली व तिचे पीटर्सबर्ग हे नामकरण केले.

झार पीटर व राणी दुसरी कॅथरीन यांच्यानंतर मात्र सत्तेवर आलेले झार पॉल पहिला (१७९६-१८०१), अलेक्झांडर पहिला (१८०१-१८२५), निकोलस पहिला (१८२५-१८५५), कलेक्झांडर दुसरा (१८५२-१८८१), अलेक्झांडर तिसरा (१८८१-१८९४) हे उत्तराधिकारी तेवढ्या तोलामोलाचे व क्षमतेचे नव्हते. त्यामुळे प्रशासनावर पूर्वीसारखी पकड ठेवता आली नाही. किंबहुना त्यांच्या काळात येथील शेतकरी व कामगारांचा सातत्याने छळ करण्यात आला. त्यांना सतत आर्थिक दुरावस्थेत ठेवण्याचे प्रयत्न झाले. जगात सुधारणाबादी विचारांचे वारे वाहत असतांना या वाऱ्यांना मात्र रशियात येऊ न देण्याची काळजी येथील शासकांनी घेतली होती. सुधारणावादी विचार यांना येथे उत्पन्नच होऊ देण्यात आले नाही. केवळ आपला एककल्ली राज्यकारभार चालत राहावा. याचीच काळजील या शासकांनी बहुधा घेतली होती. त्यामुळे रशियासारख्या देशाला भौगोलिक भव्यता लाभली असली तरी विकासाची भव्यता लाभलेली नव्हती. यासोबतच या कालखंडात जागतिक पातळीवर घडणाऱ्या काही घटनाही रशियाला एका वेगळ्या वळणावर नेणाऱ्या ठरल्या होत्या.

इ.स. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीनंतर युरोपात काही प्रमाणात राजकीय उदारमतवादाचे वारे वाहू लागले. त्याचा प्रभाव रशियातील बुत्रिजीवी वर्गावरही निश्चितपणे झाला होता. मात्र रशियन सम्राटांनी आपली एकाधिकार शाही अबाधित राखण्यासाठी उदारमतवादी विचार दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. पर्यायाने त्यांनी राजकीय सुधारणा संदर्भात जनतेकडून होत असलेल्या मागण्यांकडे पाठ फिरवली वा एकप्रकारे त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे पर्यावसन रशितील जनतेते असंतोष निर्माण होण्यात झाला. यासोबतच राज्यकर्त्यांनी प्रतिगामी धोरण स्विकरीत अंतर्गत सुधारणाकडे दुर्लक्ष केल्याने रशियाचा भौतिक विकास कुंठीत होत गेला.

रशियात अशाप्रकारे असमाधान व असंतोष असतांनाच इ.स. १८९४ मध्ये गादीवर आलेला दुसरा निकोलस हा अत्यंत दुबळा व अकार्यक्षम राजा होता. त्यामुळे त्याची राणी झारिना अलेक्झांद्रा हिने राज्यकारभाराची सुत्रे आपल्या हाती घेतली व राजा दुसरा निकोलस हा राणीच्या प्रभावाखाली राज्यकारभाराचे निर्णय घेऊ लगला. राणी झारिना अलेक्झांद्रा ही अत्यंत प्रतिगामी धोरण असलेली व अंधश्रद्धाळू स्त्री होती. तिच्यावर रासपुतीन नावाच्या एका धर्मगुरूचा मोठा प्रभाव होता. राणी झारिनाचा मुलाला एक असाध्य रोग जडलेला होता व या रोगातून रासपुनीतच त्याची मुक्तता करू शकेल असा तिचा विश्वास होता. त्यामुळे ती रासपुतीनच्या सांगण्याप्रमाणे वागू लागली होती. याच बाबीचा रासपुतीनने गैरफायदा घेत त्याने रशियाच्या राजकीय कार्यातही ढवळाढवळ करण्यास प्रारंभ केला होता.

इकडे रशियातील राजकीय सल्लागारांचा सल्ला डावलून राजा दुसरा निकोलस हा राणीच्या माध्यमातून रासपुतीनच्या सल्ल्यानुसार वागत असल्याने दरबारी मंडळी प्रचंड नाराज होती. त्यामुळे झार नकोलस याला बाजूला सारून एखाद्या सुयोग्य व्यक्तीला राजगादीवर बसविण्याचा विचारही काही राजकीय वर्चस्व असलेली मंडळी करू लागली होती. मात्र त्यांचा हा बेत पूर्ण होऊ शकता नाही. त्यामुळे झारची ही एककेंद्री व निरंकश सत्ता इ.स. १९१७ पर्यंत अव्याहतपणे सुरूच राहिली. मात्र या वेळेपर्यंत रशियन जनतेमध्ये मोठ्याप्रमाणात असंतोष निर्माण झालेला होता. त्याचाच परिपाक पुढे रशियात इ.स. १९०५ मध्ये निर्माण झालेल्या उठावाच्या निमित्ताने दिसून आला.

## ३.२.१.२ क्रांतीपूर्वीची आर्थिक स्थिती –

२० व्या शतकाच्या प्रारंभापर्यंत युरोपातील बहुतेक राष्ट्रांमध्ये औद्यागिककीकरणाची प्रक्रिया पूर्ण होत आली होती. इंग्लड, जर्मन, फ्रान्स आदी देशांतून भांडवलदार व कामगार यांचे हितसंबंधही निर्माण झाले होते. त्यामुळे हे दोन्ही वर्ग तेथे समाजव्यवस्थेचे नवे घटक म्हणून पुढे आले होते. यावेळी रशियात औद्यागिककीकरणास प्रारंभ झाला होता. इतकेच नव्हेतर रशियातील सरंजामदार वर्गसुद्धा उद्योगधंद्यात भांडवल गुंतविण्यास काही प्रमाणात कचरत होता. परदेशी व्यापाराबाबतही रशियाची पिछेहाटच सुरू होती. युरोपात औद्यागिककीरणाचा एक टप्पा जवळपास पूर्ण झालेला असला तरी रशियात मात्र सरंजामदार व्यवस्था कायम होती. किंबहुना या व्यवस्थेने १९०५ पर्यंत भूदास पद्धती कायम ठेवण्याचा प्रयत्न केला होता.

१५ व्या शतकात मस्कोवी राज्याच्या झारशाहीतील राजांनी आपल्या मर्जीतील सरदारांना सरंजाम दिले व त्या सरंजामांची सर्व व्यवस्था त्यांच्याकडे सोपविली. तेव्हापासून अस्तित्वात आलेली सरंजामशाही व्यवस्था रशियात इ.स.१९१७ पर्यंत तशीच चालू होती. रशियातील सरंजामदारांनी त्यांच्या अधिपत्याखालील गावात असलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबाच्या पोषणाला पुरेल एवढीच जमीन त्यांच्या अधिपत्याखाली ठेवून उर्वरीत सर्व जमीन आपल्या अधिपत्याखाली आणून त्यावर या गरीब शेतकऱ्यांना भूदासाप्रमाणे जुंपलेले होते. या लहान शेतकऱ्यांनी आपल्या मालकाच्या शेतीवर सतत काम करीत रहावे याकरिता त्यांच्यावर गाव न सोडण्याचेही बंधन घालण्यात आले होते. परिणामतः गावातील शेतकरी

आपल्या जमीनि मालकाला आणि त्याच्या जमिनीला बांधले गेले होते व त्यातून पर्यावरण भूदास म्हणून होत गेले. पुढे हीच भूदास पद्धत रशियाच्या कृषी व्यवस्थेचवे एक अविभाज्य अंग बनले.

रशियातील भूदास हे कायद्याने गुलाम नव्हते. परंतू प्रत्यक्ष व्यवहारात मात्र त्यांचे जीवन गुलामांपेक्षा अधिक दयनीय होते. या भूदासांवर मोठ्या प्रमाणात कामाची सक्ती केली जात असे. त्यांनी सरंजामदाराच्या जाचाला कंटाळून पळून जाण्याचा प्रयत्न केल्यास त्याला शोधून परत आणले जात व त्याच्याकडून अधिक कष्टाची कामे करवून घेतली जात. एखाद्या सरंजामदारांने वा जमीनदाराने त्याच्या अधिपत्याखाली असलेली जमीन दुसऱ्याला विकली तर त्या जमीनीवर राबणारा भूदास सुद्धा जमीन विकत घेणाऱ्या व्यक्तिचा गुलाम बनत असे. गुलामाप्रमाणे भूदासाची मुलेही आयुष्यभर भूदासच बनून राहत असत.

रशियातील या शोषित कृषी पद्धतीमुळे ग्रामीण समाज दोन वर्गात विभागला गेला होतात. एका वर्गात सधन बनलेले अल्पसंख्य अमीर उमराव, मोठे जमीन मालक होते तर दुसऱ्या वार्गत दरिद्री बनलेल बहुसंख्य भूदास होते. या दोन वागृातील आर्थिक विषमता सातत्याने वाढतच गेली होती. रशियातील एकूण लोकसंख्येच्या ९० टक्के लोक हे खेड्यात राहात होते व ९० टक्के लोकांमध्ये भूदासांची संख्या ही जवळपास ८५ टक्के होती. यावरून समाजातील एक अत्यंत मोठा वर्ग हा आर्थिक दृष्ट्या पिचलेला होता. असे आपल्या लक्षात येते.

शेतीप्रमाणे औद्योगिक व व्यावसायिक क्षेत्रातही रशिया हे युरोपातील सर्वात मागासलेले राष्ट्र होते. इ.स.१८६१ नंतर झारने उद्योग व्यवसायाला प्रोत्साहन देण्यासाठी काहीसे प्रयत्न केले. त्यासाठी काही सुविधाही उपलब्ध करून दिल्या. त्यातून हळूहळू उद्योग उभारणीला प्रारंभ झाला. सुरूवातीला लोखंड, कोळसा, खनिजतेल व इतर धातूंचे उत्खनन सुरू झाले. पुढे सुती व लोकरी कापड, ताग यांच्या गिरण्या सुरू झाल्या. त्यामुळे उपजिवीकेचे नवे साधन उपलब्ध होऊ लागले. त्याचा परिणाम असा झाला की, ग्रामीण भागातील काही लोकांनी शहराकडेवा या कारखान्यांकडे धाव घेण्यास सुरूवात केली. मात्र येथेही भांडवलदार व व्यापारी यांचा वरचष्मा सुरू राहिला व त्यातून सर्वसामान्य कामागर पिळला जाऊ लागला. भांडवलदार कामगारांकडून १२ ते १५ तास काम करून घेत. मात्र त्याबदल्यात त्यांचे वेतन हे अत्यंत तोडके व केव्हा मिळेल याची खात्री नसे. शिवाय कामगारांवर सातत्याने बेकारीची कुऱ्हाड डोक्यावर टांगलेली होती. याकाळात भांडवलदार व व्यापाऱ्यांच्या अन्यायाविरुद्ध दाद मागण्याची कुठलीही सोय नव्हती. पर्यायाने कामगारांचे जीवन अत्यंत हलाखीचे बनत गेले. पुढे याच अन्यायग्रस्त कामगारांनी संघटित होण्याचा प्रयत्न केला. आपल्या मागण्या लावून धरण्याचा प्रयत्न केला व त्यातून कालपरत्वे दोन वर्गात संघर्षाला प्रारंभ झाला. काही प्रमाणात त्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न झाला व त्यातून असंतोषाची स्थिती अधिक गडद होऊ लागली.

### ३.२.१.३ शैक्षणिक स्थिती

शैक्षणिक दृष्ट्या रशियन शासकांनी समाजातील शेतकरी व कामगार या घटकांना

शिक्षणापासून सातत्याने दूर ठेवण्याचा प्रयत्न केला होता. तत्कालीन काळात रशियात काही प्रमाणात शैक्षणिक वातावरण तयार झाले, काही शैक्षणिक केंद्रे व विद्यापीठे स्थापन गेली असली तरी त्यात अध्यापनासाठी अन्य देशातून काही विद्वान मंडळी येत होती. शैक्षणिक केंद्रे व विद्यापीठे स्थापन गेली असली तरी त्यात अध्यापनासाठी अन्य देशातून काही विद्वान मंडळी येत होती. त्याकाळत पीटर्सबर्ग, मॉस्को, कीव, कझान येथील रशियातील विद्यापीठे नावाजलेली शिक्षण केंद्रे म्हणून पुढे आली होती. मात्र या विद्या केंद्रमध्ये केवळ धनिकांच्या मुलांनाच प्रवेश दिला जात होता. त्यामुळे उच्च शिक्षण हे धनिक वर्गापुरतेच मर्यादित झाले होते. शेतकरी व कामागरांच्या मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात सहभागी करून घेण्याचा कुठलाही प्रयत्न झारशाहीकडून झालेला नव्हता.

### ३.२.१.४ साम्यवादी विचारसरणीची पाश्वभूमी

रशियात झार राजवटीच्या काळात शेतकरी व कामगार यांच्या शोषणामुळे जो असंतोष फोफावत होता. त्या असंतोषाला खतपाणी देण्याचे किंबहुना शेतकरी व कामागर यांना स्वत्वाची जाणीव करून देण्याचे कार्य काही विचारवंतांनी त्यांच्या लेखनातून केले होते व त्याचा कालपरत्वे खूप मोठा परिणाम हा येथील जनमतावर घडून आला होता. रशियन जनतेवर प्रभाव असणाऱ्या गॉर्की, टॉलस्टॉय, डोस्कोव्हस्की, टर्जेनिव्ह या विचारवंतांनी मानवतावादी दृष्टिकोनातू लिखाण करून झारशाहीचे हिडीस स्वरूप जगासमोर आणल होते. तर कार्ल मार्क्स सारख्या समाजवादी क्रांतीकारकाने समाजाचे अर्थदृष्ट्या विश्लेषण करून एक नवीन सिद्धांतच समोर आणला. श्रम हे संपत्तीचे मुख्य कारण आहे की बाब त्यांनी मोठ्या स्पष्टतेने सांगून भांडवलशाही समजारचनेत यंत्र आणि पैसा ज्यांच्या हातात असतो, त्यांच्याच हातात समजाची सर्व सुत्रे असतात. त्यामुळे मजूरांना त्यांच्या श्रमाची योग्य किंमत मिळत नाही. असे विश्लेषण करून निर्माण झालेली संपत्ती व मजुरी ह्यांच्यात खूप तफावत असल्याचे व ती फक्त भांडवदाराच्या खिशात जात असते असा सिद्धांतच मांडला. कार्ल मार्क्स यांच्या सिद्धांतालाच मार्क्सचा अतिरिक्त मूल्यांचा सिद्धांत असेही म्हटले जाते. या सिद्धाजोंचा थोडक्यात सारांश म्हणजे मजूरांना त्यांच्या श्रमाचा योग्य मोबदला दिला पाहिजे असे त्यांना अभिप्रेत होते.

तत्कालीन कालखंउात कार्ल मार्क्सच्या या तत्त्वाज्ञानमुळे मानवी विचार विश्वात जणू एक नवीन उक्रांती निर्माण झाली होती. मानवी समाजाची जडणघडण त्यात अर्थ सबंधांना असलेले महत्त्वाचे स्थान, त्याचा राजकीय संस्थांवरील परिणाम याविषयीचा मुलगामी विचार प्रथमच कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानातील करण्यात आला होता. त्यामुळे कार्ल मार्क्सने जगाला नवीन विचारसरणी दिली होती. कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानामुळे पश्चिमात्य संस्कृती, व्यापारी नितिनियम, शासनाचे मुलभूत नियम, समाजिक संस्थांच्या मर्यादा, आंतराष्ट्रीय व्यवहाराचे नियम या सर्वांना एक मूलभूत आव्हानच मिळाले. कार्ल मार्क्सच्या तत्त्वज्ञानात सांगितलेला विरोध विकासाचा नियम, वर्गयुद्धाची कल्पना, इतिहासाचे आर्थिक पुनर्मुल्यन यामुळे तर जगाला फारच मोठे वैचारिक हादरे बसले. शोषण रहित वर्गविहीन समाजची कल्पना कार्ल मार्क्सने समोर ठेवल्यामुळे शतकानुशतके पिळल्या जाणाऱ्या मानव समाजासमोर मोठा आशादायक भविष्यकाळ निर्माण झाला. कार्ल मार्क्सच्या या क्रांतीकारक विचारांचा रशियन जनतेत हक्कांची जाणीव होण्यास मदत झाली. किंबहुना कार्ल मार्क्स

यांनी वास्तववादी शास्त्रशुद्ध समाजवादाचा विचार दास कॅपिटल (Das kapital) या ऐतिहासिक ग्रंथातून मांडला होता. तो रशियन जनतेला प्रेरित करणारा ठरला.

कार्ल मार्क्सने इ.स. १८४८ मध्ये त्यांनी एंगल्स बरोबर कम्युनिस्ट जाहिरनामा (Communist Manifesto) प्रसिद्ध करून त्यात क्रांतीचा कार्यक्रम व क्रांतीच्या तत्त्वज्ञानावर विचार व्यक्त केले होते. त्यामुळे त्यास समाजवादाचा वेद या अर्थाने सुद्धा ओळखला जातो. युरोपातल्या सर्वच साम्यवादी विचारवंतांना या जाहिरनाम्याने मोठी स्फूर्ती दिली. या समाजवादी जाहिरानाम्याचे चार भाग होते. पहिल्या भागात सामाजिक उत्क्रांतीचा इतिहास सांगितला होता. या शिवाय (Havr & Have not) आहे रे आणि नाही रे यांच्यातील संघर्षाचा इतिहास कथन केलेला आहे. पिळले जाणारे व पिळवणूक करणारे यांचा संघर्ष आहे. दुसऱ्या भागात साम्यवादी पक्षाचे ध्येय धोरण यांचे विवेचन करून ते ध्येय कसे अंमलात आणावयाचे याचा कार्यक्रम सांगितला होता. जाहिरनाम्याच्या तिसऱ्या भागात आपली साम्यवादी विचारसरणी ही कशी शास्त्रशुद्ध आहे व इतर समाजवादी तत्वज्ञान आणि कार्यक्रम कसे ठिसूळ, स्वप्नाळू आणि वास्तवापासून दूर आहेत३ याचे विवेचन कार्ल मार्क्सने केलेले होते. तर चौथ्या भागात समाजवादी कार्यक्रम अंमलात आणतांना कोणत्या अडचणी येतील, त्याचे निवारण कसे करावयाचे याची चर्चा केलेली होती. अशा रितीने मार्क्सचा जाहिरनामा जगातल्या सर्व लोकांना मोठा स्फूर्तीदायक ठरला.

कार्ल मार्क्स यांच्या विचारांचा रशियन जनतेवर व्यापक परिणाम होणे स्वाभाविक होते व त्याचाच परिपाक म्हणजे रशियात १८९५ मध्ये सोशल डेमोक्रॅटिक पक्षाची स्थापना झाली होती. परंतू १९०३ मध्ये या पक्षात मतभेद निर्माण होऊन या पक्षाची बोल्शेविक (जहाल गट) व मोन्शेविक (मवाळ गट) या दोन गटात विभागणी झाली होती. त्यात सोशल रिव्होल्युशनरी पक्षाचा नेता लेनीन होता. क्रांती करून कामगारांचे सरकार रशियात प्रस्थापित करावे असे या पक्षाचे मत होते तर मोन्वोविक पक्षाचा नेता मेनशर्क होता व या पक्षाचा सनदशीर मार्गांनी समाजवादी सरकार प्रस्थापित करावे यावर विश्वास होता.

### ३.२.१.५ चे क्रांतीवर्ष

रशियात विसाव्या शतकाची सुरूवात अनेक आपत्तीनी झाली. औद्योगिक क्षेत्रातील कामगारांच्या शोषणावरून असंतोष तीव्र होऊन संपांना जणू उधाण आले होते. मुख्य म्हणजे संपाच्या वेळी आर्थिक मागण्यांबरोबर राजकीय सुधारणांची देखील कामगार मागणी करू लागले. ही बाब म्हणजे त्यांच्यात राजकीय जागृती होत असल्याचे स्पष्ट लक्षण होते. याच काळात आर्थिक हालअपेष्टांना आणि अधिकाऱ्यांच्या जुलमाला कंटाळून देशाच्या अनेक भागात शेतकरी उठावास प्रारंभ केला होता. इ.स. १९०२ आणि १९०३ साली रशियात प्रचंड दुष्काळ पडला होता. त्यामुळे शेतीच्या उत्पादनात प्रचंड घट आली. मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची टंचाई निर्माण झाली आणि या टंचाई काळात गरीब जनतेची भयंकर अशी उपासमार होऊ लागली. या नैसर्गिक आपत्तीला देशातील जनता तोंड देत असतानाच इ.स. १९०४ साली रशिया-जपान युद्धाचा भडका उडाला. आधीच दुष्काळ व उपासमारीमुळे पोळलेल्या जनतेला युद्धकाळात वाढलेल्या आर्थिक ताणांमुळे ते अधिकच त्रस्त झाले. त्यांना जीणे दुस्सह होऊ लागले.

## ३.२.१.६ फादर गॅपोन

औद्योगिक क्षेत्रातील कामगारांत प्रक्षोभ वाढत असताना त्यांचे नेतृत्व करण्यासाठी फादर गॅपोन नावाचा धर्मोपदेशक पुढे सरसावला. त्याने कामागरांनी केवळ आर्थिक मागण्यांसाठी संप करावेत, राजकीय मागण्या करू नयेत, त्यामुळे झार सरकार त्यांच्यावर बडगा उचलते असे सांगून झारापुढे कामगार वर्गाने समंजसपणे आर्थिक मागण्या इेवल्यास राजा झार त्या पूर्ण करेल असे फार गॅपोन कामगारांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करीत होता. एका अर्थाने कामगार चळवळींना राजकीय रंग चढू न देण्याचा त्यांचा प्रयत्न होता. त्यामुळे तो झार सरकारचा हस्तक आहे, अशी काही कामगार नेत्यांना शंका वाटू लागली होती. मात्र फार गॅपोनचे व्यक्तित्त्व अत्यंत प्रभावी असल्यामुळे बरेच कामगार १९०४ साली त्याच्या भोवती गोळा झाले होते.

## रक्तरंजित रविवार

इ.स. १९०५ मध्ये रशिया-जपान युद्धाला सुरूवात झाली. त्यामुळे युद्ध साहित्याचे उत्पादन वाढविण्याकामी कामगारांना जास्तीचे काम करावे लागले. मात्र त्याप्रमाणे त्यांच्या वेतनात वाढ झाली नाही. उलट युद्ध खर्चाचे कारण पुढे करीत सरकारने जनतेवर जाद ा कर लादले. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती भरमसाठ वाढल्या. अशातच जपान सोबतच्या युद्धात रशियाच्या पिछेहाटीच्या बातम्या कानावर येऊ लागल्या. त्यासोबतच या युद्ध आघाडीवरील सैनिकांना भोगाव्या लागणाऱ्या हाल आपेष्टांच्या बातम्याही लोकांच्या कानावर येऊ लागल्या. त्यामुळे सरकार विरोधातील शेतकरी व कामागर वर्गाचा प्रक्षोप अधिकच वाढला. कारण आघाडीवर लढणारे बहुतांश शेतकरी कुटुंबातील होते तर कामगारांना युद्धाच्या निमित्ताने पिळले जाते होते. त्यामुळे अशा प्रक्षुब्ध वातावरणात आपल्या मागण्या झार सरकारपुढे मांडण्यासाठी कामगारांचा मोठा मोर्चा आयोजित करण्यास पीटर्सबर्ग येथील कामागारांनी फार गॅपोनला भाग पाडले.

दि. २२ जानेवारी १९०५ रोजी सकाळी अगदी कडाक्याच्या बर्फाळ थंडीत कुडकुडत सुमारे दोन लक्ष कामगार पुरुष, बायका, वेद्ध व मुलांसह राजप्रासादाकडे निघाले. या प्रचंड मोर्चाचे नेतृत्व फादर गॅपोनला पत्करावे लागले होते. झार राजाला शांतपणे आपल्या मागण्याचे निवदेन सादर करून त्या पूर्ण करण्याचे त्याच्याकडून आश्वासन घ्यावे असे मोर्चातील कामगारांचा मानस होता. मात्र एवढ्या प्रचंड संख्येने जनसमुदाय राजप्रासदाकडे चालून येत आहे. हे ऐकून झारची घाबरगुंडी उडाली व त्याने मोर्चा पोहोचण्याच्या आदल्या दिवशीच आपल्या राजधानीतून पळ काढला.

इकडे नियोजनानुसार कामगार मोर्चाद्वारे राजप्रासादापुढे येऊन उभे ठाकले व झार राजाने स्वतः येऊन आपले निवेदन स्वीकारावे अशी मागणी करू लागले. मात्र जेव्हा झार राजा राजप्रासाद सोडून पळून गेला आहे हे माहित पडताच कामगार खवळले व त्यांनी राजप्रासादात घुसण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी झारच्या सैनिकांकडून कामगारांवर बेझूट गोळीबार करण्यात आला. त्यात शेकडो स्त्री-पुरुष, मुले व अबालवृद्ध मृत्यूमुखरी पडले हजारो

जखमी झाले. या गोळीबारामुळे राजप्रासदासमोरील जमिनीवर रक्ताचा सडा व प्रेतांचा खच पडला. या अमानुष गोळीबाराने हतबद्धझालेले व जे तीवंत वाचले त्या लोकांना घराच्या दिशेने धूम ठोकली. दि. २२ जानेवारी, १९०५ रोजी रविवार होता व ही घटना रविवारी घडल्यामुळे त्यास रक्तरंजित रविवारची घटना म्हणून संबोधण्यात आले.

निष्पाप कामगारांच्या शांत व निशस्त्र मोर्चावर झार सरकारने केलेल्या भयानक अत्याचारामुळे केवळ कामगार वर्गच नव्हे तर सामान्य जनता व बुद्धीवादी लोक देखील संतप्त झाले. त्यामुळे झार सरकार सर्वसामान्य जनतेच्या समस्यांचे निराकरण करेल याची त्यांना शाश्वती राहिली नाही. त्यामुळे ही घटना जणू पुढे झार सरकारच्या विरोधातील विघातक घटनांची एक नांदीच ठरली.

या घटनेचे सर्व देशभरातील तीव्र पडसाद उमटले. जवळपास तीन ते चार महिन्यांपर्यंत वेगवेगळ्या औद्योगिक केंद्रातील कामगारांनी या घटनेच्या निषेधार्थ मोर्चे काढले, निदर्शने केलीत. शेतकऱ्यांनीही मोठ्या जमीनदारांवर हल्ले करून त्यांचा निषेध नोंदविला. इतकेच नव्हेतर लष्कर व नाविक दलातही झार सरकारच्या विरोधातील भावना वाढीस लागली. त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाच्या विरोधात ते उठाव करण्यास सज्ज होऊ लागले. त्याचाच परिणाम म्हणजे जून १९०५ मध्ये पोर्टर्माकन नावाच्या एका युद्धनौकेवरील नौसैनिकांनी आपल्या अधिकाऱ्यांना पदच्युत करून युद्ध नौकेचा ताबा घेतला आणि बंडाचे प्रतिक म्हणून नौकेवर क्रांतीचा लाल ध्वज फडकविला. अशा प्रकारे देशात असंतोषाचे वादळ जोराने उफाळून वर आले असतांनाच ऑक्टोबरमध्ये रेल्वे कामगारांच्या संपाने त्यात तेल ओतण्याचे काम केले व त्यातून परिस्थिती अधिक गंभीर होत गेली.

### ३.२.१.७ कामगारांचा सार्वत्रिक संप –

१९०५ च्या ऑक्टोबर महिन्याच्या सुरूवातीला रशियातील सर्व रेल्वे कामगारांनी संपाचे हत्यार उपसले. त्याचा परिणाम देशातील दळणवळणावर होऊन माल वाहतूक पूर्णपणे बंद झाली. पर्यायाने व्यापार थंडावला, सर्व आर्थिक व्यवहारच ठप्प झाले. परिणामी शहरातील लोकांवर उपासमारीची वेळ आली. रेल्वे कामागारांच्या या संपाला सहानुभूती दर्शविण्यासाठी इतर अनेक उद्योगातील कामगारांनीसुद्धा काम बंद करून त्यांना पाठींबा दिला तर तरुण विद्यार्थी, शिक्षक व इतर बुद्धीजीवी लोकांनी सुद्धा विविध उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्या कार्याला नैतिक बळ देण्याचा प्रयत्न केला. इतकेच नव्हेतर काही लष्कराच्या छावण्यांतील सैनिकांनीही झार सरकार विरोधात उघडपणे उठाव करायला सुरूवात केली. परिणामी या सर्व घटनांनी देशात क्रांतीचे वातावरण त्वरेने निर्माण होत गेले.

### ३.२.१.८ पीटर्सबर्ग सोविएतची स्थापना

उपरोक्त प्रमाणेच निर्माण झालेल्या या सर्व स्फोटक परिस्थितीला पुन्हा एक वेगळे वळण देणारी घटना ऑक्टोबर १९०५ मध्येच घडून आली. ती घटना म्हणजे पीटर्सबर्ग सोविएतची स्थापना. यात देशात सर्वत्र कामगारांचा संप चालू असल्याने त्यांच्या संपाच्या

कार्यात सुसूत्रता यावी या हेतूने तसेच कामागरांना आंदोलनाच्या निमित्ताने योग्य मार्गदर्शन करावे या उद्देशाने काही कामगार नेत्यांनी पुढाकार घेऊन कामगार प्रतिनिधींची एक केंद्रिय समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार १३ ऑक्टोबर, १९०५ मध्ये पीटर्सबर्ग येथे २६ कामगार प्रतिनिधींनी एकत्र येऊन केंद्रिय कामगार प्रतिनिधी मंडळ स्थापन केले. त्यालाच पीटर्सबर्ग सोवियत या नावाने ओळखण्यात येऊ लागले. या मंडळाने एका निवेदनाद्वारे घअना समितीच्या स्थापनेची मागणी केली व या उद्दिष्टाच्या पूर्तीसाठी सरकारवर दडपण आणावे याकरिता देशातील वेगवेगळ्या भागातील कामगारांनी त्यांची प्रतिनिधी मंडळे स्थापन करून सशस्त्र दले निर्माण करावी व क्रांतीच्या ध्वजाखाली संघर्षासाठी संघटित व्हावे असे आवाहन केले. या आवाहनाला अपेक्षेपेक्षा कितीतरी अधिक प्रतिसाद मिळाला. या सर्व बाबींचा परिणाम म्हणजे केवळ एका महिन्यात देशात सुमारे ५५० सोवियत मंडळे स्थापन झालीत आणि कामगारांच्या रुपाने एक मोठे संघटित वादळ क्रांतीच्या दिशेने पुढे सरकू लागले.

### ३.२.१.९ ऑक्टोबर जाहिरनामा

देशातील कामगारांचा सार्वत्रिक संप, पीटर्सबर्ग सोव्हिएटसची स्थापना, सैनिक व नौसैनिकांची बंडे या सर्व प्रकारामुळे झार सत्तेच्या पायाखालील वाळू घसरू लागली. परिस्थिती चिघळत चाललेली पाहून आता राजकीय सुधारणेची मागणी मान्य करण्याखेरीज त्याच्यापुढे दुसरा पर्याय उरला नाही. अखेरीस ३० ऑक्टोबर, १९०५ रोजी झार राजाने एक घोषणापत्र जाहिर केले. त्यानुसार प्रजेला नागरिकत्वाचे सर्व मुलभूत अधिकार दिले जातील, त्यांना मतदानाचा अधिकार दिला जाईल. लवकरच सार्वत्रिक मतदान पद्धतीने राष्ट्रीय कायदेमंडळ निर्मितीसाठी निवडणूका घेतल्या जातील आणि राष्ट्रीय कायदे मंडळाच्या संमतीखेरीज कोणताही निर्माण केला जाणार नाही असे झारने घोषित केले. हे घोषणापत्र ऑक्टोबर महिन्यात घोषित झाल्यामुळे तयास ऑक्टोबरचा जाहिरनामा म्हणूनही ओळखले जाते. या जाहिरनाम्याच्या परिणाम असा झाला की, या घोषणेनंतर कामगारांनी पुकारलेला सार्वत्रिक संप मागे घेतला व झार सरकारवरील संकटाचे ढग काही प्रमाणात कमी झालेत.

ऑक्टोबर घोषणेने लोकांना राजकीय अधिकाराचे आश्वासन मिळाले, म्हणून मवाह उदारमतवाद्यांनी त्या घोषणेचे स्वागत केले. मात्र डाव्या क्रांतीकारी गटांतील लोकांना या घोषणापत्रातील भाषा काहीशी संदिग्ध स्वरूपाची वाटल्याने त्यातून फारसे ठोस निष्पन्न होईल अशी त्यांची मनोभूमिका होती. म्हणून झार सरकारवर लोकमताचे दडपण कायम ठेवण्यासाठी दुसरा सार्वत्रिक संप करावा, अशी मागणी जहाल मतवादी कामगार करू लागल्याने पीटर्सबर्ग सोव्हिएतने नोव्हेंबरच्या प्रारंभी दुसऱ्या संपाचे आवाहन केले. मात्र दुर्दैवाने या आवाहनाला पुरेसा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे केवळ ५दिवसातच हा संप मागे घेण्यात आला. या बाबीचा परिणामअसा झाला की, संप मागे घेण्याचा बाबीमुळे कामागारांची संघटीत शक्ती ओसरल्याचे अनुमान झार सरकारने काढले. किंबहुना या शक्तलीचे पूर्ण खच्ची करावे या हेतूने त्याने दडपशाहीमार्गाचा अवलंब करण्याचा प्रयत्न केला.

पीटर्सबर्ग सोव्हिएट्सच्या सर्व सदस्यांना डिसेंबरच्या सुरूवातीला अटक करण्यात

आली. तिकडे या मंडळाच्या सदस्यांनीही देशातील इतर मंडळांशी संपर्क साधून झारच्या रणनितीच्या विरोधात कोणती पाऊले उचलावीत  यावर चर्चा सुरू केली होती. त्यामुळे हा प्रकार म्हणजे झार सरकारच्या विरोधात उघड युद्ध आहे असे झार राजाची मनोभूमिका झालेली होती. त्यासाठी त्याने पीटर्सबर्ग सोव्हिऐतवर बडगा उचलला.ही बाब मास्को येथील सोव्हिऐतला आवडली नाही व त्यांनी तीन आठवडे झारशाहीविरुद्ध युद्ध केले व येथील कामगारांनी मास्को शहराचा जवळपास ताबा घेतला. या बाबीने झार सरकार खडबडून जागे झाले व त्यांनी महत्त प्रयासाने लष्कराच्या मदतीने मॉस्कोवर पुन्हा ताबा मिळविला व येथील क्रांतीकारक शक्तीना दडपून टाकले.

ऑक्टोबर क्रांतीचे महत्त्व असे की, या क्रांतीच्या उठावात कामगार वर्गच प्रामुख्याने आघाडीवर असल्याने कामगारांच्या संघटीत शक्तीचा प्रत्यय देशाला पाहावयास मिळाला व त्यामुळेच सरकारलासुद्धा काही प्रमाणात नमतेपणाचे धोरण घ्यावे लागले. ही बाब एका दृष्टिने कामगारांच्या दृष्टीने विजयाचे द्योतक होते.

## ३.२.१.१० प्रतिक्रांतीला प्रारंभ

१९०६ ते १९१६ हा काळ रशियाच्या इतिहासातील प्रतिक्रांतीचा काळ म्हणून ओळखला जातो. कारण १९०५ च्या कामगारांच्या उठावानंतर रशियाची पाऊले पुन्हा मागे पडू लागली. झार निकोलस दुसऱ्याने ऑक्टोबर जाहिरनामा घोषित केला होता तो केवळ कामगारांच्या दडपणामुळे. मात्र त्याला आपल्या अनियंत्रित हुकूमशाहीला कोणत्याही प्रकारचा धक्का लागू द्यायचा नव्हता. सरदार, अमीर, उमराव व उच्चपदस्थ अधिकारी वर्गाला देखील प्रजेला राजकीय अधिकार द्यावे असे वाटत नव्हते. त्यामुळे केवळ प्रक्षुब्ध लोकमत काहीसे शांत करण्याच्या दृष्टिने १९०६ मध्ये राजकीय सुधारणांचे स्वरूप निर्धारीत झाले व त्यात १९०६ च्या प्रारंभी राष्ट्रीय सभेची निवडणूक कशी होईल, मतदानाचे अधिकार कोणाला दिले जातील, या सभेची जडणघडण व तिचे अधिकार काय राहतील, या बाबीवर विचार होऊन त्या मूलभूत कायद्याने निर्धारीत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. इतकेच नव्हेतर शासनासंबंधी कायदे करण्याचा अधिकार हा निर्वाचित राष्ट्रीय सभेला म्हणजेच ड्युमाला दिला गेला. मात्र त्या निर्वाचनाच्या नियमात बदल करण्याचा, तसेच तिचे अधिवेशन बोलविण्याचा आणि ती विसर्जित करण्याचा अधिकार मात्र झार राजाच्या हाती ठेवण्यात आला. म्हणजेच एका अर्थाने ड्युमा ही राजाच्या हातातील बाहुले होणार हेच यातून त्यांना साध्य करावयाचे होते.

ऑक्टोबर घोषणेनंतर देशात राजकीय सुधारणा होणार असे दिसू लागताच काही राजकीय पक्ष अस्तित्वात आले. त्यात अनियंत्रित राजसत्तेचे समर्थन करणारा युनियन ऑफ रशियन पीपल, मवाळ राजकीय सुधारणांचा पुरस्कार करणारा ऑक्टोब्रिस्ट पक्ष, इंग्लंडच्या धर्तीवर रशियातील शासनव्यवस्थेवर ड्युमाचे प्रभुत्व असावे, अशी भूमिका असलेला कॅडेट पक्ष असे काही पक्ष निर्माण झाले होते. याशिवाय पूर्वीचे सोशॅल डेमोक्रॅटिक लेबर पार्टी आणि सोशॉलस्ट रेव्होल्युशनरी पक्ष हेही राजकीय रिंगणात होते.

१९०६ मध्ये ड्युमाची निवडणूक झाली. त्यात कॅडेट पक्षाला सर्वात जास्त जागा

मिळाल्या. या पक्षाने देशातील धर्मसंस्थांच्या, अमीर-उमरावांच्या व राजकुटुंबाच्या ताब्यात असलेल्या काही जमिनी सरकारने त्यांना मोबदला देऊन आपल्या हाती घ्याव्यात व त्या रास्त किमंतीत शेतकऱ्यांना विकाव्यात, असा प्रस्ताव मांडला. सरकारने या मागणीला विरोध केला. ड्युमातील बहुसंख्य सदस्य हा प्रस्ताव उचलून धरीत असल्याचे पाहून झारने ड्युमाच बरखास्त करून टाकली. त्यानंतर जहाल मताचे कॅडेट पक्षाचे प्रतिनिधी ड्युमावर निवडून येऊ नये म्हणून झारने निवडणूक नियमांमध्ये बदल घडवून आणले. जहाल कॅडेट सदस्यांना निवडणूकीसाठी अपात्र ठरविले. परंतु झार सरकारची अपेक्षा फोल ठरली. दुसऱ्या ड्युमामध्येही कॅडेट पक्षापेक्षाही अधिक जहाल विचारांचे सदस्य निवडून आले. तेव्हा झारने ती ड्युमाही बरखास्त केली. निवडणूकीच्या नियमात पुन्हा एकदा महत्त्वाचे बदल होते. कामगार व शेतकरी वर्गाच्या प्रतिनिधींची संख्या बरीच कमी केली. त्याचप्रमाणे निवडून आलेली तिसरी ड्युमा झारच्या समर्थकांची सभा बनली. त्यामुळे ड्युमा व झार सरकार ह्यांच्यात निर्माण झालेला तणाव संपला. ड्युमा ही झारच्या हातातील बाहुले बनली. प्रतिगामी धोरण पत्करण्यास झार व त्याचे समर्थक मोकळे झाले. म्हणून हा प्रतिक्रांतीचा काळ ठरला. पहिल्या दोन ड्युमा बरखास्त होणे व जहाल विचारांच्या लोकांना बाजूला सारण्याच्या झार राजाच्या प्रयत्नांचा जनतेवर अतिशय प्रतिकूल असा परिणाम झाला. लोक निर्वाचित राष्ट्रीय कायदे मंडळाच्या स्थापनेने जनतेचे कोणतेही प्रश्न सुटत नाहीत, कारण झारच्या अनियंत्रित हुकूमशाहीवर त्यामुळे कोणतेही निर्बंध पडलेले नाहीत. हे लोकांना चांगलेच कळून चुकले हाते. त्यामुळे जनक्षोभ वाढण्यास मदत झाली.

## पहिले महायुद्ध आणि रशिया

रशियातील राजकीय परिस्थिती चिघळत असतांनाच युरोपात पहिल्या महायुद्धाला प्रारंभ झाला. जर्मनीने ऑगस्ट १९१४ मध्ये रशियावर केलेल्या आक्रमणामुळे रशिया या युद्धात ओढला गेला. या गंभीर राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी सोशल डेमोक्रॅटिक पक्ष वगळता इतर सर्व पक्ष एकदिलाने झार सरकारच्या पाठीशी उभे राहिले. परंतु रशियन लष्कराची युद्ध सज्जता नव्हती. युद्धासाठी लागणारे सैन्य मोठे घाईघाईने व सक्तीने तसेच ग्रामीण भागातील तरुणांची लष्करात भरती करून उभे करावे लागले. या ग्रामीण तरुणांना युद्ध कार्याचे कोणतेचे प्रशिक्षण न देता युद्धावर पाठविण्यात आले. या काळात शस्त्रास्त्र उत्पादनही गरजेपेक्षा पुष्कळ कमी असल्याने, सैनिकांना आवश्यक तेवढी शस्त्राशस्त्रेही पुरवली गेली नाहीत. त्यावेळी रशियात दहा सैनिकांपैकी केवळ सात सैनिकांकडेच शस्त्रास्त्रे होती. ही शस्त्रास्त्रांची, लष्करी प्रशिक्षणाची आवश्यकता असतानाच सैनिकांना अन्नधान्य, कपडे आणि वैद्यकीय मदतीही मोठ्या प्रमाणात चणचण जाणवत होती. सीमेवर लढण्यासाठी आवश्यक प्रेरणा व मार्गदर्शन करणाऱ्या अनुभवी लष्करी अधिकाऱ्यांची संख्या सुद्धा अत्यंत तोडकी होती. या सर्वांचा परिणाम असा झालीा की, पहिल्या महायुद्धात ह्या सर्व अडचणींमुळे रशियन सैन्याची पिछेहाट होऊ लागली व बहुतेक युद्ध आघाड्यांवरून लष्कराच्या माघारीच्या व सैनिकांच्या हालआपेष्टांच्या बातम्या राजधानीत येऊ लागल्या.

आधीच शेतकरी व कामगारांच्या प्रश्नामुळे आर्थिक पिचलेल्या रशियाला पहिल्या महायुद्धाच्या काहात निर्माण झालेला आर्थिक ताण सहन करण्याची ताकद उरलेली नव्हती.

मात्र महायुद्धात तर प्रवेश केला गेला आहे. आता त्याला तोंड देण्याशिवाय कुठलाही मार्ग नसल्यामुळे झार सरकारच्या वतीने जनतेवर नवे कर बसविले गेले. दैनंदिन गरजेच्या वस्तूंचे भाव कडाडू लागले. या सर्वांचा विपरीत परिणाम येथील समाजिक जीवनावर मोठ्याप्रमावर दिसू लागला. मूळात पहिल्या महायुद्धाच्या अनुषंगाने रशियातील एकूण पुरूष संख्येच्या ३७ टक्के पुरुषांना लष्करात भरती केले गेल्यामुळे उत्पादनाचे, विशेषतः कृषी उत्पादनाचे प्रमाण अत्यंत खाली आले होते. शेतात राबणारे हातच सीमेवर लढण्यासाठी गेले असल्याने त्याचा परिणाम उत्पादनावर होणे स्वाभाविक होते. अशातच जे कामगार देश आपत्तीच्या काळात उत्पादन वाढीसाठी दोन दोन पाळ्यात काम करत होते त्यांना सुद्धा त्याबदल्यात पुरेसे वेतन दिले जात नव्हते. युद्धाचा कालावधी जस जसा लांबू लागला तसा तशा देशातील अधिकाधिक गंभीर बनत गेल्या. सामान्य नागरीकांचे जीणे कठीण णाले. या सर्व अडचणी सोसूनहीयुद्ध मोहिमेत रशियन सैनिकांच्यापराजयच पदरी पडत असलेला पाहून लोकांचा संयम सुटू लागला. त्यातून हा असंतोष पुन्हा संपाच्या व उठावाच्या रुपाने डोके वर काढू लागला. तिकडे अन्नधान्य, शास्त्रास्त्रे व वैद्यकीय सुविधा न मिळणारे सैनिकही हवालदिल होऊन युद्ध आघाडी सोडून देशात पळत येऊ लागले. या सर्व प्रकाराने देशात अंतर्गत गोंधळ व अराजकतेची स्थिती निर्माण झाली.

रशियाची युद्धात सुरू झालेली पिछेहाट वाढती महागाई, घटलेले कृषी-उत्पादन, कामगारांना मिळणारे कमी वेतन आणि या परिस्थितीने देशात निर्माण झालेले अराजकतेचे वातावरण याला केवळ दोन व्यक्ती जबाबदार आहेत असे अनेकांचे मत होते. एक म्हणजे झारिना अलेक्झांड्रा आणि तिचा निकटचा सल्लागार रासपुतीन.

रासपुतीनचा झारवरील वाढता वरचष्मा आणि विशेषतः शासकीय कार्यात त्याची लुडबूड मंत्र्यांना आणि दरबारी मंडळींना सहाजिकच खटकू लागली. विशेष महणजे, युद्धात रशियाला पराभवाची नाचक्की सहन करावी लागत असतांना अनुभवी मुत्सद्यांचा सल्ला न घेता झार रासपुतीनच्या तंत्राने वागू लागला. हे पाहून त्याचे सल्लागारही संतप्त झाले. रासपुतीन हाच सर्व अनर्थाचे मूळ आहे, त्याच्यामुळे लोकांच्या मनातील राजकुटुंबाची प्रतिमा डागाळत आहे, अशी दरबारी मंडळींची धारणा बनली. रासपुतीनला हद्दपार करण्याची ते मागणी करू लागले. अशावेळी झारने रासपुतीनला दूर करण्याऐवजी सल्लगार मंडळालाच दूर केले. त्यामुळे रासपुतीनचा काटा आपणच काढायचा असा निर्णय काही दरबारी मंडळींनी घेतला व त्यानुसार ३० डिसेंबर १९१६ रोजी त्याच्यावर विषप्रयोग करून त्याला ठार मारण्यात आले.

रासपुतीनला दूर केले की देशाची स्थिती सुधारेल ही दरबारी मंडळींची आशा फोल ठरली. झारने हाताबाहेर गेलेली परिस्थिती सावरण्याऐवजी फक्त बघ्याची भूमिका घेतली. त्यामुळे परिस्थिती अधिकच बिकट बनत गेली. अशातच जानेवारी व फेब्रुवारी १९१७ मध्ये देशातील असंतोषाने व अराजकतेने कळस गाठला. वाढत्या कराचे ओझे लोकांना पेलवले जात नव्हते. तर शासनाचा खर्च तर इ.स. १९१४ ते १६ पर्यंत जवळपास चौपटीने वाढला होता. कारखान्यातून युद्ध साहित्याचे उत्पादन वाढल्यामुळे दैनंदिन उपभोग्य वस्तूंची टंचाई भासत होती. त्यातून वस्तूंचे भाव कडाडणे व टंचाई सदृश्य परिस्थिती निर्माण होणे.

त्यावेळी केवळ एका वेळचा ब्रेड विकत घेण्यासाठीसुद्धा लोकांना तासनतास रांगेत उभे राहावे लागत असे. त्यामुळे संतापलेल्या लोकांनी मोर्चे काढण्यास सुरूवात केली. याच काळात युद्धासाठी गेलेले सैनिक माघारी पळून येऊ लागल्याने ही परिस्थिती अधिक बिकट होत गेली.

या सर्व अडचणींची झळ सधन वर्गाला फारशी बसलेली नव्हती. उलट भांडवलदार, कारखानदार अधिक नफा मिळवित होते. हे पाहून लोकांचा पारा अधिकच चढला. हा वाढता लोकक्षोभ शमविण्याचे सामर्थ्य शासनात नव्हते. परिस्थिती हाताबाहेर जात होती. अशा वेळी राजा झारने राजधानीत असणे व त्यासाठी उपायोजना करणे अत्यंत आवश्यक असतांनाही राजा झार निकोलस हा इतरत्र वास्तव्याला गेला. ही बाब अनेकांना खटकरणारी ठरली. प्रस्तुत परिस्थितीचे गांभिर्य ओळखून झारने राजधानीत ताबडतोब परत यावे असा ड्युमातील ज्येष्ठ नेता रोद्झिंकोने निरोप राजाला पाठविला. मात्र झार निकोलसने ही बाब गांभिर्याने घेतली नाही. उलट ड्युमाचे अधिवेशन ताबडतोब स्थगित करावे असा उलट टपाली आदेश पाठविला.

## ३.२.२ रशियातील साम्यवादी क्रांती किंवा बुझर्वा क्राती –

जाने–फेब्रु. १९१७ मध्ये सतत होत असलेली निदर्शने, मोर्चे उठाव यामुळे राजधानीतील कायदा व सुव्यवस्था ढासळू लागली होती. अन्नाची मागणी करणाऱ्या हजारो कामगारांचे थवेच्या थवे रस्तोरस्ती भटकतांना, सरकारविरोधी घोषणा देतांना दिसून येऊ लागले होते. अशावेळी कामगारांनी कामावर परत जा असा पंतप्रधान गोलित्सिनने काढलेला आदेश सैनिक व कामगार धाब्यावर बसविला व ते अधिक त्वेषाने निदर्शने करू लागलेत. यावेळी परिस्थितीवर नियंत्रण प्राप्त करण्याच्या हेतूने पंतप्रधान गोलित्सिनने निदर्शकांवर गोळीबार करण्याचे त्यांच्या अधिकाऱ्यांना आदेश दिलेत. मात्र पोलिसांनी पंतप्रधानांचा आदेश धुडकावून लावून ते स्वतःच निदर्शकांना सामील होऊ लागले. अशा स्थितीत राजकीय मुत्सद्यांना १९०५ चा सशस्त्री उठाव पुन्हा निर्माण होतो की काय अशी भिती वाटू लागली होती.

इकडे जनक्षोभातून क्रांतीची स्पष्ट लक्षणे दिसत असताना व शासन यंत्रणा पूर्णपणे कोलमडून गेली असतानासुद्धा झार युद्ध आघाडीवरून राजधानीत परत येत नाही. उलट ड्युमाचे सत्र स्थगित करतो, हे पाहून ड्युमाचे नेते खळवले. आपण स्वतः पुढाकार घेऊन चिघळणाऱ्या परिस्थितीला आवर घातला नाही, तर संतप्त कामगार व सैनिक सशस्त्र उठाव केल्याखेरीज राहाणार नाहीत ही बाब त्यांच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांनीच शेवटी विचारांती झाराचा आदेश गुंडाळून ठेवण्याचा व ड्युमाचे अधिवेशन सुरूच ठेवण्याचा निर्णय धेतला. रोद्झियांको या ज्येष्ठ नेत्याच्या नेतृत्वाखाली एक हंगामी कार्यकारी समिती स्थापन करावी आणि या समितीने शासन कार्याची सुत्रे तात्पुरती आपल्या हाती घ्यावी असे प्रस्ताव पास करण्यात आला. झार निकोलसचे विश्वासू असलेल्या अमीर, उमराव, भांडवलदार, कारखानदार इत्यादी धनिक वर्गाचे प्रतिनिधींच्या या ड्युमोने २७ फेब्रुवारी १९१७ रोजी घेतलेला निर्णय ऐतिहासिक होता व ती बुझर्वा क्रांतीची पहिली पायरी होती.

याच काळात यापेक्षाही अधिक महत्त्वाची दुसरी घटना राजधानीत त्याच दिवशी

घडली. ती म्हणजे पेत्रोग्राद सोविएतची स्थापना. कामगार संघाचे काही प्रतिनिधी, आघाडीवरून पळून आलेल्या सैनिकांचे प्रतिनिधी आणि काही डाव्या राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांनी एकत्र येऊन ऑक्टोब, १९०५ च्या धर्तीवर एक प्रतिनिधी मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यांची ही बैठक ड्युमाच्याच इमारतीत झाली. त्यांनी केलेल्या आवाहनानुसार दुसऱ्या दिवशी सुमारे तीन हजार प्रतिनिधी राजधानीत एकत्र जमले. त्यापैकी जवळपास दोन तृतियांश हे रशियन सैनिक होते. त्या सर्वांनी मिळून संघटित शक्ती उभी करण्यासाइी पेत्रोग्राद सोविएतची स्थापना केली. यात कामगार व सैनिकांच्या प्रतिनिधीसोबतच काही मेन्शेविक व बोल्शेविक आणि प्रामुख्याने सोशॉलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाचे सदस्यही आघाडीवर होते.

पेत्रोग्राद सोविएतच्या स्थापनेसंदर्भात राजधानीतील कामगार व सैनिकांच्या गटांनी दाखवलेला उत्साह ड्युमाच्या नजरेजतून सुटला नाही. त्यामुळे त्यांनी अराजकतेवर मात करण्याच्या हेतूने मध्यम मार्ग स्वीकारात दि. १ मार्च १९१७ रोजी पेत्रोग्राद सोविएत व ड्युमाची कार्यकारी समिती यांच्यात चर्चे अंती एक करार केला. या करारानुसार ड्य माच्या नेतृत्वाखाली रशियात हंगामी सरकार प्रस्थापित करण्याचा निर्णय घेण्यात आला. यासोबतच रशियातील सर्व राजकैद्यांची मुक्तता केली जावी, पळून आलेल्या सैनिकांना माफी दिली जावी, जनतेला राजकीय अधिकार व भाषण, लेखन व धार्मिक स्वतंत्र्य दिले जावे, स्थानिक सोविएत स्थापन करण्यासाठी निवडणूका घेतल्या याव्यात. नवी राज्यघटना तयार करून लोक- निर्वाचित सरकार अधिकारावर येईपर्यंत फक्त हंगामी सरकारने शासनाचे कामकाज चालवावे अशा प्रकारच्या त्या अटी होत्या. पेत्रोग्रादने घातलेल्या या अटी ड्युमाने मान्य केल्यानंतरच पेत्रोग्रादने हंगामी सरकारला पाठींबा जाहिर केला व चर्चेतील अटींचे पालन होत आहे किंवा नाही हे पाहाण्यासाठी पेत्रोग्रादने ५ सदस्यांची एक समिती नेमली. एकाप्रकारे हंगामी सरकारवर लोकमताचे सतत दडपण ठेवण्याचे काम या समितीने बजावले होते.

पेत्रोग्रादच्या पाठिंब्याने २ मार्च, १९९७ रोजी जॉजी लवोव ह्यांच्या नेतृत्वाखाली रशियात हंगामी सरकार अस्तित्वात आले. यात बहुतेक मंत्री सरदार. भांडवलदार व धनिक व्यापारी वर्गाचे प्रतिनिधी होते. हंगामी सरकारात न्यायखाते सोपविण्यात आलेला अलेक्झांडर केरेन्स्की हाच फक्त एकमेव सोशॉलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचा नेता व पेत्रोग्रादचा उपाध्यक्षही होता. अलेक्झांडर केरेन्स्की हा एकप्रकारे हंगामी सरकार व पेत्रोग्राद यांच्यातील दुवा म्हणूनही भूमिका बजावत होता.

तिकडे ड्युमाचा बंडखोर पवित्रा आणि पत्रोग्रादची स्थापना या बातम्या झार राजा निकोलसच्या कानावर पडताच त्याने राजधानीचा ताबा घेण्यासाठी लष्कर पाठविले. परंतु रेल्वे कामगारांनी या लष्करीची मध्येच कोंडी करून त्यांना अडकवून ठेवले. त्यामुळे परिस्त्तिीवर नियंत्रण मिळविण्यासाठी झार स्वतः राजधीनकडे यायला निघाला हे कळताच हंगामी सरकारचे दोन मंत्री त्याच्याशी वाटाघाटी करण्यासाठी त्याच्या दिशेने गेले. त्यांची पस्कोव या शहरी भेट झाली. त्यावेळी झार निकोलसवरील लोकांची निष्ठा पार लयास गेली असल्याने त्यांनी राजपदाचा त्याग करावा व आपल्या अल्पवयीन मुलाला गादीवर बसवून

झारचे बंधू मायकेल याला त्याचे पालक म्हणून नियुक्त करावे अशी त्यांनी झारला गळ घातली. यावेळी इंग्लडप्रमाणे रशियातही नामधारी राजसत्ता स्थापन करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. सुरूवातीला राजा झार निकोलस याने त्यास स्पष्ट नकार दिला. मात्र शेवटी त्याला नाइलाजाने या प्रस्तावावर स्वाक्षरी करावी लागली.

पहिल्या महायुद्धाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या परिस्त्तिीच्या काळात देशातील राजसत्ताक पद्धतीच नष्ट करावी व झार निकोलसच्या राजत्यागाबरोबरच राजसत्तेचाही लोप व्हावा असे पेत्रोग्रादचे मत होते. मात्र हंगामी सरकार हे राजसत्ता कायम ठेवण्याच्या दिशेने झारशी बोलणी करीत आहे याची राजधारीत कुणकूण लागताच राजधानीत अत्यंत उग्र निदर्शनांना वेग आला व ते राजसत्ताच पूर्णपणे नष्ट करण्याची मागणी करू लागले. पर्यायाने हंगामी सरकारचाही नाईलाज झाला. इतकेच नव्हेतर राजकुटुंबाला इंग्लडमध्ये आश्रय मिळावा याकरता हंगामी सरकार प्रयत्नशील असल्याचे कळताच पेत्रोग्रादने राजकुटुंबाला स्थानबद्ध करण्याची नरवी मागणी पुढे केली. त्यापुढेही हंगामी सरकारला नमावे लागले व त्यांना राजा झारच्या स्थानबद्धतेचे आदेश काढावे लागले. अशा रितीने इ.स. १६१३ सालापासून राजपदी असलेल्या रोमानोव घराण्याची इ.स. १९१७ मध्ये अखेर झाली. त्यांची राजसत्ता लयाला गेली. या संदर्भातील उल्लेखनीय बाब म्हणजे ही ऐतिहासिक महत्त्वाची घटना कोणत्याही रक्तपाताशिवाय घडली हे विशेषत्वाने लक्षात घेण्यासारखे आहे. रशियाच्या इतिहासाला कलाटणीच्या घटेनमागे कोणतेही पूर्व नियोजन नव्हते किंवा प्रबळ राजकीय पक्षाचे नेतृत्त्वही याकामी कार्यरत नव्हते.

झार राजा निकोलस याच्या स्थानबद्धतेनंतर व राजसत्तेच्या ऱ्हासानंतर रशियात आलेले नवे शासक पूर्णतः सत्ताधारी बनू शकले नाहीत. कारण सकृतदर्शनी ते सत्ताधारी णाले असले तरी वास्तवात सत्तेची दोन केंद्रे रशियात अस्तित्वात आली होती. ती म्हणजे धनिक मध्यमवर्गीयांचे मवाळ पुरोगामी असे हंगामी सरकार आणि त्याला सशर्त पाठिंबा देणारे कामगार व सैनिकांचे प्रतिनिधीत्व करणारे जहाल मतवादी पेत्रोग्राद सोव्हिएत.

### ⁕ वाढते अराजक –

देशाची ढासळत चालेली आर्थिक स्थिती, विस्कळीत झालेली शासन यंत्रणा, जनतेतील वाढता असंतोष, कामगार, सैनिक व शेतकऱ्यांमध्ये वाढत चाललेली कायदा तोडण्याची बंडखोरी प्रवृत्ती,पेत्रोग्राद सोव्हिएतचा आक्रमक पवित्रा अशा परिस्थितीत देशाचे प्रशासन करणे म्हणजेउनव्या सरकारसाठी तारेवरची कसरतच होती. जनतेच्या मागण्या अल्पावधीत पूर्ण होणे शक्य नव्हते. मुख्य म्हणजे मूलभूत परिवर्तनाखेरीज सुधारणा होणे दुरापास्त होते. नव्या शासकांना असे मुलभूत बदल अभिप्रेत नव्हते. त्यांचा मानस केवळ मवाळ राजकीय सुधारणेचा होता. परंतु प्रक्षुब्ध कामागर व सैनिकांचे समाधन करावयाचे, तर काही पुरोगामी पावले उचलण्याशिवाय पर्याय नव्हता. त्यामुळे युद्ध समाप्ती नंतर शेतकऱ्यांना जमिनी दिल्या जातील, सर्वसामान्यांना राजकीय अधिकारी दिले जातील. अशी आश्वासने हंगामी सारकारने दिली. परंतु महायुद्धातील रशियाच्या सहभागामुळे देशापुढील समस्या गंभीर बनल्या आहेत हे धान्यात येऊनही युद्धातून पाय मागे घेण्याची मात्र हंगामी सरकारची तयार नव्हती. उलट

युद्ध मोहिमा खंबीरपणे कराव्यात, युद्धानंतर देशाच्या पदरी काही लाभ पडले की लोक आपोआप शांत होतील, अशी त्यांची धारणा होती. शिवाय दोस्त राष्ट्रांनी नव्या हंगामी सरकारला तात्काळ राजनैमिक मान्यता दिली. युद्धकायात मदतीचे अभिवचन दिल्यामुळे युद्ध निवृत्तीचा विचार हंगामी सरकारने केला नाही. या मुद्यावर बोल्शोविकांचा मात्र हंगामी सरकारला विरोध होता. हे साम्राज्यवाद्यांचे युद्ध आहे. त्यातून रशियाने अंग काढून घ्यावे अशी भूमिका १९१४ पासून लेनिने आग्रहाने मांडलेली होती.

हंगामी सरकारने अधिकाररुढ झाल्यानंतर नव्या युद्ध मोहिमा आयोजित केल्या. त्याही पूर्वीप्रमाणे अयशस्वीच ठरल्या. हंगामी सरकारने युद्ध कार्यावर लक्ष केंद्रित केल्यामुळे जनतेचे तातडीचे प्रश्न सोडविणे अशक्य झाले. प्रजेवरील कराचा बोजा तसाच राहिला. अन्नधान्याची टंचाई अधिक तीव्र झाली. उपभोग्य वस्तूंचे भाव कडाडतच राहिले. शेतकऱ्यांना व कामागारांना कोणताहील दिलासा मिळाला नाही. युद्ध थांबले नाही म्हणून शेतकऱ्यांना जमीन वाटप झाले नाही. त्यामुळे राज्यकर्ते बदलले परंतु राज्यकर्त्यांची धोरणे बदलली नाहीत, प्रजा कल्याणाबाबतची अनास्था बदलली नाही. हे पाहून सामान्य जनतेचा हंगामी सरकारवरील विश्वासही उडू लागला. लोक युद्ध विरामाची मागणी करू लागलेत. अशात राजबंद्यावरील निर्बंध रद्द झाल्याबरोबर परदेशी वास्तव्य करीत असलेले जहालमतवादी क्रांतीकारी नेते पेत्रोग्रादला परत येऊ लागले. त्यांच्या आगमनाबरोबर देशातील राजकीय परिस्थितीला वेगळे वळण लागण्याची चिन्हे दिसू लागली व हंगामी सरकारचे अपयशही स्पष्टपणे समोर येऊ लागले.

पेत्रोग्राद सोव्हिएतच्या मागणीनुसार हंगामी सरकारने राजबंद्यांवरील निर्बंध उठवताच कामानेव, झिनोविव, स्टॅलिन व लेनिनसारखे बोल्शोविक व ऑस्ट्स्कीसारखे काही मेन्शोविक नेत्यांनी पेत्रोग्रादला परत येण्याचा निर्णय धेतला. ३ एप्रिल १९१७ रोजी लेनिन रशियात परत आला व दुसऱ्याच दिवशी पेत्रोग्रादच्या भव्य चौकात लक्षावधी कामगारांच्या पुढे त्याचे भाषण झाले. त्यावेळी त्याचे केलेल्या भाषणात हंगामी सरकार हे भांडवलदारांचे व मोठ्या जामीनदरांचे सरकार असल्याने ते उपेक्षित वर्गाचे प्रश्न सोडवू शकणार नाही. म्हणून पेत्रोग्राद सोव्हिएतने हंगामी सरकारला दिलेला पाठींबा काढून घ्यावा आणि सत्ता सुत्रे आपल्या हाती घ्यावीत. असे ठामपणे प्रतिपादित केले. लेनिनने मांडलेली ही मते एप्रिल सिद्धांत म्हणून प्रसिद्ध आहेत.

लेनिनचे हे मत मेन्शेविक व सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्ष सदस्यांनाच नव्हे तर बोल्शेविकांनाही पटले नाही. परंतु आपले मत आपल्या पक्ष सदस्यांच्या गळी उतरविण्यात लेनिनला एका महिन्यात यश आले. तसेच युद्ध विरामखेरीज देशाचे प्रश्न सुअणार नाहीत, हे तो कामागरांच्या मनावर बिंबवू लागला. अगोदरच संतप्त झालेल्या कामगारांना त्याचे हे मत पटले. मे महिन्यात कामगारांची युद्धविरोधी प्रचंड निदर्शने होऊ लागली. प्रतिकुल लोकमताचा अंदाज आल्यामुळे हंगामी सरकारातील युद्धमंत्री व परराष्ट्रमंत्री ह्यांनी राजीनामे दिले. त्यामुळे हंगामी सरकारची पुनर्रचना होऊन युद्धमंत्रीपद सोशॉलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षनेता केरेन्स्कीकडे सोपविण्यात आले. त्याने लवकरात लवकर युद्धबंदी केली जाईल असे आश्वासन दिले. परंतु ते प्रत्यक्षात मात्र उतरविले नाही.

हंगामी सरकार केवळ आश्वासने देते, पंरतु जनकल्याणाच्या दृष्टिने कोणतीही ठोस पावले उचलीत नाही, हे पाहून खवळलेले लोक कायदा धाब्यावर बसवू लागले. अधिकाऱ्यांना बाजूला सारून स्थानिक सांविएतांच्या नेतृत्वाखाली जमीनदारांच्या जमिनी ताब्यात घेऊन शेतकरी त्या आपसात वाटून घेऊ लागले. औद्योगिक क्षेत्रातील कामगारही दंगे करू लागले. राजधानीत हंगामी सरकारविरूद्ध जुलैमध्ये कामगारांनी प्रचंड मोर्चे काढले. अन्न जमीन व शांतता या मागण्यांच्या मोठ्याने घोषणा देत कामागरांचे थवेच्या थवे रस्तोरस्ती फिरू लागले. हंगामी सरकारने हे उठाव मोडून काढलेच पण यामागे बोल्शेविकांची चिथावणी आहे, असे वाटून अनेक बोल्शेविकांना अटक केली. त्यात जुलैमध्ये बोल्शेविक पक्षात येऊन मिळालेला ट्रॅट्स्की याला सुद्धा अटक करण्यात आली. लेनिन मात्र त्याच्या काही सहकाऱ्यासह भूमिगत झाला.

इकडे हंगामी सरकारच्या धोरणांना जनतेचा वाढता विरोध पाहून प्रधानमंत्री लवोवने राजीनामा दिला व मंत्रीमंडळाच्या पुनर्रचनेत पंतप्रधान हे पद केरेन्स्की यांच्या वाटेला आले, यावेळी काही सोशॉलिस्ट रेव्होल्यूशनरी व मेन्शोविक सदस्यांचाही मंत्रीमंडळात अंतर्भाव करण्यात आला. पंतप्रधान झालेल्या केरेन्स्कीने देखील युद्ध धोरण बदलले नाही. उलट बोल्शेविक सुद्धबंदीसाठी कामगारांना चिथावणी देतात, असे वाअून बोल्शेविकांविरूद्धच त्याने शस्त्र उगारले. युद्धाला असलेला सर्व विरोध मोडून काढण्यास त्याने सेनापती कोर्लिलोवच्या हाती संपूर्ण लष्कराचा ताबा दिला. दुर्दैवाने कोर्निलोवने मात्र त्याचा मोर्चा बोल्शेविकांविरूद्ध वळविण्याऐवजी केरेन्स्की सरकारविरूद्धच वळवला. केरेन्स्कीचे दुबळे सरकार उलथून पाडून राजसत्ता पुन्हा प्रस्थापित करण्याचा, अथवा लष्कराच्या हाती सत्ता घेण्याचा त्याचा मानस होता. मोठ्या सैन्यानिशी कोर्निलोव राजधानीवर चालून येत असल्याचे कळताच पंतप्रधान केरेन्स्की धास्तावला. राजधानीचा ताबा लष्कराच्या हाती जाणे कामगार व सैनिकांनाही नको होते. म्हणून बोल्शेविक पक्षाच्या प्रभावाखाली कामगार व सैनिकांनी त्यांची सशस्त्र दले उभारून कोर्निलोवला तोंड दिले आणि या लढाईत कोर्निलोव सैन्याचा धुव्वा उडवला.

कोर्निलोव आक्रमणापासून हंगामी सरकारचा बचाव करण्यासाठी केरेन्स्की सरकारला बोल्शेविकच्या प्रभावाखालील कामगार व सैनिकांची मदत घ्यावी लागली ही केरेन्स्कीच्या दृष्टीने नामुष्कीची, तर बोल्शेविकांच्या दृष्टिने अभिमानाची बाब ठरली. या आपत्तीच्या वेही केरेन्स्की सरकारची उरलीसुरली प्रतिष्ठाही लयाला गेली. हंगामी सरकारची अकार्यक्षमता व दुबळेपणा उघड झाला. उलट या प्रसंगी बोल्शेविक समर्थक कामगारांनी व सैनिकांनी दाखविलेले धडाडीचे नेतृत्व व योजना कौशल्य पाहून तेच संकटाच्या गर्तेतून देश सावरू शकतील, असा अनेकांना विश्वास वाटू लागला. अशा परिस्थितीत बोल्शेविक नेत्यांना मुक्त करणे केरेन्सीला भाग पडले.

कोर्निलोव प्रकारणात बोल्शेविकांच्या वाढलेल्या लोकप्रियेतचा प्रत्यय अल्पावधीतच आला. ऑगस्ट, १९१७ च्या अखेरी पेत्रोग्राद सोव्हिएतसाठी झालेल्या निडणूकीत बोल्शेविकांना बहुमत मिळाले. ट्रॉट्स्की पेत्रोग्राद सोव्हिएतचा अध्यक्ष बनला. तसेच बऱ्याच स्थानिक सोव्हिएत मंडळांमध्येही मेन्शेविक व सोशॉलिस्ट रेवहोल्यूशनरी पक्षाचा प्रभाव ओसरला

आणि बोल्शेविकांचा प्रभाव त्याच प्रमाणात वाढला.

केरेन्स्की सरकारच्या अपयशात वाटेकरी असलेले मेन्शेविक व सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्ष लोकांच्या मनातून उतरले आहेत आणि बोल्शेविकांना जनमताचा पाठिंबा वाढला आहे हे लेनिनने ताबडतोब ओळखले. लागलीच त्याने त्याचा आरंभीचा पवित्रा बदलला. हंगामी सरकार उलथून पाडून सोव्हिएतांनी सत्ता हाती घ्यावी असे म्हणण्याऐवजी तो बेल्शेविकांनी सत्ता घ्यावी, असे म्हणू लागला. हंगामी सरकार मोडकळीस आले आहे, इतर डावे पक्ष धडाडीचे क्रांतीकारी धोरण नल पत्करल्यामुळे मागे पडले आहेत. उलट बोल्शेविक पक्षाला प्रचंड समर्थन मिळत आहे. नेमके याच वेळी रीगाचा ताबा घेऊन जर्मन लष्कर पेत्रोग्रादच्या दिशेने चालून येत होते. अशा राष्ट्रीय आपत्तीच्या वेळी राजधानीच्या रक्षणाची जबाबदारी पेत्रोग्राद सोव्हिएतने व बोल्शेविक पक्षाने उचलावी, परंतु त्यापूर्वी सशस्त्र क्रांतीची तयारी करून हंगामी सरकार उलथून पाडून पेत्रोग्राद सोव्हिएतने सत्तासुत्रे हाती घ्यावी, अशी आशयाचा लेनिनचा प्रस्ताव १० ऑक्टोबर, १९१७ च्या पेत्रोग्रादच्या बैठकी पुढे मांडला गेला. तो बऱ्याच चर्चेनंतर बहुमताने पास झाला. याच बैठकीत ट्रॉट्स्कीच्या अध्यक्षतेखाली लष्करी क्रांतीकारी समिती स्थापन होईल हतेच आदेश लष्कराने, नौदलाने व पोलीसदलाने पाळावेत असे आवाहन केले गेले. त्याचबरोबर हजारोंच्या संख्येने पोलिस, सैनिक व नौसैनिक लष्करी क्रांतीकारी समितीला समर्थन देण्यास पुढे सरसावले.

बोल्शेविकांच्या अशा आक्रमक पवित्र्यामुळे केरेन्स्की धास्तावला. राजधानीत गोळा झालेल्या सैनिकांना त्यांच्या छावणीत परत जाण्याचे त्याने आदेश दिलेत. अरोरा नावाची युद्धनौका राजधानीलगतच्या नेवा नदीच्या पात्रात उभी होती. तिलाही त्याने परत जाण्याचे आदेश दिले. परंतु हा आदेश धुडकावून लावून नौसैनिकांनी पेत्रोग्राद सोव्हिएतचे नेतृत्व मान्य केले. एका अर्थाने या सर्व बाबी हंगामी सरकारला धोक्याच्या सूचना देणाऱ्या घटना होत्या.

राजधानीतील लष्कर व पोलिस दलांवर हंगामी सरकारचा ताबा उरलेला नव्हता. हे पाहून राजधानीबाहेरील लष्करी हंगामी सरकारच्या रक्षणासाठी आणण्याच्या हेतूने केरेन्स्की राजधानीबाहेर पडला. त्यापूर्वी बोल्शेविक नेत्यांना अटक करण्याचा आणि त्यांच्या मुद्रणालयावर व कार्यालयावर ताबा मिळविण्याचा आदेश हंगामी सरकारने काढला. राजधानीतील लष्कर व पोलिसदले लष्करी क्रांतीकारी समितीच्या समर्थनार्थ पुढे सरसावली होती. पंतप्रधान राजधानीबाहेर पडलेला होता. सशस्त्र क्रांतीसाठी ही अनुकूल संधी आहे, असे लेनिनला वाटले. त्यामुळे बोल्शेविकांचे मनोधैर्य बळावले. २४ ऑक्टोबर रोजी जुलैपासून भूमिगत असलेला लेनिन बोल्शेविक पक्षाच्या कार्यालयात परत आला. त्याच दिवशी केंद्रिय कार्यालयात एकत्र बसून बोल्शेविकांनी बहुमताने सशस्त्र क्रांतीचा निर्णय घेतला. हंगामी सरकार त्वरित उलथून पाडण्याची योजना आखण्यात आली.

२५ ऑक्टोबर१९१७ रोजी अखिल रशियन सोव्हिएत प्रतिनिधींची परिषद राजधानीत होणार होती. या परिषदेत बोल्शेविकांची संख्या मेन्शेविक व सोशॅलिस्ट रेव्होल्यूशनरी पक्षाच्या प्रतिनिधींपेक्षा अधिक होती. या परिषदेच्या उद्घाटनापूर्वी हंगामी सरकार उलथून पाडावे. शासनाची सूत्रे हाती घेत असल्याचे पेत्रोग्राद सोव्हिऐतचे राष्ट्रीय सोव्हिएत परिषदेला

सांगून, त्या सत्तांतराला मंजूरी मिळावी, अशी बोल्शेविकांची योजना होती. राजधानीतील सर्व महत्त्वाच्या शासकीय कार्यालयांचा, दळणवळण व संपर्क साधनांचा ताबा एकाचवेळी मिळावावा, त्यानंतर त्वरित हंगामी सरकारच्या कार्य केंद्रावर हल्ला करावा. अरोरा या युद्धनौकेने हंगामी सरकारचे कार्यकेंद्र असलेल्या विंटर पॅलेसवर हल्ल्याची सूचना देण्यास तोफा डागाव्यात. हंगामी सरकार त्यानंतर देखील शरण न आल्यास सैनिकांनी चालून जावे असे ठरले. यासाठी बोल्शेविक नेत्यांच्या हाताखाली कामगार व सैनिकांच्या सशस्त्र तुकड्या तयार करण्यात आल्या. या सर्व योजनेमागे प्रेरणा लेनिनची होती. तर त्याच्या आयोजनात ट्रॉट्स्कीचा पुढाकार होता.

पूर्व नियोजनाप्रमाणे २४ ऑक्टोबर १९१७ रोजी कामगार व सैनिकांची सशस्त्र दले शासकीय इमारतींचा ताबा घेण्यास स्मोली संस्थेतील बोल्शेविक पक्षाच्या कार्यालयातून बाहेर पडले. फारसा प्रतिकार न होता इमारती त्यांनी ताब्यात घेतल्या. २५ ऑक्टोबर रोजी दुपारी कामगार व सैनिकांचा मोठा जथ्था विंटर पॅलेसवर चालून गेला. अरोरातील नौसैनिकांनी आक्रमणाचे सूचक म्हणून विंटर पॅलेसवर तोफा डागल्या. हंगामी सरकारच्या मंत्र्यांची तेथे बैठक सुरू होती. रक्तपात शक्यतो टाळावा म्हणून क्रांतीकारक सैनिक प्रासादाबाहेर बरेच तास थांबले. परंतु मंत्र्यांची कोणतीच हालचाल दिसून आली नाही. अखेरीस २५ ऑक्टोबररोजी रात्री क्रांतीकारी सैन्याने विंटर पॅलेसवर धडक दिली. दरवाज्यापाशी थोडासा प्रतिकार झाला. पण तो अगदीच क्षीण होता. तो मोडून सैनिक आत शिरले. त्यांनी हंगामी सरकारच्या कार्यालयाचा व इमारतींचा ताबा घेतला आणि मंत्र्यांना अटक केली. अशाप्रकारे एका दिवसात २६ ऑक्टोबर १९१७ चा दिवस उजाडण्यापूर्वीच फारसा प्रतिकार न होता हंगामी सरकार लयाला गेले. क्रांती यशस्वी झाली. सोव्हिएत सत्ता प्रस्थापित होण्याचा मार्ग मोकळा झाला. राजसत्तेच्या पतनानंतर अवघ्या सात महिन्यात दुसरी क्रांती रशियात घडून आली. या क्रांती काळाचे अतिशय परिणामकारकचित्रण जॉन रिड अमेरीकन पत्रकाराने जगाला हलवून सोडणारे दहा दिवस या आपल्या पुस्तकात केले आहे.

अशा प्रकारे १९१७ साली रशियात दोन क्रांत्या घडून आल्या. पहिल्या बुझर्वा क्रांतीला राजसत्तेची लोककल्याणाबाबतची अनास्था, अमानुष दडपशाही, कर्तव्य चुकविणारे भ्रष्ट व लोकाविन्मुख अधिकारी वर्ग, आर्थिक विषमता, बुद्धिवादी वर्गाने व डाव्या पक्षांनी केलेले जनजागरण, विशेषतः कामगारांचे संघटन, लोकांचा घटनात्मक शासनावरील उडालेला विश्वास, युद्धातील सहभागामुळे तीव्र झालेल्या समस्या आणि त्या सोडविण्यात झारने दाखविलेली अनास्था या गोष्टी कारणीभूत ठरल्या.

दुसऱ्या क्रांतीला या सर्व कारणांबरोबरच हंगामी सरकारने दुराग्रहाने चालू ठेवलेल्या महायुद्धातील रशियाचा सहभाग, त्यामुळे अधिक बिकट झालेल्या अंतर्गत समस्यांची परिणती, कामगार-सैनिक व शेतकरी वर्गातील असंतोषाचा झालेला कळस आणि या सगळ्यांचा योग्य वेळी क्रांतीसाठी उपयोग करून घेण्यात बोल्शेविक पक्षाने विशेषतः लेनिनने दाखविलेली तत्परता, योजना कौशल्य व प्रेरक नेतृत्व या गोष्टी महत्त्वाच्या ठरल्या. पहिल्या क्रांतीने झारची एकाधिकारशाही संपुष्टात आणून धनिक वर्गाने सत्ता हाती घेतली. तर दुसऱ्या क्रांतीने साम्यवादी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या क्रांतीकारी विचारसरणीच्या

बोल्शेविक पक्षाच्या नेतृत्वाखाली कामगार व शेतकरी वर्ग अधिकारावर येण्याचा मार्ग मोकळा झाला. कामागार व शेतकरी वर्गाचे सरकार प्रस्थापित होण्याची जगाच्या इतिहासातील ही पहिलीच वेळ होती. म्हणून तिला युवप्रवर्तक क्रांती म्हटले जाते.

(रशियातील समाजवादी क्रांती त्यावेळी रशियात प्रचलित असलेल्या जुन्या दिनदर्शिकेप्रमाणे २५ ऑक्टोबरला तर रशियाने १९१८ साली अंगिकृत केलेल्या युरोपीय दिनदर्शिकेप्रमाणे ७ नोव्हेंबर रोजी घडली. या दोन दिनदर्शिकांत १३ दिवसांचा फरक आहे.)

### * बोल्शेविक क्रांतीतील लेनीनचे नेतृत्व –

बोल्शेविक पक्षाचा नेता लेनीन होता व त्याला केरेन्स्की सरकारचे मवाळ धोरण पसंत नव्हते. झारच्या पाडावापासून ते नोव्हेंबर १९१७ मधील बोल्शेविक गटाच्या विजयापर्यंत रशियाचा इतिहास म्हणजे उदारमतवादी आणि मवाळ पक्षाने आपल्या सदनशीर मार्गांनी परिस्थितीत बदल घडवून आणण्याचा जो प्रयत्न केला त्याच्या अपयशाचा इतिहास ठरला. यावेळी रशियन सैन्यात कमालीची अस्वस्थता होती. शेतकरी जमीनी जबरदस्तीने आपल्या ताब्यात घेत होते. बोल्शेविक पक्षाने उभारलेल्या रेड गार्डसमध्ये कामगार दिवसेंदिवस जास्तीत जास्त संख्येने भरती होत होते. उत्पादनाची साधने आपल्या ताब्यात द्यावीत अशी त्यांची मागणी होती. रशियाच्या वर्चस्वाखालील क्रांतीची पूर्ण सिद्धता करण्यात आली. लेनीनने प्रारंभीपासूनच आपली पक्ष संघटना मजबूत करण्यास प्रारंभ केला. पहिल्या नोव्हेंबर क्रांतीपूर्वी लेनीन हद्दपार अवस्थेत स्वित्झर्लंडमध्ये जीवन जगत होता. परंतु क्रांतीची वार्ता कळल्यानंतर जर्मनीच्या मदतीने तो रशियात परत आला. जर्मन रशियन क्रांतीच्या विरूद्ध असल्याने जर्मनीने लेनीनला रशियात पोहोचता करून क्रांतीकारक फूट पाडण्याची योजना आखली. त्या योगे रशिया कमकुवत होईल अशी जर्मनची कल्पना होती. रशियात परत आल्यानंतर लेनीनने बोल्शेव्हिक पक्षाच्या संघटनेचे व प्रचाराचे कार्य आरंभिले. या कार्यात त्याला ट्रॉटस्कीचे सहकार्य लाभले.

सुरूवातीला बोल्शेव्हिक पक्ष हा अत्यंत लहान होता. त्याचे तत्त्वज्ञान सुद्धा पुष्कळांच्या गळी उतरले नव्हते. परंतु लेनीनजवळ निश्चित कार्यक्रम व तत्त्वज्ञान असल्याने लवकरच हा पक्ष शेतकऱ्यात व कामगारात रुजला गेला. लेनीनजवह संघटन चातुर्य असल्याने रशियन खेड्यापाड्यातून या पक्षाचे जाळे विणले गेले. कामगारांसमोर आणि शेतकऱ्यांसमोर त्याने निश्चित कार्यक्रमाचा आराखडा दिल्याने सर्व जनतेला आपले ध्येय–धोरण स्पष्टपणे समजू लागले.

लेनीनची कार्ल–मॉर्क्सच्या तत्त्ज्ञानावर गाढ श्रद्धा होती. रशियाचा उद्धार करावयाचा असल्यास तो कार्ल मॉर्क्सच्या तत्त्वज्ञानाच रशियाने अंगिकार केल्यामुळेच होईल असे त्याला प्रकर्षाने वाटत होते. हा कार्यक्रम अंमलात आणण्याकरीता आपला जन्म झालेला आहे अशी त्याची मनोभूमिका होती. जगामध्ये कार्लमार्क्सचे तत्त्वज्ञान लेनीन इतकेच फारच थोड्या लोकांनी आत्मसात केले असेल. कार्ल मार्क्सच्या तत्वज्ञानावर आधारीत एक बोल्शेविक कार्यक्रम लेनीनने तयार केला व तो रशियन जनतेसमोर ठेवला. या

कार्यक्रमानुसार क्रांतीकारी मार्गाने प्रजासत्ताकाची प्रतिष्ठापना करणे, ते ध्येय साध्य करण्याकरीता प्रथमतः कामगारांची हुकुमशाही प्रस्थापित करणे, जमिनदारी व भांडवलशाही नष्ट करून उत्पादनाची सर्व साधने सरकारच्या हाती देणे, सर्व कामगारांना रोजगार मिळवून देणे, राज्यात सर्वांना भाकरी मिळवून देणे इत्यादी कार्यक्रम लेनीनने देशासमोर ठेवला.

जनतेच्या गरजा लेनीने अचूक ओळखल्याने बोल्शेविक पक्षाचा कार्यक्रम लवकरच लोकप्रिय झाला. शांतता, जमीन व अन्न ही लेनीनची घोषणा लवकरच जनमानसात पक्की रूजून बसली. बोल्शेविक पक्षाच्या या कार्यक्रमामुळे लवकरच त्यांचा मेन्शेविक पक्षाशी संघर्ष सुरू झाला. हंगामी सरकारवरचा लोकांचा विश्वास अगोदरच उडालेला होता. मेन्शेविक पक्ष म्हणतो त्याप्रमाणे सनदशीर मार्गानी देशात अमुलाग्र क्रांती घडून यावर रशियन लोकांचा विश्वास राहिलेला नव्हता. बोल्शेविक आणि मेन्शेविक पक्ष यांच्या संघर्षाने हळूहळू गंभीर स्वरूप धारण केले. या संघर्षात शेवटी बोल्शेविक पक्षाचा विजय झाला. २५ ऑक्टोबर, १९१७ रोजी बोल्शेविक पक्षाने लेनिनच्या नेतृत्वाखाली क्रांती करण्याचे निश्चित केले. त्या दिवशी कामगारांनी आणि क्रांतीकारकांनी एकदम उठाव करून सरकारी कचेऱ्या, पोस्ट, टेलीग्राम, रेल्वे, बॅंका व सर्व राज्य कारभाराची केंद्र आपल्या ताब्यात घेतली. रक्तपात न होताच राजधानी बंडवाल्या बोल्शेविकच्या ताब्यात आली. त्यामुळे मेन्शेविक सरकार हतबल झाले. केरेन्स्की रशियातून पळून गेला. त्याचे सरकार पदभ्रष्ट झाले. २६ ऑक्टोबर, लेनीनचे नव्या सरकारची अध्यक्ष म्हणून सुत्रे आपल्या हातात घेतली. ट्रॉटस्कीला सरसेनापतीपद देण्यात आले. अशा रितीने रक्ताचा एक थेंब ही न सांडता लेनीनने आयोजित केलेली क्रांती यशस्वी झाली.

### ३.२.३ लेनीन व स्टॅलीन यांची भूमिका

#### ३.२.३.१ रशियाच्या राजकिय पटलावरील लेनीनचे कर्तृत्व

अधिकार सुत्रे हाती घेतल्यानंतर लेनीनने बोल्शेविक पक्षाच्या सरकारचे धोरण जाहिर केले. त्यानुसार रशियाला शांततेची गरज असल्याने रशिया पहिल्या महायुद्धातून आपले अंग काढून घेईल. जमीनदारांकडून सरकार लवकरात लवकर जमीन काढून घेईल व ती शेतकऱ्यांना वाटून देईल. जमीनदारांना त्यांच्या जमिनीचा कोणताही मोबदला मिळणार नाही. उपाशी जनतेला पोटभर अन्न मिळण्याची सोय ताबडतोब करण्यात येईल. झारच्या वेळेपासून अस्तित्वात असलेल्या नोकरशाहीमध्ये अमुलाग्र सुधारणा करण्यात येईल. निरनिराळ्या अधिकार पदावर असणाऱ्या जुन्या अधिकाऱ्यांना काढून त्या जागी बोल्शेविक पक्षातील जबाबदार पदाधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात येतील.

उपरोक्त प्रमाणेचे धोरण जाहिर करून लेनीन थांबला नाहीतर त्याने ताबडतोब त्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ केला. झारच्या दडपशाही राजवटीमुळे व रशियाला वारंवार युद्धात गुंतावे लागल्याने रशियाची आर्थिक घडी पार विस्कटून गेलेली होती. ही घडी नीट बसणविण्याकरीता रशियाला युद्धापासून काही दिवस का होईना परंतु शांतता मिळणे आवश्यक होते. म्हणून लेनीने मार्च १९१८ मध्ये जर्मनीशी स्वतंत्र तह करून महायुत्रातून अंग काढून घेतले. त्यामुळे रशियाला पुनर्निर्माणाकरीता सवड सापडली. त्यानंतर रशियात

बोल्शेविक धोरण आणण्याकरीता प्रामाणिक नोकरशाहीची गरज लेनीनने ओळखली. याकरीता त्याने जुने अधिकारी काढून त्याजागी बोल्शेविक पक्षाचे लोक नेमले. त्यानंतर लेनीनने सामाजिक व आर्थिक क्षेत्रात राष्ट्रीयीकरण करण्यास प्रारंभ केला. उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करण्यास प्रारंभ केला. उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करून रशियाचे औद्योगिकीकरण त्याने प्रचंडप्रमाणावर घडवून आणले. देशातील सर्व कारखाने त्याने भांडवलदारांच्या हातातून काढून ते सरकारच्या ताब्यात घेतले. जमीनदाराच्या जमीनी कसणाऱ्या शेतकऱ्यांना वाटून दिल्यात. चर्चची मालमत्तासुद्धा त्याने सरकारात जमा करून घेतली. अशा रितीने मार्क्सवादी तत्त्वज्ञानावर आधारित संपूर्ण कार्यक्रम लेनीनने रशियात अंमलात आणण्याचा प्रयत्न केला.

बोल्शेविक राज्यक्रांतीमुळे रशियन साम्राज्यशाहीचा अंत घडून आला. क्रांतीपूर्वी रशिया एक मागासलेले राष्ट्र होते. मात्र क्रांतीनंतर एक साम्यवादी राष्ट्र म्हणून जागतिक राजकारणात रशियाचा उदय झाला. बोल्शेविक क्रांतीचे तटस्थपणे विश्लेषण करतांना एक दोष मात्र आपल्याला लक्षात घ्यावा लागतो तो म्हणजे श्रमणाऱ्यांचे राज्य स्थापन करावयाचे असल्यास आणि ते टिकवावयाचे असल्यास दहशतीचा अवलंब केल्याशिवाय दुसरा पर्याय नाही असे लेनीनचे मत होते. त्यामुळेच रशियात झारची हुकूमशाही जाऊन बोल्शेविक पक्षाची व एका अर्थाने लेनीनची हुकूमशाही प्रस्थापित झाली. असे असले तरी या क्रांतीने जगाला एक आदर्श जीवनपद्धती दिली. विषमतेचे निमुर्लन केले व सामान्य माणसाच्या जीवनातील दारिद्र्याचे कायमचे उच्चाटन केले. ह्या जमेच्या बाजूही आपल्याला विसरता येणार नाहीत.

रशियात घडून आलेल्या या दोन्ही क्रांत्या प्रतिगामी भांडवलशाही व्यवस्थेचा पुरस्कार करणाऱ्या लोकांना पसंत पडल्या नाहीत. किंबहुना इंग्लंड, जर्मनी आदी राष्ट्रांनासुद्धा साम्यवादी विचार पसंत नसल्याने त्यांनी ही क्रांती नष्ट करण्याचे प्रयत्न चालविले होते. अशा परिस्थितीत बोल्शेविक क्रांतीला अंतर्गत आणि बहिर्गत असे शत्रु निर्माण झाले. ह्याचाच फायदा घेऊन झेक सैन्याने रशियात शिरकाव केला व उरल पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या तुरूंगातून झार व त्याच्या कुटुंबियांची सुटका करण्याचा प्रयत्न केला होता पण त्यात ते यशस्वी होऊ शकले नीत. अशा परिस्थितीत श्रमणाऱ्या लोकांचे राज्य टिकवावयाचे असल्यास दहशतीचा अवलंब केल्याशिवाय पर्याय नाही याची लेनीनची खात्री झाली व त्यातून त्याने स्वतःचीच मजबूत अशी हुकूमशाही प्रस्थापित केली.

### ३.२.३.२ लेनीनचा दहशतवाद –

देशातील क्रांतीविरोधी शक्ती नष्ट करण्याकरीता लेनीनने दहशतवादाचा आश्रय घेतला व त्याकरीता त्याने सत्तेचे केंद्रियकरण घडवून आणले. लष्कराच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ केली. पोलिस व गुप्तहेरांमार्फत विरोधकांवर सतत नियंत्रण ठेवले. सत्तेपूर्वी जनतेला दिलेल्या वचनांची पूर्ती करण्याचा प्रयत्न चालविला. एका खास वटहुकूमान्वये जमिनीची खाजगी मालकी नष्ट करण्यात आली. जमीनदार, चर्च यांच्या मालमत्ता सरकार जमा केल्या. देशातील सर्व जमीनीची व्यवस्था शेतकऱ्यांच्या निरनिराळ्या समित्यांकडे सोपविल्या.

जप्त केलेल्या जमीनी शेतकऱ्यांना समप्रमाणात वाटण्यात आल्या. परंतु त्याची लागवड उत्तम प्रकारे केली पाहिजे अशी अट घातली. कोणत्याही प्रकारच्या फुकट मजुरीला बंदी घालण्यात आली. शेतकऱ्यांनी जमिनीचे लहान लहान तुकडे लावगडीखाली आणण्यासाठी त्याला परवानगी देण्यात आली. बॅकांची व्यवस्था सरकारने स्वतःकडे घेतली. खाजगी विक्री व खरेदी या हळूहळू बंदी घालण्यात येईल असे जाहिर करण्यात आले.

झारने जी कर्जे करून ठेवली होती ती बुडीत खात्यात टाकण्यात आली. रशियातील खाजगी उद्योगधंद्यामध्ये परकीय भांडवल गुंतवणूक करण्यास बंदी घालण्यात आली. मजूरांना रोख पगार देण्याऐवजी त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून अन्न, वस्त्र, निवारा, प्रवास यांच्या रुपात पगार दिला जाऊ लागला. उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण पायरी पायरीने करण्यात आले. १४ नोव्हेंबर, १९१७ रोजी कामगारांच्या नियंत्रणाचा वटहुकूम जारी करण्यात आला. या वटहुकुान्वये उत्पादन, खरेदी आणि विक्री यांच्या बाबतीत कामगारांशीच सल्ला मसलत केली गेली पाहिजे अशी सक्ती करण्यात आली. ८ जून १९१८ रोजी १ लाख रुबल्स पेक्षा जास्त किंमतीचे उद्योगधंदे असल्यास त्यांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. या सर्व योजनांना असलेला विरोध दयामाया न ठेवता मोडून काढण्यात आला. सर्व विरोधी राजकीय पक्षांवर बंदी घालण्यात आली.

१७ नोव्हेंबर, १९१७ रोजी विरोधी वृपत्रे सक्तीने बंद करण्यात आली. २० डिसेंबर, १९१७ रोजी लेनीनने चेका या विशेष आयोगाची स्थापना करून त्यान्वये संशयितांना विना चौकशी अटक करण्याचे, त्यांच्यावर खटला भरण्याचे व त्यांना फासावर चढविण्याचे विशेष अधिकार देण्यात आले. या आयोगामुळे लेनीनला बोल्शेविक क्रांतीला विरोध करणाऱ्या प्रतिक्रियावादी विरोधकांना नेस्तनाबूत करणे शक्य झाले. असे असले तरी या आयोगाच्या गठनामुळे देशात भितीचे, परस्पर अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले. परंतु त्यामुळे बोल्शेविक धोरणास ज्या प्रतिगामी लोकांचा विरोध होता तो हळूहळू मावळत गेला. ज्या ठिकाणी विरोधकांची केंद्रे होती ती समूळ नष्ट झाली. लवकरच सैबेरियापर्यंत लेनीनची सत्ता प्रस्थापित झाली. क्रांतीवादी कामगार व शेतकरी यांचे लालसैन्य लवकरच उभारण्यात आले. १८ फेब्रुवारी, १९१८ रोजी समाजवादी रशिया हा संकटात आहे असा वटहुकूम जारी करण्यात आला. त्यामुळे लाल सैन्यात सैनिकांची मोठ्या प्रमाणात भरती होऊ लागली. १९१८ च्या मार्च महिन्यापर्यंत त्यांची संख्या २,५०,००० पर्यंत जाऊन पोहोचली.

राज्यकारभारातसुद्धा लेनीनने शिस्त आणि कार्यखमता आणण्याचा प्रयत्न केला. निरनिराळ्या मंत्रालयात तरुण रक्ताच्या लोकांची भरती केली. १५ नोव्हेंबर, १९१७ रोजी लेनीनने लोकांच्या अधिकाराचा एक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यान्वये त्याने धार्मिक क्षेत्रातील सर्व भेद नष्ट केल. त्याच वर्षी राजकारणातील धार्मिक हस्तक्षेपास त्याने बंदी घातली व शाळांमध्ये धार्मिक शिकवणूक देण्यात येऊ नये असा नियम तयार केला. स्त्रियांना कुटुंबाच्या मालमत्तेत पुरुषांच्या बरोबरीने हक्क देण्यात आले. त्यानंतर रशियाकरीता घटना तयार करण्यात आली. २३ जानेवारी, १९१८ रोजी श्रमणाऱ्या व पिळल्या जाणाऱ्या लोकांचे हक्क कोणते असावेत याचा जाहिरानामा प्रसिद्ध करण्यात आला. अशा रितीने रशियात लेनीनची हुकूमशाही पक्की प्रस्थापित झालेली आहे. याची खात्री झाल्यानंतर लेनीनने सोव्हिएट सरकारने ताबडतोब हाती घ्यावयाचा कार्यक्रम प्रसिद्ध केला.

रशियातील एकूण परिस्थिती लक्षात घेता रशियात समाजवाद पूर्ण अर्थाने कसा आणता येईल याचा या जाहिरनाम्यात निर्देश केला होता. या कार्यक्रमानुसार पहिल्या अवस्थेत उत्पादनावर आणि वस्तूंच्या उपभोगावर नियंत्रण घालणे हा कार्यक्रम अभिप्रेत होता. दुसऱ्या अवस्थेत उत्पादनात वाढ करणे, कामगारात शिस्त वाढविणे, निरनिराळ्या कारखान्यात उत्पादनाची स्पर्धा निर्माण करणे इत्यादी कार्यक्रमांचा अंतर्भाव होता. तर तिसऱ्या अवस्थेत निरनिराळ्या भांडवलदार राष्ट्रातील विशेषज्ज्ञांकडून तांत्रिक ज्ञान प्राप्त करून घेणे हा कार्यक्रम अभिप्रेत होता. याच जाहिरनाम्यात साम्यवादी तत्वांवर संपूर्ण जगात साम्यवादी क्रांती घडवून आणणे मुर्खपणाचे, समाजवादी तत्त्वांच्या विरूद्ध आणि अव्यवहार्य आहे असे जाहिर करण्यात आले. दुसऱ्या देशात क्रांतीची आयात करता येत नाही. असा लेनीनने यावेळी युक्तीवाद केला. उलट रशियात जी बोल्शेविक क्रांती झाली तिचे जतन करणे, रशियाला स्वतःचे आर्थिक पुररूत्थान घडवून आणण्याकरीता श्वास घेण्याइतकी सवड सापडवू न देणे आवश्यक आहे. असे लेनीनने यावेळी आपले मत मांडले. अशा परिस्थितीत रशियाने साम्यवादी क्रांती दुसऱ्या देशात आयात करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे स्वतःच्या शांततेला धक्का लावून घेण्यासारखे आहे असे लेनीनने जाहिरनाम्यात मत मांडले होते. प्रत्येक देशात परिस्थिती पक्व झाली की आपोआपच क्रांती होते. इतर देशांनी हस्तक्षेप करू नये.

अशा रितीने या जाहिरनाम्यानुसार लेनीनने बोल्शेविक क्रांती कायमची रूजविण्याचा प्रयत्न केला. परंतु याचवेळी पाश्चात्य राष्ट्रांनी रशियावर स्वारी केल्यामुळे लेनीनला त्याकडे अगोरद लक्ष द्यावे लागले. या संकटावर मात करण्याकरीता लेनीनने युद्ध पातळीवरचा साम्यवाद रशियात आणला. त्यानुसार आवशयक उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण करण्यात आले. मजूर संघटना सर्वत्र आयोजित करण्यात आल्या. हजारो शाळा उघडण्यात आल्यात. प्रत्येक क्षेत्रात नियोजन अंमलात आणण्यात आले.

याच सुमारास लेनिनने परकीयांचे असलेले राष्ट्रीय कर्ज नाकारले. त्यामुळे दोस्र राष्ट्रांनी रशियाची आर्थिक कोंडी करण्याचा प्रयत्न चालविला. याच सुमारास रशियात मोठा दुष्काळ पडला. (१९२१-२२) या भयंकर दुष्काळात सुमारे ५० लाख लोक मृत्यूमुखी पडले. लेनीनने या साऱ्या संकटांना धैर्याने तोंछ दिले. परंतु युद्ध, दुष्काळ या साऱ्या पेचप्रसंगामुळे रशियाला अतिशय बिकट परिस्थितीला तोंड द्यावे लागले. रशियाची सारी अर्थव्यवस्था ढासळून पडली.

### ३.२.३.३ नवीन आर्थिक धोरण

उपरोक्त परिस्थितीवर उपाययोजना म्हणून लेनीनने ह्याचवेळी आपले नवीन आर्थिक धोरण जाहिर केले. १९२१-२७ या संपूर्ण कालखंडात रशियातील साम्यवाद पिछेहाटीला लागलेला आपल्याला आढळून येतो. परंतु हा वरवरचा भास होता. वास्तविक रशिया दोन पावले उडी मारण्याकरीता एक पाऊल मागे गेला होता. मार्च १९२१ मध्ये रशियन साम्यवादी पक्षाची जी दहावी सभा झाली त्यात मूळ साम्यवादी कार्यक्रमाचा त्याग करण्यात आला व नवीन आर्थिक धोरणाचा स्विकार करण्यात आला. या नवीन धोरणात

शासकीय समाजवाद, शासकीय भांडवलशाही आणि खाजगी भांडवलशाही याचा समन्वय साधण्यात आला होता. त्याचप्रमाणे त्यात खाजगी व्यापार, खाजगी मालमत्ता ठेवण्याचा हक्क आणि खाजगी उद्योगधंदे यांना परवानगी देण्यात आली होती. कारखान्याचे उत्पादन वाढविण्याकरीता देशी व परदेशी तंत्रज्ञ यांची मदत घेण्यात आली होती.

अशा रितीने मूळ साम्यवादी तत्त्वज्ञानात बरेच मूलभूत बदल करण्यात आल्याने साम्यवादी क्रांती हळूहळू लयाला जाते की काय? अशी अनेकांना चिंता वाटू लागली. परंतु त्यांना मार्क्स व लेनीन यांच्या तत्त्वज्ञानाचा खरा बोध झालेला नव्हता. असेच म्हटले पाहिजे. कारण नवीन आर्थिक धोरण अंमलात आल्यानंतर अतिशय थोड्या अवधीत रशियाच्या शेती आणि औद्योगिक उत्पन्नात प्रचंड वाढ झाली. राष्ट्रीय उत्पन्नासोबतच सर्वसाधारण राहाणीमानसुद्धा उंचावले.

इ.स. १९१७ पासून लेनीन व त्याचा बोल्शेविक पक्ष यांनी रशियाला कोणत्याही घटना लागू न करता राज्यकारभार केला. इ.स. १९२३ मध्ये मात्र बोल्शेबिक पक्षाने एक घटना तयार करून ती देशाला लागू केली. ह्या घटनेनुसार सोव्हिएट समाजवादी प्रजास्ताक प्रस्थापित करण्यात आले. या सर्व प्रजासत्ताकांना एकत्रित बांधणारे मध्यवर्ती सरकार निर्माण करण्यात आले. या घटनेन्वये रशियात लोकशाही प्रस्थापित केल्याचा देखावा निर्माण करण्यात आला. परंतु प्रत्यक्षात मात्र बोल्शेविक पक्षाची हुकूमशाही प्रस्थापित करण्यात आली. रशियातील १८ वर्षे किंवा जास्त वय असलेल्या आणि उत्पादन व्यवसाय करणाऱ्या किंवा लष्करात भरती झालेल्या सर्व व्यक्तींना मतदानाचा अधिकार देण्यात आला. परंतु त्याचबरोबर जुन्या झारच्या राजवटीतील माजी अधिकारी, धर्मोपदेशक, खाजगी व्यवसाय करणारे व्यापारी यांना मतदानाचा अधिकार नाकारण्यात आला. जरी लेनीनने देशाला ही घटना लागू केली असली तरीसुद्धा बोल्शेविक पक्षाची पकड देशाच्या राजकारणावर पुरेपूर राहिल याची दक्षता लेनीनने पूर्णपणे घेतलेली होती. त्यामुळे रशियात शेवटपर्यंत लेनीनची हुकूमशाही टिकून राहिली.

### ३.२.३.४ लेनीनचा मृत्यू

क्रांतीचे अपत्य असणाऱ्या लेनीनने रशियात खऱ्या अर्थाने साम्यवाद रूजविण्यासाठी अविश्रांत मेहनत घेतली होती. अतिविचार, अतिश्रम यामुळे ते मानसिक आणि शारीरिक दृष्ट्या थकून गेले होते. या सोबतच १९१८ मध्ये त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न झाला होता. त्यावेळी लेनिनला मोठी जखम झाली होती. त्या घटनेत एक गोळी त्यांच्या शरीरात कायमची रूतून बसली होती. त्यामुळे कालांतराने तीच्या परिणामामुळे लेनिनची प्रकृती वारंवार बिघडू लागली होती व त्यातच त्यांचा दि. २१ जानेवारी १९२४ रोजी मेंदूतील रक्तस्त्रावामुळे मृत्यू झाला. क्रांतीकारी नेत्यात लेनीनचे नेतृत्व सर्वश्रेष्ठ समजले जाते. त्याच्या मृतयुमुळे बोल्शेविक क्रांतीचा एक महत्त्वाचा टप्पा संपुष्टात आला. लेनीनच्या मृत्यूनंतर नेतृत्वासाठी स्टॅलीन व ट्रॉटस्की यांच्यात सत्तेसाठी चुरस निर्माण झाली.

### ३.२.३.५ सत्तेसाठी स्टॅलीन व ट्रॅटस्की यांच्यातील स्पर्धा

इ.स. १९२४ मध्ये लेनीनच्या मृत्यूनंतर त्याच्या राजकीय वारसा संदर्भात पक्षाच्या अनुयायामध्ये तीव्र मतभेद निर्माण झालेत. लेनीनच्या मृत्यूनंतर बोल्शेविक पक्षाचे नेतृत्व

कामेनॉव्ह, ट्रॉटस्की व स्टॅलीन यांच्याकडे आले. बोल्शेविक क्रांतीमध्ये तिघांनाही महत्त्वाची कामगिरी बजावलेली होती. ट्रॉटस्की हा मूळचा ज्यू. त्याने १९०५ च्या क्रांतीत भाग घेतल्याने त्याला अनेक वर्षे परदेशात वनवासात काढावी लागली होती. तो १९१७ मध्ये लेनीनला येऊन मिळाला होता. तो उत्तम संघटक, उत्तम वक्ता व लेखक होता. त्याच्या लिखाणामुळे तर रशियन जनतेत क्रांतीची जागृती निर्माण झाली. ब्रेस्ट-लिटव्हॉस्कचा तह झाला. त्यावेळी तर त्याने ज्या कौशल्याने वाटाघाटी चालविल्या त्यामुळे तर त्याचे नाव सर्वतोमुखी झाले.

स्टॅलीनहा जॉर्जियन लोहाराचा मुलगा. एका धार्मिक कॉलेजात त्याचे शिक्षण झाले होते. परंतु त्याच्या क्रांतीकारी विचारामुळे त्याला कॉलेजातून काढून टाकण्यात आले होते. १९०३ मध्ये त्याने बोल्शेविक विचारांची दिक्षा घेतली होती. झार राजवटीला विरोध केल्याने त्याला वारंवार तुरूंगात जावे लागले व हद्दपारीची शिक्षा भोगावी लागली. १९१९ मध्ये तो मध्यवर्ती साम्यवादी समितीचा जनरल सेक्रेटरी बनला. लेनिनच्या मृतयूनंतर स्टॅलीन व ट्रॉटस्की यांच्यात लेनीनचा वारसा कोण असावे याबाबत गंभीर संघर्ष निर्माण झाला. दोघातील मतभेद पुष्कळ अंशी साम्यवादी विचारप्रणालीच्या भाष्यात होते. दोघांनीही साम्यवादी विचारप्रणालीचा अर्थ वेगवेगळा लावलेला होता. ट्रॉटस्कीला कोणत्याही भांडवलशाहीला कोणत्याही प्रकारे जीवनदान देणे पसंत नव्हते. साम्यवादी क्रांती सर्व जगात पहिल्या प्रथम घडवून आणल्याशिवाय त्याचा रशियातील प्रयोग यशस्वी होणार नाही असे ट्रॉटस्कीचे ठाम मत होते. त्याच्या मतानुसार जगातील इतर देशांशी मैत्रीचे संबंध असणे शक्य नव्हते. त्याचप्रमाणे पाश्चिमात्य राष्ट्रात औद्योगिकीकरण घडून आल्याने व त्या देशातील कामगार वर्ग सर्व दृष्ट्या परिपक्व झाल्याने अशा देशात क्रांतीला अनुकूल परिस्थिती आहे असे ट्रॉटस्कीला वाटत होते. अशा क्रांतीला जितकी मदत देता येईल तितकी रशियाने दिली पाहिजे असेही त्याला वाटत होते.

स्टॅलीनचा या विचारांना पूर्ण विरोध होता. जगातल्या सर्व कामगारांनी एक व्हावे व क्रांती घडवून आणावी व त्याचे नेतृत्व रशियाने स्वीकारावे या विचारांशी स्टॅलीन सहमत नव्हता. स्टॅलीनला मध्यममार्ग पसंत होता. देशांतर्गत अनेक प्रश्न सोडवून रशियाचा प्रथम विकास घडवून आणावा आणि परदेशाशी सध्या मैत्रीचे संबंध ठेवावेत असे स्टॅलीनचे मत होते. रशियातील बोल्शेविक क्रांती कायम टिकविल्याशिवाय इरत ठिकाणी क्रांतीचा विचार करणे योग्य नाही असे स्टॅलीरनचे मत होते. स्टॅलीनने लेनीनीच विचारसरणी उचलून धरली होती. त्याचे रशियन राष्ट्रवादाला पाठिंबा दिला हे म्हणणे बरोबर नाही. या संघर्षावरून स्टॅलीन व हा लेनिनचा कट्टर अनुयायी आहे असे स्पष्टपणे दिसून येते.

### ३.२.३.६ स्टॅलीनचा विजय –

स्टॅलीन व ट्रॉटस्की संघर्ष जवळपासव दोन वर्ष चालला व त्या संघर्षात शेवटी स्टॅलीनचा विजय झाला. स्टॅलीनची पक्ष संघटनेवर पकड पक्की असल्याने ही गोष्ट शक्य झाली. स्टॅलीन लेनीनच्या मृत्यूनंतर अधिकारावर आला व ट्रॉटस्कीला सरकारमधून काढून टाकण्यात आले. कालांतराने स्टॅलीनने त्याला बोल्शेविक पक्षातून सुद्धा काढून टाकले. ट्रॉटस्की कदाचित भविष्यात सत्ता बळकविण्याचा प्रयत्न करेल या भितीपोटी स्टॅलीनने

ट्रॉटस्कोला रशियात राहाणे अशक्य करून सोडले पर्यायाने ट्रॉटस्कोला १९२९ मध्ये रशियातून पळून जावे लागले. पुढे १९४० मध्ये त्याचा मेक्सिकोत खून करण्यात आला. ट्रॉटस्कीच्या अनेक सहकाऱ्यांची तीच गत झाली. अशा रितीने स्टॅलीनने आपल्या विरोधकांचा काटा दूर केला व स्टॅलीनची हुकूमशाही प्रस्थापित झाली.

## ३.२.३.७ स्टॅलीनच्या पंचवार्षिक योजना –

लेनिनने जे नवीन आर्थिक धोरण जाहिर केले होते त्यानुसार १ ऑक्टोबर १९२८ रोजी पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या कामास प्रारंभ झाला होता. रशियन आर्थिक व्यवस्थेचा समाजवादी तत्वावर पुनरूत्थान करणे हे त्यांचे ध्येय होते. या पंचवार्षिक योजना काळात रशियात आधुनिक तांत्रिक ज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग करून घेणे, दुर्बल शेतीप्रधान आर्थिक व्यवस्थेचे मजबूत औद्योगिक आर्थिक व्यवस्थेत रुपांतर करणे, भांडवलशाहीचा नायनाट करणे, जनतेच्या मालकीचे मोठमोठे प्रकल्प बांधणे आदी उपक्रम निर्धारीत करण्यात आले होते. त्यात बोल्शोविकांना जवळपास ८५ टक्के यश प्राप्त झाले होते. या पहिल्या पंचवार्षिक योजनेत ठरविण्यात आलेली उद्दिष्टे चारच वर्षात गाठली गेल्याने ही योजना १९३२ साली म्हणजे १ वर्ष अगोदर संपली.

स्टॅलीनने त्याच्या काळात शेतीचे राष्ट्रीयीकरण करण्याचे ठरविले. त्यासाठी त्याने एका कायद्यान्वये देशातील पूर्ण शेती व त्यातील अवजारे यावर सरकारची मालकी प्रस्थापित केली. त्यानंतर जागोजागी शेतीचे एकीकरण घडवून आणले व सामूहिक शेतीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला. ज्यांनी या कामी विरोध दर्शविला त्यांना त्याने गोळ्या घालून ठार केले. स्टॅलीनने उद्योगधंद्याचेही राष्ट्रीयीकरण घडवून आणले. लहान लहान उद्योगधंद्याचे राष्ट्रीयीकरण करणे शक्य नसल्याने त्याच्या मालकांना ट्रस्ट निर्माण करण्यास भाग पाडले व त्याचे रुपांतर पुढे सिंडीकेटमध्ये केले व त्यावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. याशिवाय स्टॅलीनने १ ऑक्टोबर १९३० पासून सार्वत्रिक शिक्षणाची सुरूवात केली. पर्यायाने साक्षरतेचे प्रमाणात बरीच वाढ झाली. त्याने जवळपास ५० लाख कामगारांना घरे बांधून दिलीत व त्यांच्यासाठी अनेक सुखसोयी निर्माण केल्यात. कामगारांसाठी ७ तासाचा दिवस ठरविण्यात आला व बेकारी पूर्णपणे नष्ट करण्याचा प्रयत्न केला.

स्टॅलीनच्या काळात दुसरी पंचवार्षिक योजना १९३३–३७ या काळात राबविण्यात आली. यात दैनंदिन जीवनासाठी आवश्यक उत्पादनावर अधिक भर देण्यात आल्याने औद्योगिक उत्पादन दुपटीने व अन्नधान्य उत्पादन तिपटीने वाढले. यासोबत दळणवळणाच्या सुविधांवरही लक्ष देण्यात आले. पक्क्या सडका व रेल्वे निर्माण करण्यात आल्यात. १९३६ मध्ये त्याने देशाला एक नवीन घटना लागू केली जी स्टॅलीनची राज्यघटना म्हणून ओळखली जाते. त्यात मतदानाचा हक्क, प्रत्यक्ष निवडणूक, गुप्त मतदान, द्विगृही सदन, माम्राज्यांगर्तत स्वायत्तता व एक पक्षीय राज्यकारभार अशी त्यात तरतूद केली. या घटनेने जरी वरवर लोकशाही प्रस्थापित करण्यात अल्याचा देखावा असला तरी मुळात येथै स्टॅलीनची हुकूमशाहीच अंतर्भूत होती. याकाळी रशियात बोल्शेविक पक्ष व पक्षाचा सुत्रधार स्टॅलीन म्हणेल तीच पूर्व दिशा होती. या काळात स्टॅलीनने हेरगिरी, देशद्रोह,

विश्वासघात आदी आरोप लावून विरोधकांचे शिरकाण घडवून आले. स्टॅलीननचे ते कार्य पाहून जगातील सुसंस्कृतींना मोठा धक्का बसला.

स्टॅलीनने पुढे १९३८ मध्ये तिसरी पंचवार्षिक योजना सुरू केली. त्यात दरडोई उत्पन्न वाढीवर लक्ष देण्याचे निर्धारित करण्यात आले होते. मात्र २२ जून १९४१ रोजी जर्मनीने रशियावर स्वारी केल्याने त्याने युत्रसामुग्री निर्मितीवर लक्ष केंद्रीत केले.

रशियाने स्टॅलीनच्या नेतृत्वाखाली आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व औद्योगिक या सर्व क्षेत्रात फार मोठा विकास घडवून आणला. जे कार्य करण्याला अमेरिकेसारख्या राष्ट्रांना १०० ते १५० वर्ष लागली ते कार्य स्टॅलीनने अवघ्या २०-२५ वर्षात करून दाखवल. उदा. क्रांतीपूर्वी रशियात साक्षरतेचे प्रमाण २७ टक्के होत तर १९३९ मध्ये ते ८५ टक्के झाले. १९२१ मध्ये रशियात हा कृषीप्रधान देश होता. औद्योगिकीरणाशिवाय रशियाची प्रगती होणे शक्य नाही हे जाणून स्टॅलीनने अनेक कारखाने सुरू करून रशियाचे स्वरूपच बदलवून टाकले. अन्नधान्याच्या बाबतीत त्याने देशाला स्वयंपूर्ण बनविले. मजूरांकरीता अनेक सुखसोयी निर्माण केल्या. रशियाच्या संरक्षणासाठी लालसेने सारखी बलाढ्य सेना स्टॅलीनने निर्माण केली. दुसरे महायुद्ध सुरू झाले त्यावेळी रशियाजवह दहा टॅक्स, एक लाख मोटारी, दहा हजार विमाने व १२५ लाख लाल सैन्य होते. स्टॅलीनने विज्ञानाच्या शिक्षणाला मोठ्या प्रमाणात उत्तेजन देऊन मोठ्या मोठ्या प्रयोगशाळा निर्माण केल्यात. अशा रीतीने स्टॅलीनने अतिशय थोड्या अवधीत रशियाची जी प्रचंड प्रगती घडवून आणली, त्यामुळे साऱ्या जगातील प्रमुख राष्ट्रे आश्चर्यचकीत होऊन गेलीत. स्टॅलीनची हुकूमशाही व साम्यवाद यामुळे हे शक्य झाले.

अशा या स्टॅलीनचे इ. स. १९५३ मध्ये निधन झाले. त्याचे व्यक्तिमत्व एकानुवर्ती आणि हट्टी होते. राजकीय क्षितीजावरून त्याचा अस्त झाल्यानंतर रशियाच्या परराष्ट्र धोरणाला एकदामच वेगळे वळण मिळाले. रशियातील पोलादी भिंत कोसळून रशियात विचारांचे मोकळे वारे वाहू लागले.

## ३.३ स्वयं अध्ययानासाठी प्रश्न

१. रशियन शेतकरी व कामगार यांच्या शोषणासंदर्भात विवेचन करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

२. रक्तरंजित रविवार या घटनेची पार्श्वभूमी विशद करून रशियन राज्यक्रांतीच्या दृष्टिने तिचे महत्त्व विशद करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

३. बुझर्वा क्रांतीच्या घटनाक्रम नमूद करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. ऑक्टोबर क्रांती का झाली या विषयी आपले मत नमूद करून तिची पार्श्वभूमी व घटनाक्रम स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५. रशियाच्या विकासात लेनीन व स्टॅलीनचे योगदानाचे महत्त्व स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ३.४ सारांश

रशियन राज्यक्रांती ही आधुनिक जगाच्या इतिहासाला एक वेगळे वळण देणारी घटना म्हणून ओळखली जाते. झारशाहीने आपले वर्चस्व अबाधित राखण्यासाठी केलेला प्रयत्न व त्यातून सरंजामदार, भांडवलदाराकडून शेतकरी व कामगार यांची होत असलेल्या पिळवणूकीने एल्गार पुकारला. कार्ममार्क्सच्या रूपाने त्यांना याकामी एक नवीन प्रेरणा मिळत गेली व त्यातून त्यांना स्वतःची जाणीव होऊन प्रस्थपित व्यवस्थेविरोधात त्यांनी बंडाचे निशाण फक्कावले. १९०५ च्या घटनेनंतर झार शाहीने कोणताही धडा घेतला नाही. उलट ड्युमाच्या माध्यमातून स्वतःचेच लोक निवडून आणण्याचा केलेला प्रयत्न त्यांना घातक ठरला व त्यातून इ.स. १९१७ मध्ये रशियात दोन क्रांत्या घडून आल्यात. दुसऱ्या क्रांतीनंतर लेनीनचे दूरदर्शी नेतृत्व रशियाला प्राप्त झाल्याने त्यांच्या विकासाला गती प्राप्त झाली. हाताबाहेर गेलेली. पुढे स्टूलीनच्या निमित्ताने जागतिक पातळीवर रशियाची एक नवी ओळख प्रस्थापित झाली. याचाच परिणाम पुढे रशिया हा जागतिक महासत्तेच्या स्पर्धेत पुढे येऊ शकला हे प्रकर्षाने लक्षात घ्यावे लागते.

## ३.५ पारिभाषिक शब्दे

१. रोमानेव – रशियात क्रांतीपूर्व काळात दीर्घपणे सत्तेवर राहिलेले राजघराणे

२. ड्युमा – १९०५ मध्ये स्थापन झालेली लोकप्रतिनिधींची सभा.

३. पेत्रोग्राद – इ. स. १९१४ मध्ये पीटर्सबर्ग या राजधानीच्या शहराचे नाव बदलून पेत्रोग्राद असे ठेवण्यात आले.

४. पीटर्सबर्ग सोविएत – क्रांतीकाळातसर्व कामगारांना एकाच झेंड्याखाली आणण्याच्या उद्देशाने कामगार प्रतिधिनी एकत्र येऊन केंद्रिय कामागर प्रतिनिधी मंडळ स्थान केले त्यास पीटर्सबर्ग सोविएत या नावाने ओळण्यात येऊ लागले.

५. लालसेना – परकीय आक्रमण व अंतर्गत बंडाळी मोडून काढण्यासाठी ट्रॉट्स्कीच्या नेतृत्त्वात लढलेली रशियन फौज.

## ३.६ संदर्भ सूची


१. कोलारकर श. गो., आधुनिक जगाचा इतिहास, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, सहावी आवृत्ती, २००५.

२. ओबिच्किन व इतर, ब्ला. इ.लेनिन : संक्षिप्त चरित्र, अनु. अनिल हवालदार, पग्रती प्रकाशनप, मास्को, १९७९.

३. सुमन वैद्य व शांता कोठेकर, आधुनिक जग भाग १ व २ श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

४. सुमन वैद्य, रशियाचा इतिहास खंड १८६०–१९६४५, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

५. हुकुमचंद जेन व कृष्णचंद माथुर, आधुनिक जगाचा इतिहास, कै. सागर प्रकाशन, पुणे.

६. गजानन भिडे, आधुनिक जगाचा इतिहास, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

७. विद्याधर महाजन, आधुनिक युरोप का इतिहास, एस.चंद आणि कंपनी, नई दिल्ली.


## ३.७ सरावासाठी प्रश्न / उपक्रम/क्षेत्रीय कार्य

१. आधुनिक जग – डॉऊ. श. गो. कोलारकर

२. रशियातील समाजवादी राज्यक्रांती – लिला आपटे

३. रशियन राज्यक्रांती – पा. वा. गाडगीळ

४. रशियाचा इतिहास – सुमन वैद्य

५. आधुनिक जग – सुमन वैद्य

६. ब्ला. इ. लेनिन संक्षिप्त३ चरित्र – ओबिच्किन व इतर

# घटक ४
# दोन महायुद्धांमधील जग

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्तना

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ राष्ट्रसंघ : कार्य आणि अपयश

 ४.२.२ जागतिक महामंदी

 ४.२.३ जर्मनी व इटलीमधील नाझीवाद व फॅसिस्टवादाचा उदय

४.३ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.६ संदर्भ सूची

४.७ सरावासाठी प्रश्न/उपक्रम/क्षेत्रीकार्य


## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१. राष्ट्रसंघाच्या स्थापनेची पार्श्वभूमी लक्षात येईल.

२. राष्ट्रसंघाची ध्येय व उद्दिष्टे लक्षात येईल.

३. राष्ट्रसंघाचे कार्य अभ्यासता येईल.

४. राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे समजतील.

५. जागतिक महामंदी म्हणजे काय हे समजेल.

६. जागतिक महामंदीचे अमेरिकेवर झालेले परिणाम अभ्यासता येतील.

७. जर्मनीतील हिटलरच्या उदयाची कारणे समजतील

८. इटलीतील मुसोलीनिच्या उदयाची कारणे समजतील.

## १.१ प्रस्तावना

२० वे शतक हे अनेक महत्त्वपूर्ण घटनांचे शतक म्हणून ओळखले जाते. मानवी जीवनावर दूरगामी परिणाम करणाऱ्या अनेक घटना या शतकामध्ये घडल्या. मानवी

जीवनाच्या अस्तित्वालाच आव्हान देणारी, प्रचंड विध्वंस घडवून आणलेले पहिले व दुसरे महायुद्ध. महायुद्धात झालेल्या विनाशाने हवालदिल होऊन पुन्हा अशी महायुद्धे होऊ नयेत त्यासाठी जागतिक शांतता प्रस्थापित करणारा राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रसंघ या संघटना, अमेरिकेच्या व पर्यायाने जगाच्या आर्थिक आरोग्याला आव्हान देणारी १९२९ ची जागतिक महामंदी, जगाला दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटणारे मुसोलिनी व हिटलर, दुसऱ्या महायुद्धानंतर जगाचे नेतृत्त्व कोण करावे यावरून साम्यवादी रशिया व भांडवलशाही अमेरिका यांच्यात सुरू झालेले शितयुद्ध अशा अनेक महत्त्वपूर्ण घटना या शतकात घडून आल्या. पहिल्या महायुद्धाची झळ थोड्याफार फरकाने युरोपातील सर्वच राष्ट्रांना बसली होती. महायुद्धातील हानीमुळे मानवी जीवन उध्वस्त झाले होते. पुन्हा असे महायुद्ध होऊ नये म्हणून राष्ट्रसंघ अस्तित्वात आला. १९२० ते १९३९ या कालखंडात राष्ट्रसंघाने महत्त्वपूर्ण कार्य केले. परंतु दुसरे महायुद्ध राष्ट्रसंघ थोपवू शकला नाही. पहिल्या महायुद्धानंतर १९२९ च्या जागतिक महामंदीच्या रुपाने अमेरिका व युरोपियन राष्ट्रसमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले. या आर्थिक संकटातून अमेरिकेला बाहेर पडण्यासाठी बरेच प्रयत्न करावे लागले. हिटलर व मुसोलिनी या दोन हुकूमशहांचा उदय अनुक्रमे जर्मनी व इटली या राष्ट्रांमध्ये झाला. त्यांच्या महत्त्वाकांक्षेमुळे व त्यांनी स्विकारलेल्या आक्रमक धोरणामुळे संपूर्ण जग दुसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करू लागले. राष्ट्रसंघ, जागतिक महामंदी व जर्मनी व इटलीमधील नाझीवाद व फॅटिस्टवादाचा उदय या घटनांचा अीयास आपण सदर घटकात करणार आहोत.

## ४.२ विषय विवेचयन

१९१४ ते १९१८ या कालखंडात पहिले महायुद्ध दोस्त राष्ट्र व मित्र राष्ट्र या दोन गटांमध्ये आकाश, पाणी व जमीन या तीनही पाळत्यांवर लढले गेले. या महायुद्धात दोस्त राष्ट्रांचा विजय झाला. महायुद्धात पराभूत राष्ट्रांबरोबरच विजयी राष्ट्रांचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होत. जागतिक पातळीवर पुन्हा असे महायुद्ध होऊ नये म्हणून राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. स्थापनेनंतरच्या पहिल्या दहा वर्षात राष्ट्रसंघाने राजकीय , सामाजिक व आर्थिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. त्यापुढील दहा वर्षात मात्र राष्ट्रसंघाला आपल्या कार्यात अपयश आले. १९२९ मध्ये संपूर्ण जगाला व्यापून टाकणाऱ्या जागतिक महामंदीची सुरूवात अमेरिकेतून झाली. रूझवेल्टच्या अथक प्रयत्नानंतर महामंदीवर मात करण्यात अमेरिका यशस्वी ठरली. दरम्यानच्या काळात जागतिक राजकारणात मुसोलिनी व हिटलर या हुकूमशहांचा उदय झाला. या हुकूमशहांच्या महत्त्वकांक्षेतून जग दुसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करू लागले. या सर्व घटामोडींचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

### ४.२.१ राष्ट्रसंघ : कार्य आणि अपयश

१९१४ ते १९१८ या कालखंडात पहिले महायुद्ध जमीन, पाणी व आकाश या तीनही पातळीवर लढले गेले. प्रचंड मोठ्या प्रमाणात जीवित व वित्त हानी पहिल्या महायुद्धात घडून आली. युद्धातील विजयी व पराभूत अशा सर्वच राष्ट्रांना महायुद्धाच्या दुष्परिणामांना

सामोरे जावे लागले. पहिल्या महायुद्धामुळे संपूर्ण मानवजातीच्या अस्तित्वासमोरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. पहिल्या महायुद्धाचे विनशकारी स्वरूप पाहून सर्वच राष्ट्रांना महायुद्ध नकोसे झाले होते. युद्धपूर्व काळातील सर्व देशाच्या राज्यकर्त्यांचे युद्धविषयक अंदाज आणि धोरणे यावर युद्धविषयक घटनांनी फार मोठा आघात केला होता. जागतिक शांतता निर्माण करण्यासाठी व टिकवून ठेवण्यासाठी एखाद्या आंतरराष्ट्रीय संघटनेची आवश्यकता सर्वच राष्ट्रांना तिव्रतेने भासू लागली. त्यातूनच राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. अमेरिकेचा तत्कालीन राष्ट्राध्यक्ष विड्रो विल्सन याने जानेवारी १९१८ मध्ये चौदा तत्त्वांचा जाहिरनामा प्रसिद्ध केला. यातील शेवटचे कलम म्हणजे चौदावे कलम राष्ट्रसंघाच्या स्थापनेसंदर्भातील होते. राष्ट्रसंघाच्या माध्यमातून संपूर्ण जगात शांतता, न्याय व सहजीवनाची हमी देण्याची कल्पना बुड्रो विल्सनने प्रथमच मांडली म्हणून बिड्रो विल्सनला राष्ट्रसंघाचा जनक असे म्हटले जाते.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे शांतता परिषद भरविण्यात आली. शांतता परिषदेच्या तहामध्ये पहिल्याच राष्ट्रसंघाचा विचार मान्य करण्यात आला. या परिषदेमध्ये बुड्रो विल्सनच्या नेतृत्वाची १९ सदस्यांची एक समिती राष्ट्रसंघाची सनद बनविण्यसाठी स्थापन करण्यात आली. ३ ते १९ फेब्रुवारी या काळात या समितीने राष्ट्रसंघाचा करारनामा तयार केला. विविध राष्ट्रामधून करारनामावर सूचना, उपसूचना, चर्चा व टिका होऊन काही किरकोळ बदल करण्यात आले. २८ एप्रिल १९१९ रोजी पॅरिस शांतता परिषदेने राष्ट्रसंघाच्या अंतिम मसुद्याला मान्यता दिली. १० जानेवारी १९२० रोजी पॅरिस येथे राष्ट्रसंघाची अधिकृत स्थापना करण्यात आली. एका अर्थाने राष्ट्रसंघ ही अनेक राष्ट्रांची एकजूट होती. स्वित्झर्लंडमधील जिनिव्हा येथ राष्ट्रसंघाचे कार्यालय ठेवण्याचा निर्णय पॅरिस शांतता परिषदेत घेण्यात आला. नोव्हेंबर १९२० मध्ये राष्ट्रसंघाचे कार्य जिनिव्हा येथे सुरू झाले. राष्ट्रसंघ ही जरी जागतिक संघटना असली तरी जगातील सर्वच राष्ट्रांना राष्ट्रसंघात प्रतिनिधीत्व देण्यात आले नव्हते. सुरूवातीला साम्यवादी रशियाला सदस्यत्व नाकारण्यात आले होते. त्याचबरोबर पहिल्या महायुद्धात पराभूत झालेल्या राष्ट्रांनाही राष्ट्रसंघाचे सदस्यत्व देण्यात आले नाही. राष्ट्रसंघाची ३० दोस्त राष्ट्रे व १३ तटस्थ अशी ४३ संस्थापक सदस्य राष्ट्रे होती. १९२६ मध्ये जर्मनीस तर १९३४ मध्ये साम्यवादी रशियाला राष्ट्रसंघाचे सदस्यत्व देण्यात आले. परंतु तोपर्यंत जर्मनी, जपान, इटली या राष्ट्रांनी राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा त्याग केला होता. अमेरिकन सिनेटने राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा प्रस्ताव फेटाळल्याने अमेरिका राष्ट्रसंघाचे सदस्य होऊ शकली नाही.

### ४.२.१.१ राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये

राष्ट्रसंघाच्या करारनाम्याच्या प्रस्तावनेत राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये स्पष्ट करण्यात आली आहेत. ती पुढीलप्रमाणे आहेत.

१. जागतिक शांतता व सुव्यवस्था निर्माण करून टिकवून ठेवणे.

२. जागातील विविध राष्ट्रांत परस्पर सहकार्य निर्माण करणे.

३. जागतिक प्रश्न युद्धाच्या मार्गाने न सोडवता शांततेच्या मार्गाने सोडवणे.

४. जागातील सर्व राष्ट्रांच्या सार्वभौमत्त्वाचा आदर करणे.

५. आंतरराष्ट्रीय सहकार्य, शांतता आणि सुरक्षिततेमध्ये वाढ करणे.

६. राष्ट्र-राष्ट्रातील संबंध मैत्रीचे व परस्पर सहकार्याचे निर्माण करणे.

७. आंतराष्ट्रीय कायद्याचे पालन करणे.

८. सभासद राष्ट्रामध्ये निःशस्त्रीकरण घडवून आणणे.

९. मागासलेल्या राष्ट्रांची प्रगती करण्यास मदत करणे.

### ४.२.१.२ राष्ट्रसंघाची रचना

जागतिक शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. राष्ट्रसंघाचे कार्य पद्धतीशीर होण्यासाठी राष्ट्रसंघाची रचना पुढीलप्रमाणे करण्यात आली होती.

### १. परिषद

परिषद ही राष्ट्रसंघाची महत्त्वाची घटक संस्था होती. परिषद हे राष्ट्रसंघाचे कायदेमंडळ होते. परिषद राष्ट्रसंघाच्या सर्व समस्यांवर विचारविमर्श करणारी प्रातिनिधीक स्वरूपाची संस्था होती. राष्ट्रसंघाच्या सर्व सभासद राष्ट्रांचा समावेश परिषदेमध्ये करण्यात आला होता. परिषदेमध्ये सदस्य राष्ट्राला जास्तीत जास्त तीन प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार सदस्य राष्ट्रांना होता. परंतु मतदानाच्या वेळी एकच मत देता येत असे. हे सर्व प्रतिनिधी त्या त्या सदस्य राष्ट्रांच्या सरकारने नियुक्त केलेले असून त्या सरकारच्या मार्गदर्शनानुसार प्रतिनिधीची राष्ट्रसंघातील निती व कार्याचे स्वरूप निर्धारित होत असे. बऱ्याच वेळेस राष्ट्राचे प्रधानमंत्री परराष्ट्रमंत्री हेच त्या राष्ट्राचे प्रतिनिधी म्हणून परिषदेला उपस्थित राहत असत. परिषदेच्या अध्यक्षाची निवड साधारणतः छोट्या राष्टाच्या प्रतिनिधीतून सदस्य राष्ट्र करीत असत. अध्यक्षांच्या मदतीला आठ उपाध्यक्ष असत. जागतिक मुत्सद्यांची परिषद म्हणून परिषदेकडे पाहिल जाते. महासभेची सर्वसामान्य बैठक वर्षातून एकदा जिनेव्हा येथे होत असे. कमीत कमी तीन आठवडे व आवश्यकता भासल्यास जास्त वेळ बैठक चालत असे. आंतरराष्ट्रीय समस्यांचा विचार करून त्यावर उपायोजना करण्याचे काम परिषद करत असे. तसेच राष्ट्रसंघाच्या विविध मंडळाकडून आलेल्या अहवलांची चर्चा परिषदेमध्ये होत असे. राष्ट्रसंघाच्या कार्यक्षेत्रात मोडणाऱ्या जागतिक शांततेसंबंधी असलेल्या सर्व बाबीवर विचार विनिमय करण्याचा अधिकार परिषदेला होता. राष्ट्रसंघाच्या घटनेत दुरूस्ती करण्याचा अधिकारही परिषदेला होता. त्याचबरोबर राष्ट्रसंघाच्या घटनेत दुरूस्ती करण्याचा अधिकारही परिषदेला होता. त्याचबरोबर राष्ट्रसंघाचे धोरण ठरवणे. आंतरराष्ट्रीय कायदे करणे, आंतरराष्ट्रीय संघर्षावर शांततापूर्ण मार्ग काढणे, राष्ट्रसंघाच्या घटक संस्थांवर देखरेख ठेवणे, राष्ट्रसंघाचे अंदाजपत्रक मंजूर करणे, आंतरराष्ट्रीय न्यायालयील न्यायाधीशांच्या नेमणूका करणे. राष्ट्रसंघाच्या कामकाजाची दिशा ठरवणे व नवीन राष्ट्रांना सदस्यत्व देणे ही इतरही कामे परिषद करीत असे.

### २. समिती

समिती ही राष्ट्रसंघाचे कार्यकारी मंडळ होती. राष्ट्रसंघाच्या रयनेत समिती हा सर्वात प्रधान आणि प्रबळ घटक होता. स्थायी आणि अस्थायी सदस्यांची मिळून समिती

अस्तित्वात येत असे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली व जपान ही पाच राष्ट्रे स्थायी सदस्य होती. तर चार अस्थायी राष्ट्रे समिती राष्ट्रसंघाच्या सदस्य राष्ट्रांमधून निवडत असे. सदस्य राष्ट्रांच्या समतेच्या तत्त्वावर नव्हे तर सत्ता प्राबल्याच्या तत्त्वावर समितीची उभारणी करण्यात आली होती. समितीचे अध्यक्षपद इंग्रजी वर्णमालेच्या अक्षरांच्या कामानुसार सदस्य राष्ट्रात प्रत्येक अधिवेशनात फिरते ठेवले जात असे. अमेरिकेने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व सुरूवातीपासूनच न स्विकारल्यामुळे स्थायी सदस्यसंख्या चारच होती. स्थायी व अस्थायी सदस्यांची संख्या वेळोवेळी कमी जास्त होत गेली. समितीचे अधिवेशन वर्षातून किमान तीन वेळा व आवश्यकता वाटल्यास जास्त वेळा भरवले जात असे. समितीच्या स्थायी सदस्यांना कोणताही निर्णय एकमताने घ्यावा लागत सअे. अस्थायी सदस्यांनी एकमताने एखादा निर्णय घेतला आणि स्थायी सदस्यामध्ये एकमत न झाल्यास तो निर्णय फेटाळून लावला जात असे. नकाराधिकाराच्या रूपाने स्थायी सदस्यांना विशेष अधिकार देण्यात आला होता. त्याचा पद्धतीशीर वापर आपले व आपल्या मित्र राष्ट्रांचे हितसंबंध जपण्यासाठी अस्थायी राष्ट्रे करत असत. जागतिक शांतता निर्माण करणे, शांततेच्या मार्गाने प्रश्न सोडवणे, निःशस्त्रीकरणासंबंधी योजना आखणे, आक्रमण झाल्यास किंवा आक्रमणाचा धोका दिल्यास जागतिक शांतता व सुव्यवस्था टिकवण्यासाठी दंडात्मक व प्रतिकारात्मक कार्यवाही निश्चित करून तत्संबंधी राष्ट्राला आदेश देणे, सचिवालयाच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, निरनिराळ्या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषदा आयोजित करणे, राष्ट्रसंघाच्या विविध यंत्रणेकडून अहवाल मागवून त्याच्यावर विचारविनिमय करणे, सरचिटणीस व इतर कर्मचारी वर्गाची नियुक्ती करणे, राष्ट्रसंघाच्या नियंत्रणाखाली असलेल्या वसाहतींची देखभाल करणे, आज्ञांकित प्रदेशाच्या शासनाकडे लक्ष देणे ही कामे समितीस पार पाडावी लागत होती. राष्ट्रसंघाची सर्वश्रेष्ठ यंत्रणा म्हणून समितीकडे पाहिले जात होते.

### ३. सचिवालय

राष्ट्रसंघाचे कायम स्वरूपाचे कार्यालय म्हणजे जिनिव्हा येथील सचिवालय. राष्ट्रसंघाचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी सचिवालयाची स्थापना करण्यात आली होती. सचिवालयाचे कामकाज वर्षभर चालत असे. राष्ट्रसंघाची कायम स्वरूपाची ही एकमेव यंत्रणा असल्याने आणीबाणीच्या प्रसंगी सचिवालयाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असे. राष्ट्रसंघाची कार्यालयीन भाषा इंग्रजी व फ्रेंच होती. सरचिटणीस हा सचिवालयाचा प्रमुख होता. सरचिटणीस समितीकडून निवडला जात असे.

राष्ट्रीयसंघाचे कायम स्वरूपाचे कार्यालय म्हणजे जिनिव्हा येथील सचिवालय. राष्ट्रसंघाचे दैनंदिन कामकाज पाहण्यासाठी सचिवालयाची स्थापना करण्यात आली होती. सचिवालयाचे कामकाज वर्षभर चालत असे. राष्ट्रसंघाची कायम स्वरूपाचीही एकमेव यंत्रणा असल्याने आणीबाणीच्या प्रसंगी सचिवालयाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरत असे. राष्ट्रसंघाची कार्यालयीन ाषा इंग्रजी व फ्रेंच होती. सरचिटणीस हा सचिवालयाचा प्रमुख होता. सरचिटणीस समितीकडून निवडला जात असे. सरचिटणीसाच्या हाताखाली दोन सहचिटणीस व दोन उपचिटणीस असून विविध

राष्ट्रातील कार्यक्षम व तज्ञ असे ७५० लोकांचा कर्मचारी वर्ग सरचिटणीसाच्या मदतीस होता. या कर्मचारी वर्गाची नियुक्ती सरचिटणीस समितीच्या सल्ल्याने करीत असे. सचिवालयातील अधिकाऱ्यांना राष्ट्रसंघाच्या निष्ठेची शपथ घ्यावी लागत असे. राष्ट्रसंघाची कार्यक्षमता ही सचिवालयाच्या कार्यक्षमतेवर अवलंबून होती. राष्ट्रसंघास उपयुक्त असलेली माहिती जमा करणे, परिषद व समिती यांच्या निर्णयांची व आदेशाची अंमलबजावणी करणे, राष्ट्रसंघाचे दफ्तर सांभाळणे, जमा-खचाृचा हिशोब ठेवणे, परिषद व समिती यांची कार्यक्रम पत्रिका तयार करणे व त्यांचे निर्णय आणि आदेश कार्यान्वित करणे. राष्ट्रसंघाच्या कार्याला प्रसिद्धी देणे. राष्ट्रसंघाच्या ध्येयधोरणांना मूर्त स्वरूप देणे ही कामे सचिवालयाची होती.

## ४. आंतरराष्ट्रीय न्यायालय

आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता निर्माण करण्याचे प्रमुख उद्दिष्ट राष्ट्रसंघाचे असल्याने आंतरराष्ट्रीय न्यायालयास महत्त्व प्राप्त झाले होते. हॉलंड येथील हेग येथे १९२२ मध्ये आंतरराष्ट्रीय न्यायालयाची स्थापना करण्यात आली होती. आंतरराष्ट्रीय न्यायालयात ११ न्यायाधीश होते. ४ सहाय्यक न्यायाधीश ही होत. त्यांची नियुक्ती ९ वर्षासाठी केली जात असे. १९३० मध्ये न्यायाधीशांची संख्या १५ करण्यात आली आणि सहाय्यक न्यायाधीश ही पदे रद्द करण्यात आली. विविध सदस्य राष्ट्रांमधून कायदेतज्ञ असणाऱ्या न्यायाधीशांची निवड परिषद व समितीच्या माध्यमातून आंतरराष्ट्री न्यायालयात केली जात होती. न्यायाधीश आपापल्या राष्ट्रांचे न्यायाधीश म्हणून नव्ह तर राष्ट्रसंघाचे म्हणून न्यायदानाचे काम करीत असत. न्यायाधीश पदावर नियुक्ती झाल्यानंतर त्यांनी आपला देशाभिमान बाजूला ठेवून जागतिक दृष्टिकोन बाळगणे अभिप्रेत होते. एखाद्या न्यायाधीशास अपात्र ठरवून पदावरून काढून टाकवयाचे झाल्यास न्यायालयातील सर्व न्यायाधीशांनी मिळून निर्णय घेणे आवश्यक होते. आंतरराष्ट्रीय झगड्यांचा निवाडा करणे. आंतरराष्ट्रीय कायद्यांचा व तहाचया कलमांचा अर्थ लावणे. आंतरराष्ट्रीय कायद्याबाबत विविध प्रश्नांवर निकाल देणे, आंतरराष्ट्रीय करारांचा भंग झालेला आहे किंवा नाही त ठरवणे एखाद्या प्रश्नासंबंधी परिषद व समितीने मत मागवल्यास सल्ला देणे. आंतरराष्ट्रीय कायद्यांचे विश्लेषण करणे ही कामे आंतरराष्ट्रीय न्यायालयाची होती. न्यायालयाच्या दैनंदिन कामकाजाकरिता फ्रेंच व इंग्लीश भाषांचा वापर केला जात होता. न्यायालयाचे निर्णय राजकीय पार्श्वभूमीवर न आधारता आंतरराष्ट्रीय कायद्यावर आधारलेले असत. न्यायालयाचे निर्णय बहुमताने घेतले जात होते.

## ५. आंतराष्ट्रीय कामगार संघटना

आंतरराष्ट्रीय कामगार संघटना ही तांत्रिकदृष्ट्या राष्ट्रसंघाची घटक संस्था नव्हती. परंतु पॅरिस शांतता परिषदेत या संघटनेचा समावेश करण्यात आला होता. औद्योगिक क्रांतीमुळे युरोपखंडात कारखानदारीचा उदय झाला होता. त्यामुळे मोठ्या प्रमाणात कामगार वर्गाचाही उदय झाला होता. भांडवलदार वर्गाकडून कामगारांची पिळवणूक सुरू झाली. आपले प्रश्न सोडविण्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर एखादी संघटना असावी असे कामगारांना वाटत होती. १९०० मध्ये कामगारांच्या हितासाठीउकायदे करणारी एक

संस्था आकारास आली. कामगारांच्या जीवनमानात सुधारणा घडवून आणण्यासाठी पॅरिस शांतता परिषदेने राष्ट्रसंघाची एक शाखा म्हणून आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेची स्थापना केली. राष्ट्रसंघाचे सदस्य नसलेल्या राष्ट्रांनाही आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सदस्यत्व घेता येत होते. अमेरिकेने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व स्विकारले नव्हते. पण १९३४ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सदस्यत्व मात्र स्विकारले होते. १९३९ पर्यंत ६० राष्ट्रे आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचे सदस्य झाले होते. जिनिव्हा येथे या संघटनेचे कार्यालय होते. वर्षातून एकदा सर्वसाधारण सभेची बैठक होत असे. जागतील कामगारांचे ऐक्य घडवून आणून त्यांच्या परिस्थितीत योग्य व हितकार बदल घडवून आणणे हे या संघटनेचा मुख्य उद्देश होता. त्याचबरोबर बेकारी नाहीशी करणे, जागतील कामगारांच्या कामाचे तास नियंत्रित करणे. सुट्ट्या, विमा, वैद्यकीय व इतर सोयी, निवृत्ती वेतन, कामगार स्त्रिया व मुले यांचे संरक्षण ही इतर कामेही या संघटनेची होती. राष्ट्रसंघ विसर्जीत झाल्यानंतरही ही संघटना अस्तित्वात होती. पुढे संयुक्त राष्ट्रसंघात आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेचा समावेश करण्यात आला.

### ६. विश्वस्त समिती

राष्ट्रसंघाच्या सनदेतच विश्वस्त समिती किंवा मँडेट पद्धतीचा समावेश करण्यात आला होता. ही योजना पहिल्या महायुद्धातील जर्मनी, ऑस्ट्रिया व तुर्कस्थान या पराभूत राष्ट्राकडून विजेत्या राष्ट्रांनी जिंकलेल्या किंवा घेतलेल्या प्रदेशांचा कारभार पहाण्यासंबंधीची होती. पहिल्या महायुद्धात विजेत्या राष्ट्रांनी पराभूत राष्ट्रांकडून जो प्रदेश जिंकून घेतला होता तो प्रदेश दोस्त राष्ट्रांयनी गिळंकृत करू नये म्हणून विश्वस्त समितीची योजना अंमलात आणली गेली. पॅरीस शांतता परिषदेत पराभूत राष्ट्रांचा वसाहती व प्रदेश दोस्त राष्ट्रांनी अपापसात वाटून घेतले. या योजनेनुसार पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांनी जिंकलेला प्रदेश राष्ट्रसंघाच्या देखरेखीखाली ठेवण्यात आला. संबंधित प्रदेशाचा दैनंदिन कारभार पहाण्याची जबाबदारी मात्र दोस्त राष्ट्रांकडे देण्यात आली. या प्रदेशाचा राज्यकारभार पाहताना दोस्त राष्ट्रांनी त्यांचे शोषण न करता विश्वस्त या नात्याने कारभार पाहावा. सदर प्रदेश विकसित राष्ट्राच्या देखरेखीखाली ठेवल्यास. त्यांना आर्थिक व इतर मदत दिल्यास त्यांचा विकास होऊन त्यांना स्वातंत्र्य देता येईल. विश्वस्त राष्ट्रांनी आपल्या नियंत्रणाखाली असलेल्या प्रदेशांच्या शासनाविषयी प्रतिवर्षी राष्ट्रसंघाकडे अहवाल सादर करण्याचे ठरविण्यात आले. त्यासाठी मॅडेट कमिशन स्थापन करण्यात आले. या योजनेनुसार इंग्लंडकडे पॅलेस्टाईन, इराक व टांगानिका हे ऑस्ट्रीयाकडे सामोआ, न्युझीलंड व प्रशांत सागर बेटे हे प्रदेश देण्यात आले. वसाहतींच्या कारभारासंबंधीचा वार्षिक अहवाल विश्वस्त राष्ट्रांनी राष्ट्रसंघाच्या समितीकडे सादर करण्याचे बंधन विश्वस्त राष्ट्रांवर घालण्यात आले. या वार्षिक अहवालाची छाननी करून आपले मत व शिफारसी राष्ट्र संघ समितीपुढे ठेवण्याचे काम मॅडेट कमिशन करत असे. या अहवालावर समितीमध्ये चर्चा होत असे. आज्ञांकीत प्रदेशाचे शासन तेथील रहिवाशांच्या कल्याणाच्या दृष्टीने संबंधीत राष्ट्रानेकरावे अशी अपेक्षा राष्ट्रसंघाची होती. परंतु संबंधीत राष्ट्रांच्या स्वार्थी धोरणामुळे ते शक्य झाले नाही.

## ४.२.१.३ राष्ट्रसंघाचे कार्य

अमेरिकेचा तत्कालीन राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन याच्या पुढाकारातून १९२० मध्ये

राष्ट्रसंघ अस्तित्वात आला. १९२० ते १९३९ पर्यंत म्हणजेच दुसरे महायुद्ध सुरू होईपर्यंत राष्ट्रसंघाने विविध क्षेत्रात कार्य केले. आंतरराष्ट्रीय पातळीवर शांतता निर्माण कयन टिकवणे व सर्व वादग्रस्त प्रश्न वाटाघाटीच्या मार्गाने सोडविणे हा राष्ट्रसंघाचा मुख्य उद्देश होता. यामध्ये राष्ट्रसंघ पूर्णपणे यशस्वी ठरला नसला तरी पूर्णपणे अपयशी ठरला असेही नाही. जागतिक पातळीवर बालढ्य राष्ट्राशी संबंधित असलेले प्रश्न सोडवणे राष्ट्रसंघाला शक्य झाले नाही. १९३१ नंतर जगातील बलाढ्य राष्ट्रांनीच जागतिक पातळीवर आक्रमक धोरणाचा स्विकार केला. त्यांच्या या आक्रमक धोरणाला राष्ट्रसंघ आवर घालू शकला नाही. त्यातूनच दुसरे महायुद्ध उद्‌भवले. म्हणजेच ज्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती तो उद्देशच सफल झाला नाही. राष्ट्रसंघाच्या स्पिनेनंतरच्या पहिल्या दहा वर्षात राष्ट्रसंघाने विविध क्षेत्रात कार्य केले. या काळात राष्ट्रसंघाला ४० राजकीय विवाद सोडवावे लागले. नंतरच्या कालखंडात मात्र राष्ट्रसंघ अपयशी ठरला. राष्ट्रसंघाचे कार्य पुढीलप्रमाणे अभ्यासता येईल.

### अ) राजकीय क्षेत्रातील कार्य

### १. ऑलंड बेटाचा प्रश्न

ऑलंड बेटावर कोणाचे वर्चस्व असावे यावरून स्विडन व फिनलँड यांच्यामध्ये १९२० मध्ये वाद निर्माण झाला. ऑलंड फिनलंडच्या ताब्यात होते. परंतु तेथील बहुसंख्य जनता स्विडिश असल्याने आपण स्वीडनमध्ये सामील झाले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यासाठी तेथील जनतेने चळवळ सुरू केली. या चळवळीस स्विडनने पाठिंबा दिला. तर फिनलँडने ही चळवळ दडपून टाकण्यासाठी शस्त्रबळाचा वापर केला. युद्धाचीशक्यता लक्षात घेऊन इंग्लंडने हा प्रश्न राष्ट्रसंघात उपस्थित केला. राष्ट्रसंघाने ऑलंड बेटाबाबत दोन्ही देशांची बाजू ऐकून घेऊन या बेटावरील फिनलँडचे वर्चसव मान्य केले. पण तेथील स्विडीश जनतेच्या हक्काच्या सुरक्षिततेची हमी फिनलँडकडून घेण्यात आली. राष्ट्रसंघाचा हा निर्णय दोन्ही राष्ट्रांनी मान्य केला. १९२२ मध्ये ऑलंड बेट तटस्थ घोषित करून आंतरराष्ट्रीय संरक्षण देण्यात आले.

### २. युपेन–मेल्मेडी संघर्ष

युपेन व मेल्मेडी हा प्रदेश पॅरिस शांततापरिषदेने बेल्जियमला देण्यात आला होता. परंतु पुढे या प्रदेशावर जर्मनीने आपला हक्क सांतिला. १९२० मध्ये राष्ट्रसंघाने या प्रश्नाचा अभ्यास करून या प्रदेशावरील बेल्जियमचे वर्चस्व कायम ठेवले.

### ३. पोलंड–लिथुआनिया सीमा प्रश्न

पोलंड व लिथुआनिया यांच्या सीमेवर असलेले व्हिलना शहर कोणाचे असावे यावरून दोन्ही राष्ट्रामध्ये तणाव निर्माण झाला पोलंड व लिथुआनिया या दोन्ही राष्ट्रांना व्हिलना शहरावर आपलेच वर्चस्व असावे असे वाटत होते. पोलंडच्या या मागणीला फ्रान्सने पाठिंबा दिला. राष्ट्रसंघाने व्हिलना शहर पोलंडला दिले. त्यामुळे लिथुआनिया नाराज होऊन राष्ट्रसंघाच्या निर्णयाचा निषेध केला.

### ४. ग्रीस व इटली यांच्यातील वाद

ग्रीस व इटली यांच्यातील सीमारेषा निश्चित करण्यासाठी नेमण्यात आलेल्या

कमिशनमधील इटलीने प्रतिनिधीचा खून २३ ऑगस्ट १९२३ मध्ये झाला. या घटनेबद्दल नुकसानभरपाई देऊन ग्रीसने माफी मागावी अशी मागणी इटलीने केली. ग्रीसनेही मागणी नाकरताच इटलीने फ्यूम बेटावर वर्चस्व प्रस्थापित केले. हा प्रश्न ग्रीसने राष्ट्रसंघामध्ये उपस्थित केला. राष्ट्रसंघाने मध्यस्थी करून हा प्रश्न सोडवला. ग्रीसने इटलीस नुकसानभरपाई म्हणून ५ कोटी लिरा देण्याचे मान्य केल्यानंतर इटलीने फ्युम बेटावरील आपले सैन्य काढून घेतले.

### ५. ग्रीस–बल्गेरीया यांच्यातील संघर्ष

ऑक्टोबर १९२५ मध्ये बल्गेरिया व ग्रीसच्या सीमारेषेवर ग्रीसच्या लष्करी अधिकाऱ्याचा खून झाला. या घटनेचे निमित्त साधून ग्रीसने बल्गेरियावर आक्रमण केले. बल्गेरियाने हा प्रश्न राष्ट्रसंघात उपस्थित केला. राष्ट्रसंघाने युद्धबंदीचा आदेश देऊन हा प्रश्न सोडविण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स व इटालियन सदस्यांची समिती नियुक्त केली. या समीने ग्रीसला दोषी धरून ग्रीसला बल्गेरियास नुकसानभरपाई देण्यास भाग पाडले. अशा पद्धतीने हा प्रश्न राष्ट्रसंघाने सोडवला.

### ६. इंग्लंड–फ्रान्स वाद

१९२१ मध्ये मोरोक्को व ट्यूनिस या प्रदेशामध्ये फ्रान्सने केलेल्या राष्ट्रीयत्वाच्या कायद्यावरून इंग्लड व फ्रान्स या राष्ट्रामध्ये संघर्ष निर्माण झाला. फ्रान्सने राष्ट्रीयत्वाबाबतचा केलेला कायदा ब्रिटिश कायद्याशी विसंगत होता. हा कायदा म्हणजे फ्रान्सचा अंतर्गत प्रश्न आहे अशी भूमिका फ्रान्सने घेतली. इंग्लंडने हा प्रश्न राष्ट्रसंघामध्ये उपस्थित केला. राष्ट्रसंघाने हा प्रश्न फ्रान्सचा अंतर्गत प्रश्न नाही हे स्पष्ट केले. शेवटी हा प्रश्न दोन्ही राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांनी वाटाघाटीच्या माध्यमातून सोडवला.

### ७. युपेन–मेल्मेडी संघर्ष

पॅरिस शांतता परिषदेतील व्हर्सायच्या तहानुसार युपेन व मेल्मेडी हे प्रदेश बेल्जियमला देण्यात आले होते. १९२० मध्ये जर्मनीने या निर्णयाच्या विरोधात राष्ट्रसंघाकडे तक्रार करून हे प्रदेश जर्मनीस देण्याची मागणी केली. राष्ट्रसंघाच्या समितीने जर्मनीच्या तक्रारीची दखल घेऊन या प्रश्नाचा अभ्यास केला आणि या प्रदशातील बेल्जियमचे वर्चस्व योग्य असल्याचे सांगितले.

### ८. आर्मोनिया–तुर्कस्थान प्रश्न

तुर्कस्थान व रशिया यांच्या सीमेवरील काही प्रदेशांचे एकत्रीकरण करून आर्मेनिया या स्वतत्र राष्ट्राची निर्मिती पॅरिस शांतता परिषदेत करण्यात आली होती. आर्मोनियाच्या प्रगतीसाठी आर्थिक मदतही देण्यात आली. नंतर मात्र आर्मेनिया व तुर्कस्थान यांच्या संघर्ष सुरू झाला. हा संघर्ष सोडवण्याचा बराच प्रयत्न राष्ट्रसंघाने केला.

## अ) राष्ट्रसंघाचे इतर क्षेत्रातील कार्य

राजकीय क्षेत्रातील कार्य करत असताना राष्ट्रसंघाने अराजकीय क्षेत्रातही महत्त्वपूर्ण कार्य केले. राष्ट्रसंघाचे ह सामाजिक व मानवतावादी कार्य मानवजातीच्या दृष्टीने अधिक

महत्त्वपूर्ण ठरले. कोणत्याही राष्ट्रांचे राजकीय हितसंबंधयामध्ये गुंतले नसल्यामुळ राट्रसंघाला हे कार्य अधिक जोमाने करता आले.

### १. आंतरराष्ट्रीय बौद्धिक सहकार समिती

राष्टसंघाने आंतरराष्ट्रीय पातळीवर कला, ज्ञान व विज्ञान क्षे९ात निरनिराळ्या देशात सहकार्य घडवून आणण्यासाठी १९२२ मध्ये आंतरराष्ट्रीय बौद्धिक सहकार समितीची स्पिना केली. त्यामुळे ज्ञान, विज्ञान,कला व वाङ्‌मय क्षेत्रात जगाचा विकास घडून आला.

### २. जागतिक आरोग्य संघटना

१९२३ मध्ये जागतिक आरोग्य संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेच्या माध्यमातून मलेरिया, क्षयरोग, व कॅन्सर या रोगांचे निर्मुलन करण्यासाठी अनेक देशांना मदत केली. बालमृत्यूविषयी जागृती घडून आणली. तसेच आरोग्यविषयक माहितीचे संकलन, साथीच्या रोगांना आळा घालणे, सभासद राष्ट्रांच्या आरोग्य सेवामध्ये सुत्रबद्धता आणणे, नवनवीन शोधांची माहिती सभासद राष्ट्रांना पुरवणे इ. कामे राष्ट्रसंघाने केली. राष्ट्रसंघाच्या या मौलिक सहकार्यामुळे निरनिराळ्या राष्ट्रातील आरोग्य व्यवस्था सुधारण्यास मदत झाली.

### ३. गुलामगिरीविरोधी परिषद

राष्ट्रसंघाने १९२५ मध्ये जिनिव्हा येथे गुलामगिरी विरोधी परिषद आयोजित केली. या परिषदेत राष्ट्रसंघाने काही दशात प्रचलित असलेल्या स्त्रिया, पुरूष व मुले यांच्या गुलामगिरीवर बंदी घातली.

### ४. दळणवळण समिती

दळणवळ समितीची स्थापना राष्ट्रसंघाने केली होती. या समितीच्या माध्यमातून नद्याचे आरोग्य, मजूर संघटना, रेल्वेचा निरनिराळ्या शाखा, हवाई वाहतूक इ. संदर्भात सहकार्य प्रस्थापित करून दळणवळणात बरीच प्रगती घडवून आली होती.

### ५. वित्त समिती

वित्त समितीची स्थापना करून राष्ट्रसंघाने खोटे दस्तऐवज तयार करणे, दुहेरी कर आकारणी, खोटी नाणी तयार करणे, व्यापारविषयक प्रश्नावर लवाद नेमणे, विविध देशांना वित्तपुरवठा करणे, सोन्याच्या बाजारभावावर नियंत्रण प्रस्थापित करण्याचे काम केले.

### ६. युद्धकैद्यांची अदलाबदल

पहिले महायुद्ध सुय असताना एकमेकांचे अनेक सैनिक युद्धकैदी म्हणून सहभागी राष्ट्रांनी पकडले होते. अशा सैनिकांना आरोग्यविघातक परिस्थितीत, दारुण हालअपेष्टा सहन करीत पुढील संपूर्ण आयुष्य युद्धकैदी म्हणून जगावे लागणार होते. परंतु या प्रश्नाबाबत राष्ट्रसंघाने निभावलेली भूमिका मानवतेच्या दृष्टीने अत्यंत उपकारक ठरली. राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीमुळे १९२२ पर्यंत युद्धकैदी सैनिकांना आपापल्या घरी जाणे शक्य झाले. युद्धकैद्यांच्या अदलाबदलीचा प्रश्न राष्ट्रसंघाच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडला.

### ७. मादक पदार्थाबाबतचे कार्य

मानवी आरोग्यावर परिणाम करणाऱ्या व मानवी जीवनाच्या दृष्टीने घातक असलेल्या

अफू, गांजा व कोकेन यांचे सेवन न करण्याबाबतची जागृती राष्ट्रसंघाने केली. या पदार्थांच्या व्यापारावर आळा घालण्याचा प्रयत्न केला.

वरील प्रकारचे महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रसंघाने यशस्वीरित्या पार पाडले.

### ४.२.१.४ राष्ट्रसंघाच्या अपयशाची कारणे

जागतिक शांतता प्रस्थापित करण्याच्या उद्देशाने १९२० मध्ये राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. १९२० ते १९३० या कालावधीत राष्ट्रसंघ आपल्या कार्यात यशस्वीही ठरला होता. परंतु १९३० ते१९३९ या कालावधीत मात्र राष्ट्रसंघ अपयशी ठरला. हा कालखंड राजकारणात स्विकारलेली आक्रमक भूमिका मात्र राष्ट्रसंघ थोपवू शकलानाही. १९३१ चे जपानचे मांचूरियावरील आक्रमण, १९३४ पासून जर्मनीने स्विकारलेल आक्रमक धोरण, १९३५ मधील इटलीचे इथिओपियावरील वर्चस्व पाहत बसण्याशिवाय राष्ट्रसंघ काहीच करू शकला नाही. परिणामी राष्ट्रसंघाच्या स्थापनेनंतर अवघ्या वीस वर्षाच्या आत जग पहिल्या महायद्धापेक्षाही विनाशकारी, व्यापक व विध्वंसक अशा दुसऱ्या महायुद्धात लोटले गेले. राष्ट्रसंघाच्या अपयशामुळेच जगाला दुसऱ्या महायुद्धाला तोंड द्यावे लागले. राष्ट्रसंघाच्या अपयशाला प्रामुख्याने पुढील कारणे कारणीभूत ठरली.

### १. व्हर्सायच्या तहाशी घातलेली सांगड

पॅरीस शांतता परिषदेत तयार करण्यात आलेल्या व्हर्सायच्या तहाशी राष्ट्रसंघाची सांगड घालण्यात आली होती. पण ही घटना जगाच्या दृष्टीने भावी काळात दुर्दैवी स्वरूपाची ठरली. व्हर्सायचा तह हा सुडभावनेने, द्वेषातून करण्यात आला होता. या तहामध्ये राष्ट्रसंघाची घटना अंतर्भूत करण्यात आली होती. त्यामुळे राष्ट्रसंघाबाबत सुरूवातीपासून तिरस्कार आणि उदासीनता निर्माण झालेली होती. राष्ट्रसंघ म्हणजे व्हर्सायचा तह अंमलात आणण्यासाठी स्थापन करण्यात आलेली संघटना आहे अशी बहुतांश राष्टांची मानसिकता झाली. राष्ट्रसंघ आणि व्हर्सायचा तह वास्तिवक एकमेकांशी निगडी करण्याचे कोणतेही कारण नव्हते.

### २. राष्ट्रसंघाचा विचार रुजला नाही

राष्ट्रसंघाची कल्पना भव्यदिव्य आणि अद्वितीय स्वरूपाची होती. पहिले महायुद्ध चालू असतांना अनेकांनी या कल्पनेचे स्वागत केले. परंतु युरोपातल्या निरनिराळ्या राष्ट्रामध्ये आणि लोकांमध्ये राष्ट्रसंघाची कल्पना रुजली नव्हती. कारण नशीबावर हवाला ठेवण्याची वृत्ती, अंधश्रद्धा या कल्पना जनतेच्या मनात होत्या. त्यामुळे राष्ट्रसंघाची कल्पना रुजविण्यासाठी जो कालावधी मिळाला तो थोडाच होता. तसेच सभासद राष्ट्रांनी आपल्या सार्वभौमत्वाचा त्याग केला नाही.

### ३. राष्ट्रसंघ जागतिक स्वरूपाचा बनला नाही

राज्यसंघाचे यश हे त्याच्या जागतिक स्वरूपावर अवलंबून होते. परंत जगातील सर्व राष्ट्रे राष्ट्रसंघाचे सभासद झाले नाहीत. जर कदाचित जगातील सर्व राष्ट्रे राष्ट्रसंघाची सभास द झाले असते तर राष्ट्रसंघाचा इतिहास वेगळा घडला असता. रशिया व जर्मनी या राष्ट्रांना सुरूवातीच्या काळात राष्ट्रसंघाचे सदस्यत्व देण्यात आले नाही. अमेरिकेनेही राष्ट्रसंघाचे

सभासदत्व नाकारले होते. जर्मनी, इटली आणि जपान या सभासद राष्ट्रांनी उतरत्या काळात राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा राजीनामा देऊन राष्ट्रसंघाला धक्का दिला. त्यामुळेही राष्ट्रसंघावरील विश्वास उडाला. राष्ट्रसंघाला जागतिक स्वरूप प्राप्त होऊ शकले नाही.

## ४. अमेरिकेचे अलिप्ततावादी धोरण

राष्ट्रसंघाच्या सुरूवातीपासून अमेरिकेने राष्ट्रसंघात सामील होण्याचे नाकारले. वास्तविक अमेरिका राष्ट्रसंघात सामील न झाल्यामुळे राष्अ्रसंघाला फार मोठा धक्काबसला व या धक्क्यापासून राष्ट्रसंघ कधीच सावरू शकला नाही. अमेरिकेने पहिल्या मायुद्धात केलेल्या युद्धप्रवेशामुळेच दोस्त राष्ट्रांना विजय प्राप्त झाला होता. पहिल्या महायुद्धानंतर जगातील एक बलाढ्या राष्ट्र म्हणून अमेरिकेचा उदय झाला होता. अमेरिकेसारख्या बलाढ्य राष्अ्रानेच राष्ट्रसंघाचे सदस्यत्व नाकारल्यामुळे राष्ट्रसंघ जन्माताच अपंग जन्मला असे म्हटले गेले. अमेरिका जर राष्ट्रसंघाचे सदस्य राष्ट्र असते तर राष्ट्रसंघाला अधिक बळकटी मिळाली असती.

## ५. हुकूमशहांचा उदय

पहिल्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात इटलीमध्ये मुसोलिनी, जर्मनीमध्ये हिटलर या हुकूमशहांचा उदय झाला. या हुकूमशहांनी जागतिक राजकारणात आक्रमक धोरणांचा स्वीकार केला. राष्ट्रसंघाने त्यांच्या आक्रमक धोरणाचा निषेध करताच या हुकूमशहांनी राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा त्याग केला. त्यामुळे राष्ट्रसंघाची ध्येयधोरणे, नियम त्यांच्यावर बंधकनकार राहिजे नाहीत. हुकूमशहांनी स्वीकारलेल्या आक्रमक धोरणाला राष्ट्रसंघ पायबंद घालू शकला नाही. परिणामी जागतिक शांतता धोक्यात येऊन जग दुसऱ्या महायुद्धाकडे वाटचाल करू लागले.

## ६. राष्ट्रसंघाकडे स्वतःचे सैन्य नव्हते

राष्ट्रसंघाची घटना तयार करत३ असताना राष्ट्रसंघाच्या घटनेत अनेक मुलभूत दोष राहून गेले होते. राष्ट्रसंघाकडे कोणताही ठराव पास केल्यास तो अंमलात आणण्यासाठी राष्ट्रसंघाकडे लष्करी स्वरूपाची ताकद नव्हती. जागतिक पातळीवरील सर्वच प्रश्न सामंजस्याने, चर्चेने सुटणारे नव्हते. त्यासाठी प्रसंगी बलाचा वापरही करावा लागणार होता. अशा प्रसंगी राष्ट्रसंघाला सदस्य राष्ट्रांच्या सैन्यावर अवलंबून रहावे लागत होत. सदस्य राष्ट्रांनी प्रत्येक वेळेस स्वतःचे सैन्य राष्ट्रसंघाला देण्याचे टाळले. राष्ट्रसंघाजवळ स्वतःचे सैन्य नसल्यामुळे वादविवादास्पद प्रश्न सोडवणे शक्य झाले नाही. त्यामुळे जागतिक शांतता धोक्यात आली.

## ७. राष्ट्रसंघात जनतेचे प्रतिनिधी नव्हते

राष्ट्रसंघात सरकारचे प्रतिनिधी होते परंतु जनतेचे प्रतिनिधी नव्हते. कारण राष्ट्रसंघ हा निरनिराळ्या राष्ट्रातील सरकारचे फक्त प्रतिनिधत्व करीत होता. राष्ट्रसंघाच्या कार्यवाहीत निरनिराळ्या राष्ट्रातील जनतेला सहभागी होता येत नव्हते. त्यामुळे जनतेच्या अशा, आकांक्षा राष्ट्रसंघात व्यक्त होत नसत. राष्ट्रसंघाच्या कोणत्याही कार्यवाहीला जनतेचा

उत्साहन आणि पाठिंबा मिळत नव्हता.

वरील प्रकारच्या अनेक कारणांमुळ राष्ट्रसंघाला आपले कार्य करण्यात येश आले नाही. परिणामी राष्ट्रसंघ अपयशी ठरला व १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू झाले.

## ४.२.२ जागतिक महामंदी

१९१४ त १९१८ या काळात पहिजे महायद्ध लढले गेले. १९१८ मध्ये पहिल्या महायुद्धाचा शेवट झाला. पण त्याचे परिणाम मात्र दूरगामी स्वरूपाचे ठरले. महायुद्धातील सर्वच सहभागी राष्ट्रांना महायुद्धाचे प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष परिणाम भोगावे लागले. महायुद्धातील विजेती राष्ट्रेही त्यातून सुटली नाहीत. असे असले तरी महायुद्धाचा सर्वाधिक परिणाम जर्मनीला भोगावा लागला. राजकीय क्षेत्रातील परिणामापेक्षा आर्थिक क्षेत्रातील परिणाम अधिक गंभीर व दूरगामी स्वरूपाचे होते. सहभागी बहुतांश राष्भ्रामध्ये युद्धाचा अपरिहार्य परिणाम म्हणून चलनफुगवटा निर्माण झाला होतो. व्हर्सायच्या तहानुसार नुकसानभरपाई जर्मनीस दोस्त राष्ट्रांना देणे भाग पडत होते. पॅरिस शांतता परिषदेत जर्मनीचे जास्तीत जास्त खच्चीकरण करण्यावर फ्रान्सने भर दिला होता. कारण जर्मनी फ्रान्सला स्पर्धक राष्ट वाटत होते. त्यामुळै व्हर्सायच्या तहाची काटेकोर अंमलबजावणी झाली पाहिजे असे फ्रान्सला वाटत होते. जर्मनीचे सर्वांगीण खच्चीकरण करणे युरोपातील सत्तासंतुलनाच्या दृष्टीने इंग्लंड व अमेरिकेला धोक्याचे वाटत होते. त्यामुळे महायुद्धानंतर जर्मनीला आर्थिक सहकार्य करण्याचे धोरण अमेरिकेने स्विकारले होते. जर्मनीला आर्थिक गर्तेतून बाहेर काढण्यासाठी जर्मनीची क्रयशक्ती वाढणे, जर्मनीची औद्योगीक व आर्थिक प्रगती होणे गरजेचे होते.

पहिल्या महायुद्धाच्या अगोदर औद्योगिक क्षेत्रात अमेरिकेने मोठ्या प्रमाणात प्रगती केली होती. पहिल्या महायुद्धाचा तुलनेने सर्वाधिक फायदा अमेरिकेला झाला होता. महायुद्ध अमेरिकन युद्धभूमीवर न झाल्याने अमेकरकन उद्योगधंद्याचे नुकसान झाले नव्हते. शिवाय महायुद्धाच्या काळात अमेरिकेने दोस्त राष्ट्रांना व मित्र राष्ट्रांना शस्त्रांची विक्री करून मोठ्या प्रमाणात पैसा मिळवला होता. पहिल्या महायुद्धाच्या कालखंडात युरोपियन राष्ट्रांचे उद्योगधंदे मोठ्या प्रमाणात उध्वस्त झाले होते. त्यामुळे महायुद्धाच्या समाप्तीनंतर युरोपीयन राष्ट्रामध्ये जीवनावश्यक वस्तुंची टंचाई निर्माण झाली होती. युरोपीयन राष्ट्रांनी जीवनावश्यक वस्तुंची आयात अमेरिकेकडूनकरण्यास सुरूवात केली. त्यामुळे अमेरिकन उद्योगधंदे अधिकाधिक भरभराटीस आले. १९२१ ते १९२९ या काळात औद्योगिक उत्पादन दुपटीने वाढले. जीवनावश्यक वस्तुंच्या विक्रीतून अमेरिकेला मोठ्या प्रमाणात पैसा मिळू लागला. रेडिओ, मोटारकार, वॉशिंग मशिन्स, रेफ्रिजेटर, मोटारसायकली या वस्तुंचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले. १९२० मध्ये अमेरिकेत ७० लाख मोटारी होत्या. १९२९ मध्ये ही संख्या २ कोटी ४० लाखापर्यंत पोहोचली. अमेरिकेन जर्मनीला उद्योगधंद्याच्या उभारणीसाठी कर्जही दिले. याचाही फायदा अमेरिकेला झाला. १९१९ मध्ये अमेरिका हे सर्वात मोठे धनको राष्ट्र तर इंग्लंड हे क्रमांक दोनचे धनको राष्ट्र बनले. अमेरिकन बॅकांनी युरोपात विशेषतः जर्मनीमध्ये मोठ्या प्रमाणात पैसागुंतवण्यास सुरूवात केली. आपल्या बँकामध्ये ठेवी ठेवण्यास अमेरिकन लोकांना प्रवृत्त करण्यासाठी आकर्षक व्याजदर जाहिर केले. १९२० ते १९२८ या काळात तसे व्याजही दिले. त्यामुळ बँकातील ठेवी वाढल्या. हाच पैसा

जर्मनीमध्ये गुंतवण्यात आला. एकूणच १९२० ते १९२८ या दरम्यानचा कालखंड अमेरिकेच्या आर्थिकदृष्ट्या सर्वोच्च भरभराटीचा, संपन्नतो व भौतिक सुखसमृद्धीचा कालखंड होता. १९२७ पासून शेअर्सच्या किंमती मोठ्या प्रमाणात वाढल्या पण ही वाढ फार काळ टिकू शकली नाही. १९२९ च्या मध्यास अमेरिकेच्या शेअर बाजारात अस्थिरता जाणवू लागली. ऑक्म्टोबर १९२९ मध्ये अमेरिकेच्या राष्ट्रीय सुबत्तेचा डोलार मुळापासून हादरू लागला. २१ ऑक्टोबर १९२९ रोजी शेअर्सच्या किंमती अचानक खाली आल्या. २४ ऑक्टोबर हा दिवस अमेरिकन शेअर बाजाराच्या इतिहासात घातवार ठरला. २४ ऑक्टोबर रोजी वॉल स्ट्रीटवर शेअर विक्रीसाइी प्रचंड गर्दी जमली. परंतु शेअर खरेदी करणस एकही गिऱ्हाईक मिळाले नाही. या दिवशी १ कोटी २० लाख डॉलरचे शेअर अत्यल्प किंमतीला विकले गेले. २९ ऑक्टोबर १९२९ पर्यंत चालूच होती. शेअर बाजार कोसळल्याचा परिणाम अमेरिकेच्या सर्व आर्थिक व्यवहारावर झाला. १९३२ मध्ये शेअरच्या किंमतींनी तळ गाठला. महामंदीच्या लाटेला थोपवून धरणे दिवसेंदिवस अमेरिकेला अशक्य होऊ लागले. संपूर्ण अमेरिका मंदिने ग्रासली. मंदीची लाट सर्वव्यापी व दिर्घकालीन स्वरूपाची आहे याची जाणीव अमेरिकेला झाली. अमेरिकेतील महामंदीचा परिणाम युरोपियन राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवरही होण्यास सुरूवात झाली. १९३१ पर्यंत बहुतेक सर्व युरोपात मंदीची लाट पसरली होती. शेअरबाजार गडगडल्यामुळे अमेरिकन लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले. लोकांची बँकावरीलविश्वासउडाल्यामुळे बँकातील ठेवी परत घेण्यास लोकांनी गर्दी केली. त्यामुळे बँका बंद कराव्या लागल्या. १९२९ मध्ये पंचवीस हजाराहून जास्त बँका दिवाळखोरीत निघाल्या. बाजारातील मालाला उठाव नसल्यामुळे कारखाने बंद करण्यात आले. कारखाने बंद झाल्यामुळे सुमारे १ कोटी ४० लाख लोक बेकार झाले. शेतकऱ्यांच्या हाल अपेष्टांना तर सीमाच राहिली नाही. बाजारात धान्याला उठाव नसल्यामुळे शेतकरीही अडचणीत आले. १९२९ पूर्वी १२७९ कोटी टन असलेले शेती उत्पादन १९३२ मध्ये ५५६ कोटी टनांपर्यंत खाली आले. बांधकामे बंद पडली. लक्षावधी लोकांचे दिवाळे निघाले. आपल्या देशातील बुडणाऱ्या बँका वाचवण्यासाठी अमेरिकन सरकारने युरोपियन राष्ट्रांना दिलेले कर्ज परत घेण्यास सुरूवात केली. याचा परिणाम युरोपीयन अर्थकारणावर झाला. सर्व आर्थिक व्यवहार ठप्प झाल्यामुळे सरकारचे कररूपी मिळणारे उत्पन्नही घटत गेले. परंतु खर्च मात्र दिवसेंदिवस वाढतच गेला. अमेरिकेवरील महामंदीचे संकट दिवसेंदिवस गडद होत गेले. तत्कालीन अमेरिकन राष्ट्राध्यक्ष हुव्हर याला ही परिस्थिती पहात बसण्याशिवाय पर्याय राहिला नाही. कारण महामंदी नष्ट करण्यासाठी त्याने केलेल्या उपाययोजना अपुऱ्या पडल्या. परदेशामध्ये अमेरिकेचे गुंतवलेले भागभांडवल, संरक्षक जकातीचे दुष्परिणाम, बेसुमार सट्टेबाजी, ठराविक वस्तुंचे अतिरिक्त उत्पादन, कामगार व शेतकऱ्यांच्या दैनावस्था, अमेरिकन लोकांचा कर्जबाजारीपणा, संरक्षक जकातीचे दुष्परिणाम, राष्ट्रीय उत्पन्नाचे विषम वाटप, असंतुलीत आर्थिक विकास ही कारणे प्रामुख्याने महामंदीस कारणीभूत ठरली.

१९२९ ते १९३२ या काळात हुवर शासनाने महामंदी आटोक्यात आणण्यासाठी केलेल्या सर्व उपायोजना व्यर्थ ठरल्या. त्यामुळे हुवर शासनावरील लोकांचा विश्वास उडाला. महामंदीच्या काळातच १९३२ मध्ये अमेरिकेत राष्ट्राध्यपदाच्या निवडणूका होऊन

डोमॉक्रॅटीक पक्षाचे फ्रॅकलीन रुझवेल्ट हा अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष झाला. या निवडणूकीत महामंदी हा कळीचा मुद्दा ठरला होता. १९३० ते १९३३ या कालखंडात पाच हजार बँा दिवाळखोरीत निघाल्या. बँकांचे व्यवहार ठप्प झाले होते. बेकरी, उपासमार व हालअपेष्टांमध्ये अमेरिकन अर्थव्यवस्था अडकली होती. महामंदीचा सर्वात मोठा आघात सामान्य अमेरिकन लोकांवर झाला. अनेकांच्या आयुष्यभराच्या बचती एका रात्रीत नष्ट झाल्या. भविष्याच्या चिंतेने, निराशेने व वैफल्याने लोकांची मने हेलावून गेली होती. बँका व कारखाने बंद झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात बेकरी वाढली. लोकांना काम न मिहाल्याने उपासमार होऊ लागली. या भीषण परिस्थितीतून मार्ग काढण्याची अत्यंत जोखमीची कामगिरी रूझवेल्टवर आली होती. ४ मार्च १९३३ रोजी रूझवेल्टने राष्ट्राध्यक्षपदाची सुत्रे स्विकारून महामंदीची तिव्रता कमी करण्याचा प्रयत्न सुरू केला. लोकांचा बँकावरील उडालेला विश्वास पुन्हा बसवणे. बंद पडलेले कारखाने पुन्हा सुरू करणे. बंद झालेला परराष्ट्रीय व्यापार पुन्हा सुरू करणे. बेकारांना काम मिळवून देणे. अन्नधान्याच्या सातत्याने कमी झालेल्या किंमती सावरून शेतकऱ्यांचे जीवनमान सुधारणे ही प्रमुख आव्हाने रूटवेल्टसमोर होती. महामंदीरूपी आणीबाणीच्या परिस्थितीतून जनतच्या सहकार्याने देशाला सुखरूपपणे बाहेर काढण्याचे आश्वासन त्याने जनतेला दिले. रूझवेल्टने महामंदीचया संकटावर मात करण्यासाठी आपले नवे आर्थिक धोरण (New Deal) जाहीर केले. अमेरिकन अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी त्याने १९३३ पासून आथिृक सुधारणांचा पुरस्कार केला. तो व्यवहारावादी व चतुर मुर्तसद्दी होता. नवीन आर्थिक धोरण अंमलात आणताना त्याने परंपरागत सिद्धांतांची बंधने मानली नाहीत. तसेच पक्षीय संकुचितपणाही ठेवला नाही. ६ मार्च रोजी एक अध्यादेश काढून चार दिवस सर्व बँका बंद ठेवल्या. बँकामधून ठेवी काढून घेण्याचे जे धोरण लोकांनी स्विकारले होते ते बंद करून बँकातील लोकांच्या ठेवी सुरक्षित असल्याचा विश्वास लोकांमध्ये निर्माण करावा हा त्यांचा हेतू होता. दुबळ्या बँका बंद केल्या तर चांगल्या बँकांना राष्ट्रीय संरक्षण दिले. त्यामुळे बँकावर लोकांचा उडालेला विश्वास परत आला. बँकावरील सरकारच्या नियंत्रणामुळे अर्थव्यवस्थेतील गोंधळ एका वर्षाच्या आत बराच कमी होऊन आर्थिक व्यवहार सुरळीत चालू झाले. शेअरबाजारात वाढलेल्या सट्टेबाजीला आळा घालण्यासाठी सरकारच्या परवानगीशिवाय शेअर विक्रीवर बंदी घातली. सरकारी खर्चाला कात्री लावली. आपल्या भाषणातून लोकांना बँकांमध्ये पैसे ठेवण्याचे आवाहन केले. मार्च ते मे १९३३ या कालखंडात रूझवेल्टने महामंदीला आळा घालण्यासाठी संसदेमध्ये अनेक दूरगामी परिणाम करणारी व महामंदी आटोक्यात आणणारी अनेक विधयेके पारित केली. १९३४ मध्ये सेक्युरिटीज एक्सचेंज कमिशन स्थापन करून स्टॉक एक्स्चेंजचे व्यवहार पूर्वपदावर आणले. अन्नधान्याचे उत्पादन कमी करून किंमत वाढविणे, परदेशात अन्नधान्याची निर्यात करणे, कमी व्याजदरात शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी व कृषि उत्पादनात स्थैर्य आणण्यासाठी ॲग्रीकल्चरल ॲडजेटमेंट उॲडमिनिस्ट्रेशन (A.A.A) ची स्थापना करण्यात आली. बेकारीनिवारण हा एक मोठा प्रश्न रूझवेल्टसमोर होता. बेकारांना मदत केली पाहिजे. पण ती फुकट नकोअसे रूझवेल्टला वाटत होते. बेकारांना काम देण्यासाठी सिव्हिलियन कॉन्झर्व्हेशन कोअर (C.C.C) नावाची संघटना स्थापन केली. या संघटनेच्या माध्यमातून बेकारांना झाले लावणे, धरणे, रस्ते, इस्पितळे, शाळा, पूर प्रतिबंधक उपाय

योजनेसारख्या कामावर C.C.C ने सुमारे पाच लाख बेकार तरुणांना काम दिले. त्यासाठी ३० कोटी डॉलर्सची तरतूद करण्यात आली. कामावरील बेकारांना अन्न-वस्त्र-निवाऱ्याची सरकारच्या वतीने व्यवस्था करण्यात आली. १९३३ मध्ये फॉर्मर्स रिलीफ अॅक्ट मंजूर करून शेतकऱ्यांना नुकसानभरपाई देण्यात आली. शेतमालाच्या किंमती वाढवून देण्यात आल्या. त्यामुळे १९३७ पर्यंत शेतमालाचे उत्पन्न दुपटीपर्यंत वाढले. रीकन्स्ट्रक्शन फिनान्स कार्पोरेशन (R.F.C) मार्फत गरजू छोटे कारखानदार, विमा कंपन्या, शेतकरी, रेल्वे कंपन्याना कमी व्याजदरात कर्ज देण्याची व्यवस्था केली. बेकारांना काम देण्यासाठी रूझवेल्टने टेनेसी व्हॅली प्रकल्प हाती घेतला. हा प्रकल्प टेनेसी नदीच्या खोऱ्यातील वीज व पाणीपुरवठा संबंधी होता. १९३३ मध्ये हाती घेतलेल्या या प्रकल्पामुळे अमेरिकेच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेचे पुनरूज्जीवन झाले. या प्रकल्पात पाच अस्तित्वात असलेली धरणे सुधारण्यात आली. तरवीस नवीन धरणे बांधण्यात आली. या धरणांचा वापर विजनिर्मितीसाठी करण्यात आला. या धरणातून होणाऱ्या मुबलक विजनिर्मितीमुळ विजेचे दर कमी झाले. परिणामी विजेचा एकूण वापर ६० टक्के नी वाढला. अतिपर्जन्याच्या प्रदेशात धरणे बांधून पाण्याचा साठा केला आणि ६५२ मैलाचा नऊ रूंद कालवा तयार करून दळणवळणाचे एक मोठे साधननिर्माण केले. या धरणामुळ जमिनीची धूप तर थांबलीच, शिवाय शेतीसाठी पाणीपुरवठ्याची सोयही झाली. महामंदीच्या संकटातून उद्योगधंद्यांना बाहेर काढण्यासाठी रूझवेल्टने १९३३ मध्ये नॅशनल इंडस्ट्रियल रिकव्हरी अॅक्ट पास केला. त्यामुळे हळू हळू महामंदी आटोक्यात येण्यास सुरूवात झाली.

रूझवेल्टने धडाडीने, उत्साहाने व चिकाटीने महामंदी घालवण्यासाठी प्रयत्न केल. त्याचे प्रयत्न, धडपड पाहून सामान्य अमेरिकन माणूस प्रोत्साहीत झाला. रूझवेल्टने हाती घेतलेल्या नव्या आर्थिक धोरणामुळ अमेरिकन अर्थव्यवस्था महामंदीच्या चक्रातून हळूहळू बाहेर पडू लागली. १९३२ ते १९४० या काळात नव्या आर्थिक धोरणाने अमेरिकेच्या मोडलेल्या अर्थव्यवस्थेला पुन्हा गतिमान केले. अमेरिकन अर्थव्यवस्थेला स्थैर्य मिळवून दिले. लक्षावधी शेतकऱ्यांना व मध्यमवर्गीयाना कर्जबाजरीपणातून मुक्त केले. अमेरिकन लोकांची विस्कळीतझालेली आर्थिक जीवनाची घडी नीट बसवली. लोकांच्या कलयाणची जबाबदारी सरकारची आहे हे तत्त्व त्याने घालून दिले. एकूणच मंदीची लाट परतवून लावण्यात रूझवेल्टने यश मिळवले. रूझवेल्टचे नवे आर्थिक धोरण म्हणजे त्याच्या प्रचंड आत्मविश्वासाचे, धडाडीचे, कार्यक्षमतेचे मूर्तिमंत प्रतीक होते.

महामंदीचे परिणाम

१९२९ च्या जागतिक महामंदीने अमेरिकन अर्थव्यवस्थेवर व अमेरिकन समाजजीवनावर दूरगामी परिणाम घडवून आणले. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

१. आपण केलेल्या गुंतवणूकीवर फायदा मिळेल या आशेने सामान्य अमेकिरन लोकांनी शंअरमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक केली होती. परंतु २१ ऑक्टोबर १९२९ पासून झपाट्याने शेअरच्या किंमती घसरल्या. परिणामी अमेरिकन लोकांनी शअरमध्ये केलेली गुंतवणूक वाया गेली.

२.महामंदीमुळे लोकांनी बँकेत ठेवलेल्या ठेवी परत घेण्यास एकच गर्दी केली. शिवाय

ज्या लोकांनी, भांडवलदारांनी बँकाकडून कर्जे घेतली होती ती महामंदीमुळे परत न केल्याने हजारो बँका दिवाळखोरीत निघाल्या. अशा बँका कायमच्या बंद करण्यावाचून दुसरा पर्याय अमेरिकन प्रशासनापुढे राहिला नाही.

३.महामंदीचा सर्वाधिक फटका अमेरिकन अर्थव्यवस्थेला बसला. अमेरिकन अर्थव्यवस्थेचा पायाच महामंदीमुळे डळमळीत झाला.

४.१९२० ते १९२८ हा कालखंड अमेरिकन माणसांच्या दृष्टीने भरभराटीचा कालखंड होता. त्यामुळे अमेरिकन लोकांनी हप्त्यांवर विविध चैनीच्या वस्तू खरेदी केल्या होत्या. महामंदीमुळे हे हप्ते भरणे अमेरिकन लोकांना शक्य झाले नाही. परिणामी सदर वस्तुंचे उत्पादन करणारे कारखाने, बँका बंद पडल्या.

५.महामंदीमुळे अमेरिकन लोकांची क्रयशक्ती घटली होती. बाजारपेठेतील मालाला उठाव नसल्याने तो तसाच पडून राहिला. परिणामी सदर मालांचे उत्पादन करणारे कारखाने बंद पडले. कारखाने बंद पडल्यामुळ कामगार बेकार झाले. बेकाररांचा मोठा प्रश्न अमेरिकन प्रशासनासमोर निर्माण झाला.

६.महामंदीच्या काळात लोकांना काम देण्याची लोकोपयोगी कामे हाती घेतली होती. त्याचा आर्थिक भार अमेरिकन तिजोरीवर पडला. शिवाय मंदावलेला परराष्ट्रीय व्यापार, कमी झालेले उत्पन्नाचे स्त्रोत यामुळे सरकारचे उत्पन्न मोठ्या प्रमाणात घटले. १९३० मध्ये १६ अब्ज डॉलर असलेल राष्ट्रीय कर्ज १९३३ मध्ये २२ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचले.

## ४.२.३ – जर्मनी व इटलीमधील नाझीवाद व फॅसिस्टवादाचा उदय

### ४.२.३.१ जर्मनीतील नाझीवादाचा उदय

१९१८ मध्ये पहिले महायुद्ध संपुष्टात आले. पहिल्या महायुद्धाचे दिर्घकालीन परिणाम मानवजातीला भोगावे लागले. लोकशाहीकरीता जग सुरक्षित ठेवले पाहिजे अशी घोषणा करून पाहिल्या महायुद्धातविजय अमेरिकेने सहभाग घेतला होता. महायुद्धातील विजय म्हणजे लोकशाहीचा विजय अशी घोषणा महायुद्धानंर दोस्त राष्ट्रांनी वारंवार केली. परंतु या घोषणेला युरोपातील काही राष्ट्रांमध्ये झालेल्या हुकूमशाहीच्या उदयाने धक्का दिला. युद्धोत्तर परिस्थिती हाताळण्यामध्ये युरोपीयन राष्ट्रांना अपयश येऊ लागले. त्यामुळे लोकशाही शासनव्यवस्थेवरील लोकांचा विश्वास उडू लागला. परिणामी महायुद्धानंतर परिस्थिती हुकूमशाहीच्या उदयास पोषक ठरू लागली. इटलीमध्ये मुसोलिनी, जर्मनीमध्ये हिटलर, स्पेनमध्ये जनरल फ्रॅको तर जपानमध्ये जनरल टोजो या हुकूमशाहांचा उदय घडून आला. पहिल्या महायुद्धातील जर्मनी हे पराभूत राष्ट्र होते. जर्मनीच्या पराभवाबरोबरच कैसर विल्यम दुसरा याचे जर्मनीवरील वर्चस्व संपुष्टात आले. महायुद्धानंतर जर्मन शासनाची उसूत्रे फ्रेडरिक एबर्ट व फिलीप शिडमन या हाती येऊन जर्मन प्रजासत्तक अस्तित्वात आले. वायमर या ठिकाणी जर्मनीसाठी राज्यघटनाही तयार करण्यात आली. वायमर राज्यघटना ही जर्मनीतील पहिली लिखीत राज्यघटना होय. या घटनेनुसार अध्यक्ष हा देशाचा प्रमुख असून त्याचा कार्यकाळ पाच वर्षाचा करण्यात आला. जर्मनीत द्विगृही कायदेमंडळ अस्तित्वात

आले. पहिल्यामहायुद्धानंतर दोस्त राष्ट्रांनी जर्मनीवर जबरदस्तीने व्हर्सायचा तह लादला . या तहाच्या माध्यमातून जर्मनीचे सर्वांगीण खच्चीकरण करण्यावर दोस्त राष्ट्रांनी भर दिला. त्यामुळे जर्मन जनतेत दोस्त राष्ट्राविषयी असंतोषाची भावना निर्माण झाली. तसेच महायुद्धानंतर जर्मनीमध्ये निर्माण झालेल्या समस्या हाताळण्यात तत्कालीन वायमर सरकारला अपयश आले याचा अचूक फायदा हिटलरने घेतला व जर्मनीमध्ये हिटलरचा उदय घडून आला.

## अ) हिटलरच्या उदयाची कारणे

### १. व्हर्सायचा अपमानकारक तह

१९१८ मध्ये पहिले महायुद्ध संपुष्टात आले. महायुद्धोत्तर जगाची पुर्नरचना करण्यासाठी फ्रान्सची राजधानी पॅरिस येथे शांतता परिषदेच आयोजन करण्यात आले होत. म्हणून या परिषदेला पॅरिस शांतता परिषद असे म्हटले जाते. या परिषदेमध्ये विजत्या राष्ट्रांती महायुद्धात झालेली आपली नुकसानभरपाई वसूल करण्यासाठी पराभूत राष्ट्रांवर विविध तह लादले. पराभूत जर्मनीवर व्हर्सायचा तह जबरदस्तीने लादण्यात आला. या तहानुसार पहिल्या महायुद्धास जर्मनीस जबाबदार धरण्यात आले. पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांची झालेली हानी नुकसानभरपाईच्या माध्यमातून जर्मनीने द्यावी. खजिन संपन्न अल्सेस व लॉरेन्स प्रदेश फ्रान्सला द्यावेत. डॅन्झींग बंदर मुक्त शहर म्हणून घोशीत करावे. ऱ्हाईन प्रदेशाचे निर्लष्करीकरण करावे. सार खोऱ्यातील कोळशाच्या खाणींवर जर्मनीने स्वतःचा हक्क सोडावा. लष्कराची मर्यादा एक लाख करावी अशा अनेक जाचक अटी जर्मनीवर लादण्यात आल्या. जर्मनीचा स्वाभिमान दुखावला जाईल व जर्मनी सतत दुर्बल राहील याची काळजी या तहाच्या माध्यमातून दोस्त राष्ट्रांनी घेतली. या अन्यायकारक तहामुळे जर्मनी दुखावला गेला. दोस्त राष्ट्रांविषयी जर्मन जनतेमध्ये असंतोषाची भावना निर्माण झाली.

### २. वायमर प्रजासत्ताकाचे अपयश

कैसर विल्यम दुसरा हॉलंडला पळून गेल्यानंतर दोस्त राष्ट्रांच्या पुढाकारातून जर्मनीमध्ये वायमर प्रजासत्ताकची स्थापना करण्यात आली. सत्तेत आलेल्या वायमर प्रजासत्ताकासमोर अडचणींचा अक्षरशः डोंर होता. वायमर प्रजासत्ताकाने जर्मन जनतेचा विरोध असताना दोस्त राष्ट्रांच्या दबावापुढे झुकून जर्मनीच्या दृष्टीने अन्यायकारक असलेल्या व्हर्सायच्या तहावर सही केली. त्यामुळे जर्मन जनतेमध्ये वायमर प्रजासत्ताक अप्रिय ठरले. वायमर प्रजासत्ताकाला जर्मन राष्ट्राची नव्याने उभारणी करायची होती. जर्मन जनतेला लोकशाही सरकारची सवयही नव्हती व लोकशाही मानवणारी नव्हती. अनियंत्रित अस्तित्वात असल्याने लोकशाही कल्पना जर्मन मनात रूजणे अशक्य होते. त्यामुळे प्रत्येकजण वायमर प्रजासत्ताकाच्या उणिवावर बोट ठेऊ लागले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात जर्मनीची बाजू समर्थपणे मांडण्यात व जर्मनीला आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात वायमर प्रजासत्ताकाल अपयश आले. व्हर्सायच्या अपमानकार तहावर सही करून या सरकारने राष्ट्राची मानहानी, विश्वासघात केला असे जर्मन जनतेस वाटू लागले. लोकशाही नेत्यांच्या दौर्बल्यामुळे व राष्ट्रद्रोही वृत्तीमुळे राष्ट्राचे भवितव्य अंधारलेले आहे अशी लोकांची खात्री झाली. त्यामुळे या प्रजासत्ताकची राजवट जेवढ्या लवकर  संपुष्टात आणता येईल. तेवढ्या लवकर

संपुष्टात आणली पाहिजे अशी मानसिकता जर्मन जनतेची झाली. युद्धोत्तर जर्मनीसमोर महागाई. बेकारी, आर्थिक विपन्नावस्था जीवनावश्यक वस्तुंची टंचाई, अन्नधान्याचा तुटवडा इ. अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. एकाच वेळी या सर्व समस्या सोडवणे वायमर प्रजासत्ताकास शक्य झाले नाही. त्यामुळे वायमर प्रजासत्ताक जर्मन जनतेत अप्रिय ठरले.

## ३. आर्थिक विपन्नावस्था

पहिल्या महायुद्धाचा सर्वाधिक आर्थिक फटका जर्मनीस बसला होता. दोस्त राष्ट्रांच्या प्रखर आक्रमणामुळे जर्मनीतील उद्योगधंद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. शेतीयोग्य जमीनही उध्वस्त झाली होती. त्यामुळे जर्मनीची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती. महायुद्धामळे जीवनावश्यक वस्तुंची टंचाअ्‍र निर्माण होऊन महागाई मोठ्या प्रमाणात वाढली होती. महायुद्धामुळे जीवनावश्यक वस्तुंची टंचाई निर्माण होऊन महागाई मोठ्या प्रमाणात वाढली होती. उद्योगधंदे उध्वस्त झाल्यामुळे बेकारांचा मोठा प्रश्न जर्मनीसमोर निर्माण झाला होता. बेकारांची संख्या ६० लक्षापर्यंत गेली. अशा परिस्थितीत दोस्त राष्ट्रांनी पहिल्या महायुद्धासाठी जर्मनीस जबाबदार धरून आपली युद्धात झालेली हानी जर्मनीकडून वसूल करण्यासाठी जर्मनीवर अपमानकारक व्हर्सायचा तह लादला. या तहानुसार ६,६००,०००,००० पौंड इतकी युद्धखंडणी जर्मनीने द्यावी असे ठरविण्यात आले. एवढी मोठी रक्कम नुकसानभरपाईदेखील दोस्त राष्ट्रांना देणे आर्थिकदृष्ट्या डबघाईस आलेल्या जर्मनीला शक्य नव्हते. नुकसानभरपाई देता देता देशाचे दैन्य व दारिद्र्य वाढत होते. मार्कची किंमत मोठ्या प्रमाणात घसरली. नैसर्गिक खनिज संपत्तीने समृद्ध असलेला सार प्रांत १५ वर्षासाठी फ्रान्सला देण्यात आल्यामुळे जर्मनीच्या औद्योगीक प्रगतीवर जबरदस्त आघात झाला. १९२३ मध्ये फ्रान्सने जर्मनीचा औद्योगीक दृष्ट्या महत्त्वाचा असलेला ऱ्हूरचा प्रदेश जबरदस्तीने घेतला. कोळसा, पोलाद व लोखंड याचा प्रदेशातून जर्मनीला मिळत होते. याचाही वाईट परिणाम जर्मनीच्या आर्थिक प्रगतीवर झाला. या सर्व आर्थिक प्रश्नांची सोडवणूक करणे वायमर प्रजासत्ताकास शक्य झाले नाही.

## ४. १९२९ ची जागतिक महामंदी

१९२९ ची जागतिक महामंदी हिटलरच्या उदयास कारणीभूत ठरली. पहिल्या महायुद्धानंतरची जर्मनीची विस्कटलेली आर्थिक घडी बसवण्यासाठी अमेरिकेने पुढाकार घेतला होता. १९२४ मध्ये डॉस समितीने जर्मनीच्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करून जर्मनीची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ८०० दशलक्ष मार्क्स कर्ज जर्मनीला मिळवून दिले. त्यामुळे जर्मनीची आर्थिक स्थिती सुधारली. एका अर्थाने डॉस समितीने जर्मन अर्थव्यवस्थेला संजीवनीच दिली. १९२९ च्या यंग कमिशननुसार जर्मनीने दोस्त राष्ट्रांना देण्याची युद्धखंडणीही कमी करण्यात आली. स्ट्रेसमनच्या नेतृत्वाखाली वायमर प्रजासत्ताकाने जर्मनीची वाटचाल विकासाच्या दिशेने सुरू केली. पहिल्या महायुद्धाने आलेल नैराश्येचे वातावरण नाहीसे झाले होते. परंतु १९२९ मध्ये आलेल्या जागतिक महामंदीने जर्मनीची आर्थिक घडी पुन्हा विस्कटली. व्यापार व उत्पादन थंडावले. कारखाने बंद पडल्याने बेकारांची संख्या ६० लक्षावर गेली. जागतिक महामंदीचा जबरदस्त फटका जर्मनीला बसला. जीवनावश्यक

वस्तुंचा तुटवडा निर्माण होऊन प्रचंड मोठ्या प्रमाणात महागाई वाढली. महागाई नियंत्रणात आणणे वायमर प्रजासत्ताकास शक्य झाले नाही. वायमर प्रजासत्ताकाने यावर उपाययोजना म्हणून चलनाची निर्मिती केली. परंतु याचा उलट परिणाम होऊन चलनाचे अवमुल्यन झाले. यासाठी वायमर प्रजासत्ताकास जबाबदार धरण्यात आले. डॉस योजना व यंग योजनेनुसार जर्मनीची सुधारणारी अर्थव्यवस्था १९२९ च्या महामंदीने पुन्हा विस्कटली. जर्मनीवर कोसळलेलीही आपत्ती हिटरलरसाठी वरदान ठरली. याचा अचूक फायदा हिटलरने घेतला. खंबीर नेतृत्व देणारा नाझी पक्षच परिस्थितीतून मार्ग काढेल या आशेने जर्मन लोक हिटलरकडे पाहू लागले.

## ५. साम्यवादी पक्षाच्या कारवाया

पहिल्या महायुद्धानंतरची जर्मनीची अस्थिर राजकीय व आर्थिक परिस्थिती जर्मनीतील साम्यवादी पक्षाचे सामर्थ्य वाढवण्यास कारणीभूत ठरली. साम्यवादी विचारांचा मोठ्या प्रमाणात प्रचार व प्रसार जर्मनीमध्ये होऊ लागला. जर्मनीतील अस्थिर राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन जर्मनीतील साम्यवादी पक्षाला सर्व प्रकारची मदत, सहाय्य रशियातील साम्यवादी पक्षाकडून मिळत होते. जर्मनीत कामगारांच्या संघटना उदयास आल्या. जर्मनीत साम्यवादी नेत्यांच्या नेतृत्वाखाली तेथील कामगारवर्गाच्या संघटनेला मोठ्या प्रमाणात बळकटी आली. जर्मनीत साम्यवादी क्रांती घडवूनआणण्याचा प्रयत्न हा पक्ष करू लागला. घटना समितीच्या निवडूणका होण्यापूर्वी साम्यवाद्यांनी सरकार ताब्यात घेण्याचे ठरवून फ्रेडरिक एबर्ट याला अटक करून त्यांनी चॅन्सरलच्या कार्यालयाचा ताबा घेतला. परंतु साम्यवाद्यांचा हा प्रयत्न यशस्वी ठरला नाही. साम्यवादी पक्षाची भिती जर्मनीतील श्रीमंत व भांडवलदार वर्गाला वाटू लागली. साम्यवाद्यांचा नामशेष करण्याचे आश्वासन देणाऱ्या हिटलरला त्यांनी पाठिंबा दिला.

## ६. वंशवाद व ज्यू द्वेष

हिटलरने नाझी पक्षाला जर्मनीमध्ये लोकप्रिय बनवण्यासाठी वंशवाद व ज्यू द्वेषाचा पुरस्कार केला. जर्मन लोकांचा आर्यवंश जगातील सर्वश्रेष्ठ वंश असून प्रत्येक जर्मन माणूस श्रेष्ठ आहे. आर्यवंश श्रेष्ठ असल्याने जर्मनांना जगावर राज्य करण्याचा अधिकार आहे. वरंशश्रेष्ठत्वाची भावना जर्मन जनतेमध्ये निर्माण करून जागतिक पातळीवर आक्रमक राष्ट्रवादाचा पुरस्कार करण्याचे धोरण अवलंबले हिटलरने सुरूवातीपासून ज्यू द्वेषाचे धोरण स्वीकारले होते. पहिल्या महायुद्धातील जर्मनीच्या पराभवास हिटलरने ज्यू लोकांना जबाबदार धरले. जर्मन लोकांनीही जर्मनीवर कोसळलेल्या अरिष्ठाची जबाबदारी ज्यू लोकांवर टाकली. त्यामुळे जर्मन जनतेमध्ये ज्यू लोकांविषयी कमालीचा द्वेष निर्माण झाला.

## ७. हिटलरचे प्रभावी नेतृत्व

पहिल्या महायुद्धानंतर जर्मनीमध्ये निर्माण झालेल्या अस्थिर राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीला सामान्य जर्मन जनता कंटाळून गेली होती. जर्मन जनतेमध्यृे कमालीची नैराश्याची भावना निर्माण झाली होती. आपले भविष्य अंधकारमय आहे याची जाणीव त्यांना झाली. एकूणच वैफल्यग्रस्त, नैराश्यमय परिस्थितीत हिटलरच्या रूपाने

त्यांना एकमेव आशेचा किरण दिसून लागला. बेकारी, जर्मनीची विस्कटलेली आर्थिक घडी, महागाई, जीवनावश्यक वस्तुंची निर्माण झालेली टंचाई, दंगेदोपे या सर्व अडचणी सोडवण्यात वायमर प्रजासत्ताकाला अपयश आले होते. याचा फायदा घेऊन हिटलरने वायमर प्रजासत्ताकावर सडकून टिका केली. हिटलरचे व्यकतीमत्त्व व वक्तृत्व प्रभावी असल्याने जर्मन जनतेवर त्याची छाप पडली. व्हर्सायचा तह धुडकावून लावला. जर्मनीला आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रतिष्ठा मिळवून देणे, ज्यू लोकांची जर्मनीतून हकालपट्टी करणे, जर्मनीसाठी वसाहती मिळवणे, जर्मन लोकांचे जीवनमान उंचावणे, बेकारांना काम देण्याचे, भांडवलदारांना भांडवल उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले. हिटलरने जर्मन जनतेसमोर ठेवलेला नाझी पक्षाचा कार्यक्रम चालवलेला तुफानी व धुर्त प्रचारामुळे जर्मन जनता हिटलरकडे आकर्षित झाली. त्याने प्रखर राष्टवादाचा पुरस्कार करून जर्मनीला पूर्वीचे वैभव प्राप्त करून देण्याचे आश्वास दिले. जर्मन जनतेलाही खंबीर नेत्याची आवश्यकता वाटत होती. तत्कालीन परिस्थितीत हिटलरच्या रूपाने समर्थ खंबीर नेतृत्व दिसू लागले.

## ब) ॲडॉल्फ हिटलर

१९३९ मध्ये आपल्या पाशवी महत्वकांक्षेने जगाला दुसऱ्या महायुद्धात ओढणाऱ्या हिटलरचा जन्म २० एप्रिल १८८९ मध्ये उत्तर ऑस्ट्रीयातील ब्रुनो गावात झाला. हिटलर जन्माने जर्मनीचा नव्हे तर ऑस्ट्रेलयाचा नागरिक होता. हिटलरचे वडिल सामान्य जकात अधिकारी होते. त्यांचे वडील अलॉइल व आई फ्लारा यांना हिटलरने सरकारी नोकर व्हावे असे वाटत होते. हिटलरच्या वयाच्या १२ व्या वर्षी वडिलांचे निधन झाल्यामुळे आर्थिक अडचणींना सामोरा त्याला करावा लागला. शिक्षणाकडे त्याचे फारसे लक्ष नव्हते. चित्रकलेची मात्र त्याला विलक्षण आवड होती. आई वडिलांच्या निधनानंतर वयाच्या १८ व्या वर्षी तो व्हिएन्ना येथे आला. व्हिएन्ना होती. इंपिरिअल आर्ट ॲकाडमी येथ प्रवेश घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याला प्रवेश मिळू शकला नाही. उदरनिर्वासाठी त्याने रंगाऱ्याचा, बांधकाम करण्याचा पेशा पत्करला. व्हिएन्नाला असताना राजकीय घडामोडीचा त्याने सावधपणे अभ्यास केला. व्हिएन्ना नंतर हिटलर म्युनिचला गेला. रंगऱ्याचे काम रता असतानाच नितीशास्त्र, वंशशास्त्र, सामाजिक व आर्थिक समस्याविषयीचे वाचन केले. दरम्यानच्या काळात ज्यू लोकांविषयी त्यांच्या मनात तिरस्कार तर मार्क्सवादाविषयी द्वेष निर्माण झाला. मार्क्सवाद्यांचे आंतरराष्ट्रीय राजकारण त्याला आवडत नव्हते. राष्ट्रवादाच्या ज्वलंत भावनेस साम्यवादी तत्त्वज्ञानर मारक आह असे त्याला वाटत होते. जर्मनीविषयी त्याच्या मनात राष्ट्रवादाची भावना निर्माण झाली. सर्व जर्मन लोकांनी एकत्र आले पाहिजे असे त्याला वाअत होते. १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धास सुरूवात झाली. हिटलर व्हेरीयाच्या फोजेत भरती झाली. हिटलरने अनेक लढायामध्ये पराक्रम गाजवल्याबद्दल त्याला आर्यन क्रॉस (Iron Cross) या बहुमानाने सन्मानित करण्यात आले. पहिल्या महायुद्धात जर्मनीच्या झालेल्या पराभवामुळे त्याला खूप दुःख झाले. पॅरिस शांतता परिषदेत जर्मनीवर लादण्यात आलेल्या अपमानास्पद व्हर्सायच्या तहामुळे दोस्त राष्ट्राविषयी त्याच्या मनात द्वेष निर्माण झाला.

१९१९ मध्ये आपल्या समविचारी मित्रांना एकत्र घेऊन राष्ट्रीय समाजवादी दलाची

(National Socialist Party - Nazi) म्हणजेच नाझी पक्षाची स्थापना केली. नाझी पक्षाच्या माध्यमातन जर्मनीच्या राजकाराणत एक उत्साही तरुण म्हणून हिटलर पुढे आला. व्हर्सायचा तह जर्मनीवर अन्यायकारक असल्याने त्या तहाचे पालन करू नये असे जाहीर मत त्याने मांडले. व्हर्सायचा तह धुडकावून लावणे, दोस्त राष्टांचा सुड घेणे, जर्मनीला आंतराष्ट्रीय पातळीवर प्रतिष्ठा मिळवून देणे, युरोपातील संपूर्ण जर्मन प्रदेशांचे एकीकरण करणे, जर्मनीचे लष्करीकरण करणे, युद्धगुन्हेगारासारखे अपमानास्पद कलम पुसून टाकणे, जर्मनीसाठी वसाहती मिळवणे ही आपल्या पक्षाची ध्येय व धोरणे त्याने जाहीर केली. पहिल्या महायुद्धातील जर्मनीच्या पराभवास त्याने ज्यू लोकांना जबाबदार धरले. कारण ज्यू लोकांनी दोस्त राष्ट्रांना मदत केल्यामुळेच जर्मनीचा पराभव झाला असे हिटलरला वाटत होते. हिटलरच्या जहाल विचारसरणीमुळे निवृत्त सैनिक, राष्ट्रवादी तरुण, साम्यवादी पक्षाचे विरोधक वायमर प्रजासत्ताकाचे विरोधक हिटलरकडे आकर्षित झाले. १९२३ मध्ये लुडेनडॉर्फव व इतर पुढाऱ्यांबरोबर जर्मनीचे तत्कालीन लोकशाही सरकार पाडण्यात पुढाकार घेतला. परंतु यामध्ये हिटलरला अपयश येऊन त्याला पाच वर्षाची तुरूंगवासाची शिक्षा झाली. तुरूंगातील वास्तव्याच्या काळात त्याने माझा लढा (Mein Kamf) हे आत्मचरित्र लिहिले. या आत्मचरित्रामध्ये त्यांनी नाझी पक्षाचे तत्वज्ञान मांडले. नाझी पक्षाच्या अनुयायांच्या दृष्टीने आत्मचरित्र एकप्रकारे बायबलच ठरले. या आत्मचरित्राने जर्मनतरूणांना मोठी प्रेरणा दिली. धडाडी, ध्येयनिष्ठा व संघटन कौशल्यामुळे अनेक विश्वासू व कार्यक्षम अनुयायी त्याला मिळाले. त्यामध्ये रोझेयनबर्ग, गोबेल्स, रोएम, हेस, फेडर, गोअरिंग या व इतर अनेकांचा समावेश करता येईल. हिटलरने आपल्या पक्षाचे स्वस्तिक हे चिन्ह निवडले. आपल्या पक्षाच्या सभांचे आयोजन करण्यासाठी व विरोधकांच्या सभा उधळून लावण्यासाठी हिटलरने स्वयंसेवक दल (The Schutzataffeln) स्थापन केले. १९२४ मधील कनिष्ठ सभागृहाच्या निवडणूकीत नाझी पक्षाला १४ जागा मिळाल्या. हिटलरच्या अपेक्षेपेक्षा या जागा कमी असल्याने हिटलरने पुन्हा १९२४ ते १९२८ या काळात नाझी पक्ष प्रबळ व संघटित करण्यावर भर दिला. कारण हा काळ जर्मनीसाठी स्थैर्याचा व भरभराटीचा ठरला होता. १९२९ ची जागतिक महामंदी हिटलरच्या पथ्यावर पडली. या महामंदीने जर्मन अर्थव्यवस्था विस्कटली गेली. महामंदीमुळे जर्मनीतील बँका बुडाल्या. कारखाने बंद पडले. जर्मनीचा परराष्ट्राबरोबर असलेला व्यापार थंडावला. १९२९ ची जागतीक महामंदी नाझी पखाच्या दृष्टीने सुवर्णसंधी ठरली. खंबीर नेतृतव देणारा हिटलरच या पेचप्रसंगातून मार्ग काढेल असे जर्मन लोकांना वाटू लागले. १९३० मध्ये झालेल्या निवडणूकीत नाझी पक्षाला १०७ जागा मिळाल्या. तर १९३२ च्या निवडूकीत नाझी पक्षाला बहुमत मिळाले. अध्यक्ष हिंडेनबुर्ग याने हिटलरला चॅन्सलर म्हणून आमंत्रित कले. हिटलरची चॅन्सलर म्हणून नियुक्ती म्हणजे अध्यक्ष हिंडेनबुर्ग याने वाघावर बसून सहलीला जाण्यासारखेच होते. हिटलरला चॅन्सलर म्हणून आपण नियुक्त करून किती मोठा धोका पत्करतोय याची हिंडेनबुर्गला कल्पना नव्हती. चॅन्सलर झाल्यानंतर हिटलरने जर्मनीची सर्व सत्ता आपल्या हाती घेण्यावर भर दिला. तसेच साम्यवादी पक्षाचे जर्मनीतून उच्चाटन करण्यावरही भर दिला. मार्च १९३३ च्या निवडणूकीत नाझी पक्ष रिचस्टॅगमध्ये बहुमताने निवडून आला. चार वर्षासाठी सर्व सत्ता हिटलरच्या हाती देण्यात आली. प्रजासत्ताकवादी, साम्यवादी, समाजवादी या पक्षांना

१९३३ मध्ये बेकायदेशीर ठरवून नाझी हा एकच पक्ष कायदेशीर असल्याचे जाहीरकेले. २ ऑगस्ट १९३४ रोजी जर्मन अध्यक्ष हिंडेनबुर्गचे निधन झाले. त्यामुळे अध्यक्ष व चान्सलर पदाचे एकीकरण करून हिटलर जर्मनीचा सर्वसत्ताधीश झाला. द फ्यूरर ही पदवी धारण करून हिटलर जर्मनीचा राष्ट्रप्रमुख, शासनप्रमुख बनला. हिटलरने आपली एकतंत्री सत्ता हिटलरशाही प्रस्थापित केली.

## क) हिटलरचे अंतर्गत धोरण

### १. सत्तेचे केंद्रिकरण

१९३२ मध्ये हिटलर जर्मनीचा चान्सलर झाला. तर तत्कालीन जर्मन राष्ट्राध्यक्ष हिंडेनबुर्गचा मृत्यू १९३४ मध्ये झाल्यावर हिटलर जर्मनीचा राष्ट्राध्यक्ष झाला. चान्सलर व राष्ट्राध्यक्ष ही दोन्ही हिटलरकडे आली. तसा कायदा मंत्रीमंडळाने पास केला. हिटलर मुहातच हुकूमशाही प्रवृत्तीचा असल्याने जर्मनीची संपूर्ण सत्ता त्याने आपल्या हाती केंद्रीत केली. हिटलरला आपल्या सत्तेमध्ये वाटेकर नको होता. नाझी पक्षाचे विरोधक नष्ट करण्याच्या दृष्टीने साम्यवादी, सोशल डेमोक्रूटस व डेमोक्रॅटिक पक्ष यांचे निधी जप्त करण्यात आले. सदर पक्ष बेकायदेशीर घोषित करण्यात आल. हिटलरने साम्यवादी पक्षाचे जर्मनीतून उच्चाटन केले. अनेक साम्यवादी नेत्यांना तुरूंगात टाकले. १० जुलै १९३३ रोजी नॅशनल सोशालिस्अ पक्ष हाच एकमेव कायदेशीर पक्ष असल्याची घोषणा करण्यात आली. नवीन पक्ष काढणे हा राष्ट्रद्रोहाचा गुन्हा ठरवण्यात आला. राईशस्टॅगला नवीन घटना घोषित करण्याचा व घटक राज्यांचे राईशराट बरखास्त करण्याचा अधिकार दिला गेला. द फ्युरर ही उपाधी हिटलरने धारण केली. हिटलरने नॅशनल सोशालिस्ट पक्ष म्हणजेच राष्ट्र अशी घोषणा केली. नाझी पक्षाचा ध्वज हाच जर्मनीचा राष्ट्रध्वज बनवण्यात आला. जर्मनीची राजकीय सत्ता हिटलरने आपल्या हाती केंद्रित केली. नाझी पक्षाची पाळेमुळे जर्मनीत खोलवर रूपजवण्यावर भर दिला. त्यासाठी वेळप्रसंगी बलाचा वापर करण्यात आला. नाझी पत्राला व आपल्या सत्तेला होणारा विरोध व प्रतिस्पर्ध्यांचा विरोध मोडून काढणे हे एकमेव उद्दिष्ट या संघटनेचे ठरविण्यात आले. हेरांच्या माध्यमातून सर्वांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यात आल. हिटलरच्या सत्तेविरूद्ध कारवाई करणाऱ्यांची हत्या करण्यात आली. संशयीत व्यक्तीला पकडण्याचा व तुरूंगात टाकण्याचा अधिकार गॅस्टेपोंना देण्यात आला. आपल्या कामाबाबत गेस्टॅपो फक्त हिटलरला जबाबदार होते. गॅस्टॅपोने अल्पावधीतच आपला एवढा दबदबा व दरारा निर्माण केला की हिटलरच्या सत्तेला कोणीही आव्हान देऊ शकले नाही. नाझी पक्षाचेही शुद्धीकरण हिटलरने केले. नाझी पक्षातील डाव्या गटाचा पुरस्कार करणाऱ्या अनेक नाझी नेत्यांची हत्या हिटलरने केली. शाळा, महाविद्यालये. विद्यापीठे,कला, वाङ्मय, वृत्तपत्रे, रेडिओ या व इतर अनेक नाझी पक्षांचे नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले.

### २. ज्यू विरोध

पहिल्या महायुद्धातील जर्मनीच्या पराभवाला ज्यू जबाबदार आहेत असे हिटलरला वाटत होते. त्यामुळे सत्तेवर येण्यापूर्वी हिटलरच्या नाझी पाने ज्यूंना विरोध करण्याचे धोरण स्विकारले होते. हिटलरच्या आदेशानुसार त्याचा सहकारी गोअरिंग याने १९३३ पासून ज्यू

विरोधी मोहिम हाती घेतली. स्वतःचे राष्ट्र नसलेले ज्यू इतर राष्ट्रातील जनतेचे शोषण करून स्वतः श्रीमंत होतात. ज्यूंचे जर्मनीतील अस्तित्व जर्मनीच्या स्थैर्याला, शांततेला व पगतीला धोकादायक आहे असा पद्धतशीर प्रचार हिटलरने केला. जर्मनीची सर्व सत्ता हाती आल्यानंतर तर ज्यूंच्या निर्मूलनाचे पद्धतशीर प्रयत्न हिटलरने सुरू केले. कोणत्याही अनार्य व्यक्तीला अनार्य व्यक्तींशी विवाह केलेल्या व्यक्तीला सरकारात व इतर कोणत्याही महत्त्वाच्या पदावर नियुक्त केल जाणार नाही असा हुकूमच हिटलरने काढला. ज्यूंना डॉक्टर वकील या पदव्या मिळेनाशा झाल्या. कोर्टातून, दवाखान्यामधून ज्यूंची हकालपट्टी करण्यात आली. शाळा, महाविद्यालय, विद्यापीठातून ज्यू शिक्षकांना, प्राध्यापकांना काढून टाकण्यात आले. शाळा, महाविद्यालय व विद्यापीठतून एकूण विद्यार्थी संख्येपैकी १.५ टक्क्यापेक्षा जास्त ज्यूंची विद्यार्थीसंख्या नसावी. असा आदेश काढण्यात आला. प्रोफेसर अलबर्ट आइन्स्टीन यांच्यासारखे जगप्रसिद्ध भौतिक शास्त्रज्ञही हिटलरच्या ज्यूविरोधी धोरणाचे बळी पडले. प्रत्येक क्षेत्रातून ज्यू लोकांची हकालपट्टी करण्यात आली. १९३५ मध्ये ज्यूंना जर्मनीचे नागरिकत्व नाकारण्यात आले. १९३७ मध्ये पास करण्यात आलेल्या घेट्टो कायद्यानुसार ज्यूंना जर्मन व्यक्तीशी लग्न करण्यास बंदी घालण्यात आली. ज्यूंना रहाण्यास किंमती गाड्या वापरण्यास, किंमती पोशाख वापरण्यास, चांगले खाण्यापिण्यास बंदी घालण्यात आली. हजारो ज्यूंना कॉन्सेंट्रेशन कॅम्पमध्ये पाठवले. हिटलरच्या ज्यू विरोधी धोरणामुळे ६० लक्ष ज्यू मरण पावल. तर हजारो ज्यूंना जर्मनीबाहेर हाकलण्यात आले.

## ३. शैक्षणिक धोरण

नाझी पक्षाच्या नियंत्रणापासून शैक्षणिक क्षेत्रही सुटले नाही. जर्मनीतील शिक्षणव्यवस्थेतून नाझीवाद निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले. विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमातून हिटलरचे महात्म्य शिकवण्यावर भर देण्यात आला. हिटलरला सर्वश्रेष्ठ ठरवण्यात आले. नाझी युवक निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय ठरविण्यात आले. विद्यार्थी संघटनेवर नाझी पक्षाचे नियंत्रण प्रस्थापित करण्यात आले. हिटलरचे विरोधक देशाचे विरोधक ठरवण्यात आले. नाझी तत्त्वज्ञान अभ्यासक्रमातून शिकवले जाऊ लागले. जर्मन आर्यवंश जगातील सर्वश्रेष्ठ असल्याची शिकवण देण्यात आली. १९३६ रोजी एक आदेश काढून हिटलरने शिक्षणसंस्थांतील सर्व शिक्षक व इतर कर्मचारी नाझी पक्षाचेच असले पाहिजेत असे बंधन घातले. हिटलर आधुनिक जिझस ख्रिस्त आहे असे घोषित केले. लेखन व भाषणस्वातंत्र्यावर बंदी घालण्यात आली. शाळा व महाविद्यालयातील विद्यार्थी भविष्यातील नाझी पक्षाचे कट्टर अनुयायी व्हावेत अशा दृष्टीकोनातून अभ्यासक्रमाची आखणी करण्यात येऊन त्यानुसार पाठ्यपुस्तकांचे नव्याने लेखन करण्यात आले. सदर पाठ्यपुस्तकात नाझी तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्याबरोबरच ज्यू लोकांचा द्वेष व लोकशाही तत्त्वांचा निषेध करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील बढत्या विद्वत्तेवर न ठेवता नाझी निष्ठेवर ठेवण्यात आल्या. जर्मन आर्यवंश जगातील सर्वश्रेष्ठ वंश असून जगावर राज्य करण्याचा अधिकार जर्मनांना आहे. त्यासाठी हिटलरला पाठिंबा दिला पाहिजे. अशी शिकवण देण्यात आली. एकूणच शिक्षणाच्या माध्यमातून संपूर्ण जर्मनी नाझीमय करण्यावर हिटलरने भर दिला.

## ४. आर्थिक धोरण

पहिल्या महायुद्धात जर्मनीतील उद्योगधंदे, शेती मोठ्या प्रमाणात उध्वस्त झाली होती. व्हर्सायच्या तहामुळे तर जर्मन अर्थव्यवस्था अधिकच डबघाईस आली होती. पण अमेरिकेची आर्थिक मदत आणि जर्मन चान्सलर स्ट्रेसमनच्या कर्तृत्वामुळे जर्मन अर्थव्यवस्था सुधारण्यास मदत झाली होती. पण १९२९ च्या जागतिक महामंदीचा जबरदस्त तडाखा जर्मन अर्थव्यवस्थेला बसला. ही महामंदी हिटलरसाठी मात्र सुवर्णसंधी ठरली. जर्मनींची सर्व सत्ता हाती आल्यानंतर विस्कटलेली जर्मनीची आर्थिक घडी पुन्हा व्यवस्थित बसण्यास हिटलरने प्राधान्य दिले. जर्मनीची आर्थिक ध्येय-धोरणे आखण्यासाठी हिटलरने एक सल्लागार मंडळ नियुक्त केले. उद्योगधंदे वाढीसाठी प्रोत्साहन दिल्यामुळे उत्पादन वाढण्याबरोबरच जर्मनीतील बेकारी कमी झाली. १९३३ मध्ये जर्मनीतील सर्व कामगार संघटनांवर हिटलरने बंदी घातली. संप, टाळेबंदी व कामचुकारपणावर कायद्याने बंदी घातली. भांडवलदार व कामगार यांची संयुक्त मंडळे स्थापन करून कामगारांचे प्रश्न सोडवण्यासाठी जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात आली. नवीन उद्योगधंदे सुरू करण्यास प्रोत्साहन दिले. निर्यातीला प्रोत्साहन देण्यात आले. जर्मन भांडवलदारांनी नफा कमवण्याबरोबरच जर्मनीच्या हितसंबंधास प्राधान्य दिले पाहिजे. असे सांगण्यात आले. शेतीक्षेत्रातील उत्पादन वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहन देऊनर त्यांना कर्जे व इतर सवलती दिल्या. शेतीसाठी अत्याधुनिक अवजारे व खतांची उपलब्धताकरून दिली. परिणामी अन्नधान्याचे उत्पादन ५१ टक्क्याने वाढले. जर्मनीची संपूर्ण आर्थिक व्यवस्था हिटलरने आपल्या नियंत्रणाखाली आणली.

## ५. जर्मनीचे लष्करीकरण

आंतरराष्ट्रीय पातळीवर जर्मनीचा दरारा व दबदबा निर्माण करण्यासाठी, जागतिक पातळीवर आक्रमक धोरण स्विकारण्यासाठी जर्मनीला शस्त्रसज्ज बनवले पाहिजे असे हिटलरचे मत होते. पहिल्या महायुद्धात सैनिक म्हणून हिटलर लढला होता. त्यामुळे राष्ट्राच्या संरक्षणासाठी लष्कराचे असलेल महत्त्व त्याने ओळखलेहोते. व्हर्सायचा तह धुडकावून लावण्यासाइी जर्मन लष्करीदृष्ट्या समर्थ असणे त्याला गरजेचे वाटले. त्यामुळे त्याने लष्करी प्रशिक्षण सक्तीचे करून सक्तीची लष्करभरती सुरू केली. शस्त्रास्त्रांच्या निर्मितीसाठी नवीन कारखाने उभारले. जर्मनीचे इंग्लंड व फ्रान्स हे खरे शत्रू आहेत हे ओळखून त्यांच्या तोडीचे लष्कर उभारण्यावर भर दिला. लष्कर, आरमार व हवाईदलाची पुर्नरचना हिटलरने केली. हवाईदलासाठी अत्याधुनिक विमानतळ उभारले. जर्मनीचे लष्करी सामर्थ्य हिटलरने एवढे वाडले की युरोपियन राष्ट्रांना जर्मनीच्या लष्करी सामर्थ्याची भिती वाटू लागली. हिटलरने जर्मन जनतेत प्रखर राष्ट्रवाद, साहस आणि युद्धप्रेम रूजवले.

## ३. हिटलरचे पराष्ट्रीय धोरण

जर्मनीचा चान्सलर झाल्यानंतर हिटलरने जर्मनीची सर्व सत्ता आपल्या हाती केंद्रित केली आणि जर्मनीची अंतर्गत परिस्थिती सुधारली. हिटलरने जर्मनीच्या परराष्ट्रीय धोरणाबाबत मात्र जागतिक राजकारणात आक्रमक भूमिका स्विकारली. जागतिक प्रश्न चर्चेच्या मार्गाने सोडवण्याऐवजी लष्करी ताकदीच्या सहाय्याने सोडवण्यावर त्याने भर दिला. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपली एखादी मागणी पुढे करावी आणि ती पूर्ण झाल्यानंतर युरोपीयन देशांना

जर्मनीचे पूर्ण सहकार्य राहील असे जाहीर करावे, परंतु ही मागणी मान्य हाताच दुसरी मागणी पुढे करावी. या धोरणाचा वापर हिटलरने जागतिक राजकारणात केला. व्हर्सायचा तह धुडकावून लाऊन जर्मनीला जागतिक राजकारणात प्रतिष्ठा प्राप्त करून देणे, विशाल जर्मनीची निर्मिती करणे व त्यासाठी पोलंड, नॉर्वे, डेन्मार्क, ऑस्ट्रीया, युगोस्लाव्हिया इ. राष्ट्रातील जर्मन प्रदेश जिंकून घेणे, पहिल्या महायुद्धात गमावलेल्या सर्व जर्मनी वसाहती परत मिळवणे, व्हर्सायच्या तहानुसार लष्करी बंधने झुगारून देऊन जर्मनीला लष्करीदृष्ट्या सुसज्ज करणे ही आपल्या परराष्ट्रीय धोरणाची उद्दिष्ट्ये हिटलरने जाहीर केली. जगात आर्य वंश हाच सर्वश्रेष्ठ वंश आहे. त्यामुळ जगावर राज्य करण्याचा अधिकार आर्यवंशीय जर्मनीस आहे. त्यासाठी जर्मनीने जागतिक राजकारणात आक्रमक धोरणाचा स्विकार केला पाहिजे हे त्याने जर्मन जनतेस पटवून दिले. जागतिक राजकारणातील आपल्या आक्रमक धोरणाचा व वाढणाऱ्या लष्करी सामर्थ्याचा निषेध राष्ट्रसंघ करेल याची जाणीव हिटलरला होती. म्हणूनच हिटलरने राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. त्यामुळे राष्ट्रसंघाचे नियम, ध्येयधोरणे जर्मनीवर बंधनकारक राहिली नाहीत. जर्मनीच्या या निर्णयाने युरोपीयन राष्ट्रांना विशेषतः फ्रान्सला जबरदस्त धक्काच बसला. कारण हिटलर व जर्मनीच्या दृष्टीने फ्रान्स शत्रू राष्ट्र होते.

जागतिक राजकारणात जर्मनी शांततेच्या पुरस्कार करणारे आहे असे दाखवण्यासाठी हिटलरने २६ जानेवारी १३९४ रोजी पोलंडशी दहा वर्षासाठी अनाक्रमणाचा करार केला. त्यामुळे हिटलर खरोखर शांततेचा पुरस्कार करेल असे काही काळ युरोपीयन राष्ट्रांना वाअले. त्यानंतर हिटलरने आपले लक्ष ऑस्ट्रीयाकडे वळवले. व्हर्सायच्या तहानुसार जर्मनीने ऑस्ट्रीयाचे स्वातंत्र्य मान्य केले होते. हिटलर जन्माने ऑस्ट्रीयन असल्याने ऑस्ट्रीयाविषयी त्याला जवळीक वाटत होती. ऑस्ट्रीया जर्मनीमध्ये सामावून घेण्याची महत्त्वाकांक्षा त्याने बाळगली होती. त्याने ऑस्ट्रीयातील नाझी चळवळीला उत्तेजन देऊन तेथील सरकारविरूद्ध क्रांती घडवून आणण्याचा प्रयत्न जुलै १९३४ मध्ये केला. सर्व जर्मनांना नाझी ध्वजाखाली आणण्याचे त्याचे उद्दिष्ट होते. तत्कालीन ऑस्ट्रीयन चान्सलर गॉल्फस याला ठार मारण्यात आले. परंतु हिटलरचा हा प्रयत्न अयशस्वी ठरला. इटली, फ्रान्स, झेकोस्लोव्हाकीया या राष्ट्रांनी ऑस्ट्रीयातील जर्मनीच्या हस्तक्षेपाचा निषेध केला आणि हिटलरने या करावाया न थांबवल्यास जर्मनीवर आक्रमण करण्याचा इशारा दिला. त्यामुळे हिटलरला माघार घ्यावी लागली. त्याचबरोबर या बंडाशी आपला काहीही संबंध नाही असे सांगीतले. एकूणच ऑस्टीया जिंकून घेण्याचे हिटलरचे ध्येय साध्य झाले नाही.

व्हर्सायच्या तहानुसार जर्मनीचा खजिनसंपन्न असलेला सार प्रदेश पंधरा वर्षासाठी फ्रान्सला देण्यात आला होता. पंधरा वर्षानंतर राष्ट्रसंघाच्या नेतृत्वाखाली सार प्रदेशात सार्वमत घेण्याचे ठरवून तेथील जनतेच्या इच्छेनुसार हा प्रदेश जर्मनी किंवा फ्रान्समध्ये विलीन करण्याचे ठरवण्यात आले होते. त्यानुसार १९३५ मध्ये सार प्रदेशात सार्वमत घेण्यात आले. या सार्वमतानुसार सारमधील ९० टक्के जनतेने जर्मनीमध्ये विलीन होण्याच्या बाजूने मतदान केले. त्यानुसार १ मार्च १९३५ मध्ये सार प्रदेश जर्मनीस देण्यात आला. १९३५ मध्ये व्हर्सायच्या तहानुसारची जर्मनीवरील शस्त्रकपातीची सर्व बंधने झुगारून देऊन उघडपणे

जर्मनीसाठी शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यावर व लष्कर उभारणीवर भर दिला. व्हर्सायच्या तहानुसार ऱ्हाईनचा प्रदेश निर्लष्करीकरण करण्यात आला होता. हिटलरच्या आदेशानुसार जर्मन सैन्याने ऱ्हाईनचा प्रदेश व्यापला. ऱ्हाईनच्या प्रदेशात हिटलरने लष्कर पाठवल्यामुळे फ्रान्स व बेल्जियम या राष्ट्रांना जर्मनीची भिती वाटू लागली. हिटलरच्या या कारवाईवर युरोपातील बड्या राष्ट्रांनी काहीच केले नाही. तर राष्ट्रसंघाने निषेध करण्यापलीकडे काही केले नाही. त्यामुळे हिटलरचा आत्मविश्वास अधिकच वाढला. १९३६ मध्ये व्हर्सायचा तह धुडकावून लावला. आपल्या परराष्ट्रीय धोरणाविषयी जर्मन जनमत अजमावून घेण्यासाठी १९३६ मध्ये त्याने सार्वमत घेतले. त्यामध्ये ९९ टक्के जर्मन जनतेने हिटलरच्या परराष्ट्रीय धोरणास पाठिंबा दिला.

जागतिक राजकारणात जर्मनीचा दबदबा व दरारा निर्माण करण्याचे ध्येय हिटलरने बाळगले होत. त्यासाठी आवश्यक असलेले जर्मनीचे लष्करी सामर्थ्य वाढवण्याबरोबरच जागतिक राजकारणात जर्मनीला विश्वासू मित्र मिळवण्यावरही हिटलरने भर दिला. जून १९३५ मध्ये इंग्लंडशी नाविक करार करून आपल्या शांतता प्रेमाचे त्याने जाहीर प्रदर्शन केले. पण त्याचे हे प्रेम केवळ देखावा होता. या करारानुसार जर्मनीचे नाविक सामर्थ्य इंग्लंडच्या नाविक सामर्थ्याच्या ३५ टक्क्यापेक्षा जास्त असणार नाही हे मान्य केले. हिटलर व मुसोलिन यांची हुकूमशाही वृाी व विचारसरणी मिळतीजुळती होती. हिटलरने मुसोलिनीच्या इथिओपीयावरील स्वामीत्वाला मान्यता दिली. तसेच दोघांनीही स्पेनच्या यादवी युद्धात जनल फ्रूकोला पाठिंबा दिला. त्यामुळे स्पेनमधील यादवी युद्धात जनरल फ्रॅंकोच्या विजय झाला. त्याचबरोबर जागतिक राजकारणात हिटलर व मुसोलिनीची जवळीकही वाढली. हिटलरने १९३६ मध्ये जपानशी मैत्री करार घडवून आणला. पुढे या करारात इटलीही सामील झाले. परिणामी जगाच्या राजकारणात रोम-बर्लिन-टोकिओ पक्ष निर्माण झाला. या पक्षामुळे जर्मनीला जागतिक राजकारणात आक्रमक धोरणाचा पुरस्कार करणारे दोन समविचारी मित्र मिळाले.

जागतिक राजकारणात आक्रमक धोरणाचा उघडपणे पुरस्कार हिटलरने सुरू केला. ऑस्ट्रीया जर्मनीमध्ये सामील करून घेण्याची इच्छा हिटलरने सुरूवातीपासूनच बाळगली होती. तया प्रयत्न १९३४ मध्ये हिटलरने केलाही होता. पण त्यामध्ये त्याला यश आले नव्हते. १२ फेब्रुवारी १९३८ रोजी हिटलर व ऑस्ट्रीयाचा तत्कालीन चान्सलर शुशनिग यांची भेट घडवून आणली. हिटलरने ऑस्ट्रीयावर दडपण आणून ऑस्ट्रीयन मंत्रीमंडळात नाझी प्रतिनिधींना प्रवेश देण्यात आला. हिटलरच्या सांगण्यावरून नाझी अनुयायांनी तत्कालीन ऑस्ट्रीयन सरकारविरूद्ध निदर्शने केली. १४ मार्च १९३८ रोजी हिटलरने जर्मन सैन्य ऑस्ट्रीयामध्ये पाठवून ऑस्ट्रीयावर वर्चस्व प्रस्थापित केले. युरोपीयन राष्ट्रांनी हिटलरच्या या आक्रमक धोरणाविरूद्ध बघ्याची भूमिका स्वीकारल्यामुळे हिटलरचा आत्मविश्वास अधिकचय बळावला.

हिटलरला परराष्ट्रीय धोरणात जसजसे यश मिळत होते तसतसे त्याची महत्त्वाकांक्षा अधिकच वाढत होती. ऑस्ट्रीया गीळंकृत केल्यानंतर हिटलरने आपले लक्ष सुडेटन प्रांताकडे वळवले. सुडेटनर प्रांतातील जनतेला जर्मनीत सामील करून घेण्याची महत्त्वाकांक्षा हिटलरने

बाळगली होती. झेकोस्लोव्हाकीयातील सुडेटन प्रांतातील जनतेला सर्व प्रकारच्या सोयी सुविधा झेकोस्लोव्हाकीयातील सरकार देत होते. पण सुडेटन प्रांतातील जर्मन जनता आपले जर्मन राष्ट्रीयत्व विसरण्यास तयार नव्हत. जर्मनीत सामील होण्याची त्यांची इच्छा होती. हिटलरच्या छुप्या पाठिंब्यामुळ त्यांची ही इच्छा अधिकाधीक तीव्र बनत गेली. युद्धाच्या मार्गाने हा प्रश्न सोडवण्याचे ठरवून झेकोस्लोव्हाकीयाने युद्धाची तयारी केली. या प्रश्नावरून फ्रान्स व रशिया यांनी झेकोस्लोव्हाकीयाला पाठिंबा दिला तर इटली व हंगेरी या राष्ट्रांनी हिटलरला पाठिंबा दिला. सुडेटन प्रश्नावरून युरोपचे राजकीय वातावरण चांगलेच तापून युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण झाली. संभाव्य युद्ध टाळण्यासाठी इंग्लंडचे तत्कालीन पंतप्रधान चेंबरलेन यांनी मध्यस्थी करून हिटलरला सुडेटन जर्मन प्रदेश मिळवून देण्याचे आश्वासन दिले. सुडेटन प्रदेश मिळाल्यास आपली दुसरी कोणतीही इच्छा नाही असे हिटलरने भासवले. सप्टेंर १९३८ मध्ये म्युनिच येथे इंग्लंडचा पंतप्रधान चेंबरलेन, फ्रान्स पंतप्रधान डॅलेडायर, मुसोलिनी व हिटलर यांची एक बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीमध्ये म्युनिच करार करण्यात आला. या करारानुसार जर्मन जनता असलेला सुडेटन प्रदेश जर्मनीस देण्याचे मान्य करण्यात आले. सुडेटन प्रदेश हिटलरला दिल्यास हिटलर शांत होईल असे इंग्लंड व फ्रान्स यांना वाटले होते. परंतु प्रत्यक्षात मात्र हिटलर अधिकाधिक आक्रमक होत गेला. म्युनिच करारानुसार मिळालेला सुडेटन प्रदेश हा हिटलरचा मोठा विजय होता. हिटलरने म्युनिच करारास धुडकावून लाऊन मार्च १९३९ मध्ये झोकोस्लोव्हाकीयार आक्रमण करून बोहेमिया व मोरेव्हीया हे प्रांत जिंकून घेतले. त्यानंतर झेकोस्लोव्हाकीयावरही वर्चस्व प्रस्थापित केले.

झेकोस्लोव्हाकीयानंतर हिटलरने आपले लक्ष लिथुआनियाकडे वळवले आणि लिथुआनियाकडे मेमेल बंदर व आसपासच्या प्रदेशाची मागणी केली. हिटलरची ही मागणी लिथुआनियाने नाकारताच जर्मन सैन्य पाठवून हिटलरने मेमेल बंदरावर मार्च १९३९ मध्ये वर्चस्व प्रस्थापित केले. हिटलरने पोलंडबरोबर १३४ मध्ये केलेला दहा वर्षासाठी अनाक्रमणाचा करार धुडकवण्याचे ठरवले. पोलंडकडे हिटलरने डॅन्झींग बंदर देण्याची मागणी केली. परंतु हिटलरच्या या व इतर मागणीकडे पोलंड दुर्लक्ष केले. २३ ऑगस्ट १९३९ रोजी हिटलरने रशियाशी अनाक्रमणाचा करार करून १ सप्टेंबर १९३९ रोजी पोलंडवर आक्रमण केले. पोलंडच्या संरक्षणासाठी इंग्लंड व फ्रान्स यांनी पोलंडच्या बाजूने ३ सप्टेंबर रोजी युद्धात प्रवेश केला आणि दुसरे महायुद्ध सुरू झाले.

### ४.२.३.२ इटलीतील फॅसिस्टवादाचा उदय

पहिल्या महायुद्धाचा महत्त्वपूर्ण दूरगामी परिणाम म्हणून हुकूमशहांच्या उदयाकडे पाहिले जाते. जगातील लोकशाहीच्या संरक्षणासाठी अमेरिकेन पहिल्या महायुद्धात सहभाग घेतला होता. पण महायुद्धाच्या समाप्तीनंतर हुकूमशहांच्या उदयामुळे जगाला खऱ्या अर्थाने धोका निर्माण झाला. इटली व जर्मनी या राष्ट्रातील हुकूमशहांच्या उदयाकडे हताशपणे पहात बसण्याशिवाय दोस्त राष्ट्रांकडे कोणताही पर्याय राहिला नाही. पहिल्या महायुद्धानंतर इटलीमध्ये मुसोलिनी या हुकूमशहाचा उदय झाला. पहिल्या महायुद्धातील इटली हे विजेते राष्ट्र होते. तरीही पहिल्या महायुद्धानंतर इटलीमध्ये निर्माण झालेल्या समस्या सोडवण्यात तत्कालीन सरकारला अपयश आले. परिणामी मुसोलिनीचा इटलीमध्ये उदय झाला. पहिल्या महायुद्धाच्या

अगोदर जर्मनी, इटली व ऑस्ट्रीया या राष्ट्रामध्ये त्रिराष्ट्र लष्करी करार घडून आला होता. या करारामुळे हे तिन्ही राष्ट्रे एकमेकांशी मैत्री करारात बांधली गेली होती. त्यामुळेच पहिले महायुद्ध सुरू झाल्यानंतर इटली आपल्या गटात सामील होईल असे जर्मनी व ऑस्ट्रीयाला वाटत होते. परंतु प्रत्यक्षात मात्र इटली त्यांच्या मदतीसाठी गेलाच नाही. उलट २६ एप्रिल १९१५ रोजी लंडनच्या गुप्त करारानुसार इटलीने पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या बाजूने सहभाग घेतला. त्यामार्ग पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांचा विजय होईल व आपणास जास्त फायदा होईल असा इटलीचा उद्देश होता. परंतु इटलीचा हा उद्देश पहिल्या महायुद्धानंतर साध्य होऊ शकला नाही. पहिल्या महायुद्धानंतर आयाजित केलेल्या पॅरिस शांताता परिषदेने इटलीची घोर निराशा केली. लंडनच्या गुप्त करारानुसार इटलीला दिलेल्या आश्वासनांचा विसर पॅरिस शांतता परिषदेत दोस्त राष्ट्रांना पडला. या परिषदेत इटलीच्या वाट्याला फक्त टिरोलचा प्रदेश आला. खरे तर महायुद्धानंतर होणाऱ्या फायद्यावर लक्ष ठेवूनच इटलीने पहिल्या महायुद्धात सहभाग घेतला होता. पण इटलीचा हा उद्देश सफल झाला नाही. पहिल्या महायुद्धातील विजेते राष्ट्र असूनही पराभूत राष्ट्रांची दैन्यावस्था इटलीच्या वाट्याला आली. महायुद्धातील फायद्यापेक्षा तोटाच अधिक झाला. पहिल्या महायुद्धातील विजेते राष्ट्र असूनही महायुद्धानंतर अनेक समस्या इटलीमध्ये निर्माण झाल्या. परिणामी मुसोलिनीचा उदय इटलीमध्ये घडून आला.

## अ) मुसोलिनीच्या उदयाची कारणे

### १. पहिल्या महायुद्धातील जबरदस्त हानी

पहिल्या महायुद्धात इटलीचे जबरदस्त नुकसान झाले. १९१५ मध्ये इटलीने महायुद्धात सहभाग घेतला होता. इटलीने आपल्या विरोधात दोस्त राष्ट्रांच्या बाजूने घेतलेला सहभाग जर्मनी व ऑस्ट्रीयाला आवडला नव्हता. त्यांनी इटलीवर प्रखर आक्रमण केले. त्यांनी केलेल्या बॉम्ब वर्षावात देशातील उद्योगधंदे पूर्णपणे उध्वस्त झाले. शेतीयोग्य जमीनही उध्वस्त झाली. इटली लिबियन युद्धातून नुकतेच बाहेर पडले होते. त्यानंतर इटलीने पहिल्या महायुद्धात सहभाग घेतला. या दोन्ही युद्धांचा ताण सहन करण्याची ताकद इटलीमध्ये नव्हती. वित्तहानीबरोबरच इटलीची जिवित हानीही मोठ्या प्रमाणात झाली. युद्धकाळात सहा लक्षावर इटालियन लोक मारले गेले. तर सुमारे वीस लाख लोक जखमी झाले. इटालीन लष्कराजवळ लढण्यासाठी पुरेशी शस्त्रास्त्रेही नव्हती. त्यामुळे इटलीस ऑस्ट्रीयाकडून सातत्याने पराभव पत्करावे लागले. महायुद्धावर केलेल्या खर्चामुळे इटलीची अर्थव्यवस्था डबघाईस आली. याचा फायदा मुसोलिनीने घेतला.

### २. पॅरिस शांतता परिषदेने केलेली निराशा

पहिल्या महायुद्धानंतर जगाची पुर्नरचना करण्यासाठी फ्रान्सची राजधानी पॅरिस या ठिकाणी शांतता परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेने इटलीची घोर निराशा केली. वातविक पहाता महायुद्धानंतर होणाऱ्या प्रादेशिक लाभावर लक्ष ठेवूनच इटलीने महायुद्धात सहभाग घेतला होता. इटलीसोबत केलेला लंडनचा गुप्त तहाचा विसर पॅरिस शांतता परिषदेत दोस्त राष्ट्रांना पडला. परिषदेमध्ये जाणीवपूर्वक इटलीकडे दुर्लक्ष करण्यात

आले. महायुद्धातील जबरदस्त हानी इटलीने सहन केली ती महायुद्धानंतर होणाऱ्या प्रादेशिक लाभावर लक्ष ठेवूनच. परंतु इटलीच्या तोंडाला पॅरिस शांतता परिषदेत पाने पुसण्यात आली. या परिषदेत इटलीने तुर्की साम्राज्यातील काही प्रदेश व आफ्रिकेतील काही वसाहतींची मागणी केली होती. परंतु इटलीची ही मागणी दोस्त राष्टांनी मान्य केली नाही. मँडेड पद्धतीनुसार इटलीला कोणताही प्रदेश देण्यात आला नाही. इटलीच्या उत्तर सीमेकडील फक्त ८९०० चौरस मैल प्रदेश इटलीस देण्यात आला. आफ्रिकेतील इटलीच्या लिबिया व सोमालीलॅंड या वसाहतीभोवतालचा काही प्रदेश इटलीला देण्यात आला. थोडक्यात इटलीचा मोठ्या प्रमाणात भ्रमनिरास या परिषदेने केला. पहिल्या महायुद्धातील दोस्त राष्टांचा विजय हा इटलीच्या दृष्टीने लाजीरवाणी स्मृती ठरली.

## ३. आर्थिक विपन्नावस्था

पहिल्या महायुद्धामुळे इटालीन अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमोडली. महायुद्धाील हानी सहन करण्याची ताकद मुळातच छोटे राष्ट्र असलेल्या इटालीन अर्थव्यवस्थत नव्हती. लिबियन युद्धाचा व पहिल्या महायुद्धाचा आर्थिक ताण इटालीन अर्थव्यवस्था पेलू शकली नाही. महायुद्धामुळे बेकारी, रोगराई, नैराश्य, भाववाढ, या समस्या निर्माण झाल्या. महायुद्धातील बॉम्बहल्ल्यामुळे जर्मनीचे उद्योगधंदे व शेतीयोग्य जमीन उध्वस्त झाल्याने उत्पादन पूर्णपणे थंडावले. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंची टंचाई निर्माण झाली. महागाई मोठ्या प्रमाणात वाढली. महागाईच्या प्रमाणात लोकांचे उत्पन्न मात्र वाढले नाही. महागाईमुळे सर्वसामान्य जनतेला जीवन जगणे अशक्य झाले. चलन फुगवटा निर्माण झाल्याने इटालीन चलनाची किंमत ७० टक्क्याने घसरली. युद्धाचा खर्च भागवण्यासाठी लादलेले अतिरिक्त करांचे ओझे सामान्य इटालीन जनतेला पेलावले नाही. सातत्याने वाढणाऱ्या किंमतीने जीवनावश्यक वस्तुंचा काळाबाजार होऊ लागला. राष्ट्रीय कर्ज सहा पटींनी वाढले. संप, टाळेबंदी, मोर्चे, दंगेधोपे यांना ऊत आला. कामगारांनी एकत्र येऊन कारखान्यांचे ताबे घेतले. औद्योगिक उत्पादन थंडावल्यामुळे परराष्ट्रीय व्यापारही थंडावला. परिणामी परकीय चलन मिळणेही बंद झाले. युद्ध आघाडीवरून परतलेल्या सैनिकामध्ये नैराश्य निर्माण झाले. सामान्य शेतमजूर, शेतकरी, कामगार, मध्यमवर्गीय जनता यांना महागाईमुळे जीवन जगणे असहाय्य झाले. नैराश्यग्रस्त परिस्थितीमुळे सर्वत्र प्रचंड मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. आर्थिक समस्या सोडवण्यात सरकारला अपयश आले. आर्थिक गर्तेतून इटलीस बाहेर काढण्यासाठी खंबीर नेतृत्वाची गरज इटालीयन जनतेस वाटू लागली. याचा फायदा मुसोलिनीने घेतला.

## ४. लोकशाही सरकारला आलेले अपयश

पहिल्या महायुद्धानंतर इटलीत निर्माण झालेल्या महागाई, बेकारी, जीवनावश्यक वस्तुंची निर्माण झालेली टंचाई या समस्या सोडवणयात तत्कालीन लोकशाही सरकारला अपयश आले. मुळातच इटालीयन लोकांना लोकशाही शासनव्यवस्थेची सवय नव्हती. इटलीमध्ये लोकशाही शासनव्यवस्थेची परंपरा नव्हती. लोकशाही शासनव्यवस्था असतानाही राजपद कायम होते. जिओलिट्टीचया नेतृत्वाखालील लोकशाही सरकार इटलीस जागतिक राजकारणात मानसन्मान व प्रतिष्ठा मिळवून देण्यात अपयशी ठरले. याशिवाय पॅरिस शांतता परिषदेत इटलीची महायुद्धातील नुकसानभरपाईबाबत समर्थपणे बाजू न मांडल्याने इटलीची

घोर निराशा झाली अशा प्रकारची मानसिकता इटालीन जनतेची झाली. त्यामुळे प्रजासत्ताक सरकारची लोकप्रियता कमी होत गेली. २३ जून १९१९ ते ऑक्टोबर १९२२ पर्यंत इटलीत सहा मंत्रीमंडळे अस्तित्वात आली व गडगडली. त्यामुळे इटलीस राजकीय स्थैर्य मिळू शकले नाही. त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. राज्यकारभारात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार माजला होता. अकार्यक्षम व भ्रष्ट शासनामुळे जनतेच्या मनातील नैराश्याची व वैफल्याची भावना अधिकच दृढ झाली. दुर्बल सरकारची उचलबांगडी होऊन नवे समर्थ नेतृत्व इटलीमध्ये निर्माण झाले पाहजे असे इटालीयन जनतेस वाटू लागले. एकूणच महायुद्धानंतर इटलीमध्ये आर्थिक अस्थैर्याबरोबरच राजकीय अस्थैर्यही निर्माण झाले.

## ५. साम्यवादी पक्षाच्या कारवाया

महायुद्धानंतर इटलीत निर्माण झालेली राजकीय व आर्थिक अनागोंदीची परिस्थिती साम्यवादी पक्षाच्या वाढीस व विस्तारास अनुकूल ठरली. रशियाप्रमाणेच इटलीतही साम्यवादी पक्षाची सत्ता स्थापन करण्याचा प्रयत्न इटलीतील साम्यवादी पक्ष करू लागला. साम्यवादी पक्षाने कामागर संघटनांना हाताशी धरून आपले सामर्थ्य वाढवण्यास सुरूवात केली. औद्योगिक क्षेत्रात संप घडवून आणले. या कालावधीत ६०० कारखान्यांतील जवळपास ५०००० कामगारांनी कारखान्याचा ताबा घेतला. कामगार व शेतकऱ्यांना तत्कालीन सरकारविरूद्ध बंड करण्यास प्रोत्साहन दिले. त्यामुळे इटलीत संप, निदर्शने, टाळेबंदी, जाळपोळ व दंगली यांची एक लाटच निर्माण झाली. त्यामुळे सामान्य लोकांना जीवन जगणे अवघड झाले. कामागार व शेतकऱ्यांबरोबर सैनिक बुद्धिजिवीवर्ग, विद्यार्थी हे घटकही साम्यवादी पक्षाकडे आकर्षित झाले. साम्यवादी पक्षाच्या कारवायामुळे इटलीतील भांडवलदार वर्ग चिंताग्रस्त बनला व त्यांनी मुसोलिनीस पाठिंबा दिला.

## ६. राजकीय पक्षामधील सत्तास्पर्धा

इटलीतील पक्षा पक्षातील स्पर्धाही मुसोलिनीच्या उदयास कारणीभूत ठरली. महायुद्धा नंतर इटलीत निर्माण झालेली गोंधळाची परिस्थिती सावरण्यापेक्षा एकमेकांवर कुरघोडीचे राजकारण करण्यात इटलीतील राजकीय पक्षांनी धन्यता मानली. उदारतवादी, समाजवादी व कॅथोलिक पंथीयांचा जनता पक्ष हे इटलीतील प्रमुख तीन पक्ष होते. साम्यवादी व फॅसीस्ट पेक्षांचा नुकताच उदय झाला होता. उदारमतवादी पक्ष बरीच वर्षे सत्तेवर होता. परंतु म्हणावी तशी समाधानकारक कामगिरी या पक्षाला करता आली नाही. अंतर्गत सत्तेस्पर्धेमुळे हा पक्ष दुबळा बनत गेला. समाजवादी पक्षास शेतकरी व कामगार वर्गाचा पाठिंबा होता. महायुद्धानंतरची इटलीतील अस्थिर परिस्थिती या पक्षाच्या वाढीस पोषक बनली. पहिल्या महायुद्धानंतर जनता पक्ष इटलीमध्ये लोकप्रिय होऊ लागला. लोकशाही मार्गाने इटलीत सुधारणा करण्यावर या पक्षाने भर दिला होता. महायुद्धानंतरची परिस्थिती हाताळण्यात उदारमतवादी पक्षाला अपयश येऊ लागल्याने समाजवादी व जनता पक्षाने उदारमतवादी पक्षावर प्रखर टीका करण्यास सुरूवात केली. इटलीतील राजकीय अस्थिरतेचा फायदा घेण्याचा प्रयत्न प्रत्येक पक्ष करू लागला. प्रत्येक पक्षाचे ध्येयधोरणे वेगवेगळी असल्याने त्यांच्यातील सत्ता स्पर्धा व द्वेषभावना दिवसेंदिवस वाढतच गेली. इटलीतील तत्कालीरन

अस्थिर राजकीय परिस्थितीला कंटाळून इटालीयन जनतेला राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारा व इटलीला नवे वैभव प्राप्त करून देणाऱ्या खास इटालीयन पक्षाची आवश्यकता त्यांना वाटू लागली.

## ब) मुसोलिनीची वाटचाल

बेनिटो मुसोलिनीचा जन्म १८८२ मध्ये रोमॅग्नो प्रांतातील एका खेड्यात झाला. त्याचे वडील व्यवसायाने लोहार असून समाजवादी तत्त्वप्रणालीचे पुरस्कर्ते होत. मुसोलिनीची आई शिक्षिका हाती. आपल्या मुलाने आपल्यासारखेच शिक्षक व्हावे असे तिला वाटत होते. स्वीत्झर्लंडमध्ये शिक्षण घेत असतानाच त्याने कामागर संघटनेच्या कार्यात भाग घेऊन राजकारणात प्रेवश केला. आर्थिक परिस्थिती बेताची असल्याने शिक्षण घेताना त्याला कष्ट सहन करावे लागले होते. स्वीत्झर्लंडमध्ये त्याने पत्रकारितेचा व्यवसाय स्विकारला. मुळातच मुसोलिनीचा स्वभाव महत्त्वाकांक्षी असल्याने त्याने कामगार संघटना स्थापन करणे, संप घडवून आणणे अशी कामे सुरू केली. परिणामी १९०६ मध्ये स्वीत्झर्लंडमधून त्याला हद्दपार करण्यात आले. इटलीत आल्यानंतर तो शांत राहिला नाही. समाजवादी चळवळीत भाग घेऊन वृत्तपत्रातून त्याने समाजवादी व क्रांतीकारी विचारांचा प्रचार सुरू केला. परिणामी १९०८ मध्ये इटालीयन सरकारने त्याला तुरूंगात टाकले. एक साम्यवादी नेता म्हणून तो प्रस्दि्धीस आला. १९१२ मध्ये समाजवादी पक्षाच्या अवंती वृत्तपत्राचा तो संपादक बनला. १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धास सुरूवात झाली. महायुद्धाच्या सुरूवातीच्या काळात आपल्या अवंती वृत्तपत्राच्या माध्यमातून इटलीने महायुद्धात सहभागी होऊ नये असे मत मांडले. परंतु नंतर मात्र त्याच्या विचारात बदल घडून आला व त्याने इटलीने महायुद्धात सहभागी व्हावे असा विचार मांडला. १९१५ मध्ये लंडनच्या गुप्त करारानुसार इटलीने पहिल्या महायुद्धात दोस्त राष्ट्रांच्या बाजूने सहभाग घेतला. मुसोलिने स्वतः लष्करात दाखल होऊन लढायामध्ये पराक्रम गाजवला.१९१७ मध्ये एका खंदकात झालेल्या स्फोटात तो जखमी झाला. त्यामुळे त्याल लष्करातून निवृत्त होऊन परत यावे लागले.

इटली हे पहिल्या महायुद्धातील विजेते राष्ट्र होते. महायुद्धानंतर भरलेल्या पॅरिस शांतता परिषदेमध्ये इटलीच्या वाट्याला फारसे काही आलेच नाही. त्यामुळे इटालीयन जनतेमध्ये घोर निराशा निर्माण झाली. दोस्त राष्ट्राविषयी असंतोष निर्माण झाला. पहिल्या महायुद्धातील त्यागाच्या मानाने फायदा मात्र इटलीला झालाच नाही. त्यामुळे मुसोलिनीही नाराज होऊन जहाल राष्ट्रवादी बनला. पॅरिस शांतता परिषदेत इटलीची जाणीवपूर्वक फसवणूक करण्यातही आल्याचे त्याचे मत बनले. २३ मार्च १९१९ रोजी मुसोलिनीने फॅसिस्ट या पक्षाची स्थपना केली. फॅसिस ही पक्षाची खूण करण्यात आली. या खूणेचा अर्थ काठ्यांचा जुडगा व मध्यभागी कुऱ्हाडीचे पाते असा होतो. सामर्थ्याचे व ऐक्याचे द्योतक असलेले हे बोधचिन्ह प्राचीन रोमन साम्राज्याचे प्रतीक होते. प्राचीन रोम साम्राज्याची ही खूण मुसोलिनीने जाणीवपूर्वक स्विकारलेली होती. त्यामागे प्राचीन रोमन साम्राज्याचे वैभव व प्रतिष्ठा परत मिळवण्याच्या कल्पनेने पक्ष सदस्यांना व राष्ट्राला स्फूर्ती मिळावी हा उद्देश होता. फॅसिस्ट पक्षाच्या माध्यमातून त्याने साम्यवादास विरोध तर राष्ट्रवादाचा पुरस्कार केला. मुसोलिनीची प्रभावी वक्तृत्त्वशैली आणि संघटन चातुर्यामुळे फॅसिस्ट पक्ष इटलीत

अल्पावधीत लोकप्रिय ठरला. उत्तर व मध्य इटलीतपक्षाच्या शाखा उघडून जास्तीत जास्त अनुयायी मिळवण्यावर त्याने भर दिला. मध्यमवर्गीय लोक, लष्करातील निवृत्त अधिकारी, विद्यार्थी, व्यापारी, भांडवलदार, जमीनदार, कामगार, शेतकरी या पक्षाकडे आकर्षित झाले. देशातील निराशग्रस्त व अपमानित झालेली इटालीयन जनता आशेने या पक्षाकडे पाहू लागली. मुसोलिनीने आपल्या पक्षाचे लढाऊ दल निर्माण केले. लढाऊ दलातील कार्येकर्ते काळ शर्ट वापरत असत. मुसोलिनीने आपले लढाऊ दल शिस्तबद्ध व शस्त्रसज्ज बनवले. आपल्या पक्षाच्या प्रचारावर व प्रसारावर मुसोलिनीने भर दिला. भांडवलदार, जमीनदार, कामगार, शेतकरीव सामान्य इटालीयन जनता मुसोलिनीकडे मोठ्या आशेने पाहू लागली. मुसोलिनीच्या सततच्या प्रचारामुळे दोन वर्षातच फॅसिस्ट पक्ष इटलीतील एक प्रमुख पक्ष बनला. १९२१ च्या निवडणुकीत मुसोलिनीच्या फॅसिस्ट पक्षास कायदेमंडळात ३५ जागा मिळाल्या. १९२२ मध्ये नेपल्सा येथ भरलेल्या अधिवेशनात ५०००० स्वयंसेवक उपस्थित होते. या अधिवेशनात मुसोलिनीने एक तर शासनव्यवस्था आपल्या हाती सोपवा. नाही तर रोमवर चाल करून जाऊ अशी घोषणा केली. या स्वयंसेवकांना रोमवर आक्रमण करण्याचा आदेश त्याने दिला. ऑक्टोबर १९२२ मध्ये स्वयंसेवकांनी रोमवर आक्रमण करून रोम ताब्यात घेतले. इटलीचा तत्कालीन राजा तिसरा व्हिक्टर इमान्युएल याने मुसोलीनीस पंतप्रधानपद देऊन मुसोलिनीच्या हाती इटलीची सत्तासूत्रे सोपवली. अल्पावधीतच मुसोलिनीने सत्तेचे केंद्रीयकरण आपल्या हाती केले. परिणामी इटलीचे कायदेमंडळ त्याच्याहातचे बाहुले बनले. मुसोलिनीचे स्थान सर्वाधिकारी हुकूमशहाचे बनले. आपल्या कार्याबद्दल संसदेऐवजी तो केवळ राजाला जबाबदार राहू लागला.

## क) फॅसिस्ट तत्त्वज्ञान

पहिल्या महायुद्धातील इटलीची झालेली जबगरदस्त हानी, महायुज्ञानंतर इटलीत निर्माण झालेल्या विविध समस्या व या समस्या सोडविण्यात तत्कालियन सरकारला आलेल्या अपयशामुळे इटलीत मुसोलिनीचा उदय झाला. आपल्या फॅसिस्ट पक्षाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी, आपल्या पक्षाकडे इटालियन जनतेला आकर्षित करण्यासाठी आपल्या पक्षाचे तत्त्वज्ञान मांडले. त्यालाच फॅसिस्ट तत्त्वज्ञान असे म्हणतात. फॅसिस्ट तत्त्वज्ञान हे काही स्वतंत्र व वेगळे तत्त्वज्ञान नव्हते. मुसोलिनीच्या गरजेमधून तत्त्वज्ञानाचा विकास होत गेला. मेकॅव्हीली, नित्शे, हेगेल, सोरेल या तत्त्वज्ञांनी मांडलेल्या विचारातील स्वतःच्या सोयीचे, फायद्याचे विचार घेऊन हे तत्त्वज्ञान तयार करण्यात आले होते. विशेषतः मेकॅव्हिली याच्या विचाराचा जास्त प्रभाव मुसोलिनीवर होता. राजकारणात स्वतःचे ध्येय साध्य करण्यासाठी कोणत्याही मार्गाचा अवलंब केला पाहिजे हा मेकॅव्हिलीचा सिद्धांत मुसोलिनीला आवडला होता. प्रखर व आत्यंतिक स्वरूपाचा राष्ट्रवाद ही फॅसिझमची मुळ बैठक होती.

### १. व्यक्तीपेक्षा राष्ट्र श्रेष्ठ

हेगेलने प्रतिपादन केलेला व्यक्तीपेक्षा राष्ट्र श्रेष्ठ हा सिद्धांत मुसोलिनीने स्विकारलेला प्रत्येक व्यक्तीने राष्ट्राच्या प्रगतीसाठी व हितासाठी सातत्याने झटले पाहिजे. राष्ट्राच्या ध्येयापेक्षा व्यक्तीचे ध्येय वेगळे असूच शकत नाही. व्यकतीच्या कार्याचे मुल्यमापन हे तो

व्यक्ती राष्ट्राच्या किती उपयोगात आला यावरूनच ठरत असते. या तत्त्वानुसार व्यक्तीच्या हितापेक्षा राष्ट्राच्या हिताला अधिक प्राधान्य देण्यात आले होते. प्रत्येक व्यक्तीला हक्क नसून फक्त कर्तव्य आहेत. व्यक्तीला स्वतःची ओळख मिळते ती केवळ राष्ट्रामुळेच. त्यामुहे व्यक्तीने राष्ट्रासाठी वाटेल तो त्याग करण्यास सदैव तयार असावे.

## २. लोकशाहीस प्रखर विरोध

लोकशाही व्यवस्थेवर फॅसिस्टांचा विश्वासच नव्हता. त्यामुळ लोकशाहीला प्रखर विरोध करण्याचे धोरण फॅसिस्टांनी स्विकारले होते. राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने लोकशाही विघातक असते. फ्रेंच तत्त्वज्ञ सोरेल यांर्चया विचारातून मुसोलिनीने हे तत्त्व स्वीकारले होते. बहुमताच्या आधारावर चालत असलेली लोकशाही राष्ट्राचे भविष्य ठरवण्यास असमर्थ ठरवते. त्यामुळे राष्ट्राच्या विकासाच्या दृष्टीने लोकशाही विघातक आहे. प्रत्येक प्रश्नावर बहुमत घेण्याच्या पद्धतीमुळे चांगले निर्णय लवकर होत नाहीत. त्यामुळे त्याचा राष्ट्राच्या विकासावर परिणाम होतो. लोकशाही व्यवस्थेत राज्यकारभार करण्याच्या दृष्टीने अपात्र असलेल्या लोकांच्या हाती देशाची सत्तासूत्रे जाण्याची शक्यता असते. राष्ट्राचा खरा विकास लोकशाही व्यवस्थेत होऊ शकत नाही. सामान्य लोकांनी शासनात भाग घेण्याचा अधिकार फॅसिस्ट लोकांना मान्य नव्हता. सर्वसामान्य व्यक्तींना राजकीय क्षेत्रातले. राष्ट्राच्या भवितव्याविषयी फारसे काही कळत नसते. त्यामुळे समाजातील श्रेष्ठ व बुद्धिवान व्यक्तीच्या हाती राष्ट्राची सर्व सत्ता देणे योग्य असत. अशा व्यक्तीवर पूर्णपणे विश्वास टाकला पाहिजे. तसेच त्याने दिलेल्या आज्ञा आज्ञाधारकपणे पाळल्या पाहिजेत.

## ३. साम्यवादास विरोध

साम्यवादास विरोध करण्याचे धोरण मुसोलिनीने स्विकारले होते. साम्यवादामध्ये राष्ट्रातील सर्व संपत्ती, उद्योगधंदे व शेती राष्ट्राच्या मालकीची असते. याला फॅसिस्ट तत्त्वज्ञानात विरोध करण्यात आला होता. सर्वच संपत्ती राष्ट्राच्या मालकीची असल्यामुळे लोक जास्त काम नकरता आळशी बनतात. त्यामुळे राष्ट्राचे नुकसान हाते. संपत्तीची मालकी जर व्यक्तींकडे असेल तर व्यक्ती अधिकाधिक कष्ट करतात. परिणामी राष्ट्राचे उत्पन्न वाढते.

## ४. युद्धाचा पुरस्कार

युद्धाचा पुरस्कार मुसोलिनीने केला होता. व्यक्तींनी युद्धाला सदैव सजज असले पाहजे. कारण व्यकतीमधील धैर्य, शौर्य, चिकाटी व त्याग या गुणांचा विकास खऱ्या अर्थाने युद्धकाळातच होतो. व्यक्तीचे खरे शोर्य युद्धभूमीवरच दिसून येते. युद्धातील विजयामुळे राष्ट्राचीआंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढण्यास मदतच होते.

## ५. हकूमशाहीचा पुरस्कार

मुसोलिनी स्वतः हुकूमशाही प्रवृत्तीचा असल्याने फॅसिस्ट अनुयायांनी हुकूशाहीचा पुरस्कार केला होता. फॅसिस्ट अनुयायांच्या दृष्टीने राष्ट्र हे दैवत होते. कर्तृत्ववान हुकूमशहामुळे राष्ट्राचा कारभार एकहाती चालतो. परिणामी निर्णय घेणे, त्याची अंमलबजावणी ताबडतो होत असते. त्यामुळे राष्ट्राचा विकास कमी वेळेत उअधिकाधिक होऊ शकतो. एका व्यक्तीच्या हात सत्ता असल्यामुळे भ्रष्टाचार, गोंधळ या गोष्टींना आळ बसतो.

## ड) मुसोलिनीचे अंतर्गत धोरण

१९२२ मध्ये मुसोलिनी इटलीचा चॅन्सलर झाला. त्यानंतर त्याने इटलीवरील आपली पकड घट्ट करण्यासाठी व इटलीची प्रगती करण्यासाठी पुढील धोरणचा स्किार केला होता.

### १. सत्तेचे केंद्रिकरण

मुसोलिनी हामुळात हुकूमशाही प्रवृत्तीचा होता. स्वतःच्या मनाप्रमाणे देशाचा कारभार पहाण्यासाठी, ध्येयधोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी इटलीची संपूर्ण सत्ता आपल्या हाती असणे त्याला गरजेचे वाटत होते. त्यासाठी १९२३ व १९२८ मध्ये कायदे पास करून संसदेवर फॅसिस्टांचे वर्चस्व निर्माण करून फॅसिस्ट पक्षाची हुकूमशाही शासनव्यवस्था प्रस्थापित करण्यात आली. मुसोलिनी व त्याच्या ध्येयधोरणांना विरोध करणारया विरोधी पक्षावर बंधने घालण्यात आली. आपल्या विरोधकांचा पद्धतशीर बंदोबंस्त मुसोलिनीने केला. काही विरोधकांना ठार तर काहींना हद्दपार करण्यात आले. माजी पंतप्रधान निटी, इतिहासकार सालवेमिनी यांना हद्दपार केले. तर गिअॅकोमो मॅटिओटी या समाजवादी नेत्याला ठार मारण्यात आले. त्यामुळे मुसोलिनीला विरोध करण्याची कोणताही हिम्मत उरली नाही. मुसोलिनी व त्याच्या ध्येयधोरणावर निष्ठा नसणाऱ्यांना केंद्रिय नोकरीतून काढून टाकून त्याजागी निष्ठावान, उत्साही फॅसिस्ट अनुयायांनी नियुक्ती करण्यात आली. कोणत्याही नोकरीसाठी फॅसिस्ट पक्षाचे सदस्यत्व असणे बंधनकारक करण्यात आले. त्यामुळे सरकारी यंत्रणेत फॅसिट पक्षाचे वर्चस्व प्रस्थापित झाले. आपल्या सत्तेच्या विरोधात वृत्तपत्रांनी जनमत जागृत करू नये म्हणून वृत्तपत्रांवर कडक निर्बंध लादण्यात आले. त्यामुळे फॅसिस्ट वृत्तपत्राशिवाय इतर वृत्तपत्रे बंद पडले. स्थानिक सरकारात निवडणूका बंद करून सल्लागार मंडहे नियुक्त करण्यात आले. सत्तेचे केंद्रिकरण केल्यामुळे मुसोलिनीचे स्थान सर्वाधिकारी हुकूमशहाचे बनले. लष्कराची संपूर्ण सत्तासूत्रे मुसोलिनीच्या हाती केंद्रित करण्यात आले. आपल्या कामकाजाबद्दल मुसोलिनी संसदेला नव्हे तर राजाला जबाबदार राहू लागला. त्यामुळे संसदेचे महत्त्वही कमी झाले. कायदेमंडळात विविध बिले मांडण्याचा अधिकारही पंतप्रधान या नात्याने मुसोलिनीने स्वतःकडे घेतला. मुसोलिनीने दहशतीच्या बळावर स्वतःला पाहिजे तसे सर्व बदल घडवून आणले. सर्व अधिकारांचे केंद्रीकरण मुसोलिनीच्या हाती आल्यामुळे राजालासुद्धा फक्त नामधारी सत्ता शिल्लक राहिली. आपण सर्व संकटातून देशाला बाहेर काढू असा आशावाद त्याने इटालीयन जनतेमध्ये निर्माण केला.

### २. आर्थिक सुधारणा

१९१५ मध्ये पहिल्या महायुद्धात इटलीने सहभाग घेतला होता. जर्मनी व ऑस्टीया या राष्ट्रांनी केलेल्या जबरदस्त बॉम्बवर्षावामुळ इटलीतील उद्योगधंदे, शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. महायुद्धानंतर इटलीमध्ये बेकारी, उपासमारी, महागाई, जीवनावश्यक वस्तुंची टंचाई या समस्या निर्माण झाल्या होत्या. इटलीवरील आपली सत्तेची पकड घट्ट करण्यासाठी व लोकांमधील असंतोष कमी करण्यासाठी जलद आर्थिक सुधारणा करणे मुसोलिनीला गरलजेचे वाटत होते. इटलीचे औद्यागिक उत्पादन वाढवण्यावर त्याने भर दिला. त्यासाठी संप, टाळेबंदी बेकायदेशीर ठरवण्यात आली. १९२६ मध्ये सर्व भांडवलदारांची

एक संघटना व सर्व कामगारांची एक संघटना स्थापन करण्यात आली. कृषी उत्पादनर वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा, खंतांचा व नवीन बि-बियाणांचा वापर केला. नद्यांना बांध घालून, कालवे काढून शेतीला पाणी पुरवण्यात आल. परिणामी १९३९ पर्यंत इटलीच्या गरजेच्या ९५ टक्के अन्नधान्य इटलीमध्ये तयार होऊ लागले.

## ३. शैक्षणिक सुधारणा

शैक्षणिक क्षेत्रातही मुसोलिनीने सुधारणा घडवून आणल्या. कायदा करून त्याने शिक्षण सक्तीचे केले. मोठ्याप्रमाणात शिक्षण संस्था उघडण्यात आल्या. शिक्षणामधून इटालियन राष्ट्र, राष्ट्रप्रेमाचे धडे विद्यार्थ्यांना देण्यात आले. क्रमिक पुस्तकांचे नव्याने लेखन करून क्रमिक पुस्तकामध्ये मुसोलिनीचे मोठेपण सांगणारे अनेक पाठ टाकण्यात आले. फॅसिस्ट तत्त्वज्ञानाचा समावेश शिक्षणात करण्यात आला. रोमन साम्राज्याचे गोडवे गाण्यात आले. शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आक्रमक राष्ट्रवाद, लष्करवार व युद्धप्रियतेची शिकवण विद्यार्थ्यांना देण्यात आली. फॅसिट तत्वज्ञानाचा पुरस्कार करणाऱ्या शिक्षकांचीच नियुक्ती शाळा व महाविद्यालयात करण्यात आली. शिक्षणाच्या माध्यमातून निष्ठावान फॅसिस्ट कार्यकर्ते निर्माण करण्यावर भर दिला. फॅसिस्ट विचारसरणीच्या विरोधात असलेली पुस्तके नष्ट करण्यात आली.

## ४. लष्करी सुधारणा

इटलीची सत्तासूत्रे हाती घेतल्यानंतर लष्करी सुधारणा करण्यावर मुसोलिनीने भर दिला. कारण जगातील राजकारणात आक्रमक साम्राज्यविस्ताराचे धोरण मुसोलिनीला स्विकारायचे होते. जागतिक राजकारणात आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा वाढवण्यासाठी मुसोलिनीने इटलीस लष्करीदृष्ट्या सुसज्ज करण्यावर भर दिला. शैक्षणिक संस्थामधून लष्करी शिक्षण देणे सक्तीचे केले. लष्काराचे आधुनिकीकरण करण्यावर भर दिला. लष्काराची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढविण्यावर भर दिला. इटालियन सैन्याची संख्या १ लक्ष ७५ हजारावरून २ लक्ष ७५ हजारापर्यंत वाढवली. सैन्यासाठी अत्याधुनिक शस्त्रास्त्रांची निर्मिती करण्यात आली. इटालियन सैन्याचे मुसोलिनीप्रती एकनिष्ठ रहाण्याचा नियम करण्यात आला.

## इ) मुसोलिनीचे पराष्ट्रीय धोरण

आंतरराष्ट्रीय राजकारणात इटलीस मानाचे स्थान मिळवून देणे हे मुसोलिनीच्या परराष्ट्रीय धोरणाचे मुख्य उद्दिष्ट होते. त्यामुळे इटलीची सत्तसूत्रे हाती आल्यानंतर जागतिक राजकारणात आक्रमक साम्राज्यविस्ताराचे धोरण मुसोलिनीने स्विकारल. पहिल्या महायुद्धात इटलीने मोठ्या प्रमाणात योगदान देऊनही पॅरिस शांतता परिषदेत फारसा आर्थिक व प्रादेशिक लाभ इटलीस झाला नव्हता. १९१५ च्या लंडनच्या गुप्त करारानुसार दोस्त राष्ट्रांनी इटलीस दिलेली आश्वासने पॅसिर शांतता परिषदेत दोस्त राष्ट्रांनी पाळली नाहीत. याचा राग मुसोलिनीस आला होता. त्यामुळे जागतिक राजकारणात आक्रमक धोरण स्विकारून इटलीसाठी जास्तीत जास्त प्रदेश मिळवण्यावर मुसोलिनीने भर दिला. इटलीस गरजेच्या मानाने कच्चा मालाची उपलब्धता देशांतर्गत उत्पादनातून होत नव्हती. इटलीतील उद्योगधंद्यांना लागणारा कच्चा माल मिळवण्यासाठीही वसाहतीची आवश्यकता इटलीस वाटत होती.

इटलीची वाढलेली लोकसंख्या स्थलांतरीकरण्यासाठीही वसाहतींची आवश्यकता मुसोलिनीस भासत होती. मुसोलिनीला जुन्या वैभवशाली रोम साम्राज्याच्या प्रतिष्ठेचे पुनरूज्जीवन करायचे होते. त्यामुळे मुसोलिनीने जागतिक राजकारणात आक्रमक व विस्तारवादी धोरणाचा अंगीकार केला.

१९२३ मध्ये युरोपियन राष्ट्रांची लाऊसेन येथे परिषद सुरू होती. यावेळीच मुसोलिनीने भूमध्य सागरावरील ऱ्होडस व डॉडकेनीज या बेटावर लष्करी कारवाई सुरू केली. याच परिषदेत इटलीच्या या बेटावरील वर्चस्वाला प्रथमच कायदेशीर मान्यता देण्यात आली. त्यामुळे इटलीचे भूमध्य सागारावर वर्चस्व निर्माण झाले. मुसोलिनीने या बेटावर इटालियन आरमाराचे केंद्र निर्माण केले. मुसोलिनीचा परराष्ट्रीय धोरणातील हा पहिलाच विजय होता. फ्यूम बंदराचे इटलीला सुरूवातीपासूचन आकर्षण होत. दोस्त राष्ट्राबरोबर १९१५ मध्ये झालेल्या लंडनच्या करारतही इटलीस फ्यूम बंदर देण्यास आश्वासन दोस्त राष्ट्रांनी दिले होते. पण पॅरिस शांतता परिषदेत मात्र फ्यूम हे स्वतंत्र शहर म्हणून घोषित करण्यात आले. फ्यूम बेटावर वर्चस्व प्रस्थापित करण्यास उत्सुक असलेल्या इटली व युगोस्लोव्हाकीयाला हानिर्णय आवडला नाही. जानेवारी १९२४ मध्ये मुसोलिनीने युगोस्लोव्हाकीयाला रापेलोच्या तहात दुरूस्ती करण्यास भाग पाडले. त्यानुसार ऑडियाटिक समुद्रातील फ्यूम बंदरावर इटलीचे वर्चस्व निर्माण झाले.

जागतिक राजकारणात मुसोलिनीने हळू हळू आक्रमक धोरणाचा स्विकार केला. मुसोलिनीने आपले लक्ष ॲबिसीनीयाकडे वळवल. नैसर्गिक खनिज संपत्ती मिळवण्यासाठी, जागतिक राजकारणातील इटलीचे महत्त्व वाढवण्यासाठी, इटलीस हक्काची बाजारपेठ मिळवण्यासाठी इटलीला ॲबिसीनिया जिंकणे महत्त्वाचे वाटत होते. १८९६ मध्ये इअली व ॲबिसीनीया यांच्यामध्ये झालेल्या अडोव्हाच्या लढाईत इटलीचा पराभव झाला होता. याचा बदला इटलीस घ्यावयाचा होता. मुसोलिनीने ॲबिसीनीयावर आक्रमण करण्याचे पद्धतशीर नियोजन केले. आपल्या विश्वासातील व्यक्तीकडून ॲबिसीनियामध्ये अंतर्गत बंडाळ्या निर्माण केल्या. १९३५ मध्ये मुसोलिनीने ॲबिसीनीयावर आक्रमण केले. ॲबिसीनियाचा राजा हेल सेलासी याने या आक्रमणाविरूद्ध राष्ट्रसंघाकडे तक्रार केली. राष्ट्रसंघाने इटलीस आक्रमक राष्ट्र म्हणून घोषित करून इटलीची आर्थिक नाकेबंदी करण्याचा आदेश युरोपियन राष्ट्रांना दिला. पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. १९३६ मध्यें इटलीनेॲबिसीनिया जिंकून घेतला. इटलीच्या राजाला ॲबिसीनीयाचा राजा म्हणून घोषित करण्यात आले. ॲबिसीनियावरील इटलीच्या वर्चस्वामुळे जगात साम्राज्यविस्ताराच्या बाबतीत तिसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र बनले.

ॲबिसीनियावरील वर्चस्वानंतर मुसोलिनीने आपले लक्ष स्पेनकडे वळवले. स्पेनमध्ये अंतर्गत बंडाळीमध्ये १९३४ पासूनच मुसोलिनी लक्ष घालण्यास सुरूवात केली होती. १९३६ मध्ये स्पेनमधील अंतर्गत बंडाळीचा फायदा घेऊन जनरल फ्रॅकोने क्रांती केली. रशियाने स्पेनचा राजा अल्फान्सो तेरावा यास पाठिंबा दिला. तर मुसोलिनीने जनरल फ्रॅकोला पाठिंबा देऊन लष्करी सहाय्य दिले. इंग्लंड व फ्रान्स ही राष्ट्रे यावेळी तटस्थ राहिली. ही क्रांती यशस्वी होऊन स्पेनवर जनरल फ्रॅकोची हुकूमशाही राजवट स्पेनवर सुरू झाली.

जागतिक राजकारणात मुसोलिनी व हिटलर हे दोघेही हुकूमशहा म्हणूनच प्रसिद्ध होते. पण १९३६ पर्यंत हिटलर व मुसोलिनी यांच्यामध्ये सहकार्याचा अभावच होता.

हिटलरचे १९३४ मधील ऑस्ट्रीया जिंकून घेण्याचे स्वप्न मुसोलिनीने विरोध केल्यामुळेच प्रत्यक्षात उतरले नव्हते. हिटलरने मुसोलिनीच्या ॲबिसीनीयावरील वर्चस्वास दिलेला पाठिंबा, मुसोलिनीचे इंग्लंड फ्रान्सशी बिघडलेल्या संबंधाने जागतिक राजकारणात मुसोलिनी व हिटलर एकत्र येण्यास सुरूवात झाली. १९३६ मध्ये जर्मनी व जपान यांच्यात मैत्रीचा करार झाला होता. या करारात १९३७ मध्ये इटली सामील झाला. परिणामी जागतिक राजकारणात रोम-बर्लिन-टोकिओ आ कक्ष तयार झाला. या कक्षानुसार हुकूमशाहीचा पुरस्कार करणारी रष्ट्रे जागतिक राजकारणात एकत्र आली. जागतिक राजकारणात त्यांनी स्विकारलेल्या आक्रमक धोरणामुळे जगाची वाटचाल दुसऱ्या महायुद्धाकडे सुरू झाली. रोम-बर्लिन-टोकिओ या कक्षानंतर मुसोलिनीने आपले लक्ष बाल्कन प्रदेशातील अल्बानियाकडे दिले. अल्बानियाची आर्थिक परिस्थिती हलाकीची झाली होती. अल्बानियाचा राजा महमद जॉग याच्या विनंतीवरून मुसोलिनीने अल्बानियाला मोठ्या प्रमाणात कर्ज देऊन आपली पकड अल्बानियावर केली. १९३९ मध्ये मुसोलिनीने अल्बानियाच जिंकून घेतला. हिटलरने पोलंडवर १ सप्टेंबर १९३९ रोजी आक्रमण केले. तर ३ सप्टेंबर रोजी पोलंडच्या बाजूने इंग्लंड व फ्रान्स यांनी सहीाग घेतला. परिणामी दुसरे महायुद्ध सुरू ाले. इटलीने जर्मनीच्या बाजूने दुसऱ्या महायुद्धात सहभाग घेतला.

## ४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम

१. राष्ट्रसंघाचे उद्देश सांगा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

२. राष्ट्रसंघसाची रचना स्पष्ट करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

३. राष्ट्रसंघाच कार्य विशद करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

४. राष्ट्र संघाच्या अपयशाची कारणे सांगा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

५. १९२९ च्याजागतिक महामंदीची कारणे सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

६. रूझवेल्टच्या नवीन आर्थिक धोरणांची माहिती सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

७. जर्मनीतील हिटलरच्या उदयाची कारणे सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

८. हिटलरचे अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणाची माहिती सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

९. इटलीतील मुसोलिनीच्या उदयाची कारणे सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

१०. मुसोलिनीच्या अंतर्गत व परराष्ट्रीय धोरणची माहिती सांगा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ४.४ सारांश

पहिल्या महायुद्धाने संपूर्ण मानवी जीवन ढवळून काढले. मानवी जीवनाच्या अस्तित्वाच्यापुढेच पहिल्या महायुद्धामुळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. सहभागी राष्ट्रांना पहिल्या महायुद्धांना प्रत्यक्ष परिणाम भोगावे तर लागलेच होते. शिवाय ज्या राष्ट्रांनी पहिल्या महायुद्धात सहभाग घेतला नव्हता त्यांनाही महायुद्धाचे अप्रत्यक्ष परिणाम भोगावे लागले

होते. जागतिक पातळीवर पुन्हा असे महायुद्ध होऊ नये, जागतिी शांतता व सुव्यवस्था टिकवण्यासाठी राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात राष्ट्रसंघाने महत्त्वापूर्ण कामगिरी केली. स्थापनेनंतरच्या दहा वर्षात राष्ट्रसंघाने प्रभावी कामगिरी केली. नंतरच्या दहा वर्षात मात्र राष्ट्रसंघ अपशयी ठरला. आर्थात यामागे सीासद राष्ट्रांचा स्वार्थी दृष्टीकोन व इतर अनेक कारणे कारणीभूत ठरली. पहिल्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात बलाढ्य राष्ट्र म्हणून उदयास आलेल्या अमेरिकेला १९२९ च्या जागतिक महामंदीने जबरदस्त धक्का दिला. जागतिक महामंदीमुळे संपूर्ण अमेरिकन अर्थव्यवस्थाच कोलमडून गेली. अमेरिकेबरोबरच युरोपियन राष्ट्रांनीही महामंदीचा तडाखा बसला. अमेरिकेचा तत्कालीन राष्ट्राध्यक्ष हुवर याने महामंदी घालवण्यासाठी केलेले प्रयत्न अपुरे ठरले. परिणामी १९३२ मध्ये झालेल्या राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणूकीत त्याचा पराभव होऊन रूझवेल्ट अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष बनला. रूझवेल्टच्या नव्या आर्थिक धोरणामुळे अमेरिकेवरील महामंदीचे संकट हळूहळू दूर होत गेले. पहिल्या महायुत्राचा महत्त्वाचा परिणाम म्हणून युरोपातील हुकूमशहांच्या उदायाकडे पाहिले जाते. जर्मनीमध्ये हिटलरचा तर इटलीमध्ये मुसोलिनीचा उदय झाला. या हुकूमशहांनी जागतिक राजकारणात स्विकारलेल्या आक्रमक साम्राज्यविस्ताराच्या धोरणामुळे जागतिक शांतता धोक्यात येऊन १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धास सुरूवात झाली.

## ४.५ पारिभाषिक शब्द

## ४.६ संदर्भ सूची


१. डॉ. वैद्य सुमन, (१९९७), आधुनिक जग भाग -१, नागपूर, साईनाथ प्रकाशन.

२. डॉ. कुलकर्णी अ. रा., डॉ. देशपांडे अ.म., डॉ. देशपांडे प्र. न. (तृतियावृाी २००१)आधुनिक जगाचा इतिहास भाग २, पुणे स्नेहवर्धन प्रकाशन.

३ रेगे में. पु. (प्रमुख संपादक), (१९९९), मराठी विश्वकोश खंड १६, मुंबई, महाराट्र राज्य

४. कानिटकर वि. ग. (२०१०), नाझी भस्मासुराचा उदय, राजहंस प्रकाशन,पुणे.

५. डॉ. वाड विजया (प्रमुख संपादक) (२००७) मराठी विश्वकोश खंड १७, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

६. कदम य. ना. (दुसरी आवृत्ती २००५) विसाव्या शतकातील जगाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

# घटक ५
# विसाव्या शतकातील जग

**अनुक्रमणिका**


५.० उद्दिष्टे

५.१ प्रस्तावना

५.२ विषय विवेचन –

५.२.१ दुसरे जागतिक महायुद्ध

५.२.२ अ) कारणे, स्वरूप आणि परिणाम

५.२.२ ब) राष्ट्रवादी चळवळी आणि वसाहतवादाचे विघटन

५.२.३ क) चीनमधील साम्यवादी क्रांती, माओचे कार्य आणि तत्व

५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

५.४ सारांश

५.५ पारिभाषिक शब्द

५.६ संदर्भसूची


## ५.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१) दुसऱ्या जागतिक महायुद्धाची कारणे, स्वरूप आणि परिणाम यांची सविस्तर माहिती मिळेल.

२) आशिया-आफ्रिका खंडातील राष्ट्रवादी चळवळी स्वातंत्र चळवळी आणि या खंडातील देशांना स्वातंत्र्य मिळाल्यामुळे वसाहतवादाचे विघटन कसे झाले याची सविस्तर माहिती मिळेल. त्याचप्रमाणे

३) चीनमधील साम्यवादी क्रांती-साम्यवादी पक्षाची स्थापना-साम्यवादी क्रांतीची पार्श्वभूमी-क्रांती बाग मार्च - साम्यवादी क्रांतीतील मो.

## ५.१ प्रस्तावना

पहिले महायुद्ध इ.स. १९१८ मध्ये संपले आणि जगाने सुटकेचा श्वास सोडला. व्हर्साय येथे जागतिक परिषद भरून पहिल्या महायुद्धास प्रामुख्याने कारणीभूत झालेल्या जर्मनीवर अनेक कठोर अटी लादण्यात आल्या. पहिल्या महायुद्धासारख्या भीषण संकटाची

पुनरावृत्ती टाळावी म्हणून अमेरिकेच्या पुढाकाराने राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली आणि जागतिक शांततेची जबाबदारी राष्ट्रसंघाकडे सोपविण्यात आली. परंतु ही शांतता फार काळ टिकू शकली नाही.

१९३१ ते १९३९ या काळात युरोपिय राष्ट्रांच्या परस्पर विरोधी हितसंबंधामुळे संघर्ष निर्माण होऊन एका पाठोपाठ एक असे गंभीर पेचप्रसंग जागतिक राजकारणात उद्भवले. १९१९ च्या शांतता करारांनी असंतुष्ट जर्मनी, इटली व जपान या राष्ट्रांनी स्वत:च्या महत्त्वाकांक्षेच्या पूर्तीकरता उचललेल्या आक्रमक पावलांना प्रतिबंध घालण्याऐवजी पाश्चिमात्य राष्ट्रांनी अनुनयाचे धोरण स्विकारले व त्यामुळे राष्ट्रसंघाच्या सामुहिक सुरक्षितता पद्धतीच्या मुलभूत तत्त्वांचा बोजवारा उडून अखेर जग दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले गेले.

न्याय व समता यावर आधारीत राजकीय व्यवस्था निर्माण करून युद्धाच्या भयानक शापापासून भावी पिढ्यांची कायमची मुक्तता करण्याच्या उच्च आदर्शाचा पुनरुच्चार पहिल्या महायुद्धानंतर निरनिराळ्या राष्ट्रांच्या नेत्यांनी आणि विचारवंतांनी मोठ्या पोटतिडकीने केला होता. आंतरराष्ट्रीय कलहांचे निराकरण सामोपचाराने व्हावे व जागतिक शांतता टिकावी यासाठी राष्ट्रसंघाची निर्मितीही करण्यात आली होती. तरीही पहिला महायुद्धाचा शेवट होऊन २० वर्षे उलटतात न उलटतात तोच जग पुन्हा महायुद्धाच्या खाईत लोटले गेले.

पहिल्या महायुद्धातील पराभूत राष्ट्रांवर अत्याचारी तह लादले. त्याची तीव्र प्रतिक्रिया त्या त्या राष्ट्रात उमटली आणि जर्मनी व इटली या देशात हुकूमशाही सत्रांचा उदय झाला. सूड आणि प्रतिसूड असा प्रवास सुरू झाला. हिटलर आणि मुसोलिनी त्यांच्या आक्रमक धोरणापासून आपला बचाव करण्यासाठी युरोपियन देशांनी परस्परांशी करारनामे करून आपला गट निर्माण केला. अशा रितीने युरोप पुन्हा एकदा दोन प्रबळ गटात विभागला गेला. या दोन गटात अविश्वासाचे, असुयेचे युद्धानुकूल वातावरण तयार झाले आणि शेवटी त्यांच्यात महाभयंकर असे युद्ध सुरू झाले.

या युद्धांची व्याप्ती व भीषणता पूर्वीपेक्षा भयानक होती. दुसरे महायुद्ध इ.स. १९३९ मध्ये सुरू झाले. ते इ.स. १९४५ पर्यंत चालले. हे महायुद्ध सहा वर्षे सुरू होते. त्यामुळे संपूर्ण जग उद्ध्वस्त होण्याच्या मार्गास लागले. दुसरे महायुद्ध एवढे विनाशकारी होते की त्यामुळे तिसरे महायुद्ध झाले नाही. ज्या सर्वसामान्य जनतेचा युद्धाशी काहीच संबंध नव्हता ती जनता अणुबॉम्बने मारली गेली. त्यामुळे महायुद्ध सर्वसामान्य जनतेच्या उंबरठ्या पर्यंत आले. यावर उपाय म्हणून संयुक्त राष्ट्रसंघटनेचा जन्म झाला.

## ५.२ विषय विवेचन :–

या भयंकर युद्धाची कारणे खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १) व्हर्सायचा अपमानकारक तह :–

पहिले महायुद्ध संपल्यानंतर व्हर्साय येथे शांतता परिषद भरली. या परिषदेत इंग्लंड, फ्रान्स या विजयी राष्ट्रांनी जर्मनीवर जास्तीत जास्त कठोर अटी लादून जर्मनीला जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न केला. जर्मन साम्राज्याचे विघटन करण्यात आले. व्हर्सायच्या तहातील

४४० कलमांपैकी बरीचशी कलमे युद्धोत्तर काळात जर्मनी पुन्हा सामर्थ्यसंपन्न होऊ नये. यासाठी वापरली होती. व्हर्सायिच्या तहात प्रामुख्याने खालील अटी जर्मनीवर लादल्या होत्या.

१) जर्मनीच्या वसाहती दोस्त राष्ट्रांनी आपल्या ताब्यात घेतला. त्यामुळे तेथून होणारा कच्च्या मालाचा पुरवठा बंद झाला.

२) जर्मनीला युद्धनौका व पाणबुड्या बांधण्यास मनाई करण्यात आली.

३) जर्मनीचा सार प्रांत १५ वर्षासाठी फ्रान्सला देण्यात आला.

४. जर्मनीच्या लष्कराची संख्या अधिकारी व कर्मचारी यांच्यासह १ लाखापेक्षा जास्त असू नये.

५) जर्मनीने सक्तीचे लष्करी शिक्षण बंद करावे. शस्त्रास्त्रे व दारूगोळा यांचे उत्पादन सीमित करावे. ऱ्हाइनलँड या जर्मनीच्या प्रांतात १५ वर्षांपर्यंत जर्मन लष्करावर नियंत्रण ठेवण्यासाठी दोस्त राष्ट्रांचे लष्कर ठेवून घ्यावे.

६) अल्सेस व लॉरेन्स हे फ्रेंच प्रांत, जे १८७० पासून जर्मनीच्या ताब्यात होते ते जर्मनीला देण्यात आले.

७) जर्मनीला 'युद्धगुन्हेगार राष्ट्र' ठरवून संपूर्ण खर्चच जर्मनीकडून वसुल करण्याची इच्छा ब्रिटन व फ्रान्सची होती. युद्धखंडणीची रक्कम निश्चित करण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात आली होती. परंतु नुकसान भरपाई बाबत एकमत झाले नाही, तरी ५०० कोटी डॉलर्स जर्मनीने सोने किंवा मालाच्या रूपाने द्यावेत असे ठरले होते.

८) फ्रान्स, इटली, व बेल्जियम या राष्ट्रांना १० वर्षांपर्यंत दगडी कोळसा पुरविण्याची अट जर्मनीवर लादण्यात आली.

अशा रितीने विजयी राष्ट्रांनी जर्मनीवर जास्तीत जास्त कठोर अटी लादून जर्मनीला जमीनदोस्त करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे जर्मनी दुर्बल बनला. कर्जाचा भार डोक्यावर पडल्यामुळे राष्ट्रीय उद्योगधंद्यांना अवकळा आली. साम्राज्य विघटीत झाल्यामुळे जर्मनी अपमानित झाला. जर्मनीत दोस्त राष्ट्राविषयी सुडाची भावना निर्माण झाली. या पुढील काळात अन्न दुर्भिक्ष, बेकारी इ. संकटे जर्मनीपुढे आ वासून उभी राहिली. हे सर्व व्हर्सायिच्या अपमानकारक तहामुळे घडून आले. अशी जर्मन लोकांची मनोधारणा बनली. या सर्व परिस्थितीचा फायदा घेऊन हिटलरने आपल्या नाझी पक्षाची संघटना केली आणि त्याने व्हर्सायिच्या तहाचा कलंक धुवून काढून जर्मनीचा पुनरुद्धार करण्याचे स्वप्न जर्मन लोकांसमोर ठेवले. त्यामुळे जर्मनीत त्याचा नाझी पक्ष लोकप्रिय झाला. हिटलर जर्मनीचा सर्वेसर्वा बनला. त्यानंतर त्याने आक्रमक धोरण स्विकारून जर्मनीचे साम्राज्य वाढविण्यास सुरूवात केली. त्यामुळे जागतिक शांतता धोक्यात आली आणि दोस्त राष्ट्रांना पुन्हा जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारावे लागले हेच दुसरे महायुद्ध होय.

## २) युरोपात निर्माण झालेले परस्पर विरोधी गट :-

पहिल्या महायुद्धात जर्मनीचा पराभव झाल्यानंतर त्याला नेस्तनाबूत करण्याचा जास्तीत

जास्त प्रयत्न. पॅरिसच्या शांतता परिषदेत फ्रान्सने केला. त्यामुळे यापुढील काळातही फ्रान्स आणि जर्मनी यांचे वैर कमी न होता उलट वाढले. फ्रान्सविषयी सूडाची भावना जर्मन लोकांत धगधगत होती. जर्मनीत हिटलरचा उदय झाल्यानंतर तो आपला "Mein Kamph' या ग्रंथात म्हणतो, फ्रान्स हा जर्मनीचा परंपरागत शत्रू असून त्याला नष्ट करण्याचा प्रयत्न करणे. हे प्रत्येक जर्मन देशभक्ताचे कर्तव्य आहे.

जर्मनीच्या वाढत्या शत्रुत्वामुळे जर्मनीपासून आपले संरक्षण करण्यासाठी फ्रान्सला इंग्लंड, अमेरिकेशिवाय दुसरे मित्र शोधावे लागले. त्यातूनच फ्रान्स-बेल्जियम (१९२०), फ्रान्स-पोलंड (१९२१), फ्रान्स-झेकोस्लोव्हाकिया (१९२४), फ्रान्स-रुमानिया (१९२६), फ्रान्स-युगोस्लाव्हिया (१९२७) हे तह झाले. अशा रितीने फ्रान्सने नवीन नवीन मित्र मिळविले. त्यामुळे इटलीही फ्रान्सच्या हेतूविषयी साशंक झाला आणि इटालिनेही ऑस्ट्रीया, हंगेरी आणि बल्गेरिया या देशांशी सैनिकी करार केले. अशा रितीने युरोपात परस्परविरोधी गट निर्माण होऊन साशंकतेचे व भीतीचे वातावरण निर्माण झाले. यातूनच पुढे दुसऱ्या महायुद्धाचा स्फोट झाला.

## ३) आर्थिक कारणे :-

पहिल्या महायुद्धानंतर युरोपातील राष्ट्रासमोर अनेक आर्थिक समस्या निर्माण झाल्या. कच्च्या मालाच्या व पक्क्या मालाच्या विक्रीसाठी लागणारी हुकमी बाजार पेठेची आवश्यकता, वाढत्या लोकसंख्येसाठी रहायला जागा आणि अतिरिक्त भांडवलाच्या गुंतवणुकीसाठी अनुकूल क्षेत्र ही कारणे पहिल्या महायुद्धामागची होती. पहिले महायुद्ध संपल्यानंतरही या कारणांचे निराकरण झाले नव्हते. उलट युद्धांत झालेली अपरिमित हानी यामुळे या समस्यांचे स्वरूप अधिक तीव्र झाले होते. इंग्लंड, फ्रान्स या सारख्या विजयी राष्ट्रांसमोर बेकारी, पुनर्वसन, घसरता, परराष्ट्र व्यापार इत्यादी बिकट समस्या उभ्या राहिल्या. त्यामुळे नुकसान भरपाईच्या प्रश्नांवरून जर्मनीशी आणि आपापसात या राष्ट्रांमध्ये सतत कलह निर्माण होत होते.

जर्मनी, इटली या राष्ट्रांच्या बाबतीत या समस्या अधिकच बिकट बनल्या होत्या. जर्मनी जवळून व्हर्सायच्या तहानुसार फार मोठा प्रदेश, कच्चा माल व निसर्ग संपत्ती हिरावून घेतली होती. तर इटलीला दिलेल्या वचनांची पूर्तता दोस्तराष्ट्रांनी केली नव्हती. त्यामुळे जर्मनी व इटली ही दोन्ही राष्ट्रे अत्यंत असंतुष्ट होती. जपान हे तिसरे असंतुष्ट व महत्वाकांक्षी राष्ट्र होते. झपाट्याने झालेले औद्योगिकरण, लोकसंख्येतील वृद्धी व त्या मानाने रहायला जागा अपुरी, कच्चा माल, खनिज संपत्ती इत्यादींची तीव्र टंचाई त्या राष्ट्राला भेडसावीत होती. इ.स. १९२९ च्या महामंदीरच्या काळात स्वत:च्या उद्योगधंद्याच्या संरक्षणार्थ जवळ जवळ सर्वच राष्ट्रांनी आयात करांच्या भिंती उभारल्या. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापार ठप्प झाला. जर्मनी, इटली, जपान या राष्ट्रांवर या परिस्थितीचा अनिष्ट परिणाम झाला. त्यांची अर्थव्यवस्था कोलमडली. आर्थिक गळचेपी होऊ लागताच शांततेच्या आणि वाटाघाटीच्या मार्गाने ते मिळविणे शक्य होत नव्हते. ते शक्ती सामर्थ्यावर मिळवून घेण्यास ही राष्ट्रे पुढे सरसावली.

इ.स. १९३१ नंतर जर्मनी, इटली, जपान या तिन्ही राष्ट्रात आक्रमक धोरणाचा प्रारंभ झाला. जपानने मंचूरियावर हल्ला केला. इटलीने इथिओपियावर आक्रमण केले; तर जर्मनीने

उघडपणे व्हर्साय व लोकानी कराराचे उल्लंघन करून प्रादेशिक विस्तारास सुरूवात केली. त्याचे पर्यावरण दुसऱ्या महायुद्धात झाले.

## ४) राष्ट्रसंघाची दुर्बलता :-

पहिल्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संघर्ष सामोपचाराने सोडवून, कायम शांतता टिकविण्याच्या उद्देशाने राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली होती. परंतु अमेरिकेने सुरूवाती पासूनच राष्ट्रसंघाशी असहकाराची भूमिका स्विकारली होती. सोविएत रशियासारख्या विशाल राष्ट्राला आणि जर्मनीसारख्या पराभूत परंतु महत्वाकांक्षी राष्ट्राला राष्ट्रसंघाचे सदसत्व नाकारण्यांत आले होते; प्रमुख दोस्त राष्ट्रातील आपसातले मतभेद या सर्व कारणांमुळे राष्ट्रसंघाचे भवितव्य सुरूवातीपासूनच अंधारलेले होते. व्हर्सायचा अन्याय्य करार कायम टिकविण्यासाठी विजयी राष्ट्रांनी निर्माण केलेली ती एक सभा असल्याचा ग्रह अनेक राष्ट्रांचा त्यावेळी झाला होता.

इ.स. १९३० नंतर असंतुष्ट राष्ट्रांनी स्विकारलेल्या आक्रमक धोरणाला राष्ट्रसंघ पायबंद घालू शकला नाही. जपान, जर्मनी, इटली ही राष्ट्रे बेदरकारपणे राष्ट्रसंघाचे आदर्श तत्वे व उद्दिष्टे धाब्यावर बसवू लागली. एवढेच नाहीतर आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील राष्ट्रसंघाचा अधिकारही त्यांनी अमान्य केला. राष्ट्रसंघाच्या ध्येय धोरणांना बिनदिक्कतपणे त्यांनी हरताळ फासला. अशा परिस्थितीत शांतता टिकविण्यासाठी राष्ट्रसंघाला अपयश आले. राष्ट्रसंघाची दुर्बलता ही जागतिक शांततेला घातक ठरली.

## ५) नि:शस्त्रीकरण योजनेचे अपयश :-

व्हर्सायच्या करारानुसार जर्मनीच नि:शस्त्रीकरण करताना स्वत:ही शस्त्रकपात करण्याची कबुली विजयी दोस्त राष्ट्रांनी स्वेच्छेने दिली होती. एवढेच नाहीतर त्या संबंधातील योजना तयार करण्याची जबाबदारी राष्ट्रसंघावर सोपविण्यात आली होती. परंतु युरोपातील राष्ट्रांमध्ये परस्पर साशंकता अविश्वास व भिती यामुळे १९१९ नंतर नि:शस्त्रीकरणाच्या दृष्टीने करण्यात आलेले सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. युद्ध संपले तरीही सुरक्षिततेचा प्रश्न बहुतेक लहान मोठ्या युरोपियन राष्ट्रांना भेडसावित राहिल्याने त्यांची शस्त्र कपातीची तयारी नव्हती. १९२७ पर्यंत युरोपिय राष्ट्रांनी तसु भरही शस्त्रकपात केली नसल्याची स्पष्ट कबुली इंग्लंडच्या लॉईड जॉर्जने स्पष्टपणे दिली होती. १९३२ च्या पहिल्याच आंतरराष्ट्रीय शस्त्रकपात परिषदेचा बोजवारा उडाल्यानंतर जर्मनीचे पुर्नलष्करीकरण करण्याची सुरूवात हिटलरने केली. गमावलेल्या प्रदेशाची पुन:प्राप्ती अत्यावश्यक वाटणारा प्रादेशिक विस्तार, आर्थिक अडचणीचे निराकरण आणि राष्ट्रीय सन्मान या करीता युद्धाशिवाय मार्ग नाही. अशी हिटलर व त्याची मित्रराष्ट्रे इटली, जपान यांची खात्री झाली होती. त्यामुळे शस्त्रकपात तर दूरच उलट हिटलरच्या उदयानंतर सर्व राष्ट्रांच्या अंदाजपत्रकातील लष्कर खर्चाचा आकडा फुगू लागला. या शस्त्रास्त्र स्पर्धेचा शेवटी अपरिहार्य असा परिणाम म्हणजे दुसरे महायुद्ध होय.

## ६) हिटलर आणि मुसोलिनी यांचे आक्रमक धोरण :-

पहिल्या महायुद्धानंतर इटलीत मुसोलिनी आणि जर्मनीत हिटलरचा उदय झाला. या

दोघांनीही आक्रमक धोरण स्विकारून जर्मनीला दुसऱ्या महायुद्धाच्या खाईत लोटले. जर्मनीत व्हर्सायच्या तहामुळे दोस्त राष्ट्रांचा सूड घेतला पाहिजे, अशी भावना तर होतीच पण त्याशिवाय जर्मनीत सर्वत्र बेकारी, महागाई, वस्तूंची टंचाई इ. प्रश्न निर्माण झाले होते. हिटलरने या सर्व समस्या सोडविण्याचे, व्हर्सायचा तह फेटाळण्याचे व जर्मनीचे विशाल राज्य निर्माण करण्याचे स्वप्न जर्मन जनतेपुढे ठेवले होते. त्यामुळे जर्मनीत हिटलर लोकप्रिय झाला. १९३३ मध्ये हिटलर जर्मनीचा सर्वसत्ताधीश झाल्यानंतर त्याने आक्रमक धोरण स्विकारून जर्मनीचे साम्राज्य वाढविण्यास सुरूवात केली.

पॅरिस शांतता परिषदेने इटलीची निराशा झाली. इटली जेते राष्ट्र असूनही इटलीच्या पदरात फारसे काही पडले नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाली, अशी भावना इटालियन जनतेत निर्माण झाली. इटलीला न्याय मिळवून देण्याचे आश्वासन मुसोलिनीने दिले. त्यामुळे इटलित मुसोलिनीची हुकूमशाही प्रस्थापित झाली. इ.स. १९३६ मध्ये मुसोलिनीने ॲबिसिनीयावर हल्ला करून तो देश जिंकून घेतला. राष्ट्रसंघाने मुसोलिनीच्या धोरणाची निंदा केली तेव्हा त्याने राष्ट्रसंघातून इटलीचे सदस्यत्व काढून घेतले. त्यानंतर राष्ट्र संघाला अपमानित करण्यासाठी मुसोलिनीने इ.स. १९३९ मध्ये अल्बानिया जिंकून घेतला. मुसोलिनीच्या या धोरणामुळे युरोपातील बाकी देशांना भीती वाटू लागली.

हिटलरने तर पदोपदी राष्ट्रसंघाचा अपमान केला. व्हर्सायच्या तहाच्या अटी मोडून त्याने जर्मनीचे लष्करीकरण केले. राष्ट्रसंघाने हिटलरची जेव्हा निर्भत्सना केली तेव्हा जर्मनीने राष्ट्रसंघाचे सदस्यत्व सोडून दिले. इ.स. १९३६ मध्ये ऱ्हाईन लॅडवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. जपानशी मैत्रीचा करार केला. १९३७ मध्ये इटली येऊन मिळाल्यामुळे रोम-बर्लिन-टोकिओ अक्ष तयार झाला. याच वर्षी हिटलरने स्पेनच्या गृह युद्धात हस्तक्षेप करून तेथे फॅसिस्ट राजवट सुरू केली. १९३८ मध्ये ऑस्ट्रिया आणि १९३९ मध्ये झेकोस्लोव्हाकिया हे दोन देश गिळंकृत केले.

अशा रितीने हिटलर आणि मुसोलिनी यांनी आक्रमक धोरण स्विकारून आपल्या देशांचा विस्तार केला जपाननेही साम्राज्यवादी धोरण अनुसरले. जपानने चीनच्या ताब्यातील मांचुरियावर हल्ला केला. राष्ट्रसंघाने जपानला आपले सैन्य मागे घेण्याचा जेव्हा आदेश दिला तेव्हा जपान राष्ट्र संघातून बाहेर पडला.

जर्मनी, इटली आणि जपान यांच्या आक्रमक धोरणामुळे दुसरे महायुद्ध उद्‌भवले.

### ७. ग्रेट ब्रिटन व फ्रान्स यांचे अनुनयाचे धोरण :-

दुसऱ्या महायुद्धाचे महत्त्वाचे कारण म्हणजे इंग्लंड व फ्रान्स या राष्ट्रामधील मतभेद हे होय. पहिल्या महायुद्धानुतर केवळ चारच वर्षात या दोन्ही राष्ट्रात जर्मनीचे भवितव्य, नुकसान भरपाई, सामुहिक सुरक्षितता नि:शस्त्रीकरण अशा अनेक मुद्द्यांवरून मतभेद निर्माण झाले होते. जर्मनीच्या भीतीने पछाडलेल्या फ्रान्सपुढे आर्थिक, राजकीय व लष्करीदृष्ट्या जर्मनीला पंगू बनविणे व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात फ्रान्सचे अग्रगण्य स्थान पुन्हा प्रस्थापित करणे, हे प्रमुख ध्येय होते, तर युरोप खंडात शक्ती संतुलन राखण्याच्या इंग्लंडच्या नीतीमुळे प्रमुख राष्ट्र म्हणून जर्मनीचे स्थान नष्ट व्हावे हे इंग्लंडला मान्य नव्हते. शिवाय साम्यवादाचा लोंढा

थोपवून धरण्यासाठी जर्मनीच्या सामर्थ्याचा उपयोग करून घेणे इंग्लंडला आवश्यक वाटत होते. इंग्लंड व फ्रान्स मधील या मतभेदाचा जर्मनीने आपल्या पुनरूत्थानासाठी उपयोग करून घेतला.

हिटलरच्या उदयानंतर जागतिक युद्धाची धास्ती व हिटलरची वक्र दृष्टी प्रथम सोव्हिएत रशियाकडे वळून परस्पर साम्यवादाचे निर्मूलन होईल अशी आशा इंग्लंडला वाटत असल्यामुळे हिटलरने व्हर्साय व लोकोंनो कराराची कलमे धुडकावली असता इंग्लंड मात्र स्वस्थ राहिले. शेजारची छोटी व दुबळी राष्ट्रे हिटलर घशाखाली घालीत असता ब्रिटनने जर्मनीप्रती अनुनयाची निती स्विकारली, ती पुढे अत्यंत घातक ठरली. यावरून इंग्लंड व फ्रान्स यांच्या मनोदौर्बल्याची व त्या राष्ट्रांना युद्धाबद्दल वाटणाऱ्या धाकाची () पटून हिटलरने बेदरकारपणे आक्रमक धोरण स्विकारले त्याची परिणिती शेवटी दुसऱ्या महायुद्धात आली.

## ८) तात्कालिक कारण :-

१ सप्टेबर १९३९ रोजी हिटलरने कोणतीही सूचना न देता व युद्ध घोषित न करता जर्मन फौजा पोलंडमध्ये घुसवल्या. तोफखाना, रणगाडा, विमानदल, प्रचंड पायदळ व दारूगोळा यांच्या सहाय्याने जर्मनीने फक्त २० दिवसांत पोलंड जिंकले. पोलंडवरचे आक्रमण हे ब्रिटन-फ्रान्सला सहन होणे शक्य नव्हते. कारण पोलंड हे राष्ट्र इंग्लंड-फ्रान्सचे मित्रराष्ट्र होते. इंग्लंडने हिटलरला सैन्य मागे घेण्यास सांगितले. परंतु त्याने त्याकडे दुर्लक्ष केले. तेव्हा ३ सप्टेंबर १९३९ रोजी इंग्लंडने जर्मनी विरूद्ध युद्ध पुकारले. त्यानंतर फ्रान्सही इंग्लंड-पोलंडच्या बाजूने युद्धात सहभागी झाला. अशा प्रकारे दुसऱ्या जागतिक महायुद्धाला सुरूवात झाली.

## दुसऱ्या महायुद्धाचे स्वरूप :-

दुसऱ्या महायुद्धाची सुरूवात इ.स. १९३९ च्या सप्टेंबर मध्ये पोलंडवर हल्ला करून झाली. पोलंडचा पाडाव होऊन पोलंडची राजधानी वॉर्सा १५ दिवसांतच जर्मनीच्या ताब्यात आली. याच वेळी रशियाने देखील पोलंडवर हल्ला केला आणि रशिया व जर्मनी या दोन आक्रमक राष्ट्रांनी पोलंडचा प्रदेश वाटून घेतला. यानंतर हिटलरने नॉर्वेचा प्रदेश काबीज केला. कारण या ठिकाणच्या लोखंडाच्या खाणी युद्धसामुग्रीसाठी आवश्यक होत्या. यानंतर हिटलरने डेन्मार्क, हॉलंड, बेल्जियम हे देश काबीज केले. नंतर विद्युत वेगाने फ्रान्सवर हल्ला केला. यावेळी बेल्जियम आणि इंग्लंड यांचे संयुक्त सैन्य उकर्क बंदरातून परतले. जर्मन सैन्याने ५ जूनला फ्रान्समध्ये प्रवेश केला व तीन आठवड्याच्या आतच फ्रान्सने शरणागती पत्करली. याचवेळी इटलीने जर्मनीच्या बाजूने युद्धांत प्रवेश केला.

आता पर्यंत इंग्लंड शांत होते. परंतु हिटलरने बेल्जियम जिंकून घेतल्यामुळे बेल्जियमच्या रक्षणार्थ इंग्लंडने जर्मनीशी युद्ध पुकारले. फ्रान्सचा पराभव झालेला असल्यामुळे फ्रान्सचा अर्धा भाग जर्मनीला मिळाला. दुसऱ्या महायुद्धातील प्रमुख घटना होती. फ्रेंच विजयानंतर हिटलरने आपले लक्ष इंग्लंडकडे वळविले. ऑगस्ट १९४० पासून हिटलरने ब्रिटनवर हवाई हल्ले सुरू केले, जर्मन पाणबुड्यांनी ब्रिटिश जहाजे रसातळाला पोहोचविण्याचा सपाटा लावला. हिटलरने आपले प्रचंड विमानदल इंग्लंडवर हल्ला करण्यासाठी उपयोगात आणले. परंतु इंग्लंडच्या नाविक दलाने मोठ्या शौर्याने व धैर्याने संकटाला तोंड दिले.

इंग्लंड जर्मनीबरोबर युद्ध करण्यात गुंतलेले आहे हे पाहून मुसोलिनीने उत्तर आफ्रिकेवर आक्रमण केले व तिथल्या ब्रिटनच्या वसाहती जिंकण्याचा प्रयत्न केला. सुएझ कालवा व इजिप्त ताब्यात घेणे हा मुसोलिनीचा उद्देश होता. परंतु दोस्त राष्ट्रांचा सेनापती वेव्हेल याने इटालियन सैन्याला पिटाळून लावले. हिटलर इटलीच्या मदतीला धावला. हिटलरने इजिप्तसह पश्चिम आशियातील सिरीया, इराक व इराण जिंकण्याची व्यापक योजना अमलात आणली परंतु त्याला या मोहिमेत फारसे यश मिळाले नाही.

जर्मनीने ग्रीस हा देश जिंकला याच वेळी जर्मनी, जपान, इटली यांचा एकमेकांना लष्करी सहाय्य करण्याचा मित्रत्वाचा करार झाला. जपान-अमेरिकेच्या वैमनस्याने महायुद्धाला भयंकर वळण लागले. १९४१ पर्यंत अमेरिका युद्धापासून अलिप्त होती. परंतु मनात दुख धरून बसलेल्या जपानने ७.१२.१९४१ रोजी अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर प्राणघातक हल्ला केला. या घटनेमुळे अमेरिका खडबडून जागी झाली व तिने दोस्त राष्ट्रांच्या बाजूने युद्धात प्रवेश केला. त्यामुळे दोस्त राष्ट्रांची पारडे जड झाले. परंतु जर्मनी-इटलीची बाजू मात्र जपानच्या आक्रमणामुळे भक्कम झाली. जपानने शांघाय, हाँगकाँग, मलाया, सिंगापूर, जावा, सुमात्रा, बाली, बोर्निओ, न्यूगिनी, फिलिपाईन्स व ब्रह्मदेश जिंकून घेतले आणि तो ब्रिटिश हिंदुस्थानच्या उंबरठ्यावर येऊन पोहचला. जपानची महायुद्धातील घोडदौड अलौकिक व अभूतपूर्व होती.

जर्मनी व जपानच्या विजयामुळे सर्वच साम्यवादी व दोस्त राष्ट्रे चिंतित झाली. तसे पाहता रशिया सर्वच युरोपिय राष्ट्रांचा शत्रू होता. परंतु जपान-जर्मन विजयाने रशिया अस्वस्थ झाला व तो दोस्त राष्ट्राकडे झुकू लागला. त्यामुळे हिटलरने रशियावर आक्रमण केले आणि युक्रेन, मॉक्सो, लेनिनग्रॉड, स्टॅलिन ग्रॉडवर प्रभुत्व निर्माण केले. परंतु हिमवर्षाव व रशियाचा धाडसी प्रतिकारामुळे जर्मनीची पिछेहाट झाली. या घटनेमुळे आणि पर्ल हार्बरच्या हल्ल्यामुळे इंग्लंड, फ्रान्स, अमेरिका व रशिया या दोस्त राष्ट्रांची फळी मजबूत झाली. सततच्या युद्ध मोहिमा व विजयामुळेह्नह्न शत्रुराष्ट्रांचे सैन्य थकले त्यांची दमछाक चालू होती. अशा परिस्थितीत दोस्तांच्या नव्या दमाच्या फौजांनी जर्मनी, इटली व जपानवर हल्ले केले. युद्धाच्या निर्णायक पर्वाला प्रारंभ झाला. ४९४२-४४ पर्यंत दोस्तांच्या फौजांनी इटली-जर्मनीचा अनेक आघाड्यांवर पराभव केला. मे १९४५ मध्ये यांनी शरणागती पत्करली. पराक्रमी जपान मात्र निकराची झुंज देत राहिला. सहा व नऊ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी शहरांवर अणुबॉम्बचे हल्ले करून जपानची राख रांगोळी केली. शेवटी जपानच्या शरणागतीने दुसऱ्या महायुद्धाचा शेवट झाला.

## दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम :-

दुसरे जागतिक महायुद्ध १ सप्टेंबर १९३९ ला सुरू झाले व १४ ऑगस्ट १९४५ रोजी संपले. या युद्धात जर्मनी, इटली, जपान या देशांचा पराभव झाला. तर इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका हे देश विजयी झाले. २ मे १९४५ ला हिटलरने आत्महत्या केली तर ७ मे रोजी जर्मनीने शरणागती पत्करली. ६ ऑगस्ट रोजी जपानच्या हिरोशिमा व ९ ऑगस्ट रोजी नागासाकी या शहरांवर अमेरिकेने अणुबॉम्ब हल्ले केले. या नंतर जपानने युद्धातून माघार घेतली आणि सतत सहा वर्ष सुरू असलेले हे महायुद्ध संपुष्टात आले.

दुसरे महायुद्ध अनेक दृष्टीने उल्लेखनीय ठरले. ह्या संघर्षाुळे जगाला पुन्हा एकदा धडा मिळाला, जगाला संहाराची पुरेपूर कल्पना आली. विल्सनच्या शांततेची महती सर्वांना पटली. त्यामुळे आजतागायत तिसरे महायुद्ध झाले नाही. नवीन राजनीती, तत्वज्ञान, संकल्पना व संस्कृती महायुद्धानंतर जन्माला आले. या जागतिक महायुद्धाचे एकूण जगावर, मानव जातीवर पुढील प्रमाणे परिणाम घडून आले.

## १) जीवित व वित्तहानी :-

दुसऱ्या जागतिक महायुद्धाच्या ६ वर्षाच्या कालखंडात प्रचंड प्रमाणात जिवीत हानी झाली. अमाप संपत्तीचा चुराडा झाला. युद्धातील हानीचा निश्चित अंदाज आजपर्यंत आलेला नाही. कारण युद्धात असंख्य देश सामील झाले होते. युद्ध मैदानावर १ कोटी लोक मृत्यू पावले तर बॉम्बफेक व कैद्यांच्या छावणीत २ कोटी २० लक्ष मृत्यू पावले. त्याशिवाय अपंगांची संख्याही प्रचंड होती. शंभर लक्ष कोटींचा चुराडा युद्धामुळे झाला. एकट्या इंग्लंडचीच दोन हजार कोटी संपत्ती नष्ट झाली. रशियाला पंचवीस टक्के राष्ट्रीय संपत्ती गमवावी लागली. बॉम्ब हल्ले व रणक्षेत्रामुळे अनेक प्रदेश गावे शहरे उजाड झाली. दुसऱ्या जागतिक महायुद्धाचा लष्करी खर्च १,११७ अब्ज डॉलर्स एवढा होता. सतत ६ वर्षे युद्ध चालल्याने युरोपातील युद्धात गुंतलेल्या बहुतांश राष्ट्रांची उत्पादन केंद्रे कारखाने, दळणवळणाचे मार्ग नष्ट झाले. युद्धामुळे सर्व राष्ट्रांची अर्थव्यवस्था ठासळली व लाखोंचे संसार उद्ध्वस्त झाले.

## २) हुकूमशाहीचा अस्त :-

जर्मनी, जपान व इटली या देशात निर्माण झालेल्या साम्राज्यवादी, हुकूमशाही वृत्तीच्या महत्वाकांक्षी राज्यकर्त्यांमुळे जगाला दुसऱ्या जागतिक महायुद्धास तोंड द्यावे लागले. परंतु हिटलर, मुसोलिनी आणि जनरल रोजो यांच्या असुरी सभांचा या युद्धात पराभव झाला. त्यांचे फॅसिस्ट नाझी तत्त्वज्ञान व व्यवस्था नेस्तनाबूत झाली. अर्थात त्यासाठी जगाला जबर किंमत मोजावी लागली. युद्धात हुकूमशाही राष्ट्रांचा पराभव झाला तरीही दोस्त राष्ट्रांपेक्षा त्यांचे सामर्थ्य श्रेष्ठ असल्याचे प्रत्यंतर आले. कारण जर्मनीला पराभूत करण्यासाठी इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका या महा सत्तांना आपली संपूर्ण शक्ती पणास लावावी लागली. जपान तर शेवटपर्यंत आटोक्यात न आल्याने त्यासाठी संहारक अणुशक्तीचा वापर करावा लागला. जगाने हुकूमशाही व लष्करवादी सभेचे दोष महायुद्धामुळे अनुभवले. परिणामी दुसऱ्या महायुद्धानंतर संपूर्ण जगातच हुकूमशाही व लष्करवादी विचारांची पिछेहाट झाली.

## ३) युरोपियन साम्राज्यवादाची पिछेहाट :-

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपियन साम्राज्यवादाचा ऱ्हास झाला. इंग्लंड, फ्रान्स, हॉलंड, स्पेन, जर्मनी व इटलीची साम्राज्ये नष्ट झाली. जपानचे आग्नेय-पूर्व आशियातील साम्राज्य लयास गेले. ज्या राष्ट्रांचा युद्धात पराभव झाला होता. त्यांची साम्राज्ये आपोआप नष्ट झाली. विजयी राष्ट्रांच्या साम्राज्य वादाचीही पडझड सुरू झाली. कारण त्यांच्या ताब्यात असलेल्या वसाहतीत स्वातंत्र्य आंदोलने सुरू झाली. साम्राज्यवाद व वसाहतवाद संपल्याची सूचनाच दुसऱ्या महायुद्धाने दिली. अमेरिकेने वसाहतींना स्वातंत्र्य द्यावे असे आग्रही मत

मांडले. रशियानेही साम्यवादाच्या प्रसाराला पाठिंबा मिळविण्यासाठी आशिया व आफ्रिका खंडातील स्वातंत्र्य चळवळीला पाठिंबा दिला.

## ४) वसाहतींना स्वातंत्र्य :-

महायुद्धामुळे साम्राज्यवादाला जबरदस्त हादरे बसले. युरोपियन साम्राज्यवादी राष्ट्रांची साम्राज्ये लयास गेली. युद्धामुळे पराभूत व विजयी राष्ट्रांची दमछाक झालेली होती. आपापल्या साम्राज्यावर पकड ठेवण्याचे त्राण त्यांच्यात उरले नाही. युद्ध काळात आपले साम्राज्यकर्ते अडचणीत आहेत ही संधी साधून त्याला देशातल्या राष्ट्रवाद्यांनी आपले मुक्ती लढे जोमाने सुरू केले. परिणामी साम्राज्यवादी राष्ट्रांना स्वातंत्र्य देणे भाग पडले.

ब्रिटिशांनी भारत, ब्रह्मदेश, सिलोन, मलेशिया या देशांना फ्रान्सने इंडोचायनाला अमेरिकेने, फिलीपाईन्स व हॉलंडने इंडोनेशियाला स्वातंत्र्य दिले. आफ्रिका खंडातील इजिप्त, सुदान, घाणा, केनिया, नायजेरिया, कांगे, मोरोक्को, ट्युनिशिया वगैरे देश १९६० पर्यंत स्वतंत्र झाले. जागतिक लोकमतही वसाहतवादाविरुद्ध गेले होते. परिणामी स्वातंत्र्य चळवळी प्रखर बनल्या. युरोपियन साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या वसाहतींना स्वातंत्र्य देण्याशिवाय पर्याय उरला नाही.

## ५) नीतीमूल्यांचा ऱ्हास :-

पहिला महायुद्धाप्रमाणेच दुसऱ्या महायुद्धामुळे एकूण मानवी जीवनाचे फार मोठे नैतिक अध:पतन झाले. संपूर्ण समाज दु:ख, दारिद्र्य, उपासमार, रोगराई, निराशा, चिंता, भय व गुन्हेगारीच्या गर्तेत सापडला. मानवी जीवन असह्य झाले. कापड, औषधे, रॉकेल, कोळसा, अन्नधान्य इत्यादींची प्रचंड टंचाई निर्माण झाली. जगातील सर्वच देशांनी लष्करातून मोठ्या प्रमाणावर सैनिक निवृत्त केले. त्यामुळे बेकारीची समस्या निर्माण झाली. जुनी नैतिकमुल्ये नष्ट होवून अंधकारमय भविष्यकाळ त्याच्या समोर उभा राहिला वैज्ञानिक उन्नती, भौतिक प्रगती व आर्थिक समृद्धी मानवी समाजाला शापवत आहे व ही प्रगती आत्मघातकी आहे. हा त्यांचा समज पक्का झाला. परिणामी स्वातंत्र्य, समता, लोकशाही, स्वातंत्र, सार्वभौमत्व, सहकार्य, ऐक्य, नितीमत्ता, धर्मच सांस्कृतिक मूल्यांवरील मानव जातीचा विश्वास ढासळू लागला. समाज भ्रष्टाचार व गुन्हेगारीकडे वळू लागला आणि मानवी जीवनाच्या अध:पतनाला सुरूवात झाली.

## ६) आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना :-

League of Nations अमेरिकेचा अध्यक्ष वुड्रो विल्सनच्या आग्रही भूमिकेमुळे पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाची स्थापना झाली होती. परंतु तिच्यातील दोषामुळे महायुद्धाचा पुन्हा भडका उडाला. त्यामुळे राष्ट्रसंघाचे अपयश सिद्ध झाले. जगाला पुन्हा युद्धास सामोरे जाऊ लागू नये. जागतिक शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून जगातील प्रमुख राष्ट्रांनी पुढाकार घेऊन १९४५ मध्ये आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना केली. दोन युद्धांच्या भीषण संहारामुळे संपूर्ण जगालाच शांतता व सहकार्याची महती पटलेली होती. अमेरिका-रशिया सारख्या परस्पर विरोधी महासत्ता यूनोच्या बंधनाने एकत्र आल्या. त्यामुळे जागतिक शांततेची

जगाला खात्री वाटू लागली. ही संघटना, राष्ट्रसंघाच्या तुलनेत बऱ्याच अंशी निर्दोष व कार्यक्षम आहे आणि तिला जागतिक शांतता टिकविण्यास फार मोठे यश आले आहे.

### ७) साम्यवादी रशियाचा उदय :-

पहिल्या महायुद्धाच्या काळातच रशियात बोल्शेव्हिक क्रांती झाली आणि सामर्थ्यशाली रशियाचा उदय झाला. महायुद्धानंतरची जागतिक स्थिती साम्यवादी क्रांतीला पोषक ठरली. युरोपसह जगातल्या अनेक देशात दुःख, दारिद्र्य, उपासमार, महागाई व अस्थिरतेचे थैमान चालू होते. अशा स्थितीत त्या त्या देशात समाजवादी व साम्यवादी संघटना बळकट झाल्या. रशियाने या संधीचा फायदा घेवून तेथील साम्यवादी क्रांत्यांना साध्य केले. पोलंड, बल्गेरिया, पूर्व जर्मनी, झेकोस्लोव्हाकीय, ऑस्ट्रिया, ग्रीस, कोरिया व व्हिएतनाम हे देश साम्यवादी रशियाच्या छत्राखाली आले आणि रशियाला जागतिक महासत्ता म्हणून प्रतिष्ठा लाभली.

### ८) भांडवलशाही अमेरिकेचा प्रभाव :-

विसाव्या शतकाच्या आरंभीच सामर्थ्यशाली अमेरिकेचा उदय झाला. दोन्ही महायुद्धातील सहभाग व दोस्तांच्या विजयामुळे अमेरिकेचे महत्त्व वाढले. तसेच अमेरिकेचे आर्थिक, लष्कर व वैज्ञानिक सामर्थ्य सातत्याने वाढत गेले. महायुद्धानंतर दोस्तांची शक्ती व प्रभाव नष्ट झाला. त्यामुळे लोकशाही व भांडवलशाही राष्ट्रांचे नेतृत्त्व अमेरिकेकडे आले. दुसरे महायुद्ध अमेरिकेच्या भूमीवर लढले गेले नव्हते. त्यामुळे त्याची प्रत्यक्ष झळ अमेरिकेला बसली नव्हती. दुसरे महायुद्ध अमेरिकेला वरदानच ठरले. अमेरिकेचा व्यापार वाढला. उद्योगधंद्यांना तेजी प्राप्त झाली. महायुद्ध काळात दोस्त राष्ट्रांनी व इतर राष्ट्रांनी युद्धसाहित्य, अन्नधान्य, इतर वस्तू इत्यादींची आयात अमेरिकेतून केल्याने संपूर्ण जगातून पैसा अमेरिकेत आला. त्यामुळे अमेरिका हे राष्ट्र एक श्रीमंत राष्ट्र म्हणून पुढे आले. युरोपची आर्थिक पुर्नरचना करण्याचा कार्यक्रम अमेरिकेने हाती घेतला, मागासलेल्या, दरिद्री व विकसनशील राष्ट्रांना प्रचंड अर्थसाह्य करून आपला प्रभाव वाढविला. त्यामुळे जागतिक राजकारणावर अमेरिकेची पकड बसली.

### ९) शीतयुद्ध :-

हा महायुद्धाचा गंभीर परिणाम होता. साम्यवादी रशिया व भांडवलशाही अमेरिका ही दोन भिन्न विचार प्रणालीची राष्ट्रे असल्याने त्यांच्यात दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक वर्चस्वासाठी संघर्ष सुरू झाला. लोकशाही-भांडवलशाही राष्ट्रांचे नेतृत्व अमेरिका करू लागली. तर साम्यवादी/समाजवादी राष्ट्रांचे नेतृत्व रशिया करू लागला. पूर्व युरोपातील १०-११ देशांचा समाजवादी तत्वप्रणालीचा एक गटच निर्माण झाला व त्या गटाचे नेतृत्व रशिया करू लागला. त्यामुळे लोकशाही-भांडवलशाही अमेरिका विरूद्ध साम्यवादी रशिया असा संघर्ष सुरू झाला. हे दोन्ही देश महत्त्वाकांक्षी होते. त्यांना जगात आपला प्रभाव निर्माण करावयाचा होता. म्हणून रशिया व अमेरिका यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले. पश्चिम युरोपातील देशांच्या अर्थव्यवस्था सावरण्यासाठी अमेरिकेने मार्शल योजना आखली. मदत व कर्जाच्या रूपाने १९०० कोटी डॉलर्सची मदत त्या देशांना केली. एवढंच नाहीतर

आंतरराष्ट्रीय राजकारणात आपला गट मजबूत करण्यासाठी NaTO-SEATO, SENTO या सारख्या संघटना स्थापन केल्या. प्रत्युत्तर म्हणून रशियानेही वॉर्सा करार केला. हे देश स्वत: समोरासमोर संघर्ष करीत नव्हते. परंतु जगात संघर्ष करणाऱ्या राष्ट्रांना साध्य करून त्याला देशावर आपला प्रभाव निर्माण करण्याचा उपद्व्याप करीत होते. ह्या अप्रत्यक्ष संघर्षालाच अमेरिकन इतिहासकार वाल्टर लिप्पमनने "Cold war' 'शीतयुद्ध' असे नाव दिले आहे. हे शीतयुद्ध १९९१ पर्यंत म्हणजे रशियाच्या विघटनापर्यंत सुरू होते. यानंतर अमेरिकेला जागतिक राजकारणात स्पर्धकच राहिला नाही.

## १०. अलिप्ततावादी गटांचा प्रभाव :-

पहिल्या महायुद्धानंतर आशिया खंडात लोकजागृती सुरू झाली. त्यांना आपल्या हक्कांची जाणीव झाली. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक देश स्वतंत्र झाले. पंडित नेहरुंनी १९५१ मध्ये बांडुग परिषद भरवून (इंडोनेशिया) अलिप्ततावादी चळवळीचे सुतोवाच केले. मध्य-पूर्वेतील अरब राष्ट्रात तेल साठे सापडल्याने या राष्ट्रांचे महत्त्व वाढले. आशिया खंडातील अनेक राष्ट्रे एकत्र आली. रशिया-अमेरिका त्यांना आपल्या गोटात ओढण्याचा प्रयत्न करीत असतानाच त्यांच्या स्पर्धेत उतरणे धोक्याचे आहे. हा विवेक बाळगून आशिया खंडातल्या देशांनी अलिप्ततावादी राष्ट्रांचा स्वतंत्र गट निर्माण केला.

एकंदरीत दुसरे महायुद्ध हे सर्वंकष युद्ध होते. या युद्धात जगातील ५७ राष्ट्रे सक्रियपणे गुंतलेली होती. या महायुद्धात ज्या राष्ट्रांनी प्रत्यक्षपणे भाग घेतला. ती विजयी अथवा पराभूत राष्ट्रे युद्धापूर्वी संपन्न राष्ट्रे होती. त्या सर्वच राष्ट्रांचे प्रचंड नुकसान झाले. सर्वात जास्त नुकसान रशियाचे झाले होते. ७० लक्ष रशियन लोक युद्धात मृत्यूमुखी पडले. १२,८०० कोटीची मालमत्ता नष्ट झाली. ८ लक्ष चौरस मैलाचा प्रदेश हिटलरच्या बॉम्बहल्ल्यामुळे उद्ध्वस्त झाला. २ कोटी, ५० हजार नागरिक बेघर झाले, रेल्वेमार्ग, शेती, कारखाने यांचे ही मोठे नुकसान झाले. परतंत्र राष्ट्रात राष्ट्रवादी लढे सुरू होवून आशिया-आफ्रिका खंडातील राष्ट्रे स्वतंत्र झाली. जागतिक शांतता व सहकार्याची निकड निर्माण होवून संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. जागतिक शांततेसाठी अण्वस्त्रांची निर्मिती व स्पर्धेवर नियंत्रण ठेवण्याचे काम ही संघटना करीत आहे.

## ५.२.२ राष्ट्रवादी चळवळी आणि वसाहतवादाचे विघटन :-

## आशिया, आफ्रिका खंडातील राष्ट्रवादी चळवळी :-

विसाव्या शतकापर्यंत आशिया आणि आफ्रिका खंडातील बहुतेक देश युरोपिय साम्राज्यवादाला बळी पडले. भारत, चीन, ब्रम्हदेश, इंडोनेशिया, कंबोडिया, व्हिएतनाम, फिलीपाईन्स, इजिप्त, तुर्कस्तान, अरबस्तान आणि जवळ जवळ सर्व आफ्रिका खंडावर परकीयांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. युरोपियन राष्ट्रांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे पारतंत्र्यातील वसाहतींना राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक गुलामगिरी भोगावी लागली. राष्ट्र व समाजाला अधोगती प्राप्त होऊन कमालीचे दारिद्र्य भोगावे लागले. परतंत्र देशातील समाज असहाय्य, निराशाग्रस्त व अस्तित्वशून्य बनला. परंतु अठराव्या शतकापासून साम्राज्यवादी राष्ट्रांच्या विरुद्ध वसाहतीमधल्या जनतेने देश मुक्तीचे लढे उभारले आणि

आशिया व आफ्रिका खंडात राष्ट्रवादाचा विस्तार झाला. साम्राज्यवादी राष्ट्रांनी स्वत:च्या फायद्यासाठी जरी पाश्चात्त्य सुधारणा, पाश्चात्त्य शिक्षण, प्रशासन निर्माण केले असले तरी त्याचा फायदा वसाहती मधील जनतेला झाला. पाश्चात्त्य शिक्षणामुळे तरुण, नव सुशिक्षितांचा वर्ग निर्माण झाला. त्यामुळे समाज प्रबोधन होऊन अन्यायाविरूद्ध प्रतिकार करण्याचे सामर्थ्य निर्माण झाले. निरनिराळ्या राष्ट्रवादी संघटना स्थापन होवून, स्वातंत्र्य आंदोलने सुरू झाली आणि त्या त्या देशांना स्वातंत्र्य मिळाले.

## १. पाश्चिमात्य साम्राज्यवादाचे परिणाम :-

युरोपातील साम्राज्यवादी राष्ट्रांच्या साम्राज्यवादी धोरणामुळे आशियायी देशांवर परकियांचे प्रभूत्व निर्माण झाले. हा प्रभुत्ववाद राजकीय क्षेत्रापुरताच मर्यादित राहिला नाही. कारण विदेशी सत्तांनी आपला धर्म, शिक्षण, विचारसरणी व संस्कृतीचा ही पगडा वसाहतीवर निर्माण केला आणि वसाहतींची संपूर्ण अर्थव्यवस्था आपल्या हाती घेतली. परकीय सत्तांनी सुरूवातीला व्यापार व धर्मप्रसाराच्या माध्यमातून आपले आर्थिक हितसंबंध वाढविले आणि ख्रिश्चनधर्म प्रसाराला सुरूवात केली. वसाहती मधील व्यापार, उद्योग, शेती, खाणी, शहरे, बाजारपेठ या सर्वांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. परतंत्र देशांची संपूर्ण अर्थव्यवस्था व्यापून टाकली. आर्थिक शोषणामुळे वसाहती दरिद्री बनल्या.

साम्राज्यवाद्यांनी आपल्या वसाहतीत स्थानिक धर्म नष्ट करून सक्तीने ख्रिश्चन धर्माचा प्रसार सुरू केला. त्यामुळे वसाहतीत आर्थिक व धार्मिक असंतोष निर्माण झाला. अर्थव्यवस्था ताब्यात घेतल्यानंतर परकियांनी राजकीय प्रभुत्व प्रस्थापित केले. स्थानिक राज्यकर्त्यांत भांडणे लावून, विश्वासघात करून, भेद नितीचा उपयोग करून व युद्ध करून पाश्चात्यांनी एकएक सत्ता  नेस्तनाबूत केल्या. चीन व भारतात निरनिराळी कारणे देऊन उदा. राज्य खालसा, तैनाती फौज, दत्तक वारस नामंजूर, अफूची युद्धे, मुक्तद्वार निती अशा नवनवीन कल्पनांच्या माध्यमातून त्यांनी राज्यविस्तार केला. आशिया-आफ्रिका खंडातील समान असंस्कृत, अडाणी, मागासलेला, सनातनी व अप्रगत असल्याने त्यांच्या उन्नतीसाठी सर्वश्रेष्ठ युरोपियन संस्कृती व मानवतावादी ख्रिश्चन धर्माच्या प्रसाराची अत्यंत गरज आहे. अशी त्यांची धारणा असल्याने धर्म, संस्कृती व विस्ताराचा सपाटा त्यांनी लावला. त्यासाठी त्यांनी बळाचा वापर केला. त्यामुळे समाज असहाय्य झाला. दु:खी, निराश बनला व राष्ट्राला राजकीय पारतंत्र्य सहन करावे लागले. हे सर्व दुष्परिणाम परकीयांच्या साम्राज्यवादामुळेच घडून आले. हा अन्याय अनेक वर्षे त्यांनी सहन केला. सहनशीलतेच्या मर्यादा संपुष्टात आल्यानंतर मात्र परतंत्र राष्ट्रात स्वातंत्र आंदोलने सुरू झाली.

## २. आर्थिक विपन्नावस्था :-

युरोपियन साम्राज्यवादाचे बळी ठरलेल्या देशांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण झाले. त्यामुळे त्यांना आर्थिक विपन्नावस्था प्राप्त झाली. पाश्चात्यांच्या राजकीय गुलामगिरीपेक्षा ह्या आर्थिक पारतंत्र्याचा अत्यंत वाईट परिणाम वसाहतींवर झालेला होता. राज्यविस्ताराबरोबरच वसाहतींचे आर्थिक शोषण करणे. हाच साम्राज्यवाद्यांचा प्रधान हेतु होता. विविध मार्गाने त्यांनी आपल्या वसाहतींचे आर्थिक शोषण केले. या आर्थिक शोषणाचे प्रमुख कारण

युरोपातील औद्योगिक क्रांती हे होते. कारखान्यातील यंत्राची चाके फिरत ठेवण्यासाठी त्यांना कच्चा माल व पक्क्या मालाच्या विक्रीसाठी बाजारपेठांची नितांत आवश्यकता निर्माण झाली व या गरजांच्या पुर्ततेसाठी ते आशियायी आणि आफ्रिका खंडातील राष्ट्रांकडे वळाले. या मार्गांनी त्यांनी वसाहतींची प्रचंड लूट केली. आशिया खंडातील सुपीक जमीन आफ्रिका खंडातील नैसर्गिक संपत्ती यांचा त्यांनी पुरेपूर फायदा उठविला. भारतातून चहा, कॉफी, अफू, कापूस व रबर ह्या वस्तूंची निर्यात मोठ्या प्रमाणावर चालू होती. ब्रह्मदेशातून तांदूळ व लाकडाचा व्यापार मोठ्या प्रमाणावर चालत असे. तर व्हिएतनाम, थायलंड, कंबोडियातून मोठ्या प्रमाणावर तांदळाची निर्यात होत असे. भारत व इंडोनेशिया मसाल्याच्या पदार्थांसाठी प्रसिद्ध होते. पाश्चात्यांचा या देशांशी मसाल्याचा व्यापार प्रचंड प्रमाणात चालू होता.

आशिया-आफ्रिका खंडातील सोन्या-चांदीच्या खाणीमुळे तर युरोपियन राष्ट्रात जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. लोखंड, कोळसा, लोकर, कथिल, टीन, लाकूड व कातडीचा निर्यात व्यापार अनेक वसाहतीतून चालू होता. वसाहतींमधील हा सर्व कच्चा माल स्वस्त दराने घेवून कारखान्यात तयार झालेला पक्का माल पाश्चात्य राष्ट्रे आपल्या वसाहतींना विकू लागली. या कच्च्या-पक्क्या मालाच्या आयात-निर्यात व्यापारामधून त्यांनी वसाहतींची प्रचंड लूट केली. आपल्या देशातील व्यापार उद्योगाची भरभराट करण्याच्या हव्यासापोटी पाश्चात्यांनी वसाहतीमधल्या शेती, व्यापार व कुटीरोद्योगाचा विध्वंस केला. वसाहतीतील प्रचंड उत्पादन देणाऱ्या शेतीचे मळे मालक युरोपियन होते व राबणारे निर्धन, शेतकरी, भूदास व शेतमजूर वसाहतीतील प्रजाजन होते. विविध प्रकारच्या महसुल वसुलाच्या योजना व शेती विषयक कायदे करून त्यांनी वसाहतीमधील शेतकरी व जमीनदारांचे शोषण केले.

साम्राज्यवाद्यांच्या या आर्थिक धोरणाचे गंभीर परिणाम वसाहतींना भोगावे लागले. वसाहतीमधील ग्रामीण उद्योगधंदे नष्ट झाले. शेती व शेतकऱ्यांची दुर्दशा झाली. लक्षावधी शेतकरी-कामगार वर्गावर बेकारीची पाळी आली.

पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या वसाहतीमधूनच प्रशासनाचा, कर्मचाऱ्यांचा, लष्कराचा व युद्धाचा होणारा भरमसाठ खर्च वसुल केला. स्वतःच्या स्वार्थ, अहंकार व महत्त्वाकांक्षेपोटी केलेल्या पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाच्या खर्चाचा प्रचंड बोजा शासनकर्त्यांनी वसाहतींच्या माथी मारला. पाश्चात्य राष्ट्रांच्या या अर्थनितीमुळे परतंत्रदेश कमालीचे दरिद्री बनले. त्यांच्या शोषण केलेल्या संपत्तीवरच पाश्चात्त्य राष्ट्रे श्रीमंत बनली. डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात, भारतीय कामधेनूच्या दुधावर इंग्लंड पोसला गेला. परंतु तिची वासरे उपाशीपोटी तडफडू लागली. डॉ. ईश्वरी प्रसादांचा हा अभिप्राय जवळ जवळ सर्व वसाहतींना लागू पडतो. एकट्या भारतातून प्रतिवर्षी ४,००,००००० पौंड एवढी प्रचंड संपत्ती ब्रिटीश लुटून नेत होते.

ब्रिटिशांच्या या आर्थिक शोषणाविरूद्ध जनमत जागृत होवून परतंत्र देशांत स्वातंत्र आंदोलने सुरू झाली.

### ३. धार्मिक व सामाजिक अत्याचार :-

साम्राज्यवादी युरोपियन राष्ट्रांनी आपल्या ताब्यात असलेल्या वसाहतींमध्ये ख्रिश्चन

धर्माचा प्रसार करून तेथील मानवाचा उद्धार करण्याचे लोकांना ख्रिश्चन बनविले. धर्मप्रसाराबरोबरच त्यांनी वसाहतीमधील लोकांच्या देवता, रूढी, धर्मग्रंथ, साधुसंत, धर्मस्थळ, स्थानिक संस्कृती, साहित्य, कला, शास्त्र व वर्तनाची टिंगल केली व त्यांच्या धर्म व संस्कृतीवर अन्याय-अत्याचार केले. विविध प्रकारचे धार्मिक निर्बंध लादले. पाश्चात्यांच्या अशा कृतीमुळे वसाहतवाद्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या गेल्या. परकियांचे आपल्या धर्मावर आक्रमण होत असून आपला धर्म नष्ट होईल, अशी भीती त्यांच्या मनात उत्पन्न झाली. स्थानिक धर्मावरील अतिक्रमण व सक्तीच्या ख्रिश्चन धर्मप्रसारामुळे वसाहतीच्या प्रजाजनात धार्मिक असंतोष निर्माण झाला. परिणामी वसाहतींमध्ये धार्मिक पुनरुज्जीवनाच्या चळवळी सुरू झाल्या.

स्थानिक प्रजेला शासनात सहभाग नव्हता. पावलोपावली अन्याय, अत्याचार, अपमान व अवहेलना लोक सहन करीत राहीले. लोकपराङ्मुख जुलमी राजवट, आर्थिक शोषण व धार्मिक अत्याचारामुळे गुलाम राष्ट्रातील समाज प्रक्षुब्ध झाला आणि त्याचे पर्यवसन राष्ट्रवादी आंदोलनात झाले.

## ४. भौतिक सुधारणा व पाश्चात्य शिक्षण :-

परकीयांच्या आगमनाचे काही चांगले परिणामही वसाहतींवर झाले. दळणवळणाच्या सोयी, पाश्चात्य शिक्षण पद्धती, भौतिक शास्त्रांचे ज्ञान, वृत्तपत्राचा उदय, नवसंस्कृती व नव्या संकल्पनाची ओळख पाश्चात्यिकरणामुळे वसाहती मधील लोकांना झाली. त्यामुळे वसाहतींत राष्ट्रवादाच्या  उदय आणि विकासाला हातभार लागला.

साम्राज्यवाद्यांनी आपल्या ताब्यात असलेल्या वसाहतीत आपली राजवट सुस्थिर करण्याकरिता, वेगवान लष्करी हालचालींसाठी आणि देशांतर्गत कच्च्या, पक्क्या मालाची वाहतूक करण्यासाठी व व्यापाराच्या सोयीसाठी दळणवळणाच्या साधनात सुधारणा केल्या. त्यासाठी वसाहतींत रस्ते, लोहमार्ग व जलमार्ग बांधले. रेल्वे, मोटारी व बोटींची वाहतूक सुरू केली. तारायंत्र व पोस्टांची निर्मिती सुरू केली. महसुल, कायदा, न्याय व प्रशासन यासाठी यंत्रणा राबविली. नवनवीन शहरे व बंदरांचा विकास घडविला. कृषी उद्योगाचा विकास करून तंबाखू, अफू , चहा, कॉफी, तांदुळ, रबर व कापूस यांचे उत्पादन वाढविणारे नवे तंत्र शोधून काढले. अर्थात या सर्व सोयी, सुधारणा राज्यकर्त्यांनी आपल्या उपयोगासाठी केला असला तरी त्यांचा लाभ अप्रत्यक्षपणे वसाहतींना झाला. कारण दळणवळणाच्या सोयीमुळे निरनिराळ्या प्रांतातील लोकांना एकमेकाशी संवाद साधता येवू लागला. एकाच देशातला विविध लोकांचा परिचय वाढल्यामुळे राष्ट्रीय ऐक्यास मदत झाली. समाजात वैचारिक देवाणघेवाण होऊ शकली. परदेशातील लोकांशी संपर्क वाढला व जगाची ओळख होऊ लागली. वसाहतीतले अनेक तरुण ह्याच सोयीमुळे शिक्षणासाठी परदेशात जावू लागले.

साम्राज्यवाद्यांना प्रशासनात काम करण्यासाठी कारकूनांचा वर्ग आवश्यक होता. कारण कमी पगारावर काम करण्यासाठी एवढ्या लांब युरोपातून लोक येण्यास तयार नव्हते. म्हणून युरोपियनांनी वसाहतीत शाळा, महाविद्यालये, विद्यापिठांची स्थापना करून इंग्रजी, फ्रेंच

भाषा, विज्ञान व वैद्यक शास्त्रांचे शिक्षण देण्यास प्रारंभ केला. भारतात मुंबई, मद्रास, कलकत्ता विद्यापीठाची, चीनमध्ये पेकिंग विद्यापीठाची स्थापना केली. इतर देशांत विविध शैक्षणिक संस्था सुरू करण्यात आल्या. तसेच वसाहतीमधील हजारो तरुण पाश्चात्य शिक्षण घेण्यासाठी युरोपात गेले. शिक्षण पूर्ण झाल्यावर मायदेशी परत आल्यावर ह्या तरुणांनी राष्ट्रवादी चळवळींना प्रारंभ केला. होचीमिन्ह, सुकोर्णो, माओसारखे तरुण नेते ह्या शैक्षणिक प्रभावातूनच निर्माण झाले. शिक्षणाच्या या प्रसारामुळे वसाहती मधील जनतेत जागृती निर्माण झाली व ते राष्ट्रीय आंदोलनासाठी सिद्ध झाले. पाश्चात्य शिक्षणाच्या प्रभावामुळे अनेक वृत्तपत्रांचा उदय झाला. ही वृत्तपत्रे देशी व विदेशी भाषेत होती. केसरी, मराठा, वंदे मातरम्, अमृत बझार पत्रिका आणि इतर (भारत) दी मॉर्निंग बेल, चायना गॅझेट, स्तियांग रिव्हर, दि व्ह्यू, (चीन) निझाम, मशाविरात (तुर्कस्थान) थान, नियन व लपारिया (व्हिएतनाम) यासारख्या शेकडो वृत्तपत्रांनी परकीय राजवटी विषयी असंतोषच वाढविला. अस्मितेची जाणीव निर्माण करून दिली. छापखान्याच्या शोधामुळे हजारो ग्रंथ प्रकाशित, भाषांतरीत झाले. त्यामुळे पाश्चात्यांची ज्ञानगंगा वसाहतीत प्रवाहित झाली. भौतिक सुधारणा, पाश्चात्य शिक्षण, वृत्तपत्रे हे घटक राष्ट्रवाद पसरविण्यास कारणीभूत ठरले.

## ५. राजकीय, धार्मिक संघटनांची स्थापना :-

पाश्चात्य ज्ञान व सुधारणाचे प्रेरणा घेऊन वसाहती मधला प्रजाजनांनी आपापल्या देशात सामाजिक, धार्मिक व राजकीय सुधारणांची चळवळ सुरू केली. त्यातून विविध संघटनाचा उदय झाला आणि राष्ट्रीय आंदोलनाची पार्श्वभूमी तयार झाली. पाश्चात्यकरणाची प्रतिक्रिया दोन प्रकारची होती. पाश्चात्य सुधारणा व ज्ञानाचा उपयोग करून समाज व राष्ट्रांची प्रगती करावी आणि प्रगत समाज्याच्या बळावर साम्राज्य वाद्यांशी टक्कर व्हावी ही पहिली प्रतिक्रिया होती तर साम्राज्यवादी राष्ट्रांच्या धोरणामुळे वसाहतींमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झालेला होता. परिणामी वसाहतीमधील जनतेने विविध राजकीय संघटना स्थापन करून स्वातंत्र्य लढे उभारले ही दुसरी प्रतिक्रिया होती.

आशिया खंडातील भारत व चीन या देशांत प्रारंभी धार्मिक व सामाजिक सुधारणेला प्रारंभ झाला. भारतात इंग्रजी राजवटीपासून प्रेरणा घेऊन अनेक सुधारणावादी पुढे आले. भारतीय धर्मात सुधारणा करून त्यांनी धर्मसुधारणा चळवळ सुरू केली. धर्माचा समाज जीवनावर पगडा असल्याने सामाजिक सुधारणेलाही प्रारंभ झाला. भारतात राजराम मोहन रॉय, दयानंद सरस्वती, विवेकानंद, कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील, टिळक, रानडे, गोखले, आगरकर, ज्योतीबा फुले, आंबेडकर, सर सय्यद अहमदखान इत्यादी समाजसुधारकांनी सामाजिक-धार्मिक सुधारणेचा प्रयत्न केला. त्यातूनच ब्राह्मो समाज, आर्य समाज, थिऑसफीकल सोसायटी, रामकृष्ण मिशन व अलीगड विद्यापीठ चीनमध्ये पाई-शांग-टी-हुई (तायपिंग) युन्हो-तुआन (बॉक्सर) व तुंग-मिंज-हुई (झेन) या संघटना उदयाला आल्या. सारिकल इस्लाम, बुदी उनमो, सिन्येथा व पत्रक होन गान या इतर संघटना उदयास आल्या.

सामाजिक, धार्मिक संघटनांप्रमाणेच आशिया खंडात राष्ट्रवादी संघटनाही स्थापन झाल्या. भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, आझाद हिंद सेना, कॉमिन्टांग पक्ष, चीनी कम्युनिस्ट पक्ष,

इंडोचायना कम्युनिस्ट पक्ष, इंडोनेशियन नॅशनल पार्टी, इंडोनेशियन कम्युनिस्ट पक्ष, अॅन्टी-फॅसिस्ट पीपल्स, फ्री उमलींग, बर्मीज, सोशालिस्ट पार्टी, कुटीपुनन पक्ष, लिंगा फिलिपिया, कमिटी ऑफ युनियन अॅण्ड प्रोग्रेस, तरूण तुर्क संघटना, क्वफपक्ष इत्यादी राष्ट्रवादी संघटना स्थापन झाल्या व त्यांनी राष्ट्रवादी चळवळी सुरू केल्या.

## ६. पहिल्या महायुद्धाचा परिणाम :-

इ.स. १९१४ ते १९१८ पर्यंत पहिले महायुद्ध सुरू होते. महायुद्धाच्या काळात साम्राज्यवादी राष्ट्रांनी आपल्या ताब्यातील वसाहतीमधून हजारो सैनिकांची भरती केली. वसाहतींनी प्रचंड संपत्ती वापरली. वसाहतींचे सर्वत्तोपरी सहाय्य घेतले. त्यांना आश्वासने दिली परंतु युद्ध समाप्तीनंतर आश्वासने, त्यांच्या मागण्या पूर्ण केल्या नाहीत. परतंत्र राष्ट्रांचा विश्वासघात केला.

युद्ध समाप्तीनंतर अमेरिकेचा अध्यक्ष वुड्रो विल्सनने आपल्या चौदा कलमी योजनेप्रमाणे प्रत्येक राष्ट्रांच्या, स्वातंत्र्याची, संरक्षणाची व स्वयंनिर्णयाच्या हक्काची घोषणा केली. त्यामुळे आशिया खंडातील अनेक देशांनी स्वातंत्र्याची मागणी केली. परंतु साम्राज्यवादी देशांनी कोणत्याही देशाचे स्वातंत्र्य मान्य केले नाही. इंडोचायनाच्या हो-ची-मिन्हची आठ कलमी योजना (स्वातंत्र्याची) स्वत: विल्सननेच धुडकावून लावली.

पहिल्या महायुद्धानंतर स्थापन झालेला राष्ट्रसंघ कोणत्याही परतंत्र देशाच्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकला नाही. महायुद्धामुळे साम्राज्यवादी राष्ट्राचा कृतघ्नपणा सिद्ध झाला, वसाहतींची घोर फसवणुक झाली. परंतु स्वयंनिर्णयाचा हक्क व राष्ट्रसंघाच्या स्थापनेमुळे परतंत्र राष्ट्रांना मुक्ती लढ्याची प्रेरणा मिळाली.

## ७. जपानचे नेत्रदीपक यश :-

आशिया खंडातील जपानने नवीन इतिहास घडवून पाश्चात्यांना जबर धक्का दिला. आशियायी राष्ट्रे मागासलेली नाहीत ही गोष्ट जपानने स्वकर्तृत्वाने सिद्ध करून दाखविली. जपानच्या नेत्रदिपक यशाने आशियायी राष्ट्रांना फार मोठी प्रेरणा मिळाली. जपानने पाश्चात्य ज्ञान व तंत्रज्ञान आत्मसात केले आणि मेईजी क्रांतीच्या माध्यमातून स्वत:ची सर्वांगीण प्रगती साधली आर्थिक व लष्करीदृष्ट्या प्रबळ झाल्यावर जपानने युरोपयिन साम्राज्यवादी राष्ट्रांप्रमाणेच साम्राज्यवादी धोरणाचा स्विकार केला. १९०२ मध्ये जपानने इंग्लंडशी आरमारी तह केला. १९०५ मध्ये रशिया-जपान युद्धात रशियाला पराभूत केले. महायुद्धाची संधी साधून चीनवर २१ मागण्या लादल्या. १८९४, १९३७ या वर्षी चीनबरोबर युद्ध करून कोरिया व मांयुरिया जिंकून घेतले. १९४१ मध्ये अमेरिकेच्या पर्ल हर्बरवर हल्ला करून जगाला धक्का दिला. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात संपूर्ण आग्नेय आशिया जिंकून भारतापर्यंत धडक मारली. आशियनासाठी आशिया अशी लोकप्रिय घोषणा देवून आशियातून युरोपियनाची हकालपट्टी केली. त्यामुळे आग्नेय आशियायी राष्ट्रांना जपान आपला मुक्ती दाता वाटू लागला. जपानच्या पराक्रमांचा आशियायी देशांना सार्थ आणि अभिमान वाटत होता. त्यांना आशिया खंडातील राष्ट्रे बलवान व पराक्रमी आहेत. याची खात्री पटली.

## ८. भारत, रशिया व चीनमधील क्रांत्या :-

भारत, चीन, रशिया या तिन्ही देशातल्या क्रांतीची प्रेरणा आशिया-आफ्रिकेतल्या

देशांना फारच उपयुक्त ठरली. भारतात १८८५ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसची स्थापना झाली. १८८५ ते १९४७ पर्यंत अनेक नेत्यांच्या नेतृत्त्वाखाली राष्ट्रवादी आंदोलने चालू होती. चीनमध्ये डॉ. सेन (१९११) व माओत्सेतुंगने कम्युनिस्ट क्रांती यशस्वी केली. (१९४९) १९१७ साली रशियात लेननीच्या नेतृत्वाखाली बोल्शेव्हिक क्रांती यशस्वी झाली आणि जुलमी झारशाही संपुष्टात आली. अन्याया विरुद्धचे हे तिन्ही लढे लोकशक्तीच्या आंदोलनाने यशस्वी झाले. रशिया आणि चीन या देशांनी कम्युनिस्ट विचारसरणी स्विकारली होती आणि हाच मार्ग आग्नेय आशियातील शेतकऱ्यांना व कामगारांना योग्य वाटला. याच मार्गाने इंडोनेशिया कंबोडिया व व्हिएतनाम यांनी स्वातंत्र्य मिळविले. आशिया खंडातील इतर देशांनी भारतासारखाच राष्ट्रवादी आंदोलनाचा मार्ग स्विकारला.

## ९. राष्ट्रीय नेर्तृत्वाचा उदय :–

कोणत्याही आंदोलनासाठी परिस्थिती व नेतृत्त्वाची गरज असते. नेतृत्त्वाशिवाय आंदोलने यशस्वी होत नाहीत. भारतात लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, नेहरू, नेताजी व सावरकरांसारखे नेतृत्व लाभल्याने भारतीय कॉंग्रेसने सुरू केलेला स्वातंत्र्य आंदोलनाचा लढा यशस्वी झाला व भारताला स्वातंत्र्य मिळाले. चीनमध्ये डॉ. सेन व माओत्सेतुंग ह्या नेत्यांनी दीर्घकाळ लढा देऊन कम्युनिस्ट क्रांती यशस्वी केली. इंडोनेशियाला सुकार्णो, व्हिएतनामला होची मिन्ह ब्रह्मदेश बाता–अंगसन, फिलिपाईन्स–अग्निनाल्डो, तुर्कस्थान किमालपाशा, इजिप्त झगलूठ पाशा यांचे नेतृत्व लाभल्यामुळे त्या त्या देशातील लढे यशस्वी झाले.

साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या ताब्यातील वसाहतींना स्वातंत्र्य द्यावे लागले. आशिया खंडात अनेक बलशाली लोकशाही प्रधान देशांचा उदय झाला. इ.स. १९७५ पर्यंत आशिया खंडातील सर्व वसाहती मुक्त होऊन वसाहतवादाचे विघटन झाले.

आफ्रिकेतील साम्राज्यवादाला व राष्ट्रवादाला उशीरा सुरूवात झाली. वसाहतीमधील परकिय नागरिकांचा पुढाकार, आशिया खंडातील राष्ट्रवाद आणि साम्राज्यवाद्यांचा अत्याचार ह्या कारणांनी आफ्रिकेतील राष्ट्रवादाला चालना मिळाली. युरोपातील लोकशाही लढा, रशिया–चीन मधील साम्यवादी क्रांत्या व भारतातील अहिंसावादी आंदोलने ह्या मार्गांचा आफ्रिकेतील राष्ट्रवाद्यांनी स्विकार केला होता.

## आफ्रिकेतील राष्ट्रवादी चळवळीची कारणे :–

१. युरोपातील इंग्लंड, फ्रान्स, पोर्तुगाल, इटली, जर्मनी, हॉलंड, स्पेन या साम्राज्यवादी राष्ट्रांनी आफ्रिकेतल्या विविध देशात आपले प्रभुत्व प्रस्थापित केले. तेथील प्रशासन, कायदा, न्याय व परराष्ट्र धोरणाची सुत्रे आपल्या हाती ठेवली. वसाहतीमधील शेती, व्यापार, उद्योगधंदे, खाणी या सर्वांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. आशिया खंडातील वसाहतींप्रमाणेच आफ्रिका खंडातील वसाहतींचे आर्थिक शोषण झाले. कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांना हीन प्रकारची वागणूक दिली जात असे. हक्क, स्वातंत्र्य व न्यायाची गळचेपी करून त्यांची राष्ट्रीय आंदोलने दडपून टाकली गेली. परकियांच्या ह्या अत्याचारी राजवटीमुळे त्यांच्यात असंतोष निर्माण झाला व त्यांनी राष्ट्रवादी चळवळी सुरू केल्या.

२. आफ्रिका खंडातील संपत्तीच्या मोहानेच साम्राज्यवादी राष्ट्रे आफ्रिकेकडे आकर्षित झाली. आफ्रिकेत हिरे, सोने-चांदी, तांबे, बॉक्साइट, फॉस्फेट व युरेनियमच्या भरपूर खाणी होत्या. तसेच लाकूड, रबर, कापूर, कोका, रबर व पेट्रोलियम मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होते. त्याचा फायदा पाश्चात्यांनी घेतला. येथे विविध उद्योग सुरू करून प्रचंड संपत्ती मायदेशी नेली. आफ्रिकेतील स्वस्त मजूरांना कामाला जुंपून त्यांचे शोषण केले, आफ्रिकन लोकांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक शोषण झाले. दारिद्र्यामुळे संतप्त झालेल्या आफ्रिकन जनतेने राष्ट्रवादी आंदोलने सुरू झाली.

३. राजकीय व आर्थिक पारतंत्र्यामुळे आफ्रिकन जनता त्रस्त झाली होती. त्यांच्यावरील अन्याय-अत्याचाराला सीमाच नव्हती. पाश्चात्य राष्ट्रे आफ्रिकेतील लोकांना कनिष्ठ, हीन, असंस्कृत व अस्पृश्य समजनू त्यांचा छळ करीत व स्वत:ला उच्चवर्णी मानत होते. त्यांनी कृष्णवर्णीय कामगारांचा अमानुष छळ केला. फटके मारणे, धाकाला लावणे, भुकेले ठेवून मारणे, हद्दपार करणे, विनाचौकशी डांबणे, स्त्रियांची अब्रु घेणे, मालमत्ता जप्त करणे, कमी वेतन देणे, संप-चळवळी दडपणे, अमानुषपणे कत्तल करणे अशा मार्गाने त्यांच्यावर अमानुष अत्याचार करण्यात आले. त्यांचे सर्व हक्क व स्वातंत्र्य हिरावून घेतले. याविरुद्ध आफ्रिकेतील जनतेत असंतोष निर्माण होऊन त्यांनी राष्ट्रवादी आंदोलने केली.

४. वरील परिणामांशिवाय पाश्चात्य राष्ट्रांचे काही चांगले परिणाम आफ्रिकी राष्ट्रांवर झाले. त्यांच्याच प्रयत्नामुळे शिक्षण, रस्ते, लोहमार्ग, खाणी, कारखाने, व्यापार, उद्योगधंदे व शिक्षणाचा विकास झाला. त्यामुळे समाज जागृत होऊन संघटीत झाला. पाश्चात्य शिक्षण घेतलेल्या तरूणांची पिढी निर्माण झाली. दळणवळणाच्या सुधारणेमुळे परस्परांचा संपर्क वाढला.

५. आंतरराष्ट्रीय घडामोडीचा विलक्षण परिणाम आफ्रिकी राष्ट्रांवर झाला. पहिल्या महायुद्धानंतर अमेरिकेचा अध्यक्ष वुड्रो विल्सन याने चौदा कलमी स्वातंत्र्य-स्वयंनिर्णय या योजनांची घोषणा केली. दुसऱ्या महायुद्धानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्र संघटनेने साम्राज्यवादी राष्ट्राच्या अत्याचाराचा निषेध करून राष्ट्रवादी लढ्याला पाठिंबा दिला व अनेकदा लष्करी साह्य केले. युरोपातल्या राष्ट्रवादी चळवळीची त्यांना प्रेरणा मिळाली. रशिया व चीनमधल्या साम्यवादी क्रांतीचा परिणाम येथील समाजावर झाला. अनेक देशात कम्युनिस्ट पक्ष व साम्यवादी चळवळींचा उदय झाला. भांडवलशाही अमेरिका व साम्यवादी रशियाने अनेक देशांच्या राष्ट्रवादी लढ्यात हस्तक्षेप करून त्यांना आर्थिक व लष्करी साह्य केले. दुसऱ्या महायुद्धानंतर साम्राज्यवादी राष्ट्रांना आपल्या ताब्यात असलेल्या अनेक वसाहतींना स्वातंत्र्य द्यावे लागले.

६. आशिया खंडातील परतंत्र देशांनी सुरू केलेल्या स्वातंत्र्य आंदोलनाने आफ्रिकेतील परतंत्र देशांना स्वातंत्र्याची प्रेरणा मिळाली. रशिया, चीन, भारत व जपान या आशियायी देशांमधील क्रांत्याचा प्रभाव आफ्रिकेवर पडला. ह्या देशांमधील राष्ट्रवादी संघटना आणि नेते यांचा आदर्श समोर ठेवून आफ्रिकेतील देशांनी आपल्या लढ्याला प्रारंभ केला.

७. साम्राज्यवादी राष्ट्रांनी केलेले आर्थिक शोषण, गुलामगिरी, अन्याय-अत्याचार तसेच त्यांनी स्वत:च्या फायद्यासाठी केलेल्या सुधारणा, शैक्षणिक प्रगती, आंतरराष्ट्रीय घडामोडीचा प्रभाव या व इतर कारणांनी आफ्रिकेतील श्रमजीवी व विद्यार्थी वर्गात फार मोठा असंतोष निर्माण झाला. अशा पोषक वातावरणामुळे आफ्रिकेत अनेक राष्ट्रवादी संघटना उदयास आल्या. अहमद बेनबेला, केनेथ कौण्डा, लुमुंबा, वचामे नक्रुना, मिल्टन, अॅबोटे, जोमो, केन्याटा, सांतो-स्वांबी विनी मडेला, नेल्सन मंडेला या देशभक्तांनी लोकजागृती व जनसंघटन केले. राष्ट्रीय विचार सरणीचे पक्ष व संघटना स्थापन करून आपल्या देशांना स्वातंत्र्य मिळवून दिले.

## दक्षिण आफ्रिकेतील स्वातंत्र चळवळ :-

आफ्रिकेतील केपकॉलनी, नाताळ, ऑरेंज, फ्री स्टेट व ट्रान्सवाल या विविध प्रदेशांवर ब्रिटिशांनी आपला ताबा बसवून दक्षिण आफ्रिकासंघ ही एकच मोठी वसाहत निर्माण केली आणि ती ब्रिटिश साम्राज्यात समाविष्ट केली. या वसाहतीत 'बांटु' जमातीच्या कृष्णवर्णीय आफ्रिकन लोकांची लोकसंख्या ७५% होती आणि गोऱ्यांची लोकसंख्या २५% होती. परंतु संपत्ती व राजसत्ता मात्र गोऱ्यांच्या हातात होती.

राज्यकर्त्या गोऱ्यांनी कृष्णवर्णीय पजेवर अमानुष अत्याचार केले व त्यांच्या वर्णद्वेषी राजकारणाने चरम सीमा गाठली. पहिल्या महायुद्धात लक्षावधी आफ्रिकन लोकांनी जर्मनीच्या विरोधात ब्रिटिशांना मदत केली. परंतु ब्रिटिशांनी मात्र त्यांच्या स्वातंत्र्याचा सहानुभूतीपूर्वक विचार न करता उलट दडपशाही सुरू केली. १९१० ते १९९४ या कालखंडातील गोऱ्या पंतप्रधानांनी वर्णद्वेषी धोरण स्विकारल्यामुळे आफ्रिकेतील जनतेत प्रचंड प्रक्षोभ निर्माण झाला. गोऱ्या राज्यकर्त्यांनी कृष्णवर्णी मजुरांचे अमानवी शोषण करून त्यांच्यावर विविध प्रकारचे अत्याचार केले. त्यांना मालमत्तेचे नागरिकत्वाचे, राजसभेचे किंवा कोणतेही मूलभूत हक्क नव्हते. ह्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी पहिली राष्ट्रवादी मजूर संघटना स्थापन केली.

इ.स. १९१२ साली आफ्रिकन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाली. हा दक्षिण आफ्रिकेतील प्रमुख पक्ष असून नेल्सन मंडेलांच्या प्रभावी नेतृत्वाखाली या पक्षाने दिर्घकाळ आंदोलन चालविले. आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने नंतर 'उमखोंटोसिझवे' या लढावू दलाची स्थापना केली. इ.स. १९२१ मध्ये आफ्रिकेत कामगार वर्गाचा भरणा असलेला कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला. त्याला रशियाचा पाठिंबा होता. कृष्णवर्णीय असंतुष्ट कामगार वर्गाने राष्ट्रवादी लढ्यास सुरूवात केली व नंतर अनेक पक्षांनी त्यांना पाठिंबा दिल्यामुळे लढ्याला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. मुलभूत हक्क राजकीय अधिकार कृष्णवर्णीयांची प्रगती व वर्णद्वेषी राजकारणाचा अंत ही आंदोलनाची प्रमुख उद्दिष्ट्ये होती.

साम्राज्यवादी शासनकर्त्यांनी केवळ गोऱ्या कामगारांना विशेष हक्क व सवलती दिल्या, त्यांना शिक्षण मालमत्ता व मतदानाचा अधिकार दिला. गोऱ्यांच्या स्वतंत्र वस्त्या निर्माण केल्या. ज्या ज्या वेळी कृष्णवर्णीय आंदोलने झाली ती क्रूरपणे मोडून काढली. समालोलुपता, दडपशाही, वर्णभेदी राजकारण ही ब्रिटिश शासनाची द्योतके होती. आफ्रिकेत

स्थापन झालेल्या आफ्रिकन नॅशनल काँग्रेसची लोकप्रियता व प्रभाव वाढत होता. या पक्षाने तरुणांची 'युथलिंग' व 'उमखोटो लढावू दल' स्थापन केलेले होते. या संघटनांच्या नेत्यांनी वंशभेदी राजकारणाविरुद्ध पन्नास वर्षे संघर्ष केला.

दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्रवादी आंदोलनांनी भीषण रूप धारण केले. त्यांना नेल्सन मंडेला सारखे प्रभावी नेतृत्व लाभल्यामुळे चळवळीला वेगळीच धार आली. भारतात महात्मा गांधीजींनी सुरू केलेल्या चळवळीचा फार मोठा प्रभाव आफ्रिकन राष्ट्रवाद्यांवर पडलेला होता. तीन लक्ष कामगारांनी रॅम्फोसाच्या नेतृत्वाखाली देशव्यापी संप केला. १९५० साली युथ लीग, आफ्रिकन नॅशनल काँग्रेस व कम्युनिस्ट पक्ष यांनी १९४८ च्या दडपशाही कायद्याविरूद्ध निदर्शने केली. बाल्अन शहरातील रेल्वे स्टेशनवर सत्याग्रह केला. १९५२ मध्ये नेल्सन मंडेला आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे उपाध्यक्ष झाले व त्यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. १९५३ साली सोफियाटाऊन शहरातील ५८००० काळ्यांची हकालपट्टी करून तेथे गोऱ्यांची टंफ ही उपनगरी उभारली. काळ्यांसाठी स्वतंत्र शिक्षणपद्धतीची घोषणा करण्यात आली. ब्रिटिशांच्या या धोरणाचा परिणाम म्हणून आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने मंडलांच्या नेतृत्वाखाली देशव्यापी आंदोलन सुरू केले. उमटवोटो लढावू सेनेने घातपात व हिंसाचाराला प्रारंभ केला. १९५५ साली आफ्रिकन काँग्रेसने स्वातंत्र्याचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. सर्वपक्षीय आंदोलन सुरू झाले. परिणामी ब्रिटिशांनी दडपशाहीचे धोरण स्विकारून मंडेला व इतर हजारो नेत्यांना तुरूंगात डांबले. निदर्शने पहाण्यासाठी आलेल्या नि:शस्त्र अबाला, वृद्धांवर गोळीबार केला. त्यात ६९ नागरिक मृत्यूमुखी पडले. १९६१ साली ब्रिटिशांनी 'दक्षिण आफ्रिकन प्रजासत्ताक' स्थापन केले.

मंडेला तुरूंगात असताना त्यांच्या पत्नी विनी मंडेला व इतर नेत्यांनी आंदोलनाचे नेतृत्व केले. ठिकठिकाणी बॉम्बस्फोट व घातपाती कारवाया करण्यात आल्या. १९६१ मध्ये मंडेलांवरील आरोप सिद्ध न झाल्याने त्यांची तुरूंगातून सुटका झाली. परंतु १९६३ मध्ये उमटवोंटो संघटनेच्या 'रिव्हीनिया' येथील केंद्रावर धाड टाकून क्रांती साहित्य जप्त करण्यात आले आणि मंडेलासह हजारो नेत्यांना पुन्हा तुरूंगात डांबण्यात आले. मंडेला स्वत: वकील असल्यामुळे त्यांनी आपली व राष्ट्रवाद्यांची बाजू समर्थपणे मांडली. इंग्रजांच्या वर्णद्वेषी राजकारणाचे धिंडवडे काढले. परंतु ब्रिटिशांनी आरोप सिद्ध करून मंडेलांना शिक्षा ठोठावली.१९६४ ते १९९० पर्यंत मंडेला रॉबन बेटावर शिक्षा भोगत होते. मंडेलांची लोकप्रियता वाढत होती. जगातील कोट्यावधी जनतेने त्यांच्या लढ्याला नैतिक पाठिंबा दिला होता. मंडेलांची रवानगी तुरूंगात झाल्यानंतर त्यांची मुलगी झिंदगी आणि पत्नी विनी मंडेला यांनी आंदोलन तीव्र केले. विनी मंडेला यांनाही १० वर्षाची शिक्षा झाली. १९८३ साली आफ्रिकेतील सर्व राष्ट्रवादी ६०० संघटनांनी 'युनायटेड डेमाक्रॅटिक फ्रंट' ही संघटना स्थापन करून राष्ट्रव्यापी निर्णायक लढा सुरू केला. जगातल्या प्रमुख देशांनी व युनीने मंडेला व सहकाऱ्यांना मुक्त करा. राजकीय संघटनावरील बंदी ३६ वा आणि आफ्रिकेतील वर्णद्वेषी इंग्रजी राजवट बरखास्त करा अशी मागणी केली. (१९८९) यूनो-रशिया व अमेरिका यांनी आर्थिक निर्बंध लादण्याची धमकी दिली. आंतरराष्ट्रीय दडपण व आंदोलनाची तिव्रता लक्षात घेवून अध्यक्ष फेड्रीक क्लार्कने राष्ट्रवादी संघटनांशी वाटाघाटी सुरू केल्या. शेवटी १९९० मध्ये ब्रिटिशांनी नेल्सन मंडेलांची ब्रिटिश मुक्तता केली. राष्ट्रवादी संघटनांवरील

बंदी उठविली आणि वंशभेदी सर्व कायदे व निती रद्द केली. मंडेलाच्या वंशभेद विरोधी गांधीवादी अहिंसक लढ्याचा विजय झाला. राष्ट्रवादी लढ्याच्या यशस्वी अग्नी दिव्यातून सामर्थ्यशाली दक्षिण आफ्रिकेचा उदय झाला.

### डॉ. नेल्सन मंडेला :–

डॉ. नेल्सन मंडेला यांचा जन्म ट्रान्सकिवी प्रांतातील उमटाटा शहराजवळील 'कूतू' गावी १९१८ साली झाला. त्यांचे वडील हेन्री मंडेला थेम्बु टोळीचे सरदार होते. 'रोहीहला हिआ' हे नेल्सन मंडेलांचे आफ्रिकन भाषेतील मूळ नाव होते. क्लार्कबरी व जोहान्सबर्ग येथे मंडेलाचे शिक्षण पूर्ण झाले व त्यांनी कायद्याची पदवी संपादन केली. पुढे स्कॉटलँड विद्यापीठाने त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल केली.

नेल्सन मंडेला यांनी लहानपणापासूनच कृष्णवर्णी यांवर होणारे अत्याचार सहन केलेले असल्यामुळे त्यांनी आपले सर्व आयुष्य कृष्ण वर्णीयांच्या मुक्तीसाठी खर्च केले. जोहान्सबर्ग येथे असतानाच त्यांची आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या भिसूल व टंबो ह्या नेत्यांची भेट झाली आणि या नंतर त्यांची युथलीगचा सदस्य व नंतर अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. पुढील काळात नेल्सन मंडेलांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या कार्यास वाहून घेतले. भारतात महात्मा गांधीजींनी अहिंसेच्या मार्गाने यशस्वी लढा दिला होता. त्याचा प्रभाव नेल्सन मंडेला यांच्यावर पडल्यामुळे त्यांनी अहिंसावादी आंदोलनाचा मार्ग स्विकारला होता. परंतु ब्रिटिशांच्या दडपशाहीमुळे त्यांनी 'उमखोटे' सारख्या सशस्त्र लढ्यालाही प्राधान्य दिले.

एव्हिलीन ऐंटोकोशी यांना घटस्फोट दिल्यानंतर वैद्यकीय समाजसेविका विनी मंडेला यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. विनी मंडेला महान देशभक्त असून त्यांनी नेल्सल मंडेलांच्या खांद्याला खांदा लावून कार्य केले. भयानक हाल–अपेष्टा सहन करून आफ्रिकन राष्ट्रीय चळवळ त्यांनी सुरू ठेवली. नेल्सन मंडेला यांनी आफ्रिकेच्या स्वातंत्र्य चळवळीत प्रामुख्याने कामगार चळवळ, युथलिगची आंदोलने आणि आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे नेतृत्व इत्यादी मार्गाने कार्य केले आणि इंग्रजांच्या पाशवी शक्तींशी धैर्याने मुकाबला केला. दक्षिण आफ्रिकेत व जगभर वंशवादी इंग्रजाची निर्भत्सना करून कोट्यावधी जनतेची या लढ्याला पाठिंबा मिळविला. नेल्सन मंडेला कुशल संघटक, मुत्सद्दी राजकारणी, उत्तम प्रशासक, महान देशभक्त, व लोकप्रिय नेता आहे. जगातील वंशद्वेषज्ञचे उच्चाटन व्हावे. हे त्यांचे जीवीत कार्य बनले आहे. त्यांच्या लढ्याच्या नैतिक सामर्थ्यामुळे त्यांना जगभरातून पाठिंबा मिळाला व त्यांच्या आंदोलनाला यश प्राप्त झाले. दक्षिण आफ्रिकेला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर इ.स. १९९४ मध्ये नेल्सन मंडेला यांना आफ्रिकेच्या अध्यक्षपदाचा मान मिळाला. इ.स. १९९३ नेल्सन मंडेला यांना नोबेल पारितोषिक आणि भारतरत्न देऊन अमेरिका व भारताने त्यांना यथोचित सन्मान केला. सद्यस्थितीत नेल्सन मंडेला वृद्धावस्थेत आजारी आहेत.

## ५:२:३ चीनमधील साम्यवादी क्रांती आणि माओचे कार्य आणि तत्व :–

आधुनिक जगाच्या राजकारणात आज चीनला अतिशय महत्वाचे स्थान प्राप्त झालेले आहे. केवळ आशिया खंडातीलच नाही तर जगातील मोठ्या राष्ट्रांच्या मालिकेत चीनची

गणना होत आहे. सुमारे १०० वर्षे दारिद्र्याच्या व दुर्बलतेच्या खोल गर्तेत सापडलेल्या चीनची मोठ्या पाश्चात्य राष्ट्रांनी आपल्या स्वार्थासाठी लुबाडणूक केली. अपमानित झालेल्या या राष्ट्राने साम्यवादी राजवटीत आश्चर्यकारक व कौतुकास्पद प्रगती केली.

## चीनमधील साम्यवादी पक्षाची स्थापना :-

चीनमधील साम्यवादी पक्षाची स्थापना रशियातील १९१७ च्या क्रांतीनंतर जरी झाली असली तरी मार्क्स साम्यवादी विचारसरणीचा अभ्यास त्यापूर्वीच काही विद्वान चीनी मंडळी करू लागली होती. इ.स. १९१८ मध्ये पेंकीग विश्वविद्यालयात काम करणाऱ्या ली नावाच्या प्राध्यापकाने मार्क्सवादाच्या अध्यापनाकरीता एक मंडळ स्थापन केले. मोओ-त्से-तुंग हा त्याचा निकटचा मदतनीस व मंडळाचा सक्रिय सभासद होता. लिने विद्यापीठातील तरूणांना संघटीत करून त्यांच्यात साम्यवादी क्रांतीची प्रेरणा निर्माण केली. त्याने साम्यवादी ग्रंथांची चीनी भाषेत भाषांतरे केली. चीनमध्ये रशियाप्रमाणे कामगार वर्ग फारसा नसला तरी तेथील दरिद्री शेतकरी क्रांती घडवू शकतो हा क्रांतीकारी सिद्धांत त्याने मांडला.

चीनमध्ये साम्यवादी क्रांतीला पोषक वातावरण असून येथील प्रश्न क्रांतीनेच सुटू शकतील असा लीचा आत्मविश्वास होता. 'चेन-तू-प्सू' हा दुसरा चीन मधील साम्यवादी विचारवंत होता. तो पेकिंग मधील प्राध्यापक, लेखक व श्रेष्ठ पत्रकार होता. तो लिया सहकारी असून त्याने १९०४ साली चायनीज युथ अॅसोसिएशनची स्थापना केली. चीनने तरुणांना आधुनिकतेचा संदेश दिला. आपल्या लिखाणातून त्याने साम्यवादी विचारांचा प्रसार केला. चीनमधील १९१९ च्या आंदोलनाचे प्रेरणास्थान चेन होता. रशियन क्रांतीचा त्यावर फार मोठा प्रभाव असून रशियाप्रमाणे चीनमध्ये सर्वसामान्यांची क्रांती होवून कष्टकऱ्यांची हुकूमशाही प्रस्थापित होईल, अशी त्याची धारणा होती. म्हणूनच त्याने १९२० मध्ये साम्यवादी गटाची स्थापना केली. लि आणि चेन या चीनी विचारवंतांनी वृत्तपत्रे, निरनिराळे ग्रंथ, भाषणे, संघटना व पेकिंग विद्यापिठाच्या अभ्यास मंडळाद्वारे साम्यवादी विचारांचा प्रसार व प्रचार करून साम्यवादी पक्षासाठी अनुकुल पार्श्वभूमी तयार केली. त्यांच्या प्रयत्नांना रशिया, कॉमिंटर्नसची जोड मिळाल्याने चीनमध्ये साम्यवादी पक्षांची स्थापना झाली.

## १९४९ च्या साम्यवादी क्रांती :-

१९२१ मध्ये चीनी कम्युनिस्ट (साम्यवादी) पक्षांची स्थापना झाली आणि १९२३ मध्ये कोमिंगयंग आणि कम्युनिस्ट पक्ष यांच्यात युती झाली. इ.स. १९३१ मध्ये माओने चीनी सोव्हिएत प्रजासत्ताकाची घोषणा केली. किआंगसी प्रांतातील ज्युई-चनी येथे या प्रजासत्ताकाची राजधानी स्थापन करण्यात आली.

साम्यवादी पक्षाच्या वाढत्या प्रभावामुळे कोमिंटांग सरकारचे आसन डळमळीत होऊ लागले. त्याकडे दुर्लक्ष केल्यास तो पक्ष कोमिंगटांगचा एक प्रबळ प्रतिस्पर्धी होऊन बसेल अशी भिती चॅग-कै-शिकला भेडसावू लागली. म्हणून त्याने साम्यवादी पक्षाचे देशातून निर्मूलन करण्याचा चॅगने निर्धार केला. इ.स. १९३३ नंतर साम्यवाद्यांविरुद्ध त्याने एकूण पाच मोठ्या लष्करी मोहिमा हाती घेतलेल्या कोमिंटांग लष्कराला साम्यवादी सैन्याने बरेच दिवस निकराने तोंड दिले. गनिमी काव्याने प्रतिकार करून कोमिटांग सैन्याला जेरीस

आणले. पाचव्या लष्करी मोहिमेच्या वेळी दहा लक्ष सैनिकांसह चँगने साम्यवाद्यांच्या मुख्य तळावरच हल्ला चढविला, साम्यवादी प्रदेशांवर बाँब वर्षाव केला. त्यात शेकडो निरपराध नागरिकही मारले गेले.

## १९४९ च्या साम्यवादी क्रांतीची कारणे :-

१. कार्ल्स मार्क्सने मांडलेल्या साम्यवादी तत्त्वज्ञानाचा जगभर प्रसार झाला. ह्याच तत्त्वज्ञानाच्या आधारावर लेनिनने रशियांत बोल्शेव्हिक साम्यवादी क्रांती घडवून आणली होती. त्यामुळे १९१७ पासून सामर्थ्यशाली रशियाचा उदय झाला. रशियातील साम्यवादी क्रांतीमुळे जगातील मागासलेल्या देशात साम्यवादाचे आकर्षण निर्माण झाले. चीनमधील लि-ताचा-ओ, चेन-तु-त्सु, डॉ. सेन, माओ-त्से-तुंग असे नेले. विद्यार्थी व शेतकरी साम्यवादाने प्रभावित झाले. त्यांनी चीनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करून यशस्वी क्रांतीचे प्रयत्न सुरू केले.

२. रशियात साम्यवादी क्रांती झाल्यानंतर रशियाने स्वत: ह्या क्रांतीचा प्रसार करण्याचे प्रभावी प्रयत्न सुरू केले. १९१८ मध्ये रशियात कम्युनिस्ट इंटरनॅशनल परिषदेचे तिसरे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनातच 'कॉमिटर्न' नावाची आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन झाली. या संघटनेने जगातील मागासलेल्या दरिद्री राष्ट्रात साम्यवादी क्रांती घडवून त्यांची प्रगती साधणे हे उद्दिष्ट निश्चित केले होते. चीन मधील परिस्थिती क्रांतीसाठी पोषक आहे. हे लक्षात घेऊन कॉमिटर्न प्रतिनिधी ग्रेगरी व्हाईटान्सकीने ली व चेन या विचारवंतांशी वाटाघाटी करून १९२० साली चीनमधील विविध प्रांतात साम्यवादी पक्षाच्या शाखा स्थापन केल्या आणि थोड्याच कालावधीत राष्ट्रव्यापी साम्यवादी पक्षांचा उदय झाला. १९४९ पर्यंत रशियाने कोमिटांग-कम्युनिस्ट पक्षाला भरपूर आर्थिक व लष्करी साह्य केले. रशियाच्या पुढाकार व प्रयत्नामुळे चीनी क्रांतीला फार मोठी चालना मिळाली.

३. साम्यवादी क्रांतीपूर्वी चीनमध्ये अनेक उठाव व चळवळी झाल्या. तायपिंगचा उठाव, बाक्सरची क्रांती, १९११ ची प्रजासत्ताक क्रांती, १९१९ ची चळवळ इत्यादी. परंतु प्रभावी पक्ष व नेतृत्वाचा अभाव आणि त्यातील त्रुटीमुळे त्या यशस्वी झाल्या नाहीत. चीनी समाज व नेते निराशेने चाचपडत असतानाच त्यांना साम्यवादी क्रांतीचा उपाय सापडला. पूर्वीच्या सर्व क्रांत्याच्या अपयशामधूनच सामर्थ्यशाली साम्यवादी पक्षाची स्थापना होऊन माओच्या नेतृत्वाखाली १९४९ ची क्रांती झाली.

४. मार्क्सप्रणीत साम्यवादाचा व रशियन क्रांतीचा फार मोठा प्रभाव चीनी विचारवंत आणि विद्यार्थी वर्गावर झाला. एवढेच नाहीतर लोकशाहीचा पुरस्कर्ता डॉ. सेन व त्याचा कोमिटांग पक्ष साम्यवादाने भारले गेले. लि व चेन या विचारवंतांनी साम्यवादाचा हीरीरीने पुरस्कार केला. त्यांनी मार्क्सवादी मंडळाची स्थापना करून आपल्या लेखनाद्वारे आणि भाषणाद्वारे साम्यवादाचा प्रसार केला. १९२१ मध्ये चीनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. या पक्षाला पुढे माओसारखे नेतृत्व लाभले. अनेक हालअपेष्टा सहन करून चँगच्या कोमिटांगशी दीर्घकालीन संघर्ष करून साम्यवादी पक्षाने आपली क्रांती यशस्वी केली.

५. चॅग-कै-शकेची राजवट हा साम्यवादी क्रांतीमधील प्रमुख अडथळा होता. सुरूवातीला चॅग हा डॉन्सेनचा विश्वासू वारसदार असून लोकशाहीनिष्ठ प्रखर राष्ट्रवादी होता. त्याने चीनमधील लष्करी अराजक नष्ट करून स्थिर राष्ट्रीय सरकारची स्थापना केली होती. डॉ. सेनचा मृत्यू आणि कॅम्युनिस्टांचा वाढता प्रभाव यामुळे तो मदोन्नत बनला. चॅगने कम्युनिस्टांशी युती न करता उलट त्यांना नेस्तनाबूत करण्याचा चंग त्यान बांधला. जपानने चीनचे अनेक प्रदेश गिळंकृत केले असतानाही जपानकडून पराभूत झालेल्या चॅगने जपानशी संधान बांधून कम्युनिस्टाबरोबरचा आपला संघर्ष सुरू ठेवला. त्यामुळे चीनी जनता संतप्त झाली व त्यांनी माओच्या कम्युनिस्ट क्रांतीला पाठिंबा दिला.

६. चीन हा कृषीप्रधान देश असून गरिब शेतकऱ्यांची संख्या जास्त होती. सरंजामदार शेतकऱ्यांचे शोषण करीत होते. आतापर्यंतचे कोणतेही पक्ष, संघटना, चळवळी किंवा नेते शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देत नव्हते. शेतकऱ्यांच्या दु:खाला कोणी वाली नव्हता. अशा परिस्थितीत माओने साम्यवादी पक्षाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या दु:खाला वाचा फोडली. त्यांना संघटीत केले, त्यांची लाल सेना उभारली. त्यांची सरकारे स्थापन केली. शेतकऱ्यांच्याच साह्याने जपान व चॅगशी संघर्ष करून शेवटी त्याने शेतकऱ्यांची कम्युनिस्ट क्रांती यशस्वी केली. शेतकऱ्यांमधील असंतोष त्यांची संघटीतशक्ती व माओचे नेतृत्व हेच साम्यवादी चीनी क्रांतीचे प्रमुख आधारस्तंभ होते.

## १९४९ ची चीनमधील साम्यवादी क्रांती :-

१९२१ मध्ये चीनमध्ये चीनी कम्युनिस्ट पक्षाची स्थापना चेन-तू-चौ याने पेकिंग येथे केली. देशातील लष्करी समाधिशांचा नायनाट करून परकीय सर्वस्व नष्ट करणे. हे या पक्षाचे उद्दिष्ट होते. रशियाशी वाटाघाटी झाल्यानंतर साम्यवादी पक्षाचे सदस्य कोमिटांग पक्षात सामील झाले. त्यामागे कोमिटांग पक्षाला साम्यवादाकडे झुकविण्याचा त्यांचा उद्देश होता. १९२७ साली कोमिटांग पक्षातून डाव्या गटाचे उच्चाटन झाल्यानंतर माओ व त्याचे सहकारी दक्षिणेकडील किआंगसीच्या पर्वतमय प्रदेशातील शेतकरी वर्गात साम्यवादाचा प्रसार करू लागले. चीनमध्ये क्रांती घडवून आणावयाची असल्यास त्यासाठी आधी शेतकरी वर्गाला राजकीयदृष्ट्या जागृत व संघटित करावे लागेल अशी माओची खात्री होती.

चूते याने पक्षाचे लष्कर उभे करण्याची योजना हाती घेतली. कोमिटांग पक्षाच्या हातून सत्ता काढून घेवून चीनमध्ये साम्यवादी शासन प्रस्थापित करण्याचा पक्षाचा निर्धार होता. चार वर्षात चूच्या संघटन कौशल्यामुळे सैनिकांची संख्या एक लाखावर गेली. १९३१ साली माओने चीनी प्रजासत्ताकाची घोषणा केली. किआंगसी प्रांतातील ज्युई-चीन येथे या प्रजासत्ताकाची राजधानी स्थापन करण्यात आली. या सरकारच्या अधिकारात १९३३ पर्यंत दक्षिणेकडील सहा प्रांत होते.

दक्षिणेकडे साम्यवादी पक्षाच्या वाढत्या प्रभावामुळे कोमिटांग सरकारचे आसन डळमळीत होऊ लागले. त्याकडे दुर्लक्ष केल्यास तो पक्ष कोमिगटांगला एक प्रबळ प्रतिस्पर्धी होऊन बसेल अशी भीती चॅग-कै-शेकला भेडसावू लागली त्यामुळे साम्यवादी पक्षांचे देशातून समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार चॅगने केला. त्यासाठी त्याने १९३३ नंतर साम्यवाद्यांविरूद्ध एकूण पाच मोठ्या लष्करी मोहीमा काढल्या.

कोमिटांग सरकारने केलेल्या लष्करी आक्रमणाविरूद्ध साम्यवादी सैन्याने बरेच दिवस निकराने तोंड दिले. गनिमी काव्याने प्रतिकार करून कोमिटांग सैन्याला त्रस्त करून सोडले. शेवटी पाचव्या मोहिमेच्या वेळी दहा लक्ष सैनिकांसह चॅग-कै-शेकने साम्यवाद्यांच्या मुख्य तळांवर हल्ला चढविला. साम्यवाद्यांचा प्रभाव असलेल्या प्रदेशांवर बॉम्ब हल्ले केले. त्यात शेकडो निरपराध नागरिकही मारले गेले. दहा लक्ष साम्यवादी आणि शेतकरी यांची हत्या झाली. किआंगशी प्रांत बेचिराख केला.

## साम्यवाद्यांची प्रदीर्घ पदयात्रा (Long March)

चॅगच्या पाचव्या मोहीमेच्या वेळी सर्व बाजूंनी सुरू झालेल्या माऱ्याला तोंड देणे कठीण झाल्यामुळे, दक्षिणेतील तळ सोडून उत्तरेकडे झांसी प्रातांत जाण्याचा साम्यवादी नेत्यांनी निर्णय घेतला. सुमारे एक लक्ष साम्यवादी आपल्या कुटुंबासह उत्तरेकडे जाण्यास निघाले. किआंगशी ते झान्सी हे अंतर ६००० मैलाचे होते. कोमिंगटांगचे हल्ले चुकवीत व नैसर्गिक संकटांशी तोंड देत साम्यवाद्यांना हा खडतर प्रवास करावयाचा होता. ह्या रोमांचकारी संघर्षमय मार्गक्रमणालाच 'साम्यवाद्यांची प्रदीर्घ पदयात्रा' (Long March) असे म्हणतात.

उत्तरेकडे निघालेले हे साम्यवादी सुमारे दोन वर्षांनंतर उत्तर चीनमधील मेनान या ठिकाणी येऊन पोहचले. सहा हजार मैलांचा हा प्रवास करीत असताना त्यांना नाना प्रकारच्या नैसर्गिक आपत्तींना व चॅगच्या हल्ल्यांना तोंड द्यावे लागले. कोमिंगटांगचा मारा, बॉम्ब वर्षाव सातत्याने त्यांच्यावर सुरू होता. या मार्गक्रमणात कधी शत्रूला तोंड देत तर कधी बचावासाठी माघार घेत असता, दुष्काळ, रोगांच्या साथी, अतिश्रम यामुळे हजारो लोक मृत्यूमुखी पडले. या प्रवासात त्यांनी बारा प्रांत पायी तुडविले, अठरा पर्वत रांगा व चोवीस नद्या ओलांडल्या. या सर्व अग्नी दिव्यातून जगले-वाचलेले केवळ वीस हजार लोक नियोजीत स्थानी येवून पोहचले. निरनिराळ्या प्रकारच्या अडचणीतून तावून सुलाखून निघालेले ते पोलादी शक्तीचे व निर्धाराचे साम्यवादी भविष्यात कोणत्याही प्रकारच्या संकटाविरुद्ध जिद्दीने लढण्यास व परिस्थितीवर मात करण्यास सिद्ध झाले.

माओने प्रवासात शेतकरी, कामगार, ग्रामीण जनतेच्या भेटी घेवून जनजागृती केली, कम्युनिस्ट क्रांतीची महती पटविली आणि आपल्या लढ्याला भरपूर पाठिंबा मिळविला.

## क) १९४९ ची माओ क्रांती :-

उत्तरेकडे निघालेले हे साम्यवादी सुमारे दोन वर्षांनंतर उत्तर चीनमधील येनान या ठिकाणी येऊन पोहचले. साम्यवादी नेत्यांनी येनान येथे नवी राजधानी स्थापन केली. जवळपासच्या ग्रामीण भागात पक्षाची ध्येयधोरणे व जपान विरोधी भूमिकेचा प्रचार करण्यास त्यांनी सुरूवात केली. शेन्सी व कान्सू या प्रांतात त्यांनी आपला जम बसविला. मोठे जमीनदार, व्यापारी व कोमिंगटांगचे मोठे अधिकारी यांची मालमत्ता जप्त करून ती गरीब शेतकऱ्यांना वाटून देण्यात आली. शेतकऱ्यांना शेती सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या मदतीबरोबर क्रांतीच्या तत्त्वज्ञानाचीही शिकवण दिली. उत्तरेकडील त्यांच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशाच्या लगत रशियाची सीमा असल्याने रशियातून युद्धसाहित्य मिळविणे सुलभ झाले.

चैग-कै-शेकने, उत्तरेकडील प्रदेशातूनही साम्यवाद्यांचा पूर्ण नि:पात करण्याच्या हेतूने त्यांचा पाठपुरावा केला. परंतु त्याचे सैनिक साम्यवादी पक्षाच्या सैनिकांच्या संपर्कात आल्यानंतर त्या पक्षाच्या विचारसरणीचा प्रभाव त्यांच्यावरही पडू लागला. चाँगचा लष्करी अधिकारी चांग-सू-लीनला साम्यवाद्यांच्या प्रखर राष्ट्रभक्तीची व प्रामाणिकपणाची खात्री पटली. उत्तरेकडे जपानला साम्यवाद्यांनी केलेला विरोध त्याने पाहिला होता. लाल सेनेच्या प्रतिकारामुळे जपानच्या आक्रमणाला पायबंद बसल्याचे त्याच्या ध्यानात आले होते. देशात शत्रू घुसला असता आपसात लढत राहून आपली शक्ती खच्ची करणे, आपल्याच भाऊबंदावर गोळ्या झाडणे हा शुद्ध मूर्खपणा आहे. असे चांग-सू-लीनला वाटू लागले. त्यामुळे त्याने साम्यवाद्यांशी निकराने लढा दिला नाही. उलट साम्यवाद्यांशी सुरू असलेल्या लढ्याची पहाणी करण्यासाठी आलेल्या चँग-कै-शेकला चांग सू लीने अटक केली. एवढेच नाहीतर साम्यवाद्यांविरुद्ध चॅगने स्विकारलेले धोरण आडमुठेपणाचे आहे तसेच देशाच्या दृष्टीने विघातक असे आहे. हे त्याने चॅग-कै-शेकला पटवून दिले. संयुक्तरत्या देशाच्या शत्रूला तोंड देण्याची त्याने चॅगला गळ घातली. सुमारे दोन आठवड्यानंतर त्याला यश मिळाले. साम्यवादी गटाचा प्रतिनिधी चौ-एक-लाय व चैग-कै-शेक यांच्यात वाटाघाटी होवून जपान विरूद्ध संयुक्त आघाडी उभारण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला गेला. साम्यवादी व कोमिंगटांग दोन्ही पक्षांनी तडजोड मान्य केली.

डिसेंबर १९३६ च्या या तडजोडीनंतर चॅगची मुक्तता करण्यात आली. देशातील अंतर्गत यादवी, दुही संपून ऐक्य साध्य झाल्याने, जपान विरूद्ध अधिक परिणामकारकरित्या प्रतिकार करता येईल. अशी खात्री राष्ट्रवाद्यांना वाटू लागली. राष्ट्रीय संरक्षणाच्या योजना आखताना साम्यवाद्यांशी विचार-विनीमय करण्याचे चॅगने मंजूर केले. त्याप्रमाणे चौ-एन-लाय नानकिंगला आला. राष्ट्रीय संरक्षणासाठी स्थापन झालेल्या प्रतिनिधी मंडळात त्याचा समावेश करण्यात आला.

कोमिंटांग व साम्यवादी पक्ष यांच्यातील समझोत्यामुळे जपान अस्वस्थ झाले. अंतर्गत दुहीमुळे कोमिंगटांग सरकारला जपानचा बंदोबस्त करता आला नाही. त्यामुळे जपानला बिनधोकपणे उत्तर चीनमध्ये पाय पसरता आले. चीन मधील अंतर्गत संघर्ष संपुष्टात आल्यानंतर कोमिंगटांग सरकारचे हात मजबूत होतील आणि जपानला होणारा प्रतिकार प्रखर होईल अशी भीती जपानला वाटू लागली. त्यामुळे जपानने चीनवर हल्ला करण्याचा निर्णय घेतला.

लॉग मार्चच्या खडतर प्रवासानंतर माओने अंतर्गत यादवीला तात्पुरती स्थगिती दिली आणि कोमिंगटांग पक्षाबरोबर युती केली. याचवेळी जपानने मांचुरिया जिंकून घेतला. १९३७ मध्ये चीनवर स्वारी करून जपानने नानकिंग येथे आपले सरकार स्थापन केले. परकीय आक्रमणाचा चीनला हादरा बसला. यावेळी दुसरे महायुद्ध सुरू होते आणि दोस्त राष्ट्रांच्या बाजूने चीनने युद्धांत प्रवेश केलेला असल्यामुळे दोस्त राष्ट्रे धास्तावून गेली. जपानने पर्ल हार्बरवर हल्ला केल्यामुळे अमेरिकेने जपानविरुद्ध युद्ध सुरू केले. चीनच्या दृष्टीने ही घटना उपकार ठरली. अमेरिकेने चीनमधील जपानी ठाण्यांवर व जपानवर ही अविरत बाँब वर्षाव सुरू केला. अमेरिकेने १९४५ मध्ये जपानवर अणुबाँब टाकले म्हणून जपानने शरणागती स्विकारली. त्यामुळे चीनवरील जपानचे वर्चस्व संपुष्टात आले.

यानंतर मात्र पुन्हा चीनमध्ये कोमिंटांग व कम्युनिस्ट यांच्यात अंतर्गत संघर्ष सुरू झाला. जागतिक राजकारणातही बदल होऊन अमेरिका व रशिया यांच्यात शीत युद्धाची सुरूवात झाली. त्यामुळे चीनी यादवी युद्धाला वेगळे वळण लागले. अमेरिकेने चैग-कै-शेकला तर रशियाने माओला सर्वतोपरी सहाय्य केले. रशियाच्या मदतीमुळे माओ व कम्युनिस्टांचा आत्मविश्वास आणि सामर्थ्य वाढले. कम्युनिस्टांबरोबर सुरू असलेल्या संघर्षात अनेक ठिकाणी चॅगला पराभव पत्करावा लागला. ऑक्टोबर १९४९ मध्ये माओने राजधानी नानकिंग जिंकून घेतली. कोमिंटांग पक्षाचा राजीनामा देवून चॅग फार्मोसा बेटावर आश्रयाला गेला. तेथेच त्याने अमेरिकेच्या साह्याने 'राष्ट्रीय चीनची' स्थापना केली. १९४९ पर्यंत कम्युनिस्ट पक्षाने संपूर्ण चीन जिंकून घेतला. माओची लाल शेतकरी क्रांती यशस्वी झाली आणि जगात सामर्थ्यशाली 'लाल' चीनचा उदय झाला. गर्हणीय विश्वासघातकी कृत्यांमुळे चॅगची व कोमिंगटांग पक्षाची देशात व जगात नाचक्की झाली. माओच्या लाल चीनने नवीन इतिहास घडविला. जगात अमेरिका व रशिया प्रमाणे 'चीन' ही तिसरी शक्ती निर्माण झाली.

## साम्यवाद्यांना चीनमध्ये मिळालेल्या यशाची कारणे :-

इ.स. १९३७ मध्ये चॅग-कै-शेकला कम्युनिस्टांशी थोडे नमते घ्यावे लागले. कारण याचवेळी जपानने चीनवर आक्रमण केले होते. तसेच दुसरे महायुद्ध सुरू झालेले होते. जपानी सैन्याला कम्युनिस्ट चीनी सेनेने गनिमी काव्याचा वापर करून हैराण केले होते. कोमिंगटांग सेनेने दिला नसेल एवढा त्रास कम्युनिस्टांच्या सेनेने दिला होता.

जपानने पर्लहार्बरवर हल्ला केला. त्यामुळे अमेरिकेचा अध्यक्ष रुझवेल्टने चीनच्या राष्ट्रीय सरकारला साहाय्य करण्याचे धोरण स्विकारले चॅग-कै-शके आणि माओ-से-तुंग यांच्यात समझोता घडवून आणण्याचा प्रयत्न केला. परंतु हा प्रयत्न सफल झाला नाही. चॅगने कम्युनिस्टांना आपल्या सरकारमध्ये सहभागी करून घेतले नाही. दुसऱ्या महायुद्धात जपानने शरणागती पत्करल्यानंतर चीनमध्ये यादवी युद्धाला सुरूवात झाली. या यादवीत सर्व आघाड्यांवर चैग-कै-शेकचा पराभव झाला व कम्युनिस्टांना यश मिळाले. त्या यशाची कारणे पुढीलप्रमाणे :-

१. रशियन जनतेप्रमाणेच चीनी जनतेला साम्यवादाची तत्वे पटली होती आणि म्हणून चीनमध्ये कम्युनिस्ट यशस्वी झाले असे म्हणता येत नाही. कोमिंगटांग राजवटीत सामान्य जनतेला जीवन जगणे कठीण झाले होते. त्यामुळे जनतेने कम्युनिस्टांना पाठिंबा दिला. त्यामुळे कम्युनिस्टांना चीनमध्ये यश मिळाले.

२. स्लाईड या इतिहासतज्ञांच्या मते यांगत्से नदीच्या खोऱ्यात एक प्रकारची पोकळी निर्माण झालेली होती. कम्युनिस्टांना कुठेही खऱ्या अर्थाने विरोध झाला नाही, त्यांना कोमिंगटांग फौजेशी कुठेही हातघाईची लढाई करावी लागली नाही.

३. डॉ. सन-यत-सेन यांनी चीनच्या स्वातंत्र्याचे रक्षण करण्यासाठी चीनच्या सांस्कृतिक, आर्थिक आणि राजकीय जीवनात बदल घडवून आणणे. या गोष्टींना प्राधान्य दिले होते. बुद्धीवादी वर्ग आणि मध्यम वर्ग यांचे संघटन घडवून आणले व त्यांचे नेतृत्व

केले. डॉ. सतू-यत-सेन नंतर ही जबाबदारी चॅग-कै-शेककडे आली. परंतु चॅगला ही जबाबदारी सांभाळता आली नाही. त्यामुळे स्वाभाविकत:च चीनमधील बुद्धीवादीवर्ग कम्युनिस्ट पक्षाकडे आकर्षित झाला.

४. माओ-त्से-तुंग यांचे प्रभावी कुशल नेतृत्व कम्युनिस्टांना अत्यंत लाभदायक ठरले. शेतकरी कामगार यांच्या मोठ्या संघटना कम्युनिस्टांनी उभारल्या. या संघटनांना गनिमी काव्याच्या युद्धाचे प्रशिक्षण कम्युनिस्टांनी दिले. माओच्या लाल सेनेला अत्यंत शक्तीशाली क्षेत्र म्हणून प्रसिद्धी मिळाली. या सेनेचा मुकाबला कोमिंगटांग सेनेला करता आला नाही.

साम्यवादी पक्षातील शिस्त, प्रभावी संघटन, नि:स्वार्थी पक्ष जनतेच्या कल्याणासाठी अविरत झटण्याची सिद्धता, तत्वनिष्ठेबरोबरच सामान्य जनतेत मिसळून त्यांच्या गरजा, अडचणी व समस्या समजावून घेऊन तद्नुरूप धोरण निर्धारीत करण्याची वास्तववादी वृत्ती, कुशल प्रचार, माओ-त्से-तुंग व त्याचे सहकारी यांचे प्रभावी व प्रेरणादायी नेतृत्व त्यामुळे चीनमधील सर्वच वर्गांचा त्यांना 'पाठिंबा' मिळाला. कोमिंगटांग पक्षाचा पूर्ण पराभव होवून चीनमध्ये साम्यवादी सरकार प्रस्थापित झाले. साम्यवादी चनीला आता संयुक्त राष्ट्रसंघामध्ये प्रवेश मिळाला असून अमेरिकाही चीनशी चांगले संबंध प्रस्थापित करण्याच्या प्रयत्नात आहे.

## ई) माओ-त्से-तुंग :-

आधुनिक साम्यवादी चीनी क्रांतीचा प्रणेता माओ-त्से-तुंग याचा जन्म २६ डिसेंबर १८९३ साली सिऑग-शान जिल्ह्यातील एका छोट्या गावात झाला. त्याचे वडील गरीब शेतकरी होते. शालेय शिक्षणानंतर माओने काही वर्षे गावातच शेती व्यवसायात घालविली. त्याला वाचनाचा अतिशय नाद होता. सिआँग या पाश्चिमात्य शिक्षण संस्थेतील शिक्षण संपवून १९११ च्या सुमारास उच्च शिक्षणासाठी माओ चाँगशा शहरात आला. १९११ च्या क्रांतीनंतर माओने हुनान प्रांतात पाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचा अभ्यास केला. हुनान येथील नॉर्मल स्कूलमध्ये त्याने पाच वर्षे अध्ययनात घालविली. यानंतर तो क्रांतीकारकाच्या सहवासात आला आणि विद्यार्थ्यांनी चालू केलेल्या चळवळीत त्याने सक्रीय भाग घेतला. पुढे पेकिंग विद्यापीठात त्याला ग्रंथपाल सहाय्यकाची नोकरी मिळाली. तेथेच त्याचे साम्यवादी नेत्यांशी संबंध प्रस्थापित झाले. येथूनच त्याचे क्रांतीकारी जीवन सुरू झाले. मार्क्सवादावर त्याची नितांत श्रद्धा बसली. १९२१ मध्ये स्थापन झालेल्या साम्यवादी पक्षाचा तो सदस्य बनला चेन-तु-त्सु आणि ली-ता-चाव या साम्यवादी पण स्वतंत्र विचारवंतांच्या लिखाणाचा प्रभाव माओच्या विचारांवर पडला होता.

हुनान प्रांतात माओने साम्यवादी क्रांतीची सुरूवात केली. माओने शेतकरी वर्गाला संघटीत केले आणि आपले सर्व लक्ष शेतकऱ्यांना कम्युनिस्ट क्रांतीचे अग्रदूत बनविण्यावर केंद्रीत केले. १९२७ मध्ये चीनमधील कम्युनिस्ट-कोमिंटांग युती भंग पावल्या नंतर माओने स्वतंत्रपणे लाल सेना संघटीत करण्यात पुढाकार घेतला. या लाल सेनेला गनिमी काव्याचे शिक्षण दिले. माओचे युद्ध विषयक धोरण त्याने स्वत:च व्यक्त केले आहे. people are

the sea, we are the fish, as long as we can swim in that sea. we will survive. जनता रूपी सागरात आम्ही जोपावेतो माश्यासारखे पोहू शकतो. तो पावेतोच आम्हाला स्वत:चा बचाव करणे शक्य होईल अशी माओची धारणा असल्याने कम्युनिस्ट कार्यकर्ते निर्धन कामगार व किसान वर्गाला प्रस्थापित भांडवलवादी आर्थिक अवस्था आमूलाग्र बदलवून टाकण्यासाठी कम्युनिस्टांनी एकत्र यावे. यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू केले. माओ-त्से-तुंगने ७ नोव्हेंबर १९३१ रोजी हुनान आणि क्वाँगसीमा प्रांतात 'चायनीज सोव्हिएट रिपब्लिक' स्थापना केल्याने त्या प्रांतातील जनतेला दिलासा मिळाला.

माओ-त्से-तुंग चीनी साम्यवादी क्रांतीचा अर्ध्वयू व नंतरच्या साम्यवादी शासनाचा अध्यक्ष होता. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक हालअपेष्टा सहन करून त्याने १९४९ ची क्रांती यशस्वी केली आणि चीनला मुक्त करून उन्नतीचा मार्ग दाखविला. माओने 'चीनी साम्यवादाची' वैशिष्ट्यपूर्ण पद्धती कार्यान्वित केली. कम्युनिस्ट क्रांतीच्या वेळी ज्या यातना त्याला व त्याच्या पक्षाला सहन कराव्या लागल्या त्यातून निर्दयी कठोर शिस्तीच्या माओचे व्यक्तीमत्व तयार झाले. कोणत्याही परिस्थितीवर मात करण्याचे धैर्य त्याच्या ठायी होते. कठोर शिस्तीमुळेच क्रांतीनंतर चीनचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक विकास त्याला घडवून आणता आला. अमेरिका-रशिया सारख्या महासत्तांशी धाडशी मुकाबला करीत त्याने चीनच्या आंतरराष्ट्रीय नितीने नियोजन केले आणि लाल चीनची तिसरी शक्ती उभी केली; जगात चीनचा दबदबा निर्माण केला.

माओ-त्से-तुंगची भाषणे, वृत्तपत्रे-नियतकालिकातील लेख व विविध ग्रंथातून माओची वैचारिक भूमीका स्पष्ट होते. साम्यवादी क्रांतीचे व साम्यवादी व्यवस्थेचे विचार त्याने 'हुनान' प्रबंधातून व्यक्त केले आहे. इ.स. १९५४ साली साम्यवादी चीनची घटना तयार करण्यात आली. त्यानुसार चीनमध्ये श्रमजीवी कामगार व शेतकऱ्यांचे समाजवादी लोकशाही राज्य स्थापन करण्यात आले. अठरा वर्षावरील स्त्री-पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला. १९५४ मध्ये सार्वत्रिक निवडणुका घेऊन लोकसभेची निर्मिती केली. ह्या लोकसभेने नवीन घटनेला मंजूरी दिली. माओ स्वत: राष्ट्र प्रमुख पक्ष प्रमुख प्रजासत्ताकाचा अध्यक्ष संरक्षण समितीचा अध्यक्ष होता. संपूर्ण सत्ता माओच्या हाती केंद्रीत झालेली होती.

## ५:३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-

१) दुसऱ्या महायुद्धाची कारणे स्पष्ट करा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

२) दुसऱ्या महायुद्धाचे परिणाम सांगा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

३) आशिया खंडातील राष्ट्रवादी चळवळीची कारणे स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

४) आफ्रिका खंडातील राष्ट्रवादी चळवळीची कारणे स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

५) चीनमधील साम्यवादी क्रांतीची सविस्तर माहिती द्या.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

**सरावासाठी प्रश्न**

१) हिटलर आणि मुसोलिनी यांचे आक्रमक धोरण स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

२) चीनमध्ये साम्यवादी क्रांतीच्या यशाची कारणे स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

३) दुसऱ्या महायुद्धाचे स्वरूप स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

**टिपा लिहा.**

१) डॉ. नेल्सन मंडेला

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

२) माओ-त्से-तुंग

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

## ५:४ सारांश

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर व्हर्सायच्या राजवाड्यात पॅरिस शांतता परिषद भरली. या परिषदेने पहिल्या महायुद्धास कारणीभूत ठरलेल्या जर्मनीवर अनेक कठोर अटी लादल्या. पहिल्या महायुद्धाची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून अमेरिकेच्या पुढाकाराने राष्ट्रसंघाची निर्मिती करण्यात आली आणि जागतिक शांततेची जबाबदारी राष्ट्रसंघावर सोपविण्यात आली. परंतु अवघ्या २० वर्षातच जग पुन्हा युद्धाच्या खाईत लोटले गेले.

व्हर्सायच्या तहाची तीव्र प्रतिक्रिया पराभूत राष्ट्रांमध्ये हुकूमशाही सत्तांचा उदय झाला. हिटलर आणि मुसोलिनी यांच्या आक्रमक धोरणापासून बचाव करण्यासाठी युरोपियन राष्ट्रांनी परस्परांशी करारनामे करून आपआपले गट निर्माण केले. युरोपचे पुन्हा दोन गटात विभाजन झाले. या गटातील असूया, अविश्वासाच्या वातावरणामुळे दुसरे महायुद्ध सुरू झाले.

व्हर्सायचा अपमानकारक तह, राष्ट्रसंघाची दुर्बलता, नि:शस्त्रीकरण योजनेचे अपयश, हिटलर आणि मुसोलिनी यांचे आक्रमक धोरण आणि इतर घटना दुसऱ्या महायुद्धास कारणीभूत ठरल्या. जपानने पर्ल हर्बरवर हल्ला केल्यामुळे अमेरिकेने युद्ध प्रवेश करून जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरांवर अणुबॉम्ब हल्ले केले. यानंतर दुसरे महायुद्ध संपले. या युद्धात वित्त व जीवितहानी मोठ्या प्रमाणावर झाली. युरोपियन साम्राज्यवादाची पिछेहाट होऊन आफ्रिका–आशिया खंडांतील परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळाले त्यामुळे वसाहतवादाचे, साम्राज्यवादाचे विघटन झाले. हुकूमशाहीचा अस्त झाला. जगाला पुन्हा अशा प्रकारच्या युद्धाला सामोरे जावे लागू नये. म्हणून संयुक्त राष्ट्रसंघटना या नावाच्या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना करण्यात आली.

साम्यवादी रशियाप्रमाणेच चीनमध्ये माओ–त्से–तुंगच्या प्रेरणेने साम्यवादी क्रांती घडून आली. चीनमधील साम्यवादी पक्षाने सत्तारुढ कोमिंगटांग पक्षांशी प्रदीर्घ संघर्ष करून यश मिळविले. चॅग–कै–शेकने साम्यवाद्यांच्या बंदोबस्तासाठी एकंदर पाच मोहिमा काढल्या. साम्यवाद्यांनी प्रदीर्घ पदयात्रा करून (डेपस चरीलह) करून चॉगच्या हल्ल्यांना तोंड दिले. शेवटी या संघर्षात साम्यवाद्यांना यश मिळाले आणि चीनमध्ये साम्यवादी प्रजासत्ताकाची स्थापना झाली. माओच्या लाल चीनने नवीन इतिहास घडविला. जगात अमेरिका व रशियाप्रमाणे 'चीन' ही तिसरी शक्ती निर्माण झाली. याचे सारे श्रेय चीनी क्रांतीचा प्रणेता माओ–त्से–तुंग यास जाते.

## ५:५ पारिभाषिक शब्द :–

| | | |
|---|---|---|
| साम्यवादी पक्ष | – | समान विचार सरणीतून एकत्रित आलेली मंडळी |
| राष्ट्रवादी चळवळी | – | राष्ट्रवादी भावनेने सुरू केलेली चळवळ |
| अनुनय | – | मनधरणी करणे |

## ५:६ संदर्भसूची :–


| | |
|---|---|
| १) कदम य. ना. | जागतिक घडामोडींचा इतिहास |
| २) जोशी पी. जी. | विसाव्या शतकातील जग |
| ३) कोठेकर शांता व डॉ. सुमन वैद्य | आधुनिक जग |
| ४) शरावती शिरगावकर | आधुनिक युरोप |
| ५) सदाशिव आठवले | आधुनिक युरोप |
| ६) प्रा. माळी एम. एन. | आधुनिक चीनचा इतिहास |
| ७) डॉ. गाढाळ साहेबराव | आधुनिक जगाचा इतिहास |
| ८) प्रा. राऊत, प्रा. उदगावकर | पहिल्या महायुद्धानंतरचे जग |
| ९) डॉ. देवपुजारी मु.बा. | आधुनिक आशियाचा इतिहास |
| १०) palmer, R. R. and Cotton Jeel | History of the modern world |

# घटक ६
# जागतिक शांतता आणि मानवी विकास

## अनुक्रमणिका

६.० उद्दिष्टे
६.१ प्रस्तावना
६.२ विषय विवेचन –
६.२.१ युनो आणि जागतिक शांततेची संकल्पना
६.२.२ नागरी हक्क चळवळ : वर्णभेद विरोध
६.२.३ स्त्रियांच्या चळवळी
६.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न
६.४ सारांश
६.५ पारिभाषिक शब्द
६.६ संदर्भसूची

## ६.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१) संयुक्त राष्ट्रसंघाची रचना अभ्यासता येईल.
२) संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य अभ्यासता येईल.
३) संयुक्त राष्ट्रसंघाचे जागतिक शांतता स्थापनेतील योगदान अभ्यासता येईल.
४) आफिकेतील वर्णभेद विरोधी चळवळ अभ्यासता येईल.
५) आफिकेतील वर्णभेद विरोधी चळवळीतील डॉ. नेल्सन मंडेलांचे कार्य अभ्यासता येईल.
६) अमेरिकेतील वर्णभेदाचे स्वरूप अभ्यासता येईल.
७) डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांचे कार्य अभ्यासता येईल.
८) जागतिक पातळीवरील स्त्रीवादी चळवळीचा उदय व विकास अभ्यासता येईल.
४) भारतातील स्त्रीवादी चळवळ अभ्यासता येईल.

## ६.१ प्रस्तावना

१४ ऑगस्ट १९४५ रोजी दुसरे महायुद्ध संपुष्टात आले. या महायद्धात जर्मनीचा पराभव होण्यास अनेक कारणे कारणीभूत ठरली. त्यातील महत्त्वाचे कारण म्हणजे हिटलरने

दोन आघाड्यांवर हे युद्ध लढण्याचा घेतलेला निणर्य व त्यामध्ये त्याला आलेले अपयश होय. दुसऱ्या महायुद्धाचा कालखंड १९३९ ते १९४५ असा होता. या काळात जगात प्रचंड मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्तहानी घडून आली. त्यामुळे मानवी जीवनाच्या विकासासाठी व जागतिक शांतता निर्माण व्हावी या हेतूने आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याची गरज निर्माण झाली. त्यामधूनच २४ ऑक्टोबर १९४५ मध्ये युना/संयुक्त राष्ट्रसंघ या आंतरराष्ट्रीय संघटनेची स्थापना झाली.

## ६.२ विषय विवेचन

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक पातळीवर शांतता निर्माण करण्यात व टिकवून ठेवण्यात संयुक्त राष्ट्रसंघाने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. राष्ट्राराष्ट्रातील संषर्घ शांततेच्या मार्गाने सोडवण्यावर भर संयुक्त राष्ट्रसंघाने दिला. त्यामुळे तिसरे महायुद्ध टळले गेले असे म्हणता येईल. डॉ. नेल्सन मंडेलाच्या नेतृत्वाखाली आफ्रिकेतील निग्रोंनी लढा देऊन आपल्यावरील अन्याय संपुष्टात आणला. डॉ. मार्टन ल्युथर किंग यांनी अमेरिकेतील निग्रोंवरील होणार अन्याय व अत्याचार संपुष्टात आणाल. स्त्रीवादी चळवळीच्या माध्यमातून स्त्रीयांनी आपले हक्क मिळवले. या सर्वांचा अभ्यास आपण सदर घटकात करणार आहोत.

### ६.२.१ युनो आणि जागतिक शांततेची संकल्पना

दुसरे महायुद्धाच्या समाप्तीनंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना झाली. या युद्धाची व्याप्ती व भिषणता फार मोठी होती. संहाराचा वेग प्रचंड होता आणि जगातील लहानमोठी राष्ट्रे, वसाहती या युद्धामध्ये होरपळल्या होत्या. हिरोशीमाव नागासी येथील बॉम्ब हल्याने तर मानवजात नष्ट होते की काय अशी? अशी परिस्थिती निर्माण झाली हाती. या दुसऱ्या महायुद्धात विजयी व पराभूत अशा दोन्ही गटातील राष्ट्रांची अपरिमीत हानी झाली होती. दुसऱ्या महायुद्धात वापरण्यात आलेल्या भयानक शस्त्रास्त्रांमुळे व अण्वस्त्रांच्या वापरामुळे पयावरणाच्या समस्या निर्माण झाल्या होत्या. मानव जात टिकवायची असेल तर शांततेसाठी जागतिक पातळीवर संघटना पुन्हा एकदा निर्माण केली पाहिजे असे जागातील अनेक राष्ट्रांना वाटत होते. अमेरिकन राष्ट्राध्यक्ष फ्रॅंकलीन रूझवेल्टने अमेरिकेचा दुसऱ्या महायुद्धातील प्रवेशाचा हेतू स्पष्ट करताना म्हटले होत की, जगातल्या सर्व माणसांना विचारस्वातंत्र्य, धर्मस्वातंत्र्य, दारिद्र्य मुक्ती व भयमुक्तीची प्राप्ती होण्यासाइी अमेरिका लढत आहे. शेवटी अमेरिकेच्या पुढाकाराने २४ ऑक्टोबर १९४५ या दिवशी संयुक्त राष्ट्रसंघटनेची म्हणजे युनोची स्थापना झाली. अमेरिकेच्या न्यूयॉर्क शहरामध्ये या संघटनेचे कार्यालय सुरू करण्यात आले. आज युनोच्या सभासद राष्ट्रांची संख्या १८२ पेक्षा जास्त आहे. युनोच्या स्थापनेची पार्श्वभूमी पुढीलप्रमाणे आहे.

#### लंडनचा जाहीरनामा

१४ जुलै १९४१ रोजी लंडन मेथे दोस्त राष्ट्रांची एक परिषद भरली होती. या परिषदेस १४ राष्ट्रांचे प्रतिनिधी हजर होते. या परिषदेत सर्व देशांच्या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या केलेला एक जाहिरनामा ठरविण्यात आला. देशादेशांमध्ये शांततापूर्ण व स्वेच्छापूर्ण सहकार्य वाढीस लागून चिरस्थायी शांतता निर्माण झाली पाहिजे. हे सहकार्य भयमुक्त

असून आर्थिक व सामाजिक सुरक्षिततेने युक्त असले पाहिजे आणि हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व देशांनी युध्दकाळात व शांतता काळात प्रयत्न केले पाहिजेत असे लंडनच्या जाहीरनाम्यात ठरविण्यात आले.

## अटलांटिक सनद

संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्मीतीमधील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून या सनदेकडे पाहिले जाते. इंग्लंडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल व अमेरिकेच अध्यक्ष फ्रँकलीन रूझवेल्ट हे दोघे अटलांटिक महासागरामध्ये एका युद्धनौकेवर भेटले. त्या चर्चेत आंतरराष्ट्रीय संघटनेस रूझवेल्टने 'संयुक्त राष्ट्र संघ' असे नाव सुचविले. या सनदेत पुढील गोष्टींचा समावेश होता.

१. सर्व राष्ट्रांना समान लेखणे.

२. कोणत्याही राष्ट्रांच्या संबंधित लोकांच्या इच्छेशिवाय त्यांच्या भूप्रदेशात फेरबदल न करणे.

३. आंतरराष्ट्रीय व्यापारात समानता निर्माण करणे.

४. मजुरांची स्थिती सुधारणे.

५. सर्व देश नाझीवादाच्या भितीपासून मुक्त व्हावेत.

६. नि:शस्त्रीकरणांचा मार्ग अवलंबिणे.

७. देशांना युद्धापासून परावत्त करणे.

८. हुकूमशाहीचे संकट संपल्यानंतर शांतता व सुरक्षितता निर्माण करणे.

## अमेरिकेच्या व्हाईट हाऊस मधील घोषणा

१ जानेवारी १९४२ रोजी इंग्लंड, अमेरिका, रशिया व चीन या देशांच्या नेत्यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या घोषणा पत्रकावर सहया केल्या. त्यानंतर २२ देश त्यामध्ये सहभागी होऊन एकूण २६ देशांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या निर्मितीस मान्यता दिली. हिटलर विरूध्द एक समर्थ संघटना निर्माण करणे हा मुख्य उद्देश या पाठीमागे होता.

## मॉस्को परिषद

३० आक्टोबर १९४३ रोजी इंग्लंड, अमेरिका, रशिया, चीन या देशांच्या प्रतिनिधींनी एकत्र येऊन एका घोषणेवर सहया केल्या. त्यानुसार आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यासाठी समानतेच्या तत्वावर एक आंतरराष्ट्रीय संघटना स्थापन करण्याचे ठरविण्यात आले. या संघटनेत सर्व राष्ट्रांना सहभागी होता येणार होते.

## तेहरान परिषद

१ डिसेंबर १९४३ रोजी चर्चिल, रूझवेल्ट व स्टॅलिन यांनी इराणची राजधानी तेहरान येथे एक संयुक्त जाहीरनामा प्रसिध्द केला. जगात शांतता निर्माण होण्यासाठी जगातील

लहानमोठया राष्ट्रांची एक परिषद असावी असे जाहिरनाम्यात म्हटले होते. या सर्व परिषदांमध्ये संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या स्थापनेची पार्श्वभूमी तयार होत होती.

डम्बर्टन ओक्स परिषद

वॉशिंग्टन जवळील डम्बर्टन ओक्स येथे २१ ऑगस्ट ते ७ आक्टोबर १९४४ या काळात अमेरिका, रशिया, चीन व इंग्लंड यांच्यात परिषद होऊन आंतरराष्ट्रीय संघटनेची रूपरेषा ठरविण्यात आली.

### याल्टा परिषद

११ फेब्रुवारी १९४५ रोजी क्रिमीयातील याल्टा शहरामध्ये अमेरिका, इंग्लंड, रशिया हे तीन देश एकत्र येऊन बडया राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रसंघटनेत नकाराधिकार (Veto power) असावा व जर्मनीवर नियंत्रण ठेवण्यात यावे यावर एकमत झाले.

### सॅनफ्रान्सिस्को परिषद

अमेरिकेतील सॅनफ्रान्सिस्को शहरामध्ये २५ एप्रिल १९४५ रोजी ५१ देशांचे ८५० प्रतिनिधी असलेली परिषद सुरू झाली. या परिषदेत संयुक्त राष्ट्रसंघाचा जाहीरनामा तयार झाला. यावेळी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांनी भाषण करून आंतरराष्ट्रीय संघटना स्थापण्याचे प्रयत्न केले जातील असे म्हटले.

### संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना

२४ ऑक्टोबर १९४५ रोजी संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना झाली. त्यामुळेच २४ ऑक्टोबर हा दिवस 'युनो दिन' म्हणून पाळला जातो. संयुक्त राष्ट्रसंघाचे मुख्य कार्यालय अमेरिकेतील न्यूयॉर्क शहराजवळ मॅनहॅटन या बेटावर उभारण्यात आले आहे.

### युनोचा सरनाया (Preamble of UNO)

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेमध्ये १०,००० शब्द १९ विभाग आणि १११ उपविभाग आहेत. युनोच्या घटनेत पुढील सरनाया आहे. 'युद्धाच्या ज्या भीषण आपत्तीने आमच्या आयुष्यात दोन वेळा मानवजातीस अतोनात दुःखात लोटले. त्यापासून भावी पिढयांच्या बचावासाठी, मानवजातीचे मुलभूत हक्क, मानवाची प्रतिष्ठा व योग्यता स्त्री व पुरूष आणि छोटी मोठी राष्ट्रे यांच्या समान हक्कावरील श्रध्दा व्यक्त करण्यासाठी या संघटनेची उभारणी आम्ही युनोचे सभासद करीत आहोत.'

### संयुक्त राष्ट्र संघाची उद्दिष्ट्ये (objectives of UNO)

१. जगात शांतता व सुरक्षितता राखणे.

२. राष्ट्राराष्ट्रामध्ये मित्रत्वाचे संबंध निर्माण करणे.

३. आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवी प्रश्नांची सोडवणूक करणे.

४. आंतरराष्ट्रीय शांतता भंग झाल्यास कायद्याच्या आधारे सामुदायिक उपायोजना करणे.

५. स्वयंनिर्णयाच्या तत्वाला मान्यता देणे.

६. सर्व राष्ट्रांचे संघटनेच्या कार्यात सहकार्य वाढविणे व जागतिक सुसंवाद आणि ऐक्य राखण्याचा प्रयत्न करणे.

वरील प्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये जाहीर करण्यात आली. याशिवाय जागतिक शांतता टिकविण्याची जबाबदारी ही सर्व राष्ट्रांची संयुक्त जबाबदारी आहे असे ठरविण्यात आले.

## संयुक्त राष्ट्रसंघाची तत्त्वे

१. सभासद देशांचे सार्वभौमत्व व समानता या गोष्टी अभंग आहेत. सर्व देशांना समान दर्जा आहे.

२. प्रत्येक सभासद देशाने राष्ट्रसंघाच्या सनदेनुसार त्याच्यावर टाकलेल्या जबाबदाऱ्या सचोटीने पार पाडणे अगत्याचे राहिल.

३. आंतरराष्ट्रीय तंटे व मतभेद शांततापूर्ण मार्गाने सोडवावेत.

४. सभासद राष्ट्रांनी राष्ट्रसंघाच्या उद्दिष्ट्यांविरूध्द कोणतीही कृती करू नये.

५. राष्ट्रसंघाच्या निमयांचा भंग करणाऱ्या कोणत्याही देशाशी सभासद देशांनी सहकार्य करू नये.

६. बिगर सभासद राष्ट्रांना संयुक्त राष्ट्रसंघ शांतता पालनासाठी सहकार्य करेल.

७. संयुक्त राष्ट्रसंघ कोणत्याही देशाच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणार नाही.

## संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्यत्वाचे इतर नियम

संयुक्त राष्ट्रसंघाचे काम जगातील प्रमुख पाच भाषांमधून चालते. चीनी, स्पॅनिश, इंग्लिश, फ्रेंच, रशियन या पाच भाषा संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामकाजासाठी वापरल्या जातात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेवेळी जे ५१ सभासद सॅनफ्रान्सिस्को येथे हजर होते त्यांना प्राथमिक सदस्य असे म्हटले जाते. इतर सदस्यांना निर्वाचित सदस्य म्हणून ओळखले जाते. सभासद होऊ इच्छिणाऱ्या राष्ट्राला राष्ट्रसंघाची उद्दिष्ट्ये, तत्त्वे, नियम मान्य करावे लागतात. सदस्य होणाऱ्या राष्ट्राला सुरक्षा समितीची शिफारस व सर्वसाधारण सभेचे २/३ बहुमत प्राप्त करावे लागते. संयुक्त राष्ट्रसंघातील अमेरिका, रशिया, फ्रान्स व चीन या पाच बडया राष्ट्रांना सुरक्षा समितीचे स्थायी सभासदत्व तसेच नकाराधिकार वापरण्यास परवानगी देण्यात आली. एखादा सदस्य स्वेच्छेने सदस्यत्वाचा राजीनामा देऊ शकतो. राष्ट्रसंघाचे वार्षिक अंदाजपत्रक सुमारे ५ कोटी डॉलरचे आहे. हा सर्व पैसा सदस्य देश सहकार्यातून उभा करतात. यामध्ये अमेरिका ३१. ९१%, रशिया १४. ९२%, इंग्लंड ७. २१%, फ्रान्स ६. ९१%, चीन ५. ७५%, कॅनडा ३. २५%, भारत १. ८५%, इतर देश २९.०२%, अशा प्रमाणात आर्थिक खर्च विभागला जातो. सध्या १९१ देश संयुक्त राष्ट्रसंघाचे सदस्य आहेत.

## संयुक्त राष्ट्रसंघाची घटक अंगे किंवा रचना

संयुक्त राष्ट्रसंघाची प्रमुख सहा घटक अंगे आहेत. या घटक अंगाच्या अंतर्गत अनेक समित्या कार्यरत आहेत. त्यांची माहिति पुढीलप्रमाणेआहे.

१. महासभा किंवा आमसभा (General Assembly) आमसभा किंवा महासभा हा युनोचा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. युनोतील सर्व सभासद देश हे महासभेचे सदस्य असतात. प्रत्येक सदस्य राष्ट्राला पाच प्रतिनिधी आमसभेवर पाठविता येतात. मात्र सदस्य राष्ट्राला एकच मत देण्याचा अधिकार असतो. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतील विभाग ४ मधील उपविभाग ९ ते २२ मध्ये सर्वसाधारण सभेची किंवा आमसभेची माहिती देण्यात आली आहे. सर्व सभासद राष्ट्रांना समान दर्जा असतो. आमसभेची वर्षातून एकदा नियमित बैठक घेणे बंधनकारक आहे. सप्टेंबर महिन्याच्या तिसऱ्या मंगळवारी आमसभेच्या अधिवेशनाला सुरूवात होते. हे अधिवेशन तीन महिन्यांपर्यंत चालते. बहुसंख्य सभासद किंवा सुरक्षा समितीच्या सदस्यांच्या विनंतीनुसार खास अधिवेशनही भरविले जाते. सर्वसाधारण सभेचा एक अध्यक्ष व सात उपाध्यक्ष असतात. प्रत्येक अधिवेशनासाठी सर्वसाधारण सभा त्यांची निवड करते. महासभेला पुढील अधिकार व कर्तव्ये आहेत.

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याची चर्चा करणे. जागतिक शांतता व सुरक्षितता यासाठी प्रयत्न करणे. नि:शस्त्रीकरण व शस्त्रास्त्र नियंत्रण स्वीकारणे.
२. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी प्रयत्न करणे, त्यासाठी उपायोजना करणे.
३. आंतरराष्ट्रीय सहकार्य, आंतरराष्ट्रीय कायद्यांची निर्मिती व विकास त्याचप्रमाणे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक व आरोग्य या संदर्भात सहकार्य करून मार्गदर्शन करणे.
४. सुरक्षा समिती व राष्ट्रसंघाच्या इतर विभांगाकडून आलेले अहवाल स्वीकारून त्यावर चर्चा करणे.
५. संयुक्त राष्ट्रसंघाचा अर्थसंकल्प मंजूर करणे व त्यास मंजुरी देणे.
६. सभासद राष्ट्रांना सभासदत्व देणे, सभासदत्व रद्द करणे, तहकूब ठेवणे इ. अधिकार महासभेला आहेत.
७. समित्यांचे सदस्य व आंतरराष्ट्रीय न्यायालयातील न्यायाधिशांची निवड करणे, सुरक्षा समितीच्या शिफारशीनुसार मुख्य सचिवाची नेमणूक करणे.
८. आंतरराष्ट्रीय संकेत व कायदे मंजूर करणे, राष्ट्रसंघाला द्यावयाच्या आर्थिक हिश्याची रक्कम निश्चीत करणे.

एखादा प्रश्न सोडविण्यामध्ये सुरक्षा समितीला अपयश आले तर महासभा त्याबाबतीत संयुक्त कार्यवाहीची विनंती करू शकते. महासभेमध्ये मतदानाची पध्दत ठरविण्यात आली आहे. सर्व महत्त्वांच्या प्रश्नावर सभेस हजर असणाऱ्या २३ सभासदांचे बहुमत आवश्यक आहे.

महासभेच्या प्रमुख सहा समित्या आहेत. या समित्या महासभेला कामकाजात मदत करतात. त्या पुढीलप्रमाणे

१. सर्व साधारण किंवा नियंत्रण समिती
२. राजकीय व सुरक्षितता समिती

३. आर्थिक व वित्तीय समिती

४. सामाजिक, मानवतावादी व सांस्कृतिक समिती

५. विश्वस्त व कायदेविषयक समिती

६. प्रशासकीय व अंदाजपत्रक समिती

या सर्व समित्या आपल्या शिफारशी चर्चेसाठी महासभेत पाठवितात व मंजुरीनंतर त्याप्रमाणे अंमलबजावणी करतात.

## २. **सुरक्षा समिती** (Security Council)

राष्ट्रसंघाच्या सनदेच्या पाचव्या विभागामध्ये सुरक्षा समितीची घटना, कार्य, अधिकार व मतदान पध्दती यांची माहिती दिली आहे. सुरक्षा समिती ही राष्ट्रसंघाची महत्त्वाची, प्रभावी व सक्रीय समिती होय. सुरक्षा समितीत एकूण १५ सदस्य असतात. त्यापैकी इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया व चीन ही ५ बडी राष्ट्रे कायम किंवा स्थायी सभासद आहेत. तर उर्वरित १० सदस्यांची आशिया, आफिका ५ सदस्य, लॅटिन अमेरिकन देश २ सदस्य, पश्चिम युरोप ३ सदस्य याप्रमाणे निवड केली जाते. सुरक्षा समिती ही सतत काम करणारी समिती आहे. सुरक्षा समिततील दोन बैठकीमध्ये १४ दिवसांपेक्षा जास्त अंतर असू नये. तसेच सुरक्षा समितीची बैठक मुख्यालय किंवा इतर सोईच्या ठिकाणी होते. सुरक्षा समितीच्या दोन स्थायी समित्या आहेत. त्या समित्या लष्कर, शस्त्रास्त्र नियंत्रण, नवीन सदस्यत्व, कार्यपध्दती नियम इ. बाबींवर लक्ष ठेवतात. सुरक्षा समितीतील प्रत्येक सदस्य देशाला मतदानाचा अधिकार असून सुरक्षा समितीचा अध्यक्ष दर महिन्याला बदलत असतो. सुरक्षा समितीची कार्य पुढीलप्रमाणे आहेत.

१. आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता राखणे हे सुरक्षा समितीचे प्रमुख कार्य आहे.

२. आंतरराष्ट्रीय शांततेसाठी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करणे.

३. शांतता व सुरक्षितता यांना धोका उत्पन्न करणाऱ्या समस्यामध्ये लक्ष घालून त्याबाबत सर्वसाधारण सभेला अहवाल पाठविणे.

४. संयुक्त राष्ट्रसंघाने करावयाच्या कारवाईची योजना बनविणे.

५. नवीन सदस्य राष्ट्रांच्या प्रवेशाची निमयावली ठरविणे.

६. दरवर्षी सर्वसाधारण सभेला आपला अहवाल देणे.

याशिवाय एखाद्या राष्ट्रावर आक्रमण झाले तर ते आक्रमण थांबविण्यासाठी सुरक्षा समिती प्रयत्न करते. सुरक्षा समितीमध्ये सदस्य असणाऱ्या देशांच्या प्रतिनिधींनी केलेल्या मतदानाच्या आधारे सुरक्षा समिती आपले निर्णय घेत असते. सदस्य देशांपैकी पाच बडया राष्ट्रांना नकाराधिकार वापरण्याचा हक्क आहे. या नकाराधिकारामुळे जगात शांतता राखण्यास मदत झाली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कामकाजामध्ये या समितीला महत्त्वाचे स्थान आहे.

## ३. **आर्थिक व सामाजिक समिती** (The Economic and Social Council)

केवळ राजकीय व लष्करी माध्मयातून जगाचे प्रश्न सुटणार नाहीत. त्यासाठी

आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व आरोग्य इ. बाबींमध्ये जगातील लोकांमध्ये ऐक्याची भावना निर्माण झाली पाहिजे. यासाठी ही समिती स्थापन करण्यात आली. या समितीत एकूण ५४ सदस्य असतात. या सदस्यांची निवड सर्वसाधारण सभेमधून केली जाते. दरवर्षी १/३ सभासद निवडले जातात. सभासदांची मुदत तीन वर्षांची असते. समितीमध्ये निर्णय उपस्थित सदस्यांच्या बहुमताने घेतले जातात. प्रत्येक सदस्यास एक मत देण्याचा अधिकार असतो. सदस्य नसणाऱ्या राष्ट्राच्या प्रश्नावर चर्चा चालू असल्यास सदर देशाला चर्चेसाठी बोलविता येते. परंतु त्या देशाला मतदानाचा अधिकार नसतो. आर्थिक व सामाजिक समितीची कार्ये पुढील प्रमाणे आहेत.

१. सुरक्षा समितीने विनंती केल्यास आक्रमक राष्ट्राविरूध्द आर्थिक निर्बंध घालण्यास मदत करणे.
२. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व संस्थामध्ये समन्वय राखणे व त्यांना सल्ला देणे.
३. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्य देशांना आर्थिक मदत व तंत्रज्ञानविषयक सल्ला देणे.
४. सर्वसाधारण सभा, सुरक्षा समिती व विश्‍वस्त समिती यांना आवश्यक ती माहिती व मदत पुरविणे.
५. आंतरराष्ट्रीय परिषदा बोलाविणे, स्वत:ची कार्यपध्दती व नियम ठरविणे.
६. मानवी हक्क व मूलभूत स्वातंत्र्याची जपवणूक करणे. त्यांचा विकास व प्रसार करणे. त्यासाठी आवश्यकतेनुसार उपसमित्या व आयोग नेमणे.

आजपर्यंत आर्थिक व सामाजिक समितीमार्फत मानवी हक्क आयोग, महिला हक्क आयोग, सांख्यिकी आयोग, लोकसंख्या आयोग, समाज विकास आयोग, आर्थिक आयोग, वाहतूक व संपर्क आयोग, अंमली पदार्थ विरोधी आयोग इ. अनेक प्रकारचे आयोग नेमून मानवाच्या प्रगतीसाठी प्रमत्न केला आहे. तसेच सामाजिक व आर्थिक समितीमार्फत अनेक उपसमित्या कार्य करीत आहेत. त्यापैकी काही समित्या पुढीलप्रमाणे.

### १. **युनेस्को** (UNESCO)

आंतरराष्ट्रीय शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक संस्था. ३ नोव्हेंबर १९४६ मध्ये स्थापना. युनेस्कोचे मुख्य कार्यालय पॅरिस या ठिकाणी आहे. शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक देवाण घेवाण ही समिती करते. संत ज्ञानेश्‍वर, संत तुकाराम, संत कबीर तसेच रामायण, महाभारत या ग्रंथाचे भाषांतर युनेस्को या समितीने पाश्‍चात्य भाषांमध्ये केले आहे. सभासद राष्ट्रांची संस्कृती जतन करण्याचा प्रयत्न केला जातो.

### २. **युनिसेफ** (UNICEF) **आंतरराष्ट्रीय बालक कल्याण निधी**

डिसेंबर १९६६ मध्ये या समितीची स्थापना झाली. आशिया, आफ्रिका खंडातील १०० देशांच्या मुलांना टी. बी. व इतर रोगांपासून सुटका होण्यासाठी औषधे पुरविण्यात आली. अनेक देशांमध्ये प्रसुतिगृह व बालक कल्याण केंद्राची स्थापना युनिसेफ मार्फत करण्यात आली आहे.

### ३. **आंतरराष्ट्रीय कामगार संघटना**

(International Labour Organisation)

पहिल्या जागतिक महायुद्धानंतर ही संघटना अस्तित्वात आली होती. युनोच्या सर्व

संघटनेपेक्षा ही संघटना जुनी आहे. या संघटनेची घटना १९१९ मध्ये तयार करण्यात आली. कामगारांचे प्रतिनिधी, व्यवस्थापन आणि सरकार मिळून निर्णय जाहीर करतात. १९४४ मध्ये आंतरराष्ट्रीय कामगारांची परिषद फिलाडेल्फिया येथे भरली होती. या परिषदेत काही तत्त्वे ठरविण्यात आली. या समितीतर्फे मजुरीचा दर ठरविणे, बेकारी कमी करणे, सामाजिक सुरक्षितता, अन्न, वस्त्र, निवारा, संधीची समानता, आरोग्य रक्षण इ. बाबींमध्ये महत्त्वपूर्ण काम केले जाते. या संघटनेतर्फे आंतरराष्ट्रीय कामगार कार्यालय, आंतरराष्ट्रीय कायदा, कामगार परिषद, कार्यकारणी इ. मार्फत काम चालते.

### ४. **अन्न आणि शेती संघटना** (Food & Agricultural Organisation)

१९४५ मध्ये या संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनेचे मुख्य कार्यालय रोम येथे आहे. दोन वर्षातून एकदा या संघटनेची परिषद भरते. मानवाचे जीवनमान व पोषणमान उंचावणे, अन्नधान्याची पोषणमुल्ये, अन्नधान्य व शेती यांच्या संदर्भात माहिती गोळा करणे, तिचे विश्लेषण करणे, सकस अन्नधान्ये, शेतीमालाची खरेदी, जमिनीचे धूपनियंत्रण, सिंचन, अभियांत्रिकी, जलसंवर्धन, अन्नधान्य व शेतमाल प्रक्रिया इ. क्षेत्रामध्ये सदस्य देशांतील हजारो तज्ञ काम करत आहेत. या संघटनेच्या सदस्य देशातून एक कार्यकारी परिषद निवडली जाते व या परिषदेमार्फत या संघटनेचे कामकाज पाहिले जाते.

### ५. **आंतरराष्ट्रीय पुर्ननिर्माण आणि विकास बँक किंवा जागतिक पतपेढी**

(International Bank for Re-Construction and Development)

युनोचे सदस्य असलेल्या राष्ट्रांच्या प्रदेशामध्ये पुर्ननिर्माण आणि विकासासाठी ही संघटना भांडवल पुरवते. त्याचप्रमाणे काही परकीम राष्ट्रेही खाजगी स्वरूपात अशा प्रदेशात कर्ज सुविधा पुरवितात. या बँकेचे प्रशासन बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, संचालक, अध्यक्ष, अधिकारी वर्ग व सेवक यांच्या सहाय्याने या बँकेचे कामकाज चालते. आशिया व आफ्रिका खंडामध्ये अनेक मोठया प्रकल्पांसाठी या बँकेने आर्थिक सहाय्य पुरविले आहे.

### ६. **आंतरराष्ट्रीय नाणेनिधी** (International Monetaity)

जागतिक व्यापारामध्ये उन्नती करणे हे या संघटनेचे ध्येय आहे. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या चलनाला स्थैर्य मिळावे म्हणून काम करावे लागते. पुरेशा तारणावर आर्थिक सहाय्य करणे, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे काम बोर्ड ऑफ गव्हर्नर्स, संचालक, कार्यकारी संचालक व अधिकारी वर्ग यांच्या सहाय्याने चालते.

### ७. **जागतिक आरोग्य संघटना** (World Health Organisaiton)

या संघटनेची स्थापना ७ एप्रिल १९४८ मध्ये झाली असून दरवर्षी ७ एप्रिल हा आरोग्य दिन म्हणून पाळला जातो. युनोची ही योठी सेवाभावी संस्था आहे. जगातील लोकांचे आरोग्यमान सुधारणे, साथीच्या रोगांचा बंदोबस्त करणे, हानीकारक रोगांचा प्रतिबंध करणे इ. कामे ही संघटना करत असते. १९४७ मध्ये जागतिक पातळीवरील कॉलऱ्याची साथ फक्त सहा आठवडयात या संघटनेमार्फत आटोक्यात आणण्यात आली. अनेक दुर्धर रोगांवर संशोधन करणे, हिवताप, क्षय, गुप्तरोग, माता व शिशूंचे आरोग्य, पोषक आहार,

आरोग्यशास्त्र, प्रसूतिगृहे इ. बाबींमध्ये जागतिक आरोग्य संघटनेने महत्त्वपूर्ण काम केले आहे. सर्व सभासद देशांच्या प्रतिनिधींची सभा या सभेने १८ तज्ञांची निवडलेली कार्यकारी समिती व सचिवालय यांच्यामार्फत या संघटनेचे कामकाज चाले. या संघटनेचे मुख्यालय जिनीव्हा येथे आहे.

### ८. आंतरराष्ट्रीय निर्वासितांसाठी संघटना

(International Refugee Organisation)

१५ डिसेंबर १९४६ रोजी आम सभेच्या संमतीने या संघटनेची स्थापना झाली. या संघटनेने निर्वासीत व स्थलांतरित लोकांना त्यांच्या देशात पाठवून त्यांना त्यांची शेती, घरे मिळवून दिली. त्या संबंधीत देशांनी या संघटनेशी याबाबत करार केले. त्यानुसार त्यांचे पुनर्वसन करून निर्वासीतांना कायदेशीर हक्क या संघटनेने प्राप्त करून दिले आहेत.

### ९. जागतिक टपाल संघटना (Universal Postal Union)

या संघटनेची स्थापना १ जुलै १९७५ रोजी झाली. डाक व्यवस्थेमधील अनिश्चितपणा, गोंधळ व वाढत जाणारा खर्च कमी करणे तसेच व्यापारामध्ये वाढ करणे व दळणवळण तसेच देशादेशांमधील पत्रव्यवहार सुरळीत व्हावा या हेतूने या संघटनेची स्थापना करण्यात आली.

### १०. आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघटना (International communication Union)

या संघटनेची स्थापना १९६५ मध्ये झाली. देशादेशामध्ये दूरसंचार किंवा टेलिफोन सेवा पुरविणे, जगात दूरसंचार संघटना स्थापन करून जगातील नागरिकांना एकमेकांच्या अधिक जवळ आणून देण्याचे काम या संघटनेने केले आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढविणे, तांत्रिक पध्दतीने कार्यक्षम व उपयोगी सेवा निर्माण करणे हे या संघटनेचे हेतू आहेत.

### ११. जागतिक अंतरिक्ष विज्ञान संघटना

(World Meteorological Organisation)

या संघटनेची स्थापना १९५० मध्ये झाली. जगातील देशांमध्ये हवा, वातावरण, पर्यावरण या दृष्टीने समन्वम रहावा म्हणून या संघटनेची स्थापना झाली.

### १२. आशिया आणि पॅसिफीक आर्थिक, सामाजिक आयोग

(Economic and Social Commision for Asia and Fr East)

युनोतर्फे हा प्रादेशिक आयोग नेमण्यात आला असून आर्थिक व सामाजिक समितीशी निगडीत आहे. उत्पादन व्यवस्थेत विकासाला मदत करणे आणि पाकिस्तान ते जपान आणि पश्चिम पॅसिफीक महासागरातील बेटे यांच्या व्यापाराला मदत करणे ही या आयोगाची कामे आहेत. या आयोगाने विद्युतशक्ती, खनिजपदार्थ, छोटे उद्योग, घरे याविषयी तपशीलवार माहिती मिळविली आहे.

### १३. युरोपसाठी आर्थिक आयोग (Economic Commision for Europe)

युनोचे सभासद असणारी युरोपीयन राष्ट्रे या आयोगाचे सदस्य आहेत. युरोपीय राष्ट्रांचा

व्यापार व उद्योगधंदे यांच्या विकासासाठी हा आयोग आर्थिक मदत करतो.

### १४. लॅटिन अमेरिकेसाठी आर्थिक आयोग

(Economic Commision for Europ)

दक्षिण अमेरिकी खंडातील देशांमध्ये आर्थिक नियोजन, आर्थिक प्रगती व विकास व्हावा यासाठी या आयोगाची निर्मिती करण्यात आली आहे.

### १५. आंतरराष्ट्रीय प्रवास संघटना

(International Union of Offical Tracel Organisation)

देशविदेशामध्ये मुक्त संचार व प्रवास याला प्रोत्साहन देणे तसेच देशादेशांमध्ये आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक संबंधामध्ये वाढ व्हावी या हेतून ही संघटना स्थापन करण्यात आली आहे.

### १६. आंतर सरकारी समूह सल्लागार संघटना

(Inter Government Maritime Consultative Organisation)

युनोच्या वाहतूक व दळणवळण आयोगाच्या सहकार्याने १९४७ मध्ये नाविक विभागासाठी स्वतंत्र संघटना स्थापन करण्यात आली.

### १७. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना (World Meteorological Organisation)

यूनोतर्फे १९४५ मध्ये व्यापार व नोकरी यासाठी एक परिषद भरविण्यात आली होती. या परिषदेमध्ये आंतरराष्ट्रीय व्यापार संघटनेची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय व्यापारात वाढ व्हावी या हेतूने ही संघटना स्थापन झाली. या संघटनेने गॅट हा आंतरराष्ट्रीय व्यापारी करार स्वीकारला आहे. सध्या या करारानुसार आंतरराष्ट्रीय व्यापार चालू आहे.

अशा प्रकारे संयुक्त राष्ट्रसंघटने मार्फत यानवाच्या विकासासाठी व उत्कर्षासाठी अनेक संघटना कार्यरत आहेत. त्याचप्रमाणे १० डिसेंबर हा दिवस यूनोतर्फे जागतिक मानवी हक्क दिन म्हणून पाळला जातो. मानवी हक्क आयोगाकडे देशातील नागरिकांना दाद मागता येते.

## ४. विश्वस्त समिती (Trusteeship Council)

संयुक्त राष्ट्रसंघाच्या घटक अंगातील विश्वस्त समिती ही महत्त्वाचे घटक अंग आहे. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघाने जी मँडेट पध्दत निर्माण केली होती त्यामध्ये सुधारणा करून ही विश्वस्त समिती बनविण्यात आली होती. दुसऱ्या महायुद्धानंतर जर्मनी, जपान, इटली यांच्या अनेक वसाहती मुक्त झाल्या होत्या. अशा प्रदेशांवर देखरेख ठेऊन त्यांची प्रगती घडवून आणण्यासाठी व तेथील लोकांना अंतर्गत प्रशासन चालविण्यास कार्यक्षम बनविण्यासाठी विकसित देशांची एक विश्वस्त समिती तयार केली. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, इटली, बेल्जियम, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड या देशांकडे विश्वस्त म्हणून दुसऱ्या महायुद्धानंतर टोगोलॅन्ड, सोयालिलॅन्ड, पश्चिम सॅमोआ, टांगानिका, रूआंडा, मार्शल बेटे, कॅरोलीन इ. प्रदेश सोपविला होता. या विश्वस्त प्रदेशावर विश्वस्त समितीची देखरेख असे. या प्रदेशातील परिस्थितीचा अभ्यास करून प्रादेशिक अहवाल विश्वस्त समितीला

द्यावा लागतो. विश्वस्त समिती हा अहवाल वेळोवेळी राष्ट्रसंघाला सादर करत असते.

## ५. **आंतरराष्ट्रीय न्यायालय** (International Court of Justic)

आंतरराष्ट्रीय न्यायालय ही यूनोची न्यायसंस्था आहे. आंतरराष्ट्रीय न्यायालयाची प्रथम निर्मिती लीग व नेशन्सच्या अधिकारामध्ये करण्यात आली होती. पूर्वीच्या न्यायालयातील सर्व दोष नवीन न्यायालयामध्ये दूर करण्यात आले. न्यायालयाच्या घटनेनुसार १५ न्यायाधीशांची नेमणूक करण्यात येते. सुरक्षा समिती व सर्वसाधारण सभेमार्फत न्यायाधीशांची नेमणूक होते. त्यांची मुदत ९ वर्षे असते. मुदत संपल्यावर पुन्हा निवड होण्यास ते पात्र असतात. न्यायाधीश जर बंधनकारक अटींचे उल्लंघन करत असेल तर सदस्य देश एकमताने त्यास काढून टाकू शकत असत. एकाच देशातील दोन न्यायाधीशांची निवड केली जात नाही. १५ न्यायाधीशांच्या देशाव्यतिरिक्त दुसऱ्या देशाचा खटला चालविण्यास आल्यास तो देश तात्पुरता न्यायाधीश कायदेतज्ञ म्हणून पाठवू शकतो. सदर न्यायाधीशाला खटल्याचा निर्णय देण्याचा अधिकार नसतो. खटला संपताच सदर न्यायाधीश स्वगृही परत येतो. या न्यायालयाचे सर्व निर्णय हे बहुमताने घेतले जातात. एखाद्या प्रश्नात बहुमत होत नसल्यास मुख्य न्यायाधीशाला विशेष मताचा अधिकार असतो. या न्यायालयाच्या निर्णयाविरूध्द दाद मागता येत नाही. या न्यायालयाचे कामकाज इंग्लिश व फ्रेंच भाषेतून चालते. न्यायालयाचे मुख्यालय नेदरलँडमधील हेग येथे आहे.

सर्व सदस्य देशांना न्यायालयाचा निर्णम मान्य करण्याची शपथ घ्यावी लागते. एखाद्या पक्षास निर्णय अमान्य असल्यास दुसरा पक्ष हा निर्णय सुरक्षा समितीपुढे नेऊ शकतो. निर्णय बहुमताने होतात. न्यायालयाच्या कार्यकक्षेचे तीन प्रकार सांगता येतील. ऐच्छिक, बंधनकारक, सल्लास्वरूप या तीन प्रकाराने न्यायदान होत असते. खटला हा व्यक्तीसाठी नसून दोन्ही पक्षकार देशच असावे लागतात. कोणत्याही देशाच्या इच्छेविरूध्द त्या देशावर खटला भरता येत नाही. संयुक्त राष्ट्रसंघाची सर्वसाधारण सभा, सुरक्षा समिती अगर इतर मान्य संस्था यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर आंतरराष्ट्रीय न्यायालय सल्ला देऊ शकते. पण हा सल्ला पाळण्याचे बंधन अशा संस्थावर नसते.

## ६. **सचिवालय** (The Secretarite)

संयुक्त राष्ट्रसंघाचे सर्व कार्म चालवण्यासाठी सचिवालयाची निर्मिती करण्यात आली. सचिवालय हे संयुक्त राष्ट्रसंघाचे प्रमुख घटक अंग आहे. सचिवालयाचा कारभार मुख्य सचिव पाहत असतो त्यास यूनोचा सरचिटणीस असेही म्हणतात. सरचिटणीसाची निवड सुरक्षा समितीच्या शिफारशीनुसार होत असते. त्याची नेमणूक पाच वर्षाच्या मुदतीसाठी असते. सचिवाला आंतरराष्ट्रीय शांतता निर्माण करणे, शांतता टिकवणे, एखाद्या प्रश्नाच्या बाबतीत सुरक्षा समितीचे लक्ष वेधणे, संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व कार्याचा वार्षिक अहवाल सर्वसाधारण सभेपुढे ठेवणे तसेच सर्वसाधारण सभा, सुरक्षा समिती, आर्थिक सामाजिक समिती, विश्वस्त समिती यांच्या बैठकांना हजर राहणे इ. प्रमुख कामे सचिवाला करावी लागतात. सचिवाच्या हाताखाली यूनोचा कारभार पाहण्यासाठी ३५०० अधिकारी व कर्मचारी काम करत असतात. त्यांचे कार्य प्रशासकीय व राजकीय स्वरूपाचे असते.

सचिवालयाचे मुख्यालय न्यूयॉर्क व जिनीव्हा येथे आहेत. सचिव आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडू शकतो. कोणत्याही सदस्य देशाच्या परराष्ट्र कार्यालयात जाण्याचे स्वातंत्र्य सचिवाला असते. जनरल ट्रिग्वेली एच. लाथ हे यूनोचे पहिले सचिव होते. कामकाजाच्या सोईसाठी आठ विभाग करण्यात आले आहेत. सचिव व सचिवालयाचे कामकाज नियमीतपणे चालू असते. यूनोच्या कामकाजाची प्रशासकीय जबाबदारी सचिवालयावर अवलंबून आहे.

वरीलप्रमाणे यूनोची रचना करण्यात आली आहे. वरील घटक अंगाच्या नियंत्रणाखाली अनेक उपसमित्या आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहेत. संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक शांतता निर्माण करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य

संयुक्त राष्ट्रसंघाने आजपर्यंत राजकीय क्षेत्रात भरीव कार्य केलेले आहे. जागतिक स्तरावर शांतता कायम राखणे व मानवाचा विकास करण्याचा प्रयत्न संयुक्त राष्ट्रसंघाने स्थापनेपासून केला आहे. तात्र युद्ध थांबविण्यात व नि:शस्त्रीकरणाच्या अंमलबजावणीत संयुक्त राष्ट्रसंघाला पुरेसे यश आले नाही. गरिबी, भूक, रोगराई, नैसग्कि आपत्ती या संकटामध्ये मानवजातीसाठी युनोने महत्त्वाची भूमिका बजाविली आहे. १९९५ च्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या एका पत्रकात म्हटले आहे की, 'दुसऱ्या महायुद्धाच्या भग्नावशेषांपासून सुर्वात करून, दोन सत्तागटांमधील स्पर्धेला तोंड देत प्रवास करत अणुयुद्धाचा धोका आणि सतत चाललेल्या प्रादेशिक भांडणांना यशस्वीपणे तोंड देऊन संयुक्त राष्ट्रसंघ आता एका अशा संघटनेत विकसित झाला आहे की शांततेवर आधारलेल्या स्थिरतेचा सामुदायिकरीत्या शोध घेणे हे या संघटनेच्या चिंतेचे प्रमुख कारण बनले आहे.' राष्ट्रसंघाची सनद अशी अपेक्षा व्यक्त करते की, राष्ट्रसंघाच्या सदस्य देशांनी आपआपसातील मतभेद शांतता पूर्ण मार्गाने मिटवावेत आणि एकमेकांविरूध्द बलाचा वापर करू नये. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेच्या उपविभाग २५ अनुसार सर्व सभासद सुरक्षा समितीचा निर्णय स्वीकारून अंमलात आणण्यास बांधील आहेत. जागतिक शांतता व सुरक्षा राखण्याची जबाबदारी सुरक्षा समितीकडे आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्याचे प्रमुख दोन भाग पाडता येतील.

अ) राजकीय क्षेत्रातील कार्य

ब) अराजकीय क्षेत्रातील कार्य

## अ) राजकीय क्षेत्रातील कार्य

### १. इराण – रशिया संघर्ष

युनोपुढील पहिली समस्या इराण – रशिया संघर्षाची होती. १९ जानेवारी १९४६ रोजी रशियन फौजांनी अझरबैजान प्रांताचा ताबा घेतला आणि तेथून माघार घेण्याची तयारी नसल्याचे इराणने सुरक्षा समितीला कळविले. सुरक्षा समितीच्या दृष्टीने ही सुरुवात फारशी चांगली नव्हती. सुरक्षा समितीतील चर्चेदरम्यान सर्वांनीच या कारवाईला तीव्र विरोध केला. या एक प्रकारच्या नैतिक दबावामुळे २१ मे १९४६ रोजी रशियाने इराणमधून सैन्य काढून घेतले व हा वाद संपुष्टात आला.

## २. इंडोनेशियाचा प्रश्न

युद्धापूर्वी इंडोनेशिया हा देश हॉलंडच्या ताब्यात होता. युद्धकाळात इंडोनेशिया जपानच्या ताब्यात गेला. १९४७ मध्ये हॉलंडने इंडोनेशियात सशस्त्र कारवाई केली. तेंव्हा भारत व ऑस्ट्रिया यांनी हा प्रश्न सुरक्षा समितीत उपस्थित केला. सुरक्षा समितीने तातडीने युद्धबंदीची आज्ञा दिली. युद्धबंदी दोन्ही पक्षांना मान्य करावी लागली पण संघर्ष चालूच राहिला. मध्मस्थीसाठी इंडोनेशियाने ऑस्ट्रियाची तर डचांनी बेल्जियमची निवड केली. डचांनी करार मोडला. त्यानंतर मात्र सुरक्षा समितीने डचांविरूध्द कारवाई केली. शेवटी २ डिसेंबर १९४९ रोजी इंडोनेशियाला स्वातंत्र्य मिळाले व हा प्रश्न संपुष्टात आला.

## ३. ग्रीक – मुगोस्लाव्हीया संघर्ष

३ डिसेंबर १९४६ रोजी ग्रीकने सुरक्षा समितीकडे तक्रार नोंदविली की आपली शेजारी साम्यवादी राष्ट्रे छुप्या बंडखोरांना मदत करून आपल्या देशामध्ये यादवी निर्माण करू पाहत आहेत. यावर युनोने एक चौकशी समिती नेमली. या समितीने अल्बानिया, बल्गेरिया व युगोस्लाव्हीया ही राष्ट्रे बंडखोरांना मदत देत आहे असा अहवाल दिला. या प्रश्नाच्या बाबत रशियाने अनेक वेळा नकाराधिकाराचा वापर केला. या प्रश्नामध्ये युनोला शेवटपर्यंत समाधानकारक प्रगती करता आली नाही.

## ४. इंडोचायना

जिनीव्हा करारानुसार फ्रान्सला इंडोचायनातून माघार घ्यावी लागली. लाओस, कंबोडिया आणि व्हिएतनाम हे देश स्वतंत्र झाले. कंबोडिया, थायलंडच्या सरहद्दीचे प्रश्न युनोने सोडविले. परंतु व्हिएतनामचे १७ व्या अक्षांशावर विभाजन होऊन उत्तर व्हिएतनाम व दक्षिण व्हिएतनाम असे दोन देश निर्माण झाले. या दोन देशांमधील संघर्ष अनेक वर्षे चालू होता.

## ५. कोरियाचा प्रश्न

दुसऱ्या महायुद्धाकाळात जपानचा पाडाव करण्यासाठी ३८ अक्षांशावर कोरियाचे दोन भाग पाडून उत्तरेकडील भागात रशियाने व दक्षिणेकडील भागात अमेरिकेने सैन्य ठेवावे असे ठरले. पॉटसडॅम परिषदेत ठरल्याप्रमाणे युद्ध संपताच दोन्ही देशांनी सैन्य काढून घेऊन कोरियास पूर्ण स्वातंत्र्य द्यावे असे ठरले. पण युद्ध संपताच रशियाने हे वचन पाळण्याचे नाकारले म्हणून अमेरिकेने हा प्रश्न युनोपुढे मांडला. तीन वर्षे रशियाने युनोला दाद दिली नाही. उलट तेथील लोकांना शस्त्रास्त्रे पुरवून वातावरण तंग केले. १९५० मध्ये उत्तर कोरियाने दक्षिण कोरियात आक्रमण केले. या आक्रमणास रशियाचा पाठिंबा होता. यावेळी युनोला ३९ राष्ट्रांनी सैन्य मदत देऊ केली. अमेरिकेने मोलाची भूमिका बजावली. स्टीवेसनच्या मते, 'युनोच्या या प्रथम मोठया सामुदायिक लष्करी कृतीने हे सिध्द केले की, लष्करी शक्ती व शांती या दोन्ही पध्दतीने आम्ही काम करू शकतो.'

## ६. सुएझ कालवा पेचप्रसंग

इजिप्त सरकारने सुएझ कालव्याचे राष्ट्रीयकरण घडवून आणले व सुएझ कालव्याच्या

कंपनीचे शेअर्स व भांडवल जप्त केले. सुएझ कालवा कंपनीमध्ये इंग्लंड व फ्रान्सचे शेअर्स गुंतलेले होते. त्यामुळे त्यांनी इजिप्त सरकारच्या या कृतीस आक्षेप घेऊन हा प्रश्न २६ सप्टेंबर १९५६ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीसमोर मांडला. त्यावेळी इस्त्राईल या देशाने सुएझ कालवा प्रदेशातील इजिप्शमन ठाण्यावर हल्ले चढविले. दरम्यान इंग्लंड, फ्रान्सने सुएझच्या उत्तरेकडील प्रदेशावर हल्ला केला. त्यामुळे सुएझ प्रश्नाला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. अमेरिकेने याचा बंदोबस्त करण्याचे ठरविले. युनोने तीन ठराव मंजूर करून आक्रमण थांबवून शांततेसाठी युनोने सैन्य पाठविले. मे १९५७ मध्ये सुएझ प्रश्न संपुष्टात आला.

## ७. दक्षिण आफ्रिकेतील तणाव

दक्षिण आफ्रिकेमध्ये ब्रिटिशांचे सरकार होते. दक्षिण आफ्रिकेत वर्णद्वेषाची सुरूवात होऊन भारतीयांना वाईट वागणूक मिळत होती. भारताने हा प्रश्न युनोच्या सर्वसाधारण सभेत उपस्थित केला. दक्षिण आफ्रिका सरकार युनोच्या मानवी सनदेचे उल्लंघन करून कृष्णवर्णीयांना वाईट वागणूक देत होते. यावेळी हा आमचा अंतर्गत प्रश्न आहे असा दावा दक्षिण आफ्रिकेने केला. परंतु युनोने हा दावा फेटाळून दोन्ही देशांनी आपआपसात विचार करून हा प्रश्न सामोपचाराने सोडवावा असे स्पष्ट केले. यानंतर दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्या सरकारने जास्त अन्याय सुरू केला. कृष्णवर्णीय नेता नेल्सन मंडेला यांची १९९० – ९१ मध्ये मुक्तता केली.

## ८. पॅलेस्टाईनचा प्रश्न

दुसऱ्या महायुद्धाच्या वेळी पॅलेस्टाईनचा प्रदेश विश्वस्त म्हणून इंग्लंडच्या ताब्यात होता. पॅलेस्टाईनच्या विलीनीकरणासाठी युनोने ११ सदस्यांची एक समिती नेमली. या समितीने ऑगस्ट १९४७ मध्ये युनोला आपला अहवाल देऊन अरब राज्य व ज्यू राज्य अशी राज्ये निर्माण करण्यात यावी अशी शिफारस केली. युनोने २/३ बहुमताने ही योजना स्वीकारली. जेरूसलेम हे शहर आंतरराष्ट्रीय निमंत्रणाखाली ठेवण्याचे ठरले. हे शहर अरब, ख्रिश्चन व ज्यू लोकांना धार्मिक दृष्ट्या प्रिय होते. ज्यूंना हा विजय वाटला तर अरबांनी ही योजना स्विकारली नाही. इंग्रजांनी १६ मे १९४८ रोजी येथील सैन्य काढून घेताच पॅलेस्टाईन प्रदेशात ज्यू जमातीने इस्त्राइल या नव्या राज्याची घोषणा केली. अरबांना ही गोष्ट मान्य नव्हती. त्यामुळे अंतर्गत यादवी सुरू झाली. पुढील काळात अरबांनी पॅलेस्टाईन मुक्ती संघटना उभारली. त्यामुळे या प्रदेशात अरब विरूध्द ज्यू असा संघर्ष सुरू झाला. शेवटी इजिप्त व इस्त्रायल यांच्यात १९४९ मध्ये युद्धबंदी करार झाला. परंतु तरीदेखील आजपर्यंत या प्रदेशामध्ये शांतता निर्माण झाली नाही.

## ९. काश्मिरचा प्रश्न

१९४७ मध्ये भारताची फाळणी होऊन भारत व पाकिस्तान अशी दोन स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात आली. स्वतंत्र भारतातील काश्मीर हे एक महत्त्वपूर्ण संस्थान होते. काश्मीर संस्थानचा राजा हरिसींग हा होता. इंग्रजांनी काश्मिरला भारत किंवा पाकिस्तान या दोन्हीपैकी कोणत्याही देशात सामील होण्यास किंवा स्वतंत्र रहाण्यास परवानगी दिली होती.

त्यानुसार काश्मिरच्या संस्थानीकाने स्वतंत्र राहण्याचे जाहिर केले. पाकिस्तानने काश्मीरला जबरदस्तीने आपल्यात सामावून घेण्यासाठी काश्मिरवर २२ ऑक्टोबर १९४७ रोजी हल्ला चढविला. पाकिस्तानी आक्रमणाला आपण प्रतिकार करू शकणार नाही याची जाणीव हरिसींगास झाली. त्यामुळे हरिसींगाने काश्मीर भारतात विलीन करत आहोत असे जाहीर केले व भारताकडे लष्करी मदत मागीतली. काश्मीरच्या राजाने विलीनिकरणाच्या कागदपत्रांवर सही केली. भारत सरकारने काश्मीरच्या रक्षणासाठी आपले सैन्य पाठवले. १ जुलै १९४८ रोजी भारताने सुरक्षा समितीसमोर हा प्रश्न मांडला. पंडित नेहरूंनी सांगीतले की, काश्मिरचे विलीनकरण तेथील लोकांच्या संमतीने झाले आहे. त्यामुळे पाकिस्तानने केलेले आक्रमण मागे घ्यावे. युनोच्या सुरक्षा समितीने काश्मीर प्रश्न सोडविण्यासाठी एक आयोग नेमला. आयोगाच्या प्रयत्नाने युध्दबंदी झाली आणि काश्मीरचा काही भाग पाकिस्तानच्या ताब्यात राहिला. आयोगाने दोन्ही देशांवर जनमताची चाचणी घेण्याची बंधने टाकली. परंतु पाकिस्तानने काश्मीरबाबत कुरापती सुरूच ठेवल्या. या प्रश्नावर भारत पाकिस्तान यांच्यात समझोता झाला नाही. सुरक्षा समिती याबाबत भारतावर अन्याय करत आली आहे. १९५६ च्या कलमान्वये भारताने काश्मीर हा भारताचा अविभाज्य अंग आहे हे सिध्द केले आहे. आता काश्मीरचे स्वरूप बदलले आहे. पाश्चात्य राष्ट्रांच्या पाठिंब्यामुळे पाकिस्तान सुरक्षा समितीत हा प्रश्न पुन्हा पुन्हा मांडत असतो. परंतु भारताची न्यायी भूमिका व रशियाच्या पाठिंब्यामुळे पाकिस्तानचा हा कुटील उद्देश सफल होऊ शकला नाही. काश्मीरमध्ये सध्या जनमत चाचणीला महत्त्व राहिले नाही. युनोच्या सुरक्षा समितीपुढे काश्मीरचा प्रश्न तसाच अनिर्णीत राहिला आहे. पाश्चात्य राष्ट्र व अमेरिका पाकिस्तानला छुपी मदत देत असल्यामुळे हा प्रश्न तसाच अनिर्णीत राहिला आहे. शेवटपर्यंत युनोला हा प्रश्न सोडविण्यात यश आले नाही.

### १०. कांगो समस्या

जुलै १९६० मध्ये कांगोमध्ये बेल्जियमच्या चिथावणीमुळे युध्द छेडले गेले. कांगो सरकारने युनोकडे तक्रार केल्यानंतर युनोने सैन्य पाठवून कांगो व बेल्जियम यांच्यातील संघर्ष मिटविला. परंतु कांगोचे अंतर्गत यादवी युध्द अधिकच भडकले. युनोने मध्यस्ती करून कांगोचे विभाजन टाळले. कांगोचा प्रश्न सोडविताना युनोचे सरचिटणीस सप्टेंबर १९६२ मध्ये विमान अपघातात मृत्यू पावले. शेवटी १९६३ मध्ये कांगोचे एकत्रीकरण होऊन हा प्रश्न मिटला.

### ११. येमेनचा प्रश्न

येमेनचा प्रशासक अहमद यांचा मृत्यू १९ सप्टेंबर १९६२ रोजी झाला. त्या अगोदर १२ सप्टेंबरला येमेनमध्ये क्रांती झाली होती. लोकशाही विरूध्द राजेशाही असा प्रशासनाचा प्रश्न येमेनमध्ये निर्माण झाला होता. सौदी अरेबिया व जॉर्डन यांनी राजेशाहीला पाठिंबा दिला तर इजिप्तने लोकशाहीला पाठिंबा दिला. ऑक्टोबर १९६२ मध्ये दोन्ही सरकारामध्ये यादवी निर्माण झाली. शेवटी मार्च १९६३ मध्ये युनोचे मध्यस्थ राल्फ बूंचने दोन्ही सरकारने सैन्य परत बोलावून शांतीसाठी पर्याय शोधावा असा मार्ग काढला व नंतर येमेनमध्ये शांतता प्रस्थापीत झाली.

## १२. सायप्रसची समस्या

१३ ऑगस्ट १९६० रोजी ब्रिटिश सत्तेपासून सायप्रस हा देश स्वतंत्र झाला. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर मकारियोस या राष्ट्रपतीने घटनेत बदल करून तुर्की व युनोनी या जातीत राजकीय संघर्ष सुरू केला. या संघर्षात १९६३ मध्ये इंग्लंडने नाटोचे सैन्य पाठविण्याचा घाट रचला होता. राष्ट्रपती मकारियोसने हा प्रश्न युनोच्या सुरक्षा समितीपुढे ठेवून युनोचा मध्यस्थ पाठविण्याची विनंती केली. युनोने १९६४ मध्ये शांतीसेना पाठवून हा प्रश्न सोडवला.

## १३. डोमेनिकन गणराज्य वाद

दक्षिण अमेरिका खंडातील या छोटया राष्ट्रात एप्रिल १९६५ मध्ये यादवी युध्द सुरू झाले होते. अमेरिकेने तेथे सैन्य घुसविले त्यावेळी रशियाने युनोकडे मागणी केली की, या प्रकरणात युनोने हस्तक्षेप करावा. अमेरिकी राज्याची संघटना व युनोचे प्रयत्न यामुळे ३१ ऑगस्ट १९६५ मध्ये दोन्ही पक्षात समझोता होऊन तेथे शांतता प्रस्थापित झाली.

## १४. अरब – इस्त्रायल संघर्ष

१९५६ मध्ये अरव व इस्त्रायल यांच्यात युध्द झाले होते. त्यावेळी या प्रदेशात युनोच्या फौजा होत्या. १९६७ मध्ये इजिप्तचे राष्ट्रपती अब्दुल गमाल नासेर यांच्या प्रयत्नामुळे युनोच्या फौजा काढून घेतल्यानंतर संयुक्त अरब गणराज्य व इस्त्रायल यांच्यात संघर्ष सुरू झाला. जॉर्डन, इजिप्त, सिरीया, इराक विरूध्द इस्त्रायल असा हा संघर्ष होता. परंतु इस्त्रायलची वैज्ञानिक प्रगती व प्रयत्नामुळे त्यांनी संयुक्त अरब गणराज्याचा पराभव केला. १६ जुलै रोजी युनोच्या माध्ययातून युध्द समाप्ती झाली. परंतु आजही अरब राष्ट्रे व इस्त्रायल यांच्यात अधूनमधून संघर्ष चालू आहे.

## १५. भारत पाकिस्तान १९६५ चे युद्ध

काश्मीर बळजबरीने गिळंकृत करण्यासाठी पाकिस्तानने १९६५ मध्ये भारताबरोबर युध्द जाहीर करून आंतरराष्ट्रीय सीमा रेषा ओलांडून भारतावर आक्रमण केले. पायदळाची एक ब्रिगेड ७० टँक पाकिस्तानने भारतीय हद्दीत घुसविले. भारतानेही या आक्रमणाचा प्रखर प्रतिकार केला व पाकिस्तानी सैन्यावर आघाडी मारून त्यांच्या प्रदेशात पिटाळून लावले. २३ सप्टेंबर १९६५ पर्यंत भारतीय सेनेने पाकिस्तानचा पराभव केला. युनोने या प्रश्नात मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करून युध्दबंदीचा ठराव मांडला. हा प्रस्ताव पाकिस्तानने फेटाळला. युनोने पाश्चात्त्य व अमेरिकेच्या प्रभावामुळे या प्रश्नात पाकिस्तानचे चुकत असूनही शासन केले नाही. शेवटी २३ सप्टेंबर १९६५ रोजी युध्दबंदी जाहीर केली परंतु काश्मीरचा प्रश्न युनोला सोडविता आला नाही.

## १६. झेकोस्लोव्हाकीयाचा पेचप्रसंग

२१ ऑगस्ट १९६८ रोजी रशिया व वार्सा करारातील राष्ट्रांच्या प्रेरणेने रशियाने झेकोस्लोव्हाकीयामध्ये सैन्य घुसविले. आपण साम्यवादाच्या रक्षणासाठी हे सैन्य पाठविले आहे असा कांगावा रशियाने केला. युनोच्या सुरक्षा परिषदेकडे हा प्रश्न चर्चेला आला. परंतु या प्रश्नाबाबत युनो चर्चेशिवाय काहीच करू शकली नाही.

## १७. साम्यवादी चीनचे सभासदत्व

१९५० मध्ये चीनमध्ये साम्यवादी शासन सत्तेवर आले होते. १९७१ पर्यंत चीन संयुक्त राष्ट्रसंघाचा सभासद नव्हता. शेवटी १९७१ मध्ये चीनला युनोचे सभासद करून घेण्यात आले.

## १८. बांगलादेशाचा प्रश्न

१९७१ मध्ये बांगलादेशामध्ये पाकिस्तानपासून स्वतंत्र होण्यासाठी आंदोलन सुरू झाले. यावेळी बांगलादेशात यादवी सुरू झाल्यामुळे एक कोटी निर्वासित भारतात आले. भारताने हा प्रश्न युनोकडे नेला. परंतु पाकिस्तानला अमेरिकेचे समर्थन असल्यामुळे युनो यासंबंधी काहीही करू शकली नाही. पाकिस्तानचा बांगलादेशातील अत्याचार सुरूच होता. शेवटी भारताच्या सहकार्याने बांगलादेशाचा मुक्ती संग्राम यशस्वी झाला व बांगलादेश स्वतंत्र होऊन तो युनोचा सभासद बनला.

## १९. भारत – पाकिस्तान संघर्ष

बांगलादेशाच्या निर्मीतीवरून हा प्रश्न १९७१ मध्ये निर्माण झाला होता. खऱ्या अर्थाने या प्रश्नात भारताचा काहीही संबंध नव्हता. परंतु बांगलादेशात यादवी सुरू झाल्यानंतर निर्वासीतांचे लोंढे भारतात येऊ लागले. त्यामुळे भारताने हा प्रश्न युनोपुढे मांडला. परंतु अमेरिकेच्या प्रभावाखाली असणाऱ्या युनोने या संघर्षाला भारत – पाक असे स्वरूप देण्याचा प्रयत्न केला. यावेळी युनोमध्ये रशियाने भारताची बाजू उचलून धरली. शेवटी बांगलादेशाबाबत १६ डिसेंबर १९७१ रोजी भारताने एकतर्फी युद्धसमाप्तीची घोषणा केली.

## २०. इराण इराक युद्ध

या दोन्ही अरब राष्ट्रांमध्ये लहान लहान चकमकी चालू होत्या. पण सप्टेंबर १९८० मध्ये या दोन राष्ट्रात मोठया प्रमाणावर युद्ध सुरू झाले. सुरक्षा समितीने दोन्ही राष्ट्रांना युद्धबंदीचा आदेश जारी केला तरी देखील १९८८ पर्यंत इराण – इराक संघर्ष चालूच होता. २० ऑगस्ट १९८८ रोजी दोन्ही देशात युद्धबंदी झाली. २४ देशांच्या ३५० अधिकाऱ्यांकडे इराण – इराक सीमेवर युद्धबंदी निरीक्षणाचे काम सोपविले. युनोने या प्रदेशात शांतीसेना पाठवून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. यावेळच्या युनोच्या शांतीसेनेमध्ये दोन्ही महासत्तांचे सैन्य होते.

## २१. नामिबिया

या देशाचे पूर्वीचे नाव दक्षिण पश्चिम आफ्रिका असे होते. १९६८ मध्ये युनोने या देशाला नामिबिया हे नाव दिले. दुसऱ्या महायुद्धानंतर दक्षिण आफ्रिकेने नामिबियास आपला प्रदेश म्हणून जाहीर केले. युनोने हे अमान्य करून हा प्रश्न युनोच्या न्यायालयात नेला. न्यायालयाने नामिबिया हा प्रदेश युनोचा विश्वस्त प्रदेश असल्याचा निर्णय देऊन त्यास नामिबिया हे नाव दिले. १९७८ मध्ये युनोने दक्षिण आफ्रिकेस असा आदेश दिला

की दक्षिण आफ्रिकेने नामिबियास स्वातंत्र्य द्यावे. परंतु दक्षिण आफ्रिकेने हा निर्णय मान्य केला नाही. शेवटी १ एप्रिल १९८९ रोजी नामिबियातील दक्षिण आफ्रिकेची सत्ता संपली. निवडणूका होईपर्यंत भारताचे जनरल प्रेमचंद यांच्या नेतृत्वाखाली शांतीसेने मार्फत प्रशासन चालू होते. २१ मार्च १९९० रोजी नामिबिया सरकार सत्तेवर आले.

## २२. इराकचा कुवेतवर कब्जा

२ ऑगस्ट १९९० रोजी इराकने आपल्या शेजारी तेल उत्पादनासाठी प्रसिध्द असणाऱ्या कुवेत या छोटया देशावर अनाधिकृतपणे हल्ला करून ताबा मिळविला. अरब लीगने इराकला सुनावले की त्याने कुवेतचा ताबा सोडावा. पण इराकने काहीही ऐकले नाही. उलट सौदी अरेबियाच्या सीमेवर सैन्य जमविण्यास सुरूवात केली. नाटो संघटनेने पोत खाडीमध्ये सैन्य पाठविले तर अमेरिकेसहीत पश्चिमी राष्ट्रांनी इराकविरूध्द कारवाईची तयारी केली. कुवेतमधून इराकने माघार घ्यावी यासाठी युनोच्या सुरक्षा परिषदेने इराकवर आर्थिक निर्बंध लादले. शिवाय कुवेतवरील इराकचा कब्जा अवैध ठरविला. २९ ऑक्टोबर १९९० रोजी सुरक्षा समितीने इराकला सैन्य मागे घेण्याविषयी समज दिली. १५ जानेवारी १९९१ पर्यंत कुवेतवरील ताबा सोडावा असा आदेश इराकला देण्यात आला. १२ जानेवारी १९९१ रोजी इराकचा अध्यक्ष सद्दाम हुसेन याच्याबरोबर बोलणी करूनही प्रश्न सुटला नाही. त्यामुळे १७ जानेवारी १९९१ रोजी अमेरिकेने इराकविरूध्द युद्ध जाहीर केले. पुढे इराक अमेरिका युद्ध बराच काळ चालू होते.

## ब. अराजकीय क्षेत्रातील कार्य

युनोने राजकीय क्षेत्रात खूप कार्य केले असले तरी या कार्यामध्ये युनोला पूर्ण यश आले नाही. परंतु अराजकीय क्षेत्रामध्ये युनोने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये भूषणावह कार्य केले. मानव जातीच्या कल्याणासाठी युनोने खूप प्रयत्न केले आहेत. ते पुढील प्रमाणे

जगात समतोल आर्थिक विकास साध्य व्हावा यासाठी युनोने जानेवारी १९४८ मध्ये '१९४५ – ४७ मधील जगाची आर्थिक परिस्थिती' हा ग्रंथ प्रकाशित केला. त्यामुळे जगाला आर्थिक परिस्थितीचे ज्ञान झाले. अविकसित देशांना योग्य त्या तंत्रज्ञानाची माहिती देऊन तसेच त्यांना आर्थिक सहाय्य करून फार मोठे कल्याणकारी काम केले आहे. आंतरराष्ट्रीय बँक, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, पूर नियंत्रण मंडळ, अन्न व शेतकी संघटना, जागतिक टपाल संघटना, दळणवळण संघटना इ. अनेक संघटना जगातील मानवाच्या विकासासाठी प्रयत्नशील आहेत. याचे सर्व श्रेय युनोलाच आहे.

सामाजिक व शैक्षणीक क्षेत्रातही युनोने भरीव काम केले आहे. राहणीमान सुधारणे, आरोग्य उंचावणे, शुध्द, पेयजल, अपंग पुनर्वसन, गृह बांधणीचा प्रश्न, लहान मुलांचे आरोग्य, पोषण आहार, तरूणांना मार्गदर्शन, अपहर स्त्रीयांचा प्रश्न, चोरी, तस्करी इ. वर नियंत्रण, निर्वासीतांचा प्रश्न, मागास देशांमध्ये पुरविलेल्या आरोग्य सुविधा व त्यासाठी युनोच्या कार्य करणाऱ्या युनिसेफ, युनोस्को, जागतिक अन्न संघटना, जागतिक आरोग्य संघटना यांनी केलेले कार्य खूप महान व मोठे आहे.

आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना ही वैद्यकीय उपचार व रोगप्रतिबंधाकरीता मदत करते. या संघटनेने आतापर्यंत अनेक साथीचे रोग, लहान मुलांचे आरोग्य, स्त्रियांचे बाळंतपण व वैद्यकिय सुविधा यासाठी युनोने खूप मदत केली आहे. आंतरराष्ट्रीय मजूर संघटनाही मजुरांच्या हितसंबंधाचे रक्षण करत आहे. शिक्षण क्षेत्रात व वैज्ञानिक क्षेत्रात प्रगती व्हावी यासाठी युनोने अनेक प्रयत्न केले आहे. प्रौढ शिक्षण, सक्तीचे प्राथमिक शिक्षण, मानवी हक्क आयोग, स्त्रीयांचे प्रश्न यामध्ये युनोने भरीव कामगिरी केली आहे. अणुशक्ती निमंत्रण, नि:शस्त्रीकरण या बाबी युनो पूर्णपणे थांबवू शकला नसला तरी त्याला काही प्रमाणात मर्यादा घालण्यात युनो यशस्वी ठरला आहे. युनोची सर्वात महत्त्वाची कामगिरी म्हणजे युनोच्या प्रमत्नामुळे तिसरे महायुद्ध होऊ शकले नाही. तिसरे महायुद्ध रोखून धरण्यात युनोची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे जागतिक शांततेसाठी युनो बलिष्ठ करण्याशिवाय पर्याय नाही.

## संयुक्त राष्ट्रसंघाचे अपयश

संयुक्त राष्ट्रसंघ हे एक आंतरराष्ट्रीय व्यासपीठ आहे. तृतीय महायुद्ध आतापर्यंत युनोने रोखून धरले आहे. जगात नेहमी एक ना एक युद्ध चालत आले आहे. युनोला आपल्या कारकीर्दीमध्ये सगळेच प्रश्न सोडविण्यात यश मिळाले नाही. युनोला भारताच्या बाबतीतील काश्मीर प्रश्न सोडविता आला नाही. बड्या राष्ट्रांनी नि:शस्त्रीकरणाचे तत्त्व पाळले नाही. त्याचप्रमाणे अण्वस्त्र स्पर्धा खऱ्या अर्थाने कमी होत नाही. इराक व कुवेतचा प्रश्न सुटला नाही. कोरिया प्रश्न, पॅलेस्टाईन – इस्त्रायल संघर्ष इ. प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघ सोडवू शकला नाही. तसेच संयुक्त राष्ट्रसंघाला स्वत:चे सैन्य किंवा स्वत:ची ताकद नसल्याने युनो हा बड्या राष्ट्रांच्या हातचे बाहुले बनला आहे. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघावर टिका करणारे लोक म्हणतात की, संयुक्त राष्ट्रसंघ हा केवळ आंतरराष्ट्रीय प्रश्नांवर गप्पा मारण्याचा अड्डा आहे. असे असले तरी देखील युनोला आंतरराष्ट्रीय क्षेत्राात महत्त्वाचे स्थान प्राप्त होऊ लागले आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघाची दुर्बलता

युनो दुर्बल असण्यामध्ये अनेक घटकांचा सयावेश आहे. युनोची दुर्बलता किंवा उणीवा पुढील प्रमाणे

१. संयुक्त राष्ट्रसंघातील सभासद राष्ट्रामध्ये एकमत नसून ही राष्ट्रे परिस्थितीनुसार स्वार्थीपणे वागतात.

२. संयुक्त राष्ट्रसंघामध्ये दुसऱ्या महायुद्धात विजय मिळालेल्या राष्ट्रांचा प्रभाव आहे. त्यामध्ये पराभूत राष्ट्रांना स्थान देण्यात आले नाही.

३. अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स व चीन या बड्या राष्ट्रांना नकाराधिकाराचा वापर करता येत असल्याने या पाच बड्या राष्ट्रांविरूध्द युनोला कारवाई करता येत नाही.

४. युनोजवळ स्वत:चे सैन्य व स्वत:ची शक्ती नाही. त्यामुळे युनोचा प्रभाव पडत नाही.

५. युनोच्या निर्णयावर महासत्तांचा प्रभाव पडतो.

६. युनोच्या कार्यामध्ये लहान राष्ट्रांचे मत विचारात घेतले जात नाही. तसेच सर्व राष्ट्रांना समान लेखले जात नाही.

७. कोणताही प्रश्न 'आंतरराष्ट्रीय' किंवा 'अंतर्गत' आहे याबाबत युनोकडे स्पष्टता किंवा एकवाक्यता नाही.

८. एखाद्या राष्ट्राने युनोचा आदेश पाळला नाही तर त्या राष्ट्रावर कारवाई करण्यासाठी युनोकडे स्वत:ची यंत्रणा नाही.

९. बडी राष्ट्रे स्वत:च्या स्वार्थासाठी युनोच्या तत्वांना मुरड घालतात.

१०. विश्वस्त प्रदेशाची योजना चुकीची आहे. बडी राष्ट्रे या योजनेचा वापर साम्राज्यवाद वाढविण्यासाठी करत आहेत.

११. युनोची सनद सर्व राष्ट्रांनी मिळून तयार केलेली एक तडजोड आहे. त्यामध्ये अनेक उणिवा राहून गेल्या आहेत.

थोडक्यात युनोमध्ये वरीलप्रमाणेउणिवा असल्या तरी यानवाच्या विकासासाठी व जागतिक शांततेसाठी युनोची गरज आहे. या संदर्भात युनोचे माजी सरचिटणीस पेरेज – द – कुलयार म्हणतात, 'आजपर्यंत आलेल्या संकटात दुसऱ्या महायुद्धाचे संकट मोठे होते. त्याने युनोला अस्तित्वात आणले. यापुढील काळात युद्धाचे बी नष्ट केले पाहिजे. शस्त्रे, सैन्य कमी केले पाहिजे. शीतयुद्ध संपले असले तरी राजकीय व्यूह रचना सिध्दांतावर अवलंबून पाहिजे. राष्ट्राराष्ट्रामध्ये आर्थिक सहकार्य पाहिजे. अंमली पदार्थ, स्मगलिंग किंवा आंतरराष्ट्रीय गुन्हे हे समाजाचे रोग आहेत. त्यावर सर्वांनी उपाय शोधले पाहिजेत. पर्यावरण, लोकसंख्यावाढ, रोगराई यावर उपाय शोधले पाहिजेत. वरील गोष्टी एक राष्ट्र करू शकत नाही. त्यावर 'युनो' हा एकच पर्याय आहे. आजचे विश्व निर्धनतेच्या आधारावर विभागलेले आहे. विकसनशील राष्ट्रांच्या अर्थव्यवस्था या परदेशी कर्जाखाली दबलेल्या आहेत. उदा. भारत आर्थिक विषमता आणि लोकसंख्येचा स्फोट या गोष्टी समाजाचे विघटन करीत आहेत. मनुष्य नेहमी तणाव आणि संघर्ष करीत आलेला आहे. पुढेही करेल. युनो ही संघटना मानव जातीचे कल्याण साधू शकेल.'

संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदेतच शांततेची संकल्पना समाविष्ट आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने आजपर्यंत केलेल्या कार्याचा आढावा पाहिल्यास संयुक्त राष्ट्रसंघाने जगात शांतता नांदावी असेच कार्य केले आहे. सध्याच्या काळात यानवाने खूप मोठया प्रमाणावर वैज्ञानिक प्रगती केली आहे. विशेषत: अणुक्षेत्रात अनेक संहारक अस्त्रे निर्माण केली आहेत. या पार्श्वभूमीवर सामाजिक सुरक्षीतता व जागतिक शांततेसाठी युनोची आवश्यकता आहे.

## ६.२.२ नागरी हक्क चळवळ : वर्णभेद विरोध

जगाच्या पाठीवर वर्णावरून गोरा व काळा असा भेद केला जात होता. कृष्णवर्णीयांना तुच्छ समजून त्यांना वाईट वागणूक दिली जात होती. अमेरिका व दक्षिण आफ्रिका या दोन देशांमध्ये वर्णभेदाच्या चळवळी मोठया प्रमाणात झाल्या होत्या. कालांतराने कृष्णवर्णीयांना देखील आपल्या हक्काची जाणीव होऊ लागली. आपल्या मूलभूत नागरी हक्कांसाठी ते संघर्ष करू लागले याला नागरी हक्क चळवळ असे म्हणता येईल. अमेरिकेमध्ये

मार्टिन ल्युथर किंग या नेत्याने तर दक्षिण आफ्रिकेत डॉ. नेल्सन मंडेला या नेत्याने अहिंसात्मक मार्गाने लढा देऊन तेथील काळया व निग्रो लोकांना नागरी हक्क मिळवून दिले. या नागरी हक्क चळवळींची व वर्णभेद विरोधी चळवळींची माहिती पुढील प्रमाणे

## आफ्रिकेतील वर्णभेद विरोध चळवळ

इ. स. १७ व्या शतकात युरोपीय राष्ट्रांनी आशिया व आफ्रिका खंडात साम्राज्यवादाद्वारे अनेक वसाहती निर्माण केल्या होत्या. इ. स. १६५२ पासून युरोपीमन लोकांचा आफ्रिकेशी संपर्क वाढून गोरे युरोपीयन लोक आफ्रिकेत कायम वास्तव्यासाठी येऊ लागले. दक्षिण आफ्रिकेत गोऱ्या लोकांनी वसाहती निर्माण केल्यानंतर तेथील काळया लोकांवर बंधने घालण्यास व वंशश्रेष्ठत्वाचे धोरण राबविण्यास सुरु वात केली. १९४८ मध्ये दक्षिण आफ्रिकेचे गोरे अध्यक्ष डॉ. मालन यांनी वर्णभेदाचे धोरण सुरू केले. त्याला आफ्रिकन निग्रोंनी विरोध केला याची माहिती पुढीलप्रमाणे पहाता येईल.

### १. भेदभावाचे समर्थन

युरोपीयन लोक वसाहतवादात मोठया प्रमाणात आफ्रिकेत स्थलांतरीत झाले होते. एकूण ७० लाख युरोपीयन आफ्रिकेत होते. त्यापैकी २५ लाख गोरे युरोपीयन दक्षिण आफ्रिकेत स्थाईक झाले होते. या गोऱ्या लोकांनी मागासलेल्या काळया निग्रो लोकांचा छळ सुरू केला. गौरवर्णीय युरोपीयन लोक जन्मत:च श्रेष्ठ असून त्यांचे वर्चस्व काळया लोकांनी मान्य केले पाहिजे असे युरोपीयन लोकांना वाटू लागले. त्यांनी आफ्रिकेतील मागासलेपणाचा फायदा घेऊन तेथील सत्ता आपल्या हातात घेऊन आफ्रिकन काळया लोकांवर अनेक बंधने लादून आत्याचार सुरू केले.

### २. आफ्रिकेतील वर्णभेदाचे स्वरूप

आफ्रिकेत युरोपातून आलेल्या गोऱ्या लोकांनी आफ्रिकन निग्रोंचा प्रदेश बळकावून त्यांनाच वाईट वागणूक देण्यास सुरूवात केली होती. शाळा, क्लब, कार्यालये, उद्योगधंदे, बँका, वाचनालये इ. सार्वजनिक ठिकाणी वर्णद्वेष पसरला होता. निग्रोंना बसमध्ये सर्वांच्या पाठिमागे किंवा टपावर बसूनच प्रवास करावा लागत असे. निग्रोंना आफ्रिकेत सार्वजनिक बागा, हॉटेलमध्ये फिरण्याची मुभा नव्हती. या भेदाबाबत योहानिस स्टिमॅम म्हणतो की, 'गोरे हे जन्मत:च मालक व राज्यकर्ते असतात, तर काळे लोक हे जन्मत:च गोऱ्यांचे गुलाम असतात म्हणून काळयांशी सहकार्य म्हणजे गोऱ्यांचा यातनामय मृत्यू होम.' ही विचारसरणी युरोपीयनांमध्ये असल्याने त्यांनी आफ्रिकन काळयांना अतिशय वाईट वागणूक दिली.

### ३. आफ्रिकन निग्रोंवरील निर्बंध

१८९९ – १९०२ या काळात झालेल्या बोअर युद्धात ब्रिटिशांनी डचांचा पराभव केला व त्यांच्या ताब्यात असणाऱ्या ट्रान्सवाल, ऑरेंज फ्री स्टेट, नाताळ या वसाहती केप कॉलनीस जोडून या सर्वांचे मिळून दक्षिण आफ्रिका संघराज्य निर्माण केले. त्यामध्ये ७०% निग्रो, १८ % गोरे ९ % मिश्रवंशीय व ३% आशियन लोक होते. तेथे निग्रो बहुसंख्यीय असूनही दक्षिण आफ्रिकेची सत्ता मात्र गोऱ्यांच्या ताब्यात होती. त्यांनी काळया आफ्रिकनांवर अनेक निर्बंध लादले होते.

१. निग्रोंनी शेती व कारखान्यात शारिरीक कष्टाची कामे करावीत.
२. आफ्रिकन निग्रोंना गोऱ्यांनी मतदानाचा हक्क नाकारला.
३. निग्रोंना राखीव प्रदेशाबाहेरची जमीन खरेदी किंवा विक्री करता येत नव्हती.
४. गोऱ्यांच्या वसाहतीपासून दूर नेमून दिलेल्या भागातच (छशसी ऋह्रशीीं) मध्ये निग्रोंना राहण्याची सक्ती होती.
५. निग्रो शेतमजुरांना पास किंवा ओळखपत्र दिले होते. पास असल्याशिवाय निग्रोला वसाहतीमध्ये राहता येत नव्हते.
६. आफ्रिकन निग्रोंची वसाहत अत्यंत गलिच्छ जागेत होती. काटेरी कुंपणानी वेढलेल्या कोठडीमध्ये ८० ते ९० पुरूष रहात.
७. निग्रोंच्या संपावर १९११ च्या कामद्यान्वये बंदी घालण्यात आली.

## ४. सरकारी पातळीवरील वांशिक भेदभाव

केप कॉलनी, नाताळ, ट्रान्सवाल, ऑरेंज फ्री स्टेट या सर्वांचे मिळून दक्षिण आफ्रिकन संघराज्य निर्माण करण्यात आले होते. पुढे या प्रदेशाला दक्षिण आफ्रिका म्हणून ओळखले जाऊ लागले. १९४८ मध्ये डॉ. मालन हे दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान झाले. यावेळेपर्यंत युरोपीयनांच्या ताब्यातून आशियातील बऱ्याच वसाहती स्वतंत्र झाल्या होत्या. त्यामुळे ही वसाहत आपल्या ताब्यात रहावी या हेतूने त्यांनी या वसाहतीमध्ये अनेक कडक निर्बंध घातले होते. पिपल्स रजिस्ट्रेशन लॉ ॲक्ट अंतर्गत प्रत्येक निग्रोला स्वत:चे ओळखपत्र गळयामध्ये अडकावे लागत असे. युरोपीयन व्यक्तीस बिगर युरोपीयन व्यक्तीबरोबर विवाह करण्यास मनाई होती. सार्वजनिक ठिकाणी गोरे व काळे यांच्यासाठी स्वतंत्र व्यवस्था होती. १९४८ मध्ये पंतप्रधान झालेले डॉ. मालन हे निग्रोद्वेष्टे होते. त्यांच्या धोरणानंतरच आफ्रिकेत वर्णभेदाविरूध्द आफ्रिकन जनतेने उठाव सुरू केले.

## आफ्रिकेतील वर्णभेद विरूध्दची चळवळ

युरोपीयन लोकांनी निग्रोंवर अनेक निर्बंध घातले होते. त्यांना राजकीय पक्ष स्थापन करण्यास मनाई करण्यात आली होती. एखाद्याने वर्णभेदाविरूध्द आवाज उठविल्यास त्यास कम्मुनिस्ट घोषीत करून ठार मारले जाई. परंतु या प्रचंड विरोधात देखील आफ्रिकन नॅशनल काँग्रेसची स्थापना झाली. या नॅशनल काँग्रेसकडून शासकीय धोरणाला विरोध झाला. सरकारच्या वर्णभेदाला आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे नेते विरोध करू लागले. अल्बर्ट लुथली याच्या नेतृत्वाखाली कामगारांनी कायद्यावर बहिष्कार टाकला. १९५२ मध्ये गोऱ्या लोकांनी दुकाने व राखीव जागेमध्ये घुसण्याचा प्रयत्न ८००० निदर्शकांनी केला. पोलीसांनी त्यांच्यावर लाठीमार करून अल्बर्ट लुथलीला तुरूंगात डांबण्यात आले. दडपशाहीने हे आंदोलन दडपले असले तरी काळया निग्रोंना समुहशक्तीची जाणीव झाली होती.

आफ्रिकन निग्रोंना हक्क प्राप्त व्हावेत यासाठी आफ्रिकन काँग्रेसने स्वातंत्र्याची सनद जाहिर केली. जोहान्सबर्ग जवळील क्लिपटाऊन जवळ जमून निदर्शकांनी ही स्वातंत्र्याची सनद वाचून दाखविली. ही सनद म्हणजे आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचा कार्यक्रम होय.

त्यानुसार – कायद्यापुढे सर्व समान, मतदानाचा समान हक्क, सभा, भाषण संचार, लेखन, धर्म व मुद्रण स्वातंत्र्य, समान वेतन, समान हक्क, कायाचे तास, मोफत शिक्षण, वैद्रकीस सुविधा इ. बाबी सरकारने निग्रोंना उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी या सनदेत करण्यात आली होती. आफ्रिकन नॅशनल काँग्रेस निग्रोंना हक्क मिळवून देण्यासाठी सतत प्रयत्नशील होती. सरकारने बसच्या भाडयात वाढ केली होती. ही वाढ गरिब निग्रोंना देणे अशक्य होते त्यामुळे त्यांनी बसवर बहिल्कार घातला. हे आंदोलन यशस्वी होऊन सरकारला बसभाडेवाढ मागे घ्यावी लागली. अफ्रिकन नॅशनल काँग्रेसच्या छोटया मोठया आंदोलनांना यश येऊ लागले. त्यामुळे काँग्रेसनेही आंदोलने तीव्र करण्यास सुरूवात केली. राजधानी जोहान्सबर्ग जवळ १९६० मध्ये शार्प व्हील या ठिकाणी सरकारी जुलमी कायद्याचा निषेध करण्यासाठी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने निषेध मोर्चाचे आयोजन केले होते. यावेळी जमावाला पांगविण्यासाठी पोलीसांनी गोळीबार केला त्यात ६७ माणसे मृत पावली. १५००० निदर्शकांना अटक करण्यात आली. कित्येकांना मारहाण करण्यात आली. सरकारच्या या हिंसेला हिंसेनेच उत्तर देण्याची प्रवृत्ती सुरू झाली.

## डॉ. नेल्सन मंडेलांचे कार्य

१९६० मध्ये आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे नेतृत्व डॉ. नेल्सन मंडेला या कृष्णवर्णीय आफ्रिकन नेत्याकडे आले. डॉ. नेल्सन मंडेला यांनी काँग्रेसला लढाऊ बनविले. या काळात आफ्रिकन काँग्रेस जहाल बनली. काँग्रेसच्या जहालपणाला उत्तर देण्यासाठी सरकारने दडपशाही वाढविली. डॉ. नेल्सन मंडेला यांच्यावर गंभीर खटला भरून त्यांना १९६३ मध्ये जन्मठेपेची शिक्षा सुनावून तुरूंगात टाकले. त्यामुळे आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचा जहालपणा काही काळ कमी झाला. अल्बर्ट लुथली ने 'ङशीं ू झशेश्रिश ॠें' हे आत्मचरित्र लिहून आफ्रिकन जनतेत जागृती निर्माण केली. डॉ. नेल्सन मंडेलांच्या अटकेनंतर मोठे आंदोलन झाले नाही. परंतु १९७० मध्ये महागाई व चलनवाढ यामुळे सामान्य लोक त्रस्त झाले. याशिवाय शालेय शिक्षणात डच भाषा शिकण्याची सक्ती केली. याचा विरोध करण्यासाठी सोवेटो येथे जमलेल्या निदर्शक मुलांवर पोलीसांनी गोळीबार केला त्यावेळी २०० शालेय विद्यार्थी ठार झाले. यानंतर हिंसाचार सुरू झाला. यावेळी पोलिसांनी ५०० निग्रोंना ठार मारले.

## आफ्रिकेतील वर्णभेदास जागतिक विरोध

ब्रिटिश राष्ट्रकुलातील देशांनी दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाच्या धोरणास विरोध केला. १९६० मध्ये ब्रिटिश पंतप्रधान हेरॉल्ड मैक मिलन यांनी दक्षिण आफ्रिकेने वांशिक भेदभाव थांबविला पाहिजे असे जाहीर केले. यावेळी आफ्रिकन सरकारने हेरॉल्ड यांच्या भूमिकेकडे दुर्लक्ष करून १९६० मध्ये शार्प व्हीलची कत्तल घडवून आणली. एवढेच नव्हे तर दक्षिण आफ्रिकेत बाहेरील राष्ट्रांना वकिलाती उघडण्यास परवानगी देण्यात येणार नाही असे दक्षिण आफ्रिकेने जाहीर केले. यामुळे दक्षिण आफ्रिकन राष्ट्रकुलातील राष्ट्रांनी संतापून राष्ट्रकुलातून दक्षिण आफ्रिकेची हकालपट्टी केली. संयुक्त राष्ट्रसंघानेही १९६२ मध्ये आफ्रिकेबरोबरचे सर्व व्यवहार थांबवून आर्थिक बहिष्कार घालण्याचा ठराव संमत केला. इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, पश्चिम जर्मनी यांनी दक्षिण आफ्रिकेचा वर्णद्वेषाबद्दल फक्त निषेध

केला. आर्थिक व्यवहार थांबविले नाहीत. त्यामुळे १९७० पर्यंत दक्षिण आफ्रिकेचे निग्रोंवरील अन्यायाचे धोरण चालू होते.

१९६३ मध्ये आदिस आबाबा येथे ३२ राष्ट्रांची परिषद भरली होती. या परिषदेत आफ्रिकन ऐक्यास मान्यता देऊन आफ्रिकेला गुलामगिरीतून मुक्त करण्याचे ठरले. १९७२ मध्ये कैरो येथे आफ्रो. आशियाई देशांची परिषद भरली होती. या परिषदेस ५१ देशांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या परिषदेत आफ्रिकन स्वातंत्र्य चळवळीवर चर्चा होऊन या देशांसाठी स्वतंत्र बाजारपेठ निर्माण करण्याचे ठरले. या संघटनेचा दबाव निर्माण झाला. १९७५ मध्ये अंगोला मोझांबिक या आफ्रिकन देशांनी पोर्तुगीजांविरूध्द लढा देऊन स्वातंत्र्य मिळविले. त्यामुळे इतर आफ्रिकन राष्ट्रांचे स्वातंत्र्य चळवळीसाठी मनोर्धर्य उंचावले. १९८० मध्ये झिंबाम्बे हा देश स्वतंत्र झाला. त्यापासून इतर आफ्रिकन राष्ट्रांनी प्रेरणा घेतली. १९७० पर्यंत अमेरिका निग्रोंच्या मागण्यांबाबत निष्क्रीय होता. परंतु नंतर जागतिक सत्ता बनल्यानंतर अमेरिकेचे धोरण बदलले. अमेरिकेने १९७० नंतर राजकीय सहानुभूती व नागरी हक्क निग्रोंना बहाल केले. त्यामुळे जागतिक पातळीवरून सहकार्य संपल्याने दक्षिण आफ्रिकेच्या निग्रोबाबतच्या धोरणात बदल करणे भाग पडले. १९७९ साली पी. डब्ल्यू बोथा हे दक्षिण आफ्रिकेचे पंतप्रधान झाले. या काळापर्यंत दक्षिण आफ्रिकेवर मोठया प्रमाणावर जागतिक दबाव निर्माण झाला होता. त्यामुळे पी. डब्ल्यू बोथा या पंतप्रधानांनी आफ्रिकेतील निग्रोबाबत आपले धोरण बदलले. त्यानुसार

१. १९७५ मध्ये संघटना स्थापन करण्याचा व संपावर जाण्याचा अधिकार निग्रोंना देण्यात आला.
२. १९८१ च्या नगरपालिका निवडणूकीत निग्रोंना आपले प्रतिनिधी उभे करण्याचा हक्क मिळाला. यात्र सार्वत्रीक निवडणूकीत मतदानाचा अधिकार दिला नाही.
३. १९८४ मध्ये नवी राज्यघटना स्वीकारून द्विगृही कायदेमंडळ निर्माण करण्यात आले. एक मिश्रवंशीयासाठी व दुसरे निग्रो वगळून आशियनांसाठी कायदे मंडळ करण्यात आले.
४. १९८५ मध्ये मिश्रवंशीय विवाह आणि गौर – निग्रो लैंगिक संबंधाना मान्यता देण्यात आली.
५. निग्रोंना ओळखपत्र देण्याचा कायदा रद्द केला.

पी. डब्ल्यू बोथा सरकारने घेतलेले सर्व निर्णय गोऱ्या लोकांचे वर्चस्व राहील असेच होते. जागतिक दबावामुळे हे निर्णय घेण्याचे नाटक या सरकारने केले होते. त्यामुळे आफ्रिकन नॅशनल काँग्रेसने या सुधारणांना विरोध केला व सरकार विरूध्द हिंसक आंदोलने सुरू केली. वांशिक भेदभावास सहकार्य करणारे काळे कौन्सिलर व काळया पोलिसांच्या हत्या आफ्रिकेत सुरू झाल्या. त्यांच्या गळयात गाडीचे टायर अडकवून पेटून देण्यात येत असे. यावेळी १९८५ मध्ये शार्पव्हीलच्या २५ व्या स्मृतीदिनानिमीत्त शोकसभेसाठी निघालेल्या मिरवणूकीवर पोलिसांनी गोळीबार केला. त्यामध्ये ४० निग्रो ठार झाले. या घटनेमुळे संपूर्ण देशात हिंसाचार सुरू झाला. पोलिसांनी हजारो काळया निग्रोंना तुरूंगात टाकले. सर्व वृत्तपत्रे, टेलिव्हीजन, रेडिओ, प्रसारमाध्यमे यावर बंदी घातली. तरी देखील सरकारला ही चळवळ दडपता आली नाही. १९८६ नंतर अमेरिकेने आफ्रिकेची आर्थिक नाकेबंदी सुरू केली. तसेच आफ्रिकेतील अंतर्गत संस्थाचा दबाव वाढत्यामुळे दक्षिण आफ्रिकेला निग्रोविरोधातील धोरण कायद्याने समाप्त करावा लागले.

## दक्षिण आफ्रिकेतील वर्णभेदाची समाप्ती

१९८९ मध्ये आफ्रकेत सार्वत्रिक निवडणूका होऊन एफ. डब्ल्यू. डी. क्लार्क हे सत्तेवर आले. वर्णभेदामुळे आफ्रिकेची नाचक्की झाली. त्यामुळे त्यांना कायद्याने वर्णभेद समाप्त करावा लागला. त्यामुळे त्यांनी खालील निर्णय घेतले.

१. वांशिक भेदभाव करणारे सर्व कायदे रद्दबातल ठरविले.

२. वर्णभेदाविरूध्द लढा देणाऱ्या डॉ. नेल्सन मंडेलांना २७ वर्षाच्या कारावासानंतर मुक्त केले.

३. १९१९ पासून आफ्रिकन गोऱ्यांच्या ताब्यात असणाऱ्या नामिबिया देशाला स्वातंत्र्य देण्यात आले व तेथे काळया लोकांचे शासन निर्माण करण्यात आले.

४. १९९३ मध्ये कायद्यान्वये दक्षिण आफ्रिकेतील सरकारला कायद्यान्वये वर्णभेदास मूठमाती द्यावी लागली.

१९९० मध्ये डॉ. नेल्सन मंडेला तुरूंगातून मुक्त झाले. १९९३ मध्ये ते पहिले कृषणवर्णीय व्यक्ती म्हणून दक्षिण आफ्रिकेचे अध्यक्ष झाले. त्यांनी आफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे पूर्वीचे आक्रमक स्वरूप बदलून काळे व गोऱ्यांमध्ये समझोता होईल असे धोरण सुरू केले. १६ जून १९९९ रोजी डॉ. नेल्सन मंडेला यांनी स्वत:हून अध्यक्षपद सोडले. डॉ. नेल्सन मंडेला यांनी आफ्रिकनांच्या हक्कासाठी आपल्या जीवनाची २७ वर्षे तुरूंगात काढली. त्यामुळे दक्षिण आफ्रिक्तेतील एक महान नेते म्हणून त्यांना प्रचंड लोकप्रियता प्राप्त झाली.

## अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ व वर्णभेद

अमेरिकेतील निग्रो लोकांना नागरी हक्क मिळविण्यासाठी चळवळ करावी लागली. निग्रो मुळचे आफ्रिकेचे होते. त्यांना कापसाच्या शेतीसाठी पकडून अमेरिकेत आणण्यात आले. सुरूवातीला त्यांना 'सेवक' म्हणून कामावर लावले. पण नंतर त्यांना 'गुलाम' म्हणून राबविण्यात यऊ लागले. अमेरिकेत या निग्रोंच्या प्रश्नावर उत्तर अमेरिका व दक्षिण अमेरिका यांच्यात मतभेद होते. दक्षिण अमेरिका शेती प्रधान होती व शेतीसाठी त्यांना निग्रोंवरील गुलामगिरी हवी होती. तर उत्तर अमेरिकेचा गुलामगिरीस विरोध होता. अमेरिक्तेतील नागरी हक्क चळवळ मार्टिन ल्युथर किंग यांच्या नेतृत्वाखाली विकसित झाली.

## अमेरिकेतील वर्णभेदाचे स्वरूप

१८५७ मध्ये अमेरिकेतील निग्रोंबद्दलचा 'डेड स्टॉक खटला' गाजला. निग्रो हे गुलाम आहेत. गुलामांना कायद्याने गुलामगिरीत ठेवले पाहिजे ते नागरिक बनू शकत नाहीत असा निकाल अमेरिकेच्या सुप्रीम कोर्टाने दिला. अमेरिकन यादवी युध्दात उत्तर अमेरिका विजयी झाला. दक्षिणेकडील राज्य निग्रोंना नागरिक म्हणून हक्क व मान्यता देण्यास तयार नव्हती. केंद्र सरकारने दक्षिणेत सैन्य ठेवून निग्रोंचे हक्क कायम ठेवण्याचा प्रयत्न केला परंतु उपयोग झाला नाही. अमेरिकेतील निग्रोंना गोऱ्यांमध्ये मिसळता येत नव्हते. त्यांच्या मुलांना गोऱ्यांच्या शाळेत मज्जाव होता. आगगाडी व बसमध्ये ते गोऱ्यांच्या शेजारी बसू शकत नव्हते त्यासाठी त्यांना वेगळी बाके होती. मतदानाचा हक्क होता पण तो गरीब निग्रोंना बजाविता येऊ नये म्हणून दक्षिणेतील राज्यांनी त्यावर निवडणूक कर लादला होता. शैक्षणीक पात्रतेची अट लादली होती. त्यामुळे गरीब निरक्षर निग्रोंना मतदानाचा हक्क बजाविता येत नसे.

१९४७ मध्ये अमेरिकन अध्यक्ष ट्रुमन यांनी एक नागरी हक्क समिती नेमली होती. या समितीने निग्रोंना अलग करता येत नाही असे म्हटले आहे. १९५० मध्ये सुप्रीम कोर्टाने निकाल दिला की निग्रोंच्या शैक्षणीक संस्थामध्ये गोऱ्यांच्या संस्था सारखे उत्तम व्यवसाय शिक्षण मिळत नाही. त्यामुळे निग्रोंना गोऱ्यांच्या शैक्षणीक संस्थेत प्रवेश द्यावयास हवा. १७ मे १९५४ रोजी सुप्रीम कोर्टाने निकाल जाहीर करून निग्रोंना गोऱ्यांच्या शैक्षणीक संस्थामध्ये प्रवेश द्यावा असे जाहीर केले. परंतु दक्षिणेतील राज्यांनी सनदशिरपणे या निकालाची अंमलबजावणी करणार नाही असे सांगीतले.

## १९५७ चा नागरी हक्क कायदा

अमेरिकन अध्यक्ष आयसेन हॉवरच्या प्रयत्नामुळे १९५७ साली 'नागरी हक्क कायदा' (Civil Right Act) पास करण्यात आला. तसेच या कायद्यान्वये नागरी हक्क मंडळ निर्माण करून त्यावर सहाय्यक कायदा सचिव नेमण्यात आला. जे निग्रो मतदान करण्यास जातील त्यांना केंद्र सरकारने संरक्षण द्यावे असे ठरविण्यात आले तसेच जे लोक निग्रोंना त्यांच्या हक्कापासून वंचित ठेवतील त्यांच्या विरूध्द केंद्रीय न्यायालय आदेश देऊ शकत होते व त्या लोकांवर गुन्हे दाखल करता येत होते. दक्षिणेतील राज्यांनी १९५४ चा सुप्रीम कोर्टाचा निकाल पाळला नाही. जॉर्जिया राज्यात ज्या शाळा निग्रोंना प्रवेश देतील त्यांना सरकारी अनुदान मिळणार नाही असे जाहीर केले. व्हर्जीनियात सार्वजनिक शाळा बंद होऊन गोऱ्यांसाठी खाजगी शाळा सुरू झाल्या. जॉर्जिया, व्हर्जिनिया व मिसीसीपी या राज्यांनी सुप्रीम कोर्टाच्या आदेशाविरूध्द कायदे पास केले तसेच आरकन्सास राज्यातही निग्रोंना शाळेत प्रवेश नाकारला गेला.

## डॉ. मार्टिन ल्युथर किंग व अमेरिकेतील नागरी हक्क चळवळ

मार्टिन ल्युथर किंगचा जन्म १५ जानेवारी १९२९ रोजी जार्जिया राज्यातील अटलांटा येथे झाला. १९४८ मध्ये तो बी. ए. झाला व वडिलांच्या इच्छेनुसार त्याला धर्मोपदेशक व्हायचे होते. मार्टिन ल्युथर किंगवर महात्मा गांधीच्या सत्याग्रहविषय तत्त्वज्ञानाचा फार मोठा प्रभाव होता. वर्णभेदाच्या चळवळीचे नेतृत्व मार्टिन ल्युथर किंग यांनी शेवटपर्यंत केले. १९०९ मध्ये नॅशनल असोसिएशन फॉर दि ॲडव्हांसमेंट ऑफ कलर्ड पीपल या नावाची निग्रो संघटना स्थापन झाली. या संघटनेने निग्रोंचे संघटन व शिक्षणाचा प्रसार केला. १९५४ नंतर अमेरिकेत निग्रोंचे नागरी हक्क आंदोलन उभारले गेले. या आंदोलनाची सुरूवात पुढीलप्रमाणे.

१ डिसेंबर १९५५ रोजी एक महत्त्वाची घटना घडली. रोझा पार्क नावाची निग्रो स्त्री माँटगोमेरी शहरात बसमधून प्रवास करत होती. ती थकून गेली होती म्हणून गोऱ्यांसाठी आरक्षीत असलेल्या जागेवर बसली. तिने शेजारी उभ्या असलेल्या गोऱ्याला जागा दिली नाही असा आरोप करून तिला अटक करण्यात आली. बस कंपनीने निग्रोंबाबत भेदभाव दाखविला म्हणून सर्व निग्रोंनी आंदोलन उभारून बस कंपनीवर बहिष्कार टाकला. या बहिष्कार आंदोलनाचे नेतृत्व डॉ. मार्टिन ल्युथर किंग याने केले. तो पंचवीस वर्षाचा धर्मोपदेशक होता. हे बहिष्कार आंदोलन ३८२ दिवस चालले होते. शेवटी बस कंपनीस

माघार घ्यावी लागली व निग्रोंविषयी भेदभाव बंद करावा लागला. या आंदोलनात निग्रो विजयी होऊन डॉ. मार्टिन ल्युथर किंग हा त्यांचा नेता बनला.

१९५७ मध्ये डॉ. मार्टिन ल्युथर किंग याने सदर्न ख्रिश्चन लीडरशीप कॉन्फरन्स (SCLC) नावाची एक संस्था अटलांटा शहरात स्थापन केली. अटलांटा हे शहर निग्रो आंदोलनाचे केंद्र बनले. तरूणांसाठी स्टुडंट नॉनव्हायलंट कोऑर्डिनेटींग कमिटी (SCLC) ही संघटना स्थापन केली. या संघटनांच्या बळावर डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी अहिंसात्मक आंदोलनास प्रकाश दिला, येशू ख्रिस्ताने प्रेरणा दिली, तर महात्मा गांधीनी कार्य पध्दती दाखविली अशा आशयाचे उद्‌गार डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांनी काढले आहेत. डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांच्यावर खटले भरून तुरूंगात डांबण्यात आले. त्यांच्या घरावर बॉम्ब हल्ला झाला तरी देखील मार्टिन त्यांच्या ध्येयापासून दूर झाले नाहीत. अल्पावधीतच ते निग्रोंचे लोकप्रिय नेते बनले.

## बैठा संप

फेब्रुवारी १९६० मध्ये कॅरोलिना राज्यातील वुलवर्थ शहरात एका उपहारगृहात निग्रोंनी खाद्य वस्तू मागीतल्या. तेथील गोऱ्या सेविकेने नकार दिला म्हणून तेथील निग्रोंनी बैठा संप सुरू केला. जोपर्यंत खाद्यवस्तु मिळत नाहीत तोपर्यंत आम्ही येथून उठणार नाही. काही तासानंतर उपहारगृहाच्या गोऱ्या मालकाने त्यांची मागणी पूर्ण केली. हा बैठा संप यशस्वी झाल्याचे पाहून निग्रोंचा उत्साह वाढला व अनेक ठिकाणी त्यांना उपहारगृहे खुली होऊ लागली.

## १९६० चा नागरी हक्क कायदा

आमसेन हॉवरने १९६० साली नागरी हक्क कायदा पास करून घेतला. या कायद्यान्वये जे लोक निग्रोंना दमदाटी करतील व केंद्रीय शासनाचे आदेश झिडकारून मतदानास प्रतिबंध करतील त्यांना दंड करण्यात येईल. तसेच कारावासाची शिक्षा देण्यात येईल परंतु या कायद्याने निग्रोंचे समाधान झाले नाही. जॉन एफ. केनडी हा निग्रोंच्या बाबत सहानुभूती असणारा अध्यक्ष होता. नागरी हक्क कायद्याने दिलेले अधिकार निग्रोंना प्रत्यक्षात मिळाले पाहिजे यासाठी त्याने निग्रोंची उच्च पदावर नेमणूक केली. अनेक निग्रोंना मतदानाचा हक्क मिळवून दिला.

## चोविसावे संशोधन

अध्यक्ष केनेडीच्या प्रमत्नामुळे काँग्रेसने घटनेचे चोविसावे संशोधन मान्य केले. केंद्रीय निवडणूकीच्या वेळी ज्या निग्रोंनी पोलटॅक्स किंवा अन्य कर भरलेले नसतील तर या कारणावरून त्यांचा मतदानाचा हक्क हिरावून घेता येणार नाही अशी तरतूद या संशोधनात होती. यामुळे निग्रोंना मतदानाचा विस्तृत हक्क प्राप्त झाला. तसेच केनेडीच्या काळात अटलांटा, डलास, न्यूऑर्लिन्स, मेंफिस शहरात गोऱ्यांच्या शाळांमध्ये निग्रो मुलांना प्रवेश मिळाला. त्यामुळे इतरही ठिकाणी निग्रोंना हळूहळू प्रवेश मिळू लागले. त्याचप्रमाणे मेरीडीथ या विद्यार्थ्यास केंद्राने सैनिक पाठवून विद्यापीठात प्रवेश मिळवून दिला. निग्रोंना

हळूहळू हक्क मिळत होते तरी देखील दक्षिणेकडे वॉर्नेट व वॉलेस येथील गव्हर्नररांनी दक्षिणेत वर्णभेद पसरविला होता. त्यामुळे दक्षिणेकडे दंगली सुरू झाल्या. विल्यम मूर या निग्रो नेत्याचा खून झाला. बर्मिगंहॅम शहरात कित्येक आठवडे दंगल चालू होती.

केनेडीचे नागरी हक्क विधेयक

१९६३ मध्ये केनेडीने निग्रोंवरील अन्याय दूर व्हावा म्हणून नागरी हक्क विधेय काँग्रेसपूढे चर्चेसाठी ठेवले होते. त्यानुसार देशातील सार्वजनिक संस्था, उपहारगृहे, निवासगृहे, वसतिगृहे, दुकाने, विक्री केंद्रे, शिक्षण संस्था इ. ठिकाणी निग्रोंना प्रवेश मिळावा. शिक्षण घेण्यासाठी निग्रोंना आर्थिक मदत मिळावी. हे विधेयक पास होण्या आगोदर केनेडीचा खून करण्यात आला. केनेडीचे हे विधेयक १९६४ मध्ये नागरी हक्क कायदा या नावाने पास झाले. हा निग्रोंच्या हक्काबद्दल योग्य तो न्याय होता. मार्टिन ल्युथर किंगने निग्रोंच्या हक्काबद्दल जागृती व्हावी यासाठी योर्चा काढला होता. या योर्चात फार योठया संख्येने निग्रो सहभागी झाले होते. यावेळी यार्टिन ल्युथर किंगने आवेषपूर्ण भाषण केले होते. त्यामुळे यार्टिनला निग्रो चळवळीचा फार योठा पाठिंबा प्राप्त झाला होता. आपल्या विचारसरणीच्या प्रसारासाठी डॉ. यार्टिन ल्युथर किंग यांनी अनेक पुस्तके लिहिती ती म्हणजे StriedTowards Freedom (१९५८), Strength True Love (१९६३), Where Doe We Go From Here (१९६७), The Trumpt of Conscience (१९६८), I Have A Drea, (१९६८), My Life With Miste King (१९६८) पत्नी कोरेटा यांनी लिहिल्या सर्व पुस्तकांमधून निग्रोंच्या हक्काची व चळवळीची वाटचाल नमूद करण्यात आली आहे.

४ एप्रिल १९६८ रोजी एका गौरवर्णीय याथेफिरूने डॉ. यार्टिन ल्मुथर किंग यांची वयाच्या ३९ व्या वर्षी हत्या केली. त्शाचा परिणाम म्हणून निग्रोंनी वॉशिंग्टन येथे दंगली घडवून लुटालुट केली. यार्टिन ल्मुथर किंग हे कृष्णवर्णीयांसाठी लढा देणारे एक महान नेतृत्व होते. यार्टिन ल्मुथर किंग यांच्या कामर्याच्या स्मरणार्थ जानेवारी महिन्याचा तिसरा सोमवार हा सुट्टीचा दिवस म्हणून अध्यक्ष रेनाल्ड रेगन यांनी जाहिर केला. एका कृष्णवर्णीय नेत्याचा अमेरिकेत प्रथमच बहुमान केला गेला. अमेरिकेत निग्रोंचा पूर्ण विकास झाला नसला तरी त्यांची प्रगती योठया प्रमाणावर झाली होती. जॉन केनेडी व जॉन्सन यांनी त्यांच्या विकासासाठी १९६१ ते १९६८ पर्यंत प्रयत्न केले होते. निग्रोंची कारखान्यात, कार्यालयात, सार्वजनिक ठिकाणी अधिकार पदावर संख्या वाढली. निग्रोंचे दरडोई उत्पन्न वाढले तरी देखील निग्रोंचे दु:ख पूर्ण संपले नव्हते. डॉ. यार्टिन ल्मुथर किंग यांच्या कार्यामुळे काळी संस्कृती ही सुंदर आहे (Black is Beautiful) यातूनच काळी सत्ता (Black Power) व काळे आंदोलन सुरू झाले. मध्यमवर्गीय निग्रोंना देखील आपले स्वत:चे राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक जीवन घडविण्यासाठी निग्रोंना स्वत:ची काळी सत्ता हवी आहे असा विचार प्रवाह अमेरिकेत सुरू झाला. पुढे अमेरिकेत तरूण निग्रोंनी 'ब्लॅक पँथर पार्टी' हा जहाल पक्ष स्थापन केला. या पक्षाच्या सदस्यांनी सॅक्रामेंटो या कॅलिफोर्नियाच्या राजधानीत बंदूका घेऊन पथसंचलन केले. याचे सदस्य वेगवेगळ्या आरोपाखाली तुरूंगात गेले. काही गोरे जहाल तरूण या पंथर पार्टीला सहकार्य करतात.

परंतु सामान्य निग्रो नागरीक यात्र या पँथर पार्टीला सहकार्य करीत नाही. १९७० नंतर अमेरिकेतील वर्णभेदाची तीव्रता कमी होत गेली. अमेरिकेत अनेक वंर्षांचे मिश्रण असल्यामुळे वर्णभेदाची तीव्रता फारशी जाणवत नाही. डॉ. यार्टिन ल्मुथर किंग व डॉ. नेल्सन मंडेला यांच्या प्रयत्नामुळे निग्रोंना वर्णभेदाची जाणीव होऊन त्यांना नागरी हक्क प्राप्त झाले.

## ६.२.३ स्त्रियांच्या चळवळी

समान हक्क, समान दर्जा आणि स्वातंत्र्य या तीन तत्त्वांची देणगी फ्रेंच राज्यक्रांतीने जगाला दिली. प्रत्येकाला समान हक्क आहे. प्रत्येकजण कायद्यापुढे समान आहे असे म्हटले असले तरी युरोपात स्त्रीयांना समान हक्क, समान दर्जा दिला जात नव्हता. तसेच संपूर्ण जगात स्त्रीयांना पुरूषांच्या तुलनेत दुय्यम दर्जा दिला जात होता. प्राचीन काळापासून पुरूष स्त्रीयांवर वर्चस्व गाजवित आला आहे. २० व्या शतकापर्यंत समाज अर्थव्यवस्था, प्रशासन, धर्म, कौटुंबिक व सांस्कृतिक क्षेत्रात पुरूषप्रधान संस्कृतीचेच वर्चस्व होते. आधुनिक काळात या पुरूषप्रधान व्शवस्थेविरूध्द स्त्रीमुक्ती अथवा स्त्री हक्काचे आंदोलन युरोप व अमेरिकेत सुरू झाले. १९ व्या शतकात भारतातही स्त्री सुधारणांना सुरूवात झाली. त्यालाच स्त्रीमुक्ती चळवळ असेही म्हणतात. सुरूवातीला राजकीय पक्षांच्या आश्रयाने चालणाऱ्या या आंदोलनाला नंतरच्या काळात स्वयंस्फूर्ती लाभली आणि संपूर्ण जगभर या चळवळींना सुरूवात झाली.

### स्त्रीवाद म्हणजे काय?

स्त्रीवाद या शब्दाचा अर्थ प्रथम समजून घेणे आवश्यक आहे. Female या इंग्रजी शब्दाचा अर्थ स्त्री असा होता. ऋशाळपळीीी म्हणजे स्त्रीप्राधान्य व Feminist म्हणजे स्त्रीवाद होय. स्त्रीवाद म्हणजे स्त्रीयांनी लिहिलेली स्त्रीयांची पुस्तके, स्त्रीयांनी मांडलेले प्रश्न या बाबींचा समावेश होत नसून स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीने समान हक्क, समान दर्जा, समान स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. तसेच पुरूषप्रधान वर्चस्वापासून मुक्तता मिळाली पाहिजे या बाबींचा आधुनिक स्त्रीवादामध्ये समावेश होतो. स्त्रीयांना देखील पुरूषांच्या बरोबरीने सर्वच क्षेत्रात संधी मिळाली पाहिजे ही आधुनिक स्त्रीवादी चळवळींची प्रमुख मागणी आहे.

### स्त्रीवादी चळवळींची सुरूवात

१९४८ मध्ये न्यूयॉर्क शहरात 'द फर्स्ट वुमेन्स राईटस कन्व्हेन्शन' हे स्त्रीयांसंबंधी आधिवेशन भरले होते. या अधिवेशनात स्त्रीयांच्या गुलामगिरीविरूध्द कडक शब्दात चीड व्यक्त करण्यात आली होती. १८७९ साली इब्सेनने 'डॉल्स हाऊस' या नाटकात स्त्रीयांचे प्रश्न नोरा या पात्राच्या रूपाने मांडले होते. डेल्मर (Delmer) या राजकीय विचारवंताने स्त्रीवादाची संकल्पना स्पष्ट करताना म्हटले की, 'स्त्री - पुरूष संबंधातील परस्पर विरोधातून स्त्रीवादी चळवळ निर्माण झाली. आपल्यावर होणाऱ्या जुलमाविरूध्द तिने केलेला प्रतिवाद म्हणजे स्त्रीवाद होय. या स्त्रीवादी चळवळींचा उद्गफ किंवा सुरूवात पाहावयाची असल्यास फ्रेंच राज्यक्रांतीचा आढावा घ्यावा लागतो.

फ्रेंच राज्यक्रांतीने स्वातंत्र्य, समता, बंधुत्व ही तीन तत्त्वे जगास दिली. फ्रेंच राज्यक्रांतीनंतर Rights of Man ही मानवी हक्कांची सनद लिहिण्यात आली. त्यातून स्त्रीयांना पूर्णपणे वगळण्यात आले होते. त्यामुळे फ्रेंच राज्यक्रांतीतील स्वातंत्र्य हे फक्त पुरूषांपुरतेच मर्यादित आहे याची जाणीव स्त्रीयांना झाली व त्यातूनच स्त्रीमुक्ती चळवळीस सुरुवात झाली. थॉमस पेनच्या ठळसहीं ेष चरप ला उत्तर म्हणून मेरी बॉलस्टन क्रॉफट (गोर्डेला विचारणे) या मुळच्या लंडन येथील पत्रकार स्त्रीने १८८२ मध्ये तळपवळलरींळेप of Rights of Women (स्त्री हक्काचे समर्थन) हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ म्हणजे स्त्रीमुक्ती चळवळीचा जाहिरनामाच होय. मेरी बॉलस्टनच्या या ग्रंथानंतर तिच्या विचारांना पाठिंबा देणारे अनेक लेखक, लेखिका युरोपमध्ये पुढे आल्या. त्यामध्ये मागरिट फुलर, एलिझाबेथ स्टॉन्टन, काँडोरसेहने, व्हॉन हिप्पेल इ. अनेक लेखकांनी स्त्रीवादी चळवळीसंबंधी व स्त्रीयांच्या हक्कासंबंधी लेखन केले. सिमॉन – द – बुव्हा या फ्रेंच लेखिकेने १९४९ मध्ये The second Sex या नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये स्त्री जन्मत नाही तर जन्मल्यानंतर तिच्यावर स्त्रीत्व लादले जाते किंवा स्त्रीत्व घडविले जाते. आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ तिने अतिशय खुलेपणाने लिहिले आहे. जगातील स्त्रीवादी चळवळींची वाटचाल पुढीलप्रमाणे सांगता येईल.

## पश्चिमात्य राष्ट्रातील स्त्री चळवळ

१९ व्या शतकामध्ये युरोपीयन स्त्रीयांना आपल्या हक्काची पूर्णत: जाणीव झाली. १९ व्या शतकाच्या मध्यामध्ये जॉन स्टुअर्ट मिल व हॅरिएट टेलर यांनी स्त्रीयांच्या हक्कासंबंधी लेखनास सुरूवात केली. १८८० नंतर खऱ्या अर्थाने स्त्रीवादी चळवळीला जोर प्राप्त झाला. जॉन स्टुअर्ट मिल या राजकीय विद्वानाने The Subjection of Women हा ग्रंथ लिहून स्त्री हक्क चळवळीस वैचारिक पाया निर्माण करून दिला. पुरूषांचे स्त्रियांवरील वर्चस्व कमी करून स्त्री – पुरूष यांना समानता दिली पाहिजे असे मिलचे मत होते. पाश्चिमत्त्य राष्ट्रांतील स्त्रीवादी चळवळींचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.

## १. अमेरिकेतील स्त्री चळवळ

१९१० मध्ये कोपनहेगन येथे आंतरराष्ट्रीय महिला परिषद भरली होती. या परिषदेत ८ मार्च हा दिवस 'महिला दिन' पाळण्याचे ठरविले. पहिल्या महायुध्द काळात युरोप व अमेरिकेतील स्त्रीयांनी पुरूषांच्या बरोबरीचे काम केले. १९१८ पासून अमेरिकेतील स्त्रीयांना मतदानाचा हक्क मिळाला. पहिल्या महायुध्दात स्त्रीयांनी जे भरीव काम केले होते त्यामुळे त्यांना हा हक्क मिळाला होता. अमेरिकेत बारा घटक राज्यातील ३२ स्त्री नेत्यांनी एकत्र येऊन बेटी फ्रिडन यांच्या अध्यक्षतेखाली छरींळेपरश्र जीसरपळीरींळेप षीं थेशप (छे) ही स्त्रीयांची राष्ट्रीय संघटना २० ऑक्टोबर १९६६ रोजी स्थापन केली. ही संघटना स्त्रीयांना त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी होती. या संघटनेची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे होती.

१. स्त्रीयांच्या समान हक्कासाठी घटना दुरूस्ती.

२. नोकऱ्यात लिंगभेद रद्द करणाऱ्या कायद्याचा आग्रह धरणे.

३. बाळंतपणाची रजा.

४. नोकरी करणाऱ्या पालकाच्या उत्पन्नातून मुला – बाळांच्या शिक्षणावर व घरगुती बाबींवर होणाऱ्या खर्चास प्राप्तीकरातून सूट.

५. बालसंगोपन केंद्राची स्थापना

६. समान धंदे शिक्षण

७. स्त्रीयांच्या संतती नियमनाच्या हक्कांचे संरक्षण.

स्त्रीवादी संघटनांनी स्त्रीयांना वरीलप्रमाणे हक्क मिळावेत म्हणून प्रयत्न केले. कायदे आणि पोलिस यांच्या अनेक व्यवहारामध्ये परिवर्तन केले. १९८६ मध्ये बायकांना मारझोड करणाऱ्या नवऱ्यांची बायकांनी तक्रार केली नसतानाही नवऱ्यांना अटक करण्याचे धोरण सरकारने अवलंबिले होते. स्त्रीवादी राजकारण, पर्यायी आरोग्य सेवा, स्त्रीवादी वृत्तपत्रे इ. बाबी अमेरिकेत सुरू होऊन एक सांस्कृतिक स्त्रीवाद उदयास येत आहे. याच स्त्रीवादी गटाने रासामनिक कचरा व मानवजातीस हानिकारक असणारी आण्विक शस्त्रे यांच्या विरूध्द आवाज उठविला आहे.

## २. फ्रान्समधील स्त्रीहक्क चळवळ

फ्रेंच राज्यक्रांतीच्या काळात चार्लस फुरियर या नेत्याने स्त्रीयांवर होणाऱ्या आर्थिक आणि लैंगिक अत्याचाराविरूध्द टीकेची झोड उठविली. तसेच स्त्रीयांवरील अन्यायाबाबत उदासीन असणाऱ्या उच्चवर्णीय स्त्रीयांचीही त्याने हजेरी घेतली. ९ जानेवारी १९०८ रोजी फ्रान्स मध्ये जन्मास आलेल्या सिमॉन दि बुव्हा या लेखिकेने स्त्री हक्क चळवळीसाठी खूप लिखाण केले. तिने अनेक कथा, कादंबऱ्या, चरित्रे, निबंध, वृत्तपत्रलेखन, आत्मचरित्र लिहिले. तिची स्त्री हक्का वरील गाजलेली कादंबरी ढहश डशलेपव डशु या नावाने प्रसिध्द आहे. या कादंबरीत कोणी स्त्री म्हणून जन्मत नाही तर स्त्रीत्व घडविले जाते. १९४९ मध्ये ही कादंबरी प्रसिध्द झाली होती. पहिल्या महायुध्दानंतरच युरोपात एक एक देश स्त्रीयांना मतदानाचा हक्क देत होता. परंतु फ्रान्स व इटलीमधील स्त्रीयांना १९४५ मध्ये मतदानाचा हक्क देण्यात आला. त्यानंतर विद्यार्थी व कामगार संघटना यांच्या सहाय्याने काही काळ स्त्रीवादी चळवळ भरकटली होती. १९८० मध्ये फ्रान्स या देषात स्त्रीयांच्या हक्कासंबंधी स्त्री हक्क मंत्रालय स्थापन झाले. १९८० च्या दशकात स्त्रीवादी चळवळींनी लैगिंक अत्याचार, गर्भपात, गर्भनियंत्रण इ. बाबीतील कायदे बदलण्यासाठी प्रयत्न केले. त्याप्रमाणे बदल करणारे फ्रान्स हे पहिले राष्ट्र होय.

## ३. इंग्लंडमधील स्त्रीवादी चळवळ

इंग्लंडमध्ये स्त्रीहक्क चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या मेरी बॉलस्टन क्रॉफ्ट या स्त्रीने १८८२ मध्ये तळपवळलरींळेप ेप ढहश ठळसहीीं ेष थोशप या ग्रंथात स्त्री हक्काची जोरदार मागणी व समर्थन केले आहे. इंग्लंडमधील जॉन स्टुअर्ट मिलनेही ढहश डीलक्षशलींळेप ेष थोशप हा ग्रंथ लिहून स्त्रीहक्क चळवळीला वैचारिक पाया उपलब्ध करून दिला आहे. १९१५ मध्ये व्हर्जिनिया वुल्फ या लेखीकेने 'द व्हायेज आऊट' व 'अ रूम ऑफ वन्स ओन' या कादंबऱ्या लिहून स्त्रीयांचे प्रशन मांडण्याचा प्रयत्न केला. १९१८ मध्ये इंग्लंडमधील स्त्रीयांना मतदानाचा हक्क मिळाला. परंतु त्यासाठी इंग्लंडमधील स्त्रीयांनी केलेला संघर्ष

महत्त्वपूर्ण आहे. १९६० मध्ये इंग्लंडमधील स्त्री चळवळीच्या संदर्भात अमूलाग्र बदल झाले. समान कामाला समान दाम, विषमतेविरूध्द कायदेशीर उपायोजना व सामाजिक सुधारणा या मागण्या स्त्रीवादी चळवळीने केल्या. १९७८ मध्ये इंग्लंडमधील स्त्रीवादी चळवळ दुभंगली गेली. १९८० मध्ये मार्गारेट थॅचर पंतप्रधानपदी आल्यानंतर स्त्रीवादी राजकारण मागे पडले. १९८० नंतरच्या स्त्रीवादी चळवळीने इंग्लंडमध्ये बालवाडयांतील स्त्रीयांचे वेतन, मारहाण झालेल्या स्त्रियांसाठी मदत केंद्र, बलत्कार झालेल्या स्त्रीयांसाठी मदत केंद्र अशी कामे सुरू केली.

## ४. आयर्लंडमधील स्त्रीवादी चळवळ

आयर्लंडमधील स्त्री चळवळीचा प्रभाव राजकारणावर फार पडलेला दिसत नाही. शिवाय तेथे स्त्रीवादी राजकारणही उभे राहिले नाही. प्रत्येक पक्षाने आपल्या जाहिरनाम्यात स्त्रियांचे प्रश्न मांडायचे प्रयत्न केला. परंतु सरकारकडून प्रत्यक्षात धोरणात्मक पातळीवर कोणतेही बदल झाले नाही. गर्भपाताचा हक्क स्त्रीयांना मिळावा यासाठी लेबर पार्टीने प्रयत्न केल्याचे दिसते. १९९० नंतर आयर्लंडमध्ये स्त्रीयांच्या संदर्भात बदल घडून आले. स्त्रीयांसाठी रोजगार, बालसंगोपन सुविधा, कुटूंबांतर्गत अधिक हक्क, सार्वजनीक जीवनात स्त्रीयांना संधी इ. बाबींमध्ये सुधारणा झाल्याचे आढळते.

## ५. तुर्कस्थानातील स्त्रीवादी चळवळ

अविकसीत राष्ट्रांतील स्त्रीयांप्रमाणेच तुर्की स्त्रीयांचे जीवन मागासलेले व पुरूषांच्या वर्चस्वाखाली अडकलेले होते. पाश्चात्त्य राष्ट्रांप्रमाणे केमाल पाशाने तुर्कस्थानचे आधुनिकीकरण घडवून आणण्याचा प्रयत्न केला. स्त्री – मुक्ती शिवाय तुर्कस्थानचे आधुनिकीकरण शक्य नाही हे केमाल पाशा जाणून होता. केमाल पाशाच्या प्रभावी व पोलादी नेतृत्वाखाली तुर्की स्त्रीयांचे जीवन आधुनिक बनले. तुर्की राज्यघटनेनुसार २० एप्रिल १९२४ पासून घटना लागू होऊन सर्व स्त्रीयांना पुरूषांच्या बरोबरीचे हक्क देण्यात आले. स्त्रीच्या विवाहाचे वय किमान १७ वर्षे आणि पुरूषाचे वय किमान १८ वर्षे निश्चीत करण्यात आले. १९२६ मध्ये विवाहाची नोंदणी कायदेशीरपणे सरकारी कार्यालयात करणे सक्तीचे करण्यात आले. इस्लामी परंपरेत असणारी बहुपत्नीत्वाची व तलाक पध्दती बंद करण्यात आली. स्त्रियांनाही घटस्फोट घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. तसेच स्त्रियांना कायद्याने वारसा हक्क प्राप्त झाला. पडदापध्दती बंद झाली. तसेच सर्व स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करण्यात आली. व्यवसाय, उद्योगधंदे, कारखाने, कार्यालये, शिक्षण, मुलकी सेवा इ. ठिकाणी स्त्रिया काम करू लागल्या. १९३५ च्या निवडणूकीत ग्रँड नैशनल असेंब्लीत १७ स्त्रिया निवडून आल्या तर म्युनसीपल कॉर्पोरेशनच्या निवडणूकांमध्येही स्त्रिया सहभागी होऊ लागल्या.

## ६. स्पेनमधील स्त्री हक्क चळवळ

स्पेन या देशात जनरल फँकोची १९७५ पर्यंत सत्ता होती. त्याच्या मृत्यूनंतर स्त्रीवादाची सुरूवात झाली. कुटूंबनियोजनाचे कायद्यात रूपांतर आणि वेश्या व्यवसायाला गुनहेगारीपासून मुक्त करणे हे दोन मोठे संघर्ष स्पेनमधील स्त्रीवादी चळवळीला करावे

लागले. स्त्री चळवळीने स्पॅनिश समाज व संस्कृती बदलण्यात यश मिळविले. १९९० च्या दशकात गर्भधारणा आणि अपत्य जननाचे प्रमाण मोठया प्रमाणात घटले होते. कुटूंबातील हिंसाचाराचे प्रश्न, स्त्रियांचे समान हक्क, स्त्रि शिक्षण, लिंग भेद बंदी इ. बाबींवर स्पेनमध्ये स्त्रीवाद्यांनी संघर्ष केलेले दिसतात.

## ७. इटालीतील स्त्रीवादी चळवळ

इटालीमध्ये १९७० मध्ये स्त्रीवादी चळवळ उदयास आली. या चळवळीत मध्यम वर्ग व नोकरदार स्त्रियांचा भरणा होता. तरी देखील राजकीय विचारसरणीत या विषयाकडे गांभीर्याने पाहिले गेले नाही. १९९५ साली स्त्रियांच्या राखीव जागा रद्द झाल्या. १९९५ नंतर इटालीतील स्त्रिया उच्च शिक्षण, करिअर यात कार्यरत झाल्याचे दिसते.

## ८. पहिल्या महायुध्द काळातील युरोपातील स्त्रीमुक्ती चळवळ

पहिल्या महायुध्द काळात युरोपीयन स्त्रियांनी आपआपल्या देशाच्या युध्द प्रयत्नांना राष्ट्रभक्तीच्या व राष्ट्रहिताच्या भावनेतून प्रामाणिकपणे आटोकाट मदत केल्यामुळे पहिले महायुध्द समाप्त होताच १९१८ मध्ये इंग्लंड, पोलंड, हंगेरी, स्वीडन, जर्मनी, ऑस्ट्रीया इ. राष्ट्रांनी आपआपल्या देशातील स्त्रीयांना मतदानाचा अधिकार देण्यात आला. १९२० मध्ये अमेरिकन स्त्रीयांना तर १९४५ मध्ये फ्रान्स व इटाली या राष्ट्रातील स्त्रीयांना मतदानाचा अधिकार मिळाला.

१९१८ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटने तीस वर्षावरील स्त्रीयांना मतदानाचा हक्क दिला. तथापि वयात आलेल्या सर्व प्रौढ स्त्रीयांना मतदानाचा हक्क पाहिजे होता. त्यामुळे तेथील स्त्रीयांनी चळवळ सुरू केली. एवढेच नव्हे तर पार्लमेंटमध्ये जाऊन त्यांनी गोंधळ घातला. मंत्रीमंडळ सदस्यांवर हल्ले चढविले. त्यामुळे दंगेखोर स्त्रीयांना तुरूंगात टाकले. त्यांनी तुरूंगात अन्नत्याग केला. समान मताधिकार मिळविण्यासाठी इंग्लंडमधील स्त्रीयांनी अत्यंत चिवट संघर्ष केला. शेवटी १९२८ मध्ये २१ वर्षावरील सर्व स्त्री - पुरूषांना इंग्लंडमध्ये मतदानाचा हक्क मिळाला.

## ९. दुसऱ्या महायुध्दानंतरची स्त्री मुक्ती चळवळ

दुसऱ्या महायुध्द काळात नाझी विरोधी युध्द प्रयत्नांमध्ये युरोपीय स्त्रीयांनी सक्रीय भाग घेतला होता. चीनच्या साम्यवादी क्रांतीतही स्त्रीया सक्रीय सहभागी होत्या. जपानमध्ये सुध्दा आरियोशी सावको या महिलेने जपानमधील स्त्री चळवळीचे नेतृत्व केले. तिने स्त्रीया अबला नसून सबला आहेत हे आपल्या लिखाणातून दाखवून देण्याचा प्रयत्न केला. त्याचप्रमाणे दुसऱ्या महायुध्दाच्या समाप्तीनंतर आशिया आणि आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. या देशांच्या स्वातंत्र्य चळवळीत स्त्रीया पुरूषांच्या बरोबरीने लढल्या. इस्त्रामलमधील स्त्रीयांनी आपल्या देशाप्रती दाखविलेला राष्ट्राभिमान उल्लेखनिय आहे. सोव्हिएट युनियनमध्ये विघटन किंवा पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटींचा पाडाव यामध्ये तेथील स्त्रीयांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

१९७० मध्ये इंग्लंडमधील ऑक्सफर्ड विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या

'स्त्रीमुक्ती' या विषयावरील परिसंवादात समान वेतन, समान काम, गर्भपात व संतती नियमन साधनांच्या मुक्त वापरास परवानगी इ. मागण्या केल्या. १९६० ते १९८० या काळात विविध मागण्यांसाठी युरोपातील स्त्रीया अक्षरश: रस्त्यावर उतरल्या होत्या. त्यामुळेच १९८० मध्ये कॅथॉलिक राष्ट्रांमध्ये चर्चेचा कडाडून विरोध असतानाही संतती नियमनाची साधने वापरण्यास आणि गर्भपातास कायदेशीर मान्यता देणारे कायदे संमत करण्यात आले.

## १०. भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ

भारतात इंग्रजांच्या आगमनानंतर सुधारणांना सुरूवात झाली. १८१५ मध्ये भारतीय प्रबोधनाचे जनक राजाराम मोहन रॉय आणि त्यांच्या ब्राम्होसमाजाने भारतीय समाजात अस्तित्वात असलेल्या बालविवाह, सतीप्रथा, बहुपत्नीत्व, पडदा पध्दती या अन्यायकारक रूढींवर कडाडून हल्ला केला. राजाराम मोहन रॉय यांनी 'आत्मिक सभा' स्थापन करून सती प्रथेला कडाडून विरोध केला. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागरांनी स्त्रीयांच्या विधवा प्रश्नावर रान उठविले. या सर्वांच्या चळवळीचे फलित म्हणजे १८२९ मध्ये विल्यम बेटिंक या इंग्रज गव्हर्नरने सती प्रथा बंदीचा कायदा केला. हा कायदा सुरुवातीला बंगालपुरता मर्यादित होता. नंतर पुढे हा कायदा १८७० नंतर संपूर्ण भारतासाठी लागू झाला. बालहत्या ही एक वाईट प्रथा भारतीय समाजात रूढ होती. मुलगी जन्मास आली की तिला लहानपणीच मारून टाकण्याची अमानुष प्रथा कच्छ, गुजरात आणि राजस्थानमध्ये प्रचलित होती. रजपूत जमातीमध्ये मुलीला जन्मतःच ठार मारण्याची प्रथा होती. राठोड, जाट, मेवाती या लोकांमध्ये स्त्री - भृणहत्येचे मोठे प्रमाण होते. १८०४ च्या कायद्यान्वये बालहत्या बेकायदेशीर ठरविण्यात आली.

१८७२ मध्ये संमत झालेल्या नागरी विवाह कायद्याद्वारे बालविवाहावर बंदी घालण्यात आली व बहुपत्नीत्वाची प्रथा समाप्त करण्यात आली. १८९१ मध्ये संमती वयाचा कायदा पास होऊन विवाहाचे वेळी मुलीचे वय कमीत कमी १२ वर्षे असावे. पुढे १९३० च्या कायद्याने १४ वर्षे असावे हे निश्चीत केले. भारतात विधवा विवाहास बंदी होती. १८८८ मध्ये मलबारींनी म्हटले होते की, हिंदूस्थानमध्ये तीस वर्षाखालील २१ लाख स्त्रीयांना विधवा राहावे लागते. तर आगरकरांनी सुधारक या पत्रात २५ नोव्हेंबर १९९७ साली लिहिले होते की, 'ब्राम्हणांच्या स्त्रीयांपैकी तिसरा हिस्सा स्त्रीया विधवा असतात. एकंदरीत जातींपेक्षा ब्राम्हण जातीत विधवांचे शेकडा प्रमाण ५० हून जास्त आहे. ब्राम्हणी स्त्रीया जितक्या विधवा असतात त्यापैकी १/३ हून अधिक बालविधवा असतात.' भारतातील अनेक समाजसुधारकांनी केलेल्या प्रयत्नामुळे लॉर्ड डलहौसीच्या काळात १८५६ मध्ये विधवा विवाहाचा कायदा संमत झाला. राजाराम मोहन रॉय यांच्या अनुयायांचा भक्कम पाठिंबा लाभल्यामुळे आर्यसमाजाने जालंधर येथे 'महाकन्या विद्यालय' सुरू केले. महाराष्ट्रात डेक्कन एज्युकेशन सोसायटी स्थापन झाली. १८५१ मध्ये महात्मा जोतिबा फुले यांनी पुण्याला पहिली मुलींची शाळा काढली. सावित्रीबाईंनी या मुलींना शिक्षण दिले. १८५७ - ५८ मध्ये ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या प्रयत्नामुळे बंगाल प्रांतामध्ये ३५ मुलींच्या शाळा सुरू झाल्या. १८५४ मध्ये चार्लस वुडच्या शिक्षणविषयक खलित्यात स्त्रीशिक्षणाची गरज प्रतिपादन करण्यात आली होती.

१८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी स्त्री - पुरूष तुलना नावाचा ग्रंथ लिहून भारतीय स्त्रीयांचे प्रश्न मांडले होते. त्याचप्रमाणे बाळशास्त्री जांभेकर, गंगाधर शास्त्री फडके, महर्षी धोंडो केशव कर्वे, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले, रमाबाई रानडे, राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर इ. अनेक भारतीय स्त्री - पुरुष समाजसुधारकांनी भारतीय स्त्री चळवळीस चालना दिली व स्त्रीयांच्या हक्कासंबंधी प्रयत्न केलेले दिसून येतात. स्वातंत्र्य चळवळीत अनेक स्त्रीयांनी भाग घेतला होता. महात्मा गांधीच्या मार्गदर्शनाखाली चालू असलेल्या अनेक लढयांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीयाही सहभागी झाल्या होत्या. डॉ. आंबेडकरांच्या अस्पृश्यता विरोधी लढयामध्ये देखील स्त्रीया सहभागी झाल्या होत्या. सुभालचंद्र बोस यांच्या नेतृत्वाखाली कॅप्टन लक्ष्मी यांनी स्त्रीयांची लष्करी पलटण उभारली होती.

भारतामध्मे स्त्री संघटनानी शासनाकडे अनेक मागण्या मांडून दबाव निर्माण करून अनेक कायदे मंजूर करून घेतले. विशेष विवाह कायदा १९५४, हिंदू विवाह कायदा व घटस्फोट कायदा १९५५, हिंदू दत्तक विधान कायदा १९५६, आंतरराज्य वारसा कायदा १९५६, स्त्रीयांच्या अनैतिक व्यापारावर बंधने घालणारा कायदा १९५६, हुंडाबंदी कायदा १९६१. याशिवाय भारतात स्त्रीयांच्या हक्कासाठी नॅशनल फेडरेशन ऑफ इंडियन वुमेन (१९५४) व ऑल इंडिया डेमॉक्रॅटिक वुमेन्स असोशिएशन (१९८१) अशा संघटनाही स्थापन झाल्या होत्या. १९९० मध्ये नॅशनल कमियन फॉर वुमेन ॲक्ट मंजूर झाल्याने स्त्रीयांचे अनेक प्रश्न मार्गी लागले. भारतामध्ये २० व्या शतकात स्त्रीया पुरुषांच्या बरोबरीने नोकरी व अन्य क्षेत्रात काम करू लागल्या आहेत. भारतीय राज्यघटनेने स्त्रीला सर्व प्रकारची समानता दिली आहे व पुरुषांच्या बरोबरीचे सर्व हक्क दिलेले आहेत. त्यामुळेच भारतीय स्त्रीयांचा विकास होत आहे.

## ६. ३. स्वयंअध्यनासाठी प्रश्न / उपक्रम

१. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेची पार्श्वभूमी विषद करा

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

२. संयुक्त राष्ट्रसंघाचे उद्देष स्पष्ट करा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

३. संयुक्त राष्ट्रसंघाची रचना सांगा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

४. संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

५. आफ्रिकेतील वर्णभेद विरोधी चळवळीची सविस्तर माहिती सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

६. आफ्रिकेतील वर्णभेद विरोधी चळवळीतील डॉ. नेल्सन मंडेलांचे कार्य सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

७. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीची सविस्तर माहिती सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

८. अमेरिकेतील नागरी हक्क चळवळीतील डॉ. मार्टिन ल्युथर किंग यांचे कार्य स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

९. स्त्रीवादी चळवळ म्हणजे काय ते स्पष्ट करा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

१०. जागतिक पातळीवरील स्त्रीवादी चळवळीची सविस्तर माहिती सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

११. भारतातील स्त्रीवादी चळवळीची माहिती सांगा.

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

## ६. ४ सारांश

१९३९ ते १९४५ या कालखंडात जागतिक पातळीवर दुसरे महायुध्द लढले गेले. महायुध्दातील विध्वंसकता पाहून जागतिक पातळीवरील शांततेची आवश्यक्ता जगातील बहुतांश राष्ट्रांना जाणवू लागली. त्यातूनच संयुक्त राल्ट्रसंघाची स्थापना झाली. संमुक्त राल्ट्रसंघाने राजकीम क्षेत्रातील कार्याबरोबरच साफ्ताजिक व आर्थिक क्षेत्रातही भरीव स्वरूपाचे योगदान दिले आहे. आफ्रिकेत डॉ. नेल्सन मंडेला तर अमेरिकेत डॉ. मार्टन ल्युथर किंग यांच्या नेतृत्वाखाली वर्णभेद विरोधी चळवळ अस्तित्वात आली. त्यांनी प्रस्थापीत व्यवस्थेविरूध्द लढा देऊन निग्रोंना आपले मुलभूत हक्क मिळवून दिले. स्त्रीयांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क, समान दर्जा, समान स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. तसेच पुरुषप्रधान वर्चस्वापासून मुक्तता मिळाली पाहिजे या बाबींचा आधुनिक स्त्रीवादामध्ये समावेष होतो. स्त्रीवादी चळवळ ही स्त्री हक्क, स्त्री वादी चळवळ, स्त्री पुरुष समानता या टप्प्याने विकसित झालेली दिसते.

## ६. ५ संदर्भसूची


१ डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, (मार्च २०००) आधुनिक जग भाग २ (१९४५ – १९८०), श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.

२ डॉ. सुमन वैद्य, (२००२), आधुनिक जग भाग १, साईनाथ प्रकाशन, नागपूर.

३. डॉ. पी. जी. जोशी, (सप्टेंबर, २०००) आधुनिक जग, विद्या प्रकाशन, नागपूर.

४. डॉ. हुकूमचंद जैन, डॉ. कृष्णचंद्र माथुर, अनु. काळे अनिल, (२०११) आधुनिक जगाचा इतिहास (१५००– २०००), के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.

५. प्राचार्य म. ना. कदम, दुसरी आवृत्ती (२००५), विसाव्या शतकातील जगाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. फडके, गायकवाड, कोलारकर, (१९७९), अर्वाचीन जगाचा इतिहास, महाराष्ट्र ग्रंथ निर्मिती मंडळासाठी साहित्य प्रसार केंद्र, नागपूर.

७. डॉ. धनंजय आचार्य, (२००७), विसाव्या शतकातील जग, श्री. साईनाथ प्रकाशन, नागपूर.

८. डॉ. अ. रा. कुलकर्णी, (१९९६), आधुनिक जगाचा इतिहास, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे.

९. डॉ. नि. आ. वाक्काणी, (१९९०), अमेरिकेचा इतिहास, मंगेष प्रकाशन, नागपूर.

१०. डॉ. डी. डी. रणनवरे, सौ. जे. डी. रणनवरे, (१९९८), आधुनिक जग (१९४५ – १९९०), निराली प्रकाशन, पुणे.

# घटक क्रयांक ७
# शीतयुद्ध

**अनुक्रमणिका :**


**७.0 घटकाची उद्दिष्टे**

**७.१ प्रास्तावना**

**७.२ विषय विवेचन**

**७.२.१ शीतयुद्धाचे स्वरूप**

**७.२.२ शीतयुद्धाचे कारणे**

**७.२.३ शीतयुद्धाचा विकास/प्रमुख घटना/टप्पे**

**७.२.४ शीतयुद्धाचे परिणाम**

**७.२.५ शीतयुद्धकालीन संरक्षक लष्करी करार**

**७.३ स्वंय अध्यनासाठी प्रश्न / उपक्रम**

**७.४ सारांश**

**७.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, इत्यादी ;ळसवेंतलद्ध**

**७.६ संदर्भसूची**

**७.७ सरावासाठी प्रश्न/क्षेत्रिम कार्य/प्रात्यक्षिक कार्य**


## ७.0 घटकाची उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यावर आपल्याला

१ शीतयुद्धाचा अर्थ माहित होईल.

२ शीतयुद्धाचे स्वरूप समजेल

३ शीतयुद्धास कारणीभूत घटक सयंतील

४ शीतयुद्ध काळातील घटना व लष्करी करारांची माहिती होईल

५ शीतयुद्धाचे परिणाम समजून येतील

## ७.१ प्रास्तावना

अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील आंतरराष्ट्रीय तणावाच्या परिस्थितीला शीतयुध्द असे म्हणतात. शीतयुध्द हा शब्दप्रयोग अमेरिकन मुत्सद्दी बर्नार्ड बरूश यांनी जागतिक तणावपूर्ण परिस्थितीच्या संदर्भात प्रथमत: वापरला आणि १९४७ मध्ये प्रा. वॉल्टर लिप्पमन यांनी पाश्चियात्य सत्ता व सोव्हिएट रशिया यांच्यातील संघर्षाचे वर्णन करताना शीतयुध्द या शब्दाचा उपयोग केला. त्यांनी त्याला ‘भासयान युद्ध’ म्हटले तर लेमिंगच्या मते, हे युध्द उभय देशामधील माणसांच्या मनांमध्ये लढले गेले. प्रा. यंग हूम

किम यांनी शीतयुध्द या शब्दप्रयोगाचे स्पष्टीकरण करताना म्हटले आहे. मुक्तअर्थव्यवस्थेचे जग व साम्यवादी पर्यायाने अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील ताण तणाव व संघर्ष म्हणजे शीतयुध्द होय. आंतरराष्ट्रीय राजकारणातील हे शीत वास्तवाचे युध्द राष्ट्रीय संरक्षण, आर्थिक विकास, राजनीती व तत्वविचार यासंबंधी आंतरराष्ट्रीय जीवन स्तरावर लढले गेले. जॉन फॉस्टर डलेस यांच्या मते, हे युध्द म्हणजे चांगल्या व वाईट प्रवृत्ती, धर्म व निरीश्वरवाद आणि योग्य व अयोग्य यांच्यामधील धर्मयुध्द होते. तत्त्व प्रणालीविषयक द्वेष, राजकीय व राजनैतिक अविश्वास, एकमेंकाविरूध्द आखलेले डावपेच, एकमेकांवर कुरघोडी करण्याचा अव्याहत प्रयत्न, शस्त्रस्पर्धा, हेरगिरी, मानसशास्त्रीय युध्दतंत्र आणि अत्यंत कटू परस्परसंबंध ही या शीतयुध्दाची दृश्ये रूपे होती.

शीतयुद्ध हे शांततेच्या काळात शस्त्राविना लढले गेलेले युध्द होते. शीतयुद्धाची सुरूवात केव्हा झाली याबाबत मतभेद आहेत. काहींच्या मते इ.स.१९१७ ला रशियन राज्मक्रांतीच्या वेळेस बोल्शेविकांनी साम्यवादी तत्त्वज्ञानाच्या आधारे जगात क्रांती घडवून आणण्याचे जाहीर केले तेथे शीतयुद्धाचे मुळ आहे. तर काही दुसऱ्या महायुद्धाच्या काळात पाश्चियात्य सत्ता व रशिया यांनी हिटलर, मुसोलिनीशी लढण्यासाठी एकत्र येऊन जो महाकरार केला तेथेच शीतयुद्धाचे मुळ आहे असे यानतात. तर काही जण इ.स. १९४७ साली याल्टा व पॉटसडॅम करारावर चर्चा करताना पश्चिमी सत्ता व सोव्हिएट रशिया यांच्यात तीव्र मतभेद झाले त्यात शीतयुद्धाचे बीज शोधतात.

## ७.२ विषय विवेचन

### ७.२.१ शीतयुध्दाचे स्वरूप :

शीतयुध्द हे राजनैतिक युध्द असते. ते जर प्रमाणाबाहेर तीव्र झाले तर त्याची परिणती सशस्त्र युध्दात होऊ शकते. अमेरिका व रशिया या दोन महासत्तांमध्ये प्रत्यक्ष, समोरासमोर युध्द घडून आले नसले तरी या दोन महासत्तांमधील स्पर्धेमुळे तिसऱ्या जगातील अनेक देशांत स्थानिक स्वरूपाच्या ज्या चकमकी झाल्या त्यांमध्मे मोठी जीवितहानी झाली. महासत्तांमधील शीतयुद्ध म्हणजे युध्दही नव्हे व शांतताही नव्हे! या शीतयुध्दाने फक्त युध्दासाठी पार्श्वभूमी तयार केली.

फ्रेड हेलीडे यांच्या मते, शीतयुद्धाच्या सहा प्रवृत्ती दिसून येतात.

१. सैनिक व शस्त्रास्त्र वाढ विशेषत: अणुबाँब निर्मिती
२. एक दुसऱ्याच्या विरूध्द प्रचार व निंदा, द्वेष
३. महाशक्तींच्या मध्ये सफलतापूर्वक समन्वयाचा अभाव
४. भांडवलवाद व साम्यवाद यांच्यामधील संघर्षाच्या कारणामुळे तिसऱ्या जगातील अनेक क्रांतीकारी घटना
५. दोन्ही गटात अनेक करार व तह
६. पूर्व व पश्चिम यांच्यामध्ये तणाव व संघर्ष अधिक धोकादायक होणे.

अशा तऱ्हेने शीतयुध्द म्हणजे मानसिक दशा आहे. शीतयुध्दाला 'उष्ण शांती' म्हणता येईल. म्हणजे शांती व युद्धामधील परिस्थिती होय. यामध्ये महाशक्ती एक दुसऱ्याला घाबरत असतात. युद्धाशिवाय सर्व मार्गाचा अवलंब करून एक दुसऱ्याला दुर्बल बनविण्याचा प्रयत्न करतात.

### ७.२.२ शीतयुद्धाची कारणे :

### अ) सामान्य कारणे :

### १. साम्यवादाची भीती :

काही तज्ज्ञांच्या मते, इ. स. १९१७ च्या बोल्शेविक क्रांतीमध्मे शीतयुद्धाची बीजे दडलेली होती. साम्यवाद हा भांडवलशाही नष्ट करण्याची भाषा बोलत असल्याने पाश्चात्य राष्ट्रे रशियाला नष्ट करण्याचा प्रयत्न करत होती. ती हिटलरला रशियावर हल्ला करण्यासाठी चिथावणी देत होती. कारण त्यांना त्यावेळी नाझी जर्मनीपेक्षा साम्यवादी रशियाची भीती अधिक वाटत होती.

### २. दोन महासत्ता :

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया वगळता इतरांचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पडेल अशी स्थिती नव्हती. मात्र अमेरिका व रशिया हे परस्पर विरोधी विचारसरणीचे प्रतिनिधीत्व करीत असल्याने त्यांचा प्रभाव वाढू लागला. त्यांनी आपआपला गट निर्माण करून प्रभाव वाढवण्यास सुरूवात केली.

### ३. तात्विक विचारसरणीतील मतभेद :

कार्ल मार्क्सच्या साम्यवादी विचारसरणीवर आधारित रशियात क्रांती झाली. पश्चिमी राष्ट्रे व अमेरिका खुल्या अर्थव्यवस्थेचे पुरस्कर्ते असल्याने तेथील भांडवलशाहीला साम्यवादाचा धोका वाटत होता. अमेरिकेने रशियाला विश्वशांतीचा शत्रू मानून साम्राज्यवादी शक्ती म्हटले. तर सोव्हिएट रशियाने पश्चिम युरोपातील देश वसाहतवादाचे समर्थक असून साम्यवाद आशिया, आफ्रीका व लॅटिन अमेरिकेतील विकसनशील देशांच्या गरीब जनतेसाठी रामबाण उपाय असल्याचे म्हटले होते. या वैचारिक मतभेदाचे रूपांतर पुढे संघर्षात होत गेले. परस्परविरोधी तात्विक विचारसरणी असल्यामुळे संघर्ष अटळ झाला. हाच संघर्ष आपणास शीतयुध्दाच्या रूपाने दिसून येतो.

### ४. परस्परांविषयी अविश्वास :

रशिया व पाश्चियात्य राष्ट्रे यांच्यात अविश्वास मोठया प्रयाणात होता. दोघांचा शत्रू समान असल्याने ते युद्धाकाळात एकत्र आले असले तरी परस्परांत संशय व अविश्वास होता. अमेरिकेने अणुबॉम्बचे गुपित रशियापासून लपवून ठेवले होते. .

### ५. संकुचित राष्ट्रीय हितसंबंध :

दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाने आपली स्थिती मजबूत केल्यानंतर शेजारची राष्ट्रे

आपल्या गटात आणण्याचा प्रयत्न केला. त्यांना आर्थिक व लष्करी मदत करून उपकाराच्या ओझ्याखाली ठेवले. त्यांच्याशी राजनैतिक व लष्करी करार केले. अमेरिकेनेही हेच धोरण अवलंबिले. पूर्व युरोप रशियाकडे तर पश्चिम युरोप अमेरिकेकडे असे दोन गट युरोपात उभे राहिले.

### ६. पोकळीची संकल्पना :

जर्मनी व जपानचा पराभव झाल्यामुळे एक प्रकारची पोकळी अथवा निर्वात प्रदेश निर्माण झाला होता. रशिया व अमेरिका हे दोन्ही देश ही पोकळी भरून काढू शकले असते. पण त्याऐवजी त्यांनी जर्मनीचे खच्चीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शीतयुद्धाला पोषक अशी परिस्थिती निर्माण झाली.

## ब) अमेरिकेविरूध्द सोव्हिएट सरकारच्या तक्रारी :

### १. दुसऱ्या मोर्चाचा प्रश्न :

दुसऱ्या महायुद्धा दरम्यान दुसरा मोर्चा काढण्यावरून दोन्ही देशात मतभेद निर्माण झाले. जर्मनीविरूध्द पूर्व आघाडी उघडताना पश्चिमी देशांनी विलंब केला त्यामुळे रशियाचे जास्त नुकसान झाले. सोव्हिएट इतिहासकार जी. दैदायांत्स यांनी याचे विश्लेषण असे केले की, अमेरिका आणि ब्रिटनने खूप विचार करून जाणूनबूजून विलंब केला, कारण की जर्मनीने कोणत्याही प्रकारे साम्यवादी रशियाला घायाळ करावे.

### २. अमेरिकेद्वारे अणुबॉम्बचे गुपित रशियापासून लपवून ठेवले :

दुसऱ्या महायुद्धादरम्यान अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी शहरांवर अणुबाँब टाकल्याने सोव्हिएट रशियाला आश्चर्य वाटले कारण अमेरिकेने अणुबॉबचे गुपित रशियापासून लपवून ठेवले होते परंतु ब्रिटन व कॅनडाला हे माहित होते. त्यामुळे शीतयुद्धाचा मार्ग प्रशस्त झाला.

### ३. रशियाला मिळणाऱ्या मदतीला लगाम :

रशिया अमेरिकेच्या धोरणावर पहिल्यापासून नाराज होता. लँड लीज कायद्यानुसार सोव्हिएत रशियाला मिळणारी अमेरिकेकडून मदतीवर रशिया खुश नव्हता. त्यामध्येच अमेरिकन अध्यक्ष ट्रूमनने ही मदत बंद केल्याने रशियाला धक्का बसला व शीतयुद्धास कारण ठरले.

### ४. पोलंड आणि बाल्टिक देशात रशियाविरोधी अमेरिकेची चाल :

रशियाला असे वाटत होते की, पोलंड व बाल्टिक देशात आपल्या अधिकाराला अमेरिकेने मान्यता द्यावी परंतु उलट अमेरिकेने ब्रिटनबरोबर पोलंडच्या रशियाविरूध्द् निर्वासित सरकारला मान्यता दिली. याशिवाय इ.स. १९३९ला लेनिनग्राडच्या सुरक्षेसाठी जेव्हा फिनलँडची भूमी मिळवण्याचा प्रयत्न केला तेव्हा अमेरिका व पाश्चियात्य देशांनी विरोधी भूमिका घेतली.

### क) सोव्हिएट सरकारविरूध्द् अमेरिकेच्या तक्रारी :

### १. रशियाकडून याल्टा कराराचा भंग :

रशियाने रूझवेल्ट, स्टॅलिन व चर्चिल यांनी केलेल्या याल्टा कराराचा इ.स. १९४५ मध्ये भंग करून पोलंडच्या ल्मुबनिन सरकारवर आपला प्रतिनिधी लादण्याचा प्रयत्न केला. दोस्त राष्ट्रांना सैबिरियामध्ये लष्करी तळ स्थापन करण्यास रशियाने प्रतिरोध केला. त्यामुळे दोस्तांना रशियाबद्दल संशय वाढत गेला.

### २. रशियाकडून बाल्कन कराराचा भंग :

ऑक्टोबर १९४४ मध्ये रशियाने पूर्व युरोपचे विभाजन करण्याविषयीच्या चर्चिलच्या योजनेला मान्यता दिली होती. रशियाने या कराराकडे दुर्लक्ष करून या सर्व देशांमध्ये कामगारांची हुकूमशाही प्रस्थापित केली. या सर्व देशांतील प्रशासनावर रशियन साम्यवादी पक्षाचे नियंत्रण होते. या करारभंगामुळे पाश्चात्य राष्ट्रामध्ये चीड उत्पन्न झाली.

### ३. रशियाद्वारा ईरानमधून आपली सेना हटविण्यास मनाई :

दुसऱ्या महायुद्धा दरम्यान सोव्हिएट सेना इरानच्या उत्तर भागात होती. महायुद्धानंतर अमेरिका व ब्रिटनने आपल्या सेना मागे घेतल्या परंतु रशियाने तसे केले नाही. युनोच्या दबावामुळे रशियाने पुढे आपले सैन्य मागे घेतले.

### ४. तुर्कस्थानवर रशियाचा दबाव :

रशियाने दुसऱ्या महायुद्धानंतर तूर्कस्थानवर दबाव आणला की, बास्फोरस व इतर भागात लष्करी तळ उभारण्यासाठी जागा द्यावी. त्यावर युरोपीय देशांनी आक्षेप घेतला.

### ५. रशियाद्वारा जर्मनीवर बोजा टाकणे :

दुसऱ्या महायुद्धा दरम्यान जर्मनीमुळे अमेरिकेचे खूप नुकसान झाले होते. त्यामुळे याल्टा परिषदेत स्टॅलिनने जर्मनीकडे २० अरब डॉलरची मागणी केली. त्यासाठी जर्मनीमधील किंमती मशिनीचे स्थलांतर रशियात चालवले. त्यामुळे युरोपीय देश रशियाविरूध्द नाराज झाले.

### ६. बर्लिनची नाकेबंदी :

सोव्हिएट संघाद्वारे बर्लिनची नाकेबंदी करण्यात आली. जून १९४८च्या लंडन कराराचे उल्लंघन करत रशियाने बर्लिन व पश्चिम जर्मनीच्या मधील रेल्वे व दळणवळणाची साधने बंद केली. एवढेच नव्हे तर हजारो जर्मन युद्धकैद्यांना त्यांच्या देशात जाण्यास मनाई केली. पीटर लामनने बर्लिनच्या नाकेबंदीने शीतयुद्धावर पडलेल्या प्रभावाचे पुढील शब्दात वर्णन केले आहे, 'यद्यपि रशियाची बर्लिन नाकेबंदी असफल झाली आणि मे १९४९मध्ये ही नाकेबंदी समाप्त झाली परंतु या घटनेचा गंभीर परिणाम असा झाला की, रशियाला विरोध करण्यासाठी अमेरिका विविध लष्करी गट करून सक्रिय झाली.'

याशिवाय रशियाद्वारा व्हेटोचा पुन्हापुन्हा प्रयोग तसेच अमेरिकेमध्ये रशियाद्वारा साम्यवादी प्रचार हे कारणेही कारणीभूत ठरली.

### ७.२.३ शीतयुद्धाचा विकास/प्रमुख घटना/टप्पे :

### अ. पहिला टप्पा (इ. स. १९१७–४५):

हॉल व फॉन्तेन यांच्या मते, शीतयुद्धाची सुरूवात इ.स. १९१७ मध्ये झाली. इ. स. १९२४ मध्ये ब्रिटनने मजूर सरकार आल्यानंतरच रशियाला मान्यता दिली. तर अमेरिकेने इ. स. १९३३ मध्ये रशियाशी राजनैतिक संबंध स्थापन केले.

लेमिंगच्या मते या काळात शीतयुध्दाला कारणीभूत ठरलेल्या घटना :

१. जर्मनीविरूध्द दुसरी आघाडी उघडण्यासाठी एप्रिल १९४२ ते जून १९४४ इतका लावला गेलेला प्रदीर्घ विलंब.

२. २९ मार्च १९४४ पासून फेब्रुवारी १९४५ पर्यंत पूर्व युरोपवर रशियन फौजांनी ठेवलेला ताबा.

३. मार्च १९४५ मध्ये इटली व जर्मनीच्या शरणागती संदर्भात करारांवरून रशियाशी झालेले मतभेद.

४. ६ व ९ ऑगष्ट १९४५ रोजी अमेरिकेने अनुक्रमे हिरोशिमा व नागासाकीवर टाकलेल्या अणुबॉम्बमुळे ढासळलेला सत्तासमतोल.

५. १८ ऑगस्ट १९४५ रोजी पूर्व युरोपात खुल्या निवडणूका घेण्याचा बर्नेज बेव्हिनने लढविलेला राजनैतिक डाव.

### ब. दुसरा टप्पा (इ.स. १९४६–५३) :

या काळात रशिया व पाश्चात्य राष्ट्रामध्ये, संयुक्त राष्ट्रसंघामध्ये, अणुशक्तीवरील निमंत्रण, नि:शस्त्रीकरण, पराभूत देशांशी करण्याचे शांतता करार, बर्लिनचा प्रश्न आणि आशिया व आफ्रीकेतील अविकसीत देशांचे भवितव्य आदि मुद्दयावरून मोठया प्रमाणात मतभेद होते. इ.स. १९४७ मध्ये नऊ साम्यवादी देशांनी केलेल्या कोमिन्फॉर्म या संघटनेमुळे शीतयुद्धाला धार आली. फिनलंडने रशियाच्या दबावाखाली येऊन मार्शल योजनेखाली मदत स्वीकारण्याचे नाकारले. यात्र युगोस्लाव्हिया रशियाच्या गटात सामील झाला नाही.

### रशियाचे धोरण :

देशाची संरक्षण व्यवस्था भक्कम करण्यासाठी रशियाने प्रयत्न केले. रशियाने अनेक देशांशी मैत्री करार केले.

### रशियाचे वर्चस्व प्रस्थापित झालेले तीन गट :

१. ऑगष्ट १९४० मध्ये घेतलेली इस्टोनिया, लिथुआनिया व लटाव्हिया ही तीन बाल्टिक राष्ट्रे. २.जर्मनीशी रशियाच्या बाजूने लढाईत उतरलेली झेकोस्लोव्हाकिया, मुगोस्लोव्हिया, अल्बानिया व पोलंड ही चार राष्ट्रे., ३. जर्मनीच्या बाजूने लढून पराभूत झालेली फिनलँड, हंगेरी, रूमानिया व बल्गेरिया ही चार राष्ट्रे. रशियाने काही देशांत साम्यवादी राजवटी आणल्या. काही ठिकाणी संयुक्त सरकारे सत्तेवर आली असली तरी

तेथे साम्यवाद्यांचा प्रभाव होता.  एवढेच नव्हे तर त्या देशांचे संपूर्ण रशियायीकरण घडविण्यात रशियाने प्रयत्न केले. फिनलँड, झेकोस्लोव्हाकिया व पोलंड इ.स. १९४७ मध्ये अमेरिकेने आर्थिक मदत देण्याच्या तयारीसाठी आयोजित केलेल्या मार्शल योजनेच्या परिषदेस उपस्थित राहिले नाहीत.  युगोस्लाव्हिया व ग्रीस वगळता रशियाने पूर्व युरोप इ.स. १९४५ ते १९५३ या काळात आपल्या प्रभावाखाली आणला.

### तुर्कस्थानचा प्रश्न :

व्यापारी मार्गाच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे तुर्कस्थान आपल्या वर्चस्वाखाली आणण्याचा रशियाने सातत्याने प्रयत्न केला होता.  रशियाने इ.स. १९३६ मध्ये डार्डनेल्स व बॉस्फोरस या सामुद्रधुन्यांवर वर्चस्व मिळवले होते.  परंतु या कराराचा तुर्कस्थानने भंग केल्याने इ.स. १९४६ मध्ये रशियाने तुर्कस्थानवर अनेक आरोप केले.  अमेरिकेने रशियन धोक्यापासून तुर्कस्थानला वाचविण्यासाठी मार्शल योजनेखाली १५ कोटी डॉलर्सची मदत देण्यास मंजूरी दिली.  अशा तऱ्हेने रशियापासून तुर्कस्थानला वेगळे केले.

### इराण प्रश्न :

खनिज तेलाच्या दृष्टीने इराणला महत्त्व होते.  पर्शियन आखातातून हिंदी महासागरात रशियाचा प्रवेश रोखण्यास इराणची मदत मिळणे जरूर होते.  त्यामुळे दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाने आपल्या हितसंबंधासाठी इराणमध्ये हस्तक्षेप केला.  इराणने अमेरिकेच्या पाठिंब्याने रशियाला इराणमधून आपली फौज मागे घेण्यास भाग पाडले.  इराणच्या कारवाईमागे अमेरिकेचा हात आहे हे रशियाच्या लक्षात आल्याने रशिया अमेरिका यांच्यातील संघर्ष वाढण्यास मदत झाली.

### अमेरिकेचे धोरण :

### १.  ट्रुमन सिध्दांत :

पूर्व जर्मनी व पूर्व युरोपातील देश रशियाच्या गटात जात असल्याने अमेरिकन अध्यक्ष हॅरी ट्रुमन यांनी अमेरिकेच्या प्रतिनिधी सभागृह व सिनेटची बैठक १२ मार्च १९४७ ला बोलावली.  ''जगात कोठेही प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष आक्रमण होऊन जागतिक शांतता धोक्यात आली की, अमेरिकेची सुरक्षिततादेखील धोक्यात आली असे मानले जाऊन अमेरिका या प्रकरणात हस्तक्षेप करील''.

### २.  मार्शल योजना :

जगाला साम्यवादी क्रांतीपासून वाचविण्यासाठी ८जून १९४७ ला अमेरिकेने मार्शल योजना जाहीर केली.  अमेरिकेच्या परराष्ट्र सचिवांनी जाहीर केले की, यूरोपला आर्थिक सुधारण्यासाठी प्रयत्न केले नाहीत तर तो साम्यवादी होईल.  यावरून मार्शल योजना महत्त्वपूर्ण घटना होती असे लक्षात येते. युद्धामुळे कोलमडलेली अर्थव्यवस्था सावरण्यासाठी मदत झाली.  तसेच साम्यवादाची आक्रमक पावले रोखण्यास मार्शल योजनेची मदत झाली.  अॅग्लो अमेरिकन सहकार्याचा उत्तम नमुना म्हणजे मार्शल योजना होय.  अमेरिकेच्या

युरोपातील गुंतवणुकीमुळे अमेरिकेस फायदा झाला. युरोपातील लोकशाही प्रणालीवर आधारित सायाजिक, राजकीय व आर्थिक संस्था टिकवून ठेवण्याचे कार्य या योजनेने केले.

### ३. नाटोची स्थापना :

४ एप्रिल १९४९ ला अमेरिकेच्या नेतृत्वाखाली कॅनडा व पश्चिम युरोपचे दहा देश यांनी नाटो नावाची लष्करी संघटना स्थापन केली. त्यामुळे शीतयुध्दाचे वातावरण तीव्र बनले.

### ४. चीनवरील परिणाम :

रशियाला तुर्कस्थान व इराणमध्ये आपला प्रभाव प्रस्थापित करावयाचा होता. पण त्या देशांनी पाश्चात्य राष्ट्रांच्या मदतीने रशियाला यशस्वी विरोध केला. १ ऑक्टोबर १९४९ मध्ये चीनचे साम्यवादी प्रजासत्ताक स्थापन झाल्यामुळे शीतयुद्ध आणखी तीव्र बनले. अमेरिकेने चीनला मान्यता न देता युनोच्या सुरक्षा समितीवर चीनला सदस्यत्व देण्यास विरोध केला. त्यामुळे रशिया व अमेरिकेचे संबंध आणखी बिघडले.

### ४. कोरिमन युद्ध :

जून १९५० मध्ये उत्तर कोरियाने दक्षिण कोरियावर हल्ला केला. त्यामुळे सशस्त्र संघर्ष झाला. कोरियन युद्धामुळे चीन व रशिया एकमेकांच्या अधिक जवळ आले. पण चीनचे पाश्चात्य देशांशी असलेले संबंध मात्र बिघडले.

### ५. अमेरिकेचा जपानशी शांतता करार :

कोरियन युद्ध सुरू असतानाच अमेरिकेने जपानशी शांतता करार केला. अमेरिकेच्या या एकतर्फी कृतीचा रशियाने तीव्र निषेध केला.

इ. स. १९४८ मध्ये रशियाने बर्लिनची नाकेबंदी केली. ही गोष्ट १९४९ला नाटो संघटनेच्या स्थापनेला कारणीभूत ठरली. ब्रिटन, फ्रान्स व अमेरिकेने आपल्या ताब्यातील पश्चिम जर्मनीवर २१ डिसेंबर १९४९ला प्रजासत्ताक जर्मन संघराज्याची स्थापना केली. ७ ऑक्टोंबर १९४९ रोजी रशियाने आपल्या ताब्यातील जर्मनीच्या पूर्व भागात जर्मन लोकशाही प्रजासत्ताक स्थापन केले व जर्मनीचे दोन देश झाले.

### क. तिसरा टप्पा (इ.स. १९५३–५८):

स्टॅलिननं तर क्रुश्चेव्ह रशियाचा प्रमुख झाला. अमेरिकेतही आमसेनहॉवर अध्यक्षपदावर आले.

### रशियाचा अण्वस्त्रस्फोट :

ऑगस्ट १९५३ मध्ये रशियाने अणुबॉम्बचा पहिला स्फोट केला. यानंतर रशिया व अमेरिका यामध्ये जी अंतराळस्पर्धा व अण्वस्त्रस्पर्धा सुरू झाली. त्यामुळे शीतयुद्ध स्फोटक बनत गेले.

### इंडोचायनामधील यादवी युद्ध :

इंडोचामनामधील फ्रेंच साम्राज्मवादाविरूध्दच्या संघर्षात दोन्ही राष्ट्र गटांनी विरूध्द बाजूंना पाठिंबा दिला असला तरी या प्रश्नावर शांततापूर्ण तोडगा काढण्याचा प्रयत्न केला

गेला. त्यामुळे १९५४ मध्य इंडोचायना प्रश्नावर जिनिव्हा करार झाला. व्हिएतनामचे साम्यवादी उत्तर व्हिएतनाम व लोकशाहीवादी दक्षिण व्हिएतनाम असे दोन तुकडे करण्यात आले. या करारावर स्वाक्षऱ्या केल्यानंतर २४ तास उलटण्याआधीच त्यांच्यामध्ये गनिमी काव्याचे युद्ध सुरू झाले. १९५३ ते १९७० या काळामध्ये अमेरिका-रशिया यांच्यातील शीतयुद्धाचे, व्हिएतनायचे युद्ध हे एक प्रमुख कारण होते.

## हंगेरिमन पेचप्रसंग व शीतयुद्ध :

इ.स. १९५६ मध्ये हंगेरीमध्ये रशियाने केलेल्या हस्तक्षेपाचा पाश्चात्य राष्ट्रानी कडक निषेध केला. सुएझ कालवा प्रश्नावर एकत्र आले.

## आमसेनहॉवर सिध्दात :

जून १९५७ मध्ये साम्यवादाच्या धोक्याला तोंड देण्यासाठी आयसेनहॉवर सिध्दाताने अण्वस्त्र वापरण्याचे अधिकार अमेरिकेला मिळाले. यामुळे शीतयुध्दाला आणखी प्रोत्साहन मिळाले.

## ड. चौथा टप्पा (इ.स. १९५९-६२)

क्रुश्चेव्हची अमेरिका भेट : १५ ते २८ सप्टेंबर १९५९ या काळात क्रुश्चेव्हने अमेरिकेला भेट दिली. यामुळे शीतयुध्द कमी होण्याची चिन्हे दिसू लागली. क्रुश्चेव्ह यांनी शांततामय सहजीवनाचे धोरण स्वीकारले.

## यु-२ची घटना :

अमेरिका, रशिया, ब्रिटन व फ्रान्स यांनी पॅरिस येथे शिखर परिषद भरविण्याचे ठरविल्यानंतर अमेरिकेचे यु-२ प्रकारचे हेरगिरी करणारे विमान रशियन हद्दीमध्ये पाडण्यात आले. रशिया गुप्तपणे लष्करी तयारी करत असल्याचे कारण सांगून आमसेनहॉवर यांनी हेरगिरीचे समर्थन केले. तर रशियाने अमेरिका शांततेचा भंग करीत असल्याचा आरोप केला.

पॅरिस शिखर परिषद अयशस्वी : यू-२ विमानाच्या घटनेमुळे १६ मे १९६० रोजी क्रुश्चेव्हने यू-२ विमानाचा प्रश्न उपस्थित करून अमेरिकेचा निषेध केला. ही परिषद अयशस्वी झाली.

## बर्लिन भिंत प्रकरण :

इ.स. १९६१ मध्ये बर्लिन भिंत व क्युबन क्षेपणास्त्र या अत्यंत गंभीर पेचप्रसंगानी शीतयुध्दाची धार तीव्र झाली. ऑगस्ट १९६१ मध्ये रशियाला बर्लिनचे पूर्व व पश्चिम असे भाग करणारी भिंत उभारावयाची होती. अमेरिकेने याचा निषेध करून त्या ठिकाणी आपले सैनिक व रणगाडे पाठविले. हा तणाव पुढे कमी झाला.

## क्मूबन क्षेपणास्त्र पेचप्रसंग :

रशियाला क्मूबामध्मे अण्वस्त्रतळ उभारावयाचा होता. यामुळे या दोन्ही महासत्तांमध्ये प्रत्यक्ष सशस्त्र संघर्षाची स्थिती निर्माण झाली. अमेरिकेच्या भूमिकेमुळे शेवटी रशियाने

आपला क्षेपणास्त्र तळ काढून घेण्याचे ठरविले.

### इ. पाचवा टप्पा (इ.स. १९६३-७९):

अणुचाचण्यांवर अंशत: बंदी : व्हिएतनाम, आग्नेय आशिया, संयुक्त राष्ट्रसंघ आणि बर्लिनमध्ये शीतयुद्धाचा परिणाम होत राहिला. ५ ऑगष्ट १९६३ ला अमेरिका, ब्रिटन व रशियाने अणुचाचण्यांवर अंशत: बंदी घालण्याचा करार केला. या करारानुसार फक्त भूमिगत अणुचाचण्या करण्याची परवानगी देण्यात आली. या करारावर पुढे चीन व फ्रान्स सोडून १०२ देशांनी सह्या केल्या.

अमेरिकेत लिंडन बी जॉन्सनच्या हाती तर रशियामध्ये ॲलेक्सी कोसिजिन व ब्रेझनेव्ह यांच्याकडे सत्ता गेली. इ. स. १९६४ मध्ये अमेरिकेने व्हिएतनाममध्ये लष्करी हालचाली वाढविण्याचा निर्णय घेतला. या निर्णयाचा रशियाने निषेध केला.

अरब-इस्त्रामल युद्ध : अरब-इस्त्रायल युद्धात पाश्चात्य देशांनी इस्त्रायलची बाजू घेतली. या धोरणाला रशियाने कडाडून विरोध केला. हे युद्ध सुमारे २७ वर्षे चालले.

### ग्लासब्रो शिखर परिषद :

२३ ते २६ जून १९६७ या काळात भरलेल्या ग्लासब्रो शिखर परिषदेत अमेरिका व रशिया या दोन्ही देशांचे राष्ट्रप्रमुख एकमेकांना भेटले. इ.स. १९६८ चा अण्वस्त्रप्रसार बंदी करार आणि व्हिएतनाममधील बॉम्ब वर्षाव थांबविण्याचा अमेरिकेचा निर्णय यामुळे उभय राष्ट्रामधील तणाव काहीसा कमी झाला. इ.स. १९६८ मध्ये रशियाने झेकोस्लाव्हाकियात केलेला हस्तक्षेप आणि इ.स. १९६९ची बर्लिनची नाकेबंदी यांच्यामुळे शीतयुद्ध आणखी लांबले. आंतरराष्ट्रीय तणाव संपुष्टात आणण्यासाठी हेलसिंकी येथे एक परिषद भरविण्यात आली.

### सहावा टप्पा ( इ.स. १९८०-८१):

सप्टेंबर १९८३ मध्ये रशियन परराष्ट्रीय मंत्री आंद्रे ग्रोमिको जेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्यासाठी अमेरिकेला गेले तेव्हा त्यांच्या संरक्षणाची पुरेशी व्यवस्था करण्यास अमेरिकेने असमर्थता दर्शविली. १९८७ मध्ये रशियाने अणुचाचणी केली.

### ७.२.४ शीतयुद्धाचे परिणाम :

शीतयुद्धाचे आंतरराष्ट्रीय घडामोडीवर दुरगामी परिणाम झाले.

**१. लष्करी करार :** दोन महासत्तामध्ये संशयाचे व अविश्वासाचे वातावरण निर्माण झाल्याने परस्परांना विरोध करण्यासाठी लष्करी करार करण्यात आले. नाटो, सेंटो, सीटो, वॉर्सा इ. करारात जगातील बहुतांशी राष्ट्रे सामील झाली. कालांतराने काही राष्ट्रे अलिप्त राष्ट्राच्या चळवळीत सामील झाली.

**२. राष्ट्र संघटनेची अप्रतिष्ठा :** दोन महासत्तामधील संघर्षास राष्ट्र संघटना आवर घालू शकली नाही. अमेरिकेचा राष्ट्र संघटनेवर प्रभाव होता. चीन साम्यवादी असल्यामुळे अनेक वर्षे युनोचा सदस्य होऊ शकला नाही. महासत्तामधील वैचारीक मतभेदामुळे युनोला आपली ध्येय, उद्दष्टे साध्य करण्यात अनेक अडथळे आले.

**३. शस्त्रास्त्र स्पर्धा :** परस्पर अविश्वास निर्माण झाल्यामुळे शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. त्यामुळे विकासाकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नाही. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे अणुयुध्दाचा गंभीर धोकाही निर्माण झाला.

**४. विकासातील मोठी धोंड :** शस्त्रास्त्र स्पर्धा वाढल्यामुळे देशातील विकासाची कामे मागे पडू लागली. रशियाने आपल्या उत्पन्नाच्या २०/२५ टक्के केवळ शस्त्रनिर्मितीचे कारखाने उभारण्यावर व शस्त्रसंशोधनावर खर्च केले. दैनंदिन वस्तुंची टंचाई निर्माण झाली. अवकाश युद्धाची कल्पना पुढे आली. शीतयुध्द विकासातील मोठा अडथळा ठरला.

**५. अलिप्त राष्ट्र गटाची उभारणी :** जगातील दोन सत्ता आपआपला गट प्रबळ बनवत होत्या. आर्थिक व राजकीय दबावामुळे काही राष्ट्रे नाईलाजाने सामील होत होती. मात्र भारत, इजिप्त व युगोस्लाव्हिया या प्रमुख राष्ट्रांनी कोणत्याही गटात सामील न होण्याचे ठरवून अलिप्त राष्ट्र गटाची उभारणी केली. बेलग्रेड येथे अलिप्त राष्ट्र गटाची पहिली शिखर परिषद भरली.

**६. मानवतेची हानी :** शीतयुध्दाने मानव जातीला प्रत्यक्ष युध्दात लोटले नसले तरी रणांगणावरील युध्दात भौतिक हानी जास्त होते. मात्र शीतयुध्दाने दारिद्र्य, रोगराई, अज्ञान, मागासलेपणा अशा भयानक हानीला सामोरे जावे लागले.

## शीतयुद्धाची अखेर :

शीतयुद्ध वैचारीक व तात्त्वीक कारणांमुळे घडवून आले. पुढे वैचारिक संघर्ष बाजूला पडून सत्ता-संतुलनाचे राजकारण सुरू झाले. स्टॅलिनच्या मृत्यूपर्यंत (इ.स. १९५३) हे युद्ध भयंकर वाटत होते. अलिप्ततावादाचा प्रभाव दोन्ही सत्तावर पडत होता. अमेरिकेने चीनला मान्यता दिल्यानंतर (इ.स. १९७३) साम्यवाद व भांडवलशाही यातील संघर्ष संपूष्टात आला. सत्ता संतुलनाचे राजकारण मागे पडून सहकार्याचे व सहजीवनाचे मार्ग मानव कल्याणासाठी उपयुक्त आहेत असे सर्वांना वाटू लागले. इ.स. १९८९ मध्ये जगाच्या इतिहासाने एक अनपेक्षित वळण घेतले. बर्लिनची भिंत पाडण्यात आली. पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण झाले. वॉर्सा करार रद्द करण्यात आला. १९८९-९०च्या मध्य पूर्वेतील गल्फ प्रदेशातल्या पेचप्रसंगाच्या वेळी दोन्ही बाजूंनी सुरक्षा समितीच्या प्रस्तावांना पाठिंबा दिला. पूर्व युरोपियन देशामधील साम्यवादी सत्ता संपुष्टात आली. सोव्हिएट रशियाचे विघटन झाले. रशियन अध्यक्ष गोर्बाचेव्ह यांच्या पुढाकाराने शीतयुद्ध संपुष्टात आले.

## ७.२.५ शीतयुद्धकालीन संरक्षक लष्करी करार :

अ. अमेरिकाप्रणीत करार : अमेरिकेचा प्रभाव असलेल्या किंवा प्रभावाची शक्यता असलेल्या प्रदेशात साम्यवादाचा शिरकाव, प्रसार व विस्तार होऊ नये म्हणून मार्शल योजनेद्वारे आर्थिक मदत देण्याचा अमेरिकेचा कार्यक्रम धडाक्यात चालू होता. साम्यवादी आक्रमण थोपविण्यासाठी लष्करी संघटना व राजकीय संस्था अमेरिकेने सर्व जगभर उभ्या केल्या. १. युरोपीय देशांची युध्दानंतर खालावलेली आर्थिक परिस्थिती व साम्यवादी आक्रमणाची टांगती तलवार, २. रशिया व पाश्चिमात्य सत्ता यांच्यात कदापि सहकार्य

होणे नाही याची पुरेपूर जाणीव, ३. परंपरागत सत्ता संतुलनाऐवजी परस्पर सहकार्याचा निर्धार, ४. युरोपच्या संरक्षणासाठी अमेरिकेची नितांत गरज, ५. फ्रान्स-जर्मनी यांच्यातील परंपरागत संघर्ष संपुष्टात आणणे. ६. संयुक्त राष्ट्रसंघाशी इमान राखून साम्यवाद विरोधी जागतिक लोकमत तयार करणे. या गृहीत सत्यांचा विचार करून अमेरिकेने संरक्षक स्वरूपाचे लष्करी करार घडवून आणले व रशियाविरोधी सर्व जगभर एक फळी उभी केली. लष्करी करार खालीलप्रमाणे :

**१. डंकर्क तह (इ.स.१९४७) :** जर्मनीचे पूर्णत: लष्करी खच्चीकरण करून तो पुन्हा युध्दासाठी उभा रहाणार नाही याची काळजी फ्रान्सने घेतली. म्हणून जर्मनीच्या संभाव्य संकटाला तोंड देण्यासाठी अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाप्रमाणे युरोपचा संयुक्त संघ तयार करण्यात यावा, अशी फ्रान्स-इंग्लडची इच्छा होती. फ्रान्स-इंग्लडच्या लष्करी योजनेला डंकर्कच्या तहात कायदेशीर स्वरूप मिळाले. साम्यवादाला रोखण्यासाठी जर्मनीची अमेरिकेने पुर्नरचना केली. त्यामुळे फ्रान्सला वाटणारी जर्मनीची भीती नष्ट झाली. पुढे या तहाचे रूपातर ब्रुसेल्स तहात झाले.

**२. ब्रुसेल्स तह (इ.स. १९४८) :** अमेरिकेच्या धोरणाला रशियाकडून कॉमिन्फार्म संघटनेद्वारे अतिशय कडवा विरोध झाला. तसेच झेकोस्लोव्हाकियातील उठाव, रशिया फिनलँड समझोता या घटनामुळे रशिया केव्हाही आक्रमण करणार अशी फ्रान्स-इंग्लडला भीती वाटत होते. यावर सुरक्षिततेचा उपाय म्हणून १७ मार्च १९४८ रोजी फ्रान्स, इंग्लड, बेल्जअम, नेदरलँड व लक्झेबर्ग यांच्यात ब्रुसेल्स तह घडून आला. या तहान्वये सुरक्षिततेचे तत्त्व प्रत्यक्षात अस्तित्वात आले. पश्चिम युरोपीय संघाचा या तहातूनच उदय झाला.

**३. रिओ करार ( इ.स.१९४७) :** बदललेल्या परिस्थितीत अमेरिका खंडातील शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी अमेरिका खंडातील राष्ट्रांची एक बैठक रिओ डी जानेरो मेथे १९४७ मध्मे बोलावली व अमेरिकांतर्गत परस्पर सहकार्याचा करार घडवून आणला. हा करार रिओ करार या नावाने ओळखला जातो. या करारात अमेरिका खंडातील कोणत्याही राष्ट्रावर दुसऱ्या एखाद्या राष्ट्राने आक्रमण केल्यास ते आक्रमण सर्व राष्ट्रावर आहे असे गृहीत धरण्यात येईल व कराराशी संबंध असलेल्या सर्व राष्ट्रांनी आक्रमण परतवून लावण्यास मदत केली पाहिजे. या करारापासून नाटो संघटनेने जन्म घेतला. या करारात सामुदायिक सुरक्षिततेचे तत्व अवलंबण्यात आले.

**४. अमेरिकन राज्य संघटना ( इ.स.१९४८) :** रिओ करारात अमेरिका खंडातील राज्ये एकत्र आली होती. त्यांची संघटना अमेरिकेच्या पुढाकाराने बोगोटा येथे अमेरिका राज्य संघटना १९४८ मध्ये स्थापन झाली. या संघटनेने तंटे सोडविण्याचे यशस्वी कार्य पार पाडले. याशिवाय राजकीय, लष्करी, वैधानिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य केले

**५. उत्तर अटलांटिक करार संघटना 'नाटो' ( इ.स.१९४९) :** नाटो या संघटनेने आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपला ठसा उमटविला आहे. रशियाविरोधी संरक्षक गट म्हणून अमेरिका उदयाला आली. युरोपच्या बर्लिन विभाजनामुळे पूर्व-पश्चिम तणाव वाढू

लागला. म्हणून अमेरिकेने ब्रुसेल्स तहातील राष्ट्रांशी गुप्तपणे चर्चा करून युरोपवरील सोव्हिएट रशियाचे आक्रमण थोपविण्यासाठी एका संघटनेस जन्म दिला. त्याचे नाव उत्तर अटलांटिक करार संघटना छावणी असे आहे. या करारात अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, इटली, बेल्जिअम, डेन्यार्क, लक्झेंबर्ग, नेदरलॅंड, नॉर्वे, पोर्तूगाल, कॅनडा, आयर्लंड, ग्रीस, तुर्कस्थान व पश्चिम जर्मनी हे राष्ट्रे १९५५ पर्यंत नाटो करारात सामील झाले.

**करारातील कलमे :**

१. नाटो करारातील राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघटनेवर पूर्ण विश्वास व्यक्त केला. लोकशाही, स्वातंत्र्य, मानवता, कायद्याचे राज्य या तत्वांशी कटिबध्द रहाण्याची ग्वाही दिली.

२. सदस्य राष्ट्रांनी आपआपसातील वाद शांततेने व सांमजस्याने सोडवून सामुदायिक सुरक्षितता मजबूत करण्याचे मान्य केले.

३. स्वातत्र्य व सुरक्षितता धोक्यात आली आहे असे वाटल्यास त्यावर निर्णय घ्यावा.

४. युरोप अथवा उत्तर अमेरिका देशांवर झालेले आक्रमणाला तोंड देण्याच्या दृष्टीने युनोच्या सनदेशी सुसंगत लष्करी किंवा अन्य स्वरूपाची मदत दिली जाईल.

५. ज्यांना नाटो करार मान्य आहे त्यांना नाटोचे सभासदत्व देण्यात येईल.

६. नाटो करारानंतर १० वर्षांनी सभासद राष्ट्रांना सुधारणा करण्यास संधी असेल.

७. नाटो कराराच्या २० वर्षानंतर एखाद्या सभासद राष्ट्रास सभासदत्व सोडावयाचे असल्यास किमान एक वर्ष अगोदर तशी नोटीस दिली पाहिजे.

नाटोचे कामकाज उत्तर अटलांटिक कौन्सिल व लष्कर समिती या दोन घटक संस्थातर्फे चालविले जात असे. नाटोमध्ये निर्माण होणाऱ्या समस्यांचा विचार करण्यासाठी २० कायम समित्या आहेत. नाटोचे सरचिटणीस दैनंदिन कामकाज पहातो व बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारतो.

**नाटोची कामगिरी :**

युरोपात शांतता प्रस्थापिण्यासाठी नाटोने प्रयत्न केले. नाटोची स्थापना झाल्यापासून साम्यवादी गटाला शह बसला. मार्शल योजनेमुळे युरोपीय देशांचा आर्थिक विकास झपाटयाने झाला.

नाटो सभासद राष्ट्रांत युद्धाविषयक गटात विलक्षण वाढ झाली. नाटोची भूसेना १२ विभागावरून इ. स. १९६० पर्यंत ती १०० विभागापर्यंत गेली. तर ४०० विमानांची संख्या ६००० वर गेली. नौदलात ३० टक्के वाढ झाली. संशय व मतभेदाचे वातावरण नष्ट करून सर्वांना व्यावहारिक पातळीवर आणले व त्यांच्यात परिणामकारक सहकार्य वाढीस लावले. या सहकार्यातून पश्चिम युरोपीय संघ निर्माण झाला.

**मुल्यमापन :** रशियाच्या साम्यवादास आळा घालण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने नाटोची स्थापना झाली होती. अमेरिका जागतिक शांतता टिकविण्यासाठी प्रयत्न करते असा त्यांचा दावा होता. मग युनो असताना नाटोची काय गरज? असा प्रश्न पडतो. यातून अमेरिकेला युनोची प्रतिष्ठा कमी करावयाची असे मानले जाते.

नाटोवर रशियाने अत्यंत कठोर टीका केली. रशियाच्या मते, नाटोच्या आधारे म्हणजे अँग्लो-अमेरिकन जगतातील राष्ट्रांना स्वतंत्र परराष्ट्र धोरण अथवा गृहधोरण ठरविण्याची संधी न देता आपल्या जागतिक श्रेष्ठत्वास साहाय्यभूत ठरेल असेच त्यांना वागावयाचे होते. काही देशांनी एकत्र येऊन अलिप्त राष्ट्राची संघटना निर्माण केली.

पश्चिम युरोपात अमेरिकेचा प्रभाव वाढल्याने रशियाने आपली दृष्टी मध्यपूर्व व अतिपूर्व या भागाकडे वळविली. अमेरिकेनेही आग्नेय आशिया करार संघटना (सीटो) ची स्थापना केली. शीतयुध्द तीव्र करणे हेच नाटोचे उद्दिष्ट आहे असे रशियाचे मत होते. भारताचे त्यावेळचे पंतप्रधान पं. नेहरू यांच्यामते, ''स्वसंरक्षणासाठी असे करार करण्यास हरकत नाही. परंतु भौगोलिकदृष्टया अशा करांराचा विस्तार होतो यास माझा विरोध आहे. नाटोच्या चर्चेच्यावेळी वसाहतीवरील प्रभुत्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न झाला. अशी भूमिका युनोच्या तत्वांशी विसंगत आहे''.

## ६. युरोपीय संरक्षक संघ इ.स.१९५२

फ्रान्सने पुढाकार घेऊन पॅरिस येथे युरोपीय राष्ट्राच्या संरक्षणासाठी १५ फेब्रुवारी १९५१ ला एक बैठक बोलावली. इ.स. १९५२ ला युरोपसाठी सैन्य उभारण्यासाठी व त्याचे निमंत्रण ठेवण्यासाठी युरोपीय संरक्षक संघाची स्थापना करण्याचे ठरले. त्यानुसार २७ मे १९५२ ला पश्चिम जर्मनी, फ्रान्स, बेल्जीअम, इटली, नेदरलॅंडस्, लक्झेबर्ग या राष्ट्रांच्या परराष्ट्र मंत्र्याच्या स्वाक्षऱ्या होऊन युरोपीय संरक्षक संघ अस्तित्वात आला.

या संघाचा उद्‌देश युरोपच्या संरक्षणासाठी एकच संयुक्त संरक्षण यंत्रणा उभारणे हा होता. सभासद राष्ट्रांनी वेगळी राष्ट्रीय संरक्षण व्यवस्था ठेवण्याची गरज नाही असे करारात ठरविण्यात आले. परंतु सार प्रदेशावरून फ्रान्स-जर्मनी वादाने पुन्हा डोके वर काढले. या वादात इंग्लड व अमेरिकेने मध्यस्ती करण्याचा प्रयत्न केला पण त्याचा उपयोग झाला नाही. फ्रेंच सरकारने युरोपीय संरक्षक संघास मान्यता देण्याची सूचना ३० ऑगस्ट १९५४ रोजी फेटाळून लावली. असे मतभेद चांगले नसल्याने परस्पर सहकार्यातून पश्चिम युरोपीय संघ जन्माला आला.

## ७. युरोपची महासमिती (१९४९) :

दुसऱ्या महायुद्धापासून युरोपला एकसंघ बनविण्यासाठी अनेक प्रयत्न झाले. तरी पाहिजे तशी युरोपला बळकटी आली नव्हती. अमेरिकेने यात पुढाकार घेऊन युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका याप्रमाणे युनायटेड स्टेट्स ऑफ युरोपची कल्पना इ. स. १९४७ साली मांडली. त्यानुसार २७ जानेवारी १९४९ला युरोपची महासमिती अस्तित्वात आली. सार प्रश्नावरून पश्चिम जर्मनीने सभासदत्व स्वीकारण्यास नकार दिला होता. परंतु सारमधील सार्वमतानुसार तो जर्मनीत सामील झाल्याने हा प्रश्न मिटला. युरोपच्या महासमितीने सांस्कृतिक व आर्थिक संबंध दृढ करण्याचे महत्त्वाचे काये केले तसेच युरोपीय जनतेस राजकीय शिक्षणाद्वारे राजकीय संस्थांमध्ये समन्वय साधून राजकीय जागृती करण्याचे महत्त्वाचे कार्यही पार पाडले.

## ८. पश्चिम युरोपीय संघ ( इ.स. १९५५) :

सार प्रश्न मिटल्यानंतर फ्रान्सने युरोपीय संरक्षक संघास यान्यता दिली. अमेरिकेला या संघापासून दूर करणे व युरोपला आपल्या पायावर उभे करणे हाही फ्रान्सचा हेतू होता. ७ मे १९५५ रोजी पॅरीस येथील बैठकीत पश्चिम युरोपीय संघाची स्थापना झाली. या संघाच्या महासभेने त्रिसूत्री कार्यक्रम सादर केला.

१. समान परराष्ट्र धोरण

२. अण्वस्त्र सज्ज अशी संघाची स्वतंत्र फौज

३. बाजारपेठांचे संघटन

**कामगिरी :** या संघाने युरोपीय अणुशक्ती मंडळ आणि युरोपीय कोळसा व पोलाद मंडळ यांच्यात समन्वय घडून युरोपची एकता या संघाने साधली. राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक समन्वय साधण्यासाठी सर्वसाधारण व्यवहार समिती स्थापन केली. १९६१-६३ या कालखंडात इंग्लडने संघाचा उपयोग युरोपीय समाईक बाजारपेठेत प्रवेश मिळण्यासाठी करून घेतला.

## ९. आग्नेय आशिया करार संघटना (सीटो) इ.स.१९५४ :

शीतयुद्धाचा प्रसार जगात सर्वत्र झाला. पश्चिम आशिया व मध्यपूर्व या तेलक्षेत्रावर वर्चस्व ठेवण्याचा प्रयत्न रशिया व अमेरिका या महासत्तांनी केला. इराण व इराकमध्ये अमेरिकेने शिरकाव करून घेतला. रशियाला तेथून माघार घ्यावी लागली. माओने चीनमध्ये लाल क्रांती घडवून आणली. तेव्हा त्यास राजनैतिक मान्यता देण्यास अमेरिकेने नकार दिला. तसेच अमेरिकेने व्हेटोचा अधिकार वापरून संयुक्त राष्ट्रसंघात चीनला प्रवेश मिळवण्यास अडथळा निर्माण केला. चीनला विरोध म्हणजे साम्यवादाला विरोध अशी अमेरिकेची भूमिका होती. कोरियाच्या संघर्षाच्या वेळी अमेरिकेने दक्षिण कोरियाच्या बाजूने लष्करी मदत केली.

अमेरिकेने आशिया खंडाच्या राजकारणात भाग घेतला. पाकिस्तानला आपलेसे करून १९५४ मध्ये अमेरिका-पाक लष्करी करार केला. आग्नेय आशियाच्या संरक्षणाची योजना फिलिपाईन्सची राजधानी मॅनिला येथे मांडली. मॅनिला परिषदेस अमेरिका, इंग्लड, फ्रान्स, ऑस्ट्रेलिया, पाकिस्तान, फिलिपाईन्स व थायलंड ही आठ राष्ट्रे हजर होती. या परिषदेत आग्नेय आशिया करार संघटना स्थापन झाली. सीटोचा यूनोवर विश्वास होता. सामुदायिक सुरक्षिततेच्या तत्त्वावर परस्परांशी सहकार्य करण्याचे ठरले होते.

**सीटोचे मुल्यमापन :** अमेरिका सीटो कराराचा केंद्रबिंदू होता. हा करार चीनचे साम्यवादी आक्रमण रोखण्यासाठी होता. आशिया खंडात माओने आक्रमक विस्तारवादास सुरूवात केलेली होती त्यास पायबंद घालण्याचा अमेरिकेचा डाव होता. भारताने सीटोमध्ये सामील होण्यासाठी अमेरिकेने बरेच प्रयत्न केले. परंतु भारताने त्यास दाद दिली नाही. तत्कालीन भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले होते, 'आता शीत युध्द् भारताच्या दारात येऊन ठेपले आहे'.

सीटोतील राष्ट्रे शांततेच्या नावाखाली शस्त्रनिर्मिती करण्यावर भर देत होते. त्यामुळे परस्पर अविश्वास व संशय वाढत गेला. अमेरिका यामध्ये स्वार्थी राजकारण करत होती. लष्करी खर्च वाढल्याने सभासद राष्ट्रांच्या अर्थव्यवस्थेवर वाईट परिणाम झाला.

सीटोला अपेक्षेप्रमाणे यश मिळाले असे म्हणता येणार नाही. व्हिएतनाम प्रश्नात अमेरिकेला माघार घ्यावी लागली. थायलंडमध्ये चीनचा शिरकाव झाला. पाकिस्तानने फक्त भारताविरूध्द मदत मिळविण्यासाठी सभासदत्वाचा उपयोग केला. अँझ्युस, आशिया पॅसिफिक समिती मॅनिला शिखर परिषद या सारख्या संघटना स्थापन झाल्याने सीटोचे महत्त्व कमी झाले. १९७०नंतर जागतिक परिषद बदलू लागली.

१०. अरब संघ ( इ.स. १९४५) :

पश्चिम युरोप, पॅसिफिक विभाग अथवा आग्नेय आशिया या विभागात संरक्षक संघटना उभी करणे अमेरिकेला सोपे होते. अमेरिका संरक्षणासाठी संघटनेच्या बाबतीत मध्यपूर्वेत प्रवेश करू इच्छित होती.

दुसऱ्या महायुध्दानंतर छोटी छोटी इस्लाम राष्ट्रे स्वतंत्र झाली. अरब व ज्यू यांच्या संघर्षात पाश्चियात्य सत्ता व अमेरिका यांनी अरबांविरूध्द ज्यूंना पाठिंबा दिला व इस्त्रायलची निर्मिती झाली. त्यामुळे २५ सप्टेंबर १९४४ ला सिरिया, इराक, इजिप्त, लेबॅनॉन, ट्रॅन्सजॉर्डन, मेमेन आणि सौदी अरेबिया या देशांचे प्रतिनिधी इजिप्त येथे एकत्र आले. आणि अलेक्झांड्रिया करार मंजूर झाला. २२ मार्च १९४५ ला करारातील सात देशांनी अरब संघाच्या करारावर कैरो मेथे स्वाक्षऱ्या केल्या व अरब संघ अस्तित्वात आला.

अरब संघाच्या उद्दिष्टानुसार एक सर्वसाधारण सामुदामिक सुरक्षितता पध्दती स्थापन करून आपआपसातील तंटे शांततेच्या मार्गाने सोडवणे, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात विकास घडवून आणणे हे मान्य करण्यात आले. नाटोच्या धर्तीवर अरब देशांनी संयुक्त संरक्षणाचा करार केला. त्यासाठी एक लष्करी मंडळ स्थापन करण्यात आले.

अरब संघावर पहिल्यापासून इजिप्तचे वर्चस्व राहिल्याने इतर सभासद राष्ट्रांना त्याविषयी अविश्वास वाटत होता. इराकने आपला आर्थिक हिस्सा संघाकडे भरला नाही. जॉर्डनने संघात दुफळी माजवली. सौदी अरेबिया संघाविषयी उदासीन होता. लेबॅनॉनमध्मे मोठया संख्येने ख्रिश्चन असल्यामुळे संघाविषयी द्वेषभावना होती. तरीसुध्दा संघ अस्तित्वात होता.

अरबांमध्ये राष्ट्रभावनेची जागृती प्रखर होण्यास संघाची मदत झाली. विविध आंतरराष्ट्रीय प्रश्नावर अरब संघाने सक्रिय भूमिका घेतल्याने सर्वाचे लक्ष आपल्याकडे खेचून घेतले. तत्कालिन अमेरिकेचे अध्यक्ष यांनी आयसेन हॉवर सिध्दांत जाहीर केल्यानंतर आपल्या अस्मितेला धक्का देणाऱ्या या सिध्दांताला संघाने विरोध केला. १९५७ला कैरो येथे भरलेल्या अरब संघाच्या बैठकीत अमेरिकेचा व पाश्चियात्य सत्तांचा निषेध केला. येमेनमधून ब्रिटिशांनी, अल्जिरियातून फ्रान्सने माघार घ्यावी इ. ठराव झाले. १९५५ ते १९६० या काळात अंतर्गत मतभेद मिटवण्यास अरब संघाला फारसे यश मिळाले नाही. अरब सामुदायिक बाजारपेठ निर्माण करण्यात आली. संयुक्त अरब गणराज्याची स्थापना करण्यात आली. यात्र त्यावर इजिप्तचे वर्चस्व होते. इस्त्रायलने इजिप्तवर अचानक हल्ला करून इजिप्तचा पराभव केला. त्यामुळे अरब जगताची फार मोठी हानी झाली.

## ११. बगदाद करार संघटना (सेंटो) इ.स. १९५५ :

अमेरिका मध्यपूर्वेत एखादी संरक्षक संघटना स्थापन करण्याच्या प्रयत्नात होती. १९५१ मध्ये इंग्लड, फ्रान्स, अमेरिका व तुर्कस्थानने मध्यपूर्व लष्करी विभाग स्थापन करून त्याचा मुख्य तळ सुएझ क्षेत्रात ठेवण्याबाबत चर्चा केली. मध्यपूर्व संरक्षक संघटना स्थापन करण्याचा विचार झाला. परंतु या योजना अस्तित्वात आल्या नाहीत. १९५४च्या अखेरीस पाश्चियात्य सत्ता व अमेरिका यांच्या पाठिंब्याने इराक-तुर्कस्थान यांच्यात बगदाद करार २४ फेब्रुवारी १९५५ रोजी घडून आला. पुढे या कराराची व्याप्ती वाढल्याने त्यास मध्यवर्ती करार संघटना सेंटो असे नाव देण्यात आले.

### सेंटो करारातील तरतूदी :

१. संरक्षण व सुरक्षितता याबाबत परस्पर सहकार्य करणे.

२. सुरक्षिततेवर उपायोजना करणे.

३. परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप न करणे.

४. परस्परातील वाद-तंटे शांततामय मार्गाने सोडविणे.

५. युनो सनदेवर पूर्ण निष्ठा ठेवून कार्य करणे.

### सेंटोवरील प्रतिक्रिया :

इराक अरब संघात होता परंतु तो सेंटोमध्ये सामील झाल्याने अरब गणराज्याकडून कठोर विरोध झाला. इराकला अरब संघातून बाहेर काढण्याचे डावपेच अमेरिका व पाश्चियात्य राष्ट्रांनी अवलंबिल्यामुळे अरब संघ रशियाच्या बाजूला झुकला. जॉर्डन सेंटोत सामील होण्यासाठी ब्रिटनने प्रयत्न केले. मार्च १९५६ मध्ये इंग्लडचे परराष्ट्रमंत्री सेल्विन लॉईड भारत भेटीवर आले असता त्यांचा अंतर्गत हेतू समजला. तो म्हणजे सेंटो करार भारताविरूध्द नसून रशियाविरूध्द होता. इंग्लड, अमेरिकेने सेंटो करारापासून भारताला धोका नसल्याची ग्वाही देऊनही भारताने या करारास विरोध केला. पं. नेहरू म्हणाले, 'सेंटो व सीटो करारामुळे भारतावर निश्चित परिणाम झाला आहे. धोक्याची टांगती तलवार भारतावर सतत आहे'. इजिप्तचे अध्यक्ष नासर, रशिया यांनी सेंटोविरूध्द तिखट टीका केली. इराकमध्येही या कराराविरूध्द जनमत तयार झाले. इराकने सेंटोतून बाहेर पडल्यामुळे सेंटो संघटना कमकुवत झाली. १९६० नंतर सेंटो विशेष प्रभावी राहिली नाही.

## १२. आमसेन हॉवर सिध्दांत ( इ.स.१९५७) :

सुएझ प्रकरणामुळे मध्यपूर्वेतील राजकारणाला वेगळी दिशा मिळाली. सुएझ क्षेत्रातून ब्रिटन फ्रान्सला काढता पाय घ्यावा लागल्याने मध्यपूर्वेतील राजकीय स्थैर्याला आधार देणारी शक्तीच नाहीशी झाली. मध्यपूर्वेतील सत्तेची पोकळी भरून काढण्यासाठी अमेरिकेने रशियन आक्रमणाला शह देण्याचा प्रयत्न केला. मध्यपूर्वेत लष्करी तळ मजबूत करणे, नविन आरमारी तळ उभारणे हा कार्यक्रम अमेरिकेने सुरू केला. अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी आपला विख्यात आयसेन हॉवर सिध्दांत जाहीर केला.

**आमसेन हॉवर सिध्दांत :** आमसेन हॉवर सिध्द्ांतातील तरतुदी खालीलप्रमाणे

१. मध्यपूर्वेतील स्वातंत्र्य टिकवणे व आर्थिक स्थिती मजबूत करणे यासाठी संबंधित राष्ट्रांशी वा राष्ट्रगटांशी सहकार्य करण्याचे अधिकार अध्यक्षांना मिळावेत.

२. लष्करी मदत किंवा सहकार्य देण्याचे अधिकार अध्यक्षांना असावेत.

३. साम्यवादी नियंत्रणाखाली असलेल्या राष्ट्राने मध्यपूर्वेतील कोणत्याही राष्ट्रावर आक्रमण केल्यास त्या राष्ट्रास लष्करी वा अन्य स्वरूपाची मदत देण्याचे अधिकार अध्यक्षांना असावेत.

४. अमेरिकेने द्यावयाच्या लष्करी वा अन्य स्वरूपाच्या मदतीवर कोणतेही निर्बंध असू नयेत.

आमसेन हॉवरची ही उपायोजना मुख्यत: प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष साम्यवादी आक्रमणाविरूध्द होती. मध्यपूर्वेतील सत्तेचा अभाव अमेरिकेने त्याच भागातील सत्तेला लष्करी व अन्य प्रकारे मदत देऊन तास भरून काढण्याचा उद्देश आमसेन हॉवर सिध्द्ांतात अभिप्रेत होता. आमसेन हॉवर सिध्दांतानुसार अमेरिकेने जुन्या ट्रुमन सिध्दांताचा पुनरूच्चार केला तसेच नवीन धोरणेही जाहीर केली. अध्यक्ष आमसेन हॉवर यांना कोठेही, केव्हाही युध्द जाहीर करण्याचे अमर्याद स्वातंत्र्य मिळाले. आमसेन हॉवर सिध्दांतांवर अनेकांनी टीका केली.

**सिध्दांताचा परिणाम :** या सिध्दांतामुळे स्थैर्य निर्याण होण्याऐवजी तणावाची परिस्थिती निर्माण झाली.

१. मध्यपूर्वेत अरब राष्ट्रवाद, अरबांचे इस्त्रायलशी युद्ध, अरब जनतेची आर्थिक व सामाजिक दुर्दशा, नासरची प्रतिष्ठा यामुळे आयसेन हॉवर सिध्दांतास अपेक्षित यश मिळाले नाही.

२. मन्रो सिध्दांतास मिळालेले यश आयसेन हॉवर सिध्दांतास लाभणे शक्य नव्हते. राष्ट्रवादाच्या जागृतीमुळे परावलंबी बनवणारा आयसेन हॉवर सिध्दांत यशस्वी झाला नाही.

३. मध्यपूर्वेतील सत्तेची पोकळी भरून काढण्यासाठी अमेरिकेने युनोला अवयानित केले. हे जागाला न पटणारे होते.

४. आमसेन हॉवर सिध्दांतानुसार स्पेन, इटली, फ्रान्स, मोरोक्को, ट्यूनिशिया, अल्जिरिया, सुदान व लिबिया यांचा भूमध्य सामुद्रिक करार घडवून आणण्याची अमेरिकेची योजेना होती. परंतु ती बारगळली.

## ब. सोव्हिएट रशियाचे धोरण :

रशियाने अमेरिकेसारखे संरक्षक करार केले नाही. परंतु साम्यवादाचा प्रसार करण्यासाठी प्रभावी उपायोजना केल्या. अमेरिकेच्या मार्शल योजनेला प्रत्युत्तर म्हणून रशियाने 'योलोटोव्ह योजना' लागू करून पूर्व युरोपातील इतर देशांना आर्थिक व तांत्रिक मदत चालू केली.

**१. वॉर्सा करार :** पश्चिमी देशांनी संभाव्य रशियन प्रभाव रोखण्यासाठी सिंटो, नाटो या सारखे लष्करी करार संमत केले. या पार्श्वभूमीवर रशियालादेखील मित्रराष्ट्राशी या धर्तीवर

करार करणे आवश्यक झाले होते. ११ ते १४ मे १९५५ मध्ये रशिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, अल्बानिया, बल्गेरिया, पूर्व जर्मनी, पोलंड, रूयानिया या राष्ट्रांची बैठक पोलंडची राजधानी वार्सा येथे झाली. या राष्ट्रात मैत्री, सहकार्य व परस्पर मेदतीचा करार करण्यात आला.

वॉर्सा करारावर अमेरिकेचे वर्चस्व होते. रशियाने हंगेरीतील स्वातंत्र्य चळवळ दडपून टाकली. रशियाने या करारातील देशांना मदत केली. परंतु रशिया-चीन संबंध बिघडू लागल्यामुळे युरोपातील इतर साम्यवादी मित्राशी रशियाने स्नेहाचे संबंध ठेवले. राजकीय एकता व शिस्त टिकवण्यासाठी आर्थिक क्षेत्रात कॉमेकॉन व सेया जसे कार्य करीत होत्या तसे कार्य लष्करी क्षेत्रात सुरू करण्यात आले.

### २. बाल्कन संघ :

दुसऱ्या महायुध्दानंतर आग्नेय युरोपातील राष्ट्रांनी एकत्र येऊन बाल्कन संघराज्य निर्माण करावे अशी तेथील साम्यवादी देशांची अपेक्षा होती. मार्शल टिटो यांनी बाल्कन संघराज्य निर्मितीसाठी प्रयत्न केले. ऑगस्ट १९५४ मध्ये युगोस्लाव्हिया, ग्रीस, तुर्कस्थान या देशांनी एकत्र येवून बाल्कन करार केला. पुढील काळात स्टॅलिनच्या मृत्यूनंतर रशिया युगोस्लाव्हिया संबंध सुधारले. युगोस्लाव्हिया अलिप्त राष्ट्रांच्या संघटनेत सामील झाला. त्यामुळे बाल्कन संघ मृतप्राय झाला.

## ७.३ स्वंय अध्यनासाठी प्रश्न / उपक्रम

१. शीतयुद्ध म्हणजे काम?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. नाटो कराराची कामगिरी थोडक्यात लिहा?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. सीटो कराराची माहिती लिहा?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. वार्सा करारातील देशांची नावे लिहा?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

उपक्रम : शीतयुद्धकालीन संरक्षक लष्करी करारांचा अभ्यास करताना जगाचा राजकीय नकाशा पहावा.

## ७.४ सारांश

रशियात साम्यवादी शासन आले. त्यामुळे अमेरिका व युरोपमधील राष्ट्रे रशियाबद्दल शत्रू मानू लागले. दुसऱ्या महायुद्धानंतर उभय देशांनी स्वीकारलेल्या धोरणांच्या परिणामामधून शीतयुद्धाचा जन्म झाला. ब्रेस्ट लितोस्क मेथील ट्राटस्कीच्या घोषणनुसार 'न युद्ध आणि न शांती' असा शीतयुद्धाचा अर्थ होता. शीतयुद्धास अनेक घटक जबाबदार ठरले. दुसऱ्या महायुद्धानंतर रशियाचे साम्यवादी वर्चस्व चीन, कोरिया आणि पश्चिम आशियात वाढू लागले होते. त्याला लगाम घालण्याच्या दृष्टीने अमेरिकेने प्रयत्न केले. विन्स्टन चर्चिलच्या फुल्टन येथील भाषणातून आपल्याला रशियाबद्दलचे धोरण दिसून येते. रशियाच्या वार्सा करारापासून दोन विरोधी विचारधारा स्पष्ट दिसू लागल्या. दोन्ही महासत्तांनी आपल्या राजकीय उद्देशासाठी सैध्दातिक बाजू स्पष्ट केली. अमेरिकेनेही विविध लष्करी करार केले होते. शेवटी १९८९-९० च्या दरम्यान शीतयुद्ध संपुष्टात आले.

## ७.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ, इत्यादी

शीतयुद्ध - मुक्त अर्थव्यवस्थेचे जग व साम्यवादी जग पर्यायाने अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील ताण तणाव व संघर्षास शीतयुद्ध म्हणतात.

नाटो : North Atlantic Traty Organisation - NATO

सेंटो : The Baghdad Pact or Central Traty Organisation- CENTO

सीटो : South-East Asia Treaty Organisation - SEATO

## ७.६ संदर्भसूची

१. कदम य. ना. (२००१).आधुनिक जग (१९४५-२०००), कोल्हापूर: फडके प्रकाशन, पृष्ठ क्र. ९०-१३०.

२. जैन हुकुमचंद, कुष्णचंद्र माथूर (मराठी अनुवाद - काळे अनिल) (दुसरी आवृत्ती २००९). आधुनिक जगाचा इतिहास (१५००-२०००), के सागर पब्लिकेशन्स, पृष्ठ क्र. ५३१-५४१.

३. पंत पुष्पेश व जैन पाल, अंतरराष्ट्रीय संबंध, मेरठ : मिनाक्षी प्रकाशन, पृष्ठ क्र. ४४-७०.

## ७.७ सरावासाठी प्रश्न/क्षेत्रिम कार्य/प्रात्यक्षिक कार्य

१. शीतयुद्ध ही संकल्पना स्पष्ट करा? १९४५ ते १९६२ ह्या काळात शीतयुद्धामध्ये झालेल्या घटनांची चर्चा करा?

..........................................................................................................

..........................................................................................................

..........................................................................................................

२. शीतयुद्ध म्हणजे काय? त्याची कारणे व परिणाम स्पष्ट करा?

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

३. शीतयुध्द काळात झालेल्या संरक्षक लष्करी करारांची थोडक्यात माहिती लिहा?

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

४. शीतयुद्धाचे स्वरूप सांगून त्याचा जगावर झालेला परिणाम सांगा?

.....................................................................................................

.....................................................................................................

.....................................................................................................

## ७.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. V.D. Mahajan, International Reltions

२. D.F. Fleming, The Clod War and Its Origin, (London 1961)

३. Fred Halliday, The making of the Second Cold War, (London 1983)

४. Edward Crankshaw, The New Cold War (London 1963)

५. Issac Deutcher, Russia, China and the Weast (London 1970)

# घटक ८

# समाजवादी गटाचे विभाजन आणि शीतयुद्धाचा शेवट

**अनुक्रमणिका**


८.० उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ विषय विवेचन

 ८.२.१ समाजवादी गटाचे विभाजन आणि शीतयुद्धाचा शेवट

 ८.२.२ जागतिक राजकारणातील बदल

८.३ स्वंय अध्ययनासाठी प्रश्न

८.४ सारांश

८.५ पारिभाषिक शब्द

८.६ संदर्भ सूची

८.७ सरावासाठी प्रश्न


## ८.० उद्दिष्टे

ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१. दुसऱ्या महायुद्धानंतर जगाची दोन गटात कसे विभाजन झाले. हे स्पष्ट होईल.

२. समाजवादी किंवा साम्यवादी रशियाची व भांडवलशाही अमेरिकेची ओळख होईल.

३. समाजवाद व शीतयुद्ध यांचे आकलन होईल.

४. शीतयुद्धातून निर्माण झालेल्या जागतिक द्विध्रुवीकरणाचा बोध घेता येईल.

५. शीतयुद्धातून जागतिक राजकारण व अर्थकारणावर पडणाऱ्या प्रभावाचे आकलन होईल.

६. जागतिक उद्भवणाऱ्या विविध समस्यांची/प्रश्नांची जाणीव होईल.

७. जागतिक राजकारणातील विविध विचार प्रवाहाचे आकलन होईल.

८. समाजवादाच्या/साम्यवादाच्या त्रुटींची नोंद घेता येईल.

९. समाजवादी गटाच्या विभाजनानंतर व शीत युद्धाचा शेवट झाल्यावर निर्माण झालेल्या एकध्रुविकरणाचा आढावा घेता येईल.

## ८.१ प्रस्तावना

समाजवादी गटाचे विभाजन आणि शीतयुद्धाचा शेवट जगाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानला जातो. १९४५ मध्ये दुसरे महायुद्ध संपुष्टात आले. युनोची स्थापना झाली.

शिवाय रशिया व अमेरिका ह्या दोन महासत्तांचा उदय झाला. ह्या घटनांचे पडसाद जागतिक राजकारणावर पडले आणि त्यातून दोन महासत्तांमधल्या शीतयुद्धांची जगभर सुरुवात झाली व जगात राजकारण, समाजकारण, अर्थकारण, विज्ञान व तंत्रज्ञान या क्षेत्रात जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. त्यांनी युनो, राजनैतिक मूल्ये, मानवतावाद व संपूर्ण जगास वेठीस धरले व जागतिक राजकारणात रशिया व अमेरिकेने आपला प्रभाव कायम ठेवण्याची सतत धडपड केली. दोन्ही देश समोरासमोर संघर्ष करीत नव्हते. मात्र जगात घडणाऱ्या कोणत्याही महत्त्वपूर्ण घटनेत परस्परांविरुद्ध उभे होते व जगातले लहान-मोठी मागास-विकसनशील राष्ट्रे रशिया, अमेरिकेच्या राजकारणाचे व अर्थकारणाचे बळी ठरत होते. रशियाचा साम्यवादी विस्तार व अमेरिकेची भांडवलशाही डॉलर नीती, युनोचा गैरवापर, आंतरराष्ट्रीय लष्करी करार, कमालीची शस्त्रास्त्र स्पर्धा, तेलाचे राजकारण कोरीया, जर्मनी, क्युबा, व्हिएतनाम, काश्मिर, आखाती संघर्ष व अरब-इस्त्रायल संघर्ष या घटना महासत्ताच्या शीतयुद्धाच्या द्योतक होत्या. १९९० पासून मात्र परिस्थिती बदलत गेली. विविध कारणांनी समाजवादी गटाचे नेतृत्त्व करणारा रशिया दुबळा बनला. अमेरिकेला प्रतिस्पर्धी उरला नाही. शीतयुद्ध संपुष्टात आले. अमेरिका या एकमेव महासत्तेचे वर्चस्व निर्माण झाले. आज तिच्या सामर्थ्याला आवाहन देणारी दुसरी सत्ता राहिली नाही व हीच आजच्या जागतिक राजकारणाची व अर्थकारणाची सद्य:स्थिती आहे. या प्रकरणात या स्थितीचे विश्लेषण केले आहे.

## ८.२ विषय विवेचन

### ८.२.१ समाजवादी गटाचे विभाजन आणि शीतयुद्धाचा शेवट

प्रत्येक महान व्यक्ती दोनदा निधन पावते. एकदा शरीराने मरते नंतर त्यांचे शिष्य त्यांचा विचारांचा व तत्त्वज्ञानाचा निकाल जेव्हा लावतात तेव्हा ती व्यक्ती दुसऱ्यांदा मरते. कार्ल मार्क्सच्या बाबतीत रशियन भूमीवर व कम्युनिस्ट युरोपमध्ये हेच घडलेले आपणास दिसते.

कार्ल मार्क्सने 'जगातील कामगारांनो एक व्हा' अशी घोषणा दिली व पिळवणूक करणाऱ्यांच्या हातातील सत्ता श्रमणाऱ्यांच्या हाती गेली पाहिजे. असा राजकीय व आर्थिक विचार त्यातून स्थिर झाला. लेनीनने तो पुढे नेला. कृतीत आणला व रशियात १९१७ च्या ऑक्टोबर क्रांतीने इतिहास घडविला. कामगारांच्या शक्तीचे नवे दर्शन घडविले. जग हादरले. एक नवा संदेश दिला.

लेनीन, स्टॅलीन, ट्रॉटस्की इ. नेत्यांनी रशियात व जगात विकसित केलेले समाजवादी तत्त्वज्ञान. क्रुश्चेव्ह व गोर्बाचेव्हा मोडीस काढले. १९९०-९१ मध्ये सोव्हिएत रशियाच्या विघटनाने समाजवादी राजवटीचा डोलारा जमीनदोस्त झाला. त्याची काही कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

### ८.२.२ विभाजनास प्रारंभ आणि प्रक्रीया

#### १. शास्त्रीय समाजवाद ही तात्त्विक बैठक चुकीची :-

कार्ल मार्क्सने साम्यवादास शास्त्रीय समाजवाद म्हटले आहे. कोणत्याही शास्त्राचे काही नियम असतात व या नियमांचा अवलंब केल्यास निष्कर्ष देखील काल-स्थल-

निरपेक्ष समान असतात. म्हणूनच शास्त्रास पद्धतीशीर ज्ञान म्हटले जाते व हा नियम नैसर्गिक शास्त्रास लागू पडतो. नैसर्गिक शास्त्रात छोट्या प्रमाणावर प्रयोग केल्यानंतर जे निष्कर्ष येतात. तेच निष्कर्ष मोठ्या प्रमाणावर प्रयोग केल्यास येतात. मार्क्सचा हा समाजवाद हे नैसर्गिक शास्त्र नसल्याने शास्त्राचे नियम पूर्णत: त्यास लागू होत नाहीत. 'समाजवाद' हे सामाजिक शास्त्र असल्याने सदा-सर्वकाळ निष्कर्ष सारखे असत नाहीत. साहजिकच निष्कर्ष वेगळे येतात किंवा असून शकतात कारण सामाजिक शास्त्रात शास्त्रातील इतर घटकाबरोबर 'समाज' हा सजीव घटक असतो व हा समाज मानवी प्राण्यांचा असल्याने त्याची मानसिकता व्यक्ती-स्थल-कालपरत्त्वे भिन्न असते. त्याचे निष्कर्षही त्यामुळे भिन्न असणार यात शंका नाही. म्हणूनच कार्ल मार्क्सने आपल्या साम्यवादास किंवा समाजवादी तत्त्वास शास्त्रीय बैठक देण्याचा जो प्रयत्न केला तोच चुकीचा होता. त्यामुळे साम्यवादाच्या किंवा समाजवादाच्या विघटनास ही चुकीची तात्त्विक बैठकच मोठ्या प्रमाणावर जबाबदार ठरते.

## २. मूलभूत तत्त्वातील अतिरेकी धाडस :-

इतिहासातील घटनांचे विश्लेषण हे भविष्यातील घटनांचा वेध घेऊन करणे हे मार्क्सवादाचे मूलभूत तत्त्व आहे. भविष्यात काय घडू शकेल याचा अंदाज असल्याशिवाय भूतकाळ व वर्तमानकाळ यातील घटनांची सांगड घालता येणार नाही. अशी माक्क्सची धारणा होती व भविष्याचा वेध घेण्याचे ज्ञान आपल्या विचारसरणीमुळे मिळू शकते. अंदाज वर्तविणे हा कोणत्याही शास्त्राचा एक भाग असतो. असा अंदाज काही मिनिटाच्या किंवा काही वर्षानंतर घडणाऱ्या घटनांसंदर्भात वर्तवला जातो. अर्थात जेवढा अल्पावधी मोठा तेवढा अंदाज वर्तविण्याचा धोका जास्त असतो. सामाजिक बाबतीत असे अंदाज वर्तमान परिस्थितीच्या संदर्भातच आणि मर्यादित कालावधीसाठीच वर्तविले जाऊ शकतात. परंतु मानवजातीचे भवितव्य अनादी अनंत काळापर्यंत वर्तविण्याचा आणि या कालावधीत कोणकोणते सामाजिक गट असतील. हे सांगण्याचा प्रयत्न करणे व तेही हे अंदाज 'शास्त्रीय' आहेत. अशा दाव्यासह करण्याचे धाडस मार्क्सने केले. हा दावा अतिरेकी स्वरूपाचा होता. मात्र आकर्षकही होता. त्यामुळे लोकांनी स्वप्नरंजनाच्या स्वरूपात मार्क्सचा हा समाजवाद स्वीकारला. त्यातील पायाभूत कमकुवतपणाच समाजवादाच्या निरंकुशतेस कारणीभूत ठरला.

## ३. इतिहासाचे आर्थिक विश्लेषण अवास्तव :-

मार्क्सने सामाजिक इतिहासाचे केलेले आर्थिक विश्लेषण वस्तुस्थितीला धरून नव्हते. मानवी समाजाची इतिहास काळात झालेली उत्क्रांती केवळ आर्थिक उत्पादनाच्या मार्गाने झालेली नाही. मानवाची समूह करून राहण्याची सहजप्रवृत्ती, त्याचे कौटुंबिक जीवन, समाज जीवनातील सांस्कृतिक बदल, समाज व्यवस्थेच्या नियमासाठी व नियंत्रणासाठी निर्माण झालेली राज्यव्यवस्था, सामाजिक भान ठेवून मानवी समाजात झालेली स्थित्यंतरे, मानवाची इतिहास कालापासून झालेली बौद्धिक प्रगती इ. घटक मानवी समाजाच्या उत्क्रांतीतील घटक अन्य घटकाइतकेच महत्त्वाचे आहेत. अशा अनेक घटकांचा समाजजीवनावर

परिणाम झाला असून समाजाच्या उत्क्रांतीमध्ये त्यांचा वाटा आहे. त्यामुळे इतिहासाचे केवळ आर्थिक विश्लेषण अवास्तव आहे. त्यामुळेच समाजवादाची पिछेहाट झालेली आपणास दिसते.

४. द्विवर्गीय समाज विभागणी अपुरी व चुकीची :-

मार्क्सच्या मते समाज दोन वर्गात विभागलेला असतो. मालक-मजूर/धनिक-गरीब/आहेरे-नाहीरे. समाजाची अशी दोनच वर्गात केलेली विभागणी अपुरी व चुकीची आहे. शिवाय ही विभागणी आर्थिक पायावर आहे. वास्तविक समाजात या वर्गाबरोबरच गरीब नाही व श्रीमंत नाही. असा एक मध्यमवर्ग असतो. बुद्धिवंतांचा वर्ग असतो. व्यवस्थापकांचा वर्ग असतो. तंत्रज्ञानांचा वर्ग असतो. शिवाय इतरही अनेक वर्ग समाजात प्रभावीपणे काम करणारे असतात. काही वर्ग जीवनाकडे आर्थिक फायद्या-तोट्याकडे पाहत नाहीत. साहित्यिक, कवी, प्रतिभावंत, शास्त्रज्ञ अशा वर्गांना एका आंतरिक उर्मीने जगाला वेगळेपणाने काहीतरी सांगायचे असते. अशा वर्गाला आर्थिक उत्पन्न कमी असल्याचे कारण पुढे करून नाहीरे वर्गात टाकल्यास बौद्धिक श्रीमंतीचा अवमान केल्यासारखे होईल म्हणून मार्क्सच्या समाजवादाला समाजाची दोन वर्गात विभागणी अपुरी व चुकीची ठरली व समाजवादाची चौकट मोडून पडली.

### ५. व्यक्तीस्वातंत्र्यास नकार :-

मार्क्सच्या साम्यवादी/समाजवादी तत्त्वज्ञानात व्यक्तीस्वातंत्र्यास अजिबात स्थान नाही. साम्यवादी किंवा समाजवादी विचारात मार्क्सने व्यक्तीचा विचारच केला नाही. वास्तविक अनेक व्यक्तीचा मिळून समाज तयार होतो. व्यक्ती विकास झाल्यास समाजाचा आपोआप विकास होतो. समाजातून व्यक्ती वगळल्यास समाज शिल्लकच राहत नाही. मग सामाजिक प्रगती किंवा विकास या संज्ञांना अर्थच राहत नाही. मार्क्सने समाज या संघटीत समूहाचा विचार करून आपले तत्त्वज्ञान मांडले हे खरे मात्र त्याने व्यक्ती या घटकाकडे दुर्लक्ष केले आहे. त्यामुळे व्यक्ती विकास, व्यक्ती स्वातंत्र्य, समाज विकास अत्यंत गौण ठरले. वास्तविक कोणतेही राजकीय, सामाजिक, आर्थिक तत्त्वज्ञान व्यक्ती या घटकाला वगळून उभे राहू शकत नाही. किंबहुना प्रथम व्यक्ती नंतर समाज या क्रमाने विचार मांडले जातात. मार्क्सने मात्र समाजवादी तत्त्वज्ञानास व्यक्तीस्वातंत्र्यास नकार देऊन एका सर्वकष तत्त्वज्ञानालाच गालबोट लावले. त्यामुळे साम्यवादी/समाजवादी तत्त्वज्ञान कायम होऊ शकले नाही.

### ६. स्वयंसुधार यंत्रणेचा अभाव :-

मार्क्सच्या समाजावादी तत्त्वज्ञानात दोष आहेत. तसे ते मूलभूत तत्त्वज्ञानातही आहेत. मात्र विचारसरणीमध्ये परीस्थितीनुसार योग्य ते बदल सहजपणे घडून येणारी लवचिकता असली तर विचारसरणीतले दोष आपोआप नष्ट होऊ शकतील. अशा प्रकारची स्वयंसुधार यंत्रणा मार्क्सच्या या समाजवादी तत्त्वज्ञानात राहीली असती तर जगातून समाजवादी तत्त्वज्ञानाला नाकारले गेले नसते किंबहुना ते मोठ्या प्रमाणावर स्वीकारले गेले असते. म्हणजेच समाजवाद जसा आहे तसा स्वीकारा व राबवा असे बंधन आल्याने त्याच्या मोडतोडीचा पर्याय पुढे आला.

## ७. खाजगी मालमत्तेस विरोध/नकार :-

मार्क्सच्या साम्यवादात/समाजवादास खाजगी मालमत्तेस अजिबात स्थान नाही. ही या तत्त्वातील फार मोठी त्रुटी आहे. मनुष्य स्वभावात माझेपणाची, मालकी हक्कांची सहजप्रवृत्ती आहे. ती प्रवृत्तीच उखडून टाकण्याचा समाजवादात अट्टाहास आहे. उत्पादनाची साधने समाजाच्या व राज्याच्या मालकीची व उत्पादनावर समाजाचे व राज्याचे वर्चस्व. कामगाराने फक्त वेतनावर काम करावे व गरजेप्रमाणे वेतन घ्यावे. या तत्त्वावर आधारलेले होते. अन्न, वस्त्र, निवारा या गरजांची पूर्ती या व्यवस्थेत शासनाने करण्याची जबाबदारी स्वीकारल्याने, वेतनाची आवश्यकता ही राहत नाही. त्यामुळे माणूस व कामगार या व्यवस्थेत एक यंत्र आहे. हा विचार पुढे येतो. भाव-भावनांचा विचार करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. मार्क्सच्या या समाजवादी विचारसरणीत व्यक्ती सजीव प्राणी आहे, त्याचे कुटुंब परिवार, भोवतालचे विश्‍व, इच्छा, आकांक्षा, प्रेरणा त्याचे जीवन अर्थपूर्ण करतात. म्हणून मानव उमेदीने जगतो. या गोष्टीचा विचारच केला नाही. त्याचे हे भावविश्वच नष्ट केले. त्याच्या सर्व सहजप्रवृत्तींनां लगाम घातला. समाजवादाने मानसाचे माणूसपण हिरावून घेतले. म्हणून मानवाचे समाजवादाचे तत्त्वज्ञानच नाकारले.

## ८. रशियातील समाजवादी प्रयोगाचे अपयश :-

समाजवादाच्या अपयशास या तत्त्वज्ञानातील अंगभूत दोष महत्त्वाचे आहेतच त्याचबरोबर हा प्रयोग रशियात झाला त्या देशाच्या राजवटीचेही अपयश कारणीभूत आहे. कोणतेही तत्त्वज्ञान व विचारसरणी दोषपूर्ण असली तरी त्यांची व्यवहाराशी सांगड घालणारे व तीची अंमलबजावणी करणारे लोक जर चांगले असतील तर ते तत्त्वज्ञान किंवा विचारसरणी यशस्वी होते. त्यामुळे मार्क्सचा साम्यवाद/समाजवाद कितीही अंगभूत दोषांनी भरलेला असला तरी स्टॅलीनसारख्या नेत्याने तो रशियात राबवताना त्यात आणखी चुका केल्या. त्यामुळे समाजवादाची रशियात दुर्दशा झाली व अर्धशतकानंतरच ही विचारसरणी लोकांच्या मनातून उतरण्यास सुरुवात झाली.

## ९. कामगाराची हुकूमशाही आणण्याची घाई :-

रशियात समाजवादी राज्यक्रांती घडून आल्यावर ती स्थिरस्थावर होण्यासाठी काही काळ जाऊ देणे गरजेचे होते. लेनिनने योग्य प्रकारे पावले टाकून त्या उद्देशाने कालानुरूप काही धोरणे ठरवून ती राबविण्याचे प्रयत्न सुरू केले होते. मात्र लेनिनच्या अकाली निधनानंतर सत्तेवर आलेल्या स्टॅलिनने लेनिनची धोरणे बाजूला सारून रशियात समाजवादी/साम्यवादी हुकूमशाही राजवट आणली व ती कामगारांची हुकूमशाही आहे, अशा थाटात स्वत:चीच हुकूमशाही सुरू केली. त्यात स्टॅलिनची घाईच झाली. कामगारांना आपल्या हक्काची जाणीव होऊन त्यांनी स्वत:हून अस्थायी स्वरूपाची हुकूमशाही स्वीकारली असती. मात्र तसे झाले नाही. स्टॅलिनच्या एकतंत्री कारभाराने रशियात नियोजन सुरू करून वेगाने प्रगती झाल्याचे दृश्य दिसले. मात्र त्यामुळे कामगार व सर्वसामान्य जनतेला आपल्यावर आलेल्या जबाबदारीची पूर्ण कल्पनाच आली नाही. कामगारांनी उत्साहाने कामाला सुरुवात केली. मात्र थोड्याच काळात प्रारंभीचा उत्साह निघून गेला व ठोकळेबाज यंत्राप्रमाणे

कामाचे स्वरुप झाले व राज्यविहीन समाजाचे ध्येय गाठण्यासाठीची पावले जागेवर स्थिरावली व उद्दिष्ट्यपूर्तीचे स्वप्न स्वप्नच राहिले.

## १०. सामुदायिक व असहकारी शेतीचा असफल प्रयोग :-

शेती अन्नधान्याच्या उत्पादनाचे एक महत्त्वाचे साधन होते व रशियात शेती हे साधन व्यक्तीगत मालकीचे होते. समाजवादी व्यवस्थेत मात्र शेती हे उत्पादनाचे साधन समाजाच्या, पर्यायाने शासनाच्या मालकीचे करणे व सर्वांनी उत्पादनासाठी झटणे हा या समाजवादी व्यवस्थेचा एक भाग होता. त्यानुसार शासनाने जमीनदार-सरंजामदार यांच्या जमिनी ताब्यात घेऊन त्यावर शेतमजुरांकरवी 'सामुदायिक शेतीचा' प्रयोग सुरू केला व शासकीय मालकीच्या जमिनीवर शेतमजुरांना कामावर जुंपण्यात आले. त्यांना या कामाबद्दल वेगळे वेतन न देता त्यांच्या किमान गरजांची अन्न, वस्त्र, निवारा यांची पूर्तता करण्याचे धोरण राबविले व शेती उत्पादन शासकीय गोदामात जमा करण्याची व्यवस्था केली गेली. शेवटी कामगार हे दिल्या अन्नवस्त्राचे भाडोत्री कामगार राहिले. त्यामुळे त्यांना आपल्या कामाविषयी आस्था अजिबातच राहिली नाही. उत्पादनाचे सोयरसुतक राहिले नाही. त्यातून उत्पादन घटू लागले. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर जसजसा 'पोलादी पडदा' विरळ होऊ लागला. तसतसा अन्नधान्याचा व इतर जीवनोपयोगी वस्तूंचा तुटवडा भासू व वाढू लागला. सामुदायिक शेतीचा प्रयोग पूर्ण फसला. हीच गोष्ट सहकारी शेती बाबतीत घडली. शेतकऱ्यांच्या जमिनीमधील वाढीव उत्पन्न सरकार जमा होऊ लागल्याने उत्पादन वाढीचा शेतकऱ्यांचा प्रयत्नही त्यामुळे थांबला. सामान्य नागरिक, शेतकरी, शेतमजूर यांना समाजवादी राजवटीविषयी प्रेम राहिले नाही व समाजवाद जनतेच्या मनातून पूर्णपणे उतरला.

## ११. ढासळलेली अर्थव्यवस्था :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात रशियाला प्रतिष्ठा मिळविण्याचा एक उपाय म्हणून रशियात वैज्ञानिक प्रगतीकडे अधिक लक्ष पुरविण्यात आले व प्रचंड उद्योगधंदे व कारखाने उभारण्यात आले. त्यामुळे कामागारांच्या बेकारीचा प्रश्नही निकालात निघाला. मात्र जागतिक राजकारणात हिटलर व मुसोलिनीच्या उदयामुळे सगळे आंतरराष्ट्रीय संकेत बदलले. त्यामुळे परिस्थितीला तोंड देण्यासाठी स्टॅलिनने उद्योगधंद्यातील उत्पादनाचा रोख शस्त्र निर्मितीकडे वळविला व पहिल्या महायुद्धातील अपयशाचा कलंक धुवून काढण्यासठी आधुनिक शस्त्रास्त्रांनी रशिया सज्ज उभा केला. यासाठी रशियाचे आर्थिक उत्पन्न मोठ्या प्रमाणावर खर्च झाले. त्याचा परिणाम अंतर्गत अर्थव्यवस्था ढासळण्यात झाला. जीवनोपयोगी वस्तू उत्पादनाकडे दुर्लक्ष झाले. मात्र जीवनोपयोगी वस्तूंचे भाव नियंत्रित असल्याने शासनाला मोठ्या प्रमाणावर उत्पादन खर्चातील तूट भरून काढावी लागत होती. जनतेला मात्र याची अजिबात कल्पना नव्हती. प्रसार माध्यमे शासकीय नियंत्रणात असल्याने देशात सर्वत्र आबादी आबाद आहे असे चित्र जनतेपुढे ठेवण्यात येत होते. देशाबाहेर रशियाच्या परिस्थितीचे वृत्त जाणार नाही, याचाही बंदोबस्त करण्यात आला होता. दोस्त राष्ट्रांच्या साथीने रशियाचा दुसऱ्या महायुद्धात विजय झाल्याने रशियाची आंतरराष्ट्रीय प्रतिमा उजळून निघाली. शीतयुद्ध काळात रशियाने अणू व अवकाश क्षेत्रात भरारी मारल्याने व अमेरिकेबरोबर शस्त्रास्त्राची निर्मिती केल्याने 'एक

महासत्ता' म्हणून रशिया पुढे आला. मात्र स्टॅलिनच्या मृत्यूनंतर कुश्चेव्हने स्टॅलिनच्या चुकांचा पाढा वाचायला सुरुवात केल्यावर रशियाचे अंतरंग जगाच्या निदर्शनास आले. आर्थिक आघाडीवरचे चित्र भयानक होते. अन्नधान्य घट, टंचाई यामुळे रशियन जनता बेजार झाली व ही दुर्दशा समाजवादामुळेच आली असा समज रशियन जनतेचा झाला.

## १२. नोकरीशाहीचे राज्य :-

स्टॅलिनने प्रस्थापित केलेल्या हुकूमशाही राजवटीचा आधार नोकरशाही होती. वरिष्ठांकडून आलेल्या आदेशांचे तंतोतंत पालन हे नोकरशाहीचे कर्तव्य असते. स्टॅलिनच्या १९३६ मध्ये राज्यघटनेत केलेल्या बदलामुळे नोकरशहांना मोकळे रान मिळाले व मार्क्सवाद बाजूला पडून स्टॅलिनवाद प्रस्थापित झाला. यंत्रवत नोकरशाहीने स्टॅलिनला खूष करण्याचे प्रयत्न केले. सर्वसामान्यांच्या समस्यांची दैनंदिन अडचणीची नोकरशाहीने दखल घेतली नाही. आर्थिक व औद्योगिक प्रगतीच्या नावाखाली स्टॅलिनने भक्कम व्यवस्था निर्माण केली. त्यामुळे सर्वच क्षेत्रात रशियात प्रगती झाल्याचे दृश्य उभे राहिले. मात्र प्रत्यक्षात कागदी घोडे नाचविण्याचाच प्रकार जास्त होता. स्टॅलिनच्या मृत्यूनंतर प्रगती किती पोकळ आहे. नागरिकांना कळून चुकले. अर्थात नोकरशाहीच्या अशा व्यवस्थेत समाजवादाचा कुठेच संबंध नव्हता. मात्र तरीही हे समाजवादी व्यवस्थेमुळेच झाले असा जनतेचा समज झाला.

## १३. क्रुश्चेव्ह ते गोर्बाचेव्ह प्रवास :-

क्रुश्चेव्ह सत्तास्थानी येताच स्टॅलिनच्या चुकांचा पाढा वाचायला सुरुवात झाली व स्टॅलिनचा हुकूमशाही पोलादी पडदा भंग पावू लागला. तरीही क्रुश्चेव्हने कम्युनिस्ट पक्ष-पॉलिट ब्युरोचे वर्चस्व कायम ठेवले. रशिया व अमेरिका यांच्यात या काळात शीतयुद्ध तणावाचे शिखर गाठले होते. क्रुश्चेव्हने क्युबामध्ये अण्वस्त्र तळ उभारण्याच्या रोखाने केलेल्या हालचाली व अचानक क्युबातून घ्यावी लागणारी माघार यामुळे रशियाचा आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठेला जबरदस्त हादरा बसला. त्यातच क्रुश्चेव्हने प्रसारमामध्यमांवरील नियंत्रणे उठविल्यामुळे सत्य परिस्थिती माध्यमातून जगाला कळू लागली. रशियालाही संकट परंपरा निवारण्यासाठी परराष्ट्रांची मदत घेणे आवश्यक वाटू लागले. सामुदायिक शेतीचा व सहकारी शेतीचा प्रयोग बंद केला पाहिजे, अन्नधान्याची आयात केली पाहिज,. ही जाणीव रशियाला झाली. शीतयुद्ध कालखंडातील लष्करी कराराच्या जोरावर पूर्व युरोपातील राष्ट्रानी उभारलेली बंडेही कायमची शमत नाही, हे देखील रशियाला कळून चुकले. पोलंड, झेकेस्लोव्हीया, हंगेरी येथे समाजवादाची चौकट टिकवून ठेवण्यासाठी रशियाने कायम केलेली मदतही तेथील लोकाशाहीवादी व स्वातंत्र्यवादी विचार रुजवू शकले नाही. सीटो, सेन्टो, वार्साकरार ही रशियाने उभ्या केलेल्या लष्करी संघटना कालबाह्य ठरू लागल्या. शस्त्रास्त्रकपात, निश:स्त्रीकरण, अण्वस्त्र बंदी या विषयावर रशिया अमेरिका चर्चा सुरू झाली. निर्णय झाले. दोघा देशाच्या राष्ट्रप्रमुखांमध्ये हॉट-लाइन मार्फत थेट संपर्क व चर्चा सुरू झाल्या. दोन महासत्तांमधले तणावाचे वातावरण निवळले. १९८० च्या दशकात शीतयुद्धाचीच अखेर झाली. सर्व क्षेत्रातील स्पर्धाच न राहिल्याने शस्त्रास्त्र निर्मितीचे कारखाने बंद करण्याची पाळी आली. त्यातून बेकारी वाढली. त्याचे रुपांतर असंतोषात

झाले. वरील परिस्थितीला तोंड देणे रशियाला अवघड झाले. त्यातून जनतेला समाजवादाचा फोलपणा लक्षात आला. स्टॅलिन राजवटीविरुद्ध उघड बोलायला सुरुवात झाली व देशावर संकटे लादणाऱ्या राजवटीची चिन्हे नेस्तनाबूत करण्यास प्रारंभ झाला. स्टॅलिन, लेनीनचे पुतळे मोडले गेले. दोघा नेत्यांची क्रेमलिन राजवाड्यातील संग्रहालयात जपून ठेवलेली कलेवरे दफन करण्यात आली. स्टॅलिनग्राड, लेनिनग्राड इ. शहराची नावे बदलून पूर्वीची नावे आली व समाजवादी राजवटीचे नामोनिशान मिटविण्याचे नेत्यांनी व जनतेने प्रयत्न केले. त्यातून समाजवादी व्यवस्थाच ढासळली.

## १४. वर्गविहीन व राज्यविहीन समाज निर्मितीचे स्वप्न गंभ पावले :-

समाजवादाचे/साम्यवादाचे अंतिम उद्दिष्ट्य वर्ग व राज्य विहीन समाज निर्मिती हे होते. रशियात समाजवादाच्या या प्रयोगाला सुरुवात झाली. जमीनदार-सरंजामदार-सत्ताधारी वर्ग जाऊन आहेरे-नाहीरे वर्ग नष्ट झाले. मात्र समाजात त्या नंतर एकच वर्ग राहणे अपेक्षित होते. दुसरा कोणताच वर्ग निर्माण होणार नाही. हे अपेक्षित होते. तरच खऱ्या अर्थाने वरील उद्दिष्ट साध्य होणारे होते. कालांतराने मात्र समाजात शासकांचा, बुद्धिवंतांचा, उद्योगधंदे व कारखाने यांच्या व्यवस्थापकांचा, कुशल व अकुशल कामागरांचा असे अनेक वर्ग समाजात राहिले. त्यांच्या पुन्हा स्वतंत्र संघटना उभ्या राहिल्या व त्यातून ठळकपणे व्यवस्थापक व कामगार हे दोन वर्ग रशियात पुढे आले. डोळसपणे पाहिल्यास इतर अनेक वर्गही होते. अर्थात अनेक वर्गही गुण्यागोविंदाने नांदू शकतात. त्यांचा संघर्ष असतो, असे मानण्याचे कारण नाही. ते जगातील इतर राष्ट्रांनी सिद्धही केले आहे. तरीही रशियाने या व्यवस्थेत वर्गविहीन समाज निर्मितीचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवले. त्याचा अट्टाहास धरला. त्याचप्रमाणे राजविहीन समाजनिर्मिती ही कल्पनाही भ्रामक ठरली. १९१७ च्या रशियन राज्यक्रांतीपासून आजतागायत रशियात राज्य ही संस्था अस्तित्त्वात आहे. ती त्या काळात जितकी आवश्यक होती. तितकीच आजही त्या संस्थेची गरज आहे. 'समाज' ही एक व्यापक संस्था व 'राज्य' ही समाजाची एक घटक संस्था आहे. समाजाचे नियमन करण्यासाठी राज्य ह्या संस्थेची आत्यंतिक गरज आहे. लेनिनच्या शासनानंतर २५/३० वर्षांत शासन ही संस्था नष्ट व्हायला हवी होती. परंतु स्टॅलिन काळात शासनाची समाजावर घट्ट पकड झाली. पुढील काळात शासनयंत्रणा नष्ट होण्याऐवजी जास्तच मजबूत झाली. समाजवादाच्या अंतिम उद्दिष्टाची अशी परवड झाल्यावर समाजवादावरील जनतेचा विश्वास डळमळीत झाला.

## १५. गोर्बाचेव्हचे पुनर्रचना व खुलेपणाचे धोरण :-

गोर्बाचेव्हनेच स्पष्टपणे म्हटले होते की समाजवाद अंमलात आणण्याचा जो आदर्श आपण समोर ठेवला तो दिवाळखोर असल्याचे आढळून आले आहे. समाजवाद व खुल्या बाजाराचे तत्त्व परस्पर विरोधी असल्याचे आपण समजत होतो. पण अनुभवाने ते खोटे ठरविले सोव्हिएट युनियनप्रमाणे इतर देशांनी स्विकारलेला हा मार्ग फलदायी नसल्याचे आढळले आहे. शिवाय गोर्बाचेव्ह विद्यार्थिदशेपासून सक्रीय राजकारणात होता. तरुणपणी त्याला स्टॅलिन राजवटीचा अनुभव होता. २०/३० वर्षातील समाजवादी/साम्यवादी रशियाला लागलेली उतरती कळा त्याने पाहिली होती. क्रुश्चेव्ह काळातही गोर्बाचेव्ह विद्यार्थी नेता

होता. म्हणूनच १९८६ साली रशियाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी पुनर्रचना आणि खुलेपणा कार्यक्रम त्याने जाहीर केला व पक्षाची देशातील सर्व क्षेत्रावर असलेली पकड ढिली केली. पुनर्रचना व खुलेपणा या संकल्पनाच्या माध्यमातून गोर्बाचेव्हने समाजवादावर अखेरचा टोला मारला त्यातून समाजवादाची रशियातून पर्यायाने जागतिक राजकारणातून पिछेहाट झाली.

## ८.२.१.२ समाजवादाचे विघटन व विभाजन

१९१७ मध्ये राज्यक्रांती यशस्वी होऊन लेनिनने रशियाची सत्ता सूत्रे ताब्यात घेतल्यावर पेट्रोग्राड येथे सर्व कामगार संघटनाची परिषद भरविण्यात आली होती. ज्या परिषदेसमोर लेनिनने एक जाहीर निवेदन केले त्यात लेनिन म्हणतो. 'कॉम्रेडस' तुम्हीच राज्याच्या सार्वभौम सत्तेचे अधिष्ठान आहात. तुमच्या संघटना राज्याचे घटकावयव आहेत. राज्यकारभारासंबंधी निर्णय घेऊन अंमलबजावणी करायला पूर्ण सत्ता आहे. आपण राज्यकारभाराची व्यवस्था कडक ठेवली पाहिजे. अराजकता दडपून टाकली पाहिजे. कामगारांनो, शिपायांनो, शेतकऱ्यांनो आपण स्थानिक संघटना बनवून हाती स्थानिक राज्यकारभार घ्या. अन्नधान्य, कारखाने उत्पादनाची साधने या सर्वांची काळजी घ्या. डोळ्यात तेल घालून त्यांचे रक्षण करा. कारण ती तुमच्या मालकीची आहेत. जे जे कोणी उत्पादनाचे श्रम करतो. त्यांच्या मालकीची ती आहेत. आपण मानवाची मानवाच्या दास्यातून मुक्तता करू या. लेनिनच्या या वक्तव्यात सर्वांचे खंबीर सोव्हिएट उभारण्याचे उद्दिष्ट होते. सर्वांचे बलाढ्य राज्य उभे करण्याचे लेनिनचे स्वप्न होते. त्या दृष्टीने त्यांनी पावले टाकली होती व रशियन सम्राज्यात समाविष्ट राज्यांना एका छत्राखाली आणले होते व ३० डिसेंबर १९२२ रोजी सोव्हिएट युनियन स्थापन केले. पुढे स्टॅलिनने पंचवार्षिक योजना आमलात आणली. पुढे राज्यकारभारात कायदेशीर प्रशासकीय व तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी दुसऱ्या पंचवार्षिक योजना काळात १९३६ मध्ये नवी राज्यघटना आणली व घटनेनुसार 'युनियन ऑफ सोव्हिएट सोशॅलिस्ट रिपब्लिक (U.S.S.R.) या नावाने रशियाचे सोव्हिएट प्रजासत्ताक संघराज्य निर्माण केले. त्यामुळे रशियाची सोव्हिएट रशिया अशी ओळख पुढे आली. १९२२ ते १९९१ असा हा सोव्हिएट रशियाचा प्रवास झाला.

मिखाईल गोर्बाचेव्हच्या पुनर्रचना व खुलेपणा या धोरणामुळे सोव्हिएट रशियाचे पर्यायाने जागतिक समाजवादी व्यवस्थेचे विघटन झाले. अर्थात गोर्बाचेव्हची धोरणे निमित्तमात्र ठरली. या व्यवस्थेच्या विघटनाची कारणे ५०/५५ वर्षांच्या इतिहासात आपणास धुंडाळावी लागतील तसे बघितल्यास काही कारणे नजरेस येतात.

## १. स्टॅलिनची हुकूमशाही :-

१९३६ च्या घटनेनुसार स्टॅलिनने USSR स्थापन करून विशाल रशिया निर्माण केला. सोव्हिएट रशिया जगातील प्रभावी राष्ट्र निर्माण करण्याच्या दृष्टीने स्टॅलिन झपाटला. त्याला जगात समाजवादी साम्यवादी क्रांती घडवून आणावयाची होती. त्यासाठी रशियात त्याला भक्कम समाजवादी शासनव्यवस्था उभी करावयाची होती.

रशियातील समाजवादी व्यवस्था भांडवलशाही राष्ट्रांच्या नजरेत भरेल व त्या त्या

देशातील कामगार, शेतकरी, शेतमजूर आपापल्या राष्ट्रात समाजवादी व्यवस्था घडवून आणतील. असा स्टॅलिनचा उद्देश होता. अर्थात त्याचे विचार योग्य होते. मात्र या धोरणाच्या यशस्वीतेसाठी त्याने रशियात योजलेली उपाययोजना पाशवी होती व ती पूर्णपणे हुकूमशाही प्रवृत्तीची होती. त्याने भांडवलशाही नष्ट करून समाजवादी व्यवस्था आणण्यासाठी कत्तलीचा मार्ग स्वीकारला, दहशतीचा मार्ग अनुकरला. स्ट्रॉटस्कीने त्यांच्या या मार्गाला विरोध केल्यावर त्यालाही हद्दपार करून त्यांची हत्या होण्याची व्यवस्था केली. आदेश न मानणारे, आज्ञा भंग करणारे विरोधक यांचा त्याने निर्दयीमार्गाने काटा काढला. सहकाऱ्यांनाही सोडले नाही. कामगार, शेतकरी, शेतमजूर यांना चाबकाचा धाक दाखवून कामाला जुंपले. त्याच्या या दहशतीच्या काळात रशियात प्रगती झाली. त्याचाही माज स्टॅलिनला चढला. मात्र आतून त्याच्या व व्यवस्थेविरोधात असंतोष खदखदत होता. स्टॅलिन जीवंत असे पर्यंत कोणी ब्र काढला नाही. त्यांच्या १९५३ च्या मृत्यूनंतर मात्र असंतोष हळूहळू व्यक्त होऊ लागला. पुढच्या काळात त्यात भर पडली.

## २. साम्यवादी विश्वासाला तडा/समाजवादी विश्वासाला तडा :-

साम्यवाद/समाजवादाचा आधार घेऊन रशियात १९१७ मध्ये पहिली क्रांती झाली. इतिहासाने तिचा गौरवही व स्वागतही केले. मात्र जसजसा काळ जाऊ लागला तसतसा तत्त्व व प्रत्यक्ष कार्यवाही यात दुरावा होऊ लागला. काही अंगभूत दोष समाजवादी व्यवस्थेचे नजरेस येऊ लागले. मार्क्सचे आर्थिक विश्लेषण अपुरे वाटू लागले. नेमका समाजवाद-सामाजिकशास्त्रातला की शास्त्रातला असा संभ्रम निर्माण झाला. 'व्यक्तीस्वातंत्र्य' सारख्या मूलभूत हक्कांना नाकारले गेले. ज्या विश्वासाने रशियाने समाजवादाचे बोट धरले तो समाजवाद अदूरदर्शी ठरला. त्यामुळे त्यांच्यावरचा विश्वास ढळला व त्या व्यवस्थेवर उभी इमारत पायासकट कोसळली.

## ३. देशांतर्गत अपयश :-

सामुदायिक व सहकारी शेती व्यवस्थेमुळे उत्पादनात घट झाली व शेती प्रयोग फसला. तरीही राज्यकर्त्यांनी अट्टाहासाने सुरू ठेवल्याने अन्नधान्य उत्पादन घटून प्रचंड टंचाई निर्माण झाली. आयात करण्याची सोय नव्हती. कारण या क्षेत्रातले अपयश झाकायचे होते. तसेच कारखान्यातून होणाऱ्या दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनासही खीळ बसून टंचाई निर्माण झाली. त्यातून सामान्य जनता हैराण झाली. वस्तू उत्पादन व भाव यात समन्वय नसल्याने सरकारला तुटीचा सामना करावा लागला. अर्थात हे सोंग फार काळ टिकणे अशक्य होते. या व्यवस्थेतील दुर्दशा जनतेच्या लक्षात आली व ती व्यवस्था शक्य तेवढ्या लवकर संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले.

## ४. मूलभूत स्वातंत्र्यावर गदा :-

१९३६ च्या नव्या घटनेनुसार स्टॅलिनने व्यक्तीला अनेक मूलभूत अधिकार दिले. वास्तवात मात्र कोणतेच मूलभूत स्वातंत्र्य नव्हते. अविष्कार, भाषण, मुद्रण, खाजगी मालमत्तेचे स्वातंत्र्य नव्हते. वृत्तपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन प्रसार माध्यमांना स्वातंत्र्य नव्हते. थोर साहित्यिकांना देशाबाहेर जाण्यासाठी मज्जाव होता. साहित्यिक व कलावंतांवर अनेक

बंधने होती. जगमान्य नोबेल पारितोषिके स्वीकारण्यासाठी सुद्धा रशियात प्रशासकीय बंदी होती. सर्वत्र मुस्कटदाबी, हुकूमशाही चालली होती. ही मूलभूत स्वातंत्र्यावरची गदा स्फोटक बनली व इतिहासाची पुनरावृत्ती होऊन समाजवाद संपला.

## ५. सोव्हिएट संघराज्य निर्मिती कृत्रिम पद्धत :-

रशियन झार साम्राज्य पूर्व युरोपातील बाल्कन राष्ट्रांत अतिपूर्वेकडे सैबेरियाच्या दक्षिणेकडे मंगोलियात, काळ्या समुद्रानजीक क्रिमीया राज्यात पसरलेले होते. १९१७ च्या क्रांतीनंतर ही सर्व राज्ये समाजवादी रशियाच्या वर्चस्वाखाली असावीत म्हणूनच ३० नोव्हेंबर १९२२ रोजी सोव्हिएट युनियन जाहीर करण्यात आले. १९३६ मध्ये नव्या घटनेने १५ राज्यांचे सोव्हिएट प्रजासत्ताक स्थापन करण्यात आले व लिथुआनिया लॅटेव्हिया, इस्टोनिया, कझाकिस्तान, तझिकीस्थान, तुर्कमेनिस्तान, उझबेकीस्थान इ. रशियाच्या सोव्हिएट साम्राज्यात १४ राज्ये जोडण्यात आली. पैकी बहुसंख्य इस्लामधर्मीय भिन्न धर्म, भाषा व वंश असलेली होती. अशी ही सोव्हिएट संघराज्यांची निर्मिती. भिन्न संस्कृती असलेल्या लोकांची होती. जो पर्यंत सोव्हिएट संघराज्य हुकूमशाही वर्चस्वाखाली होती. तोपर्यंत राजकीय एकता दिसत होती. हुकूमशाही दबाव स्टॅलिनच्या मृत्यूनंतर सैल होताच भेत पुढे आले. त्यातून सोव्हिएट संघराज्याचे विघटन झाले.

## ६. साम्यवादी/समाजवादी राजवटीची अखेर :-

पोलंड, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, हंगेरी, रूमानिया, बल्गेरिया इ. राष्ट्रात समाजवादी नेत्यांच्या वर्चस्वाखाली समाजवादी राजवटी सुरू झाल्या. त्यांना शीतयुद्धाची नीती म्हणून वार्सा लष्करी करारात बांधिल केले गेले. त्यामुळे ही सर्व राष्ट्रे व तेथिल नेते रशियाच्या हातातील बाहुले बनली. ती रशियाच्या तंत्राने चालू लागली. जनतेला मात्र नकली समाजवादी शासनव्यवस्था मान्य नव्हती. जनतेने त्यामुळे बंडांना हात घातला. मात्र रशियाने हस्तक्षेप करून ती मोडून काढली. युगोस्लाव्हियाच्या मार्शल टिटोने मात्र वार्सा करारात सामील होण्यास नकार देऊन स्वत:ची मुक्ती केली. बाकी राष्ट्रे मात्र रशियाच्या दडपणाखालीच होती. १९८० च्या दशकात शीतयुद्धाची अखेर होताच वार्सा करारातील राष्ट्रांनी रशियन वर्चस्वातून मुक्ती घेतली व समाजवादी व्यवस्था झुगारून दिली. या देशांमध्ये राज्यक्रांतीच झाल्या. रक्तपात, हिंसाचार, जाळपोळ, सार्वजनिक मालमत्तेची नासधुस असे सारे घडले. अर्थातच स्वातंत्र्यासाठी एवढी किंमत मोजण्याची राष्ट्रांची तयारी होती. गोर्बाचेव्ह प्रशासनानेही पूर्व युरोपात समाजवादी विरोधी चळवळींना हरकत घेतली नाही व तेथे रशियन लष्कराला हस्तक्षेप करू दिला नाही. उलट पूर्व युरोपातील समाजवादी प्रशासन व्यवस्थेचा शेवट उघड्या डोळ्यांनी पाहिला व सोव्हिएट युनियन मधील जनताही तो पाहत होती. त्यांच्यातही त्यामुळे स्वातंत्र्याची उर्मी येत होती.

## ७. गोर्बाचेव्हचा 'पेरित्रोयका - ग्लासनोस्तचा' अखेरचा आघात :-

स्टॅलिन नंतर सत्तेवर आलेल्या क्रुश्चेव्ह, बुल्गानिन, कोसिजिन, ब्रेझनेव्ह इ. नेत्यांनी समाजवादी व्यवस्थेची चौकट हळूहळू खिळखिळी करायला सुरुवात केली होती. क्रुश्चेव्ह व स्टॅलिनने तर समाजवादी साऱ्या व्यवस्थेवर आघातच सुरू केले होते. इतरांनीही त्यांचीच

'री' ओढली. त्यातून मार्क्स लेनिन-स्टॅलिन शवे दफन झाली. प्रसारमाध्यमांवरचे नियंत्रण सैल झाले. परकीय नागरिकांचे रशियात व रशियन जनतेचे परदेशांमध्ये जाणे-येणे सुरू झाले. रशियन जनतेला आपल्या दैन्यावस्थेची जाणीव झाली. अशा काळातच १९८५ मध्ये रशियन सत्तेवर गोर्बाचेव्ह आलात्याने रशियन अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी खुली अर्थव्यवस्था स्वीकारण्याचा विचार केला. पुनर्रचना व खुलेपणाचे धोरण जाहीर केले. त्यातून रशियन सोव्हिएट रशियात राजकीय व आर्थिक उलथापालथ झाली व सोव्हिएट युनियनचे संघराज्यात्मक समाजवादी प्रजासत्ताक कोसळले. ती रशियातील दुसरी राज्यक्रांती समजली जाते. म्हणून या दुसऱ्या क्रांतीचा प्रणेता मिखाईल गोर्बाचेव्हचा इतिहास पाहणे तेवढेच महत्त्वाचे आहे.

## ८.२.१.३ मिखाईल गोर्बाचेव्ह :-

१९१७ च्या रशियन राज्यक्रांतीने झारशाही संपुष्टात आणली. त्यानंतर १९३६ मध्ये सोव्हिएट प्रजासत्ताक संघराज्य USSR स्थापन झाले. मात्र हे संघराज्य ३१ डिसेंबर १९९१ मध्ये संपुष्टात आले. त्यातून साऱ्या जगातूनच समाजवादी गटाचा ऱ्हास झाला. अशा या क्रांतीचा किंवा बदलाचा प्रणेता मिखाईल गोर्बाचेव्ह. त्यांचा जन्म रशियातील स्टॉव्हारापोल विभागात प्रिव्होलनोये खेड्यात १९३१ मध्ये झाला. शाळेत हुशार विद्यार्थी म्हणून ओळख. शाळेत व महाविद्यालयात नाटकात अभिनय. आई-वडील धार्मिक व श्रद्धाळू वृत्तीचे. गोर्बाचेव्ह कुटूंब गरीबच. आर्थिक कठीण परिस्थितीत मिखाईल गोर्बाचेव्ह कृषी पदवीधर झाला. नंतर माक्सो विद्यापीठात कायद्याचे शिक्षण पूर्ण केले. त्यातच डॉक्टरेट मिळविली. शिक्षण काळातच रईसा नावाच्या तरुणीशी प्रेम व प्रेमाचे रुपांतर विवाहात झाले.

शिक्षण करतानाच 'काम्सोमॉल' या कम्युनिस्ट पक्षाच्या युवक संघटनेत सामिल झाला. १९७० मध्ये स्टॉव्हारापोल येथे कम्युनिस्ट पक्षाच्या पक्षाच्या प्रचारासाठी नेमणूक झाली. घरचा शेती व्यवसाय असल्याने शेती व शेतकऱ्यांचे प्रश्न हाताळण्याची कामे त्याच्याकडे सोपविली. शेतीची आवड असल्याने शेतीच्या अनेक प्रश्नांचे ज्ञान त्यास होते. त्यामुळे लवकरच स्टॉव्हरापोल विभागाचा पक्षप्रमुख बनला.

स्टॅलिन नंतरच्या काळात तर एक तरुण कार्यकर्ता म्हणून पुढे आला व तरुणांचा पुढारी बनला. १९७७ नंतर मास्कोत नेमणूक झाली. तेथे केंद्रिय समितीत शेती विभागाचे प्रमुख बनले. या वेळी १९७८ मध्ये एक अहवाल सादर केला. त्यात मिखाईल गोर्बाचेव्हने सोव्हिएट संघराज्यातील शेतीच्या अधोगतीचे वर्णन केले. त्यात कोठाराअभावी वाया जाणारे धान्य व फळे, सुमार रस्ते इ. विवेचन केले.

गोर्बाचेव्ह १९८३ मध्ये अभ्यास दौऱ्यावर कॅनडात गेले. तेथे पाश्चात्त्य देशांच्या अर्थव्यवस्थेचा अभ्यास त्यांनी केला. कॅनडातील रशियाचे राजदूत याकोवलेव्ह यांच्याशी अर्थव्यवस्थेबाबत प्रदीर्घ चर्चा केली व त्या आधारावर रशियाच्या आर्थिक राजकीय स्थितीचा खोलात अभ्यास केला. याच वेळी १९८५ मध्ये ते कम्युनिस्ट पक्षाचे सरचिटणीस झाले. याच वेळी राजकीय स्वातंत्र्य व आर्थिक पुनर्रचना हा एकच मार्ग रशियाला तारणार याची खात्री त्यांना झाली. त्यातून मे १९८५ मध्ये लेनिनग्राडला भेट देऊन त्यांनी तेथेच

‘स्वातंत्र्य व पुनर्रचना’ ही घोषणा केली व ती करताना प्रचलित अर्थव्यवस्थेतील दोष स्पष्ट केले.

गोर्बाचेव्हच्या लेनिनग्राडच्या भेटी वेळीच रशियातील विदारक राजकीय व आर्थिक परिस्थितीचे चित्र स्पष्ट झाले होते. त्यामुळे त्यांनी शास्त्रज्ञ, अर्थतज्ञ, पत्रकार यांना वरील परिस्थितीवर खुली चर्चा करण्याचे आमंत्रण दिले. त्याला प्रतिसाद मिळाला.

### ८.२.१.४ पेरिस्त्रोईका–ग्लासनोस्तचा जन्म :–

शास्त्रज्ञ, अर्थतज्ञ, पत्रकार यांच्याबरोबर खुली चर्चा गोर्बाचेव्हने सुरू केली. तेव्हाच झालावस्काया नावाच्या समाजशास्त्रज्ञ महिलेने गोर्बाचेव्ह बरोबर आर्थिक चर्चा करताना प्रथमच ‘पेरिस्त्रोईका’ Perestroika पुनर्रचना हा शब्द वापरला. त्यात कारखानदारी वाढत असताना माणसाच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्याचे मत त्या लेनिनग्राड मधील सामाजिक शास्त्रविषयक संस्थेत काम करणाऱ्या महिलेने नोंदविले. चर्चेतून निघालेल्या निष्कर्षामुळे गोर्बाचेव्ह यांची राजकीय सुधारणा करण्याविषयी आस्था वाढली व त्यांनी त्या दिशेने पावले उचलण्यास सुरुवात केली. सत्ता कशी राबवली जाते. तिचे मर्म काय असते. सध्याच्या चौकटीत राहून एक महासत्ता फार काळ तग धरणार नाही याची कल्पना गोर्बाचेव्ह यांना होतीच. वरील आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी तज्ञांनी निर्णय घेणे आवश्यक होते व त्यासाठी सर्वत्र असलेली कम्युनिस्ट पकड सैल करणे जरुरीचे होते. त्यातूनच पेरिस्त्रोईका व ग्लासनोस्त या संकल्पनांचा जन्म झाला.

### ८.२.१.५ समाजवादी गटाची विभाजन प्रक्रिया :–

मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी लेनिनग्राड मध्ये १९८५ साली समाजशास्त्र, अर्थतज्ञ, वृत्तपत्रकार यांच्याशी खुली चर्चा करून त्यावर ‘पेरिस्त्रोईका व ग्लासनोस्त’ या संकल्पनांची घोषणा केली व या संकल्पनाचा सोव्हिएट राजवटीत अंतिम निर्णय घेणारी, ध्येयधोरणे ठरवणारी सर्वोच्च संस्था सोव्हिएट कम्युनिस्ट काँग्रेस पार्टीची संमती मिळविणे तेवढेच गरजेचे होते व गोर्बाचेव्हच सोव्हिएट युनियनचे त्या वेळी अध्यक्ष होते. त्यामुळे त्यांनी १९८६ मध्ये पार पडलेल्या कम्युनिस्ट पक्षाच्या सत्ताविसाव्या महाअधिवेशनात ‘पुनर्रचना व खुलेपणा’ या संकल्पनांना/धोरणांना मंजुरी दिली व रशियाचा सुधारणेचा मार्ग खुला केला.

१९८६ नंतरची पाच वर्षे सोव्हिएट युनियनच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची वर्षे होती. या काळात घटना विलक्षण वेगाने रशियाच्या राजकारणात घडल्या व रशियात प्रत्यक्षात सुधारणांचे वारे वाहू लागले. अर्थातच या काळात पुनर्रचनेच्या धोरणाला विरोध करणाऱ्या पक्षातील प्रस्थापितांना तोंड देण्याच कसरत गोर्बाचेव्हला करावी लागली. या कसरतीतून बऱ्याच अंशी ते बाहेरही पडले. म्हणूनच गोर्बाचेव्हची कारकीर्द महत्त्वाची मानली जाते. त्यांच्या काळात रशियात ठळक घटना घडल्या, त्या पुढीलप्रमाणे –

१९८६ ते १९९१ या काळातील प्रमुख घटना

* १९८६ ‘पुनर्रचना व खुलेपणा’ कार्यक्रम कार्यान्वित
* १९८७ अमेरिका रशिया यांच्यात निशस्त्रीकरण करार व युरोपातून सैन्य व क्षेपणास्त्रे मागे घेऊन अण्वस्त्र थांबवण्याचा करार

* १९८८ सोव्हिएट कम्युनिस्ट काँग्रेस पार्टीचे महाअधिवेशन संपन्न व रशियन संसदेला अधिक सत्ता देण्याबाबत सुधारणा
* १९८९ अफगाणिस्तानातून रशियन फौजा माघारी बोलावण्याचा निर्णय

  १९९० पक्षाची मक्तेदारी हक्क संपुष्टात आणण्याचा निर्णय, आखाती युद्धाबाबत रशियाचा संयुक्त राष्ट्राच्या संयुक्त कारवाईस पाठिंबा, अध्यक्षाची निवड खुल्या निवडणूक पद्धतीने घेण्याचा निर्णय व मुक्त अर्थव्यवस्था आणण्यासाठी योग्य बदल.
* १९९१ प्रजासत्ताकांना जादा अधिकार देण्याच्या कराराच्या पावित्र्यात

२ जुलै ते ११ जुलै १९९० रोजी मोस्कात गोर्बाचेव्हने सोव्हिएट काँग्रेस पक्षाचे २८ वे महाअधिवेशन भरविले व यात कम्युनिस्ट तत्त्वज्ञानातील सर्व संकल्पना बाजूला सारून समाजवादाला लोकशाहीचा, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा, स्पर्धेवर आधारित अर्थरचनेचा चेहरा देण्याचा प्रयत्न केला व त्यात त्यांना भरघोस पाठिंबाही मिळाला. म्हणून हे अधिवेशन ऐतिहासिकच म्हणावे लागले. शिवाय १९८६ ते १९९० या काळात कम्युनिस्ट जगतात जेही घडले तेही ऐतिहासिकच म्हणावे लागेल. या काळात पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटी कोसळल्या, रुमानियातील चासेक्यू हुकूमशहा परास्त झाले. जर्मनीतील बर्लीन भिंत उद्ध्वस्त झाली. रशियातील कम्युनिस्ट हुकूमशाही संपली. सर्वत्र संघराज्यातून फुटून वेगळे होण्याची भाषा सुरू झाली. वांशिक हिंसाचार सुरू झाला. कामगार संपावर जाऊ लागले. बहुउमेदवार पद्धतीने निवडणुका होऊ लागल्या. सोव्हिएट रशियाच्या सैन्याची अफगाणिस्तानातून माघार झाली. रशिया शस्त्रकपातीस तयार झाला व रशियाचा पुनर्रचनेचा रथ धावू लागला.

### लिथुआनियाची प्रजासत्ताकाची घोषणा :-

२८ व्या कम्युनिस्ट काँग्रेस पक्षाच्या महाअधिवेशनापूर्वीच ११ मार्च १९९० रोजी बाल्टिक राज्यातील लिथुआनियाने सार्वभौम स्वतंत्र प्रजासत्ताक घोषीत करून सोव्हिएट संघराज्याच्या विरोधी पहिली बंडखोरी करून फुटून निघण्याचा प्रयत्न केला.

### ८.२.१.६ सोव्हिएट रिपब्लिक ऑफ रशियाची सार्वभौमत्त्वाची घोषणा :-

सोव्हिएट संघराज्यातले रशियन प्रजासत्ताक मोठे व महत्त्वाचे राज्य १२ जून १९९० रोजी सोव्हिएट फेडरेशनच्या लोकप्रतिनिधींनी रशियाच्या स्वायत्ततेचा ठराव ९०७ विरुद्ध १३ अशा मतांनी मंजूर केला व रशियाचे सार्वभौमत्त्व घोषित केले. सोव्हिएट किंवा समाजवादी संघराज्यातून फुटून निघण्याचा हक्क व अधिकार आम्हाला आहे. हे जाहीर केले. दुसऱ्याच दिवशी गोर्बाचेव्हने अशीच स्वायत्तता सर्व १५ रिपब्लिक राज्यांना देणारी नवीन घटना तयार करणार असल्याचे जाहीर केले. शिवाय सर्व राजकीय पक्षांना, सार्वजनिक व धार्मिक संस्थांना व जनआंदोलनांना पूर्ण अभय देण्यात येईल हे जाहीर केले.

### १) बाल्टिक राज्यातील बंड :-

गोर्बाचेव्हने सुरू केलेल्या या वाऱ्यामुळे सोव्हिएट युनियनमधील काही प्रजासत्ताकात

वांशिक प्रश्नावरून बंडे उद्भवली आणि त्यातून स्वातंत्र्याची मागणी पुढे आली. बाल्टिक राज्यात लिथुआनिया, इस्थोनिया व लॅटेव्हिया या राज्यात बंडे उद्भवली. तेथे वांशिक प्रश्नाबरोबरच स्वातंत्र्याची मागणी पुढे आली. या बाल्टिक राज्यातील लोकात जर्मन, स्वीडिश, पोलिश व स्लॉव्ह वंशाचे लोक राहत होते व तीघा राज्यांना स्लॉव्ह वंशीय रशियाच्या प्रभावातून मुक्त व्हायचे होते. त्यामुळे बाल्टिक राज्यांमध्ये स्वातंत्र्यवादी शक्तींनी जोर धरला. त्यातून सोव्हिएट युनियनच्या विघटनाला सुरुवात झाली.

## २) गोर्बाचेव्ह विरुद्ध बंड :-

सोव्हिएट युनियनमधील सनातनी, परंपरावादी यांना बाजूला सारून गोर्बाचेव्हने प्रभावी संघराज्य उभे करण्याचा प्रयत्न केला. मात्र सनातनी, परंपरावादी स्टॅलिनवाद्यांनी कडवा विरोध सुरू केला. स्टॅलिनवाद्यांनी लष्कराला मदतीस घेऊन १९ ऑगस्ट १९९१ रोजी रशियन प्रजासत्ताकाच्या संसदेवरच रणगाडे घुसविले. मात्र रशियन प्रजासत्ताक अध्यक्ष बोरीस येल्तसिन याने संसदेसमोर जनतेचा जागता पहारा ठेवला. झालेल्या लष्करी गोळीबारात १० नागरिक ठार झाले. स्टॅलिनवादी बंडखोरांचा जगात निषेध झाला. त्यामुळे आधीच जनतेच्या मनातून उतरलेला कम्युनिस्ट पक्ष पूर्ण उतरला व एक दिवाळखोर व्यवस्था डागडुजी करून सुधारणार नाही. ती उखडूनच टाकावी लागेल. हे स्पष्ट झाले. म्हणजेच स्वातंत्र्याचा काळ स्टॅलिनवाद्यांच्या बंडाने आणखी जवळ आला.

## ३) स्वतंत्र बाल्टिक राज्ये :-

११ मार्च १९९० रोजी लिथुआनियाने सार्वभौम जाहीर केले होते. मात्र आर्थिक नाकेबंदीच्या मार्गाने त्यास रोखून धरले गेले. पुढे लिथुआनिया, इस्थोनिया व लॅटेव्हिया येथे स्वातंत्र्यासाठी बंडे उद्भवली. तेही लष्करी बळाने मोडून काढली गेली. मात्र गोर्बाचेव्ह यांना व त्याचे प्रजासत्ताक उखडून टाकण्यासाठी स्टॅलिनवाद्यांनी, सनातनी परंपरावादी यांनी केलेले बंड जेव्हा फसले तेव्हा वरील बाल्टिक राज्यांनी स्वातंत्र्यासाठी बंड पुकारले. पाश्चात्त्य देशांनीही त्यांच्या स्वातंत्र्याचा आग्रह धरला. इंग्लंड, डेन्मार्क व जर्मनी इ. देशांनी या राज्यांच्या स्वातंत्र्याला अधिकृत मान्यताच दिली. त्यामुळे गोर्बाचेव्ह यांनी या तिन्ही प्रजासत्ताकांच्या स्वातंत्र्यास व सार्वभौमत्त्वास अधिकृत मान्यता दिली. तेथून समाजवादी गटाचे विभाजन सुरू झाले.

## ४) घटना बदल किंवा घटना दुरुस्ती :-

सोव्हिएट युनियन मधून घटक राज्ये फुटून निघू नयेत. म्हणून गोर्बाचेव्ह यांनी रशियाच्या राज्यघटनेत दुरुस्ती करणारे विधेयक संसदेत मांडले व आवश्यक तीन चतुर्थांश बहुमताने मंजूर झाले, या घटना दुरुस्तीमुळे सोव्हिएट संघराज्याचे स्वरुप बदलणार मात्र त्याचे विघटन न होता त्याचे खऱ्या संघराज्यात रुपांतर होईल अशी गोर्बाचेव्हची अपेक्षा होती. अशी दुरुस्ती केल्यावर तयार झालेली नवी राज्यघटना १०/११ प्रजासत्ताकांनी स्वीकारली. त्यांना स्वतंत्र होण्याची मोकळीक देण्यात आली. म्हणजे या घटना दुरुस्तीमुळे केंद्रसत्ता बळकट असलेले स्वरुप बदलले व घटक राज्यांना व्यापक अधिकार देणारे संघराज्य असे त्याचे स्वरुप झाले. या घटना दुरुस्तीमुळे आर्थिक पुनर्रचनेसाठी सर्व निर्बंध सैल झाले. गोर्बाचेव्हच्या

या धोरणात सोव्हिएट संघराज्य टिकून राहील व त्यास पूर्वीचेच आंतरराष्ट्रीय महत्त्वही कायम राहील. अशी व्यवस्था होती. मात्र पुढे रशियन प्रजासत्ताकाचे अध्यक्ष बोरिस येलितसन यांनी अशी काही पावले टाकली की सोव्हिएट संघराज्याचे विघटन अटळ ठरले.

### ८.२.१.७ सोव्हिएट संघराज्याची अखेर :-

गोर्बाचेव्हच्या पुनर्रचना व खुलेपणा या धोरणांमुळे सोव्हिएट संघराज्यात स्वातंत्र्याचे व मुक्ततेचे वारे वाहू लागले होते. तसेच ते पूर्व युरोपीय साम्यवादी राजवटी असलेल्या देशातही वाहू लागले. परिणामी १९८८-८९ पर्यंत पूर्व युरोपातील साम्यवादी/समाजवादी राजवटी कोसळल्या. सोव्हिएट युनियन मधील प्रजासत्ताकावर त्या घटनांचा प्रभाव पडला. वंशीय दंगली, कामगारांचे संप, मोर्चे, निदर्शने सुरू झाली. महागाई, चलनवाढ, टंचाई, काळा बाजार यांनी रशियात कहर केला. सर्व क्षेत्रातले उत्पादन थंडावले. रशिया अराजकतेच्या उंबरठ्यावर उभा राहिला. संघराज्यातले प्रत्येक प्रजासत्ताक स्वतंत्र सार्वभौम झाले. बाल्टिक राज्ये स्वतंत्र झाली. रशिया, युक्रेन, बायलोरशिया यांनी स्वातंत्र्य जाहीर केले. तीन स्लॉव्ह प्रजासत्ताकांनी राष्ट्रकुल तयार करण्याचा मनोदय केला व त्यांनी सोव्हिएट युनियन नष्ट झाल्याचे एकतर्फी जाहीर केले. गोर्बाचेव्हने त्यांना कायदेशीर बाजूने प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. मात्र वस्तुस्थिती त्यांच्या बाजूची नव्हती. आर्थिक, राजकीय व परराष्ट्र धोरण विषयक निर्णय घ्यायचे व त्यास विरोध करण्याची शक्ती गोर्बाचेव्हकडे नव्हती. अशा स्थितीत जे घडते आहे ते पाहत राहण्याशिवाय गोर्बाचेव्हला गत्यंतर नव्हते. अखेर ३० डिसेंबर १९२२ मध्ये लेनिनने स्थापन केलेले सोव्हिएट युनियन ३१ डिसेंबर १९९१ रोजी विलय पावले व कायदेशीरपणे या युनियनमधील १५ प्रजासत्ताक स्वतंत्र व सार्वभौम झाली. ती अशी १. लिथुआनिया २. इस्टोनिया ३. लॅटेव्हिया ४. रशिया ५. युक्रेन ६. बायलोरशिया ७. जार्जिया ८. आर्मिनीया ९. अझरबैजान १०. कझाकिस्थान ११. किर्गिझिया१२. ताझिकीस्तान १३. उझबेकिस्तान १४. तुर्कमेनिस्तान १५. मोल्हेव्हिया

२५ डिसेंबर १९९१ रोजी गोर्बाचेव्ह निवृत्त झाले. त्याचे शेवटचे भाषण महत्त्वाचे होते. 'सोव्हिएट युनियन मधील प्रजासत्ताकांना अधिक स्वायत्तता देण्यास माझा विरोध नव्हता. मात्र देश एकसंघ रहावा असे वाटत होते. म्हणून मी संघराज्य टिकवून ठेवण्यासाठी आग्रही होतो. मात्र माझा आग्रह अमान्य झाला. स्वायत्ततेऐवजी स्वतंत्रता जाहीर झाली. त्यामुळे सामान्य माणूस एका प्रचंड देशाचे नागरित्त्व गमावून बसला. याची मला खंत आहे. सुरक्षितता वा व्यापार या दृष्टीने एकसंघ देशाचे अनेक फायदे असतात. त्या सर्व फायद्यावर पाणी सोडून स्वातंत्र्याचा ज्या प्रकारे निर्णय घेतला गेला. त्याबद्दल मी दुःखी आहे.

गोर्बाचेव्ह यांनी सहा-सात वर्षात स्वदेशाचेच नाही तर साऱ्या जगाचेच स्वरुप बदलून टाकले. सामान्य लोकांना न्याय मिळू लागला. शेतीसुधार मार्गातील अडथळा दूर झाला. सहकारी व खाजगी कारखानदारीस मुभा मिळाली. उत्पादन शक्तीला मोकळीक मिळाली. लष्करी सामर्थ्यावर आधारलेले साम्राज्य व व्यवस्था नष्ट झाली. शीतयुद्ध संपून स्पर्धा काहीशी थांबली. म्हणून एका राजकीय पत्रकाराने गोर्बाचेव्ह या शतकातला एक महान क्रांतीकारक आहेत असे म्हटले.

## ८.२ जागतिक राजकारणातील बदल :-

जागतिक राजकारणातील बदल लक्षात घेताना आपणास रशिया केंद्रस्थानी ठेवावा लागेल. कारण पूर्व व मध्य युरोपातील राजवटी रशियाच्या राजकीय व आर्थिक प्रभावाखाली होत्या. रशियातील परिवर्तन या बाह्य राजवटीवर व बाह्य राजवटीतील परिवर्तन रशियाच्या व्यवस्थेवर परिणाम करताना आपणास दिसते. त्यात पूर्व युरोपातील युगास्लाव्हिया, रुमानिया, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया व पोलंड या राजवटी प्रमुख होत्या. स्टॅलिनच्या जबरदस्त पकडीमुळे त्या देशातील साम्यवादी/ समाजवादी व्यवस्थेला कोणी धक्का लावू शकत नव्हता. मात्र स्टॅलिन नंतर परिस्थितीत झपाट्याने बदल होत गेले. गोर्बाचेव्हने त्यावर शेवटचा प्रहार केला. अर्थातच जागतिक राजकारणातील आर्थिक, राजकीय, सामाजिक, तांत्रिक, वैज्ञानिक इ. सर्वच क्षेत्रातील सुधारणांचे वारे तेवढेच महत्त्वाचे आहे. त्याचा मागोवा साधारणत: आपणास खालील कारणांमधून पाहता येईल.

### ८.२.२.१ कुंठित समाजवादी अर्थव्यवस्था

स्टॅलिनने रशियन अर्थव्यवस्थेच्या आधारावर युरोपातील साम्यवादी देशात अर्थव्यवस्थेची रचना केली होती. रशियात या अर्थव्यवस्थेला जेवढे यश मिळाले. तेवढे यश पूर्व युरोपातील राष्ट्रांमधील अर्थव्यवस्थेला मिळाले नाही. उलट अमेरिकेने मार्शल योजनेद्वारे इतर युरोपीयन राष्ट्रांना भरघोस अर्थसहाय्य केले. त्यामुळे त्या राष्ट्राचा विकास घोडदौडीने झाला. समाजवादी/ साम्यवादी पूर्व युरोपातील देशाचा विकास मात्र नियंत्रणामुळे मंदगतीने चालला होता. शिवाय या राष्ट्रानी स्वत:भोवती कुंपण घालून घेतल्यामुळे नवे विचार व तंत्रज्ञान येत नव्हते. खुल्या अर्थव्यवस्थेत व लोकशाही शासन व्यवस्थेत विकासाला भरपूर संधी असते. अमेरिका प्रणीत खुल्या अर्थव्यवस्थेची आवाहने स्वीकारून पश्चिम युरोपीयन राष्ट्रांनी औद्योगिक तांत्रिक उभारणीवर भर दिला. ही राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण होऊन जागतिक बाजारपेठेत आपला प्रभाव दाखविण्यात सिद्ध झाली. साम्यवादी/समाजवादी राजवटीचे देश मात्र नियंत्रण पद्धतीमुळे मागे पडली. उलट या देशाचे शेतीसहीत औद्योगिक उत्पादन घटले. कारखाने बंद पडले. बेरोजगारी वाढली. लोकशाही व्यवस्थेवर नियंत्रणे असल्याने सामान्य जनतेचा कोंडमारा सुरू झाला. समाजवादी राष्ट्रामधील कुंठीत अर्थव्यवस्था व इतरत्र असलेली खुली/मुक्त अर्थव्यवस्था असा तुलनात्मक परिणाम तपासला जाऊ लागला. त्यात खुली/मुक्त अर्थव्यवस्था अधिक सोयीची व फायद्याची दिसली. त्या दिशेने जागतिक राजकारणात इष्ट बदल होऊ लागले. त्याचा परिणाम समाजवादी व्यवस्थेवर पडला.

### ८.२.२.२ समाजवादी विचारसरणी सुधारणा विरोधी

सामजवादी तत्त्वज्ञानात बदलास, सुधारणेस वाव नव्हता. उलट अधिकाधिक नियंत्रणे होती. त्यामुळे जगात बदलणाऱ्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास हे तत्त्वज्ञान कमी पडले. चीनमध्ये माओ-त्सो-तुंगने हे समाजवादी तत्त्वज्ञान स्वीकारल्याने चीनमध्ये राजकीय बदलाशिवाय आर्थिक सुधारणा झाल्या नाहीत. मात्र, चिनने आपली दारे परकीय भांडवलांसाठी थोडी उघडल्यावर अमेरिका व इतर पाश्चात्य राष्ट्रे पुढे सरसावली. त्यातून चीनचा आर्थिक विकासाचा वेग लक्षणिय वाढला. याचाच अर्थ कोणतेही तत्त्वज्ञान जसेच्या तसे शुद्ध

स्वरूपात अंमलात येत नाही. त्यात कालपरत्त्वे बदल करणे आवश्यक असते. साम्यवाद हा शास्त्रीय समाजवाद जरी असला तरी त्यांची अमंलबजावणी मानवी समुहात करतांना त्याची शास्त्रीयतेची दुरुस्ती करणे गरजेचे होते. त्यामुळे रशियाला व पूर्व युरोपीय देशाला सुधारणांना विरोध करणारा समाजवाद कालबाह्य होण्याची वेळ आली. उलट चीनने या समाजवादाचे राजकीय स्वरूप कामय ठेवत आर्थिक बदलाला प्राधान्य दिल्यामुळे २० व्या शतकात चीन आशिया खंडातील आर्थिक सत्ता म्हणून पुढे आली. सुधारणा विरोधी पूर्व युरोपातील राजवटी मात्र माघेच राहिल्या. पश्चिम युरोपच्या तुलनेत तर त्या फारच मागे राहिल्या. कालांतराने तेथेही परिवर्तन येणे क्रमप्राप्त झाले व समाजवाद विरोधी खुली अर्थव्यवस्था व राजकीय परिवर्तन स्वीकारले गेले. हा जागतिक राजकारणातला बदल इष्टच म्हणावा किंवा मानावा लागला व त्याचे खुल्या दिलाने समर्थनही करावे लागले.

### ८.२.२.३ समाजवाद विरुद्ध लोकशाही तत्त्वज्ञान

समाजवादी तत्त्वज्ञानात कामगारांची हुकूमशाही हे अंतिमध्येय असते. वर्ग, राज्य विहीन व्याख्या एक पायरी मानली जाते व हुकूमशाही तंत्रात हिंसक मार्गाचा अवलंब करावाच लागतो. म्हणजेच समाजवादात हुकूमशाही परवलीचा शब्द ठरला. सुरुवातीला स्टॅलिनने प्रथम रशियात हे तंत्र स्विकारले व वापरले नंतर पूर्व युरोपातील समाजवादी राजवटींनी/देशांनी स्टॅलिनचा आदर्श ठेवून हुकूमशाही राबविली. जगात मात्र या वेळी लोकशाहीचे व व्यक्ती स्वातंत्र्याचे नगारे वाजत होते. तरीही समाजवादी व्यवस्थेने आपल्या जनतेपर्यंत हा आवाज पोहचू न देण्याची व्यवस्था केली. युगोस्लाव्हियाच्या मार्शल टिटोने ही चौकट मोडून युगोस्लाव्हियात लोकशाही शासन व्यवस्था उभी केली. हंगेरी, पोलंड यांनीही प्रयत्न केले. या विरोधी प्रयत्नांना मोडून काढण्यासाठी समाजवाद हिंसकशाहीकडे वळला. त्याला मात्र पूर्व युरोपासह जगाने नाकारले. हा नकार म्हणजे जागतिक राजकीय बदलाचे शुभ संकेत ठरला व सर्वत्र समाजवाद विरोधी वातावरण वाहू लागले.

### ८.२.२.४ समाजवादाचा मानवी हक्कांचा विरोध

व्यक्ती विकास, व्यक्ती स्वातंत्र्य मानवी जीवनाचा आत्मा आहे. समाजवादी व्यवस्थेत मानवाच्या या अशा, आकाक्षांची दखल घेतली नाही. उलट मानव यंत्रवत केला. माणसाचे मी पण, माझे पण दाबून टाकले. मात्र माणूस या सहजप्रवृत्तीचा गुलाम असतो हे विसरता येणार नाही. समाजवादी राजवटीने जगात मानवाच्या या सहजप्रवृत्ती दाबून टाकण्याचा जोरदार प्रयत्न केला. मानवाच्या सर्व मुलभूत हक्कांवर गदा आणली. त्यामुळे रशिया सकट जगातच समाजवादी व्यवस्थेविरुद्ध वावटळ उठली. अर्थातच समाजवादी व्यवस्था असलेल्या देशांच्या राज्यघटनेतही स्वातंत्र्ये, हक्क, नमूद करण्यात आले होते. मात्र त्यांची अंमलबजावणी कधीच झाली नाही. किंबहुना हेतूपुरस्करपणे टाळली गेली. उलट जागतिक स्तरावर मात्र मानवी हक्कांचा पाठिंबा मिळत होता व समाजवादी व्यवस्थेत त्याला नाकरले जात होते. ही जागतिक राजकारणातील परस्पर विरोधी विसंगती फार काळ टिकू शकली नाही. समाजवादी व्यवस्थेचे जगाने उच्चाटन करून ही विसंगती कायमची निकाली काढली.

### ८.२.२.५ धर्म भावना

मार्क्सने समाजवादी/साम्यवादी व्यवस्थेत 'धर्म ही अफूची गोळी असते' असा नारा

दिला होता. धर्म मंदिरे, धर्मसंस्था सर्वत्र बंद केल्या होत्या. जडवादी संस्कृतीत धर्मवादाचे स्थान नष्ट केल्याने फारसे अडत नाही. मात्र, भौतिक सुखसोयींची खैरात करून मन:शांती मिळतेच असे नाही. मानसिक व आध्यात्मिक गरज भागविण्यासाठी धर्म ह्या संस्थेची मानवाला गरज भासते. समावाजवादी व्यवस्थेने मात्र, धर्माकडे हेटाळणीच्या भावनेनेच सतत पाहिल्याने समाजवादी जगातील जनता धर्म  या आधाराला मुकली. एक व्यक्तीगत बाब म्हणून जनतेने मात्र धर्माचे स्थान आपल्या आयुष्यात पक्के केलेले होते. त्यातून समाजवादी बहुसंख्य ख्रिस्ती धर्मीय जनतेने व इस्लाम धर्मिय जनतेने आपापले सण, उत्सव साजरे करणे सुरू ठेवले होते. समाजवादी व्यवस्था त्यावर दबाव व बंदी घालत होते. त्यातून समाजवादी जगातच वंशीय धर्मीय असंतोष वाढला. कालपरत्वे त्याने उग्र रुप धारण केले. या धर्मभावनेने जगातून समाजवादी व्यवस्थेचा घोट घेतला.

### ८.२.२.६ जगात लोकशाही व्यवस्थेचे आकर्षण

जगाच्या इतिहासातील शासन व्यवस्थेत 'लोकशाही शासनप्रणाली' उच्चतम स्थानावर आहे. निर्दोष नसली तरी कमीत कमी दोष असलेली व जास्ती जास्त उपकारक आहे व खरी लोकशाही तीच की, जी लोकांची, लोकांकडून व लोकांसाठी असते. कालमान परिस्थितीपरत्त्वे बदलत जाते. या उलट हुकूमशाही शासन व्यवस्था असते. समाजवादात मुलत:च हुकूमशाही अभिप्रेत असते. हुकूमशाहीत मानवी आशा, आकांक्षाची कत्तल केली जाते. लोकशाही, लोकाभिमुख असते. लोककल्याण तिचे अंतिम उद्दिष्ट असते. या व्यवस्थेत सर्व मुलभूत स्वातंत्र्य दिलेले असतात. पूर्व युरोपातील समाजवादी राजवटीची व्यवस्था लोकशाहीजन्य होती. परंतु प्रत्यक्षात मात्र हुकूमशाही व्यवस्था होती. मुलभूत स्वातंत्र्याला जरी घटनेने तत्त्वत: मान्यता दिली असली तरी नियंत्रणे प्रमाणाबाहेर होती. खुला श्वास जनतेसाठी नव्हता. म्हणूनच गोर्बाचेव्हने थोडी दोरी सैल करताच जगात समाजवादी राजवटीच्या विरोधात जनआंदोलने उभी राहिली. त्यात समाजवादी राजवटींची आहुती पडली.

### ८.२.२.७ समाजवादाचा महिमा संपला

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या पुर्वार्धात साम्यवाद/ समाजवादाची चलती होती. या काळात जगातील प्रत्येक नागरिकास आपण समाजवादी असावे असे वाटत होते. म्हणून समाजवादी देशांबद्दल सर्वत्र आपुलकीची भावना होती. मात्र, समाजवादी व्यवस्थेचे अपयश उघडकीस येऊ लागल्यावर जगाचाच समाजवादासंबंधी भ्रमनिरास झाला व समाजवादी देशांची हळूहळू समाजवादी तत्त्वे बाजूला ठेऊन खुले उदारीकरणाचे धोरण स्वीकारून आर्थिक पुनर्रचनेला हात घातला. सर्वत्र समाजवाद व समाजवादी नेत्यांच्या विरोधात तिरस्कार बळावला. जागतिक स्तरावरील हा तिरस्कार समाजवादाला जगातून हद्दपार करण्यास कारण ठरला. या हद्दपारीचा मागोवा पुढीलप्रमाणे पाहता येईल.

### ८.२.२.८ युगोस्लाव्हिया

पहिल्या महायुद्धानंतर ऑस्ट्रिया-हंगेरीच्या साम्राज्याची विल्हेवाट लावण्याच्या उद्देशाने सर्व, क्रोट, स्लाव्ह, मॅसिडोनियन व अल्बानियन वंशाचे विशेषत: ख्रिश्चन व

इस्लाम धर्मीयांना एकत्र आणून कृत्रिमरित्या उभा केलेला देश म्हणजे, समाजवादी राजकीय व्यवस्था स्वीकारणारा युगोस्लाव्हिया. दुसऱ्या महायुद्धानंतर पूर्व युरोपात समाजवादी व्यवस्था दुबळी झाली. त्याला युगोस्लाव्हिया मात्र अपवाद होता. या देशाचे नेतृत्त्व मार्शल टिटो यांच्याकडे गेल्यावर व त्यांनी 'लोकांची लोकशाही' ही कल्पना पुढे केल्यावर स्टॅलिन-टिटो मतभेद झाले व आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट संघटनेतील युगोस्लाव्हियाचे स्थान नष्ट झाले.

मार्शल टिटोचे युगोस्लाव्हियावर जवळ जवळ ३५ वर्षे एकछत्री राज्य होते. 'लोकांची लोकशाही' असे त्याच्या राजवटीचे नाव होते. धर्मभेद, पंथभेद, भाषाभेद, इत्यादी भेट असूनही टिटोने कौशल्याने वाद-भेद दाबून ठेवले होते. शिवाय पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटी व रशियापासून वेगळा झालेला व आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली वेगळी प्रतिमा व प्रतिष्ठा उभा करणारा व इतर युरोपिय राष्ट्रापेक्षा वेगळा होता. १९८० च्या टिटोच्या निधनानंतर मात्र युगोस्लाव्हियातील सर्व वाद-भेदांवर मात करू शकेल असा नेता राहिला नाही. दिर्घकाळ सत्ता भोगलेला कम्युनिस्ट पक्ष दुबळा पडला. युगोस्लाव्हिया विघटनाच्या टप्प्यावर आला. युगोस्लाव्हिया-सर्बिया, क्रोशिया, स्लोव्हेनिया, बोस्निया, हर्झेगोविना, मॉसिडोनिग्रा, माँटोनिया इत्यादी घटक राज्य मिळून तयार झालेला देश व प्रत्येक घटकराज्यांमध्ये ईर्षा होती. त्यातून उद्भवणाऱ्या अंतर्गत संघर्षांना टिटोने अटकाव घातला होता. टिटोनंतर मात्र प्रत्येक घटक राज्याने स्वतंत्र राष्ट्र होण्याच्या जिद्दीने पावले टाकली. त्यातून १९९१ मध्ये युगोस्लाव्हियाचे विघटन झाले. २५ जानेवारी १९९१ रोजी मॉसिडोनिया स्वतंत्र झाला. २५ जून १९९१ रोजी स्लोव्हेनिया व क्रोशियाने स्वातंत्र्य घोषित केले. बोस्निया व हर्झेगोविना यांनीही आपल्या स्वातंत्र्याची घोषणा केली. वरील सर्व राष्ट्रांना युरोपियन समुदायाने व अमेरिकेनेही मान्यता दिली. त्यांचे सर्वात मोठे दुःख युगोस्लाव्हियातील सर्वात मोठे घटक राज्य सर्बियाला झाले. कारण सर्बिया स्वत:ला छोटे युगोस्लाव्हिया समजत होता. म्हणून सर्बियाला आपल्या महत्त्वाकांक्षेलाच आवाहन दिल्यासारखे वाटले. त्यातून सर्बिया- बोस्निया संघर्ष उभा राहिला. दोघा घटक राज्यात युद्धे सुरू झाली. प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे गेल्यावर युद्धबंदीचे आवाहन करण्यात आले. युनोचे शांतता रक्षक दल बोस्नियात आले. मात्र, सर्बियाने युनोच्या लष्कराला दाद दिली नाही. उलट सर्बिया-बोस्निया संघर्ष ख्रिश्चन विरुद्ध मुस्लिम या धर्मयुद्धाकडे गेला. हा संघर्ष तीन चार वर्ष चालू राहिला.

संयुक्त राष्ट्रसंघ, अमेरिका व युरोपियन समुदाय यांनी हा संघर्ष सोडविण्याचा प्रयत्न केला. मात्र उपयोग झाला नाही. उलट युनोवर सैन्य माघारी बोलाविण्याची नामुष्की आली. या चार वर्षांच्या संघर्षात दोन लाख नागरिक मारले गेले. तीस हजार बेघर झाले. शेवटी युद्धविराम करार झाला. मात्र, युगोस्लाव्हियाची शकले होऊन सर्बिया, मॉटोनिग्रो, मिळून युगोस्लाव्हिया राहिला व इतर सर्व घटक राज्ये स्वतंत्र सर्वभौम झाली.

## ८.२.२.९ रुमानिया

पहिल्या महायुद्धानंतर पॅरिस तहाने रुमानियाची निर्मिती झाली. पूर्वी हा प्रदेश ऑस्ट्रिया, हंगेरी व तुर्कस्थान साम्राज्यात होता. रुमानियात सुरुवातीपासूनच हुकूमशाही राजवट होती. १९४५ पासूनच रुमानियात साम्यवादी राजवट प्रस्थापित झाली. कम्युनिस्ट

नेत्यांनी तेथे सुधारणाही केल्या. १९६५ मध्ये रुमानियात चौसेस्क्यू कम्युनिस्ट पक्षाचा सरचिटणीस झाला. प्रथेनुसार तोच रुमानियाचा सत्ताधिश झाला. त्याने चीनशी संबंध प्रस्थापित केले. रशियाच्या आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट मोहिमेशी संबंध तोडले. व पाश्चात्यांची आर्थिक मदत मिळविली. मात्र, चॉसेस्क्यूने क्रुर हुकूमशाही रुमानियावर लादली. सारी सत्ता स्वत:कडे केंद्रीत केली. देश एक कुटूंबाची मालकी म्हणून चालविला.

रुमानियात रुमानियन, हंगेरीयन, जर्मन वंशाचे लोक त्यात पुन्हा रुमानियन, ऑर्थाडॉक्स, रुमानियन युनियन, कॅथॉलीक, लुथेरियन इतर पंथाचे लोक. त्यामुळे नेहमीच धर्मसत्ताचे सत्तेची सघर्ष. या सघर्षात सत्तेचा नेहमीच हिंसक मार्गाचा अवलंब, खाजगी उपक्रमशीलतेला व असंतुष्टांना चॉसेस्क्यूने कधीच वाव दिला नाही. पाशवी बळाचा वापर करून विरोध मोडून काढला. सहकारी शेती सरकारची होऊन तिची दुर्दशा झाली. खेडी ओस पडली. परदेशी कर्जाचा बोजा वाढला. जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा निर्माण झाला. पाश्चात्य देशांनी अमेरिकेच्या आग्रहाने रुमानियाच्या सवलती बंद केल्या. रुमानियात विरोधी शक्ती संघटीत होऊ लागल्या. त्यांना नैतिक आधार मिळू लागला. रुमानियन जनता चॉसेस्क्यूच्या नैसर्गिक मृत्यूची वाट पाहू लागली. अशातच नॅशनल सॉल्व्हेशन फ्रंटने उभारलेल्या आंदोलनाची साथ मिळाली. लष्करच उलटल्याने लष्कराच्याच गोळीने चॉसेस्क्यू बळी पडला. जुलमी राजवट नष्ट होऊन प्रजासत्ताक सत्तेवर आले.

### ८.२.२.१० हंगेरी

पहिल्या महायुद्धाने ऑस्ट्रिया, हंगेरी साम्राज्य संपवून हंगेरीचा उदय झाला. हंगेरीत ५८ टक्के कॅथॉलिक, २२ टक्के हंगेरीयन उर्वरित लुथेनियन व ऑर्थडॉक्स चर्च नागरिक आहेत. १९४५ मध्ये रशियाच्या वर्चस्वाखाली तेथे निवडणूक झाली. मात्र, कम्युनिस्ट पक्षाला फक्त १७ टक्के मते मिळाली. परंतु तरीही रशियन दडपणामुळे कम्युनिस्ट पक्षाचा सरकारमध्ये समावेश झाला. पुढे १९४९ च्या हंगेरीतील निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाला बहुमत मिळाले व 'राकोसी' हा राक्षसी प्रवृत्तीचा नेता सत्ताधिश झाला. त्याने स्टॅलिनवादी राज्यघटना आणून दहशतीचा आश्रय घेत सरसकट कत्तलीचा मार्ग अनुसरला. त्यातून सर्वत्र असंतोष वाढला. परिणामी राकोसीची सत्ता जाऊन नवा 'सुधारणावादी इम्रेनाज' पंतप्रधान झाला. यानेही समाजवादी नेता म्हणूनच सत्ता स्वीकारली. व नव्या आर्थिक धोरणाचा अवलंब करून स्टॅलिनवादी घटना अमान्य केली व हंगेरीतून रशियन फौजा काढून घेण्याची मागणी केली. ही मागणी म्हणजे रशियन वर्चस्वाला शह होता. स्टॅलिनने फौजा मागे घेण्यास नकार दिला. उलट हंगेरीत अधिक रशियन फौजा घुसविल्या. इम्रेनाजने रशियाच्या विरोधात उठाव केला. जनतेनेही त्याला साथ दिली. मात्र, लष्करापुढे चालले नाही. इम्रेनाजला सत्ता त्याग करावा लागला. त्याच्या जागी 'जानोस कदर' आला. यावेळी दोनलाख हंगेरियन नागरिकांना प्राण गमवावे लागले. हंगेरीतील उठाव दडपण्यासाठी रशियाने क्रुर मार्गाचा अवलंब केल्याने साम्यवादी देश वगळता सर्व जगाने रशियाचा कडक निषेध केला. भारताची सुरुवातीला संदिग्ध भूमिका होती. नंतर रशियाला विरोध केला. इम्रेनाजसह ३०० नेत्यांना रशियाने दोषी ठरवून फाशी दिली. १६ जून १९५८ रोजी इम्रेनाज याला फाशी दिली.

जानोस कादरने शेतकऱ्यांना सवलती देऊन परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न केला.

शिवाय राजकीय व आर्थिक सुधारणांना हात घातला. मात्र, कम्युनिस्टाची त्यावर बधंने राहिली. जवळ जवळ १५ वर्षे हंगेरित सुधारणावादी व कम्युनिस्ट यांच्यात सुधारणांवरून अंतर्गत वाद होत राहिले. त्याचे रुपांतर संघर्षात झाले. मात्र, धिम्यागतीने सुधारणा चालूच ठेवल्या होत्या. जानोस कादरही राजकीय बदल करून सुधारणास तयार नव्हता. त्यालाही स्वत:ची हुकूमशाही सत्ता अबादित ठेवायची होती. त्यामुळे राजकीय हक्कांशिवाय सुधारणा होणार नाहीत हा विचार हंगेरीत बळावू लागला. मार्च/एप्रिल १९८९ मध्ये हंगेरीत सार्वत्रिक निवडणुका झाल्या स्पष्ट बहुमत कोणत्याच पक्षाला मिळाले नाही. हंगेरीयन डेमॉक्रॉसिक फोरम, फ्रीडेमॉक्रॅटस, इंडिपेडंट स्मॉल होल्डर्स या तीन पक्षाचे सरकार सत्तेवर आले व हंगेरीतील कम्युनिस्ट सत्तेचा शेवट झाला. इम्रेनाजच्या १६ जून १९८५ च्या फाशीनंतर बरोबर ३१ वर्षंनी १६ जून १९८९ रोजी कम्युनिस्ट राजवटीचा अंत झाल्यावर इम्रेनाज यांचा राष्ट्रीय इतमामाने दफनविधी करण्यात आला. बुडोपेस्ट या राजधानीच्या शहरात अडीच लाख लोक या विधीस हजर होते. यावेळी हंगेरीत देशभर घंटानाद झाला.

### ८.२.२.११ झेकोस्लोव्हाकिया

पहिल्या महायुद्धानंतर नवीन निर्माण झालेले हे राष्ट्र झेक व स्लॉव्ह वंशीयांचे हे राष्ट्र. जन्मापासूनच दुहीचे बीज असलेले. तरीही संसदीय लोकशाही मार्गाने जाणारे हे राष्ट्र. हिटलरने मात्र १९३९ मध्ये झेकोस्लोव्हाकियावर कब्जा मिळविला. मात्र दुसऱ्या महायुद्धात रशियानाजवादाला मानवी चेहरा देण्याचा प्रयत्न केला. मात्र त्याना फारसे यश लाभले नाही. रशियाने ऑगस्ट १९६८ मध्ये झेकोस्लोव्हाकियात फौजा घुसविल्या. त्यातून ड्यूबचेकला माघार घेत सत्ता सोडावी लागली. पुन्हा तेथे कम्युनिस्ट पक्षाचे नवे प्रिसिडियम स्थापन झाले. 'हुसाक' तडजोडीच्या मार्गाने सत्तेवर आला व रशियाच्या हातातील बाहुले बनला. मात्र, जनतेस मुलभूत स्वातंत्र्य हवी होती. रशिया या स्वातंत्र्याच्या विरोधात होता. त्यामुळे 'हुसाक' कोडींत पडला. हुसाकने रशियाशी मिळते जुळते घेत तडजोड करीत सुधारणा करण्याचा प्रयत्न केला. हुसाक नंतर 'याकस' सत्तेवर आला. त्यानेही रशियाचा प्रभाव कायम ठेवला. या वेळी पूर्व युरोपात कम्युनिस्ट राजवटीविरोधात आंदोलनाला उधाण आले. त्यात याकसचीही आहुती पडली. नोव्हेंबर १९८९ मध्ये याकसला पदत्याग करावा लागला. अज्ञातवासात गेलेल्या ड्यूबचेकने पुन्हा उचल खाल्ली. मानवी चेहरा असलेला समाजवाद आणण्याची भाषा केली. त्यानतून जनतेत प्रिय झाला. रशियाने पुन्हा लष्करी बळाचा वापर सुरू केला. मात्र, शेवटी जन आंदोलनासमोर नमते घेऊन रशियाला झेकोस्लोव्हाकिया राष्ट्रीय सरकार स्थापन करण्यास मान्यता दिली. ४५ वर्षात प्रथमच निवडणुका झाल्या. हॉवेलच्या सिव्हिकल फोरम पक्षास निर्विवाद बहुमत मिळाले. कम्युनिस्ट पक्षाचे पूर्ण पानिपत झाले. हॉवेल नोव्हेंबर १९८९ रोजी अध्यक्षपदावर आरूढ झाले.

### ८.२.२.१२ पोलंड

पूर्वी पोलंड राज्य बाल्टीक समुद्र ते काळ्या समुद्रापर्यंत पसरलेले होते. परंतु १७ व्या व १८ व्या शतकात त्यांचा ऱ्हास झाला. पहिल्या महायुद्धानंतर मात्र पोलंडचा पुर्नजन्म झाला. दुसऱ्या महायुद्ध काळात मात्र दक्षिण पोलंडवर जर्मनीचा तर पूर्व पोलंडवर रशियाचा

प्रभाव निर्माण झाला. युद्धानंतर रशियाच्या दबावाखाली पोलंडमध्ये कम्युनिस्ट सरकार स्थापन झाले. 'गोमुल्का' कम्युनिस्ट नेता सत्ताधिश झाला. मात्र त्याला रशियाचे वर्चस्व मान्य नव्हते. त्याला समाजवादाकडे जाणारा स्वत:चा पोलिश मार्ग अपेक्षित होता. त्याला हुकूमशाही दहशतवाद नको होता, म्हणून गोमुल्का सरकार कम्युनिस्ट सरकार नसून समाजवादी नेते असलेले संयुक्त सरकार होते व त्याला रशिया बरोबर, पाश्चात्त्य राष्ट्रांबरोबर संबंध ठेवायचे होते. म्हणूनच रशियाने गोमुल्काची हकालपट्टी केली. त्यामुळे पोलंडचे अंतर्गत स्वातंत्र्य नष्ट झाले. पोलंडवर पूर्ण रशियाचा प्रभाव निर्माण झाला. पोलंडमध्ये दहशतवादी पर्वाला सुरुवात झाली. गिरेक हा या काळात सर्वसत्ताधारी होता. नोकरशाही, पक्ष, पोलिस, गुप्तहेर खाते, लष्कराच्या जोरावर राज्य चालू लागले. जनतेला विश्वासात घेण्याचा प्रश्नच नव्हता. महागाई, वस्तूंची टंचाई, चलन फुगवटा, संप, मोर्चे या समस्या उभ्या राहिल्या. सरकार व शेतकरी शहरी कामगार संघर्ष सुरू झाला. कम्युनिस्ट सरकारवर जनतेचा विश्वास उरला नाही. त्यातून लेक वालेन्सा या कामगार नेत्याच्या नेतृत्त्वाखाली आंदोलन उभे राहिले. रशियाने या प्रसंगी गिरेकला बाजूला सारून मार्शल यारुझेल्स्कीला लष्करप्रमुख म्हणून सत्तेवर आणले. त्याला व त्याच्या सर्व धोरणांना विरोध करणारी सॉलिडॅरिटी कामगार संघटना पुढे आली व त्या संघटनेने सत्तेचे विकेंद्रीकरण व्हावे ही मागणी केली. तेव्हा यारुझेल्स्की सरकारने रशियाच्या इशाऱ्याने सॉलिडॅरिटी कामगार संघटनाच बरखास्त केली. मात्र कोणतेही आर्थिक प्रश्न सोडविले नाहीत म्हणून पोलंड दिवाळखोरीच्या गर्तेत ओढला गेला. या वेळी रशियाने आर्थिक मदत करणे अपेक्षित होते. रशियाचीही परिस्थिती वाईटच होती. यारुझेल्स्कीने लष्करी कायदा रद्द करून नवे कायदे केले. घटनेत दुरुस्त्या केल्या. तरीही जनतेला खरे स्वातंत्र्य मिळाले नाही. पोपने व ख्रिस्ती धर्मपीठानीही यारुझेल्स्की सरकारवर दडपण आणून पोलंड जनतेला स्वातंत्र्य देण्याचा प्रयत्न केला.

दरम्यानच्या काळात वालॅन्सारची सॉलिडॅरिटी कामगार संघटना प्रबळ होत गेली. तिथे अनेक मागण्या मागत सरकारवर दबाव वाढविला. सरकारने रशियाची मदत घेऊन सॉलिडॅरिटी कामगार आंदोलन दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. मात्र, संघटना दडपली गेली नाही. याच काळात रशियाने गोर्बाचेव्ह सत्तेवर आला त्याने जनआंदोलने दडपली जाणार नाहीत हे जाहीर केल्याने यारुझेल्स्करीस सॅलिडॅरिटीशी तडजोड करावी लागली व निवडणुका घेण्यास समंती द्यावी लागली. त्यानुसार जून १९८९ मध्ये निवडणुका घेण्यात आल्या. सॉलिडॅरिटी बहुमताने निवडून आले. नंतर अध्यपदाची निवडणूक झाली त्याने सॉलिडॅरिटी कामगार संघटना नेते लेक वॉलेन्सा निवडून आले व अखेर कम्युनिस्ट मिरासदारी संपली.

### ८.२.२.१३ जर्मनीचे एकीकरण

१८७०-७१ मध्ये बिस्मार्कने जर्मनीचे एकीकरण घडवून आले होते. परंतु पहिल्या महायुद्धाला जर्मनीला जबाबदार धरून जर्मनीवर १९१९ मध्ये अन्यायकारक व्हर्सायचा तह लादला गेला. याच अन्यायकारक व्हर्सायचा तहाचा बदला घेण्याच्या उद्देशातून जर्मनीत नाझी हुकूमशाहीचा उदय झाला. याच हिटलरच्या नाझी हुकूमशाही भस्मासूराने जगात दुसऱ्या महायुद्धाचा स्फोट घडवून आणला. मात्र रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स या दोस्त

राष्ट्रांनी विजयी घोडदौड करीत जर्मनीची पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी अशी विभागणी केली. पूर्व जर्मनीवर रशियाचा तर पश्चिम जर्मनीवर अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स चा प्रभाव निर्माण करून जर्मनीची विभागणी केली. अर्थात या विभागणीत जर्मनीचे राजधानीचे शहर बर्लिनचीही पूर्व व पश्चिम जर्मनीत विभागणी केली गेली. रशियाच्या समाजवादी प्रभावाखाली पूर्व जर्मनी व अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स यांच्या भांडवलशाही प्रभावाखाली पश्चिम जर्मनी अशी ही अनैसर्गिक कृत्रीम विभागणी होती. पूर्व जर्मनीत खुली, मुक्त सुधारणांना हात घालणारी सरकारी व्यवस्था याचा परिणाम असा झाला की, पश्चिम जर्मनीचा विकास झाला. पूर्व जर्मनीची मात्र समाजवादी व्यवस्थेमुळे सर्वत्र अधोगती झाली. त्यातून पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी अंतर आपोआप वाढत गेले. पूर्व भागात लष्करावरच जास्तीत जास्त खर्च होत होता तर पश्चिम जर्मनीत सुधारणांवर भर होता. पूर्व जर्मनीत लोकाचे राहणीमान कमालीचे खालावले होते. तर पश्चिम जर्मनीत लोकांच्या राहणीमानात कमालीची सुधारणा होती. हा फरक सर्वच क्षेत्रात दिसत होता. त्यामुळे पूर्व जर्मनीतून लोक मोठ्या प्रमाणार पश्चिम जर्मनीत स्थलांतर करू लागले. ही संख्या लाखांच्या घरात गेली. त्यावर उपाय योजना म्हणून कम्युनिस्ट नेत्यांनी १९६१ मध्ये बर्लिन शहरालाच दोन भागत वाटून टाकणारी ऐतिहासिक अशी भिंत बांधली. जर्मनीच्या व बर्लिनच्या विभाजनाचा मूर्तिमंत पुरावा म्हणजे ही भिंत. तिच्या दोन्ही बाजूचा १०० मिटरचा भाग निर्मनुष्य केला गेला होता. भिंत ओलांडणाऱ्यास गोळ्याघातल्या जात. जर्मन भिंत उभारणारा होनेकर १९७१ मध्ये पूर्व जर्मनीचा प्रमुख बनला. त्याने औद्योगिकरणाचे धोरण आणून कारखानदारी वाढवली. मात्र, थोड्याच काळात त्याचे धोरण फसले. त्यांच्या काळात पूर्व जर्मनीचा विकास खुंटला. उलट पश्चिम जर्मनीने विज्ञानाच्या व तंत्रज्ञानाच्या जोरावर आश्चर्यकारक प्रगती केली. प्रसंगी प्रगत राष्ट्रांचे सहकार्यही घेतले. उद्योगधंदे शास्त्रस सरकार, परकीयमत यांच्या समन्वय घडवून आणला. अमेरिकेने युरोपीयन राष्ट्रांच्या पुर्नरचनेसाठी लागू केलेल्या मार्शल योजनेचाही पश्चिम जर्मनीला लाभ झाला. पश्चिम जर्मनीत चॅन्सलर पदी विली ब्रांट आल्यावर त्याने पश्चिम जर्मनी व रशिया संबंधात सहकार्याचे धोरण आणले. त्यातून रशियाचे ब्रेझनेव्ह व विली ब्रांट यांच्यात आर्थिक व राजकीय सहजीवनाचा नवा अध्याय सुरू झाला. विली ब्रांटने रशिया बरोबरच पूर्व युरोपातील कम्युनिस्ट राजवटीशी ही सहकार्य धोरण सुरू केले. त्यामुळे पूर्व जर्मनीतील अधिकारी, सरकार यांना पश्चिम जर्मनीशी विरोधाचे धोरण अवलंबणे अवघड झाले. जर्मनीची फाळणी जनतेला असह्य होऊ लागली. पश्चिम जर्मनीची आर्थिक क्षेत्रातील आघाडी पूर्व जर्मन नागरिकांना अकर्षित करीत होती. मात्र, राजकीय व्यवस्था बदलल्याशिवाय ते शक्य नव्हते. ती बदलण्याच्या दृष्टीने विली ब्रांट यांनी रशिया व पश्चिम जर्मनी सहकार्याचा करार करून पावले टाकली. याच वेळी पूर्व बर्लीनमध्ये ब्रेझनेव्हच्या मार्गदर्शनाखाली कम्युनिस्ट काँग्रेसचे अधिवेशन भरले. या अधिवेशनात समाजवादी ध्येयप्राप्तीसाठी कोणता मार्ग अवलंबवावा या बद्दल कम्युनिस्ट राष्ट्रांतच मतभिन्नता पुढे आली. काही राष्ट्रांनी कामगारांच्या हुकूमशाहीचा प्रस्थापित मार्ग तर फ्रेंच कम्युनिस्टांनी संसदीय लोकशाहीच्या मार्गावर विश्वास व्यक्त केला. त्यामुळे कम्युनिस्ट राष्ट्रांच्या तटबंदीलाच खिंडार पडले. त्यातून बर्लीनच्या भिंत रूपी तटबंदीलाच तडा गेला.

रशियात गोर्बाचेव्ह सत्तेवर आल्यावर त्याचा व त्यांच्या धोरणांचा परिणाम पूर्व

जर्मनीतील कम्युनिस्ट राजवटीवरही झाला. १९८९ मध्ये गोर्बाचेव्हने पूर्व जर्मनीस भेट दिली. तेव्हा त्यांनी बर्लीन भिंत काढून टाकण्याची तयारी दर्शविली. पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणारा लोकांचा लोंढा रोखण्यासाठी ही भिंत उभारली होती. मात्र, भिंतीमुळे हा लोंढा फारसा रोखता आला नव्हता. गोर्बाचेव्हच्या नव्या धोरणांमुळे कम्युनिस्ट देशात होत असलेले बदल पाहून पूर्व जर्मनीतील राज्यकर्त्यांविषयी जनतेत नाराजी पसरली. शिवाय पूर्वेकडून पश्चिमेकडे स्थलांतरही वाढले. भावनिकदृष्ट्या भिंत लोकांनी कधीच उद्ध्वस्त केली. लोंढे थांबले नाहीत. कम्युनिस्ट व्यवस्था ते थोपू शकली नाही. गोर्बाचेव्हने कम्युनिस्ट राजवटीत होत असलेले जनआंदोलने दडपून टाकण्यासाठी कोणतेही सहाय्य दिले जाणार नाही हे जाहीर झाल्यावर तर पूर्व जर्मनीचा रशियाचा आधारच तुटला. त्यातच होनेकरच्या सत्तात्यागाने क्रेन्झ सत्तेवर आले. मात्र क्रेन्झ व कम्युनिस्ट पक्ष जनआंदोलने दडपूही शकले नाहीत व लोकमानसात स्थानही मिळवू शकले नाहीत. या परिस्थितीत एकच पर्याच समोर दिसत होता. तो म्हणजे पूर्व व पश्चिम जर्मनी एकीकरण आणि तसेच झाले. अठ्ठावीस वर्षांपूर्वी उभी केलेली भिंत ९ नोव्हेंबर १९८९ रोजी जनतेपुढे हार खाऊन पूर्व जर्मन सरकारनेच पाडण्यास सुरुवात केली. मार्च १९९० मध्ये पूर्व जर्मनीत झालेल्या निवडणुकीत एकीकरणाच्या दिशेने जनमताने कौल दिला, त्याला सर्व बाजूंनी पाठिंबा मिळून २ जुलै १९९० रोजी जर्मनीत एकच चलन आले. पुढे ३ ऑक्टोबर १९९० रोजी अधिकृत घोषणा होऊन पूर्व-पश्चिम जर्मनी विलय झाला व जर्मनीला जर्मन लोकशाही प्रजासत्ताक नाव मिळाले व जर्मनीचा पुर्नजन्म झाला.

## ८.२.२.१४ शीतयुद्धाचा शेवट

दुसऱ्या महायुद्धानंतर चार दशकात १९५१-९१ जगभर शीतयुद्धाचे तांडव चालू होते. संपूर्ण जग तिसऱ्या महायुद्धाच्या मुखावर उभे होते. रशिया-अमेरिका या साम्राज्यवादी असुरी महत्त्वाकांक्षी महासत्ता सर्वत्र थैमान घालीत होत्या. त्यांच्या भयंकर कृतीला वेसण घालण्याची शक्ती अस्तित्वात नव्हती. जगातील जनता भविष्यकालीन युद्धाच्या काल्पनिक संहाराने व्याकूळ होती. कारण प्रमुख देश शस्त्रसज्ज होते व अण्वस्त्र वापराची भाषा करीत होते. हा नवसाम्राज्यवादाचा क्रुर चेहराच होता. युद्धोत्तर आंतरराष्ट्रीय नीतीचे स्वरूप होते. सर्व जग समाजवादी रशियाच्या व भांडवलशाही अमेरिकेच्या गटात विभागलेले होते. अलिप्ततावादी देशही प्रत्यक्ष अप्रत्यक्ष या दोन गटात ओढले गेले होते. सुदैवाने जगातल्या निरपराध लोकांचे नशीब बलवत्तर होते. म्हणून रशिया दुबळा झाला. समाजवादी विस्ताराला पायबंद बसला. अमेरिकेच्या विरोधाची धार बोथट झाली. रशिया, अमेरिका वैर संपुष्टात आले. महासत्तांना जागतिक शांततेची महती पटली व अल्पकाळात शीतयुद्धाचा प्रभाव संपला. जगातला समतोल बदलला. ह्या शीतयुद्धाचा सविस्तर वृत्तात आपण कथन केलाच आहे. येथे फक्त आपण शीतयुद्ध संपुष्टात येण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या घटकांच्या/ कारणांचा आढावा घेऊ.

### १) रशियाचा शक्तीपात

शीतुद्धाचा उदय रशियाच्या कृतीने झाला व शेवटही रशियाच्या परिस्थिमुळेच

झाला. हा एक योगायोगच म्हणावा लागले. १९१७ च्या बोल्शेव्हीक क्रांतीनंतर रशियाने देशांतर्गत प्रचंड दडपशाही करून समाजवादी राजवट स्थिर केली व आश्चर्यकारक भौतिक प्रगती साधली. परंतु समाजवादी दडपशाहीमुळे नागरिकांत असंतोष धुमसत होता आणि गोर्बाचेव्हची उदारमतवादी राजवट सुरू होताच असंतोषाचा उद्रेक झाला. रशियन साम्राज्यातून १५ संघराज्ये बाहेर पडली व स्वतंत्र झाली. उन्नतीला व भौतिक समृद्धीला खीळ बसली. त्यातून रशियाचा देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय राजकारणातील दबदबा नाहीसा झाला. जागतिक समाजवादाच्या विस्ताराला पायबंद बसला. अनेक देश समाजवादी पंजातून मुक्त झाले. स्वत: गोर्बाचेव्हने या मुक्ती लढ्याला हातभार लावला व विविध देशांना स्वातंत्र्य बहाल केले. अनेक देशातील रशियन फौजा माघारी फिरल्या अमेरिका, चीनशी चालू असलेल्या शस्त्रास्त्र, अवकाश संशोधन व अन्वस्त्र स्पर्धेला आवर घातला व ह्या देशांशी सलोख्याचे संबंध निर्माण केले. रशियन सामार्थ्याचा पोकळपणाही जगासमोर आला. सर्व मार्गांनी समाजवादाची पिछेहाट झाली व रशियाचे महासत्तापण गेले. पर्यायाने अमेरिकेचा प्रतिस्पर्धी नाहीसा झाला. शीतयुद्ध थंडावले. किंबहूना संपले. हे केवळ रशियाच्या शक्तीपाताने झाले.

## २) युरोपियन संघाची स्थापना

१९५० नंतर रशियाने मोठ्या प्रमाणावर समाजवादाचा प्रसार केला व अल्पावधीत पोलंड, पूर्व जर्मनी, झेकोस्लोव्हाकिया, युगोस्लाव्हिया, ऑस्ट्रिया, हंगेरी, बल्गेरिया, अल्बानिया, रुमानिया, ग्रीस या देशात समाजवादी राजवटी स्थापन झाल्या व तेथे रशियाची दडशाही सुरू झाली. त्यामुळे उर्वरित जग भयभीत झाले. कारण ही राष्ट्रे भांडवलशाही व लोकशाहीवादी होती. त्यांनी समाजवादापासून स्वत:ला लांब व आपली सुटका करून घेण्यासाठी संरक्षक तह, अमेरिकेचे सहाय्य व युरोपीयन देशांची संघटना ह्या तीन प्रकाराने उपाययोजना आमलात आणल्या. त्यात अमेरिकेच्या पुढाकाराने सिटो, नाटो, सिंटो हे लष्करी करार केले. त्यात युरोपीय राष्ट्रे सहभागी झाली. शिवाय पश्चिम युरोपिय राष्ट्रांनी व्यापार, उद्योगधंदे व आर्थिक व्यवहार संघटित करण्याच्या उद्देशाने १९५७ मध्ये European Economic community (ECE) ची स्थापना केली. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, बेल्जीयम, फिनलँड इत्यादी १५ राष्ट्रे ह्या संघात सामिल झाले. त्यांनी समाजवादाचा प्रतिकार सुरू केला. १९५७ ते १९९५ पर्यत हा संघ प्रभावी होता. मात्र, २० व्या शतकाच्या शेवटी समाजवादाचा प्रभाव संपुष्टात आल्यावर पश्चिम युरोपातील सर्व राष्ट्रांनी 'युरो' नावाचे एकच चलन आमलात आणले. त्यामुळे युरोपीयन राष्ट्रांचे लष्करी करार व युरोपातील आर्थिक संघटना यांच्यामुळे रशियाच्या समाजवादाला विरोध करणारा शक्तीशाली गट तयार झाला. त्या गटांनी समाजवादाला पायबंद घातला. त्यातून पूर्व युरोपातील समाजवादी गट दुबळा बनला. त्याचा धक्का रशियाच्या सामर्थ्याला बसून शीतयुद्धाचा शेवट झाला.

## ३) राष्ट्रवादी लढे व तिसऱ्या शक्तीचा उदय

१९९० पर्यंत प्रखर राष्ट्रवादी चळवळी होऊन जवळपास सर्व देश स्वतंत्र झाले होते. मात्र, या राष्ट्रांसमोर आर्थिक अनंत समस्या होत्या. रशिया व अमेरिका या महासत्तांनी यांचा फायदा घेऊन या राष्ट्रांना अर्थसहाय्य व इतर प्रकारची मदत केली. यामागे या दोनही

महासत्ताचा स्वार्थी व वर्चस्व प्रथापित करण्याचा डाव होता. तो या राष्ट्रांना लक्षात आल्यावर त्यांच्या स्वार्थी व घातकी नीतीला पायबंद घालण्यासाठी आशियायी राष्ट्रांनी प्रयत्न सुरू केले. त्यात भारताने पुढाकार घेऊन अलिप्ततावादी राष्ट्रीय चळवळ सुरू केली. १९५५ मध्ये नेहरुंनी बांटुंग येथे आफ्रिकी-आशियायी राष्ट्रांची परिषद भरविली. त्यात अमेरिका व रशियाच्या गटात सामिल न होणे, स्वतंत्र व स्वालंबीपणाने स्वराष्ट्रांची उन्नती साधणे, आंतरराष्ट्रीय प्रश्न युद्धाच्या मार्गाऐवजी अहिंसा, शांतता, चर्चा या विधायक मार्गाने सोडविणे व कोणत्याही लष्करी करारात भाग न घेणे ही उद्दीष्ट्ये ठरविली गेली. पुढे १९८५ मध्ये भारताच्या शेजारील राष्ट्रांची सार्क संघटना स्थापन झाली. 'चीन' या महासत्तेचा उदय झाला व त्यातून आशियाची व आफ्रिकी राष्ट्रांची तिसरी शक्तीच जन्माला आली. या शक्तीच्या रुपाने महासत्तांच्या सत्ता स्पर्धेला व शीतयुद्धाच्या राजकारणाला पायबंद घातला गेला. त्यातून शीत युद्धाचा शेवट झाला.

### ४) समाजवादी विस्ताराला व अमेरिकन प्रभावला विरोध

रशियाच्या समाजवादी महत्त्वाकांक्षेतून शीतयुद्धाचा प्रारंभ झाला व या समाजवादी विस्तारातून जागाची मुक्तता करावी हे निमित्त साधून अमेरिकेने साम्राज्यवादाला हात घातला. दोघा सत्ताची विविधांगी स्पर्धा सुरू झाली. दोघांना सुरुवातीला परिस्थिती अनुकूल होती. कालांतराने तिच्यात बदल झाला व आशियायी राष्ट्रांची अलिप्ततावादी चळवळ पुढे आली. चीनचा महासत्ता म्हणून उदयास आला. जपानचे आर्थिक सामर्थ्याचे आवाहन उभे राहिले. आशियायी व आफ्रिकी राष्ट्रे सामर्थ्यशाली, स्वावलंबी व अण्वस्त्रयुक्त बनले. पश्चिम आशियात तेलोत्पादक देशांचे सामर्थ्य वाढले व महासत्ताना ठिकठिकाणी प्रखर विरोध सुरू झाला. त्यांची आत्मघातकी, स्वार्थी, कुटील धोरणे अपयशी ठरू लागली. पूर्व युरोपात प्रस्थापित रशियाच्या समाजवादी प्रभावाला विरोध सुरू झाला. उठाव झाले, त्यातून ते स्वतंत्र होऊ लागले. जर्मनीचेही एकीकरण झाले. कोरियाने महासत्तांचे दडपण झुगारले. क्युबात अमेरिकेला माघार घ्यावी लागली. व्हिएटनाममध्ये अमेरिकेला अपयश आले. सद्दाम हुसेनने अमेरिकेची दमछाक केली. चीनला अमेरिका आवर घालू शकली नाही. उलट समन्वय साधण्यासाठी चिनला युनोचे कायम सदस्यत्त्व देण्याची पाळी अमेरिकेवर आली. इजिप्तने महासत्तांचे वर्चस्व झुगारले. अरब-इस्त्राईल युद्धाने महासत्ताचे अपयश स्पष्ट झाले. एकूणच रशिया व अमेरिकेचा प्रभाव नाकारला गेला. त्यातून शीतदयुद्ध संपुष्टात आली.

### ८) शस्त्रास्त्र प्रतिबंध नीती

दोन महायुद्धांमुळे जग होरपळून निघाल्यावर पुन्हा महायुद्ध होऊ नये ही जगाची व मानव समाजाची तीव्र इच्छा होती. त्यासाठीच युनोची स्थापना झाली व जागतिक शांतता व सहाकार्य निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. मात्र, रशिया व अमेरिका या महासत्तांनी छुप्या साम्राज्यवादाला हात घालून जगालाच शीत युद्धात लोटले. जवळ जवळ अर्धा शतक जग या शीतयुद्धाच्या छायेखाली आला. मात्र, आधी सांगितल्याप्रमाणे लवकरच परिस्थिती पालटत गेली. रशिया अमेरिका व चीनला आत्मपरिक्षण करून शस्त्रास्त्र स्पर्धा नष्ट करण्याच्या दृष्टीने पावले टाकली. कारण जग या काळात शस्त्रास्त्र व अण्वस्त्र निर्मिती कार्याकडेच वळले

होते. त्यातून जगात जीवघेणी स्पर्धा सुरू झाली होती. वेळीच जगाने या दोन महासत्ताना या संकटांच्या भीषणतेची ओळख करून दिली व रशिया अमेरिका यांनाही या भीषणतेची जाणीव झाली. त्यातून अण्वस्त्र निर्मितीला प्रतिबंध व अणुशक्तीचा विधायक वापर याबाबत जगात काही करार पुढे आले.

१) १९४६ मध्ये बर्नार्ड बरूच्या नेतृत्त्वाखाली कमिशन योजना आली. Internal Atomic Energy Agency (I.A.E.A.) त्यात अण्वस्त्र निर्मितीला प्रतिबंध व अणुशक्तीच्या विधायक वापर यावर भर देण्यात आला.

२) १९६३ मध्ये Limited Nucler Test Ban Treaty (N.T.B.T.) करार झाला व जल आणि आकाशात अणुचाचण्या करू नयेत व अणुशक्तीचा राष्ट्रीय विकासासाठी उपयोग करावा हा या कराराचा आशय होता.

३) १९६७ मध्ये The nucler non-proliferation treaty (N.N.P.T.) करार झाला. १७० देशांनी तो मान्य केला भारत व पाकिस्तानने नाकारला. या करारात शस्त्रास्त्र नष्ट करणे. क्षेपणास्त्रांवर बंदी घालणे. इत्यादी गोष्टींना प्राधान्य देण्यात आले.

४) १९७२ मध्ये Antiballistic Missile Treaty (A.B.M.T.) या करारान्वये रशिया व अमेरिका यांच्या जवळ असलेल्या क्षेपणास्त्राच्या नष्टतेवर विचार झाला.

५) १९८७ मध्ये Intermedial Nucler Force Treate (I.N.F.T.) करारान्वये ५०० ते ६००० कि. मी. पर्यत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रावर निर्बंध घालण्यात आले.

६) १९९१ व १९९३ मध्ये Strategic Arms Reduction Talk (START-I & START-II) हे करार झाले. या करारातही क्षेपणास्त्रावर निर्बंध घातले गेले.

७) १९९२ मध्ये Comprehensive Test Ban Traty (C.T.B.T.) हा अण्वस्त्र करार करून भूमिगत अणुचाचण्यावर प्रतिबंध घालण्यात आला. चीनने मात्र तो अमान्य केला.

या वरील कारांबरोबरच दळणवळण विषयक उपग्रहाच्या व रासायनिक शस्त्रास्त्रांच्या युद्धविषयक वापरावर बंदी घालणारे डञ्ख, डढअठ, थअठड, उइथ, उझउथ असे करारही झाले. वरील सर्व करारांमुळे संहारक शस्त्र वापरावर मर्यादा पडल्या त्यातून शीतयुद्धाची तीव्रता संपली.

## ६) रशिया–अमेरिका–चीन समन्वय

१९५० ते १९९० पर्यंत अमेरिका व रशिया या दोन सत्तांमध्ये अण्वस्त्र, शस्त्रास्त्र, क्षेपणास्त्र अवकाश संशोधन, समाजवाद व भांडवलशाही विस्तार इत्यादी विविध क्षेत्रात भीषण व जीवघेणी स्पर्धा होती. वरील करारान्वये दोन देशामधील स्पर्धा, ईर्षा व तणाव कमी झाला. याच दरम्यान जागतिक राजकारणात चीनचा महासत्ता म्हणून उदय झाल्याने चीन–रशिया–अमेरिका यांच्यातल्या तणावपूर्ण संबंधाने पुन्हा शीतयुद्धाची तीव्रता वाढली होती. परंतु १९९० नंतर मात्र परिस्थितीत कमालीचे परिवर्तन होत गेले. रशिया–चीन, रशिया–अमेरिका, अमेरिका–रशिया, चीन–अमेरिका यांच्यात परस्पर समन्वय निर्माण झाला. म्हणजेच रशियाची दुर्बलता, तीन महासत्ताचा समन्वय व आंतरराष्ट्रीय घडामोडी शीतयुद्धात शेवट होण्यास कारणीभूत ठरली.

## ७) जागतिक नवा सत्तासमतोल

पहिल्या महायुद्धानंतर इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, इटली, रशिया ह्या जागतिक महासत्ता होत्या. त्याच्या भोवती जागतिक राजकारण केंद्रित होते. दुसऱ्या महायुद्धानंतर मात्र ती जागा रशिया, अमेरिका या राष्ट्रांनी घेतली. यांच्या समाजवाद व भांडवलशाही व्यवस्था विस्तारावरून जगात शीतयुद्ध रुपी स्पर्धा सुरू झाली. यात पुन्हा चीन या महासत्तेचा तिसरी शक्ती म्हणून भर पडली. तरीही जागतिक राजकारणाचे रशिया व अमेरिका असे द्विध्रुवीकरण तसेच राहिले. १९९१ नंतर मात्र रशिया दुबळा बनला. त्याचा समाजवादी जगावरचा प्रभावही नष्ट झाला. त्यातून शीतयुद्ध संपुष्टात आले. त्यामुळे अमेरिका ही जगातील सर्वोच्च सत्ता राहिली. म्हणजेच सत्तेच एकध्रुवीकरण झाले व आंतरराष्ट्रीय१ राजकारणातील ही आजची सद्यस्थिती आहे. म्हणजेच जागतीक नवा स्तर समतोल शीतयुद्धाच्या समाप्तीस बऱ्याच अंशी कारणीभूत दिसतो.

## ८) जागतिकीकरण

जागतिकीकरण हे शीतयुद्ध समाप्तीचे गंभीर कारण १९९१ नंतर रशियाच्या समाजवादी गाटाचा प्रभाव नष्ट झाला. जगात अमेरिकेला प्रतिस्पर्धी उरला नाही. जागतिक राजकारणाचे व अर्थकारणाचे एकध्रुवीकरण झाले. जगात सर्वत्र अमेरिकेचे वर्चस्व स्थापित झाले. शीतयुद्ध समाप्तीनंतर अमेरिकेला राजकीय प्रभुत्त्वाची गरज उरली नाही. मात्र जगातल्या जास्तीतजास्त देशावर आपले आर्थिक वर्चस्व असावे असा तीने खटाटोप चालविला व त्यादृष्टीने व्यापार, उद्योग, शेतीउत्पादने, विक्री, सेवा, बँका, तंत्रज्ञान, दळणवळण, प्रसारमाध्यमे व एकूण जागतिक अर्थव्यवस्थेवर आपला प्रभाव निर्माण करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. या तिच्या नव्या आर्थिक साम्राज्यवादाला ‘जागतिकीकरण’ असे गोंडस नाव तीने दिले. सुदैवाने सर्व भांडवलशाही राष्ट्रे तिच्या पाठीशी उभी आहेत. इंग्लंड, फ्रान्स, जपान इत्यादी अनेक राष्ट्रे या योजनेला सहमती देत आहेत. ह्या जोरावर हवी ती अर्थनीती, अर्थव्यवस्था व अर्थव्यवहार अमलात येत आहेत. युरो, नाणेनिधी, जागतिक बँक, व WTO ह्या माध्यमातून अमेरिका आदी पुढारलेले देश इतर जगावर वेळोवेळी दडपणे आणून आपले वर्चस्व करीत आहेत. अनेक देश या जागतिकरणाचे बळी ठरत आहेत. याचाच अर्थ शीतयुद्धाच्या समाप्तीसाठीही व शीतयुद्धानंतरच्या या दुष्परिणामासाठीही जागतिकीकरण कारणीभूत ठरले आहे हे दिसते.

## ८.३ स्वयअ-अध्ययनासाठी प्रश्न

**पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगून कंसात (x) किंवा (?) अशी खूण करा.**

१) दुसऱ्या महायुद्धानंतरचा काळ हा शीतयुद्धाचा काळ मानला जाता. (-------)

२) दुसऱ्या महायुद्धानंतर रशिया व जपान या दोन महासत्तांचा जन्म झाला.(-----)

३) लेनीन, स्टॅलिन व ट्रॉट्स्की या नेत्यांनी रशियात व जगात समाजवादी तत्त्वज्ञान

विकसीत केले. (-------)

४) क्रश्चेव्ह व गोर्बाचेव्ह या नेत्यांनी रशियात व जगात समाजवादी तत्त्वज्ञान विकसीत केले. (-------)

५) समाजवादी तत्त्वज्ञान कार्ल-मार्क्सच्या तत्त्वज्ञानावर आधारीत होते. (-------)

६) कार्ल-मार्क्सने साम्यवादास शास्त्रीय समाजवाद म्हटले आहे. (-------)

७) समाजवाद हे सामाजिकशास्त्र असल्याने सदा सर्वकाळ निष्कर्ष सारखेच असतात. (-------)

८) कार्ल-मार्क्सच्या मते समाजातला कलह हा गरीब व श्रीमंत यांच्यातला असतो

९) समाजवाद म्हणजे खाजगी मालमत्तेला उत्तेजन. (-------)

१०) समाजवादाच्या विघटनास रशिया अजिबात जबाबदार नाही. (-------)

११) गोर्बाचेव्ह यांनी पेरिस्त्रोयका व ग्लासनोस्त या तत्त्वाचे समर्थन केले. (-------)

१२) जागतिक समाजवादावर गोर्बाचेन्ह यांनी पेरिस्त्रोयका व ग्लासनोस्त या तत्त्वांनी आघात केला. (-------)

१३) समाजवादी व लोकशाही तत्त्वज्ञान परस्पर पुरक आहेत. (-------)

१४) समाजवादी व हुकूशाही तत्त्वज्ञान परस्पर पुरक आहेत. (-------)

१५) समाजवादी तत्त्वज्ञानात मानवी हक्कांना प्राधान्य असते. (-------)

१६) शीतयुद्धात अण्वस्त्रांचा वापर केला जातो. (-------)

१७) शीतयुद्ध अवकाशात खेळले जाते. (-------)

१८) रशिया व अमेरिका या दोन महासतेतच्या उदयातून शीतयुद्धाचा उदय झाला. (-------)

१९) लेनीन ग्रार्ड, स्टॅलिन ग्रार्ड ही शहराची नावे होती. (-------)

२०) रशिया, अमेरिका व चीन यांच्यातील समन्वयाने शीतयुद्धाचा शेवट झाला. (-------)

## ८.४ सारांश

समाजवादी गटाच्या विभाजनाची पार्श्वभूमी विभाजनाची प्रारंभीची प्रक्रिया, प्रत्यक्ष समाजवादी गटाचे विघटन होण्याची कारणे मिखाईल गोर्बाचेव्हचे धोरण. १९८६ ते १९९१ या काळात घडलेल्या प्रमुख घटना, सोव्हिएट रिपब्लिक ऑफ रशियाची घोषणा. घटना दुरुस्ती, जागतिक राजकारणातील बदल, कंठित समाजवादी अर्थव्यवस्था, शीतयुद्धाचा शेवट रशिया-अमेरिका-चीन समन्वय जागतिक नवा सत्तासमतोल व जागतिकीकरणाचा उदय, इत्यादी घटकाची सविस्तर मांडणी करून प्रत्येक उपघटक सविस्तरपणे मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

## ८.५ प्रारिभाषिक शब्द

### पेरिस्त्रोईका

पेरिस्त्रोईका म्हणजेच पुर्नरचना या तत्त्वाचा रशियात गोर्बाचेव्हने स्वीकार केला. लेनीन, स्टॅनीन व स्ट्रॉटस्की यांनी समाजवाद आमलात आणण्याचा जो मार्ग रशियासमोर ठेवला होता तो गोर्बाचेव्हला दिवाळखोर वाटत होता. म्हणूनच १९८६ मध्ये गोर्बाचेन्हने रशियाची अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी जो मार्ग ठेवला तो मार्ग म्हणजेच पुर्नरचना होय.

### ग्लासनोस्त

ग्लासनोस्त म्हणजेच खुलेपणाचे धोरण. या धोरणाचाही रशियात गोर्बाचेव्हने स्वीकार केला व रशियात अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी खुल्या अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. पुर्नरचना सोबत खुलेपणाचे धोरण जाहीर केले. त्यातून सोव्हिएट रशियात आर्थिक व राजकीय उलथापालथ झाली व सोव्हिएट युनियनचे समाजवादी प्रजसत्ताक कोसळले.

### शीतयुद्ध

दुसऱ्या महायुद्धानंतर भांडवलशाही व साम्यवादी विचारसरणीच्या राष्ट्रांच्या वैचारिक संघर्षाला शीतयुद्ध ही संज्ञा दिली जाते. या संघर्षात प्रत्यक्ष युद्ध न होता युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली. प्रामुख्याने १९४५-६४ हा शीतयुद्धाच्या तीव्रतेचा कालखंड समजला जातो.

### शस्त्रास्त्र प्रतिबंधक नीती

दोन महायुद्धांमुळे जग होरपळून निघाल्यावर पुन्हा महायुद्ध होऊ नये ही जगाची व मानव समाजाची तीव्र इच्छा होती. त्यातून युनोची स्थापना झाली. मात्र तरीही रशिया व अमेरिकेने छुप्या साम्राज्यवादाला हात घातला. जग शीतयुद्धात लोटले गेले. ही परिस्थितीही पालटली गेली. त्यातून रशिया, अमेरिका चीन या राष्ट्रांनी आत्मपरिक्षण करून शस्त्रास्त्र स्पर्धा नष्ट करण्याच्या दृष्टीने पावले टाकली. त्यातून शस्त्रास्त्र प्रतिबंध नीती पुढे आली.

## ८.६ संदर्भ सूची

१) डॉ. आचार्य धनंजय, विसाव्या शतकातील जग - श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

२) HIS २८३ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, सार्क देशांचे इतिहास

३) डॉ. तांबोळी एन.एस. राजन्स्वाती - पहिल्या महायुद्धानंतरचे जग (१९१८ ते १९२२) निराली प्रकाशन

४) प्रा. वाईकर अनंत - आंतरराष्ट्रीय राजकारण, निराली प्रकाशन

५) प्रा. जोशी पी. जी. विसाव्या शतकाचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर

६) डॉ. आठल्ये विभा आधुनिक भारत व आधुनिक युरोप, अंशुल पब्लिकेशन्स, नागपूर

७) प्रा. कुलकर्णी बी. वाय. आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या प्रकाशन, नागपूर

८) दीक्षित नी. सी. युरोपचा इतिहास, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर

९) प्राचार्य कदम य. ना. – समकालीन आधुनिक जग (१९४५, २०००) फडके प्रकाशन, कोल्हापूर

१०) डॉ. देवळाणकर शैलेंद्र – आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबादफ

## ८.७ सरावासाठी स्वाध्याय

१) समाजवादी गटाच्या विभाजनाची पार्श्वभूमी स्पष्ट करून विभाजनाच्या प्रक्रियेचा सविस्तर आढावा घ्या.

२) समाजवादी गटाच्या विभाजनास कारणीभूत ठरलेल्या कारणांचा आढावा घ्या.

३) मिखाईल गोर्बाचेव्हची भूमिका सविस्तर स्पष्ट करा.

४) जागतिक राजकारणातील बदलाचा समाजवादी व्यवस्थेवर झालेल्या परिणामांची चर्चा करा.

५) शीतयुद्ध संपुष्टात येण्यासाठी कारणीभूत ठरलेल्या कारणांचा आढावा घ्या.

# घटक-९
# जागतिकीकरण आणि एकध्रुवीकरण प्रणाली

**अनुक्रमाणिका**


९.० उद्दिष्टे

९.१ प्रस्तावना

९.२ विषय विवेचन

 ९.२.१ जागतिकीकरण

 ९.२.२ असंतुलित विकास

 ९.२.३ आंतकवादाची समस्या

९.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

९.४ सारांश

९.५ पारिभाषिक शब्द

९.६ संदर्भ सूची

९.७ सरावासाठी प्रश्न


## ९.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१. जागतिकीकरणाचे अर्थ, स्वरूप, व्याख्या याचे आकलन होईल

२. जागतिकीकरणाच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रभावाची ओळख होईल

३. जागतिकीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये समजतील

४. जागतिकीकरणामुळे झालेल्या असंतुलित विकासाची ओळख होईल

५. जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम समजतील

६. एकध्रुवीकरण प्रणाली म्हणजे काय याचा अर्थबोध होईल

७. एकध्रुवीकरणाचे स्वरूप समजण्यास मदत होईल

८. एकध्रुवीकरणाची तत्त्वे व वैशिष्ट्ये समजून घेता येतील

९. आंतरराष्ट्रीय राजकारणातील सध्याची अमेरिकेची भूमिका अचूक समजण्यास मदत होईल

१०. आतंकवादाच्या समस्येचा अर्थ व स्वरूप समजण्यास मदत होईल

११. आतंकवादाची उद्दिष्टे, वैशिष्ट्ये कळतील

१२. आतंकवादाच्या प्रकारांची अचूक ओळख होईल

१३. आतंकवादाची साधने समजण्यास मदत होईल

१४. आतंकवादाला विरोध व संघर्ष भूमिका समजून घेता येईल

१५. संयुक्त राष्ट्रसंघाचे आतंकवादी विरोधी मोहिमेतील विभाग समजतील

१६. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आतंकवादी विरोधी धोरणातील अडथळे समजण्यास मदत होईल

## ९.१ प्रस्तावना

जागतिकीकरण आणि एकध्रुवीकरण प्रणालीची चर्चा आज चांगल्या व वाईट या दोन्ही अर्थाने सर्वत्र होताना दिसते. शीतयुद्धोत्तर काळात निर्माण झालेल्या नवीन विश्‍वरचनेमध्ये या दोन्ही प्रणालींचा प्रभाव वाढला असून, त्या अपरिहार्य बनल्या आहेत. विशेष म्हणजे दोन्ही प्रणाली जगातील सर्व राष्ट्रांच्या व जनतेच्या जीवनाला प्रभावित करत आहेत. जागतिकीकरणाच्या व एकध्रुवीकरणाच्या प्रणालीपासून आज कोणतेही राष्ट्र अलिप्त राहू शकत नाही. इच्छा असो वा नसो, आज प्रत्येक राष्ट्र जागतिकीकरण व एकध्रुवीकरण या प्रणालींमध्ये ओढले गेले आहे. आर्थिक उदारीकरण या प्रणाली साधन आहे. या साधनाच्या जोरावर राष्ट्रीय अर्थव्यवस्था आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी जोडण्याचा प्रयत्न जगात सर्वच राष्ट्रांकडून होतो आहे. काही राष्ट्रे या प्रणालींकडे आर्थिक व व्यापारी विकासाची गुरूकिल्ली म्हणून पाहत आहेत. तर काही राष्ट्रे या प्रणालींकडे संशय व भीतीच्या दृष्टिकोनातून पाहत आहेत. त्यांना ही नववसाहतवादाची साधने वाटतात आणि त्यामुळे आर्थिक व राजकीय सार्वभौमत्त्व गमवावे लागेल, अशी भीती निर्माण होत आहे. या प्रकरणात जागतिकीकरण, एकध्रुवीकरण या प्रणालीचा अर्थ, स्वरूप, वैशिष्ट्ये, फायदे, तोटे यांची सविस्तर चर्चा केली आहे. त्याचबरोबर आतंकवादाचा अर्थ, स्वरूप, उद्दिष्टे प्रकार, साधने, आतंकवादाविरूद्ध संघर्ष इ. घटकांवर प्रकाश टाकला आहे. त्यामुळे या सर्व प्रणाली किंवा संकल्पना समजावून घेणे, सोपे जाणार आहे.

## ९.२ विषय विवेचन

### ९.२.१ जागतिकीकरण

**अर्थ/व्याख्या :**

या प्रक्रियेच्या काही अभ्यासकांनी काही व्याख्या केल्या आहेत.

**१) एडवर्ड हार्मन –** सीमापार उत्पादने, भांडवल, सेवा आणि आर्थिक क्रिया-प्रक्रियांच्या वाढत्या प्रवाहाला लक्ष्य करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण.

**२) स्मिथ –** आंतरराष्ट्रीय आणि सर्वांसाठी स्वातंत्र्य या मूल्यांचा समावेश असणारी आणि मुक्त व्यापार व अर्थव्यवस्थेचे फायदे सर्वांना मिळवून देणारी सर्वसमावेशक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण.

**३) कॉक्स व कॉर्टन –** जागतिक भांडवलशाहीमधून निर्माण झालेल्या बहुराष्ट्रीय कंपन्या, संस्था यांचा प्रभाव असणारी आंतरराष्ट्रीय राजकीय व आर्थिक व्यवस्थेत राष्ट्रांची भूमिका मर्यादित करणारी प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण.

**४) हेरॉड, टायेल व रॉबर्टस –** आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेचे एका काल्पनिक विश्व अर्थव्यवस्थेकडे होणारे संक्रमण दर्शविणारी संकल्पना म्हणजे जागतिकीकरण.

**५) बायलिस व स्मिथ –** जगाच्या विविध भौगोलिक क्षेत्रात राहणाऱ्या लोकांमध्ये वाढते सामाजिक, आर्थिक, औद्योगिक, व्यापारी, सांस्कृतिक संबंध दर्शविणारी व्यापक प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण.

### जागतिकीकरणाचे स्वरूप

अ) उत्पादने, सेवा, भांडवल इ. सीमापार प्रवाहाला दर्शविणारी प्रक्रिया – जागतिकीकरण या संकल्पनेचे निश्चित स्वरूप स्पष्ट होत नाही. सर्वसाधारणपणे उत्पादने सेवा, भांडवल, लोक माहिती व संस्कृती यांच्या सीमापार वाढत्या प्रवाहाला दर्शविणारी ही प्रक्रिया आहे.

ब) एकीकरण प्रक्रिया – वैश्विक पातळीवर होत असलेल्या राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक एकीकरण दर्शविणारी संकल्पनाही मानली जाते, तर काही मुक्त व्यापार व मुक्त बाजारपेठांच्या माध्यमातून वैश्विक एकीकरण साधणारी प्रक्रिया आहे.

क) राज्यांचे महत्त्व वाढविणारी प्रक्रिया – बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांचे महत्त्व वाढविणारी प्रक्रिया म्हणून या संकल्पनेकडे पाहिले जाते.

### राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रभाव

### जागतिकीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये

### १) आंतरराष्ट्रीय पातळीवर क्रिया–प्रतिक्रिया वाढविणारी प्रक्रिया–

जागतिकीकरण आंतराष्ट्रीय पातळीवर क्रिया–प्रतिक्रिया वाढविणारी प्रक्रिया आहे. १९९०च्या दशकात या प्रक्रियेने वेग पकडला व आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य वाढविले. शीतयुद्धाचा शेवट, आर्थिक संबंधांना निर्माण झालेले प्राधान्य, माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील क्रांती, विश्व व्यापार संघ व संघटनांची निर्मिती यामुळे जागतिकीकरण प्रक्रियेला वेग प्राप्त झाला. या प्रक्रियेमुळे लोकांमधील अंतर कमी झाले.

### २) मुक्त व्यापार पुरस्कार–

जागतिकीकरण प्रक्रिया मुक्त विश्व व्यवस्थेच्या निर्मितीशी संबंधित आहे. मुक्त व्यापार व बाजारपेठांच्या माध्यमातून अशी व्यवस्था आकाराला येईल. जगातील सर्व लोकांना या व्यवस्थेचा फायदा घेता येईल. लोकांमधील वाढत्या आर्थिक सामाजिक, सांस्कृतिक संबंधातून व सहकार्यातून अशी व्यवस्था निर्माण होणे शक्य आहे. या व्यवस्थेमध्ये जगातील सर्व लोकांचे आर्थिक, सामाजिक एकीकरण होईल व ही व्यवस्था राजकीय व आर्थिक स्वरूपाची असेल.

### ३) बहुराष्ट्रीय कंपन्यांची प्रभावी भूमिका–

जागतिकीकरण प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका व प्रभाव मोठा आहे. आंतरराष्ट्रीय आर्थिक व राजकीय व्यवस्थेवर व निर्णय प्रक्रियेवर प्रभाव टाकणारे हे घटक आहेत. अर्थात

या कंपन्यांचे बहुराष्ट्रीय स्वरूप कामाची व्याप्ती, त्यांचे भांडवल त्यांच्या वाढत्या प्रभावाला जबाबदार आहे. काही अभ्यासक या कंपन्यांना भांडवली अर्थव्यवस्थेची निर्मिती मानतात. भांडवलशाहीच्या जागतिक प्रसारात अशा कंपन्यांची भूमिका महत्त्वाची आहे. शोषणावर आधारित नववसाहतवादी व्यवस्थेत भांडवलशाही राष्ट्र अशा कंपन्यांच्या शोषणाचे साधन म्हणून वापर करतात.

### ४) बिगर शासकीय संघटनांची सक्रीयता–

आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि राजकीय व्यवस्थेत बिगर शासकीय संघटनांची भूमिका महत्त्वाची आहे. १९७०च्या दशकापासून अशा संघटनांची भूमिका आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढत आहे. सुरुवातीला या संघटनांचे कार्य विकासात्मक होते. परंतु, १९९०च्या दशकापासून त्यांच्या कार्याची व्याप्ती वाढली आहे. पर्यावरण संरक्षण, मानवी हक्क संरक्षण, नि:शस्त्रीकरण, बालकामगार, युद्धकैदी प्रश्न, महिला प्रश्न इ. अनेक क्षेत्रांशी त्यांचे कार्य निगडित आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडींना या संघटना प्रभावित करत आहेत. ५०००हून अधिक बिगर शासकीय संघटना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सक्रीय आहेत. त्यात आंतरराष्ट्रीय रेडक्रॉस संघटना, आंतरराष्ट्रीय विमान वाहतूक संघटना, आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समिती, मानवी हक्क आयोग, विकासाचा आंतरराष्ट्रीय आयोग, व्यापार संघ विश्व परिषद, ह्युमन राईटस-वॉच, ग्रीनपीस इ. संघटनांचे कार्य तर उल्लेखनीय आहे.

### ५) विभागीय व्यापारसंघाची भूमिका–

जागतिकीकरण प्रक्रियेत या संघाची भूमिका महत्त्वाची आहे. व्यापारी व आर्थिक पातळीवर विभागीय एकीकरणात या व्यापार संघाचे योगदान महत्त्वाचे आहे. या व्यापार संघामधील महत्त्वाच्या व्यापार संघाचं योगदान व कार्य आपण पाहू.

### अ) आशियान– ASEAN

Association of South East Asian Nation

दक्षिणपूर्वी आशियाई राष्ट्रांची ही संघटना. हिची स्थापना १९६७ मध्ये झाली. आशियाई राष्ट्रांमध्ये आर्थिक सहकार्य वृद्धिंगत करणे हा या संघटनेचा उद्देश. थायलंड, मलेशिया, सिंगापूर, फिलीपाईन्स, इंडोनेशिया, ब्रुनेई, व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस, म्यानमार इ. दहा देशांची ही संघटना. आर्थिक सहकार्य व संरक्षण विषयक मुद्यांवर चर्चा करण्यासाठी या संस्थेने आशियान रिजनल फोरम नावाचे एक व्यासपीठ तयार केले आहे. भारत देखील या फोरमचा सदस्य आहे. दक्षिणपूर्व आशियाई राष्ट्रांच्या आर्थिक, औद्योगिक विकासात या संघटनेचा महत्त्वाचा वाटा आहे. ही संघटना आशियाई वाघ ओीळरप ढळसर्शीी म्हणून ओळखली जाते.

### ब) एपेक– Apec

Asia Pacific Economic Cooperation

हा जगातील श्रीमंत राष्ट्रांचा व्यापार संघ. १९८९मध्ये स्थापना. या व्यापार संघात

अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जपान, दक्षिण कोरिया, न्यूझीलंड, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, ब्रुनेई, चीन, हाँगकाँग, तैवान, मेक्सिको, गिनिया चिली इ. राष्ट्रांचा समावेश. विकसित व विकसनशील अशा दोन्ही प्रकारची राष्ट्रे सहभागी आहेत.

### क) नाफ्टा- Nafta

North American Free Trade Agreement

जानेवारी १९९४ मध्ये स्थापना. अमेरिका, कॅनडा, मेक्सिको यांचा हा व्यापार संघ. मुक्त व्यापार क्षेत्राची निर्मिती हा या संघाचा मुख्य उद्देश. बँकिंग, विमा, जाहिरात, दळणवळण ही क्षेत्रे या राष्ट्रांनी गुंतवणुकीसाठी खुली केली आहेत.

### ड) युरोपियन महासंघ- Europen Union-EU

जगातला यशस्वी व्यापार संघ. या संघाचे जुने नाव युरोपियन परिषद असे होते. १९९३ मध्ये ते बदलण्यात आले. ऑस्ट्रिया, बेल्जियम, डेन्मार्क, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, आयर्लंड, इटली, लक्झेमबर्ग, नेदरलँड, पोर्तुगाल, स्पेन, स्वीडन, इंग्लंड व काही पूर्व युरोपिय राष्ट्रांचा समावेश असलेला हा संघ. युरोपसाठी मुक्त आर्थिक व्यापारी क्षेत्र, सामाईक चलन व्यवस्था बरोबरच युरोपसाठी सामाईक राज्यघटना, परराष्ट्र व संरक्षण धोरण तयार करणे यासाठी हा महासंघ प्रयत्नशील आहे. या महासंघामार्फत युरोपचा कारभार पाहण्यासाठी सर्वसमावेशक सात घटक असलेली यंत्रणा तयार करण्यात आली आहे.

I) युरोपियन परिषद : यामध्ये युरोपिय महासंघ सदस्य राष्ट्रांचा समावेश होतो. यात युरोपसाठी संरक्षण, परराष्ट्र, आर्थिक धोरण ठरविण्याचे काम चालते.

II) युरोपियन संसद : महासंघाची प्रातिनिधीक सभा दर पाच वर्षांनी प्रतिनिधींची निवड करते.

III) मंत्रीपरिषद : युरोपियन महासंघात निर्णय घेणारी ही सर्वोच्च समिती. यात सदस्य राष्ट्रांच्या परराष्ट्रमंत्र्यांचा समावेश असतो.

III) युरोपियन आयोग : युरोपियन महासंघाचा हा कार्यकारी विभाग. दैनंदिन प्रशासकीय कामे केली जातात.

V) न्यायालय : युरोपियन महासंघाच्या घटनेतील कलमांचा अर्थ लावण्याचे व सदस्य राष्ट्रांमधील संघर्षावर निर्णय देण्याचे कामकाज चालते. लक्झेमबर्ग येथे या न्यायालयाचे मुख्यालय आहे. १५ न्यायाधिश या न्यायालयात असतात.

VI) महालेखापाल न्यायालय : महासंघाच्या जमा-खर्चाचा हिशेब ठेवण्याचे कार्य चालते. याचेही मुख्यालय लक्झेमबर्ग येथे आहे.

VII) सल्लागार समित्या : आर्थिक, राजकीय व संरक्षण विषयांवर चर्चा करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी विविध समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे.

## इ) सार्क– SAARC

South Asian Association For Regional Co-operation

दक्षिण आशिया उपखंडातील सात राष्ट्रांमध्ये आर्थिक व व्यापारी सहकार्यासाठी बांगलादेशचे अध्यक्ष झिया–उर–रेहमान यांच्या पुढाकाराने १९८५ मध्ये स्थापन झालेली ही संघटना. भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, भूतान, मालदीव या राष्ट्रांची ही संघटना. आर्थिक व व्यापारी सहकार्यातून राष्ट्रीय प्रगती साधणे, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीसाठी प्रयत्न, वाढती लोकसंख्या, निरक्षरता, बेकारी, दहशतवाद, पूर, वादळ, दुष्काळ, रोगराई या सारख्या समस्यांच्या निवारणार्थ प्रयत्न करणे, राष्ट्राराष्ट्रांत परस्पर विश्वास व आदराची भावना निर्माण करणे, विकसनशील राष्ट्रांबरोबर सहकार्य वाढविणे, आशियाई राष्ट्रांमध्ये आत्मनिर्भरता निर्माण करणे ही वैशिष्ट्ये या संघटनेची आहेत. सार्कची प्रगती संथ गतीने होत आहे. कारण सार्कमार्गात अनेक अडथळे आहेत.

### व्यापार संघाचे फायदे

जागतिकीकरण प्रक्रियेत व्यापार संघ महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. आर्थिक व व्यापारी क्षेत्रांबरोबरच राजकीय व संरक्षण विषयक संबंधांत हा विभागीय व्यापारसंघ प्रभावी ठरत आहे. आंतरराष्ट्रीय एकीकरण, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासाला भरीव मदत, राष्ट्रा राष्ट्रां मधील मतभेद, संघर्ष, वाद कमी करण्यासाठी प्रयत्न, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व्यापारी सहकार्य, राष्ट्राराष्ट्रांमध्ये परस्पर विश्वास व आदर निर्माण करण्याचे कार्य इ. महत्त्वपूर्ण भूमिका हा विभागीय व्यापार संघ पार पाडत आहे.

## ई) विश्व व्यापार संघटना

गॅट सदस्य राष्ट्रांत गॅट करारानुसार चर्चा होऊन सर्वसमावेशक सुधारणांचा मसुदा तयार करण्यात आला. तोच डंकेल प्रस्ताव या नावाने पुढे आला व याच डंकेल प्रस्तावातून १ जानेवारी १९९५ रोजी विश्व व्यापार संघटनेचा जन्म झाला. या व्यापार संघटनेत खुल्या पद्धतीने व्यापारवृद्धीला प्रोत्साहन देण्यात आले. उत्पादन व रोजगार वृद्धीवर भर देण्यात आला. जनतेच्या राहणीमानात सुधारणांवर भर देण्यात आला. स्वसंवर्धित विकासाला प्रोत्साहन देण्यात आले. पर्यावरण संरक्षणावर लक्ष केंद्रीत केले गेले. अविकसित, गरीब, विकसनशील राष्ट्रांना आर्थिक न्याय मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले गेले. आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थापन नियमांची यंत्रणा उभी केली गेली. राष्ट्रांराष्ट्रांमध्ये सहकार्य व समतेच्या आधारावर संबंध प्रस्थापित करण्यावर भर देण्यात आला. आज विश्व व्यापार संघटनेची सदस्य संख्या १४२ एवढी आहे.

## ९.२.२ असंतुलित विकास

### राष्ट्रीय सार्वभौमत्त्वाचे विभाजन झाले :

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा सर्वांत अधिक परिणाम राष्ट्रीय सार्वभौमत्त्वावर झाला आहे. राष्ट्रांचा सर्वोच्च गुणविशेष म्हणून सार्वभौमत्त्वाचा उल्लेख केला जायचा. मात्र आज

जागतिकीकरण प्रक्रियेत परस्परावलंबित्व वाढले आहे. प्रत्येक राष्ट्रांची अर्थव्यवस्था जागतिक अर्थव्यवस्थेशी जोडली जात आहे. अशा परिस्थितीत कोणत्याही राष्ट्राला अलिप्त राहून आपली स्वायतत्ता टिकवणे शक्य नाही. प्रत्येक राष्ट्राला आपली अर्थव्यवस्था इतरांसाठी खुली करावीच लागत आहे. या वाढत्या परस्परावलंबित्वामुळे स्वायत्त सार्वभौमत्त्वावर त्याचा विपरीत परिणाम होतो आहे.

## ब) राजकीय सार्वभौमत्त्वावर परिणाम :

आर्थिक सार्वभौमत्त्वाप्रमाणे राजकीय सार्वभौमत्त्व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने प्रभावित झाले आहे. या प्रक्रियेत विकसित व प्रभावी बनलेल्या राजवटींनी मानवी सुरक्षा, मानवी हक्क संरक्षण, पर्यावरण संरक्षण, बालकामगारांची प्रथा, नि:शस्त्रीकरण इ. बाबतचे नियम बनवून ते प्रत्येक राष्ट्रावर बंधनकारक केले आहेत व नियम उल्लंघनाचा प्रतिवर्षी अहवाल तयार केला जातो. त्याचे सकारात्मक अथवा नकारात्मक परिणाम राष्ट्रांना भोगावे लागतात. हा राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप असून, राजकीय सार्वभौमत्त्वाचे उल्लंघनच आहे.

## क) व्यापारी राजवटीचा राष्ट्रांच्या आर्थिक व व्यापारी अधिकारावर मर्यादा

पूर्वी आयात व्यापारावरील जकात ठरविण्याचा अधिकार त्या त्या राष्ट्रांचा होता. आता मात्र सर्वच राष्ट्रांना जकातीविषयी व्यापारी राजवटींचे नियम पाळावे लागतात. याचाच अर्थ आर्थिक व व्यापारी क्षेत्रात राष्ट्रे आणि व्यापार राजवटी यांच्यात अधिकारांची विभागणी झाली आहे. आर्थिक धोरण निर्मिती प्रक्रिया आता व्यापारी राजवटी, विभागीय व्यापार संघ, बिगर शासकीय संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या यांच्या तंत्राने चालताना दिसते. त्यामुळे राष्ट्रांच्या स्वत:च्या अधिकारांवर मर्यादा पडल्या आहेत.

उदा. भारत विश्व व्यापार संघटनेचा सदस्य आहे. भारताचे पाकिस्तानबरोबर राजकीय प्रश्नांवरून मतभेद आहेत. तरीही भारताला पाकिस्तानला Most Favord Nation चा विशेष दर्जा द्यावाच लागेल. हीच बाब पाकिस्तानलाही लागू पडते.

## ड) भांडवलशाहीला अनुकूल प्रक्रिया

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेवर केला जाणारा सर्वांत मोठा आरोप म्हणजे ही प्रक्रिया भांडवलशाही राष्ट्रांचे हितसंबंध जोपासणारी आहे. भांडवलशाही व्यवस्थेच्या जागतिक प्रसारातून जागतिकीकरण प्रक्रिया सुरू झाली आहे. म्हणजेच भांडवलशाही राष्ट्रांनी जाणीवपूर्वक आर्थिक व व्यापारी हितसंबंधासाठी या प्रक्रियेची निर्मिती केली आहे.

## इ) शोषणावर आधारित प्रक्रिया

जागतिकीकरण ही प्रक्रिया गरीब व अविकसित राष्ट्रांच्या शोषणावर आधारित आहे. या प्रक्रियेमुळे जगाची दोन गटांत विभागणी झाली आहे. एक गट अल्पसंख्य पाश्चिमात्त्य भांडवलशाही राष्ट्रांचा तर दुसरा गट बहुसंख्यांक आशिया, आफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील विकसनशील व अविकसित राष्ट्रांचा आहे. दुसरा बहुसंख्यांकांचा गट आर्थिक व औद्योगिक विकासासाठी पहिल्या गटावर अवलंबून आहे. हे परावलंबित्व त्यांच्या शोषणाचे मुख्य

कारण आहे व या शोषणाला संघटित व संस्थात्मक रूप प्राप्त करून दिले जात आहे.

### ई) नववसाहतवादाचे साधन

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेकडे वसाहतवादाचे साधन म्हणून पाहिले जाते. नववसाहतवादामध्ये राजकीयदृष्ट्या एखादे राष्ट्र स्वतंत्र असते. मात्र, अर्थव्यवस्थेची सर्व सूत्रे पूर्णपणे दुसऱ्या राष्ट्राच्या हातात असतात. नववसाहतवादाची प्रक्रिया आर्थिक क्षेत्रात अप्रत्यक्ष शोषणावर आधारित आहे. आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिकेतील बहुसंख्य राष्ट्रे ही नववसाहतवादी शोषणाला बळी पडली आहेत.

## ९.२.१.६ जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम

जागतिकीकरणाच्या या प्रक्रियेमुळे विकसित राष्ट्रांची उत्पादन क्षमता वाढली आहे. तर अविकसित राष्ट्रांची उत्पादन क्षमता घटली आहे. गरिबी, बेकारी, उपासमारीचे प्रमाण वाढले आहे. जगाची अर्ध्याहून जास्त लोकसंख्या दारिद्र्यरेषेखाली आहे. शिवाय गरीब व श्रीमंत राष्ट्रांमधील आर्थिक दरी वाढत आहे. जागतिक लोकसंख्येच्या ९० टक्के लोकसंख्या गरीब व अविकसित राष्ट्रांमध्ये आहे व जागतिक राजकारणातील त्यांचा वाटा केवळ ०.३ टक्के एवढाच आहे.

### अ) लोकशाहीविरोधी प्रक्रिया

लोकशाही संकल्पना स्वातंत्र्य, समता व न्याय या मूल्यांवर आधारित आहे. मात्र, जागतिकीकरण ही प्रक्रिया या तीनही मूल्यांचे उल्लंघन करणारी आहे. त्यामुळे गरीब, अविकसित राष्ट्रांना न्याय देण्यात ती असमर्थ आहे. जागतिकीकरण ही जनतेची गरज नसून, त्यांच्यावर लादलेली प्रक्रिया आहे.

### ब) बहुराष्ट्रीय कंपन्यांची मक्तेदारी

जागतिकीकरणाच्या या युगात बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रसाराला अनुकूल परिस्थिती निर्माण झाली आहे. या कंपन्या भांडवलशाही शोषण प्रक्रियेतील साधन बनल्या आहेत व त्यांनी विकसनशील राष्ट्रांच्या बाजारपेठा काबीज केल्या आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या प्रवेशामुळे विकसनशील राष्ट्रांमधील छोटे व मध्यम उद्योग देशोधडीला लागले आहेत. शिवाय बहुराष्ट्रीय कंपन्या आपल्या प्रवेशासाठी अनेक अनैतिक मार्गाचा अवलंब करीत आहेत. त्यातून भ्रष्टाचार वाढला आहे.

### क) राष्ट्रीय सार्वभौमत्त्वाला आव्हान

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राष्ट्रांच्या आर्थिक व राजकीय सार्वभौमत्त्वाचे उल्लंघन होत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या व व्यापारी राजवटींनी राष्ट्रांच्या अनेक क्षेत्रांतील अधिकारांवर अतिक्रमण केले आहे. त्यामुळे अशा राष्ट्रांचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्व कमी झाले आहे.

### ड) वाढते परावलंबित्व

जागतिकीकरणामुळे परावलंबित्व वाढले आहे. गरीब व अविकसित राष्ट्रे आपल्या आर्थिक व औद्योगिक विकासासाठी विकसित राष्ट्रांवर अवलंबून राहतात. त्यांच्या या

परावलंबित्वातून ते विकसित राष्ट्रांच्या शोषणाला बळी पडतात. त्यामुळे अविकसित राष्ट्रांचे विकसित राष्ट्रांवरील परावलंबित्व वाढले आहे.

## एकध्रुवीकरण प्रणाली

सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर जन्माला आलेली प्रणाली म्हणजे एकध्रुवीकरण प्रणाली. यालाचा एकध्रुवी विश्वरचना असेही म्हटले जाते.

एकध्रुवी विश्वरचना ही एका राष्ट्राभोवती केंद्रीत असणारी विश्वरचना आहे. जागतिक नेतृत्त्वाची धुरा त्या राष्ट्राकडे असते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रमुख निर्णय त्या राष्ट्राच्या मर्जीने घेतले जातात. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी त्या राष्ट्रावर असते. त्या राष्ट्राशी स्पर्धा करू शकेल किंवा त्यांच्या सत्तेला आव्हान देऊ शकेल अशी दुसरी सत्ता या विश्वरचनेत अस्तित्वात नसते व आज हे सर्व नेतृत्त्व अमेरिका करत आहे.

सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर अमेरिकेशी स्पर्धा करू शकेल, अशी दुसरी सत्ता अस्तित्वात नाही. त्यामुळे नवीन एकध्रुवी विश्वरचनेत अमेरिकेची पकड निर्विवाद निर्माण झाली. १९९१ साली अमेरिकेचे तत्कालिन अध्यक्ष जॉर्ज बुश (सिनिअर) यांनी शीतयुद्धोत्तर काळातील नवीन एकध्रुवीय विश्वरचनेची घोषणा केली. ही रचना अमेरिका केंद्रीत आहे. या रचनेत अमेरिकेची भूमिका विश्वरक्षणकर्त्याची असेल व त्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिकेचा सक्रीय सहभाग असेल, असा सूर या घोषणेत जॉर्ज बुश यांचा होता. जॉर्ज बुश यांची ही एकध्रुवी विश्वरचना पाच प्रमुख तत्त्वांवर आधारित आहे.

## एकध्रुवी विश्वरचनेची तत्त्वे

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व, जागतिक पातळीवर शांतता व सुरक्षितता टिकविण्याची जबाबदारी अमेरिकेवर असेल.

२) आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या माध्यमातून शांतता व सुरक्षिततेचे उद्दिष्ट साधले जाईल.

३) एकध्रुवीय विश्वरचनेत संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका महत्त्वपूर्ण असेल.

४) आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या राष्ट्राविरूद्ध सामूहिक सुरक्षिततेच्या तत्त्वाअंतर्गत कारवाई केली जाईल.

५) अणुचाचणी बंदी, अण्वस्त्र प्रसार बंदीसाठी युद्धपातळीवर प्रयत्न केले जातील.

## अमेरिकेची वाढती एकाधिकारशाही

जॉर्ज बुश यांनी घोषीत केलेल्या या नवीन एकध्रुवीकरण प्रक्रियेतून अमेरिकेच्या भविष्यातील भूमिकेची जगाला कल्पना आली. १९९१ ते २०१२ पर्यंतच्या आंतरराष्ट्रीय राजकारणातील घडामोडी तपासल्यावर तर जॉर्ज बुश यांनी घोषीत केलेली ही एकध्रुवीकरण विश्वरचना प्रणाली अमेरिका प्रत्यक्षात आणताना दिसते. या घडामोडींमधून शीतयुद्धानंतर विश्वरचना एकध्रुवी असल्याचे स्पष्ट संकेत मिळतात. या बावीस वर्षांमध्ये अमेरिकेची एकाधिकारशाही, दादागिरी वाढलेली दिसते. अमेरिकेचे हे वाढते वर्चस्व थांबवण्यात संयुक्त राष्ट्र संघटनेलाही अपयश आल्याचे दिसते. याच व्यवस्थेवर आधारित एकध्रुवीय प्रणालीची वैशिष्ट्ये स्पष्ट होतात.

## एकध्रुवीय प्रणालीची वैशिष्ट्ये

१) ही व्यवस्था सत्तेच्या केंद्रिकरणावर आधारित असते. सत्ता ही एखाद्या विशिष्ट राष्ट्राच्या किंवा राष्ट्रसंघाच्या हातात केंद्रीत असते.

२) विशिष्ट राष्ट्राचे किंवा राष्ट्रगटाचे आर्थिक, भौतिक सामर्थ्य इतर राष्ट्रांपेक्षा अधिक असते.

३) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व सामूहिक स्वरूपाचे नसून ते एकीकृत स्वरूपाचे असते. आंतरराष्ट्रीय राजकारणाची धुरा एका शक्तिशाली राष्ट्राकडे असते. हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय घडामोडीच्या केंद्रस्थानी असते.

४) या व्यवस्थेमध्ये एका राष्ट्राची एकाधिकारशाही किंवा हुकुमशाही निर्माण होण्याची शक्यता असते.

५) या व्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नेतृत्त्व ठरणारे राष्ट्र आंतरराष्ट्रीय तसेच विभागीय सत्ता समतोलामध्ये समतोलकाची इरश्नरपलशी भूमिका पार पाडते.

६) शीतयुद्धोत्तर काळातील एकध्रुवीय आंतरराष्ट्रीय व्यवस्थेमध्ये अमेरिका जागतिक सत्तेच्या केंद्रस्थानी असल्याचा दावा केला जात आहे. या नवीन एकध्रुवीय प्रणालीत अमेरिकेची भूमिका स्वयंघोषीत विश्व रक्षणकर्त्याची आहे.

शीतयुद्ध समाप्तीनंतर अशा प्रकारची एकध्रुवी प्रणाली जगात निर्माण झाली असून, अमेरिका आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या केंद्रस्थानी आहे, असे मत बरेच अभ्यासक मांडताना दिसतात. पैकी काही मते पुढील प्रमाणे :

अ) सोव्हिएट रशियाच्या विघटनानंतर अमेरिका ही एकमेव महासत्ता ठरली आहे. अमेरिकेची बरोबरी करू शकेल असे दुसरे सत्ताकेंद्र अस्तित्वात नाही.

ब) आर्थिक व लष्करी सामर्थ्य, विज्ञान-तंत्रज्ञान व माहिती तंत्रज्ञानातील प्रगतीच्या जोरावर जागतिक राजकारणाचे नेतृत्त्व करण्याची क्षमता अमेरिकेत आहे.

क) शीतयुद्ध समाप्तीनंतर भांडवलवादी लोकशाही ही जगातील सर्वांत प्रभावशाली विचारसरणी बनली असून, या विचारसरणीचे नेतृत्त्व अमेरिकेकडे आहे.

ड) अमेरिकेचा आर्थिक व लष्करी प्रभाव हा स्थानिक व विभागीय नसून वैश्विक स्वरूपाचा आहे. कारण शीतयुद्ध समाप्तीनंतरही अमेरिकेच्या नेतृत्त्वाखालील नाटोचे अस्तित्व कायम आहे. १९९५ मध्ये बोस्निया व १९९९मध्ये सर्बियाच्या कोसोबा प्रांतात नाटोच्या हवाई हल्ल्याने ते सिद्ध झाले आहे.

याचाच अर्थ शीतयुद्धोत्तर एकध्रुवीकरण प्रणाली अमेरिकेच्या नेतृत्त्वाखाली आहे व ते खालील घडामोडींवरून स्पष्ट होताना दिसते.

## १९९१चे खाडी युद्ध

१९९१च्या खाडी युद्धादरम्यान अमेरिकेच्या नेतृत्त्वाखाली संयुक्त राष्ट्र संघटनेने सामूहिक सुरक्षितता या तत्त्वाअंतर्गत इराक विरूद्ध लष्करी कारवाई केली वअमेरिकेन दोन लाख अमेरिकन सैन्य` सौदी अरेबियामध्ये ठेवले. या लष्करी कारवाईनंतर इराकने कुवैतमधून माघार घेतली. तथापि, अमेरिकेने सौदी अरेबियातून आपले सैन्य काढून घेण्यास नकार दिला.

### * नाटोचे बॉम्बहल्ले

बोस्निया व सर्बिया राष्ट्रांमधील वांशिक हिंसाचार थांबविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेने जी शांतीसेना पाठविली होती. त्यातून अमेरिकेने आपला सहभाग तडकाफडकी काढून घेतला. अमेरिकेचा हा निर्णय पूर्णत: एकतर्फी व संयुक्त राष्ट्र संघटनेच्या नियमांचा भंग करणारा होता.

### * शांतीसेनेतून माघार

आफ्रिकेतील सोमालिया या राष्ट्रामध्ये उद्‌भवलेल्या वांशिक दंगली थांबविण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने जी शांतीसेना पाठविली होती. त्यातून अमेरिकेने आपला सहभाग अचानक काढून घेतला होता. अमेरिकेचा हा निर्णय पूर्णत: एकतर्फी व संयुक्त राष्ट्र संघटनेच्या नियमांचा भंग करणारा होता.

### * अफगाणिस्तानावर लष्करी कारवाई

११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर मोठे दहशतवादी हल्ले झाले. या हल्ल्यात न्यूयॉर्कमधील विश्वव्यापार केंद्राची इमारत उद्‌ध्वस्त झाली. शिवाय अमेरिकन संरक्षण विभागाचे (पेंटागॉन) कार्यालय उद्‌ध्वस्त झाले. या हल्ल्यात ५ हजार नागरिक मारले गेले. या हल्ल्यांचा मूख्य सूत्रधार ओसामा बिन लादेनला अफगाणिस्तानातील तत्कालिन तालिबान सरकारने आश्रय दिला, असा अमेरिकेचा संशय होता. त्यामुळे अमेरिकेने तालिबानी सरकार विरूद्ध लष्करी कारवाई केली. तेथील तालिबानी शासन संपुष्टात आणले. या लष्करी कारवाईत शेकडो अफगाणी नागरिकांना जीव गमवावा लागला. या कारवाईत सर्व युद्धनियम अमेरिकेने धाब्यावर बसविले व मानवी अधिकारांचे उल्लंघन केले.

### * आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्ध अमेरिकेचे युद्ध

अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय दहशतवादाविरूद्ध अमेरिकेने युद्ध पुकारले आहे. या युद्धामध्ये अमेरिका वापरत असलेल्या विविध तंत्रांवरून अमेरिकेची एकाधिकारशाही, दादागिरी स्पष्ट होते. दहशतवादाच्या नावाखाली एखाद्या सार्वभौम राष्ट्राच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणे, दहशतवादाला समर्थन देण्याच्या आरोपावरून काही राष्ट्रांविरूद्ध एकतर्फी आर्थिक बहिष्काराची, व्यापारी नाकेबंदीची घोषणा करणे, काही राष्ट्रांना दैत्य राष्ट्रे म्हणून संबोधून त्यांना आंतरराष्ट्रीय राजकारणात वेगळे पाडण्याचा प्रयत्न करणे, मूलभूत मानव अधिकार तसेच युद्धनियमांचे उल्लंघन करणे इ. तंत्रांमधून अमेरिकेची एकाधिकारशाही वाढत असल्याचे दिसते. आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा सामना करण्यासाठी अमेरिकेने काही राष्ट्रांसमवेत लष्करी करार केले आहेत. या करारांतर्गत अमेरिका शस्त्रास्त्रांचा पुरवठा त्या राष्ट्रांना करत आहे. यातून विभागीय पातळीवर शस्त्रास्त्र स्पर्धा जोर धरताना दिसत आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरूद्धच्या मोहिमेत अमेरिकेची साथ देणाऱ्या पाकिस्तानसारख्या राष्ट्रांना अमेरिकेकडून मोठ्या प्रमाणावर आर्थिक लष्करी मदत मिळत आहे. वास्तविक पाकिस्तान भारतात दहशतवादी कारवायांत प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष मदत करत आहे. याबाबत मात्र अमेरिका खंबीर भूमिका घेताना दिसत नाही.

## * इराक विरूद्धची लष्करी कारवाई

अमेरिकेच्या वाढत्या एकाधिकारशाहीचा सर्वोच्च बिंदू म्हणजे २००४ मध्ये अमेरिकेने इराकवर केलेली लष्करी कारवाई. संयुक्त राष्ट्रसंघाच्या १५०हून अधिक राष्ट्रांचा या कारवाईला विरोध असताना काही मूठभर राष्ट्रांच्या सहकार्याने अमेरिकेने ही कारवाई पूर्णत्वाला नेली. अमेरिकेच्या युद्धपिपासू धोरणांना मुरड घालण्यास संयुक्त राष्ट्र संघटनेला आलेले हे सर्वांत मोठे अपयश आहे. ही लष्करी कारवाई दोन उद्दिष्टांसाठी करण्यात आली होती. इराकमध्ये सद्दाम हुसेनची राजवट बदलणे आणि नि:शस्त्रीकरण करणे, शिवाय तत्कालीन अध्यक्ष सद्दाम हुसेन यांच्या काळात आण्विक, रासायनिक व जैविक अस्त्रांचा विकास करण्यात आला, असा संशय अमेरिकेला होता. ही शस्त्रास्त्रे भविष्यात दहशतवादी संघटनांकडून अमेरिके विरूद्ध वापरली जाण्याची भीती होती. या शस्त्रांचा गैरवापार होण्या अगोदरच ती नष्ट केली जावीत, या उद्दिष्टांसाठी ही लष्करी कारवाई करण्यात आली. या कारवाईने सद्दाम हुसेनची राजवट बदलली गेली. त्याला फाशी देण्यात आली. मात्र प्रत्यक्षात अमेरिकेच्या हाती कोणतेही आण्विक, रासायनिक व जैविक अस्त्र लागले नाही. यावरून आपणांस अमेरिकेची दादागिरी दिसते.

## ९.२.२.४ अमेरिकेची आंतरराष्ट्रीय राजकारणातील सध्याची भूमिका

आजची आंतरराष्ट्रीय राजकारणातील अमेरिकेची भूमिका एखाद्या स्वयंघोषित विश्वरक्षणकर्त्याची आहे. त्यासाठी अण्वस्त्र बाळगण्याचा अधिकार केवळ आपल्याला व आपले सहकारी इंग्लंड, फ्रान्स यांना आहे. आपला प्रभाव टिकवून ठेवण्यासाठी भारत, पाकिस्तान, इस्त्रायल इ. राष्ट्रांना अण्वस्त्रांचा विकास करण्यापासून परावृत्त करण्याचा अमेरिका प्रयत्न करत आहे. यासाठी अमेरिकेने भारत, पाकिस्तानवर आर्थिक बंधने व इराकवर लष्करी कारवाईचा वापर केला आहे. संपूर्ण नि:शस्त्रीकरणाच्या योजनेला अमेरिकेचा विरोध आहे. मात्र अण्वस्त्रांच्या मुद्यावर अमेरिकेने उत्तर कोरिया, सिरिया, इराण या सारख्या राष्ट्रांना तर लष्करी कारवाई करण्याची धमकी दिली आहे.

## * आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालय निर्मितीस विरोध

आज अमेरिकेचा आंतरराष्ट्रीय गुन्हेगारी न्यायालयाच्या निर्मितीस विरोध आहे. एवढेच नाही, तर अशा न्यायालयाने युद्ध गुन्ह्यांसाठी अमेरिकन सैनिकांवर खटले भरू नये म्हणून अमेरिका अनेक राष्ट्रांवर दबाव आणत आहे.

जरी अमेरिकेची भूमिका विश्वरक्षणकर्त्याची असली तरी एक गोष्ट मात्र निश्चित आहे की, अमेरिकेने केवळ अशाच वेळी हस्तक्षेप केला आहे, ज्या वेळी अमेरिकेचे राष्ट्रीय हितसंबंध गुंतले आहेत किंवा धोक्यात आले आहेत. उदा. खाडी युद्धाचे नेतृत्त्व अमेरिकेने केले. कारण पश्चिम आशियात अमेरिकेचे आर्थिक हितसंबंध गुंतले होते. म्हणजेच अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणात दुटप्पीपणा दिसतो. कारण आज पाकिस्तानकडे अण्वस्त्रे आहेत. आण्विक तंत्रज्ञानाच्या व्यापारात व आंतरराष्ट्रीय दहशतवादाच्या प्रसारात पाकिस्तानचा हात असल्याचे स्पष्ट पुरावे अमेरिकेकडे आहेत. पण पाकिस्तानवर अमेरिकेकडून लष्करी कारवाई होत नाही. इस्त्रायल-पॅलेस्टाईन संघर्षाबाबतीत अमेरिकेचा हाच दुटप्पीपणा दिसतो आहे.

## ९.२.३ आतंकवादाची समस्या

११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेवर झालेल्या आतंकवादी हल्ल्याने आतंकवादाच्या समस्येचे गांभीर्य आंतरराष्ट्रीय समुदायाला पटले. ही समस्या केवळ गरीब, अविकसित व विकसनशील राष्ट्रांपुरती मर्यादित राहिली नसून, अमेरिकेसारख्या बलाढ्य महासत्तेला देखील या समस्येला बळी पडावे लागले आहे. आज आंतरराष्ट्रीय समुदायापुढची सर्वांत गंभीर समस्या म्हणून आतंकवादाचा उल्लेख केला जातो. या समस्येने भारत, रशिया, चीन, अमेरिका, मध्य आशियायी राष्ट्रे, स्पेन इ. राष्ट्रांच्या शांतता व सुरक्षिततेला आव्हान दिले आहे. गेल्या पंधरा वर्षांत आतंकवादातून मारले गेलेल्या लोकांची संख्या दोन लाखांहून अधिक आहे. पैकी जम्मू-काश्मीरमध्ये ती ९० हजारांपर्यंत जाते. या समस्येचा सामना करण्यासाठी प्रादेशिक व आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक करार गेल्या काही वर्षांमध्ये झाले आहेत. या ठिकाणी आपण आतंकवादाचा अर्थ, स्वरूप, वैशिष्ट्ये, उद्दिष्टे, साधने इ. प्रकार समजावून घेणार आहोत व आतंकवादाविरूद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवर होणाऱ्या प्रयत्नांचा आढावा घेण्यासाठी आतंकवादाच्या विकासाचे प्रमुख टप्पे समजावून घेवू.

### १९५०च्या दशकातील पश्चिम आशियातील आतंकवाद

या दशकात पश्चिम आशियात स्वतंत्र पॅलेस्टाईन निर्मितीसाठी आतंकवाद कारवायांना प्रारंभ झाला व १९४८ मध्ये पॅलेस्टाईनच्या भूमीचे विभाजन करून स्वतंत्र इस्रायल राष्ट्र निर्माण झाले. पॅलेस्टाईन विभागणीस पश्चिम आशियातील मुस्लिम राष्ट्रांचा विरोध होता. इस्रायलचे अस्तित्व नष्ट करण्यासाठी व स्वतंत्र पॅलेस्टाईन राष्ट्राच्या निर्मितीसाठी आतंकवादी संघटनांचा उदय झाला. या संघटनांना अरब राष्ट्रांकडून प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष आर्थिक, लष्करी समर्थन प्राप्त झाले.

### १९६०च्या दशकातील युरोपमधील आतंकवाद

दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपीय राष्ट्रांमध्ये निर्माण झालेल्या राजकीय व आर्थिक व्यवस्थांना विरोध करण्यासाठी आतंकवादी संघटना उदयाला आल्या. महायुद्धोत्तर युरोपातील आर्थिक व राजकीय अस्थिरतेमुळे असंतोषाची भावना वाढीस लागली. या असंतोषाचे भांडवल आतंकवादी संघटनांनी केले. त्यात इटलीत 'रेड ब्रिगेड', पश्चिम जर्मनीत 'रेड आर्मी', उत्तर आयर्लंडमध्ये रोमन कॅथोलिक व प्रोटेस्टंट पंथाच्या संघर्षातून 'आयरिश रिपब्लिकन आर्मी' अशा संघटना उदयाला आल्या.

### शितयुद्ध व आतंकवाद :

आशिया व युरोपातील आतंकवादाला शीतयुद्धाने खतपाणी घातलेले दिसते. रशिया व अमेरिकेच्या जागतिक चढाओढीतून लष्करी गट-प्रतिगट निर्माण झाले. शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली. शस्त्रास्त्रांचा जाणीवपूर्वक प्रसार केला गेला. आतंकवादी संघटनांना लष्करी, आर्थिक मदत पुरवून त्यांचा राजकीय अस्थिरता, सत्तापालटसाठी अमेरिका व रशियाने वापर केला. शीतयुद्धाने निर्माण केलेल्या या असुरक्षितता व संशयाच्या वातावरणात आतंकवादी चळवळी फोफावल्या.

### ९.२.३ आतंकवाद कार्य व स्वरूप :

आतंकवाद गुंतागुंतीची व वादग्रस्त संकल्पना आहे. आतंकवादाच्या व्याख्येविषयी विद्वानांमध्ये व राष्ट्रांमध्ये मतभेद आहेत. आतंकवादाचा उल्लेख नकारात्मक दृष्टीने केला जात असल्याने स्वत:स कोणीही आतंकवादी संबोधून घेण्यास तयार नाही. आतंकवादास एक राष्ट्र आतंकवादी समजते तर दुसरे राष्ट्र त्याचा उल्लेख स्वातंत्र्यसैनिक करते. आपणास काश्मीरवरून त्याची प्रचिती येते.

१) ‘‘आतंकवाद म्हणजे राजकीय उद्दिष्टांसाठी हिंसेच्या साधनांचा वापर’’

२) ‘‘अमूलाग्र राजकीय व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या उद्देशाने शासनावर दबाव आणण्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब करणे म्हणजे आतंकवाद’’

आतंकवाद निर्माण करण्यासाठी हत्या, बॉम्बस्फोट, नासधूस, अपहरण इ. मार्गांचा अवलंब केला जातो. आतंकवाद शासनविरोधी कृती म्हणून जरी उल्लेखली जात असली तरी आज अनेक राष्ट्रांमधील सरकारे आतंकवादी संघटनांचा वापर इतर राष्ट्रांविरूद्ध व अंतर्गत विरोधकांचा बिमोड करण्यासाठी करीत आहेत. म्हणून आतंकवादाचे स्वरूप गुंतागुंतीचे बनले आहे.

### ९.२.३.४ आतंकवादाची वैशिष्ट्ये :

खालील प्रकारे मांडता येतील.

### अ) हिंसाचाराचा जाणिवपूर्वक वापर :

आतंकवादात हिंसाचाराचा जाणिवपूर्वक व पद्धतशीर वापर केला जात आहे. हिंसाचार साधनाद्वारे उद्दिष्टपूर्ती साधण्याचा आतंकवादामध्ये प्रयत्न होतो. यात अ) आपल्या प्रश्नाकडे सर्वांचे लक्ष वेधून घेणे, ब) प्रश्नांचे गांभीर्य सरकार व जनतेला करून देणे ही मुख्य कारणे यात आहेत. आज तर हिंसेसाठी आत्मघातकी पथके वापरली जातात.

### ब) दहशतीचे दबावतंत्र :

आंतकवादी संघटना आपल्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी सरकारवर दहशतीने दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी राजकीय नेत्यांचे, त्यांच्या नातेवाईकांचे, प्रसिद्ध व्यक्तीचे अपहरण, खून, घातपात, धमक्या, बॉम्बस्फोट, शासकीय इमारतींवर हल्ले, सार्वजनिक ठिकाणी गोळीबार, महत्त्वपूर्ण इमारतींवर हल्ले इ. मार्गांचा अवलंब करून सरकार व जनतेत दहशत निर्माण करतात.

### क) प्रसिद्धीला महत्त्व :

आतंकवादी आपल्या मागण्या व प्रश्नांना प्रसिद्धी देण्यासाठी सतत प्रयत्न करतात व देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधून घेण्यासाठी विविध तंत्रांचा वापर करतात. आर्थिक, व्यापारी, संरक्षणदृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांवर हल्ले करणे, विमान अपहरण, प्रसार माध्यमांद्वारे धमक्या, राष्ट्रीय व परराष्ट्रीय संघटनांच्या प्रतिनिधींना ओलीस ठेवणे इ. मार्गांचा प्रसिद्धीसाठी सर्रास वापर करतात. ११ सप्टेंबर २००१ च्या अमेरिकेवरील हल्ला

याचे उत्तम उदाहरण आहे किंवा १९९९चे इंडियन एअरलाईन्स विमान अपहरण किंवा अल जजिरा वृत्तवाहिनीवरून ओसामा बिन लादेनच्या अनेकदा प्रसारित झालेल्या धमक्या.

### ड) अस्थिरता निर्माण करणे :

आतंकवादामध्ये प्रस्थापित राजकीय, सामाजिक, आर्थिक, प्रशासन व्यवहार, व्यापार, दळणवळण इ. विविध व्यवस्थेमध्ये अस्थिरता निर्माण करण्याचा व त्यात बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे सरकारच्या आंतकवाद विरोधी धोरणांना खीळ बसते. शिवाय सर्वत्र अस्थिरता निर्माण होते. भारतातील संसदेवरील हल्ला, हॉटेल ताजमहल व इतर झालेले हल्ले याच अस्थिरतेसाठी झालेले दिसतात.

### मूलभूत मानव अधिकारांचे उल्लंघन :

आतंकवाद हिंसाचारावर आधारलेली संकल्पना आहे. त्यामुळे तेथे मानवी मूल्यांना स्थान नाही. त्यामुळे ते कोणत्याही साधनांचा वापर करतात. आतंकवादाच्या प्रयत्नांमुळे मानवी मूलभूत मूल्यांचे सतत उल्लंघन होते. आतंकवादी हिंसाचारात निरपराध, लहान मुले, स्त्रिया यांचे प्रमाण अधिक आहे.

### विचारसरणीचा आधार :

आतंकवाद आपल्या उद्दिष्टांना न्याय ठरविण्यासाठी अल्पसंख्यांकांच्या मूलभूत मानवी अधिकारांचे संरक्षण, वांशिक अल्पसंख्यांकांच्या अधिकारांचे संरक्षण, स्वातंत्र्य चळवळ, मुक्ती लढा, स्वयंनिर्णयाचा अधिकार इ. विविध विचारसरणींचा आधार घेऊन आतंकवादी कारवाया करतात. या आधारामुळेच ते जनसमर्थन प्राप्त करण्याचा प्रयत्न करतात.

### युद्धाला चालना :

आतंकवादी कारवायांमुळे अनेकदा राष्ट्रे युद्धासाठी प्रवृत्त होतात. आतंकवाद रोखण्यासाठी शेजारील राष्ट्रांवर आक्रमण केले जाते. हे कारण पुढे करून इस्त्रायलने अनेकदा पॅलेस्टाईनमध्ये लष्करी हस्तक्षेप केला आहे. अमेरिकेने इराकमध्ये हस्तक्षेप केला आहे.

### त्वरित समाधान :

आतंकवादी आपल्या समस्यांवर, प्रश्नांवर त्वरीत तोडगा काढण्याचा प्रयत्न करतात. त्यांचा लोकशाही, सहकार्य, चर्चा या माध्यमांवर विश्वास नसतो. आतंकवादाने, हिंसाचाराने दबाव आणून तात्काळ आपल्या मागण्या मान्य होतील, असा त्यांचा विश्वास असतो.

### अमूलाग्र राजकीय व सामाजिक परिवर्तन :

बहुतांश आतंकवादी संघटना राजकीय व सामाजिक परिवर्तनासाठी सक्रीय असतात. परिवर्तन हे उद्दिष्ट अनेकदा अतिरेकी व अवास्तव असते. सर्व इस्लामी राष्ट्रांना एकत्र करून एकसंघ इस्लामिक राजवट निर्माण करणे, हे अल् कायदासारख्या संघटनेचे ध्येय आहे. या ध्येयाच्या आड येणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला ही संघटना शत्रू मानते.

### आतंकवादाची उद्दिष्टे :

आतंकवादाची उद्दिष्टे खालील प्रमाणे सांगता येतील.

**स्वातंत्र्यप्राप्ती :**

राजकीय स्वातंत्र्यासाठी हिंसाचाराचा वापर पूर्वीपासून होत आला आहे. २०व्या शतकात त्याचे प्रमाण वाढले. आशिया व आफ्रिका खंडातील अनेक वसाहतींमधून राजकीय स्वातंत्र्यासाठी हिंसाचाराच्या मार्गाचा अवलंब केला गेला. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतही तो आपणास दिसतो.

**अ ) स्वतंत्र सार्वभौम राज्य निर्मिती :**

आतंकवादी कारवायांच्या माध्यमातून स्वतंत्र व सार्वभौम राज्याच्या निर्मितीसाठी आज अनेक आतंकवादी संघटना प्रयत्नशील आहेत. श्रीलंकेतील लिट्टे, पॅलेस्टाईनमधील हमास, इंग्लंडमधील आयरिश रिपब्लिकन आर्मी, जम्मू-काश्मीरमध्ये हिजबुल मुजाहिदीन, लष्कर ए तोयबा, जैश-ए-मोहम्मद इ. सर्व संघटना स्वतंत्र व सार्वभौम राज्याच्या निर्मितीच्या उद्दिष्टाने प्रभावित आहेत.

**ब) धार्मिक व वांशिक प्रेरणा :**

या प्रेरणेमधून हिंसाचाराचा वापर आतंकवादी संघटनांकडून होताना दिसतो. बहुसंख्याकांकडून धार्मिक व वांशिक अल्पसंख्याकांवर होणाऱ्या अन्यायाचा सूड घेण्यासाठी, धार्मिक अधिकार प्राप्तीसाठी, स्वतंत्र धार्मिक व वांशिक ओळख जपण्यासाठी आतंकवादी संघटना प्रयत्नशील आहेत. त्यात हमास, अल कायदा, अबू निदाल, सशस्त्र इस्लामिक संघ, हिजबुल इ. समावेश होतो. इस्त्रायलमधील ज्यू मूलतत्त्ववाद्यांची कछ ही संघटना धार्मिक संस्कृतीच्या भावनेने प्रेरित आहे. बहुसंख्य इस्लामी आतंकवादी संघटनांचा पश्चिमी संस्कृतीच्या वाढत्या प्रभावाला विरोध आहे. इस्लामिक राष्ट्रांमधील अमेरिकेच्या वाढत्या हस्तक्षेपाला विरोध आहे.

**क) राजकीय, सामाजिक परिवर्तन :**

अमूलाग्र राजकीय, सामाजिक परिवर्तनाच्या उद्दिष्टांसाठी आतंकवादी संघटना सक्रीय आहेत. बऱ्याचदा ही उद्दिष्टे अतिरेकी व अवास्तव असतात. जगातील सर्व मुस्लिम राष्ट्रांना एकत्र करून इस्लाम धर्मावर आधारित राजवटीची स्थापना करणे हे अल् कायदाचे उद्दिष्ट आहे. धार्मिक मूलतत्त्ववादी व पुनरूज्जीवनवादी चळवळीतून पुढे आलेल्या आतंकवादी संघटनांचे उद्दिष्ट अमूलाग्र राजकीय व सामाजिक परिवर्तन हेच आहे.

**ड) अन्यायाचा सूड व बदला घेणे :**

राजकीय, सामाजिक व आर्थिक स्वरूपाच्या अन्यायाचा सूड घेणे हे काही संघटनांचे उद्दिष्ट आहे. अशा संघटना क्रिया-प्रतिक्रिया तत्त्वातून पुढे येतात. अल् कायदा सारख्या अनेक इस्लामिक आतंकवादी संघटनांचे प्रमुख उद्दिष्ट हेच आहे.

**इ) प्रश्नाचे त्वरित समाधान :**

हे आतंकवादाचे वैशिष्ट्य आणि उद्दिष्टही आहे. या संघटनांचा लोकशाही पद्धतीने

प्रश्न सोडविण्यावर विश्वास नसतो. त्यांना क्रांतीकारी बदल हवे असतात व त्या बदलांसाठी ते हिंसाचाराचा वापर करतात. उदा. पॅलेस्टाईनचा प्रश्न सोडविण्यासाठी अराफत यांनी अवलंबलेल्या या लोकशाही मार्गावर हमाससारख्या पॅलेस्टाईनमधील दहशतवादी संघटनेचा विश्वास नव्हता. त्यांना त्वरित समाधान हवे होते. त्यामुळे प्रश्न सुटण्याऐवजी अधिक गुंतागुंतीचा झाला व शांतता प्रक्रियेला खीळ बसली.

**लक्ष वेधणे :**

आपल्या प्रश्नांकडे देशांतर्गत व देशाबाहेरील जनतेचे लक्ष आकर्षित करणे हे या संघटनांचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी ते हिंसाचाराच्या विविध तंत्रांचा वापर करतात. उदा. अलकायदाने आपल्या मागण्यांकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचे लक्ष वेधण्यासाठी ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेच्या विश्व व्यापार केंद्रावर हल्ला केला. यातून त्यांच्या मागण्यांची व ओसामा बिन लादेनची जगाला ओळख झाली.

**आतंकवादाचे प्रकार :**

आतंकवादी संघटनांचे कार्यक्षेत्र, उद्दिष्टे, कार्यप्रणाली या आधारावर आतंकवादाचे पाच प्रकार पाडता येतात. ते पुढील प्रमाणे पाहता येतील

**अ) राष्ट्रीय पातळीवरील आतंकवाद :**

यात आतंकवादाचे कार्यक्षेत्र एखाद्या भौगोलिक क्षेत्रापुरतेच मर्यादित असते. त्या राष्ट्राच्या शासनाविरूद्धच संघटना सक्रीय असतात. स्वातंत्र्यप्राप्ती किंवा स्वतंत्र सार्वभौम राज्य निर्मिती यांची उद्दिष्टे असतात. उदा. श्रीलंकेतील लिट्टे (LTTE) १९८३ ते २००३ पर्यंत लिट्टे व श्रीलंका सरकार असा संघर्ष चालू आहे. त्यात एक लाखापेक्षा जास्त निष्पाप लोक मारले गेले. श्रीलंकेचे माजी राष्ट्राध्यक्ष प्रेमदासा, भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या हत्येमागे लिट्टेचाच हात होता. लिट्टेप्रमाणेच पॅलेस्टाईन निर्मितीसाठी इस्त्रायल विरूद्ध काम करणारी 'हमास' ही संघटना. शिवाय इंग्लंडमधील आयरिश रिपब्लिकन आर्मी उत्तर आयर्लंडमधून ब्रिटीशांना हुसकावून लावणे व उत्तर आयर्लंडचे एकीकरण घडवून आणणे हाच या संघटनांचा आपापल्या मर्यादित भागापुरता मर्यादित कार्यक्षेत्राचा भाग.

**ब) आंतरराष्ट्रीय आतंकवाद :**

याचे कार्यक्षेत्र एका राष्ट्राच्या भौगोलिक सीमांपुरतेच मर्यादित नसते. अनेक राष्ट्रांमध्ये त्याचे जाळे पसरलेले असते. अलकायदा सारख्या संघटनेचे लोक एकापेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये पसरलेले आहेत. या संघटनांमुळे अनेक राष्ट्रांना धोका निर्माण झाला आहे. या संघटना क्रांतीकारी राजकीय व सामाजिक परिवर्तनासाठी पछाडलेल्या असतात. अलकायदा या संघटनेचे जाळे ५० हून जास्त राष्ट्रांमध्ये पसरलेले आहे. सर्व इस्लामिक राष्ट्रांना एकत्र करून एकसंघ इस्लामिक राजवट निर्माण करण्याच्या कल्पनेने प्रभावित संघटना या उद्दिष्टांच्या आड येणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला शत्रू मानते.

**क) सीमापार आतंकवाद :**

आतंकवादाचा हा एक प्रकार. यात संघटनेचे केंद्र एका देशात तर कार्यक्षेत्र दुसऱ्या देशात असते. या प्रकारात एक राष्ट्र आतंकवादी संघटनांचा वापर दुसऱ्या राष्ट्राविरोधात

करते. या सीमापार आतंकवादामधून हिंसाचार वाढला आहे. भारताच्या जम्मू-काश्मीरमध्ये होणारा हिंसाचार हा सीमापार आतंकवाद आहे.

### ड) राज्यपुरस्कृत आतंकवाद :

एखादे राष्ट्र शेजारी राष्ट्रामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी जाणिवपूर्वक आतंकवादी साधनांचा वापर करते, तेव्हा तो प्रकार या राज्य पुरस्कृत आतंकवादात मोडतो. अनेकदा देशांतर्गत विरोधकांचा नाश करण्यासाठी शासनकर्ते अशा आतंकवादी मार्गाचा अवलंब करतात. पाकिस्तानचा भारतामधील आतंकवाद किंवा पूर्वीचा जर्मनीतील हिटलरचा व इटलीतील मुसोलिनीचा व रशियाचा स्टॅलिन आतंकवाद या प्रकारात मोडतो. अशा आतंकवादाला शासनकर्ते मोठ्या प्रमाणावर मदत करत असतात.

### अ) धार्मिक व वांशिक भावनेने प्रेरित आतंकवाद :

हा आतंकवाद धार्मिक मूलतत्त्ववादी भावनेतून जन्मास येतो. यात अल्पसंख्याकांना वाटणारी असुरक्षितता, बहुसंख्याकांचे अत्याचार, वांशिक राष्ट्रवाद, स्वतंत्र धार्मिक व वांशिक ओळख गमावण्याची भीती, सांस्कृतिक वाढता प्रसार, जागतिकीकरण इ. कारणांनी हा आतंकवाद प्रभावित होतो.

### आतंकवादाची साधने :

आत्मघातकी पथके, बॉम्बस्फोट, गोळीबार, राजकीय व्यक्तीची हत्या, प्रसिद्ध व्यक्तीचे अपहरण, अंमली पदार्थ तस्करी, बनावट चलन, शासकीय कार्यालये, सार्वजनिक ठिकाणी आर्थिक, व्यापारी संरक्षण दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांवर हल्ले, प्रार्थना स्थळांवर हल्ले, आंतरराष्ट्रीय संस्था प्रतिनिधींना ओलिस ठेवणे, अशा संस्था कार्यालयावर हल्ला करणे इ. एक ना अनेक साधने आतंकवादी वापरताना आपणास दिसतात.

### * आण्विक आतंकवाद :

हा जगासमोर उभा राहणारा नवा आतंकवाद. यामुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली आहे. आण्विक आतंकवाद म्हणजे आतंकवादी संघटनांकडून आपल्या हितसंबंधाच्या पूर्ततेसाठी अण्वस्त्रांचा वापर सोव्हिएत रशियाच्या विघटनानंतर अण्वस्त्र तंत्रज्ञानाची व साधने सामुग्रीची काळ्या बाजारातील खरेदी विक्री वाढली. शिवाय त्याचा वापर आतंकवादी संघटना उघड करू लागल्या आहेत. जेव्हा आधिकाधिक राष्ट्रे नागरी तसेच संरक्षण उपयोगासाठी अणुतंत्रज्ञानाचा वापर करतात, तसतसा आण्विक आतंकवादाचा धोका वाढत जातो. सध्या जगात अण्वस्त्रे मिळविण्याची स्पर्धाच सुरू आहे. आशिया खंडातील काही राष्ट्रांनी बेकायदेशीर अणुतंत्रज्ञान व साधनसामग्री प्राप्त केल्यामुळे तर आशिया खंडाला आण्विक आतंकवादाचा धोका वाढला आहे.

## आतंकवादाला विरोध व संघर्ष :

दुसऱ्या महायुद्धानंतर आतंकवादाचे चटके आंतरराष्ट्रीय समुदायाला बसू लागले. शीतयुद्धाच्या राजकारणामुळे आतंकवादी चळवळींनी जोर धरला. शीत युद्धाच्या अवघड

राजकारणामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर संयुक्त राष्ट्र संघटनेला त्यास विरोध करणे अवघड होते. तरीही १९७० पासून संयुक्त राष्ट्र संघटनेने प्रयत्न सुरू केले व आजपर्यंत ३०हून अधिक ठराव आतंकवादाच्या विरोधात पास केले आहेत. पैकी महत्त्वपूर्ण ठराव खालीलप्रमाणे :

### १) आतंकवादाविरूद्ध सामूहिक प्रयत्नांसाठी आमसभेत ठराव –

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १८ डिसेंबर १९७६ रोजी बहुमताने ठराव मंजूर केला व आतंकवादाच्या निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

### २) आतंकवाद विरोधी समिती –

१९७३ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने आतंकवादाच्या निर्मूलनासाठी आतंकवाद विरोधी समिती नेमली. या समितीने आतंकवादाचा अर्थ, कारणे व उपाय योजना यासाठी एक उपसमिती नेमली. मात्र, आतंकवादाविषयी समिती सदस्यांत एकमत होऊ शकले नाही.

### ३) ओलिस ठेवण्याविरूद्ध ठराव–

परराष्ट्र प्रतिनिधी, निष्पाप नागरिक, आंतरराष्ट्रीय संस्था प्रतिनिधी यांचे अपहरण करून ओलिस ठेवण्याच्या पद्धतीविरूद्ध संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेत १९७८ मध्ये ठराव पास केला गेला व या ठरावाद्वारे अपहरण करून ओलिस ठेवण्याच्या पद्धतीला आंतरराष्ट्रीय गुन्हा मानले गेले व अशा प्रकारा विरूद्ध सामूहिक कारवाईबाबत सदस्य राष्ट्रांना आवाहन करण्यात आले.

### ४) आतंकवादी संघटनाचा वापर, मदत–प्रशिक्षण देणाऱ्या राष्ट्राविरूद्ध ठराव–

आतंकवादी चळवळींचा प्रसार होण्यामागे बहुतेक राष्ट्रांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष समर्थन देणे हे महत्त्वाचे कारण. समर्थनामुळे संघटना वाढल्या, बळावल्या, त्यांचा प्रसार झाला या प्रकाराला आळा घालण्यासाठी आमसभेने समिती नेमली. समितीने एक अहवाल सादर केला. त्यावर ४ डिसेंबर १९८९ रोजी आमसभेने वरील ठराव मंजूर केला. शिवाय अशा राष्ट्रांचा तीव्र शब्दांत निषेधही केला. शिवाय समर्थन थांबविण्याचे आवाहन केले.

### ५) आतंकवाद निर्मुलना उपायांची घोषणा –

१९९०च्या दशकात आतंकवादी कारवायांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. या वाढत्या भस्मासुराला रोखण्यासाठी कडक उपाययोजनांची आवश्यकता पुढे आली. त्यातून ९ डिसेंबर १९९४ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेत आतंकवादाच्या निर्मुलनासाठी उपायांची घोषणा करण्यात आली व आतंकवादाचा सामना करण्यासाठी सामूहिक प्रयत्नांचे आवाहन करण्यात आले.

### ६) आतंकवाद निर्मुलनसाठी विभागाची स्थापना–

आतंकवादी कारवाया रोखण्यासाठी व त्यावर सामूहिक उपाययोजना करण्यासाठी आतंकवाद निर्मुलन ठरावांतील तरतुदीचे पालन सदस्य राष्ट्रांकडून होते की नाही, हे पाहण्यासाठी वरिष्ठ विभागाची १९९९ मध्ये स्थापना करण्यात आली.

### ७) आतंकवादाला मिळणाऱ्या आर्थिक समर्थनाविरूद्ध ठराव–

आतंकवादी संघटनांना काही राष्ट्रांकडून प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष मिळणारी आर्थिक मदत थांबविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघाच्या आमसभेने ९ डिसेंबर १९९९ रोजी एक महत्त्वपूर्ण ठराव पास केला व सर्व सदस्य राष्ट्रांना अशी आर्थिक मदत तात्काळ थांबविण्याचे आवाहन करण्यात आले.

### संयुक्त राष्ट्रांचे आतंकवादी विरोधी मोहिमेतील सक्रीय विभाग

संयुक्त राष्ट्राच्या आतंकवादी विरोधी मोहिमेत विविध संस्था, संघटना किंवा विभाग योगदान देत आहेत. त्यात

१) संयुक्त राष्ट्राचा अमली पदार्थ व गुन्हेगारी विरोधी विभाग– हा विभाग आतंकवादी संघटनांकडून होणाऱ्या अमली पदार्थाच्या वापराला आळा घालण्यासाठी सहकार्य करतो. २) संयुक्त राष्ट्राचा विकास कार्यक्रम– हा विभाग आतंकवादाला बळी पडलेल्या राष्ट्रांना विकासनिधी उपलब्ध करून देण्यात तसेच विकासयोजना आखण्यात मदत करतो. विकास हा या समस्यांवरील तोडगा आहे. ही भूमिका समोर ठेवून संयुक्त राष्ट्रांचा हा विभाग सक्रीय आहे.

३) आंतरराष्ट्रीय अणुशक्ती संस्था– हा विभाग किंवा संस्था आतंकवाद्यांना अण्वस्त्रे, अणु तंत्रज्ञान मिळणार नाही, यासंबंधी दक्षता घेतो. यासाठी आवश्यक त्या सूचना या संस्थेकडून राष्ट्रांना दिल्या जातात.

४) आंतरराष्ट्रीय नागरी उड्डाण संघटना– आंतरराष्ट्रीय नागरी विमान वाहतुकीचा आतंकवादी संघटनांकडून गैरवापर रोखण्यासाठी ही संघटना मदत करते.

५) विश्व आरोग्य संघटना– जैविक आतंकवाद या नवीन आतंकवादाचा सामना करण्यासाठी ही संघटना संयुक्त राष्ट्र संघाच्या सदस्य राष्ट्रांना मदत करत असते.

६) आंतरराष्ट्रीय सागरी संघटना – सागरी मार्गाच्या सुरक्षिततेविषयी दक्षता घेण्यासंबंधी ही संघटना कार्यरत आहे.

### संयुक्त राष्ट्रांच्या आतंकवाद विरोधी धोरणातील अडथळे :

### १) अपुरा निधी –

आतंकवाद विरोधी आंतरराष्ट्रीय मोहीम आवश्यक निधी अभावी प्रभावी कार्य करू शकत नाही. आतंकवाद विरूद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवर कारवाई करणे अतिशय खर्चिक बाब आहे. आतंकवादाच्या निर्मुलनासाठी स्वतंत्र आतंकवाद निर्मुलन शाखा स्थापन करण्यात आली आहे व या विभागाला निधी संयुक्त राष्ट्राच्या गुन्हेगारी निर्मुलन व गुन्हेगारी न्याय निधीतून उपलब्ध करून दिला जातो. मात्र, या कार्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्य राष्ट्रांकडून मिळणारी आर्थिक मदत फारच त्रोटक आहे. शिवाय राष्ट्र संघाच्या अर्थसंकल्पातही राखून ठेवलेला निधी पुरेसा नाही. शिवाय राष्ट्रसंघाला स्वत:चे अर्थिक स्त्रोतही नाहीत. त्यामुळे आतंकवादाचा सामना करण्यासाठी नेहमीच अपुरा निधी ही मोठी समस्या आहे.

**२) आतंकवादी कारवायांकडे विकसनशील राष्ट्रांचा पाहण्याचा पक्षपाती दृष्टिकोन :**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आतंकवाद विरोधी मोहिमेवर केला जाणारा एक महत्त्वाचा आरोप म्हणजे, आशिया-आफ्रिका खंडातील आतंकवादी कारवायांकडे पाहण्याचा पक्षपाती दृष्टिकोन होय. अमेरिकेवर आतंकवादी हल्ला झाल्यावर जी संवेदनशीलता व तत्परता संयुक्त राष्ट्रसंघाने दाखविली, ती अन्य देशांतल्या आतंकवादी हल्ल्यानंतर दाखविली जात नाही. यावरून आतंकवाद विरोधी मोहिमेवर पश्चिमी राष्ट्रांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. आशिया व पॅसिफिक क्षेत्रातील आतंकवादी कारवायांच्या निर्मुलनात संयुक्त राष्ट्रसंघाची भूमिका सक्रीय नाही, हा पक्षपाती दृष्टिकोन आतंकवादाच्या निर्मुलनातील मोठा अडथळा आहे.

**३) सदस्य राष्ट्रांचे असहकार्य :**

आतंकवाद विरोधी मोहिमेत सदस्य राष्ट्रांचे सक्रीय सहकार्य मिळत नसल्यामुळे ही मोहीम प्रभावहीन बनली आहे. संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्य राष्ट्राने आपल्या भूमीवरील आतंकवादासंबंधी महत्त्वपूर्ण माहिती स्वतंत्र अहवालाच्या माध्यमातून दिली पाहिजे या माहितीच्या देवाण-घेवाणीतून आतंकवादाचा सामना करण्यासाठी धोरणनिश्चिती व उपाययोजना ठरविणे गरजेचे आहे. शिवाय वेळोवेळी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सदस्य राष्ट्रांनी आपापल्या भूमीवरील आतंकवादाची साधने यांची माहिती पुरविली पाहिजे. मात्र, अशी माहिती वेळोवेळी संयुक्त राष्ट्रसंघाला होताना दिसत नाही. हा असहकार आतंकवाद विरोधी मोहिमेतील मोठा अडथळाच आहे.

**४) महासत्ताचे राजकारण :**

बड्या राष्ट्रांचे राजकारण त्यांचे व्यक्तिगत हितसंबंध हा आतंकवाद विरोधी मोहिमेतील मोठा अडथळा आहे. आतंकवादामुळे आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता धोक्यात आल्यामुळे त्या विरूद्ध कारवाई करण्याची मुख्य जबाबदारी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेची आहे व सुरक्षा परिषदेत कोणत्याही प्रश्नावर पाच कायम सदस्य राष्ट्रांमध्ये एकमत झाले पाहिजे, हे बंधन आहे. मात्र, या पाच कायम सदस्य राष्ट्रांच्या व्यक्तिगत हितसंबंधांमुळे अडचणी निर्माण होऊन कारवाई करण्यास अडचणी निर्माण होतात. शिवाय बड्या राष्ट्राच्या मित्र राष्ट्रांविरूद्ध कारवाई करण्यास अडचणी निर्माण होतात. महासत्ताचे हे राजकारण सुद्धा आतंकवादाच्या विरोधी मोहिमेत मोठ्या प्रमाणावर अडसर स्वरूपात पुढे येते. हे राजकारण बदलणे गरजेचे आहे.

## ९.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१) जगातील प्रत्येक राष्ट्र जागतिकीकरण व एकध्रुवीकरण या प्रणालीमध्ये ओढले गेले आहे

....................................................................................................

....................................................................................................

....................................................................................................

२) आर्थिक उदारीकरण हे जागतिकीकरणाचे प्रमुख साधन नाही

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

३) जागतिकीकरणामुळे काही राष्ट्रांना आर्थिक व राजकीय सार्वभौमत्त्व गमवावे लागेल

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

४) जागतिकीकरणामुळे उत्पादने सेवा, भांडवल, लोकमाहिती व संस्कृती या मर्यादित स्वरूपात केंद्रीत होतात

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

५) जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या, आंतरराष्ट्रीय संस्था व संघटनांचे महत्त्व वाढत जाणार आहे

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

६) जागतिकीकरणामुळे लोकांमधील अंतर वाढत आहे

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

७) जागतिकीकरण प्रक्रिया मुक्त विश्व व्यवस्थेच्या निर्मितीशी संबंधीत आहे

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

८) जागतिकीकरण प्रक्रियेत बहुराष्ट्रीय कंपन्यांची भूमिका प्रभावी दिसत नाही

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

९) १९७०च्या दशकापासून बिगर शासकीय संघटनांची भूमिका आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभावी ठरत आहे

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

१०) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत कोणत्याही राष्ट्राला अलिप्त राहणे अशक्य आहे

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

११) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे राष्ट्रांना आयात व्यापारावर जकात ठरविण्यास मर्यादा पडतात

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१२) जागतिकीकरणाची प्रक्रिया भांडवलशाही राष्ट्रांचे हितसंबंध जोपासणारी प्रक्रिया आहे

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१३) जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे गरीब व अविकसित राष्ट्रांचे शोषण होत नाही

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१४) जागतिकीकरण हे नववसाहतवादाचे साधन आहे

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१५) जागतिकीकरण प्रक्रियेत अविकसित राष्ट्रांची उत्पादन क्षमता वाढली आहे

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१६) जागतिकीकरणामुळे विकसित राष्ट्रांची उत्पादन क्षमता वाढली आहे

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१७) जागतिकीकरणाच्या युगात बहुराष्ट्रीय कंपन्या भांडवलशाही शोषण प्रक्रियेतील साधन बनल्या आहेत

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

१८) जागतिकीकरणामुळे राष्ट्रांच्या आर्थिक व राजकीय सार्वभौमत्त्वाचे उल्लंघन होत नाही

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

१९) एकध्रुवीप्रणाली म्हणजे एका राष्ट्राभोवती केंद्रीत असणारी प्रणाली

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२०) आतंकवादामुळे जगातील शांतता व सुव्यवस्थेला धोका अजिबात पोहोचत नाही

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२१) भारतावर आतंकवादी कारवायांचा विपरित परिणाम होत आहे

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२२) आतंकवादी कारवाईंचा दबावतंत्रासाठी वापर केला जातो

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२३) आतंकवाद हिंसाचारावर आधारलेली संकल्पना नाही

२४) बहुतांश आतंकवादी संघटना राजकीय व सामाजिक परिवर्तनासाठी सक्रीय असतात

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२५) आण्विक आतंकवादामुळे राष्ट्रीय सुरक्षा धोक्यात आली नाही

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२६) आतंकवाद रोखण्यास संयुक्त राष्ट्रसंघाला अपयश येत आहे

.................................................................................................................

.................................................................................................................

.................................................................................................................

२७) संयुक्त राष्ट्र संघटनेला आतंकवाद रोखण्यास अडथळे निर्माण होत आहेत

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

२८) आतंकवाद रोखण्यास महासत्ताचे राजकारण अजिबात आडवे येत नाही

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

२९) आतंकवादाच्या प्रक्रियेत मुस्लिम जनतेचा व राष्ट्राचा सहभाग अधिक आहे

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

३०) आपल्या प्रश्नाकडे जगाचे लक्ष वेधने हे आतंकवादी संघटनेचे मुख्य उद्दिष्ट आहे

..................................................................................................

..................................................................................................

..................................................................................................

## ९.४ सारांश

जागतिकीकरण व एकध्रुवीकरणप्रणाली पार्श्वभूमी, जागतिकीकरण व एकध्रुवीकरण प्रणाली अर्थ, स्वरूप यांचा अभ्यास शिवाय आतंकवाद अर्थ, स्वरूप, वैशिष्ट्ये, उद्दिष्टे, प्रकार, साधने यांचा अभ्यास प्रस्तुत घटकांत केला आहे. शिवाय जागतिकीकरणाचा राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रभाव, जागतिकीकरणाचा असंतुलित विकास, जागतिकीकरणाचे नकारात्मक परिणाम इ. समजून घेण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे.

त्याचबरोबर आंतरराष्ट्रीय राजकारणातील सध्याची अमेरिकेची भूमिका व वाढता प्रभाव आणि आतंकवादाच्या विरोधातील अडथळे समजून घेण्यास मदत होणार आहे.

## ९.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

### १) आशियान ASEAN

दक्षिण पूर्व आशियाई राष्ट्रांची ही संघटना. १९६७ मध्ये या संघटनेची स्थापना झाली. थायलंड, मलेशिया, सिंगापूर, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, ब्रुनेई, व्हिएतनाम, कंबोडिया, लाओस, म्यानमार या राष्ट्रांचा समावेश आहे.

### २) एपेक Apec

जगातील श्रीमंत राष्ट्रांचा हा व्यापार संघ. १९८९मध्ये स्थापना. अमेरिका, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जपान, दक्षिण कोरिया, न्यूझीलंड, मलेशिया, थायलंड, सिंगापूर, फिलिपाईन्स, इंडोनेशिया, ब्रुनेई, चीन, हाँगकाँग, तैवान, मेक्सिको, गिनिया, चीली इ. राष्ट्रांचा समावेश आहे.

### ३) **नाफ्टा** Nafta

जानेवारी १९९४ मध्ये स्थापना. मुक्त व्यापार क्षेत्राची निर्मिती हा संघाचा उद्देश. अमेरिका, कॅनडा, मेक्सिको इ. राष्ट्रांचा समावेश.

### ४) **युरोपियन महासंघ** Europen Union

जगातला यशस्वी व्यापार संघ. ऑस्ट्रिया, बेल्जियम, डेन्मार्क, फिनलंड, फ्रान्स, जर्मनी, ग्रीस, आयर्लंड, इटली, लक्झेमबर्ग, नेदरलँड, पोर्तुगाल, स्पेन, स्वीडन, इंग्लंड इ. राष्ट्रांचा समावेश.

### ५) **सार्क** SAARC

दक्षिण आशियाई राष्ट्रांची प्रादेशिक सहकार्य संघटना. डिसेंबर १९९५मध्ये स्थापना. भारत, पाकिस्तान, श्रीलंका, नेपाळ, भूतान, बांगलादेश, मालदीव या राष्ट्रांचा समावेश.

### ६) **विश्व व्यापार संघटना**

डंकेल प्रस्तावातून १ जानेवारी १९९५ रोजी या संघटनेचा जन्म. खुल्या बाजार वृद्धीला प्रोत्साहन व उत्पादन व रोजगार वृद्धीवर भर. अविकसित व विकसनशील राष्ट्रांना आर्थिक न्याय मिळविण्याच्या दृष्टीने प्रयत्न. आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थापन नियमांची यंत्रणा उभी केली गेली.

## ९.६ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) डॉ. देवळाणकर शैलेंद्र : आंतरराष्ट्रीय संबंधी, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद

२) प्राचार्य कदम य. ना. : समकालिन आधुनिक जग १९४५-२००, फडके प्रकाशन, कोल्हापूर

३) डॉ. आचार्य धनंजय : विसाव्या शतकातील जग, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर

४) HIS २८३ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ : सार्क देशांचा इतिहास

५) डॉ. तांबोळी एन. एस., राजन स्वाती : पहिल्या महायुद्धानंतरचे जग, १९१८ ते १९९२, निराली प्रकाशन

६) प्रा. वाईकर अनंत : आंतरराष्ट्रीय राजकारणें, निराली प्रकाशन

७) प्रा. कुलकर्णी बी. वाय : आंतरराष्ट्रीय संबंध, विद्या प्रकाशन, नागपूर

८) दीक्षित नी. सी. : युरोपचा इतिहास, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

९) प्रा. उदगावकर म. न. : एकविसाव्या शतकातील दहशतवाद, डायमंड पब्लिकेशन, पुणे

१०) शरण शंकर : जिहादी आतंकवाद, राजपाल प्रकाशन, दिल्ली.

११) डॉ. रत्तू कृष्ण कुमार : जिहाद और आतंक बुक एनक्लेव प्रकाशन, जयपूर

१२) खंडेला मानचन्द : आंतरराष्ट्रीय राजनीती, अरिहंत पब्लिशिंग हाऊस, जयपूर.

## ९.७ सरावासाठी स्वाध्याय

१) जागतिकीकरणाचा अर्थ सांगून जागतिकीकरणाची प्रमुख वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) जागतिकीकरणाचे स्वरूप स्पष्ट करून राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातील प्रभाव विशद करा.

३) जागतिकीकरणाच्या नकारात्मक परिणामांवर चर्चा करा.

४) एकध्रुवीकरण प्रणाली म्हणजे काय ते स्पष्ट करून स्वरूप, तत्त्वे व वैशिष्ट्ये यावर भाष्य करा.

५) आंतरराष्ट्रीय राजकारणातील सध्याची अमेरिकेची भूमिका स्पष्ट करा.

६) आतंकवादाचे प्रकार स्पष्ट करून आतंकवादाच्या साधनांवर भाष्य करा.

८) संयुक्त राष्ट्रसंघाच्या आतंकवाद विरोधी धोरणातील अडथळे स्पष्ट करा.

९) संयुक्त राष्ट्रसंघाचा आतंकवाद विरोधी मोहिमेतील सक्रीय विभागावर भाष्य करा.

# घटक १०
# विकासाचे युग

## अनुक्रमणिका

१०.० उद्दिष्ट्ये
१०.१ प्रस्तावना
१०.२ विषय विवेचन
  १०.२.१ विज्ञान आणि तंत्रज्ञान
  १०.२.२ दळणवळण आणि महिती तंत्रज्ञान
  १०.२.३ अणू चाचणी
१०.३ स्वंय अध्ययनासाठी प्रश्न
१०.४ सारांश
१०.५ पारिभाषिक शब्द
१०.६ संदर्भसूची

## १०.० घटकाची उद्दिष्ट्ये

१) पदार्थविज्ञानातील प्रगतीचा आढावा घेता येईल.
२) रसायनशास्त्रातील मुलद्रव्याचा विकास कसा झाला हे समजले.

## १०.१ प्रस्तावना

पंधराव्या शतकात प्रबोधन चळवळीनंतर जगात आधुनिक प्रगतीला सुरुवात झाली. इजिप्त, हिंदू चीन, बॅबोलोनिया, ग्रीक व रोमन ह्या प्राचीन संस्कृतीच्या काळात विज्ञानाची अनेक क्षेत्रात विकास झालेला होता. मध्ययुगात अस्थिर व अप्रगत काळात प्रगती थंडावली होती. १८ व्या व १९ व्या शतकात वैज्ञानिक प्रगतीने बराच मोठा टप्पा गाठलेला होता. युरोप, अमेरिका व इतर देशात वैज्ञानिक अदयास आले आणि विज्ञानाच्या असंख्य शाखा विकसित होत गेल्या. प्राणीशास्त्र, रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र पदार्थ विज्ञान इ. अनेक क्षेत्रात नवनवे शोध लागले व त्यांनी मानवाची विविध क्षेत्रे समृद्ध केली.

विसाव्या शतकात विज्ञामुळे विविध क्षेत्रात प्रगती व परिवर्तने घडून आली. २० व्या शतकात प्रगतीचा प्रचंड वेग होता. अवकाश संशोधने, अणुशक्ती, जननशास्त्र, कृषीविज्ञान, कृत्रिम उपग्रह, क्षेपणास्त्रे, गणकयंत्र, माहिती तंत्रज्ञान, दळणवळणाची साधने ही वर्तमान विज्ञानाची प्रतिके आहेत. या शतकात विज्ञानाच्या तंत्रज्ञानाची जोड मिळाल्याने विज्ञानाच्या

क्षेत्रात सर्वत्र विकास घडून आला. या तंत्रज्ञानाची सुरुवात १९ व्या शतकात झाली. वैज्ञानिक संशोधनाचा व्यावहारिक जीवनात उपयोग करण्यास सुरुवात झाली. या वैज्ञानिक संशोधनाचा व्यावहारिक जीवनात उपयोग करण्याच्या पद्धतीला. ''तंत्रज्ञान'' असे म्हणतात. वैज्ञानिक अणुशक्ती, दळणवळण उपग्रह किंवा यंत्राचे संशोधन करतो. त्या आधारे विविध यंत्रे उपयोगाला आणण्याचे कार्य विविध व्यक्ती, संस्था व कंपन्या करीत असतात.

## १०.२. विषय विवेचन

### १०.२.१ विज्ञान आणि तंत्रज्ञान

प्रबोधन काळाच्या आधी युरोपच्या जनतेवर धर्माचे अवास्तव प्राबल्य होते. चर्च म्हणेल तेच खरे मानले जाई. त्याविरुद्ध आवाज उठविण्याचे धाडास कोणीही करत नव्हते. परंतु प्रबोधनामुळे अंधकाराचे युग समाप्त होऊन ज्ञानाचा प्रकाश दिसू लागला. त्यांचा व्यावहारिक जीवनात उपयोग करण्यात आला. या पद्धतीला 'तंत्रज्ञान' असे म्हणतात. ते तंत्र उपयोगात आणण्याचे कार्य विविध व्यक्ती, संस्था, शासन व कंपन्या करीत आहेत. त्यासाठी लागणारी साधनसामुग्री व पैसा ते उपलब्ध करून देऊ लागले. मोटारीचे विज्ञान माहिती असून ती चालणार नाही. तर ती प्रत्यक्षात तयार करून बाजारात विक्रीला आणावी लागते. याच प्रकियेला तंत्रज्ञान म्हणतात. प्रगत राष्ट्रांच्या अनेक विज्ञान संस्था, शासन, भांडवलदारांच्या (कंपन्या) प्रयत्नातून आधुनिक तंत्रज्ञानाचा विकास झाला. तंत्रज्ञानामुळे वैज्ञानिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीला चालना मिळाली. विज्ञान हे तंत्रज्ञानाचा मंत्र आहे आणि तंत्रज्ञान विज्ञानाचे व्यावहारिक दृश्य रूप आहे. विज्ञानशास्त्रात प्रगती केली; परंतु तंत्रज्ञानात अपेक्षित प्रगती न केल्यामुळे आपला देश वैज्ञानिक स्पर्धेत मागे राहिला आहे.

**वैद्यकशास्त्रातील प्रगती**

१९ व्या शतकात वैद्यकशास्त्रात फार मोठ्या प्रमाणावर प्रगती घडून आली. विविध रोगांवर उपाययोजना करण्यासाठी विविध औषधे, शल्यचिकित्सा, विविध तंत्रे व रोगनिदान यंत्रे शोधून काढलेली होती. वैद्यकशास्त्राच्या अनुषंगाने जीवशास्त्राचा व वनस्पतीशास्त्राचा विकास घडून आला. औषधशास्त्र, जननशास्त्र, शल्यचिकित्सा, पेशीविज्ञान, अवयवरोपण, आरोग्यशास्त्र, गर्भविज्ञानशास्त्र व अस्थिशास्त्र अशा १०० हून अधिक शाखा व उपशाखा निर्माण झाल्या आहेत. आज प्रत्येक रोगाचे व अवयवांचे स्वतंत्र डॉक्टर्स आहेत. 'क्ष' किरण, लेसर किरण, इ. सी. जी. आवश्यक असलेल्याच्या स्कॅनिंग असे अनेक यंत्र व तंत्रांचा उपयोग करून रोगाचे निदान व रोग उपचार करता येणे सहज शक्य झाले आहे. संगणकाच्या साह्याने रोगाने निदान करून व इंटरनेटद्वारे इतर ठिकाणच्या डॉक्टरांशी विचारविनिमय करून उपचार करणे सहज शक्य झाले आहे.

१९२८ साली अलेक्झांडर फ्लेमिंगने पेनिसिलीनचा शोध लावला व नंतरच्या संशोधकांनी अनेक पेनिसिलीन व स्ट्रप्टोमायसीन, टेट्रासायक्लिन व क्लोरोमायसिटीनसारखी औषधे शोधून काढली. १९५३ मध्ये डॉ. साल्कने पोलिओ व रोगाची लस तयार केली.

प्लास्टिक सर्जरी करून कुरुपपणा नाहीसा करण्याचे व चेहरेपट्टीच बदलण्याचे तंत्र

विकसित करण्यात आले. मृतांचे किंवा अन्य व्यक्तीचे डोळे, हृदय (१९६७), मुत्रपिंड व अनेक अवयव शरीरात स्थापित करणे, ''अवयव रोपन'' शास्त्र मोठ्या प्रमाणावर विकसित झाले. लिंगनिदान व गर्भाशयातील बालकाच्या स्थितीचा शोध घेणारी 'सोनोग्राफी' अस्तित्त्वात आली. आपत्याहीन पालकांना बालकाला जन्म देणारे विज्ञान जन्माला आले आणि अपत्यहिनांना अपत्यप्राप्तीचा आनंद मिळाला.

## जननशास्त्राची निर्मिती

''जननशास्त्र'' ही एक वैद्यकशास्त्राची शाखा मोठ्या प्रमाणावर विकसित झाली. १९ व्या शतकात ग्रेग्रार मेंडेल (१८२२-८४) ह्या ऑस्ट्रेलियन शास्त्रज्ञाने अनुवंशशास्त्राचा पाया घातला. वनस्पतीवर प्रयोग करून नवीन संकरित बिजाचा शोध लावला. माणसांचे अनुवंशिक गुण तिसऱ्या पिढीत समान पद्धतीने येतात व संकरित पिढी जास्त कार्यक्षम व प्रभावशाली असते हे त्याने प्रयोगाने सिद्ध केले.

सजीव प्राणी व माणसातल्या पेशी रंगसुत्रे व गुणसुत्रे (D. N. A.) वैज्ञानिक पद्धतीने बदल केल्यास मनुष्याचे रंगरूप, उंची व स्वभाव बदलू शकतात  हा क्रांतीकारी सिद्धांत शास्त्रज्ञांनी मांडला. थॉमस मार्गन व जगभरातले शास्त्रज्ञ या संशोधनात गढून गेलेले आहेत. हे जननशास्त्र विकसित झाल्यास विज्ञानाच्या प्रभावाने  सुंदर, बुद्धीमान, धाडसी, प्रेमळ, क्रूर किंवा सज्जन माणूस तयार करता येईल. ह्या दृष्टीने सद्यस्थितीत (२००१) संशोधकांनी 'क्लोनीज' पर्यंत मजल मारलेली आहे.

विज्ञानाने कृत्रिम हृदय, अवयव, यंत्रमानव (रोबो), मेंदू (गणकयंत्र) तयार करण्यात यश मिळविलेले आहे. हे  मानवाचे अस्तित्त्व संपविण्याचे चिन्ह आहे आणि त्यातून नीतीमूल्यांचे गंभीर प्रश्न निर्माण होतील. भारतातील हरगोविंद खोरांतानी अनुवंश शास्त्रातल्या गुणसुत्रावर मूलगामी संशोधन केले. (१९८१) डॉ. जगदीशचंद्र बसू मनुष्याप्रमाणेच वनस्पतींना संवेदना असतात. (लाजाळू वनस्पती) हे प्रयोगाने सिद्ध केले.

## अवकाश संशोधनातील प्रगती

प्राचीन काळापासून भारत, ग्रीस व अरब राष्ट्रातील ज्योतिष व खगोलशास्त्राच्या माध्यमातून अवकाश संशोधनशास्त्राचा अभ्यासाला प्रारंभ केलेला होता. प्राचीन व मध्ययुगीन संशोधनात अनेक चुका व गैरसमज होते. प्रबोधनानंतरच्या १८ व्या व १९ व्या शतकात खगोलशास्त्राचा तर्कशुद्ध अभ्यास सुरू झाला. ग्रहताऱ्यांच्या हालचाली, ग्रहणे व विश्वनिर्मिती आदीचे संशोधन झालेले होते. २० व्या शतकात अवकाश संशोधनाने आकाशात प्रचंड झेप घेतली आणि खगोलशास्त्र, विश्वोत्पत्तीशास्त्र व अंतराळ संशोधनशास्त्र या उपशाखाचा स्वतंत्र अभ्यास सुरू झाला.

रॉबर्टसन गॅमॉव्ह, जयंत नारळीकर व डॉपलरने महत्त्वपूर्ण संशोधन केले. प्रकाशाचा वेग प्रती सेकंदाला १.८६.००० मैल आहे. पृथ्वी व सूर्य असलेल्या आकाशगंगेत अब्जावधी तारे आहेत. आकाशगंगेचे विश्व बनलेले आहे. अमेरिकेने प्रारंभी १०५ परीघांची आणि १९४८ साली २०० व्यासाची अजस्त्र दुर्बीण तयार केली. त्यामुळे अवकाश निरीक्षणाला गती मिळाली.

२० व्या शतकात रशिया व अमेरिका यांनी अवकाश संशोधनात फार मोठ्या प्रमाणावर प्रगती केली आहे. त्यामुळे अमेरिका व रशिया या देशात शीत युद्ध घडून रशियाने पहिला कृत्रिम उपग्रह स्फुटनिक-१ १९६७ अवकाशात पाठविला. त्याचवर्षी स्फुटनिक २ हा कुत्रीसह अवकाशात सोडला.

अमेरिकेने देखील १९५८ एक्सप्लोअर-१ हा पहिला कृत्रिम उपग्रह अवकाशात पाठविला. १९६४ साली रेंजर-७ या अमेरिकन यानाने चंद्राच्या पृष्ठभागाची हजारो छायाचित्रे काढली. १९६६ साली रशियाने अवकाशयान चंद्रावर (मानवरहित) उतरविले. अमेरिकेने हा उपक्रम पूर्ण केला. १९६९ नील आर्मस्ट्राँग या चंद्रविराने चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. जगाच्या इतिहासातील हा महत्त्वपूर्ण दिवस होता. नंतर दगडमाती पृथ्वीवर आणली. पृथ्वी व चंद्राचे दळणवळण सुरू करून तेथे मनुष्यवस्ती करण्याचा संशोधकांचा इरादा आहे. मंगळ, शुक्र व गुरू या ग्रहाभोवती अवकाशयान पाठवून माहिती मिळविण्याचा प्रयत्न चालू आहे. मंगळावर पाणी व भूमी असल्याचे पुरावे सापडले आहेत. ग्रहताऱ्याचे संशोधन, कृत्रिम उपग्रह निर्मिती, विविध प्रकारच्या उपग्रहाद्वारे आकाशमार्गे माहिती, दळणवळण व सागर संचार आदीची वैज्ञानिक प्रगतीत भर पडत आहे.

अमेरिके पाठोपाठ रशिया, चीन, भारत व इतर देशांनी अवकाश संशोधनात मोठी प्रगती केली आहे. NASA आणि ISRO या दोन अवकाश संशोधन संस्था अस्तित्त्वात आहेत.

भारताने १९९७ साली अवकाशात Inset-२ हा उपग्रह सोडला. प्रसारण व प्रक्षेपण या क्षेत्रात स्थान निश्चित केले. २००० मध्ये इन्सॅट-३ अवकाशात सोडला. हवामानावर नियंत्रण ठेवणारे व माहिती पुरविणारे, दूरदर्शन, टेलीफोन व मायाजाल (इंटरनेट) सागरसंचार करणाऱ्या पाणबुड्या इ. शोध भारताने लावला. अवकाशात तरंगणारी प्रयोगशास्त्र (स्कायलॅब) अमेरिकेने तयार केली आहे.

## पदार्थविज्ञान आणि भौतिकशास्त्रातील प्रगती

भौतिकशास्त्राची प्रगती ही मानवाच्या नजरेत भरणारी आहे. या शाखेने मानवी जीवन सुखी, समृद्ध केले आहे व तेवढेच भयग्रस्त व व्याकुळ बनविले आहे. ''विज्ञान शाप की वरदान'' असा प्रश्नचिन्ह निर्माण झालेला आहे. कारण भविष्यांतील संहारक शस्त्रास्त्रे त्याने निर्माण केली आहेत. म्हणून या शास्त्राची व्याप्ती मोठी आहे आणि त्याचा उपयोग ही अनंत आहेत.

२० व्या शतकात अणुऊर्जा, किरणोत्सारी द्रव्य, पेट्रोलियम पदार्थ, सौरशक्ती व पवनशक्ती ही साधने उपलब्ध झाली. अणुशक्ती व पेट्रोलियमने आश्चर्यजनक प्रगती केली आहे. अलबर्ट आईनस्टाइनने १९०५ साली सापेक्षवादाचा सिद्धांत मांडला व $E=Mc^2$ हे अभिनव सूत्र जगासमोर आणले. या सिद्धांताचा वापर करून शास्त्रज्ञांनी अणुशक्तीची निर्मिती केली. म्हणून आईनस्टाइनला सापेक्षवादाचा व अणुशक्तीचा जनक मानतात.

डॉल्हन वेकवेहेल, थॉमसन, पेरीक्युरी, मेरीक्युरी, वाल्टन, नील्सभोर, फर्मी, हान, सदरफोर्ड इ. शास्त्रज्ञांनी अमेरिकेच्या अथक प्रयत्नातून अणुशक्तीची निर्मिती केली. जगातला पहिला अणुसिद्धांत भारतातील ऋषी कणाद याने ''वैशैषिक दर्शन'' या ग्रंथात इ. स. तिसऱ्या शतकात मांडलेला होता. अणुत न्युट्रॉन, प्रोटॉन व इलेक्ट्रॉन हे तीन घटक

असतात. टाचणीच्या एका टोकावर १०० दशलक्ष अणू राहू शकतात. फर्मी, रॉबर्ट व निल्सभोर यांनी अणुविभाजन करणारा पहिला अणुबॉम्ब १५ जुलै १९४५ मध्ये तयार केला व अमेरिकेने ६ व ९ ऑगस्ट १९४५ हिरोशिमा व नागासाकीवर अणुबॉम्बचे हल्ले केले. अणू विभाजनामुळे अणुच्या प्रचंड शक्तीचे दर्शन संपूर्ण जगाला झाले.

अमेरिकेच्या अणुशक्ती मंडळाने हायड्रोजन बॉम्ब १९५२ तयार करून प्रशांत महासागरात स्फोट केला. त्यामुळे ते बेट पूर्णपणे उद्‌ध्वस्त झाले होते. १९०० साली मॅक्सप्लॅकने 'शक्तीपुंजवादाचा' सिद्धांत मांडला. या संशोधनामुळे प्रकाश उष्णता व विद्युत चुंबकीय किरणाच्या कणस्वरूप लहरीचा गणकयंत्रे, उपग्रह, दूरदर्शन इ. क्षेत्रात उपयोग झाला. अणुशक्तीची अणुबॉम्ब, अणुऊर्जा, लेसर किरण व अणुपाणबुड्या ही विविध रूपे आहेत.

२० व्या शतकात टेलर वे यंग याने रडार या अभिनव यंत्राचा शोध (१९४०) लावला. हवामान भूकंप व वादळाचा शोध घेणारे रडार आणि विमाने उपग्रह नौदल व सागरी विभागाची माहिती पुरविणारे विविध प्रकारची रडार तयार करण्यात आले. पीटारीच्या उत्पादनात अमेरिका, जापान, युरोपीय राष्ट्रांनी आघाडी मिळविली. बोटी, रेल्वे, विमान वाहतुक रेडिओ (१९१०) दूरदर्शन (१९४५) सेल्युलोज फोन S. T. D. I. S. D. नेटवर्कींग्ज व उपग्रहाच्या साधनांची माहिती, प्रसारण व प्रक्षेपणाच्या क्षेत्रात सुधारणा घडून आल्या आहेत. अनेक क्षेत्रात संगणकाचा वापर केला जातो. विविध भाषांचे सॉफ्टवेअर तयार करण्यात आले आहे.

## शस्त्रास्त्रनिर्मिती

विज्ञानाने संहारक शस्त्रास्त्रांना जन्म दिला आणि महासत्तांनी आपल्या हिंसाचारी महत्त्वकांक्षेपोटी विज्ञानाला संहारक शस्त्रास्त्र साठा करण्यास सुरुवात केली. अणुबॉम्ब, हायड्रोजन बॉम्ब, अणुपाणबुड्या व किरणोत्सारी शस्त्रास्त्रे इ. प्रकारची विज्ञानाने आधुनिक अणु शस्त्रास्त्रे निर्माण केली. अमेरिका, चीन देशांनी दूरवर मारा करणारी क्षेपणास्त्रे निर्माण केली आहेत. त्यांचा वेग प्रतितास २०,००० ते ३२,००० कि. मी. आहे. अशी हजारो मिसाईल महासत्ताकडे आहेत.

भारताने १९४७ व १९९८ पोखरण येथे यशस्वी अणुचाचण्या केल्यानंतर भारत अण्वस्त्र सज्ज बनला. पाकिस्तानकडेही शाहीन १९९८ व घोरी १५०० कि. मी. मारा करणारी अण्वस्त्र आहेत. भारत त्रिशुळ, अग्नी-१ व अग्नी-२ क्षेपणास्त्रे व इस्त्रोने SL. U., PSLV, IRS इन्सॅट-३ या उपग्रहाचे यशस्वी उड्डाणे करून अवकाश संशोधनात आघाडी घेतली आहे.

रामन, होमी भाभा, रामण्णा, सेठना, साराभाई, अय्यंगार, श्रीनिवासन राव, अब्दुल कलाम या भारतीय शास्त्रज्ञांनी भौतिकशास्त्रात मोलाची कामगिरी केली आहे. जगदीशचंद्र (वनस्पतीशास्त्र) जयंत नारळीकर (खगोलशास्त्र) हे आंतरराष्ट्रीय संशोधक आहेत.

## शेती क्षेत्रातील प्रगती

कृषी हा अर्थव्यवस्थेवर व राष्ट्रीय उत्पन्नाचा महत्त्वपूर्ण घटक आहे. जागतिकीकरणाचा व विज्ञान तंत्रज्ञानाचा परिणाम कृषी क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात झाला आणि जगातील लहानमोठ्या देशांनी कृषी उत्पादनात तंत्रज्ञानामुळे विक्रमी वाढ केली आहे.

शेती क्षेत्रात दुय्यम स्थान निर्माण झाले होते. परंतु कृषीप्रधान देशांनी मात्र कृषीक्षेत्रात फार मोठी आघाडी घेतली आहे. औद्योगिक क्रांतीनंतर २१ व्या शतकापासून हरित क्रांतीला प्रारंभ झालेला आहे. युरोप, जापान व अमेरिकेने उत्पादन वाढविले. लोकशाहीवादी किंवा साम्यवादी शासनकर्त्यांनी शेतीक्षेत्राला विविध प्रकारची मदत करून कृषी उत्पन्न वाढविले.

युरोप, अमेरिकेच्या तुलनेत आशिया व आफ्रिका खंडातील देशामध्ये शेतीतील विकासाला २० व्या शतकात प्रारंभ झाला. अमेरिका, जपान व युरोपीय देशांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा वापर करून १९ व्या शतकापेक्षाही जास्त प्रगती केली आहे. त्यामुळे त्यांचे उत्पादन आफ्रो-आशियाई देशापेक्षाही जास्त होते.

## कृषीक्षेत्रातील विकासाची कारणे किंवा ठळक वैशिष्ट्ये

१) मध्ययुगीन सरंजामशाही प्रथेचा अस्त.

२) पडीक जमिनी लागवडीखाली आणण्याची वेगवान प्रक्रिया व जमिनीच्या संख्येत वाढ.

३) वैज्ञानिक शोध, नवीन कृषीतंत्रज्ञानाचा उदय व शेतीचे आधुनिकीकरण, संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशक, सिंचन व्यवस्था नवनवीन कृषीयंत्राचा वापर.

## १०.२.१ विज्ञान आणि तंत्रज्ञान

२० व्या शतकात जागतिकीकरणाच्या काळात दळणवळण आणि माहिती तंत्रज्ञान यामध्ये मोठ्या प्रामाणावर बदल झालेले आहेत. या बदलामुळे जग फारच जवळ आले आहे. जगाच्या कोणत्याही कानाकोपऱ्यात घडलेली घटना एका क्षणात जगभर पसरते. तसेच जगातील कोणतेही माहिती घरी बसून इंटरनेटवरून मिळू शकते किंवा जगातल्या कोणत्याही व्यक्तीशी संपर्क प्रस्थापित करू शकतो. तसेच मालाची ने आण करण्यासाठी रेल्वे, जहाज, हवाई वहातूक किंवा दळणवळणाची साधने मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत.

तारायंत्र, टेलिफोन, रेल्वे, आगबोटी यांनी नवे युग सुरू झाले. मोटार, ट्रक्स, विमाने, चलत चित्रपट, रेडिओ यांचा शोध लागला. तांत्रीक प्रगतीमुळे पावलांनी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेने मोठी गती घेतली. जगातील उद्योगधंद्याच्या विश्वात त्यांचा वापर मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. अनेक नवनवीन शोधामुळे व तंत्रज्ञानामुळे जग अतिशय जवळ आले आहे.

## १०.२.२ दळणवळण आणि महिती तंत्रज्ञान

### रेल्वे वाहतुक/दळणवळण

रेल्वे या इंग्रजी शब्दाचे मराठी भाषेतील रूपांतर म्हणून ''लोहमार्ग'' हा शब्दप्रयोग केला जातो. परंतु रेल्वे या मूळ इंग्रजी शब्दाचा अर्थ 'रुळांचा रस्ता' असा होतो. लोहमार्गावरून ये-जा करणाऱ्या रेल्वे परिवहन व्यवस्थेचे पुढील घटक असतात १) लोहमार्ग, २) लोहमार्गवरून चालणारी वाहने, ३) वाहनांना ओढणारे स्वयंचलीत इंजिन लोहमार्गांना दोन समांतर जोडलेल्या लोखंडी पट्ट्याना कळ असे म्हणतात. भारतात रेल्वे

बॉड ग्रेज, मीटर गेज, नॅरो गेज रुंदीच्या अंतरावर रुळ असतात. सर्वसाधारणपणे सपाट जमीनीवर रुंद अंतराचा अवलंब केला जातो.

इ. स. १८३०-९० : १८३० मध्ये लिव्हरपूर ते मॅचरेटर आणि बॉल्टिमोर ते ओहायओ या दोन रेल्वे परिवहन व्यवस्था सुरू झाल्यानंतर २० ते २५ वर्षात जगातील अनेक देशात रेल्वे व्यवस्था सुरू झाली. १८७० च्या सुमारास रेल्वेचे जाळे संपूर्ण जगामध्ये पसरले. नव्या यांत्रिक वाहतुक साधनांचा जगामध्ये विशेषत: पाश्चिमात्य देशात, झपाट्याने प्रचार व प्रसार होण्याचे महत्त्वाचे कारण औद्योगिक क्रांती होय. औद्योगिक क्रांती काळात यांत्रिक संशोधनाचा उपयोग रेल्वे दळणवळण होण्यास उपयोग झाला. तसेच रेल्वे परिवहन व्यवस्थेमुळे औद्योगिकीकरणाचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झाला. अमेरिका, रशिया, इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, भारत, जपान, चीन या देशांमध्ये रेल्वे वाहतुकींची विशेष प्रगती झालेली दिसते. त्या देशातील मानवी जीवनावर व जीवनमान उंचवण्यावर मोठा परिणाम घडून आला.

जगात पहिली रेल्वे वाहतूक सुरू करणाऱ्या इंग्लंडमध्ये केवळ एका वर्षात २,१०० कि.मी. अंतराचे रेल्वे मार्ग कार्यान्वीत झाले. इंग्लंड शासनाने ४०० नवा लोहमा ग बांधकामास मान्यता दिली. दळणवळाच्या क्षेत्रात १९५०नंतर संपूर्ण जगात वहातूक व्यवस्थेत रेल्वेने अतिउच्च स्थान प्राप्त केले आहे. आज भारत रेल्वे वाहतुकीमध्ये सर्वात प्रथम क्रमांकाचा देश म्हणून ओळखला जातो.

अमेरिका, रशिया, युरोप व आशिया व आफ्रिका खंडात मोठ्या प्रमाणावर रेल्वे वहातूकमध्ये व दळणवळणात सुधारणा होऊन विकास घडून आला. १९६० नंतर आशियाई व आफ्रिकेतील अनेक विकसनशील व अविकसीत राष्ट्रात वाहतुकींच्या साधनामध्ये अत्यंत सोयीचे व स्वस्त मालाची आयात-निर्यात करण्याकरीता रेल्वेचा वापर केला जातो.

वाहतूक करणाऱ्या डब्याना किंवा रेल्वेला वाघिणी असे संबोधले जाई. भुपृष्ठावरून होणाऱ्या वाहतूक साधनांपेक्षा रेल्वेला कमी प्रमाणावर शक्ती लागते तसेच मालगाडी ५००० टनापेक्षाही जास्त जड वहातूक लोहमार्गावरून करीत असते. माल वाहतूक पद्धतीत हे प्रमाण दर टनास ८-१० अश्वशक्तीचे इंजन वापरले जाते. रेल्वे व्यवस्थेत यांत्रिक गुणवत्तेमुळे वाहतूक व्यवस्था अतिशय सुरळीत झाली आहे.

सुरुवातीला वाफेवर चालणारे इंजीन यांचा शोध ''जेम्स वॅट'' यांनी लावला. त्यानंतर डिझेल इंजीन व विद्यूत इंजीनाचा वापर केला जाऊ लागला. रेल्वेचा विकास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. १९७१ ला अनेक अविकसीत देशात वसाहत वादामुळे रेल्वे वहातूक सुरू झाली. परंतु त्यानंतर त्या देशांनी रेल्वेचे जाळे संपूर्ण जगभर पसरलेले आहे. युरोप खंडातील अनेक देश रेल्वेमुळे एकत्र आलेले दिसतात. तसेच आशियाई देशातील चीन, भारत, जपान, पाकिस्तान, श्रीलंका या देशातही रेल्वेचाही विकास झालेला दिसतो. जगातील २०% लोक दररोज रेल्वेने प्रवास करताना आढळतात.

रेल्वेच्या वहातुकीद्वरा अन्नधान्य, कपडे, फळे, भाज्या, सिमेंट इ. वस्तुंची मोठ्या प्रमाणात आयात-निर्यात केली जाते. दगडी कोळसा, मांस तसेच धान्य हे मोठ्या प्रमाणात निर्यात होते. इंधनामध्ये कच्चे ऑईल, डिझेल, पेट्रोल, केरोसिन ऑईल इ. वस्तुंची मोठ्या

क्रमाणावर ने-आण केली जाते. आज रेल्वेमुळे सर्व देश एकमेकांना जोडलेले आहेत. त्यातून प्रवासी वाहतुकही केली जाते.

## हवाई वाहतूक -

दळणवळणाच्या साधनातील अत्यंत जलद व महत्त्वाचे साधन म्हणून हवाई वाहतूक महत्त्वाची मानली जाते. जॉन राइट, ऑव्हिल या अमेरिकन संशोधकांनी विमानाचा शोध लावला. आणि विमानाची शक्तिचलीत, अविरत व नियंत्रित उड्डाणे साध्य करण्याचे महत्त्वाचे काम १९०५ पर्यंत पूर्णपणे यशस्वी केले.

१९४७ नंतर अनेक देशामध्ये विमानसेवा सुरू झाल्या असून भारताकडे इंडीयन एअर लाईन्स व किंगफिशर, स्वतंत्र विमान कंपनी आहे. भारताबरोबरच जपान, चीन, इंग्लड, रशिया, अमेरिका या सर्व देशाकडे विमान (हवाई व्यवस्था) असून वस्तुचे ने-आण करणे तसेच दळवळणात अत्यंत गती आलेली दिसून येते. हवाई वाहतूकीमुळे अनेक देशाच्या खेड्यातील भाजीपाला, वस्तु त्वरीत निर्यात करता येतात व त्यामालाची चांगली किंमत मिळत आहे.

## रस्ते दळणवळण - मोटार वाहतूक

२० व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे मोटार वाहतुकीमध्ये मोठ्या प्रमाणावर सुधारणा झाल्या आहेत. आंतरराष्ट्रीय हायवे रोड तयार झाले. त्यामुळे मोटार वाहतूक व्यवस्था अतिशय सुरळीत झाली आहे.

ट्रक्स मोटारी, मोठी वाहने तसेच तेल वाहतूक करणारे टँकर, दुध आयात-निर्यात करणारी वाहने यांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला. एवढेच नव्हेतर आंतरराष्ट्रीय वहातूक व्यवस्था सुरळीत झाली आहे. विज्ञानामुळे तंत्र व यंत्र सामुग्रीत भर पडल्याने आधुनिक दळणवळणास क्षेत्रात प्रगती झालेली आहे.

## जल वाहतूक

मालाची आयात-निर्यात व प्रवासी यांची वाहतूक अनेक प्रकारांनी केली जाते. पाण्यातून किंवा पाण्याच्या पृष्ठभागावरून वाहतूक केली जाते तेव्हा त्या वाहतूकीस जलवाहतूक असे म्हणतात. पृथ्वीच्या भुपृष्ठापैकी तीन चतुर्थांश भाग पाण्याने व्यापलेला आहे. म्हणून जलवाहतूक जगभर आढळते.

वेगवेगळ्या प्रकारची वाहने पाण्यातून वाहतूक करण्यासाठी वापरली जाातात. असे जल वाहतुकीची साधने समुद्राच्या किनारी सगळेकडे आढळतात. त्यासाठी प्रेरक शक्ती अनेक प्रकारच्या वापरतात. वल्हे, शिडातील वारा, वाफेचे इंजिन, डिझेल इंजीन इत्यादी प्रेरक शक्तीद्वारा जल वाहतूकीची साधने कार्यान्वयीत केली जातात. आजच्या युगात अणू या प्रेरक शक्तीचा ही वापर केला जातो. अत्याधुनिक इंधन म्हणून अणुशक्तीचा वापर मोठ्या बोटीमध्ये केला जातो. ज्या माध्यमातून वाहतूक होते. त्यावरूनच वाहतुकीची वर्गवारी केली जाते. नदितील वाहतुकीस नदीवाहतूक, कालव्यातील वाहतुकीस कालव्याची वाहतूक राष्ट्राच्या किंवा देशाच्या समुद्र किनाऱ्यालगत होणाऱ्या वाहतुकीस सागरी वाहतूक असे म्हटले जाते.

## जल वाहतुकीचे फायदे –

दळणवळणच्या इतर साधनापैकी जलवाहतूक ही अतिशय सोयीची व फायदेशीर ठरते. रेल्वे किंवा मोटार वाहतुकीप्रमाणे लोहमार्ग व रस्ते बांधणीचा खर्च करावा लागत नाही. फक्त बंदरावरील, नदीतळाचा व कालवे तळाचा गाळ काढण्याचीच व्यवस्था करावी लागते. जलवाहतुकीस रेल्वे व मोटार प्रमाणेच इंधनाची आवश्यकता असते. वाहनाच्या वजनाच्या कितीतरी पट वजनाचा माल वाहनातून कमी खर्चात वाहतूक करता येतो. जलवाहतूक करताना अनेक दूरच्या देशांशी संपर्क ठेवून दळणवळण वाढविता येते. त्यामुळे आर्थिक व्यवहाराचे क्षेत्रही वाढताना दिसते. संरक्षणाच्या दृष्टीनेही जलवाहतूक अतिशय महत्त्वाचे साधन आहे.

युरोप खंडात रोमन साम्राज्याच्या काळापासून जलवाहतुकीला अतिशय महत्त्व आहे. १४९२ पोर्तुगीज प्रवासी हिंदुस्थानचा जलमार्ग शोधत तो वेस्ट इंडिज बेटावर जाऊन पोहोचला. अशा रीतीने कोलंबसन अमेरिकेचा शोध लावला.

जॉन हेन्री या पोर्तुगीज राजाने हिंदुस्थान जलमार्ग शोधून काढण्यासाठी केलेल्या प्रयत्नातूनच १४९८ मध्ये वास्को–द–गामा यांने केप ऑफ गुड होपला वळसा घालून हिंदुस्थानच्या पश्चिम किनारपट्टीवर कालीकत बंदरावर येऊन पोहोचला. पोर्तुगीजानी जलमार्ग खुले न ठेवता आपली मक्तेदारी निर्माण केली. पोर्तुगीजां पाठोपाठ डच, फ्रेंच, इंग्रज इ. युरोपीय देशांनी जलवाहतुकीत आपले वर्चस्व सिद्ध केले. १९५० पर्यंत अनेक धाडसी खलाशांनी समुद्रात प्रवास करून सामुद्रीक मार्ग शोधून काढले.

१९ व्या शतकात अमेरिकेच्या विकासामुळे सागरी वाहतुकीची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढली. इंग्लंड व अमेरिका यांच्यामध्ये जहाज बांधणीच्या बाबतीत चुरस निर्माण झाली. अमेरिकन जहाज बांधणीचा खर्च कमी होता व ब्रिटिश जहाजापेक्षाही त्यांचा वेग अधिक होता. जहाज बांधणीमध्ये लाकडाऐवजी लोखंडाचा वापर केला गेला. दगडी कोळशाचा इंधनासाठी वापर केला जात असे. त्यानंतर कोळशाऐवजी डीझेलचा वापर करण्यास सुरुवात झाली. तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञानामुळे जहाजातील यंत्रणाही बदलली व अत्याधुनिक यंत्र जहाजात बसविण्यात आले. १९५० अब्दुल नसिरने सुऐझ कालव्याचे राष्ट्रीयकरण केले.

१९५० मध्ये ५५% जहाजे डीझेल व ३०% जहाजे कोळसा इंधन म्हणून वापरत होते.

जागतीकीकरणाच्या प्रकीयेमुळे अनेक देशामध्ये जल वाहतूकीला प्राधान्य प्राप्त झाले आहे. भारत, जपान, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, तेल उत्पादक व समुद्र किनाऱ्यावरील देशाकडे मोठ्या प्रमाणावर जहाजे असून दळणवळणासाठी त्याचा वापर केला जातो. या जहाजातून मसाल्याचे पदार्थ, चीज, वस्तू, चहा, कॉफी, इ. विविध प्रकारच्या मालाची ने–आण केली जाते.

## संदेशवहनातील क्रांती

दूरसंचार व्यवस्था ही संदेश वहन साधानातील आधुनिक व क्रांतीकारकर प्रणाली आहे. दूरध्वनी, टेलीफोन, दूरदर्शन, इलेक्ट्रानिक सेल, इलेक्ट्रानीक कॉमर्स, इंटरनेट यांचा

विचाराची देवाणघेवाण तसेच वस्तुंची, उत्पादनाची, आदलाबदल करण्यासाठी वापर केला जातो. संगणक हे इलेक्ट्रानिक उपकरण आहे. 'संगणक महाजाल' ही संकल्पना जोडणी संकल्पनेशी केंद्रभूत आहे. त्यामुळे जगातील कोणत्याही देशाशी संपर्क साधणे शक्य होते.

१) टपाल सेवा - इ. स. १८२७ पासून सार्वजनिक क्षेत्रात टपाल सेवा सुरू झाली. १८५४ मध्ये तार खात्याची स्थापना झाली. १८७२ मध्ये मनीऑर्डर सेवा उपलब्ध करण्यात आली.

२) दूरध्वनी टेलिफोन - १८८५ अलेक्झाडर ग्रॅहम बेल यांनी टेलिफोनचा शोध लावला.१९५० मध्य भारतात ३२१ दूरध्वनी केंद्र व ८२००० जोडणी होती. इ. स.२००० पर्यंत त्याची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली.

३) आकाशवाणी - एखाद्या केंद्रावरील प्रक्षेपित केलेला कार्यक्रम जगाच्या कोणत्याही भागात ऐकण्याला येऊ लागला. अमेरिकेत जागतिक मंदीच्या काळात प्रेसिडेंट रुझवेल्ट यांनी रेडिओवरून भाषण देऊन जनतेला आवाहन होते.

४) दूरदर्शन - संदेश वहनाचे प्रभावी साधन म्हणून दूरदर्शन मानले जाते. १९५९ साली प्रायोगिक स्वरूपात दूरदर्शनची सुरुवात झाली. १९७२ अनेक देशांनी अवकाशात उपग्रह पाठवून शैक्षणिक कार्यक्रमाला सुरुवात केली. भारताने आर्यभट्ट हा उपग्रह अवकाशात सोडला. १९८२ रंगीत प्रक्षेपणास सुरुवात झाली.

## टेलेक्स संपर्क सेवा-

टेलेक्सचा वापर वर्तमानपत्रातील बातम्या मिळविण्यासाठी होऊन यंत्राद्वारे टाईप करण्याची क्षमता वाढली आहे. एवढेच नव्हे तर त्याचा वापर व्यापार, प्रशासन, शिक्षण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात होत आहे. १९६३ मध्ये ४१ देशांनी संपर्क क्षेत्रात टेलेक्सचा वापर केलेला आढळतो.

## * उपग्रहीय संदेश दळणवळण -

उपग्रहाद्वारे संदेशवहन हा तंत्रज्ञानातील एक अतिमहत्त्वाचा टप्पा आहे. दूर अंतरावरून ध्वनी व चित्र यांच्या प्रक्षेपणाबरोबर उपग्रहाने दूरध्वनी, दूरसंदेश वहनात क्रांतीकारक बदल घडून आले.

आजचे युग हे माहिती तंत्रज्ञानाचे युग मानले जाते. काही दशकापूर्वी वैज्ञानिक कल्पना चमत्कार रोजच्या वापरात येऊ लागले आजच्या विज्ञानाने केलेली प्रगती ही सहज लक्षात येणारी आहे.

## संगणकाच्या इतिहासाविषयी

गणित शास्त्राचा विकास पूरातन काळापासून झाला आहे. प्रचंड आकड्यांच्या बेरीज, वजाबाकी, गुणाकार, भागाकार करण्याची पद्धती व वर्गमूळ, घनमूळ, पावली, निमकी, औटकीचे हिशेब कौशल्य मानवाने पूर्वीपासून हस्तगत केली. या पार्श्वभूमीवर अलन टुरिंग नामक इंग्लिश गणित अभ्यासकाने १९३७ साली लंडन मॅथेटिकल सोसायटीत निबंध

वाचला. आणि मनुष्याच्या तर्क विचारांची अक्षरात हुबेहुब नक्कल करणाऱ्या काल्पनिक यंत्र टाईपरायटरचा शोध लागला. त्यालाच ''दुरिज मशीन'' असे नाव मिळाले. त्या संकल्पनेवरच संगणकाची रचना करण्यात आली.

संगणक बांधण्याचे श्रेय अनेकांना दिले जाते. १९४६ साली तीन टन वजनाचा दोन खोल्यामध्ये पसरलेला पहिला संगणक हा इलेक्ट्रॉनिक न्युमरिक इंटिग्रेटर या नावाने ओळखला जाऊ लागला. त्याचे सर्व श्रेय जॉन मॉसली आणि जे प्रेस्पर एकर्ट यांना दिले जाते. इतरांपेक्षा संगणकाला जवळजवळ आजच्या अवस्थेपर्यंत नेऊन पोहोचविण्याचे सर्व श्रेय जॉन व्हॅान न्युमन यांना दिले जाते. हा वैज्ञानिक अमेरिकेत स्थायिक झालेला हंगोरियन प्रज्ञावानला होय. संगणकामध्ये सुधारणा होण्यासाठी १९५२ साल उजाडले. IBM या विख्यात कंपनीने ७०१ असे नामानिधान केलेला सुधारीत संगणक १९५३ मध्ये अमेरिकेत लष्कराला सुपुर्त केला. त्या संगणकाचा अमेरिकेत हैड्रोजन बॉम्ब बनविण्याच्या प्रयत्नात बराच हातभार लागला.

क्लॉड शेन्नॉन याने १९४९ मध्ये सर्व प्रकारची ० ते ९ या चिन्हात बायनरी संज्ञापन पद्धतीत घडवली. १९५८ मध्ये रॉबर्ट नॉईक व जॅक फिल्वी यांनी स्वतंत्रपणे मायक्रो चिप तयार केल्या. त्यातूनच संगणाकाला अत्याधुनक विकसीत स्वरूप प्राप्त झाले. आणि अतिशय वेगवान, सुटसुटीत व अधिक कुशाग्र संगणकात त्याचे रूपांतर झाले. १९६८ मध्ये गॉर्डन मूर आणि रॉबर्ट नाईक यांनी इन्टेल कंपनी स्थापन करून मेमरी चिप तयार केली. व संगणाकची खरी घोडदौड सुरू झाली.

### संगणकाचे जाळे

इ. स. १९८० च्या दशकात संगणकाद्वारे मांडण्यात येणारी माहिती जगातील अनेक देशात पोहोचली. माहिती तयार करणे, माहिती संग्रहीत करणे, माहितीचे वितरण करणे. या गोष्टी संगणकाला सहज शक्य झाल्या.

सुपर संगणक, मेन फ्रेम संगणक, मिनी संगणक व मायक्रो संगणक असे चार प्रकार आहेत. दोन पेक्षा जास्त संगणकाचे जाळे तयार करता येते. औद्योगिक आकारानुसार संदेशवहन नेटवर्क्समध्ये फरक पडतो. यातील तीन प्रकार १) लोकल एरिया नेटवर्क, २) मेट्रो पॉलिटन एरिया नेटवर्क, ३) वाईड नेटवर्क आहेत. त्याद्वारा विस्तृत क्षेत्रीय जाळे, राष्ट्रीय स्तरावर माहिती पाठविण्या करीता व डाटा वाहून नेण्याकरीता त्याचा वापर केला जातो.

### महाजाळ/इंटरनेट

इ. स. १९९० साली टीम वर्नसली या शास्त्रज्ञाने पहिला इंटरनेट प्रोटोकॉल तयार केला. त्यातूनच ''वर्ल्ड वाईड वेब'' ची निर्मिती झाली. त्यामुळे जगभरातील लक्षावधी संगणकाच्या फाईल जोडल्या गेल्या www. मध्ये नकाशे, गाणी, चित्रे, फोटो, असे काहीही साठविलेले असू शकते. WWW चा अर्थ जगभर पसरलेली माहिती म्हणजेच वेब पेज होय. तंत्रज्ञानातील सुधारणा आणि विकासामुळे रेडिओ, टेलिफोन टेलिव्हीजन व संगणक ही चार साधने अधिकाधिक एकत्र येत गेली.

सर्वच क्षेत्रात तंत्रज्ञान हे अत्यंत वेगाने बदलत असते. तंत्रज्ञानाच्या वेगाबाबत भारतच अज्ञान आणि भारताच्या अज्ञानाचे प्रमुख कारण अमर्त्य सेन यांनी भारतातील दारिद्र्य मोठ्या प्रमाणावर आहे असे सांगीले आहे.

## संगणक आणि माहिती तंत्रज्ञान

माहिती गोळा करणे, साठवणे, तिच्यावर प्रक्रिया करणे, तिचे विश्लेषण करणे, ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविणे, तिचा उपयोगी स्वरूपात पुन्हा उपलब्ध करून देणे हा माहिती उच्च तंत्रज्ञानाचा गाभा आहे. अशी माहिती सामुग्री (सॉफ्टवेअर) संगणकांच्या जडसामुग्रीत (हार्डवेअर) भरून एकमेकांशी पोहचविणे व केंद्रीत तंत्रज्ञानाचा वापर करणे, सांगणकीय या प्रणालीद्वारा उपलब्ध होण्याऱ्या माहितीचा उपयोग दूरसंचार सेवेत व संदेशवहनात होत आहे. १९६९ मध्ये विद्यापीठीय संशोधनासाठी संगणकाचे जाळे तयार केले. ते आजच्या जागतिक महाजालाचे बीज होय. इंटरनेटचे हजारो तऱ्हेचे उपयोग आहेत. उदा. वैद्यकिय विश्लेषण व वैद्यकीय मदत, ई-कॉमर्स वृत्तपत्र किंवा ऑनलाईन वृत्तपत्र, सायबर विश्व वगैरे होत. बिल गेट्सच्या म्हणण्यानुसार महाजालामुळे संपूर्ण विश्व एकत्र आले आहे.

''संगणक क्रांतीमुळे सर्जनशीलतेच्या, विनाशकाररची शक्यता आहेत हे विसरता कामा नये.'' राष्ट्रीय संकल्पना पहिला बळी ठरू शकते. संगणकामुळे नवीन संधी उपलब्ध होतात तसेच जुन्या नोकऱ्याचा ऱ्हास देखील होऊ शकतो. हे विसरता कामा नये.

## १०.२.३ अणू विकास

मुलद्रव्याचा अंतिम घटक हा अणू असून तो अभेद्य म्हणजेच त्याचे भंजन करता येणार नाही. अशी कल्पना डाल्टनची होती. परंतु डाल्टननंतर अणूच्या अंतरंगावर अधिक संशोधन झाले. त्यातूनच अणूच्या अंतरंगात केंद्रस्थानी असणाऱ्या न्युट्रॉन व प्रोटॉन यांचा व त्यांच्या भोवती फिरणाऱ्या इलेक्ट्रानचा शोध लावला. विसाव्या शतकात आईनस्टाईन, रुदरफोर्ड, कॉक काफ्ड, बाल्टन फर्मी हान, स्ट्रासमन, भार्रे, अेपनहायमर इत्यादी शास्त्रज्ञांनी प्रयत्न करून अणुच्या अंतरंगात प्रवेश करून त्यांचे विकासन करण्याचा प्रयत्न करून यश मिळविले. ते संशोधन करीत असताना त्यांना अणूच्या ठिकाणी असणाऱ्या प्रचंड शक्तीचा प्रत्यय आला. सर्व मुलद्रव्यात जास्त वजन असलेल्या युरेनियमच्या अणुचे विभाजन करण्यात आले होते व स्ट्रारूमन हे जर्मन शास्त्रतज्ज्ञ यशस्वी झाले. युरेनियमचे भारांक अंतर्गत वजन व शक्ती जास्त असल्यामुळे पुढे युरेनियम एकामागून एक भारांकाचे विभाजन करून अणूची शक्ती सर्वात अधिक होती. हे सिद्ध झाले. युरेनियमच्या विभाजनाचे तंत्र इटालियन शास्त्रज्ञ एनरिको फर्मी यांनी १९४२ प्रक्रिया शोधून काढल्या एका अणुतून अनेक अणूंचे भंजन होत असताना या प्रक्रियेला शृंखला प्रक्रिया असे नाव मिळाले. अणू भंजनातून अणूशक्ती निर्माण होऊन पुढे तिचा विकास झाला.

## अणूचा विकास

जगातील पहिला अणुबॉंब अमेरिकेने तयार केला. त्या अणू बॉम्बची रॉबर्ट ओपन हायमर आणि निल्सभीत या दोघांनी १६ जुलै १९४५ रोजी मेक्सीकोच्या वाळवंटात स्फोट

करून अणूचाचणी घेण्यात आली. हायड्रोजन बॉम्ब ही अणुबॉम्बची पुढची पायरी होती. अणू भंजनातून अणुशक्ती निर्माण होते. व अणुशक्तीही संघटनातूनही निर्माण होते. हायड्रोजन बॉम्बच्या निर्मितीत सर्वात हलके हायड्रोजनचे अणू वापरलेले असतात. हायड्रोजन बॉम्बच्या स्फोटाच्या वेळी त्यामधील हायड्रोजनच्या असंख्य अणुंचे संघटन होत असतानाच त्यामधील वस्तुमान नाहीसे होते. हायड्रोजन बॉम्बचा स्फोट करण्यासाठी प्रचंड उष्णतेची आवश्यकता असते. त्यासाठी हायड्रोजन बॉम्बच्या अंतरंगात अणुबॉम्बचा स्फोट घडवून एक दशलक्षांश सेकंदात प्रचंड उष्णता निर्माण केली जाते. अमेरिकेच्या अणुशक्ती मंडळाने नोव्हेंबर १९५२ मध्ये पहिला हायड्रोजन बॉम्ब तयार केला. व दक्षिण प्रशांत महासागरातील मार्शल बेट समुहातील एका बेटावर त्याचा पहिला स्फोट करण्यात आला. त्यामुळे, प्रशांत महासागरातील प्रचंड स्फोटामुळे मार्शल बेटच नष्ट झाले.

### अणूशक्ती व अवकाशयुगाचा प्रारंभ –

१९५० ते १९७० हा काळ इतका अलिकडचा आहे की त्यात झालेल्या अनेक संशोधनामुळे तांत्रीक गोष्टीचे. ऐतिहासिक दृष्ट्या यथायोग्य मांडणी करणे कठीणच आहे. या काळात विज्ञान, तंत्रज्ञानाची व अणूच्या विकासाची प्रगती झपाट्याने झाली. त्याच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. रशियाने ४ ऑक्टोबर १९५७ रोजी पहिला कृत्रिम उपग्रह अवकाशात सोडून यश संपादन केले. अवकाश संशोधनात अनेक अडचणी आल्या परंतु रशियाने त्यांचे निराकरण केले. अमेरिकेनेही स्वतंत्र संशोधानच्या जोरावर हे तंत्र संपादन केले. व अमेरिकेने पहिला कृत्रिम उपग्रह अवकाशात पाठविला.

अवकाश संशोधनामुळे धातुविज्ञान, इलेक्ट्रानिक जीवविज्ञान, रसायनशास्त्र इ. अनेक शाखांमध्ये संशोधनाला मोठी चालना मिळाली. तसेच संदेश वहन, वातावरण विज्ञान, दूरवर्ती नियंत्रण, सर्वेक्षण इ. विषयात नवनविन तंत्रे विकसित झाली आहेत. सुरुवातीस विमान अभियांत्रिकीतील तज्ज्ञ अगदी निर्धाराने सांगत की, आवाजाच्या वेगापेक्षा विमान उड्डाने जास्त वेगाने येणे शक्य आहे. तसेच पृथ्वीच्या वातावरणातून एखाद्या उपग्रहाला बाहेर पडण्यासाठी त्याचा पृथ्वीवरून निघतानाच वेग आवाजाच्या वेगाच्या पन्नास पटीहून अधिक असायला हवा. ही बाब साध्य झालेल्या गोष्टी विचारात घेता अभियांत्रिकीच्या या क्षेत्रात किती प्रगती झाली आहे. हे आपणास लक्षात येते.

दुसऱ्या महायुद्धात जेट इंजिन आल्यानंतर थोड्याच दिवसांत विमानाचा वेग ध्वनीच्या वेगापेक्षा जास्त होतो. आणि लांब प्रवासाची विमाने आवाजाच्या वेगापेक्षा किंचित कमी वेगाने धावणे सहज शक्य झाले. विमान उड्डाणे करण्यासाठी संपीडक वायु टरबाईनची गरज असते. टरबाईनात अतिउच्च तापमान असते. व ते सहन करणाऱ्या धातू मिळाल्यानंतरच टरबाईनात खरी प्रगती झाली. उष्णता संक्रमणाच्या वायूच्या प्रवाहासंबंधी विशेष माहिती मिळाल्यावर या माहितीचा अनपेक्षित आश्चर्यकारक उपयोग करण्यात आला. हवेच्या स्तरामध्ये चालणारे वाहक, हॉव्हरक्राफ्ट हे त्यांचे एक उदाहरण आहे.

याकाळात तंत्रविद्येला आणखी एक मोठे यश म्हणजे अणुकेंद्रीय विक्रियंकाची उभारणी आणि त्यांच्या अणुकेंद्रीय भंजनामुळे (विभाजनामुळे) निर्माण होणाऱ्या उष्णतेचा वीज

उत्पादनाकरीता केलेला उपयोग होय. विमानामध्ये युरेनियम  हे इंधन वापरण्यात येते द्रव कार्बनडॉय ऑक्साईड वायू, साधे पाणी, जडपाणी इ. उष्णता वहनांचे कार्य करतात. या संयंत्रात नेहमीच वाफ यंत्रात मुख्य फरक हा आहे की, येथे भट्टीच्या वाफकाऐवजी उष्णता विनिमयक (एका पदार्थाची उष्णता दुसऱ्या पदार्थाला पोहोचविणे) जातीचा बाष्पक असतो. यामध्ये अतिउच्च तापमानाचा शीतक खेळविला असून त्यातील नळीच्या वेटोळ्यातून संथरप जल जाताना त्याची वाफ होते. अमेरिका, इंग्लड. येथे कॉल्डर होल १९५७ मध्ये तयार करण्यात आलेले संयंत्र. पुढे उद्योग व वैद्यकीय उपचार यासाठी विक्रियातून मिळणाऱ्या अणुक्रमांक तोच परंतु एकाच मूलद्रव्याचा प्रकार वेगवेगळ्या स्वरूपात उपयोग होऊ लागला.

१९६० जर्मनी, रशिया, फ्रान्स, इटली, जपान, भारत या देशातही संयंत्रे उभारण्यास सुरुवात झाली. अमेरिकेत तर अणुशक्तीवर चालणाऱ्या पाणबुड्या बांधल्या गेल्या.

## अणु पाणबुड्या – अणुशक्तीचा अविष्कार

अणू पाणबुड्या म्हणजे आरमार क्षेत्रातील व सागराच्या तळाच्या संशोधन क्षेत्रातील एक अविष्कार होय. पहिली अणुपाणबुडी नौटिळस अमेरिकेने बांधली . तिने पाण्याखालून उत्तर ध्रुवावर १९५९ ला स्वारी केली. रशिया, चीन, अमेरिका यांच्याकडे ही अणुपाणबुड्याचे ताफे आहेत.

## तारका युद्ध

जगाच्या इतिहासात दुसऱ्या महायुद्धानंतर अणुबॉम्बची भीती निर्माण झाली आणि संपूर्ण जगाला नि:शस्त्रीकरणाची गरज भासू लागली. शांततेसाठी अर्थिक कल्याण नैतिक वातावरणासाठी अण्विक संकटातून वाढविण्यासाठी नि:शस्त्रकरणाची गरज आहे. १९५५ जुलै महिन्यात जिनिव्हा येथे भरलेल्या युनोच्या अधिवेशनात रशिया, अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स ही राष्ट्र शस्त्र कपातीसाठी एकत्र आली. त्यामध्ये आयसेन हॉवटने खुली आकाश योजना (Open skien plan) मांडली परंतु त्यास सफलता मिळाली नाही. १९६० पर्यंत शस्त्रे कमी करण्यासाठी प्रयत्न झाले. रशिया व अमेरिकेने १९६० ते १९७७ पुन्हा प्रयत्न केले. परंतु रशियाने ५० मेगावॅट शक्तीचा अणुबॉम्ब तयार केला.

## इ. स. १९७७ महाशक्ती राष्ट्रातील शस्त्र स्पर्धा

अमेरिकेने क्रूज शस्त्र निर्माण केले. १९७७ मध्ये कॉर्टेर व ब्रेझनेव्ह यांच्यात शस्त्रे वाढवायची नाहीत म्हणून करारावर सह्या करण्यात आल्या. १९८६ मध्ये रेगन व गोर्बाचेव्ह यांच्यातील नि:शस्त्रीकरणासंबंधी बोलणी फिसकटली. रेगनने स्वैर वॉर कार्यक्रम बंद केला जाणार नाही असे स्पष्ट केले. अंतराळात विस्फोटक उपग्रह सोडले जातील. अंतराळात निर्माण केलेल्या स्टेशन जवळ जातील. आणि एकाच वेळी अनेक स्टेशन निष्क्रिय होऊ देतील. उच्च प्रतीच्या लेसर किरणांचा उपयोग अंतराळातील अड्डा उध्वस्त केला जाऊ शकतो. रशियाने स्टार विरुद्ध एस. एस १२ व एस. एस. २३ क्षेपण अस्त्रे नष्ट करण्याचे अमेरिकेला आव्हान दिले. अमेरिकेची शस्त्रेही जपान व चीन देशाना धोकादायक वाटत होती.

१५ मे १९८५ रोजी व्हिएनाममध्ये अमेरिकेत परराष्ट्रमंत्री बरोबर चर्चा करून नि:शस्त्रीकरणाचा विचार मांडला. २९ जुलै १९८५ रोजी गोर्बाचेव्ह यांनी परमाणू परीक्षण कार्यक्रम पाच महिन्यासाठी थांबविला. अमेरिकेनेही परमाणू शक्ती कमी करावी असे सांगण्यात आले.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया यांच्यात महासत्तेसाठी शित युद्धाची निर्मिती झाली. या स्पर्धेत वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रातही स्पर्धा सुरू झाली. अवकाश संशोधक करीत असताना विभिन्न अणु शस्त्रास्त्रे तयार करण्यात राष्ट्रांना यश मिळाले. रासायनिक क्षेपणास्त्रे संहारक तर होतीच परंतु विषारी वायुंची होती. अमेरिकेने स्कड नावाचे शस्त्र शोधून काढले. रशिया, इराक, इस्राइल भारत इ. राष्ट्रांनी शस्त्र निर्माण करण्यात यश मिळवले.

जमिनीवरून जमिनीवर मारा करण्यापेक्षा आकाशातून मारा केल्यास शत्रूचे अस्तित्व राहणार नाही. शत्रुच्या हालचालीवर नियंत्रण ठेवता येईल. त्यासाठी अमेरिकेने अवकाशात स्कायलॅब ही प्रयोगशाळा अवकाशात स्थिर केली.

## अणुयुगातील नि:शस्त्रीकरणाची समस्या :

२० व्या शतकातील जागतीक राजकारणात ज्या समस्या निर्माण झाल्या आणि अखंड प्रयत्न करूनही काही समाधानकारक उत्तरे सापडली नाही. एक महत्त्वपूर्ण समस्या नि: शस्त्रीकरण होय. नि:शस्त्रीकरणाची गरज. सर्वच लहान-मोठ्या राष्ट्रांना भासू लागली. अण्वस्त्र निर्मितीवर जो अमाप पैस खर्च होतो. त्या पैशाचा अपव्यय आहे. हाच पैसा मानवी कल्याणासाठी वापरण्यात आला तर जगातील दारिद्र्याचे उच्चाटन सहजपणे करता येईल. सर्वसामान्य जनता मानवी समाज शांततेची मागणी करीत असताना. त्यांनी स्वकष्टाने मिळविलेला पैसा कराच्या स्वरूपात हिरावून घेऊन त्याचा वापर शस्त्रास्त्र उत्पादनासाठी वापरून देशाला युद्धाच्या खाईत लोटणे अमानूष आहे. अमेरिकेचे अध्यक्ष आयसेन हॉवर यांनी २५-०९-१९६१ रोजी युनोच्या महासभेपुढे भाषण करताना ''मानवाने निर्माण केलेल्या संहारक शक्ती मानवानेच नष्ट केल्या नाहीत तर त्या मानवालाच नष्ट करून टाकतील. म्हणून पुढील पिढ्यांना शांतता व सुरक्षितता लाभावी यासाठी नि:शस्त्रीकरण अत्यंत निकडीचे आहे.'' असे उद्‌गार केनेडी यांनीही काढले होते.

## राष्ट्रसंघाचे शस्त्र कपातीचे प्रयत्न -

अण्वस्त्राच्या प्रयोगामुळे युद्ध समाप्तीनंतर शांतता प्रस्तापित होण्याऐवजी अधिकच असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आणि सुरक्षिततेच्या निमित्ताने सर्वच मोठी राष्ट्रे अण्वस्त्र निर्मितीच्या स्पर्धेत उतरली. आज संपूर्ण मानव जात भयानक विध्वंसाच्या व विनाशाच्या खाईत लोटली जाण्याच्या भयाने ग्रासलेली असून त्याचवेळी सुरक्षिततेच्या तीव्र जाणिवेमुळे शक्ती संपादनाची ईर्षा, स्वत:चे प्रभुत्व टिकविण्याची धडपड, राजनीती, खाजगी शस्त्रास्त्र उत्पादन व आंतराष्ट्रीय व्यापार यामुळे मानवाचे रक्षण धोक्यात आले आहे.

## नि:शस्त्रीकरण म्हणजे काय?

पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी ''नि:शस्त्रीकरण म्हणजे शस्त्रास्त्रे नष्ट करणे'' हा होय. शस्त्रास्त्रे नष्ट करण्यापेक्षा शस्त्र कपात व शस्त्र नियंत्रण यावरच आज भर दिला जातो.

आजच्या परिस्थितीत अण्वस्त्र नष्ट करणे शक्य आहे का? आणि अण्वस्त्र नियंत्रणासाठी राष्ट्रांच्या सार्वभौमत्वावर अपरिहार्यपणे पडणाऱ्या मर्यादा ती राष्ट्रे मान्य करणे शक्य आहे का? या प्रश्नाची उत्तरे बहुतांशी नकारात्मक स्वरूपात दिसून येतात. अण्वस्त्र नष्ट करण्यास कोणतीही राष्ट्रे तयार नाहीत. अण्वस्त्र निर्मितीवर लादलेली बंधने परिणामकारक व व्यवहार्य ठरत नसल्याने आजच्या अनुभवावरून दिसून येते. नि:शस्त्रीकरणाचे अंतिम सत्य हे शस्त्रकपात व शस्त्र नियमन या साध्याकडे नेणारे आहे.

## संयुक्त राष्ट्र संघटनेची उद्दिष्ट्ये आणि चर्चा

दुसऱ्या महायुद्धानंतर णछज ने जागतिक शांततेसाठी निशस्त्रीकरणाचे महत्त्व आग्रहाने मांडले आहे. युनोच्या सनदेत ११ कलमे नि:शस्त्रासंदर्भात निर्धारीत केली आहेत. सुरक्षा समितीच्या अधिकाऱ्यानी २६ व्या कलमानुसार व ४७ व्या कलमानुसार शस्त्रास्त्रांचे नियंत्रण करणे शक्य आहे असे नमूद केले. अमेरिकेजवळ अणुबॉम्ब होते. आणि त्या शोधाबाबत अमेरिका अतिशय गुप्तता पाळीत असे. रशिया, इंग्लंड ही राष्ट्रेही चिंतीत होती. या राष्ट्राच्या दबावाखाली युनोची एक अणुशक्ती समिती स्थापन करण्यात आली २४ जानेवारी १९८६ रोजी त्यात प्रत्येक सदस्य राष्ट्रांचा एक प्रतिनिधी व एक कॅनडाचा प्रतिनिधी असावा असे ठरविण्यात आले. अणुशक्तीचे उत्पादन वापर यावर नियंत्रण व देखरेख ठेवण्यासाठी एक आंतरराष्ट्रीय समिती ''इंटरनॅशनल ॲटॉमिक डेव्हलपमेंट ॲथॉरिटी'' स्थापन करण्यात यावी. या समितीने अणुबॉम्बची निर्मिती बंद व्हावी यासाठी गोपनीय माहिती समितीकडे सादर केली. सदर योजना अमेरिकेला गैरसोयीची वाटली कारण अमेरिकेकडे असलेले अणुबॉम्ब नाहीसे करावे लागणार होते. आणि पारंपारिक लष्करी शक्ती ही रशियाकडे मोठ्या प्रमाणावर होती.

## हॉट लाईनची स्थापना

१९६०-६१ ला जागतिक वातावरण पुन्हा तापले कारण १९६० मध्ये फ्रान्सने अणुस्फोट केला. चीनदेखील अणुस्फोट करण्याच्या तयारीत होता. क्युबाच्या प्रश्नावर रशिया-अमेरिका युद्ध होण्याची संभावना निर्माण झाली होती. (१९६३) २ जून १९६३ रोजी अमेरिका व रशिया यांच्या संभाषणासाठी हॉट लाईनची स्थापना करण्यात येऊन दोन्ही देशांनी त्यावर सह्या केल्या.

## न्युक्लिअर टेस्ट बॅन ट्रिटी. (N.T.B.T.)

२५ जुलै १९६३ रोजी अमेरिका, रशिया व इंग्लंड यांनी मास्को येथे अणुचाचणी बंदी करारावर स्वाक्षऱ्या केल्या या करारा‌द्वारे सागरात, वातावरणात व अंतराळात अण्वस्त्र चाचण्या करण्यावर बंदी घालण्यात आली परंतु हे यश मर्यादित स्वरूपाचे होते.

## आऊटर स्पेस ॲग्रीमेंट

जानेवारी १९६५ मध्ये रशिया व इंग्लंड यांनी बाह्य अंतराळात (डेंीशी ीरिलिश) अण्वस्त्राचा वापर न करण्याच्या कराराला मान्यता दिली. अवकाशात उभारलेली स्थानके व अंतराळ यात्री चुकीने दुसऱ्या राष्ट्राच्या प्रदेशात उतरल्यास त्याला आपल्या मायदेशात परत पाठविण्यात यावे अशी तरतूद करण्यात आली.

## न्युक्लिअर नॉन-प्रॉलीफरेशन ट्रिटी -(N.N.P.T.)

अणुशक्ती शांततापूर्ण व मानव जातीच्या कल्याणासाठी वापरण्यावर कोणत्याही प्रकारची बंदी नसावी. अशा तरतुदी १९६८ मध्ये N.N.P.T. द्वारा शांततापूर्ण वापरासाठी अण्वस्त्रे नसलेल्या राष्ट्रांना अणुशक्तीचे ज्ञान उपलब्ध करून देण्याचे मोठ्या राष्ट्रांनी मान्य केले.

## सी. बेड ट्रीटी -

१९५८ साली अमेरिकेन जपानच्या सीमेलगत समुद्रात अणुस्फोट केला. त्यामुळे होणाऱ्या किरणोत्सर्गाचे दुष्परिणाम जपानवर झाले. म्हणून १९५८ पासून कोणत्याही राष्ट्राच्या सागरी तळापासून १२ मैल आतील समुद्र त्या राष्ट्राचा प्रादेशिक समुद्र मानला जावा. या सागरी प्रदेशात अण्वस्त्रे व इतर संहारक अस्त्रे यंत्रसामुग्री ठेवण्यात येऊ नये अशी तरतुद १९७१ च्या सी. बेड ट्रीटीने केली.

## स्ट्रेटेजिक आर्मस् लिमिटेशन ट्रीटी (SALT-I)

या करारान्वये १९७२ पासून रशिया व अमेरिका या राष्ट्रानी शस्त्रास्त्र स्पर्धेला आवर घालण्याचे मान्य केले. शस्त्रस्त्रानी महासत्ता एकमेकांवर अण्वस्त्राचा प्रत्यक्ष मारा करू नये. ''ॲण्टी रॅलिस्टिक मिसाईल'' च्या साठ्यावर मर्यादा घालून दिली. दोन महासत्तामध्ये अण्वस्त्रात समतोल टिकविण्याचा हा महत्त्वाचा करार मानला जातो.

## जैविक शस्त्रास्त्र बंदी परिषद

सूक्ष्म जीवापासून तयार करण्यात येणारी शकडो इतर विषारी शस्त्रे त्यांचा साठा करणे व ती नष्ट करणे या हेतूने १९७४ साली आंतराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. अशा शक्तीचा वापर केवळ मानवी कल्याणकारी कार्यासाठी करण्याचा निर्णय घेण्यात आला. अमेरिका व रशियाने पुढील १० वर्षात शस्त्रास्त्रात वाढ न करण्याचे मान्य केले. पाणबुड्यांची संख्या वाढवू नये. भूगर्भात अणुचाचण्या घेऊ नयेत. १९७९ साली पुन्हा रशिया व अमेरिका यांच्यात SALT. खख करार करण्यात आला.

## सी. टी. बी.टी.

सर्वकष अण्वस्त्र चाचणीबंदीचा मोठ्या राष्ट्रांनी केलेला करार. C.T.B.T.C.कॉम्पीहेन्सिप टेस्ट बॅन ट्रिटी अण्वस्त्राचा साठा असलेल्या राष्ट्रानी मान्य केला. व अणुशक्तीचा वापर शांततेच्या कामासाठी देखील आंतरराष्ट्रीय अणुशक्ती मंडळाच्या देखरेखीखाली करावा. व संशोधनातून निष्पन्न झालेल्या ज्ञानाची माहिती सर्वांना उपलब्ध करून द्यावी. असे नमुद करण्यात आले.

## १०.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) अणुशक्तीचा विकास कसा लावला. त्याविषयी सविस्तर चर्चा करा?

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

२) अण्वस्त्र नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रिया व विविध कराराची सविस्तर माहिती लिहा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

३) च.ढ.इ.ढ. करार थोडक्यात लिहा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

४) अणुशक्ती व अवकाश संशोधनातील प्रगतीचा आढावा घ्या.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

५) अणुपाणबुड्या - अणुशक्तीचा अविष्कार - टिपा लिहा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

६) 'तारका युद्ध' टिप लिहा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

७) अमेरिका व रशिया राष्ट्रातील अण्वस्त्र शस्त्रास्त्र स्पर्धा कशी व का निर्माण झाली?

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

८) युनोचे शस्त्रकपातीचे प्रयत्न व यश सविस्तर लिहा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

९) नि:शस्त्रीकरण म्हणजे काय? व्याख्या लिहा.

.......................................................................................................

.......................................................................................................

.......................................................................................................

१०) ''सी बेड करार'' थोडक्यात लिहा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

११) आधुनिक जगाच्या इतिहासातील वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीचा सविस्तर आढावा घ्या.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

१२) रशिया व अमेरिकेने अवकाश संशोधनात केलेल्या प्रगतीची सविस्तर चर्चा करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

१३) खडठज - पूर्ण रूप लिहा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

१४) र डार म्हणजे काय?

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

१५) अंतराळातील विज्ञान व तंत्रज्ञानाचा वापरातून राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली चर्चा करा.

........................................................................................................

........................................................................................................

........................................................................................................

## १०.४ सारांश -

२० व्या शतकात अणुचा शोध लागल्यानंतर त्याचा वापर अनेक ठिकाणी होऊ लागला. अण्वस्त्र, शस्त्रात्रे, पाणबुड्या, अणुशक्ती, वीजनिर्मिती मानवी कल्याणासाठी अणुशक्तीचा वापर करण्यासाठी मानवाने व युनोने अनेक करार केले. आणि अणुशक्ती जोरावर महासत्ता राजकीय वर्चस्व या गोष्टी समोर येऊन शस्त्रास्त्र स्पर्धा निर्माण झाली आणि त्यातून त्यांच्या संहारकतेची जाणीव अमेरिकेने संपूर्ण जगाला करून देऊन त्यावर उपाय योजना म्हणून नि:शस्त्रीकरण व मानवी हित, मानवी कल्याण आंतरराष्ट्रीय शांतता या गोष्टी समोर येऊन नि:शस्त्री करणाचे प्रयोग व करार करण्यात आले. रशियाचे विघटन होऊन २० वर्ष पूर्ण होऊनही अण्वस्त्र स्पर्धेला पूर्ण विराम मिळविला नाही. पृथ्वीतलावरील सर्व प्राणी

मात्र विनाशाच्या उंबरठ्यावर उभे आहेत. त्यांना शांततेची नितांत आवश्यकता आहे. अशी पावले उचलण्यात मानव तयार नाही हिच मानवी समाजाची शोकांतिका आहे.

विज्ञान व तंत्रज्ञान परस्परांना पूरक आहेत. २० शतकात या दोन्ही क्षेत्राची दैदीप्यमान प्रगती झालेली आहे. वैद्यकशास्त्रामुळे मानवाच्या शरीरातील रोगजंतू व आंतररचनाचे अवलोकन करणारी यंत्रे तयार झाली. त्यामुळे रोगनिदान, रोगोपचार, रोगनिर्मुलन करणारी औषधे व नवनवीन तंत्रे वैद्यकशास्त्रज्ञांनी विकसित केली. वैद्यकशास्त्रामुळे विविध व्याधींच्या संकटातून मानवाला मुक्त केले.

अवकाश संशोधनातही मोठ्या प्रमाणावर विकास झाला. दळणवळण, शस्त्रास्त्र आणि खगोल विश्वोत्पतीशास्त्राला पूरक ठरत आहे. विज्ञानाच्या शाखोपशाखा विविध क्षेत्रात नेत्रदीपक उन्नती घडवीत आहेत. विज्ञान व तंत्रज्ञान हातात हात घालून कार्य पार पाडीत आहेत.

साम्यवाद व राष्ट्रीयीकरणामुळे अमेरिका, रशिया, चीन, जापान या प्रमुख देशामध्ये कृषी विकास घडून आला.

## १०.५ परिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) IBRO : भारतातील अवकाश संशोधन करणारी संस्था

२) स्कायलॅब : अंतराळातील प्रयोगशाळा

३) रडार : हवामान, भूकंप व वादळाचा शोध घेणारे यंत्रआऊटपेस

४) NATO : अमेरिकेची अवकाश संशोधन संस्था

५) हॉट लाईन : शित युद्धाच्या काळात अमेरिका व रशिया यांच्यातील संभाषण प्रक्रिया करण्यासाठी असलेली लाईन

६) M.T.B.T. : न्युक्लिअर बॉम्ब तयार करण्यावर बंदी आणण्याचा करार.

७) आऊटपेस : अंतरातळतील सीमा रेषा

८) M.N.P.T. : अण्वस्त्र विरोधी करार.

९) सी. बेड : समुद्र किनाऱ्यापासून १२ मैल अंतरातील समुद्र

## १०.६ संदर्भ सूची


१) डॉ. देवळाणकर शैलेन्द्र आंतरराष्ट्रीय संबंध – विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

२) प्रा. दीक्षित नी. सी. पाश्चिमात्य जग – पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर

३) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ – आधुनिक जगाचा इतिहास व्ळी २२१.

४) डॉ. जाधव शिवाजी विज्ञान व तंत्रज्ञान विकास –शाश्वत पब्लिकेशन, कोल्हापूर

५) डॉ. तांबोळी एन. एस. राजन स्वाती - पहिल्या महायुद्धानंतरचे जग, निराली प्रकाशन
६) प्रा. मोरे दिनेश पहिल्या महायुद्धानंतरचे जग - के. एस. पब्लिकेशन, पुणे
७) डॉ. कोठेकर शांता, डॉ. वैद्य सुमन - आधुनिक जग १९४५ ते १९८०, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
८) इंटरनेट - मराठी विश्वकोश, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई. (अणुशक्ती व अवकाश युगाचा प्रारंभ).
९) इंटरनेट महाजाल आणि मराठी
१०) इंटरनेट - दळणवळण, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
११) इंटरनेट - अतिसूक्ष्म तंत्रज्ञान (विश्वकोश).

# एम . ए . इतिहास

# द्वितीय वर्ष

# पेपर ः **2**

# स्वातंञ्योत्तर भारत

# घटक १

## स्वतंत्र भारताचा उदय

**अनुक्रमणिका**

**१.० उद्दिष्टे**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ विषय विवेचन**

**१.२.१ राज्यघटना**

**१.२.१. व्याख्या**

**१.२.१.२ घटनानिर्मिती**

**१.२.१.३ मुख्य तरतुदी**

**१.२.२ भारताचे एकीकरण**

**१.२.२.१ भारतीय संस्थानिकांचा पूर्व इतिहास**

**१.२.२.२ संस्थानांचे विलीनीकरण**

**१.२.३ राज्यांची पुनर्रचना**

**१.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न**

**१.४ सारांश**

**१.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ**

**१.६ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रीय कार्य / प्रात्यक्षिक कार्य**

## १.० उद्दिष्टे

- या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला भारतीय राज्यघटनेच्या पार्श्वभूमीची माहिती होईल.
- भारतीय राज्यघटनेतील मुख्य तरतुदी स्पष्ट करता येईल.
- भारतीय संस्थानांच्या विलीनीकरणाची प्रक्रिया विशद करता येईल.
- स्वातंत्र्योत्तर भारतात राज्यांची पुनर्रचना कशाप्रकारे झाली याची माहिती घेता येईल.

## १.१ प्रस्तावना

वास्को-द-गामाच्या भारतातील आगमनापासून अनेक पाश्चात्यांनी हिंदुस्थानात आपल्या वखारी स्थापन केल्या. १७५७ मधील प्लासीच्या व १७६४ च्या बक्सारच्या लढाईनंतर हिंदुस्थानात ब्रिटिशांची राजकीय सत्ता स्थापनेची मुहूर्तमेढ रोवली गेली. १८५७ चा उठाव ब्रिटिशांनी दडपून टाकला असला तरी भारतात राष्ट्रवादी भावना निर्माण होण्याची वेगाने

प्रक्रिया सुरू झाली. १८५७ ते १९४७ पर्यंत भारतीयांनी स्वातंत्र्याकरिता अनेक टप्पे, चळवळी पार केल्यात. त्याचे फलीत म्हणजे हिंदुस्थान १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वतंत्र झाला.

या प्रकरणात आपण भारतीय राज्यघटना कशाप्रकारे निर्माण झाली ते अभ्यासणार आहोत. भारतीय राज्यघटनेतील प्रमुख तरतुदींची माहिती घेणार आहोत. भारतीय राज्यघटना भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे. राज्यघटना निर्मितीत लोकशाहीचा आत्मा आहे. राज्यघटना निर्मितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान महत्वाचे आहे.

संस्थांनिकांच्या बळावरच ब्रिटिशांनी हिंदुस्थानात साम्राज्य स्थापन केले. यामुळेच जाता जाता संस्थानिकांना स्वातंत्र्याचा अधिकार ब्रिटिशांनी दिला. अनेक संस्थानिक स्वातंत्र्यापूर्वीच हिंदुस्थान किंवा पाकिस्तानात विलीन झाले. मात्र भौगोलिकदृष्ट्या संलग्नता नसतानाही जूनागड, हैद्राबाद सारखी संस्थाने पाकिस्तानात समाविष्ट होण्याचा तर काश्मीरने स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. मात्र सरदार वल्लभभाई पटेल यांनी वेळीच खंबीर भूमिका घेऊन संस्थानांचे हिंदुस्थानात विलीनीकरण करून घेतले. त्याचाही उहापोह प्रस्तुत प्रकरणात होणार आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळाले मात्र भाषावार, प्रदेशवार पुनर्रचनेची मागणी स्वातंत्र्यापूर्वीपासूनच होत होती. त्यामुळेच स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या राज्य पुनर्रचनेची माहिती आपण या प्रकरणातून घेणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ भारतीय राज्यघटना

#### १.२.१.१ व्याख्या

'राज्यघटना म्हणजे मूलभूत नियमांचा संग्रह होय', की ज्याद्वारे सार्वभौम सत्तेची वाटणी केली जाते, तसेच ही सार्वभौम सत्ता कोणी आणि कशी वापरावी या संबंधी सर्वसामान्य तत्त्वे निश्चित केली जातात किंवा ज्या नियमांच्याद्वारे सार्वभौमसत्तेची विभागणी आणि अंमलबजावणी होते, त्या नियमांना 'राज्यघटना' असे म्हणतात.

#### १.२.१.२. भारतीय राज्यघटनेची स्थापना :

कॅबिनेट मिशन योजनेत घटना समितीच्या निर्मितीची तरतूद करण्यात आली. जुलै १९४६ मध्ये त्यासाठी निवडणुका झाल्या व समितीची पहिली बैठक ९ डिसेंबर १९४६ रोजी भरली. घटनेच्या उद्दिष्टांचा ठराव नेहरूंनी मांडला. पंडित नेहरू, सरदार पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, मौलाना अबुल कलाम आझाद, डॉ. श्मामाप्रसाद मुखर्जी यांसारखे मान्यवर नेते तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सर अलादी कृष्णस्वामी अय्यर, डॉ. जयकर यासारखे विद्वान घटना समितीवर होते. १९४७ मध्ये घटना समितीने डॉ. आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली घटना तयार करण्याकरिता एक मसुदा समिती नेमली. त्या समितीने देशातील राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात घेऊन व जगातील प्रमुख देशांच्या घटनांचा अभ्यास करून घटनेचा मसुदा तयार केला, तो फेब्रवारी १९४८ मध्ये प्रसिद्ध झाला. घटनासमितीत

त्यावर बरीच साधक बाधक चर्चा झाल्यानंतर २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटनासमितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी त्या घटनेवर स्वाक्षरी केली आणि घटना संमत झाल्याचे जाहीर केले. २६ जानेवारी १९५० रोजी ती घटना लागू करण्यात आली.

संविधान सभेने भारताचे स्वतंत्र संविधान करण्यासाठी २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस अर्थ प्रयत्न केले. भारताची राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी अशी लिखित राज्यघटना आहे. या राज्याघटनेमध्ये ३९५ कलमे असून ती २२ विभागांमध्ये समाविष्ट केली आहेत. त्याशिवाय ९ परिशिष्ट्ये आहेत.

### १.२.१.३ घटनेतील मुख्य तरतुदी

**(१) उद्देशपत्रिका (Premble) :–** घटनेचा प्राण किंवा आत्मा म्हणजेच उद्देशपत्रिका होय. भारताच्या राज्यघटनेच्या उद्देशपत्रिकेमध्ये भारताच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाची रूपरेषा दर्शविली आहे. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना परिषदेने ही उद्देशपत्रिका मंजूर केली ती पुढीलप्रमाणे –

''आम्ही भारतीय जनता, भारताचे सार्वभौम प्रजासत्ताक गणराज्य निर्माण करण्याचे आणि भारताच्या सर्व नागरिकांना न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता यांची शाश्वती देण्याचे आमच्या या घटना समितीत ठरवीत आहोत.'' पुढे बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीत ''समाजवादी व धर्मनिरपेक्ष' हे शब्द टाकण्यात आलेत.

(२) मूलभूत हक्क :– भारतीय घटनेच्या तिसऱ्या अध्यायात नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा समावेश केला. भारतीय घटनेने नागरिकांना पुढील सात प्रकारचे मूलभूत अधिकार दिले आहेत.

(१) समतेचा अधिकार –Right to Equality (कलम १४ ते १८)

(२) स्वातंत्र्याचा अधिकार – Right toFreedom (कलम १९ ते २२)

(३) शोषणाविरुद्धचा अधिकार – Right against Explcitation (कलम २३ ते २४)

(४) धर्मस्वातंत्र्याचा अधिकार – Right to Freedom of Religion (कलम २५ ते २८)

(५) संस्कृती व शिक्षणाचा अधिकार – Cultural and Educational (कलम २९ व ३०)

(६) संपत्तीचा अधिकार – Right to Property (कलम ३१)

हा अधिकार ४४ व्या घटनादुरुस्तीने १९७८ साली रद्द केला.

(७) घटनात्मक उपायांचा अधिकार – Right to constitutional Remodies (कलम ३२)

समतेच्या हक्काचे वर्णन संविधानाच्या १४ ते १८ कलमामध्ये केले. घटनेच्या १४ व्या

कलमानुसार कायद्यासमोर प्रत्येक व्यक्तीला समान मानण्यात येईल. घटनेच्या १५ व्या कलमानुसार धर्म, वंश, स्त्री-पुरुष, जन्मस्थान, लिंग जात यांच्या आधारावर नागरिकांमध्ये कोणत्याच प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही. घटनेच्या १६ व्या कलमानुसार प्रत्येक नागरिकाला आपल्या पात्रतेनुसार नोकरी करण्याचा, एखादे पद ग्रहण करण्याचा समान अधिकार आहे. १७ व्या कलमानुसार स्पृश्य-अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविण्यात आला आहे. १८ व्या कलमानुसार व्यक्ती-व्यक्तींमध्ये असणारा सामाजिक, आर्थिक व राजकीय भेदभाव नष्ट केला आहे.

घटनेच्या १९ ते २२ व्या कलमांमध्ये व्यक्तिस्वातंत्र्य दिले आहेत. त्यानुसार भाषण, विचार, सभा, संस्था स्थापन करणे, देशात मुक्त संचार, वास्तव्य, संपत्ती संपादन, व्यवसाय स्वातंत्र्य देण्यात आली आहेत.

भारतीय घटनेच्या २३ व्या कलमानुसार भारतामध्ये मानवाच्या क्रय-विक्रयास बंदी घातली आहे. २४ व्या कलमानुसार चौदा वर्षांचे आतील मुलामुलींना खाणी किंवा धोक्याच्या ठिकाणी काम करण्यास बंदी आहे.

भारतीय घटनेच्या २५ व्या कलमानुसार धर्म स्वातंत्र्याचा अधिकार देण्यात आला आहे. २६ व्या कलमानुसार कायदा करून राज्यातील धार्मिक संस्थांची चल व अचल संपत्तीची मालकी स्वीकारण्याचा अधिकार सरकारला आहे. २७ व्या कलमानुसार कोणत्याही धर्माच्या प्रचारासाठी सक्तीने पैसा गोळा करण्यावर बंदी घातली आहे. २८ व्या कलमान्वये शिक्षण संस्थातून धार्मिक शिक्षण देण्यावर बंदी घातलेली आहे.

घटनेच्या २९ व्या कलमानुसार भारतात राहणाऱ्याच्या नागरिकाला आणि नागरिकांच्या समूहाला आपली स्वतःची भाषा, लिपी आणि संस्कृती यांची जोपासना करण्याचा अधिकार आहे. ३० व्या कलमानुसार अल्पसंख्याक जातींना स्वतःच्या आवडीनुसार धर्म किंवा भाषा या आधारावर शिक्षण संस्था चालविण्याचा अधिकार आहे.

घटनेच्या कलम ३१ नुसार मर्यादित मालमत्तेचा हक्क देण्यात आला आहे. मूलभूत अधिकारांच्या संरक्षणासाठी घटनात्मक उपायांचा अधिकार कलम ३२ नुसार देण्यात आला आहे. त्यानुसार,

बंदी प्रत्यक्षीकरण - (Habias Corpus)

परमादेश - (Mandamus)

प्रतिषेध - (Prohibition)

अधिकारपृच्छा - (Qua-warranto)

उत्प्रेषण - (Certiriori)

हे पाच अधिकार देण्यात आले आहेत.

**(३) मूलभूत कर्तव्ये :-** भारताच्या मूळ राज्यघटनेत मूलभूत कर्तव्यांचा लिखित स्वरूपात समावेश केला नव्हता. परंतु कर्तव्याशिवाय अधिकार म्हणजे अराजक होय आणि

अधिकारांशिवाय कर्तव्ये म्हणजे गुलामगिरी होय. यासाठी बेचाळीसाव्या घटना दुरुस्तीने प्रकरण ४ अ आणि ५१ अ कलम यामध्ये नागरिकांच्या पुढील १० मूलभूत कर्तव्यांचा समावेश केला.

(१)राज्यघटना, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा मान राखणे.

(२) उदात्त आदर्शांचे जतन आणि पालन करणे.

(३) भारताचे सार्वभौमत्व, एकता आणि एकात्मता यांचा सन्मान करणे, संरक्षण करणे.

(४) देशाचे संरक्षण करणे.

(५) वर्गविरहित बंधुत्व निर्माण करणे.

(६) आपल्या देशाची एकात्म संस्कृती आणि गौरवशाली परंपरेचे संरक्षण करणे.

(७) नैसर्गिक संपत्तीचे रक्षण आणि संवर्धन करणे.

(८) वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद, प्रगतीच्या भावनेचा विकास करणे.

(९) सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे.

(१०) व्यक्तिगत आणि सामुदायिक उत्कर्षाकडे वाटचाल करणे.

**(४) नागरिकत्व :–** ब्रिटिश शासन काळात भारतातील सर्व लोक हे ब्रिटिश राजाचे प्रजाजन होते. २६ जानेवारी १९५० रोजी घटना संमत होऊन भारत सार्वभौम, लोकशाही प्रधान गणराज्य बनताच भारतातील सर्व लोक भारताचे नागरिक बनले. नागरिक असलेल्या व्यक्तीचे नागरिकत्वाचे हक्क काढून घेणे किंवा कोणाला नागरिकत्व देणे याबाबतचे अधिकार संसदेला देण्यात आले आहेत.

**(५) मार्गदर्शक तत्त्वे :–** भारतीय घटनेने स्वीकारलेले लोककल्याणाचे ध्येय घटनेतील मार्गदर्शक तत्त्वात स्पष्टपणे प्रतिबिंबीत झाले आहे. भारतीय शासनाचे अंतिम उद्दिष्ट काय असावे, त्या दृष्टीने नीती कशी असावी विषद करणारी ही तत्त्वे आहेत.

स्थानिक स्वराज्याला प्रोत्साहन, परराष्ट्रांशी शांततेचे व सलोख्याचे संबंध, समतेवर आधारित आर्थिक, सामाजिक रचना, श्रमिकांच्या मूलभूत हितांचे रक्षण, प्राण्यांना संरक्षण, मोफत प्राथमिक शिक्षण, आरोग्यविषयक सुविधांकडे लक्ष, राष्ट्रीय स्मारकांची जोपासना इ. मार्गदर्शक तत्त्वे घटनेत नमूद करण्यात आले आहेत. मार्गदर्शक तत्त्वांना कायद्याचा आधार नसला तरी जनमताचा पाठिंबा त्या तत्त्वांना असल्याने त्याकडे पाठ फिरवणे सरकारला शक्य होत नाही.

**(६) न्यायव्यवस्था :–** संघराज्य पद्धतीत न्यायपालिकेला विशेष महत्त्व असते. घटनेच्या कलमांचा अर्थ लावून त्यांचे संरक्षण करणे, मूलभूत अधिकारांची पायमल्ली होत नाही याची दक्षता घेणे या दृष्टीने न्यायपालिकेचे महत्त्व वादातीत आहे.

**(७) लोकसेवा आयोग :–** लोकशाहीत दर पाच वर्षांनी निवडणूक होऊन नवे

मंत्रिमंडळ अधिकारावर येते. त्यामुळे राज्यकारभारात सातत्य राखण्यासाठी व निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी सरकारी नोकरवर्गाची निर्मिती अनिवार्य ठरते. नोकऱ्यांत केवळ पात्र व कार्यक्षम व्यक्तींची नियुक्ती व्हावी म्हणून पक्षीय राजकारणापासून स्वतंत्र असलेली एखादी यंत्रणा निर्माण करणे आवश्यक असते. तशी तरतूद संघ लोकसेवा आयोग व राज्य लोकसेवा आयोग निर्माण करून भारतीय घटनेने केली आहे.

**(८) निवडणूक मंडळ :–** संसदीय लोकशाही व्यवस्थेत जनतेने दर पाच वर्षांनी आपले प्रतिनिधी निवडावयाचे असतात. ही निवडणूक निःपक्षपाती व्हावी याकरिता घटनेने एका निवडणूक मंडळाची तरतूद केली आहे. मुख्य निवडणूक आयुक्त हा त्या मंडळाचा प्रमुख असतो. मतदारसंघ हे जात किंवा धर्म अशा गोष्टींवर आधारलेले नाहीत. १८ वर्षे वयावरील सर्व स्त्री–पुरुषांना मतदानाचा हक्क देण्यात आला आहे.

**(९) भारतीय संघराज्य :–** ब्रिटिशकालीन भारतातील अनेक प्रांत, संस्थाने मिळून भारतीय संघराज्य निर्माण करण्यात आले. संघराज्य राज्यपद्धतीत सत्तेची विभागणी केलेली असते. संघसूची, राज्यसूची, समवर्ती सूची अशा तीन भागात अधिकारांची विभागणी घटनेने केली आहे. त्यात संघसूचीत एकंदर ९७ विषय आहेत. रेल्वे, पोस्ट, तार, संरक्षण, परराष्ट्र संबंध अशा अखिल भारतीय महत्त्वाच्या सर्व विषयांचा त्यात अंतर्भाव करण्यात आला आहे. त्या विषयांबाबत कायदे करण्याचा अधिकार केवळ संसदेलाच आहे. घटकराज्यांच्या दृष्टीने महत्त्वाच्या विषयांचा अंतर्भाव राज्यसूचीत केलेला आहे. या यादीत शेती, आरोग्य, तुरुंग, शिक्षण इ. ६५ विषयांचा अंतर्भाव आहे. त्या विषयांवर सामान्यतः राज्य कायदे मंडळालाच कायदे करता येतात, परंतु विशिष्ट परिस्थितीत राज्यसूचीतील विषयांवर संसदही कायदा करू शकते. समवर्ती सूचीतील विषयांसंबंधी कायदा करण्याचा अधिकार संसदेला त्याचप्रमाणे राज्य विधी मंडळालाही आहे. या यादीत विवाह, घटस्फोट, कामगार, संघटना, कारखाने इ. ४७ विषयांचा अंतर्भाव आहे. या ३ सूचींव्यतिरिक्त जर आणखी काही विषय राहिले तर त्या उर्वरित विषयांवर कायदे करण्याचा अधिकार संसदेला आहे.

**(१०) संसदीय शासन पद्धती :–** कार्यकारी मंडळ आणि कायदे मंडळ यांच्या परस्परसंबंधावर आधारित असा शासनाच्या संघटनांचा प्रकार, मंत्रिमंडळ/कार्यकारी मंडळ हे कायदेमंडळाला जबाबदार असावे हे या प्रकारचे मुख्य वैशिष्ट्ये. कायदेमंडाळामध्ये बहुमत असणाऱ्या पक्षाचा/गटाचा नेता कार्यकारी प्रमुख होतो. पंतप्रधान हा अन्य मंत्र्यांची निवड करतो. मंत्री हे कायदेमंडळाचे सभासद असावे लागतात आणि कार्यकारी मंडळ, सामूहिक कायदेमंडळाला जबाबदार असते. त्यालाच 'सामूहिक जबाबदारीचे तत्त्व' म्हणतात. प्रश्नोत्तरे, लक्षवेधी सूचना, चर्चा, तहकुबीचे ठराव, अविश्वासाचा ठराव अशा विविध मार्गांनी कायदेमंडळाचे सभासद कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवू शकतात.

## १.२.२ भारतीय संस्थानांचे विलीनीकरण

### १.२.२.१ भारतीय संस्थानिकांचा पूर्व इतिहास

ब्रिटिश राजवटीत हिंदुस्थानचे ब्रिटिश भारत व संस्थानिकांचे राज्य असे दोन भाग करण्यात आले होते. संस्थानिक ब्रिटिश सरकारचे मांडलिक होते. १७५७–१८१३ या

कालखंडात संस्थानांना सन्मानाची वागणूक दिली. १८५८ च्या राणीच्या जाहीरनाम्यानुसार संस्थानांना अभय देण्यात आले. पुढील काळात ब्रिटिश रेसिडेंटच्या माध्यमातून संस्थानांच्या राज्यकारभारातील हस्तक्षेप सुरूच राहिला.

१९१९ च्या माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणा काद्यानुसार 'चेंबर ऑफ प्रिन्सेस' या संस्थानिक संघटनेची निर्मिती ८ फेब्रुवारी १९२९ मध्ये करण्यात आली. यामध्ये १२० संस्थानिक सभासद झाले. परंतु राज्याच्या एकीकरणाच्या दृष्टीने कोणतीही कामगिरी झाली नाही. लॉर्ड माउंट बॅटन यांनी फाळणीची योजना मांडली. भारतातील सर्व पक्षांची त्यास मान्यता मिळविली. त्यानुसार १८ जुलै १९४७ रोजी भारतीय स्वातंत्र्याचा कायदा समंत झाला. हिंदुस्थानातील संस्थानिकांची संख्या ५६२ एवढी होती. एक चतुर्थांश लोकसंख्या व दोन पंचमांश प्रदेश संस्थानिकांच्या ताब्यात होता.

संस्थानिकांसमोर ब्रिटिश सरकारने तीन मार्ग ठेवले

(१) स्वतंत्र भारतात विलीन होणे.

(२) स्वतंत्र पाकिस्तानमध्ये विलीन होणे.

(३) स्वतःचे स्वतंत्र राज्य निर्माण करणे.

संस्थानिकांच्या विलीनीकरणाच्या प्रश्नाबाबत पंडित नेहरू म्हणतात, ''भारताच्या संघराज्यात स्वायत्तता व समान भूमिकेवरून सामील होणे किंवा संघराज्याची अधिसत्ता मान्य करणे असे दोनच पर्याय संस्थानिकांसमोर आहेत. संस्थानिकांनी परकीय सत्तेशी संबंध जोडणे हा पर्याय भारताचे स्वातंत्र्य नष्ट करणारा आहे. तेव्हा आम्ही अशी घटना संस्थानिकांकडून होऊ देणार नाही. एखाद्या परकीय सरकारने संस्थानिकांचे स्वातंत्र्य मान्य केल्यास ती कृती शत्रुत्वाची समजू.''

### १.२.२.२ संस्थानांचे विलीनीकरण

भारतीय स्वातंत्र्याची पहाट होत असताना संस्थाने एक निर्णायक टप्प्यावर उभी होती. स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडात संस्थानातील प्रजाही आपल्या स्वातंत्र्याबद्दल जागृत झाली होती. सरदार पटेलांनी संस्थानी प्रजेला स्वातंत्र्य चळवळ करण्यासाठी प्रत्यक्ष अप्रत्यक्ष प्रेरणा दिली होती. सरदार पटेल संस्थानिकांना इशारेवजा आवाहन करताना म्हणतात की, संस्थानातील प्रजा आपल्या स्वातंत्र्यासाठी संस्थानिकांविरुद्ध चळवळ करील. स्वतंत्र भारत सरकारचे स्वातंत्र्याच्या प्रश्नावर सहाय्य करण्याचे धोरण असल्याने आम्ही अशा चळवळीला मदत करू, म्हणून संस्थानिकांनी कोणत्याही प्रकारची कटूता निर्माण न करता भारतीय संघराज्यात सामील होण्याचा निर्णय घ्यावा.

संस्थाने विलीनकरणाबाबत खालील तीन मर्ग अवलंबिण्यात आले.

**(१)लहान-लहान राज्यांचे शेजारील मोठ्या राज्यामध्ये/प्रदेशामध्ये विलीनकरणः-** या मार्गानुसार मुंबई, मद्रास, ओरिसा, छत्तीसगड, पूर्व पंजाब व पश्चिम बंगालमधील छोट्या मोठ्या संस्थानिकांचे विलीनीकरण करण्यात आले.

**(२)स्टेट युनियनच्या (संघ) स्वरूपात विलीनीकरण :-** यानुसार भौगोलिक, भाषिक व सामाजिक एकतेचा विचार करून २२२ संस्थानिकांचा समावेश करून सौराष्ट्र (काठीयावाड)ची निर्मिती करण्यात आली.

**(३)केंद्रशासित प्रदेशाच्या स्वरूपात संस्थानांचे विलीनीकरण :-** ही योजना हिमाचल प्रदेश, विंध्य प्रदेश व कच्छ प्रदेश यासाठी लागू करण्यात आली व तेथील संस्थानांचे या प्रदेशात विलीनीकरण करण्यात आले.

सरदार वल्लभभाई पटेलांनी अत्यंत मुत्सद्देगीरीने व कणखर धोरणाचा अवलंब करून १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत जुनागढ, हैद्राबाद व काश्मीरचा अपवाद वगळता सर्व संस्थानांचे भारतीय संघराज्यात विलीनीकरण केले.

जुनागढचे विलीनीकरण

जुनागढ हे सौराष्ट्राच्या किनाऱ्यावरील भारतीय भू-भागाने वेढलेले व पाकिस्तानशी भौगोलिक सलगता नसणारे संस्थान होते. महाबतखान हा या संस्थानचा नबाब होता. जुनागढचे क्षेत्रफळ ३०,३३७ चौरस मैल होते, तर लोकसंख्या ६,७०,७११ एवढी होती. त्यापैकी ८० टक्के हिंदू तर २० टक्के प्रजा मुस्लीम होती. नबाब महाबतखान याने बॅ. जीनांशी गुप्तपणे पत्रव्यवहार केला. पाकिस्तान सरकारने १३ सप्टेंबर १९४७ रोजी जुनागढ संस्थान पाकिस्तानात विलीन होत असल्याचे भारत सरकारला कळविले. याबाबत जुनागढशी 'स्टँड स्टील' करार झाल्याचे जाहीर केले.

नबाबाच्या निर्णयामुळे जुनागढ संस्थानातील जनतेला धोका बसला. ८० टक्के जनता हिंदू असताना कोणत्याही प्रकारचा विचार न घेता नबाबाने घेतलेला निर्णय आपला अवमान असल्याचे प्रजेला वाटले. त्यांनी नबाबाच्या विरोधात आंदोलन उभारले. नबाब महाबतखान चैनी, विलासी व ऐशारामी होता. जुनागढमधील प्रजेने केलेल्या आंदोलनाला भारत सरकारने पाठिंबा दिला. जुनागढमधील नवानगर, भावनगर, गोंडल ही संस्थाने यापूर्वीच भारतात सामील झाली होती. भारत सरकारने २४ सप्टेंबर १९४७ रोजी जुनागढमध्ये लष्करी कारवाई केली. नबाब महाबतखानास पाकिस्तानात पळून जावे लागले. यानंतर श्यामलदास गांधी यांच्या नेतृत्वाखाली काठियावाड जनता आघाडीच्या हंगामी सरकारची स्थापना झाली. फेब्रुवारी १९४८ मध्ये जुनागढमध्ये सार्वमत घेण्यात येऊन जुनागढ संस्थानाचे भारतात विलीनीकरण करण्यात आले.

**हैद्राबादचे विलीनीकरण**

मुघल साम्राज्याच्या विघटनाच्या कालखंडात हैद्राबाद संस्थानचा उदय झाला. हे संस्थान भारतातील सर्वात मोठे संस्थान असून सर्व बाजूंनी भारतीय भू-भागाने वेढलेले होते. या संस्थानामध्ये मराठवाडा, कर्नाटक, तेलंगणा यांचा समावेश होतो. हैद्राबाद संस्थानचे क्षेत्रफळ ८२,३१३ चौरस मैल तर लोकसंख्या १,६३,३८,५४३ एवढी होती. या लोकसंख्येपैकी ८५ टक्के हिंदू, १० टक्के मुसलमान, ५ टक्के इतर अल्पसंख्यांक होते. हैद्राबाद संस्थानचा नबाब मीर उस्मान अली खान याने पाकिस्तानच्या चिथावणीने हैद्राबाद संस्थान स्वतंत्र ठेवण्याचे जाहीर केले. एवढ्यावरच न थांबता संस्थानाच्या सीमा विस्तारासाठी लष्करी

तयारीस सुरुवात केली.

याबाबत सरदार पटेल म्हणतात की, ''जे भारतीय संघराज्य आम्ही आमचे रक्त सांडून मिळवले आहे. त्याच्या मध्यभागी असे एखादे अलग राज्य आम्ही सहन करणार नाही.''

भारत सरकार आणि निजाम यांच्यामध्ये २९ नोव्हेंबर १९४७ रोजी जैसे थे करार झाला. यामुळे लॉर्ड माऊंट बॅटनला वाटाघाटीसाठी वेळ मिळणार होता. निजामाने वॉल्टर मॉकटन यास आपला वकील म्हणून वाटाघाटीसाठी पाठविले. निजाम आणि भारत सरकार यांच्यातील वाटाघाटीत अडथळा आणण्याचा प्रयत्न इतिहाद नावाच्या कट्टर धर्मनिष्ठ मुस्लीम संघटनेचा नेता कासीम रझवी करीत होता. निजामानेही जैसे थे परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी हालचाली सुरू केल्या.

जैसे थे करारानंतर हैद्राबादमध्ये घडून आलेल्या महत्त्वपूर्ण घडामोडी

(१) निजामाने इतिहाद उल-मुसलमान या कट्टर मुस्लीम संघटनेच्या माध्यमातून रझाकार या निमलष्करी दलाची निर्मिती केली.

(२) हैद्राबाद काँग्रेसने ७ ऑगस्ट १९४७ पासून निजामाने लोकप्रतिनिधींचे सरकार नेमावे यासाठी सत्याग्रह सुरू केला. यामुळे रझाकार या निमलष्करी दलाने संस्थानातील प्रजेवर भयंकर स्वरूपाचे अन्याय, अत्याचार केले. सीमेवरील ७१ खेडी उद्ध्वस्त केली. तर १४० वेळा भारतीय प्रदेशावर आक्रमण केले. कोट्यवधी रुपयांची भारतीय मालमत्तेची नासाडी केली.

(३) हैद्राबाद संस्थानातील तेलंगणा भागात १९४६ च्या उत्तरार्धात कम्युनिस्ट प्रणीत शेतकरी आंदोलन घडून आले होते. हैद्राबादमुक्ती आंदोलनामुळे शेतकरी आंदोलनाला पुन्हा जोर चढला. रझाकारांच्या अन्याय, अत्याचाराचा सामना करण्यासाठी त्यांनी शेतकरी संरक्षण दलाची निर्मिती केली व या दलाच्या माध्यमातून जमीनदारांवर हल्ले केले व त्यांच्या ताब्यातील जमिनी शेतकरी व भूमिहीन यांना वाटून दिल्या.

परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन सरदार पटेलांनी पंतप्रधानांना कळविले की, कोणत्याही परिस्थितीत हैद्राबादचे विलीनीकरण करून तेथे प्रतिनिधी सरकार स्थापन केले पाहिजे. शेवटी रझाकारांच्या अन्याय, अत्याचारास लगाम घालण्यासाठी पोलीस कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. यानुसार १३ सप्टेंबर १९४८ रोजी लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्र सिंहजी यांच्या मार्गदर्शनाखाली मेजर जनरल जे. एन. चौधरी यांच्या नेतृत्वाखाली कारवाई सुरू झाली. १८ सप्टेंबर १९४८ रोजी हैद्राबाद ताब्यात आले. तर १९४९ मध्ये एस. के. बेलोदी या आय. सी. एस. अधिकाऱ्याने निवडणुका घेतल्या. त्यातून काँग्रेस सरकार सत्तेवर आले. सरदार पटेलांच्या खंबीर नेतृत्वामुळे संस्थाने विलीनीकरणाचे प्रश्न मार्गी लागले म्हणून सरदार पटेलांना पोलादी पुरुष/लोहपुरुष असे म्हटले जाते.

### काश्मीर विलीनीकरणाचा प्रश्न

काश्मीर संस्थानात लडाख, गिलगिट, काश्मीर खोरे व जम्मू इ. प्रदेशांचा समावेश होता. काश्मीर संस्थानचा राजा हरिसिंग हा हिंदू होता. तर तेथील बहुसंख्य प्रजा मुसलमान होती.

काश्मीरचा प्रदेश समुद्रसपाटीपासून अत्यंत उंच असून तेथील परिसर विलोभनीय आहे. लष्करीदृष्ट्याही काश्मीरला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पूर्वेला तिबेट, ईशान्येला सिकियांग, वायव्येला अफगाणिस्तान असा भारत-पाकिस्तान सीमेलगतचा प्रदेश आहे. माऊंट बॅटनने राजा हरिसिंग यांच्याशी विलीनीकरणाबाबत चर्चा केली. परंतु राजा हरिसिंग यांनी काश्मीर संस्थान स्वतंत्र राष्ट्र म्हणून ठेवण्याचा निर्णय घेतला.

काश्मीर संस्थानमध्ये बहुसंख्य प्रजा मुसलमान असल्याने हा प्रदेश पाकिस्तानात सामील व्हावा, अशी पाकिस्तानची इच्छा होती. परंतु हरिसिंगाच्या स्वतंत्र काश्मीरच्या भूमिकेमुळे तसे होणे कठीण होते. पाकिस्तानने काश्मीरबाबत आक्रमक भूमिका स्वीकारली. बॅ. जिनांनी मेजर शहा यास काश्मीरमध्ये पाठवून राजा हरिसिंगाविरुद्ध उठाव करण्याचा प्रयत्न केला. मेहरचंद महाजन हे यावेळी काश्मीरचे पंतप्रधान होते. त्यांनी पाकिस्तानकडून जैसे थे कराराचा भंग होत असल्याची तक्रार ब्रिटिशांकडे केली. २२ ऑक्टोबर १९४७ रोजी पाकिस्तानने लष्करी अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली ३० हजार पठाण सेना काश्मीर खोऱ्यात घुसवली. ही सेना अत्यंत वेगाने काश्मीरची राजधानी श्रीनगरकडे धाव घेऊ लागली. पाकिस्तानच्या आक्रमणास तोंड देईल एवढे लष्कर राजा हरिसिंगाने भारताकडे मागितले. पंतप्रधान पंडित नेहरूंनी राजा हरिसिंगाला भारतात सामील होण्याच्या करारावर स्वाक्षरी करण्याची सूचना केली. राजा हरिसिंगापुढे अन्य कोणताही पर्याय न राहिल्याने तत्कालीन गृहमंत्री व संस्थान मंत्रालयप्रमुख सरदार पटेल यांचे सचिव व्ही. पी. मेनन यांच्या उपस्थितीत राजा हरिसिंगानी सामीलनाम्यावर २६ ऑक्टोबर १९४७ रोजी स्वाक्षरी केली. यामुळे कायदेशीररीत्या काश्मीर संस्थानाचे भारतामध्ये विलीनीकरण झाले.

काश्मीर संस्थान भारतात विलीन होताच भारत सरकारने अत्यंत तातडीने हवाईमार्गे आपली सेना काश्मीरमध्ये पाठविली. दरम्यान टोळीवाले राजधानी श्रीनगरपर्यंत येऊन पोहोचले होते. परंतु भारतीय सेनेने टोळीवाल्यांचे मनसुबे उधळून लावले. पाकिस्तानी घुसखोरांना काश्मीरमधून हाकलून देण्याची मोहीम जोरदारपणे सुरू केली. एक तृतीयांश प्रदेश अद्यापही घुसखोरांच्या ताब्यात होता. सशस्त्र संघर्षावरून भारत-पाकिस्तान युद्धाचा धोका निर्माण झाला. गव्हर्नर जनरल लॉर्ड माऊंट बॅटन यांनी पाकिस्तानी आक्रमणापासून काश्मीरच्या मुक्तीसाठी हा प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेण्याचा सल्ला पंतप्रधान नेहरूंना दिला. त्यानुसार पंडित नेहरूंनी ३० डिसेंबर १९४७ रोजी काश्मीर प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघाकडे नेला.

भारताच्या तक्रारीची दखल घेऊन संयुक्त राष्ट्रसंघाने १ जानेवारी १९४८ रोजी दोन्ही देशांना जैसे थे परिस्थितीत युद्धबंदी करण्याची सूचना केली. त्याप्रमाणे युद्धबंदी झाली. काश्मीर प्रश्नावर सखोल चर्चा होऊन संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा समितीने १३ ऑगस्ट १९४८ रोजी काश्मीरबाबत ठराव संमत केला. त्यामधील प्रमुख कलमे खालीलप्रमाणे :-

(१) दोन्ही राष्ट्रांनी युद्धबंदी करावी.

(२) दोन्ही राष्ट्रांनी आपआपली सेना आपल्या मूळ सरहद्दीपर्यंत मागे घ्यावी.

(३) सद्यःपरिस्थितीत काश्मीर सरकार कायम राहील व सरकारच्या नेतृत्वाखाली काश्मीरमध्ये सार्वमत घेण्यात यावे.

(४) सार्वमताच्या प्रक्रियेवर संयुक्त राष्ट्रसंघाचे (युनो) निरीक्षक लक्ष ठेवतील.

वरील ठरावाची अंमलबजावणी होऊ शकली नाही. आपापली सेना मूळ सरहद्दीपर्यंत मागे घेण्याची सूचना पाकिस्तानने फेटाळून लावली व ताबा मिळविलेला काश्मीरचा प्रदेश आपल्याकडेच ठेवला. आक्रमणपूर्व स्थिती निर्माण न झाल्याने सार्वमत घेण्यात आले नाही. युद्धबंदी झाल्यानंतरच्या रेषेलाच सरहद्दरेषा म्हणून ओळखण्यात येऊ लागले. पुढील काळात काश्मीर प्रश्नावरून पाकिस्तानने तीन वेळा इ.स. १९६५, इ.स. १९७१, इ.स. १९९९ साली भारतावर आक्रमण केली. या तिन्ही युद्धात भारताने पाकिस्तानचा दारुण पराभव केला.

### फ्रेंच वसाहतींची मुक्तता

युरोपीय व्यापाऱ्यांनी मुघल बादशहांकडून व्यापारी परवाने मिळवून भारतात अनेक ठिकाणी आपआपल्या वसाहती निर्माण केल्या होत्या. फ्रेंच वसाहतकारांनी पाँडेचरी, माहे, कारिकल, चंद्रनगर इ. ठिकाणी वसाहतींची स्थापना केली. औरंगजेबाच्या मृत्युनंतर १७०७ मुघल साम्राज्य कमकुवत झाले. याचा फायदा युरोपीय व्यापारी कंपन्यांनी घेतला. व्यापाराच्या मक्तेदारीवरून इंग्रज व फ्रेंच यांच्यात मोठी स्पर्धा झाली. दक्षिण भारताच्या पूर्व किनाऱ्यावरील चेन्नई येथे इंग्रजांची मुख्य वखार होती. तर चेन्नई शेजारीच पाँडेचरी हे फ्रेंचाचे मुख्य ठाणे होते.

कर्नाटकाच्या युद्धानंतर फ्रेंचांनी भारतात प्रदेश विस्तारात फारसा रस दाखविला नाही. पाँडेचरी, माहे, कारिकल, चंद्रनगर, येलम या भागावरच त्यांनी लक्ष केंद्रित केले. १९४७ पूर्वी संस्थानांच्या विलीनीकरणाबाबत निर्णय घेण्यात आला. भाषावर प्रांत रचनेच्या हालचाली सुरू झाल्या. परंतु विदेशी वसाहतीबाबतचा प्रश्न तसाच भिजत पडला होता. पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कार्यकुशलतेमुळे अनेक वसाहतींचे यशस्वीरीत्या भारतात विलीनीकरण झाले. स्वातंत्र्यानंतर पोर्तुगीज व फ्रेंच वसाहतींचा प्रश्न महत्त्वाचा होता.

### पोर्तुगीज वसाहतींची मुक्तता

इ. स. १४९८ मध्ये पोर्तुगीज खलाशी वास्को-द-गामा भारतातील कालीकत बंदरात उतरला. भारतात येणारा तो पहिला युरोपीय खलाशी होय. १६ व्या शतकाच्या प्रारंभी भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर पोर्तुगीज सत्ता स्थिर होऊ लागली. पोर्तुगीजांपाठोपाठ डच, इंग्रज व फ्रेंच भारतात आले. गोवा, दीव, दमण, दादरा व नगर हवेली इ. प्रदेशांवर पोर्तुगीजांनी वर्चस्व निर्माण केले. छत्रपती संभाजी महाराज व पोर्तुगीज यांच्यात संघर्ष झाला होता. मराठ्यांचा पश्चिम किनारपट्टीवरील प्रबळ शत्रू सिद्दीजोहर व पोर्तुगीज यांच्यात संघर्ष झाला होता. पोर्तुगीजांना धडा शिकविण्यासाठी छत्रपती संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांवर चाल करून फोंडा ताब्यात घेतला. यामुळे भयभीत झालेल्या पोर्तुगीजांनी सेंट झेवियरच्या चर्चमध्ये आश्रय घेतला.

औरंगजेब पुत्र शहा आलमच्या स्वराज्यावरील आक्रमणामुळे या मोहिमेतून छत्रपती संभाजी महाराजांना माघार घ्यावी लागली होती. अन्यथा पोर्तुगीजांचा कायमचा बंदोबस्त झाला असता. भारतातील साम्राज्य स्पर्धेमध्ये पोर्तुगीज मागे पडले असले तरी गोवा, दिव,

दमण, दादरा व नगर हवेली या प्रदेशात सत्ता टिकवून ठेवण्यात ते यशस्वी झाले.

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने पोर्तुगीजांच्या ताब्यातील वसाहतींची मागणी केली. परंतु पोर्तुगीजांनी यास दाद दिली नाही. १९५४ मध्ये भारतीय स्वयंसेवकांनी दादरा व नगर हवेली या प्रदेशात प्रवेश केला. परिणामतः पोर्तुगीजांनी हा प्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे नेला. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने या प्रश्नाचा अभ्यास करून भारताच्या बाजूने आपला निर्णय दिला. ऑगस्ट १९६१ मध्ये दादरा व नगर हवेली या प्रदेशाचे भारतात विलीनीकरण झाले.

### गोवा मुक्ती संग्राम

वास्को-द-गामा, अल्यअन्सो अल्बुकर्क यासारख्या कार्यक्षम पोर्तुगीज नेत्यांनी भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर आपली सत्ता भक्कम केली. १९३९ मध्ये मराठ्यांनी वसई घेऊन पोर्तुगीजांच्या वसाहतवादास एक झटका दिला होता. त्यामुळे पोर्तुगीजांनी गोवा, दिव, दमण येथील वसाहतींवर आपले लक्ष केंद्रित केले.

गोवा हे पश्चिम किनारपट्टीवरील निसर्ग सुंदर व व्यापारीदृष्ट्या अत्यंत महत्त्वपूर्ण बंदर होते. त्याचा विस्तार १,३०१ चौरस मैल असून लोकसंख्या तीन लाखांच्या जवळपास होती. पोर्तुगीजांच्या ताब्यातील भारतीय प्रांत भारतीयांच्या हवाली करण्यास त्यांनी नकार दिला. गोवा आम्ही कधीही भारताला देणार नाही, अशी ठाम भूमिका पोर्तुगालने घेतली. यामुळे भारतीयांनी हा प्रश्न गांभीर्याने घेतला. १९५४ पासून गोवामुक्ती आंदोलनास विशेष गती मिळाली. पोर्तुगीजांच्या साम्राज्यवादी भूमिकेच्या विरोधात जागृती करण्याचे काम डॉ. टी. बी. कुन्हा यांनी केले. पोर्तुगीजांविरुद्ध लढा देण्यासाठी लोकांना संघटित करून गोवा काँग्रेस समितीची स्थापना करण्यात आली. डॉ. राम मनोहर लोहिया यांनी १९४६ पासून गोवा मुक्तीसाठी प्रयत्न केले. गोव्याचे शांततापूर्ण मार्गाने हस्तांतरण होण्यासाठी सत्याग्रहींनी गोव्यामध्ये प्रवेश करावा, असे ठरविण्यात आले. त्यानुसार ऑगस्ट १९५५ मध्ये सेनापती बापट, महादेव शास्त्री जोशी, नानासाहेब गोरे, सुधीर फडके आदींच्या नेतृत्वाखाली सत्याग्रहींच्या अनेक तुकड्या गोव्यामध्ये शिरल्या. अहिंसेच्या मार्गाने लढा देणाऱ्या या सत्याग्रहींवर पोर्तुगीज पोलिसांनी अमानुष गोळीबार केला. यामध्ये १२१ सत्याग्रही मृत्युमुखी पडले, तर कित्येक लोक जखमी झाले. या घटनेमुळे १९ ऑगस्ट १९५५ रोजी भारत सरकारने पोर्तुगालबरोबरचे राजनैतिक संबंध संपुष्टात आणले.

### लष्करी कारवाई

भारत सरकाने गोव्याबाबत ठोस निर्णय घेण्याचे ठरविले. पंडित जवाहरलाल नेहरूंनी ११ डिसेंबर १९६१ रोजी लोकसभेत जाहीर केले की, गोवाप्रश्नाबाबत आमची सहनशक्ती संपुष्टात आली आहे. भारत सरकारच्या सामोपचाराच्या वाटाघाटी निष्फळ ठरल्या होत्या. शेवटी भारत सरकाने १८ डिसेंबर १९६१ रोजी आपल्या लष्कराची १७ वी तुकडी नौदल व वायुदलासह गोव्यामध्ये पाठविली. सर्व बाजूंनी गोव्याची नाकेबंदी करण्यात आली. १९ डिसेंबर १९६१ रोजी पोर्तुगिजांकडून दिव व दमण मिळविण्यात भारतास यश मिळाले. पोर्तुगीज वसाहती ताब्यात घेत असताना स्थानिक प्रजेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची खबरदारी भारतीय लष्कराने घेतली. वसाहतींचा ताबा घेतल्यानंतर भारतीय

लष्कराच्या ताब्यात असणारे पोर्तुगीज सैनिक व मुलकी कैदी यांची मुक्तता करण्यात आली.

अहिंसा व अलिप्ततेचे धोरण स्वीकारणाऱ्या भारताने गोव्यामध्ये केलेल्या लष्करी कारवाईमुळे सर्व जगाला धक्का बसला. अनेक राष्ट्रांनी भारतावर दुटप्पीपणाचा आरोप केला. भारतावर आरोप प्रत्यारोप होत असताना भारताची पाठराखण करणारा रशियन नेता व कम्युनिस्ट पक्ष प्रमुख ब्रेझनेव्ह यांनी स्पष्टपणे म्हटले की, भारतीय लोकांना आपल्या स्वातंत्र्याबरोबर गोवा, दिव, दमण या वसाहतीतील लोकांनासुद्धा स्वातंत्र्य मिळावे असे वाटत होते. त्यांचे स्वप्न पूर्ण झाले. पोर्तुगालने भारतावर टीका टिप्पणी करणारा ठराव युनोमध्ये मांडला. भारताने आपली न्याय्यभूमिका असल्याचे स्पष्ट केले. पोर्तुगाल नाटो संघटनेचा सदस्य असल्याने अमेरिकेने त्यास पाठिंबा दिला. रशियाच्या व्हेटो अधिकाराच्या वापरामुळे हा ठराव संमत होऊ शकला नाही. अशा प्रकारे रशियाने युनोमध्ये भारताची पाठराखण करून देशाच्या प्रादेशिक अखंडत्वाचा सन्मान केला.

### १.२.३. राज्य पुनर्रचना

१९५३ मध्ये पं. नेहरू यांनी राज्य पुनर्रचना आयोग नेमला. फजल अली, हृदयनाथ कुंजरू आणि सरदार पाळीकर यांचा आयोगामध्ये समावेश होता. फजल अली हे या राज्य पुनर्रचना आयोगाचे अध्यक्ष असल्याने हा आयोग 'फजल अली आयोग' म्हणूनही ओळखला जातो. या राज्यपुनर्रचना आयोगाने ब्रिटिश निकषांच्या आधारे १६ राज्य आणि ३ केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्याची शिफारस केली.

१) पंजाब, २) उत्तरप्रदेश, ३) बिहार, ४) बंगाल, ५) आसाम, ६) ओरिसा, ७) आंधप्रदेश, ८) तामिळनाडू, ९) कर्नाटक, १०) केरळ, ११) हैद्राबाद, १२) मुंबई, १३) विदर्भ, १४) मध्यप्रदेश, १५) राजस्थान, १६) जम्मू-काश्मीर

तीन केंद्रशासित प्रदेश :- १) दिल्ली, २) मणिपूर, ३) अंदमान-निकोबार बेटे.

आयोगाच्या शिफारशींमुळे भारतभर दंग्याची लाट उसळली. १ मे १९६० महाराष्ट्र व गुजरात, १९६२ - नागालँड, १९६६ - हरियाणा राज्य निर्माण करण्यात आले.

## १.३. स्वतंत्र अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम

● भाषावार प्रांतरचना स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

● भारतीय राज्यघटनेतील प्रमुख तरतुदी स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

● भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर संस्थानांचे विलीनीकरणासाठी आखलेल्या धोरणाचे मूल्यमापन करा.

---------------------------------------------

---------------------------------------------

## १.४. सारांश

भारताने २६ जानेवारी १९५० रोजी राज्यघटना स्वीकृत केली आणि भारत हे संसदीय लोकशाही असलेले राष्ट्र बनले. भारतीय राज्यघटनेने भारतीयांना एका शाळेत बांधून ठेवले आहे. आज हिंदुस्थान जो अबाधितपणे स्वातंत्र्य उपभोगतो आहे ते भारतीय राज्यघटनेतील तरतुदींमुळेच.

स्वातंत्र्यापूर्वीच अनेक संस्थाने हिंदुस्थानात विलीन झाली. जुनागढही विलीन करून घेण्यात आले. मात्र हैद्राबाद संस्थान विलीन करताना लष्करी कार्यवाही करावी लागली. शेवटी रझाकारांना नामशेष करून हैद्राबाद हिंदुस्थानात विलीन करण्यात आले तर काश्मीरचा प्रश्न आजही हिंदुस्थान व पाकिस्तानातील कळीचा मुद्दा बनलेला आहे.

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र, गुजरात, हैद्राबाद याप्रमाणेच इतरही राज्यांनी पुनर्रचनेची मागणी केली. त्या आधारावर वेळोवेळी राज्य पुनर्रचना करण्यात आली. आजतागायत २८ राज्य व ०७ केंद्रशासित प्रदेशांमध्ये राज्यांची विभागणी करण्यात आली आहे. असे असले तरी तेलंगणा, विदर्भ यांसारखी प्रांत वेगळी राज्य मागणी करतांना दिसून येत आहेत.

## १.५. द्विभाषिक शब्द-शब्दार्थ

## १.६. संदर्भग्रंथ सूची


- आधुनिक भारताचा इतिहास - ग्रोव्हर-बेल्हेकर, एस.चांद, दिल्ली (२००७).
- फडके य. दि., जम्म-काश्मीर स्वायत्ता की स्वातंत्र्य?, अक्षर प्रकाशन, मुंबई (२००१).
- वर्तमान भारत - वेदप्रताप वैदिक, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली(२००२).
- आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य-कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७-२०००).
- स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास - सरदेसाई म. हि., गोवा, दमण, दीव, खंड - १, पणजी सरकार (१९८६).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स - बिपिनचंद्र (अनु. पारशी मा. कृ. व इतर), के.सागर, पुणे (२००४).


## १.७. सरावासाठी प्रश्न /क्षेत्रिय कार्य ।

संयुक्त - महाराष्ट्र निर्मितीतील घटनाक्रमांचा आढावा घ्या.

# घटक २

## राजकीय विकास - १


२.० उद्दिष्टे

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

२.२.१ जवाहरलाल नेहरू ते इंदिरा गांधी

२.२.१ पंडित जवाहरलाल नेहरू - (१९४७-१९६४)

२.२.१.२ लाल बहादूर शास्त्री

२.२.१.३ इंदिरा गांधी

२.२.२ आणीबाणी

२.२.२.१ जनता पक्षाची स्थापना

२.२.२.२ जनता राजवट.

२.२.३ राज्यांची पुनर्रचना

२.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम

२.४ सारांश

२.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

२.६ संदर्भग्रंथसूची

२.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रीय कार्य / प्रात्यक्षिक कार्य


## २.० उद्दिष्टे

- स्वंतत्र भारताचे पहिले प्रधानमंत्री जवाहरलाल नेहरूंचे देशासाठी दिलेले योगदान स्पष्ट करता येईल.
- लालबहादूर शास्त्री यांची पंतप्रधान म्हणून कारकीर्द विषद करता येईल.
- स्वतंत्र भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधींच्या कार्यकर्तृत्वाचे मूल्यमापन करता येईल.
- आणीबाणी काळातील परिस्थिती जाणून घेता येईल.
- जनता शासनाचे यशापयशाचे परिक्षण करता येईल.

## २.१. प्रस्तावना

इ. स. १९४७ मध्ये ज्या पद्धतीने भारत देशात सत्तांतर घडून आले. त्यामुळे स्वातंत्र्यलढ्याच्या काळात निर्माण झालेली राष्ट्रीय ऐक्याची भावना क्षीण बनली होती.

ऐक्याची ही भावना टिकवून ठेवण्यात व दृढ करण्यात नेहरू यशस्वी झाले. स्वातंत्र्य लढ्यातील परंपरा अनुसरून नेहरूंनी स्वतंत्र भारतात लोकशाही व संसदीय प्रशासन यांची काळजीपूर्वक जोपासना केली व त्यांची भक्कम पायाभरणी केली. त्यांच्या एकंदरित कारकीर्दीचा, ध्येय-धोरणांच्या अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

नेहरूंच्या मृत्युनंतर लालबहादूर शास्त्री पंतप्रधान झाले. त्यांची कारकीर्द अल्पजीवी असली राष्ट्रभाषाविषयक विधेयक, भारत-पाकिस्तान युद्ध (१९६५) इत्यादी महत्त्वपूर्ण घटना त्यांच्या कार्यकाळात घडल्यात. त्याचेही विवेचन या प्रकरणात केलेले आहे.

भारताच्या तिसऱ्या प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी यांची २८ महिन्यांचे जनता सरकारचे मध्यंतर वगळता, सुमारे १७ वर्षांची कारकीर्द जितकी संघर्षमय तितकीच देशाच्या प्रगतीच्या दृष्टीने लक्षणीय ठरली. रुपयांच्या अवमूल्यनापासून ते संस्थानिकांचे तनखे बंद करण्यापर्यंतचे, आसाम व पंजाब प्रश्नापासून ते बांग्लादेश युद्धापर्यंतचे सर्व प्रकारच्या कार्याचा ऊहापोह या प्रकरणात करण्यात आला आहे.

आणीबाणीनंतर काँग्रेसेतर जनता राजवट प्रस्थापित झाली. परंतु जनतेच्या इच्छा, आकांक्षा ती पूर्ण करू शकली नाही. देशांची सूत्रे हाताळता आली नाही. त्यामुळे देशात पुन्हा काँग्रेस शासन प्रस्थापित झाले.

## २.२. विषय विवेचन

### २.२.१. पंडित जवाहरलाल नेहरू ते इंदिरा गांधी

#### २.२.१.१ पं. जवाहरलाल नेहरू (१९४७-१९६४)

भारत देशाला स्वातंत्र्य प्राप्त करून देण्याचे कार्य अत्यंत बिकट, कष्टाचे व जिकिरीचे होते हे खरेच. परंतु मिळविलेले स्वातंत्र्य टिकवून धरणे व राष्ट्रैक्य साधून नवराष्ट्राची उभारणी सुदृढ पायावर यशस्वीपणे करणे हे कार्य तितकेच, किंबहुना त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते आणि म्हणूनच भारताच्या स्वातंत्र्याकरिता म. गांधींच्या नेतृत्वाखली ब्रिटिश अधिसत्तेविरुद्ध सातत्याने व निर्धाराने दिलेला लढा व स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नवराष्ट्राच्या उभारणीच्या कार्यात देशाचे पहिले प्रधानमंत्री या नात्याने केलेले योगदान या दोन्ही दृष्टींनी जवाहरलाल नेहरूंचे स्थान भारताच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**पहिली सार्वत्रिक निवडणूक**

१९५० मध्ये भारताची घटना स्वीकृत झाल्यानंतर सार्वत्रिक निवडणुकांचे वेध भारत देशाला लागले. लोकशाहीची गुरुकिल्ली म्हणजे अर्थातच निवडणुका. जानेवारी १९५२ मध्ये प्रौढ मतदान पद्धतीवर भारतात घेतल्या गेलेल्या त्या पहिल्याच निवडणुका होत्या. या सार्वत्रिक निवडणुकांबद्दल भारतातच नव्हे तर परदेशांतही राजकीय निरीक्षकांना दाट आशंका होती. नव्याने प्रस्थापित झालेल्या भारत सरकारसमोर ते एक प्रचंड आव्हान होते. कारण भारतात तो एक नवा उपक्रम होता. मतदार निरक्षर व अननुभवी होते, राजकीयदृष्ट्या अपरिपक्व होते. १९५१-५२ च्या निवडणुकीच्यावेळी भारतात १७७ दशलक्ष मतदार होते.

लोकसभा व विधानसभा याकरिता ३८०० लोकप्रतिनिधींची निवड व्हावयाची होती. निरनिराळ्या ७७ राजकीय पक्षांचे व संघटनांचे एकूण १७००० उमेदवार रिंगणात होते. ९०,००० मतदान केंद्रे, २,२४,००० मतदान केंद्र, २,५००,००० मतपेट्या, तर ६२,००,००,००० मतपत्रिका होत्या. या आकडेवारीवरून हे कार्य किती प्रचंड होते याची कल्पना येते. जगातील सर्वात नव्या लोकशाहीतील ही सर्वात मोठ्या प्रमाणावरील निवडणूक होती.

काँग्रेस पक्षाची कार्यक्रम पत्रिका नेहरूंनीच तयार केली. उमेदवारांची निवड केली. काँग्रेस प्रतिनिधींना निवडून देण्यास लोकांना त्यांनीच उद्युक्त केले. वयाच्या बासष्टाव्या वर्षी, सव्वा महिन्याच्या काळात, दळणवळणाची साधने विकसित झालेली नसता त्यांनी तीस हजार मैलापेक्षाही अधिक लांबीचा प्रचार दौरा त्यांनी केला. दिवसाला ते कधीकधी दहा-दहा, बारा-बारा सभांतून भाषणे देत असत.

स्वतंत्र भारतातील या पहिल्यावहिल्या निवडणुकांत केंद्रात व बावीस राज्यांपैकी एकोणीस राज्यांत काँग्रेस पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले. नेहरूंची असामान्य वैयक्तिक लोकप्रियता हाच काँग्रेसच्या यशाचा खरा आधार होता. लोकसभेच्या एकूण ४८९ जागांपैकी ३६४ जागा (७४%) काँग्रेसने जिंकल्या. सर्व राज्यांच्या विधानसभांच्या एकूण ३१९९ जागांपैकी (दिल्ली व हिमाचल असेंब्ली वगळता) २१८३ जागा (६८.२०%) ४२.१२% मते मिळून काँग्रेसने जिंकल्या. निवडणुकांच्या निकालांवरून राष्ट्रीय पातळीवरील पक्षांत हिंदुत्वाच्या प्राचीन सुवर्ण युगापासून स्फूर्ती घेणाऱ्या परंपरावादी व प्रतिगामी शक्तीपेक्षा समाजवादी कार्यक्रम स्वीकृत केलेल्या प्रगतीशील पक्षांना लोकमताचा अधिक पाठिंबा असल्याचे उघड झाले.

### पंचवार्षिक योजना

१ एप्रिल १९५१ रोजी पहिल्या पंचवार्षिक योजनेला प्रारंभ झाला. निवडणुकांनंतर नेहरू सरकारचा प्रशासकीय कार्याबाबतचा आत्मविश्वास बळावला आणि सरकारने आपले लक्ष आर्थिक व सामाजिक प्रश्नांकडे वळविले. पहिल्या योजनेत बहुउद्देशीय जलसिंचन व विद्युत्पादन प्रकल्पांना अग्रक्रम देण्यात आला. अन्नधान्याबाबत राष्ट्र स्वावलंबी बनावे हाही त्यामागील एक महत्त्वाचा उद्देश होता. भारताची आर्थिक परिस्थिती व गरजा, समाजवादाच्या अनिवार्यतेबद्दलची त्यांची खात्री अशा निरनिराळ्या कारणांमुळे नेहरूंनी संमिश्र अर्थव्यवस्थेचा पाया भारतात घातला.

१ एप्रिल १९५६ पासून दुसऱ्या पंचवार्षिक योजनेला प्रारंभ झाला. पहिल्या योजनेत शेती, जलसिंचन व विद्युत्पादन यांना प्राधान्य होते, तर दुसऱ्या योजनेत पोलाद, कोळसा, यंत्रोत्पादन यांसारख्या जड उद्योगांवर, शिवाय खाणी, वाहतूक यावर भर देण्यात आला. पहिल्या व दुसऱ्या योजनेच्या दहा वर्षांच्या नियोजन काळात राष्ट्रीय उत्पन्न ४१ टक्क्यांनी वाढले.

१९४८ मध्ये सरकारने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे राष्ट्रीयकरण केलेले होतेच. १९५४-५५ च्या सुमारास, खाजगी हाती असलेले वित्त नियंत्रित करण्याच्या हेतूने भारत सरकारने इम्पिरियल बँकेचेही राष्ट्रीयकरण केले. याबरोबरच खाजगी उद्योगधंद्यांच्या सर्व क्षेत्रात

गुंतलेल्या आयुर्विमा व्यवसाचे राष्ट्रीयीकरण केले.

१ एप्रिल १९६१ पासून तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला प्रारंभ झाला. ही योजना दुसऱ्या योजनेपेक्षाही अधिक महत्त्वाकांक्षी स्वरूपाची होती. या योजनेचा आराखडा तयार करताना दीर्घकालीन आर्थिक विकासाची उद्दिष्ट नेहरूंनी डोळ्यासमोर ठेवले होते. योजनेत जलसिंचनासह कृषिविकासावर व ऊर्जासह मूलभूत जड उद्योग व तांत्रिक शिक्षण यावर दुसऱ्या योजनेपेक्षाही अधिक भर देण्यात आला होता. शिवाय खाजगी क्षेत्रातही लहान व मध्यम आकाराचे उद्योग शक्यतोवर, सहकारी तत्त्वावर चालविण्यात यावेत हे अगत्याने ठरविण्यात आले. सार्वजनिक क्षेत्राची व्याप्तीही वाढविण्यात आली. त्या क्षेत्रातील कारखानी उद्योगांचे योगदान पहिल्या योजनेच्या प्रारंभी केवळ दोन टक्के होते ते दुसऱ्या योजनेच्या प्रारंभी आठ टक्के झाले आणि ते तिसऱ्या योजनेत पंचवीस टक्के व्हावे असे उद्दिष्ट होते. एकूण खर्चापैकी सार्वजनिक क्षेत्रातील गुंतवणूक पहिल्या योजनेत सुमारे ५० टक्के होती, ती दुसऱ्या योजनेत ५४ टक्के झाली, तर तिसऱ्या योजनेत ती रक्कम ६० टक्के होती.

### समाज विकास योजना

ऑक्टोबर १९५२ मध्ये समाज विकास योजना कार्यान्वित होण्यास सुरुवात झाली. दीड कोटी लोकसंख्या असलेल्या १६,५०० खेड्यात ही योजना प्रथम राबविण्यात आली. स्थानिक सहकार्याने पाटबंधारे, रस्ते बांधणी, भूविकास, आरोग्य, शिक्षण अशा गावांच्या सामुदायिक स्वरूपाच्या गरजा भागवाव्यात, शेतीसुधारणोकरिता शेतकऱ्यांना मदत द्यावी, त्याचबरोबर लोकशिक्षण केले जावे हा त्या योजनेचा मुख्य उद्देश होता. ही समाजविकास योजना म्हणजे ग्रामीण क्षेत्रात शांततेच्या मार्गाने घडवून आणावयाच्या क्रांतीची जणू नांदीच होती. ग्रामीण जनतेला या योजनेमुळे आर्थिक व मार्गदर्शनात्मक लाभ तर झालाच, पण त्याचबरोबर जनता राजकीयदृष्ट्या अधिक जागरूक झाली.

### नियोजित आर्थिक विकास

भारताच्या अर्थकारणाला नियोजनाचा आधार देण्याचे, भारताचे पहिले पंतप्रधान व नियोजन मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्या मंडळाच्या कार्याला दिशा देण्याचे, मंडळाने केलेल्या शिफारशींना वास्तव रूप देण्याचे व मुख्य म्हणजे त्याकरिता संसदेचा व जनतेचा पाठिंबा मिळवून घेण्याचे श्रेय बव्हंशी नेहरूंकडेच जाते.

भारतातील नियोजनात केवळ आर्थिक विकासाचे ध्येयच साध्य होत नसून त्याबरोबर समाजाचा कायापालट घडवून आणणे, अधिक व्यापक पायावर नेतृत्व निर्माण करणे व लोकशाही संस्थांची निर्मिती करून त्यांद्वारे समान प्रश्नांची सोडवणूक करणे व जीवनमान वाढविण्याचा प्रयत्न करणे ही उद्दिष्टे साधण्याचाही मानस होता. एकंदरीत भारताच्या नियोजनाचा विशेष असा की या नियोजनाचे मूळ लोकशाही व समाजवादात रुजलेले आहे.

मार्च १९५० मध्ये जवाहरलाल नेहरूंच्या मार्गदर्शनाखाली 'नियोजन मंडळाची' स्थापना करण्यात आली. नियोजनाला प्रत्यक्ष कृतीत उतरविण्याकरिता 'पंचवार्षिक योजना' आखल्या. याद्वारे अवजड मूलभूत उद्योगांची स्थापना सार्वजनिक क्षेत्रात करून भारतातील नियोजित

आर्थिक विकासाचा भरभक्कम पाया नेहरूंनी घालून दिला. त्यांच्याच कार्यकाळात, भिलाई, भाक्रानानगल यासारखी मोठमोठी उद्योग, जलसिंचन व विद्युतनिर्माण केंद्रे उभारली गेली. विकासाची ती केंद्रे म्हणजे 'नवभारताची तीर्थक्षेत्रे' आहेत असे ते म्हणत. शस्त्रास्त्रे व युद्धसाहित्य याबाबत भारताने परावलंबी राहू नये या दृष्टीने शस्त्रास्त्र निर्मितीला सुरुवातही त्यांच्याच काळात झाली. औद्योगिकीकरणाच्या क्षेत्रात स्वावलंबन व विकास या दिशेने भारताच्या होणाऱ्या लक्षणीय प्रगतीचे बहुतांश श्रेय नियोजित अर्थव्यवस्थेला प्रारंभ करून देणाऱ्या जवाहरलालांकडे जाते.

### दुसरी सार्वत्रिक निवडणूक

१९५७ मध्ये झालेल्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकांत सर्वात अधिक जागा मिळविणारा व म्हणून सत्तारूढ होणारा पक्ष होता तो म्हणजे काँग्रेस. नेहरूंच्या अलौकिक लोकप्रियतेचा फायदा याही निवडणुकात काँग्रेसला भरपूर मिळाला. लोकसभेच्या एकूण ४९४ जागांपैकी काँग्रेसने ३७१ जागा जिंकल्या. बहुतेक सर्व राज्यांतही काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले. १९५७ मध्ये लोकसभेत काँग्रेसला ७५.१ टक्के जागा मिळाल्या व ४७.७८ टक्के मते मिळाली.

### पंचायत राज्य

म. गांधीच्या ग्रामस्वराज्याच्या कल्पनेत पंचायत राज्याचे मूळ आढळते. राजकीय सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे प्रमुख उद्दिष्ट साध्य करण्यासाठी पंचायत राज्यच आवश्यक असून सर्व निर्णय ग्रामपातळीवर घेतले जावेत असा आग्रह या कल्पनेचे पुरस्कर्ते धरतात. भारताच्या राज्यघटनेत मार्गदर्शक तत्त्वांमध्ये पंचायत राज्याचे तत्त्व समाविष्ट केले आहे. शासकीय कार्यक्रमांमध्ये लोकांचा सहभाग वाढविणे, आर्थिक-सामाजिक कार्यक्रमांमध्ये लोकांना सहभागी करून घेणे, स्थानिक शासनाद्वारे लोकशाहीचे शिक्षण देणे हे हेतू पंचायत राज्याच्या स्थापनेमागे असतात.

बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींनुसार १९६० नंतर विविध राज्यांनी आपापल्या सोयीप्रमाणे राज्याची यंत्रणा निर्माण केली आहे. शासकीय धोरणाच्या दृष्टीने २ ऑक्टोबर १९५९ रोजी नेहरूंच्या हस्ते पंचायत राज्याची झालेली सुरुवात हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जाते. लोकांच्या हातात थोडी फार सत्ता दिल्याशिवाय समाज विकासात जनता मनापासून सहभागी होणार नाही, असे समाजविकास योजनांच्या कार्याचा आढावा घेताना आढळून आले होते. त्यातून पंचायती राज्याची कल्पना उदयास आली. लोकशाही ग्रामीण भागापर्यंत पोहचविणारी योजना म्हणून तिचे स्वागत केले गेले. या योजनेची अंमलबजावणी म्हणून दोन लक्ष वीस हजार खेड्यांत पंचायती, तालुका पातळीवर पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषदा स्थापन करण्यात आल्या. समाजविकास योजनांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी या पंचायती राज्यावर सोपविण्यात आली. 'लोकसभेपासून ग्रामसभेपर्यंत पोहचणारी लोकशाही' असे वर्णन या योजनेचे केले होते.

### तिसरी सार्वत्रिक निवडणूक

१९६२ च्या तिसऱ्या सार्वत्रिक निवडणुकांतही जनतेने निश्चितपणे काँग्रेसच्या बाजूनेच

कौल दिला. लोकसभेच्या ४९४ जागांपैकी ३६१ जागा काँग्रेसने जिंकल्या होत्या; तर १९६२ मध्ये काँग्रेसला मते मिळाली ती ४४.७२ टक्के व त्यांनी जागा मिळविल्या ७३.०७ टक्के जनमानसावरील, विशेषतः बुद्धिवादी वर्गावरील काँग्रेसचा प्रभाव थोडा का होईना, पण निश्चितपणे ओसरला होता.

भारतात मतपेट्यांची लोकशाही चालू शकणार नाही हे परकीय राजकीय निरीक्षकांचे भाकीत या तीन निवडणुकांनी खोटे ठरविले. उलट, या काळात जनतेचे राजकीय बाबींचे आकलन अधिकाधिक सुस्पष्ट होत गेले व त्यामुळे भारतीय लोकशाही टिकावू स्वरूपाची ठरणार याबद्दल शंकेला जागा उरली नाही. निवडणुकांतील मतदारांचा सहभाग ४६ टक्क्यांपासून ६० टक्क्यांपर्यंत वाढला.

**चीनचे आक्रमण**

१९५३-५४ पासूनच भारत-चीन संबंधात दिवसेंदिवस तणाव वृद्धिंगत होतच होता. दोन्ही राष्ट्रांतील सीमाप्रश्नांची उकल वाटाघाटींद्वारा, शांततेच्या मार्गाने व्हावी यासाठी आटोकाट प्रयत्न १९५१-५२ पासूनच्या दशकात नेहरू सरकारने केले. उभय राष्ट्रांतील मतभेद कितीही तीव्र असले तरी त्याकरिता चीन युद्धमार्गाचा अवलंब करणार नाही असा विश्वास नेहरूंना होता. कारण चीनने पंचशील तत्त्वांना जाहीरपणे मान्यता दिली होती. परंतु चीनने ती तत्त्वे धुडकावून लावली व २० ऑक्टोबर १९७३ रोजी भारतावर हल्ला केला. या भारत-चीन युद्धात भारतीय प्रतिकार कोलमडून पडला. भारताच्या पदरी फार मोठी नामुष्की आली.

**कामराज योजना**

पदापेक्षा पक्षकार्य अधिक महत्त्वाचे आहे, तेव्हा जनतेपर्यंत जाऊन काँग्रेसची ध्येयधोरणे लोकांना समजावून सांगणे, पक्ष संघटना दृढ करणे, पक्षात नवा जोम व आत्मविश्वास निर्माण करणे, निष्क्रियता व आळस यांच्या गर्तेतून पक्षाला बाहेर खेचून काढणे, अशा कार्याला काँग्रेसजनांनी व श्रेष्ठींनी स्वतःला वाहून घ्यावे, असे आवाहन नेहरूंनी केले. त्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून एक काँग्रेस नेते कामराज यांनी पक्षकार्याच्या मुद्द्यांवर नेहरूंशी चर्चा केली. त्याची फलनिष्पत्ती एक योजना आखण्यात आली, ती 'कामराज योजना' म्हणून ओळखली जाऊ लागली. सरकारातील पक्ष नेत्यांनी सत्ता व पदे यांचा त्याग करून पक्ष दृढ करण्याच्या कार्याला स्वतःला वाहून घ्यावे, सामान्य जनतेत कार्य करून पक्षाबद्दल नवा विश्वास जनमानसात निर्माण करावा, पक्ष कार्यकर्त्यांना जनसेवेला उद्युक्त करावे, असे आवाहन त्या योजनेनुसार नेहरूंच्या संमतीने कामराज यांनी केले.

९ व १० ऑगस्ट १९६३ रोजी झालेल्या बैठकीत कामराजांनी आपली योजना सदस्यांपुढे ठेवली व ती अखिल भारतीय काँग्रेस कमिटीने व वर्किंग कमिटीने मान्य केली. कामराज योजनेच्या घोषणेनंतर, पक्षश्रेष्ठी जे कोणते काम त्यांच्याकडे सोपवतील ते करण्याची तयारी अनेक काँग्रेस नेत्यांनी दर्शविली. एका आठवड्यातच केंद्र सरकारचे मंत्री, राज्यांचे मुख्यमंत्री, तसेच राज्य मंत्रिमंडळातील अनेक मंत्री यांचे राजीनामे त्यांच्याकडे आले असल्याचे नेहरूंनी काँग्रेस कार्यकारिणीला सांगितले. २४ ऑगस्ट रोजी सहा केंद्रीय मंत्री व सहा राज्यांचे

मुख्यमंत्री यांचे राजीनामे पक्षाने स्वीकारले असल्याचे नेहरूंनी जाहीर केले. केंद्र सरकारातून वित्तमंत्री मोरारजी देसाई, गृहमंत्री लालबहादूर शास्त्री, अन्नमंत्री स. का. पाटील, वाहतूक व संपर्कमंत्री जगजीवनराम, माहिती व नभोवाणी खात्याचे मंत्री गोपाल रेड्डी व शिक्षणमंत्री के. एल. श्रीमाळी, तर राज्यांतून स्वतः कामराज, तसेच ओरिसाचे मुख्यमंत्री बिजू पटनाईक, बिहारचे बी. एन. झा., उत्तर प्रदेशचे सी. बी. गुप्ता, मध्य प्रदेशचे मंडलोई व काश्मीरचे बक्षी गुलाम महंमद यांचे राजीनामे मंजूर झाले होते.

कामराज योजनेचा एक महत्त्वाचा परिणाम झाला तो असा की, यानंतर पक्षाचा सरकारवरील प्रभाव काहीसा वाढला; व काँग्रेस अध्यक्षपदाला अधिक महत्त्व प्राप्त झाले.

परराष्ट्र धोरण

परराष्ट्र धोरणाच्या क्षेत्रात, नेहरूंच्या नेतृत्वाखाली असंलग्नतेचे धोरण स्वीकारणारे भारत हे जगातील पहिलेच राष्ट्र होते. त्या धोरणाची आखणी व अंमलबजावणी अत्यंत कौशाल्याने केली गेली. भारताच्या असंलग्नतेच्या, जागतिक शांततेच्या व शांततामय सहजीवनाच्या उद्दिष्टांना आंतरराष्ट्रीय क्षेत्रात हळूहळू सर्वत्र मान्यता मिळाली. एवढेच नव्हे तर असंलग्न राष्ट्रांचा एक नवा राष्ट्रगट तयार होण्यास सुरुवात होऊन आंतरराष्ट्रीय राजकारणाला एक नवे, जागतिक शांततेला पोषक ठरणारे असे वळण लागले. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा सखोल अभ्यास करून भारताला लाभदायक व जागतिक शांततेला पोषक ठरेल असे धोरण स्वातंत्र्योत्तर दशकात पंडित नेहरूंनी अतिशय कौशल्याने राबविले. त्यांच्या शांततामय सहजीवनाच्या तत्त्वज्ञानामुळे 'जगाचे शांतीदूत' अशी त्यांची प्रसिद्धी होऊन एक ध्येयवादी, शांततावादी मुत्सद्दी नेता म्हणून त्यांची सर्वत्र ओळख होऊ लागली.

२७ मे १९६४ रोजी पंडित नेहरू कालवश झालेत. नेहरू गेले आणि भारताच्या इतिहासातील एका युगाचा अंत झाला.

### २.२.१.२. लाल बहादूर शास्त्री

काँग्रेसच्या संसदीय पक्षाचे नेतृत्व आणि पंतप्रधान यांसाठी मोरारजी देसाई आणि लाल बहादूर शास्त्री असे दोन प्रमुख स्पर्धक होते. देसाई हे ज्येष्ठ व अधिक अनुभवी तसेच उत्तम प्रशासक आणि अत्यंत प्रामाणिक होते, परंतु त्यांचा स्वभाव ताठर होता आणि ते हेकेखोर– आपलं तेच खरं म्हणणारे, दुसऱ्याचे ऐकून न घेणारे आणि उजव्या विचारसरणीचे आहेत, असा त्यांचा लौकिक होता. पक्षाच्या एका मोठ्या गटाचा त्यांना तीव्र विरोध होता. या उलट शास्त्रीजी सौम्य प्रकृतीचे, धोरणी, मनमिळावू आणि प्रामाणिक असल्यामुळे पक्षात त्यांना आदराचे स्थान लाभले होते.

'सिंडिकेट' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या काँग्रेसने त्यांच्या एका वरिष्ठ गटाने नेहरूंच्या वारसदाराची निवड केली. १९६३ साली स्थापन झालेल्या त्या गटात काँग्रेसचे अध्यक्ष के. कामराज आणि बंगालचे अतुल घोष, मुंबईचे एस. के. पाटील. आंध्रप्रदेशचे एन. संजीवरेड्डी, कर्नाटकचे एस. निजलिंगप्पा या प्रादेशिक नेत्यांचा समावेश होता. या सर्वांना देसाई बिलकुल नको होते. म्हणून त्यांनी शास्त्रींच्या बाजूने कौल दिला. कारण अन्य गुणांशिवाय पक्षात त्यांच्या नावास व्यापक मान्यता मिळाली होती. त्यामुळे पक्ष एकसंघ

राहण्यास मदत होणार होती. शास्त्री आपल्या इच्छेबाहेर जाणार नाहीत आणि आपल्या नेतृत्वाला आव्हान देणार नाहीत, अशीही या नेत्यांची धारणा होती. शास्त्रीजीचे नाव त्यांनी उचलून धरण्यास हेही कारण होती.

सिंडिकेटचे नेते आणि पक्षाचे अन्य पुढारी पक्षात असलेली अन्य गटबाजी अधिक तीव्र होऊ नये म्हणून प्रयत्नशील होते. या पार्श्वभूमीवर कामराज यांनी पक्षाच्या संसद सदस्यांचा व्यापक पाठिंबा कोणास आहे याचा शोध घेतला आणि शास्त्री हे सर्वसाधारणपणे अधिक स्वीकारर्ह आहेत असे जाहीर केले. सिंडिकेटचा निर्णय हाही एक बनाव आहे असे खाजगीत सूचित करणाऱ्या देसाईंनी तो स्वीकारून अत्यंत सभ्यतेने स्पर्धेतून माघार घेतली. २ जून १९६४ रोजी काँग्रेस पक्षाच्या खासदारांनी काँग्रेस पक्षाचा नेता म्हणून लालबहादूर शास्त्रीजींची बिनविरोध निवड केली. ९ जून १९६४ रोजी शास्त्री मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. स्वतंत्र भारताचे दुसरे प्रधानमंत्री म्हणून त्यांनी शपथ घेतली.

आपल्या मर्यादा लक्षात घेऊन शास्त्रींनी नेहरूंच्या मंत्रिमंडळात मोठे बदल केले नाहीत. फक्त माहिती आणि नभोवाणी खात्याच्या मंत्री म्हणून इंदिरा गांधींनी मंत्रिमंडळात सहभागी व्हावे यासाठी त्यांनी मन वळविले. त्यांच्या नेतृत्वाखाली कॅबिनेट मंत्र्यांनी अधिक स्वायत्तपणे कारभार केला. शास्त्रींनी पक्षाच्या कामकाजात किंवा राज्य शासनाच्या कारभारातही हस्तक्षेप केला नाही. एकंदरीत त्यांनी आपल्या प्रशासनाचा शेवटचा काळ वगळता मवाळ धोरणाचा अंगीकार केला.

नेहरू मंत्रिमंडळातील तेरा मंत्र्यांव्यतिरिक्त, स. का. पाटील, नीलम संजीव रेड्डी व इंदिरा गांधी यांची नियुक्ती शास्त्रींनी आपल्या मंत्रिमंडळात केली. शास्त्री स्वभावाने सौम्य असल्याने व नेहरूंची जागा आपण भरून काढू शकत नाही याची जाणीव असल्याने त्यांच्या कारकिर्दीची सुरुवात काहीशी सावधपणानेच झाली. जुलै १९६४ म्हणजे त्यांनी 'प्रधानमंडळाने सचिवालय' प्रस्थापित केले व ए. के. झा यांची सचिव म्हणून नियुक्ती केली. झा यांची आर्थिक नीती काहीशी प्रतिगामीच होती. त्यामुळेच शास्त्रींचे धोरण साधारणतः उजवेच राहिले.

**अन्नधान्याचा प्रश्न**

शास्त्रींच्या कारकिर्दीच्या प्रारंभीच, अन्नधान्याच्या तीव्र टंचाईमुळे देशात अनेक ठिकाणी स्फोटक परिस्थिती निर्माण झाली. धान्याकरिता दंगली होऊ लागल्या. लुटालुटीचे अनेक प्रकार झाले. किमती झपाट्याने वाढल्या. साठेबाजी व काळाबाजार यांना ऊत आला. याकरिता विरोधी पक्ष व वृत्तपत्रे यांनी सरकारला चांगलेच धारेवर धरले. अन्नधान्य हा विषय राज्यांच्या अधिकारात असल्याने, रास्त भावात जनतेला धान्य उपलब्ध करून देण्याचे आणि नफेबाजी आणि काळाबाजर यांना आळा घालण्याचे आवाहन शास्त्रींनी मुख्यमंत्र्यांना केले. विरोधी पक्षांनाही त्यांनी सहकार्याची विनंती केली. पण त्यांना अपेक्षित तो प्रतिसाद मिळाला नाही.

नियंत्रणाशिवाय धान्याच्या तुटवड्याचे संकट आटोक्यात येणार नाही. असे वाटून शास्त्रींनी ऑक्टोबरमध्ये दिल्ली येथे देशातील मुख्यमंत्र्यांची परिषद बोलवली. मोठ्या शहरातून रेशनिंग सुरू करावे. नियंत्रित भावापेक्षा अधिक चढ्यादराने धान्य विकणाऱ्या

व्यापाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी. अशा सूचना त्यांनी मुख्यमंत्र्यांना केल्या. त्याचबरोबर अन्नधान्याचा साठा व पुरवठा या संबंधीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यापाऱ्यांवर खटले भरण्याची तरतूद करणारा वटहुकूम ५ नोव्हेंबर रोजी सरकारने काढला. पण मुख्यमंत्र्यांच्या असहकारामुळे त्यातून फारसे काही निष्पन्न झाले नाही. केंद्र सरकारच्या दुबळ्या धोरणावर वृत्तपत्रातून सडकून टीका होऊ लागली. सरकारी धोरणात राज्यांचे वर्चस्व वाढणार, नेहरूंच्या वैचारिक प्रतिष्ठेमुळे अनेक प्रश्नांबाबत दबून राहिलेला असंतोष आता उग्र स्वरूप धारण करणार, अशी लक्षणे दिसू लागली. सरकारी धोरणातील दुबळेपणा व राज्यांची केंद्राला न जुमानण्याची प्रवृत्ती या काळात स्पष्टपणे प्रत्ययाला आली.

राष्ट्रभाषाविषयक धोरण

अन्नधान्याच्या प्रश्नाबरोबर दुसऱ्याही एका तितक्याच गंभीर समस्येला शास्त्रींना तोंड द्यावे लागले. १९६५ च्या प्रारंभाला राष्ट्रभाषेच्या मुद्यावरून दक्षिणेच्या राज्यांत जबरदस्त प्रक्षोभ उसळला. संपूर्ण राष्ट्राची एक भाषा आसावी हे राष्ट्राच्या ऐक्याच्या दृष्टीने अत्यावश्यक असल्याची जाणीव घटनाकारांना होती. देशाच्या फार मोठ्या भागात हिंदी भाषा प्रचलित असल्याने त्या भाषेला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळावी अशी कल्पना होती. परंतु दक्षिणेकडील अहिंदी भाषिक राज्यांना ते पसंत पडणार नाही ही जाणीव असल्याने २६ जानेवारी १९६५ नंतर सरकारी कामकाजात हिंदीचा वापर सुरू व्हावा, अशी तरतूद घटनेत करण्यात आली होती. हा ठराव त्या वेळी ७७ विरुद्ध ७८ मतांनी संमत झाला होता. दक्षिणेकडील राज्यांचा हिंदीला असलेला विरोध त्या ७७ मतांतून ध्वनित झाला होता.

हिंदी जबरीने दक्षिणेवर लादली तर राष्ट्राच्या एकात्मतेला तडा जाईल असे नेहरूंना वाटत होते. त्यामुळे १९६३ मध्ये, राष्ट्रभाषा संबंधीचे विधेयक जेव्हा लोकसभेपुढे आले त्यावेळी, १९६५ नंतरही इंग्रजी ही सरकारी कामकाजाची भाषा राहू शकेल, असे आश्वासन लोकसभेत नेहरूंनी दिली होते व त्यावर विसंबून दाक्षिणात्य गप्प राहिले. परंतु १९६४ मध्ये झालेले नेहरूंचे निधन आणि जानेवारी १९६५ पासून हिंदीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळण्याची धास्ती, या कारणामुळे दक्षिणेकडील राज्ये अस्वस्थ झाली. १९६५ नंतरही सरकारी कामकाजात इंग्रजी प्रचलित राहू शकेल या नेहरूंनी दिलेल्या आश्वासनाला कायद्याचे स्वरूप दिले जावे, अशी मागणी ती राज्ये करू लागली. हिंदीचा अट्टाहास धरणारी काही मंडळी केंद्रात होती. त्यामुळे हिंदी संपूर्ण राष्ट्रावर लादून उत्तरेकडील नेते दक्षिणेवर वर्चस्व प्रस्थापित करतील अशी धास्ती दाक्षिणात्यांना होती. दक्षिणेकडील तामीळ भाषा चांगलीच प्रगल्भ असल्याने तामिळनाडूत हिंदीला विशेष प्रखर विरोध होता.

वस्तूतः सरकारी कामकाजात हिंदीचा वापर सुरू व्हावयाचा तर प्रथम कारभाविषयक सर्व अधिनियमांचे व कायद्याचे हिंदीत भाषांतर होणे आवश्यक होते. पण मार्च १९६५ पर्यंत ते काम अर्ध्यानेही पूर्ण झाले नव्हते. तरीही, २६ जानेवारी १९६५ पासून सरकारी कामकाजात हिंदी ही अधिकृत भाषा व इंग्रजी ही अतिरिक्त भाषा राहिली. अहिंदी राज्ये केंद्राशी व अन्य राज्यांशी इंग्रजीतून पत्रव्यवहार करू शकतील पण प्रत्येक पत्राबरोबर त्याचे हिंदी भाषांतर आवश्यक मानले जाईल. सर्वोच्च न्यायालयाची भाषा काही काळ इंग्रजी राहणार असली तरी तेथेही हिंदीचा वापर हळूहळू सुरू होईल, असा सरकारी निर्णय त्या पत्रकाद्वारे काढण्यात

आला होता.

या परिपत्रकामुळे दक्षिणेत, विशेषकरून तामिळनाडूत चांगलाच प्रक्षोभ उसळला. विद्यार्थ्यांनी चळवळ समिती गठित करून प्रखर आंदोलन उभे केले. मद्रासमध्येच नव्हे तर मदुराई, कोईमतुर, वेल्लोर इ. ठिकाणी दंगली झाल्या. आगगाड्या, बसगाड्या अडविणे, बंद व निदर्शने आयोजित करणे, केंद्र सरकारच्या कार्यालयांवर दगडफेक व जाळपोळ करणे, असे प्रकार सुरू झाले, सार्वजनिक मालमत्तेची फार मोठ्या प्रमाणावर हानी झाली. शाळा व अन्य शैक्षणिक संस्था बंद पडल्या. काही ठिकाणी चळवळीला हिंसक स्वरूप आले. त्यामुळे पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्या संघर्षात बरेच लोक मारले गेले. शेकडो जखमी झाले.

ही स्फोटक परिस्थिती आटोक्यात आणून शांतता प्रस्थापित करावी या हेतुने शास्त्रींनी ११ फेब्रुवारी रोजी सरकारचे राजभाषाविषयक धोरण विशद केले. प्रत्येक राज्याला आपल्या मताप्रमाणे, कारभारात कोणत्याही भाषेचा वापर करण्याची मुभा राहिल; राज्याराज्यांतील व केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांतील पत्रव्यवहार इंग्रजीतून होत राहिल, निदान त्या पत्रांचे इंग्रजी भाषांतर तरी त्याला जोडलेले असेल व केंद्र सरकारचा कारभार इंग्रजीतून चालेल, अशी आश्वासने त्यांनी दिली. पण तेवढ्यात आंदोलकांचे समाधान झाले नाही. त्या आश्वासनांना कायद्याचे स्वरूप दिले जाऊन त्याचा अंतर्भाव सरकारी अधिनियमात केला जावा, अशी त्यांची मागणी होती.

एकीकडे, तडजोडीद्वारा शास्त्री दाक्षिणात्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न करीत असताना, दुसरीकडे गुलझारी लाल नंदा, मोरारजी देसाई यासारखे हिंदी समर्थक, राष्ट्रभाषा म्हणून हिंदीचा वापर लागलीच सुरू झाला पाहिजे, असे दडपण शास्त्रींवर आणीत होते.

या प्रश्नाबाबत धोरण निश्चित करण्याकरिता एप्रिलमध्ये मंत्रिमंडळाची एक समिती नेमण्यात आली. राजभाषा कायद्यात आवश्यक ती दुरुस्ती करण्याचा मसुदा तयार करण्याचे काम त्या समितीकडे सोपविण्यात आले. जून १९६५ मध्ये सर्वांना संमत होईल अशी तडजोड भाषा प्रश्नाबाबत करण्यात आली. विद्यापीठ पातळीपर्यंतच्या शिक्षणकरिता सर्व राज्यांनी मातृभाषा हिंदी व इंग्रजी असे त्रिभाषासूत्र अमलात आणवे, केंद्रीय स्पर्धा परीक्षा हिंदी, इंग्रजी, निरनिराळ्या प्रमुख राज्यभाषा यातून घेण्यात याव्या. या परीक्षांत हिंदी व इंग्रजीचे पेपर सक्तीचे असावेत. हिंदी भाषिक उमेदवारांकरिता हिंदी व्यतिरिक्त एका कोणत्यातरी भारतीय भाषेची एक प्रश्नपत्रिका असावी, हिंदी विकास कार्यक्रमाला गती दिली जावी, राज्यांच्या पत्रव्यवहाराकरिता प्रादेशिक भाषेचा वापर करता यावा, असे त्यानुसार निश्चित करण्यात आले.

### २.२.१.३. इंदिरा गांधी

लाल बहादूर शास्त्रींच्या आकस्मिक निधनानंतर प्रधानमंत्री पदाकरिता २४ जानेवारी १९६६ रोजी भारताच्या प्रधानमंत्री म्हणून इंदिरा गांधींचा शपथविधी संपन्न झाला.

**प्रधानमंत्रीपदासाठी चुरस**

नव्या नेत्याची रीतसर निवड होईपर्यंत काळजीवाहू प्रधानमंत्री म्हणून गुलझारीलाल नंदा यांचा पुन्हा शपथविधी झाला. त्या वेळी प्रधानमंत्रीपदासाठी मोरारजी, नंदा, इंदिरा गांधी, जगजीवन राम, चव्हाण या नावांची चर्चा होती. याही वेळी प्रधानमंत्र्यांच्या निवडीबाबत कामराज यांनी पुढाकार घेतला. काहीही झाले तरी मोरारजींना प्रधानमंत्री होऊ देऊ नये, यावर सर्व सिंडिकेट नेत्यांचे एकमत होते.

एक स्त्री आणि प्रत्यक्ष राजकारणात फारसे महत्त्वाचे स्थान नसलेल्या इंदिरा गांधी आपल्या वर्चस्वाखाली राहतील, अशी खात्री सिंडिकेट नेत्यांना वाटत होती. महाराष्ट्र, तामिळनाडू, आंध्र, कर्नाटक, काश्मीर, ओरिसा या राज्यांच्या मुख्यमंत्र्यांनी मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डी. पी. मिश्रा यांच्या पुढाकाराने भरलेल्या बैठकीत इंदिरा गांधींना आपला पाठिंबा असल्याचे जाहीर केले.

सार्वत्रिक निवडणुका जेमतेम तेरा महिन्यांवर येऊन ठेपल्या होत्या. नेहरूंच्या असीम लोकप्रियतेचा फायदा न मिळता काँग्रेसला लढवावी लागणारी ही पहिलीच निवडणूक होती. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाची मोहिनी थोडीफार कोणात असली तर ती केवळ इंदिरा गांधीतच आहे व त्याचा उपयोग निवडणूक निश्चितपणे जिंकण्याच्या दृष्टीने होऊ शकेल, असे काँग्रेस नेत्यांना वाटत होते. त्यामुळेही काँग्रेस श्रेष्ठी, बहुसंख्य मुख्यमंत्री व खासदार यांनी इंदिरा गांधींना पाठिंबा दिला.

प्रधानमंत्र्याची निवड एकमताने व्हावी, त्याकरीता लढत होऊ नये व म्हणून मोरारजींनी माघार घ्यावी याकरिता प्रयत्न करण्यात आले. पण मोरारजींचा प्रतिसाद मिळाला नाही.

शेवटी १९ जानेवारी १९६६ रोजी पार्लमेंटच्या मध्यवर्ती सभागृहात प्रधानमंत्री निवडण्याकरिता मतदान झाले. मोरारजींना १६९ तर इंदिरा गांधींना ३५५ मते पडून त्या विजयी झाल्या व २४ जानेवारी १९६६ रोजी भारताच्या प्रधानमंत्री म्हणून त्यांचा शपथविधि संपन्न झाला.

**रुपयाचे अवमूल्यन**

भारतात आर्थिक संकटावर मात करण्याकरिता रुपयाचे अवमूल्यन हा एकच उपाय असल्याचा सल्ला अर्थतज्ज्ञ देत होते. तसे अवमूल्यन केल्याशिवाय अमेरिका व जागतिक बँक यांनी मदत देण्यास नकार दिला होता. लाल बहादूर शास्त्रींच्या मंत्रिमंडळात नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष असलेल्या अशोक मेहतांनी व सी. सुब्रमण्यम यांनी तसे करण्याची निकड शास्त्रींकडे लावली होती.

जून १९६६ मध्ये सरकारात कॅबिनेट मंत्री असलेल्या अशोक मेहतांनी त्या मुद्यावर तयार केलेले टिपण सरकारसमोर ठेवण्यात आले. अर्थकारणाशी संबंधित असलेल्या खातेप्रमुखांशीही इंदिरा गांधींनी विचारविनिमय केला. व मदतीसंबंधी बोलणी करण्याकरिता मार्च १९६६ मध्ये त्या अमेरिकेला गेल्या.

अध्यक्ष जॉन्सन यांनी मदतीच्या मोबदल्यात त्यांच्या अटीं इंदिरा गांधींसमोर ठेवल्या.

रुपयाचे अवमूल्यन ही मुख्य अट होती. शिवाय पी. एल. ४८० नुसार अमेरिकेने भारताला असलेल्या मोठ्या निधीचा वापर करून फोर्ड फाउंडेशनच्या धर्तीवर 'इंडो अमेरिकन एज्युकेशन फाउंडेशन' ही संस्था भारतात स्थापन करावी. भारतात सार्वजनिक क्षेत्रात नव्हे तर खाजगी क्षेत्रात उद्योगांना व खाजगी परकीय गुंतवणुकीला प्रोत्साहन द्यावे व अमेरिकेच्या व्हिएतनाम नीतीवर भारत सरकारने टीका करू नये. अशाही सूचना त्यांनी केल्या. त्या मोबदल्यात अमेरिका भारताला तीन दशलक्ष टन धान्य व नऊशे दशलक्ष डॉलर्सची मदत देईल व भारताच्या गरजा लक्षात घेऊन जागतिक बँक भारताप्रति अधिक सहानुभूतीपूर्ण धोरण ठेवील असा प्रयत्न अमेरिका करेल, असे आश्वासन जॉन्सन यांनी दिले. देशातील अन्नधान्याची तीव्र टंचाई लक्षात घेता या अटी मान्य करून घ्याव्या असे इंदिरा गांधींच्या सल्लागारांचे मत होते. त्यानुसार ५ जून १९६६ रोजी ३५ टक्क्यांनी रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले.

### १९६७ ची सार्वत्रिक निवडणूक

निवडणुकीचे निकाल काँग्रेस व विरोधी पक्ष या दोघांनाही धक्का देणार ठरले. १९६२ मध्ये काँग्रेसला ४५ टक्के मते मिळाली होती. ती टक्केवारी या निवडणुकीत ४१ टक्क्यांवर आली. ही घसरण चारच टक्क्यांची असली तरी जागा मिळवण्याच्या दृष्टीने त्याचे परिणाम मात्र गंभीर ठरले. लोकसभेच्या एकूण ५२१ जागांपैकी काँग्रेसला केवळ २८१ जागा मिळाल्या. काँग्रेसचे मोठमोठे दिग्गज या वेळी पराभूत झालेत.

एकंदर परिस्थिती प्रधानमंत्रीपदाकरिता निवडणूक झालीच तर यशाचे पारडे आपल्या बाजूने झुकेल अशी फारशी आशा मोरारजींना नव्हतीच. त्यामुळे कामराजांनी सुरू केलेल्या मध्यस्थीला प्रतिसाद देण्यास ते एका अटीवर तयार झाले. उपप्रधानमंत्रीपद व गृहखाते ते मागू लागले. इंदिरा गांधींना ते मान्य नव्हते. मंत्रिमंडळात त्यांना दुसऱ्या क्रमांकाचे स्थान देण्यास त्या तयार होत्या. पण गृहखाते त्या वेळी यशवंतराव चव्हाणांकडे होते. त्यांना नाराज करून ते खाते मोरारजींना देण्यास त्यांनी नकार दिला. शेवटी मोरारजींना उपप्रधानमंत्रिपद व वित्तखाते दिले जावे अशी तडजोड झाली व इंदिरा गांधींची प्रधानमंत्री म्हणून एकमताने निवड झाली.

सिंडिकेटला आव्हान देण्याइतपत इंदिरा गांधींचे स्थान त्या वेळी बळकट नव्हते. त्यामुळे ही तडजोड त्यांनी मान्य केली असली तरी इतक मंत्र्यांच्या निवडीबाबत मात्र त्यांनी खंबीर भूमिका घेतली. सिंडिकेटचे एकमेव नेते नीलम संजीव रेड्डी हे निवडणुकीत विजयी झाले होते. पण त्यांना त्यांनी मंत्रिमंडळात घेतले नाही; मात्र कटुता टाळण्याकरिता त्यांना लोकसभेचे सभापती म्हणून मान्यता दिली. तसेच १९६६ मध्ये मंत्र्यांची निवड करताना त्यांनी कामराजांचा सल्ला घेतला होता पण आता स्वतःच्या मतानुसार मंत्र्यांची यादी त्यांनी तयार केली व अखेरच्या क्षणी केवळ उपचार म्हणून ती कामराजांना दाखवली. १३ मार्च १९६७ रोजी भारताच्या प्रधानमंत्री म्हणून त्यांनी सत्तासूत्रे हाती घेतली.

### काँग्रेस दुभंगली

राष्ट्रपती झाकीर हुसेन यांचे ३ मे १९६९ रोजी अकस्मात निधन झाले व नवा राष्ट्रपती निवडण्याची वेळ काँग्रेसवर आली. सिंडिकेटची अशी योजना होती की, त्यांच्या गटाचा

राष्ट्रपती निवडून आणायचा; नंतर काँग्रेसच्या काही खासदारांनी इंदिरा गांधीवर त्यांचा विश्वास नसल्याचे पत्र राष्ट्रपतींना सादर करायचे व त्या आधारावर इंदिरा गांधींनी पदभ्रष्ट करून मोरारजींना प्रधानमंत्री करायचे. त्या दृष्टीने त्यांनी नीलम संजीव रेड्डी यांची उमेदवारी निश्चित केली.

राष्ट्रपती पदाकरिता जगजीवनराम यांचे नाव इंदिरा गांधींनी सुचविले ते वर्ष गांधी जन्मशताब्दीचे असल्याने, त्या पदावर एखादा हरिजन निवडून काँग्रेसने महात्मा गांधींचे स्वप्न साकार करावे असे त्या म्हणाल्या. पण ती सूचना सिंडिकेट नेत्यांनी फेटाळून लावल्याने, त्यावेळी उपराष्ट्रपती असलेल्या व्ही. व्ही. गिरींचे नाव त्यांनी पुढे केले. पण मोरारजींनी त्यांनाही विरोध केला.

राष्ट्रपती पदाकरिता उमेदवारीच्या प्रश्नावरून अशी रस्सीखेच चालू असतानाच गिरींनी, राष्ट्रपती पदाकरिता स्वतंत्र उमेदवार म्हणून ते उभे राहणार असल्याचे जाहीर केले. त्यांना इंदिरा गांधी मूक पाठिंबा देतील की काय, अशी धास्ती सिंडिकेट नेत्यांना वाटू लागली. लढत अटीतटीची झाली. २० ऑगस्ट रोजी निकाल जाहीर करण्यात आला. गिरी निवडून आले. हा इंदिरा गांधींचाच विजय मानला गेला.

काँग्रेसमधील उघड फुटीची जबाबदारी स्वतःकडे घेण्यास दोन्ही पक्ष कचरत होते. आरोप-प्रत्यारोपांना मर्यादा नव्हती. शेवटी फुटीचा निर्णय घेतला तो निजलिंगप्पांनी. काँग्रेस कार्यकारिणी विरुद्ध बंडखोरी केल्याच्या गुन्ह्याकरिता इंदिरा गांधींचे काँग्रेसचे मूळ सदस्यत्वच रद्द केले गेल्याची घोषणा त्यांनी केली व काँग्रेस संसदीय पक्षाने आपला नवा नेता निवडावा असा आदेश त्यांनी दिला. पार्लमेंटच्या दोन्ही सभागृहांच्या एकूण ४२९ काँग्रेस सदस्यांपैकी ३१० सदस्य इंदिरा गांधींच्या सभेला उपस्थित होते. आपणच खरी काँग्रेस आहोत असा दोन्ही गटांचा दावा होता. यापुढे इंदिरा गांधी व त्यांचे समर्थक गटाला काँग्रेस (आर) म्हणजे सत्ताधारी, तर सिंडिकेट गटाला काँग्रेस (ओ) म्हणजे संघटनावादी असे संबोधण्यात येऊ लागले.

काँग्रेस अशा प्रकारे दुभंगल्यामुळे इंदिरा गांधींचे सरकार संसदेच्या दोन्ही सभागृहात अल्पमतात आले. अर्थात भारतीय साम्यवादी पक्ष, अनेक प्रादेशिक पक्ष व बरेच स्वतंत्र सदस्य यांचा पाठिंबा इंदिरा सरकारला असल्याने त्या सरकारला धोका नव्हता. काँग्रेस (ओ)ने सरकारविरुद्ध आणलेला अविश्वासाचा ठराव निश्चितपणे फेटाळला गेला.

### संस्थानिकांचे तनखे बंद

संस्थानांचे विलीनीकरण झाले त्या वेळी विलीनीकरणाच्या मोबदल्यात त्यांना तनखे दिले जावे असे निश्चित करण्यात आले होते. हे तनखे कायम स्वरूपाचे असले तरी पित्याच्या मृत्यूनंतर नवा संस्थानिक गादीवर येण्याचे वेळी त्यांच्या तनख्याच्या रकमेत कपात केली जाण्याची तरतूद होती. तशी कपात पूर्वी करण्यात आलीही होती. नंतरच्या काळात जहाल मतवादाच्या उदयाबरोबर तनख्याच्या तरतुदींवर विशेषाधिकार रद्द करण्यात यावे अशी मागणी पुढे येऊ लागली. १९६७ च्या निवडणुकीत सर्वस्वी उजव्या विचारसरणीच्या स्वतंत्र पक्षाच्या तिकिटावर बरेच संस्थानिक राजकारणाच्या रिंगणात उतरल्यापासून त्या मागणीला

जोर आला होता. संस्थानिकांच्या संघटनेशी वाटाघाटी करून तो निकालात काढावा. या हेतूने त्यांनी संस्थानिकांशी बोलणी करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नाही. त्यामुळे त्याकरिता घटनेत आवश्यक तो बदल करून ते उद्दिष्ट साध्य करण्याखेरीज दुसरा पर्याय त्यांच्यासमोर उरला नाही. २ सप्टेंबर १९७० रोजी ते बिल लोकसभेत दोन तृतियांश बहुसंख्येने पारितही झाले. पण राज्यसभेत मात्र केवळ एका मताने ते बिल फेटाळले गेले. त्यावर विरोधकांनी उघडपणे मनवलेल्या आनंदामुळे इंदिरा गांधी अधिकच क्षुब्ध झाल्या. त्याच दिवशी संध्याकाळी त्यांनी मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलविली व राष्ट्रपतींकडून संस्थानिकांचे तनखे व विशेषाधिकार रद्द करणारा वटहुकूम जारी करवून घेतला.

याही वेळी संस्थानिकांचे तनखे बंद करण्याच्या सरकारच्या निर्णयाविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आली; व पुन्हा तो सरकारी निर्णय बेकायदेशीर असल्याचा निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला.

### १९७१ ची लोकसभा निवडणूक

१९७१ ची लोकसभा निवडणूक म्हणजे इंदिरा गांधींच्या नेतृत्वावरील जणू सार्वमत ठरले. विरोधकांनी 'इंदिरा हटाव' असेच मुख्य आवाहन प्रचार करताना लोकांना केले होते. त्याला प्रत्युत्तर म्हणून इंदिरा गांधींनी आपल्या प्रचारात 'गरिबी हटाव' अशी घोषणा केली. ती जनमानसाच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी ठरली.

हे यश पदरी पडताच प्रगतिशील बदल आणण्याच्या दिलेल्या आश्वासनाची पूर्ती करण्याच्या दिशेने इंदिरा गांधींनी पाऊले उचलली. मे १९७१ मध्ये सर्वसामान्य विमा व्यवसायाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. संस्थानिकांच्या तनख्याच्या वटहुकूमावरही शिक्कामोर्तब झाले. त्यानंतर घटनेल्या मूलभूत हक्कांत बदल करण्याचा संसदेला अधिकार आहे, असे निश्चित करणारी घटनादुरुस्ती करण्यात आली. दुसऱ्या घटनादुरुस्तीनुसार, सार्वजनिक कल्याणाकरिता कोणत्याही व्यक्तिच्या मालमत्तेपैकी काही भाग सरकारकडे घेण्याची गरज भासल्यास त्याकरिता त्या व्यक्तीला द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम सर्वोच्च न्यायालय नाही तर ससंद ठरवील असे निश्चित करण्यात आले.

### २.२.२. भारत देशात आणीबाणी

विरोधकांनी सर्व बाजूंनी त्यांना कोंडीत पकडल्यामुळे व देशात सर्वत्र गोंधळ व अराजक वाढत असल्याचे दिसत असल्यामुळे, विशेषतः लष्कर व पोलीस यांना बंडाचे आवाहन करण्यात येत असल्याने त्यातील धोका ओळखून विरोधकांच्या आव्हानाला तोंड देण्यास त्या पुढे सरसावल्या. आपले विश्वासू सल्लागार व मदतनीस यांच्याशी विचारविनिमय करून इंदिरा गांधींनी अंतर्गत आणीबाणी घोषित करण्याचा निर्णय घेतला.

२५ जून रोजी रात्री सुमारे अकरा वाजता रे यांच्या समवेत इंदिरा गांधी राष्ट्रपती भवनात गेल्या व एकंदर परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता. देशात अराजक व हिंसाचार पसरू नये या हेतूने आणीबाणी जाहीर करण्याचा निर्णय त्यांच्या सरकारने घेतला असल्याचे त्यांनी

राष्ट्रपतींना कळविले. आणीबाणीच्या घोषणेवर राष्ट्रपतींची स्वाक्षरी होताच लागलीच अंमलबजावणीला प्रारंभ झाला. जयप्रकाश, मोरारजी, तसेच चंद्रशेखर, मोहन धारिया यांसह सत्तारूढ पक्षातील काही प्रमुख नेते यांना त्याच रात्री अटक करण्यात आली.

२६ जून रोजी सकाळी दहा वाजता घाईघाईने मंत्रिमंडळाची बैठक बोलविण्यात आली. अल्पावधीत आणीबाणीच्या घोषणेला मंत्र्यांनी मान्यता दिली. विरोध केला तो एकट्या स्वर्ण सिंगानी. त्यामुळे त्यांना मंत्रीपद गमवावे लागले. त्यांच्याऐवजी संरक्षणमंत्री म्हणून बन्सीलाल यांची नियुक्ती झाली. जगजीवनराम व चव्हाण हे इंदिरा गांधींविरुद्ध बंड करून काँग्रेसमधून बाहेर पडतील ही जयप्रकाशांची आशा मात्र फलद्रूप झाली नाही. उलट, आणीबाणीचे समर्थन करून तत्संबंधित ठराव लोकसभेत जगजीवनराम यांनीच मांडला. विरोधीपक्षांचे बरेच सदस्य गजाआड असल्याने व काँग्रेसची बहुसंख्या असल्याने त्या ठरावावर, कोणतीही खळबळ न होता लोकसभेचे शिक्कामोर्तब झाले.

देशात स्वागतार्ह असे आर्थिक व सामाजिक बदल घडवून आणण्याच्या उद्देशाने आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी सुधारणांची वीस कलमी योजना जाहीर केली. देशभर सुमारे ऐंशी हजार लोकांना तुरुंगात डांबण्यात आले होते. सामान्य कैद्यांची स्थिती दयनीयच होती.

### २.२.२.१. जनता पक्षाची स्थापना

निवडणुका जाहीर करण्याबरोबरच सरकारने सर्व विरोधी पक्षनेत्यांची व अन्य अनेक कार्यकर्त्यांची मुक्तता केली. काँग्रेस व इंदिरा गांधी यांच्याविरुद्ध लोकमत प्रक्षुब्ध होते व त्याचा फायदा निवडणुकीत विरोधी पक्षांना मिळणार हे उघडच होते. तरीही निश्चित विजयाकरिता काँग्रेसविरुद्ध सर्व विरोधी पक्षांची एकजूट व्हावी याची निकड जयप्रकाशांसह सर्व विरोधकांना जाणवत होती. ती युती साकार करण्याकरिता, सुटका झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी १९ जानेवारी रोजी काँग्रेस, जनसंघ, समाजवादी व भारतीय लोकदल या प्रमुख विरोधी पक्षाचे नेते मोरारजी देसाई यांच्या निवासस्थानी एकत्र आले.

अशा प्रकारे काँग्रेस व इंदिरा गांधी यांना पराभूत करण्याचे एकमेव उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून सर्व विरोधी पक्षांनी एकत्रित येऊन 'जनता पक्षाची' स्थापना केली. त्याबद्दलची अधिकृत घोषणा २० जानेवारी रोजी करण्यात आली. एक नेता, एक व्यासपीठ, एक निवडणूक चिन्ह, एक उद्दिष्ट व एकसूत्री प्रचार अशा स्वरूपात जनता पक्ष अस्तित्वात आला. पंजाबातील अकाली पक्षानेही काँग्रेस विरोधात जनता पक्षाशी हातमिळवणी केली. मार्क्सवादी, साम्यवादी पक्ष जनता पक्षात सामील झाला नाही. पण उमेदवार उभे करण्याबाबत मात्र त्याने समझोता केला. तामिळनाडूत काँग्रेसशी सहकार्य करण्याचा निर्णय येथील द्रविड मुन्नेत्र कळघम या पक्षाने घेतला.

निवडणुकीच्या निकालाने इंदिरा गांधींच्या निवासात निराशेचा अंधकार पसरला. तर जनता पक्षात आनंदाला उधाण आले. जनतेने दिलेला कौल मान्य करून, इंदिरा गांधींनी आपला राजीनामा उपराष्ट्रपती बी. डी. जत्ती यांना सादर केला. राजीनामा देण्यापूर्वी त्यांनी आणीबाणी उठवल्याची घोषणा केली.

### २.२.२.२. जनता सरकार

१९७७ च्या लोकसभा निवडणुकीत जनतेने इंदिरा गांधी व काँग्रेस यांना निश्चितपणे अव्हेरून जनता पक्षाला प्रचंड बहुमताने निवडून दिले. मात्र सत्तासूत्रे हाती घेण्यास जनता पक्षाला थोडा वेळ लागला. कारण प्रधानमंत्री कोणी बनायचे याचा निर्णय लागलीच होऊ शकला नाही. मोरारजी, चरणसिंग, जनजीवनराम हे सगळेच त्या पदाकरिता आपला दावा पुढे करीत होते. शेवटी त्या समस्येतून मार्ग काढण्याकरिता जयप्रकाश नारायण आणि आचार्य कृपलानी, यांना पाचारण करण्यात आले. त्यांनी प्रधानमंत्री म्हणून मोरारजींची निवड केली. २३ मार्च १९७७ रोजी प्रधानमंत्री म्हणून मोरारजींचा शपथविधी झाला. काँग्रेस व इंदिरा गांधी यांचा झालेला पराभव व जनता पक्षाचे सत्ताग्रहण ही 'मतपेटीतून झालेली क्रांती' अशा शब्दात त्या घटनेचा उल्लेख त्याकाळी करण्यात आला.

जनता सरकारने शासनाची सूत्रे होती घेतल्यानंतर आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधी यांनी केलेले सर्व कायदे व घटनादुरुस्त्या रद्द केल्या. वृत्तपत्रांवरील नियंत्रणे दूर करून त्यांना स्वातंत्र्य दिले. आणीबाणीच्या काळात बंद पडलेल्या अनेक मुद्रणसंस्था पुन्हा सुरू झाल्या. देशात येण्यास बंदी घालण्यात आलेल्या परकीय पत्रकारांना पुन्हा परत येण्यास आमंत्रित करण्यात आले. आणीबाणीच्या काळात बंद पडलेले प्रेस कौन्सिल पुन्हा नव्याने निर्माण करण्यात आले. न्यायसंस्थेचे स्वातंत्र्य अबाधित राहील असे अभिवचन दिले गेले. देशातील अंतर्गत सुरक्षिततेकरिता कोणालाही अटक करण्याचा अधिकार सरकारला देणारा 'मिसा' कायदा रद्द करण्यात आला. विरोधी पक्षांना देशाच्या राजकारणात कायदेशीर स्थान दिले गेले. कायदेमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या विरोधी पक्षनेत्याला मंत्रिमंडळाच्या मंत्र्याचा दर्जा दिला गेला. आकाशवाणी व दूरदर्शन या प्रसार माध्यमांचा उपयोग विरोधी पक्षांनाही करता यावा, अशी तरतूद करण्यात आली. आणीबाणीच्या काळात तुरुंगात डांबण्यात आलेल्या सर्व बंद्यांची मुक्तता करण्यात आली. त्यात काही गुन्हेगारही सुटले.

इंदिरा गांधींवर सर्व दिशांनी टीकेचे प्रहार करणाऱ्या जनता सरकारकडून लोकांना फार मोठ्या अपेक्षा होत्या. कारण नाना प्रकारची अभिवचने या नेत्यांनी दिली होती. पण जनता राजवटीच्या २८ महिन्यांच्या अल्पकाळातच त्या नेत्यांवरील जनतेच्या विश्वासाला सुरुंग लागला. राजकीय पक्षांतरावर जनता नेत्यांनी उघडपणे कठोर टीका केली होती. काही काँग्रेसजन जनता पक्षात सामील झाले. तेव्हा राज्यसभेत जनतापक्ष सदस्यांची संख्या वाढविण्याचे साध्य करण्याकरिता जनता सरकारने त्यांच्या त्या पक्षांतराचे स्वागत केले.

राष्ट्रहिताच्या दृष्टीने भारताच्या लोकसंख्यावृद्धीला आवर घालणे ही वस्तूतः एक अत्यंत निकडीची बाब होती. परंतु ही बाब इंदिरा गांधींच्या पराभवाला फार मोठ्या प्रमाणात कारणीभूत झाली. याची जाणीव असल्यामुळे की काय, जनता सरकारने त्या उद्दिष्टांच्या दिशेने कोणतेही पाऊल उचलले नाही.

मोरारजींचा दारुबंदीवर फार भर होता व त्या दिशेने कार्यवाही करण्याकरिता ते दृढसंकल्प होते. त्यामुळे चोरट्या दारुचे व त्याबरोबर गुन्हेगारीचेही प्रमाण वाढले. एकीकडे दारुबंदी करण्याच्या कार्यक्रमावर मोठ्या प्रमाणावर केलेला खर्च वाया गेला. तर दुसरीकडे सरकारचे

अबकारी उत्पन्न घटले. अनेक जनता पक्ष नेत्यांचाही दारुबंदी कार्यक्रमाला पाठिंबा नव्हता.

आकाशवाणी व दूरदर्शन या प्रसार माध्यमांना स्वायत्तता दिली जाईल. असे जनता पक्षाने आपल्या निवडणूक जाहीरनाम्यात घोषित केले होते. त्याकरिता वर्गीस कमिटीचे गठनही करण्यात आले. त्या समितीने त्या माध्यमांना स्वायत्तता देण्याच्या कार्यवाहीबाबत शिफारशी करावयाच्या होत्या. मात्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्र्यांनी मे १९७९ मध्ये लोकसभेपुढे मांडलेल्या प्रसार भारती बिलात, त्या माध्यमांना खरे स्वातंत्र्य मिळेल, सरकारी नियंत्रणापासून ती मुक्त राहतील, अशी तरतूद मोठे दिसत नव्हती. त्या बिलावर विरोधकांनीच नव्हे तर जनता नेत्यांनीही सडकून टीका केली. शेवटी त्या बिलातून काहीही फलनिष्पत्ती झाली नाही.

जून १९७९ मध्ये जनता सरकारच्या कार्यपद्धतीवर वृत्तपत्रांतून टीका येऊ लागताच त्या सरकारने इंडस्ट्रीज ॲक्टची कलमे मुद्रण व्यवसायालाही लागू केली. आडमार्गाने वृत्तपत्रांवर सरकारी नियंत्रण लादण्याचा तो प्रयत्न होता. इंदिरा गांधी वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी करीत आहेत. या नेत्यांनी पूर्वी त्यांच्यावर केलेल्या जळजळीत टीकेशी, जनता सरकारचे हे पाऊल निश्चितच सुसंगत नव्हते.

जून १९७७ मध्ये जनता सरकारने राज्यांत निवडणुका घेतल्या. वस्तूतः राज्यांतील विधानसभांचा कार्यकाळ संपलेला नव्हता. तरीही तेथे निवडणुका घेण्यात आल्या. त्यामागे एकमेव हेतू होता तो म्हणजे तेथील काँग्रेस सरकार पाडून त्याऐवजी जनता सरकार प्रस्थापित करणे. इंदिरा गांधींना राजकीय जीवनातून पूर्णपणे उठवणे हे जनता सरकारचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट होते.

त्या हेतूने, नगरवाला प्रकरण, तुरुंगवासात जेपींना देण्यात आलेली वागणूक, अशा गोष्टींची चौकशी करण्याकरिता त्यांनी समित्या तर नेमल्याच, पण मुख्य म्हणजे आणीबाणीच्या काळात इंदिरा गांधींनी केलेल्या 'दुष्कृत्यांची' चौकशी करण्याकरिता न्यायमूर्ती शहा यांची नियुक्ती केली. या शहा कमिशनमुळे दररोज होणारे साक्षी पुरावे व त्या चौकशीला देण्यात आलेली प्रसिद्धी यामुळे अगोदरच लोक रोषाला बळी पडलेल्या इंदिरा गांधी, संजय गांधी व काँग्रेस यांच्यावर जबरदस्त चिखलफेक होत होती.

जनता पक्ष सत्तारूढ झाल्यानंतर वर्ष-सव्वा वर्षात महागाईही एकदम भडकली. त्याचे एक कारण हे होते की, गैरव्यवहाराविरुद्ध सरकारकडून दंडात्मक कार्यवाही होईल याची धास्ती नफेबाज व्यापाऱ्यांना वाटेनाशी झाली होती. दुसरे म्हणजे मान्सूनने पुन्हा दगा दिला होता. त्यामुळे जनतेत असंतोष पसरू लागला. पण यापेक्षाही, अत्यंत चिंताजनक बाब ठरली ती म्हणजे हरिजनांवर होणारे वाढते अत्याचार. पूर्वीही तसे अत्याचार होत नव्हते असे नाही पण आता त्या अत्याचारांची संख्या व भयावहता फार वाढली. चरणसिंगांच्या अनुयायांत जाट, यादव, अहिर, राजपूत अशा निरनिराळ्या गटांचे लोक होते, ते काँग्रेसला पाठिंबा देणाऱ्या उच्चवर्णियांपेक्षाही अधिक हरिजनद्वेष्टे व आक्रमक प्रवृत्तीचे होते. जनता सरकार अधिकारारूढ होताच सत्तेचा अहंकार यांच्या मनात भिनला व खेड्यापाड्यांतून हरिजन जराही कोठे डोके वर काढीत आहेत असे वाटले की, त्यांना चिरडून टाकण्यात ते मागेपुढे

पाहिनासे झाले.

गांधी जयंतीच्या दुसऱ्याच दिवशी ३ ऑक्टोबर १९७७ रोजी इंदिरा गांधींना अटक करण्याकरिता १२ विलिंडन क्रेसेंट या इंदिरा गांधींच्या निवासस्थानी पोलीस गेले. पोलिसांबरोबर जाण्यापूर्वी ''हातकड्या कुठे आहेत?'' असा प्रश्न विचारून हातकड्या घातल्या गेल्याशिवाय जाण्याचे इंदिरा गांधींनी नाकारले. तेव्हा त्या अधिकाऱ्यांची स्थिती मोठी अवघड झाली. ''कृपा करून आम्हाला अडचणीत टाकू नये, अशी विनंती त्यांनी केली. तेव्हा इंदिरा गांधी पोलीस व्हॅनमध्ये बसल्या. त्यांचे समर्थक निषेधाच्या जोरदार घोषणा करीतच होते.''

दुसऱ्या दिवशी दहा वाजता त्यांना दिल्लीच्या तीसहजारी न्यायालयात मॅजिस्ट्रेटपुढे हजर केले होते. इंदिरा गांधींविरुद्ध कोणताही आरोप नसल्याने मॅजिस्ट्रेटने काही मिनिटांतच त्यांची बिनशर्त सुटका केली.

१ जानेवारी १९७८ रोजी पुन्हा काँग्रेसमध्ये फूट पडली. इंदिरानिष्ठ काँग्रेसजनांच्या पक्षाला काँग्रेस (इं) म्हणण्यात येऊ लागले. तर पक्षाला दुसरा गट स्वर्णसिंग यांच्या नावातील आद्याक्षरामुळे काँग्रेस (एस) या नावाने ओळखला जाऊ लागला. फेब्रुवारी १९७८ मध्ये काही राज्यांत झालेल्या विधानसभा निवडणुकीत लोकांचा इंदिरा गांधींकडे झुकणारा कल स्पष्ट झाला. आंध्र व कर्नाटकात जनता पक्ष व काँग्रेस (एस) या दोन्ही पक्षांचा पराभव करून काँग्रेस (इं.) पक्ष विजयी झाला. याबाबत इंदिरा गांधींचे दौरे भारतभर सुरूच होते.

**जनता सरकारचे पतन**

जनता सरकारविरुद्ध लढा देण्याची फारशी गरजच इंदिरा गांधींना उरली नाही. अंतस्थ यादवीने आत्मनाश करून घेण्याचा विडाच जणू जनता नेत्यांनी उचलला होता. मोरारजी देसाई यांचे पुत्र कांतीभाई व्यापार धंद्यात काळे धंदे करण्याकरिता आपल्या पित्याच्या पदाचा गैरवापर करीत आहेत, असे आरोप चरणसिंगांसह अनेक लोक उघडपणे करीत होते. तर चरणसिंगांच्या पत्नीवर अशाच प्रकारचे आरोप केले जात आहेत, असे मोरारजींचे म्हणणे होते.

चरणसिंगांच्या प्रखर हल्ल्यामुळे २७ जुलै १९७९ रोजी मोरारजींना पायउतार व्हावे लागले. राष्ट्रपतींनी नवे सरकार बनविण्याकरिता चरणसिंगांना पाचारण केले. २८ जुलै रोजी प्रधानमंत्री म्हणून त्यांचा शपथविधी झाला. एक महिन्याच्या आत संसदेत आपली बहुमत त्यांनी सिद्ध करावे असा आदेश चरणसिंगांना राष्ट्रपतींनी दिला.

पण संसदेत विश्वास ठरावाला सामोरे जाणे चरणसिंगांना शक्य झाले नाही. चरणसिंगांनी प्रधानमंत्री होण्यास काँग्रेस (इं.) ने औपचारिक संमती दिली होती. पण ती एका अटीवर, ती म्हणजे मोरारजींनी स्थापिलेली खास न्यायालये चरणसिंगांनी रद्द करावी. लोकसभेत आवश्यक ते बहुमत नसल्यामुळे तसे करणे चरणसिंगांना शक्य नव्हते. २० ऑगस्ट १९७९ रोजी लोकसभेचे अधिवेशन सुरू झाले. पण चरणसिंग त्या सभेवर उपस्थित नव्हते. अधिवेशन सुरू होण्यापूर्वीच त्यांनी प्रधानमंत्रिपदाचा आपला राजीनामा सादर केला व राष्ट्रपतींनी लोकसभा बरखास्त केली व जानेवारी १९८० मध्ये सार्वत्रिक निवडणुका होतील असे जाहिर केले. तोपर्यंत काळजीवाहू सरकार म्हणून चरणसिंगांनी कार्यभार सांभाळायचा होता.

**जनता सरकारच्या अपयशाची कारणे**

मार्च १९७७ मध्ये सत्तेवर आलेले जनता सरकार कार्य काळाची ५ वर्षांची मुदत पूर्ण करू शकले नाही ते जेमतेम २८ महिनेच सत्तेवर होते. जनता सरकारचे अकाली पतन होण्यास अनेक बाबी कारणीभूत ठरल्या. सहकाऱ्यांत व अनुयायांत स्फूर्ती व आत्मविश्वास ओतू शकेल असा राष्ट्रीय पातळीवरील, गतिमान व उच्च श्रेणीचा नेता जनता पक्षात नव्हता. मोरारजी देसाई प्रधानमंत्री बनले त्यावेळी ते ८१ वर्षांचे होते. त्यांची उमेदीची वर्षे उलटून गेली हाती. शिवाय ते छंदिष्ट, आत्मकेंद्रित, स्वतःच्या मतांना आडमुठेपणाने चिकटून राहणारे, बदलत्या परिस्थितीचा मोकळ्या मनाने विचार करण्याची तयारी नसलेले, तोपर्यंत त्या पदाकरिता अव्हेरले गेलेले असे होते.

पक्ष नकारात्मक भूमिकेतून जन्माला आला होता. काँग्रेस द्वेष व इंदिरा गांधींना खाली खेचून सत्ता बळकावणे हे या पक्षातील सर्व घटक पक्षांचे एकमेव उद्दिष्ट होते. त्यामुळे निवडणुकीच्या वेळी युती करून काँग्रेसला सत्तेवरून दूर करण्यात तो पक्ष यशस्वी ठरला असला तरी प्रत्यक्षात सत्ता राबविताना मात्र चार पुढाऱ्यांच्या चार दिशा अशी अवस्था झाली.

जनता पक्ष एकसंघी व बलशाली कधी बनलाच नाही. निवडणुकीच्या सोयीकरता तयार झालेले चार पक्षांचे ते एक कडबोळे होते. जनता पक्षातील घटक पक्षांचे ध्येय धोरण व अस्तित्व कधीच नाहीसे झाले नाही. जनता नेत्यांच्या त्यांच्या मूळ पक्षाप्रती निष्ठाही तशाच कायम होत्या. हाती आलेल्या सत्तेचा फायदा करून घेऊन आपला मूळ पक्ष बळकट करावा अशीच नीती त्या नेत्यांनी अवलंबिली. सत्तेवर आल्यानंतर त्यांच्या निवडणूक जाहीरनाम्यात जनता पक्षाने दिलेल्या आश्वासनांची पूर्ती करण्याचा प्रयत्न त्या सरकारने केला नाही. कामगारांविषयी ते सहानुभूतीशून्य राहिले. विद्यार्थी वर्गातील असंतोष हेतू पुरस्सर भडकावून जेपींचे आंदोलन तीव्र करण्याकरिता त्याचा उपयोग करून घेतला गेला होता. परंतु सत्तेवर आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या बेताल वागणुकीला आवर घालणे त्यांना अगत्याचे झाले. ज्या नेत्यांची सरकारविरोधाला प्रोत्साहन देऊन विघातक कारवायांसाठी विद्यार्थ्यांना उद्युक्त केले तेच नेते आता त्यांच्याविरुद्ध कार्यवाही करतात. ते पाहून विद्यार्थीही जनता सरकारवर नाराज झाले.

इंदिरा गांधींविरुद्ध चळवळीचे रान उठवताना जनता नेत्यांनी भ्रष्टाचाराच्या मुद्याला प्राधान्य दिले होते. पण नंतर जनता दलही भ्रष्टाचारापासून मुक्त नाही असे लोकांच्या प्रत्ययाला आले. कृषी उत्पादनाची निर्यात थांबविल्याने सुरुवातीला अल्पकाळात अन्नधान्याच्या किमती उतरल्या हे खरे. पण त्यामुळे शेतकरी वर्गात तीव्र असंतोष पसरला. बेकारीची समस्या सोडविण्याचे प्रयत्न न केल्याने तरुण वर्गातही सरकारविरुद्ध असंतोषाची भावना निर्माण झाली. सत्तेवर आल्यानंतर वर्षही उलटले नाही तोच, त्यांना ज्यांनी निवडून दिले होते त्या सामान्य जनतेशी जनता नेत्यांचा संपर्क तुटल्यासारखा झाला.

## २.३. स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१) पंतप्रधान म्हणून पंडित जवाहरलाल नेहरू यांचे योगदान स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

२) पंतप्रधान म्हणून लालबहाद्दूर शास्त्री यांचे योगदान स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

३) पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधी यांचे योगदान स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

४) देशात उद्‌भवलेल्या आणीबाणीचे मुल्यमापन करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

## २.४. सारांश

स्वातंत्र्यानंतरची नेहरूंची सतरा वर्षांची कारकीर्द हा भारताच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वाचा काळा मानला जातो. त्यांच्या नेतृत्वाखाली, विभाजनानंतरच्या भयावह संकटांना शासनाने क्षमतेने व यशस्वीपणे तोंड दिले. या काळात देशाला उपकारक ठरेल अशी राज्यघटना तयार झाली. प्रौढ मतदान पद्धतीवर आधारलेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका यशस्वीपणे पार पडून लोकशाहीचा स्वरूप निश्चित होऊन, पहिली पंचवार्षिक योजना बहुतांशी यशस्वीपणे खऱ्या अर्थाने सुरुवात झाली. भारताच्या अर्थव्यवस्थेचे स्वरूप निश्चित होऊन संक्षिप्त अर्थव्यवस्थेचा व औद्योगिकीकरणाचा पाया व शस्त्रोत्पादनाची सुरुवात झाली. भारताची राजकीय पुनर्रचना झाली.

लालबहाद्दूर शास्त्री यांनी मवाळ धोरणाचा पुरस्कार करीत शांततेच्या मार्गाने विविध प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला.

शास्त्रीनंतर इंदिरा गांधी सत्तेवर आल्या. खंबीर भूमिका घेऊन त्यांनी देशांतर्गत तसेच सीमेवरील प्रश्न सोडवले. संस्थानिकांचे विशेषाधिकार त्यांनी मोडून काढले. आसाम व पंजाब समस्यांच्या धैर्याने तोंड दिले. पाकिस्तानच्या अत्याचारापासून मुक्त अशा नव्या राष्ट्राची बांगलादेशाच्या निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका वठवली. आंतरराष्ट्रीय राजकारणात आपल्या प्रभावी नेतृत्वाची छाप त्यांनी उमटवली. आणीबाणी घोषित करून विरोधकांचा बिमोड केला. सत्तेतून पायउतार झाल्यावर जनता राजवटीला धैर्याने सामोरे जावू लागली. अल्पावधीतच इंदिराजी पुन्हा सत्तेवर आल्या. एकंदरित या काळात नेहरू ते इंदिरा गांधी यांच्या कार्याची छाप भारतीय राजकारणावर पडलेली दिसून येते.

## २.५. पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

**समग्र क्रांती**

जयप्रकाश नारायण यांनी मांडलेला मूलभूत परिवर्तनाचा विचार. मुख्यतः १९७४-७५ च्या सुमारास हा विचार पुढे आला असला तरी जयप्रकाश नारायण यांनी सर्वोदय विचार स्वीकारल्यानंतर केलेल्या चिंतनात त्याचे मूळ आहे असे मानले जाते. समग्र क्रांतीची कल्पना काहीशी संदिग्ध असून तिच्या तपशिलाविषयी विशेषतः आर्थिक विचारांविषयी स्पष्टतेचा अभाव आहे. या संकल्पनेत पुढील गोष्टींचा समावेश करता येईल.

(१) भ्रष्टाचार विरहित, वर्गहीन, जातिहीन समाजाची निर्मिती.

(२) खरेखुरे लोकशाही शासन आणि त्यासाठी जागरूक लोकसमित्यांची निर्मिती.

(३) शिक्षण, निवडणूक पद्धती, स्थानिक शासनाची व्यवस्था यामध्ये मूलभूत बदल.

(४) मानवी दृष्टिकोनात बदल, मानवतावादी मूल्यांची निर्मिती आणि जतन.

(५) शांततापूर्ण मार्गाचा अवलंब, अहिंसक सत्याग्रही मार्गाचा स्वीकार.

परिवर्तनाच्या या विचाराला 'समग्र' क्रांती म्हणायचे. कारण सर्व क्षेत्रात परिवर्तनाचे उद्दिष्ट या क्रांतीपुढे आहे. त्याचप्रमाणे क्रांतीच्या साधनांची शुद्धता त्यात गृहीत धरलेली आहे आणि सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे निव्वळ समाजरचना बदलण्यापेक्षा व्यक्तींची मनोभूमिका बदलणे समग्र क्रांतीमध्ये अभिप्रेत आहे.

## २.६. संदर्भग्रंथसूची


- आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य, कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर(१९४७-२०००).
- इंडिया अफ्टर इंडिपेंडन्स - बिपिनचंद्र (अनु. पारधी मा. कृ. व. इतर), के. सागर, पुणे-२००४


## २.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रीय कार्य / प्रात्यक्षिक कार्य

स्वातंत्र्योत्तर भारतातील पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा व राज्यसभा अध्यक्षांची नावे व कालखंड यांची सूची तयार करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

# घटक ३

# राजकीय विकास – २

**अनुक्रमणिका**


**३.० उद्दिष्टे**

**३.१ प्रस्तावना**

**३.२ विषय विवेचन**

**३.२.१ इंदिरा गांधी ते राजीव गांधी**

**३.२.१.१. इंदिरा गांधी**

**३.२.१.२. राजीव गांधी**

**३.२.२ राजीव गांधींनंतर**

**३.२.२.१ विश्वनाथ प्रतापसिंग**

**३.२.२.२ चंद्रशेखर**

**३.२.२.३ पामुलपती वेंकट नरसिंहराव**

**३.२.२.४ राजकीय अस्थिरतेचा कालखंड**

**३.२.२.५ अटलबिहारी वाजपेयी**

**३.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**३.४ सारांश**

**३.५ पारिभाषिक शब्द–शब्दार्थ**

**३.६ संदर्भग्रंथसूची**

**३.७ सरावासाठी स्वाध्याय–उपक्रम**


## ३.० उद्दिष्टे

- जनता राजवटीनंतरच्या काळातील इंदिरा गांधींच्या पंतप्रधान पदाच्या कार्याचा आढावा घेता येईल.
- राजीव गांधी यांचे पंतप्रधान म्हणून योगदान स्पष्ट करता येईल.
- विश्वनाथ प्रतापसिंग यांच्या कार्यकालाचे परीक्षण करता येईल.
- चंद्रशेखर यांच्या कार्यकालाचे मूल्यमापन करता येईल.
- पी. व्ही. नरसिंहराव यांच्या धोरणांचे टीकात्मक परीक्षण करता येईल.
- अटलबिहारी वाजपेयी यांचे कार्य विशद करता येईल.
- इंद्रकुमार गुजराल यांचे कार्य स्पष्ट करता येईल.

## ३.१ प्रस्तावना

आणीबाणीनंतरच्या कालखंडाचा विचार आपणांस या प्रकरणात करावयाचा आहे. आणीबाणीनंतर पुन्हा एकदा काँग्रेसने म्हणजेच इंदिरा गांधींनी पंतप्रधान म्हणून सत्तेची सूत्रे हाती घेतलीत. या काळात त्यांना आसाम समस्या, पंजाब प्रश्न यांसारख्या समस्यांना सामोरे जावे लागले. त्याचा ऊहापोह प्रस्तुत प्रकरणात करायचा आहे.

इंदिरा गांधींच्या हत्येनंतर राजीव गांधी हे पंतप्रधान झालेत. त्यांची कारकीर्द नवीन तंत्रज्ञानयुगाची नांदी ठरली. दूरसंचार, संगणक या क्षेत्रात भारताने कमालीची प्रगती साधली.

राजीव गांधीनंतर पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळात नव्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करण्यात आला. 'खाऊजा' धोरण राबविण्यात आले. भारतीय बाजारपेठ परकीय भांडवल गुंतवणुकीस मोकळी करून देण्यात आली.

विसाव्या शतकाच्या अखेरपर्यंतच्या सर्वच पंतप्रधानांच्या राजकीय कारकीर्दीचा आढावा आपण या प्रकरणात घेणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१. इंदिरा गांधी ते राजीव गांधी

#### ३.२.१.१. इंदिरा गांधी

**१९८० ची सार्वत्रिक निवडणूक**

१९८० च्या निवडणुकीत काँग्रेस पक्षाला निर्णायक बहुमत मिळवून इंदिरा गांधी पुन्हा भारताच्या प्रधानमंत्री बनल्या. १४ जानेवारी १९८० रोजी त्यांनी सत्तासूत्रे हाती घेतली. जनता नेत्यांना लोकांनी निश्चितपणे अव्हेरले होते.

अशा परिस्थितीतच २३ जून १९८० रोजी विमान अपघातात संजय गांधी यांचे निधन झाले. दैवाने इंदिरा गांधींवर केलेला हा सर्वात क्रूर आघात होता. त्यातून त्या पूर्णपणे कधीच सावरल्या नाहीत.

**आसाम समस्या**

१९८० मधील लोकसभा निवडणुकीकरिता तयार करण्यात आलेल्या मतदारांच्या यादीत अनेक परकीयांचा, बांगलादेशातून आलेल्या निर्वासितांचा अंतर्भाव झालेला होता. या कारणावरून आसामातील जनता इतकी प्रक्षुब्ध होती की, आसामातील १६ पैकी १४ मतदारसंघात निवडणुका घेणे अशक्य झाले होते. लवकरच त्या राज्यातील आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्याचे नेतृत्व 'ऑल आसाम स्टुडंट्स युनियन' व 'आसाम रणसंग्राम परिषद' या संघटनाकडे गेले. आसामातील परकीयांना सरकारने हुडकून काढावे, त्यांना मतदानाचा हक्क देऊ नये आणि त्यांना बांगलादेशात परत पाठविण्यात यावे किंवा त्यांना भारताच्या इतर राज्यांत पाठवून देण्यात यावे असे त्यांचे म्हणणे होते. या त्यांच्या मागण्यांची पूर्णपणे पूर्तता झाल्याशिवाय राज्यात कोणतेही कामकाज सुरळीतपणे चालू देणार नाही अशी

त्यांची उघड धमकी होती. बांगलादेशातून आलेले निर्वासित व पश्चिम बंगालमधून आलेले बंगाली यामुळे त्रिपुरा राज्यातील मूळ रहिवासी जसे अल्पसंख्य बनले तसे आसामातही होईल, अशी धास्ती आसामी जनतेला वाटत होती.

आसामातील आंदोलकांचा रोख केवळ तेथील निर्वासितांविरुद्ध नव्हे तर आसाममध्ये पूर्वापार स्थायिक झालेल्या, आसामी भाषा न बोलणाऱ्या, प्रामुख्याने बंगाली नागरिकांविरुद्ध होता. बंगाली सांस्कृतिकदृष्ट्या आसामींपेक्षा स्वतःला श्रेष्ठ समजत. या उच्चभ्रू मनोवृत्तीमुळे त्यांच्याबद्दल आसामी मनात चीड होती.

आसाममध्ये १९६१ साली करण्यात आलेल्या शिरगणतीत इतर राज्यांच्या तुलनेत आसामच्या लोकसंख्येत बेसुमार वाढ झालेली दिसताच तेथे चांगलीच खळबळ उडाली. लोकमत चांगलेच प्रक्षुब्ध झाले. अशा परिस्थितीतच १९७१ मध्ये जेव्हा पूर्व पाकिस्तानातून दहा लाखांवर निर्वासित आसामात आले तेव्हा जनतेचा संताप पराकोटीला गेला. बांगलादेश अस्तित्वात आल्यावर त्या निर्वासितांना परत पाठविण्यात आले असले तरी सुमारे एक लाखावर निर्वासित आसामातच राहून गेले. त्याच्या संभाव्य परिणामांची शक्यता लक्षात घेऊन २५ मार्च १९७१ नंतर जे लोक आसामात बेकायदेशीरपणे गेलेले असतील त्यांनाच त्यांच्या बांगलादेशाच्या नागरिकत्वाची खात्री पटली तरच, बांगलादेशात परत घेतले जाईल, तत्पूर्वीच्या नाही, अशा आशयाचा करार बांगलादेशाने भारताशी केला.

१९७९ मध्ये आसामातील मतदार पुनर्विचार झाला तेव्हा त्या यादीतील सुमारे साडेतीन लक्ष लोकांचे राष्ट्रीयत्व विवाद्य असल्याचा दावा करण्यात आला.

त्या सर्व 'परकीयांची' नावे मतदारांच्या यादीतून काढून टाकण्यात यावी, अशी मागणी करून ऑल आसाम स्टुडंट्स युनियन व आसाम गणतंत्र परिषद या संघटनांनी आंदोलन तीव्रतर केले. पुनःपुन्हा सार्वत्रिक संप, सार्वजनिक मालमत्तेची नासधूस, सरकारी कार्यालये, बँका, पोस्टाची कार्यालये इत्यादी समोर निदर्शने, अशा गोष्टींना सुरुवात झाली. त्यामुळे तेथील जनजीवन जवळजवळ ठप्प झाले.

इंदिरा गांधींनी आंदोलनाच्या नेत्यांशी वाटाघाटी करून २५ मार्च १९७१ पूर्वी मतदार म्हणून नोंदणी झालेल्या लोकांना तेथील नागरिक म्हणून त्यांनी मान्यता द्यावी याकरिता सर्वतोपरी प्रयत्न केले. बांगलादेश-भारत सीमेवर निर्वासितांची आवक थांबवण्याकरिता प्रभावी पोलीस यंत्रणा कार्यान्वित केली जाईल व सीमेवरील जिल्ह्यात छायाचित्रे असलेली ओळखपत्रे दिली जातील. असे आश्वासनही त्यांनी त्या नेत्यांना दिले.

आसाममधील आंदोलन सुरू असतानाच त्या प्रश्नातील गुंतागुंत ब्रह्मपुत्रेच्या खोऱ्यात राहणाऱ्या आदिवासींनी पुढे केलेल्या दाव्यामुळे अधिकच वाढली. त्या प्रदेशांचे मूळ रहिवासी आपण आहोत. आसामी भाषिक हिंदू नव्हेत त्या असामी हिंदूंनी पिढ्यान्‌पिढ्या आपली पिळवणूक केलेली आहे. त्यांची भाषा व संस्कृती आपल्यावर लादली आहे. असे त्यांचे म्हणणे होते व त्यात तथ्यही होते. ऑल आसाम ट्रायबल युथ लीग या त्यांच्या संघटनेने आसामातील आंदोलनाला विरोध तर केलाच, पण त्याचबरोबर आदिवासींच्या क्षेत्रात बेकायदेशीरपणे शिरलेल्या सर्व लोकांना तेथून हाकलून दिले जावे व तेथील शेतजमिनीची

फेरवाटणी आदिवासींत केली जावी, अशी मागणी केली. आंदोलक व आदिवासी यांच्यात निर्माण झालेल्या तणावाला लवकरच गंभीर स्वरूप प्राप्त झाले.

आसाममधील आंदोलनाला आवर घालून येथे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याकरिता १९८० मध्ये इंदिरा सरकारने 'नॅशनल सिक्युरिटी' वटहुकूम जारी केला व थोडेच दिवसात लोकसभेच्या संमतीने त्याला कायद्याचे स्वरूप दिले. त्यानुसार सार्वजनिक शांततेचा भंग करण्याच्या गुन्ह्याकरिता, त्याच्याविरुद्ध खटले न भरता, बारा महिनेपर्यंत तुरुंगात ठेवण्याचा अधिकार सरकार दिला. याशिवाय महत्त्वाच्या सार्वजनिक सेवात संपांना बंदी घालण्याच्या उद्दिष्टाने व संपावर जाणाऱ्याविरुद्ध तडकाफडकी खटले भरता यावेत या हेतूने 'इसेन्शियल सर्व्हिसेस मेंटेनंस ॲक्ट' ही पारित करण्यात आला. या दोन कायद्यांचा निषेध करण्याकरिता १९८१ मध्ये विरोधी पक्षांतर्फे आयोजित करण्यात आलेला देशव्यापी संप चिरडून टाकण्यात आला.

भारताच्या फाळणीनंतर विभाजित पंजाबमधील शिखांची संख्या पंजाबच्या एकूण लोकसंख्येच्या एक तृतियांशपर्यंत वाढली असली तरी पंजाबात आपली बहुसंख्या आहे, असे ते म्हणू शकत नव्हते. शिवाय ब्रिटिश राजवटीत शिखांना मिळणारी खास सवलतींची वागणूक स्वतंत्र भारतात साहजिकच मिळेनाशी झाली. त्यामुळे असंतुष्ट अकाली पुन्हा लढ्याला उभे ठाकले. नुकतेच भारताचे विभाजन झालेले होते. तेव्हा लागलीच पुन्हा दुसऱ्या विभाजनाची भाषा कोणी ऐकून घेणार नाही हे कळत असल्याने, भारताच्या राजकीय चौकटीतच पण शिखांच्या 'स्वायत्त' राज्याची, पंजाबी सुभ्याची मागणी ते करू लागले. भाषिक राज्याची मागणी हा केवळ एक बुरखा होता. त्यांच्या मागणीचे खरे स्वरूप जातीय होते याची स्पष्ट जाणीव होती ती नेहरूंना, म्हणून अखेरपर्यंत त्यांनी पंजाबी सुभ्याची मागणी फेटाळून लावली. भाषिक राज्ये निर्माण करण्यालाच नेहरूंचा विरोध होता. पण जनतेच्या इच्छेपुढे वाकून १९५३ मध्ये त्यांना राज्य पुनर्रचना मंडळ गठीत करावे लागले. तेव्हा पंजाबी सुभ्याची मागणी आता नेहरूंना नाकारता येणारच नाही, अशी खात्री वाटून अकाली आनंदित झाले पण तत्त्वतः भाषिक राज्यांना त्या मंडळाने मान्यता दिली असली तरी पंजाब हे संवेदनक्षम सीमाराज्य असल्याने व तेथे पंजाबी व हिंदी अशा दोन्ही भाषा बोलल्या जात असल्याने त्याचे विभाजन होऊ नये, अशी शिफारस मंडळाने केली. त्यामुळे अकाली नेते अत्यंत प्रक्षुब्ध झाले. शिखांना 'नेस्तनाबूत' करण्याचाच तो प्रयत्न आहे. शिखांबद्दल वाटणारा अविश्वास त्यातून डोकावतो आहे असा प्रचार ते करू लागले.

शेवटी मार्च १९६६ मध्ये प्रधानमंत्री इंदिरा गांधींनी हिंदी भाषिक हरयाणा पंजाबपासून विलग करून पंजाबी भाषिक राज्याच्या निर्मितीला मान्यता दिली.

१९७१ मध्ये ग्यानी झैलसिंग हे पंजाबचे मुख्यमंत्री बनले. शिखांच्या धार्मिक भावनांना खतपाणी घालून अकाली नेतृत्व स्वतःकडे घेण्याचा प्रयत्न त्यांनी चालविला. त्यामुळे अकाली नेते चांगलेच संतप्त झाले. आणि त्यांनी स्वतंत्र शीख राज्याची 'खलिस्तानची' मागणी पुढे दामटली. तसे करण्यात जगजितसिंग चौहान आघाडीवर होते. त्या वेळी ते लंडनहून सूत्रे हलवित होते व स्वतःला 'खलिस्तान'चे अध्यक्ष म्हणवून घेत होते.

ज्या ठिकाणी शिखांचे दहावे गुरू गोविंद सिंग यांनी 'खालसा'ची पहिली सभा घेतली होती. त्याच आनंदपूर साहेब या ठिकाणी १९७३ मध्ये अकालींनी एक सभा घेतली. जेथे 'खालसा' सर्वश्रेष्ठ असतील असे एक राज्य भारतात असले पाहिजे, पंजाबात केंद्र सरकारची 'ढवळाढवळ' संरक्षण, परराष्ट्र संबंध, मुद्रा व दळणवळण यापुरतीच मर्यादित असावी; अशा आशयाचा ठराव तेथे पारित केला. त्यात 'खलिस्तान' हा शब्द स्पष्टपणे वापरलेला नसला तरी स्वायत्तता व स्वातंत्र्य यातील सीमारेषा धूसर असावी, अशा हेतूने मोठ्या कौशल्याने त्या ठरावाचे शब्दांकन करण्यात आले होते. सार्वभौम सत्ता हातात असल्याशिवाय शीख धर्माचे संरक्षण अशक्यच आहे, असे उघडपणे त्या ठरावात नमूद केले गेले होते.

पंजाबात दाटणाऱ्या वादळाला अधिक भीषण स्वरूप देणाऱ्या एका शक्तिशाली शीख नेत्याचा उदय १९८० च्या सुमारास पंजाबच्या राजकारणात झाला. ती व्यक्ती म्हणजे जर्नेलसिंग भिंद्रानवाले. १९७७ च्या निवडणुकीत अकाली सत्तेवर आल्यावर, अकाली दलात फूट पाडून त्या सरकारपुढे अडचणी उपस्थित कराव्या याकरिता झैलसिंग व संजय गांधी यांना, एखादा समर्थ शीख नेता हाताशी धरता आला तर हवा होता. त्या दृष्टीने त्यांनी भिंद्रानवाले यांना उचलून धरले.

प्रारंभी कट्टर धर्मवेडाच्या विरुद्ध असलेल्या 'निरंकारी'विरुद्ध भिंद्रानवाले यांनी शस्त्र चालविले. पण १९८१ मध्ये काँग्रेस सत्तारूढ होताच, त्याविरुद्ध अकालींनी धर्मयुद्ध पुकारले व भिंद्रानवाले लागलीच त्याच केवळ सामीलच नव्हे तर अग्रेसर झाले. ९ सप्टेंबर १९८१ रोजी पंजाबातील काही सुप्रसिद्ध वृत्तपत्रांचे मालक व संपादक व आपल्या वृत्तपत्रांतून 'खलिस्तान'ला विरोध करणारे निर्भिड लेखक जगत नारायण यांची हत्या झाली. त्या घटनेने पंजाबात जबरदस्त प्रक्षोभ दाटला. जगत नारायण यांच्या हत्येमागे भिंद्रानवाले यांची योजना होती, अशी दाट आशंका असल्याने त्यांच्या अटकेचा आदेश जारी करण्यात आला. पण पंजाब व हरयाणा यातून भिंद्रानवाले उघडपणे मोटारीतून हिंडत असूनही ते पकडले गेले नाहीत. त्याचे मुख्य कारण होते ते म्हणजे त्याकाळी गृहमंत्री असलेले झैलसिंग. जगत नारायण यांच्या हत्येमुळे संपूर्ण देशात निषेधाची लाट उसळली असूनही भिंद्रानवाले यांना ते संरक्षण देत होते.

'खलिस्तान'च्या फुटीरतावादी समस्येशिवाय पंजाब प्रश्नात आणखीही २ मुद्दे महत्त्वाचे ठरले. एक मुद्दा होता तो अविभाजित पंजाबची राजधनी असलेल्या चंदीगढ संबंधीचा. पंजाब व हरयाणा या दोन्ही राज्यांना राजधानी म्हणून त्या शहराचा उपयोग व्हावा अशी कल्पना होती. पण दोन्ही राज्ये त्याबाबत समाधानी नव्हती. शेवटी, उभय पक्षांत झालेल्या अत्यंत कटू व प्रदीर्घ चर्चेनंतर चंदीगढ पंजाबकडे जावे त्या मोबदल्यात हरयाणा सीमेवरील पंजाबचा अबोहर व फाजिल्काचा हिंदू बहुसंख्य लोकवस्तीचा छोटासाच परंतु सुपीक प्रदेश हरयाणाला दिला जावा. असा निवाडा इंदिरा गांधींनी १९७० मध्ये दिला होता व तो दोन्ही पक्षांना मान्यही होता.

दुसरा महत्वाचा मुद्दा होता तो रावी, बियास व सतलज या तीन नद्यांच्या पाण्यासंबंधीचा. या नद्यांचे पाणी, काही प्रमाणात राजस्थानच्या तृषार्त भूमीलाही पुरविले जाणार होते व

त्याकरिता कालवे बांधणीचे काम चालू होते. पंजाबातील सधन शेतकऱ्यांना त्या नद्यांचे पाणी साहजिकच महत्त्वाचे वाटत होते आणि त्याची जाणीव असल्याने त्या नद्यांचे पाणी पंजाबला कमी पडू देणार नाही, असे आश्वासन काँग्रेस सरकारने दिलेही होते. तरीही अकालींना समाधन नव्हते. पंजाब प्रश्नाचे गांभीर्य अनर्थकारक ठरण्यास, अकाली पक्षाचे नेते व त्यांच्या चळवळीचे सूत्रधार हरचंद सिंग लोंगोवाल, शीख प्रार्थना मंदिराचे व सुवर्ण मंदिराचे नियंत्रक गुरुचरण सिंग तोहरा व पंजाबचे माजी मुख्यमंत्री प्रकाशसिंग बादल ही त्रिमूर्ती फार मोठ्या प्रमाणात जबाबदार होती. त्या तिघांत परस्पर द्वेष, स्पर्धा व महत्त्वाकांक्षेचा टकराव तर होताच शिवाय केवळ भीतीपोटी भिंद्रानवाले व हत्या करण्यात निष्णात असलेले त्यांचे समर्थक यांना त्यांनी कोणताच विरोध न करता मोकळे रान करून दिले.

अकाली व सरकार यांच्यात १९८३ मध्ये पुन्हा वाटाघाटी झाल्या. त्या फिसकटताच शिख दहशतवाद्यांच्या हिंसाचाराला पुन्हा उधाण झाले. २३ एप्रिल १९८३ रोजी अमृतसर येथील अत्यंत धर्मनिष्ठ असलेले ज्येष्ठ पोलीस अधिकारी डेप्युटी इन्स्पेक्टर जनरल ए. एस. अटवाल यांची सुवर्ण मंदिरात दहशतवाद्यांनी हत्या केली.

शिखांच्या सर्वात पवित्र मानल्या गेलेल्या त्या प्रार्थना मंदिराच्या महाद्वाराशी अटवाल यांच्या निष्प्राण देह काही वेळ तसाच पडून होता. त्याचा ताबा घेण्याकरिता जिल्हाधिकाऱ्याला मंदिराच्या प्रमुखाकडे दोन तास विनवण्या कराव्या लागल्या.

हिंदू लोकांत दहशत निर्माण करून पंजाबातून त्यांना हाकलून लावण्याच्या उद्देशाने ५ ऑक्टोबर १९८३ रोजी शीख दहशतवाद्यांनी एक बस अडवून त्यातील हिंदू प्रवाशांची सरसकट कत्तल केली. दुसऱ्या दिवशी इंदिरा गांधींनी दरबारसिंग मंत्रिमंडळ बरखास्त करून पंजाब केंद्र शासनाखाली घेतले पण दहशतवाद्यांवर आता कशाचाच परिणाम होत नव्हता. एप्रिल १९८४ मध्ये त्यांनी पंजाबातील सदतीस रेल्वेस्थानकांना आगी लावून दिल्या.

अशा परिस्थितीत, लवकरच सुवर्ण मंदिरात शिरून सरकार त्यांना अटक करील अशी भिंद्रानवाले यांची अटकळ होती. म्हणून तशी कार्यवाही करणे अत्यंत कठीण व्हावे या हेतूने त्या मंदिराची संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यास त्यांनी प्रारंभ केला. त्या उद्योगात व जास्तीत जास्त शस्त्रसंचय करण्यात, त्यांना सेवानिवृत्त झालेले मेजर जनरल शहाबेग सिंग यांची भरीव मदत झाली. बांगलादेश युद्धात ते आघाडीवर होते. पण नंतर भ्रष्टाचाराच्या गुन्ह्याकरिता त्यांना नोकरीवरून दूर करण्यात आले होते. भिंद्रानवाले अशी लष्करी सिद्धता करीत आहेत ते दिसत असूनही पंजाबातील कोणत्याही नेत्याने त्यांना अडविण्याचा यत्किंचितही प्रयत्न केला नाही. लवकरच, सुवर्ण मंदिरात, खलिस्तानच्या हेतूने, शस्त्रास्त्रे ठासून भरली गेली. मोठ्यां संख्येने अतिरेकी तळहातावर शिर घेऊन लढ्याला सिद्ध झाले. शिखांच्या त्या सर्वाधिक पवित्र मानल्या गेलेल्या मंदिराचे रूपांतर मजबूत बालेकिल्ल्यात झाले.

अशा परिस्थितीत भिंद्रानवाले यांच्याविरुद्ध लष्करी कार्यवाही करण्याशिवाय इंदिरा गांधींसमोर अन्य पर्यायच उरला नाही. या वेळी पंजाबातील परिस्थिती आटोक्याबाहेर जात असल्याचे जाणवून लोंगोवालही अस्वस्थ झाले होते. ती संधी साधून पुन्हा एकदा पंजाब समस्येची उकल वाटाघाटीद्वारा करण्याचा प्रयत्न इंदिरा गांधींनी केला. चंदीगढच्या मोबदल्यात

अबोहर व फाजिल्का हे प्रदेश हरयाणाला न दिले तरी चालेल; त्याऐवजी फक्त पंजाब-हरयाणा सीमेवरील एक गाव जरी दिले, तरी चंदीगढ पंजाबच्या हाती सोपविले जाईल. असे आश्वासन त्यांनी अकाली नेत्यांना दिले. त्यांनी अट फक्त एकच होती. ती म्हणजे या तडजोडीला भिंद्रानवाले यांनी मान्यता दिली पाहिजे.

लोंगोवाल, तोहरा व बादल या तिघाही अकाली नेत्यांनी या तडजोडीला आनंदाने स्वीकृती दिली. भिंद्रानवाले यांची संमती मिळवून घेण्याची जबाबदारी तोहरा यांनी स्वीकारली पण भिंद्रानवाले काहीही ऐकून घ्यायला तयार नव्हते. आनंदपूर साहेब ठरावाला मान्यता मिळवून घेऊन त्याची अंमलबजावणी झालीच पाहिजे. त्याऐवजी कोणतीही अशी तडजोड केवळ भ्याड, विश्वासघातकी व स्वार्थी लोकच करू शकतात असे उत्तर तोहरांना देऊन भिंद्रानवाले यांनी ती सूचना फेटाळून लावली. आनंदपूर साहेब ठरावाला मान्यता देणे म्हणजे धर्मनिरपेक्ष भारतात एका धर्माधिष्ठित राज्याची उभारणी करणे किंवा भारताचा आणखी एक भूप्रदेश भारतापासून विलग होण्याला संमती देणे असाच त्याचा अर्थ होत होता. ते काँग्रेस सरकारला मान्य होणे शक्यच नव्हते.

**ऑपरेशन ब्लू स्टार : इंदिरा गांधींची हत्या**

पंजाब समस्येची शांततापूर्ण मार्गाने उकल करण्याचा अखेरचा प्रयत्न म्हणून २ जून १९८४ रोजी दूरदर्शन व आकाशवाणी या दोन्ही प्रसार माध्यमांवरून इंदिरा गांधींनी वाटाघाटीकरिता अकालींना आवाहन केले पण त्यांच्याकडून प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे अत्यंत नाइलाजाने, सुवर्ण मंदिरातून दहशतवाद्यांचे उच्चाटन करण्याकरिता लष्करी कार्यवाहीचा आदेश त्यांनी जारी केला.

ते उद्दिष्ट साध्य करण्याचे काम अपेक्षेपेक्षा बरेच अवघड ठरले. भिंद्रानवाले यांनी उभारलेल्या तटबंदीची मजबुती, दहशतवाद्यांजवळ असलेल्या अत्याधुनिक शस्त्रास्त्रांचा साठा व त्यांची आघातक्षमता यांचा बरोबर अंदाज सरकारला नव्हता. रणगाडे व तोफांचा वापर करणे शेवटी सरकारला भाग पडले. त्या संघर्षात भिंद्रानवाले, त्यांचे अनुयायी व लष्करातील सैनिक यांसह शेकडो माणसे मृत्युमुखी. अकाल तख्तची इमारत जवळजवळ भूईसपाट झाली. सर्वात पवित्र मानल्या गेलेल्या हरमंदिर साहेब या प्रार्थनास्थळालाही धक्का लागला.

'ऑपरेशन ब्लू स्टार'ची कार्यवाही ६ जून रोजी संपली. ३१ ऑक्टोबर १९८४ रोजी सकाळी त्यांच्या अकबर रोड कार्यालयासमोरच्या हिरवळीवर ब्रिटिश नाटककार, अभिनेते व विनोदी लेखक पीटर उत्सीनोव दूरदर्शकरिता त्यांची मुलाखत घेणार होते. त्याकरिता हलकी न्याहारी करून सकाळी ९ वाजता त्या आपल्या घरून कार्यालयाकडे निघाल्या. दोन्ही इमारती एकाच आवारात होत्या. मध्ये त्यांना विभागणारे साधे कुंपण होते.

कुंपणाच्या छोट्या फाटकावर त्या सकाळी सबइन्स्पेक्टर बियांतसिंग व कॉन्स्टेबल सतवंतसिंग पहाऱ्यावर होते. बियांतसिंग नऊ वर्षांपासून इंदिरा गांधींच्या विश्वासू अंगरक्षकांपैकी एक होते. परदेश दौऱ्यावर ते अनेकदा त्यांच्याबरोबर गेलेले होते. पण काही दिवसांपासून गुरुद्वारात माथेफिरू शीख अतिरेक्यांशी त्यांच्या भेटीगाठी होत असल्याचे कळल्यामुळे

साशंक होऊन सुरक्षा अधिकाऱ्यांनी दिल्लीच्या सशस्त्र पोलिसदलात त्यांची बदली केली होती. पण बियांतसिंगानी त्याबद्दल सरळ इंदिरा गांधींना विनंती करून ती बदली रद्द करवून घेतली होती. वयाची विशीही न ओलांडलेले सतवंतसिंग हे पंजाबच्या गुरुदासपूर जिल्ह्यातील त्यांच्या खेड्यातून सुटी संपवून नुकतेच दिल्लीला परतले होते. बियांतसिंगबरोबर पहाऱ्यावर आपली नेमणूक व्हावी, अशी व्यवस्था त्यांनी करून घेतली होती.

प्रधानमंत्री कोठेही गेल्या तरी त्यांच्याभोवती अंगरक्षकांचे कडे असावे असा नियम होता. पण त्या सकाळी त्या बाहेर अशा पडलेल्याच नव्हत्या. त्यामुळे की काय, तोही नियम पाळण्यात आला नव्हता. इंदिरा गांधी झपाझप पावले टाकीत सर्वांच्या समोर चालल्या होत्या. त्यांच्या किंचित मागे चालत होते त्यांचे मदतनीस आर. के. धवन. त्यांचे सुरक्षा सैनिक धवन यांच्याही मागून चालत होते. कुंपणाच्या फाटकाशी पोहचताच इंदिरा गांधी यांनी बियांतसिंगांना नमस्ते म्हटले आणि त्याच बियांतसिंगांनी जवळच्या पिस्तुलाने त्यांच्यावर गोळ्या झाडल्या. त्या कोलमडताच सतवंतसिंगांनी त्याच्या हाती असलेल्या स्टेगनच्या सगळ्या गोळ्या त्यांच्यावर झाडल्या. काही सेकंदात सगळे आटोपले. गोळ्यांचा धडाका ऐकताच क्षणभर सगळे सून्न झाले. पण लागलीच चोहो दिशांनी धावपळीला सुरुवात झाली. प्रधानमंत्री निवासाबाहेर व कार्यालयाबाहेर पहाऱ्यावर असलेले इंडो तिबेट सीमा कमांडोंनी लागलीच बियांत व सतवंत यांना पकडून नजीकच्या पहारेकऱ्यांच्या खोलीत नेले. तेथे झालेल्या झटापटीत बियांतसिंग मारले गेले. तर सतवंत जखमी झाले. त्यांच्यावर भरण्यात आलेल्या खटल्याचा निकाल चार साडेचार वर्षांनंतर लागला व १९८९ मध्ये त्यांना फाशी देण्यात आली.

गोळ्यांचा आवाज ऐकताच इंदिरा गांधींच्या स्नुषा सोनिया गांधी धावतच बाहेर आल्या आणि रक्ताच्या थारोळ्यात जमिनीवर पडलेल्या इंदिरा गांधींना त्यांनी व धवन यांनी कसेबसे ॲम्बॅसडर गाडीत घालून ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेसमध्ये नेले. तेथे त्यांच्यावर तत्काळ उपचार सुरू झाले.

इंदिरा गांधींना वाचविण्याचे डॉक्टरांचे सर्व प्रयत्न अपयशी ठरले. त्यांच्या शरीरात वीसपेक्षाही अधिक गोळ्या रूतून बसल्या होत्या. त्यांना घेऊन इन्स्टिट्यूटमध्ये गाडी आली. तेव्हाच काही आशा उरली नव्हती. त्यांची प्राणज्योत विझली गेली.

### ३.२.१.२. राजीव गांधी

३१ ऑक्टोबर १९८४ रोजी देशाच्या पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांची त्यांच्याच अंगरक्षकांनी गोळ्या घालून निर्घृण हत्या केली. या बातमीने सारा देश हादरून गेला. अशा स्थितीत कोणताही वाद न घालता काँग्रेस श्रेष्ठींनी पंतप्रधानपदाची सूत्रे राजीव गांधींच्या हाती सोपविण्याचा निर्णय ३१ ऑक्टोबरच्या रात्री घेतला.

#### नवा शैक्षणिक उपक्रम

देश स्वतंत्र होऊन चाळीस वर्षे होत आली तरी ६० टक्के लोक निरक्षर होते. त्यांना साक्षर व सज्ञान करणे व त्यांच्यातील सुप्त शक्तीचा वापर देशाच्या विकासासाठी करून घेणे

आवश्यक असल्याने शैक्षणिक विकासावर विशेष भर देण्यात आला. दूरदर्शनचे संच ग्रामीण भागात उपलब्ध करून देण्याची सोय करण्यात आली. १९६८ साली निर्धारित केलेल्या शिक्षण व्यवस्थेत सुधारणा करण्याच्या हेतूने १९८६ साली नव्या शैक्षणिक धोरणाचा सूत्रपात करण्यात आला. या धोरणानुसार १५ ते ३५ वयोगटातील लोकांत साक्षरता प्रसार करणे, त्याद्वारा त्यांना कुटुंब नियोजन, राष्ट्रीय ऐक्य, विज्ञानाचे व तंत्रज्ञानाचे महत्त्व, लसीकरण, महिलांचे सबलीकरण इत्यादी विषयांची माहिती करून देणे हे उद्दिष्ट होते.

या शासनकाळातील सर्वात लक्षणीय शैक्षणिक उपक्रम म्हणजे ग्रामीण भागातून झालेली नवोदय विद्यालयाची स्थापना हा होय. ग्रामीण भागातील होतकरू, हुशार मुलांना अद्ययावत शिक्षण मिळावे या हेतूने ज्या जिल्ह्यात शाळा नसतील तेथे नवोदय विद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बौद्धिक क्षमतेच्या आधारे मुलामुलींची निवड करून त्यांना नवोदय विद्यालयात प्रवेश द्यायचा, त्यांच्या निवासाची तेथेच व्यवस्था करायची, तो सर्व खर्च शासनाने करावयाचा, त्यांना अद्ययावत व मूल्याधारित शिक्षण देऊन आधुनिक समाजाचे घटक म्हणून जगण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण करावयाची असे या योजनेचे स्वरूप होते. देशातील शिक्षणतज्ज्ञांच्या मदतीने हा उपक्रम आखण्यात आला.

या कालावधीतील आणखी एक महत्त्वाचा शैक्षणिक उपक्रम म्हणजे नोव्हेंबर १९८५ मध्ये इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठाची स्थापना होय. निरंतर शिक्षणाच्या संकल्पनेवर आधारित असलेले हे विद्यापीठ जगातले मोठे मुक्त विद्यापीठ ठरले. ज्यांना शिक्षणाची आवड असूनही काही अडचणींमुळे उच्च शिक्षण घेतात आले नाही त्यांना या विद्यापीठाने उच्च शिक्षणाचा राजमार्ग मोकळा करून दिला.

### दूरसंचार व्यवस्थेचे आधुनिकीकरण

उद्योग व व्यापार वृद्धी, देशाच्या कानाकोपऱ्याशी सुलभ संपर्क, बाहेरील जगाशी देवघेव इत्यादीसाठी दूरसंचार व्यवस्थेचे आधुनिकीकरण आवश्यक होते. राजीव अमेरिकेच्या दौऱ्यावर असताना सॅम पित्रोडा या दूरसंचार क्षेत्रात लक्षणीय कार्य केलेल्या भारतीय व्यक्तीशी त्यांचा परिचय झाला. या क्षेत्रातील त्यांना अनुभव व कार्यक्षमता ध्यानात घेऊन भारतात हे काम करण्याची जबाबदारी पित्रोडांवर सोपविण्यात आली. त्यासाठी दूरसंचार मंडळ राष्ट्रीय स्तरावर स्थापन करण्यात येऊन त्याचे अध्यक्षपद पित्रोडांना देण्यात आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली या क्षेत्रात केवळ पाच वर्षांच्या अवधित क्रांतिकारी परिवर्तन घडून आले. १९८६ साली स्थापन झालेल्या दूरसंचार आयोगाने देशभर भूमिगत केबलचे जाळे पसरले आणि मागेल त्याला अल्पावधित दूरभाष यंत्राची सोय उपलब्ध करून दिली. बाहेरच्या देशांशी संपर्क प्रस्थापित करण्यासाठी व्ही. एस. एन. एल. स्थापन करण्यात आले.

उद्योजकांना व इंजिनिअर्सना भारतात संगणक तयार करण्यात शासनाकडून प्रोत्साहन देण्यात आले. शासकीय कार्यालये, बँका, शिक्षण संस्था इत्यादीतून संगणकाचा वापर करण्यास उत्तेजन देण्यात आले. त्यासाठी लोकांना प्रशिक्षण देण्याची सोय करण्यात आली. या दृष्टीने तज्ज्ञांचा ताफा हाताशी धरण्यात आला. वेगवेगळे सॉफ्टवेअर तयार करण्याचे उपक्रम हाती घेण्याच्या सोयी तरुणांना उपलब्ध करून देण्यात आल्या. विदेशी संगणक

कंपन्यांना भारतात प्रवेश करण्यास परवानगी देण्यात आली. या क्षेत्रात उच्च दर्जाचे ज्ञान प्राप्त करून घेऊ इच्छिणाऱ्या महत्त्वाकांक्षी तरुणांना परदेशी जाण्यास मदत उपलब्ध करून देण्यात आली.

### संसदीय कामकाज

१९८५ साली 'ॲण्टी डिफेक्शन ॲक्ट' हा अशिय महत्त्वाचा कायदा पास झाला. लोकसभेच्या सदस्य म्हणून एखाद्या पक्षातर्फे निवडून आल्यानंतर त्याने संसद सदस्यत्वाचा कार्यकाळ संपण्यापूर्वी पक्षांतर करण्यावर अंकुश लावणारा हा कायदा होता.

एका राजकीय पक्षातर्फे संसदेत निवडून आल्यानंतर, त्या पक्षाच्या संसदेतील एकूण सदस्यांच्या १/३ सदस्यांनी पक्ष सोडण्याचा एकत्रित निर्णय घेतला. तरच त्या गटाला स्वतंत्र पक्षाचा दर्जा मिळेल व लोकसभेचे सदस्यत्व कायम राहील, मात्र एकट्या दुकट्या सदस्याने त्या काळात पक्षांतर केल्यास त्याचे लोकसभेचे सभासदत्व रद्द केले जाईल, अशी तरतूद या कायद्याने केली. राजकीय क्षेत्रात वाढू लागलेल्या अनिष्ट स्वार्थी प्रवृत्तीला काही अंशी आळा बसण्याच्या आणि मतदारांप्रती त्याचे उत्तरदायित्व आहे. याची जाणीव निर्वाचित सदस्यांना करून देण्याच्या दृष्टीने हा कायदा महत्त्वाचा ठरला.

सांस्कृतिक वारसा हा देशाचा अनमोल ठेवा आहे. भारतीय अस्मितेचा तो भक्कम अनन्यसाधारण आधार आहे, या ठाम धारणेच्या आधारे देशाचे सांस्कृतिक ऐक्य भारतीय जनतेच्या मनावर बिंबण्याच्या हेतूने देशाच्या भिन्न भागांमध्ये सांस्कृतिक केंद्रांची स्थापना करण्यात आली. अशी सात केंद्रे, पतियाळा, उदयपूर, अलाहाबाद, तंजावर, शांतिनिकेतन, दिनापूर व नागपूर येथे स्थापन झाली. या केंद्राद्वारा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आणि स्थानिक लोककलांना, आदिवासी कलावंतांना जनतेपुढे आणून त्यांना लोकमान्यता मिळवून देण्यात आवश्यक तो निधी उपलब्ध करून देण्यात आला. तसेच भारताच्या संपन्न वैविध्यपूर्ण संस्कृतीचा व विविध परंपरागत कलांचा परिचय परकीयांना करून देण्याच्या हेतूने भारताबाहेर इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स, रशिया, जपान इत्यादी अनेक देशांत भारत महोत्सवाचे आयोजन करण्याचा उपक्रम राबविण्यात आला.

राजीव गांधींच्या शासन कार्याचे एक लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे सत्तारूढ होताच संघर्षाचा आक्रमक पवित्रा न घेता सामंजस्याच्या धोरणाने वादग्रस्त समस्यांचे निराकरण करण्याचा त्यांनी केलेले प्रयत्न हे होय. १९८५ ते ८७ च्या दरम्यान देशातील तीन भागात पंजाब, आसाम व मिझोराममधील हिंसक चळवळी शमवण्याच्या हेतूने तेथील नेत्यांशी वाटाघाटी करून शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

### शहाबानू प्रकरण

केरळमधील शहाबानू नावाच्या एकावृद्ध घटस्फोटित महिलेने महंमद अहमद खान नावाच्या आपल्या पूर्वीच्या पतीविरुद्ध न्यायालयात खटला भरला. पोटगी दाखल त्याने दर महिन्याला तिला ठराविक रक्कम द्यावी, अशी तिची मागणी होती. अशा प्रकारचा एक कायदा पंधरा वर्षांपूर्वी झाला होता. त्यावेळी त्याकडे कोणाचे लक्ष वेधले गेले नव्हते. १९८६ मध्ये या खटल्याचा निकाल घोषित करतांना सर्वोच्च न्यायालयाने तिचा पोटगीचा अधिकार

मान्य केलाच, पण त्याच बरोबर देशात लोकशाही व्यवस्थेत सर्व नागरिकांना समान कायदा लागू असावा असे विधान केले. या वक्तव्यामुळे देशातील कडव्या धर्मनिष्ठ मुस्लीम गोटात खळबळ माजली.

भारतात मुस्लीम समाजाचा वैयक्तिक बाबतीत शरियत कायदा लागू होता व या कायद्याप्रमाणे तलाक झाल्यावर इद्दतचा कालावधी संपल्यानंतर घटस्फोटित पत्नीच्या भरण पोषणाची जबाबदारी पतीवर रहात नाही. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय इस्लाम धर्मावर व मुस्लिमांच्या समाजजीवनावर प्रहार करणारा आहे असा आरोप कडव्या धर्मनिष्ठ मुस्लिमांनी केला व या निर्णयाविरुद्ध सभा, निदर्शने, मोर्चे यांचे सत्र सुरू केले. या निकालामुळे इस्लाम धोक्यात आला आहे, असा अपप्रचार करून मुस्लीम मूलतत्त्ववादी गट मुस्लीम जनतेच्या धर्म भावना भडकवू लागले. त्यामुळे देशांत सांप्रदायित्व तणाव निर्माण झाला.

Muslim Women's Protection of Rights on Devorce Bill त्यानुसार १९८६ मध्ये लोकसभेत मांडण्यात आले व पारित झाले.

## ३.२.२. राजीव गांधीनंतर

### ३.२.२.१. विश्वनाथ प्रतापसिंग

काँग्रेसमधून बाहेर काढलेली अरुण नेहरू, सतपाल मलिक, विद्याचरण शुक्ला, आरिफ महंमद खानासारखी काही असंतुष्ट मंडळी व्ही. पी. सिंगांभोवती एकत्र आली आणि त्यांनी २ ऑक्टोबर १९८७ रोजी महात्मा गांधींच्या जन्मदिनी (जन मोर्चा) या नावाने एका राजकीय गटाची स्थापना केली.

काँग्रेस विरोधी वेगवेगळ्या राष्ट्रीय व प्रादेशिक पक्ष नेत्यांशी, कामगार नेत्यांशी त्यांनी वाटाघाटी केल्या. या वाटाघाटींचे फलित म्हणून ६ ऑगस्ट १९८८ रोजी या पक्षांनी मिळून राष्ट्रीय आघाडी तयार केली. तर ११ ऑक्टोबर १९८८ रोजी जनमोर्चा, काँग्रेस (एस्.), जनता पक्ष व लोकदल यांचे एकत्रीकरण करून जनता दलाची स्थापना झाल्याचे घोषित करण्यात आले.

१९८९ च्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ १९७ जागा मिळाल्या. जनता दलाला त्यापेक्षा कमी म्हणजे १४६ जागा मिळाल्या. काँग्रेसला स्पष्ट बहुमत न मिळाल्यामुळे काँग्रेस मंत्रिमंडळ बनविणार नाही, अशी भूमिका राजीव गांधींनी घेतली. तेव्हा केवळ १४६ सदस्य असलेले जनता दल मित्रपक्षांच्या साहाय्याने मंत्रिमंडळ बनविण्यास पुढे आले.

डाव्या पक्षांनी सरकारात सामील न होता जनता दल शासनाला बाहेरून पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला, असाच निर्णय भाजपनेही घेतला. अखेरीस जनता दलाचे अल्पमतातील सरकार भाजप व डाव्या पक्षांच्या खांद्यांवर विसंबून देशाचा राज्यकारभार चालविणार असे ठरले. ६ डिसेंबर १९८९ रोजी सिंग मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पडला.

व्ही. पी. सिंग सरकारला बोफोर्स तोफा प्रकरणाची पंधरा दिवसात चौकशी पूर्ण करून गुन्हेगाराला जनतेपुढे उभे करण्याचे निवडणुकीच्या काळात भारतीय नागरिकांना दिलेले

आश्वासनही पूर्ण करता आले नाही. केंद्रीय गुप्तचर खात्याला व्यापक अधिकार देऊन स्वीडनला पाठविण्यात आले. स्वीडिश सरकारने बोफोर्स कंपनीवर दडपण आणावे म्हणून प्रयत्न झाले. या सर्व कारवायांवर अमाप पैसा खर्च करण्यात आला. परंतु त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही यापुढे भारत सरकार बोफोर्स कंपनीशी कोणताही व्यवहार करणार नाही, असा निर्णय तेवढा सिंग सरकारने घेतला.

या दरम्यान मंडल आयोगाच्या शिफारशीबाबत पंतप्रधानांनी केलेल्या घोषणांविरुद्धची जनतेची तीव्र प्रतिक्रिया लक्षात घेऊन भाजपने लोकमताचा ओघ आपल्या पक्षाकडे वळविण्यासाठी प्रचार मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला. गुजराथेतील सुप्रसिद्ध सोमनाथ मंदिरापासून ज्येष्ठ भाजप नेते लालकृष्ण अडवाणी यांनी रथयात्रा सुरू केली. २५ सप्टेंबरला निघालेली ही रथयात्रा ६००० मैलांचे अंतर कापून अयोध्येला जाऊन थांबणार होती. यामुळे सांप्रदायिक तणाव वाढेल अशी ओरड काँग्रेसचे, अधिकाररूढ पक्षाचे व डावे सदस्य करू लागले. अखेरीस २३ ऑक्टोबर रोजी बिहारमधील समस्तीपूरला रथयात्रा अडविण्यात येऊन अडवाणींना अटक करण्यात आली. लागलीच भाजपने सिंग सरकारला दिलेले समर्थन मागे घेतल्याची घोषणा केली. विश्व हिंदू परिषदेने अडवाणींच्या रथयात्रेच्या वेळी अयोध्येत राममंदिर बांधण्याचा मानस घोषित केला होता. त्यासाठी हजारो रामभक्त अयोध्येत गोळा झाले. मशिदीनजीकच्या वादग्रस्त भागात शिरून मशिदीच्या घुमटावर चढून ते मोठमोठ्याने घोषणा देऊ लागले. परिस्थिती आटोक्याबाहेर जाऊ लागल्याने या जमावावर ३० ऑक्टोबर रोजी गोळीबार करण्यात आला. यामुळे उत्तर भागात अनेक ठिकाणी वातावरण तंग झाले. सांप्रदायिक तणाव वाढला.

या सर्व घडामोडींचा कळस ५ नोव्हेंबर रोजी झाला. त्यादिवशी जनता दलात फूट पडली. चंद्रशेखर यांच्या नेतृत्वाखाली पक्षाचे ५८ सदस्य पक्षाबाहेर पडले. त्यात देवीलाल आघाडीवर होते. इतक्या मोठ्या संख्येने पक्ष सदस्य बाहेर पडल्यानंतर व भाजपने पाठिंबा काढून घेतल्यानंतर सिंग सरकार टिकणे शक्य नव्हते. परंतु सिंग यांनी पायउतार होण्याचा निर्णय लागलीच न घेता आपले बहुमत सिद्ध करण्यास पंधरा दिवसांचा अवधी मागून घेतला. काँग्रेस व भाजपमधील काही सदस्यांना आपल्याकडे वळवून सरकार टिकवता येईल ही अपेक्षा त्यामागे असावी. परंतु असे घडले नाही, अखेरीस ७ नोव्हेंबर रोजी सिंग सरकार गडगडले. एकूण सिंग सरकारचा अकरा महिन्यांचा कार्यकाळ वादळी ठरला.

### ३.२.२.२. चंद्रशेखर

सिंग यांचे जनता दलाचे सरकार कोलमडले. त्या वेळी देशात चमत्कारिक राजकीय स्थिती निर्माण झाली. जनता दलात पडलेली फूट आणि भाजपने काढून घेतलेला पाठिंबा यामुळे जनता दलातील दुसऱ्या एखाद्या नेत्याने मंत्रिमंडळ बनविणे अशक्य होते. काँग्रेसला बाहेरून समर्थन मिळवून सरकार बनविता आले असते. परंतु लोकमताचा कौल असल्याखेरीज सरकार न बनविण्याचा काँग्रेसचा ठाम निर्णय होता. एक वर्षाच्या आत पुन्हा सार्वत्रिक निवडणुका घेणे खर्चाचे तर होतेच, शिवाय देशातील प्रक्षुब्ध जनमत लक्षात घेता ते दुरापास्त व विघातकही होते. अशा स्थितीत जनता दलाबाहेर पडलेल्या गटाने चंद्रशेखर यांच्या

नेतृत्वाखाली सरकार बनवावे असा पर्याय पुढे आला. या शासनात काँग्रेसने सामील व्हावे असा प्रयत्न करण्यात आला. परंतु सरकारात प्रत्यक्ष सामील न होता चंद्रशेखर सरकारला बाहेरून समर्थन देण्याची तयारी काँग्रेसने दर्शविली. डाव्या पक्षानेही अशीच भूमिका घेतली. अखेरीस १० नोव्हेंबर रोजी चंद्रशेखर सरकार सत्तारूढ झाले.

चंद्रशेखर मंत्रिमंडळात उपपंतप्रधानपद देवीलाल यांना देण्यात आले आणि परराष्ट्र खाते विद्याचरण शुक्ला यांच्या हाती सोपविण्यात आले. चंद्रशेखर स्वतः राजकारणात मुरलेले अनुभवी नेते होते. १९७० पासून जे राजकारणात सक्रिय होते. प्रारंभी इंदिरा गांधींच्या निकटच्या वर्तुळात असलेले चंद्रशेखर आणीबाणीच्या काळात जयप्रकाशांच्या चळवळीत सामील झाले. त्या काळात त्यांना काही दिवस कारावास घडला. बाहेर आल्यानंतर जनता पक्षाची उभारणी करण्यात त्यांचा मोठा वाटा होता.

प्रारंभी चंद्रशेखर शासनापुढे दोन अडचणी होत्या. एक तर मंडळ आयोगाकडून देशात निर्माण झालेला प्रक्षोभ तोवर काहीसा शमला असला तरी बाबरी मशिदीवरून वाढलेला सांप्रदायिक तणाव अजूनही कायम होता आणि दुसरी महत्त्वाची अडचण म्हणजे संसदेत त्यांना बहुमताचा ठाम पाठिंबा नव्हता. काँग्रेस किती काळ पाठिशी राहील याची शाश्वती नव्हती.

अशात राजीवजींच्या निवासस्थानी काही गुप्तहेर काम करीत असल्याचे उघडकीस आले. हे गुप्तहेर चंद्रशेखर यांनी आपल्या निवासस्थानी पेरले असल्याची राजीवजींना दाट शंका आली. चंद्रशेखर यांनी हा आरोप निखालस खोटा असल्याचे जाहीरपणे सांगितले आणि त्या प्रकारची योग्य ती चौकशी करण्याचे आश्वासन दिले. हेरगिरी करणारे हरियाणाचे काही पोलीस होते. त्यांच्या विरुद्ध ताबडतोब कडक कारवाई करण्याची मागणी काँग्रेसने केली. तेव्हा चौकशीनंतर जो गुन्हेगार सिद्ध होईल, त्याविरुद्ध कारवाई केली जाईल असे सांगितले. परंतु केवळ संशयावरून कारवाई करणार नाही, असे पंतप्रधान चंद्रशेखर यांनी निक्षून सांगितले. यावर काँग्रेस सदस्यांनी सभात्याग केला. काँग्रेस हा चंद्रशेखर सरकारचा मुख्य आधारस्तंभ होता. तो कोसळताच चंद्रशेखर यांनी ७ मार्च रोजी आपल्या सरकारचा राजीनामा संसदेला सादर केला. चंद्रशेखर यांचे औटघटकेचे सरकार १२० दिवसातच कोलमडले.

चंद्रशेखर यांचा राजीनामा आणि लोकसभेचे विसर्जन यामध्ये सहा दिवसांचा अवधी होता. या दरम्यान नवे सरकार बनविण्याबाबत वेगवेगळी राजकीय समीकरणे तयार करण्यात राजकीय नेते गुंतले होते. भाजपने सरकार बनविण्याची तयारी दर्शविली. परंतु राष्ट्रपतींनी ती अवास्तव वाटल्यामुळे ती अमान्य केली. राष्ट्रीय सरकारची कल्पनाही विचाराधीन होती. परंतु तिला मूर्त रूप आले नाही. शेवटी लोकसभेच्या विसर्जनाचा निर्णय नाईलाजाने घेण्यात आला आणि सार्वत्रिक निवडणुका मे १९९१ मध्ये घेण्याची घोषणा करण्यात आली.

निवडणुकीच्या दरम्यान राजीव गांधींच्या झालेल्या भयानक हत्येमुळे व त्यांना प्रचार सभांतून मिळत असलेला जनतेचा अनुकूल कौल लक्षात घेता काँग्रेसला १९८४ सालाप्रमाणे प्रचंड बहुमत मिळेल अशी काहींना असलेली अपेक्षा पूर्णतः फलद्रूप झाली नाही.

अखेरीस काँग्रेस पक्षाने ज्येष्ठ अनुभवी नेते नरसिंहराव यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ गठित करण्याचा निर्णय घेतला. २१ जून १९९१ रोजी देशाचे नववे पंतप्रधान म्हणून सत्तर वर्षांच्या नरसिंह रावांचा शपथविधी झाला.

### ३.२.२.३. पामुलपर्ती वेंकट नरसिंहराव

राजकारणातून निवृत्त होण्याच्या उद्देशाने त्यांनी इ. स. १९९१ ची लोकसभा निवडणूक लढवली नाही. मात्र निवडणूक प्रचारादरम्यान काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि पंतप्रधानपदाचे उमेदवार राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यानंतर राव यांची काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड झाली. लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यावर काँग्रेस पक्ष केंद्रात सरकार बनविण्याच्या स्थितीत होता. पक्षाचे नेते म्हणून राव यांची निवड झाली आणि त्यांनी जून २१, इ. स. १९९१ रोजी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली.

### नवे आर्थिक धोरण

अपूर्व अशा आर्थिक आपत्तीतून मार्ग काढण्यासाठी नरसिंहराव सरकारने मनमोहन सिंग या वित्तमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली देशाच्या आर्थिक व्यवस्थेत क्रांतिकारी परिवर्तन घडून आणले. २० टक्क्यांने रुपयाचे अवमूल्यन करण्यात आले. पंचवीस टन सोने दोनशे मिलीयन डॉलर्सचे कर्ज उभारण्यासाठी भारतातून इंग्लंडला पाठविण्यात आले. याविरुद्ध झालेल्या टीकेपुढे केंद्र सरकार नमले नाही. उद्योग व व्यापाराच्याबाबतीत उदारीकरण व परकीय भांडवल गुंतवणुकीला प्रोत्साहन देण्यात आले. त्यासाठी आयात मालावरील कर कमी करण्यात आला व निर्यातीला उत्तेजन देण्यात आले. सार्वजनिक उद्योगात आलेले शैथिल्य दूर करण्यासाठी नवे नियम घालू देण्यात आले. तसेच शासनाने तेथे निर्गुंतवणुकीचे धोरण अंगीकारून सार्वजनिक उद्योगात खाजगी भांडवल गुंतवणुकीचा विस्तार करण्यासाठी प्रचलित कडक नियम शिथिल केले. शासकीय तूट भरून काढण्यासाठी शासकीय खर्चात कपात करण्यात आली. परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना भारतात भांडवल गुंतविण्यास उत्तेजन देण्यात आले. मुख्य म्हणजे परदेशी बहुराष्ट्रीय कंपन्यांना भारतात गुंतविण्यास व उद्योग सुरू करण्यास जो मज्जाव होता तो काहीसा दूर करण्यात आला. हे नवे आर्थिक धोरण उदारीकरण, खाजगीकरण व निर्गुंतवणुकीकरण या ३ तत्त्वावर आधारले गेले. ही धोरणे देशाच्या परंपरागत आर्थिक नीतीच्या तसेच काँग्रेस पक्षाच्या आर्थिक धोरणाच्या विरुद्ध होती. त्यामुळे पक्षातील काही नेत्यांनी या परिवर्तनाला विरोध केला. काही हितसंबंधी गटांचा विरोधही सरकारला पत्करावा लागला. परंतु तो टोकाला गेला नाही. शासनाविरुद्ध ससंदेत मांडले गेलेले तीनही अविश्वास ठराव फेटाळले गेले. याचे इष्ट परिणाम दोन वर्षातच निदर्शनास आले. देशाची आर्थिक स्थिती सुधारली. बदलत्या जागतिक आर्थिक स्थितीच्या अनुषंगाने भारताला आपली धोरणे आखावी लागतील, हे नंतरच्या शासकांच्याही ध्यानात आल्यामुळे जुलै १९९१ पासून सुरू करण्यात आलेला आर्थिक सुधारणांचा प्रवाह नरसिंहरावांच्या उत्तराधिकाऱ्यांनी देखील बदलण्याचा प्रयत्न केला नाही. अशा प्रकारे, पंडित जवाहरलाल नेहरूंच्या काळापासून चालत आलेल्या परंपरागत आर्थिक धोरणाला व्यवहार्य दृष्टिकोनातून नवी दिशा देण्याचे कार्य अल्पमतातील काँग्रेस शासनाने केले.

या अतिशय महत्त्वाच्या सुधारणांव्यतिरिक्त आणखी काही लक्षणीय कामे पाच वर्षांच्या कालावधीत नरसिंहराव शासनाने केली. धार्मिक स्थळांचा गैरवापर करण्यासाठी कडक शिक्षेची तरतूद असलेला कायदा १९९१ साली संमत करण्यात आला. मंडल आयोगाच्या शिफारशीत थोडा बदल करून मागासवर्गातील सधनस्तराला बाजूला सारून इतरांना राखीव जागांची तरतूद १९९३ साली लागू करण्यात आली. नवी दिल्ली या राजधानीच्या शहरालगतच्या प्रदेशाला स्वतंत्र संवैधानिक दर्जा देऊन, त्यासाठी शासनाची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली. त्यासाठी निर्वाचित प्रतिनिधी मंडळाची तरतूद करण्यात आली. लोकसभेच्या कामकाजाचे प्रत्यक्ष चित्रण दूरदर्शनवरून देशवासीयांना दाखविण्याचा प्रारंभ डिसेंबर १९९१ मध्ये झाला.

लोकशाही शासन व्यवस्था देशाच्या तळागाळापर्यंत नेण्याच्या दृष्टीने देशाच्या संविधानात सुधारणा करण्याचा प्रस्ताव डिसेंबर १९९२ मध्ये लोकसभेपुढे मांडण्यात आला. वस्तूतः हा प्रयत्न नवीन नव्हता. राजीव गांधींच्या कार्यकाळात, १९८८ सालच्या थंगन समितीने केलेल्या शिफारशींनुसार पंचायत समित्या अधिक कार्यक्षम होण्यासाठी त्यांना संवैधानिक दर्जा देण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तो प्रस्ताव काँग्रेस विरोधापोटी राज्यसभेने फेटाळून लावला होता. त्या विधेयकात थोडा फेरफार करून पंतप्रधान सिंग यांनी तो लोकसभेपुढे मांडला होता. परंतु त्यांचे सरकार अल्पावधित पाय उतार झाल्याने तो प्रस्ताव पास झाला नाही. अखेरीस नरसिंहराव सरकारने तो पुन्हा आणला. १९९३ साली तो संसदेत पारित झाला व राज्यघटनेत ७३ व ७४ व्या दुरुस्तीने पंचायती व नगरपालिकांना संवैधानिक दर्जा देण्यात आला. अशा प्रकारे राजीव गांधींच्या काँग्रेस शासनाने सुरू केलेल्या कार्याला नरसिंहरावांच्या काँग्रेस शासनाने मूर्त रूप दिले.

वरील विधेयकाने पंचायत समित्या व नगरपालिका यांची घडण, कार्यकाळ व अधिकार याबाबतचा तपशील निर्धारित केला. तसेच जे विषय समित्यांच्या अधीन राहावयाचे होते अशा २९ विषयांची सूची त्यात अंतर्भूत करण्यात आली. तीन प्रकारची प्रतिनिधी मंडळे स्थापन व्हावीत. लहान गावात नगर पंचायत, लहान शहरात म्युनिसिपल कौन्सिल व मोठ्या शहरात महानगरपालिका म्युनिसिपल कॉर्पोरेशन. प्रत्यक्ष निर्वाचन पद्धतीने या समित्या स्थापन करण्यात याव्यात, निर्वाचन क्षेत्रामधील लोकसंख्येतील अनुसूचित जाती व जमातीच्या प्रमाणाच्या आधारे त्यांना या समित्यांत प्रतिनिधित्व दिले जावे, महिलांना त्यात १/३ राखीव जागा असाव्यात, या समित्यांचा कार्यकाळ पाच वर्षांचा असावा.

त्यापूर्वी त्या बरखास्त झाल्यास बरखास्तीनंतर ६ महिन्यांच्या आत पुन्हा निवडणुका घेण्यात याव्यात; राज्याच्या राज्यपालाने वित्त आयोगाची स्थापना करावी. जिल्हा स्तरावर योजना समित्या स्थापन केल्या जाव्यात व समित्यांनी त्या भागांच्या विकासाची व कल्याणाची कामे हाती घ्यावीत. अशा यातील महत्त्वाच्या तरतुदी होत्या. या सुधारणेमुळे स्थानिक स्वशासनाचे अधिकार समाजाच्या निम्न स्तरापर्यंत पोचले आणि देशाच्या इतिहासात लोकशाहीचे नवे पर्व सुरू झाले.

### बाबरी मशिदीवर हल्ला

बाबरी मशीद हा १९४९ च्या अखेरीपासून सांप्रदायिक वादाचा विषय बनला होता. मात्र

तो विषय न्याय प्रविष्ट असल्यामुळे सुमारे तीन दशके तो वाद दबून राहिला. १९८३ साली तो वाद उकरून काढण्याचे काम विश्व हिंदू परिषदेने केले. मशिदीचे स्थन हे रामाचे जन्मस्थान आहे आणि म्हणून मशीद पाडून तेथे राममंदिर बांधण्याचा मानस विश्व हिंदू परिषदेने जाहीर केला आणि बाबरी मशिदीविरुद्ध तोफ डागली.

१९८६ साली या मुद्यावर उत्तर भागात दंगे उसळले. अशा स्थितीत बाबरी मशीद हा दोन्ही समाजगटांसाठी प्रतिष्ठेचा मुद्दा बनला. मशिद सुरक्षित ठेवण्यासाठी बाबरी मशीद कृती समिती स्थापन करण्यात आली व आपल्या कडव्या प्रचाराने ती मुस्लीम मने चेतवू लागली.

बाबरी मशिद - राज जन्मभूमी वादाला राजकीय पैलू असल्याचे १९८९ च्या सार्वत्रिक निवडणुकीने सिद्ध केले. भाजपने राम जन्मभूमीचा मुद्दा उचलून धरला व मंदिर बांधण्याचा संकल्प जाहीर केला. निवडणुकीत भाजपाला हा प्रचार लाभदायक ठरला. भाजपचे ज्येष्ठ नेते अडवाणी यांनी हिंदूंना संघटित करण्यासाठी सोमनाथपासून रक्षयात्रा सुरू केली. ती अयोध्येला पोहोचणार त्या सुमारास हजारो रामभक्त तेथे गोळा झाले. हा जमाव इतका आटोक्याबाहेर गेला की, तेथील राज्य सरकारला ३० ऑक्टोबरला गोळीबार करून तो पांगवावा लागला. मुस्लीम समाजही संतप्त झाल्याने अधनू-मधून दंगली होऊ लागल्या. दोन्ही पक्ष निकरावर येऊ लागले.

या सांप्रदायिक तणावाचा स्फोट करणारी घटना ६ डिसेंबर १९९२ रोजी अयोध्येत घडली. लक्षावधी हिंदू स्वयंसेवक भिन्न मार्गांनी अयोध्येत एकत्र आले. विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे नेते तेथे उपस्थित होते. हजारो स्वयंसेवक हत्यारे घेऊन मशिदीच्या घुमटावर चढले आणि घुमट पाडायला त्यांनी प्रारंभ केला. हा प्रकार कित्येक तास चालला. मशिदीची मोठ्या प्रमाणात नासधूस झाली.

या घटनेचे चित्रण दूरदर्शनवर दाखविण्यात आल्याने या घटनेचे पडसाद लागलीच साऱ्या देशभर उमटले. काही तासानंतर हा प्रकार थांबविण्याची कारवाई करण्यात आली खरी, परंतु तोवर त्याचे अनिष्ट परिणाम व्हायचे ते झाले होते. देशभर सांप्रदायिक भावना भडकल्या. भारतभर हिंसक दंगलीचे लोण पसरले. हे हिंसाचाराचे सत्र कित्येक दिवस चालले, त्यात सुमारे तीन हजारांवर लोक मृत्युमुखी पडले.

मार्च १९९३ मध्ये मुंबई शहरातील वेगवेगळ्या महत्त्वाच्या गजबजलेल्या जागी काही मिनिटांच्या अंतराने जबरदस्त बॉम्बस्फोट झाले. त्या भयानक स्फोटात दोनशे ते तीनशे माणसे क्षणात मृत्युमुखी पडली. शेकडो लोक गंभीररीत्या जखमी झाले. मुंबईत हाहाकार माजला.

या देशविघातक सांप्रदायिक हिंसाचाराच्या घटनांनंतर नरसिंहराव सरकारच्या कार्यक्षमतेबाबत शंका उपस्थित करणारी काही प्रकरणे वृत्तपत्रातून प्रकाशित होऊ लागली. हवाला प्रकरण, शेअर बाजारातील घोटाळ्याचे प्रकरण, शासकीय संस्थांतील भ्रष्टाचाराची प्रकरणे उघडकीस येऊ लागल्यामुळे सरकारच्या व शासकीय अधिकाऱ्यांच्या सचोटीविषयी साशंकता निर्माण होऊ लागली. प्रत्यक्ष पंतप्रधानांना अशा प्रकरणात अडकविण्याचा प्रयत्न होऊ लागला. कायदेतज्ज्ञ राम जेठमलानी यांनी तर पंतप्रधानांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याची परवानगी मागितली. मोठी लाच घेतल्याचे व परदेशी चलन कायद्याचा भंग केल्याचे आरोप

त्यांच्यावर, त्यांच्या कुटुंबियावर व काही काँग्रेस नेत्यांवर लादण्यात आले. हे आरोप सिद्ध झाले नाहीत. परंतु अशा चिखलफेकीतच नरसिंहराव सरकारची दोन तीन वर्षे संपली. या सर्वांचा परिणाम १९९६ मधील सार्वत्रिक निवडणुकीवर झाला.

### ३.२.२.४. राजकीय अस्थिरतेचा कालखंड

१९९६ सालच्या निवडणुकीत काँग्रेसला केवळ १४० जागा मिळाल्या. भाजपची सदस्य संख्या मात्र १६१ झाली. जनता दलात एकत्र आलेले काही पक्ष आता फुटून निघाले असल्याने सरकार बनविण्याच्या दृष्टीने त्यांचे सामर्थ्य नगण्यच होते. इतर पक्षांपेक्षा अधिक सदस्य असलेला पक्ष म्हणून भाजपने इतर काही सदस्यांच्या पाठिंब्याने सरकार बनविण्याचा दावा केला. तो मान्य होऊन भाजपने अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ गठीत केले. १३ मे रोजी बनलेले हे मंत्रिमंडळ जेमतेम तेरा दिवस टिकले. संसदेत बहुमत सिद्ध न करता आल्यामुळे १ जून रोजी मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागला. त्यापाठोपाठ काही पक्ष एकत्र येऊन देवेगौडा यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त आघाडीचे सरकार सत्तारूढ झाले. लोकसभेचे सदस्य नसूनही पंतप्रधानपदी आलेले देवगौडा हे भारतातील पहिले नेते होते व यावेळी राज्यसभेचे सदस्य होते. ते जेमतेम अकरा महिने अधिकाररूढ राहिले. देवगौडा २१ एप्रिल १९९२ ला पायउतार झाले व त्यांची जागा संयुक्त आघाडी सरकारचे प्रमुख म्हणून इंद्रकुमार गुजराल यांनी घेतली. या सरकारात भारतीय साम्यवादी पक्ष सामील झाला तर मार्क्सवादी पक्ष व काँग्रेस यांनी सरकारला बाहेरून समर्थन दिले. गुजराल हे वस्तूतः पूर्वाश्रमीचे काँग्रेसमधील मान्यवर नेते होते. इंदिरा गांधींच्या मंत्रिमंडळात त्यांचा समावेश करण्यात आला. पुढे ते जनता दलात सामील झाले होते.

इंद्रकुमार गुजराल यांच्या नेतृत्वाखालील संयुक्त आघाडीच्या सरकारला दिलेले समर्थन काँग्रेसने लवकरच काढून घेतले, तेव्हा लोकसभा विसर्जित करण्यात येऊन फेब्रुवारी १९९८ मध्ये सार्वत्रिक निवडणुका घेण्यात आल्या. या निवडणुकीत भाजपला १८२ जागा तर काँग्रेसला १४७ जागा मिळाल्या. सर्वात अधिक जागा मिळालेला पक्ष म्हणून भाजपने पुढाकार घेऊन टी. डी. पी., तृणमूल काँग्रेस व ए. आय. ए. डी. एम. के. या पक्षांच्या मदतीने सरकार गठीत केले. मार्च १९९८ रोजी अटलबिहारी वाजपेयींच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी पार पाडला. परंतु अनेक पक्षांचे कडबोळे असलेले सरकार बनविणे फार कठीण नसले तरी ते चालविणे कठीण असल्याचा अनुभव पंतप्रधानांना लवकरच आला. घटक पक्षांच्या मागण्या, राष्ट्रीय शासनाची जबाबदारी सांभाळत पूर्ण करणे दुरापास्त होते. अखेरीस वाजपेयी शासनाचीही तारेवरची कसरत चालू असताना ऑल इंडिया अण्णा डी. एम. के. च्या नेत्या जयललिता यांनी वाजपेयी सरकारातून पाय काढून घेतला. त्यामुळे एप्रिलमध्ये लोकसभेचा विश्वास ते संपादन करू शकले नाहीत. मात्र सप्टेंबर–ऑक्टोबर १९९९ मध्ये पुन्हा निवडणुका होईपर्यंत वाजपेयी सरकार अधिकारारूढ राहिले. १९९९ च्या निवडणुकीत भाजप व त्याच्या मित्रपक्षांच्या राष्ट्रीय आघाडीला २९६ जागा मिळाल्या, तर काँग्रेस व सहकारी मित्रपक्षांना केवळ १३४ जागा मिळाल्या हे विशेष. साहजिकच वाजपेयींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय आघाडीचे सरकार अधिकारारूढ झाले.

### ३.२.२.५. अटलबिहारी वाजपेयी

ते १९९१ ते २००९ दरम्यान भारतीय जनता पक्षाचे लखनौ येथील खासदार होते. केवळ १३ दिवस टिकलेल्या ११ व्या लोकसभेत तसेच त्यानंतरच्या १२ व्या लोकसभेत (१९ मार्च १९९८ ते १९ मे २००४) ते पंतप्रधान होते. ११ व्या लोकसभेतील विरोधी पक्षाचे नेते, तसेच २४ मार्च १९७७ ते २८ जुलै १९७९ दरम्यान भारतीय परराष्ट्रमंत्री ही पदे भूषविली आहेत.

**पंतप्रधानपद :– पहिली खेप (मे १९९६)**

१९९६ च्या निवडणुकात भाजप १६२ जागांसकट सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आला. अनेक प्रादेशिक पक्ष तसेच छोट्या पक्षांमुळे १९९६ ची लोकसभा त्रिशंकु राहिली. सर्वात मोठा पक्ष म्हणून भाजपाला सत्ता स्थापण्यासाठी निमंत्रण मिळाले. वाजपेयी यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. पण लोकसभेत विश्वासमत प्रस्ताव चर्चेवेळी इतर पक्षांकडून पाठिंबा मिळविणे भाजपाला शक्य झाले नाही. त्यामुळे बहुमत चाचणी न घेताच वाजपेयींनी १३ दिवसात राजीनामा दिला.

**दुसरी खेप (मार्च १९९८)**

१९९६ ते १९९८ दरम्यान तिसऱ्या आघाडीला सरकार स्थापनेच्या दोन संधी मिळाल्या. देवेगौडा आणि इंद्रकुमार गुजराल भारताचे पंतप्रधान झाले. ही दोन्ही सरकारे लवकरच कोसळली. ९८ च्या निवडणुकांत भाजप पुन्हा प्रबळ दावेदार झाला आणि वाजपेयी यांनी पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. या वेळी भाजपाने इतर पक्षांसोबत मिळून राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रा. लो. आ) (छऊअ – छरींळेपरश्र ऊशोलीरींळल अश्रश्रळरपलश), ची स्थापना केली. मात्र १९९८ च्या अखेरीस अण्णा द्रमुकच्या नेत्या जयललिता यांनी रालोआचा पाठिंबा काढला. या वेळी विश्वासमत प्रस्तावावेळी वाजपेयी सरकार अवघ्या एका मताने पडले. विरोधी पक्षसुद्धा सरकार स्थापन करून शकला नाही. मात्र भारत पुन्हा लोकसभा निवडणुकांना सामोरा गेला. त्या वेळी वाजपेयी हे काळजीवाहू पंतप्रधान बनले. या दुसऱ्या खेपेत वाजपेयींनी स्वतःच्या राजकारणाची आणि कणखरतेची छाप सोडली होती. त्यांचे काही महत्त्वाचे निर्णय खालीलप्रमाणे होते.

**अणुचाचणी पोखरण २**

मे १९९८ मध्ये वाजपेयी सरकारने जमिनीखाली ५ अणुचाचण्या केल्या. सत्ताप्राप्त केल्यावर केवळ एका महिन्यात करण्यात आलेल्या या चाचण्या जगाला, खास करून अमेरिकेला हादरवणाऱ्या ठरल्या, कारण भारताने अमेरिकेच्या हेरगिरी उपग्रहाला चुकवून त्या पार पाडल्या होत्या. २ आठवड्यात पाकिस्तानेही अणुचाचण्या केल्या. रशिया आणि फ्रान्स यांनी भारताच्या स्वसंरक्षणासाठी आणि शांततापूर्ण उपयोगासाठी अण्वस्त्रक्षमतेचे समर्थन केले. तरी अमेरिका, कॅनडा, जपान, इंग्लंड, युरोपिय महासंघ यांनी भारतावर अनेक क्षेत्रात निर्बंध लादले. पण वाजपेयींच्या आर्थिक धोरणांमुळे याची झळ देशाला लागली नाही. अखेर भाजप आणि वाजपेयींच्या प्रतिमेच्या दृष्टीने या चाचण्या लाभदायीच ठरल्या.

### लाहोर भेट आणि चर्चा

१९९८ च्या शेवटी वाजपेयींनी पाकिस्तानसोबत शांतता चर्चेसाठी मोठा पुढाकार घेतला. त्यांनी लाहोर-दिल्लीदरम्यान बससेवा सुरू करण्याचा निर्णय घेतला. ते स्वतः

पहिल्या बसमध्ये पाकिस्तानमध्ये चर्चेसाठी गेले. याचे भारतात, पाकिस्तानात आणि जागतिक स्तरावर उत्तम प्रतिसाद उमटले. वाजपेयींसोबत पाकिस्तानला केवळ राजकारणी आणि मुत्सद्दीच नव्हे तर कला क्षेत्रातूनही अनेक मान्यवर गेले. देव आनंद यांचाही त्यात समावेश होता. कारगिल युद्धानंतर पाकिस्तान दौऱ्यावर जाणाऱ्या भारतीय क्रिकेट संघाला त्यांनी 'खेल भी जितो और दिल भी' हा संदेश दिला होता. यानंतर अण्णा द्रमुकने पाठिंबा काढल्यावर त्यांनी काळजीवाहू पंतप्रधान म्हणून ऑक्टोबरपर्यंत काम पाहिले.

### कारगिल युद्ध

कारगिल युद्धादरम्यानची मुत्सद्देगिरी वाजपेयींच्या कणखरतेची साक्ष देणारी आहे. लाहोर भेटीत दोन देशांदरम्यानचे संबंध सुधारण्यासाठी वाजपेयी प्रयत्न करत असताना पाकिस्तान काश्मीरमध्ये घुसखोरी करीत होता. हिवाळ्यात काश्मीरच्या नियंत्रणरेषेवरील अतिउंचावर असलेल्या चौकी -५०$^{0}$ अंश पर्यंत तापमान घसरत असल्याने दोन्ही देशांकडून खाली केल्या जात. उन्हाळा सुरू होताच दोन्ही देशांचे सैनिक परत चौकींवर रूजू होत. पण १९९१ च्या प्रारंभी पाकिस्तानने आपले सैनिक आणि अधिकारी दहशतवाद्यांच्या वेशात भारतीय रिकाम्या चौक्यांवर घुसवले. यातल्या कित्येक सैनिक आणि अधिकाऱ्यांजवळ त्यांची पाकिस्तानी ओळखपत्रेही होती. तसेच सोबतीला काही भाडोत्री दहशतवादीही होते. उन्हाळा सुरू होताच भारतीय सैन्याच्या ध्यानात ही बाब आली आणि जुनमध्ये 'ऑपरेशन विजय' सुरू केले. भारतीय सैन्याला अतिदुर्गम प्रदेश, अतिउंच शिखरे, बोचरी थंडी यांचा सामना करावा लागला. तरी हवाईदल आणि भूदलाच्या एकत्रित कारवाईने पाकिस्तानच्या सैन्याचा प्राभव दिसून लागला. नवाझ शरीफ यांनी याही परिस्थितीचे भांडवल करून त्याला आंतरराष्ट्रीय स्वरूप द्यायचा प्रयत्न केला. चीनला भेट देऊन त्यांनी मदतीची याचना केली. पण भारताने मोठ्या शिताफीने ऑपरेशन विजयची कारवाई नियंत्रण रेषेपर्यंतच मर्यादित ठेवली होती. भारताच्या पवित्र्यापुढे चीनने हस्तक्षेप नाकारला. नवाझ शरीफ यांनी मग अमेरिकेकडे मदतीची याचना केली. तत्कालीन अध्यक्ष बिल क्लिंटन यांची मध्यस्थीची तयारी दाखवत वाजपेयींना चर्चेसाठी वॉशिंग्टनला बोलावले. पण वाजपेयींनी बाणेदारपणे ही बाब सरळ धुडकावून लावत नकार दिला. यामुळे अमेरिकेला जागतिक पोलीस समजण्याच्या प्रवृत्तीला सणसणीत उत्तर गेलेच पण काश्मीर प्रश्न आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्याचा आणि तिसऱ्या पक्षाला हस्तक्षेप करवून शिमला करार मोडण्याचा पाकिस्तानचा प्रयत्नही शिताफीने उधळवला.

### इंद्रकुमार गुजराल

इंद्रकुमार गुजराल हे भारताचे १५ वे पंतप्रधान होते.

## ३.३ सारांश

इंदिरा गांधींनी अनेक समस्यांना तोंड देऊन, जनता राजवटीचे सत्तांतर घडवून आणले. या सत्तांतरानंतर त्यांनी पुन्हा एकदा नव्या जोमाने आपली कारकीर्द सुरू केली. परंतु भारत एकसंध राहवा, धर्म किंवा जात, भाषा किंवा प्रांत प्रभावी ठरून देशाचे विभाजन होऊ नये याकरिता खंबीरपणे त्यांनी पंजाब प्रश्न हाताळला. परंतु या पंजाब प्रश्नानेच त्यांना आपला प्राण गमवावा लागला. याच पद्धतीने राजीव गांधींना सुद्धा तमिळांच्या मुद्यावरून त्यांना आपले प्राण गमवावे लागले.

'खाऊजा' धोरणाच्या अंमलबजावणीमुळे भारताने पारंपरिक अर्थव्यवस्थेपासून फारकत घेऊन नव्या जागतिकीकरणाच्या युगात पाऊल ठेवलेले दिसून येते. परंतु याच काळात अयोध्या प्रश्न उद्‌भवला व त्यानंतर अनेक सत्तांतर घडून अनेक पंतप्रधानांची कारकीर्द बघायला मिळाली. शतकाच्या शेवटी भारतीय जनता पक्षाचे प्रमुख नेतृत्व असलेले एनडीएचे वाजपेयींचे शासन सुरक्षितपणे चालू असलेले आपणास दिसून येते.

## ३.४ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

## ३.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) पंतप्रधान म्हणून राजीव गांधी यांचे योगदान स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) पंतप्रधान म्हणून पी. व्ही. नरसिंहराव यांचे योगदान स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) विश्वनाथप्रताप सिंग.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

४) एच. डी. देवेगौडा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

५) अटलबिहारी वाजपेयी.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

## ३.६ संदर्भग्रंथसूची


- आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य-कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७-२०००).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स - बिपिनचंद्र(अनु.पारधी मा.कृ. व इतर), के. सागर, पुणे (२००४)


## ३.७ सरावासाठी स्वाध्याय - उपक्रम

पंचायत राज्य व्यवस्थेविषयी माहिती लिहा.

# घटक ४

# परराष्ट्र धोरण

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषय विवेचन

४.२.१. भारत व शेजारील राष्ट्र

४.२.१.१. भारत–पाकिस्तान संबंध

४.२.१.२. भारत–चीन संबंध

४.२.१.३. भारत–नेपाळ संबंध

४.२.१.४. भारत–श्रीलंका संबंध

४.२.२. महासत्तांशी संबंध

४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.४ सारांश

४.५ पारिभाषिक शब्द–शब्दार्थ

४.६ संदर्भग्रंथसूची

४.७ सरावासाठी स्वाध्याय–उपक्रम


## ४.० उद्दिष्टे

- भारत–पाकिस्तान संबंधांचे टीकात्मक परीक्षण करता येईल.
- भारत–चीन संबंध विशद करता येईल.
- भारत–नेपाळ संबंध स्पष्ट करता येईल.
- भारत–श्रीलंका संबंधांचे मूल्यमापन करता येईल.
- भारत–अमेरिका संबंधांचे टीकात्मक परीक्षण करता येईल.
- भारत–रशिया संबंधांचे मूल्यमापन करता येईल.
- भारताचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील योगदान स्पष्ट करता येईल.

## ४.१. प्रस्तावना

एका राष्ट्राचे जगातील इतर राष्ट्रांशी असलेल्या संबंधांना त्या राष्ट्राचे 'बाह्य संबंध' असे म्हणतात. कोणत्याही राष्ट्राचे बाह्य संबंध विशिष्ट तत्व आणि धोरणावर आधारित असतात.

या सर्व तत्त्वांना आणि धोरणांना 'परराष्ट्रीय धोरण' म्हणून ओळखले जाते. अशा प्रकारे 'बाह्य जगातील इतर राष्ट्रे तसेच आंतरराष्ट्रीय प्रादेशिक संघटना यांच्याशी संबंध ठेवताना केलेल्या कृतींना एकत्रितपणे परराष्ट्र धोरण असे म्हणतात.'

भारताच्या परराष्ट्र संबंधांना भारताइतकाच प्राचीन इतिहास आहे. प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात भारताचे उर्वरित जगाशी अत्यंत सौहार्दाचे संबंध होते. मात्र भारतात ब्रिटिश सत्तेवर आल्यानंतर या संबंधात आमूलाग्र बदल घडून आले. ब्रिटिशांचे परराष्ट्र धोरण वसाहतवादी हेतूने प्रेरित होते. त्यामुळे राष्ट्रवादी नेत्यांनी अशा धोरणावर टीका केली आणि राष्ट्रीय सार्वभौमत्व, प्रादेशिक अखंडता आणि शांततापूर्ण सहअस्तित्व या गोष्टींवर आधारित परराष्ट्र धोरणाची मागणी केली.

त्यामुळे भारताने स्वातंत्र्यानंतर आपल्या पारतंत्र्याच्या कालखंडातील कटू आठवणींपासून बोध घेऊन आपले परराष्ट्रीय धोरण तयार केले. भारताचे पहिले पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे या परराष्ट्र धोरणाचे मुख्य शिल्पकार होते. तेव्हापासून आजतागायत भारताने नेहरूंचेच परराष्ट्र धोरण थोड्या बहुत बदलांसह कायम ठेवले आहे.

## ४.२. विषय विवेचन

### ४.२.१. भारत व शेजारील राष्ट्र

#### ४.२.१.१. भारत-पाकिस्तान संबंध

**फाळणीतून उद्‌भवलेल्या समस्या, निर्वासित व त्यांची मालमत्ता**

भारत पाकिस्तान विभाजनामुळे दोन्ही राष्ट्रांपुढे उभ्या ठाकलेल्या समस्यांपैकी अत्यंत दुःखद व जटील ठरलेली समस्या होती ती निर्वासितांची. फाळणी होणार हे लक्षात येताच, १९४७ च्या मध्यकाळापासूनच होऊ घातलेल्या पाकिस्तानी प्रदेशातून हिंदूंचे, तर भारतातून त्या प्रदेशात जाणाऱ्या मुसलमानांचे फार मोठ्या प्रमाणावर स्थलांतर सुरू झाले होते. दोन्हीकडील निर्वासितांचीही संख्या जवळजवळ बारा दशलक्ष होती.

निर्वासितांच्या समस्येशी निगडित असलेला एक अत्यंत अवघड व गुंतागुंतीचा प्रश्न होता तो निर्वासितांच्या मालमत्तेसंबंधीचा, अत्याचार, कत्तली यांना धास्तावून स्थलांतर करणारी मंडळी, निर्गमनाच्या घाईगर्दीत, शेतजमीन, इमारती, बँकेतील ठेवी, अलंकार, कारखान्यातील यंत्रसामग्री व उपकरणे अशा स्वरूपाची त्यांची बरीच मालमत्ता तेथेच सोडून निघून आली होती. या त्यांच्या नुकसानीची भरपाई दिली जावी, अशी मागणी जेव्हा त्यांनी आपापल्या सरकारांकडे केली त्या वेळी त्याकडे दुर्लक्ष करणे दोन्ही सरकारांना अशक्य झाले. परंतु त्यांच्या त्या पूर्वीच्या मालमत्तेची किंमत ठरविणे, त्यांच्या दाव्यांचा खरेखोटेपणा पडताळून पाहणे व योग्य ती भरपाई देणे हे काम अत्यंत जिकीरीचे व कठीण होते.

या प्रश्नाचा विचार करण्याकरिता दोन्ही राष्ट्रांच्या शासकांच्या अनेक बैठकी १९५० पासूनच्या दशकात झाल्या. निर्वासितांनी आपापली मालमत्ता शक्य असल्यास परत मिळविण्याचा प्रयत्न दलालांद्वारा करावा, ते अशक्य झाल्यास सरकारने त्या इस्टेटीची विक्री

करून आलेली रक्कम पूर्वीच्या मालकांना द्यावी यावर दोन्ही देशातील सरकारे डिसेंबर १९४७ मध्ये सहमत झाली होती. परंतु तसे करण्यात अनेक अडचणी येऊ लागल्या. शिवाय हिंदू व शीख यांच्या पाकिस्तानात राहिलेल्या मालमत्ता व पाकिस्तानात जाताना मुसलमानांनी भारतात सोडलेल्या मालमत्ता यात खूपच तफावत होती. त्यामुळे नुकसानभरपाई देण्याचा प्रश्न भारतात, अत्यंत बिकट ठरला. पश्चिम पंजाबमधील ओलिताखाली असलेली बरीचशी सुपीक जमीन व पाकिस्तानच्या दोन्ही भागातील बरीच शहरी मालमत्ता भारतात निघून आलेल्या गैरमुस्लिमांच्या मालकीची होती. या उलट भारत सोडून पाकिस्तानला गेलेली बहुसंख्य मुसलमान जनता मालमत्ताविहीन गरीब शेतकरी होती. निर्वासित शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा मोठा बिकट प्रश्न दोन्ही राष्ट्रांपुढे होता. परंतु पूर्व पंजाबमध्ये ही समस्या विशेषच गंभीर होती. कारण पूर्व पंजाबातून पाकिस्तानला गेलेल्या मुसलमानांच्या मालकीच्या जमिनी, पाकिस्तानातून भारतात आलेल्या हिंदू व शिखांच्या येथील शेतजमिनींपेक्षा अगदीच तोकड्या होत्या.

या सर्व कटकटींतून विनाविलंब मार्ग निघणे अशक्यच होते. त्यामुळे निर्वासितांच्या पुनर्वसनाचा प्रश्न सोडविणे व अन्नधान्याचे उत्पादन चालू ठेवणे या हेतूने भारतात निघून गेलेल्या हिंदू, शिखांच्या जमिनींवर भारतातून आलेल्या मुसलमानांनी तात्पुरते स्थायिक होऊन धान्योत्पादन करावे याला १९४७ च्या अखेरीस पाक सरकारने परवानगी दिली. भारतानेही त्या कार्यवाहीला पाठिंबा दिला. यानंतर देशांतर केलेल्या मंडळींच्या शेतजमिनींवर निर्वासित शेतकऱ्यांना स्थायिक होऊ देणे हा उभयपक्षी सामान्य नियम बनला. निर्वासितांच्या मालमत्तेची भरपाई करून देण्याचा प्रश्नही दोन्ही राष्ट्रांत वाटाघाटी होऊन सुटण्याजोगा नव्हता. तो दोन्ही सरकारांनी जमेल तसा सोडविला. देशांतर केलेल्यांची मालमत्ता ताब्यात घेऊन त्यातून सरकारने निर्वासितांना नुकसानभरपाई द्यावी अशी तरतूद करणारा कायदा करून; शिवाय नुकसान भरपाईकरिता बराच पैसाही मंजूर करून भारताने त्या प्रश्नाचा निकाल लावला. फेब्रुवारी १९५५ मध्ये पाकिस्ताननेही तोच मार्ग स्विकारला.

### सिंधू व तिच्या उपनद्यांच्या पाणी वाटपाचा प्रश्न

विभाजनपूर्व काळात सिंधू खोऱ्यातील जवळजवळ सर्वच कालवे पश्चिम पंजाबात होते. तर भारताकडे आलेला पूर्व पंजाब मात्र त्या तुलनेत काहीसा अविकसित राहिला होता. परंतु ज्या नद्यांचे ते कालवे पश्चिम पंजाबाची शेतजमीन ओलिताखाली आणीत होते, त्या नद्या व त्यावरील धरणे मात्र भारतीय प्रदेशात असल्याने भारत सरकारच्या नियंत्रणाखाली होती. प्रारंभी उभय राष्ट्रांची भूमिका होती ती अशी की, फाळणीपूर्व परिस्थिती कायम टिकवावी, भारतातून वाहणाऱ्या सतलज व रावी नद्यांचे पाणी पाकिस्तानला पूर्ववत मिळावे, परंतु त्याची किंमत पाकिस्तानने भारताला द्यावी. त्या आशयाचा एक करार दोहोत डिसेंबर १९४७ मध्ये झालाही होता. त्या जैसे थे कराराची कालमर्यादा संपल्यानंतर त्याचे नूतनीकरण करण्यास पाकिस्तानने नकार दिल्याने व त्या पाण्याच्या मोबदल्याची रक्कमही न दिल्याने पूर्व पंजाब सरकारने पाकिस्तान सरकारला दिले जाणारे पाणी तोडले.

त्या नद्यांच्या पाणीपुरवठ्याबाबत मध्यस्थी करून जागतिक बँकेने आपली एक योजना ५ फेब्रुवारी १९५४ रोजी दोन्ही राष्ट्रांपुढे ठेवली.

जून १९५७ मध्ये पाणीपुरवठ्याबाबतच्या तंटयातून तोडगा काढण्याकरिता बँकेने एक शिष्टमंडळ पाठविले. बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, नेहरू व अयूबखान यात झालेल्या वाटाघाटी फलद्रूप होऊन १९ सप्टेंबर १९६० रोजी 'इंडस् वॉटर' करारावर कराचीत संबंधितांच्या स्वाक्षऱ्या झाल्या. १९५४ मध्ये बँकेने सुचविलेल्या योजनेनुसार व करारानुसारही पश्चिमेकडील झेलम, चिनाब व सिंधू या नद्यांचे पाणी पाकिस्तानला; तर रावी, बियास व सतलज या नद्यांचे पाणी भारताला अशी विभागणी व्हावयाची होती. पाकिस्तानात स्वतंत्रपणे नवी कालवापद्धती उभारण्याकरिता जी धरणे व सुमारे चारशे मैल लांबीचे कालवे बांधावयाचे होते ती योजना साकार करण्याकरिता सिंधू खोरे विकास निधीची स्थापना करण्यात आली. जागतिक बँक व अमेरिका यांच्याकडून पाकिस्तानला दिले जाणारे कर्ज, ऑस्ट्रेलिया, कॅनडा, जर्मनी, न्यूझीलंड, ब्रिटन व अमेरिका यांच्याकडून मिळणारी अनुदाने, पाकिस्तानने त्याकरिता उचलावयाचा वित्तभार व भारताने द्यावयाची ८३.३ कोटी रुपयांची रक्कम मिळून तो निधी उभारला जाणार होता.

या करारामुळे पूर्वेकडील तीनही नद्यांचे पाणी केवळ भारताच्या विकासासाठी वापरणे व त्यातून नव्या बहुउद्देशीय योजना साकार करणे शक्य होणार असल्याने त्याची किंमत म्हणून पाकिस्तानच्या कालवा पद्धतीकरिता उचलावा लागणारा आर्थिक भार अनाठायी ठरणार नाही असे भारताला वाटले. पाकिस्तानला होणारा फायदा तर स्पष्ट होता. पूर्वीपेक्षाही अधिक पाणी त्यांना या योजनेमुळे उपलब्ध होणार होते व पाणीपुरवठ्याकरिता भारतावर विसंबण्याचे कारण राहणार नव्हते. यामुळे रावी, बियास व सतलज या नद्यांच्या पाण्यावरील आपला दावा पाकिस्तानने सोडून दिला. नेहरू व अयुबखान यांचे राजकीय चातुर्य, जागतिक बँकेची कुशल मध्यस्थी व पाश्चिमात्य राष्ट्रांचे आर्थिक सहकार्य यामुळे सिंधू खोऱ्यातील पाण्याचा प्रश्न उभय पक्षांना लाभदायक ठरेल, अशी तडजोड होऊन सुटला.

### १९६५ चे भारत-पाक युद्ध

भारत-पाकिस्तान यांतील वाटाघाटी किंवा संयुक्त राष्ट्रसंघाची कार्यवाही यातून पाकिस्तानच्या काश्मीरबाबतच्या उद्दिष्टांची पूर्ती होत नाही हे कळून चुकताच अयुबखान सरकारने त्याकरिता पुन्हा युद्धमार्गाचा अवलंब करण्याचे ठरविले. १९६४ मध्ये परिस्थितीही त्याकरिता अनुकूल आहे, असे पाकिस्तानला वाटत होते. नेहरू नुकतेच दिवंगत झाले होते. त्यामुळे प्रभावी नेतृत्वाच्या अभावी, युद्धाच्या धक्क्यामुळे भारत अल्पावधीतच कोलमेडल अशी पाकिस्तानची अटकळ होती. तसेच १९५४ पासून फार मोठ्या प्रमाणात अमेरिकेकडून मिळालेल्या लष्करी मदतीमुळे भारताला यशस्वीपणे आव्हान देता येईल, असा आत्मविश्वास पाकिस्तानला वाटत होता.

पाकिस्तान व्याप्त काश्मीरच्या प्रदेशात, म्हणजे आझाद काश्मीर क्षेत्रात, काश्मीर भारताकडून हिसकावून घेण्याच्या हेतूने पाकिस्तानची भारताविरुद्ध युद्धाची सज्जता सुरू झाली. पाकिस्तानच्या प्रचारामुळे तेथे जनप्रक्षोभ चांगलाच उफाळून आला. भारताविरुद्ध जिहादच्या घोषणा निनादू लागल्या. काश्मीरकरिता अखेरचा लढा देऊन भारताच्या हाती असलेले काश्मीर 'मुक्त' करण्याकरिता शस्त्रसज्ज मुसलमान 'स्वातंत्र्य सैनिकांच्या' तुकड्या युद्धबंदी रेषा ओलांडून युद्धवेषात काश्मिरात शिरू लागल्या. त्यांचा प्रतिकार साहजिकच भारतीय

सैनिक करू लागले. त्यांचा काश्मीरकडील मार्ग बंद करण्याच्या हेतूने कारगिल व टिथवाल क्षेत्रातील पाकिस्तानी ठाणी व उरी-पूंछ मार्गावरील हाजी पीर खिंड भारतीय सैनिकांनी काबीज केली.

१ सप्टेंबर रोजी नैर्ऋत्य काश्मीरच्या अखनूर क्षेत्रातील छांब विभागावर तेथील आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून पाकिस्तानने सर्व सामर्थ्यनिशी हल्ला चढविला. भारताकडून श्रीनगरला जाणारी रसद तोडण्याचा त्याचा उद्देश स्पष्टच होता.

पाकिस्तानने या हल्ल्यात आपले संपूर्ण लष्करी सामर्थ्य ओतले होते. त्यांचे कमीत कमी ९० रणगाडे त्या कारवाईत रणक्षेत्रावर होते. पहिल्याच वादळी धडाक्यात आपली उद्दिष्टे साध्य करून घेण्याचा प्रयत्न पाकिस्तान करीत होते. चिनाब नदीवरील लष्करीदृष्ट्या मोक्याचे असलेले अखनूर शहर काबीज करून जम्मूपासून राजौरी व पूंछकडे जाणारा मार्ग तोडणे (तसे झाले की काश्मीरच्या पश्चिमी भागात भारतीय फौजा अडकून पडल्या असत्या व मग त्यांवर निर्णायक आघात करणे पाकिस्तानला सहज शक्य झाले असते) आणि पहिल्याच धडाक्यात जम्मू शहर हस्तगत करून जम्मू-श्रीनगर महामार्गाचा ताबा मिळवून बनिहाल खिंडीच्या उत्तरेकडील भारतीय फौजांना एकाकी पाडणे ही त्या हल्ल्यामागील पाकिस्तानची प्राथमिक उद्दिष्टे होती.

अखनूर क्षेत्रात भारताने पाकिस्तानी हल्ल्याला खंबीरपणे तोंड दिले. परंतु छाबा विभागातील पाकिस्तानी हल्ला इतका जबरदस्त होता की, पाकिस्तानचे मुख्य उद्दिष्ट असलेल्या काश्मीरवरील त्यांचा लष्करी दबाव कमी करावयाचा असेल तर तेथे केंद्रित झालेल्या पाकिस्तानी सैन्याला अन्यत्र वळवले पाहिजे हे भारताने ओळखले. त्या हेतूने युद्धातील एक डावपेच म्हणून ६ सप्टेंबर रोजी, आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून भारतीय लष्कराने लाहोरच्या दिशेने मुसंडी मारली व त्यानंतर दोनच दिवसांनी त्यांनी उत्तरेला सियालकोटवर हल्ला चढविला. त्याबरोबर काश्मीरमध्ये ओतलेले बरेचसे लष्कर तेथून काढून घेऊन, त्वरेने ते लाहोर-सियालकोटच्या रक्षणाकरिता आणणे पाकिस्तानला भाग पडले. त्या डावपेचामुळे काश्मीरवरील पाकिस्तानचे लष्करी दडपण कमी करण्याचा भारताचा हेतू सफल झाला. काश्मीरचे रक्षण झाले. या युद्धात झालेल्या सर्व घनघोर लढ्यात पाकिस्तानला निश्चितपणे मागे हटावे लागले.

बावीस दिवस चाललेले हे युद्ध शेवटी बाह्य सत्ता व संयुक्त राष्ट्रसंघ यांच्या मध्यस्थिने थांबले. ताबडतोब युद्धबंदी व्हावी असा ठराव २० सप्टेंबर रोजी सुरक्षा समितीत एकमताने पारित झाला. अमेरिका व इंग्लंड यांनी दोन्ही युद्धमान राष्ट्रांना शस्त्रपुरवठा बंद केला. व यू थांट यांनी मध्यस्थी करून युद्धबंदी घडवून आणली. युद्धबंदी झाली त्या वेळी पाकव्याप्त काश्मीरचा प्रदेश धरून एकूण ७४० चौरस मैलांचा पाकिस्तानी प्रदेश भारताच्या तर २१० चौरस मैलांचा भारतीय प्रदेश पाक सैन्याच्या ताब्यात होता.

### ताश्कंद करार : परिणाम

सोव्हिएत संघाच्या आवाहनाला भारत व पाकिस्तान या दोन्ही राष्ट्रांनी प्रतिसाद दिला व वाटाघाटींकरिता ताश्कंद येथे जाण्याचे मान्य केले. ४ ते १० जानेवारी १९६६ या काळात ती दोन राष्ट्रे व मध्यस्थ म्हणून सोव्हिएत संघ या राष्ट्रांत झालेल्या वाटाघाटी अपेक्षेपलीकडे

यशस्वी ठरल्या. त्यांची फलश्रुती १० जानेवारी रोजी ताश्कंद करारात झाली. भारत व पाकिस्तान यात सामान्य व शांततापूर्ण संबंध पुन्हा प्रस्थापित व्हावेत; युद्ध भडकण्यापूर्वी ज्या ठिकाणी भारतीय व पाक फौजा होत्या त्या जागी उभय पक्षांनी आपापल्या फौजा २५ फेब्रुवारीच्या आत माघारी न्याव्या; युद्धबंदीच्या परतीची व्यवस्था करण्यात यावी; दोन्ही पक्षांनी राजनैतिक, आर्थिक, व्यापारी, दळणवळण व सांस्कृतिक क्षेत्रात सलोख्याचे संबंध पुन्हा प्रस्थापित करावे. परस्परांविरुद्ध अपप्रचार करू नये; बेकादेशीर आवासींच्या व निर्वासितांच्या प्रश्नावर योग्य ती कार्यवाही व्हावी, अशा तरतुदी ताश्कंद करारात होत्या.

**काश्मीर प्रश्न**

भारतीय संघराज्यातील २८ राज्यांपैकी जम्मू आणि काश्मीर हे एक राज्य असून त्याचे क्षेत्रफळ ८६,०२३ चौरस मैल एवढे आहे. या क्षेत्रामध्ये काश्मीरचे खोरे, जम्मू आणि लडाखचे क्षेत्र, पर्वतीय क्षेत्र आणि बाल्टीस्तान, गिलगीट, हेजा आणि नगर हे आदिवासी क्षेत्र यांचा समावेश होतो. सध्या काश्मीरचे खोरे, जम्मूचे क्षेत्र आणि लडाख हे भारतीय अधिपत्याखाली आहे. आदिवासी क्षेत्र पाकिस्तानच्या अधिपत्याखाली आहे. काही पर्वतीय क्षेत्र पाकिस्तानमध्ये तर काही भारतात आहेत.

भारताच्या स्वातंत्र्याबरोबरच काश्मीरचे राज्य स्वतंत्र झाले. काश्मीरचे महाराजा हरिसिंग यांनी भारत किंवा पाकिस्तानमध्ये विलीन होण्यास नकार देत स्वतंत्र अस्तित्व टिकवून धरले. ऑक्टोबर १९४७ मध्ये पाकिस्तानने या क्षेत्रातील काही स्थानिक जमातींच्या माध्यमातून काश्मीर क्षेत्रात घुसखोरी केली, पाकिस्तानचे हे काश्मीरवरील पहिले आक्रमण होते. राजा हरिसिंग याने भारताकडे मदतीची विनंती केली. २३ ऑक्टोबर १९४७ रोजी राजा हरिसिंग याने भारतात काश्मीर विलीन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार भारताबरोबर २६ ऑक्टोबर १९४७ रोजी काश्मिर विलीनीकरण करार करण्यात आला. अशा प्रकारे काश्मीर क्षेत्र भारताचा घटक बनले. भारताने घुसखोरांविरुद्ध त्वरित लष्करी कारवाई करून घुसखोरांना रोखले.

१ जानेवारी १९४८ रोजी भारताने संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेतील कलम ३५ अंतर्गत हा प्रश्न सुरक्षा समितीपुढे मांडला आणि पाकिस्तानने काश्मीरवरील आक्रमण त्वरित माघारी घ्यावे यासाठी सुरक्षा परिषदेने हस्तक्षेप करावा, अशी विनंती केली. सुरक्षा परिषदेने जून १९४८ मध्ये काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी एका आयोगाची नेमणूक केली. या आयोगाने सादर केलेल्या अहवालानुसार ५ जानेवारी १९४९ रोजी सुरक्षा परिषदेने एक महत्त्वपूर्ण ठराव मंजूर केला. त्यानुसार पाकिस्तान काश्मीर क्षेत्रातून आपले सैन्य त्वरित माघारी बोलावेल आणि त्यानंतर भारत सरकार काश्मीर क्षेत्रात सार्वमत घेईल. या ठरावाची अंमलबजावणी करण्यास पाकिस्तानने नकार दिल्यामुळे भारतानेदेखील सार्वमत घेतले नाही.

काश्मीरचा प्रश्न सोडविण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने तीन मध्यस्थ नेमले. एम. सी. नॉटन, ऑवेन डिकसन आणि फ्रँक ग्रॅहम. तथापि या तीनही मध्यस्थांचे प्रयत्न काश्मीरचा प्रश्न सोडवण्यात अयशस्वी ठरले.

ऑगस्ट १९६५ मध्ये पाकिस्तानने पुन्हा एकदा काश्मीर क्षेत्रात घुसखोरी केली. या

घुसखोरीचे रूपांतर पुढे भारत-पाकिस्तान युद्धात झाले. युद्धाचा शेवट 'ताश्कंद करार' या कराराने झाला.

१९७२ च्या 'शिमला करारा'नुसार असे मान्य करण्यात आले की, काश्मीरचा प्रश्न हा केवळ द्विपक्षीय चर्चेतून, वाटाघाटीतून आणि कोणत्याही तिसऱ्या देशाच्या हस्तक्षेपाशिवाय सोडविला जाईल. दोन्ही पक्ष जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेचा आदर करतील.

१९९९ साली दोन्ही राष्ट्रांदरम्यान प्रसिद्ध 'लाहोर करार' झाला. या करारामध्ये तीन प्रमुख तरतुदींचा समावेश होता. तो पुढीलप्रमाणे,

(अ) दोन्ही राष्ट्र काश्मीरचा प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडविण्यासाठी प्रयत्न वृद्धिंगत करतील.

(ब) परस्परांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप केला जाणार नाही.

(क) अण्वस्त्रांचा गैरवापर केला जाणार नाही. यासाठी दोन्ही देश प्रयत्न करतील.

मे १९९९ मध्ये पाकिस्तानने जम्मू-काश्मीर राज्याच्या भारतीय अखत्यारितील कारगिल क्षेत्रात घुसखोरी केली. या घुसखोरीमागे पाकिस्तानचे दोन प्रमुख उद्देश होते. एकतर पाकिस्तानला अशा घुसखोरीच्या माध्यमातून जम्मू-काश्मीरमध्ये युद्धसदृश परिस्थिती निर्माण करावयाची होती. अशी परिस्थिती निर्माण करून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा पाकिस्तानचा डाव होता. काश्मीर प्रश्नाच्या आंतरराष्ट्रीयीकरणामुळे भारतावर हा प्रश्न सोडवण्यासाठी आंतरराष्ट्रीय दबाव वाढेल. दुसरे म्हणजे पाकिस्तानला काश्मीर प्रश्नात इतर राष्ट्रांची मध्यस्थी हवी होती. काश्मीर प्रश्नाच्या आंतरराष्ट्रीयीकरणातून अशा मध्यस्थीची वाट मोकळी होणार होती. ही घुसखोरी रोखण्यासाठी भारताने त्वरित लष्करी कारवाई केली.

१४ ते १७ जुलै २००१ दरम्यान पाकिस्तानचे अध्यक्ष जनरल परवेझ मुशर्रफ आणि भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यात आग्रा येथे एक महत्त्वपूर्ण बैठक झाली. त्यात खालील गोष्टी ठरवण्यात आल्या.

(१) काश्मीरचा प्रश्न सोडवण्यासाठी उभय पक्षांमध्ये द्विपक्षीय पातळीवरची बोलणी पुन्हा सुरू करावी.

(२) काश्मीरच्या प्रश्नावर शांतता बोलणी चालू असतानाच इतर क्षेत्रातील सहकार्य वृद्धिंगत करण्याला भर दिला जावा.

(३) जम्मू काश्मीरमधील दहशतवादी हालचाली त्वरित नियंत्रणात आणल्या जाव्यात.

(४) काश्मीरचा प्रश्न शिमला कराराअंतर्गत सोडवला जावा.

मुंबई हल्ल्यानंतर ठप्प झालेली भारतीय आणि पाकिस्तानमधील प्रक्रिया २००९ मध्ये पुन्हा रुळावर आली. इजिप्तमध्ये झालेल्या बैठकीत पंतप्रधान मनमोहनसिंग आणि पाकिस्तानचे पंतप्रधान युसूफ रझा गिलानी यांनी चर्चा पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला. चर्चेनंतर दोन्ही देशांनी एक निवेदन प्रसिद्ध केले. त्यात दहशतवाद हा भारत आणि पाकिस्तानचा समान शत्रू असल्याचं म्हटलं. दोन्ही देशांच्या संयुक्त सहकार्यानं या शत्रूचा सामना करण्याचा निर्णय झाला. पण दहशतवादाच्या मुद्यावर चर्चा प्रक्रिया अडणार नसल्याचं ठरवण्यात आलं.

भारताने दहशतवादाच्या मुद्याचा आग्रह सोडला असून पाकिस्तानने काश्मीरशिवाय चर्चा करायला तयारी दाखवली. संबंध सुधारण्यासाठी चर्चा हाच एकमेव मार्ग असल्याचं दोन्ही देशांच्या नेत्यांनी मान्य केले.

डिसेंबर १९७१ मध्ये झालेल्या भारत–पाक युद्ध हे भारत व पाकिस्तानमधील तिसरे युद्ध होते. या युद्धात भारताने पाकिस्तानचा निर्णायक पराभव केला व बांगलादेशाची निर्मिती केली.

**पार्श्वभूमी**

१९७० च्या पाकिस्तानमधील सार्वत्रिक निवडणुकीत पूर्व पाकिस्तानातील अवामी लीगने १६९ पैकी १६७ जागा जिंकल्या व इस्लामाबादमध्ये संसदेत अवामी लीगचे बहुमत झाले. अवामी लीगचे नेते शेख मुजीबूर रहमान यांनी राष्ट्राध्यक्षांपुढे सरकार स्थापनेचा दावा मांडला. पाकिस्तानच्या स्थापनेपासून राजकारणात वर्चस्व ठेवणाऱ्या पश्चिम पाकिस्तानातील खासकरून पंजाबी व पठाणी राजकारण्यांना बंगाली वर्चस्व होणे मान्यच नव्हते. झुल्फिकार अली भुट्टो यांनी मुजीबूर यांना पंतप्रधानपद देण्यास विरोध केला. राष्ट्राध्यक्ष याह्याखान यांनी सेनेला तैनात केले.

पूर्व पाकिस्तानात यानंतर सर्वत्र अटकसत्र व दडपशाही सुरू झाली. पूर्व पाकिस्तानी सैनिक व पोलिसांना निःशस्त्र करण्यात आले. पूर्व पाकिस्तानमध्ये सेनेने हे सर्व प्रकार दडपून २५ मार्च १९७१ रोजी ढाक्यात ताबा मिळवला व अवामी लीगवर बंदी घालण्यात आली. मुजीबूर रहमान यांना अटक करून पश्चिम पाकिस्तानात त्यांची रवानगी झाली. बांगलादेशमधील हिंदूंचे मोठ्या प्रमाणात शिरकाण सुरू झाले.

२७ मार्च १९७१ रोजी झिया उर–रहमान यांनी मुजीबूर रहमान यांच्या वतीने बांगलादेशच्या स्वातंत्र्याची घोषणा केली व एप्रिलमध्ये छुप्यासरकारची स्थापना केली. पूर्व पाकिस्तानात यामुळे स्वातंत्र्याची ओढ लागून हजारो लोक मुक्तीवाहिनीमध्ये सामील झाले.

**भारतातील घडामोडी**

२७ मार्च १९७१ रोजी भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी बांगलादेशच्या स्वातंत्र्य लढ्याला पूर्ण पाठिंबा जाहीर केला व बांगलादेशी जनतेला जी मदत लागेल ती पुरवण्याचे आश्वासन दिले. मोठ्या प्रमाणावर चाललेल्या मानवी शिरकाणामुळे भारतात मोठ्या प्रमाणावर बांगलादेशी लोक सीमा ओलांडून आश्रयास आले. सीमेवर छावण्या उभारण्यात आल्या. अज्ञातवासातील बांगला सैनिकांनी व लष्करी अधिकाऱ्यांनी लगेचच मुक्तिवाहिनीच्या स्वयंसेवकांना तयार करण्यास सुरुवात केली.

नोव्हेंबरपर्यंत घडामोडींना आणखीनच वेग आला व युद्ध शक्यता अटळ झाली. भारताने मोठ्या प्रमाणावर पूर्व पाकिस्तान सीमेवर सैन्य जमा केले. पावसाळ्यानंतरच्या काळात जमीन बऱ्यापैकी कोरडी होते तसेच हिमालयात थंडीमुळे चिनी आक्रमणाची शक्यता कमी झाली. २३ नोव्हेंबर १९७१ रोजी पाकिस्तानी राष्ट्रध्यक्ष याह्याखान यांनी पाकिस्तानमध्ये आणीबाणी लागू केली व युद्धास तयार राहण्याचे देशवासीयांना आवाहन केले. रविवार ३

डिसेंबर रोजी पाकिस्तानी हवाई-दलाने उत्तर भारतातील अनेक हवाईतळांवर हल्ले चढवून युद्धाची पहिली ठिणगी टाकली. जोरदार हवाईहल्ले चढवून भारताची आक्रमण क्षमता खच्ची करण्याचे पाकिस्तानी तंत्र होते. पाकिस्तानने हल्ला तर केला, परंतु त्यात त्यांचा फारसा फायदा झाला नाही; उलट भारताला आक्रमण करायला सबळ कारण मिळाले व दुसऱ्या दिवशीच भारताने पाकिस्तानविरुद्ध युद्ध पुकारले.

**भारतीय आक्रमणाची दोन उद्दिष्टे होती.**

(१) पूर्व पाकिस्तानात जास्तीत जास्त आत प्रवेश करून पूर्व पाकिस्तानचा ताबा मिळवणे.

(२) पश्चिम पाकिस्तानातून येणाऱ्या पाकिस्तानी फौजेला फक्त रोखून धरायचे. पश्चिम पाकिस्तानामध्ये घुसून कोणत्याही परिस्थितीत आक्रमण करायचे नाही, अशी भारताची युद्धनीती होती.

**याउलट पाकिस्तानी सेनेची उद्दिष्टे होती.**

(१) भारताला पूर्व पाकिस्तानात घुसण्यापासून रोखणे. पूर्व पाकिस्तानात आत खोलवर जाणे बरेच अवघड होते व भारतीय सेनेला त्यात जास्तीत जास्त वेळ लागेल असे पहाणे.

(२) दरम्यान पश्चिमेकडून भारतात घुसून जास्तीत जास्त भूक्षेत्राचा ताबा मिळवणे. भारताने पश्चिम सीमेवर त्यामानाने कमी सैन्य तैनात केले होते. त्यामुळे त्यात पाकिस्तानी सेनेला यश मिळेल असा विश्वास होता. या दोन्हीत यशस्वी झाल्यावर भारताची कोंडी होईल अशी पाकिस्तानी लष्कराची चाल होती.

पाकिस्तानने पहिले आक्रमण करून युद्धाची सुरुवात केली खरी, परंतु त्यांना त्याचा संवेग राखता आला नाही. पश्चिम पाकिस्तानातून अनेक ठिकाणी जोरदार मुसंडी मारण्याचा प्रयत्न केला. परंतु भारतीय सेनेपुढे काहीएक चालले नाही. त्यातील एक प्रसिद्ध 'लोंगेवालाच्या लढाईत' त्यांना जबरदस्त नुकसान सहन करावे लागले. केवळ १२० भारतीय सैनिकांनी २,००० पेक्षाही अधिक सैन्य असलेल्या चिलखती ब्रिगेडचा पहाटेपर्यंत टिच्चून सामना केला. सकाळ होताच भारतीय हवाईहल्ल्यात पाकिस्तान चिलखती (रणगाडा) तुकडीचे जबरदस्त नुकसान झाले. पाकिस्तानी सेनेला पश्चिम सीमेकडे भारतीय मोर्चे विस्कळीत करण्यात अपयश आले. भारतीय सेनेने आक्रमक भूमिका घेऊन पाकिस्तानच्या सीमेलगत मोठा भूभाग काबीज केला. एकूण १४,००० चौ. कि. मी. इतका भाग काबीज करण्यात आला. हा सर्व भाग नंतर सिमला करारा अंतर्गत पाकिस्तानला परत करण्यात आला.

भारतीय वायुसेनेने या युद्धात जबरदस्त कामगिरी नोंदवली. 'ऑपरेशन पायथन'च्या अंतर्गत भारतीय नौदल व हवाईदलाने अमेरिकन पद्धतीप्रमाणे विमानवाहक युद्धनौकांचा वापर करून चितगाव येथे पाकिस्तानी विमानतळ उद्ध्वस्त केले. एकूण ४,००० उड्डाणे उडवण्यात आली. याला पाकिस्तानी हवाईदलाकडून फारसा प्रतिकार झाला नाही. पश्चिमेकडे भारतीय

नौदलाने कराची बंदराची कोंडी केली व त्याबरोबरच दोन पाकिस्तानी विनाशिका बुडवल्या.

भारतीय पायदळाने अपेक्षेपेक्षाही अधिक वेगाने पूर्व पाकिस्तानमध्ये वाटचाल केली. शत्रूचे कच्चे दुवे हेरत व मोठा प्रतिकार शक्य असलेल्या ठिकाणी वळसा घालून भारतीय सेनेने पुढे वाटचाल केली. यामध्ये पाकिस्तानला मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागले. पंधरवड्याच्या आतच भारतीय सेनेने ढाका काबीज केले. ९०,००० हून अधिक पाकिस्तानी सैनिक युद्धबंदी झाले. १६ डिसेंबर रोजी पूर्व पाकिस्तानातील पाकिस्तानी सेनेने भारतापुढे शरणागती पत्करली. दुसऱ्या दिवशी पाकिस्तानने शरणागती पत्करली.

### भारत–पाकिस्तान युद्धाचे परिणाम

भारताने या युद्धात निर्णायक विजय मिळवला. पाकिस्तानच्यावतीने लेफ्टनंट जनरल ए. के. नियाझी यांनी शरणागतीपत्रावर सही केली. भारताने लगेचच बांगलादेशच्या स्वातंत्र्याची घोषणा केली व जगाच्या पाठीवर बांगलादेश हा नवीन देश उदयास आला. हा पराभव पाकिस्तानला चटका लावून गेला व आजही भारताने आमच्या देशाचे दोन तुकडे केले, अशी पाकिस्तानी जनमानसात अजूनही भावना आहे. याह्याखान यांनी राष्ट्राध्यक्षपदावरून राजीनामा दिला. मुजीबूर रहमान यांची मुक्तता करण्यात आली. १० जानेवारी १९७२ रोजी रहमान परत बांगलादेशात आले.

भारताचे जवळपास ४ हजार सैनिक या युद्धात कामी आले. पाकिस्तानच्या मृत सैनिकांची संख्या आजही निश्चित नाही. भारताने पाकिस्तानचे ९० हजारांहून अधिक सैनिक व समर्थक युद्धबंदी बनवले. या युद्धात मानवतेला काळीमा फासणाऱ्या अनेक घटना घडल्या. पाकिस्तानने केलेले मानवी शिरकाण हे उपखंडातील आजवरच्या इतिहासातील सर्वाधिक मानले जाते. पाकिस्तानी सेनेने अंदाजे २० ते ३० लाख लोक सामुहिक संहारात मारले असण्याची शक्यता आहे. जर हा आकडा खरा असेल तर हे कृत्य हिटलरच्या कृत्यापेक्षाही क्रूर आहे. यात बांगलादेशातील हिंदूंना मुख्यत्वे मोठ्या प्रमाणात मारण्यात आले.

### कारगील युद्ध

कारगीलचे युद्ध हे भारत व पाकिस्तान यांच्या दरम्यान १९९९ च्या उन्हाळ्यात लढले गेलेले मर्यादित स्वरूपाचे युद्ध होते. या युद्धाची व्याप्ती भारताच्या कारगील व आजूबाजूच्या परिसरापुरतीच मर्यादित राहिली, त्यामुळे याला 'मर्यादित युद्ध' म्हणतात. तसेच या पूर्वीच्या भारत–पाक युद्धांप्रमाणेच याही युद्धात, युद्ध सुरू झाल्याची व संपल्याची कोणतीही घोषणा करण्यात आलेली नव्हती. उलट पाकिस्तानर्फे युद्धादरम्यान त्यांचा देश अलिप्त आहे, असा कांगावा करण्यात आला होता. पुढे अनेक वर्षांनंतर हळूहळू पाकिस्तान सरकारने व अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी हे युद्धच होते असे जाहीर केले. १९९९ च्या उन्हाळ्यात, पाकिस्तानी घुसखोरांनी भारतीय सीमा ओलांडून भारताच्या हद्दीतील अनेक ठाण्यांवर कब्जा घेतल्याचे भारताच्या लक्षात आले व या घुसखोरांना हुसकावण्यासाठी कारगीलचे युद्ध सुरू झाले. ही ठाणी कारगील व द्रास परिसरातील अतिउंच दुर्गम जागी होती. अनेक महिन्यांच्या प्रयत्नांनंतर भारताला ही ठाणी परत मिळवण्यात यश मिळाले.

हे युद्ध आधुनिक इतिहासातील अतिउंचीवरच्या युद्धाचे अत्युत्कृष्ट उदाहरण आहे. यात युद्धाला लागणारी सामग्री व मनुष्यबळ ने-आण करण्याचा चांगलाच अनुभव भारतीय सैन्याला मिळाला. हे युद्ध दोन्ही देश अण्वस्त्रसज्ज झाल्यानंतरचे पहिलेच युद्ध होते. त्यामुळे सगळ्या जगाचे लक्ष हे युद्ध कसेकसे पुढे चालले आहे याकडे होते. परंतु भारताने हे युद्ध कारगीलपुरतेच मर्यादित ठेवले. त्यामुळे दाखवलेल्या संयमाबद्दल भारताचे जगभर कौतुक झाले. म्हणूनच, भारताला आंतरराष्ट्रीय स्तरावर पाठिंबा मिळाला व याउलट, सैन्य मागे घ्यावे यासाठी पाकिस्तानवर अमेरिकेसह अनेक देशांनी दबाव आणला. या युद्धानंतर भारताने आपल्या संरक्षण खर्चात अनेकपटीने वाढ केली. तर पाकिस्तानात राजकीय अस्थिरता माजली. परिणामी, काही महिन्यांतच (ऑक्टोबर १९९९ मध्ये) पाकिस्तानात जनरल परवेझ मुशर्रफ यांनी नवाझ शरीफ यांचे सरकार उलथून लष्करशाही लागू केली.

### कारगिल युद्धाची कारणे :-

कारगील शहर हे सामारिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे. १९७१ च्या युद्धानंतर भारत व पाकिस्तानमध्ये थेट मोठे युद्ध झाले नाही. तरी सातत्याने छोट्या मोठ्या चकमकी होत राहिल्या. सियाचीन हिमनदीवर भारतीयांचे नियंत्रण तसेच सभोवतालच्या परिसरावर नियंत्रण मिळवण्यात दोन्ही बाजू सातत्याने प्रयत्नशील असत.

१९९८-९९ च्या हिवाळ्यात पाकिस्तानी लष्करातून अनेक तुकड्यांचा मुजाहिदीनच्या वेशात भारतात नियंत्रण रेषेपलीकडे पाठवण्यात आले. या कारवाईला 'ऑपरेशन बद्र' असे नाव देण्यात आले व कुणाच्याही लक्षात न येता त्यांनी रिकाम्या भारतीय चौक्यांचा ताबा घेतला. (वर नमूद केल्याप्रमाणे हिवाळ्यात प्रखर थंडीमुळे सैन माघारी घेतले गेले होते.) नियंत्रण रेषेच्या जास्तीत जास्त आत घुसखोरी करून राष्ट्रीय महामार्ग १ च्या जवळ यायचे. असे केले की, महामार्गावर कायमस्वरूपी ताबा मिळवता येईल आणि नंतर राजकीय वजन वापरून काश्मीरच्या प्रश्नाचे आंतरराष्ट्रीयीकरण करणे पाकिस्तानला सोपे पडेल असा या कारवाईचा मुख्य उद्देश होता. भारताला नवीन नियंत्रणरेषा मान्य करायला भाग पाडले की, लडाख व सियाचीनला भारतापासून तोडणे सोपे जाईल असा पाकिस्तानी युद्धनीतिज्ज्ञांचा कयास होता. तसेच घुसखोरीदरम्यान कारगील/काश्मीर परिसरात अंतर्गत बंडखोरी भडकावून भारताला अजून बुचकळ्यात पाडण्याचा पाकिस्तानी व्यूह होता. भारतीयांनी सियाचीन हिमनदीवर नियंत्रण मिळवण्यात जी क्लृप्ती वापरली तसाच काहीसा प्रकार पाकिस्तानने केला असा काही लेखकांचा सूर होता.

### युद्धाचा घटनाक्रम

#### पाकिस्तानी घुसखोरांचा भारतीय चौक्यांवर कब्जा

फेब्रुवारी १९९९ मध्ये पाकिस्तानी लष्कराने कडक हिवाळ्यातच भारतीय चौक्यांचा ताबा घेणे आरंभले. पाकिस्तानने ही कारवाई अशिय सूत्रबद्धरीत्या व थांगपत्ता लागू न देता पार पाडली. यातच भर म्हणजे, भारतीय गुप्तहेर खात्याला या घटनेची माहिती अजिबात मिळाली नाही. त्यामुळे भारतीय गुप्तहेर खात्याच्या कार्यक्षमतेवर सर्व भारतातून व जगातूनही चांगलीच टीका झाली. स्पेशल सर्व्हिसेसच्या सर्वोत्कृष्ट तुकड्या, तसेच नॉर्दर्न लाइट

इन्फंट्रीच्या ४ ते ७ बटालियन तुकड्या या कामात गुंतल्या होत्या. रिकाम्या चौक्यांव्यतिरिक्त भारतीय सैन्याला हल्ला करायला अवघड जावे म्हणून मोक्याच्या जागाही ताब्यात घेण्यात आल्या. साधारणपणे, अतिउंचावरील एक मुख्य चौकी व त्याला टेका देणाऱ्या दुय्यम उतारावरील व कमी उंचीवरील चौक्या ताब्यात घेण्यात आल्या. पाकिस्तानी मुख्य सैनिकांबरोबरच अफगाणी मुजाहिद्दीन, काश्मिरी मुजाहिद्दीन यांनाही या कार्यवाहीत समाविष्ट केले गेले.

पाकिस्तानने एकूण सुमारे १३० ते २०० चौरस किलोमीटर प्रदेश ताब्यात घेतला होता. तर मुशर्रफ यांच्या मते १३०० चौरस किलोमीटर इतका प्रदेश ताब्यात घेण्यात आला होता. भारतीय सरकारने 'ऑपरेशन विजय' या नावाखाली कारगीलच्या युद्धासाठी कार्यवाही चालू केली. त्यासाठी संख्येने मुळात सुमारे २,००,००० इतक्या फौजेचा आधार घेण्यात आला. परंतु भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता मोठ्या प्रमाणात युद्ध करणे शक्य नव्हते. त्यामुळे रेजिमेंटल व बटालियन पुरतीच कारवाई शक्य होती. अर्थातच फौजेची गणसंख्या २०,००० पर्यंत मर्यादित ठेवण्यात आली. अर्धसैनिक व वायुदल मिळून भारताने एकूण ३०,००० पर्यंत सैनिक कारगीलच्या युद्धात वापरले. घुसखोरांची संख्या पाकिस्तानी सूत्रांप्रमाणे साधारणपणे ५,००० होती. यात पाकव्याप्त काश्मीरमधील तोफखान्यामधील सैनिकही समाविष्ट होते.

भारतीय वायुसेनेकडूनही 'ऑपरेशन सफेद सागर' सुरू झाले. या ऑपरेशनद्वारे पायदळ सैन्याची ने-आण करण्याची मोठी भूमिका वायुसेनेने निभावली. मोठे बॉम्ब वाहून नेण्यासाठी लागणारे मोठे विमानतळ, भौगोलिक परिस्थितीमुळे या भागात नसल्याने इथेही वायुसेनेची व्याप्ती मर्यादित होती.

भारतीय नौदलानेही पाकिस्तानी बंदरांना आपले लक्ष्य केले व त्यामध्ये येणाऱ्या जहाजांची कोंडी केली. कराची बंदर हे खासकरून लक्ष्य करण्यात आले. या कृत्याने पाकिस्तानला आवश्यक अशा जीवनावश्यक वस्तुंची रसद थांबवली गेली. काही काळाने नवाज शरीफ यांनी उलगडवून सांगितले की, पाकिस्तानकडे या काळात फक्त ६ दिवसांचाच इंधन साठा राहिला होता व जर पूर्ण युद्ध सुरू झाले असते तर पाकिस्तानची बरीच नाचक्की झाली असती.

**भारतीय प्रत्युत्तर**

कारगीलचे युद्ध सुरू झाल्यानंतर केवळ रसद तोडण्यासाठी पाकिस्तानचा श्रीनगर-लेहमार्ग कापून काढायचा इरादा आहे हे नक्की झाले. भारताने सैन्य जमवाजमवीचे प्रयत्न सुरू केल्यानंतर पाकिस्तानकडून श्रीनगर-लेह मार्गावर मोठ्या प्रमाणावर उखळी तोफांचा मारा करण्यात आला. प्रत्युत्तरादाखल भारताकडून श्रीनगर-लेह या राष्ट्रीय महामार्गावर जवळचा भाग ताब्यात घेण्यास जास्त महत्त्व देण्यात आले. असे केले की, हा महामार्ग सुकर होणार होता.

महामार्गाच्या जवळच्या चौक्यांवरील भारतीय आक्रमणांत टायगर हिल व तोलोलिंग शिखर या दोन चौकीवजा शिखरांवरील आक्रमणे नोंद घेण्याजोगी होती. यानंतर बटालिक व तुर्तुक या सियाचीनलगतच्या भागाला लक्ष्य करण्यात आले. यातील काही जागा गमावणे

पाकिस्तानी संरक्षणाच्या दृष्टीने परवडणारे नव्हते. पॉइंट ४५९० व पॉइंट ५३५३ या त्यापैकी काही महत्त्वाच्या जागा होत्या. (या भागात शिखरांना नावे त्यांच्या उंचीप्रमाणे असतात.) ४५९० हा महामार्गाला सर्वात जवळचा पॉइंट होता तर ५३५३ हे युद्धातील सर्वात अधिक उंचीचे शिखर होते. पॉइंट ४५९० वर १४ जून १९९९ रोजी भारतीय सेनेने ताबा मिळवला व युद्धाचे पारडे हळूहळू भारताच्या बाजूने झुकू लागले. याच शिखराच्या ताब्यासाठी भारतीय सेनेला सर्वाधिक मनुष्यहानी सोसावी लागली. जरी भारतीय सेनेने जून मध्यापर्यंत महामार्गासाठी महत्त्वाची ठिकाणी ताब्यात घेण्यात यश मिळवले असले तरी पाकिस्तानी बाजूने युद्धाच्या अंतापर्यंत, तोफखान्याचा भडिमार चालूच होता.

**पाकिस्तानी सैन्याने पाडलेल्या भारतीय विमानाचे अवशेष**

भारताने जेव्हा महामार्गालगतच्या महत्त्वाच्या चौक्यांवर ताबा मिळवला तेव्हा भारतीय सैन्याने घुसखोरांना नियंत्रण रेषेपलीकडे पिटाळायचे धोरणे आखले. तोलोलिंगची लढाई व टायगर हिलची लढाई ही या युद्धातील सर्वात महत्त्वाची घटना मानली जाते. अनेक शूर भारतीय अधिकारी व सैनिक या लढायांमध्ये मरण पावले. तोलोलिंगच्या लढाईनंतर सामरिक तसेच राजनैतिकही पारडे पूर्णपणे भारताच्या बाजूने झुकले. टायगर हिलवर उशिरा नियंत्रण मिळवले गेले तरी ती सर्वात महत्त्वाची लढाई होती असे मानतात. टायगर हिल या लढाईत दोन्ही बाजूने जबरदस्त प्रयत्न झाले. पाकिस्ताननेही खंदक वगैरे खोदून भारतीय सैनिकांना चांगलेच झुंजावयाला लावले. सरतेशेवटी ४ जुलै रोजी टायगर हिल भारताच्या ताब्यात आली. या लढाईत भारताचे ५ सैनिक व पाकिस्तानचे १० सैनिक मृत्युमुखी पडल्याचे कळते.

## कारगील युद्धाची परिणती

### भारत

तत्कालीन पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वामुळे कारगील युद्धामधील १९९९ च्या निवडणुकात भारतीय जनता पक्षाला चांगलेच यश मिळाले.

कारगीलचे युद्ध हे भारतीय लोकसभा बरखास्त झाल्यानंतर झाले होते. तरीही युद्धाच्या सुरुवातीला विरोधी पक्षाने सत्तारूढ पक्षाला लष्करी कारवाईसाठी चांगलाच प्रतिसाद दिला. त्यामुळे भारतीय राजकारणात फारशी न दिसणारी एकता कारगील युद्धाच्या निमित्ताने दिसली. मात्र, आगामी निवडणुकांच्या दृष्टीने सत्ताधारी पक्षाला विजयाचे श्रेय घेणे लाभदायक ठरणार होते. म्हणून सैनिक कारवाई सुरू करण्यास विलंब लावला, असा आरोप युद्ध पार पाडल्यावर विरोधी पक्षाने केला. या आरोपनंतरही भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीने पुढील निवडणुकीत भरघोस यश मिळवले. निवडणूकपूर्व आघाडीने संपूर्ण बहुमत मिळवले असे हे १९८४ नंतर प्रथमच घडले.

कारगीलचे युद्ध भारतातील प्रसारमाध्यमांमध्ये मोठ्या प्रमाणात चर्चिले गेले. अनेक वाहिन्यांची युद्धक्षेत्रात जाऊन बातम्यांचे संकलन करण्यात चढाओढ झाली. त्यामुळे भारतीय नागरिकांना प्रथमच भारतातील युद्धाची क्षणचित्रे टीव्हीवर पहायला मिळाली. यामुळे भारतात

एकंदर राष्ट्रीयत्वाच्या विचारसरणीने चांगलेच मूळ धरले. या युद्धानंतर भरलेल्या कित्येक सैन्य भरती शिबिरांना अनेक राज्यांत अफाट प्रतिसाद मिळाला.

या युद्धात भारतीय गुप्तहेर खात्याचे कच्चे दुवे स्पष्ट झाले, संपूर्ण जगातून गुप्तहेर खात्याच्या अकार्यक्षमतेमुळे हे युद्ध झाल्याचे मत प्रदर्शित झाले होते. तसेच युद्धादरम्यान भारतीय सैन्याकडे अतिउंचीवर लढण्यासाठी पुरेशी साधने नव्हती. त्यामुळे युद्धानंतर भारताने सैन्यखर्चामध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ केली.

**पाकिस्तान**

कारगीलच्या युद्धानंतर पाकिस्तानी राज्यकर्त्यांमधील कच्चे दुवे बाहेर आले. पाकिस्तानातील नवाज शरीफ यांचे लोकशाही सरकार व लष्कर यांच्यात कोणत्याही प्रकारचा ताळमेळ नव्हता हे सिद्ध झाले. सूत्रांनुसार नवाज शरीफ यांना या युद्धाबद्दल फारशी माहिती नव्हती असे कळते. तसेच युद्धादरम्यानही पाकिस्तानी लष्कराने शरीफ यांना अद्यतने दिली नाहीत. त्यामुळे नवाज शरीफ यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर या युद्धासाठी मान्यता मिळवणे अवघड गेले. अगदी युद्धाच्या काळात नवाज शरीफ यांना, त्यांच्या अगदी जुना लष्करी मित्र असलेल्या अमेरिकेनेही सैन्य माघारीचा सल्ला दिला. पाकिस्तानने सुरुवातीपासूनच हे सैनिक आमचे नाहीत हा पवित्रा घेतल्याने शहीद सैनिकांचा स्वीकार करण्यास नकार दिला. ज्या सैनिकांना मानाने अंत्यसंस्कार मिळायला पाहिजे होते, त्यांचे संस्कार भारतीय सैन्याने केले. त्यामुळे पाकव्याप्त काश्मीरमध्येही सरकारविरुद्ध जनमताची लाट उसळली. पाकिस्तान सरकार व पाक लष्कर यांच्यातील दरी वाढत गेली. असे कळते की, मुशर्रफ यांच्यावर कारवाईची तयारी शरीफ यांनी केली होती. परंतु मुशर्रफ यांनी शरीफ यांचे प्रयत्न फोल पाडले. यादरम्यान एका घटनेत मुशर्रफ यांचे विमान इस्लामाबाद येथे उतरू देण्यास नकार दिला. परंतु त्यांचे विमान त्यांच्या निष्ठावंतांनी दुसऱ्या विमानतळावर उतरवून मुशर्रफ यांचा जीव वाचवला. मुशर्रफ यांनी हत्येचा प्रयत्न या आरोपाखाली शरीफ यांचे लोकशाही सरकार उलथून लावले व पाकिस्तानात आणीबाणी लागू केली. त्यानंतर काही दिवसातच पाकिस्तानच्या भल्यासाठी आपले सत्तेत राहणे गरजेचे आहे, असे दूरचित्रवाणीवर सांगत लष्करी राजवट लागू केली.

### ४.२.१.२. भारत–चीन संबंध

चीन व भारत ही आशियातील दोन सगळ्यात मोठी शेजारी राष्ट्रे. भारताला स्वातंत्र्य मिळताच चीनच्या राष्ट्रवादी सरकारशी भारताने राजनैतिक संबंध प्रस्थापित केले. १ ऑक्टोबर १९४९ रोजी चँग काय शेक सरकार उलथून पडून माओत्सेतुंगच्या नेतृत्वाखाली चीनमध्ये साम्यवादी सरकार प्रस्थापित झाले. ३० डिसेंबर १९४९ रोजी भारताने चीनच्या नव्या सरकारला राजनैतिक मान्यता दिली. पण्णीकरण हे साम्यवादी चीनमधील भारताचे पहिले राजदूत होते.

**तिबेट प्रश्न**

एकोणिसाव्या शतकात भारत व चीन यातील एक आघातप्रतिबंधक राज्य म्हणून

तिबेटचे महत्त्व भारताच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांना जाणवले. त्यांच्या दृष्टीने भारताच्या उत्तरेला वसलेले तिबेट म्हणजे भारताचे एक संरक्षककडेच होते. त्यामुळे तिबेट चीनच्या दुबळ्या व नामधारी सार्वभौमत्वाखाली असले तरी व्यावहारिकदृष्ट्या ते ब्रिटिश प्रभावाखाली असावे अशी त्यांची नीती होती. चीन सरकारच्या दौर्बल्यामुळे ती बऱ्याच अंशी फलद्रूपही झाली होती.

१९९१ मध्ये चीनमध्ये झालेली राज्यक्रांती व त्यात मांचू राजसत्तेचे झालेले पतन ही संधी साधून तिबेटने चीनचे सार्वभौमत्व झुगारून देऊन आपले स्वातंत्र्य घोषित केले होते. जून १९१२ मध्ये तिबेटच्या दलाई लामाने तिबेटची सत्तासूत्रे आपल्या हाती घेतली. चीनने तिबेटच्या त्या स्वातंत्र्याला कधीच मान्यता दिली नाही. तिबेट हा चीनचा एक अविभाज्य घटक आहे अशीच त्यांची भूमिका होती. तसेच १९११ नंतर व्यावहारिकदृष्ट्या तिबेटने स्वातंत्र्य मिळविले असले तरी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कोणत्याही राष्ट्राकडून तिबेटच्या स्वातंत्र्याला कायदेशीर मान्यता मिळाली नव्हती.

१९४९ मध्ये चीनमध्ये साम्यवादी सरकार प्रस्थापित होताच तिबेटमध्ये घटनाक्रम वेगाने फिरू लागले. तिबेट चीनच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली आणण्याचा त्या सरकारचा निर्धार होता. त्यानुसार १९५० मध्ये तिबेटच्या मुक्तीकरिता चीनने आपले सैन्य तिबेटमध्ये पाठविले. भारती सीमेनजीक सुरू झालेल्या चीनच्या त्या लष्करी कारवाईमुळे भारत सरकार साहजिकच अस्वस्थ झाले. चीन तिबेटमध्ये शांततेने तडजोड व्हावी याकरिता भारताने बोलणे लावून पाहिले. परंतु 'चीनच्या सीमेचे संरक्षण करण्याकरिताच तिबेटमध्ये लष्कर पाठविण्यात आले आहे, तिबेटबाबतचा भारतीय दृष्टिकोन चीनप्रती शत्रूत्व राखणाऱ्या परकीयांच्या प्रभावामुळे बनला आहे', असे उत्तर चीनकडून भारताला मिळाले. चीनच्या आक्रमणाविरुद्ध मदतीकरिता विनंती तिबेटने संयुक्त राष्ट्रसंघाकडे केली. परंतु तिबेटचा प्रश्न शांततापूर्ण वाटाघाटींद्वारा सुटू शकेल असा विश्वास त्या वेळी भारताने व्यक्त केला. इतर राष्ट्रांकडूनही भारताच्या या भूमिकेला पुष्टी मिळाली. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाकडून त्या संदर्भात कोणतीही कार्यवाही झाली नाही.

१९१४ मध्ये भारत व तिबेट यात झालेल्या सिमला करारानुसार तिबेटमध्ये भारताला काही अधिकार प्राप्त झाले होते. त्यानुसार दक्षिण तिबेटमध्ये भारताने काही महत्त्वाच्या ठिकाणी आपली व्यापारी केंद्रे प्रस्थापित करून, पोस्ट व तारायंत्रे यांनी ती भारताला जोडली होती. इच्छेनुसार तिबेटमध्ये व्यापाराची व संचाराची मुभा त्या करारानुसार ब्रिटिश नागरिकांना दिली गेली होती. शिवाय व्यापारी केंद्रांच्या कक्षेत किंवा व्यापार मार्गांवर त्यांच्याकडून गुन्हे घडल्यास त्यांची चौकशी तिबेटी कायद्यानुसार नव्हे तर भारतीय कायद्यांनुसार तिबेटमधील ब्रिटिश एजंटाने करावी, अशीही तरतूत त्या करारात होती. १९३० पासून तिबेटची राजधानी ल्हासा येथे एक कायम ब्रिटिश रेसिडेंट ठेवण्यात आला होता. भारतातून तिबेटला शस्त्रेही निर्यात होत होती. एकंदरीत तिबेटचे परराष्ट्र संबंध व व्यापार यावर भारताच्या ब्रिटिश सरकारचा संरक्षणात्मक स्वरूपाचा प्रभाव होता. चीनच्या संभाव्य दडपणाला अडसर व बाहेरच्या जगाशी संपर्क ठेवण्याचा मार्ग म्हणून भारताशी संबंध तिबेटलाही महत्त्वाचे होते.

चीनच्या लष्करी दबावाखाली नमणे छोट्याशा तिबेटला भागच पडले. २३ मे १९५१ रोजी चीन-तिबेट करारावर स्वाक्षरी केली व भारतानेही तो करार मान्य केला.

यानंतर भारत-तिबेट संबंधांबाबत भारत व चीन यांत वाटाघाटी सुरू झाल्या. २९ एप्रिल १९५४ रोजी चीन व भारत यांत तिबेटबाबत करार झाला. या कराराचे दोन भाग होते. पहिल्या भागात, परस्परांच्या अंतर्गत कारभारात ढवळाढवळ न करणे, ही पंचशीलची तत्त्वे विषद करण्यात आली होती. ही तत्त्वे दोन्ही राष्ट्रांच्या संबंधांना आधारभूत ठरावीत अशी अपेक्षा होती.

कराराच्या दुसऱ्या भागात, चीनचा तिबेट प्रदेश व भारत यांतील व्यापारसंबंधीच्या अटी नमूद करण्यात आल्या होत्या. तिबेटमध्ये भारताची याटुंग, ग्यान्असी व गारटोक ही तीन व्यापारी केंद्रे कायम राहावीत, परंतु त्याबरोबर चीनचीही तशीच तीन व्यापारी केंद्रे नवी दिल्ली, कलकत्ता व कालिम्पाँग येथे प्रस्थापित व्हावीत; यात्रेकरूंना प्रवासाचे अधिकार दोन्ही राष्ट्रांत सारखे असावेत अशा त्या तरतुदी होत्या. दोन्ही राष्ट्रांतील दळणवळण मार्ग म्हणून, शिष्कीला, माना, नीटी, कुन्ग्री बिन्ग्री, धर्मा व लिपू या सहा खिंडींचा उल्लेख त्या करारात करण्यात आला होता.

या कराराबरोबरच, ब्रिटिश शासनकाळाचा वारसा म्हणून भारताकडे आलेल्या तिबेटमधील विशेषाधिकारांवरही पाणी सोडण्याचे भारताने कबूल केले. भारतीय व्यापारी यात्रेकरू यांच्या संरक्षणाकरिता ठेवलेले याटुंग व ग्यान्असी येथील सुमारे दोनशे सैनिकांचे आपले दल भारताने सहा महिन्यांच्या आत माग घ्यावे; तिबेटमध्ये भारताने उभारलेली पोस्ट, तारायंत्रे व टेलिफोन यंत्रणा व भारताच्या मालकीची असलेली तेथील बारा विश्रामगृहे योग्य त्या किमतीला भारताने चीन सरकारच्या स्वाधीन करावीत, तिबेटमध्ये भारताकडे असलेल्या सर्व इमारती व जमीन भारताने चीनला परत करावी व आवश्यक वाटेल तेवढी जमीन व इमारती चीनकडून भाडेपट्टीने घ्याव्यात, यालाही भारताने मान्यता दिली.

१९५९ मध्ये चीनविरुद्धच्या तिबेटी उठाव त्याविरुद्धची चीनची लष्करी कार्यवाही अधिकच उग्र व कठोर बनली. त्यामुळे दलाई लामा सुरक्षिततेकरिता भारतात निघून आले. भारत सरकारने त्यांना आश्रय दिला. परंतु तिबेटचे निर्वासित सरकार भारतात स्थापण्याची परवानगी मात्र त्यांना दिली नाही. दलाई लामांच्या पाठोपाठ चिनी दडपशाहीमुळे धास्तावलेले हजारो तिबेटी निर्वासित भारतात आश्रयाला आले. १९५९ मधील वीस हजारांची त्यांची संख्या १९६२ मध्ये तीस हजारावर गेली.

भारत-चीन यांच्यातील दीर्घकालीन सुरळीत संबंधासाठी एक लोकशाहीवादी 'बफर झोन' आवश्यक आहे. तिबेटबाबत भारताचे धोरण बदलताना दिसते. प्रथम १९५४ मध्ये चीनबरोबर पंचशील करार करून भारताने तिबेट हा चीनचा भाग असल्याचे मान्य केले. मात्र तिबेटी जनतेला चिनी राजवट नको होती आणि तिबेटी जनतेचे स्थलांतर सुरू झाले आणि भारताचे धोरण बदलले. राजीव गांधी यांनी १९८८ मध्ये केलेल्या बीजिंग दौऱ्यात भारताने तिबेटला स्वायत्तता देण्याचा मुद्दा उपस्थित केला. तिबेटला खरी स्वायत्तता मिळेपर्यंत तिबेटी निर्वासित त्यांच्या मातृभूमीत परतू शकणार नाहीत, असे भारतातर्फे स्पष्ट करण्यात आले.

मात्र वर्तमान परिस्थितीत तिबेटबाबत भारताने पुन्हा एकदा भूमिका बदलली. १४ मार्च २००८ रोजी तिबेटमध्ये झालेल्या निदर्शनांपासून आणि ती रोखण्यासाठी चीनने योजलेल्या उपायांपासून अलिप्त राहण्याचे धोरण भारताने स्वीकारले. या वादावर शांततेने तोडगा काढण्याची भूमिका घेण्यात आली.

**नकाशा प्रश्न**

चीनमध्ये प्रकाशित झालेल्या काही नकाशात रेखाटण्यात आलेल्या भारत-चीन सीमेनुसार सुमारे ५०,००० चौरस मैलाचा भारतीय प्रदेश चीनचा असल्याचे दर्शविले होते. १९५४ मध्ये नेहरूंनी त्या चुकीच्या सीमारेषेचा प्रश्न आपल्या चीन दौऱ्याचे वेळी चिनी नेत्यांजवळ काढला होता. त्यावेळी, ते नकाशे म्हणजे चीन मुक्तीपूर्वीच्या नकाशांच्या नव्या आवृत्त्या आहेत, तत्संबंधी विचार करण्यास पेकिंग सरकारला अजून वेळच मिळालेला नाही, असे उत्तर चाऊ-एन-लाय यांनी नेहरूंना दिले.

ते विवादात्मक नकाशे १९५८ मध्ये 'चायना पिक्टोरियल'च्या जुलैच्या अंकात पुन्हा प्रकाशित झाले. २१ ऑगस्ट १९५८ रोजी भारताने चीनकडे तत्संबंधात आपला निषेध व्यक्त केला. तेव्हा 'चीन सीमेच्या सर्वेक्षणाचे काम चीन सरकारने अद्याप हाती घेतलेले नाही व संबंधित राष्ट्रांशी बोलणी केल्याशिवाय कोणताही एकतर्फी निर्णय चीन सरकार घेणार नाही', असे भारताला कळविण्यात आले. भारत-चीन हिमालयीन सीमा दर्शविणारे भारतीय नकाशेही चीनची प्रतिक्रिया जाणून घेण्याच्या हेतूने भारताने चीन सरकारला अनेकदा दाखविले. परंतु त्यावर कोणत्याही प्रकारे आक्षेप त्या सरकारने घेतला नाही.

**सीमा प्रश्न**

तिबेटमधील या घटनांबरोबरच १९५४ पासून भारत व चीन यात सुरू झालेल्या सीमातंट्यामुळेही उभय राष्ट्रांतील कटुता तीव्रतर होत गेली. या सीमातंट्यांना प्रारंभ झाला तो उत्तर प्रदेशच्या गढवाल जिल्ह्यात सोळा हजार फूट उंचीवर असलेल्या बारा होटी या सपाटीच्या क्षेत्रात. बारा होटी येथे वर्षानुवर्षे भारताच्या सीमा सुरक्षा दलाचे ठाणे होते. १९५४ च्या ग्रीष्मात या ठाण्यावर भारताचे सीमा सुरक्षा पथक जाऊन पोहोचले तेव्हा तेथे तिबेटी अधिकारी व त्यांच्या पाठीशी सशस्त्र चिनी सैनिक अगोदरच ठाण मांडून बसल्याचे व त्या भागातील भारतीय धनगरांकडून ते सक्ती करवसुली करीत असल्याचे त्यांना आढळले. तेथे पोहोचलेल्या भारतीय पथकाला तेथून हुसकावून लावण्याचा त्यांनी प्रयत्न केला.

सिंकियांगमधील यारकंद व तिबेटमधील गारटोक या चिनी ठिकाणांना जोडणारा, अक्साई चीनमधून जाणारा रस्ता, १९५७ मध्ये चीनने बांधून पूर्ण केला. १९५८ मध्ये भारत सरकारने दोन टेहळणी पथके अक्साई चीनमध्ये पाठवली त्यावेळी चीनने भारतीय प्रदेशातून रस्ता नेल्याचे भारत सरकारला कळले. तिबेटी टोळ्यांच्या प्रदेशाला वळसा घालून तो रस्ता जात असल्याने तिबेटमध्ये जाण्याकरिता पेकिंग सरकारच्या दृष्टीने तो सर्वात सुरक्षित व म्हणून महत्त्वाचा मार्ग होता. भारतीय प्रदेशावरून रस्ता नेण्याची चीनची ही कार्यवाही अर्थातच गंभीर स्वरूपाची होती. चीनने त्याबाबत भारताला परवानगी विचारणे तर दूरच, पण साधे कळविलेही नव्हते. भारताने त्याबद्दल चीन वकिलाकडे आपला निषेध नोंदविलाही, पण

चीनने त्याची दखलही घेतली नाही.

जुलै १९५८ मध्ये चिनी सैनिकांनी पूर्व लडाखमध्ये शिरून तेथील खुर्नाक किल्ला व्यापला. स्पान्गर येथे छावणी ठोकली व तेथील भारतीय सुरक्षा जवानांना अटक केली. वर्षानुवर्षे मान्य झालेल्या भारत-चीन सीमेचे उल्लंघन करून चिनी सैनिकांनी भारतीय प्रदेशात तळ ठोकला आहे हे स्पष्ट करून २६ सप्टेंबर १९५९ रोजी नेहरूंनी त्या चिनी कार्यवाही विरुद्धचा भारताचा कडक निषेध व्यक्त केला.

भारताच्या ईशान्य सीमेवरील 'नेफा' (नोर्थ ईस्टर्न फ्रंटिअर एजन्सी) विभागातही या काळात गंभीर स्वरूपाच्या चकमकी चालल्या होत्या. १९५९ च्या ग्रीष्मात, नेफा तिबेटी सीमा सुस्पष्ट करणाऱ्या व अनेक दशकांपासून सर्वमान्य असलेल्या मॅकमोहन रेषेच्या क्षेत्रात मोठ्या संख्येने चिनी सैनिक शिरले. त्यांच्या त्या आक्रमक हालचालींमुळे भारतीय चौक्यांतील सुरक्षा सैनिकांशी त्यांच्या चकमकी उडू लागल्या. नेफाच्या सुबान्सरी विभागातील लोंगजू या भारतीय चौकीवर चिन्यांनी उघडपणे हल्ले केले. तेव्हा चीनमधील भारतीय वकिलाने २८ ऑगस्ट १९५९ राजी 'लोंगजूवरील हल्ला म्हणजे चिनी सैनिकांनी भारतीय प्रदेशावर हेतूपुरस्सर केलेले आक्रमण होय.' अशा कडक शब्दात चीन सरकारकडे भारताचा निषेध नोंदवला.

हे सर्व सीमातंटे म्हणजे परस्परविरोधी विचारप्रणालीच्या दोन राष्ट्रांत धुमसणाऱ्या राजकीय वैराग्याचाच एक आविष्कार होता हे १९५९ पर्यंत उघड झाले. 'पाश्चिमात्य साम्राज्यवादाचा' पाठिंबा असलेला भारताचा 'विस्तारवाद' व चीनचे सुरक्षा हितसंबंध यांत संघर्ष अटळ आहे. हिमालयीन भागातील नेफा व लडाख या प्रदेशांवर मालकी हक्क खरा चीनचाच आहे. गतकाळात भारतीय 'विस्तारवादी' व पाश्चिमात्य 'साम्राज्यवादी' यांनी हिमालय क्षेत्रातील चिनी प्रदेशावर अतिक्रमण केले. सिक्कीम, भूतान, नेपाळ यांवरही त्यांनी आपला प्रभाव प्रस्थापित केला. त्या इतिहासाचा दाखला देऊन भारत स्वार्थ साधण्याकरिता तो साम्राज्यवादी दावा उचलून धरीत आहे. जे राष्ट्र पाश्चात्य साम्राज्यवादाचा पोटतिडकीने धिक्कार करते त्याच भारताने त्याच साम्राज्यवादाचा व वसाहतवादाचा परिपाक म्हणून भारताच्या ताब्यात आलेल्या चिनी प्रदेशावर आपला हक्क असल्याचा दावा करणे निश्चितच आवश्यक आहे. भारताच्या या कृतीमुळे चीनच्या प्रादेशिक अबाधित्वाला व सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असल्याने त्या प्रदीर्घ साम्राज्यवादी आक्रमणाचे दुष्परिणाम नाहीसे करण्याकरिता संपूर्ण भारत चीन सीमेचे नव्याने रेखांकन व्हावे हे अगत्याचे आहे, असा युक्तिवाद चीन सरकार अट्टाहासाने करू लागले.

नोव्हेंबर १९५९ पर्यंतच्या सीमा तंट्यात सर्वात गंभीर स्वरूपाची ठरलेली कोंगका घटनेनंतर भारत-चीन वाटाघाटी व्हाव्यात अशी सूचना चाऊ-एन-लाय यांनी केली होती. परंतु तशी बोलणी होण्यापूर्वी नक्की कोणत्या प्रदेशाच्या स्वामित्वाबद्दल मतभेद आहेत ते प्रथम स्पष्ट झाले पाहिजे, असे नेहरूंना वाटत असल्याने त्यावेळी त्यांनी चीनच्या त्या सूचनेला प्रतिसाद दिला नव्हता. परंतु बोलणी करण्यास नकार दिला तर सीमा प्रश्नाबाबतची भारताची बाजू तितकीशी समर्थनीय किंवा न्याय्य नाही असा परराष्ट्रांचा गैरसमज होण्याचा धोका होता. शिवाय तुलनात्मक दृष्ट्या सीमाक्षेत्रातील भारताचे शासकीय व लष्करी

दौर्बल्यही त्यामुळे उघडे पडल्यासारखे झाले असते. त्यापेक्षा, चीनने केलेल्या वाटाघाटींच्या सूचनेला प्रतिसाद देऊन भारताने आपली बाजू न्याय्य असल्याचे सिद्ध करून दिले तर भारताला इतर राष्ट्रांचा पाठिंबा मिळू शकेल, असे नवी दिल्ली येथील परराष्ट्रांच्या प्रतिनिधींनी भारत सरकारला सुचविले. शिवाय, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील सर्व विवाद्य प्रश्न शांततेच्या व वाटाघाटींच्या मार्गे सोडविले जावेत या नियमाशी, पंचशील तत्त्वांचे प्रणेते या नात्याने नेहरूंची बांधिलकी होती. या कारणामुळे ५ फेब्रुवारी १९६० रोजी, 'वाटाघाटी' नव्हे तर, 'बोलणी' करण्याकरिता दिल्लीला येण्याचे निमंत्रण नेहरूंनी चाऊ-एन-लाय यांना पाठविले.

नेहरू-चाऊ-एन-लाय भेट २०-२५ एप्रिल १९६० च्या दरम्यान नवी दिल्ली येथे झाली. अक्साई चीनवरील हक्क मागे घेण्यास चीन कधीही तयार होणार नाही हे त्या बोलण्यांतून स्पष्ट झाले. चीनने या वेळी तडजोड म्हणून पुढे मांडलेली योजना सामान्यतः अशी होती की, लडाखमधील अक्साई चीन या प्रदेशावर भारताने पाणी सोडावे आणि त्या मोबदल्यात नेफाच्या जवळजवळ सर्व प्रदेशावरील हक्क चीनने सोडून द्यावा. भारताच्या दृष्टीने चीनच्या या सूचनेचा अर्थ असा होत होता की, चीनने अगोदरच व्यापलेला अक्साई चीन हा भारताचा एक प्रदेश जर भारताने देऊन टाकला तर भारताच्या नेफाच्या काही भागावरील स्वामित्वाच्या हक्काचा दावा सोडून देण्यास चीन तयार होईल.

चीनची ही 'तडजोड' योजना भारताला मान्य होईल हे अशक्यच होते. भारताचा कोणताही प्रदेश चीनला देऊन टाकून चीनपुढे नमते घेणे हे नेहरूंना व भारतीय जनमताला रुचले नसते हे तर खरेच, परंतु त्याचबरोबर तशा 'तडजोडी'तून भारताचे लष्करी दौर्बल्य उघडे झाले असते व त्याचा फायदा घेण्यास, भविष्यात चीन नक्कीच पुढे सरसावला असता, हा महत्त्वाचा विचार भारतापुढे होता.

सीमातंट्यातून मार्ग काढण्याच्या हेतूने भारताने आपल्या बाजूने काही सूचना करून पाहिल्या. अक्साई चीन भारताने चीनला दिल्यास त्या मोबदल्यात चुंबी-खोऱ्याचा प्रदेश चीनने भारताला द्यावा अशी एक सूचना भारताने केली. परंतु आपल्या अगदी लहानशाही प्रदेशावर पाणी सोडावे लागेल, अशी कोणतीही सूचना ऐकून घेण्याची चीनची तयारी नव्हती.

नेहरू-चाऊ-एन-लाय बोलण्यातून फलनिष्पत्ती झाली ती एकच. ती म्हणजे विवाद्य प्रदेशातील आपापले स्वामित्व सिद्ध करण्याकरिता उभय पक्षांनी आपली बाजू सबळ पुराव्यांनिशी तयार करावी व दोन्ही राष्ट्रांच्या सीमा अधिकाऱ्यांनी एकत्र बसून त्या पुराव्यांची विश्वसनीयता व समर्थनीयता पडताळून पाहावी असे ठरले.

जून ते डिसेंबर १९६० या काळात दोन्ही राष्ट्रांच्या सीमातज्ज्ञांनी, गतकाळातील नकाशे, ऐतिहासिक व शासकीय स्वरूपाची कागदपत्रे, आपली बाजू न्याय्य असल्याचे सिद्ध करण्याच्या हेतूने पुरावा म्हणून पुढे मांडली. भारतीय तज्ज्ञांनी, अक्साई चीन व नेफा या प्रदेशावरील भारताचे स्वामित्व पटवून देण्याकरिता भारतीय बाजू मोठ्या कौशल्याने परिश्रमपूर्वक तयार केली; तर चीनने मात्र आपल्या दाव्याच्या समर्थनार्थ पुरावे वगैरे गोळा करण्याकडे फारसे लक्ष दिले नव्हते. यावरून, नकाशे, करारनामे, रूढी आणि शासनाची परंपरा अशा कोणत्याच गोष्टी विचारात घेण्याची चीनला गरज वाटत नाही; तर आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार

लडाखवर, नेफा विभागातील प्रदेशावर चीनचा हक्क पोचत असो वा नसो, ते प्रदेश हस्तगत करण्याचा चीन सरकाचा निर्धार यावरूनही राजकीय तडजोडीद्वारा सीमा प्रश्नाची उकल होणे शक्य नाही हे भारताला या गोष्टीवरून कळून चुकले.

## भारत–चीन युद्ध (१९६२)

### १९६२ च्या युद्धाची कारणे

भारताकडून अधिकाधिक दमदारपणे केली जाणारी विधाने, चिनी लष्करी दडपणला तोंड देण्याच्या क्षमतेबद्दल भारत सरकार लोकसभेला देत असलेली आश्वासने, सीमेवरील भारतीय दलांचे वाढते सामर्थ्य व त्यांच्या लष्करी हालचाली यामुळे युद्ध सज्जतेकरिता भारताला अधिक वेळ देऊ नये असे चीन सरकारला वाटले असावे. अर्थात, लडाख व नेफा विभागात आक्रमक युद्धाची सिद्धता बऱ्याच महिन्यांपासून चीनने चालविली होतीच. अशा परिस्थितीत सीमाक्षेत्रात लष्करीदृष्ट्या भारत आपली स्थिती मजबूत करीत आहे हे दिसताच चीन निकरावर आला. शेवटी ऑक्टोबर १९६२ मध्ये चीनने भारतावर हल्ला केला. ऑक्टोबरमध्ये हल्ला करण्यामागील कारण उघडच होते. भारताला प्रतिहल्ला करण्याला वेळ न मिळू देणे, हिवाळ्यात जोरदार बर्फवृष्टीला प्रारंभ झाला की, त्या भागात लष्करी हालचाली अशक्य झाल्या असत्या.

बऱ्याच वर्षांपासून चिघळणारा भारत–चीन सीमातंटा हे चीनच्या हल्ल्यामागील एक प्रमुख कारण होते हे तर खरेच. त्याचबरोबर वाटाघाटींचा सोयीस्कर मार्ग सोडून देऊन, चीनच्या मुख्य सत्ताकेंद्रापासून शेकडो मैल दूर असलेल्या हिमालयाच्या अवघड व दुर्गम अशा प्रदेशात युद्ध चालविण्याचा धोका पेकिंग सरकारने पत्करला, यामागे इतरही काही कारणे होती. एक तर, नेहरू म्हणाले त्याप्रमाणे, चीनला दक्षिण आशियाचे नेतृत्व हवे होते. भारताने चीनचे ते पुढारीपण मान्य न केल्याने भारताला अवमानित करून नमवणे चीनला अगत्याचे वाटले. एकदा भारताला नमविले की मग आग्नेय आशियावर प्रभाव प्रस्थापित करणे सहज शक्य होईल असे चीनला वाटत होते. चीनच्या अंतर्गत अडचणींकडून चिनी जनतेचे लक्ष अन्यत्र वळविण्याची गरज, तसेच आपल्या आर्थिक व शासकीय पद्धतीचे श्रेष्ठत्व आणि भारताच्या आर्थिक विकासाचा व लोकशाही पद्धतीचा फोलपणा जगापुढे सिद्ध करण्याची ईर्षा असाही हेतू चिनी हल्ल्यामागे असल्याचे सांगण्यात आले.

मात्र त्यापेक्षा चिनी हल्ल्याची खरी कारणे वेगळीच होती. एक म्हणजे चीनची नीती मुळातच विस्तारवादी होती. ब्रह्मदेशापासून इंडोनेशियापर्यंतच्या क्षेत्रातून ब्रिटन, फ्रान्स, नेदरलँड या वसाहतवादी सत्तांचे उच्चाटन झाल्यामुळे जी राजकीय पोकळी निर्माण झाली ती चीनने भरून काढावी ही पेकिंग सरकारची महत्त्वाकांक्षा होती.

चीन व सोव्हिएत संघ यात त्याकाळी वृद्धिंगत होत असलेली कटुता हेही एक कारण चिनी हल्ल्यामागे होते. भारत–चीन युद्ध भडकले की, साम्यवादी जगाच्या ऐक्याला तडा जाण्याचा धोका पत्करूनही असंलग्न भारताला मदत करणे चालू ठेवावयाचे की आशियायी उपखंडातील आपली राजकीय उद्दिष्टे बाजूला ठेवून साम्यवादी चीनला पाठिंबा द्यावयाचा याचा निर्णय घेणे सोव्हिएत संघाला भाग पडेल व चीनसंबंधिची सोव्हिएत नीती स्पष्ट होऊन

जाईल, असे चीनला वाटत होते. तसेच त्या संकटकाळात मदतीकरिता भारत पाश्चिमात्यांकडे वळला की, भारताच्या असंलग्नता नीतीचा फोलपणा उघड होईल आणि मग पश्चिमेकडे झुकलेल्या भारताशी मैत्री करणे व्यर्थ आहे हे सोव्हिएत संघाला कळून चुकेल, असाही चीनचा अंदाज होता. शिवाय, क्युबात सोव्हिएत संघाने अण्वस्त्र तळ उभारण्याच्या कारणावरून उद्‌भवलेल्या आणीबाणीत अमेरिका व सोव्हिएत रशिया त्याकाळी गुंतली असल्याने, भारत-चीन युद्ध व त्यातील भारताची पीछेहाट यामुळे नेहरू सकरारवरील व त्यांच्या असंलग्नता नीतीवरील भारतीय जनतेच्या विश्वासाला तडा जाऊन ते सरकार कोलमडेल व आफ्रिका व आशिया खंडातील भारताच्या प्रतिष्ठेलाही जबरदस्त धक्का बसेल, हाही चीनच्या दृष्टीने एक महत्त्वाचा फायदा होता.

लष्करी बळाने भारताला नमवून लडाखवरील हक्क सोडून देण्यास भारताला भाग पाडावे याकरिता चीनने रणभेरी फुंकली ती प्रथम लडाखमध्ये नव्हे तर नेफा विभागात. ८ सप्टेंबर १९६२ रोजी चिनी फौजा थागला कड्यावरून पुढे आल्या व त्याच्या अडीच मैल दक्षिणेला असलेल्या ढोला येथे त्यांनी आपले पाय रोवले. त्याविरुद्ध चीन सरकारकडे भारताने आपला निषेध नोंदविला. परंतु त्याचा काही परिणाम होत नाही असे दिसताच तोवांग येथून भारताने आपल्या फौजा पुढे नेल्या. ऑक्टोबरच्या मध्यकाळात उभय पक्षात चकमकी होत राहिल्या. याच काळात थागला क्षेत्रात आवश्यक ती लष्करी सज्जता करून चीनने नेफा विभागात २० ऑक्टोबर रोजी हल्ला चढविला. खिन्झेमाने व ढोला ही दोन्ही ठिकाणी लागलीच पडली आणि त्यापाठोपाठ एका आठवड्यातच, संख्याबळ व आत्मक्षमता या दोन्हीत श्रेष्ठ असलेल्या चिनी लष्कराने कामेंग सीमा विभागात पसरलेल्या भारतीय लष्कराची पूर्ण दाणादाण उडविली. याच वेळी पूर्व नेफा व लडाख येथेही त्यांनी आक्रमक हल्ल्यांना प्रारंभ केला.

अल्पकाळातच भारताच्या संरक्षण फळ्या कोलमडल्या. एका महिन्यात चीनच्या प्रखर हल्ल्यांमुळे तोवांगमधून नेफा विभागातील लष्करीदृष्ट्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या से-ला व बोमडी-ला या खिंडीतून, तसेच पूर्वेकडील बोलांग येथून भारतीय तुकड्यांना माघार घ्यावी लागली. लडाख क्षेत्रातही भारताने नव्याने प्रस्थापित केलेली ठाणी जमीनदोस्त झाली. पूर्वेला आसामवर धडक मारता येईल अशा पवित्र्यात मॅकमोहन रेषेपासून दीडशे मैलावर चिनी फौजा येऊन थडकल्या.

तोवांग हे महत्त्वाचे युद्ध केंद्र पडणार हे स्पष्ट होताच, युद्धबंदी व्हावी, तत्कालीन संपर्क रेषेपासून उभय पक्षांनी फौजा मागे घ्यावा व सीमा समस्येची उकल करण्याकरिता वाटाघाटी सुरू करण्यात याव्या, अशी सूचना २४ ऑक्टोबर रोजी चाऊ-एन-लाय यांनी केली. ती मान्य करणे म्हणजे चीनची लडाखव्याप्ती गृहीत धरून बोलणी करण्याला संमती दिल्यासारखे होणार होते. त्यामुळे 'चीनच्या मागण्यांपुढे झुकणे म्हणजे अत्यंत उद्दाम, आक्रमक व विस्तारवादी शत्रूच्या दयेवर जगणे होय आणि भारत ते कधीही करणार नाही', असे चाऊ-एन-लाय यांना कळवून नेहरूंनी ती सूचना फेटाळून लावली. २६ ऑक्टोबर रोजी भारत सरकारने आणीबाणी घोषित केली व त्या संकटप्रसंगी भारताला सहानुभूती व पाठिंबा द्यावा असे आवाहन परराष्ट्रांना केले.

## युद्धबंदी : परराष्ट्रांची प्रतिक्रिया

मात्र तोपर्यंत भारताची आसाममधील संरक्षण फळी पूर्ण कोलमडून नेफा क्षेत्रात भारतीय लष्कराचा धुव्वा उडालेला असूनही व लडाखमध्ये चीनचा वरचष्मा प्रस्थापित झाल्याचे स्पष्टपणे प्रत्ययाला येत असूनही चीनने एक अत्यंत धूर्त व राजकारणी डाव म्हणून एकतर्फी युद्धबंदी केल्याचे व रणक्षेत्रापासून फौजा माघारी घेत असल्याचे २० नोव्हेंबर रोजी जाहीर केले.

हिवाळ्यात बर्फवृष्टीला प्रारंभ झाला की दळणवळणाचे मार्ग बंद होऊन पुरवठ्याची समस्या उद्‌भवण्याची शक्यता, डोंगरी प्रदेशात भारतीय सैन्य हरले असले तरी आसामच्या सपाटीवर भारतीय प्रतिकार कडवा होण्याची संभाव्यता; भारताला पाश्चिमात्यांकडून मदत मिळणे शक्य आहे याची झालेली जाणीव, भारतावर आक्रमण केल्याबद्दल जागतिक लोकमताकडून एवढेच नव्हे तर साम्यवादी राष्ट्रांकडूनही होत असलेली प्रखर टीका, आक्रमणाचा प्रतिकार करण्याकरिता चीनविरुद्ध एकमताने उभे ठाकलेले भारतीय राष्ट्र, अशी निरनिराळी कारणे चीनच्या एकतर्फी युद्धबंदीकरिता देण्यात आली होती.

याशिवायही दोन महत्त्वाची कारणे होती. एक म्हणजे भारतीय प्रदेश गिळंकृत करण्याची चीनची महत्त्वाकांक्षा नाही हे आपल्या कृतीने सिद्ध करून देऊन राजनैतिक क्षेत्रात आफ्रो-आशियायी राष्ट्रांकडून चीनला पाठिंबा मिळवून घ्यावा व भारताला वाटाघाटी करण्यास भाग पाडावे हा चीनच्या त्या युद्धबंदीमागील एक प्रमुख हेतू होता. दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे सोव्हिएत संघाने युद्धबंदीकरिता चीनवर आणलेले दडपण, ही शक्यता खुद्द नेहरूंनी त्यावेळी व्यक्त केली होती. या तर्काला ब्रिटिश-रशियातज्ज्ञ व्हिक्टर झोर्झा यांनी जोरदार दुजोरा दिला आहे. १७ ते २० नोव्हेंबरच्या काळात नेहरू व सोव्हिएत नेते क्रुश्चेव यांची भेट ठरली होती पण ती होऊ शकली नाही. कारण त्या वेळी क्रुश्चेव हे युद्धबंदीकरिता चिनी नेत्यांवर दडपण आणण्यासाठी गुप्तपणे गेलेले होते असे के. पी. एस. मेनन यांनी नेहरूंच्या मताची पुष्टी करताना नमूद केले आहे.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताला कोणकोणत्या राष्ट्रांकडून खरा पाठिंबा मिळू शकतो हेही त्या संकटकाळात भारत सरकारला कळून चुकले होते. नेहरूंनी पाठिंब्याकरिता केलेल्या आवाहनाला मिळालेला प्रतिसाद भारताच्या दृष्टीने काहीसा निराशाजनकच होता. असंलग्नता नीतीमुळे ज्या राष्ट्रांनी आपल्या पदरात लाभ पाडून घेतले होते, त्यांच्याकडूनही भरीव पाठिंबा भारताला मिळाला नाही. उलट राष्ट्राराष्ट्रांतील संघर्षाचे वेळी असंलग्नता हे एक मोठे सोयीस्कर तत्त्व ठरू शकते, असा कटू प्रत्यय भारताला त्या काळात आला. अनेक असंलग्न राष्ट्रांनी भारत-चीन संघर्षाकडे तटस्थ दृष्टिकोन ठेवला व दोन्ही युद्धमान राष्ट्र वाटाघाटींद्वारा सीमातंट्यातून मार्ग काढतील, अशी आशा व्यक्त करण्यापलीकडे त्यांनी कोणतेही वक्तव्य केले नाही. दक्षिण आशियात पाश्चिमात्य राष्ट्रांशी लष्करी संबंध असलेल्या राष्ट्रांनीच केवळ भारताला पाठिंबा व्यक्त केला. इतर राष्ट्रांनी, त्या संघर्षात उघड झालेले भारताचे दौर्बल्य व चीनचे सामर्थ्य पाहता, भारताला पाठिंबा देण्यात दडलेले धोके ओळखून तटस्थता राखली. शिवाय चीनने आफ्रो-आशियायी राष्ट्रांत केलेल्या कुशल प्रचारामुळे, भारत-चीन सीमातंट्यात चीनची बाजूच न्याय्य व समर्थनीय आहे, असे त्यांना वाटू लागले, तर उलट भारताच्या

भूमिकेबद्दल त्यांच्या मनात साशंकता निर्माण झाली.

चिनी आक्रमणाविरुद्ध मदत मिळण्याच्या दृष्टीने अनुकूल प्रतिसाद भारताला मिळाला तो, अल्प प्रमाणात का होईना, पाश्चिमात्यांकडून. थोडी फार शस्त्रास्त्रे व साधनसामग्री घेऊन अमेरिकन विमाने कलकत्त्याला पोचली व भारतीय लष्कराला व वायुदलाला मदत देण्याचे आश्वासन अमेरिका व ब्रिटन यांने दिले. या आश्वासनांची पूर्ती पूर्णांशाने अमेरिकेकडून झाली मात्र नाही. सोव्हिएत संघाकडूनही भारताला शस्त्रास्त्रे मिळत होतीच. चीनयुद्ध म्हणजे भारताच्या पंचशील व असंलग्न नीतीचा पराभव असे सकृतदर्शनी वाटले तरी त्या संकटप्रसंगी पाश्चिमात्य राष्ट्रे व सोव्हिएत संघ या दोहोकडून अल्पशी का होईना, मदत मिळू शकली हा असंलग्नतेचा एक फायदा निश्चितच होता.

डिसेंबर १९६२ मध्ये श्रीलंका, इजिप्त, घाना, ब्रह्मदेश, इंडोनेशिया व कंबोडिया या सहा राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक बैठक, भारत–चीन तडजोड घडवून आणण्याच्या हेतूने कोलंबो येथे भरली. त्यांनी तयार केलेल्या योजनेत, चीनने २० किलोमीटर अंतरापर्यंत आपल्या फौजा माघारी घ्याव्या, भारताने आपली तत्कालीन ठाणी कायम ठेवावीत, वाटाघाटींद्वारो समस्येची उकल होत नाही तोपर्यंत चीनने खाली केलेला २० किलोमीटरचा टापू निर्लष्कर मानण्यात यावा. पूर्वीय विभागात 'प्रत्यक्ष नियंत्रण रेषा' ही युद्धबंदी रेषा म्हणून मान्य व्हावी; या क्षेत्रातील उरलेल्या प्रदेशाविषयीचा व मध्यविभागातील प्रदेशाबद्दलचा विवाद युद्धमार्गाचा अवलंब न करता, वाटाघाटींद्वारा सोडविला जावा, अशा आशयाच्या शिफारशी केल्या होत्या.

चीनने परिषदेच्या सूचनांना केवळ तत्त्वतः मान्यता दिली, तर चीनचा आक्रमक म्हणून स्पष्ट उल्लेख परिषदेने केलेला नव्हता, हे वस्तूतः भारताला बोचले असूनही भारताने काही मुद्यांबाबत परिषदेकडून स्पष्टीकरण मिळाल्यानंतर त्या सूचनांना स्वीकृती दिली. मात्र चीनने लवकरच कोलंबो परिषदेच्या सूचना धुडकावून लावल्या. मार्च १९६३ मध्ये चीनने लडाख विभागात नव्या लष्करी चौक्या उभारल्या. त्यापैकी सात निर्लष्कर टापूत होत्या. चीनच्या या नीतीमुळे कायम स्वरूपाची सीमा तडजोड होणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष वाटाघाटी शक्य न झाल्या तर सीमाप्रश्न आंतरराष्ट्रीय न्यायालयासमोर किंवा एखाद्या निःपक्षपाती लवाद समितीकडे निर्णयार्थ सोपवावा ही भारताने एप्रिल १९६३ मध्ये केलेली सूचनाही चीनने फेटाळून लावली.

भारताने सीमा समस्या व चिनी आक्रमण या विरुद्ध संयुक्त राष्ट्रसंघाकडे तक्रार नेली नाही. एक तर भारताला बाहेरच्या राष्ट्रांची लुडबुड नको होती. शिवाय, संयुक्त राष्ट्रसंघापुढे कोणताही प्रश्न नेला, तर त्या समस्येची सरळपणे उकल होण्याऐवजी नवनव्या अडचणी उद्‌भवून राजकीय गुंतागुंत वाढते व प्रश्न अधिकच चिघळतो याचा इतका कटू अनुभव काश्मीरप्रकरणी भारताला आला होता की, कोणताही तंटा त्या आंतरराष्ट्रीय संघटनेकडे नेऊ नये असे भारताने ठरविल्यास नवल नव्हते.

**पराभवाची कारणे :–**

आर्थिक क्षेत्रातील भारताच्या दौर्बल्यामुळे लष्कर, नौदल व वायुदल यांच्या

आधुनिकीकरणाच्या दिशेने आवश्यक ते प्रयत्न झाले नव्हते, लष्कराला युद्धसाहित्याचा पुरवठा पुरेसा झाला नाही कारण दळणवळणाच्या सोयी अगदीच तुटपुंज्या होत्या; युद्धकाळात पुष्कळदा साधनसामग्री आसामच्या सपाटीपर्यंत जाऊन पडे. पण ती प्रत्यक्ष डोंगरी प्रदेशातील आघाडीपर्यंत पोचविण्यात मात्र अडचणी उपस्थित होत. त्यामुळे पुरवठाव्यवस्था तोकडी पडली; आपली तत्कालीन वाहनेही जुन्या घडणीची डोंगराळ भागातील वाहतुकीकरिता कुचकामाची होती. पर्वतमय प्रदेशातील युद्धतंत्राचे व चिनी लष्कराला तोंड देण्याच्या दृष्टीने आवश्यक ते खास प्रशिक्षण आपल्या सैनिकांना दिले गेले नव्हते. चिन्यांचे डावपेच, त्यांची युद्धपद्धती, शस्त्रसामग्री, संख्याबळ इत्यादी गोष्टींची आपल्या लष्कराला पुरेशी माहिती नव्हती. सैन्याच्या विविध विभागात परस्पर विश्वास, समन्वय व सहकार्य नव्हते; बऱ्याच वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांत आपसात बेबनाव होता व त्यांनी प्रत्यक्ष आघाडीवरील अधिकाऱ्यांच्या कामात नको ती ढवळाढवळ केल्याने गोंधळ निर्माण झाला, हेरखातेही असावे तसे सक्षम व जागरूक नव्हते; दुबळे, क्षमताशून्य, बेजबाबदार लष्करी नेतृत्व या कारणाचा उल्लेखही येथे करावा लागेल. राष्ट्रप्रमुख म्हणून पराभवाची जबाबदारी स्वीकारताना, चीनने भारताच्या पाठीत खंजीर खुपसला; आम्ही स्वप्नांच्या जगात वावरत होतो, चिनी आक्रमणामुळे आमचा भ्रमनिरास झाला, अशा आशयाचे उद्‌गार पंडित नेहरूंनी काढले होते. ते तात्त्विकदृष्ट्या काहीसे खरेही असले तरी आदर्शवादाच्या मागे लागल्याने नेहरूंना चीनच्या शत्रूत्वाची ओळख पटली नाही, त्यामुळे ते बेसावध राहिले व म्हणूनच चीनयुद्धाची शोकांतिका भारताच्या पदरी पडली.

**चीनविरुद्धच्या पराभवाचे परिणाम**

चीनविरुद्ध भारताच्या पदरी आलेल्या पराभवाचे फार गंभीर परिणाम दिसून आले. तेव्हापासून भारताच्या इतिहासाला काहीसे वेगळे वळण लागले असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. संरक्षणव्यवस्था व अंतर्गत राजकारण या क्षेत्रात या घटनेमुळे बदल घडून आले. नेहरू युगाच्या अस्ताची सुरुवात जणू त्या पराभवाने केली. एक प्रकारच्या आदर्शवादी तत्त्वनिष्ठेचा कालखंड संपून व्यवहारी व कठोर वास्तववादाच्या राजकारणाला सुरुवात झाली. कृष्ण मेनन यांना शेवटी राजीनामा द्यावा लागला.

पराभवाचा लागलीच जाणवलेला दुसरा महत्त्वाचा परिणाम म्हणजे काँग्रेस प्रतिष्ठेला व लोकप्रियतेला गेलेला तडा.

जनमानसावरील काँग्रेसचा प्रभावही यानंतर थोडाफार ओसरला. १९६२ पर्यंत अंतर्गत हेवेदावे, सत्तास्पर्धा, भ्रष्टाचार, गटबाजी यामुळे काँग्रेसची प्रतिमा डागाळली गेली होतीच. अशा परिस्थितीत पदरी आलेल्या पराभवाने काँग्रेसच्या लोकप्रियतेला चांगलाच धक्का बसला. मे १९६३ मध्ये अमरोहा, फरुकाबाद व राजकोट येथे झालेल्या लोकसभेच्या तीनही पोटनिवडणुकांत काँग्रेस उमेदवारांचा पराभव होऊन कृपलानी, लोहिया व मसानी हे विरोधी पक्षनेते व काँग्रेसचे कठोर विरोधक लोकसभेवर निवडून आले. त्यापाठोपाठ नेहरू सरकार विरुद्ध लोकसभेत अविश्वासाचा ठरावही मांडला गेला. भारताचे असंलग्नता धोरण, पंचशील तत्त्वांचा आदर्श, स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता या सर्वच गोष्टींबद्दल भारताच्या काही

राजकीय गटात व काही परराष्ट्रांतही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले. 'आशियाचा नेता' म्हणून भारताकडे पाहण्याचा दृष्टिकोनही बदलला. उलट त्या प्रमाणात चीनचा दबदबा वाढला.

या पराभवाचे पडसाद भारताच्या राजकीय व लष्करी वर्तुळावरही उमटले. आंतरराष्ट्रीय क्षेत्रात भारताच्या प्रतिष्ठेवर मोठाच आघात झाला असून ती हानी कधीही भरून न निघणारी अशी आहे अशीच परराष्ट्र खात्यातील अनेक अधिकाऱ्यांची समजूत झाली. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास डळमळला. पराभवाला जबाबदार असलेल्या अनेक लष्करी अधिकाऱ्यांच्या बदल्या दूर बिनमहत्त्वाच्या जागी झाल्या. लष्कराच्या मनोधैर्यावरही या पराभवाने साहजिकच विपरित परिणाम झाला.

चीनने केलेल्या हल्ल्यामुळे व त्याबद्दल चीनचा धिःकार करण्यात भारतीय कम्युनिस्ट पक्षाने केलेल्या टाळाटाळीमुळे त्या पक्षाबद्दल जनतेच्या मनात संताप दाटला व तो पक्ष जनतेच्या मनातून उतरला. खुद्द त्या पक्षातही रशियावादी व चीनवादी असे दोन गट पडून पक्ष दुभंगला. या कारणामुळे त्या पक्षाचे बळही ओसरले.

चीनच्या हल्ल्याने भारताच्या अर्थव्यवस्थेवर चांगलाच ताण पडला. यानंतर संरक्षण खर्चात उत्तरोत्तर वाढच होत गेली. त्याचा खर्च पेलणे भारताला जड जाऊ लागले. कराचा बोजा वाढू लागला. भाववाढ होऊ लागली. त्याचा परिणाम सामान्य जनजीवनावर तर झालाच, पण भारतीय नियोजनावरही त्यामुळे मोठा आघात झाला. नेहरूंच्या सैद्धांतिक समाजवादावर, त्यांच्या सामाजिक व आर्थिक परिवर्तनाच्या उद्दिष्टांवर त्यांचे विरोधक कडाडून टीका करू लागले. उजव्या शक्ती डोके वर काढू लागल्या.

या युद्धाचा, अप्रत्यक्षपणे का होईना, त्या काळात एक चांगला परिणाम दिसून आला, तो असा की ते परकीय आक्रमण येताच, त्या संकटकाळात, तोपर्यंत देशात घोंगावणारे भाषिक तंटे, राज्याराज्यांतील मतभेद, जातीय तेढ, विरोधकांची निदर्शने, संप, धमक्या यांचे वादळ शमले व सर्व पक्ष, राज्ये व सामान्य जनता एकजुटीने आक्रमणाला तोंड देण्यास निर्धाराने कटिबद्ध झाली.

### १९६२ नंतरची स्थिती

भारत-चीन युद्धानंतर इतकी वर्षे उलटली तरी भारत-चीन सीमातंट्याची उकल अजून झालेली नाही. कोलंबो परिषदेच्या सूचना चीनने मान्य कराव्यात व वाटाघाटीद्वारा सामीप्रश्न निकालात काढण्याकरिता भारताने बरेच प्रयत्न केले. परंतु कोलंबो योजनेच्या सर्व कलमांना मान्यता देण्याचे चीनने नाकारले. तसेच भारत-चीन-सीमावाद आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे सोपविण्याची भारताची सूचनाही चीनने धुडकावून लावली. लडाखच्या भागात चीनने उभारलेली सात ठाणी चीनने सोडून द्यावीत ही भारताची मागणी तर चीनने फेटाळून लावलीच पण त्याचबरोबर भारताने चीनचा ६०,००० किलोमीटरचा प्रदेश बेकायदेशीरपणे व्यापला असल्याचा आरोप चीनने १९६४ साली केला.

युद्धबंदीनंतर समेटासाठी भारताने केलेल्या सूचना फेटाळून लावीत असतानाच चीनने

अनेक बाबतीत उघड-उघड भारतविरोधी पवित्रा घेण्यास सुरुवात केली. सिक्कीम या भारताच्या राज्याजवळ चीनने आपले लष्कर उभे केले. काश्मीर खोऱ्यात जो प्रदेश पाकिस्तानने बेकायदेशीररीत्या बळकाविला होता, त्या प्रदेशातील चीन सीमेलगतचा काही भाग चीनच्या ताब्यात राहण्याबाबत १९६५ साली चीनने पाकिस्तानशी करार केला आणि पाकिस्तानला युद्ध साहित्याची मदत सुरू केली. मार्च १९७१ पासून पाकिस्तान सरकारने पूर्व पाकिस्तानात चालविलेल्या अनन्वित अत्याचाराबद्दल चीनने टीकेचे अवाक्षरही काढले नाही. उलट पूर्व पाकिस्तानमधील फुटीरतावादाला भारतानेच खतपाणी घातले असल्याचा व तेथे भारत अप्रत्यक्षरित्या हस्तक्षेप करीत असल्याचा आरोप चीनने केला. ऑगस्ट १९७१ मध्ये भारत-रशिया मैत्री करार झाल्यानंतर चीनने भारतावर अधिकच आग पाखडली. हा शांततेचा मैत्री करार नसून लष्करी करार आहे. हा करार करून भारताने स्वतःला साम्राज्यवादाशी निगडित करून घेतले आहे, असा आरोप चीनने केला. डिसेंबर १९७१ मध्ये भारत-पाक-युद्धाच्या वेळी चीनने उघडपणे पाकिस्तानला पाठिंबा दिला आणि भारताची आक्रमक राष्ट्र म्हणून निर्भर्त्सना केली; तसेच राष्ट्रसंघात अमेरिकेच्या भारतविरोधी पवित्र्याला साथच दिली.

भारतात अस्थिरता निर्माण करण्याचे प्रयत्नही या वेळी चीनने केले. नागालँड, मणिपूर व मिझोराममधील असंतुष्ट गटांना भारतविरोधी सशस्त्र कारवायांसाठी चीनने शस्त्रास्त्रे पुरविली. तसेच बांगलादेशातील भारतविरोधी गटांनाही चिथावणी देण्यास चीनने सुरुवात केली.

१९७६ सालापासून दोन्ही राष्ट्रांनी राजनैतिक प्रतिनिधींची देवाणघेवाण करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे चीनशी बिघडलेले संबंध एकदम सुधारतील असे मानण्याचे कारण नाही. मात्र दोहोत सलोखा प्रस्थापित करण्याच्या मार्गावरील हे पहिले पाऊल आहे, असे मानण्यास हरकत नाही. असा अभिप्राय या निर्णयाबाबत संसदेपुढे बोलताना भारताचे परराष्ट्रमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी व्यक्त केला.

भारतात १९७७ साली झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव होऊन जनता पक्ष सत्तारूढ झाल्याचे चीनने स्वागत केले. सोव्हिएत रशियाच्या दावणीला बांधलेले भारतातील सरकार जाऊन त्याची जागा जनता पक्षाच्या सरकारने घेतल्याबद्दल चीनने आनंद प्रदर्शित केला. कारण निवडणूक प्रचाराच्या दरम्यान जनता पक्ष सत्तारूढ झाल्यास तो पक्ष भारत-सोव्हिएत मैत्री कराराचा पुनर्विचार करेल असे वक्तव्य काही जनता पक्ष नेत्यांनी केले होते. आणि चीनशी जवळीक प्रस्थापित करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती. अशा वातावरणात चीनच्या परराष्ट्र मैत्री संघाचे एक शिष्टमंडळ १९७८ मध्ये भारतात आले. या भेटीचे आमंत्रण १९७४ व १९७६ साली चीनला गेलेल्या अखिल भारतीय डॉ. कोटनीस स्मारक समितीने चीनमध्ये मैत्री संघाला दिले होते. कॅन्टन येथे चीनने आयोजित केलेल्या व्यापारी प्रदर्शनात भारताचे व्यापारी प्रतिनिधी मंडळही सहभागी झाले. या वेळी दोन्ही देशात व्यापार सुरू करण्याबाबत व भिन्न क्षेत्रातील अनुभवी तज्ज्ञ मंडळींची देवघेव करण्याबाबत बोलणी झाली. या वाटाघाटींचे भारत सरकारने स्वागत केले. मात्र सीमावादाचा निकाल लागल्याखेरीज दोहोत खरा सलोखा निर्माण होणे शक्य नाही, असा अभिप्राय १६ मार्च १९७८ रोजी केलेल्या आपल्या भाषणात पंतप्रधान मोरारजी देसाई यांनी व्यक्त केला.

भारत–चीन तणाव शिथिल करण्यासाठी भारताने उचललेले महत्त्वाचे पाऊल म्हणजे १९७९ साली भारताचे परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांची चीन भेट. वाजपेयी चीनच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वी भारतीय संसद सदस्यांनी आणि वृत्तपत्रांनी भारत–चीन संबंधाचे बरेच विश्लेषण केले आणि चीनची मैत्री संपादन करण्याच्या उत्साहाच्या भरात जनता सरकारने राष्ट्रहिताकडे दुर्लक्ष केल्यास ते भारतीय जनता खपवून घेणार नाही असा इशारही दिला गेला. याला उत्तर म्हणून सीमावादाबाबतची भारताची तोवरची भूमिका आपण सोडणार नाही असे आश्वासन वाजपेयींनी चीनच्या दौऱ्यावर निघण्यापूर्वी दिले. चीन भेटीच्या दरम्यान चिनी नेत्यांशी वाजपेयींनी अनेक मुद्यावर चर्चा केली. या चर्चेच्या वेळी आफ्रिकेतील स्वातंत्र्य चळवळीबाबत तसेच पॅलेस्टाइनच्या समस्येबाबत दोहोत समान दृष्टिकोन असल्याचे आढळून आले. यावेळी चीन पाकिस्तानला पुरवीत असलेल्या युद्ध साहित्याबद्दल पाकव्याप्त काश्मीरच्या प्रदेशातून पक्का रस्ता चीनने तयार केल्याबद्दल व नागा बंडखोरांना चीन पुरवित असलेल्या शस्त्रास्त्रांबद्दल भारताची चिंता वाजपेयींनी स्पष्टपणे चिनी नेत्यांना कळविली. कैलास व मानस सरोवराला भेट देऊ इच्छिणाऱ्या भारतीय प्रवाशांना चिनी प्रदेशातून जाताना आवश्यक त्या सवलती देण्याची मागणी केली. तसेच दलाई लामांना भारतात दिला गेलेला आश्रय मानवतावादी भूमिकेतून दिला गेला आहे. त्यामागे चीनला विरोध करण्याची भूमिका नाही, असे वाजपेयींनी चिनी नेत्यांना सांगितले. या वाटाघाटीमुळे तणाव शैथिल्याची आशा निर्माण होते न होते तोच चीनने ती पुन्हा चिरडून टाकली. वाजपेयी चीनच्या दौऱ्यावर असतानाच चीनने भारताचे परराष्ट्रीय मित्र असलेल्या व्हिएतनामवर आक्रमण केले. अनपेक्षित हल्ल्याच्या या बातमीने वाजपेयी अडचणीत आले. कारण भारतीय परराष्ट्रमंत्री सद्भावना भेटीसाठी चीनमध्ये आलेले असताना चीनने भारतीय परराष्ट्रीय मित्रावर हल्ला करणे हा भारताचा उघड उघड अपमान आहे. भारताशी चीनने चालविलेल्या सलोख्याच्या वाटाघाटीत चमत्कारिक परिस्थितीत सापडलेल्या वाजपेयींना आपली चीन भेट घाई–घाईने आटोपती घ्यावी लागली. या अनपेक्षित घटनेमुळे भारत–चीन संबंध सुधारण्याची आशा पुन्हा मावळली. मूलभूत वादाचे निराकरण झाल्याखेरीज केवळ सद्भावना भेटींनी राष्ट्राराष्ट्रातील संबंध सुधारत नाहीत, हे या घटनांनी स्पष्ट केले. वाजपेयी यांच्या चीन भेटीचा एक परिणाम मात्र झाला, तो म्हणजे उभयपक्षी उच्चस्तरीय भेटींना प्रारंभ होऊन गोठून गेलेल्या संबंधामुळे निर्माण झालेला गतिरोध दूर झाला.

१९८० साली इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली अधिकारारूढ झालेल्या काँग्रेस सरकारने चीनशी संबंध सुधारण्याचे नव्याने प्रयत्न सुरू केले. चीनने भारताच्या प्रयत्नांना प्रतिसाद दिला. जून १९८१ मध्ये चीनने उपपंतप्रधान व परराष्ट्रमंत्री भारत भेटीसाठी आले. त्या वेळी सामोपचाराने दोन्ही दोन्ही राष्ट्रातील वाद मिटविण्याची त्यांनी जाहीरपणे तयारी दर्शविली. अफगाणिस्तानात आलेले रशियन लष्कर येथून काढून घेतले जावे. या चीनच्या मागणीला भारताने अनुकूलता दर्शविली. तसेच सीमावाद सोडविण्यासाठी उच्चस्तरीय बैठकी आयोजित केल्या जाव्यात. मात्र त्यांचा निकाल लावण्याची वाट न पाहता इतर क्षेत्रात दोन्ही राष्ट्रांनी सहकार्याचा मार्ग पत्करावा असेही ठरविण्यात आले. ऑक्टोबर १९८१ मध्ये मेक्सिकोतील कानकून येथील आंतरराष्ट्रीय परिषदेच्या वेळी इंदिरा गांधींनी तेथे आलेल्या चिनी नेत्यांशी

बोलणी केली. त्या अनुरोधाने १९८१ मध्ये मंत्रिस्तरीय वाटाघाटी सुरू झाल्या.

या प्रक्रियेत १९८४ साली इंदिरा गांधींच्या मृत्युने खंड पडला नाही. तेच सूत्र पंतप्रधान राजीव गांधी यांनी स्विकारले. नोव्हेंबर १९८५ मध्ये चीनच्या परराष्ट्र आर्थिक व्यवहार मंत्र्यांच्या भारतभेटीच्या वेळी परस्पर व्यापारी संबंधांची व्याप्ती वाढविण्याचा व तांत्रिक देवाणघेवाणीबाबतचा निर्णय घेण्यात आला. त्यासंदर्भात १९८६ साली इंडियन चेंबर ऑफ कॉमर्सच्या प्रतिनिधी मंडळाने चीनला भेट दिली. त्यानंतर पंतप्रधान राजीव गांधी यांनी १९८८ मध्ये चीनला भेट दिली. या भेटीमुळे दोघात सहकार्याची भावना निर्माण झाली. आजही भारत–चीन सीमवादाचा निकाल लागलेला नसला तरी शत्रूत्व ओसरून व्यापारी संबंध वाढत आहेत. ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

डिसेंबर १९८८ मध्ये राजीव गांधींनी दिलेल्या चीन भेटीने भारत–चीन संबंधातील नव्या पर्वास सुरुवात झाली. १९५४ मधील जवाहरलाल नेहरूंच्या चीन भेटीनंतर ३४ वर्षांनी चीनला भेट देणारे राजीव गांधी हे भारताचे पहिले पंतप्रधान होते. या पाच दिवसांच्या भेटीत त्यांचे चीनमध्ये स्वागत करण्यात आले. चीनच्या साम्यवादी पक्षाचे सरचिटणीस झाओ झिआंग, राष्ट्राध्यक्ष यांग शांगकुन व पंतप्रधान ली फेंग यांच्याशी राजीव गांधींनी बोलणी केली. परस्परांच्या भूमिका–आंतरराष्ट्रीय प्रश्न समजून घेण्यास यामुळे मदत झाली. या वेळी भिन्न क्षेत्रात सहकार्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सीमा निर्धारणाचे काम संयुक्त समितीकडे सोपविण्याचे ठरले. यानंतर एक दोन वर्षांत उच्चस्तरीय प्रतिनिधी मंडळाच्या गाठीभेटी विविध विषयांवरील चर्चेसाठी होत राहिल्या.

डिसेंबर १९९१ साली चीनचे पंतप्रधान ली फेंग यांची भारतभेट ही दोहोच्या संबंधांना बळकटी देणारी घटना होती. ३१ वर्षांनंतर चिनी पंतप्रधान भारताच्या दौऱ्यावर आले. वाटाघाटी अतिशय विधायक व सकारात्मक वातावरणात झाल्या. शांघाय व मुंबईला भारताचे व चीनने व्यापारी केंद्र प्रस्थापित केले जावे. व्यापाराचे नवे मार्ग खुले करावेत, सीमेवर शांतता राखावी असे महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

१९९१–९२ च्या दरम्यान आंतराष्ट्रीय परिस्थितीत क्रांतिकारी परिवर्तन झाले. रशियातील सोव्हिएत सत्ता लयाला जाऊन सोव्हिएत संघाचे विघटन झाले. त्यामुळे अमेरिका ही एकच महासत्ता शिल्लक राहिली आणि जागतिकीकरण व उदारीकरणाची नीती पुरस्कृत करणाऱ्या बड्या भांडवलवादी विकसित राष्ट्राचे दडपण विकासशील राष्ट्रांवर येऊ लागले. यामुळे चीन–भारत अशासारख्या विकासशील राष्ट्रांसमोर नवी आव्हाने उभी राहू लागली. या परिस्थितीत चीन व भारत यांना परस्पर सहकार्याची गरज विशेषत्वाने प्रतीत झाली. शिवाय आतंकवादाचे आव्हान दोन्ही देशांपुढे होतेच. अशा परिस्थितीत १९९३ नंतर दोहोतील संबंधांना बळकटी आणण्याचे प्रयत्न होऊ लागले. चीनमध्ये संयुक्त प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच १९९४ साली सीमेवरील लष्करात दोन्ही देशांनी कपात करण्याचे मान्य केले. त्याच वर्षी चीनमध्ये एक वर्षीय भारत महोत्सवाला प्रारंभ झाला.

नोव्हेंबर १९९६ साली चीनचे राष्ट्रपती झियांग झेमीन भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आले असताना अनेक करारांवर स्वाक्षऱ्या झाल्या. त्यात हाँगकाँगमधील भारतीय

वकिलात कायम ठेवणे, सीमेलगत लष्कराच्या कवायती न करणे किंवा त्याबाबत दुसऱ्या पक्षाला पूर्वसूचना देणे, सीमेवरील लष्करात कपात करणे, सीमेनजीकच्या दहा किलोमीटरच्या क्षेत्रात लष्करी विमानांना मज्जाव करणे तसेच ऊर्जानिर्मिती, पर्यटन, शिक्षण, कायदा, विज्ञान, तंत्रज्ञान, संस्कृती इ. क्षेत्रात देवाणघेवाण करणे आदी विषयांचा समावेश होता. १९९७ साली भारतीय औद्योगिक वस्तूंचे प्रदर्शन बीजिंगमध्ये तर चिनी उत्पादनांचे प्रदर्शन दिल्लीच्या प्रगती मैदानावर आयोजित करण्यात आले. चीनमध्ये मल्टीमीडिया तंत्रज्ञानाची प्रशिक्षण केंद्रे भारताने स्थापन करण्यास व टी. सी. एस. या भारताच्या बड्या सॉफ्टवेअर कंपनीची शाखा बीजिंगमध्ये, तर इन्फोसिसची शाखा शांघायमध्ये उघडण्याची चीनने परवानगी दिली. नोव्हेंबर ८७ मध्ये भारतीय स्टेट बँकेची शाखाही शांघायला उघडण्यास चीनने परवानगी दिली. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारताने केलेल्या प्रगतीला चीनने दिलेली ही पावतीच होती.

या कालावधीत दोन्ही देशात राजकीय स्तरावर वाटाघाटी चालत राहिल्या. व्यापार वाढत गेला. उत्तर प्रदेशातील लिपुलेख खोरे व हिमाचल प्रदेशातील शिपकीद्वारा अनुक्रमे १९९२ व ९६ साली भूमार्गे व्यापार होऊ लागला. भारताशी संगणकीय व दूरसंचार, तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सहकार्य करण्यास चीन विशेष रुची दाखवित आहे. १९९९ साली भारताचे विदेशमंत्री जसवंतसिंग व २००० मे-जूनमध्ये राष्ट्रपती नारायणन यांनी चीनचा दौरा केला. तर चिनी साम्यवादी पक्षाच्या पॉलिटब्यूरोच्या समितीने व संसदेच्या प्रतिनिधी मंडळाने भारताला भेट दिली. पाकिस्तानने कारगील भागात केलेल्या आक्रमणाला चीनने समर्थन दिले नाही. ४ जून १९८९ रोजी बीजिंगच्या तिनानमेन चौकातील विस्तीर्ण मैदानात चिनी शासनाविरुद्ध घोषणा करणाऱ्या व लोकशाहीची मागणी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जमावावर चिनी लष्कराने गोळीबार केला. त्यात हजारो विद्यार्थी प्राणास मुकले. या घटनेने तीव्र प्रतिकूल पडसाद पाश्चात्त्य जगात उमटले. चिनी सरकारवर आग पाखडण्यात आली. मात्र ही घटना म्हणजे चीनची अंतर्गत बाब होती असे वक्तव्य करून चीनवर टीका करण्याचे भारताने टाळले.

भारत हा अत्यंत महत्त्वाचा सन्माननीय शेजारी आहे, अशी सकारात्मक प्रतिक्रिया चीनचे पंतप्रधान वेन जिआबाओ यांनी १५ डिसेंबर २०१० मध्ये भारत भेटीच्या वेळी व्यक्त केली. असे असले तरी भारत-चीन संबंधातील हे सकारात्मक मुद्दे निश्चित महत्त्वाचे असले तरी दोहोतील सीमावाद अजूनही निकालात निघालेला नाही आणि सिक्कीम हा भारताचा अविभाज्य भाग असल्याचे अलीकडे चीनने मान्य केले असले तरी अरुणाचलला तशी मान्यता चीनने दिलेली नाही. त्या प्रदेशातील सुमारे पन्नास हजार चौरस किलोमीटरचा भाग आजही चीनच्या ताब्यात आहे.

### समारोप

भारत आणि चीन यांचे विभागीय पातळीवरील आंतरराष्ट्रीय संबंध अन्य शेजारी देशांशी जसे विकसित झाले, तसा विकास या दोन देशांतील द्विपक्षीय संबंधांचा झालेला नाही. आर्थिक विकासाच्या क्षमतांचा आढावा घेतल्यास एकविसावे शतक हे 'आशियाचे शतक' असा विश्वास व्यक्त केला जातो आणि अशा क्षमता साकार करणारे महत्त्वाचे शिल्पकार

भारत आणि चीन असल्यामुळे हे दोन देश 'आशियाचे शतका'ची रूपरेषा ठरवतील, असेही म्हणता येते. मात्र, मोठी आर्थिक शक्ती दोन्ही देशांकडे असूनही तसेच हे दोन देशच एकमेकांचे सर्वाधिक मोठे आणि सर्वात महत्त्वाचे शेजारी असूनही भारत-चीन संबंधांत स्थैर्य आणि दृढतेचा नित्यक्रम अद्याप सुरू व्हायचा आहे असे म्हणावे लागेल.

### ४.२.१.३. भारत-नेपाळ संबंध

नेपाळ हे भारताच्या उत्तर सीमेवरील एक लहानसे राष्ट्र आहे. परंतु त्या राष्ट्राच्या विशिष्ट भौगोलिक स्थितीमुळे भारताच्या परराष्ट्र नीतीत भारत-नेपाळ संबंधांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. एकीकडे भारत व दुसरीकडे रशिया व चीन यांतील आघात प्रतिबंधक राष्ट्र म्हणून नेपाळचे महत्त्व भारताच्या ब्रिटिश शासकांनाही जाणवले होते. त्यामुळे नेपाळचा व्यापार, परराष्ट्रनीती यांची सूत्रे त्यांनी बव्हंशी त्यांनी आपल्या हाती ठेवली होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर नेपाळबद्दलची नीती निश्चित करताना भारताची सुरक्षितता हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा साहजिकच भारत सरकारच्याही विचाराधीन होता. त्या दृष्टीने नेपाळबाबतची नीती विषद करताना, नेपाळच्या स्वातंत्र्याचा सन्मान राखला जाईल. नेपाळ एक प्रगतिशील राष्ट्र बनावे अशीच भारताची भूमिका आहे; परंतु भौगोलिक कारणांमुळे इतर राष्ट्रांच्या तुलनेत भारत-नेपाळ संबंधात विशेष जवळीक राहणार हे सत्य इतर राष्ट्रांनी जाणावे, अशी आमची अपेक्षा आहे, हे नेहरूंनी केलेले विधान त्या दृष्टीने सूचक होते.

१९४७ मध्ये पाकिस्तानची झालेली निर्मिती व १९४९ मध्ये चीनमध्ये आलेली साम्यवादी राजवट यामुळे नेपाळेचे भौगोलिक व राजकीय महत्त्व, भारत, चीन व पाकिस्तान या राष्ट्रांनाच केवळ नव्हे तर खुद्द नेपाळलाही जाणवले. एक राजकीय व्यक्तिमत्त्व असल्याची नेपाळची जाणीवही त्याबरोबर विकसित झाली. व पूर्वापार चालत आलेले भारताचे मार्गदर्शन बाजूला सारून स्वतंत्रपणे नीती निर्धारित करण्याची नेपाळची इच्छा बळावली. तसेच, नेपाळशी सलोखा असणे भारताला अत्यंत अगत्याचे वाटते. हे लक्षात येताच त्या परिस्थितीचा फायदा पदरात पाडून घेण्याचा प्रयत्नही, अभावितपणे नेपाळकडून होऊ लागला. त्यामुळे भारत व नेपाळ यांत हितसंबंधांचा संघर्ष नसला तरी त्यांना अधूनमधून तणाव निर्माण होई. परंतु त्याचबरोबर, व्यापार, दळणवळण इत्यादी गोष्टींकरिता नेपाळ बव्हंशी भारतावरच विसंबून असल्याने भारताशी सलोखा व मैत्री संबंध टिकविणे नेपाळच्या हितसंवर्धनाकरिता आवश्यक असल्याची जाणीव नेपाळला होती.

एका आघात प्रतिबंधक राष्ट्र म्हणून भारताच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचे असलेल्या नेपाळशी भारताचे संबंध मैत्रीपूर्ण असणे आवश्यक असल्याने भारत सरकारने त्या दिशेने पावले उचलली. त्याची फलश्रुती ३१ जुलै १९५० रोजी दोहोत घडून आलेल्या करारा झाली. दोन्ही राष्ट्रांत कायम शांतता व मैत्री नांदावी, परस्परांचे सार्वभौमत्व, प्रादेशिक अबाधित्व व स्वातंत्र्या यांचा सन्मान राखला जावा, कोणत्याही शेजारी राष्ट्राशी मतभेद किंवा तणाव निर्माण झाला (शेजारी राष्ट्राचे नाव नमूद करण्यात आले नसले तरी ते राष्ट्र चीन असणार हे उघडच होते) व त्यामुळे भारत-नेपाळ संबंधांवर विपरीत परिणाम होणार असला तरी त्याबाबत माहिती दोनही सरकारांनी एकमेकांना द्यावी, भारताकडून किंवा भारतीय भूमिकडून

गरजेनुसार शस्त्रे आयात करण्याची मुभा नेपाळला असावी, औद्योगिक व आर्थिक विकासाकरिता दोन्ही राष्ट्रांनी परस्परांना विशेष सवलती द्याव्या, अशा तरतुदी त्यात होत्या. त्यापाठोपाठ झालेल्या एका व्यापारी करारानुसार भारतातून नेपाळमध्ये आयात होणारा माल जकातयुक्त असावा अशी व्यवस्था करण्यात आली.

१९५५ च्या अखेरीस, प्रामुख्याने भारताच्याच पुढाकाराने संयुक्त राष्ट्रसंघात सदस्य म्हणून नेपाळला स्थान मिळाले. नेपाळ चीनच्या प्रभावाखाली जाऊ नये व भारत-नेपाळ दळणवळण सुलभ व्हावे या हेतूने भारताने नेपाळला भरीव मदत दिली व तत्संबंधित योजना तत्परतेने व क्षमतेने साकार करण्यात आल्या. १९५४ मध्ये काठमांडू येथील नेपाळच्या पहिल्या विमानतळाची उभारणी भारतीय इंजिनिअरांनी पूर्ण केली. १९५५ पर्यंत काठमांडू ते भारतीय सीमेवरील रक्सौल या गावापर्यंतचा रस्ता 'त्रिभुवन राजपथ' अत्यल्प काळात बांधला गेला. जलसिंचनाच्या व पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याच्या योजनांना चालना दिली गेली.

परंतु १९६० मध्ये चिनी प्रधानमंत्री चाऊ-एन-लाय यांनी नेपाळला दिलेली भेट व एप्रिलमध्ये घडून आलेला नेपाळ-चीन शांतता मैत्री करार, नेपाळ नरेशांनी लोकशाही सुधारणांची त्यांच्या देशात पायमल्ली केली होती. पाकिस्तान व चीन यांच्याशी एवढेच नव्हे तर इस्त्रायलशीही अधिक जवळकीचे संबंध प्रस्थापित करण्याचा नेपाळ नरेश करीत असलेले प्रयत्न; ५ ऑक्टोबर १९६१ रोजी झालेला चीन-नेपाळ सीमा करार, ल्हासा ते काठमांडू रस्ता तयार करण्याकरिता चीनने नेपाळला देऊ केलेली मदत, या सर्व घटनांमुळे, विशेषतः याच सुमारास भारत-चीन संबंधातील कटुता तीव्रतर झालेली असल्याने, भारत सरकार साहजिकच चिंतित झाले. भारत-नेपाळ सलोखा दृढतर व्हावा या हेतूने नेहरूंनी राजे महेंद्र यांना एप्रिल १९६२ मध्ये दिल्ली येथे आमंत्रित केले. या वेळीही परस्परांचे सार्वभौमत्व व प्रादेशिक अबाधित्व यांचा सन्मान व समान हितसंबंधांच्या सर्व बाबींवर विचारविनिमय यांवर भर देण्यात आला.

भारत-चीन युद्धाचे वेळी नेपाळने चिनी आक्रमणाचा उघडपणे निषेध केला नाही; उलट आपली तटस्थता व असंलग्नता अधिकृतपणे जाहीर केली हे भारताला काहीसे जाचक व्हावे हे साहजिकच होते.१९८५ सुमारास भारत-नेपाळ संबंधदेखील तणावग्रस्त होते. नेपाळवर चीनचा प्रभाव वाढत होता. भारतीय मालावर नेपाळ सरकारने जबर जकात लावली होती आणि नेपाळच्या बाजारपेठात भारताऐवजी चीनचा माल मोठ्या प्रमाणात विकला जात होता. याशिवाय नेपाळ चीनकडून शस्त्रास्त्रेही मिळवीत होते. नेपाळमध्ये काम करणाऱ्या भारतीयांना परवान्याखेरीज काम करण्यावर बंदी घालण्यात आली होती. या सर्व गोष्टी भारताला प्रतिकूल होत्या. विशेषतः भारताच्या सीमेला लागून असलेल्या नेपाळवर चीनचा प्रभाव वाढणे भारताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने निश्चितच धोक्याचे होते. अशा परिस्थितीत १९८९ मध्ये नेपाळवर आर्थिक निर्बंध लादण्याची वेळ भारतावर आली. त्यानंतर मात्र वाटाघाटींचे सत्र सुरू झाले. विशेषतः कोईराला प्रधानमंत्रीपदावर आल्यानंतर विचारविमर्श सुरू झाला. १९९६ च्या महाकाली कराराने संबंधांना नवे वळण मिळाले. भारताच्या प्रदेशातून नेपाळला माल वाहतुकीला परवानगी देण्यात आली त्यामुळे नेपाळचा व्यापार वाढला. भारताच्या मदतीने

अनेक प्रकल्प सुरू झाले. रेल्वेमार्ग, पूल बांधणी, वीजपुरवठा या क्षेत्रात सहकार्य देण्यात आले. धारण येथे मोठे वैद्यकीय संस्थान व विद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. ह्यासाठी लागणारी यंत्रसामुग्री पुरविण्याचे आश्वासन देण्यात आले. काठमांडूला देखील मोठे रुग्णालय उभारण्याचा निर्णय घेऊन त्या इमारतीचा शिलान्यास जून १९९७ मध्ये भारताचे पंतप्रधान इंद्रकुमार गुजराल यांच्या हस्ते करण्यात आला.

### ४.२.१.४. भारत–श्रीलंका संबंध

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत–श्रीलंका संबंधांना सुरुवात झाली ती काहीशा साशंकतेच्या वातावरणात. श्रीलंकेच्या युनायटेड नॅशनल पार्टी या पाश्चात्त्याकडून पक्षाच्या पहिल्या तीन प्रधानमंत्र्याच्या नेतृत्वाखाली श्रीलंकेचे पूर्वीच्या त्यांच्या साम्राज्यवादी स्वामीशी–ब्रिटनशी चांगलेच सख्य होते. त्यामुळे विशेषतः श्रीलंका व ब्रिटन यात असलेला सुरक्षा करार व ब्रिटनच्या नियंत्रणाखाली असलेले श्रीलंकेचे अर्थकारण या कारणांनी भारत सरकार श्रीलंकेच्या भूमिकेबात साशंक होते. १९५५ च्या बांडुंग परिषदेत, श्रीलंकेच्या प्रधानमंत्री कोटलावाला यांनी 'पाश्चात्त्यांचा साम्राज्यवाद' व 'सोव्हिएतांचा वसाहतवाद' यात काहीच फरक नाही. त्यामुळे 'पंचशील'मधील शांततामय सहअस्तित्वाचे तत्त्व अर्थशून्य व अव्यवहार्य आहे, अशा आशयाची विधाने उघडपणे केली होती. जागतिक शांततेकरिता धडपडत असलेल्या नेहरूंना त्यांची ती भूमिका साहजिकच रुचण्याजोगी नव्हती.

भारत व श्रीलंका यात शेजारधर्माचा सलोखा सहजपणे प्रस्थापित होऊ नये याला आणखीही एक महत्त्वाचे कारण होते, ते म्हणजे श्रीलंकेत स्थायिक झालेल्या भारतीयांची समस्या. श्रीलंकेच्या राष्ट्रजीवनात तेथील मूळ रहिवाशांच्या तुलनेत भारतीयांचा वरचष्मा प्रस्थापित होईल की काय, अशा धास्तीमुळे श्रीलंका सरकारने त्यांच्यावर राजकीय, आर्थिक व सामाजिक बंधने लादली. भारताला श्रीलंकेचे ते धोरण अन्याय्य वाटत होते. अनेक पिढ्यांपासून तेथे स्थायिक झालेल्या भारतीयांचा श्रीलंकेच्या आर्थिक विकासाला भरीव हातभार लागला होता. त्यामुळे त्यांना श्रीलंकेचे नागरिकत्व मिळावे हा त्यांचा हक्क आहे व तो त्यांना देणे ही श्रीलंकेची राजकीय व नैतिक जबाबदारी आहे असे भारत सरकारला वाटत होते.

मे १९५७ मध्ये बुद्धजयंती समारोहात सामील होण्याकरिता नेहरू श्रीलंकेला गेले तेव्हा दोन्ही राष्ट्रांतील अनिर्णित प्रश्नांची समाधानकारक उकल लवकरच होईल, अशी आशा त्या वेळी प्रस्तुत करण्यात आलेल्या एका संयुक्त निवेदनात व्यक्त करण्यात आली होती. प्रधानमंत्री भंडारनायके यांनीही भारताला भेटी दिल्या. दोन्ही राष्ट्रांच्या नेत्यांच्या या उच्चस्तरीय भेटींमुळे परस्पर सद्भाव वृद्धिंगत होण्यास मदत झाली.

जानेवारी १९६१ पासून सिंहली ही श्रीलंकेची राष्ट्रभाषा करण्याच्या श्रीलंका सरकारच्या निर्णयाविरुद्ध तेथील फेडरल पार्टीने (तेथे स्थायिक झालेल्या तामीळ लोकांनी संघटित केलेला पक्ष) तामीळ भाषेलाही योग्य ते स्थान मिळाले पाहिजे अशी मागणी करून आंदोलन सुरू केले व त्याबद्दल सहानुभूती राखून असलेल्या दक्षिण भारतातील तामीळ जनतेने, भारताने त्या प्रश्नाबाबत मध्यस्थी करावी, अशी विनंती भारत सरकारला केली तेव्हा, तो श्रीलंकेचा

अंतर्गत प्रश्न आहे. अशी भूमिका घेऊन भारत सरकारने त्या प्रश्नात ढवळाढवळ करण्याचे नाकारले. उलट व्यापारी क्षेत्रात उभय राष्ट्रांना जाणवणाऱ्या अडचणी दूर करून व्यापारवृद्धी व्हावी याकरिता उभय राष्ट्रांत करार करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात श्रीलंकेनेही भारताची बाजू उचलून धरली. गोवामुक्तीच्या वेळी सुरक्षा समितीत भारताच्या कार्यवाहीचे समर्थन श्रीलंकेने निःसंदिग्धपणे केले. तसेच काश्मीर समस्येबाबत संयुक्त राष्ट्रसंघाला पाठविलेल्या अहवालात, तो प्रदेश मोक्याचा वाटत असल्याने अमेरिका पाकिस्तानला त्याबाबत प्रोत्साहन देत आहे व त्यामुळेच काश्मीरप्रश्न चिघळणारा व गुंतागुंतीचा बनला आहे, असे मत श्रीलंका सरकारने व्यक्त केले होते.

श्रीलंकेने दिलेल्या या पाठिंब्याची जाणीव भारतालाही होती. ऑक्टोबर १९६२ मध्ये एस. डब्ल्यू. आर. डी. भंडारनायके यांच्या स्मरणार्थ उभारण्यात आलेल्या आयुर्वेदिक शोध संस्थेच्या उद्घाटन समारंभास उपस्थित राहण्याकरिता नेहरू कोलंबोला गेले. श्रीलंकेच्या त्या नेत्याबद्दल नेहरूंना असलेल्या आदराचे ते प्रतीक होते.

ऑक्टोबर १९६४ मध्ये सिरिमाओ भंडारनायके व लाल बहादूर शास्त्री यांच्यात त्या प्रश्नावर चर्चा होऊन उभय राष्ट्रांत एक करार करण्यात आला. त्यात ८,७५,००० श्रीलंकास्थित तामिळांबाबत निर्णय घेण्यात आला. त्यापैकी तीन लक्ष तामिळांना नंतरच्या १५ वर्षांच्या काळात भारतात परत पाठविण्यात यावे, त्यांना भारताने नागरिकत्व द्यावे; श्रीलंकेतील उरलेल्या दीड लक्ष तामिळांबद्दल नंतर विचारविनिमय होऊन वेगळा करार व्हावा, अशी तरतूद करण्यात आली.

या कराराची अंमलबजावणी होणे मात्र लांबणीवर पडले. कारण १९६५ मध्ये श्रीलंकेतील युनायटेड नॅशनल पक्ष सत्तेवर आला व त्याच्या नेतृत्वाखाली श्रीलंका पार्लमेंटने १९६७ पर्यंत त्या करारावर शिक्कामोर्तब केले नाही. १९६७ नंतरही उभय राष्ट्रांतील नेत्यांत त्या प्रश्नावर वाटाघाटी झाल्या. परंतु त्या समस्येची समाधानकारक उकल होऊ शकली नाही. त्यामुळे दोन्ही राष्ट्रांच्या संबंधात कटुतेचा सूर अधूनमधून ऐकू येऊ लागला.

जुलै १९८३ मध्ये श्रीलंकेत झालेल्या गंभीर वांशिक दंगलीत शेकडो निरपराध तामिळांची हत्या झाल्याची बातमी भारतात येऊन थडकली. त्यामुळे तामिळनाडू राज्यातील लोकमत अत्यंत प्रक्षुब्ध झाले आणि श्रीलंकेविरुद्ध कडक धोरण अंगीकारावे असे दडपण केंद्र सरकारवर येऊ लागले. श्रीलंकेत होणाऱ्या वांशिक दंगलींचे मूळ घसरत्या अर्थकारणात होते आणि ही श्रीलंकेची अंतर्गत बाब होती. त्यामुळे भारताला त्यात हस्तक्षेप करता येणार नव्हता. परंतु तेथील तामिळ नागरिक हे मूळ भारतीय असल्याने त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी घेणे ही भारताची नैतिक जबाबदारी होती.

अशा पेचात सापडलेल्या भारत सरकारने श्रीलंका सरकारशी निकडीची बोलणी केली आणि तामिळांना न्याय्य अधिकार दिले जावेत व संरक्षण दिले जावे अशी मागणी केली. त्यानुसार श्रीलंकेचे अध्यक्ष जयवर्धने यांनी काही सवलती तामिळांना देऊ केल्या. परंतु त्या पुरेशा पडत नसल्याने तामिळ पुढाऱ्यांचे समाधान झाले नाही आणि या असंतोषातून तामिळ फुटीरवादाचा व दहशतवादाचा जन्म झाला. श्रीलंकेतील सिंहली नागरिकांच्या बरोबरीचे

अधिकार तेथील तामिळांना मिळणार नसतील तर श्रीलंकेच्या उत्तरेला असलेल्या तामिळ बहुसंख्य प्रदेशाला स्वायत्तता दिली जावी अशी मागणी तेथील तामिळ नेते करू लागले. तामिळांचे काही जहाल नेते तर तेथे तामिळांचे स्वतंत्र राज्य प्रस्थापित करण्यासाठी त्यांनी सशस्त्र लढा सुरू केला. अशा संघर्षासाठी ते दक्षिण भारतातून आणि परदेशात स्थायिक झालेल्या तामिळांकडून निधी व शस्त्रास्त्रे गोळा करू लागले. तामिळनाडूमधील काही लोक अनधिकृतरित्या श्रीलंकेतील तामिळ नेत्यांना साहाय्य देऊ लागले. यामुळे भारत सरकार पेचात सापडले. श्रीलंकेतील भारतीय तामिळांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यात भारत प्रयत्नशील असले तरी जहाल तामिळ गटांच्या फुटीरवादी वृत्तीला खतपाणी घालणे भारताला विघातक वाटत होते.

या दरम्यान जहाल तामिळ गटांनी सरकारविरुद्ध सशस्त्र संघर्षाचा पवित्रा घेताच श्रीलंका सरकारने त्यांच्याविरुद्ध लष्करी कार्यवाही सुरू केली. तामिळ बंडखोरांचा निःपात करण्यास एक स्वतंत्र खातेच श्रीलंकेत स्थापन करण्यात आले. अशा सततच्या संघर्षामुळे सामान्य तामिळ भारताच्या आश्रयाला येऊ लागले. १९८५ पर्यंत या तामिळ निर्वासितांची संख्या एक लक्षापर्यंत वाढली. तामिळ बंडखोरांचा नायनाट करणे श्रीलंकेच्या लष्कराला जड जाऊ लागले. तेव्हा अमेरिका, चीन, इंग्लंड, इस्त्रायल या परकीयांकडून अत्याधुनिक युद्ध साहित्य मिळविण्याची खटपट श्रीलंका सरकार करू लागले. श्रीलंकेच्या अडचणीचा फायदा घेऊन तेथे अमेरिकेचा नाविक तळ प्रस्थापित करण्याबाबत अमेरिका प्रयत्न करू लागले. इस्त्रायलच्या मोसाद या गुप्तचर संघटनेची मदत श्रीलंका घेत असल्याच्या बातम्या भारतात येऊ लागल्या.

या वार्तांमुळे भारत अतिशय चिंतित झाले. श्रीलंकेने परकीयांची मदत घेऊन त्या मोबदल्यात त्यांना नाविक तळ उभारण्यास परवानगी दिल्यास भारताच्या दक्षिण टोकानिकट परकीयांच्या हालचाली वाढणार होत्या. त्यामुळे तेथे अस्थैर्य व असुरक्षितता वाढणार होती आणि भारताच्या सुरक्षिततेला गंभीर धोका निर्माण होणार होता. हे टाळण्याचा एकच मार्ग भारतापुढे होता तो म्हणजे श्रीलंका सरकार व तेथील तामिळ बंडखोर गट यांच्यात मध्यस्थी करून त्यांना परस्पर विचारविनिमयासाठी एकत्र आणणे. या मार्गाचा अवलंब १९८५ साली राजीव गांधींनी केला. सर्व तामिळ नेत्यांशी व श्रीलंका सरकारशी संपर्क साधून त्यांना राजीव गांधींनी वाटाघाटींसाठी उद्युक्त केले. त्याप्रमाणे भूतानची राजधानी शिप्पू येथे बंडखोर तामिळ गटांचे प्रतिनिधी व श्रीलंका सरकारचे प्रतिनिधी यांच्यात जुलै १९८५ मध्ये वाटाघाटी सुरू झाल्या. परंतु वाटाघाटींना प्रारंभ झाल्यानंतर चौथ्या दिवशी श्रीलंकन अध्यक्षांची हत्या करण्याचा प्रयत्न झाला. त्यात तामिळ दहशतवाद्यांचाच हात असल्यामुळे वाटाघाटी फिसकटल्या. त्यानंतर दोन्ही विरोधी पक्षांनी पुन्हा संघर्षासाठी कंबर कसली. मुख्य म्हणजे तामिळ बंडखोरांना भारताची फूस आहे, तेथून पैशाची व शस्त्रास्त्रांची मदत तामिळ बंडखोरांना मिळते, या मदतीला भारताने प्रतिबंध केल्यास या समस्येचा निकाल लावणे कठीण होणार नाही. अशी वक्तव्ये श्रीलंकेचे शासन करू लागले. या सुमारास तामिळ बंडखोरही सुरुवातीची स्वायत्ततेची मागणी सोडून स्वतंत्र राज्याची मागणी करू लागले. सामोपचाराने समस्या सोडविण्याचा भारताचा सल्ला मानण्यास ते आता तयार नव्हते, तर त्यांच्या हिंसक, विघातक कारवायांमुळे श्रीलंका सरकारही इर्षेला पेटले होते. अशा स्फोटक वातावरणात

भारताचे श्रीलंकेशी संबंध बिघडू लागले आणि ते लष्करवादी सत्तांच्या प्रभावाखाली जाण्याचा गंभीर धोका निर्माण झाला. या प्रक्षोभक परिस्थितीत श्रीलंकेत शांतता प्रस्थापित करण्यासाठी तेथील अध्यक्षांशी वाटाघाटी करून तेथे भारतीय लष्कर पाठविण्याबाबतचा निर्णय भारत सरकारला अत्यंत नाइलाजाने घ्यावा लागला. परंतु त्यानंतरही तेथील संघर्ष थांबला तर नाहीच उलट तेथे भारताबाबत श्रीलंकेतील काही राजकीय गटात प्रतिकूल प्रतिक्रिया होऊन भारत-श्रीलंका संबंधातील तणाव अधिकच वाढला.

१९८६ च्या जानेवारीमध्ये भारत-श्रीलंका करार होऊन ज्या तामिळांना श्रीलंकेत नागरिकत्वाचे अधिकार नाहीत, (असे सुमारे ९४००० तामिळ होते) त्यांना तेथे नागरिकत्वाचे अधिकार देण्याचे श्रीलंका सरकारने मान्य केले, तर सुमारे ८०,००० निर्वासित सामावून घेण्याचे भारताने अभिवचन दिले.

मात्र एवढ्याने जाफनातील जहाल तामिळ गटाचे समाधान झाले नाही. तामिळ लिबरेशन फ्रंटने जाफनाच्या प्रदेशात स्वतंत्र तामिळ राज्याची मागणी आग्रहाने रेटली. सशस्त्र लढा चालू ठेवला, श्रीलंकेच्या सरकारनेही जाफनाच्या भागावर लष्करी हल्ले सुरू केले. सामान्य नागरिकांची उपासमार होऊ लागली. हालअपेष्टा वाढल्या. सशस्त्र संघर्षामुळे जीवन असुरक्षित, अस्थिर झाले. त्यांच्या मदतीसाठी अन्नधान्य व औषधे घेऊन जाणारी भारताची जहाजे श्रीलंकन जहाजांनी अडविली. तेव्हा हवाईमार्गे ही मदत जाफनातील लोकांना पोहोचवावी लागली.

या दरम्यान सार्कच्या बैठकीच्या वेळी राजीव गांधी व जयवर्धने यांच्या भेटीगाठी झाल्या आणि आवाक्याबाहेर जाणाऱ्या या समस्येचे निराकरण करण्याची निकड दोघांनाही जाणवली. अखेरीस जून १९८७ मध्ये करार होऊन भारताचे साहित्य रेडक्रॉसमार्फत जाफनाला जाऊ देण्याचे श्रीलंका सरकारने मान्य केले. राजीव गांधींनी श्रीलंकेला जुलैमध्ये भेट दिली. त्या वेळी जुलै १९८७ मध्ये भारत-लंका करार झाला. त्याला बहुसंख्य तामिळांनी मान्यता दिली. तामिळ दहशतवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवावीत, तामिळ लिबरेशन फ्रंट ही संघटना विसर्जित करावी, श्रीलंकेच्या सरकारने ज्या प्रदेशात तामिळ बहुसंख्य नागरिक आहेत, त्या उत्तर व पूर्व भागातून लष्कर काढून घ्यावे, त्या भागांमध्ये जनमताचा कौल घेण्यासाठी निवडणुका घ्याव्यात, त्यानंतर त्या प्रदेशात विधिमंडळ व न्यायालय स्थापन करावे, तामिळ व सिंहली भाषांचा अंतर्भाव श्रीलंकेच्या शासकीय भाषांमध्ये असावा व तामिळ नागरिकांच्या सुरक्षिततेची हमी श्रीलंका सरकारने द्यावी असे ठरले. तसेच भारताच्या प्रदेशातून श्रीलंकाविरोधी दहशतवादी कारवाया होणार नाहीत याची खबरदारी भारताने घ्यावी आणि या करारानुसार शांतता टिकविण्यासाठी श्रीलंकेच्या सरकारला आवश्यकता वाटल्यास भारताने शांती सैनिक पाठवावेत अशा तरतुदी झाल्या.

या करारानुसार काही तामिळ दहशतवाद्यांनी शस्त्रे खाली ठेवली. परंतु सर्वात अधिक जहाल गटाने लिबरेशन टायगर्स ऑफ तामिळ इलमने (डढढए) मात्र करारावर स्वाक्षरी केली नाही. श्रीलंकेचे सरकार दिलेला शब्द पाळणार नाही, अशी त्या संघटनेला भीती असल्याने त्यांनी हिंसक कारवाया चालूच ठेवल्या. त्यामुळे एल. टी. टी. ई व श्रीलंकेच्या लष्करात सतत संघर्ष चालत राहिला आणि अशा स्थितीत तेथे शांतता टिकविण्यासाठी भारतीय लष्करी

दल पाठविणे भारताला भाग पडले. यामुळे भारतीय मूळ असलेल्या तामिळांविरुद्ध हत्यार वापरण्याचा प्रसंग भारतावर ओढवला व श्रीलंकेतील तामिळ नागरिकांत तसेच भारतीय जनमनात राजीव गांधींविरुद्ध तीव्र असंतोष दाटू लागला. विशेषतः तामिळनाडूतील नागरिकांचे कित्येक सगेसोयरे श्रीलंकेत वास्तव्याला असल्यामुळे त्यांच्या विरुद्ध दंडात्मक कार्यवाही करीत असलेले भारतीय लष्कर आपले वैरी असल्याची भावना तेथे प्रस्तृत झाली. परंतु भारताला फुटीरवादाला लगाम लावण्यासाठी आटापिटा करीत असलेल्या राजीव गांधींना श्रीलंकेतील भारतीयांच्या फुटीरवादाचे समर्थन करणे, तामिळांचे स्वतंत्र राज्य स्थापन करण्याची मागणी उचलून धरणे भारताच्या तात्त्विक भूमिकेत बसणारे नव्हते. असा विचित्र पेच राजीव गांधींच्या पुढे निर्माण झाला. त्या विशिष्ट परिस्थितीत श्रीलंकेतील संहार मुकाटपणे पाहणे किंवा तेथील भारतीयांच्या फुटीरवादी भूमिकेचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात समर्थन करणे अव्यवहार्य व अनैतिक होते.

ऑक्टोबर १९८७ मध्ये भारतीय सेनेने शांतता टिकविण्यासाठी कार्यवाही सुरू केल्यानंतर जाफनाच्या भागातून दहशतवादी कृत्यांना आवर घालण्यात त्या सेनेला बरेच यश आले. शांतता प्रस्थापित होऊ लागल्याचे अनुभवाला आल्यामुळे श्रीलंकेच्या संसदेने नोव्हेंबर १९८७ मध्ये संविधानात सुधारणा करून उत्तर व पूर्वी प्रदेशांना स्वायत्तता देण्याचा व त्यासाठी प्रांतिक प्रतिनिधी परिषद स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

मात्र हा निर्णय सिंहली लोकांना फारसा रुचला नाही. त्यांच्यातील जहालवाद्यांनी ङ्ढढए ला तोंड देण्यास आपली दहशतवादी संघटना स्थापन केली. तामिळ व सिंहली संघर्ष सुरू झाला. श्रीलंकेतील राजकीय पेच अधिकच गुंतागुंतीचा होऊ लागला व दोन्ही राष्ट्रांतील वैमनस्य वाढत गेले.

भारतीय लष्कर श्रीलंकेच्या भूमीवर रहाणे म्हणजे भारताचे श्रीलंकेवर अतिक्रमण आहे, अशी भावना तेथील सिंहली लोकांत प्रबळ होऊ लागली. राजीव गांधींच्या लंका भेटीत त्यांच्यावर घाव घालण्याचा सिंहली सैनिकाने प्रयत्न केला, तो फसला खरा; मात्र २१ मे १९९१ रोजी झालेल्या राजीव गांधींच्या अमानुष हत्येचे मूळ या स्फोटक परिस्थितीतच रुजले होते.

## ४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(१) भारत-पाकिस्तान संबंधाचे परीक्षण करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(२) भारत-चीन संबंधांचे परीक्षण करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

(३) भारत–श्रीलंका संबंधांचे परीक्षण करा.

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

(४) भारत–बांगलादेश संबंधांचे परीक्षण करा.

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

(५) भारत–अमेरिका संबंधांचे परीक्षण करा.

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

(६) भारत–रशिया संबंधांचे परीक्षण करा.

-------------------------------------------------------

-------------------------------------------------------

## ४.४ सारांश

भारताला परराष्ट्रांशी मैत्री संबंध हवे होते. आंतरराष्ट्रीय तणाव कमी करून, युद्धाच्या संहारकतेपासून मानवाचे रक्षण करणे असा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून भारताने आपले परराष्ट्र धोरण आखलेले दिसते. नेहरूंनी अलिप्ततावाद हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे सूत्र ठरवले. वसाहतवाद व साम्राज्यवादाविषयी भारताने असहिष्णू भूमिका घेतली. युनोच्या शांतता आणि विकासाच्या तत्वास भारताने पूर्ण पाठिंबा दिला.

भारताने नेहमीच द्विस्तरीय आणि प्रादेशिक स्तरावर इतर राष्ट्रांशी चांगले संबंध राखण्याचा प्रयत्न केला आहे. निःशस्त्रीकरण धोरणाचा पाठपुरावा केला.

## ४.५ पारिभाषिक शब्द

## ४.६ संदर्भग्रंथसूची

(१) वेदप्रताप वैदिक, वर्तमान भारत, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली – २००२

(२) वैद्य–कोठेकर, आधुनिक भारताचा इतिहास (१९४७–२०००) साईनाथ प्रकाशन, नागपूर

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय

इ. स. २००० नंतर भारत व शेजारील राष्ट्र यांच्या संबंधांचा आढावा घ्या.

# घटक ५

# आर्थिक धोरण

**अनुक्रमणिका**


**५.0 उद्दिष्टे**

**५.१ प्रस्तावना**

**५.२ विषय विवेचन**

**५.२.१. नियोजन**

**५.२.१.१. मिश्र अर्थव्यवस्था**

**५.२.१.२. नियोजन**

**५.२.१.३. पंचवार्षिक योजना**

**५.२.२. औद्योगिक विकास**

**५.२.३. पायाभूत सुविधांचा विकास**

**५.२.४. १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा**

**५.३ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न**

**५.४ सारांश**

**५.५ पारिभाषिक शब्द**

**५.६ संदर्भसूची**


## ५.0 उद्दिष्टे

१)भारताच्या नियोजनाचा इतिहास अभ्यासता येईल.

२) पंचवार्षिक योजनांचे मूल्यमापन करता येईल.

३) भारताच्या औद्योगिक विकासाचा आढावा घेता येईल.

४) भारतातील पायाभूत सुविधांचे चिकित्सक परीक्षण करता येईल.

५) १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणांचे परीक्षण करता येईल.

## ५.१ प्रस्तावना

विशिष्ट उद्दिष्ट ठराविक मुदतीत पूर्ण करण्याकरिता करण्यात येणाऱ्या विचारपूर्वक व पद्धतशीर प्रयत्नांना नियोजन असे म्हणतात. नियोजनाच्या माध्यमातून जलद आर्थिक विकास साध्य करण्यासाठी आणि जास्तीत जास्त समाजहित साध्य करण्यासाठी प्रयत्न केले जातात. भारतात आर्थिक विकासासाठी आर्थिक नियोजनाचा स्वीकार करून पंचवार्षिक योजना राबविल्या जात आहेत. भारतात १९५१ पासून पंचवार्षिक योजनांना सुरुवात झाली. आतापर्यंत

११ पंचवार्षिक योजना पूर्ण झाल्या आहेत.

औद्योगिक धोरण हे शासनाच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टिकोनाचा आराखडाच असतो. भारताने आपल्या औद्योगिक धोरणात सार्वजनिक क्षेत्राला अधिक महत्त्व दिले.

भारतामध्ये स्वातंत्र्यानंतर पायाभूत सेवांची सर्व जबाबदारी सार्वजनिक क्षेत्रावरच होती. कालांतराने त्यात सरकारी व खाजगी क्षेत्रावरही ती जबाबदारी टाकण्यात आली.

## ५.२. विषय विवेचन

### ५.२.१. नियोजन

#### ५.२.१.१. मिश्र अर्थव्यवस्था

ज्या अर्थव्यवस्थेमध्ये आर्थिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी साम्यवादी व भांडवलशाही अर्थव्यवस्थेचे मिश्रण करण्यात येते तिला 'मिश्र अर्थव्यवस्था' असे म्हणतात. मिश्र अर्थव्यवस्थेचे सार्वजनिक, खाजगी व सहकारी अशा तिन्ही क्षेत्रांचे अस्तित्व दिसून येते. या तिन्ही क्षेत्रांच्या माध्यमातून मिश्र अर्थव्यवस्थेतील मूलभूत प्रश्नांची सोडवणूक केली जाते.

#### भारतातील मिश्र अर्थव्यवस्था

स्वातंत्र्योत्तर काळात भारत सरकारने १९४८ मध्ये औद्योगिक धोरणाविषयीचा पहिला प्रस्ताव मांडला. या प्रस्तावात मिश्र अर्थव्यवस्थेची रचना, औद्योगिक क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र यांनी करावयाच्या कार्याची दिशा ठरवून दिली. तसेच भारताचा संभाव्य आर्थिक विकास साधण्याचा मिश्र अर्थव्यवस्था हाच एकमेव पर्याय आहे असे स्पष्ट केले. नंतर लगेच सन १९५६ मध्ये पुन्हा औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणात समाजवादी समाजरचनेचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मिश्र अर्थव्यवस्था या तत्त्वप्रणालीचा स्वीकारच करण्यात आला. या उद्दिष्टपूर्तीसाठी या धोरणात उद्योगांचे खालील तीन भागांत वर्गीकरण करण्यात आले.

#### (१) सार्वजनिक क्षेत्र

ज्या क्षेत्रावर शासनाची मालकी, नियंत्रण असून त्याचे व्यवस्थापनही शासनच करते त्यास 'सार्वजनिक क्षेत्र' म्हणतात. या क्षेत्रात शस्त्रास्त्रे, दारुगोळा निर्मिती, अणुशक्ती यांच्या विकासाची संपूर्ण जबाबदारी शासनाची असते याखेरीज मूलभूत उद्योग उदा. कोळसा, लोखंड आणि पोलाद, विमाननिर्मिती, जहाजबांधणी इ. यांच्या निर्मितीचीही जबाबदारी शासनाची असते.

#### (२) खाजगी क्षेत्र

ज्या क्षेत्रावर खाजगी उद्योजकांची मालकी आणि नियंत्रण असते तसेच व्यवस्थापनही खाजगी उद्योगच करतात त्यास 'खाजगी क्षेत्र' म्हणतात. सार्वजनिक क्षेत्रासाठी राखून ठेवलेले उद्योग सोडून राहिलेल्या उद्योगांत खाजगी क्षेत्र सहभागी होऊ शकते, परंतु शासनाने ठरवून दिलेल्या सामाजिक, आर्थिक विकासाच्या आणि शासनाच्या नियंत्रणाच्या चौकटीतच

खाजगी क्षेत्राला काम करावे लागते.

### (३) संयुक्त क्षेत्र

ज्या उद्योगात सार्वजनिक क्षेत्र आणि खाजगी क्षेत्र संयुक्तपणे सहभागी असतात त्यास 'संयुक्त क्षेत्र' म्हणतात. या क्षेत्रात आर्थिक विकासासाठी अति महत्त्वाचे उद्योग उदा. यंत्रसामग्री, रसायने, मिश्रखते, रस्तेवाहतूक, सिमेंट, खनिज इत्यादी उद्योगांचा समावेश केला जातो. खाजगी क्षेत्राला या उद्योगांत सहभागी होण्याला मुभा दिली तरी त्यांची प्रगती समाधानकारक नसल्यास हे उद्योग शासन हस्तगत करू शकते. आर्थिक विकासाच्या प्रक्रियेत खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्र संयुक्तपणे सहभागी होत असल्यामुळेच त्यास संयुक्त क्षेत्र म्हणतात.

### ५.२.१.२. नियोजन

१९४७ मध्ये जेव्हा भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले तेव्हा भारतीय अर्थव्यवस्था एक मागास अर्थव्यवस्था होती. कृषिप्रधान देश असूनही वेळोवेळी अन्नधान्याची आयात करावी लागत होती. औद्योगिकीकरण अल्प प्रमाणात झाले होते. वाहतूक, दळणवळण, व्यापार व सर्व क्षेत्रांची परिस्थिती दयनीय होती. दारिद्र्य, बेरोजगारी, आर्थिक विषमता यासारखे अनेक प्रश्न भारत सरकारसमोर स्वातंत्र्योत्तर काळात उभे राहिले होते. अशा मागास अर्थव्यवस्थेचा जलदगतीने आर्थिक विकास करण्यासाठी भारत सरकारने आर्थिक नियोजनाचा मार्ग अंगीकारला.

### १) अर्थ

'आर्थिक नियोजन म्हणजे संपूर्ण अर्थव्यवस्थेचा तपशीलावर आढावा घेऊन कोणत्या वस्तू व सेवांचे, किती प्रमाणात, कोठे आणि कसे उत्पादन करायचे व ते कसे वितरित करायचे असे महत्त्वाचे आर्थिक निर्णय निश्चित अशा सत्ताधारी समितीने जाणीवपूर्वक घेणे होय.'

### २) व्याख्या

'देशातील साधन सामग्री संघटित करून तिचा जास्त उपयोग करून घेऊन ठरविलेली सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आखलेला जाणीवपूर्वक मार्ग म्हणजे आर्थिक नियोजन होय.'

### ३)भारताच्या नियोजनाचा इतिहास

भारतात नियोजनाच्या संदर्भात पहिले लिखाण म्हैसूर संस्थानचे दिवाण मोक्षगुण्डम विश्वेश्वरय्या यांनी केले. १९३४ मध्ये लिहिलेल्या भारतासाठी नियोजन (झश्ररपपशव एलेपॉ षीं खपवळर) या ग्रंथात त्यांनी भारताच्या आर्थिक विकासाची १० वर्षांची एक योजना मांडली होती. १९३८ मध्ये गुजरातमधील हरिपुरा येथील काँग्रेस अधिवेशन नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. यामध्ये नियोजनासंदर्भात झालेल्या चर्चेतून सुभाषचंद्र बोस यांनी नियोजन समितीची शिफारस केली होती.

१९३८ मध्ये काँग्रेस पक्षाने स्थापन केलेल्या प्लॅनिंग कमिशनचे पहिले अध्यक्ष पं. नेहरू

हे होते. या समितीने नियोजनाच्या निरनिराळ्या भागांवर पंचवीस अहवाल प्रसिद्ध केले. १९३९ मध्ये सुरू झालेले दुसरे महायुद्ध व स्वातंत्र्याची चळवळ यामुळे वरील समिती कार्य करू शकली नाही. यामुळे १९४४ पासून लहान स्वरूपाच्या योजना आखण्यास सुरुवात झाली. १९४४ मध्ये सर अर्देशिर दलाल यांच्या अध्यक्षतेखाली 'नियोजन आणि विकास मंडळ' स्थापन झाले.

मुंबईतील आठ उद्योगपतींनी १९४४ मध्ये एक योजना तयार केली. देशातील या पहिल्या आर्थिक योजनेस 'मुंबई योजना' किंवा 'टाटा बिर्ला योजना' संबोधले जाते. १५ वर्षांत दहा हजार केटी रुपये खर्चून राष्ट्रीय उत्पन्न दुप्पट करण्याचे यात उद्दिष्ट होते. यानंतर तीन महिन्यात मानवेंद्रनाथ रॉय यांनी 'जनता योजना' (झशेश्रिशी झश्ररप) ही मांडली. त्या वेळी १० वर्षांच्या काळात १५००० कोटी रुपये खर्च करण्याचे उद्दिष्ट होते. अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा, ग्रामीण कर्ज निर्मूलन व शेतीचे राष्ट्रीयकरण हे या योजनेचे मुख्य ध्येय होते. वर्धा कॉमर्स कॉलेजचे प्राचार्य व नियोजन मंडळाचे माजी सदस्य एस. एन. अग्रवाल यांनी १९४४ मध्ये गांधीजींच्या तत्त्वावर आधारित 'गांधीवादी योजना' तयार केली.

### ४) राष्ट्रीय विकास परिषद

१९५२ मध्ये राष्ट्रीय विकास परिषद निर्माण करण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष पंतप्रधान असतात. तर योजना आयोगाचे सचिव हेच याचेही सचिव असतात. याशिवाय कृषी, अन्न, जलसिंचन, ऊर्जा व शिक्षण खात्याचे केंद्रीय कॅबिनेट मंत्री आणि घटक राज्याचे मुख्यमंत्री व संबंधित प्रदेशाचे प्रशासक, नियोजन मंडळाचे सर्व सभासद, राष्ट्रीय विकास परिषदेचे सदस्य असतात. ही परिषद पंचवार्षिक योजनांना अंतिम रूप देते.

पंडित जवाहरलाल नेहरूंना रशियन राज्यक्रांतिविषयी जिव्हाळा होता. राज्यक्रांतीनंतरच्या कालखंडात पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून जोसेफ स्टॅलिनने रशियाचा अभूतपूर्व विकास केला होता. त्यामुळे देशाच्या प्रगतीसाठी नेहरूंना हा मार्ग आवश्यक वाटू लागला. नेहरूंनी नियोजनबद्ध आर्थिक विकास हे भारताच्या आर्थिक धोरणाचे सूत्र ठरविले. नेहरूंच्या अध्यक्षतेखाली १९ जानेवारी १९५० रोजी राष्ट्रीय नियोजन मंडळ स्थापन करण्यात आले. पंतप्रधान हा या मंडळाचा पदसिद्ध अध्यक्ष असतो. या मंडळावर उपाध्यक्षासह चार सदस्यांची नियुक्ती करण्यात येते. त्याचबरोबर एक उपमंत्री, एक सचिव, एक सांख्यिकी सल्लागार असे एकूण आठ सदस्य नियोजन मंडळ काम पाहत असते. आयोगाची मुख्य जबाबदारी उपाध्यक्ष पार पाडत असतो.

### ५) राष्ट्रीय नियोजन मंडळाचे प्रमुख उद्देश

(१)राष्ट्रीय उत्पन्नात वाढ करण्यासाठी दरडोई उत्पन्न वाढविणे.

(२)सर्वांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे.

(३)संपत्ती व उत्पन्न यामधील विषमता दूर करणे.

(४)समता व न्यायावर आधारित, शोषणरहित समाजवादी समाजाची निर्मिती करणे.

भारतात नियोजनास सुरुवात होऊन सहा दशके पूर्ण झालेली आहेत. आर्थिक नियोजनास

सुरुवात करताना जी उद्दिष्टे पुढे ठेवली होती ती काही प्रमाणात साध्य करण्यास नियोजनाला यश मिळाले आहे. पंचवार्षिक योजनेत शेती, उद्योग व सेवा क्षेत्राचा मोठ्या प्रमाणात विकास झाला आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नात व दरडोई उत्पन्नात सातत्यपूर्ण रीतीने वाढ झाली आहे. या काळात वाहतूक, दळणवळण ऊर्जा वगैरे पायाभूत सुविधांची प्रगती झाली आहे. शिक्षण व आरोग्यविषयक सेवांचाही विकास झाला आहे. तसेच बचत व गुंतवणूक यात वाढ झाली आहे. जीवनावश्यक सुधारणा होण्यास मदत झाली आहे. नियोजन काळात विज्ञान व तंत्रज्ञानात मोठ्या प्रमाणात प्रगती झाली असून, त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाच्या प्रक्रियेला वेग आलेला आहे.

भारतातील नियोजनाला अशा अनेक बाबतीत यश आले असले तरी अनेक आघाड्यांवर विकास योजनांचा अपयश आले आहे. दारिद्र्य निर्मूलन व गरजुंना रोजगार पुरविणे याबाबतीत नियोजनाला अपयश आले आहे. दारिद्र्य व बेकारी या देशापुढील प्रमुख समस्या असून, त्या सोडविण्यासाठी यापुढे मोठ्या प्रमाणात प्रयत्न करण्याची गरज आहे. उत्पन्न व संपत्तीच्या वाटपातील विषमता दूर करणे, आर्थिक शक्तीचे केंद्रीकरण कमी करणे, किंमत वाढ रोखणे, शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी करणे, अशा अनेक बाबतीत नियोजनाला अपयश आले आहे.

### ५.२.१.३. पंचवार्षिक योजना

#### १) पहिली पंचवार्षिक योजना (१ एप्रिल १९५१–३१ मार्च १९५६)

आर्थिक विकासाच्या योजना आखण्यासाठी १९५० मध्ये नियोजन मंडळाची स्थापना करण्यात आली. राज्यघटनेत नमूद करण्यात आलेली मार्गदर्शक तत्त्वे नजरेसमोर ठेवून पहिल्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्याचे आदेश १९५१ मध्ये सरकारने त्या मंडळाला दिले. भारतात नियोजनाच्या युगाला प्रारंभ झाला.

पहिल्या पंचवार्षिक योजनेचा कालखंड एप्रिल १९५१ ते मार्च १९५६ असा होता. मात्र नियोजन मंडळाने योजनेचा आराखडा जुलै १९५१ मध्ये पूर्ण केला आणि योजनेचा कालखंड सुरू झाल्यावर सुमारे दीड वर्षाने, डिसेंबर १९५२ मध्ये योजनेचे अंतिम रूप प्रकाशित करण्यात आले.

अन्नधान्याची टंचाई व भाववाढ या दोन प्रमुख समस्या योजनाकारांसमोर होत्या. त्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी विकासावर भर देण्यात आला. त्यामुळे ही योजना 'कृषी योजना' असल्याचे म्हटले जाते.

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळात सार्वजनिक म्हणजेच शासकीय क्षेत्रात २,०६९ कोटी रुपये खर्च करण्याचे सुरुवातीस ठरविण्यात आले असले तरी प्रत्यक्षात सार्वजनिक क्षेत्रात १,९६० कोटी रुपये खर्च करण्यात आले. या योजनेत शेती आणि सिंचन प्रकल्पांवर विशेष भर देण्यात आला होता.

१९५१ ते १९५६ या कालावधीत पहिल्या पंचवार्षिक योजनेत भाक्रानांगल, हिराकुंड, मेलत्तूर ही मोठी धरणे घेण्यात आली. या योजनेत दळणवळण आणि वाहतूक यावर ४९७

कोटी रुपये खर्च करण्यात आला. याच कालावधीत पाच तांत्रिक शिक्षण देणाऱ्या संस्था कार्यान्वित झाल्या. पहिल्या योजनेच्या यशस्वी कार्यवाहीत समाधानकारक पर्जन्यमानाचा भाग बराच होता. पहिल्या योजनेच्या यशस्वी कार्यवाहीमुळे किंमतपातळीवर अनुकूल परिणाम घडून आला तसेच भारताची आंतरराष्ट्रीय व्यवहारतोलाची स्थिती सुधारली.

ही पहिली पंचवार्षिक योजना म्हणजे भारतातील आर्थिक नियोजनाचा पहिलाच प्रयोग होता. पुढील योजनांकरिता अनुकूल परिस्थिती निर्माण करणारी ती योजना होती. तत्पूर्वीच्या दोनशे वर्षांच्या काळात तुंबून पडलेल्या व भयावह शोषणाने पिळून निघालेल्या राष्ट्राच्या अर्थकारणाला त्यामुळे गतिशीलता आली.

### २) दुसरी पंचवार्षिक योजना (एप्रिल १९५६–मार्च १९६१)

योजनेचे प्रारूप तयार करण्याची जबाबदारी प्रा. पी. सी. महालानोबीस यांच्याकडे सोपविण्यात आली होती. त्यांनी १७ मार्च १९५५ रोजी योजनेचे प्रारूप नियोजन मंडळाला सादर केले. त्या आधारे दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा तयार करण्यात आला.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचे एक सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे औद्योगिकीकरणावर त्यात फार मोठ्या प्रमाणावर देण्यात आलेला भर. एकूण खर्चाच्या सुमारे ८० टक्के रक्कम मूलभूत उद्योग सुरू करण्याकरिता म्हणजे उत्पादनाच्या साधनांचे उत्पादन करणारे उद्योग सुरू करण्याकरिता खर्च करण्यात यावा असे ठरविण्यात आले. अशा उद्योगांकरिता आवश्यक असलेले फार मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणूक खाजगी उद्योजकांकडून होणे अशक्यच असल्याने हे उद्योग सार्वजनिक क्षेत्रात सुरू करण्याचे निश्चित करण्यात आले. हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचा केंद्रबिंदूच ठरला.

### ३) तिसरी पंचवार्षिक योजना (१ एप्रिल १९६१–मार्च १९६६)

या योजनेत कृषी (जलसिंचनासह, अवजड मूलभूत उद्योग (ऊर्जासह) व तांत्रिक शिक्षणासारख्या काही सामाजिक सेवा यावर दुसऱ्या योजनेपेक्षाही अधिक भर देण्यात आला.

विकासाच्या अनेक क्षेत्रात, विशेषकरून कृषी, जलसिंचन, ऊर्जा, संघटित उद्योग या क्षेत्रात योजनेने ठरवून दिलेली लक्ष्य गाठली गेली नाहीत. योजना काळात राष्ट्रीय उत्पन्न २५ टक्क्यांनी वाढावे हे ध्येय होते. ते प्रत्यक्षात १७ टक्क्यांनीच वाढले.

तिसरी पंचवार्षिक योजना १९६६ साली संपल्यानंतर चौथी योजना अंमलात आणण्यात यावयाची होती. चौथ्या योजनेचा मसुदा ऑगस्ट १९६६ मध्ये तयार झाला होता. परंतु त्याला अंतिम स्वरूप दिले गेले नाही. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालावधीत भारताला चीन व पाकिस्तान या देशांच्या आक्रमणांना तोंड द्यावे लागले होते. त्यामुळे देशाच्या तिजोरीवर पडलेला युद्धखर्चाचा अमाप बोजा, संरक्षण खर्चात करावी लागलेली वृद्धी, १९६६ व ६७ या दोन वर्षात लागोपाठ मान्सूनने दिलेला फटका व त्यामुळे निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती, परकीय वित्तसाहाय्याचा आटलेला ओघ व १९६६ साली रुपयाचे अवमूल्यन करून देखील विदेशी विनिमयात न झालेली सुधारणा, देशात झालेली अमाप चलनवाढ, वस्तुंच्या भरमसाठ वाढलेल्या किंमती, त्यामुळे उद्योगधंद्याची मंदावलेली गती, धान्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे

धान्याच्या आयातीची निर्माण झालेली निकड इ. अनेक कारणांमुळे अर्थव्यवस्थेत पोकळी निर्माण झाली होती. अशा अस्थिर परिस्थितीत पंचवार्षिक योजनेची अंमलबजावणी करण्याऐवजी वार्षिक योजना राबवून अर्थव्यवस्थेत स्थैर्य आणणे आणि चौथ्या योजनेसाठी योग्य वातावरण निर्माण करणे सरकारला व योजनाकारांना आवश्यक वाटले. म्हणून १९६६–६७, ६७–६८ व ६८–६९ अशा तीन वर्षात वार्षिक योजना राबविण्यात आल्या.

वाढत्या किंमतींना आळा घालणे, चलनवृद्धीला अंकुश लावणे व अन्नधान्याचा तुटवडा दूर करण्यासाठी अधिक उत्पन्न देणारी बी–बियाणे व खते यांचा वापर व पाणीपुरवठा यात वाढ करून शेतीची उत्पादकता वाढविणे, ही त्या तीन वार्षिक योजनांची प्रमुख उद्दिष्टे निश्चित केली गेली.

### ४) चौथी पंचवार्षिक योजना (१९६९–७४)

**उद्दिष्ट – चौथ्या योजनेची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती.**

(१) आर्थिक स्थैर्याबरोबरच विकास साध्य करणे.

(२) राष्ट्रीय उत्पन्न, कृषी उत्पादन व औद्योगिक उत्पादन या क्षेत्रात अनुक्रमे ५.७, ५.० व ८ ते १० टक्के वार्षिक वाढ साध्य करणे.

(३) स्वयंपूर्णतेच्या दिशेने पाऊल टाकणे.

(४) औद्योगिक विकासाची दिशा निर्धारित करणे.

(५) योग्य वित्तीय धोरण व एकाधिकार विरोधी कायदे करून आर्थिक सत्तेच्या केंद्रीकरणावर अंकुश लावणे.

(६) सार्वजनिक औद्योगिक क्षेत्राची उत्पादनक्षमता वृद्धिंगत करणे.

(७) प्रादेशिक आर्थिक असमतोल कमी करण्यासाठी दुर्लक्षित भागातील लहान व दुर्बल उद्योजकांना मदत करणे व ग्रामीण भागात रोजगाराचे नवे उपक्रम सुरू करून त्याची कक्षा वाढविणे.

या योजनेच्या कालावधीत वार्षिक उत्पन्नाच्या वाढीचे ५.७ टक्के हे लक्ष्य निर्धारित केले होते. परंतु प्रत्यक्षात वाढीचे प्रमाण केवळ ३.३ टक्के इतकेच गाठता आले. निर्यातील मात्र लक्षणीय. म्हणजे वार्षिक १३.६ टक्के वृद्धी झाली.

### ५) पाचवी पंचवार्षिक योजना (१९७४–७९)

पाचव्या योजनेच्या कालावधीत एकूण ३९,४२६ कोटी रुपये खर्च करण्यात आले. किमान गरजपूर्तीचा कार्यक्रम (एम. एन. पी) याच योजनेच्या अंतर्गत अमलात आणला गेला. या कार्यक्रमाच्या अंतर्गत प्राथमिक शिक्षण, पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करणे, ग्रामीण आरोग्यविषयक उपक्रम, पोषक आहार, भूमिहीन शेतमजुरांना घरबांधणीसाठी जागा देणे, ग्रामीण भागात रस्ते बांधणे, ग्रामीण भागाला विद्युतपुरवठा, झोपडपट्टीसुधार इ. अनेक कल्याणकारी कार्यक्रम राबविण्यात आले.

### ६) सहावी पंचवार्षिक योजना (१९८०-८५)

पंचवार्षिक योजनेचा कालावधी संपण्यापूर्वीच एक वर्ष ती योजना समाप्त करण्यात आल्याने १९७९-८० या एका वर्षात योजना राबविण्यात आली नाही व सहावी योजना १९८० साली सुरू झाली. म्हणून १९७९-८० या वर्षाला 'योजनेच्या सुटीचे वर्ष' असे संबोधले जाते.

सहाव्या योजनेत ९७,५०० कोटी रुपयांची खर्चाची तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात हा आकडा १०९.२९१ कोटींपर्यंत फुगला. यापैकी सर्वात जास्त खर्च ऊर्जा विकासावर झाला. तो ३०५७१ कोटी (२८.१ टक्के) होता. याचे प्रमुख कारण म्हणजे १९७९ या एकाच वर्षात परदेशांकडून येणाऱ्या अशुद्ध खनिज तेलाच्या किंमतीत तिप्पट वाढ झाली होती व त्यामुळे तेलाची आयात कमी करून देशातील खनिज तेलाचे उत्पादन वाढविणे सरकारला निकडीचे झाले होते.

सहावी योजना १९८५ साली पूर्ण झाली. या योजना काळात राष्ट्रीय उत्पन्न प्रतीवर्ष सरासरी ५.३ टक्क्याने वृद्धी झाली. औद्योगिक क्षेत्रातही वाढीचा दर ६.९ टक्के होता. अन्नधान्याचे उत्पादनही १५१.८ दशलक्ष टनापर्यंत वाढले.

### ७) सातवी पंचवार्षिक योजना (१९८५-९०)

अर्थव्यवस्थेचा विकास, आधुनिकीकरण, स्वावलंबन आणि सामाजिक न्याय ही भारताच्या आर्थिक नियोजनाची मूलभूत तत्त्वे होती. त्या अनुरोधाने सातव्या योजनेत अन्नधान्याचे उत्पादन वाढविणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे आणि औद्योगिक उत्पादनात वृद्धी करणे यावर विशेष भर देण्यात आला. उत्पादन वृद्धीमागे स्वावलंबनाचे व स्वयंपूर्णतेचे उद्दिष्ट होते तर सामाजिक न्यायासाठी अन्नधान्याचे रास्त वाटप व क्रयशक्ती वाढविण्यासाठी रोजगाराची नवी क्षेत्रे निर्माण करण्यावर भर देण्यात आला. अनुकूल हवामान, काही कार्यक्रमांची जलदगतीने अंमलबजावणी, शेतकऱ्यांना शासनाकडून दिले गेलेले साहाय्य यामुळे सातव्या योजनाकाळात अन्नधान्याचे उत्पादन पूर्वीच्या तुलनेत ३.२३ टक्के वाढले. बेरोजगाराची समस्या हाताळण्यासाठी अमलात येत असलेल्या रोजगार योजनांबरोबरच जवाहर रोजगार योजना अमलात आणण्याची तरतूद सातव्या योजनेत करण्यात आली. रोजगार वाढविण्याच्या हेतूने लघु उद्योग, ग्रामोद्योग व खाद्य वस्तुंवर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना उत्तेजन देण्याचा निर्णय घेण्यात आला. केवळ उत्पादन वृद्धी करण्यावरच नव्हे तर, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धेत भारताचा माल टिकावा या दृष्टीने आवश्यक ती शासकीय धोरणे ठरविण्यात आली. नव्या यंत्रणा व सवलती निर्माण करण्याऐवजी अस्तित्वात असलेल्या यंत्रणा अधिक सक्षम बनविण्यावर आणि प्रचलित सवलतींचा पुरेपूर उपयोग केला जाण्यावर सातव्या योजनेचे लक्ष केंद्रित करण्यात आले.

१९९० ते १९९२ च्या दरम्यान दोन वार्षिक योजना आखण्यात आल्या. १९९०-९१ च्या योजनेत ६४७१६.८० कोटी रुपयांची तर १९९१-९२ साली ७२३१६.७५ कोटींची तरतूद करण्यात आली.

## ८) आठवी पंचवार्षिक योजना (१९९२–९७)

आठव्या पंचवार्षिक योजनेची दिशा विशद करणारी उद्देशपत्रिका डिसेंबर १९९१ मध्ये नॅशनल डेव्हलपमेंट कौन्सिलने तयार केली होती. "Objectives, Phrusts and Macro Dimensions of Eighth Plan" अशा शब्दात या पत्रिकेत आठव्या योजनेची मूलभूत उद्दिष्टे स्पष्टपणे नमूद करण्यात आली व ह्याने देशाच्या आर्थिक नियोजनात नव्या पर्वाला सुरुवात केली. शासकीय व नोकरशाहीच्या पकडीतून उद्योग व व्यापार टप्प्याटप्प्याने मुक्त केले जातील, देशाच्या विकासकार्यातील नागरिकांचा सहभाग वाढविण्याचा प्रयत्न केला जाईल, जागतिक अर्थकारणातील नव्या आर्थिक प्रवृत्तींवर नजर ठेवून भविष्याला समर्थपणे सामोरे जाण्यास दीर्घकालीन धोरणे आखली जातील, आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील स्पर्धात्मक स्वरूप ध्यानात घेऊन त्यात सहभागी होण्यास भारताला सक्षम करण्यासाठी भारताचा सर्वांगिण विकास द्रूतगतीने साधण्याचे मार्ग अवलंबिले जातील. तसेच ज्या सार्वजनिक उद्योगांची उपयोगिता बदलत्या काळात फारशी उरलेली नाही अशा सार्वजनिक क्षेत्रातील शासकीय गुंतवणूक रद्द करावी लागेल, असे या उद्देशपत्रिकेत नमूद करण्यात आले.

## ९) नववी पंचवार्षिक योजना (१९९७–२००२)

नवव्या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट सामाजिक न्याय व समतेबरोबर विकास हे असून अर्थव्यवस्थेवरील शासकीय नियंत्रण टप्प्याटप्प्याने कमी करून खाजगी क्षेत्राला वाढत्या प्रमाणात वाव देणे व बाजार व्यवस्थेवर आधारित निर्णय प्रक्रियेला उत्तेजन देणे हे असल्याचे आढळते. या योजनेच्या मसुद्यानुसार वार्षिक विकास दर ७ टक्के ठरविण्यात आला आणि सर्व नागरिकांना किमान सात मूलभूत सेवा ठराविक कालावधीत उपलब्ध व्हाव्यात असे ठरविण्यात आले. या सात सेवांमध्ये पिण्याचे शुद्ध पाणी, प्राथमिक आरोग्य सेवा, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकरण, बेघर गरीब लोकांना निवासासाठी मदत, बालकांना पोषक आहाराची व्यवस्था, सर्व खेड्यांना जोडणारे रस्ते बांधणे व गरिबांसाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था यांचा अंतर्भाव होता. शासनाला येत असलेली कराच्या उत्पन्नातील तूट कमी करण्यासाठी अनावश्यक खर्च कपात, विशेषतः आजवर दिल्या जाणाऱ्या सवलतीत कपात आणि कर गोळा करण्याच्या प्रमाणात वृद्धी या मार्गाचा अवलंब सुचविण्यात आला तसेच राज्य शासन व पंचायत संस्थांना योजना आखणे व त्यांची अंमलबजावणी याबाबत अधिक अधिकार देणे याचाही अंतर्भाव मसुद्यात करण्यात यावा.

अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली संयुक्त राष्ट्रीय आघाडीचे सरकार अधिकाररूढ झाल्यानंतर त्या सरकारने या योजनेच्या मसुद्यावर पुनर्विचार केला. पक्षाचा कार्यक्रम व पंतप्रधानांची विशेष कार्य योजना (Special Action Plan) यानुसार उद्दिष्टांची प्राथमिकता काहीशी बदलण्यात आली. अन्नधान्याचे उत्पादन दुपटीने वाढवावे व पुढील दहा वर्षांत भारतातून उपासमारी हद्दपार करावी. भौतिक मूलभूत संरचनेचा द्रूतगतीने विकास करावा, पाण्याचे राष्ट्रीय धोरण निर्धारित करावे, सामाजिक मूलभूत गरजांची पूर्ती केली जावी आणि माहिती तंत्रज्ञानाचा विकास व प्रसार करावा या मुद्यांची भर मसुद्यात घालण्यात आली.

### ५.२.२. औद्योगिक विकास

औद्योगिक विकास वेगाने घडून येण्यासाठी योग्य अशा औद्योगिक धोरणाची गरज असते. औद्योगिक धोरणांद्वारे देशातील औद्योगिक उपक्रमांवर नियंत्रण ठेवले जाते तसेच औद्योगिकीकरणाच्या रचनेला आकार देण्याचा प्रयत्न केला जातो. बदलत्या परिस्थितीत आवश्यकतेनुसार औद्योगिक धोरणात बदलही करावे लागतात. भारतात जलद औद्योगिकीकरण घडवून आणणे, रोजगारसंधीत वाढ करणे, प्रादेशिक असमतोल दूर करणे, पायाभूत उद्योगांचा विकास करणे ही व इतर उद्दिष्ट्ये पुढे ठेवून औद्योगिक धोरणाची आखणी व अंमलबजावणी करण्यात आली आहे. भारतात १९४८ मध्ये पहिले औद्योगिक धोरण जाहीर झाल्यानंतर अनेक वेळा त्यात बदल करण्यात आले.

औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक, उद्योगांचे मालकी हक्क, उद्योग स्थापन करणे व ते चालविणे याबाबतचे कायदे, औद्योगिक स्थान निश्चय, औद्योगिक वित्तपुरवठा व त्याबाबतीतील प्रश्न, कामगारांचे प्रश्न, अशा निरनिराळ्या उद्योगासंबंधीच्या बाबींचा विचार करून सरकारकडून जे धोरण आखले जाते त्यास 'औद्योगिक धोरण' असे म्हणतात.

विविध उद्योगांच्या व एकूण औद्योगिक क्षेत्रासंबंधीच्या निरनिराळ्या बाबींवर विचार करून औद्योगिक क्षेत्रासंबंधी जे सर्वसमावेशक धोरण निश्चित केले जाते व राबविले जाते, त्यास 'औद्योगिक धोरण' असे म्हणतात.

औद्योगिक धोरण औद्योगिक विकासात निर्णायक भूमिका बजावीत असते. स्वातंत्र्योत्तर काळात विविध औद्योगिक धोरणे औद्योगिक विकासाच्या रणनीतीच्या रूपात अवलंबिली गेली.

#### ५.२.२.१ १९४८ चे औद्योगिक धोरण

६ एप्रिल १९४८ रोजी भारतीय संसदेत भारताच्या औद्योगिक धोरणाची रुपरेषा घोषित करण्यात आली. सर्व नागरिकांना न्याय व विकासाची समान संधी मिळेल अशी व्यवस्था करणे, जनतेचे जीवनमान उंचावण्याकरिता देशातील सर्व सुप्त साधनसामग्रीचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन उत्पादनात वेगाने वृद्धी घडवून आणणे ही प्रमुख उद्दिष्टे होती.

या औद्योगिक नीतीनुसार उद्योगधंद्यांची तीन गटांत विभागणी करण्यात आली.

अ) पहिल्या अ गटात निर्दिष्ट करण्यात आलेल्या उद्योगांचे संपूर्ण स्वामित्व व नियंत्रण सरकारने स्वतःकडे ठेवले. शस्त्रास्त्रे, दारू गोळा व संरक्षाणाशी संबंधित असलेले सर्व उद्योग, अणुशक्ती यांचे कारखाने आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या उद्योगांना लागणारी यंत्रसामग्री तयार करणारे कारखाने, विजेची अवजड उपकरणे, पवन व पाणचक्क्या वगैरे, कोळसा व लिग्नाईट, खनिज तेल, लोखंड, मॅग्निज, जस्त, गंधक, सोने, हिरे, चांदी, शिसे, टिन इत्यादी धातूंचे खाणकाम, अणुशक्ती संबंधित सर्व धातूंचे खाणकाम, विमाननिर्मिती व विमान वाहतूक, रेल्वे व रेल्वे वाहतूक, जहाजबांधणी, टेलिफोन, टेलिग्राफ व बिनतारी संदेशाकरिता लागणारी साधने, विद्युतनिर्मिती व वाटप या सर्व उद्योगांचा अ गटात समावेश होता.

ब) दुसऱ्या गटात निर्दिष्ट करण्यात आलेले उद्योग म्हणजे किरकोळ, खनिजे सोडून अन्य

सर्व प्रकारची खनिजे, ॲल्यूमिनियम व इतर निर्लोह धातू, यांत्रिक अवजारे तसेच लोखंडी व मिश्र धातूंची उपकरणे, औषधे, रंग व प्लास्टिक यांना लागणारी द्रव्ये, जंतुघ्ने व अन्य अत्यावश्यक औषधे, खते, कृत्रिम रबर, कोळशाचे कार्बनायझेशन, केमिकल पल्प, रस्ते व सागरी वाहतूक. या सर्व उद्योगधंद्यांना सार्वजनिक व खाजगी अशा दोन्ही क्षेत्रात स्थान राहणार असले तरी या गटातील उद्योग नव्याने सुरू करण्यात सरकार पुढाकार घेणार होते.

क) तिसऱ्या गटात अ व ब गटात नमूद करण्यात आलेल्या उद्योगांव्यतिरिक्त देशातील अन्य सर्व उद्योगांचा समावेश करण्यात आला. हे खाजगी क्षेत्र भारतीय उद्योजकांकरिता मोकळे ठेवण्यात आले.

१९४८ च्या या औद्योगिक धोरणाने भारत सरकारची संमिश्र अर्थव्यवस्थेची भूमिका तयार केली. उद्योगांची सार्वजनिक व खाजगी अशी दोन क्षेत्रे स्पष्टपणे नमूद करण्यात आली.

१९४८ च्या औद्योगिक धोरणात लघु व कुटीर उद्योगांचीही दखल सरकारने घेतली होती. भारताच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कुटीर उद्योगांचे महत्त्व मान्य करून, त्यांच्या विकासाकरिता आवश्यक ते सर्व प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन सरकारने आपल्या या औद्योगिक धोरणाद्वारे दिले. त्या उद्योगांचा विकास प्रामुख्याने सहकारी तत्त्वावर करण्यावर भर देण्यात आला. तसेच, त्या उद्योगांची सांगड मोठ्या उद्योगांशी घालण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही स्पष्ट करण्यात आले.

### ५.२.२.१ १९५६ चे औद्योगिक धोरण

भारत सरकारने राष्ट्राच्या नव्या आर्थिक नीतीबाबतची घोषणा ३० एप्रिल १९५६ रोजी केली.

अ) पहिल्या अ गटात निर्दिष्ट केलेल्या एकूण १७ उद्योगांच्या भावी विकासाची जबाबदारी सरकारने सर्वस्वी स्वतःकडे घेतली. त्यात शस्त्रास्त्रे, दारूगोळा उद्योग, अणुशक्ती, लोखंड व पोलाद, अवजड यंत्रसामुग्री, कोळसा, खनिज तेल, विमान उत्पादन, अणुशक्ती, विमान व रेल्वे वाहतूक, जहाजबांधणी, संदेशवाहक तारा, विद्युतनिर्मिती व वाटप अशा महत्त्वाच्या मूलभूत उद्योगांचा समावेश होता.

ब) ब गटात ॲल्युमिनियम, यांत्रिक उपकरणे, सलोह मिश्रधातू, ॲंटिबायोटिक खते, कृत्रिम रबर, केमिकल पल्प, रस्ते व सागरी वाहतूक इत्यादी बारा उद्योगांचा समावेश करण्यात आला. या गटातील उद्योगांबाबत सार्वजनिक व खाजगी क्षेत्रात सहकार्य असावे यावर भर देण्यात आला. या गटात निर्दिष्ट केलेले उद्योग सरकार सार्वजनिक क्षेत्रात सुरू करील; परंतु त्याचबरोबर खाजगी उद्योगांना स्वतंत्रपणे किंवा सरकारी सहभागाने हे उद्योग विकसित करण्यास संधी व मदत दिली जाईल असे स्पष्ट करण्यात आले.

क) अ व ब गटात निर्दिष्ट केलेल्या उद्योगांव्यतिरिक्त अन्य सर्व उद्योग क गटात समाविष्ट करण्यात आले. या गटात उद्योगांच्या विकासाचे क्षेत्र सरकारने खाजगी संघटकांसाठी खुले ठेवले.

अशा प्रकारे उद्योगांचे वर्गीकरण करून सरकारने सार्वजनिक, संयुक्त व खाजगी अशी

तीन उद्योगक्षेत्रे सुनिश्चित केली. मात्र हे विभाजन लवचिक होते. देशाचा दीर्घकालीन विकास, सामाजिक चौकट व तात्त्विक बैठक या गोष्टी विचारात घेऊन १९५६ च्या औद्योगिक धोरणाची संतुलन ही सर्व उद्दिष्टे नजरेसमोर ठेवून उद्योगांची रुपरेषा या धोरणाने तयार केली. १९५६ नंतर औद्योगिक क्षेत्रात देशाच्या झालेल्या प्रगतीचे बहुतांश श्रेय या औद्योगिक धोरणाला द्यावे लागेल.

### ५.२.२.३ १९७० चे औद्योगिक धोरण

भारतातील औद्योगिक परवाना धोरणाच्या अंमलबजावणीबद्दल डॉ. हजारी यांनी मांडलेली मते, दत्त समितीचा अहवाल आणि प्रशासकीय सुधारणा, आयोगाच्या सूचना या गोष्टी लक्षात घेऊन १८ फेब्रुवारी १९७० साली भारत सरकारने आपले नवीन औद्योगिक धोरण घोषित केले.

अ) या धोरणानुसार अत्यावश्यक उद्योग क्षेत्राबद्दलचे आपले धोरण शासनाने स्पष्ट केले. या उद्योगांत करण्यात येणारी गुंतवणूक, त्यांच्या विकासाचे उपक्रम, उद्योगांच्या वाढीचा दर याबाबत निर्णय घेताना पंचवार्षिक योजनांमध्ये निरनिराळ्या क्षेत्रांना देण्यात येणाऱ्या अग्रक्रमाकडे व शासनाने घोषित केलेल्या निर्णयाकडे लक्ष पुरविले जाईल.

ब) या धोरणात 'अवजड उद्योगांची' स्पष्ट व्याख्या करण्यात आली. किमान पाच कोटी रुपयांची गुंतवणूक असलेले उद्योग या क्षेत्रात समाविष्ट केले गेले.

क) ज्या उद्योगांसाठी एक ते पाच कोटी रुपयांची गुंतवणूक लागते त्यांचा अंतर्भाव मध्यम आकाराच्या उद्योगात करण्यात आला. असे उद्योग सुरू करण्यासाठी केंद्र सरकारकडून परवाना मिळविणे आवश्यक राहील.

ड) एक कोटी रुपयांचे भांडवल लागणाऱ्या उद्योगांसाठी परवाने लागणार नाहीत असे या धोरणाने निर्धारित करण्यात आले.

ई) लघु उद्योगांच्या विकासासाठी अशा उद्योगांना विशेष प्रकारचे साहाय्य व सवलती सरकार देईल, तसेच अशा उद्योगांसाठी सहकारी संस्थांना प्राधान्य दिले जाईल असेही ठरविण्यात आले.

### ५.२.२.४ १९७३ सालचे औद्योगिक धोरण

२ फेब्रुवारी १९७३ रोजी नव्या औद्योगिक धोरणाची घोषणा केली. त्यात पुढील मुद्यांचा समावेश होता.

अ) देशात समाजवादी समाजरचना प्रस्थापित करण्यासाठी सार्वजनिक उद्योगक्षेत्राची व्याप्ती व क्षमता यात वृद्धी करण्याच्या हेतूने सर्वसामान्य उपभोग्य वस्तुंचे मोठ्या प्रमाणावर उत्पादन करणारे उद्योग व मोठ्या प्रमाणावर गुंतवणुकीची गरज असणारे उद्योग यांचा सार्वजनिक क्षेत्रात समावेश करण्यात आला.

ब) औद्योगिक विकासाचा वेग वाढविण्यासाठी राष्ट्रीय अर्थव्यवस्थेत संयुक्त क्षेत्राची निर्मिती केली.

क) शेतीमध्ये उत्पादित होणाऱ्या वस्तुंचा कच्चा माल म्हणून वापर करणारे उद्योग सहकारी क्षेत्रात विकसित केले जातील. उदा. साखर, ताग, सुती, कापड इ.

ड) विदेशी भांडवलाच्या गुंतवणुकीला कोणकोणत्या क्षेत्रात वाव राहील हे या धोरणात स्पष्ट करण्यात आले.

इ) ज्या औद्योगिक घराण्यांचे निरनिराळ्या उद्योगांत गुंतविलेले भांडवल, किमान वीस कोटी रुपये असेल अशा घराण्यांना 'मोठी औद्योगिक घराणी' असे संबोधण्यात आले.

### ५.२.२.५ जनता सरकारचे १९७७ चे औद्योगिक धोरण

१९७७ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा पराभव होऊन जनता पक्षाचे सरकार अधिकाररूढ झाले. नव्या शासकांनी प्रचलित अर्थव्यवस्थेत मूलगामी बदल करण्याच्या हेतूने २३ डिसेंबर १९७७ रोजी आपल्या आर्थिक धोरणाचा मसुदा संसदेपुढे ठेवला. नेहरू युगात घालून देण्यात आलेली अर्थव्यवस्था व विशेष म्हणजे असलेला अवजड उद्योगांवरील भार देशासाठी हितकारक नाही असे या पक्षाग्रणींचे मत होते. तसेच ग्रामोद्योगावर व कुटीरोद्योगावर अधिक लक्ष केंद्रित करणे अगत्याचे असल्याचे त्यांचे ठाम मत होते. त्या अनुषंगाने जनता सरकारने आपल्या औद्योगिक धोरणात पुढील मुद्यांचा अंतर्भाव केला.

अ) लघु व कुटीरोद्योगांसाठी राखून ठेवलेल्या वस्तूंची संख्या १०८ वरून ५०४ पर्यंत वाढविण्यात आली. तसेच ज्या वस्तू ग्रामोद्योगात उत्पादित होऊ शकतात अशा वस्तू लघु उद्योगांनी तयार करू नयेत आणि ज्यांचे उत्पादन लघु उद्योगात होऊ शकते त्यावर मोठ्या उद्योगांनी अतिक्रमण करू नये असे ठरविण्यात आले.

ब) लहान गावांमध्ये लघु उद्योगांच्या विकासासाठी जिल्हा औद्योगिक केंद्रे स्थापन करण्याची नवी योजना आखण्यात आली.

क) लघु उद्योग, ग्रामोद्योग व कुटीरोद्योग यांना नियमित व कमी व्याजाच्या दराने कर्जपुरवठा करण्यासाठी औद्योगिक विकास बँकांत एक स्वतंत्र विभाग उघडण्यात आला.

ड) या धोरणानुसार मोठ्या उद्योगांच्या विकासासाठी पोलाद, सिमेंट, खनिज तेल शुद्धीकरण, यंत्रसामग्री, रसायने, उच्च तंत्रज्ञानाचा वापर, त्यावर तयार होणारे उद्योग यांची निवड केली गेली.

इ) या धोरणात सार्वजनिक उद्योगक्षेत्राचे महत्त्व मान्य करण्यात आले. या उद्योगांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्यांना स्वायत्तता दिली जावी असेही ठरविण्यात आले.

ई) भारतातील उद्योगात गुंतविण्यात येणाऱ्या विदेशी भांडवलाबाबत नियम केले गेले. एखाद्या उद्योगातील भांडवलापैकी ४७ टक्केपेक्षा अधिक भांडवल गुंतविता येणार नाही. अशा तरतुदी केल्या गेल्या.

१९७७ साली हे औद्योगिक धोरण घोषित केलेले जनता पक्षाचे सरकार जेमतेम २८ महिने सत्तेवर राहिले. त्यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणीला पुरेसा वेळ मिळाला नाही. जानेवारी १९८० मध्ये काँग्रेस पक्षाचे सरकार पुन्हा सत्तेवर येताच त्या सरकारने २३ जुलै

१९८० रोजी आपले वेगळे औद्योगिक धोरण घोषित केले.

### ५.२.२.६ १९८० सालचे औद्योगिक धोरण

अ) शासकीय धोरणे व पंचवार्षिक योजना यांची उद्दिष्टे ध्यानात घेऊन, आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण होऊ न देता, केंद्र सरकार खाजगी क्षेत्रातील उपक्रमांच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या सोयी उपलब्ध करून देईल.

ब) लघु उद्योग व पूरक उद्योगांच्या वृद्धीसाठी सरकारने विशेष सवलती व वित्तीय मदत देण्याचा निर्णय जाहीर केला.

क) मागासलेल्या प्रदेशात उद्योगांचा प्रारंभ करण्यास सर्वतोपरी साहाय्य दिले जाईल. या धोरणाने खाजगी क्षेत्राला विकासाची नवी दालने खुली करून देण्यात आली.

### ५.२.२.७ १९९१ सालचे औद्योगिक धोरण

औद्योगिक क्षेत्रातील बदलाची मुख्य सूत्रे 'लायसन्स, परमिट, कोटा' पद्धतीचा अंत करून उद्योगांना करकचून आवळणारे नियम रद्द करणे, खाजगी भांडवलाला उद्योगाच्या क्षेत्रात शिरण्याची दारे मोकळी करून देणे, उद्योगांना विकासासाठी प्रोत्साहन देणे, औद्योगिक उत्पादनाच्या विकासाला अनुकूल परिस्थिती निर्माण करणे आणि जागतिक क्षेत्रातील स्पर्धेत भारताचा माल उतरू शकेल या उद्दिष्टाने उत्पादनवृद्धीबरोबरच मालाचा दर्जा उंचावणे व उद्योगातील शासनाचा वाटा कमी करून खाजगी भांडवलाला प्रवेश देणे ही होती. यालाच आधुनिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरण (Modernisation, Liberalisation and Privatisation) असे संबोधण्यात येते. हे जागतिकीकरणाच्या व्यापक प्रवाहाचे मूलभूत पैलू आहेत. २४ जुलै १९९१ रोजी जाहीर झालेल्या नव्या औद्योगिक धोरणाची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

(अ) नवे उद्योग सुरू करण्यावर असलेले क्षेत्रीय बंधन रद्द करण्यात आले.

(ब) उद्योगांनी बँक समूहाकडून घ्यावयाच्या कर्जाची मर्यादा ५ कोटी होती, ती ५० कोटींपर्यंत वाढविण्यात आली.

(क) परदेशी तंत्रज्ञानाच्या आयातीला मुभा देण्यात आली व त्यांचे भागभांडवल ५१ टक्के घ्यायला मान्यता मिळाली.

(ड) १९५१ च्या डेव्हलपमेंट ॲण्ड रेग्युलेटिंग ॲक्टने स्थापन करण्यात आलेली परवानापद्धती रद्द करण्यात आली.

(इ) ज्या उद्योगांचा विकास देशाच्या विकासासाठी आवश्यक होता त्या क्षेत्रात परकीय भांडवल गुंतवणुकीला अधिक प्रोत्साहन देण्यात आले. त्यासाठी ऋीशळपस खर्पींशीीांशपीं झीेेींळेप बोर्डाची स्थापना करण्यात आली.

(ई) सार्वजनिक क्षेत्रातील आठ उद्योग महत्त्वाचे गाभ्याचे उद्योग म्हणून ठरविण्यात येऊन ते शासकीय हातीच राहतील असे ठरविण्यात आले. त्यात खाजगी भांडवलाला वाव देण्यात आला नाही. रेल्वे, टपाल, शस्त्रास्त्रे आयुधनिर्मिती, लढाऊ विमाने, युद्ध नौका, परमाणु

ऊर्जा व अणुऊर्जेशी संबंधित खनिजे, पेट्रोल व इतर खनिज संपत्तीचे उत्खनन, वाहतूक यांचा आठ गाभ्याच्या उद्योगात अंतर्भाव करण्यात आला.

सार्वजनिक उद्योगाविषयीच्या नव्या धोरणानुसार जानेवारी १९९२ मध्ये सुझुकी या जपानी कंपनीला मारुती उद्योगात ५० टक्के भाग देण्यात आले. सार्वजनिक उद्योगाच्या क्षेत्रात खाजगी परकीय भांडवलाला प्रवेश देण्याचे हे पहिले पाऊल होते. मार्च १९९३ मध्ये खाण उद्योगात खाजगी भारतीय भांडवलाला व परकीय भांडवलाला जागा दिली गेली. फेब्रुवारी १९९४ मध्ये ओ. एन. जी. सी. ही पब्लिक लिमिटेड कंपनी करण्यात आली. तर दूरसंचार क्षेत्रही परकीयांना खुले केले गेले. नोव्हेंबर १९९८ मध्ये विम्याचे क्षेत्र परकीयांना खुले केले गेले. ही निर्गुंतवणुकीच्या धोरणाची लक्षणीय उदाहरणे होत.

तसेच लघुउद्योग व मध्यम दर्जाचे उद्योग यांना अधिक गतिशील करण्यासाठी उद्योग मंत्रालयाच्या अधिकाराखाली 'Small Scale Industries and Agro-Rural Industries' हे एक नवे खाते स्थापन करण्यात आले.

अशा प्रकारे १९५६ च्या औद्योगिक धोरणाने ज्या सार्वजनिक उद्योग क्षेत्राला देशाच्या आर्थिक विकासात अग्रक्रम दिला होता, त्यात १९९१ सालच्या धोरणाने मूलतः परिवर्तन केले. देशाचे औद्योगिक उत्पादन वाढविणे, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत टिकाव धरेल असा उत्तम दर्जाचा माल उत्पादित करणे, त्याद्वारा निर्यात वाढविणे, उद्योगातील शासनाचा सक्रिय सहभाग कमी करून खाजगी उपक्रमशीलतेला उत्तेजन देणे, परदेशी भांडवल गुंतवणुकीला प्रोत्साहन देऊन उत्पादनवृद्धीला चालना देणे, ही नव्या औद्योगिक धोरणाची उद्दिष्टे होती.

## ५.२.३. पायाभूत सुविधांचा विकास

### ५.२.३.१ अर्थ

खपषीर हा लॅटिन शब्द असून त्याचा अर्थ पाया किंवा तळ असा घेतला जातो. तर डींीलर्ींीीश हा इंग्रजी शब्द असून याचा अर्थ रचना किंवा ढाचा असा घेतला जातो. खपषीर-डींीलर्ींीीश याचा अर्थ पायाभूत संरचना होय.

### ५.२.३.२ व्याख्या

'ज्या सेवांच्या आधारे व्यापार, उद्योग, नागरी जीवन, समाज आणि संस्कृती अस्तित्वात येतात, बहरतात आणि टिकून राहतात अशा सर्व सेवांना पायाभूत सेवा मानले जाते.'

पायाभूत सुविधा या अशा सुविधा असतात की ज्या सर्वोपयोगी, सर्वांसाठी असतात व आर्थिक विकासाला कारणीभूत होतात. या सोयी कृषी व उद्योग यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीतीने चालना देतात. साधारणपणे वीज, सिंचनाच्या सोयी, दळणवळणाची साधने, संज्ञापनाची साधने, शिक्षण, आरोग्यसेवा, वित्तपुरवठ्याची साधने वगैरे सोयी पायाभूत सुविधांमध्ये समाविष्ट होतात. या सार्वत्रिक उपयोगासाठी असल्याने पूर्ण समाजाला लाभप्रद होतात. अशा सोयी जशा वाढत जातात तसा आर्थिक विकास गतिमान होतो व सर्वसामान्यांचे जीवन उंचावत जाते. विद्युत स्वरूपातील ऊर्जा उद्योगव्यवसायाचे चक्र गतिमान करते व विहिरीवर सिंचनासाठी पंप लावून ओलिताचे क्षेत्र वाढविते. पथदिवे, पाणीपुरवठा या सोयी उपलब्ध

करते. रेल्वेमार्ग व रस्ते यांची सोय आणि मालवाहतूक सहजतेने करते. यामुळे सामाजिक संपर्क व्यवसाय यामध्ये वाढ होते. कृषी उत्पादन व उपभोग्य वस्तू यांचे स्थानांतरण लवकर होते. त्याचप्रमाणे टपाल-तार, टेलिफोन आणि सध्याच्या काळातला संगणक याद्वारे व्यक्तिगत, सामाजिक, आंतर्देशीय व आंतरराष्ट्रीय माहितीची आणि विचारांची देवघेव होते. प्राथमिक, माध्यमिक, उच्च शिक्षणाच्या क्षमता विशिष्ट कौशल्य आत्मसात करण्याची क्षमता वाढवितात. वृत्तपत्रे, मासिके, पुस्तके याद्वारा एकूण सामाजिक, व्यक्तिगत प्रगल्भता येते. विज्ञान आणि तंत्रविज्ञानाच्या प्रसारामुळे उत्पादनाच्या पद्धती व परिणाम यामध्ये बदल होतो. आरोग्यसेवा व्यक्ती आणि समाजाचे स्वास्थ्य राखून कार्यक्षमता वाढवितात. सिंचनाच्या विविध साधनांमुळे ओलितांचे क्षेत्र वाढून कृषीवर आधारित कारखान्यांमध्ये वाढ होते. या सर्व सोयी समाजातील सर्व घटकांसाठी असल्याने या सोयी उपलब्ध असणे म्हणजे सामाजिक भांडवल वाढणे असे समजले जाते. वित्त पुरवठा करणाऱ्या संस्था कार्यरत असल्या की, उत्पादन कार्याला गती मिळते. आर्थिक विकासाच्या संदर्भात पायाभूत सोयी महत्त्वाच्या असल्याने त्यासाठी अग्रक्रम दिला पाहिजे. पायाभूतसोयींचा क्रमशः पुढीलप्रमाणे विचार केलेला आहे.

### ५.२.२.३ विद्युतनिर्मिती व पुरवठा

आर्थिक विकासाच्या दृष्टीने ऊर्जा एक अत्यंत महत्त्वपूर्ण पायाभूत साधन आहे. ऊर्जेची काही साधने अशी असतात की, ज्यांच्या वापराबरोबर ती नष्ट होतात त्याचा साठा कमी होत जातो, त्यांचे पुनरुत्पादन होत नाही. अशी साधने म्हणजे पेट्रोलियम, कोळसा इत्यादी होय. तर काही साधनांचे पुनरुत्पादन शक्य होते. त्याच्या वापराबरोबर जरी त्यांचा नाश होत असला तरी नैसर्गिकरीत्या त्यांचे उत्पादनासाठी प्रयत्न करावे लागतात. अशी साधने म्हणजे लाकूड, शेणाच्या गोवऱ्या, सौरऊर्जा, पवन ऊर्जा, जल विद्युत इत्यादी होय.

१९५०-५१ मध्ये देशात वीज उत्पादनाची स्थापित उत्पादन क्षमता २.३ हजार मेगावॅट होती. त्यात २००७ पर्यंत १५७ हजार मेगावॅटपर्यंत वाढ झाली. १९५०-५१ मध्ये खनिज तेलाचे उत्पादन फक्त ०.३ दशलक्ष टन झाले होते. २००७ पर्यंत त्यात ११६.१ दशलक्ष टनापर्यंत वाढ झाली. भारतात खनिज तेल शुद्धीकरणाचे काम हिंदुस्थान पेट्रोलियम, भारत पेट्रोलियम, इंडियन ऑईल, आय. बी. पी. या सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांकडून केले जाते. अलीकडील काळात रिलायन्स, आय. पी. सी. एल., गुजरात रिफायनरी, मद्रास रिफायनरी, मंगलोर रिफायनरी या खाजगी कंपन्यांमार्फत केले जात आहे. खनिज उत्खनन आणि तेल शुद्धीकरणातून नैसर्गिक वायू प्राप्त होतो. याचा घरगुती व औद्योगिक कारणांसाठी वापर केला जातो. २००२-०३ मध्ये नैसर्गिक वायूचे उत्पादन ३१.९२ बिलियन क्युबिकपर्यंत वाढले.

### ५.२.३.४ वाहतूक क्षेत्र

व्यक्तिच्या वाढत्या गरजा आणि गरजा भागविण्यासाठी अनेकविध वस्तू आणि सेवा यांचा उपयोग होण्यासाठी या वस्तूंची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी ने-आण करण्यासाठी आवश्यकता निर्माण होते. चीन खालोखाल विकास गाठणारा भारत जगातील सर्वात मोठी एक अर्थव्यवस्था म्हणून उदयाला येत आहे. चीनने त्यांच्या वाहतुकीच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी गुंतवणूक केली. भारत मात्र त्यातुलनेत मागे पडला आहे. याकडे लक्ष देणे गरजेचे आहे.

विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत आपल्याला जाऊन बसायचे असेल तर त्यासाठी आपल्या देशातील वाहतूक क्षेत्रासाठी पायाभूत सुविधांच्या उभारणीकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे.

### (अ) रस्ते

भारत हा एक आकाराने प्रचंड देश असून येथील ७० टक्के माल व प्रवासी वाहतूक रस्ते महामार्गाने होते. आर्थिक विकासाच्या दृष्टीने सुरक्षित व विश्वसनीय असे रस्ते असणे गरजेचे आहे.

इतक्या दशकांपासून रस्त्यासारख्या पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे ग्रामीण भागाच्या विकासाला आळा बसला होता. यावर उपाय म्हणून प्रधानमंत्री ग्रामसडक योजना तयार करण्यात आली. राष्ट्रीय महामार्ग विकास कार्यक्रमांतर्गत (National Highway Development - NHDP) अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय महामार्गाचे नूतनीकरण, पुनर्बांधणी व रुंदीकरण अंमलबजावणीच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आहे. बांधा, चालवा व हस्तांतर करा (Build, Operate & Transfer - BOT) या शुल्क आकारणीवर बेतलेल्या तत्त्वानुसार ६० राष्ट्रीय महामार्ग भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने (National Highway Authority of India - NHAI) खाजगी गुंतवणूकदारांकडे सोपविले आहेत. यामुळे प्रकल्प उभारणी खाजगी क्षेत्राच्या सहभागाला प्रोत्साहन तर मिळाले आहे, तसेच सरकारी निधिवरील अवलंबनही कमी झाले आहे. इजढ मार्गाद्वारे उत्तर-पश्चिम-दक्षिण-पूर्व या टोकांना जोडणारा सुवर्ण चतुष्कोन (Golden Quadrilateral) प्रकल्प, उत्तर-दक्षिण, पूर्व-पश्चिम टोकांना जोडणारा वाहतूक पट्टा (NSEW Corridor) व इतर राष्ट्रीय महामार्गांचे अद्ययावतीकरण पार पाडले जात आहे. सुवर्ण चतुर्भुज (GQ - ५८४६ कि. मी.) दिल्ली, मुंबई, कोलकाता आणि चैन्नई या चार महानगरांना जोडणारा आहे. तर उत्तरेत श्रीनगर, दक्षिणेत कन्याकुमारी यांना जोडणारा आहे तर पूर्वेकडे सिल्वर आणि पश्चिमेकडे पोरबंदरला जोडणारा आहे. भारत निर्माण योजनेच्या सहा घटकांपैकी ग्रामीण रस्ता प्रकल्प (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना) हा असाच एक विशाल उपक्रम आहे. किमान १००० लोकसंख्या असलेली सर्व गावे बारमाही रस्त्यांनी जोडण्याचे त्याचे उद्दिष्ट आहे.

१९९५ मध्ये राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले. देशाबाहेरून प्राप्त झालेल्या कर्जातून कार्यान्वित करावयाच्या पाच महामार्ग प्रकल्पाच्या पूर्तीचे कार्य सुरुवातीला या प्राधिकरणाकडे सोपविण्यात आले. नंतर या प्राधिकरणाकडे राष्ट्रीय महामार्ग विकास प्रकल्प पूर्ण करण्याचे कार्य सोपविण्यात आले आहे.

१९५०-५१ मध्ये रस्त्यांची लांबी ४०,००० कि. मी. होती. ती २००५-०६ पर्यंत २७१२.५ लाख कि. मी. पर्यंत वाढली. रस्त्यांच्या लांबीत दरवर्षी सरासरीने १७.७% नी वाढ झालेली आहे.

### (ब) रेल्वे

रेल्वे हे प्रवासी आणि माल वाहतुकीचे जलद आणि प्रभावी साधन आहे. भारतातील रेल्वेची सुरुवात १६ एप्रिल १८५३ रोजी झाली. १९५०-५१ मध्ये रेल्वे मार्गाची लांबी

५३५९६ कि. मी. होती ती २००७ मध्ये ६३३३२ कि. मी. पर्यंत वाढली आहे. जगात भारतीय रेल्वेचे दुसऱ्या क्रमांकाचे आणि आशिया खंडात पहिल्या क्रमांकाचे सर्वात मोठे जाळे आहे. भारतात रेल्वेचे जे विशाल जाळे पसरविले गेले आहे, त्याचा भारतीय अर्थव्यवस्थेतील सर्वच क्षेत्रावर अनुकूल परिणाम झालेला दिसून येतो.

**(क) जलमार्ग**

भारतातील जलवाहतूक, आंतरजल वाहतूक व समुद्री वाहतूक या दोन प्रकारे केली जाते. आज भारतीय समुद्र किनाऱ्यावर १२ मोठे आणि २०० मध्यम व लहान बंदरे आहेत. भारत सरकारने समुद्रीय वाहतूक करण्यासाठी ऑक्टोबर १९६१ मध्ये शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियाची स्थापना केली. एकूण वहन क्षमतेत या कंपनीचा वाटा ३५ टक्के आहे.

भारताला ५,६०० कि. मी. लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. तसेच देशात १२ मोठी आणि १८१ इतर बंदरे आहेत. तसेच ५,२०० कि. मी. लांबीचे नदीमार्ग देशात उपलब्ध आहेत. मात्र, यातील २,००० कि. मी. लांबीचे नदीमार्ग वापरात आहेत. देशात १०० कि. मी. लांबीचे कालवे वाहतुकीस उपलब्ध आहेत. त्याचप्रमाणे सर्व विकसनशील देशात भारताचा व्यापारी जहाजाचा ताफा मोठा आहे. १ एप्रिल २००१ रोजी भारतात १२२ जहाज कंपन्या होत्या. त्यापैकी शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ही सार्वजनिक क्षेत्रातील एकमेव जहाज कंपनी आहे. अशा प्रकारे सागरी व अंतर्गत जल वाहतुकीच्या दृष्टीने योग्य अशी परिस्थिती भारतात आहे.

**(ड) हवाई वाहतूक**

जल वाहतुकीप्रमाणेच हवाई वाहतुकही भारताच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

१९५३ मध्ये विमान वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. अंतर्गत विमान वाहतुकीसाठी इंडियन एअरलाईन्स आणि आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीसाठी एअर इंडिया या दोन सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्या सुरू करण्यात आल्या.

**५.२.३.५ दूरसंचार सेवा**

दोन व्यक्तिंमध्ये संपर्क प्रस्थापित करण्याचे साधन म्हणजे दूरसंचार सेवा होय. दूरध्वनी, दूरचित्रवाणीचे जाळे सर्वदूर पसरत आहे. दूरसंचार क्षेत्राकडे देशाचा सामाजिक-आर्थिक विकास घडवून आणण्याचे एक महत्त्वाचे साधन म्हणून जगभर पाहिले जात आहे. १९८० च्या दशकाच्या मध्यापर्यंत भारतातील दूरसंचार क्षेत्रावर सरकारी मक्तेदारी असे. १९९० च्या दशकात झपाट्याने होणाऱ्या तंत्रज्ञानात्मक प्रगतीमुळे जगभरातील दूरसंचार क्षेत्रं खुली करणे क्रमप्राप्त बनले. गतिमान आर्थिक उलाढालीमुळे दूरध्वनी सेवांच्या वाढीला मोठा वाव असल्याचे लक्षात येताच, भारत सरकारने १९९४ मध्ये राष्ट्रीय दूरसंचार धोरण व १९९९ मध्ये नवीन दूरसंचार धोरण (छशु ढशश्रशली झेश्रळलू छढझ) जाहीर केले. १९९७ मध्ये दि टेलिकम्युनिकेशन्स रेग्युलेटरी ॲथॉरिटी ऑफ इंडिया (ढठअख) ची स्थापना केली. सेवा पुरवठादारांतील स्पर्धेमुळे दूरसंचार शुल्कामध्येदेखील पटकन घट झाली. सध्या भारत हा जगात सर्वात स्वस्त दूरध्वनी सेवा पुरवणारा व दूरध्वनी उपभोक्ता संख्येमध्ये सर्वाधिक वाढ

नोंदवलेला देश आहे.

### ५.२.३.६ शिक्षण आणि आरोग्य सेवा

नियोजन काळात देशातील शिक्षण व आरोग्यविषयक सुविधांमध्ये मोठ्या प्रमाणावर वाढ झालेली आहे. सध्या देशात विद्यापीठ पातळीवरील ३०६ संस्था आहेत, तसेच ११ मुक्त विद्यापीठे आहेत. सध्या देशात ८.५ लाख प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळा आहेत. तसेच तंत्रशिक्षण देणाऱ्या संस्थाही कार्यरत आहेत. शिक्षणाबरोबर आरोग्यविषयक सुविधाही मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असून, त्या केंद्र व राज्य सरकारमार्फत पुरविल्या जातात. शहरी भागाबरोबरच ग्रामीण भागातही आरोग्यविषयक सुविधांचे जाळे पसरलेले आहे. ३१ मार्च २००१ रोजी ग्रामीण भागात ३,०४३ समाज आरोग्य केंद्रे, २२,८४२ प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि १,३७,३११ उपकेंद्रे प्राथमिक आरोग्य सेवा पुरवित होते. अशा प्रकारे देशात पायाभूत सुविधांची मोठ्या प्रमाणात उपलब्धता आहे. मात्र त्याचबरोबर या सुविधांच्या बाबतीत काही उणिवाही आहेत.

### ५.२.३.७ बँक व्यवसाय व वित्त

शेती, उद्योग, व्यापार वगैरे क्षेत्राच्या विकासासाठी वित्तपुरवठ्याची आवश्यकता असते. देशात स्वातंत्र्योत्तर काळात बँकांची व वित्त संस्थांची मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. मार्च २००२ मध्ये देशात एकूण २९८ व्यापारी बँका होत्या व त्यांच्या कार्यालयांची संख्या ६६,२०८ होती. १६ हजार लोकांमागे एक कार्यालय असे प्रमाण होते. मार्च २००३ मध्ये प्रादेशिक ग्रामीण बँकांची संख्या १९६ होती. देशात सहकारी बँकांची वाढही मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. खासगी क्षेत्रातील बँकांच्या विकासासही सुरुवात झालेली आहे. औद्योगिक क्षेत्राला वित्तपुरवठा करण्यात विकास बँका महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहेत.

### ५.२.३.८ दळणवळण : महत्त्व व प्रगती

वाहतूक व दळणवळण यात महत्त्वाचा फरक असा की, वाहतुकीच्या साधनाद्वारे वस्तू एक ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेल्या जातात, तर दळणवळणाच्याद्वारे माहितीचे वहन होते. दळणवळण व वाहतूक यात जवळचा संबंध आहे. वाहतूक व्यवस्थेतील सुधारणांमुळे दळणवळणाची गती वाढण्यास मदत होते. पोस्ट सेवा, दूरध्वनी सेवा, आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट ही काही महत्त्वाची दळणवळणाची साधने आहेत.

देशाच्या अर्थव्यवस्थेत दळणवळण व्यवस्थेला असलेले महत्त्व विचारात घेऊन भारतात स्वातंत्र्योत्तर काळात दळणवळण व्यवस्थेत सुधारणा करण्यावर भर देण्यात आला. भारतात नियोजन काळात पोस्ट व्यवस्था, तार व्यवस्था व दूरसंचार व्यवस्था यात मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली. सुरुवातीच्या काळात भारतातील पोस्ट व्यवस्था शासकीय किंवा कार्यालयीन कामासाठी वापरली जात होती. मात्र १८३७ मध्ये पोस्टाच्या सेवा सर्व लोकांसाठी खुल्या करण्यात आल्या. भारतातील पोस्ट व्यवस्था फारच जुनी आहे. पहिले पोस्टाचे तिकीट १८५२ मध्ये कराची येथे प्रसिद्ध करण्यात आले व ते फक्तसिंध प्रांतापुरतेच वापरात येणारे होते. १८५४ मध्ये देशात ७०० पोस्ट कार्यालये होती.

जगातील सर्वात मोठी पोस्ट व्यवस्था भारतात आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशात २३,३४४ पोस्ट कार्यालये होती. त्यापैकी १९,१८४ पोस्ट कार्यालयांची संख्या १.५४ लाख एवढी होती. (मार्च २००६ मध्ये देशात १,५५,३३३ पोस्ट कार्यालये होती. देशात सरासरी २१.१६ चौरस किलोमीटरला एक पोस्ट कार्यालय असे प्रमाण असून, सरासरी ६,६२३ लोकांना एक पोस्ट कार्यालय सेवा पुरविते, अर्धवेळ विभागीय पोस्ट कार्यालये सुरू करून ग्रामीण भागात पोस्टाचे जाळे वाढविण्यावर भर देण्यात येत आहे.)

शासनाने १९७२ पासून पोस्ट सेवेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी शास्त्रीय पद्धतीने तयार केलेला सहा आकडी पीन कोडचा वापर सुरू केलेला आहे. पोस्ट खात्याने संगणकीकरण, पोस्ट बचत सेवा, पोस्ट लाईफ इन्शुरन्स वगैरे बाबतीत प्रगती केली आहे.

१ ऑगस्ट १९८६ मध्ये स्पीड पोस्ट सेवा सुरू करण्यात आली. स्पीड पोस्ट सेवेचे जाळे १०० राष्ट्रीय व ४९४ राज्य स्पीड पोस्ट केंद्रे व ९७ परकीय देश यांना जोडण्याचे काम करते. १६ मे १९९४ पासून टपाल पाठविण्यासाठी राजधानी चॅनल सुरू केले असून त्याद्वारे राजधानी दिल्लीशी सहा राज्यांच्या राजधान्या जोडल्या गेल्या. १९९४ मध्ये सर्व राज्यांच्या राजधान्या दिल्लीशी जोडण्यात आल्या. राजधानी चॅनेलव्यतिरिक्त सहा मोठी शहरे जोडणारा मेट्रो चॅनेल, ग्रीन चॅनेल, बिझीनेस चॅनेल अशी चॅनेल्स सुरू करण्यात आली.

भारतातील तार यंत्रणेची सुरुवात १८५१ मध्ये झाली. मात्र देशातील तार सेवेचा विकास स्वातंत्र्योत्तर काळात झाला. १९५१ मध्ये देशात ८,२०० तार कार्यालये होती. आता ही संख्या ३०,००० पेक्षाही जास्त आहे.

भारतात दूरसंचार सेवेचे मोठ्या प्रमाणावर जाळे पसरलेले आहे. अलीकडील काळात भारताच्या दूरसंचार क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली आहे. स्वातंत्र्य मिळाले तेव्हा देशात दूरध्वनी केंद्रांची संख्या केवळ ३०० होती. मार्च २००१ मध्ये ती ३१,९५२ एवढी झाली. जुलै २००३ मध्ये दूरध्वनी केंद्राची संख्या ३६,७७२ होती. देशातील सर्व दूरध्वनी केंद्र इलेक्ट्रॉनिक प्रकारची आहेत.

सध्या दूरसंचार नेटवर्कबाबत जगात भारताचा ५ वा क्रमांक असून देशात ६१ दशलक्ष दूरध्वनी कनेक्शन व १.४८ दशलक्ष सार्वजनिक संपर्क केंद्रे (र्झीलश्रळल उरश्रश्रेषषळलशी – झउज) आहेत. देशात दूरसंचार क्षेत्रातील प्रगती होण्यास या क्षेत्रातील वाढती स्पर्धा जबाबदार आहे.१९९४ च्या राष्ट्रीय दूरसंचार धोरणात हे क्षेत्र खाजगी कंपन्यांना खुले करण्यात आले. तसेच या क्षेत्रात ५१ टप्प्यांपर्यंत परकीय भागभांडवलास परवानगी देण्यात आली. त्यानंतरच्या काळातही वेळोवेळी दूरसंचार धोरणात बदल करण्यात आला.

### ५.२.४. १९९१ नंतरच्या आर्थिक सुधारणा

१९९१ मध्ये जेव्हा देशाची आर्थिक पत धोक्यात येण्याचे संकट उभे ठाकले तेव्हा सुधारणांना होणारा सैद्धांतिक व हितसंबंधी विरोध अगदी क्षीण झाला होता. त्याचा फायदा नरसिंहराव सरकारला घेता आला आणि परंपरावादी दृष्टिकोन मोडून त्यांनी अभूतपूर्व अशा सर्वसमावेशक आर्थिक सुधारणांना सुरुवात केली. अर्थात या सुधारणांना तसा उशीरच झाला होता.

सन १९९१ मध्ये सुरू झालेल्या आर्थिक सुधारणा प्रक्रियेत इतर गोष्टींबरोबर ताबडतोब वित्तीय क्षेत्रात सुधारणा, विनिमय दर बाजार दराजवळ वास्तवपूर्व रीतीने ठेवणे, व्यापार व औद्योगिक उदारीकरण, अधिक मुक्त आयात, मक्तेदारी कायदा मोडीत काढणे आणि परवाना पद्धती काढून टाकणे, टप्प्याटप्प्याने खाजगीकरणासह सरकारी क्षेत्राची सुधारणा, परकीय भांडवल व बहुराष्ट्रीय कंपन्यांवरील बहुतांश नियंत्रणे उठवणे व प्रत्यक्ष परकीय गुंतवणुकीचे स्वागत इत्यादी महत्त्वाच्या गोष्टींचा समावेश होता. थोडक्यात अर्थव्यवस्थेला गुदमरून टाकणाऱ्या बंधनापासून मुक्त करणे आणि तिला हितकारक ठरेल अशारीतीने जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेणे यासाठीचा हा प्रयत्न होता. या प्रयत्नांमुळेच अतिशय गंभीर अशा स्थूल अर्थशास्त्रीय अरिष्टातून भारताने अतिशय वेगाने सुटका करून घेतली.

सन १९९१-९२ या अरिष्टकारक वर्षात भारताच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा वेग जेमतेम ०.८ टक्के इतका नगण्य होता. १९९२-९३ मध्ये तो एकदम ५.३ टक्के आणि १९९३-९४ मध्ये ६.२ टक्के एवढा सुधारला. पुढच्या तीन वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ अभूतपूर्व अशा वार्षिक सरासरी ७.५ टक्के दराने झाली. पूर्व आशियाई देशांतील उत्तम कामगिरी करणाऱ्या देशांची जवळजवळ बरोबरी भारताने केली.

१९९१-९२ मध्ये औद्योगिक विकासाचा दर अतिशय निराशाजनक म्हणजे १ टक्क्यापेक्षाही कमी होता. पण १९९२-९३ मध्ये तो २.३ टक्के एवढा सुधारला. १९९३-९४ मध्ये तो ६ टक्क्यांवर पोहोचला. १९९५-९६ मध्ये औद्योगिक विकासाचा वृद्धीदर विक्रमी १२.८ टक्क्यांवर पोहोचला. आधीच्या अनेक वर्षांत भांडवली उत्पादन क्षेत्रातील वाढ ऋणच होती. त्याने एकदम उसळी मारून १९९४-९५ मध्ये २५ टक्के वृद्धी साध्य केली. आयात उदारीकरणामुळे देशी भांडवली उद्योगांना तडाखा बसेल ही भीती खोटी ठरली. लघुउद्योग क्षेत्राची वाढही एकूण औद्योगिक विकासदरापेक्षा जास्त राहिली. मक्तेदारी कायदा रद्द केल्याने लघुऔद्योगिक क्षेत्रविकासावर कोणताही विपरित परिणाम झाला नाही. उलट वाढीलाच प्रेरणा मिळाली असेच त्यातून सूचित झाली. १९९१-९२ मधील पीछेहाटीनंतर शेतीक्षेत्रानेही उचल खाल्ली आणि १९९६-९७ पर्यंत येथील सरासरी वाढीचा वेग ३ टक्क्यांपेक्षा जास्त राहिला.

या काळात भारताने स्वावलंबन वाढत असलेले दिसू लागले. कारण आयातीची वाढती किंमत निर्यातीमधून दिली जाऊ लागली. आयातीचे निर्यात उत्पन्नाशी प्रमाण १९८० च्या दशकात ६० टक्के इतके होते ते १९९५ च्या सुमारास ९० टक्के इतपत वाढले. १९९०-९१ मध्ये चालू खात्यावरील आंतरराष्ट्रीय ताळेबंदाच्या तुटीचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी प्रमाण ३.२ टक्के म्हणजे धोकादायक पातळीवर होते ते १९९३-९४ मध्ये ०.४ टक्के इतपत खाली गेली आणि १९९५-९६ मध्ये ते १.६ टक्के या सुरक्षित मर्यादेपर्यंत वाढले होते. आंतरराष्ट्रीय ताळेबंदातील किंवा व्यवहारस्तोलातील ही तूट सातव्या योजना काळात राष्ट्रीय उत्पन्नाच्या सरासरी२.३ टक्के इतकी होती. १९९१-९२ ते १९९७-९८ या काळात ही तूट १.१ टक्क्यांपर्यंत खाली आली. सुवर्ण व एसडीआरसहित परकीय चलनसाठा जानेवारी १९९९ मध्ये ३,०४० कोटी डॉलर्स इतका म्हणजे उत्तम म्हणण्याइतपत होता. जुलै १९९१ मध्ये जेमतेम दोन आठवड्यांच्या आयातीसाठी पुरेल एवढा चलनसाठा होता. तो जानेवारी १९९९ मध्ये सात महिन्यांच्या आयातीसाठी पुरेल इतका वाढला.

कर्जस्थितीही धोक्याच्या परिस्थितीतून बाहेर पडू लागली. १९९५-९६ या काळात परकीय कर्जाचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी (जीडीपी) असलेले प्रमाण ४१ टक्क्यांवरून २८.७ टक्के इतपत खाली आले. परकीय कर्जफेडीसाठी वापराव्या लागणाऱ्या निर्यात उत्पन्नाचे प्रमाणही (Debt Service Ratio) १९९०-९१ ते १९९७-९८ या काळात ३५.३ टक्के या गंभीर पातळीवरून १९.५ टक्के इतक्या सुरक्षित पातळीपर्यंत खाली आले.

भारतीय शेअर बाजारातील भागांच्या बाजारमूल्याचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी (जीडीपी) असलेले प्रमाण १९८० ते १९९० या दशकात ५ टक्क्यांवरून १३ टक्के एवढे वाढले, पण १९९१ च्या सुधारणानंतर त्यात वेगाने वाढ होत गेली आणि १९९३ अखेर हे प्रमाण ६० टक्क्यांपर्यंत वाढले. १९९५ मध्ये सूचित (लिस्टेड) कंपन्यांच्या संख्येचा विचार करता भारतीय शेअर बाजार अमेरिकन बाजारापेक्षाही जगात सर्वात मोठा ठरला. १९४७ मध्ये संमत केलेल्या भांडवल उभारणी नियंत्रण कायद्यानुसार सरकार नवीन भागांच्या विक्री व किंमतीवर नियंत्रण ठेवीत असे. तो कायदा रद्द करण्यात आला. त्याचबरोबर परकीय भांडवल व्यवहारातही उदारीकरण आणल्याने परकीय संस्थात्मक गुंतवणूकदारांना भारतीय कंपन्यांचे भाग विकत घेणे शक्य झाले. तसेच भारतीय कंपन्यांनाही परकीय भांडवल बाजारातून भांडवले उभे करता येऊ लागले. याचा परिणाम म्हणजे कंपन्यांना त्यांच्या वाढीसाठी व प्रगतीसाठी शेअर बाजारातून (भारतीय व परदेशी) पुरेसे भांडवल गोळा करणे शक्य झाले. १९८० मध्ये भारतीय कंपन्या भारतातील प्राथमिक भांडवल बाजारातून ९२.९ कोटी रुपये उभे करू शकल्या. तर १९९३-९४ मध्ये तर हा आकडा २२,५०० कोटी रुपयांवर गेला. म्हणजेच भारतीय कंपन्या भारतीय प्राथमिक भागबाजारातून १९८० च्या तुलनेत १९९३-९४ मध्ये अडीचशेपट रक्कम उभारू शकल्या.

प्रत्यक्ष गुंतवणुकीस प्रोत्साहन दिल्याचे फळ म्हणजे १९९१ ते १९९६ या काळात प्रत्यक्ष परकीय गुंतवणूक दरवर्षी सरासरी १०० टक्क्यांनी वाढली. १९९१-९२ मध्ये ही गुंतवणूक १२.९ कोटी डॉलर्स होती, ती १९९५-९६ मध्ये २०१ कोटी डॉलर्स इतपत वाढली. ज्या प्रमाणात परकीय भांडवल आकर्षित केले ते पाहता भारतात आलेली परकीय गुंतवणूक खूपच कमी होती, असे म्हणावे लागेल.

सुधारणाविरोधी टीकाकारांनी मुख्यतः कर्मठ डाव्यागटांनी अशी टीका केली की, या सुधारणा गरिबांच्या विरोधी आहेत. परंतु अनेक देशांच्या अभ्यासावरून असे दिसते की, काही थोडे अपवाद वगळता जलद आर्थिक विकासाबरोबर दारिद्र्य पातळीतही घट होत गेली. १९८० च्या दशकातील वाढत्या विकासदरामुळे भारतातही दारिद्र्यरेषेखालील लोकांचे प्रमाण कमी होत गेले.

या काळात ग्रामीण रोजगार कार्यक्रमावर पुरेसा खर्च करणे अगत्याचे होते. पण तसे केले गेले नाही. दारिद्र्यविरोधी सामाजिक सेवा आणि ग्रामीण विकास कार्यक्रमांवरील खर्चात कपात करणे टाळावयास हवे होते. आर्थिक सुधारणांच्या आर्थिक उदारीकरणाच्या समर्थकांनीही या संदर्भात शासनावर टीका केली.

एकंदरीत सुधारणा यशस्वी झाल्या असे दिसत असले तरी अजून बरीच मजल मारावयाची

आहे. कोणत्याही पक्षाला संसदेत स्पष्ट बहुमत नसल्याने निर्माण झालेली कायमची राजकीय अस्थिरता, लोकप्रिय घोषणा देणे सोडून आवश्यक पण कठोर निर्णय घेण्याकडे कोणत्याही सरकारची वाटचाल होऊ देत नाही. यामुळे सरकारी बचती वाढवून, सरकारी खर्च कमी करून वित्तीय तुटीचा प्रश्न सोडविण्यासाठी गंभीरपणे प्रयत्नच केले जात नाहीत. अंदाजपत्राकातील प्रचंड तुटीचा प्रश्नही अजून कायम आहे.

१९९७ नंतरच्या वर्षात तर अर्थव्यवस्थेत घसरगुंडीची चिन्हे दिसत आहेत. १९९६-९७ मधील ७.८ टक्के विकासदर १९९७-९८ मध्ये ५ टक्क्यांपर्यंत खाली आला. ज्या निर्यातीत २० टक्के दराने वाढ होत होती ती १९९६ नंतरच्या तीन वर्षात कमी होत गेली आणि १९९८-९९ मध्ये ती वाढ ऋण झाली. १९९५-९६ पासून उद्योगक्षेत्रातील वाढीचा वेगही मंदावत गेला आणि पुढच्या तीन वर्षांत औद्योगिक क्षेत्रातील वाढीचा दर निम्म्यावर आला. महत्त्वाच्या पायाभूत सोयीतही वाढीचा दर मंदावत आहे.

सर्वात धोकेदायक स्थिती वित्तीय तुटीच्या संदर्भात निर्माण झाली. १९९६-९७ मध्ये प्राथमिक तुटीचे स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाशी असलेले प्रमाण ०.६ टक्के इतके खाली आणले गेले होते. ते १९९७-९८ मध्ये दुपटीपेक्षा अधिक वाढून १.३ टक्क्यांवर पोहोचले. पाचव्या वेतन आयोगाच्या निवडक शिफारशी गुजराल सरकारने १९९७ मध्ये स्वीकारल्यामुळे सरकारी वेतन खर्चात इतर अनुरूप बचती न होता प्रचंड वाढ झाली आणि त्यामुळे वित्तीय तूट प्रचंड वाढली.

१९९६-९७ पासून सुरू झालेल्या घसरणीचे एक कारण पूर्व आशियातील अरिष्ट हे होते. १९९६-९७ मध्ये जपानमध्ये मंदी आली आणि दक्षिण कोरिया, थायलंड, इंडोनेशिया इत्यादी देशांत विकासवेग ऋण होत गेला. १९९८ मध्ये जागतिक विकास मंदावलाच पण जागतिक व्यापारवाढ जास्तच मंदावली. या संकटामुळे जागतिक स्तरावरील भांडवली देवाणघेवाणही कमी झाली. भारताच्या निर्यातीत आणि भारतातील परकीय गुंतवणुकीत झालेल्या घटीचे हेही एक कारण सांगता येईल, पण इतर विकसनशील देशांच्या निर्यातघटीपेक्षा भारताची निर्यात घट जास्त होती. या वास्तवाचा अर्थ असा की, आपल्या देशातील आर्थिक सुधारणा प्रक्रियांमध्ये काही महत्त्वाच्या गोष्टींत अपयश आले.

भाजप सरकारने देशांतर्गत राजकीय परिस्थितीवर डोळा ठेवून अण्वस्त्र चाचण्या घेतल्या. भारताने अण्वस्त्र चाचण्या घेतल्यामुळे अमेरिकेने भारतावर जे आर्थिक निर्बंध लादले त्यांचाही अर्थव्यवस्थेवर विपरित परिणाम घडूला आला. राजकीय अस्थैर्य, अनेक प्रश्नांबाबत वेगवेगळे दृष्टिकोन असलेल्या राजकीय पक्षांची संधीसाधू युती, राजकारणाप्रमाणे आर्थिक क्षेत्रातही भाजपचा दुहेरी चेहरा, या सर्व गोष्टींच्या परिणामवशात सुधारणा मंदगतीने होत गेल्या. भाजपाचे वैचारिक मूळ तो राष्ट्रीय स्वयंसेवक संघ तो स्वदेशाची भाषा करीत होता. त्यामुळे भारतातील सुधारणांच्या आर्थिक व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेस खीळ बसली.

१९५० च्या दशकात स्वावलंबन व जलद आर्थिक विकासासाठी जशी आयात-पर्यायीकरणाची गरज होती. तशीच आज भांडवलप्रवाह आणि तंत्रज्ञान प्रवाहाची गरज आहे. भांडवलप्रवाह, तंत्रज्ञानप्रवाह, कार्यक्षमता आणि उत्पादकतेत वाढ या मार्गांनी आता स्वावलंबन

आणि जलद आर्थिक विकास साधावयाचा आहे.

बाह्य परिस्थितीतील बदल आणि अंतर्गत अनुभवानुसार धोरण बदलण्याची गरज देशात मान्य होऊ लागली आहे. या महान देशाला आपली कुवत सिद्ध करण्यासाठी आणि सुप्त शक्ती वापरात आणण्यासाठी तसेच स्वातंत्र्यानंतर आतापर्यंत जे मिळविले ते व्यर्थ जाऊ नये यासाठी हे बदल आवश्यकच आहेत. नव्या सहस्त्रकात प्रवेश करणाऱ्या भारतास यामुळे आशा आहे की, नियतीशी केलेला संकेत हे राष्ट्र पाळणार आहे.

## ५.३. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(१) १९९१ नंतर झालेल्या आर्थिक सुधारणांचे मूल्यमापन करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

(२) स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या औद्योगिक विकासाचा आढावा घ्या.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

(३) स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या पायाभूत सुविधांच्या विकासाचा आढावा घ्या.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

(४) भारताने अवलंबिलेल्या पंचवार्षिक योजनांच्या यश-अपयशाची चर्चा करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

## ५.४. सारांश

भारताचे नियोजित पंचवार्षिक योजनांमधून बरेच फलित साध्य झाले. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ, दरडोई उत्पन्नात वाढ, शेती, औद्योगिक क्षेत्राचा विकास, विज्ञान-तंत्रज्ञान, सार्वजनिक क्षेत्राची प्रगती झालेली दिसून येते. असे असले तरी बेरोजगारी, उत्पन्न व संपत्तीची विषमता कमी करण्यात अपयश आले आहे. तसेच वित्तीय नियोजनावर अवास्तव भर, भाववाढ याबाबत अपयश आलेले दिसून येते.

अर्थव्यवसथेच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने पायाभूत सुविधांचे स्थान महत्त्वाचे आहे. शेती व उद्योग क्षेत्रातील उत्पादन कार्यासाठी वीजपुरवठा, वाहतूक, दळणवळण, पतपुरवठा, खरेदी-विक्री व्यवस्था अशा पायाभूत सुविधांची गरज असते. या सुविधा उपलब्ध नसतील तर त्या आर्थिक क्षेत्राच्या विकासास व पर्यायाने देशाच्या आर्थिक विकासात अडथळा येतो. नियोजन काळात शेती व उद्योग क्षेत्राची प्रगती घडून येण्यासाठी, औद्योगिकीकरणाचा वेग वाढण्यासाठी ग्रामीण भागाचा विकास होण्यासाठी, पायाभूत सुविधांच्या विकासावर भर

देण्यात आला. नियोजन काळात देशात रस्ते, रेल्वे, जल व टंचाई वाहतुकीची प्रगती घडून आली. दळणवळण सुविधात वाढ झाली. वीज, कोळसा, पोलाद, क्रूड, पेट्रोलियम सिमेंट अशा पायाभूत उद्योगातील उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाली. पायाभूत सुविधांच्या बाबतीत काही उणिवा आहेत. गरजेच्या मानाने पायाभूत सुविधांची उपलब्धता कमी आहे. उपलब्ध पायाभूत सुविधांचा वापर कार्यक्षमतेने केला जात नाही. ग्रामीण भागात वाहतूक व दळणवळण सुविधा मर्यादित आहेत. ऊर्जेच्या बाबतीत अपारंपरिक स्त्रोतांचा विकास मर्यादित आहे. वीज उत्पादन मागणीच्या मानाने कमी आहे. पायाभूत सुविधांच्या बाबतही उणिवांमुळे देशातील शेती उद्योग यांच्या विकासात अडथळा आलेला आहे. देशाच्या आर्थिक वेगाने आर्थिक विकास घडून येण्यासाठी पायाभूत सुविधांच्या प्रगतीवर आणखी भर देण्याची गरज आहे. ग्रामीण भागात वाहतूक, दळणवळण सुविधात वाढ, वीज उत्पादनात व पुरवठ्यात वाढ, पतपुरवठ्यात वाढ, पायाभूत उद्योगातील उत्पादनात वाढ, वगैरे गोष्टींवर अधिक भर देण्याची गरज आहे.

## ५.५. पारिभाषिक शब्द

(१) अर्थसंकल्प **(Budget)** :- अर्थसंकल्प म्हणजे सरकारच्या वित्तीय योजनेचे विवरणपत्र होय. यात पूर्ण झालेल्या शेवटच्या वित्तीय वर्षाचा महसूल किंवा उत्पन्न व खर्च, चालू वर्षाच्या उत्पन्न व खर्चाचा अंदाज आणि पुढील वित्तीय वर्षासाठीच्या अपेक्षित उत्पन्नाचा व ठरविलेला खर्चाचा अंदाज दर्शविलेला असतो.

(२) अर्थव्यवस्था **(Economy)** :- कोणत्या वस्तू व सेवांचे उत्पादन करावयाचे, ते कमी प्रमाणात व कोणत्या पद्धतीने करावयाचे, साधन सामग्रीचे वाटप विविध वस्तू व सेवांच्या उत्पादनासाठी कशा प्रकारे करावयाचे, अशा निरनिराळ्या बाबीसंबंधात निर्णय घेण्यासाठी निर्माण केलेली व्यवस्था म्हणजे अर्थव्यवस्था होय. उदा. भांडवलशाही अर्थव्यवस्था.

(३) आर्थिक नियोजन **(Economic Planning)** :- भारतीय नियोजन मंडळाच्या मते देशातील साधन सामग्री संघटित करून तिचा जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन ठरविलेली सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आखण्यात आलेला मार्ग किंवा अवलंब केलेली पद्धती म्हणजे आर्थिक नियोजन होय.

(४) औद्योगिक धोरण **(Industrial Policy)** :- औद्योगिक क्षेत्रातील गुंतवणूक, उद्योगांचे मालकी हक्क, उद्योग स्थापन करणे व ते चालविणे याबाबतचे कायदे, औद्योगिक स्थान निश्चयन, औद्योगिक वित्तपुरवठा व त्याबाबतीतील प्रश्न, कामगारांचे प्रश्न अशा उद्योगासंबंधीच्या निरनिराळ्या बाबींचा विचार करून सरकारकडून जे धोरण आखले जाते, त्यास 'औद्योगिक धोरण' असे म्हणतात.

(५) पायाभूत सुविधा **(Infrastructure)** :- शेती व उद्योग क्षेत्रातील उत्पादनासाठी ऊर्जा, पतपुरवठा, वाहतूक सेवा, दळणवळण, विपणन सुविधा, बँक आणि विमा सुविधा अशा अनेक बाबींची आवश्यकता असते. या सर्व सुविधा आणि सेवा यांना एकत्रितपणे आर्थिक व सामाजिक परिसेवा किंवा पायाभूत सुविधा म्हणतात.

## ५.६. संदर्भसूची


- आधुनिक भारताचा इतिहास - ग्रोव्हर-बेल्हेकर, एस.चांद, दिल्ली (२००७).
- फडके य. दि., जम्म-काश्मीर स्वायत्ता की स्वातंत्र्य?, अक्षर प्रकाशन, मुंबई (२००१).
- वर्तमान भारत - वेदप्रताप वैदिक, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली(२००२).
- आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य-कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७-२०००).
- स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास - सरदेसाई म. हि., गोवा, दमण, दीव, खंड - १, पणजी सरकार (१९८६).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स - बिपिनचंद्र (अनु. पारशी मा. कृ. व इतर), के.सागर, पुणे (२००४).

# घटक ६

# कृषी

**अनुक्रमणिका**

**६.0 उद्दिष्टे**

**६.१ प्रस्तावना**

**६.२ विषय विवेचन**

**६.२.१. कृषी**

**६.२.१.१. जमीन सुधारणा**

**६.२.१.२. जमीनदारी निर्मूलन**

**६.२.१.३. कुळपद्धतीत सुधारणा**

**६.२.१.४. कमाल जमीन धारणा**

**६.२.१.५. भूदान चळवळ**

**६.२.२ हरितक्रांती**

**६.२.२.१. पार्श्वभूमी**

**६.२.२.२. प्रगती**

**६.२.२.३. परिणाम**

**६.२.३ कृषीक्षेत्रातील नवीन प्रवाह**

**६.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न**

**६.४ सारांश**

**६.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ**

**६.६ संदर्भ सूची**

## ६.0 उद्दिष्टे

१) स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या जमीन सुधारणांचा आढावा घेता येईल.

२) स्वातंत्र्योत्तर काळातील हरितक्रांतीचे मूल्यमापन करता येईल.

३) भूदान चळवळीची माहिती मिळविता येईल.

## ६.१ प्रस्तावना

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय कृषीचे स्वरूप, स्थान आणि महत्त्वात बरेच बदल झाले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतात शेतजमिनीची मालकी संख्येने थोड्याच असलेल्या जमीदार आणि मोठ्या शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणावर होती. ते आपल्याकडील शेतजमीन

खंडाने कुळांना कसण्यासाठी देत होते. शेतजमिनीची उत्पादकता ही शेतीत केल्या जाणाऱ्या कायमस्वरूपी सुधारणांवर अवलंबून असते. मालकी कुळाकडे नसल्याने शेतजमिनीत जलसिंचन, जमीन सपाटीकरण, बांध बंदिस्ती, सेंद्रिय खते इ. कायम स्वरूपी सुधारणा केल्या जात नव्हत्या. म्हणूनच जमीनदारी पद्धतीने उच्चाटन करून शेतजमिनीची मालकी लहान शेतकरी व शेतमजुरांमध्ये विभाजित करणे आणि उत्पादकतेत वाढ करणे याबाबत धोरण आखण्यात आले.

## ६.२. विषय विवेचन

### ६.२.१. कृषी

#### ६.२.१.१. जमीन सुधारणा

स्वातंत्र्यानंतर जमीन सुधारणांची प्रक्रिया स्थूलमानाने दोन टप्प्यात झाली. स्वातंत्र्यानंतर लगेच सुरू झालेल्या पहिल्या टप्प्यात-जो १९६० च्या दशकाच्या सुरुवातीपर्यंत चालू होता व त्यात पुढील गोष्टींवर भर होता.

(१) जमीनदार, जहागीरदार इत्यादी मध्यस्थांचे उच्चाटन.

(२) कुळांना जमीन वापराच्या मुदतीची शाश्वती देणे, खंड कमी करणे आणि जमीनमालकी देणे यासाठी कुळपद्धतीत सुधारणा.

(३) जमीनधारणेच्या आकारावर मर्यादा.

(४) सहकारीकरण आणि सामुदायिक विकास कार्यक्रम.

या अवस्थेला 'संस्थात्मक सुधारणेचा टप्पा' असेही म्हटले जाते. १९६० च्या दशकाच्या मध्यवधीनंतर सुरू झालेल्या टप्प्यात हरितक्रांतीची सुरुवात झाल्याने त्याला 'तांत्रिक सुधारणांचा टप्पा' म्हटले जाते. अर्थात हे टप्पे अगदी कप्पेबंद, काटोकोर नाहीत. खरे म्हणजे हे दोन टप्पे एकमेकांना पूरक होते आणि या टप्प्यांतील कार्यक्रमात सरमिसळ होती.

स्थूलमानाने जमीन सुधारणेच्या दोन बाजू आहेत. एक म्हणजे भूमीच्या लागवडीच्या दृष्टीने भूमीच्या मालकी हक्काचा प्रश्न सोडवून, भूमीशी संबंधित असलेल्या व्यक्तींचे आपसातील संबंध सुरळीत राहतील अशी व्यवस्था करणे. दुसरी बाजू अशी की जमिनीतून जास्तीत-जास्त उत्पादन मिळविण्याकरिता, ओलिताच्या सोयी, खतपुरवठा, सुधारित बी-बियाणे, कृषीचे यांत्रिकीकरण, उत्तम कृषी व्यवस्थापन अशा आवश्यक गोष्टींचे संयोजन करणे. या दोन्ही बाजू वस्तूतः परस्पर निगडित व एकमेकांना पूरक अशा आहेत. उदा. कुळांना सुरक्षितता नसेल तर त्यांच्याकडून जमिनीच्या चांगल्या मशागतीची अपेक्षा करणे अवास्तव ठरेल.

#### ६.२.१.२. जमीनदारी निर्मूलन (Zamindari abolition)

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारत सरकारने कृषी क्षेत्रात शोषणाला वाव देणाऱ्या जमीनदारी पद्धतीने निर्मूलन करण्याचे ठरविले. १९५४ पर्यंत बहुतेक सर्व राज्यांनी या उद्दिष्टाने कायदे पारित केले. राज्यांप्रमाणेच केंद्र शासनाने १९५१ ची पहिली आणि १९५५ ची चौथी

घटनादुरुस्ती या मुख्यतः जमीनदारी निर्मूलन करण्यासाठी, विधिमंडळाचे हात मजबूत करण्यासाठी केलेल्या होत्या. १९६० पर्यंत जमीनदारी निर्मूलनाचे काम पूर्ण झाले असे म्हणतात येईल. कोणताही धाकदपटशा किंवा हिंसाचाराचा अवलंब न करता लोकशाही चौकटीत हे काम झाले हे लक्षात घेतले तर खूप कमी वेळेत झाले असेच म्हणावे लागेल. जमीनदारी निर्मूलनामुळे सुमारे दोन कोटी कुळे जमीनमालक बनली.

जमिनी ताब्यात घेतल्यानंतर जमीनदारांना जी नुकसान भरपाईची रक्कम दिली गेली ती साधारणपणे खूपच कमी होती आणि शेतकरी चळवळींची ताकद, मालक व कुळे यांच्यातील सामाजिक तोल तसेच विधिमंडळाचे काँग्रेस नेतृत्व व विधिमंडळातील रचनेवरील सैद्धांतिक प्रभाव यानुसार राज्याराज्यात त्यात फरक होते. काश्मीरमध्ये काहीही नुकसान भरपाई दिली गेली नाही. पंजाबमध्ये पतियाळातील ताबेदार कुळांना काहीच दिले गेले नाही. अनेक वर्षे हप्त्याने द्यावयाच्या या रकमेचा काहींना फक्त पहिला हप्ताच मिळाला. बहुतेक राज्यांनी उत्तर प्रदेशच्या धर्तीवर नुकसान भरपाई ठरवली होती. उत्तर प्रदेशात मालकीची जमीन व नुकसान भरपाई यांच्या व्यस्त संबंध ठेवला गेला होता. जे जमीनदार २५ रुपयांपर्यंत शेतसारा भरत होते त्यांना फक्त वार्षिक उत्पन्नाच्या वीसपट रक्कम दिली गेली होती. पण जे जमीनदार २,००० ते १०,००० रुपयांपर्यंत सारा भरत होते त्यांना मात्र त्यांच्या फक्त वार्षिक उत्पन्नाच्या फक्त दुप्पट ते चौपट रक्कम मिळणार होती.

मात्र जमीनदारी निर्मूलनाच्या कायद्यांमध्ये काही उणिवा होत्या. उदा. उत्तर प्रदेशात 'स्वतः कसण्यासाठी' म्हणून जेव्हा जमीन जमीनदार जाहीर करतील तेवढी वगळण्याची तरतूद होती. 'स्वतः कसणारा' याची व्याख्या इतकी सदोष होती की, त्यात स्वतः जमीन कसणाऱ्याबरोबर, जे जमिनीवर स्वतः अथवा नातेवाईकांमार्फत देखरेख करीत होते, त्यांचाही समावेश होत होता. इतकेच नव्हे तर ज्यांनी जमीन कसण्यासाठी भांडवल वा कर्ज पुरविले होते; असेही लोक स्वतः जमीन कसणारे गणले गेले.

या कायद्यास व त्याच्या अंमलबजावणीस विरोध करण्याचे अनेक मार्गही वापरण्यात आले. हे कायदे विधिमंडळात संमत व्हावयाचे असल्याने तेथे त्यांना विरोध करण्यासाठी जमीनदारांनी सर्व प्रकारच्या संसदीय अडथळ्यांचा अवलंब केला. कायदे संमत झाल्यानंतरही त्यांच्या अंमलबजावणीस जमीनदारांनी न्यायालयीन मार्गांनी विलंब लावला. कायद्याच्या घटनात्मकतेला त्यांनी वारंवार आव्हान दिले आणि त्यासाठी सर्वोच्च न्यायालयापर्यंत गेले. जमीनदारांनी जमीन हक्कासंबंधीची त्यांच्या त्याब्यातील कागदपत्रे सरकारला देण्यास नकार दिला. त्यामुळे ती कागदपत्रे पुन्हा तयार करण्यास सरकारला खूप कालावधी लागला. थोडक्यात, सरकारच्या विधिमंडळीय, न्यायालयीन व कार्यकारी पातळींवर जमीनदारांनी या कायद्यास मोठा विरोध केला.

जमीनदारांचा विरोध असूनही भारतीय प्रजासत्ताकाच्या स्थापनेनंतर दहा वर्षात बिहारमधील काही भाग वगळता जमीनदारी-निर्मूलनाचे काम पूर्ण झाले. सरंजामशाहीतील मोठे जमीनदार नाहीसे झाले. मोठ्या जमीनमालकांची बरीच जमीन जरी त्यांच्या ताब्यातून गेल्याने त्यांचे नुकसान झाले. तरी या कायद्याचा खरा लाभ जमिनीवर प्रत्यक्ष असलेल्या कुळांना या जमिनी प्रत्यक्षात भाडेपट्टीने घेतलेल्या संरक्षित कुळांना निश्चितपणे झाला. ते आता जमीनमालक

बनले. पण अशी ही कुळे सामान्यतः मध्यम व श्रीमंत शेतकरीच होते.

### ६.२.१.३. कुळपद्धतीत सुधारणा (Tenancy Reforms)

जमीनदारी निर्मूलनानंतरसुद्धा जमीनदारी भागातील तोंडी आणि सरकारकडे नोंद नसलेल्या कुळांचा प्रश्न शिल्लक राहिला होताच. स्वतः कसण्यासाठी म्हणून ज्या जमीनदारांनी जमिनी मिळविल्या तेथील कुळे आणि जी कुळे आता जमीनमालक झाली त्यांच्या पोटकुळांचा हा प्रश्न होता. जमीन सुधारणा कायद्याचा दुसरा भाग अशारीतीने कुळकायद्याशी संबंधित होता. भारताच्या विविध भागातील राजकीय आणि आर्थिक परिस्थितीत खूप फरक असल्याने विविध राज्यांनी संमत केलेले कुळकायदे आणि त्यांची अंमलबजावणी यातही खूप फरक होते. तथापि, कालौघात या कायद्यांमधील काही समान उद्दिष्टे आणि त्यांच्या अंमलबजावणीतील प्रमुख वैशिष्ट्ये भारताच्या बहुतेक भागात स्पष्ट झाली.

कुळकायद्यांचे तीन स्थूल हेतू सांगता येतील. पहिला म्हणजे ज्या कुळांकडे विशिष्ट जमीन काही ठरावीक वर्षांसाठी समजा सहा वर्षे – (हा कालावधी राज्याराज्यात वेगवेगळा ठरवला गेला होता.) कसण्यास आहे. त्यांना जमीन वापराची शाश्वती देणे हा होता. दुसरा हेतू त्यांना द्यावा लागणारा खंड कमी करून तो न्याय्य पातळीवर आणणे हा होता. कसण्यास दिलेल्या जमिनीवरील स्थूल उत्पादनमूल्याचा एक–चतुर्थांश ते एक–षष्ठांश भाग साधारणपणे खंड म्हणून न्याय्य मानला गेला होता. तिसरा हेतू हा होता की, कुळांना काही निर्बंध पाळून जमिनीचा मालक बनण्याचा हक्क देणे.

येथे एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे की, कुळांची परिस्थिती सुधारण्याचा प्रयत्न करीत असतानाच शक्यतो जमीनमालक आणि कुळे यांच्या हितसंबंधात समतोल राखण्याचा प्रयत्न भारतातील कूळ कायद्यात केला होता. देशातील बहुतेक भागात गैरहजर जमीन मालकाला स्वतः कसण्यासाठी जमीन मिळण्याचा हक्क दिला गेला होता. तसेच कुळांच्या जमीन विकत घेण्याच्या हक्काबाबतही हा समतोल टिकविण्यासाठी कमाल आणि किमान जमीनधारणेची गुंतागुंतीची व बदलती व्यवस्था केली गेली होती.

स्वतः कसण्यासाठी जमीन परत घेण्याचा जमीनमालकांचा हक्क, प्रत्येक राज्याने ठरवून दिलेल्या कमाल मर्यादेपेक्षा त्याच्याकडील जमीन जास्त होणार नाही, एवढा मर्यादित केला होता. कुटुंबधारण क्षेत्राच्या तिप्पट ही मर्यादा असावी, असे पहिल्या योजनेने सूचविले होते. 'एका नांगरटीखालील जमीन' अशी कुटुंब धारणक्षेत्राची व्याख्या केली होती. तसेच जमीन परत घेताना कुळाकडील सगळीच जमीन घेता कामा नये, असे बंधन होते.

याउलट, लहान धारण क्षेत्राच्या मालकांच्या हिताकडे लक्ष देऊन जमीन मालकाची जमीन ताब्यात घेण्याच्या कुळांच्या हक्कावर अशी मर्यादा होती की, जमीनमालक जमिनीपासून पूर्ण वंचित होऊ नये आणि प्रत्येक राज्याने ठरवून दिलेल्या कमाल धारणेपेक्षा कुळांकडे जास्त जमीन असता कामा नये.

दुसऱ्या योजनेत हे मान्य केले होते की, लहान जमीनमालकांची आर्थिक स्थिती कुळांपेक्षा इतकी वेगळी नाही की, कुळकायदे त्यांना प्रतिकूल असावेत. म्हणून योजनेने असे ठरविले की, अतिशय थोडी जमीन असलेल्या मालकांना स्वतः कसण्यासाठी सर्व जमीन घेऊ

द्यावी. कुळकायद्याच्या अंमलबजावणीचा अनुभव प्रत्यक्षात खूप गुंतागुंतीचा होता. तिसऱ्या योजनेतही मोठ्या जमीनदारांनी आपल्या जमिनीची अनेक नातेवाइकात विभागणी करून छोट्या जमीनमालकात समावेश करून घेऊन स्वतः कसण्यासाठी म्हणून कुळांची हकालपट्टी केली.

कुळांच्या असुरक्षिततेचे सर्वात मोठे कारण म्हणजे बहुतेक वहिवाटी तोंडी व अनौपचारिक होत्या; लेखी नोंद कुठेही नसल्याने त्यांना कायद्याचा लाभ मिळाला नाही.

पश्चिम बंगालमधील डाव्या आघाडीच्या सरकारने जुलै १९७८ मध्ये बटाईदारांची नावे नोंद घेण्याचा एक कालबद्ध कार्यक्रम – 'बरगा मोहीम' सुरू केली. त्यामुळे त्यांना त्यांचे कायदेशीर हक्क प्राप्त होणार होते. कायम जमीन कसण्याचा व वंशपरंपरेचा हक्क आणि मालक व बटाईदारात उत्पादन वाटणी १:३ या प्रमाणात करायची अशा स्वरूपाचे ते हक्क होते.

अशारीतीने सर्व कुळांना जमिनीची शाश्वती देण्याच्या कुळकायद्यांच्या पहिल्या हेतूला भारतात मर्यादित यश मिळाले. बहुतांश कुळांना जरी शाश्वती मिळाली तरीही असुरक्षित कुळांचे प्रमाणही काही थोडे नव्हते. कुळांनी द्यावयाच्या खंडनियमनासंबंधी सर्व राज्यांनी कायदे केले. बहुतेक राज्यांनी पहिल्या व दुसऱ्या योजनांनी सुचविल्याप्रमाणे स्थूल उत्पादनाच्या २० ते २५ टक्के ही कमाल खंड मर्यादा ठरवून दिली. कुळांना जमिनीची मालकी हक्क देणे हा कुळकायद्याचा हेतूही अंशतःच साध्य झाला. स्वतः कसण्यासाठी जमीन परत घेण्याची जमीनमालकांना दिलेली सवलत, कुळांची कायदेशीर व बेकायदेशीरपणे झालेली हकालपट्टी, स्वखुशीने कुळांनी सोडलेले हक्क, तोंडी किंवा गुप्त कुळकरार इत्यादींमुळे हे उद्दिष्ट साध्य झाले नाही.

### ६.२.१.४. कमाल जमीन धारणा (Celling on Land Holdings)

जमिनीचे वाटप अधिक समान व्हावे यासाठी जमीन धारणेवर कमाल मर्यादा घालणे हा भारतातील जमीन सुधारणा कायद्यातील महत्त्वाचा भाग होता. मात्र या प्रश्नावर समाजात फारसे मतैक्य नव्हते. त्यामुळे त्याच्या अंमलबजावणीत बरेच अडथळे आले आणि त्यात यशही फार मर्यादित मिळाले.

जे. सी. कुमारप्पा यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या 'काँग्रेस शेती सुधार समिती'ने आपला अहवाल जुलै १९४९ मध्ये सादर केला. भूखंडाच्या आकाराची कमाल मर्यादा ही आर्थिकदृष्ट्या कसण्यायोग्य अशी आकराच्या तिप्पट असावी अशी शिफारस त्यामध्ये केली होती. (आर्थिकदृष्ट्या कसण्यायोग्य भूखंडाच्या आकाराची, व्याख्या, भूखंडाचा जो आकार शेतकऱ्याला योग्य प्रकारचे राहणीमान देऊ शकेल व एका सर्वसाधारण आकाराच्या कुटुंबाला किमान एक बैलाजोडीसह पूर्णवेळ काम देऊ शकेल, असा आकार अशी केली होती.)

पण या दरम्यान देशाच्या अनेक भागात, वृत्तपत्रांमधून, संसदेत, विधिमंडळात आणि खुद्द काँग्रेस पक्षातही या कमालधारणेला विरोध वाढत होता. ग्रामीण भागातील जमीनमालक आणि शहरातील हितसंबंधांनाही यात खाजगी मालकीच्या हक्काला धोका दिसू लागला. जानेवारी १९५१ मध्ये नागपूरच्या काँग्रेस अधिवेशनात याला तोंड फुटले. अनेक मान्यवर

काँग्रेस नेत्यांचा विरोध आणि खुल्या अधिवेशनाच्या आधी होणाऱ्या विषय नियामक समितीच्या बैठकीत याला विरोध होऊनदेखील जानेवारी १९५९ मध्ये काँग्रेसने संमत केलेल्या ठरावात म्हटले होते की, ''जमीन सुधारणेविषयीची अनिश्चितता दूर करण्यासाठी आणि शेतकऱ्याला जमिनीची शाश्वती देण्यासाठी चालू व भविष्यकालीन जमीन धारणेवर कमाल मर्यादा ठरविली जावी आणि त्यासंबंधीचे कायदे सर्व राज्यांनी १९५९ अखेर संमत करून द्यावते.'' जादा जाहीर झालेली जमीन ''पंचायतीच्या ताब्यात राहील आणि भूमिहीन शेतमजुरांच्या सहकारी संरचनामार्फत तिचे व्यवस्थापन केले जाईल.''

कमाल जमीनधारणेचे कायदे व त्यांची अंमलबजावणी ही राज्य पातळीवर होणार होती. त्यामुळे या विरोधकांना खरे यश राज्यपातळीवरच मिळणार होते. नागपूर ठरावानंतर ज्या राज्यांच्या विधिमंडळाची अधिवेशने सुरू झाली त्यांनी तो ठराव अमलात आणण्याची काहीही घाई दाखविली नाही. कमाल जमीन धारणा कायदे रेंगाळत गेले आणि ही मूळ कल्पना मांडली गेल्यापासून तब्बल चौदा वर्षांनी म्हणजे १९६१ अखेर बहुतेक राज्य सरकारांनी त्याविषयीचे कायदे केले.

**कमालधारण कायद्यातील उणिवा**

या कायद्याचे स्वरूप व त्याला लागलेला दीर्घ विलंब यामुळे फारच कमी जादा जमीन पुनर्वितरणासाठी उपलब्ध होऊन त्याचा काही परिणाम होणार नाही याची खात्री होती. बहुतेक राज्यातील कायद्यात बऱ्याच मोठ्या उणिवा होत्या. पहिली गोष्ट म्हणजे भारतातील ७० टक्के धारणा क्षेत्रे पाच एकरांपेक्षा लहान होती. त्यामुळे राज्यांनी ठरविलेली कमाल मर्यादा खूपच जास्त वरची होती. उदा. आंध्र प्रदेशात जमिनीच्या प्रतवारीनुसार ही मर्यादा २७ ते ३१२ एकर होती, तर आसाममध्ये ५० एकर, महाराष्ट्रात १८ ते १२६ एकर अशी कालमर्यादा होती.

दुसरी उणीव म्हणजे, दुसऱ्या योजनेने सुचविल्याप्रमाणे काही विशिष्ट प्रकारच्या जमिनींना कमाल मर्यादेतून सूट देता येणार होती. यानुसार अनेक राज्यांनी अनेक सवलती दिल्या. चहा, कॉफी, रबर मळ्यांना, फळबागांना, दूध उत्पादन, पशुसंवर्धन, लोकर उत्पादन इत्यादी विशिष्ट शेतमाल उत्पादनांना, साखर कारखान्यांनी चालविलेली ऊस शेती आणि ज्यामध्ये खूप गुंतवणूक केली आहे, अशी कार्यक्षम शेती इत्यादींना या सवलती देण्यास परवानगी होती.

हा कायदा करण्यात खूप विलंब झाल्याने त्याचा हेतूच मोठ्या प्रमाणात विफल झाला. मोठ्या जमीनमालकांना आपल्याकडील जादा जमिनी विकण्यास, नातेवाईकांच्या नावावर खोटी हस्तांतरणे करण्यास आणि बेनामी व्यवहार करण्यास खूप अवधी मिळाला.

जुलै १९७२ च्या मार्गदर्शक तत्त्वांमुळे कमाल धारणा कायद्यांच्या इतिहासाला वेगळे वळण मिळाले. त्यातील काही महत्त्वाची तत्त्वे पुढीलप्रमाणे होती –

(१) पाणीपुरवठ्याच्या कायम सोयी असणाऱ्या दुबार पिकांच्या जमिनींची कमाल मर्यादा १० ते १८ एकरांच्या दरम्यान ठेवावी. एकच पीक येणाऱ्या जमिनीबाबत २७ एकर व

निकृष्ट कोरडवाहू जमिनींबाबत ती ५४ एकर ठेवावी.

(२) कुटुंबाच्या आकाराला पती-पत्नी व तीन अज्ञान अपत्ये अशा पाच जणांची कमाल मर्यादा लागू करावी.

(३) जादा जमिनीच्या वाटपात शेतमजुरांना विशेषतः अनुसूचित जाती-जमातींच्या लोकांना प्राधान्य द्यावे.

(४) ज्यांना जमीन दिली जाईल त्यांच्या आवाक्यात किंमत राहावी म्हणून नुकसान भरपाईची किंमत बाजारदरापेक्षा बरीच कमी ठेवावी.

१९७२ च्या वरील मार्गदर्शक तत्त्वांनुसार बहुतेक राज्यांनी त्यानुसार कमाल जमीनधारणा कमी करणारे कायदे संमत केले. तथापि, या कायद्यांना विरोध करण्याचे आणि ते टाळण्याचे अनेक मार्ग वापरले होते.

अशा रीतीने १९७२ नंतर परिस्थितीत जरी सुधारणा झाली असली तरी भूमिहीनांना वाटण्यासाठी जी जादा जमीन जाहीर झाली तिचे एकूण लागवडीखालील जमिनीशी असलेले प्रमाण केवळ २ टक्के होते आणि प्रामुख्याने ४५ लाखांवर भूमिहीन लाभार्थींना काहीना काही जमीन जरी मिळाली असली तरी भारतातील जमीन वाटपातील विषमता कमी करण्यात कमाल जमीनधारणा कायद्यांना यश आले नाही.

कमाल जमीन धारणा कायद्यांचा एक महत्त्वाचा दूरगामी परिणाम असा झाला की, जमिनीचा बाजारच नाहीसा झाला आणि मोठ्या शेतजमिनी निर्माण होण्याची प्रक्रिया रोखली गेली.

वाढती लोकसंख्या आणि जमिनीचे पिढ्यांनुसार होत जाणारे विभाजन यामुळे १९९० च्या दशकापर्यंत मोठ्या शेतजमिनीच्या प्रकारात म्हणजे २५ एकरांपेक्षा जास्त क्षेत्र असलेल्या धारणाक्षेत्रांची संख्या कमीच होत गेली. परंतु आता कमाल मर्यादा आणखी खाली आणून जमिनीचे फेरवाटप करणे राजकीयदृष्ट्या व्यस्त आणि आर्थिकदृष्ट्याही योग्य ठरणार नाही.

### ६.२.१.५. भूदान

जमीन सुधारणांत शेतीत संस्थात्मक बदल घडवून आणणे, जमिनीचे फेरवाटप या गोष्टी केवळ कायद्याने न करता चळवळीद्वारे व्हाव्यात यासाठी भूदान हा एक प्रयत्न होता. प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते आचार्य विनोबा भावे यांनी ग्रांधीप्रणीत तंत्रांचा आणि तत्वांचा विधायक विचार व विश्वस्ताची कल्पना यांच्या आधारे ही चळवळ १९५० च्या दशकाच्या प्रारंभी सुरू केली.

विनोबांनी कार्यकर्त्यांची राष्ट्रीय पातळीवर 'सर्वोदय समाज' नावाची संघटना स्थापन केली. देशात अहिंसात्मक मार्गाने सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न त्याद्वारे केला जाणार होता. त्यांचे अनुयायी आणि ते स्वतः पदयात्रेने गावोगावी जाऊन मोठे जमीन मालकांना त्यांच्या जमिनीपैकी किमान एक षष्ठांश जमीन भुमिहीन व गरीब शेतकऱ्यांना देण्यासाठी प्रवृत्त करणार होते. भारतातील ३० कोटी एकर लागवडीखालील जमिनीच्या एक अष्टमांश म्हणजे ५ कोटी एकर जमिनीचे दान मिळविण्याचा त्यांचा संकल्प होता. त्यामागील

कल्पना अशी होती की, सरासरीने पाच माणसांच्या एका कुटुंबाने एका भूमिहीनास कुटंबाचा सभासद म्हणून मानावे व त्यासाठी आपल्या जमिनीपैकी एक-षष्ठांश जमिनीचे दान करावे.

आंध्रप्रदेशातील तेलंगण भागात पोचमपल्ली या खेडेगावात १८ एप्रिल १९५१ रोजी विनोबांना पहिले भूदान मिळाले. कम्युनिस्टांनी सुरू केलेल्या सशस्त्र शेतकरी बंडाचे पडसाद त्यावेळी तिथे उमटत होते. तीन महिन्यांच्या अवधीत त्या भागातील सुमारे २०० गावांना भेटी देऊन त्यांनी १२,२०० एकर जमिनीचे दान मिळविले. नंतर ही चळवळ उत्तरेकडे विशेषतः बिहार व उत्तर प्रदेशात पसरली. मार्च १९५६ अखेरी चाळीस लाख एकरांपेक्षा जास्त जमिनीचे दान (भुदान) मिळाले, पण नंतर या चळवळीत शिथिलता आली.

मिळालेल्या जमिनीपैकी बरीच जमीन कसण्यास निरुपयोगी होती किंवा वादग्रस्त मालकीची होती. त्यामुळेच की काय मिळालेल्या सुमारे ४५ लाख एकर जमिनीपैकी १९५७ अखेर केवळ ६.५४ लाख एकर जमिनीचे दोन लाख कुटुंबात वाटप केले गेले. १९६१ च्या सुरुवातीपर्यंत ८.७२ लाख एकर जमिनीचे वाटप झाले.

१९५५ च्या अखेरीपासून या चळवळीने 'ग्रामदान' असे नवे रूप धारण केले. सर्व जमीन परमेश्वराची आहे, या गांधीजींच्या कल्पनेच्या आधारे ग्रामदानात मिळालेल्या गावातील सर्व जमीन सामुदायिक किंवा समान मालकीची असणार होती आणि कोणा एका व्यक्तिची मालकी जमिनीवर राहणार नव्हती. ही चळवळ ओरिसात सुरू झाली आणि तेथे खूप यशस्वीही झाली. १९६० अखरे ४,५०० पेक्षा जास्त गावांचे ग्रामदान झाले. त्यापैकी १,९४६ ओरिसामध्ये, ६०३ महाराष्ट्रात, ५४३ केरळात, ४८३ आंध्रप्रदेशात आणि सुमारे २५० गावांचे मद्रास राज्यात ग्रामदान झाले. ज्या गावात वर्गभेद अजून निर्माण झाले नव्हते आणि शेतजमिनीच्या किंवा अन्य संपत्तीच्या मालकीत फारशी विषमता नव्हती अशा भागातच ही चळवळ प्रामुख्याने यशस्वी झाली. बहुता आदिवासी जमातींच्या गावात अशी स्थिती असते.

भूदान चळवळीच्या काही महत्त्वाच्या वैशिष्ट्यांची नोंद होणे आवश्यक आहे. एक म्हणजे, स्वातंत्र्यानंतर जमीन मालकीत सुधारणा घडवून आणण्यासाठी सरकारी कायद्यांनी सुरुवात करण्याऐवजी चळवळीमार्फत ती व्हावी. या दृष्टीने हा लक्षणीय प्रयत्न होता. दुसरी गोष्ट सर्व जमीन परमेश्वराची आहे व संपत्तीबद्दलची विश्वस्त कल्पना यावर ती चळवळ उभी असल्याने तिच्यात प्रचंड अव्यक्त सामर्थ्य होते. जर जमीन मालकांनी विश्वस्ताप्रमाणे वागण्यास नकार दिला किंवा संपत्तीतील एक समान वाटेकरी होण्याचे नाकारले गांधीजींच्या पद्धतीने सत्याग्रह करायचा होता. गांधीजींचे तत्व व कृतीचा त्यांच्यावर प्रभाव पडला होता अशा काही समाजवाद्यांसह काही मंडळींना विश्वकल्पना आणि विधायक कार्यातून या चळवळीचे सामर्थ्य प्रकट व्हावे असे वाटत होते. अन्यायाविरुद्ध कायदेभंगाच्या रूपाने सत्याग्रही चळवळ सुरू करावी असे त्यांचे मत होते. पण हा बदल करणे सर्वोदय समाजाला जमले नाही. देशातील विविध भागातील अशी व्यापक सामाजिक मोहीम सुरू करून सामाजिक परिवर्तनासाठी प्रचंड दबाव आणणे त्यांना शक्य झाले नाही. पण जमीन मालकांवर दबाव आणून भूमिहीनांना अनुकूल परिस्थिती तयार करण्यासाठी नैतिक वातावरण निर्मिती या चळवळीने केली, ही तिची महत्त्वाची कामगिरी आहे. या वातावरणाचा दबाव जमीन मालकांवर पडला; त्याचप्रमाणे भूमिहीनांना अनुकूल असे वातावरणही समाजात तयार झाले.

सुरुवातीला जरी या चळवळीने खूप आशा उंचावली असली तरी १९६० च्या दशकापर्यंत तिचा जोर ओसरला होता. भूदान चळवळीत शिथिलता येण्याला दोन प्रमुख कारणे होती. एक म्हणजे १९५७ नंतरच्या सर्वोदय कार्यक्रमात ग्रामदानाला प्राधान्य देण्यात आले होते. त्यामुळे सर्वोदयी कार्यकर्त्यांचे लक्ष भूदानाकडून ग्रामदानाकडे वेधले गेले. दुसरे म्हणजे १ जानेवारी १९५७ पासून भूदान कार्यकर्त्यांनी चरितार्थाकरिता कोणत्याही निधीवर किंवा संस्थेवर अवलंबून राहू नये, त्यांनी स्वतःच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था स्वतःच करावी व ठरविलेल्या कार्याच्या सिद्धीकरीता प्रत्येकाने आवश्यकतेनुसार आपापला कार्यक्रम तयार करावा असा निर्णय घेण्यात आला. त्याचबरोबर तालुका व जिल्हा पातळीवरील भूदान समित्या विसर्जित करण्यात आल्या.

या सर्व गोष्टींचा परिणाम व्हावयाचा तो झाला. चरितार्थाची व्यवस्था लावण्यातच भूदान कार्यकर्त्यांचा बराच वेळ जाऊ लागल्याने भूदान कार्याची साहजिकच पिछेहाट झाली. तसेच प्रत्येक कार्यकर्ता आपला कार्यक्रम आपल्या कल्पनेनुसार ठरवू लागल्याने त्यांच्यात कार्याचे संयोजन किंवा एकसूत्रता राहिली नाही.

भारतातील ग्रामीण क्षेत्राच्या परिवर्तनाच्या व प्रगतीच्या दृष्टीने उचललेले भूदान हे एक क्रांतिकारी पाऊल आहे असे मत श्रीमन्नारायण यांनी व्यक्त केले, तर भूदान चळवळ ही एक विवेकहीन विचारसरणी आहे असे डी. डी. कर्वे म्हणतात. के. एम. पण्णीकरांच्या मते भूदान हे भविष्यातील क्रांतिकारक बदलाकरिता पोषक असे वातावरण निर्माण करीत आहे. परंतु भूमीच्या प्रश्नाचे उत्तर मात्र त्यात मिळू शकत नाही; ते शासनाच्या दृढ व जागरूक कृतीपासूनच मिळू शकते, असे ते म्हणतात; तर भूमिविषयक प्रगतीशील कायद्यांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने भूदान व ग्रामदान व चळवळींचे सहाय्य मोलाचे ठरले आहे, असा निर्वाळा नियोजन मंडळाने दिला आहे.

### ६.२.२. हरितक्रांती (Green Revolution)

डॉ. एस. एम. स्वामीनाथन यांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या भारतातील हरितक्रांतीमुळे कधी नव्हे इतके देशाच्या विश्वासाच बळ वाढले. १९६५ मध्ये सुरू झालेल्या या क्रांतीमुळे, अन्नधान्याच्या बाबतीत तोट्यात असलेल्या भारताने फक्त अन्नधान्य मुबलक प्रमाणात पिकवण्यापर्यंतच मजल मारली असे नाही, तर ग्रामीण भागातील अर्थव्यवस्था शेती सोडून इतर व्यवसायाकडेही वळली. या क्रांतीमुळे सुमारे ४० ते ५० कोटी भारतीयांचे आयुष्यं बदलून गेली. बारमाही अन्नधान्याची आयात करणारा भारत दहा वर्षांपूर्वी अन्नधान्याची निर्यात करणारा देश झाला.

यानंतर १९७९ आणि १९८७ मध्ये शतकातले सर्वात भीषण दुष्काळ आपण अनुभवले आहेत. मात्र, जगाला त्याची दखलही आपण घेऊ दिली नाही. कारण आपण अन्नधान्यासाठी, त्याकाळात कुणाकडेही याचना केली नाही.

#### ६.२.२.१. पार्श्वभूमी

**(१) धान्यटंचाई**

१९४९ ते १९६५ या काळात शेती उत्पादन प्रतिवर्षी ३ टक्के या उत्तम दराने वाढूनही १९५० च्या दशकाच्या मध्यापासून भारतात धान्यटंचाई होती आणि १९६५ पर्यंत तिने उग्र स्वरूप धारण केले होते.

स्वातंत्र्यापूर्वीच्या ५० वर्षातील लोकसंख्या वाढीचा वेग १ टक्के होता; तो स्वातंत्र्यानंतर २.२ टक्का इतका वाढला. प्रत्येक योजनेत नियोजित औद्योगिकरणावरील खर्च वाढत होता. सर्व कारणांमुळे १९५० च्या दशकाच्या मध्यापासून भारतीय शेतीवर खूप दीर्घकालीन ताण पडला. अन्नधान्याची वाढती मागणी पुरविणे भारतीय कृषीक्षेत्राच्या आवाक्याबाहेर होते. १९५० च्या दशकाच्या मध्यावर धान्यकिंमती आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारला वाढती धान्य आयात करावी लागली. पी. एल. ४८० या वादग्रस्त योजनेखाली भारताने १९५६ पासून अमेरिकेकडून धान्य आयातीस सुरुवात केली.

### (२) प्रतिकूल आंतरराष्ट्रीय परिस्थिती

या परिस्थितीत चीनविरुद्ध (१९६२) आणि पाकिस्तानविरुद्ध (१९६५) अशी दोन युद्धे झाली. त्यात भर म्हणून १९६५-६६ ही दोन पाठोपाठ वर्षे अवर्षणाची गेली आणि शेती उत्पादन १७ टक्क्यांनी आणि धान्य उत्पादन २० टक्क्यांनी घटले. धान्य किंमती प्रचंड वाढल्या. १९६५ ते १९६८ या काळात धान्य किंमती वाढीचा वार्षिक दर जवळजवळ २० टक्के होता. १९६६ मध्ये भारताला १ कोटी टनपेक्षा जास्त धान्याची आयात करावी लागली. अशा अत्यंत अडचणीच्या काळात देशातील अनेक भागात विशेषतः बिहार आणि उत्तरप्रदेशामध्ये दुष्काळसदृश्य स्थिती निर्माण झाली असताना अमेरिकेने धान्य करार रद्द करण्याची धमकी दिली.

### (३) शासनाचा सकारात्मक पाठिंबा

ही परिस्थिती लक्षात घेता १९६५ च्या दरम्यान आर्थिक स्वावलंबन आणि विशेषतः धान्य उत्पादनात स्वयंपूर्णता हे भारताच्या आर्थिक आणि परराष्ट्रीय धोरणाचे अग्रक्रमाचे उद्दिष्ट बनले. नव्या शेतीविषयक धोरणाची निष्ठेने व वेगाने अंमलबजावणी सुरू झाली. लालबहादूर शास्त्री, इंदिरा गांधी या दोघांनी आणि अन्नधान्यमंत्री सी. सुब्रमण्यम यांनी भारतीय शेतीसुधारणेच्या पायाभूत बदलास संपूर्ण पाठिंबा दिला.

### ६.२.२.२. हरितक्रांतीची प्रगती

उच्चवर्धिष्णू जातीचे बियाणे, रासायनिक खते व किटकनाशके, मृदसर्वेक्षणाच्या सोयी, शेती मशागतीच्या शिक्षणाचे कार्यक्रम आणि संस्थात्मक कर्जपुरवठा या सर्व गोष्टी खात्रीच्या पाणीपुरवठ्याच्या आणि संस्थात्मक सोयी असलेल्या भागात केंद्रित करण्यात आल्या. असा हा एकत्रित कार्यक्रम अग्रक्रमाने ३.२ कोटी एकर जमिनीवर म्हणजे लागवडीखालील क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्रावर राबविण्यात आला.

शेतीमधील सरकारी गुंतवणुकीतही उल्लेखनिय वाढ करण्यात आली. १९६८ ते १९७३ या काळात शेतीला होणारा संस्थात्मक वित्तपुरवठा दुप्पट केला गेला. १९६५ मध्ये कृषी उत्पन्न किंमत आयोगाची (ए. पी. सी.) स्थापना करण्यात आली. आणि शेतकऱ्याला

दीर्घकाळ पुरेसा फायदा मिळवून देणाऱ्या किंमतीची हमी देण्याचे प्रयत्न सुरू झाले. सार्वजनिक गुंतवणूक, संस्थात्मक पतपुरवठा, किफायदशीर किंमती आणि स्वस्तात मिळणारे नवे तंत्रज्ञान यामुळे शेतकऱ्यांनी शेतीत केलेली गुंतवणूक वाढत्या फायद्याची ठरू लागली. त्याचा परिणाम म्हणजे शेतीतील एकूण स्थूल भांडवलनिर्मिती वेगाने वाढू लागली.

### ६.२.२.३. परिणाम

या नव्या धोरणाची फळे अल्पावधीतच दिसू लागली. १९६७-६८ ते १९७०-७१ या काळात फक्त धान्य आयात १.०३ कोटी टनांवरून ३६ लाख टन एवढी कमी झाली. त्याचकाळात धान्याची उपलब्धता ७.३५ कोटी टनांवरून ९.९५ कोटी टन इतकी वाढली. १९८० च्या दशकात भारत धान्यात केवळ स्वयंपूर्ण झाला नाही तर तीन कोटी टनांच्या राखीव साठा त्याने उभा केला. त्याही पुढे जाऊन पूर्वीचे कर्जे फेडण्यासाठी भारत धान्य निर्यात करू लागला किंवा धान्यटंचाई असलेल्या देशांना धान्य कर्जाने देऊ लागला. या उत्तम परिस्थितीमुळे १९८७ आणि १९८८ मधील अवर्षणांना भारत यशस्वीरित्या तोंड देऊ शकला.

हरितक्रांतीविषयक धोरणाचा एक महत्त्वाचा परिणाम म्हणजे स्वातंत्र्यानंतर शेती विकासाचा जो उच्च दर गाठला गेला होता तो कायम राखणे भारतास शक्य झाले. १९४९-५० ते १९८९-९० या काळात वार्षिक सरासरी वाढीचा वेग २.७ टक्के इतका होता. १९४९-५० ते १९६४-६५ या हरितक्रांतीपूर्व काळात शेती उत्पादनात जी वाढ झाली त्यापैकी ५१ टक्के वाढ क्षेत्रवाढीमुळेच झाली होती. आणि ४९ टक्के वाढ उत्पादकता वाढीमुळे झाली. म्हणजे वाढता वेग टिकविण्यासाठी क्षेत्रवाढ व उत्पादकता वाढ दोन्ही महत्त्वाच्या होत्या. पण क्षेत्रवाढीची मर्यादा एकदा गाठली गेली की, उच्च दरवाढ टिकविण्यासाठी उत्पादकतेतच वाढ व्हावी लागते. हरितक्रांती यातच यशस्वी झाली.

अखिल भारतीय पातळीवरील उत्पादनवाढीच्या वेगामुळे नव्हे तर हरितक्रांतीमुळे बाजार वाढीस लागला त्यामुळे सरकारला अंतर्गत धान्य खरेदी करून मोठे साठे निर्माण करणे शक्य झाले. जलद औद्योगिकरणाच्या धोरणामुळे झालेली धान्य मागणीतील वाढ, सर्वसाधारण आणि नागरी लोकसंख्येतील मोठी वाढ आणि अधून-मधून धान्यतूट येणारे भाग या सगळ्यांची गरज देशांतर्गत उत्पादनातून भागविणे आता सहज शक्य झाले. या सर्व गरजा भागविण्यासाठी पी. एल. ४८० किंवा अन्य आयातीपासून झालेली सुटका हा भारताच्या स्वतंत्र, स्वावलंबी विकासाच्या वाटचालीतला महत्त्वाचा टप्पा आहे.

१९६२-६५ ते १९७०-७३ या हतिरक्रांतीच्या पहिल्या टप्प्यात अखिल भारतीय पातळीवर विकासाच्या एकत्रित वार्षिक वेग २.०८ टक्के इतका होता; पण त्याचे मुख्य कारण म्हणजे वायव्य भारतातील पंजाब, हरियाणा आणि पश्चिम उत्तरप्रदेश या भागात गव्हाची उत्पादकता सरासरीपेक्षा खूप जास्त वेगाने वाढली हे होते. १९७०-७३ ते १९८०-८३ या दुसऱ्या टप्प्यात एचवायव्ही बियाण्यांचे तंत्र गव्हाकडून भाताकडे नेले गेले; त्यामुळे आता हरितक्रांतीचा प्रसार इतर भागात मुख्यतः पूर्व उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेशाची किनारपट्टी, कर्नाटक आणि तामिळनाडूचा काही भाग इत्यादी ठिकाणी झाला. महाराष्ट्र, गुजरात,

आंध्रप्रदेश यासारख्या प्रदेशातील वृद्धीदरही २.३८ टक्के या राष्ट्रीय सरासरी वृद्धीदरापेक्षा अधिक होता. १९८०-८३ ते १९९२-९५ या अलीकडच्या तिसऱ्या टप्प्यात उत्साहजनक व महत्त्वाचे परिणाम घडून आले आहेत. पूर्वीपासून कमी विकास दर असलेल्या पूर्वेकडील पश्चिम बंगाल, बिहार, आसाम आणि ओरिसा या प्रदेशात आता हरितक्रांती पसरू लागली. विशेषतः पश्चिम बंगालमध्ये अभूतपूर्व असा वार्षिक ५.३९ टक्के इतका विकास दर गाठला गेला.

हरितक्रांतीमुळे नवे तंत्र, सुधारित बियाणे आणि इतर साधानांच्या साहाय्याने छोटा शेतकरी अर्थक्षम बनला. असंरक्षित कुळे व बटाईदार यांचे मात्र नुकसान झाले. ज्या भागात हरितक्रांती पसरली तिथे खंड व जमिनीच्या किंमतीत प्रचंड वाढ झाल्याने या वर्गावर फार ताण पडला. कुळांना हाकलून देऊन पगारी मजूर आणि आधुनिक अवजारांच्या साहाय्याने स्वतः जमीन कसण्यास या भागातील जमीन मालक पुढे सरसावले. असंरक्षित कुळे व असंरक्षित बटाईदार यांचे नुकसान झाले. मात्र संरक्षित कुळे व नोंदित बटाईदार यांचा छोट्या जमीन मालकांप्रमाणे नव्या तंत्र वापराने चांगलाच फायदा झाला.

शेतीच्या यांत्रिकीकरणामुळे तसेच आधुनिक तंत्र वापरामुळे प्रासंगिक मजुरांच्या मागणीत वाढ झाल्याने त्यांचे वेतन दरही वाढले आणि भूमिहीन शेतमजुरांची स्थिती पूर्वीपेक्षा थोडी सुधारली आहे. ट्रॅक्टर वापराचे बळी बैल होते; श्रमिक नव्हते. ट्रॅक्टरच्या वाढत्या वापरामुळे पीक सहानता इत्यादीत वाढ झाली आणि त्याचा निव्वळ परिणाम श्रम मागणी वाढण्यात झाला.

हरितक्रांतीमुळे शेतीत रोजगार वाढ झालीच त्याचबरोबर शेतीवर आधारित उद्योगांची वाढ झाल्याने ग्रामीण बिगरशेती रोजगार आणि अर्धशहरी भागातील रोजगारही वाढीस लागला असा अनुभव पंजाब, हरियाणा, आंध्रच्या किनारपट्टीचा भाग, महाराष्ट्र, तामिळनाडू विविध भागांचा होता. या ग्रामीण उद्योगधंद्यांमुळे व्यापारवृद्धी साध्य झाली. कृषी उत्पादन व खते , बि-बियाणे, औषधे यांच्या साठवण सोयी-सुविधा वाढल्या. प्रचंड वाहतूक सोयी, शेती अवजारांचे आणि इतर साधनांचे उत्पादन वाढले. मालट्रक्स, वाहतूक साधने, वीज व डिझेलचे पंप इत्यादींची दुरुस्ती व देखभालीचे असे अनेक व्यवसाय वृद्धींगत झाले व त्यातील रोजगार वाढीस लागला. कालांतराने शेतीची सर्व यांत्रिक अवजारे व साधने देशातच तयार होऊ लागली आणि त्यातून नागरी कारखानदारी रोजगार निर्माण झाला. हरितक्रांतीमुळे ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात वाढ झाल्याने गवंडी, सुतार, शिंपी, विणकर इत्यादींना मागणी वाढली. भौतिक वस्तूंच्या मागणीत वाढ झाल्याने कारखानदारीही वाढली. शेती विकासाच्या बिगरशेती क्षेत्रावरील परिणामाचा तो दृश्य पुरावा होता.

शेतीमधील सुधारणेमुळे जे जादा धान्यसाठे निर्माण झाले त्यांच्या साहाय्याने मुख्यतः मागासलेल्या भागांमध्ये रोजगार निर्मितीचा व दारिद्र्य कमी करण्याच्या योजना मोठ्या प्रमाणावर राबवणे शक्य झाले.

गेल्या काही वर्षात जो एक महत्त्वाचा व गंभीर प्रश्न पुढे आला आहे तो पर्यावरणाची हानी आणि शेती विकासाच्या दीर्घकालीन सातत्याविषयी आहे. रासायनिक खते व

किटकनाशकांच्या अतिरिक्त वापरामुळे पर्यावरणाची हानी आणि विकासदर मंदावून स्थिर होण्याची प्रवृत्ती पंजाबसारख्या दीर्घकाळ हे तंत्र वापरणाऱ्या राज्यात स्पष्ट दिसू लागली आहे. बऱ्याच भागात शेतीसाठी भूपृष्ठावरील पाणी मोठ्या प्रमाणावर काढले जात आहे. त्यामुळे पाण्याची पातळी खोल जात आहे. या साठ्यांमध्ये पुन्हा भर घालण्याची व्यवस्था झाली नाही तर काही काळाने ते साठे संपून जमिनीखालील पर्यावरणाचा विनाश होईल आणि शेतीविकास थांबेल.

ही सर्व परिस्थिती लक्षात घेतल्यास सध्याच्या आधुनिक तंत्राने शेती विकासाला आंधळेपणाने विरोध करणे योग्य होणार नाही आणि त्याचे उलट दुष्परिणामच होतील. मात्र त्याचबरोबर पाण्याचा, रासायनिक खतांचा, किटकनाशकांचा अतिरिक्त वापर न करण्यासाठी शेतकऱ्यांना शिक्षण देण्याची फार आवश्यकता आहे. हा गैरवापर टाकून सजीव सृष्टीची विविधता टिकविण्याचे महत्त्व त्यांना पटवून दिले पाहिजे. शेती उत्पादनासाठी आधुनिक तंत्र व पर्यावरण समतोलासाठी परंपरागत पद्धती यांची एकत्रित माहिती त्यांना देणे आवश्यक आहे. जैविक तंत्रज्ञान संशोधित करून त्याचा वापर हा यावरचा एक उपाय आहे. जर भारताला सतत चालू राहणारा आत्मनिर्भर विकास साधावयाचा असेल तर आतापर्यंत हरितक्रांतीच्या तंत्रसाहाय्याने जसा विकास साध्य केला आहे, तसा यापुढे तो नवसंशोधित जैविक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने साधावा लागेल.

### ६.२.३ कृषी क्षेत्रातील नवीन प्रवाह

#### १) करार शेती

आर्थिक सुधारणांचा एक भाग म्हणून कृषी क्षेत्रात करार शेतीची संकल्पना रुजत आहे. करार शेती हा असा प्रकार आहे की, ज्यात शेतमाल उत्पादक शेतकरी आणि शेतमाल खरेदी करणारा खरेदीदार यांच्यात शेतमाल खरेदी-विक्रीच्या संदर्भात एक करार झालेला असतो. जो दोहोंना मान्य असतो. या करारानुसार शेतकऱ्याने आपल्या शेतजमिनीतून विशिष्ट प्रकारचे उत्पादन उत्तम दर्जा राखून करावयाचे असते. उत्पादित शेतमाल खरेदीदाराने शेतकऱ्याकडून हमी भावाने खरेदी करावयाचा असतो. उत्पादनाचा दर्जा उंचावण्यासाठी खरेदीदाराकडून शेतकऱ्याला उच्च दर्जाचे, बि-बियाणे, खते, अवजारे, किटकनाशके तसेच भांडवल पुरविले जाते. पिकांची देखरेख व किडचे नियंत्रण करण्यासाठी तज्ज्ञांमार्फत शेतकऱ्यांना सल्ला व मार्गदर्शन केले जाते. उत्पादित मालाची प्रतवारी करणे, त्याची साठवणूक करणे, वाहतूक करणे इत्यादी जबाबदारी खरेदीदाराला पार पाडावी लागते. शेतमाल खरेदी-विक्री करार शेतकरी आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मॉलची साखळी असणारी बहुराष्ट्रीय कंपनी किंवा देशी कंपनी दरम्यान केला जातो. शेतकरी आणि कंपनी या दोहोंनी कराराचे काटेकोर पालन करावयाचे असते.

भारतात मॉल संस्कृतीचा जसजसा विकास होत आहे तस तसे करार शेतीचे महत्त्व वाढत आहे. भारतात प. महाराष्ट्र, गुजरात, हरियाणा, पंजाब या राज्यांमध्ये करार शेतीचे प्रस्त वाढत आहे. करार शेतीमुळे आज भारतीय शेतमालाला जागतिक बाजारपेठ सहज उपलब्ध होत आहे. भारतातील रिलायन्स, बिर्ला यासारखे मोठे उद्योग समूह किरकोळ व्यापार

माध्यमातून करार शेतीत सहभागी होत आहेत.

**२) सेंद्रिय शेती**

सेंद्रिय शेती हा असा प्रकार आहे की ज्यात पीक उत्पादन घेण्यासाठी रासायनिक खते, किटकनाशके, यंत्रसामग्री, साठवणूक गृहे या कृषी आदानांचा कोणताही वापर केला जात नाही तर नैसर्गिक पद्धतीने शेती कसण्यासाठी प्रयत्न केले जातात.

भारतात हरितक्रांती यशस्वी झाल्यानंतर कृषी उत्पादनात वाढ करण्यासाठी जास्तीत-जास्त रासायनिक खते, किटकनाशके, यंत्रसामग्री, पाणीपुरवठा यांचा वापर होऊ लागला. प्रारंभीच्या काळात या आधुनिक आदानांचा परिणाम म्हणून कृषी उत्पादनात प्रचंड वाढ झाली. परंतु अलिकडील काळात कृषी उत्पादकता वाढ जी स्थिर झाली आहे किंवा काही प्रांतात उत्पादकतेत घट होत आहे. याचे प्रमुख कारण आधुनिक आदानांचा अती वापर हेच आहे. शिवाय या आधुनिक आदानांच्या साहाय्याने जी कृषी उत्पादने घेतली जात आहे ती उत्पादन ॲगमार्क हा भारतातील कृषी उत्पादन मानांकन आणि ऋअज (ऋेेव रपव असीळ-लीश्रींीीश जीसरपळीरींळेप) हा आंतरराष्ट्रीय मानांकन दर्जा व त्याच्या अटी पूर्ण करू शकत नाही. भारतीय कृषी उत्पादनात रसायने आणि किटकनाशके यांचा अंश जास्त आहे. शिवाय त्यांचा टिकाऊपणा कमी आहे. ती आरोग्याला अपायकारक ठरत आहे. देश आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कृषी उत्पादने नाकारली जात आहे. यामुळेच अलिकडील काळात कृषी उत्पादकतेत वाढ करण्यासाठी व कृषी उत्पादनांचा दर्जा उंचावण्यासाठी शेतकरी वर्ग पुन्हा पारंपरिक शेती म्हणजे सेंद्रिय शेतीकडे वळत आहे.

## ६.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१) विनोबा भावे यांच्या नेतृत्वातील भूदान चळवळीचे महत्त्व स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

२) हरित क्रांतीच्या फलनिष्पत्तीचे चिकित्सक परीक्षण करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

३) भारताच्या आर्थिक विकासात सहकार चळवळीचे योगदान स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

## ६.४ सारांश

आज भारत अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण झाला आहे. हेच कृषी विकासाचे प्रमुख लक्षण मानले जाते. कृषीतून उत्पादित होणाऱ्या कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे उद्योग वाढत

आहेत. म्हणून भारताच्या औद्योगिक विकासाचा दर वाढला आहे.

भूदान आणि ग्रामदान चळवळीमुळे शेतकरी वर्गात राजकीय आणि अन्य जागृती निर्माण झाली आहे. भारतीय शेतीची उत्पादकता वाढून शेतीचा विकास घडवून आणण्यासाठी स्वातंत्र्योत्तर काळात संस्थात्मक सुधारणांवर भर देण्यात आला. भारतात जमीन सुधारणांचा कार्यक्रम हाती घेण्यात आला. मध्यस्थांचे उच्चाटन कमाल जमीन धारणेवर मर्यादा, कुळविषयक सुधारणा वगैरेंचा जमीन सुधारणात समावेश होता. भारतात सामाजिक न्याय व आर्थिक कार्यक्षमता ही पहिल्या योजनेपासून पुढे ठेवलेली उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जमीन सुधारणा कार्यक्रमात भर देण्यात आला. भारतात शेतकऱ्यांना उत्पादन वाढीसाठी प्रेरणा देणे. शेती व्यवसायातील वातावरणात बदल करणे, सामाजिक न्याय प्रस्थापित करणे यासाठी जमीन सुधारणांची आवश्यकता होती.

प्रत्यक्ष शेती करणारा व सरकार यांमध्ये असलेले जमीनदारासारखे मध्यस्थ दूर करून या दोन घटकांत प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले. कुळविषयक सुधारणात खंडाचे नियंत्रण करणे, कुळांना संरक्षण मिळवून देणे. कुळांना मालकी हक्क मिळवून देणे यादृष्टीने प्रयत्न करण्यात आले. कमाल जमीनधारणेवर मर्यादा घालून अतिरिक्त जमीन सरकारने ताब्यात घेऊन त्याचे भूमिहीन शेतमजूर व अल्पभूधारक शेतकऱ्यात वाटप करण्यात आले.

## ६.५ पारिभाषिक शब्द

(१) कुळ (Tenant) :– खंडाने दुसऱ्याची जमीन करणाऱ्यास 'कूळ' म्हणतात. कायमस्वरूपी कुळे, तात्पुरती कुळे व उपकुळे हे कुळांचे तीन प्रकार आहेत.

(२) खंड (Rent) :– जमीन कसण्याच्या मोबदल्यात शेतात उत्पादित झालेल्या शेतमालापैकी जमीनमालकाला दिला जाणारा हिस्सा म्हणजे खंड होय.

(३) जमीन सुधारणा (Land Reforms) :– देशातील शेतजमिनीच्या मालकी हक्काचे व शेतीपासून मिळणाऱ्या उत्पादनाचे न्याय्य वाटप घडवून आणून सामाजिक न्याय प्रस्थापित करण्याच्या हेतूने शेतजमिनीच्या मालकी हक्काचा एक आदर्श आकृतीबंध निर्माण करणे म्हणजे 'जमीन सुधारणा' होय.

(४) जमीनदारी पद्धत (Zamindari System) :– जमीन महसूल गोळा करण्याच्या सोयीसाठी ब्रिटिशांनी जमीनदारी पद्धत सुरू केली. जमीनदारी पद्धतीतील गावातील सर्वच जमीन एका किंवा काही व्यक्तींच्या ताब्यात असे व ते ती जमीन कुळांना कसण्यासाठी देत. त्या बदल्यात खंड म्हणून कुळांना शेती उत्पादनातील हिस्सा जमीनमालकांना द्यावा लागत असे. जमीनदार सरकारला जमीन महसूल देत असत.

(५) महालवारी पद्धत (Mahalwari System) :– भारतात मुस्लिम परंपरेतून महालवारी पद्धती अस्तित्वात आली. या पद्धतीत संपूर्ण गावासाठी ठराविक महसूलाची आकारणी केली जाई व हा महसूल गावाचा प्रमुख सरकारकडे भरत असे.

(६) रयतवारी पद्धती (Rayatwari System) :– रयतवारी पद्धती हिंदू परंपरेतून अस्तित्वात

आली. या पद्धतीत प्रत्येक कुटुंबाकडे जमिनीची स्वतंत्र मालकी होती व प्रत्येक कुटुंब सरकारकडे जमीन महसूल भरत असे.

(७) हरितक्रांती (Green Revolution) :– भारतात शेती विकास घडवून आणण्यासाठी १९६५–६६ मध्ये नवीन व्यूहरचना (डीरींशसू) स्वीकारण्यात आली. त्यानुसार आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न सुरू झाला. रासायनिक खते, कीटकनाशके, सुधारित व संकरित बी–बियाणे, पाणीपुरवठा व आधुनिक यंत्रांचा वापर भारतात करण्यात येऊन शेती उत्पादनात वेगाने वाढ घडून आली. या बदलाचा उल्लेख 'हरितक्रांती' असा केला जातो.

## ६.६ संदर्भ सूची


- आधुनिक भारताचा इतिहास – ग्रोव्हर–बेल्हेकर, एस.चांद, दिल्ली (२००७).
- फडके य. दि., जम्म–काश्मीर स्वायत्ता की स्वातंत्र्य?, अक्षर प्रकाशन, मुंबई (२००१).
- वर्तमान भारत – वेदप्रताप वैदिक, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली(२००२).

श्र आधुनिक भारताचा इतिहास – वैद्य–कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७–२०००).

- स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास – सरदेसाई म. हि., गोवा, दमण, दीव, खंड – १, पणजी सरकार (१९८६).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स – बिपिनचंद्र (अनु. पारशी मा. कृ. व इतर), के.सागर, पुणे (२००४).

# घटक ७

# जनसंघर्ष

**अनुक्रमणिका**


**७.0 घटकांची उद्दिष्टे**

**७.१ प्रस्तावना**

**७.२ मुख्य मुद्दा**

**७.२.१. आदिवासींच्या चळवळी**

**७.२.२. शेतकऱ्यांच्या चळवळी**

**७.२.३. कामगार चळवळी**

**७.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**७.४ सारांश**

**७.५ पारिभाषिक शब्द**

**७.६ संदर्भसूची**


## ७.0 घटकाची उद्दिष्टे

१) आदिवासींच्या चळवळीचे मूल्यमापन करता येईल.

२) शेतकऱ्यांच्या चळवळीचे मूल्यमापन करता येईल.

३) कामगारांच्या चळवळीचे मूल्यमापन करता येईल.

## ७.१ प्रस्तावना

स्वातंत्र्यपूर्वकाळात कामगार चळवळ, दलित चळवळ, ब्राह्मणेत्तरांच्या चळवळी यांच्या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्योत्तर राजकारण उलगडत गेले. त्यामुळे राजकीय पक्षांनी पाठिंबा मिळविण्यासाठी वेळोवेळी जनजागृती आणि चळवळी यावर भर दिला.

भांडवली विकास प्रक्रियेत हस्तक्षेप करून राज्यसंस्थेच्या कामगारांच्या बाजूने कायदे करायला लावण्याचा प्रयत्न कामगार चळवळीने केला. समाजवादी कामगार संघटनांसह सर्वत्र चळवळीचा रोख राजकारणाचे वर्गीय आधारावर ध्रुवीकरण करणे हा होता.

भारतीय आदिवासी हे स्वभावातच शांतीप्रिय लोक आहेत. जोपर्यंत बाह्य जगाशी म्हणजे आधुनिक संस्कृतीशी त्यांचा संपर्क नव्हता, तोपर्यंत त्यांच्या शांत सामाजिक जीवनात कोणतीही आंदोलने झाली नाहीत. मात्र बाह्य जगाशी संबंध आल्यानंतर हे चित्र बदलू लागले.

## ७.२ विषय विवेचन

जनतेच्या चळवळी

स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या पाव शतकातील विविध सामूहिक कृतींपैकी कामगार चळवळ, नक्षलवादी चळवळ, प्रादेशिक चळवळी आणि जय प्रकाशांचे नवनिर्माण आंदोलन या मुख्य चळवळी मानता येतील. शेतकरी चळवळी, आरक्षण विरोधी चळवळी यांच्याबरोबरच चळवळींच्या राजकारणाचे अपहरणही या काळात घडून आले. तसेच विकास प्रक्रियेची चिकित्सा करणाऱ्या छोट्या आणि ठिकठिकाणी उद्‌भवलेल्या चळवळी हे देखील या उत्तरार्धाचे वैशिष्ट्य ठरते.

### ७.२.१. आदिवासी चळवळ

जगातील सर्व देशात आदिवासी जमाती अस्तित्वात आहेत. भारतात आदिवासी जमाती मोठ्या संख्येत असून त्या भारतभर पसरलेल्या आहेत. त्यांची जमातींची संख्या सुमारे ४१४ आहे. आपल्या देशाच्या लोकसंख्येच्या आठ टक्के इतकी लोकसंख्या अनुसूचित जमातींची आहे. इ. स. २००१ मध्ये त्यांची लोकसंख्या ८२० लाख एवढी होती. त्यांचे दोन वर्गांमध्ये विभाजन करता येईल. (१) सरहद्द प्रांतातील जमाती, (२) असरहद्द प्रांतातील जमाती. पहिल्या वर्गातील जमाती ईशान्य सरहद्दीवरील अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मणीपूर, त्रिपूरा, मिझोराम आणि नागालँड या राज्यांमधील रहिवासी होत. एकूण जमातींच्या लोकसंख्येपैकी ११% इतकी लोकसंख्या या सरहद्द प्रांतातील जमातींची आहे. असरहद्द प्रांतातील ८९ टक्के इतकी या जमातींची लोकसंख्या इतर सर्व राज्यांमध्ये विभागली गेली आहे. अनुसूचित जमातींना 'टोळ्या', 'आदिवासी', 'अगदी मूळचे रहिवासी' किंवा 'आदिम' असे म्हटले जाते. त्याचप्रमाणे अरण्यात राहणारे म्हणून 'वनवासी', तसेच पर्वतावर राहणारे म्हणून 'गिरिजन', हिंदीत 'जनजाती' हा शब्द वापरतात.

आदिवासींच्या चळवळींचे पुढीलप्रमाणे भाग करता येऊ शकतात.

(१) जातीभिन्नतासंबंधित संस्कृती धर्मसंबंधित चळवळ.

(२) जमीनविषयक आणि वनकायदाविषयक चळवळ.

(३) पर्यावरणविषयक चळवळ.

(४) नाखुषीने लादलेले विस्थापन आणि पुनर्वसन चळवळ.

(५) स्वतंत्र राज्याच्या मागणीसंबंधीची राजकीय चळवळ. पाचही प्रकारांचा परस्परांशी संबंध तर आहेच. एका प्रकारातून दुसरा प्रकार निघतो. तसेच काही विषय दोन प्रकारांमध्ये सारखे असलेले आढळून येतात.

जमिनीचे संक्रमण, जबर व्याजाने पैसे देणे, सक्तीची मजुरी, कमीतकमी मजुरीवर राबविणे, जमीन हिसकावून घेणे अशा अनेक गोष्टी स्वातंत्र्याच्या उदयाच्यावेळी आणि नंतरसुद्धा आदिवासींच्या चळवळीची प्रमुख कारणे होती. १९५० मध्ये गुजरातेत त्यांनी महसूलबंद आणि जमीन बळकाव आंदोलन छेडले आणि असे जाहीर केले की आदिवासी हेच जमिनीचे मूळचे रहिवासी मालक आहेत. दक्षिण गुजराततेतील पारडी तालुक्यातील आदिवासींनी जमीनसुधारणा कायद्याची अंमलबजावणी आणि कसणाऱ्या शेतकऱ्याला जमिनीची वाटणी या मागण्यांसाठी आंदोलन उभारले. १९५० साली समाजवादी पक्षाने या चळवळीचे

नेतृत्व केले होते.

१९६० च्या दशकात पश्चिम बंगाल आणि आंध्रप्रदेशमधील नक्षलवादी आंदोलनाचे मुख्य घटक आदिवासीच होते की जे शोषणाविरुद्ध लढले. आंध्रप्रदेश, बिहार, महाराष्ट्र, गुजरात या राज्यांमध्ये किमान वेतन, कर्ज नाकारणे आणि शोषण यासाठी जमीनमालकांविरुद्ध आदिवासींनी आंदोलन उभारले. तसेच १९६९-७० मध्ये बिहार, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि आंध्रप्रदेश येथील आदिवासी जमीन बळकाव आंदोलनात सामील झाले. १९७० मध्ये झालेल्या चळवळीत महाराष्ट्रात शहादा आणि भूमिसेना चळवळीत मुख्यत्वे आदिवासींचाच सहभाग होता. ब्रिटिशांच्या काळात दिक् म्हणून जे सावकार आणि जमीनमालक शोषणकर्ते होते, त्यांच्याविरुद्ध छोटा नागपूर भागातील आदिवासींनी आंदोलन केले. स्वातंत्र्योत्तर काळातील लढ्याचीसुद्धा हीच मुख्य कारणे आहेत.

१९७० मध्ये गढवाल भागातील जंगलाच्या ठेकेदारांविरुद्ध आदिवासींनी चळवळ केली. १९८० पासून १९९० च्या मध्यातील गुजरातमधील डांग आदिवासींनी काहीही यश न येता जंगलविषयक कायदा आणि जंगलापासून मिळणारी उत्पादने यांना मुकावे लागले होते, लढा दिला. पूर्व जंगलातील उत्पादने मिळविण्याचा हक्क आणि जंगलातील जमीन कसणे यासंबंधी सतत लढा दिला. स्वयंसेवी गटांनी या चळवळींमध्ये पुढाकार घेतला.

स्वतंत्र राजकीय अस्तित्वासाठी-राज्य किंवा जिल्हा म्हणून-पूर्व भारत, ईशान्य भारत आणि मध्य भारत येथून करण्यात आल्या. डांगच्या आदिवासींनी पूर्वीच्या द्विभाषिक मुंबई राज्यात स्वतंत्र जिल्हा मिळण्याची मागणी केली. काही गुजराती पुढाऱ्यांनी स्वायत्त आदिवासी राज्याची मागणी केली, पण त्यांना जनमताचा पाठिंबा मिळाला नाही आणि त्यांची फक्त घोषणाच शिल्लक राहिली. जरी ही चळवळ कालांतराने कमी होत गेली, तरी आदिवासीवाद, सत्ताधारी वर्गाचा निषेध करीत राहणे या गोष्टी दक्षिण गुजरातेतील आदिवासींनी चालू ठेवल्या.

१९५० साली छत्तिसगडच्या गोंड जमातींनी स्वतःसाठी स्वतंत्र राज्याची मागणी केली. १९६० पासून मिझो जमातीने भारतीय संघटराज्याच्या बाहेर स्वतःचे स्वतंत्र राज्य मागितले. या राजकीय मागण्या करताना आर्थिक आणि जातिभिन्नतेच्या मागण्या केल्या जातात. पूर्व आणि मध्य भारतातील आदिवासींचे जातिवंत हिंदूबरोबर निकटचे परस्परसंबंध आहेत, म्हणून ते भारतीय राज्याच्या बाहेरील राजकीय दर्जाची मागणी करीत नाहीत. खरं त्या त्यांच्यापैकी बऱ्याच जणांनी ख्रिस्ती धर्माचा स्वीकार केलेला आहे आणि आंतरराष्ट्रीय सरहद्दीवर त्यांची वस्ती आहे म्हणून त्यांना भारतीय राज्यांमधून फुटून बाहेर पडावयाचे आहे.

भारतामध्ये १९५० ते १९९० या कालावधीत कालवे काढणे कार्यक्रम, खाणी, औष्णिक वीज निर्मितिकेंद्र, वन्यजीव अभयारण्य, उद्योगधंद्यांची वाढ इत्यादींमुळे २१२ लाख विस्थापित झाले. त्यांच्यापैकी ८५ टक्के लोक हे आदिवासी आहेत. अतिशय क्षुल्लक नुकसानभरपाई देऊन त्यांच्या जमिनी आणि वस्तीस्थाने सरकार आणि खाजगी उद्योगधंद्यांकडून बळकाविण्यात आल्या. त्यांनी वारंवार विस्थापनाचा विरोध केला आणि त्यांच्या विरोधाने काही भागांमध्ये सुसंघटित चळवळींचे स्वरूप घेतले. अलीकडच्या काळात नर्मदा बचाव आंदोलनाने धरण

बांधण्याविरुद्ध दीर्घकाळ लढा दिला की ज्या धरणामुळे खूप मोठ्या संख्येने आदिवासी विस्थापित झाले. काही ठिकाणी त्यांनी अजून नुकसानभरपाईची मागणी केली आणि अजून चांगल्या पुनर्वसनासंबंधीची धोरणे करण्याची मागणी केली. काही वेळा त्यांनी अशा सुधारणांविरुद्ध आवाज उठविला की ज्यांच्यामुळे नैसर्गिक साधनसंपत्तीवरील त्यांचा हक्क संपुष्टात येत होता.

### ७.२.१.१ झारखंड चळवळ

१९५० जमशेदपूरमध्ये झालेल्या अधिवेशनात झारखंड पार्टीची स्थापना झाली. त्यांचे नेते जयपाल सिंह हे होते. पुढे त्यांनी काँग्रेस पक्षात समावेश केल्याने नेतृत्वात फूट पडली. बिरसा सेवादलाने १९६८ मध्ये झारखंडची मागणी केली. १९७३ मध्ये शिबू सारेन यांनी झारखंड मुक्तिमोर्चाची स्थापना केली. झारखंड को-ऑर्डिनेशन कमेटी केलरी यांनी बनविली. या आंदोलनात कम्युनिस्ट, नक्षलवादी व इतर सर्वांचाच पाठिंबा मिळाला. या आंदोलना भूमी व जंगलांच्या बाबतीत निष्कासित झाल्याबाबत, रोजगार आणि प्रशिक्षणापासून वंचित, सांस्कृतिक संमीश्रण, असंतुलित विकास इत्यादी मुद्यांचा समावेश होता. आदिवासींचे शोषण करणाऱ्यांना त्यांच्यातून बाहेर हाकलण्यासाठीचे हे आंदोलन होते. त्यांनी स्वतंत्र राज्य मागितले. आज झारखंड हे जरी स्वतंत्र राज्य स्थापन झाले तरी त्यांच्यासमोर अनेक समस्या आहेत.

### ७.२.१.२ बोडो आंदोलन

आसामात एकूण २ कोटी ६५ लाख विभिन्न आदिवासी जमातींचे लोक आहेत. त्यापैकी ४२ लाख ९६ हजार केवळ बोडो आदिवासी आहेत. बोडो आंदोलन हे आदिवासी क्षेत्राला स्वायत्ता द्यावी या मागणीशी संबंधित आहे. सुमारे ७८,५२३ चौ. कि. मी. क्षेत्रासाठी ही मागणी आहे. यात कोकटाझार, ध्रुवी, गोलपाडा, बारपेठा, नळबारी, कामरू, दरांग, शांतीपूर, लखीलपूर, मंजुली व सेंदिया हे भाग अंतर्भूत होतात. अखिल बोडो छात्र संघटनेने आपली मागणी पूर्ण करण्यासाठी हिंसात्मक आंदोलन केले. आसाम बंद व रेल रोको आंदोलन केले. जाळपोळही केली. 'करो या मरो' असा नारा त्यांचा नेता उपेंद्रनाथ ब्रह्मा यांनी दिला. ब्रह्मपुत्रेच्या किनाऱ्यापलीकडे मैदानात राहणाऱ्या आदिवासींसाठी स्वतंत्र्य राज्य ब्रम्हपुत्रेच्या दक्षिण किनाऱ्यावरच्या आदिवासी क्षेत्रातील जिल्ह्यांना स्वायत्ता, कारबी, एकलांगच्या बोडो कछाटी वंशाच्या मैदानी आदिवासींना सातव्या अनुसूचित टाकणे इत्यादी मांगण्यासाठी बोडो आंदोलन उभे राहिले आहे.

### ७.२.१.३ इंदरवेली चळवळ

इंदरवेलीची चळवळ म्हणून प्रसिद्ध आहे. तेथील गैर आदिवासींनी आदिवासींची जमीन ताब्यात घेतली. म्हणून आदिवासींनी संघटित होऊन ठराव करण्याचे ठरविले. २० एप्रिल १९८१ रोजी इंदरवेली येथे त्यांनी मोठी सभा घेतली. 'जगायचे असेल तर मरायला शिका' असा नारा देऊन रणशिंग फुंकले. त्या सभेवर पोलिसांनी गोळीबार केला. १३ आदिवासी ठार झालेत. परिस्थितीने गंभीर वळण घेतले. शेवटी आंध्रप्रदेशचे तत्कालिन मुख्यमंत्री टी. अंजैय्या यांनी मध्यस्थी केल्यानी प्रकरण निवळले. आदिवासींना त्यांची जमीन परत मिळाली.

### ७.२.१.४ महाराष्ट्रातील चळवळ

आदिवासींच्या शेतजमिनी कायदेशीर बंधनाचे उल्लंघन करून गैर आदिवासींनी लुबाडल्या. याच संदर्भात एक मोठी चळवळ अंबरसिंग महाराज यांनी महाराष्ट्रात सुरू केली. त्याचा परिणाम होऊन शासनाने 'महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड आणि टेनस्सी लॉ' यात ६ जुलै १९७४ रोजी अध्यादेश काढून बदल केला. आदिवासींच्या जमिनी काढून घेतल्यामुळे जीवन जगण्यासाठी त्यांना जंगलातील वनजमिनीवर अतिक्रमण करून शेती करणे अनिवार्य झाले. अशी अतिक्रमणे नियमीत करण्यात यावी आणि त्या वनजमिनीचे पट्टे आदिवासींना मिळावेत, यासाठी ही चळवळ झाली. परिणामतः डिसेंबर १९७८ मध्ये अतिक्रमणाने करण्यात येणारी वनशेती नियमित करण्यासाठी आदेश काढण्यात आले.

### ७.२.१.५ चिपको आंदोलन

उत्तरप्रदेशात सुंदरलाल बहुगुणा यांच्या नेतृत्वाखाली जंगलातली वृक्षतोड थांबविण्यासाठी चिपको आंदोलन या नावाने ही चळवळ सुरू झाली. खाजगी कंपनीचे लोक बेसुमार वृक्षतोड करीत होते ती थांबविण्यासाठी आदिवासींनी वृक्षतोडीला लोक आले की, वृक्षांना मिठी मारण्याचे 'चिपको' आंदोलन केले. २७ मार्च १९७३ रोजी गोपेश्वर या आंदोलनाची सुरुवात झाली. शेवटी कटाई करणाऱ्या ठेकेदाराला वृक्षतोड बंद करायला त्यांनी भाग पाडले. पर्यावरणाचे संतुलन राखणे आणि आदिवासींचे घर असलेले जंगल टिकविणे हे हिचे मुख्य उद्दिष्टे होते.

### ७.२.१.६ जंगल बचाव-मानव बचाव

महाराष्ट्राच्या गडचिरोली जिल्ह्यात ही चळवळ उभी राहिली. गडचिरोली जिल्ह्याच्या महाराष्ट्र, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश यांच्या सीमेवरच्या त्रिकोणी परिसरात सुमारे सतरा लहान मोठी धरणे बांधण्याची योजना आखण्यात आली. यात महाराष्ट्रातली उत्तम प्रतीची जंगले व जमीन पाण्याखाली जाऊन माडिया-गोंड हे अतिमागास आदिवासींचे जनजीवन विस्थापित होणार होते. आदिवासी नेते जोगा मडावी यांनी पुढाकार घेऊन 'जंगल बचाव-मानव बचाव' हे आंदोलन उभे केले. या धरणांविरुद्ध आवाज उठविण्यात आला. शेवटी हे आंदोलन यशस्वी होऊन धरणांची योजना थांबविण्यात आली.

### ७.२.१.७ भूमिसेना आंदोलन

ठाणे जिल्ह्यात आदिवासींचे भूमिसेना आंदोलन हे पालघर तालुक्यातल्या वारली आदिवासींच्या दृष्टीने फार महत्त्वाचे ठरले. भूमिसेना ही एक अराजकीय संघटना होती. ती १९७० मध्ये स्थापन झाली. आदिल नावाचा आदिवासी शेतकऱ्यांच्या नेतृत्वाखाली वारली आदिवासींनी सावकार व जमीनदारांच्या विरुद्ध लढा उभारला. सुरुवातीला आदिवासींनी शेतात जाऊन जी शेत त्यांचीच असून सावकारांनी लबाडीने ताब्यात घेतली होती. त्या शेतामध्ये जाऊन उभी पिके कापून ताब्यात घ्यायला सुरुवात केली. भूमिसेनेने या गैरव्यवहाराबद्दल शासकीय अधिकाऱ्यांकडे तक्रारी नोंदविल्या होत्या. परंतु त्यांची दखल घेतली गेली नव्हती. पीक कापण्याच्या आंदोलनामुळे अधिकाऱ्यांना या प्रकरणांकडे लक्ष द्यावे लागले, मात्र पिके कापणे चालूच ठेवून आदिवासींनी त्यातून धान्यपेढी तयार केली व त्यातून आदिवासींमध्ये

सामूहिक वाटप केले.

### ७.२.१.८ मावा नाटे – मावा राज

गडचिरोली जिल्ह्यात १९८५ च्या सुमारास धानोरा तहसिलीतील लेखा-मेंढा या गोंड बहुल गावांमध्ये आदिवासींच्या अन्याय मुक्ती आणि विकासासाठी स्थानिक आदिवासींची चळवळ उभी राहिली आणि तिचे नेतृत्व देवाजी तोफा या आदिवासीने केले. तोफाच्या नेतृत्वात 'मावा नाटे – मावा राज' म्हणजे 'आमच्या गावात – आमचे राज्य' या मागणीसाठी चळवळ झाली. ग्रामाबाबत निर्णय घेण्याचे आणि जंगल उत्पादनाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार ग्रामसभेलाच असावेत अशा स्वरूपाची मागणी होती.

आदिवासी चळवळींचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की, त्यांच्यातील जास्तीत जास्त चळवळी या आर्थिक शोषण आणि बाह्या संस्कृतीतील घटकांनी त्यांच्या निवासस्थानांवर म्हणजे जंगलावर केलेले अतिक्रमण, जंगलतोड, पर्यावरणात असंतुलन आणि आदिवासींचे विस्थापन यांच्या विरोधातच झालेले आहेत. आदिवासींच्या राजकीय चळवळी या त्यांच्या विभागीय स्वातंत्र्यासाठी अथवा स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी झालेल्या दिसतात. विशेषतः भारताच्या उत्तर-पूर्व भागात त्यांचे प्रमाण बरेच मोठे आढळते.

### ७.२.२. शेतकऱ्यांच्या चळवळी (Peasant Movements)

ग्रामीण उपजीविकांमध्ये शेतीवर गुजराण करणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. या शेतकरी वर्गाचे प्रश्न अर्थातच शेतीशी संबंधित असणाऱ्या जमीन, तिचे वाटप व मालकी, पाणी व पाणी वाटप, शेतीमालाचे भाव व शेतीउत्पादनाचे वाटे, शेतसारा या बाबींशी निगडित असतात. जमीन महसूलाच्या बदलत्या पद्धती, उत्पादनाची बदलणारी तंत्रे, त्याचप्रमाणे बदलत्या जागतिक/राष्ट्रीय राजकीय-आर्थिक परिस्थितीनुसार शेतकऱ्यांच्या समस्या व प्रश्नांमध्येही बदल होता. या प्रश्नांचे स्वरुप जसे बदलते तसे शेतकऱ्यांच्या संघर्षाचे स्वरूपही बदलते.

शेतीप्रधान विकसनशील देशांत शेतकरी वर्गाचे प्रमाण मोठे असते व तो वर्ग देशाच्या अर्थकारणात व राजकारणातही महत्त्वाचा असतो. शेतकऱ्यांच्या चळवळींचा अभ्यास अशा देशांच्या विकासप्रक्रियेच्या अभ्यासातही महत्त्वाचा ठरतो.

हरितक्रांतीमुळे शेतीतील भांडवली खर्च वाढल्यामुळे शेतकरी वर्गातील कर्जबारीपणाचे प्रमाणही बरेच वाढले. शेतीला लागणाऱ्या आदानांच्या वाढत्या किंमती यामुळे मध्यम व श्रीमंत शेतकऱ्यांमध्येही वैफल्याची भावना निर्माण झालेली होती. शेतीमधील बेकारीचे प्रमाणही वाढले. त्यातून शेतमजुरांच्या संख्येतही बरीच वाढ झाली. कृषिक्षेत्रातील या अरिष्टाच्या परिणामी देशभर शेतकऱ्यांचे लढे सुरू झाले व त्यात शेतकऱ्यांचे सर्वच घटक ओढले गेले.

१९८०-८१ मध्ये महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, पंजाब, हरियाणा, गुजराथ या राज्यांमध्ये ज्या चळवळी झाल्या त्यांच्या काही समान मागण्या होत्या. त्यातील सर्वात महत्त्वाची मागणी 'शेतीमालाला वाजवी भाव' मिळावा ही होती. या खालोखाल

शेतीसाठीच्या आदानांच्या किंमती कमी करणे, अवाजवी कर व लेव्ही बंद करणे, कर्जबारीपणातून मुक्ती याही मागण्या आंदोलक करीत होते. यातील काही आंदोलनांमध्ये शेतमजुरांना जास्त मजुरी मिळावी हीही मागणी केली जात होती.

शेतीमालाच्या भावासाठी झालेली ही आंदोलने प्रामुख्याने अहिंसक स्वरूपाची, भौगोलिक दृष्ट्या व्यापक व शेतकरी समाजातील विशिष्ट वर्ग त्यात सामील असल्यामुळे स्वतंत्र भारताच्या इतिहासात अभूतपूर्व म्हणता येतील अशी होती. त्यात शेतकऱ्यांनी फार मोठ्या संख्येने अटक करवून घेतली, लाठ्या खाल्ल्या व बंदुकीच्या गोळ्या झेलल्या. या प्रकारच्या आंदोलनांनी देशविदेशातील माध्यमांचे लक्ष तर खेचून घेतलेच पण त्या त्या राज्यांतील सरकारांवर आपल्या मागण्यांचा मोठा दबाव निर्माण केला व काही मागण्या मान्यही करून घेतल्या. या आंदोलनांनी सरकारच्या एकंदरीतच कृषिविषयक धोरणांना व सत्ताधारी वर्गाच्या शेतकऱ्यांविषयीच्या वृत्तीला आव्हान दिले.

स्वातंत्र्योत्तर काळातील शेतकऱ्यांच्या लढ्यात खूप विविधता आहे. तेलंगणातील शेतकऱ्यांच्या प्रख्यात चळवळीपासून ते पेप्सू मधील स्वातंत्र्यपूर्वकापासून चालत आलेला कुळांचा संग्राम, १९६० च्या दशकाच्या अखेरच्या काळातील माओवादी किंवा नक्षलवादी चळवळ आणि १९८० च्या दशकातील नव्या शेतकऱ्यांच्या चळवळी या सगळ्यांचा त्यात समावेश होता. कम्युनिष्टांप्रमाणे समाजवादी व प्रजासमाजवादी पक्षांनीही १९७० मध्ये 'जमीन बळकाव मोहीम' सुरू केली होती. पंजाब आणि आंध्र प्रदेशात पिकांना वाढीव किमती देण्यासाठी, सिंचनसोयींचा खर्च भागविण्यासाठी बसविलेला सुधारणा कर रद्द करण्यासाठी यांसारख्या अनेक कारणांनी शेतकऱ्यांनी आंदोलने केली. १९६८मध्ये मोंगा येथे भारतीय कम्युनिस्ट पक्षाने 'भारतीय शेत मजदूर युनियन' नावाची शेतमजुरांची अखिल भारतीय पातळीवरील पहिली संघटना स्थापन केली. देशातील या सगळ्या चळवळींचा मागोवा घेतला तर त्यातून स्वातंत्र्योत्तर काळातील कृषिक्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील बदलांचा आपणास वेध घेता येतो. स्वातंत्र्योत्तर सुरुवातीच्या काळातील आंदोलने वसाहतवाद व सरंजामशाहीशी निगडित अशा प्रश्नांवरून, तदनंतरच्या काळातील आंदोलने हरित-क्रांतीशी संबंधित आणि इतर शेतीप्रश्नांशी निगडित अशा मुद्द्यांभोवती उभारली गेली. विशेषतः जमीन सुधारणांमुळे जमीनमालकी संबंधी ज्या आकांक्षा निर्माण झाल्या होत्या त्यांचाही त्यात समावेश होता.

१३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सैन्याने हैद्राबाद संस्थानात प्रवेश केला. 'मुक्तिसेना' म्हणून जनतेने तिचे स्वागत केले आणि काही दिवसांतच निजाम व त्याचे सैन्य शरण आले. नंतर भारतीय सैन्य रझाकारांचा बंदोबस्त करण्यासाठी ग्रामीण भागात शिरले. परंतु दरम्यानच्या काळात, आपली शस्त्रे टाकून न देता, क्रांतिकारी कार्यकर्त्यांची दले बरखास्त न करता, पूर्वी जसे रझाकारांवर हल्ले केले तसा आता वसाहतवादाचे पुरस्कर्ते असलेल्या बूर्ज्वा जमीनदारांच्या बाजूने असलेल्या नेहरूंच्या सकारविरुद्ध मुक्तिसंग्राम करायचा, असा निर्णय कम्युनिष्टांनी घेतला होता. त्यानुसार जंगजात लपून भारतीय सैन्यावर हल्ले करण्याचे आदेश क्रांतिकारी दलांना देण्यात आले. काही महिन्यातच सेनेने खेड्यात लपलेले कार्यकर्ते शोधून बाहेर काढले. पण या प्रकारात हजारो शेतकऱ्यांना खूप त्रास सहन करावा लागला. अखेरीस अनेकदा चर्चा झाल्यानंतर १९५१ मध्ये कम्युनिस्टांनी ही चळवळ अधिकृतरीत्या मागे

घेतली.

मात्र या चळवळीने पुढे आणलेल्या प्रश्नांची सरकारने तत्काळ दखल घेतली. १९४९ मध्येच जहागिरदारी निर्मूलन कायदा संमत झाला आणि १९५०मध्ये हैद्राबाद कुळ आणि शेतजमीन विषयक कायदा मंजूर झाला. मशागतीखालील जमिनीपैकी १/४ पेक्षा जास्त जमिनीवरची सहा लाखांहून अधिक कुळे संरक्षित म्हणून जाहीर करण्यात आली. १९५५ च्या सुमारास कमाल जमीनधारणा कायदाही अमलात आणला गेला.

स्वातंत्र्यानंतर पतियाळा संस्थान भारतात विलीन झाले. मात्र पतियाळाच्या राजाने कुळांवर मोठी जुलूम जबरदस्ती सुरू केली. अखेर कुळांच्यावतीने प्रजामंडळाने कुळांचे गाऱ्हाणे दिल्लीतील राज्य मंत्रालयाकडे नेले. पतियाळा अँड ईस्ट पंजाब स्टेट्स युनियनच्या (पेप्सू) स्थापनेनंतर जुलमाचे प्रमाण कमी झाले. जुलै १९४८ मध्ये पंजाबमधील सर्व संस्थानांना एकत्रित करून पेप्सू एक नवे राज्य निर्माण करण्यात आले.

परंतु सरकारला आपला अधिकार गाजवता न आल्याने परिस्थिती यादवी युद्धाच्या जवळ पोहोचण्याची लक्षणे दिसू लागली. जमीनदारांनी सशस्त्र टोळ्या स्थापन करावयास सुरुवात केल्याने चळवळीलाही हिंसाचाराला तोंड देण्यासाठी सशस्त्र गटाची स्थापना करावी लागली. १९४८ अखेर सशस्त्र स्वयंसेवकांची फौज निर्माण झाली. बिसवेदार आणि त्यांच्या टोळ्यांकडून जेथे आणि जेव्हा मुझारांवर हल्ला होण्याची शक्यता असेल तेथे धावून जाऊन प्रतिकार करण्याची जबाबदारी यांच्यावर होती. या स्वयंसेवकांमुळेच बिसवेदारांच्या कारवायांना पायबंद बसला.

१९५१ मध्ये नवे संपूर्ण काँग्रेसचे सरकार स्थापन झाले. त्यात ब्रिशभान उपमुख्यमंत्री झाल्याने त्यांच्या गटास अधिक महत्त्व प्राप्त झाले आणि परिस्थिती पूर्णपणे बदलली. एक शेतीसुधार चौकशी समिती नेमण्यात आली. त्यांनी शिफारसी करून कायदा समंत करण्यापर्यंतच्या काळासाठी पेप्सू कूळकायदा जानेवारी १९५२ मध्ये अमलात आणण्यात आला. त्यात कुळांना हकालपट्टीपासून संरक्षण दिले गेले. पण मध्यंतरीच्या काळात सार्वत्रिक निवडणुका आल्या आणि काँग्रेस पक्षाला स्वतःच्या बळावर पेप्सूमध्ये बहुमत मिळविण्यात अपयश आले आणि रारेवाला यांचे मंत्रिमंडळ सत्तेवर आले.

रारेलालांचे मंत्रिमंडळही शेतीविषयक कायदा संमत करण्याआधीच कोसळले आणि राष्ट्रपती राजवट आली. राष्ट्रपतींनी १९५३ मध्ये पेप्सू कूळ कायदा अमलात आणला. या कायद्यानुसार ज्या कुळांचा जमिनीवर ताबा होता अशा कुळांना नुकसान भरपाई देऊन जमीन मालक बनण्याचा हक्क देण्यात आला.

### नक्षलवादी चळवळी

नक्षलबारी हे गाव उत्तर बंगालमधील दार्जिलिंग जिल्ह्यात आहे. १९५० च्या दशकाच्या सुरुवातीपासूनच कम्युनिस्टांनी तेथील बटाईवर आणि चहा मळ्यांवरचे कामगार यांच्या संघटना बांधणीचे काम सुरू केले होते. संथाळ, ओरॉन, राजवेशी यांसारख्या आदिवासी जमातींचे हे लोक होते. तेथील जोबेदार किंवा जमीनमालकांकडे हे वाटेकरी 'अधिसार'

पद्धतीने काम करीत. या पद्धतीत जमीनमालक त्यांना नांगर, बैल आणि बियाणे पुरवीत आणि पीक उत्पादनात वाटा घेत. या वाट्यावरून सतत तंटे होत असत. बंगालमध्ये संयुक्त आघाडीचे सरकार आल्यावर आता वाटेकऱ्यांच्या मालकीची जमीन होणार अशी सार्वत्रिक भीती निर्माण झाली आणि तंटेबखेडे वाढतच गेले. त्या भागातील चारू मुजूमदार हा एक मोठा नेता होता. कायदेशीर मार्गाने जमीनसुधारणा शक्य असते, यावर त्याचा विश्वास नव्हता. आपले राजकीय इप्सित साध्य करण्यासाठी हिंसात्मक मार्गांनीच जमीन ताब्यात घेतली पाहिजे आणि टिकविली पाहिजे, याकरिता त्याने कानू सन्थाळ व जंगल सन्थाळ यांच्या सहाय्याने एक शेतकरी परिषद भरविली. जमीन मालकांची जमिनीवरील मक्तेदारी रद्द करा, शेतकरी समित्यांमार्फत जमिनीचे वाटप करा आणि जमीनदार, केंद्र सरकार आणि संयुक्त आघाडीचे सरकार यांविरुद्ध सशस्त्र संघर्ष करा असा आदेश या परिषदेत देण्यात आला. खेड्यात स्थापन केलेल्या शेतकरी समित्या या सशस्त्र सक्षकांचे केंद्र बनल्या. त्यांनी जमिनी बळकावल्या. जमिनीची कागदपत्रे जाळली आणि एक समांतर सरकार स्थापन केले.

सरकारने प्रथमतः नक्षलवाद्यांचे मतपरिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात अपयश आल्याने दडपशाही करावी लागली. जुलै १९६७ अखेर जंगल संथाळसारखे अनेक नेते तुरुंगात डांबले गेले.

**श्रीकाकुलम, आंध्रप्रदेश**

ओरिसाच्या सीमेवरील आंध्रप्रदेशचा सर्वात उत्तरेकडचा श्रीकाकुलम हा जिल्हा सर्वाधिक मागासलेला होता. 'जहायू' आणि सावारा' जमातींच्या या स्थानिक आदिवासी जमातींना पार्वतीपूरम्, पालकोंडा, पटापटनम् आणि कोत्तूर भागातील कम्युनिस्टांनी संघटित केले होते. हे काम १९५० च्या दशकाच्या सुरुवातीपासूनच चालू होते. १९५७ ते १९६७ या काळात गिरिजन संघ आणि महिला संघ यांच्यामार्फत सावकार व जमीनदारांनी बेकायदेशीररीत्या गिळंकृत केलेल्या आदिवासींच्या जमिनी परत मिळविणे, कर्जे कमी करणे, घरांसाठी व दैनंदिन वापरासाठी जंगलांचा मुक्त वापर, वेतनवाढ, जंगल उत्पादनाला चांगली किंमत इत्यादी बरेच फायदे त्यांनी मिळवून दिले होते.

नोव्हेंबर १९६७ मध्ये या चळवळीस सुरुवात झाली आणि नोव्हेंबर १९६८ आणि फेब्रुवारी १९६९ दरम्यान तीव्र सामुदायिक संघर्षाचा अत्युच्च बिंदू तिने गाठला, यामुळे साहजिकच पोलिसांची दडपशाही वाढली. जून १९७० मध्ये पोलिसांनी एक व्यापक मोहिम सुरू केली. त्यात १४०० जणांना पकडण्यात आले. १० जुलै १९७० रोजी व्ही. सत्यनारायण आणि आदिभूतला कैलासम हे ज्येष्ठ नेते मारले गेले. इथे चळवळीचा शेवट झाला.

**शेतकऱ्यांच्या 'नव' चळवळी**

१९८० मध्ये महाराष्ट्रातील नाशिक येथे शेतकरी संघटनेच्या शरद जोशींनी सुरू केलेल्या रेल-रास्ता-रोको आंदोलनाने पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या चळवळींनी जोर धरला. १० नोव्हेंबर रोजी दोन लाख शेतकऱ्यांनी मुंबई-कोलकाता आणि मुंबई-दिल्ली मार्गांवरची वाहतूक अडवली. ऊस आणि कांद्याला वाढीव भाव द्या, ही त्यांची मागणी होती. शरद जोशींनी आपले चळवळी तत्त्वज्ञान इंडिया विरुद्ध भारत किंवा ग्रामीण शेतीप्रधान भारत विरुद्ध

शहरी औद्योगिक इंडिया अशा स्वरूपात मांडले.

तामिळनाडूमधील विवासायिमल संगम, कर्नाटकातील राज्य रयतू संघ, उत्तर प्रदेश व पंजाबमधील भारतीय किसान युनियन, गुजरातमधील खेडूत समाज आणि किसानसंघ आणि महाराष्ट्रातील शेतकरी संघटना यांच्या नेतृत्वाखाली निरनिराळ्या वेळी विविध मागण्यांसाठी हजारो-लाखो शेतकरी एकत्र आले. त्यांनी रेल्वे-वाहतूक अडवली; शहरांना होणारा आवश्यक वस्तूंचा पुरवठा बंद केला; स्थानिक व प्रादेशिक सरकारी कचेऱ्यापुढे धरणे धरली. अधिकाऱ्यांना घेरावा घातला, गावात प्रवेश करण्यास विशेषतः निवडणुकांच्या वेळी राजकीय नेते व अधिकाऱ्यांना प्रतिबंध केला. वाढीव दराने वीजबील देण्याचे नाकारले, कर्जफेडीचे हप्ते फेडणे बंद केले, पाणीपट्टी भरणे बंद केली, कर्जफेडीसाठी जाती-कारवाईत अडथळे आणले आणि जप्त केलेली जमीन व मालमत्ता परत हिसकावून घेतली.

विशेषतः १९८० च्या दशकात शेतमालाला चांगली किंमती मिळावी; पाटाचे पाणी, वीजबीले, व्याजदर, कर्जफेड इत्यादींबाबत शेतकऱ्यांनी भर दिला.

या चळवळीचा 'नवेपणा' आणखी एका मुद्याने दाखविला जातो. यापूर्वीच्या चळवळी पक्षीय संघटना सुरू करत असत. पण आता या चळवळी कुठल्याही राजकीय पक्षांशी जोडलेल्या नाहीत; पण हे अंशतः खरे आहे. यांपैकी कुठल्याही संघटना कोणत्याही राजकीय पक्षांनी सुरू केल्या नव्हत्या; पण कालांतराने त्या अपरिहार्यपणे राजकारणाशी जोडल्या गेल्या. तामिळनाडूतील संघटना ही प्रथमच उघडपणे राजकीय पक्ष बनली, कर्नाटक रयत संघाने निवडणुकीत आपले उमेदवार उभे केले. १९८४ च्या लोकसभा निवडणुकीत शेतकरी संघटनेने महाराष्ट्रात ४८ उमेदवार उभे केले होते. गुजरात किसान संघाचे भाजपाशी असलेले संबंध तर सर्वज्ञात आहेत.

या चळवळीने ग्रामीण भागाकडे होत असलेले दुर्लक्ष आणि ग्रामीण भागातील मागासलेपण यांच्याकडे सर्वांचे लक्ष वेधून किसानांच्या हक्कांची तार छेडली; परंतु या प्रश्नांची तड लावण्यावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी शेतकरी व ग्रामीण लोक यांना शहरी लोकांविरुद्ध उभे करून या चळवळीने भावाभावांत संघर्ष पेटविण्यासाठी शक्ती खर्च केली.

नव्या अर्थव्यवस्थेत शेतकरी अधिकच भरडला जाऊन २१ व्या शतकाच्या पहिल्या दशकात शेतीक्षेत्रातील व शेतकऱ्यांवरील अरिष्ट अधिकच गंभीर झाले आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रचंड संख्येने आत्महत्त्या होत असतानाच ऊस उत्पादकांमध्येही ते लोण शिरले आहे. पण शेतकरी इतका अडचणीत असताना आज आपल्या विचारप्रणालीच्या आधारे शेतकरी संघटना पूर्वीप्रमाणे नेतृत्व देऊ शकत नाही किंवा आंदोलनही उभे करू शकत नाही.

आज जागतिकीकरणाच्या टप्प्यातील भांडवलशाहीला लोकशाही प्रक्रियाच अडचणीची वाटत आहे. जागतिकीकरणाच्या 'विकास प्रक्रियामुळे' विस्थापित होणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाणही वाढते आहे. अशा घटनाक्रमांविरुद्ध शेतकऱ्यांच्या चळवळी उभ्या राहत असताना त्या दडपून टाकून 'विकासासाठी' काही जणांना किंमत द्यावीच लागणार असा युक्तिवाद केला जात आहे. भांडवलदार वर्गाला लोकशाहीचा अर्थच बदलायचा असून लोकांच्या चळवळी म्हणजे लोकशाही व्यवस्थेतील एक उपद्रव अशाप्रकारे त्यांची बोळवण प्रसार

माध्यमांमध्येही केली जात आहे. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांच्या चळवळीला कुंठितावस्था आली असेल तर त्यात नवल ते काय!

### ७.२.३. कामगारांच्या चळवळी

मालक आणि कामगार यांच्या हितसंबंधात फरक असतो. साधनांची मालकी मालकांकडे असते. मालक जास्तीत जास्त नफा मिळविण्याचा प्रयत्न करतात व कामगाराला कमीत कमी वेतन देऊन त्याची पिळवणूक करतात. त्याचा प्रतिकार एकटा कामगार करू शकत नाही म्हणून आपल्या समान हितसंबंधांच्या संरक्षाणासाठी कामगार एकत्रित होऊन संघटन तयार करतात व त्याच्या द्वारा सामूहिक कृती करतात, त्यातून कामगारांच्या चळवळी निर्माण होतात.

औद्योगिक क्रांतीमुळे कामगारांचा एक मोठा वर्ग निर्माण झाला. या वर्गाला आपल्या हिताचे रक्षण करण्यासाठी संघटित होण्याची गरज भासल्याने कामगार संघटनांची स्थापना होण्यास सुरुवात झाली. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात कामगार संघटना स्थापन झाल्या व त्यांची वाढ झाली असली तरी स्वातंत्र्योत्तर काळातच कामगार संघटनांची प्रगती वेगाने झाली.

मुंबईतील प्रसिद्ध व्यापारी कावसजी नानाभाई दावर यांनी ५० व्यापारी एकत्र करून त्यांच्या साहाय्याने ५ लाख रुपये भांडवलाची संयुक्त स्टॉक कंपनी काढली आणि ११ जुलै १८५१ रोजी पहिल्या कापड गिरणीचा प्रारंभ झाला. यापाठोपाठ १८५४ साली माणिकजी पेटीट यांनी दुसरी गिरणी काढली. इ. स. १८६० पर्यंत मंगळदास नुभाई, दिनशॉ पेटीट, बोमनजी वाडिया, केशवजी नाईक यांनीही गिरण्या सुरू केल्या. १८७२-७३ मध्ये मुंबई इलाख्यात आरंभी गिरणी असे म्हणण्याऐवजी सूत कातण्याचा व विलायती कापड विणण्याचा कारखाना म्हणत. कापड गिरण्यांची मालकी इंग्रज, पारशी, भाटिया, खोजा वगैरे बिगर मराठी भाषकांच्या हाती होती. मात्र गिरण्यातील बहुतेक सारे कामगार मराठी भाषक होते. गिरण्या सुरू झाल्यामुळे लोकांना रोजगार उपलब्ध झाला. परंतु कामाच्या ठिकाणी कामगारांचे अनेक प्रकारे साऱ्या जगामध्ये कामगार चळवळी फोफावल्या. त्यास भारतही अपवाद नव्हता. म्हणून भारतीय कामगार चळवळीचा इतिहास काय आहे ते पाहू.

### पहिली कामगार संघटना

इ. स. १८९० मध्ये नारायण मेघाजी लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली 'मुंबई गिरणी कामगार संघटना' (Bombay Mill Hands Association) स्थापन झाली. त्यांनी कधी संप तर कधी विनंती अर्ज करून कामगारांना सुविधा मिळवून दिल्या.

देश स्वतंत्र झाल्यावर १९४७ मध्ये सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस' (Indian National Trade Union Congress - इंटक) ची स्थापना झाली. समाजवाद्यांनी काँग्रेसप्रणीत इंटक कामगार संघटनेला शह देण्यासाठी आपल्या विचारांची १९४८ साली 'हिंद मजदूर सभा' स्थापन केली. एन. एन. रॉय यांची 'इंडियन फेडरेशन ऑफ लेबर' या कामगार संघटनेच्या फाळणीमुळे जनाधार कमी होऊन ती कमकुवत झाली. त्यामुळे 'हिंद मजदूर सभे'त तिला विलीन करण्यात आले. अशा

तऱ्हेने राजकीय पक्षाच्या छायाछत्राखाली कामगार संघटना आल्यात.

१४ जानेवारी १९५९ रोजी भरलेल्या समितीच्या नेत्यांच्या बैठकीत मुंबईतील सर्व गिरणी कामगारांची एक युनियन करण्याचा निर्णय घेण्यात आला. नव्या युनियनचे नाव 'मुंबई गिरणी कामगार युनियन' असे ठरविण्यात आले. या कामगार संघटनेचे अध्यक्ष एस. एम. जोशी असतील आणि कॉ. डांगे सरचिटणीस असतील असे जाहीर करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळातही आपल्या मागणीसाठी ज्या विविध चळवळी झाल्यात, त्यात साधारणपणे दोन प्रकार आढळतात. संघटित कामगार आपल्या मान्यताप्राप्त संघटनेद्वारा कायद्यानुसार मालकांना नोटीस देवून आंदोलने करतात आणि यात सामान्यतः लाक्षणिक संप किंवा विशिष्ट काळासाठी संप असतो. असंघटित कामगारा खालीलपैकी एक किंवा जास्त, ज्या सामुदायिक कृती करतात, त्यात संप, सत्याग्रह, उपोषण, बंद, हरताळ, घेराव, निदर्शने, सामुदायिक रजा, वीज बंद, रस्ता रोको, मोर्चा इत्यादी प्रकार अवलंबितात.

विदर्भात नागपूर येथे प्रा. रूपा कुलकर्णी यांनी मोलकरीण संघटना स्थापण्यात नेतृत्व केले. त्या संस्थेतर्फे अधिवेशने मोर्चे इत्यादी काढून शेवटी सरकारला मोलकरणींच्या हितासाठी व इतर घरगुती कामगारांसाठी घरेलू कामगार म्हणून काही मागण्या मान्य कराव्या लागल्या. १९९५ साली पुण्यात हमाल पंचायतची स्थापना झाली. या संघटनेने शासनावर दबाव आणून माथाडी कायदा आणि योजना अंमलात आणल्या.

अशिक्षितपणा, निरक्षरता, उदासिनता, अज्ञान आणि व्यसनाधीनता हे कामगार चळवळीच्या मार्गात येणारे अडथळे आहेत. कामगारांचे स्थलांतर, त्यांच्यातला आपापसातला बेबनाव, बाहेरून येणारे मतलबी नेतृत्व यामुळेही अनेकदा ही चळवळ शिथिल होते. उद्योगांच्या मालकांचे प्रतिकूल धोरण, सरकारची उदासिनता याचाही चळवळीच्या यशस्वीतेशी संबंध असतो. कामगारांचे प्रबोधन, कामगार शिक्षण आणि त्यांची एकजूट व प्रामाणिक आणि प्रभावी नेतृत्व हे घटक त्यांची चळवळ पुढे नेऊ शकते.

आज सर्व जागतिकीकरणाचे वारे वाहू लागलेले आहेत. जगामध्ये १९७० ते १९८० या दशकामध्ये जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय नाणेनिधी यांच्या मार्फत एक नव्या जागतिक अर्थव्यवस्थेचे धोरण अवलंबिले जात आहे. जागतिक बाजारपेठ निर्माण करणे हा उद्देश आहे. त्यासाठी जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरण हे मार्ग सुचविण्यात आलेले आहेत. भारताने १९९० साली या नव्या आर्थिक धोरणांचा स्वीकार केलेला आहे. याचा परिणाम म्हणून सार्वजनिक उद्योगधंद्यांचे खाजगीकरण, वित्तसंस्थेचे खाजगीकरण अथवा त्यातील परकीय कंपन्याचा सहभाग यातून भारतीय आर्थिक धोरणाची दिशा दिसू लागलेली आहे. वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीमुळे नवनवी उत्पादनपद्धती यांचा शोध सुरू झालेला आहे. यांत्रिकीकरणामुळे कामगारांना मिळालेले हक्क हिरावून घेतले जात आहेत. नोकरकपात अनिर्बंध चालण्याची शक्यता आहे. परदेशी कंपन्यांना भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये मुक्तपणे प्रवेश देण्याचे शासनाचे धोरण दिसून येते. परकीय कंपन्या हे नफा कमावण्यासाठी अनेक देशांमध्ये मुक्तपणे संचार करीत आहेत. जितक्या नफ्याचा हव्यास मोठा तेवढ्या प्रमाणात महागाईमध्ये वाढला. परिणामतः सामान्य माणसाचे व कामगारांचे जीवन हलाखीचे होते

जाणार हे आपल्यापुढील भविष्य आहे. तेव्हा कामगार चळवळीने गंभीर विचाराने व प्रयत्नाने कामगार चळवळीची भावी दिशा ठरविणे गरजेचे झाले आहे. जागतिकीकरणाला विकासाचा एक नवा पर्याय शोधून काढणे गरजेचे आहे. हे कामगार चळवळीपुढील आव्हान आहे.

## ७.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) स्वातंत्र्योत्तर भारतातील कामगारांच्या चळवळीचे मूल्यमापन करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

२) स्वातंत्र्योत्तर भारतातील आदिवासींच्या चळवळीचे मूल्मापन करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

३) चिपको आंदोलन म्हणजे काय?

---------------------------------------------------

---------------------------------------------------

४) शेतकऱ्यांच्या नव चळवळींचे वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

---------------------------------------------------

---------------------------------------------------

## ७.४ सारांश

कामगार संघटनांना आपल्या ताकदीचे राजकीय शक्तीत रूपांतर करणे अवघड ठरले. त्यातून ऐंशीच्या दशकात विचारप्रणाली निरपेक्ष कामगार संघटना उदयाला आल्या. औद्योगिक उत्पादनाच्या पद्धती बदलत गेल्या आणि चळवळींना विस्कळीत रूप आले.

आदिवासी चळवळींचा मागोवा घेतल्यास असे लक्षात येते की, त्यांच्यातील जास्तीत जास्त चळवळी या आर्थिक शोषण आणि बाह्य संस्कृतीतील घटकांनी त्यांच्या निवास स्थानांवर म्हणजे जंगलावर केलेले अतिक्रमण, जंगलतोड, पर्यावरणात असंतुलन आणि आदिवासींचे विस्थापन यांच्या विरोधातच झालेले आहेत. आदिवासींच्या राजकीय चळवळी या त्यांच्या विभागीय स्वातंत्र्यासाठी अथवा स्वतंत्र राज्याच्या मागणीसाठी झालेल्या दिसतात. विशेषतः भारताच्या उत्तर-पूर्व भागात त्यांचे प्रमाण बरेच मोठे आढळते.

## ७.५ पारिभाषिक शब्द

१) चिपको आंदोलन : वृक्षतोड थांबविण्यासाठी वृक्षांना मिठी मारणे म्हणजे चिपकणे. वृक्षांना मिठी मारून केलेले आंदोलन

२) मावा नाटे, मावा राज - आमच्या गावात आमचे राज्य

## ७.६ संदर्भसूची


- आधुनिक भारताचा इतिहास - ग्रोव्हर-बेल्हेकर, एस.चांद, दिल्ली (२००७).
- फडके य. दि., जम्म-काश्मीर स्वायत्ता की स्वातंत्र्य?, अक्षर प्रकाशन, मुंबई (२००१).
- वर्तमान भारत - वेदप्रताप वैदिक, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली(२००२).
- आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य-कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७-२०००).
- स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास - सरदेसाई म. हि., गोवा, दमण, दीव, खंड - १, पणजी सरकार (१९८६).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स - बिपिनचंद्र (अनु. पारशी मा. कृ. व इतर), के.सागर, पुणे (२००४).

# घटक ८

## सामाजिक न्याय

**अनुक्रमणिका**


८.0 उद्दिष्टे

८.१ प्रस्तावना

८.२ विषय विवेचन

  ८.२.१. दलित चळवळ

  ८.२.२. स्त्रियांच्या चळवळी

८.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

८.४ सारांश

८.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

८.६ संदर्भग्रंथ सूची


## ८.0 उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१) दलित चळवळीची पार्श्वभूमी समजून घेता येईल.

२) स्वातंत्र्योत्तर काळातील दलित चळवळीचा आढावा घेता येईल.

३) स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या चळवळीचे मूल्यमापन करता येईल.

## ८.१ प्रस्तावना

वसाहतकालीन आणि वसाहतकालानंतरचे दलित चळवळीचे वादाचे मुख्य विषय हे अस्पृश्यतेच्या प्रश्नांची संबंधित आहेत. राजकीय कार्यालये, सरकारी नोकऱ्या आणि कल्याणकारी योजना यामधील आरक्षण टिकविण्यासाठी आणि वाढविण्यासाठी त्यांनी चळवळी उभारल्या.

स्वत:चे अस्तित्व, सरकारी नोकऱ्या आणि राजकीय पदे यामधील आरक्षण या विषयायर दलितांच्या चळवळींमध्ये त्यांच्या मध्यमवर्गीय सामाजिक गरजांचा पगडा प्रामुख्याने दिसून येतो.

कोणत्याही संस्कृतीची महानता अथवा श्रेष्ठपणा त्या संस्कृती मधील स्त्रियांच्या सामाजिक दर्जावरून ठरविला जातो. स्त्रीमुक्ती म्हणजे कुटुंब, धर्म, संस्कृती, शिक्षण, रोजगार या अशा जीवनातील सर्व क्षेत्रात स्त्रीच्या दुय्यम स्थानांविरूद्ध लढा होय. याचाच अभ्यास आपणास प्रस्तुत प्रकरणात करावयाचा आहे.

## ८.२ विषय विवेचन

### ८.२.१. दलित चळवळ

भारतात पूर्वीच्या काळी अस्तित्वात असलेल्या वर्णव्यवस्थेत शुद्रांना सर्वात खालचे स्थान होते. जाती व्यवस्थेत त्यांना अवर्ण म्हटले जात असे. अति शुद्र, नाम शुद्र, अन्तज, अस्पृश्य संबोधण्यात येत असे. महात्मा गांधींनी १९३३ मध्ये अस्पृश्यांसाठी 'हरिजन' हा शब्द वापरला. परंतु अस्पृश्यातील नेत्यांना तो मानहानिकारक वाटला. उलट त्यांनी स्वतःसाठी दलित म्हणजे दडपलेले हा त्यांची समाजातील स्थितीदर्शक शब्द जास्त पसंत केला.

भारतीय लोकसंख्येच्या एकूण १६% इतकी लोकसंख्या अनुसूचित जातींची आहे. २००१ साली त्यांची संख्या १६ कोटी ८० लाख एवढी होती. अनुसूचित जातींमध्ये महार, मांग, भंगी, चांभार आणि इतर अनेक जातींचा समावेश होतो, असे असले तरी दलितांच्या चळवळीमध्ये मुख्य पुढाकार महार या जातीचा आढळतो.

आज ज्यांना 'दलित' किंवा 'अनुसूचित जाती' म्हणण्यात येते त्यांना त्या काळात अस्पृश्य, अंत्यज, पंचम वगैरे नावांनी ओळखण्यात येत असे. दलित चळवळ ही सामाजिक चळवळ आहे आणि सापेक्षवंचितता (ढहश ढहर्शीू ष ठशश्ररींळींश ऊशिाळीींरींळेप) सिद्धांताचा आधार आहे. या सिद्धांताप्रमाणे एकाच समाजातील काही लोकांना त्यांच्या हक्कापासून, स्वातंत्र्यापासून वंचित केले जात असेल तर सामाजिक चळवळीचा उदय होतो अशीच नेमकी परिस्थिती दलितांची झाल्याने दलित चळवळीचा उदय झाला. दलित चळवळीचे तीन टप्पे मानले जातात.

(१) डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ

(२) आंबेडकरकालीन दलित चळवळ

(३) डॉ. आंबेडकरोत्तर दलित चळवळ

#### ८.२.१.१ डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ

महात्मा ज्योतिबा फुले, गोपाळबाबा वलंगकार, शिवराम जानबा कांबळे, राजश्री शाहू छत्रपती, विठ्ठल रामजी शिंदे, मध्यप्रांत–वऱ्हाडातील किसन फागू बंनसोडे, गणेश काकाजी गवई आणि कालीचरण नंदागवळी हे सारे त्यांचे पूर्वसुरी होते. या पूर्वसुरींनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींचे प्रश्न सोडवण्यासाठी परोपरीने प्रयत्न केले आणि दलित चळवळीची पायाभरणी केली.

**महात्मा फुले :–** १८५१ साली अस्पृश्यांच्या मुलांसाठी प्राथमिक शाळा सुरू केली. त्यांच्या या कार्याला दक्षिणा प्राईज मधून मदत केली. १८६८ साली त्यांनी आपल्या घरावजळील खाजगी हौद अस्पृश्यांना पाणी भरण्यास खुला केला. १८७३ साली जोतीरावांनी अस्पृश्यता निवारणाचा जाहीरनामा प्रसिद्ध केला.

**गोपाळबुवा वलंगकर :–** गोपाळबाबा वलंगकर हे दलित चळवळीच्या प्रारंभकाळातील एक प्रमुख नेते होते. वलंगकरांनी १८८८ मध्ये 'विटाळ विध्वंसन' हे पुस्तक लिहिले. त्यात जातिभेद व अस्पृश्यता यासंबंधी अनेक प्रश्न उपस्थित करून त्यांची उत्तरे आर्य म्हणविणाऱ्या हिंदुंनी द्यावीत असे जाहीर आव्हान दिलेले होते. गोपाळबुवा वलंगकरांनी पहिली दलित

संघटना दापोली येथे १८९० साली स्थापून महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारण्याची चळवळ प्रथम सुरू केली. त्यांनी 'अनार्य दोष परिहारक मंडळी' या संघटनेची स्थापना केली. जातीयता आणि अस्पृश्यता नष्ट करून समता निर्माण करण्याचे प्रधान उद्दिष्ट या संघटनेने ठरविले होते. ''अस्पृश्योन्नतीची चळवळ प्रथम सुरू केल्याचा मान जर कोणास द्यावयाचा झाला तर तो अनार्य दोषपरिहारक मंडळास आणि मुंबई प्रांतास द्यावा लागेल.'', असे डॉ. आंबेडकर म्हणत असत. १८९३ मध्ये जेव्हा लष्करात भरती घेण्याची बंदी झाली, त्यावेळी अनार्य दोषपरिहार मंडळी या संस्थेने प. वा. महादेव गोविंद रानडे यांच्या साहाय्याने सरकारकडे एक मोठा अर्ज केला होता, असे डॉ. आंबेडकरांनी ३ एप्रिल १९५७ च्या बहिष्कृत भारतात लिहिले आहे. वलंगकरांनी १८९५ च्या सामाजिक परिषदेमध्ये भावना हालवून सोडणारे एक भाषण केले होते. ''सवर्ण हिंदूंनी शाळा, उतारू बंगले, पाणवठे, सरकारी नोकऱ्या आणि व्यापार यात आपल्या अस्पृश्य बांधवांना हिंदूधर्मियांप्रमाणे प्रवेश द्यावा.'' असे त्यांनी आपल्या प्रभावी भाषणात आवाहन केले.

**शिवराम जानबा कांबळे :–** वलंगकरांच्या मृत्यूनंतर अस्पृश्यता नष्ट करण्याचा अथक् प्रयत्न केला तो पुण्याच्या शिवराम जानबा कांबळे यांनी १९०३ साली त्यांनी सासवडला एकावन्न गावांतील महारांची सभा भरवून अस्पृश्यांना लष्करात व पोलिसात नोकऱ्या मिळाव्या अशी मागणी केली आणि त्या आशयाचा अर्जही सरकारकडे धाडला. १९०४ साली त्यांनी 'श्रीशंकर प्रासादिक सोमवंशिय हितचिंतक मित्र समाज' स्थापन केला आणि १ जुलै १९०८ रोजी 'सोमवंशीय मित्र' हे वृत्तपत्र सुरू केले. आपल्या लिखाणातून त्यांनी जातीव्यवस्थेवर आणि अनिष्ट प्रथेवर कडाडून हल्ले चढविले. अनेक परिषदा घेऊन लोकजागृती करण्याचा प्रयत्न केला. समाज एकसंघ बनविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांना वि. रा. शिंदे 'अखिल महाराष्ट्रात सुप्रसिद्ध महारांचे पुढारी' असे संबोधतात.

**मध्यप्रांत–वऱ्हाडातील त्रिमूर्ती :–** किसन फागू बनसोडे, गणेश आकाजी गवई आणि कालीचरण नंदागवळी या तिघांनी मध्यप्रांत–वऱ्हाडातील अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींमध्ये जागृती करण्याचे आणि त्यांच्या गाऱ्हाण्यांना वाचा फोडण्याचे कार्य मोठ्या जिद्दीने केले. किसन फागूंनी १९०३ साली 'सन्मार्गबोधक निराश्रित समाज' स्थापन केला. तसेच १९०७ साली नागपूरच्या पाच पावली भागात 'चोखामेळा मुलींची शाळा' सुरू केली. गावोगाव वणवण करीत व्याख्याने देऊन किसन फागूंनी अस्पृश्यांना माणसासारखे वागवले जावे आणि सर्व मानवी हक्क मिळावेत असा पोटतिडिकेने प्रचार केला.

अमरावती जिल्ह्यातील गणेश आकाजी गवई यांच्या अध्यक्षतेखाली मे १९११ मध्ये अस्पृश्योद्धारक अधिवेशन भरविण्यात आले. गोंदियाचे कालीचरण नंदागवळी यांनी १९१३ साली गोंदिया येथे मुलींसाठी शाळा सुरू केली. १९१४ साली त्यांनी 'भारतीय महार पंचायत' नावाची संस्था स्थापन केली. १९१६ मध्ये अस्पृश्यता निवारणार्थ एक परिषद भरविली.

**विठ्ठल रामजी शिंदे :–** महाराष्ट्रात अस्पृश्यता निवारणाचा सामुदायिकरीत्या संघटित व पद्धतशीर असा प्रयत्न करण्याचा पहिला मान वि. रा. शिंद्यांना द्यायला हवा. १८ ऑक्टोबर १९०६ रोजी त्यांनी 'भारतीय निराश्रित साहाय्यकारी मंडळी' (ऊर्शाीर्शीीशव

उश्ररींशी चळींीळेप डेलळशीं ेष खपवळर) स्थापन केली. या संस्थेमार्फत त्यांनी अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, अस्पृश्य जातींच्या मुला-मुलींसाठी वस्तीगृहे चालविणे, अस्पृश्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देणे इत्यादी कामे हाती घेतली. प्राथमिक शाळेतील शिक्षणाप्रमाणेच अस्पृय मुलामुलींना धंदेशिक्षण द्यावे आणि त्यांच्यासाठी मुंबई प्रांतात होत्या तशा स्वतंत्र शाळा न काढता मध्यप्रांत-वऱ्हाडात होत्या तशा संमिश्र शाळा काढाव्यात म्हणजे सवर्ण आणि अस्पृश्य मुले यांच्या परस्परसौहार्द निर्माण होईल असे शिंद्यांचे मत होते.

**राजर्षी शाहू छत्रपती :-** छत्रपती म्हणून शाहू महाराजांनी २ एप्रिल १८९४ रोजी अधिकारसूत्रे हाती घेतली. तेव्हापासूनच अस्पृश्य मानल्या गेलेल्या जातींत जन्मलेल्या मुलांच्या शिक्षणासाठी हरतऱ्हेच्या सोयी करून देण्यास त्यांनी सुरुवात केली होती. २६ जुलै १९०२ रोजी करवीर गॅझेटमध्ये आरक्षणासंबंधीचा क्रांतिकारक जाहिरनामा प्रसिद्ध केला. त्यानुसार सरकारी खात्यातील ५० टक्के जागा मागासवर्गीयांमधील सुशिक्षित तरुणांकरिता राखीव करण्यात आल्या. १९११ मध्ये त्यांनी अस्पृश्य मुलामुलींना मोफत शिक्षण मिळावे अशी सोय केली. १९१७ नंतरच्या काळात पोलीस, तलाठी, कारकून वगैरेंच्या जागा भरताना त्यांनी अस्पृश्यांना त्या जागा मिळाव्यात म्हणून खास प्रयत्न केलेच; शिवाय अस्पृश्य तरुणांना वकील, डॉक्टर होता यावे यासाठी आवश्यक ती व्यवस्था केली. ८ ऑक्टोबर १९१९ च्या आदेशान्वये कोल्हापूर संस्थानातील सर्व शाळा, महाविद्यालये, न्यायालीय, सरकारी कार्यालये, धर्मशाळा, अन्नछत्रे, पाणवठे, विहीरी वगैरे अस्पृश्यांसाठी खुले करण्यात आले. २३ व २४ मार्च १९१८ रोजी सयाजीराव गायकवाडांच्या अध्यक्षतेखाली शिंद्यांनी मुंबईत 'अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद' आयोजित केली. १८ सप्टेंबर १९१८ रोजी आपल्या राज्यातील महारवतने रद्द करून त्या वतनी जमिनी महारांच्या नावावरीने भरून दिल्या.

### ८.२.१.२ डॉ. आंबेडकरकालीन दलित चळवळ :-

महात्मा फुलेंनी धार्मिक आणि सामाजिक समस्येच्या मुळाशी हात घातला आणि व्यवस्थेला हलवून सोडले. डॉ. आंबेडकर त्यापुढील सुधारित आवृत्ती मानली जाते की, जी घटनात्मक रूपाने समोर आली.

**माणगावची परिषद :-** २० मार्च १९२० रोजी कमल जहागिरीतल्या माणगावला तेथील गावकामगार-पाटील आप्पासाहेब दादगोंडा पाटील यांच्या सहकार्याने अस्पृश्यांची एक परिषद डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली. या परिषदेत मान्य झालेले ठराव दलितांच्या चळवळीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे होते. ते ठराव पुढीलप्रमाणे - प्रत्येक व्यक्तीच्या उन्नतीला अनुकूल अशा सामाजिक परिस्थितीची अत्यंत जरूरी आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात यावे. बहिष्कृत वर्गातील विद्यार्थ्यांना ब्रिटिश हद्दीत शिष्यवृत्त्या मिळाव्यात. भावी कायदे कौन्सिलांत बहिष्कृतांचे प्रतिनिधी त्यांच्या लोकसंख्येच्या व गरजेच्या प्रमाणात त्यांच्या स्वतंत्र मतदार संघातून निवडून घेण्यात यावेत इत्यादी.

**बहिष्कृत हितकारिणी सभा :-** २० जुलै १९२४ रोजी त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी

सभे'ची स्थापना केली. इतर जातींच्या व धर्मांच्या उदारमतवादी गृहस्थांना आपल्या कार्यात सामील करून घेतले. सभेचे अध्यक्ष म्हणून सर चिमनलाल सेटलवाड यांची निवड करण्यात आली तर सभेचे कार्याध्यक्ष स्वतः डॉ. आंबेडकर तर सेक्रेटरी शिवथरकर हे होते. तिच्या उद्दिष्टांमध्ये अस्पृश्यांसाठी वसतीगृहे काढून शिक्षण प्रसार करणे, ग्रंथालये, समाजकेंद्र आणि अभ्यासमंडळे स्थापन करून अस्पृश्यांमधील सांस्कृतिक उत्थानाला चालना देणे, तसेच औद्योगिक आणि कृषीशाळा काढणे, अस्पृश्यांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करणे यांचा समावेश होता.

**महाडच्या पाण्याचा सत्याग्रह :–** १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड अधिवेशन भरले. आपल्या भाषणात बाबासाहेब म्हणाले, ''चवदार तळे सार्वजनिक असून अस्पृश्यांना मोकळे असल्याचा महाड म्युनिसिपालिटीचा ठराव आहे. तेव्हा आपण स्पृश्यास्पृश्य बंधू मिरवणुकीने तळ्यावर जाऊ व आपली तृष्णा शांत करू.'' बाबासाहेबांनी अस्पृश्यांचा पाणी भरण्याचा हक्क बजावण्यासाठी महाडच्या चवदार तळ्याचे ओंजळभर पाणी प्राशन केले.

**मनुस्मृतीचे दहन :–** ग्रंथावर अफाट प्रेम करणाऱ्या डॉ. आंबेडकरांनी २५ डिसेंबर १९२७ मध्ये प्रतीकात्मक मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. मनुस्मृती दहन हा अस्पृश्यांवर लादण्यात आलेल्या गुलामगिरीचे आणि त्या गुलामगिरीचे समर्थन करू पाहणाऱ्या प्रवृत्तींचा केलेला निषेध होता.

**मंदिर प्रवेशाकरिता सत्याग्रह :–** महाराष्ट्रात दलितांनी मंदिर प्रवेशासाठी काही चळवळी केल्यात. त्यामध्ये १९२५ साली अमरावती येथे मंदिर प्रवेशाची चळवळ झाली. हिचे नेतृत्व माधवराव गोविंदराव मेश्राम यांनी केले. महाराष्ट्रात काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी प्रश्न बराच गाजला. १९३० साली नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश मिळविण्यासाठी हजारोंच्या संख्येने लोक सत्याग्रहात सामील झाले. तथापि पुजाऱ्याने मंदिराचे दरवाजे बंद करून घेतले. १९३४ पर्यंत हा सत्याग्रह लांबला होता. नाशिक सत्याग्रहाने अस्पृश्यांना मंदिर प्रवेशाच्या प्रश्नाला महत्त्व प्राप्त करून दिले. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी कोकणात रत्नागिरी येथे अस्पृश्यांसाठी वेगळे मंदिर उभारले व सवर्ण हिंदूही या देवळात यावेत असा प्रयत्न केला.

**पुणे करार :–** लंडन येथे पहिली गोलमेल परिषद १९३० साली भरली होती. त्यात अस्पृश्यांचे पुढारी म्हणून बाबासाहेबांनाही निमंत्रण होते. त्यात डॉ. आंबेडकरांनी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली. १९३२ मध्ये रॅम्से मॅक्डोनाल्डचा 'जातीय निवाडा' जाहीर झाला आणि बाबासाहेबांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी मंजूर झाली. गांधीजी यावेळी येरवडा तुरुंगात होते. 'अस्पृश्यांना हिंदूंपासून फोडण्याचा इंग्रजांचा डाव आहे' असे मत देऊन तुरुंगात त्यांनी प्राणांतिक उपोषणाला सुरुवात केली. अखेर श्रेष्ठ नेत्यांनी एकत्र बसून तोडगा काढला. २४–२५ सप्टेंबर १९३२ साली 'गांधी–आंबेडकर करार' होऊन स्वतंत्र मतदार संघांची मागणी डॉ. आंबेडकरांनी मागे घेतली.

१९३२ मध्ये महात्मा गांधींनी 'ऑल इंडिया ॲन्टी–अनटचेबिलीटी लीग' ही संस्था स्थापन केली. पुढे तिचेच नाव 'सर्व्हंट्स ऑफ अनटचेबल सोसायटी' असे करण्यात आले.

**हरिजन सेवक संघ :–** ३० सप्टेंबरला मुंबईत भरलेल्या हिंदूंच्या जाहीर सभेत घनश्यामदास बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्यता निवारण संघ स्थापन करण्याचे ठरले होते. लवकरच त्याचे हरिजन सेवक संघ असे नामांतर करण्यात आले. त्याचे सरचिटणीस अमृतलाल ठक्कर उर्फ ठक्करबापा हे होते.

**राजकीय चळवळ :–** कोणतीही सामाजिक चळवळ राजकीय आश्रयाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. म्हणून समाजाच्या विकासाची गुरुकिल्ली राजकीय सत्ता आहे. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित समाजाला 'राज्यकर्ती जमात' होण्याचा संदेश देतात. राजकीय सत्तेत जाण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी तीन संघटना निर्माण केल्या. **१) स्वतंत्र मजूर पक्ष** : दलितांच्या हक्काचा लढा राजकीय पातळीवरून लढविण्यासाठी १९३७ मध्ये स्वतंत्र मजूर पक्ष स्थापन केला. **२) शेड्युल्ड कास्ट फेडरेशन** : दीनदलितांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी जुलै १९४२ मध्ये नागपूर अधिवेशनात ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनची स्थापना केली. १९४२ ते १९५२ पर्यंत पक्षाचे अध्यक्ष म्हणून एन. शिवराज यांनी काम पाहिले. **३) रिपब्लिकन पक्ष** : शेड्युल्ड कास्ट फेडरेशनचे रूपांतर रिपब्लिकन पक्षात करण्याचा विचार बाबासाहेब करीत होते; परंतु दुर्दैवाने तत्पूर्वीच त्यांचे निर्वाण झाले. मात्र त्यांचे अपूर्ण स्वप्न त्यांच्या अनुयायांनी पूर्ण केले. १९५७ साली रिपब्लिकन पक्षाची स्थापना झाली. रिपब्लिकन पक्षाच्या रूपाने महाराष्ट्रात दलितांची फार मोठी शक्ती उभी राहिली.

बाबासाहेबांच्या कार्यकाळात दलित चळवळीला जोम आला. देशपातळीवरचे नेतृत्व डॉ. आंबेडकरांच्या रूपात दलित जनतेला मिळाले. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या हजारो अनुयायांसह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूर येथे बौद्ध धर्माची दीक्षा घेतली. यामुळे दलित चळवळीला एकप्रकारे नवा जोम आला.

### ८.२.१.३ आंबेडकरोत्तर दलित चळवळ :–

डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर ३ ऑक्टोबर १९५७ रोजी शेड्युल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या नव्या पक्षाची स्थापना करण्यात आली. ९ जुलै १९७२ रोजी 'दलित पँथर'ची निर्मिती झाली. महाराष्ट्रातील दलितांनी दलित पँथर चळवळ सुरू केली. सुरुवातीला महाराष्ट्रात शहरी भागात ही चळवळ पसरली, पण नंतर ही चळवळ गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, उत्तरप्रदेश आणि इतर राज्यांमध्ये पसरली. दलित पँथर, जाहीरनाम्यात त्यांचा कार्यक्रमही आढळतो. दलित किसानांच्या जमिनीच्या प्रश्नांना हात घातलाच पाहिजे; खेड्यातील संरजामशाही पद्धतीचे अवशेष दलितांची छळवणूक करून अत्याचार करतात. या सर्व गोष्टींचा अंत व्हायलाच हवा; वेशीबाहेरच्या वस्त्या गावात आणल्या पाहिजेत; सर्व उत्पादनाची साधने दलितांच्या मालकीची झाली पाहिजेत; सर्व दलितांना रोजगार हमी मिळाली पाहिजे; सर्व दलितांना मोफत शिक्षण मिळाले पाहिजे; दलित पँथरच्या या कार्यक्रमाचा फार वेगाने राज्यभर प्रसार झाला.

नवबौद्ध झालेल्यांचे प्रमाण महारांमध्येच जास्त होते आणि हाच समाज जास्त शिक्षित आणि संघटीत आहे आणि दलित संघर्षामध्ये आघाडीवर असतो. विशेषतः धर्मांतरामुळे नवबौद्ध समाजाची अधिक जागृती झाली आहे. शासकीय आणि राजकीय सोयी सवलतीसुद्धा

या समाजाकडेच जास्त प्रमाणात गेल्यामुळे तो सर्वच क्षेत्रात आघाडीवर आहे. अस्पृश्यांपैकी ज्यांनी धर्मांतर केले नाही, तो नवबौद्ध समाजपासून दूर जातो आहे आणि त्यानेच नवबौद्धांचे नेतृत्व स्वीकारले नाही. याउलट महारेत्तर अस्पृश्य जाती स्वतःच्या संघटना बांधित आहे. मांतग समाजाने अण्णाभाऊ साठे यांना दैवत मानून संघटना स्थापन केल्या. ढोर समाजाने संत रोहिदास यांचे नावे संघटना स्थापन केली. चर्मकार व ढोर समाजाने जगजीवनराम, सुशीलकुमार शिंदे आणि कांशीराम यांचे नेतृत्व मान्य केले आहे. तर मातंग समाजात संदीपन थोरात, लक्ष्मणराव ढोबळे, विठ्ठल शिंदे आदी नेते मंडळी आहेत तरीही अनेक महारेत्तर कार्यकर्ते फुले-आंबेडकर चळवळीत निष्ठेने राबतांना दिसतात.

दलित चळवळीचा ठसा उमटविणे हा दलित चळवळीचा सर्वात महत्त्वाचा आणि मध्यवर्ती विचार झाला आहे. भारतातील दलितांच्या चळवळीचा सर्वात महत्त्वाचा नेता डॉ. आंबेडकर हेच होते. जेवढे उच्च पातळीवर शक्य होईल तेवढ्या उच्च पातळीवर आणि आधुनिक पद्धतीने आंबेडकरांचे कार्यक्रम अस्पृश्यांना ऐक्य शिकविण्यासाठी हेतुबद्ध होते. शिक्षणावर आधारलेल्या आधुनिक पद्धती आणि कायदेशीर हक्कांची अंमलबजावणी करून अस्पृश्यांना माणुसकीहीन परिस्थिती आणि गुलामगिरीतून बाहेर काढण्यासाठी आंबेडकरांनी आपल्या कार्यक्रमांची आखणी केली. संघटनेच्या परिणामकारक प्रगतीसाठी आणि सामुदायिक कृतीसाठी आवश्यक असलेली ऐक्यभावना निर्माण करण्यासाठी आंबेडकरांनी फार प्रयत्न केले.

ज्या जातींनी आपली आर्थिक परिस्थिती सुधारली त्याच जातींकडे त्यांच्या राजकीय चळवळींचे नेतृत्व गेले. महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि उत्तर प्रदेश या राज्यांमधील सध्याचे मुख्य सूत्रधार हे शहरी, सुशिक्षित मध्यम वर्गातून येतात. वेगवेगळ्या चळवळींमध्ये जातींचे वर्चस्व राहिलेले आहे. महाराष्ट्रातील महार, उत्तर प्रदेशातील चामर किंवा जातव, गुजरातेतील वॉकर, आंध्रप्रदेशातील माला इत्यादी आपापल्या भागांमध्ये जास्त क्रियाशील राहिलेले आहेत. महाराष्ट्रातील महार हे दलितांमधील सर्वात जास्त क्रियाशील राहिले आहेत.

### ८.२.२. स्त्रियांच्या चळवळी (Womens Movement)

महात्मा फुलेंनीच सर्वप्रथम समाजाच्या सर्वांगाने स्त्री-पुरुष समता आणण्यासाठीचा विचार व कृती केली. स्त्री शिक्षणाचा पाया घालणे, अस्पृश्यांच्या मुलींसाठी शाळा काढणे, विधवांसाठी आपल्या घरात प्रसूतीगृह काढणे, केशवपनाच्या विरोधात भूमिका घेणे या क्रांतिबा फुलेंच्या कृती स्त्री-पुरुष समताधिष्ठित समाजनिर्मितीकडे वाटचाल करणाऱ्या आणि आपल्या सर्वांना अंतर्मुख होऊन विचार क्रांतीप्रवण करणाऱ्या अशा आहेत.

एकोणिसाव्या शतकातील न्यायासाठी झगडणारी स्त्री १९२० च्या दशकात स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या पुरुषांना कळकळीचा पाठिंबा देणारी बनली आणि तीस व चाळीसच्या दशकात ही स्त्री त्याची साथीदार बनली. प्रथम गांधीवादी, नंतर समाजवादी, साम्यवादी आणि क्रांतिकारी दहशतवादी अशा राष्ट्रीय चळवळीच्या सर्व प्रवाहांत स्त्रियांनी भाग घेतला आहे. शेतकरी आंदोलनात आणि कामगार संघटनांच्या संघर्षातही त्या होत्या.

स्वातंत्र्यानंतर राष्ट्रीय चळवळीतील भिन्न राजकीय शक्ती आपापल्या मार्गाने गेल्यावर

स्त्रियांच्या चळवळीतही विविधता आली. पुष्कळ महिला पुढाऱ्यांनी शासनाने सुरू केलेल्या आणि अन्य संस्थांच्या महिला कल्याण कार्यक्रमात स्वतःला गुंतवून घेतले. या उद्योगात फाळणी बरोबर झालेले दंगे आणि स्थलांतरामुळे हरवलेल्या किंवा टाकून दिलेल्या स्त्रियांना शोध आणि त्यांचे पुनर्वसन काम करणाऱ्या स्त्रियांसाठी शहरात वसतिगृहे आणि व्यवसाय केंद्रे उभारणे यांचा समावेश होता. १९५४ मध्ये साम्यवादी महिलांनी अखिल भारतीय राष्ट्रीय संघ स्थापन केला. परंतु तो संघ स्त्रियांसाठी एक विशाल संयुक्त व्यासपीठ न बनता केवळ पक्षाचे व्यासपीठ बनला.

१९७३-७५ च्या काळात महाराष्ट्राच्या शहरी भागातील कम्युनिष्ट आणि समाजवादी स्त्री-कार्यकर्त्यांनी संघटित केलेल्या भावविरोधी आंदोलनांतर्गत सार्वजनिक मेळाव्यात हजारो महिलांनी भाग घेतला आणि ज्यांना घराबाहेर पडता आले नाही त्यांनी लाटणी हातात घेऊन थाळ्या वाजविल्या. हे आंदोलन गुजरातमध्ये पसरले आणि जयप्रकाश नारायण यांच्या 'संपूर्ण क्रांती'ने प्रभावित केलेल्या नवनिर्माण आंदोलनात गुरफटले.

गुजरातमध्ये कापड कामगार संघटना या गांधीवादी संघटनेच्या महिला आघाडीची स्थापना झाली. तिचे नाव सेवा (डशश्रष एाश्रिशिव थोशपी ओंीलळरींळेप - डएथअ) असे होते. सेवाने किरकोळ विक्रेत्या व फेरीवाल्या या असंघटित क्षेत्रातील महिलांना संघटित करून त्यांची एक संघटना निर्माण केली आणि त्यांना सामूहिक सौदेबाजी बरोबर प्रशिक्षण, पतपैसा आणि तांत्रिक मदत देण्यासाठी व्यवस्था केली.

१९७२ मध्ये महाराष्ट्राच्या धुळे जिल्ह्यातील शहादा या आदिवासी भागात एक वेगळ्या प्रकारचे आंदोलन सुरू झाले. प्रारंभी गांधीवादी सर्वोदयी कार्यकर्त्यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले आणि नंतर माओवादी चळवळीच्या नेतृत्वाखाली चालविले गलेले हे आंदोलन दुष्काळात मदत मिळविण्यासाठी सुरू झाले होते आणि त्यात आदिवासी भिल्ल स्त्रियांचा महत्त्वाचा सहभाग होता. त्याचे पर्यावसन दारुविरुद्धच्या झुंजार मोहिमेत झाले. दारू हेच बायकोला मारझोड करण्यामागचे प्रमुख कारण असल्यामुळे स्त्रियांनी दारूच्या गुत्यांमधील दारूची भांडी फोडली आणि पत्नीला मारझोड करणाऱ्या पुरुषांना सार्वजनिक शिक्षा करण्यासाठी मोर्चे काढले.

अशाचप्रकारे नव्वदच्या दशकात आंध्रप्रदेशात ग्रामीण महिलांनी चालविलेल्या दारूविरोधी चळवळीची अशी एक मोठी लाट आली की शासनाला प्रथम दारूबंदीचे धोरण जाहीर करावे लागून नंतर दारूच्या विक्रीवर निर्बंध घालावे लागले.

१९७४ पासून उत्तराखंडातील स्त्रिया 'चिपको' आंदोलनात पुन्हा सक्रिय झाल्या. इमारती लाकडाच्या ठेकेदारांना झाडे तोडण्यास प्रतिबंध करण्यासाठी झाडांना चिटकून राहण्याच्या स्त्रियांच्या कृतीमुळे 'चिपको' हे नाव या आंदोलनाला मिळाले. पर्यावरणाचे रक्षण करणारे पहिले मोठे आंदोलन म्हणून ते प्रसिद्ध पावले आणि स्त्रियांना निसर्गाच्या रक्षणात एक विशेश भूमिका पार पाडायची आहे. हे ही या आंदोलनाने लक्षात आणून दिले.

मध्यप्रदेशातील छत्तीसगढमध्ये भिलाई पोलाद कारखान्याच्या यांत्रिकीकरणाच्या धोरणाचा निर्षध करण्यासाठी तेथील आदिवासी पट्ट्यात १९७७ मध्ये स्थापन झालेल्या 'छत्तीसगढ

खाणी–श्रमिक–महिला संघा’च्या महिला कार्यकर्त्या खूपच लढाऊ वृत्तीच्या होत्या. भिलाई पोलाद कारखान्याच्या यांत्रिकीकरणाचे हे धोरण महिलांना मिळणाऱ्या रोजगारांच्या दृष्टीने हानिकारक असल्याने ‘महिला–मुक्ती–मोर्चा’ हे एक नवीन व्यासपीठ निर्माण झाले.

१९८४ मध्ये भोपाळच्या ‘युनियन कार्बाइड’ या कारखान्यातील विषारी वायूच्या गळतीचे बळी झालेल्यांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याच्या कामी ‘भोपाळ गॅस पीडित महिला उद्योग संघटना’ या संस्थेने महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. १९८० पासून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या शेतकरी संघटनेची महिला आघाडी म्हणून ऐंशीच्या दशकात ‘समग्र महिला आघाडी’चा उदय झाला.

जनता पक्षातील बहुतांश समाजवादी महिलांनी ‘महिला दक्षता समिती’ स्थापन केली आणि ज्यात दिल्लीस्थित स्त्री संघर्ष ही संघटना पुष्कळच सक्रिय होती असा हुंडाविरोधी मोहिमेस सुरुवात केली. हुंड्यासाठी छळ आणि हुंडाबळींची प्रकरणे, रस्त्यावरील मेळावे, पथनाट्ये, हुंडाबळींच्या घराबाहेर निदर्शने आणि कायदेशीर सुधारणांच्या मागण्या यामार्गांनी मोठ्या प्रमाणावर हाताळण्यात आली. मार्क्सवादी पक्षाच्या महिलांची आघाडी असलेली ‘जनवादी महिला समिती’ आणि १९८१ मध्ये स्थापन झालेली ‘अखिल भारतीय लोकशाही संघटना’ यांनी या प्रश्नावर दारोदार मोहीम सुरू केली. हुंडाप्रतिबंधक कायद्यात (१९६१) दुरुस्ती करणारे विधेयक संसदेच्या संयुक्त चिकित्सा समितीकडे पाठविण्यात आले आणि महिला संघटना आणि अन्य कार्यकर्त्यांनी १९८१ व १९८२ मध्ये देशभर फिरून गोळा केलेले पुरावे समितीला सादर केले. हुंड्यांशी संबंधित गुन्हे करणाऱ्यांविरुद्धचा कायदा बळकट करणाऱ्या दुरुस्त्या १९८४ मध्ये मंजूर करण्यात आल्या; काही किरकोळ दुरुस्त्या नंतर झाल्या.

दिल्लीच्या ‘सहेली’सारख्या महिलांच्या अनेक गटांना असे वाटले की, स्त्रियांच्या समस्यांवरच केवळ प्रकाशझोत टाकणे गरजेचे नसून त्यांचे जीवनही आनंदी–उत्साही बनविले पाहिजे. म्हणून त्यांनी स्त्रियांना संगीत, नृत्य आणि कलेच्या माध्यमातून स्वतःला व्यक्त करण्यास उत्तेजन दिले. अन्य गटांनी मासिके काढली; स्त्रियांची मानहानी करणाऱ्या प्रसारमाध्यमांतील जाहिराती आणि चित्रपटांचे निरीक्षण करण्याचे पहारेकऱ्याचे काम केले. स्त्रियांच्या आरोग्याशी संबंधित समस्यांना वाचा फोडली किंवा भ्रूणहत्त्येविरुद्ध बालिकांच्या आधिकारांसाठी किंवा झोपडपट्टीत राहणाऱ्या स्त्रियांच्या घरांसाठी आणि पिण्याच्या पाण्यासाठी मोहिमा आखल्या.

हैदराबादमध्ये स्त्रियांच्या तात्त्विक अभ्यासासाठी एक व्यासपीठ म्हणून ‘अन्वेशा’ची स्थापना झाली आणि दिल्लीच्या स्त्री विकास अभ्यासकेंद्राने माहितीचे संकलन आणि संशोधनास उत्तेजन दिले आणि पुढील काळात लैंगिक अभ्यासाशी संबंधित माहिती पुस्तिका व नियतकालिका सुरू केले. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात स्त्रीविषयक अभ्यासाचा समावेश करता येईल इतके संशोधन आणि लेखन या केंद्रांनी उपलब्ध केले आहे. स्त्रियांच्या चळवळीचा शासनाच्या धोरणावर निश्चितच परिणाम झाला. स्त्रियांचे आरोग्य, शिक्षण आणि राजकीय सहभागासाठी १९८८ मध्ये एक सविस्तर राष्ट्रीय योजना तयार करण्यात आली. १९८९ मध्ये मांडलेल्या पंचायत राज विधेयकाने पंचायतींमध्ये स्त्रियांसाठी एक

तृतीयांश जागा राखील ठेवल्या. ग्रामीण भागातील स्त्रिया आणि मुले यांच्या विकासासाठी आखलेल्या योजनेने ग्रामीण भागात महिला मंडळे किंवा संघ सुरू करण्याची जबाबदारी स्वीकारली आणि त्यामुळे अनेक गरीब स्त्रियांना स्थानिक पातळीवरील स्वयंसेवी संस्था आणि राजकीय कार्यकर्ते यांच्या मदतीने संघटित होता आले आणि आपल्या भावना व्यक्त करता आल्या. संसदेतील एक तृतीयांश जागा स्त्रियांसाठी राखीव ठेवण्याची तरतूद करण्याविषयी गांभीर्यपूर्वक प्रयत्न सुरू आहेत. त्यासाठी राजकारणी स्त्रिया, महिलांचे गट आणि काही राजकीय पक्षांकडून मोठ्या प्रमाणावर पाठिंबा मिळाला आहे.

## ८.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) भारतातील स्त्री सुधारणा चळवळीचा आढावा घ्या.

---------------------------------------------

---------------------------------------------

२) स्वातंत्र्योत्तर भारतातील दलित चळवळीचे मूल्यमापन करा.

---------------------------------------------

---------------------------------------------

## ८.४ सारांश

स्वतःचे अस्तित्व, सरकारी नोकऱ्या आणि राजकीय पदे यामधील आरक्षण या विषयावर दलितांच्या चळवळींमध्ये त्यांच्या मध्यम वर्गीय सामाजिक गरजांचा पगडा प्रामुख्याने दिसतो. दलितांच्या चळवळी जास्त करून मध्यम वर्गाकडून पार पाडल्या जातात. अस्पृश्यतेची प्रथा आणि भेदभाव यांच्याविरुद्ध स्थानिक सामुदायिक पातळीवर चळवळींना गती मिळाली नाही. परंतु त्या चळवळींचा फायदा एवढाच झाला की, राजकीयदृष्ट्या मुख्य कार्यक्रमांमध्ये दलितांचा समावेश झाला. दलित चळवळींनी सत्ताधारी वर्गावर यशस्वीरित्या चांगलाच दबाव आणला आहे.

## ८.४ पारिभाषिक शब्द

१) जातीयवाद : 'जातियवाद' ही एक अशी विश्वासप्रणाली आहे की, जिच्यामार्फत समाज, अर्थव्यवस्था आणि राज्यसंस्था यांचा विचार केला जातो आणि जिच्याभोवती राजकारण संघटित करण्याचा प्रयत्न करण्यात येतो.

२) मनुवादी विचारसरणीनुसार 'पतिही देवो नारिणां पतिर्बन्धु पतिर्गती' म्हणजे स्त्रियांना पती हाच देव, तोच बंधु आणि तीच गती अशासारख्या वचनांचा घट्ट पाश आवळलेल्या भारतीय पुरुषी संस्कृतीत महिलांनी स्वातंत्र्योत्तरकाळात दैदिप्यमान अशी कामगिरी बजावलेली दिसून येतो. स्त्री स्वातंत्र्याची कास धरून आपल्या रक्ताचा थेंब न थेंब महिलांसाठी खर्च करणाऱ्या या महिलांचे योगदान नवीन पिढीला सदैव स्फुरण देणारे ठरणार आहे.

## ८.६ संदर्भसूची


- आधुनिक भारताचा इतिहास – ग्रोव्हर–बेल्हेकर, एस.चांद, दिल्ली (२००७).
- फडके य. दि., जम्म–काश्मीर स्वायत्ता की स्वातंत्र्य?, अक्षर प्रकाशन, मुंबई (२००१).
- वर्तमान भारत – वेदप्रताप वैदिक, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली(२००२).
- आधुनिक भारताचा इतिहास – वैद्य–कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७–२०००).
- स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास – सरदेसाई म. हि., गोवा, दमण, दीव, खंड – १, पणजी सरकार (१९८६).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स – बिपिनचंद्र (अनु. पारशी मा. कृ. व इतर), के.सागर, पुणे (२००४).

# घटक ९

## मुख्य आव्हाने

**अनुक्रमणिका**


९.० उद्दिष्टे

९.१ प्रस्तावना

९.२ विषय विवेचन

  ९.२.१. वर्ग-जात संघर्ष

  ९.२.२. प्रादेशिक समस्या

  ९.२.३. भ्रष्टाचार

  ९.२.४. लिंग-भेद

  ९.२.५. नक्षलवाद

९.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

९.४ सारांश

९.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

९.६ संदर्भग्रंथसूची


## ९.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१) वर्ग-जात संघर्षाविषयी जाणून घेता येईल.

२) स्वातंत्र्योत्तर काळातील प्रादेशिक समस्यांचा मागोवा घेता येईल.

३) भ्रष्टाचाराच्या समस्येचे विवेचन करता येईल.

४) नक्षलवादाची पार्श्वभूमी व विस्तार स्पष्ट करता येईल.

## ९.१ प्रस्तावना

भारतीय संघराज्यासमोर अनेक समस्या आहेत. त्यात प्रामुख्याने वंशवाद, सांप्रदायिकता, जातीयता, भाषावाद, मागासलेपणा, राज्यांचा असमान आर्थिक विकास, धर्म, सांस्कृतिकता, प्रादेशिकता यांचा उल्लेख करता येईल.

## विषय विवेचन

### ९.२.१. वर्ग-जात-संघर्ष

जात :- जाती आणि तिच्यावर आधारलेली जातीव्यवस्था हे भारताचे वैशिष्ट्य समजले

जाते. जगातील सर्वच समाजांमध्ये विविध आधारांवर सामाजिक गट पडतात. त्यातलाच एक प्रकार जाती हा होय. मात्र जाती हा बंदद्वार असलेला सामाजिक गट म्हणावा लागेल. कारण गटातून बाहेर जाणे किंवा बाहेरून या गटात येणे शक्य नसते. जन्मानेच जात प्राप्त होते आणि मृत्यूपर्यंत टिकून राहते. व्यक्तिने आपल्या जीवनात आपल्या पात्रतांचा विकास करून कितीही प्रगती करून घेतली तरी त्याची जात बदलत नाही. शिवाय सामाजिक दर्जाच्या उतरंडीत त्या जातीला जे स्थान किंवा दर्जा असेल तोच व्यक्तीला मिळतो आणि कधीही तो बदलत नाही.

**वर्ग :–** सामाजिक वर्ग हा व्यक्तींच्या समाजातील विभिन्न सामाजिक दर्जा किंवा स्थानावरून निर्माण होतो. वर्ग हा मात्र प्रामुख्याने व्यक्तीच्या अर्जित दर्जावर आधारित असतो. रंकाचा राव व रावाचा रंकही होऊ शकतो. जिन्सबर्ग याने, 'समान कामधंदा, सांपत्तिक स्थिती, शिक्षण किंवा वंश यामुळे एकसारखे जीवन जगणारे लोक, ज्यांच्या वृत्ती, भावना, विचार हे समान असतात व आपापसातील समानतेमुळे ज्यांना आपण एकाच समूहाचे सदस्य आहोत असे कमी–अधिक प्रमाणात वाटत असते अशा लोकांचा समूह म्हणजे 'सामाजिक वर्ग होय' असे म्हटले आहे.

एकाच समुदायात अनेक वर्ग आढळतात. त्या वर्गाचे लोक त्यांच्या सामाजिक आर्थिक किंवा व्यावसायिक परिस्थितीमुळे व समान समस्यांनी ग्रस्त असल्यामुळे आपण सर्व एकाच स्थितीत आहोत अशी भावना मनात बाळगतात. या सामाजिक वृत्तीमुळेच ते एकत्रित येतात किंवा वेगळेही होतात. जसे एखादा श्रमजीवी मजूर गरीब स्थिती कष्ट करतो तेव्हा तो मजूर वर्गाचाच भाग असतो. परंतु त्याला पैसे मिळून श्रीमंत झाला व भिन्न जीवन जगू लागला की त्याची मानसिक ठेवण बदलते व तो श्रीमंत वर्गाच्या प्रवृत्तीचा बनून त्या वर्गाचा भाग बनतो.

**वर्ग संघर्ष :–** वर्ग व्यवस्थेचा अनिवार्य परिणाम म्हणजे वर्ग संघर्षाची निर्मिती होय. मानवशास्त्रज्ञांच्या शब्दात सांगायचे झाल्यास समाजाची गतिमानता त्यातून टिकून राहते. वर्ग संघर्ष हे शांततामय मार्गानेही चालतात आणि साम्यवाद्यांच्या विचारसरणीनुसार ते हिंसेचा, बळाचा वापर करूनही चालतात. त्यातूनच वर्ग कलह/वर्ग युद्ध उदयास येते.

### ९.२.२. प्रादेशिक समस्या

भारतातील संघराज्यासमोरील सर्वात मोठी आव्हाने प्रादेशिकतेची आहेत. 'समान संस्कृती, समान इतिहास किंवा समान हितसंबंधामुळे लहानमोठ्या विभागात निर्माण झालेली वेगळेपणाची जाणीव आणि त्यावरील राष्ट्रापेक्षा अधिक निष्ठा म्हणजे प्रादेशिकता होय.' भारतीय संघराज्यासमोरील जी अनेक आव्हाने आहेत त्यात प्रांतवाद किंवा प्रादेशिकता हे महत्त्वाचे आव्हान आहे. त्यालाच प्रदेशवाद, विभागीयवाद असेही म्हटले जाते. देशातील एखाद्या विशिष्ट भागावर देशापेक्षा अधिक प्रेम करणे म्हणजे प्रादेशिकवाद होय. एखाद्या विभागातील जनतेत आपल्यावर अन्याय झाला की दाबून ठेवलेली भावना उफाळून आली की, ती भावना प्रांतवाद किंवा प्रादेशिकता या नावाने ओळखली जाते. ही भावना एकदा निर्माण झाली की, मोठ्या विभागातून फुटून निघण्याची मागणी पुढे येते. प्रादेशिकतेमधून भारतीय संघराज्यांसमोर राष्ट्रीय एकात्मता, केंद्र–राज्य संबंध, राज्या–राज्यातील अंतर्गत

संघर्ष, भाषा, वांशिक मतभेद, जाती-जातीतील संघर्ष यासारखे अनेक आव्हाने निर्माण झाली. देशांच्या अखंडतेला तडे जाऊ लागले.

भारतातील प्रादेशिकवादाला मुख्य समस्या ठरली ती भाषा. गुजराथी, मारवाडी, तेलगू या भाषेवर निर्माण झालेल्या जाती आहेत. यामुळे प्रादेशिक वाद उदयास आला. त्याचबरोबर असमर्थ नेतृत्व आणि राजकीय पक्ष यामुळेसुद्धा प्रादेशिकता उदयास आली. प्रादेशिक पक्षांमुळे वाद वाढला. प्रादेशिक पक्ष केंद्र शासन ठरवू लागले. त्यामुळे राष्ट्रहितापेक्षा प्रादेशिक हिताला जास्त महत्त्व केंद्र शासनाला देणे गरजेचे ठरले आहे. प्रादेशिक पक्षांनी प्रादेशिकवादाला चालना दिली आहे. आज वर्तमान परिस्थितीत भारतीय संघराज्य प्रादेशिक वादाकडे झुकला आहे. याचे मुख्य कारण राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने कुठलेही कार्य केंद्राकडून होत नाही तर प्रादेशिक पक्षांच्या हट्टामुळे प्रादेशिक प्रश्न केंद्राला अगोदर सोडवावे लागतात. नंतर राष्ट्रीय हिताचा विचार करावा लागतो. राजकीय पक्ष राजकारणाद्वारे प्रादेशिकवादाला चालना देतात. ज्यामुळे त्यांना त्यांचे हित साधण्यास योग्य मार्ग याद्वारे प्राप्त होत आहे.

**भाषावार प्रांतरचना**

स्वतंत्र भारतीय संघराज्यात १९४८ ला दार कमिशन नेमून प्रांतवादावर विचार करण्यात आला. भाषावर प्रांतरचनेतून अधिक गुंता निर्माण होईल असा कमिशनने विरोधी अहवाल दिला. पुढे १९५३ मध्ये राज्य पुनर्रचना मंडळ सथापन करण्यात आले. या कमिशनच्या अहवालास संसदेने १९५६ मध्ये मान्यता दिली. त्यातून १६ घटक राज्ये व ६ केंद्रशासित प्रदेश अस्तित्वात आले. त्यानंतर कोणत्या ना कोणत्या कारणावरून राज्य पुर्ननिर्माण केल्यामुळे ही संख्या वाढत गेली. तरीदेखील आंध्रप्रदेशात तेलंगणा, महाराष्ट्रात विदर्भ, गुजरातेत सौराष्ट्र इत्यादी प्रांतातून स्वतंत्र प्रादेशिक अस्मितेचे दर्शने वेळोवेळी होतांना दिसते.

**घटक राज्यांमधील संघर्ष**

भाषावर प्रांतरचनेमुळे काही प्रमाणात भाषिक प्रांतवादाचा प्रश्न सोडविण्यामध्ये यश मिळाले असले तरी रचनेमुळे राज्याराज्यामधून संघर्षाची परिस्थिती ही उद्‌भवली आहे. या प्रश्नामध्ये भाषिक आधारावर निर्माण झालेले सिमा प्रश्न, राजधानीच्या स्वरूपामध्ये निर्माण झालेले प्रश्न, पाणी वाटपासंबंधीचे प्रश्न आणि एका राज्यातील जनतेचे दुसऱ्या राज्यामध्ये झालेले स्थलांतर या प्रकारचे अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत. राज्यामधील संघर्षातून प्रादेशिकतेचे तीव्र रूप दिसून येते. महाराष्ट्र व गुजरातच्या संदर्भामध्ये मुंबईचा प्रश्न, पंजाब व हरियाणाच्या संदर्भामध्ये चंदीगडचा प्रश्न, कावेरी पाणी प्रश्नावर कर्नाटक व तामिळनाडू यांचा संघर्ष, निपाणी व कारवार या संबंधी महाराष्ट्र व कर्नाटक या दोन राज्यातील संघर्षही उदाहरणे आहेत.

एका राज्यामधून दुसऱ्या राज्यामध्ये स्थलांतरीत झालेल्या लोकांचे प्रश्न तीव्र बनत चालले आहे. रोजगाराची संधी मिळण्यासाठी स्थलांतरीत झालेल्या अन्य प्रांतियाकडून संबंधित प्रदेशाच्या भूमिपुत्राच्या रोजगाराच्या संधी हिरावून घेतल्या जातात आणि ते भूमिपुत्रावर वर्चस्व गाजवितात अशा भावनेतून अनेक ठिकाणी प्रखर आंदोलने उभी राहिली आहेत. आसाममध्ये लछीत सेना, पश्चिम बंगालमध्ये सुभाष सेना, महाराष्ट्रात शिवसेना या प्रकारचे

इतर राज्यातून ही स्थानिक लढावू प्रादेशिक वादाचे स्वरूप दिसून आले आहे. मराठी माणसांसाठी महाराष्ट्र, कन्नडीगांसाठी कर्नाटक आणि ओरियासाठी ओरीसा या घोषणा लोकप्रिय झाल्या.

दाक्षिणात्यांनी मुंबईच्या सार्वजनिक जीवनावर वर्चसव बसविले असून त्यांना मुंबईमधून हुसकावून लावल्याशिवाय मराठी माणसाला स्वाभिमानाने जगता येणार नाही, असे प्रतिपादन शिवसेना करते. याचप्रकारचे कार्य बिहारमध्ये बिहार बचाव मोर्चा आणि त्रिपुरामध्ये त्रिपुरा उपजातीजुवा समितीकडून केले जाते. आसाममध्ये ऑल असाम स्टुडंट्स युनियन आणि ऑल आसाम गणसंग्राम परिषद या दोन संघटनांनी परकीय घुसखोरांच्या प्रश्नावरून दीर्घकाळ जनआंदोलन चालविले. अशा आंदोलनामधून तीव्र प्रादेशिक भावनेचा आविष्कार होतो.

### फुटिरतावाद

शिखांसाठी पंजाब हे स्वतंत्र घटक राज्य बनविण्यात आले. तरीही काही बाह्यशक्तींनी प्रोत्साहन दिल्यामुळे पंजाबमध्ये प्रांतवाद उफाळून आला. सीमेपलीकडून प्रोत्साहन व प्रशिक्षण मिळाल्यामुळे १९८० च्या दशकात पंजाबमध्ये आतंकवाद उदयाला आला. संत जर्नेलसिंग भिंद्रनवाले यांच्या 'ऑपरेशन ब्ल्यू स्टार' ही मोहीम राबवून भारतीय सैन्याने पंजाब शांत केले.

'द्रविड मुन्नेत्र कळघम' व 'नाम तामिळ' या संघटनांनी प्रारंभी मद्रास या स्वतंत्र व सार्वभौम राज्याची मागणी केली. व नंतर दक्षिण भारताचे 'द्रविडनाड गणराज्य' केले जावे अशी मागणी केली. प्रादेशिक भावनांशी खेळल्यामुळे डी. एम. के. ला बरीच लोकप्रियता मिळाली. त्यानंतर या पक्षाचे नेते सी. एम. अण्णादुराई यांनी मे १९६२ मध्ये राज्यसभेत भाषण करताना 'दक्षिणेतील लोक इतर भागातील लोकांपेक्षा वेगळे आहेत' अशी घोषणा केली.

### भूमिपुत्र सिद्धांत

या सिद्धांतानुसार, एखाद्या राज्यात त्या राज्यातील मुख्य भाषा बोलणारे जे रहिवासी आहेत ते या राज्याचे मालक आहेत; म्हणजे मुख्य भाषा बोलणारे रहिवासी 'भूमिपुत्र' म्हणजे 'स्थानिक' रहिवासी आहेत आणि ते राज्य केवळ त्यांचीच 'जन्मभूमी' आहे; त्या राज्यात राहणारे इतर लोक किंवा तेथील मुख्य भाषा ज्यांची मातृभाषा नाही ते सर्व रहिवासी 'बाहेरचे' म्हणजे परके आहेत. हे परके लोक त्या राज्यात पूर्वीपासून राहत असोत किंवा अलीकडे दुसरीकडून वस्तीला आले असोत, ते त्या 'भूमीचे संतान' नव्हते. हा सिद्धांत 'लोकप्रिय' झाला आहे.

जेथे येथील मुख्य भाषा बोलणारे लोक अल्पसंख्य होते किंवा जेमतेम काठावर बहुसंख्य होते. त्या प्रदेशात व शहरात हा प्रश्न अधिक गंभीर झाला. उदा. १९६१ साली मुंबई शहरात मराठी भाषिक तेथील एकूण लोकसंख्येच्या ४२.८ टक्के होते; बंगळूरमध्ये कानडी भाषिक २५ टक्क्याहून कमी होते; कोलकोत्त्यात बंगाली बोलणारे बहुसंख्येच्या काठावर होते; आसामच्या नागरवस्तीमध्ये आसामी भाषिक जेमतेम ३३ टक्के होते. उत्तरोत्तर शहरांमध्ये

राहायला येणाऱ्या बाहेरच्च्यांची संख्या आणखी वाढत गेली.

जेव्हा औद्योगिक व पांढरपेशा कामधंद्यांसाठी बाहेरून वस्तीला आलेले आणि स्थानिक सुशिक्षित मध्यमवर्गीय तरुण यांच्यामध्ये प्रत्यक्षतः स्पर्धा सुरू होते किंवा होण्याचा संभव असतो तेव्हा 'भूमिपुत्र' आंदोलन उद्‌भवते आणि या आंदोलनास जोरही चढतो. ज्या राज्यात किंवा शहरात 'बाहेरच्यां'ना उच्च शिक्षणात जास्त वाव मिळतो आणि सरकारी, व्यावसायिक व औद्योगिक क्षेत्रांमधील पांढरपेशा नोकऱ्या ते मोठ्या प्रमाणावर पटकवतात, तसेच दुकानदारी व छोटे उद्योगधंदे करतात तेथे तेढ जास्त धारदार होते.

अनेक ठिकाणी असे दिसून येते की, हे बाहेरचे लोक शहरापेक्षा ग्रामीण भागातच जास्त आहेत. तेथे ते शेतमजूर म्हणून किंवा तागाच्या व सुती कापडासारख्या पारंपरिक उद्योगांमध्ये कामगार म्हणून राहत आहेत. अशा ठिकाणी 'भूमिपुत्र' भावना अस्तित्वात नाही आणि येथे पांढरपेशा नोकऱ्यांचा प्रश्न येत नसल्यामुळे 'बाहेरच्यां'बद्दल द्वेषभावनाही नाही. शेतमजुरांचे व औद्योगिक कामगारांचे स्थलांतर फार मोठ्या संख्येने अनेक राज्यांत झाले आहे. उदा. बिहार व ओरिसातील मजूर आसाम व बंगालमधील चहाच्या मळ्यांवर; ओरिसातील बांधकाम करणारे मजूर गुजरातेत; आणि घरगडी तर संबंध देशभर. परंतु या कोणत्याही ठिकाणी या बाहेरच्यांबद्दल कलह माजला नाही. हे बाहेरचे मजूर कामगार जी कामे करतात त्यांच्याशी स्थानिक लोकांची स्पर्धा नाही. म्हणूनच तेथे 'भूमिपुत्र' मनोगंड बाहेरच्यांच्या फारसा आड येत नाही. बाहेरून आलेल्या मजूर वर्गामुळे स्थानिक मध्यमवर्गीयांच्या बस्तानाला धक्का पोहोचत नाही. अलीकडे मात्र कामधंद्यांमध्ये शिक्षण व कौशल्य यांची गरज वाढत असल्यामुळे आणि पगार जास्त मिळू लागल्यामुळे तांत्रिकदृष्ट्या पुढारलेल्या उद्योगांमध्ये नोकऱ्या मिळविण्यासाठी बाहेरच्यांशी स्थानिकांची स्पर्धा वाढत आहे.

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत जगभरात सर्वत्र मोठ्या प्रमाणावर लोकांचे स्थलांतर होत आहे. अविकसित देशांमधून विकसित देशांमध्ये आणि अविकसित प्रदेशांकडून विकसित भागांकडे किंवा शहरांकडे लोक स्थलांतर करताना दिसतात. स्थलांतरित समूह आपल्याबरोबर आपल्या भाषा, सांस्कृतिक बाबी व हितसंबंध घेऊन येत असतात. याचा परिणाम स्थानिक लोकसमूह, त्यांच्या भाषा, संस्कृती व अर्थकारणावर होत असतो. जेव्हा स्थानिकांना स्थलांतरितांची राजकीय ताकद वाढते आहे असे वाटते तेव्हा 'भूमिपुत्र' व 'परके' असा विरोध व संघर्ष सुरू होतो. जगात अनेक प्रगत देशांना आज या प्रश्नांना तोंड द्यावे लागत आहे. यातूनच देशांच्या व आंतरराष्ट्रीय पातळीवर 'राष्ट्र' या संकल्पनेकडे पुन्हा नव्याने पाहिले जात आहे. 'राष्ट्र' या संकल्पनेतील 'एकात्म' समाज निर्माण करणे किंवा असलेला टिकविणे या बाबी नव्या आव्हानांच्या संदर्भात अवघड बनत चाललेल्या दिसतात. भारतासारख्या संघराज्यात्मक व्यवस्था स्वीकारलेल्या देशात अशा समस्या वारंवार डोळे वर काढताना दिसतात. राष्ट्रबांधणीचा जो प्रकल्प स्वातंत्र्यानंतर हाती घेतला गेला त्या प्रकल्पातील हा सर्वात महत्त्वाचा आव्हानात्मक भाग आहे असे म्हणता येईल.

### समारोप

स्थानिक अभिमान आणि एखाद्या विशिष्ट प्रदेशाशी, प्रांताशी, राज्याशी किंवा तेथील

भाषेशी व संस्कृतीशी निष्ठा म्हणजे प्रादेशिकता नव्ह तर जेव्हा संबंध देशाशी किंवा तर प्रदेशांशी किंवा राज्यांशी शत्रुत्व पत्करून एखाद्या राज्याचे किंवा प्रदेशाचे हितसंबंध हट्टाने रेटले जातात. त्या हितसंबंधांसाठी संघर्ष केला जातो तेव्हा ती प्रादेशिकता ठरते. स्वातंत्र्योत्तर काळात अनेक प्रादेशिक विवाद निर्माण झालेत. नद्यांचे पाणी वापरल्याबद्दल अनेक राज्यांमध्ये तंटे सुरू आहेत. उदा. तामिळनाडू–कर्नाटक, कर्नाटक–आंध्रप्रदेश, पंजाब–हरियाणा–राजस्थान. भाषावार राज्यरचना झाल्यावर राज्यांच्या सरहद्दीबद्दलही वाद निर्माण झाले आहेत. उदा. महाराष्ट्र–कर्नाटक दरम्यान बेळगावबद्दल व पंजाब–हरियाणा दरम्यान चंदिगढबद्दल पाणीपुरवठा व वीजनिर्मितीकरिता धरणे बांधण्याबद्दलही वाद उत्पन्न झाले आहेत; परंतु हे वाद फार काळ राहिले असले आणि त्यांनीकधी कधी लोकांमध्ये प्रक्षोभ उसळला असला तरी, एकंदरीत ते मर्यादेबाहेर गेले नाहीत.

### ९.१.३ भ्रष्टाचार

प्रामाणिक, शिस्तबद्ध प्रयत्नांच्या अभावी भ्रष्टाचार बोकाळतो. भ्रष्टाचार हेदेखील देशाची प्रगती खुंटण्याचं आणखी एक कारण आहे. भ्रष्टाचार हा केवळ नैतिक मुद्दा नाही तर भारतासारख्या गरीब देशाची आर्थिक प्रगती रोखणारा खूप मोठा अडसर आहे. बरेच मोठमोठे प्रकल्प हे गरिबांना आरोग्यसेवा, शिक्षण आणि पोषण देशासाठी सुरू होतात, पण भ्रष्टाचाराच्या दलदलीमुळे औषधांच्या किमती आकाशाला भिडतात, शाळांच्या इमारती डुगडुगू लागतात, अप्रशिक्षित, गैरहजर शिक्षकांचा सुळसुळाट होतो आणि या साऱ्यामध्ये गरीब भरडला जातो. मध्यवर्गीय आणि श्रीमंत वर्ग अशा सेवांवर अवलंबून नसतातच, त्यामुळे समतोल हरवलेल्या समाजव्यवस्थेला भ्रष्टाचार अजूनच बेताल करतो. भ्रष्टाचारामुळे विकासाचा आणि उत्पादनक्षेमतेचा दर घसरतो, गुंतवणुकी कमी होतो, वित्तीय गळतीला सुरुवात होते, अर्थव्यवस्थेवरचा लोकांचा विश्वास कमी होतो आणि नकारात्मक घटनांची साखळी सुरू होते, असा अर्थतज्ज्ञांच्या निष्कर्ष आहे. भ्रष्टाचारानं बरबटलेल्या देशातला भ्रष्टाचार जर ५० टक्के कमी झाला, तर त्या देशाची जीडीपीमध्ये १.५ टक्क्यांनी वाढ होऊ शकते, असं एका प्रथितयश अर्थतज्ज्ञानं नमूद केलं आहे. राष्ट्रीय पातळीवरच्या गुंतवणुकीच्या प्रमाणातदेखील भ्रष्टाचारामुळे घट होते हे संशोधकांनी दाखवून दिलं आहे. भ्रष्टाचारपासून मुक्ती मिळवण्यासाठी प्रेरणादायक, निःस्वार्थी आणि धैर्यवान नेतृत्व हवं. नेत्यांमध्ये न्याय्यता, पारदर्शकता आणि जबाबदारीची जाणीव दिसली की सामान्य माणसाचा समाज आणि सरकारवरचा विश्वास प्रस्थापित होतो.

मुळात भ्रष्टाचार हा गुंतागुंतीचा विषय आहे. वेगवेगळ्या देशातल्या समाजाचे पैलू त्यात गुंतलेले असतात. त्यामुळे भ्रष्टाचाराच्या विरोधात सगळ्यांचेचे एकमत असले तरीही त्याचे अनेक चेहरे आहेत. जेव्हा कोणत्याही व्यवहारात भ्रष्टाचार असतो त्यात दोन बाजू असतात. लाच देणाऱ्याबरोबरच घेणाराही त्यात साक्षीदार असतो.

मोठ्या प्रमाणावरील भ्रष्टाचार, गुन्ह्यांमध्ये वाढ आणि राजकारणाचे व पोलिसांचे गुन्हेगारीकरण यामुळे भारताचा विकास, लोकशाही आणि नैतिक आरोग्य यांना मोठे धोके निर्माण झाले आहेत. खूप वेतन घेणारे वरिष्ठ अधिकारी सोडले तर वसाहतीचे प्रशासन सुरुवातीपासूनच सामान्य लोकांना दुर्लभ आणि भ्रष्टाचाराने किडलेले होते. परंतु अर्थव्यवस्थेच्या

अविकसित स्वरूपामुळे आणि वसाहती राज्याचा कारभार मर्यादित असल्याने फार थोड्या लोकांना भ्रष्टाचाराची झळ बसली. तथापि, परमिट-लायसन्स, कोटा राज्याची सुरुवात, ग्राहकोपयोगी वस्तूंची टंचाई आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळातील उच्च कर यामुळे काळाबाजार आणि करचुकवेगिरी वाढली. परंतु तोपर्यंत भ्रष्टाचाराने प्रशासनात प्रवेश केला नव्हता किंवा राजकीय व्यवस्थेला स्पर्श केला नव्हता.

आर्थिक विकास, राज्याच्या विकासात्मक आणि नियामक कार्यात द्रूतगतीने झालेली मोठी वाढ यामुळे अर्थव्यवस्थेचे आणि प्रशासनाने मोठे क्षेत्र भ्रष्टाचारासाठी खुले झाले. राजकीय वरदहस्ताचा वापर आता राज्याच्या आर्थिक साधनसामग्रीपर्यंत जाण्यासाठी आणि परमिट, लायसन्स आणि कोटा मिळविण्यासाठी होऊ लागला.

पन्नासच्या दशकात भ्रष्टाचाराचे जाळे सर्वदूर पसरलेले नव्हते आणि त्याला, स्वातंत्र्य चळवळीत आणि अनुयायी, विशेषतः मध्य आणि उच्च स्तरांवरील प्रामाणिक नोकरशाही आणि उच्च दर्जाची सचोटी असलेले न्यायमंडळ या स्वरूपाचे मोठे अस्तित्वात होते; नेहरूंनी भ्रष्टाचाराची वैयक्तिक प्रकरणे हाताळली; परंतु प्रश्नाच्या मुळाशी जाण्याचे आणि तातडीने कारवाई करण्याचे धोरण आखण्यात आले नाही.

परिणामतः लोकांच्या जीवनातील शासकीय कार्यात वाढ झाल्यावर भ्रष्टाचाराचे प्रमाणही वाढत गेले. काही काळानंतर राजकीय व्यवस्थाही भ्रष्टाचाराला बळी पडू लागली. कनिष्ठ पातळीवर भ्रष्टाचाराचा बंदोबस्त न झाल्यामुळे तो हळूहळू उच्च स्तरावरील प्रशासन आणि राजकारणापर्यंत पोहोचला. राजकीय वरदहस्ताचे प्रोत्साहन लाभलेल्या सर्वस्पर्शी भ्रष्टाचाराने प्रशासनाला गिळून टाकण्यास सुरुवात केली. तथापि, भ्रष्टाचार हा केवळ राजकारणी आणि नोकरशहांपुरता मर्यादित नाही.

समाजाचा कोणताही विभाग त्यापासून मुक्त नाही; प्रसार माध्यमे, शिक्षणक्षेत्र, भिन्न व्यवसाय आणि न्याय संस्था या सर्वांना भ्रष्टाचाराचा कलंक लागला आहे. आज सामान्य नागरिकांना भ्रष्टाचार, प्रशासकीय विलंब आणि अकार्यक्षमता यामुळे जगणे असह्या झाले आहे.

साठच्या दशकाच्या अखेरीपासून निवडणुकांसाठी मिळणारा निधी हा भारतीय राजकीय व्यवस्थेतील भ्रष्टाचाराचा प्रधानस्त्रोत बनला आहे. पैशाच्या थैल्या आणि काळा पैसा यांचा पाठिंबा मिळविणाऱ्यांना निवडणुकांत अयोग्य फायदे मिळाल्याने त्यात भाग घेणे फार खर्चिक झाले आहे.

सांप्रदायिकता आणि जातियवाद, कायदा आणि सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीतील ढिलेपणा, भ्रष्टाचार आणि निवडणुकांमधील पैशाचा आणि बळाचा वापर यामुळे देशाच्या काही भागात राजकारणाचे गुन्हेगारीकरण झाले असून राजकारणी, व्यापारी, नोकरशाही, पोलीस आणि गुन्हेगार यांचे परस्पर संबंध प्रस्थापित झाले आहेत.

मुळात कोणत्याही देशात आणि विशेषतः गरीब विकसनशील देशात भ्रष्टाचाराचा विषय हा तेथील जनमताशी निगडित असलेला प्रश्न आहे. या रोगावर जनतेचे किती प्रबोधन झालेले आणि लोकमताचा किती प्रभाव सार्वजनिक जीवनातल्या लोकप्रतिनिधींवर आणि पर्यायाने

प्रशासनावर झालेला आहे यावर अवलंबून आहे. भारतसारख्या देशात लोकमत प्रशिक्षित आहे आणि प्रसारमाध्यमे जागरूक आहेत. परंतु तरीही भ्रष्टाचारावर फारसा परिणामकारक इलाज झालेला नाही. याचे कारण म्हणजे सर्व राजकीय पक्षांची आपापसात एक सहमती बनलेली आहे आणि त्यांना भ्रष्टाचाराच्या विरोधात ठाम भूमिका घ्यायची नाही. तसेच कायदा आणि सुव्यवस्था ठेवणाऱ्या पोलीस आणि न्यायसंस्था याच मुळात भ्रष्टाचाराने व्यापलेल्या आहेत. अशा परिस्थितीत जोपर्यंत कोणत्याही देशातील जनतेला भ्रष्टाचार हा गंभीर प्रश्न वाटत नाही तोपर्यंत बाहेरच्यांनी कोणत्याही नैतिक भूमिका घेतल्या अगर आवाहने केली तरीही या रोगाचे निर्मूलन करणे शक्य होणार नाही.

### ९.२.४. **लिंग भेट** (Gender Inequaqulity)

निसर्गाने मानवजातीची निर्मिती करताना ॲडम आणि ईव्ह यांचा जन्म दिला आणि त्यांच्यापासून मानवजातीची निर्मिती झाली अशी कथा आपण ऐकतो. कुटुंबाच्या कार्यात स्त्री व पुरुष या दोघांचाही बरोबरीचा सहभाग आहे. एकाच गाड्याची ती दोन्ही समसमान चाके आहेत. किंबहुना मातृत्वशक्तीमुळे स्त्रीचे महत्त्व हे थोडे जास्तच मानावयास हवे. पूर्वी अनेक समाजांमध्ये मातृप्रधान व मातृसत्ताक कुटुंबपद्धती होत्या. कुलाचा परिचय मातेकडूनच होत असे. मात्र कालांतराने पुरुषांचे प्राबल्य होऊन स्त्रियांना दुय्यम किंवा कनिष्ठस्थान देण्यात आले. पुरुषप्रधान कुटुंब व समाजव्यवस्था निर्माण झाली.

भारतात एकीकडे स्त्रीला देवी मानून पूजा होत असताना समाजात मात्र बहुपत्नीत्व, सतीची प्रथा, विधवा विवाहास बंदी, हुंडा प्रथा, स्त्रीला वारसाहक्कात वाटा नसणे, स्त्रियांना मारहाण, टाकूण देणे या गोष्टी होत्या. मुस्लिमांमध्येही चार पत्नी करण्यापर्यंत बहुपत्नित्व, 'तलाक' हा शब्द तीनदा म्हणून तलाक देण्याची प्रथा इत्यादी प्रथा होत्या. समाजसुधारकांच्या कार्यामुळे, विविध कायद्यांमुळे या प्रथा संपुष्टात आल्या. स्वातंत्र्योत्तर भारतात स्त्रियांना राजकीय हक्क देण्यात आले. जिल्हा परिषदस्तरापर्यंत ३३% आरक्षण मिळाले. परंतु अनेक वर्षे घोळ घालूनही संसदेत अजून ३३% आरक्षणाचे विधेयक पुरुष खासदारांनी संमत केलेले नाही. सामाजिक क्षेत्रातही हुंडा व हुंडाबळी, परित्यक्ता स्त्रिया व मुलींवर बलात्कार हे प्रकार वाढत्या प्रमाणात आढळतात.

वास्तविक शारीरिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या स्त्री व पुरुष यांच्यात नैसर्गिक भेद असला तरी त्यांच्या शारीरिक व बौद्धिक पात्रता/क्षमता पुरुषांच्या बरोबरीने असतात फक्त त्यांना संधी मिळत नाही. स्त्री कुटुंबात विनावेतन श्रमकरून कौटुंबिक कार्य पार पाडते. मुलांना जन्म देऊन त्यांचे संगोपन करते, घराच्या व कुटुंबाच्या दैनंदिन गरजा पुरविते, म्हणून पुरुष नोकरी व्यवसाय करू शकतात असे रॉस पूल यांनी म्हटले आहे. ग्रामीण भागातील स्त्रिया ही कौटुंबिक कार्ये पार पाडून शिवाय शेतावर कष्ट करतात, घरी गायी-म्हशी असल्यास त्यांचे संबंधी सर्व कामे करतात, जंगलात मजुरी करणे, जळावू लाकूडफाटा आणणे, मोलमजुरी करणे ही कार्ये करतात. शहरातल्या पुरुषांच्या बरोबरीने नोकरी करून कमावतात परंतु पुरुषांबरोबर समानता मिळत नाही.

### ९.२.५. नक्षलवाद

'नक्षलवाद' या संकल्पनेला भारतीय सामाजिक चळवळीच्या इतिहासात एक विशेष अर्थ आहे. नक्षलवादी चळवळ मागील पाच दशकात कधी गनिमी पद्धतीने तर कधी आक्रमकपणे भारतीय समाजकारणात आणि राजकारणात चर्चेचे केंद्र बनलेले आहे. आज जवळपास देशातील १३ राज्ये त्यातील २२३ जिल्हे नक्षलवादाचा कचाट्यात सापडलेली आहे. नक्षलवाद आज सरकारसाठी गंभीर चिंतनाचा विषय व राष्ट्रीय सुरक्षेला घातक आजार ठरलेला आहे.

#### नक्षलवादाचा पूर्व इतिहास

नक्षलवाद ही उग्र संगठनांची क्रांतिकारी चळवळ मानली जाते. या चळवळीचा प्रारंभ स्वातंत्र्यपूर्व काळात किसान आंदोलन म्हणून झाले. इ. स. १९४८ मध्ये पहिल्यांदा साम्यवादी जहालांनी शस्त्रबद्ध हिंसात्मक कृत्यांनी सुरुवात केली. परंतु हिंसेला जनमाणसाचा पाठिंबा न मिळाल्याने चळवळीच गती मंदावली. भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात माओच्या तत्त्वावर आधारित भूमी सुधार व विकास कार्याच्या स्वरूपात नक्षलवादी चळवळ उदयास आली.

१९६२ च्या भारत-चीन युद्धानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्षामध्ये मोठी फूट पडली. त्यातून भारतीय कम्युनिस्ट पक्ष सी. पी. आई आणि भारतीय कम्युनिस्ट पक्ष मार्क्सवादी असे दोन गट उदयास आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे मवाळ धोरण पक्षातील एका मोठ्या गटाला मान्य नव्हते. इ. स. १९६४ मध्ये आंध्र प्रदेशातील पक्ष अधिवेशनात त्याचा स्फोट झाला. त्याचाच परिणाम म्हणजे ज्योति बसू बी. टी. रणदिवे इत्यादींनी पक्ष सोडला आणि 'मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष' या नावाचा अधिक जहाल व कडवा पक्ष काढला.

भारताच्या स्वातंत्र्यानंतर पश्चिम बंगालमध्ये १९६७ मध्ये नक्षलबाडी गावात काही शेतकऱ्यांनी आंदोलन सुरू केले. यात जमिनदारांविरुद्ध मजूर, शेतकरी यांचे हे आंदोलन होते. साम्यवादी विचारांशी बांधिलकी ठेवणाऱ्या नेत्यांत नेतृत्वाला स्वातंत्र्यापूर्व काळातही आंदोलन झाले होते. १९६७ ला नक्षलाबाडी गावातील आंदोलनानंतर नक्षलवाद हा शब्द प्रचलित होऊन भारतीय राजकारणात, समाजकारणात या शब्दाला प्रसिद्धी मिळाली. नक्षलवादी आंदोलनाने भारताच्या राजकीय क्षितिजावर एक आव्हान निर्माण केलेले आहे. चारू मुजूमदार यांना नक्षलवादी चळवळीचा संस्थापक मानले जाते. सुरुवातीला नक्षल चळवळीचे स्वरूप शेतकऱ्याच्या हितासाठी करण्यात येणारे आंदोलन असे होते. नंतर अन्याय, दडपशाही, शोषणाविरुद्धचा सशस्त्र लढा असे स्वरूप प्राप्त होत गेले. अन्याय करणारे जमीनदार, संधीसाधू निष्क्रिय राजकारणी, भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी, भ्रष्ट पोलीस अशा लोकांचे खून नक्षलवाद्यांच्या जहाल गटाकडून करण्यात येऊ लागले आणि नक्षलवाद्यांच्या दहशतीचे नवीन पर्व या चळवळीने निर्माण केले.

पश्चिम बंगालमधील ही चळवळ सलग तीन वर्षे टिकली. हजारोंचे बळी या हिंसाचारात पडले. याच सुमारास पश्चिम बंगालचे संयुक्त सरकार कोसळले आणि सिद्धार्थ रे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेस सत्तेवर आली. या नव्या सरकारने आल्या आल्या 'साम, दाम, दंड, भेद' या सर्व तंत्राचा वापर करीत नक्षल बंडाळीवर कुठराघात केला. चारू मजुमदार पकडले

गेले. इ. स. १९७० मध्ये कलकत्त्यातील लाल बाझार तुरुंगात त्यांचा मृत्यू झाला. चारू मुजुमदारांचा मृत्यूवर चीनच्या पीपल्स डेली नावाच्या प्रसिद्ध वृत्तपत्राने लिहिले. स्प्रींग थंडर ब्रेक्स ओवर इंडिया तथाकथित क्रांती विझून गेली. बंगालमधील हा उठाव पूर्णतः फसला. शहरी भागातून त्याचे उच्चाटन करण्यात आले. मात्र उरलेले कार्यकर्ते भूमिगत झाले व त्यांनी ग्रामीण भागाचा आश्रय घेतला. श्री. चंद्रपुल्ला रेड्डी यांनी नेतृत्व स्विकारून गरज पडले तिथेच हिंसा करू असे तत्त्व अवलंबिले. मात्र यश मिळाले नाही.

इ. स. १९७५ च्या आणीबाणीच्या काळानंतर नक्षलवाद्यांनी कोंडापली सीतारमय्या यांच्या नेतृत्वाखाली सी. पी. आई. एम. एल. पीपल्स वार ग्रुप असा पक्ष स्थापन केला. या पक्षाचा संसदीय कार्यपद्धती व राज्य सरकारवर मुळीच विश्वास नव्हता. या पक्षाने प्रारंभीच्या किसान आंदोलनच्या स्वरूपात, अन्याय, जुलूम शोषणाविरुद्ध सशस्त्र लढा असा तात्त्विक आधार त्यास जोडला. जुलमी लोकांच्या हत्त्या या जहाल गटाकडून केल्या जाऊ लागल्या व दहशतीचे नवे दालन या चळवळीने प्रस्थापित केले.

नक्षलवादातील उठाव जरी फसले, तरी भूमिगत कार्यकर्त्यांनी आपापले स्वतंत्र अस्तित्व कायम राखून क्रांती अद्याप संपली नसल्याची घोषणाच केली. परिणामी त्यातून अनेक नक्षलवादी गट उदयास आले. भारत हा एक देश नसून यात अनेक देश आहेत. अशी अनेक राष्ट्रवादाची नवी संकल्पना पुढे आणण्यात आली. यातूनच क्षेत्रीय चळवळी उभारल्या जाऊ लागल्या. अशातील संतोष राणा, विनोद मिश्रांनी झारखंड चळवळ उभारली. परंतु पुढे विनोद मिश्रा यांनी 'इंडियन पीपल्स फ्रंट' नावाचा नवा राजकीय पक्ष काढून राजकारणात प्रवेश केला.

कार्लमार्क्सच्या वर्गसंघर्षाचे सिद्धांत आणि कामगारांचा अंतिम विजय आणि त्याचे राज्य या विचारसरणीच्या पायावर नक्षलवादी पक्षाची स्थापना करण्यात आलेली होती. या चळवळीचा जोर बिहार, आंध्रप्रदेश, झारखंड, छत्तीसगढ, मध्यप्रदेश, पूर्व महाराष्ट्र, तेलंगणा आणि ओरिसाचा पश्चिमभाग या राज्यात आढळतो. या भागाचा विकास अत्यंत बेताचा झाला आहे. या प्रदेशात सुमारे १५६ जिल्ह्यात नक्षलवादी चळवळीने व हिंसाचाराने उच्चांक गाठला आहे.

**आंध्रप्रदेशातील नक्षलवादी चळवळ**

आंध्रप्रदेशात दहा नक्षलवादी गट अस्तित्वात होते. तर बिहारमध्ये नऊ गट होते. चारू मुजुमदार यांचे कट्टर शिष्य कोंडापल्ली सीतारामय्या यांनी १९८० मध्ये 'पीपल्स वॉर ग्रुप'ची स्थापना केली व इतर नक्षलवादी गटांना निष्प्रभ करून सोडले. अनेक गनिमी पथके तयार केली. त्यांना 'डालमा' असे संबोधले जात असे. या पथकांनी सुरक्षा सैनिकांवर दबा धरून हल्ले करणे, राज्य सरकारच्या मालमत्तेची मोडतोड करणे, नासधूस करणे याचा सपाटा चालवला होता. १९८४ पासून १९८८ पर्यंत २१ शिपाई, ५ हेडकॉन्स्टेबल, ५ सब इन्स्पेक्टर्स, १ डेप्युटी सुपरिटेंडेंट यांना यमसदनी पाठवले आहे.

**छत्तीसगढ**

२० फेब्रुवारी २००२ साली भूमीगत सुरुंगाचा स्फोट करण्यात येऊन २३ पोलिसांना ठार

करण्यात आले. मे, जून आणि सप्टेंबर २००५ मध्ये केंद्रीय राखीव दलाचे ५ जवान फडीगुंडा, ५ जवान भैरवगड व २४ जवान कुंजीरनाला येथे ठार करण्यात आले. जुलै आणि ऑगस्टमध्ये विरोधी काँग्रेस नेते श्री महेंद्रकर्म यांच्या जवळच्या दोन नातेवाईकांसह ५० जणांची हत्या करण्यात आली. ८ फेब्रुवारी २००६ रोजी केंद्रीय औद्योगिक सुरक्षा सैनिकांच्या तळावर सुमारे ९०० सशस्त्र नक्षलवाद्यांनी अंधाधूंद गोळीबार करून आठ जवान ठार, ९ जवान जखमी करून ५० टन स्फोटक पदार्थांची, १८ रायफलींची लूट केली.

### ओरिसा

२००६ मध्ये ४०० नक्षलवाद्यांनी ज्यात काही स्त्रियापण होत्या. ओरिसा राज्यातील उदयगीरा शहरात पहाटे साडेचारच्या सुमारास तुरुंगावर हल्ल करून ४० कैद्यांची सुटका, ३ पोलिसांना गोळ्या घालून ठार, श्री. आर. के. मलिक व श्री. सेठी या दोन पोलीस अधिकाऱ्यांचे अपहरण केले. या धाडीत बरीच शस्त्रे व रोकड पळवली.

### बिहार

उच्चवर्णीयांच्या छळाला जबरदस्तीला तोंड देण्यासाठी १९५६ साली बिहारमध्ये भूमिगत स्वरूपात नक्षलवादी चळवळ सुरू झाली. आता बिहारच्या सर्व भागात नक्षलवादाचा प्रसार झालेला आहे. माओवादी कम्युनिस्ट सेंटर या संघटनेचा प्रभाव बिहारमधील २६ जिल्ह्यात निर्माण झाला. माओइस्ट कम्युनिस्ट सेंटर या गटाने सिंगगूम जिल्ह्यातील जंगलात लपूनछपून दहशतवादी कारवाया करण्यास प्रारंभ केला. याठिकाणी ७० कोटींची सिद्धार्थ सहाय्य योजना, मेघदूत सहाय्य कार्य, गरिबी हटविण्याकरिता काही उपाययोजना राबविण्यात आल्याचे दिसून येते.

अलीकडेच केंद्र सरकारने नक्षलविरोधी सर्वंकष योजना तयार केली असून त्यात ८० हजार सशस्त्र निमलष्करी दलांच्या मदतीसाठी आवश्यक त्या ठिकाणी कमांडो उतरविणे, कुमक पुरविणे, जखमी जवानांना तातडीने हलविणे आदी कामासाठी १० हेलिकॉप्टर्स तैनात केले आहेत. झारखंडमधील रांची आणि छत्तीसगडमधील रायपूर येथील हेलिकॉप्टर्स तैनात केले आहेत.

### महाराष्ट्रातील गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद

१९७९ पासूनच पीपल्स वॉर ग्रुपने महाराष्ट्रातील गडचिरोली, चंद्रपूर या वनवासी भागात कार्य सुरू करण्याचा प्रयत्न केला. गडचिरोलीमधील अहेरी, एटापल्ली, सिरोंचा, धानोरा, कुरखेडा, कोरची, भामरागड या क्षेत्रात नक्षलवादी संघटनेचे कार्य सुरू आहे. ही तालुक्याची ठिकाणे मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेशाच्या सीमेवर आहेत. घनदाट जंगल आणि भीषण गरिबी ही नक्षलवादी चळवळीला पोषक परिस्थिती येथे भरपूर प्रमाणात आहे. शिवाय एका प्रदेशात गुन्हा करून दुसऱ्या प्रदेशात सहीसलामत निसटताही येते. या ठिकाणी पोलिसी दलात दळणवळण किंवा सुसूत्रीकरण आणि समन्वय पाहिजे तेवढा दिसून नाही. या परिस्थितीचा लाभ नक्षलवाद्यांना होतो.

### गोंदिया जिल्ह्यातील नक्षलवाद

गोंदिया जिल्ह्यात नक्षलवाद्यांच्या भाकपा, मा–लेद्ध पीपल्स वार हा गट कार्यरत आहे. बालाघाट–उत्तर गडचिरोली–गोंदिया डिव्हिजनल कमेटी या क्षेत्रात कार्यरत आहे. १९८९ पासून गोंदिया जिल्ह्यात (जुना भंडारा जिल्ह्यात) हळूहळू नक्षलवाद्यांनी आपले पाय जमवणे सुरू केलेले होते. जवळच्या गडचिरोली जिल्ह्यात टिप्पागड, अहेरी दलमची निर्मिती करण्यात आलेली होती. गोंदिया जिल्ह्यात सर्वेक्षण सुरू होते. दाट जंगल, अशिक्षित आदिवासी, नक्षलवाद्यांप्रती आदराची भावना या अनुकूल गोष्टी लक्षात घेऊन गोंदिया जिल्ह्यात नक्षलवादी संघटना बनविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार २० एप्रिल १९९० ला देवरी दलमची निर्मिती करण्यात आली. रावजी तुलावी हा देवरी दलमचा प्रथम कमांडर होता.

१९८९ पासून आतापर्यंत नक्षलवाद्यांनी गोंदिया जिल्ह्यात करोडो रुपयांच्या राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान केले तसेच अनेक लोकांचे खूनही केलेत. गोंदिया जिल्ह्यात सालेकसा, देवरी, सडक/अर्जुनी, मोरगांव/अर्जुनी या तालुक्यात नक्षलवाद्यांचे जास्त प्रस्थ आहे. सालेकसा तालुक्यात १९८९ पासून २००९ पर्यंत नक्षलवाद्यांनी ४२ गुन्हे केलेले आहे. गोंदिया जिल्ह्यात सन १९९९ ते ३०/४/२००८ पर्यंत नक्षलवाद्यांनी ६३ गुन्हे केलेले आहेत.

१ ऑगस्ट १९९५ ला डोमाटोलाच्या जंगलात दामोदर वळतकर या पोलीस शिपायाचा खून करण्यात आला. बाकी शिपायांवर नक्षलवाद्यांनी गोळीबार केला. ३० मे २००५ ला बेवारटोला शिवारात पोलिसांची क्वालिस गाडी भुसूरंगाचा स्फोट करून उडवून देण्यात आली. या घटनेत २ पोलीस अधिकारी, ५ पोलीस कर्मचारी व खाजगी वाहन चालक जागीच ठार झालेत.

अशा अनेक घटनांची नक्षलवाद्यांनी या जिल्ह्यात पोलीस विभागाला नोंद घेण्यास भाग पाडले.

### नक्षलवाद्यांनी काम करण्याची पद्धत

नक्षलवाद्यांनी आदिवासी जंगली भागात आपला प्रभाव वाढविण्यासाठी आदिवासींची दिशाभूल करणे, सरकारच्या विरोधात गुन्हे करण्यास प्रवृत्त करणे, साम, दाम, दंड, भेद नीतीचा उपयोग करून दलममध्ये भरती करण्यास आदिवासींना प्रवृत्त करणे, पोलिसांच्या विरोधात मदत करणे, सहानुभूती दाखविणे अशा प्रकारे नक्षलवादी प्रभाव वाढविण्याचे काम करतात. रात्री किंवा दिवसा गावात जाणे, लोकांना जेवण मागणे, श्रीमंत, सावकार, दुकानदाराकडून पैसे व इतर साहित्याची मागणी करणे, नकार देणाऱ्यास ठार मारणे किंवा धमकी देणे, गावात रात्री सभा घेणे, त्यांना आपले विचार पटवून सांगणे, खबरी व्यक्तींचा शोध घेणे, त्याला ठार मारणे, अशी त्यांची काम करण्याची पद्धत आहे.

### वनवासींचे जीवन–नक्षलवादी शेतमजूरांचा देव

वनवासींना बारामाही काम मिळत नाहीत. तेंदूपत्ता व बांबूकटाई अशा दोन प्रकारच्या मजुरीवर इथले जीवन चालते पण ती मजुरी मिळायची नाही. नक्षलवाद्यांनी तो चौपट. पाचपट करून दिली पटवाऱ्यांकडे, वनाधिकाऱ्यांकडे जी कामे आठ दहा वर्षे खेटे घालून होत नव्हती.

ती कामे १० मिनिटात होऊ लागली. याचा परिणाम असा झाला की रोजीरोटींचा प्रश्न सोडविणारा नक्षलवादी शेतमजुरांचा देव झाला! एखादा नक्षलवादी घरात दडून बसला असेल तर तो मात्र सापडू नये, अशी जीवला जीव देणारी वनवासी संस्कृती नक्षलवाद्यांसाठी अभेद्य तटबंदी झाली.

आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश व महाराष्ट्रात मात्र कोंडापल्ली सीतारमय्या यांच्या नेतृत्वाखालील पीपल्स वॉर ग्रुप ही अत्यंत जहाल संघटना सक्रीय राहून अनेक दलम निर्मिती करण्यात यशस्वी झाली.

सामान्यतः तालुका हे नक्षलवाद्यांचे केंद्र असते. त्यांच्या कामाच्या दोन पद्धती ठरवल्या आहेत. एक दलम आणि दुसरे संघम म्हणजे गावात काय चालले आहे काय नाही याची खडान्‌खडा माहिती असणाऱ्या निरोप्या संघमने पुरविलेल्या माहितीच्या आधारावर कारवाई करणारा शस्त्रसज्ज आणि गणवेशात वावरणारा माणूस म्हणजे दलमचा कार्यकर्ता. सर्व कार्यवाही दलम कमांडरच्या आदेशानुसार होते. त्यांच्या कामात अडथळा उत्पन्न करणाऱ्यास अतिशय क्रुरपणे ठार जाते. बंदुकीची गोळी घालून मारले तरी त्याचे तुकडे करून टांगून ठेवण्यात येतात, जेणेकरून दहशत निर्माण होईल. दलम ही नक्षलवादी कारवायांचा गाभा आहे.

थोडक्यात, जातीजातीचे राजकारण थांबविणे, रोजगार वाढविण्यासाठी मूलभूत विकासाच्या सोयी आरोग्य, शैक्षणिक, पाणी, रस्ते, विद्युतपुरवठा या मूलभूत सोयींची पूर्तता करावी. दहशतवादी कारवाया विरोधी ग्रामीण जनतेला प्रबोधन झाले पाहिजे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या समस्या लक्षात घेऊन त्यावर उपाययोजना करून जेणे करून त्यांनी नक्षलवाद्यांपासून फारकत करणे, नक्षलवाद्यांच्या विरोधातील कारवाईचे चांगले परिणाम हाती यावेत म्हणून सुरक्षा दलांनी आपल्या डावपेचात आमूलाग्र बदल करून, नक्षलवादी जंगलात लपून राहात असल्याने त्यांना हुडकून काढण्यासाठी, नेमका ठावठिकाणा शोधला पाहिजे.

नक्षलवादरूपी दहशतवाद आटोक्यात आणण्यासाी सरकार, जनता आणि नक्षलवादी समूह यांच्यात समन्वय साधून सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न करावा जेणे करून नक्षलवाद कमी होण्यास मदत होईल!

## ९.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) भारतीय राजकारणातील जमातव्यवस्था विकासाची मीमांसा करा.

----------------------------------------------

----------------------------------------------

२) भ्रष्टाचार

----------------------------------------------

----------------------------------------------

## ९.४ सारांश

समाजजीवनावर वर्ग पद्धतीचा निश्चितपणे परिणाम होतो. मग ते वर्ग असोत, जाती असतो, असेच काही प्रादेशिकतेबाबतही आहे. त्यामुळे देशाच्या एकात्मतेला तडे जातात. सामाजिक आणि आर्थिक मागासलेपणा, शिक्षणाच्या सुविधा, आरोग्य, दळण-वळण या सर्वांच्या अपुरेपणामुळे सामान्य लोक शासनापासून दुरावले जातात आणि त्याचा फायदा नक्षलवाद्यांना होतो. तेव्हा शासनाने याकडे लख पुरवायला हवे.

## ९.५ पारिभाषिक शब्द

१) भ्रष्टाचार : Corruption

२) लिंग भेद : Gender Inequality

## ८.६ संदर्भसूची


- आधुनिक भारताचा इतिहास - ग्रोव्हर-बेल्हेकर, एस.चांद, दिल्ली (२००७).
- फडके य. दि., जम्म-काश्मीर स्वायत्ता की स्वातंत्र्य?, अक्षर प्रकाशन, मुंबई (२००१).
- वर्तमान भारत - वेदप्रताप वैदिक, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली(२००२).
- आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य-कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७-२०००).
- स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास - सरदेसाई म. हि., गोवा, दमण, दीव, खंड - १, पणजी सरकार (१९८६).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स - बिपिनचंद्र (अनु. पारशी मा. कृ. व इतर), के.सागर, पुणे (२००४).

# घटक १०

# नवशतकाची वाटचाल

**अनुक्रमणिका**


१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ विषय विवेचन

१०.२.१. शिक्षण

१०.२.२. विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास

१०.२.३. अणुसंशोधक

१०.२.४. अवकाश संशोधन

१०.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१०.४ सारांश

१०.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

१०.६ संदर्भग्रंथसूची


## १०.० उद्दिष्टे

१) स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण व्यवस्थेत झालेल्या बदलांचा आढावा घेता येईल.

२) अणुसंशोधकात भारताने केलेल्या प्रगतीचे मूल्यमापन करता येईल.

३) विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास स्पष्ट करता येईल.

४) अवकाश संशोधनाचे टप्पे अभ्यासता येतील.

## १०.१ प्रस्तावना

स्वातंत्र्याप्राप्तीनंतर भारत सरकारने आपली शिक्षणविषयक उद्दिष्टे व धोरणे निर्धारित केली. तसेच विज्ञान व तंत्रज्ञानाच्या विकासाकरिता ध्येय-धोरणे निश्चित करण्यात आली. भविष्याचा वेध घेणाऱ्या जवाहरलाल नेहरूंच्या दूरदृष्टीने संपन्न व बलशाली भारताचे स्वप्न पाहिले होते.

## १०.२ विषय विवेचन

### १०.२.१. शिक्षण

भारताने अंगिकृत केलेला लोकशाही शासनव्यवस्थेचा मार्ग लाभदायक ठरण्यासाठी देशाच्या तळागाळात पोचणारी साक्षरतेची व्यापक मोहीम होती घेणे, सर्व तरुण पिढीच्या

शिक्षणाची व्यवस्था करणे, उच्च शिक्षणाचा दर्जा सुधारणे, विज्ञान व तंत्रज्ञानाचे अद्यावत शिक्षण भारतीयांना उपलब्ध करून देणे, शिक्षणाची प्रत्यक्ष व्यावहारिक जीवनाशी सांगड घालणे इत्यादी मूलभूत उद्दिष्टे भारत सरकारने निर्धारित केली व ती द्रुतगतीने साकार करता यावीत या दृष्टीने शिक्षणविषयक धोरणे आखली.

### १९६४ सालचा शिक्षण आयोग

पहिल्या दोन पंचवार्षिक योजनाच्या काळात भारतातील शैक्षणिक क्षेत्रात बरीच प्रगती झाली असली तरी राष्ट्रीय स्तरावर शिक्षणाच्या सर्व अंगांचा व पैलूंचा एकत्रित विचार करणारी सुसंगत अशी सर्वांगीण राष्ट्रीय शिक्षण योजना तयार केली गेली नाही. ही उणीव भरून काढण्यासाठी १९६४ साली सादर केलेल्या अहवालाच्या आधारे १९६८ साली राष्ट्रीय शिक्षण नीतीबाबत एक प्रस्ताव पारित केला. त्यात राष्ट्रीय शिक्षण पद्धतीची उद्दिष्टे व निर्देशक तत्त्वे स्पष्टपणे निर्दिष्ट केली गेली. चौदा वर्षे वयापर्यंतच्या मुलांना शिक्षण सक्तीचे व निःशुल्क असावे. देशाच्या सर्व भागात प्राथमिक व माध्यमिक शिक्षण उपलब्ध करून दिले जावे, ग्रामीण भागातील शिक्षणावर आणि महिला व दलित वर्गाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविले जावे; शालेय शिक्षकांच्या प्रशिक्षणाची तरतूद केली जावी व त्यांना पुरेसे वेतन दिले जावे; संपूर्ण देशात शालेय स्तरापर्यंत समान अभ्यासक्रम असावा व त्यावर समान क्रमिक पुस्तके तयार केली जावीत; प्रादेशिक भाषा हे शिक्षणाचे माध्यम असावे. उच्च शास्त्रीय, तांत्रिक व कृषी शिक्षणाचा व संशोधनाचा दर्जा सुधारण्यासाठी मोजक्या पण सर्व सोयी असलेल्या शिक्षण संस्था असाव्यात; शारीरिक शिक्षणाकडे लक्ष पुरविले जावे; शालेय व महाविद्यालयीन शिक्षणाचा आकृतिबंध १०:२:३ असा असावा, अशा अनेक शिफारशी या आयोगाने केल्या.

शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरविण्यासाठी १९८४ साली शिक्षणाचे स्वतंत्र खाते एका केंद्रीय मंत्र्याच्या हाती सोपविण्यात आले. व्यावसायिक शिक्षण, तांत्रिक शिक्षण व महिला शिक्षण प्रसार, तसेच बुद्धिमान शाळकरी मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या हेतूने शिक्षणपद्धतीत बदल करण्याबाबत केंद्र शासनाने नवे धोरण आखले. त्यातून नवोदय विद्यालयांचा उपक्रम जन्माला आला.

### प्राथमिक शिक्षण

प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारासाठी पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत स्थानिक संस्थांना प्रोत्साहन दिले गेले. परिणामतः १९५० ते १९६० च्या दरम्यान प्राथमिक शाळांची संख्या अडीच पटीने, तर शाळकरी मुलांची संख्या तिपटीवर वाढली. या क्षेत्रातील अनेक त्रुटींवर शिक्षण आयोगाने आपल्या १९६६ सालच्या अहवालात बोट ठेवले. त्या शिक्षणाचे हात अनुसूचित जाती-जमाती, शेतमजुरांची मुले व मुली यांच्यापर्यंत पोचलेले नाहीत, शाळांना इमारती नाहीत, प्रशिक्षित शिक्षक पुरेसे नाहीत, शिक्षणाचा दर्जा सुधारलेला नाही, यावर विशेष भर होता. या त्रुटी दूर करण्याच्या उद्देशाने पाचव्या व सहाव्या पंचवार्षिक योजनेत तरतुदी करण्यात आल्या. परिणामतः १९८५ पर्यंत प्राथमिक शिक्षण निःशुल्क व सक्तीचे झाले आहे.

### माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी आवश्यक त्या शिफारशी करण्याचे काम १९५२ साली मद्रास विद्यापीठाचे कुलगुरू व प्रख्यात शिक्षणतज्ज्ञ लक्ष्मणस्वामी मुदलियार यांच्या अध्यक्षतेखालील समितीकडे सोपविण्यात आले. या समितीने १९५३ साली सरकारला सादर केलेल्या अहवालात शिक्षणाची मूलभूत उद्दिष्टे नमूद करून शालेय शिक्षण पद्धतीत बदल करण्याबाबत शिफारसी केल्या. शालेय शिक्षणाने मुलांच्यात सामाजिक जाण आणि व्यावहारिक जीवनाला खंबीरपणे सामोरे जाण्याची कुवत निर्माण करावी व राष्ट्रीय चारित्र्यसंवर्धन करावे व ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी, शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय केली जावी, त्यांना पुरेसे वेतन दिले जावे, शालेय शिक्षणाचे माध्यम मातृभाषा हे असले तरी शाळातून मातृभाषेबरोबरच राष्ट्रभाषा व इंग्रजी भाषाही शिकविल्या जाव्यात, शालेय अभ्यासक्रम अद्यावत असावा, शालान्त परीक्षेनंतर मुलांना स्वतंत्र व्यवसाय करता यावा यासाठी तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणावर भर देणाऱ्या बहुउद्देशीय शाळा स्थापन केल्या जाव्यात इत्यादी शिफारसी मुदलियार समितीने केल्या. या समितीच्या शिफारशीनुसार देशाच्या अनेक भागात बहुउद्देशीय शाळा स्थापन करण्यात आल्या. १९५९ ते १९८५ च्या दरम्यान शालेय विद्यार्थ्यांची संख्या दहा पटीने वाढली. शालेय शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या कामी १९६१ साली प्रस्थापित झालेली नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशनल रिसर्च ॲण्ड ट्रेनिंग (एन. सी. ई. आर. टी.) ही संस्था मौलिक योगदान करते.

### विद्यापीठ स्तरावरील शिक्षण व संशोधन

स्वतंत्र भारतात उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात विशेष लक्षणीय प्रगती झाली. १९४७ साली विद्यापीठातील विद्यार्थ्यांची तीन लक्षाची संख्या १९८५ पर्यंत चाळीस लक्षावर गेली. देशातील उच्च शिक्षण अद्यावत दर्जाचे असावे या दृष्टीने प्रचलित शिक्षणपद्धतीत बदल सुचविण्यासाठी १९४८ साली डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली. या समितीन भारतीय विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमांचा आढावा घेऊन उच्च शिक्षणाच्या हेतूने काही महत्त्वाच्या शिफारशी केल्या. शालेय शिक्षणक्रमाचा काळ बारा वर्षांचा व महाविद्यालयीन शिक्षणाचा तीन वर्षे असावा असे या समितीने सुचविले. विद्यापीठे स्वायत्त असावीत; उच्च शिक्षणावरील खर्चात वृद्धी केली जावी; विद्यापीठांना वेळोवेळी आवश्यक ते मार्गदर्शन करून विद्यापीठीय शिक्षणात सुसंगती आणण्यासाठी विद्यापीठ अनुदान मंडळाची सथापना केली जावी, अशी सूचना राधाकृष्णन समितीने केल्या.

या शिफारशींनुसार १९५६ साली विद्यापीठ अनुदान मंडळाची निर्मिती केली गेली. विद्यापीठांची कार्यपद्धती व धोरणे यांच्यात समन्वय साधून पदव्युत्तर शिक्षण व संशोधन यांना प्रोत्साहन व मदत देण्याचे मोलाचे कार्य या मंडळाकडे आले. आता सन २००१ च्या जनगणनेनुसार भारतातील साक्षरतेचे प्रमाण ६५.३८% इतपत वाढले असून, पुरुषांमधील साक्षरतेचे प्रमाण ७५.८५% तर स्त्रियांमधील साक्षरतेचे प्रमाण ५४.१६% इतके आहे. त्र्याण्णवावे घटनादुरुस्तीन्वये ६ ते १४ वयोगटातील बालकांसाठी शिक्षण हा आता मूलभूत हक्क ठरला आहे.

अशाप्रकारे स्वातंत्र्योत्तर काळात देशात शिक्षणाचा प्रसार करणाऱ्या अद्यावत ज्ञानाचा उपयोग समाज जीवन समृत करण्याच्या व ज्ञानाच्या कक्षत्त विस्तारण्याच्या दृष्टीने प्रस्थापित करण्यात आलेल्या शैक्षणिक संस्थांनी, समित्यांनी व आयोगांनी केला. प्राथमिक शिक्षणापासून ते मौलिक संशोधनापर्यंतच्या क्षेत्राचा भक्कम पाया तयार होऊन त्या आधारावर शैक्षणिक विकासाचा लांबचा पल्ला गाठणे भारताला शक्य झाले.

राष्ट्राचे भवितव्य बऱ्याच अंशी शिक्षणावर अवलंबून असल्यामुळे शिक्षणपद्धती व अभ्यासक्रमाचे स्वरूप भारतीय जीवनपद्धतीशी, जीवनमूल्यांशी व राष्ट्रीय गरजांशी निगडित करण्यास अग्रक्रम देणे अत्यंत अगत्याचे आहे, याची जाणीव शिक्षणतज्ज्ञांत असूनही प्रत्यक्षात मात्र त्या अनुरोधाने आखलेले व अंमलात आलेले उपक्रम उद्दिष्टसिद्धीच्या दृष्टीने अपुरे पडत आहेत. ही बाब निश्चितच अतिशय खेदजनक आहे.

### १०.२.२. विज्ञान व तंत्रज्ञानाचा विकास

विज्ञान आणि तंत्रवैज्ञानिक विकास स्वयंपूर्णतेने होण्याच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणून ४ जानेवारी १९४७ रोजी राष्ट्रीय पदार्थविज्ञान प्रयोगशाळेची कोनशिला बसविण्यात आली. राष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीच्या दृष्टीने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रगतीचे धोरण निर्धारित करून देणारा १९५८ सालचा केंद्र सरकारने पारित केलेले ठरावा महत्त्वाचा ठरतो. या ठरावाने विज्ञान व तंत्रज्ञान विकासाचा मूलाधार घालून दिला. या क्षेत्रात होतकरू तरुणांना अद्यावत ज्ञान मिळविता यावे या हेतूने देशाच्या भिन्न भागात इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (बंगलोर), खडकपूर, पवई, कानपूर, मद्रास इत्यादी ठिकाणच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी यांसारख्या संस्था प्रस्थापित करण्यात आल्या. शास्त्रीय पद्धतीने कृषी उत्पादनाला चालना देण्यासाठी शेतकी संशोधन संस्थाही स्थापन करण्यात आल्या. या भिन्न क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना देशाच्या विकास योजनांची माहिती देऊन, त्या अनुरोधाने त्यांना कार्य करण्यासाठी मार्गदर्शन व आर्थिक साहाय्य देण्यास इंडियन कौन्सिल ऑफ सायन्टिफिक अ‍ॅण्ड इंडस्ट्रियल रिसर्च, इंडियन कौन्सिल ऑफ रिसर्च, इंडियन कौन्सिल ऑफ अ‍ॅग्रिकल्चरल रिसर्च यांसारखी राष्ट्रीय मंडळेही प्रस्थापित करण्यात आली. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील नव्या संशोधन कार्यांचा लाभ प्रत्यक्ष व्यवहारात व्हावा म्हणून संशोधन संस्था, औद्योगिक संस्था व कारखाने यांच्यात परस्पर संपर्क प्रस्थापित करण्यास मदत करणाऱ्या राष्ट्रीय समित्याही प्रस्थापित करण्यात आल्या.

### १०.२.३. अणुसंशोधन

अणुशक्तीचा वापर मानवी समाजाच्या भौतिक विकासासाठी करून घेता येईल याची जाणीव असल्याने नेहरूंना या विषयात विशेष रूची होती. तज्ज्ञ मंडळींच्या मदतीने भारतात अणुशक्ती उत्पादित करून तिला विकासाच्या दावणीला जुंपण्याचा त्यांनी घेतलेला निर्णय १९४८ साली अणुशक्ती समितीच्या स्थापनेने साकार झाला. जागतिक कीर्तीचे डॉ. होमी भाभा यांची या समितीच्या अध्यक्षपदी नियुक्ती केली. तसेच केंद्रशासनात अणुशक्ती खातेही निर्माण करण्यात आले. मुंबईनजीक ट्रॉम्बे येथे अणुभट्टी केंद्र प्रस्थापित करण्यात आले. जीवशास्त्र, पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, धातुशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स या पाच प्रमुख ज्ञानशाखांत

व त्यांच्या घटकशाखांत मूलभूत संशोधनाची व्यवस्था येथे करण्यात आली. प्रारंभी अणुशक्ती निर्मितीसाठी लागणाऱ्या युरेनियम करिता भारताला पाश्चिमात्य राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागे. ते पुरविण्यात ही राष्ट्र चालढकल करतात, तसेच ते पुरविण्यासाठी परराष्ट्रीय धोरणाबाबत ही राष्ट्रे भारतावर दडपण आणतात असा अनुभाव घेऊ लागतात, या धातूचा देशात शोध घेण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. या प्रयत्नाला अंशतः यश मिळाले. बिहार राज्यात युरेनियम खनिजांचा शोध लागल्याने हे परावलंबित्व काही अंशी कमी झाले. हळूहळू ट्रोम्बेच्या अणुशक्ती केंद्रात परमाणू संशोधनासाठी लागणारी यंत्रसामुग्री व उपकरणे तयार होऊ लागली. महत्त्वाच्या औषधाबाबतही संशोधने होऊ लागली. कर्करोगासारख्या दुर्धर रोगावरील उपचारासंबंधी प्रयोग होऊ लागले. ध्यानाचा दर्जा व उत्पादनाचे प्रमाण सुधारण्यासाठी व खाद्य पदार्थ टिकविण्याच्या हेतूने नवे नवे प्रयोग होऊ लागले. ट्रॉम्बेप्रमाणे तारापूर, कल्पकम् येथेही अणु संशोधन संस्था अस्तित्वात आल्या. राष्ट्रीय अणुशक्ती समितीच्या अधिकारक्षेत्र ट्रोम्बेमधील भाभा ॲटॉमिक रिसर्च सेंटर, कल्पकम् येथील रिॲक्टर रिसर्च सेंटर, मुंबई टाटा इन्स्टिट्यू ऑफ फंडामेंटल रिसर्च, कलकत्ता येथील साहा इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लियर फिजिक्स, तारापूरचे ॲटॉमिक पॉवर स्टेशन, हैद्राबादचे न्यूक्लियर फ्यूएल कॉम्प्लेक्स, मद्रासमधील ॲटॉमिक पॉवर स्टेशन, नान्गल, कोटा, तुतिकोरिन येथील हेवी वॉटर प्लान्ट इत्यादी प्रकल्पांचा अंतर्भाव होतो. अणुशक्तीचा वापर विनाशकारी कार्यासाठी न करता शांततापूर्ण विकासासाठीच केवळ केला जाईल या नेहरू काळात घेतलेल्या निर्णयापासून भारत आजही ढळलेला नाही.

१० ऑक्टोबर १९४८ रोजी भारतात अणु ऊर्जा आयोग स्थापन करण्यात आला. ३ ऑगस्ट १९५४ रोजी भारत सरकारच्या अणु ऊर्जा विभागाची स्थापना करण्यात आली. १९५६ मध्ये ट्रॉम्बे येथे पहिली अणु संशोधन भट्टी 'अप्सरा' सुरू करण्यात आली. १९६० मध्ये अणु अनुसंधान भट्टी 'साइरस' कार्यान्वित झाली. यानंतर १९६० मध्ये अणु अनुसंधान भट्टी 'नरलिना' कार्यान्वित झाली. भारताने १८ मे १९९८ मध्ये प्रधानमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांचे काळात दुसऱ्यांदा अणुचाचणी केली.

## १०.२.४. अवकाश संशोधन

### पूर्वकाळ

सध्याचे भारताचे आधुनिक अंतराळ संशोधन याचा मागोवा कलकत्ता येथील सास्त्रज्ञ एस. के. मित्रा यांचे कार्यापर्यंत पोचतो त्यांनी सन १९२० मध्ये आयनोस्फिअर व रेडियो याबाबत अनेक प्रयोग केलेत. त्यानंतर रमण व मेघनाद साह सारख्या अनेक भारतीय शास्त्रज्ञांनी अंतराळ संशोधनासाठी आवश्यक असलेल्या शास्त्रीयत्त्वात योगदान दिले. तसेच सन १९४५ नंतरच्या काळात अंतराळ संशोधनात भारताची बरीच प्रगती झाली. अहमदाबाद येथील भौतिक संशोधन प्रयोगशाळा सुरू करणारे विक्रम साराभाई व होमी भाभा, ज्यांनी सन १९४५ मध्ये टाटा इन्स्टिट्यूट ऑफ फंडामेंटल रिसर्चच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका निभावली, या दोघांचा भारताच्या संघटित अंतराळ संशोधनात मोलाचा वाटा आहे. अंतराळ संशोधनातील प्राथमिक प्रयोगात, वैश्विक किरण, अत्युच्च पातळीवर व अवकाशात अनेक

उपकरणांची तपासणी आणि कोलार येथील खाणीत, (जी जगात सर्वांत खोल खाणींपैकी एक समजली जाते) भूगर्भाच्या बरेच आत, अनेक महत्त्वाचे प्रयोग इत्यादींचा तसेच पृथ्वीच्या वरील वातावरणाचा अभ्यास आदींचा समावेश होतो.

हा अभ्यास संशोधन प्रयोगशाळेत अनेक विद्यापीठात आणि वेगवेगळ्या स्वतंत्र जागेत केला गेला. सन १९५० मध्ये यात सरकारचा दृश्य सहभाग दिसून आला जेव्हा भारत सरकारने अणु ऊर्जा खात्याची स्थापना केली व होमी भाभा यांना त्याचे सचिव म्हणून नेमले.

भारतीय अणु ऊर्जा खात्याने भारतभर अवकाश संशोधनासाठी पैसा पुरविणे सुरू केले. मुंबईत कुलाबा येथे सन १८२३ मध्ये वेधशाळा सुरू केल्यापासून पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राबाबत भारतात प्रयोग सुरू आहेत. त्यामुळे भूगर्भशास्त्राविषयी महत्त्वाची माहिती मिळत गेली. उत्तर प्रदेश राज्यामधील हिमालयाच्या पायथ्याशी सन १९५४ मध्ये एक वेधशाळाही स्थापन करण्यात आली. त्यानंतर हैद्राबाद येथे उस्मानिया विद्यापीठात रंगापूर वेधशाळाही स्थापन करण्यात आली. या दोन्ही वेधशाळेस संयुक्त राज्य अमेरिकेचे तांत्रिक व शास्त्रीय पाठबळ मिळाले. भारताचे पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंनी अवकाश संशोधन कार्यक्रमास पुढे प्रोत्साहने दिले. सन १९५७ मध्ये सोव्हिएत संघाने स्फुटनिकचे यशस्विरित्या प्रक्षेपण करून संपूर्ण जगास अवकाश प्रक्षेपणाचा मार्ग खुला करून दिला. भारतीय राष्ट्रीय अवकाश संशोधन समितीची (खछउजडझअठ) सन १९६२ मध्ये स्थापना करण्यात येऊन विक्रम साराभाई यांना त्याचे अध्यक्षपद देण्यात आले. सन १९६० मध्ये सुरुवात करून सोव्हिएत संघासोबतच्या मजबूत गठबंधनाने इस्त्रोस त्याचा अवकाश कार्यक्रम व भारतात अणु ऊर्जा कार्यक्रम राबविणे सोपे झाले. हे दि. १८ मे १९७४ ला पोखरण येथे हसरा बुद्ध या संकेतिक नावांतर्गत भारताचा प्रथम चाचणी अणुस्फोट केल्यानंतरही सुरू होते. दि. २७ जानेवारी १९६६ रोजी होमी भाभा यांचा विमान अपघातात झालेला मृत्यू हा भारताच्या अवकाश कार्यक्रमास बसलेला एक मोठा धक्का होता. भाभांच्या मृत्यूनंतर, साराभाई यांना अणुऊर्जा कमिशनचे अध्यक्ष म्हणून व अणु ऊर्जा खात्याचे सचिव म्हणून नेमले गेले. सन १९६० या वर्षाने अवकाश विज्ञान व तंत्रज्ञान केंद्र आणि प्रायोगिक उपग्रह दळवळण भूस्थापनकाचे श्रीहरीकोटा तळ तसेच भारतीय उपग्रह प्रणाली प्रकल्प याची स्थापना झाली. सन १९६९ मध्ये विक्रम साराभाई यांनी भारतीय अंतराळ संशोधन संस्थेस आधुनिक रूप दिले. ही संस्था भारतीय गणराज्याच्या सर्व अवकाश कार्यक्रमाचे नियंत्रण घेणार हाती.

**ध्येय व उद्दिष्टे**

इस्त्रोचा मूळ उद्देश अवकाश तंत्रज्ञानाचा विकास करणे व त्याचा उपयोग विविध राष्ट्रीय कार्यात करणे हा भारतीय अंतराळ विकास कार्यक्रम डॉ. विक्रम साराभाई यांच्या दूरदृष्टित्वाने चालला होता. त्यांना भारतीय अंतराळ कार्यक्रमाचे जनक समजले जाते. त्यांच्यामते भारतीय अवकाश संशोधनाचे उद्दिष्टे होते की, 'आम्हाला आर्थिकदृष्ट्या प्रगतीशील राष्ट्रांशी चंद्राच्या शोधाबद्दल, ग्रह वा मानवासहित अवकाश उड्डाणाबद्दल चढाओढ करण्याबद्दल काहीच स्वारस्य नाही. पण राष्ट्रात व राष्ट्रांच्या समूहात जर आम्हास अर्थपूर्ण भूमिका निभावयाची असेलतर , आम्ही मानवांचे व समाजाचे खरेखुरे प्रश्न सोडविण्याचा

प्रगत तंत्रज्ञानाचा वापर करण्यास प्रथम राहू.'

भारताच्या आर्थिक प्रगतीने त्यांचा अंतराळ कार्यक्रम ठळकपणे व प्रामुख्याने दिसू लागला. अंतराळ तंत्रज्ञानात जास्तीतजास्त स्वंयपूर्णतेची या देशाची भूमिका राहिली. न्युजविक या प्रसिद्ध दैनिकाचे लेखन हेणॉक (Hennock) नुसार, भारत त्याच्या अंतराळ शोधास त्यांच्या राष्ट्रीय मानबिंदूशी जोडले. पुढे ते म्हणतात, ''या वर्षी भारताने एकूण ११ उपग्रह प्रक्षेपित केले. ज्यातील ९ हे इतर देशांचे होते. तो १० उपग्रह एकाच अग्नीबाणाने प्रक्षेपित करणारा पहिला देश आहे.''

**प्रक्षेपण यानांचा ताफा**

१९६० व १९७० च्या दशकात जागतिक राजकारण व आर्थिक बाबींच्या विचाराने भारतास स्वतःचा प्रक्षेपण यान कार्यक्रम राबविणे भाग पडले. प्रथम स्तरात, (१९६०-१९७० चे दशक) भारताने आपला दणदणीत अग्नीबाण विकास कार्यक्रम पूर्ण केले. १९८० च्या दशकात, संशोधनाने उपग्रह प्रक्षेपण याअ

न-३ चे उत्पादन केले गेले आणि अतिप्रगत असे (Augmented Satelite Launch Vehicle - ASLV) संपूर्ण कार्यरत अशा साधनांसह इस्त्रोन तदनंतर संपूर्ण कार्यक्षमता यान बनविण्यावर केंद्रित केली.

**उपग्रह प्रक्षेपण यान** (SLV) :- भारतीय उपग्रह प्रक्षेपण यानाचे काम १९७० मध्ये इस्त्रोने सुरू केले. या कामाचे प्रोजेक्ट लीटर डॉ. ए. पी. जे. अब्दूल कलाम होते. उपग्रह प्रक्षेपण यानाने ४०० कि. मी. ची उंची गाठावी असा या कामाचा मुख्य उद्देश होता. उपग्रह प्रक्षेपण यान हे चार स्टेज रॉकटे आहे व याच्या प्रत्येक स्टेजमध्ये सॉलीड प्रोपेलंट मोर्टास वापरल्या जातात. यातील प्रथम प्रक्षेपण सन १९७९ मध्ये झाले.

**सुधारित उपग्रह प्रक्षेपण यान** (ASLV) :- Augmented Satellite Launch Vehicle - ASLV), हा पाच स्टेज रॉकेट आहे. याची १५० कि. गॅं. उपग्रह वाहून नेण्याची क्षमता आहे. हा प्रकल्प इस्त्रोने १९८० च्या सुरुवातीला सुरू करून पृथ्वीच्या कक्षेत उपग्रह व्यावसायिक तत्त्वावर स्थापित करण्यास सुरुवात केली. पहिली चाचणी १९८७ आणि त्यानंतर १९८८, १९९२ आणि १९९४ या चार पैकी दोन चाचण्या यशस्वी झाल्या.

**धृविय उपग्रह प्रक्षेपण यान** (PSLV) :- धृवीय उपग्रह प्रक्षेपक वाहन इंग्रजीत P. S. L. V. (Polar Satellite Launch Vehicle) असे याचे संक्षिप्त नाव असून इस्त्रोच्या कामगिरीतला हा मानाचा तुरा आहे. केवळ भारतीय नव्हे तर इतरही देशांचे उपग्रह सुद्धा अवकाशात पाठवून परकीय चलन मिळवण्यात आणि अवकाश स्पर्धेत भारताला आघाडीत आणण्यात याचा महत्त्वाचा वाटा आहे. या प्रक्षेपकाची उंची ४४ मीटर तर, वजन २३० टन आहे. २००८ मध्ये 'इस्त्रो'ने याचा वापर करून एकाचवेळेस दहा उपग्रह प्रक्षेपित करून विश्वविक्रमाची नोंदी केली होती. हे संपूर्ण स्वदेशी बनावटीचे असून इस्त्रो (ISRO - Indian Space Research Organization) ने केली आहे. पी. एस. एल. व्ही. भूस्थिर कक्षेत (Geostationary Transfer Orbit - GTO) उपग्रह नेऊ शकते. आतापर्यंत १९

भारतीय तर २२ विदेशी असे ४१ उपग्रह इस्त्रोने अवकाशात यशस्वीरित्या पाठवले आहेत. पी. एस. एल. व्ही. च्या एका उड्डाणाचा खर्च साधारण १.७ करोड अमेरिकन डॉलर इतका आहे.

**भूस्थिर उपग्रह प्रक्षेपण यान** (GSLV) **:-** The Geosynchronous Satellite Launch Vehicle, usually know by its abbreviation GSLV, is an Expendable Launch system developed to enable India to launch its INSAT - type satellite into geostationary orbit and to make India less dependent on foreign rockets. At present, it is ISRO's heaviest satellite launch vehicle and is capable of putting a total payload of up to 5 tons to low Earth Orbit0

**भूनिरीक्षण व दळणवळण उपग्रह**

भारताचा प्रथम उपग्रह आर्यभट्ट याचे सन १९७५ मध्ये सोव्हिएत रशियाद्वारे प्रक्षेपण केले गेले. त्यानंतर रोहिणी क्रमावलीतील प्रायोगीक उपग्रह हे तयार करून प्रक्षेपीत केले गेले. सध्या इस्त्रोजवळ अनेक भूपाहणी उपग्रह आहेत.

## १०.३ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१) स्वातंत्र्योत्तर भारतातील शिक्षण विषयक धोरणाचे मूल्यमापन करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

२) भारताने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा आढावा घ्या.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

३) अणुसंशोधन व अवकाश संशोधनातील भारताची बलस्थाने स्पष्ट करा.

-----------------------------------------------

-----------------------------------------------

## १०.४ सारांश

स्वातंत्र्योत्तर काळात भारताने धर्मनिरपेक्ष तसेच विज्ञानावर आधारित शिक्षणाची कास धरल्याने भारतात आता सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. तसेच विज्ञान व तंत्रज्ञानावरील प्रगतीमुळे आता भारत चंद्रयान तसेच मंगळयान मोहीम राबवित आहे हे भारताचे मोठे यश आहे.

## १०.५ पारिभाषिक शब्द

## १०.६ संदर्भसूची


- आधुनिक भारताचा इतिहास - ग्रोव्हर-बेल्हेकर, एस.चांद, दिल्ली (२००७).
- फडके य. दि., जम्म-काश्मीर स्वायत्ता की स्वातंत्र्य?, अक्षर प्रकाशन, मुंबई (२००१).
- वर्तमान भारत - वेदप्रताप वैदिक, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली(२००२).
- आधुनिक भारताचा इतिहास - वैद्य-कोठेकर, साईनाथ प्रकाशन, नागपूर (१९४७-२०००).
- स्वातंत्र्य लढ्याचा इतिहास - सरदेसाई म. हि., गोवा, दमण, दीव, खंड - १, पणजी सरकार (१९८६).
- इंडिया आफ्टर इंडिपेंडन्स - बिपिनचंद्र (अनु. पारशी मा. कृ. व इतर), के.सागर, पुणे (२००४).

# एम . ए . इतिहास

# द्वितीय वर्ष

# पेपर ः 3

## मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास

# घटक १
# साधने

**अनुक्रमणिका**


१.० उद्दिष्टे

१.१ प्रस्तावना

१.२ विषय विवेचन

 १.२.१ शिवकालीन इतिहासाची वाङ्मयीन साधने

 १.२.२ परकीय प्रवाशांची प्रवासवर्णने

 १.२.३ पुरातत्वीय साधने – १) पुरातत्वीय वास्तू २) दप्तर खात्यातील कागदपत्रे

१.३ स्वयं अध्ययन प्रश्न

१.४ सारांश

१.५ पारिभाषिक शब्द

१.६ संदर्भ सूची


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला

१) मध्ययुगीन महाराष्ट्रातील मराठा कालखंडाच्या ऐतिहासिक साधनांचे महत्व व स्वरूप स्पष्ट करता येईल.

२) ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासाने मध्ययुगीन महाराष्ट्राची राजकीय, सामाजिक, आर्थिक परिस्थितीची माहिती मिळेल.

३) ऐतिहासिक साधनांच्या उपलब्धतेमुळे मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाची सुसंगतवाद मांडणी कशी झाली आहे लक्षात येईल.

४) ऐतिहासिक साधनांच्या अभ्यासातून शिलालेख, ताम्रपट, नाणी, चित्रे, नकाशे, किल्ले, वाडे, समकालीन ग्रंथ, परकीय प्रवाशांचे प्रवासवर्णन इत्यादीची माहिती होईल.

५) मराठ्यांच्या राज्यकारभाराचे वर्णन करता येईल.

६) मध्ययुगीन महाराष्ट्राच्या साधनांमध्ये अस्सल कागदपत्रे, संस्कृत, फार्शी, परकीय पाश्चात्य भाषेतील साधने इत्यादीची माहिती मिळेल.

## १.० प्रस्तावना

शिवकाल म्हणजे स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज आणि छत्रपती राजाराम महाराजांनंतर मराठ्यांचा मोगलांशी झालेला स्वातंत्र्य संग्राम हा कालखंड म्हणजे इ. स. १६३० पासून ते १७०७ पर्यंतचा कालखंड होय. या कालखंडाला मराठ्यांच्या इतिहासात शिवकाल म्हणून संबोधले जाते. मा शिवकालाचा इतिहास तयार करणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. कारण या कालखंडाची विश्वसनीय अशी ऐतिहासिक अस्सल साधने फारशी उपलब्ध नाहीत. शिवकालाच्या बाबतीत अस्सल साधनांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. दरबारी किंवा प्रशासकीय स्वरूपाचा पत्रव्यवहार इतिहास लिहिण्यासाठी अत्यंत उपयुक्त असतो. परंतु शिवकालाच्या संदर्भात अशा स्वरूपाचा पत्रव्यवहार अगदी अल्प प्रमाणात उपलब्ध आहे. कारण छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर सम्राट औरंगजेबाने दक्षिणेची मोहिम सुरू केली. इ. स. १६८९मध्ये छत्रपती संभाजी महाराजांचा वध केला आणि मराठ्यांची राजधानी रायगड जिंकून घेतला.

छत्रपती शिवाजी महाराजांचा दप्तरखाना रायगडावरच होता. सम्राट औरंगजेबाने रायगड जिंकून घेतल्यानंतर रायगडावरील मराठ्यांचा दप्तरखाना सुरक्षित राहणे अशक्य होते. मोगलांनी रायगडावरील मराठ्यांचा संपूर्ण दप्तरखाना जाळून नष्ट केला. तसेच मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्ध काळात मोगलांनी मराठ्यांच्या निरनिराळ्या किल्ल्यांवरील दप्तरखान्यांसह इतर साधनसामुग्री नष्ट केली.

थोडक्यात, शिवकालाच्या इतिहासाला उपयुक्त अशी साधनसामुग्री काळाच्या भक्ष्यस्थानी पडली. जी कागदपत्रे उपलब्ध झालेली आहेत, त्यामध्ये खासगी दस्तऐवज, सनदा आणि महजर यांचा समावेश आहे. या संदर्भात जदुनाथ सरकार म्हणतात, 'सरकारी दप्तरखाना फारच पूर्वी नष्ट झाला असल्याने हे कागद त्यातील नव्हते, यात शंकाच नाही. ज्यांचे हितसंबंध या कागदावर अवलंबून होते, त्यांनी त्याचे संरक्षण करून ठेवले.'

सुदैवाने अलिकडच्या काळात याबाबतीत संशोधन होऊनही काही साधनसामुग्री उपलब्ध झालेली आहे. तिच्या सहाय्याने शिवकालाच्या इतिहासावर विदारक प्रकाश टाकता येतो. परंतु तो परिपूर्ण स्वरूपाचा नाही. जी ऐतिहासिक साधनसामुग्री उपलब्ध आहे, ती पुष्कळशा घराण्यांच्या बाबतीत परस्परविरोधी माहिती सांगते. त्यामुळे शिवकालाचा अभ्यास करताना विश्वासार्ह साधनांचा डोळ्यात तेल घालून शोध घ्यावा लागतो.

राजकीय दृष्टीकोनातून मराठ्यांचा इतिहास तयार करणे जसे मोठे जागृतीचे आणि जिकरीचे काम आहे, तशीच परिस्थिती शिवकालीन सांस्कृतिक, प्रशासकीय व आर्थिक इतिहासाच्या निर्मितीच्या बाबतीत आहे. शिवकालीन इतिहासाची साधने आपणास पुढीलप्रमाणे सांगता येतील.

## १.२ विषय विवेचन

**साधनांचे वर्गीकरण**




**साधनांचे महत्व**

इतिहास हा साधनांवर आधारित असतो. ज्याच्या सहाय्याने इतिहासाचे ज्ञान प्राप्त होते, घटनेची सविस्तर माहिती मिळते त्यांना इतिहासाची साधने असे म्हणतात. गतकाळातील मानवाने आपल्या कर्तबगारीचे अवशेष, ठसे, पुरावे मागे ठेवलेले असतात, त्यांना आपण इतिहासाची साधने असे म्हणतो. भारतीय इतिहासाची १)भौतिक/पुरातत्वीय २) वाङ्यमीन/ पुराभिलेखीय अशी दोन प्रकारची साधने आहेत.

इतिहासाचे शास्त्रशुद्ध लिखाण व अभ्यास होण्यासाठी साधनांचे महत्व फार मोठे आहे. फ्रेंच इतिहासकार व संशोधक प्रो. लॅजीसॉस बसेन बॉस म्हणतात – “No Document No History” इतिहासाचे सत्यचित्र जाणून घेण्यासाठी पुरातत्वीय साधनांचा आधार घ्यावा लागतो म्हणून या साधनांचे महत्वही तेवढेच मोठे आहे. साधनांच्या शिवाय इतिहास लिहिता येत नाही.

### १.२.१ शिवकालीन इतिहासाची वाङ्मयीन साधने :–

**अ) संस्कृत साधने :– १) अनुपुराण, सूर्मवंश किंवा शिवभारत –**

कवी परमानंद यांनी हे ग्रंथ लिहिले. कवी परमानंद हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकालीन होते. परमानंद यांचे मूळ गाव नेवासे, तसेच त्यांचे मूळ नाव आनंद असे होते. शिवाजी महाराजांनी त्यांना कवींद्र, कवीश्वर असा किताब दिल्यानंतर त्यांनी ‘परमानंद’ हे नाव धारण केले.

कवी परमानंद उच्च शिक्षण घेण्यासाठी ‘काशी’ येथे गेले असता तेथील ब्राह्मणांनी कवी परमानंदांना शिवचरित्र सांगण्याची विनंती केली. तेव्हा परमानंदांनी ‘अनुपुराण’ या ग्रंथाची रचना केली. या ग्रंथाचे ३१ अूध्याय पूर्ण असून त्यात इ. स. १६६१ पर्यंतच्या

शिवचरित्रातील घटना कथन केल्या आहेत.

कवी परमानंदांचा दुसरा ग्रंथ शिवभारत हा असून, हा ग्रंथ म्हणजे एक महाकाव्य आहे. या ग्रंथाचे स्वरूप महाकाव्याप्रमाणे असल्याचे इतिहासाचे साधन या दृष्टीने या ग्रंथाचा दर्जा गौण आहे, असे मत जदुनाथ सरकारांनी व्यक्त केले आहे. असे असले तरी शिवभारतातील कथन केलेल्या घटना, अतिशयोक्तींची वर्णने वगळल्यास इतिहासाच्या कसोटीला उतरलेल्या आहेत. शिवकालीन सामाजिक व आर्थिक इतिहास समजावून घेण्यासाठी हा समकालीन ग्रंथ उपयुक्त आहे.

शिवभारत या ग्रंथात कवी परमानंदांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या पूर्वजापासून ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या कोकण विजयापर्यंतची माहिती दिलेली आहे. तर अनुपुराण या ग्रंथात शहाजीराजे भोसले ते छत्रपती संभाजी महाराज, एवढ्या मोठ्या कालखंडाची माहिती दिलेली आहे. या ग्रंथाच्या सहाय्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील त्यांची कौटुंबिक माहिती मिळते. शिवपूर्वकालीन आणि शिवकालीन राजकीय परिस्थिती समजावून घेण्मासाठी हा ग्रंथ मोलाचा आहे.

**२) पर्णालपर्वत ग्रहणाख्यानम :-**

कवी जमराम पिंड्ये यांनी पर्णालपर्वत ग्रहणाख्यानम हा छोटासा संस्कृत ग्रंथ लिहिला आहे. या ग्रंथातून इ. स. १६७३मध्ये अण्णाजी दत्तो आणि कोंडाजी फर्जद मांनी पन्हाळा किल्ला कशाप्रकारे जिंकून घेतला याची हकिकत दिलेली आहे. मराठ्यांचे लष्करी डावपेच समजावून घेण्यासाठी या विशेष ग्रंथाची मदत होते.

राधामाधव विलास चंपू हे दुसरे गद्यकाव्य कवी जयराम पिंड्ये यांनी लिहिले आहे. या ग्रंथात प्रामुख्याने शहाजीराजे भोसले यांच्या विषयीची माहिती मिळते. शहाजीराजे भोसले यांची मिरजुम्लावरील स्वारी, कर्नाटकातील विविध राजांचा शहाजीराजांनी केलेला बिमोड, शहाजीराजे भोसले व पोर्तुगीज संबंध यावरही प्रकाश टाकता येतो. शहाजीराजे यांच्या कारकिर्दीतील निरनिराळ्या घटना अभ्यासण्यासाठी या ग्रंथाची मोलाची मदत होते. तसेच शिवपूर्वकाळातील सामाजिक व राजकीय परिस्थितीवरही प्रकाश टाकता येतो. परंतु जदुनाथ सरकारांनी भाटाने लिहिलेली गौरवगाथा म्हणून या ग्रंथाला त्याज्य ठरविले आहे.

**३) शिवराज्याभिषेक कल्पतरू :-**

कवी अनिरूद्ध सरस्वती यांनी या ग्रंथाची रचना केलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकासंबंधी निश्चलपुरी आणि गोविंद बरळे यांच्यातील संभाषण या ग्रंथात काव्यरूपाने दिलेले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या राज्याभिषेकाचा उलगडा या ग्रंथामुळे होतो. गागाभट्टाने छत्रपती शिवाजी महाराजांचा वेदोक्त पद्धतीने केलेला राज्याभिषेक कसा चुकीचा आहे, या विषयीची माहिती या ग्रंथात पहावयास मिळते. ग्रंथकर्त्याने दुसऱ्या राज्याभिषेकाचे महत्व या ग्रंथात कथन केले आहे.

**४) राज्यव्यवहार कोश :-**

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकानंतर अमात्य रघुनाथपंत हनुमंते यांच्याकडून राज्यव्यवहार कोश या ग्रंथाचे काम करवून घेतले. रघुनाथपंत हनुमंते यांनी कोश तयार करण्यासाठी धुंडीराज लक्ष्मण व्यास यांची नियुक्ती केली होती. शासकीय व्यवहारामध्ये

फार्शी व अरबी शब्द मोठ्या प्रमाणावर रूढ झालेले होते. या शब्दांना संस्कृत प्रतिशब्द योजून व्यवहारात त्यांचा उपयोग व्हावा हा उद्देश छत्रपती शिवाजी महाराजांचा होता. या कोशामध्ये लष्कर, किल्ले, अधिकारी यांच्या संदर्भातील माहिती मिळते. तसेच छत्रपती शिवाजी महाराजांचे (कार्यालये) अठरा कारखाने व १२ महाल यावरील अधिकारी यांचीही माहिती यातून मिळते.

**५) राजारामचरित्रम :–**

छत्रपती राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत कवी केशव पुरोहित यांनी हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून छत्रपती राजाराम महाराजांचे जिंजीपर्यंतचे मार्गक्रमण या संदर्भातील माहिती मिळते. तसेच छत्रपती राजाराम महाराजांच्या दरबाराची माहिती या ग्रंथातून उपलब्ध होते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी कालगणणेसाठी कृष्ण ज्योतिषी यांचेकडून करणग्रंथ आणि आचार धर्मासाठी गागाभट्टांकडून शिव कार्योदय हे ग्रंथ तयार करवून घेतले. याशिवाय भोसले वंशावली, बुधभूषण, परमानंद काव्य इत्यादी ग्रंथांचा संस्कृत साधनांत समावेश होतो.

वरील संस्कृत साधनांच्या सहाय्याने मराठ्यांच्या सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

**ब) मराठी साधने :–**

मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांमध्ये पहिला दर्जा मराठी कागदपत्रांना दिला जातो. या कागदपत्रांमध्ये प्रामुख्याने छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, छत्रपती राजाराम महाराज व महाराणी ताराबाई या राज्यकर्त्यांची आज्ञापत्रे, वतनपत्रे, इनामपत्रे, न्यायनिवाडे इत्यादी कागदपत्रांचा समावेश होतो. तसेच ठाणेदार, किल्लेदार, सुभेदार व अष्टप्रधानांनी लिहिलेल्या पत्रांचाही समावेश होतो. गोतसभा, ब्रह्मसभा यांनी दिलेली निवाडपत्रे यांचाही मराठी कागदपत्रांत समावेश होतो.

कागदपत्रांचे महत्व विषद करताना इतिहासाचार्य वि. का. राजवाडे आपल्या मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड–८ या ग्रंथाच्या प्रस्तावनेत म्हणतात, 'पृथ्वीवरील जुन्यांत जुने वाङ्मय जसे वेद तसे अर्वाचीन युगाच्या प्रारंभीचे अभ्यासनीय वाङ्मय म्हणजे १७ व्या शतकातील कागदपत्रे होत.' इतिहासाचार्य राजवाडे आणखी एके ठिकाणी म्हणतात, 'अनेक बखरींपेक्षा अस्सल कागदाचे एखादे चिटोरेही अधिक मौल्यवान आहे.'

शिवकालीन शासकीय स्वरूपाचा पत्रव्यवहार अगदीच अल्प प्रमाणात उपलब्ध असला तरी महसूलविषयक पत्रांची संख्या त्यामानाने अधिक आहे. त्यांच्या आधारे ऐतिहासिक घटनांचा शोध घेता येतो. वा. सी. बेंद्रे यासंदर्भात म्हणतात, राजकीय पत्रव्यवहार या ना त्या कारणाने आज जवळ जवळ निदान १६ व्या, १७ व्या शतकातील दुर्मिळ होऊन बसला आहे. त्यामुळे आपणास आपल्या इतिहासाच्या पुनर्रचनेच्या कामात या जमीन महसूलाच्या कागदपत्रांत येणाऱ्या बारीक सारीक ऐतिहासिक तपशीलावर अवलंबून राहवे लागते.

या दृष्टीने काही मराठी कागदपत्रे महतप्रयासाने उपलब्ध झालेली आहेत, ती पुढीलप्रमाणे

**१) मराठ्यांच्या इतिहासाची साधने :–** वि. का. राजवाडे यांनी २२ खंडांत ही

कागदपत्रे संपादित केलेली आहेत. या साधनांत मराठा घराण्याच्या कागदपत्रांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. राजवाडे यांनी अपार कष्ट उपसून मराठा घराण्यांची अशी कागदपत्रे उजेडात आणली. मराठ्यांच्या इतिहासाच्या जडणघडणीत भाग घेतलेली शेकडो कुटुंबे महाराष्ट्रात व महाराष्ट्रा सभोवती असल्याने त्यांच्या घरी गेल्यास आपणांस त्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकणारी अस्सल साधनसामुग्री उपलब्ध होऊ शकेल, असे राजवाडे यांना वाटत होते. त्या दिशेने अनेक वर्षे प्रयत्न केल्यावर राजवाड्यांना बरेच यश मिळाले. परंतु काही ठिकाणी मात्र अशी साधनसामुग्री मिळविणे त्यांना कठिण जात होते. कारण अशा घराण्यातील वारसांना आपण जर ही कागदपत्रे दिली तर कदाचित आपल्या मालमत्तेवर गदा येईल किंवा जनमानसातील आपल्या स्थानाला गालबोट लागेल अशी भीती वाटत असल्यामुळे हे वारसदार अशी कागदपत्रे दाखविण्यास तयार नसत. त्यावर राजवाडे संतापून म्हणत, पूर्वजांनी संदादिलेल्या जहांगिरी व राज्ये भोगण्यास राजी आणि त्यांचे पराक्रम आणि इतिहास जाणण्यास गैरराजी. राजवाडे लोकांची समजूत घालीत, त्यांच्याकडून कागदपत्रे मिळाल्यानंतर त्यांचे वाचन व परिक्षण करीत. महत्वाच्या कागदपत्रांची निवड करून तिथल्या तिथे बसून त्यांच्या नकला करीत. जेथे साधा बैलगाडीचा रस्ता नाही अशा दूरच्या खेड्यांत राजवाड्यांनी पायपीट करून ऐतिहासिक कागदपत्रे गोळा केली. त्यातून २२ खंडांचे संपादन केले. या खंडांपैकी ८, १५, १६, १७, १८, २० आणि २१ हे खंड शिवकालाच्या इतिहासाला उपयुक्त आहेत. या ग्रंथातून शिवकालीन राजकीय, सामाजिक, प्रशासकीय व आर्थिक इतिहासाची माहिती मिळते.

**२) शिवचरित्र साहित्य :-** भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांनी १४ खंडांत शिवचरित्र साहित्य या ग्रंथाचे प्रकाशन केले आहे. हे खंड प्रामुख्याने शिवकालीन सामाजिक आणि आर्थिक इतिहासाच्या अभ्यासासाठी अत्यंत उपयुक्त आहेत. या १३ खंडांत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कारकिर्दीतील अनेक घटनांच्या कागदपत्रांचा समावेश करण्यात आला आहे.

**३) शिवकालीन पत्रसार संग्रह :-** श. ना. जोशी यांनी या ग्रंथाचे संपादन केलेले असून, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांनी ३ खंडांत हा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. शिवकालीन पत्रसार संग्रह या ग्रंथात शिवकालीन अस्सल पत्रांचा संग्रह करण्यात आलेला आहे. या संग्रहात प्रामुख्याने मराठी, इंग्रजी, पोर्तुगीज, डच, कानडी, फारशी व संस्कृत अशा ७ भाषेतील अस्सल पत्रांचा समावेश करण्यात आला आहे. या ग्रंथात राजमाता जिजाऊ यांचे चार महजर देण्यात आले आहे. त्यावरून शिवकालीन न्याय व्यवस्थेवर प्रकाश टाकता येतो.

**४) संभाजीकालीन पत्रसार संग्रह :-** श. ना. जोशी मांनी मा ग्रंथाचे संपादन केलेले असून भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांनी हा ग्रंथ प्रकाशित केलेला आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीतील अनेक घटनांची माहिती देणारे अस्सल कागदपत्रे या संग्रहात उपलब्ध आहेत. निरनिराळ्या ५४ मराठी साधन ग्रंथातून संभाजी महाराजांच्या कारकिर्दीची कागदपत्रे कालानुक्रमाने राजकीयदृष्ट्या साररूपाने संग्रहित केलेली आहेत. इतर भाषांतील कागदपत्रांचाही समावेश या ग्रंथात करण्यात आलेला आहे. या ग्रंथाचे

विशेष म्हणजे, पृष्ठ ९९ ते १२० ही २२ पाने छत्रपती संभाजी शकावलीची आहेत. या ग्रंथात राज्यकारभारविषयक पत्रांचा भरणा अधिक आहे.

**५) ताराबाईकालीन कागदपत्रे :-** कोल्हापूरच्या शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू आप्पासाहेब पवार यांनी ३ खंडांत ही कागदपत्रे संपादित केलेली आहेत. या कागदपत्रांवरून मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाच्या वेळची राजकीय परिस्थिती कळते.

या शिवाय शिवकालीन मराठी अस्सल कागदपत्रांत काव्यसंग्रह, काव्येतिहास संग्रह, रामदास आणि रामदासी, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांची त्रैमासिके इत्यादी जुन्या व नव्या निमतकालिकांतून प्रसिद्ध झालेली कागदपत्रे तसेच सेतु माधवराव पगडी, स. रा. देसाई, वि. गो. खोबरेकर, वा. सी. बेंद्रे, स. मा. गर्गे, शिरोडकर, काकोडकर इत्यादी संशोधकांनी प्रसिद्ध केलेली कागदपत्रे आहे.

कागदपत्रांप्रमाणेच याद्या, कैफियती, करिने (दस्तऐवज), इतिवृत्त, संमेलनवृत्त इत्यादी साधनेही मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास उपयोगी ठरतात. करीना या साधन प्रकारामध्ये 'जेधे करीना', 'शिवापूरकर देशपांडे करीना' हे महत्त्वाचे मानले जातात.

अशी विखुरलेली ऐतिहासिक कागदपत्रे गोळा करून ती प्रकाशित करण्याचे कार्य महाराष्ट्रातील संशोधकांनी केले. त्यामुळेच मराठा इतिहास लेखनाला चालना मिळाली.

**शकावली :-**

तवाहिखा किंवा महत्वपूर्ण घटनांच्या नोंदी करण्याची पद्धत इस्लामी राज्यकर्त्यांत रूढ होती. मराठ्यांनी या पद्धतीचे अनुकरण करून शकावली तयार केली. शकावलीचे महत्व विशद करताना वा. सी. बेंद्रे म्हणतात, 'बखरीतील विसंगत दिसणाऱ्या तपशीलाला संगती देणारे व कागदपत्रांतील गुपित माहितीस सांधणारे व मराठ्यांच्या इतिहासाची बिनचूक मांडणी देणारे असे शकावली हे एकच महत्वाचे साधन आहे.'

शिवकालीन इतिहासाचे जेधे शकावली हे एक उपयुक्त साधन मानले जाते. कान्होजी नाईक जेधे, बाजची सर्जेराव जेधे या सरदारांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांची सेवा केली. जेधे घराणे छत्रपतींशी संबंधीत असून, त्यांची ही शकावली आहे. इ. स. १६१८ तं १६९७ पर्यंतच्या घटना जेधे शकावलीत आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची जन्मतिथी (शके १५५१ फाल्गुन वद्य त्रयोदशी) या शकावलीत देण्यात आलेली आहे (१९ फेब्रुवारी १६३०). भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांनी ही शकावली प्रसिद्ध केली. जेधे शकावलीमधील नोंदी अचूक आहेत.

इतर शकावल्यामध्ये शहाजीकालीन शकावली, होनप देशपांडे शकावली, शिवापूरकर शकावली, राज्माभिषेक शकावली, शिवनिधन शकावली, दासपंचामतन शकावली इत्यादी या शकावल्यांमधून शिवकालाचा इतिहास लिहिण्यास उपयुक्त माहिती मिळते. आपटे व दिवेकर मांनी 'शिवचरित्र प्रदिप' या ग्रंथात अनेक शकावल्यांचे संकलन केलेले आहे.

**मेस्तके :-**

शिवकालीन जमाखर्चाचे महत्व सांगणारे आणि जमाखर्चाच्या पद्धती विशद करणारे

ग्रंथ 'मेस्तके' या नावाने प्रसिद्ध आहेत. यादवकालापासून मेस्तके लिहिण्याची पद्धती अस्तित्वात होती. मेस्तकावरून ऐतिहासिक घटना समजू शकत नाहीत. परंतु शिवकालीन निरनिराळे कारखाने (कार्यालये) यांची व्यवस्था, कामाकाजाच्या पद्धती कशा होत्या हे समजण्यासाठी काही प्रमाणात मेस्तकांचा उपयोग होतो. बा. सी. बेंद्रे यांनी संपादित केलेल्या 'महाराष्ट्रेतिहासाची साधने' या ग्रंथात सहा मेस्तकांचे संकलन केलेले आहे. शिवकालीन आर्थिक इतिहास लिहिण्यासाठी मेस्तकांचा उपयोग होतो.

**आज्ञापत्रे :-**

रामचंद्र पंत अमात्य यांनी इ. स. १७१६ च्या सुमारास आज्ञापत्रे हा ग्रंथ लिहिला. रामचंद्र पंत अमात्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांची कारकिर्द अतिशय जवळून पाहिलेली होती. त्यांच्या राजनितीचे अवलोकन केलेले होते. रामचंद्र पंत यांचा आज्ञापत्र हा ग्रंथ राजनितीविषयक ग्रंथ आहे. हा ग्रंथ छत्रपती शिवाजी महाराजांची राजनिती व राजव्यवस्था समाजवून घेण्यास उपयुक्त ठरतो.

शिवाजी महाराजांच्या वारसांना छत्रपती शिवाजी महाराजांची राजनिती मार्गदर्शक ठरावी म्हणून हा ग्रंथ रामचंद्र पंत अमात्यांनी लिहिला. या ग्रंथात एकूण ९ प्रकरणे आहेत. या ग्रंथात रामचंद्र पंत अमात्यांनी राजाची व प्रधानाची कर्तव्ये, वतनदार वृत्ती, इनामे, व्यापार, सावकार, आरमार, किल्ले अशा अनेक विषयांवर मार्गदर्शनपर विचार मांडले आहेत. हे विचार म्हणजेच छत्रपती शिवाजी महाराजांची राजनिती होय. ज्याप्रमाणे प्राचीन भारताच्या प्रशासन प्रणालीचे अध्ययन करण्याच्या दृष्टीने कौटिल्याचे अर्थशास्त्र हे जसे महत्वाचे ऐतिहासिक साधन आहे, त्याचप्रमाणे आज्ञापत्र हा ग्रंथ १७व्या शतकातील मराठ्यांची राजनिती, आर्थिक प्रशासन यांचा परामर्श घेणारे ऐतिहासिक महत्वाचे साधन आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजव्यवस्थेचे मर्म या आज्ञापत्रावरून समजू शकते.

या ग्रंथाचे संपादक राव हे ग्रंथाच्या आपल्या प्रस्तावनेत म्हणतात, आज्ञापत्रात मूलभूत तत्वे यांचे विवेचन न करता मराठी राज्याची उभारणी ज्या काही विशिष्ट पद्धतीवर आधारलेली होती, त्या पद्धतीचे सांगोपांग दर्शन या ग्रंथात घडते. प्रत्यक्ष शककर्त्या युगपुरूषाचे राजकीय तत्वांचे, अनुभवाचे बोल या ग्रंथात दिसतात. शिवकालीन राजकीय व प्रशासकीय इतिहास समजावून घेण्मासाठी आज्ञापत्रे हा ग्रंथ महत्वाचा आहे.

**पोवाडे : -**

पोवाडे हा शिवकालातील लोकप्रिय काव्यप्रकार होय. मध्ययुगीन महाराष्ट्रात गोंधळीवर्गाने पोवाड्यांचे जतन केले. परंतु हे पोवाडे परंपरेने चालत आलेले आहेत. पोवाडे मूळ स्वरूपात उपलब्ध नसल्यामुळे त्मांचे प्रामाण्य संशयास्पद ठरते. तत्कालिन शाहिरांनी वीररस खुलविण्यासाठी काव्यांत कल्पनाविलास वाढविलेला असल्यामुळे पोवाड्यात वस्तुस्थिती असतेच असे नाही. त्यामुळे पोवाडे हे इतिहासाचे विश्वसनीय साधन नाही.

शिवकालीन शाहिरांत अज्ञानदास, तुळशीदास, ममाजी व फतनजी या शाहिरांचा उल्लेख करावा लागेल. शाहिर फतनजी प्रमाणे शाहिर अज्ञानदासाने अफझलखान प्रसंगावर पोवाडा रचला आहे. पोवाड्याच्या कथनात शाहिर म्हणतो, की पोवाडा ऐकल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपल्या हातात शेरभर सोन्याचा तोडा घातला. या पोवाड्यात

शाहिराने छत्रपती शिवाजी महाराजांच्या गुणग्राहकतेबद्दल व त्यांच्या पराक्रमाचे वर्णन केले आहे.

शाहिर तुलशीदासाने तानाजीवर पोवाडा केला. कोंढाणा किल्ला घेताना तानाजीला धारातिर्थी पडावे लागले. या प्रसंगी तानाजीने केलेल्या पराक्रमाचे कौतुक करण्यासाठी राजमाता जिजाऊने शाहिर तुळशीदासाला त्याच्यावर पोवाडा करण्यास सांगितले. एच. ए. अक्कथ आणि एस. टी. शाळीग्राम यांनी मराठ्यांच्या पोवाड्याचे संपादन सर्वप्रथम केले. त्यानंतर म. ना. केळकरांनी पोवाड्यांची सविस्तर चिकित्सा करून ते संग्रह रूपात प्रसिद्ध केले. पोवाडे हे ऐतिहासिक साधन ठरत नसले तरी त्यातील अतिशयोक्तीचा भाग वगळल्यास पोवाड्यातून ऐतिहासिक घटना समजण्यास मदत होते.

**बखर वाङ्मय : –**

शिवकालीन इतिहासासंबंधी अनेक बखरी उपलब्ध आहेत. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या ह्यातीत एकही बखर लिहिली गेलेली नाही. बहुतेक बखरी पेशवाईत लिहिल्या गेल्या असून त्यातील माहिती अतिरंजीत स्वरूपाची आहे. बखरकारांनी अस्सल कागदपत्रे आणि इतर साधने क्वचितच वापरलेली दिसतात. असे असले तरी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राच्या संदर्भात अधिकाधिक माहिती देणारे साधनग्रंथ म्हणून बखरीचा विचार करणे आवश्यक ठरते. मात्र बखरीतील माहिती काटेकोरपणे पारखून जर ती ऐतिहासिक सत्याच्या कसोटीला उतरत असेल तरच तिचा उपयोग इतिहास लेखनासाठी करणे योग्य ठरेल. मराठ्यांच्या स्वत:च्या इतिहास लेखनाविषयी काय कल्पना होत्या, याची जाणीव बखरे वाङमयावरून होते.

## १) सभासद बखर :–

कृष्णाजी अनंत सभासद माने छत्रपती राजाराम महाराजांच्या आज्ञेवरून इ. स. १६९४ मध्ये ही बखर लिहावयास घेतली आणि तीन वर्षांनंतर ती लिहून पूर्ण झाली. कृष्णाजी अनंत सभासद हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकालीन असला तरी त्याने ही बखर महाराजांच्या मृत्यूनंतर १७ वर्षांनी पूर्ण केलेली आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. शिवाय बखरीचे लेखन सभासदाने स्मरणावर विसंबून केलेले आहे. घटनांच्या तारखा क्वचितच दिलेल्या आहेत. शिवजन्माची तारीख सभासदाने दिलेली नाही तसेच काही महत्वाच्या घटनांचाही उल्लेख सभासदाने केलेला नाही. काही ठिकाणी माहिती देताान सभासदाने गल्लत केलेली आढळते. घटना मागेपुढे झालेल्या आहेत. अर्थात स्मरणावर मदार ठेवूनच लेखन केलेले असल्यामुळे हे दोष राहणे स्वाभाविक आहेत. असे असले तरी शिवचरित्राच्या लेखनासाठी ही बखर सर्वांत विश्वसनीय आहे. बखरीतील काही दोष वगळता बरीचशी माहिती सभासदाने अचूक दिलेली आहे. इतर साधनांशी पडताळून पाहता त्यातील सत्यता पटते. मात्र लेखक छत्रपती राजाराम महाराजांचा पक्षपाती असल्यामुळे छत्रपती संभाजी महाराजांविषयी त्याने विपर्यस्त स्वरूपाची माहिती दिलेली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील ७१ प्रसंग या बखरीत वर्णन केलेले आहेत. तसेच शिवकालीन १८ कारखाने, शिलेदार, कारकून, देवी भवानीचा आशिर्वाद यांचीही माहिती सभासदाने बखरीत दिलेली आहे. राजकीय इतिहासाच्या दृष्टीने या बखरीत काही त्रुटी असल्या तरी प्रशासकीय, आर्थिक इतिहासाच्या दृष्टीने या बखरीतील माहिती

विश्वसनीय आहे.

**२) ९१ कलमी बखर :-**

अण्णाजी रंगनाथ मलकारे यांचा पुत्र खंडो अण्णाजी याने ही बखर लिहिली. जदुनाथ सरकार यांच्या मते विश्वसनीयता व कालानुक्रम यांच्या बाबतीत सभासदाच्या बखरीनंतर या बखरीचा क्रम लागतो. ही बखर 'प्रभात' व 'भारत वर्ष' यामध्ये प्रसिद्ध झालेली आहे. बखरीचे फारशी भाषांतर तारीख-इ-शिवाजी या नावाने प्रसिद्ध आहे. 'रायरीची बखर' म्हणूनही या बखरीचा उल्लेख केला जातो..

**३) चिटणीस बखर :-**

मल्हार रामराव चिटणीस यांनी लिहिलेले 'शिवाजी महाराजांचे सप्त प्रकरणांत्मक चरित्र' चिटणीस बखर नावाने ओळखले जाते. मल्हाररावाने छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराजांचे चरित्र अशा आणखी दोन बखरी लिहिलेल्या आहेत. या बखरींतून शिवकालाचा सविस्तर वृत्तांत मिळतो. या बखरी इ. स. १८१०-१८११च्या सुमारास लिहिल्या गेल्या. म्हणजे शिवकालानंतर जवळजवळ सव्वाशे वर्षांनंतर त्या लिहिल्या गेल्या. बखरी लिहिताना मल्हाररावाने ऐतिहासिक कागदपत्रांचा फारसा उपयोग केलेला दिसत नाही. याशिवाय चिटणीस हा राजारामांचा पुरस्कर्ता असून त्याचे पूर्वज बाळाजी आवजी यांना संभाजीने देहांताची शिक्षा दिली होती. म्हणून त्याचा संभाजीवर राग असणे स्वाभाविक आहे. त्यामुळेच त्याने संभाजीचे व्यक्तीमत्व विकृतपणे रेखाटले आहे. ही बखर इ. स. १८७७ मध्ये विविध ज्ञानविस्तार या मासिकात प्रसिद्ध झालेली आहे.

**४) मराठी साम्राज्याची छोटी बखर :-**

इ. स. १८१०च्या सुमारास ही बखर तमार झाली. चिटणीस बखरीच्या मानाने ही बखर सामान्य स्वरूपाची आहे. शिवकालीन घटना विस्कळीतपणे आणि अतिरंजितपणे रेखाटलेल्या आढळतात. इ. स. १८८९मध्ये बाळाजी जनार्दन मोडक मांनी 'काव्मेतिहास ग्रंथ' या मासिकातही बखर प्रथम प्रसिद्ध केली.

**५) शिवदिग्विजय :-**

इ. स. १८१८मध्ये या बखरीचे लेखन पूर्ण झाले. या बखरीत शिवचरित्रातील अनेक घटनांचे वर्णन आढळते. जुन्या अनेक बखरींच्या सहाय्याने या बखरीचे पुनर्लेखन झाले असावे, असा संशोधकांचा अंदाज आहे. लेखकाचे नाव मात्र उपलब्ध नाही.

वरील बखरी शिवाम शिवाजी प्रताप (१८२९), पंतप्रतिनिधी बखर (१८४४), शेडगावकर बखर (१८५४) मा बखरींचा उल्लेख करावा लागेल. मा सर्व बखरी शिवकालानंतर लिहिल्या गेल्या आहेत. बखरीतील माहिती विपर्यस्त व अतिरंजित स्वरूपाची असल्यामुळे इतिहासाचे साधन ग्रंथ म्हणून या बखरींचे स्थान तिसऱ्या दर्जाचे आहे.

**संतांचे वाङ्मय :-**

शिवकालात संत तुकाराम व समर्थ रामदास हे संत होवून गेले. त्यांच्या साहित्यांतून आपणास शिवकालीन सामाजिक व आर्थिक परिस्थिती समजू शकते. रामदासांचे 'अस्मानी सुलतानी' हे काव्य या दृष्टीने महत्वाचे आहे. तसेच रामदास स्वामींनी संभाजीला उद्देशून

लिहिलेले 'ओवीबद्ध' पत्रावरूनही आपणास शिवकालावर प्रकाश टाकता येतो. या शिवाय शेख मुहम्मद या मुस्लिम संतकवीच्या काव्यातूनही शिवकालीन सामाजिक परिस्थिती समजण्यास हातभार लागतो.

**इतर भारतीम भाषांमधील साधने :–**

**१) फार्सी साधने :–**

इतर भाषांच्या तुलनेत फार्सी भाषेतील साधने विपुल आहेत. परंतु त्यात शिवाजी महाराजांचे शत्रू असलेल्या मुघल आणि आदिलशहा यांच्या दरबारी लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथांचीच संख्या अधिक आहे. या ग्रंथांतील माहिती एकांगी आणि शिवाजी महाराजांविषयी बऱ्याच अंशी गैरसमज निर्माण करणारी आहे. फार्सी लेखकांनी छत्रपती संभाजी महाराजांचीही मोठ्या प्रमाणावर निंदानालस्ती केलेली आहे. मात्र समकालीन फार्सी 'अखबारातून' किंवा बातमीपत्रातून आलेल्या माहितीचा इतिहास लेखनासाठी उपयोग होतो.

बिकानेर मेथील दप्तरखात्यांत आणि लंडन मेते अखबारात ३–दरबारात–३–मुअल्लाफ हा बातमीपत्रांचा संग्रह उपलब्ध आहे. त्यामध्ये औरंगजेबाच्या काळातील कितीतरी बातमीपत्रे उपलब्ध आहेत. परंतु या बातमीपत्रांतही मुघलांना अनुकूल अशा बातम्यांचेच प्रमाणत अधिक आढळते. असे असले तरी या ग्रंथामधून मराठ्यांसंबधीची माहिती मोठ्या प्रमाणावर आलेली असल्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीकोनातून हे साधन ग्रंथ उपयुक्त ठरतात.

**अ) मासिरे आलमगिरी :–**

साकी मुस्तदखान याने फार्सी भाषेत हा ग्रंथ लिहिला. साकी मुस्तदखान हा औरंगजेबाचा विश्वासू अधिकारी होता. औरंगजेबाच्या दरबारात मुश्रीफ, मुन्शी इत्यादी पदांवर साकी मुस्तदखान याने काम केले होते. औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत साकी मुस्तदखान हा या पदांवर कार्यरत होता. त्याने इ. स. १७०९मध्ये आपला ग्रंथ लिहून पूर्ण केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर औरंगजेबाने इ. स. १६८२ मध्ये जी दक्षिणेची मोहिम सुरू केली तेव्हापासून ते इ. स. १७०७ पर्यंत म्हणजे सम्राट औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंत साकी मुस्तदखान औरंगाजेब बादशहाबरोबर दक्षिणेच्या मोहिमेवर होता. ङ्गमराठ्यांचा स्वातंत्र्यसंग्रामफसमजावून घेण्यासाठी या फार्सी ग्रंथाच उपयोग होतो.

साकी मुस्तदखानाने आपल्या ग्रंथात घटनांच्या तारखा दिलेल्या आहेत. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेतील काही वेढ्यांची वर्णने साकी मुस्तदखानाने तपशीलवार दिलेली आहेत. औरंगजेबाच्या मोगल दरबाराची कागदपत्रे, इतर दप्तरे इत्यादीमधून मिळणाऱ्या माहितीच्या आधारे साकी मुस्तदखानाने ५४१ पानांत हा ग्रंथ लिहिला. औरंगजेबाच्या ५१ वर्षांच्या कारकिर्दीचे वर्णन या ग्रंथात आलेले आहे.

साकी मुस्तदखान हा बादशहाचा विश्वासू सेवक होता. चाळीस वर्षांपासून त्याचा मोगल दरबाराशी घनिष्ठ संबंध आलेला होता. त्याने ज्या घटनांचा आणि घडामोडींचा उल्लेख आपल्या ग्रंथात केलेले आहेत, त्यांचा तो प्रत्यक्ष साक्षीदार होता. असे असले तरी मोगलांचे पराभव झाकून ठेवण्यावर त्याने भर दिलेला आढळतो. त्यामुळे त्याने दिलेली माहिती इतर समकालीन साधनांशी पडताळून पाहणे आवश्यक ठरते.

बंगालच्मा रॉमल एशिमाटिक सोसायटी या संस्थेने हा ग्रंथ प्रकाशित केला. हिंदीत भाषांतर केलेल्या या ग्रंथाला 'आलमगीर नामा' असे म्हटले जाते. इतिहास संशोधक ग. द.

खरे यांनी या ग्रंथातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या संदर्भातील भाग भाषांतरीत केलेला आहे. इ. स. १६८० ते १७०७ पर्मंतच्या कालखंडाचे सेतु माधवराव पगडी यांनी भाषांतर केलेले आहे. या ग्रंथाच्या सहाय्याने मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

**ब) मुन्तखब–उल–लुबाब :– (तारीखे खाफी खान) :–**

मुहंम्मद हाशिम खाफीखान याने इ. स. १७३४मध्ये 'मुन्तखब–उल–लुबाब ३ मुहम्मदशाही' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथालाच 'तारीखे खाफीखान' असे म्हणतात. खाफीखानाला इतिहास लेखनाची मनापासून आवड होती. त्यामुळे नोकरी, पद, प्रतिष्ठा, पैसा यांच्यामागे तो कधीही धावला नाही.

खाफीखानाने आपल्या ग्रंथात इ. स. १५१९ पासून इ. स. १७३४ पर्यंत म्हणजे मुघल साम्राज्याचा संस्थापक सम्राट बाबराच्या कारकिर्दीपासून मुहम्मदशहाच्या कारकिर्दीपर्यंतचा इतिहास लिहिला आहे. इ. स. १६८२मध्मे औरंगजेबाने दक्षिणेची मोहिम सुरू केली. त्यावेळी खाकीखान औरंगजेबाबरोबर दक्षिणेत आलेला होता. खाफीखान  निजाम–उल–मुल्काच्या पदरी दिवाण म्हणून दोन वर्षे नोकरीला होता. मोगल सम्राट फर्रूखशिमर याच्या कारकिर्दीत खाफीखानाने निजामाचे दिवाणाचे पद स्विकारावे असा आग्रह निजामाने केला होता. महंम्मद हाशिम माला सम्राट मुहम्मदशहा माने 'खाफीखान' हे बिरूद दिले होते.

खाफीखान मराठ्यांचा द्वेष्टा असून, आपल्या ग्रंथात खाफीखानाने मराठ्यांची भरपूर निंदानालस्ती केलेली आहे. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या नीतिमत्तेची त्याने मुक्तकंठाने स्तुती केलेली दिसून येते. महाराणी ताराबाई यांच्या कर्तुत्वाचीही त्याने स्तुती केलेली आहे. सम्राट औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेतील काही किल्ल्यांच्या वेढ्यांचा तपशील खाफीखानाने विस्ताराने दिलेला आहे. सम्राट औरंगजेबाच्या दक्षिणेच्या मोहिमेची दुर्दशा रेखाटताना एके ठिकाणी तो म्हणतो, 'शहाजहान बादशहाने साठविलेला सगळा खजिना बादशहाने ओतला. चिकाटीने युद्ध केले, हजारो माणसे मारली गेली, बादशहाने मराठ्यांच्या मुलखात शिरून त्यांचे गगनचुंबी किल्ले घेतले, मराठ्यांना त्याने बेघर करून सोडले. परंतु मराठ्यांचा पराक्रम वाढतच केला.' मराठ्यांबद्दल लिहिताना काफर, जहन्नमी, लयीम, तीराबख्तान यांसारखी शेलकी विशेषणे त्याने जागोगी वापरलेली आढळतात. त्याचप्रमाणे मुघलांना आलेले अपयशही त्याने आडपडदा न ठेवता वर्णन केले आहे.

खाफीखानाच्मा या ग्रंथाच्या संदर्भात यदुनाथ सरकार म्हणतात, 'औरंगजेबाच्या कारकिर्दीच्या मध्यापर्यंत खाफीखानाने लिहिलेला मोगल घराण्याचा इतिहास हा या विषमावरील काही अस्सल व दर्जेदार ग्रंथातील माहितीचा सरळ सरळ संक्षेप आहे. त्यानंतरच्या कालखंडावर लिखाण करताना खाफीखान माने घटनांशी संबंधीत असलेल्या आणि हयात असलेल्या मंडळींची प्रत्यक्ष भेट घेवून त्यांच्याकडून माहिती मिळवून त्या आधारे आपले लिखाण अधिक निर्दोष, अद्ययावत आणि वस्तुनिष्ठ करण्याचा प्रयत्न केला आहे. त्याची चिंतनाची शैली, तत्कालिन सामाजिक परिस्थितीचे त्याने केलेले वर्णन, काही वैशिष्ट्यपूर्ण आठवणींचा समावेश त्याने आपल्या लिखाणात केलेला आहे. त्यामुळे खाफीखानाचे लिखाण दरबारी इतिहास असे न राहता ते वाचनीय झालेले आहे. खाफीखानाचा हा ग्रंथ आपणास दक्षिण भारतातील घडामोडीची विशेष माहिती देतो'.

इ.स. १८७४ मध्ये बंगालच्या एशियाटिक सोसायटीने हा ग्रंथ प्रकाशित केला. या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर लंडनमधील 'इंडिया हाऊस' येथे उपलब्ध आहे.

## क) तारीखे दिल्कुशा :–

तारीखे दिल्कुशा या फार्सी ग्रंथाचा लेखक भीमसेन सक्सेना हा होय. भीमसेन सक्सेनाचा चुलता भगवानदास हा सम्राट औरंगजेबाच्या पदरी तोफखान्याच्या खात्मात हिशोब तपासनीस म्हणून कार्यरत होता. सम्राट औरंगजेबाला बादशहाचे पद प्राप्त झाल्यानंतर भीमसेन सक्सेनाचा पिता दक्षिणेत मुघल चाकरीत रूजू झाला होता. त्याने इ.स. १६६७ मध्ये आपली जागा भीमसेन सक्सेनास दिली आणि तो निवृत्त झाला.

मुघल सुभेदार दाऊतखान, महाबतखान, बहादुर खान, दिलेरखान, शहाजादा मुअज्जम, दतिया संस्थानचा राजा रावदलपत बुंदेला यांच्या पदरी भीमसेन सक्सेनाने नोकरी केली होती. सम्राट औरंगजेबाने दक्षिणेची मोहिम सुरू केली. त्यावेळी भीमसेन सक्सेना महाराष्ट्र, कर्नाटक भागांत आपल्या अधिकाऱ्याबरोबर फिरत होता. मुघलांनी मराठ्यांचे अनेक किल्ले जिंकण्याचा प्रयत्न केला. भीमसेन सक्सेना स्वत: काही वेढ्यांच्या प्रसंगी जातीने हजर होता. इ.स. १६९८ मध्ये मोगलांनी जिंजीचा किल्ला जिंकून घेतला. त्यावेळी भीमसेन सक्सेना हजर होता. इ.स. १७०९मध्ये तो सेवानिवृत्त झाला. उत्तर भारतात परत गेल्यावर त्याने 'तारीखे दिल्कुशा' हा ग्रंथ लिहिला.

भीमसेन सक्सेनाने आपल्या ग्रंथात मुघल–मराठा संघर्षाची तपशिलवार माहिती दिलेली आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनावरील शाहिस्तेखानाची स्वारी, छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा भेट, वणी दिंडोरीची लढाई इत्यादी संदर्भात भीमसेन सक्सेनाने महत्वपूर्ण माहिती दिलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कर्तुत्वाचे यथायोग्य वर्णन भीमसेन सक्सेनाने केलेले आहे. तो म्हणतो, ' शिवाजी हा एक सतपुरूष होता. शिपाई गडी म्हणून तो अद्वितीय होता. तो राजनिती निपुण होता. एकनिष्ठ सैनिकांना तो जीव की प्राण करी.'

औरंगजेबाची दक्षिण मोहिम आणि मराठ्यांचा स्वातंत्र्य संग्राम समजावून घेण्यासाठी भीमसेन सक्सेनाचा हा ग्रंथ अत्यंत उपयुक्त आहे. परंतु घटनांच्या तारखा देताना भीमसेनाने अनेक ठिकाणी गल्लत केलेली आहे. त्यामुळे इतर साधनांमध्ये या ग्रंथातील तपशील पडताळून पहावा लागतो.

भीमसेन सक्सेनाला कामानिमित्ताने बराच प्रवास करावा  लागत असे. एकदा भीमसेन सक्सेनाला त्याच्यावर सोपविलेल्या कामानिमित्ताने दिल्ली ते कन्याकुमारी असा प्रवास करावा लागला. दक्षिण भारतातील मोगल सैन्यांतील हिंदू आणि मुस्लिम अशा दोन्ही अधिकाऱ्यांशी भीमसेन सक्सेनाचे स्नेहाचे संबंध होते.

सेतु माधवराव पगडी यांनी या ग्रंथाचे मराठीत भाषांतर केले आहे तर जे स्कॉट यांनी या ग्रंथाचा सारांश त्यांच्या 'History of the Deccan' या ग्रंथात दिलेला आहे. फार्सी भाषेतील मुळप्रत ब्रिटीश म्युझियममध्ये उपलब्ध आहे.

## ड) फुतुहात–ए–आलमगिरी : औरंगजेबाचे विजय :–

ईश्वरदास नागर माने हा ग्रंथ लिहिला. ईश्वरदास नागर हा औरंगजेबाचा मुख्य न्यायाधीश शेख इस्लाम याचा कारकून होता. त्यामुळे ईश्वरदासाला औरंगजेबाच्या छावणीत सतत राहावे लागे. त्याच्या या ग्रंथात इ.स. १६९८ पर्यंतच्या घटनांचा तपशील देण्यात आला आहे. सम्राट औरंगजेबाच्या मृत्यूनंतर आपल्या आठवणीवर विसंबून ईश्वरदास नागर

माने या ग्रंथाचे लेखन केले. या ग्रंथात प्रामुख्याने औरंगजेब बादशहाच्या विजयांचे वर्णन त्याने केलेले आहे. हा ग्रंथ अद्याप अप्रकाशित आहे. या ग्रंथाचे स्वरूप मराठी बखरी प्रमाणे आहे. ईश्वरदास नागर माने ग्रंथात दिलेल्या घटनांत सुसूत्रता नाही. तारखांच पूर्णपणे अभाव आहे.

ईश्वरदासाने आपल्या ग्रंथात औरंगजेबाच्या कारकिर्दीचा १७००पर्यंतचा इतिहास दिलेला आहे. छत्रपती शिवाजी महाराजांविषयी दिलेली माहिती फारशी विश्वसनीय नाही. सम्राट औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेची वर्णन ईश्वरदासाने दिलेले असून मराठ्यांचा स्वातंत्र्य संग्राम समजावून घेण्मासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरतो. छत्रपती संभाजी महाराजांच्या वधाचा तपशील देताना छत्रपती संभाजी महाराजांची स्वाभिमानीवृत्ती ईश्वरदासाने स्पष्ट केली आहे.

**इ) मुहम्मदनामा :–**

विजापुरचा बादशहा मुहम्मद आदिलशहा याच्या कारकिर्दीची माहिती देणारा हा ग्रंथ आहे. या फार्सी ग्रंथाचा लेख जुहूर हा दुसरा इब्राहिम आदिलशहा याच्या दरबारातील राजकवी जुहूरी याचा मुलगा होता. या ग्रंथाची अस्सल प्रत उपलब्ध नसून इ.स. १७८३मध्ये तयार करण्यात आलेली नक्कलप्रत उपलब्ध आहे. या ग्रंथात अनेक मराठा सरदारांची माहिती लेखकाने दिलेली असल्यामुळे मराठ्यांच्या इतिहासाच्या दृष्टीकोनातून हा ग्रंथ महत्वाचा आहे. विशेषत: शहाजीराजे भोसले यांच्या राजकीय कारकिर्दीविषयी महत्वपूर्ण तपशील या ग्रंथात आलेला आहे. शहाजीराजे भोसले यांचे वर्णन करताना जुहूर म्हणतो, ‘जुगाराच्या फाशाप्रमाणे नेहमी बाजू बदलणारा शहाजी.’ छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य सनथापनेपूर्वीची राजकीय, सामाजिक व आर्थिक परिस्थिती समजावून घेण्यासाठी हा ग्रंथ उपयुक्त ठरतो.

**फ) अलीनामा :–**

मुहम्मद नुस्मत उर्फ नुस्मती या कवीने हा ग्रंथ दख्खनी उर्दु भाषेत लिहिला. अली आदिलशहा याच्या दरबारात तो राजकवी म्हणून कार्यरत होता. त्याच्या ग्रंथात प्रामुख्याने शिवकालीन अफजलखान प्रसंग, पन्हाळा प्रकरण, शाहिस्तेखानावरील हल्ला, छत्रपती शिवाजी महाराजांवरील जयसिंगाची स्वारी इत्यादी प्रसंगाचे वर्णन आलेले आहे. तसेच विजापूरचा सरदार खवासखान याने छत्रपती शिवाजी महाराजांवर केलेल्या स्वारीची हकीकत लेखकाने मोठ्या कौतुकाने रंगविली आहे. स्वराज्याच्या भूतीविषयी छत्रपती शिवाजी महाराजांना कसा अभिमान होता, हे नुस्मतीने स्पष्ट केले आहे. तो म्हणतो, ‘खवानखानाला महाराजांनी निरोप पाठविला तो असा, या जागेवर आपल्या पावलाने मनुष्य येऊ शकेल, पण आमच्या पावलांशिवाय जाऊ शकणार नाही.’

अलीनामा या ग्रंथाच्या सहाय्याने शिवकालीन अनेक घडामोडीची माहिती उपलब्ध होत असल्याने शिवकालीन इतिहास लिहिण्यासाठी हा ग्रंथ महत्वाचा आहे. तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि विजापूरचा अली आदिलशहा यांच्यातील संबंधावरही या ग्रंथामुळे प्रकाश टाकता येतो.

**ग) फार्सी पत्रसंग्रह : –**

शिवकालाच्या इतिहासासाठी उपयुक्त ठरणारे काही फार्सी कागदपत्रांचे संग्रह उपलब्ध आहेत. इतर ग्रंथांपेक्षा इतिहासाच्या दृष्टीने पत्रव्यवहाराचे महत्व अस्सल साधनांच्या दृष्टीने अधिक आहे. कारण ही पत्रे समकालीन असून संबंधीत व्मक्तींची स्वत:ची असतात. मात्र अशा संग्रहातून काही पत्रे नक्कल असल्यामुळे त्मांचा उपयोग चिकित्सापूर्वक करणे आवश्यक आहे.

**अ) दफ्त अंजुमन :-**

सम्राट औरंगजेबाचा महत्त्वाचा सरदार मिर्झा राजा जयसिंग याने इ.स.१६६५मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरूद्ध दक्षिणेची मोहिम सुरू केली. दक्षिणेत आल्यावर आपल्या हालचाली आणि युद्ध विषयक डावपेच यांची माहिती मिर्झाराजे जयसिंग यांनी वेळोवेळी सम्राट औरंगजेबाला पत्रे लिहून कळविली. या पत्रांचा संग्रह मिझाराजे जयसिंगाचा चिटणीस उदयराज याने केला. तो दफ्त अंजुमन या नावाने प्रसिद्ध आहे. पुरंदरचा वेढा, पुरंदरचा तह, जयसिंगाची विजापुरची मोहिम इत्यादी घटना समजावून घेण्यासाठी हा पत्रसंग्रह उपयोगाचा आहे.

**२) खुतुत-इ-शिवाजी :-**

लंडनच्या रॉयल एशियाटिक सोसायटीत 'खुतुते शिवाजी' या नावाचा पत्रसंग्रह उपलब्ध आहे. या पत्र ंग्रहात एकूण ३२ पत्रे असून त्यांपैकी दोन पत्रे छत्रपती शिवाजी महाराजांची आहेत. परंतु ही पत्रे मूळ नसून नक्कल आहेत. या संग्रहात औरंगजेबाचा मुलगा अकबर याने संभाजी, कवी कलश आणि औरंगजेब यांना लिहिलेली पत्रेही संकलित करण्यात आलेली आहेत. या पत्रांवरून छत्रपती संभाजी महाराज आणि सम्राट औरंगजेब पुत्र अकबर यांच्या राजकीय संबंधाविषयी माहिती मिळते. याशिवाय छत्रपती शिवाजी महाराजांनी सम्राट औरंगजेबाला लिहिलेले सविस्तर पत्र या संग्रहात पहावयास मिळते.

**३) इन्शामे-इ- माधोराम :-**

सम्राट औरंगजेबाच्या पदरी लुत्फुल्लाखान नावाचा सरदार होता. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेत लुत्फुल्लाखानही दक्षिणेत आलेला होता. संताजी घोरपडे, रामचंद्र पंत अमात्य इत्यादी नामवंत मराठा सरदारांबरोबर लुत्फुल्लाखानाचा संघर्ष झाला होता. लुत्फुल्लाखानाच्या पदरी माधोराम नावाचा मुन्शी होता. त्याने लुत्फुल्लाखान, जहांदरशहा, कोकलतारा खान यांची अनेक पत्रे तयार केली होती. त्याच्या जवळील हा पत्रसंग्रह माधोरामाचा पुतण्या हरप्रसाद याने तयार केलेला असून तो 'इन्शाये माधोराम' या नावाने प्रसिद्ध आहे. मुघल-मराठा संघर्ष, मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध समजावून घेण्यासाठी हा पत्रसंग्रह बराच उपयुक्त आहे.

या पत्रसंग्रहाशिवाय ङ्क.अखबार-इ-दरबार, ,रूछआम आलमगिरी, या पत्रसंग्रहात शिवकालाच्या इतिहासाला उपयुक्त अशी बरीच पत्रे आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे यांनी प्रकाशित केलेली ऐतिहासिक फार्सी साहित्य खंड ६ यातही शिवकालीन इतिहासाच्या अभ्मासाच्या दृष्टीने उपमोगाची असलेली बरीच पत्रे आहेत.

या सर्व फार्सी साधनांच्या सहाय्याने शिवकालाचा इतिहास लिहिता येतो.

**मराठ्यांच्या इतिहासाची परकीय भाषेतील साधने :-**

शिवकालाचा इतिहास समजावून घेण्यासाठी पाश्चात्य साधने महत्वाची आहेत. कारण स्वराज्याच्या पश्चिम किनाऱ्यावर इंग्रज, पोर्तुगीज, डच, फ्रेंच या सारख्या पाश्चात्यांची व्यापारी केंद्रे होती. (वखारी). पोर्तुगिजांनी तर गोवा भागात आपले राज्यच स्थापन केले होते. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याचा विस्तार करताना महाराष्ट्राचा पश्चिम किनारा व्यापून टाकला होता आणि आपली राज्यसीमा अरबी समुद्रापर्यंत नेऊन भिडविली. त्यामुळे या किनारपट्टीवरील पाश्चात्य व्यापारी सावध झाले आणि त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या विरोधात कारवाया करण्याचा प्रयत्न सुरू केला, तेव्हा त्यांच्या वखारी मराठ्यांनी लुटल्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या सुरतेवरील स्वारीमुळे पाश्चात्य वखारवाले चांगलेच हादरले. त्यांनी व्यापारासाठी छत्रपती शिवाजी महाराजांकडे कौल मागितला. विनवण्या केल्या. प्रतिनिधी पाठविले. परंतु महाराजांच्या शत्रुला विशेषत: जंजिऱ्याच्या सिद्दीला इंग्रजांनी अंतस्थपणे मदत करण्याचे दुटप्पी धोरण सुरू ठेवले.

स्वराज्याशी व्यापार या दृष्टीकोनातून पाश्चात्यांचा मराठ्यांशी संबंध येत असे. म्हणून त्यांनी शिवकालात व्यापार विषयक सवलती स्वराज्यांत मिळविण्याच्या दृष्टीकोनातून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज यांच्याशी पत्रव्यवहार करून कधी भेटी घेवून संबंध प्रस्थापित करण्याचे प्रयत्न केले. यातून परस्परांचा जो पत्रव्यवहार आणि बोलणी झाली त्यावरून शिवकालाचा इतिहास समजण्यास मदत होते. परंतु बऱ्याचवेळा ऐकीव बातम्या आणि अफवा या बातमीपत्रांत आढळतात. त्यामुळे त्यातील माहिती इतर अस्सल साधनांशी पडताळून पाहिल्याशिवाय ग्राह्य धरता येत नाही.

**इंगजी साधने :–**

भारतात असलेल्या ब्रिटिशांच्या व्यापारी वखारी ईस्ट इंडिया कंपनीच्या निमंत्रणाखाली होत्या. शिवकालात सुरत, मुंबई, राजापूर, हुबळी, धरणगाव, कारवार येथे ब्रिटिशांच्या वखारी होत्या. या वखार प्रमुखांना आपल्या अधिकाऱ्यांकडे सदोदित पत्रव्यवहार करावा लागे, त्यांचे मार्गदर्शन घ्यावे  लागे. त्यामुळे ईस्ट इंडिया कंपनीच्या डायरेक्टर बोर्डापुढे मराठ्यांचे दक्षिणेतील राजकारण, त्यांच्या मोहिमा, ब्रिटीश व्यापाऱ्यांचे संरक्षण याबद्दल विचार–विनीमय होत असे. ब्रिटीशांच्या वखारींशी शिवाजी महाराजांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध आला. महाराजांनी दक्षिणेची मोहिम हाती घेतली तेव्हा मद्रासच्या ब्रिटीश वखारवाल्यांनी त्यांच्या हालचालींची माहिती गोळा केली. ब्रिटीशांच्या दप्तरातून मराठ्यांचा तारिखवार इतिहास शोधता येतो. इंग्रजांचा हा पत्रव्यवहार फॅक्टरी रेकॉर्डस  या नावाने प्रसिद्ध आहे. 'रॉबर्ट ऑर्मेफमाने हिस्टॉरिकल फ्रेंगमेंट'  हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथात त्याने शिवकालातील घटना कागदपत्रांच्या आधारे देण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे या ग्रंथाला साधनग्रंथ म्हणून महत्त्व दिले जाते.

छत्रपती शिवाजी महाराजांची भेट घेण्याची संधी अनेक ब्रिटीश वकिलांना मिळाली होती. त्यांनी आपल्या रोजनिशीत छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन केलेले आहे. इंग्रज प्रतिनिधी थॉमस निकल्स आणि  हेन्सी ऑक्झिडेन यांनी अनुक्रमे इ.स. १६७३ आणि १८७४मध्ये रायगडाला भेट दिली होती. हेन्सी ऑक्झिडेन हा छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी रायगडावर हजर होता. त्याने आपल्या रोजनिशीत छत्रपती शिवाजी

महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्यचे वर्णन तपशीलाने दिले आहे. इ.स. १६७२ मध्ये स्टीफन उस्टीक, इ.स. १६७५मध्ये सॅम्युअल ऑस्टिन यांनी रायगडावर महाराजांची भेट घेतली होती. फॅक्टरी रेकॉर्डसमध्ये या दोन्ही प्रतिनिधींच्या भेटींची माहिती आलेली आहे. इंग्रज वखारवाले छत्रपती शिवाजी महाराजांना पूर्वेकडील देशातील अत्यंत धोरणी राजा म्हणून मानत होते.

डॉ. जॉन फ्रामर हा वैद्य इ. स. १६७२-८१ च्या दरम्मान भारतात आला होता. मुंबई, वसई, ठाणे, कल्याण, जुन्नर, कारवार इत्यादी दक्षिणेतील स्थळांना त्याने भेटी दिल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांचीही भेट त्याने घेतली होती. आपल्या वृत्तांतात त्याने मराठ्यांविषयी बरीच माहिती दिलेली आहे. ईस्ट इंडिया कंपनीच्या कारकिर्दीतील कागदपत्रे लंडन, कलकता, मद्रास, मुंबई येथील रेकॉर्ड ऑफिसमध्ये आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पत्रासंबंधीचे संकलन करून 'English Records on Shivaji' हा ग्रंथ तयार केला गेला आहे.

डॉ. सेन मांनी 'Foreign Biographies of Shivaji' या ग्रंथाचे संपादन केले आहे. या ग्रंथात डॉ. सेन यांनी पाश्चात्य लेखकांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयी इंग्रजीत माहिती दिलेली आहे. इंग्रजी भाषेतील रेकार्ड लंडनच्या कॉमनवेल्थ लामब्ररीमध्ये पहावयास मिळते. वा. सी. बेंद्रे यांनी यातील बराचसा पत्रव्यवहार भाषांतरीत केलेला आहे.

याशिवाय तंजावर येथील सरस्वती महाल ग्रंथालय व मद्रास येथील मेकॅझी संग्रह मराठ्यांचा इतिहास लिहिण्यास मोलाची माहिती पुरवितात. इंग्रजी साधनांत अप्रकाशित साधने बरीच उपलब्ध आहेत. त्यात वखारीच्या खासगी पत्रव्यवहाराशिवाय स्थानिक व हिंदुस्थाानातील इतर भागातील परिस्थितीचे वर्णन देणारे अहवाल आहेत. प्रत्येक वखारीतील बारनिशी व रोजनिशी, तहनामे व याद्या यांचा मराठ्यांच्या इतिहासाला उपयोग होतो. मात्र या साधनांचा उपयोग करताना सावधगिरी बाळगावी लागते. इंग्रजी कागदपत्रांतील माहिती समकालीन असल्याने महत्वाची असली तरी त्यात गावाच्या व नावांच्या बऱ्याच चुका झालेल्या आहेत. इंग्रजांच्या हिंदू चालीरिती चांगल्या अंगवळणी न पडल्याने त्यांच्या पत्रातून साध्या गोष्टींचा हास्यास्पद विपर्यास आढळतो.

असे असले तरी इंगजी साधनांची उपयुक्तता सांगताना वा. सी. बेंद्र म्हणतात, बारकाईने माहिती मिळवून ती तपशीलवार व क्रमवार सांगण्याची इंग्रज लोकांची पद्धत शास्त्रशुद्ध आहे. इंग्रजी दप्तरातील समकालीन साधने अस्सल आहेत.

**२) डच साधने :-**

इंग्रजांप्रमाणेच डचांनी भारतात मच्छलीपट्टण, सुरत, वेंगुर्ला, मलबार इत्यादी ठिकाणी वखारी स्थापन केल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रारंभीच्या हालचालीच्या काळात त्यांचा वेंगुर्ल्याच्या डचांशी संबंध आला. डच आणि पोर्तुगीज यांच्यात नेहमी स्पर्धा चालत असे. त्यामुळे पोर्तुगीजांच्या विरोधात एतद्देशीय राज्यकर्त्यांना मदत करण्याचे धोरण डच वखारवाले स्विकारीत. परंतु डचांचे सामर्थ्य विशेष नव्हते.

व्यापारी सवलती मिळविण्यासाठी डचांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती

संभाजी महाराज यांच्याशी संपर्क साधल्याचे दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराज कर्नाटक दिग्विजयावर असताना डच वकील हर्बट डिजागेर त्यांना भेटला होता. डच डॉक्टर व प्रवाशी नेहमी मुख्य ठिकाणी गेले असल्याचे स्पष्ट होते. डच व्यापारी दक्षिण कर्नाटकात बरेच दिवस व्यापार करीत होते.

डचांचा सर्व पत्रव्यवहार आमस्टरडॅम मेथे वेस्ट इंडियन स्कॉलर्स हाऊस येथे संकलित करण्यात आला आहे. पुढे हा दप्तरखाना व मिडलब्रगचा दप्तरखाना १८५६ मध्ये हेगला नेण्यात आला. हा संग्रह सन १९२३ पर्यंत तारीखवार लावलेला आहे. या संग्रहात ५६४ दप्तरे हिंदुस्थानविषयक आहेत. त्यातील बरीचशी कागदपत्रे शिवकालीन आहेत. इतर कागदपत्रांत इतर राजांशी झालेले तह, बोलणी व कारस्थाने रचली जात याबद्दलची माहिती आहे.

याशिवाय डी. जंग (De Jonge) आणि एल. व्हान दिवेंटर (l. Vandeventer) यांनी हिंदुस्थानातील डच पत्रव्यवहार प्रकाशित केलेला आहे. तसेच रेव्हरंड हेरॉस यांनी अनेक डच कागदपत्रांचा इंग्रजी अनुवाद केला आहे. याशिवाय अनेक डच प्रवाशांची प्रवासवर्णने उपलब्ध आहेत. डच साधनांच्या संदर्भात वा. सी. बेंद्रे म्हणतात, या ऐतिहासिक साधनांचे महत्त्व असे, की ज्या कालनिर्देशाच्या अभावी मराठ्यांचा इतिहास विस्कळीत व त्रुटित होवून राहिला आहे, त्या कालनिर्देशाला ही साधने फार महत्वाची ठरतील. यातील दक्षिण कर्नाटकातील माहिती समकालीन व स्थानिक असल्याने महत्वाची आहे. या डच लोकांचा स्थानिक माहितीचा अहवाल लिहिण्याचा परिपाठ होता. त्यासाठी ते स्वतंत्र माणूस नेमित. अशा अहवालात व प्रवास वृत्तात मराठ्यांच्या इतिहासातील दुर्धर परंतु अज्ञात स्थळे उकलण्यास योग्य अशी माहिती मिळू शकेल.

डच दप्तराला ‘डाग रजिस्टर’ या नावाने ओळखले जाते. हे दप्तर हेग येथे ठेवलेले आहे. या दप्तरात इ. स. १६४० ते १८०७ पर्यंतच्या घडामोडी दिलेल्या आहेत. डॉ. बाळकृष्णांनी या दप्तराचे भाषांतर करून “Shivaji the Great’ या ग्रंथात त्याचा उपयोग केला आहे. या दप्तरातून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावरील शाहिस्तेखान, जयसिंगाची स्वारी, शिवाजीची वेंगुर्ल्यावरील मोहिम, सुरतेची स्वारी इत्यादी माहिती मिळते.

**३) पोर्तुगीज साधने :–**

भारतीय राजकारणात सहभाग घेवून भारतात आपल्या राज्याची स्थापना करणारे पोर्तुगीज हे पहिले युरोपियन होते. शिवकालामध्ये गोवा प्रदेशावर पोर्तुगीजांची सत्ता होती. तसेच वसई, दीव, दमण, साष्टी, बारदेश इत्यादी प्रदेशांवरही पोर्तुगीजांचे वर्चस्व प्रस्थापित झालेले होते. हे प्रदेश मराठा राज्याला जवळचे होते. लिस्बन आणि एव्होस या ठिकाणी असलेल्या दप्तरखान्यातून मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधीत अशी हजारो कागदपत्रे आहेत. त्मयांची संख्या १२,४६५ एवढी आहे.

पोर्तुगीज व्हाईसरॉयने आपल्या राजास लिहिलेली पत्रे, मराठा व मोगल सरदारांना लिहिलेली पत्रे, आपल्या मंडळातील ठराव, मासिक व वार्षिक अहवाल, पोर्तुगीज राजाकडून व्हाईसरॉयला आलेली पत्रे इत्यादींचा समावेश आहे. या कागदपत्रांच्मया सहाय्याने छत्रपती शिवाजी महाराजांची सुरतेची स्वारी, बारदेश स्वारी, फोंड्याचा वेढा, गोव्यावरील नियोजित हल्ला, छत्रपती संभाजीचा रेवदंडा चौलचा वेढा, फोंड्याचा लढा, गोव्याचा वेढा इत्यादी

अनेक प्रसंग समजावून घेण्यास पोर्तुगीज दप्तरातील कागदपत्रे उपयोगी आहेत.

पोर्तुगीज लेखकांनी लिहिलेल्या ग्रंथातून शिवशाहीच्या इतिहासासंबंधी माहिती मिळते. गोव्याचा विजरई तिसरा कोंदी द लिन्हारेस याच्या दैनंदिनीमध्ये शहाजी व इतर मराठे सरदार यांच्याविषयी महत्त्वाची माहिती आलेली आहे. कोस्मिदग्वार्द या कॅथॅलिक लेखकाने १६९५ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र पोर्तुगीज भाषेत लिहिले आहे. या चरित्रात काल्पनिक आणि अतिरंजित स्वरूपाच्या कथा घुसडल्या असल्यामुळे ऐतिहासिक साधन म्हणून या ग्रंथाचे मूल्य शून्य आहे. असे असले तरी या ग्रंथातून कोकणातील देसायांची आलेली माहिती उपयुक्त आहे.

'तोरि दु तोंबु' या कागदपत्रांत पोर्तुगीज-मराठे संबंध, पोर्तुगीज-मोगल संबंध या बाबतची कागदपत्रे आहेत. या कागदपत्रांच्या आधारे डॉ. पिसुर्लेकर यांनी अनेक उपयुक्त ग्रंथ लिहिले असून, पोर्तुगीज-मराठे संबंध हा त्यांचा पुणे विद्यापीठाने प्रकाशित केलेला ग्रंथ प्रसिद्ध आहे. गोव्याचे पुराणवस्तू संशोधन विभागाचे प्रमुख बागास परेरा यांनी पोर्तुगीज कागदपत्रांचे अनेक खंड प्रकाशित केले आहेत. त्यांचा मराठी अनुवाद महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'मराठ्यांच्या इतिहासाची साधने-पोर्तुगीज दप्तर' या नावाने दोन खंडांत प्रसिद्ध केला आहे. हा अनुवाद स. रा. देसाई यांनी केलेला आहे. तसेच 'ताराबाईकालीन कागदपत्रे' या शिवाजी विद्यापीठाने प्रसिद्ध केलेल्या ग्रंथातही श्री. देसाई यांनी अनुवादित केलेल्या कागदपत्रांचा समावेश आहे. या सर्व कागदपत्रे आणि ग्रंथाच्या सहाय्याने मराठ्यांच्या इतिहासाचा अभ्यास करता येतो.

**४) फ्रेंच साधने :-**

भारतात इंग्रज, पोर्तुगीज आणि डच यांच्मया प्रमाणेच फ्रेंचांच्याही पाँडेचरी, सुरत, मद्रास, कोरोमंडल इत्यादी ठिकाणी वसाहती होत्या. पाँडेचरी हे फ्रेंचांचे मुख्य केंद्र होते. फ्रेंचांनी मायदेशी लिहिलेली पत्रे, हिंदुस्थानातील राजांना, अधिकाऱ्यांना व सरदारांना लिहिलेली पत्रे यांचा फ्रेंच साधनांत समावेश होतो. ही फ्रेंच साधने पॅरिस व लंडन येथील दप्तरखान्यांत उपलब्ध आहेत. या साधनांमधील मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीने उपयुक्त साधन म्हणजे फ्रेंच गव्हर्नर मार्टिन माने लिहिलेली रोजनिशी. या रोजनिशीचे इंग्रजी भाषांतर सर यदुनाथ सरकार यांनी प्रसिद्ध केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज आणि फ्रेंचांचा फारसा संबंध आलेला नाही. मार्टिन हा पाँडेचरीचा गव्हर्नर असून त्याच्या रोजनिशीत छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंजीस वेढा दिला, त्यावेळॅ मार्टिनने आपला ब्राह्मण वकिल महाराजांकडे पाठविला होता. रोजनिशीचे हस्तलिखित पॅरिस येथील "Archives Nationals' या संग्रहात उपलब्ध आहे.

मार्टिनच्या रोजनिशी विषयी जदुनाथ सरकार लिहितात, ''मार्टिनचे हेर शिवाजीच्या शिबिरांत वारंवार फिरून तेथील खडान खडा माहिती मार्टिन यास पुरवीत असत व तो ती तात्काळ आपल्या रोजनिशीत दाखल करीत असे.''

La Compagnie Indes Orientales (ला कॅम्पेइंडेज ओरीएन्टल्स) हा पत्रसंग्रह tayage des Indes Orientales (व्हाऐज डेस इंडेज) हा अॅबेकॅरे याचा ग्रंथ त्याचप्रमाणे

डोर्लेन्स याचा The History de Shivaji हा ग्रंथ आणि जेसुईट मिशनऱ्याचा डर Mission dy Madyre हा पत्रव्यवहार या सर्व फ्रेंच साधनांमधून मराठ्यांच्या इतिहासाला उपयुक्त माहिती मिळते.

इतिहास संशोधक डॉ. हाताळकर यांनी प्रकाशित व अप्रकाशित अशा फ्रेंच कागदपत्रांचा वापर करून Relation between the French and the Maratha हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून १६६८ ते १८१५ या कालखंडाची माहिती उपलब्ध होते.

वरील सर्व पाश्चात्य भाषेतील साधनांमधून मराठ्यांच्या इतिहासाला उपयुक्त असलेली माहिती मिळते.

### १.२.२ विदेशी प्रवाशांची प्रवासवर्णने :–

१७ व्या शतकात ३०हून अधिक पाश्चात्य प्रवाशी भारतात येवून गेले. यापैकी काही प्रवाशी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या स्वराज्यात येवून गेले. हे प्रवाशी प्रामुख्याने इंग्लंड, इटली व फ्रान्स मया देशांतून आले होते. यापैकी कोणी व्यापारी, कोणी वेदू, कोणी धर्मगुरू, कोणी सैनिक, कोणी खलाशी तर कोणी साहसी प्रऐशी अशा भिन्न–भिन्न पेशातील होते. त्यातील बहुतांश प्रवाशांनी आपल्या प्रवासवर्णनात मराठा राज्यातील पुष्कळशा घटनांचे उल्लेख सविस्तररित्या दिलेले आहेत. मराठा कालखंडातील सामाजिक, आर्थिक स्वरूपाची माहिती त्यांच्या प्रवासवर्णनांतून मिळते. मात्र या प्रवशांनी घटना ऐकिव माहितीवर विसंबून लिहिलेल्या आहेत. त्यामुळे दिलेल्या महितीच्या उपमोग चिकित्सकपणे करणे आवश्यक ठरते. असे असले तरी या प्रवाशांची प्रवासवर्णने समकालीन असल्याने मराठ्यांच्या इतिहासाला अत्यंत उपयुक्त ठरतात. या प्रवशांनी आपली माहिती शास्त्रशुद्ध कालनिर्देश करून देण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय पाश्चात्य प्रवाशांनी आपल्या प्रवास वृत्तांतात स्थानिक लोकांचे पोशाख, राहणीमान, सवयी, दैनंदिन जीवन, तत्कालिन बाजारभाव, सामाजिक चालीरिती, त्यांना प्रवासात आलेल्या अडचणी, अधिकाऱ्यांची वर्तणुक, दळणवळणाची साधने, मजुरीचे दर इत्यादींची माहिती दिलेली आहे. इतिहासाच्या अभ्यासाला याचा फार उपयोग होतो. कारण स्थानिक लेखकांना आपल्या स्वजनांच्या या बाबी नित्याच्या असल्यामुळे व त्यांना त्यांचे महत्त्व वाटत नसल्यामुळे त्यांनी आपल्या लिखाणात त्या लिहिलेल्या नाहीत. त्यामुळे पाश्चात्य प्रवाशांची ही प्रवासवर्णने मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी अत्यंत उपयक्त ठरतात.

**१७ व्या शतकात पुढील प्रवाशी महाराष्ट्रात येवून गेले.**

**बर्नीमर :–** हा फ्रेंच प्रवासी इ. स. १६५५ ते १६६७ या कालावधीत भारतात येवून गेला. बर्नीमरने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यालाही भेट दिली होती. त्याच्या प्रवासवर्णनांत सतीची चाल, जगन्नाथाची यात्रा, सुर्यग्रहणाच्या वेळचे हिंदुंचे धार्मिक आचार इत्यादी सामाजिक स्वरूपाची माहिती पहावयास मिळते. बर्नीमरने आपल्या ग्रंथात छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र दिलेले आहे.

**ॲबेकॅरे : –** हा फ्रेंच प्रवासी इ. स. १६८८ ते ७४ मा दरम्यान भारतात आला होता. त्याने छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याला भेट दिली होती. त्याच्या प्रवास वृत्तांतात छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठे यांच्या संदर्भात मनोरंजक स्वरूपाची माहिती

आलेली आहे. त्याचा ग्रंथ चिकित्सक असून घटनांचा कालपट त्याने बरोबर दिला आहे. अॅबेकॅरे आपल्या प्रवासवर्णनांत छत्रपती शिवाजी महाराजांचे वर्णन, one of the greatesr man, the east has never seen असे करतो. शिवकालीन आर्थिक परिस्थिती समजावून घेण्यासाठी अॅबेकॅरेचे प्रवासवर्णन अत्यंत उपयुक्त ठरते.

**थेबेनॉट :–** हा फ्रेंच प्रवासी इ. स. १६६५ ते १६६७ च्या दरम्यान भारतात आला होता. त्याने औरंगाबाद, दौलताबाद, वेरूळ, अजिंठा, भागानगर, सुरत या शहरांना भेटी दिल्या होत्या. त्याला भूगोलाचे ज्ञान चांगले होते. थेबेनॉटच्या प्रवास वृत्तांतावरून मराठ्यांच्या इतिहासावर प्रकाश टाकता येतो.

फादर पिएर द ऑर्लिन्स :- या पोर्तुगीज प्रवाशाने इ. स. १६८८च्या सुमारास Histoire De Shivaji हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथातून शिवकालाच्या इतिहासाला उपयुक्त माहिती मिळते.

**कॉस्मा –डा–गुर्डा :–** या फ्रेंच लेखकाने इ. स. १६९५मध्ये आपला ग्रंथ लिहिला. त्याच्या लिखाणात अपूर्णता आढळते. तरी त्याच्या लिखाणातून तत्कालिन चलन व्यवस्था, नाणी, मराठ्यांचे लष्करी संघटन, सैन्याला मिळणारी वागणूक, महाराष्ट्रातील राजा व प्रजा यांच्यातील संबंध इत्यादीबद्दल अत्यंत मोलाची माहिती मिळत असल्यामुळे कॉस्मा-डा-गुर्डा याचा ग्रंथ शिवकालाच्या इतिहासासाठी उपयुक्त ठरेल.

**डॉ. जॉन फ्रामर :–** हा ईस्ट इंडिया कंपनीचा डॉक्टर होता. इ. स. १६७२ ते १६८१ या दरम्यान तो हिंदुस्थानातील ईस्ट इंडिया कंपनीत डॉक्टर म्हणून काम पहात होता. त्याने मुंबई, रायगड, जुन्नर, वेंगुर्ला, कारवार, गोवा, गोकर्ण इत्यादी ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक प्रसंगी डॉ. जॉन फ्रामर रायगडावर हजर होता. त्याने Travels in the India in the 17th Centur या नावाचा ग्रंथ लिहिला. त्याच्या या प्रवास वर्णनांत मध्ययुगीन महाराष्ट्रातील लोकांचे पोशाख, खान-पान, आहार, राजदरबार त्याचबरोबर मुंबई आणि वसई या शहरांची वर्णने या संबंधीची सविस्तर माहिती आलेली आहे.

**निकोलाय मनुची :–** हा इटालियन प्रवासी वयाच्या १४ व्या वर्षी मायदेशाहून निघाला. पुढे तीन वर्षांनी म्हणजे १६५६ मध्ये केवळ मोगामोगाने हिंदुस्थानात आला. तो हिंदुस्थानातून परत गेलाच नाही. इ. स. १७१७ मध्ये तो हिंदुस्थानातच मरण पावला. हिंदुस्थानातील वास्तव्यात तो संपूर्ण हिंदुस्थानभर फिरला. त्याने अनेक ठिकाणी नोकऱ्या केल्या. आपल्या प्रवासात व नोकरीत त्याने जे पाहिले, ऐकले, अुभवले त्याचा वृत्तांत त्याने Storia Do Mogor (मोगलांचा इतिहास) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा काही भाग पोर्तुगीज भाषेत तर काही भाग फ्रेंच व इटालियन भाषेत आहे. या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर विल्यम आयर्विन यांनी तर मराठी भाषांतर असे होते मोगल नावाने महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केले आहे.

निकोलय मनुची माने छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र आपल्या ग्रंथात दिले आहे. मनुची माने मोगलांच्या दरबारात नोकरी स्विकारली होती. औरंगजेबाने दक्षिणेची मोहिम सुरू केली, त्यावेळी मनुची औरंगजेबाबरोबर तोफखान्याचा अधिकारी म्हणून दक्षिण

भारतात आला होता. मनुचीने आपल्या वृत्तांतात औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेचा वृत्तांत दिलेला आहे. मराठा-मोगल संघर्ष, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध समजावून घेण्यासाठी त्याच्या ग्रंथाचा उपयोग होतो.

आपला ग्रंथ फ्रान्सचा राजा चौदावा लुई याला अर्पण करावा अशी मनुचीची इच्छा होती.

**डॉ. जॉन जेमिली कॅरेरी :-** कॅरेरी हा इटालियन डॉक्टर होता. त्याने महाराष्ट्रातील अनेक शहरांना भेटी दिल्या होत्या. उदा. वसई, घोडबंदर, कान्हेरी, चौल, दाभोळ, फोंडा, मुधोळ, बेळगाव या गावांना व शहरांना त्याने भेटी दिल्या होत्या. या ग्रंथातून या शहरातील सामाजिक व आर्थिक स्वरूपाची माहिती त्याने दिलेली आहे.

वरील सर्व पाश्चात्य प्रवाशांच्या प्रवासवर्णनातून आपल्याला मराठ्यांच्या इतिहासासाठी आवश्यक असणारी माहिती मिळते. त्यांच्या वर्णनातील सामाजिक, भौगोलिक व इतर माहिती क्वचितच इतरत्र आढळते. त्यांच्या प्रवासवर्णनांत त्यांनी प्रत्यक्ष पाहिलेल्या वस्तुस्थितीचे वर्णन शुद्ध व सहज असते. निसर्गरचना, पशुपक्षी, वनस्पती, जंगल याविषयी महत्त्वपूर्ण माहिती त्यांनी दिलेली आहे. वजने, मापे व चलनपद्धती यांचा त्यांनी फार बारकाईने अभ्यास केला होता.

असे असले तरी हे प्रवासी स्वत:बद्दल फाजील अभिमान बाळगत असून त्यांच्या लिखाणांत आत्मप्रौढी दिसून येते. त्यांचा पौर्वात्य संस्कृतीशी मोजकाच संबंध आलेला असल्यामुळे ते पौर्वात्य संस्कृतीचा व चालीरितींचा उपहास करताना आढळतात. म्हणून त्यांच्या वृत्तांताचा चिकित्सक अभ्यास करून इतिहासाचे साधन म्हणून वापर करावा लागतो.

## १.२.३ मराठ्यांच्या इतिहासाची पुरातत्वीय साधने :-

पुरातत्वीय साधनांचे दोन भाग आहेत. १) पुरातत्वीय वस्तू २) दप्तरखान्यातील कागदपत्रे

### १) पुरातत्वीय वस्तू :-

फ्रेंच इतिहास संशोधक प्रो. लॅंजीलॉस व सिनबॉस म्हणतात, " No Documents No History' इतिहासाचे सत्य चित्र जाणून घेण्यासाठी अस्सल कागदपत्रे आवश्यक असतात. परंतु ज्या कालखंडातील कागदपत्रे उपलब्ध होत नाहीत त्या काळाचा इतिहास जाणून घेण्यासाठी पुरातत्वीय वस्तूशिवाय दुसरा आधार नाही. अर्थात पुरातत्वीय वस्तू काळाच्या ओघात ऊन, वारा, पाऊस यांच्या उपसर्गाने खराब होतात, नष्ट होतात किंवा त्यांचे स्वरूप बदलते हे लक्षात घेतले पाहिजे.

### शिलालेख व ताम्रपट :-

शिलालेख हे एक अविनाशी साधन आहे. शिलालेखाच्या सहाय्याने पुरातन फार मोठा इतिहास उपलब्ध करून घेता येतो. परंतु मध्ययुगीन महाराष्ट्रात लेखनाची बरीच साधने निर्माण झाल्याने शिलालेख फक्त इमारती, किल्ले, वृंदावने इत्यादी बांधकामावर लावले जात. शिलालेखांचा वास्तू बांधणारा किंवा ज्याच्यासाठी वास्तूचे बांधकाम करण्यात आले

आहे त्याच्या नावाचा उल्लेख, शक संवत्सर देण्यापुरताच उपयोग होत असे. त्यामुळे या शिलालेखांतून फारशी माहिती उपलब्ध होत नाही.

शिवकालीन शिलालेख फारसे उपलब्ध नाहीत. काही किल्ल्यांमधून शिलालेख आढळतात. ते फारशी व उर्दू भाषेतील आहे. या शिलालेखांवरून गडाचा दरवाजा किंवा तट केव्हा बांधला, किल्ल्यावरील एखादे मंदिर केव्हा बांधले, किल्ल्यावरील पाण्याची टाकी, तलाव केव्हा पूर्ण झाला इत्यादी माहिती शिलालेखांतून आढळते.

शिवकालातील रायगड किल्ल्यावरील शिलालेख व तंजावर मेथील बृहडेश्वराच्या मंदिरातील शिलालेख इतिहासाच्या दृष्टीने महत्वाचे मानले जातात. तंजावर मेथील बृहडेश्वराच्या मंदिरातील शिलालेख इ. स. १८०३ च्या सुमारास कोरला गेलेला असल्यामुळे त्यातील माहिती विश्वसनीय मानता येत नाही. या शिलालेखांत भोसले घराण्यातील घटना वर्णन केलेल्या आहेत.

शिलालेख लिहिताना परमानंदकृत शिवभारत या ग्रंथाचा आधार शिलालेख लिहिणाऱ्याने घेतलेला दिसतो. या शिलालेखाविषयी यदुनाथ सरकार म्हणतात, तंजावरचे घराणे श्रेष्ठ आहे, असे दाखविण्यासाठी हा शिलालेख तयार झाला असून, त्यात शहाजी व शिवाजी यांचा विपर्यस्त स्वरूपाचा वृत्तांत आहे.

पश्चिम महाराष्ट्रात अनेक ताम्रपटही मिळाले आहेत. परंतु ऐतिहासिकदृष्ट्या त्यातील माहिती फारशी महत्वाची नाही.

**नाणी :–**

शिलालेखाप्रमाणेच नाणी हे एक अविनाशी ऐतिहासिक साधन आहे. इतिहासाच्या दृष्टीने नाण्यांचे एक वेगळे महत्व समजले जाते. कारण लिखित इतिहासाचे पुरावे म्हणून शिलालेख, ताम्रपट, समकालीन कागदपत्रे व नाणी हे बरेच काही सांगून जातात. त्यामुळे त्या त्या काळातील ऐतिहासिक, सामाजिक, आर्थिक घडामोडींचा परामर्श घेता येतो.

निरनिराळ्या कालखंडात निरनिराळे राज्यकर्ते होवून गेले. त्यांनी वेगवेगळ्या भागांत आपली राज्ये स्थापन केली. परंतु सर्वच राज्यकर्त्यांचे ऐतिहासिक लेख किंवा पुरावे लिखित स्वरूपात पहावयास मिळत नाहीत. त्या दृष्टीने विनिमयात असलेली चलनी नाणी ही समकालीन इतिहास, राज्यकर्ते, व्यापार, राज्य शासनाचा काल इत्यादीबद्दल माहिती सांगू शकतात.

नाणी या ऐतिहासिक साधनाच्या सहाय्याने राजाच्या नावाचा आणि त्याच्या कारकिर्दीचा बोध होऊ शकतो. ज्यावेळी इतर कोणतेही समकालीन साधन उपलब्ध नसते. त्यावेळी नाणी महत्वाची ठरतात. शिवकालात नाणी पाडण्यासाठी मराठ्यांनी टांकसाळी सुरू करण्यासाठी फारसा प्रयत्न केल्याचे दिसत नाही. फक्त छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेकाच्या वेळी रायगडावर एक टांकसाळ सुरू केल्याचा संदर्भ मिळतो. या टांकसाळीतून छत्रपती शिवाजी महाराजांनी होन आणि शिवराई ही नाणी पाडली होती. पेशवे कालखंडात मात्र महाराष्ट्रात बऱ्याच सरकारी व खासगी टांकसाळी उघडण्यात आल्या होत्या. मुंबई, पुणे, अहमदनगर, कोल्हापूर, धुळे येथील वस्तु संग्रहालयांत मराठाकालीन नाणी मोठ्या प्रमाणावर पहावयास मिळतात.

**चित्रे :–**

हिंदुस्थानात फार प्राचीन काळापासून चित्रकला प्रचलित होती. संपूर्ण हिंदुस्थानात मोठ्या प्रमाणावर लेण्या कोरल्या गेल्या. अजिंठा, वेरूळ, घारापुरी, भोजे-कार्ले, जुन्नर येथील कोरीव लेण्या, दगडी मूर्ती आणि लेण्यांमधील चित्रे भारतीय चित्रकलेची साक्ष देतात. चित्रकलेच्या क्षेत्रात जयपूर, दिल्ली, काश्मीर येथील संप्रदाय आहेत.

शिवकालात मराठ्यांची चित्रकलेत विशेष प्रगती नव्हती. परंतु पेशवेकाळात मराठ्यांचे राज्य उत्तरेकडे वाढल्यावर मराठा सरदारांमध्ये चित्रकलेबद्दल आस्था व प्रेम निर्माण झाले. पहिल्या माधवराव पेशव्याच्या पदरी माणकोजी चितारी या नावाचा पगारी चित्रकार होता. माधवराव पेशव्यांच्यानंतर नाना फडणीसाने दरबारी चितारी बाळगले होते व या चिताऱ्यांनी हिंदुस्थानातील ठिकठिकाणच्या राजवाड्यांतून चित्रे आणली. राजस्थानात भागवताचा सचित्र ग्रंथ एका चित्रकाराने तयार केला होता. तो नाना फडणीसाने मिळविला. जेम्स वेल्स नावाचा इंग्रजी चित्रकार मॅलेट बरोबर पुण्यास आला होता. त्याने सवाई माधवराव, नाना फडणीस, महादजी शिंदे, परशुरामभाऊ पटवर्धन यांची चित्रे काढली. सवाई माधवरावांच्या गणपती महालातील दरबाराचे चित्र जेम्स वेल्सने तयार केले होते. सवाई माधवराव पेशव्यांनी शनिवारवाड्यात चित्रशाळा सुरू करून त्याचा प्रमुख जेम्स वेल्सची नियुक्ती केली होती. त्याच्या हाताखाली असलेल्या गंगाराम तांबट या चिताऱ्याने वेरूळच्या लेण्याची चित्रे वाड्यात काढली होती.

वाडा सुशोभित करण्यासाठी वाड्यातील मुख्य दिवाणखात्यात, चित्रमंदिरात विविध प्रकारची चित्रे काढली जात. ही चित्रे साधारणत: पुराणे व महाकाव्ये यातील प्रसंगावर आधारित असत. चित्राचा आकार लहान राहत असे. चित्रे काढण्यासाठी पांढऱ्या, किरमिजी व तपकिरी रंगाचा वापर केला जात असे. या चित्रावरून तत्कालीन पोशाख पद्धती, अलंकार यांची माहिती मिळते.

मराठा राज्यकर्त्यांच्या शिवाय कित्येक खासगी लोकांकडे मराठा कालखंडातील चित्रांचे संग्रह उपलब्ध आहेत. भारत इतिहास संशोधक मंडळ संग्रह, पारसनिस व मावजी संग्रह, औंध येथील म्युझियम वगैरे संग्रहातून दक्षिणेतील सरदार, राजेरजवाडे यांची चित्रे बरीच आढळतात. या चित्रांवरून तत्कालीन समाज जीवनाचा अभ्यास करता येतो.

**नकाशे :-**

इतिहास संशोधनासाठी नकाशे हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. नकाशाच्या अभ्यासावरूनच इतिहासकाळात झालेल्या लढायांची व भौगोलिक परिस्थितीची पूर्ण माहिती होऊ शकते. जमिनीचे नकाशे काढणे किंवा एखाद्या क्षेत्राचे नकाशाच्या रूपाने विवेचन करण्याची पद्धती शिवकालात प्रचारत होती. परंतु हे नकाशे मोठमोठ्या देशांचे अगर प्रांताचे नसत. हिंदुस्थानात बाहेरून येणारे विदेशी प्रवाशी नकाशे काढीत असत. हे प्रवासीसुद्धा नकाशे काढताना दिशेचा उल्लेख करीत नसत. अंतराबद्दल ते फारसे बिनचूक नसत. ऐकीव माहितीवर बराच भर दिलेला असे. त्यामुळे मराठेकालीन नकाशे इतिहासाच्या दृष्टीने फारसे उपयुक्त नाहीत. डेक्कन कॉलेज दप्तरखाना मंडळ पुणे येथे ५० नकाशांचा संग्रह व अनेक युद्ध योजनांचे आराखडे उपलब्ध आहेत. फ्रेंच नकाशा तज्ज्ञ सॅमसन-ड-अवेव्हिले यांनी काढलेला इ. स. १६५४ चा मोगल साम्राज्य दाखविणारा नकाशा उपलब्ध आहे.

तळेगावची लढाई, खड्याची लढाई, धारवाडच्या किल्ल्याचा नकाशा इत्यादी उपलब्ध आहेत.

**किल्ले, वाडे, इमारती :–**

छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ल्यांचे महत्त्व ओळखले होते. अगदी प्राचीनकाळापासून संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्यांचा उपयोग होत असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ताब्यात जवळजवळ ३६१ किल्ले होते. किल्ल्यांच्या बांधकामासाठी आणि डागडुजीसाठी महाराजांनी फार मोठ्या प्रमाणावर खर्च केला होता. यातील बहुतांश किल्ले आजही इतिहासाची साक्ष देतात. एखाद्या ऐतिहासिक प्रसंगाची जागा किल्ल्यांच्या आधाराने निश्चित करता येते. उदा. प्रतापगड, अफझलखान प्रसंग, मराठा कालखंडातील शिल्पकला, बांधकाम शैली, किल्ल्यांची रचना, प्रवेशद्वारे, पाणी पुरवठ्याची योजना, संरक्षणाच्या तरतूदी, तटबंदी, बुरूज यांची माहिती मिळते. त्याचबरोबर मध्ययुगीन महाराष्ट्रात संरक्षणाच्या दृष्टीकोनातून किल्ल्यांना किती महत्त्व होते स्पष्ट होते.

ज्या ठिकाणी अनेक राजमार्ग, खिंडी, महत्त्वाची शहरे एकमेकांना जोडलेली असतात, अशाच ठिकाणी किल्ला बांधला जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यातील अवघड व उंच डोंगरांपैकी कोणताही डोंगर शिल्लक नव्हता कीं ज्या ठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांचा किल्ला नव्हता. स्वराज्यातील प्रत्येक तालुका एखाद्या किल्ल्याशी संलग्न असे. अशारितीने संपूर्ण स्वराज्य किल्ल्यांनी वेढलेले होते. असे असले तरी शिवकालात संपूर्ण राष्ट्रच धामधुमीत असल्यामुळे वाडे व घरे मांची लुटालूट व जाळपोळ होत असे. मराठ्यांच्या स्वातंत्र्य मुद्धाच्या काळात प्रदेश लुटणे, वाडे पेटविणे या नित्याच्याच गोष्टी बनल्या होत्या. तरीसुद्धा शिवकालातील रायगड, पन्हाळा, प्रतापगड, शिवनेरी या किल्ल्यांवरील घरे, इमारती, बाजारपेठा, मंदिरे यांचे अवशेष आजही पहावयास मिळतात.

शिवकालात किल्ल्मांचे बांधकाम मोठ्या प्रमाणावर झाले हे बांधकाम प्रामुख्याने दगडाचे असे. पेशवेकाळात युद्धाचे तंत्र बदलल्यामुळे किल्ल्यांचे महत्त्व कमी झाले. किल्ल्यांच्या ऐवजी पुणे, सातारा या राजधान्यांच्या ठिकाणी पेशवे व त्यांच्या सरदारांनी मोठमोठे वाडे बांधले. सरदारांनी आपल्या वतनाच्या गावी सुद्धा वाडे बांधले. पुणे येथील शनिवार वाडा, सातारचा राजवाडा, कोल्हापूर येथील राजवाडा, शिवापूर येथील देशपांड्यांचा वाडा, सासवड येथील जाधवांचा वाडा इत्यादी पेशवेकालीन या इमारतीवरून तत्कालिन वास्तुशास्त्र व शिल्पकला, बांधकाम शैली, निवासाच्या योजना या विषयीची माहिती मिळते.

पेशवेकालीन वाड्याचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे त्यामध्ये लाकूडकाम जास्त असे, दगडी बांधकाम कमी असे. दगडी बांधकाम टिकून राहते, लाकडी बांधकाम काळाच्या ओघात नष्ट होते. नेमकी हिच गोष्ट पेशवे काळात झाली. लाकूडकामाला जवसाचे तेल लावे जाई. त्यामुळे काही काळ हे काम टिकले. परंतु मराठा राज्य नष्ट झाल्यावर हळूहळू हे लाकडी बांधकाम वाळवीच्या भक्ष्यस्थानी पडले. नदी किनारी असलेले वाडे पुरात वाहून गेलनयामुळे नष्ट झाले. मराठी राज्य संपल्यावर पुणे–सातारा–नागपूर येथील वाडे आगीच्या भक्ष्यस्थानी पडले. आजच्या स्थितीत वाड्याचे जे काही अवशेष शिल्लक आहेत. त्यांच्यावरून

आपल्याला पेशवेकालीन वाड्यांची रचना समजावून घ्यावी लागते.

वरील सर्व पुरातत्वीय साधनांच्या सहाय्याने आपणास मराठा कालखंडाचा अभ्यास करता येतो.

**२) महाराष्ट्रातील दप्तरखाने :-**

पुरातत्वीय साधनांचा दुसरा भाग म्हणजे महाराष्ट्रातील दप्तरखान्यांतील कागदपत्रांचा होय. मराठ्यांच्या इतिहासासंबंधी माहिती देणारी लाखो कागदपत्रे महाराष्ट्रातील पुणे, मुंबई व नागपूर येथील सरकारी दप्तरखान्यांत आहेत. या शिवाय अहमदनगर, धुळे (राजवाडे संशोधन मंडळ), पुणे (भारत इतिहास संशोधक मंडळ) येथे खासगी दप्तरखाने आहेत. या दप्तरखान्यांची माहिती डॉ. वि. गो. खोबरेकर आणि डॉ. के. एन. चिटणीस यांनी आपल्या ग्रंथात दिलेली आहे.

**१) पुणे दप्तरखाना :-**

पेशवेकाळासंबंधी सर्वात जास्त कागदपत्रांचा संग्रह पुणे येथील शासकीय दप्तरखान्यांत आहे. या संग्रहात कागदपत्रांचे एकूण ३९००० दप्तरे असून जवळजवळ ३ कोटी ९० लाख एवढी कागदपत्रे आहेत. ही कागदपत्रे ज्या भाषेत लिहिलेली आहेत, त्यावरून त्यांचे चार गटांत वर्गीकरण केलेले आहे. मराठी विभागात २९४६३ दप्तरे आहेत. मराठी विभागात शाहू दप्तर, पेशवा दप्तर, आंग्रे दप्तर, कर्नाटक दप्तर, सोलापूर दप्तर, सातारा महाराजांचे दप्तर, जमाव दप्तर, इनाम कमिशनच्या चौकशीचे दप्तर, ब्रिटीशपूर्व काळातील रियासतींची कागदपत्रे, ब्रिटीश रियासतींची कागदपत्रे, हक्क कमिशनची कागदपत्रे, जकातीविषयक कागदपत्रे, पर्शियन विभागातील ७० दप्तरे, गुजराथी विभागात ६४४ दप्तरे तर इंग्रजी विभागात १०५१८ फाईल्स आहेत.

वरील मुख्य विभागांशिवाय निरनिराळे संस्थानिक व सरदार यांच्याशी संबंधीत असे अनेक पोट विभाग पेशवा दप्तरांत आहेत. उदा. जंजिरा दप्तर १२८ रूमाल, औंध दप्तर २०८ रूमाल, बुधगाव दप्तर १९५ रूमाल यात संस्थानिकांचे जमाखर्च, अधिकाऱ्यांचे पगार, महसुली विभाग इत्यादी विषयांशी संबंधीत कागदपत्रे आहेत.

**२) मुंबई दप्तरखाना :**

मुंबई दप्तरखान्यात सर्वांत जास्त इंग्रजी कागदपत्रांचा समावेश आहे. या दप्तरखान्यातील कागदपत्रांची विभागणी खालील पाच विभागांत करण्यात आली आहे. १) वखारीतील व ब्रिटीश रेसिडेन्सीमधील कागदपत्रे २) सचिवालयातील कागदपत्रे ३) संकीर्ण कागदपत्रे ४) खासगी कागदपत्रे ५) छापील कागदपत्रे.

**३) कोल्हापूर दप्तरखाना :-**

कोल्हापूर येथील दप्तरखान्यात ७५७१ रूमाल आहेत. यात राजांची खासगी कागदपत्रे, १८ कारखान्यांतील हिशोबाची कागदपत्रे, किल्ले, घोडदळ, आज्ञापत्रे, राजा व सरदार यांच्यातील पत्रव्यवहार, कैफियती इत्यादी कागदपत्रांचा समावेश होतो. कोल्हापूर दप्तरखान्यात ३३० रूमाल केवळ कोल्हापूर संस्थानातील मुख्य राजांशी संबंधीत आहेत. त्यांना दप्तर असे

म्हटले जाते. ही दप्तरे म्हणजे शाहू दप्तर, छत्रपती राजाराम दप्तर, मिरज दप्तर, गगनबावडा दप्तर, कागल दप्तर, हिंमत बहादूर दप्तर इत्यादी. या सर्व कागदपत्रांतून आपणास जहागिरीच्या हिशोबाची कागदपत्रे, महसूल अधिकाऱ्यांची कागदपत्रे, तुरूंग, किल्ले, इनामे इत्यादी संबंधीची कागदपत्रे पहावयास मिळतात.

**खासगी दप्तरखाने :-**

**१) भारत इतिहास संशोधक मंडळ :-**

पुणे येथील भारत इतिहासह संशोधक मंडळाचा खासगी दप्तरखाना सर्वात मोठा आहे. या दप्तरखान्यांत प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक व इतर विषयांशी संबंधीत अशी एक लाखाच्यावर ऐतिहासिक कागदपत्रे आहेत. ज्या व्यक्तींनी ही कागदपत्रे जमा केलेली आहेत, त्या व्यक्तींच्या नावाने ती रूमालांत जतन करून ठेवलेली आहेत. या कागदपत्रांचे वैशिष्ट्य म्हणजे ही कागदपत्रे ताळेबंद, महसूल, किल्ले, बँकिंग व्यवहार इत्यादी विविध प्रकारच्या हिशोबांची आहेत. या विभागातील कागदपत्रांची विभागणी पुढील प्रमाणे करण्यात आली आहे- आपटे दप्तर, चापेकर दप्तर, केळकर दप्तर, आवळसकर दप्तर, चांदोरकर दप्तर, चंद्रचूड दप्तर, तुळशीबागवाले दप्तर, दीक्षित-पटवर्धन दप्तर, दीक्षित-पाटणकर दप्तर, हिंगणे दप्तर, इचलकरंजी दप्तर, दाभाडे दप्तर इत्यादी.

**२) डेक्कन कॉलेज दप्तरखाना :-**

या दप्तरखान्याची सुरूवात डी. बी. पारसनीस यांनी गोळा केलेल्या ऐतिहासिक कागदपत्रांतून झाली. हा संग्रह सुरूवातीला पारसनीसांच्या सातारा येथील संग्रहालयात होता. मुंबई सरकारने हे संग्रहालय खरेदी करून ते ऑगस्ट १९३९मध्ये डेक्कन कॉलेजमध्ये हलविले. या दप्तरखान्यातील कागदपत्रांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे : १) मोडी कागदपत्रांचे १०१ रूमाल २) मॅकारटनी कागदपत्रे (मद्रास गव्हर्नर), ३) हस्तलिखिते ४) ताम्रपटांवरील सनदा ५) दुर्मिळ ग्रंथ ६) नकाशे व युद्ध योजना यांचे आराखडे ७) कॅमेऱ्याने घेतलेले सूक्ष्म फोटो ८) रंगीत चित्रे इत्यादींचा समावेश आहे.

**३) दुळे दप्तरखाना (राजवाडे संशोधन मंडळ) :-**

धुळे येथील दप्तरखान्यात वि. का. राजवाडे यांनी संग्रहित केलेल्या संस्कृत, मराठी, पर्शियन कागदपत्रांचे व हस्तलिखितांचे २४० रूमाल आहेत.

**४) अहमदनगर येथील ऐतिहासिक संग्रहालय :-**

अहमदनगर येथील संग्रहालयात दोन मोठे संग्रह आहेत. १) संतांची हस्तलिखिते २) पळशीकर दिवाण यांच्या कागदपत्रांचा संग्रह. पळशीकर दप्तरात कागदपत्रांची ५० पोती आहेत. रामजी यादव पळशीकर हा इ. स. १७५० पासून होळकरांचा दिवाण होता. त्याच्या पाच पिढ्यांनी होळकरांची सेवाचाकरी केली. या कागदपत्रांवरून होळकर घराण्याच्या इतिहासावर चांगला प्रकाश टाकता येतो. तसेच नाना फडणिस, दौलतराव शिंदे यांच्या विषयीची माहिती मिळते.

अशा प्रकारच्मा पुरातत्वीय साधनांच्या आधारे मराठ्यांचा इतिहास लिहिता येईल.

## १.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :-

**१) थोडक्यात उत्तरे द्या –**

१) साधने म्हणजे काय?

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

२) शिवकालाचा इतिहास लिहिणे अवघड का आहे.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

३) कोणतीही दोन संस्कृत साधने सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

४) राज्मव्मवहार कोश हा ग्रंथ कोणी लिहिला?

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

५) मेस्तके म्हणजे काय?

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

६) सभासद बखर कोणी लिहिली.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

७) मराठ्यांच्या इतिहासाची कोणतीही दोन फार्सी साधने सांगा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

८) कोणकोणत्मा परकीय प्रवाशांनी आपल्मा प्रवास वृत्तांतात छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र दिलेले आहे.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

९) मराठ्यांच्या इतिहासाची कोणतीही दोन पुरातत्वीय साधने सांगा.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

१०) भारत इतिहास संशोधन मंडळ कोठे आहे.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

**२) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असणाऱ्या पुराभिलेखीय (वाङ्मयीन) साधनांचे परिक्षण करा.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

२) मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असलेल्या फार्शी साधनांचे मूल्यमापन करा.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

३) मराठ्यांच्या इतिहासाच्या अभ्यासासाठी उपयुक्त असलेल्या परकीय भाषेतील साधनाची चिकित्सा करा.

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

**३) टिपा लिहा :**

१) परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

२) पुरातत्वीय साधने

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

३) भारत इतिहास संशोधक मंडळ

.....................................................................................

.....................................................................................

.....................................................................................

## सारांश

इतिहास हे एक शास्त्र आहे. इतिहासाचा शास्त्रशुद्ध अभ्यास करण्यासाठी साधनांचा उपयोग होतो. मध्ययुगीन महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली आणि मराठ्यांचे राज्य निर्माण झाले. छत्रपती शिवाजी महाराजांपासून ते दुसऱ्या बाजीरावापर्यंत मराठा राज्याचा प्रचंड राज्यविस्तार झाला. मराठा राज्यकर्त्यांनी मध्ययुगीन महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी कार्यक्षम प्रशासन व्यवस्थेसाठी, प्रजेच्या हितासाठी महत्त्वाची भूमिका बजावली. या मराठा राज्याच्या इतिहासाची अनेक उपमुक्त साधने उपलब्ध आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासाची भौतिक आणि वाङ्मयीन अशी दोन प्रकारची साधने उपलब्ध आहेत. इतिहासाचे सत्यचित्र जाणून घेण्यासाठी पुरातत्वीय साधनांचा आधार घ्यावा लागतो म्हणून साधनांचे महश्वही तेवढेच आहे.

मात्र शिवकालाचा इतिहास तयार करणे म्हणजे तारेवरची कसरत आहे. कारण या कालखंडाची विश्वसनीय अशी ऐतिहासिक अस्सल साधने फारशी उपलब्ध नाहीत. कारण औरंगजेबाने रायगड जिंकून घेतल्यानंतर रायगडावरील सर्व दप्तरखाना जाळून नष्ट केला. तसेच मराठ्यांच्या निरनिराळ्या किल्ल्यांवरील दप्तरखात्यासह इतर साधन सामुग्रीही नष्ट केली. शिवकालाच्या तुलनेत पेशवेकालाच्या इतिहासाची विपुल साधने उपलब्ध आहेत. पुरातत्वीय साधने (शिलालेख, ताम्रपट, नाणी, किल्ले, वाडे, इमारती), वाङ्मयीन साधने (संस्कृत, मराठी, फार्शी, पाश्चात्य), परकीय प्रवाशांचे प्रवासवृत्तांत या सर्व साधनांच्या द्वारे मराठ्यांचा शास्त्रशुद्ध इतिहास लिहिता येतो.

## पारिभाषिक शब्द :–

१) सनदा – हक्कपत्र

२) मदजर – निवाडपत्र (न्यायविषयक पत्र)

३) नगरखाने – कार्मालमे

४) करिना – दस्तऐवज

५) शकावली – महत्वपूर्ण घटनांच्या नोंदी

६) मेस्तके – जमाखर्चाच्या पद्धती सांगणारे ग्रंथ

७) आज्ञापत्र – राजनिती विषमक ग्रंथ

८) वृत्ती – नेमणुक

## संदर्भ सूची :–

१) राजवाडे वि. का. – मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड ४, ८.

२) बेंद्रे वा. सी. – साधन चिकित्सा

३) पगडी सेतु माधवराव - मोगल-मराठा संघर्ष फार्शी साधने

४) कुलकर्णी अ. रा. आणि खरे ग. ह. - मराठ्यांचा इतिहास खंड १.

५) खोबरेकर वि. गो. - महाराष्ट्रातील दप्तरखाने

६) चिटणीस के. एन.- "RESEARCH Methodology in History'

७) सरदेसाई गो. स. - " Hand Book to the Records in the Alienation office, poona'.

# घटक २
# मराठेकालीन प्रशासन

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रस्तावना
२.२ विषय विवेचन
  २.२.१ राजपद संकल्पना
  २.२.२ अष्टप्रधान मंडळ
  २.२.३ केंद्रीय व प्रांतिक प्रशासन
२.३ स्वयं अध्ययन प्रश्न
२.४ सारांश
२.५ पारिभाषिक शब्द
२.६ संदर्भ सूची

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासामुळे आपल्याला

१) मराठेकालीन राजपदाची संकल्पना स्पष्ट होईल.
२) मराठेकालीन राजपदाची वैशिष्ट्ये जाणून घेता येतील.
३) अष्टप्रधान मंडळातील प्रधानांची ओळख होईल.
४) मराठेकालीन केंद्रीय प्रशासनाचीओळख होईल
५) मराठेकालीन प्रांतिक प्रशासनाची रचना लक्षात येईल.

## २.१ प्रस्तावना

शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात स्वराज्याची स्थापना केली. इ.स. १६४६ पासून स्वराज्य निर्मितीच्या हालचाली सुरु झाल्या. वयाच्या अवघ्या पन्नासाव्या वर्षी त्यांचे देहावसान झाले. महाराष्ट्रातील परधर्मीय सत्तेच्या जोखडातून हिंदू धर्मीय प्रजेला मुक्त करण्यासाठी त्यांनी आयुष्यभर लढा दिला. इ.स. १६७४ मध्ये राज्याभिषेक करवून स्वतंत्र राज्य निर्माण केले. त्यांच्या मृत्यूनंतर औरंगजेब मराठी राज्य संपविण्यासाठी स्वराज्यात ठाण मांडून बसला पण छ. संभाजी, छ. राजाराम, महाराणी ताराबाई यांच्या नेतृत्वात

मरठ्यांनी त्यांना जुमानले नाही. मुघल साम्राज्याची सत्ता, संपत्ती, दरारा यांची पर्वा न करता मराठ्यांनी मोठा संघर्ष केला व राज्य टिकवून ठेवण्यात ते यशस्वी झाले. पुढे शाहू महाराजांच्या कारकिर्दीत मराठ्याचें राज्य विस्तारले. नंतर पेशवे काळात पश्चिमात्य सत्तेशी संघर्ष सुरू झाला आणि  राज्याचे पतन झाले. सुमारे दिडशे वर्षे मराठ्यांची सत्त टिकून होती. मराठा राज्याचे हे यश मावळ्यांच्या पराक्रमामुळे होते हे जितके खरे आहे तितकेच त्यात उत्तम प्रशासनाचेही योगदान महत्त्वाचे आहे. उत्तम प्रशासन निर्माण करून शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली राज्यव्यवस्था सुसुत्रता त्यांच्या यशाचे गमक मानावे लागेल. या प्रशासनाच्या आधारेच हे राज्य दिडशे वर्षापर्यंत टिकाव धरू शकले.

## २.२ विवेचन

**मराठेकालीन प्रशासन**

शिवाजी राजांनी वडिलांच्या छोट्या जाहागिरीमधून हे स्वराज्य प्रस्थापित केले होते. स्वराज्य विकासाबरोबर नव्या प्रदेशाची व्यवस्था लावणे महत्त्वाचे होते. त्यामुळे राज्य विस्ताराबरोबरच शासन यंत्रणा वाढत गेली. या प्रशासन यंत्रणेचे नेतृत्त्व राजपदाकडे होते. ही शासन व्यवस्था प्रचलित मुस्लिम शासन संस्था, भारतीय नीतीशास्त्र, श्रृती, स्मृती या धर्मग्रंथावर आधारलेली होती. त्याचबरोबर प्रचलित रूढी परंपरा, मर्यादांचे संरक्षण करण्याची जबाबदारीही शासनव्यवस्था सांभाळत होती. हिंदू व मुस्लिम परंपरांमधील प्रशासनविषयक उत्तम संकल्पना शिवाजी राजांनी आपल्या प्रशासनात वापरल्या. दोष काढून टाकून प्रशासनात कालानुरूप परिस्थितीनुसार बदल केले जोते. काळाच्या ओघात पेशवेकाळात प्रशासन व्यवस्था बदलली. या घटकात आपण मुलकी प्रशासनाची ओळख करून घेणार आहोत. मुलकी प्रशासनाची केंद्रीय व प्रांतिक अशी विभागणी होती. प्रशासनाच्या सोयीसाठी प्रांतांची पुन्हा लहान भागात विभागणी केलेली होती. या सर्व प्रशासनाचे नेतृत्व राजाकडे असे. सर्वप्रथम आपण राजपद संकल्पना व राजपदाची वैशिष्ट्ये जाणून घेऊ या.

### २.२.१ राजपद संकल्पना

मराठाकालीन राजपद संकल्पना ही परंपरेनुसार चालत असलेल्या हिंदू राजेशाहीचे विकसित रूप होते. परधर्मीय राज्यकर्त्यांच्या ताब्यातील प्रदेश जिंकून हिंदू धर्माधिष्ठीत राज्य व राजपद शिवाजी राजांनी स्थापन केलेले होते. मराठा कालखंडात ह्या राजपदामध्ये कालपरत्वे बदल झालेले दिसतात. राजपद अभ्यासतांना २ कालखंडात विभागणी करायला हवी-शिवकालीन व पेशवेकालीन.

### अ) शिवकालीन राजपद

शिवकालीन राजपद श्रृती, स्मृती, पुराणे, शुक्रनीतीसारवर आधारित होते. शिवकालीन राजपदाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे

**ईश्वरनिर्मित राजपद :-** हिंदू धर्मपरंपरेनुसार शिवकालीन राजपद देखील दैवी मानले जात होते. शिवाजीचा उल्लेख सभासद बखरीत शंभू महादेवाचा अवतार म्हणून केलेला आहे. कवी भुषणने शिवाजीचे वर्णन शिव, विष्णू, इंद्राचा अवतार म्हणून केलेला आहे. चिटणीस बखरीतही शिवाजीला अवतारी पुरूष मानलेले आहे.

राजा–राज्याचा केंद्रबिंदू :ऋ राजा हा संपूर्ण राज्य यंत्रणेचा आधारस्तंभ होता. शुक्रनीतीसार मधील उल्लेखानुसार राजाला आपल्या गुणांनी मान प्राप्त होतो. शिवजी राजांनी आपल्या कर्तव्यांना अधिक महत्त्व दिले हाते. रयतेच्या राज्यात हिताला जास्त महत्त्व दिले होते. जन्माने राजा नसला तरी महाराष्ट्रातील जनतेने त्याच्या कतृत्वामुळे शिवाजीला मनोमन आपला राजा मानले होते. राजाच्या हाताखाली अष्टप्रधान मंडळ, प्रांतिक प्रशासन, राज्याच्या सर्व विभागांचा समावेश होता. सर्व अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या, बढत्या, बडतर्फी राजा करीत असे.

प्राचीन धर्मग्रंथात सांगितलेल्या राज कर्तव्याचे पालन शिवकाळात झालेले दिसते. राज्याचे संरक्षण, भेदभाव न करता प्रजेचे पालन ही कर्तव्ये शिवकालीन राजपदाने पार पाडलेली आहेत. शिवाजी महाराजांच्या हातात राज्याचे सर्व अधिकार एकवटले असले तरी हुकूमशहासारखी त्यांची वागणूक नव्हती. त्यांनी आपल्या हातातील अधिकार लोक कल्याणासाठी वापरले. आपल्या अधिकाऱ्यांकडूनही रयतेची पिळवणूक होऊ नये असा प्रयत्न शिवाजी महाराजांचा होता. राजपदाच्या कर्तव्यापैकी सर्वात महत्त्वाचे कर्तव्य राज्यात शांतता व सुव्यवस्था टकविणे होते. त्यात शिवाजी राजे यशस्वी झाले होते. कुठलाही भेदभाव न बाळगता प्रजेला अभय देण्याचे काम त्यांनी केले होते. राज्य हिंदू धर्माधिष्ठीत असले तरी इतर धर्मियांनाही शिवाजीच्या अंमलात धार्मिक स्वातंत्र्य होते. समाजातील रितीरिवाजांमध्ये फारसा हस्तक्षेप केला नव्हता पण दोष काढून टाकण्यासाठी मात्र ते दक्ष होते. जुलमती, मुजोर वतनदारांना त्यांना धडा शिकविला. धर्मातरीतांना शुद्धीकरण करवून पुन्हा धर्मात घेतले. भ्रष्ट सरदारांना वठणीवर आणले. राज्य रक्षणासाठी स्वतः धाडसी प्रयत्न करून, यश मिळवून रज्याबद्दलची निष्ठा जनतेत निर्माण केली.

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजीच्या काळात राजपदासाठी झालेल्या यादवीने महत्त्व काहीसे कमी झाले होते, पण अतियश प्रतिकूल परिस्थितीत शत्रुपासून राज्य रक्षण अतिशय समर्थपणे केले. राज्य व धर्म रक्षणाकरीता छत्रपती संभाजीनी मरण पत्करले. अतिशय धामधुमीच्या वातावरणात राज्याची घडी न विस्कटता राज्यातील सर्वच घटक शत्रूचा विरोध करीत होते. छ. संभाजी औरंगजेबाच्या तावडीत सापडल्यानंतर राज्याची धूरा राजाराम महाराजांनी सांभळली. छ. शिवाजी आणि छ. संभाजीच्या काळापासून वतनासंबंधीच्या धोरणात राजाराम महाराजांनी परिस्थितीनुरुप परीवर्तन केले. त्यामुळे राजपदाची सत्ता काहीशी मर्यादित झाली होती. पण या परीवर्तनामुळेच राजा जिंजीत असला तरी मराठा सरदारांनी पराक्रम गाजवून मुघलांना हैराण केले. मराठी राज्य जिंकण्याची इच्छा असलेल्या औरंगजेबाला मराठ्यांनी दाद दिली नव्हती.

छ. राजारामाच्या मृत्यूनंतर अल्पवयीन मुलाला राजपदावर बसवून राणी ताराबाईने राज्यकारभार पाहिला. मुघल५ांच्या हालचालींना राणी ताराबाईने मराठी सरदारांच्या मदतीने शह दिला असला तरी राजसत्तेच्या असहायतेचा फायदाही त्यांनी उचलला. त्यामुळेच राजपद आणखी क्षीण झाले होते.

**पेशवेकालीन राजपद**

पेशवेकालीन राजपद शिवकालीन राजपदापेक्षा सर्व तऱ्हेने वेगळे होते. औरंगजेबाच्या

मृत्यूनंतर मुघल दरबाराच्या राजकारणात गुंतल्यावर मराठे प्रबळ होऊ नये म्हणून कैदेत असलेल्या शाहूची सुटका केली गेली व मुघलांचा उद्देश सफल झाला. शाहू व ताराबाई यांच्यात यादवी होॅन मराठा राजपद अस्थीर बनले. शाहू आणि ताराबाई यांच्या दरम्यानच्या खेडच्या निर्णायक लढाईत शाहू यशस्वी झाले. महाराणी ताराबाईंनी कोल्हापुरात दुसरी गादी स्थापन केली. मराठी राजपदाचे विभाजन झाल्याने सरदारांच्या निष्ठा देखील दुभंगल्या. शिवकाळातील राजपदाचा दबदबा कमी झाला. बहुतेक मराठा सरदारानी राज्याच्या हितापेक्षा स्वहिताचा विचार केला.

बाळाजी विश्वानाथाने शाहूच्या पक्षाला बळकटी आणण्याकरीता मुघलांकडून स्वराज्यख चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा आणल्या, एकप्रकारे मराठ्यांनी मुघलांचे मांडलिकत्व पत्करले होते. शिवकाळापासून स्वतंत्र राज्य टिकविण्यासाठी झालेली खटपट संपून मराठा राजपदाचेही सार्वभौमत्व संपुष्टात आले. काळाची गरज म्हणून ही योजना स्वीकारलेली असली तरी स्वराज्याचे श्रेष्ठ असलेले स्थान मुघल साम्राज्याला पूर्णपणे दुय्यम बनले. मुघलांच्या शाही इतमामात वाढलेले शाहू राजे स्वराज्य चळवळीचे महत्त्व समजू शकले नाही. त्यामुळे मुघलांचे हे औपचारीकपणे मान्य केलेले वर्चस्व झुगारून देण्याची स्थिती असतांनाही त्यासाठी प्रयत्न झाले नाही. मराठा मंडळाच्या निर्मितीमुळे मराठे सरदारांमधील स्वतंत्र वृत्ती वाढत गेली. छ. शाहूने बहुतेक पदे वंशपरंपरागत केल्याने त्याचे दुष्परीणाम मराठा राज्यावर झाले ही प्रबळ बनलेली मंडळी राजाला फारसे महत्त्व देत नव्हती. छ. शाहू राजपदावर असेपर्यंत या पदाला थोडीफार प्रतिष्ठा होती. प्रत्यक्ष रणांगणावर पराक्रम गाजविला नसला तरी पेशवा व इतर सरदारांमधील विाद छ. शाहू राजे लक्ष घालून सोडवत होते. छ. शाहूंच्या कारकिर्दीपासून पेशवेपदाची प्रतिष्ठा वाढत गेली तसे राजपदाचे महत्त्व कमी होत गेले. डिसेंबर १९४९ मध्ये छ. शाहूंचे निधन झाले. त्यांना मुलबाळ नव्हते म्हणून भोसले घराण्यातील राणी ताराबाईंचा नातू राम शाहूचा दत्तक पुत्र म्हणून राजपदी आला. राजराजाच्या काळात तर राजपद नाममात्र राहिले. पेशवे व इतर प्रतिनिधी, सचीव वगैरे अधिकाऱ्यांची नेमणूक राजाने करण्याची प्रथा तशीच चालू राहिली असली तरी राजाची स्थिती दयनीय बनलेली होती. राजाच्या खाजगी सेवकांची नियुक्ती, बढती, वेतन वाढीचे अधिकार पेशव्यांकडे होते. राजाच्या कौटुंबिक खर्चाची तपासणी पेशव्यांकडून अधिक काटेकोरपणे होत होती. दीन व सत्ताहीन झाल्यामुळे राज्याचा प्रमुख राजकीय घटक म्हणून राजाचे महत्त्व संपलेले असले तरी समाजात त्याचा मान राखला जाई. राजाच्या पदाचे महत्त्व टिकवून ठेवण्याचा प्रयत्न नाना फडणीसाने दोन वेळा केला व तो प्रत्येक वेळा फसला. राजाचे स्थान पेशवे कालखंडात दुय्यमच राहिले. मराठा राज्याचे प्रमुखपद पेशव्यांकडे गेले होते. कागदोपत्री पेशवेपदाची वस्त्रे व सरंजाम राजा बहाल करीत असला तरी त्याची स्थिती दयनीय बनली होती. राजाच्या खर्चावर, हालचालीवर नियंत्रण ठेवणारी बंधने पेशव्यांनी घातली होती, असे मराठ्यांच्या प्रशासन पद्धतीचे अभ्यासक डॉ. एस. एन. सेन लिहितात.

### २.२.२ अष्टप्रधान मंडळ

शिवाजी राजांनी वडिलांकडून मिळालेल्या छोट्या जहागिरीमधून सुरूवात केली व

मराठी राज्य उभारले. हे राज्य उभारतांना लढवय्या म्हणून पूर्वीपासून ख्याती असलेल्या मराठ्यांचे त्यांना सहकार्य लाभले. शिवाजी राजे स्वतः उत्तम सेनापती होते. याबद्दल वाद नाही पण त्याहीपेक्षा मुलकी प्रशासक म्हणून त्यांनी पार पाडलेली कामगिरी निर्विवाद अधिक महत्त्वाची होती. येथील परिस्थिती, रहिवाशांचे स्वभाव शिस्तबद्ध प्रशासन करण्यास प्रतिकूल होते हे समकालीन कागदपत्रांवरून लक्षात येते. शिवाजीला अराजकामधून सुव्यवस्था निर्माण करावी लागली. लोककल्याणाच्या हेतूने स्थापन केलेल्या स्वराज्यात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होणे आवश्यक होते. त्यासाठी छोट्या जहागिरीमधून कार्यरत जहागिरदारांना संघटित केल्याशिवाय भक्कम शिस्तबद्ध शासन प्रस्थापित होणार नव्हते. मानमरातबामध्ये, आपापसातील वैमनस्यामध्ये गुंतलेल्या जहागिरीदारांना संघटित करून ध्येयनिष्ठ सैन्यदल व मुलकी प्रशासन व्यवस्था उभारणे सोपे काम नव्हते. पण शिवाजी महाराजांनी उत्कृष्ठ प्रशासन व्यवस्था निर्माण केली. कोणत्याही राज्याची शासनव्यवस्था ही तत्कालीन आवश्यकतेनुसार निर्धारीत होत असते. मराठी राज्याची प्रशासनव्यवस्था देखील अशीच आवश्यकतेनुसार विकसित झाली होती.

प्रशासनात राजा हा प्रमुख होता. मध्ययुगीन राज्यव्यवस्थेत राजा हा हुकुमशाही पद्धतीने राज्य करीत असे. पण शिवाजी राजांनी लोककल्याणकारी राजपद प्रस्थापित केले होते. राजा आपल्या अष्टप्रधान मंडळाच्या मदतीने राज्यकारभार सांभाळत होता. हे अष्टप्रधान मंडळ इ. स. १६७४ पर्यंत पूर्णत्वास पोहाचले होते. त्याची सुरूवात इ.स. १६४२ पासून झालेली दिसते. इ. स. १६४२ मध्ये बालशिवाजी व जिजाबाई बंगलोरहून स्वराज्यात परतले तेव्हा शहाजीराजांनी त्यांच्याबरोबर शामराज निळकंठ यांना पेशवा म्हणूनख बाळकृष्ण हणमंते यांना मुजूमदार म्हणून, सोनोपंत डबीर म्हणून रघुनाथ बल्लाळ यास सबनीस म्हणून नियुक्ती देऊन शिवाजीबरोबर दिले होते. हा शिवाजीच्या मंत्रीमंडळाचा प्रारंभ. त्यानंतर इ. स. १६४७ मध्ये सरनौबत पद निर्माण झाले. जावळीच्या विजयानंतर सुरनीस व वाकनीस ही पदे निर्माण केली तर आग्र्याहून सुटका झाल्यानंतर इ.स. १६६६७ चे सुमारास न्यायाधीश पद निर्माण होऊन अष्टप्रधान मंडळ पूर्णत्वास पोहचले.

अष्टप्रधान मंडळाचे आठही मंत्री शिवाजीच्या राज्यभिषेक प्रसंगी राजसिंहासनाच्या दोन्ही बाजूंना उपस्थित होते. राज्याभिषेक प्रसंगी त्यांच्या अधिकारपदांचे संस्कृत नामकरण केले होते. राज्याभिषेकाच्या आधीच्या वर्षीचा अष्टप्रधान व इतर विभागप्रमुखांच्या जबाबदाऱ्या निर्देशित करणारा एक कानुजाबता उपलब्ध होतो व त्यावरून चिटणीस बखरीवरून अष्टप्रधान मंडळातील मंत्र्यांच्या जबाबदाऱ्या पुढीलप्रमाणे.

१. मुख्यप्रधान (पेशवा) – राज्यकारभार पहावा, राज्यात शांतता व सुव्यवस्था राखणे, मोहिमा काढून युद्ध चालतविणे, सरकारी कागदपत्रावर शिक्का मारणे, राजाज्ञा पाळणे, सर्व मंत्र्यांमध्ये समन्वय साधणे इत्यादी.

२. मुजुमदार (अमात्य) – हा शिवकाळातील अर्थमंत्री राज्यातील जमाखर्चाच्या व्यवहारावर याची देखरेख असे. हे काम दप्तरदार व फडणीस यांचेकडून करून घ्यावे. चिटणीसी पत्रांवर आपली मुद्रा करावी. युद्धाच्या वेळी याला मोहिमेवर देखील जावे लागे.

३. सेनापती – सैन्याची उभारणी, वेतन इत्यादीची चांगली व्यवस्था ठेवणे, युद्धमोहिमा

काढून त्यांचे नेतृत्व करणे, नवीन जिंकलेल्या प्रदेशाची व्यवस्था ठेवणे, राजाज्ञा पाळणे, पराक्रम गाजविणाऱ्यांना छत्रपतीकरवी सन्मानीत करणे, बक्षिस देणे इत्यादी.

४. सुरनीस (सचिव) - सरकारी दप्तर याच्या नियंत्रणात असे. छत्रपतींचा पत्रव्यवहार पहाणे, स्वराज्यातील निरनिराळे अकिधारी, किल्लेदार यांच्याकडून आलेली पत्रे, सरकारातून जाणाऱ्या पत्रांचा आशय तपासून पहाणे, सरकारी कागदपत्रांवर शिक्का करणे इत्यादी कामे करावी लागत.

५. वाकनीस (मंत्री) - हा राजाचा खाजगी चिटणीस होता. खाजगी दप्तर व पत्रव्यवहार यावर देखरेख ठेवणे, राजाची दैनंदिन कृत्ये व राज्यात होणाऱ्या घडामोडी यांची नोंद ठेवणे इत्यादी कामे करावी लागत. गुप्तहेर विभागावर याचे वर्चस्व असे. राजाची रोजनिशी लिहिणे, राजाच्या आमंत्रितांची देखरेख करणे इत्यादी कामे मंत्र्याला करावी लागत.

६. पंडितराव - धार्मिक बाबतीत निर्णय देणे हे याचे मुख्य काम होते. विद्वान साधूसंतांचा आदरसत्कार धर्मशास्त्रानुसार न्याय देणे, धर्मबाह्य अचारण करकणाऱ्यांना शासन करणे इत्यादी धर्मविषयक कामे पंडितरावास करावी लागते.

७. डबीर (सुमंत)- परराज्यांशी होणाऱ्या व्यवहारांची देखरेख ठेवेण, परराज्यातून येणारे वकील, परराज्यात जाणारे आपले दूर यांची व्यवस्था पहाणे, आवश्यक भासलयास युद्धासाठी जावे, राजपत्रावर मुद्रा करणे इत्यादी कामे सुमंतास करावी लागत.

८. न्यायाधिश - न्यायविषयक कारभार या मंत्र्याला हाताळावा लागे. न्यायवस्थेवर देखरेख, प्रत्यक्ष न्यायदान, जातपंचायती आणि ब्रह्मसभेच्या न्यायदानावर देखरेख अशी कामे करावी लागत.

**अष्टप्रधान मंडळाची वैशिष्ट्ये**

१. सेनापती व्यतिरिक्त सर्व मंत्री पदावर बाह्मण व्यक्ती असते

२. पंडितराव व न्यायाधिश वगळता इतर ६ मंत्र्यांना लष्करी मोहिमेवर जावे लागे.

३. राज्याच्या महत्त्वाच्या निर्णायक कागदपत्रांवर अष्टप्रधान मंडळातील मंत्र्यांच्या मुद्रा व्हाव्या लागत. तशी पद्धत शिवाजी राजांनी रूढ केली होती. महत्त्वाचे निर्णय सर्वांच्या नजरेखालून जावे, मंत्र्यांमध्ये राज्यकारीराची जाणीव वाढावी व कारीर अधिक कार्यक्षम व्हावा हा त्यामागील उद्देश होता.

४. प्रशासन व्यवस्थेचे सरंजामी स्वरूप दूर करण्यासाठी शिवाजी महाराजांनी मंत्र्यांना जहागिरी ऐवजी रोख रकमेत वेतन देण्याची पद्धत सुरू केली होती. पेशव्यास वार्षिक १५,००० होन, अमात्यास वार्षिक १२,००० होन व इतर प्रधानांना वार्षिक १०,००० होन वेतन दिले जात होते.

५. मंत्र्यांना त्यांच्या गुणानुसार पद दिले जात होते, वंशपरंपरागत नव्हते.

६. मंत्री राज्यकारभारात राजाला सल्ला देत असत. मात्र तो सल्ला पाळण्याचे बंधन राजावर नव्हते. शिवाजींच्या धोरणांची व हुकुमांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी मंत्र्यांची होती.

## ब) मंत्रीमंडळातील बदल

मंत्रीमंडळाचा उल्लेख अष्टप्रधान मंडळ असा होत असला तरी प्रत्यक्षात मंत्र्यांची संख्या ९ होती. राज्याभिषेकाचे वेळी अमात्यपदी नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ या दोघा बंधूंची नेमणूक होती. संभाजीच्या कारकिर्दीत निर्माण झालेल्या यादवीत प्रधानांनी केलेल्या कारस्थानामुळे संभाजीचा विश्वास गमावला. परिणामी सेनापती व छंदोगामात्य (अष्टप्रधानातील पंडितराव पद) हे दोघे वगळता बाकीचे निष्प्रभ बनले होते. त्यातही छंदोगामात्य पदी असलेल्या कवी कलशाने संभाजीवर विशेष प्रभाव निर्माण केलेला होता. व एकप्रकारे तो संभाजीचा प्रमुख प्रधानच बनला होता. शिवाजी महाराजांचे वतनासंबंधीचे धोरण मात्र सीजीने बदलले नव्हते.

राजारामाचे कारकिर्दीत राजमंडळाचे पुनरुज्जीवन झाले. तेव्हा राजा जिंजीस असल्याने त्याचा प्रतिनिधी असे एक अधिकाराच्या व आर्थिक प्राप्तीच्या दृष्टीने सर्वोच्च पद समाविष्ट झाले. राजाच्या गैरहजेरीत राजप्रतिनिधी असलेल्या प्रल्हाद निराजीस विशेष स्थान मिळाले होते. तेव्हापासून पेशवाईच्या उदयापर्यंत प्रतिनिधींचे स्थान महत्त्वाचे राहिले. राजारामाच्या कारकिर्दीत स्वराज्य रक्षणासाठी लोकांना प्रोत्साहन देण्याकरीता जाहागिरी देण्याची पद्धत स्वीकारली गेली. त्यामुळे स्वराज्यात लहान लहान सत्ता केंद्रे निर्माण होऊन राजपदाची सत्ता मर्यादित झाली. ताराबाईच्या काळात ही परिस्थिती अशीच राहिली. या कालखंडात मंत्रीमंडळातील रामचंद्रपंत अमात्यांनी राजकाराणत वर्चस्व प्रस्थापित केले होते.

### पेशवेकालीन बदल

शिवाजी राजांनी आपल्या राज्यव्यवस्थेत कोणतेही पद वंशपरंपरागत ठेवले नव्हते. परंतु शाहूच्या कारकिर्दीत ही स्थिती पालटली. वंशपरंपरागतरित्या अधिकारपदे दिल्याने राजपदाचा दरारा कमी होत गेला.

अष्टप्रधान मंडळात पेशवा हा सर्व प्रधानापैकी एक होता. इतर मंत्र्यांपेक्षा त्याचा दर्जा उच्च असला तरी नंतरच्या काळात छंदोगामात्य किंवा प्रतिनिधीपदाने त्याला दुय्यम केलेले दिसते. बाळाजी विश्वनाथाने शाहूचा पक्ष बळकट करण्यासाठी मराठा मंडळाचा विकास केला. राजाराम महाराजांच्या काळात जहागिरी देण्याची प्रथा सुरू झाल्यापासूनच एका अर्थाने मराठा मंडळाचा प्रारंभ झाला होता. बाळाजी विश्वनानाने त्याला आकार दिला. वेगवेगळ्या प्रदेशांची जाहागिरी वेगवेगळ्या मराठा सरदारांना देऊन त्यांचेकरवी तेथे मराठी राज्य प्रस्थापित करविले. मोगल बादशहाकडून चौथाई व सरदेशमुखीचे अधिकार प्राप्त केले व मराठामंडळाला कायदेशीर स्वरूप प्राप्त झाले. बाळाजीच्या या कर्तृत्वाने त्याचे महत्त्व वाढत गेले.

पहिल्या बाजीरावाने, नानासाहेब पेशव्यांनी आपल्या पराक्रमाने ते पद आपल्या घराण्यात वंशपरंपरने ठेवण्यात यश मिळावले. इतर मंत्र्यांच्या तुलनेत पेशवेपदाचे स्थान उंचावले होते. शाहू राजांच्या पश्चात त्यांच्या सूचनेप्रमाणे छत्रपतीच्या रक्षणाची जबाबदारी पेशव्यांकडे आली. गोविंदराव चिटणीसाची अकार्यक्षमता, ताराबाईची महत्त्वाकांक्षा व राम राजाची दुर्बलता या सर्वांमुळे पेशवा राज्याचा सर्वेसर्वा बनला. धार्मिक बाबींसदंर्भातील राजाचे अधिकार देखील पेशव्यांकडेच आल्यामुळे पेशवे छत्रपतींप्रमाणे सार्वभौमत्व उपभोगू

लागले होते. पेशव्यांचे हे बदललेले स्थान जुन्या सरदारांना मान्य नव्हते. जूने सरदार पेशव्यांना आपल्याच दर्जाचे मानत आपल्या बरोबरीचे पेशवे स्वतंत्र वागू लागल्याचे पाहून इतर सरदारांनीही छत्रपतीकडे दुर्लक्ष केले. शिवाय मराठा सरदारांमध्ये दुफळी निर्माण झालली. शिवशाहीतील सरदार घराणी पेशव्यांना छत्रपतीच्या अष्टप्रधानांपैकी एक असे मानत. तर पेशवाईत पुढे आलेली घराणी पेशव्यांचा अंमल मानत.

थोडक्यात, शिवकाळात अष्टप्रधान मंडळामुळे मराठी राज्यात प्रस्थापित झालेली ऐक्याची, संघटनाची भावना पेशवेकाळात हळूहळू लयास गेली.

## २.२.३ केंद्रीय व प्रांतिक प्रशासन

या प्रकरणात आपण आतापर्यंत मराठेकालीन राजपद, मराठ्यांचे अष्टप्रधान मेडळ अभ्यासले. आता शिवकालीन व पेशवेकालीन केंद्रीय व प्रांतिक प्रशासन जाणून घेऊ या.

६ जून १६७४ रोजी शिवाजी महाराजांचा राज्यभिषेक झाला व हिंदू धर्माधिष्टीत मराठी राज्य प्रस्थापित झाले. हा राज्यनिर्मिती खटाटोप शिवाजी राजांनी आपल्या सहकाऱ्यांसह सुमारे २५-३० वर्षांपासून चालविला होता. लष्करी ताकदीच्या बळावर हे राज्य उभे राहिले होते. मात्र लोककल्याणकारी राज्य म्हणून ते उत्तम प्रशासनामुळे घडले होते. ते करतांना पूर्वीची प्रशासन व्यवस्था पूर्णपणे बदलली नव्हती तर त्यातील दोष काढून टाकण्याचा प्रयत्न केला होता व काळनुरुप असे योग्य प्रशासन निर्माण केले असे सर यदूनाथ सरकारांनी म्हटले आहे. बदलत्या परिस्थितीने पेशवेकाळात या प्रशासन पद्धतीत बदल झाले होते.

### शिवकालीन केंद्रीय प्रशासन

शिवकालीन प्रशासनात राजा हा राज्ययंत्रणेचा प्रमुख होता. राजाने राजधर्माचे पालन करून धर्म रक्षण करावा अशी अपेक्षा असे. आपली सर्व कर्तव्ये पार पाडण्याकरीता राजाला अष्टप्रधानमंडळाची मदत असे. आपण शिवाकालीन राजेपद व अष्टप्रधान मंडळाची सविस्तर माहिती याच प्रकरणात याआधी घेतलेली आहे. आता केंद्रीय प्रशासनाकडे कळू.

### छत्रपतीचे चिटणीस व इतर अधिकारी

या अष्टप्रधानांशिवाय काही इतर अधिकारी राजाच्या मदतीसाठी असत. त्यांचा मानमरातब राजदरबारात अष्टप्रधानासारखाच असे. त्यांचेपेक्षा राजाच्या अधिक खास विश्वासातले मानले जात. उदा. बाळाजी आवजी हा शिवाजीचा चिटणीस होता. राजाचा हेतू जाणून त्यास राजपत्रांचे लेखन करावे लागे. फडणीस हा वतनपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे तयार करण्याचे काम करीत असे. सर्व किल्लेदारांच्या पत्रांना उत्तर देण्याचे काम गडबई नावाचा अधिकारी करीत असे. मुघल बादशहा, मुघल वजीर , सरदार अशा बड्या मंडळींशी करावयाच्या पत्रव्यवहाराचे काम पारसनीस या अधिकाऱ्याकडे असे. थोडक्यात हे सर्व चिटणीस राजाच्या कामाचा बराच ताण कमी करीत असत. प्रत्येक प्रधानाच्या हाताखाली देखील वेगवेगळे ८ प्रकारचे अधिकारी असत. १) दिवाण, २) मुजुमदार, ३) फडणीस, ४) सबनीस, ५) कारखानीस, ६) चिटणीसव, ७) जामदार, ८) पोतनीस

### १८ कारखाने व १२ महाल

राज्यकारभाराची विभागणी अष्टप्रधानांच्या ८ विभागांमध्ये केल्यानंतर पुन्हा त्यांच्या हाताखाली १८ कारखाने व १२ महाल अशी लहान लहान खाती निर्माण करण्यात आली

होती. १८ कारखाने व १२ महाल पुढीलप्रमाणे–

**१८ कारखाने**

१) खजिना, २) जव्हाहीरखाना, ३) अंबारखाना (धान्य कोठार), ४) शरबतखाना (औषधालय), ५) तोफखाना, ६) दफ्तरखाना (सरकारी कागदपत्र विभाग), ७) जामदारखाना (धनालय/राजवस्त्रालय), ८) जीरातखातना (शस्त्रागार), ९) मुदपाकखाना., १०) उष्ट्रखाना (उंटशाहा), ११) नगारखाना. १२) तालीमखाना, १३) पीलखाना (हत्तीशाळा), १४) फरासखाना (तंबू, राहूट्या इत्यादी), १५) अबदारखाना (मद्यशाळा), १६) शिकारखाना, १७) दारूखाना (दारूगोळा कोठार), १८) शहतखाना (नैसर्गिक संपत्ती रक्षण करणारे मंडळ)

**१२ महाल**

१) पोते महाल (कोषागार), २) सौदागीर महाल (व्यापारविषयक), ३) पालखी महा, ४) कोठी महाल (धान्याचे कोठार), ५) इमारत महाल, ६) वहिली महाल (रथशाळा), ७) पागा महला (अश्वशाळा), ८) सेरी महाल (मनोरंजन, आराम इत्यादी), ९) दारुनी महाल (अन्तःपूर), १०) थट्टी महाल (गोशाळा), ११) टोकसाळ महाल (नाणी), १२) छबीना महाल (अंगरक्षक इ.)

कारखाने व महाल हे शासकीय व राजकौटुंबिक कारभारासंबंधीची विभागणी होती. त्याबद्दल एस. एन. सेन म्हणतात, ‘‘ही शासकीय व राजकौटुंबिक कारभारासंबंधीची विभागणी शास्त्रीय स्वरूपाची नव्हती. परंतु चहुबाजूने शत्रूनी वेढलेल्या आणि आत्मसंरक्षणासाठी आणि मुलुख जिंकण्यासाठी सतत लढावे लागणाऱ्या व्यक्तीकडून, आधुनिक पद्धतीच्या शास्त्रीय विभागणीची अपेक्षा करणे योग्य होणार नाही. तत्कालीन प्रचलित व्यवस्थेतूनच त्यांनी ती उचलली होती हे उघड आहे. त्यांच्या धामधुमीच्या जीवनात त्याला सुधारणा करण्याइतके स्वाथ्य लाभले नाही.’’

**केंद्रीय प्रशासनाची वैशिष्ट्ये**

**वंशपरंपरागत पदे दिली नाहीत**

शिवकाळात पदांवर कायमची किंवा वंशपरंपरेने नेमणूक केली जात नसे. राजाच्या मर्जीनुसार व्यक्तीची कार्यक्षमता पाहून पद दिले जात होते अथवा काढून घेतले जात होते. उदा. स्वराज्याचा पहिला सरनोबत तुकोजी याने धन्याचा विश्वास गमावल्याने पदावरून दूर करून त्याचे जागेवर माणकोजी दहातोंडे सरनोबत झाले. माणकोजीच्या मृत्यूनंतर या पदावर आलेला नेताजी पालकर पन्हाळ्यावर कुमक पाठविण्यात अपशयी ठरल्याने पदावरून दूर करून प्रतापराव गुजरास सरनोबती मिळाली. शिवाजी महाराजांच्या अशा धोरणी नियमांनी अपेक्षित परिणाम होऊन सरंजामशाहीस पायबंद बसला. याबाबत न्यायमूर्ती रानडे लिहितात, ‘शिवाजी राजाच्या काळात उच्चपदावरील कोणत्याही कर्तबगार अकिधाऱ्यांना आपल्या वारसदारांसाठी जहागिरी करून ठेवता आली नाही.’

**जहागिरी पद्धत बंद**

राज्याच्या सेवेसाठी जहागिरी देण्याची पद्धत बंद केली होती. रोख रकमेच्या स्वरूपात

सेवेचा मोबदला दिला जात होता. उदा. अष्टप्रधानांना सेवेच्या मोबदल्यात रोख व नियमित वेतन दिले जात होते. स्थानिक पातळीवरील व्यवस्थेत मात्र बदल केले नव्हते. काही अपवादात्मक परिस्थिती जहागिरी दिलेली आढळते. उदा. अफजलखान प्रकरणात कृष्णाजी भास्करने केलेल्या कामगिरीकरीता त्याला जहागिर दिली होती. बाजीप्रभूच्या मुलाला त्यार्च्या वडिलांच्या पराक्रमासाठी त्याची पूर्वीची जहागिरी व किल्ले दिले, बाळाजी आवजीच्या घराण्यात चिटणीसी कायमची दिली, शाहिस्तेखान प्रकरणात केलेल्या कामगिरीबद्दल कोयाजी बांदल याला इनामी जमीन दिली होती. हंबीरराव मोहिजे, संताजी घोरपडे, बहिर्जी नाईक यांना स्वतंत्र जहागिरी दिल्या होत्या इत्यादी पण अशी उदा. अत्यंत कमी आहेत.

**अधिकाऱ्यांच्या गुणवत्तेनुसार नेमणुका व बदल्या**

शिवाजीला माणसाची उत्तम पारख होती. अधिकाऱ्यांची निवड स्वतः शिवाजीने केलेली असे. प्रत्येक अधिकारी शिवाजीला जबाबदार असे. सर्व माणसांना विश्वासात घेऊन शिवाजी त्यांच्यावर कामगिरी सोपवीत असे. अधिकार पदे वंशपरंपरात नसूनही अकिधाऱ्यांच्या मनातील शिवजीबद्दलचे प्रेम व निष्ठा वाखाणण्यासारख्या होत्या. एकाच ठिकाणी अनेक वर्षे राहिल्याने अधिकाऱ्यांचे गैर हितसंबंध निर्माण होऊ नये म्हणून अधिकाऱ्यांच्या वारंवार बदल्या होत.

**सर्व जातीधर्माचा समावेश**

शिवाजी राजांनी प्रशासनात सर्व जातीजमातींना, धर्मांना सामावून घेतले होते. त्यांनी महाराष्ट्रातील जातीजमातीच्या अंगभूत गुणांचा वापर अतिशय हुशारीने स्वराज्यासाठी केला होता. उदा. किल्ल्यांच्या प्रशासनात हवालदारीवर मराठा, सबनिशीवर ब्राम्हण व कारखानीशीवर प्रभू व्यक्तीची नेमणूक असे. याशिवाय मावळे, हेटकरी, रामोशी, मांग, भिल्ल, कोळी, भंडारी, मुसलमान यांनाही प्रशासनात संधी दिली जात असे.

**अधिकाऱ्यांसाठी नियमावली**

राज्यातील सर्व अधिकाऱ्यांचे अधिकार, कर्तव्ये याबाबत महाराजांनी जातीने लक्ष घालून नियमावली तयार केली होती. शासकीय जबाबदाऱ्या पार पाडतांना अधिकाऱ्यांच्या वर्तनविषयक नियम महाराजांनी वेळोवेळी आपल्या आज्ञापत्रातून सांगितलेले दिसतात. नियमांची पायमल्ली करणाऱ्या अकिधाऱ्यांना कठोर शासन केले जात असे. रयतेला त्रास होऊ नये यासाठी राजे दक्ष होते.

**छत्रपती व प्रधानांचे दौरे**

अधिकारी आपली नेमून दिलेली जबाबदारी योग्य तऱ्हेने बजावतात की नाही याची प्रत्यक्ष पहाणी करण्यासाठी छत्रपती तसेच प्रधान राज्यात वारंवार दौरे काढत. प्रजेची गाऱ्हाणी ऐकून घेत व ती दूर करत.

**शिवकालीन प्रांतिक प्रशासन**

प्रशासनाच्या सोईकरीता राज्याची विभागणी केलेली होती. राज्यकारभाराच्या सोईसाठी स्वराज्याचे ३ भाग केलेले होते. त्यांना सरसुभे म्हणत व ते अष्टप्रधान मंडळातील ३ मंत्र्यांकडे सोपविले होते. उत्तर कोकणपासून साल्हेर मुल्हेर व पुण्यापर्यंतचा प्रदेश यावर

मोरोपंत पेशव्याची नेमणूक होती. पुणे ते धारवड कोप्पल पर्यंतचा प्रदेश यावर दत्ताजीपंत वाकनीसची नेमणूक होती. दक्षिण कोकण व कारवार बेदनूरपर्यंतची किनारपट्टी यावर अण्णाजी दत्तोजी नेमणूक होती. पुढे कर्नाटक दिग्विजयानंतर जिंकलेल्या प्रदेशाचा चौथा स्वतंत्र विभाग हरजी महाडीकांकडे सोपविला. या चार विभागांवरील प्रधानांच्या गैरहजेरीत काम पहाण्यासाठी त्यांचा मुतालिक असा एका अधिकाऱ्याची नेमणूक करण्यात येत असे. त्यास सरसुभेदार किंवा मुख्य देशाधिकारी असे संबोधित. या विभागीय कचेरीस 'प्रांत राजमंडळ' असे म्हणत. अशा प्रकारे राजमंडळाचे ३ प्रधान मध्यवर्ती सत्तेचे प्रमुख व शिवाय विभागीय कारभाराचे प्रमुख दुहेरी भूमिका पार पाडत होते. आपापल्या प्रांतिक विभागात ते राजाचे प्रतिनिधीत्व करीत होते. स्वराज्याची विभागणी सरसुभा, सुा/प्रांत, महाल/तालुका, मौजे/गांव अशी झालेली होती.

२-३ सुभ्यांचा मिळून १ सरसुभा होत असे. २ महाल मिळून लाख-सव्वा लाख महसूलाच्या उत्पन्नाचा १ सुभा होई. सुभ्याच्या प्रमुखास सुभेदार व कचेरीस ''दिवाण-सुभा'' म्हणत. सुभेदाराच्या मदतीस मुजुमदार, निघावन (त्याच्या हाताखालच्या कारकून) चिटणीस, सभादार, सबनीस व पोतनीस असे अधिकारी असत. सुभ्याच्या बंदोबस्तासाठी असलेल्या शिबंदीवर हवालदार प्रमुख होता. सुभेदारास वार्षिक ४०० होन वेतन व पालखीची तैनात असे. सुभ्यातील किल्ल्यांचे हवालदार सुभेदाराच्या वर्चस्वाखाली असत. सुभ्यातील सरकारी वसुलीचे काम सुभेदार परगण्याच्या देशमुख, देशपांड्यांच्या मदतीने करीत असत.

सुभ्याची विभागणी महालांमध्ये झालेली असे. मोठ्या महालांना तर्फेच्या ऐवजी प्रांत अथवा परगणा म्हणत. परगण्याच्या देशमुखाकडे त्याचे स्वतःचे प्रधान, मजुमदार, सबनीस असे अधिकारी असत. हवालदार हा महालाचा प्रमुख. त्याच्या मदतीस मुजुमदार असे. त्यांना प्रत्येकी ३ ते ५ होन वार्षिक वेतन मिळे. महालातील वसुलाच्या बाबी, दिवाणी-फौजदारी स्वरूपाचे दावे व राजकीय उलाढाली यावर हवालदाराची देखरेख असे तर मुजुमदार हिशेबी व्यवहार सांभाळत असे. महालाच्या संरक्षणाखाली सैनिक तुकडी नाईकवाडीच्या हाताखाली असे. काही महालांच्या गावी बाजार रीत असे. त्यास महाल कसबा म्हणत. तेथे शेटे, महाजन, सरजोशी हे वतनी अधिकारी असत. परगण्याचा पोटविभाग तर्फ/तरफ वरील अधिकारी तरफदार हा परगण्यातील अधिकारी मामलेदाराच्या ताब्यात असे. कामविसदार हा स्वतंत्र अधिकारी व्यवस्थापन किंवा वहिवाटदार म्हणून वावरतांना दिसतो. हा कामविसदारदेखील मामलेदाराच्या मार्गदर्शनात काम करी.

गांव किंवा मौजे हा सर्वात शेवटाचा घटक. त्यावरील प्रमुख मुलकी अधिकारी पाटील व कुलकर्णी. त्यांचे मदतनीस चौगुला, पोतदार, महार हे असत. गावाच्या सुरक्षिततेची, वसुलाची जबाबदारी पाटील, कुलकर्ण्यांची असे. गावातील हे सारे अधिकारी वंशपरंपरागत वतनदार असत. सर्व वतनदारांना गावातून वतनी जमीन व वंशपरंपरेने काही हक्क, मानपान मिळत.

**पेशवेकालीन केंद्रीय प्रशासन**

इ.स. १७०७ मध्ये औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मुघलांच्या कैदेतून शाहूची सुटका झाली. स्वराज्यात परतलेल्या शाहूने स्वराज्यावर आपला हक्क सांगितल्याने शाहू व ताराबाई

यांच्यात यादवी निर्माण झाली. मराठी सरदारांमध्येही शाहूच्या व किंवा ताराबाईच्या पक्षात जाण्यामुळे फूट पडली. अशा परिस्थितीत शाहूचा पक्ष बळकट करण्याची महत्त्वाची जबाबदारी पेशवा बाळाजी विश्वनाथने पार पाडली. दिल्ली बादशहाशी बाळाजी विश्वनाथाने इ.स. १७१८-१९ मध्ये करार करून मोगलांच्या दक्षिणेकडील ६ सुभ्यांमध्ये चौथाई व सरदेशमुखी घेण्यास मान्यता देण्याऱ्या सनदा आणल्या बाळाजी विश्वनाथाने स्वराज्यात मराठा मंडळ संघटीत करून प्रदेशाची व्यवस्था आपल्या मराठा सरदारांमार्फत लावली. मराठ्यांना मिळालेल्या चौथाई सरदेशमुखीच्या सनदांनी मोगल वर्चस्वाच्या प्रदेशात दुहेरी अंमल सुरू झाला. मोगलांनी घ्यावयाच्या वसुलास मोगली अंमल तर मराठ्यांनी घ्यावयाच्या वसुलास स्वराज्य अमंल म्हणत. अंमल वसुलीची जबाबदारी सरंजामदारांच्या स्वाधीन झाले. या बदलेल्या राजकीय परिस्थितीमुळे पेशवेकाळात राजा, पेशव्यांच्या शिवकालीन स्थानात बदल झाले. त्याचा अभ्यास आपण याच घटकात यापूर्वी केला आहे.

**राजा आणि पेशवा**

पेशवेकालीन केंद्रीय प्रशासनात अधिकृतपणे राजा हा सर्वोच्च मानला जात होता. पण प्रत्यक्षात राजेपद पेशव्यापेक्षा कनिष्ठ बनले होते. पेशवेकालीन राजपदामधील हे चढउतार आपण यापूर्वी पाहिले आहेत. पेशवेपदाचे महत्त्व या काळात अधिक वाढले होते. शिवकाळात अष्टप्रधान मंडळातील पेशवा शाहू महाराजांच्या काळात आपल्या कर्तृत्वाने सर्वोच्च स्थानी पोहचल्याची सविस्तर चर्चा आपण अष्टप्रधान मंडळ या उपघटकातील पेशवेकालीन बदल या मुद्द्यात सविस्तरपणे केलेली आहे. पेशव्याचे हे सर्वोच्च स्थान पेशवेकालीन केंद्रीय प्रशासनात महत्त्वाचा बदल करणारे ठरले. राज्याची सर्व सुत्रे राजाकडून पेशव्यांकडे हस्तांतरीत झाली होती. राजा हा पेशव्याला दुय्यम बनला होता. रजाचे दिवाणी व फौजदारी अधिकार पेशव्याकडे आले होते.

**सचिव**

पेशवेकाळात केंद्रीय राजकारभाराच्या प्रमुख केंद्राला हुजूर दप्तर असे म्हणत. पुण्यात असलेल्या या हुजूर दप्तरात सुमारे २०० कारकून काम करीत असत. हे कारकून जेथे काम करीत त्याला फड असे म्हणत. राज्यकारभाराची अनेक खात्यात विभागणी करण्यात आलेली होती. जिल्ह्याचा महसूल आणि खर्च, गाव, महाल, परगण्यांच्या अधिकाऱ्यांनी सादर केलेले हिशेब, सरकारी नोकरांच्या श्रेणी व पदांचे नियम त्यांना मिळणाऱ्या सवलती वेतन, मुलकी, लष्करी आणि धार्मिक अर्थसंकल्प या सर्वाचा समावेश हुजूर दप्तरात होत असे. येथे सर्व आर्थिक व्यवहाराची दैनंदिन नोंद करण्यात येत असे. नाना फडणीसाने या दप्तराच्या एकंदर कार्यपद्धतीत सुधारणा केली होती. हुजूर दप्तराचे सोईच्या दृष्टीने केलेल्या वेगवेगळ्या विभागापैकी एकबेरीज दप्तर व चालते दप्तर महत्त्वाचे होते.

चालते दप्तर हे फडणीसाकडे होते. या दप्तराचे फड, बेहडा, सरंजाम असे विभाग असत. फडामध्ये सर्व प्रकारच्या रोजकिर्दी ठेवल्या जात असत. बेहडा म्हणजे अंदाजपत्रक तयार करणारा विभाग. येथे प्रत्येक खेडे व सुभ्याच्या जमाखर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येई. सरंजामी विभागामध्ये सरंजामदारांचे सर्व हिशेब ठेवण्यात येत तसेच दुमला जमीनीविषयी हिशेब ठेवले जात. राज्यातील लोकांना देण्यात येणाऱ्या सर्व सनदा व हुकूम

फडणीसामार्फत जात. थोडक्यात चालते दप्तर हे हुजूर दप्तराचा महत्त्वाचा भाग होते.

एकबेरीज दप्तर हा हुजूर दप्तराचा दुसरा महत्त्वाचा विभाग यात राज्याचा सर्व जमा खर्च, शिल्लक नोंदविण्यात येई हिशेबाच्या खतावण्या येथे तयार होत असत.

या शिवाय लष्करी बाबींचे स्वतंत्र दप्तर होते. तसेच जमिनदारांसबंधीची कागदपत्रे हुजूर दप्तराच ठेवण्यात येत. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकिर्दीत जी गोंधळाची स्थिती निर्माण झाली त्यामुळे कागदपत्रांना विशेष महत्त्व उरले नव्हते.

इंग्रजांनी पुण्याचा ताबा घेतला त्यावेळी ८८ वर्षाच्या शासकीय व्यवहारांची कागदपत्रे उत्तम स्थितीत आढळून आली. पेशवे दप्तराचा कारभार किती व्यवस्थित होता हे लक्षात येते.

**प्रांतिक प्रशासन**

पेशव्यांचे व सरंजामदारांचे संबंध सरंजामदार त्याप्रमाणे निश्चित होत गेले. सरंजामदारांकडे प्रदेश देतांना त्याच्या कारभारावर वचक रहावा म्हणून सरंजामी प्रदेशातील काही प्रदेश पेशवे आपल्या अखत्यारीत ठेवत, त्यास हुजूर कमाविसीचे प्रांत म्हणत. पेशव्यांनी नेमलेलया अधिकाऱ्यामार्फत त्याचा कारभार चालत असे. तर सरंजामदारांकडील प्रांताना सरंजामी प्रांत कारभारात सरंजामदारांच्या कमाविसदारांवर लक्ष ठेवण्यासाठी पेशव्यामार्फत दुय्यम अधिकारी दिवाण, फडणीस इ. दरखदार नेमले जात. त्यांच्यामार्फत सरंजामी प्रदेशातील कारभारावर देखरेख ठेवणे, तेथील उत्पन्नाचे हिशेब मध्यवर्ती दप्तरात सादर करणे इ. कामे केली जात . पुढे सवाई माधवरावांच्या काळात पेशव्यांची सत्ता फडणीसांच्या हातात गेली. त्याकाळात शासन अधिक विस्कळीत होत गेले.

महसुल व्यवस्थेकरीता राज्याची विभागणी सामान्यपणे प्रांत/सुभ्यांमध्ये केलेली असे. सरंजामदारांना स्वातंत्र्य असे. सरंजामदार सामान्यतः मध्यवर्ती कारभाराप्रमाणेच व्यवस्था लावीत. पेशवेकाळातील कागदपत्रांच्या अभ्यासावरून असे लक्षात येते की सरकार, प्रांत, सुभा या संज्ञा ढोबळपणे म्हणजे सोयीने वापरल्या जात होत्या. काही वेळा तर्फ व परगणा यांचा उल्लेख महाल असा केला आहे. या विभागांचा आकार लहान मोठा

| सरकार | परगणे/महाल |
|---|---|
| नंदुरबार | ६ महाल |
| गाळणा | ७ महाल |
| बागलाण | २१ महाल ५ कसावे |
| अशीर | ३२ परगणे |
| बिजगड | ३३ परगणे |
| हांडिया | २२ परगणे |

| परगणा | खेडी |
|---|---|
| कन्नड | १०६ |
| फुलंब्री | ९२ |
| जिंतूर | ८ |
| विठ्ठलवाडी | २१ व निजामाबाद कसबा |

असे. पुढील कोष्टकावरून ते लक्षात येईल.

सुभा, सरकार, परगण्याच्या सीमा कायम निर्धारीत नव्हत्या. त्या वेळोवेळी बदलेल्या दिसतात. सरकारातील परगण्यांची संख्या कमीजास्त होत असे. उदा. १७६५ मध्ये खानदेशात १२२ तर इ. स. १७७६-७७ मध्ये २२ परगणे होते. बागलाण मध्ये इ.स. १७६५ मध्ये २१ तर इ.स. १७८२-८३ मध्ये १६ परगणे होते.

प्रांत प्रमुखास सुभेदार म्हणत. परंतु महत्त्वाच्या दूर असलेल्या कर्नाटक, माळवा, गुजराथ, बुंदेलखंड, खानदेश, कोकण प्रांत प्रमुखांना सरसुभेदार म्हणत. सरसुभेदारांना त्यांच्या वर्चस्वातील प्रांतातील मोकासी महालांची व्यवस्था पहावी लागे. सरसुभेदारांच्या जबाबदाऱ्या वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या असत. उदा. कर्नाटाकातील सरसुभेदाराला महसुल विषयक जबाबदारी होती. त्याच्या अखत्यारीतील मामलेदारांची नेमणूक तोच करीत होता. तर खानदेशातील सरसुभेदाराला देखरेखीची जबाबदारी होती. प्रत्येक मामलेदार आपले जमाखर्च आणि वसुली स्वतः सरकारात जमा करीत असे.

प्रांतातील सुभेदार व इतर अधिकारी पेशव्यांकडून नियुक्त केले जात. कार्यक्षम व्यक्तीची नेमणुक सुभेदार पदी होत असे. अपवादात्मक परिस्थिती पेशव्याच्या जवळच्या नातेवाईक किंवा सरदारांची नेमणूक होत असे. प्रांताच्या शांतता व सुव्यवस्थेची, रयतेच्या कल्याणाची जबाबादरी सुभेदाराची होती. प्रांताचे आर्थिक व्यवहार व न्यायालयीन व्यवहार सुभेदाराच्या अधिकारात होते. सरंजाम प्रांतांमधील सर्व अधिकार सरंजामदाराकडे असत.

प्रांताची विभागणी परगण्यात होत होती. मामलतदार हा प्रांतातील मोठ्या विभागाचा तर कमाविसदार हा लहान विभागाचा मुख्य अधिकारी होता. कमाविसदार, मामलतंदाराची नेमणूक पेशवे करीत व मामलतदार प्रत्यक्ष केंद्रीय प्रशासनाला तसेच प्रांतातील प्रत्येक घटनेला जबाबदार असे. फक्त खानदेश, गुजराथ, कर्नाटकातील मामलतदार हे सरसुभेदाराच्या हाताखली नेमलेले असत. आपपल्या प्रांतातील हिशेब केंद्रीय सरकारला सादर करण्याचे काम मामलतदार, कमाविसदाराकडे होते तसेच न्यायदान, गुन्हेगारीपासून सरंक्षण ही फौजदारी कामेही सांभाळावी लागत. कमाविसदार, तर्फदार हे महालाच्या वसुलीचे काम पहात. महालाच्या अधिकाऱ्यास मदतीकरीता मुजुमदार, फडणीस व संरक्षणाकरीता असलेल्या शिबंदीच्या पहाणीकरीता हशमनीस असत.

तर्फदार, कमाविसदार गावच्या पाटील, कुलकर्ण्यांच्या मदतीने दरसालच्या वसुलीचे अंदाजपत्रक तयार करीत. पीक तयार झाल्यावर मामलतदार प्रत्यक्ष पहाणी करून ते अंदाजपत्रक कायम करीत असे. वर्षाअखेर मामलतदार वसूल झाल्यावर वसुलाचे हिशेब सरकारकडे सादर करीत असे. या कामी देशमुख , देशपांडे, यांची मदत होत असे. मामलतदाराच्या हिशेबावर या लोकारूढ अधिकाऱ्यांची नांगर ही निशाणी आवश्यक असे. अशाप्रकारे मुलकी प्रशासनात सरकारी अधिकारी व पाटील कुलकर्णी, देशमुख, देशपांडे हे वतनदार सहभागी असत. शिवकाळात या वतनदारांचे अधिकार कमी झाले होते. पेशवे काळात हे अधिकारी रयतेचे हितकर्ते म्हणून ओळखले जात. पेशवेकाळात हे अधिकारी रयतेबद्दल आस्था बाळगत असत याची अनेक उदाहरणे कागदपत्रांमधून आढळातात. देशमुख, देशपांडे हे वंशपरंपरागत वतनदार असत.

सरंजामी प्रांतामध्ये मामलतदारख कामविसदारांच्या नेमणुका सरंजामदार करीत. परंतु

त्यांच्याबरोबर सरकारनियुक्त दरकदार – दिवाण, मुजुमदार, फडणीस, दफ्तरदार, पोतनीस, सभासद, चिटणीस असत. या दरकदारांचे वेतन सरकारकडून असे. त्यामुळे मामलतदारांचे त्यांच्यावर नियंत्रण नसे. आपले काम ते स्वतंत्रपणे करू शकत असत. मामलतदाराचा पत्रव्यवहार सरकारकडे जाण्यापूर्वी ह्या दरकदारांच्या निशाण्या व्हाव्या लागत. दरकदार एकूण ८ असत. माधवराव पेशव्यांच्या काळात मात्र दिवाणाला जमाबंदीचे काम समजावून देण्याची जबाबदारी असणाऱ्या जमेनिस या नवव्या दरकदारचा उल्लेख आढळतो. दरकदारांची ही तरतुद प्रामुख्याने मामलतदार, कमाविसदारांच्या गैरकारभारावर वचत ठेवण्यासाठी होती. असा गैरकारभार रोखण्यासाइी आणखी २ तरतूदी होत्या. एक म्हणजे त्यांच्या नियुक्तीच्या वेळी त्यांच्याकडून वर्षाच्या एकंदर उत्पन्नाच्या सुमारे निम्म्यापर्यंत रक्कम वसुल केली जाई. या रकमेस रसद म्हणत. या रकमेवर त्यांना १ ते २ टक्के व्याज सरकारकडून मिळे. रसदेची परतफेड त्याच्या महसुलातून नंतर करीत. दुसरी तरतूद म्हणजे बेहडा. पेशवे दप्तरातील अनुभवी अधिकाऱ्यांनी अतिशय चिकित्सकपणे केलेला जमाखर्चचा अंदाज. अशा बेहड्यातून अधिकाऱ्यांना जमाखर्चाबाबत मार्गर्शन मिळत असे.

गाव किंवा मौजे हे मुलकी प्रशासनाचा शवेटचा घटक. पाटील, कुलकर्णी हे २ वतनी अधिकारी पेशवेकाळात गाव किंवा मौजेचे प्रशासन सांभाळीत. गावातील जमिनीचे दप्तर सांभाळणे खरेदी विक्रीच्या व्यवहाराची नोंद ठेवणे अशी कामे कुलकर्णी करीत असे. तर सारावसुली, लावणीसंचणी अशी कामे पाटील करी. गावातील शांतता व सुरक्षितता, न्यायदान ही जबाबदारी पाटलाची असे. या कामी त्याला कुलकर्णी, चौगुला, महार हे इतर वतनदार मदत करीत.

## २.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**थोडक्यात उत्तरे लिहा**

१. शिवकालीन राजपदाची वैशिष्ट्ये सांगा.

...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

२. शिवकालीन व पेशवेकालीन राजपदामधील फरक स्पष्ट करा.

...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

३. अष्टप्रधान मंडळाची माहिती द्या.

...........................................................................................

...........................................................................................

...........................................................................................

४. शिवकालीन केंद्रीय प्रशासनाचा आढावा द्या.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

५. पेशवेकालीन केंद्रीय प्रशासनाची माहिती द्या.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

६. मराठाकालीन प्रांतिक प्रशासनाचा आढावा द्या.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

## २.४ सारांश

भारतातील खूप मोठ्या भूभागावर मुस्लिम अंमल प्रस्थापित असतांना छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदू धर्माधिष्ठीत राज्य स्थापन केले. आपल्या राज्याचे रक्षण करण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले. स्वतः धाडसी यश मिळवत. रयतेच्या मनात या राज्याबद्दल विश्वास निर्माण केला. शिवकाळ हा अनियंत्रित राजेशाहीचा काळ शिवाजी रजांनीही अनियंत्रित राजेशाहीचा पुरस्कार केला होता. पण अनियंत्रित राजपद असलेले लोककल्याणकारी राज्य शिवाजी महाराजांनी प्रस्थापित केले. आपला राज्य स्थापनेचा उद्देश साध्य करण्यासाठी शिवाजी महाराजांनी एक उत्तम प्रशासन व्यवस्था प्रस्थापित करतांना त्यांनी हिंदू व मुस्लिम परंपरांमधील प्रशासनाविषयक उत्तम संकल्पना वापरल्या. काही दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. त्यात ते बऱ्याच अशी यशस्वी झाले होते. राज्यकारभार कार्यक्षम करण्यासाठी अष्टप्रधान पत्रती वापरतांना सामुहिक जबाबदारीचे महत्त्व त्यांनी प्रस्थापित केले.

शिवकाळात प्रस्थापित झालेले उत्तम प्रशासन संभाजीराजांच्या नंतर राजाराम महाराज जिंजीस गेल्यावर नेतृत्वहीन बनलेले राज्याचे अस्तित्व टिकवून ठेवण्यास उपयुक्त ठरले. राज्यव्यवस्थेत राजाचे सर्वोच्च स्थान पेशवेकाळात ढळलेले दिसते. पेशवेकाळात तर राजपद नाममात्र उरले. सर्व अधिकार पेशव्यांकडे हस्तांतरीत झाले होते. आपासातील हेवेदावे, वैमनस्यामुळे पेशव्यांशी इतर मराठा सरदारांचे निर्माण झालेले शत्रूत्व मराठी राज्यास घातक ठरले.

## २.५ पारिभाषिक शब्द

सरंजाम – मानमरात ठेवता यावा किंवा लढाईच्या वेळी हुकुमी मदत करता यावी म्हणून राजाने मनसबदारास दिलेली जागीर

बेहडा – बजेट

मोकासा - एक वसुली हक्क

कामविशी - महसुल गोळा करणे

दुमाला - इनामाचा एक प्रकार

## २.६ संदर्भ सूची

१. खोबरेकर वि.गो., (२००६) महाराष्ट्राचा इतिहास मराठा कालखंड (भाग-१) शिवकाल, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

२. सेन सुरेंद्रनाथ, अनु. कुलकर्णी, विजया, (२००३) मराठ्याची प्रशासन व्यवस्था, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ.

३. सं.पा. कुलकर्णी, अ. रा. व खरे ग. ह. (१९८५) मराठ्यांचा इतिहास (खंड-१) शिवाजी आणि शिवकाल (१६०० ते १७०७), पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.

४. सं.पा. कुलकर्णी, अ. रा. व खरे ग. ह. (१९८५) मराठ्यांचा इतिहास (खंड-२) शाहू आणि शिवकाल (१७०७ ते १७६१), पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.

५. Mahajan T.T. (1990)] Maratha Administration in the 18$^{th}$ Century, New Delhi, Commonwealth Publishers.

६. भावे वा. कृ. (१९९८), शिवकालीन महाराष्ट्र, पुणे वरदा प्रकाशन.

७. भावे वा. कृ. (१९९८), पेशवेकालीन महाराष्ट्र, पुणे वरदा प्रकाशन.

## २.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रिय कार्य / प्रात्यक्षिक कार्य

१. मराठाकालीन प्रशासनाची सविस्तर माहिती संकलीत करा.

२. मराठा कालखंडात पराक्रम गाजविणाऱ्या सरदार घराण्याचा शोध घ्या. त्या घराण्याच्या व्यक्तीने प्रशासनासंदर्भात निभावलेल्या भूमिकेची माहिती मिळावा.

३. मराठाकालीन क्षेत्रीय भेटी देऊन त्यांचे महत्त्व जाणून घ्या.

# घटक ३
# मराठ्यांची लष्करी व्यवस्था

**अनुक्रमणिका**


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रस्तावना

३.२ विषय विवेचन – मराठाकालीन लष्कारी व्यवस्था

  ३.२.१ मराठ्यांचे युद्धतंत्र

  ३.२.२ पायदळ

  ३.२.३ घोडदळ

  ३.२.४ आरमार

३.३ स्वयं अध्यनासाठी प्रश्न

३.४ सारांश

३.५ पारिभाषिक शब्द

३.६ संदर्भ सूची

३.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रिय कार्य / प्रात्यक्षिक कार्य


## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासामुळ आपणास

१) मराठेकालीन लष्कर व्यवस्थेची माहिती मिळेल.

२) मराठेकालीन युद्धतंत्राची वैशिष्ठ्ये जाणून घेता येतील.

३) मराठेकालीन घोडदळाची रचना व महत्त्व याबद्दल माहिती मिळेल.

४) मराठेकालीन पायदळ व त्यांच्या कार्याची माहिती मिळेल.

५) मराठेकालीन आरमाराची ओळख होईल.

६) मराठेकालीन राज्यव्यवस्थेतील लष्करी यंत्रणेचे महत्त्व जाणून घेता येईल.

## ३.१ प्रस्तावना :–

दक्षिणेतील यादव सत्ता लयास गेल्यानंतर महाराष्ट्राच्या भूमीवर इस्लामी सत्तेचे वर्चस्व राहिले. बहमनी सत्ता, त्यानंतर शाही राजवटी यांच्या लष्करात येथील मराठा

सरदार पराक्रम गाजवीत. काही मराठा घराण्यांनी उच्च श्रेणीत स्थान मिळविले होते. परंतु स्वतंत्र अस्तित्वासाठी लढा देण्याची कल्पना निर्माण झाली नव्हती. प्रत्येक जण स्वतःचा स्वार्थ सांभाळत होता. दक्षिणेकडील राजकारण करणारे मुस्लिम राज्यकर्त्यांच्या धर्म सहिष्णू धोरणाने हिंदू धर्मीयांची हिंदुत्वाची चेतना प्रखर झाली नव्हती. दक्षिणेतील राजकारणा मुघलांचा प्रवेश, शहाजहान, औरंगजेबाचा कडवा धर्मांधपणा ही चेतना फुलविण्यास कारणीभूत झाला. अशा परिस्थितीत शिवाजी महाराजांचा उदय झाला. त्यांनी हिंदूधर्माधिष्ठीत राज्य प्रस्थापित करण्याचे आपले स्वप्न या डोंगराळ प्रदेशात वावरणाऱ्या मावळ्यांच्या मदतीने पूर्ण केले. त्यासाठी आपले सर्व लष्करी व प्रशासकीय कौशल्य पणास लावले.

राज्य उभारणी हे एकट्या दुकट्याचे काम नाही किंवा केवळ प्रशासकीय कौशल्य त्याकरीता पुरेसे ठरत नाही. मध्ययुगात तर अनियमित राजेशाहीच्या काळात लष्करी ताकदीवर राजकीय अस्तित्व अवलंबून होते. ती ताकद त्यांनी मराठी राज्यात निर्माण केली. उत्कृष्ट लष्करी यंत्रणा त्यांनी उभारली.

त्याच्या पश्चात हे राज्य संपविण्याकरीता औरंगजेबाने जंग जंग पछाडले पण मराठी राज्याने त्याला दाद दिली नाही. पुढे पेशवे काळात राज्य विस्तारले. अटकेपार झेंडे फडविण्याचा पराक्रम मराठ्यांनी केली. या बदलत्या स्थितीत कार्यपद्धती बदलली. पूर्वीची तत्वे बदलली. शिवाजीने संपविलेली सरंजामशाही पुनरुज्जिवित झाली. लष्करातील शिस्त मोडकळीस आली. राज्य लयाला गेले. उत्कर्षाच्या कळसावर पोहचलेले मराठी राज्याचे तितक्या झपाट्याने पतन झाले. ज्या लष्करी शक्तीच्या बळावर हे चढउतार मराठी राज्याने अनुभवले त्या लष्करी प्रशासन व्यवस्थेचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन – मराठाकालीन लष्करी व्यवस्था

लहानशा जहागिरीच्या आधारे मोठे स्वराज्य निर्माण करण्याच्या कार्यात शिवाजी राजांना आपल्या लष्करी यंत्रणेच्या फार मोठा उपयोग झाला. सतत शत्रूशी संघर्षाच्या धामधूमीच्या काळात राज्य उभारणी व राज्य संरक्षण हे पूर्णपणे लष्करी ताकदीवर अवलंबून होते. चहूबाजूला प्रबळ शत्रूचा प्रदेश असतांना आपल्या अल्पशा ताकदीवर मराठी राज्य उभारतांना व टिकवतांना शिवाजी राजांनी आपली स्वतःची लष्कर व्यवस्था विकसित केली. परंपरागत सरंजामी लष्करी पद्धती बंद करून नवे बदल स्विकारले. सैनिकांना नियमित व भरपूर पगार देण्याचे धोरण स्विकारले.

पेशवेकाळात बदलत्या परिस्थितीत ही सरंजामी पद्धत पुन्हा स्विकारण्यात आली. या बदलांच्या बळावर मराठी सत्ता जवळजवळ भारतभर पसरली. मराठ्यांचा वचक वाढला होता. मात्र सरंजामी पद्धतीने आपापसातील वैमनस्य, संघर्ष वाढला होता. मराठी संघटनात फूट पडत गेली व शेवटी मराठी राज्य लयाला गेले. स्वराज्य उभे करण्यात महत्त्वाची ठरलेली लष्करी ताकद नेतृत्वहीन राज्य टिकवून ठेवण्यात यशस्वी ठरली होती. तेच सामर्थ्यशाली राज्य शेवटी लयाला गेले. लष्करी व्यवस्थेतील या स्थित्यंतरांचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

## ३.२.१मराठ्यांचे युद्धतंत्र

### अ) शिवकालीन युद्धतंत्र

प्राचीन काळापासून भारतीय युद्धपत्रतीत साम, दाम दंड, भेद अशा ४ तंत्रांचा अवलंब केला जातो. या युत्रतंत्राचा अवलंब करीत आपल्या मर्यादा लक्षात घेऊन शिवाजी राजांनी आपले युद्धतंत्र विकसित केले. त्याची वैशिष्ट्ये आपण अभ्यासू या.

### १) गनिमी कावा –

मर्यादित साधने व डोंगराळ प्रदेशात उपयुक्त असणारी गनिमी काव्याची पद्धती त्यांनी वापरली. मात्र या तंत्राचा वापर अगदी सुरूवातीच्या काळातच केला. इ.स. १६४५ ते इ.स. १६६० या काळात बलाढ्य मुघल व आदिलशाहीशी संघर्ष करतांना नुकत्याच उभारलेल्या घोडदळ व पायदळाच्या छोट्या छोट्या तुकड्यांच्या मदतीने या सत्तांकडून प्रदेश व किल्ले काढून घेण्याचा सपाटा चालविला. स्वराज्याचे रक्षण करीत ताकद वाढविली. शत्रूच्या प्रबळ सैन्याचा सामना करणे शक्य नव्हते. म्हणून शत्रूची रसद तोडण्यासाठी पुरवठा केंद्रावर अचानक हल्ला करणे, शत्रूंच्या संपर्कहीन केंद्रावर हल्ले करणे, गाफील शत्रूवर अचानक चहूबाजूंनी हल्ला करणे, अशा योजनांचा वापर गनिमी काव्यात केला जातो. इ.स. १६६० ते इ.स. १६८० या २० वर्षांच्या काळात अनेक आक्रमक व पल्लेदार मोहिमा आखल्या. उदा. उंबरखिंडीची कारतबल खाना विरूद्ध लढाई, बहलोलखाना विरूद्ध उमरणीची लढाई इत्यादी. या सर्व आक्रमक व योजनाबद्ध लढाया होत्या. शिवाजीच्या युद्धनीतीमध्ये झालेला हा बदल मद्रासकर ब्रिटीश बखारवाल्यांनी जाणलेला होता असे त्यांच्या कागदपत्रांमधील उल्लेखांवरून लक्षात येते. म्हणूनच शिवाजी राजे गनिमी कावा युद्धाचे प्रवर्तक होतेच पण त्याचबरोबर त्यांचे कार्य व कर्तृत्व आक्रमक व विजेत्या योध्याचे ही होते.

### २) कडक शिस्त

शिवाजीच्या युद्धपद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे कडक शिस्त. शत्रूच्या सैन्याकडून रयतेला त्रास, लूट, स्त्रियांची विटंबना यासारख्या पद्धतीचा वापर होत असतांना शिवाजी राजांनी आपल्या सैन्यासाठी पुढील काही नियम घालून देऊन शिस्त निर्माण केली.

अ) लष्करात बायका, दासी, कलावंतीणी, वेश्या आणू नयेत.

ब) शत्रूच्या स्त्रियांना हात लावू नये. त्यांचा आदर करावा.

क) मोहिमेवर असतांना परधर्मियांच्या पूजास्थानांचा व धर्मग्रंथांचा आदर करावा.

ड) गाई पकडू नये. ओझी वाहण्यासाठी बैल धरावे

इ) ब्राह्मणांना त्रास देऊ नये.

फ) लुटीतील सर्व माल सरकार जमा करावा.

भ) सेनाधिकाऱ्यांनी सर्व जमाखर्च, लुटीतील प्राप्तीचा हिशेब मोहिमेवरून परतल्यावर सरकारके जमा करावा.

म) मोहिमेवर असतांना सैन्याकडून रयतेला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी.

या नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जात असे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना कठोर शिक्षा असे. या नियमांव्यतिरिक्त वेळोवेळी अधिकाऱ्यांना पाठविलेल्या

पत्रांमधून केलेल्या मार्गदर्शनामधून लक्षात येते की सैनिकी हालचालींमुळे रयतेला त्रास होऊ नये यासाठी शिवाजी राजे दक्ष होते. मौजे हलवणं (ता. चिपळूण) येथील लष्करी छावणीचया अधिकाऱ्यास पाछविलेल्या पत्रात त्यांनी लिहिले होते, कोणावरही जुलूम अगर ज्याजती अगर कोणासही कलागती करावयाची गरज नाही. म्हणजे त्यास ऐसे कोईल की, मोगल मुलकात आले त्याहुनही अधिक तुम्ही -- मराठीयाची इज्जत वाचणार नाही.

## ३) साधी रहाणी

मराठी लष्कराच्या हालचाली जलद गतीने होत. त्याचे कारण त्यांची रहाणी अत्यंत साधी, गरजा मर्यादित असलेली असे. चैन विलासाला त्यात वाव नसे. स्त्रिया, नोकरचाकर असे बिनलढाऊ लोक त्यात नसत. त्यामुळे जलद हालचाली करून कोणत्याही मोहिमेकरीता हे सैन्य सदैव तत्पर असे. डॉ. फ्रायरने शिवाजीच्या सैन्याबाबत लिहिले आहे, शिवाजीच्या सैनिकांना हालअपेष्टांची सवय होती. प्रवासात होणाऱ्या उपासमारीला तो सरावलेले ाहेते. त सुखासीन बनलेले नव्हते. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या साहसी आक्रमणाला ते अधिक लायक हाते. स्वतः शिवाजीराजे लष्करी मोहिमांत अतिशय साधेपणाने रहात. सुरतेच्या मोहिमेत व कर्नाटक मोहिमेत त्यांना पाहिलेल्या अनेक युरोपियनांनी त्यांच्या साधेपणाबाबतचे वर्णन लिहून ठेवले आहे.

## ४) सरंजामशाही लष्करीव्यवस्थेचा त्याग

स्वराज्य उभारणीला प्रारंभ करतांना शिवाजी राजांसमोर आदिलशाही, मुघल, कुतुबशाही या राजवटींच्या सरंजामी प्रदेश दिला जाई. या प्रदेशातील महसूल सरंजामदाराने घ्यावा त्याच्या मोबदल्यात राजाला लष्करी सेवा द्यावी. या पद्धतीत सरंजामदाराकडून आपल्या प्रदेशातील जनतेवर अन्याय होत असे. ताकद अधिक वाढाली की त राजाला न जुमानता बंडास प्रवृत्त होत. हे दोष महारजांनी आपल्या लष्करी प्रशासनातून दूर केले.

## ५) लष्करी शिक्षण

आपल्या लष्काराला शिक्षण देणारा शिवाजी हा मध्ययुगातला एकमेव राजा होता. त्यांच्या लष्कराची कार्यक्षमता, नैपुण्य पहाता शिवाजीने सैनिकांना प्रशिक्षण दिले असावे. मात्र त्याबद्दलची फारशी माहिती उपलब्ध नाही. डॉ. सेन यांनी आपल्या 'Foreign biographies of Shivaji' या ग्रंथात उल्लेख केला आहे की, त्यांच्या सैन्यात ठिकठिकाणाहून ोळा केलेले अनेक नवशिके लोक होते. त्यांना युद्धाचे शिक्षण देण्याकरीता त्यांनी उघड्या शेतात ३ महिने तळ दिला व घोड्यावर कसे बसावे. युद्धकलेचे डाव कसे खेळावे, लढाई कशी करावी याविषयी शिक्षण काळजीपूर्वक दिले.'

## ६) नियमित वेतन व पारितोषिके

सरंजामी लष्करी व्यवस्था बंद करून शिवाजी महाराजांनी नियमित व रोख वेतन देण्याची पद्धत सुरू केली. सैन्याची निष्ठा टिकवून ठेवपण्याच्या दृष्टीने भरपूर वेतन दिले जाई. लष्करभरती प्रसंगी निश्चित केलेले वेतन दर प्रतिपदेला न चुकता दिले जात असे. त्यामुळे सैन्य पुरवठा कधी कमी पडला नाही. पगाराकरीता सैन्यात उठाव झाल्याचे उदाहरण शिवकाळात दिसून येत नाही.

शिवाजी राजे पराक्रम गाजविणाऱ्या सैनिकाला व सेनानींना खास बक्षिसे व पदे देऊन

गौरव करीत असत. कोणत्याही माणसाने केलेल्या उत्तम कामगिरीबद्दल त्यास पारितोषिक दिले नाही असे कधीच झाले नाही. एखाद्यास पारितोषिक देणे तसेच अपराध्यास शिक्षा करणे यासंबंधात ते इतके निःपक्षपाती होते. सैन्याच्या कार्याबद्दल शिवाजीकडे खडान–खडा माहिती असे. कर्तृत्ववान लोकांना बक्षिसे व बढत्या दिल्याची अनेक उदा. आहेत. अफजलखानाच्या वधानंतर शिवाजीने दरबार भरवून अनेकांचा सत्कार केला होता. कोन्हाजी जधेस खड्ग प्रमाणाचा मान दिला. कडतोजी गुजरास 'प्रतापराव' व हंसाजी मोहितेस 'हंबीरराव' पदव्या दिल्या; मोरोपंत पिंगळ्यास कर्तृत्व पाहूनच पेशवा केले होते. लढाईतील जखमींना जखमांच्या प्रमाणात नेमणुका मिळत. लढाईत ठार झालेल्या सैनिकांच्या बायका मुलांकरीता बालपरवेशी देण्यात येत असे.

### ७) हेर व्यवस्था

शिवाजी राजांनी आपल्या लष्करात स्वतंत्र हेर खाते निर्माण केले होते. ते मराठी लष्कराचा कणा होते. मोहिम यशस्वी करण्यात हेरांकरवी मिळालेली अचूक माहिती खूप महत्त्वाची असे. शत्रूप्रदेशात प्रत्येक शहरी मराठी हेर नेमलेले असत तसेच सैन्यात, दरबारात किल्ल्यावर व इतर ठिकाणीही हेर असत. बहिर्जी नाईक हा शिवाजी महाराजांच्या हेर खात्याचा प्रमुख होता.

### ८) सर्वसमावेशक लष्करीनिर्मिती

शिवाजीच्या लष्करात उच्च कुलीन मराठे, मावळे, हेटकरी, ब्राह्मण, प्रभू, रामोशी, महार, मांग, कोळी, भंडारी इ. अनेक जातीजमातींचा समोवश होता. मराठी सत्तेचा लढा इस्लामी सत्तेविरूद्ध असला तरी लष्करात इस्लामधर्मीयांचाही समावेश होता. अनेक अधिकारपदे मुसलमान व्यक्तीकडे होती. उदा. आरमार प्रमुख दर्यासारंग पदी दौलतखान हा मुसलमान होता. याशिवाय इब्राहीमखान, काझी हैदर, सिद्दी हिलाल असे अनेक अधिकारी इस्लाम धर्माचे होत. अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या विश्वासाने शिवाजीने त्यांच्यावर सोविल्याची उदा. आहेत. थोडक्यात, जात, धर्म, यांचा विचार न करता सर्वसमावेशक असे सैन्य शिवाजीने उभारले होते. हे सैन्य व्यक्तलीगत सुखाची पवर्पा न करता प्राणपणाने स्वराज्यासाठी लढत हाते. यादृष्टीने त्यांच्यात राष्ट्रीय भावना होती. आधुनिक काळात ज्याला राष्ट्रीय भावना आपण म्हणतो, तशी राष्ट्रीय भावना मध्ययुगीन कालखंडात कोठेही नव्हती.

या सर्व वैशिष्ट्यपूर्ण युद्धतंत्राचा वापर शिवाजी राजांनी केला. एक उत्तम लष्करी संघटन मजाराजांनी निर्माण कले होते.

## ब) पेशवेकालीन युद्धतंत्र

शिवकालीन युद्धतंत्रात पेशवेकाळात बदल होऊन मराठी लष्काराचे खास वेगळेपण या काळात संपुष्टात आले. हे बदल पुढीलप्रमाणे सांगता येतील –

### १) युद्धपद्धतीत गनिमी काव्याकडे, पायदळाकडे दुर्लक्ष

पेशवेकाळात मराठी राज्य विस्तारले; पेशव्यांना व सरदारांना नवीन प्रवेश जिंकण्यासाठी मांडलिकांकडून खंडणी वसुलीसाठी लांबलांबच्या मोहिमा काढाव्या लागत. अशा वेळी पायदळातील सैनिक प्रदिर्घ काळ घरापासून लांब राहू शकत नसत. अशा वेळी घोडदळ

अधिक उपयोगी ठरत असे. काही वेळा पायदळात गरजेनुसार त्या त्या प्रदेशातून सैन्य भरती करण्या येत असे. त्यामुळे शिवकाळात दिसणारा सैन्यातील एकजिनसीपणा पेशवेकाळात आढळत नाही. शिवाय मैदानी लढाया लढाव्या लागल्या. पेशवेकाळात गनिमी काव्याचा वापर सोडून समोरासमोर युद्ध करण्याची पद्धती वापरली जाऊ लागली.

**२) सरंजामी व्यवस्थेचे पुनरूज्जीवन**

लष्करी व्यवस्थेतील दोष कमी करण्यासाठी शिवाजी महारजांनी सरंजामी व्यवस्थेचे उच्चाटन केले होते. सेवेचा मोबदला जहागिरी स्वरूपात न देता रोख रकमेच्या स्वरूपात दिला जात होता. राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत परिस्थितीच्या रेट्याने सरंजामी पद्धतीचे पुनरूज्जीवन झाले. शाहू राजांच्या काळात ही पद्धत पुन्हा दृढ झाली. बालाजी विश्वनाथ मराठा मंडळाची निर्मिती करून शाहूचा पक्ष बळकट केला. या मराठा मंडळाची उभारणी सरंजामी पद्धतीवरच आधारीत होती. मात्र सरंजामदारांवर राजाचा राहण्याची तरतूद केली होती. तरी सरंजामदारांनी राजाची गरज व कमकुवतपणा ओळखून त्याचा फायदा उचलला. आपापल्या प्रदेशात त्यांना पूर्ण स्वातंत्र्य होते. हळूहळू या पद्धतीत विस्कळीतपणा येत गेला. अधिकाराची सुसुत्रता राहील नाही. आवश्यकतेनुसार पेशव्यांच्या मदतीसाठी मराठे सरदार येईनासे झाले. आपापसात वैमनस्य वाढले. शाहू महाराजानंतर पेशव्यांना मराठा सरदारांचे संघटन टिकविता आले नाही. आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी पेशव्याने शिंदे होळकरातील वाद मिटविला नाही. परिणामी या उभयतामधील संघर्ष मराठेशाहीला क्षीण करणारा ठरला. आंग्र्यांच्या बाबतीत हेच घडले. पेशव्यांनीच आंग्र्यांचे आरमार बुडविले. पानीपत युद्धानंतर ही बंडखोर प्रवृत्ती अधिक फोफावली.

**३) सैन्यात भाडोत्री सैनिकांत वाढ**

शिवकाळात राज्यासाठी लढणारांचा भरणा असे. पेशवेकाळात राज्य विस्ताराबरोबर लढाईचे क्षेत्र विस्तारात गेले. सैन्याला वर्षभर घरापासून लांब राहणे मानवणारे नव्हते. त्यामुळे सैन्यात भाडोत्री सैनिकांची वाढ होऊ लागली. त्यात शीख, राजपूत, सिंधी, कर्नाटकी, अरब, पोर्तुगीज, सिद्दी गोव्यातील धर्मांतरीत इ. या सर्वांना गारदी म्हणत. हे लोक धाडसी वृत्तीने चढाई करीत पण तत्त्वहीन व निष्ठाशून्य असत. परिणामी लष्कर अराष्ट्रीय बनले. गारद्यांच्या पलटणी बऱ्याचदा अत्याचार करीत व त्यांच्यावर सरदारांचा दबाव नसे. या भाडोत्री सैन्याने देशाच्या कानाकोपऱ्यात मराठ्यांचे नाव बदनाम केले.

पेंढारी हे देखील पेशवेकाळात सैन्याचा घटक होते. जिंकलेल्या प्रदेशात लूट करण्याच्या कामात हे लोक सैन्याला मदत करीत. पेंढाऱ्याचा उपयोग लढण्यासाठी होत नव्हता तर उत्पन्नाची बाब म्हणून होत असे. ते लुटीतील हत्ती, घोडे, पालख्या, निशाणे, नगारे सरकार जमा करीत तर छोटी लूट स्वतःकडे ठेवीत हा त्याचा फायदा. त्यांना किंवा त्यांच्या सरदारास पगार दिला जात नसे. उलट स्वसंरक्षणाबद्दल त्यांना सैन्याच्या सेनापतीला पालपट्टी द्यावी लागे. मराठा सैन्यात पहिल्यांदा पेंढाऱ्यांचा वापर केव्हा सुरू झाला याबाबत नेमकी माहिती उपलब्ध नाही. शिवकाळात सैन्यात असे लोक असल्यास उल्लेख आढळत नाही. परंतु बाळाजी बाजीरावाच्या वेळेपासून पेंढारी हे मराठा सैन्यातील कायमचा घटक होते. सरदार होळकरांकडे पेंढाऱ्यांची संख्या मोठी होती. लष्करातील पेंढारी, गारदी यांच्यामुळे पेशवेकालीन लष्करात बेशिस्त निर्माण झाली.

### ३) अनियमित वेतन

शिवकाळात सैन्याला दिल्या जाणाऱ्या वेतनाची नियमितता पेशवेकाळात टिकली नाही. भरपूर व नियमित वेतन हे शिवकाळातील सैन्य व्यवस्थेचे वैशिष्ट्य होते. त्यामुळेच शिवकाळात सैन्यात बंडाळ्या, किंवा प्रजेची लूट इ. झाल्याचे उल्लेख नाहीत. पेशवेकाळात बाहेरील प्रदेशातील लष्करी मोहिमा पार पाडण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पैसा लागे. युद्धातील यशापयश नंतर, आधी खर्च करावाच लागे. विजित प्रदेशाची चोख जमाबंदी करण्यासाठी आवश्यक शासकीय कार्यक्षमता मराठ्यांकडे फारशी नव्हती. बाहेरील प्रदेशांकडून मिळणाऱ्या खंडणी वसुलीसाठी काढाव्या लागत त्यावर खर्च प्रचंड असे. त्यामुळे पेशवे, मराठा सरदार सतत आर्थिक विवेचनेत असत. पेशवे काळात विशेषतः उत्तर पेशवाईत मराठ्यांच्या आर्थिक दुरावस्थेमुळे सैन्याला लूटालूट करण्याची सवयच लागली होती. लुटारू म्हणून मराठ्यांचे नाव देशभर बदनाम झाले होते. सैन्याला नियमित वेतन न मिळाल्याने बंडाळ्या होत. त्यामुळे लष्करी ताकद कमी झाली.

**लष्करातील शिवकालीन साधेपणा नष्ट झाला**

लष्करातील साधेपणामुळे शिवकालीन मराठा लष्कर जलद गतीने हालचाल करू शकत असे. हा साधेपणा पेशवेकाळात संपला. मोगलांच्या सान्निध्यात वाढलेल्या शाहू राजांने स्वतः केलेल्या मोहिमांमध्ये मुघलांची भव्यता दिसत असे. शाहूनंतर ही जबाबदारी पेशव्यांकडे आली होती. पेशव्यांच्या व सरदारांच्या लष्कारा देखील डामडौलांचे अनुकरण केले जात होते. सैन्यात स्त्रिया, बाजारबुणगे, नर्तिका, वेश्या यासारख्या बिनलढाऊ लोकांची मोठी संख्या असे. सैन्याच्या व या साऱ्या बिनलढाऊ लोकांच्या दैनंदिन गरजा व सुखसोयी पुरवण्यासाठी वेगवेगळे कारागीर उदा. शिंपी, पखाली, दिवटे, भोई अ. सैन्याबरोबर असत. अशा हजारो नोकर चाकर, कारगिरांचा तांडाच सैन्याबरोबर असे. या बाजारबुणग्यांमुळे व सामानामुळे लष्कराच्या हालचाली मंदावल्या. लष्करात युद्धासाठी आवश्यक घोड्यांव्यतिरिक्त सामान वाहतुकींसाठी लहान घोडे, बैल मोठ्या संख्येने असत. ही जनावरे काहीशी उपयुक्त असली तरी त्यांच्या चाऱ्यापाण्याची व्यवस्था करणे लष्करासाठी समस्या ठरत असे. कुपोषण व योग्य काळजी अभावी रोगराईने मारणाऱ्या प्राण्यांची संख्याही मोठी असे.

### ३.२.२ पायदळ

### अ) शिवकाकलीन पायदळ

शिवाजी महारांजाच्या पायदळात प्रामुख्याने घाटमाथ्यावरील मावळे व कोकणातील शेतकऱ्यांचा भरणा असे. डोंगरी भागातील लढायांसाठी सैन्यातील पायदळ जास्त उपयुक्त ठरत असे. अतिउंच किल्ल्यांच या रक्षणाकरीता घोडदळाचा वापर शक्य नव्हता, शिवाय प्रारंभीच्या काळात घोडदळाचा खर्चही पडवरणारा नव्हता. शिवाजी राजांनी आपल्या पायदळाकडे विशेष लक्ष दिलेले दिसते. पायदळातील प्रत्येकाकडे ढाल, तलवार, बंदुक प्रमुख ही शास्त्रात्रे असत. त्यास लागणारा दारूगोळा सरकारातून दिला जात असे. पायदळाची रचना पुढीलप्रमाणे होती.

१० सैनिक – १ नाईक

५ नाईक – १ हवालदार,

२-३ हवालदार - १ जुमलेदार

१० जुमलेदार - १ हजारी

७ हजारी - १ सरनौबत

येसाजी कंक हा सरनोबत होता. जुमलेदारास वार्षिक १०० होन वेतन व त्याला १ सचिव - सबनीस, त्यास ४० होन, हजारीस वार्षिक ५०० होन व त्याचे सचिवास १२५ होन पगार होता. सैनिकास नोकरीत ठेवतांना नुसते धान्य देऊन ठेवती. परंतु नंतर हुशारी पाहून त्यास १ पासून ३ होन पर्यंत दरमहा पगार दिला जाई. लढाईत शौर्य गाजविल्याबद्दल हत्ती, घोडे, जडजवाहीर बक्षिस देण्यात येई, किताबही देण्यात येत.

**ब) पेशवेकालीन पायदळ**

पेशवेकाळात राज्याच्या वाढत्या विस्ताराबरोबर सैन्याचे महत्त्वही वाढले, पण शिवकाळाच्या तुलनेत पायदळाचे महत्त्व मात्र कमी झाले होते. लांबलांबच्या प्रदेशात पायदळ नेणे बराच अडचणीचे होते. त्यामुळे पेशवेकाळात पायदळात बिगर मराठा लोक अधिक आढळतात. त्यात बहुसंख्येने शीख, अरब ॲबेसेनियन सिद्दी इ. होते. ही सैन्यभरती त्यांचे स्वतःचे जमादार करीत. यांना गारदी असे म्हणत. त्यांना भरती करणारच शस्त्र पुरवीत असे किंवा त्यांची स्वतःची असत. पायदळातील मराठी फोजेवर जितका मराठा सादारांचा वचक राहत असे, तितका या परदेशी शिपयांवर राहत नसे. गारद्यांच्या पलटणी बऱ्याचदा जनतेवर अत्याचार करीत. पेशवाईत पायदळ राष्ट्रास सबळ करण्यास फारसे उपयुक्त ठरले नाही हे लक्षात येते.

परकीय प्रशिषित शत्रूसैन्याशी लढण्याचे प्रसंग पेशवाईत वेळोवेळी यायला लागले. त्यामुळे मराठा सरदारांनी आपल्या पायदळात कवायती पलटणी व संरक्षणार्थ तोफखाना ठेवण्यास सुरुवात केली. सदाशिवराव भाऊ, महादजी शिंद्यांनी कवायती फौजांचा उपयोग यशस्वीपणे केला. फ्रेंच मुत्सदी डिबॉईनच्या मदतीने महादजींनी ३० हजार पायदळ, १० हजार नजीब, ३ हजार तुरूक स्वार अशी कवायती फौज उभारली होती.

### ३.२.३घोडदळ

**अ) शिवकाळ**

शिवाजी महाराजांच्या घोडदळात बारगीर व शिलेदार असे २ प्रकारचे घोडेस्वार होते. बारगीराच्या घोडदळास पागा असे म्हणत. बारगीरास दिला जाणारा घोडा हा सरकारी असे, त्याची निगा सरकारतर्फे होत असे. सरकारी घोड्यांच्या मागील चौड्यावर ओळखीकरीता शिक्का मारलेला असे. शिलेदाराचा घोडा स्वतःचा असे. तसेच आपल्या घोड्याची निगा त्याला स्वतःच ठेवावी लागे. त्यामुळे बारगीरापेक्षा शिलेदारास जादा तनखा मिळत असे. बारगीरास दरमहा २ ते ५ होन मिळत, शिलेदारास ६ ते १२ होन मिळत. घोडेस्वारांजवळ कमरेस तलवार, पाठीस ढाल तर काहीजवळ भाले , बंदुका असत. बारगीरास सरकारी दारूगोळा मिळे, तर शिलेदार स्वतःचा वापरीत. घोडदळाची रचना पुढीलप्रमाणे असे,

२५ बारगीर / शिलेदार - १ हवालदार

५ हवालदार - १ जुमलेदार

५ जुमलेदार - १ सुभेदार

१० सुभेदार  – १ पंचहजारी

घोडदळात २५ घोड्यांगे १ पखालीजी व १ नालाबंद असे. हजारी व पंचहजारींच्या हाताखाली प्रत्येकी १ मुजुमदार, १ कारभारी व १ जमेनलीस असे, याशिवाय उपंचहजारीकडे वाकेनीसाचे कारकून व जासूद असत. ते लष्करातील वृत्तांत लिहून सरकारला कळवीत असत.

मराठ्यांच्या मोहिमा साधरणपणे पावळसा संपताच दसऱ्यापासून सुरू होत व पावसाळा सुरू होण्यापूर्वी संपत असत. पावसाळ्यात क्वचित युद्ध चाले. त्यामुळे पावसाळ्यात घोडदळासाठी मोठमोठ्या छावण्या असत. तेथे निवारा, अन्नधान्य, औषधपाणी, घोडयांसाठी गवत अशी व्यवस्था असे. आपल्या लष्कराच्या सोयीसाठी शिवाजी महाराज विशेष दक्ष असत. घोडदळातील जुमलेदारास २५० होन व पालखी, सुभेदारास वार्षिक ६०० होन व पालखी हजारींस वार्षिक १००० होन, त्याचेकडील इतर सहकाऱ्यांना वार्षिक ५०० होन, पंचहजारीस २००० होन वार्षिक व पालखी व अबदागीर अशी नेमणूक असे. घोडदळाचा सरनौबत अष्टप्रधान मंडळातील सेनापती असे त्यास वार्षिक १०००० होन वेतन होते.

**ब) पेशवे काळ**

पेशवे काळात घोडदळाचे महत्त्व पायदळापेक्षा वाढले होते. बारगीर व शिलेदार असे २ प्रकारचे घोडेस्वार असत.

**बारगीर –** सरकारच्या नोकरीत असून सरकारी घोडा व हत्यार वापरीत असे बारगीरास दरमहा ५ ते १० रु.  दिले जात. बारगीर पेशव्यांच्या पागेत तसेच सरदारांकडेही असत. पागेत बारगीर व घोडे असत. पागेवरील अमदारास पाग्या म्हणत. एका पागेत दहा ते पाच सातशे घोडे असणाऱ्या पाग्याची सरदारामध्ये गणना होत असे. सरदाराप्रमाणेच लवाजमा मिळत असे. त्याच्या पागेबरोबर नौबत, निशाणा, पालख्या वगैरे इतमाम, फडणीस, पोतनीस, इ. दरखदार, मशालजी, शिंगे, पाखलील खासदार, नालबंद, दाणेकरी, जासूद, गारदी, फरास, डेरे, राहुट्या इ. सरंजाम ओझे, दाणावेरण वहाण्यासाठी तट्टू, बैल, उंट, हत्ती इ. मिळत. त्याचा सर्व कच्चा खर्च सरकारकडून मिळत असे. हरीवंशाच्या बखरीततील उल्लेख आहे, 'एक पागा म्हणजे हजारो लोकांचे पोट भरण्याचे साधन'.

शिलेदार –  शिलेदारांच्या समुदायास पथक म्हणत. पथकाच्या प्रमुखास पथके किंवा पतकी म्हणत. पथकाचा सरकारातून मिळत असल्यास त्यास इतलाखी पथक म्हणून व प्रदेश लावून दिला असल्यास त्यास सरंजामी पथक म्हणत. याशिवाय पथकांच्या खाजगी पागा असत.

स्वारांना जे वार्षिक वेतन दिले जाई त्याचे निम्मे किंवा तिजाई भाग अगाऊ द्यावा लागे. त्यास नालाबंदी म्हणत शिलेदारांची पथके नालबंदी मिळाल्याशिवाय युद्धास येत नसत.

याशिवाय एकांडे शिलेदारांचाही लहान वर्ग असे. हे प्रत्येक पथकातील किंवा पागेतील सैनिकांच्या संख्येनुसार ठेवलेले असत. हे सहसा खानदानी घराण्यातले कअसत. मोठ मोठे मातब्बर सरदार एकांड्यांना मोठमोठी वतने व बसावयास आपल्या पागेतील निवडक घोडी देऊन जीवास जीव देणारे स्नेही म्हणून चाकरीत ठेवती. आणीबाणीचे

प्रसंगीहे आघाडीवर असायचे. हेच पुढे बढती मिळून पागे किंवा पथके होत असत. शिलेदारांकडे राऊत असत. ते पेशवे सांगतील त्या सरदाराकडे काम करीत. सरदारांच्या इतमाम सरंजामदारापेक्षा जास्त असे. त्यांच्या ताब्यातील मुलुखास जागीर म्हणत. उदा. पटवर्धनांकडे २४ लक्षाची जागीर होती.

लष्करी भरतीला माणसे व घोड्यांची सहसा कमतरता भासत नसे. लष्करी शिक्षणाकरीता शाळा नसल्या तरी घराघरातून मुलांना घोड्यावर बसणे, विविध शस्त्रे चालविणे याचे शिक्षण दिले जात असे. त्याकाळात लष्करी पेशा लोकप्रिय होता. १८ व्या शतकाच्या अखेरीस सर्व मराठे सरदार मंडळींचे एकंदर सैन्य सुमारे अडीच ते तीन लाखापर्यंत होते. पेशव्यांकडे ४०००० घोडदळ व २०००० पायदळ असे ६०००० सैन्य होते. मराठ्यांकडे लष्करी ताकद प्रचंड असूनही पाश्चिमात्यांच्या कवायती फौजांसमोर त्याचा टिकाव लागला नाही. आपापसातील हेव्यादाव्यामुळे शासनातील एकरुपता विस्कळीत झाली होती. त्यामुळे मराठ्यांना नमविणे ब्रिटिशांना शक्य झाले.

**हुजूरात / शरीररक्षक दल**

शिवकाळात लष्करातील अतिशूर , लढवय्ये, एकनिष्ठ व हुशार सैनिकांची शरीरसंरक्षक दलात भरती होत असे. हे दल राजा मोहिमेवर असतांना त्याच्या अवतीभावती त्याच्या संरक्षणासाठी असे.

सभासद बखरीतील उल्लेखानुसार शिवाजीच्या लष्कराची संख्या २,०८,२६० होती. त्यात वेगवेगळे विभाग होते. त्यात वैयक्तिक रक्षक पथकाचा समावेश होता. या पथकाचे ४ भाग असून त्यात २००० माणसे होती. ही लष्करातील निवडक अतिशूर, लढवय्ये व एकनिष्ठ मंडळी महाराजांच्या पालखीबरोबर नेहमी असत. राजाच्या शरीररक्षणाबरोबरच राजाची सभा, निवासस्थान, येथील सर्व प्रकारची व्यवस्था यांचे रक्षण करण्याची जबाबदारी या दलावर असे. या शरीररक्षक दलाकडे बंदुकधारी, भालेकरी, हल्ली हत्यारे, तोफखाना असे हत्यारबंद लोक असत. या दलातील सैनिकांना खास पोशाख होता. डोक्यास मंदिल, दोन्ही हातात सोन्याची किंवा चांदीची कडी, बुदीकीला रुप्याचे कट, कानात कुट्याची जोडी असा त्यांचा साज असे.

या हुजूर पायदळाप्रमाणे हुजूर पागाही होती. त्यात ५००० घोडी असत. त्यांचे जीनसमान सोन्यारुपाचे असे. त्यावरील करोल किंवा स्वार चांगले शूर, हुशार बारगीर असत. याशिवाय आणखी २०० उमदे घोडे राजासाठी निराळे ठेवलेले असत. त्यांचेवरील जीन सामान फारच उंची असे. राजाची स्वारी निघाली की हुजूर पायदळ व हुजूर पागेतील लोक ठरल्या पद्धतीने पुढे मागे दोन्ही बाजूस अंतराअंतराने चालत असत.

पेशवेकाळात पेशव्यांबरोबर निघणाऱ्या फौजेस हुजुरात व छत्रपती बरोबर निघाणाऱ्या फौजेस राजहुजुरात म्हणत. पथक्यांमध्येही अशा प्रकारे पथके व राजपथके असा भेद असे. पथक्यामध्ये वरिष्ठ शिंदे, होळकर इतर राजपथक्यांमध्ये वरिष्ठ पेशवे, ीसले, गायकवाड इत्यादी पेशव्यांची फौज म्हणजे हुजुरात मध्यवर्ती सत्तेच्या स्वरूपात मोठी असणे आवश्यक असे. हुजूर पागेत सामान्यतः १०००० घोडे असत. त्यांची पथके ५२ होती. त्यावर सरदार असत. प्रवरा, भीमा, नीरा नदीकाठी सरकारी कुरणांमध्ये पागांची वाढ होत असे. पागेकडे

फडणीस, पोतनीस इत्यादी दरखदार व पथकास बक्षी असत.

**तोपखाना –** तोफांचे बाबतीत पोर्तुगीज प्रबळ होते. त्यांचे अनुकरण शिवाजी राजांनी केले असावे. तोफा दारुगोहा याकरीता शिवाजी राजे इतरांवर अवलंबून होते. महाराजांनी इंग्रजांशी होणाऱ्या बोलण्यांदरम्यान शस्त्रास्त्राची मागणी वेळोवेळी केलेली दिसते. तोफा, दारूगोळा यासाठी शिवाजी महाराजांनी सतत इंग्रज, फ्रेंच, पोर्तुगीजांकडे पाठपुरावा केला होता. इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच वखारवाल्यांशी त्यांच्या झालेल्या पत्र व्यवहारावरून हे लक्षात येते.

तोफखाना हा स्वतंत्र विकसित विभाग शिवाजी राजांच्या लष्करात नव्हता. मात्र शिवाजीने दारूखाना असा स्वतंत्र विभाग पोर्तुगीजाच्या 'कासा दी पोल्वारा' धर्तीवर काढला होता असा उल्लेख डॉ. सेन करतात. शिवकाळात तोफांचा वापर प्रामुख्याने किल्ल्यांवर बचावासाठी व नौदलातील गलबतांवर नाविक लढाई मध्ये करीत असावे. जंजिरा व फोंड्याच्या मोहिमांत तोफा वापरल्या होत्या.

फ्रेंचाकडून शिवाजी महाराजांनी इ.स. १६७४ मध्ये ८८ व ३ हजार मण शिसे मिळविले होते. पन्हाळा किल्ला घेतांना त्यांना तोफांची गरज होती. परंतु कोकणात फ्रेंचांकडून घेतलेल्या ४० तोफा लुबाडल्या गेल्याचा उल्लेख फॅक्टरी रेकॉर्डस मध्ये आढळतो. युरोपीयन बनावटीच्या तोफांशिवाय शिवाजी महाराजांकडे भारतीय बनावटीच्या शुतरनाल नावाच्या हलक्या तोफा होत्या. तोफ गोळे हे दगडी किंवा लोखंडाचे असत. पुरंदरावर शिवाजी महाराजांनी तोफा ओतण्याचा कारखाना सुरू केलेला होता हे जयसिंगाने औरंगजेबास लिहिलेल्या पत्रावरून स्पष्ट होते. शिवाजीच्या तोफांच्या मागणीकडे ब्रिटिश वखारवाल्यांनी दुर्लक्ष केल्याचे पत्र व्यवहारावरून लक्षात येते. पुढे संभाजी राजांना मात्र सुरूवातीच्या काळात तोफा, दारूगोळा पुरविण्यास इंग्रज व पोर्तुगीज तयार होते असे पत्र व्यवहारावरून दिसते. पण सीजीचे पोर्तुगीजांशी सलोखा फार काळ टिकला नव्हता. १८ व्या शतकाच्या दुसऱ्या दशकातही मराठ्यांना तोफांसाठी युरोपीयनांवरच अवलंबून रहावे लागले.

पेशवे काळात तोफा व दारूगोळा तयार करण्याचे प्रयत्न झाले. पेशवा बाजीरावाच्या दारुगोळा तयार करण्याच्या भट्टीला भेट दिल्याचा उल्लेख ब्रिटीश राजदूत कॅप्टन विल्यम गोर्डानने केलेला आहे. माधवराव पेशव्यांच्या कारकिर्दीत ओतूर (सुभा जुन्नर) येथे तोफगोळे तयार करण्याची फॅक्टरी उभारण्यात आली होती. तोफा, दारूगोळा निर्मितीचे हे प्रयत्न मर्यादित होते. तोफा, बंदुका वगैरेसाठी मराठ्यांना इंग्रजांवरच अवलंबून राहावे लागत होते.

## ३.२.४ अरमार

### अ) शिवाकालीन आरमार

शिवकालीन राजनीतीचे वर्णन करणाऱ्या 'आज्ञापत्र' या ग्रंथात रामचंद्रपंत अमात्यांनी 'अरमार एक स्वतंत्र राज्यांग असल्याचे सांगितलें आहे.' ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र असे ते वर्णन कतात. शिवाजीच्या लष्करव्यवस्थेत आरमार विशेष महत्त्वाचे होत. मध्ययुगीन भारतीय राज्यकर्त्यांपैकी शिवाजी महाराजांनी सर्वप्रथम आपल्या लष्कर व्यवस्थेत आरमाराला विशेष स्थान दिले. स्वराज्य आकाराला येत असतांना भारताच्या दोन्ही बाजूस पसरलेल्या समुद्रावर युरोपीयनांचे वर्चस्व होते. भारतातील प्रमुख सत्ता मानल्या जात

असललेल्या मुघल राज्यकर्त्यांना देखील सागरावर सत्ता निर्माण करता आली नव्हती. पोर्तुगीजांचे समुद्रावर विशेष स्वामित्त्व होत. पोर्तुगीजांच्या परवान्याशिवाय कोणत्याही जहालाला समुद्रावर संचार स्वातंत्र्य नव्हते. सागरी सत्ता असलेले सिद्दी मराठ्यांचे शत्रू होते. पेर्तुगीज, सिद्दींना धडा शिकविण्याकरीता स्वतःचे आरमार उभारणे आवश्यक असल्याचे शिवाजीच्या लक्षात आले.

**आरमारातील सामर्थ्य –** शिवाजी राजांनी इ.स. १६५८ मध्ये कोकणचा काही भाग ताब्यात आल्यानंतर आरमार उभारणी सुरू केली. कल्याण, भिवंडी, पनवेल ही बंदरे जिंकल्यापासून तेथे जहाज बांधावयास सुरूवात केली होती. इ. स. १६६७ पर्यंत मराठी आरमार पोर्तुगीजांना धडकी भरविण्याइतपत समर्थ झाले होते. शिवाजीच्या आरमारातील जहाजांचा आकार युरोपीयनांच्या तुलनेत लहान होता. मराठी आरमारातील सर्वत मोठे जहाज गुरबा हे २००–३०० टन वजनाचे होते. शिवाजीच्या आरमारातील जहाजांची संख्या साधनांमधून वेगवेगळी दिलेली आढळते. सभासद बखरीतील उल्लेखानुसार मराठी आरमारात सुमारे ४०० जहाजे होती. तर चिटणीस बखरीत ही संख्या ४०० ते ५०० दिलेली आहे. चित्रगप्त बखरीत ही संख्या ६४० दिलेली आहे. त्यात गुराबा, तरांडी, गलबते, तारवे, मचवा, शिबार, तरांडी, पगार, दुबार, तारू, होडी इ. लहान मोठे प्रकार होते. लढाऊ जहाजांवर तोफा, जंबुरे, बंदुका, दारूगोळा असे लढाईचे साहित्य असे.

कोकण किनारपट्टीवरील कल्याण, भिवंडी, पनवेल, राजापूर, देवगड, मालवण अशा अनेक बंदरांमध्ये जहाजबांधी व दुरूस्तीचा उद्योग चालू असे. जहाज बांधणीसाठी आवश्यक सागवानी लाकूड कोकणच्या जंगल विशेषतः वसईच्या जंगलात मुबलक प्रमाणात उपलब्ध होते. जहाज बांधणीसाठी स्थानिक कारागीरांबरोबरच काही पोर्तुगीज कारागीरांनाही महाराजांनी आपल्या पदरी ठेवल्याची माहिती मिळते.

**आरमाराची रचना**

आज्ञापत्रात आरमाराची रचना सांगतांना म्हटले आह की, ५ गुराबा व १५ गलबते मिळून १ सुभा बनत असे. प्रत्येक सुभ्यावर १ अधिकारी असे. अशा सर्व सुभ्यांचे मिळून २ आरमार दले निर्माण केलेली असत. प्रत्येक दलावर १ आरमार प्रमुख नेमला जाईल. मायनाईक व दर्यासारंग अशी दोन आरमार दलांसाठी २ प्रमुख पदे निर्माण केली होती. मायनाईक पद हिंदू भंडारी जातीकडे तर दर्यासारंग पद मुसलमान व्यक्तीकडे असे. महाराजांच्याआरमारात कोकण किनारपट्टीवरील कोळी भंडारी, मलबारी, ख्रिश्चन या लोकांना खलाशी म्हणून घेतले जात होते. समुद्रावरील त्यांचा धाडसीपणा, काटकपणा व अनुीवाचा उपयोग महारजांनी आरमार उभारणीच्या कामी करून घेतला होता.

आरमाराच्या संरक्षणासाठी विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, रत्नागिरी, पद्मदुर्ग, सिंधुदुर्ग इ. किल्ले महाराजांनी बांधले. सिंधुदुर्ग विशेष महत्त्वाचा किल्ला होता. मुंबईकर इंग्रजांवर वचक निर्माण करण्यासाठी मुंबईलगतच्या खांदेरी बेटावर इंग्रजांच्या अडथळ्यांना न जुमानता तटबंदी उभारली होती.

व्यापारी आरमार

लढाऊ आरमाराबरोबरच महाराजांनी काही लहान व्यापारी नौकाही बांधल्या होत्या.

त्यात मचवा, शिबार, तरांडी, पगार इ. चा समावेश होता. युरोपियनांच्या तुलनेत महाराजांच्या व्यापारी नौका अत्यंत लहान होत्या. महाराजांच्या राज्याच्या किनाऱ्यावर ८-१० मोठी बंदरे होती. तेथून जहाजांच्या सहाय्याने परदेशांशी महाराजांचा व्यापार चाले. अनेक अरबी व युरोपीयन व्यापारी आपली जहाजे घेऊन मराठी बंदारांमध्ये येत व वस्तूंची देवघेव करीत. या परकीय व्यापाऱ्यांना सर्व सोयी उपलब्ध करून देणे, त्यांचे संरक्षण, आदरातिथ्य याकडे लक्ष दिले जात होते. त्यामुळे बंदरातील व्यापार वाढला, जकातीचे उत्पन्न वाढले.

**आरमाराची कामगिरी**

मध्ययुगात कोणत्याही रजाने समुद्रावर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला नव्हता. शिवाजी राजांनी मात्र प्रतिकूल राजकीय परिस्थिती अल्प सामर्थ्यानिशी आरमार बांधण्याची मोठी कामगिरी केली. महाराजांच्या आरमारामुळे पुढील फायदे झाले.

१. आरमाराच्या संरक्षणासाठी जलदुर्ग किंवा तटबंदीने आरमारी तळ निर्माण केले, मराठी आरमाराचे सामर्थ्य वाढले, कोकण किनाऱ्यावरील प्रदेशाचे सिद्दी, पोर्तुगीज व इतर युरोपीयन सत्ता यांच्या धाडीपासून संरक्षण झाले. कोकणातील जनतेला शांतता लाभली.

२. आरमारामुळ व्यापार वृद्धींगत झाला. व्यापाऱ्यांना संरक्षण मिळाले.

३. आरमार उभारणीमुळे समुद्रावर मराठ्यांची सत्ता प्रस्थापित झाली. तत्कालीन आंतरराष्ट्रीय नियमानुसार समुद्रात फुटून किनाऱ्यावर आलेल्या जहजांवर मराठ्यांना मालकी सांगता येऊ लागली. मराठ्यांच्या उत्पन्नाचा हा एक स्रोत बरला.

४. सागर संचारासाठी पोर्तुगीजांचा परवाना घ्यावा लागे. पोर्तुगीजांचा हा अधिकार महाराजांनी धुडकावून लावला. त्याच्या परवान्याशिवाय मराठी जहाजे समुद्रावर फिरु लागली.

५. भूदलाला मोहिमा यशस्वी करतांना आरमार दलाचे बरेच सहाय्य लाभले. उदा. सुरतेवर स्वारी, बसरूरची स्वारी इ. आरमारामुळे किनाऱ्यावरील लष्करी मोहिमेप्रसंगी रसद पुरविणे सुलभ झाले.

६. आरमान उभारणीमुळे हजारो लोकांना रोजगार मिळाला. जहाज बांधणी, दुरूस्ती, आरमारातील नोकऱ्यात रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या. समुद्रकिनाऱ्यावरील लोकांना त्यांच्या दर्यावर्दीपणाचा उपयोग राष्ट्रकार्यासाठी करता आला.

शिवाजी राजांनी उभारलेल्या या आरमाराने त्यांचेनंतर स्वराज्याला एक नवे क्षेत्र निर्माण झाले होते. महाराजांच्या मृत्यूनंतर ज्या संघर्षमय अवस्थेतून स्वराज्याला जावे लागले, त्यावर मात करण्यासाठी आरमाराचा बराच उपयोग झाला. संभाजीच्या मृत्यूपूर्वीपासून भीमराव उर्फ सिदोजी गुजर, त्याचा सहाय्यक कान्होजी आंग्रे आरमाराची जबाबदारी सांभाळत होते. पुढे राजाराम महाराजांनी जिंजीस जातांना सिदोजी गुजरास बरोबर घेऊन कान्होजीस आरमाराची जबाबदारी दिली. ती त्याने समर्थपणे पार पाडली. सिद्दीने जिंकलेला मराठ्यांचा प्रदेश परत घेतला. म्हणून राजाराम महाराजांनी त्यास इ.स. १६९८ मध्ये आरमाराचा सुभेदार म्हणून 'सरखेल' किताबाने गौरविले होते. पुढील काहात ४० वर्षे आंग्रे घराण्याने आरमार समर्थपणे सांभाळले.

## ब) पेशवेकालीन आरमार

राजाराम महाराजांच्या काळापासून कान्होजी आंग्रेचा आरमारी सेनापती म्हणून उदय झाला होता. तथापि तो सागरी क्षेत्रात स्वतंत्र सरदार बनला होता. आरमारावर छत्रपती ऐवजी आग्र्यांची सत्ता चालत होती. आंग्रे छत्रपतींना नाममात्र मानत होते. सरंजाम पद्धतीच्या पुनरुज्जीवनाचा हा परीणामत होता. कान्होजी आंग्रे ताराबाईच्या सर्व सरदारांमध्ये प्रबळ सरदार मानला जात होता.

पुढे शाहू महाराजांसाठी पेशवा बाळाजी विश्वनाथाने मध्यस्थीकरून कान्होजी आंग्रेस शाहूच्या पक्षात आणले. कान्होजीबरोबर स्वतंत्र करार करून कोकण प्रदेश व आरमाराची सरखेली कायम करण्यात आली. आंग्रे घराण्याने आपल्या सामर्थ्याने पश्चिम किनारपट्टीवर सर्व सत्तांमध्ये दहशत निर्माण केली होती. पोर्तुगीज, इंग्रजांनी मिळून आंग्र्यांना बुडविण्याचे प्रयत्न करून पाहिले. पण ते निष्फळ ठरले होते. जून १७२९ मध्ये कान्होजी आंग्रेंच्या मृत्यूनंतर त्याचा मोठा मुलगा सखोजीने आरमाराची जबाबदारी सांभाळली. सप्टेंबर १७३३ मध्ये त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर त्याच्या ३ मुलांमध्ये-मानाजी, संभाजी, तुळाजी-आरमार प्रमुखपदासाठी संघर्ष सुरू झाला. या यादवीने पेशवे व छत्रपती शाहू त्रस्त झाले. पेशवा बाजीरावाने संभाजी व मानाजी यांच्यात सत्ता वाटणी करून तात्पुरते भांडण मिटवले. मानाजीस 'वजारतमाब' किताब देऊन त्याला ठाणे कुलाबा प्रदेश दिला तर संभाजीस 'सरखेल' पद देऊन सुवर्णदुर्ग ते विजयदुर्ग पर्यंतचा प्रदेश दिला. सौम्य स्वभावप्रवृत्तीच्या मानाजीकडे पेशव्याचा कल अधिक होता. त्यामुळे संभाजी व तुळाजीचे पेशव्यांशी वैर झाले. आपापसातील भांडणे असली तरी आंग्र्यांचा वचक परकीय लोकांवर चांगला होता. मानाजी व संभाजीने पोर्तुगीज, इंग्रजांना चांगलेच जेरीस आणले होते. पूर्वी ३०० टनापर्यंत जहाजे मराठी आरमारात होते. ते वाढवून ४०० टनापर्यंत नेले होते. इ.स. १७४२ मध्ये संभाजी आंग्रेचा मृत्यू झाला, तेव्हा त्याचेकडे ४०० टनाची ८ जहाजे होती. तुळाजीने संभाजीची जबाबदारी सांभाळली, त्यानेही परकीयांना त्रस्त केले होते. मात्र मानाजी व तुळाजीत पुन्हा सरखेलपदासाठी वैमनस्य निर्माण झाले. हे भांडण छत्रपती शाहूने सोडविले. सिद्दीच्या ताब्यातील अंजनवेल, गोवळकोट जिंकणाऱ्यास सरखेलपद देण्याचे शाहूने मान्य केले. ही कामगिरी तुळाजीने पार पाडल्यामुळे तुळाजीस शाहूने सरखेलपद दिले. ही मध्यस्थी पेशव्यांना आवडली नव्हती. कारण पेशव्याचा ओढा मानाजीकडे होता. पेशव्याने आरमाराकडे दुर्लक्ष केले. वसईच्या बाजूने स्वतःचे स्वतंत्र आरमार उभारण्यास पेशव्यांनी इ.स. १७३७ पासूनच सुरूवात केली होती. तुळाजीनही पेशव्याने दुर्लक्ष केले असले तरी आपली ताकद वाढवली. पाश्चात्य जलचरांमध्ये दहशत वाढवली. पेशव्यांनाही तो जुमानत नव्हता. इ. स. १७४९ मध्ये शाहूच्या मृत्यूनंतर सर्व अधिकार पेशव्यांकडे आल्यानंतर नानासाहेब पेशव्यांनी इ.स. १७५६ मध्ये तुहाजीचा पाडाव केला. मराठ्यांचे आरमार नाममात्र उरले. याचा फायदा पाश्चात्य सत्तांना झाला, मराठी राज्याची मात्र हानी झाली.

**पेशव्यांच्या आरमाराची रचना इ. स. १७३७ पासून सुरू केलेली स्वतंत्र आरमार उभारणी पेशव्यांनी तुळाजीच्या पाडावानंतरही सुरूच ठेवली होती. आरमाराचे**

**२ भाग केले. वसई व विजयदुर्गाचे आरमार आनंदराव धुळपकडे आरमार सुभ्याचे काम सांगितले. वसई विजयदुर्ग, रत्नागिरी, अंजनवेल, देवगड, रंवदंडा येथे आरमारी ठाणी घातली. प्रत्येक ठाण्यास तालुका म्हणत. आरमार खर्चासाठी महाल लावून देण्यात आले. पेशव्यांच्या नौदल प्रमुखास 'आरमारप्रमुख' किंवा 'सुभेदार' म्हणत. पहिला आरमार प्रमुख हा बाजीराव बक्षी होता. त्याचे नंतर इ.स. १७४९-५० चे सुमारास त्याचा मुलगा त्रिंबकरावाकडे हे पद आले. माधवरावाच्या कारकिर्दीत आंग्र्यांकडील आनंदराव धुळप आरमार प्रमुख होता. माधवराव पेशव्यांनी आनंदराव धुळपास गहाळ माणूस दूर करून चांगल्या माणसाची जगजोड करण्यास व आंग्र्यांच्या शिलकी जर्जर आरमाराची दुरूस्ती करण्याची ताकीद दिली होती.**

आरमाराच्या मुलकी प्रशासनात दरखदार हे वंशपरंपरागत कारकून अधिकारी असत. त्यांना हजेरी घेणे, हिशेब ठेवणे यासारखी कामे असत. त्यांना थोडेफार तांत्रिक ज्ञानही घ्यावे लागे. इ.स. १७६५-६६ मध्ये आरमारप्रमुखाच्या मुलकी प्रशासनावरील देखरेख व मदतीकरीता कारभारी व अमीन हे अधिकारी ठेवण्यात आले. कारभारी सुभेदारास मदत करी, अमीन हा हजेरी, हिशेब व लागणाऱ्या सामानाची खरेदी इत्यादीस जबाबादर असे. नानासाहेब पेशव्याच्या कारकिर्दीत आरमारी सुभेदाराचा वार्षिक पगार ११८६/- रु. रोख व १६ मण धान्य असा होता. सरतांडेलास मासिक १० रु., तांडेलास ७ ते साडेतास रुपये व खलााला साडेचार ते पाच रुपये पगार मिळे. याशिवाय पदाप्रमाणे शिधा दिला जाई. अधिकारी व खलाशी यांना लढाईत चांगली कामगिरी केल्याबद्दल पेशव्यांकडून बक्षिस मिळत असे. उदा. माधवराव पेशव्यांनी हैदरअली विरूद्ध चांगली नाविक कामगिरी केल्याबद्दल अधिकारी व खलाशांना ४२५० रुपये वाटले होते.

### आरमारी युद्धपद्धती

मराठा आरमार भूदलाप्रमाणेच युद्ध करीत असे. मोठमोठ्या युद्धनौकांतून समुद्रात जावे, शत्रूच्या जहाजांजवळ नौका भिडवाव्यात, आपल्या नौकांमधून उड्या मारून पोहत जाऊन शत्रूच्या जहाजावर चढावे, तेथे युद्ध करावे असे मराठा आरमाराचे युद्धतंत्र होते. सहाजिकच या हालचाली होईपर्यंत शत्रूच्या बंदूकांच्या माऱ्याने तर काहीजण समुद्रात बुडून मरत. इंग्रजांनी ज्या तुळाजीचा पराभाव केला त्याचे लढण्याचे तंत्र, शस्त्रास्त्रे यात शिवकाळापेक्षा काहीही फरक पडला नव्हता. शिवकाळात आरमाराचा पाया घातला गेला होता. या काळातील युद्ध पद्धतीत तो प्राथमिक प्रयत्न असल्याने दोष असणे सहाजिक होते. पुढे हे दोष काढून शत्रूच्या तोंडीस तोंड अशी युद्ध पद्धती विकसित व्हायला हवी होती. दुसरे असे की शिवकाळातील स्वराज्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता, कमी साधनसामुग्री होती. तुलनेत पेशवेकाळात साधनसामुग्री अफाट होती. त्याचा योग्य तो वापर होऊन आरमार विकसित होणे अवघड नव्हते. परंतु शिवाजी प्रमाणे पेशव्यांकडे दूरदृष्टी व चिकाटी नव्हती. त्यामुळे आंग्र्यांचे आरमार बुडविले. आपापसातील वैरभावही त्यास कारणीभूत ठरला. आरमार ही काळाची गरज आहे याची जाणीव पेशव्यांनी ठेवली नाही. परिणामी मराठी राज्य पश्चिमात्य सत्तांपुढे टिकले नाही.

## ३.३ स्वयंअध्यनासाठी प्रश्न

टीपा लिहा

१. शिवकाली युद्धतंत्र

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. गनिमा कावा

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. मराठेकालीन पायदळ

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. पेशवेकालीन घोडदळ

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५. मराठ्यांचा तोफखाना

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

६. मराठ्यांचे आरमार

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

दिर्घोत्तरी प्रश्न

१. पेशवेकालीन लष्करी व्यवस्थेचे टिकात्मक परिक्षण करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. मराठेकालीन आरमाराची माहिती देऊन कामगिरीचे वर्णन करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ३.४ सरांश

मराठी राज्य लष्करी राज्य होते. सतत शत्रुपासून संरक्षणाकरीता व राज्य विस्तारासाठी आक्रमक मोहिमा लढाव्या लागल्या. शिवकाळत व पेशवेकाळात समकालीन परिस्थितीला सामोरे जाण्याकरीता मराठ्यांनी लष्कराचा यशस्वीपणे वापर केला. शिवकाळ व पेशवेकाळाची तुलना करतांना लक्षात येते की शिवकाळात लष्करी व्यवस्थेची वैशिष्ट्ये पेशवेकाळात दुर्लक्षित झाली. खरे तर कुठलाही आदर्श नजरेसमोर नसतांना शिवाजी महाराजांनी राज्य उभारले, स्थिर केले, डोंगराळ प्रदेशात मावळ्यांच्या मदतीने, स्वकर्तबगारीने मराठ्यांची बळकट लष्करी यंत्रणा उभी केली होती, पण पेशवेकाळात बदलत्या परिस्थितीत या प्रेरणा मागे पडल्या. लष्करी व्यवस्थेत कालसापेक्ष बदल झाले ते मराठ्यांचे पूर्वीचे सामर्थ्य टिकवून ठेऊ शकले नाही. ज्या शत्रूशी लढायचे होते. त्यांच्या ताकदीला शह देण्याची ताकद मराठी लष्कर मिळवू शकले नाही. लष्कराचे एक नवे अंग – आमरा – शिवाजी महाराजांनी हेतूपूर्वक उभारून सुदृढ केले पण पेशवे काळात आपापसातील वैमनस्याने आरमार उध्वस्त झाले. शेवटी मराठ्यांना आपले राज्य गमवावे लागले.

## ३.५ पारिभाषिक शब्द

नजबी – बंदुकवाले

अबदागीर – राजे, सरदार वगैरे लोकांच्या डोक्यावर सुर्याचे ऊन लागू नये म्हणून मिरवणुकीच्या वेळी धरावयाचे छत्र.

तुरूकस्वार – ट्रप या इंग्रजी शबद्ाचा मराठी अपभ्रंश तुरक, इंग्रजांच्या कवायती घोडदळाकरीता तुरकस्वार अशी मराठी संज्ञा वापरली जाते

इतलाखी – रोख पगार देऊन ठेवलेला सैनिक.

फरास – बिछायत.

## ३.६ संदर्भ सूची

१) सेन, एस. एन. – अनु. शिवदे सदाशिव (२०११) – मराठ्यांची लष्करी व्यवस्थापुणे, डायमंड प्रकाशन.

२) कुलकर्णी अ. रा. (२००४) शिवकालीन महाराष्ट्र पुणे, राजहंस प्रकाशन.

३) सं.पा. कुलकर्णी, अ. रा. व खरे ग. ह. (१९८५) मराठ्यांचा इतिहास (खंड–१) शिवाजी आणि शिवकाल (१६०० ते १७०७), पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.

४) सं.पा. कुलकर्णी, अ. रा. व खरे ग. ह. (१९८५) मराठ्यांचा इतिहास (खंड–२) शाहू आणि शिवकाल (१७०७ ते १७६१), पुणे, कॉन्टिनेंटल प्रकाशन.

# घटक ४
# मराठाकालीन न्यायव्यवस्था

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्ये
४.१ प्रस्तावना
४.२ विषय विवेचन
४.२.१ मध्ययुगीन महाराष्ट्रातील कायद्याचे स्त्रोत - धर्म आणि व्यवहार, कायद्याचा उगम, रूढी व परंपरा, विवाह विषयक कायदा, मालमत्तेसंबंधी कायदा, दत्तकविधानासंबंधी कायदा, वारसा विषयक कायदा
४.२.२ शिवकालीन न्यायव्यवस्था- केंद्रीय न्यायव्यवस्था, स्थानिक न्यायव्यवस्था
४.२.३ पेशवेकालीन न्यायव्यवस्था -गोतसभा-ग्रामपंचायत
४.२.४ मराठाकालीन गुन्हे व शिक्षा
४.३ स्वयं अध्यनासाठी प्रश्न
४.४ सारांश
४.५ पारिभाषिक शब्द

## ४.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास

१) मध्ययुगीन महाराष्ट्रातील कायद्याचे स्त्रोत कोणते होते याबाबत सविस्तर माहिती मिळेल.

२) शिवकालीन न्यायव्यवस्थेचा परिचय होईल.

३) पेशवेकालीन न्यायव्यवस्था जाणून घेता येईल.

## ४.१ प्रस्तावना :-

अतिदक्षिणेत असलेल्या न्याय पद्धतीपेक्षा जास्त चांगली न्यायरचना मध्ययुगीन महाराष्ट्राची होती. राज्य कारभाराच्या इतर खात्यासारखाच न्यायरचनेवरसुद्धा बराच मुसलमानी छाप पडलेला दिसतो. पण मूलभूत संकल्पना आणि वैशिष्ट्ये यांचे उगमस्थान

हिंदू धर्मशास्त्रातच होते. मुसलमानांप्रमाणे हिंदूंमध्ये देखील सुरूवातीच्या काळात विधिनियम बऱ्याच अंशी धार्मिक स्वरूपाचे होते. न्यायसंस्थेमध्ये हिंदू आणि मुस्लीम परंपरेचे मिश्रण झाले होते.

हिंदूधर्मशास्त्र हे हिंदूंचे शरियत होते. कुराणाप्रमाणे श्रुती अपौरूषय होती तर हदीसप्रमाणे स्मृतीत परंपरागत विधीनियम होते. वेद व त्यावर आधारलेली धर्मशास्त्रे हे हिंदू विधिनियमांचे उगमस्थान होते. स्मृती ही धार्मिक विधिनियमांशी सांगड घातलेल्या परंपरागत प्रचलित असलेल्या रूढी रिवाजांचा संग्रह होती. बदलत्या परिस्थितीनुसार या स्मृतीचे विशदीकरण व स्पष्टीकरण केले गेले. त्यातून विधिनियम सार संग्रह यांची निर्मिती झाली. याज्ञवल्क्य स्मृतीवरील टिका विज्ञानेश्वराची 'मिताक्षरा' आणि पराशरस्मृतीवरील विद्यारण्यांची टिका पराशरमाधवीयम हे या ग्रंथाना कायद्याचे ग्रंथ म्हणून मान्यता मिळाली.

याच ग्रंथांना मध्ययुगीन महाराष्ट्रात मान्यताप्राप्त झाली होती. त्यांच्याच सहाय्याने न्यायदान केले जात होते. शिवपूर्व काळात न्यायदानासाठी मजलिस नावांची संस्था कार्यरत होती. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केल्यानंतर स्वराज्यात गोतसभा आणि ब्रह्मसभा यांच्यामार्फत न्यायदान केले जात होते. न्यायदानासाठी न्यायाधीश व पंडितराव या दोन स्वतंत्र न्यायाधिशांची नेमणूक केलेली असली तरी सर्वोच्च न्यायदानाचा अधिकार छत्रपतींकडेच होता. पेशवे काळात पंचायतीमार्फत न्यायदान केले जात होते. त्यासाठी स्वतंत्र न्यायाधिशांच्या नेमणुका केल्या जात असत.

**मध्ययुगीन महाराष्ट्रातील न्यायव्यवस्था पुढीलप्रमाणे :**

## ४.२ विषय विवेचन

### ४:२:१ मध्ययुगीन महाराष्ट्रातील कायद्याचे स्त्रोत :

**धर्म आणि व्यवहार :-**

मराठा कालखंडात गोतसभेच्या मार्फत न्यायदान केले जात होते. न्यायदानाच्या कामात धर्म आणि व्यवहार या दोन्ही बाजू प्रामुख्याने पाहिल्या जात. धर्म याचा अर्थ हिंदूंचे धार्मिक ग्रंथ व पुराणे, श्रुती व स्मृती यामध्ये दिलेला धर्म होय आणि व्यवहार म्हणजे प्रचलित पद्धत पाहून सदसद्विवेक बुद्धिच्या जोरावर करावयाचा निर्णय होय.

मराठा राज्याच्या उदयापूर्वी दक्षिणेत मुस्लीम कायदा अस्तित्वात होता. मुस्लीम राज्यकर्त्यांनी अंमलात आणलेली कायदेसंहिता व इतर न्यायविषयक संस्था महत्वाच्या मानल्या जात. काही वेळेला हिंदूंच्या वैयक्तिक बाबींमध्ये मुस्लीम राज्यकर्ते लक्ष घालत नसत. तर स्थानिक मजलिस हिंदुधर्मशास्त्रानुसार दिवाणी स्वरूपाचे खटले चालवित असे. परंतु हळूहळू दक्षिणेत मुसलमानांची सत्ता अधिक बळकट होत गेली व सर्वत्र मुस्लीम कायदा अस्तित्वात आला. परंतु वतनदारीच्या बाबतीत वतनदारांचेच कायदे अस्तित्वात होते. वतनाचा कायदा हाच सार्वजनिक कायदा अशी स्थिती होती. परंतु मराठा राज्याच्या उदयाबरोबर ही परिस्थिती पालटली.

**कायद्याचा उगम :–**

मराठेकालीन कायद्याचा उगम हा प्रामुख्याने हिंदूंच्या पवित्र धार्मिक ग्रंथांतून पहावयास मिळतो. अशा धार्मिक ग्रंथांमध्ये प्रामुख्याने संस्कृतमधील श्रुती–स्मृती, मनुस्मृती मिताक्षरा, व्यवहार प्रमुख, दानकमलाकर, पराशर माधवीयम, चतु:वर्ग चिंतामणी यांचा समावेश होता. हे धार्मिक ग्रंथच मध्ययुगीन महाराष्ट्रातील विधिनियमांची उत्पत्तीस्थाने होती.

जातीय तंटे सोडविण्यासाठी जातीय तंट्यांशी संबंधीत माती–निर्णय या स्मृतीग्रंथांचा उपयोग होत असे. ज्यावेळी धार्मिक ग्रंथाचा न्यायविाड्याच्या बाबतीत संबंध येत असे, तेव्हा बहुतेक विद्वान ब्राह्मणांच्या नेतृत्वाखाली या खटल्याचा विचार होत असे. हिंदू कामद्याच्या बाबतीत विज्ञानेश्वराने लिहिलेला 'मिताक्षरा' हा ग्रंथ अतिशय लोकप्रिय होता. पेशवेकाळात व्यवहार प्रमुख या ग्रंथाला मिताक्षराचा दर्जा प्राप्त झाला होता. मनु, हेमाद्री व माधव यांची अवतरणे वारंवार देवून एखादा खटला चालविणे ही त्यावेळी शिष्टसंमत पद्धत होती.

**रूढी व परंपरा :–**

मध्ययुगीन महाराष्ट्रात लिखित कायदे अतिशय कमी प्रमाणांत अस्तित्वात होते. बहुतेक सर्व कायद्याचा भर रूढी व परंपरा यांच्यावरच अवलंबून असे. मुस्लीम कालखंडात काही प्रमाणात कायदे निर्माण झाले व न्यायदानाचे काम फक्त राजाकडे न राहता काही प्रमाणात सामान्य लोकांच्या हातात गेले. राजाचे स्थानिक प्रतिनिधी स्थानिक स्वरूपाचे न्यायदानाचे काम करू लागले. मजलिस व इतर संस्था यांच्या मार्फतच न्यायदानाचे काम चालत असे. त्यामुळे प्रत्यक्षात कायद्याचे एकसंघ असे कोणतेही ग्रंथ दिसून येत नाहीत. म्हणून रूढी व परंपरा यांना अनुसरूनच न्यायदानाचे काम चालत असे. जाती व्यवस्थेची बंधने चांगलीच दृढ होती. प्रत्येक जात आपले नितीनियम कसोशीने पाळण्याचा प्रयत्न करीत असे. त्यामुळे क्वचित प्रसंगीच दीन जातीत संघर्ष निर्माण होत असे. जर असे संघर्ष उद्‌भवलेच तर ते रूढी आणि परंपरेनुसार सोडविले जात.

एकंदरीत शिवकालापर्यंत न्यायदानाची पद्धती बऱ्याच प्रमाणात अपरिपक्व असल्याचे दिसून येते. शिवकालात मात्र छत्रपती शिवाजी महाराजांनी काही प्रमाणात हिंदू कायदा व राजव्यवस्था यांचा समन्वय साधून न्यायदानाची नवी पद्धत सुरू केली.

कायदेकानू हे जरी लिखित स्वरूपात नसले तरी पुढील काही बाबतीत समाजाने नितीनियम पाळावेत अशी अपेक्षा असे. विवाह कायदा, मालमत्ता विषयक कायदा, दत्तक कायदा, वारसा विषयक कायदा इत्यादी कायद्यांचा मराठेकालीन विधिनियमात समावेश होत होता.

**विवाह विषयक कायदा :–**

विवाहविधी हा सार्वजनिकरित्या झाल्याशिवाय त्याला समाजात अधिकृत दर्जा प्राप्त होत नसे. ब्राह्मण जाती सार्वजनिकरित्या विवाह झाल्याशिवाय तो विवाह अधिकृत मानला जात नव्हता. इ. स. १७४४–४५ मध्ये पेशवा नानासाहेब यांनी असा नियम केला, की

कोणत्याही व्यक्तीला आपली मुलगी आपल्या भाच्याला (बहिणीच्या मुलाला) देता येणार नाही. विवाहाचे आठ प्रकार प्रचलित होते. पैशाच व गांधर्व विवाहांचेही काही ठिकाणी संदर्भ पहावयास मिळतात. गांधर्व विवाहाबद्दल फारसे अनुकूल मत नव्हते तर पैशाच विवाह शिष्टसंमत नव्हता.

**मालमत्तेसंबंधी कायदा**

मिताक्षरा या ग्रंथात नमूद केलेले नियम मालमत्तेच्या कायद्याच्या बाबतीत अस्तित्वात होते. जर एखाद्या व्यक्तीने स्वत:च्या कष्टाने मालमत्ता मिळविली असेल तर आपल्या भावांना त्यामध्ये वाटा देण्याचे कारण नव्हते. परंतु जर मालमत्ता वडिलोपार्जित असेल तर सर्व भावांना समान हिस्सा दिला पाहिजे असा नियम होता. परंतु जर संबंधीत व्यक्तींमध्ये समझौता झाला तर कायदा बाजूला ठेवून व्यवहारानुसार कोणताही फेरबदल करता येत नसे. औरस संततीलाच त्या व्यक्तींची संपूर्ण मालमत्ता मिळत असे. परंतु जर त्या व्यक्तीला विवाहबाह्य संबंधातून किंवा पाटाच्या लग्नापासून मुलगा झाला तर त्या मुलाचा त्याच्या पित्याच्या संपत्तीवर अधिकार राहत नसे. काही व्यक्ती पालकपुत्र सांभाळत. परंतु त्यांचाही आपल्या पालक पित्याच्या संपत्तीवर कोणताही अधिकार रहात नसे.

**दत्तकविधानासंबंधी कामदा :–**

एखादी व्यक्ती निपुत्रीक अवस्थेत मरण पावली तर त्या व्ययक्तीच्या पत्नीला स्वगोत्रातील एखादा मुलगा दत्तक घेता येत असे. असा दत्तक स्वगोत्रातील असावा असा नियम होता. परंतु स्वगोत्रातील मुलगा दत्तक म्हणून मिळाला नाही तर परगोत्रातील मुलगा दत्तक घेता येत असे. परंतु त्यासाठी गोतसभेची परवानगी घेणे आवश्यक असे. गोतसभेच्या मान्यतेशिवाय दत्तकविधानाला अधिकृत मान्यता मिळत नसे. दत्तकविधानाला गोतसभेने मान्यता दिल्यानंतर दत्तकविधानाची संबंधीत व्यक्तीला सरकारतर्फे सनद दिली जात असे. कोणत्याही परिस्थितीत त्या विधवा स्त्रीला मुलीचा मुलगा दत्तक घेता येत नव्हता.

**वारसा विषमक कायदा :–**

एखादी व्यक्ती निपुत्रिक अवस्थेत मरण पावली तर त्या व्यक्तीच्या पत्नीला आपल्या पतीच्या मालमत्तेवर वारसा हक्क सांगता येत असे. परंतु त्या स्त्रिला जर मुलगीच असेल व त्या मुलीला मुलगा असेल तर त्या मुलाला आपल्या आजोबांच्या मालमत्तेवर हक्क सांगत येत नसे. परंतु त्या मुलाच्या आजीने जर आपल्या नातवाच्या नावाने बक्षीसपत्र केले तर ती मालमत्ता त्या मुलाला मिळत असे.

एखाद्या व्मक्तीने पहिल्या बायकोचा काहीही दोष नसताना दुसरा विवाह केला तर पहिल्या बायकोला आपल्या पतीकडून पोटगी मागण्याचा हक्क होता. तसेच एखाद्या व्यक्तीची सून विधवा झाली तर त्या विधवा सूनेला आपल्या सासऱ्याकडून वारसा हक्काने खर्च मागण्याचा अधिकार होता. हा कायदा शिवपूर्व काळापासून अस्तित्वात होता. प्रत्येक स्त्रिला तिला दिलेली मालमत्ता स्त्रीधन म्हणून राखण्याचा पूर्ण अधिकार होता.

मराठा जातीतील निपुत्रिक विधवा स्त्री मरण पावल्यास त्या स्त्रिची संपूर्ण मालमत्ता तिच्या नवऱ्याच्या बहिणीच्या मुलाला मिळत असे. परंतु बऱ्याचवेळा निपुत्रिक व्यक्तीची मालमत्ता सरकार जमा केली जात असे.

वरील सर्व विधिनियम, स्मृतीकारांचे आदेश तसेच प्रचलित चालीरिती यांच्या प्रभावाखाली अस्तित्वात होते.

### ४.२.२ शिवकालीन न्यायव्यवस्था :–

मध्ययुगीन महाराष्ट्राची न्यायरचना दक्षिणेतील न्यायरचनेपेक्षा जास्त चांगली होती. राज्य कारभाराच्या इतर खात्यासारखेच न्यायव्यवस्थेवर सुद्धा बराच मुसलमानी छाप पडलेली दिसतो. परंतु मुलभूत संकल्पना आणि वैशिष्ट्ये यांचे उगमस्थान हिंदू धर्मशास्त्रात होते. म्हणून न्यायसंस्थेतही हिंदू व मुसलमान परंपरांचे मिश्रण झालेले दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कारकिर्दीची सुरूवात आदिलशहाचा एक जहागिरदार म्हणून केली होती. त्यामुळे सुरूवातीच्या काळात मुस्लीम राजवटीतील कायदेकानून व पद्धतींचा त्यांनी स्विकार केल्याचे दिसते. डॉ. व्ही. टी. गुणे म्हणतात, 'सर्व मुस्लीम न्यायालयीन संस्था मराठे काळात थोड्याफार फरकाने अस्तित्वात असलेल्या दिसतात.' इ. स. १६५० पासून छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीला हळूहळू वजन प्राप्त होत गेले. स्वराज्याच्या प्रदेशांत वाढ झाली आणि इतर राज्यकर्त्यांच्या तुलनेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात शांतता लाभल्याने त्यांनी आपल्या न्यायव्यवस्थेत बदल केले व जुन्या धर्म ग्रंथावर आधारित अशी नवी न्यायव्यवस्था स्वराज्यास लागू केली. छत्रपती शिवाजी महाराजांनी न्यायव्यवस्थेत काही नविन बदल केले असले तरी जुन्या न्यायव्यवस्थेतील काही परंपरा तशाच ठेवल्या होत्या. व्यवहार निर्णयाची व्यवस्था चांगली व्हावी याकरिता अष्टप्रधान मंडळात न्यायाधिशाची नेमणूक केली होती. तर धर्मनिर्णयासाठी पंडितराव या मंत्र्याची नेमणूक केली होती. शिवकालीन न्यायव्यवस्था पुढीलप्रमाणे होती.

**केंद्रीय न्यायव्यवस्था :–**

**राज्यसभा किंवा राजमंडळ :–**

केंद्रीय न्यायसभा ही प्रामुख्माने राजा, प्रमुख न्यायाधीश, पंडितराव आणि सरकारी अधिकारी यांची मिळून बनलेली असे. न्यायदानाचे प्रमुख आणि सर्वश्रेष्ठ अधिकार राजाकडे असत. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांची राजसभा ही एक अपिल करण्याचे न्यायलय होते. निरनिराळ्या प्रकारच्या खटल्यांचा न्यायनिवाडा करणे हे राजसभेचे काम होते.

राजसभेचे न्यायालय भरल्यानंतर राजाला संबंधीत खटल्याची माहिती देणे व न्यायाच्या बाबतीत राजाला सल्ला देणे हे काम राजसभेला करावे लागे. वतनांचे तंटे निकालात काढणे, निरनिराळ्या जमिनींच्या तंट्यांचा निकाल देणे अशा स्वरूपाची कामे राजसभेला करावी लागत. राजाने तंट्याचा निकाल दिल्यानंतर जी राजमुद्रा तयार होत असे. त्यावर सही करणे हे राजसभेचे काम होते.

गाव मजलिस किंवा गाव राजमंडळ, महाल राजमंडळ, परगणा राजमंडळ व सुभा राजमंडळ अशा चढत्या श्रेणीने राज्यसभेचे काम चालत असे. सुभा राजमंडळांत सुभेदार न्यायदानाचे काम करीत असे. परंतु त्याने दिलेल्या निकालावर राजाची सही असल्याशिवाय तो निकाल अंतिम समजला जात नसे. सुभेदाराला न्यायदानांत मदत करण्यासाठी देशमुख व परगणा गोतसभा असे.

**केंद्रीमय न्यायव्यवस्थेतील राजाची कामे पुढीलप्रमाणे :**

**राजा :–**

शिवकाळात राजा हाच राजमंडळाचा प्रमुख अधिकारी असे. राजाला त्याच्या कामांत मदत करण्यासाठी अष्टप्रधान मंडळ, खासगी सचिव, त्यांच्या हाताखाली काम करणारे दुय्यम अधिकारी आणि त्यांचे मुतालिक इत्यादी असत. काही वेळा विद्वान लोकांनाही राजमंडळात समाविष्ठ करून घेतले जात असे. त्यांना सभासद असे म्हणत. राजमंडळातील या सर्व अधिकाऱ्यांची नेमणूक राजा स्वत: करीत असे. ते सर्व छत्रपतीला जबाबदार असत. जोपर्यंत छत्रपतीची मर्जी आहे तोपर्यंत ते राजमंडळात रहात. इ. स. १६७४मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक केला. त्यानंतर अधिकृतपणे हे राजमंडळ अस्तित्वात आले. हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे राजा हाच न्यायव्यवस्थेचा प्रमुख झाला. न्यायाधीश व पंडितराव हे दोन मंत्री स्वतंत्रपणे न्यायदानाचे कामकाज पाहू लागले.

राजसभेचे कामकाज दोन पद्धतीने चालत असे. त्यातील पहिली पद्धत म्हणजे राजा हा आपल्या मंत्र्याच्या मदतीने निकाल देत असे. त्याला राजमुद्रा असे म्हणत. दुसरी पद्धत म्हणजे एखाद्या दरबारात उघडपणे खटल्याचे कामकाज चालत असे. तेव्हा त्याला धर्मसभा किंवा हुजूर मजलिस असे म्हणत. याज्ञवल्क्य स्मृतीनुसार राजाने आपल्या सल्लागारा शिवाय न्यायनिवाडा करू नये हे तत्वज्ञान छत्रपती शिवाजी महाराजांनी काटेकोरपणे पाळले होते. ज्या खटल्यांमध्ये स्थानिक स्वरूपाचा प्रश्न समाविष्ठ होत असे त्यावेळी मजलिस किंवा गोतसभा यांचा सल्ला छत्रपती शिवाजी महाराज घेत होते.

फौजदारी स्वरूपाचे आणि वतनासंबंधीचे खटले मात्र छत्रपती शिवाजी महाराज स्वत: चालवित. अशावेळी सर्व पुरावे राजा पहात असे. फिर्यादीला आपली बाजू मांडण्याची संधी दिली जात असे. एखाद्या वेळी महाराज मोहिमेवर निघाले असता काही तक्रारी आल्यानंतर त्यांचा निकाल राखून ठेवला जात असे व महाराज मोहिमेवरून परत आल्यावर निर्णय देत.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या या व्यवस्थेत छत्रपती राजाराम महाराजांनी बदल केला. छत्रपती राजाराम महाराजांनी अष्टप्रधान मंडळात 'प्रतिनिधी' नावाचा अधिकारी नेमला व हा प्रतिनिधीच येथून पुढे छत्रपतींच्या ऐवजी न्यायदानाचे कामकाज पाहू लागला. राजमंडळाची ही पद्धती शाहू महाराजांच्या सुटकेपर्यंत अस्तित्वात होती.

**न्यायाधिश व पंडितराव :–**

शिवकालीन केंद्रीय न्यायव्यवस्थेतील छत्रपतींच्या खालोखालचे अधिकारी म्हणजे न्यायाधिश व पंडितराव हे होत. त्यांच्या नेमणुका छत्रपतींकडून केल्या जात. इतर मंत्र्यांप्रमाणेच हे ही कामकाज करीत. न्यायाधिशाने प्रचलित असलेल्या कायद्यांचा अभ्यास करून निकाल द्यावा असे त्याच्यावर बंधन असे. न्यायाधिशाच्या अधिकार कक्षेत राज्यातील सर्व खटल्यांचा समावेश होता. न्यायाधिशाने धर्मशास्त्राला अनुसरून निकाल द्यावा, त्याच्या निकालावर राजाची संमतीदर्शक सही असावी, न्यायाधिशाचे पद हे पूर्णपणे मुलकी स्वरूपाचे असावे अशी रचना होती. परंतु सुरूवातीचे काही न्यायाधिश हे मुलकी व लष्करी अशा स्वरूपाचे होते. उदा. निराजी रावजी, प्रल्हाद निराजी.

न्यायाधिशाला दिवाणी व फौजदारी या दोन्ही प्रकारच्या खटल्यांत प्रजेला न्यायदान

व्यवस्थित व कायद्याप्रमाणे होते किंवा नाही हे पाहण्याचे मुख्य काम होते. गोतसभेने किंवा सरकारी अधिकाऱ्यांनी दिलेला निर्णय अन्यायकारक वाटल्यास लोकांना मध्यवर्ती सरकारकडे अर्ज करता येत असे. त्यावेळी योग्य न्यायदान करण्याची जबाबदारी न्यायाधिशांची होती. निकालपत्रावर न्यायाधिशाला 'संमत' असे चिन्ह करावे लागे.

न्यायाधिशाच्या जोडीला पंडितराव हा दुसरा न्यायाधिश असे. पंडितरावाकडे फक्त धार्मिक स्वरूपाचे खटले चालविले जात. देवस्थानांना दिलेल्या इनामाबद्दल जर काही खटले निर्माण झाले तर हे खटले पंडितराव धर्मशास्त्राच्या आधारे चालवित असे.

पंडितराव म्हणजे दानाध्यक्ष. सर्व धार्मिक बाबींवर त्याचा अधिकार चालत असे. राजाला प्रसंगी शास्त्रार्थ सांगणे, जाती-जमातींचे निवाडे करणे, राज्यातील विद्वानांचा आणि साधु पुरूषांचा आदर-सत्कार करणे, देव देवस्थानांची व्यवस्था ठेवणे, राजवाड्यांतील सर्व धार्मिक विधी व्यवस्थित पार पाडणे, फौजदारी खटल्यांत धर्मशास्त्राप्रमाणे न्यायनिवाडा होतो किंवा नाही ते पहाणे, कोणी धर्मबाह्य वर्तन केल्यास त्यास शिक्षा किंवा प्रायश्चित देणे, निर्णयपत्रांवर संमत असा ठसा उमटविणे इत्यादी कामे पंडितरावाला करावी लागत.

न्यायाधिश व पंडितराव यांना कायद्याचे चांगले ज्ञान असावे, याबद्दल छत्रपती शिवाजी महाराज अतिशय दक्ष असत. या दोघांच्या जागी साधारणपणे ब्राह्मण कुटुंबातील विद्वान, धर्मशास्त्राचे ज्ञान असलेल्या व्यक्तींची नेमणुक केली जात असे. अशा व्यक्तीची निवड करताना बुद्धिमत्ता, प्रामाणिकपणा, नि:पक्षपातीपणा, हिंदू कायद्यांचे व रूढींचे ज्ञान असणे हे गुण आवश्यक मानले जात. परमानं म्हणतो, शिवाजीला न्यायाधिशांबद्दल फार आदर असे. न्यायालयांत न्यायाधिशाला बसण्यासाठी उच्च आसन दिले जात असे. शिवकालात न्यायाधिशाला वार्षिक ३,००० होन पगार होता.

थोडक्यात, शिवकालीन केंद्रीय न्यायव्यवस्थेत छत्रपती, न्यायाधिश व पंडितराव हे तीन मुख्य अधिकारी होते.

**ब्राह्मणसभा :-**

ब्राह्मणसभा ही विद्वान ब्राह्मणांची सभा होय. नाशिक, पैठण, पुणतांबे, कऱ्हाड, कोल्हापूर, पंढरपूर, वाई, महाबळेश्वर अशा तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी ब्रह्मसभा अस्तित्वात होत्या. या सभेमध्ये वेद ज्ञान संपन्न वैदिक, पंडित, मीमांसक, जोतिषी व पुराणिक यांचा समावेश असे. या सर्वांना धर्मशास्त्र चांगले अवगत आहे असे पाहूनच त्यांची सरकारकडून नेमणूक केली जात असे. ब्रह्मसभेच्या प्रमुखाला धर्माधिकारी असे म्हणत. ब्रह्मसभा हिंदूंचे पवित्र ग्रंथ, श्रुती, स्मृती, वेद, दर्शने व विद्वानांचे कामदे विषयक ग्रंथ यांचा निर्णय देताना आधार घेत असली तरी आचार व व्यवहार यांचा विचार करूनच निर्णय देत असे. त्यामुळे ब्रह्मसभेच्या निवाड्याबद्दल कोणच्याही मनात संशय रहात नसे.

डॉ. व्ही. टी. गुणे म्हणतात, ब्राम्हसभा किंवा धर्मसभा ही ग्राममजलिस किंवा मुस्लीम काळातील परगणा मजलीस यांचेच विकसीत रूप होते..या सभेचे मुख्य काम म्हणजे हिंदू कायदे किंवा धर्मशास्त्रे यातील कायद्यांचा अर्थ लावणे, सामाजिक आणि धार्मिक संघर्ष सोडविणे हे होते. धर्मात काही चुकीच्या गोष्टी शिरल्या असतील तर त्यावर ब्रम्हसभा आपले मत देत असे. या सभेपुढे पुजाऱ्यांचे मंदिरा संबंधीच्या हक्कांचे खटले,

धर्माधिकाऱ्यांच्या वतनासंबंधीचे खटले, दोन जाती-जमातीमधील भांडणासंबंधीचे खटले, हिंदू-मुस्लीम धर्मियांतील भांडणासंबंधचे खटले येत होते. उदा. नरसोजी जगदाळे आणि याकूबजी मुसलमान यांच्यातील वतनाचा तंटा पैठण येथील ब्रम्हसभेसमोर चालविला गेला.

ब्रह्मसभेला दोन पंथाचा अथवा धर्माच्या अनुयायांमधील असलेल्या वादावर निर्णय देण्याचे धार्मिकदृष्ट्या महत्त्वाचे काम करावे लागे. यावेळी दोन्ही जमातींच्या प्रमुखांना ब्रह्मसभेच्या बैठकीला बोलविले जात असे. शिवाय ते सांगतील त्या अधिकाऱ्यांनाही बालावले जात असे. उदा. १६५६ मध्ये अथनी गावातील लिंगायत व जैन यांच्यात संघर्ष निर्माण झाला असता, जमखंडी येथे ब्रह्मसभेची बैठक बोलाविण्यात आली. या बैठकीला दोन्ही जमातींनी केलेल्या विनंतीवरून देसाई, देशकुलकर्णी, पाटील, चौधरी, पठाण, शेटे व महाजन, कुणबी व बलुतेदार यांना न्यायदानासाठी बोलविण्यात आले होते. सर्वांना आपले मत व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य या सभेने दिले होते.

ब्राह्मसभेच्या न्यायदान विषयक कार्याबद्दल डॉ. व्ही. टी. गुणे म्हणतात, ही सभा ज्यावेळी तिला एखाद्या बाबतीत मजलिस किंवा सरकारी अधिकारी सल्ला विचारीत असत, त्याचवेळी काम करीत असे. इतर वेळी हिचे फक्त अस्तित्वच लोकांना दिलासा देणारे असे.

काही वेळा न्यायदानासाठी काशीच्या विद्वान ब्राह्मणांचा सल्ला घेतला जात असे. ब्राह्मसभेच्या बैठकीत एखादा महत्वाच्या खटल्याचा निकाल दिला जात असताना अनेक वरिष्ठ हुद्याचे सरकारी अधिकारी तसेच प्रसंगी छत्रपती शिवाजी महाराजही हजर रहात. उदा. गोवळीकर पाध्ये, देवरूखे ब्राह्मण यांच्यातील उपाध्ये वृत्तीच्या तंट्याच्या निकालासाठी राजापूर येथे ब्रह्मसभेची बैठक बोलाविण्यात आली. या बैठकीला विद्वान पंडित कवींद्र परमानंद, अनंता महादेव शेष व स्वत: छत्रपती शिवाजी महाराज उपस्थित होते.

अशारितीने धार्मिक खटल्यांसंबंधी निर्णय देरी ब्राह्मसभा शिवकाळात एक महत्त्वाची सभा मानली जात असे.

**स्थानिक न्यामव्मवस्था :-**

**गोतसभा :-**

प्राचीन काळापासून खेड्यातील न्यायदानाचे काम खेड्यातच चालत असे. स्थानिक पातळीवरील तंटे स्थानिक पातळीवरच सोडविले जावे या मागील कल्पना म्हणजे गाव इतर बाबतीत जसे स्वयंपूर्ण होते तसेच न्यायदानाच्या बाबतीतही स्वयंपूर्ण असावे अशी होती. मुस्लीम काळात स्थानिक पातळीवर न्यायदानाचे काम करणाऱ्या ज्या संस्था होत्या, त्यांना मजलिस किंवा सभा हे नाव होते. शिवकालात या सभांना गोतसभा असे म्हणत.

प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत खेड्याची वसाहत जो करीत असे, त्याला पाटीलकीचे वतन मिळे आणि त्याला गावात प्रतिष्ठा प्राप्त होत असे. अशा गावांतील सर्व लोक एकमेकांचे  नातलग असत. ते एकमेकांचे गोत असत. या वरूनच त्या काळात न्यायदानासाठी बोलविण्यात येणाऱ्या सभेला गोतसभा असे म्हटले जाऊ लागले.

ग्रामगोतसभा :- शिवकाळात परगणा गोत सभा (कसबा अथवा पेठ), तर्फ येथील गोतसभा आणि ग्रामगोतसभा  इत्यादी गोतसभेचे प्रकार होते. खेडेगावातील गोतसभेत सरकारी प्रतिनिधी म्हणजे पाटील, कुलकर्णी, मिरासदार आणि बारा बलुतेदारांचे प्रतिनिधी

यांचा सहभाग रहात असे. सामाजिक विषमता असूनही गोतसभा भरविताना भेदभाव केला जात नसे.

ग्रामगोतसभा गावातील सर्व प्रश्नांचा विचार करीत असे. गोतसभेच्या निर्णयाला महजर असे म्हटले जात असे. कानंद खोरे तालुक्यातील धानी गावच्या गोतसभेला गावाचे देशक, देशमुख आणि चौदा गावांचे मोकादम हजर होते. या गोतसभेच्या सभास्थानी अध्यक्षाचे स्थान राजमाता जिजाबाई यांना दिले होते. या गोतसभेने बाबाजी देशमुख आणि मालोजी पंतगराक यांच्या वतनाच्या भाऊपणाच्या तंट्याचा निवाडा करून महजर तयार केला होता. (राजवाडे खंड १६ ते २२). वि. का. राजवाडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने या ग्रंथात अनेक महजर प्रसिद्ध केलेले आहेत. या महजरावरून तत्कालिन न्यादानाचे काम कशारितीने चालत होते, न्यायनिवाडे कसे दिले जात याची माहिती मिळते.

शिवकालात गोतसभा ही अतिशय महत्त्वपूर्ण समजली जात होती. या गोतसभेचे स्वरूप आजच्या लोकशाही सारखे होते. गोतसभा ही सर्वसाधारणपणे गावांतील मंदिराच्या पारावर, नदीच्या काठी, पाटलाच्या घरी किंवा पाटलाच्या चावडीवर भरत असे. शक्यतो गोतसभा मंदिरातच भरत असे. मंदिरात देवाचे वास्तव्य असल्यामुळे खोटे बोलणे देवाला सहन होणार नाही असा उद्देश यामागे असे. मंदिरातील धार्मिक वातावरणाचा परिणाम लोकांच्या मनावर होत असे.

ग्रामगोतसभा भरविण्याचा अधिकार पाटलाला होता. एखाद्या व्यवहाराबद्दल तंटा निर्माण झाला असता, वतनाविषयीचे तंटे, भाऊपणाच्या हक्काविषयीचे तंटे, वतनाच्या वाटणी संबंधीचे तंटे, भिन्न-भिन्न जातीतील तंटे यांच्या तक्रारी पाटलाकडे नोंदविल्या जात. सुरूवातीला पाटील असे तंटे आपआपसांत मिटविण्याचा प्रयत्न करीत असे. जर ते तंटे आपसांत मिटले नाही तर पाटील गोतसभा बालावित असे. गावगोतसभेत असे तंटे मिटले नाही तर परगणा गोतसभेत ते सोडविले जात. हंगाम संपल्यानंतर साधारणत: गावाच्या सोयीनुसार गोतसभा बोलावली जात असे.

**परगणा गोतसभा :-**

परगणा गोतसभा ही प्रत पातळीवर न्यायदानाचे काम करणारी आणखी एक न्यायसंस्था होते. परगणा गोतसभेला परगण्याचे देशमुख, देशपांडे, शेटे व महाजन, परगण्यातील मोकादम यांचा समावेश रहात असे. न्यायदानाचे काम देशमुख व देशपांडे करीत. परगणा गोतसभेचा प्रमुख देशमुख रहात असे. देशमुखाला परगणा गोतसभेचा प्रमुख या नात्याने दिवाणी व फौजदारी अशा दोन्ही स्वरूपाचे खटले चालवावे लागत. जमीन महसूलाच्या तक्रारी सोडविणे, परगण्यातील मोकादमा विरूद्ध आलेल्या रमतेच्या तक्रारी सोडविणे, परगण्यातील वतनासंबंधीच्या तक्रारी ऐकूण घेणे आणि परगणा गोतसभेच्या मदतीने त्यांचा निकाल देणे ही कामे देशमुखाला करावी लागत. वतनांची अदला-बदल करणे किंवा वतनावरील हक्कासंबंधीच्या तक्रारींचा निकाल देताना देशमुख संबंधीत गावातील प्रमुख रहिवाशांना साक्षीदार म्हणून बोलावित असे. अशा वेळी तो सर्वांना तक्रारींचे स्वरूप सांगत असे. कागदपत्रांचा पुरावा सादर करून सर्वांचा सल्ला व सूचना विचारांत घेवून निर्णय देत असे. परगणा गोतसभेने दिलेल्या निकाल पत्रांवर देशमुखाला सही करावी लागे. तो.

आपल्या मुतालिकामार्फत वादी व प्रतिवादी यांच्याकडून जमीन शुल्क वसुल करीत असे. देशमुखाला परगणा गोतसभेने दिलेल्या निकालासंबंधीचा अहवाल राजाला सादर लागत असे. खुनासारख्या गुन्ह्यांच्या संदर्भात सरकारचा प्रतिनिधी व परगणा गोतसभेचा प्रमुख या नात्याने देशमुख महत्वाची भूमिका पार पाडित असे.

**तर्फ, ठाणा किंवा तालुका गोतसभा :–** तर्फ किंवा ठाणा किंवा तालुका गोतसभेत हवालदार व ठाणा गोतसभा असे दोन भाग असत. हवालदार हा पगारी नोकर असला तरी त्याला गोतसभेच्मया सहाय्याने न्यायदानाचे काम करावे लागत असे. ठाणा गोतसभेच्या कामकाजावर देखरेख ठेवणे, गावांच्या सरहद्दी विषमीचे तंटे सोडविणे, इनामी वतनासंबंधीच्मा तक्रारी दूर करणे हे हवालदाराचे मुख्म काम होते. पोलिस अधिकारी म्हणून हवालदार काम करत असे. अशावेळी त्याला बरेच न्यायालयीन अधिकार प्राप्त होत असत. तालुक्यातील शांतता व सुव्यवस्था बिघडविणाऱ्याला शिक्षा करणे, कैद्यांवर नजर ठेवून तुरूंगाच्या व्यवस्थेवर देखरेख ठेवणे, तालुका गोतसभेने गुन्हेगारांना केलेला दंड वसुल करणे इत्यादी. न्यायालमीन कामे हवालदाराला करावी लागत. एखाद्या घटनेचा ज्यावेळी पंचनामा होत असे, त्यावेळी हवालदार सरकारच्या वतीने पंच म्हणून तेथे हजर रहात असे. वादी व प्रतिवादी यांचे जाब–जबाब घेत असताना सरकारी साक्षीदार म्हणून हवालदाराची उपस्थिती आवश्यक मानली जात असे.

**शिवकालीन गोतसभेच्या कामकाजाचे स्वरूप :–** शिवकालात न्यायदानासाठी गोतसभा ही न्यायसंस्था कार्यरत होती. मध्ययुगीन महजरावरून असे स्पष्ट होते, की कोणत्याही गुन्हेगाराला त्याला योग्य अशा ठिकाणी गोतसभा बोलाविण्याचा अधिकार होता. परंतु सर्वसाधारणपणे कोणतीही तक्रार प्रथम हवालदाराकडे किंवा परगण्याच्या प्रमुख अधिकाऱ्यापुढे आणली पाहिजे अशी पद्धत होती. आलेल्या तक्रारींच्या संदर्भात हवालदार ब्राह्मसभा व जातीसभा यांच्याशी चर्चा करीत असे. त्यानंतर ही तक्रार कोणत्या सभेच्या अधिकार क्षेत्रात मेते हे ठरवून ती संबंधीत सभेकडे सोपविली जात असे. परंतु सर्वसाधारणपणे तक्रार किंवा घटना ज्या ठिकाणी घडली असेल, त्याच टिकाणी तिचा निकाल लावण्याकडे कल असे.गोतसभा गावातील एखाद्या पुरातन मंदिरात, वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर, नदीच्या पात्रात, पाटलाच्या किंवा देशमुखाच्या घरी, पाटलाच्या चावडीवर किंवा एखाद्या तिर्थक्षेत्राच्या ठिकाणी भरत असे. गोतसभेच्या मुख्यास सभानामक असे म्हणत. इतर जाणकार आणि तज्ज्ञ मंडळी गोतसभेत एकत्र येत, त्यांना 'परीक्षक' किंवा 'प्रासनिक' असे म्हणत. गोतसभेत मुलकी स्वरूपाचे गुन्हे मोठ्या प्रमाणावर मेत. प्रथमवाद उपस्थित करणारा तो अग्रवादी व त्याला उत्तर देणारा प्रश्चिमवादी. गोतसभेत अग्रवादी व पश्चिमवादी यांचे राजीनामे लिहून घेतले जात. याचा अर्थ मान्यता दर्शक संमती. गोताने दिलेला निर्णय आम्हाला मान्य आहे. यासाठी राजीनामे लिहून घेतले जात. अग्रवादी व पश्चिमवादी यांना जामीन द्यावा लागे. त्याला जमान कतबे असे म्हणत. अग्रवादी आणि पश्चिमवादी यांनी कथन केलेली हकिकत लिहून काढली जात असे. तिला तकरीर किंवा करीना असे म्हणत. तकरीरमधील तक्रार गोतसभेत वाचून दाखविली जात असे. आरोपीला स्वत:चा बचाव करण्याची संधी दिली जात असे. साक्षीदारांच्या साक्षी लिहून घेतल्या जात. जर एखाद्या साक्षीदाराने लेखी जबानी दिली तर तिला बखेर असे म्हणत. साक्षीदाराची साक्ष गंभीर

स्वरूपाची असावी असा नियम होता. साक्षीदाराला साक्ष देण्याच्या आधी नदीत उभे केले जात होते. ईश्वरी अस्तित्वाचे साक्षीदारावर दडपण असल्यामुळे तो खोटी साक्ष देत नसे. बऱ्याचवेळा मंदिरातील देवावर हात ठेवून साक्षीदाराला शपथ घ्यावी लागे. शपथ मोडल्यास वाराणसीला गोहत्या केल्याचे पाप लागत होते. साक्षीदार हिंदू असेल तर ज्ञानेश्वरीची आणि मुसलमान असेल तर कुराणाची शपथ घेत असे. साक्षीदाराने खोटे बोलू नये म्हणून ही बंधने होती.अग्रवादी आणि पश्चिमवादी यांच्यातील पुरावे सादर झाल्यानंतर गोतसभेचे सदस्य त्या तंट्यावर विचार करीत, जुने अनुभवी लोक आपले विचार मांडीत. खुली चर्चा होत असे. जर एखाद्यावेळी अडचण निर्माण झाल्यास धर्मशास्त्राचा आधार घेतला जात असे. आरोपीने गुन्हा कबुल केला तर गोतसभेचे कामकाज लवकर पूर्ण होत असे. जर गुन्हा नाकबुल केला तर हे प्रकरण वरिष्ठ अधिकाऱ्याकडे पाठविले जात असे.आरोपीने गुन्हा कबुल केल्यानंतर गोतसभा निर्णयाप्रत पोहचत असे. गोतसभेच्या निर्णय पत्राला महजर असे म्हणत. यात सर्व खटल्याचे वर्णन लिहिलेले असे. त्यावर गोतसभेच्या सर्व सदस्यांच्या सह्या व निशाण्या उमटविल्या जात. जिंकलेल्या पक्षाकडून हरकी आणि पराभूत पक्षांकडून गुन्हेगारी सरकारी फीच्या रूपाने वसुल केली जात असे. महजरची अंमलबजावणी गोतसभेच्या सरकारी अधिकाऱ्याकडे असे. तो आपल्या हाताखालील अधिकाऱ्यांना संबंधीत महजरासंबंधी लेखी सूचना पाठवित असे.अशारितीने खटल्याच्या निकालाची अंमलबजावणी केली जात असे.

### ४.२.३ पेशवेकालीन न्यायव्यवस्था :

छत्रपतींतर्फे राज्यकारभार असलेल्या पेशव्यांना सर्वोच्च न्यायालयीन अधिकार होते. परंतु मुख्य न्यायाधीश हाच प्रमुख न्यायदंडाधिकारी होता. त्याला दिवाणी आणि फौजदारी या दोन्ही प्रकारच्या खटल्यांचा न्यायनिवाडा करण्याचा अधिकार असे. याशिवाय ज्यांना मुतालिकी शिक्का मिळालेला होता अशा सुभेदारांना न्यायदानाचा अधिकार होता. तसेच इतर काही अधिकाऱ्यांनाही त्यांच्या कर्तुत्वामुळे न्यायनिवाड्याचे काम देण्यात आले होते. उदा. कल्याणचा सुभेदार, शिवराम थत्ते, खानदेशचा फडणीस.

किरकोळ खटल्मयांचा न्यायनिवाडा मुत्सद्दी नावाचे अधिकारी करीत. परगणे, कर्यात आणि खेड्यात गरजेप्रमाणे न्यायालये बोलाविण्यात येत. पैठण, सातारा, पाली, पुणे, नासिक अशी काही ठिकाणे न्यायदानासाठी प्रसिद्ध होती. छत्रपती शाहू महाराज जीवंत असेपर्यंत छत्रपतीलाच सर्वश्रेष्ठ न्यायालयीन अधिकार होते. निरनिराळ्या सरदारांमध्ये निर्माण झालेले तंटे छत्रपतींच्या सल्ल्याने मिटविले जात. छत्रपतींनी दिलेला निर्णय अंतिम समजला जात असे. काहीवेळा छत्रपती मंत्र्यांचा किंवा आपल्या सरदारांचा सल्ला घेत. परंतु तो सल्ला त्यांच्यावर बंधनकारक नसे. एखादे प्रकरण जर हाताबाहेर गेले तर राजा धर्मसभेला पाचारण करीत असे. शिवकालाप्रमाणेच न्यायाधीश व पंडितराव हे दोन न्याय प्रक्रियेतील अधिकारी होते. छत्रपती शाहू महाराजांनंतर (१७५०) मात्र सर्व अधिकार पेशव्यांकडे आले. पेशव्यांचे महत्व वाढल्यामुळे आणि राजमंडळातील सर्व सभासद व जुने सरदार कमकुवत झाले. शिवकाळात न्यायालयीन क्षेत्रात राजाचे जे स्थान होते ते पेशवेकाळात पेशव्याला प्राप्त झाले. पेशवा हाच राज्याचा मुख्य अधिकारी झाल्याने न्यायालयीन क्षेत्रामध्ये तो सर्वोच्च बनला. पहिल्या तीन पेशव्यांनी गोतसभेच्या मार्फत न्यायदान केले. परंतु १७५०नंतर मात्र

न्यायदानासाठी पेशव्यांनी गोतसभेऐवजी पंचायत पद्धती स्विकारली. पेशव्याला मदत करण्यासाठी दिवाण किंवा फडणीस नावाचा अधिकारी असे.

तोच पंचायतीमार्फत सर्व खटल्यांचा निर्णय देत असे. तसेच पेशव्यांनी एक स्वतंत्र न्यायाधीश नेमून त्याच्याकडे न्यायदानाचे काम सोपविले. पेशव्यांचे सरदार आपआपल्या जहागिरीत न्यायदानाचे काम करीत. महत्वाचा खटला मात्र हे सरदार स्वत: न चालवता पुण्याला पेशव्यांकडे पाठवित.

**पेशवेकालीन न्मामव्मवस्था पुढीलप्रमाणे :**

**पेशवेकालीन गोतसभा :-**

मराठेकालीन न्यायव्यवस्थेमधील गोतसभा हे एक महत्वाचे अंग समजले जाते. गोतसभेला छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत फार महत्व प्राप्त झाले होते. पेशव्यांच्या काळात स्थानिक प्रशासन हेच महसुलाच्या प्रकरणांचा निकाल लावत असे. त्यामुळे गोतसभेचे महत्त्व हळूहळू कमी झाले. गोतसभेचे अधिकार पंचायतीने घेतले. तरी सुद्धा न्यायदानाच्या कामकाज पद्धतीत मराठेकालीन गोतसभेचे एक खास वैशिष्ट्य म्हणून गोतसभेकडे पाहिले जाते. डॉ. व्ही. टी. गुणे यांनी गोतसभेचे तीन विभाग पाडले आहेत. १) परगणा गोतसभा २) तर्फ किंवा कसबा किंवा पेठ गोतसभा ३) ग्रामगोतसभा इत्यादी.

**परगणा गोतसभा : -**

पेशवेकाळांत न्यायव्यवस्थेतील एक महत्वाची न्यायसंस्था म्हणून परगण्यातील गोतसभेकडे पाहिले जात होते. परगण्यातील गोतसभेत देशमुख, देशपांडे, शेटे, महाजन, मोकादम, पाटील, नामकवाडी, मिरासदार व रयत यांचा समावेश होत असे.

परगणा गोतसभेचे मुख्य देशमुख रहात असे. न्यायदानाच्या कामात देशमुखाला देशपांडे मदत करीत असे. देशमुख व देशपांडे दोघे मिळून परगण्याच्या बाबतीत निर्माण होणारे आर्थिक, न्यायालयीन व सार्वजनिक शांततेची प्रकरणे हाताळत. हे दोघेही परगण्यातील रयतेचे प्रतिनिधी म्हणून काम पहात. काही वेळा दिवाण परगणा गोतसभेच्या मार्फत अनेक प्रश्नांचा निकाल देत असे.

**तर्फ, कसबा किंवा पेठ गोतसभा :-**

या सभेमध्ये सर्व देशक म्हणजेच देशमुख, देशपांडे, शेटे व महाजन, नामकवाडी, पाटील व कुलकर्णी, चौघुला व बलुतेदार यांचा समावेश रहात असे. कसब्यातील व्यापारी पेठांचे संरक्षण करण्याचे काम शेटे करीत. त्याला बलुतेदार मदत करीत. पेठेतील न्यायविषयक कामे पेठगोतसभेकडे असत. पेठ गोतसभेच्या दिवाण कसबा गोतसभेच्या मार्फत न्यायालमीन कामे करीत असे. कसबा म्हणजे व्मयापाराचे ठिकाण होय. मालाच पेठ असेही म्हणत. या गोतसभेत हजर असणारी सर्व माणसे निवाड पत्रावर आपआपल्या खुणा करीत. त्या पुढील प्रमाणे महाजन-तराजू, सोनार-ऐरण, शिंपी-कात्री, ठाकूर-कट्यार, आवटी-माप, माळी-मोठी कात्री, जिनगर-करवत, नामकवाडी-दंडुका इत्यादी.

**ग्रामगोतसभा :-**

ग्रामगोतसभा ही गोतसभेमधील सर्वात पहिली पायरी होय. या सभेत गावातील सर्व

वतनदार, बारा बलुतेदार, उपरे व आलुतेदार यांचा समावेश होत असे. गावातील वतनदारांपैकी सर्वात श्रेष्ठ वतनदार म्हणजे पाटील होय. तोच ग्रामगोतसभेचा प्रमुख रहात असे. त्याच्या मदतीसाठी कुलकर्णी आणि चौघुला हे वतनदार असत. हे सर्व वतनदार, बारा बलुतेदार व गावातील इतर प्रतिष्ठित लोक एकत्र बसून प्रशासकीय व न्यायदान विषयक कामे करीत असत. ग्रामगोतसभेने दिलेला निर्णय राजा सुद्धा बदलू शकत नव्हता. निवाडपत्रांवर हजर असणाऱ्या सर्व सभासदारांनी आपआपले शिक्के उमटविले म्हणजे तो न्याय निर्णय पक्का झाला असे समजले जात असे. बलुतेदारांची संमत चिन्हे पुढील प्रमाणे : चांभार–आरी, महार–विळा व दोर, कुंभार–चाक, न्हावी–आरसा, मुलाणा– सुरा इत्यादी.

परगणा गोतसभेला अव्वल किंवा प्राथमिक आणि फेरतपासणीचे अधिकार असत. परंतु पेठ व ग्रामगोतसभेला फक्त अव्वल किंवा प्राथमिक न्यायनिवाड्याचे अधिकार असत. गोतसभेच्या सभासदांची संख्या ठरलेली नसे. खटल्याच्या व्याप्तीवर सभासदांची संख्या अवलंबून असे. गोतसभेची बैठक गावातील एखाद्या पुरातन मंदिरात, वडाच्या किंवा पिंपळाच्या पारावर, नदीच्या पात्रात, पाटलाच्या घरी, पाटलाच्या चावडीवर यापैकी कोणत्याही एका ठिकाणी भरत असे. ग्रामगोतसभेच्या न्यायदानाच्या कामात धर्म आणि व्यवहार, रूढी आणि परंपरा यांचा आधार घेवून निर्णय दिला जात असे.

कर्जासंबंधीचे कज्जे सोडविणे. पेशवेकाळात सावकारीचा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालत होता. पैसे देण्या–घेण्याच्या व्यवहारावरून बरेच तंटे उद्‌भवत. ऋणकोने पैसे देण्याचे नाकारल्यावर सावकार त्याच्या दारात आपला माणूस पैसे वसुलीसाठी बसवित असे. या प्रक्रियेला ‘धरणे’ असे म्हणत. यानंतरही ऋणकोने पैसे देण्याचे नाकारले तर ते प्रकरण ग्रामगोतसभेत येत असे. ग्रामगोतसभसा सर्व साक्षी पुरावे तपासून निर्णय देत असे. ग्रामगोतसभेचा निर्णय अंतिम समजला जाई.

गावागावातील सीमाचे तंटे सोडविण्याचे काम ग्रामगोतसभेकडून केले जात असे. असे तंटे सोडविताना जमीन आणि एक शिपाई सरकारकडून पाठविला जात असे. गावाच्या शिवेवर साक्षीदार, शिवेचे नकाशे व इतर पुरावे हजर ठेवली जात. ज्या गावांच्या सीमेचा तंटा निर्माण झाला आहे, त्या गावांच्या आजूबाजूच्या पाच गावांतील पाटील–कुलकर्णी, परगण्याचे देशमुख, देशपांडे आणि दोन्ही गावांतील गोतसभेचे प्रतिनिधी व इतर प्रमुख मंडळी यांना बोलावले जाई. ग्रामगोतसभेत सर्व साक्षी–पुरावे तपासले जात आणि या नतंर गावाचा पाटील किंवा महार दिव्य करीत असे. दिव्य प्रकारात पाण्याने भरलेली घागर घेवून चालणे, ओले कपडे घेवून चालणे इत्यादी प्रकार असत. दिव्य झाल्यानंतर ग्रामगोतसभा आपला निर्णय जाहीर करीत असे. हा निर्णय नंतर पेशव्यांना पाठविला जात होता.

गावामध्ये अनेकवेळा भावा भावांमध्ये, कुलकर्णी, देशकुलकर्णी, पाटील, देशमुख यांच्यात वतनासंबंधी तंटे निर्माण होत. बऱ्याचवेळा गावातील देवस्थानाच्या हक्काबद्दल पुण्यामध्ये वतनासंबंधी तंटे निर्माण होत. हे सर्व तंटे ग्रामगोतसभेमार्फत सोडविले जात. वतनासंबंधीच्या तंट्यात वादी व प्रतिवादी यांचे म्हणणे लेखी स्वरूपात घेतले जात असे. साक्षीदारांच्याही साक्षी लेखी स्वरूपात घेतल्या जात. दोन्ही पक्षांचे जाब जबाब झाल्यानंतर ग्रामगोतसभेतील सर्व सदस्य विचार–विनिमय करून निकालपत्र तयार केले जात असे व

त्यावर हजर असलेल्या सर्व सदस्यांच्या निशाण्या उमटविल्या जात. वादी–प्रतिवादी यांना निकाल वाचून दाखविला जात होता. यापैकी कोणा एकाला निकाल मान्य नसल्यास पेशव्यांकडे त्याला अपील करता येत होते. एखाद्या निपुत्रीक स्त्रिला दत्तक घ्यावयाचा असेल तर गोतसभा तिला परवानगी देत असे. स्वगोत्रातील दत्तक मिळाला नाही तर त्या स्त्रिला परगण्यातील मुलाला दत्तक घेण्याची परवानगी ग्रामगोतसभा देत असे. गोतसभेच्या मान्यतेशिवाय दत्तक विधानाला कायदेशीर मान्यता मिळत नव्हती.

**ब्राह्मसभा :–**

विद्वान ब्राह्मणांच्या सभेला ब्राह्मसभा असे म्हटले जात होते. अशा ब्राह्मसभा प्रामुख्याने हिंदुंच्या पवित्र अशा तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भरत. उदा. पैठण, कोल्हापूर, नाशिक, पुणतांबे, वाई, पंढरपूर, कराड इत्यादी. या सभेत फक्त स्थानिक वैदिक, पंडित, ज्योतिषी, पुराणिक व धर्मशास्त्रांचे मिमंसक मयांचा समावेश होत असे. ब्राह्मसभेच्या प्रमुखाला धर्माधिकारी असे म्हणत.त्याला समाजात मानाचे स्थान असे. धर्माधिकाऱ्याला सरकारकडूनच धर्माधिकारीपणाचे वतन मिळत असे. ब्राह्मसभेतील सभासदांची संख्या निश्चित नसून खटल्याचे स्वरूप व व्याप्ती पाहून ठरत असे. ब्राह्मसभेतील सभासद हे तज्ज्ञ व नि:स्पृह असून ते हिंदूंच्या धर्मग्रंथाप्रमाणेच निर्णय देत. त्यामुळे त्यांच्यावर सर्वांचा विश्वास असे.

ब्राह्मसभेचे मुख्य काम म्हणजे हिंदू कायदे किंवा धर्मशास्त्रे यातील कायद्यांचा अर्थ लावणे, सामाजिक व आर्थिक संघर्ष सोडविणे. ब्राह्मसभा धर्मशास्त्रातील शंकास्पद व विवादास्पद तत्वांचा अर्थ लावून आपले स्वत:चे मत देत असे. धर्मबाह्य वर्तन करणाऱ्याला ब्राह्मसभा प्रायश्चिताची शिक्षा देत असे. जाती–जमातीमधील हक्कांच्या संदर्भात निवाडा करण्याचे कामही ब्राह्मसभा करीत असे.

ब्राह्मसभेच्या न्यायदान विषयक कार्याबद्दल डॉ. व्ही. टी. गुणे म्हणतात, ही सभा ज्यावेळी तिला एखाद्या बाबतीत गोतसभा किंवा सरकारी अधिकारी सल्ला विचारीत असत, त्यावेळी ती काम करीत असे. इतर वेळेला हिचे फक्त अस्तित्वच लोकांना दिलासा देणारे असे. या सभेतील सर्व सदस्य तज्ज्ञ व नि:स्पृह असल्यामुळे त्यांच्यावर सर्वांचा विश्वास रहात असे. ब्राह्मसभा आपल्या निवाड्यांचे समर्थन करत असताना संस्कृत कायदे संहितेतील संदर्भ देत असे. त्यामुळे सहाजिकच कोणच्याही मनात ब्राह्मसभेच्या निवाड्याबद्दल संशय रहात नसे.

**जातीसभा :–**

जातीसभेच्या रचनेबद्दल फारशी माहिती मिळत नाही. परंतु या सभेच्या नावावरून असे स्पष्ट होते, की प्रत्येकी जातीची स्वतंत्र सभा असून, त्या सभेत ती ज्या जातीची असेल त्याच जातीचे लोक एकत्र येत असत. जातीसभेमध्मे स्वत:च्या जातीची जातीबंधने व्यवस्थित पाळली जातात किंवा नाही हे पाहिले जात असे. जर एखाद्या व्यक्तीने जातीबाह्य वर्तन केले तर त्याला योग्य ती शिक्षा करण्याचे काम जातीसभा करीत असे.

एखादे प्रकरण जातीसभेमार्फत सोडविले गेले नाही, तर ते प्रकरण ब्राह्मसभेकडे पाठविले जात असे आणि ब्राह्मसभेने दिलेला निर्णय ग्राह्य मानला जात असे.

**ग्रामपंचायत :–**

शिवपूर्व काळापासून न्यायदानासाठी मजलिस म्हणजेच गोतसभा कार्यरत होती. ही पद्धती महाराणी ताराबाईच्या काळापर्यंत चालू होती. इ. स. १७३० नंतर मात्र या पद्धतीत बदल घडून येवू लागले. सातारचे छत्रपती जेव्हा मराठ्यांचा राज्य कारभार पहात होते, त्यावेळी न्यायदानातील प्रमुख अष्टप्रधान मंडळातील पंडितराव हा होता. शाहू महाराजांच्या देहान्तानंतर सातारच्या छत्रपतींची सत्ता दुर्बल होत गेली आणि मराठा राज्याची सत्तासूत्रे साताऱ्याहून पुण्याकडे अर्थात पेशव्यांकडे स्थलांतरित झाली आणि मराठा राज्याचा राज्यकारभार पुण्याहून चालू  लागला.

इ. स. १७५० नंतर न्यायदानाच्या बाबतीत पेशवा हाच कुलमुखत्यार बनला. त्याचबरोबर हुजूर, हाजिर, मजलिस, धर्मसभा, मराठा मंडळ मांचेही महत्त्व कमी झाले. पेशवेकाळात न्यायदानाचे सर्वात सुलभ व सायीचे साधन म्हणजे ग्रामपंचायत होय. वासुदेव वामनशास्त्री खरे नाना फडणिसांचे चरित्र या ग्रंथात म्हणतात, पेशवाईमध्ये अत्यंत महत्त्वाची संस्था म्हटली म्हणजे पंचायत ही होय. शाहू महाराजांच्या काळात ही पद्धती सुरू झाली. तिचा विकास बाळाची बाजीराव पेशव्याच्या कारकिर्दीपासून सुरू झाला व तिला पहिल्या माधवरावाच्या कारकिर्दीत पूर्णत्व आले. मराठा राज्याच्या अस्तापर्मंत पंचामत पद्धती सुरू होती.

नानासाहेब पेशव्याच्या काळापर्यंत न्यायदानाचे काम गोतसभेमार्फत मुतालिकी शिक्क्याप्रमाणे चालत असे. नानासाहेब पेशव्यानंतर ही प्रथा बंद करण्यात येवून न्यायदान हे पंचायतीमार्फत केले जाऊ लागले. पुण्याला स्वतंत्र न्यायाधिशांच्या नेमणुका केल्या जात. बाळकृष्ण गाडगीळ, रामशास्त्री प्रभुणे, बाळशास्त्री दीक्षित, आप्पाशास्त्री इत्यादी सुप्रसिद्ध न्यायाधिश होवून गेले. पंचायत पद्धती म्हणजे न्याय देण्यासाठी पंचाचे छोटे मंडळ किंवा समिती होय. एखाद्या तंट्यात एकाच माणसाने निकाल देण्यापेक्षा ४–५ व्मक्तींनी विचार–विनिमय करून निकाल द्यावा अशी भूमिका पंचामतीची होती. यावरून पाचामुखी परमेश्वर ही म्हण निर्माण झाली. पंचाच्या मुखाने परमेश्वरच न्याय देतो अशी कल्पना होती.

**पंचामतीची सदस्म संख्मा व बैठकीची जागा :–**

पेशवे कालखंडात न्यायदानासाठी कार्यरत असलेली पंचायत ही सभा कायमची बोलावलेली सभा नसून ज्यावेळी तंटा निर्माण होत असे त्याचवेळी पंचायत बोलविली जात असे. ज्या जातीचा तंटा असेल त्याच जातीतील अनुभवी लोकांची पंच म्हणून नियुक्ती केली जात असे. पंचायतमधील सदस्य संख्या निश्चित नसे. वा. कृ. भावे पेशवेकालीन महाराष्ट्र या आपल्या ग्रंथात म्हणतात, पंचांची संख्या पाचाहून कमी नसे व कधी फार महत्त्वाचा तंटा असेल तर ५०पर्यंत पंच नेमले जात. या शिवाय गावाचा पाटील, कुलकर्णी व गाव कामगार (बलुतेदार) यांचाही समावेश रहात असे. डॉ. व्ही. टी. गुणे आपल्या "Judicial system of the Maratha' या ग्रंथात म्हणतात, खटल्यांच्या स्वरूपावर सभासदांची संख्या अवलंबून असे. वेगवेगळ्या खटल्यांसाठी वेगवेगळ्या आकाराची पंचायत असे. पंचायतीमधील पंचांची नेमणूक पाटील करीत असे.

एलफिन्स्टन आपल्या अहवालात म्हणतो, दोन गावांतील सीमा तंटा सोडविताना

बोलाविलेल्या पंचायतीत पाटील, देशमुख, देशपांडे आणि महार हे प्रमुख असत आणि इतर सदस्मांच्मा मदतीने ते न्मामदानाचे काम करीत. वतनासंबंधीचा खटला असल्मास संबंधीत व शेजारील गावांतील व परगण्मातील वतनदारांना पंचामतीसाठी बोलाविले जात असे.फ

पंचामत जर पाटलाने बोलाविलीअसेल तर ती पाटलाच्मा घरी, चावडीवर, गावातील एखाद्या मंदिरात, पारावर किंवा नदीच्मा पात्रात भरविण्मात मेत असे. पंचामतीमध्मे नेमल्मा गेलेल्मा पंचांना कोणताही मेहनताना मिळत नसे. विजमी पक्षकार पंचांना स्वखुशीने शेला-पागोटे देत असे किंवा जेवण देत असे. तो त्माच्मा स्वखुशीचा प्रश्न होता.

**पंचामतीची कामकाज पद्धती :-**

पेशवा रोजनिशी खंड ७ मा ग्रंथातील संदर्भानुसार ग्रामपंचामतीत गावातील वतनासंबंधीचे तंटे, मालमत्तेच्मा वाटणीसंबंधीचे तंटे, दिवाणी खटले चालविले जात. तसेच एखाद्या व्मक्तीला दत्तक घेण्मासाठी परवानगी देणे किंवा न देणे, सावकार व ऋणको मांच्माकडून आलेले कर्जासंबंधीचे संघर्ष सोडविणे, दोन गावांमध्मे सीमेवरून निर्माण झालेले तंटे सोडविणे आणि गावातील इतर संघर्ष सोडविणे इत्मादी संबंधीचे न्मामदान पंचामतीला करावे लागे.

गावात कोणताही तंटा निर्माण झाला म्हणजे तो प्रथम पाटलाकडे येतो. पाटील वादी-प्रतिवादी यांच्यात स्नेही या नात्याने तडजोड करून पहात असे. पाटलाकडून ही तडजोड जमली नाही तर मग पाटील पंचायत बालवित असे. पंचाची नेमणूक जरी पाटलाने केलेली असली तरी वादी-प्रतिवादी सांगतील त्यास पंच म्हणून पाटील नेमत असे. पंचासमोर प्रतिवादी हजर झाला नाही तर सरकारकडून त्याला सक्ती केली जात असे. पंचायतीपुढे चौकशी करताना पक्षकारांना आपले राजीनामे लिहून द्यावे लागत. वादीची फिर्याद व प्रतिवादीचे उत्तर लिहून घेतले जात होते. त्याला तकरीर असे म्हणत. साक्षीदाराची तपासणी फार काळजीपूर्वक होत असे. साक्षीदाराला लिहिता, वाचता येत असेल तर लेखी साक्ष घेतली जात असे. यानंतर न्यायालयाचे सर्व सभासद दोन्ही पक्षांनी हजर केलेल्या पुराव्यांचे निरीक्षण करून निर्णय घेत. हा निर्णय एका महजराच्या स्वरूपात देण्यात येवून त्यावर पंचायतीच्या सभासदांची नावे व हुद्दे लिहिण्यात येत.

पंचामत पद्धतीत तोंडी पुराव्मापेक्षा लेखी पुराव्माला विशेष महत्व होते. वादी-प्रतिवादी साक्षीदार मांचे म्हणणे ऐकून घेतल्मानंतर त्मावर चर्चा करून निर्णम दिला जात असे. अशावेळी जर अडथळा निर्माण झाला तर धर्मग्रंथाची मदत घेतली जात असे. आणि त्मानुसार पुन्हा चर्चा होवून संपूर्ण तंट्याचा सारांश काढला जाई आणि त्मावर सर्व पंचांच्मा सह्या घेतल्मा जात. त्माला ङ्गमहजरफअसे म्हटले जात होते. मानंतर हे निवाडापत्र पाटलाकडे सोपविले जाई. त्माची एक प्रत विजमी पक्षाला दिली जात असे. पराभूत पक्षाकडून ङ्गमतित पत्रफघेतले जात असे. डॉ. व्ही. टी. गुणे म्हणतात, ङ्गहे निवाडापत्र पूर्णपणे अधिकृत असा निकाल रहात असे.फमानंतर हे निवाडापत्र पेशव्माकडे सहीसाठी पाठविले जात होते. पेशव्माची सही झघली म्हणजे ते निवाडापत्र अंतिम समजले जात होते. सरकारी अधिकारी त्मा निवाडापत्राची अंमलबजावणी स्थानिक अधिकाऱ्मामार्फत करीत.

पंचामतीचा निकाल जर पक्षकाराला मान्म नसेल तर त्माला अपील करता मेत असे. परंतु अपिलाचा निकाल जर त्माच्मा विरूद्ध लागला तर त्माला गुन्हेगारी म्हणून दंड भरावा लागे. न्मामदानापूर्वीच त्माच्माकडून निकालाप्रमाणे वागेन माबद्दल जामीन घेतला जात होता. अपील ऐकताना नविन पंचांची नेमणूक केली जात असे किंवा पंचामतीशिवाम

सरकारी अधिकारी स्वत: निर्णय देत. परंतु पंचायतीमार्फतच न्यायनिवाडा होत असे.

पंचायतीत पक्षकाराकडून घेतल्मया जाणाऱ्या शुल्काबद्दल निश्चित माहिती मिळत नाही. परंतु दोन्ही पक्षाकडून न्यायालयीन शुल्क वसुल केले जात असे. डॉ. सेन म्हणतात, ही रक्कम खटल्याच्या खर्चाच्या २५ टक्के असे.विजयी पक्षाने दिलेल्या न्यायालयीन शुल्काला हारकी किंवा 'शेरणी' असे म्हणत, तर गुन्हेगाराकडून वसुल करण्यात आलेल्या शुल्काला गुन्हेगारी असे म्हणत. जोपर्यंत पक्षकार न्यायालयीन शुल्क भरीत नव्हते, तोपर्यंत निवाडपत्र जाहीर केले जात नसे. शुल्काच्या रूपाने मिळणारी रक्कम सरकारी तिजोरीत जमा होत असे. पंचायतीच्मा सभासदांना कोणताही मेहताना मिळत नसे. विजयी पक्ष स्वखुशीने शेले-पागोटे किंवा जेवण देत असे.

पंचायत पद्धतीत गावातील तंट्यांचे निकाल गावातच लावण्याची सोय होती. इ. स. १७३० पासून पंचायत पद्धत सुरू. इ. स. १७५० पर्यंत तिचा सर्वत्र प्रसार झाला आणि गोतसभा पूर्णपणे मोडकळीस आली. पंचामतीचे सर्वोच्च न्यायालय पुण्यात रहात असे. पुण्याच्या न्यायाधिशांकडे पेशव्यांनी सोपविलेले खटले चालविले जात. रामशास्त्री प्रभुणे यांचे न्यायालय शनिवार वाड्यात गणेश महालात चालत होते. त्यांच्या न्यायालयात १३९८ खटले चालविले गेले होते. डॉ. व्ही. टी. गुणे यांनी आपल्या “Judicial system of the Maratha’ या ग्रंथात खटल्यांची यादी दिलेली आहे.

पेशवेकालीन पंचायत पद्धतीचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही परिस्थितीत वादी-प्रतिवादी यांच्या गैरहजेरीत निर्णय दिला जात नसे. पंचामतीच्या न्यायदान पद्धतीमध्ये साक्षी, पुरावा व दिव्य या गोष्टींना महत्त्वाचे स्थान होते. पंचायतीला फौजदारी खटले चालविण्याचाही अधिकार होता. फौजदारी खटल्यात वादी-प्रतिवादी यांच्यापैकी कोणाच्याही वतीने एखाद्या साक्षीदाराने खोटी साक्ष दिल्यास दंड आकारण्यात येई. गुन्हेगार सापडला नाही तर गावाच्या मुकादमावर गुन्ह्याची जबाबदारी ठेवून त्याच्याकडून दंड वसुल केला जाई. गावातील गुन्ह्याचा शोध लावण्याचे काम गावच्या महाराचे असे. महार-पाटलाचा मदतनीस, हाताखालचा माणूस म्हणून पाटलाला दंड केला जात असे.

**पंचामतीचे प्रकार :-**

पेशवेकाळात न्यायदान करणाऱ्या पंचायतीचे चार प्रकार होते. १) पेशव्यांचे अधिकारी आणि त्यांना न्ययदानात मदत करणारा वर्ग २) विशिष्ट पंचायतीचे दोन प्रकार होते- १)खासगी पंचायती २) लवाद पंचायती (सार्वजनिक पंचायती) ३) जात पंचायत- प्रत्येक जातीच्या खटल्याचा निकाल या पंचायतीमध्ये दिला जात असे. जाती पंचायतीचे निर्णय सरकारला मान्य करावे लागत. ४) अध्यात्मिक स्वरुपाच्या पंचायती किंवा ब्राह्मसभा, पैठण येथील ब्राह्मसभेत निरनिराळ्या जातीचे लोक सामाजिक व धार्मिक स्वरूपाचे खटले आणत.

पेशवेकाळात धर्मशास्त्र हेच कायदेशास्त्र होते. रूढी, परंपरा, नियम बघून निर्णय दिले जात. पंचायतीने निर्णय दिल्यानंतर सरकारकडून त्याची अंमलबजावणी होत असे. प्रतिवादी हजर न राहिल्यास वादीच्या बाजूने एकतर्फी निकाल देण्याची पद्धत नव्हती. प्रतिवादीस बोलावण्यासाठी दूत पाठविला तर त्याचा सर्व खर्च प्रतिवादीला द्यावा लागत असे.

यानंतरही जर प्रतिवादी हजर झाला नाही तर त्याची मालमत्ता जप्त केली जात असे. वादी–प्रतिवादींना पंचायतीचा निकाल मान्य नसेल तर त्यांना सर्वोच्च न्यायालयात दाद मागता येत असे. पण, त्यासाठी त्यांना पंचायतीमधील पंचांचा भ्रष्टाचार सिद्ध करावा लागे. साक्षीदारांचा खर्च त्या त्या पक्षकाराला करावा लागे.

पेशवेकाळात साक्षी पुराव्याच्या जोडीलाच दिव्य या प्रकाराला सुद्धा तितकेच महत्त्व होते. जे काम साक्षी पुराव्याने साध्य होत नसे ते काम करण्यासाठी दिव्याचा आधार घ्यावा लागे. वतन आणि शिवेचे वाद असल्यास दिव्य केले जात होते. खा दिव्य, अग्नी दिव्य, जल दिव्य इत्यादी दिव्यांचे प्रकार होते. दिव्य हे एखाद्या पुरातन मंदिरात किंवा प्रसिद्ध अशा शंकराच्या मंदिरात किंवा नद्यांच्या संगमावर केले जात असे. दिव्य करण्यासाठी रविवरा हा दिवस निश्चित केलेला होता. दिव्य हे चार दिवस चालत असे. दिव्य करून पूर्ण झाल्यावर त्या ठिकाणचा अधिकारी दिव्य झाल्याचे पत्र पंचायतीला देत असे. त्याला स्थळपत्र  असे म्हटले जात असे. या स्थळपत्रावरून संबंधीत खटल्याचा महजर लिहिला जात असे.

**पंचामत पद्धतीचे गुण–दोष :–**

**गुण –** १) पंचायत आणि गोतसभा यांच्यातील महत्त्वाचा गुण म्हणजे गावातील तंटे गावातच सोडविले जात. २) पंचायत ही लोकप्रिय झालेली पद्धत होती. ब्रिटीशांनी सुद्धा या पद्धतीची स्तुती केली आहे. गोतसभेत सर्व जातीचा समावेश झालेला असल्यामुळे तिला लोकशाहीचे स्वरूप प्राप्त झालेले होते. ३) पंचायत ही एक लहान सभा असून तिच्यात ५ पासून ५0पर्यंत सभासद असत. ज्या जातीचा तंटा असेल त्मा जातीतील अनुभवी  लोकांची पंच म्हणून नियुक्ती केली जात असे. त्याच जातीचा विचार त्यावेळी पंचायतीत केला जात असे. ४) पंचायत ही गावातच भरत असे. ५) पंचायतीत व गोतसभेत आरोपीला ओळखणारे पंच असल्यामुळे अन्याय होण्याची शक्यता फार कमी रहात असे. ६) पंचायतींत न्यायदानासाठी विलंब लागत नसे. गावाच्या सोयीनुसार न्यायदानाची वेळ निश्चित केली जात असे. ७) पंचायत व गोतसभा यांच्यामध्ये वकीलवर्ग नसल्यामुळे पक्षकारांचे शोषण होत नव्हते. पंचायतीपुढे कोणत्याही पक्षाला आपले मत मांडत येत होते. ८) शक्यतो समझोत्माने खटले निकाली काढण्माची प्रवृत्ती दिसून येते. विजमी व पराभूत पक्षांत काममची तेढ राहू नमे माची काळजी पंचामत घेत असे. ९) कोणावरही अन्याय होवू नये म्हणून पक्षकारांना सर्वोच्च न्यायव्यवस्थेकडे अपील करता यत होते. १०) डॉ. सेन म्हणतात, मराठ्यांना एक गोष्ट जाणवलेली दिसते, की करावयाची शिक्षा ही त्या माणसाला जीवनातून उठविण्यासाठी नव्हे तर त्याची चूक सुधारण्यास त्याला प्रवृत्त करावे अशी असावी. गुन्हेगाराचे रूपांतर समाजविरोधी शक्तीत होवू नये हा त्यांचा हेतू स्पष्ट होतो.

दोष – १) गोतसभा किंवा पंचायत या न्यायसंस्थेत लिखित कायद्यांचा संग्रह नव्हता तर धर्मशास्त्रांचा आधार घेवून न्यायदान केले जात असे. धर्मशास्त्रांचा जनसामान्यांना परिचय नसल्यामुळे पक्षकारांना आपल्यावर अन्याय होत आहे किंवा नाही हे कळत नव्हते. २) न्यायदान करणारे पंच पक्षकारांना ओळखणारे असत त्यामुळे त्यांच्या मनात पक्षकारांविषयी चांगले किंवा वाईट मत असल्यास त्याचे पडसाद न्यायदानाच्या वेळी उमटत. पंच हे

न्यायाधिशाप्रमाणे नि:पक्षपाती नसत. त्यांची भूमिका ही आजच्या वकिलांसारखी दिसून येते. त्यामुळे नि:पक्षपाती न्याय मिळण्याची शक्यता फार कमी रहात असे. ३) पंचायत किंवा गोतसभा यांनी दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे काम पंचायतीचे नसून सरकारचे रहात असे. त्यामुळे निर्णयाची अंमलबजावणी लवकर होत नसे. तगादा लावून न्याय मिळवावा लागे. ४) गावातील पाटील किंवा इतर सरकारी अधिकारी पंचावर दबाव आणित. त्यामुळे नि:पक्षपातीपणे न्याय मिळण्याची शक्यता कमी रहात असे. ५) एलफिन्स्टन म्हणतो, न्यायदानासाठी कोणतीही ठराविक व्यवस्था नव्हती. दावा लावण्याचे निश्चित उपाय नव्हते आणि दावा लावल्यानंतर कामकाज कसे चालवावे यासंबंधी कायदेकानून ठरलेले नव्हते.

पंचायत पद्धतीत असे दोष असले तरी या संस्थांनी काळाची गरज भागविली होती. त्याचप्रमाणे यश आणि लोकप्रियता संपादन केली होती. म्हणूनच एलफिन्स्टनने पंचायत पद्धती चालू ठेवण्याची सूचना केल्याचे दिसून येते. आजचे लोक न्यायालय या पद्धतीलच प्रकार आहे.

## ४.२.४ मराठाकालीन गुन्हे व शिक्षा :

आतापर्यंत आपण मराठेशाहीत अस्तित्वात असणाऱ्या न्यायपद्धतीचा अभ्यास केला. मराठा कालखंडातील गुन्ह्यांचे स्वरूप आणि शिक्षा कशाप्रकारे दिल्या जात होत्या याची माहिती घ्यावयाची आहे. शिक्षेचे अनेक प्रकार अस्तित्वात होते. शिक्षा देण्याचे काम स्वत: राजा, त्याच्या हाताखालील सरसुभेदार व सरदार देत असल्याचे दिसून येते.

शिक्षेचे प्रकार : दिवाण दंड (राजदंड), देवदंड (ब्रह्मदंड), जातीदंड (गोतदंड).

दिवाण दंड : डॉ. व्ही. टी. गुणे मांच्मा मते शिवपूर्वकाळात दिवाणदंड किंवा राजदंड हा कोणत्या पद्धतीने दिला जात असे याबद्दल माहिती मिळत नाही. परंतु साधारणत: सर्वसामान्य खटले देशमुख व देशपांडे चालवत असत. व महत्त्वाचे खटले सुलतानाकडे पाठविले जात. शिवकाळात राजदंडाचे काम स्वत: छत्रपती शिवाजी महाराज करीत. छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या शिक्षांचे स्वरूप अतिशय कडक असे. गुन्हा सिद्ध झाल्यावर हातपाय तोडणे, नाक-कान कापणे अशा शिक्षा दिल्या जात. शिवकाळातील गुन्हे व त्यासाठी दिल्या गेलेल्या शिक्षा याबाबत असलेली व्यवस्था पुढे छत्रपती शाहू महाराजांच्या काळापर्यंत सुरू होती. पुढे मात्र राजदंडाच्या अधिकाराची विभागणी झालेली दिसून येते. इ. स. १७५० ते १८१८ या काळात राजदंड देण्याचे काम स्वत: पेशवा व त्याचे सरदार करीत.

पेशवे कालखंडात गुन्ह्याचा शोध लागल्यानंतर दंड देण्याचे काम स्वत: पेशवा किंवा त्याच्या हाताखालील एखादा अधिकारी करीत असे. महत्त्वाचा फौजदारी खटला सरन्यायाधिशांकडे सोपविला जाई. पेशव्यानंतरचा दुय्यम न्यायविषमक अधिकारी म्हणजे सरन्यायाधिश हाय. सरन्यायाधिशाकडेच दिवाणी व फौजदारी स्वरूपाचे खटले चालविले जात. थोडक्यात म्हणजे पेशवेकाळात राजदंड देण्याचे काम पेशवा व सरन्यायाधिश करीत असे.

शिक्षेचे प्रकार

- दिवाण दंड (राजदंड)
- देवदंड (ब्रम्हदंड)
- जातीदंड (गोतदंड)

पेशवेकाळात शिक्षेसाठी पुढील पद्धती अस्तित्वात होत्या.

- केंद्रीय
  - पेशवा
  - सरन्यायाधिश
- स्थानिक
  - सुरसुभेदार
  - सुभेदार किंवा मामलेदार
  - कमाविसदार
  - पाटील

**केंद्रीय :– दिवाण दंड (राजदंड) :–**

राजाविरूद्ध कट कारस्थाने करून शत्रूला मदत करणे, सरकारी अथवा सार्वजनिक पैशाचा अपव्यय करणे, जमा झालेला महसुल सरकारी खजिन्यात भरण्यासाठी दिरंगाई करणे, सरकारी अधिकाऱ्यांचे अनैतिक वर्तन, परस्त्रीबरोबर अनैतिक वर्तन अशा गुन्ह्यांच्या संदर्भात राजा स्वत: राजदंड देत असे.

**स्थानिक :–** स्थानिक न्यायदान पद्धतीत पेशवेकाळात सरसुभेदार, सुभेदार, मामलतदार, कमाविसदार व पाटील या सरकारी अधिकाऱ्यांना राजदंड देण्याचा अधिकार होता. डॉ. व्ही. टी. गुणे म्हणतात, या प्रत्येकाचा अधिकार व कामे ही कधीच निश्चित केलेली नसत. प्रत्येक अधिकारी आपापल्या क्षेत्रातील सामान्य खटले स्वत:च्या जबाबदारीवर व स्वत:च्या अधिकारांत चालवित असत. परंतु, गंभीर स्वरूपाचे खटले मात्र हुजूर दरबाराकडे सोपविले जात. पेशव्यांच्या गैरहजेरीत त्यांचा मुतालिक काम पहात असे. लिखित स्वरूपाचे निश्चित कायदे अस्तित्वात नव्हते. हिंदूधर्म ग्रंथाप्रमाणे न्यायदान केले जात होते. विविध प्रकारचे स्थानिक अधिकारी गुन्ह्याच्या स्वरूपाप्रमाणे शिक्षा करीत फौजदारी स्वरूपाच्या गुन्ह्यांच्या तपासाचे काम बारकाईने केले जाई.

गुन्हा सिद्ध झाल्यानंतर शिक्षेची अंमलबजावणी करण्याचे काम वरिष्ठ अधिकारी करीत. फाशीची शिक्षा अस्तित्वात नव्हती. फौजदारी स्वरूपाचा गुन्हा सिद्ध झाला तर गुन्हेगाराला हत्तीच्या पायी देणे, डाग देणे, मुंडके छाटणे किंवा तोफेच्या तोंडी देणे अशा शिक्षा दिल्या जात. एखाद्या गुन्हेगाराचे पाय तोडले तर त्याला त्याच ठिकाणी टाकून दिले जाई. परंतु एखाद्या व्यक्तीला त्या गुन्हेगाराला मदत करण्याची इच्छा असेल तर ती व्यक्ती मदत करू शकत असे.

काही खटल्यात गुन्हा केल्यानंतर गुन्हेगार पळून जात, त्यावेळी तमयाच्या बापाला पकडून शिक्षा केली जात असे. एखाद्या संपूर्ण कुटुंबावर आरोप ठेवला गेल्यास त्या कुटुंबाला अंधार कोठडीत टाकले जाई. एखाद्या खटल्यात संपूर्ण गावाचा संबंध आल्यास

संपूर्ण गावास वेठीस धरले जात असे. गोवध, चोरी अशा गुन्ह्यांच्या वेळी लोक आग्रहास्तव गुन्ह्याचा शोध लावण्यासाठी खास अधिकारी नियुक्त केले जात. अगदी महत्त्वाच्या खटल्यात एखाद्या कारकूनाची नेमणूक केली जात असे. एखाद्या गावात जर चोरी झाली असेल तर चोराच्या पावलाच्या ठशावरून गुन्हेगाराचा शोध लागला नाही तर त्याच्या पावलाचे ठसे ज्या गावाच्या शिवेत लुप्त झाले असतील त्या गावाकडून संबंधीत चोरीचे पैसे वसुल केले जात असे.

पेशव्याप्रमाणेच त्यांच्या सरदारांना सुद्धा आपल्या जहागिरीत स्थानिक खटले चालविण्याचा अधिकार असे. अशा सरदारांनी आपल्या जहागिरीतील खटल्यांचा निकाल पंचायतीमार्फत करावा अशा प्रकारची पद्धत असे. परंतु नागपूरकर भोसल्यासारखे स्वतंत्रवृत्तीचे सरदार आपल्या जहागिरीत राजदंड देत.

एकंदरीत मराठेकालीन गुन्ह्याचे स्वरूप पाहिले असता गंभीर स्वरूपाच्या गुन्ह्यांचे प्रमाण कमी होते. दिवाणी स्वरूपाच्या गुन्ह्याचे स्वरूप जरी फौजदारी गुन्ह्यापेक्षा जास्त असले तरी सुद्धा एकंदरीत गुन्हे न करण्याकडे कल दिसून येतो. एलफिन्स्टन म्हणतो, मराठा राज्यात गुन्हे बहुदा घडत नाही याचे कारण असे की, राज्यकर्ते स्वभावत: क्रूर नव्हते. ते शिक्षा विचारपूर्वक देत. राजद्रोह सारख्या गुन्ह्याबद्दलही केव्हा माफी मिळे.

**देवदंड किंवा ब्रह्मदंड :-**

देवदंडालाच प्रायश्चित असे म्हणत. प्रायश्चित्म देण्माचे काम ब्राह्मणांकडे असे. प्रत्येक खटल्यातील गुन्ह्याचे स्वरूप पाहून धर्मशास्त्रानुसार दंड दिला जात असे. धर्मशास्त्रानुसार दंड दिला जात असे. धर्मशास्त्रानुसार सामाजिक स्थैर्य व शांतताभंग करणाऱ्यालाच देवदंड देण्याचे काम ब्राह्मसभेचे प्रमुख धर्माधिकारी करीत.

**प्रायश्चित्म :-** ब्राह्मणांना गाई अथवा द्रव्य दान देणे, तिर्थयात्रा करणे, वेदमंत्राचे पठण करणे, निरनिराळ्या देवतांच्या नावाचा जप करणे, प्राणायाम करणे, होम, जप, उपोषण, सुवर्णदान, गायत्री मंत्राचा जप, ब्राह्मण भोजने, गाईच्या शेणातील दाणे वेचून खाणे इत्यादी.

**जातीदंड :** पेशवेकाळात जातीसभा ही एक महत्त्वाची सभा होती. एखाद्या व्यक्तीने जातीबाह्य कृत्य केल्यास जातीसभेत त्याला शिक्षा केली जात असे. त्याला जातीदंड असे म्हणत. त्या व्यक्तीला जाती बहिष्कृत केले जात होते.

**परिमार्जनाची पद्धत :** एखाद्या गुन्हेगाराला आपल्या गुन्ह्याबद्दल पश्चाताप झाल्यास गुन्ह्याचे परिमार्जन करून त्याला पुन्हा आपल्या जातीत येण्याचा हक्क रहात असे. राजदंड करण्यात आलेल्या व्यक्तीला ब्राह्मसभेपुढे त्याच्या गुन्ह्याचे परिमार्जन करून त्याला पुन्हा जातीत घेतले जात असे. अशा प्रकारे परिमार्जन करीत असताना राजदंड व ब्रह्मदंड हे दोन्हीही त्या व्यक्तीला द्यावे लागत. परंतु ज्यावेळी एखादा सामाजिक किंवा धार्मिक प्रश्न गुंतलेला असेल अशावेळी त्या व्यक्तीला एखाद्या तिर्थक्षेत्रातील विद्वान ब्राह्मणाकडून शुद्धीपत्रक आणावे लागे आणि त्या व्यक्तीच्या गुन्ह्याचे परिमार्जन होत असे. एखाद्या व्यक्तीला जर आपण केलेल्या गुन्ह्याबद्दल पूर्ण पश्चाताप झाला तर त्या व्यक्तीकडून 'दोषपत्र'लिहून घेतल्यानंतर त्या व्यक्तीला शुद्धीपत्र दिले जात असे.

जातीदंडाच्या संदर्भात गुन्हा गेलेल्या व्यक्तीने आपला गुन्हा मान्य केला तर त्या व्यक्तीला पुन्हा जातीत घेण्यासाठी गोताई बोलावली जात असे. त्यानंतर त्या व्यक्तीला जातीत घेतले जाई आणि मग तो पतीतपावन होत असे. एखाद्या व्यक्तीने जर स्वखुशीने आपली जात किंवा धर्म सोडला तर त्माला घटस्फोटामार्फत आपल्या जातीची बंधने ताडता येत असत. तसेच धर्मांतरीत व्यक्तीला स्वधर्मात येण्याची इच्छा असल्याचे त्याचे शुद्धीकरण केले जात असे.

अशारितीने प्रजेस नेहमी दयाळूपणाने वागविण्यात येत असल्यामुळे एखादेवेळी धाक-जरब बसविण्याकरीता शिक्षा दिल्यास ती फार परिणामकारक होत असे. कठोर शिक्षा असल्यामुळे गुन्ह्याचे प्रमाण कमी होते.

## ४.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**थोडक्यात उत्तरे द्या -**

१) मध्ययुगीन महाराष्ट्रात न्यायदानासाठी कोणते ग्रंथ महत्वाचे होते.?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२) राजमुद्रा म्हणजे काय?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३) छत्रपती राजाराम महाराजांच्या काळात छत्रपतींच्या ऐवजी न्यायदानाचे कामाज कोण पहात असे.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४) न्यायाधिश व पंडितराव यांच्या नेमणुका कोणाकडून केल्या जात.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५) पंडितरावाकडे कोणत्या स्वरूपाचे खटले येत.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

६) ब्राह्मसभा कोठे भरत असे.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

७) ब्राह्मसभेचे मुख्य काम कोणते.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

८) गोतसभेत प्रमुख प्रतिनिधी म्हणून कोणाकोणाला पाचारण केले जात होते.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

९) गोतसभा कोठे भरत असे.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

१०) गोतसभा बोलाविण्याचा अधिकार कोणाला होता.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

११) पेशवेकाळात गोतसभेऐवजी कोणती संस्था न्यायदानासाठी कार्यरत होती.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

१२) पेशवाईत कोणकोणते सुप्रसिद्ध न्यायाधिश होवून गेले.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

१३) पंचायतीची सदस्य संख्या किती रहात असे.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

१४) दिव्य कोणत्या दिवशी केले जात होते.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

१५) पंचायतीच्या नावावरून कोणती म्हण रूढ झाली आहे.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

**दिर्घोत्तरी प्रश्न –**

१) शिवकालीन न्यायव्यवस्थेचा आढावा घ्या.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

२) गोतसभा आणि ब्राह्मसभा यांचे स्वरूप स्पष्ट करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

३) पेशवेकालीन पंचायत पद्धतीच्मा कामकाजाचे स्वरूप स्पष्ट करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

**टिपा लिहा –**

१) मध्ययुगीन महाराष्ट्रातील कायद्याचे स्त्रोत.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

२) जातीसभा

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

३) पंचायतीचे गुण–दोष

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

## ४.४ सारांश

दक्षिण भारतातील इतर न्यायसंस्थेपेक्षा मध्ययुगीन महाराष्ट्राची न्यायव्मवस्था जास्त चांगली होती. मध्ययुगीन महाराष्ट्रात हिंदू धर्मशास्त्रानुसार न्यायदान केले जात होते. न्यायदानासाठी लिखित कायदे अस्तित्वात नव्हते. विज्ञानेश्वराचा मिताक्षरा आणि व्यवहार प्रमुख या ग्रंथांना कायद्याचे स्त्रोत म्हणून मान्यता मिळाली होती. रूढी, परंपरा आणि प्रत्येक जातीचे नियम लक्षात घेवून न्यायदान केले जात असे.

शिवपूर्व काळात न्यायदानासाठी मजलिस ही संस्था कार्यरत होती. शिवकाळात गोतसभे मार्फत तर पेशवेकाळात पंचायतीमार्फत न्यायदान केले जात असे. ब्राह्मसभेमार्फत धार्मिक व सामाजिक स्वरूपाचे खटले सोडविले जात. हिंदूंच्या पवित्र तिर्थक्षेत्रांच्या ठिकाणी (पैठण, नाशिक, कोल्हापूर, पंढरपूर, काशी) ब्राह्मसभेचे आयोजन केले जात असे.

शिवकाळात राज्य कारभाराच्या इतर खात्यांसारखेच न्याय व्यवस्थेवरही बराच मुसलमानी छाप पडलेला दिसतो. परंतु इ. स. १६५० नंतर छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीला वजन प्राप्त होत गेले. स्वराज्याच्या प्रदेशांत वाढ झाली. इतर रज्यकर्त्यांच्या तुलनेत शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात शांतता लाभल्याने त्यांनी आपल्या न्यायव्यवस्थेत बदल केले. अष्टप्रधान मंडळात न्यायाधिश व पंडितराव या स्वतंत्र न्यायाधिशांच्या नेमणुका केल्या. स्थानिक पातळीवरील न्यायदान स्थानिक पातळीवरील सरकारी अधिकारी पार पाडीत. सर्वोच्च न्यायदानाचा अधिकार छत्रपतींचा होता. पेशवेकाळात सर्वोच्च न्यायदानासाठी पुण्यास स्वतंत्र न्यायाधिशांच्या नेमणुका केल्या जात.

मध्ययुगीत महाराष्ट्रात इतर बाबती गाव जसा स्वयंपूर्ण आहे, तसाच न्यायदानाच्या बाबतीतही स्वयंपूर्ण असावा, म्हणून स्थानिक पातळीवरील गोतसभा आणि ग्रामपंचायती यांच्या मार्फत न्यायदान केले जात असे. या संस्थांनी दिलेला निर्णय महत्त्वपूर्ण असे. गोतसभा किंवा पंचायत गावातील एखाद्या पुरात मंदिरात, पाटलाच्या घरी, चावडीवर किंवा वडाच्या-पिंपळाच्या पारावर भरत असे. या सभेतील सभासद गावातील अनुभवी आणि वयोवृद्ध लोक रहात. वादी-प्रतिवादी, साक्षीदार, पुरावे या सर्वांचे अवलोकन केल्यानंतर या सभा निर्णयाप्रत पोहचत. निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी सरकारी अधिकाऱ्यांवर रहात असे.

मध्ययुगीन महाराष्ट्रातील न्यायसंस्थेत आपल्याला लोकशाहीचे स्वरूप पहावयास मिळते तर पेशवेकालीन पंचायत पद्धतीत आजच्या लोक न्यायालयाचे प्रतिबिंब दिसते. गोतसभा आणि पंचायत या दोन्ही संस्थांमध्ये अनेक गुण-दोष असले तरी या संस्थांनी काळाची गरज भागविली होती, हेही तेवढेच खरे.

## ४.५ पारिभाषिक शब्द

मजलिस – न्यायदानासाठी कार्य करणारी संस्था

गोतसभा – स्थानिक पातळीवरील न्यायसंस्था

ब्राह्मसभा – विद्वान ब्राह्मणांची सभा

| | | |
|---|---|---|
| राजमुद्रा | – | राजाचा शिक्का |
| अग्रवादी | – | प्रथमवाद उपस्थित करणारा (फिर्यादी) |
| पश्चिमवादी | – | वादाला उत्तर देणारा (आरोपी) |
| राजीनामे | – | संमती दर्शक पत्र |
| जमान कतबे | – | जामीन |
| बखेर | – | लेखी साक्ष |
| महजर | – | निवाडपत्र |
| देशक | – | गावचे मुळचे रहिवासी |
| तकरीर | – | वादी–प्रतिवादी यांचे म्हणणे |
| मतीतपत्र | – | निर्णय मान्य असल्याचे पत्र |
| हारकी | – | विजयी पक्षाकडून वसुल केलेले न्यायालयीन शुल्क |
| गुन्हेगारी | – | पराभूत पक्षाकडून वसुल केलेले न्यायालयीन शुल्क |
| खा दिव्य | – | तेल–तुपाच्मा उकळत्मा भांड्यातील लोखंडाचा गोळा काढणे |
| अग्नी दिव्य | – | लोखंडाचा तप्तगोळा हातात घेवून देवळाभोवती सात प्रदक्षणा घालणे |
| थळपत्र | – | दिव्य झाल्याबद्दल पत्र |

## ४.६ संदर्भ सूची :–

१) V. T. Gune - The Judicial system of the Maratha

२) T. T. Mahajan - Courts and Administration of Justice under Chhatrapati Shivaji

३) डी. व्ही. आपटे, एन. सी. केळकर – संपादक –शिवकालीन पत्रसार संग्रह

४) M. G. Ranade - Rise of the Maratha Power

५) Surendra Nath Sen - Administrative System of the Maratha

६) A. R. Kulkarni - Maharashtra in the Age of Shivaji

७) वा. कृ. भावे – पेशवेकालीन महाराष्ट्र

८) के. त. चिटणीस – मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग १

९) गामकवाड –सरदेसाई–थोरात–हनमाने – मराठेकालीन संस्था व विचार.

# घटक ५
# कृषीव्यवस्था

**अनुक्रमणिक**

५.0 उद्दिष्टे
५.१ प्रस्तावना
५.२ विषय विवेचन–
 ५.२.१ मध्ययुगीन शेती
 ५.२.२ शेतीचे प्रकार (जमिनींचे प्रकार)
 ५.२.३ महसूल,आकारणी
५.३ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न
५.४ सारांश
५.५ पारिभाषिक शब्द
५.६ संदर्भग्रंथ सूची

## ५.0 उद्दिष्टे

विदयार्थी मित्रांनो या घटकातून तुम्हाला.

१. मध्ययुगीन शेतीबाबत माहिती मिळेल.

२. शेतीच्या विविध प्रकारांची माहिती होईल.

३. महसुल आकारणीबाबत सविस्तर माहिती मिळेल.

## ५.१ प्रस्तावना–

इ.स. १२०६ हे वर्ष भारताच्या इतिहासातील एक महत्वाचे वर्ष आहे. या वर्षी भारतातील इस्लामी राजसत्तेची स्थापना झाली. उत्तर भारतात सुलतानशाहीच्या कालखंडाचा प्रारंभ झाला, भारतीय इतिहासाच्या संदर्भात मध्ययुग सुरू झाले. मध्ययुगाचा प्रारंभ म्हणजे एका निश्चित दिवशी व वेळी प्राचीन काळ(युग) संपले आणि मध्ययुग सुरू झाले, अशी गणना केली जात नाही. महाराष्ट्राच्या संदर्भात ममध्ययुगफ हे महाराष्ट्रातील इस्लामी आक्रमणापासून मानले जाते. इ.स. १२९५ मध्ये महाराष्ट्रात यादव घराण्याची राजवट होती. दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दिन खिल्ली याचा सरदार मलिक काफूर याने यादवांवर आक्रमण केले. यादवांना पराभूत करून खिल्लीने त्यांना दिल्लीचे मांडलिक बनविले. पुढील वीस वर्षांनी महाराष्ट्रात इस्लामी राजवटीचा अंमल सुरू झाला. या घटनेपासून महाराष्ट्रात मध्ययुगाचा प्रारंभ झाला असे साधारणपणे मानतात. या दृष्टीने महाराष्ट्राचे मध्ययुग म्हणजे इस्लामी राजवटीचा कालखंड अशी ढोबळमानाने गणना करावी लागते.

म मध्ययुगफ ही संकल्पना किंवा विशेषण अथवा संज्ञा युरोपच्या इतिहासाच्या संकल्पनेवरून आपण स्विकारली आहे. महाराष्ट्रात इतिहास- संशोधनास सुरूवात झाली ती ममराठयांच्या इतिहासाच्या संशोधनाच्या जाणिवेमधून ;प्रारंभीचे बहुतांश संशोधक मराठयांच्या इतिहाससंशोधनामध्येच विशेषतःराजकीय इतिहासावर भर देताना दिसतात.

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण महाराष्ट्राच्या इतिहासाच्या विविध पैलूंपैकी कृषी घटकाकडे विशेष पैलू म्हणून त्याचबरोबर शेतीचा विकास,पिके,शेती व तिच्या उत्पन्नावरील विविध कर,महसुली उत्पन्नाच्या बाबी इत्यादी मुद्यांचा अभ्यास करणार आहोत.

## ५.२ विषय विवेचन-

### ५.२.१ मध्ययुगीन शेती-

मध्ययुगीन महाराष्ट्रीय समाजाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे शेतीव्यवस्था आणि आर्थिक विकास होय. अबुल फजलकृत मऐने अकबरीफ्या ग्रंथामध्ये शेती, शेतजमिनीची मालकी, तिचा कस, शेतीची विविध उत्पन्ने, शेतमालाच्या व्यापारी पेठा, महसुलाची वसुली इ. बाबतची माहिति मिळते.

इ.स. १३३६ मध्ये तुंगभद्रा नदीकाठी मविजयनगरफ्हे शहर स्थापन झाले. याचवेळी महहिरफ्व मबुक्कफ या दोन बंधूनी विजयनगर साम्राज्याची स्थापना केली. विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय याने तेलुगू भाषेमध्ये लिहिलेल्या मआमुक्तमाल्यदाफ्या ग्रंथामध्ये धार्मिक सहिष्णूता, जनतेची सदैव काळजी कशी घ्यावी.महसुली उत्पन्नाच्या बाबी इ. बाबींची चर्चा केली आहे. विजयनगरमध्ये तांदुळ, गहू,बाजरी, ही धान्ये, तर मिरे, लवंग, सुंठ, दालचिनी हे मसाल्याचे पदार्थ, साखर, चंदन विविध प्रकारचे कापड इ. चे उत्पादन विपुल प्रमाणात होते. यापैकी ब-याच बाबींची निर्यात इराण, चीन व अफगाणिस्तान या देशांमध्ये केली जात होती.

विजयनगरच्या स्थापनेनंतर अकरा वर्षांनी म्हणजेच इ.स.१३४७ मध्ये महाराष्ट्रात बहमनी राज्याची स्थापना झाली. बहमनी राज्याची स्थापना महसन गंगूफ्उर्फ मझफरखानफ याने केली. बहमनी साम्राज्याचा मुख्य प्रधान ममहमूद गवानफ(कारकीर्द इ.स.१४६१ ते १४८२) याने राज्यविस्ताराबरोबरच अनेक प्रशासकीय सुधारणा केल्या. राज्यातील जमिनीची मोजणी करून महसूलाची निश्चिती केली. बहमनी-विजयनगर यांच्या प्रदीर्घ संघर्षामुळे प्रथम बहमनी साम्राज्याचे विघटन झाले. त्याच्या पाच शाहया निर्माण झाल्या. पुन्हा या पाचही शाहयांनी एकत्र येऊन तालिकोटच्या लढाईमध्ये विजयनगरचा संपूर्ण पाडाव केला. बहमनी साम्राज्यामधून निर्माण झालेल्या अहमदनगरच्या निजामशाहीमध्ये मलिक अंबर याने शासनाचे उत्पन्न वाढावे व जमिनीच्या महसूलाची आकारणी जाचक पध्दतीने होऊ नये यासाठी उत्तरेतील अकबराच्या महसुलविषयक सुधारणांप्रमाणे स्थानिक परिवेशात काही बदल करून सुधारणा केल्या. जमिनीची पाहणी करून तिची प्रतवारी किंवा वर्गीकरण केले. महसूल-आकारणी करताना, जमिनीचा दर्जा लक्षात घेऊन महसूलाचे वेगवेगळे दर ठरविण्यात आले. या कामामध्ये मलिक अंबर यास साबाजी आनंदराव, शिवाजीपंत व

सखाराम मोकाशी या मराठी सरदारांनी मदत केली. मलिक अंबरने इजा-याने जमिनी देण्याची पध्दती बंद केली.महसूलाची वसुलीसाठी माहितगार ब्राम्हण माणसे नेमली. शेतीची जमिन मोजून मागील वर्षांची सरासरी काढून प्रत्येक शेतावर पिकाच्यानुसार कर बसविला.नवीन जमिनी तयार करण्यावर भर दिला.त्यासाठी पडीत जमिनी लागवडीखाल आणल्या.मलिक अंबरने महसूलाच्या आकारणीचे दर उत्पन्नाच्या एक चतुर्थांश असा ठरविला. मात्र सतत चालणा-या लढायांमुळे तो कमी करून२/५ करण्यात आला. याशिवाय विविध प्रकारचे करही प्रचालित होते. गावामधून कर वसुलीच्या कामी गावचा पाटील हाच प्रमुख आधार होता.

इ.स. १६१४ नंतर मलिक अंबरने राज्यातील काही ठिकाणी वर्षांच्या वास्तविक उत्पन्नाच्या तुलनेत १/३ रोख महसूलाचा प्रयत्न केला.त्याने अनेक ग्रामीण सुधारणा केल्या. मकुणबीफलोकांना मिरासपणे दिली.त्यांना एका अर्थाने जमिनीचे मालकी हक्कच दिले. पाटील, कुलकर्णी,ग्रामधिकारी व बलुतेदार यांची वतने क ायमस्वरूपी करून दिली.गावासाठी पडिक जमिनीमधून वनचराई, गायराने दिली. मलिक अंबराने केलेल्या या जमिनमहसूलविषयक सुधारणा ममलिकंबरीतहफया नावाने प्रसिध्द आहेत. कुणब्यास जमीन दिल्याशिवाय व त्यास मातीशी एकजीव केल्याशिवाय आपणास शेतसारा मिळू शकत नाही, ही बाब मलिक अंबर यास माहिती होती.

गावाकडे गावाच्या मालकीची जी जमीन असे तिला ममिरासीफम्हणत. तिची मशागत करणारास ममिरासदारफम्हणत.एखाद्या परिवाराकडे जी जमीन पिढयांनपिढया राहत असे तिला ममिरासीफ अशी संज्ञा प्राप्त झाली. गावामध्ये ही जमीन कसणारा एक वर्ग तयार झाला तो ममिरासदारफया नावाने ओळखला जाऊ लागला. मिरासी जमिनीव्यतिरिक्त गावामध्ये जी मकीर्दसारफजमीन होती तिला प्रसंगी मखालसाफराजाच्या मानकीची जमीनें जमीन भाढेतत्वावर एखाद्यास लागवडीसाठी देत त्यांना म उपरीफ अशी संज्ञा प्राप्त झाली होती. मराठे राजवटीमध्ये अशीच रचना पुढे आली. संत तुकाराम महाराजांच्या एका अभंगात ममिरासीफ ची नोंद आली आहे. ती पुढीलप्रमाणे-

**''हे माझे मिरासी। ठाव तुझ्या पायापाशी।।''**
**याचा धरीन अभिमान।करीन आपुले जतन।।''**

यावरून ममिरासदारीफ ही पध्दती शिवपूर्वकालापासून अस्तित्वात होती. शिवाजीमहाराजांच्या राजवटीमध्ये देखील शेती हाच उत्पन्नाचा प्रमुख भाग होता. महसुलाची आकारणी सुसूत्रबद्धपणे करता यावी यासाठी जमिन विविध प्रकारांमध्ये विभाजित केलेली होती.

### ५.२.२ शेतीचे प्रकार-

**जमिनीची विभागणी-**

१. पांढरी - ही प्रामुख्याने गावाच्या वसाहतीची जागा होय.

२. काळी - जी शेतीयोग्य व नांगरट करता येत असे ती जमीन.

**काही जमीन प्रकार-**

१.जिच्यावर पिकाची लागवड करत ती.

२.लागवडीयोग्य नसलेली अथवा पडीत किंवा वाजट जमीन.

वाजट जमीन ही विविध कामांसाठी उदा. गावाची गायराने, चराऊ कुरणांसाठी,वार्षिक यात्रा भरविण्यासाठी जागा, आणि आठवडा बाजारसाठी दिली जात असे. त्याचप्रमाणे याच जमिनीचा काही भाग उप-या लोकांना लागवडीसाठी देण्याची पद्धती होती.गावाच्या जमिनीपैकीं काही जमीन धार्मिक स्थळांना इनाम म्हणून तर काही गावे ब्राम्हणांना इनाम दिली जात असतात. ब्राम्हणास दान दिलेल्या जमीन किंवा गावास मअग्रहारफम्हणत. जमिनीच्या प्रतवारी करण्याच्या काही पद्धती होत्या. ते प्रकार पुढीलप्रमाणे-

१. अव्वल - चांगल्या प्रतीची शेतीयोग्य जमीन.

२. दुम - शेतीयोग्य जमीन

३. सीम - दोन्ही प्रकारापेक्षा दर्जा कमी.

४. वाजट - पडीत जमीन.

महाराष्ट्रातील जमिनींचे विभाजन सामान्यपणे डोंगराळ,गवताळ,काळया मातीच्या सपाट जमिनी यांच्या गुणधर्मावरून वर्गिकरण केल्या जात. त्याचप्रमाणे उत्तम ,कनिष्ठ व मध्यम असे उपप्रकारही दिसतात. जलसिंचनाची सोय असणारी आणि नसलेल्या बागायती व जिरायती जमिनीही होत्या. जमिनीच्या प्रतवारीप्रमाणे महसूल आकारण्याची पद्धती होती.

महाराष्ट्रात शेतीव्यवसाय हा अतिशय कष्टाचा, त्याचप्रमाणे मनुष्यबळाची आवश्यकता असलेला होता. शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दीत बराच मोठा वर्ग सैनिकी सेवेत कार्यरत असल्याने सहाजिकच शेतीसाठी मनुष्यबळाची कमतरता भासत असे. महाराजांनी शेतक-यांना बैलजोडी,विहीरी खोदण्यास मदत,बी-बियाणे खरेदीसाठी मोठया प्रमाणात मदत केली होती.याविषयीचे पुढील दोन उल्लेख महत्वपूर्ण आहेत-

**“ज्याला शेत करावयास कुवत आहे आणि त्याला**
**जोतास बैल, नांगर, पोटास दाणा नाही,त्यावीण**
**तो आडोन निकामी जाला असेल, तरी त्याला**
**रोख पैके हाती घेऊन दो चौ बैलांचे पैके द्यावे,**
**बैल घेवावे.....''** शिवकालीन पत्रसारसंग्रह-१

याठिकाणी एक बाब लक्षात घेण्यासारखी आहे ती म्हणजे शेतक-यांना शासनातर्फे हे कर्ज दिल्यावर कोणत्याही प्रकारची व्याजाची आकारणी केली जात नसे. ती कशा प्रकारे वसूल करावी याविषयीची नोंद पहा-

'' बैलाचे व गल्याचे पैकी वाढी पिढी न करता मुदलच उसनेच हळूहळू याचे तवानगी माफीक घेत घेत उसूल घ्यावा.जोवरी त्याला तवानगी येई तोवरी वागवावे.''

शिवाजीमहाराजांचा शेतीविषयक दृष्टिकोण हा अतिशय पुरोगामी पद्धतीचा होता. आजही तो प्रशंसनीय आहे. त्यांचा कोणताही सैनिक केंव्हाच शेतक-यांच्या भाजीच्या देठालाही हात लावत नसे, ही बाब अतिशय पुरोगामी स्वरूपाची आहे.

### ५.२.३ महसूल आकारणी-

शेतजमिनीच्या वर्गीकरणाप्रमाणे तिचा महसूल आकारला जात असे. महसूल

आकारण्याच्या नांगरपद्धती, क्षेत्रपद्धती, बटाईपद्धती या तीन प्रचलित पद्धती अस्तित्वात होत्या. नांगरपद्धतीमध्ये जमीन नांगरण्यास आवश्यक असलेल्या नांगरांच्या संख्येवरून महसूल आकारत. क्षेत्रपद्धतीमध्ये प्रथम जमिनीचे मोजमाप करत,शेतीची मर्यादा लक्षात घेऊन,पिकांच्या लागवडीप्रमाणे कर वसुली ठरवित.बटाई पद्धतीमध्ये जमिनीच्या उत्पन्नाचा अंदाज घेतला जाऊन उत्पन्नाच्या अर्धा भाग सरकारचा हिस्सा घेत असत.

जमीन मोजणीसाठी वापरल्या जाणा-या काठीस मशिवशाही काठीफ असे म्हणत.काठीची लांबी काही ठिकाणी ८२,तर काही ठिकाणी ८४ मतसूफ असे.या काठीला कोकणात मपांडफम्हणत. जमिनीच्या मोजमापाची जबाबदारी प्रामुख्याने महार समाजातील व्यक्तीकडे असे.त्यावेळी जमिनीविषयीची त्यांच्याइतकी माहिती अन्य व्यक्तीस क्वचितच असे. शिवाजीमहाराजांनी स्वराज्यातील जमिनीची मोजणी तीन वेळा केली होती. पहिली मोजणी दादोजी कोंडदेव यांनी, दुसरी मोरोपंत पिंगळे यांनी आणि १६७८ ते १६८० या कालावधीत आण्णाजी दत्तो यांनी केलेली तिसरी मोजणी. या मोजणीच्या कामामध्ये परगणा,खेडे या ठिकाणच्या अधिका-यांना सहभागी करून घेतले होते. त्यामुळे महसूल ठरविताना अचूकता येई. महसूलाची निश्चिती करताना पिकनिहाय आकारणी करत. लागवड केलेली पिके,त्यांचे अंदाजे उत्पन्न याची माहिती घेत. नव्याने लागवडीखाली आणलेल्या जमिनीवर मइस्तावाफपद्धतीने सारा आकारणी करत. शिवाजी महाराजांच्या काळात रोख व वस्तूच्या स्वरूपामध्ये शेतसारा घेण्याची पद्धती होती. हे दोन्हींचे प्रमाण बहुधा एकूण उत्पन्नाच्या २/५ एवढे असावे.बागायती जमिनीवरील शेतसारा रोख व ऊस,हळद,भाजीपाला,फळे इ. पिकासाठी रोख स्वरूपात शेतसारा घेत.धान्यरूपाने घेतलेला शेतसारा सरकारी गोदामात साठविण्याची सोय होती. महाराजांनी राबविलेला हा प्रयोग एवढा अभिनव होता की, मोगलांनी दक्षिणेत २७ वर्षे आक्रमणे केली तरी ती अबादित राहिलेला दिसतो.

पेशवेकाळात नानासाहेब उर्फ बाळाजी बाजीरावाच्या काळात जमिनीची मोजणी करण्यात आली.पुढे माधवराव पेशव्यांनेही सारा आकारणीमध्ये सुसुत्रता आणली. शेतसारा गोळा करण्याचे कामी देशमुख व देशपांडे,पाटील,कुलकर्णी त्याचप्रमाणे स्वंतत्रपणे अधिकारीही नेमलेले दिसतात. परगण्यामध्ये कमाविसदाराची भूमिका महत्वपूर्ण होती.

मध्ययुगीन आर्थिक व्यवस्थेमध्ये शेतीने मत्हवपूर्ण भूमिका बजावली. ग्रामीण लहान घटकांपासून तर परगण्यापर्यंतची स्थानिक यंत्रणा अतिशय मजबूत होती. त्यांचे नित्याचे व्यवहार सामान्यपणे अबाधित असत.

**बाळाजी विश्वनाथ- चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा-**

दि.२० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा महाराष्ट्रात अहमदनगर येथे मृत्यू झाला.त्याचा मृत्यू ही मध्ययुगीन भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी घटना ठरली. १७०७ च्या मार्च महिन्यामध्ये औरंगजेबाचा मुलगा आज्तमशाह याने स्वतःस मुघल साम्राज्याचा वारस म्हणून घोषित करून तो दिल्लीचा बादशहा झाला. आजमशाहास आपला भाऊ शहा आलमकडून विरोध होणे स्वाभाविक होते. म्हणून मराठयांबरोबर सुरू असलेला संघर्ष थांबवून आज्जमशहा घाईघाईने उत्तरेस रवाना झाला. दिल्लीकडे जात

असताना त्याने झुल्फिकारखानाच्या सल्ल्यावरून ८मे १७०७ रोजी मध्यप्रदेशातील दोराहसराई येथून शाहूची सुटका केली.

शाहू महाराष्ट्रात येताच त्याने मराठी राज्यावर आपला हक्क सांगितला. महाराणी ताराबाईने त्यास विरोध केला. त्यांच्या मते, छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले राज्य संभाजी महाराजांच्या मृत्यूबरोबरच संपुष्टात आले होते. मराठी राज्यावरील शाहूंचा हक्क नाकारून महाराणी ताराबाईने शाहूशी लढा देण्याची तयारी केली.शाहूंची सुटका केल्याने शाहू-ताराबाई यांच्यात पर्यायाने मराठी राज्यामध्ये यादवी सुरू झाली. ताराबाईसूमवेतचा आगामी संघर्ष हा लढयाने न सोडविता सामोपचाराने मिटवावा असा शाहू महाराजांचा प्रयत्न होता. महाराणी तारबाईंनी मात्र लढयाची भूमिका घेतली.तिच्या बाजूने परशुरामपंत प्रतिनिधी,मानाजी जाधव हे मातब्बर सरदार होते. जर शाहूंच्या बाजूने बाळाजी विश्वनाथाने आघाडी सांभाळली. पुणे जिल्हयातील खेड (राजगुरूनगर) येथे झालेल्या लढाईत अचानकपणे ताराबाईंचा सेनापती धनाजी जाधव यांस बाळाजी विश्वनाथाने शाहूच्या बाजूंस वळवून घेतले.परिणामी ताराबाईचा पराभव झाला. ही लढाई १२ ऑक्टोबर १७०७ रोजी झाली. आता मराठी राज्याची सूत्रे शाहूंकडे आली. यानंतर शाहूने सातारा येथे आपली राजधानी बनविली. शाहूंचे आसन स्थिर करणयामध्ये बाळाजी विश्वनाथाने महत्वपूर्ण योगदान आहे.

**बाळाजी विश्वनाथ-**

मबाळाजी विश्वनाथ भटफ मूळचे कोकणातील श्रीवर्धन या ठिकाणचे पूर्वज सासवड येथे आले. सासवड जवळचे गराडे गावची पाटिलकी त्यांच्याकडे होती. शाहू महाराजांना मदत केली म्हणून शाहूंनी त्यास धनाजी जाधवाबरोबर जुन्नर प्रांताचा कारभार पाहण्यास सांगितले. बाळाजीने आपली पात्रता सिद्ध केल्यावर त्यास शाहूंनी १७ नोव्हेंबर १७१३ रोजी पेशवाईची सूत्रे दिली. त्यावेळी बाळाजी विश्वनाथाचे वय ५३ वर्षांचे होते. पेशवेपदी येताच बाळाजी विश्वनाथास शाहूने काही गावांचा सरंजामही दिला. पेशवेपद मिळताच बाळाजीने शाहूचा पक्ष बळकट करण्यास प्रारंभ केला.कान्होजी आंग्रे (मराठी नाविकदलाचे प्रमुख) यांना शाहूकडे आणण्यासाठी त्यांच्याशी संघर्ष करण्याऐवजी चर्चा सामोपचाराने त्यांना शाहूच्या पक्षात आणले.

मराठी राज्यामध्ये या घडामोडी चालू असताना निजाम हा मोगल सरदार दक्षिणेत मोगलांचा प्रतिनिधी म्हणून आला. दिल्नीच्या दरबारामध्ये सय्यद अब्दुला व सय्यद हुसेन या दोन सय्यद बंधूचा प्रभाव वाढू लागला. दोघांनी मोगल वजीर झुल्फिकारखानाचा कायमचा बंदोबस्त करून फर्रूखसियार यास नामधारी बादशहा बनवून सत्ता ताब्यात घेतली. दक्षिणेत निजाम-उल-मुल्क (मूळ नाव चिन किलीचखान)आणि उत्तरेत सय्यद बंधू अशी सत्ताकेंद्रे उभी राहिली. दिल्लीतील सय्यद बंधूचे वजन कमी करण्यासाठी बादशहा फर्रूखसियारने सय्यद हुसेनला दिल्लीमधून दक्षिणेत पाठविले. वास्तविक तो मनापासून तयार नव्हता. मराठयांशी जुळवून घ्यावे असे त्यास वाटत नव्हते.मात्र बादशहा आपणाविरूद्ध जाऊ नये,त्याचा त्रास होऊ नये म्हणून मशंकराजी मल्हारफच्या मराठी सरदारामार्फत त्याने शाहूशी बोलणी केली. बाळाजी विश्वनाथाने ही संधी साधून मोगल बादशाहाशी सय्यद हुसेन अलीमार्फत तह केला. तो मचौथाईचा तहफ या नावाने प्रसिद्ध आहे.

(अधिक माहितीसाठी वाचावे. - गो.स. सरदेसाई,मराठी रियासत, खंड३, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, नवीन संदर्भासह, संपादित केलेली आवृत्ती,पुनर्मुद्रण,२०१०,पृ.१४०-१४२)

**चौथाईचा तह-**

१. शिवाजी महाराजांच्या काळातील सर्व स्वराज्य,संपूर्ण किल्ले शाहूंच्या स्वाधीन करावेत.

२. मराठी सरदारांनी जिंकलेले भूप्रदेश विशेषतःखानदेश, गोंडवन, व-हाड, हैद्राबाद व कर्नाटक या भागातील प्रदेशाचा मालकी हक्क मोगलांनी सोडून द्यावा आणि तो मराठी स्वराज्यामध्ये सामील करण्यात यावा.

३. मोगलांच्या दक्षिणेतील मुलखांवर चौथाई व सरदेशमुखीचे हक्क मराठयांनी स्वतःवसूल करावे. त्या मोबदल्यात आपली १५००० फौज मराठयांनी बादशहाच्या मदतीस ठेवावी. सरदेशमुखीच्या बदल्यात मोगलांचे मुलखात मराठयांनी चोर व उपद्रवींचा बंदोबस्त करावा.

४. शाहूंनी कोल्हापूरच्या संभाजीस उपद्रव देऊ नये.

५. मराठयांनी मोगल बादशहास दरवर्षी दहा लाख रूपये खंडणी द्यावी.

६. शाहूंची आई,व परिवार,संभाजींचा दासीपुत्र मानसिंग जे दिल्लीमध्ये मोगल बादशहाच्या कैदेत आहेत, त्यांना सोडून देण्यात यावे.

इ.स. १७१८ मध्ये हा तह मंजूर करण्यात आला.

**या तहाचे महत्व-**

मोगल बादशहास या तहास मान्यता देणे भाग होते. मराठयांशी हा तह करण्यामागे सय्यद बंधुंचा आपल्याविरूद्ध कट करण्याचा हेतू आहे ही बादशहाची खात्री पटून त्याने सय्यद बंधूंविरूद्ध गुप्तपणे युद्धाची तयारी केली. मराठयांची मदत घेणे म्हणजे आपल्या सैन्यतळाचा ताबाच शत्रूला देणे असा प्रकार होता कारण त्याचवेळी बादशहाने सय्यद बंधूचा पाडाव करण्यासाठी मतुराणीफ पक्षाची मदत घेतली होती. अशावेळी मराठयांनी सय्यद बंधुस मदत करणे मोगल बादशहासाठी चांगली बाब ठरणार नव्हती.

चौथाईच्या तहामुळे मराठयांचा फायदा झाला. महाराष्ट्रामध्ये छत्रपती शाहूंचे वजन वाढले. हा तह करण्यापूर्वी दक्षिणेत कर वसुलीसाठी मोगलांचे तीन अधिकारी येत असत. पहिला अधिकारी बादशहातर्फे येई.दुसरा चौथाईसाठी, तिसरा सरदेशमुखीच्या वसुलीसाठी येत असे. तिघांचा मोठा त्रास मराठी प्रजेस होत असे. तह मंजूर झाल्याने मराठी प्रदेशात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्याची जबाबदारी व प्रदेशाची मालकी मराठयांकडे आली.या तहामुळे शाहू महाराजांचे महाराष्ट्रामध्ये तर मराठा मंडळामध्ये बाळाजी विश्वनाथाचे आणि एंकदरितच मराठयांचे दिल्ली दरबारामध्ये वजन वाढले.

चौथाईचा तह आटोपून सय्यद बंधू बाळाजी विश्वनाथासह दिल्लीस पोहोचले.मराठयांनी १६ फेब्रुवारी १८१९रोजी दिल्नीमध्ये प्रवेश केला.त्यावेळी बाळाजी विश्वनाथासमवेत खंडो बल्लाळ, खंडेराव दाभाडे,उदाजी, केरोजी,तुकोजी पवार हे तिघे पवार सरदार, संताजी भोसले,शेख मिरा,नारो शंकर, बाळाजी महादेव भानू आणि पहिला बाजीराव इत्यादी मराठी सरदार होते.

**दिल्लीमध्ये स्थलांतर–**

मराठे व सय्यद बंधू दिल्लीमध्ये पोहोचताच मोगल बादशहा फर्रूखसियार बादशहाने सय्यद बंधूस विरोध केला. १७१९ च्या फेब्रुवारी महिन्यामध्ये सय्यद बंधूनी व मराठयांनी दिल्लीवर वर्चस्व प्रस्थापित केले.सय्यद बंधूनी मोगल बादशहा फर्रूखसियारला पदच्युत करून त्या जागी रफीउद्दराजत यास, नंतर रफिउद्दोला यास बादशहापदी आणले. या संपूर्ण धामधुमीत मराठी सैन्याची बरीच मोठी हानी झाली.या सर्व धावपळीमध्ये सय्यद बंधूनी दि.१३ मार्च १७१९ रोजी मोगल बादशहाकडून छत्रपती शाहू व हुसेन अली याच्यांमध्ये झालेला तह मंजूर करून घेतला.त्यानंतर २४ मार्च १७१९ रोजी छत्रपती शाहूच्या नावाने तयार करण्यात आलेल्या स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखीच्या सनदांवर सय्यद बंधूनी मोगल बादशहाकडून शिक्कामोर्तब करून घेतले. अशा प्रकारे बाळाजी विश्वनाथाची दिल्ली मोहिम यशस्वी होऊन मराठयांना ऐतिहासिक सनदांची प्राप्ती झाली. तत्पूर्वीच येसुबाई व मोगलांच्या कैदेतील मराठी सरदारांची सुटका होऊन ही मंडळी महाराष्ट्रात येऊन दाखल झाली होती.

दिल्लीमध्ये मराठयांची जी हानी झाली होती; त्याबद्ल बाळाजी विश्वनाथाने सय्यद बंधूकडून बरीच मोठी रक्कम वसूल केली.मोगल बादशहाने संताजी भोसले याच्या भावास मसवाई संताजीरावफ्हा किताब दिला.शाहूने बाळाजी महादेव भानू याचा मुलगा जनार्दन व भाऊ रामाजी यांना मवाकसईफ्गावाचे गाव इनाम दिला. बाळाजी विश्वनाथास रांजणगाव, कर्डे,निमोण इ. पाच महालांची सरदेशमुखी दिली. स्वराज्य,सरदेशमुखी आणि चौथाईच्या सनदांबरोबरच मराठायांनी दिल्ली मोहिम ख–या अर्थाने फायदेशीर ठरली.

बाळाजी विश्वनाथाने दिल्लीहून सनदा आणल्याची नोंद ममराठयांच्या इतिहासाची साधनेफ, मपेशव्यांची शकावलीफ,खंड २ मध्ये आहे. ती पुढीलप्रमाणे–

‘‘... प्रथम सरदेशमुखी म्हणजे कोठे शेकडा दहा रूपये व साडेबारा रूपयेप्रमाणे वहिवाट आहे, ती राजाचे वतन असें ठरविले.बाकी राहिले बेरजेपैकी चौथाई,बाबती राजाचा हक्क ठरविला.बाकी तीन हिस्से राहिले त्यास मोकासा असे नाव ठेविले. याशिवाय साहोत्रा व नाडगौकी हे हक्क राजाचे होते, त्यापैकी साहोत्रा पंतसचिव यास दिल्हा, नाडगौकी दुसरे कोणास दिल्ही.आता चौथाई *मोकास वगैरे वजा होऊन बाकी राहिले यांत फौजदारी एक हक्क, बाकी दोन हिस्से पातशाही हक्क तो सरकारचा असे ठरविलेः तो जहागीर अंमल असे पुढे म्हणू लागले......*’’

चौथाई ,सरदेशमुखी सनदांचे महत्व–

या सनदा मिळविल्याने मराठयांच्या इतिहासाला नवे वळण लागले. सनदांमुळे शाहू हा ख–या अर्थाने मराठी राज्याचा स्वामी झाला. दक्षिणेतील सहा मोगली सुभ्यांमधून मराठयांना चौथाई व सरदेशमुखीच्या वसुलीचे अधिकार मिळाले. दक्षिणेत मराठयांचा प्रभाव वाढला, मराठा राज्याची आर्थिक परिस्थिती सुधारली.दक्षिणेतील मराठयांचे स्वामित्व मोगल बादशहाने एक प्रकारे मान्यच केले होते. मात्र या सनदा प्राप्त केल्याने मराठयांना काय मिळाले याविषयी त्र्यंबक शंकर शेजवलकर यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे. ते पुढीलप्रमाणे–

*"या स्वारीसंबंधाने मराठयांच्या राज्यघटनेच्या दृष्टीने एवढेच लक्षात ठेवावयाचे की, मबाळाजी विश्वनाथाने ज्या स्वराज्याच्या सनदा आणल्या,त्या मसाम्राज्यांतर्गत स्वराज्याच्याफ म्हणजे इंग्रजी भाषेत म डोमिनिअन स्टेटसूफच्या सनदा होत्या. शाहूचा वकील सेवक म्हणून बादशहाच्या दक्षिणेतील प्रतिनिधीस म्हणजे निजामास मोठया अदबीनें अर्ज करून चौथाई-सरदेशमुखीचे हक्क मिळविताना दिसतो."*

एका अर्थाने मराठयांनी दक्षिणेत मोगलांचे राज्य कायम काण्यास मान्यता दिली. शाहूने आपले स्वतः चे नाणे पाडले नाही. पेशवाईतील सर्व रूपये मोगल बादशहाच्या नावाने वर फार्सी अक्षरे कोरून पाडण्यात येत असत. पेशव्यांच्या मनात हे मांडलिकत्व झुगारून देण्याची कृती करावी असे वाटले नाही. एका अर्थाने सनदांमुळे मराठी राज्याचा पायाच उखडला गेला. मराठयांच्या पदरी मांडलिकी आली.

**सनदांचे मूल्यमापन-**

या सनदा कोणत्या परिस्थितीमध्ये मिळविल्या तिचे भान मूल्यमापन करताना ठेवणे आवश्यक आहे. शाहू महाराष्ट्रात आला त्यावेळी मराठी राज्याचा बहुतेक भूभाग कोल्हापूरकरांच्या नियंत्रणाखाली होता. आपली सत्ता सुरक्षित राहण्यासाठी,संभाजीचा विरोध मोडून काढण्यासाठी सनदांचा आधार घेणे शाहूस क्रमप्राप्त होते.स्वराज्याच्या सनदेमध्ये सोळा परगण्यांचा आणि दक्षिणेतील शिवाजीने जिंकलेल्या प्रदेशाचा उल्लेख आला ते परगणे एकसंघ नसून तुटक- तुटक होते. ते सर्व एकसंघ करण्यासाठी सनदा आवश्यक होत्या. म्हणून सनदांबाबत शाहू व बाळाजी विश्वनाथास दोष देणे योग्य ठरत नाही. सनदांमुळे मिळालेले प्रांत-

चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा बाळाजी विश्वनाथाने दिल्लीहून आणल्या.त्या मोगल बादशहा महंमदशहाच्या नावाने लिहिलेल्या असून त्या साताराच्या महाराजांच्या प्रशासकीय दप्तरामध्ये ठेवल्या होत्या. या सनदा जेम्स् कॅनिगहॅम ग्रॅंट डफने पाहिल्या होत्या. स्वराज्याच्या सनदेत मराठयांना दिलेले प्रांत पुढीलप्रमाणे-

१. पुणे २. बारामती ३. इंदापूर ४. वाई ५. मावळे ६. सातारा ७. कसराबाद (क-हाड) ८. खटाव ९. माण १०. फलटण ११. मलकापूर १२. तारळा १३. पन्हाळा १४. आजरा १५. जुन्नर १६. कोल्हापूर, कोप्पल, गदग, हल्याळ, तुंगभद्रा

नदीच्या उत्तरेकडील परगणे, शिवाजी महाराजांनी जिंकलेले सर्व किल्ले, कोकण व कोकणातील रामनगर, गणदेवी, जव्हार, चौल,भीमगड, भिवंडी, कल्याण, राजापुरी ,दाभोळ, जावळी, राजापूर,अंकोला व कुडाळ इ. अशा प्रकारे सहयाद्रीच्या पूर्वेस व पश्चिमेस बागलाणपासून कोंडयांपर्यंतचा भूप्रदेश, या भूप्रदेशाच्या प्रसारास मस्वराज्यफअशी संज्ञा मिळाली.

## ५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न-

१. बाळाजी विश्वनाथाची दिल्ली स्वारी.

.............................................................................................

.............................................................................................

.............................................................................................

२. चौथाई व सरदेशमुखींच्या सनदांमुळे कोणता व कसा फायदा झाला.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

३. स्वराज्याच्या सनदांप्राप्तीमुळे शाहूस कोणत्या प्रदेशांची प्राप्ती झाली.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

४. ऐतिहासिक सनदांचे मूल्यमापन तुमच्या शब्दांमध्ये लिहा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

५. सनदांविषयीच्या इतिहासकार त्र्य.शं शेजवलकर यांचे मतप्रयोग लिहा.

.................................................................................................

.................................................................................................

.................................................................................................

## ५.४ सारांश–

औरंगजेबाच्या निधनानंतर मराठयांचे मोगलांशी अनेक वर्ष चालू असलेले मस्वातंत्र्ययुद्धफ संपुष्टात आले. मोगल बादशहाने कैदेतून शाहूंची सुटका केली. शाहूने बाळाजी विश्वनाथाच्या मदतीने आपले आसन पक्के केले.बाळाजी विश्वनाथ अनेक मराठी सरदारांसह दिल्लीस गेला. मोगल बादशहाकडून स्वराज्य, चौथाई व सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. मराठयांना दक्षिणेतील मोगली सुभ्यांमधून चौथाई व सरदेशमुखी वसुलीचे हक्क मिळाले. शाहू–ताराबाई संघर्षामध्ये आपोआपच शाहूचे आसन स्थिर होऊन शाहूच खरा मराठी राज्याचा वारस ठरला. बाळाजी विश्वनाथाने आणलेल्या या सनदा सातारा येथे छत्रपतींच्या प्रशासकीय दप्तरामध्ये ठेवल्या होत्या. जेम्स् कॅनिंगहॅम ग्रॅट डफने त्या पाहून लिखाणात त्यांचा आधार घेतल्याची नोंद आहे. या सनदांवर कितीही आक्षेप घेतला किंवा त्यामुळे आपण स्वातंत्र्य गमावून बसलो असे म्हटले तरी त्या सनदा ज्या परिस्थितीत मिळविल्या त्याचा विसर पडता कामा नये.

## ५.५ पारिभाषिक शब्द–

१. सनद – गावावर किंवा महालांवर दिलेले अधिकारपत्र.

२. फर्मान – बादशाही सही शिक्क्यांचे अधिकृत आज्ञापत्र.

३. सनदपत्र – इनाम दिल्याचे सही शिक्क्याचे पत्र.

४. चौथाई – चौथाई ही युध्दापासून निर्माण झालेली मराठी राज्याच्या

उत्पन्नाची एक महत्वाची बाब होय. मचौथफ्याच उत्पन्नाच्या १/४ असा आहे.

५. सरदेशमुखी – सरदेशमुखी ही स्वराज्यातून जो सरकारी महसूल वसूल केला जात असे त्याच्या १/१० रक्कम ही राजाकडे खाजगी तिजोरीत वैयक्तिक खर्चांसाठी जमा केली जात असे.

## ५.६ संदर्भ सूची


१. कुलकर्णी अ.रा. १९९७, शिवकालीन महाराष्ट्र ,राजहंस प्रकाशन, पुणे.

२. सरदेसाई गो. स. २०१०, मराठी रियासत, खंड ३, पॉप्युलर प्रकाशन, मुबंई, दुसरी आवृत्ती, पुनर्मुद्रण.

३. शेजवलकर त्र्य. श, १९६३, निजाम- पेशवे संबंध, प्रका. पुणे विद्यापीठ, पुणे.

४. खोबरेकर वि. गो, १९८८, महाराष्ट्राचा इतिहास-मराठा कालखंड, भाग२, १७०७ १८१८, प्रका.महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुबंई.

५. कुलकर्णी म.रा. १९९१, मोडी लिपी परिचय आणि ऐतिहासिक नमुना पत्रे, प्रका. भारतीय इतिहास संकलन समिती, पुण.

६. अ.रा. कुलकर्णी, ग.ह. खरे (संपा.),१९८५, मराठयांचा इतिहास, खंड २, प्रका. कौन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

७. अत्रे त्रि. ना., १९८९, गाव-गाव,प्रका. वरदा बुक्स्,पुणे.

# घटक ६

# सामाजिक परिस्थिती

**अनुक्रमणिका**


**६.0 उद्दिष्टे**

**६.१ प्रस्तावना**

**६.२ विषय- विवेचन**

**६.२.१ ग्रामीण सामाजिक रचना**

**६.२.२ जाती आधारित सरंजामदारी, स्त्रियांची स्थिती, शिक्षण**

**६.३ स्वयं अध्ययन प्रश्न**

**६.४ सारांश**

**६.५ पारिभाषिक शब्द**

**६.६ अधिक वाचनासाठी पुस्तके.**


## ६.0 उद्दिष्टे-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला-

१. मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाजरचना अभ्यासता येईल.

२. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या समाजरचनेची वैशिष्टये समजतील.

३. यादव,बहमनी राजवटींमधील सामाजिक परिस्थितीचे ज्ञान होईल.

४. अहमदनगरच्या निजामशाही राजवटीतील स्त्रियांच्या सामाजिकतेविषयी माहिती मिळेल.

५. मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये शिक्षणपद्धती कशी होती ते समजून घेता येईल.

६. चांदबिबीच्या कार्याची ओळख व त्याविषयी माहिती घेता येईल.

७. मराठेव पेशवेकालीन स्त्रियांची परिस्थिती अभ्यासता येईल.

## ६.१ प्रस्तावना-

मध्ययुगीन महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीची मांडणी करण्याचे काम ऐतिहासिक दृष्टया गुंतागुंतीचे आहे. महाराष्ट्रामध्ये इस्लाम धर्माचे झालेले आगमन,अल्लाउद्दिन खिल्ली व मलिक काफूर यांच्या स्वा-या,इस्लाम धर्माचाउ धर्मप्रसार, त्यासाठी इस्लामी राज्यकर्त्यांनी दिलेला पाठिंबा, महाराष्ट्रातील संतांचे कार्य, छत्रपती शिवाजीमहाराजांनी स्थापन केलेले स्वराज्य अर्थात मराठी सत्तेचा उदय, तिचा जीवितहेतू, पेशव्यांची राजवट, या सर्व

राजवटींमध्ये असलेले स्त्रियांचे स्थान, समाजातील प्रचलित जातीव्यवस्थेची चौकट, ग्रामीण समाजजीवन, समाजाचे शिक्षण, शिक्षणपद्धती इत्यादी एक- एक घटक टप्याटप्याने आपण या प्रकरणात विस्ताराने पाहणार आहोत.

## ६.२ विषय-विवेचन

### ६.२.१ मध्ययुगीन महाराष्ट्रः समाजरचना-साधने.

महाराष्ट्राच्या इतिहासाविषयी मराठी व इतर भाषांमध्ये विविध प्रकारे लेखन झाले आहे. मात्र मध्ययुगीन महाराष्ट्राविषयीचे इ.स. १३००-१६०० या कालखंडावर प्रकाश टाकणारे लिखाण फारच कमी प्रमाणात आहे.महाराष्ट्राच्या इतिहास-संशोधनाची सुरूवात मुलतः मराठयांच्या इतिहास-संशोधनाने झाली. म्हणजेच इ.स.१६०० पासून पुढचा इतिहास आपणास ज्ञात होतो. वुस्लेकृत 'केंब्रिज हिस्ट्री ऑफ इंडिया', एच.के. शेरवानी यांचा 'बहमनी ऑफ दि डेक्कन', भ.ग. कुंटेकृत, 'बहमनी साम्राज्याचा इतिहास' या अनुवादित ग्रंथामध्ये मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाची माहिती मिळते. रियासतकार गो. स.सरदेसाईकृत, 'मुसलमानी रियासती'मध्ये, त्याचप्रमाणे अ.रा.कुलकर्णीकृत 'मराठयांचा इतिहास', 'शिवकालीन महाराष्ट' इ. ग्रंथांमधून आपणास माहिती मिळते. त्रिबंक नारायण अत्रे यांचे 'गावगाडा'हे पुस्तक ग्रामीण जीवनाचे उकृष्टपणे चित्रण करणारे आहे.

इ.स.चौदाव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात इस्लाम धर्माचा फार मोठया प्रमाणात प्रसार झाला नव्हता.इ.स.१३४७ मध्ये बहमनी साम्राज्याची स्थापना झाली. त्यामुळे इस्लाम धर्मप्रसारास काही प्रमाणात चालना मिळाली.या कालावधीत सुफी पंथीयांचे योगदानही धर्मप्रसार व समाजजागृतीच्या क्षेत्रात महत्वपूर्ण आहे. येथून पुढे महाराष्ट्रात सामाजिक स्थित्यंतराची वाटचाल सुरू झाली.

यादवकालखंडामध्ये त्यांची प्रशासकीय यंत्रणा भक्कम व विस्तिर्ण होती. त्यांच्या प्रशासनामध्ये 'देश'हा घटक सर्वात मोठा, तर त्याचे उपविभाग 'खंपण', 'मंडल', आणि 'ग्राम'हे होते. खेडी किंवा ग्रामामध्ये ग्रामपंचायत अथवा जातपंचायत अस्तित्वात होती. त्यावेळी जातीव्यवस्थेची पालेमुळे समाजात घट्टपणे रूढ होती. ग्रामीण भागात ती अधिक प्रमाणात असल्याच्या नोंदी पहावयास मिळतात.

**ग्रामीण समाजरचना-**

महाराष्ट्राच्या मध्ययुगीन इतिहासामध्येही त्यावेळी चातुर्वर्णांची पद्धत रूढ होती. विविध जातींचे लोक आपआपल्या जातींचा परंपरागत व्यवसाय करताना दिसून येत होते.समाजातील जातीयतेची पारंपरिक चौकट बदलविण्यासाठी, जातीव्यवस्था मोडकळीस आणण्यासाठी विशेषत्वाने प्रयत्न केले. समता प्रस्थापित करण्याचा संतांचा हा प्रयत्न चांगला असला तरी त्यास काही मर्यादा पडल्याचे दिसते. समाजामध्ये व्यवसायानुसार 'बलुतेदारी पद्धत' अस्तित्वात होती. अगदी सतराव्या शतकापर्यंत सामाजिक- आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू 'खेडे' होते. खेडे, वाडी, मौजा, पाडी, किंवा पाडा कसबा म्हणजे कसबी लोकांचे गाव, हे सर्व शब्दप्रयोग गावाशी संबंधित होते. गावातील समाजाचे जमीन

हेच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन होते. गावामध्ये प्रामुख्याने चार प्रकारच्या धर्मसत्ता अस्तित्वात होत्या. त्यात प्रामुख्याने दिवाणसत्ता, गोतसत्ता, धर्मसत्ता आणि व्यापारी सत्ता यांचा समावेश होतो. दिवाणसत्तेमध्ये प्रशासनामधील हवालदार, कारकून,तर गोतसत्तेमध्ये गावातील ग्रामाधिकारी, वतनदार अधिकारी, बलुतेदार इ.चा समावेश होता. धर्मसत्तेमध्ये धार्मिक करणारांचा समावेश होता. हवालदाराचे काम फौजदाराचे, अशी प्रत्येकाच्या कामाची विभागणी होती.

गावामध्ये वंशपरंपरागत अधिकार असलेलाही वर्ग होता. त्यांना सरकारी कामाच्या मोबदल्यामध्ये जमीन वंशपरंपरेने मिळत असे. जमिनीच्या उत्पनामध्ये काही विशिष्ट प्रकारचे हक्क मिळत असत. त्यांना जमिनीवरील शेतसाराही माफ केला जाई; काहींची गणना वतनदारांमध्ये होत असे. गावामध्ये प्रामुख्याने देशमुख, देसाई, देशपांडे, महार इ.चा समावेश देशकांमध्ये होत असे. वतनदार हा आपल्या गावाचा चाकर असे. पाटील व कुलकर्णी गावातील परंपरागत अधिकारी होते. कुलकर्णी हिशेबाचे काम, तर पाटील गावाचा वसूल झालेला शेतसारा कचेरीत भरत असे. वंशपरंपरेने गावामध्ये मिरासदारांनाही जमीन होती. मात्र त्यांना सरकारी कर द्यावा लागत असे. गावातील पडीत जमीन लागवडीखाली आणणे हे काम पाटलाचे होते. गावातील या वंशपरंपरागत अधिका-यांना स्वतंत्र हाकलजिमे, मानपान असत. काही वेळा त्यांच्या हाताखाली इतर वर्गातील माणसेही असत. उदा. गावामध्ये पाटलाच्या मदतीसाठी चौगुला हा अधिकारी होता.गावातील पेठेची जबाबदारी 'शेटे'हा अधिकारी पाहत असे. देशमुख हा पाटलांचा नायक तर देशपांडे हा कुलकर्ण्यांचा प्रमुख होता.या सर्वांच्या माध्यमातून गावचा कारभार चोखपणे चालत असे.

**बलुतेदारी पद्धती-**

बलुतेदारांमध्ये गावकामगार,गावचे वतनदार, आणि मिरासदार यांच्यानंतरचे गावचे मानकरी म्हणजे गावचे बलुतेदार होय.बलुतेदारांची गावाच्या प्रगतीमध्ये महत्वपूर्ण भूमिका असे. बलुता म्हणजे गावचे कारागीर, आणि सेवक यांच्या उदरनिर्वाहासाठी गावाने दिलेला मोबदला होय. त्या मोबदल्यात त्यांची मजुरी आणि त्यांचे हक्क इ.चा. समावेश होत असे. बलुतेदारांमध्ये कारागीर, व्यावसायिक, सामान्य सेवक वर्ग, धार्मिक सेवा करणारा वर्ग, याशिवाय आलुतेदारांचाही एक वर्ग होता.या वर्गाची सेवा प्रसंगानेच घेतली जात असे.

थोडक्यात वतनदार, मिरासदार,बलुतेदार आणि उपरी या सर्वांचा मिळून ग्रामीण समाज बनला होता.हा प्रत्येक घटक गावाच्या योगदानासाठी तयार राहत असे.

*** जातियता-**

मध्ययुगीन महाराष्ट्रीय समाजामध्ये ब-याच जाती,उपजाती, त्यांच्या उपशाखा अस्तित्वात होत्या. माणसांच्या वास्तव्याचे ठिकाण, वंश, पंथ, व्यवसाय, अनेक कारणांवरून जाती व उपजाती अस्तित्वात आल्या होत्या.प्रत्येक जात, उपजात हा मर्यादीत घटक झाला होता. समाजाची विभागणी तुकडयांमध्ये झाली होती. प्रत्येक जाती-जमातींची स्वतंत्र गोतसभा होती. छत्रपती शिवाजीमहाराजांनी मोठया कौशल्याने विविध जाती-जमातींना एकत्र करून सेवेत सामावून घेतले होते. उदा. किल्ल्यांच्या कारभारामध्ये मराठा, ब्राम्हण, कायस्थ, प्रभू,महार, मांग, ठाकर, रामोशी यांना नियुक्त केले होते.

मुस्लिम समाजामध्येही विविध पंथभेद होते. शिया, सुन्नी, परदेशी मुस्लिम व एतद्देशिय मुस्लिम असे वर्ग तयार झाले होते. समाजातील कनिष्ठ जातींप्रमाणे स्त्री देखील मध्ययुगामध्ये उपेक्षितच राहिली होती. कित्येक जातींना महाराष्ट्राचे आराध्य दैवत पंढरपूरच्या विठोबाच्या मंदिरामध्ये प्रवेश नव्हता. यासाठी साने गुरूजींनी सत्याग्रह केला ही बाब सर्वत्र ज्ञात आहे.

पेशवेकाळातही आपआपसातील अन्नोदकसंसर्ग, असंगसंगती, पंक्तिपावनत्व या समस्यांना मोठाच जोर चढला होता. त्याची व्याप्ती जाती-पोटजातींमध्ये पसरली होती. आपली जात इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे असे प्रत्येक जातीचे विचार असत. पेशवे स्वतःच बाम्हण असल्याने ब्राम्हणांना समाजात अग्रक्रम होता. या वर्गाने आता समकालीन राजकारणामध्येही भाग घेण्यास सुरूवात केली होती. ज्या जातीचे राज्यकर्ते असतात; त्या जातीचे समाजामध्ये प्राबल्य असते ही बाब सत्यच आहे. म्हणून उत्तर पेशवेकाळामध्ये ब्राम्हण वतनदारांचे महाराष्ट्रामध्ये वर्चस्व असल्याचे दिसून येते. एका अर्थाने ब्राम्हण सरंजामदारांचे प्राबल्य होते. पेशवे ब्राम्हण, छत्रपती मराठे, त्यातही पेशवे कोकणस्थ, त्यामुहे स्थानिक पातळीवर देशस्थ-कोकणस्थ,असा सुप्त वाद निर्माण होऊ लागला असल्याचे दिसते. प्रभू विरूद्ध ब्राम्हण असाही सामाजिक संघर्ष होता. हा सर्व वाद स्थानपरत्वे श्रेष्ठत्वासाठी होता.

मराठा समाजामध्येही महाराष्ट्रात मराठे स्वतःस शहाण्णव कुळी व क्षत्रिय समजत असत. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या कालावधीमध्ये समाजामध्ये मराठयांना मानाचे स्थान प्राप्त झाले होते. या समाजात मराठे व कुणबी या दोन शाखा असून दोघांमध्ये सामाजिकदृष्टया मोठी तफावत होती. मराठयांना वतनदारीतील पदे प्राप्त होत असत. कुणबी वर्ग शेती व सैनिकी दोन्ही ठिकाणी कार्यरत होता.

समाजामध्ये अन्य जातींमध्ये प्रामुख्याने कुंभार, सोनार, सुतार, शिंपी, धनगर तेली, न्हावी, माळी, गोंधळी, गुरव,लिंगायत, महार, मांग, चांभार, कोळी, रामोशी, ठाकर, भिल्ल, इत्यादी विविध जातींचा समावेश होता. कुंभारांमध्ये मराठे कुंभार, गुजराती कुंभार, अहिर किंवा लहान चाके घडविणारा, सुतारांमध्ये राजे सुतार, न्हाव्यांमध्ये वाजंत्री व मशालजी,तेली समाजात एक बैल व दोबैल, शिंपी समाजात नामदेव, शिंपी,भावसार शिंपी, मराठा शिंपी व अहिर शिंपी इ., सोनारांमध्ये पांचाल हे इतरांपेक्षा श्रेष्ठ मानीत. माळी समाजामध्ये फुलमाळी,जिरे माळी, हळदेमाळी, धनगरांमध्ये हटकर व काटकर, खुटकर म्हणजे घोंगडी विणणारे, मेंढया घेऊन फिरणारे, या जातींशिवाय वडार,बेलदार, दगडी घडविणारे, कैकाडी,पारधी, इ. जातींही समाजामध्ये होत्या. महार, चांभार, मांग या जातींमध्येही उपजाती होत्या.

या सर्व जाती-जमातींमध्ये अनेक पोटजाती मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये समाजात अस्तित्वात होत्या.आज आपण आधुनिक युगामध्ये, त्याचप्रमाणे भारतीय संघराज्यामध्ये धर्मनिरपेक्ष जीवनपद्धतीने वावरत आहोत.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतास 'स्वतंत्र राज्यघटना' दिली आहे. न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता यावर आधारीत आता धर्मनिरपेक्ष समाज मान्य आहे. या लेखामध्ये नमूद केलेली जातींची नावे ही मध्ययुगीन महाराष्ट्राच्या समाजरचनेची माहिती सांगणारी आहेत ही बाब वाचकांनी लक्षात घेणे गरजेचे आहे.

६.२.२ सरंजामशाही–

'सरंजामशाही'हा शब्द मध्ययुगीन पश्चिम युरोपातील राजकीय, सामाजिक, आर्थिक व लष्करी व्यवस्था प्रणालीचे दिग्दर्शन करणारी एक व्यापक शब्द आहे. मराठी भाषेमध्ये 'सरंजामशाही' शब्दास 'सामंतशाही'असाही शब्द प्रचलित आहे. जमीन महसूल गोळा करण्यासाठी उच्चभ्रु वर्गाने करार पद्धतीने पोटजहागिरदारांना मोकासा किंवा सरंजाम म्हणून जमीन दिली किंवा देण्याची प्रथा होती. इंग्रजी शब्द 'फ्यूडॅलिझम' हा सरंजामाशी निगडीत आहे. मूळ 'लॅटिन'शब्द 'फिओडम' Feodumपासून फ्यूडॅलिझम हा शब्द तयार झाला. Feodum हा शब्द शब्दार्थाने गुरे–ढोरे व घोडे– जमीन ही जंगम संपत्ती अशा अर्थाचा आहे. सरंजामशाही पद्धतीमध्ये प्रामुख्याने लष्करी व राजकीय सेवा अभिप्रेत होती.

भारतातील सरंजामशाहीचे स्वरूप प्रामुख्याने जमिनीच्या आर्थिक व्यवहाराशी निगडीत होते. वतनदार व कुळ हे दोन घटक या व्यवस्थेमध्ये होते. या दोघांचे संबंध वंशपरंपरागत चालत असत. भारतात अथवा महाराष्ट्रामध्ये सरंजामशाही व्यवस्था वतनसंस्थेमधून उदयास आली. महाराष्ट्रात १२०७–१७०७ या कालखंडात वतनसंस्था दृढ झाली होती.महाराष्ट्रात बहमनी साम्राज्यामध्येही ही पद्धती अस्तित्वात होती. पुढे पेशवाईपर्यंत ती क्रमशः चालत होती. छत्रपती शिवाजीमहाराजांच्या राजवटीत त्यांनी वतनपद्धती ऐवजी वेतनपद्धती राबविण्याचा प्रयत्न केला. यामुळे सामान्यांना मोठा दिलासा मिळाला. मात्र राजारामांच्या कालावधीत परिस्थितीची गरज म्हणून त्यांना वतनदारी पद्धतीचे पुनर्रूज्जीवन करावे लागले. छत्रपती शाहू महाराजांच्या कालावधीत एखाद्या सरदाराने नवीन प्रदेश जिंकून घेतला की,तो त्यास जहागीर म्हणून दिला जात असे. पेशवाईत या कृतीमुळे मराठी राज्याचा विस्तार झाला तरी सरंजामीवृत्तीमुळे मराठी राज्य एकसूत्री राहिले नाही.

महाराष्ट्रातील सरंजामशाहीचे वैशिष्टय म्हणजे ब्राम्हणांना देण्यात आलेल्या इनाम जमिनी म्हणजेच अग्रहार होय. जमीन दान देताना त्यांच्याबरोबर उत्पन्नाच्या सर्व बाबी त्याचप्रमाणे प्रशासकीय, कायदा व सुव्यवस्था राखण्याचे अधिकार देण्यात येत. त्यामुळे जे खेडे त्यास आग्रहार दिले जाई,त्याचप्रमाणे त्या खेडयातील जमीन एक मालकी हक्क असणारा स्वतंत्र आर्थिक घटक (Manor) बनू लागला. खेडयातील पाटील, मोकदम अथवा गौडा हा अधिकारी कुळांना बळजबरीने जमीन कसावयास लावत. खेडयातील ब्राम्हण, पाटील, मोकदम, व्यापारी श्रेणी, जमीनदार, आपआपल्या जागेत जवळजवळ स्वतंत्रपणे वागत. ते प्रसंगी न्यायनिवाडाही करत असत. जमिनदार व कुळ, भूदास यांचे परस्परांमधील संबंध सरंजामी पद्धतींचे होते. सक्तीची मजुरीची पद्धत प्रचलित होती. मध्ययुगीन महाराष्ट्रात या पद्धतीस 'वेठबिगार'पद्धती रूढ होती. धान्यस्वरूपात मोबदला देत असत. हे सरंजामी पद्धतीचे लक्षण आहे.

सरंजामी पद्धतीमध्ये सावकार, व्यापारी या वर्गांना महत्व प्राप्त झाले होते. युरोपमधील Guild's च्या धर्तीवर आपणाकडेही Guild's अस्तित्वात आल्या. प्रसंगी व्यापारी वर्ग आपल्या पैशाच्या जोरावर शासकीय यंत्रणांवर आपला प्रभाव प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत असत.सावकारांचा वर्ग आणि सरंजामंदार शेतक–यांची पिळवणूक करताना दिसतात. सधन व्यापारी वर्ग सरंजामदारांना मदत करताना दिसतो. उत्पादनाच्या क्षेत्रातही सरंजामी मनोवृत्ती स्पष्ट होती. सामान्य कुळांना मजुरीवर लावणे, त्यांचा मोबदला न देता वेठबिगार पद्धतीने राबवून घेत. उत्पादित माल देखील सरंजामी राज्याच्या गरजा भागविण्यासाठी वापरत.मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये सरंजामी व्यवस्थेतील विकासाठी 'उत्पादन'हा घटकही कारणीभूत ठरला होता. सरंजामदार मूदास व कुळांना एक प्रकारे विकतच घेऊ पाहत होते. एकंदरीतच पेशवाइच्या अस्तापर्यंत महाराष्ट्रात सरंजामी पद्धतीची समाजरचना होती.

* मध्ययुगीनः महाराष्ट्रातील स्त्रियांची–

एकोणिसाव्या शतकाच्या आरंभापर्यंत महाराष्ट्रातील स्त्री–जीवन हे मध्ययुगीन सरंजामी चौकटीत बंदिस्त झालेले होते. एकीकडे 'यत्र नार्यस्तु पूजन्ते'.... तर दुसरीकडे 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हती....'अशी विसंगत मनुवादी वृत्ती भारतीय समाजमनाचे पारंपारिक वैशिष्टय होते. महाराष्ट्रही त्यास अपवाद नव्हता.माता आणि पतिव्रता या भूमिकांस स्त्रीचा गौरव करायचा, तिला देव्हा–यात बसवासचे; पण या देव्हा–याचाच तुरूंग बनवायचा, ही गतानुगदिक चलाखी अद्यापही संपलेली नव्हती.चूल आणि मूल यांमध्ये स्त्री–जीवन बंदिस्त होते. मुलीच्या जन्माबाबत स्वागतशीलतेचा अभाव,बालिकाहत्येची समस्या, स्त्री– शिक्षणाला बंदी, बालविवाह, जरठ– बाला विवाह, हुंडयाची प्रथा, वधुपक्षाची पिळवणूक व मानहानी,संमती– वयाचा प्रश्न,बहुभार्यापद्धत, पडदा– पद्धत, सती, केशवपन,विधवा– विवाह बंदी, इ. विविध समस्यांनी स्त्री– जीवन ग्रस्त झालेले होते. पुरूषप्रधान समाजव्यवस्थेमध्ये स्त्री उपभोग्य वस्तू बनली होती.

प्राचीन काळापासून आपल्या कुटुंबातील एक घटक न पाहता 'दुस–या किंवा परक्याचे धन' असे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोण होता. जीवनभर तिच्या हालचालींवर बंधने येत असत. धर्मशास्त्राचा अविवेकी पगडा समाजमनावर होता. लहानपणी मुलगी, लग्नानंतर पत्नी, म्हातारपणी मुलांच्या आज्ञेनुसार वास्तव्य करावे असा अलिखित मात्र चुकीचा संदेश रूढ झाला होता. मुलीच्या जन्माचे स्वागत करण्याची प्रथा नव्हती. एका अर्थाने स्त्रीयांचे जीवन व समाजातील स्थान दुय्यम स्वरूपाचे होते. विधवा स्त्रियांची अवस्था फारच विदारक होती. विविध सामाजिक चालिरीती व बंधनांच्या कचाटयात तिला अडकविले जाई. तत्कालीन महाराष्ट्रच नव्हे तर उत्तर भारतातही स्त्रियांची अवस्था दैनीय होती.

विजयनगर साम्राज्यामध्ये 'गरती'व 'भटक्या'स्त्रिया असा वर्ग होता. सामान्य परिवारातील स्त्रियांची परिस्थिती उच्च वर्गापेक्षा अधिक चांगली असल्याचे दिसते. अमिर उमराव वर्गातील स्त्रियांना प्रसंगी शिक्षण,संगीत,नृत्य,गायन, वादन यांचे धडे घेता येत असत. 'लक्ष्मीनारायण' नावाचा संगीत शिक्षक कृष्णदेवरायाच्या अंतःपुरातील स्त्रियांना संगीत शिकविण्याचे काम करत असे. समाजात बहुपत्नीची पद्धत अस्तित्वात होती. मंदिर संस्थेच्या संदर्भात 'देवदासी',गणिका असलेल्या स्त्रियांचा स्वतंत्र वर्ग होता. सतीची चाल देखील रूढ होती. हुंडा पद्धतीही अस्तित्वात होती.एवढी बंधने असली तरी स्त्रियांनी काही राजवटींमध्ये प्रगती केली असल्याचे दिसून येते. भक्ती संप्रदायात स्वतंत्र अस्तित्व असलेल्या कान्होपात्रा,मुक्ताबाई,जनाबाई, मराठी राज्यामध्ये वीरमाता जिजाऊ, ताराबाई येसूबाई, पेशवाईत आनंदीबाई, अहिल्याबाई होळकर इ.नी आपल्या कर्तृत्वाने महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये स्वतंत्र ठसा उमटविला आहे.

वीरमाता जिजाऊंनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनुपस्थितीमध्ये स्वराज्याचे प्रशासन सांभाळले. ताराबाईंनी मोगलांशी अनेक वर्षे लढा देऊन मराठयांचा स्वातंत्रलढा यशस्वी करून दाखविला. पहिल्या बाजीरावाची पत्नी राधाबाई यांनी गोविंद हरी पटवर्धन या सरदाराला प्रायश्चित करण्यास भाग पाडले. बाळाजी विश्वनाथाची मुलगी अनुबाई घोरपडे हिने इजलकरंजी संस्थानामध्ये भरीव काम केले.तिचे विविध भाषांवर प्रभुत्व होते. दाभाडे घराण्यातील उमाबाई दाभाडे यांनी१७३४ मध्ये अहमदाबादवर स्वारी करून मुघल

सरदार जोरावरखानाचा पराभव केला. राजकारण व रणांगण या दोन्ही क्षेत्रांमध्ये आपले प्रभुत्व गाजविले. अहिल्याबाईंनी इंदोरचा कारभार अत्यंत कुशलतेने हाताळला.इंग्रजांविरूद्ध सर्व मराठे सरदारांनी एकत्र यावे अशा आशयाची तिची अनेक पत्रे उपलब्ध आहेत.कान्होजी आंग्रे यांची पत्नी लक्ष्मीबाई आंग्रे यांना आरमाराचे सखोल ज्ञान होते.

असे असले तरी मध्ययुगीन विविध राजवटींच्या काळातील स्त्रियांची अवस्था म्हणजे एक प्रकारे मवेदनेचा इतिहासफम्हणावे लागते.

*निजामशाहीतील प्रसिद्ध स्त्री 'चांदबिबीनें' मोगलांशी दिलेला लढा इतिहासामध्ये प्रसिद्ध आहे. निजामशाही वाचविण्यासाठी तिने केलेली धडपड व तिचे कर्तृत्व प्रशंसनीय आहे.* शिक्षण–

शिक्षणाचा उदय प्रागैतिहासिक काळात झाला. अगदी प्रारंभी कुटुंब हाच शिक्षणासाठीचा मुख्य आधार होता. कालांतराने मानवी जीवन व्यवहाराच्या कक्षा बदलू किंवा विस्तारू लागल्या. उपजिविकेसाठी शिक्षण असा विचार बदलून अंकज्ञान, वाचन, लेखन यांचे ज्ञान प्राप्त करणे असा शिक्षण विचार पुढे आला. प्राचीन भारतीय शिक्षण प्रारंभी मौखिक पद्धतीचे, धार्मिक चालिरीती, संस्कृतीशी निगडीत होते. वैदिक शिक्षणामधून संस्कृत,भाषा, विचार, तत्वज्ञान आणि अध्ययनपद्धती इ.चा विकास झाला. त्याचप्रमाणे उत्तर वैदिक काळात विविध विद्यापीठे उदा. नालंदा, तक्षशिला, वलभी, विक्रमशिला, मिथिला, नाडिया इ.उदयास आली. भाषा, न्यायशास्त्र, तत्वज्ञान, विविध कला, कौशल्ये इ.चे शिक्षण या विद्यापीठांमधून दिले जात असे.

भारतावर व महाराष्ट्रामध्ये इस्लामी आक्रमणांची सुरूवात झाली आणि प्रस्थापित समाजातील ब–याच यंत्रणा कोलमडू लागल्या. शिक्षण ही खाजगी बाब असून त्याचा राज्यशासनाशी संबंध नाही अशी विचारधारा प्रस्थीपित झाली होती. त्यामुळे शिक्षण विशिष्ट गटांपुरते मर्यादित राहिले होते. इ.स.१४९७ मध्ये 'सोमसौभाग्यकाव्य'हा शिक्षणविषयक ग्रंथ लिहिला गेल्याची नोंद 'ऐन–ए–अकबरी' या ग्रंथामध्ये आली आहे.या ग्रंथामध्ये ज्ञानार्जन, आध्यात्मिक आनंदाची प्राप्ती व्हावी,सामाजिक व आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा व्हावी म्हणून शिक्षण गरजेचे आहे असे उद्दिष्टपर मत प्रतिपादन केले आहे. मध्ययुगामध्ये आजच्या शब्दप्रयोगातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षण हे आचार्यांशी निगडीत होते.खेडयात उपाध्येपण करणा–या व्यक्तीच्या घरीच शिक्षणाची सोय होती.समाज एकत्र येऊन त्यांना आर्थिक मदत करे. प्रसंगी राजा किंवा सरदारांकडून शैक्षणिक काम करणारांना जमीन मअग्रहारफ म्हणून दिली जात असे. महाराष्ट्रात यादव राजवटीमध्ये शैक्षणिक संस्था होत्या. पाटण जि. जळगाव या ठिकाणचा मठ सुबाजी बापूकृत सिध्दांन्तशिरोमणीच्या शिक्षणासाठी प्रसिद्ध होता. यादव राजा रामचंद्रदेव याने आपल्या राजवटीमध्ये अग्रहार दिल्याची नोंद इतिहासामध्ये सापडते.

**✻ अभ्यासक्रम–**

प्रत्येक शैक्षणिक संस्थांच्या ध्येयधोरणाप्रमाणे स्वतंत्र अभ्यासक्रमांची रचना करण्यात आली होती. साधारणतः अभ्यासक्रमामध्ये पौराणिक विषय, विविध शास्त्रे, धर्मशास्त्रे, वेद, उपनिषदे, विविध छंद, नाटके, कालिदासांचे साहित्य, धर्नुविद्या,गणित, वैद्यकशास्त्र,

चरकसंहिता, खगोल व राजनीतिशास्त्र, शिल्प व स्थापत्यकला, विविध प्रकारचे संस्कृत साहित्य इ.त्याचप्रमाणे काही ठिकाणी शांकरभाष्य, सिद्धान्तशिरोमणी,पांतजलीचे योगसूत्र इ.चा अभ्यासक्रमांमध्ये समावेश होता.विशेष म्हणजे शरीर शास्त्राचाही अभ्यास केला जात असे. अभ्यासक्रम शिकविण्याचे माध्यम संस्कृत आणि प्रादेशिक भाषांही होत्या. मुस्लिम राजवटीमध्ये फार्सी भाषेचा प्रभाव होता. फार्सी राजमान्यता पावलेली भाषा होती. १६ व १७ व्या शतकामध्ये फार्सी भाषेतील अनेक शब्द मराठी भाषेमध्ये भाषांतरीत झालेले दिसतात. पुढे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात त्यांनी 'राज्यव्यवहारकोश' बनवून घेतला आणि संस्कृत व प्राकृत भाषांना प्राधान्य दिले.

***शिक्षणपद्धती–**

मध्ययुगामध्ये ज्यास आपण प्राथमिक शिक्षण म्हणतो ते सामान्यपणे कमीत कमी साधनांच्या साहयाने एखाद्या वृक्षाखाली शाळा भरवून दिले जाई.जमिनीवर बारीक वाळू पसरवून लिखाणाचा सराव केला जात असे.शक्यतो पाठंतरावर अधिक भर असे. मोठमोठया आश्रमांमध्ये किंवा प्रसिद्ध विद्वानांच्या घरी जाऊन शैक्षणिक कामकाज चालत असे.बहुतांश विद्वानांकडे किमान १० ते १५ विद्यार्थी असत.अभ्यासक्रम संपल्यावर मौखिक परीक्षा घेतली जात असे.विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या वादविवादांच्या स्पर्धांमध्ये भाग घेण्यास प्रोत्साहन देण्याची प्रथा होती. महाराष्ट्रात पैठण, वाई,गोकर्ण ही प्रसिद्ध विद्या केंद्रे म्हणून उदयास आली होती. शिवकाळात जॉन फ्रायर हा इंग्रज प्रवाशी भारतात आला होता. त्याने गोकर्णला भेट दिल्याची नोंद त्याने प्रवास वर्णनामध्ये केली आहे.

धार्मिक  विद्याकेंद्रे म्हणून मंदिर संस्था व मठ यांचा उदय झालेला होता.या ठिकाणी धार्मिक तत्वज्ञाच्या शिक्षणावर भर होता. त्याचप्रमाणे बहमनी राजवटीत मदरसाही होत्या. प्रसिद्ध विद्वान मुहम्मद गावान याची बिदरची मदरसा प्रसिद्ध होती.त्याचे स्वतःचे हजारो पुस्तकांचे ग्रंथालय होते.

मराठा राजवटीमध्ये पुणे, पैठण, वाई, क–हाड, कोल्हापूर, सांगली, नाशिक ही उच्च शिक्षणाची केंद्र असून तत्कालीन केंद्रामध्ये मोठमोठी ग्रंथालये येथे निर्माण करण्यात आली होती. विविध प्रकारच्या जुन्या दुर्मिळ हस्तलिखितांचा संग्रह येथे करण्यात आला होता. १७४७ मध्ये बाळाजी बाजीराव पेशव्यांने आपल्या ग्रंथालयासाठी भागवताची एक प्रत ४००/– रूपयांना विकत घेतली होती. राघोबादादा व आनंदीबाई यांचा कोपरगाव व नाशिक (आनंदवल्ली) या ठिकाणी मोठा ग्रंथ संग्रह होता. नाना फडणिसाने विविध ग्रंथांची हस्तलिखिते तयार करून घेऊन त्यांचे जतन करून ठेवल्याची नोंद आहे.

अशा प्रकारे मध्ययुगीन महाराष्ट्रात देवालये, आश्रम, अग्रहार व मठ इ.ठिकाणी शिक्षणकेंद्रे होती. शिक्षणपद्धतीचा रोख किंवा भर पारंपरिक अथवा अध्यात्मिक शिक्षणावर होता.स्त्रियांना मात्र अतिशय कमी प्रमाणात शिक्षण दिले जात असे. पारंपरिक शिक्षणासमवेतच सैनिकी शिक्षणावर जास्त भर होता.मात्र ते काही विशिष्ट वर्गांपुरतेच मर्यादित असल्याचे दिसते.पेशवाई संपुष्टात येईपर्यंत अशा प्रकारची शिक्षणाची पारंपरिक चौकट अस्तित्वात होती. ब्रिटिशांच्या आगमनानंतर शिक्षणपद्धतीत बदलांची प्रक्रिया सुरू झाली.

महमूद गवान हा मूळचा इराणी व्यापारी, तो विद्या– कलांचा आश्रयदाता होता.बिदर

येथील त्याचा भव्य मदरसा प्रसिद्ध होता. या टोलेजंग इमारतीमध्ये एक हजार विद्यार्थी व शिक्षकांची व्यवस्था केली होती. या मदरशामध्ये इराण- इराकमधून काही विद्वान येऊन राहिले होते.

## ६.३ स्वयं अध्ययन प्रश्न-

१. सरंजामशाही म्हणजे काय?

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

२. समाजरचनेची साधने कोणती आहे?

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

३. स्त्रियांच्या स्थितीबाबत थोडक्यात लिहा.

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

४. मध्ययुगीन महाराष्ट्रातील शिक्षण पद्धती स्पष्ट करा.

..........................................................................

..........................................................................

..........................................................................

## ६.४ सारांश

या पाठात आपण मध्ययुगीन महाराष्ट्रातील समाजरचना, ग्रामीण जीवन,शिक्षणपद्धती, स्त्रियांचे स्थान या घटकांची माहिती अभ्यासली आहे.

## ६.५ पारिभाषिक शब्द-

१. ग्रामाधिकारी – गावाचा कारभार पाहणारा अधिकारी.

२. कसबा – गावापेक्षा मोठा घटक, बाजार भरत असणारे खेडे, येथे कसबी कारागीरांची वस्ती असे.

३. मौजा – लहान गाव.

४. मदरसा – मुस्लिम बांधवांसाठीचे शिक्षण केंद्र.

५. अग्रहार – ब्राम्हणांना दान दिलेली करमुक्त जमीन.

## ६.६ संदर्भ सूची

१. अ.रा. कुलकर्णी, १९९७, शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे

२. अ.रा. कुलकर्णी, ग.ह.खरे(संपा), १९८५, मराठयांचा इतिहास, खंड,१ ते ३, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.

३. कृ.ना. चिटणीस, १९८२, मध्ययुगीन भारतीय संकल्पनाव संस्था, भाग १ ते ४, प्रका. सौ. रा.कृ.चिटणीस, रामबाग कॉलनी, पुणे.

४. त्रिंबक नारायण अत्रे, १९९५, गाव-गाडा, ह.अ.भावे. वरदा बुक्स्, पुणे

५. अ.रा. कुलकर्णी, २००६, मध्ययुगीन महाराष्ट्र ,डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे.

# घटक ७

# आर्थिक परिस्थिती

## अनुक्रमणिका


७.० उद्दिष्टे

७.१ प्रस्तावना

७.२ विषय विवेचन

 ७.२.१ उद्योग व व्यापार

 ७.२.२ चलन आणि पेढी व्यवसाय

७.३ स्वयंअध्ययन प्रश्न

७.४ सारांश

७.५ परिभाषिक शब्द

७.६ संदर्भ सूची


## ७.०. उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास-

१. मध्ययुगीन महाराष्ट्रातील व्यापार, उद्योग, चलन व पेढीव्यवहारांविषयीची माहिती होईल.

२. मध्ययुगीन महाराष्ट्राच्या आर्थिक परिस्थितीची माहिती मिळेल.

३. मोगल, यादव, बहमनी, निजामशाही, शिक्काळ व पेशवेकाळ, इत्यादी राजवटींच्या कालावधीतील व्यापार, उद्योगधंदे, चलनव्यवस्था व पेढीव्यवहार याविषयींचे ज्ञान मिळेल.

४. चलनपध्दती, टांकसाळी, धातू, नाण्यांचे प्रकार, सावकारी पेढ्या त्यांचे व्यवहार समजून घेण्यास मदत होईल.

५. शिवराई, होन व इतर नाण्यांच्या विविध प्रकारांची अधिक माहिती मिळविता येईल.

## ७.१. प्रस्तावना

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या व्यापार, उद्योग आणि चलनपेढीव्यवहाराचा अभ्यास करण्यासाठी आपणास महाराष्ट्राचा मुस्लिम राजवटींपासूनच्या इतिहासाचा आढावा घ्यावा लागेल. यादवांना पराभूत करून अल्लाउद्दिन खिलीने महाराष्ट्रात म्हणजेच एका अर्थी इस्लामी सत्तेने महाराष्ट्रात पाऊल ठेवले. खिस्ती, मुहम्मद तुघलक, बहमनी, मराठा, मोगल व पेशवा इत्यादी राजवटींच्या कालावधीतील उपरोक्त घटकांची माहिती घेणे आवश्यक

आहे. तत्कालीन महाराष्ट्राच्या व्यापार व उद्योगांमध्ये प्रामुख्याने आयात व्यापारामध्ये चैनीच्या वस्तूंचा समावेश होता. कापड, मसाले, तांबे, अन्नपदार्थ, पारा, अरबी घोडे, मौल्यवान रत्न, मोती, हत्ती इत्यादींची आयात केली जाई. निर्यात करण्यासाठी आपणाकडे ढाक्याचे प्रसिध्द मलमल कापड, विविध प्रकारचे मसाल्याचे पदार्थ, डाळी इत्यादी होते. त्यांची निर्यात केली जात असे. याकाळात महाराष्ट्रात कल्याण, चौल, ठाणे, वसई, दंडाराजपुरी, बांदा, विजयदुर्ग, दाभोळ इत्यादी ठिकाणी बंदरे कार्यरत होती.

शिवकाळात विविध प्रकारचे व्यवसाय होते. अठरा महाल, बारा कारखाने, समाजातील बारा बलुतेदारांचा उत्पादक वर्ग होता. स्थानिक कारागिरांना समाजामध्ये मोठा मान होता. खेडी ही स्वावलंबी किंवा स्वयंपूर्ण होती. मध्ययुगीन खेड्यांतून निरनिराळे व्यवसाय निर्माण झाले होते. शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तू खेड्यातच तयार केल्या जात होत्या. मराठाकालीन स्वयंपूर्ण खेड्यांचे वर्णन शिवभारतामध्ये कवी परमानंदाने केलेले आहे. अत्रे यांनी गावगाडा या ग्रथांमध्ये ग्रामीण उद्योगांवर, जीवनावर प्रकाश टाकला आहे. कसबी कारागिरांचा वर्ग अस्तित्वात होता. मराठा कालखंडातील सामराज या कवीने लिहिलेल्या रूक्मिणीहरण या काव्यामध्ये विविध प्रकारच्या अलंकारांची यादीच दिली आहे. अनेक ठिकाणी व्यापारी पेठा विकसित झाल्या होत्या. महाराष्ट्रात देवगिरी, गुलबर्गा, जामोद, जुन्नर याठिकाणी नाणी छापण्याच्या टांकसाळी होत्या. जुन्नर व कल्याण याठिकाणी व्यापारी उतारपेठा होत्या. व्यापारी माल उतरवून घेणे, दुसऱ्या व्यापाऱ्याच्या गाड्यांवरा माल लादून देणे ही कामे याठिकाणी केली जात असत.

व्यापारी माल वाहून नेण्यासाठी व्यापारी तांडे होते. अहमदनगरच्या निजामशाही राजवटीमध्ये उत्तम व्यापारी मार्ग तयार करण्यात आल्याचे दिसते. व्यापारी मार्गांवर अंतर दाखविणारे मैलांचे दगड म्हणजे आजच्या भाषेत दिशादर्शक दगड आजही पहावयास मिळतात. नाशिक जिल्ह्यातील निंबत, औरंगाबाद जिल्ह्यातील अंतु, यवतमाळ जिल्ह्यातील कळंब, बीड, वर्धा या ठिकाणी व्यापारी मार्गांवरील अंतर दाखविणारे दगड आजही पहावयास मिळतात. या व्यापारी मार्गांवरून व्यापारी तांड्यांची आवक-जावक चालत असे. मुघल साम्राज्यामध्येही व शिवकाळातही अशाप्रकारचे व्यापारी मार्ग होते. शिवकाळ व पेशवाईत कल्याण बंदरातून आलेला माल पैठणापर्यंत पोहेचविण्यासाठी माळशेज घाटाचा मार्ग तयार करण्यात आला होता. पहिला पेशवा बालाजी विश्वनाथ व पहिल्या बाजीरावाच्या काळात याठिकाणच्या व्यापारी जकातीचा मक्ता कसा दिला जात असे याविषयीची वर्णने तत्कालीन ग्रंथात व कागदपत्रांमध्ये आली आहेत. व्यापारी अंतर प्रामुख्याने कोंस या परिमाणामध्ये मोजले जात असे. ग्रामीण भागात पायवाटा व गाडीवाटा अस्तित्वात होत्या. वाहतुकीच्या साधनांमध्ये प्रमुखतः बैलांचा वापर केला जात असे.

संत तुकाराम महाराजांच्या गाथेत व्यापारी माल विषयक एका अभंगाचा आपणास याठिकाणी उल्लेख करता येईल.

**''साखरेच्या गोण्या बैलाचिये पाठी**
**तयासी सेवटी करबाडे''**

यावरून बैलांचा वापर केला जात होता हे अगदी स्पष्ट आहे.

**''मालाचे पै पेटे वाघताती उंटे**
**तयालागी कांटे भक्षावया।।''**

यावरून आपणांस तत्कालीन व्यापाराची माहिती मिळते. आपणास या घटकांमध्ये मोठे व लघुउद्योग, अंतर्गत व परकीय व्यापार, चलन व पेढीव्यवहार या मुद्दांच्या अनुषंगाने माहिती घ्यावयाची आहे. त्याची विभागणी आपण शिवपूर्वकाळ, मराठा कालखंड, पेशवा कालखंड, पेशवा कालखंड, अशी करू या.

## ७.२. विषय विवेचन

### ७.२.१ उद्योग व व्यापार :-

**शिवपूर्वकालीन व्यापार :-**

शिवपूर्वकाल म्हणजे इस्लामी राजवटीमध्ये महाराष्ट्रत कोकण किनारपट्टीवरील बंदरांमधून व्यापार चालत असे. कोकणातील वसई, कल्याण, ठाणे, चौल, दंडाराजपूरी, दाभोळ, संगमेश्वर, मांडला, बांदा व विजयदुर्ग ही ती बंदरे होती. अहमदनगरच्या निजामशाहीच्या अंमलाखाली चौल, दंडाराजपूरी तर आदिलशाहीचा अंमल दाभोळ, संगमेश्वर, विजयदुर्ग व बांदा याठिकाणांवर होता. सावित्री नदीवरील मांडला बंदर व्यापारासाठी प्रसिध्द होते. 'रूंद' नदीच्या मुखाशी चौल बंदर असून डिसेंबर ते मार्च दरम्यान याठिकाणाहून मलबार येथे व्यापारी माल जात असे. निर्यात मालामध्ये मसाल्याचे पदार्थ, सुपारी, नारळ, औषधे, ताडगूळ, मेण, कुरूंदाचा चूर (कुरूंद हा दगडाचा एक प्रकार), हिंगूळ, तांबे या मालाचा समावेश होता. अदिलशाही राज्यामधून शेजारच्या राज्यांना कापड, तांदुळ, बाजरी, तलम कापड व सुती कापड पाठविले जात असे. मांडला बंदरातून मसाले, तांबे, नारळ, सुपारी महाराष्ट्रात पाठविले जात असत. वसिष्ठी नदीवरील दाभोळ हे प्राचीन काळापासून व्यापारासाठी प्रसिध्द होते. रशियन प्रवासी निकितिगीनने १४७५ मध्ये दाभोळ बंदरास भेट दिली होती. दाभोळमध्ये मक्का, एडन, येथून व्यापारी जहाजे येत. देशांतर्गत भागामध्ये दाभोळहून मलबार, खंबायत, दोन इत्यादी ठिकाणी व्यापारी माल पाठविला जात असे. स्थानिक व्यापारासाठी नदीपात्राचाही वापर केला जाई.

संगमेश्वरचा जहाजबांधणीचा कारखाना, विजयदुर्गमधील विड्यांच्या पानांचा व्यापार (याठिकाणचा विड्यांचा पानांचा व्यापार एवढा जास्त होता की, ज्या वाघोटान नदीमधून हा व्यापार चालत असे, तिला विड्यांची नदी असे नांव पडले होते). बांदा बंदरामधून नारळ, मसाले, मिरी, औषधे इतरत्र पाठविली जात.

**प्रमुख बंदरे :-**

**१. चौल :-**

मध्ययुगात चौल बंदरास 'मूर्तजाबाद' असेही म्हणतात. व्यापारासाठी प्रसिध्द गाव. इंग्रज प्रवाशी जॉन फ्रायरने १६७२ मध्ये चौल बंदरास भेट दिली होती. ही दक्षिणेमधील सर्वात मोठी बाजारपेठ होती असे, तो लिहितो, रेशीम व घोड्यांचा व्यापार, त्याचप्रमाणे

नीळ, अफू व्यापारासाठी प्रसिध्द होते. याठिकाणच्या रेशमाचा दर्जा चीनमधील रेशमापेक्षा अधिक चांगला होता. दरवर्षी साधारणपणे चौल परिसरामध्ये ५००० टॅफॅटाचे कापड तयार होत असे. शिवकाळानंतर चौलमधील विणकर मुंबईच्या भिवंडी परिसरात स्थायिक झाले आणि चौलाचे व्यापारी महत्त्व कमी होऊ लागले.

**२. दाभोळ :–**

मराठाकाळात दाभोळ–मुंबई असा व्यापारी मार्ग दळणवळणासाठी प्रसिध्द होता. ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या कागदपत्रांमध्ये दाभोळ बंदर सुरत बंदरापेक्षा अधिक महत्त्वाचे असल्याची नोंद आहे. दाभोळ अंतर्गत व्यापारासाठी प्रसिध्द होते.

**३. कल्याण :–**

कल्याण प्राचीन सातवाहन राजवटीपासून कलियण नावाने व्यापारासाठी उपयुक्त व प्रसिध्द बंदर होते. दक्षिणेतून गोवढकोंडा व केरळ येथून विविध प्रकारच्या मालांनी भरलेली जहाजे कल्याणमध्ये येत. कल्याणहून पैठणपर्यंतच्या भूमार्गाने माल अंतर्गत भागामध्ये पोहोचविला जात असे. कल्याण श्रीमंत व्यापारी पेठही होते. छत्रपती शिवाजीमहाराजांनी कल्याणवर स्वारी केल्याचे उल्लेख आहेत.

**४. भिवंडी :–**

भिवंडीस विणकरांचा व्यवसाय मध्ययुगापासून प्रसिध्द आहे. आजही येथे अनेक हातमाग व्यावसायिक आहेत. १६५७ पासून शिवाजीमहाराजांनी कल्याण व भिवंडीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. त्यांची विविध प्रकारची लहान–मोठी जहाजे भिवंडीच्या खाडीमध्येच तयार करण्यात आली होती.याविषयीचे उल्लेख शिवकालीन–पत्र–सार–संग्रहामध्ये आले आहेत. एपसश्रळीह ऋरलींू ठशलेंवी मध्येही मराठी आरमाराचा उल्लेख विशेषतः भिवंडीच्या आरमारी तळाचा उल्लेख आहे.

**५. राजापूर :–**

अदिलशाहीच्या ताब्यातील राजापूर बंदराचा विकास इतर बंदरांप्रमाणे झाला होता. महाराष्ट्रात अंतर्गत व्यापारासाठी ते प्रसिध्द होते. या बंदरामधून मिरे, वेलदोडे, सुती कापड, सुती धागा इ. चा व्यापार चालत असे. महाराष्ट्राच्या पश्चिम किनाऱ्यावर आपल्या व्यापारी वाढीसाठी फ्रेंच व इंग्रजांनी आपआपल्या वखारी राजापूरमध्ये उभारल्या होत्या. फ्रेंच व्यापारी प्रामुख्याने लोखंड व शिसे यांचा व्यापार करत. ॲबे कॅरेला फ्रेंच प्रवाशी राजापूर बंदरांविषयी लिहितो, 'राजापूरचे तांबडा समुद्र आणि इराणमधील बसरा बंदराशी संबंध होते'. शिवकाळातील राजापूर हे व्यापारी बंदर म्हणून विकसित झाले होते.

**६. वेंगुर्ले :–**

वेंगुर्ले याठिकाणी डचांची व्यापारी वखार होती. येथे जपान, श्रीलंका, इराण, अरबस्थान इ. देशांच्या बंदरांमधून व्यापारी जहाजे माल घेऊन येत. सुती कापड, मिरी, रेशमी कापड, लाख, धान्य इ. पदार्थ निर्यात केले जात असत. गुजरातमधील सुरत बंदरापेक्षा शिवकाळात राजापूर व कोकणातील इतर बंदरांमध्ये माल स्वस्त होता. शिवकाळामध्ये कोकणामधून मिठाचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. बारदेश म्हणजे गोव्यामधून महाराष्ट्रात येणाऱ्या पोर्तुगीजांनी बनविलेल्या मीठावर शिवाजींनी कर बसवून

स्थानिक मीठ उत्पादकांना मोठा दिलासा दिल्याचे उदाहरण प्रसिध्द आहे. याठिकाणी छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीची प्रचिती येते. पोर्तुगीजांनी तयार केलेल्या कमी किंमतीच्या मीठावर संरक्षक जकात आकारून स्वदेशी मीठास संरक्षण दिले. संरक्षण हा शब्द व्यापारी विशेषतः आर्थिक धोरणाच्या संदर्भात युरोपमध्ये ेश्रिळलू ेष ीींशिलींळेप १९ व्या शतकात झाला.शिवाजी महाराजांनी सोळाव्या शतकामध्ये संरक्षक जकातीचा प्रयोग राबविला यावरून त्यांची दूरदृष्टी लक्षात येते. कुडाळचा मराठी सुभेदार नरहर आनंदाऊ यांस याविषयीचे पत्र लिहिले आहे. कोकणातील सर्व एतद्देशिय मीठ उत्पादकांना मीठाच्या भावाविषयी समजावून सांगितले. त्याप्रमाणे अंमलबजावणी करण्यात आली.

**व्यापाराच्या वस्तू :-**

१. मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये अन्नधान्य, मसाल्याचे पदार्थ, विविध प्रकारचे कापड, फळे, इतर बाबींमध्ये पायपोस, छोट्या नावा, फण्या, सुपे, साबण, पलंग, गाद्या इ. संकीर्ण पदार्थांचा समावेश होता.

**२. प्राणी :-**

प्राण्यांमध्ये घोडा, बैल, म्हैस, शेळ्या इत्यादींची आयात-निर्यात केली जात असे. युरोपियन देशांपैकी फ्रेंच, डच, इंग्रज आणि पोर्तुगीज या लोकांचे महाराष्ट्राशी व्यापारी संबंध अत्यंत निकटचे होते.

**वाहतुकीची साधने :-**

मध्ययुगीन कालखंडामध्ये प्रामुख्याने वाहतुकीच्या साधनांमध्ये बैल, उंट, तट्टू, गाढव, बैलगाडी, रेडा, नावा, होडी, अथवा लहान-लहान ओझ्यांसाठी माणसांचा वापर केला जात असे. उदा. पन्हाळ्यावर तोफा ओढण्यासाठी शिवाजी महाराजांनी बैल व रेडे यांचा वापर केल्याची नोंद आहे.

बैलगाड्यांचाही वापर मालवाहतुकीसाठी करत. कोकणामध्ये अंतर्गत वाहतुकीसाठी पडावांचा वापर करत. लहान-लहान गलबते होड्या, विशेषतः नदीपात्रातून वाहतुकीसाठी उपयुक्त ठरत असत. मोठ्या जहाजांमधून मीठाची वाहतूक करत नव्हते. कारण, मीठाच्या वाहतुकीने जहाजे खराब होण्याचा धोका होता. अशाप्रकारे शिवकाळात एकंदरीतच व्यापारउद्यीम चांगल्या अवस्थेमध्ये होता.

**शिवकालीन ग्रामीण उद्योगधंदे :-**

मध्ययुगामध्ये खेडी ही स्वावलंबी अथवा स्वयंःपूर्ण होती असे आजही मानण्याची पध्दत रूढ आहे. ग्रामीण भागात प्रमुख उद्योग म्हणजे शेतीव्यवसाय होय. समाजामध्ये प्रमुखतः सोनारकाम, लोहारकाम, तांब्याची भांडी बनविण्याचा उद्योग, सुतारकाम, कुंभारकाम, विविध लोखंडी व लाकडी शेती उपयुक्त औजारे तयार करणे, विविध प्रकारचे तेलाचे घाणे, मूर्तिकाम करणे, गंधिक म्हणजे सुगंधी द्रव्यांचा व्यापार करणारा वर्ग, बांगड्या तयार करून विकणारा कासारांचा वर्ग असा विविध उद्योगांनीयुक्त समाज अस्तित्वात होता.

विविध कागदपत्रांमध्ये सोन्याच्या अलंकारांचा येत असल्याने सोनाराचा व्यवसाय तेजीत असल्याचे दिसून येते. धनगर समाज घोंगडी विणत असे. हातमागाचा व्यवसाय तेजीत होता. विविध प्रकारच्या कापडाचे विणकामांचे उद्योग होते. मराठा राज्यामध्ये

विविध ठिकाणी बाजारपेठा तयार झाल्या होत्या. व्यापारी पेठा वसविण्याची जबाबदारी शेटे हा अधिकारी तर पेठेचा हिशोब महाजन हा अधिकारी पाहत असे. शेट्यास मदत करणाऱ्या अधिकाऱ्यास 'बिडवई' म्हणत. छत्रपती शिवाजी महाराजांनी रायगड व राजगडावर बाजारपेठा नव्याने वसविल्या. त्यांचे लक्ष राज्याच्या सर्वांगिण प्रगतीकडे असल्याने त्यांनी व्यापार व उद्योगात स्वतः लक्ष घालून आपली ध्येयधोरणे ठरविली. रामचंद्रपंत आमात्यांनी लिहिलेल्या आज्ञापत्रामध्ये शिवाजी महाराजांच्या व्यापारविषयक धोरणांचे प्रतिबिंब दिसून येते.

**पेशवेकालीन व्यापार व उद्योग :-**

पेशवेकाळात महाराष्ट्रामध्ये मसाले, साखर, सुकामेवा इ. पदार्थ युरोपिय व्यापाऱ्यांमार्फत चीन, अफगणिस्तान, इराण देशांमधून आयात-निर्यात करीत.

**बंदरे :-**

कोकण किनाऱ्यावर चौल, राजापूर, दाभोळ, नागोठणा, मालाड, चिपळूण, रत्नागिरी, मालवण इ. मोठी बंदरे होती. तर केलिये, बेलापूर, जंबुसार, बलसार, पेण व पनवेल ही लहान-सहान बंदरेही होती. पेशव्यांनी वसई व साष्टी जिंकून घेऊन तेथे बंदरे विकसित केली. बंदरांच्या आसपास व्यापाऱ्यांना निवासासाठी जागा दिल्या. जहाजबांधणी उद्योगास प्रोत्साहन दिल्याचे दिसते. उदा. अंजनवेल तालुक्यामधील कृष्णाजी विश्वनाथ या अधिकाऱ्यांस नवीन जहाजबांधणीसाठी तीन खंडी लोखंड देण्याचे आदेश मध्यवर्ती अधिकाऱ्यांस पेशव्यांनी दिलेले होते. पेशवेकाळात चहाची भांडी, विविध प्रकारचे साबण, बंदुकीची दारू, शिसे या वस्तू परदेशांमधून आयात करत. समुद्रात संचार करणाऱ्या कोणत्याही जहाजास पेशव्यांचा व्यापारी परवाना घ्यावा लागत असे. अन्यथा ते जहाज आंग्रे जप्त करीत. १७८५ मध्ये मराठी आरमारचा अधिकारी आनंदराव घुलप याने मस्कत येथील नरोत्तम जोशी याचे व्यापारी जहाज जप्त केल्याची नोंद आहे. नानासाहेब पेशव्यांनी १७४४ मध्ये व्यापाऱ्यांपैकी विठोजी कृष्ण कामत, पुंडलिक कामत या दोघांना वसई बंदरामध्ये स्थायिक होण्यासाठी विविध सुविधा दिल्या. यांमधून बंदरांचा विकास होताना दिसतो. त्यांना जकात करांमध्ये ५०% सुट देण्यात आली, निवासासाठी जागा आणि एका खेड्याची खोती देण्यात आली.

**अंतर्गत व्यापार :-**

अंतर्गत व्यापारामध्ये नद्यांमधून लहान नौकांच्या साह्याने चालणारा व्यापार आणि राज्याच्या अंतर्गत भागामध्ये उपयुक्त पदार्थ पोहोचविण्यासाठी भूमार्गाने चालणारा व्यापार अशी विभागणी होती. साधारणतः विविध प्रकारची फळे, मसाल्याचे पदार्थ, दैनंदिन वापरामधील वस्तू, अन्नपदार्थांमध्ये तांदुळ, विविध धान्ये, मासे, मिरची, सुरण, सुकामेवा, विविध प्रकारचे मसाल्याचे पदार्थ, धातूंमध्ये जस्त, तांबे, शिसे आणि कापडामध्ये धोतर, पासोड्या, मलमल, साड्या, शाली, मखमल इत्यादी प्रकारच्या वस्तू आणि पदार्थांचा समावेश होता. मराठी राज्यामधील गोदावरी, प्रवरा, घोडनदी, भीमा व कृष्णा या नद्यांमधून थोड्याफार प्रमाणात जलवाहतूक केली जात असे.

भूमार्गाने किंवा खुष्कीच्या मार्गाने चालणारा व्यापारही महत्त्वाचा होता. पर्वतरांगांमधून जाणारे घाटमार्ग तयार करण्यात आले होते. माळशेज घाट, नाणेघाट, खंबाटकी, फोंडा इ. घाटांमधून वाहतूक चालत असे. घाटमार्गावरील व्यापारी मार्गावर देखरेख करणारा अधिकारी

घाटपांडे होता. घाटपांडे आता आडनांव झाले आहे. घाटपांडे यांस मदतीसाठी मोधवी, पानसरे, पथकदार, बिडवई, गुजर व गुमास्ते इ. अधिकारी होते. त्यांची कामे पुढीलप्रमाणे :-

१. मोधवी - घाटमार्ग सुरक्षित ठेवणे.

२. पथकदार - प्रवाशांना एका चौकीपासून दुसऱ्या चौकीपर्यंत सुरक्षित सोडणे.

३. गुजर - पथकी/ पथकदारास मदत करणे.

४. बिडवई - बाजारपेठेचा अधिकारी. व्यापाऱ्यांची यादी करणे.

५. सरबिडवई - बिडवईकडून काम करून घेणे.

६. गुमास्ता / मुतालिक - हा घाटपांडेच्या हाताखाली काम करणारा शिपाई होय.

पेशवाईमध्ये पुणे हे राजधानीचे प्रमखु शहर होते. पुण्याहून राज्याच्या विविध भागांमध्ये जाणारे रस्ते होते. उदा. पुणे-सातारा, पुणे-उज्जैन, पुणे-अहमदनगर, पुणे-औरंगाबाद, पुणे-बोरघाटमार्गे मुंबई इ. हमरस्त्यांचे जाळे विणण्यात आले होते. रस्तेमार्गानेच टपालसेवाही सुरळीत चालू होती. टपालांमध्ये सरकारी व व्यापारी टपाल असे दोन प्रकार अस्तित्वात होते. टपालव्यवस्थेत सुसूत्रता होती. दिल्ली ते पुणे टपाल पोहोचण्यासाठी २७ दिवसांचा कालावधी लागत असे. सरकारकडून व्यापार व उद्योगांसाठी विविध प्रकारच्या सोयीसुविधा दिल्या जात असत.

भूमार्गे चालणाऱ्या व्यापारासाठी बंजारी, लमाण, बनिया आणि चारण या चार व्यापारी जमाती अनेक संकटांना तोंड देवून व्यापारी माल सर्वत्र पोहोच करीत. त्यांच्याकडे अंगरक्षक ठेवलेले असत. गोसावी समाज व्यापारी तांडे एका ठिकाणाहून दुसऱ्या व्यापारी ठिकाणापर्यंत घेऊन जात असे. महाराष्ट्रामध्ये पुण, सातारा, कोल्हापूर, नाशिक, पैठण, येवला व सोलापूर याठिकाणी व्यापारी केंद्रे उभी राहिली.

**सारांश :-**

अशारितीने मध्ययुगीन महाराष्ट्रात विशेषतः शिवकाळातील व्यापारी धोरण पेशव्यांनी पुढे चालू ठेवले होते. वाहतुक व जकातीविषयीची व्यवस्थित यंत्रणा उभी केली. त्यासाठी आवश्यक तो प्रशासकीय वर्ग तयार करण्यात आला. पेशवेकाळाच्या उत्तरार्धात मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाल्यामुळे पुढील काळात व्यापारविषयक धोरण यशस्वी होऊ शकली नाही.

**अधिक वाचनासाठी पुस्तके :-**

१. अ.रा. कुलकर्णी, एप्रिल १९९७, **शिवकालीन महाराष्ट्र,** राजहंस प्रकाशन, पुणे.

२. अ. रा. कुलकर्णी, ॅ, २००७, **मराठे व महाराष्ट्र,** डायमंड पब्लिकेशन्स्, पुण.

३. कृ. ना. चिटणीस, १९८२, **मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था,** प्रका. रा. कृ. चिटणीस, नवी पेठ, पुणे.

## ७.२.२. चलन आणि पेढी व्यवसाय

**चलनपध्दती :-**

जगभरामध्ये मागील किमान २५०० वर्षांमध्ये अशी एकही प्रौढ व्यक्ती झाली नाही की, ज्याने चलनाचा वापर कधीच केला नसेल. सध्या आपण नाणी, नोटा, क्रेडिट व डेबिट

कार्ड इ. चा वापर आर्थिक व्यवहारासाठी करतो. भारतामध्ये मनाण्यांचाफ वापर व जन्म हा इ. स. पूर्व सहाव्या शतकामध्ये झाला असे मानतात. डॉ. परमेश्वरीलाल गुप्त हे नाण्यांच्या अभ्यासाचे मोठे अभ्यासक, दामोदर धर्मानंद कोसंबी हे देखील, डॉ. दिलीप राजगोर हे नाण्यांचे मोठे अभ्यासक तथा नाणकशास्त्रज्ञ आहेत. नाशिक जवळील अंजनेरी येथील नाणकशास्त्र संस्था महाराष्ट्रात एकमेव अशी संस्था आहे की, ज्याठिकाणी आपणास नाण्यांचा विकासक्रम पहावयास मिळतो. नाण्यांचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. परमेश्वरीलाल गुप्त यांच्या मते, मआहतफ र्पिलहारीज्ञशव लेळपी ही सर्वात जुनी भारतीय नाणी आहेत.भारतात भगवान बुध्द व भगवान महावीर यांच्या काळापासून मदुसरे नागरिकरणाचीफ प्रक्रिया घडून आली. ज्यामध्ये लोह तंत्रज्ञानाचा शेती व लढाईच्या क्षेत्रांमध्ये वापर, मोठ्या नगरांचा उदय, व्यापार कारागिरी विकास, नाण्यांचा जन्म या सर्व प्रक्रिया घडून आल्या. नाण्यांमुळे इतिहासामध्ये विशेषतः आर्थिक इतिहासाच्या क्षेत्रामध्ये महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. मूल्यमापन मूल्यसंचय इत्यादी महत्त्वाच्या आर्थिक कृती नाण्यांमुळे सुलभ झाल्या आहेत.

प्राचीन कालखंडांप्रमाणे मध्ययुगीन नाण्यांचा कालप्रवासही महत्त्वाचा आहे. मध्ययुगीन नाण्यांवर लिपी व मजकूरच दिसतो, चिन्हे दिसत नाहीत. महाराष्ट्रात यादव, विजयनगर, बहमनी, शाही व फारूखी राजघराण्यांची नाणी व त्यांची चलनपध्दती दिसते.

(नाण्यांचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी भेट द्या. Indian Institute of Research in Numismodic studies, p.o. Anjaneri, Nashik)

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या आर्थिक विशेषतः नाण्यांचा अभ्यास करण्यासाठी आपणास यादव, बहमनी, मुघल, बहमनींपासून उदयास आलेल्या शाखा, मराठा कालखंड १६३०-१७०७ व १७०७ ते १८१८ अशा कालखंडांचा अभ्यास करावा लागतो.

**मुघकालीन चलनपध्दती :-**

**मुघलकालीन नाणी :-**

मुघल कालखंडामध्ये प्रामुख्याने सोने, चांदी आणि तांबे या धातूंपासून नाणी पाडली जात असत.

**विजयनगरची नाणी :-**

विजयनगर साम्राज्यामध्ये दक्षिण भारतातील नाणी उत्कृष्टतेच्या शिखरावर पोहोचली होती. विजयनगरच्या प्रमाणभूत सोन्याच्या नाण्यांचे वजन ५२ ग्रॅम एवढे होते. विजयनगरच्या राजा सदाशिवराय (इ. स. १५४२-१५७६) याने 'शिवसाई होन' तयार केला होता. विजयनगरच्या चलनांचा प्रभाव छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार केलेल्या चलनावर होता. विजयनगरच्या नाण्यांवर प्रामुख्याने त्यांची दैवते, वाहने, हत्ती, शंख आणि चक्र त्याचप्रमाणे गण्डभेरूड यांची मुद्रा उमटविलेली असे. देवतांमध्ये प्रमुखतः देवांची युगुले उदा. लक्ष्मी-नृसिंह, उमा-महेश्वर, लक्ष्मी-नारायण इ. काही नाण्यांवर देवतांची वाहने उदा. शिवाचे वाहन नंदी, विष्णूंचे वाहन गरूड, देवीचे वाहन सिंह इ. प्राणी व पक्षी यांच्या चित्रांचा समावेश होता. काही नाण्यांवर हत्ती आणि दुसऱ्या बाजूस राजाची प्रतिमा कोरली आहे. तर काही विशिष्ट नाण्यांवर दोन मुख असलेला गरूड यांची प्रतिमा आहे.

विजयनगर राज्याची प्रारंभीची नाणी हनुमंत राई वराह ही होती. हे सोन्याचे नाणे होते. कृष्णदेवरायाने दैवते आणि वाहन यांची छाप असलेली नाणी प्रचारात आणली. वराह नाण्याची विभागणी प्रताप म्हणजे अर्धा, काटी म्हणजे एक-चर्तुर्थांश, चिन्न म्हणजे एक - अष्टमांश, पण म्हणजे एक-दशांश आणि हाग म्हणजे एक - चाळीशांश भाग. ही सर्व सोन्याची नाणी होती. अब्दुल रझ्झाक व डेमिंगो पेईस या परकीय प्रवाशांनी विजयनगरच्या विविध नाण्यांची आणि आर्थिक परिस्थितीची माहिती आपल्या प्रवासवर्णनांमध्ये दिली आहे. संपूर्ण विजयनगरच्या कालावधीतील फक्त चांदीच्या नाण्यांचा एकच नमुना सापडला आहे.

नाणी तयार करण्यासाठी दुर्गी, मंगळूर, नेल्लोर, मदुराई ही ठिकाणे टांकसाळींसाठी प्रसिध्द होती. प्रसंगी राज्याच्या प्रतिनिधींना, व्यापारी श्रेणी, अथवा खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्याची परवानगी दिली जात असे. उदा. दुसरा देवराय या राजाचा प्रतिनिधी म्हणून 'लखमण दण्णायक' यास व व्यापारी श्रेणींपैकी 'नकर- परिवार श्रेणी' यांच्याकडे नाणी पाडण्याचा परवाना होता. एकंदरीतच नाण्यांच्या व आर्थिक सुबत्तेसंदर्भात विजयनगर साम्राज्य प्रसिध्द होते. बहमनी साम्राज्याच्या पाच शाह्यांनी एकत्र येऊन १५६५ मध्ये विजयनगरशी जी तालिकोटची लढाई केली. त्यामध्ये पराभूत झाल्याने विजयनगरची वाटचाल अस्ताकडे झाली.

**बहमनींची नाणी :-**

दिल्लीमध्ये मुहम्मद तुघलकाची सत्ता असताना दक्षिणेत हसन गंगू बहमनीने इ. स. १३४७ मध्ये बहमनी साम्राज्याची स्थापना केली. त्यांची राजधानी प्रथम गुलबर्गा व नंतर बिदर याठिकाणी होती. इ. स. १३४७ ते १५२६ याकालावधीमध्ये बहमनी राज्यांवर एकूण १८ सुलतानांनी राज्य केले. बहमनी व विजयनगर यांच्यामध्ये वारंवार संघर्ष उद्‌भवत. त्याचे कारण म्हणजे त्यांचे राजकीय-आर्थिक हितसंबंध एकमेकांच्या विकासात अडसर येत होते. दोघांचीही आर्थिक सुबत्ता चांगली होती.

बहमनी सुलतानांची नाणी दिल्लीच्या सुलतानाशाहीच्या नाण्यांप्रमाणे तयार केली होती. नाण्यांचा आकार वर्तुळाकृती व चौकोनाकृती होता. सोन्याच्या नाण्यांचे वजन १७० व १९७ ग्रेन एवढे होते. चांदीची नाणी १७० ग्रेन वजनाची होती. तांब्याची नाणी २६ ग्रेन ते २६९ ग्रेन पर्यंतची होती. गुलबर्गा, बिदर, दौलताबाद याठिकाणी बहमनींच्या टांकसाळी होत्या. नाणी तयार करताना एका बाजूस खलिफाचे नाव, पदवी, प्रसंगी कुराणातील पवित्र वचने, तर दुसऱ्या बाजूस टांकसाळीचे नाव, नाणी तयार करण्याचे वर्ष, सुलतानाचे नाव, त्याचे बिरूद इ. मजकूर छापला जात असे. अशा प्रकारची विविध नाणी उपलब्ध झाली आहेत.

बहमनी राज्याची स्थापना झाल्यावर त्यांनी(हसन गंगू याने) गुलबर्गा येथे टांकसाळ स्थापन केली. दिल्लीच्या सुलतानांप्रमाणे एक तोळा वजनाची सोन्याची नाणी पाडली. मात्र पुढील काळात नाण्यांमधील सोने व चांदीच्या नाण्यांचे प्रमाण कमी होऊन तांब्यांच्या नाण्यांचे प्रमाण वाढले. निजामशाहीच्या राजवटमध्ये अहमदनगर येथे पाडलेली नाणी तांब्याची आहेत. सोने व रूप्याच्या नाण्यांचा अभाव हा निजामशाहीच्या आणि पर्यायाने

महाराष्ट्राच्या आर्थिक विपन्नावस्था किंवा दुरावस्थेचा निदर्शक आहे.

**मराठाकालीन चलन :–**

मध्ययुगीन महाराष्ट्रातील विशेषतः मराठाकालीन चलनाच्या अभ्यासासाठी १६७४ ते १८१८ हा कालावधी अभ्यासणे गरजेचे आहे. महाराष्ट्राच्या चलनपध्दती विषयीचा विशेषतः शिवकाळाच्या संदर्भामध्ये नाणकशास्त्राच्या शास्त्रशुध्द पध्दतीने प्रा. पद्माकर प्रभुणे, यांनी महाराष्ट्रातील चलनाचा इतिहास हा विषय पुणे विद्यापीठामध्ये एम. फिल संशोधनासाठी घेतला होता. त्यांचे हे संशोधन पुस्तकरूपाने प्रसिध्द झाले आहे. शिवकाळात प्रामुख्याने सोन्याचा होन, चांदीची लारी, तांब्याचा 'शिवराई' हे प्रमुख नाणे प्रकार आढळतात. आपल्या धामधुमीच्या कार्यामधुनही वेळ काढून महाराजांनी इ. स.१६७४ मध्ये राज्याभिषेक प्रसंगी स्वतःची नाणी पाडली. शिवराई हे नाणे सोन्याचे असून ते विजयनगरच्या सोन्याच्या नाण्यांच्या धर्तीवर तयार केले होते. छत्रपती शिवाजीमहाराजांनी पाडलेल्या 'होन' या नाण्यांवर एका बाजूस श्री राजा शिव व मागील बाजूवर 'छत्रपती' असे मुद्रित केले असून त्या सुवर्णहोनाचे वजन २.७२ ग्रॅम एवढे आहे.

शिवकालीन कागदपत्रांमध्ये होनांचे होन, निशाणी होन, पातशाही होन, कावेरीपाक होन, इत्यादी उल्लेख सापडतात. शिवकालीन चलनव्यवस्थेत होन या नाणे प्रकारास महत्त्वपूर्ण स्थान होते. सतरा ते एकोणिसाव्या शतकामध्ये मराठा राज्याचे प्रतीक म्हणजे 'शिवराई' होय. शिवराई या तांब्याच्या नाण्याचे किमान १५० प्रकार आतापर्यंत संशोधनात सापडली आहेत. मराठा राज्यामध्ये विशेषतः शिवकाळात पाडलेल्या एकूण शिवराई नाण्यांची संख्या ४,५०,००० एवढी आहे. इंग्रज अधिकारी हेन्री ऑक्सिडेन राज्याभिषेकप्रसंगी रायगडावर उपस्थित होता. त्यावेळी त्याने महाराजांकडे चलनाच्या संदर्भात पुढील मागणी केली ते लिहितो,

Raja graunted all our demands except those articles, Wherein it is expressed that our moneys shall goe current in his dominions and this on Bombay.

याचा अर्थ असा – वरील कलमास ज्यात 'आमची (ब्रिटिश) नाणी तुमच्या प्रांतात चालवावीत असे म्हटले होते ते नाकारलेले दिसते.'

शिवकाळात स्थानिक सराफ सोनारांना परवाना देऊन विशिष्ट वजन, कस याची नाणी पाडून घेतली जात. प्रति १०० लारींमागे एक लारी, व १ मण तांब्यांच्या नाण्यांमागे ५ लारी मेहताना म्हणजेच मोबदला मिळत असे. याशिवायही सावकारी व सराफी परवान्यांबरोबरच मराजगडाफ्वर नाणी पाडण्यासाठी टांकसाळ होती.

शिवकालीन नाण्यांविषयीची माहिती प्रामुख्याने सभासद व चित्रगुप्ताची बखर या ग्रंथांमधून मिळते. महाराजांच्या खजिन्यांमध्ये २१ प्रकारची होन नाणी सापडली आहेत.

**नाण्यांचे प्रकार :–**

१) शिवराई होन, २) देवराई, ३) अच्युतराई, ४) रामचंद्रराई, ५) कावेरीपाक, ६) गुत्ती होन, ७) सतलामी, ८)धारवाडी. ९) आदवानी, १०) ताडपत्री,

११) निशाणी, १२) सणगरी, १३) गडमल, १४) एलोरी, १५) शैलागुटी, १६) पादशाही, १७) इब्राहिमी, १८) पुतळी, १९) गंबर, २०) मुहुर

या नाण्यांपैकी सर्वच प्रचलित असली तरी शिवराई सोडून बाकी महाराष्ट्राच्या बाहेर पाडलेली दिसतात.

छत्रपती शिवाजी महाराजांनी चांदीची नाणी पाडलेली दिसत नाहीत. त्यावेळी चांदीची नाणी राज्याबाहेरूनच आणलेली होती. 'राज्यव्यवहारा कोशा'मध्ये नोंद असल्याप्रमाणे वराह अथवा होन या नाण्याची लहान नाणी म्हणजे प्रताप, दरण, चवल, दुवल अशी विभागणी होती. ती पुढीलप्रमाणे :-

| | | |
|---|---|---|
| १ होन | = | २ प्रताप |
| १ प्रताप | = | २ दरण |
| १ दरण | = | २ चवल |
| १ चवल | = | २ दुवल |
| १ दुवल | = | २ पल अथवा पण अथवा बेळे |
| १ बेळे | = | २ वीस |

'बेळे' या नाण्यास महाराष्ट्रामध्ये 'ब्याल' असे म्हणत. शिवकाळात मराठा पध्दतींच्या नाण्यांसाठी चलन परिमाण होते. मराठा पध्दतीतील ६४ 'वीस' नाणी मिळून १ होन तयार होत असे. शिवराई होन नाण्यांचे वजन सुमारे ४२ व ४३ ग्रेन होते. याचा अर्थ मराठा होन विजयनगरच्या वराह नाण्यांपेक्षा लहान होता. शिवकाळातील तांब्याची नाणी विपुल प्रमाणात सापडली आहेत. 'टका' हे तांब्याचे नाणे प्रमाणभूत होते. त्याची विभागणी 'शिवराई' 'त्रिरूका' आणि 'रूका' अशी होती.

| | | |
|---|---|---|
| १ होन | = | १० टका |
| १ टका | = | ४८ रूळा |
| १ रूळा | = | १.५० पै.एक शहागणी =१/८ टका. |

अशाप्रकारे शिवकाळात चलनपध्दती आपणांस अभ्यासता येते.

**टांकसाळी :-**

मध्ययुगामध्ये टांकसाळी या मक्त्याने चालविण्यासाठी देण्याची प्रथा होती. सरकारला जास्तीत जास्त उत्पन्न (अधिक दराने) देणाऱ्यास टांकसाळ स्थापन करण्यासाठीचा परवाना दिला जात असे. या परवान्यापोटी जे शुल्क (Fee) आकारले जाई. ते सरकारी उत्पन्नाचा एक भाग होते. ही बाब आपण लक्षात घ्यावयास हवी.

टांकसाळीच्या व्यवस्थापकास कागदपत्रांमध्ये 'कमाविसदार' असा शब्दप्रयोग केला आहे. टांकसाळीतील कच्चा माल, सरकारमार्फत पुरविला जात आहे. त्याठिकाणच्या कामगारांना रोख वेतन देण्याची प्रथा होती. कामगारांमध्ये प्रामुख्याने लोहार, सुतार, घणकरी, भातेकरी, शिक्के (आवटी) तयार करणारा, टिकली करणारा इ. प्रकारचे कसबी कारागीर होते. टांकसाळीमध्ये धातूची शुध्दता पडताळून, भातेकरी तो धातू वितळवत असे.

गोल दंडाकृती धातूच्या तुकड्यांमधून टिकल्या (चकत्या-planchet) तयार केल्या जात. ऐरण आवटी (शिक्का) आणि हातोडा आवटी यांच्यामध्ये नाणी पाडली जात असत.

महाराष्ट्रातील टांकसाळीच्या संदर्भात अलिबाग, तळेगांव दाभाडे व पुणे याठिकाणच्या आर्थिक सनदा प्रसिध्द आहेत. एकंदरीतच मध्ययुगीन इतिहासामध्ये शिवकाळात नाणी अथवा चलनव्यवस्था अतिशय चोख होती.

**पेशवेकालीन चलन :-**

पेशवेकालीन चलनाबाबत साधारणतः १७०७-१८१८ हा कालावधी ढोबळमानाने मानला जातो. इतिहास अभ्यासक कृ. ना. चिटणीस यांचे पेशवेकालीन चलनांच्या वाटचालींसंदर्भात मत लक्षात घेणे आवश्यक आहे. ते म्हणतात, 'पेशवेकालीन नाण्यांचा इतिहास म्हणजे एकंदरितच नाणेपध्दतीच्या ऱ्हासाचा इतिहास होय.' याचे प्रमुख कारण म्हणजे नाण्यांमध्ये भेसळ करण्याचे व खाजगी व्यक्तींना नाणी पाडण्याचा परवाना देण्याचे प्रमाण अधिक वाढणे हा होय.

छत्रपती शिवाजी महाराजांनी 'होन' हे नाणे पेशव्यांनी त्याग करून 'रूपया' या नाण्याची निवड केली. पेशव्यांची नाव घेण्यासारखी स्वतःची नाणेपध्दती नव्हती. त्याकाळात महाराष्ट्रामध्ये अर्काटपासून दिल्लीपर्यंत चलनात असलेली नाणी प्रचलित होती. तरी देखील रहिमतपुरी, मलकापुरी, चांदवड, चिंचवड, जुनी व नवी औरंगाबादी, भातवडी, मुंबई, मिरजी-मलकापुरी, दौलताबादी, तळेगांवी, पुणे-चलन व सिक्का इत्यादी ठिकाणची नाणी प्रसिध्द होती. नाणी ज्या भागांमध्ये विनिमयासाठी प्रचलित होती. ती त्याच नावाने ओळखली जात होती. 'रूपया' धान्यबाजारातील चलती नाणे तर 'पोतेचाल' हे नाणे सरकारी खजिन्यात स्विकारले जाणारे नाणे होते. या नाण्यांमधील धातूचे प्रमाण व नाण्यांचा नमुना पेशव्यांनी ठरवून दिलेला होता. पेशवेकाळात शिवराई देखिल नाणे होते. त्यावरील एका बाजूवर 'श्री / राजा' व दुसऱ्या बाजूवर 'छत्र/पती' असा उल्लेख असलेली नाणी सापडली आहेत.

औरंगजेबाच्या निधनानंतर बालाजी विश्वनाथाने दिल्लीहून चौथाई, सरदेशमुखीच्या सनदा आणल्या. एका अर्थाने आता मराठी राज्य मोगलांचे अंकित राज्य बनले. छत्रपती हा मोगलांचा प्रतिनिधी व पेशवे 'कुलमुख्त्यार' झाले. शाहूंनी आता स्वतःची नाणी पाडलेली दिसत नाहीत. नाण्यांवर मुगल बादशाहाचे नाव मुद्रीत केलेले आहे. ज्या ठिकाणी नाणी पाडली त्या ठिकाणचे नाव मात्र छापलेले दिसते. उदा. 'मुहियाबाद पुना', गुलशनाबाद नाशिक इत्यादी.

इतिहासकार त्र्यंबक शंकर शेजवलकर लिहितात, 'पेशवाईत तथाकथित साम्राज्याला स्वतःचे नाणेही नव्हते. महाराष्ट्रातील टांकसाळी मोगल बादशहांच्या बिरूदावलीसह फारसी भाषेत अंकित केलेली नाणी पाडीत. शिवशाहीचे नाव केवळ तांब्याच्या शिवराई पुरतेच उरलेले होते, तरीही, शाहूचे राज्य स्वतंत्र होते, असे आग्रहाने सांगितले जाते.' याठिकाणी एक बाब नमूद करावी लागेल की, 'पेशव्यांच्या नाण्याबरहुकुम नाणी पाडल्याने, शाहआलम बादशहाचे जे नाव दिसते की जो सदर नाणी पाडण्याच्या सुमारास हयात नव्हता.'

सारांश, पेशवेकाळात ब्रिटिश कालखंडाप्रमाणे एक देश एक चलन नव्हते. नाणी

पाडण्यासाठी केंद्रीय व खाजगी टांकसाळी होत्या. त्यामुळे नाण्यांमध्ये वैविध्य निर्माण होत असे. नाण्यांचे मूल्य हे अंतर्गत(खर्पीीळपीळल) असल्याने नाण्यातील धातूचे मूल्य हेच त्याचे मूल्य असे. नाण्यांमधील धातूचा कस विभिन्न व स्थलसापेक्ष असल्याने किंमतीत फरक असे. मराठ्यांची नाणी जरी मध्ययुगीन पध्दतीची असली तरी मराठा चलनामध्ये परिवर्तनाच्या काही प्रसुप्त प्रेरणा दिसतात.

**पेढीव्यवहार :-**

मध्ययुगीन महाराष्ट्रातील पेढीव्यवहाराच्या विषयी ऐतिहासिकदृष्ट्या जास्त संशोधन झालेले नाही. व्ही. डी. दिवेकर यांनी लिहिलेला, र्डीींशूेष चरींशीळरश्र ळप चरीरींहळेप ींहश एलेपोळल रपव ीलळरश्र र्क्ळींीेूष खपवळर, ड्ढींपश १९८१ या ग्रंथाचा उल्लेख पेढ्यांच्या अभ्यासासंदर्भात आवर्जून करावा लागेल. चं. बा. जोशी यांनी भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकामध्ये १९३५ मध्ये ड्ढदीक्षित पटवर्धन यांचे पेढीचा व्यवहारड्ढ, त्याचप्रमाणे ना. गो. चाफेकरकृत भा.इ.स. त्रैमासिकामधील ड्ढखासगीवाल्यांच्या हिशोबाचे मंथनड्ढ, हा लेख व खांडेकर यांचा पेढींचे व्यवहार व इतिहास (१९२२), शाळीग्राम यांचा ड्ढमुंबईचा व्यापारड्ढ, इ. संदर्भ साहित्यामध्ये पेढीव्यवहारांची माहिती आली आहे.

पेढींचे व्यवहार प्रामुख्याने चलनांचा विनिमय व कर्जासाठी पैशांची देवाणघेवाण इ. स्वरूपांमध्ये होते. पेढ्यांमधून आधुनिक बँकांच्या आर्थिक व्यवहारांप्रमाणे व्यवहार होत असत. तत्कालीन पेढीवाल्यांना महाजन व कर्ज देणारास ड्ढसाहूड्ढ असे म्हणत असत. मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये व्यापार वाढू लागल्याने अंतर्गत व परदेशाशी चालणारा व्यापाराचा आर्थिक व्यवहार मोठा होऊ लागला. कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थांची संख्या अधिक प्रमाणात असावी अशी निकड भासू लागली. त्यामधूनच ड्ढपेढीड्ढ हा प्रकार उदयास आला. परकीय व्यापारासाठी हुंड्याचा वापर केला जात असे. व्यापारी माल ज्याठिकाणी पाठविला जाई. त्याठिकाणच्या अंतरावर हुंडीच्या वटणावळीचा दर ठरविला जात असे. उदा. लाहोरहुन सुरतेस हुंडी पाठविण्या दर ६.२५ % होता. आग्रा ते सुरत दरम्यानचा हुंडीचा दर ४.२५ ते ५% होता. मध्ययुगात विशेषतः मोगलकाळात चार प्रकारच्या हुंड्या अस्तित्वात होत्या.

**१. दर्शनी हुंडी :-** या प्रकारामध्ये रक्कम तातडीने द्यावी लागत असे.

**२. मिती हुंडी :-** हुंडीमध्ये नमूद केलेल्या तारखेपासून ते काही ठराविक दिवसांमध्ये किंवा मुदतीत पैसे दिले जात असत.

**३. शहाजोग हुंडी :-** या हुंडीची रक्कम कोणाला द्यावयाची याबाबत त्या हुंडीमध्ये नमूद केलेले नसे. ती रक्कम हुंडीच्या धारकास द्यावी असा संकेत होता.

**४. जोखमी हुंडी :-** या प्रकारामध्ये जवळच्या गावातील व्यवहारासाठी वापरली जाणारी हुंडी होय. अशा प्रकारची हुंडी क्वचितच वापरली जात असे.

मोगलकाळात पेढीव्यवहार करणाऱ्या संस्थाना मकोठीफ अशी संज्ञा होती. त्याकाळातील प्रसिध्द व्यापाऱ्यांमध्ये सुरतेचे वीरजी व्होरा, हा श्रीमंत व पहिल्या दर्जाचा व्यापारी होता. पेढी वापर करणाऱ्यांमध्ये प्रामुख्याने नीळीच्या व्यापाऱ्यांचा अधिक भरणा होता. या पेढ्यांना पुढे मनीळ-कोठ्याफ (खपवळसे-इरपज्ञी)अशी संज्ञा प्राप्त झाली. औरंगजेबाच्या राजवटीमध्ये ममाणिकचंदफ हा प्रसिध्द नीळ व्यापारी होता.मफत्तेचंदफ नावाचा प्रसिध्द पेढीव्यावसायिक होता. हे दोघेही व्यापारी मुर्शिदाबाद येथे वास्तव्यास

होते. त्यांनी फर्रूखसियार या मोगल बादशहास मोठे कर्ज दिल्याने बादशहाने त्यास मजगत् – शेठफ अशी पदवी देऊन गौरविले होते.

राजस्थान राज्यात पेढीव्यवसायाचा मोठा विकास झालेला दिसतो. सर्व प्रकारच्या पेढ्या राजस्थानामध्ये विकास झालेला दिसतो. सर्व प्रकारच्या पेढ्या राजस्थानामध्ये विकसित झालेला होता. पेढी व्यवसायिकांना बोहरा, सेठजी, सराफ, बनिया इ. नावे होती.

**विजयनगरकालीन पेढीव्यवहार :–**

विजयनगर साम्राज्यामध्ये पेढीव्यवहाराचे उल्लेख आढळत नाहीत. मात्र त्यांच्या मांडलिक राज्यांमध्ये पेढी व्यवहार काही प्रमाणात होता अशी नोंद सापडते. पेढी व्यवसाय करणारे प्रामुख्याने कर्जाचा व्यवहार करत असत. कर्जाऊ दिलेल्या रक्कमांवर व्याज आकारण्याची पध्दत होती. व्याजाचा दर अनुक्रमे १२ व १८ % एवढा होता. शेत जमिनीसाठी कर्ज देण्याची प्रथा होती.

**मराठेकालीन पेढीव्यवहार :–**

मराठा कालखंडांमध्ये महाराष्ट्रात पेढीव्यवहार करणारांची संख्या बऱ्याच मोठ्या प्रमाणात वाढली. अनेक घराणी पेढीव्यवसायांत होती. उदा. दीक्षित, पटवर्धन, जगताप, घारापुरे, अनगळ, पाठक, वैद्य इत्यादी दीक्षित–पटवर्धन हे मूळचे कोकणातील घराणे, त्यांनी १७२२ मध्ये नाशिक व औरंगाबाद येथे पेढी सुरू केली. पहिल्या बाजीराव पेशव्याने ज्यांना पुण्यामध्ये आणले. १७२९ मध्ये ते पुण्यातील पेढी व्यावसायिक झाले. त्यांच्या पेढीचा वार्षिक व्यवहार पुण्यामध्ये १७६९ मध्ये ३३, ८७, ३८१ एवढ्या रकमांच्या भरणा झाला. तर खर्च झालेली रक्कम ३०, ७७, ९७७–११–० एवढी होती. पेढींमध्ये पुढील वह्यांमध्ये हिशोब ठेवला जात असे –

१. पोते – नाण्यांची प्रत्यक्ष उलाढाल.

२. परभारे हिशेबी उलाढाल.

**विविध खाती –**

१. व्याज खाते	२. बट्टा खाते

३. हुंडणावळ	४. हुंडणावळ

या सर्वांची एक वर्षाची जमा ३३, ८७, ३८१–३–० रूपये व आणे एवढी तर खर्चाची रक्कम. ३०, ७७, ९७७–११–० रूपये व आणे एवढा ताळेबंद होता.

(दीक्षित–पटवर्धनांच्या वंशजांनी अशा प्रकारच्या १०७ वह्या ज्यामध्ये १७५०– १८३६ याकाळातील हिशोब आहेत, त्या भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे यांना भेट दिल्या आहेत. याचा अभ्यास करूनच इतिहास लेखक कृ. ना. चिटणीस यांनी 'चलन व पेढीव्यवहार' असे स्वतंत्र पुस्तक लिहिले आहे.)

पेढी व्यवहारामध्ये 'मोहोर' हे स्वतंत्र खाते होते. व्यवहार प्रामुख्याने रूपये, अधेल्या, पावत्या, खुर्दा, सिवराई यामध्ये चालत असे. यामध्ये 'आट मांडणावळ' म्हणजे झिजलेले रूपये आटवून त्याची चांदी बनवत. पेढीव्यवहारात नाण्यांची आदलाबदल केली जात असे.

साधारणपणे १८ व्या शतकाच्या पूर्वाधात सावकारी व पेढीव्यवहार अधिक विकसित झाला. पेशव्यांनी विकसित केलेला पेढीव्यवहार-सराफी-सावकारी या यंत्रणांनी चलनाचा विकास-कसाचा प्रश्न-विनिमयात्मक गरजा भागविण्याचा प्रयत्न केला.

सरकारी व्यवहारांमध्ये हुंड्यांचा वापर केला जात असे. सरकारने काढलेल्या हुंडीस मवरातफ म्हणत. खाजगी व्यापाऱ्यांकडून सरकारला मोठी रक्कम घ्यावयाची असल्यास ती रक्कम वसूल करावयाची असेल तर त्वरेने वरात काढली जात आहे. पेशवे आपल्या कमाविसदारांच्या नावाने, वरात काढीत, व्यापारासाठी कर्जही पेढ्यांमार्फत दिले जात असे. कर्जापोटी कर्जदारांकडून त्याची मालमत्ता गहाण म्हणून घेतली जात असे. कर्जदाराने ज्याच्याकडून कर्ज घेतले त्यास वचनचिठ्ठी लिहून देत असे. त्यामध्ये कर्जफेडीचे वचन व ते कर्ज कसे फेडणार आहे याविषयीचा मजकूर असे. अशा प्रकारची कागदपत्रे तीन प्रकारांमध्ये होती. १ कर्जरोखा, २. वादारोखा, ३. शरकतरोखा. तीनही कागदपत्रांवर साक्षीदारांच्या सह्या असतात. यापैकी शरकतरोखा कागदपत्रांमध्ये शेतमालाच्या उत्पन्नातून कर्जाची रक्कम दिले जाईल असे वचन होते.

**सारांश** – अशाप्रकारे मध्ययुगीन महाराष्ट्रात चलन व पेढीव्यवहारांचा विकास झालेला दिसतो.

## ७.३ स्वयंअध्ययन प्रश्न

१. मुघलकालीन व्यापार पध्दती स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. अंतर्गत व्यापारांची थोडक्यात माहिती लिहा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. चलन व पेढीव्यवसाय स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ७.४ सारांश

अशारितीने या घटकातून आपण मध्ययुगीन महाराष्ट्राची आर्थिक परिस्थिती अंतर्गत मोठे व लघु उद्योग, व्यापार पध्दती व चलन व्यवस्था आणि पेढी व्यवसाय याबाबत सविस्तर माहिती घेतली.

## ७.५ परिभाषिक शब्द

हुंडी – धनादेश (Check)
दारोगा – पोलिस
टाकसाळ – नाणी पाडण्याचे ठिकाण

## ७.६ संदर्भ सूची


१. पद्माकर प्रभुणे, (२००७) महाराष्ट्रातील चलनाचा इतिहास, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे

२. कृ. ना. चिटणीस, (१९८५) मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था. प्रका. सौ. चिटणीस, पुणे, भाग १ ते ४

३. म. श्री. माटे, (२००२) मध्ययुगीन महाराष्ट्र, (सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन १३००–१६५०), महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, ऑक्टोबर

# घटक ८

# धर्म

**अनुक्रमणिका**


८.० **उद्दिष्टे**

८.१ **प्रस्तावना**

८.२ **विषय विर्वचन**

 ८.२.१ **वारकरी संप्रदाय**

 ८.२.२ **रामदासी पंथ**

 ८.२.३ **महानुभव पंथ**

८.३ **स्वयंअध्ययन प्रश्न**

८.४ **सारांश**

८.५ **परिभाषिक शब्द**

८.६ **संदर्भ सूची**


## ८.०. उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास-

१. वारकरी संप्रदायाची माहिती मिळेल.

२. वारकरी संप्रदायाचा उदय व वाटचालीचा अभ्यास करता येईल.

३. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे योगदान अभ्यासता येईल.

४. रामदासी संप्रदायाची माहिती मिळेल.

५. समर्थ रामदासांचे कार्य अभ्यासता येईल.

६. रामदासी पंथाचा प्रचार व प्रसार अभ्यासता येईल.

७. महानुभव संप्रदायाची माहिती मिळेल.

८. महानुभाव संप्रदायातील श्रीचक्रधरांचे योगदान अभ्यासता येईल.

९. महानुभाव संद्रदायाचे कार्य अभ्यासता येईल.

## ८.१ प्रस्तावना

मानव जातीच्या विकासात व मानवी जीवनात धर्म व ईश्वराला महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते. ईश्वराचे महत्त्व विषद करणारे, ईश्वरप्राप्तीसाठी वेगवेगळे मार्ग सांगणारे अनेक संप्रदाय प्राचीन व मध्ययुगीन भारतात उदयास आले. प्रत्येक संप्रदायामध्ये ईश्वरप्राप्तीचे

वेगवेगळे मार्ग, कार्यपद्धती व तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. परंतु अंतिम हेतू मात्र ईश्वरप्राप्ती व मोक्ष मिळवणे हाच असतो. मध्ययुगीन भारतात अशा अनेक संप्रदायाचा उदाय घडून आला. धर्माच्या बाह्य अवडंबरावर त्यांनी हल्ला चढवला या संप्रदायाच्या माध्यमातून समाजाची सेवा, दुःखितांची सेवा, दुःखाचे निवारण करणयत आले. मानवी समाजाला, जीवनाला वेळोवेळी नवी दिशा देण्याचे काम या संप्रदायांनी केले.

८.२ विषय विवेचन

मध्ययुगीन महाराष्ट्रात नाथ संप्रदाय, महानुभव संप्रदाय, वारकरी संप्रदाय, दत्त संप्रदाय, व समर्थ संप्रदाय हे पाच संप्रदाय विकसित झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात या पंथांनी भक्तीचा प्रचार व प्रसार केला. हिंदू धर्मातील अनिष्ठ रूढी परंपरावर हल्ला चढवून त्यातील फोलपणा दाखवून दिला. भौतिक दुरावस्था व मानसिक गुलामगिरीतून समाजाची मुक्तता केली. जातीव्यवस्थेला विरोध करून जातीजातीतील विषमता कमी केली. सदर घटकामध्ये आपण महाराष्ट्रातील महानुभव संप्रदाय, वारकरी संप्रदाय व समर्थ संप्रदायाची माहिती पहाणार आहोत.

## ८.२.१ वारकरी संप्रदाय

मध्ययुगीन महाराष्ट्रात नाथ, महानुभव, दत्त, वारकारी व समर्थ असे पाच भक्तीसंप्रदाय होते. त्यातील वारकरी संप्रदाय हा सर्वात लोकप्रिय, व्यापक व प्रभावी संप्रदाय होता. संतांनी आपल्या लेखणीने व वाणीने महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, व सांस्कृतिक जीवनात महत्त्वपूर्ण बदल घडवुन आणले. यासाठी संतानी ज्या मार्गाचा अवलंब केला त्यास वारकरी संप्रदाय, माळकरी, भक्तीमार्ग, भागवत धर्म असे म्हटले जाते. वारी या शब्दाचा अर्थ ज्ञानेश्वरांच्या काळात येरझारा या अर्थाने वापरला जात होता. आषाढी, कार्तिका, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपूरास जातो तो पंढरपुराचा वारकरी म्हटला जातो व त्याच्या उपासनेचा जो मार्ग तो वारकरी पंथ होय माळकरी म्हणजे विठ्ठलाला प्रिय असणारी तुळशीची माळ जो भक्त सातत्याने गळ्यात घालतो तो माळकरी. तुळशीमाळा प्रत्येक वारकरी श्रद्धापूर्वक व निष्ठेने गळ्यात घालो. कृष्णास प्रिय असलेली तुळशीची माळ गळ्यात घातल्याशिवाय वॅारकरी होऊच शकत नाही. तर भागवत म्हणजे जो भगवंतास आपले सर्वस्व अर्पण करून भक्ती करतो तो भक्त म्हणजे भागवत व त्यांचा धर्म म्हणजे भागवत धर्म होय. सोलापूर जिल्ह्यातील भीमानदीच्या (चंद्रभागा) तिरावर वसलेले पंढरपूर हे वाकरी संप्रदायाचे आद्य तीर्थक्षेत्र. ज्ञानेश्वर म्हणतात –

।। आले आले रे हरीचे डिंगर (भक्त)
वीर वारीकर पंढरीचे ।।

ज्ञानेश्वर, नामदेव यांच्या काळापासून या तीर्थक्षेत्रास महत्त्व प्राप्त झाले. नामदेव म्हणतात –

सर्व सुखराशी भीवरेचे तीरी ।
आमुची पंढरी कामधेनु ।।

पंढरपूरबरोबरच ज्ञानेश्वरांची आळंदी एकनाथांचे पैठण व तकारामांचे देहू ही वारकरी संप्रदायायाची इतर तीर्थक्षेत्रे आहेत.

वारकरी संप्रदायाचा इतिहास ६ व्या शतकापर्यंत जाऊन पोहोचतो. इ.स. ५१६ च्या एका ताम्रपटात राष्ट्रकुल राजा अविधेय याने एका ब्राम्हणास चार गावे दान दिल्याची माहिती आहे. त्यातील एक गाव पांडरंगावल्ली आहे. पांडरंगावल्ली म्हणजेच पांडुरंगाचे पंढरपूर गाव होय. या ताम्रपटातील माहितीच्या आधारे पंढरपूर, विठ्ठल व त्यांचा आद्य भक्त पुंडलिक यांचा कालखंड इ. स. च्या ६ व्या शतकापर्यंत असल्याचे दिसून येते. श्रीद्वारकाधीश श्रीकृष्ण हे पुंडलिकाच्या सेवेने संतुष्ट होऊन त्याजकरिता पंढरीस आले व विटेवर उभे राहिले हली गोष्ट सर्व संतास मान्य आहे.

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा

पुडलिकाचे भेटी परब्रम्हा आलेगा ।। चरणी वाहे भीमा उद्धरी जगा (नामदेव)

ज्ञानेश्वरांच्या अगोदरच्या कालखंडात विठ्ठल दैवत लोकप्रिय व प्रसिद्ध झाले होते. ज्ञानेश्वर-नामदेव यांच्या अगोदरही आषाढी-कार्तिकी शुद्ध एकादशीस पंढरपूरास संतभार जमत होता. ६ वे शतकापासून ते १३ व्या शतकापर्यंत विठ्ठलाचे व पंढरपूराचे महत्त्व हळूहळू वाढत गेले. ''काया वाचा मने जीवे सर्वस्व उदार । बाप रखुमादेवीवरा विठ्ठलाचा वारीकार ।। '' असे वारकऱ्यांचे वर्णन ज्ञानेश्वरांनी केले आहे. वारकरी विठ्ठलाच्या भेटीसाठी जाताना गळ्यात तुळशीची माळ, खांद्यावर पताका व मुखात विठ्ठलाचे नाव घेऊन जात असतात. विठ्ठलाच्या भेटीसाठी वारकरी कसा जातो हे सांगताना ज्ञानेश्वर म्हणतात, ''कुंचे पताका झळकती । टाळ मृदंग वाजती । आनंदे प्रेमे गर्जनी ।। भद्रजाती विठ्ठलाचे ।'' रामकृष्णहरी हा वारकरी संप्रदायाचा मंत्र आहे. राम म्हणजे हृदयात रमविणारा, कृष्ण म्हणजे आकर्षण करणारा व हरी म्हणजे ऐक्यरुप असणारा विठ्ठलरूप परमात्मा होय.

संतांच्या कारकीर्दीवरून स्थुलमानाने वारकरी संप्रदायाचे पाच कालखंड मानले जातात.

१. पुंडलिक ते ज्ञानेश्वरांपर्यंतचा काळ
२. ज्ञानेश्वर ते नामदेव यांचा काळ
३. भानुदास ते एकनाथ यांचा काळ
४. तुकारामांचा काळ
५. तुकारामोत्तर काळ

वारकरी संप्रदायातील संतांच्या कार्याविषयी बहिणाबाई म्हणतात -

संतकृपा झाली । इमारत फळा आली ।।

ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालय ।।

नामा तयाचा किंकरा । तेणे केला हा विस्तार ।।

जनार्दन एकनाथ । ध्वज उभारिला भागवत ।।

भजन करा सावकाश । तुका झालासे कळस ।।

वारकरी पंथाची सुरूवात भक्त पुंडलिक यांनी केली. पुढे ज्ञानेश्वरांनी वारकरी पंथाचा

खऱ्या अर्थाने पाया घातला. तर नामदेवांनी वारकरी संप्रदाायाचा खऱ्या अर्थाने प्रचार व प्रसार केला. एकनाथांनी ध्वज उभारला तर तुकारामांनी वारकरी पंथास कळसास पोहोचवले. समाजातील सर्व थरातील लोक या संप्रदायात सामील झाले. ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाचा पाया रचला तर नामदेव, एकनाथ व तुकाराम या संतांनी या संप्रदायाचा प्रसार सामान्य लोकांमध्ये केला. या संतांची वारकरी संप्रदायसंबंधीची माहिती पुढीप्रमाणे पाहता येईल.

### १. ज्ञानेश्वर (१२७५–१२९६)

ज्ञानेश्वरांचा जन्म पैठणजवळच्या आपेगाव येथे श्रावण वद्य उ८ शके ११९७ (१२७५) रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव विठ्ठलपंत तर आईचे नाव रुक्मीणी होते. ज्ञानेश्वरांना निवृत्तीनाथ, सोपानदेव हे बंधू तर मुक्ताबाई ही एक बहिण होती. वडिलांना समाजाकडून झालेला त्रास ज्ञानेश्वरांनी जवळून पाहिला होता. त्यांनी वैदिक धर्माविरूद्ध बंड करून भक्तीमार्गाचा स्वीकार केला. ज्ञानेश्वरांनी कर्मकांड, बहुदेवतावादास विरोध केला. ज्ञानेश्वरी ग्रंथाची रचना ज्ञानेश्वरांनी वयाच्या सोळाव्या वर्षी म्हणजेच इ.स. १२९० मध्ये गोदावरी नदीच्या तिरावरील नेवासे येथे केली. या ग्रंसि भावार्थ दीपिका असेकी म्हटले जाते. ज्ञानेश्वरीम म्हणजे भगवतगीतेवरील मराठी पद्यरूपात केलेले भाष्य आहे. गीतेतील १८ अध्यायातील मुळ ७०० श्लोक ज्ञानृश्वरीत १८ अध्यायात ९००० मराठी श्लोकात मांडलेले आहेत. ज्ञानेश्वरीमुळे सामान्य लोकांना भगवद्‌गीतेतील तत्त्वज्ञान समजू लागले. ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लिहून वारकरी संप्रदायाला भक्कम तत्वज्ञान दिले. वारकरी संप्रदायाचा मोठ्या प्रमाणात पुरस्कार ज्ञानेश्वरांनी केल्याने ज्ञानदेवे रचिला पाया असे म्हटल जाते. ज्ञानेश्वरांनी विखुरलेल्या वारकरी भक्तांची आपल्या स्वयंसिद्ध समार्थ्याने संघटना केली. ज्ञानेश्वरांनी रचलेली ज्ञानेश्वरी म्हणजे मराठी वाङ्‌मयाला दिलेली मोठी देणगी आहे. ज्ञानेश्वर म्हणतात –

माझा मऱ्हाटाची बोल कौतुके ।
परि अमृताते ही पैजा जिंके ।
ऐसी अक्षरे रसिके । मेळवीन ।।

संतानी संस्कृतमधील वाङ्‌मय मराठीत रूपांतरीत करून सामान्य लोकांपर्यंत पोहचवले. ज्ञानेश्वरी व अमृतानुभव हे ग्रंथ वारकरी संप्रदायाचे आधारभूत ग्रंथ आहेत. ज्ञानेश्वरांनी भावार्थदीपिका म्हणजेच ज्ञानेशव्री, अमृतानुभव, चांगदेवपास्ष्टी व काही अभंग एवढी ग्रंथरचना केली. इ, स. १२९६ मध्ये ज्ञानेश्वारांनी समाधी घेतली. त्यावेळी नामदेव आळंदीत उपस्थित होते.

### २. नामदेव (१२७१–१३५०)

नामदेव वारकरी संप्रदााचे आद्य प्रचारक होते. त्यांचा जन्म मराठवाड्यातील नरसी बामगी गावातील शिंपी कुटुंबात झाला होता. त्यांचे वडिल रामाशेटी व आई गोणाई पंढरपूरच्या विठ्ठलाचे भक्त होते. पंढरपूर येथे २६ ऑक्टोबर १२७१ रोजी त्यांचा जन्म झाला. अकराव्या वर्षी त्यांचा विवाह राजाई हिच्याशी झाला. सुरूवातीपासूनच त्यांना विठ्ठलभक्तीची आवड होती. चार मुले व एक मुलगी अशी पाच अपत्ये त्यांना होती. विठ्ठलभक्तीच्या आवडीमुळे सुरूवातीपासूनच ते संसारात रमले नाहीत. नामदेव व

ज्ञानेश्वारांची भेट आळंदी येथे झाली. ज्ञानेश्वर नामदेवाना भक्तशिरोमणि अथवा भक्तराज म्हणत असत. विठोबा खेचर हे नामदेवांचे गुरू हाते.

नामदेवांनी उत्तर भारतात दीर्घकाळ प्रवास केला. २० वर्षे पंजाबमध्ये त्याचे वास्तव्य होते. या वास्तव्याच्या काळात त्यांनी भक्तीमार्गाचा प्रचार करण्याबरोबरच अनेक भक्तगणही मिळविले. त्यांच्या भक्तांनी अमृतसर जिल्ह्यातील घुमान/गुरदासपूर या गावी नामदेवांच्या नावाने बाबा नामदेवजी अथवा देहुरा साहेब यांचा गुरूद्वारा हे मंदिर बांधले. नामदेवांच्या स्मरणार्थ त्यांचा शिष्य बहोरदास याने हे मंदिर बांधले. या वास्तव्यातील काळात त्यांनी हिंदी भाषेत काही भक्तीपर गीतांची निर्मिती केली. हिंदी आणि मराठी या दोन्ही भाषांना एकत्र आणण्याचे काम नामदेवांनी केले. नामदेव स्वतःला नामा तयाचा (पंढरपूर मंदिराचा) किंकर । तेणे केला हा विस्तार ।। असे म्हणवून घेत असत. ग्रंथ साहेब या शीखांच्या पवित्र धर्मग्रंथात नामदेवांनी रचलेली ६२ अभंग संत नामदेवजीकी गुरूबाणी या नावाने ग्रंथीत केले आहेत. या हिंदी पदावर मराठीचा संस्कार आहे. विठ्ठलाच्या नामाचा जयजयकारही आहे. या ग्रंथात कबीर, मीराबाई, रामानंद व सुरदास यांच्या नावाबरोबर नामदेवांचेही नाव आढळते. कबीर आणि नामदेव यांच्या रचनामध्ये अनेक साम्यस्थळे दिसून येतात. विठ्ठलाच्या व्यापक दर्शनाचा अनुभव हिंदी भाषेत व्यक्त करताना नामदेव म्हणतात –

ईभै बीठलू उभै बीठलू, बीठल बिनु संसार नाहीं ।

थान थनंतरि नामा प्रणवै, पूरि रहिब त् सरब मही ।।

विठ्ठल सर्वत्र आहे. विठ्ठलावाचून जगात दुसरे काहीही नाही. विठ्ठल संपूर्ण विश्व व्यापून आहे असे नामदेव म्हणतात. वारकरी संप्रदायाचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. वारकरी पंथाचा प्रचार करून बहुजन समाजाच्या सुप्त आकांक्षा त्यांनी जागृत केल्या. वारकरी संप्रदायाची पताका उत्तर भारतात फडकवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. हिंदू मुस्लीम समाजात ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न तयांनी केला. या संदर्भात ते म्हणतात.

हिंदू अंधा, तुरकू काणा ।

दुहाते गिआनी सिआणा ।।

हिंदू पूजे देहुरा मुसलमाणु मसीति ।

नामे सोई सेविआ जह देहुरा न मसीति ।।

लिंगायत या वेगवेगळ्या वर्गातील होत. त्यांनी तळागळापर्यंत भक्तीमार्गाचा प्रसार केला. आपल्या कीर्तनाच्या माध्यमातून त्यांनी पाखंडी, भोंदू लोकांवर प्रखर टिका केली. तुकारामांचे सुमारे पाच हजार अभंग उपलब्ध आहेत. तुकाराम गाथा हा त्यांचा अभंग संग्रह आहे. आपल्या अभंगाच्या माध्यमातून त्यांनी वारकरी संप्रदाय खेड्यापाड्यापर्यंत नेहून पोहचवला. कर्मकांड, रूढी परंपरा, अंधश्रद्धा यावर त्यांनी अभंगाच्या माध्यमातून टिका केली. तुकारामांनी दांभिकतेवर कठोरपणे कोरडे ओढून आपल्या अभंगात सर्वत्र भक्ती, भूतदया, परमार्थ व परोपकार यांचा मिलाफ घडवून आणला. तुकारामांनी दया, क्षमा, शांती यांची शिकवण दिली. सामान्य लोकांविषयी त्यांना तळमळ होती. त्यामुळे तुकाराम म्हणतात

बुडती हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणोनिया ।

आपल्या अभंगाच्या माध्यमातून त्यांनी बहुजन समाजाला मार्गदर्शन केले.

वारकरी संप्रदायाचा कळस म्हणजे तुकाराम महाराज होय. ज्ञानेश्वरांनी भक्तीमार्गाचा पाया रचला तर तुकारामांनी भक्तीमार्गास कळसापर्यंत नेऊन पोहचवले. एकनाथांचे समाजसुधारेचे व लोक जागृतीचे कार्य तुकारामांनी अधिक तेजस्वीपणे पुढे सुरू ठेवले. वारकरी पंथाचे मुकूटमणी म्हणून तुकारमांकडे पाहिजे जाते. तुकारमांनी आपल्या कार्याच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाची शिकवण समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहचवली. ज्ञानेश्वारांनी सुरू केलेले कार्य तुकारमांनी घरोघरी पोहचवले. ज्ञानेश्वरप्रणीत भागवत धर्माच्या मंतिदरावर कळस चढवला. १६४९ मध्ये वयाच्या एकेचाळिसाव्या वर्षी तुकाराम महाराजांचे देहावसान झाले. त्यांनी जगाचा कसा निरोप घेतला त्याविषयी अनेक अख्यायीका प्रसृत आहेत.

वारकरी संप्रदायाचे कार्य

वारकरी संप्रदाय म्हणजे संतांची धार्मिक व सामाजिक चळवळ होती. या संप्रदायाने महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक, व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण कामगिरी बजावली. ज्ञानेश्वरांनी या संप्रदायाचा पाया घातला व भागवत धर्माला तत्त्वज्ञानाची बैठक दिली. तर नामदेवांनी भागवतधर्माचा संदेश सर्वदूर पसरवला. नामदेव (१२७१-१३५०), एकनाथ (१५५३-१५९९), तुकाराम (१६०८-१६४९) हे या संप्रदायाचे प्रमुख प्रसारक होते. गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, चोखामेळा, विसोबा खेचर, जनाबाई सेना न्हावी, कान्होपात्रा, बहिणाबाई यांनीही भागवत धर्माचा प्रसार केला. ज्ञानेश्वर-नामदेव यांच्या काळात वारकरी संप्रदाय विकसित झाला. पुढे एकनाथ व तुकाराम यांनी सोळाव्या आणि सतराव्या शतकात या संप्रदायाचा मोठ्या प्रमाणात विस्तार घडवून आणला. ज्ञानेश्वारांनी महाराष्ट्राला तत्त्वज्ञान दिले. नामदेवांनी भक्तीची पताका फडकवली. एकनाथांनी तत्त्व आणि तपशील विचार आणि आचार यांचा मिलाफ घडवून आणला. तर तुकारामनी ज्ञान., भक्ती आणि आचार यांच्या माध्यमातून समाजकंटकांची यथोचित संभावना करून चिरंतन नितीमूल्यांची जोपासना केली.

वारकरी संप्रदायाचा विस्तार महाराष्ट्राबरोबरच महाराष्ट्राच्या बाहेरही घडून आला. हिंदू-धर्मात निर्माण झालेल्या कर्मकांडास, जुन्या बुरसटलेल्या विचारास व अंधश्रद्धेस संतांनी विरोध केला. कर्मठपणा व व्रतवैकल्ये यावर त्यांनी टिका केली. ईश्वरप्राप्तीचा खरा मार्ग लोकांना सांगितला. ईश्वरभक्ती ही विशिष्ट वर्गाची मक्तेदारी नाही हे सांगून समाजाच्या सर्व वर्गातील लोकांना भक्ती करण्याचा अधिकार आहे असे सांगितले. महाराष्ट्रातील जनता जात, धर्म, लिंगभेद विसरून या संप्रदायात सामील झाली. अवताराचे सामर्थ्य पूर्ण । प्रपंच परमार्थी सावधान ।। असे सांगून एकनाथांनी प्रपंच व परमार्थ यांचा समन्वय साधला. परमार्थ करण्यासाठी प्रपंच त्याग करण्याची गरज नाही. प्रपंच करून परमार्थ साधता येतो हे संतांनी दाखवून दिले. चोखामेळा, गोराकुंभार, सावता माळी हे सर्व संत गृहस्थाश्रमी व कुटूंबवत्सल होते. दया, क्षमा, शांती, अहिंसा, समता व मानवता या तत्वांची शिकवण संतांनी समाजाला दिली. समाज जीवनास आवश्यक असणाऱ्या मुल्यांचे स्मरण घडवले. दुरितांचे तिमिर जावो. जो ज वांछिल तो ते लाहो असे मानवतावादावर अधिष्ठित पसायदान मागितले.

वारकरी संप्रदायामध्ये सर्व जातीधर्मातील लोकांनी सहभाग घेतला होता. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई, विसोबा खेचर, चांगदेव,

नरहरी सोनार, सेना न्हावी, सावता माळी, गोरो कुंभार, चोखा मेळा, राहिदास,. जनाबाई, कान्होपात्रा हे वारकरी संप्रदायामधील संत वेगवेगळ्या जातीचे होते. कोणत्याही जातीच्या मनुष्यास भक्तीने आपली आध्यात्मिक उन्नती साधता येते असा विश्वास दिला. येथ कुल जाति वर्ण अप्रमण मानून अंतरी निर्मळ वाचेचा रसाळ । त्याच्या गळा माळ असो नसो अशा कुणाही व्यक्तीस सामावून घेण्या इतकी मनाची विशालता सिद्ध केली. जात किंवा पंथ यासारखी कोणतीही समाजिक बंधने भक्ताच्या आध्यात्मिक प्रगतीच्या मार्गात अडथळे आणत नाहीत. समाजात उच्च-नीच, स्पृश्य-अस्पृश्य हा भेदभाव मोठ्या प्रमाणावर अस्तित्वात होता. संतांनी जातीभेद मानला नाही. जातीव्यवस्थेवर प्रहार करून जाती जातीतील विषमता कमी करण्यावर भरत दिला. संतांनी या सामाजिक विषमतेविरूद्ध बंड उभारले. चोखामेळासारखा हरिजन संत खटनट यावे शुद्ध होऊनी जावे । दवंडी पिटी भावे चोखामेळा । अशा प्रकारे निर्भयतेने आपल्या दलित बांधवांना पुकारू लाृला. संतांनी केवळ सामाजिक समतेचे तत्त्वज्ञानच सांगितले असे नाही तर त्यांचे आचरणही केले. संतांनी आपल्या उपदेशाने व प्रत्यक्ष आचरणाने सामाजिक विषमतेविरूद्ध बंड उभारले. उन्हात तळमळणारे महाराचे पोर प्रेमाने कडेवर घेणारे, आपल्या अंथरूणावर वडाऱ्यास झोपवणारे अनाथांचे नाथ म्हणजे संत एकनाथ, शेकडो वर्षाच्या सामाजिक दडपणामुळे खुरटून गेलेल्या बहुजन समाजाच्या सुप्त आकांक्षा वारकरी संप्रदायामुळे पुन्हा जागृत झाल्या. संतांनी वारकरी संप्रदायाचा प्रचार व प्रसार करण्याबरोबरच समाजजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य केले. आपल्या समाजातील दोष, उणीवा त्यांनी लोकांसमोर मांडल्या. अभंग, ओव्या, पदे, भारूडें, कीर्तने, भूपाळी इ. माध्यमातून समाजजागृतीचे तत्त्वज्ञान लोकांपर्यंत पोहचवले.

भक्ती म्हणजे देवावरचे नितांत प्रेम. भक्तीला अध्यात्मनिष्ठ मानवतावादाची बैठक त्यांनी मिळवून दिली. कर्मकांडाचे स्तोम न माजवता ईश्वरप्राप्तीसाठी भक्तीमार्गाचा प्रसार सर्वसामान्य लोकांमध्ये केला. कर्मकांड, उपास-तापस भक्तिविना निरर्थक आहेत हे दाखवून दिले. विठ्ठलाची निस्सीम भक्ती करून कोणालाही परमेश्वरप्राप्ती करून घेता येणे शक्य आहे ही या संप्रदायाची सर्वात मोठी शिकवन आहे. संतांनी विठ्ठलाच्या नामघोषाने संपूर्ण महाराष्ट्र दुमदुमून सोडला. स्त्री शुद्रादिकांना आत्मविकासाचा मार्ग खुला करून दिला. कोणत्याही जातितील व्यक्तींना भक्तीच्या माध्यमातून आध्यात्मिक उन्नती साधता येईल. नैतिक सामर्थ्य वाढवता येईल. प्रापंचिक दुःखावर मात करता येईल असा विश्वास त्यांनी लोकांमध्ये निर्माण केला. सामन्य लोकांच्या अंतःकरणात धर्माभिमानाची ज्योत प्रज्वलित केली. तिर्थयात्रा, व्रतवैकल्ये, तिथी-वार, कर्मठपणा, संन्यास व श्राद्धपक्ष या अवडंबरावर संतांनी टिका केली. सहज, सुलभ व सोप्या अशा भक्तीमार्गाची शिकवण त्यांनी दिली. निष्काम कर्म, त्यागबुद्धी स्थितप्रज्ञता, मनोनिग्रह, वासनाजय हा खरा धर्म असल्याचे संतांनी सांगितले. भागवत धर्माचे पहिले लक्षण म्हणजे भक्तीयोग होय. सवधर्माचे, विहित कर्माचे आचरण हे दुसरे लक्षण, संन्यासाला संसारत्यागास विरोध हे तिसरे लक्षण, कर्मकांड निषेध हे चौथे लक्ष आहे. रंजल्यागांजलेल्यांना आपले म्हणणे, दया, क्षमा, शांती, भूतांचे पालन, कंटकांचे निर्दालन हा शुद्ध भागवत धर्म होय असा संतांचा ठाम सिद्धांत होता.

ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत आणि तुकाराम महाराजांची गाथा हे वारकरी संप्रदायांचे

तीन अध्यात्मिक ग्रंथ मानले जातात. या व इतर ग्रंच्यिा माध्यमातून वर्षानुवर्षे बंद असलेली ज्ञानाची कवाडे सर्वांना खुली केली व सर्वसामान्य लोकांपर्यंत हे ज्ञान पोहोचवले. त्यासाठी संस्कृत भाषेतून ग्रंथरचना न करता मराठी भाषेतून केली. संतांनी संस्कृत भाषेच्या विचाराचा प्रभाव दूर केला व मराठीस चालना दिली. पदोपदी आपल्या भाषाभिमान प्रकट केला. विद्वान व निरक्षर, पुरोगामी व कर्मठ, स्त्रिया व पुरूषख तरुण व वृद्ध अशा प्रकारे लोक वारकरी संप्रदायाच्या प्रचंड लाटेने वाहून गेले. विठ्ठलाचा जयघोष करीत हजारो वारकरी जातपात विसरून दरवर्षी आषाढी-कार्तिकी वारीमध्ये सामील होतात. समान्य लोकांच्या मनावर वारकरी संप्रदायाचा विलक्षण पगडा आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील भागवतधर्मीय संतांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. न्या. रानडे संत चळवळीच्या कामगिरीचे मुल्यमापन करताना Rise of the Maratha Power या ग्रंथा म्हणतात, ‘या देशाच्या प्रकृत भाषेत एक बहुमोल वाङ्मय या चळवळीमुळे आम्हास उपलब्ध झाले. जातीजन्म श्रेष्ठत्वाच्या वेडगळ कल्पनेचा जोरही या चळवळीनेच कमी झाला. शुद्र वर्गाला पारमार्थिक शिक्षण देऊन त्यांचे समाजामध्ये महत्त्व वाढवून ब्राम्हणांच्या तोडीस या चळवळीनेच आणून बसविले. कुटुंब संबंधाने पावित्र्य प्राप्त होऊन स्त्रियांची योग्यता वाढली. राष्ट्रांची बंधुप्रीती वाढवून परस्परांनी सहनशील होऊन जूट कायम राखण्यास परस्परांनी शिकविले. विधी, उपचार, यात्रा, उपोषणे यापेक्षा ईश्वरावर दृढ भक्ती ठेवून भजन व नामस्मरण करण्याचे महत्त्व वाढविले.’ संत चळवळीविषयी प्रा. ग.बा. सरदार म्हणतात. वारकरी पंथ हा सर्वसंग्राहक आहे. त्याने संकुचित सांप्रदायिकता बाळगली नाही. प्रतिकाचा दुराग्रह धरला नाही. दैवतावर रण माजवित नाहीत. वारकरी पंथात विठ्ठलभक्तीचा महिमा विशेष आहे. यात काहीच आश्चर्य नाही. कारण पंढरीच्या या विठ्ठलाने महाराष्ट्रातील साधुसंतांना चारशे वर्षे ग्रंथलेखनाची व कवित्वाची स्फुर्ती दिली आहे. लक्षावधी शूद्रातिशूद्रांना या दयामय दैवताने आत्मोद्धाराची प्रेरणा दिली आहे. संतांच्या कार्याचे मुल्यमापन करताना डॉ. पु.ग. सहस्त्रबुद्धे म्हणतात, ज्ञानेश्वरादी संतांनी वैदिक धर्माचे, गीता धर्माचे, भागवत धर्माचे पुनरूज्जीवन केल आणि मुसलमानांच्या धार्मिक आक्रमणापासून महाराष्ट्राचे रक्षण केले.

### ८.२.२ रामदसी पंथ

महाराष्ट्रातील एक अग्रगण्य संत म्हणून रामदास स्वामींकडे पाहिले जाते. मुस्लीम सत्तेच्या वर्चस्वाचाली भरडल्या जाणाऱ्या महाराष्ट्रीयन समाजाला त्यांनी जागे कले. संत व समर्थ अशी दोन रूपे त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची दिसून येतात. ज्ञानी, भक्तीमान व कर्मयोगी संतकवी म्हणून रामदास प्रसिद्ध आहेत. कृष्णाजीपंत ठोसर हे रामदासांचे पूर्वज असून ते ऋग्वेदी व जामदग्न्य गोत्राचे होते. या घराण्यात सूर्योपासना पूर्वापार चालू ोती. कृष्णाजीपंतास पाच मुले होती. कृष्णाजीपंताच्या दशरथ नावाच्या मुलाने हिवऱ्यापासून तीन कोसावर जांब नावाचे गाव वसवले. या गावचे जोशी कुलकर्णीपणाचे वतनही मिळवले. दशरथला सहा मुले होती. सहा मुलांपैकी रामाजीपंतहा ज्येष्ठ मुलगा होता. त्यापासून विसाव्यापिढीत रामदासस्वामींचा जन्म शके १५३० चैत्री नवमीला रामाचा जनमोत्सव चालू असताना मराठवाड्यातील जांब या छोट्याशा गावात झाला. रामदासांच्या वडिलांचे नाव सूर्याजीपंत

ठोसर व आईचे नाव राणूबाई होते. त्यांना गंगाधर व नारायण असे दोन मुले होती. नारायण यांनाच रामदास, समर्थ असे म्हटले जाऊ लागले. रामदास लहानपणापासूनच बुद्धीमान होते. घरातील पारमार्थिक संस्कारामुळे समर्थ बालवयातच चिंतरशील व अंतर्मुख बनले. त्यांच्या घरामध्ये राम व सूर्य यांची उपसना केली जात होती. १२ व्या वर्षीच त्यांनी शब्दरूपावली. समासचक, अमरकोश, रूद्र, पवमान इ. ग्रंथ मुखोद्गत केले. गावाबाहेरील मारूतीच्या देवळात जाऊन त्यांनी आपल्यातील सर्व अंतःप्रेरणांना रामस्वरूपी एकाग्र केले. चिंता करितो विश्वाची असे उत्तर देणाऱ्या या मुलास याच वयात अशा तऱ्हेने रामदास्य प्राप्त झाले. रामदास हे त्यांनी स्वतःसाठी घेतलेले नाव होते. रामदासांचे वडिल सूर्याजीपंत ठोसर मंत्रदीक्षा देत असत. त्यांच्या मृत्यूनंतर रामदासांचे बंधू गंगाधरपंत मंत्रदीक्षा देण्याचे काम करू लागले. वडिल सूर्याजीपंत व बंधू गंगाधर यांच्याकडून आपल्याला मंत्रोपदेश मिळावा असे रामदासांना वाटत होते. परंतु प्रत्यक्षात मात्र मंत्रोपदेश मिळाला नाही. रामदासांचा कुटूंबाच्या आथिृक प्रगतीत हातभार लागत नव्हता. रामदासांचे आई राणूबाई रामदासांचे लग्न करण्याचा निर्णय घेतला. लग्नातील मंगलाष्टके सुरू झाली. द्विजांनी सावधन म्हणताच रामदासांनी लग्नमंडपातून पलाय करून गोदावरीच्या परिसरात नाशिक जवळच्या टाकळी गावी गेले. रामदासांनी घर सोडल्यानंतर बारा वर्षे गोदातीरी अध्ययन व तपाचरण करण्यात गेली. येथे त्यांनी बारा वर्षे संस्कृत ग्रंथांचे अध्ययन, कथा - कीर्तन श्रवण, रामंत्र व गायत्रीमंत्र यांचा अखंड जप, वेदशास्त्रे, पुराणे, काव्ये व अनेक प्राकृत ग्रंथांचे परिशिलन केले. बारा वर्षाच्या तपश्चर्येमुळे एका ज्ञानी सत्पुरूषाचा उदय झाला. वे-वेदांत रामायण, महाभारत, गीता, उपनिषदे, भागवतादी ग्रंथांचा सखोल अभ्यास केला. या कालावधीत त्यांनी तीन गायत्रीपुरश्चरणे व श्रीराम ग्रंथ जय राम जय जय राम या त्रयोदशाक्षरी मंत्राचा १३ कोटी जप केला. रामदासांच्या या काळातील तपश्चर्येविषयी प्रा. न. र. फाटक म्हणतात, पुरश्चरणाच्या व तीर्थयात्रेच्या काळात समर्थांनी आपल्या भक्तीच्या ध्येयाला आवश्य असणारे ज्ञानार्जन केले असले पाहिजे.

तपश्चर्या संपल्यानंतर १६२२ मध्ये रामदास टाकळी सोडून तिर्थयात्रेसाठी उत्तरेकडे निघाले.रामदासांनी प्रथम प्रयाग, काशी, गया, या तीर्थस्थळांचे दर्शन घेतले. त्यानंतर रामदास अयोध्येस गेले. अयोध्या येथे अकरा महिने वास्तव्य केले. हिमालयातल्या बदरी केदार, बदरी नारायण या क्षेत्रांची यात्रा केली. पंजाबात जाऊन तेथील शीख धर्मगुरूंना ते भेटले. उत्तरेतील तीर्थक्षेत्रांचे दर्शन घेऊन जगन्नाथपुरीवरून रामदास दक्षिणेस परत आले. दक्षिणेतील अनेक तीर्थांना त्यांनी भेटी दिल्या. महाराष्ट्रातही ते फिरले. सुमारे बारा वर्षाच्या कालावधीत रामदासांनी उत्तर भारतातील बहुतांश तीर्थस्थळांना भेटी दिल्या होत्या. समर्थांच्या आयुष्यातील या यात्रार्वात त्यांना भारताच्या लोकस्थितीचे दर्शन घडले. उत्तरेकडील भ्रमंतीच्या काळात रामदासांनी आपल्या ध्येयाची व जीवनकार्याची स्पष्ट ओळख करून घेतली. पारमार्थिक हेतू उराशी बाळगून केलेल्या या तीर्थयात्रेत समर्थांनी तत्कालीन समाजस्थितीचे सूक्ष्म अवलोकन केले. त्याचेच चित्र अस्मानी सुलतानी आणि परचक्रनिरूपण या दोन स्फुट काव्यात उमटले आहे. या प्रवासाच्या काळात हिंदू समाजाची अगतिकता व केविलवाणी स्थिती पाहून त्यांच्या मनात क्षुब्धता व कोलाहल निर्माण झाले. विचारात

क्रांती घडू लागली. स्वकीय सत्तोवर स्वधर्म अवलंबून असतो, याची आंतरिक जाणीव होऊ लागली. समर्थांना स्वधर्मस्थापना करण्याकरिता मठस्थापन करून संघटना उभी करण्याची तिच्याद्वारे लोकस्थिती सुधाऱ्याची नितांत आवश्यकता वाटू लागली.

रामदास १६४४ च्या वैशाखात कृष्णातिरी दाखल झाले. कराडजवळच्या शहापूरच्या डोंगरावर ते राहू लागले. तेथे त्यांनी एका मारूतीची स्थापना केली. त्यांनी स्थापलेल्या अकारा मारूतीमधील हा पहिला मारूती होता. रामदास हे रामोपासक होते. चाफळ येथे रामदासांनी राममंदिर बांधून श्रीरामची स्थापना केली. चाफळच्या देवस्थानासाठी त्यांनी इनामे मिळवली. विजापूरच्या आदिलशाहानेही चाफळच्या देवस्थानासाठी दनाम दिले होते. पुढे शिवाजींनीही अनेक गावे इनाम म्हणून दिली. रामदासांनी १६४५ नंतर ठिकठिकाणी रामाची, हनुमानाची मंदिरे व मठ स्थापन केले. रामदासांनी चाफळ खोरे आवडल्याने तेथेच त्यांनी मुक्काम केला. त्यांनी किर्तनाच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती करण्यात सुरूवात केली. रामदासांच्या ज्ञानमुळे प्रभावित होऊन अनेक लोकांनी त्यांचे शिष्यत्व पत्करले. जातिधर्मामध्ये त्यांनी भेदभाव केला नाही. त्यामुळे वेगवेगळ्या जातीचे व धर्माचे लोक समर्थांकडे आकृष्ट झाले होते. त्यामध्ये काही मुस्लीम फकीरही होते. दिनकर स्वामी व गिरीधर हे त्यांचे पट्टशिष्य होते. परमार्थाचा अधिकार पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही आहे असे समर्थांचे मत होते. स्त्रियांनीही रामदासाचे शिष्यत्व पत्करले होते. त्यामध्ये अक्काबाई व वेणूबाई या त्यांच्या प्रसिद्ध शिष्या होत्या. रामदासांचे शिष्य त्यांनी घालून दिलेल्या नियमांचे, आचार विचारांचे काटेकोर पालन करत असत.

छत्रपती शिवाजींच्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला रामदासांनी धर्मस्थापनेच्या चळवळीची जोड दिली. तसेच प्रभावशाली तत्वज्ञानही मिळवून दिले. समर्थांचे लोकजागृतीचे कार्य स्वराज्य स्थापनेच्या कार्यात शिवाजींना अनुकूल ठरले. शिवाजी व रामदास यांचे वेगवेगळ्या क्षेत्रातील कार्य ध्येयासंबंधीच्या एकवाक्यतेमुळे व समकालीनत्वामुळे परस्परांना पूरक ठरले. शिवाजीच्या राजकीय घडामोडीत समर्थांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला नव्हता. पण शिवाजींनी हाती घेतलेल्या स्वराज्यस्थापनेच्या कार्याला लोकांची अनुकूल मानसीकता निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. शिवाजींनी १६५८ मध्येरामदासांच्या चाफळ येथील श्रीरामच्या मंदिरातील रामनवीच्या उत्सवासाठी ३०० होनाची देणगी दिली होती. शिवाजींनी स्वराज्याची स्थापना केली तर रामदासांनी त्यांच्या कार्याला आशिर्वाद दिले. या संदर्भात श्री. पांगारकर म्हणतात, नाथ - तुकोबांनी भागवत धर्माचा जयजयकार करून महाराष्ट्राची मनोभूमी शुद्ध केली आणि शिवबा-रामदासांनी त्याच भूमीवर स्वराज्याची भव्य इमारत उभारली. शिवाजी रामदास संबंध, स्वराज्य स्थापनेमधील रामदासांचे कार्य याविषयी प्रा. माटे म्हणजात, प्रवृत्तिवादाचे आरंभस्थान पुन्हा चाळवून, जागृत करून त्याने प्रपंचावर आलेला हीनत्वाचा आरोप तर उडवून लावला. पण तामस तामस हिणविल्या तेव्हाच्या प्रत्यक्ष राजकारणातसुद्धा हात म्हणून घातला! शिवाजींच्या राजकारणाशी रामदास एकजीव झाले होते. त्यांनी शिवाजींना राजकारणाचा मंत्र दिला हे मात्र खरे नव्हे किंवा शिवाजीशी ते बरोबरीने राजकारणात वागले हेही खरे नव्हे. शिवाजीच्या प्रत्यक्ष राजकारणाला मागे चिकटलेले व त्यांच्या यशला उपयोगी पडणारे राजकारण रामदासांनी केले हे मात्र खचित. शिवाजी व रामदास यांची भेट झाली की नाही, कोठे झाली याविषयी विविध मते दिसून

येतात. शिवाजी महाराज व समर्थ रामदास यांच्यातील भेट इतिहासाच्या क्षेत्रातील विद्वानामधील वादाचा विषय ठरला आहे. वि.का. राजवडे, शंकर श्रीकृष्ण देव व शं. गो. तुळपुळे यांच्या मते शिवाजी व रामदास यांची भेट शके १५७१ वैशाख शुद्ध नवमीस (इ.स.१६५९) मध्ये झाली. तर गो. चि. भाटे, गो. का चांदोरकर, न. र. फाटक, सर जदूनाथ सरकार यांच्या मते शिवाजी व रामदास यांची भेट शके १५९४ (इ.स.१६७२) मध्ये झाली. तर मराठ्यांच्या इतिहासाचेसंशोधक अप्पासाहेब पवार यांची १६५८ पर्यंत शिवाजींना रामदासांची माहिती नव्हती असे म्हटले आहे. रामदांसानी शिवाजींना पाठवलेल्या आशीर्वादपर पत्रात रामदास म्हणतात–

निश्चयाचा महामेरू । बहुत जनांसी आधारू ।
अखंड स्थितीचा निर्धारू । श्रीमंत योगी ।।
यशवंत कीर्तिवंत । समार्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ।।

या पत्रात रामदास म्हणतात, देवालयाच्या रक्षणासाठी धर्माच्या रक्षणासाठी, गोमातेच्या व ब्राम्हणांच्या रक्षणाकरिता देव तुमच्या ह्दया स्थानापन्न झालेला आहे. तुमच्यामुळे महाराष्ट्रधर्म रक्षिला गेला आहे. राजा हा परमार्थाची चाड बाळगणारा, देवधर्माचा कैवार घेणारा आणि ब्राम्हणांची चिंता वाहरणारा असला पाहिजे असे त्यांना वाटत होते. शिवाजींचे कर्तत्व पाहून त्यांच्या मनात आदर्श राजाची कल्पना साकारली. शिवाजींनी देशाला राजकीय व धार्मिक दास्यातून मुक्त करावे ही समर्थांची आकांक्षा होती. शिवाजींच्या मृत्यूनंतर राजा झालेल्या संभाजीना लिहिलेल्या पत्रात समर्थ म्हणतात, बहुत लोक मिळावे। एकविचारे भरावे । कष्ट करूनि घसरावे । म्लेंच्छांवरी ।। लोकी हिम्मत धरावी । शर्थीची तलवार करावी । चढती वाढती पदवी । पावला येणे ।। शिवराजास आठवावे । जीवित तृणवत मानावे । ईश्वर लोकी राहावे । कीर्तिरूपे । शिवरायाचें आठवावे रूप ।। शिवाराजाचा आठवावा प्रताप । शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळी ।। शिवाजींच्या काळात समर्थ संप्रदायास सुरू झालेला राजाश्रय संभाजी , राजाराम व शाहू महारांजच्या कारकीर्दीतही सुरू होता.

श्रीराम, हनुमान व तुळजाभवानी ही तीन समर्थांची उपास्यदैवते होती. तुळजाभवानीला स्फुट कवितेतून प्रार्थना करताना रामदास म्हणतात

येकची मागणें आतां । द्यावे ते गजकारणे ।।
तुझा तुं वाढवी राजा । सीघ्र आम्हाची देखत ।।
दुष्ट संव्हारिलें मागे । ऐसे उदंड ऐकतो ।।
परंतु रोकडे कांही । मूळ सामर्थ्ये दाखवी ।।
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर बोलणें ।
क्षमावे तुळजे माते । ईच्छा पूर्णचीते करी ।।

महाराष्ट्रातील क्षत्रियांना तुळजाभवानीचे स्मरण करून धर्मस्थापनेसाठी संघटित व्हा असे रामदासांनी सांगीतले. एक थोर सिद्धपुरूष म्हणून लोक त्यांना आदरपूर्वक समर्थ रामदास म्हणत १६८० मध्ये शिवाजींच्या निधनानंतर दोन वर्षांनी समर्थांचे सज्जनगडावर निधन झाले. सज्जनगडावर श्रीरामनामाचा अखंड घोष करीत आपला देह ठेवला. तत्पूर्वी

दुःखात बुडालेल्या आपल्या शिष्यांना उद्देशून ते म्हणाले

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणी ।।
परि मी आहे जगज्जीवनी । निरंतर ।।
आत्माराम दासबोध । माझे स्वरूप स्वतःसिद्ध ।
असतां न करावा खेद । भक्तजनी ।।

**समर्थ रामदास**

सतराव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराट्रात समर्थांचे कार्य व शिकवण यातून प्रवर्तित झालेला पंथ म्हणजे रामदासी पंथ होय. समर्थ संप्रदायाची उभारणी रामदस स्वामींनी केली. शिवपूर्वकाळ काळातील राजकीय धार्मिक व सामाजिक परिस्थिती दुःसह होती. अशा परिस्थितीत वैदिक वर्णाश्रमधर्मांचे पुनरुज्जीवन रामोपासनेच्या बळावर करणारा संप्रदाय रामदासांनी सुरू केला. १६४४ पासून त्यांनी आपल्या संप्रदायाची उभारणी सुरू केली. पुढे रामदासांच्या या संप्रदायाचा विस्तार संपूर्ण भारतभर झाला होता. या संप्रदायास री. संपद्रदाय, समर्थसंप्रदाय, दाससंप्रदाय, महाराष्ट्रधर्म, राघवाचा धर्म इ. वेगवेगळी नावेही आहेत. राघवाचा धर्म सांगताना समर्थ म्हणतात.

राघवाचा धर्म गाजो । कीर्ति अद्भुत माजो ।
ठाई ठाई देवालये । भक्तमंडळी सोजो ।
शक्ति आहे तोचि फावे । दोनी लोक साधावे ।
इहलोक परलोक । शत्रे सर्व रोधावे ।।

आपल्या संप्रदायाची विस लक्षणे सांगताना समर्थ म्हणतात –

प्रथम लिहिणे दुसरे वाचणे । तिसरे सांगणे अर्थांतर ।।
आशंकानिवृत्ति ऐसी चौथी स्थिति । पांचवी प्रवीति अनुभावें ।।
सहावे तें गाणे, सातवे नाचणे । टाळी वाजविणे आठवे तें ।।
नववा अर्थभेद, दहावा प्रबंध । अकरावा प्रबोध प्रचीतीसी ।।
बारावे वैराग्य, तेरावा विवेक । चोदावा तो लोक राजी राखें ।।
पंधरावे लक्षण तें राजकारण । सोळावे तें जाण अव्यग्रता ।।
पंधरावे जाणावा हा गुण सत्रावा । काळ समजावा सर्वां ठायी ।।
अठरावें लक्षण वृत्ती उदासीन । लोलंगता जाण ते थें नाही ।।
एकोणिसावें चिन्ह सर्वांसी समान । राखे समाधान ज्यांचे त्यांचे ।।
विसावे लक्षण राऊपासना । वेध लावी जना भक्तिरंगे ।।

रामदास हे वैदिक परंपरेचे अभिमानी होते. त्यांनी देश, काल, परिस्थिती पाहून आपल्या संप्रदायाची उभारणी केली. तंजावर येथील भीमस्वामींच्या मठातील एका बाडात असा उल्लेख आहे की, ब्रम्हचर्यव्रत, हुरमुजी वस्त्रे, विवेकवैराग्य, इंद्रियनिरोध, भिक्षावृत्ती, निस्पृहता व ईश्वरभक्ती हाच रामदासांचा संप्रदाय होय. या संप्रदायाच्या भजन, प्रार्थना,

मंत्रजप, वैराग्य, विवेक, इंद्रीयनिरोध, वर्णाश्रमधर्माचे पालन, स्नानासंद्धारी नित्यकर्मे, एकानती मानसपूजा या गोष्टी इतर धार्मिक संप्रदायाहून वेगळ्या नाहीत.

**संप्रदायाची दैवते**

प्रभूरामचंद्र, हनुमान, आणि तुळजाभवनी ही समर्थ संप्रदायातील तीन प्रमुख दैवते होती. श्रीरामचंद्र ही समर्थ संप्रदायाची प्रमुख दैवता तर श्रीहनुमान ही दुसरी मुख्य देवता होती. सामर्थांनी आपल्या संप्रदायाचे श्रीराम हे उपास्य दैवत ठरवले. समर्थ संप्रदायाची उभारणी प्रभूरामचंद्र या दैवताभोवती झाली असल्यामुळे या संपद्रदायास रामदासी संप्रदाय म्हटले जात होते. रामचंद्राचा अवतार दुष्टांच्या निर्दालनासाठी राक्षसांच्या विनाशासाठी होता. समर्थांचा उपास्य श्रीराम हा धनुर्धारी आहे. धनुर्धारी रामाची उपासना त्यांनी लोकांमध्ये प्रस्तृत केली. 'रामें रामदासीं उपदेशिले' असा प्रत्यक्ष श्रीरामाने आपणास उपदेश केला असे समर्थ म्हणतात. रामदासांच्या एका अभंगवरून असे दिसते की प्रत्यक्ष रामचंद्रांनीच स्वप्नात येऊन 'श्रीराम जयराम जयजयराम' आ त्रयोदशाक्षरी मंत्र त्यांना दिला. समर्थांनी रामाच्या जोडीनेच जितेंद्रिय, बलसंपन्न आणि स्वामिकार्यसाधक अशा मारूतीची उपासना समाजात रूढ केली. हनुमंत हा समर्थांच्या रामोपसनेचा परमादर्श आहे. हनुमान हा सर्व भक्तश्रेष्ठांचा आदर्श. रामभक्तांना रामाची भेट घडवून देणारा मध्यस्थही तोच आहे. हनुमान हे शक्तीचे, बुद्धीचे व समर्पित भक्तीचे प्रतिक आहे. तुळजापूरच्या भवानीमातेसही समर्थांनी महत्त्वाचे स्थान दिले होते. तुळजावराचेनि गुणें । रामें रावण मारिला ।। ऐसी ही तुळजाभवनी । प्रसिद्ध रामवरदायिनी ।। अशी रामदासांची दृढ श्रद्धा होती. आपल्या संप्रदायाचा इतिहास सारांशाने सांगताना रामदास म्हणतात–

हनुमंत आमुची कुळवल्ली । राममंडपी वेली गेली ।
श्रीरामभक्तिने फळली । रामदास बोले या नांवे ।।१।।
आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचे मुख्य दैवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिद्धि न पवे सर्वथा ।।२।।
साहय आम्हांसी हनुमंत । आराध्य दैवत श्रीरघुनाथ ।
गुरू श्रीराम समर्थ । उणे काय दासासी ।।३।।
दाता एक रघुनंदन । वरकड लंडी देईल कोण ।
तथा सांडोनि आम्ही जन । कोणाप्रती मागावे ।।४।।
म्हणोनी आम्ही रामदास । रामचरणी आमुचा विश्वास ।
कोसळोन पडो रे आकाश । आणिकाधि वास न पाहूं ।।५।।
स्वरूप संप्रदाय अयोध्या मठ । जानकी देवी श्रीरघुनाथ दैवत ।
मारूतीऊपासना मार्ग नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासी ।।६।।

स्वधर्मरक्षणाला समाजाच्या निष्कलंक चारित्र्याची, संघटित जीवनाची आणि प्रयत्नवादाची नितांत आवश्यकता असते. म्हणून हे अंतिम साध्य डोळ्यासमोर ठेवून समाजाच्या अज्ञानातून निर्माण झालेले जडमुढतेचे हीण भस्मसात करून टाकण्यासाठी सर्व

गुणांचा आदर्श अशा पुरूषार्थी प्रभुरामचंद्रसारख्या दैवताभोवती त्यांनी आपल्या संप्रदायाचे प्रवर्तन केले. रामदासांनी धनुर्धारी रामचंद्र व हनुमान या दैवतांच्या उपासनेचा स्वतंत्र पंथ उभारून महाराष्ट्राला बलोपासनेची दीक्षा दिली. रामनवमी व हनुमानजयंती हे या संप्रदायाचे दोन मुख्य उत्सव होत. श्रीराम व मारूती यांच्या उपासनेला त्यांनी नवा अर्थ दिला. या संप्रदायाची चाफळ व सज्जनगड ही प्रमुख पूज्य स्थाने होती.

**गुरूपरंपरा**

गुरूपरंपरा सांगताना रामदास म्हणतात–

आदिनारायण सद्गुरू आमुचा । शिष्य जाहला त्याचा महाविष्णू ।

तयाचा जो शिष्य तो जाणावा हंस । तर्णे ब्रम्हयास उपदेशिले ।।

ब्रम्हदेवे केला उपदेश वसिष्ठा । तेथे धरा निष्ठा शुद्धभाव ।।

वसिष्ठ उपदेश श्रीरामायासी । रामे रामदासीं उपदेशिले ।।

यावरून आदिनारायण – महाविष्णू – हंस – ब्रम्हदेव – वसिष्ठ – श्रीरामचंद – रामदास अशी गुरूपरंपरा असल्याचे दिसून येते.

**तीर्थस्थाने**

रामदासी संप्रदायात तीर्थस्थानांना महत्त्वाचे स्थान आहे. नाशिकच्या पूर्वेस असलेल्या टाकळीत गोदावरीच्या पात्रात उभे राहून रामदासांनी पुरश्चरण करीत १२ वर्षाचा काळ घालवला. चाफळ हे रामदासी संप्रदायाचे प्रमुख केंद्र होते. सातारा जिल्ह्यातील पाटण ताजुक्यातील मांड नदीच्या काठावर चाफळ गाव रामदासांनी चाफळ येथे पहिला मठ स्थापन केला होता. रामदासी संप्रदायाचे आदिपीठ म्हणून चाफळ प्रसिद्ध आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील रामदासांचे जांब हे जन्मगाव. समर्थांनी दासबोधाची रचना केलेले महाड तालुक्यातील शिवथरघळ समर्थांच्या वडिल बंधूंची समाधी असलेले परभणी जिल्ह्यातील दहिफळ, सज्जनगड, ही ठिकाणे या संप्रदायातील अनुयायी महत्त्वपूर्ण मानतात.

**सांप्रदायिक वेश**

रामदासी संप्रदायातील अनुयायांचा वेश काखेत कुबडी, गळ्यात भिक्षेची झोळी, हातात चिपळ्या, अंगात भगव्या रंगाचे कौपीन, भाळी राजमुद्रा व मुखात मनाचे श्लोक. रामदासी संप्रदायाचे अनुयायी ब्रम्हचारी व गृहस्थाश्रमीही होते. मेखला, शिरोवस्त्र, झोळी कमरेस बांधावयाचे रामनामांकित वस्त्र व भगवे निशाण अशी पंच वस्त्रे भिक्षेच्या वेळेस असावीत. सूर्यनमस्कार, हनुमंतस्मरण, श्रीरामाचे भजनपूजन, करूणाष्टके म्हणणे, दररोज दासबोधाचे दोन समास व मनोबोधाचे अकरा श्लोक वाचणे हे भाग समर्थ संप्रदायातील आचाराचे वैशिष्ट्य दर्शवणारे आहेत.

**अकरा मारूती**

रामदसी संप्रदयात मारूतींना महत्त्वाचे स्थान होते. मारूतीच्या मध्यस्थीनेच रामाची व त्यांच्या भक्तांची भेट घडून येत असे. रामदासांनी शहापूर, मसूर, उउंब्रज, शिरोळे, मनपाडळे, पारगाव, माजगाव, बहेगाव, शिंगणवाडी व चाफळ या ठिकाणी अकरा मारूतींची स्थापना केली होती. रामभक्तांनी अकरा मारूतींची स्थापना करावी असा संकेत या संप्रदायात निर्माण झाला होता.

**मठस्थापना**

रामदास स्वामींनी एकूण किती मठ स्थापन केले याविषयी एकमत नाही. चाफहा मठ हे त्यांचे आदिपीठ होते. पुढेसुमारे ११०० मठांची स्थापना त्यांनी व त्यांच्या प्रेरणेने त्यांच्या शिष्यांनी केली असे म्हटले जाते. या मठांमधील सर्वात महत्त्वाचा मठ म्हणून चाफळचा मठ प्रसिद्ध आहे. चाफळच्या मठातून इतर मठांवर व त्यातील कार्यावर नियंत्रण ठेवले जात. मठस्थापना व शिष्यसंप्रदाय यांच्याद्वारे संघटनेचा पद्धतीशर मार्ग घालून दिला. जांब (रामदासांची जन्मभूमी), चाफळ (रामदासांची कर्मभूमी), व सज्जनगड (रामदासांची समाधीभूमी) येथील मठांचे महंत (मठाधिपती) स्वतः रामदास होते. याशिवाय डोमगाव, टाकळी, इंदुरबोधनर, शिरगाव, महाबळेश्वर, कारंजे, भालगाव, भिंगार, दादेगाव, मिरज, मजालगाव, निलंगा, कण्हेरी, शिरवळ, पसरणी, मर्ढे, तंजावर, एक्केहाळी, राशिवडे, व वाळवे या व इतर अनेक ठिकाणी समर्थांनी मठाची स्थापना केली होती. मठ म्हणजे रामदासांच्या कार्याची केंद्रेच होती. आपल्या संप्रदायाचे कार्य सर्वत्र पसरवण्यासाठी समर्थांनी महंत निर्माण केले. विस–बावीस वर्षातील ब्राम्हण व मराठा तरुणांना निवडून समर्थ त्यांना शिकवण देऊन महंत बनवत असत. प्रत्येक महंताला मठ बांधून दिला. महंतास समर्थ कोणत्या वस्तु देत व कोणती कर्तव्य सांगत हे पुढील ओव्यातून दिसून येते.

करू महंतीला धाडिती जयासी । दासबोध झोळी काठी तयासी ।।

वोपूनि सिकविती श्रीरामासी । धरोन मानवी वर्तावे ।।

ग्रंथातरी विवरत जावें । नित्यनेम श्रद्धेने सर्वदा करावे ।

कीर्तनासि विन्मुख न व्हावे । सार शोधावें प्रत्ययानें ।।

येका कारणें बोलतां स्वहित । सकळांसी तेणें बिंबतो अर्थ ।

जेवि उद्धवासि बोधितां कृष्णनाथें । जाले पावन बहुतेकी ।।

महंताने मठात राहून भैक्ष्य वृत्तीने समाज प्रबोधन करावे अशी समर्थांची अपेक्षा होती. समर्थांनी आपल्या ह्यातीतच गुणवत्ता पाहून महंतांच्या नेमणूका करून महंते महंत करावे । युक्तिबुद्धीने भरावे । जाणते करून विखरावे । नाना देशी ।। असा त्यांना संदेश दिला होता. मठांचा खर्च भिक्षेवर चालवला जात असे. ही भिक्षा लोकांकडून घेतलेली असे. महंताना खाजगी मालमत्ता जमा करता येत नसे. महंताने दासबोधाचे दोन समास व मनोबोधाचे अकरा श्लोक नित्य वाचावेत. महंताची पहाटे उठवे, तत्वमसि मंत्राचे चिंतन, मोक्षसाधनमंत्राचा जप, पूजामूर्तीचे ध्यान, भजन व प्रार्थना, रामाचे चिंतन, आरती, नित्यकर्मे, एकांती भजन, मानसपूजा व मंत्रजप, गुरूपूजा, सूर्यनमस्कार, तत्वमासि मंत्राने तीनदा तीर्थग्रहण, वैवेद्रसमर्पण, भोजन, आपापला व्यवसाय करणे, सायंकाळी स्तोत्रे म्हणून मारूतीची आराधना व भोजन अशी दिनचर्या असे. मठाचा प्रमुख असलेल्या महंतास वर्षाच्या शेवटी चाफळ येथे येऊन आपल्या कार्याचा अहवाल त्यास सादर करावा लागत असे.

**संप्रदायाचे तत्वज्ञान**

रामदासांचे विचारधन ज्यामध्ये एकवटलेले आहे तो ग्रंथ म्हणजे दासबोध हा समर्थांचा व रामदासी संप्रदायाचा प्रमुख ग्रंथ आहे. ७७५१ ओव्यांच्या आणि दोशने समासांच्या

आजच्या दासबोधापूर्वी समर्थांनी एकवीस समासांचा एक दासबोध रचला होता. दासबोधात मानवी सद्‌गुणांची वाढ व्हावी, लोक कर्तृत्वसंपन्न व परमार्थप्रवण व्हावेत ही तळमळ दिसून येते. दासबोध या ग्रंथातून रामदासांचा व्यासंग, चिंतन व समाजाचे त्यांनी केलेले सुक्ष्म अवलोकन दिसून येते. रामदासांनी दासबोध ग्रंथात जीवनाचे सर्वांगीण चिंतन मांडले आहे. दासबोध हे मोठे विचार भांडार आहे आहे असे डॉ, केतकर म्हणतात– एकवीससमासी व दासबोध यातील विचार सामान्य जनतेसाठी सोप्या भाषेत मनाच्या श्लोकातून रामदासांनी सांगितले आहेत. स्फुट कविता, प्रासंगिक कविता, आत्मारामसारखी वेदान्त प्रकरणे, अभंग, श्लोक, भूपाळ्या, करूणाष्टके, सुखकर्ता दुःखहर्ता वर्ता विघ्नाची... ही श्रीगणेशाची प्रसिद्ध आरती या रचना प्रसिद्ध आहेत. करूणाष्टके कारूण्याने ओथंबलेली आहेत ही रचना म्हणजे साधकावस्थेतील रामदासांच्या अंतरंगाचे प्रतिबिंबच होय. रामभक्तीने प्रेरित होऊन त्यांनी दोन रामायणे लिहिली. अन्यायाचा निःपात करणारा राम जसा पूर्ण उदयाला आला, तसेच आता कुणीर नवा राम पुढे येईल काय असा प्रश्न त्यांना या रामायणातून विचारायचा आहे. ग्रंथरूप आणि स्फुट काव्यरूप अशी द्विविध स्वरूपाची ग्रंथरचना समर्थांनी केली. समर्थांच्या साहित्यसृष्टीवर मुकुंदराज, एकनाथ, दासोपंत, त्र्यंबकराज यांचा ठसा उमटलेला दिसून येतो. रामदासांच्या लेखनकार्याचा क्रम प्रथम करूणाष्टके, नंतर आध्यात्मिक प्रकरणे, नंतर रामायण, शेवटी दासबोध व मधूनमधून स्फुट व प्रासंगिक काव्ये असा असावा असा अंदाज शं. गो. तुळपुळे यांनी व्यक्त केला आहे. रामदासांनी आपल्या ग्रंथामधून तत्कालीनप पिरिस्थितीतील धर्मग्लानीचे मित्र अनेक ठिकाणी रेखाटले आहे. रामदासांच्या वाङ्‌मयातील भाषाशैली सुगम व अर्थगर्भ, अकृत्रिम व रोखठोक, प्रगल्भ आणि प्रभावी आहे. रामदासांचे लेखन त्यांच्या चिंतनशील आणि समाजमनस्क वृत्तीचे दर्शन घडवणारे आहे. सामर्थ्याची उपासना, सामर्थ्याचे तत्त्वज्ञान, सामर्थ्याचे पद्धतीशर संघटन यातच समर्थ्यांच्या वाङ्‌मयाचे समर्थपणे साठवले आहे.

रामदासी संप्रदायाचे तत्त्वज्ञान रामदासांच्या दासबोध ग्रंथातून दिसून येते. कर्म, भक्ती व ज्ञान याविषयी समर्थांचे विचार भागवतधर्मीय संताप्रमाणेचे होते. परंपरागत अद्वैतसिद्धांत आणि त्याला भक्तीची जोड हाच त्यांच्या तत्त्वज्ञानाचा गाभा आहे. अध्यात्म हा त्यांच्या एकूण विचारसरणीचा केंद्रबिंदू आहे. परमार्थसिद्धी, आत्मसाक्षात्कार हे मनुष्यमात्राचे अंतिम साध्य आहे असे त्यांना वाटत होते. कोणत्याही कार्यास रामदासांना भगवंताचे अधिष्ठान अभिप्रेत होते. आत्मज्ञानाची महती समर्थांनी सांगीतली आहे. ज्ञान म्हणजे आत्मज्ञान पाहवे । आपणासि आपण । या नांव ज्ञान ।। अशी ज्ञानाची व्याख्या त्यांनी केली आहे. आत्मज्ञान प्राप्त झाल्यानेच व्यास, वसिष्ठ महामुनी, शुक आणि नारद, सनकादिक, वामदेवादिक, वाल्मीकी, अत्री, शौनक, आदिनाथ, मीननाथ आणि गोरक्षनाथ इ. पैलपार झाले. ननाची प्राप्ती होण्यासाठी सद्‌गुरूची आवश्यकता असते. निश्चल, चंचल आणि जड अशी तीन तत्त्वे मिळून हे जग बनले आहे असे समर्थांना वाटत होते. विश्व म्हणून जे काही आहे त्या सवाृगंना ब्रम्हाने अंतर्बाह्य व्यापून टाकले आहे. ते पृथ्वीत असून पृथ्वीबरोबर नाश पावत नाही. पाण्यात असून त्याबरोबर आटत नाही. तेजाळ असून जळत नाही. शरीराला व्याप्त असून आढहत नाही. अनुभवानेच ते जाणता येते. निश्चत, ब्रम्ह, चंचल आत्मा आणि जड पंचमहाभूत या तीन तत्वांनी जगाची निर्मिती झाल्याचे समर्थांनी सांगीतले आहे.

परमेश्वराविषयी समर्थ म्हणतात परमात्मा परमेश्वर । सर्व कर्ता तो ईश्वरू । तयापासूनि विस्तारू । सकळ जाला ।। ईश्वर हा अनंत नावे धारण करणारा व अनंत शक्ती उत्पन्न करणारा मूळ पुरूष आहे. रामोपासनेचा प्रचार आणि प्रसार हे समर्थांनी आपले जीवितकार्य मानले होते. समथांृचा सर्वात्मा राम हा सगुण, निर्गुण व पूर्णकाम आहे. त्याचा ते देवाधिदेव, थोरला देव अथवा मुख्य परमात्मा असाही उल्लेख करतात. त्यांच्या उपासनेसाठी त्यांनी नामस्मरण हे प्रभावी साधन सांगितले. श्रीराम जय राम जय जय राम हा त्रयोदशाक्षरी मंत्र सांगितला. समर्थांनी नामस्मरणात ध्याना वर विशेष भर दिला होता. सूक्ष्म ध्यान आणि स्थूल ध्यान असे ध्यानाचे दोन प्रकार कल्पून सूक्ष्म ध्यानाचा समर्थांनी पुरस्कार केला होता. कर्मयोगाला व्यवहारावादाचा किंवा प्रयत्नवादाची जोड देऊन ऐहिक जीवनाच्या उत्कर्षात त्याची परिणती करणारे रामदास हेच एक संत दिसून येतात. प्रपंचपरमार्थाचा विवेक प्रयत्नवादाचा पुरस्कार, लोकसंग्रहाचा ध्यास व देशकालपरिस्थितीचे उत्कट भान हे समर्थांचे विचार महत्त्वपूर्ण आहेत.

समाजाला परमार्थाची शिकवण देण्याबरोबरच तत्कालीन परिस्थिती लक्षात घेऊन समाजाला प्रपंचविज्ञान सांगितले. रामदासांना प्रपंचाची हेळसांड मान्य नव्हती. प्रपंच व परमार्थ यांची सारखीच काळजी घेतली पाहिजे असे त्यांना वाटत होते.

प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करीज जागण ।

प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।।

प्रपंच - परमार्थाची सांगड, सर्व बाबतीत सावधानता व प्रयत्नवादाचा पुरस्कार समथांृनी केला. प्रपंच सोडून परमार्थ कराल, तेणे तुम्ही कष्टी व्हाल. ही त्यांची शिकवण व्यक्तीच्या आणि राष्ट्राच्याही जीवनाला अनुलक्षून होऊ लागली. प्रपंचात जो यशस्वी होतो, पुरूषार्थ गाजवू शकतो तोच परमार्थात यशस्वी होऊ शकतो. याविषयी समर्थ म्हणतात. आधी प्रपंच करावा नेटका । मग लागावे परमार्थ विवेका परमार्थ हा प्रपंचावर अधिष्ठित आहे याची जाणीव त्यांना झाली होती. गृहस्थाश्रमाविषयी समर्थ म्हणतात, याकारणे गृहस्थाश्रम । सकाळांमध्ये उत्ततोत्तम । परंतु पाहिजे स्वधर्म । आणि भूतदया ।। सर्वांचे मूळ गृहस्थाश्रम । जेथे पावती विज्ञाम । त्रैलोक्यावासी ।। देव ऋषी मुनी योगी । नाना तपस्वी वीतरागी । पितृ आदिकरूनी विभागी ।। अतीत अभ्यागता ।। प्रपंच असो, प्रयत्नवाद असो वा राजकारण असो, या सर्वांना भगवंताचे अधिष्ठान असलेच पाहिजे यावर समर्थांनी भर दिला होता. पारमार्थीक बोधावर लक्ष ठेवूनही नेटका प्रपंच करण्याची महती त्यांनी पटविली. मोक्षसित्रीचा मार्ग अंगीकृत असताना ऐहिक प्रपंचाविषयी उदासीन न राहता प्रयत्नशील असावे व प्रपंच नेटका करीत करीतच परमार्थ साधावा असे त्यांचे मत होते. प्रपंच व परमार्थ या दोन्ही ठिकाणी सावधानता बाळगावी असे त्यांनी सांगितले. आधी देव मस्तकी धरूनच प्रत्येक कार्याला आरंभ करावा असे त्यांना वाटत होते.

या संप्रदायाच्या दैनंदिन आचारात स्नानसंध्या, देवपूजा, दाबोधातील निदान दोन समास मनोबोधातील अकारा श्लोक व दोन करूणाष्टके यांचे वाचन ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवतादी आध्यात्मिक ग्रंथाचे वाचन इ. समावेश होता. संप्रदयातील सांप्रदायिक भिक्षा मागत असत. भिक्षा हे पोअ भरण्याचे साधन नसून कार्यसिद्धीचे ते एक साधन होते. भिक्षा मागण्यासाठी जाताना हातात कुबडी, काखेत हुर्मुनी रंगाची झोळी, हुर्मुजी रंगाचे शिरोवस्त्र,

कमरेस रामनामी, भगवे निशाण असा वेश परिधान केला जात असे.

संप्रदायाचे कार्य

व्यक्ती वा समाज पारतंत्र्यात खऱ्या अर्थाने जीवनमुक्त होऊ शकत नाही. ही जाणीव त्यांच्या अंतःकरणात सतत जागृत होती आणि म्हणूनच त्यांची पारिमार्थीक चळवळ राजकीय चळवळीला प्रत्याप्रत्यक्ष रीतीने पोषक होत गेली. रामदासांनी आपल्या संप्रदायाच्या माध्यमातून निवृत्तीमार्गाने झपाटलेल्या समाजाला प्रवृत्तिमार्गाकडे नेण्यासाठी त्यांनी प्रवृत्तीवादाचे तत्वज्ञान उभे केले. लोकामधील आळस, शैथिल्य, नाकर्तेपणा झाडून कर्तृत्वाची दिशा त्यांना दाखवली. अज्ञान, भोळसटपणा, परधार्जिणेपणा, विवेकशुन्यता व आचारभ्रष्टता याविषयी लोकामध्ये तिटकारा निर्माण केला. देवाधर्माचे अराजक मोडावे, खऱ्या परमार्थाची स्थापना करावी आणि ऐहिक पुरूषार्थ साधनारी समाजव्यवस्था घडवावी ही त्यांनी आपली साध्ये ठरवली. ऐहिक पुरूषार्थ आणि परमार्थ यांचा अनोखा मेळ रामदासांनी घडवून आणला. निष्क्रीय उदासीनतेविरूद्ध प्रवृत्तीपर प्रयत्नवादाची शिकवण त्यांनी दिली. सामर्थ्य, चतुरस्त्रता, विवेकचातुर्य, लोकसंग्रह, प्रतिकार या गुणांची शिकवण लोकांना दिली. लोकसंस्थेच्या संरक्षणासाठी आणि सवंर्धनासाठी देवधर्म, राजधर्म आणि क्षात्रधर्म यांच्या समन्वयाचे महत्त्व ओळखून रामोपासनेबरोबरच राजकारणाचा, परमार्थाबरोबर प्रपंचाचा आणि भक्तीबरोबर शक्तीच्या उपासनेचा संदेश समाजास दिला. राजधर्म, क्षात्रधर्म, ब्राम्हणधर्म या सर्व कल्पनांना स्वधर्मा च्या विशाल कल्पनेत सामावून त्या धर्मजागृतीसाइी उदंड समुदाय करावे. संघटित समुदायाला एकविचारे भारावे आणि परमार्थनिरूपणाबरोबरच प्रचलित प्रतिकुल परिस्थितीविरूद्ध जाऊन मारितां मारितां मरावे । तेणें गतीस पावावे अशी आक्रमक शिकण आपल्यावाङ्मयाच्या माध्यमातून त्यांनी निमृण केली. स्वधर्माच्या रक्षणासाठी स्वराज्य हवे हे त्यांनी ओळखले होते. परकीय आक्रमणाचा प्रतिकार पराक्रमाने करावा असे संदेश दिला. समर्थांचा राजकीय क्षेत्रातील कार्याचा वाटा वैचारिक किंवा सांस्कृतिक स्वरूपाचा होता. प्रत्यक्ष राजकारणाच्या किंवा मुत्सेद्देगिरीच्या स्वरूपाचा नव्हता. तत्कालीन राजकीय परिस्थिविषयी इतर संतांच्या तुलनेने रामदास हे अधिक जागरूक होते. राजकारण धर्मकारणात जाणीवपूर्वक अंतर्भूत करणारे रामदास हे एकमेव महाराष्ट्रीय संत होते. समर्थांनी धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी मंदिरे बांधली देवांचे सार्वजनिक उत्सव सुरू केले.

समर्थांच्या प्रयत्नवादाला परमार्थाचे अधिष्ठान आहे. सामाजिक जीवनाची नैतिक परिशुद्धी करणे हे समार्थांच्या राजकारणाचे मर्म होते. तत्कालीन राजकीय व सामाजिक परिस्थितीत केवळ धर्मकारण हे जीवितध्येय न बाळगता राजकारणाचे महत्त्व जाणणारे रामदास द्रष्टे तर होतेच पण महान कर्मयोगी तत्वचिंतकही होते. प्रयत्नवाद व लोकसंग्रह यांचा पुरस्कार त्यांनी केला. धर्म, उपासना, कर्म, ज्ञान, व्यवहार, अध्यात्म, राजकारण व रामभक्ती यांचा लोकोद्धारासाठी प्रसार करणे हे या संप्रदायाचे प्रमुख कार्य होते. काळाची पावले ओळखून, संतत्वाबरोबरच ऐहिकाचा उत्कर्ष साधाणाऱ्या गुणांनी मंडित असलेल्या महंतांची परंपरा त्यांनी निर्माण केली. या महतांच्या माध्यमातून समर्थांनी महाराष्ट्र व महाराष्ट्राच्या बाहेर आपल्या विचारांचा व कर्याचा प्रसार केला. मठस्थापन व शिष्यसंप्रदायामुळे

रामदासांचे कर्तृत्व इतर संतापेक्षा वेगळे दिसून यते. दुबळ्या झालेल्या, आत्मविश्वास गमावून बसलेल्या हिंदू समाजाला सावरण्यासाठी मोठ्या प्रमाणावर सामूहिक प्रयत्न करणारी शिष्यसंघटना उभी करणारे रामदास हे एकमेव संत म्हणावे लागतील. कर्मकांडाला, मुर्तिपूजेला आणि भोळ्या समजूतींना समर्थांनी विरोध केला. 'सर्वाभूती वसणारा अंतरात्मा हाच आपला राम आहे' असा त्यांचा सिद्धांत होता. त्यांनी लोकशिक्षणावर भर देऊन लोकशिक्षणाचा पुरस्कार केले. जे जे कांही आपणासी ठावें । तें तें इतरां सिकावावें । शहाणे करून सोडावें । सकळ जन ।। यावर त्यांनी भर दिला होता. रामदास जातिवंत शिक्षक, संघटनाकुशल महंत आणि प्रचीतिपूर्ण पारमार्थिक होते. अध्यात्मासारखे गहन शास्त्र सामान्य लोकांना समजावे असे त्यांना वाटत होते. समर्थ रामदासांनी व त्यांच्या अनुयायांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून साहित्यनिर्मितीत महत्त्वपूर्ण भर टाकली. त्यांनी व त्यांच्या अनुयायांनी निर्माण केलेली साहित्यसृष्टी श्रेष्ठ दर्जाची आहे. परमार्थज्ञानाचा आणि व्यवहारज्ञानाचा कोश म्हणून रामदासांच्या दासबोध ग्रंथाकडे पहावे लागेल. आपल्या साहित्याच्या माध्यमातून लोकजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. भागवतधर्माचा वारसा रामदासांनी आपल्या समर्थ संप्रदायाच्या माध्यमातून पुढे चालवला.

औरंगजेबाच्या दक्षिण भारतावरील आक्रमणामुळे चाफळास व सज्जनगडास प्रत्येक वर्षी भरणारा महंतमेळावा बंद पडला. समर्थांच्या ह्यातीत या संप्रदायाचा प्रचार व प्रसार मोठ्या प्रमाणात घडून आला होता. समर्थांच्या पश्वात मात्र या संप्रदायास उतरती कळा लागली. त्यांच्या स्वर्गवासानंतर त्यांची जागा भरून काढील असा नेता मिळाला नाही. समर्थांच्या नंतर या संप्रदायातील अनुयायींनी आपला संपद्रदाय तेजस्वी करण्याचे व समर्थांचा वारसा ऐतिहासिकदृष्ट्या चालविण्याचे फार मनावर घेतले नाही. त्यांचे विचार समर्थपणे पुढे नेणारे शिष्य न मिळाल्याने संप्रदायातील चैतन्य ओसरत गेले व मठांचे केवळ सांगाडे शिल्लक राहिले. समर्थानंतर लोकजागृती व लोकसंग्रहाकडे दुर्लक्ष झाले. दैनंदिन पुजाअर्चा, भजनकीर्तन व त्याबरोबर रामनवमी, हनमानजयंती व दासनवमी असे वार्षिक उत्सव साजरे करणे एवढेच मर्यादित कार्य रामदासी मठातून होत राहिले.

### ८.२.३महानुभव पंथ

महानुभव पंथाची स्थापना चक्रधनांरी तेराव्या शतकाच्या उत्तरार्धात केली. गुजरातमधील भरवस (भडोच) राज्याचा राजा मल्लदेव याच्या विशालदेव या प्रधानाचा चक्रधर हा मुलगा होता. चक्रधरांचा जन्म शके १११६ (इ.स. ११९४) मध्ये झाला. सिंघण राजाने गुजरातवर स्वारी केल्यावर बावीस वर्षीय हरपाळदेवाने चांगलेच शौर्य दाखवले होते. हरपाळदेवाच्या पत्नीचे नाव कमळाइसा होते. वयाच्या सव्वीसाव्या वर्षी हरपाळदेवचा मृत्यू झाला. मृत्यूनंतर त्यांचा देह स्मशानात नेला असता परेमश्वराने मृत शरीरात प्रवेश करून तो उठवला अशी कथा प्रसिद्ध आहे. हरपाळदेवच्या मृत शरीरात फलटनचे नाथसिद्ध पुरूष द्वारावतीकर चांगदेवराउळ यांनी प्रवेश केला. चांगदेवराउळ यांचा हा पुनरवतार होय. तो पतितांचे म्हणजे मृत देहाचे, उत्थापन करून स्वीकारलेला असल्याने तो 'पतित' अवतार मानला जातो. नवचैतन्य प्राप्त झालेल्या हरपाळदेवाने पत्नीसमवेत पुन्हा कालक्रमणा करावयास सुरूवात केली. परंतु जुव्याच्या व्यनामुळे हरपाळदेवचे मन संसारावरून उडाले व त्यांची वैराग्यवृत्ती उसळून आली. जुव्याच्या खेळात आपण हरलेल्या द्रव्याची परतफेड

करण्यासाठी आपले दागिने देण्यास आपली प्रिय पत्नी तयार होत नाही हे पाहून त्यांना संसाराचा विट आला. रामटेकला यात्रेला जाण्याचे निमित्त करून त्यांनी कायमचे घर सोडले. रिधपूर येथील गुंडम राउळ/श्रीगोविंद प्रभू यांच्याकडून त्यांना प्रसादरूपाने शक्तिदान मिळाले. तेंव्हापासून महानुभव पंथ उदयास आला. गोविंदप्रभूनींच त्यांचे नाव चक्रधर असे ठेवले. त्यामुळे ते हरपाळदेवचे चक्रधर झाले. त्यांनी सालबर्डी च्या डोंगरावर एकांतात बारा वर्षे तपश्चर्या केली. चक्रधरांच्या आयुष्याचे एकाक, पूर्वार्ध व उत्तरार्ध असे तीन भाग पडतात. त्यांच्या एकाक भागात त्यांनी अवतार धारण केल्यापासून तो त्यांच्या पैठण येथील आगमनापर्यंचा समावेश होतो. पूर्वार्ध या दुसऱ्या भागात व पैठण येथे आल्यावर नागांबिकेला किंवा बाइसेला केल्यास प्रेमदानाने व त्याचा शेवट खडकुली येथे नागदेव किंवा भटोबास यांना केलेल्या बोधदानाने होतो. तेथून चक्रधरांच्या आयुष्याचा उत्तरार्ध सुरू होऊन तो त्यांच्या प्रयाणकालापर्यंत चालाते व त्यांच्या उत्तरापंथे गमना ने त्याची समाप्ती होते. पूर्वार्ध आणि उत्तरार्ध मिळून आठ वर्षाचा हा कालखंड होतो. या कालखंडात चक्रधरांनी आपल्या विचारांचा आणि तदॲनुषंगिक आचारधर्माचा उपदेश केला.

चक्रधरांच्या उत्तरापंथे गमनाचा म्हणजे प्रयाणाचा काळ सांप्रदायिकांच्या मते इ. स. १२७२ तर डॉ. कोलते यांच्या मतानुसार इ, स. १२७४ आहे. चक्रधरांचा शेवट कसा झाला याविषयी एकवाक्यता दिसत नाही. महाराष्ट्र सारस्वत करांनी श्रीचक्रधर शके ११९४ मध्ये हा प्रांत सोडून बदरिकाश्रमी गेला. तेथून पुढे याची हकीकत काय झाली याचा उल्लेख कोठेही आढळत नाही. असे म्हटले होते. डॉ. कोलते व डॉ. तुळपुळे यांनी चक्रधरांचा वध झाला असे म्हटले आहे. लीळाचरित्रातील काही लीळांच्या आधारे चक्रधरांचा वध यादवांचा करणधिप हेमाद्री याच्याकडून झाला असावा असा निष्कर्ष डॉ. कोलते यांनी काढला आहे. चक्रधरांच्या वधानंतर पुन्हा ते जिवंत होऊन उत्तरापंथे निघून गेल्याचे म्हटले आहे. डॉ. तुळपूळे चक्रधरांचा वध झाला असे सांगताना म्हणतात, ‘चक्रधरांच्या भोवती निर्माण झालेले विरोधाचे वादळ एक दिवस त्यांचा बळी घेणार, हे ठरल्यासारखेच होते. तसा तो घेतला गेला, हे लीळाचरित्रा चे व शेवटचेप्रकरण’ सांगते. चक्रधर स्वतः निःसंग विभुक्त असतील. परंतु यद्यपि शुद्ध लोकविरूद्ध नाकारणीय नाचरणीयमृ या तत्वाचा विसर पडल्यामुळे म्हणा किंवा अन्य काही कारणाने म्हणा, त्यांचे लोकातील वागणे आक्षेपार्ह ठरले, याची साक्ष लीळचरित्रात अनेक प्रसंगी मिळते. याचाच शेवट त्यांचा वध होण्यात झाला. महानुभाव पंथींच्या मतानुसार त्यांचा अवतार अजूनही विद्यमान असून त्याचा वास हिमालयात लालबदाक्ष किल्ल्यात असतो अशी त्यांची श्रद्धा आहे.

मराठी, गुजराती व संस्कृत भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते. सर्वांनी भारावून जावे असे त्यांचे वेधक सौंदर्य होते. जीळाचरित्रामधील लीळा मधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्वांगीण दर्शन घडते. अयाः कैसे सौंदर पुरुष साक्षात गोरक्षनाथु, कैसे गोसावी बरवेः बहुत राजकुमार देखिल. परि ऐसे सुंदर्य कव्हणी ठायीं नाही’ अशा प्रकारचे उत्स्फूर्त उदगार त्यांच्याविषयी ोक काढत असत. स्त्रियांनाही त्यांच्या रूपसौंदर्याचा अभिलाघ वाटत असे. ज्ञानसंपन्न लोकांनीही भारावून जावे अशी विद्या त्यांनी संपादीत केली होती. समत्वदृष्टीने पाहणाऱ्या त्यांच्या दृष्टीत स्पृश्यास्पृश्य, स्त्री-पुरूष असा भेदभाव नव्हता. अंतरिची निर्लेपता,

निरहंकारित्व, सहिष्णूता, उदारमनस्कता, लोकल्याणाची तळमळ , लोकमानसात शिरून मार्मिकपणे उपदेश करण्याची कला, चमत्कारांतून व्यक्त होणारे विभूतिमत्व इ. असाधारण गुण त्यांच्यामध्ये दिसून येतात. त्यांनी स्वतःच्या व महंतांच्या आचरणातील शिस्तीवर भर दिला होता. स्वपंथीयांनी इतर पंथीयांविषयी केलेले अनुद्गार वर्तन त्यांना आवडत नसे. गुरूविषयी त्यांच्या मनामध्ये मोठ्या प्रमणात आदर होता. गुरूविषयीच्या परम श्रद्धाभावामुळेच त्यांच्या ऋद्धिपूरला ते परमेश्वरपूर असे म्हणत, चक्रधर गीता, भागवत, श्रीकृष्ण आणि दत्त यांना पूज्यस्थानी मानत असत. चक्रधारांना सर्वज्ञ, ईश्वर व देव असे म्हटले जाऊ लागले. पैठण येथील त्यांच्या वास्तव्यामुळे पैठण हेच त्यांच्या प्रचारकार्याचे केंद्र बनले.

**महानुभाव पंथ**

बाराव्या शतकाच्या उत्तरार्धात मराठी भाषेला ज्ञानभाषेचे स्थान देणारा, ज्ञान आणि ीक्ती यांची सांगड घालून एकेश्वरी भक्तीचा पुरस्कार करणारा, सामाजिक विषमता नाकारून सर्वांनाच मोक्षाचा अधिकार देणारा महानुभाव संप्रदाया उदयास आला. महानुभव पंथ हा एक हिंदूधर्मान्तिर्गत संप्रदाय असून त्यास महात्मा पंथ, अच्युत पंथ, मानभाव, भटमार्ग, जयकृष्णी पंथ असेही म्हटले जाते. महानुभाव पंथ सुरूवातीपासून महानुभव पंथ या नावाने ओळखला जात नव्हता. सुरूवातीच्या काळात या पंथास 'मानभाव' पंथ असे म्हटले जात होते. पुढे या नावाचे संस्कृतीकरण होऊन 'महानुभाव' शबद सिद्ध झाला व तोच या पंथाचे नाव आणि कायमचे नाव होऊ बसला. महानुभाव हा शब्द महानुभाव ग्रंथकारांनी श्रेष्ठ असा अनुभव किंवा ज्ञान प्राप्त झालेला साधुपुरूष अशा अर्थाने वापरलेला दिसतो. डॉ. कोलते यांनी सर्वसाधारणपणे निरंजनमाधवांच्या काळी व नंतर या संप्रदायास महानुभाव हे नाव प्राप्त झाले असावे असा निष्कर्ष काढला आहे. डॉ. कोलते यांनी महानुभव ग्रंथातील उल्लेखावरून परमार्ग हे या संप्रदायाचे मुळ नाव असा निष्कर्ष काढलेला आहे ते म्हणतात, महानुभववांच्या धर्माला परधर्म व शास्त्राला परशास्त्र असे म्हणतात. महानुभाव मतानुसार चक्रधर हा परमेश्वरावतार आहे व त्याचा मार्ग म्हणजे परमेश्वराचा मार्ग किंवा परमार्ग. १६ व्या शतकात या संप्रदायास महात्मा पंथ असेही म्हटले जात होते. चक्रधर आपल्या सांप्रदायिकांना महात्ता म्हणत व त्यांचे अनुकरण करून पंथाचे आद्य आचार्य नागदेव आपल्या शिष्यांनामहात्मा असे म्हणत. चक्रधरांच्या सूत्रपाठाच्या आचार-प्रकरणातील 'महात्मेनि प्रियवक्तेया होआवे,' 'महात्मेनि सत्यार्जवा होओवे' असे उल्लेख आहेत. स्वतः चक्रधर आपल्या अनुयायांना महात्मा म्हणत असत. तसेच इतरांच्यातही ते महात्मा म्हणून ओळखले जात. त्यामुळे या पंथास महात्मापंथ असे म्हटले जात असावे. पंजाबमध्ये या संप्रदायास जयकृष्णीपंथ असे म्हटले जात होते. श्रीकृष्णाच्या उपासकांचा पंथ तो जयकृष्णी पंथ. उत्तर हिंदुस्थानात या पंथाचा प्रसार सतराव्या शतकाच्या प्रारंभी झाला आणि तेव्हापासून हे नाव त्या भागात प्रचलित झाले. महानुभाव पंथ बुंदेलखंडात अच्युतपंथ म्हणून प्रसिद्ध आहे. ज्ञानेश्वरांचा उदय होण्यापूर्वी महानुभाव संप्रदायाचा महाराष्ट्रात बद्धमूल झाला होता. महानुभाव पंथ महाराष्ट्रात उदयाला आला असला तरी एका काळी त्याचा प्रसार काबूल-कंदहारपर्यंत झालेला होता. सध्या या पंथाचे अनुयायी महाराष्ट्र, मध्यप्रदेश व पंजाब या तीन राज्यात पसरलेले दिसतात.

**पंचकृष्ण**

महानुभाव पंथाच्या तत्वज्ञानानुसार परमेश्वर जीवांच्या उद्धारासाठी अवतार घेतो. परमेश्वराचे असे पंचावतार हा संप्रदाय मानतो. महानुभवांची पंचकृष्ण कल्पना महत्त्वपूर्ण आहे. महानुभवांचे पंचकृष्ण म्हणजे चालते बोलते देवच होते. जीवांना मोक्ष देण्याचे सामर्थ्य पंचकृष्णामध्ये आहे असे महानुभावांची श्रद्धा होती. 'सूत्रपाठांत परमेश्वराच्या सगुणावताराची कल्पना सांगून पाच परमेश्वरांची पुढील नावे सांगितली आहेत.'

जैसे द्वापरी श्रीकृष्ण चक्रवती ।।१।। जैसे सैहाद्री श्रीदत्तात्रेय प्रभू ।।२।। जैस द्वारावतीए श्री चांदेवो राउळ ।।३।। जैसे ऋद्धिपुरी गुंडम राउळ ।।४।। जैसे प्रतिष्ठानी श्री चांगदेव राउळ ।।५।।

महानुभावांनी श्रीकृषण चक्रवती, श्रीदत्तात्रेयप्रभू, श्रीचांगदेव राउळ (श्रीचक्रपाणी), श्रीगोविंदप्रभू (श्रीगुंडम राउळ) आणि चक्रधरस्वामी हे पाच कृष्णावतार (परमेश्वरावतार) सांगितले आहेत. परमेश्वरांच्या या पाच अवतारांना पंचकृष्ण म्हणतात. त्यांची नावे दत्तभक्ती व कृष्णभक्ती यांचे मीलन सुचवितात. त्यामुळे महानुभाव संप्रदाय जसा कृष्णसंप्रदाय तसाच दत्तसंप्रदायही ठरतो.

श्रीकृष्ण हा या संप्रयातील सर्वश्रेष्ठ अवतार. श्रीकृष्ण चक्रवर्ती हा पंचकृष्णातील पहिला परमेश्वर होय. महानुभाव संप्रदायात श्रीकृष्णास अनन्यसाधारण महत्त्व होते. महानुभाव संप्रदायाचे श्रीकृष्ण हे आदिदैवत आहे. श्रीकृष्णास श्रीविष्णूचा मर्यादित अवतार न मानता परब्रम्हाचा साक्षात अवतार मानतात. तो पूर्णावतार असून 'गर्भीचा' व 'उभयदर्शी' अवतार आहे. तो आपल्या पूर्वातारात बदरिकाश्रम येथे हंसरूपाने राज्य करीत होता व दैत्यांचे निर्दालन करून साधुजनांचे रक्षण करावे यासाठी तो देवकींच्या पोटी आला. देवकी देवीस प्रसूती झाली. सर्वेचि परमेश्वरें गर्भासि बीजें केलें. म्हणून श्रीकृष्णाला गर्भीचा अवतार म्हणतात. श्रीकृष्णाजवळील अनेक शक्तीपैकी ज्ञानशक्ती व विज्ञानशक्ती या प्रमुख होत्या. ज्ञानशक्ती म्हणजे परमेश्वर जीवांना जे आपले ज्ञान देतो ते ज्ञान. तर विज्ञानशक्ती म्हणजे ज्या शक्तीने भावी अभाव किंवा अभावी भाव अशा प्रकारचे चमत्कार परमेश्वर करू शकतो ती शक्ती. श्रीकृष्णाजवळील वेधशक्तीही विशेष प्रभावी होती. सजातीय आणि विजातीय, दोघांनाही वेध लावण्याचे सामर्थ्य त्याच्या ठिकाणी असल्याने चक्रधरांनी श्रीकृष्णाला वेधाचार्य म्हटले आहे. श्रीचक्रधर स्वतःस श्रीकृष्णाचा अवतार मानत असत. श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीत महानुभव पंथ प्रमाण मानतो.

दत्तात्रयेय हा पंचकृष्णातील दुसरा अवतार. श्रीदत्तात्रेय हा त्रेतायुगातील अवतार असून तो श्रीदत्तात्रेय प्रभूचा चतुर्युगी अवतारू असल्याची महानुभावांची श्रद्धा आहे. महानुभावांच्या मते श्रीदत्तात्रेय म्हणजे प्रत्यक्ष रमब्रम्ह परमेश्वराचा अवतार असून अत्री आणि अनसूया या मातापितरांच्या पोटी विष्णूने नव्हे तर प्रत्यक्ष परब्रम्ह परमेश्वराने अवतार घेतला. 'अळर्का भेटीः माहादाइसीं पूसिलेः जी जी दत्तात्रेय प्रभूंचे दर्शन अळर्कासि कवणें वेखें जालेः सर्वज्ञें भणितलेंः बाईः मातंग वेखे जालेः बाबर झोटीः गुंजावर्ण डोळेः श्रीकंठी बोरिया मणियांची गांठीः उभा टीया धाटाः कटि सुंता मांश भेदिती कांतीः दुतळीया उपान हौः गळत माशाचा भारूः श्रीदत्तात्रेये प्रभूचीया दर्शना सरिसे अळर्काचे तीन्ही तापु शंबोलि

शंबोलि भणौथन फेडिते जालेः कां ते वापी अमृतवर्षिणी की गाः असे वर्णन दत्तात्रेयाचे केले आहे. दत्तात्रेय हा त्रिमुखी नसून, एकमुखी चतुर्भुज आहे. चक्रधनांनी दत्तात्रेयप्रभूंना आपल्या मार्गाचे आदिकरारण म्हटले आहे. दत्तात्रेय प्रभूंची माहूर, पंचाळेश्वर ही स्थाने महानुभाव पंथीय पूज्य मानतात. त्यामध्ये माहूरला विशेष महत्त्वाचे स्थान आहे. माहूरच्या डोंगरावर दत्तात्रेयप्रभूंनी ज्या लीळा केल्या त्याचे वर्णन रवळोबासाच्या सैह्यादि0वर्णन या काव्यात आले आहे.'

चांगदेव राउळ हा महानुीाव संप्रदायातील तिसरा अवतार. चांगदेव राउळ यांचेच दुसरे नाव चक्रपाणी. चांगदेव राउळ सुरूवातीपासूनच मनाने विरक्त होते. कमळाइसेशी लग्न करून सुद्धा ते तिच्यापासून दूरदरूच राहिले. एक दिवस यात्रेला जाण्याचे निमित्त करून त्यांनी फलटण सोडले व यात्रेकरूंच्या मेळाव्याबरोबर ते माहूरला आले. तेथील तळ्यात स्नान करून ते दत्तस्थानाच्या दर्शनासाठी जात असताना श्रीदत्तात्रेयप्रभू वाघाच्या रूपात डरकाळी फोडीत बाहेर आले व आपला चवडा त्यांनी चांगदेवांच्या माथ्यावर ठेवला. अशा रीतीने चांगदेवांनी त्यांच्याकडून शक्तीचा स्वीकार केला. चांगदेवांनी गृहस्थाश्रम सोडून अवधूताचा वेष धारण केला व भिक्षाव्रत स्वीकारले. चांगदेव राउळ पुढे माहूर येथून द्वारावतीला आले. येथे ते एका हातात खराटा व दुसऱ्या हातात सूप घेऊन गावातील रस्ते झाडीत व आपल्या दर्शनासाठी येणाऱ्या पुरूषांच्या डोक्यावर हातातील सूप ठेवून त्यांना खराट्याने पाठीवर मारीत. विद्यादान करण्याची त्यांची ही पद्धत होती. चांगदेव राउळांनी योगसामर्थ्याने देहत्याग करून भडोच येथे स्मशानात आणलेल्या प्रधानपुत्र हरपाळदेव यांच्या मृत देहात प्रवेश करून त्यांनी नवीन अवतार स्वीकारला. हा नवीन अवतार म्हणजेच महानुभव पंथाचे संस्थापक श्रीचक्रधर होय.

गोविंदप्रभू हे महानुभवांच्या पंचकृष्णापैकी चौथा अवतार. त्यांना गुंडी किंवा गुंडम राउळ असेही म्हणतात. त्यांचे वास्तव्य शेवटपर्यंत सिधपुरास होते. म्हणून त्यांचा उल्लेख ऋद्धिपुरीचे श्रीगुंडम राउळ असा केला जातो. महानुभवांच्या पंचकृष्णापैकी तिसरे पंचकृष्ण चांगदेव राउळ व गोविंदप्रभू / गुंडम राउळ यांची भेट द्वारावती येथे झाली. चांगदेव राउळ यांनी आपल्या हातातील सूप गोविंदप्रभूंच्या माथ्यावर ठेवले आणि त्यांना खराट्याने हाणून पाठीवर मारले. या प्रसंगाने गोविंदप्रभू चांगदेव राउळांकडून शक्तीस्वीकार केला व रिधपूरास परत येऊन जीवोद्धरणाचे कार्य करू लागले. महानुभव पंथीय त्यांना अवतारी पुरूष मानत असत. गोविंदप्रभूंचा अवतार हा अच्छादनीचा परदृश्यावतार होता. अच्छादनीचा परदृश्यावतार हा परमेश्वराने अवतार धारण करण्याचे जे पाच प्रकार महानुभाव मानतात त्यातील हा तिसरा अवतार होता. मळवट, कुंकुम िरणे, माथा भांग, जवादि भरणे, पायी वाकी, गळा साखळ, मुकुटी तेल, वेणएी, नाभीचुंबित दाढी, अशा स्वरूपात व्यक्तीदर्शन होते. त्रिकालाज्ञान, संजीवनी विद्या, पंचमहाभूतांवर नियंत्रण विष निर्विष करणे, भूमिगत द्रव्य शोधणे, मुक्याला वाचा देणे, अंतरीक्षातून वस्तु आणणे, आजाऱ्याला लत्ता प्रहाराने बरे करणे, हरवलेली वस्तु अचूकपणे कोठे आहे ते सांगणे इ. अनेक सामर्थ्य गोविंदप्रभूंच्या अवतारीत्वाची साक्ष देतात. परमेश्वरी अवताराच्या ठिकाणी असणारी सर्वसत्ता व कर्तुमर्कुमन्यथाकर्तुम् शक्ती त्यांच्यामध्य होती. श्रेष्ठ कनिष्ठपणा गोविंदप्रभू मानत नसत. स्वतः ब्राम्हण असूनही

महारामांगाच्या घरी अन्नोदक घेण्यात त्यांना काही वाटत नसे. गावातील महारामांगांचा मात्र गोविंदप्रभू हा एकमेव आसरा होता. राउळोः आम्ही पाणियेंवीण मरत असोः तरि काई करूं जी? असे त्यांनी म्हटल्यानंतर गोविदप्रभू आपल्या दैवी शक्तीने त्यांच्यासाठी पाणी निर्माण करीत. अशा परिस्थितीत त्या दलितांनी राउळ मायः राउळ बापुः राउळाचेनि प्रसादें आम्ही पाणी पीत असोः असे का म्हणू नये? अनाथ स्त्रियांनाही गोविंदप्रभू आपले महार वाटत असे. महानुभाव पंथीयांच्या दृष्टीने गोविंदप्रभूंचे सर्वात महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे चक्रधर निर्मिती होय. गोविंदप्रभूंनी चक्रधरांच्या माध्यमातून एका नवीन पंथाचा संस्थापक निर्माण केला व पर्यायाने महानुभाव पंथाची मुहूर्तमेढ रोवली.

चक्रधरस्वामी हे महानुभाव संप्रदायातील पंचकृष्णापैकी पाचवा व शेवटचा अवतार होय. चक्रधरांच्या अनासक्ती, अहिंसा व अपार करूणा या अलौकिक गुणांमुळे त्यांच्या अनुयायांनी त्यांना ईश्वरावतार मानून त्यांचा पंचकृष्णात समावेश केला. चक्रधरांच्या अवतार धारणाची कथा अपूर्व आहे. ती म्हणजे गुजरातमधील भडोच येथील प्रधानपुत्र हरिपाळदेव हा ऐन तारुण्यात मरण पावल्यावर त्याचा मृतदेह स्मशानात नेता असता परमेश्वाराने त्यामध्ये प्रवेश करून तो उठवला व नवीन अवतार धारण केला. हरिपाळदेवाच्या मृत देहात प्रवेश करून तो जिवंत करणारा परमेश्वरावतार म्हणजे द्वारावतीकार चांगदेव राउळ. हरपाळदेवाचे मृत शरीर सजीव करून त्यांनी जो अवतार स्वीकारला तो त्यांचा पुनरवतार होय. त्यांचा हा पतीत अवतार मानला जातो महानुभाव पंथातील पंचकृष्ण संकल्पना केंव्हा अस्तित्वात आली याविषयी वेगवेगळी मते मांडली जातात. लीळाचरित्रात ही संकल्पना दिसून येत नाही. पंचकृष्ण ही संकल्पना चक्रधरोत्तर काळातीलअसावी असे म्हटले जाते.

**अवतार कल्पना**

महानुभाव संप्रदायात परदृश्यावतार (पराशक्तीचा स्वीकार, उदा. श्रीगोविंदप्रभू), अवरदृश्यावतार (अवरशक्तीचा स्वीकार, उदा. श्रीचांगदेव राउळ) व उभयदृश्यावतार (अच्छावनीचा अवतार, उदा. श्री दत्तात्र्येयप्रभू, श्रीकृष्ण व चक्रधरस्वामी) हे तीन प्रकारचे अवतार मानले जातात. वरील अवतारांबरोबरच आणखी तीन अवतारा सांगीतले जातात ते महणजे गर्भावतार (मातेच्या गर्भात जन्म घेणारा-श्रीकृष्ण), दवडण्याचा अवतार (मातेच्या गर्भातील वाढत्या गर्भाला दूर करून, दवडून त्याजागी घेतलेला अवतार- गोविंदप्रभू) व पतितावतार (एखाद्या मृत देहात प्रवेश करून घेतलेला अवतार -श्रीचक्रधर) हे होय.

**आचार्यपद**

महानुभाव संप्रदायाचे नागदेवाचार्य, बाईदेवबास, कवीश्वर बास, पदशरामबास हे या संप्रदायाचे आचार्य होते. चक्रधरांनी नागदेव या आपल्या कुशाग्र बुद्धीच्या, संघटनकुशल शिष्यावर आपल्या पश्चात आपल्या मार्गाचे संवर्धन करण्याची जबाबदारी सोपवली. नागदेव हे चक्रधरांचे निस्सीम भक्त होते. चक्रधरांच्या आचारांशी आणि तत्त्वविचारांशी नागदेव पूर्णपणे समरस झाले होते. चक्रधरांनी उत्तरापंथाने प्रयाण करण्यापूर्वी नागदेवास आपल्या संप्रदायाचे तत्त्वज्ञान व आचार याचे सर्व रहसय समजावून सांगून संप्रदायाचे पहिले आचार्यपद सोपवले. लीळाचरित्राच्या उत्तरार्धात नागदेवांचे दर्शन चक्रधरशिष्य म्हणून

घडते. लिळाचरित्रामध्ये नागदेवांच्या भावनाशीलता, व्यवहारादक्षता, समर्पणवृत्ती, निष्ठा, गुरूभक्ती, बुद्धीमतत्ता, स्वाभिमान या गुणांचा प्रत्यय येतो. त्यांच्या आचार्यपदावरून झालेल्या कारकिर्दीतच यासंप्रदयाचा खरा प्रचार व प्रसार झाला. पंथाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी आवश्यक असलेले गुण त्यांच्यामध्ये होते. लोकसंग्रह करण्याची त्यांची वृत्ती संप्रदायाच्या प्रचारास उपयुक्त ठरली. नागदेवांनी आचार्यपद शेवटपर्यंत निष्ठेने व सेवावृद्धीने सांभाळले. ते शुद्रांनाही आपल्या मार्गाची दीक्षा देत असत. महानुभव संप्रदायाचे बाईदेवबास हे त्रितीय आचार्य होत. नागदेवानंतर महानुभाव संप्रदायाचे आचार्यपद बाईदेवबास यांच्याकडे आले. त्यांना श्रीगोविंदप्रभू व श्रीचक्रधर या दोघांचेही सानिध्य लाभले होते. बाईदेवबास यांच्याविषयी नागदेवांना आत्मीयता वाटत होती. आपल्या अंतकाळी नागदेवांनी बाईदेवबासास लीळाचरित्र व सूत्रपाठाची पोथी दिली. चक्रधराविषयी त्यांची नितांत भक्ती होती. आचार्यपद फार थोडे दिवस असावे. कारण नागदेवाचार्य इ.स. १३१२ च्या सुमारास निधन पावले व बाईदेवबासांचे निर्वाण त्यानंतर तीन वर्षांनी झाले. म्हणजेच महानुभाव पंथाचे दुसरे आचार्यपद त्यांनी सुमारे तीन वर्षे पाहिले. बाईदेवबास यांच्यानंतर महानुभव संप्रदायाचे आचार्यपद कवीश्वर बास यांच्याकडे आले. हे कार्य त्यांनी अखेरपर्यंत निष्ठेने केले. अलौकिक कवित्व, वादविवाद, रसिकत्व, रसाळ वर्क्तृत्व इ. गुण त्यांच्यामध्ये होते. पंथीयांच्या धर्मरक्षणाचे कार्य त्यांनी एके ठिकाणी राहून नव्हे तर सर्वत्र संचार करून केले. आयुष्याचे अखेरचे दिवस त्यांनी कडाष्टी येथे आढले व तेथेच त्यांचा देहान्त झाला. महानुभाव संप्रदायाचे चौथे आचार्य परशरामबास होते. लीळाचरित्राची पुन्हा बांधणी करण्याचे कार्य त्यांनी केले. ते धर्मप्रवचन उत्तम प्रकारे करत होते.

**शाखाभेद : तेरा अम्नाय**

महानुभाव संप्रदायाची शिस्त व नियमांचे काटेकोर पालन नागदेवचार्यांच्या काळात टिकून होते. गुरूकुलाचा सर्वाधिकार नागदेवांच्या हाती राहिल्यामुळे संप्रदयात मतभेद निर्माण झाले नव्हते. त्यांच्यानंतर मात्र शिष्यवर्गात अभिमानातून स्वतःच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव निर्माण झाली. महानुभाव संप्रदायाचे चौथे आचार्य पराशरामबास झाले. परशरामबास आचार्य असतानाच पंथात मतभेद निर्माण होऊन महानुभाव संप्रदायात उपाध्ये, कवीश्वर, पारिमांडल्य, अमृते, मदालसा, कुमार, कक्षदेव, दामोदर, हरिदेव, जयदेव, साळकर, दिवाकर, महेश्वर हे तरा अम्नाय अस्तित्वात आले. वरील सर्वच आम्नाय टिकून राहिले असे नाही. काळाच्या ओघात त्यातील बरेचसे नाहीसे झाले. वरील तेरा आम्नाय १) उपाध्ये आम्नाय व २) कवीश्वर आम्नाय या दोन गटात विभागले जातात. दिवाकर, जयदेव, दामोदर, साळकर व हरिदेव या अम्नायाचा समावेश उपाध्ये या अम्नायात होतो. उपाध्ये जानोपाध्यांच्या नावाने प्रसिद्धीस आला असला तरी त्याचे प्रवर्तक मात्र जानोपाध्ये नसून त्यांची पुतणी कमळाइसे ही आहे. पारिमांडल्य, मदालसा, अमृते, महेश्वर, यक्षदेव व कुमार या अम्नायाचा समावेश कवीश्वर अम्नायात होतो. कवीश्वर आम्नायाचे प्रमुख भास्करभट होते.

तीर्थक्षेत्रे

महानुभाव संप्रदायातील प्रवर्तकांचा ज्या ज्या ठिकाणांशी संपर्क आला अशी ठिकाणे

या संप्रदायाची तीर्थक्षेत्रे आहेत. फलटण (चांगदेव राउळांचे जन्मस्थान), माहूर (चांगदेव राउळ वास्तव्यस्थान), ऋद्धिपूर (गोविंदप्रभूचाजीवनकाळ व्यतीत झालेले ठिकाण) या ठिकाणांबरोबरच डोंबेगाव, बेलापूर, बीड, आपेगाव, त्र्यंबक, मढचड, पिंपरी, आरणगाव, भिंगार, जोगेश्वरी, वेरूळ ही ठिकाणे या संप्रदायाची तीर्थस्थाने आहेत.

**वेष**

महानुभाव संप्रदायातील साधकाने विकार उत्पन्न करणाऱ्या सर्व वस्तुंचा त्याग करावा असे चक्रधरांनी सांगीतले आहे. लज्जारक्षणासाठी वेष आवश्यक असतो पण तो कसा असावा याचे निर्देश या संप्रदायाचे होते. नवे वस्त्र न होआवे कारण नवीन वस्त्र वापरल्यास त्यापासून मिळणाऱ्या सुखाचा मोह होईल. त्यामुळे साधकाने फाटकी, मळलेली वस्त्रे वापरावीत. श्रीचक्रधरांनी साधकांना रस्त्यावर सापडणाऱ्या वस्त्रावर आपली गरज भागवण्यास सांगितले होते.

**महानुभावांचे तत्वज्ञान**

महानुभाव संप्रदायाचे तत्वज्ञान चक्रधरांनी विकसित केले होते. महानुभावांचे तत्वज्ञान आणि आचारधर्म चक्रधरांच्या वचनातूनसिद्ध झालेला आहे. अचार व विचार यामध्ये असलेले तत्वज्ञान महानुभाव संप्रदायाने मांडले सर्व जीव समान आहेत याची जाणीव चक्रधरांनी करून दिली. सृष्टीमध्ये कव्हणें करणें मुंचिजेना एकें परमेश्वरेंविण हे चक्रधरांच्या सूत्रपाठातील पहिले सूत्र म्हणजे महानुभाव तत्वज्ञानाचा पायाच असल्यामुळे परमेश्वराची भक्ती करून त्याचे ज्ञान पन्राप्त करून घेणे हे या पंथाचे एकमेव साध्य आहे.उकेशवराज सूरी यांनी सूत्रपाठ हा महानुभाव संप्रदायाचा तत्वज्ञानपर ग्रंथ सिद्ध करून महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. चक्रधरांनी द्वैतप्रधान मतप्रणालीचा पुरस्कार करून तिच्या पायावर आपल्या संप्रदायाची व संप्रदायाच्या तत्वज्ञानाची उभारणी केली होती. द्वैत म्हणजे दोन, चक्रधरांचे द्वैती तत्वज्ञान जीव, देवता, प्रपंच आणि परमेश्वर असे चार स्वतंत्र पदार्थ मानते. यातील प्रत्येक पदार्थ इतरांपासून पूर्णपणे वेगळा असून तो अनादी व अनंत आहे. या चारही पदार्थांमध्ये ऐक्य होणे शक्य नाही. मोक्षप्राप्तीनंतर जीव ईश्वराच्या आनंदात विलीन होतो. परंतु तो ईश्वर होत नाही. महानुभावांनी मानलेली पहिली नित्य वास्तु म्हणजे जीव. जीव अनंत आहेत. परमेश्वराच्या ज्ञानाने किंवा भक्तीने त्यांना मुक्ती मिळू शकते. जीव स्फटिकाप्रमाणे शुभ्र असतो. पण अविद्येमुळे त्याला काळसरपणा प्राप्त होत असतो. महानुभवांनी मानलेली दुसरी नित्य वस्तू म्हणजे देवता होय. देवतामध्ये स्त्री देवता व पुरूष देवतांचा समावेश होतो. महानुभाव तत्त्वज्ञानात देवतांची संख्या ८१ कोटी सव्वालक्ष दहा इतकी सांगितली असून ती नऊ थोव्यात (विभागत) विभागली आहे. ती म्हणजे १) कर्मभूमीच्या १३ कोटी, २) अष्टौदेवयोनीच्या १३ कोटी, ३) अंतराळीच्या १३ कोटी, ४) स्वर्गीच्या ३३ कोटी, ५) त्य –कैलास–वैकुंठीच्या ९ कोटी, ६) क्षीराब्धीच्या सव्वा लक्ष, ७) अष्टभैरव ८, ८) विश्व १, ९) माया १ या नऊ थोव्यात उच्चनीचक्रम असून माया देवतेचा थोवा सर्वोच्च आहे. माया ही सर्वात उच्च व सामर्थ्यवान देवता आहे. माया देवतेला सर्व देवतांची स्वामिनी असे महानुभावांनी मानले आहे. परमेश्वराचा अवतारी देह देखील मायेनेच बनवलेला असतो. माया ही विश्वाच्या पलीकडे आहे. कर्मभूमीच्या देवतांचा थोवा सर्वात खाली आहे.

उच्चनिगरचक्रम प्रत्येक थोव्यातील देवतांतही आहे. अधीनत्व, अज्ञान, आणि अविद्या या तीन अनादिसिद्ध बंधांनी देवतास्वरूप नित्यासी बांधलेली असल्यामुळे देवतांना मोक्षप्राप्तीचा संबंध येत नाही. नित्यबद्ध असल्याने त्यांचा विकास या संकोच होत नाही. देवता जिवांना त्यांच्या कर्माची फळे देतात. देवतांकडून मिळणारी ही फळे सुखदुःखात्मक स्वरूपाची असतात. देवता आधी दुःभोग व नंतर सुखभोग असा क्रम ठेवतात. जिवाचे जेवढे अर्जित असेल तेवढेच देण्याचा त्यांचा स्वरूपधर्म आहे. महानुभावांनी मानलेली तिसरा नित्य पदार्थ म्हणजे प्रपंच होय. कारणरूप प्रपंच व कार्यरूप प्रपंच असे या प्रपंचाचे भेद केले आहेत. कारणरूप प्रपंच अव्यक्त, अनादिसिद्ध आहे. तर कार्यरूपप्रपंचअनित्य आहे. कार्यप्रपंच कारणप्रपंचात संहाराच्या वेळी लय पावतो, पण कारण प्रपंच नित्यत्वामुळे बीजरूप राहतोच.

चौथा अनादित्य पदार्थ परमेश्वर होय. सत् शब्द ब्रम्हा बोलिजे : ब्रम्हाः मायाः ईश्वरू ऐसा त्र्यंशु परमेश्वरू एकु अति यानुसार या संप्रदायाचा परमेश्वर, ब्रम्हा, माया आणि ईश्वर मिळून होतो. महानुभवांनी परमेश्वरास अंतिम सत्य मानले होते. महानुभावांचा परमेश्वर सर्वात्मक सर्वातीत, आनंदमय, ज्ञानमय, नित्यमुक्त आणि शुद्ध आहे. तसेच परमेश्वर हा निरपेक्ष असून परमेश्वरामध्ये दया, माया, कृपा, करूणा हे गुण आहेत. परमेश्वरच ज्ञानदाता आहे. व्यक्तीने सर्वसंगपरित्याग करून परेमश्वराची भक्ती करावी. अचारधर्माचे पालन करावे. जो भक्त असे करेल त्याला परमेश्वर शबद्ज्ञान, अपरोक्षाला, समान्यज्ञान व विशेषज्ञान देतो. त्यानंतरच त्याला मोक्षप्राप्ती होते. मोक्षप्राप्ती म्हणजे ईश्वराच्या स्वरूपाचा आनंद उपभोगणे होय. निरामय, निराकार असलेला परमेश्वर दयाळू, कृपाळू, आहे प्रतिसृष्टी परमेश्वर अवतरेतिः अनंत अवतार यानुसार परमेश्वर देहधारी अवतार घेऊन जीवांचा उद्धार करतो. जिवांचा उद्धार करणे हे परमेश्वराचे मुख्य कार्य आहे. मायेच्या तमातून मनुष्यदेहात येणाऱ्या जिवाला परमेश्वर ज्ञानदान करतो. त्यासाठी परमेश्वरालाही मनुष्यदेह धारण करून कर्मभूमीत अवतरावे लागते. कारण त्याशिवाय परमेश्वर जिवांना ज्ञान देऊ शकत नाहिी. सृष्टीमध्ये परमेश्वरू अवतरेतिः नुष्यवेषधारीए हाति असे चक्रधरस्वामींचे वचन आहे. देवतांच्या पासनेपेक्षा महानुभवांनी परमेश्वरा ची उपसना श्रेयस्कर मानलीर आहे. परमेश्वर तीन प्रकारांनी अवतार धारण करतो ते म्हणजे १. गर्भीचा अवतार (सृष्टीनियमानुसार मातेच्या उदरी जन्म घेणे), २. दवडण्याचा अवतार (मातेच्या उदरात वाढत असलेल्या गर्भाला दवडून घालवून त्या ठिकाणी परमेश्वर जन्म घेतो) ३. पतिताचा अवतार (एखाद्यामृत शरीरात प्रवेश करून तो देह उठवणे) हे होय. महानुभाव संप्रदाय विचारप्रामाण्य मानणारा संप्रदाय आहे. ज्ञानाशिवय भक्तीला महत्त्व प्राप्त होत नाही यावर या संप्रदायाने भर दिला होता. ज्ञानाशिवाय मोक्षप्राप्ती होत नाही म्हणून या संप्रदायाने ज्ञानाला अधिक महत्त्व दिले होते.

विषयवासनेच्या जास्त आहारी गेलेला जीव आपोआपच धर्मापासून दूर जातो. त्यामुळे स्त्रीसंबंध वर्ज्य मानला आहे. स्त्रीत्र म्हणजे मतद्रव्यांचा रावो गाः अणिके द्रव्ये सेविलिया माजवीतिः स्९ी दर्शनमाच्त्रेंचि माजवी असे स्वामींनी सांगीतलेले आहे.तसेच चित्राची स्त्री न पाहावी असेही म्हटले आहे. कारण चित्रातील स्त्री ही अधिक सुंदर असते.

त्यामुळे विकार वासना वाढीस लागू शकतात. असे असले तरीही चक्रधरांनी स्त्रियांना कोठेही कमी लेखले नाही. त्यांनी स्त्री स्वातंत्र्याचा व स्त्री शक्तीचा स्वीकारच केला. स्त्री–पुरूष समानतेचा त्यांनी विचार मांडला. स्त्रीयांनाही पुरूषांबरोबर धर्माचा अधिकार असल्याची जाणीव करून दिली.

**आचारधर्म**

महानुभाव संप्रदाया हा संन्याशी व गृहस्थी अशा दोन वर्गात विभागला गेला असला तरी तो मुख्यत्वे संन्यासप्रधानच आहे. समाजातील चारही वर्णातील स्त्रीपुरूषांना संनयासाचा अधिकार देण्यात आला होता. संन्यासाचा आचरणावर मात्र कडक बंधने घालण्यात आली होती. संन्यासासाठी नित्याटन, भिक्षाभोजन, एकान्तवास व नामस्मरण ही प्रमुख कर्तव्ये सांगितली होती. महानुभाव संप्रदायातील गृहस्थाश्रमींना उपदेशी किंवा अनुयायी असेही म्हटले जात होते. चक्रधरनिरूपीत आचारधर्म सर्वस्वी संन्यासप्रवणतेकडे, निवृत्तीवादाकडे झुकणारा आहे. महानुभाव संद्रदायाच्या आचारधर्माची उभारणी जीवेश्वरभेद, संन्यास, भक्ती आणि अहिंसा या चार प्रमुख तत्वावर झाली आहे. महानुभाव संप्रदायातील शिष्यांना अन्न, वस्त्र, निद्रा, अटन, भोजन, उपासना याबाबत घालून दिलेल्या नियमांचे पालन काटेकोरपणे करावे लागत होते. विषयसुखत्याग महानुभाव संप्रदायाचा महत्त्वाचा आचार होता. इंद्रिये विषयाधीन होऊ नयेत म्हणून सर्व सुखोपभोग वर्ज्य करावेत असे चक्रधर म्हणत असत. संगीत, चांगले कपडे व चांगले खाणे वर्ज्य करावेत. साधकाने विचारविकल्पशून्य होऊन ईश्वराधीन राहून त्याचे स्मरण जन्मभर करावे. विकारशून्यतेसाठी इंद्रियांचे दमन करावे. महानुभाव संप्रदायातील साधक भिक्षा मागत असत. भिक्षा मागून आणलेले अन्न सेवन करताना इंद्रियार्थ रसु न सेवावा या मनोवृत्तीवर अधिक भर दिला होता. समाजातील चारही वर्णीयांकडे भिक्षा मागावी. भिक्षा मागताना दाराची वासु न पाहावी. पायाची वासु पाहावी. असे म्हटले होते. करीए चांगले अन्न मिळेल अशी अपेक्षा निर्माण होऊन दाराची वासु पाहत ओळखीच्या घरात जाऊन भिक्षा मागण्याची पद्धत सुरू होईल. तसे होऊ नये म्हणून भिक्षा मागताना पायाची वासु पाहावी. इंद्रियसुखाचा मोह होऊ नये म्हणून चांगली वस्त्रे नेसू नयेत. फाटकी, मळकी वस्त्रे वापरावीत. ती न मिळाल्यास स्माशानातील वस्त्रे वापरावीत. साधकाने निरंतर परमेश्वराची अर्ति करावी. निरंतर पमेश्वराचा विरह भावावा असे चक्रधरांनी सांगीतले होते. साधकाने कोठे रहावे हे सांगताना चक्रधर म्हणतात, कन्नडदेशा तेलंगदेशा न वाचावे. महाराष्ट्री असावे. चक्रधर स्वामींच्या वेळी महाराष्ट्रात देवगिरींच्या यादवांची सत्ता होी. देवगिरीचे यादव वैदिक संस्कृतिचे अभिमानी होते.

महानुभाव संप्रदायातील साधकाने अहिंसेवर भर द्यावा. कोणत्याही प्राणीमात्रांची हिंसा होणार नाही याची काळजी घेण्यास सांगितले. साधकाने मुंगीही मारून हिंसा करू नये हे सांगताना चक्रधर म्हणतात, मुक्तीची चाड तणें मुंगिये वीरू चिंतावे. तुमचेनि मुंगी रांड न होआवी. साधकाने आपल्या वागण्याने किंवा शब्दानेही कोणासही दुखवू नये म्हणून चक्रधर म्हणतात महात्मेनि प्रियवक्तेया होआवे महानुभाव संप्रदायात गुरूला महत्त्वपूर्ण स्थान दिले जात होते. गुरूला अधिकारण किंवा आचार्य अशी संज्ञा होती. आचार्य हा शिष्याला अनिष्ठापासून इष्टाकडे नेणारा असतो. या संप्रदायात गुरूचे स्थान महत्त्वाचे असले

तरी मात्र गुरू परमेश्वराचे स्थान घेऊ शकत नाही. इंद्रियाच्या धर्मामुळे जिवाच्या ठिकाणी विकार निर्माण होत असतात. या विकारांचा नाश करण्याचे मुख्य साधन म्हणजे वैराग्य. त्यासाठी स्वदेशसबंधु त्याज्यः स्वग्रामसंबंधु त्याज्यः संबंधियांचा संबंधु तो विशेषतां त्याज्यं हे सुत्र फार महत्त्वाचे आहे. देश, ग्राम, जाती, नातेवाईक या सर्वांचा त्याग केल्याशिवाय तुम्ही परमेश्वराच्या भक्तीत रममाण होऊ शकत नाही.

**कार्य**

वैदिक धर्मातील कर्मठपणा, व्रतवैकल्ये, तीर्थयात्रा, बहिर्मुखता व पारमार्थिक क्षेत्रातील उच्चवर्णीयांचे वर्चस्व या दोषाविरूद्ध चक्रधरांनी ज्ञान आणि भक्ती या दोन विशुद्ध तत्वांच्या पायावर महानुभाव संप्रदायाची उभारणी केली. सर्वसामान्य जनतेला विकासाचा मार्ग मोकळा करून देणे हे या संप्रदायाचे प्रमुख उद्दिष्ट होते. चक्रधर नव्याने उदयास आलेल्या पंथाचे, संप्रदायाचे, तत्वप्रणालीचे प्रवर्तक होते. चक्रधरांनी एका बाजूने श्रीगोविंदप्रभूंचे शिष्य आणि दुसऱ्या बाजूने आपल्या भक्तमंडळीचे गुरू अशी दुहेरी भूमिका त्यांनी निवाभवली. तत्कालीन परिस्थितीत महानुभाव संप्रदायाचे सर्वांना सारखा होईल असा आत्मविकासाचा साधनामार्ग उपलब्धकरून दिला. महानुभाव संप्रदायप्रवर्तकाने आपल्या तत्वज्ञानात भक्तीभावनेला प्रेरक, पोषक ठरणारी परमेश्वरावताराची कल्पना मांडली. चक्रधरांनी प्रतिसृष्टी परमेश्वर अवतरेति यातत्वानुसार पंचकृष्णांच्या कल्पनेची योजना करून ज्ञान आणि भक्ती हे त्याच्या प्राप्तीचे दोन श्रेष्ठ मार्ग सांगीतले. चक्रधरांनी महानुभाव संपद्रदायाची उभारणी करताना समन्वयवादी दृष्टी स्वीकारली होती. त्यांनी इतर संप्रदायाकडून आवश्यक त्या गोष्टींचा स्वीकार केला व त्यावर आपल्याला इष्ट वाटतील तसे संस्कार केले. नाथ संप्रदायाकडून त्यांनी समत्वदृष्टी लोकभाषेचा पुरस्कार, विशुद्धाचरणाचे महत्त्व या गोष्टींचा स्वीकार केला. वैष्णव परंपरेतून कृष्णभक्ती, मायाविचार अवतारांची कल्पना या गोष्टींचा स्वीकार केला. तर जैन धर्माकडून अहिंसापालन, स्त्रियांनाही संन्यास देण्याची कल्पना व कर्मसंन्यासपर निवृत्तिधर्माचे आचरण या गोष्टींचा स्वीकार केला.

महानुभाव संप्रदायाच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी लोकभाषेचा स्वीकार करण्यात आला होता. लोकभाषेतून श्रेष्ठ वाङ्मयाची निर्मिती केली. मराठी भाषेला धर्मभाषेचे स्थान देण्याचा पहिला मान महानुभाव पंथालाच जातो. आपल्या संप्रदायाचे तत्वज्ञान सामान्य लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी त्यांनी मराठीचा प्रभावीपणे वापर केला. चक्रधरस्वामी गुजरातमधून येऊनही मराठीत अनावर बोलत होते. त्यांनी आपल्या ब्रम्हविद्येचे निरूपण मराठीतूनच केले. चक्रधरास्वामींनी निरूपण केलेल्या मराठी भाषेचाच वापर सर्वांनी करावा. असा श्रीनागदेवाचार्यांचाही दंडक होता. संस्कृतमधून प्रश्न विचारणाऱ्या दामोदरपंडित आणि केशिराजव्यास यांना तुमचा अस्मातु मीनेणेंगाः मज रीचक्रधरेंरायें मऱ्हाटी नीरूपीलीः ते मी मऱ्हाटी जाणे गाः आज तियाची माते पुसावेः असे स्पष्ट सांगीतले. महानुभाव अनुयायांनी मोठ्याप्रमाणात मराठी ग्रंथचरना करून मराठी भाषेची काव्य, कथाकाव्य, चरित्र, टिका, स्थलवर्णने, सूत्रग्रंथ, छंद, भाष्य, व्याकरण, कोश ही विविध दालने समृद्ध केली. वाङ्मयीन गुणवत्तेने सकस असलेले साहित्य तर महानुभावांनी निर्माण केलेच. परंतु सर्वसमान्यांनाही ते कळावे या जाणिवेतून मूळ तत्त्वज्ञान व त्यावरील भाष्यही मराठीतूनच लिहिले. महानुभावाचे

साहित्य विपुल व वैविध्यपूर्ण आहे. मध्ययुगीन मराठी साहित्यात इतकी विपुलता व विविधता कोणत्याही धर्मसंप्रदायाच्या साहित्यात नाही.

चक्रधरस्वामींनी महाराष्ट्रात सर्वप्रथम चातुर्वर्ण्य व्यवस्थेला विरोध केला. चातुर्वर्ण्य चरेत् भैक्ष्यम्: म्हणून चारही वर्ण समान मानावेत. चारही वर्णाच्या घरी जाऊन भिक्षा मागावी असे सांगीतले. महारवाडाहुनि धर्मु काढावा म्हणजे धर्माचा प्रारंभ महारवाड्यापासून करण्यात यावा अशी भूमिका मांडली. चक्रधरांनी चांभाराच्या हातचा लाडू घेऊन आपल्या भक्तांना प्रसाद म्हणून वाटला तर श्रीगोविंदप्रभू हे तर दीनदलितांचे, अनाथ स्त्रियांचे माहे होते. चातुर्वर्ण्य व्यवस्था नाकारून महानुभाव संप्रदायाने समाजाला समानतेचा संदेश दिला.

**महानुभाव संप्रदायाची वाङ्मयनिर्मिती**

महानुभाव संप्रदायाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात वाङ्मयाची निर्मिती झाली. त्यामागे या संप्रदायातील संप्रदायप्रवर्तक, आचार्य आणि विद्वान यांच्याकडून मिळणारी प्रेरणा कारणीभूत ठरली. महानुभावांचे सर्व वाङ्मय त्यांच्या पंचकृष्णाभोवती निर्माण झाले आहे. महानुभाव संप्रदायाच्या स्थापनेपासून निर्माण झालेले वाङ्मय पुढील कालखंडात श्रुती, स्मृती, वृद्धाचार, मार्गरूढी आणि वर्तमान या पाच विभागात वर्गीकृत केले आहे. महानुभाव संप्रदायातसाती ग्रंथ पवित्र मानलेल होतो. त्यामध्ये नरेन्द्रकृत रूक्मीणी स्वयंवर शके १३१४-१५ (इ.स. १३९३), भास्करभट बोरकरकृत शिशुपालवध शके १२३४ (इ.स. १३१२), भास्करभट बोरीकरकृत उद्धवगीता शके १२३५ (इ.स. १३१३), दामोदर पंडितकृत वछाहरण शके १२३८ (इ.स. १३१६), खळोबासकृत सह्यादि0वर्णन शके १२७५ (इ.स. १३५३), विश्वनाथ बासकृत ज्ञानप्रबोध शके १३४0 (इ.स. १४१८), व नारायणबासकृत ऋद्धिपूरवर्णन शके १३४0 (इ.स. १४१८), यांचा समावेश होतो. वरील ग्रंथातील पहिले चार ग्रंथ श्रीकृष्णचरित्रपर आहेत. पाचव्या ग्रंथातून श्रीदत्तात्रेयाच्या लीळा सहाव्या ग्रंथातून गीतेतील पाच श्लोकांच्या आधारे भक्तिमार्गाचे प्रतिपादन तर सातव्या ग्रंथातून ऋद्धिपूरला प्राप्त झालेले क्षेत्र माहात्म्य भावपूर्ण अंतःकरणाने वर्णिले आहे. लीळाचरित्र हा मराठीतील आद्य गद्यग्रंथ आहे. तसेच सर्वच दृष्टींनी एक आदर्श ग्रंथ आहे. या ग्रंथामध्ये चक्रधरांनी दैनंदिनी म्हाइंभटाने ग्रथित केली. या ग्रंथाच्या माध्यमातून आठवणीच्या रूपाने चरित्र लिहिण्याची प्रथा मराठीत म्हाइंभटाने सुरू केली. या ग्रंथाच्या माध्यमातून चक्रधरांच्या व्यक्तीमत्वाचे दर्शन घडण्याबरोबरच महानुभाव संप्रदायाचे तत्वज्ञान, यादवकालीन सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडते. चक्रधरस्वामींच्या विलोभनीय व्यक्तिमत्वाचे दर्शन घडण्याबरोबरच तत्त्वज्ञान, इतिहास, राज्यशास्त्र, व्यापारशास्त्र, भूगोल, कला, काव्य, नाट्य, संगीत, साहित्यशास्त्र या सर्वांचे उत्तम दर्शन लीळाचरित्रातून होते. महानुभाव अनुयायांच्या दृष्टीने हा ग्रंथ वेदोपनिषदाइतका पवित्र आहे. महानुभाव संप्रदायाचे एक विश्वनीय साधन म्हणून या ग्रंथाकडे पाहिले जाते.

चक्रधर, गुरू गुंडम राउळ यांच्या लीला वर्णन करणारा गद्य चरित्रग्रंथ म्हाइंभटाने ऋद्धिपूर लीळा या नावाने संपदित केलेला आहे. या ग्रंथाची सिद्धता इ.स. १३८८ मध्ये झाली असून त्यामध्ये एकूण ३६५ लीळा समाविष्ट आहेत. चांगदेव चक्रपाणी हेही चरित्र लीभारूपच आहे. चांगदेव चक्रपाणी हे महानुभावांच्या पंचकृष्णापैकी तृतीय परमेश्वर यामध्ये त्यांचा जन्म, मुंज, विवाह, संसार, वैराग्य, महूरगमन, द्वारावतीस प्रयाण, बावन

पुरूषास विद्यादान अशा त्यांच्या आयुष्यातील ठळक प्रसंगावर आधारित लीळा आलेल्या आहेत. श्रीकृष्ण चरित्र याचा कर्ता कोण आहे यावरून मतभेद आहेत. महाराष्ट्र सारस्वतकार यांचे कर्तृत्व भास्करभट बोरीकराकडे देतात. तर डॉ. कोलते व डॉ.य. खु. देशपांडे यांनी म्हाइंभटाचे कर्तृत्व मान्य करतात. श्रीकृष्ण चरित्रग्रंथावर महानुभाव संप्रदायाच्या विचारांची दाट छाया पडली आहे. पूजावसर हा बाईदेवबासांचा लघु ग्रंथ आहे. यामध्ये चक्रधरस्वामींची दिनचर्या बारीकसारीक गोष्टींचा निर्देश करून सांगितली आहे. मूर्तिप्रकाश हा महानुभावांचा प्राचीनतम म्हटला गेलेला ग्रंथ मुनिकेशिराज यांनी शके १२११ (अ.स.१२८९) मध्ये लिहिला. यामध्ये चक्रधरांचे मूर्तिवर्णन अत्यंत रेखीव आणि दृकप्रत्ययी स्वरूपात केलेला आहे. स्मृतिस्थळ या ग्रंथाचे नायक नागदेव आहेत. हा ग्रंथ महानुभावीयांचा नागदेवांच्या आठवणीतून अनेक प्रसंगातून साकारलेला स्मृतिग्रंथ आहे. श्रुतीनंतर महानुभाव या स्मृतिग्रंथाला प्रमाण मानतात. हा ग्रंथ महानुभावांच्या आचार-विचारांचा कृतिरूप आदर्श ग्रंथ ठरला. त्यानंतर वृद्धाचार, मार्गरूढी, चरित्र आबाब, हेतुस्थळ इ. गद्यग्रंथ निर्माण झाले.

## ८.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१. वारकरी संप्रदायातील ज्ञानेश्वरांचे कार्य सांगा.

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................................

२. वारकरी संप्रदायातील नामदेवांचे कार्य सांगा

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................................

३. वारकरी संप्रदायाची सविस्तर माहिती सांगा.

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................................

४. वारकरी संप्रदायाचे कार्य सांगा.

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................................

५. समर्थ रामदासांचे कार्य सांगा.

..............................................................................................
..............................................................................................
..............................................................................................

६. रामदासी संप्रदायाची सविस्तर माहिती सांगा.

.................................................................................................
.................................................................................................
.................................................................................................

७. रामदासी संप्रदायाचे कार्य सांगा.

.................................................................................................
.................................................................................................
.................................................................................................

८. महानुभाव संप्रदायातील पंचकृष्णाची माहिती सांगा.

.................................................................................................
.................................................................................................
.................................................................................................

९. चक्रधरांचे कार्य सांगा.

.................................................................................................
.................................................................................................
.................................................................................................

१०. महानुभाव संप्रदायाची सविस्तर माहिती सांगा.

.................................................................................................
.................................................................................................
.................................................................................................

## ८.४ सारांश

मध्ययुगीन महाराष्ट्रातील प्रमुख भक्तीसंप्रदाया म्हणून वारकरी संप्रदायाकडे पाहिले जाते.मध्ययुगीन महाराष्ट्रात समजाजागृतीचे महत्त्वपूर्ण कार्य वारकरी संप्रदायाने केले. पंढरपूरचा विठ्ठल हे या संप्रदायाचे आद्य दैवत. हजारो वारकरी पंढरपूरास विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाण्यासाइी मध्ययुगातील परंपरा आजही टिकून आहे. वारकरी संप्रदायाच्या माध्यमातन महाराष्ट्रात संतांची मोठी परंपरा निर्माण झाली. या संतांनी आपल्या कार्यातून समाजातील जातीजातीतील विषमता नष्ट करण्यावर भर दिला. समर्थ रामदासांच्या पुढाकारातून महाराष्ट्रात रामदासी पंथ अस्तित्वात आला. समर्थांनी आपल्या विचारातून व कार्यातून स्वधर्माच्या रक्षणासाठी स्वराज्याची आवश्यकता प्रतिपादीत केली. मठ व महंताच्या माध्यमातून आपल्या पंथाचा प्रचार व प्रसार त्यांनी केला. वारकरी व रामदासी पंथाबरोबरच महाराष्ट्रातील महानुभाव संप्रदायही महत्त्वाचा होता. चक्रधरांनी या संप्रदायाची स्थापना करून आपल्या संप्रदायाचा प्रचार व प्रसार केला. या संप्रदायातील संतानी विविध साहित्यातून आपले विचार मांडले. त्यांनी मराठीतून साहित्याची निर्मिती केल्यामुळे विशिष्ट वर्गापुरतेच मर्यादित

आलेल ज्ञानाचे भांडार बहुजन समाजापर्यंत पोहचले. ईश्वरभक्तीचे ज्ञान समाजाला उपलब्ध झाले. आपल्या साहित्यातन अंधश्रद्धा, अनिष्ठ यढी परंपरा, जातीव्यवस्था, यावर संतांनी टिका करून समाजजागृती घडवून आणली. थोडक्यात मध्ययुगीन महाराष्ट्रातील तीन महत्त्वपूर्ण संप्रदाय म्हणून महानुभाव, वारकरी व रामदासी संप्रदायाकडे पाहिजे जाते.

## ८.५ पारिभाषिक शब्द

कवाडे – दारे, मार्ग

भंडार – खजिना, ठेवा

## ८.६ संदर्भ सूची

१. लक्ष्मणशास्त्री जोशी, (१९८९) मराइी विश्वकोश खंड १४, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.

२. पं. महादेवशास्त्री जोशी (१९६८-२०११) भारतीय संस्कृतिकोश खंड ४ व खंड ५, भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

३. पं. महादेवशास्त्री जोशी (तृतीयावृत्ती -२००२) भारतीय संस्कृतिकोश खंड १० भारतीय संस्कृतिकोश मंडळ, पुणे.

४. रा. श्री. मोरवंचीकर (संपा), (जून २००९) आधुनिक महाराष्ट्री जडणघडण शिल्पकार चरित्रकोश खंड १, इतिहास, प्रकाशक - साप्ताहिक विवेक हिंदुस्थान प्रकाशन संस्था, मुंबई

५. कृ.ना. चिटणीस, (१९८७) मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था भाग - (दुसरी आवृत्ती) समाज व संस्कृती, प्रकाशिका : सौ. रा. कृ. चिटणीस, पुणे

६. ह. भ. प. प्रा. शं. वा. दांडेकर (१९९५) वारकरी पंथाचा इतिहास, प्राचार्य दांडेकर धार्मिक वाङ्मय प्रकाशन, पुणे.

७. गजाने भिडे, विजय नलावडे, वैजयंती नाईकनवरे (२०००), मध्ययुगीन भारत (सामाजिक, आर्थिक, आणि सांस्कृतिक इतिहास ) फडके प्रकाशन, कोल्हापूर.

८. अ. ना. देशपांडे (१९७३), प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग तिसरा एकनाथ - पर्व प्रारंभ. व्हीनस प्रकाशन, पुणे.

९. ह. श्री. शेणोलीकर (१९८७), प्राचीन मराठी वाङ्मयाचे स्वरूप, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

१०. ल. ना. नसिराबादकर, (२००६), प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

# घटक ९

# कला व स्थापत्य

**अनुक्रमणिका**


९.० उद्दिष्टे
९.१ प्रस्तावना
९.२ विषय विवेचन
  ९.२.१ शिल्पकला
  ९.२.२ चित्रकला
  ९.२.३ स्थापत्य – मराठेकालीन किल्ल्यांची ठळक वैशिष्ट्ये
९.३ स्वयंअध्ययन प्रश्न
९.४ सारांश
९.५ परिभाषिक शब्द
९.६ संदर्भ सूची


## ९.०. उद्दिष्टे :-

या घटकाच्या अभ्यासाने आपल्याला –

१. मराठेकालीन शिल्प कलेविषयी माहिती मिळेल
२. मराठेकालीन चित्रकलेचा विकास जाणून घेता येईल.
३. मराठेकालीन किल्ल्यांची माहिती मिळेल.
४. छत्रपती शिवाजी महाराजांनी किल्ले बांधतांना वापरलेली वैशिष्ट्ये अभ्यासता येतील.
५. मराठेकालीन स्थापत्य कलेची माहिती मिळेल.

## ९.१. प्रस्तावना

या घटकात आपल्याला मराठाकालीन शिल्पकला, चित्रकला, स्थापत्य या अंगाने अभ्यास करावयाचा आहे. हा राज्य लष्करीराज्य होते. राज्य स्थापनेपासून अस्ताला जाईपर्यंत सतत धामधुमीचा काळ असल्यामुळे शांततेची स्थिती प्रस्तापित न झाल्याने राज्यकर्त्यांना राज्य रक्षणापलीकडे इतर सांस्कृतिक बाबींकडे लक्ष देण्याची संधी मिळाली नाही. असे असले तरी कला स्थापत्याच्या विविध क्षेत्रांच्या संदर्भात मराठा राज्य मागे नव्हते. हे अलिकडे संशोधनाअंती लक्षात आले आहे. या क्षेत्रात मराठा कालखंडात नेमकी काय स्थिती होती, हे आपण जाणून घेणार आहोत.

## ९.२.१मराठेकालीन शिल्पकला

भारतीय शिल्पकला ही प्रामुख्याने स्थापत्य शिल्प स्वरूपाची आहे. कारण स्वतंत्र शिल्पे अपवादात्मक आहेत. मराठा कालखंडही याला अपवाद नव्हता. स्वतंत्र शिल्पे क्वचितच कोरलेली आढळतात. मराठा कालखंडात प्रामुख्याने मंदिराच्या शिखरावर शिल्पे आढळतात. मराठे शाहीत शिल्पकलेचा फारसा विकास न होण्याची पुढील कारणे सांगता येतील.

१) मराठा राज्यकर्त्यांचे संपूर्ण आयुष्य आदिलशाही, मोग, ब्रिटिश, निजाम व इतर शत्रूंशी लढण्यातच व्यस्त राहिले. शत्रूशी संघर्ष व आपापसातील हेवेदावे यामुळे कलेकडे लक्ष देण्याइतका फुरसतीचा काळ त्यांना लाभला नाही.

२) मराठा राज्याची आर्थिक स्थिती सतत होणाऱ्या लढायांमुळे सतत नाजूक राहिली. बरेच राज्यकर्ते कायम कर्जबाजारी राहिले. अशा स्थितीत कलेला राजाश्रय मिळणे शक्य झाले नाही.

३) यादवांनंतर महाराष्ट्रात मुस्लिम राजवटीच्या काळात भारतीय कलेचा ऱ्हास झाला होता. मराठेकाळात ती पुररुज्जीवीत होत असतांना खूप भरभराटीला येणे अवघड होते.

मराठेशाहीतील शिल्पकलेचे कालखंडानुसार ३ भाग करता येतात.

### १) शिवकाळ ते पेशवा बाळाजी विश्वनाथ पर्यंत (इ.स.१६४६ ते १७२०) –

या पहिल्या कालखंडात कलेला फारसे उत्तेजन मिळाले नाही. या कालखंडातील शिल्पकलेचे अगदी मोजकी उदाहरणे आहेत. शिवकालीन वैशिष्ट्यपूर्ण शिल्प यादवाड (कर्नाटक) येंं सापडले आहे. या शिल्पात शिवाजी महाराज व बेळवडीची मल्लम्मा यांच्यातील बोलणी झालेला प्रसंग दर्शविलेला आहे. महाराज कर्नाटक स्वारीवरून परत येत असतांना या मल्लम्माशी लढाई होऊन तिने पराक्रमाची शर्थ केली होती. ती पराभूत झाली असली तरी तिच्या पराक्रमाने प्रभावित होऊन महाराजांनी तिला आदराची वागणूक दिली. त्यामुळे तिने हे शिल्प कोरविले असावे. चौकोनी आकराच्या ३ फूट लांब २.५ फूट रुंद शिलेवर कोरलेल्या या शिल्पाचे २ भाग आहेत. वरच्या भागात शिवाजी महाराजांचा घोडा चौखून धावतांना दाखविला आहे तर खालच्या भागात शिवाजी महाराज व मल्लम्मा यांच्यात बोलणी चालू असल्याचा प्रसंग दर्शविला आहे. या शिल्पाचे कोरीव काम श्रेष्ठ दर्जाचे नसूनही शिवकालीन दुर्मिळ शिल्प असल्याने महत्त्वाचे आहे.

शिवकाळात मंदिरे देखील फारशी उभारली गेली नाहीत. जीजाबाईने पुण्यातील कसबा गणपती मंदिर, शिवाजी महाराजांनी विठ्ठलवाडीचे विठ्ठल मंदिर व शिखर शिंगणापूर येथील शंभूमहादेवाचे मंदिर बांधल्याचा उल्लेख आढळतो. येसूबाईने पुण्याजवळ पाषाण येथील शिवमंदिर उभारले. धनाजी जाधवाने सातारा जिल्ह्यातील पालीच्या खंडोबा मंदिराची दुरुस्ती केली इत्यादी.

### २) थोरले बाजीराव पेशवे ते नानासाहेब पेशवे (इ.स. १७२० ते १७६१)

या कालखंडात मराठा सरदारांनी उत्तरेत अनेक मोहिमा काढल्या. उत्तरेतून व इतर भागातून कलेच्या वस्तु आणल्या. उत्तरेतील मंदिरे व शिल्पे पाहून मंदिर उभारणीसाठी

उद्युक्त झाले. या कालखंडात अनेक वास्तू उभारण्यात आल्या. त्यात मध्ययुगीन शिल्पकलेची हुबेहूब नक्कल दिसते. मंदिरांवरील मूर्तीकाम सजीव, कलापूर्ण वाटन नाही पण मुर्तीचे नाक, डोळे, अलंकार, वस्त्रे दाखवितांना कलाकारांनी विशेष लक्ष दिलेले दिसते. उदा. सासवड येथील वटेश्वर मंदिराती स्तंभावरीललढाईची दृश्ये. या कालखंडात शाहू महाराज व पेशव्यांचे गुरु ब्रह्ममेंद्रस्वामी यांनी देवालये बांधली. त्यात चिपळूणचे परशुराम मंदिर, यवतचे भुलेश्वर देवालय, धावडशीचे परशुराम मंदिर, राजुरीचा गणपती इ. चा उल्लेख करता येईल. १७३० चे सुमारास राणोजी शिंदेने जोतिबाच्या डोंगरावर केदारेश्वर मंदिर बांधले. नानासाहेबांनी पुण्यात पर्वतीवर देवदेवश्वर मंदिर, नाशिकला त्रिंबकेश्वराचे मंदिर बांधले.

### ३) थोरले माधवराव पेशवे ते सवाई माधवराव पेशवे

पानीपतच्या लढाईने मराठ्यांची मोठी हानी झाली होती. परंतु माधवराव, नारायणराव, सवाईमाधवराव या पेशव्यांनी मराठा सत्ता सावरण्याचा प्रयत्न केला. त्यात नाना फडणीस व इतर मराठा सरदारांनी त्यांना सहयोग दिला. या काळात मंदिराची उभारणी मोठ्या प्रमाणात झाली. या काळातील मंदिरात शाडुच्या मूर्ती आणि कोरीव काम मोठ्या प्रमाणात झाले. वास्तुशिल्पावर गुजराथी व राजपूत कलेचा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. मंदिराच्या प्रवेशद्वारांवर उभ्या किंवा बसलेल्या किंवा हत्तींवर आरुढ झालेल्या मराठा सरदारांच्या मूर्ती कोरलेल्या आढळातात. नर्तकी, वाद्यवृंदांच्या मूर्तींचा पोशाख उत्तर भारतीय पद्धतीचा दिसतो. मंदिरात व मंदिराच्या बाहेरील भिंती, मंडपाच्या छतावर भरपूर शिल्प आढळते. त्यात अतिशय कौशल्याने कोरलेली फुले व भौमितिक नक्षी विशेषतः कमळ, हंस कोरलेले आढळतात. हत्ती, मोर, माकडे यांचेही चित्रण ठसठशीत व नैसर्गिक दिसते. मात्र या कालावधीत कोरल्या गेलेल्या मानवी आकृती फारशा कलापूर्ण कोरल्या गेलेल्या नाहीत. शिल्पांमधून कृष्णजीवनातील प्रसंग, पौराणिक कथा, राजदरबार असे विषय हाताळलेले दिसतात.

नाशिक, वाई, पंढरपूर, माहूली, जेजूरी, पाली या ठिकाणाची बहुतेक देवालये या काळात बांधली गेलेली आहेत. पेशव्यांनी पुण्यात अमृतेश्वर, तुळशीबाग व ओंकारेश्वर ही मंदिरे बांधली. शिंदे होळकरांनी जेजूरी, ज्योतिबा येथील मंदिरे उभारली. अहिल्याबाई होळकरचे स्थापत्य क्षेत्रातील बहुमुल्य योगदान याच काळातील आहे. आहिल्याबाईंनी महेश्वर, वाराणशी, रामेश्वर, नाशिक, पंढरपूर यासह संपूर्ण भारतभर ठिकठिकाणी घाट व देवालये बांधली. अनेक सरदारांनाही मंदिरे बांधली. उदा. चंद्रचुड यांनी नेवाशाचे मोहिनीराज मंदिर, गद्रे यांनी टोक्याचे सिद्धेशवर देवालय, पुरंदरेंनी सासवडला चांगवटेश्वर व संगमेश्वर ही देवालये, पटवर्धनांनी सांगली, तासगावात गणेश मंदिरे, प्रतिनिधींनी औंध येथे यमाईचे देवालय, माहुलीत काशी विश्वेश्वराचे मंदिरे, नाना फडणिसाने बेलबाग, भीमानदीच्या उगमस्थानी भिमाशंकर देवालय, हिंगणेंनी नाशिकला नीळकंठेश्वराचे देवालय, रास्त्यांनी वाईला रामेश्वर, काशी विश्वेश्वर, महेश्वराची देवालये बांधल्याचे उल्लेख आढळतात.

मराठाकालीन देवालयांवर यादवकालीन स्थापत्यकलेचा प्रभाव दिसतो. यादवकालीन मंदिरांचे जीर्णोद्धारासह सुशोभिकरण मराठा कालखंडात झाले. उदा. यवतचे भुलेश्वर मंदिर, पुण्यातील कसबा गणपती, पाली, जेजुरीचा खंडोबा देवस्थाने, शिरवळ, पाषाण, बनेश्वर

येथील शिवालये, विठ्ठलवाडी विठ्ठल मंदिर, शिंगणापूरचे शंभूमहादेवाचे मंदिर इ. मराठा स्थापत्याचे अभ्यासक डॉ. श्री. म. माटे यांनी मराठाकालीन मंदिराचे स्थापत्य वैशिष्ट्यांच्या आधारे अ,ब,क असे ३ प्रकार सांगितलेले आहेत. या तिन्ही प्रकारातील मंदिरांचा स्थापत्याचा दृष्टीने अभ्यास करता लक्षात येते की, येथील कलाकार मूर्तिविज्ञान, सजावट याबाबत निष्णात नव्हते. त्यांचे शिल्प अतिशय साधे व सरळ असे. काही ठिकाणी त्यांनी नक्षी काढून मूर्तिविज्ञानातील उणिवा भरून काढलेल्या आहेत. सभामंडपाच्या रचनेत बदल होत गेला व मंदिर शिल्पाच्या दृष्टीने हितावह ठरला. मंदिरांमधील नक्षीला पॉलिश करण्याच्या पद्धतीमुळे सौंदर्यात भर पडली.

मंदिरामधील देवतांच्या प्रतिमा

मराठा कालखंडात प्रतिमा कोरण्याची कल फारशी प्रगत नव्हती असे डॉ. माटे यांचे मत आहे. देवालयामधील मूर्ती ओबडधोबड आहेत. सुबक मुर्ती बहुधा उत्तर किंवा दक्षिण भारतातून मागविलेल्या किंवा नामवंत मूर्तीकारास खास बोलावून तयार करून घेतल्या जात. इ.स. १७६७ मध्ये तुळाजीराजे चंदावरकर यास दक्षिणेतून सोन्याचा गणपती करून पाठविण्यातबाबत माधवराव पेशव्यांनी लिहिल्याचा उल्लेख आढळतो. पुण्यातील तुळशीबागेतील राममूर्ती, बेलबागेतील विष्णूमूर्ती राजस्थानी शैलीतील आहेत. माहुली येथील राम, सीता, लक्ष्मण यांच्या ब्रांझमुर्ती दक्षिण हिंदुस्थानातू आणलेल्या आहेत. शिवालयांमध्ये शंकरमूर्ती ऐवजी सांबाची पिंढ अधिक आढळते. कारण शिवमूर्ती तयार करण्यापेक्षा पिंढ तयार करणे जास्त सोयीचे  व सोपे होते.

मराठाकालीन शिल्पप्रकारात वीरगळ हा एक प्रकार आढळतो. शिल्पकलेच्या दृष्टीने ते फारसे उल्लेखनीय नाहीत. ३-४ फूट ३ उंचीच्या दगडी शिळेवर ३ भागात उठावात शिल्प कोरलेले असले तरी कलाकार फारसे निष्णात नसल्याने मूर्ती फार आकर्षक नाहीत. गावातील शूरवीर लढाईत वा शिकारीत मृत्यू पावल्यास त्याच्या स्मरणार्थ वीरगळ उभारले जात. वीरगळाच्या शीलेवर खालच्या भागात तो पालखी किंवा मेण्यातून उप्सराच्या खांद्यावरून कैलासास जातांना दाखविलेला असतो. वरच्या भागात वीर कैलासावर सूरागणांसह शीवपूजा करतांना दर्शविलेला असतो. क्वचित या शिळेवर कोरीव लेखही आढळतात.

छत्री किंवा समाधी

एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर किंवा त्याच्या स्मरणार्थ मृत्यूच्या ठिकाणी वास्तू उभारली जाते, तिला छत्री किंवा समाधी म्हणत. वास्तू कलेच्या दृष्टीने छत्री व समाधी मध्ये फारसा फरक नसतो. रायगडावर शिवाजी महारजांचे देहावसान झाल्यानंतर त्यांची छत्री उभारली गेली. तिचा आकार अष्टकोनी असावा असे अवशिष्ट अवशेषांवरून दिसते. सिंहगडावर राजाराम महाराजांची चौकोनी आकाराची छत्री आहे. ती आकाराने लहान व चून्याचा गिलावा केलेली असून वक्र रेखाच्छादीत आहेत. पुण्यात मुळामुठेच्या संगमावर होळकर घराण्यातील पुरूषाच्या स्मृतिप्रित्यर्थ छत्री उभारलेली आहे. वाघोली येथे संभाजी जाधवाची चौकोनी, दगडी छत्री आहे. भिंतातील ४ दगडी खांबांमधून टोकदार कमानी काढलेल्या आहेत. शिखराचा आकार कंदमुळासारखा असून शिखराच्या चारही कोपऱ्यात घुमट आहेत. माहेश्वर येथे मालेराव होळकरांची छत्री आहे. चौकोनी दगडी, सुरूच्या ~~आकाराचे खांब, त्यांना टोकदार कमान, छत्रहवर कंदमुळाच्या आकाराचे चुन्याचे छत~~

आहे. छत्रीवर उत्तम नक्षीकाम असून त्यातील हत्तींची रांग वैशिष्ट्यपूर्ण आहे. इंदूर येथे छत्रीबागेत होळकर घराण्यातील अनेक वीरपुरूषांच्या स्मरणार्थ छत्र्या बांधलेल्या आहेत. इ.स. १७९७ मध्ये यशवंतराव होळकरांने माहेश्वर येथे अहिल्यबाई होळकरची छत्री उभारली आहे. महादजी शिंद्यांची छत्री स्थापत्यातील उत्तम नमूना आहे. ही छत्री पुण्याच्या आग्नेयेस वानवडी येथे आहे. छत्री फरसबंद, दगडाच्या गुळगुळीत भिंती असलेली आहे. छत्रीच्या भव्य प्रवेशद्वारास दिंडी दरवाजा असून वर गॅलरी आहे. छताचे खांब हत्तीच्या डोक्यावर आहेत. या हत्तीच्या वळलेल्या सोंडामुळे तोफगोळे बसविलेले आहेत. प्रवेशद्वाराच्या आत भव्य अंगणात मध्यभागी छत्रीच्या इमारत आहे. त्या इमारती छतावर भडक रंग दिलेल्या धान्यस्थ ऋषींच्या आकृत्या आहेत. इमारतीत संगमरवरी तळ असलेला भव्य हॉल आहे. हॉलच्या खांबावर नक्षीकाम आहे.

**घाट, धर्मशाळा, कुंड**

घाट हा नदीवर धार्मिक विधीसाठी बांधलेला वास्तू कलेचा एक उत्तम प्रकार आहे. नदीला येणाऱ्या पूरापासून गांवाचे रक्षण व्हावे आणि तिर्थयात्रेसाठी आलेल्या यात्रेकरूंना तिर्थस्नान करता यावे यासाठी घाट बांधले जात होते. मराठेशाहीत रास्ते पेठ, नाईख नाना फडणीस विशेषतः अहिल्याबाई होळकर अशा अनेक सरदारांनी कर्तव्यबुद्धीने घाट बांधल्याचे उल्लेख आहेत. वाई, टोके, माहुली, पंढरपूर, आनंदवल्ली, नाशिक, माहेश्वर, कराड, बनारस, पंढरपूर, रामेश्वर येथे घाट बांधलेलेआहेत. नानासाहेब पेशवे व दुसरा बाजीराव या पेशव्यांनी घाट बांधण्यासाठी लोकांना प्रोत्साहन दिले. काही वेहा रयतेकडून पैसा उभारून घाट बांधल्याची उदाहरणे आहेत,उदा. कराडचा घाट, घाटाची बांधणी व आकार हे बांधणाऱ्याची आर्थिक स्थिती, नदीचा प्रवाह व तया तिर्थस्थाचे महत्त्व यावर अवलंबून असे. घाटावर व्हरांडे व धर्मशाळा बांधल्या जात. यात्रेकरू या धर्मशाळांमध्ये उतरून घाटावर धार्मिक कृत्ये करीत. अशा धर्मशाळा नाशिक, पंढरपूर येथे होत्या. तिर्थक्षेत्री विहीरी किंवा कुंड बांधून यात्रेकरूंची पाण्याची व्यवस्था करीत.

**९.२.२ मराठे कालीन चित्रकला**

मराठेकाळात चित्रकलेची फारशी प्रगती झाली नाही. असे सामान्यपणे मानले जात होते. परंतु इ.स. १९७० ते १९८० या कालावधीत मराठी चित्रकलेविषयी बरीच माहिती उपलब्ध झाली व मराठेकालीन स्वतंत्र चित्रशैली या काळात निर्माण झाली होती. याबाबत दमत राहिले नाही. याकाळात चित्रकार तर होतेच पण त्याचबरोबर चित्रकलेबाबत विशेष अभिरुची व समज असणारा रसिक वर्ग मराठेशाहीच्या उत्तर काळात तयार झालेला होता. फुरसतीच्या वेळी केवळ मनोरंजनासाठी चित्रांचा, तसबिरीचा संग्रह बाळगणे हे वैभवाचे प्रतिष्ठेचे तसेच उच्च अभिरुजीचे निदर्शक होते.

मराठेकालीन चित्रकलेसंदर्भातीलन सगळ्यात आधीच्या नोंदी शाहू महारजांच्या काळातील आढळतात. त्यापूर्वीचे चित्रकलेचेनमुने किंवा माहितीही उपलब्ध होत नाही. चित्रकलेचे नमुन्यापेक्षा कागदपत्रामधून माहिती पुष्कळ उपलब्ध होते. उदा. पूर्व पेशवाईत शिवराम नावाचा चित्रकार प्रसिद्धीत आला होता. बाजीराव पेशव्यांनी शनिवार वाड्याच्या भिंतीवर चित्रे काढून घेतली होती. त्या वाड्यांची व्यवस्था पहाणारे जिवाजी गणेश

खाजगीवाले यांनी एका पत्रात 'राघो, तानाजी, अनुपराव हे चित्रकार चांगले होते.' असे उल्लेख केलेला आहे. पहिल्या माधवरावाच्या पदरी माणकोजी हाचित्रकार पगारी नोकर रु. ३०/- दिडमासी पगारावर होता. इ.स. १७६५ मध्ये रघुनाथरावांनी नाना फडणीसास कळवून आपल्या आनंदवल्ली मुक्कामी माणकोजीस बोलविले होते. इ.स. १७६४ मध्ये माधवरावाने खाशा दिवाणखान्यात लावण्यासाठी रागमालेची ३६ चित्रे रु. १९५/-स खरेदी केल्याचा उल्लेख आढळतो. आपल्या पदरीच्या चित्रकारांप्रमाणे जयपूरहून चितारी आणल्याचे उल्लेख आढळतात. नाना फडणीसाने दिल्ली आग्रा येथून कारागीर मागविले होते.

पेशवेकाळात चित्रकलेचा चांगला विकसित झालेला प्रकार म्हणजे भित्तीचित्रे, वास्तुसुशोभनाचा तो एक प्रकार मराठेशाहीत होता. सणासुदींना घराच्या भिंती रंगवून त्यावर देवादिकांची चित्रे काढण्याचा प्रघात होता. पुणे, सातारा, वाई, नाशिक, चांदवड, निपाणी येथील वाड्मध्ये भित्तीचित्रे होती. तसेच पांडेश्वर, मोरगांव, खंडोबाची पाल, बेनवडी, पाषाण येथील मंदिरांच्या भिंतीवर छतांवर चित्रे होती. भित्ती चित्रांचे विषय प्रामुख्याने दशावतार, गणपतीख ऋद्धिसिद्धीची चित्रे हे होते. याशिवाय रामपंचायतन, शिवपार्वती, विष्णूलक्ष्मी इ. चित्रे असत. चित्रफलक मोठे असल्यास महाभारत, रामायणाती द्रौपदी स्वयंवर, गापिका वस्त्रहरण, गोपीकृष्णांची रंगपंचमी, रासनृत्य नवनारीकुंजर यासारखे प्रसंग चितारलेले असत. निपाणीच्या निपाणकारांचा वाडा, वाईचा पटवर्धनांचा वाडा, गोखले वाडा, चांदवड येथील होळकरांचा रंगमहाल येथे अशाप्रकारचे चित्र होते. शिकार किंवा घोडदळाचेही चित्रण काही ठिकाणी असे. तळेगाव दाभाडे, चांदवड अशा काही ठिकाणी व्यक्ती चित्रेही होती. विदर्भात जामोद येथे जैन मंदिरात जिनचरीत्राचे वेधक रेखाटन आहे. बाजार गावाच्या जैन मंदिरात देखील अशीच चित्रे आहेत. पण ती जामोद इतकी वैविध्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण नाहीत. बहुधा चित्रविषयक वरवर धार्मिक स्वरूपाचे असले तरी मूलतः ऐहिक व प्रापंचिक होते.

चित्रांमधील राजप्रसाद इमारती हे तत्कालीन मराठी प्रसादांचे हुबेहूब चित्रण आहे. स्त्री पुरुषांची शरीरयष्टी खास मराठी दर्शविलेली आहे. स्त्री पुरूषांचे पोशाख खास मराठील आहेत. उदा. रामकृष्णांना फक्त धोरत, पितांबर व उपरणे तर सीता रुक्मिणी यांना चापूनचोपून नऊवारी नेसवलेल्या दर्शविलेल्या आहेत. काही वेळा राजस्थानी वेशभूषाही दर्शविलेली दिसते. रास्थानातून चित्रकार बोलविण्याचे, तसबीरी आणल्याचे उल्लेख कागदपत्रांमधून मिळतात. त्यामुळे मराठेशाहीतील चित्रकला ही राजस्थानी चित्रकलेची छाया मानली जात होती. पण या समजूतीला छेद देणाऱ्या अनेक गोष्टी अलीकडे निदर्शनास आलेल्या आहेत.

मराठी शैलीतील चित्रकलेचा दुसरा प्रकार म्हणजे पत्रिका. या पत्रिकेत १०-१२ इंच रुंद व १२ फूट कागदी पट्ट्या एकमेकांना जोडून त्यावर जन्मकुंडली लिहीत मधून मधून ग्रहराशींची चित्रे तर अधूनमधून चक्रांच्या आकृती असत. उदा. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या संग्रही असलेली बलवंत बाजीराव पेशवे यांची कुंडली.

पटचित्र हा असाच एक मराठी चित्रकलेचा प्रकार. पटचित्रांचे २ प्रकार - संक्राती फल पट व पूजेसाठी रंगविलेले पट. या पटांवर गणपती, ऋद्धीसिद्धी, संक्रांत देवता, तिचे वाहन, संक्रांतीची उपदेवता व तिचे वाहन अशी चित्रे असत. या पटांवरील स्त्री आकृतीचे पोशाख

मराठी आहेत. पुजेकरीता असलेल्या पटचित्रांमध्ये पिठोरी व्रतकथा विविध कथानकांसह रंगविलेली आढळतात. पिठोरी पट हा मराठा शैलीचा अत्यंत महत्त्वाचा व आकर्षक नमुना आहे. या शिवाय मोठ्या प्रमाणात आढळणारा प्रकार म्हणजे सचित्र हस्तलिखिते. मुद्रणकला अस्तित्वात नसल्याने ग्रंथनिर्मिती हस्तलिखित स्वरूपात केली जाई. महानुभव, रामदास, नाथ संप्रदायाच्या मठांमधून ग्रंथसंग्रह केलेला असे. पेशवे, त्यांचे सरदार यांचे स्वतःचे संग्रह असत. भिक्षुक, वैद्य यांचेही आपापल्या विषयांचे संग्रह असत. या ग्रंथसंग्रहातील बरेच ग्रंथ हे चित्रांनी सजविलेली दिसतात. असे ग्रंथ आज विविध संग्रहालयामधून जतन केलेले आहे. या पोथ्या हाताने तयार केलेल्या कागदावर असत. पोथ्यांचे विषय बहुधा धार्मिक असत काही धार्मिकतेवर पोथ्याही आहेत. या पोथ्यांवरील चित्रांचे विषय बहुधा त्यातील मजकूरावर ठरत. धार्मिकतर विषयांत व्यक्तिचित्रणे, नायकनायिका, दरबार, लढाया, रागचित्रे असे आढळतात. यातील चित्ररचनाही वेगवेगळी आढळते. या व्यतिरिक्त पोथ्यांची पुष्ठीपत्रे किंवा पोथ्या बांधण्याच्या लाकडी फळ्यांवरही चित्रे काढत.

लघुचित्रे हा प्रकार ही मध्युयगात अतियश लोकप्रिय होता. हा प्रकार हस्तलिखितातल्या चित्रपरंपरेतीलच आहे. रसिक जाणकारांकडे अशा चित्रांचे संग्रह पोथ्याप्रमाणे बांधून ठेवलेले असत. यावर निरनिराळी काव्य लिहिलेली असत. या काव्यांमधील विषयाधारीत अशी ही चित्रमाला असे. आश्रयदात्याची आवड, वर्ण्यविषय यामुळे या चित्रांमध्ये बरेच वैविध्य निर्माण झाले होते. यातील सगळ्यात लोकप्रिय प्रकार म्हणजे रागमाला. संगीतातील विविध रागध्यान चित्राच्या माथ्यावर लिहिलेले असे व खाली चित्र असे. रागचित्र प्रकारातील खास मराठी घाटातील चित्रमालिकेचा नमुना नाशिकच्या सार्वजनिक वाचनालयात आहे. १३ व्या शतकात रेवा राजदरबारात सेवेत असलेल्या क्षेमकर्ण नावाच्या कवीने रागमाला काव्यरचना केली. यावर आधारित ही रागचित्र मालिका आहे. याचित्रांची पृष्ठभूमी बगीचे, वाड्यांचे भाग यांची आहे. हे वाडे १८ व्या शतकातील मराठी वाड्यांसारखे आहेत. स्त्री पुरूष आकृत्या वेषभूषा, दागिने मराठी पद्धतीचे दर्शविलेली आहेत.

दुसरा प्रकार म्हणजे कथा किंवा प्रसंगचित्रण, यात लैलामजनू, शिरी-फराद यासारखे अरबी फारसी कथांमधील प्रसंग, शिकार, खेड्यातल्या विहिरींवर पाणी पिणारा राजपुत्र असे चित्रविषय दिसतात. मराठी सरदारांचीआर्थिक स्थिती खालावल्यावर त्यांच्या चित्रसंग्रहांची वाताहात झाली. त्यातील काही संग्रह आज वस्तुसंग्रहालयांमधून जतन केलेले आहेत. ऐतिहासिक पुरुषांची चित्रे देखील उपलब्ध होतात. उदा. शिवाजीचे चित्रे, बाजीरावाचे चित्र, नानासाहेब पेशवा, रघुनाथराव अशी अनेकांची यित्रे उपलब्ध आहेत. सवाई माधवरावांच्या दरबारी असलेल्या जेम्स वेल्सने सवाई माधवराव, नाना फडणीस, महादजी शिंदे, परशुराम भाऊ, पटवर्धन यांची चित्रे काढली. तसेच सवाई माधवराव, नाना फडणीस महादजी शिंदे यांचे एकचित्र तयार केले, सवाई माधवरावांचे गणपती महालातील दरबारचे चित्र तयार केले. इंग्रज वकील मॅलेटच्या सल्ल्यावरून शनिवार वाड्यात चित्र शाळा तयार केली. तेथे प्रमुख जेम्स वेल्स होता. पुणे दरबारात जेम्स वेल्स व डॅनियल या चित्रकारांनी स्थानिक चित्राकारांना प्रशिक्षण दिले. जेम्स वेल्सच्या हाताखाली वेरुळच्या लेण्यांची चित्रे तयार करणारा गंगाराम तांबट हा चित्रकार तयार झाला होता.

आणखी एका वैशिष्ट्यपूर्ण प्रकार भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे येथील संग्रहालायात असलेली तालमाला, त्यात अतिशय प्रेक्षणीय अशी १२ चित्रे आहेत. त्यातील पद्ममालिका विशेष उल्लेखनीय आहे. चित्राच्या वरच्या भागात मृदंगाच्या बोलांवर आधारीत मजकूर व खालच्या अर्ध्या भागात तालध्यान असे या तालमालेचे स्वरूप आहे.

थोडक्यात चित्रकला मराठा कालखंडात उपजिविकेचा व्यवसाय या दृष्टीने भरभराटीस आलेली नसली तरी जे नमुने किंवा चित्राची माहिती उपलब्ध होते त्यावरून मराठा शैलीतील चित्रनिर्मिती या काळात झालेली दिसते. पहिला बाजीराव, नानासोब यांच्या काळातील चित्रांमधील सफाई नंतरच्या चित्रामध्ये दिसत नाही. त्याऐवजी जोरकस व तुटक फटकाऱ्यांचा वापर केलेला दिसतो. रंग पूर्वीपेक्षा भडक वापरण्याकडे कल वाढला होता असे दिसते.

### ९.२.३स्थापत्य – मराठाकालीन किल्ल्यांची ठळक वैशिष्ट्ये

मराठी राज्याची जशी शिवाजी राजांनी नवनिर्मिती केली तद्वतच मराठी स्थापत्य विशारदांनी आपल्या क्षेत्रात कागिरी केलेली आहे. पूर्वकालीन व समकालीन स्थापत्य शैली व परंपरांची उपयोग करत त्यांनी आवश्यकता लक्षात घेऊन स्थापत्य निर्माण केले. मराठी राज्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता गरजा पूर्ण करण्यातच शक्ती खर्ची पडत असल्यामुळे मुस्लिम राज्यकर्त्यांनी जशा भव्य वास्तू निर्माण केल्या तशा भव्य वास्तू मराठेशाहीत निर्माण झाल्या नाहीत. मात्र राज्य रक्षणासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडणाऱ्या किल्ल्यांवर मात्र मराठेशाहीत प्रचंड खर्च करण्यात येत होता. किल्ल्यांचे स्थापत्य मराठे काळात चांगले विकसित झालेले दिसून येते.

**किल्ल्यांचे प्रकार**

शत्रु पासून संरक्षणाकरीता व आसपासच्या प्रदेशावर नियंत्रण ठेवण्याकरीता किल्ल्यांचा उपयोग प्राचीन काळापासून होत होता. किल्ल्यांचे विविध ८ प्रकार जुन्या ग्रंथामधून दिलेले आहेत. मात्र प्रत्यक्षात ४ प्रकारचे किल्ले आढळतात. १) गिरीदुर्ग, २) भूईकोट किल्ला, ३ वनदुर्ग, ४) जलदुर्ग – या ४ प्रकारांपैकी वनदुर्ग हा वैशिष्ट्यपूर्ण प्रकार मानला पाहिजे. वनदुर्ग म्हणजे, अरण्यात बांधलेला किल्ला नसून घनदाट अरण्य हाच दुर्गम किल्ला. असा अर्थ आहे. उदा. १६६१ साली शिवाजी महाराजांच्या सैन्याने मोगल अधिकारी कारतलबखानाच्या सैन्याला उंबरखिंडीच्या घनदाट अरण्यात गाठून पराभूत केले होते. गनिमी काव्याच्या लढाया करतांना शिवाजी महारजांना दाट झाडी असलेल्या प्रदेशाचा अनेकदा उपयोग झालेला दिसून येतो.

भूईकोट किल्ला हा सपाटीच्या प्रदेशात खंदक, तटबंदी घालून सुरक्षितता निर्माण केलेली जागा, अनंक नगरांना तटबंदी, खंदकांनी मध्ययुगात सुरक्षित केलेले होत हेच भूईकोट किल्ले. शिवकाळात भूईकोट किल्ल्यांना फारसे महत्त्व नव्हते. शिवकाळात जलदुर्ग विशेष महत्त्वपूर्ण मानले गले. जलदुर्ग किंवाजंजिरा म्हणजे समुद्रातील खडकावर बांधलेला किल्ला होय. शिवाजी राजांनी स्वतंत्र आरमार विकसित केले. त्यादृष्टीने जलदुर्ग महत्त्वाचे होते. मराठ्यांची मदार सर्वात जास्त होती ती गिरीदुर्गावर, दुर्गम चढाच्या व पाण्याची सोय असलेल्या व रुंद पठार असलेल्या डोंगरी किल्ल्याला गिरीदुर्ग म्हणतात. शिवकाळात डोंगरी किल्ल्यांचा वापर जास्त झाला होते. याशिवाय गढी हा किल्ल्याचाच छोटा प्रकार.

जहागिरदारांनी आपल्या संरक्षणासाठी गढ्या गिरीदुर्गासंदर्भात स्वतंत्र शास्त्रच विकसित झालेउभारलेल्या होत्या. त्या प्रामुख्याने सपाट प्रदेशात असत.

**शिवकालीन किल्ले**

शिवाजी महारजांनी किल्ले जिंकूनच स्वराज्याची स्थापना व विस्तार केला. संरक्षणासाठी किल्ले बांधण्याची कला भारतात प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. मध्ययुगात भारतावर वर्चस्व प्रस्थापित केलेल्या मुस्लिम सत्तांनाही किल्ल्यांचे महत्त्व माहित होते. त्यांनीही किल्ल्यांचा वापर परिणामकारकरित्या केलेला दिसतो. परंतु किल्ल्यांचा विशेषतः डोगरी किल्ल्यांचा राज्याच्या सुरक्षिततेसाठी पुरेपुर उपयोग मराठ्यानी केला. संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग या एका वाक्यात किल्ल्यांचे महत्त्व रामचंद्रपंत अमात्यांनी आज्ञापत्रामध्ये स्पष्ट केले आहे.

मध्ययुयगात दख्खन या नावाने ओळखल्या जाणाऱ्या प्रदेशात मराठी राज्य पसरले होते. दख्खन प्रदेशाचे उत्तरदक्षिण पसरलेल्या सह्याद्री पर्वताने घाटमाथा, देश, कोकण असे स्वाभाविक भाग तयार झाले आहेत. सह्याद्री, सातमाळा, अजिंठा, बालाघाट व महादेव पर्वत श्रेण्यांनी ह्या प्रदेशातील सपाटीचा प्रदेशाला नैसर्गिक संरक्षण मिळाले होते. तर डोंगरांमध्ये माथ्यावर विस्तृत प्रदेश असलेल्या टेकड्या गिरीदुर्गासाठी उपलब्ध झाल्या होत्या. म्हणजे गिरीदुर्ग स्थापत्यास नैसर्गिक विपुल स्थळांची या भागातील उपलब्धी हे दुर्गस्थापत्याचे आवश्यक वैशिष्ट्य मानावे लागेल. एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की शिवाजीचा उदय होण्यापूर्वीच दख्खन भागात किल्ल्यांचे जाळे पसरलेल होते. राजगड, तोरणा, विशाळगड, मनोहरगड, भूधरगड, लिंगाणा, रायगड अशा कितीतरी किल्ल्यांची दुरूस्ती किंवा पुन्हा उभारणी शिवाजी महाराजांनी केली होती तर अगदी नव्याने उीरलेल्या किल्ल्यांमध्ये प्रतापगड, मच्छिंद्रगड वर्धनगड, यशवंतगड, पालगड, महिपतगड, मानगड यांचा उल्लेख करता येईल. शिवाजी राजांनी नव्याने उभारलेल्या आरमाराला बळकटी करता येईल. शिवाजी राजांनी नव्याने उभारलेल्या आरमाराला बळकटी आणण्यासाठी सिंदधुदुर्ग, पद्मदुर्ग यासारखे जलदुर्ग बांधले. किल्ल्यांची डागडुजी करतांना किंवा एखादा किल्ला नव्याने उभारतांना काही ठिकाणी महाराजांनी आगळ्या स्थापत्य विशेषांचा उपयोग केलेला आढळून येतो. गिरीदुर्गाच्या बाबतीत तर त्यांचे स्वतंत्र शास्त्रच निर्माण झाले होते. आज्ञापत्रातील गट कोट किल्ले या प्रकरणावरून शिवशाहीतील दुर्गशास्त्राची ओळख होते. तसेच रघुनाथपंत हणमंते यांच्या राज्यव्यवहाराकोशातील दुर्गवर्ग या प्रकरणातही दुर्गस्थापत्याबाबतही बरीच माहिती उपलब्ध होते.

किल्ल्यांचे महत्त्व लक्षात घेऊन शिवाजी महाराजांनी किल्ल्यांच्या मजबूतीसाठी बराच खर्च केला. किल्ले दुरूस्तीसाठी शिवाजी महाराज बरीच रक्कम राखून ठेवत. इ.स. १६७१-७२ च्या एका जाबत्यातील उल्लेखानुसार किल्ल्यांवरील घरे बांधण्यासाठी १ लक्ष ७५ हजार होनांची तरतूद केली होती. त्यापैकी एकट्या रायगडासाइी ५० हजार होन राखून ठेवले होते.

**किल्ल्यांचे वास्तुशास्त्र**

शिवाजी महाराज किल्ल्यासाठी जागा काळजीपूर्वक निवडत, किल्याची जागा अवघड असली पाहिजे याबाबत ते सावधअसत. त्यांनी बांधलेल्याकिल्ल्यांना एकापेक्षा

अधिकप्रवेदशद्वारे असते, त्याशिवाय चोरदिंड्या असत. दरवाजाचे बुरूज अधिकपुढे करून गडावर येणाऱ्या मार्गांचे नियंत्रण करण्याची तरतूद शिवकाहातील भरपूर गिरिदुर्गांवर आढळते. उदा. पुरंदर, तोरणा, प्रतापगड इ. डोंगरी किल्ल्याला नैसर्गिक तट असत. उदा. जीवधन, गाहणा, वाससोटा इ. पण पन्हाळा. घोसाळगड, सातारा इ. किल्ल्यांना संरक्षणाच्या दृष्टीने मुद्दाम डोंगराचेकडे तपासून तट तयार केलेले दिसतात. किल्ल्यांची तटबंदीच्या भिंतीवर पडकोट, अर्धदल, फालिका, जंग्या यांची योजना केलेली असे. पडकोट म्हणजे बाहेरील शत्रूवर मारा करण्यासाठी बांधलेली कठडेवजा भिंत. अर्धदल म्हणजे तटबंदीवरील शिबंदीला आडोशासाठी जागा. मारा करण्यासाठी एकाआड एक अशी फालिका तर बंदुकीचा मारा करण्यासाठील असलेली छिद्र म्हणजे जंग्या. याशिवाय जागोजागी बुरूज असत. या बुरूजांवर शत्रूवर मारा करण्यासाठल तोफा ठेवलेल्या असत.

शिवकाळात किल्ल्यांच्या स्थापत्याबाबत उपयोगात आणलेले आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे चिलखत. चिलखत म्हणजे अग्रभागी असलेल्या तटाला किंवा बुरुजाला पाठीमागे काही विशिष्ट अंतर ठेऊन बांधलेलातट. उदा. प्रतापगडाला एका बुरुजाच्या मागे दुसरा बुरुज बांधून चिलखत निर्माण केलेले होते. अशीच चिलखती योजना राजगडावरही आहे. रागयडाच्या सुवेळा माचीच्या बाहेरील तटाला आतील बाजूने भुयारी नाळ खोदून पडकोटाच्या खालील भागातून मारा करण्याची खास सोय करण्यात आली होती. चिलखती योजना ही माराजांनी किल्ले स्थापत्यात घातलेली महत्त्वाची भर होती.

मेटे, माची, बालेकिल्ला हे या गिरीदुर्ग स्थापत्याची वैशिष्ट्ये मानली जातात. मेटे म्हणजे गडावर येजा करण्याच्या मार्गावर पहारा देण्याचे ठिकाण. गडावर चढण्याच्या मार्गामध्ये येणाऱ्या सपाटीच्या जागेवर अशा प्रकारचे अनेक मेटे उभारले जात. जवळच्या वास्तूच्या नावावरून मेटे ओळखले जात. उदा. कोठी दरवाजा मेटा, भांडी दरवाजा मेटा इ. तोरणा किल्ल्यास ७ मेटे असल्याचा उल्लेख आढळतो. माची म्हणजे उंच भाग किंवा ओटा, गडाच्या चढणीमध्येच एखादे लांबरुंद विस्तीर्ण मैदान माची म्हणून ओळखली जाई. राज्यव्यवहार कोशात माचीला उल्लेख उपत्यका असा केलेला आहे. गडाचा सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या भागाला तटबंदी उभारून सुरक्षित केलेले असे. माचीचे रस्ते दुर्गम केलेले असत. राजगड, तोरणा, पुरंधर मलंगगड, लोहगड अशा अनेक किल्ल्यांना माच्या आहेत. या माचींवर काही महत्त्वाच्या इमारती उभारलेल्या आहेत. राजगडाला सुवेळा, संजिवनी, पद्मावती अशा ३ माची आहेत. राजगडावर राजधानी असतांना या महत्त्वाच्या माचींवर महत्त्वाच्या इमारती होत्या. तोरण्यावरील बुधला माची किल्ल्यांच्या बालेकिल्ल्यापेक्षाही कितीतरी पटीने विस्तृत असल्यानेच तोरणा गडाला प्रचंडगड या नावानेही ओळखला जातो.

बालेकिल्ला म्हणजे मुख्य किल्ल्याच्या आत व उंच जागी बांधलेले तट वेष्ठित ठिकाण, राजा किंवा किल्ल्याचा मुख्य अधिकारी येथे रहात असत. राज्यव्यवहार कोशमध्ये बाले किल्ल्यांला अधित्यका म्हटलेले आहे. राजगड, अर्नाळा, पुरंधर, तोरणा, प्रतापगड, हरिश्चंद्रगड, रसाळगड, यशवंतगड इ. गिरीदुर्गांवर बालेकिल्ला होता. रायगडावरील बालेकिल्ल्यात शिवाजी राजांची सदर, निवासस्थान, राण्यांचे, राजपूत्रांचे महाल होते.

प्रत्येक किल्ल्यावर इमारती कशा असाव्यात याबाबतचा उल्लेख आज्ञापत्रामध्ये आलेला आहे. तट, बुरुंज, पडकोट, चिलखते, पहारे चांगले मजबूत असावे. गडावर झाडी असावी, राजमंदिराशिवाय मोठी इमारत बांधून नये. धान्यकोठारे उंदीर, किडामुंगी, वाळवी पासून सुरक्षित असावे. गडावर धान्यासाठी भरपूर असला पाहिजे असे शिवाजी महाराजांचे धोरण होते. दारुगोळयाची कोठारे वस्तीपासून दूर अंतरावर सुरक्षित असावे, विशेष महत्त्वाचा उल्लेख म्हणजे. पाण्याची व्यवस्था, पाण्याची उपलब्धी पाहून किल्ला बांधण्याबाबत महाराज अत्यंत सतर्क होते. भरतगडाच्या टेकडीची किल्ला बांधण्याच्या दृष्टीने इ.स. १६७० मध्ये त्यांनी पहाणी केली होती. पाण्याच्या दुर्भिक्ष्यामुळे तेव्हा किल्ला बांधण्याचे टाळले होते. इ.स. १६८० मध्ये फोंड सांवताला या टेकडीवर पाण्याचा झरा सापडल्यावर किल्ल्याची उभारणी केली गेली.

शिवाजी महाराज स्वतः असामान्य स्थापत्याविशारद होते. जिंजीचा किल्ला घेतल्यानंतर किल्ल्यांची नवी बांधणी करण्याकरीता त्यांनी स्थापत्य विशादरांची मागणी इंग्रज, फ्रेंचाकडे केली. त्यांनील ते दिले नाही. तेव्हा स्वतःच आखणी व देखरेख करून छत्रपतींनी किल्ला इतका उत्तम बांधला ही तसा पाश्चात्य स्थापत्य विशारदांनाही बांधता आला नसता, असा उल्लेख फ्रेंच कागदपत्रांमध्ये आहे. किल्ल्यांच्या स्थापत्याचे महाराजांना चांगले ज्ञान होते. किल्ले उभारणीकरता परंपरागत कलाकारांबरोबर पाश्चात्य तंत्रज्ञानांची मदतही त्यांनी घेतली होती. इ.स. १६७७ मध्ये कर्नाटक मोहिमेवर असतांना मद्रास येथील ब्रिटिश गव्हर्नरला पत्र पाठवून आपल्याकडे कर्नाटकात जिंकलेल्या किल्ल्यांच्या दुरूस्तीसाठी तोफा नेण्याचे गाडे तयार करण्याचे काम करणारे, सुरुंगे यांची आवश्यकता असल्याचे सांगून ही कामे करू शकणारे लोक आपल्याकडे पाठविण्याबाबत सुचविलेले दिसते. गडावरील प्रचंड खर्चाबाबत तक्रार करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना शिवाजी राजे मार्मिक शब्दात सांगतात, ‘‘दिल्लीद्रासारखा शत्रू उरावर आहे. तो आला तरी नवे जुने ३६० किल्ले हजेरीस आहेत. एक एक किल्ला वर्ष वर्ष लढला तरी ३६० वर्षे पाहिजेत.’’ यावरून महाराजांना किल्ल्यांचे महत्त्व किती वाटत होते हे लक्षात येते.

**किल्ल्यांचा साखळया**

शिवाजी महारजांनी संरक्षणाच्या दृष्टीने किल्ल्यांच्या ३ साखळ्या तयार केल्या होत्या. एका किल्ल्यावरून दुसऱ्या किल्ल्यावर संदेश पाठविण्यासाठी संपर्क साधण्यासाठी किल्ल्यांच्या साखळ्या उपयुक्त होत्या. मराठेशाहीचे यश एका किल्ल्यात नसून या साखळ्यांमध्ये होते.

**पहिल साखळी**

वायव्येलाअशेरी गडापासून दक्षिणेस विशाळगडापर्यंत पूर्वेकडे सिंहगड आणि पुरंदर वज्रगड, दक्षिणेस रायगड, तोरणा, पश्चिमस तळे व घोसाहे आणि उत्तरेस सुधागड हे महत्त्वाचे किल्ले या साखळीत समाविष्ठ होते. या साखळी कक्षेत स्वराज्यचा गाभा असलेला प्रदेश येत होता. त्यामुळे यातील प्रत्येक किल्ल्यांच्या सुरक्षिततेबाबत महाराज दक्ष असत. जयसिंगाबरोबर झालेल्या पुरंदरच्या तहानंतर जे १२ किल्ले महारजांनी आपल्याकडे ठेवले होते, त्यात या पहिल्या साखळीतील ७ किल्ले होते. त्यांच्या सहाय्यानेच महाराजांनी

गमावलेले किल्ले नंतर परत मिळविले होते. या साखळीच्या बळकटीकरीता साल्हेर ते माहुली व रोडि ते रांगणाअशा चिलखती साखळ्या त्यांनी निर्माण केल्या होत्या.

**दुसरी साखळी**

ही साखळी जलदुर्गाची होती. ती तयार करण्यासाठी सिंधुदुर्ग, पद्मदुर्ग, सारखे काही जलदुर्ग नव्याने बांधले तर विजयदुर्ग, सुवर्णदुर्गसारख्या काहींची दुरूस्ती केली. या साखळीच्या निर्मिती २ उद्देश होते. १) समुद्रातले शत्रू असलेले सिद्दी, पोर्तुगीज यांच्या करावायांना आळा घालणे. २) स्वराज्यात भूभागात नाकेबंदी केल्यास समुद्रमार्गे निसटण्याची सोय ठेवणे

या साखळीचा उपयोग स्वराज्याला राजाराम महारजांच्या काळात मोठ्या प्रमणात झाला होता.

तिसरी साखळी

ही साखळी विशालगड ते जिंजी दरम्यानच्या महत्त्वाच्या किल्ल्यांची कर्नाटक मोहिमेत तयार केली होती. मुघल आक्रमणाचा धोका लक्षात घेऊन या साखळीच्या सहाय्याने स्वराज्याला सुरक्षितता निर्माण केली. या साखळीमुळेच राजारामाला रायगडाहून जिंजीस सुरक्षितपणे निघून जाणे शक्य झाले होते.

राजाराम महाराजांच्या कारकिर्दीत पहिल्या व तिसऱ्या साखळीच्या सहाय्याने मोगल्यांच्या प्रचंड सेनेला त्रस्त करण्यात मराठे यशस्वी ठरले. या दोन्ही साखळ्या शत्रूने घेरण्याचा प्रयत्न केला तेव्हा दुसऱ्या साखळीच्या मदतीने रसद पोहचविणे शक्य झाले. मराठ्यांच्या यशाचे रहस्य या किल्ल्यांच्या साखळ्यांत आहे. म्हणूनच मोगल मराठ्यांची राजधानी रायगड जिंकून देखील मराठी राज्य काबीज करू शकले नव्हते.

किल्ल्यांची चोख व्यवस्था

शिवाजी राजांनी केलेले किल्ल्यांचे व्यवस्थापवन वैशिष्ट्यपूर्ण होते. त्या काळात होणाऱ्या फंदफितुरीचा, पुंडाईचा धोका लक्षात घेऊन महारजांनी किल्ल्याची जबाबदारी कोणत्याही एका अधिकाऱ्याकडे सोपविली नव्हती. समान दर्जाचे ३ अधिकारी असत. हवालदार, सबनीस,ख कारखानीस, हवालदार या मुद्राधारी अधिकाऱ्यांकडे किल्ल्यांच्या रक्षणाची जबाबदारी असे. किल्ल्यावरील शिबंदी याचया नियंत्रणात असे. किल्ल्यांच्या महत्त्वानुसार शिबंदी कमीजास्त असे. तो बहुधा मराठा जातीचा असे. गडाला माची असल्यास माचीसाठी स्वतंत्र सरनोबत, तटांसाठी तट सरनोबत हे अधिकारी हवालदाराच्या आदेशाप्रमाणे काम पहात. महत्त्वाच्या किल्ल्यांवर अधिक हवालदार नेमून प्रमुख हवालदारास सरहवालदार म्हणत. सबनीस हा अधिकारी हिशेब ठेवण्याचे काम पाही. तो ब्राह्मण जातीचा असे. तर प्रभु जातीचा असलेला कारखानीस धान्यपुरवठा, दारुगोळ, डागडुजी, शस्त्रास्त्र साठा याबाबतची जबाबदारी सांभाळत असे. रोख पैसा सबनीसाकडे असला तरी त्यावर सील दवालदाराचे असे. सैन्य हवालदाराच्या ताब्यात असले तरी हजेरीपत्रक सबनीसांकडे असे व कारखानीस त्याची तपासणी करीत असे. गडाच्या रखवालीचे काम रामोशीसारख्या निर्भिड जमातीकडे असे. कोणत्याही अधिकाऱ्याची जागा वंशपरंपरागत न होण्याबाबत ते दक्ष होते. अधिकाऱ्यांच्या ठराविक काळानंतर बदल होत होत्या.

किल्ल्यांच्या अशा व्यवस्थापनावरून लक्षात येत की १) वतनदाराच्या ताब्यात किल्ले न देता महारजांनी स्वतःच्या नियंत्रणात ठेवले. २) निरनिराळ्या जातीच्या अधिकाऱ्यांची

नेमणूक करून, त्यांची कौशल्ये स्वराज्याकामी उपयोगात आणली व त्यांच्यावर किल्ल्यांची संयुक्त जबाबदारी नेमून गैरवर्तनावर आळा घालता.३) किल्ल्यावरील अधिकाऱ्यांच्या वेळोवेळी बदल्या होत. अकार्यक्षम व्यक्तीची हकालपट्टी होत असे. ४) किल्ल्याच्या, सुरक्षिततेसाठी किल्ल्यांच्या पायथ्याशी चौक्या बनविल्या. त्यावर भिल्ल, रामोशी, महार, मांग, कोळी या कर्तव्यदक्ष लोकांच्या नेमणुका करून पहाऱ्याची व्यवस्था केली. ५) किल्यावरील अधिकाऱ्यांना किल्ल्यावर सहकुटुंब रहाण्याची सक्ती असे. त्यामुळे किल्ल्याच्या सुरक्षिततेसाठी ते दक्ष रहात. ६) किल्ल्यावर रसद, दारुगोळा, शस्त्रास्त्र, पाणी, औषधे यांचा मुबलक साठा असे. त्यामुळे शत्रूचा वेढा पडल्यास किल्ला दीर्घकाळ लढवता येत असे. ७) शिवाजी महाराज स्वतः किंवा मंत्री सतत अचानक किल्ल्यांना भेट देत. किल्ल्याचा तपासणीची जबाबदारी त्यांनी अण्णाजी दत्तोवर सोपविलेली होती.

शिवाजी राजांच्या मृत्यूमयी मराठी राज्यात सुमारे ३०० किल्ले होते. राजाच्या कडक नियंत्रणात किल्ल्यांचे प्रशासन सुरळीत चालले. संभाजी राजांच्या कारकिर्दीत किल्ल्यांच्या व्यवस्थेत बदल झाला नाही पण प्रत्यक्ष औरंगजेबाच्या प्रचंड सैन्यासह चढाईने संभाजी सततच्या युद्धात गुंतला. किल्ल्यांच्या व्यवस्थेत ढिलाई निर्माण झाली. राजारामाच्या करकिर्दीत परिस्थिती आणखी पालटली. राजा जिंजीस गेला. स्वराज्य रक्षणार्थ मराठे सरदार लढत राहिले. शिवकाळापासून बंद झालेली वतनदारी प्रथा परिस्थितीच्या रेट्याने राजारामाच्या काळात पुन्हा सुरू झाली. प्रमुख सरदार किल्ल्यांचे मालक बनले. प्रत्येक सरदाराकडे आपल्या कुटुंबाच्या वास्तव्याकरीता एकतरी किल्ला असावा अशी दुष्ट प्रथा पडली. ताराबाईच्या काळात ती अधिकच दृढ झाली होती. इ. स. १७१० पर्यंत परशुरामपंत प्रतिनिधींच्या ताब्यात ३५ किल्ले होते.

पेशवेकालीन किल्ले व व्यवस्थापन

पेशवेकाहात दृढ होत गेलेल्या वतनदारी पद्धतीने किल्ले राजाच्या प्रभुत्वात न रहाता वतनदारांच्या ताब्यात गेले. तसेच राज्य विस्तार झाल्याने गिरिदृर्गांचे महत्त्व कमी होत गेले. तरी पेशवेकाळातही किल्ले बांधल्याचे किंवा दुरूस्तीचे तुरळक उल्लेख येतात. उदा. बाळाजी विश्वानाथाने लोहगडजवळ विसापूर किल्ला बांधला. पहिल्या बाजीरावाने अर्नाळा किल्ला जिंकून दुरूस्ती केली. पहिल्या माधवरावाने बहादूरगडाच्या किल्ला बांधला. नाना फडणीसाने लोहगडाची दुरूस्ती केली.

पेशव्यांनी माळवा, बुंदेलखंड या उत्तरेकडील प्रदेशात साम्राज्याविस्तार केल्यावर स्वतंत्र किल्ले बांधले. शिंदे, होळकर, पवार इ. प्रमुख सरदार देखील उत्तरेत किल्ल्यांच्या आश्रयाने स्वतंत्रपणे वावरत होते. पेशवेकाळात किल्ल्यांचे व्यवस्थापन शिवकालाप्रमाणेच राहिले होते. मात्र किल्ल्यांवरील नोकऱ्या वंशपरंपरागत बनल्या. रोख पगाराऐवजी किल्ल्याच्या परीसरातील प्रदेश वंशपरंपरागत वतन म्हणून देण्यात आला. अधिकाऱ्यांची कार्यक्षमता देखील पेशवेकाळात बरीच कमी झालेली दिसते. शिवकाळात किल्ल्यांना संरक्षणात्मक महत्त्व होते. पण पेशवेकाळात मराठे आक्रमक युद्धात गुंतल्यामुळे हे संरक्षणात्मक महत्त्व कमी झाले. पाश्चात्यांचा राजकारणात सहभाग वाढला. त्यांच्या प्रभावी शस्त्रास्त्रामुळे देखील किल्ल्यांचे महत्त्व कमी होत गेले असे दृष्टीस येते.

## ९.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**प्र.१. एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. शिवकाळात उभारलेल्या लेण्य, मंदिरांची वैशिष्ठ्ये सांगा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

२. इ.स. १७२० ते १७६१ या कालखंडातील शिल्पकलेची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

३. पानिपतानंतरच्या शिल्पकलेची वैशिष्ट्ये विशद करा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

४. मराठेकालीन चित्रकले बद्दल माहिती सांगा.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

५. मराठे कालीन चित्रकलेत कोणकोणते चित्र प्रकार आढळतात?

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

६. लघुचित्राबाबात माहिती द्या.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

७. वनदुर्ग बद्दल माहिती द्या.

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

८. चिलखत म्हणजे काय?

.................................................................................

.................................................................................

.................................................................................

९. पडकोट कशास म्हणतात?

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

१०. किल्ल्यावर कोणकोणते अधिकारी असत? त्यांच्या जबाबदाऱ्या स्पष्ट करा.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

**प्र.२. टीपा लिहा.**

१. शिवकालीन शिल्प.

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

२. मराठेकालीन देवतांच्या प्रतिमा

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

३. छत्रीः वैशिष्ट्यपूर्ण स्थापत्य शिल्प प्रकार

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

४. मराठेकालीन भित्ती चित्रे

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

५. लघुचित्रे

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

६. शिवकालीन किल्ल्यांचे महत्त्व

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

७. शिवकालीन किल्ले स्थापत्य

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

८. पेशवेकालीन किल्ले

..........................................................................................

..........................................................................................

..........................................................................................

## ९.४ सारांश

थोडक्यात मुघल राज्यकर्त्यांनी उभारलेल्या मोठमोठ्या वास्तू प्रमाणे मराठाकालखंडात मंदिरे, वास्तू उभ्या राहिल्या नाहीत. मराठ्यांची सारी ताकद शत्रूशी लढण्यात व आपापसातील हेव्या दाव्यांमध्ये खर्ची पडली. कलेचा विकास हा राजकीय स्थैर्य, आर्थिक सुबत्तेचे निदर्शक आहे. मात्र लष्करी स्थापत्यातील किल्ले स्थापत्याच्या बाबतीत शिवकाळात विकास झाला होता. किल्ले उभारतांना आपल्या आवश्यकताध्यान्यात घेऊन शिवाजी महाराजांनी किल्ले उभारणी केली. किल्ल्यांच्या साखळ्यांचा अभ्यास करतांना त्यांचे व्यवस्थापन कौशल्य लक्षात येते.

मराठेशाहीच्या उत्तरार्धात चित्रकलेचे पुनरुज्जीवन झालेले दिसते. खास मराठी चित्र शैलीही निर्माण झाली. चित्रांची जाण असणारा रसिक वर्ग मराइेशाहीच्या उत्तरार्धात तयार झाला होता. ही चित्रे बहुधा धार्मिक परंपरेतील व पारंपारिक पद्धतीची होती.

## ९.५ पारिभाषिक शब्द

रसद – दारुगोळा, धान्य वगैरे युद्धोपयोगी सामुग्री

शिबंदी – सामान्यतः रक्षणासाठी किंवा बंदोबस्तासाठी ठेवलेली शिपयांची तुकडी

बुरुज – कोटाच्या तटबंदीत मजबुतीसाठी, बचावासाठी व माऱ्यासाठी जागोजाग केली वर्तुळाकार बंदिस्त

चोरदिंडी – चोर दरवाजा

## ९.६ संदर्भ सूची

१. Mate S. M. - Maratha Architectur.

२. गायकवाड आर.डी., सरदेसाई बी. एन., थोरात डी.डी., हनमाने व्ही. एन., (१९८७) मराठेकालीन संस्था व विचार, फडके प्रकाशन, द्वित्तीयावृत्ती.

३. कुलकर्णी अ. रा., खरे ग. ह. (१९८५) मराठ्यांचा इतिहास खंड १ ला (पुणे), कॉन्टिनेन्टल प्रकाशन प्रथमावृत्ती.

४. संपा. पवार जयसिंगराव, (२०११) छत्रपती शिवाजी महाराज स्मृतीग्रंथ, मुंबई महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ , प्रथमावृत्ती.

५. भावे वा.क (१९९८) शिवकालीन महाराष्ट्र (पुणे) वदरा प्रकाशन, दुसरी आवृत्ती.

३. भावे वा.क (१९९८) पेशवेकालीन महाराष्ट्र (पुणे) वदरा प्रकाशन, दुसरी आवृत्ती.

## ९.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रिय कार्य / प्रात्याक्षिक कार्य

१. ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयातील मराठाकालीन चित्रांचा अभ्यास करा.

२. आपल्या परिसरातील मराठा कालखंडातील वास्तू किंवा किल्ल्यांला भेट देऊन तेथील स्थापत्य विशेश अभ्यासा.

३. शिवकालीन किल्ल्यांवर प्रकल्प तयार करा.

# घटक १०

# मराठा साम्राज्यावर इस्लामचा प्रभाव

**अनुक्रमणिका**


१०.० उद्दिष्टे

१०.१ प्रस्तावना

१०.२ विषय विवेचन

१०.२.१ भाषा

१०.२.२ समाजिक व सांस्कृतिक परिणाम

१०.२.३ मराठी घरण्याचे महत्त्व

१०.३ स्वयंअध्ययन प्रश्न

१०.४ सारांश

१०.५ परिभाषिक शब्द

१०.६ संदर्भ सूची


## १०.०. उद्दिष्टे :-

विद्यार्थी मित्रांनो हा घटक अभ्यासल्यवर आपणांस काय समजेल –

१. महाराष्ट्रात इस्लामचे आगमन कसे झाले हे समजले.

२. मध्ययुगीन समाज व संस्कृतीवर इस्लामी संस्कृती व आक्रमणाचा कोणता परिणाम झाला हे समजले.

३. मध्ययुगीन महाराष्ट्रात एतद्देशिय व इस्लामी संस्कृतीचा सांस्कृतिक संयोग कसा घडून आला हे समजले.

४. फार्सी भाषेचा मराठी भाषेवर कोणता परिणाम झाला हे अभ्यासता येईल.

५. इस्लामी वास्तूकला, इतिहासलेखन, जीवनमान पद्धती, शिक्षणपद्धती या घटकांचा महाराष्ट्राच्या संस्कृतीवर परिणाम कसा झाला हे समजले.

६. इस्लामी शाह्यांच्या राजवटीमध्ये कोणकोणती मराठी घराणी उदयास आली हे समजले.

७. मराठी सरदारांचे मुस्लिम शाह्यांमध्ये महत्त्व का व कसे वाढले हे लक्षात येईल.

## १०.१. प्रस्तावना

महाराष्ट्रात यादव राजवटीत उत्तरेतील खिल्जी घराण्यातील सुलतान उल्लाउद्दिन खिल्जी व त्याचा सेनापती मलिक काफूर या दोघांनी दक्षिणेवर स्वारी करून यादव राजवटीचा शेवट केला. त्याचबरोबर दक्षिणेत इस्लामची राजवट सुरू झाली. मुहम्मद तुघलकाच्या राजवटीत त्याने राजधानी बदलाचा प्रयोग केला. उत्तरेतून भारताची राजधानी दक्षिणेत दौलताबाद येथे आणली. त्याचदरम्यान धर्मप्रसार व प्रचारार्थ मुस्लिम संत दक्षिणेत आले होते. त्याचप्रमाणे जे मुस्लिम महाराष्ट्रात आले ते या ठिकाणीच स्थायिक झाले. बहमनी साम्राज्याची स्थापना होऊन १३४७ पासूनमहाराष्ट्रात इस्लामी राजवटींचे नवे पर्वच सुरू केले. बहमनींचे विघटन होऊन पाच शाह्या निर्माण झाल्या. बहमनीच्या शाह्यांमध्ये एतद्देशिय मुस्लिम व त्याचवेळी बाहेरून आलेले मुस्लिम यांच्यामध्ये वारंवार भांडणे झालेली दिसतात. त्याचाच परिणाम म्हणजे मुहम्मद गवानचा झालेला खून होय. इस्लामी संस्कृतली, परंपरा, स्थापत्य, साहित्य यांचा प्रभाव महाराष्ट्रीय समाज मनावर पडलेला दिसतो. उदा. मुस्लिम उर्दू व फार्सी भाषेचा प्रभाव वाढू लागला. स्थापत्य कलेमध्ये इस्लामी कारागीरांनी इराणी कलेचा भारतीय कलेशी संयोग घडवून आणला. 'इंडो-इराणी' कला उदयास आली. मध्ययुगीन महाराष्ट्रात हिंदू, मुसलमान आणि ख्रिश्चन धर्माच्या अनुयायांमुळे एक संमिश्र समाज निर्माण झाला. सतराव्या शतकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. तरी, इस्लामी परंपरेचा पगडा असलेला दिसतो. इस्लामी शाह्यांच्या पदरी नोकरी करणारा एतद्देशिय स्थानिक मराठी सरदारांचे प्राबल्य वाढू लागले. महाराष्ट्रात भिन्न धर्माचे, भिन्न भाषा बोलणारे, चालिरीती जोपसणारा समाजतयार झाला. भिन्नत्वामधून एकत्वाकडे जाण्याचा स्वराज्याच्या माध्यमातून प्रयत्न झाला. भाषा, साहित्य, सामाजिक संबंध या घटकांच्या सहाय्याने आपण या प्रकरणामध्ये इस्लामचा प्रभाव मराठी राज्यावर कसा पडला याची माहिती घेणार आहोत.

## १०.२ विषय विवेचन

### १०.२.१ इस्लामचा भाषेवरील परिणाम

मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये विविध शाह्यांनी आपलेराज्य केले. याकाळात संस्कृत, मराठी, फार्सी व उर्दू भाषांमध्ये आपणाकडे साहित्यांची निर्कूती झाली. तत्कालीन सरदारांमध्ये मलिक अंबर, मुहम्मद गावान यांच्या पदरी मोठा ग्रंथसंग्रह होता. त्यांची हस्तलिखिते आजही विविध संग्रहालयांमध्ये उपलब्ध आहेत. त्यापैकी काही ग्रंथांची मराठी आणि स्थानिक भाषांमध्ये भाषांतरे झाली आहेत. विविध संतांनी निर्माण केलेल्या सांहित्यकृतींनी समाजामध्ये जागृती झाली.

इ.स. चौदाव्या शतकापासून महाराष्ट्र मुस्लिम सत्तेंच्या अंमलाखाली आला. याविषयीचा अभ्यास मध्ययुगीन भारताचे मान्यवर इतिहासकार डॉ. मोहम्मद हबीब व डॉ. इरफान हबीब यांनी मोठा अभ्यास संशोधन केला आहे. के. ए. निझामी. यांनी "Some Aspects of Religion and Politics in India During the Thirteen Century, Mumbai, 1961" असा ग्रंथ लिहिला आहे. डॉ. हबीब यांनी या ग्रंथास प्रस्तावना लिहिली आहे.

मुस्लिम साहित्य, भाषा, संस्कृतीचा प्रभाव महाराष्ट्रावर कसा झाला. या विषयीची ती संशोधकीय मांडणी आहे.

ज्येष्ठ साहित्यकार त्र्यंबक शंकर शेजवलकर यांनी प्रस्तुत विषयाच्या संदर्भात आपला पीएच.डी. चा प्रबंध लिहिला असून तो अिद्यापही पुणे येथील डेक्कन अभिमत विद्यापीठाच्या ग्रंथालयामध्ये उपलब्ध आहे. जिज्ञासूंनी तो अवश्य पहावा. अर्थात त्यांनी पीएच.डी. पदवी घेतली नाही हा भाग वेगळा आहे.

इस्लामी राजवटीत फार्सी व उर्दू भाषांचा वापर होता. तसाच प्रभाव मराठी भाषेवर पडला. अनेक अरबी, तुर्की, फार्सी भाषांमधील शब्द मराठी भाषेमध्ये वापरले जाऊ लागले. राजसत्ता चालविण्यासाठी राज्यकर्तांना स्थानिक अधिकाऱ्यांची आवश्यकता होती. त्यासाठी त्यांनाही मराठी भाषेचा स्विकार केला. मराठी व्यक्तींही मराठी शिवाय अन्य भाषा शिकू लागले. त्यामुळे भाषेबरोबरच इतर भाषा व संस्कृतींमधील नवे विचार, आचार, त्याचप्रमाणे इतर दैनंदिन जीवनातील बाबींचाही मराठी भाषा जीवनात प्रवेश झाला. त्यावेळी फार्सी भाषेचा मोठा पगडा मराठी भाषेवर होता. महाराष्ट्रातील लेखन भाषेचा प्रभाव दिसतो. उदा. मराठी राज्याच्या प्रशासनिक पत्रांमध्ये अज रख्तखाने राजेश्री सीवाजी राजे (अज-पासून आणि रख्तखाने म्हणजे कचेरी) याचा अर्थ हे पत्र शिवाजी महाराजांच्या कचेरीतून लिहिलेले आहे. कालगणनेमध्येही मुस्लिम कालगणनेचा प्रभाव दिसतो.

मराठी भाषिक पत्रांमध्ये फार्सी हा शब्द फार पूर्वीपासून आले आहेत. फार्सी शब्दांना पर्यायी शब्दरचना महाराजांनी करण्यासाठी नव्याने 'राज्यव्यवहार कोश' तयार करून घेतला. तत्पूर्वी मराठी कागदपत्रांमध्ये फार्सीचा वार कसा होता ते पुढील पत्रांवरून दिसते.

इतिहासाचार्य विश्वनाथ काशीनाथ राजवाडे यांनी या संदर्भात फार मोठी ऐतिहासिक संशोधनाची कामगिरी केली आहे. वि. का. राजवाडे यांनी १६२८, १६७७ आणि १८२८ या तीन वर्षांधील भाषांचा अभ्यास करून प्रमाण मांडले ते पहा -

| वर्ष | फार्सी शब्द | मराठी शब्द | एकूण शब्द | मराठी प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १६२८ | २०२ | ३४ | २३६ | १४.४ % |
| १६७७ | ५१ | ८४ | १३५ | ६२.२ % |
| १८२८ | ०८ | ११९ | १२७ | ९३.७ % |

अगदी ब्रिटीश राजवटीच्या प्रारंभीच्या काळापर्यंत फार्सी भाषेचा चांगलाच प्रभाव पडलेला दिसून येतो. इ. स. १२९०-१८१८ या कालावधीमधील भाषेच्या वापर व प्रभावा संदर्भातील पुढील काही निरीक्षणे पहा -

१. **१२९०-१३९५ : यादवकाळ** - बोलणे व लेखन, दैनंदिन वापरात शुद्ध मराठी भाषेचा वापर .
२. **१३९५-१६५६ : शिवपूर्वकाल** - फार्सी भाषेचे वर्चस्व
३. **१६५६-१७२८ : शिवकाल व नंतर** - फार्सी भाषेच्या वापरामध्ये घट.
४. **१७२९-१८१८ : मराठी अंमल** - केवळ मुसलमानी राजवटीशी पत्रव्यवहार करावयाचा असेल तरच फार्सी भाषेचा वापर केलेला दिसतो. वि. का. राजवडे यांनी मराठ्यांच्या इतिहासाची साधने खंड आठच्या प्रस्तावनेमध्ये ही सविस्तर मांडणी केली आहे.

मुस्लिम राजवटीच्या दैनंदिन वापरावर कसा प्रभाव होता. यासाठी आपणास विविध प्रकारची सरकारी कागदपत्रे पाहिल्यास ही बाब लक्षात येते. सरकारी कागदपत्रांमध्ये आज्ञापत्रे, सनदापत्रे, कौलनामे, महजर, अखबर, कतबा इत्यादी फार्सी शब्दांचा वापर केला जात होता. जमिनीच्या व्यवहारामध्येही मराठी कागदपत्रांमध्ये मुस्लिम शब्द आढळतात. उदा. वतन, दस्तावा, नख्त, गाला, मोकदम, मिरासदार, बागाईत, जिरायत ही सर्व शब्द अगदी परगणा, कसबा देखील फार्सी भाषेमधून मराठीमध्ये येँन आपल्या दैनंदिन वापरामध्ये आली आहेत. याविषयी जिज्ञासूंनी डॉ. माधवराव पटवर्धन लिखित 'फार्सी मराठी कोश' जरूर पहावा.

मध्ययुगामध्ये ज्यावेळी मराठी भाषेचा वापर शाह्यांच्या दरबारी कमी झाला होता. त्या पार्श्वभूमीवर छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहार कोश' तयार करून घेतला. शिवाजी महाराजांच्या शौर्याचे, धाडसाचे, स्वराज्य स्थापनेचे जेवढे कौतुक केले जाते तेवढे कौतुक व महत्त्व त्यांनी तयार करून घेतलेल्या राज्यव्यवहार कोश कार्यास दिले जात नाही.

राज्यव्यवहार कोशामध्ये १३८० फार्सी शब्दांना संस्कृत प्रतिशब्द दिले आहेत. वरील दख्खनी १३८० शब्दांपैकी १००० शब्द उर्दू आहेत. मध्ययुगीन महाराष्ट्राचा 'सामाजिक इतिहास' अभ्यासण्यासाठी हा 'राज्यव्यवहार कोश' उपयुक्त आहे. उदा. फार्सी भाषेचा वापर वाढल्यावर ती भाषा शिकणे व अवगत करणे आवश्यक असल्याने समाजात नवीन ीाषा शिकणाऱ्यांचा आणि लेखनिकांचा एक वर्ग उदयास आला. त्यांना 'पारसनीस' अशी संज्ञा प्राप्त झाली होती.

मध्ययुगीन महाराष्ट्रामध्ये मुस्लिम प्रभावाचा परिणाम पदोपदी आढळतो. समाजाच्या भाषा अनेक व अनेक अंगांमध्ये परस्पर संबंध, संयोग आणि मिलाफाची, संस्कृती समन्वयाची प्रक्रिया झालेली दिसून येते. याविषयी डॉ. ताराचंद आणि, 'Influence of Islam and Indian Culture' असा ग्रंथ लिहिला आहे. तो जिज्ञासूंनी मुळातून वाचल्यास आपणास हा पाठ-घटक अधिक चांगल्या पद्धतीने समजून घेता येईल.

### १०.२.२ सामाजिक व सांस्कृतिक प्रघातावर पडलेला प्रभाव

मध्ययुगीन भारतात इस्लामी राज्यकर्त्यांची सत्ता होती. इस्लामी राज्यकर्त्यांचे आचार, विचार, वेशभूषा, संसकृती, समाज, धार्मिक आचरण यांचा तत्कालीन मराठा राज्यावर प्रभाव पडलेला दिसतो. हिंदू-मुस्लिम यांच्यातील संबंधांची जुळणी, दोन्ही समाजाच्या संस्कृतीचा संगम त्यांचे आचार-विचार यांची सांगड घालणे. त्यातून उदयास आलेली संस्कृती यांचे विवेचन उद्‌बोधन ठरेल.

या दोन्ही समाजाच्या संस्कृतीच्या समन्वयाबाबत काही विचारवंतांच्या मते, हिंदू-मुस्लिम संस्कृती विरोधी आहे. परंतु काही विचारवंतांनी या दोन्ही संस्कृतीच्या भारतातील एकीकरणाच्या प्रक्रियेकडे लक्ष वेधलेले आहे.

भारतीय संस्कृतीवर इस्लामचा प्रभाव या ग्रंथात ताराचंद यांनी मांडलेल्या मताप्रमाणे ''जे मुस्लिम भारतात आले, त्यांनी येथेच घर केले. हिंदूंनी वेढलेल्यापरिसरात मुस्लिम वास्तव्य करीत असत व अशा स्थितीत हिंदूशी सातत्याने वैर करणे त्यांना अशक्य होत. परस्पर संबंधाचे पर्यावसन परस्पर सामंजस्यात झाले. ज्यांनी धर्म बदलला त्यांच्यात मुळ

धर्मबांधवांपेक्षा फार मोठा फरक पडला नव्हता. त्यामुळे विजय-पराजयाचे पहिले धक्के ओसरल्यानंतर शेजारीम्हणून राहण्याचे योग्य मार्ग शोधन काढण्याचे दोन्ही जमातींनी पसंत केले. नवीन जीवनपद्धती शोधून काढण्याच्या प्रयत्नांचे पर्यावसन एका नवीन संस्कृतीच्या विकासात झाले. ही नवी संस्कृती पूर्णपणे हिंदू नव्हती किंवा पूर्णपणे मुस्लिम नव्हती. ती खरोखर मुस्लिम-हिंदू संस्कृती होती.''

आर.सी. मुजूमदार यांच्या मते ''पोषाख, अन्न, भाषा, संगीत, शास्त्र, कला, स्थापत्य कला वगैरे बाबतीत मुस्लिम व हिंदू यांचा जो काय परस्पर प्रभाव पडला ता`अगदी क्षुल्लक स्वरुपाचा होता व फक्त जीवनाच्या बाह्य स्वरुपाशी संबंधीत होता. असे असले तरी, हिंदू-मुसलमान संस्कृती एकत्र येवून त्यांची समन्वयीत नवीन एकच संस्कृती निर्माण होणार नसली तरी परस्परांचा एकमेकांवरन मोठा प्रभाव पडलेला होता व तो टाळता येण्यासारखा नव्हता. या संदर्भात प्रो. मुहम्मद हबीब म्हणतात, ''जेव्हा दोन संस्कृतिक समाज समोरासमोर येतात, तेव्हा त्यांची 'आपण निराळे आहोत' अथवा दुसऱ्याबद्दल अविश्वास अथवा तटस्थता अशी वृत्ती फार काळ टिकाव धरू शकत नाही. सामाजिक आणि आर्थिक संबंध त्यांना एकमेकांजवळ आणतात, कालांतराने त अधिक घनिष्ठ बनतात आणि असे समाजिक संबंध वाढतात तेव्हा हिंदू आणि मुसलमान परस्परांच्या चालीरिती, आवडीनिवडी स्विकारतात, खालच्या थरांमधील लोकांचे वैवाहिक संबंध सहजपणे घडून येतात. ताराचंद.'' ताराचंद, आर. सी. मुजूमदार, देशपांडे, अ.ना. आणि प्रो. मुहम्मद हबीब यांनी मांडलेल्या मतांप्रमाणे तत्कालीन मराठा समाजावर पडलेला प्रभाव परिस्थितीजन्य होता हे मान्य केल पाहिजे. मध्ययुगीन महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीचे चित्र बरेच गुंतागुंतीचे आहे. ही गुंतागुंत अशी तत्कालीन अनेक प्रवाहांमुळे झाली. तशीच ती विविध इतिहासकारांच्या मांडणीमुळे झाली असे दिसते. महाराष्ट्रात इस्लाम धर्माचा प्रवेश, प्रसाराचे कार्य, राज्यकर्त्यांचा पुढाकार, मराठी संत मंडळींचे कार्य, मराठी सत्तेचा उदय, तिचा उद्देश हे सर्व घटक उलगडून अभ्यासले तर समाज जीवनाच्या समाजिक स्थित्यंतराची माहिती मिळते. तत्कालीन समाज जीवन, स्त्री जीवन, पोशाख, भाषा, भक्ती मार्गातील प्रवाह, हिंदू सरदार, प्रशासन, बांधकाम, चित्रकला, नाणी अशा मराठेकालीन अनेक क्षेत्रांवर इस्लामांचा प्रभाव पडलेला दिसून येतो.

पोशाखाच्या बाबतीत मराठ्यांनी बराचसा मुस्लिम पेहराव स्विकारला होता. उदा. तुंग, तुमान, सदरा, लांब रेशमी कोट, टोकदार पागोटे, शेला, पट्टा असा पेहराव करण्यास प्रारंभ केला होता.

मराठे सरदार पान खात ही सवय मुस्लिमांनी घेतली. साहित्याच्या क्षेत्रातही एकमेकांचा प्रभाव स्पष्ट दिसून येतो. उदा. अल्लाउद्दिन दुसरा या बहमनी पातशहास गुरुचरित्र या ग्रंथाचा नायक 'नृसिंह सरस्वती' यांच्याबद्दल मोठा आदर होता. विजापूरचा अदिलशहा तर 'अजपूजा सरस्वती' अशा पवित्र वचनांनी आपले लेखनाचे फर्मान लिहित असे. दोघांनीही एकमेकांच्या धार्मिक स्थळांना इनामे दिल्याचे दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांनी तर मराइेत्तर लोकांना अतिशय चांगली वागणूक दिली होती ही गोष्ट सर्वत्र परिचित आहे. याविषयी A. R. Kulkarni यांचे 'Medieval Maharashtra' हे पुस्तक आवर्जून वाचावे.

मध्ययुगात महाराष्ट्रात इतर धर्मियांप्रमाणे मुस्लिम धर्मबाबींचाही पगडा हिंदू धर्मावर पडला होता. कालांतराने राजकीय सत्ता नष्ट झाल्या. मुस्लिम या ठिकाणचेच नागरिक झाले. एका नव्या सामाजिक सहजीवनाचा प्रारंभ महाराष्ट्राने करून दिला.

*** हिंदू जीवन मनावर पडलेला प्रभाव**

हिंदू व मुसलमान हे दोन्ही समाज जन्म, मृत्यू, विवाह प्रसंग आणि इतर सण सारख्या पद्धतीने साजरा करत असत. दोघांच्या जीवनमानात सारखेपणा आढळून येतो.

**१. वेशभूषेवर पडलेला प्रभाव**

हिंदू मुसलमानांप्रमाण तंग, रंगीत कपडे घालू लागले. गोरी शंकर म्हणतात त्याप्रमाणे वेशभूषेत अचकन, पायजमा, उत्तर भारतात साडी ऐवजी घागरा, पगडीचा वापर दोन्ही समाजात होत होता. या शिवाय अफगाणी पद्धतीची काटाकुली टोपी वारण्याची पद्धत सुरू झाली होती.

**२. खानपानावर पडलेला प्रभाव**

मोगल शासकाच्या पदरी असलेले उच्चाधिकारी खाण्यापिण्याबाबत इस्लामी शासनकाचे अनुकरण करू लागले. पुलाव, बिर्याणी, कोफ्ता, कबाब हे अन्न पदार्थ हिंदूंच्या भोजनपात्रात दिसू लागले होते.

**३. स्त्री जीवनावर पडलेला प्रभाव**

इस्लाम सत्तेचा स्त्री-जीवनावर सर्वात विपरीत परिणाम झाला. मुसलामन सरदार हिंदू सरदारांच्या मुलींची लग्नासाठल मागणी करत किंवा देखण्या मुलींचे सर्रास अपहरण केले जाई. तेव्हा ह्या धर्मसंकटातून वाचण्यासाठील हिंदू पालक आपल्या मुलींचे विवाह अतिशय लहान वयातच करणे पसंत करत. परिणामी बालविवाहाची पद्धत सुरू झाली होती.

हिंदू स्त्रियांमध्ये पडदा पद्धतीचा अवलंब होऊ लागला यात एकतर मुसलमान स्त्रियांचे अनुकरण किंवा मुसलमानांच्या अत्याचारापासून स्वतःला वाचविणे. साहजीकच हिंदू स्त्रियांनी स्वतःची सुटका करून घेण्यासाठी पडदा पद्धतीचा स्विकार केला होता. त्यामुळे स्त्री जीवन मागासलेपणाचे झाले होते.

ऐन-ए-अकबरी मध्ये केलेल्या वर्णनाप्रमाणे सम्राटाच्या घरादाराचा पहिला भाग म्हणजे जनाना होय. जनानखान्यात ५००० स्त्रिया होत्या. प्रत्येकीची राहण्याची जागा निश्चित असे. या स्त्रियांच्या दिमतीला पुरेसा नोकरवर्ग असे. स्त्री पहारेकरी, षंढ नोकर ठेवले असत. इस्लाम धर्माप्रमाणे एकापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करण्यास मान्यता होती. या धोरणाचा तत्कालीन हिंदू समाजात बहु पत्नीत्वाची पद्धत रूढ झाली. किंबहुना बहुपत्नीत्व प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई. त्यामुळे हिंदू राज्यकर्ते, सरदार, श्रीमंत व प्रतिष्ठित व्यक्ती एकापेक्षा जास्त स्त्रियांशी विवाह करत. छत्रपती शिवाजी महाराजांच्या ८, छत्रपनती शाहूंच्या ४, नानासाहेब पेशव्यांचया २, राघोबादादांच्या ६, नाना फडणिसांच्या ९, दुसऱ्या बाजीरावाने ११, महादजी शिंदेंच्या ९ बायका होत्या. इस्लामी जनानखान्याप्रमाणे हिंदू पुरुष लग्न न करता अनेक स्त्रियांना रखेली म्हणून ठेवीत असत. ही पद्धत इस्लामी जनानखान्यातील स्त्रियांच्या स्थिती सारखीच होती.

## १४. भक्ती संप्रदायाचा भूमिकेवर पडलेला प्रभाव

भक्ती संप्रदायाने इस्लाम धर्मातील अनेक तत्त्वांचा अवलंब केला. त्यापैकी भाषा या माध्यमांचा अतिशय जाणिपूर्वक उपयोग भक्ती संप्रदायातील लोकांनी करून घेतला. उर्दू ही अरेबिक लिपीमध्ये अस्तित्वात होती. भक्ती संप्रदायातील लोकांनी मुसलमानांच्या संपर्काने उर्दू शिकून घेतली व त्याच्याच आधारे इस्लामधर्म व हिंदूधर्म यांच्यातील साम्य व भेद यांची मिमांसा सुरू केली.

सुफी संप्रदायातील प्रचारकांनी हिंदू धर्मातील काही समाजातील लोकांना इस्लाम धर्माची दिक्षा दिली. इस्लामी प्रचारकांनी हिंदूंच्या जाती व्यवस्था व मुर्तीपुजेवर टिका केली. इस्लामांच्या टिकेला उत्तर देण्यासाठी काही विद्वानांनी प्रयत्न केला. त्यातून भक्ती संप्रदायाचा उदय झाला. इस्लामच्या या आक्रमणाला प्रतिउत्तर देण्यासाठी रामानुज, माधवाचार्य, रामानंद च वल्लभाचार्य असे विद्वान पुढे आले. त्यांनी इस्लामांशी संघर्ष करण्याऐवजी आपल्या समाजातील अनिष्ठ चालीरीती व रूढी परंपरांना पायबंद घालण्याचा प्रयत्न केला.

देशपांडे अ. नां. यांनी प्राचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास या ग्रंथात इस्लाम आक्रमणाचा अप्रत्यक्ष सामाजिक परिणाम नोंदवितांना म्हटले आहे. की, ‘‘इस्लामाच्या आगमनाने ब्राम्हण धर्माच्या भव्या प्रासादाला जबरदस्त हादरा बसला. त्यांच्या प्रतिष्ठेला अनेक तडे गेले. म्हणूनच मुसलमानी आमदानीत आनंदतीर्थ, मेघातिथी, विज्ञानेश्वर, विद्यापती असे रथी महारथी ब्राम्हण धर्माच्या रक्षणाला धावून आले. इस्लाम धर्माच्या प्रचाराचा धडका बसल्यावर रामानुजाचार्य, श्री. बसवेश्वर वगैरे धार्मिक नेत्यांची दृष्टी जनतेकडे वळली. सामाजिक विषमतेचेदुःख काहीसे ओठावर आणीत व बरेचसे जिरुन टाकीत विषमतेची भिंत भक्तीमार्गाच्याद्वारे उद्धस्तकेली.’’

डॉ. ताराचंद यांनी रिशैव व इस्लाम यांच्या संबंधावर प्रकाश टाकतांना म्हटले आहे की, ‘‘विरशैव हे पूर्णपणे इस्लाम प्रभावित होते. विरशैव हे लिंगायत धर्माचे असून त्यांचे वास्तव्य प्रामुख्याने बेळगाव, धारवाड, म्हैसूर आणि विजापूर या जिल्ह्यात होते. विरशैवचा ईश्वर शिव असून अल्लम प्रभू यांना शिवाचा अवतार मानतात. विरशैव पंथाचे लोक यज्ञ, उपवास, तीर्थयात्रा, जातीप्रथा, व पुनर्जन्म यांच्या विरोधात आहे. ते प्रेताचे दहन करण्याऐवजी मुसलमानाप्रमाणे दफन करतात. त्यांच्यात श्राद्धाविधी नाही. घटस्फोट आणि विधवा विवाहाला या पंथात मान्यता देण्यात आल आहे. या सर्व बाबी इस्लामांच्या प्रभावाचे निदर्शक आहेत.’’

## ५. मराठी लढवय्ये व प्रशासनावरवर पडलेला प्रभाव

मध्ययुगीन महाराष्अ्रात छत्रपती शिवजी महाराजांनी स्वराज्य स्थापन केले. त्या कालावधीत बहामनी राजवटीतून बाहेर पडलेल्या शहाची सत्ता होती. ते सत्ताधिश वेगवेगळ्या करणासाठी आपआपसात संघर्ष करत होते. त्यामुळे या मुस्लिम सत्ताधिशांनी स्थानिक हिंदू लढवयांना आपल्या सत्तेच्या रक्षणासाठी एकत्रीत केले. हिंदू लढवय्यांनी आपल्या बळाचा कौशल्याने वापर केल्यामुळ मुस्लिम सत्तेला सुरक्षितता प्राप्त झाली. परिणाम स्वरूप इस्लामी सत्तेत हिंदू लढवय्यांना महत्त्व प्राप्त झाले. प्रशासकीय धोरणावरही इस्लामांचा

प्रभाव दिसून येतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळाच्या उगर शुक्रनितीसार मधून झाला असला तरी दक्षिणेकडील मुस्लिम सत्तेमध्ये सुद्धा मंत्र्यांच्या संख्येचे प्रमाण असेच होते. शिवाय पेशवा, मुजूमदार, सरनौबत, सरलष्कर, नाईक जूमलेदार, दर्यासारंग अशा हुद्द्यांनी ओळखले जाणारे प्रशासनातील हुद्द्ययावर इस्लामचा प्रभाव दिसून येतो.

**६. स्थापत्य कलेवर पडलेला प्रभाव**

मध्ययुगीन काळात बहामणी राज्यात परदेशातून आलेलया लोकसमूहात तुर्कस्थान व इराण या देशातील चांगले कारागीरही होते. त्यांनी आपल्या देशातील वास्तूकलेतील वैशिष्ट्ये बांधकाम करतांना उपयोगात आणले. दर्गे, मशीद, मिनार उभारले, चुण्याचा भरपूर वापर करून गिलावा देण्याचेतंत्र वापरले. गोलाकार घुमट, कमानी, मिनार, उंच प्रवेशद्वार, दरवाजे इ. बहामनी काळातील स्थापत्य कलेच मराठ्यांनी स्विकार करतांना चुण्याचा गिलावा वापर, उंच प्रवेशद्वार, किल्ल्याच्या बांधकामात चुण्याचा वापर, मोठे महाल, वाडे, दरवाजे बांधलेल आढळतात. इस्लामी सत्ताधिश मृत पावलेल्या व्यक्तीच्या स्मरणार्थ कबर बांधत. त्यांचे अनुकरण करत मराठे काळात समाधी व छत्री बांधण्याचा प्रघात आवलंबलेला आढळतो.

**७. नाण्यांवर पडलेला प्रभाव**

मराठे काळात चलनात असलेल्या नाण्यावर इस्लामी नाण्याचा प्रभाव दिसून येतो. नाण्याचा आकार, वजन, धातू, मूल्य आणि त्यावरील अक्षरे किंवा चित्रे हे इस्लामी नाण्याच्या प्रभावाचे आढळतात.

मध्ययुगीन महाराष्ट्रात सामाजिक व सांस्कृतिक प्रघात परंपरागत असले तरी इस्लामाच्या संपर्कातून ते प्रघात प्रभावीत होऊन संस्कृती समन्वय घडून आलेला आढळतो.

## १०.२.३ मध्ययुगीन भारतातील मराठी घराण्यांचे महत्त्व

छत्रपती शिवाजी महाराजंनी स्थापन केलेल्या स्वराज्याचे पेशवे आणि त्यांचे सरदार यांनी साम्राज्यात रुपांतर केले. परंतु पेशवेकाली मराठा राज्याचे स्वरूप संघराज्यासारखे होते. छत्रपती राजाराम महाराजांच्या काळापासून मराठा राज्याचे स्वरूप बदलत गेले. छत्रपती शिवाजी महाराजांनी जी तत्त्वे घालून दिली होती. ती तत्त्वे मागे पडली. छत्रपती शाहू महाराजांच्या कारकिर्दीत मराठा सरदारांना अधिक स्वातंत्र्य द्यावे लागले. छत्रपतील शिवाजी महाराजांनी जे स्वराज्य उभे केले होते, मोगलांच्या झंझावातही जे टिकून राहिले होते ते आता नष्ट होणार अशी परिस्थिती निर्माण झाली होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काहात मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्ध काळात जी माणसे, जी साधने, जो पराक्रम मराठ्यांजवळ होता त्याच गोष्टी हाता ही मराठ्यांजवळ होत्या. फक्त छत्रपती शिवाजी महाराजांसारख्या नेता किंवा औरंगजेबासारखा शत्रू नव्हता. त्यामुळे मराठ्यांमधील पराक्रम, साधने, साहस, आपापसातील भांडणे, हेवेदावे यांत वाया जाणार नाही. त्यासाठली या सर्वांना एकत्र आणून त्यांना राष्ट्रकार्यास जुंपण्याचे कार्य बाळाजी विश्वनाथने केले. राजाराम महाराज आणि त्यांच्या सल्लागारांनी मराठा सरदारांना एकत्र आणण्यासाठी जो मार्ग स्विकारला होता तोच मार्ग बाळाजी विश्वनाथाने स्विकारला.

पेशवा बाळाजी विश्वनाथाने मराठी सरदारांना प्रदेश वाटून त्या प्रदेशातून चौथाई,

सरदेमुखी वसुल करण्याचे अधिकार दिले आणि त्यासाठी त्यांना स्वतंत्र फौजा उभारण्याची परवानगी दिली. अशाप्रकारे मराठा स्वराज्याला सरंजामशाही राजवटीचे स्वरूप प्राप्त झाले. मराठा स्वराज्य हे मराठी संघराज्यात विभागले गेले. आपापसांत भांडत असलेल्या मराठी सरदारांच्या कर्तृत्वालानवी दिशा मिळाली. बाळाजी विश्वनाथ मोठमोठ्या सरदारांना स्वतःची प्रगती मराठा राज्याच्या प्रगतीशी निगडीत आहे हे पटवून दिले. जो प्रदेश प्रत्यक्ष या सरदारांच्या ताब्यात होता तो छत्रपती शाहू महाराजांच्या सनदाद्वारे त्यांना वंशपरंपरागत देवून टाकला. त्याबरोबरच या प्रदेशात वृद्धि करण्याची मुभा दिली. जुन्या कर्त्या सरदारांना अनेक किताब व जहागिऱ्या दिल्या. या जहागिऱ्यांमधून वंशपंरागत वसुलीचे अधिकार दिले. त्यामुळे सर्वच मराठा सरदार कामाला लागले. बाळाजी विश्वनाथाने मराई सरदारांत एकजूट निर्माण करून त्यांचया पराक्रमाला नवी दिशा दिली. कर्तृत्वाचीनवी क्षितीजे निर्माण करून दिली. संपूर्ण मोगल साम्राज्यांतून चौथाई–सरदेशमुखी वसुल करण्याचे अधिकार बाळाती विश्वनाथने मोगल बादशहाकडून मिळविले. त्यामुळे मराठा सरदारांचे घोडे संपूर्ण हिंदूस्थानभर उधळू लागले. तात्विक दृष्ट्या नसला तरी व्यवहारी दृष्टीकोनातून संपूर्ण हिंदूस्थान मराठ्यांच्या नियंत्रणाखाली आला. पुढील काळात मोगल बादशहावर मराठा सरदारांचे नियंत्रण प्रस्थापित झाले. मराठेच राज्य निर्माते बनले.

पानिपतच्या अनर्थकारी संकटानंतरही मराठी पुन्हा उत्तरेत स्थिरावले. महादजी शिंदे इंग्रजांना नमवूशकला. मोगल बादशहाला आपल्या मुठीत ठेवण्याचे कार्य त्याने अखेरपर्यंत केले. दक्षिणेत छत्रपती शिवाजी महाराजांनी जिंकलेला प्रदेश तर मराठ्यांनी आपल्या ताब्यात ठेवलाच शिवाय इतर छोट्या छोट्या राज्यांवर आपला अंमल बसविला व त्यांच्याकडून चौथाई–सरदेशमुखी वसुल केली. याबाबतीत अनेक मराठा घराण्यांनी योगदान दिले.

छत्रपती शाहू महारजांनी मोगलांचे सार्वभौमत्व मान्य करून मराठेशाहीच्या मूळ तत्वाचाच त्याग केला. ऐवढेच नाही तर मराठा राज्याची संपूर्ण सुत्रेही पेशव्यांच्या स्वाधीन केली. त्यामुळे मराठा राज्याचे स्वरूपच बदलून गेले. पेशव्यांनी नवीन सरदारवर्ग निर्माण करून आपली सत्ता एवढी वाढविली की, हळूहळू छत्रपतींची सत्ता नामशेष झाली. छत्रपती निष्प्रभ होवून पेशव्याला मोठी प्रतिष्ठा प्राप्त झाली. छत्रपती शाहूंच्या मृत्यूनंतर पेशवेच मराठा राज्याचे सर्वाधिकारी बनले.

मराठ्यांचे निरनिराळे सरदार उदा. होळकर, पवार, गायकवाड आणि इतर हे पेशव्यांचे अंकित समजले जात होते. प्रत्येकाच्या जवळ त्यांची वतंत्र जहागीरअसून त्यांना आपल्या जहागिरीच्या अंतर्गत कारभारांत पूर्ण स्वातंत्र्य होते. फक्त पेशवे सांगतील तेव्हा त्यांना आपले सैन्य  घेवून मध्यवर्ती सत्तेच्या मदतीला जावे लागे.

परंतु हळूहळू परिस्थितीत बदल झाला. पेशव्यांनी सामर्थ्यशाली बनून जसे छत्रपतीला निष्प्रभ बनविले होते. त्याचप्रमाणे मराइा सरदारांनीही सामर्थ्यवान बनून पेशव्यांना निष्प्रभ बनविले. मराठा सरदारांमध्ये स्वातंत्र्याची वृत्ती बळावली. मध्यवर्ती सभेला ते जुमानिनासे णाले. पेशवे आपल्यापैकीच एक ते कोणी मालक नाहीत या भावनेने होळकर–शिंदे पेशव्यांशी नमून वागायला तयार नव्हते. तर पेशवे त्यांच्या शिरजोर वर्तनाशी जमवून घ्यायला तयार नव्हते. त्यामुळे फूट वाढत जावून मराठा राज्याचा विनाश जवळ आला.

*** मध्ययुगीन भारतातील मराठी घराण्यांचे महत्त्व**

मराठा राज्यसंघ हा पेशव्यांचेराज्य आणि शिंदे, होळकर, गायकवाड, आणि भोसले यांच्या राज्यांनी मिळून बनलेला होता. पेशवाईच्या उत्तरार्धात मराठा सरदारांची वनते किंवा राज्ये जवळजवळ स्वतंत्र झालेली होती. ते पेशव्योंचया सत्तेलाही जुमानासे झाले होते. इंग्रजांचे आव्हान उभे ठाकल्यानंतर पेशव्यांबरोबरच हे मराठा सरदार सुद्धा आपल्या स्वातंत्र्याकरीता स्वतंत्रपणे प्रयत्नांची पराकाष्ठा करतील अशी अपेक्षा होती. परंतु, प्रत्यक्षात मात्र यशवंतराव होळकरांचा अपवाद सोडल्यास इतर मराठा सरदारांनी स्वातंत्र्याकरीता विशेष प्रयत्न कलेले आढळत नाहीत. पेशवा दुसऱ्या बाजीरावाप्रमाणेच त्यांनी इंग्रजांच्या तैनाती फौजेचे तह स्विकारले आणि पेशव्यांप्रमाणेच त्यांचे स्वातंत्र्य हळूहळू लयाला गेले.

*** मराठ्यांची प्रमुख घराणी**

**१. गायकवाड**

अठराव्या शतकात मराठा राज्याच्या विस्तारासाठी आणि शूर मराठ्यांच्या महत्त्वाकांक्षेला नवे क्षेत्र मिळावे यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी स्वराज्यालगतचा प्रदेश शुर व धाडशी मराठा सरदारांकडे त्यांचे कार्यक्षेत्र म्हणून सोपविला. या उपक्रमानुसार खानदेश आणि गुजरातचा प्रदेश खंडेराव दाभाडे यांच्याकडे सोपविला. खंडेराव दाभाड्यांनी अल्प काळातच गुजरातमध्ये आपला जम बसविला. परंतु १७१६ मध्ये त्यांची सेनापतीपदी नियुक्ती झाल्यामुळे त्यांना गुजरातकडे लक्ष देता येईना. तेव्हा त्यांनी आपला मुलगा त्रिंबकराव दाभाडे याच्या नावे सेना खास खेल हा किताब छत्रपती शाहू माहाराजांकडून मिळविला आणि त्याची रवानगी पिलाजी गायकवाड या आपल्या विश्वासू सरदाराबरोबर गुजरातमध्ये केली.

पिलाजी गायकवाड हा दमाजी गायकवाडांचा दत्तकपुत्र दमाजी खेड तालुक्यातील दावडी या गावचा राहणारा होता. तो खंडेराव दाभाडे यांच्या लष्करात दाखल झाल्यानंतर त्याने १७१९ च्या बाळापूरच्या लढाईत अतुलनिय कामगिरी बजावली म्हणून खंडेराव दाभाडे यांनी त्याची शिफारस छत्रपती शाहू महाराजांनी प्रसन्न होवून दमाजीस 'समशेर बहाद्दर' असा किताब दिला आणि सेनापतीच्या लष्करात दुय्यम अधिकाऱ्याचे पद दिले.

दमाजी गायकवाड हा कर्तबगार मराठा सरदार होता. दमाजी गायकवाडांच्या नंतर पिलाजी गायकवाड हे गायकवाडांच्या संस्थानाचे कामकाज पाहू लागले. उत्तरेत रार्जयविस्तार करावा, उत्तरेच्या राजकारणात मराठ्यांचा प्रभाव निर्माण करावा अशी बाजीरावाची इच्छा होती. दक्षिणेकडून उत्तरेकडे आणि उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारे सर्व मार्ग माळवा, गुजरातमधून जात असल्यामुळे पेशव्यांच्या दृष्टीने या प्रांतांना विशेष महत्त्व प्राप्त झालेले होते. पिलाजीच्या मोहीमांमुळे त्रस्त झालेल्या मोगल सुभेदाराने (सरबुलंदखानाने) पेशव्याच्या मार्फत या दोघांचा काटा काढण्याचा डाव टाकला. गुजरातमध्ये पाय रोवण्याची चालून आलेली संधी सोडावयास पेशवा तयार नव्हता. पेशव्याने छत्रपतींकडून चिमाजी अप्पांच्या नावे गुजरातचा निम्मा मोकासा मिळविला. त्यामुळे दाभाडे, गायकवाड रुष्ठ झाले. गुजरातमध्ये पेशव्यांचा हस्तक्षेप दाभाड्यांना नको होता. पेशव्याने मोगल सुभेदाराबरोबर तह केल्यामुळे पेशवे-दाभाडे यांच्यात तंटा निर्माण झाला. तो सोडविण्यासाठी छत्रपतींनी दाभाड्यांना प्रत्यक्ष भेटीसाठी बोलाविले. परंतु शाहू महाराजांच्या पत्राची दखल न घेता उलट गुजरातमधून पेशव्याला हाकलून लावण्यासाठी दाभाड्यांनी निजामाची मदत घेतली.

दाभाड्यांच्या या धोरणामुळे मराठा राज्याला धोका निर्माण झाला होता. त्यामुळे

बाजराव पेशवा आणि त्रिंबकराव दाभाडे यांच्यात उभई येथे युद्ध होवून या युद्धात त्रिंबकराव मारला गेला. पिलाजी गायकवाडांचा मोठा मुलगाही मारला गेला. पिलाजी आपल्या दमाजी व खंडेराव या दोन मुलांना घेवून सोनगडच्या आश्रयाला गेला. पेशवा-दाभाडे संघर्ष वाढू नये म्हणून छत्रपती शाहू महाराजांनी गुजरातची जहागिरी दाभाडे यांच्याकडेच ठेवली आणि पिलाजी गायकवाडांना दाभाड्यांचा मुलाजिमा म्हणून ठेवले. परंतु, यशवंतराव दाभाडे कर्तृत्ववान नसल्यामुळे मोहिमांची जबाबदारी पिलाजीनेच उचलली. पिलाजीच्या वाढत्या शक्तीला पायबंद घालण्याची कुवत मोगल सुभेदारास नव्हती. म्हणून त्याने वाममार्गाचा अवलंब करून मारेकऱ्यांमार्फत पिलाजीची निर्घृण हत्या केली.

पिलाजीच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा दमाजी याने आपल्या पित्याच्या हत्येचा पुरेपूर सूड उगविला. अवघ्या दहा वर्षात दमाजीने गुजरातमधील मोगलसत्ता पोखरून काढली. दमाजी हा पिलाजी प्रमाणेच पेशव्यांच्या विरोधात होता. दमाजीच्या हालचालींवर पेशवा बाळाजी बाजीराव लक्ष ठेवून होता. १७५१ मध्ये पेशव्याने दमाजीच्या छावणीवर अनपेक्षितपणे हल्ला केला आणि त्याला त्याच्या मुलासह अटक केली. १७५२ मध्ये पेशवा-गायकवाड यांच्यात तह होवून गुजरातचा कारभार गाकवाडांकडे आला. या नंतर मात्र पेशवा-गायकवाड यांच्यात सलोख्याचे संबंध प्रस्थपित झाले. गायकवाडांनी गुजरातमधील मोगल सत्त संपुष्टात आणली. अहमदाबाद याठिकाणी टांकसाळ सुरू केली. पानिपतच्या मोहिमेत भाग घेतला. माधवराव पेशव्याच्या कारकिर्दीत दमाजीने रघुनाथराव पेशव्याला साथ दिल्यामुळे रघूनाथरावाने दामाजीला मानाची वस्त्रे व दाभाड्यांचा सेनाखासखेलहा किताब मिळवून दिला. दाभाडे निजामाला सामील झाल्यामुळे दाभाड्यांचे गुजरातवरील हक्क रद्द करून ते कायगवाडांकडे सोपविण्यात आले.

दामाजीच्या मृत्यूनंतर त्याच्या मुलांमध्ये वारसा हक्काचे भांडण सुरू झाले. त्यामध्ये गोविंदरावाला यश मिळाले. पेशव्यांनेही गायकवाडा घराण्याचा प्रमुख म्हणून गोविंदरावालाच मान्यता दिली. सोनखासखेल ही पदवी दिली. नाना फडणिसाने रावजी अप्पाजी आणि गंगाधरशास्त्री पटवर्धन यांना गोविंदरावाबरोबर दिले आणि ते १९ डिसेंबर १७९३ मध्ये गुजरातचा ताबा घेण्यासाठी पुण्याहून निघाले. अरब सैनिकांची मदत घेवून गोविंदरावाने गुंजरातमध्ये आपले सार्वभौमत्व प्रस्थापित केले. परंतु, १९ सप्टेंबर १८०० रोजी गोविंदरावाचा मृत्यू झाला.

गोविंदरावाच्या मृत्यूनंतर त्याच्या चार औरस आणि चार अनौरस पुत्रांत गादीसाठी संघर्ष सुरू झाला. या संघर्षात गोविंदरावाचा थोरला पुत्र आनंदराव यास यश मिळाले. त्याला त्याकामी रावजी अप्पाजीचे बरेच सहकार्य मिळाले. आनंदरावाला गायकवाडांची गादी मिळाली खरी परंतु, द्रव्याअभावी तो अरब सैनिकांचे पगार देऊ शकला नाही. म्हणून गायकवाडांच्या राज्यांत अरबांनी दंगेधोपे करण्यास सुरुवात केली. त्यामुळे आनंदरावाला राज्य करणे कठीण झाले. अशा कठीण परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी रावजी अप्पाजीने बॉम्बे येथील इंग्रजी वखारवाल्यांचे सहाय्य घेण्याचे ठरविले. यावेळी मुंबईला जोनाथन डंकन हा गर्व्हनर होता. त्याने मेजर वॉकरच्या नेर्तृत्वाखाली दोन हजार इंग्रजी फौज बडोद्यास आनंदरावाच्या मदतीसाठी पाठविली. रावजीने इंग्रजांची मदत घ्यावी ही गोष्ट अरब सैनिकांना पसंत पडली नाही. त्यांनी सूड म्हणून रावजीच्या कुटूंबाला तुरुंगात टाकले.

याचवेळी आनंदरावाचा पुतण्या मल्हारराव यानेही आनंदररावाच्या विरुद्ध बंड पुकारले.

या सर्व परिस्थितीचा आढावा घेऊन मेजर वॉकरने आनंदरावाचा पाठिंबा देण्याचा निर्णय घेतला. गायगवाड आणि इंग्रज यांच्या संयुक्त फौजांनी मल्हाररावविरुद्ध मोहिम उभारली. या मोहिमेत मल्हाररावाचा पराभव झाला. मेजर वॉकरने केवळ सहा महिन्याच्या आतच गुजरातमधील दंगे मिटवून आनंदरावाची स्थिती मजबूत केली. इंग्रजांनी गायकवाडांना मदत केल्यामुळे गायकवाड आणि इंग्रज यांच्यात एक करार घडून आला. या करारामुळे इंग्रजांना सुरतेचा जिल्हा तोडून देण्यात आला, इंग्रजांचा या करारामुळे बराच मोठा फायदा झाला. मेजर वॉकरने मुंबईच्या इंग्रज गर्व्हनरची मान्यता मिळविली.

यानंतर आनंदराव गायकवाडाने संस्थानातील प्रजेने प्रशासनामध्ये मेजर वॉकरशी सहकार्य करावे असा एक वटहुकूमही जारी केला. त्यामुळे गायकवाडात राज्यांवर इंग्रजांचे वर्चस्व निर्माण झाले. रावजीच्या मृत्यूनंतर मात्र बडोदा संस्थानातून इंग्रजांना विरोध सुरू झाला. खुद्द रावजीचा पुत्र सिताराम याने इंग्रजांना विरोध केला. शेवटी १८०६ मध्ये मेजर वॉकरने राज्याच्या व्यवस्थेसाठी एक सल्लागार समिती नियुक्त केली आणि आनंदरावाचा भाऊ फत्तेसिंग याला राज्याचा प्रमुख म्हणून नेमण्यात आले. १८१० मध्ये मेजर वॉकरने राजीनामा दिल्यामुळे त्याच्या जागी रेसिडेंर म्हणून कॅप्टन करनैक यांची नेमणूक करण्यातआली. बडोद्याच्या राज्यकारभारांत इंग्रज वारंवार हस्तक्षेप करतात. म्हणून प्रजेत मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाला होता.

दरम्यानच्या काळात पेशवा दुसरा बाजराव आणि बडोद्याचे गायकवाड यांच्यामध्ये खंडणीच्या प्रश्नावरून वाद निर्माण झाला. हा वाद सोडविण्यासाठी इंग्रजांनी गंगाधर शास्त्र्याला बडोद्याचे वकील म्हणून पुण्याला पाठविले. परंतु आपल्या अंतर्गत राज्यकारभारात इंग्रज हस्तक्षेप करीत आहे हे लक्षात आल्यामुळे दुसऱ्या बाजीरावाने गंगाधर शास्त्र्याचा खून घडवून आणला.

थोडक्यात ज्यावेळी दुसरा बाजीराव, शिंदे, होळकर , भोसले हे आपापल्या स्वातंत्र्यासाठी शेवटचा प्रयत्न करीत होते त्यावेळी गायकवाड इंग्रजांची मदत घेण्यात धन्यता मानीत होते. इंग्रज-मराइा दुसऱ्या, तिसऱ्या युद्धांत गायकवाड कोणत्याही रितीने सामील झाले नाही. इंग्रजांनी गायगवाडांना आपल्या हातातील बाहुले बनविले आणि गायकवाडांचा उपयोग जास्तीत जास्त प्रादेशकि व आर्थिक लाभ पदरात पाडून घेण्यासाठी केला. परंतु, त्यापेक्षा मराठेशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची बाब म्हणजे इंग्रजांनी गायकवाडांना मराठा मंडळापासून दूर ठेवून त्यांचा उपयोग मराठेशाही आणि पेशवाई नष्ट करण्यासाठी करून घेतला. सुरुवातीपासूनच पेशव्यांशी कसून वागणाऱ्या गायकवाडांना शेवटी इंग्रजांच्या मगरमिठीतून सुटण्यासाठी पेशव्यांच्या मदतीची आवश्यकता भासली परंतु तो पर्यंत पेशवाईच ब्रिटीशांच्या साम्राज्यवादी पाशात अडकली होती.

१८१८ मध्ये फत्तेसिंग गायकवाड यांचे निधन झाले आणि त्याचा धाकटा बंधू सयाजी गादीवर आले. मराठेशाही नष्ट झाल्यानंतर इंग्रजांनी मराठा सरदारांबरोबरचे आपले धोरण बदलविले. मुंबईचा गर्व्हनर एलफिटसनने १८२० मध्ये बडद्याला भेट दिली आणि सयाजीराव गायकवाडाबरोबर नवा तह केला आणि गायकवाडावर पूर्णपणे आपले वर्चस्व प्रस्थापित केले.

अशाप्रकारे १८२० मध्ये गायवाडांच्या स्वतत्र्याचा पूर्ण अस्त झाला. ब्रिटीशांनी आपले सार्वभौमत्व त्यांच्यावर लादून त्यांना आपल मांडलिक बनविले.

## २. होळकर घराणे

मल्हारराव होळकरांचे पूर्वज पुणे जिल्ह्यात वाफगावी रहात होते. नंतर ते फलटण परगण्यात नीरा नदीच्या काठावर होळ नावाच्या खेड्यात स्थायीक झाले. या गावाच्या नावावरून त्यांना होळकर हे नाव मिळाले. मल्हाररावाच्या नन्मानंतर अवघ्या तीन वर्षात त्याचे वडील खंडोजीचा मृत्यू झाला. मल्हाररावाची आई जिवाई आपल्या एकुलत्या एक मुलाचे पालनपोषण करण्यासाठी आपल्या भावाकडे निघून आली. तिचा भाऊ भोजराज बारगळ कदमबांडेच्या पथकात पंचवीस घोडस्वारांचा नायक होता. त्याने मल्हारावालाही लष्करात नोकरी मिळवून दिली. इ.स. १७२६ मध्ये मल्हाराव सरंजामी सरदार झाला आणि अवघ्या २० वर्षातच मल्हारावाकडे साडे चौऱ्याहत्तर लक्षाचा मुलुख देण्यात आला होता. उत्तर भारतात राज्याचा विस्तार होवून मराठा राज्याचे साम्राज्यात रुपांतर झाले.

मल्हाररावाला १७२७ मध्ये गुजरात, माळवा व खानदेश प्रांतात सरंजाम मिळाला तसेच खर्चासाइी ११ परगणें मिळाले. माळवा प्रांताची वाटणी २ होळकर, २ शिंदे आणि १ पवार या प्रमाणे पेशव्यांनी केली होती. बाजीराव पेशव्याने मल्हाररावाच्या विनंतीवरून त्यांची पत्नी गौतमाबाईच्या नावाने ३ लक्ष रुपये उत्पन्नाचा मुलूख खाजगीकडे नेमून दिला होता. पानिपतानंतर २० मे १७६६ रोजी आलमपूर मुक्कामी मल्हाररावाचा मृत्यू झाला.

मल्हारराव होळकरांची सून अहिल्याबाई होळकर यांची तीस वर्षांची कारकिर्द प्रसिद्ध आहे. मल्हाररावाच्या मृत्यूनंतर तुकोजी होळकर यांच्याकडे फौजेचे काम होते. परंतु प्रत्यक्ष राज्यकारभार अहिल्याबाई होळकरांच्या हाती होता. अहिल्याबाई महेश्वर येथून राज्यकारभार पाहत होत्या. त्यांच्या कारीकिर्दीत शिंदे-होळकर वैमनस्य वाढत गेले. महादजी शिंदेनी उत्तरेत आले महत्त्व वाढविल्यामुळे तुकोजी होळकर आणि होळकरांचे जुने नवे सरदार दुय्यम प्रतिचे ठरले. होळकर घराण्यांत अंतर्गत निर्माण झाला तुकोजी होळकरांची मुले आपापसांत लढत होती. अहिल्याबाईला अनेक कौटूंबिक क्लेश सहन करावे लागले. जावई यशवंतराव फणसे यांच्या मृत्यूनंतर अहिल्याबाईंची मुलगी मुक्ताबाई सती गेली, नातू धोंडीबा मरण पावला. त्यापूर्वीच एकुलत्या एका मुलाचे निधन झाले होते. अशी अनेक संकटे आली तरी अहिल्याबाई धिराने राज्यकारभार करीत होत्या. होळकरशाहीच्या रक्षणार्थ प्रयत्नांची शिकस्त करीत होत्या. ४ सप्टेंबर १७९५ राजी अहिलाबाईंचे निधन झाले. त्यानंतर होळकर संस्थानात श्रेष्ठ बुद्धीची व शुद्ध आचरणाची व्यक्ती राहिली नाही.

यानंतर तुकोजी होळकरांनी, होळकर संस्थानाची व्यवस्था पाहण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यांचेही शरीर रोगग्रस्त झाले होते. १५ ऑगस्ट १७९७ राजी तुकोजी होळकरांचा मृत्यू झाला. तुकोजीला चार मुले होती. परंपरेनुसार थोरला पुत्र काशीराव होळकर याच्याकडे होळकरांची गादी जायला पाहिजे होती. परंतु, काशीनाथ होळकर वेडसर असल्यामुळे त्याला गादी देऊनये असे इतर तिघा भावांचे म्हणणे होते. परंतु, पेशवा दुसऱ्या बाजीरावाने दौलतराव शिंद्यांच्या सल्ल्यानुसार काशीनाथ होळकरांच्या नावाने वस्त्रे पाठविली म्हणून इतर तिघे होळकर बंधू न्याय मागण्यासाठी पुण्यास आली. त्यावेळी दौलतराव शिंदेने ~~मल्हारराव होळकर दुसरा याचा खून घडवून आणला. म्हणून उरलेले दोघे बंधू पळून गेले~~

आणि त्यांनी पेशव्यांविरूद्ध दंगेधोपे सुरू केले म्हणून या फौजेने विठोजीच्या पाठलागावर आपली फौज रवाना केली. या फौजेने विठोजीला जिवंत पकडून बाजीरावाने त्यास ठार केले. त्यामुळे संतप्त यशवंतराव होळकराने दुसऱ्या बाजीरावावर स्वारी केली आणि बाजीरावाचा पराभव केला. अपमनित झालेल्या दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांचा आश्रय घेतला. इंग्रज आणि बाजीराव यांच्यात वसईचा तह घडून आला.

बाजीराव इंग्रजांची मदत घेवून यशवंतरावावर चालून येत असतांना यशवंतरावाने, दौलतराव शिंदेची मदत घेण्याचा प्रयत्न केला. परंतु दौलतरावाने यशवंतरावाला कोणतीही मदत न केल्यामुळे यशवंतराव इंग्रज येण्यापूर्वी पुणे सोडून निघून गेला. यानंतर इंग्रजांनी बाजीराव पेशव्याला बरोबर घेवून शिंदे, होळकर, भोसले यांच्या बरोबर युद्ध केले. यालाच इंग्रज-मराठा द्वितीय युद्ध असे म्हणतात. या युद्धाच्या वेळी परस्परांना एकमेकांविषयी वाटणाऱ्या अविश्वासामुळे त्यांच्यात एकोपा निर्माण होवू शकला नाही. मराठा सरदारांमध्ये एकजूट निर्माण होणार नाही आणि त्यांच्यातील वैरभावना सतत प्रज्वलीत राहील अशी काळजी इंग्रजांनी घेतलजी. त्यामुळे यशंवतरावाला इतर सरदारांची युती करण्यात अपशय आले.

उत्तरेकडे जाणाऱ्या यशवंतरावाच्या पाठलागावर इंग्रज फौजा होत्या. यशवंतरावाने जाट, मोगल बादशहा आणि शेख यांची मदत घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्यात यश आले नाही. शेवटी एकट्या पडलेल्या यशवंतराव होळकराला इंग्रजाशी तह करण्यावाचून दुसरा पर्याय उरला नाही. १८०५ मध्ये इंग्रज आणि होळकर यांच्यात राजघाटचा तह घडून आला. यानंतर यशवंतराव होळकरांची परिस्थिती अधिकाधिक बिघडत गेली. द्रव्याच्या अभावी त्याचे सैनिकही त्याला सोडून जाऊ लागले. यशवंतरावाच्या डोक्यावर परिणाम होवून तो १८११ मध्ये मरण पावला, यानंतर यशवंतरावाचा मुलगा मल्हार तिसरा हा कारभार पाहू लागला. त्याच्याच कारकिर्दीत इंग्रज-मराठा संघर्ष सुरू डला आणि पेशव्यांच्या बरोबर १८१८ मध्ये होळकरांच्या राज्यावरही इंग्रजांचा अंमल प्रस्थापित झाला.

### ३. शिंदे घराणे

सेंद्रक या क्षत्रिय कुलाच्या नावापासून शिंदे या नावाची उत्पत्ती सांगितली जाते. बहमनी अंमलापासून कित्येक मराठा घराणी उदयास आली त्यापैकी शिंदेच एक घराणे होय. सातारा जिल्ह्यातील कण्हेरखेर गावचे पाटील शिंदे जमीन जुमला सांभाळून होते. शाहू महाराज मोगलांच्या कैदेत असतांनाच कण्हेरखेरच्या शिंदे पाटील कुटूंबातील मुलीशी त्यांचा विवाह झाला होता. याचा अर्थ राणोजीपूर्वीही हे घराणे मान्यता पावलेले होते.

२० ऑक्टोबर १७३१ रोजी राणोजीला माळवा सुभ्याचा सुभेदार म्हणून नियुक्त करण्यात आले आणि माळवा सुभा शिंदे घराण्याचे मुख्य कार्यक्षेत्र बनला. उज्जैन येथे शिंद्यांची मुख्य कचेरी आणि छावणी होती. १७४५ मध्ये राणोजीच्या मृत्यूनंतर शिंद्यांच्या जहागिरीवर जय्यप्पाची नेमणूक करण्यात आली. राणोजी शिद्यांना जयाप्पा, दमाजी आणि ज्योतिबा आणि दुसऱ्या पत्नीपासून महादजी आणि तुकोजी अशी मुले होती. ज्योतीबा राणोजीच्या ह्यातीतच मरण पावला होता. इतर चौघांनी मोठे पराक्रम गाजविले. मराठा-जाट संघर्षत बिजेसिंगाने मारेकरी पाठवून जयाप्पाचा खून करविला. जयाप्पाचा भाऊ

दमाजीने आवेशाने मोहिम चालविली. दरम्यानच्या काळात मोगल बादशहावर अहमदशहा अब्दालीची आक्रमणे सुरू झाली. अब्दालीच्या बंदोबस्तासाठ दमाजी बरारी घाटांत मुक्कामाला असतांना दमाजीला गोळी लागली आणि या युद्धात दमाजी ठार झाला. जयाप्पाचा पुत्र जनकोजी यांच्या पायाला गोळी लागली. विश्वासू सैथनकांनी त्याला पिछाडीला हटविले. यानंतर उद्‌भवलेल्या पानिपतच्या लढाईत शिंदेशाही पथकाचा नाश झाला. तुकोजी युद्धात मारला गेला. जनकोजी भैर झाला. शत्रुंनी कोणतीही दयामाया न दाखविता जनकोजीला ठार केले. सुदैवाने या रणक्षेत्रातून जीव वाचवून महादजी शिंदे माळव्यांत परत आले. महादजी शिंदे यांची माधवराव पेशव्यांने शिंदेच्या जहागिरीवर नेमणूक केली. महादजीने पानिपतच्या पराजयाचे अपयश धुवून काढले. १७८४ ते १७९४ अशी दहा वर्षे बादशाहीचा कारभार चालवून मराठ्यांची सत्ता उत्तरेत पुन्हा प्रस्थापित केली. मराठ्यांना उत्तरेत पुन्हा प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. पानिपतानंतर १७९५ पर्यंत उत्तर हिंदूस्थानचे राजकारण हे महादजी भोवती फिरर होते आणि महादशी म्हणेल ती पूर्वदिशा अशी परिस्थिती उत्तर हिंदूस्थानात निर्माण झालेली होती. महादजी शिंदेनी ॲडीबॉईन सारख्या फ्रेंच सेनापतीच्या नेर्तृत्वाखाली कवायती फलटणी उभारल्या. तीस हजार कवायती सैन्य, त्यांना लागणारा तोफखाना, लहान मोठ्या बंदूका, त्यांना लागणारे गणवेश महादशी शिंद्यांनी तयार केले. या कवायती फौजांच्या जोरावर महादजी शिंद्यांनी बादशाहीचा कारभार आपल्या हातात घेवून सर्व देशांचे राजकारण चालवावयाचे मराठ्याचे स्वप्न खरे करून दाखविले. १७९४ मध्ये सवाई माधवराव पेशव्यांची भेट घ्यावी. हिशोब सादरकरावे, आपल्याला मिळालेले मानमरातब पेशव्यास सादर करावे, सर्व प्रश्नांवर चर्चा व्हावी, मतभेद मिटवावेत म्हणून महादजी दक्षिणेत आले. महादजी-नाना फडणीस या दोघांत दिलजमाई घडून आली. गैरसमज दूर झाले. दक्षिणेत वास्तव्याला असतानाच एकाएकी आजारी पडून महादजी शिंदे मरण पावले.

महादजी शिंदेना मुलगा नव्हता. म्हणून महादजी शिंदे यांन मृत्यूपूर्वी काही महिने अगोदर आपल्या भावाचा नातू दौलतराव शिंदे यास दत्तक घेतल होते. महादजींच्या नंतरयाच दौलतरावाला शिंदेंची जहागिरी मिळाली. माधवराव पेशव्यांच्या अपघाती मृत्यूनंतर दौलतराव आणि नाना फडणीस यांच्यात जीवघेणी स्पर्धा सुरू झाली. दौलतरावाजवळ सामर्थ्यशाजी तोफखाना होता आणि त्या तोफखान्याची नाना फडणीसाला भिती वाअत होती. यांत अनेक उलट-सुलट कारस्थाने होवून शेवटी भरपूर लाभ घेऊन दौलतरावाने दुसऱ्या बाजीरावाला पेशवा म्हणून मान्यता दिली. त्यामुळे नाना फडणीसाला बाजरावास पेशवा म्हणून स्विकारावे लागले.

दौलतरावाला कबुल केलेला पैसा नव्या पेशव्याजवळ नव्हता. तेव्हा राजधानी पुणे लुटून पैसा उभारण्याची योजना शिंदे-पेशवे यांनी आखली आणि दौलतराव शिंदेचे सारसरे सर्जेराव घाडगे यांनी ती पार पाडली. सरदार-सावकार नागवले, भल्याभल्यांची विटंबना केली. मालकांना गरम राखेचे तोवरे देवून उन्हांत त्यांच्या डोक्यावर धोंडे त्यांच्या वाड्यांच्या खणत्या केल्या. जनतेचे फार मोठ्या प्रमाणावर हाल केले.

शिंदे-होळकर माळव्यातील पेशव्यांचे बरोबरीचे सरदार परंतु, गेल्या २५ वर्षात महादजी शिंदेंनी शिंदेशाहीचा उत्कर्ष केला. कवायती फौजा उभारून अनेक शत्रूंचा नायनाट

केला. सतलज ते नर्मदा असे राज्यनिर्माण केले.त्यामुळे होळकरांना त्यांच्याविषयी वैश्यम्य वाटू लागले. त्यामुळे शिंदेच्या विरोधात उत्तरेत त्याचा करावाया सुरू झाल्या. म्हणून दौलतराव शिंद्यांना १८०१ मध्ये उत्तरेत जावे लागले. शिंदे आणि होळकर यांच्यात युद्ध झाले. पेशव्यांनी मध्यस्थी करून हा प्रश्न सोडवावा असा प्रयत्न यशवंतराव होळकरांने केला. परंतु, पेशव्याने मात्र याकडे लक्ष दिले नाही. पुण्याच्या जवळ हडपसर येथे होळकरांच्या फौजेने शिंद्यांना पाडाव केल्यामुळे पेशवा वसईला इंग्रजांच्या आश्रयाला निघून गेला.

इंग्रजतर संधीची वाटच पाहत होते.मरसठी राज्यातील अहराजकतेचा फायदा घेण्याचे इंग्रजांनी ठरविले. पेशव्याबरोबर वसईचा तह केला आणि सर्व मराठा सरदारांनी तो तह मान्य करावा असे त्यांना कळविले. वसईचा तह मान्य करणे म्हणजे आपले सर्वस्वी गमावणे हे दौलतरावाला कळून चुकले होते. म्हणून त्याने होळकर, भोसले यांच्याशी संधान बांधर्णयाचा प्रयत्न केला परंतु, आता खूप उशिरा झाला होता. शिंदे-इंग्रज यांच्यात युद्ध होवून १८०४ मध्ये दौलतराव शिंद्यांनी ब्रिटीशांच्या तैनाती फौजेचा स्विकार केला. महादजी शिंद्यांनी महत्प्रयत्नाने मिळविलेले राज्य दौलतरावाने केवळ दहा वर्षात नष्ट केले.

* मराठ्यांची प्रमुख सरदार घराणी

१. पवारद झराणे

मराठ्यांच्या इतिहासात ज्या घराण्यांनी स्वराज्य स्थापनेसाठी आणि त्यानंतर स्वराज्याचा विस्तार करण्यासाठी पराक्रम गाजविलाआणि बहुमोल कामगिरी बजावली, अशा घराण्यांत पवार घराण्याचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. पवार घराण्याचा संबंध राजपूत, परमार घराण्यांशी जोडला जातो. या घराण्याचे मूळ वास्तव्य माळव्यात धार येथे असल्याचे ऐतिहासिक पुरावे सापडतात. त्यांची एक शाखा १७ व्या शतकाच्या सुरुवातीला महाराष्ट्रात आली आणि तेव्हापासून पवार महाराष्ट्राच्या इतिहासाशी निगडीत झाले.

या शाखेचा मूळ पुरुष साबुसिंग उर्फ शिवजी पवारहोता. देवास आणि धार येथील पवार घराण्याच्या राज्यकर्त्यांचे मूळ पुरुष साबुसिंग हेच मानले जातात. स. १६५७ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी कल्याणवर स्वारी केली. या स्वारीत साबुसिंगाने पराक्रम गाजविला. तेव्हापासून साबुसिंग छत्रपती शिवजी महाराजांच्या विश्वासातील मानला जावू लागला.

साबुसिंगाने अहमदनगर सुभ्यात सुखेवाडी उर्फ सुपे हे गाव वसविले. शिवाजी महारजांनी साबुसिंगाला सुप्याची पाटीलकी दिली होती. सुप्याला लागून असलेल्या हंगे गावाशी साबुसिंगाच्या अनेकदा कटकटी होत. अशाच एका झटापटीत इ.स. १६८५ मध्ये साबुसिंग मारला गेला.

साबुसिंगाच्या नंतर त्याचा मुलगा कृष्णाजी पवार याला इ.स. १६७७ मध्ये छत्रपती शिवाजी महारजांनी आपल्या पागेचा खास सरदार म्हणून नियुक्त कले. अफझलखान आणि त्याचा मुलगा फाजलखान याच्याशी झालेल्या लढाईत कृशणाजी पवार महाराजांबरोबर होता. या दोन्ही प्रसंगी कृष्णाजी पवाराने महत्त्वाची कामगिरी बजावल्यामुळ त्याच्यावर खूष होवून महाराजांनी त्याला कणगी आणि करणगाव ही दोन गावे इनाम दिली. सुपे कढी असलेली गादी कृष्णाजीनेच बांधलेली आहे.

कृष्णाजीनंतर बुबाजी, रामाजीव केरोजी या त्याच्या तीन पुत्रांनी कृष्णाजीचा वारसा चालविला. तिघांनीही पुढे मराठ्यांच्या इतिहासात अतुलनिय पराक्रकम गाजविला. बुबाजी हा छत्रपती शिवजी महाराजांच्या खास पागेचा निवडक तेहतीस सरदारांपैकी एक सरदार होता. या तिघा बंधूंनी कर्नाटक स्वारीच्या वेळी महत्त्वाची कामगिरीबजावली होती.

छत्रपती संभाजी महारजांच्या वधानंतर मराठेशाहीवर जे संकट कोसळले त्यावेळी राजाराम महाराजांनी पवार घराण्यांतल या तीनही बंधुंना महाराष्ट्रात मोगल सैन्याच्या विरूद्ध निरनिराळ्या ठिकाणी पाठविले. बुबाजी आणि केरोजी यांनी मोठी फौज वाढवून गोदावरीच्या काठी आणि वऱ्हाड प्रांतात अनेक ठिकाणी मोगलांवर हल्ले केले. उत्तरेकडून दक्षिणेत बादशहाच्या छावणीसाठी येणारा दाणागोटा व इतर सामान लुटले. मोगल सैन्याला अनेकदा अडचणीत आले. सर सेनापती संताजी घोरपडे लुटीत असता मोगल सैन्याधिकारी हिम्मतखान याने त्याला घेरले. तेव्हा बुबाजी पवार याने आपल्या फौजेसह हिम्मतखानावर अचानक हल्ला करून संताजीवर आलेले संकट नाहिसे केले.

बुबाजी आणि त्याचा भाऊ करोजी यांच्या या कामगिरीवर खुष होवून छत्रपती राजारामाने बुबाजीस विश्वासराव अशी सन्मानदर्शक पदवी दिली. तरी केरोजीस सेनाबारासहस्ती हे बहुमानाचे पद दिले. त्याशिवाय त्यांना सरंजामही दिला. अशी अनेक जोखमीची कामे बुबाजी आणि त्यांचे बंधूनी पार पाडली. बुबाजीस खानदेशाच्या एका लढाईत मोगलांनी पकडले. मोगलांची चाकरी केल्यास सरंजाम देऊ असे प्रलोभनही दाखविले ते झिडकारल्यामुळे मोगलांनी बुबाजीला आशीरगडच्या किल्ल्याच्या बुरुजात चिणून ठार केले.

छत्रपती राजाराम महाराजांनंतर महाराणी ताराबाईच्या कारकिर्दीतही पवार बंधूंच्या कामगिरीचे अनेक उल्लेख आढळतात. इ.स. १७०३ मध्ये औरंगजेबाने सिंहगडास वेढा दिला त्यावेही काळोजी व संभाजी पवार यांनी इतर मराठे सरदारांबरोबर होवून माळव्यात बऱ्हाणपूर, उज्जेन व खरगोण या शहरांवर हल्ले चढविले. त्यांनी मांडवगडाला वेढा घातला असता, मांडवगडच्या मोगल फौजदाराने किल्ला सोडून दिला व तो धार येथे आश्रयाला गेला. इ.स. १७०४ मध्ये या भागातील मोगलसत्ता नष्ट करण्यासाठी काळोजी पवारांनी फार मोठी कामगिरी बजावली. त्याचा मोबदला म्हणून महाराणी ताराबाई साहेबांकडून काळोजी पवाराला खानदेशात सरांजामी मुलूख मिळाला. मार्च १७२६ मध्ये काळोजीचे निधन झाले आणि त्याचा पुत्र कृष्णाजी पवार (दुसरा) यास विश्वासराव पदाचा सरंजाम मिळाला. छत्रपती शाहू महाराजांची २ नोव्हेंबर १७२० ची सनद उपलब्ध आहे.

काळोजीस कृष्णाजी, तुकोजी, जीवाजी व मानाजी असे चारपुत्र होते. त्यापैकी जेष्ठ पुत्र कृष्णाजीस काळोजी पवाराचा सरंजाम मिळाला. शाहू माराजांचे पेशवे बाळाजी विश्वनाथ यांनी इ. स. १७१८ मध्ये दिल्लीची मोहिम सुरू केली. या मोहिमेत पवार घराण्यातील कृष्णाजी राव पवार, विश्वासराव, तुकोजीराव, उदाजीराव व आनंदराव यांनी सहभाग घेतला.

थोरल्या बाजीराव पेशव्यांच्या कारकिर्दीत कृष्णाजीराव पवारांनी महत्त्वाची कामगिरी पार पाडली. बाजीरावाने गुजराथ व माळवा हे दोन प्रांत जिंकून घेतले. त्या कामी कृष्णाजी पवारांचे सहाय्य बाजीरावास मिळाले. उत्तरेकडील स्वाऱ्यांप्रमाणेच दक्षिणेकडील स्वाऱ्यांतही

पेशव्यांबरोबर कृष्णाजी पवाराने भाग घेतला. इ. स. १७२५-२६ च्या बाजीरावाच्या कर्नाटक मोहिमेत त्रिंबकराव दाभाड्यांबरोबर कृष्णाजी पवार स्वारीत होते. ही स्वारी इतिहासात चितळदुर्गाची स्वारी म्हणून ओळखली जाते. कृष्णाजी पवारांनी बनविलेल्या अशा महत्त्वाच्या कामगिरीबद्दल शाहू महाराजांनी त्यांना सुरसुभा असा सन्माननीय किताब देवून गौरविले.

थोरल्या बाजरावाच्या निजामाविरूद्धच्या पालखेडाच्या मोहिमेत उदाजी पवार, आनंदराव पवार, कृष्णाजी पवार, तुकोजीराव पवार, मालोजीराव पवार असे पवार घराण्याती पाच पुरूष सहभागी झाले होते. या मोहिमेत पवार घराण्यातील पुरुषांनी जे शौर्य गाजविले त्याची वाखाणणी स्वतः बाजीरावाने छत्रपती शाहू महाराजांपुढे केली. इ.स. १७१७-२८ मध्ये कृष्णाजी पवार याने गुजरातच्या मोहिमेतही शौर्य गाजविले आणि त्या प्रांतावर मराठ्यांचे वर्चस्व प्रस्थापित केले. शाहू महाराजांनी गुजरातचा अंमल पवारकडे सोपविल्यामुळे सेनापती दाभाडे दुखावले गेले. त्यामुळे दाभाड्यांनी पवार आणि पेशवे यांच्या प्रांतात धामधुम सुरू केली. त्यामुळे पेशव्यांनी योजना आखून गुजरात प्रांतातील मोकाशाचे दोन भाग उदाजी पवार आणि एक भाग मल्हारराव होळकरांस देण्यात आला. या योजनेमुळे उघड उघड दोन पक्ष निर्माण झाले (पेशवे आणि सेनापती).

पवार घराण्याची मूळ परंपरा राजपूत परमार यांच्याशी जोडली जाते. हे परमार घराणे माळव्यात उज्जैन, धार, देवास आणि सभोवतालच्या प्रदेशात राज्य करीत होते. त्यामुळे साहजिकच  बाजीराव पेशव्यांनी माळवा जिंकल्यानंतर तो प्रदेश तुकोजीरावाकडे सोपविला. इ.स. १७३२ पासून तुकोजीरावाने देवास येथे आपले मुख्य ठाणे बसविले. तेव्हापासूनहे संस्थान विलीन होईपर्यंत पवार घराण्यांच्याच ताब्यात होत. १७३०-३२ मध्येच धारचा प्रदेश मराठ्यांच्या ताब्यात आला आणि धार हे संस्थानही पवारांच्या ताब्यात देण्यात आले. अशारितीने माळव्यात धार आणि देवास ही दोनही ठिकाणी पवारांच्या सभेची मुख्य केंद्रे होती.

चिमाजी अप्पाने सुरू केलेल्या वसईच्या मोहिमेतही तुकोजी पवाराने महत्त्वाची कामगिरी बजावली. या मोहिमेत पोर्तुगिलांच्या तोफांचा भडिमार चालू असतांनाही, तारापुरावर तुकोजी पवाराने मराठ्यांचा झेंडा लावला आणि वसई मोहिमेच्या शेवटच्या हल्ल्यातही मोठा पराक्रम गाजविला. तुकोजी पवारची ही कामगिरी लक्षात घेवून शाहू महाराजांनी तुकोजीला जरीपटक्याचा मानमरातब आणि सेनासप्तसहस्ती हा किताब दिला.

पवारांच्या पराक्रमाला खरेखुरे प्रोत्साहन बाजीराव पेशव्याने दिले होते. माळव्यात पवार घराण्याची स्थापना ही बाजीरावानेच केली होती. म्हणूनच बाजीराव पेशव्याच्या निधनानंतर तुकोजीराव पवाराने नानासाहेब पेशव्यांशीही दृढ संबंध ठेवले होते. तुकोजी पवाराला पुत्र संतती नसल्यामुळे त्याने पवाराचा, विश्वासराव याचा थोरला मुलगा कृष्णाजीराव यास दत्तक घेतले.

तुकोजी पवार नानासाहेब पेशव्याने काढलेल्या बूंदेलखंड, रोदिलखंड आणि राजपुताना येथील मोहिमातही सामील होता तसेच सुरजमल जाटाच्या विरूद्ध झालेल्या लढाईत मुख्यता कुंभेरीच्या वेढ्यात पवारांच्या फौजा आघाडीवर होत्या. नोव्हेंबर १७५४ च्या

नागोर वेढ्यांत तुकोजी पवार यांचे निधन झाले. पानिपतपूर्वी तीन वर्षे आधी मराठ्यांच्या फौजा उत्तर हिंदुस्थानात अनेक ठिकाणी लढाया देत होत्या. त्यात कृष्णाजीपवारांच्या सैन्याचा समावेश होता. पानिपतातही कृष्णाजी पवार, जीवाजी पवार यांच्या फौजांनी भाग घेतला होता. पानिपतानंतर थोड्याच दिवसांत माधवराव पेशवे यांनी राज्याची घडी नीट बसविली. यानंतर कृष्णाजी पवार आल्या फौजेनिशी माधवराव पेशव्यांना येऊन मिळाले. पेशव्यांनी पवारांना माळव्यातील आणखी काही मुलूख दिला. तसेच उत्तर हिंदुस्थानातून मिळणाऱ्या खंडणीपैकी शेकडा १२ रुपये पवार बंधूंना देण्याचे पेशव्याने मान्य केले.

माधवराव पेशव्याच्या नंतर निर्माण झालेल्या बारभाई मंडळालाही पवारांनी सहकार्य केले. पवारांच्या पराक्रमाचा परमोच्च बिंदू खर्डीच्या लढाईत दिसून येतो. खर्ड्याची लढाई इ.स. १७९५ मध्ये मराठी आणि निजाम यांच्यात झाली. या लढाईत सवाई माधवराव पेशवे, नाना फडणीस, रघुजी भोसले, दौलतराव शिंदे, तुकोजी होळकर, फत्तेसिंग गायकवाड, परशुराम भाऊ पटवर्धन यांच्या बरोबर विश्वासराव घराण्याचे राणोजी पवार, देवास थोरल्या पातीचे दुसरे तुकोजीराव पवार सेनासप्तसहस्ती धारचे आनंदराव पवार, नगरदेवळ्याचे दुसरे शिवराम पवार आणि फलटणचे मल्हारराव पवार अशी प्रमुख पवार मंडळी आपापल्या फौजेनिशी सामील झाली होती.

खर्ड्याच्या लढाईनंतर मराठा राज्यात अनेक कट कारस्थाने होऊ लागली. मराठा राज्याला एका अर्थाने उतरती कळा लागली. नाना फडणीसाच्या मृत्यूनंतर दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांशी तैनाती फौजेचा तह करून आपले स्वातंत्र्य गहाण टाकले. त्यामुळे धार आणि देवास या पवार घराण्यांच्या राज्याचा मराठ्यांच्या केंद्र सत्तेचा आधार राहिला नाही. १८०१ च्या सुमारास दौलतराव शिंदेंनी तुकोजी पवारांच्या परगण्यांवर हल्ले चढविले याच सुमारास दुसऱ्या बाजीरावाने हिंदुस्थान व माळवा आणि दक्षिणतेतील पवारांचे महाल व त्यांना मिळणारी खंडणी जप्त केली.

होळकरांच्या ससेमिराही पवारांच्या मागे लागला होता. पेंढाऱ्यांनीही मावळ्यात धुमाकूळ घातला होता. अशा अनेक अडचणीतून सुटण्यासाठी धार-देवास येथील पवारांनी इंग्रजांशी तहाची बोलणी सुरू केली आणि पवार व इंग्रज यांच्यात १२ डिसेंबर १८१८ रोजी तैनाती फौजेचा करार होवून पवारांचे स्वतंत्र अस्तित्व संपले. धार-देवास इंग्रजांच्या सत्तेखालील संस्थाने बनली.

भारत स्वातंत्र झाल्यानंतर धार व देवास ही पवार घराण्याची संस्थाने १९४८ मध्ये भारतात विलीन झाली.

## १०.३ स्वयं अध्ययन प्रश्न

१. इस्लामचा भाषेवरील परिणाम स्पष्ट करा.

..............................................................................................

..............................................................................................

..............................................................................................

२. सामाजिक व सांस्कृतिक परिणाम थोडक्यात लिहा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील प्रमुख मराठा घराण्याचें मत्त्व स्पष्ट करा.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

**टीपा लिहा**

१. पवार घराणे.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

२. होळकर घराणे.

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

३. शिंदे घराणे

.......................................................................................

.......................................................................................

.......................................................................................

## १०.४ सरांश

अशारितीने या घटकांत आपल्या मराठा साम्राज्यावर इस्लामचा झालेल्या प्रभावाबाबत भाषा, सामाजिक व सांस्कृतिक परिणात आणि मध्ययुगीन भारतातील मराठी घराण्यांचे महत्त्व या मुद्द्यांच्या अधारे सविस्तर अभ्यास केला.

## १०.५ पारिभाषिक शब्द

१. अचकन – लांब कळीदार अंगरखा, बंद गळ्याचा आखूड कोट.

२. जनानखाना – राणीवसा, अिंतःपुर, असे ठिकाण की जेथे स्त्रिया राहतात.

३. सुफी – मुसलमानांतील एक उदारमतवादी संप्रदाय, सर्व धर्मावर प्रेम करणारा.

## १०.६ अधिक वाचनासाठी पुस्तके / संदर्भ सूची

१. यु. म. पठाणन (१९९०) मराठी बखरीतील फारशी महत्त्व, औरंगाबाद.

२. A. R. Kulkarni (1996) Medieval Maharashtra. Ne Delhi.

३. म. श्री. माटे (१९९५) मध्ययुगीन महाराष्ट्र, १३००-१६५०, मुंबई.

४. अ. रा. कुलकर्णी (२०१३) मराठी आणि महराष्ट्र, पुणे.

# एम . ए . इतिहास
# द्वितीय वर्ष

# पेपरः 4

## आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास

## घटक १
# आधुनिक महाराष्ट्राची पार्श्वभूमी

**अनुक्रमणिका:**


**१.० उद्दिष्टे**

**१.१ प्रस्तावना**

**१.२ विषय विवेचन**

**१.२.१ महाराष्ट्र ष्ट्र ब्रिटिश सत्तेचा प्रवेश व वर्चस्व**

**१.२.४ अ) ब्रिटिशांच्या विजयाकालीन महाराष्ट्राची राजकीय स्थिती**

**ब)सामाजिक-आर्थिक परिस्थिती**

**१.२.५ ब्रिटिश वसाहतिक राज्याचा प्रभाव-**

**अ)प्रशासकीय**

**ब)सामाजिक**

**क)वैचारिक**

**१.३ स्वयां अध्ययनासाठी प्रश्न**

**१.४ सारांश**

**१.५ पारिभाषिक शब्द/संज्ञा/संकल्पना**

**१.६ संदर्भ सूची/अधिक वाचनासाठी पुस्तके**

**१.७ सरावासाठीह प्रश्न/स्वाध्याय**


## १.० उद्दिष्टे

आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास पाहण्यापूर्वी आपण आधुनिक महाराष्ट्राची पार्श्वभूमी अभ्यासणार आहोत.या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हाला,

महाराष्ट्र शब्दाची उत्पत्ती व अर्थ सांगता येईल.

महाराष्ट्राच्या प्रचीन व मध्ययुगीन इतिहासाची थोडक्यात ओळख होईल.

महाराष्ट्रातील ब्रिटिश सत्तेचा प्रवेश विस्तार व वर्चस्व याबद्दल माहिती मिळेल.

ब्रिटिशांच्या विजयाच्या वेळी महाराष्ट्राच्या राजकीय,सामाजिक व आर्थिक परिस्थितीची कल्पना येईल.

# १.१ प्रस्तावना

आधुनिक महाराष्ट्राचा कालखंड १९ व्या शतकापासून सामान्यपणे सुरु होतो. इ.स.१८१८ मध्ये मराठ्यांचा पाडाव होऊन महाराष्ट्रात इंग्रजांची सत्ता प्रस्थापित झाली. हा महाराष्ट्राच्या इतिहासातील परिवर्तनाचा एक टप्पा मानला जातो, एका अर्थाने हा काळ महाराष्ट्राच्या दृष्टीने आधुनिकतेचा प्रारंभ म्हणता येईल.

एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्राच्या जडणघडणीचा म्हणजेच आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास विलक्षण रोमहर्षक आहे.उदारमतवादी न्या.रानडे, आद्य क्रांतिकारक वासुदेव बळवंत फडके, स्वातंत्र्यवीर सावरकर व त्यांचे सहकारी यांचे कार्य तसेच राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना,टिळक व गांधी युग, संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचे तेजस्वी पर्व या सर्व घटना महाराष्ट्राच्याच नव्हे तर भारताच्या इतिहासाचा अविभाज्य घटक आहेत.हा सर्व इतिहास पाहण्यापूर्वी आपणास या इतिहासास कारणीभूत असलेल्या पार्श्वभूमीचा विचार करणे, अभ्यास करणे अत्यंत आवश्यक आहे.याच आधुनिक महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. पानिपत (१७६१) च्या युद्धानंतरच्या महाराष्ट्रात निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीचा लाभ इंग्रजांनी घेतला. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणत इंग्रजांचा प्रवेश जसा मराठी सत्तेच्या पाडावास कारणीभूत ठरला तसा महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाली कारणीभूत ठरला इ.स.१८१८ मध्ये महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता स्थापन झाली, त्याचे राजकीय,सामाजिक, आर्थिक, वैचारिकदृष्टया चांगले-वाईट परिणाम महाराष्ट्रावर झाले,या सर्व घटकांचा अभ्यास आधुनिक महाराष्ट्र अभ्यासण्यापूर्वी गरजेचा आहे. या आधुनिकतेचा प्रारंभ होण्यापूर्वीचा प्राचीन व मध्ययुगीन महाराष्ट्र कसा होता याचाही विचार आपण या घटकात करणार आहोत. त्यामुळे पुढील आभ्यासाची एक चौकट तुमच्या मनात तयार होईल. कारण पुढील सर्व इतिहास या पार्श्वभूमीवरच आपणास अभ्यासावयाचा आहे.

# १.२ विषय विवेचन

## १.२.१ महाराष्ट्र- मूळ व व्याप्ती.

महाराष्ट्र ही भौगोलिक संज्ञा प्राकृत शब्द 'महारठी' यापासून आलेली आहे. ज्याचा उल्लेख कान्हेरी,नाणेघाट,कार्ले,बेडसे इ.लेण्यांमधील शिलालेखांमध्ये आढळतो. या महारठींची नाणी महाराष्ट्रातील कराड, कोल्हापूर व कर्नाटकातील कारवार, चित्रदुर्ग, चंद्रावल्ली या परिसरात आढळली आहेत. या शिलालेखात व नाण्यांवरून हे स्पष्ट होते की रांगाच्या परिसरातील शासक होते.

महाराष्ट्र या शब्दाच्या उत्पत्तीबाबत विद्वानांत एकमत आढळत नाही.बर्जेस या विद्वानाच्या मते महारठी म्हणजे पुराणकाळातील योद्धे होते,मौर्य काळात प्रांताच्या प्रमुखास 'राष्ट्रीय' म्हणले जाई. त्यावरून 'महाराष्ट्रीय असा शब्द आला असावा असे काही विद्वानांना वाटते. तर महावंशच्या बौद्ध ग्रंथात 'महारठी' या शब्दाचा उल्लेख आढळतो. अशोकाच्या शिलालेखात 'राष्ट्रीक' लोकांचा उल्लेख आढळतो. सातवाहन काळात याच राष्ट्रीय लोकांचे एक मोठे राष्ट्र अर्थ महाराष्ट्र निर्माण झाले असावे. राष्ट्रीकांचा मोठा प्रदेश किंवा महान राष्ट्र असे महाराष्ट्र शब्दाचे मूळ आपापल्या परीने

संशोधकांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

रट्ट,महारट्ट,राष्ट्रीक,महाराष्ट्रीक हे शब्द महाराष्ट्र शब्दाच्या मुळाशी आहेत हे निर्विवाद होय. वरुची किंवा कात्यायन 'महाराष्ट्री प्राकृत' भाषेचा उल्लेख करतो; पण इ.स.च्या दुसऱ्या शतकातील श्रीधरवर्मनच्या शिलालेखात 'महाराष्ट्र' ही भौगोलिक संज्ञा उल्लेखिली आहे. ऐहोळे शिलालेखातही 'महाराष्ट्र' संज्ञेचा उल्लेख आहे. एवढेच नव्हे तर चिनी प्रवासी ह्युयन त्संग असा उल्लेख करतो की, पुलकेशी दुसरा हा राजा होता. डॉ. भांडारकरांच्या मते 'रट्ठ' चा संस्कृत शब्दाचेच संस्कृत रूप हे 'राष्ट्रीय' असून 'राष्ट्रीक' हे स्वतःला 'महाराष्ट्रीक' म्हणत असत.

जळगाव जिल्ह्यातील मेहूण येथील नवव्या शतकातील शिलालेखात 'महाराष्ट्र' हा शब्द व्यक्तीचनामवाचक आलेला आहे मात्र १२ व्या शतकातील अर्धापूर, जि. नांदेड येथील रट्ट प्रमुख बल्लाळ यांच्या शिलालेखात 'महाराष्ट्र' या भौगोलिक संज्ञेचा स्पष्ट उल्लेख आहे. येथून पुढे महाराष्ट्र म्हणजे मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश असा उल्लेख होत गेला. इ.स. १३३६ च्या बसव कल्याण येथील शिलालेखात कल्याण हे महाराष्ट्र मंडलचा भाग असल्याचे म्हटले आहे.

प्राचीन काळात दक्षिणपथ म्हणून उल्लेख होणाऱ्या प्रदेशात महाराष्ट्राचा समावेश होता. यासच दंडकारण्य असेही म्हटले जाई. हे सर्व उल्लेख पाहता महाराष्ट्र म्हणजे भौगोलिकदृष्ट्या पश्चिम भारताचा प्रदेश होय. ज्यात प्राचीन अश्मक, मुलक, कुंतल, विदर्भ व अपरांत या जनपदांचा समावेश होता असे दिसते. उत्तरेत नाशिकपासून दक्षिणेत कोल्हापूर व प. कर्नाटकपर्यंतचा भाग महाराष्ट्रात येत होता.

१९ व्या शतकात या पश्चिम भारताचा उल्लेख 'महाराष्ट्र देश' महाराष्ट्र भाषा या अर्थाने येतात. उदा.१८२२ मध्ये 'विदुरनीती' हा महाराष्ट्र भाषेत प्रकाशित झालेला ग्रंथ असा उल्लेख 'कुरिअर' या वृत्तपत्राने केला, तर १८२७ मध्ये महाराष्ट्र प्रयोग चंद्रिका हे व्याकरणविषयक पुस्तक प्रसिद्ध झाले. इ.स. १८४० साली 'दिग्दर्शक' या आपल्या मासिकात बाळशास्त्री जांभेकरांनी 'महाराष्ट्र भाषा' आणि महाराष्ट्र देशाचा नकाशा असे उल्लेख केलेले आढळतात.तर भाऊ महाजन 'प्रभाकर' मध्ये महाराष्ट्र मुलख असा उल्लेख करतात. इ.स. १८४३ मध्ये रामकृष्ण विश्वनाथ आपल्या ग्रंथात 'महाराष्ट्र लोक' व 'महाराष्ट्र लोकांचे राज्य' असे शब्दप्रयोग करतात तर १८६६ मध्ये बाबा पद्मनजींच्या पुस्तकाचे नावच 'महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास' असे आहे.

थोडक्यात महाराष्ट्र ही संज्ञा फक्त भौगोलिक नसून ती भाषिक आहे. मूलतः व मुख्यतः मराठी मातृभाषा असलेल्या लोकांचा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र होय. या व्याख्येच्या आधारावरच आजचा आधुनिक महाराष्ट्र निर्माण झाला आहे. एवढेच नव्हे तर संयुक्त महाराष्ट्राची चळवळ याच वैचारिक पार्श्वभूमीतून निर्माण झाली होती व यशस्वी झाली हे लक्षात घेणे गरजेचे आहे.

ब्रिटिश राजवटीत महाराष्ट्राची व्याप्ती मुंबई इलाख म्हणजेच खानदेश, अहमदनगर, पुणे व सातारा हा प्रदेश तसेच कोकण, नाशिक, ठाणे, सोलापूर या प्रदेशापुरतीच होती व आजच्या महाराष्ट्रात असलेला मराठवाडा हा प्रदेश हैदराबादच्या निजाम राजवटीखाली होता.तर विदर्भाचा समावेश ब्रिटिश वर्चस्वाखालील 'विदर्भ' आणि मध्यप्रांत यामध्ये होता. महाराष्ट्र हा शब्द फक्त भौगोलिक नसून तो विशेषतः मराठी भाषा, संस्कृतीच्या व मानसिकतेच्या दृष्टीने उपयोगीला जातो.

एकूणच महाराष्ट्र या शब्दाची कूळकथा व व्याप्ती उपरोक प्रमाणे व्यापक आहे. आधुनिक महाराष्ट्राचा विचार करताना ही व्याप्ती लक्षात घेणे आवश्यक आहे.

## १.२.२ महाराष्ट्र–प्राचीन व मध्ययुगीन कालखंड

महाराष्ट्राच्या भूगोलाचा विचार केल्यास असे जाणवते की, गोदावरी, कृष्णा, भीमा, प्रवरा, निरा, पूर्णा इ. नद्यांच्या खोऱ्यात महाराष्ट्र संस्कृती बहरली. महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीतूनच या भूप्रदेशाचा इतिहास आकारास आला आहे. महाराष्ट्राच्या भूगोलाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य म्हणजे ती एक संयोगभूमी असून उत्तर-दक्षिण तथा पूर्व-पश्चिम यांच्या भौतिक तथा सांस्कृतिक आदान-प्रदानाचे क्षेत्र आहे. त्यामुळे अनादी काळापासून यांना जोडणारे मार्ग, सार्थ वाह पथ या भूमीतून, तेथील महत्त्वाच्या घाटांतून जातात. यासाठी सह्याद्री, सातपुड्याचे घाट प्राचीन ऐतिहासिक काळापासून ज्ञात आहेत. याच मार्गाचे पुढे सांस्कृतिक मार्गात रूपांतर झालेले दिसते.

महाराष्ट्राची संस्कृतीची जडण-घडण होत असताना संबंधित क्षेत्रामध्ये सीमावर्ती प्रादेशिकतेचा प्रभाव जाणवतो. उदा. विदर्भावर मध्यप्रदेश व बस्तच्या आदिवासी जनजीवनाचा, खानदेशवर सुरत-अहमदाबादच्या गुजराती जनजीवनाचा, मराठवाड्यावर हैद्राबाद भालकी- गुलबर्गा असा तेलगू-कानडी संमिश्र संस्कृतीचा, पश्चिम महाराष्ट्रावर भूमध्यसागरी प्रदेशातील लोकजीवनाचा प्रभाव पडलेला आहे. भौगोलिक परिस्थितीच्या इतिहासावर झालेल्या परिणामातून आधुनिक महाराष्ट्राची निर्मिती झाली.

### (अ) महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास–

महाराष्ट्राचा प्राचीन इतिहास अश्मयुगापासून आरंभ होतो. महाराष्ट्रात आद्य पुराश्मयुगीन अनेक स्थळे सापडली आहेत. त्यापैकी नेवासे आणि गंगापूर (नाशिक) या दोन ठिकाणी शास्त्रशुद्ध उत्खनन झाले आहे. येथे सापडलेल्या हात कुऱ्हाडी (handaxe) आणि परशू (cleaver) या हत्यांवरून ही ओळख पटते. तर धुळे जिल्ह्यातील रंजाळा, जळगाव जिल्ह्यातील बहाळ, टेकवाडे आणि नागपूर जिल्ह्यातील माहुरझरी येथे सापडलेल्या अवशेषांवरून येथे महापाषाण युगीन संस्कृती (megalithie age) होती असे दिसते. काळाच्या ओघात महाराष्ट्रात विविध संस्कृतींचा उदय झाला. दायमाबार येथील उत्खननात सिंधुपुर्व काळातील एका ताम्रपाषाण, युगीन संस्कृतीचा शोध लागला. तिला सावळदा संस्कृती असे म्हटले जाते. याचप्रमाणे सिंधु संस्कृती माळवा संस्कृती, जीर्वे संस्कृती यांचा विकास महाराष्ट्रात झाला.

इ.स.पू. सहाव्या शतकात म्हणजे महाजनपद काळात अश्मक हे जनपद महाराष्ट्रात होते. हे गोदावरीच्या काठी आजच्या औरंगाबाद व अहमदनगर जिल्ह्याच्या प्रदेशात होते. पुढे मुलक (नगर जिल्हा), ऋषिक (खानदेश), भोगवर्धन (भोकरदन), विदर्भ इ. राज्यांचा उदय झाला.

प्राचीन काळात महाराष्ट्रात अनेक राजघराण्यांनी राज्य केले; यामध्ये सातवाहन, वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट व यादव ही प्रमुख घराणी होती. सातवाहन हे येथील आद्य राज्यकर्ते होत. सातवाहन पर्व म्हणजे महाराष्ट्राच्या इतिहासातील सुवर्णयुग होय, सातवाहनांच्या उदयाबरोबरच महाराष्ट्राचा भाग्योदय होतो. प्रतिष्ठाण (पैठणी) ही सातवाहणांची राजधानी होय. सातवाहनांनी महाराष्ट्राच्या सर्व भूप्रदेशाशिवाय उत्तरेकडे नर्मदेपर्यंतचा व दक्षिणकडे कावेरीपर्यंतचा प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणून प्रदीर्घ काळापर्यंत एकछत्री अंमल प्रस्थापित केला. या काळात महाराष्ट्राचा व्यापार ग्रीक-रोमनपर्यंत पोहोचला होता. जगण्याची कला साध्य झालेला मुक्त व सुखी समाज ही महाराष्ट्राला सातवाहनांनी दिलेली सर्वश्रेष्ठ देणगी होय.

सातवाहनांनंतर वाकाटक, चालुक्य, राष्ट्रकुट, शिलाहार, गोंड या राजवटींनी राज्य केले.

नागपूर जवळील नगरधन (नंदीवर्धन) व वत्सलगुल्प (वाशिम) या वाकाटकांच्या दोन शाखा होत्या. वाकाटकांचा काळ हा महाराष्ट्रातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक वैभवाचा काळ म्हणून ओळखला जातो. श्रेष्ठ साहित्यिक कालिदास ही याच काळाची देणगी होय.

चालुक्य, राष्ट्रकूट कालखंड हा कला व स्थापत्याच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा होता. बदामी, हंपी, ऐहोळे, पटदक्कल, श्रवण वेळगोळ येथील मंदिरे चालुक्य काळातील स्थापत्याची प्रगती दर्शवितात तर एकाश्म दगडात कोरलेले वेरुळ लेणे राष्ट्रकुटांचे वैभव सांगते.

देवगिरीच्या यादवांचा कालखंड हा प्राचीन महाराष्ट्रातील अखेरचा राजवंशाचा काळ होय. यादव घराणे हे शेवटचे हिंदू घराणे होते. यादव किती प्रमाणात यशस्वी झाला. हा वादाचा मुद्दा होऊ शकतो. मात्र या काळात मराठी भाषेचा विकास, हेमाडपंथी मंदिरांची निर्मिती, दुर्ग निर्मिती मोठया प्रमाणात झाली. मराठी भाषेतील वाङ्मय निर्मितीला याच काळात आरंभ झाला. रामचंद्र यादव या शासकाच्या काळात यादव सत्तेचा विस्तार गुजरात, माळव्यापर्यंत झाला होता. देवगिरीच्या यादवांचे वैभव पाहून इ.स. १८९६ मध्ये अल्लाउद्दिन खिलजी याने देवगिरीवर आक्रमण केले व यादवांचा पराभव केला. यादवांच्या पराभवाने महाराष्ट्राच्या प्राचीन कालखंडाची अखेर होऊन महाराष्ट्रात मध्ययुगाचा आरंभ झाला.

## ब) महाराष्ट्राचा मध्ययुगीन इतिहास–

महाराष्ट्रावरील मुस्लीम आक्रमणापासून मध्ययुगाचा आरंभ होतो. व इंग्रजी राजवटीपासून आधुनिक कालखंडाची सुरुवात होते. त्यामुळे इ.स. १२९६ ते इ.स. १८१८ हा कालखंड मध्ययुगीन महाराष्ट्राच्या इतिहासाचा मानता येईल. हा कालखंड महाराष्ट्राच्या दृष्टिकोणातून अतिशय नामुष्कीचा, पराभवाचा, मानहानीचा, कर्तृत्वशून्यतेचा मानावा लागतो. यांमध्ये केवळ छत्रपती शिवाजी महाराज व त्यांनी स्थापन केलेले स्वराज्य हाच केवळ महाराष्ट्राच्या अभिमान व कर्तृत्वाचा विषय होय. याच स्वराज्यापासून पेशव्यांनी प्रेरणा घेऊन उत्तरेत घोडदौड केली. मात्र ही घोडदौडही पानिपतच्या १७६१ च्या युद्धाने थांबविली.

अल्लाउद्दिनची स्वारी हे महाराष्ट्रावरील पहिले मुस्लीम आक्रमण होय. दक्षिण भारतात मुस्लीम सत्ता स्थापन करणारा तो पहिलाच सुलतान होय. यादवांच्या पतनानंतर बहामनी राजवट निर्माण झाली. मात्र इ.स. १४९० च्या सुमारास बहामनीच्या अंतर्गत कलहाने उच्चांक गाठला आणि त्याचे विभाजन पंच शाह्यांत झाले (आदिलशाही, निजामशाही, कुतूबशाही, बरीदशाही, व इमादशाही) बहामनी राज्याचा इतिहास हा महाराष्ट्राच्या इतिहासाचाच एक भाग होय. विजयनगरच्या पारिपत्यानंतर प्रामुख्याने मुघल सम्राट अकबराच्या दक्षिण विस्तार धोरणातून महाराष्ट्रावर मुघलांच्या आक्रमणास सुरुवात झाली. अहमदनगरच्या राणी चांदबिबिने या आक्रमणाचा यशस्वी प्रतिकार केला मात्र पुढे शहाजहान काळात मलिक अंबरच्या प्रतिकारानंतर अहमदनगरच्या निजामशाहीचा शेवट झाला. (इ.स. १६३६) शहाजहान काळापासून राजपुत्र औरंगजेबाचे वास्तव्य दक्षिणेत होते व सम्राट झाल्यावर दुसऱ्या टप्प्यात त्याच्या अखेरपर्यंत म्हणजे इ.स. १७०७ पर्यंत महाराष्ट्रात वास्तव्य होते.

उपरोक्त विविध मुस्लीम राजवटींचे मध्ययुगात महाराष्ट्रात भिन्न भागांवर वर्चस्व होते. या काळात अस्तित्वासाठीच्या आणि वर्चस्वासाठीच्या सततच्या युद्धाने महाराष्ट्र त्रस्त झाला होता. सामान्य माणूस जिवंत राहण्यासाठी भराव्या लागणाऱ्या निरनिराळ्या करांच्या ओझ्याखाली दबलेला होता. अशा प्रतिकूल परिस्थितीत संतांनी जनजागृतीचे महत्त्वाचे कार्य केले. यांमध्ये संत ज्ञानेश्वर,

एकनाथ, नामदेव, रामदास, व तुकाराम यांचे महत्त्वपूर्ण योगदान होते. हे महापुरुष झालेच नसते तर, महाराष्ट्राचा सर्वनाश निश्चित होता. हे एक ऐतिहासिक सत्य आहे.

समर्थ रामदासांनी 'महाराष्ट्र धर्मा'वर विशेष भर दिला. स्वराज्य, स्वधर्म आणि स्वसंरक्षण यासाठी संघटित होण्याचे त्यांनी अवाहन केले, बलोउपासनेला महत्त्व दिले. या विविध संतांनी केलेल्या कार्याची पार्श्वभूमी छत्रपती शिवरायांच्या उदयास पूरक ठरली. राजा ही काळाची गरज असते. शिव- छत्रपतींचा उदय आणि महाराष्ट्रातील हिंदवी स्वराज्याची उभारणी, हे याचे उत्तम उदाहरण होय. शिवरायांमुळे महाराष्ट्राला ओळख मिळाली. हिंदवी स्वराज्याची स्थापना ही केवळ राजकीय क्रांती नसून ते सामाजिक, धार्मिक आणि ऐहिक परिवर्तन होते. सातवाहनानंतर महाराष्ट्राच्या जडणघडणींचे अखेरचे पर्व छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीमध्ये आकारास आले. म्हणूनच त्यांना युगप्रवर्तक मानले जाते.

'' शिवाजी महाराजांनी एक नवी वाट निर्माण केली. हिंदू जमातीने आपण फक्त जमादार किंवा चिटणीस नव्हे तर छत्रपतीसुद्धा निर्माण करू शकतो हे सिद्ध केले. राज्यनिर्मितीबरोबर प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा राज्य राखणारी माणसे राजांनी तयार केली होती. स्वराज्याचा आणि अस्मितेचा रुजविलेला हा संस्कार ही शिवरायांची अविस्मरणीय ऐतिहासिक कामगिरी होती.''

इ.स.१६३० ते इ.स.१७०७ हा शिवकाळ मानला जातो. या कालखंडात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची निर्मिती केली. ते टिकविण्याचा आटोकाट प्रयत्न छत्रपती संभाजी, राजाराम व राणीताराबाई यांनी यशस्वीपणे केला. छत्रपती शिवरायांच्या मृत्यूनंतर १६८० ते १७०७ या काळात मुघल सम्राट औरंगजेबाचा मुक्काम महाराष्ट्रातच होता. या काळास मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचा कालखंड म्हटले जाते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या निधनाने मराठी स्वराज्याला मोठा हादरा बसला. शिवरायांच्या असामान्य कामगिरीच्या पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीने स्वराज्याची सूत्रे हाती घेतली व प्राण पणाला लावून स्वराज्याचे रक्षण करून शिवरायांचे कार्य चालू ठेवले.

इ.स. १७०७ हे वर्ष महाराष्ट्राच्या इतिहासाला निर्णायक वळण लावणारे ठरले. या वर्षी सम्राट औरंगजेबाचा मृत्यू झाला व छत्रपती शाहू मराठ्यांचा छत्रपती झाला आणि येथूनच महाराष्ट्राच्या राजकारणात पेशवाई कालखंडास सुरुवात झाली. प्रबळ मुघलांच्या विरोधात शिवाजी महाराजांनी मराठी राज्याची- स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी मराठी मनाच्या आस्मितेला जागृत करून सत्त्व व स्वत्व यांची जाणिव करून दिली. यामुळे मराठी एकसंघ शक्तीचे चैतन्यात रूपांतर होऊन भविष्यात स्वराज्याचे रूपांतर साम्राज्यात झाले. यामध्ये विशेषतः पेशवा पहिला बाजीराव व नानासाहेब यांचे योगदान मोठे आहे. परंतु दुसऱ्या बाजीरावाच्या काळात इंग्रजांशी इ.स. १८०२ चा वसईचा तह झाला व मराठी राज्याच्या, स्वराज्याच्या संध्याकालाचा आरंभ झाला, आणि शेवटी १८१८ मध्ये अस्त झाला.

## १.२.३ महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेचा प्रवेश व वर्चस्व : आधुनिक महाराष्ट्राचा आरंभ

इ.स. १७६१ मध्ये पानिपतावर मराठ्यांचा पराभव झाला असला, तरी या पराभवासही मराठ्यांच्या इतिहासात एक वेगळे परिमाण आहे. पानिपतच्या युद्धामुळे सिद्ध झालेली महत्त्वाची गोष्ट ही की, मराठे हिंदुस्थानचे राज्यकर्ते म्हणून वागत होते, केवळ लुटारु म्हणून दुसऱ्या लुटारूशी लढले नाहीत. हिंदुस्थानात सत्ताधीश कोणी व्हायला किंवा राहायचे याबद्दल वाद असो; पण हे राज्य

हिंदी रहिवाशांचेच असले पाहिजे व तेच येथील राज्यकर्ते राहिले पाहिजेत. या तत्त्वासाठी मराठे पानिपतावर लढले.

इतिहासकार त्र्यं. शं. शेजवलकर पानिपतच्या पराभवाबद्दल लिहितात.

''..........मराठ्यांनी अनेक चुका केल्या असतील; पण त्यांनी पाचशे वर्षांच्या वरवंठ्याखाली चुरडलेल्या हिंदू प्रजेस आपल्या वर्तनाने ताठ उभे राहण्याचे उदाहरण घालून दिले होते. मराठ्यांनी मुसलमानी राज्यतंत्र इतके खिळखिळे केले होते की, कोणत्याही प्रदेशात तेथील प्रजेने बंड करून उठावे व मुसलमान सुभेदारास हाकून द्यावे व स्वतःचे राज्य स्थापावे. या कामात त्यास मराठ्यांची मदत आपोआप मिळाली असती आणि हीच शिवछत्रपती निर्मिती मराठी राज्याची इतिकर्तव्यता होती! इतर प्रातांत हे लोण पोहचू शकले नाही, हीच मराठ्यांच्या इतिहासातील खरीखुरी शोकांतिका होय, पानिपतचा पराभव नव्हे!''

पानिपतच्या पराभवाने कोलमडणाऱ्या मराठी राज्याला पेशवा माधवरावाने आपल्या अल्प कारकिर्दीत सावरण्याचा यशस्वी प्रयत्न केला. इ.स.१७७२ मध्ये माधवरावचा अकाली मृत्यू झाला. माधवराव असेपर्यंत इंग्रजांना मराठा राजकारणात हस्तक्षेपाची संधी त्याने मिळू दिली नाही. यानंतर पेशवा नारायणराव, राघोबा-बारभाई संघर्ष,सवाई माधवराव यांच्या काळात मराठी राज्य अस्थिर झाले.

माधवराव पेशव्यानंतर नारायणराव पेशव्यांच्या काळात राघोबा पेशवे पदासाठी उत्सुक होता. त्यास बारभाई मंडळाने विरोध केला तेव्हा राघोबाने १७७५ च्या सुरत तहाने इंग्रजांशी संधान बांधले. हा करार मराठे-इंग्रज संबंधात मैलाचा दगड ठरला. या कराराने इंग्रजांना अपेक्षित असलेली, मराठा राजकारणातील हस्तक्षेपाची संधी मिळाली. यातूनच इ.स.१७७५-८२ या काळात इंग्रज-मराठे यांच्यात पहिले युद्ध घडून आले व साल्बाईच्या तहाने महादजी शिंदेंनी इंग्रजांना माघार घेणे भाग पाडले.

इ.स.१७९६ मध्ये दुसरा बाजीराव हा राघोबाचा पुत्र पेशवेपदावर आला. याच दरम्यान इ.स. १७९८ मध्ये लॉर्ड वेलस्लीने गव्हर्नर जनरल म्हणून सुत्रे हाती घेतली. मराठे अथवा अन्य एतद्देशीयांनी तैनाती फौजेची पद्धती स्वीकारावी यासाठी त्याने प्रयत्न सुरू केले होते. दुसऱ्या बाजीरावच्या दुर्बलतेमुळे इंग्रजांना ही संधी मिळाली.

## * पुणे दरबारात ब्रिटिश रेसिडेंटचे आगमनः–

राघोबा पुत्र दुसरा बाजीराव पेशवेपदावर अधिकच गडद होऊ लागले. शिंदे-होळकर-भोसले आदी मराठा सरदार पेशव्यांचे वर्चस्व मानावयास तयार नव्हते. यातच विठोजी होळकरच्या वधाच्या कारणावरून यशवंतराव होळकरने थेट पुण्यावरच १८०२ मध्ये आक्रमण केले, प्रचंड जाळपोळ केली. होळकरांच्या या आक्रमणाने घाबरून जाऊन पेशवा दुसऱ्या बाजीरावाने पुण्याहून पलायन केले व आपल्या पित्याप्रमाणे इंग्रजांचा आश्रय घेतला व ३१ डिसेंबर १८०२ रोजी इंग्रज व बाजीराव यांच्यात वसईचा तह झाला. या तहाने पेशव्यांचे स्वातंत्र्य संपुष्टात आले, पेशव्याने तैनानी फौज स्वीकारली आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे पेशव्याच्या दरबारात ब्रिटिश रेसिडेंटचे आगमन झाले. अशा प्रकारे रितसर ब्रिटिशांचा मराठ्यांच्या म्हणजे महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश झाला आणि राज्याची उलटी गणणा सुरु झाली.

## * इंग्रज–मराठे संघर्ष–(इ.स.१८०२–१८१८)

इ.स. १८०२ चा वसईचा तह तैनानी फौजेचा तह म्हणून ओळखला जातो. खरे म्हणजे दुसऱ्या बाजीरावने या करारावर स्वेच्छेने स्वाक्षरी केलेली नव्हती तर इंग्रजांनी, ''हा करार न केल्यास बाजीरावचा भाऊ अमृतरावास आम्ही पेशवा बनवू'' अशी बाजीरावास धमकी दिली होती. तसेच हा करार शिंदे, होळकर व नागपूरकर रघुजी भोसले यांनाही मान्य नव्हता तर इंग्रजांच्या मते, पेशव्याने हा करार केल्यामुळे तो सर्व मराठा सरदारांवर बंधनकारक होता. यातून १८०२-१८०४ या कालावधीत दुसरे इंग्रज-मराठे युद्ध घडून आले.

या दुसऱ्या संघर्षात इंग्रजांनी दौलतराव शिंदे व रघुजी भोसले यांना १८०३ च्या वसईच्या लढईत पराभूत केले. व आडगावच्या लढाईत रघुजी भोसल्यास पराभूत करून त्यालाही आपल्या दरबारात ब्रिटिश रेसिडेंट ठेवणे भाग पाडले.

दुसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात मराठा सरदारांचा पराभव होत असताना वसईच्या तहामुळे पेशवा बाजीरावास हतबलपणे शांत रहावे लागले होते. तसेच ब्रिटिश रेसिडेंट माऊंट स्टुअर्ट एलफिंन्स्टन ने बाजीरावावर बंधने घालण्यास व त्याच्या अंतर्गत राजकारण  हस्तक्षेप करणे सुरू केले होते. तर नागपूरला दुसऱ्या रघुजीच्या मृत्यूनंतर रेसिडेंट जेन्किन्स यानेच सर्व सूत्रे आपल्या हाती घेतली होती. यामुळे दुसरा बाजीराव व आप्पासाहेब भोसले अस्वस्थ होते. त्यातूनच बाजीरावाने इंग्रज रेसिडेंन्सीवरच हल्ला करण्याचे धाडस केले. व तिसऱ्या इंग्रज-मराठे युद्धाला ५ नोव्हेंबर १८१७ च्या खडकीच्या लढाईत सुरुवात झाली. बाजीरावाने पुण्याहून पलायन केले. दि.१९ फेब्रुवारी १८१८ रोजी पंढरपुरजवळ आष्टी येथे झालेल्या लढाईत मराठ्यांचा अखेरचा सेनापती बापू गोखले यांचा मृत्यू झाला.

१९ फेब्रुवारी या दिवसाचा योगायोग पाहा, याच दिवशी १६३० साली छत्रपता शिवाजी महाराजांचा जन्म झाला होता. ज्यांनी हिंदवी स्वराज्साची स्थापना केली, तर याच दिवशी १८१८ मध्ये मराठा राज्याची जवळपास अखेर झाली.

आष्टीच्या पराभवानंतर पेशवा बाजीरावाची भटकंती सुरू झाली, अखेरीस १ जून १८१८ रोजी असहाय्य अवस्थेत पेशवा बऱ्हाणपूरजवळ इंग्रजांच्या स्वाधीन झाला. त्यास इंग्रजींनी उत्तरप्रदेशात कानपूरजवळ बिठूर ब्रह्मावर्त येथे स्थानबद्ध केले. व इंग्रजांचा पेन्शनर बनविले. बाजीरावाच्या पराभवाने मराठा सत्तेचा पूर्ण पाडाव झाला व राजधानी पुणे येथे इंग्रजी सत्तेचा अंमल सुरू झाला .

मराठी पेशव्याचाच फक्त पराभव झाला नव्हता तर खुद्द छत्रपती प्रतापसिंह इंग्रजांच्या हाती सापडले होते. शनिवारवाड्यावर इंग्रजी निशाण लावल्यानंतर रेसिडेंट एलफिन्स्टनने पेशव्याचे सर्वाधिकार रद्द झाल्याचे घोषित केले. तसेच छत्रपती प्रतापसिंह यांना सातारच्या गादीवर बसवण्याचे जाहीर केले. व ग्रँट डफ यास छत्रपतींचे मार्गदर्शक म्हणून नेमण्यात आले. अशा प्रकारे पेशवाईचा, मराठा राज्याचा अस्त ब्रिटिशांनी केला.

मराठी राज्याच्या अस्ताला प्रामुख्याने पुढील घटक कारणीभूत ठरले-

- देशाभिमानाचा अभाव.
- अंतर्गत  यादवी, मत्सर व एकसंधवृत्तीचा अभाव.
- नवीन ज्ञान-कल्पना व सुधारणा याकडे दुर्लक्ष.
- शोधक बुद्धी व सुधारणा याकडे दुर्लक्ष.

✻ प्रगत ज्ञानाविषयी अनास्था.

✻ दुसरा बाजीराव, यशवंतराव होळकर, दौलतराव शिंदे व अप्पासाहेब भोसले यांसारखे दुय्यम नेतृत्व.

मराठा राज्याच्या अस्ताची कारणमीमांसा, वासुदेवशास्त्री खरे मोठ्या समर्पक शब्दांत करताय ते वाचाः-

''देशाभिमानशुन्यता, समूहाने कार्य करण्याची नालायकी, स्वार्थ-साधनाची बेसुमार हाव, पिण्याची सवय इत्यादी दुर्गुण आताच्या समाजात अंगी जे खिळले आहेत, तेच आमच्या राज्यशाला कारण झालेले आहेत. असल्या दुर्गुणांनी खिळखिळे झालेले कोणतेही राष्ट्र पाश्चात्त्य राष्ट्रांशी विरोध प्राप्त झाला असता टिकाव धरू शकत नाही.

हिंदुस्थान जर इंग्रजांनी घेतला नसता, तर फ्रेंचांनी घेतलाच असता. प्रवाहांत पडलेली भांडी एकमेकांवर आदळली असतो कोणते फुटायचे ? मातीचे की लोखंडाचे हे ठरलेलेच आहे.......''

आधुनिक महाराष्ट्राच्या निर्मितीला, जडणघडणीला ही सर्व पार्श्वभूमी आहे. १८१८ मध्ये महाराष्ट्रात पेशवाईची समाप्ती होऊन इंग्रजी राजवट प्रस्थापित झाली. येथूनच महाराष्ट्राच्या इतिहासातील आधुनिक युग सुरू झाले असे समजले जाते.

## १.२.४ ब्रिटिश विजयाकालीन महाराष्ट्र

**(अ) राजकीय परिस्थितीः-**

**मराठी सत्तेचा अस्त-**

दि.३१ डिसेंबर १८०२ हा दिवस मराठी सत्तेच्या दृष्टीने अतिशय घातक ठरल, याच दिवशी दुसऱ्या बाजीरावाने इंग्रजांशी वसईचा तह करून तैनाती फौजेची योजना स्वीकारली आणि तो ब्रिटिशांच्या संरक्षणाखाली गेला. हा तह म्हणजे एक प्रकारे मराठी राज्याचे स्वातंत्र्य गहाण टाकण्याचाच प्रकार होता. मात्र इंग्रजांच्या मैत्रीतील पोकळपणा जेव्हा बाजीरावाला जाणवू लागला, व इंग्रजी नियंत्रण जाचक वाटू लागले तेव्हा त्याला इंग्रजांशी युद्ध अपरिहार्य वाटू लागले. यातूनच तिसरे इंग्रज-मराठा युद्ध उद्‌भवले व नर्मदा नदी परिसरातील धुळकोट येथे पेशवा दुसरा बाजीराव याचा अंतिम पराभव झाला.

दुसऱ्या बाजीरावचा हा पराभव मराठी सत्तेचा अस्त करणारा ठरला. दि. १७ नोव्हेंबर १८१७ रोजी शनिवारवाड्याच्या दिल्ली दरवाजावरील मराठी राज्याचा झेंडा, ब्रिटिश रेसिडेंट माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांच्या आदेशावरुन इंग्रजी अंमलदार रॉबिन्सन याने खाली उतरविला आणि त्याजागी युनियन जॅक निशान फडकविले. या घटनेने पुणे या पेशवाईच्या केंद्राचा, मराठ्यांच्या राजधाणीचा कब्जा ब्रिटिश सत्तेकडे जाऊन सत्तांतर घडून आले. ज्या १७ नोव्हेंबरला हे सत्तांतर घडून आले, त्या तारखेचा योगायोग कसा होता पहा-

''ज्या दिनांक १७ नोव्हेंबर १७१३ रोजी पहिला पेशवा बाळाजी विश्वनाथ भट याने पेशवाईची वस्त्रे धारण केली व छत्रपतींचे कारभारी या नात्याने मराठी सत्तेच्या राज्यविस्ताराचे ऐतिहासिक कार्य पुढील १०४ वर्षे पेशव्यांनी केली. त्याच १७ नोव्हेंबर १८१७ ला ब्रिटिशांनी पेशवाईची मसदन बाजूस सारून शनिवारवाड्यावर इंग्रजी निशाण फडकविले.''

१८ व्या शतकाच्या उत्तरार्धात ब्रिटिशांचे भारतावर वर्चस्व प्रस्थापित करण्याच्या मार्गातील सर्वात मोठा अडसाचं मराठ्यांची सत्ता हाच होता. आपसातील मतभेद व दुसरा बाजीराव किंवा

दौलतराव शिंदे अशा खुज्या नेतृत्वामुळे मराठी सत्तेचा अस्त जवळ आला. याबाबत एलफिन्स्टन म्हणत- ''मराठी लोकांत राष्ट्रीय भावना पक्की सजली आहे.... पण आता त्यांच्या दौलतीत एवढी भांडणे आहेत आणि परस्पर हितसंबंध इतके ताणले गेले आहेत, की ते लगेच एक होतील असे दिसत नाही.''

असे असले तरी मराठयांची मूलभूत वैगुण्ये आणि ब्रिटिशांचे श्रेष्ठत्व यांमधील तफावत मराठी सत्तेच्या अस्ताला प्रामुख्याने कारणीभूत ठरली. मराठी सत्तेच्या अस्ताची विद्वानांनी केलेली ही कारणमीमांसा अभ्यासा-

रियासतकार सरदेसाई:- १८ व्या शतकाच्या अखेरीस कर्तृत्वन मराठ्यांची पिढीच नष्ट झाल्यामुळे मराठा राज्य कोसळले.

वि. का. राजवाडे- मराठ्यांनी विज्ञानाकडे केलेले दुर्लक्ष त्यांना महागात पडले.

त्र्यं. शं. शेजवलकर - ''मराठा राज्याचे शिवकालीन नैतिक अधिष्ठान पेशवे काळात ढळले, तसेच पेशव्यांच्या चुकीच्या धोरणांमुळे विनाश ओढवला.''

वासुदेवशास्त्री खरे- '' राष्ट्रीय वृत्तीचा अभाव, आपापसातील वैरभाव, विज्ञानाविषयी उदासिनता, जहागिरीचा हव्यास हे दुर्गुण मराठे शाहीच्या विनाशाला कारणीभूत ठरले.''

मराठेशाहीच्या ऱ्हासासंदर्भात मुख्यतः हे लक्षात घेतले पाहिजे की तत्कालीन अन्य भारतीय राज्यकर्त्यांमधील मध्ययुगीन वैगुण्ये मराठ्यांच्या विनाशाला कारणीभूत ठरली. सरंजामशाही चौकटी, दुहीचा शाप, आधुनिक राष्ट्रवादी दृष्टीचा अभाव, लष्करी क्षेत्रातील कमतरता, आर्थिक दिवाळखोरी इ. घटकांमुळे आधुनिक व्यापारी-भांडवलशाही राष्ट्र-राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या साम्राज्यवादी ब्रिटिशांपुढे त्यांचा टिकाव लागला नाही. याबाबतीत डॉ. राजा दीक्षित यांचे मत लक्षात घेण्यासारखे आहे ते म्हणतात.

'' मराठ्यांचे राज्य व्यक्तिप्रधान होते. ब्रिटिशांप्रमाणे संस्थाप्रधान नव्हते. १८ व्या शतकावर मराठ्यांच्या सत्ताविस्ताराचा ठसा निश्चितपणे उमटला. अन्य अनेक भारतीय राज्यकर्त्यांच्या तुलनेत मराठ्यांनी अधिक प्रमाणात राष्ट्रीय वृत्ती दाखवली. महाराष्ट्रीय समाजात निश्चितपणे परिवर्तनाच्या सुप्त शक्ती होत्या. परंतु त्या शक्तींचा विकास होण्यापूर्वीच त्यांची प्रगत ब्रिटिशांशी गाठ पडली. ब्रिटिशीर आर्थिक थोर आणि तंत्रिक कौशल्य मराठयांपाशी नव्हते. राजकारण, अर्थकारण आणि युद्धकारण या तिन्ही क्षेत्रात ब्रिटिश मराठ्यांपेक्षा वरचढ ठरले. त्यामुळे अखेर मराठे पराभूत झाले.''

मराठे सत्ता नष्ट झाल्याने लोकांना काय वाटले असावे , याचे वर्णन करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात- '' महाराष्ट्रातील बहुसंख्य जनतेला या घटनेने तीव्र धक्का बसला. ते सुन्न झाले. परकीय लुटारू टोळया सबंध हिंदुस्थानातील लोक एकापाठोपाठ एक परक्यांचे गुलाम बनत होते. पण देशाच्या एका लहानशा कोपऱ्यात, या महाराष्ट्रात एक पोलादी-कणखर जमात राहत होती. स्वातंत्र्य म्हणजे काय, हे अनुभवलेला हा महाराष्ट्र होता. येथील माणसाने स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्राणपणाने लढा दिला होता. इंच-इंच लढून त्याने स्वातंत्र्याचा मुलूख वाढविला होता. इंग्रजांचा जय झाला आणि या मुलखातील माणसाने आपण अत्यंत मौल्यवान ठेवा गमावला.''

मराठी सत्तेच्या ऱ्हासाची कारणमीमांसा आपण अभ्यासली. कारणे काहीही असोत, महाराष्ट्रामध्ये १९ व्या शतकाच्या आरंभी मराठी सत्तेचा अस्त होऊन ब्रिटिश अमदानीची सुरुवात झाली. पेशवा

दुसरा बाजीराव याचा प्रतिकार मोडून काढत इंग्रज पलटणी दि. १७ नोव्हेंबर १८१७ रोजी पुणे शहरात घुसल्या व एलफिन्स्टनला फितूर झालेल्या बाळाजीपंत नातू याने त्याच दिवशी शनिवारवाड्यावरचा भगवा झेंडा उतरवून त्याऐवजी इंग्रजी निशान फडकविले व एका नव्या युगाचा आरंभ महाराष्ट्रात झाला.

## * पेशवा बाजीराव दुसरा याची व्यवस्था :–

तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात बाजीरावचा पराभव झाला व शनिवारवाड्यावर 'युनियन जॅक' फडकला. आष्टीच्या लढाईनंतर बाजीरावाने पलायन केले. शेवटी नर्मदा परिसरातील चुळकोट येथे बाजीरावाचा अंतिम पराभव झाला. आणि ३ जून १८१८ या दिवशी इंदूरजवळील खैर येथे बाजीराव इंग्रजांच्या स्वाधीन झाला. या पराभवाने बाजीरावाचे पेशवेपद गेले व मराठ्यांचे राज्य बुडाले. इंग्रजांनी उत्तर प्रदेशात कानपूरजवळ विठूर (ब्रह्मावर्त) येथे स्थानबद्ध केले व आठ लाख रुपये वार्षिक निवृत्तीवेतन देऊन इंग्रजांचा पेन्शनर बनविले.

''शेवटचा पेशवा दुर्दैवाची शिकार होता, की त्या पदासाठी अपात्र होता. त्याच्या यापैकी कोणत्या गोष्टीमुळे मराठ्यांचे राज्य धुळीला मिळाले, हे शोधून काढणे फार कठीण आहे. मराठी सत्तेला शेवटची घरघर लागली असताना तो मसनदीवर आला. त्याच्याऐवजी दुसरा कोणताही लायक माणूस सत्तेवर आला, तरी त्याला मराठ्यांची सत्ता टिकविणे कठीण गेले असते.''

इंग्रजांकडून वर्षासन स्वीकारल्यानंतर दुसरा बाजीराव त्याच्या मृत्युपर्यंत म्हणजे १८५१ पर्यंम विठूर येथेच राहिला. त्यास 'विठूरचे राजे' म्हणून ओळखले जाई. त्याचा दत्तकपुत्र धोंडोपंत उर्फ नानासाहेब पेशवा यांस बाजीरावच्या मृत्यूनंतर इंग्रजांनी पेन्शन देण्यास नकार दिला. याच नानासाहेब पेशव्याने १८५७ च्या उठावात महत्वाची भुमिका इंग्रजांच्या विरोधात बजावली आहे.

## छत्रपती प्रतापसिंह यांची सातारच्या गादीवर पुनर्स्थापना–

तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धाच्या काळात आष्टीच्या लढाईनंतर झालेल्या धावपळीत मराठ्यांचे छत्रपती प्रतापसिंह इंग्रजांच्या हाती सापडले. याचा एकफिन्स्टननं अत्यंत मुत्सद्देगिरीने वापर केला. पेशवा बाजीराव व छत्रपती प्रतापसिंह यांच्यातील मतभेदांचा फायदा इंग्रजांनी घेतला.

रेसिडेंट एलफिन्स्टनने मराठ्यांची राजधानी सातारा १० फेब्रुवारी १८१८ रोजी काबीज केली, छत्रपती प्रतापसिंहाशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित झाले. युद्धकाळातच इंग्रजांनी 'सातारा राज्याची' संकल्पना उचलून धरली होती व एका जाहिरनाम्याद्वारे असे आश्वासन दिले होते की, पेशव्यांच्या कैदेतील सातारच्या महाराजांना मुक्त करून स्वतंत्र राज्य दिले जाईल. त्याप्रमाणे पेशव्याच्या पाडावानंतर १० एप्रिल १८१८ राजी प्रतापसिंहाकडे सातारच्या गादीची सूत्रे सोपविण्यात आली. या सातारा गादीची पुनर्स्थापना करण्यामागे इंग्रजांचा हेतू हा शिवछत्रपतींचे राज्य पुन्हा निर्माण करण्याचा नव्हता तर महाराष्ट्रात मराठा-ब्राह्मण दुहीला उत्तेजन देण्याचा होता.

छत्रपती प्रतापसिंहाला गादीवर बसविण्यात आले. तेव्हा त्यांचे वय २५ वर्षे होते. त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी कॅप्टन जेम्स ग्रँट डफ याची सातारचा 'पोलिटिकल एजंट' म्हणून नियुक्ती करण्यात आली. छत्रपतीच्या नावे एक जाहिरनामा काढून पेशवा बाजीरावावर बेइमानीपणाचा ठपका ठेवून त्याचे अधिकार काढून घेतल्याची घोषणा करण्यात आली. तसेच ब्रिटिशांकडे राज्यकारभार चालविण्याची जबाबदारी सोपवल्याचे नमूद करण्यात आले.

छत्रपतीस नाममात्र राजेपदावर बसविण्यात आले, त्याचे सार्वभौमत्व मर्यादित असून तो ब्रिटिशांच्या पंखाखालीच राहील याची कल्पना एलफिन्स्टनने प्रतापसिंहास दिली. प्रत्यक्षाज राज्य कारभाराची सूत्रे रेसिडेंट ग्रँटकडेच होती. छत्रपतींचे हे सातारा राज्याअतिशय लहानसे होते. पश्चिमेला घाटापासून पूर्वेस  निजामराज्य आणि नीरा  नदी ते कृष्णावरणा नदी अशी उत्तरदक्षिण सरहद्द इंग्रजांनी छत्रपतींना आखून दिली होती. इ.स. १८३५ पर्यंत छत्रपती प्रतापसिंहाने रेसिडेंटच्या सल्ल्याने कारभार केला. ग्रँट डफनंतर जॉन ब्रिग्ज, कर्नल आर्चिबाल्ड रॉबर्टसन, लॉडविक हे रोसिडेंट साताऱ्यास आले.

१८३५ मध्ये इंग्रजांनी छत्रपती प्रतापसिंहावर अनेक आरोप ठेवले, त्यामध्ये इंग्रजांविरुद्ध गुप्त कटाचाही आरोप ठेवण्यात आला. कटाचे हे कारण समोर करून इंग्रजांनी ५ सप्टेंबर १८३९ ला प्रतापसिंहा पदच्युत करून त्यांची रवानगी काशी येथे केली, पुढे १८४७ मध्ये त्यांचा मृत्यू झाला. प्रतापसिंहानंतर त्यांचा लहान भाऊ अप्पासाहेब याला इंग्रजांनी गादीवर बसविले. ते १८४८ पर्यंत सत्तेवर  होते. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचा दत्तकपुत्र व्यंकोजी राजे गादीवर आले, परंतु तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड डलहौसी याने दत्तकविधान नामंजूर करून १ मे १८४९ रोजी सातारा राज्य खालसा केले व एलफिन्स्टनने पुनर्स्थापना केलेले नाममात्र राज्य इंग्रजी साम्राज्याचा एक भाग बनले.

## महाराष्ट्रात ब्रिटिश राजवटीचा प्रारंभ–

इ.स. १८१८ मध्ये पेशवा दुसरा बाजीराव याचा पाडाव करून महाराष्ट्रावर निर्विवाद वर्चस्व इंग्रजांनी मिळविले, इ.स. १८१८ ते १८४९ या काळात सातारची नाममात्र गादी छत्रपतींच्या हाती होती. हे राज्यही पुढे डलहौसीने खालसा केले. त्यामुळे सातारा ब्रिटिश पंखाखाली आले. १८४0 मध्ये कुलाबा संस्थान खालसा करून मुंबई इलाख्यास जोडला गेला.वऱ्हाड प्रांत कर्जवसुलीच्या बदल्यात इंग्रजांनी निजामाकडून घेतला. व १८५३ मध्ये नागपूरकर भोसल्यांचे राज्यही इंग्रजांनी आपल्या ताब्यात घेतले. अशाप्रकारे आजच्या महाराष्ट्रापैकी मराठवाडा जो निजाम वर्चस्वाखाली होता, हा प्रदेश वगळता संपूर्ण महाराष्ट्रावर ब्रिटिश राजवटीचा प्रारंभ झाला.

मराठी सत्ता नष्ट करून त्याजागी ब्रिटिश राजवटीचा आरंभ करण्याचे श्रेय एलफिन्स्टनला द्यावे लागते. त्याने महाराष्ट्रात ब्रिटिश अंमलाची प्रस्थापना व आधुनिकतेची पायाभरणी करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. पेशवा बाजीरावाचा पाडाव, कोल्हापूरकरांचा बंदोबस्त आणि कामगिरी करून त्याने महाराष्ट्रांच्या भूप्रदेशावर ब्रिटिश वर्चस्व प्रस्थापित केले. पेशवाई नष्ट झाल्यावर पेशव्यांकडून ब्रिटिशांकडे आलेला प्रदेश मुंबई वा मद्रास प्रांतात समाविष्ट न करता त्याचा स्वतंत्र दख्खन प्रशासकीय विभाग निर्माण करण्यात आला. व त्यावर डेक्कन कमिशनरची नियुक्ती करण्यात आली. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन हा पहिला कमिशनर होता.

## * माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे योगदान–

मराठी सत्तेचा अस्त करून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेची स्थापना करणे आणि आधुनिक महाराष्ट्राचा पाया घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने केले. महाराष्ट्र आणि एलफिन्स्टन यांचा जवळचा संबंध आहे. त्याच्या भारतातील ३२ वर्षे वास्तव्यातील बहुतांश म्हणजे २३ वर्षे तो महाराष्ट्रात राहिला. १८0१ मध्ये सर बॅरी क्लोजचा सहाय्यक म्हणून पुणे रेसिडेन्सीमध्ये त्याची नियुक्ती झाली . १८0४ ते १८0८ या कालखंडात तो नागपूरकर भोसल्यांच्या दरबारात रेसिडेंट म्हणून त्याने काम पाहिले तसेच १८११-१८ पुणे दरबारात रेसिडेंट, १८१८-१९ मध्ये डेक्कन कमिशनर

व १८१९-२७ मुंबई इलाख्याचा गव्हर्नर अशा विविध नात्यांनी महाराष्ट्राला एलफिन्स्टनचा व एलफिन्स्टनला महाराष्ट्राचा जवळून परिचय होता. त्यामुळेच महाराष्ट्रावर त्याचा विशेष प्रभाव आहे.

महाराष्ट्रात एलफिन्स्टनचे ऐतिहासिक स्थान वैशिष्टयपूर्ण आहे. १८०३ साली आडगावच्या लढाईत रघुजी भोसल्यांचा इंग्रजांनी निर्णायक पराभव केल्यावर देवगांवच्या तहानुसार माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याचे नागपूर दरबारी रेसिडेंटचया आगमनापासूनच नागपूरच्या राज्याला घरघर लागली व पुढे रेसिडेंट मॅनसेलच्या काळात १८५४ मध्ये इंग्रजांनी नागपूर खालसा केले. हाच एलफिन्स्टन रेसिडेंट म्हणून १८११ मध्ये पुणे येथे पेशव्यांच्या दरबारात होता. पेशवे, भोसले, आणि ईस्ट इंडिया कंपनी यांच्यात महत्त्वाचा दुवा म्हणून त्यानं कार्य केले. व १८१८ मध्ये पेशव्यांचे राज्य बरखास्तीमध्ये महत्त्वाची भूमिका एलफिन्स्टनने रेसिडेंट या नात्याने बजावली. रेसिडेंटच्या देशी राज्यांच्या दरबारातील एकूणच भूमिकेबद्दल मार्क्विस ऑफ हेस्टिंग्ज पुढील मत पाहा-ः

''.......आमच्या सर्व तहनाम्यात आम्ही त्यांना स्वतंत्र, सार्वभौम राजे म्हणून लिहितो व मग हळूच आम्ही त्यांचे दरबारात आपला रेसिडेंट पाठवतो. हा रेसिडेंट परस्परांचा वकील या नात्याने त्या संस्थानिकांशी न वागता त्यांचेवर हुकूमत गाजवितो. त्यांच्या सर्व अंतस्थ कारभारात ढवळाढवळ करतो. संस्थनिकांच्या विरुद्ध असलेल्या त्यांच्या प्रजेस आपल्या पाठीशी घालतो. व आपल्या अधिकाराचे खूप प्रदर्शन करतो. या सर्व प्रकारात रेसिडेंटास आमच्या कौंसिलचे पाठबळ असते.''

एलफिन्स्टनने महाराष्ट्रात ब्रिटिश अंमल प्रस्थापित करण्याची व त्याला मजबूती आणण्याची कामगिरी तर केलीच परंतु त्याबरोबर येथील मध्यम वर्गाच्या उदय प्रक्रियेत आणि आधुनिकतेकडील वाटचालीत; सुद्धा त्याचा मोठा वाटा होता. तो मूळतः एक साम्राज्यवादी होता आणि त्याची सर्व प्रशासकीय व्यूहरचना ब्रिटिश साम्राज्यवादाला पूरक होती, हे लक्षात घेणे आवश्यक आहे. त्याच्या धोरणातील उदार आशय एतद्देशीयांना हितरवह वाटणे स्वाभाविक असले, तरी ब्रिटिश साम्राज्यवादाच्या दृष्टीने तो अधिक हितावह होता. महाराष्ट्रात ब्रिटिश वर्चस्वाला अधिमान्यता मिळविण्यासाठी त्याने चातुर्याने कल्याणकारी कारभार केला. याबाबत अरविंद देशपांडे म्हणतात,

''.........कल्याणकारी राज्यव्यवस्था हा एक एलफिन्स्टनचा मार्ग होता, अंतिम उद्दिष्ट नव्हते.'' या दृष्टीने एलफिन्स्टनकडे पाहिले.

मराठ्यांच्या पराभवानंतर एलफिन्स्टनवर मोठी जबाबदारी येऊन पडली होती. त्याने मराठ्यांना पराभवानंतरही कमी लेखण्याची चूक केली नाही. महाराष्ट्रातील समाजाच्या गट-रचनेची जाण बाळगून विविध सामाजिक गटांना संतुष्ट व शांत राखण्याची कसरत त्याने साधली. उदा. '' मर्यादित सार्वभौमत्वाखालील सातारा राज्याच्या निर्मितीद्वारे मराठे जातीची अस्मिता कुरवाळली तसेच ब्राह्मणांची, 'दक्षिण' निधीच्या रूपात टिकवली.

पेशवाई संपून ईस्ट इंडिया कंपनीचे राज्य महाराष्ट्रात सुरू झाल्यावर १९ व्या शतकातल महाराष्ट्रात विविध उठाव घडून आले. एलफिन्स्टनने इंग्रजविरोधात उठाव करणाऱ्यांना तोफेच्या तोंडी दिले. पेशवाई जाऊन इंग्रजी शासन सुरू होण्याबाबत महाराष्ट्रात दोन परस्परविरोधी विचार प्रवाह निर्माण झाले. पहिला म्हणजे, 'ईश्वरी प्रसाद' व दुसरा म्हणजे इंग्रजी राजवट म्हणजे भयंकर शाप होय.

इंग्रजी राज्य सुरू झाल्यावर शासकीय धोरणे, पाश्चात्त्य शिक्षण, एतद्देशीयांचे आत्मपरीक्षण व नव्या ऐहिक आकांक्षा यामुळे महाराष्ट्रात नव्या बौद्धिक-सांस्कृतिक घडामोडींना व सामाजिक बदलांना सुरुवात झाली. एलफिन्स्टनने राज्यकारभार हाती घेताच पदच्युत पेशवा बाजीरावाच्या सग्यासोयऱ्यांनी बाजीरावाशी हातमिळवणी करून उठाव करू नये, म्हणून त्यांना वेगवेगळ्या ठिकाणी ठेवण्याची धूर्तपणे व्यवस्था केली. सातारला छत्रपती म्हणून प्रतापसिंहास बसविले तर नागपूरच्या गादीवर आप्पासाहेबास बसविले. त्यामुळे कंपनीचा प्रभाव निर्माण झाला.एलफिन्स्टनच्या सुधारणांमुळे महाराष्ट्र राजकारणाचे चित्र पूर्णतःच बदलले. पेशवाई बुडाल्यामुळे ब्राह्मण राज्यकर्ते संपुष्टात आले. मराठा सत्ताधीश एक तर इतिहासजमा झाले. किंवा ते नाममात्र सत्ताधीश म्हणून राज करू लागले. सातारा, कोल्हापूरचे राजे कंपनीच्या कृपेमुळे आपले अस्तित्व टिकवून ठेवू शकले.

पुणे व सातारा जिंकल्यानंतर इंग्रजांनी १० फेब्रुवारी १८१८ रोजी 'प्रोजेक्ले मेशन ऑफ सातारा' या पत्राची द्वाही फिरवली. ही साताऱ्याची घोषणा मराठी मुलखातीत परिवर्तनाची नांदी मानावी लागेल. मराठी प्रदेशात इंग्रज सुडाचे राजकारण करणार नाहीत, याची ग्वाही या पत्रकाने दिली. इंग्रज सत्तेच्या आगमनाने मध्ययुगात परकीय आक्रमणाला प्राणपणाने विरोध करणाऱ्या मराठी समाजाने ब्रिटिश राजवटीची ताबेदारी पत्करली. इंग्रजांकडून पराभव तर मान्य केलाच; पण विशेष म्हणजे या राजवटीला फारसा विरोध केला नाही. यामागे एलफिन्स्टनचे सर्वांशी जमवून घेण्याचे धोरण होते.

महाराष्ट्र जिंकून घेताना गव्हर्नर जनरलने एलफिन्स्टनला सर्वधिकार दिले होते. पुणे हातात पडताच एलफिन्स्टनने कलेक्टर म्हणून रॉबर्टसनला नियुक्त केले. रॉबर्टसनने सत्ता हाती येताच शेतकऱ्यांना सारामाफी देऊन टाकली. रयतेला खुष करणे, त्यांना आपलेसे करून नव्या राजवटीशी त्यांचा सांधा जोडणे, हा हेतू सारामाफीमागे होता. पुण्यात राज्यकारभाराची एक ब्रिटिश चौकट निर्माण केली गेली. त्याप्रमाणेच अहमदनगर, खानदेश इ. प्रदेशांमध्ये पेशावाई नष्ट करून ब्रिटिश राजवट साकारली गेली. नवे इंग्रजी शासन जनमानसात लोकप्रिय करण्यासाठी प्रयत्न केले गेले.

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई जाऊन ब्रिटिश अंमल सुरू झाला, हे सत्तांतर लोकांच्या पचनी पडण्यासाठी, त्यांच्या मनात ब्रिटिश राजवटीबद्दलची कटूता कमी करण्यासाठी दारुबंदी, जुगार बंदी, सारखे निर्णय घेण्यात आले. त्यामुळे नव्या राजवटीला अनपेक्षित असे सहकार्य मिळाले. उदा. भारतीय कला, विद्या यांची प्रगती होण्यासाठी दक्षिण प्रथा चालू ठेवून पाठशाळांना पेशवे सरकारतर्फे मिळाणारे आर्थिक सहकार्य एलफिन्स्टननेही चालू ठेवले.

पेशवे काळात ब्राह्मण ही सत्ताधारी जमात होती, ब्राह्मणांनी संस्कृती, राजकारण व प्रशासन या क्षेत्रांत नेतृत्व केलेले होते. या जमातीची उपयुक्तता लक्षात घेऊन एलफिन्स्टनने महाराष्ट्रावर राज्य करण्यासाठी ब्राह्मण वर्गास हाताशी धरले. ब्राह्मणांना सन्मानाने वागवून उदारपणे दक्षिणा दिली. महाराष्ट्रातील लोकमत इंग्रजांना अनुकूल करून घेण्यासाठी त्यांचे हे धोरण इंग्रजांसाठी उपयुक्त ठरले.

एलफिन्स्टनच्या काळात महाराष्ट्राच्या राज्यकारभारात आधुनिकता आली. जुनी सरंजामशाही कार्यपद्धती हळूहळू अस्तास गेली. व नवे प्रशासकीय विभाग सुरू झाले. पुणे, सातारा, खानदेश, अहमदनगर येथे कलेक्टर नियुक्त करण्यात आले. एलफिन्स्टनने महाराष्ट्रात नव्या राज्याची घडी हळूवारपणे बसविली. त्यामुळे हे सत्तांतर सहजपणे, अविरोधपणे घडून आले. लोकांच्या विश्वासाला तडा जाईल अशी धोरणे त्याने राबविली नाहीत. नेमस्त व उदारमतवादी असे एलफिन्स्टनचे धोरण

होते. इंग्रजी राजवटीचा नवेपणा इथल्या रयतेला बोचणार नाही, आपले परकीयत्व झाकले जाईल असा सरळ हिशेब एलफिन्स्टनचा होता. एलफिन्स्टनने आपल्या राज्यातील जहागीरदारांना पेन्शन देण्याची व्यवस्था केली. तसेच पेशवाईतील सनदी अधिकाऱ्यांनाही निवृत्तवेतन दिले. या धोरणामागे हेतू हा होता की, इंग्रजी राजवटीने आपल्या पोटावर पाय दिला, आपले निर्वाहाचे साधन हिरावून घेतले असे त्यांना वाटू नये आणि भविष्यात त्यांनी इंग्रजी राजवटीविरुद्ध बंड करू नये.

एलफिन्स्टनने जुन्या राजवटीतील काही चांगल्या गोष्टी पुढेही चालू ठेवल्या तर उणिवा दूर करून राज्यकारभाराची नवी चौकट बनविली. नव्या कल्पना, संस्था आणताना स्थानिकांचा विरोध होणार नाही याची काळजी घेतली. महाराष्ट्रात सत्तांतर घडून येत असताना अनेक समस्या, संघर्ष उद्‌भवले. या महत्त्वाच्या कालखंडात महाराष्ट्राला एलफिन्स्टनचे पुरोगामी, नेमस्त, उदारमतवादी नेतृत्व लाभले. आपण विजेते आहोत म्हणून त्याने आपली मते महाराष्ट्रावर लादली नाहीत. हे त्याचे वेगळेपण होते. महाराष्ट्रातील सत्तांतर हे त्याच्यासारख्या उदारमतवादी व आधुनिक विचारांच्या व्यक्तीच्या हस्ते झाले. हे महाराष्ट्राचे नशीबच होय. एलफिन्स्टनने घातलेल्या पायावरच आजच्या आधुनिक महाराष्ट्राची इमारत उभी आहे.

कंपनीच्या कार्यकाळात मुंबई इलाख्याची निर्मिती केली. कंपनीने मराठ्यांच्या सर्व सरदारांचा पराभव केला आणि १८१८ मध्ये मुंबई रेसिडेन्सी किंवा मुंबई इलाखा निर्माण केला. मुंबई इलाख्यात खानदेश, बेळगाव, रत्नागिरी,कुलाबा, धारवाड, गुजरातचा काही भाग व कोल्हापूर-सातारा सोडून पश्चिम दख्खनचा समावेश होता. मुंबई इख्याचा कमिशनर म्हणुन एलफिन्स्टनने कार्य केले. १ नोव्हेंबर १८१९ पासून मुंबई इलाख्याचा तो गव्हर्नर बनला. तो १८२७ पर्यंत या पदावर होता.

माऊंट स्टुअर्टच्या आधुनिक महाराष्ट्रातील योगदानाबद्दल 'महाराष्ट्रगाथा' या ग्रंथात ह. म. घोडके यांनी अतिशय समर्पक वर्णन केले आहे. ते असे-

''मराठे शाहीच्या अस्तानंतर महाराष्ट्रात जी ब्रिटिश राजवटी सुरू झाली, त्याचे नेतृत्व एलफिन्स्टनसाख्या उमद्या माणसाकडे आले, त्यामुळे ही गुलामगिरी बरीच सुसह्य झाली. या उदारमतवादी प्रशासकाने आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी केली व मुख्य म्हणजे सरंजामशाही महाराष्ट्राला आधुनिक काळात आणण्याचे श्रेय बरेचसे त्याला दिले जाते....... महाराष्ट्रात ब्रिटिश पद्धतीचे आधुनिक प्रशासन सुरू करायचे व त्याचबरोबर मराठेशाहीतील पूर्वापार चालत आलेल्या काही चांगल्या प्रथाही टिकवायच्या. इंग्लंडमधील उदारमतवाद येथे जमेल तितका अंमलबजावणीत आणावयाचा व येथील सुरंजामशाहीतील अनिष्ट गोष्टींना शक्य तितकी मुरड घालावयाची, अशी उद्दिष्टे मनात बाळगून एलफिन्स्टनने महाराष्ट्रात सत्तांतर घडवून आणले व आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी केली.''

## (ब) ब्रिटिश विजयकालीन महाराष्ट्राची सामाजिक व आर्थिक परिस्थिती –

**सामाजिक परिस्थितीः–**

महाराष्ट्र प्रदेश आणि महाराष्ट्र समाज यांची काही गुणवैशिष्ट्ये आहेत. 'महाराष्ट्रीयत्व' या संज्ञेने या सर्व गुणवैशिष्ट्यांना अधोरेखित करता येईल. समाजातील वैचारिक प्रेरणा या सामाजिक पैलू आणि सांस्कृतिक जीवन यांना विशिष्ट आकार देत असताना, वस्तुतः समाजासंबंधीचा इतिहास हा अधिक मूलगामी आणि व्यापक स्वरूपाचा असतो; त्यामुळे इतिहासाचा विचार सामाजिक संदर्भात होणे अधिक महत्त्वाचे असते.

आधुनिक महाराष्ट्राच्या आरंभकालीन म्हणजे ब्रिटिश विजयाच्या वेळी महाराष्ट्राची सामाजिक परिस्थिती पाहण्यापूर्वी महाराष्ट्राच्या प्राचीन समाजजीवनाचा आढावा घेणे आवश्यक आहे. सातवाहनांच्या कालखंडात महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, नागरी जीवनाचा प्रारंभ झाला. हा कालखंड म्हणजे महाराष्ट्राच्या सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनाच्या बहुमुखी विकासाचा कालखंड होय. सातवाहन ते यादव काळात महाराष्ट्राच्या समाजजीवनाला एक आकार प्राप्त झाला. दहाव्या- अकराव्या शतकात समाजव्यवस्थेचे स्वरूप अधिक ताठर झाले. सातवाहन ते यादव हा काळ महाराष्ट्र समाजजीवनाचा पहिला टप्पा होय. महाराष्ट्र समाज, संस्कृती, मराठी भाषा, मराठी मन ही सर्व वैशिष्ट्ये यादव काळात आकाराला आली.

अल्लाउद्दिन खिलजीच्या आक्रमणामुळे यादव सत्तेचा पराभव झाला. पराभव आणि पारतंत्र्य यांचा हा प्रारंभ होता. यादव काळातील जातिभेद, यामुळे समाज अवनतीकडे गेला. चातुर्वर्ण्य व्यवस्थेतून जातीयता, विषमता निर्माण झाली. संकुचित वृत्ती, अस्पृश्यता, ऐक्याचा अभाव या बाबी बाह्य आक्रमणांस कारणीभूत ठरल्या. शिवकाळात बलुतेदारी व्यवस्था भरभराटीस आली होती.

पेशवाईत जातिबंधने अधिक कडक झाली. सर्व जातींमध्ये पोटजातींच महत्त्व आले होते. विशिष्ट जातीसाठी विशिष्ट काम ठरलेले होते. व त्यामुळे कायमचा दीनदर्जा प्राप्त झालेल्यांना त्यातून सुटका नव्हती. या जातींमध्ये सामाजिक श्रेष्ठत्वासाठी संघर्ष होता. या सामाजिक पार्श्वभूमीवर १८१८ मध्ये ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रात निर्माण झाली.

सातवाहन काळापासून विविध सामाजिक संस्था आणि प्रवृत्ती ह्यांच्या माध्यमातून महाराष्ट्राचे समाजमन कसे घडत गेले यासंबंधी न्या. म. गो. रानडे म्हणतात -

''भिन्न वंशाच्या महाराष्ट्रीयांत योग्य मिश्रणामुळे त्यांच्या संस्था व धर्म यांच्याद्वारे भारताच्या इतर भागात क्वचित दिसणारा समतोल राखला आहे..... सांप्रदायिकता व जातिभेदाचा अतिरेक हे दोष महाराष्ट्रीयांत आढळत नाहीत.....'' (- मराठी सत्तेचा उत्कर्ष )

ब्रिटिशपूर्व काळापर्यंत ज्या ज्या राजघराण्यांनी राज्य केले त्यांच्या धोरणांचा, संस्कृतीचा, राजकारणाचा प्रभाव प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे निर्माण झाला. त्याचे मूलगामी परिणाम महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितीवर कालौघात घडून आले. या सामाजिक परिस्थितीची ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांता येतील-

पेशवेकालीन महाराष्ट्रातील सामाजिक परिस्थितींवर रूढी, परंपरा, अंधश्रद्धा या अनिष्ट प्रथांचा पगडा होता. ही समाजव्यवस्था ईश्वरप्रणितच आहे. त्यात कोणताही बदल करण्याचा अधिकार मानवाला नाही. ती स्वयंभू आहे. ईश्वरप्रणित समाजव्यवस्थेत बदल करणे म्हणजे ईश्वरीय संकट ओढवून घेणे होय, अशा प्रकारची लोकभावना समाजात निर्माण झालेली होती.

१९ व्या शतकाच्या प्रारंभी महाराष्ट्रीय समाजात वर्णव्यवस्था, जातिव्यवस्था, श्रेष्ठ-कनिष्ठ, स्पृश्य-अस्पृश्य इ. बाबतीत कडक निर्बंध अस्तित्वात होते. वैज्ञानिक व प्रगत दृष्टिकोन, तर्कनिष्ठ विचार यापेक्षा समाजातील चालीरीती, रूढी व परंपरा यांना फार महत्त्व होते. धार्मिक विचार व आचारांचा प्रभाव समाज जीवनावर होत.

✻ उत्तर पेशवाईत व इंग्रजी रालवटीत महराष्ट्रात देवभोळेपणा, भावडेपणा आणि अंधश्रद्धा मोठ्या प्रमाणावर होती. शकुन-अपशकुन, उपासतापास, कर्मकांड, तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये यांचे प्रस्थ होते. भूत, भानामती, मंत्रतंत्र, जप-अनुष्ठाने यावर समाजाचा विश्वास होता.

✻ इ.स. १८१८ मध्ये पेशवाई संपूर्ण ब्रिटिश अंमल सुरू झाला असला तरी जातीप्रथेत फारसा बदल झाला नाही. जातीव्यवस्थेमध्ये जी उतरंडीसारखी श्रेणीबद्ध रचना होती, उच्चनीचतेच्या ज्या भावना होत्या, त्या इंग्रजी राजवटीच्या सुरुवातीलाही होत्या. जातीनुसार व्यवसाय व कर्म करावयाचे असल्यामुळे समाजात प्रत्यक्ष संघर्ष नव्हता.

✻ पेशवाईत सत्ताधारी वर्ग ब्राह्मण हा होता. समाजाला नेतृत्व देण्याचे कार्य या वर्गाकडे होते. सहाजिकच ब्राह्मण वर्गाला समाजात मानाचे स्थान होते. जाती अथवा वर्णव्यवस्थेला ईश्वरी अधिष्ठान दिल्यामुळे त्याविरुद्ध बंडाची भावना नव्हती उलट 'जातीसाठी माती खावी' अशा म्हणींद्वारे जातीव्यवस्थेला महत्त्व दिले जाई.

✻ १९ व्या शतकारंभी बालविवाहाचे वय ६ ते ८ वर्षे होते. विवाहाचे वय विधवा, सतीप्रथा या समस्या निर्माण झाल्या. जरठ-कुमारी विवाह होत असत. बालविधवांना संतती झाल्यास त्यांच्या अपत्यांचा प्रश्न निर्माण होत असे.

✻ बालविवाहांमुळे विधवांची समस्या होती. विधवांना केशवपन करावे लागे. अर्थात ही प्रथा प्रामुख्याने ब्राह्मण जातीमध्ये होती. विधवांवर अनेक बंधने होती. त्यामुळे विधवा स्त्रीचे जगणे यातनामय होते. विधवांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टिकोन हा उदार नव्हता.

विधवांना पूर्वी पुनर्विवाह करण्याची परवानगी नव्हती. विधवांच्या पुनर्विवाहाकडे पाहण्याची समाजाची दृष्टी सहानुभूतीची नव्हती. इंग्रजी राजवटीचा प्रारंभ झाल्यावर समाजसुधारकांनी हवधवा विवाहास प्रोत्साहन दिले. विशेषतः इ.स. १८१७ मध्ये मुंबईत विधवाविवाहाच्या चळवळीस सुरुवात झाली. गंगाधरशास्त्री फडके, जगन्नाथ शंकरशेठ व विष्णुशास्त्री पंडित हे या चळवळीचे प्रणेते मानले जातात. पुढे परमहंस सभा, सत्यशोधक समाज, प्रार्थना समाज या संस्थांनी त्यास उत्तेजन दिले. अर्थात असा विधवा विवाह घडून येण्यास १८६० साल उजाडावे लागले. मात्र याचा प्रारंभ ब्रिटिश विजयाच्या वेळीच झाला होता.

✻ बहुपत्नीत्व, सतीप्रथा या जाण्यासाठी स्त्रीला सक्तीही केली जात असे. सती जाणाऱ्या स्त्रीला देवता मानले जाई, तिचे उदात्तीकरण केले जाई. सती प्रथेविषयी पुढील वर्णन वाचा-

'' इ.स.१८२३ मध्ये पुण्यात ओंकारेश्वरला कोकणस्थ ब्राह्मणांची स्त्री राधाबाई सती निघाली. तिला सरणावर बसविली व अग्नी दिली. पण तिला तो अग्नी सहन न होता तिने सरणातून बाहेर उडी टाकली तेव्हा तिचे अंग भाजले होते; प्राण होता म्हणून इंग्रज सरकारच्या कामगारांनी शहरात परत आणून बरी होण्यासाठी औषधी उपाय केले; पण ती फार होरपळली होती म्हणून काही उपाय चालला नाही. ती तीन दिवसांनी मेली. गावात सती परत आणविली म्हणून शास्त्राधाराने दुष्ट चिन्ह झाले असे सर्व लोक बोलू लागले.''

जोशी ना. वि-पुणे शहराचे वर्णन

वरील उताऱ्यावरून तत्कालीन स्थितीची कल्पना येईल.

**✻ आर्थिक परिस्थिती–**

पेशवाईत कृषी हेच समाजाच्या उपजीविकेचे महत्त्वाचे साधन होते. लागवडीखालील व पडीक असे दोन मुख्य प्रकार जमिनीचे होते. लागवडीखालील जमीन जिराईत व बागाईत अशा दोन प्रकाराची होती. खरीप व रब्बी हे पिके घेण्याचे प्रमुख हंगाम होते. बहुतांश शेती ही निसर्गावर अवलंबून होती. पशुपालन हा जोडव्यावसाय होता.

ब्रिटिश येण्यापूर्वी येथील ग्रामीण जीवन स्वावलंबी होते. ग्रामीण अर्थव्यवस्था शेतीशी निगडीत होती. तर नागरी अर्थव्यवस्था व्यापार, उद्योगधंदे व प्रशासन यांच्याशी निगडित होती. इंग्रजांचा विजय होण्याच्या वेळेच्या आर्थिक परिस्थितीला मध्ययुगीन म्हणजेच मुस्लीम व शिवकालीन राजवटींतर्गत अर्थव्यवस्थेची पार्श्वभूमी लाभलेली आहे.

शिवकालीन महाराष्ट्र हा मुख्यत्वेकरून ग्रामीण होता. शिवकाळात राज्यकारभार हा किल्ल्यावरून केला जाई. राज्यकारभाराच्या निमित्ताने विकसित झालेल्या नागरी राजधान्या या काळात आढळून येत नाहीत. भूभागाचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने किल्ल्यांना अनन्यसाधरण महत्त्व प्राप्त झाले. ग्रामीण भागात मुख्य व्यावसाय हा शेती होता. शेतकऱ्याला आपली शेती विकसित करण्यासाठी सुरक्षितता हवी असे, आपण विकसित केलेली जमीन भविष्यकाळातही आपल्याच मालकीची राहील, याची त्याला शाश्वती पाहिजे असे. यातून महाराष्ट्रात वतनदारी विकसित झाली.

पेशवेकाळात ग्राम, कसबा(मोठे खेडे), मौजे (मध्यम खेडे), मचरे (लहान खेडे) अशी रचना होती. पाटील व कुलकर्णी हे दोघे प्रामुख्याने खेड्याची इनामी जमीन असे पाटील व कुलकर्णी पदाचे हक्क वंशपरंपरेने मिळत. गावाच्या संरक्षणाची व सारावसुलीची जबाबदारी अनुक्रमे पाटील व कुलकर्णी यांची असे.

गावातील रहिवाशांच्या गरजा भागविण्याचे काम गावातील बलुतेदार व अलुतेदार करतचौगुला, महार, सुतार, न्हावी, सोनार, जोशी, परीट, गुरव व कोळी हे बारा बलुतेदार आणि तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डोंगरी, भाट, ठाकर, गोसावी, जंगम, मुलाणी, वाजंत्री, घडशी, कलावंत, तराळ, भोई, हे अलुतेदार होते. प्रत्येकाकडे गावकीचे कोणते ना कोणते काम असे. काम वैयक्तिक असेल तर त्यास मोबदला मिळे व गावकीच्या कामासाठी जमीन इनाम म्हणून मिळे. बलुतेदारांची कामे तीन प्रकारची असत. एक सरकार उपयोगी, दुसरे ग्रामउपयोगी व तिसरे कुलउपयोगी.

छत्रपती शिवाजी महाराजांनी जमिनीची मोजणी करून,प्रतीनुसार करआकारणी सुरू केली. नानासाहेब पेशव्याने महसुलाची घडी नीट बसविली. जमिनीची अव्वले, दुय्यम व सीम अशी विभागणी केली होती. पाटस्थळ व मोटस्थळ असे जमिनीची दोन प्रकार होते. नवीन मुलूख जिंकल्यावर सारा आकारणी नव्या पद्धतीने केली जाई. मामलेदारकडे पुढील कामे होती-

१) कुळांना तगाई देणे.

२) पागांची डागडुजी करणे.

३) बागा खंडाने लावणे.

४) शेतकऱ्यांस धीर देऊन शेतजमीन कसणे.

५) गावाचे संरक्षण करणे.

दूरवरचे मामलेदार आपल्याकडील वसूली पेशव्यांना हुंडीद्वारे पाठवत असत. मामलेदार हा सारा वसूल करणारा अधिकारी होता.

पेशवाईत महसूल किंवा कर पुढील मार्गांनी मिळत असे-

१) शेतसारा

२) दुकानदार, लोहार इ. व्यवसायिक.

३) जत्रेतील पाल.

४) दगडाच्या खणी.

५) जलवाहतूक करणारी गलबते.

पेशवे काळात सुभेदार, सरदेशमुख, देशमुख, देशपांडे, पाटील,कुलकर्णी, चौगुला, महार, हे सर्व अर्थव्यवस्थेतील अत्यंत महत्त्वाचे घटक होते. मामलेदार, कमाविस्तार व ग्रामस्थ हे शेतीकडे विशेष लक्ष देत.

पेशवे काळात फुलबाग व फळबागांकडेही विशेष लक्ष दिले गेले. इ.स. १७९१ च्या आसपास पेशव्यांनी हिराबाग, सारसबाग, वसंत बाग, पर्वती बाग, पाषाण बाग, हिंगणे बाग, रमण बाग, इ. बागा निर्माण केल्या. १८१३ मध्ये दुसऱ्या बाजीरावाने बंगला बागेसाठी संत्री, द्राक्षे, अंजीर, डाळिंब, पेरू, इ.फळझाडे व मोतीचा, गुलाब, जाई, बेलीचा, सोनचाफा, इ. फुलझाडे विकत घेतल्याची नोंद आहे.

पेशवे काळात व्यापार-उदीमाची बरीच प्रगती झाली होती. महाराष्ट्रात कापसाचे उत्पन्न मोठया प्रमाणावर असल्यामुळे कापूस पिंजून काढणे, सूत काढणे, कापड विणणे हे उद्योग प्रगत होते. पैठण, नागपूर, सोलापूर, जालना, या महत्त्वाच्या बाजारपेठा होत्या. सावकारीचा व्यवसाय तेजीत होता. सावरकार पेशव्यांनाही कर्जे देत. थत्ते, दातार, दामले, कर्वे, गाडगीळ, पटवर्धन, भावे, रास्ते, लेले इ. काही सावकारांची नावे सांगता येतील.

शेतकरी हा आर्थिक जीवनाचा केंद्रबिंदू असला तरी त्याची स्थिती वाईटच होती. पाणीपुरवठ्याच्या सोयी नसल्यामुळे उत्पादन कमी होते. सावरकरांकडून त्यांना कर्जे घ्यावी लागत.

इ.स. १८१८ मध्ये पेशव्यांचा इंग्रजांनी पराभव केला व वैभवसंपन्न पुणे शहरास अवकळा झाली. पुण्याच्या दुर्दशेचे वणन लोकहितवादी पुढील शब्दात करतात-

“ मोठमोठे वाडे ओस पडले. सर्व अदितवार पेठ आणि पेढीवाले यांचा नायनाट झाला.....घरमोडे म्हणून नसिनच उदमी निघून त्यांचा घरे, वाडे वगैरे पाडण्याचा रोजगार चालला! लोकांच्या जहागिरी, वतने, इनामे वगैरे बंद होऊन थोर लोकास आपल्या घरातले लक्षावधी रुपयांचे सोन्यारुप्याचे दागिने व भांडी कुंडी बाजारात विकावयास काढावी लागली. घरांच्या व जमिनीच्या किंमती उतरवत लोक अगदी टेकीस आले.

दुसऱ्या बाजीरावाच्या काळातील आर्थिक दिवाळखोरी हा घटक मराठ्यांच्या ऱ्हासाला मुख्यत्वे कारणीभूत ठरला. व हे राज्य व्यापारी-भांडवलशाही राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या इंग्रजांपुढे टिकाव धरू शकले नाही. राज्यकारणाप्रमाणे अर्थकारणातही मराठे इंग्रजांपेक्षा कमी पडले. मराठा कालखंडातील सावरकर घराणी इंग्रज आमदनीत दरिद्री व नादार झाली. व त्यांची जागा महाराष्ट्रात गुजर-मारवाडी यांनी घेतली. पुढे याच समाजाने ग्रामीण व शहरी महाराष्ट्रातील अर्थव्यवस्थेवर आपली पकड मजबूत बसविली, पेशवाईत पुण्याशिवाय जुन्नर, खेड, सासवड, इंदापूर, सुपे, नाशिक इ. लहान गावे सधन होती. त्यांचे वैभव नष्ट होऊन तीही दारिद्री बनली. तेथील मोठमोठे वाडे, हवेल्या ओस पडल्या. पुण्याचे वैभव नष्ट होऊन इंग्रजी आमदानीत मुंबईचे प्रस्थ वाढले. मुंबई हे सत्ता-उद्योग केंद्र बनले. आधुनिक महाराष्ट्राला ही आर्थिक पार्श्वभूमी होती.

## १.२.५ ब्रिटिश वसाहतिक राज्याचा प्रभाव

औद्योगिक क्रांती व नव्या सागरी मार्गाचे शोध हे व्यापाराला अनुकूल घटक ठरले. यातून युरोपीयनांची पावले पूर्वेकडे वळली, पूर्वेत व्यापारासाठी वसाहती निर्माण केल्या. इ.स. १६00 मध्ये

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून ब्रिटिशांनी भारतात हळूहळू राजकीय वर्चस्व स्थापन केले. इ.स.१६०० ते १८५७ हा प्रदीर्घ काळ वसाहतकाळ म्हणून ओळखला जातो. प्रारंभी फक्त व्यापार करण्यासाठी आलेल्या कंपनीने भारताला हुकमी वसाहत बनविले. कंपनी प्रशासनाच्या माध्यमातून ब्रिटिशांनी वसाहतवादी धोरणाचा अवलंब केला.

" वसाहतवाद म्हणजे देशाबाहेर वसाहती मिळवून त्यांचे शोषण करण्याची प्रवृत्ती. वसाहतवादात मायभूमीच्या तुलनेत वसाहतींना दुय्यम स्थान असते. या प्रदेशांचे शोषण करता यावे यासाठी राजकीय नियंत्रणाद्वारे शासनयंत्रणा निर्माण केली जाते. या वसाहतींचा उपयोग मायभूमीच्या उत्कर्षासाठी केला जातो."

वसाहतवादी कालखंडात संपूर्ण भारतात वाणिज्य तत्त्वज्ञानास चालना मिळाली, ही एक शोषक अर्थव्यवस्था होती. इंग्रजांचा वसाहतवाद म्हणजे आर्थिक वसाहतवाद होता. इ.स. १८१३ पर्यंत व्यापारी क्षेत्रात कंपनीची एकाधिकारी शाही निर्माण झाली होती. मुक्त व्यापारी धोरणामुळे भारतातील संपत्तीचा ओघ ब्रिटनकडे वाहू लागला. म्हणूनच याबाबत लोकहितवादी म्हणतात, " हिंदुस्थानची लक्ष्मी दर्यापार जाऊ लागली."

इ.स. १८१८ मध्ये दुसऱ्या बाजीरावच्या काळात मराठ्यांचा पराभव होऊन महाराष्ट्रात ब्रिटिश राजवट सुरू झाली. या वसाहतिक राजवटीचे देशाप्रमाणे महाराष्ट्रावरही परिणाम झाले. वासाहतिक राजवटीचा प्रभाव विविध क्षेत्रांत निर्माण झाला. यापैकी प्रशासकीय, सामाजिक, आर्थिक व वैचारिक क्षेत्रांवर महाराष्ट्रात काय प्रभाव निर्माण झाला, याचा आपण विचार करणार आहोत.

(अ) प्रशासकीय क्षेत्र-

इ.स. १८१८ मध्ये पेशवाई जाऊन इंग्रजी अंमल सुरू झाला. नवी विटी, नवे राज्य, या न्यायाने इंग्रजांनी विविध क्षेत्रांप्रमाणे प्रशासनाच्या क्षेत्रातही अनेक बदल घडवून आणले, त्याचा प्रभाव महाराष्ट्रात निर्माण झाला. प्रशासनाच्या क्षेत्रात माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने मोठे योगदान दिले. तो १८१९ ते १८२७ च्या कालावधीत मुंबईचा गव्हर्नर होता, त्याच्या उदारमतवादी विचारांचा ठसा महाराष्ट्राच्या प्रशासनावर उमटलेला आहे.

ब्रिटिश अंमलाचा महाराष्ट्रावर एक मोठा परिणाम झाला. तो म्हणजे मध्यमवर्गाचा उदय होय, याच मध्यमवर्गाने पुढे प्रशासनाच्या क्षेत्रात मोठी भूमिका बजावली. इंग्रजांनी जिंकून घेतलेला महाराष्ट्र हा परिवर्तनाच्या उंबरठ्यावर उभा असलेला होता. सत्तांतरानंतर महाराष्ट्रात जे नवे स्वत्वसंशोधन सुरू झाले, त्यामध्ये परंपरेतून मिळालेल्या प्रेरणा आणि इंग्रजी अंमलातील पूरक घटक यांचा समन्वय घडला.

एलफिन्स्टनळे हा मूलतः एक साम्राज्यवादी होता आणि त्याची सर्व प्रशासकीय व्यूहरचना ब्रिटिश साम्राज्यवादाला पूरक होती. त्यासच्या प्रशासकीय नीतीच बैठक परंपरवादी व निसर्गवादी होती. त्याने एतद्देशिवादी व युरोपीय पद्धतींचा मेळ घालून प्रशासन पद्धती विकसित केली.

इंग्रजी अंमलामुळे महाराष्ट्रात प्रशासनाची एक चौकट निर्माण झाली. वसाहतकाळात ब्रिटिशांनी जसजसे भारतीय प्रदेश ताब्यात घेतले तसे तेथे ब्रिटिश प्रशासन लागू केले. त्यामुळे पारंपरिक, मध्ययुगीन प्रशासन पद्धतीचा अस्त झाला. केंद्र, राज्य, जिल्हा, तालुका व ग्राम प्रशासनाची एक साखळी निर्माण झाली... केंद्रीय प्रशासनात गव्हर्नर जनरल किंवा व्हाईसरॉय तर राज्यात गव्हर्नर हा प्रशासनाचा प्रमुख होता. आजचे राष्ट्रपती व राज्यपाल हे त्याचीच आकृती होय.

ब्रिटिश प्रशासनातील 'कलेक्टर' पदाचे महत्त्व आजही अबाधित आहे. जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी असे विस्तृत अधिकार त्याच्याकडे होते. त्याच्या मदतीला दप्तरदार, कोषाध्यक्ष, हिशेबनीस, सराफ, कारकून, मामलेदार, पाटील-कुलकर्णी हे अधिकारी होते. महाराष्ट्रात 'कल्याणकारी राज्यव्यवस्था' निर्माण करण्याचा प्रयत्न वसाहतकाळात झाला. अर्थात त्याचा साधन म्हणून ब्रिटिशांनी उपयोग केला.

इ.स.इ१७७३ च्या ' रेग्युलेटिंग अ‍ॅक्ट' नुसार संपूर्ण देशातच प्रशासन व्यवस्थित आमूलाग्र बदल झाले. प्रशासनाचा घटक निर्माण केला. फायदा व सुव्यवस्था राखणे व महसूल वसुली करणे ही मुख्य दोन कामे जिल्हाधिकाऱ्याकडे होती. याशिवाय पोलीस, न्याय, फौजदारी, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य इ. क्षेत्रांवरही कलेक्टरचे अप्रत्यक्ष नियंत्रण होते. ब्रिटिश प्रशासनात 'कलेक्टर' पदाचे महत्त्व विशद करताना हंटर यांनी मोठ्या मार्मिक शब्दांत केले आहे. ते म्हणतात -

''जिल्ह्याचा अधिकारी कलेक्टर, दंडाधिकारी अथवा उपऱ्याआयुक्त या कोणत्याही नावाने ओळखला जाणार असू द्या, तो जिल्ह्याचा एक जबाबदार प्रशासकीय प्रमुख आहे. भारतातील प्रशासनाची खरीखुरी धुरा तोच सांभाळतो. त्याच्या वैयक्तिक चारित्र्य आणि कर्तृत्वावरच प्रशासनाची सर्व मदार असते. त्याच्यावर सोपविलेली जबाबदारी इतकी बहुविध आणि नाना प्रकारची आहे की, त्रयस्थाला अचंबाच वाटावा.

आपले देशबांधव व एद्देशीय सहकारी यांना त्याच्या वैयक्तिक कार्यक्षमतेतून प्रेरणा मिळू शकते. या पदाची तुलना करण्याचा मोह अनेकांना झालेला आहे; परंतु भारतातील कलेक्टर त्याच्यासारखा एकमेवच आहे. तो मध्यवर्ती शासनाचा दुय्यम अधिकारीच नसून तो भारतीय शासनाच्या धोरणांचा प्रतीक व प्रतिनिधी आहे. त्याचे हे पद पूर्णतः व्यक्तिगत स्वरूपाचे आहे. ग्रामीण विकासाचा व ग्रामीण भागातील जनतेच्या सुखाचा तो एक स्फूर्तिदाता आहे.

जिल्हा प्रशासनात तालुका हा प्रशासनाचा घटक महत्त्वाचा होता, त्यास तहसील असेही म्हणत. तहसीलदार हा या घटकाचा प्रशासकीय प्रमुख होता. त्यानंतर ग्राम हा प्रशासनाचा शेवटचा घटक होता. याशिवाय 'डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डा' ची ही निर्मिती करण्यात आली होती. तसेच सिव्हिल सर्जन, जिल्हा पोलीस अधिक्षक, ही पदेही महत्त्वाची होती.

वसाहतवादी राजवटीतील प्रशासन व्यवस्थेचा प्रभाव आजही कायम आहे. कंपनी काळातील सर्वोच्च न्यायालये, दिवाणी व फौजदारी न्यायालयांची व्यवस्था आजही कायम आहे.

प्रशासनात महत्त्वाच्या पदांवर नियुक्तीसाठी परीक्षा पद्धतीचा अवलंब केला जाऊ लागला, हा ब्रिटिश प्रशासनाचा सर्वात मोठा प्रभाव होय. ब्रिटिशकाळात नोकरशाही निर्माण झाली. या नोकरशाहीने प्रशासनावर आपली पकड निर्माण केली. ही नोकरशाही म्हणजे आजच्या भारतीय प्रशासनाला ब्रिटिश वसाहतवादाची सर्वात मोठी देणगी होय.

' कायद्याचे राज्य' हा ब्रिटिश प्रशासनाचा भारतीय जीवनावरील सर्वात मोठा प्रभाव होय. ' 'समान गुन्ह्यासाठी समान शिक्षा' या पैलूची ओळख, जाणीव भारतीयांना प्रथमच झाली. कोणीही कायद्यापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही या तत्त्वाची ओळख भारतीयांना झाली. एकूणच आजची आपली प्रशासनपद्धती ही पूर्णपणे ब्रिटिश प्रभावाची देणगी होय. प्रशासन पद्धतीतील प्रभाव सारांश रुपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल -

**१) प्रशासनाला उदारमतवादाची चौकट.**

**२) मध्यमवर्गाचा उदय.**

३) केंद्र, राज्य, जिल्हा, तालुका व ग्राम पातळी अशी प्रशासन श्रृंखला.

४) कलेक्टर पदाचे महत्त्व व अधिकार.

५) कल्याणकारी राज्यव्यवस्था.

६) न्यायव्यवस्था.

७) प्रशासकीय नद भरतीसाठी परीक्षा पद्धतीचा अवलंब.

८) नोकरशाहीची निर्मिती.

९) कायद्याचे राज्य व श्रेष्ठत्व.

१०) इंग्रजी भाषेला प्रशासनाला महत्त्व.

## (ब) सामाजिक क्षेत्र–

वसाहतवादी राजवटीचा अन्य राजकीय क्षेत्रांप्रमाणेच सामाजिक क्षेत्रावरही मोठा परिणाम, प्रभाव निर्माण झाला होता. इंग्रजी शिक्षणामुळे समाजसुधारणांच्या प्रयत्नांना गती मिळाली, व्यापार-उदीम ही वाढली. समाजातील शिक्षण, वर्तमानपत्रे, चालीरिती, वेशभूषा, केशभूषा, आहार-विहार, स्थापत्य, स्त्रीशिक्षण, धार्मिक पुनरुत्थान, जातीय व्यवस्था, दळणवळण इ. सर्वच क्षेत्रात आमूलाग्र प्रभाव निर्माण झाला.

ब्रिटिशांनी येथे पाश्चात्त्य शिक्षण पद्धतीचा पुरस्कार करताच विशेषतः येथील हिंदूनी त्याचा स्वीकार केला. यातून एक जागृत नवा हिंदू, भारतीय आकारास आला. याच मध्यमवर्गीय, सुशिक्षितांनी साम्राज्यवादी चौकटीत आणि ब्रिटिशांच्या वर्चस्वाखाली राहूनच आपली सर्वांगीण प्रगत केली. इंग्रजी भाषेचा स्वीकार केला तसेच या मध्यमवर्गाने पाश्चिमात्य केशरचना, वेशभूषा, आहार-विहार आत्मसात केले. मुख्य म्हणजे विज्ञानवादाचा स्वीकार केला. पाश्चिमात्य शिक्षण, संस्कृती, विज्ञान संस्कृती, विज्ञान या प्रक्रियेतून जात असतानाच त्याला राष्ट्रजागृतीचे शिक्षण मिळाले.

प्रबोधनाचा प्रारंभ महाराष्ट्रात इंग्रजी वसाहतवादामुळेच झाला. हिंदुस्थानात आलेल्या या गोऱ्या पाहुण्यांच्या सामर्थ्याची चिकित्सा येथील विद्वान मंडळी करू लागली. अनेक विद्वानांनी त्यांच्या सामर्थ्याचे मर्म जाणून घेण्यासाठी इंग्रजी भाषेचे अध्ययन सुरू केले. त्यातून आपल्या समाजाच्ण्या ऱ्हासाची कारणे कळाली.

ज्या आर्थिक व सामाजिक परिस्थितीत वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था तसेच कर्मकांड, श्रेष्ठकनिष्ठत्वाच्या कल्पना निर्माण झाल्या त्या बदलल्या पाहिजेत असे येथील विचारवंतांना वाटू लागले. समाजातील दोष आणि उणिवा दूर करण्याची, व समाजाला ज्ञानसंपन्न करण्याची, सती, अस्पृश्यतासारख्या विकृती नष्ट करण्याची आवश्यकता येथील विचारवंतांना वाटली. वसाहतवादी राजवटीतून इंग्रजांशी आलेल्या संपर्काचा हा प्रभाव होता.

इंग्रजी राजवटीच्या संपर्कातून महाराष्ट्रात समाजसुधारकांची मोठी फळीच तयार झाली. यात बाळशास्त्री जांभेकर, महात्मा फुले, लोकहितवादी, न्या. रानडे यांचा समावेश होता. या पिढीनेच आधुनिक महाराष्ट्र घडविला. अध्ययन, ज्ञानप्रसार आणि समाजशिक्षण ही नवी व्रते स्वीकारून समाजसुधारणा महाराष्ट्रात घडवून आणल्या, राजवटीच्या प्रभावाची आणखी एक देणगी होय. या काळात निर्माण झालेल्या वृत्तपत्रांनीच महाराष्ट्र व देशाला नवविचारांचा मंत्र दिला. 'दर्पण', 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश', 'शतपत्रे' आदींनी महाराष्ट्राचे आजचे समाजमन घडविले.

इंग्रजी संस्कृतीच्या संपर्काने, आधुनिक विचारांच्या ओळखीमुळे येथील विचारवंतांना असे

वाटू लागले की, पाश्चात्त्य सांस्कृतीमधील चांगले ते घ्यावे, त्याज्य ते टाकावे. यातून वैचारिक संघर्ष निर्माण झाला. इंग्रजी विद्येचे ज्ञानभांडार यांच्या वसाहतवादी राजवटीमुळे खुले झाले. समाजाचे ऋण फेडण्याचा एक मार्ग म्हणजे आपण मिळालेले ज्ञान समाजास देणे या विचारातून प्रबोधन प्रारंभ झाला.

वसाहतवादी कालखंडात महाराष्ट्रात १९ व्या शतकात महाराष्ट्रातील समाजजीवनात मोठे स्थित्यंतर घडून आले. वर्णजातींवर आधारित समाजात आता वर्ग निर्माण झाले. व्यक्तिप्रधान राज्ययंत्रणेची जागा संस्थाप्रधान यंत्रणेने घेतल्यामुळे समाजजीवनात त्यांचे पडसाद उमटू लागले.

कायद्याचे राज्य, शिक्षणातील ऐहिक आशय, उपजिविकेच्या नव्या संधी, वाहतूक व संज्ञापनाची नवी साधने, अर्थव्यवस्थेवर पडू लागलेला व्यापारवादी - भांडवलशाही प्रभाव या सर्वांमुळे पारंपरिक समाजव्यवस्थेला तडे जाऊ लागले. या स्थित्यंतराच्या अवस्थेत सत्ताजकारणाचे महत्त्व वाढणे स्वाभाविक होते. या काळात मध्यमवर्गाने सामाजिक-धार्मिक सुधारणा चळवळींमध्ये पुढाकार घेतला, व त्यांनी समाजकारणाला दिशा दिली.''

-राजा दिक्षित, (१९ व्या शतकातील महाराष्ट्र,पृ. १४२)

इंग्रजी राजवटीत जो मध्यमवर्ग निर्माण झाला त्याने धर्मसुधारणेच्या क्षेत्रात मोठे कार्य केले. उदा. लोकहितवादी प्रणीत धर्मसुधारणेच्या व्याप्तीत जातिव्यवस्था, विवाहविषयक सामाजिक सुधारणा, स्वदेशप्रीती, रोजगार स्वातंत्र्य, विद्यावृद्धी इ. गोष्टींचा समावेश होता. अर्थात विविध मध्यमवर्गीय विचारवंत सुधारकांचे धर्मसुधारणाविषयक दृष्टिकोन भिन्न होते. परंतु धर्मचिकित्सेची निकड बहुतेकांना वाटत होती. बदलत्या कालमानाला अनुकूल अशा व्यापक बंधुत्ववादावर बहुतेक सर्वांचाच भर होता. अर्थात हा गोऱ्या साहेबांच्या संगतीचा परिणाम, प्रभाव होता.

आपल्या समाजात असलेला जातिभेद आपण नष्ट केला पाहिजे असा विचार समाजातल्या काही लोकांच्या मनात येणे हीसुद्धा क्रांतिकारक बाब होती. उदा. 'जातिभेद विवेकसार' या ग्रंथात तुकारामतात्या पडवळ म्हणतात, ''हिंदुजन जी संसारात दुःखे भोगतात त्या, किंबहुना सर्व दुःखांचे मूळ हा जातिभेद आहे.'' वसाहतवादी कालखंडात आधुनिकतेची जी ओळख समाजधुरिणांना झाली. त्यातून ही जाणीव निर्माण झाली. समाजजीवनातील स्त्रीचे स्थान, विवाहविषयक समस्या याबद्दल सुधारणांची गरज समाजाला वाटू लागली, हाही इंग्रज राजवटीचाच पराभव होता. संती, केशवपन या प्रथा, बालविवाह, जरठ कुमारी विवाह, स्त्री-पुरुष समता, स्त्री शिक्षण इ. प्रश्नांवर १९ व्या शतकात मोठे विचारमंथन घडून आले. मुख्य म्हणजे स्त्रीकडे बघण्याची दृष्टी तुलनेने अधिक मानवतावादी आणि समतावादी बनली. वाढत्या सामाजिक गतिशिलतेच्या प्रक्रियेतून स्त्रियांना वगळणे शक्य नाही आणि योग्यही नाही याची जाणीव समाजात निर्माण झाली.

इंग्रजी शिक्षण व पाश्चात्य शिक्षणामुळे महाराष्ट्रात प्रबोधनाची सुरुवात झाली. समाज व राष्ट्र जागृतीचे कार्य सुरू झाले. या बदलाने जी जागृती घडून आली त्यामुळेच ब्रिटिशांविरोधात लढा राष्ट्रीय पातळीवर उभा राहू शकला. ब्रिटिश वासाहतिक राज्याचा प्रभाव सारांश रूपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल :-

- समाजात जागृत मध्यमवर्गाची निर्मिती झाली.
- इंग्रजी भाषा व पाश्चात्त्य शिक्षणाचा स्वीकार.
- महाराष्ट्रात प्रबोधनाचा प्रारंभ.
- आपल्या समाजातील दोष व उणिवा दूर करण्याची गरज भासली.

* समाजसुधारक, विचारवंतांची एक फळीच महाराष्ट्रात निर्माण झाली.
* महाराष्ट्रात वृत्तपत्रांचे युग सुरू झाले.
* इंग्रजी विद्येचे ज्ञानभांडार खुले झाले.
* जातीयता, स्त्री-पुरुष समता याकडे पाहण्याची समाजाची दृष्टी बदलली.

(क) आर्थिक क्षेत्र-

ब्रिटिश वसाहतवादाचा कालखंड जवळपास दोन शतकांचा होता. त्यामुळे या दीर्घकालीन ब्रिटिश वास्तव्याचे बरे- वाईट परिणाम अथवा प्रभाव एतद्देशीयांवर होणे अपरिहार्यच होते. आर्थिक क्षेत्रही या प्रभावापासून मुक्त राहू शकले नाही.

ब्रिटिश वसाहतवादाचा कालखंड जवळपास दोन शतकांचा होता. त्यामुळे या दीर्घकालीन ब्रिटिश वास्तव्याचे बरे-वाईट परिणाम अथवा प्रभाव एतद्देशीयांवर होणे अपरिहार्यच होते. आर्थिक क्षेत्राही या प्रभावापासून मुक्त राहू शकले नाही.

ब्रिटिश वसाहतवादाच्या काळात ब्रिटिशमध्ये औद्योगिक क्रांती झाली. मात्र येथील पारंपरिक हस्तउद्योग नष्ट होऊन औद्योगिकरण झाले. भारतीय खेड्यांचे स्वावलंबन संपून ती शहरांवर अवलंबून राहू लागली. ग्रामोद्योग संपुष्टात आल्यामुळे खेडी ओस पडू लागली.

औद्यीगिकरणामुळे भांडवलदार कामगार हा नवा वर्ग निर्माण झाला. मजूर, कामगारांच्या संघटना निर्माण झाल्या. संघटित मध्यमवर्ग व संघटित कुशल मजूरवर्ग ही औद्योगिकरणाची देणगी होय.

एकीकडे औद्योगिक क्रांतीमळे इंग्लडची भरभराट होत असताना, भारतीयांच्या दारिद्र्यात वाढ झाली. याबाबत डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात, ''भारत ही इंग्लंडचे पोट भरणारी दुभती गाय बनली आणि तिची वासरे मात्र उपाशी मरू लागली.''

वसाहतवादी धोरणामुळे कुटिर उद्योग बंद होऊन यावर अवलंबून असलेला, कामगार वर्ग शेतीकडे वळला. त्यामुळे शेतीवरचा भार वाढला, शेतीची दुरावस्था झाली. ब्रिटिशांनी नगदी पिकांना प्राधान्य दिले. त्यामुळे धान्यटंचाई निर्माण झाली. वसाहतवादी राजवटीत येथे मोठे उद्योगही निर्माण झाले, दळणवळणाचा विकास झाला अर्थात याचे श्रेय ब्रिटिशांनाच द्यावे लागेल. व्यवस्थापन क्षेत्रातही क्रांतिकारक बदल झाले. ब्रिटिशांमुळे या क्षेत्रात भारतीयांसाठी नवे दालन उघडले गेले.

ब्रिटिश राजवटीमुळे एक समान चलन, बँका, वजने-मापे, आंतरराष्ट्रीय व्यापार या क्षेत्रांत मोठी परिवर्तने झाली. एकीकडे ग्रामीण अर्थव्यवस्था उद्ध्वस्त होत असतांना नागरीकरणाचा वेग वाढला मुंबईसारखी महानगरे ही याच प्रभावाची देण होय.

'' ब्रिटिश वसाहतवादी प्रभावातून यंत्राच्या आगमनामुळे कामगारांत नवा विश्वास निर्माण झाला. उत्पादन प्रक्रियेचा वेग वाढला, अधिक उत्पादनामुळे जीवन अधिक सुखकारक बनले. भांडवलदारांकडून व कारखानदारांकडून कामगारांचे शोषण होऊ लागल्यामुळे संप, मोर्चे, हरताळ, बंद या संस्कृतीचा उदय झाला. मुख्य म्हणजे पूर्वी भारतीय संस्कृतीत श्रमाला असणारी प्रतिष्ठा नष्ट होऊन श्रमाचे, श्रम करणाऱ्यांचे अवमूल्यन झाले.''

वसाहतवादी राजवटीत १९ व्या राजकात ब्रिटिश अंमलाखालील मध्यमयुगीन सरंजामशाही अर्थव्यवस्थेकडून आधुनिक व्यापारवादी, भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दिशेने स्थित्यंतर, पायाभरणी समाजसुधारक, विचारवंत, अर्थतज्ज्ञांनी केली. या मध्यमवर्गीय विचारवंतांनी तत्कालीन स्थित्यंतराची व इंग्रजांच्या अर्थनिर्मितीची चिकित्सा केली, कठोर आत्मपरीक्षण केले, देशोन्नतीचे विचार मांडले व आर्थिक राष्ट्रवादाला चालना दिली.

इंग्रजांप्रमाणे आपणही व्यापार केला पाहिजे ही जागृती महाराष्ट्रीयांमध्ये निर्माण होणे हा फार मोठा आर्थिक प्रभाव होता. उदा.' पुणे देशी व्यापारोत्तेजक मंडळी किंवा औद्योगिक परिषद' किंवा स्वदेशीचा प्रचार करणारी 'सार्वजनिक सभा' या संस्था म्हणजे आर्थिक क्षेत्रातील ब्रिटिश वसाहतवादी राजवटीचा प्रभावच होय.

महाराष्ट्राने देशाला औद्योगिक नेतृत्व जमशेदजी टाटांच्या रूपाने दिले. एवढेच नव्हे तर अभिजनांच्या रूपाने महाराष्ट्रातून देशाला अर्थशास्त्रीय आणि आर्थिक राष्ट्रवादी नेतृत्व लाभले. उदाहरणादाखल काही नावे पाहाः-

१) रामकृष्ण विश्वनाथ २) लोकहितवादी ३) ग.वा. जोशी ४) गो.गा आगरकर ५) बोपाळ कृष्ण गोखले ६) न्या. रानडे

या विचारवंतांनी भारताच्या आर्थिक दुरवस्थेची विशेषतः दारिद्र्याच्या समस्येची आणि इंग्रजांनी चालविलेल्या शोषणाची मीमांसा केली. स्वदेशीवर भर दिला.

इंग्लडमधील अर्थशास्त्राच्या अभिजात संप्रदायाचे खुल्या व्यापाराचे तत्त्वज्ञान आत्मसात करून भारतीय संदर्भात त्याचे उपयोजन करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रापुरता संकुचित विचार न करता देशाच्या संदर्भात त्यांनी आपल्या अर्थशास्त्रीय विचारांची मांडणी केली.

नवे उद्योग, पर्यटन, यंत्रे, रेल्वे, इ. क्षेत्रांत आपण आधुनिक व प्रगत दृष्टिकोन ठेवला पाहिजे, नवे तंत्रज्ञान स्वीकारले पाहिजे असा प्रचार करण्यात महाराष्ट्रातल्या वृत्तपत्रांनी मोठे योगदान दिले. उदा. १८५६ मध्ये मुंबईच्या पहिल्या कापडगिरणीस प्रत्यक्ष भेट देऊन सविस्तर वर्णन पुण्याच्या ' ज्ञानप्रकाश' प्रसिद्ध केले, ते वाचा-

९९----- जेवढे हे मुंबईचे यंत्र एक दिवसांत सूत काढते तेवढेच सूत काढण्यास एक माणूस बसला तर ५० वर्षे लागतील तेव्हा पन्नास वर्षोंचे काम या यंत्राने एके दिवसात केले. तेव्हा या यंत्राची शक्ती किती असेल याचा विचार आमच्या वाचणाऱ्यांनी करावा....'' किंवा १६ एप्रिल १८५३ रोजी मुंबईत रेल्वे सुरू होताच 'ज्ञानोदय' मधील मजकूर वाचा-

'' लोखंडी रस्ता व विघुल्लतायंत्र यांच्या योगाने व्यापार पुष्कळ पसरेल, व लोकांची आबदानी होईल........ जे उद्योग करतील त्यांस द्रव्य, प्रतिष्ठा व धन मिळाले''

अशा प्रकारे वृत्तपत्रांनी जनतेला आपल्या लेखनातून प्रेरणा दिली, लोकमान्य टिळक तर १३ फेब्रुवारी १८८१ च्या 'मराठा' मध्ये म्हणतात.

''आपण भांडवलदार आणि उद्योजक बनले पाहिजे........व्यापाऱ्यांचे, यंत्रनिर्मात्यांचे आणि दुकानदारांचे राष्ट्र बनले पाहिजे.''

एवढेच नव्हे तर २० व्या शतकातील स्वदेशी व बहिष्काराच्या देशाव्यापी चळवळी म्हणजे केवळ स्वात्रंत्र्य लढ्यातील राजकीय हत्यार नव्हते तर ब्रिटिश साम्राज्यवादाच्या आर्थिक आव्हानाला भारतीयांनी जाणीवपूर्वक दिलेले ते प्रत्युत्तर होते.

आर्थिक क्षेत्रातील ब्रिटिश वसाहतिक राजवटीचा प्रभाव सारांशरूपाने पुढीलप्रमाणे सांगता येईल -

१) वसाहतवादी धोरणामुळे औद्योगिकरणास प्रारंभ.

२) संघटित मध्यमवर्ग व कुशल मजूर वर्गाची निर्मिती.

३) कृषीची दुरवस्था, नगदी पिकांना प्राधान्य व अन्नधान्याची टंचाई.

४) मोठ्या उद्योगाची महाराष्ट्रात उभारणी.

५) नागरीकरणाचा वेग वाढला.

६) श्रमाचे व श्रम करणाऱ्यांचे अवमूल्यन.

७) आधुनिक व्यापारवादी -भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या दिशेने महाराष्ट्राचे स्थित्यंतर, आर्थिक राष्ट्रवादाची निर्मिती व राष्ट्रीय चळवळीस गती.

८) स्वदेशी व बहिष्काराच्या चळवळी.

(ड) वैचारिक क्षेत्रः -

वसाहतवाद व साम्राज्यवाद यामध्ये कोणताही फरक नव्हता, दोन्हीचाही उद्देश समान होता. १७५७ ते १८५७ या शतकभराच्या काळात इंग्रजांनी भारतीयांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. हे तरा वास्तव असले तरी यामुळेच भारतीय समाजाच्या विविध क्षेत्रांशी इंग्रजी राजवटीचा जवळून संबंध आला होता खरे आहे. यातून वैचारिक मंथनाला आरंभ झाला. या वसाहतवादी राजवटीचा प्रभाव वैचारिक दृष्ट्याही निर्माण झाला.

ब्रिटिश वसाहतवादामुळे भारतातील मध्ययुगीन राजवटी जाऊन, सरंजामी व्यवस्था जाऊन लोकशाही मूल्य येथे रुजण्यास मदत झाली. भारतात पक्षपद्धती निर्माण झाली. निवडणुकांचे तत्त्व मान्य झाले. स्थानिक स्वराज्य संस्था ग्रामपातळीपर्यंत पोहचल्या, हा सर्व वैचारिक प्रभाव होय.

ब्रिटिश राजवटीमुळे जसा लोकशाहीचा परिचय एतद्देशीयांना झाला. तसेच व्यक्तिस्वातंत्र्य, समता, बंधुत्व या मूल्यांचीही ओळख भारतीयांना झाली. या मूल्यांच्या आधारेच भारतातील मध्ययुगीन राजवटीविरोधात लोकांनी लढे दिले.

उदारमतवादी परिचय भारतीयांना होणे हाही वैचारिक प्रभावाचाच परिणाम होय. न्या. महादेव गोविंद रानडे व गोपाळे कृष्ण गोखले व अन्य राष्ट्रीय काँग्रेसचे पुढारी म्हणजे वसाहतवादी प्रभावातून निर्माण झालेले नेतृत्व होय.

वैचारिक प्रभावातून महाराष्ट्रात विचारवंतांची एक श्रृंखलाच निर्माण झाले. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, महात्मा फुले, न्या. रानडे आदि विचारवंतांनी नव्या युगाचा वेध घेण्यास प्रारंभ केला. त्यासाठी वृत्तपत्रांचा उपयोग केला, त्याद्वारे जागृती घडवून आणली. हा सर्व प्रभाव इंग्रजी सहचर्याचा होय. वर्तमानपत्रे ही प्रबोधनाची एक फार मोठी शक्ती ठरली. त्यांच्या माध्यमातून परस्परविरोधी विचारांनी समाज ढवळून निघण्याची प्रक्रिया सुरू झाली.

'' वर्तमानपत्रांमधून तत्कालीन सामाजिक, धार्मिक, राजकीय व आर्थिक विषयांवर राजवटीचे गोडवे गाणारा जसा एक वर्ग होता तसा तीव्र टीकेचा आसूड ओढणारा वर्ग ही होता. याच परस्पर विरोधी विचार मंथनातून १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात समाजसुधारणा चळवळीचा जन्म झाला. प्रबोधनाच्या लाटेत सुरू झालेल्या विधवा विवाह, बालविवाह, स्त्री/ शिक्षण, धर्म सुधारणा इ. सर्व विषयांची बिजे या वृत्तपत्रीय विचारमंथनात सापडतात.''

वृत्तपत्रांनी देशाला नवविचारांचा मंत्र दिला, स्वातंत्र्याच्या आधुनिक कल्पना दिल्या आणि भविष्यातील मानवी संस्कृतीचा पाया बांधून दिला. प्रारंभिक प्रबोधनकारांत प्रामुख्याने पत्रकारच होते. या विचारवंत पत्रकारांनी पाश्चात्त्य संस्कृतीतील चांगल्या बाबी स्वीकारण्याचा आग्रह जसा समाजाला केला, तसा आपल्या संस्कृतीतील वाईट बाबी त्यागण्याचाही सल्ला दिला. वृत्तपत्रांमुळे आपले विचारधन समृद्ध झाले.

पाश्चात्त्य शिक्षणाच्या अभ्यासामुळे फ्रेंच, अमेरिकन, औद्योगिक क्रांतीचा परिचय आपल्याला झाला. याच प्रभावातून इंग्रजी राजवटीविरुद्ध अनेक विचारवंतांनीही वैचारिक बंड पुकारले. महात्मा फुले, लोकहितवादीसारख्या व्यक्ती म्हणजे समाजात विकसन पावू लागलेल्या नव्या उर्मींच्या प्रतिनिधी होत्या. लोकशाहीसारखी व्यवस्था आपल्याकडेही असावी अशी इच्छा १८४९ मध्ये लोकहितवादी व्यक्त करतात, त्यांच्या शब्दातील हे उदाहरण वाचा-

‘‘ आमचे लोकांनी एकत्र येऊन पार्लमेंट मागावे आणि मुंबई, कलकत्ता येथे ते नेमून तेथे काही इंग्रज व आपले सर्व जातींचे शाहाणे लोक त्यात ठेवावे आणि त्यांचे हुकुमाने कारभार करावा. म्हणजे विलायतेचे बादशाह जातीस ही विलायतेत पार्लमेंट असावे व येथे नसावे अशी काही चोरी केली नाही......’’

१८४९ मध्ये पार्लमेंटची मागणी म्हणजे महाराष्ट्रीय विचारवंतावर ब्रिटिश राजवटीचा वैचारिक प्रभाव होय. लोकहितवादींनी केलेला स्वदेशीचा पुरस्कार, उद्योगप्रियतेची शिकवण, आर्थिक राष्ट्रवाद, वर्णविरहित समाजव्यवस्थेचा स्वीकार हे वर्ण आधुनिक विचारसरणीचे घटक होते.

ब्रिटिश वासाहतिक राजवटीच्या वैचारिक प्रभावाचे आणखी एक उदाहरण म्हणजे महात्मा फुले होत. इ.स. १८४१ मध्ये ज्योतिबा इंग्रजी शाळेत जाऊ लागले. महाराष्ट्रात तेव्हा अमेरिकन मिशन, स्कॉटिश मिशन, लंडन मिशनरी सोसायटी इ. अनेक संस्था कार्यरत होत्या. त्यांच्या कार्यांचा खोल परिणाम महात्मा फुलेंवर झाला. तसेच थॉमस पेन यांच्या विचारांनाही महात्मा फुले प्रभावित झाले व त्यांनी समाज सुधारणेच्या कार्यास वाहून घेतले.

महाराष्ट्रातील बऱ्याच सामाजिक सुधारणांचे प्रयत्न ख्रिस्ती धर्मापासून व मिशनऱ्यांकडून स्फूर्ती घेऊनच झाले होते. ख्रिस्ती मिशनच्या शाळांमधून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचा भर धर्मप्रसार आणि पाश्चिमात्य तत्त्वज्ञान यावर असे. लोकांना सुसंस्कृत करणे म्हणजे त्यांना पाश्चात्त्य ज्ञानाची दालने खुली करून देणे असे एलफिन्स्टन, लॉर्ड मेकॉले यांना वाटे. याच मेकॉलेच्या विचारांच्या प्रभावातून येथील शिक्षणाची दिशा ठरली.

येथील विचारवंतांना त्यांचे क्षितिज रुंदावण्यासाठी उपयुक्त झालेला महत्त्वचा घटक म्हणजे उदारमतवादी परंपरा घेऊन भारतात आलेल्या इंग्रजांचे कार्य व त्यांचा दृष्टिकोण होय. ते माजके असले तरी त्यांच्या कार्याचा ठसा उमटवला. यातूनच पुढे राष्ट्रीय कॉंग्रेस, सार्वजनिक सभा, बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशनसारख्या संस्थाचा महाराष्ट्रात उदय झाला.

१९ व्या शतकात आधुनिक भारतीय साहित्याचे युग सुरू झाले. येथील साहित्यिकांच्या लेखनातही निसर्गवाद, इहवाद, मानवतावाद, राष्ट्रवाद अशा नवविचार प्रणालींचा प्रभाव साहित्यात जाणवू लागला. महाराष्ट्रातील सामाजिक अंतःसत्त्वाच्या निर्मितीत आणि निर्देशनात साहित्याचा निश्चितपणे वाटा होता. रानडे, चिपळूणकर, महात्मा फुले व आगरकर यांनी प्रतिनिधित्व केलेले महाराष्ट्रातील प्रमुख विचारप्रवाह वैचारिक वाङ्मयाद्वारे महाराष्ट्रात रुजत होते.

महाराष्ट्रात इंग्रजी शिक्षणाच्या सोयीमुळे आंग्लविद्याविभूषितांची संख्या सातत्याने वाढत गेली. इंग्रजी शिक्षण हे नव्या मूल्यांच्या स्वीकाराचे आणि प्रसाराचे प्रभावी साधन बनले. जेम्स मिल याने १८२४ साली पारंपरिक हिंदू वा मुस्लीम शिक्षणाऐवजी नवे उपयुक्त ज्ञान भारतीयांना देण्याचा विचार मांडला होता. महाराष्ट्रातील मध्यमवर्गीयांना या नव्या ज्ञानाची, विशेषतः उपयुक्त ज्ञानाची महती पटली होती. त्यामुळे त्यांनी कालमापन ओळखून नव्या उपयुक्त शिक्षणाची कास धरली व अभ्युदय साधला. एकूणच या वासाहतिक वैचारिक प्रवासामुळे पुढील बदल घडून आले.

**महाराष्ट्रात वैचारिक मंथनास प्रारंभ**

उदारमतवादाचा महाराष्ट्राला परिचय

लोकशाही मूल्यांची देशी लोकांकडून मागणी

फ्रेंच, अमेरिकन क्रांत्यांचा परिचय

वृत्तपत्रे ही प्रबोधनाची शक्ती ठरली.

मिशनरी कार्यातून समाज प्रबोधनाची प्ररणा एतद्देशीयांनी घेतली.

ब्रिटिश उदारमतवाद्यांचा येथील विचार विधावर ठसा उमटला.

नवविचार प्रणालींचा प्रभाव साहित्यातून उमटू लागला.

मध्यमवर्गाने नवउपयुक्त शिक्षणाची कास धरून आपला अभ्युदय साधला.

## १.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न/ उपक्रम

प्रश्न १. संज्ञा/ संकल्पना स्पष्ट करा.

१ महाराष्ट्र

२ रेसिडेंट

३ छत्रपती प्रतापसिंह

४ माऊंटएस्टुअर्ट उलफिन्स्टन

५ बिकरचे राजे

६ सातारा जाहिरनामा

७ मुंबई इलाखा

८ वसाहतवाद

१0 कलेक्टर

११ प्रबोधन

१२ जरठ कुमारी विवाह

१३ उदारमतवासद

१४ पेशवाई

१५ तैनाती फौज

१६ कायद्याचे राज्य

## प्रश्न २. दिर्घोत्तरी प्रश्न

१ महाराष्ट्राची ऐतिहासिक पार्श्वभूमी स्पष्ट  करा.

२ पुणे दरबारात ब्रिटिश रेसिडेंटचे आगमन मराठी सत्तेच्या ऱ्हासास कसे कारणीभूत ठरले?

३ ब्रिटिशांचे आगमन महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणास कसे उपयुक्त झाले?

४ ब्रिटिश विजयाकालीन महाराष्ट्राचे राजकीय चित्र रेखाटा.

५ मराठी राज्याच्या अस्तास कोणते प्रमुख घटक कारणीभूत ठरले?

६ पेशवेकालीन सामाजिक परिस्थितीची वैशिष्ट्ये स्पष्ट करा?

७ ब्रिटिश वासाहतिक राज्याचा प्रभाव महाराष्ट्रावर कसा पडला?

८ ब्रिटिश राजवटीत वैचारिक प्रभाव महाराष्ट्रावर पडलेला प्रभाव स्पष्ट करा.

## प्रश्न : लघुत्तरी

१. इ. स. १८१८ हे वर्ष महाराष्ट्राच्या इतिहासातील परिवर्तनाचा एक टप्पा का मानला जातो?

२. महाराष्ट्र शब्दाची व्याप्ती सांगा.

३. 'सावळदा संस्कृती' बद्दल आपण काय जाणता?

४. 'यादवांच्या पराभवाने महाराष्ट्रात मध्ययुगाची सुरुवात झाली' या संकल्पना स्पष्ट करा.

५. 'महाराष्ट्र धर्म ' या संकल्पनेत संत रामदासांना काय अभिप्रेत होते?

६. सातारा राज्य स्थापनेमागील ब्रिटिशांचा हेतू स्पष्ट करा.

७. ग्रँड डफबद्दल तुम्हाला काय माहीत आहे?

८. 'आधुनिक महाराष्ट्राचा पाया एलफिन्स्टनने घातला' असे का म्हटले जाते.

९. पेशवेकाळातील महसुलीचे मार्ग कोणते?

१०. 'हिंदुस्थानची लक्ष्मी दर्यापार जाऊ लागली असे लोकहितवादी का म्हणतात?

११. महाराष्ट्रातील प्रशासन पद्धतीवरील वासाहतिक प्रभाव सांगा.

१२. 'महाराष्ट्राने देशाला आर्थिक राष्ट्रवादी नेतृत्व दिले ' स्पष्ट करा.

१३. ब्रिटिश राजवटीतील महाराष्ट्रीयांचा प्रतिसाद कसा होता?

१४. सारांश

इ.स. १७६१ व १८१८ ही वर्षे मराठी सत्तेच्या ऱ्हासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरली. पानिपतच्या पराभवाने मराठी राज्ये दुबळे बनले तर १८१८ च्या पराभवाने महाराष्ट्रात इंग्रजी सत्तेचा प्रवेश झाला. इंग्रजांचा हा प्रवेश महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाच्या जडणघडणीत महत्त्वपूर्ण ठरला.

आधुनिक महाराष्ट्राची पार्श्वभूमी तयार होण्यासाठी सातवाहन ते यादव आणि अल्लाउद्दिन ते औरंगजेब हा इतिहास समजून घेणे गरजेचे आहे. ब्रिटिशांच्या आगमनाने आधुनिक महाराष्ट्राचा आरंभ  झाला. यामध्ये माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याच्याच काळात महाराष्ट्रात कल्याणकारी राज्याच्या संकल्पनेने मूळ धरले तसेच कायद्याचे राज्य, लोकशाही, उदारमतवाद, प्रबोधन, समाज व धर्मसुधारणा या बाबींचा महाराष्ट्रीयांना परिचय झाला, महाराष्ट्राच्या आधुनिकीकरणाच्या दृष्टीने ही सुरुवात ठरली. परिणामी महाराष्ट्रात वैचारिक घुसळण सुरू झाली.

पेशवाई जाऊन इंग्रजी अंमलाचा प्रारंभ झाला. हा बदल महाराष्ट्रीयांनी सकारात्मक रितीने घेतला. पेशवाईनंतर महाराष्ट्रात वासाहतिक राज्याचा आरंभ झाला. या राज्याचा प्रभाव राजकीय, आर्थिक, सामाजिक व वैचारिक क्षेत्रांत निर्माण झाला. विज्ञानवादाचा स्वीकार एतद्देशीयांनी केला. एवढेच नव्हे तर लोकशाही संस्थेची मागणी ते करू लागले. प्रबोधनामुळे समाजमन प्रगत झाले. व आपल्या संस्कृतीतील वाईट गोष्टींचा त्याग करून पाश्चात्त्य संस्कृतीच्या चांगल्या बाबी स्वीकारण्यास काहीच हरकत नाही असे नवशिक्षितांना वाटू लागले.

इंग्रजी राजवटीत जो मध्यमवर्ग महाराष्ट्रात निर्माण झाला त्याने धर्म व समाज सुधारणेच्या क्षेत्रात मोठे कार्य केले. आपल्या समाजातील दोष व उणिवा दूर करण्याची गरज भासू लागली. या प्रबोधनातून महाराष्ट्रात विचारवंतांची एक फळीच निर्माण झाली. ही सर्व पार्श्वभूमी आधुनिक महाराष्ट्र निर्माण होण्यास कारणीभूत ठरली.

## १.५ पारिभाषिक शब्द/संज्ञा/संकल्पना.

**आधुनिकताः–**

आधुनिकता ही केवळ कालवाचक संज्ञा नसून मूल्यवाचक संज्ञा आहे. जे अलीकडचे, ते केवळ आधुनिक नसते. आधुनिकतेत जसा भौतिक प्रगतीचा समावेश आहे; पण त्याचबरोबर काही तत्त्वांचा, मूल्यांचाही समावेश आहे. नव्या यंत्र-तंत्राप्रमाणे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्म-निरपेक्षता, चिकित्सक व प्रयोगशील दृष्टी, विवेकवाद इ.गोष्टींचाही समावेश आधुनिकतेमध्ये आहे. म्हणूनच केवळ पोशाखावरून नव्हे तर विचारांवरून माणूस आधुनिक ठरतो.

महाराष्ट्रः-

महाराष्ट्र म्हणजे मराठी-संस्कृती असणाऱ्यांचा देश होय. आजचे महाराष्ट्र राज्य १ मे १९६० रोजी अस्तित्वात आले. त्यापूर्वीच्या द्वैभाषिक मुंबई राज्यात समाविष्ट असलेले कच्छ, सौराष्ट्र , गुजरात हे प्रांत वेगळे करून त्यांचे स्वतंत्र गुजरात राज्य निर्माण करण्यात आले आणि उर्वरित मुंबई प्रदेशात मध्य प्रदेशातील विदर्भ व तेव्हाच्या हैदराबादच्या निजाम राज्यातील मराठवाडा यांची भर घालून आजचे महाराष्ट्र राज्य आकारास आले. आजच्या महाराष्ट्र राज्यात कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ व खानदेश या प्रादेशिक विभागांचा अंतर्भाव होतो.

पेशवाईः-

पेशवा म्हणजे मुख्य प्रधान, पंतप्रधान. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळात पेशवा हे पंतप्रधानाचे पद महत्त्वाचे होते. इ.स. १७०८ मध्ये मोगलांच्या कैदेतून शाहूची सुटका झाल्यापासून शाहूला छत्रपतिपद मिळवून देण्याबाबत बाळाजी विश्वनाथाने महत्त्वाची भूमिका बजावली. या बाळाजी विश्वनाथास छत्रपती शाहूने १७१३ मध्ये पेशवेपदी नियुक्ती केली. पुढे पेशवेपदी नियुक्ती वंशपरंपरेने झाली. इ.स. १८१८ पर्यंत बाजीराव पहिला, नानासाहेब, माधवराव, नारायणराव, सवाई माधवराव व दुसरा बाजीराव हे पेशवेपदी येथून गेले. दुसऱ्या बाजीरावच्या काळात इंग्रजांनी मराठ्यांचा पराभव केला. इ.स.१७१३ ते १८१८ हा कालखंड छत्रपती पेशव्यांच्या प्रभावाचा होता म्हणून त्यास 'पेशवाई' असे संबोधले जाते.

तैनाती फौजः-

भारतात ब्रिटिश सत्तेच्या दृढीकरणासाठी लॉर्ड वेलस्लीने तैनाती फौजेच्या पद्धतीचा वापर केला. यामुळे दुर्बल भारतीय सत्ताधीश ब्रिटिश राजकीय परिघात आले. या फौजेच्या खर्चापोटी

वार्षिक निश्चित रक्कम अथवा प्रदेश द्यावा लागे. तसेच ब्रिटिशांचा रेसिडेंट भारतीय शासकाच्या दरबारी येत असे. या पद्धतीच्या स्वीकारामुळे भारतीय शासकांचे स्वातंत्र्य संपुष्टात येत असे.

## रेसिडेंटः –

लॉर्ड वेलस्लीच्या तैनाती फौजेच्या पद्धतीनुसार भारतीय राज्यांना आपला एक ब्रिटिश प्रतिनिधी आपल्या दरबारात ठेवावा लागे. त्यास रेसिडेंट म्हटले जाई. तो भारतीय राज्यांच्या अंतर्गत व परकीय कारभारात हस्तक्षेप करीत असे व हळूहळू राज्य ताब्यात घेत असे.

बिठूरचे राजेः-

इ.स. १८१८ मध्ये मराठ्यांचा पूर्ण पराभव ब्रिटिशांनी करून शनिवारवाडयावर युनियन जॅक फडकविला, नंतर मराठा शासक दुसरा बाजीराव यास कैद करून उत्तरप्रदेशात कानपूरजवळ ब्रह्मावर्त अथवा बिठूर येथे स्थानबद्ध केले व आठ लाख रुपये वार्षिक निवृत्तीवेतन देऊन इंग्रजांचा पेन्शनर बनविले. या दुसऱ्या बाजीरावास 'विठूरचे राजे ' म्हणून तेथे ओळखले जाई.

सातारची गारीः-

इ.स. १७०८ मध्ये शाहूची मोगल कैदेतून सुटका झाल्यावर सातारा गादीची निर्मिती झाली. सातारा येथे छत्रपती व पुणे येथे पेशवे राहू लागले. ही व्यवस्था १८१८ पर्यंत म्हणजे मराठयांच्या पराभवापर्यंत कायम होती.

तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात १९ फेब्रुवारी १८१८ राजी आष्टीच्या लढाईत दुसरा बाजीरावचा इंग्रजांनी पराभव केल्यामुळे त्याने पलायन केले व मराठ्यांचे छत्रपती प्रतापसिंह इंग्रजांच्या हाती सापडले. ब्रिटिश रेसिडेंट एलफिन्स्टनने सातारा येथे १० एप्रिल १८१८ रोजी प्रतापसिंहाची छत्रपतिपदी पुनर्स्थापना केली . त्यांच्या दरबारी जेम्स ग्रँट डफ याची नियुक्ती केली. अर्थात ही छत्रपतिपदी नियुक्ती नाममात्रच होती व खरी सूत्रे ब्रिटिश प्रतिनिधीकडेच होती . इ.स. १८४९ मध्ये हे सातारा राज्य ब्रिटिशांनी खालसा केले.

## मुंबई इलाखाः –

इ.स. १८१८ मध्ये ब्रिटिशांनी मराठ्यांचा पराभव केला . मुंबई रेसिडेन्सी किंवा इलाखा निर्माण केला. इलाख्यात खानदेश, बेळगाव, रत्नागिरी, कुलाबा, धारवाड , गुजरातचा काही भाग व कोल्हापूर - सातारा सोडून पाश्चिम दख्खनचा समावेश होता. मुंबई इलाख्याचा कमिशनर म्हणून एलफिन्स्टन याने कार्य केले. १८१९ ते १८२७ पर्यंत मुंबई इलाख्याचा तो गव्हर्नर होता.

## सतीप्रथाः –

मध्यमयुगातील स्त्रीला जिवंतपणी जाळण्याची एक कुप्रथा पत्नीच्या मृत्यूनंतर पत्नी पतीच्या सोबतच अग्नीमध्ये प्रवेश करीत असे. सती जाण्यासाठी पुष्कळदा स्त्रीला सक्ती केली जाई. सती जाणाऱ्या स्त्रीला देवता मानले जाई, तिचे उदात्तीकरण केले जाई. ब्रिटिश गव्हर्नर जनरल लॉर्ड बेंटिक याने कायद्याने ही प्रथा बंद केली.

## बलुतेदारीः –

स्वयंपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेतील बलुतेदारी ही पद्धती होय. गावातील रहिवाशांच्या गरज भागविण्याचे काम गावातील बलुतेदार आलूतेदार करीत. बलूत म्हणजे कामाच्या बदल्यात शेतकऱ्याने दिलेला धान्यरूपी मोबदला होय. या व्यवस्थेत १२ बलुतेदार व १२ आलुतेदार होते.

**वसाहतवादः–**

देशाबाहेर वसाहती मिळवून त्यांचे शोषण करण्याची प्रवृत्ती मध्ययुगातील भौगोलिक शोधांमुळे वसाहतवादाला विशेष चालना मिळाली. या व्यवस्थेला मातृराष्ट्राच्या तुलनेत वसाहतींना अगदीच दुय्यम स्थान होते.

**कलेक्टरः–**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत बंगालमध्ये महसूल वसूलीसाठी कलेक्टर या पदाची निर्मिती केली. कलेक्टर हा जिल्हा प्रशासनाचा प्रमुख घटक होता. महसूल गोळा करणे व कायदा - सुव्यवस्था राखणे ही त्याची प्रमुख कर्तव्ये होती. तसेच तो जिल्हादंडाधिकारी होता.

प्रबोधनः-

प्रबोधन म्हणजे वैचारिक जागृती होय. बुद्धिप्रामाण्यवादाचा उदय व ग्रंथप्रामाण्य, परंपरावादावर अविश्वास होय. १९ व्या शतकातील प्रबोधनाने मध्ययुगीन जीवनप्रणालींचा त्याग करावयास भारतीयांना आधुनिकतेकडे वाटचाल सुरू झाली. गलितमात्र समाजाला जागृत करण्याचे कार्य प्रबोधनाने केले.

अनुद्योगीकरण :-

अनुद्योगिकरण म्हणजे उद्योगांचा ऱ्हास होणे होय. औद्योगिक क्रांतीनंतर ब्रिटनमधील उद्योगधंद्यांचा विकास झाला. आपल्या मालास स्पर्धा नको म्हणून ब्रिटिशांनी भारतीय उद्योगांचे खच्चीकरण केले. यामुळे शहरातील कसबी हस्तउद्योगांचा व स्वयंपूर्ण खेड्यातील कुटिरोद्योगांचा ऱ्हास झाला. म्हणजे ब्रिटनचे औद्योगिकीकरण होत असताना भारताचे अनुद्योगीकरण झाले.

कायदयाने राज्यः-

'कायद्याचे राज्य' हा ब्रिटिश प्रशासनाचा भारतीय जीवनावरील सर्वात मोठा प्रभाव होय. 'समान गुन्ह्यासाठी समान शिक्षा' या पैलूची ओळख, जाणिव भारतीयांना प्रथमच झाली. कोणीही कायद्यापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही. हे तत्त्व यामध्ये महत्त्वाचे मानले जाते.

## १.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१ ढवळीकर मधुकर केशव (२०११) महाराष्ट्राची कुळकथा, पुणे, राजहंस प्रकाशन.

२ मोरवंचीकर रा. श्री. (२००९), संपादक, आधुनिक महाराष्ट्राची जडणघडण, शिल्पकार, चरित्रकोश-इतिहास खंड, मुंबई, साप्ताहिक विद्येयक प्रकाशन इ. दीक्षित राजा(२००९). १९ व्या शतकातील महाराष्ट्र, पुणे, डायमंड पब्लिकेशन.

४) घोडके ह. म. (२000). महाराष्ट्र गाथा. पुण, राजहंस प्रकाशन.

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

१ Historical Giography of maharashtra and Goa हा डॉ. हरिहर ठोसर यांचा संदर्भ ग्रंथ मिळवा व महाराष्ट्राची ऐतिहासिक, भौगोलिक पार्श्वभूमी जाणून घ्या.

## घटक क्र. 2– महाराष्ट्रातील प्रबोधन

**अनुक्रमणिका**


2. 0 घटकाची उद्दिष्टे

2. 1 प्रस्तावना

2. 2 मुख्य मुद्दा – महाराष्ट्रातील प्रबोधन

2. 2. 1 उपमुद्दा – माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे कार्य

2. 2. 2 उपमुद्दा – ख्रिश्चन मिशन-यांचे कार्य

2. 2. 3 उपमुद्दा – वृत्तपत्र आणि जनजागृती

2. 2. 4 उपमुद्दा – सुधारणा चळवळ : लोकहितवादी, न्या. रानडे आणि आगरकर

2. 3 स्वयं अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम

2. 4 सारांश

2. 5 पारिभाषिक शब्द शब्दार्थ

2. 6 संदर्भसूची


### 2. 0 घटकाची उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

1. आधुनिक महाराष्ट्रातील माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे योगदान अभ्यासता येईल.
2. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे कार्य समजून येईल.
3. ख्रिश्चन मिशन-यांचे महाराष्ट्रातील कार्य अभ्यासता येईल.
4. भारतातील वृत्तपत्राचा उदय व विकास अभ्यासता येईल.
5. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील वृत्तपत्रांचे योगदान अभ्यासता येईल.
6. महाराष्ट्रातील सुधारणा चळवळ अभ्यासता येईल.
7. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांचे कार्य अभ्यासता येईल.
8. न्या. रानडे यांचे कार्य अभ्यास करता येईल.
9. गोपाळ गणेश आगरकर यांचे कार्य अभ्यासता येईल.

### 2. 1. प्रस्तावना

इ. स. 1818 मध्ये पेशवाईचा अस्त होऊन पेशव्यांच्या वर्चस्वाखालील प्रदेशावर ब्रिटिशांचे वर्चस्व सुरू झाले. ब्रिटिशांनी पेशव्यांकडून जिंकून घेतलेला प्रदेश मुंबई किंवा मद्रास प्रांताला न जोडता हा प्रदेश स्वतंत्र ठेवून या प्रदेशावर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याची 'डेक्कन कमिशनर' म्हणून नियुक्ती केली. एलफिन्स्टन हा उदारमतवादी विचारांचा होता. त्याने नव्या सुधारणा महाराष्ट्रीयन जनतेच्या गळी हळूहळू उतरविल्या. राजकीय, सामाजिक, धार्मिक व आर्थिक क्षेत्रात एकदम बदल केले तर ब्रिटिश सत्तेच्या विरोधात महाराष्ट्रामध्ये उठाव होईल असे त्याला वाटत होते. त्यामुळेच वरिल विविध क्षेत्रातील बदल त्याने सावकाश घडवून आणले. महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेच्या विरोधात उठाव न होण्याचे श्रेय त्याच्याकडे दिले पाहिजे. त्याने केलेले सुधारणामुळे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्याला महत्वाचे स्थान दिले जाते. युरोपीयन व्यापा-यांच्या पाठोपाठ भारतात ख्रिश्चन मिशन-या ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी आल्या. महाराष्ट्रही त्याला अपवाद ठरला नाही. महाराष्ट्रात ख्रिश्चन मिशन-यांनी ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार करू नये या मताचा एलफिन्स्टन होता. कारण महाराष्ट्रीयन जनतेच्या धार्मिक व सामाजिक जीवनात हस्तक्षेप केल्यास ब्रिटिशसत्तेविरूध्द उठाव होईल अशी भिती त्याला वाटत होती. परंतु 1813 च्या चार्टर ॲक्टनुसार ख्रिश्चन मिशन-यांना भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार करण्याची परवानगी ब्रिटिश पार्लमेंटनी दिली. त्यामुळे महाराष्ट्रात ख्रिश्चन मिशन-यांनी ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार केला. परंतु त्यांना अपेक्षीत यश मात्र महाराष्ट्रात मिळू शकले नाही. महाराष्ट्रीयन व भारतीय जनतेमध्ये जनजागृती करण्यात वृत्तपत्रांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली. भारतात वृत्तपत्राची सुरूवात ब्रिटिशांनी त्यांच्या सोयीसाठी केली असली तरी त्याचा अप्रत्यक्ष फायदा भारतीयांना झाला. ब्रिटिशांच्या ध्येयधोरणांच्या विरोधात वृत्तपत्रामधून निर्भीडपणे लिखाण होऊ लागले. भारतीय वृत्तपत्रामुळे ब्रिटिश सत्तेच्या अस्तित्वाला धोका निर्माण होईल या भितीने वेळोवेळी

ब्रिटिशांनी भारतीय वृत्तपत्रावर बंधने घालणारे कायदे केले. तरीही भारतातील राष्ट्रवादाच्या उदयात वृत्तपत्रांनी महत्वाची भूमिका बजावली. लोकहितवादी, न्या. रानडे व आगरकर यांनी महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीत महत्वाची भूमिका बजावली. सामाजिक सुधारणांचे विचार त्यांनी हिरीरीने मांडले. त्यासाठी त्यांनी प्रस्थापीतांचा विरोधही पत्करला. परंतु आपल्या कार्यात खंड पडू दिला नाही.

## 2. 2 मुख्य मुद्दा – महाराष्ट्रातील प्रबोधन

महाराष्ट्रातील प्रबोधन या घटकात आपण महाराष्ट्रातील माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे कार्य, ख्रिश्चन मिशन-यांचे कार्य, वृत्तपत्र आणि जनजागृती आणि सुधारणा चळवळीत लोकहितवादी, न्या. रानडे आणि आगरकर यांनी केलेले कार्य अभ्यासणार आहोत.

### 2. 2. 1 उपमुद्दा – माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे कार्य

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने महत्वपूर्ण भूमिका बजावली. एलफिन्स्टनचा जन्म 6 आक्टोबर 1779 रोजी झाला. माऊन्ट स्टुअर्ट हे नाव त्याला त्याच्या आईच्या आजोळाकडून मिळाले होते. ईस्ट इंडिया कंपनीच्या सेवेत 1795 मध्ये आला तेंव्हा एलफिन्स्टन अवघ्या सोळा वर्षाचा होता. 26 फेब्रुवारी 1796 मध्ये एलफिन्स्टन मद्रासला आला. तेथून पुढे तो कलकत्यास रवाना झाला. एकूण 31 वर्षे एलफिन्स्टन भारतात वास्तव्यास होता. त्यातील अर्धा कालखंडात एलफिन्स्टन महाराष्ट्रात होता. ईस्ट इंडिया कंपनीत एलफिन्स्टन लेखनिक म्हणून रूजू झाला. त्यानंतर बनारसचा डिस्ट्रीक मॅजिस्ट्रेट सॅम्युअल डेव्हिस याच्या हाताखाली काम करू लागला. सॅम्युअल डेव्हिसच्या विचारांचा प्रभाव एलफिन्स्टनवर पडला. 1801 मध्ये त्याचा पुणे येथील रेसिडेन्सीमध्ये सर बॅरी क्लोजचा सहाय्यक म्हणून नियुक्ती झाली. एलफिन्स्टनची धडाडी, ज्ञानलालसेमुळे आर्थर वेलस्ली प्रभावीत झाला. एलफिन्स्टनची व वेलस्लीची जवळची मैत्री झाली. वेलस्लीला तो आपला आदर्श मानत होता. 1803 मध्ये एलफिन्स्टनची नागपूरचा प्रभारी रेसिडेंट म्हणून नियुक्ती झाली. राजनैतिक क्षेत्रातील त्याची ही पहिली जबाबदारीची नियुक्ती होती. नागपूरच्या भोसलेंना तैनाती फौज स्वीकारण्यास त्याने भाग पाडले. 1809 मध्ये एलफिन्स्टनची अफगाणिस्तानच्या मोहिमेवर रवानगी करण्यात आली. अफगाणिस्तानला पाठवलेल्या शिष्टमंडळाचे नेतृत्व एलफिन्स्टन करत होता. अफगाणिस्तानमध्ये ब्रिटिश सत्तेचा प्रभाव वाढवणे, फ्रेंचांना विरोध करणे ही कामे त्याच्यावर सोपवण्यात आली होती. 1811 मध्ये पुण्यास ब्रिटिशांचा रेसिडेंट म्हणून त्याची नियुक्ती करण्यात आली. एलफिन्स्टनला वाचनाची आवड असल्याने या धावपळीच्या काळातही अखंडपणे त्याचे वाचन सुरू होते. इंग्रजी साहित्यातील कवी, लेखक त्याने अभ्यासले होते. जेरामी बेंन्थॅम व त्याच्या उपयुक्ततावादाचाही अभ्यास त्याने केला होता. मराठी भाषा त्याने आत्मसात केली होती.

1811 मध्ये पुण्याचा रेसिडेंट म्हणून नियुक्त झाल्यानंतर मराठयांचे राज्य नष्ट करून ब्रिटिशांची सत्ता महाराष्ट्रावर निर्माण करण्याचे प्रमुख काम त्याला करावयाचे होते. 1818 मध्ये दुस-या बाजीरावचा पराभव करून एलफिन्स्टनने ही जबाबदारी चोखपणे पार पाडली. 1818 मध्ये मराठी सत्तेचा अस्त करून मराठयांच्या वर्चस्वाखालील प्रदेशावर ब्रिटिशांचे वर्चस्व एलफिन्स्टनने निर्माण केले. एलफिन्स्टनचा स्वभाव सुसंस्कृत, मनमिळाऊ व भावनाप्रधान होता. राज्यकारभाराच्या बाबतीत अतिरेकी दृष्टीकोण न स्वीकारता सौम्य धोरण स्वीकारून मराठयांचे मन, विश्वास जिंकण्याचे धोरण त्याने स्वीकारले होते. राजकारणात नितीमत्तेला महत्व असले पाहिजे या मताचा तो होता. एलफिन्स्टनने केलेले बदल आधुनिक महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरतात. मराठयांकडून जिंकून घेतलेल्या प्रदेशामध्ये एलफिन्स्टनला ताबडतोब अमुलाग्र बदल करावयाचे नव्हते. हे बदल टप्याटप्याने व मराठी समाजाला रूचतील, पचतील अशा पध्दतीने करायचे होते. कारण संपूर्ण बदल जर ताबडतोब केले तर ब्रिटिश सत्तेविरोधात उठाव होऊ शकतो याची जाणीव एलफिन्स्टनला होती. आपल्या प्रशासनाची कार्यक्षमता वाढवणे व भ्रष्टाचार कमी करण्यावर त्याने भर दिला.

#### एलफिन्स्टनचे कार्य

#### अ) एलफिन्स्टनची डेक्कन कमिशनर म्हणून नियुक्ती

मराठयांकडून 1818 मध्ये जिंकलेला प्रदेश मद्रास किंवा मुंबई इलाख्यास न जोडता तो 'डेक्कन कमिशन' या शीर्षकाखाली स्वतंत्र ठेवण्यात आला. या प्रदेशाचा कमिशनर म्हणून एलफिन्स्टनची नियुक्ती करण्यात येऊन या प्रदेशाचे पूर्ण अधिकार त्याला देण्यात आले. कारण कंपनी सरकारचा पूर्ण विश्वास

एलफिन्स्टनवर होता. या प्रदेशाची प्रशासन व्यवस्था सुधारण्याचे काम त्याने सुरू केले. प्रत्येक समाजात काही चांगल्या गोष्टी असतात त्याचा आपण स्वीकार केला पाहिजे या मताचा तो होता. ब्रिटिशांची प्रशासनव्यवस्था, ध्येयधोरणे येथे राबवण्यास त्याचा विरोध नव्हता. पण त्यासाठी अती घाई करू नये. कारण असे केल्यास स्थानिक लोकांमध्ये असंतोष निर्माण होऊन उठावाला सामोरे जावे लागेल असे त्याला वाटत होते. स्थानिक लोकांच्या रूढी परंपरा, चालीरिती व जीवनपध्दतीत कमीत कमी हस्तक्षेप करण्याचे धोरण त्याने स्वीकारले होते. एलफिन्स्टनच्या ताब्यात आलेला हा प्रदेश पन्नास हजार चौरस मैलाचा व चाळीस लाख लोकसंखेचा होता. मराठयांच्या राजकारणाचे बारकावे एलफिन्स्टनला माहिती होते. मराठे लढाऊ वृत्तीचे आहेत याची जाणीव त्याला होती. मराठी मन त्याने जवळून अभ्यासले होते. मराठयांकडून जिंकलेल्या प्रदेशाचे त्याने पुणे, अहमदनगर, खानदेश, धारवाड व सातारा असे पाच विभागात विभाजन केले. ते पुढील प्रमाणे आहेत.

**1. पुणे विभाग**

पुणे विभागाचा विस्तार पाच हजार तिनशे पन्नास चौरस मैल होता. एच. डी. रॉबर्टसन याची या प्रदेशाच्या कलेक्टरपदी नियुक्ती करण्यात आली होती. निरा ते भिमा या नद्यांमधील प्रदेशांचा या विभागात समावेश करण्यात आला होता.

**2. अहमदनगर विभाग**

अहमदनगर विभागाचा विस्तार सहा हजार सहाशे सहासष्ट चौरस मैल इतका होता. हेन्री पॉन्टीजर याची या विभागाचा कलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली. भिमा नदीपासून चांदोर टेकडयांपर्यंतचा प्रदेश या विभागात समाविष्ट करण्यात आला.

**3. खानदेश विभाग**

खानदेश विभागाचा विस्तार दहा हजार चारशे एकतीस चौरस मैल होता. कॅ. जॉन ब्रिग्ज याची या विभागाचा कलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्र्यंबक, येवला, कोपरगाव, लासलगाव, राम – सेज व वहेगाव या प्रदेशाचा समावेश या विभागात करण्यात आला होता.

**4. धारवाड विभाग**

विल्यम चॅपलीन याची या विभागाचा कलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली. कृष्णा ते तुंगभद्रा या नद्यांमधील प्रदेशाचा समावेश या विभागात करण्यात आला होता. या विभागाला कर्नाटक विभाग असेही म्हटले जात होते.

**5. सातारा विभाग**

सातारा विभागाचा विस्तार चार हजार सातशे ब्यान्नव चौरस मैल होता. जेम्स ग्रॅंट डफ याची या विभागाचा कलेक्टर म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या प्रदेशाचा प्रशासकीय कारभार व्यवस्थीत करता यावा यासाठी एलफिन्स्टनने वरील प्रकारची विभागणी केली होती.

**आ) नवे प्रशासकीय अधिकारी**

एलफिन्स्टनने आपल्या प्रशासन व्यवस्थेला आवश्यक असलेले बदल हळूहळू करण्यास सुरूवात केली. पूर्वीचे अधिकारी तसेच ठेवले. परंतु त्यांचे अधिकार कमी केले. प्रशासनाच्या दृष्टीने गरजेचे असलेले नवे अधिकारी निर्माण केले. ते पुढील प्रमाणे आहेत.

**1. पाटील**

पाटिल हा गावपातळीवरील प्रशासन व्यवस्थेचा महत्वाचा अधिकारी होता. मराठेकालीन कालखंडात पाटलास महत्वपूर्ण अधिकार होते. एलफिन्स्टनने मात्र पाटलांचे काही अधिकार कमी केले. त्यामध्ये एखाद्याला देहांताची शिक्षा देण्याचा पाटलाचा जो अधिकार होता तो कमी करून एखाद्याला जास्तीत जास्त 1 ते 2 रूपये दंड किंवा दोन दिवसांची कोठडी एवढीच शिक्षा ठोठावण्याचा अधिकार पाटलास देण्यात आला. पूर्वीच्या राजवटीत गावतील पडीक जमीन कोणासही देण्याचा अधिकार पाटलास होता. मामलेदाराच्या परवानगीशिवाय गावातील पडीक जमीनीचे वाटप पाटलास करता येणार

नाही असा नियम केला. महसूल वसुलाबाबत रयतेला 4 आण्यापर्यंत दंड करण्याचा अधिकार पाटलाला देण्यात आला. पाटलांच्या अधिकारावर आक्रमण करू नये असे कलेक्टरला सांगण्यात आले. पाटलाने देश विघातक कृत्य केल्यास मात्र त्याचे अधिकार काढून घेण्याचा अधिकार कलेक्टरला दिला. मराठी राज्यात पाटलांचे अधिकार सर्वत्र सारखे नव्हते. एलफिन्स्टनने मात्र आपल्या राजवटीत पाटलांना समान अधिकार दिले. एकूणच एलफिन्स्टनने पाटलांचे पूर्वीच्या काळातील पाटलांचे अधिकार कमी केले.

**2. कुलकर्णी**

गावपातळीवरील पाटला नंतरचा दुसरा महत्वाचा अधिकारी म्हणजे कुलकर्णी होय. पूर्वीच्या राजवटीत गावची कागदपत्रे सांभाळण्याचे व गावचा महसूल सरकारी तिजोरीत भरण्याचे काम कुलकर्णी करीत असे. पूर्वीच्या राजवटीतील कुलकर्णींच्या अनेक अधिकारावर बंधने घालून एलफिन्स्टनने कुलकर्ण्यांचे अधिकार सीमीत केले. कारण कुलकर्ण्यांच्या कार्यपध्दतीबद्दल व कार्यक्षमतेबद्दल बहुतांश कलेक्टरांनी नाराजी व्यक्त केली होती. कुलकर्ण्यांचा शेतक-यांकडून ठराविक भत्ता 'मुशाहिरा' रोख किंवा वस्तुरूपाने घेण्याचा त्याचा हक्क कायम ठेवण्यात आला. एलफिन्स्टनने पाटील व कुलकर्ण्यांचे अधिकार हळूहळू कमी केले. परिणामी समाजावर असणारा त्यांचा प्रभाव कमी होत गेला.

**3. देशमुख**

परगणा पातळीवरील महत्वाचा अधिकारी म्हणजे देशमुख होय. सर्व वतनामध्ये देशमुखी वतन श्रेष्ठ मानले जात होते. ब्रिटिशपूर्व काळातील राजवटीत देशमुखांना फार महत्व होते. देशमुख वतन व त्यांचे अधिकार ब्रिटिशांना आपल्या मार्गातील मोठी अडचण वाटत होती. देशमुखांचे समाजातील व प्रशासन व्यवस्थेतील महत्व कमी केल्याशिवाय ब्रिटिश प्रशासन स्थिर होणार नाही असे एलफिन्स्टनला वाटत होते. आपल्या प्रशासन व्यवस्थेत एलफिन्स्टनला देशमुख वतन नकोसे होते. त्यामुळे एलफिन्स्टनने हळूहळू राज्यकारभारातील देशमुखी वतनाचे महत्व कमी केले. महसूल वसुल करण्याचा देशमुखांचा अधिकार काढून घेण्यात आला. कलेक्टरांना देशमुखांवर देखरेख ठेवण्याचा अधिकार देण्यात आला. नविन प्रशासन व्यवस्थेत देशमुखांपेक्षा मामलेदाराचे महत्व वाढवण्यात आले.

**4. मामलेदार**

तालुका पातळीवरचा महत्वाचा अधिकारी म्हणजे मामलेदार होय. मामलेदाराचे अधिकार व महत्व वाढवून प्रशासन स्थिर व बळकट करण्यावर एलफिन्स्टनने भर दिला. पाटील, कुलकर्णी व देशमुख या परंपरागत अधिका-यांचे महत्व हळूहळू कमी करण्याबरोबरच एलफिन्स्टनने मामलेदाराचे महत्व वाढवण्यावर भर दिला. ब्रिटिश राजवटीत मामलेदार हाच तालुका प्रशासनाचा मुख्य आधार राहिला. एलफिन्स्टनने 50 हजार ते 1 लाख रूपये वसुलीचा प्रदेश एका तालुक्यामध्ये समाविष्ट करण्यात आला. मराठे कालखंडामध्ये मामलेदारास रोख पगार नव्हता तर त्याने वसुल केलेल्या महसुलातील 10% रक्कम त्याला पगाराबद्दल मिळत होती. एलफिन्स्टनने मात्र ही पध्दत बंद करून मामलेदारास त्याच्या कार्यक्षमतेनुसार मासिक 70 ते 150 रूपयापर्यंत पगार देण्याचे ठरवले. जॉन ब्रिग्ज या खानदेशच्या कलेक्टरने मामलेदाराच्या अधिकार व कामाबाबत ज्या सुधारणा केल्या त्याच थोडयाफार फरकाने एलफिन्स्टनने महाराष्ट्रात लागू केल्या. मामलेदाराचे अधिकार व कामे पुढीलप्रमाणे ठरवण्यात आली.

1. तालुक्यातील महसूल व्यवस्थेचा व पोलीस खात्याचा प्रमुख म्हणून मामलेदाराने काम करावे.
2. सरकारी नोकरांनी कोणाकडूनही भेटवस्तु स्वीकारू नये. तसेच वैयक्तीक व्यापार करू नये. यावर मामलेदाराने लक्ष ठेवावे.
3. किरकोळ भांडणे सोडवण्याचा अधिकार मामलेदारास देण्यात आला. गुन्हेगाराला जास्तीत जास्त दोन दिवसापर्यंत कोठडीत डांबण्याचा अधिकार व दोन किंवा तिन रूपयापर्यंत दंड करण्याचा अधिकार देण्यात आला.
4. मामलेदाराने वर्षातून दोनदा जमीन महसूल गोळा करावा. तसेच महसूल वसुल रकमेच्या पावत्या शेतक-यांना द्याव्यात.
5. मामलेदाराने प्रत्येक महिन्याला आपल्या तालुक्यातील घडलेल्या गुन्हयांची आकडेवारी कलेक्टरला कळवावी.
6. गाव पातळीवरील बारा बलुतेदार आपापली कामे करतात किंवा नाही यावर देखरेख ठेवावी.

मामलेदाराचे काम व कार्यक्षमता पाहून त्यांना बढती देण्याचे धोरण एलफिन्स्टनने स्वीकारले होते.

**4. कलेक्टर**

जिल्हयातील सर्वात मोठा व जिल्हापातळीवरील अधिकारी म्हणजे कलेक्टर होय. कलेक्टर हा जिल्हयाचा सर्वोच्च शासक होता. चांगली परंपरा व अनुभव असलेल्या अधिका-यांना एलफिन्स्टनने कलेक्टर पदावर नियुक्त केले. कलेक्टरांना अधिकार देऊन मामलेदाराचे महत्व कमी करण्याचे धोरण एलफिन्स्टनने स्वीकारले होते. एका जिल्हयात आठ ते बारा तालुके ठेवण्यात आले. कलेक्टरचे अधिकार व कामे पुढीलप्रमाणे ठरवून देण्यात आली.

1. मराठेकालीन पध्दतीप्रमाणे जमीन महसूल गोळा करावा.
2. मराठेकालीन कायदे व परंपरा ब्रिटिश परंपरेच्या विरूध्द असतील तर त्यामध्ये योग्य तो बदल करण्याचा अधिकार कलेक्टरला देण्यात आला.
3. जिल्हयातील गुन्हेगारांना डेक्कन कमिशनरच्या पूर्वसंमतीने देहांतापर्यंतची शिक्षा देण्याचा अधिकार कलेक्टरला देण्यात आला.
4. न्यायदानाच्या बाबतीत आपल्या बुध्दीप्रमाणे योग्यायोग्य ठरविण्याचा अधिकार कलेक्टरला देण्यात आला.
5. कलेक्टरने प्रचलित न्यायदानाच्या पध्दतीत योग्य ते बदल करून न्यायदानाचे काम करावे.

**इ) पंचायत व्यवस्था**

मराठेकालीन पंचायत व्यवस्था एलफिन्स्टनला उपयुक्त वाटत होती. मराठेकालीन पंचायत व्यवस्थेचा प्रभाव एलफिन्स्टनवर पडला होता. मराठा कालखंडामध्ये पंचायतीला निर्णय देण्याचे अधिकार होते. परंतु अंमलबजावणीचा अधिकार नव्हता. या व्यवस्थेतील दोष दुर करून ही व्यवस्था पुढे चालू ठेवावी असे एलफिन्स्टनला वाटत होते. पंचायत व्यवस्थेच्या माध्यमातून लोकशाहीचे बिजे असलेली ही संस्था महाराष्ट्रात शिल्लक रहावी असे त्याचे मत होते. पाटील, मामलेदार आणि कलेक्टर यांच्या सहाय्याने पंचायती नेमणे, त्यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवणे शक्य होत असे. पंचायतीसमोर प्रामुख्याने जमिनीच्या हद्दीसंबंधीचे, वाटणीचे, शेताच्या मालकीसंबंधीचे व कर्जफेडीसंबंधीचे वाद येत असत. पंचायतीने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याचे काम सरकारवर होते. काही वेळेस पंचायत सदस्य लाचखोरी करीत असत. त्याचबरोबर पंचायतीमध्ये निर्णय घेण्यास उशीर होत असे. हे दोष दूर करण्याचा प्रयत्न एलफिन्स्टनने केला. पंचायतीच्या कार्यपध्दतीत हे दोष असले तरीही गावातील लहान सहान खटले सोडवून न्याय देण्याच्या कामी पंचायतींचा चांगलाच उपयोग होत असे. त्यामुळेच एलफिन्स्टनने पंचायत पध्दतीचा पुरस्कार केला होता. लोकांना न्याय मिळाला पाहिजे याबाबत एलफिन्स्टन आग्रही होता. पंचायत पध्दतीत आवश्यक त्या सुधारणा करून पंचायती अधिक कार्यक्षम आणि उपयुक्त करण्याचा त्याने प्रयत्न केला. एलफिन्स्टनने 10 जुलै 1818 रोजी पंचायत व्यवस्थेसंदर्भात कलेक्टरांना पुढील सूचना केल्या.

1. न्यायदानाचे काम पंचायतीकडूनच करून घ्यावे.
2. पंचायतीसमोर येणा-या वादाच्या स्वरूपावरून पंच निवडावेत.
3. वादी – प्रतिवादींना पंचायतीमध्ये आपले दोन दोन सभासद पाठवण्याचा अधिकार असावा. त्यामध्ये सरकारी अधिकारी असू नयेत. तसेच प्रतिपक्षाने हरकत घेतलेला अधिकारी असू नये.
4. कलेक्टरला पंचायतीच्या निर्णयावर अपील ऐकण्याचा अधिकार असावा.
5. खटले सामान्यपणे दिवाणी स्वरूपाचे असावेत.

एलफिन्स्टनने पंचायत व्यवस्थेच्या कार्यासंबंधी पुढील नियम ठरवून दिले.

1. पाटलाने आयोजित केलेल्या पंचायतीस 150 रू. खटला चालवण्याची परवानगी असावी.
2. मामलेदाराने आयोजित केलेल्या पंचायतीस 1000 रू. पर्यंतचा खटला चालविण्याची परवानगी असावी.
3. पंचायतीच्या निर्णयावर कलेक्टरकडे अपील करण्याचा हक्क पक्षकाराला देण्यात आला.
4. गरज भासल्यास कलेक्टरला दुसरी पंचायत बोलावण्याचा अधिकार देण्यात आला.

1927 मध्ये एलफिन्स्टनची नवी कायदेसंहिता अस्तित्वात आली. पंचायत व्यवस्थेस भव्य स्वरूप देण्याची एलफिन्स्टनची इच्छा मात्र पंचायत व्यवस्थेस होणा-या विरोधामुळे पूर्ण होऊ शकली नाही.

### ई) महसूल व्यवस्था

मध्ययुगीन कालखंडातील उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणून जमिन महसूलाकडे पाहिले जात होते. मराठा कालखंडात जमिन महसूल हेच मराठयांच्या उत्पन्नाचे मुख्य साधन होते. ब्रिटिश कालखंडही त्याला अपवाद ठरला नाही. दुस-या बाजीरावच्या कारकीर्दीत महसूल वसुलीसाठी लिलावाच्या पध्दतीचा अंगीकार केला. गावच्या महसूलाचा लिलाव घेणारे रयतेला छळत असत व जादा पैसे वसूल करत असत. त्यामुळे राज्यात गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. मराठयांचा प्रदेश जिंकून घेतल्यानंतर एलफिन्स्टनने शेतीविषयक सुधारणांना प्राधान्य दिले. जमीन महसूल पध्दतीची पुनर्रचना करण्याचा महत्वाचा प्रश्न एलफिन्स्टनसमोर होता. कारण जमिनीवरील करामुळे ब्रिटिशांना मोठया प्रमाणात उत्पन्न मिळेल याची जाणीव त्याला होती. महाराष्ट्रात जमिन महसूल वसुलीची कोणती पध्दत लागू करावी असा प्रश्न त्याच्यासमोर निर्माण झाला. सरकारची आर्थिक स्थिती सुधारेल व शेतक-यांचेही हित साधले जाईल अशी महसूल व्यवस्था ठरवणे हे एलफिन्स्टनचे प्रमुख धोरण होते. शेतक-यांशी चर्चा करून जमिन महसूल ठरवावा असा विचार जेम्स मिलने मांडला होता. एलफिन्स्टनवर मिलच्या विचारांचा प्रभाव होता. तत्कालीन परिस्थितीत एलफिन्स्टनपुढे कायमधारा पध्दत व रयतवारी पध्दत हे दोन पर्याय उपलब्ध होते. परंतु या दोन्ही पर्यायापैकी कोणताही एक पर्याय जशासा तसाच लागू करण्यास एलफिन्स्टन तयार नव्हता. बंगालमधील कायमधारा पध्दतीचे दुष्परिणाम त्याने पाहिले होते. माळव्यात महालवारी पध्दत सुरू करण्यात आली होती. ब्रिटिश सत्तेच्या हितासाठी जमिनदारांचा वर्गही त्याला टिकवून धरायचा होता. एलफिन्स्टनच्या नेमस्त स्वभावानुसार त्याने जमिनदार व शेतकरी यांच्या हक्कामध्ये समन्वय साधला. रयत म्हणजे प्रजा. जमिन महसूलाच्या बाबतीत सरकार व शेतकरी यांचा प्रत्यक्ष संबंध असणारी पध्दत म्हणजे रयतवारी पध्दत होय. रयतवारी पध्दतीमध्ये शेतकरी व सरकार यांचा थेट संबंध येत होता. रयतवारी पध्दत थॉमस मन्रोने मद्रास प्रांतात सुरू केली होती. रयतवारी पध्दत एलफिन्स्टनने महाराष्ट्रात मराठयांकडून जिंकलेल्या प्रदेशात लागू केली. एकूण उत्पन्नाच्या 55% उत्पन्न रयतेने सरकारला द्यावे असे ठरविण्यात आले. शेतसारा निश्चित करण्यापूर्वी प्रथम तज्ञ मोजणीदाराकडून लागवडीखालील जमिनीची मोजणी करण्यात आली. प्रत्यक्ष लागवडीखाली असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ पाहून तेवढयाच जमिनीवर शेतसारा आकारण्यात आला. जमिनीची प्रतवारी उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी करण्यात आली. जमिनीची प्रतवारी ठरवताना जमिनीची खोली, उपजावूपणा, तालुक्यातील हवामान, मशागतीची परिस्थिती हे सर्व विचारात घेण्यात येत असे. तालुक्यात किती शेतसारा जमा होऊ शकेल याचा अंदाज घेतला जात असे. त्यासाठी तालुक्याची पूर्वीची जमाबंदी विचारात घेतली जात असे. पडिक जमिनीवर शेतसारा आकारण्यात आला नाही. शेतसारा रोखीनेच भरला पाहिजे असे बंधन ठेवले नाही. धन्याच्या स्वरूपातही शेतसारा भरण्याची तरतुद करण्यात आली. शेतक-यांनी नविन पडिक जमिन लागवडीखाली आणण्यास प्रोत्साहन देण्यात आले. एखाद्या शेतक-याला शेतसा-यामध्ये सुट द्यावयाची असेल तर भावनेच्या आहारी न जाता वस्तुस्थिती पाहून निर्णय घेण्याचे आदेश आपल्या अधिका-यांना एलफिन्स्टनने दिले होते. रयतवारी पध्दत यशस्वी करण्यासाठी एलफिन्स्टनने अधिका-यांची साखळी निर्माण केली. जिल्हयातील जमिन महसूल विषयक अधिकार कलेक्टरला देण्यात आले. कलेक्टरच्या हाताखाली मोजणीदार, कारकून व चौकशी अधिकारी नियुक्त करण्यात आले. तालुका पातळीवर मामलेदारास वसुलीचे अधिकार देण्यात आले. रयतवारी पध्दतीमुळे शेतकरी व सरकार यांच्यात प्रत्यक्ष संबंध येऊ लागला. त्यामुळे जमीनदार व अन्य मध्यस्थांचे महत्व संपुष्टात आले.

शेतसारा निश्चितीसाठी एलफिन्स्टनने सांगितलेली तत्वे

शेतसारा निश्चितीसाठी व वसुलीसाठी एलफिन्स्टनने आपल्या अधिका-यांना पुढील सूचना दिल्या होत्या.

1. प्रत्यक्ष लागवडीखाली असलेल्या जमिनीवरच शेतसा-याची आकारणी करावी.
2. लागवडीखाली नसलेल्या जमिनीवर शेतसारा आकारू नये.
3. शेतसारा कमी व शेतक-यांना सहन होण्यासारखा असावा.
4. कर रकमेचे मुल्य व जमिन महसुलाची आकारणी शक्य तो समान असावी.
5. कोणताही नविन कर बसवू नये.
6. शेतक-यांमध्ये ब्रिटिश शासनाबद्दल विश्वास निर्माण होईल असे वर्तन ठेवावे.
7. पडिक जमिन लागवडीखाली आणण्यासाठी शेतक-यांना प्रोत्साहन दयावे.
8. एखाद्या शेतक-याला शेतसा-यामध्ये सुट दयायची असेल तर वस्तुस्थिती पाहून निर्णय

घ्यावा.

नवे कर लादू नयेत व जुन्या व्यवस्थेतील अन्यायकारक कर रद्द करावेत अशा सूचना त्याने आपल्या अधिका-यांना दिल्या होत्या. एलफिन्स्टनने मराठयांकडून जिंकलेल्या प्रदेशात रयतवारी पध्दत सुरू केली. परंतु ही पध्दत सर्वत्र एकदम लागू होऊ शकली नाही. लोकांना ही पध्दत रूचली नाही. त्यामुळे या पध्दतीत काही सुधारणा करणे आवश्यक वाटू लागले. एलफिन्स्टनचा मित्र एडवर्ड स्ट्रॅची याने या पध्दतीत उपयुक्ततावादावर आधारित सुधारणा करावी असा आग्रह एलफिन्स्टनकडे धरला. त्यामुळे पुणे जिल्हयाचा असिस्टंट कलेक्टर रॉबर्ट कीथ प्रिंगल याच्याकडे रयतवारी पध्दतीमध्ये सुधारणा करण्याचे काम एलफिन्स्टनने सोपवले.

## उ) एलफिन्स्टनची कायदेसंहिता

मराठयांकडून जिंकून घेतलेल्या प्रदेशाची प्रशासकीय घडी बसवत असतानाच एलफिन्स्टनने महाराष्ट्रात पाश्चात्य न्यायव्यवस्था व कायदेपध्दती लागू केली. मराठेकालीन न्यायदानाच्या पध्दतीत एकसंघपणा व सुसूत्रता नव्हती. प्रत्येक समाजाच्या रूढी परंपरा वेगवेगळया होत्या. त्यानुसार न्यायदानाचे कामकाज केले जात होते. सर्व हिंदू समाजाला लागू पडेल अशी एकच कायदेसंहिता अस्तित्वात नव्हती. प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे कायदे होते. हे कायदे रूढी परंपरा, चालीरिती व अंधविश्वासावर आधारित होते. त्याला धर्मशास्त्र म्हटले जात होते. याची व्याप्ती ब्राम्हण वर्गापुरतीच मर्यादित होती. इतर जाती – जातीचे कायदे वेगवेगळे होते. व्यक्तीच्या सामाजिक स्थानानुसार एकाच गुन्हयासाठी वेगवेगळया कोर्टात वेगवेगळया शिक्षा केल्या जात होत्या. तेंव्हा धर्मशास्त्र व वहिवाट यांचा आधार घेऊन रयतेसाठी दिवाणी कायद्याचे नविन पुस्तक तयार करावे असे एलफिन्स्टनला वाटत होते. त्यासाठी 1820 मध्ये एलफिन्स्टनने बॅबिंगटनच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्त केली. अर्सिकीन व नॉरीस हे या समितीचे सदस्य तर समितीचे सेक्रेटरीपद स्टीलला देण्यात आले. या समितीच्या सदस्यांना ही कायदेसंहिता तयार करत असताना शास्त्री पंडित, वेगवेगळया जातींच्या प्रतिनिधींशी चर्चा करावी, रयतेच्या स्वाभिमानाला धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी अशा सूचना एलफिन्स्टनला दिल्या होत्या. या समितीचे कार्य जवळजवळ सात वर्षे सुरू होते. 1827 मध्ये या समितीने एक संहिता तयार केली. या संहितेला 'बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट 1827' असे म्हणतात. तसेच या संहितेला 'एलफिन्स्टनची कायदेसंहिता' असेही म्हटले जाते. एलफिन्स्टनची कायदेसंहिता केवळ हिंदूनाच नव्हे तर मुंबई इलाख्यातील सर्व जनतेस लागू पडेल असे त्याचे मत होते. या संहितेत पुढील बाबींचा समावेश करण्यात आला होता.

1. पंचायत पध्दतीने दिवाणी खटले चालवावेत. वादी – प्रतिवादींच्या संमतीनेच पंचाची नियुक्ती करण्यात यावी.
2. पाटील, कुलकर्णी यांनी पंचायतीवर काम करावे.
3. पंचायत आपला निवाडा लेखी किंवा तोंडी स्वरूपात देऊ शकेल.
4. पंचायतीच्या निवाडयावर अपील करावयाचे असेल तर फक्त लेखी निवाडयाचाच विचार केला जाईल.
5. पंचायतीमध्ये भ्रष्टाचार होऊ नये व पक्षपाती निर्णय होऊ नये म्हणून वादी – प्रतिवादींना अपील करण्याचा हक्क देण्यात आला.
6. न्यायालयाची त्रिस्तरीय रचना करण्यात आली. सद्र अदालत, त्यानंतर जिल्हा अदालत व सर्वात कनिष्ठ नेटिव्ह कमिशनर.
7. सद्र अदालतीचे सद्र दिवाणी अदालत व सद्र फौजदारी अदालत अशी विभागणी केली.
8. कनिष्ठ अदालतीवर देखरेख ठेवणे, न्यायदानाच्या कामात सुसूत्रता आणने, कनिष्ठ कोर्टाला मार्गदर्शन करणे व कनिष्ठ न्यायाधीशांची नेमणूक करणे ही जिल्हा अदालतीचे कामे ठरवून देण्यात आली.

एलफिन्स्टनने महाराष्ट्रातील कायदा कायद्यातील विसंगती, विस्कळीतपणा दूर करण्याचा प्रयत्न केला. त्याने पाश्चिमात्य कायदेपध्दत व न्यायपध्दत महाराष्ट्रात आणून कायद्याचे राज्य प्रस्थापीत केले. इंग्रज सरकार जुलमी आहे असे वाटू नये म्हणून शिक्षा देताना पूर्वीच्या सरकारप्रमाणे प्रसंगी आरोपींच्या जातीचाही विचार करावा असे एलफिन्स्टनने आपल्या अधिका-यांना सांगीतले होते.

## ऊ) एलफिन्स्टनचे शिक्षणविषयक धोरण

ब्रिटिशपूर्व कालखंडात जनतेच्या शिक्षणाची जबाबदारी राज्यकर्त्यांची नव्हती. जनतेला अपापल्या पध्दतीने शिक्षण घ्यावे लागत होते. पेशवे कालखंडात शिक्षणाचे लष्करी शिक्षण, व्यावहारिक शिक्षण व धार्मिक शिक्षण असे प्रकार होते. शिक्षण हे वरिष्ठ वर्गाची मिरासदारी होती. ब्रिटिश कालखंडात मात्र यामध्ये बदल झाला. ब्रिटिश कालखंडात शिक्षणातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी संपुष्टात आली. शिक्षण घेण्याचा सर्वांना समान अधिकार आहे या धोरणाचा अंगीकार ब्रिटिशांनी केला. त्यामुळे कनिष्ठ समाजातील लोकांना शिक्षणाची द्वारे खुली झाली. सामान्य लोकांच्या शिक्षणाची जबाबदारी ब्रिटिश सरकारने आपल्याकडे घेतली. 1813 च्या सनदी कायद्यानुसार ईस्ट इंडिया कंपनीने भारतीय लोकांच्या शिक्षणावर एक लाख रूपये वर्षाला खर्च करणे बंधनकारक करण्यात आले. एलफिन्स्टनने डेक्कन कमिशनर झाल्यानंतर शिक्षणविषय धोरणाबाबत विचारपूर्वक निर्णय घेतले. शिक्षणाची जबाबदारी खिस्ती मिशन-यांकडे सोपवू नये, सरकारनेच आपल्या प्रजेस शिकविण्याच्या योजना हाती घेतल्या पाहिजेत असे एलफिन्स्टनला वाटत होते. महाराष्ट्रीयन जनतेला स्थानीक भाषेतून शिक्षण दयावे असे एलफिन्स्टनचे मत होते. एलफिन्स्टनने मुंबई इलाख्याची शैक्षणीक पाहणी करून शिक्षणाबाबत पुढील धोरण आखले.

1. प्रचलित शिक्षण पध्दतीत प्रत्यक्ष ढवळाढवळ न करता त्या संस्थांना आर्थिक मदत करावी.
2. गावांमधील शाळांची संख्या वाढवावी. शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी पात्र शिक्षकांची नियुक्ती करावी.
3. शाळांना उपयुक्त पुस्तके देण्यात यावीत.
4. पाश्चात्य विज्ञान शिकवण्यासाठी नविन शाळा सुरू कराव्यात आणि त्या माध्यमातून उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात सुधारणा घडवून आणावी.
5. दुसरी भाषा म्हणून इंग्रजीला प्राधान्य द्यावे.
6. भारतीयांना ज्ञानाच्या विविध शाखांचा अभ्यास करण्यासाठी उत्तेजन द्यावे.
7. शाळांवर देखरेख करण्याची जबाबदारी त्या त्या जिल्हाधीका-यांकडे सोपवावी.

भारतीय लोक शिकून शहाणे झाल्यास आपणास हा देश सोडून जावे लागेल अशी भिती काही इंग्रज अधिका-यांनी होती. म्हणून त्यांनी एलफिन्स्टनच्या शिक्षण प्रसाराच्या धोरणाला विरोध केला होता. हा विरोध मोडून काढून एलफिन्स्टनने आपले शिक्षण प्रसाराचे धोरण सुरूच ठेवले. लोकांना अज्ञानात ठेवून त्यांच्यावर राज्य करणे त्याच्या सद्सद्विवेकबुध्दीला पटत नव्हते. भारतीयांच्या शिक्षणाच्या बाबतीत एलफिन्स्टनची मते ठाम होती. भारत सरकारला त्याने वेळोवेळी जी पत्रे पाठवली होती त्यामध्ये त्याची ही मते दिसून येतात. याबाबतीत त्याने लिहिलेले 'मिनिट' (सरकारी पुस्तिका) फार महत्वाचे आहे. शिक्षणविषयक धोरण ठरवताना बहुतांश शिक्षणाधिका-यांनी एलफिन्स्टनच्या या लेखनाचा उपयोग करून घेतला. 1854 चा वूडचा खलिता प्रसिध्द होईपर्यंत एलफिन्स्टनच्या या शिक्षणविषयक धोरणाचा उपयोग झाला. ब्रिटिश सरकारच्या शिक्षणविषय धोरणाचा हा पायाच होता. जनतेच्या शिक्षणाची जबाबदारी ही सरकारची आहे. त्यामुळे शिक्षणाबाबत सरकारने काटकसर करू नये असे त्याचे मत होते. महाराष्ट्रात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्यात एलफिन्स्टनने महत्वपूर्ण भूमिका बजावली. मुंबई इलाख्यात आधुनिक शिक्षणाचा पाया घालण्याचे कार्य त्याने केले. 1815 मध्ये एलफिन्स्टनच्या पुढाकाराने 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' ची स्थापना करण्यात आली. सुरूवातीस या संस्थेच्या शाळेत फक्त युरोपीयन लोकांच्या मुलांनाच प्रवेश दिला जात होता. पण 1818 पासून स्थानिक लोकांच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास सुरूवात केली. 1820 मध्ये मुंबईत एलफिन्स्टनच्या प्रेरणेने 'सोसायटी फॉर द प्रमोशन ऑफ एज्युकेशन ऑफ द पूअर' नावाची संस्था काढून देशी भाषांतून लोकशिक्षणाच्या कार्यास प्रारंभ केला. एलफिन्स्टनने 1822 मध्ये 'दि बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन ॲड स्कूल बुक सोसायटी' ची स्थापना केली. या संस्थेचा अध्यक्ष एलफिन्स्टन होता. इंग्रजी भाषेतील चांगल्या ग्रंथाचे देशी भाषेत भाषांतर करणे हा या संस्थेचा मुख्य उद्देश होता. 1827 मध्ये या सोसायटीचे रूपांतर 'नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' त झाले. तर पुढे या सोसायटीचे नामांतर 'एलफिन्स्टन सोसायटी' असे करण्यात आले.

एलफिन्स्टनने डेक्कन कमिशनर म्हणून पेशव्यांकडून जिंकून घेतलेल्या प्रदेशाची व्यवस्था लावल्यानंतर कंपनीने एलफिन्स्टनकडे मुंबई प्रांताच्या गव्हर्नरपदाची सुत्रे (1819 – 27) सोपवली. वेगवेगळया क्षेत्रात सुधारणा करून, नव्या व जुन्या विचारांची सांगड घालून आधुनिक महाराष्ट्राची पायाभरणी करण्याचे महत्वाचे काम एलफिन्स्टनने केले. आपल्या कर्तत्वाच्या जोरावर सामान्य नोकरीपासून अत्यंत उच्चपदापर्यंत एलफिन्स्टन पोहचला. मराठयांच्या पराभवानंतर मराठयांकडून जिंकून घेतलेल्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था निर्माण करण्याचे महत्वाचे काम त्याने केले. लोकोपयोगी कामे

करून मराठी मने त्याने जिंकली. महाराष्ट्रीय जनतेच्या इच्छा, सवयी व स्वभाव यांच्या विरोधी शासन महाराष्ट्रात सुरू केले तर ते यशस्वी होणार नाही. त्यामुळे येथील जनतेला रूचेल, पचेल व मानवेल असेच शासन महाराष्ट्रात निर्माण केले पाहिजे असे एलफिन्स्टनला वाटत होते. महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता भक्कम पायावर उभे करण्याचे काम ख-या अर्थाने एलफिन्स्टनने केले. एलफिन्स्टन हा उदारमतवादी होता. तो उत्कृष्ट प्रशासक म्हणूनही प्रसिध्द आहे. प्रशासन, शिक्षण, न्यायदान, महसूल व्यवस्था या क्षेत्रात त्याने आवश्यक बदल घडवून आणले. पण हे बदल स्थानिक लोकांना पचतील अशा पध्दतीनेच घडवून आणले. त्यामुळेच त्याच्या धोरणांना फारसा विरोध झाला नाही. स्थानिक लोकांच्या लोकजीवनात कमीत कमी ढवळाढवळ करण्याचे त्याचे धोरण होते. ब्रिटिशांचे राज्य महाराष्ट्रात विनासायस आणि द्रुतगतीने प्रस्थापीत करण्याचे श्रये एलफिन्स्टन व त्याच्या साथीदारांना दयावे लागेल. निवृत्तीनंतर ब्रिटिश सरकारने त्याला 1829 व 1834 मध्ये गव्हर्नर जनरल हे भारतातील अत्युच्च पद देऊ केले होते. पण एलफिन्स्टनने त्यास नकार दिला. एलफिन्स्टनच्या कर्याविषयी ग्रॅंट डफ म्हणतो, 'महाराष्ट्राच्या जनतेवर त्याने जे उपकार केले आहेत, त्याची आठवण, नंतरच्या काळात कितीही राजकीय उलथापालथी झाल्या तरीही महाराष्ट्राच्या जनतेला राहिल' 1827 पर्यंत म्हणजेच तो मायदेशात परत जाईपर्यंत त्याचा व महाराष्ट्राचा अतुट संबंध राहिला. एलफिन्स्टन गव्हर्नर, प्रशासक, मुत्सद्दी व इतिहासकार म्हणून प्रसिध्द आहे.

### २. २. २ उपमुद्दा —खिश्चन मिशन-यांचे कार्य

महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाच्या कार्यात खिस्ती मिशन-यांनी महत्वपूर्ण योगदान दिले. भारतीय समाजात सुधारणा घडवून आणण्यात त्यांनीही मोठा वाटा उचलला. खिस्ती धर्माच्या प्रचाराचे, प्रसाराचे कार्य करणा-या किंबहुना या कार्यालाच कायमचे वाहून घेणा-या व्यक्तींना खिस्ती मिशनरी असे म्हटले जाते. खिस्ती धर्मप्रसारकांनी खिश्चन धर्माच्या प्रचाराला व प्रसाराला प्राधान्य दिले होते. त्यासाठी त्यांचा सेवाभावी संस्था स्थापण्यावर भर होता. या संस्थांच्या वतीने प्रतिनिधी म्हणून सेवाभावी वृत्तीने धर्मप्रसाराचे काम करणा-या धर्मप्रसारकांना 'मिशनरी' असे म्हटले जात होते. खिस्ती मिशनरी आपले काम निष्ठेने करत असत. खिस्ती धर्माच्या प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून येशू खिस्तांचा संदेश जगाच्या कानाकोप-यात पोहचवण्याचे काम ही मंडळी करत असत. वास्को – दी – गामा याने भारताकडे येण्याचा जलमार्गाचा शोध लावल्यानंतर युरोपीयन राष्ट्रातील लोक व्यापार करण्यासाठी भारतात आले. त्यांच्या बरोबरच खिस्ती मिशनरी खिश्चन धर्माच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी भारतात दाखल झाले. भारतासारख्या विशाल क्षेत्रफळ असलेल्या व मागास देशात खिश्चन धर्माचा प्रचार करण्यास त्यांना अधिक वाव होता. युरोपीयन देशांनी सुरूवातीला भारताच्या काही भागावर वर्चस्व प्रस्थापीत केल्यानंतर या प्रदेशात सुरूवातीस त्यांनी खिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार केला.

भारताबरोबर व्यापार करत असतानाच भारतात खिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार करण्याचे धोरण युरोपीयन राष्ट्रांतील खिश्चन मिशन-यांनी स्वीकारले होते. त्यासाठी खिश्चन मिशन-यांनी शिक्षण प्रसार व सेवाभााव या दोन मार्गाचा स्वीकार केला होता. ईस्ट इंडिया कंपनीने सुरूवातीच्या काळात आपल्या वर्चस्वाखालील भारतीय प्रदेशात खिश्चन मिशन-यांना खिश्चन धर्मप्रसारासाठी बंदी घातली होती. भारतीय समाज परंपराप्रिय आहे, आपल्या धार्मिक जीवनात इतरांनी हस्तक्षेप केल्याचे त्यांना आवडणार नाही. आपण भारतीयांच्या धार्मीक जीवनात हस्तक्षेप केल्यास आपल्या सत्तेविरूध्द भारतीय बंड करतील. परिणामी आपल्या सत्तेच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होईल अशी भिती ब्रिटिशांना वाटत होती. त्यामुळे खिश्चन मिशन-यांना मदत करण्याचे त्यांनी कटाक्षाने टाळले होते. ब्रिटिश सरकारने केलेल्या विरोधामुळे डॉ. विल्यम कॅरे या मिशन-याला कलकत्ता येथील आपले कार्यालय व मुद्रणालय श्रीरामपूर येथील डॅनिश वसाहतीत स्थलांतरीत करावे लागले. मुंबई इलाख्याचा गव्हर्नर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यानेही खिश्चन मिशन-यांच्या विरोधात धोरण स्वीकारले होते. पेशव्यांचे राज्य बुडाल्यामुळे अगोदरच वरिष्ठ जातीचे लोक दुखावलेले आहेत. अशा स्थितीत त्यांच्या धार्मीक जीवनात हस्तक्षेप केल्यास ब्रिटिश सत्तेविरूध्द बंड होईल अशी भिती त्यांना वाटत होती. तरीही खिस्ती मिशन-यांनी वैयक्तीक पातळीवर जिद्द व चिकाटीने इंग्रजाच्या वर्चस्वाखालील प्रदेशातही धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले होते. 1813 च्या चार्टर ॲक्टनुसार ईस्ट इंडिया कंपनीने भारतीयांच्या शिक्षणासाठी एक लाख रूपये खर्च करावेत असे बंधन घालण्यात आले. तसेच खिस्ती मिशन-यांना भारतात वास्तव्य करण्याचे व धर्मप्रसाराचे कार्य करण्यास परवानगी देण्यात आली. त्यामुळे महाराष्ट्रात चर्च मिशनरी सोसायटी, स्कॉटिश मिशनरी

सोसायटी, लंडन मिशनरी सोसायटी, अमेरिकन मराठी मिशन इ. मिशनर-यांनी ख्रिस्ती धर्मप्रसाराचे कार्य जोमाने हाती घेतले.

1813 च्या कायद्याने मिशनरींना भारतामध्ये ख्रिश्चन धर्मप्रसाराची परवानगी देण्यात आल्यामुळे ख्रिश्चन धर्मप्रसारकांचा मोठा लोंढा भारतात दाखल झाला. 1818 मध्ये मराठयांचे राज्य जिंकून घेतल्यानंतर एलफिन्स्टनने जाणीवपूर्वक ख्रिश्चन धर्मगुरूंना धर्मप्रसारापासून दूर ठेवले होते. कारण ख्रिश्चन धर्माचा प्रसार करणे त्याला घाईचे वाटत होते. ख्रिश्चन धर्म बुध्दीप्रामाण्यावर, तारतम्यावर व व्यवहारवादावर आधारित आहे. त्यामुळे हिंदूना जेंव्हा ख्रिश्चन धर्म पटेल तेंव्हा ते आपोआप ख्रिश्चन धर्म स्वीकारतील असे एलफिन्स्टनला वाटत होते. 1815 मध्ये अमेरिकन मिशन-यांनी सर्वप्रथम मुंबई येथे पाश्चात्य धर्तीवर शाळा सुरू केली. महाराष्ट्रात पुणे, नाशिक, अहमदनगर, सातारा, शिरूर, जुन्नर, हर्णे, बाणकोट येथे आपल्या प्रचाराची केंद्र मिशन-यांनी सुरू केली. भारतीय समाजाने स्त्रीयांना व अस्पृश्यांना शिक्षणाचा अधीकार नाकारला होता. ख्रिस्ती मिशन-यांनी मात्र शिक्षणप्रसारासाठी समाजातील या दोन्ही घटकावर लक्ष केंद्रित केले. ख्रिश्चन मिशन-यांनी भारतात मुलींच्या शिक्षणाची सुरूवात केली. 1819 मध्ये अमेरिकन मिशनने कलकत्ता येथे मुलींसाठी पहिली शाळा सुरू केली. महाराष्ट्रातही मुंबई व पुणे येथे अमेरिकन मिशन व स्कॉटिश मिशन यांनी मुलींसाठी शाळा सुरू केल्या. 1820 पर्यंत अमेरिकन मिशन-यांच्या शाळांची संख्या 21 पर्यंत पोहचली होती. त्यांच्यामार्फत सुरू केलेल्या शाळांची संख्या दिवसेंदिवस वाढत गेली. धर्मप्रसारासाठी उपयोगात आणावयाचे माध्यम म्हणून त्यांनी शिक्षणक्षेत्राचा उपयोग केला. अमेरिकन मिशन-यांनी 1824 मध्ये मुंबई प्रांतात मुलींसाठी स्वतंत्र शाळा काढून आधुनिक स्त्री शिक्षणाची सुरूवात केली. मुलींच्या शाळांची संख्या दोन वर्षाच्या काळात 9 पर्यंत पोहचली. 9 शाळांमधून 400 मुली शिक्षण घेत होत्या. 1849 – 50 मध्ये ही संख्या 2000 पर्यंत पोहचली. अमेरिकन मिशन-यांनी 1834 मध्ये इंग्रजी माध्यमाच्या शाळा सुरू केल्या. मुलींच्या शाळेमध्ये स्त्री शिक्षीकांच्या नियुक्त्याही करण्यात आल्या. चर्च मिशनरी सोसायटीचे रेव्हरंड केनेडी यांनी 1820 पासून मुंबई व त्यानंतर वसईमध्ये अनेक शाळा सुरू केल्या. माहिम, वांद्रे व वसई ही त्या सोसायटीची प्रमुख केंद्रे होती.

मुंबईच्या शैक्षणीक प्रगतीत स्कॉटिश मिशन-यांनीही महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. 1822 मध्ये स्कॉटिश मिशनरी सोसायटीने डोनाल्ड मिचेल याला मुंबईत पाठवले. त्यानंतर रॉबर्ट नेस्बीट, रेव्ह नॉन विल्सन व रेव्ह. मरे मिचेल हेही महाराष्ट्रात आले. जॉन विल्सन व मिसेस विल्सन यांनी मुंबईतील श्रीमंतांच्या मदतीने स्थानिकांच्या शिक्षणासाठी महत्वपूर्ण प्रयत्न केले. स्कॉटिश मिशनरी सोसायटीने स्त्री शिक्षणावर अधिक भर दिला. मुंबईमध्ये जॉन विल्सन व मिसेस विल्सन यांनी स्त्रीशिक्षणाची चळवळ सुरू केली. त्यांनी सुरू केलेल्या शाळांमधून मराठी, गुजराती व पारशी मुली शिक्षण घेत होत्या. अंकगणित, लिहिणे – वाचने, सामान्यज्ञान इ. शिक्षण या शाळांमधून दिले जात होते. मिसेस केनेडींनी परित्यक्ता स्त्रीयांसाठी शाळा सुरू करण्याची एक अभिनव कल्पना राबवली. वेगवेगळया जातीधर्मातील मुली या शाळांमधून शिक्षण घेत होत्या. डॉ. विल्सन यांनी इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याची योजना यशस्वीपणे राबवली. महाराष्ट्रात ख्रिस्ती धर्माचा प्रचार व प्रसार करावयाचा असेल तर मराठी भाषा आत्मसात केली पाहिजे याची जाणीव होऊन ख्रिश्चन धर्मगुरूंनी मराठी व संस्कृत भाषा आत्मसात केल्या. ख्रिस्ती मिशन-यांनी वाड्.मयीन क्षेत्रातही भर घातली. महाराष्ट्रीय जनतेला बायबल वाचता यावे म्हणून कोलकात्याजवळच्या श्रीरामपूर (सेरामपूर) मिशनमधील डॉ. विल्यम करे याने संपूर्ण बायबलचे मराठीत भाषांतर केले. तर डॉ. रॉबर्ट ट्रमंड याने मराठी व्याकरण व शब्दकोश प्रसिध्द केला. मराठी भाषेच्या विकासाला काही प्रमाणात ख्रिस्ती मिशन-यांनी हातभार लावल्याचे दिसून येते. ख्रिश्चन मिशन-यांनी सुरू केलेल्या शाळांमधून विद्यार्थ्यांना बायबल शिकवत असत. बाणकोट येथे शिला प्रेस/लिथो प्रेस घालून त्यावर धार्मिक पुस्तके छापून ती विद्यार्थ्यांना मोफत वाटत असत. 1832 मध्ये जॉन विल्सन यांनी इंग्रजी शाळा सुरू केली. या शाळेला नंतर 'अंब्रोली इंग्लिश स्कूल' असे नाव देण्यात आले. 1835 मध्ये जनरल असेंब्लीचे 'सेंट्रल कॉलेज' विल्सनने सुरू केले. 1836 मध्ये जनरल असेंब्लीने अनाथ व पंगू मुलींसाठी शाळा सुरू केली. शिक्षणाच्या माध्यमातून लहान मुलांच्या मनावर ख्रिश्चन धर्माचे महत्व बिंबवण्याचे काम या शाळांमधून सुरू होते. ख्रिश्चन धर्मगुरूंना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे मदत करण्याचे काम सरकारी अधिकारी करत होते.

मिशन-यांच्या ख्रिश्चन धर्म प्रसाराच्या धोरणातूनच मुंबईत 'श्रीपती शेषाद्री प्रकरण' गाजले होते. ख्रिस्ती धर्माची श्रेष्ठता दाखवण्यासाठी व हिंदू धर्मातील दोष दाखवण्यासाठी मिशन-यांनी हिंदू धर्मातील अनिष्ठ चालिरिती, रूढीपरंपरांवर हल्ले करण्यास सुरूवात केली. ख्रिस्ती धर्माच्या प्रचार व

प्रसारासाठी त्यांनी ज्ञानोदय, प्रभोदय, सायंदीपिका ही वृततपत्रे सुरू केली. या वृत्तपत्रातून हिंदू धर्मातील अनिष्ठ चालिरिती, रूढी परंपरावर टिका केली जात होती. त्यामुळे काही भारतीय खडबडून जागे झाले. त्यांनी आपल्या धर्मातील अनिष्ठ रूढीपरंपरा दूर करण्यासाठी सामाजिक व धार्मिक सुधारणाचळवळी हाती घेतल्या. भारतीय समाजातील कनिष्ठ वर्गामध्ये खिश्चन धर्माचा प्रचार करण्याचे धोरण खिश्चन मिशन-यांनी अंगीकारले होते. कारण भारतीय समाजातील शिक्षण घेतलेला वरिष्ठ वर्ग खिश्चन धर्माकडे आकर्षीत होणार नाही याची जाणीव खिश्चन मिशन-यांना होती. भारतातील उपेक्षीत समाजघटकांना खिस्ती धर्माचे महत्व पटवून देणे गरजेचे होते. त्यासाठी त्यांनी समाजकार्याचे धोरण अंगीकारले. भारतीय समाजातील वेगवेगळया घटकात आपल्याविषयी प्रथम विश्वासाची भावना निर्माण करून त्यांना आपलेसे करायचे व त्यानंतर धर्मांतरासाठी प्रवृत्त करायचे या धोरणाचा अंगीकार त्यांनी केला. आपल्याविषयी भारतीय समाजात विश्वास निर्माण करण्यासाठी समाजसेवा, शिक्षणप्रसार करण्यास सुरूवात केली. मिशन-यांनी महाराष्ट्राच्या बहुतांश भागात जाऊन काम सुरू केले. सुरूवातीस महाराष्ट्रीयन जनतेकडून थंड प्रतिसाद त्यांना मिळाला. तरीही मिशन-ंनी आपले काम चिकाटीने सुरूच ठेवले. भारतातील सुशिक्षीत लोकांना खिस्ती धर्माचे समता, मानवतावाद, एकेश्वरवाद, उपेक्षीताविषयी कणव हे तत्वज्ञान सांगून आकर्षीत करून घेतले. तर अशिक्षीत लोकांना शाळा सुरू करून, दवाखाने सुरू करून, मोफत औषधोपचार करून, आर्थिक मदत करून विश्वास संपादन केला व त्या माध्यमातून खिश्चन धर्माचा प्रसार केला.

**2. 2. 3. मुख्य मुद्दा – वृत्तपत्र आणि जनजागृती**

समाजमनाला प्रभावी आकार देण्याचे महत्वपूर्ण कार्य वृत्तपत्र करतात. पोर्तुगीजांनी 1550 मध्ये भारतात मुद्रणकला सुरू केली. खिस्ती धर्मग्रंथ छापण्यासाठी दोन मुद्रणयंत्रे त्यांनी भारतात आणली. पुढे ब्रिटिशांनी भारतात आधुनिक मुद्रणतंत्र रूजवले. भारतात 19 व्या शतकाच्या आरंभी आधुनिक मुद्रणकलेचा प्रसार झाला. त्यामुळे ग्रंथछपाईला व वृत्तपत्र व्यवसायाला चालना मिळाली. 1780 मध्ये कलकत्ता येथे जेम्स ऑगस्टस हिकी याने सुरू केलेले 'बेंगॉल गॅझेट' हे इंग्रजी साप्ताहिक म्हणजे भारतातील पहिले वृत्तपत्र होय. जेम्स ऑगस्टस हिकी वृत्तपत्राचा हेतू स्पष्ट करताना म्हणतो, '....मनाला व आत्म्याला स्वातंञ्य लाभावे म्हणून हे कष्ट घेण्यात मला आनंद वाटतो.' जेम्स ऑगस्टस हिकी हा साहसी व वृत्तपत्र स्वातंञ्याचा पुरस्कर्ता होता. त्याने आपल्या वृत्तपत्रातून वॉरण हेस्टींग्ज, एलिजा इम्पे यांसारख्या उच्चपदस्थ इंग्रज अधिका-यावर टिका केल्यामुळे ब्रिटिश सरकारने त्याचा छापखाना जप्त केला. याच कालखंडात 'द कलकत्ता गॅझेट', 'द इंडियन वर्ल्ड' ही वृत्तपत्रेही सुरू झाली. इंग्रजी भाषेतून निघणारी, इंग्रज व्यक्ती संपादक असलेली व इंग्रज लोक वाचकवर्ग असलेली ही वृत्तपत्रे होती. 1818 मध्ये सुरू झालेले 'दिग्दर्शन' हे बंगाली मासीक म्हणजे देशी भाषेतील पहिले नियतकालिक, तर 'समाचार दर्पण ' हे बंगाली साप्ताहिक म्हणजे देशी भाषेतील पहिले वृत्तपत्र होय. 'दिग्दर्शन' या मासिकातून साहित्य, इतिहास, विज्ञान या विषयांवर इंग्रजी व बंगाली भाषेतून लेखन केले जात होते. पुढील काळात संपूर्ण भारतात वृत्तपत्रे निघाली आणि त्यांनी मोलाचे कार्य बजावले. राजा राममोहन रॉय यांचे बंगाली 'संवाद कौमुदी' व दादाभार्द नौरोजी यांचे गुजराती 'रास्त गोफ्तार' हे भारतातील महत्वपूर्ण वृत्तपत्रे आहेत. 'संवाद कौमुदी' हे वृत्तपत्र सुरुवातीच्या भारतीय वृत्तपत्रापैकी विशेष महत्वाचे वृत्तपत्र होते. वृत्तपत्रातील सुधारकी विचारसरणीमुळे हे वृत्तपत्र प्रसिध्द आहे. राजा राममोहन रॉय यांनी आपले धार्मिक व सामाजिक सुधारेणेचे विचार या वृत्तपत्रातून मांडले. तत्कालीन अनिष्ठ सामाजिक व धार्मिक रूढीपरंपरेवर त्यांनी प्रखर हल्ला चढवला. 'संवाद कौमुदी' हे पुरोगामी विचारांचा पुरस्कार करणारे वृत्तपत्र होते. या वृत्तपत्राने एका बाजूला खिस्ती मिशन-यांच्या हिंदुधर्मविरोधी लेखनाला प्रत्युत्तर दिले, तर दुस-या बाजूला हिंदू धर्मातील अंधश्रध्दांचा फोलपणाही दाखवून दिला. 'संवाद कौमुदी' बंद झाल्यानंतर राजा राममोहन रॉय यांनी 'मिरात – उल – अखबार' हे फारसी भाषेतील वृत्तपत्र सुरू केले. प्रबोधन व मनोरंजन करण्याचे काम वृत्तपत्रे करू लागली. भारतीय वृत्तपत्रे हे राष्ट्रीय जागृतीचे महत्वपूर्ण साधन बनले. बंगाल प्रांतात 'हिंदू पॅट्रीअट', 'अमृत बझार पत्रिका', 'इंडियन मिरर', 'द बेंगाली', 'सोमप्रकाश', 'संजीवनी' ही वृत्तपत्रे, मुंबई प्रांतात 'दर्पण', 'प्रभाकर', 'रास्त गोफ्तर', 'नेटिव्ह ओपिनियन', 'इंदूप्रकाश', 'केसरी', 'मराठा' ही वृत्तपत्रे, मद्रास प्रांतात 'हिंदू', 'स्वदेशमित्रन', 'आंध्र प्रकाशिका', 'केरळ पत्रिका' ही वृत्तपत्रे, संयुक्त प्रांतात 'ॲडव्होकेट', 'हिंदुस्थानी', 'आझाद' ही वृत्तपत्रे तर पंजाबमध्ये 'द ट्रिब्यून', 'अखबार – इ – आम', 'कोहिनूर' या राष्ट्रवादी

वृत्तपत्रांनी मोठी जागृती घडवून आणली. भारतातील देशी वृत्तपत्रांच्या खपाचा आकडा 1885 ते 1905 या कालखंडात सुमारे 2,99,000 वरून 8, 17,000 पर्यंत वाढला.

1789 मध्ये मुंबईत 'बॉम्बे हेरॉल्ड' हे पहिले वृत्तपत्र सुरू झाले. यातील माहिती युरोपीयन समाजाला आवडेल अशीच होती. 1822 मध्ये सुरू झालेले 'मुंबईना समाचार' हे गुजराती भाषेतील वृत्तपत्र भारतीय मालकीचे पहिले वृत्तपत्र होते. मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक म्हणून बाळशास्त्री जांभेकर प्रसिध्द आहेत. 1832 मध्ये त्यांनी 'दर्पण' हे मराठी भाषेतील पहिले साप्ताहिक वृत्तपत्र सुरू केले. 1840 मध्ये हे वृत्तपत्र बंद पडले. 1840 मध्ये 'दिग्दर्शन' हे पहिले मराठी मासिक त्यांनी सुरू केले. यामध्ये सांस्कृतिक, शैक्षणीक, शास्त्रीय व साहित्यीक विषयावर लेखन केले होते. 'दर्पण' वृत्तपत्राच्या पहिल्या अंकात वृत्तपत्राची उद्दिष्टये स्पष्ट करताना बाळशास्त्री जांभेकर म्हणतात, 'मनोरंजन करणे, चालते काळाची वर्तमाने कळविणे आणि योग्यतेस येण्याचे मार्ग दाखविणे.' यावरून वृत्तपत्र सुरू करण्यामागची त्यांची भूमिका दिसून येते. बाळशास्त्रींनी दर्पणमधून सतीप्रथा, विधवा विवाह, धर्मांतर या विषयावरही लेखन केले. 19 व्या शतकात महाराष्ट्रात मोठया प्रमाणात जागृती घडवून आणण्याचे काम 'प्रभाकर', 'ज्ञानप्रकाश', 'इंदूप्रकाश', 'दीनबंधू', 'निबंधमाला', 'केसरी', 'मराठा', 'सुधाकर', 'काळ' या वृत्तपत्रांनी केले. मुंबईतील काही वृत्तपत्रांनी ब्रिटिशांच्या ध्येय धोरणावर टिका केल्यामुळे वृत्तपत्रावर निर्बंध लादण्यात आले. एलफिन्स्टननेही वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा संकोच केला. 1825 मध्ये वृत्तपत्रांचे मालक, संपादक व मुद्रक यांनी आपली नावे सरकारकडे नोंदवणे बंधनकारक करण्यात आले. मुंबई प्रांतातील देशी वृत्तपत्रांची संख्या दिवसेंदिवस वाढतच गेली. 1880 – 81 मध्ये ही संख्या 76 पर्यंत पोहोचली. 'दर्पन' हे वृत्तपत्र इंग्रजी व मराठी अशा दोन्ही भाषामध्ये प्रकाशित होत होते. बाळशास्त्री जांभेकरांनी आपले धार्मिक व सामाजिक सुधारणेसंदर्भातील विचार या वृत्तपत्रातून मांडले. 1841 मध्ये भाऊ महाजन यांनी 'प्रभाकर' हे वृत्तपत्र सुरू केले. पुढे जवळजवळ 21 वर्षे हे वृत्तपत्र सुरू होते. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांची 'शतपत्रे' 1848 ते 1850 या कालावधीत प्रभाकर मधून प्रसिध्द झाली. शतपत्रांच्या माध्यमातून लोकहितवादींनी तत्कालीन रूढी परंपरांवर कठोर प्रहार करून सुधारणांचा पुरस्कार केला. प्रभाकर वृत्तपत्रामधून ब्रिटिशांच्या राज्यपध्दतीवर, आर्थिक शोषणावर टिका केली जात होती. 1842 मध्ये अहमदनगर येथील मिशनरींनी 'ज्ञानोदय' सुरू केले. तात्या छत्रे यांनी 1842 मध्ये 'ज्ञानसिंधू' नावाचे साप्ताहिक सुरू केले. कृष्णाजी त्रिंबक रानडे यांनी संपादित केलेले 'ज्ञानप्रकाश' साप्ताहिक 1849 पासून सुरू झाले. 1857 च्या उठावानंतर भारतीयांच्या मालकीच्या व भारतीयांनी संपादित केलेल्या वृत्तपत्रांच्या संख्येत मोठया प्रमाणात वाढ झाली.

इंदूप्रकाश हे एक महत्वाचे वृत्तपत्र होते. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषामधून हे वृत्तपत्र प्रकाशित होत असे. इंदूप्रकाशमधून तत्कालीन बालविवाह, केशवपन, जरठकुमारी विवाह, स्त्रीशिक्षण या विषयांची चिकित्सक मांडणी केली जात होती. 1877 मध्ये 'दीनबंधू' हे वृत्तपत्र सुरू झाले. शोषित वर्गाच्या हक्कांचा खंबीर पुरस्कार या वृत्तपत्रामधून केला जात होता. 1881 मध्ये 'केसरी' हे मराठी तर 'मराठा' हे इंग्रजी वृत्तपत्र लोकमान्य टिळक, आगरकर व त्यांच्या काही सहका-यांनी सुरू केले. केसरी वृत्तपत्राचे पहिले संपादक आगरकर होते. टिळकांशी मतभेद झाल्यानंतर आगरकरांनी केसरी वृत्तपत्राचे संपादकपद सोडून 1888 मध्ये 'सुधारक' हे वृत्तपत्र सुरू केले. भारतामध्ये राष्ट्रीय जागृती निर्माण करण्याचे महत्वपूर्ण कार्य केसरी व मराठा या वृत्तपत्रांनी केले. टिळकांनी आपली जहाल विचारसरणी केसरीमधून प्रभावीपणे मांडली. या वृत्तपत्रांमधून त्यांनी ब्रिटिशांवर सडकून टिका केली. राष्ट्रवादी चळवळीची मुखपत्रे म्हणून केसरी व मराठा वृत्तपत्रांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे.

वृत्तपत्रांमधून ब्रिटिश सत्तेवर, त्यांच्या अन्यायकारक धोरणावर टिका होऊ लागल्यामुळे वृत्तपत्रस्वातंत्र्याची गळचेपी करण्याचे धोरण ब्रिटिशांनी अंगीकारले. ब्रिटिशांच्या ध्येय धोरणावर भारतीय वृत्तपत्रे करीत असलेली टिका ब्रिटिशांना सहन होणे शक्य नव्हते. ब्रिटिश सत्तेचे स्थैर्य धोक्यात येईल असे त्यांना वाटत होते. त्यामुळेच वेळोवेळी ब्रिटिशांनी भारतीय वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर गदा आणनारे कायदे पास केले. ब्रिटिशांच्या ध्येयधोरणावर वृत्तपत्रामधून होत असलेल्या टिकेचा सूर जसजसा अधिकाधिक कठोर होऊ लागला, तसतसे वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करण्याचे सरकारी धोरणही अधिकाधीक कडक होत गेले. वृत्तपत्राच्या माध्यमातून होणा-या टिकेमुळे चिडून जाऊन वृत्तपत्रांवर सरकारी नियमानुसार बंधने घालण्याची सुरूवात लॉर्ड वेलस्लीच्या काळात झाली. लॉर्ड वेलस्लीने वृत्तपत्रांवर जबरदस्त नियंत्रणे लादली. लॉर्ड हेस्टिंग्जला वृत्तपत्रावरील नियंत्रणे योग्य न वाटल्याने त्याने वेलस्लीने लादलेली नियंत्रणे उठवली. वृत्तपत्रांना स्वातंत्र्य दिल्यास याचा गैरफायदा घेऊन वृत्तपत्रे कंपनी सरकारची बदनामी करतील, कंपनी सरकारविरूध्द लोकमत भडकावतील अशी

भिती ब्रिटिशांना वाटत होती. हेस्टींग्जनंतर गव्हर्नर जनरलपदी आलेल्या ॲडमने वृत्तपत्र स्वातंत्र्यावर निर्बंध घालणारा कायदा 1823 मध्ये केला. या कायद्यानुसार वृत्तपत्र सुरू करण्यासाठी सरकारकडून परवानगी घेणे व व वृत्तपत्रातील मजकूर सरकारच्या विरोधात असणार नाही याची हमी देण्यात यावी. या अटींचे उल्लंघन करणा-या वृत्तपत्राचा परवाना रद्द करण्याचा अधिकार सरकारला होता. या कायद्याच्या विरोधात राजा राममोहन रॉय यांनी आघाडी उघडली होती. द्वारकानाथ टागोर यांनी या नियमाविरूध्द उघडपणे निषेध नोंदवला होता. वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करणा-या चार्लस् मेटकाफ याने 1835 मध्ये हा कायदा रद्द केला. 1857 मध्ये ब्रिटिशांच्या विरोधात भारतात मोठा उठाव घडून आला. त्यामुळे 1857 मध्ये ब्रिटिशांनी 'लायसन्सिंग ॲक्ट' पास केला. या कायद्यानुसार प्रत्येक वृत्तपत्रासाठी सरकारी अनुज्ञापत्र सक्तीचे करण्यात आले. वृत्तपत्रांना हे अनुज्ञापत्र द्यायचे की नाही याचा अधिकार गव्हर्नर जनरलला देण्यात आला. 1865 पर्यंत हा कायदा अस्तित्वात होता. वृत्तपत्रांच्या माध्यमातून सरकारवर वाढत जाणारी टिका सहन न झाल्याने ब्रिटिश सरकारने 1867 मध्ये 'द प्रेस ॲड रजिस्ट्रेशन ऑफ बुक ॲक्ट' पास केला. यानुसार वृत्तपत्रांचे मुद्रक, मालक व प्रकाशक यांनी आपली नावे वृत्तपत्रात प्रसिध्द करावीत, वृत्तपत्रांच्या प्रती तपासणीसाठी सरकारकडे सादर कराव्यात, सरकारविरोधात अयोग्य प्रचार करणार नाहीत याची लेखी हमी द्यावी असे ठरवण्यात आले. लॉर्ड लिटनची आक्रमक अफगाण धोरण व त्यातून उद्भवलेले दुसरे अफगाण युध्द, अफगाण युध्दाचा भारतीय तिजोरीवर पडलेला ताण, त्याचे प्रतिगामी अंतर्गत धोरण या त्याच्या धोरणावर भारतीय वृत्तपत्रांनी सडकून टिका करताच लिटनने 1878 मध्ये वृत्तपत्र स्वातंत्र्याची गळचेपी करणारा 'व्हरनॅक्युलर प्रेस ॲक्ट' पास केला. हा कायदा फक्त देशीभाषिक वृत्तपत्रांनाच लागू करण्यात आला होता. या कायद्यानुसार सरकारी धोरणावर टिका न करण्याची लेखी हमी घेण्यात आली. या हमीचे उल्लंघन केल्यास मुद्रणालयाची यंत्रसामग्री व वृत्तपत्रांच्या प्रती जप्त करण्याचा अधिकार सरकारला देण्यात आला. सरकारच्या विरोधात वृत्तपत्रांना न्यायालयातही जाता येणार नव्हते. लॉर्ड रिपन या उदारमतवादी गव्हर्नर जनरलने भारतीयांमधील असंतोष कमी करण्यासाठी 1882 मध्ये व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट रद्द केला. 1905 च्या बंगालच्या फाळणीनंतर भारतीय वृत्तपत्रांनी ब्रिटिशांवर मोठया प्रमाणात टिका केली. त्यामुळे 1908 मध्ये वृत्तपत्रांचा गळचेपी करणारा 'न्यूज पेपर्स ॲक्ट' पास केला. या कायद्यानुसार एखादे वृत्तपत्र हत्येला, हिंसेला किंवा उठवाला प्रोत्साहन देत असल्यास वृत्तपत्राच्या प्रकाशनावर बंदी घालण्याचा, मुद्रणालयाची सर्व यंत्रसामुग्री जप्त करण्याचा अधिकार जिल्हाधिका-यांना देण्यात आला. हा कायदा वृत्तपत्रावर नियंत्रण आणण्यासाठी अपुरा वाटू लागल्यामुळे 1910 मध्ये ब्रिटिशांनी वृत्तपत्रांचे स्वातंत्र्य सीमित करण्याच्या हेतूने 'इंडियन प्रेस ॲक्ट' पारित केला.

वृत्तपत्रामुळे भारतीयांना स्वतःची मते मांडण्याचे व्यासपीठ मिळण्याबरोबरच लोकजागृतीचे व्यासपीठही मिळाले. वृत्तपत्रांच्या माध्यमातून भारतात ज्ञानाचा प्रसार आणि राजकीय – सामाजिक जागृती घडून आली. वृत्तपत्रांमधून राजकीय व सामाजिक प्रश्नांची चर्चा उघडपणे होऊ लागली. भारतीय समाजात ज्ञान व माहिती प्रसारित करण्याचे महत्वाचे काम वृत्तपत्रांनी केले. त्याचबरोबर भारतीय समाजात जागृतीही घडवून आणली. 1885 मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाल्यानंतर भारतीय वृत्तपत्रे कॉंग्रेसच्या ध्येयधोरणांची, राजकीय आदर्शाची व कार्याची माहिती जनतेला करून देऊ लागली. राजकीय प्रश्नांची मांडणी वृत्तपत्रामधून होऊ लागली. शिक्षणविषयक प्रश्नांचीही मांडणी वृत्तपत्रातून झाली. भारतीय समाजात राष्ट्रवादाचा प्रसार व राजकीय जागृती याबाबत मोलाची कामगिरी वृत्तपत्रांनी केली. देशापुढील समस्यांकडे जनतेचे लक्ष वेधून त्याबाबत लोकमत साकार करणे व देशप्रेम व राष्ट्रवाद जनमनात रूजवण्याचे काम वृत्तपत्रांनी केले. ब्रिटिश शासनाच्या धोरणातील दोष, उणीवा व प्रतिगामी सरकारी निती याची पध्दतशीर मांडणी करून ब्रिटिश शासनाच्या विरोधात भारतीय लोकमत जागृत केले. इंग्रज अधिका-यांच्या दुष्ट कृत्यांना वाचा फोडली. राजकीय प्रश्नांची राष्ट्रवादी दृष्टीकोनातून सडेतोड चर्चा केली. सार्वजनिक खर्चात कपात, उच्च पदांवर पात्र भारतीयांच्या नेमणूका, अवास्तव कर, भारताचे आर्थिक शोषण, डोईजड जमिनमहसूल, न्यायदान पध्दतीत असलेले दोष, वंशभेदाची व श्रेष्ठ कनिष्ठत्वाच्या भावनेची असलेली दरी, भारतीयांची वाढती आर्थिक दुरावस्ता, ब्रिटिश सरकारचे आक्रमक परराष्ट्र धोरण व त्याचा भारताच्या आर्थिक तिजोरीवर पडणारा ताण आणि ब्रिटिश अधिका-यांचे लठ्ठ पगार अशा अनेक प्रश्नांची परखड मांडणी करून ब्रिटिश सत्तेच्या विरोधात लोकमत जागृत केले. वृत्तपत्रामधून प्रखर राष्ट्रवाद व ब्रिटिश सत्तेविरूध्द निर्भीड लिखान होऊ लागले. वृत्तपत्र हे राजकारणाच्या क्षेत्रातील भारतीयांच्या हाती असलेले एक शस्त्र बनले. वृत्तपत्रांनी जनमनात राष्ट्रीय भूमिका दृढ केली. राष्ट्रीय आंदोलन ऐन भरात असताना भारतीय वृत्तपत्रांनी अत्यंत मोलाची कामगिरी

बजावली. ब्रिटिशांच्या अन्यायी धोरणाविरूध्द जनमत जागृत करून राष्ट्रवादाची भावना दृढ करण्याचे व लोकमत साकार करून सामान्य जनतेला स्वातंञ्य संग्रामात सामील करून घेण्याचे महत्वाचे कार्य वृत्तपत्रांनी केले. राष्ट्रपेमाची ज्योत व स्वातंञ्याची ओढ जनतेमध्ये निर्माण केली. स्वातंञ्यचळवळीची माहिती जनतेपर्यंत पुरवून सामान्य लोकांना स्वातंञ्यचळवळीत उतरण्यास प्रोत्साहन दिले. जनतेच्या अशा आकांक्षा सरकारपर्यंत पोहचवल्या. ब्रिटिशांची शोषक आर्थिक निती, ब्रिटिशांचा भारतीयांविषयीचा दृष्टीकोण लोकांपर्यंत पोहचवून ब्रिटिशांविरूध्द लोकांना संघटित केले. राजकारणातील व समाजकारणातील दोष निर्भिडपणे जनतेसमोर आणले. भारतातील राष्ट्रवादी चळवळीला खतपाणी घातले. भारताला स्वातंञ्य मिळवून देण्यासाठी हाती घेण्यात आलेल्या स्वातंञ्य चळवळीचे प्रतिबिंबच केवळ वृत्तपत्रामध्ये पडले असे नव्हे तर वृत्तपत्रामुळे या चळवळीला दिशा देण्याचे, चळवळीमध्ये उत्साह निर्माण करण्याचे काम वृत्तपत्रांनी केले. राष्ट्राच्या स्वातंञ्यासाठी लोकांमध्ये आवश्यक असलेला त्याग, देशभक्ती, ध्येयनिष्ठा व धैर्य निर्माण केले. एकूणच भारतीय स्वातंञ्य संग्रामात वृत्तपत्रांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

**२. २. ४.उपमुद्दा – सुधारणा चळवळ : लोकहितवादी, न्या. रानडे आणि आगरकर**

**गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी**

महाराष्ट्रीयन समाजात जागृती घडवून आणण्याचे महत्वपूर्ण काम गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादींनी केले. त्यांचा जन्म 18 फेब्रुवारी 1823 मध्ये पुणे येथे झाला. त्यांचे वडिल सेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते. तिन गावांची देशमुखी त्यांना मिळाली होती. त्यामुळे त्यांना देशमुख हे नाव मिळाले होते. पेशवाई बुडाल्यानंतर एलफिन्स्टनने त्यांना भेटीसाठी बोलावले असता ठराविक मुदतीत भेटीसाठी न गेल्यामुळे त्यांची जहागिरी जप्त करण्यात आली. परंतु पेशव्यांच्या मध्यस्थीमुळे जहागिरी त्यांना परत मिळाली. वडिलांच्या मृत्यूनंतर ब्रिटिश सरकारने त्यांची जहागिरी जप्त केली. जहागिरी परत मिळवण्यासाठी गोपाळरावचे वडिल बंधू चिंतामणराव यांनी प्रयत्न केले. परंतु त्यांना यश आले नाही. मात्र त्यांच्या आईला वार्षिक 600 रूपयांची पेन्शन देण्यात आली. गोपाळ तेरा वर्षाचे असताना त्यांच्या वडिलांचे निधन झाले. त्यामुळे त्यांना मोठा आघात सहन करावा लागला. लोकहितवादी लहानपणापासूनच कुशाग्र बुध्दीचे म्हणून ओळखले जात होते. त्यांची प्रकृतीही सुदृढ असून त्यांना पोहण्याची, घोडयावर बसण्याची व व्यायमाचीही आवड होती. 1841 मध्ये त्यांनी इंग्रजी शाळेत प्रवेश घेऊन तिन वर्षात अभ्यास पूर्ण केला. आपल्या बुध्दीमत्तेची छाप त्यांनी शिक्षकांवर पाडली. इंग्रजी, संस्कृत, गुजराती व फारसी भाषा त्यांनी आत्मसात केल्या होत्या. 1844 मध्ये त्यांना ट्रान्सलेटर म्हणून नोकरी मिळाली. दरमहा 77 रूपये पगार त्यांना मिळू लागला. कामाच्या व गुणांच्या जोरावर शिरस्तेदार या पदावर ते नियुक्त झाले. 1846 मध्ये त्यांनी मुनसफची परिक्षा दिली. 1852 मध्ये त्यांची वाई येथे 'फर्स्ट क्लास मुनसफ' म्हणून नियुक्ती करण्यात आली. कामात दक्ष असल्यामुळे आपल्या वरिष्टांची मर्जी त्यांनी संपादन केली. 1856 मध्ये त्यांची इनाम कमिशनवर असिस्टंट कमिशनर व कमिशनर या पदांवर नियुक्त झाली. 1862 मध्ये अहमदाबाद येथे असिस्टंट जज् व नंतर अहमदनगरला जज् म्हणून त्यांनी कार्य केले. शासकीय नोकरीत वेगवेगळया पदावर 35 वर्षे काम करून 1879 मध्ये ते सेवानिवृत्त झाले. नोकरी करत असतानाच 'जस्टीस ऑफ पीस' व 'रावबहाद्दर' या पदव्या देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला होता. 1880 मध्ये ब्रिटिश सरकारने मुंबई इलाख्याच्या विधीमंडळाचे सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती केली. मुंबई विद्यापीठाच्या सिनेटचे सदस्य म्हणून त्यांनी काही काळ काम केले. रतलाम संस्थानाचे दिवाण म्हणून एक वर्ष त्यांनी काम केले. वयाच्या एकोणसत्तराव्या वर्षी 9 आक्टोबर 1892 रोजी त्यांचे निधन झाले.

एकोणिसाव्या शतकात समाजसुधारणेचा मुलगामी विचार करणारे विचारवंत व 'सर्वांगीण सुधारणावादाचे आद्य प्रवर्तक' म्हणून लोकहितवादी प्रसिध्द आहेत. मार्च 1848 ते ते 1850 या कालावधीत भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' साप्ताहिकातून लोकहितवादी या टोपननावाने 'शतपत्रे' लिहिली. हिंदू समाजाला उद्देशून लिहिलेली शतपत्रे त्यांच्या सुधारणावादी विचारांची साक्ष देतात. समाजाला उद्देशून लिहिलेल्या शतपत्रामधून सुधारणावादी विचार मांडले. शतपत्रातून सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक विषयावर लेखन केले. शतपत्राच्या माध्यमातून अंधश्रध्दा, लोभ, भ्रम, ढोंग, लाचारी, सुखासीनता, धर्मभोळेपणा व दैववादावर प्रखर टिका केली. यामागे आपल्या समाजातील अनिष्ठ रूढी, परंपरा नष्ट व्हाव्यात व समाजाची प्रगती व्हावी हा त्यांचा उद्देश होता. शतपत्राच्या माध्यमातून लोकांमध्ये जागृती करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. शतपत्रे त्यातील सर्वांगीण सुधारणावादामुळे विशेष प्रसिध्द आहेत. शतपत्रातील भाषा साधी व सोपी असल्यामुळे वाचकाच्या अंतःकरणाला जाऊन भिडत होती. सर्वांगीण सामाजिक सुधारणांचा त्यांनी पुरस्कार केला होता. शब्दप्रामाण्यापेक्षा

बुध्दीप्रामाण्यावर भर दिला होता. एकोणीसाव्या शतकात महाराष्ट्रातील सामाजिक रूढी व जुन्या धर्मकल्पनावर सर्वप्रथम प्रखर टिका केली. भारतीय समाजातील दोषावर, अनिष्ठ प्रथावर कठोर प्रहार केला. समाजातील हे दोष दूर झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही याची जाणीव लोकांना करून दिली. भारतीय समाजातील जातीसंस्थेवर कठोर प्रहार केला. कारण समाजाच्या विकासातील जातिसंस्था हा मोठा अडथळा त्यांना वाटत होता. स्त्रीशिक्षणाचा पुरस्कार करून स्त्रियांचे जीवन बंदिस्त करणा-या बालविवाह, हुंडाप्रथा, बहुपत्नीत्व या अनिष्ठ प्रथावर कठोर टिका केली. बालविवाहामुळे स्त्रीयांच्या आयुष्यावर होणारे दूरगामी परिणाम विषद केले. समाजातील विधवांची वाईट स्थिती पाहून विधवांना पुनर्विवाह करण्याचा अधिकार असला पाहिजे असे सांगितले. विधवांच्या पुनर्विवाहाविषयी लोकहितवादी म्हणतात, 'ईश्वराने स्त्री व पुरूष सारखेच केले व उभयांते अधिकार समसमान आहेत, असे असताना पुरूषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रीयांना मात्र मनाई हा केवढा जुलूम आहे.' लोकांना सुधारणेच्या मार्गावरून वाटचाल करण्याचा आग्रह धरला. भारतीय समाजातील दोषाविरूध्द त्यांनी आपली लेखनी परखडपणे चालवली.

धार्मिक विचार लोकहितवादींनी समतोलपणे मांडले. धर्माचा उगम मानवाच्या बुध्दीमध्ये झाला असे त्याचे मत होते. धर्मामध्ये अनिष्ठ प्रथा, परंपरा घुसवल्याने आजचा धर्म विकृत झाला आहे. धर्माच्या नावावर निंद्य प्रकार घडत आहेत. यावर टिका करून समतेवर आधारित धर्माचा त्यांनी पुरस्कार केला. मुर्तीपूजा करू नका असे सांगीतले. धर्माच्या नावावर निष्क्रीय राहून चालणार नाही, प्रयत्न सोडून देऊन चालणार नाही, असे झाले तर आपली व आपल्या समाजाची प्रगतीच होणार नाही.जुन्या धर्मविषय कल्पनावरही लोकहितवादींनी प्रखर टिका केली. लोकहितवादींनी मुर्तीपुजेला विरोध करून गीतेला मूर्तीपूजा मान्य नव्हती हे गीतेतील लोकांचा आधार घेऊन दाखवून दिले. धर्मावर अंधश्रध्दा ठेवण्यापेक्षा सद्सद्विवेकबुध्दीने धर्माकडे पहा असे सांगीतले. धर्माच्या नावाखाली निष्क्रीय रहाणे त्यांना मान्य नव्हते. समाजाचा उत्कर्ष, त्याची धारणा, त्याची प्रगती, त्याचे वैभव हा खरा धर्माचा हेतू आहे. कर्मकांड, व्रतवैकल्य, उपास – तापास, सोवळे ओवळे, मंत्र तंत्र अशा समजुती म्हणजे धर्म नव्हे. भारतीय समाजातील उच्चनीचपणा व विषमता कमी झाल्याशिवाय आपली प्रगती होणार नाही, समाजातील निरूद्योगी व आळशी लोकांचे प्रमाण वाढल्यामुळे समाजात दारिद्रय, औदासीन्य, निराशा, वैफल्य बळावत गेले याची जाणीव त्यांनी करून दिली. ते म्हणतात, 'आपमचे कडे, आमची छत्री, आमची चाकू – कात्री, आमचे घडयाळ, आमची गाडी परदेशातील आहेत. आम्ही धान्य मात्र आपले खातो. यामुळे सर्व व्यापार बुडाला. मुजुमदार, कसबी, कारागीर घरी बसले.' समाजातील चातुर्वण्य व्यवस्था व समाजातील ब्राम्हणांचे स्थानावर टिका करताना लोकहितवादी म्हणतात, 'अशा प्रकारचे वर्ण दुस-या देशात नाहीत. जो ब्राम्हण, त्याचा वंशही ब्राम्हणच, तसेच जो शुद्र त्याचा वंशही शुद्रच. ब्राम्हण असून शुद्राहूनही नीच कर्म करील तो ब्राम्हणच नव्हे. तसेच क्षत्रियाने ब्राम्हणकर्म केले तर तो ब्राम्हण व्हावा. असे केले नाही तर कित्येक अयोग्य लोक ब्राम्हणाचे नावाने मिरवतील.' ब्राम्हणांच्या ऐतखाऊपणावर त्यांनी टिका केली. ब्राम्हणाविषयी ते म्हणतात, 'ब्राम्हणांनी आपल्या जन्मजात मोठेपणाच्या खुळया कल्पना सोडाव्यात. जातीचा अभिमान बाळगू नये, मनुष्यमात्राला सारखे लेखावे.' जुन्या अनिष्ठ प्रथांचा त्याग करण्याचा, लाचारी सोडून देण्याचा व देशहिताला प्राधान्य देण्याचा सल्ला त्यांनी दिला.

भारतीय समाजात शिक्षणाचा प्रचार व प्रसार झाल्याशिवाय समाजाची प्रगती होणार नाही असे त्यांचे मत होते. पाश्चात्य भौतिक शास्त्राचा अभ्यास केला पाहिजे, नवे ज्ञान मिळवून आपली प्रगती करावी. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी मराठी शाळामध्ये इंग्रजी शिक्षकांची नियुक्ती करावी, वृत्तपत्राचा प्रसार व्हावा व त्याद्वारे ज्ञानप्राप्ती करावी, आधुनिक शास्त्रांचे ज्ञान संपादन करावे असे सांगितले. भारतामध्ये लोकशाहीची पध्दत आली पाहिजे अशी मागणी केली. भारताला पार्लमेंट हवे अशी मागणी करताना ते म्हणतात, 'आपण सर्व एकत्रित होऊन विलायतेत शिष्टमंडळ पाठवावे आणि आपल्या देशात पार्लमेन्ट मागून घ्यावे.' ब्रिटिश पार्लमंट भारताला दुय्यम वागणूक देत. भारतात सर्व थरातील लोकांचा समावेश असलेले राज्य प्रस्थापीत केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. ब्रिटिश व भारतीयांची तुलना करून भारतीयांपेक्षा ब्रिटिश का श्रेष्ठ आहेत व भारतीय का कनिष्ठ आहेत हे त्यांनी विषद केले. इंग्रजांमध्ये शिस्त, चिकाटी, उद्योगप्रियता, शौर्य, देशाभिमान आढळतो. तर उलट भारतीय आळशी, भित्रे व स्वार्थी आहेत हे विषद केले. ब्रिटिश सामाजिक विषमता न माणनारे तर भारतीय मात्र सामाजिक विषमता माणनारे, जातियतेचा पुरस्कार करणारे आहेत. त्यामुळेच भारतीय समाजाची अधोगती झाली असे सांगितले. ब्रिटिश राजवटीला ते दैवी देणगी मानत होते. ईश्वराच्या प्रेरणेनेच भारतावर इंग्रजांचे राज्य प्रस्थापीत झाले. भारतातील सती प्रथा, ब्राम्हणांचे श्रेष्ठत्व व इतर वर्गांचे झालेले खच्चीकरण, मुले

मारावयाची चाल हे नष्ट करण्यासाठी ईश्वराने या देशात इंग्रजांची प्राठवले आहे. आर्थिक क्षेत्रातील विचारही त्यांनी परखड मांडले. प्राचीन काळात आर्थिक दृष्टया सुखी असलेला भारत देश पुढील काळात वाढलेल्या लोकसंख्येमुळे व परकीयांच्या आक्रमणामुळे गरीब बनत गेला. पुढे इंग्रजांच्या राजवटीत त्यामध्ये आणखी भर पडली. ब्रिटिशांच्या आर्थिक ध्येयधोरणावर टिका करून भारताच्या दारिद्रयाबद्दल त्यांनी ब्रिटिशांना जबाबदार धरले. आपल्या लिखानातून त्यांनी स्वदेशीचा पुरस्कार केला.

लोकहितवादी साहित्यीक म्हणूनही प्रसिध्द होते. समाजसुधारणेचे विचार मांडण्याबरोबरच लेखन करण्यावरही त्यांनी भर दिला होता. समाजकारण, अर्थकारण, राजकारण, धर्मकारण व इतिहासावर प्रकाश टाकणारे 36 ग्रंथ लिहिले. नोकरी सुरू असताना व निवृत्त झाल्यावरही त्यांनी सातत्याने लेखन केले. राजकारण, अर्थकारणावर त्यांनी 'लक्ष्मीज्ञान', 'हिंदुस्थानास दारिद्रय येण्याची कारणे आणि त्याचा परिहार व व्यापार विषयी विचार', 'स्थानिक स्वराज्य व्यवस्था', 'ग्रामरचना', 'भरतखंडपर्व', 'गीतातत्व', स्वाध्याय', 'जातीभेद', 'भिक्षुक', 'प्राचीन आर्यविद्या व रीती', 'होळीविषयी उपदेश', 'महाराष्ट्र देशातील कामगार लोकांशी संभाषण', 'निबंधसंग्रह', 'बोधपत्र' हे महत्वपूर्ण ग्रंथ लिहिले. इतिहासाशी संबंधीत 'हिंदुस्थानचा इतिहास', 'गुजरात', 'ऐतिहासीक गोष्टी', 'लंका', 'राजस्थान', 'पानिपत' 'स्वामी दयानंद सरस्वती', 'पृथ्वीराज चौहान' हे ग्रंथ लिहिले. या ग्रंथलेखनातू त्यांची चिकाटी व शोधकता हे गुण दिसून येतात. तसेच त्यांच्या ज्ञानाचा व विद्वत्तेचा आवाकाही दिसून येतो. समाजहिताच्या तळमळीतूनच त्यांनी हे लिखान केले. ग्रंथास लिहिलेल्या त्यांच्या प्रस्तावना मार्मिक आहेत. त्यांची भाषाशैली व विषय मांडण्याची पध्दत उत्कृष्ट प्रकारची होती. आपण मांडलेल्या मतांसाठी ते तळटिपा देत असत. आपले विचार मांडण्याची त्यांची हातोटी अभूतपूर्व होती. आपल्या लेखनामुळे कोणी दुखावले तरी त्याची पर्वा ते करत नसत. आपल्या लेखनामागची भूमिका स्पष्ट करताना ते म्हणतात, 'लाभावर अगर द्रव्यावर नजर ठेवून कीर्ती व्हावी या हेतून लिहिले नाही. इतके श्रम जे केले ते लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी, त्यांनी सुधारावे, त्यास इहलोकी समृध्दी व्हावी, परलोकाचे साधन घडावे व बहुत काळापासून दृढ भ्रम झाले आहेत, त्यापैकी काही अविचाराने व काही मुर्खपणाने जडलेले आहेत ते कमी व्हावे.' आपल्या लिखानामुळे लोकांना वास्तविक परिस्थिती समजावी हा त्यांचा लेखनामागचा निखळ हेतू दिसून येतो.

सरकारी नोकरी करत असल्यामुळे आपल्या विचारांना प्रत्यक्ष कृतीची जोड लोकहितवादी देऊ शकले नाहीत. लोकहितवादींनी सामाजिक, आर्थिक, राजकीय व धार्मिक क्षेत्रात आधुनिक विचार मांडले. त्यांनी मांडलेले सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय क्षेत्रातील विचार त्यांच्या पुरोगामी विचारांची साक्ष देतात. भारतीय समाजातील व धर्मातील अनिष्ठ रूढी परंपरा, प्रथांवर टिका करून सुधारणांची आवश्यक्ता प्रतिपादित केली. जुन्या रूढी परंपरामध्ये अडकून पडलेल्या भारतीय समाजाला नवा मार्ग त्यांनी दाखवला. भारतीय लोकांनी आळशीपणा, परावलंबीत्व, दैववाद सोडून स्वतःच स्वतःची प्रगती करावी असे सांगीतले. इंग्रजी भाषा, आधुनिक ज्ञान व आधुनिक उद्योगधंद्याचा पुरस्कार केल्याशिवाय भारतीय समाजाची प्रगती होणार नाही. वृत्तपत्र व ग्रंथाच्या माध्यमातून आपले सुधारणाविषयीचे प्रभावी विचार लोकांपर्यंत पोहचवले. नोकरीतून निवृत्त झाल्यानंतर 'लोकहितवादी' हे मासिक सुरू केले. लोकांचे कल्याण व्हावे, प्रगती व्हावी यासाठी ते कार्य करत राहिले. म्हणूनच ते 'लोकहितवादी' या नावाने प्रसिध्द आहेत. हिंदुस्थानला पार्लमेंट हवी अशी मागणी केली. यावरून त्यांची दुरदृष्टी दिसून येते. सामाजिक समतेसाठी प्रयत्न केले. भारतीयांनी आळस सोडून उद्योगी व्हावे कारण त्याशिवाय भारताची प्रगती होणार नाही याची जाणीव भारतीयांना करून दिली. आपल्या समाजाची व राष्ट्राची प्रगती व्हावी हा आपले विचार मांडण्यामागील त्यांचा मुख्य हेतू होता.'महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचे आद्य प्रवर्तक' असे त्यांचे वर्णन प्रा. गं. बा. सरदार यांनी केले आहे.

**न्या. महादेव गोविंद रानडे**

भारतातील समाजसुधारक, कायदेपंडित, तत्वज्ञानाचे अभ्यासक, उदारमतवादी राजकीय विचारवंत, अर्थशास्त्रज्ञ, धर्मसुधारक, द्रष्टे पुरूष व इतिहासकार म्हणून महादेव गोविंद रानडे प्रसिध्द आहेत. त्यांचा जन्म नाशिक जिल्हयातील निफाड गावी 18 जानेवारी 1842 रोजी झाला. वडिल कंपनी सरकारच्या पदरी कारकून होते. त्यांच्या आईचे नाव गोपीकाबाई होते. मराठी आणि प्राथमिक इंग्रजी शिक्षण कोल्हापूरला झाले. तर माध्यमिक आणि उच्च शिक्षण मुंबईस झाले. उच्च शिक्षणासाठी मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. लहानपणापासूनच ते शांत स्वभावाचे व सहिष्णू होते. 1862 मध्ये बी. ए. च्या परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. शिक्षण घेत असतानाच त्यांच्या बुध्दीमत्तेची चमक दिसून आली. 1862 मध्ये त्यांनी 'इंदुप्रकाश' या साप्ताहिकाचे संपादक म्हणून काम सुरू केले. या

साप्ताहिकामधून समाजसुधारेची मिमांसा अनेक लेख लिहून केली. 1864 मध्ये एम. ए. ची परिक्षा दिली. शिक्षण सुरू असताना त्यांनी भारताच्या व मराठयांच्या इतिहासाचे विशेष अध्ययन केले. एलफिन्स्टन कॉलेजमध्ये शिकत असतानाच एक निबंध लिहून ब्रिटिश सत्तेवर टिका केली होती. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, तर्कशास्त्र, इंग्रजी व गणित त्यांच्या आवडीचे विषय होते. 1865 मध्ये कायद्याच्या परिक्षेत ते उत्तीर्ण झाले. 1866 मध्ये ओरिएन्टल ट्रान्सलेटर म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तत्कालीन कालखंडात मराठी भाषेत जे ग्रंथ प्रकाशित होत होते त्यांच्यावर अभिप्राय लिहिण्याचे काम ते करत होते. इंग्रजी व मराठी भाषेवर त्यांचे प्रभूत्व होते. 1868 मध्ये मुंबई येथील एलफिन्स्टन कॉलेजमध्ये इंग्रजी व इतिहास विषयाचे प्राध्यापक म्हणून नियुक्त झाले. 1871 मध्ये त्यांनी ॲडव्होकेटची परिक्षा दिली. पुणे येथे न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती झाली. पुण्यातील वास्तव्याच्या काळात गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांच्या सहाय्याने 1870 मध्ये 'सार्वजनिक सभा' स्थापन केली. रानडे यांची हुशारी पाहून 1885 मध्ये मुंबई इलाख्याचे तत्कालीन गव्हर्नर लॉर्ड रे यांनी मुंबई इलाख्याच्या कायदेमंडळाचे विधिसदस्य म्हणून त्यांची नियुक्ती केली. 1885 मध्ये स्थापन झालेल्या 'राष्ट्रीय सभा' च्या सुत्रचालकापैकी ते एक होते. 1893 मध्ये त्यांची मुंबईच्या उच्च न्यायालयात न्यायमूर्ती म्हणून नियुक्ती झाली. तत्कालीन परिस्थितीत एवढया मोठया पदावर भारतीयांची सहजासहजी नियुक्ती ब्रिटिश करत नसत. परंतु रानडे यांच्यातील विद्वत्ता पाहून त्यांची नियुक्ती केली गेली. न्यायदानाच्या क्षेत्रातील न्यायनिष्ठा, कायद्याचे सखोल ज्ञान व परिश्रम हे त्यांचे गुण दिसून आले. त्यांची वेशभूषा व राहणी अत्यंत साधी होती. 16 जानेवारी 1901 मध्ये त्यांचे निधन झाले.

आधुनिक भारताच्या आर्थिक आणि राजकीय परिस्थितीचा सखोल व व्यापक अभ्यास त्यांनी केला होता. महाराष्ट्रातील सार्वजनिक जीवनातील 1870 ते 1880 पर्यंतचा काळ हा त्यांच्या प्रभावाचा काळ होता. महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणा चळवळीला त्यांनी चालना दिली. सामाजिक कार्यासाठी आपल्या सहका-यांच्या माध्यमातून समाजाचे प्रबोधन करणे व समाजसुधारणेसाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचे काम त्यांनी केले. इंदूप्रकाश वृत्तपत्रातून समाजसुधारणेसंबंधी लेख लिहून आपल्या कार्याचा त्यांनी प्रारंभ केला. या वृत्तपत्रातून लेखन करून विधवा विवाहाचे त्यांनी समर्थन केले. समाजातील अनिष्ठ रूढी – परंपरांना त्यांनी विरोध केला होता. त्यांच्या विचारांचा व संस्थात्मक कार्याचा आधुनिक मराठी समाजावर फार मोठा ठसा उमटला. जातिभेदविरहीत समता, धार्मिक बंधुभाव व व्यक्तीस्वातंज्याचा पुरस्कार त्यांनी केला होता. श्रध्दा, भक्ती व प्रार्थनेच्या माध्यमातून अध्यात्मिक जीवनाबरोबरच सामाजिक समतेची प्रगती साधता येते असे त्यांना वाटत होते. रानडे सर्वांगीण सुधारणेचे पुरस्कर्ते होते. राजकारण, धर्मकारण, अर्थकारण व समाजकारण ही समाजाची विविध अंगे असून ती परस्पराशी पूरक अशीच आहेत. त्यामुळे त्यांची एकमेकांपासून फारकत न करता या सर्वच क्षेत्रात एकाच वेळी सुधारणा करण्याची आवश्यक्ता त्यांनी व्यक्त केली. समाजातील अनिष्ठ रूढी परंपरा व धर्माच्या नावाने अंगीकारलेल्या परंपरा नाहीशा झाल्या पाहिजेत असे त्यांना वाटत होते. स्वातंज्य, समता व बंधुता या विचारांचा पुरस्कार त्यांनी केला होता. व्यक्तीस्वातंज्य, सामाजिक समता व लोकशाही या तत्वांचा स्वीकार केल्याशिवाय भारतीय समाजाची प्रगती होणार नाही असे त्यांना वाटत होते.

समाजसुधारणेच्या कार्याला तात्विक आशय प्राप्त करून दिला. रानडे हे सामाजिक सुधारणांचे आग्रही होते. समाजातील विधवा स्त्रियांची स्थिती सुधारली पाहिजे असे वाटून 1865 मध्ये आपल्या सहका-यांच्या मदतीने 'विधवा विवाहोतेजक मंडळाची' स्थापना केली. या मंडळाच्या वतीने एक विवाह घडवून आणला. वेद, स्मृती व पुराणांच्या आधारे विधवाविवाहास शास्त्राधार दाखवून दिला. बाल विवाहाची प्रथा कायद्याने बंद करण्याची मागणी त्यांनी केली. संमती वयाच्या विधेयकासही त्यांनी पाठिंबा दिला. हिंदू समाजातील चांगल्या परंपरांचे पुनरूज्जीवन करून समाजसुधारणा करता येतील, आपल्या प्राचीन धार्मिक व सांस्कृतिक परंपरांच्या आधारे समाजसुधारणेचे कार्य करता येईल असे त्यांना वाटत होते. लोकांच्या सदसद्विवेकबुध्दीला आवाहन करून लोकांना या कार्यात सामील करून घेतले पाहजे. कारण समाजसुधारणेच्या बाबतीत लोकांवर जबरदस्ती करून चालणार नाही, सुधारणा लोकांवर लादता येणार नाहीत त्यासाठी लोकांचे मतपरिवर्तन करणे त्यांना गरजचे वाटत होते. महाराष्ट्रातील सर्व सामाजिक चळवळीशी त्यांचा संबंध होता.

सामाजिक सुधारणा झाल्याशिवाय समाजाची राजकीय व आर्थिक क्षेत्रात प्रगती होणार नाही, जीवनाकडे पहाण्याचा जनतेचा दृष्टीकोन बदलल्याशिवाय नवसमाजाची निर्मिती होणार नाही, भारतीय समाजातील दोषामुळे भारतीय समाज मागास राहिला असे त्यांना वाटत होते. आपल्या विचारांनी महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रात त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. आपल्या लेखनीच्या व व्याख्यानाच्या माध्यमातून सुधारणेच्या चळवळीला संघटित करण्याचा प्रयत्न केला. आपल्या लिखानातून

त्यांनी भारतामधील अज्ञान, स्त्रियांची दुरावस्था, अनिष्ठ सामाजिक रूढी परंपरावर हल्ला चढवला. शब्दप्रामाण्याऐवजी बुध्दीप्रामाण्य व जन्मनिष्ठेपेक्षा गुणनिष्ठेला त्यांनी महत्व दिले होते. रानडेंच्या सामाजिक कार्याबद्दल डॉ. पु. ग. सहस्त्रबुध्दे म्हणतात, 'न्या. रानडे यांनी समाजकारणाची धुरा आपल्या खांद्यावर घेतल्यानंतर समाजसुधारणेमागे निश्चित तत्वज्ञान उभे केले आणि लेख लिहून, व्याख्याने देऊन व विविध संस्था स्थापून त्या चळवळीला संघटित व प्रतिष्ठीत रूप आणले.' राजा राममोहन रॉय यांनी हिंदू धर्मामध्ये मौलिक, तात्विक परिवर्तनास प्रारंभ केला होता. धर्मसुधारणेच्या या आंदोलनात आपल्या धर्मचिंतनाची भर रानडेंनी घातली. वंशभेद व धर्मभेद न मानता माणसा माणसात समानता व न्याय प्रस्थापीत करण्याची गरज त्यांनी प्रतिपादीत केली.

संस्थात्मक पातळीवरही त्यांनी महत्वाचे कार्य केले होते. 1867 मध्ये मुंबई येथे डॉ. आत्माराम पांडुरंग, न्या. रानडे, डॉ. भांडारकर व वामन आबाजी मोडक यांनी 'प्रार्थना समाजा' ची स्थापना केली. भारतीय समाजातील व हिंदू धर्मातील अनिष्ठ रूढी परंपरा नष्ट करून समाजसुधारणा करणे हा हेतू यामागे होता. हिंदू धर्मातील मूर्तिपूजा, अवतार कल्पना, अनेकेश्वरवाद व जातिभेदास त्यांनी विरोध केला होता. प्रार्थना समाजाच्या स्थापनेत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. प्रार्थना समाजाचे प्रमुख आधारस्तंभ ते होते. पुण्यातील सार्वजनिक सभेच्या कार्याला त्यांनी फार मोठे सहाय्य केले. या सभेला सभेला त्यांनी ख-या अर्थाने सक्रीय केले. सार्वजनिक काकांच्या सहकार्याने सार्वजनिक सभेच्या कार्याला राजकीय चळवळीचे स्वरूप दिले. 1871 ते 1880 या कालखंडातील सार्वजनिक सभेच्या कार्यामागील प्रेरणा त्यांचीच होती. या सभेच्या माध्यमातून त्यांनी सनदशीर राजकारणाचा पाया घातला. 1874 मध्ये सार्वजनिक सभेच्या वतीने त्यांनी जबाबदार राज्यपध्दतीची मागणी करणारा हजारो लोकांच्या सहया असलेला अर्ज ब्रिटिश पार्लमेंटकडे पाठवून दिला. 1874 ते 76 या कालखंडात महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. महाराष्ट्रातील भिषण दुष्काळाच्या परिस्थितीत सार्वजनिक सभेच्या मार्फत शेतक-यांच्या आर्थिक स्थितीचे सर्वेक्षण करून त्यावर उपायही सुचवले. शेतक-यांच्या हालअपेष्टास सरकारचे प्रतिकुल धोरण कारणीभूत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या सभेच्या माध्यमातून जनतेचे प्रश्न सरकारदरबारी मांडणे, जनतेच्या अडचणींना वाचा फोडण्याचे काम त्यांनी केले. 1877 मध्ये भरलेल्या दिल्ली येथील दरबारात इंग्लंडची राणी व्हीक्टोरीया हिला हिंदुस्थानची सम्राज्ञी हा किताब देण्यात आला. या प्रसंगी सार्वजनिक सभेच्या वतीने राणीला एक मानपत्र दिले. त्याचबरोबर हिंदी जनतेच्या मागण्यांचा अर्जही दिला होता.

भारतातील प्रागतिक सनदशीर राजकारणाचा पाया त्यांनी घातला. ब्रिटिश सत्ता ही ईश्वरी सत्ता आहे. ब्रिटिश सत्तेच्या वर्चस्वाखालीच भारताची प्रगती होऊ शकते असे त्यांना वाटत होते. 1885 मध्ये स्थापन झालेल्या राष्ट्रीय सभेच्या स्थापनेत त्यांनी महत्वाची भूमिका निभावली होती. राष्ट्रीय सभेच्या माध्यमातून त्यांनी आपले राष्ट्राच्या राजकारणाशीही नाते जोडले. कॉग्रेसच्या माध्यमातून समाजसुधारणेचे कार्य व्हावे असे त्यांना वाटत होते. कॉग्रेसला जोडून सामाजिक परिषद घेण्याची कल्पना त्यांनी मांडली होती. 1887 च्या मद्रास येथील राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनावेळी 'भारतीय सामाजिक परिषदे' ची स्थापना करण्यात आली. सामाजिक परिषदेचे ते जनक होते. या परिषदेच्या स्थापनेत रानडे यांनी महत्वाची भूमिका बजावली. या परिषदेच्या माध्यमातून सामाजिक प्रश्नाकडे देशातील जनतेचे लक्ष वेधून घेणे व मसाजसुधारणेच्या कार्याला गती देणे हा यामागचा उद्देश होता.

आपली सरकारी नोकरी त्यांनी आपल्या सामाजिक कार्याच्या आड येऊ दिली नाही. सरकारी नोकरीत असल्यामुळे त्यांना राजकारणात सक्रीय सहभागी होता येत नव्हते. त्यामुळे त्यांनी मार्गदर्शकाची भूमिका बजावली. सरकारी नोकरीत असूनही त्यांनी लोकसेवा करण्याचे धोरण स्वीकारले होते. रानडे यांचे विचार क्रांतिकारी नव्हे तर उत्क्रांतिवादी होते. प्राचीन भारताच्या इतिहासाचा त्यांना अभिमान होता. रानडे इतिहासाचे अभ्यासक होते. 'मराठी सत्तेचा उत्कर्ष हा ग्रंथ लिहून ग्रॅंट डफचा वणवा सिध्दान्त खोडून काढला. शिक्षणाचे महत्व त्यांनी ओळखले होते. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या स्थापनेत त्यांनी हातभार लावला. पुण्यातील शैक्षणीक प्रगतीत त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. रानडेंच्या कार्याचे महत्व टिळकांनी जाणले होते. त्यांच्या कार्याविषयी टिळक म्हणतात, 'अनेक कारणांमुळे महाराष्ट्र देश म्हणजे त्यावेळी एक थंड गोळा होऊन पडला होता, या थंड गोळयास कोणत्या रीतीने ऊब दिली असता तो पुन्हा सजीव होईल याचा रात्रंदिवस विचार करून.... त्याकरीता जिवापाड जर कोणी मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनी केली.' आधुनिक महाराष्ट्रीय समाजकारणाचा व राजकारणाचा पाया घालण्याचे काम त्यांनी केले. एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात त्यांनी आपल्या कर्तत्वाने स्वतंत्र स्थान निर्माण केले.

सर्वांगीण सुधारणेचे प्रवर्तक, सनदशीर राजकारणाचे प्रणेते व समाजसुधारक म्हणून त्यांचे स्थान महत्वाचे आहे.

**गोपाळ गणेश आगरकर**

महाराष्ट्राच्या सामाजिक प्रबोधनाचे थोर उद्गाते म्हणून गोपाळ गणेश आगरकर यांच्याकडे पाहिले जाते. महाराष्ट्रातील बुध्दीप्रामाण्यवादी विचारवंत आणि थोर समाजसुधार म्हणून आगरकर प्रसिध्द आहेत. त्यांचा जन्म सातारा जिल्हयात टेंभू या गावी 14 जुलै 1856 रोजी झाला. त्यांच्या वडिलांचे नाव गणेशपंत तर आईचे नाव सरस्वतीबाई होते. घरची आर्थिक परिस्थिती बेताचीच असल्यामुळे सुरूवातीपासूनच त्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत होता. विद्यार्थी जीवनापासूनच त्यांना शिक्षण घेण्यासाठी संघर्ष करावा लागला. टेंभूला शाळा नसल्याने आगरकरांना कराडला मामांच्या गावी प्राथमिक शिक्षणासाठी जावे लागले. शालेय जिवनातच त्यांना वाचनाची आवड निर्माण झाली होती. कराडला इंग्रजी तिसरीपर्यंतच शाळा असल्याने पुढील शिक्षणासाठी ते रत्नागिरीला गेले. रत्नागिरी येथे चौथी व पाचवी इंग्रजी इयत्तांचे शिक्षण पूर्ण केले. पुढील शिक्षणासाठी आगरकर अकोल्यास गेले. अकोल्यात त्यांचे तिन वर्षे वास्तव्य होते. 1876 मध्ये पुणे येथील 'डेक्कन कॉलेज' मध्ये प्रवेश घेतला. याच वर्षी पुणे वक्तृत्वोजन सभेचे बक्षीस मिळाले. 'व-हाड समाचार' या साप्ताहिकात लेखन सुरू केले. 1878 मध्ये आगरकर बी. ए. उत्तीर्ण झाले. बी. ए. सुरू असतानाच वयाच्या बावीसाव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. विवाहानंतर पत्नीचे नाव यशोदाबाई असे ठेवले. बी. ए. उत्तीर्ण झाल्यानंतर डेक्कन कॉलेजमध्ये फेलो म्हणून त्यांची नेमणूक झाली. 1880 मध्ये एम. ए. झाले.

महाविद्यालयीन जीवनात जॉन स्टुअर्ट मिल आणि हर्बर्ट स्पेन्सर यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडला होता. शिक्षण घेत असतानाच त्यांचा टिळकांशी संबंध येऊन दोघामध्ये मैत्री निर्माण झाली. सरकारी नोकरी करण्यापेक्षा स्वतंत्र बाण्याने आणि स्वाभिमानाने देशासाठी, समाजाच्या प्रगतीसाठी काही तरी करावे असे त्यांना वाटत असे. त्यातुनच विष्णूशास्त्री चिपळूणकर, आगरकर व टिळक यांनी लोकशिक्षण आणि लोकजागृती करण्यासाठी, महाराष्ट्रात आधुनिक शिक्षण देण्याच्या उद्देशाने पुण्यात 1880 मध्ये 'न्यू इंग्लीश स्कूल' ची स्थापना केली. समाजाचे शिक्षण घडावे, त्यांच्या सामाजिक आणि राजकीय जाणीवांचे क्षेत्र वाढावे ही त्यांची यामागची भूमिका होती. त्यांनी न्यू इंग्लीश स्कूलमध्ये शिक्षक म्हणून काम सुरू केले. आगरकरांनी शिक्षकाचा पेशा स्वीकारला आणि आयुष्याच्या अखेरपर्यंत हे कार्य त्यांनी चालू ठेवले. समाजात देशभक्तीने प्रेरित झालेला नव्या विचारांचा तरूण वर्ग महाविद्यालयातून शिक्षण घेऊन बाहेर पडावा आणि त्याने सार्वजनिक जीवनात सहभागी व्हावे अशी आगरकर व त्यांच्या सहका-यांची इच्छा होती. तरूणांना उच्च शिक्षण देण्याच्या हेतून 'डेक्कन एज्युकेशन सोसायटीची' स्थापना 24 आक्टोबर 1884 मध्ये करण्यात आली. या संस्थेच्या वतीने 1885 मध्ये 'फर्ग्यूसन कॉलेज' सुरू करण्यात आले. 1885 मध्ये आगरकर राष्ट्रीय सभेच्या मुंबई येथील पहिल्या अधिवेशनास उपस्थित होते. 1885 मध्ये न्यू इंग्लीश स्कूलचे सुपरिडेंट म्हणून त्यांची नेमणूक झाली. 1992 मध्ये आगरकरांची फर्ग्यूसन कॉलेजचे प्राचार्य म्हणून नियुक्ती झाली. 17 जून 1895 मध्ये वयाच्या एकोणचाळीसाव्या वर्षी त्यांचे निधन झाले. आगरकरांच्या मृत्यूनंतर दुस-या दिवशी टिळकांनी केसरीत आग्रलेख लिहून आगरकरांच्या धोरणाचा, उदात्त जीवनाचा आणि चारिज्यसंपन्न आयुष्याचा गौरव केला. त्या लेखात टिळक म्हणतात, 'परिस्थितीचा गुलाम न बनता परिस्थितीला यावत्शक्य आपल्या ताब्यात आणण्यास जो मनोनिग्रह, स्वार्थत्याग, निर्लोभीपणा आणि धैर्य लागते ते त्यांच्या अंगात आहे आणि दुःखाची अथवा संकटाची भिती अगर पर्वा न बाळगता जो आपल्या ठायी असणा-या या सद्गुणांचा लोकोपयोगार्थ उपयोग करतो तोच मोठा म्हणावयाचा. गोपाळराव आगरकर हे या कोटीतले होते.'

आगरकरांनी लोकहितार्थ आपले आयुष्य वेचले. आगरकरांची रहाणी अतिशय साधी होती. पण या साधेपणामागे सामाजिक सुधारणेचे मुलगामी विचार होते. नविन विचारांचा प्रचार व प्रसार समाजामध्ये करण्यासाठी वृत्तपत्र सुरू करणे गरजेचे आहे असे आगरकर, टिळक, आपटे व त्यांच्या सहका-यांना वाटले. त्यातूनच 'केसरी' व 'मराठा' या दोन साप्ताहिकांचा जन्म झाला. केसरी हे मराठी साप्ताहिक जानेवारी 1881 मध्ये सुरू झाले. आगरकर हे केसरीचे पहिले संपादक होते. पुढे आठ वर्षे आगरकर संपादक होते. या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्नांची, ते प्रश्न सोडविण्याची गरज समाजापुढे मांडली. राजकीय दृष्टया, सरकारच्या धोरणावर टिका करणे, लोकांना आपल्या हक्कांची जाणीव करून देण्याबरोबरच समाजातील जुन्या चालीरिती टाकून देण्यासंबंधी आणि नवे विचार स्वीकारण्यासंबंधी लोकांना प्रवृत्त करणे हे उद्देश केसरी वृत्तपत्रामागचे होते. आगरकरांच्या

लोकहितकारी पण परखड विचारांनी केसरी समाजामध्ये लोकप्रिय ठरले. स्वातंत्र्यभावनेची ज्योत मराठी सुशिक्षीतांच्या मनात प्रज्वलित करण्याचे काम आगरकरांनी केसरीच्या माध्यमातून केले. परिणामकार लेखन आणि कुशल संपादन यांच्या जोरावर अल्पावधीतच त्यांनी केसरीला लोकप्रियता मिळवून दिली. 1882 मध्ये कोल्हापूरच्या बर्वे प्रकरणात आगरकर आणि टिळक यांना चार महिने साधी कैदेची शिक्षा झाली होती.

सामाजिक प्रश्नांच्या जाणीवपेक्षा राजकीय प्रश्नांची जाणीव अधिक तीव्र असली पाहिजे असे केसरी व मराठा वृत्तपत्रच्या चालकमंडळीस वाटत असल्यामुळे आगरकरांनी केसरीचे संपादकपद 1887 मध्ये सोडले. 1888 मध्ये आगरकरांनी गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सहकार्याने 'सुधारक' साप्ताहिक सुरू केले. सुधारक वृत्तपत्रामधून आगरकरांनी सामाजिक सुधारणासंबंधीचे विचार हिरीरीने मांडले. 'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार' अशा खणखणीत शब्दात त्यांनी सुधारकांची ध्येयधारणा निश्चित शब्दात व्यक्त केली. सुधारकाच्या पहिल्याच अग्रलेखात आपले ध्येय आणि धोरणे स्पष्ट करताना आगरकर म्हणतात, 'समाजातील दोषस्थळे वारंवार लोकांच्या नजरेस आणावीत, ती दूर करण्याचे उपाय सुचवावे आणि युरोपीय सुधारणेत अनुकरण करण्यासारखे काय आहे ते पुनः पुनः दाखवावे, यास्तव हे सुधारक पत्र काढले आहे.' 'टाकातून अर्थबोधक अक्षरे काढण्याचे सामर्थ्य असेल व ती वाचण्यास निदान एक इसम तयार असेल तोपर्यन्त आपली लेखणी सामाजिक सुधारणेचे कार्य करीतच राहिल' असा आगरकरांचा संपादकीय बाणा होता. सुधारमधून सामाजिक सुधारणांचा पुरस्कार त्यांनी केला. बुध्दीवादीष्दृ टीकोणातून समाजजीवनाचे विश्लेषण करून अनिष्ठ रूढी परंपरावर त्यांनी हल्ले केले. नितीमान आणि सदाचरणी समाजाच्या निर्मीतीसाठी ईश्वर आणि धर्म याचीही आवश्यकता त्यांना वाटत नव्हती. कालबाहय रूढी परंपरावर, सनातनी वृत्तींच्या लोकांवर टिका केली. व्यक्तीचे श्रेष्ठत्व आणि जेष्ठता त्याच्या जन्मावरून न ठरता कर्तत्वावरून ठरवावी असा विचार त्यांनी मांडला. चातुर्वर्ण्य, जातिसंस्था, अस्पृश्यता व बालविवाह त्यांना मान्य नव्हते. आगरकरांनी आयुष्यभर सामाजिक सुधारणांचा आग्रह धरला. त्यामागे त्यांची समाजनिष्ठा होती, तशीच उत्कट ज्ञानोपासनाही होती. लोकशिक्षण हे त्यांनी आपल्या जीवनाचे श्रेष्ठ तत्व मानले होते. सामाजिक मन प्रगत झाल्याशिवाय राजकारण हाती घेणे त्यांना फलदायी वाटत नव्हते. आगरकरांनी आपल्या लेखनीतून बालविवाहास विरोध, सक्तीचे प्राथमिक शिक्षण, लोकसंख्येला प्रतिबंध, सामाजिक न्यायाचा पुरस्कार केला होता. तर समाजातील अंधश्रध्दा, व्रतवैकल्ये, धार्मिक धर्मकांड, अनिष्ठ रूढी आणि परंपरा यांच्यावर प्रखर टिका केली होती. त्यासाठी समाजाचा रोष आणि क्रोधही पत्करला. त्यांना समाजातून बहिष्कृत करण्याचे प्रयत्न झाले. त्यांना ठार मारण्याच्या धमक्याही देण्यात आल्या. जिवंतपणी त्यांची प्रेतयात्रा काढण्यात आली. पण त्याची पर्वा आगरकरांनी केली नाही. आयुष्याच्या शेवटपर्यंत त्यांनी समाजसेवेचे वृत सोडले नाही. सामाजिक सुधारणेचे विचार समाजापुढे मांडतानाही त्यांना अनेक संघर्षाला तोंड द्यावे लागले. अशा संघर्षांना तोंड देताना त्यांनी कधीही पराभव पत्करला नाही. आपल्या विचारांच्या माध्यमातून आगरकरांनी समाजाला आधुनिक परिवर्तनाची दृष्टी दिली. बुध्दीवाद, व्यक्तीवाद, समता आणि मानवतावाद या चतुःसूत्रीने त्यांचा संपूर्ण सामाजिक विचार व्यापलेला होता. आपल्या वैचारिक लेखांनी मराठीतील निबंधसाहित्यात त्यांनी मोलाची भर घातली.

**2. 3. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम**

1. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने केलेल्या प्रशासकीय सुधारणा सांगा.
2. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनने पंचायत व्यवस्थेत केलेल्या सुधारणांची माहिती सांगा.
3. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे जमीन महसूल विषयक धोरण सांगा.
4. माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनचे आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीतील योगदान सांगा.
5. खिश्चन मिशन-याचे महाराष्ट्रातील कार्य सांगा.
6. भारतातील वृत्तपत्राचा उदय व विकास स्पष्ट करा.
7. भारतीय स्वातंज्य संग्रामातील वृत्तपत्रांचे योगदान विषद करा.
8. गोपाळ हरी देशमुख ऊर्फ लोकहितवादी यांचे सुधारणाविषयक विचार स्पष्ट करा.
9. न्या. रानडे यांचे कार्य विषद करा.
10. गोपाळ गणेश आगरकर यांचे समाजिक सुधारणासंबंधीचे विचार स्पष्ट करा.

**2. 4 सारांश**

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन याने महत्वपूर्ण भूमिका बजावली. 1818 मध्ये पेशवाईचा अस्त करून एलफिन्स्टनच्या नेतृत्वाखाली ब्रिटिश सत्ता महाराष्ट्रात प्रस्थापीत झाली. पेशवाईचा अस्त करून महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता प्रस्थापीत करण्यात त्याने सिंहाचा वाटा उचलला. महाराष्ट्रात सत्ता प्रस्थापीत केल्यानंतर एलफिन्स्टनने ब्रिटिश सत्तेच्या दृष्टीने आवश्यक असलेले बदल पटकन केले नाहीत. राजकीय, आर्थिक व सामाजिक क्षेत्रात महाराष्ट्रीयन जनतेला रूचतील, पचतील अशा पध्दतीने सावकाश बदल घडवून आणले. एलफिन्स्टनच्या या धोरणामुळे महाराष्ट्रात फार मोठया प्रमाणात ब्रिटिश सत्तेला विरोध झाला नाही. ख्रिश्चन धर्माच्या प्रचारासाठी व प्रसारासाठी ख्रिश्चन मिशनरी भारतात व महाराष्ट्रात दाखल झाले होते. शिक्षण व समाजसेवेच्या माध्यमातून ख्रिश्चन धर्माचा प्रचार व प्रसार करण्यावर त्यांनी भर दिला होता. पण त्यांच्या अपेक्षेपेक्षा थंड प्रतिसाद त्यांना महाराष्ट्रात मिळाल. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या वाटचालीत वृत्तपत्रांनी महत्वपूर्ण भूमिका बजावली होती. भारतीय जनतेमध्ये ब्रिटिश सत्तेच्या विरोधात जागृती घडवून आणण्यात वृत्तपत्रांनी महत्वाची भूमिका बजावली. गोपाळ हरी देशमुख, न्या. रानडे व गोपाळ गणेश आगरकर यांनी समाजसुधारणेसंबंधी विचार मांडून महाराष्ट्रीयन समाजात जागृती घडवून आणली. सामाजिक, धार्मिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात सुधारणांची आवश्यक्ता त्यांनी प्रतिपादीत केली. आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत त्यांनी महत्वाचे योगदान दिले.

## 2. 5 संदर्भसूची


1. लक्ष्मणशास्त्री जोशी, (1974) **मराठी विश्वकोश खंड 1**, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई.
2. लक्ष्मणशास्त्री जोशी, (1989) **मराठी विश्वकोश खंड 14**, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई.
3. गो. मा. कुलकर्णी, (2003) **मराठी वाड्.मयकोश खंड 2 भाग 1**, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई.
4. यशवंत दिनकर फडके, (1989) **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
5. स. मा. गर्गे, (चौथी आवृत्ती,2004) **गोपाळ गणेश आगरकर,** नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, दिल्ली.
6. ह. रा. प्रभू, (1942) **आधुनिक भारताचे निर्माते आणि त्यांची पार्श्वभूमी**, वामन राधाकृष्ण, मुंबई.
7. डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, (तिसरी आवृत्ती, 2004) **आधुनिक भारताचा इतिहास 1757 ते 1857**, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
8. डॉ. सुमन वैद्य, डॉ. शांता कोठेकर, (चौथी आवृत्ती, 2004) **आधुनिक भारताचा इतिहास 1857 ते 1920**, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
9. डॉ. अ. रा. कुलकर्णी, (2007) **मराठयांचे इतिहासकार (इतिहासलेखन पध्दती)**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
10. डॉ. अ. रा. कुलकर्णी, (2007) **मराठे आणि महाराष्ट्र**, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
11. डॉ. बी. एन. सरदेसाई, (द्वितीयावृत्ती 2000), **आधुनिक महाराष्ट्र 1818 – 1960**, फडके प्रकाशन, कोल्हापूर.
12. जी. एल. भिडे, एन. डी. पाटील, (बाविसावी आवृत्ती 2013) **महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास**, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

# घटक क्र. 3 – वासाहातिक राजवटीतील प्रारंभिक उठाव

## अनुक्रमणिका


3. 0 घटकाची उद्दिदष्टे
3. 1 प्रस्तावना
3. 2 मुख्य मुद्दा – वासाहातिक राजवटीतील प्रारंभिक उठाव
3. 2. 1उपमुद्दा – आदिवासींचे उठाव : रामोशी, भिल्ल, कोळी
3. 2. 2 उपमुद्दा – शेतक-यांचे उठाव : दक्षिणेतील उठाव, गडकरी
3. 2. 3 उपमुद्दा – महाराष्ट्रातील 1857 चा उठाव
3. 2. 4 उपमुद्दा – वासुदेव बळवंत फडके
3. 3 स्वयं अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम
3. 4 सारांश
3. 5 पारिभाषिक शब्द शब्दार्थ
3. 6 संदर्भसूची


## 3. 0 घटकाची उद्दिदष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास –

1. रामोशी, भिल्ल, कोळी या जमातींनी ब्रिटिशांविरूध्द का उठाव केला ते अभ्यासता येईल.
2. रामोशी उठावाचे स्वरूप समजून येईल.
3. उमाजी नाईक यांच्या कार्याची माहिती मिळेल.
4. भिल्लांच्या उठावाचे स्वरूप समजून येईल.
5. कोळींच्या उठावाचे स्वरूप समजून येईल.
6. 1875 च्या शेतक-यांचा उठाव अभ्यासता येईल.
7. गडक-यांच्या उठावाचा अभ्यास करता येईल.
8. महाराष्ट्रातील 1857 चा उठाव अभ्यासता येईल.
9. वासुदेव बळवंत फडके यांचा सशस्त्र उठाव अभ्यासता येईल.

## 3. 1. प्रस्तावना

1818 मध्ये ब्रिटिशांनी मराठयांचा पराभव करून मराठयांच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापीत केले. महाराष्ट्रातील हा सत्ताबदल येथील जनतेच्या दृष्टीने महत्वपूर्ण ठरला. एक सत्ता जाऊन दुसरी सत्ता प्रस्थापीत झाली एवढयावरच या सत्ताबदलाचे महत्व मर्यादित नव्हते. या सत्ताबदलाचे परिणाम येथील सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवनावर घडून आले. ब्रिटिशांच्या सत्तास्थापनेमुळे आत्तापर्यंत नव्या असलेल्या व्यवस्थेशी व विचारांशी महाराष्ट्रीयन जनतेचा संबंध येण्यास सुरूवात झाली.

माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनची या भागाचा कमिशनर म्हणून नियुक्ती करण्यात आली. एलफिन्स्टनने स्थानीक रूढी परंपरांना धक्का न लावण्याचे धोरण स्वीकारले. परंतु ब्रिटिश सत्तेचे परिणाम महाराष्ट्रातील जनतेस हळूहळू जाणवू लागले. ब्रिटिश जुलमी आहेत याची जाणीव त्यांना झाली. इंग्रजांच्या अन्यायी धोरणामुळे त्यांच्या विरोधात उठाव होण्यास सुरूवात झाली. नागपूर, सातारा, कोल्हापूर व सावंतवाडी संस्थानातील लोकांनी आणि रामोशी, भिल्ल, कोळी या जमातींनी ब्रिटिश सत्तेच्या विरोधात उठाव केले. आपले हितसंबंध, अस्तीत्व व अधिकार ब्रिटिश राजवटीमुळे धोक्यात आल्याने आणि ब्रिटिशांनी आपल्या अधिकारावर आणलेली बंधने झुगारून देण्यासाठी या जमातींनी ब्रिटिशांविरूध्द शस्त्र हाती घेतले. रामोशी, भिल्ल व कोळी या जमाती स्वतंत्रवृत्तीने जगणा-या होत्या. परकीय ब्रिटिशांच्या राजवटीत आपले सर्वस्व गहाळ झाले आहे याची जाणीव त्यांना झाली.

## 3. 2 मुख्य मुद्दा – वासाहातिक राजवटीतील प्रारंभिक उठाव

महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता प्रस्थापीत झाल्यानंतर माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टनच्या नेतृत्वाखाली ब्रिटिशांचा अंमल सुरू झाला. महाराष्ट्रातील सर्वच जनतेने ब्रिटिशांचा अंमल सहजासहजी मान्य केला असे झाले नाही. ज्या समाजाला ब्रिटिश राजवटीचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष चटके बसले त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात शस्त्र हाती घेऊन आपला ब्रिटिश सत्तेविषयीचा असंतोष व्यक्त केला. यामध्ये रामोशी, कोळी, भिल्ल, गडकरी या जमातींचा समावेश करावा लागेल. या समाजाचे ब्रिटिश राजवटीत हितसंबंध, अस्तित्व धोक्यात आल्यामुळे त्यांनी ब्रिटिशांच्या विरोधात उठाव केले. आपल्यावर होणा-या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी शेतक-यांनीही ब्रिटिशांच्या विरोधात संघर्ष केला. ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणाला कंटाळून वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिश सत्तेविरूध्द सशस्त्र लढा हाती घेतला. या सर्व घटनांचा अभ्यास आपण सदर घटकात करणार आहोत.

### 3. 2. 1 उपमुद्दा – आदिवासींचे उठाव : रामोशी, भिल्ल, कोळी

रामोशी, भिल्ल व कोळी या जमाती स्वतंत्र वृत्तीच्या व आपले वेगळेपण जपणा-या होत्या. या जामतीतील लोक स्वतंत्र बाण्याचे होते. महाराष्ट्रात अनेक सत्ताबदल झाले. पण यांचे स्वातंत्र्य मात्र अबाधीत होते. ब्रिटिशांमुळे आपले स्वातंत्र्य व अधिकार धोक्यात आल्याची जाणीव त्यांना झाली. परिणामी ब्रिटिश व त्यांच्यातील संघर्ष अपरिहार्य बनला. या उठावाच्या माध्यमातून ब्रिटिश सत्तेविरूध्दचा आपला असंतोष त्यांनी व्यक्त केला. त्यांनी ब्रिटिशांचे नविन राज्य सहजासहजी मान्य केले नाही. हे सर्वच उठाव देशभक्तीने भारावले होते असे म्हणता येणार नाही. हे उठाव ब्रिटिशांनी मोडून काढले तरीही या जमातीमध्ये आपल्या विरोधात होत असणा-या असंतोषाची दखल घेणे ब्रिटिशांना भाग पडले. महाराष्ट्रात सत्ता स्थापना झाल्यानंतर ब्रिटिशांनी आपली सत्ता अधिक बळकट करण्यासाठी स्थानिक जमीनदार, वतनदारांना विविध प्रलोभने दाखवून, गोडीने किंवा प्रसंगी कठोर मार्गाने आपलेसे करून घेतले. रामोशी, भिल्ल व कोळी या जमाती स्वतंत्र वृत्तीच्या असल्याने व दरोडे घालणे आपल्या धर्माचा भाग असल्याचे मानत असल्यामुळे या जमातींना आपलेसे करून घेणे ब्रिटिशांना कठीण झाले. परिणामी आपल्या राज्यात शांतता व सुव्यवस्थेचा पुरस्कार करणा-या ब्रिटिशांचा रामोशी, कोळी व भिल्ल या जमातीशी संघर्ष

होणे अपरिहार्य बनले. महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता स्थिर व भक्कम पायावर उभी करत असतानाच ब्रिटिशांना विसाव्या शतकात या उठावांना सामोरे जावे लागले. परकीय असलेल्या ब्रिटिशांच्या राजवटीत आपले सर्वस्व हिरावून घेतले आहे अशी त्यांची मानसीकता बनली. संपूर्ण भारताचा विचार करता ब्रिटिशांच्या विरोधात तुलनेने सर्वाधीक उठाव महाराष्ट्रात झाल्याचे दिसून येतात.

### 3. 2. 1. 1. रामोशांचा उठाव

महाराष्ट्रातील सत्ता स्थापनेनंतर ब्रिटिशांना रामोशांच्या उठावाला तोंड दयावे लागले. रामोशांची वस्ती प्राधान्याने महाराष्ट्रात आढळते. रामोशी म्हणजे रामवंशी किंवा रानवंशी म्हणजे रानात राहणारे अशी त्यांची उत्पत्ती सांगीतली जाते. कानडीमध्ये त्यांचा उल्लेख 'बेडर', 'बयादरूस' असा केला जातो. निजामाच्या प्रदेशातील शोरापूरच्या राजास ते आपला प्रमुख मानत होते. रामोशी आपल्या नावापुढे नाईक अशी संज्ञा लावत होते. रामोशी लोक शरीराने बळकट, उंचेपूरे, बांधेसूद व राकट होते. पुणे परिसरामध्ये रामोशी जमातींची संख्या अधिक होती. पुणे प्रांतात रामोशांमध्ये चव्हाण आणि जाधव अशा दोन आडनावाची लोक आढळून येतात. या रामोशांमधील काही रामोशी चोरी व दरोडा घालण्याचे काम करत असत. तर काही रामोशी किल्यांचा बंदोबस्त करणे, पाटील, देशमुख व इतर श्रीमंत लोकांच्या वाडयावर पहारेक-यांची कामे करणे, शेती, पशुपालन ही कामे करत असत. रामोशी जमात शूर असल्याने त्यांना बंदोबस्ताची, पहारेक-यांची कामे दिली जात असे. मराठा कालखंडात रामोशींनी पोलिसी बंदोबस्ताची कामे केली. त्यांच्या शूरपणामुळे मराठेकाळात त्यांना किल्यांच्या बंदोबस्ताचे काम दिले जात होते. ठराविक गावांचा महसूल गोळा करण्याचा अधिकार त्यांना होता. मराठेशाहीच्या अस्तानंतर त्यांना आपल्या उदरनिर्वाहासाठी चोरी व दरोडयांची कामे करावी लागली. त्यांच्या या कामामुळे ब्रिटिश कालखंडात शांतता व सुव्यवस्था धोक्यात आली. परिणामी इंग्रज व रामोशी यांच्यातील संघर्ष सुरू झाला. पुढे या संघर्षाचे नेतृत्व उमाजी नाईकने केले. आर्थिक हालाकीमुळे संतप्त झालेल्या रामोशी जमातील एकत्रीत करून उमाजी नाईकने बंडाचे निशाण उभारून इंग्रजी सत्तेला आव्हान दिले. उमाजी नाईकचा जन्म 1791 मध्ये पुरंदरच्या ईशान्येस असलेल्या भिवरी गावात झाला. उमाजीचे वडिल दादजी दरोडेखोर म्हणून प्रसिध्द होता. दरोडे घालण्याची माहिती त्याला वडिलाकडूनच मिळाली. उमाजी अकरा वर्षे वयाचा असताना दादजीचा मृत्यू झाला. काही काळ उमाजीने पुरंदर किल्याच्या बंदोबस्ताचे काम केले होते. प्रा. सदाशिव आठवले उमाजी नाईकचे वर्णन करताना म्हणतात, 'उमाजी एकशे बासष्ट से. मी. उंचीचा, मोठया डोळयांचा, वर्णाने लालसर होता. तो क्रुर नव्हता. त्याचा चेहरा सौम्य व प्रसन्न वाटे.' 1818 मध्ये उमाजीने भोर जवळील विंग गावात दरोडा घालताना पकडला जाऊन त्याला कैदेत टाकण्यात आले होते. कैदेत असतानाच उमाजी नाईकने अक्षरांची ओळख करून घेतली.

उमाजी नाईक व इंग्रज यांच्यातील पहिला संघर्ष 1824 – 25 मध्ये झाला. उमाजी व उमाजीचा भाऊ यांनी संतू रामोशीच्या नेतृत्वाखाली इंग्रजांचा भांबुडर्याचा खजिना लुटला. 1825 मध्ये संतू मरण पावल्यानंतर उमाजी संतूच्या टोळीचा प्रमुख बनला. 1825 मध्येच उमाजीने आठ ठिकाणी वाटमारी केली. तर सात दरोडे घातले. अनेक श्रीमंतांना लुटले. उमाजीच्या दरोडा व लुटमारीतून मिरजेचे पटवर्धन व फलटनचे निंबाळकर हे

सरदारही सुटले नाहीत. मिरजेच्या पटवर्धनाच्या लग्नातील लोकांना उमाजीने लुटले तर फलटनच्या निंबाळकरांचा पुण्याला जाणारा ऐवज दौण्डजवळ लुटला. इंग्रजांनी 28 आक्टोबर 1826 रोजी उमाजीविरूध्द पहिला जाहिरनामा काढून उमाजी व त्याचा जोडीदार पांडुजी याला पकडून देणा-यास प्रत्येकी 100 रू. बक्षीस जाहिर केले. परंतु इंग्रजांना या जाहिरनाम्याचा फायदा झाला नाही. 1827 – 28 पासून उमाजीने इंग्रजाविरूध्द अधिकच आक्रमक धोरण स्वीकारले. सासवड, जेजूरी, परिंचे, किकवी व भिवरी या प्रदेशात उमाजीने गोंधळ उडवून दिला. दिवसेंदिवस उमाजीचा वाढत जाणारा धोका पाहून इंग्रजांनी उमाजीला पकडण्यासाठी जागोजागी 152 चौक्या बसवल्या. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. सामान्य लोकांबरोबरच श्रीमंत लोकांचाही पाठिंबा उमाजीला मिळत गेला. 8 ऑगस्ट 1827 रोजी ब्रिटिशांनी उमाजीविरूध्द जाहिरनामा काढला व उमाजीस पकडून देणा-यास 1200 रू. बक्षीस जाहिर केले. परंतु त्याचाही उपयोग झाला नाही. उलट उमाजी नाईकची लोकप्रियता वाढू लागली. लोकांनी उमाजीला पाठिंबा देणे सुरू केले. त्यामुळे इंग्रजांनी हे प्रकरण अधिक गांभीर्याणे घेतले. उमाजी नाईकने स्वतःला 'राजे' म्हणवून घेण्यास सुरूवात केली. त्याचा दरबार डोंगर – कपारीत भरत होता. कोल्हापूरच्या महाराजांच्या पाठिंब्याने त्याने रामोशांचे राज्य स्थापन केले. उमाजींने आपल्या दरबारात भिक्षुंना दानधर्म करण्यास सुरूवात केली. त्यामुळे इंग्रजांना अधिकच धक्का बसला. यवतचा राणोजी नाईक व रोहिडयाचा आप्पाजी नाईक यांना हाताशी धरून उमाजी नाईकचा बंदोबस्त करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही.

1827 मध्ये उमाजीने पुण्याचा तत्कालीन कलेक्टर एच. डी. रॉबर्टसन याच्याकडे काही मागण्या सादर करून इंग्रजांना प्रत्यक्ष आव्हान दिले. त्या मागण्या पुढीलप्रमाणे आहेत.

1. अमृता रामोशी व विनोबा ब्राम्हण यांची इंग्रजांनी कैदेतून सुटका करावी.
2. रामोशांची परंपरागत वतने इंग्रजांनी रामोशांना परत करावीत.
3. पुरंदर व इतर ठिकाणी असणा-या रामोशांच्या वतनास इंग्रजांनी धक्का लाऊ नये.

या मागण्या इंग्रजांनी मान्य न केल्यास रामोशांच्या उठावाला तोंड देण्याची तयारी इंग्रजांनी ठेवावी अशी धमकीही दिली. उमाजीच्या या मागण्यांना इंग्रजांनी दाद दिली नाही. उलट उमाजीला प्रतिउत्तर देण्यासाठी पुण्याच्या कलेक्टरने 15 डिसेंबर 1827 रोजी एक जाहिरनामा काढला. या जाहिरनाम्यात कलेक्टर म्हणतो

1. उमाजी इंग्रजांना आव्हान देत असल्याने जनतेने उमाजीला पाठिंबा देऊ नये.
2. उमाजी व त्याच्या जोडीदारांना पकडून देणा-यास प्रत्येकी पाच हजार रूपयांचे बक्षीस देण्यात
   येईल.
3. इंग्रजांना शरण येणा-या उमाजीच्या साथीदारास संपूर्ण माफी देण्याचा विचार केला जाईल.
4. सामान्य जनतेला त्रास देणा-या रामोशांचा बंदोबस्त केला जाईल.

इंग्रजांच्या या जाहिरनाम्यास उमाजीने आव्हान देण्याचे ठरवून 20 डिसेंबर 1827 रोजी उमाजीने पाच इंग्रजांना पकडून ठार केले व त्यांची डोकी सासवडच्या इंग्रज अधिका-यास भेट म्हणून पाठवून दिली. त्यामुळे इंग्रजांना चांगलाच धक्का बसला. उमाजीने 25 डिसेंबर 1827 रोजी एक जाहिरनामा काढला. त्यात उमाजी म्हणतो

1. ठाणे व रत्नागिरी जिल्हयातील मामलेदार व पाटलांनी महसूल ब्रिटिशांना न देता उमाजीस द्यावा.
2. मामलेदार व पाटलांनी उमाजीस महसूल न दिल्यास गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागेल.

उमाजीच्या जाहिरनाम्याचा परिणाम होऊन 12 गावांनी आपला महसूल उमाजीस दिला. उमाजीने कोल्हापूरचे छत्रपती व आंग्रे यांच्याशी सलोख्याचे संबंध निर्माण केले. वेगवेगळे बक्षीसे जाहिर करूनही उमाजीस पकडणे इंग्रजांना शक्य झाले नाही. उमाजीच्या कारवायांची गंभीर दखल घेऊन इंग्रजांनी उमाजीला पकडण्यासाठी उमाजीची पत्नी, दोन मुली व एका मुलास पकडून कैदेत टाकले. याचा योग्य परिणाम होऊन उमाजी इंग्रजांना शरण आला. उमाजीचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी इंग्रजांनी उमाजीचे सर्व गुन्हे माफ केले व उमाजीस नोकरी दिली. उमाजीवर सातारा व पुणे या परिसरात शांतता टिकवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. 1828 ते 1830 या काळात उमाजीने नोकरी केली. भोर संस्थानातील तेरा गावांच्या महसुलावरून उमाजींचा इंग्रजांशी संघर्ष वाढत गेला. नोकरी करत असताना उमाजीने आपल्या विश्वासातील व्यक्तींना पाठवून खंडण्या गोळा करणे सुरूच ठेवले होते. सातारा, फलटण, भोर व पुणे या प्रदेशात दरोडयांचे प्रमाण वाढल्यामुळे इंग्रजांना उमाजीचा संशय आला. इंग्रजांनी उमाजीला पकडून कैदेत टाकले. परंतु उमाजीने कैदेतून यशस्वी पलायन केले. उमाजी क-हेपठारावर आला. उमाजीने पुन्हा रामोशांना एकत्र करण्यास सुरूवात केली. इंग्रजांशी समोरासमोर संघर्ष करण्याचे टाळून उमाजीने इंग्रजांशी गनिमी काव्याने लढण्याचे ठरवले. इंग्रजांनी उमाजीला पकडण्यासाठी पाठलाग सुरू केला. कॅ. अलेक्झांडर मॅकिन्टॉश याच्यावर उमाजीला पकडण्याची जबाबदारी सोपवण्यात आली. इंग्रजांनी उमाजीला पकडून देणा-यास पाच हजार रूपये व 200 बिघे जमीन देण्याचे जाहिर केले. परंतु त्याचा काहीच उपयोग झाला नाही. उमाजीविषयी कोणतीही माहिती इंग्रजांना मिळाली नाही. इंग्रजांच्या या धोरणास प्रतिउत्तर म्हणून उमाजीने 16 फेब्रुवारी 1831 मध्ये एक जाहिरनामा काढला. या जाहिरनाम्यात उमाजी म्हणतो –

1. दिसेल त्या युरोपियनांना ठार मारावे. मग तो सैनिक असो किंवा नसो.
2. इंग्रजांनी ज्यांची वतने व तनखे बंद केली आहेत त्यांनी उमाजीस पाठिंबा दिला तर त्यांची वतने
   व तनखे आपण परत मिळवून देऊत.
3. ब्रिटिशांच्या लष्करातील घोडदळ व पायदळात असणा-यां सैनिकांनी ब्रिटिशांचे हुकूम धुडकावून
   लावावेत. अन्यथा आपले सरकार त्यांना शिक्षा देईल.
4. जी गावे इंग्रजांना महसूल देतील ती उध्वस्त केली जातील.

या जाहिरनाम्यात उमाजीने आपण सर्व हिंदुस्थानसाठी जाहिरनामा काढला आहे, असे म्हटले आहे. संपूर्ण भारत एक देश किंवा राष्ट्र म्हणून संकल्पना अवतरलेली दिसते. उमाजीने काढलेल्या जाहिरनाम्याची ही वैशिष्टये आहेत. या जाहिरनाम्यानंतर उमाजीने 'समस्त गडकरी नाईक' यांना उद्देशून एक पत्रक काढून सर्वांना इंग्रजाविरूध्द लढण्याचे आवाहन केले. उमाजी व त्याच्या साथीदारांनी सोलापूर, अहमदनगर, सांगली, सातारा, पुणे व मराठवाडयात धुमाकूळ उडवून दिला. उमाजीच्या या कारवाईमुळे इंग्रज हताश बनले. 8

ऑगस्ट 1831 मध्ये इंग्रजांनी जाहिरनामा काढून उमाजीस पकडून देणा-यास दहा हजार रूपये व 400 बिघे जमीन देण्याचे जाहिर केले. इंग्रजांच्या या अमिषाला उमाजीचे काळू व नाना हे जवळचे साथीदार बळी पडले. उमाजीला पकडून देण्याची जबाबदारी त्यांनी घेतली. उमाजीचा जुना शत्रू बापूसींग परदेशी यानेही इंग्रजांना सहकार्य केले. काळू व नाना यांनी विश्वासघाताने उमाजीला पुण्याच्या मुळशी जवळ आवळस येथे आणले. नानाने उत्तोळी येथे 15 डिसेंबर 1831 रोजी उमाजीस पकडून दिले. इंग्रजांनी चौकशीचे नाटक करून 3 फेब्रुवारी 1834 रोजी उमाजी नाईकास फाशी दिली. उमाजीने इंग्रजांविरूध्दचा केलेला हा पहिला उठाव होता.

### 3. 2. 1. 2. कोळयांचा उठाव

ब्रिटिश राजवटीमुळे कोळी समाजाचे हितसंबंध धोक्यात आल्याने कोळी समाजानेही ब्रिटिशांविरूध्द उठाव केले. महाराष्ट्रातील कोळी समाजाचे साधे कोळी व डोंगरी कोळी असे भेद असून सोनकोळी, महादेवकोळी इ. पोटभेद आहेत. मराठा कालखंडात कोळी समाजाला किल्यांच्या बंदोबस्तामध्ये महत्वाचे स्थान होते. ब्रिटिशकाळात मात्र किल्यांचे महत्व कमी झाल्याने कोळी समाजावर बेकारीची कु-हाड कोसळली. कोळयांना पूर्वापार मिळालेल्या वतनामध्येही ब्रिटिशांनी हस्तक्षेप करून ही वतने काढून घेतली. त्यामुळे कोळी समाजावर उपासमारीची वेळ आली. परिणामी कोळी समाजात ब्रिटिशांविरूध्द असंतोष निर्माण झाला. कोळी समाजाचा प्रसार गुजरातमधील कच्छच्या रणापासून पश्चिम घाटापर्यंत ठिकठिकाणी झाला होता. कोळयांची मुख्य वसाहत सहयाद्रीपर्वतामध्ये ठाणे जिल्हयात होती. 1824 मध्ये कोळी समाजाने पहिला उठाव गुजरातमध्ये केला होता. या उठावात कोळी समाजाने बडोद्याच्या आसपासच्या प्रदेशात लुटालूट, जाळपोळ केली होती.

**पहिला टप्पा**

मुंबईमध्ये नेटिव्ह इन्फंट्रीने उठाव केला होता. सैन्यदलातील हा उठाव इंग्रजांनी अत्यंत निर्दय पध्दतीने मोडून काढला व शांतता प्रस्थापीत केली. त्यामुळे कोळी समाजातील काहीजण ब्रिटिशांवर नाराज झाले. इंग्रजांच्या या उठाव मोडून काढण्याच्या पध्दतीवर नाराज होऊन पोलीस दलातील कोळी समाजाचा अधिकारी रामजी भांगडिया याने आपल्या पदाचा राजीनामा दिला. ब्रिटिश सरकारच्या धोरणांचा निषेध करण्यासाठी सरकारी सारा भरण्यास नकार दिला. कोळी समाजाला एकत्र करण्याचे धोरण रामजी भांगडियाने स्वीकारले. कोळी समाजाला एकत्र आणून ब्रिटिश सत्तेविरूध्द उठाव केला तर आपली परिस्थिती सुधारेल असे त्याला वाटत होते. 1828 मध्ये रामजी भांगडियाच्या नेतृत्वाखाली कोळी समाजाने ब्रिटिशांविरूध्द उठाव केला. पश्चिम किणा-यावर कोळी समाज व इंग्रज यांच्यातील संघर्ष जवळजवळ दोन वर्षे सुरू होता. कॅ. अलेक्झांडर मॅकिन्टॉश या इंग्रज अधिका-याने कोळयांचा हा उठाव मोडून काढला.

**दुसरा टप्पा**

कोळयांचा हा उठाव मोडून काढल्यानंतर पुढे नऊ वर्षे कोळी समाज शांत होता. परंतु ही शांतता वरवरची होती. परंतु आतून उठावाची तयारी कोळी समाज करत होते. भाऊ खरे, चिमणाजी जाधव व नाना दरबारे या तिघांचे खंबीर नेतृत्व त्यांना लाभले होते. या तिघांच्या नेतृत्वाखाली उठावासाठी आवश्यक असलेली शस्त्रास्त्रे कोळयांनी जमा केली.

पुणे जिल्हयातील संरक्षक दलात इंग्रजांनी कपात करताच 1839 मध्ये कोळयांनी एकदम उठाव केला. उठावाचे लोण हळूहळू पसरत गेले. उठावात सहभागी होणा-यांची संख्या 400 पर्यंत पोहचली. कोळी समाजाने लुटालुटीचे धोरण आरंभले. यावेळी त्यांनी दोन महत्वाच्या घोषणा केल्या.

1. दुस-या बाजीरावची पुन्हा पेशवेपदावर नेमणूक झाली असून त्याच्या राज्याची पुन्हा स्थापना झाली
आहे.
2. संपूर्ण राज्याचा ताबा कोळयांकडे आहे.

कोळयांनी केलेल्य घोषणेमुळे इंग्रजांना चांगलाच धक्का बसला. कोळयांनी शिरूर येथील सरकारी खजिन्यावर धाड घालण्याची योजना तयार केली. या योजनेनुसार 150 कोळयांनी शिरूर येथील सरकारी खजिन्यास वेढा दिला. असिस्टंट कलेक्टर रोझ याने समर्थपणे कोळयांचा प्रतिकार केला. हा वेढा मोडून काढण्यासाठी पुण्यावरून सैन्य मागवण्यात आले. असिस्टंट कलेक्टर रोझच्या नेतृत्वाखाली इंग्रजांनी कोळयांचा वेढा मोडून काढला. 54 कोळयांना पकडण्यात येऊन वेगवेगळया मुदतीच्या शिक्षा देण्यात आल्या. काहींना फाशीही देण्यात आली. अशा पध्दतीने कोळयांचा हा उठाव मोडून काढण्यात आला. पुढील पाच वर्षे कोळी शांत राहिले.

**तिसरा टप्पा**

इंग्रजाविषयीचा कोळयामधील असंतोष दिवसेंदिवस अधिकाधीक वाढत होता. 1844 मध्ये कोळयांनी पुन्हा उठाव केला. यावेळी कोळयांच्या उठावाचे नेतृत्व रघू भांगरे व बापू भांगरे यांनी केले होते. पूर्ण तयारीनिशी कोळयांनी यावेळी उठाव केला होता. त्यांचा मुख्य तळ पुण्याजवळ होता. पुणे अहमदनगर व नाशिक या जिल्हयात कोळयांनी एकदम उठाव केला. उठावाचे लोण हळूहळू वाढत जाऊन पुरंदर व सातारापर्यंत पोहचले. सरकारी खजिने लुटण्यावर कोळयांनी भर दिला. सावकारांना लुटण्याचे धोरणही कोळयांनी स्वीकारले. पुरंदरजवळच्या एका पाटलाने कोळयांविषयी इंग्रजांना माहिती दिली म्हणून त्याला ठार मारण्यात आले. 1854 मध्ये बापू भांगडियाला इंग्रजांनी पकडले. पण त्याचा फारसा परिणाम कोळयांवर झाला नाही. कोकणात जाणा-या रस्त्यांची नाकेबंदी कोळयांनी केली. नाणेघाट व मालशेज घाट कोळयांनी ताब्यात घेतला. तुक्या व माणक्या या उमाजी नाईकच्या दोन मुलांनी कोळयांना मदत केली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून काही काळ इंग्रज हातबल झाले. इंग्रजांनी सर्व परिस्थितीचा बारकाईने अभ्यास करून 1846 पासून कोळयांचा उठाव दडपून टाकण्यास सुरूवात केली. कॅ. जेल या अधिका-याने उठाव मोडून काढण्यासाठी कारवाई सुरू केली. त्यासाठी कोळयांच्या कमकुवत जागा शोधल्या. कोळयांचा ठावठिकाणा शोधला. रघू भांगरेला पंढरपूर येथे साधूच्या वेषात जनरल डोल याने पकडले. 1850 मध्ये तुक्या व माणक्या या उमाजी नाईकच्या दोन्ही मुलांनाही इंग्रजांनी पकडले. बहुतांश नेतेमंडळी पकडली गेल्यामुळे हळूहळू कोळयांचा उठाव शांत होत गेला. 1850 पर्यंत कोळयांच्या उठावाचा कायमचा बंदोबस्त इंग्रजांनी केला. पकडलेल्या व्यक्तींना इंग्रजांनी कठोर शिक्षा दिल्या.

### 3. 2. 1. 2. भिल्लांचे उठाव

महाराष्ट्रात ब्रिटिश सत्ता प्रस्थापीत झाल्यानंतर ब्रिटिशांना भिल्लांच्या उठावाला तोंड द्यावे लागले. भिल्ल हा शब्द द्राविडी भाषा समुहातील विल्लू किंवा बिल्लू (धनुष्यबाण) या शब्दापासून आला असावा असे मत विल्सन याने व्यक्त केले आहे. लढाऊ बाणा हा भिल्लांचा मुळ पिंड होता. भारतातील लोकसंख्येने मोठी असलेली जमात म्हणून भिल्लांकडे पाहिले जाते. राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश, महाराष्ट्र व आंध्र प्रदेश या राज्यात भिल्लांची वस्ती आढळून येते. सातपुडा व सहयाद्री पर्वतीय प्रदेशात भिल्लांची वस्ती मोठया प्रमाणावर आहे. खानदेशातही भिल्लांची संख्या मोठया प्रमाणात आहे. शेती करणे, गुरे पाळणे, मासेमारी व शिकार करणे ही भिल्लांच्या उदनिर्वाहाची साधने होती. डोंगराळ प्रदेशात लुटमार करणे हाही त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधनच होते. मराठे कालखंडात त्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांवर गदा न आल्याने भिल्लांनी उठाव केला नाही. परंतु ब्रिटिश राजवटित भिल्लांची उदरनिर्वाहाची साधने हिरावून घेतली गेल्यामुळे ब्रिटिशांच्या विरोधात भिल्लामध्ये असंतोष निर्माण झाला. भिल्लांच्या बरडा, डागची, माऊची, वसावा, तुडवी इ. जाती होत्या. मराठेशाहीच्या उत्तरार्धात निर्माण झालेल्या गोंधळाचा फायदा घेऊन 1803 मध्ये भिल्लांनी उठाव केला होता. या उठावाचे स्वरूप प्रखर होते. 1816 मध्ये भिल्लांनी पुन्हा उठाव केला. भिल्लांच्या या उठावाला पेंढारी उठावाचाही पाठिंबा होता. या उठावाचे स्वरूपही प्रखर होते. 1818 मध्ये भिल्लांनी उत्तर – दक्षिणेस सातमळा, अजंठा येथे उठाव केला. या उठावात जवळजवळ आठ हजार भिल्लांनी सहभाग घेतला होता. या उठावाचे नेतृत्व 32 प्रभावी भिल्लांकडे होते. ठाण्याच्या तुरूंगातून पळून जाऊन त्रिंबकजी डेंगळे खानदेशात भिल्लांच्या आश्रयाला गेला. त्रिंबकजी डेंगळे याने भिल्लांना पाठिंबा व पैसा दिला. कॅ. ब्रिग्ज हा या भागाचा कलेक्टर होता. ब्रिटिश अधिकारी ब्रिग्ज खानदेशात आल्यावर भिल्लांचा उठाव मोडून काढण्यासाठी महत्वाच्या ठिकाणी लष्करी बंदोबस्त केला. भिल्लांना मिळणारी रसद बंद करणे हा त्यामागचा ब्रिग्जचा हेतू होता. परंतु त्याचा फारसा परिणाम भिल्लांवर झाला नाही. ब्रिग्जने भिल्लांच्या मोक्याच्या ठिकाणी हल्ला करण्याचे धोरण स्वीकारले. ब्रिग्जच्या या धोरणामुळे चिडून जाऊन भिल्लांनी मोठया प्रमाणात लुटालूट सुरू केली. त्यामुळे रयत गावे सोडून जाऊ लागली. भिल्लांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न त्याने करून पाहिला. परंतु यामध्येही त्याला यश आले नाही. भिल्लांच्या उठावावर नियंत्रण प्रस्थापीत करणे इंग्रजांना शक्य होईनासे झाले. एलफिन्स्टनने भिल्लांच्या बाबतीत सौम्यपणाच्या धोरणाचा अंगीकार करण्याचा सल्ला ब्रिग्जला दिला. त्यानुसार ब्रिग्जने बंदोबस्ताचे काम भिल्लांना दिले. काही प्रमुख भिल्लांना पेन्शन दिल्या. परंतु त्याचा फारसा परिणाम झाला नाही. 1819 मध्ये भिल्लांनी पुन्हा उठाव केला. ब्रिग्जने लष्कर पाठवून भिल्लांचा उठाव मोडून काढण्याचा प्रयत्न केला. परंतु सातपुडा पर्वतामध्ये भिल्लांना पकडणे अशक्य होत असे. भिल्लांनी केलेला उठाव शांत करण्यासाठी, भिल्लांचा ब्रिटिशांविरूध्दचा असंतोष कमी करण्यासाठी ब्रिग्जने एक जाहिरनामा काढला. त्यानुसार ब्रिटिशांना शरण येणा-या भिल्लांना माफी दिली जाईल व भिल्लांना पूर्वीचे हक्क बहाल केले जातील असे जाहिर केले. परंतु ब्रिटिशांच्या या जाहिरनाम्याचा परिणाम भिल्लांवर झाला नाही. सातमाळयाचा चिल नाईक याने इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. ब्रिग्जने चिल नाईकचा पाठलाग करून त्याला पकडले व त्याच्यावर आरोप ठेवून त्याला फाशी दिली. परंतु भिल्लांचे बंड काही शांत झाले नाही. भिल्लांच्या उठावाचा बंदोबस्त

करण्यासाठी कॅ. ब्रिग्जने मेजर मोरीन याची नियुक्ती केली. मेजर मोरीन याला भिल्लांचा उठाव मोडून काढण्यात यश आले. त्यामुळे काही काळ शांततेत गेला.

भिल्लांनी 1822 मध्ये हिरा नावाच्या भिल्लाच्या नेतृत्वाखाली पुन्हा उठाव केला. या उठावाच्या वेळी भिल्लांनी चांगलीच तयारी केली होती. या उठावाचे स्वरूपही व्यापक होते. भिल्लांनी या उठावाच्या माध्यमातून खानदेशातील ब्रिटिश प्रशासन जवळजवळ संपुष्टात आणले. भिल्लांच्या उठावाचा बंदोबस्त करण्यासाठी कर्नल रॉबिन्सन या ब्रिटिश अधिका-याची नियुक्ती करण्यात आली. दोन वर्षाच्या प्रयत्नानंतर त्याने भिल्लांचा उठाव मोडून काढून शांतता प्रस्थापीत केली. 1825 मध्ये सेवाराम घिसाडयाच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी पुन्हा ब्रिटिशांच्या विरोधात उठाव केला. सेवाराम घिसाडयाच्या उठावाला देशी संस्थानिक, देशमुखांचा पाठिंबा होता. त्यामुळे उठावाचे स्वरूप व्यापक बनले. भिल्लांच्या इंग्रजांनी काढून घेतलेल्या जमिनी भिल्लांना परत देण्यात आल्या. जमिनी कसण्यासाठी सरकारतर्फे जनावरे, अवजारे व बि – बियाणे देण्यात आली. मुख्य रस्ते व खिंडी यांच्या बंदोबस्ताचे काम पुन्हा भिल्लांकडे देण्यात आले. खानदेशात बंदोबस्तासाठी भिल्लांचे स्वतंत्र पथक तयार करण्यात आले. ब्रिटिशांच्या या धोरणामुळे भिल्लांचा इंग्रजावरील रोष कमी होत गेला. परिणामी खानदेशात हळूहळू शांतता प्रस्थापीत होत गेली.

### 3. 2. 2. मुख्य मुद्दा – शेतक-यांचे उठाव : दक्षिणेतील उठाव, गडकरी

महाराष्ट्रात ब्रिटिश सत्तेची स्थापना झाल्यानंतर ब्रिटिशांना रामोशी, कोळी व भिल्ल यांच्या उठावाला सुरूवातीस तोंड द्यावे लागले होते. त्यानंतर 1875 मध्ये महाराष्ट्रात शेतक-यांचा उठाव ब्रिटिशांच्या विरोधात घडून आला. त्यासाठी ब्रिटिशांचे शेतीविषयीचे अन्यायकारक धोरण कारणीभूत ठरले होते. जमीनमहसूल हे ब्रिटिशांच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन होते. त्यामुळे ब्रिटिशांनी जमीन महसूल व्यवस्थेकडे विशेष लक्ष दिले होते. एलफिन्स्टनने महाराष्ट्रात रयतवारी पध्दत सुरू केली. त्यामुळे शेतक-यांचा थेट ब्रिटिश सरकारशी संबंध येऊ लागला. रयतवारी पध्दतीमुळे वैयक्तीक शेतकरी जमीन महसूलाचा भरणा करण्यासाठी जबाबदार धरण्यात आला. जमीन महसूल रोख रकमेत व वेळेवर भरण्याचा नियम ब्रिटिशांनी केला. रयतवारी पध्दतीमुळे शेतकरी – सावकार, शेतकरी – सरकार यांच्यातील संबंधात बदल घडून आले. ग्रामीण रचनेतील एकसंघपणा कमी झाला. पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे यांचे महत्व कमी झाले. मराठा कालखंडात अतिवृष्टी, दुष्काळ व युध्दामुळे शेतक-यांचे नुकसान झाल्यास शेतक-यांना शेतसा-यात सुट मिळत असे. ब्रिटिश कालखंडात मात्र दुष्काळ किंवा अतिवृष्टीमुळे शेतक-यांच्या पिकांचे नुकसान झाले तरीही ठरलेला शेतसारा भरावाच लागत असे. शेतसारा भरण्यासाठी शेतक-यांनी सावकारांकडे जमिनी गहाण ठेवल्या. सावकारांना पैसा वेळेवर परत न केल्याने सावकारांनी शेतक-यांच्या जमीनी जप्त केल्या. ब्रिटिश काळात सावकारांना कायद्याचे संरक्षण मिळाले. त्यामुळे शेतकरी अधिकच हतबल झाला. शेतसारा भरण्यासाठी अनेक शेतक-यांना शेवटी आपल्या जमिनी विकाव्या लागल्या. शेतक-यांचे ब्रिटिश सरकार व समाजातील वरिष्ठ वर्गाकडूनही शोषण होत होते. त्यामुळे शेतक-यांची अवस्था दयनीय बनली. शेतकरी सावकार व ब्रिटिश सरकार यांच्या कचाटयात सापडून भरडला गेला. सरकार आकारत असलेला अवास्तव जमीन महसूल, जमीनदारांकडून व सरकारी अधिका-याकडून होणारे

शोषण, रोखीने भरावा लागणारा महसूल व शेतीसुधारणेकडे सरकारने केलेले दुर्लक्ष यामुळे शेतक-यांची परिस्थिती हलाकीची बनली. शेतक-यांचे कर्ज व त्यावरील व्याजावरून शेतकरी व सावकार यांच्यात संघर्ष होऊ लागले. 1840 मध्ये ठाण्याच्या रयतेने सावकार आपल्याकडून 30 ते 60 टक्यापर्यंत व्याज घेत असल्याची तक्रार ब्रिटिशांकडे केली होती. परंतु या तक्रारीकडे ब्रिटिशांनी दुर्लक्ष केले. ग्रामीण भागातील जवळजवळ 75% शेतकरी कर्जबाजारी झाले होते. तर एकटया पुणे जिल्हयातील 90% शेतकरी कर्जबाजारी झाले होते. परिणामी शेतक-यांमधील असंतोष दिवसेंदिवस वाढतच गेला. शेतक-यांमधील असंतोष वाढण्यास ब्रिटिशांनी वाढवलेला शेतसारा व त्याची कडकपणे होणारी वसुलीही कारणीभूत ठरली. एलफिन्स्टनच्या काळापासून शेतसा-यात सातत्याने वाढ होत गेली. 1867 मध्ये फ्रॅन्सिस व वॅडिग्टन या अधिका-यांनी शेतसारा आकारणीत 50% वाढ केल्यामुळे शेतक-यांचे बहुतांश उत्पन्न शेतसारा भरण्यातच जाऊ लागले. परिस्थिती हाताबाहेर जाताच शेतक-यांनी ब्रिटिश सत्तेविरूध्दच बंड केले.

**3. 2. 2. 1. 1857 चा शेतक-यांचा उठाव**

1875 मध्ये महाराष्ट्रात शेतक-यांनी ब्रिटिश सत्तेविरोधात बंड पुकारले. या उठावाची सुरूवात पुणे जिल्हयातील शिरूर तालुक्यातील कर्डे गावापासून झाली. या उठावाची सुरूवात जरी 1875 मध्ये झाली तरी त्याची पार्श्वभूमी अगोदरच तयार झाली होती. डॉ. डी. एन. धनागरे यांनी 1871 – 72 मध्ये कमी झालेले पावसाचे प्रमाण, गरीब शेतक-यांची झालेली दयनीय अवस्था, शेतमजुराला मिळणारी कमी मजुरी, शेतीच्या उत्पन्नात होणारी घट, विकला न जाणारा शेतीमाल ही कारणे 1875 च्या शेतक-यांच्या उठावास कारणीभूत झाल्याचे म्हटले आहे. तर प्रो. इयान कॅटनॅच यांनी शेतक-यांची गरिबी, उत्पन्नातील अनियमीतपणा, प्रतिकूल हवामान, शेतक-यांचे अज्ञान व अदूरदर्शीपणा, शेतक-यांवरील कर्ज, ब्रिटिश सरकारकडून सावकारांना मिळणारे प्रोत्साहन ही कारणे 1875 च्या उठावास कारणीभूत झाल्याचे सांगीतले आहे. लोभी ब्रिटिश राज्यकर्ते व निष्ठूर सावकार या दोघांच्या कचाटयात शेतकरी अडकला गेला. सहनशीलतेचा अंत झाल्यानंतर शेतक-यांनी ब्रिटिश सत्तेविरोधातच दंड थोपटले. शिरूर तालुक्यातील कर्डे गावात काळूराम नावाचा जुलमी सावकार होता. काळूराम सावकाराने बाबासाहेब देशमुख या शेतक-याविरूध्द कोर्टातून हुकूमनामा मिळवला. काळूराम सावकाराने बाबासाहेब देशमुखाच्या वाडयाचा लिलाव केला. हा लिलाव 150 रूपयाला काळूराम सावकाराने घेतला. बाबासाहेब देशमुखाने विनंती करूनही काळूराम सावकाराने वाडा पाडण्यास सुरूवात केली. गावातील इतर शेतक-यांनाही काळुराम सावकाराने असाच त्रास दिला होता. त्यामुळे सर्व गावकरी काळुराम सावकाराविरूध्द एकत्र आले. कर्डे गावातील शेतक-यांनी सर्व सावकारांवर बहि कार टाकल्यामुळे सर्व सावकार शिरूरला गेले. 1875 च्या शेतक-यांच्या उठावास 'दख्खन दंगे' असेही म्हटले जाते. शेतक-यांच्या या उठावाचे उल्लेख ब्रिटिश कागदपत्रामध्ये दख्खन दंगे असे आहेत. महाराष्ट्रातील पुणे व अहमदनगरपासून सुरू झालेल्या या उठावाचे लोण हळूहळू महाराष्ट्रात व देशाच्या अनेक भागात पसरले.

12 मे 1875 रोजी सुपे येथील शेतक-यांनी पहिला उठाव करून सावकारांच्या घरावर मोर्चा नेहला. सावकार, मारवाडी, गुजर यांच्या घरावर हल्ले करून घरातील गहाणखताच्या

हुकूमनाम्याच्या कागदपत्रांची होळी केली. पुणे जिल्हयातून सुरू झालेले उठावाचे हे लोण अहमदनगर, सातारा, सोलापूर व रत्नागिरी या जिल्हयात पोहोचले. या उठावात पुणे जिल्हयातील भिमथडी तालुक्यातील 17 गावे, शिरूर तालुक्यातील 10 गावे, इंदापूर हवेलीमधील 3 गावे उठावात सामील झाली होती. पुणे जिल्हयात 24 ठिकाणी सावकारावर हल्ले झाले. तर 8 ठिकाणी चो-या, सात लुटमारीचे प्रकार, एक खून झाला. अहमदनगर जिल्हयातील पारनेर तालुक्यात 6 गावे, श्रीगोंदा तालुक्यात 11 गावे, कर्जत तालुक्यात एक गावात या उठावाचे लोण पसरले होते. सावकारांच्या घरावर हल्ले करून मालमत्ता लुटणे, गहाणखते मिळवणे व ती जाळून टाकण्याचे धोरण शेतक-यांनी स्वीकारले होते. शेतक-यांमधील हा असंतोष काही एकदम निर्माण झाला नव्हता. सावकार शेतक-यांच्या जमिनी लाटत असताना, शेतक-यांवर अन्याय करत असताना ब्रिटिश सरकार मात्र शांत बसले होते. शेतक-यांमधील असंतोष वाढत जाऊन जेंव्हा त्याचा स्फोट झाला तेंव्हा मात्र सरकारने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करून शेतक-यांचे उठाव दडपून टाकण्याचे धोरण स्वीकारले. सरकारने प्रथम पोलिस पथके गावोगावी पाठवून उठाव नियंत्रीत करण्याचा प्रयत्न केला. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून लष्कराला पाचारण करावे लागले. शेतक-यांची धरपकड सुरू केली. परिणामी उठाव हळूहळू शांत होत गेला. 1875 च्या उठावाचे वैशिष्टय म्हणजे या उठावाचे नेतृत्व कोणत्याही एका व्यक्तीने केले नव्हते. तर सावकाराकडून पिळवणूक होणारा शेतकरीवर्ग या उठावाचे नेतृत्व करत होता. या उठावामध्ये पूर्वी कधीही दिसून न येणारी एकी दिसून आली. या उठावामध्ये खेडयातील बहुतांश लोकांनी सहभाग घेतला होता. ब्रिटिश सरकार व जुलमी सावकार यांच्याकडून आपल्यावर होणारा अन्याय दूर करण्यासाठी महाराष्ट्रातील शेतक-यांनी एकत्र येऊन केलेली ही देशातील पहिली चळवळ होती. शेतक-यांनी केलेली ही चळवळ पूर्वनियोजीत नव्हती, ती उत्स्फुर्तपणे केलेली चळवळ होती. या चळवळीचे स्वरूपही व्यापक होते.

1875 च्या शेतकरी उठावाचे स्वरूप ठरवताना वेगवेगळया व्यक्तींनी वेगवेगळी मते मांडली आहेत. या मतावरून या उठावाचे स्वरूप ठरवण्यास मदत होते. प्रो. रविंद्रकुमार यांच्या मतानुसार रयतवारी पध्दतीमुळे महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनाचे स्वरूपच बदलले. रयतवारी पध्दतीमुळे पूर्वीच्या काळातील शेतक-यांना मिळणारे संरक्षणच नाहीसे झाले. शेतक-यांचा थेट संबंध सरकारशी येऊ लागला. महसूल व्यवस्थेतील बदलामुळे शेतक-यांना आपल्या जमिनी सावकाराकडे गहाण टाकाव्या लागल्या. सावकारांना ब्रिटिश कालखंडात कायद्याने संरक्षण मिळाले. त्यामुळे शेतक-यांची पिळवणूक मोठया प्रमाणात होऊ लागली. हा उठाव शेतकरी, सावकार व सरकार यांच्या संबंधावर विदारक प्रकाश टाकतो. प्रो. इयान कॅटनॅच यांनी या उठावाची तुलना फ्रेच राज्यक्रांतीच्या सुरूवातीच्या झालेल्या Grande Peur (ग्रॉ पर) या चळवळीशी केली आहे. प्रो. रणजीत गुहा या घटनेविषयी म्हणतात, 'हा उठाव शेतक-यांनी आपले शोषण करणा-यांच्या विरूध्द केला नव्हता. त्यामागे त्यांचा व्यवहारी हेतू होता. आपले शत्रू असलेल्या सावकारांना निःशस्त्र करणे हा त्यांचा मुख्य हेतू होता. सावकाराकडील बॉन्डस् व हिशेबाचे कागद जाळण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले होते.' डॉ. रणजीत गुहा यांनी या घटनेची तुलाना 1830 मध्ये इंग्लंडमध्ये झालेल्या 'swing' चळवळीशी केली आहे. पुणे सार्वजनिक सभेने या घटनेचे स्वरूप पुढीलप्रमाणे विषद केले आहे. खेडयामध्ये पूर्वी सहसा न दिसलेली एकी दिसून आली, हा

उठाव एखाद्या तालुक्यापुरता मर्यादित न रहाता पुणे, अहमदनगर, सोलापूर व सातारा या जिल्हयामध्ये पसरला आणि ज्या ठिकाणी जमाबंदीचे नवे दर लागू केले होते तेथे उठाव मोठया प्रमाणात झाले.

शेतक-यांच्या या उठावाची दखल घेणे ब्रिटिश सरकारला भाग पडले. या उठावाची चौकशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने 'डेक्कन रॉयटस् कमिशन' नियुक्त केले. त्यामध्ये चार सभासद होते. या कमिशनने महाराष्ट्रातील शेतक-यांची आर्थिक स्थिती कशी आहे याची चौकशी करून आपला अहवाल सरकारला सादर करायचा होता. या कमिशनने सावकाराकडून शेतक-यांच्या होणा-या पिळवणूकीविरोधात सरकारने कायदा करणे आवश्यक आहे असे प्रतिपादीत केले. यानुसार ब्रिटिश सरकारने तसा कायदा केला. 'दी डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस् रिलिफ ॲक्ट' या नावाने तो कायदा ओळखला जातो. 1879 मध्ये हा कायदा पास करण्यात आला. या कायद्याने शेतक-यांच्या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी अनेक योजना आखण्यात आल्या. शेतक-यांसाठी 'शेतकी बॅंका' सुरू करण्यात याव्यात, शेतक-यांसाठी तगाईची सोय करावी व कायद्याने कर्जबाजारी शेतक-यांच्या जमिनी सावकारांकडे सहजासहजी हस्तातरीत होणार नाहीत अशा प्रकारच्या तरतुदी करण्यात आल्या. या माध्यमातून ब्रिटिश सरकारने शेतक-यांमधील असंतोष कमी करण्याचा प्रयत्न केला.

### 3. 2. 2. 2. गडक-यांचा उठाव

कोल्हापूर संस्थानातील गडक-यांनी 1844 मध्ये इंग्रजाविरूध्द उठाव केला. कोल्हापूरच्या तत्कालीन राजाचे 1837 मध्ये निधन झाल्यामुळे त्यांचा अल्पवयीन मुलगा चौथा शिवाजी गादीवर आला. कोल्हापूरचे राजे इंग्रजांच्या प्रभावाखाली होते. चौथा शिवाजी अल्पवयीन असल्याचे निमीत्त करून इंग्रजांनी दाजीकृष्ण पंडित या आपल्या विश्वासू व्यक्तीची नियुक्ती कोल्हापूरच्या मंत्रीपदावर केली. दाजीकृष्ण पंडित याने कोल्हापूर संस्थानातील किल्यांवर वर्चस्व प्रस्थापीत करण्यासाठी गडक-यांना गडावरून दूर करून गडक-यांच्या परंपरागत वतनावर कर बसवला. दाजीकृष्ण पंडिताने महसूल व्यवस्थेत बदल केल्यामुळे सामान्य जनताही नाराज झाली होती. त्यातच गडक-यांच्या असंतोषाची भर पडली. आपल्या परंपरागत वतनावर दाजीकृष्ण पंडिताने आणलेली गदा गडक-यांना आवडली नाही. चिडलेल्या गडक-यांनी 1844 मध्ये इंग्रजाविरूध्द सशस्त्र उठाव केला. स्थानिक सामान्य जनता व सैनिक गडक-यांच्या उठावात सामील झाले. दाजीकृष्ण पंडिताला गडक-यांनी अटक करून त्याच्या कार्यालयाचा ताबा घेतला. त्याच्या कार्यालयातील कागदपत्रेही जाळण्यात आली. कोल्हापूर शहराचा ताबा घेऊन गडक-यांनी किल्लेही आपल्या वर्चस्वाखाली आणले. कोल्हापूरातील गडक-यांच्या उठावाचे लोण आसपासच्या प्रदेशातही पसरले. इंग्रज अधिका-यांनाही अटक करण्यात आली. गडक-यांचा उठाव मोडून काढण्यासाठी ब्रिटिशांना तिन ते चार महिन्यांचा कालावधी लागला. आपल्या परंपरागत वतनावर व हक्कावर बंधने आल्याने गडक-यांनी ब्रिटिशांविरूध्द हा उठाव केला होता.

### 4. 2. 3. उपमुद्दा – महाराष्ट्रातील 1857 चा उठाव

ब्रिटिश सत्तेच्या विरोधात भारतीयांनी संघटितरित्या केलेला पहिला व्यापक उठाव म्हणून 1857 च्या उठावाकडे पाहिले जाते. आधुनिक भारताच्या इतिहासाला कलाटणी देणारी ही अभूतपूर्व घटना होती. 1757 च्या प्लासीच्या लढाईपासून ब्रिटिशांनी भारतावर वर्चस्व प्रस्थापीत करण्यास सुरूवात केली होती. 1818 मध्ये मराठयांचा पराभव करून बहुतांश भारत ब्रिटिशांनी आपल्या वर्चस्वाखाली आणला. ब्रिटिश सत्तेचे परिणाम हळूहळू जाणवू लागताच 1857 मध्ये ब्रिटिशाविरूध्द मोठा उठाव घडून आला. ब्रिटिशांनी स्वीकारलेले आक्रमक साम्राज्यविस्ताराचे धोरण, लॉर्ड डलहौसीने स्वीकारलेले संस्थाने खालसा करण्याचे धोरण, सामाजिक व धार्मिक कारणे, आर्थिक कारणे, लष्करातील असंतोष ही कारणे 1857 च्या उठावास कारणीभूत ठरली. 10 मे 1857 रोजी मीरतच्या शिपायांनी बंड केले आणि ते दिल्लीस धावले. स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी 1857 च्या उठावास 'भारतीयांचे पहिले स्वातंत्र्यसमर' असे म्हटले आहे. तर न. र. फाटक यांनी 1857 च्या उठावास 'शिपायांची भाऊगर्दी' असे म्हटले आहे. 1857 चा उठाव जसा उत्तर भारतात दिर्घकाळ व मोठया प्रमाणात झाला तसा तो मुंबई इलाख्यात किंवा मध्यप्रांत व व-हाडात झाला नाही. महाराष्ट्रातील या उठावाचे प्रमाण तुलनेने तुरळकच होते. कोल्हापूर, पेठ, नाशिक, जमखिंडी संस्थान, मुधोळ, नागपूर व औरंगाबाद येथे ब्रिटिशांविरूध्द उठाव घडून आले. ब्रिटिशांनी हळूहळू हे सर्व उठाव मोडून काढले.

1857 च्या उठावात सातारच्या राजघराण्याचे निष्ठावंत सेवक रंगो बापूजी गुप्ते व त्याचा मुलगा सीतारामपंत यांनी सहभाग घेतला. सातारचे छत्रपती प्रतापसींह यांचे गेलेले राज्य परत मिळवण्यासाठी रंगो बापूजीने प्रयत्न सुरू केले होते. त्यासाठी सातारच्या राजाच्या वतीने वकील म्हणून रंगो बापूजीला इंग्लंडलाही जावे लागले. परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाही. दरम्यानच्या काळात 1857 च्या उठावाला सुरूवात झाली. या उठावात सहभागी होण्यासाठी आपली ताकद वाढवण्यासाठी रंगो बापूजीने रामोशी, कातकरी, कोळी या असंतुष्ट आदिवासी जमातीं संघटित करून सैन्य उभारले. सातारच्या राजांना पुन्हा गादीवर बसवण्याचा व इंग्रजांना हुसकावून लावण्याचा कट त्याने केला. उठावासाठी कोल्हापूर, सातारा, पंढरपूर, भोर, फलटण, वाठार, बेळगाव, कळंबी, कराड, आरळे, देऊर इ. ठिकाणांची निवड केली. रंगो बापूजी गुप्ते गोसाव्याच्या वेषाने सर्वत्र फिरत होते. या उठावाची कल्पना येताच इंग्रजांनी रंगो बापूजी गुप्तेंना पकडले. रंगो बापूजी गुप्तेचा मुलगा सीतारामपंत, सावंतवाडीचे रामजी शिरसाळ, बेळगावचे ठाकूरसिंग यांनी 31 जुलैला उठाव केला. इंग्रजांनी या सर्वांना पकडले व फाशीस दिले.

या उठावात कोल्हापूरच्या छत्रपतींचा सावत्र भाऊ चिमासाहेबही सामील झाले होते. उठावासाठी लागणारी हत्यारे, दारूगोळा व पैसाही जमा केला. कोल्हापूर, बेळगाव व धारवाड येथील कंपनीच्या लष्करात उठावाचे प्रयत्न सुरू केले. इंग्रजांना याची माहिती मिळताच चिमासाहेबची रवानगी इंग्रजांनी कराचीस केली. कोल्हापूरात 31 जुलै 1857 च्या रात्री 27 व्या रेजीमेंटमधील भारतीय सैनिकांनी उठावात भाग घेऊन रेजिमेंटची तिजोरी लुटली. तसेच ब्रिटिश अध्कि-यांच्या घरावरही हल्ले केले. सैनिकांनी इंग्रजांना शहरातून हुसकावून लाऊन शहराचा ताबा घेतला. ब्रिटिशांनी पुणे, सातारा व बेळगाव येथून सैन्य बोलावून हा उठाव दडपून टाकला. 6 डिसेंबर 1857 रोजी पुन्हा उठाव झाला. परंतु हा उठाव ब्रिटिशांनी मोडून काढला. अनेकांना ठार करण्यात आले.

नाशिक जिल्हयातील पेठ येथे कोळयांनी उठाव केला. भगवंतराव निळकंठराव हा पेठचा राजा या उठावामागे होता. 6 डिसेंबर 1857 रोजी कोळयांनी येथील हर्सुलच्या बाजारात लुटमार केली. सरकारी खजिना लुटला. भागोजी नाईक व मकाणी फुलदीखान यांच्या नेतृत्वाखाली बंडवाले आघाडीवर होते. या उठावाचा बंदोबस्त करण्यासाठी ग्लासपुल हा इंग्रज अधिकारी पेठला आला. बंडखोरांना पकडून त्याने शिक्षा दिल्या. पेठचा राजा भगवंतरावास फाशी देण्यात आली. नाशिक व नगरमधील भिल्लांनीही ब्रिटिशांविरूध्द संघर्ष केला. भिल्ल व इंग्रज यांच्यात नांरगाव येथे संघर्ष झाला. ब्रिटिशांनी अनेक भिल्लांना ठार केले. तर काहींना कैद केले. जमखिंडी संस्थानचे प्रमुख रामचंद्र पटवर्धन यांनीही या उठावात सहभाग घेतला होता. रामचंद्र पटवर्धन यांनी किल्यांची डागडूजी करून शस्त्रास्त्रांची जमवाजमव करताच इंग्रजांना त्यांचा संशय आल्याने त्यांना अटक करण्यात आली. त्यांच विश्वासू सेवक छोटूसींग याला तोफेच्या तोंडी देण्यात आले. मुधोळ संस्थानातील काही बेरडांनी या उठावात सहभाग घेतला होता. ब्रिटिश व बेरड यांच्यात लालगडच्या परिसरात संघर्ष झाला. त्यामध्ये बेरडांचा पराभव झाला. ब्रिटिशांनी बेरडांच्या प्रमुखांना फासावर दिले. त्यामुळे लोकांमध्ये दहशत निर्माण झाली. औरंगाबाद येथील सैन्यात ब्रिटिशांविरूध्द असंतोष निर्माण झाला होता. सैन्यातील घोडदळाने ब्रिटिशांविरूध्द उठाव केला. परंतु ब्रिटिशांनी उठाव करणा-या सैनिकांना पकडून फाशी दिली. नागपूर जवळील कामठी व टाकळी येथे ब्रिटिशांचे सैन्य होते. यातील काही सैनिकांनी ब्रिटिशांविरूध्द उठाव करण्याचे ठरवले. त्यांना लखनौ व कानपूर येथील बंडखोरांचे सहाय्य मिळाले. 13 जून 1857 ही उठावाची तारीख निश्चित करण्यात आली. या रात्री 12:00 वाजता आकाशात शोभेच्या दारूचे फुगे फोडले जाऊन एकमेकांना इशारा देण्यात येणार होता. त्यानंतर सीताबार्डीचा किल्ला, कामठी इ. ठिकाणे ताब्यात घेण्याचे ठरले होते. परंतु याचा सुगावा ब्रिटिशांना लागताच त्यांनी बंडखोर सैनिकांना ताब्यात घेतले. इनायतुलाखान, विलायतखान, नवाब कादरखान यांना फाशी देण्यात आली तर काहींना जन्मठेपेच्या शिक्षा दिल्या. शहरातील लोकांची हत्यारे काढून घेण्यात आली. नागपूरच्या भोसले घराण्यातील राणी बाकाबाई भोसले आपणास पाठिंबा देतील अशी बंड करणा-या सैनिकांची अपेक्षा होती. पण बाकाबाई भोसलेंनी पाठिंबा दिला नाही.

मुंबईतील सैन्यातही ब्रिटिशांविरूध्द असंतोष होताच. गुलमार डुबे या सैनिकाने उठावाची तयारी केली होती. प्रत्यक्ष उठावाचा दिवस पुढे ढकलण्यात आला. दरम्यानच्या काळात उठावाची माहिती इंग्रजांना मिळाली. इंग्रजांनी उठाव करणा-या सैनिकांना पकडले व त्यांची रवानगी फोर्ट जॉर्जवरील तुरूंगात करण्यात आली. खानदेशातही 1857 चा उठाव घडून आला. सातमाळा परिसरातील भागोजी नाईक व सातपुडा भागातील कजरसिंग नाईक व भिमा नाईक यांच्या नेतृत्वाखाली भिल्लांनी उठाव केला. काजीसींग हा ब्रिटिशांची नोकरी करीत होता. परंतु त्याच्यावर खूनाचा आरोप ठेवून त्याला कामावरून काढण्यात आले होते. त्याने सिंदवा घाट बंद केला. इंदूरहून मुंबईला नेण्यात येत असलेला साडेसात लाखांचा सरकारी खजिना लुटण्यात आला. आसपासची गावे लुटण्यात आली. सरकारी पोस्ट, टेलिग्राफच्या तारा लुटण्यात अल्या. आंबापाणी येथे झालेल्या संघर्षात ब्रिटिशांचे नुकसान झाले. पुढे अनेक दिवस हा संघर्ष सुरूच होता. एकूणच महाराष्ट्रातून 1857 च्या उठावाला मिळालेला प्रतिसाद कमीच होता.

## 3. 2. 4 उपमुद्दा – वासुदेव बळवंत फडके

भारतीय स्वातंत्र्य चळवळीमध्ये सशस्त्र क्रांतीचे आद्य प्रवर्तक म्हणून वासुदेव बळवंत फडके प्रसिध्द आहेत. ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणाविरोधात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात जे उठाव झाले त्यामध्ये वासुदेव बळवंत फडके यांचा सशस्त्र उठाव महत्वपूर्ण मानला जातो. 1857 च्या उठावानंतर ब्रिटिशांच्या विरोधातील पहिला सशस्त्र उठाव म्हणून वासुदेव बळवंत फडके यांच्या उठावाकडे पाहिले जाते. 1857 च्या उठावातील पराभवानंतर महाराष्ट्रात जवळजवळ विस वर्षे शांतता होती. पण बडोद्याचे महाराज मल्हारराव गायकवाड यांची पदच्युती, 1875 चा शेतक-यांचा उठाव, 1876 – 77 चा भिषण दुष्काळ, लॉर्ड लिटनचे दडपशाहीचे धोरण या कारणामुळे महाराष्ट्रात असंतोष निर्माण झाला. ब्रिटिश सत्तेच्या जुलूमी धोरणाचे दुष्परिणाम आता ख-या अर्थाने महाराष्ट्रात जाणवू लागले होते. ब्रिटिश सत्तेचे खरे रूप महाराष्ट्रीयन जनतेला कळाले. परिणामी ब्रिटिश सत्तेच्या विरोधात महाराष्ट्रात वासुदेव बळवंत फडकेंचा सशस्त्र उठाव घडून आला.

वासुदेव बळवंत फडकेंचा जन्म 4 नोव्हेंबर 1845 रोजी कुलाबा जिल्हयातील शिरढोण येथे मध्यमवर्गीय कुटूंबात झाला. पनवेल शेजारच्या कर्नाळा किल्याची किल्लेदारी पेशवाईत फडके यांच्या घराण्याकडे होती. त्यामुळे त्यांना सुभेदार फडके असे म्हटले जात होते. पेशवाईच्या अस्तानंतर त्यांच्या कुटूंबाचे उदरनिर्वाहाचे साधनच नाहीसे झाले. वासुदेव फडकेंना घरच्या बेताच्या आर्थिक परिस्थितीमुळे आपले इंग्रजी शिक्षणही पूर्ण करता आले नाही. बेताच्या आर्थिक स्थितीमुळे नोकरीच्या माध्यमातून उत्पन्नाचे साधन मिळवणे त्यांना आवश्यक होते. म्हणून त्यांनी रेल्वे खात्यात लिपीक म्हणून कामाला सुरूवात केली. पुढे 1863 मध्ये पुण्याच्या 'मिलीटरी अकौंन्टस्' मध्ये नोकरी मिळवली. भारतीयांपेक्षा आपण श्रेष्ठ आहोत या ब्रिटिशांच्या मानसीकतेमुळे ब्रिटिशांकडून त्यांना अपमानास्पद वागणूक मिळत होती. 1865 मध्ये आजारी आईला भेटण्यास जाण्याची त्यांची इच्छा होती. परंतु रजा न मिळाल्याने आईचे अखेरचे दर्शन घेणेही त्यांना शक्य झाले नाही. ब्रिटिशांच्या धोरणास कंटाळून त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला.

एकूणच ब्रिटिशांच्या ध्येयधोरणाविषयी त्यांच्या मनामध्ये तिरस्काराची भावना निर्माण झाली. शस्त्रास्त्रांचा वापर ब्रिटिशांच्या विरोधात केल्याशिवाय ब्रिटिश भारतातून जाणार नाहीत असे त्यांना वाटत होते. लष्करी सामर्थ्यावर त्यांचा विश्वास होता. वासुदेव फडकेंनी 1873 मध्ये स्वदेशी वस्तु वापरण्याची शपथ घेतली. देशप्रेम व स्वदेशीबद्दल तरूणांनमध्ये आस्था निर्माण करण्याचे प्रयत्न त्यांनी केले. न्या. रानडे व गणेश वासुदेव जोशी उर्फ सार्वजनिक काका यांच्या विचारांचा फडकेंवर प्रभाव होता. पुण्यात 1870 मध्ये सार्वजनिक सभेची स्थापना झाली होती. या सभेच्या कामकाजाच्या वेळी फडके उपस्थित असत. आपण देशासाठी काहीतरी केले पाहिजे असे त्यांना वाटू लागले. समाजातील विषमता नाहीसी करून समाजात ऐक्य, समानता व समन्वय निर्माण करण्यासाठी 'ऐक्यवर्धिनी संस्था' पुण्यात सुरू करण्यात आली होती. या संस्थेच्या कार्यात फडके सहभागी होऊ लागले. 1874 मध्ये वासुदेव फडके, वामनराव भावे व लक्ष्मणराव इंदापूरकर यांनी पुण्यात 'पूना नेटिव्ह इन्स्टिटयुशन' ही शाळा सुरू केली. वासुदेव फडकेंनी ब्रिटिश राजवट, ब्रिटिशांचे अन्यायकारक धोरणाबाबत भाषणे देण्यास सुरूवात केली. आपला देश स्वतंत्र झाल्याशिवाय सामान्य लोकांची दुःखे नाहीसे होणार नाहीत. आपल्या स्वार्थापुढे ब्रिटिशांना सामान्य लोकांचे कल्याण दिसत नाहीत असे विचार त्यांनी आपल्या भाषणामधून

मांडण्यास सुरूवात केली. एकूणच ब्रिटिशविरोधी वातावरण लोकांमध्ये निर्माण करण्याचे धोरण त्यांनी स्वीकारले. ब्रिटिशांनी बडोद्याचे संस्थानिक मल्हारराव गायकवाड यांच्यावर गंभीर आरोप ठेवून त्यांना पदच्यूत केले. ब्रिटिशांच्या या धोरणाविरूध्द सर्वत्र संतापाची लाट निर्माण झाली. वासुदेव फडकेंना या घटनेमुळे इंग्रजाविषयी वाटणा-या तिरस्काराच्या भावनेत वाढ झाली. लॉर्ड लिटन याच्या काळात लिटनने व्हिक्टोरीया राणीला हिंदुस्थानची सम्राज्ञी हा किताब दिला. दिल्ली येथे भरवलेल्या दरबारात पाण्यासारखा पैसा खर्च केला. लिटनने स्वीकारलेले आक्रमक साम्राज्यविस्ताराचे धोरण, भारतीय वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर निर्बंध घालण्यासाठी केलेला व्हर्नाक्युलर प्रेस ॲक्ट यामुळे लिटनच्या या धोरणाविषयी वासुदेव फडकेंना मोठया प्रमाणात राग आला.

ब्रिटिशांच्या अन्यायकारक धोरणाला प्रतिकार केला नाही तर ते दिवसेंदिवस वाढतच जाणार याची वासुदेव फडकेंना जाणीव झाली. आता स्वस्त बसून चालणार नाही हे ठरवून त्यांनी ब्रिटिशविरोधी कार्याला सुरूवात केली. आपली ओळख लवकर पटू नये म्हणून फडकेंनी दाढी वाढवली. बैरागयासारखा वेश परिधान करून ब्रिटिशविरोधी प्रचार करत गावोगावी फिरण्यास सुरूवात केली. ब्रिटिशांना सशस्त्र प्रतिकार करण्याचे ठरवून वासुदेव फडकेंनी तलवार, दांडपट्टा, भाला, बरची व बंदूक चालवण्याचे प्रशिक्षण घेतले. ब्रिटिशांना सनदशीर मार्गाने प्रतिकार करून ब्रिटिशांचा पराभव करता येणार नाही, ब्रिटिशांना भारतातून हुसकावून लावता येणार नाही. त्यामुळे ब्रिटिशविरोधात शस्त्र हाती घेण्याचा निर्णय त्यांनी घेतला. वासुदेव फडके दत्त उपासक होते. आपल्या ब्रिटिशविरोधी कार्याला देवाचे अधिष्ठान हवे असे त्यांना वाटले. त्यांनी 'दत्तमहात्म्य' हा सात हजार ओव्यांचा ग्रंथ लिहिला. ब्रिटिशविरोधी कार्यासाठी त्यांनी रामोशी, कोळी, मांग, महार, मुसलमान यांना आपले सहकारी म्हणून निवडले. 20 फेब्रुवारी 1879 रोजी त्यांनी दौलतराव नाईकच्या मदतीने पुण्याजवळील लोणी गावाजवळील धामारी गावावर दरोडा टाकला. दरोडा टाकत असताना कोणालाही मारहाण करायची नाही, स्त्रीयांना धक्का लावायचा नाही तर फक्त पैसा जमा करायचा असे आदेश त्यांनी दिले होते. या पहिल्या दरोडयामध्ये वासुदेव फडकेंना तिन हजार रूपये मिळाले. यानंतर दरोडा घालण्याचे प्रमाण वाढवण्यात आले. गावोगावी असलेल्या सावकारांच्या घरावर दरोडा घालून पैसे मिळवण्याचे धोरण त्यांनी अंगीकारले. 25 ते 27 फेब्रुवारी 1879 रोजी वासुदेव फडकेंनी लोणी व खेडवर दरोडा घातला. लोणीच्या भाऊसाहेब व रेवारीराव यांनी फडकेंना आश्रय दिला होता. 5 मार्च 1879 रोजी वासुदेव फडके व त्यांच्या साथीदारांनी जेजुरी जवळील वाल्हे गावावर दरोडा टाकला. या दरोडयात त्यांना 4 बंदुका, 300 रू. रोख व 100 रू. चे कापड मिळाले. 7 मार्च 1879 रोजी पुरंदरवर दरोडा टाकला. वासुदेव फडकेंच्या या दरोडयामुळे ब्रिटिश सरकार चक्रावून गेले. 15 मार्च 1879 रोजी मगदारी तर 20 मार्च 1879 रोजी सोनापूर, 29 मार्च 1879 रोजी सवारगाव ही गावे फडकें व त्यांच्या साथीदारांनी लुटली.

दरम्यानच्या काळात वासुदेव फडके व रामोशी यांच्यातील संबंध बिनसले होते. कारण लुटीतील पैसे रामोशी आपल्याकडेच ठेवत असत. रामोशांना वासुदेव फडकेंची ध्येयधोरणेच समजली नव्हती. शिवाजी महाराज हे त्यांचे प्रेरणास्थान होते. शिवाजींनी ज्याप्रमाणे छापे घालून स्वराज्यासाठी पैसा व शस्त्रे जमवली, त्याप्रमाणेच वासुदेव फडकेंनी अन्यायी ब्रिटिशांविरोधात लढण्यासाठी पैसे व शस्त्रास्त्रे जमा करण्यावर भर दिला. मे 1879 मध्ये वासुदेव फडकेंनी जाहिरनामा प्रसिध्द केला. या जाहिरनाम्यात वासुदेव फडके म्हणतात, 'आम्ही जे करत आहोत ते खरे म्हणजे इंग्रज सरकारच्या विरूध्द आहे.' ब्रिटिश

सरकारने सामान्य लोकांची केलेली लूट, करांचे वाढणारे ओझे, दुष्काळामुळे झालेली अन्न – अन्न दशा व ब्रिटिश अधिका-यांचे मोठे पगार इ. या जाहिरनाम्यात टिका करून वासुदेव फडके म्हणतात, 'आतापर्यंत फक्त येथील श्रीमंत लोकांविरूध्द चालेली आमची मोहिम आम्ही युरोपियनांविरूध्द सुरू करू. युरोपीयनांची सापडेल तेथे कत्तल करू आणि 1857 च्या बंडासारखे दुसरे बंड उभारू.' वासुदेव फडके यांच्या या जाहिरनाम्यावरून त्यांनी बंड का उभारले, त्यांचे उद्देश काय होते याची कल्पना येते. दिवसेंदिवस वाढत जाणा-या लुटीच्या बातम्यांमुळे इंग्रज चांगलेच हादरून गेले. पुण्याचा तत्कालीन पोलिस प्रमुख मेजर डॅनियल याने तपास सुरू केला. वेगवेगळया विभागात बरेच दिवस कोण गैरहजर आहे याची त्याने बारकाईने चौकशी केली असता पुण्यातील मिलीटरी अकाउटन्स खात्यातील वासुदेव फडके ब-याच दिवसापासून गैरहजर असल्याचे दिसून आले. वासुदेव फडकेंचा शोध घेत मेजर डॅनियल 129 शुक्रवार पेठ, पुणे येथे पोहचला. या ठिकाणी डॅनियलला तलवारी, बंदूका मिळाल्याने डॅनियलने वासुदेव फडकेंचे अटक वॉरंट काढले. मुंबई सरकारने वासुदवे फडकेंना पकडण्यासाठी चार हजार रूपयांचे बक्षीस जाहिर केले. परंतु ब्रिटिश सरकारला कोणीही वासुदेव फडकेंची माहिती दिली नाही. ब्रिटिशांच्या या धोरणाला प्रतिउत्तर म्हणून वासुदेव फडकंनी 'मुंबईचे गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल यांचे डोके कापून आणून देणा-यास दहा हजार रूपयांचे बक्षीस दिले जाईल.' असे जाहिर केले.

ब्रिटिशांनी वासुदेव फडकेंचा पाठलाग सुरू ठेवताच वासुदेव फडके कोकणात गेले. कोकणातील शेतक-यांना विश्वासत घेऊन धाडी घालण्यास सुरूवात केली. वासुदेव फडकेंनी इंग्रजाविरूध्द दुसरा जाहिरनामा प्रसिध्द केला. या जाहिरनाम्यात वासुदेव फडके म्हणतात, 'चार चार माणसे महिना – महिना पूर्वी पाठवून देशात लहान बंडे करीत. एवढे केले तरी इंग्रजांच्या मनात मोठी भिती उत्पन्न झाल्याशिवाय राहणार नाही. अशी बंडे केली तर डाक बंद होतील, आगगाडी बंद होईल, तारा बंद पाडता येतील. म्हणजेच तुरूंग मोकळे करण्यास हरकत नाही. अशी लहान लहान बंडे झाली तर सर्वच चमत्कार व्हावा त्याप्रमाणे होऊन जाईल. इंग्रजांना हाकलून लाऊन प्रजासत्ताक राज्य स्थापन करण्याचा आपला हेतू तडीस जाईल.' या जाहिरनाम्यातून आपल्या बंडामागील भूमिका त्यांनी विषद केली. इंग्रजांना भारतातून हुसकावून लावण्यासाठी काय केले पाहिजे याची जाणीवही त्यांनी करून दिली. वासुदेव फडके कोकणातून गाणगापूरला आले. 13 मे 1879 रोजी पुण्यातील विश्रामबागवाडयास व बुधवार वाडयाला आग लागी. या आगीमागे वासुदेव फडकेंचा हात असावा असा संशय पोलिसांना आला. परंतु ही आग कृष्णाजी नारायण रानडे व त्याचा मुलगा केशव याने लावल्याचे सिध्द झाले. वासुदेव फडके गाणगापूरवरून निजामाच्या राज्यात श्रीशैल्यला गेले. येथे त्यांची रघुनाथ भट याच्याशी भेट झाली. वासुदेव फडकेंचा पाठलाग करत डॅनियल श्रीशैल्यला पोहचला. डॅनियलने रघुनाथ भटाच्या धानुरला वेढा घातला. रघुनाथच्या आईस वासुदेव फडकेंची कागदपत्रे देण्यास सांगितले. परंतु रघुनाथच्या आईने ती कागदपत्रे न देता नदीत टाकली. त्यातील काही कागदपत्रे डॅनियलच्या हाती लागली. या कागदपत्रामध्ये वासुदेव फडकेंचा जाहिरनामा मिळाला. या जाहिरनाम्यात गव्हर्नरला ठार मारणा-यास पाच हजार रूपयांचे बक्षीस जाहिर करण्यात आले होते. ब्रिटिश सरकारने वासुदेव फडकेंच्या विरोधात प्रचार करून त्यांची संभावना लुटारू, दरोडेखोर, अत्याचारी, माथेफिरू अशी केली. आपल्याबद्दल आपल्या देशबांधवाचे असे मत होऊ नये म्हणून वासुदेव फडकेंनी आत्मचरित्र लिहून बंडामागची आपली भूमिका

विषद केली. विजापूरजवळील देवर नावगडी या गावाबाहेरी एका बौध्द विहारामध्ये वासुदेव फडके गाढ झोपेत असताना 23 जुलै 1879 रोजी त्यांना डॅनियलने विश्वासघाताने पकडले व पुण्यास आणले. न्या. अल्फ्रेड केसर यांच्यासमोर खटला सुरू झाला. वासुदेव फडकेंवर इंग्लंडच्या राणीविरूध्द युध्द पुकारण्याचा कट केल्याचा आरोप ठेवण्यात आला. वासुदेव फडकेंचा खटला सत्र न्यायाधीश न्युनहॅमकडे वर्ग करण्यात आला. भारतीय दंड विधानाच्या कलम 121 अ, 122 व 124 अ खाली बिटिश सरकारने वासुदेव फडकेंवर बेकायदेशिररीत्या माणसे जमवणे, शस्त्र बाळगणे व दारूगोळा जमवणे इ. आरोप ठेवले. वासुदेव फडकेंना 121 अ, 123 अ, 395 व 400 कलमानुसार काळया पाण्याची शिक्षा ठोठावण्यात आली. या शिक्षेच्या विरोधात वासुदेव फडकेंनी अपल केले. महादेव चिमणाजी आपटे यांनी त्यांचे वकीलपत्र स्वीकारले. वासुदेव फडकेंच्या बचावासाठी लोकांनी निधी जमा केला. परंतु अपील नामंजूर करण्यात आले. न्यायाधीशाने वासुदेव फडकेंना राजद्रोही ठरवून जन्मठेपेची शिक्षा दिली. 3 जानेवारी 1880 रोजी तेहरान बोटीने त्यांना एडनच्या तुरूंगगात पाठवण्यात आले. एडनच्या तुरूंगात ब्रिटिशांनी त्यांचा अनन्वीत छळ केला. 17 फेब्रुवारी 1883 रोजी एडनच्या तुरूंगात वासुदेव बळवंत फडके यांचे निधन झाले.

वासुदेव बळवंत फडकेंना पकडून जन्मठेपेची दिलेली शिक्षा, त्यासाठी एडनच्या तुरूंगात केलेली रवानगी व एकूणच त्यांच्या कार्याची दखल तत्कालीन वृत्तपत्रांनी घेतली होती. 24 नोव्हेंबर 1879 च्या 'इंदूप्रकाश' च्या अंकात 'फडक्यांना जेंव्हा कोर्टातून शिक्षा ठोठावल्यानंतर बाहेर नेत होते तेंव्हा कोर्टाबाहेर गर्दी होती. त्यामधील एका व्यक्तीने फडक्यांचा जयजयकार केला. यावर ब्राम्हणविरोधी गटाने टिका केली की पुण्यातील ब्राम्हणांचा फडक्यांना पाठिंबा होता हा निष्कर्ष अत्यंत पूर्वग्रहदूषीत होता.' असे म्हटले आहे. 21 नोव्हेंबर 1879 च्या अंकात शिवाजी या व्रत्तपत्रात म्हटले की, 'वा. ब. फडकेंला त्याच्या कर्माचे फळ मिळाले. फडक्यांचा उद्‌देश गौरवास्पद होता. पण चोखाळलेला मार्ग योग्य नव्हता. या बाबतीत त्यांना योग्य शिक्षणाची आवश्यक्ता होती. आपल्या देशबांधवाच्या सुखासाठी त्यांनी आपली पत्नी, सुख यांचा त्याग केला. त्यांनी संपत्ती मिळवण्याच्या उद्‌देशाने दरोडे घातले नाहीत. त्यांच्या तटस्थ वृत्तीचे व राष्ट्रप्रेमाचे कौतूक केले पाहिजे.' दि. 23 नोव्हेंबर 1879 रोजीच्या डेक्कन स्टार वृत्तपत्रात म्हटले की, 'फडक्यांनी आपल्या देशबांधवाच्या नजरेत कोणतेही गैरकृत्य केले नाही. फडक्यांचे भारतीयांनीच नव्हे तर सर्व इंग्रजांनी अभिनंदन केले पाहिजे. कारण त्यामुळे सरकार जागे झाले. पूर्वेकडील ब्रिटिश साम्राज्य सुखरूप राहण्यास मदत होईल.' वासुदेव बळवंत फडके यांच्या कार्याचे मुल्यमापन करताना य. दी. फडके म्हणतात, 'वासुदेव बळवंतांच्या आधी इंग्रज राजवटीला सशस्त्र प्रतिकार इतर प्रांताप्रमाणे महाराष्ट्रातही झाला होता. पण इंग्रजी विद्या घेतलेल्या व इंग्रज सरकारची नोकरी करीत असलेल्या तरूणाने इंग्रजांचे राज्य बुडविण्याचा केलेला प्रयत्न अभूतपूर्व होता.' वासुदेव फडकेंच्या उठावाविषयी ना. स. करंदीकर म्हणतात, 'ते क्रांतिकारकांचे अग्रणी होते. 'स्वराज्य' हे त्यांचे ध्येय होते.' ब्रिटिश सत्तेविषयी सामान्य जनतेच्या मनात असलेल्या असंतोषाला वाचा फोडण्याचे महत्वपूर्ण काम वासुदेव फडकेंनी केले.

## 3. 3. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम

1. उमाजी नाईकच्या नेतृत्वाखाली रामोशींनी केलेल्या उठावाची माहिती सांगा.
2. कोळी समाजाच्या उठावाची सांगा.

3. भिल्लांच्या उठावाची माहिती सांगा.

4. रामोशी, कोळी व भिल्ल या जमातींनी ब्रिटिशांविरूध्द केलेल्या उठावाची कारणे सांगा.

5. 1875 च्या शेतक-यांच्या उठावाची सविस्तर माहिती सांगा.

6. 1875 च्या शेतक-यांच्या उठावाची कारणे सांगा.

7. गडक-यांच्या उठावाची माहिती सांगा.

8. महाराष्ट्रातील 1857 च्या उठावाची माहिती सांगा.

9. वासुदेव बळवंत फडके यांच्या उठावाची माहिती सांगा.

10. वासुदेव बळवंत फडके यांनी ब्रिटिशांविरूध्द केलेल्या उठावाची कारणे सांगा.

## 3. 4 सारांश

1818 मध्ये मराठी सत्तेचा पराभव करून ब्रिटिशांनी मराठयांच्या वर्चस्वाखाली असलेल्या प्रदेशावर आपले वर्चस्व प्रस्थापीत केले. तत्कालीन परिस्थितीत भारतातील सर्वात प्रबळ राज्यकर्ते म्हणून मराठे प्रसिध्द होते. मराठयांच्या पराभवामुळे ब्रिटिश सत्ता भारतात ख-या अर्थाने प्रस्थापीत झाली. मराठयांकडून जिंकून घेतलेल्या प्रदेशावर ब्रिटिशांनी आपली धोरणे राबवण्यास सुरूवात केली. ब्रिटिश सत्तेमुळे रामोशी, कोळी व भिल्ल या जमातींचे हितसंबंध, उदरनिर्वाहाची साधने व अस्तित्व धोक्यात आल्यामुळे या जमातींनी ब्रिटिशांच्या विरोधात शस्त्र हाती घेतले. ब्रिटिशांनी हे उठाव मोडूनही काढले, परंतु या उठावाच्या माध्यमातून ब्रिटिशांना महाराष्ट्रीयन समाजात आपल्या विरोधात निर्माण होत असलेल्या असंतोषाची जाणीव झाली. ब्रिटिशांविरूध्द संघटितरित्या केलेला पहिला मोठा उठाव म्हणून 1857 च्या उठावाकडे पाहिले जाते. हा उठाव उत्तर भारतात जसा मोठया प्रमाणात घडून आला तसा तो दक्षिण भारतात व महाराष्ट्रात घडून आला नाही. महाराष्ट्रात कोल्हापूर, औरंगाबाद, नागपूर, खानदेश व नाशिक येथे काही प्रमाणात उठाव घडून आला. उठावाची व्याप्ती मोठी नसल्याने उठाव मोडून काढणे ब्रिटिशांना शक्य झाले. 1875 मध्ये महाराष्ट्रातील शेतक-यांनी जुलमी सावकार व जुलमी ब्रिटिश सत्ता या दोहोंच्या विरोधात उठाव केले. ब्रिटिशांनी अंगीकारलेल्या आर्थिक धोरणाच्या विरोधात हा उठाव शेतक-यांनी केला होता. शेतक-यांमधील असंतोषाची जाणीव होताच शेतक-यांच्या हालअपेष्टा नष्ट करण्यासाठी ब्रिटिशांनी काही सुधारणाही केल्या. परंतु त्या अपु-याच होत्या. 1857 च्या उठावानंतर ब्रिटिश सत्तेला विरोध करण्यासाठी वासुदेव बळवंत फडके यांनी शस्त्र हाती घेतले. ब्रिटिश सत्तेविषयी असलेला असंतोष त्यांनी आपल्या उठावामधून व्यक्त केला.

## 3. 5 संदर्भसूची


1. Gazetter of the Bombay Presidency, (1885), Vol. XVII, Part III, Poona.

2. डॉ. चौधरी कि. का. (संपा.), (1994) **महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर, जळगाव जिल्हा**, मुंबई, महाराष्ट्र शासन.

3. जोशी लक्ष्मणशास्त्री, (1981) **मराठी विश्वकोश खंड 10**, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ.

4. फडके यशवंत दिनकर, (1989) **विसाव्या शतकातील महाराष्ट्र**, पुणे, श्रीविद्या प्रकाशन.

5. डॉ. सरदेसाई बी. एन., (द्वितीयावृत्ती 2000), **आधुनिक महाराष्ट्र 1818 – 1960**, कोल्हापूर, फडके प्रकाशन.

6. डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता, (तिसरी आवृत्ती, 2004) **आधुनिक भारताचा इतिहास 1757 ते 1857**, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.

7. डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर शांता, (चौथी आवृत्ती, 2004) **आधुनिक भारताचा इतिहास 1857 ते 1920**, नागपूर, श्री साईनाथ प्रकाशन.

# घटक क्र.४
# राजकीय जागृती

अनुक्रमणिका

४.0 उद्दिष्टे
४.१ प्रस्तावना
४.२ विषय विवेचन
४.२.१ बाँबे असोसिएशन
४.२.२ पूर्ण सार्वजनिक सभा
४.२.३ भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना
४.२.४ ना. गोखले आणि लो. टिळकांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस
४.२.५ महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय काँग्रेस
४.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न.
४.४ सारांश
४.५ पारिभाषिक शब्द : शब्दार्थ, संज्ञा, संकल्पना
४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके / संदर्भग्रंथ
४.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रिय कार्य.

## ४.0 उद्दिष्टे

ब्रिटिश वासाहतिक राजवटीला भारतीयांनी केलेल्या प्रारंभिक सशस्त्र विरोधाच्या स्वरूपाचा अभ्यास आपण मागील घटकात केला. प्रबोधनामुळे भारतीयांनी उदारमतवादी मार्गाने ब्रिटिश राजवटीला कसा विरोध केला याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत. या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला -

महाराष्ट्रात राजकीय जागृती कशी झाली ? त्यास कोणते घटक कारणीभूत ठरले हे समजू शकेल.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेस स्थापन होण्यापूर्वी महाराष्ट्रात कोणत्या संघटना कार्यरत होत्या याची माहिती मिळेल.

उदारमतवादी मार्गाचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

मवाळ व जहाल मार्गातील फरक सांगता येईल.

ना. गोखले व लो. टिळकांच्या कार्यपद्धतीतील वेगळेपण समजू शकेल.

महाराष्ट्र म. गांधी व राजकीय जागृतीचा संबंध सांगता येईल.

## ४.१ प्रस्तावना

आधुनिक भारताच्या जडणघडणीत प्रबोधनाचा, वैचारिक जागृतीचा वाटा फार मोठा आहे. ब्रिटिश राजवटीत भारतात जी वैचारिक जागृती घडून आली त्यामुळे भारतीय समाजात फार मोठे परिवर्तन घडून आले. वैचारिक जागृती झाली. म्हणजे भोवतालच्या वातावरणाबद्दल जागरूकता निर्माण झाली. बुद्धीवाद, ऐहिकता, राष्ट्रवाद, औद्योगिक क्रांती, उदारमतवाद, समजा, व्यक्तिस्वातंत्र्य, लोकशाही या नव्या मूल्यांची ओळख भारतीयांना झाली. ही वैचारिक जागृती भारतीयांमध्ये प्रशासन, पाश्चात्त्य शिक्षण, वृत्तपत्रे, मिशनरी इ. माध्यमातून झाली. ब्रिटिश काळात झालेले समाज व धार्मिक परिवर्तन, सुधारणा हे घटकही वैचारिक, पर्यायाने राजकीय जागृतीस कारणीभूत ठरले.

१९ व्या शतकात झालेल्या वैचारिक जागृतीतून भारतात राष्ट्रवादी चळवळीचा उदय झाला. वैचारिक जागृतीचा आधार सुधारणांबरोबरच पुनरुज्जीवनही होता. राष्ट्रवाद हे या वैचारिक जागृतीचे अंत:सूत्र होते. वैचारिक जागृतीमुळे भारतात आधुनिकतेची सुरुवात झाली. तसेच एकात्मता व स्वातंत्र्य यांची जाणीव विकसित होत गेली. ब्रिटिशांच्या हातून सत्ता परत मिळवून स्वातंत्र्य मिळविण्याची मोठी आकांक्षा निर्माण झाली. यातूनच उदारमतवादी विचारसरणीचा एक वर्ग उदयास आला व राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म झाला.

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धातील प्रारंभिक २५-३० वर्षांचा काळ हा राजकीय जागृतीचा व राष्ट्रवादाच्या जन्माचा आणि विकासाचा काळ होय. या काळखंडात सुबुद्ध, सुशिक्षित भारतीयांत राजकीय जागृती फार झपाट्याने झाली. भिन्न प्रांत नवे राजकीय स्फूरण, नवी चेतना निर्माण होऊन या चेतनेला व्यापक राष्ट्रीय कार्यक्षेत्राची गरज भासू लागली आणि याच जाणिवेतून १८८५ साली अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना झाली.

भारताचे राजकीय एकीकरण हा एक प्रकारे ब्रिटिश राजवटीचा परिणाम होय. या एकीकरणामुळे भिन्न प्रांतीय, धर्मीय, जातीय, वांशिक लोक एका छत्राखाली आले. ब्रिटिश राजवटीत समाज जुलमी धोरणाचा सामना करावा लागला. यामुळे आपण एकाच राजवटीचे प्रजाजन आहोत अशी भावना भारतीयांच्या मनात आकार घेऊ लागली. राजकीय एकसंधनेमुळे व प्रादेशिक संलग्नेमुळे राजकीय जागृतीला पोषक वातावरण मिळाले.

महाराष्ट्रात ही राजकीय जागृती प्रामुख्याने पहिल्यांदा मुंबई व पुणे शहरात झाली. मराठी सत्तेच्या अस्तानंतर इंग्रजी अंमलाचा हा परिणाम होता. मुंबईला इंग्रजांनी आपली प्रांतिक राजधानी बनविल्यामुळे या शहरात आधुनिकीकरणाच्या प्रेरणाप्रवृत्ती लवकर निर्माण झाल्या. या राजकीय जागृतीतून महाराष्ट्रात बाँबे असोसिएशन, पुणे सार्वजनिक सभा या संस्थांचा जसा उदय झाला तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या राष्ट्रीय स्तरावरील संघटनेची स्थापना येथेच झाली. एवढेच नव्हे तर नामदार गोखले व लोकमान्य टिळक या महाराष्ट्रीयांनीच काँग्रेसचे नेतृत्व १९२० पर्यंत केले. त्याचप्रमाणे महात्मा गांधींची कर्मभूमीही महाराष्ट्रच होती. या सर्व बाबींचा विचार आपण या घटकात करणार आहोत.

# ४.२ विषय विवेचन :

ब्रिटिश राजवटीच्या संपर्कातून मध्यमवर्गाचा उदय झाला. या मध्यमवर्गाने टप्प्याटप्प्याने

राजकारणाच्या क्षेत्रात प्रवेश केला. आपली कमकुवत स्थाने ओळखून, आत्मपरीक्षण करून मध्यमवर्गाने नावीन्याचा, आधुनिकतेचा मध्यमयुगीन चौकट झुगारून आधुनिक राष्ट्रवादी उदारमतवादी, लोकशाही, चौकट त्याने स्वीकारली. मध्यमवर्गीय विचारवंतांनी साम्राज्यशाहीचा वैचारिक प्रतिवाद केला व राष्ट्रीय स्वातंत्र्य लढा संघटित केला. १९ व्या शतकाच्या मध्यापासून उदयास आलेल्या राजकीय संघटनांवर मध्यमवर्गीय प्रभाव होता.

१८४८ मध्ये मुंबईत स्थापन झालेली 'द स्टुडंट्स् लिटररी अँड सायंटिफिक सोसायटी', १८५० मध्ये स्थापन झालेली परमहंस सभा, १८५२ मध्ये स्थापन झालेली 'द डेक्कन असोसिएशन' यासारख्या संघटना स्थापना करण्यात मध्यमवर्गीयांनीच पुढाकार घेतला. यातूनच पुढे १८५२ मध्ये मुंबईत 'बॉंबे असोसिएशन' ही पहिली राजकीय उद्देशाने प्रेरित अशी संघटना स्थापन झाली.

## ४.२.१ बॉंबे असोसिएशन

महाराष्ट्रातील प्रबोधनाचा आरंभ करण्याचा मान मुंबईत जगन्नाथ शंकर शेठ, भाऊ दाजी यांच्याकडे जातो, त्याचप्रमाणे दादाभाई नौरोजी यांनाही महाराष्ट्रातील प्रबोधनाचे श्रेय द्यावे लागेल. १८५१ मध्ये त्यांनी 'रास्त गोफ्तार' या नावाचे गुजराती साप्ताहिक सुरू केले. एलफिन्स्टन कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून कार्य करीत असतानाच त्यांनी सार्वजनिक कार्याला सुरुवात केली. ज्ञानप्रसारक सभेच्या माध्यमातूनही ते ज्ञान ज्ञानाचे कार्य करीत. एवढेच नव्हे तर मुंबईत पहिली मुलींची शाळा स्थापन करण्यात दादाभाई नौरोजींचा पुढाकार होता. अशा सर्व प्रयत्नांच्या एकीकरणाला राजकीय आकार 'बॉंबे असोसिएशनच्या स्थापनेच्या माध्यमातून आला.

### स्थापनेची पार्श्वभूमी :-

'बॉंबे असोसिएशन' या संघटेनची स्थापना २६ ऑगस्ट १९५२ रोजी स्थापना मुंबईतील एलफिन्स्टन विद्यालयात झाली; ही पश्चिम भारतातील पहिली राजकीय संस्था होती. ही संस्था काढण्यात जगन्नाथ ऊर्फ नाना शंकरशेठ, दादाभाई नौरोजी यांनी प्रामुख्याने पुढाकार घेतला.

इ.स. १८१८ पासून घडलेल्या सामाजिक व राजकीय संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तीव्र विचार मंथनानंतर बॉंबे असोसिएशनचा जन्म झाला. १८४४ मध्ये सुरत येथे सरकारने मीठावर लावलेल्या करवाढीविरूद्ध तेथील नागरिकांनी सरकारला नमते घ्यायला लावले. भारतातील पहिले जन आंदोलन असे या घटनेचे वर्णन केले जाते. याशिवाय १८१८ नंतरचे विविध सशस्त्र उठावांची पार्श्वभूमीही असोसिएशनच्या स्थापनेला होती.

इ.स. १८५२ मध्ये मुंबईत पारशी आणि मुसलमान जमातींत दंगली झाल्या. या दंगलींचे निमित्त करून व देशातील एकूणच राजकीय, सामाजिक परिस्थितीचा विचार करण्यासाठी नाना शंकरशेठ यांनी १८ ऑगस्ट १८५२ रोजी आपल्या वाड्यात मुंबईकर नागरिकांची एक बैठक बोलावली. अर्थात या सभेला फक्त भारतीयांनाच बोलावल्यामुळे ब्रिटिश सरकारला ही सभा म्हणजे आपल्या विरूद्धचा एक कट वाटला. ही सभा म्हणजे आधुनिक राजकीय चळवळीची नांदीच होती.

१८ ऑगस्ट १९५२ ची सभा गुप्त स्वरूपाची होती. मात्र २६ ऑगस्टला एलफिन्स्टन विद्यालयात प्रगट सभा बोलावून रितसर बॉंबे असोसिएशन'ची स्थापना करण्यात आली. या सभेला हिंदु, मुस्लीम, ज्यू व पारशी समाजातील नेते उपस्थित होते. या सभेमध्ये अध्यक्ष नाना शंकरशेठ यांनी हिंदी जनतेच्या आशा आकांक्षा काय आहेत हे स्पष्ट करून इंग्रज राज्यकर्त्यांकडून कोणत्या प्रकारच्या राजकीय सुधारणा अपेक्षित आहेत, ते विशद केले.

ही नव्याने स्थापन झालेली संस्था सरकारच्या विरोधात नाही तर बॉंबे असोसिएशन व सरकार या दोघांचेही कार्य परस्पर पूरक असेल याची ग्वाही देण्यात आली. या सभेच्या कामकाजाची इत्यंभूत माहिती मुंबई सरकारला देण्यात आली. एवढेच नव्हे, तर सरकारने या नवोदित संघटनेला सर्व तऱ्हेची मदत करावी अशी विनंतीही गव्हर्नरला करण्यात आली. या पहिल्या संघटनेच्या स्थापनेबद्दलचा उत्साह बघा -

बॉंबे असोसिएशनच्या स्थापना अधिकवेधनात २५ हजार रूपयांचा निधी जमा झाला तर चीनसारख्या दूरवरच्या देशात काही भारतीय राहत होते. त्यांना जेव्हा ही बॉंबे असोसिएशनच्या स्थापनेची वार्ता समजली, तेव्हा ती दूरदेशस्थ मंडळीही आनंदली. त्यांनी स्वयंस्फूर्तीने २००० रूपये जमा करून मुंबईला पाठविले.

बॉंबे असोसिएशनच्या स्थापना अधिवेशनात खालीलप्रमाणे पदाधिकारी निवडण्यात आले -

सन्माननीय अध्यक्ष - सर जमशेटजी जिजीभाई

कार्यकारी अध्यक्ष - जगन्नाथ उर्फ नाना शंकरशेठ

उपाध्यक्ष - बोम्मनजी होरमसजी आणि खर्शेदजी जमशेदजी

सचिव - भाऊ दाजी व विनायक जगन्नाथ

बॉंबे असोसिएशनच्या सभासदांमध्ये कावराजी जहांगीर, डेव्हिड ससून, बापू जगन्नाथ जोशी, ब्रांझ फर्नांडिस, वि. ना. मंडलिक यासारख्या मान्यवरांचा समावेश होता. या संघटनेवर धनाढ्य शेटजी आणि बुद्धिवंत सुशिक्षित यांचा संयुक्त प्रभाव होता, मध्यमवर्गीयांचा वरचष्मा होता. या संघटनेच्या कार्याची पद्धत लोकशाहीप्रधान व मार्ग सनदशीर असा निश्चित करण्यात आला.

उद्दिष्टे -

बॉंबे असोसिएशनच्या स्थापना अधिवेशनात या संघटनेची उद्दिष्टे स्पष्ट करण्यात आली. नवरोजजी फर्दूनजी आपल्या निवेदनात म्हणतात -

''कारभाराच्या सुकरतेच्या दृष्टीने व जनतेच्या कल्याणाच्या दृष्टीने कोणत्या सुधारणा अंमलात आणण्याची जरूरी आहे. याची सरकारला वेळोवेळी जाणीव करून दिली जाईल. त्याचबरोबर सध्या ज्या निर्बंधामुळे व कायदेकानूमुळे जनतेची पिळवणूक होत आहे त्यांचे निर्मूलन करण्यासाठी किंवा त्यात जरूर त्या सुधारणा घडवून आणण्यासाठीही ही संस्था झटेल.''

श्री. दादाभाई नौरोजी म्हणतात, आम्हाला ब्रिटिश राजवटीत जी काही दुःखे भोगावी लागतात याचे कारण म्हणजे आपल्या चालीरिती, वहिवाटी याविषयी इंग्रज अधिकाऱ्यांचे अज्ञान होय. जनतेच्या हिताविरूद्ध कायदे कधी कधी त्यांच्याकडून संमत केले जातात; या कायद्यांमुळे त्या अधिकाऱ्यांना आपण आपले कर्तव्यपालन केले असे वाटते. बॉंबे असोसिएशनसारखी संघटना जर अस्तित्वात असेल, तर असे घडणार नाही, अधिकाऱ्यांना काही सुधारणा आम्ही सुचवू शकू.

बॉंबे असोसिएशन सारख्या मोठ्या संस्थेकडून आलेल्या सूचनांचा विचार सरकारला ही करावा लागेल आणि त्या सूचना त्यांना स्वीकाराव्या लागतील. सध्याच्या काळात खऱ्या तक्रारी जर कोणाच्या असतील तर त्या खेड्यातील शेतकऱ्यांच्या तसेच न्यायदान व महसूल क्षेत्रातील लोकांची बरीच गाऱ्हाणी आहेत. या संदर्भात आम्हाला आवश्यक ती माहिती गोळा करावयाची आहे व ही संस्था म्हणजे त्या मार्गावरचे एक पाऊल आहे. सारांशरूपाने संस्थेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे सांगता येतील -

१) मुंबई प्रांतातील एनदेशियांच्या गरजांची चौकशी करणे.

२) देशाची सुधारणा करण्यात कोणते उपाय आवश्यक आहेत, ते सरकारला कळविणे.

३) जनतेची दु:खे सरकारच्या नजरेस आणून देणे आणि रयतेच्या सुखासाठी सरकारला सर्व प्रकारचे सहाय्य करणे.

४) जनतेच्या अडचणी, प्रश्न सरकारपुढे सादर करणे.

५) देशातील जनतेचे कल्याण करणे.

६) ज्या अन्याय कायद्यांमुळे जनतेची पिळवणूक होत आहे त्यांचे निर्मूलन वा त्यात सुधारणा करण्यासाठी झटणे.

**कार्य –**

बाँबे असोसिएशन स्थापन होतेवेळी इंग्रज अधिकाऱ्यांनी या संघटनेविषयी शंका व्यक्त केली होती. परंतु संस्थेची उद्दिष्टे व सनदशीर मार्ग याविषयी सरकारला खात्री वाढली, एवढेच नव्हे तर सरकारने या संस्थेला अनुकूल प्रतिसादही दिला.

बाँबे असोसिएशनने सनदशीर मार्गाने आपल्या मागण्यांचे विनंती अर्ज इंग्लडच्या संसदेकडे - सरकारकडे पाठवणे हे आपले उद्दिष्ट मानले होते. या सनदशीर मार्गाची तयारी होत असतांना समाजातील असंतोषही व्यक्त होवू लागला होता. इ. स. १८५२ ते १८६४ या कालखंडात बाँबे असोसिएशनने विविध क्षेत्रात कार्य केले. यामध्ये न्यायदान, भ्रष्टाचार, पोलीस, शिक्षण, पाणीपुरवठ्याच्या सोयी, औषधोपचार, इस्ट इंडिया कंपनीचा कारभार, कायदेमंडळात प्रतिनिधीत्व, व्यापाऱ्यावरील वाढीव कर इ. क्षेत्रातील प्रश्नांसंबंधी व अन्यायासंबंधी संघटनेने आवाज उठवला.

''बाँबे असोसिएशनचे केलेल्या कार्यात इ.स. १८५३ मध्ये असोसिएशनने ब्रिटिश संसदेला सादर केलेले निवेदन अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. या निवेदनावर पुणे, मुंबई व ठाणे येथील ३००० लोकांच्या सह्या घेण्यात आल्या होत्या. त्या निवेदनाच्या शेकडो प्रती तयार करून त्या इंग्लंडमधील वृत्तपत्रांना पाठविल्या. हे निवेदन म्हणजे भारताच्य सनदशीर चळवळीतील पहिले पान होय.''

बाँबे असोसिएशन सामान्यपणे पुढील प्रमाणे मागण्या मांडून भिन्न क्षेत्रात कार्य केले -

१) ईस्ट इंडिया कंपनीचे व्यापारी स्वरूप जावून कंपनीला कसे राजकीय स्वरूप आले व त्याचे भारतीयांवर कोणते परिणाम झाले ते निवेदन देऊन स्पष्ट केले.

२) हिंदी जनतेविषयी सहानुभूती असणाऱ्या अनुभवी ब्रिटिश, सनदी अधिकाऱ्यांचे एक 'इंडिया कौंसिल' इंग्लडमध्ये स्थापन करावे व त्यांच्या सल्ल्याने भारताचा कारभार करावा.

३) राज्य कारभाराच्या खर्चाचा बोजा भारतावर लादू नये.

४) लायक हिंदी लोकांना राज्यकारभारात संधी द्यावी.

५) युरोपियन अधिकाऱ्यांच्या एकतंत्री व हूकूमशाही कारभाराला लगाम घालावा.

६) राज्यव्यवस्थेतील दोष व उणिवा दर्शवून उपाययोजना सुचविण्यात आल्या.

७) पाटबंधारे, पूल, कालवे, रस्ते इ. सार्वजनिक कामांचा पाठपुरावा केला.

८) कायदेमंडळात देशी भाषेत विधेयके मांडावित यासाठी आग्रह धरला.

९) भारतीयांच्या बाबतीत सूडाने वागू नये.

१०) मुंबई उच्चन्यालयात हिंदी लोकांच्या नियुक्त्या कराव्यात, लष्करात हिंदी डॉक्टरांच्या

नियुक्त्या कराव्यात यासाठी आग्रह धरला.

बाँबे असोसिएशनने सरकारबरोबर सहकार्याचे धोरण जसे ठेवले होते तसेच वेळप्रसंगी टोला करण्यासही मागे पाहिले नाही. १८५७ च्या उठावाच्या वेळी, मुंबईत उठाव झाल्यास शांततेसाठी सरकारला सहकार्य करण्याचे आश्वासन असोसिएशनने सरकारला दिले. तर १८५९ मध्ये सरकारने व्यापारी व व्यावसायिकांवर कर बसविला तेव्हा असोसिएशनने भारत सरकारचा निषेध केला. बाँबे असोसिएशनने स्थानिक स्वराज्य संस्थांचा प्रश्न सातत्याने इंग्रज राज्यकर्त्यांसमोर मांडला. या संस्थांच्या कारभारात भारतीयांना संधी द्यावी अशी संस्थेची मागणी होती.

बाँबे असोसिएशनच्या कार्यपद्धतीचे कौतुक इंग्लडमधील 'स्पेक्टेटर' या वृत्तपत्राने आपल्या ८ जानेवारी १८५३ च्या अंकात पुढील शब्दात केले ते वाचा -

''गाऱ्हाण्यांचे किंवा जुलुमांचे अर्जामध्ये (बाँबे असोसिशनच्या अवास्तव स्तोत माजवण्यात आलेले नाही. चालू राज्यवस्थेबद्दल जे काही सांगायचे ते सरळ भाषेत संयम पाळून सांगितले आहे. राज्य व्यवस्थेतील दोष व उणिवा योग्य प्रकारे दर्शविण्यात आल्या आहेत; तसेच उपाययोजनाही सुचविण्यात आली आहे. याच्या पेक्षा शहाणपणाचा मार्ग आणखी दुसरा कोणता असणार ?''

**– कुलकर्णी पु. बा. नाना शंकरशेठ**

**चरित्र, १९५९, पृ. २१५**

**इ.स. १९६५ मध्ये नाना शंकरशेठ यांचा मृत्यू झाला व संघटनेचे कार्य थंडावले.**

## महत्त्व –

बाँबे असोसिएशनने संसदेला दिलेल्या निवेदनाचा बराच गाजावाजा झाला. कलकत्ता येथील 'ब्रिटिश इंडिया असोसिएशन' आणि मद्रास येथील 'महाजन सभा' या समान उद्दिष्टांनी स्थापन झाल्या होत्या. त्यांच्याशी मुंबईकरांनी संपर्क जोडला होता.

बाँबे असोसिएशनच्या सनदशीर मार्गामुळे, भारतीय राजकारणात 'अर्ज विनंत्याचे राजकारण 'पहिल्यांदा सुरू झाले. या संस्थेच्या कार्याची दखल ब्रिटिश संसदेच्या दोन्ही सभागृहात घेण्यात आली. एवढेच नव्हे तर संसदेने त्यावर भारतातील राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक खास समिती नेमली.

बाँबे असोसिएशनच्या कार्याचे महत्त्व सांगतांना श्री. पु. बा. कुलकर्णी म्हणतात -

''बाँबे असोसिएशन या संस्थेसारखी लोककल्याणात वाहिलेली, जनतेची गाऱ्हाणी चव्हाट्यावर मांडून त्यांची दाद लावून घेण्यासाठी झटणारी व वेळोवेळी राजसत्तेशी सामना देणारी संस्था स्थापन करून ती यशस्वी रितीने चालविणे ही त्या काळात सहजसाध्य गोष्ट नव्हती. आपला कोणी तरी आहे असा विश्वास जनतेत उत्पन्न होऊ लागल्यामुळे या संस्थेचे महत्त्व वाढत गेले.''

ब्रिटिश सरकार हालायला, बोलायला वा जनतेच्या सुख-दु:खांच्याकडे लक्ष द्यायला सहसा तयार होत नव्हते, त्या काळात सरकारच्या धोरणावर व बारीक सारीक कृत्यांवर सक्त पहारा ठेवून यथाशक्ती जे जे करण्यासारखे होते, ते ते करून या संस्थेने जनतेला व सरकारला आपल्या अस्तित्वाची व कर्तृत्वाची वेळोवेळी जाणीव करून दिलेली आहे. अशा मोजक्या शब्दात संस्थेच्या कार्याचा परामर्श श्री. पु. बा. कुलकर्णींनी घेतला आहे.

बाँबे असोसिएशनचे आणखी एक आगळे वैशिष्ट्ये म्हणजे यामध्ये सर्व जाती व धमाृचा झालेला अंतर्भाव होय. या संघटनेबाबत अनिल सील म्हणतात, ''कुटुंब, जाती, धर्म आणि प्रदेश या

(संकुचित) घटकांना भेटून या संघटनेनी भारतीय उपखंडात एक सामाजिक व राजकीय क्रांती घडवून आणली.'' यासर्व राजकीय प्रक्रियेची अर्थाने बाँबे असोसिएशन म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची गंगोत्रीच होय.

एकूणच, महाराष्ट्रातीलही पाहिली राजकीय संघटना ज्या वातारणात जन्माला आली, ते वातावरण राजकीय हालचालींसाठी फारसे पोषक नव्हते. सार्वजनिक जीवन आणि राजकारण याबाबत लोक उदासिन होते. बाँबे असोसिएशनमुळे राजकीय हालचाली सुरू झाल्या ही अभिमानाची बाब होय. अर्थात हे नवे वारे फक्त अभिजनांपुरतेच मर्यादित होते, सर्व सामान्यांचा त्यात कुठेही सहभाग नव्हता. हेही येथे लक्षात घेतले पाहिजे. बाँबे असोसिएशनच्या चळवळीचे यामर्थ्य लक्षात घेतल्यास महाराष्ट्राच्या पुढील राजकीय प्रगतीची मर्मस्थाने लक्षात येतील. सुबत्ता आणि बुद्धीमत्ता यांचा मिलाप बाँबे असोसिएशनच्या माध्यमातून झालेला दिसतो. मात्र कालांतराने याचेच रूपांतर व्यापारी व सुशिक्षित पुढारी यांच्यात गटबाजी होवून संघटना मोडकळीस आली.

## ४.२.२ पुणे सार्वजनिक सभा –

**प्रेरणा व स्थापना –**

सनदशीर राजकीय चळवळीची पायाभरणी मुंबई इलाख्यात करणारी सार्वजनिक सभा होय. न्या. महादेव गोविंद रानडे हे या संस्थेचे सूत्रचालक होते, मुख्य म्हणजे प्रेरक शक्ती होते. त्यांच्या प्रेरणेतून आणि अविरत प्रयत्नांतून कितीतरी भिन्न भिन्न उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी अनेकविध संस्था महाराष्ट्रात उभ्या राहिल्या. विधवा विवाहोत्तेजक मंडळी, देशी व्यापारोत्तेजक मंडळ, औद्योगिक परिषद, वक्तृत्वोत्तेजक मंडळ, औद्योगिक परिषद, वक्तृत्वोत्तेजक सभा, वसंत व्याख्यानमाला, फिमेल हायस्कूल, वेदशास्त्रोत्तेजक सभा, विचारवती स्त्री सभा, सामाजिक परिषद, ग्रंथकार संमलने आणि सर्वात महत्त्वाची म्हणजे 'सार्वजनिक सभा'. सार्वजनिक सभेच्या माध्यमातून रानडे यांनी एक ज्ञानयज्ञच आरंभला होता. रानडे यांच्या प्रेरणेने सार्वजनिक सभेमार्फत सामाजिक व राजकीय जागृतीचे कार्य सुरू  झाले. ''या सभेच्या कार्यामागील प्रेरणा, कल्पना आणि विचार न्यायमूर्ती रानडेंचे आणि विचारांची अंमलबजावणी सार्वजनिक काकांची'' या पद्धतीने या सभेने फार मोठे काम केले.

दिनांक २ एप्रिल १८७० रोजी पुणे येथे 'सार्वजनिक सभे'ची स्थापना झाली. काँग्रेसच्या पूर्वसुरी संस्थांमध्ये ती विशेष महत्त्वाची संस्था मानली जाते. वस्तुत: या संस्थेचा जन्म १८६७ साली 'पूना असोसिएशन' या नावाने झाला. तीन वर्षांनंतर या संघटनेचे नामकरण 'सार्वजनिक सभा' असे करण्यात आले. या संस्थेच्या स्थापनेसमयी पुण्यातील ९५ प्रतिष्ठित नागरिक तिचे सभासद बनले. यामध्ये सरदार, जहागीरदार, इनामदार, सावकार इ. लोक सभेचे सदस्य होते; पण सभा नावारूपाला आली ती न्या. रानडे व गणेश वासुदेव जोशी यांच्यामुळेच.

सार्वजनिक सभेची स्थापना हा महाराष्ट्राच्या राजकीय उत्कर्षातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो, ही सभा भारतातील पहिली प्रतिनिधिक राजकीय संघटना मानावी लागेल. या सभेचे प्रमुख संस्थापक सदस्य होते -

१. गणेश वासुदेव जोशी

२. सदाशिव गोवंडे

३. शिवराम साठे

४. सीताराम चिपळूणकर

''भारतातील कोणत्याही राजकीय संस्थेने वा पक्षाने आपल्या सभासदांना जनतेकडून 'प्रतिनिधी प्रमाणपत्र' आणावयाची अट घातली नव्हती. सार्वजनिक सभेने मात्र असा नियम केला होता की, 'प्रत्येक सभासदाने आपण कमीत कमी पन्नास व्यक्तींचे प्रतिनिधित्व करतो, असे सिद्ध करण्यासाठी त्यांच्या स्वाक्षऱ्या असलेले संमतीपत्र आणावे' असे ५० व्यक्तींचा पाठिंबा असलेले ९५ प्रतिनिधी स्थापना बैठकीस उपस्थित होते.'' हे एक वेगळेपण आपल्या स्थापनेपासूनच सभेने ठेवले.

**उद्देश –**

खरे म्हणजे पुण्यातील पर्वती संस्थानमधील विविध प्रश्न हाताळण्यासाठी, त्यावर विचार करण्यासाठी पुणे सार्वजनिक सभेची स्थापना झाली. परंतु कालांतराने या सभेच्या कार्याची व्यापकता वाढली. या सभेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे होती -

१. पर्वती संस्थानमधील प्रश्नांवर उपाययोजना करणे.

२. जनतेच्या हिताचे कायदे व नियम यांची अंमलबजावणी करणाऱ्या सरकारी यंत्रणेवर लक्ष ठेवणे.

३. स्थानिक समस्या सोडविण्यावर भर देणे.

४. दारू दुकानांची संख्या कमी करणे.

५. मराठी शाळांची संख्या वाढविणे.

६. देवस्थाने, नगरपालिका, रुग्णालयाच्या व्यवस्थापनात सुधारणा घडवून आणणे.

७. मुंबई हायकोर्टात हिंदी न्यायाधीश नियुक्तीसाठी प्रयत्न करणे.

प्रारंभी सार्वजनिक सभेने स्थानिक प्रश्नांवर भर दिला, मात्र ही संघटना फक्त स्थानिक समस्यांतच अडकून राहिली नाही. प्रांताच्या पातळीवरील काही महत्त्वाच्या विषयांतही तिने रस दाखविला.

## कार्य –

सार्वजनिक सभेचे कार्य न्या. रानडे व ग. वा. जोशी या दुकलीने खऱ्या अर्थाने पुढे नेले, गतिमान केले. इ. स. १८७१ मध्ये न्या. रानडे पुण्यामध्ये न्यायाधीश म्हणून आले. त्यांचे पुण्यात झालेले आगमन सार्वजनिक सभेला मोठे फलदायी ठरले. सार्वजनिक सभेमध्ये उपक्रमांना वैचारिक मार्गदर्शन करण्याचे काम रानडे यांच्याकडे तर उपक्रम तडीस नेण्याचे काम सार्वजनिक काकांकडे अशी कामाची विभागणीच झालेली होती. त्यांनी आपल्या कार्यातून सार्वजनिक क्षेत्रातून लोकहितासाठी चळवळ अशी उभारावी, ते आंदोलन पुढे कसे रेटावे, याचा आदर्श त्यांनी चालून दिला.

सार्वजनिक सभा स्वत:ला मराठी जनतेची प्रतिनिधी मानत होती. या सभेने राजकारणात फारसा भाग घेतला नाही व सामाजिक क्षेत्र आपले कार्यक्षेत्र ठरवून घेतले. ब्रिटिश सरकारला तीव्र विरोध न करता सरकारच्या मदतीने सुधारणा घडवून आणण्यावर भर दिला. चांगल्या गोष्टींसाठी सरकारचे गोडवे जसे सभेने गायिले तशीच वेळप्रसंगी सरकारवर टीका करण्यासही मागे पाहिले नाही. एकूणच सनदशीर मार्गाचा अवलंब या संस्थेने केला. सार्वजनिक सभेच्या कार्याचे स्वरूप सारांशरूपाने पुढीलप्रमाणे होते-

१. सार्वजनिक सभेने १८७३ मध्ये महाराष्ट्रात दौरे काढून शेतकऱ्यांच्या स्थितीची आर्थिक पाहणी केली व या स्थितीचे स्वरूप सरकारला सादर केले.

२. सार्वजनिक सभेने सरकार व रयत यांच्यामध्ये दुवा म्हणून कार्य केले. दुष्काळ व टंचाईग्रस्त भागाची माहिती गोळा केली. या माहितीच्या आधारे सरकारवर दबाव टाकून सरकारकडून दुष्काळी कामे सुरू करून घेतली.

३. सरकारच्या दुष्काळ समितीवर अवलंबून न राहता सार्वजनिक सभेने १८७२ मध्ये दुष्काळाचा अभ्यास करण्यासाठी स्वत:ची समिती नेमली, लोकांच्या मुलाखती घेतल्या, लोकांच्या कर्ज, बाजारी स्थितीची कल्पना सरकारला दिली.

४. प्रादेशिक, संकुचित विचार न करता महाराष्ट्राप्रमाणे बंगालमधीलही दुष्काळी प्रदेशातील जनतेसाठी निधी गोळा केला व तिकडे पाठविला.

५. गावोगावी आपले कार्यकर्ते पाठवून दुष्काळग्रस्तांना मदत करून सरकारी मदतकार्याला सहकार्य दिले.

६. १८७८ मध्ये सार्वजनिक सभेने एक पाक्षिक सुरू करून त्यात सरकारच्या आर्थिक धोरणावर शेतकऱ्यांच्या समस्यांवर अभ्यासपूर्ण लेख लिहिले.

७. ब्रिटिश संसदेमध्ये भारताचे प्रतिनिधी असावेत, त्यांना निवडणूक लढविण्याची परवानगी द्यावी असा आग्रहही सभेने धरला.

८. सार्वजनिक सभेने ब्रिटिश सरकारला शह देण्यासाठी समांतर न्यायालये सुरू केली. सरकारी न्यायालयातील दिरंगाई व खर्च टाळणे व झटपट न्यायदान करणे हा हेतू यामागे होता.

९. सार्वजनिक सभेने जनजागृतीचे मोठे कार्य केले. ठिकठिकाणी कीर्तने करून, देशभक्तीवर प्रवचने देऊन, व्याख्यानांद्वारे ही जागृती घडवून आणली.

१०. बॉंबे असोसिएशनसारख्या संस्थेला मदत करण्याचे कार्य या सभेने केले. ब्रिटिश पार्लमेंटने नेमलेल्या कमिटीपुढे साथ देण्यासाठी नौरोजी फर्दुनजी यांची नियुक्ती झाली तेव्हा सार्वजनिक सभेने या संघटनेला आर्थिक मदतही केली.

वॉर्ड लिटन याने दिल्लीमध्ये एका दरकाराचे आयोजन करून त्यात राणी व्हिक्टोरियास भारताची सम्राज्ञी असा किताब देऊन गौरविण्यात आले. याप्रसंगी ग. वा. जोशी यांनी सार्वजनिक सभेचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहून दिल्ली दरबारात राणीला सभेच्या वतीने मानपत्र दिले तसेच आपल्या मागण्या सादर केल्या. या मानपत्रात जसे इंग्रज सरकारचे कौतुक केले हिंदी जनतेच्या मागण्या प्रभावीपणे मांडण्याचे कार्य सभेने केले. या मानपत्राचा सारांश -

''इंग्रजांनी या देशाला शांतता, सुव्यवस्था, स्थैर्य दिले. हा देश वाहतुकीच्या विविध साधनांनी जोडला गेला. इंग्रजींनी येथे एक आधुनिक शिक्षणपद्धती आणून या देशाला सुसंस्कृत केले. संस्थानिकाचे संरक्षण, व्यापारवृद्धी, औद्योगिक भरभराट, सत्ताविभाजन, न्याय, निधर्मीवृत्ती, स्वातंत्र्य ही सगळी ब्रिटिश राजवटीची देणगी आहे.

हिंदी संस्थानिकांना राज्ययंत्रणेत महत्त्वाचे स्थान दिले पाहिजे, त्यासाठी त्यांचा विधिमंडळ, कार्यकारी मंडळात समावेश करावा. हिंदी जनतेला विधिमंडळात योग्य ते प्रतिनिधित्व मिळावे. उच्च पदावर लायक हिंदी व्यक्तींची निवड करावी. सारा - महसूल व्यवस्थेत सुधारणा केली जावी.''

असा मध्यममार्ग स्वीकारून आपल्या ताकदीप्रमाणे सभेने कार्य केले. या मानपत्राच्या माध्यमातून सभेने देशवासीयांना आपले राजकीय ऐक्य अबाधित ठेवण्याचा तसेच मतभेद विसरून राजकारणासाठी एक येण्याचा संदेश दिला. देशहितासाठी झटणाऱ्या सुरेंद्रनाथ बॅनर्जी व एस. के.

घोष यांना पुण्यात मानपत्र देऊन आपली 'राष्ट्रीय' वृत्ती सभेने दाखवून दिली.

**महत्त्व–**

सार्वजनिक सभेने केलेल्या पायाभूत कार्याचे महत्त्व सनदशीर संस्थांच्या इतिहासात अनन्यसाधारण आहे. या सभेने तरुणांना सार्वजनिक कार्याचे बालकडू पाजले. त्यांना राजकीय कार्याची दिशा दाखविली. जनतेत राजकीय हक्कांची जाणीव निर्माण केली तसेच जनतेला सनदशीर मार्गाने आंदोलन करण्याचे प्रशिक्षणही दिले.

मिठावरील करास विरोध, स्वदेशीचा प्रचार, मुद्रण स्वातंत्र्याचा स्वीकार, शेतकऱ्यांसाठी चळवळ, जनजागृती व देशभक्तीचे कार्य अशा विविधांगी कार्यांत रस घेऊन सार्वजनिक सभेने राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेची पार्श्वभूमी तयार केली. सार्वजनिक सभेचे कार्य कसे चौफेर होते तसेच सभेचे सामर्थ्य शेतकऱ्यांमध्ये कसे होते याची साक्ष देणारा हा प्रसंग पहा -

''सोलापूर जिल्ह्यातील बार्शी या गावात १८७४ मध्ये डब्ल्यू. वेलिंग्टन हा अधिकारी आपल्या वरिष्ठांना कळवितो, 'मी शेतकऱ्यांना उद्देशून केलेले भाषण संपते न संपते, तोच अनेक शेतकरी उठून उभे राहिले. खतपत्रे आम्ही सरकारला दाखविणार नाही आणि सरकार सांगेल त्या दराने आम्ही शेतसारा पण देणार नाही, असे ते ओरडू लागले. मी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला; पण ते शांत बसावयास तयार नव्हते. या सर्व असंतोषास सार्वजनिक सभा जबाबदार आहे. मला राहवले नाही. म्हणून हा सारा प्रसंग निदर्शनास आणला आहे.''

सार्वजनिक सभेने एक वैचारिक नेतृत्व भावी पिढीला दिले. दुष्काळाबाबत कार्य करून आपली उपयुक्तता सरकार दप्तरी नोंदविली. दुष्काळात सेवा करण्यासाठी आपले कार्यकर्ते कामास लावले व विशेष म्हणजे 'जबाबदार शासनपद्धतीचा' पाठपुरावा केला. ''इंग्रजांचे प्रशासन भारतीय जनतेला जबाबदार आहे, ते इंग्लडच्या सरकारला जबाबदार नाही; तेव्हा विलायतेकडे डोळे लावून इथे राज्यकारभार करू नका'' असा इशारा देण्यास सार्वजनिक सभेने मागेपुढे पाहिले नाही.

ज्या काळात महाराष्ट्रात फारसे राजकारण नव्हते, राजकीय आघाडीवर सामसूम होती. सभेचा काळ हा राजकारणासाठी अत्यंत प्रतिकूल होता. अशा वातावरणात सार्वजनिक सभेने चाचपडत, ठेचाळतच प्रवास केला. सार्वजनिक प्रश्न चव्हाट्यावर मांडून ते सोडविण्याची पराकाष्ठा केली. सार्वजनिक सभेसारख्या राजकीय संघटनांना पायामध्ये गडप झालेल्या दगडाचा मान दिला पाहिजे. कारण काँग्रेस पक्ष जन्मास येण्याअगोदर या देशाचे राजकीय जीवन जगविण्याचे कार्य या संघटनेने केले, काँग्रेससाठी या संघटनेने पायाभरणी केली. या दृष्टीने सार्वजनिक सभेच्या कार्याचे महत्त्व महाराष्ट्र व भारताच्या इतिहासात, राजकारणात, समाजकारणात आहे.

या सभेस सार्वजनिक काका, न्या. रानडे यांच्याखेरीज नामदार गोखले, लो. टिळकांचेही नेतृत्व लाभले. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक सभेमार्फत खंडबंदीची चळवळ उभारून सभेचा प्रभाव वाढविला, पण पुढे लोकमान्य मंडालेला तुरुंगात गेल्यावर मात्र सार्वजनिक सभा मागे पडली. सार्वजनिक काकांच्या अविरत व नि:स्वार्थी कार्यामुळे सार्वजनिक प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या त्यांच्या नेटाच्या प्रयत्नांमुळे 'सार्वजनिक सभा' ही महाराष्ट्रातील लोकमान्य राजकीय संस्था बनली.

## ४.२.३ भारतीय राष्ट्रीय सभेची स्थापना

राष्ट्रीय काँग्रेस स्थापनेची पार्श्वभूमी -

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना व भारतीय राष्ट्रवादाचा उदय या दोन्ही बाबी एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. ब्रिटिश सत्तेची भारतावरील पकड जशी मजबूत होत गेली तशी राष्ट्रवादी भावना वाढीस लागली. राष्ट्रीय काँग्रेसचा जन्म हा भारताच्या राष्ट्रीय पातळीवरील राजकीय घडामोडींची सुरुवात होय.

राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना १८८५ मध्ये प्रत्यक्षात झाली असली तरी १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात युरोप खंडात घडून आलेल्या लोकशाही व राष्ट्रवादी चळवळींची प्रेरणा घेऊन भारतीयांनी संघटन शक्तीचे महत्त्व ओळखले होते. काँग्रेसच्या स्थापनेपूर्वी बंगाल, मुंबई व मद्रास प्रांतात स्वतंत्रपणे कार्य करणाऱ्या विविध राजकीय संस्थांनी भारतीयांच्या राष्ट्रवादी भावनेची जोपासना केली होती. काँग्रेसपूर्व प्रमुख राजकीय संस्था -

१. बंगाल प्रसारिका सभा (१८३६)

२. लँड ओनर्स असोसिएशन (१८३७)

३. ब्रिटिश इंडियन असोसिएशन (१८५१)

४. बाँबे असोसिएशन (१८५२) - नाना शंकरशेठ

५. मद्रास नेटिव्ह असोसिएशन (१८५२)

६. पुणे सार्वजनिक सभा (१८७०) - ग. वा. जोशी

७. इंडियन असोसिएशन (१८७६) - सुरेंद्रनाथ बॅनर्जी

८. नॅशनल कॉन्फरन्स (१८८३)

९. मद्रास महाजन सभा (१८८४)

१०. बाँबे प्रेसिडेंसी असोसिएशन (१८८५)

११. लंडन इंडिया सोसायटी (१८६६) - दादाभाई नौरोजी

१२. ईस्ट इंडिया असोसिएशन (१८६६)

१३. नॅशनल इंडिया सोसायटी (१८७२)

१४. इंडियन सोसायटी (१८८३)

१५. नॅशनल कॉन्फरन्स (१८८३)

अशा विविध राजकीय संस्था भारतात व भारताबाहेर कार्यरत होत्या. या संस्थांच्या सदस्यांचा ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास होता. अर्जविनंत्या व सार्वजनिक व्याख्याने या सनदशीर मार्गांचा वापर करून आपल्या मागण्या सरकारपर्यंत पोहचविण्याचा प्रयत्न या संस्थांनी केला. या राष्ट्रवादी संस्थांनी राष्ट्रीय सभेची पार्श्वभूमी तयार केली. या संस्थांच्या कार्यातून राष्ट्रवादाचा संघटित राजकीय अविष्कार आपणास दिसून येतो.

भारतीय राष्ट्रवादी चळवळींचा उदय होण्यास अथवा काँग्रेसचा उदय होण्यास १९ व्या शतकात झालेली वैचारिक जागृती कारणीभूत ठरली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उदयास प्रामुख्याने पुढील कारणे पूरक ठरली -

१. राजकीय ऐक्याची भावना

२. वैचारिक जागृती

३. भारतीयांचे आर्थिक शोषण

४. धर्म व समाज सुधारणा चळवळी
५. पाश्चात्त्य शिक्षण व इंग्रजी भाषा
६. वृत्तपत्रांचे योगदान
७. दळणवळणाच्या साधनांतील वाढ
८. मध्यमवर्गाने केलेली जागृती
९. ब्रिटिशांचे प्रशासन, राजवट, वंशविद्वेशी धोरण
१०. ब्रिटिश उदारमतवादी प्रशासकांकडून मिळालेली प्रेरणा.

या विविध कारणांमुळे राष्ट्रवादी भावना वाढीस लागली, स्वदेशाभिमान जागृत झाला. यातून भारताच्या भिन्न भागात असलेल्या उपरोक्त निरनिराळ्या संघटनांना एकत्र येण्याची गरज भासली, राष्ट्रीय पातळीवरील संघटनेचे महत्त्व पटले. या विविध संस्थांना प्रत्यक्ष यश फारसे मिळाले नसले तरी राष्ट्रीय सभेची पार्श्वभूमी तयार करण्याचे फार महत्त्वाचे काम या संस्थांनी केले. या संस्थांमध्ये महाराष्ट्रातील बाँबे प्रेसिडेन्सी असोसिएशन व पुणे सार्वजनिक सभेचा वाटा सिंहाचा होता.

**स्थापना –**

राष्ट्रीय पातळीवर भारतीयांची एखादी संघटना असावी असे भारतीयांना ज्याप्रमाणे वाटत होते तशीच गरज राज्यकर्त्या ब्रिटिश वर्गालाही १८८५ च्या दरम्यान वाटू लागली होती. तत्कालीन गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरिन याच्या मते, अशी सभा स्थापन झाल्यास आपल्या सरकारचे या संस्थेवर नियंत्रण हितावह राहील. लॉर्ड रिपनसारख्या उदारमतवादी प्रशासकाच्या मते, भारतीय लोकांना हळूहळू लोकशाही हक्क द्यावेत.

राष्ट्रीय स्तरावर संघटना स्थापना करण्याबाबत निवृत्त सनदी अधिकारी ॲलन ऑक्टोव्हिएन ह्यूम याची भूमिका महत्त्वाची ठरली. 'काँग्रेस' या शब्दाचा अर्थच 'एकत्र येणे' असा आहे. १८८३ साली कलकत्ता विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभाच्या वेळी ह्यूम यांनी एक पत्रक काढले होते. त्या पत्रकात म्हटले होते की, 'देशाच्या सेवेसाठी निरलस, चारित्र्यवान, कर्तबगार अशा निदान पन्नास लोकांनी एकत्र येऊन संस्था स्थापन करण्यासाठी वेळ आली आहे.''

ॲलन ह्यूम दिवसेंदिवस इंग्रजांच्या असंमजस धोरणाबाबत नाराज होते. १८८४ मध्ये त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा दिला. स्वतः पुढाकार घेऊन 'इंडियन युनियन' या संस्थेची स्थापना केली. लोकमत नीट जाणून घेतल्यास कारभार करणे अधिक सुलभ होईल, हे ओळखून लॉर्ड डफरिन यांनीही ह्यूम यांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन दिले.

भारतीयांच्या असंतोषाची जाणीव लक्षात घेऊनच ॲलन ह्यूमने १ मार्च १८८३ रोजी कलकत्ता विद्यापीठाच्या पदवीधरांना असे अवाहन केले की,

''वैयक्तिक स्वार्थ, उन्नती व सुखासीन जीवनाचा मोह सोडून सार्वजनिक कल्याण कार्याला व देशाच्या नैतिक उन्नतीला हातभार लावण्यास सुशिक्षितांनी पुढे यावे.''

भारताची प्रगती ब्रिटिश राज्याने घडवून आणावी हे जसे ह्यूम यांना वाटत होते तसेच भारताचा संबंध इंग्लंडलाही हितकारक आहे आणि म्हणून तो तुटू नये असेही त्यांचे प्रामाणिक मत होते. भारतीय राष्ट्रीय संस्थांचे कार्य व ब्रिटिश सरकारला भारतीयांच्या सहाकार्याची वाटलेली गरज याचे फलित म्हणजे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना होय. 'हिंदी राष्ट्रीय सभा' असे यथार्थ नाव या सभेने घेतले होते.

स्थापना दिन - २८ डिसेंबर १८८५
स्थळ - गोकुळदास तेजपाल संस्कृत महाविद्यालय, मुंबई
अध्यक्ष - श्री व्योमेशचंद्र बॅनर्जी
उपस्थित प्रतिनिधी - ७२
पहिल्या अधिवेशनाचे यजमानपद- बॉंबे प्रेसिडेन्सी असोसिएशन
प्रमुख संस्थापक सदस्य - दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता,
न्या. के. टी. मेहता, न्या. म. गो. रानडे,
गो. ग. आगरकर, नरेंद्रनाथ सेन, जी. सुब्रमण्यम अय्यर

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची स्थापना करण्यात महाराष्ट्राचे योगदान मोलाचे आहे. विशेषत: मुंबई व पुणे शहरातील पुढाऱ्यांनी मोलाची कामगिरी बजावली. राष्ट्रसभेचे पहिले नामकरण 'इंडियन नॅशनल युनियन' असे करण्यात आले, नंतर ते 'इंडियन नॅशनल काँग्रेस' असे ठेवण्यात आले. आपणास हे माहीत आहे काय ?

''भारतीय राष्ट्रीय काँग्रेस या नव्या पक्षाचे पहिले अधिवेशन पुणे शहरात पेशवे उद्यानात २५ ते ३१ डिसेंबर १८८५ या काळात घेण्याचे ठरविण्यात आले होते. या सभेचे यजमानपद 'सार्वजनिक सभे'कडे सोपविण्यात आले होते. यासंबंधी गुप्तपत्रके वाटली होती व वृत्तपत्रांना या अधिवेशनाची खबर कळणार नाही याची काळजी घेतली होती. एवढी तयारी होऊनही पुणे शहरात १८८५ मध्ये कॉलरा सुरू झाल्यामुळे पुण्यात भरणारे हे ऐतिहासिक अधिवेशन मुंबईला हलविले. अशा रितीने भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापना अधिवेशनाचा मान अचानक मुंबईस मिळाला.''

काँग्रेसच्या स्थापनेत महाराष्ट्राचे योगदान मोठे आहे. या संघटनेची स्थापनाच महाराष्ट्रात मुंबई शहरात झाली. या राजकीय संघटनेची निर्मिती मुंबई - पुण्यातील नेत्यांना हाताशी धरून करण्यात आली. जवळपास १९२० पर्यंत राष्ट्रीय काँग्रेसवर महाराष्ट्राचे नेतृत्व होते. न्या. म. गो. रानडे, ग. वा. जोशी, लोकमान्य टिळक, बद्रुद्दिन तय्यबजी, दिनशॉ वाच्छा, दादाभाई नौरोजी, नामदार गोखले या मंडळींनी काँग्रेसच्या बाल्यावस्थेच्या कालखंडात एक वैचारिक बैठक तयार करून दिली. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचे महत्त्व आपणास पुढीलप्रमाणे सांगता येईल -

भारताच्या राजकीय जीवनात नवे युग सुरू झाले.

लोकशाही मार्गाने भारतीय राष्ट्रवादाची वाटचाल सुरू झाली.

भारतीयांच्या या राष्ट्रीय संघटनेची दखल ब्रिटिश राजवटीला घेणे भाग पडले.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या वाटचाली बरोबरच भारतीय राज्यघटना निर्मितीची प्रक्रिया सुरू झाली.

## भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची उद्दिष्टे –

राष्ट्रीय सभेचे स्थापना अधिवेशन तीन दिवस चालले. अध्यक्ष व्योमेशचंद्र बॅनर्जी यांनी आपल्या भाषणात असे म्हटले की, 'हिंदुस्थानात लोकसत्ताक राज्यपद्धती निर्माण व्हावी, याबद्दल प्रयत्न करण्यात आपण ब्रिटिश साम्राज्याचा द्रोह करीत आहो, असे मानण्याचे कारण नाही. त्यांनी आपल्या भाषणात राष्ट्रीय सभेची उद्दिष्टे स्पष्ट केली -

१. देशाच्या विविध भागात कार्य करणाऱ्या नेत्यांना संघटित करून देशबंधुत्वाची भावना वाढीस लावणे.

२. जातीय, धार्मिक व वांशिक भेदभावाचे वातावरण दूर करून सर्व देशभक्तांना एकत्र आणून त्यांच्यात राष्ट्रीय एकात्मतेची भावना निर्माण करणे.

३. महत्त्वाच्या सामाजिक व राष्ट्रीय प्रश्नांवर चर्चा करून देशहिताच्या दृष्टीने योग्य असे मार्ग शोधून काढणे आणि त्या संदर्भात शासनास वेळोवेळी सूचना करणे.

**स्थापना अधिवेशनातील ठराव –**

राष्ट्रसभेच्या तीन दिवसांच्या सत्रात ठराव संमत करण्यात आले. ते पुढीलप्रमाणे होते -

१. ब्रिटिशांच्या भारतातील राज्यकारभाराची चौकशी करण्यासाठी एक आयोग नेमला जावा. त्यामध्ये योग्य प्रमाणात हिंदी प्रतिनिधी असावेत.

२. मध्यवर्ती व प्रांतिक कायदेमंडळात मोठ्या प्रमाणावर लोकनियुक्त प्रतिनिधी असावेत.

३. नोकरशाहीत हिंदी लोकांचा प्रवेश असावा.

४. सनदी नोकरीच्या परीक्षा इंग्लंडप्रमाणे हिंदुस्थानातही घेतल्या जाव्यात.

५. लष्करी खर्च वाढवू नये.

६. हिंदुस्थानच्या सरकारच्या कर्जाला ब्रिटिश सरकारने हमी द्यावी.

७. ब्रह्मदेश खालसा करू नये.

८. भारतीयांना लष्करी व तांत्रिक शिक्षण द्यावे.

९. न्यायमंडळ व कार्यकारी मंडळ परस्परांपासून विभक्त करावे, इंडिया कौन्सिल रद्द करावे.

या स्थापना अधिवेशनात उपस्थित ७२ प्रतिनिधींनी ब्रिटिश शासनाविषयी आपली निष्ठा व्यक्त केली. राष्ट्रीय सभेच्या स्थापनेस प्रारंभी मर्यादित सुशिक्षितांचाच पाठिंबा मिळाला; परंतु राष्ट्रीय एकात्मता साधताना राजकीय नेत्यांचे संघटन ही पहिली पायरी होती. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत ॲलन ह्यूम यांच्या भूमिकेचे महत्त्व सांगताना ना. गोखले म्हणतात, ''राष्ट्रसभेचे प्रस्थापक जर एक इंग्रज गृहस्थ नसते, तर कोणाही हिंदी मनुष्याला तिची स्थापना करता आली नसती आणि ती कोणी केली असती, तरी त्या काळी राजकीय चळवळीविषयी इतका वहीम होता की, अधिकाऱ्यांनी ती चळवळ कोणत्या तरी मिषाने दडपून टाकली असती.''

'कथा स्वातंत्र्याची' या ग्रंथात श्री. कुमार केतकर राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेबाबत काय म्हणतात ते पहा -

''आपण एकत्र येऊन नक्की काय करू शकू याचे चित्र त्यांच्यासमोर नव्हते; पण नवयुगाचे झंकार त्यांच्या अंत:करणात कुठेतरी खोल उमटत असावेत. जसजसे ते झंकार पुढे स्पष्ट ऐकू येऊ लागले, तसतसे त्यातील सूर, ताल आणि लय समाजमनाची पकड घेऊ लागले. हिंदी राष्ट्रसभेच्या पहिल्या अधिवेशनाला जमलेल्या ७२ प्रतिनिधींनी सुरू केलेल्या प्रवाहाचे पुढे सागरात रूपांतर झाले आणि त्या सागरात निर्माण होणाऱ्या प्रचंड लाटांनी इंग्रजांचे साम्राज्य कोसळले.''

## ४.२.४. नामदार गोखले व लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस

भारताच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा इतिहास हा बऱ्याच अंशी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या उदयाशी व विकासाशी जोडलेला आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीने वेळोवेळी ज्या मार्गांचा प्रारंभी अवलंब

केला त्याचे वर्गीकरण ढोबळमानाने खालीलप्रमाणे करता येईल.

## १) मवाळवादी किंवा नेमस्त –

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेपासून म्हणजे १८८५ ते १९०५ या कालखंडात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस ही पूर्णपणे अनुनय-विनय व अर्जविनंत्यांवर अवलंबून होती. या विचारसरणीच्या मते इंग्रजी सत्ता ही ईश्वरी देणगी आहे, इंग्रज सद्भावनेने प्रेरित होऊन आपल्या देशावर राज्य करीत आहेत, आपल्यात योग्यता येईल तेव्हा राज्यकारभाराचे अधिकार ते आपल्या हाती सोपवतील. अशा नेमस्त किंवा उदारमतवादी विचारसरणीचे नेतृत्व नामदार गोपाळ कृष्ण गोखलेंनी केले.

## २) जहालवादी –

इ. स. १९०५ ते १९२० या दुसऱ्या कालखंडात काँग्रेसमध्ये नव्या शक्ती उदयास आल्या. अर्ज विनंत्या करण्याऐवजी हिंदुस्थानातील लोकांचे मनोबल उंचावण्यावर त्यांनी भर दिला. लोकशिक्षण, लोकसंघटन व लोकजागृती ही त्यांची त्रिसूत्री होती. नवनवे सार्वजनिक उपक्रम, कार्यक्रम सुरू करून लोकांत आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न जहालवादी नेतृत्वाने केला.

जहालवादी संपूर्णपणे कायदेशीर व सनदशीर मार्गांनीच आपले आंदोलन चालवू पहात होते; परंतु राजनिष्ठा हे त्यांच्या राजकारणाचे वैशिष्ट्य नव्हते. या विचारसरणीचे नेतृत्व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले.

राष्ट्रीय काँग्रेसच्या प्रारंभिक चार दशकांच्या काळात विचारसरणीनुसर मवाळवादी व जहालवादी असे दोन कालखंड समजले जातात. उदारमतवादी ना. गोखले व जहालवादी लो. टिळक या दोन्ही महाराष्ट्रीय नेत्यांनी या दोन्ही कालखंडांचे नेतृत्व समर्थपणे केले. या दोन्ही राष्ट्रीय नेत्यांमध्ये जे ज्वलंत मतभेद होते ते साधनांच्या बाबतीत. नामदार गोखले व लोकमान्य टिळक यांच्या आपापल्या विचारसरणीची व मार्गाची वेगळी वैशिष्ट्ये आहेत; त्यांचा आपण स्वतंत्रपणे विचार करणार आहोत.

## अ) ना. गोपाळकृष्ण गोखले नेतृत्वाखालील काँग्रेस –

भारतीय जनमानसात 'नामदार गोखले' या नावाने प्रसिद्ध असलेल्या गोपाळकृष्ण गोखले यांचा जन्म १८६६ मध्ये कोल्हापूर जिल्ह्यात कोतळूक येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. सरकारी नोकरीची मळलेली पायवाट सोडून गोखले यांनी समाजसेवेचे व्रत घेतले व घेतलेला हा वसा कधीच टाकून दिला नाही. कोल्हापूर येथील राजाराम कॉलेज व मुंबईतील एलफिन्स्टन कॉलेज येथे त्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले. १८८५ त्यांनी न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाचे काम स्वीकारून राष्ट्रीय चळवळीतील कार्याला सुरुवात केली. फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य म्हणून ते निवृत्त झाले. डेक्कन एज्युकेशन सोसायटीत काम करताना त्यांचा सार्वजनिक सभा आणि पुढे आगरकरांच्या 'सुधारक'चे सहसंपादक म्हणून संबंध आला.

न्या. रानडे हे गोखल्यांचे गुरू होते. राष्ट्रीय सभेच्या कार्यात १८८९ पासून ते सक्रीय झाले. इ. स. १९०५ मध्ये वाराणसी येथे भरलेल्या राष्ट्रीय काँग्रेसचे ते अध्यक्ष होते. यावेळी केलेल्या भाषणात त्यांनी 'वसाहतीचे राज्य' हे काँग्रेसचे ध्येय असल्याचे घोषित केले.

## मवाळवादी विचारसरणी –

नेमस्त पुढारी या नात्याने गोखले सुधारणांचा व राजकीय अधिकारांचा सातत्याने पाठपुरावा करीत, मात्र हे सर्व क्रमाने मिळावे असे त्यांचे मत होते. देशकार्यासाठी उत्साही तरुणांची पिढी

निर्माण करावी म्हणून त्यांनी १९०५ मध्ये पुणे येथे 'भारत सेवक समाजाची' स्थापना केली. ब्रिटिशांच्या न्याय बुद्धीवर त्यांचा विश्वास होता.

प्रारंभीची राष्ट्रीय सभा ही पूर्णत: मवाळपंथीय होती, मवाळवादी नेत्यांमध्ये विशेषत: दादाभाई नौरोजी, फिरोजशहा मेहता, दिनशॉ वाच्छा, न्या. रानडे, सुरेंद्रनाथ बॅनर्जी व गोपाळकृष्ण गोखले इ. प्रमुख नेत्यांचा समावेश होता. या काळातील नेते ब्रिटिशांच्या उदारमतवादाने प्रभावित झालेले होते. त्यामुळे ब्रिटिश लोकशाही, न्याय यावर विश्वास ठेवून अर्ज विनत्यांचा मार्ग त्यांनी स्वीकारला. राष्ट्रीय सभेचे या काळातील कार्य शांततेने व कायद्याच्या कक्षेत राहून चालले होते.

ब्रिटिश सरकारची मर्जी सांभाळून, मिळते-जुळते धोरण स्वीकारून शक्य तितक्या यथायोग्य मागण्या आपल्या पदरात पाडून घेण्याचा प्रयत्न कॉंग्रेसचा होता. या कालखंडातील कॉंग्रेसच्या चळवळीची मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे होती -

१. क्रमश: सुधारणा घडवून आणण्याच्या तत्त्वावर विश्वास ठेवणे.

२. सनदशीर मार्गाचा अवलंब करून आपल्या मागण्या ब्रिटिश सरकारसमोर व घटनात्मक चौकटीत त्या मान्य करून घेणे.

३. ब्रिटिशांच्या न्यायबुद्धीवर विश्वास ठेवणे.

४. ब्रिटिशांशी असलेले संबंध अधिकाधिक दृढ करून भारताचे आधुनिकीकरण घडवून आणणे.

५. देशाच्या प्रगतीसाठी प्रयत्न करीत असताना ब्रिटिश राज्याशी एकनिष्ठ राहणे.

''ब्रिटिशांप्रति मवाळवाद्यांना विश्वास वाटत होता, त्यांच्या लोकशाही शासनप्रणालीबद्दल त्यांना आदर होता. ब्रिटिश राजसत्तेप्रति अविचल निष्ठा आणि ब्रिटिश साम्राज्याशी अतूट संबंध या दोन तत्त्वांवर ही तत्त्वप्रणाली आधारलेली होती.

असाध्य ध्येय समोर ठेवण्यापेक्षा हळूहळू वाटाघाटींनी एक-एक मागणी पूर्ण करून घेणे. सनदशीर मार्गाने भारताची प्रगती घडवून आणणे. ब्रिटिशांच्या सहकार्याने आधुनिक भारताची वाटचाल व्हावी असे त्यांना वाटत होते. या विचारसरणीलाच मवाळवादी किंवा नेमस्त विचारसणी असे नाव पडले.''

## कार्य –

राष्ट्रीय कॉंग्रेसच्या आरंभीच्या काळातील मवाळवादी नेतृत्व राज्यकर्त्यांना जवळचे असले तरी त्यांची राष्ट्रनिष्ठा प्रबळ होती. मवाळवादी राजकारण हा भारताच्या राष्ट्रीय आंदोलनातील पहिला टप्पा होता. प्रारंभीच्या काळात राष्ट्रीय सभेने ज्या मार्गाचा अवलंब केला, त्यामुळे ती नेमस्त मानली जाऊ लागली. कोणत्याही प्रकारे देशाच्या स्वातंत्र्याचे ध्येय स्पष्टपणे समोर न ठेवता शासनात जास्तीत जास्त सहभाग, अन्याय्य कर रद्द करणे, अधिक सुधारणा अशीच ध्येये राष्ट्रीय सभेसमोर होती. तसे ठराव अधिवेशनात संमत होऊन त्यावर आधारित मागणीपत्र तयार करून ते व्हाईसरॉयकडे पाठवले जाई. या मागणी पत्राचे स्वरूप पूर्णत: विनंती अर्जासारखे असे.

सारांशरूपाने मवाळांच्या कार्याचे स्वरूप पुढीलप्रमाणे होते -

१) भारत व इंग्लंडमधील जनमत जागृत करून सरकारवर त्याचे दडपण आणणे.

२) राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नांवर वार्षिक अधिवेशनात चर्चा करून तसा ठराव संमत करणे.

३) संबंधित ठराव व अन्य मागण्या सरकारला सादर करणे.

४) सरकारला पाठविलेल्या निवेदनांना वृत्तपत्रांमधून प्रसिद्धी देणे.

५) भिन्न प्रांतांत सभा व बैठका घेऊन वार्षिक अधिवेशनातील ठरावांवर चर्चा करणे.

६) भारतीय समस्यांचा आकडेवारीच्या मदतीने अभ्यास करून त्यातून निघालेले शास्त्रशुद्ध निष्कर्ष सरकारपुढे मांडणे.

७) भारताविषयी सहानुभूती असलेल्या ब्रिटिश मुत्सद्यांशी, अधिकाऱ्यांशी व पार्लमेंट सदस्यांशी संपर्क ठेवून त्यांच्यामार्फत भारताच्या प्रश्नांवर ब्रिटिश संसदेचे लक्ष केंद्रित करणे.

या सनदशीर मार्गाबाबत गोपाळ कृष्ण गोखले म्हणतात -

''आम्ही काही भिकारी नाहीत, परकीय सरकारच्या दरबारात आम्ही आमच्या देशातील जनतेचे राजदूत असून आमच्या देशाच्या हितसंबंधांचे रक्षण जागरूकतेने करणे आणि देशासाठी शक्य ते पदरात पाडून घेणे हे आमचे कर्तव्य आहे.''

## वेल्बी कमिशनसमोर गोखल्यांची साक्ष –

अर्थ व राजनीतीचे पाठ गोखल्यांनी आपले गुरू रानडेंकडून घेतले होते. राष्ट्रीय सभेच्या कार्यात गोखले १८८९ पासून सक्रिय सहभागी झाले. १८९५ मध्ये ते राष्ट्रीय सभेचे सचिव बनले. १८८३ ते १८९६ या काळात भारताची आर्थिक स्थिती फारच खालावली होती. रुपयाचा भाव उतरला होता. त्यामुळे भारत सरकारला इंग्लंडमध्ये पाठवाव्या लागणाऱ्या रकमेत साडे, नऊ कोटी रुपयांची वाढ झाली होती. प्रथम मिळकतीवर आणि पुढे एक-दोन वर्षांत मिठावर जबरदस्त कर आकारण्यात आला. या करबोजामुळे लोक चिडले होते. या अडचणीतून मार्ग कसा काढायचा यावर विचार करण्यासाठी ब्रिटिश पार्लमेंटने लॉर्ड बेल्बी यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. या कमिशनपुढे साक्ष देण्यासाठी गोखले इंग्लंडला गेले. काँग्रेसच्या माध्यमातून इंग्लंडमध्ये गेलेले गोखले हे भारताचे पहिले लोक, प्रतिनिधी होत.

नामदार गोखले यावेळी फक्त तीस वर्षांचे होते, त्यांनी भारताचे दारिद्र्य, आर्थिक सुधारणांची गरज याबाबतीत आपली साक्ष अत्यंत प्रभावीपणे मांडली, ते म्हणतात -

''हिंदुस्थानात कर देणाऱ्या लोकांचा तिजोरीवर हक्क नाही. देशाच्या उत्पन्नाची वाटणी करताना हिंदी जनतेचे हितसंबंध जराही पाहिले जात नाहीत. कित्येक रकमा तर अशा पद्धतीने खर्च केलेल्या असतात, की त्यांचा फायदा जनतेस काहीच नसतो.

''ब्रिटिश राज्यविस्ताराचा खर्च हिंदुस्थानवरच लादला जात आहे. शांतता काळातही युरोपियन लष्कराच्या खर्चाचा भार येथील जनतेकडूनच वसूल केला जात आहे. वरिष्ठ लष्करी आणि मुलकी जागांवर हिंदी लोकांच्या नेमणुका नसल्याने त्यांना काही अधिकार नाहीत. त्यामुळे तेही काही करू शकत नाहीत आणि येथील परतंत्र जनतेला आपल्याला काही हक्क नसल्याची हरघडी तीव्र जाणीव होत आहे.''

नेमस्त पुढारी या नात्याने त्यांनी सुधारणा व राजकीय सुधारणांचा सतत आग्रह धरला. इंग्लडमधील आपल्या पन्नास दिवसांच्या मुक्कामात ना. गोखल्यांनी पंचेचाळीस जाहीर व्याख्याने दिली. त्यात भारताच्या हलाखीचे, दारिद्र्याचे, अज्ञानाचे व सरकारच्या दडपशाहीचे चित्र त्यांनी ब्रिटिश जनतेसमोर ठेवले. १९०२ ते १९१२ या कालखंडात गोखल्यांनी राजकीय, आर्थिक, विषयांबरोबरच लष्करी खर्च, शिक्षण इ. बाबत तसेच शेतकऱ्यांबाबत महत्त्वाचे कार्य केले. ना. गोखल्यांच्या अभ्यासपूर्ण भाषणाचे कौतुक लॉर्ड मिंटी याने असे केले की, इतके अभ्यासपूर्ण भाषण ब्रिटिश

पार्लमेंटमध्येही क्वचितच ऐकायला मिळते?

## बनारस काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून कार्य –

१९०५ या वर्षी लॉर्ड कर्झन याने बंगालची फाळणी केली; या घटनेचे तीव्र पडसाद उमटले. मूळत: गोखले मृदू स्वभावाचे असूनही बंगालच्या फाळणीने ते संतप्त झाले व ही फाळणी करणाऱ्या लॉर्ड कर्झनला त्यांनी औरंगजेबाची उपमा दिली. तसेच इंग्लडमध्ये राहून भारताबद्दल तेथील जनमत जागृत करून गोखले भारतात परतले तेव्हा तीव्र स्वरूपाचे राजकीय मतभेद असूनही लो. टिळकांनी पुण्यात एक जाहीर सभा भरवून ना. गोखल्यांचा ब्रिटिशविरोधी भूमिका घेतल्याबद्दल जाहीर सत्कार केला, एवढेच नव्हे तर 'केसरी' व 'मराठा'च्या अंकासोबत ना. गोखलेंचा एक फोटोही जनतेला वाटला. तसेच टिळकांशी मतभेद असूनही ना. गोखलेंनी जहालवाद्यांच्या स्वदेशी व बहिष्काराच्या तत्त्वांना मान्यता दिली.

इ. स. १९०५ च्या डिसेंबरमध्ये उत्तर प्रदेशात वाराणसी (बनारस) येथे काँग्रेसचे २१ वे अधिवेशन भरले होते. वयाच्या अवघ्या ४० व्या वर्षी गोखले काँग्रेसचे अध्यक्ष बनले होते. दक्षिण अफ्रिकेत गौरवर्णीयांकडून भारतीयांवर अत्याचार होत होते त्याविरूद्ध म. गांधींनी जी चळवळ चालवली होती त्यास गोखल्यांनी पाठिंबा दिला एवढेच नव्हे तर १९१२ मध्ये दक्षिण अफ्रिकेचा स्वत: दौराही केला व तेथे होणाऱ्या भारतीयांवरील अत्याचाराची कल्पना सरकारला दिली.

सरकारचे अंदाजपत्रक महागाई, तसेच लष्करीकरण यावर त्यांनी काँग्रेसचे अध्यक्ष या नात्याने कोरडे ओढले. बनारस येथील अधिवेशनात अध्यक्षपदावरून बोलताना ना. गोखले म्हणतात -

''या वेळेइतकी अस्वस्थ, असंतुष्ट व निर्वाणीची परिस्थिती देशात पूर्वी कधीही नव्हती, तिच्या काँग्रेसच्या सौम्य मागण्यांची इतकी चेष्टा व हेटाळणी कधीही झाली नव्हती, तिच्या उच्च आकांक्षा कस्पटासमान पूर्वी मानल्या गेल्या नव्हत्या. पण हे सर्व लॉर्ड कर्झन यांच्या कारकिर्दीत झाले.

बंगालची फाळणी हा क्रूरपणाचा कळस आहे. भारतीय जनतेची अशीच मानखंडना सरकार करणार असेल, तर त्याला विरोध करण्याचा एकच मार्ग मला सुचतो - तो म्हणजे या नोकरशहाशी पूर्ण असहकार !''

ना. गोखल्यांसारख्या नेमस्त पुढाऱ्याने अशी सरकारशी असहकार करण्याची जहाल भाषा वापरतात यावरून तत्कालीन परिस्थितीची कल्पना येते. १९०५ च्या बनारस अधिवेशनात तर जमलेले सर्व प्रतिनिधी उत्स्फूर्तपणे उभे राहिले आणि त्यांनी सामूहिकरित्या 'वंदेमातरम्' या गीताचे गायन केले.

## नामदार गोखलेंच्या सरकारला सूचना –

ब्रिटिश राजवटीत कायदेमंडळासारखे लोकप्रिय माध्यम भारतीयांना आपल्या आशा-आकांक्षांचे केंद्रस्थान बनविण्यास मदत झाली. शासकीय माध्यमाचा वापर सनदशीर मार्गाने ना. गोखलेंनी केला. आपल्या कायदेमंडळातील भाषणांमधून ना. गोखलेंनी विविध विषयांवर पुढील सूचना केल्या -

१) सक्तीचे व मोफत प्राथमिक शिक्षण सर्व भारतीयांकरीता असावे असा ठरावच कायदेमंडळात मांडला.

२) स्थानिक स्वराज्य संस्थांना शिक्षण प्रसारासाठी केंद्र व प्रांतिक सरकारांनी अनुदान द्यावे.

३) शेतकऱ्यांवरील सारा कमी करावा, कर्ज कमी करावे.

४) शेतीच्या विकासासाठी कृषी बँकांची स्थापना करावी.

५) परदेशातून शेतीतज्ज्ञ येथे आणण्याऐवजी हुशार हिंदी विद्यार्थी परदेशात शेतीच्या शिक्षणासाठी पाठवावेत.

६) ना. गोखलेंनी कृषी, बरोबरच औद्योगिकीकरणावर भर दिला.

## भारत सेवक समाजाची स्थापना –

ना. गोखल्यांच्या विचारांमधून आदर्शवाद डोकावतो. १९०४-०५ च्या जपान रशिया युद्धात जपानच्या विजयाची बातमी गोखल्यांनी 'भारत सेवक समाज' या संघटनेची स्थापना करण्यासाठी प्रेरणास्थान वाटली. १२ जून १९०५ रोजी त्यांनी आपल्या मनातील विचार प्रत्यक्षात आणला व भारत सेवक समाज या संघटनेची स्थापना केली. या संघटनेची उद्दिष्टे ते सांगतात -

१) लोकांमध्ये देशभक्ती उत्पन्न करून स्वार्थत्यागाची शिकवण देणे.

२) जनतेस राजकीय शिक्षण देणे.

३) लोकमत तयार करून समाजात चळवळ करणे.

४) निरनिराळ्या जाती धर्मांतील विरोध नष्ट करून सलोखा व प्रेमभावना निर्माण करणे.

५) मागासलेल्या मंडळींत शिक्षणाचा प्रसार करणे.

६) पूर्वास्पृश्यांची सर्वांगीण सुधारणा करणे.

भारत सेवक समाजांचा स्वयंसेवक हा विधायक, शिस्तबद्ध आणि शास्त्रशुद्ध सेवाकार्य करणारा असा गोखल्यांना अपेक्षित होता. ते म्हणतात,

''एखादे धर्मकृत्य करावयाचे झाल्यास ज्या चैतन्याने माणसे त्या कामास पुढे सरसावतात, त्याच चैतन्याने या ऐहिक देशकार्याच्याही कामी आपल्या देशबांधवांपैकी पुरेशा संख्येने तरुण मंडळींनी पुढे सरसावले पाहिजे, ही एक आवश्यक गोष्ट आहे. सार्वजनिक जीवनाचे अध्यात्मीकरण होणे जरूर आहे. सर्वांची अंत:करणे देशप्रेमाने इतकी ओतप्रोत भरली पाहिजेत, की त्याच्यापुढे बाकी सर्व गोष्टी अगदी तुच्छ भासल्या पाहिजेत. मायभूमीसाठी यज्ञ करावयाची जी जी वेळ येईल, त्या त्या प्रत्येकवेळी आनंदच आनंद मानणारा जिव्हाळ्याचा देशाभिमान, अडचणीने किंवा संकटानेदेखील स्वत:च्या ध्येयापासून यत्किंचितही माघार न घेणारे अंत:करण ईश्वरी इच्छामात्रावरील असा सखोल विश्वास, की जो कशानेही डगमगणार नाही. या अशा गुणांनी सज्ज असणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपल्या जीवनकार्यास आरंभ करून स्वदेशाच्या सेवेत स्वत:ला झिजविण्यात आनंद मानला पाहिजे.''

भारत सेवक समाजाच्या शाखा मुंबई, नागपूर, मद्रास आणि अलाहाबाद येथे स्थापन करण्यात आल्या.

## मवाळ काँग्रेसच्या प्रमुख मागण्या –

इ. स. १८८५ ते १९०५ या कालखंडात काँग्रेसची जी वार्षिक अधिवेशने भरली, त्यात अनेक ठराव संमत करण्यात आले. या विविध ठरावांद्वारे राष्ट्रीय सभेने सरकारकडे वेगवेगळ्या मागण्या सादर केल्या, त्या सारांश रूपाने पुढीलप्रमाणे होत्या -

१) गव्हर्नरच्या मंडळात वाढ व्हावी.

२) गव्हर्नरच्या मंडळात हिंदी सदस्य नियुक्त करावेत.

३) भारतमंत्री व त्याचे मंडळ बरखास्त करावे.

४) लष्करी खर्च कमी करून लष्करात हिंदी अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या कराव्यात.

५) हिंदुस्थानातील कापड उद्योगांचे पुनरुज्जीवन करावे, नवीन उद्योग काढून बेकारी निर्मूलन करावे.

६) न्यायसंस्था सरकारच्या प्रभावातून मुक्त करावी व तिची स्वायत्तता राखली जावी.

७) हिंदुस्थानच्या बाहेर जे हिंदी लोक वास्तव्यास आहेत त्यांच्या हितसंबंधांचे रक्षण करावे.

८) आय.सी.एस.ची परीक्षा भारतातही व्हावी.

९) वृत्तपत्रांना अधिक स्वातंत्र्य द्यावे.

१०) शेतकऱ्यांना किमान दरात कर्ज देणाऱ्या बँका स्थापन कराव्यात.

११) दारूबंदीचे धोरण मान्य करावे.

१२) मिठावरील कर कमी करावा.

१३) 'इंडिया कौंसिल' रद्द करावे.

१४) जमीनदारांकडून रयतेवर होणाऱ्या अत्याचारांपासून रयतेचे रक्षण करावे.

१५) कायदेमंडळावर भारतीयांना योग्य प्रतिनिधीत्व द्यावे.

उपरोक्त मागण्या या प्रातिनिधीक आहेत. हिंदी लोकांवर अन्याय होऊ नये, सरकारने लोककल्याण करावे, शिक्षण, राजकारण व प्रशासनात भारतीयांना संधी मिळावी असे या मागण्यांचे स्वरूप होते. यात काँग्रेसने कुठेही ब्रिटिशांना विरोध केला नाही अथवा ब्रिटिशांची सत्ता उलथवून स्वातंत्र्य मिळविण्याची भाषा केली नाही. याचे कारण हा कालखंड म्हणजे काँग्रेसचा बाल्यावस्थेचा काळ होता. काँग्रेसने प्रारंभीच तीव्र विरोध केला असता तर कदाचित सरकारने ही संघटनाच मोडीत काढली असती, असे नेमस्तांना वाटत होते.

## नेमस्त राजकारणाचे महत्त्व –

राष्ट्रीय सभेच्या कार्यावर प्रारंभीच्या काळात नेमस्त, मवाळवादी नेत्यांचा प्रभाव होता. ब्रिटिश उदारमतवादाने प्रभावित झालेल्या नेमस्त नेत्यांनी सनदशीर व शांततामय मार्गाने राजकीय अधिकार मिळविण्याचा प्रयत्न केला; कारण राष्ट्रीय सभेचा उगमच मूळतः सरकारच्या सहाय्यभूत धोरणातून झाला होता. या कालखंडात राष्ट्रीय काँग्रेसने भारतीय जनतेत उत्साह निर्माण केला व राष्ट्रवादाचा विकास घडवून आणला.

राष्ट्रीय काँग्रेसमधील नेमस्तांनी केलेल्या कार्याचे वर्णन गोपाळकृष्ण पुढीलप्रमाणे करतात -

''आजपर्यंत नेमस्त रीतीने केलेल्या राजकीय चळवळीमुळे भारत हे एक राष्ट्र असून येथील जनता मुक्त होण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करीत आहे, ही गोष्ट आता सर्वांना सुपरिचित झाली आहे. राष्ट्रीय पातळीवर लोकमत तयार झाले आहे; वेगवेगळ्या प्रांतांमध्ये निकटचे भावबंध निर्माण झाले असून, त्यांच्यात ऐक्य साधलेले आहे. आपल्या समान उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या आड जातिधर्माचे आणि विचारांचे भेद कमी होऊ लागले आहेत.

''आपल्या राष्ट्राच्या अस्तित्वाची आणि प्रतिष्ठेची जाणीव समाजाच्या सर्व थरात निर्माण झाली आहे.... आणि या सर्वांपेक्षाही अधिक महत्त्वाचे म्हणजे आपल्यासमोरील ज्या नवीन धेयाच्या पूर्ततेसाठी आपल्याला प्रयत्न करावयाचे आहेत, त्या ध्येयाच्या स्वरूपाचे आकलन आता लोकांना झाले आहे. त्याचप्रमाणे यासाठी किती तीव्र संघर्ष आणि किती प्रचंड त्याग करावा लागेल. याचीही कल्पना लोकांना येऊ लागली आहे.''

## ब) लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखालील काँग्रेस –

**जहालवादी कालखंड (१९०५ – १९२०)**

भारतीय राष्ट्रीय चळवळीचे १९०५ - १९२० या कालखंडातील म्हणजे दुसऱ्या टप्प्यातील नेतृत्व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी केले. त्यांच्या जहाल विचारांमुळे या कालखंडास जहालवादी कालखंड असे म्हटले जाते. त्यांच्या जहाल लेखनीमुळे व वाणीमुळे राष्ट्रीय काँग्रेसमधील 'विनंती पर्व' संपून 'चळवळ पर्व' सुरू झाले. राष्ट्रीय सभेचे नेमस्त नेते राजनिष्ठा, फायदा व शांतता या चौकटीबाहेर पडू इच्छित नव्हते तर टिळकांच्या मते ब्रिटिश सरकारच्या विरोधात जनजागृतीची गरज भासत होती. या विचारसरणीतून जहालवादाचा उदय झाला. लाल-बाल-पाल यांच्या नेतृत्वाने या कालखंडातील राजकारणाला दिशा दिली.

**लोकमान्य बाळ गंगाधर टिळक – (१८५६ – १९२०)**

महाराष्ट्रात रत्नागिरी येथे २३ जुलै १८५६ रोजी लोकमान्यांचा जन्म झाला; एक शिक्षक म्हणून त्यांनी 'न्यू इंग्लिश स्कूल'च्या माध्यमातून आपल्या सार्वजनिक कार्याला प्रारंभ केला. 'डेक्कन एज्युकेशन सोसायटीची' स्थापना करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता.

राष्ट्रीय चळवळ लोकांपर्यंत नेण्यासाठी त्यांनी 'केसरी' व 'मराठा' ही वृत्तपत्रे चालविली. जनजागृतीशिवाय स्वराज्य मिळविणे कठीण आहे याची त्यांना जाणीव होती म्हणून त्यांनी शिवजयंती (१८९५) व गणेश उत्सव (१८९३) सुरू करून सामान्य जनतेला राष्ट्रीय प्रवाहात आणले. आपल्या विचारांतून त्यांनी लढाऊ राष्ट्रवाद निर्माण केला. ब्रिटिश अधिकारी रँडच्या वधाचे नैतिक समर्थन केल्याबद्दल टिळकांना १८ महिन्यांची कारावासाची शिक्षा देण्यात आली. सरकारच्या मते हा राजद्रोह होता. अशा प्रकारची राजद्रोहाची शिक्षा भोगणारे टिळक हे पहिले राजकीय पुढारी होते.

लोकमान्य टिळकांना 'भारतीय असंतोषाचे जनक' असे म्हणतात. टिळक केवळ राजकीय नेतेच नव्हते तर एक लेखक, गणितज्ज्ञ व भाषातज्ज्ञही होते. गीता रहस्य, ओरायन, आर्क्टिक होम इन वेदाज हे त्यांचे प्रसिद्ध ग्रंथ होत. इ.स. १९०५ पासून लोकमान्यांच्या नेतृत्वामुळे राष्ट्रीय चळवळीत जहालवाद निर्माण झाला तसेच स्वातंत्र्य आंदोलनाने कात टाकून मोठी झेप घेतली. टिळकांच्या या महान कार्यामुळेच त्यांना लोकमान्य, तेल्यातांबोळ्यांचे पुढारी, असंतोषाचे जनक, टिळक महाराज असे संबोधले जाते.

**जहालवादाच्या उदयाची कारणे –**

१९ व्या शतकाच्या शेवटी राष्ट्रीय सभेत तरुण नेतृत्व उदयास आले, यावेळी राष्ट्रीय सभेची पूर्ण सूत्रे मवाळवादी नेत्यांकडे होती. नेमस्त नेतृत्वामध्ये कृतिशीलतेचा अभाव होता. त्यामुळे राष्ट्रीय सभेच्या ध्येयधोरणावर उघडपणे टीका तरुण नेतृत्व करू लागले. यामध्ये लोकमान्य आघाडीवर होते.

स्वातंत्र्य ही मागून मिळणारी गोष्ट नव्हे, भारताचे शोषण करणाऱ्या ब्रिटिश सत्तेकडून स्वातंत्र्याची अपेक्षा करणे गैर आहे असे टिळकांचे मत होते. अर्ज विनंत्यांपेक्षा प्रत्यक्ष कृती व आंदोलनाच्या मार्गावर त्यांचा विश्वास होता. मवाळांच्या राजकारणाला सरकारचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नसेल तर दरवर्षी फक्त अधिवेशने भरविण्यात अर्थ नाही, असे नव्या गटाला वाटू लागले. आपण कायद्याच्या बाहेर पाऊल टाकता कामा नये, असे गोखले यांचे मत होते. टिळकांनी याबाबत आपले मत मांडले ते असे-

''अधिकाऱ्यांनी कायदेशीरपणाने लोकांची डोकी फोडली, म्हणून लोकांनी हा कायदेशीर छळ

निमूटपणे सोसावयाचा, की कसे? जुलूम तो जुलूम, मग तो कायदेशीर असो किंवा बेकायदेशीर असो. कायदेशीर जुलूम असला, तर शांततेने व हाल सोसण्याच्या दृढनिश्चयाने त्याचा प्रतिकार केला पाहिजे. तो बेकायदेशीर असला, तर बेकायदेशरी रीतीने त्याचा प्रतिकार केला पाहिजे. काहींच्या हालअपेष्टा झाल्या, तर हरकत नाही; पण काळ सोकावू देता कामा नये.''

लो. टिळक फक्त सैद्धांतिक नव्हते, व्यवहारी, राजकारणी होते. राजकारणात लोकांना उतरवावयाचे, लोकशक्ती संघटित करावयाची, आंदोलनाच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळवायचे, लोकांमधील ब्रिटिश राजवटीबाबतचा असंतोष जागा करावयाचा, जेव्हा लोकच परकीय राजवटीविरुद्ध आवाज उठवतील; तेव्हा इथे इंग्रजांना राज्य करणे अवघड होऊन बसेल. हा टिळकांचा विचार होता, डावपेच होते. लाल-बाल-पाल या नेतृत्वामुळे जहालवादाची पार्श्वभूमी तयार झाली; या जहालवादाच्या उदयाची प्रमुख कारणे -

१) मवाळवादी मार्गाला आलेले मर्यादित यश.

२) आर्थिक शोषणाबद्दल झालेली जागृती.

३) असंतुष्ट भारतीय सुशिक्षित वर्ग.

४) ब्रिटिश शासनाप्रति जनतेत वाढलेला असंतोष.

५) आंतरराष्ट्रीय घटनांचा प्रभाव.

६) लॉर्ड कर्झनचे नेतृत्व.

७) ब्रिटिश सरकारची भारतीयांबद्दलची उदासिनता.

८) लाल-बाल-पाल यांचे नेतृत्व.

याशिवाय केसरी, मराठा या वृत्तपत्रांमधून केलेले लेखन जहालवादास पूरक ठरले. उदा. 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' 'राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे' किंवा 'उजाडले पण सूर्य कोठे आहे?' यासारखे अग्रलेख तरुणांच्या डोळ्यात अंजन घालण्याचे कार्य करीत. तसेच ''स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच'' ही त्यांची प्रसिद्ध गर्जना सर्वांनाच प्रेरणादायी होती.

**जहालवादी तत्त्वज्ञान –**

ज्या काळात 'स्वराज्य' असा शब्दोच्चार करणेसुद्धा राजद्रोह मानले जाई त्या काळात 'स्वराज्य माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळविणारच' अशी गर्जना करण्याचे धाडस टिळकांनी दाखविले. टिळकांनी जनतेला आंदोलनाचा मंत्र दिला व स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण हा चतु:सूत्री कार्यक्रम दिला. लाल-बाल-पाल, अरविंद घोष यांच्या विचारांतून जहाल राष्ट्रवादाची बैठक तयार झाली. त्यांनी मांडलेल्या कृतिशील विचारांना 'जहालवाद' असे नाव मिळाले.

जहालवादाचा निश्चित अर्थ समजण्यासाठी श्री. पट्टाभिसितारामय्या यांनी जहाल व मवाळ यांच्यातील फरक पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे -

''गोखले यांना, आहे त्या शासनयंत्रणेत सुधारणा पाहिजे होत्या तर टिळकांना शासनाची पुनर्बांधणी करावयाची होती... ब्रिटिश नोकरशाहीशी सहकार्य करणे गोखल्यांना आवश्यक वाटत होते, तर या नोकरशाहीशी दोन हात करणे आवश्यक अशी टिळकांची धारणा होती.

शक्य असेल तेथे ब्रिटिशांना सहकार्य द्यावे व आवश्यक असेल तेथे फक्त विरोध करावा असे

गोखल्यांना वाटत होते, तर टिळक प्रत्येक ठिकाणी ब्रिटिशांची वाट अडवायला अस्तन्या सावरून बसलेले !

परकीय पाहुण्यांची मने जिंकण्यात गोखले गुंतलेले तर त्यांना हाकलून लावण्याची टिळकांना घाई झालेली. काही बुद्धिमान मंडळी गोखल्यांचा आधार तर लाखोंचा अफाट जनसागर हे टिळकांचे बळ.''

**जहाल राष्ट्रवादाची वैचारिक बैठक खालीलप्रमाणे होती –**

१) कोणतीही साम्राज्यवादी सत्ता कल्याणकारी असू शकत नाही, त्यामुळे भारतीयांनी ब्रिटिश सत्तेवरही विश्वास ठेवू नये.

२) राष्ट्रीय सभेची चळवळ परिणामकारी होण्यासाठी बहुजनसमाज त्यात सामील होणे अत्यावश्यक आहे.

३) काँग्रेसच्या फक्त वार्षिक अधिवेशनांपेक्षा लोकसंग्रह, लोकजागृती व लोकसंघटन महत्त्वाचे आहे.

४) राष्ट्रीय चळवळीला गतिमान करण्यासाठी लोकांमध्ये राष्ट्राभिमान निर्माण करणे गरजेचे आहे.

५) राष्ट्रीयत्वाची भावना रुजविणारा अभ्यासक्रम स्वीकारावा, सरकारी मदतीपेक्षा स्वत:च्या शिक्षण संस्था काढाव्यात.

६) राष्ट्र ही मातृदेवता असून तिच्या पायातील शृंखला तोडून तिला मुक्त करणे हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे.

७) समाज जागृतीसाठी स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार या चतु:सूत्रीचा वापर करावा.

८) राष्ट्रवाद भिक्षावृत्तीवर पोसला जात नाही. साम्राज्यवादामुळे निर्माण झालेली मानसिक गुलामगिरी नष्ट झाली पाहिजे.

९) राष्ट्रवाद हा केवळ राजकीय कार्यक्रम नाही; तो ईश्वरप्रणित धर्म आहे. राष्ट्रवाद अमर असून तो मानवीय वस्तू नव्हे.

१०) 'आधी स्वराज्य मगच सुधारणा' अशी विचार पद्धती जहालवाद्यांची होती.

आपल्या विचारसरणीमध्ये 'स्वदेशी'चा आग्रह त्यांनी धरला. स्वदेशीचीच दुसरी बाजू म्हणजे बहिष्कार होय. स्वदेशीचा पुरस्कार करण्यामागे ब्रिटिशांची अर्थव्यवस्था कोलमडून टाकण्याचा टिळकांचा विश्वास होता.

**जहालवादी गटाच्या कार्याचे स्वरूप –**

जहालवादी गटाच्या चळवळीस लाल-बाल-पाल यांचे नेतृत्व मिळाल्यामुळे राष्ट्रीय आंदोलनास देशभर गती मिळाली. जनजागृती होऊन भारतीय जनतेत मोठ्या प्रमाणात असंतोष निर्माण झाला. टिळकांच्या 'केसरी'तून प्रसिद्ध होणाऱ्या लेखांनी सरकारमध्येही अस्वस्थता पसरली, अशाच एका लेखात टिळक म्हणतात,

''जागृतीची क्रिया बंद पाडण्यासाठी वर्तमानपत्रांचा नवा कायदा सरकारने पास केला आहे; त्यामुळे निराशेचे स्वरूप अधिक भयंकर होऊन विचारी व शांत स्वभावाच्या लोकांनाही माथेफिरू, निर्माण होण्याचा संभव आहे. बाँबगोळे नाहीसे करण्यासाठी खरा व टिकाऊ उपाय म्हणजे स्वराज्याचे

महत्त्वाचे हक्क देण्यास आरंभ करणे होय.''

जहाल राष्ट्रवाद्यांची प्रमुख दोन उद्दिष्टे होती -

१) काँग्रेसच्या धोरणाला व कार्यपद्धतीला नवी दिशा देणे.

२) जनतेत राजकीय जागृती निर्माण करून त्यांना कार्यप्रवण बनविणे.

या उद्दिष्टांवर आधारित लोकमान्य टिळकांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसने केलेल्या कार्याचे स्वरूप सारांशरूपाने पुढीलप्रमाणे होते -

१) स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण इ. च्या मार्गाने राष्ट्रीय चळवळ तीव्र करणे.

२) पाश्चात्त्य शाळा-महाविद्यालयांऐवजी भारतीयांनी स्वत:च्या शिक्षण संस्था स्थापन करून जनतेस राष्ट्रीय शिक्षण द्यावे.

३) वृत्तपत्रांच्या माध्यमातून जनतेत राष्ट्राभिमान निर्माण करण्याचे कार्य जहालांनी केले.

४) शेतकरी, दुष्काळग्रस्तांना मदत व शोषणाबाबत सामान्यांमध्ये जागृती करणे.

५) लोकजागृतीसाठी शिवजयंती व गणेश उत्सवाची सुरुवात केली, या उत्सवांचा हेतू फक्त धार्मिक नव्हता तर राजकीयही होता.

६) राष्ट्रकार्यासाठी तरुणांना नैतिक शिक्षण दिले तसेच व्यायामशाळांच्या माध्यमातून लाठ्या, तलवारी, मुष्टीयुद्धाचे प्रशिक्षण जाणीवपूर्वक दिले. उदा. अमरावती येथील श्रीहनुमान व्यायाम शाळा.

७) राष्ट्रीयत्वाची भावना रुजविण्यासाठी व्याख्याने आयोजित करणे.

८) 'देशसेवा म्हणजे मातृसेवा' असे प्रतिपादन जहालांनी करून तरुणांच्या संघटना उभारल्या.

९) सरकार करीत असलेल्या आर्थिक शोषणाची माहिती जनतेला देणे.

१०) बंगालच्या फाळणीविरुद्ध जहालांनी देशभर आंदोलन छेडले.

अशा विविध मार्गांनी कार्य करून जहालांनी नेमस्तांचा मार्ग कालबाह्य ठरवून जनतेला आंदोलनाचा नवा मार्ग दिला. राष्ट्रीय आंदोलनात जहालगटाने लढाऊ राष्ट्रवाद आणला. साहजिकच जनतेत चैतन्य निर्माण होऊन राष्ट्रीय सभेवर जहालांचे वर्चस्व वाढले. त्यामुळे लोकमान्य टिळक १९०५ पासून राष्ट्रीय नेते म्हणून प्रसिद्ध झाले. लोकमान्यांनी बहिष्कार या शस्त्राचा अत्यंत प्रभावीपणे वापर केला, ते म्हणतात-

''आमच्याकडे ब्रिटिशांशी लढण्यासाठी शस्त्रे नाहीत. आम्हाला त्याची गरजही नाही. आमच्याकडे बहिष्कार हे शक्तिशाली शस्त्र आहे. बहिष्कार हेच आमचे राजकीय शस्त्र आहे. इंग्रज हे आमच्या साहाय्यावरच राज्यकारभार करीत आहेत. आम्हाला आमच्या स्वराज्याच्या राज्यकारभाराचा ताबा हवा आहे. त्यासाठी बहिष्काराच्या शस्त्राने आपण ब्रिटिशांना नमविले पाहिजे.''

इ.स. १८९६ च्या दुष्काळात टिळकांनी लोकांना 'दुष्काळ निवारण कायद्याची' माहिती दिली. जनतेने निर्भयपणे जगावे असे 'केसरी'तून अवाहन करताना लोकमान्य लिहितात -

'' निव्वळ भीती व संकोच यापायी राणीने देऊ केलेली मदत नाकारून उपासमारीचे बळी होणे यात कुठले शहाणपण? सरकारी कर भरण्यास तुमच्याकडे पुरेसा पैसा असेल तर जरूर कर भरा; परंतु नसेल तर दुय्यम सरकारी अधिकाऱ्यांच्या रोषाला भिऊन तुम्ही घरदार विकून पैसा उभारणार की काय? ऐन मृत्यूच्या जबड्यातदेखील थोडेसे धीट हाता येणार नाही काय?''

दुष्काळ, प्लेग इ. बाबतचे सरकारचे धोरण सहानुभूतिशून्य होते, परिणामी या काळात दहशतवादाकडे तरुण वर्ग वळला होता. टिळकांचा जहालवाद त्यापासून भिन्न होता. मात्र या

दहशतवादामागे टिळकांचेच विचार कारणीभूत आहेत अशी ब्रिटिशांना खात्री होती. शांततामय व अहिंसक मार्गाने ब्रिटिश सत्तेला प्रतिकार करणे लोकमान्यांना अपेक्षित होते. राष्ट्रीय आंदोलनाला जनआंदोलनात रूपांतर करण्याचे श्रेय लोकमान्यांच्या नेतृत्वाला जाते.

**जहालवादी कालखंडातील महत्त्वाच्या घडामोडी –**

बंगालच्या फाळणीपासूनच्या कालखंडास जहालवादी कालखंड आरंभ होतो. लॉर्ड कर्झनच्या अत्यंतिक प्रतिगामी धोरणाची झळ भारतीयांना जशी अधिकाधिक लागू लागली तशी जहाल राष्ट्रवाद्यांच्या प्रचारालाही धार आली. आपल्यावरील राजद्रोहाच्या खटल्यात प्रतिवाद करताना लोकमान्य म्हणतात-

''सरकारला दोष देणे किंवा कारभारात सुधारणा मागणे हा राजद्रोह होऊ शकत नाही. आपल्या देशबांधवांच्या दास्यमुक्तीसाठी, सरकार बदलण्यासाठी, लढा देणे हा प्रत्येकाचा जन्मसिद्ध हक्क आहे.''

इ.स. १८९९ मध्ये व्हाईसरॉय म्हणून आलेल्या लॉर्ड कर्झनमुळे राष्ट्रीय सभा मवाळ विचारसरणीकडून जहालवादाकडे झुकली. कर्झनने केलेल्या बंगालच्या फाळणीमुळे गोपाळ कृष्ण गोखले, सुरेंद्रनाथ बॅनर्जी सारखे मवाळमार्गी नेतेही अवाक झाले. जहालखंडात बंगालची फाळणी, सुरत अधिवेशन, मोर्लेमिंटो सुधारणा, टिळकांना सहा वर्षांची कैद, होमरूल चळवळ, लखनौ करार, माँटफर्ड सुधारणा, पहिले महायुद्ध इ. अत्यंत महत्त्वाच्या घडामोडी घडून आल्या. मुस्लिम लीगची स्थापनाही याच काळात होऊन भारतीय राजकारणाने नवे वळण घेतले. या कालखंडातील प्रमुख घटनांचा आपण थोडक्यात आढावा घेऊ या -

**१) बंगालची फाळणी (१९०५) –**

बंगालची फाळणी हा स्वातंत्र्य चळवळीतील एक महत्त्वाचा टप्पा होय. बंगालच्या फाळणीला विरोध करण्याच्या निमित्ताने बंगालमध्ये व देशभर जी शक्ती दिसून आली, तिचा उपयोग राष्ट्रीय चळवळीसाठी लोकमान्यांनी करून घेतला.

४ जुलै १९०५ रोजी प्रशासकीय कारण पुढे करून बंगालचे विभाजन केले व 'फोडा व राज्य करा' या नीतीचा प्रारंभ इंग्रजांनी केला. टिळकांनी स्वदेशी व बहिष्काराचे आंदोलन सुरू करून फाळणीला विरोध केला. याच काळात 'वंदेमारम्' गीताचे जाहीर गायन सुरू झाले, परकीय मालावर बहिष्कार टाकून त्यांना वाळीत टाकले. या बहिष्काराचा परिणाम इंग्लंडमधील उद्योगावरही झाला. फाळणीविरोधी आंदोलनाने देशात एक नवी चेतना निर्माण केली. आपल्यावरील अन्याय दूर करण्यासाठी अर्ज-विनंत्यांचा मार्ग योग्य नसून त्यासाठी कृती व संघटनेची गरज आहे याची जाणीव जहालवादी तत्वज्ञानाने करून दिली.

**२) सुरत अधिवेशन (१९०७) –**

बंगालच्या फाळणीनंतर जहाल-मवाळ यांच्यातील दरी वाढत जाऊन त्याचे पर्यवसान १९०७ च्या सूरत येथील अधिवेशनात काँग्रेसच्या विभाजनात झाले.

१९०७ चे अधिवेशन नागपूरला घ्यावे असे जहालवाद्यांना वाटत होते. परंतु तसे झाल्यास तेथे टिळकांना समर्थन मिळेल म्हणून मवाळ नेत्यांनी हे अधिवेशन सूरत येथे घेण्याचे ठरविले. या अधिवेशनाचे अध्यक्षपद रासबिहारी घोष यांना देऊन लोकमान्यांना डावलण्यात आले. त्यांना बोलण्याची संधीही नाकारण्यात आली. टिळकांनी जेव्हा आपले विचार मांडण्यास प्रारंभ केला तेव्हा

व्यासपीठावर गोंधळ, धक्काबुक्कीचे प्रकार घडले. त्यामुळे टिळक समर्थकांनी सभात्याग केला. या घटनेपासून काँग्रेसचे विभाजन होऊन टिळकांच्या नेतृत्वाखालील गट जहाल गट म्हणून ओळखला जाऊ लागला. या फुटीमुळे काँग्रेसवर टिळकांचा प्रभाव वाढला. परंतु राष्ट्रीय चळवळ काही काळ थंडावली.

**३) लखनौ करार (१९१६) –**

इ.स. १९०७ मध्ये काँग्रेसचे मवाळ-जहाल गट निर्माण झाले. तत्पूर्वी १९०६ मध्ये मुस्लिम लीगची स्थापना झाली होती, १९०८ मध्ये टिळकांना सहा वर्षांच्या कैदेची शिक्षा झाली होती. यामुळे १९०८ ते १९१४ या काळात काँग्रेसची चळवळ थंडावली होती. त्यातच ब्रिटिश सरकारने १९०९ मध्ये मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ घोषित केले होते आणि महत्त्वाचे म्हणजे १९१४ मध्ये पहिल्या महायुद्धास सुरुवात होऊन अप्रत्यक्षपणे भारतही युद्धात ओढला गेला.

या सर्व पार्श्वभूमीवर लखनौ अधिवेशन १९१६ मध्ये भरले होते. उपरोक्त सर्व घटनांच्या पार्श्वभूमीवर लोकमान्यांनी १९१५ मध्ये पुणे येथे प्रांतिक परिषद भरवून पहिल्या महायुद्धात इंग्लडला पाठिंबा देण्यात स्वराज्य प्राप्तीचा स्वार्थ असल्याचे स्पष्ट केले. १९१६ मध्ये टिळकांचा जहालगट पुन्हा काँग्रेसमध्ये सामील झाला व पुन:श्च 'हरि ओम' म्हणून टिळकांनी काँग्रेसचे नेतृत्व स्वीकारले.

१९१६ मध्ये काँग्रेस व मुस्लिम लीग यांचे एकत्रित अधिवेशन लखनौ येथे घेण्याबाबत टिळकांनी पुढाकार घेतला, या अधिवेशनाचे वर्णन त्यांनी 'डींलज्ञ-पे' या शब्दात करून स्वातंत्र्य जवळ असल्याचे घोषित केले. या अधिवेशनात मुस्लिम लीगशी करार करून मुस्लिमांच्या स्वतंत्र मतदारसंघास मान्यता देऊन युद्धकाळात मुस्लिमांच्या ब्रिटिश विरोधी भावनेचा उपयोग टिळकांनी लखनौ कराराच्या निमित्ताने करून घेतला. या कराराने हिंदू-मुस्लिम अथवा काँग्रेस-लीग ऐक्याचे प्रयत्न झाले. या काराراपासून काँग्रेसची सर्व सूत्रे टिळकांकडे आली. लखनौ कराराने काँग्रेसमधील जहाल-मवाळ गट व लीग हे सर्व ब्रिटिश विरोधात एकत्र आले हे विशेष.

**४) होमरूल चळवळ (१९१६) –**

लोकमान्य मंडालेच्या कैदेतून सुटून आल्यावर भारतीय राजकारणात सक्रीय झाले व होमरूल चळवळीच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रीय आंदोलनाला गतिमान केले. या कार्यात त्यांना जोसेफ बॅप्टिस्टा, न.चिं. केळकर, दादासाहेब खापर्डे, बा. शि. मुंजे आणि मुख्य म्हणजे डॉ. ॲनी बेझंट यांचे बहुमोल सहकार्य लाभले.

मुंबईत लोकमान्य टिळकांनी व मद्रास प्रांतात अड्यार येथे डॉ. ॲनी बेझंट यांनी 'होमरूल लीगची' स्थापना केली. ''भारताला ब्रिटिश साम्राज्यांतर्गत स्वशासित राज्याचा दर्जा सनदशीर मार्गाने मिळविणे व यासाठी जनजागृती, लोकसंघटन करणे'' हे होमरूलचे उद्दिष्ट घोषित करण्यात आले.

लोकमान्य टिळकांनी होमरूलचा प्रसार मुंबई, विदर्भ व मध्य प्रांतात प्रचार दौरे काढून केला. होमरूल चळवळ ही काँग्रेसच्या कार्याला पूरक अशी होती. या चळवळीने स्वशासनाची मागणी करत राष्ट्रीय चळवळीचे नेतृत्वच एकप्रकारे आपल्याकडे घेतले होते. या चळवळीचाच प्रभाव जेव्हा भारतभर झाला तेव्हा गृहमंत्रालयाने पार्लमेंटला असा अहवाल पाठविला की, ''राजकीय सुधारणांसंबंधी ब्रिटिश सहकारने निश्चित घोषणा केल्याखेरीज ही चळवळ थांबणार नाही.'' या चळवळीचे यश म्हणजे, भारताला राजकीय अधिकार देण्याची गरज ब्रिटिश सरकारला भासू लागली हे होय. परिणामी

१९१९ मध्ये मॉंटफर्ड सुधारणा कायदा लागू झाला.

**जहाल कालखंडाची अखेर –**

इ.स. १९१८ मध्ये पहिले महायुद्ध संपले, १९१९ च्या मॉंटफर्ड सुधारणांनी भारतीयांचे समाधान झाले नाही. तेव्हा टिळकांनी 'प्रतियोगी सहकारितेचा' मार्ग स्वीकारला. दरम्यान १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला व या घटनेने जहाल कालखंडाची अखेर झाली, भारतीय राष्ट्रीय चळवळीतील 'टिळक पर्व' संपले. अन्यायाविरुद्ध शस्त्र उचलणाऱ्या जहालवादी तरुणांचे प्रेरणास्थान गेले.

सर्वसामान्य जनतेत घडवून आणलेली जनजागृती व अन्यायाविरुद्ध आपण ब्रिटिश सरकारच्या विरोधात उभे राहू शकतो. हा आत्मविश्वास निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य टिळकांनी केले. आपल्या योगदानाने टिळकांनी स्वातंत्र्य आंदोलनास एका उंचीवर नेऊन ठेवले, त्यांच्या मृत्यूने राष्ट्रीय चळवळीवरील 'महाराष्ट्रीय' प्रभाव संपुष्ठात आला.

## ४.२.५ महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय कॉंग्रेस – गांधी पर्व (१९२० – १९४७)

इ.स. १९२० मध्ये लोकमान्य टिळकांचा मृत्यू झाला व भारतीय राजकारणात महात्मा गांधींचा उदय झाला, म्हणजे टिळक पर्वाचा अस्त होऊन गांधीपर्व सुरू झाले. मवाळवाद, जहालवाद, क्रांतिकारी या मार्गापेक्षा गांधी पर्वातील स्वातंत्र्य आंदोलनाचा कॉंग्रेसचा मार्ग वेगळा होता व तो म्हणजे सत्याग्रहाचा. या मार्गाने दक्षिण आफ्रिकेत साम्राज्यवादी व वर्णद्वेषी शक्तीविरुद्ध लढताना महात्मा गांधींनी शांततेच्या व अहिंसेच्या मार्गाने भारतीयांना न्याय मिळवून दिला. त्यानंतर गांधी भारतात परत आले आणि चंपारण्य, खेडा, अहमदाबाद येथे त्यांनी सत्याग्रह तंत्राचा वापर करून यश संपादन केले. बॅरिस्टर असूनही सर्वसामान्यांसारखा राहणारा व राष्ट्रीय आंदोलनाला नवी दिशा देऊ शकणारा नेता म्हणून सर्व राष्ट्राचे लक्ष, गांधींवर केंद्रित झाले.

'महात्मा' म्हणून प्रसिद्ध होण्यापूर्वी गांधींना दक्षिण अफ्रिकेतील कार्याची पार्श्वभूमी होती. दक्षिण अफ्रिकेत असताना गांधीजी 'एशियाटिक रजिस्ट्रेशन ॲक्ट' या अन्यायी कायद्यामुळे सत्याग्रहाच्या मार्गाकडे वळले. त्यांच्या विरोधामुळे आफ्रिकन सरकारला हा कायदा रद्द करावा लागला. १९१४ मध्ये गांधीजी भारतात परतले. त्यांचे राजकीय गुरू गोपाळ कृष्ण गोखले यांच्या सल्ल्यावरून देशाच्या विविध भागात फिरून परिस्थितीचे निरीक्षण केले. त्यात त्यांना भारतीय जनतेच्या दारिद्र्याची, अज्ञानाची, मागासलेपणाची पूर्ण कल्पना आली. अशा जनतेचे प्रतिनिधित्व करायचे असेल, तर त्यांच्यासारखे राहायला हवे हे जाणून बॅरिस्टर गांधींनी सुटाबुटाचा त्याग केला आणि सामान्यांसारख्या वेशभूषेला प्रारंभ केला. तसेच ब्रिटिशविरोधी लढ्यासाठी 'सत्याग्रह' हे तंत्र वापरण्यास सुरुवात केली.

### महात्मा गांधी व महाराष्ट्र –

महाराष्ट्र व महात्मा गांधींचा जवळचा संबंध होता. महाराष्ट्र ही त्यांची कर्मभूमी, वास्तव्यभूमी होती. असहकार असो वा भारत छोडो यासारखी मोठी आंदोलने महाराष्ट्रातूनच छेडली गेली. वर्धा येथील सेवाग्राम आश्रम हा स्वातंत्र्य चळवळीचे केंद्रच होते. १९२० च्या दरम्यान देशातील राजकीय वातावरणात बदलेल्या परिस्थितीचा अचूक वेध १९२० च्या कॉंग्रेस अधिवेशनाने घेतला. महाराष्ट्राचे भाग्य असे की कॉंग्रेसला नवे वळण देणारे हे अधिवेशनही मराठी भूमीवर भरले.

दक्षिण अफ्रिकेतील सत्याग्रहाचे प्रयोग आणि चंपारण्यासारख्या चळवळींनी जगाचे लक्ष वेधून घेतले होते; पण नागपूरच्या अधिवेशनापासून गांधीजींचे नेतृत्व खऱ्या अर्थाने प्रस्थापित झाले. १८८५ ते १९२० या काळात काँग्रेसचा प्रसार जरी झाला होता, तरी तिचे स्वरूप अजूनही विस्कळीत राहिले होते. नागपूर अधिवेशनात जिल्हा व गाव पातळीवर शाखा स्थापन स्थापन करण्याची योजना आखली गेली. सर्वसाधारण माणसालाही काँग्रेसमध्ये सामील होणे शक्य व्हावे, अशा रीतीने संघटना बांधण्याचे ठरले. याच अधिवेशनात 'साम्राज्यांतर्गत वासाहतिक स्वायत्त सरकार' हे काँगेसचे ध्येय बदलून 'शांततामय व सनदशीर मार्गाने स्वराज्य' असे नवे ध्येय ठरविण्यात आले.

असहकार, अहिंसा, बहिष्कार आणि खादी याबाबत कलकत्ता येथे ४ ते ९ सप्टेंबर १९२० या कालावधीत भरलेल्या विशेष अधिवेशनात ठरलेल्या कार्यक्रमावर नागपूर अधिवेशनात शिक्कामोर्तब केले गेले. अस्पृश्यता निवारण, दारूबंदी असे कार्यक्रम काँग्रेस चळवळीचा अधिकृत भाग बनले. या अधिवेशनानंतर गांधीजी म्हणतात, ''ब्रिटिशांनी आम्हाला न्याय दिला नाही, तर त्यांचे साम्राज्य नष्ट करणे हे प्रत्येक हिंदी नागरिकाचे कर्तव्य राहील.''

''महात्मा गांधींचे राजकीय गुरु गोपाळकृष्ण गोखले हे महाराष्ट्रीय होते, तर महात्मा गांधींचे प्रिय शिष्य विनोबा भावे हे महाराष्ट्रीय होते आणि महात्मा गांधींचे मारेकरी नथुराम गोडसे व अन्य हेही महाराष्ट्रीयच होते. असा विचित्र योगायोग आपली कर्मभूमी महाराष्ट्र मानणाऱ्या महात्मा गांधींच्या बाबतीत होता.''

## सत्याग्रहाचे तंत्र व मार्ग –

मवाळ, जहाल, क्रांतिकारी मार्गापेक्षा सत्याग्रहाचा अभिनव मार्ग, महात्मा गांधींनी वापरला. गांधींचे 'साध्य' समजून घेण्याआधी आपण त्यांनी त्यासाठी वापरलेले 'साधन' कसे होते याचा विचार करू या. गांधीजींच्या दृष्टीने साध्यापेक्षा साधनाला म्हणजेच साधनशुचितेला विशेष महत्त्व होते. त्यांच्या 'सत्याग्रह' या साधनाची आपण ओळख करून घेऊ.

**सत्याग्रह म्हणजे काय? याविषयी म. गांधी म्हणातात –**

''सत् + आग्रह = सत्याग्रह होय. सत्याग्रहात केवळ सत्याचा आग्रह असतो. सत्याग्रह हे नैतिकतेवर आधारित असे अस्त्र असून आत्मबल हा त्याचा मुख्य आधार आहे. सत्याग्रह हा मानवाचा जन्मसिद्ध हक्क होय. अन्याय, दडपशाही व शोषण या विरुद्धचा आत्म्याचा प्रतिकार म्हणजे सत्याग्रह होय. आत्मविश्वास व आत्मक्लेश हे आत्मशक्तीचे दोन विशेष गुण होत. विरोधामुळेच सत्याग्रहाचे महत्त्व समजण्यास मदत होते.''

म. गांधींच्या मते कोणालाही सत्याग्रही होता येणार नाही, त्यासाठी सत्याग्रहीची पात्रता त्यांनी निश्चित केली होती. ती पुढीलप्रमाणे -

१) सत्याग्रहीची परमेश्वरावर नितांत श्रद्धा आवश्यक आहे, त्यामधूनच त्याला आत्मबल प्राप्त होणार आहे.

२) सत्याग्रहीस सत्ता, प्रसिद्धी व संपत्तीची हाव असता कामा नये.

३) सत्याग्रहीचे शारीरिक व मानसिक स्वास्थ उत्तम असावे.

४) सत्याग्रहीने कोणत्याही गोष्टीची भीती बाळगू नये.

५) सत्याग्रहीची आपल्या ध्येयावर अविचल निष्ठा असावी.

६) सत्याग्रह व्यक्तिगत लाभाकरिता असू नये.

७) सत्याग्रहीने काम - क्रोधापासून दूर राहावे.

सत्याग्रहीला सल्ला देताना गांधीजींनी बजावले की, 'पापाचा तिरस्कार करा, पाप करणाऱ्यांचा करू नका.' सत्याग्रहासाठी त्यांनी आपल्या तंत्रामध्ये पुढील साधनांचा समावेश केला आहे -

असहयोग

उपोषण

हरताळ

हिजरात

बहिष्कार

स्वातंत्र्य आंदोलनासाठी हा मार्ग गांधीजींनी भारतीयांना दिला होता. स्वीकारलेल्या मार्गावरून अविचलपणे चालण्याचा त्यांनी अखेरपर्यंत प्रामाणिक प्रयत्न केला. त्यांच्या सत्याग्रहाच्या तत्त्वज्ञानात गौतम बुद्धाची अहिंसा आणि श्रीकृष्णाच्या अन्याय प्रतिकाराचा निष्काम कर्मयोग यांचा संयोग झालेला होता. याच मार्गावर आधारित त्यांचे व राष्ट्रीय काँग्रेसचे मार्गक्रमण होते. त्याचा थोडक्यात आढावा आपण घेऊ यात -

## अ) असहकार चळवळ (१९२०) –

**पार्श्वभूमी –**

सत्याग्रहाचे तंत्र महात्मा गांधींनी भारतात आल्यावर सर्वप्रथम १९१७ मध्ये चंपारण्य येथे वापरले. या सत्याग्रहामुळे हिंदुस्थानच्या अगदी मागासलेल्या भागातील कनिष्ठ स्तरातील लोकांशी गांधीजींचा संबंध आला. यामुळे शेतकऱ्यांची शंभर वर्षांपर्यंत कोणत्याही उपायांनी दूर झाली नव्हती ती समस्या गांधीजींच्या सत्याग्रही व लोकसेवेच्या धोरणाने दूर झाली. एखाद्या हिंदी नेत्याने खालच्या स्थरातील लोकांचे मत घेऊन चळवळ करण्याचा हा पहिलाच प्रयोग होता. यात गांधीजींनी कुळांना बराच न्याय मिळवून दिला. त्यामुळे त्यांच्याबद्दल मोठा आदर शेतकऱ्यांत निर्माण झाला. यानंतर गांधीजींनी खेडा (१९१८) व अहमदाबाद येथे ही सत्याग्रहाद्वारे शेतकरी व कामगार यांना स्वातंत्र्य आंदोलनात समाविष्ट केले. भारतीय राष्ट्रीय चळवळीतील हे मोठे परिवर्तन होते.

पहिल्या महायुद्धानंतर १९१९ मध्ये रौलेट विधेयक संमत केले. या कायद्यामुळे कोणत्याही आरोपीस केवळ संशयावरून अटक करण्याचा अधिकार सरकारला मिळाला. या 'काळ्या कायद्यास' महात्मा गांधींनी विरोध केला तर रॉलेट कायद्यास विरोध करणाऱ्या डॉ. सत्यपाल व डॉ. सैफुद्दिन किचबू यांना पंजाबात अटक झाली. १३ एप्रिल १९१९ ला जालियनवाला बाग हत्याकांड घडले. याबरोबरच गांधीजींनी खिलाफत चळवळीच्या माध्यमातून मुस्लिमांना ब्रिटिशविरोधी लढ्यात सामील करून घेण्याचा प्रयत्न केला. ही सर्व पार्श्वभूमी १९२० च्या असहकार चळवळीस होती.

### असहकार म्हणजे काय ?

असहकार चळवळीच्या निमित्ताने राष्ट्रीय सभेची सूत्रे गांधीजींकडे आली. डिसेंबर १९२० मध्ये नागपूर येथील काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात सी.आर. यांनी 'असहकाराचा ठराव' मांडला, जो बहुमताने संमत झाला. हा ठराव म्हणजे गांधीपर्वाचा आरंभ होता. राष्ट्रीय सभेच्या इतिहासात हे नागपूर अधिवेशन अत्यंत महत्त्वाचे व क्रांतिकारी ठरले. महात्मा गांधींच्या नेतृत्वास येथूनच राष्ट्रीय

मान्यता मिळाली. खऱ्या अर्थाने म. गांधींचा भारतीय राजकारणात प्रवेश या चळवळीच्या रूपाने झाला.

१ ऑगस्ट १९२० ही असहकार चळवळ सुरू करण्याची तारीख निश्चित झाली होती; परंतु याच दिवशी लोकमान्यांचे निधन झाल्यामुळे ती प्रत्यक्षता सप्टेंबरपासून सुरू झाली. असहकाराच्या चळवळी मागची भूमिका स्पष्ट करताना गांधीजी म्हणतात -

''इंग्रजांचे भारतातील साम्राज्य केवळ त्यांच्या शस्त्र सामर्थ्यावर आधारलेले नाही. लोकांचे सहकार्य, मग ते भयापोटी दिलेले असो वा अजाणतेपणातून दिलेले असो, हाच कोणत्याही शासनव्यवस्थेचा पाया असतो. लोक निर्भय बनले आणि इंग्रज सरकारला सहकार्य देण्याचे त्यांनी नाकारले, तर ते एक दिवसही राज्यकारभार चालवू शकणार नाहीत.''

असहकार चळवळीची सुरुवात म्हणजे टिळक युगातून गांधी युगाची सुरुवात होती. महाराष्ट्र व इतरत्र गांधीजींना टिळक प्रवाहातून आलेल्या अनेक मंडळींनी साथ दिली. यामध्ये काकासाहेब गाडगीळ, भाऊसाहेब रानडे, शिवराम महादेव परांजपे, गंगाधरराव देशपांडे, सेनापती बापट, हरिभाऊ फाटक, विनोबा भावे, लोकनायक अणे, नरकेसरी अभ्यंकर, अच्युतराव कोल्हटकर, वीर वामनराव जोशी असे कितीतरी टिळकवादी पुढे गांधीजींबरोबर आले.

नागपूर अधिवेशनाची सांगता 'एका वर्षात स्वराज्य' या घोषणेने झाली व असहकार आंदोलनाने लोकांच्या मनाची पकड घेतली.

असहकार चळवळ सुरू करण्यापूर्वी १० मार्च १९२० म. गांधींनी असहकाराचा जाहीरनामा प्रसिद्ध केला होता. यातून असहकाराचा अर्थ स्पष्ट होईल, यात गांधीजी म्हणतात -

''जर आमच्या मागच्या मान्य करण्यात आल्या नाहीत, तर काय करावे यासंबंधी दोन शब्द लिहितो. उघड किंवा गुप्त युद्ध करणे हा एक रानटी मार्ग आहे. तो निदान अव्यवहार्य या दृष्टीने तरी सोडून देणे भाग आहे. हा मार्ग सर्व परिस्थितींत अनिष्टच आहे, अशी मी जर खात्री पटवू शकेन, तर आमच्या सर्व न्याय्य मागण्या आम्हास फार अल्पावधीत मिळू शकतील. अत्याचाराचा त्याग करणाऱ्या व्यक्तीस अथवा राष्ट्रास जी शक्ती निर्माण करता येते, ती अप्रतिकार्य असते; पण अत्याचाराविरुद्ध आजचा माझा युक्तिवाद पूर्णपणे अव्यवहार्य व निष्फळ आहे, या आधारावर उभारलेला आहे; म्हणून असहकार हा एकच मार्ग आपणास उपलब्ध आहे.

अत्याचारापासून पूर्ण अलिप्त राहिल्यास तो तितकाच परिणामकारकही होईल. जेव्हा सहकाराने अध:पात व अपमान होत असतो किंवा आपण धारण केलेल्या धार्मिक भावनेस धक्का पोहोचत असतो, तेव्हा असहकार हे कर्तव्य बनते. जे हक्क मुस्लिमांना आपल्या प्राणाइतके प्रिय आहेत, त्यांचा अन्यायाने अपहार झाला असता, ते आम्ही मुकाट्याने सहन करावे अशी इंग्लंडला अपेक्षा करता येणार नाही. म्हणून आम्हास असहकाराचा पूर्ण अवलंब करता येईल.

ज्यांना सन्मानाच्या पदव्या अगर अधिकार प्राप्त झाले असतील, त्यांचा त्याग करावा. सरकारच्या खालच्या दर्जाच्या नोकऱ्या जे करीत असतील, त्यांचाही त्यांनी त्याग करावा. असहकारात खाजगी नोकऱ्यांचा त्याग अंतर्भूत नाही. जे असहकार करणार नाहीत, त्यांना सामाजिक भीती घालणे मला पसंत नाही. स्वयंप्रेरित असहकार हीच जनतेच्या भावनेची व असंतोषाची कसोटी आहे.

सैनिकांना नोकरी सोडण्यास सांगणे हे अकाली आहे, ही पहिली पायरी नसून अखेरची पायरी आहे. जेव्हा व्हाईसरॉय, भारतमंत्री व मुख्यप्रधान आम्हाला दगा देतील, तेव्हाच त्या पायरीवर पाऊल

टाकण्याचा हक्क आम्हास प्राप्त होईल. शिवाय असहकाराच्या मार्गावरील प्रत्येक पाऊल अत्यंत प्रखर वातावरणातही आपला आत्मसंयम कायम राहावा यासाठी आपण सावकाश प्रगती केली पाहिजे.''

**असहकार चळवळीचा कार्यक्रम –**

'अहिंसक असहकाराचा मार्ग योग्य रितीने चोखाळल्यास भारताला एका वर्षात स्वराज्य मिळेल' या शब्दांनी जनता भारावून गेली. म. गांधींनी या चळवळीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे जाहीर केला -

१) सन्मानदर्शक पदव्या व अधिकाऱ्यांचा त्याग करणे.

२) सरकारी व निमसरकारी शाळा, महाविद्यालयांतून विद्यार्थ्यांनी काढून राष्ट्रीय शिक्षण संस्थांची स्थापना करणे.

३) सरकारी उत्सव, समारंभावर बहिष्कार टाकणे.

४) वकील व अशील यांनी ब्रिटिश न्यायालयांवर बहिष्कार टाकून खाजगी निवाडा मंडळांद्वारे तंटे सोडविणे.

५) परकीय मालावर बहिष्कार, स्वदेशीचा वापर करणे.

६) निवडणूक व मतदानावर बहिष्कार टाकणे.

**असहकार चळवळीचे स्वरूप –**

''महात्मा गांधींनी सुरू केलेल्या चळवळीच्या कार्यक्रमास संघर्षात्मक व विधायक असे दोन पैलू होते. संघर्षात्मक कार्यक्रमात शाळा, महाविद्यालये, न्यायालय, परदेशी कापड यावर बहिष्कार, पदव्यांचा त्याग यांचा समावेश होता, तर विधायक कार्यांत स्वदेशी, खादीचा वापर, दारूबंदी, अस्पृश्यता निवारण, हिंदु-मुस्लिम ऐक्य यांचा अंतर्भाव होता.''

नागपूर अधिवेशनातच म. गांधींनी सरकारला बजावले होते की, ब्रिटिशांनी आम्हाला न्याय दिला नाही तर त्यांचे राज्य नष्ट करणे हे हिंदी नागरिकांचे कर्तव्य राहील.''

असहकार चळवळीला देशभरातून चांगला प्रतिसाद लाभला. विधिमंडळ निवडणुकीस उभे राहिलेल्या सर्व राष्ट्रीय उमेदवारांनी माघार घेतली, मतदानावर बहिष्कार टाकला, विद्यार्थ्यांनी शाळा-कॉलेजवर बहिष्कार टाकला व राष्ट्रीय विद्यापीठे, महाविद्यालये, शाळांची स्थापना करण्यात आली.

''महाराष्ट्रात ज्या ज्या राष्ट्रीय शिक्षण संस्था निघाल्या त्यातील बहुतेकांना लोकांनी टिळकांच्या स्मरणार्थ 'टिळक' हे नाव जोडले. उदा. टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे; टिळक महाविद्यालय, पुणे, टिळक राष्ट्रीय शाळा, अकोला, टिळक राष्ट्रीय विद्यालय, खामगाव, टिळक राष्ट्रीय विद्यालय, जळगांव, टिळक राष्ट्रीय शाळा, निपाणी, टिळक विद्यालय, देवगड अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. असहकाराच्या पर्वात गुजरात विद्यापीठ, बिहार विद्यापीठ, काशी विद्यापीठ, जामिया मिलिया इस्मामिया इ. अनेक संस्थांची देशात स्थापना झाली. राष्ट्रीय शिक्षण व स्वांतत्र्य चळवळ यांची अशी सांगड घालण्यात आली.''

असहकार चळवळीमुळे काँग्रेस संघटनेवर सरकारतर्फे बंदी घालण्यात आली. मुंबईत जेव्हा ब्रिटिश युवराजांचे आगमन झाले तेव्हा हरताळ पाळण्यात आला तर २७ मार्च १९२१ रोजी नागपूरमध्ये उत्स्फूर्तपणे निघालेल्या, पूर्णपणे अहिंसक मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. यात आठ स्वयंसेवक मारले गेले, अनेक जखमी झाले. ही उदाहरणे प्रातिनिधिक आहेत. देशभर असेच वातावरण होते.

राष्ट्रसभा व खिलाफत मंडळांची स्वयंसेवकांची पथके बेकायदा ठरवून सरकारने दडपशाही सुरू केली. पं. मोतीलाल नेहरू, सी.आर.दास, वल्लभभाई पटेल, लाला लजपतराय इ. नी आपले व्यवसाय सोडून सक्रीयपणे चळवळीत भाग घेतला. सरकारचे तुरुंग सत्याग्रहींनी भरले होते.

महाराष्ट्रातील असहकार आंदोलनातील एक विशेष उल्लेखनीय घटना म्हणजे 'मुळशी-पेटा सत्याग्रह' मुळशी येथे होणाऱ्या धरणामुळे ५४ गावे धरणाच्या पाण्याखाली जाणार होती. याविरुद्ध सेनापती बापट यांनी महात्मा गांधींच्या मार्गदर्शनाखाली सत्याग्रह करण्याचे ठरविले. 'पोलिसांनी गोळीबार केल्यास आपली छाती पुढे करण्यात जे कोणी तयार असतील, त्यांनी आपली नावे नोंदवावीत' असे सेनापती बापट यांनी केलेल्या अवाहनास ४०० शेतकऱ्यांनी लगेच प्रतिसाद दिला. 'एक तर प्राण घ्या किंवा जमीन घ्या' असा ठराव स्वत: गांधीजींनी मंजूर करून घेतला होता. १९२१ ते १९२४ असा तीन वर्षे हा सत्याग्रह चालू होता.

परदेशी कापडांच्या होळ्या, निदर्शने यांना उत आला होता, मुंबई युवराज, विरोधी निदर्शकांवर झालेल्या गोळीबारात ५३ लोक मारले गेले तर ४०० जखमी झाले. या चळवळीचा प्रसार देशभर झाला, या चळवळीस कसा आवर घालावा याच संभ्रमात सरकार होते. या संदर्भात लॉर्ड रिडिंग यांचे शब्द पाहा-

''हिंदुस्थानातील लोक असे एकामागून एक हजारोंनी तुरुंगात कसे व का जात आहेत याचा आपणास उलगडा होत नाही व ही चळवळ कशी थांबवावी यासंबंधी आपले मन गोंधळून किंवा भांबावून गेले आहे.''

असहकार चळवळ देशभर अशी ऐन भरात आली असताना, निर्णायक वळणावर आली असताना ५ फेब्रुवारी १९२२ रोजी उत्तरप्रदेशातील गोरखपूरजवळ चौरीचौरा या ठिकाणी लोकांनी पोलीस चौकीस आग लावून दिली, त्यात २१ पोलीस व १ फौजदार यांना जिवंत जाळण्यात आले. गांधीजी या हिंसाचाराने अस्वस्थ झाले व त्यांनी ही असहकार चळवळ मागे घेतली. 'अहिंसक असहकाराचा' मार्ग घेत असल्याचे जाहीर केले. यावरून गांधींच्या सत्याग्रहाच्या मार्गात साधन शुचितेला किती महत्त्व होते हे लक्षात येत.

**असहकार चळवळीचे परिणाम –**

चौरी-चौरा घटनेनंतर १० मार्च १९२२ रोजी राजद्रोहाच्या आरोपाखाली गांधीजींना अटक होवून चळवळ थंडावली. या चळवळीचे परिणाम पुढीलप्रमाणे -

१) भारतीय जनता निर्भय बनली, आत्मविश्वास वाढला.

२) भारतीय जननेस राजकीय अस्तितेची जाणीव झाली.

३) शेतकरी, मंजूर, कामगार, शिक्षण-विद्यार्थी, वकील-अशील, नेते, व्यवसायिक, महिला इ. सर्वच घटकांचा राष्ट्रीय आंदोलनात सहभाग वाढला.

४) राष्ट्रीय सभेला जनआंदोलनाचे स्वरूप मिळाले.

५) या चळवळीच्या निमित्ताने सत्याग्रह व नि:शस्त्र प्रतिकाराच्या मार्गाची ओळख जनतेला झाली.

६) भारतीयांच्या विरोधाची सरकारला कल्पना आली.

७) स्वराज्य पक्षाचा उदय झाला.

**ब) सविनय कायदेभंग चळवळ (१९३० – १९३४) –**

**पार्श्वभूमी –**

असहकार चळवळीमुळे सामान्य जनता जशी राष्ट्रीय आंदोलनात सामील झाली तसेच जनतेत अन्यायाविरोधात उभे राहण्याचा आत्मविश्वासही निर्माण झाला. असहकारानंतर सविनय कायदेभंग हा गांधीप्रणित राष्ट्रीय आंदोलनाचा दुसरा टप्पा होता. ते पाहण्यापूर्वी १९२२ ते १९२८ या काळातील घटनांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

चौरी-चौरा घटनेमुळे महात्मा गांधींनी असहकार चळवळ अचानक स्थगित केल्यामुळे त्यांच्याशी मतभेद होऊन पंडित मोतीलाल नेहरू व सी.आर.दास यांनी काँग्रेस, अंतर्गत 'स्वराज्य पक्ष' स्थापन केला. या पक्षाच्या मते असहकाराचे धोरण न ठेवता कौन्सिलमध्ये जाऊन सरकारी धोरणास विरोध करावा. १९२५ पर्यंत स्वराज्य पक्ष सक्रीय होता. १९२८ मध्ये सर जॉन सायमन यांच्या नेतृत्वाखाली सायमन कमिशन भारतात आले. ज्या भारतीयांसाठी हे कमिशन आले होते त्या कमिशनमध्ये एकही भारतीय सदस्य नव्हता. म्हणून या कमिशनला भारतात ठिकठिकाणी प्रखर विरोध झाला. 'सायमन गो बँकच्या  घोषणा व निदर्शनांना, भारतीयांच्या रोषाला कमिशनला तोंड द्यावे लागले.

भारतीयांनी राजकीय पक्षांनी कमिशनवर बहिष्कार टाकल्यामुळे ब्रिटिश सरकार अस्वस्थ झाले. सरकारने भारतीयांना असे अवाहन केले की, त्यांनी स्वत:ची राज्यघटना बनवावी. त्याला प्रतिसाद म्हणून १९२८ मध्ये 'नेहरू आहवाल' सरकारला सादर करण्यात आला. हा अहवाल म्हणजे हिंदी नेत्यांनी एकत्र येऊन तयार केलेला घटनेचा पहिलाच आराखडा होता. 'वसाहतीच्या स्वराज्याची' मागणी या अहवालाने केली होती. मात्र काँग्रेसमधील तरुण नेते पंडित जवाहरलाल नेहरू व सुभाषचंद्र बोस यांनी १९२९ च्या लाहोर अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याची मागणी केली, एवढेच नव्हे तर राष्ट्रीय सभेच्या १९२९ च्या अधिवेशनात २६ जानेवारी १९३० हा दिवस 'स्वातंत्र्य दिन म्हणून पाळण्याचे आवाहन करण्यात आले.

लाहोर काँग्रेसने दिलेल्या आदेशानुसार २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून देशभर साजरा झाला, हजारो लोकांनी तिरंगी झेंडा हातात घेऊन मिरवणुका काढल्या आणि त्या झेंड्याच्या साक्षीने पुढीलप्रमाणे शपथ घेतली -

''आमचा असा विश्वास आहे, की हिंदी जनतेला इतर कोणत्याही जनतेप्रमाणे आपला म्हणून स्वतंत्र असण्याचा, स्वत:च्या श्रमाची फळे उपभोगण्याचा आणि जीवनाला आवश्यक असलेली साधनसामग्री प्राप्त करून घेण्याचा हक्क आहे, जो कोणालाही हिरावून घेता येणार नाही... हिंदुस्थान स्वतंत्र करण्याची आम्ही पुन्हा नव्याने प्रतिज्ञा करतो आणि स्वराज्य मिळेपर्यंत स्वातंत्र्याचा लढा अनत्याचाराने चालविण्याचा गंभीर निश्चय करतो.''

या पार्श्वभूमीवर सविनय कायदेभंगाची चळवळ १९३० मध्ये महात्मा गांधींनी सुरू केली.

**सविनय कायदेभंग चळवळीचे स्वरूप**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलनातील एक महत्त्वाची व दीर्घकाळ चाललेली चळवळ म्हणून या चळवळीकडे पाहिले जाते. या चळवळीचा आरंभ दांडी येथील मिठाच्या सत्याग्रहाने झाला. मिठासारख्या जीवनावश्यक आणि सर्वात स्वस्त असू शकणाऱ्या वस्तूवरही सरकारने कर बसविल्यामुळे लोकांमध्ये चीड होती. अगोदर  झालेल्या राजकीय जागृतीच्या पार्श्वभूमीवर मीठ हा जर चळवळीचा

केंद्रबिंदू केला, तर त्या आधारे राष्ट्रव्यापी आंदोलन उभारता येईल, असा गांधीजींचा अंदाज होता. 'सविनय कायदेभंगाची' चळवळ कशी व कोठे सुरू करावयाची यासंबंधी निर्णयाचे सर्वाधिकार काँग्रेसने महात्मा गांधींना दिले होते.

२ मार्च १९३० रोजी महात्मा गांधींनी व्हाईसरॉय लॉर्ड आयर्विन यांना पत्र लिहून काही मागण्या सादर केल्या व त्या मान्य न झाल्यास दांडी येथील मिठाच्या सत्याग्रहाने सविनय कायदेभंग उभारण्याचा इशारा दिला. म. गांधींच्या मागण्यात दारूबंदी करणे, मिठावरचा कर रद्द करावा, जमीन महसूल कमी करावा, लष्करी खर्च कमी करावा यासारख्या मागण्या होत्या. लॉर्ड आयर्विन यांनी या मागण्यांकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्यामुळे म. गांधींनी गुजरातमध्ये दांडी येथे मिठाचा सत्याग्रह करण्याचे निश्चित केले.

**दांडी सत्याग्रह –**

दांडी हे गाव गुजरात राज्यात साबरमतीपासून ३८५ किलोमीटर अंतरावर आहे. १२ मार्च १९३० रोजी गांधीजी आपल्या ७८ अनुयायांसह दांडीकडे निघाले. साबरमती ते दांडी या प्रवासात हजारो लोक त्यांना सामील झाले. ६ एप्रिल १९३० रोजी पहाटे प्रार्थनेनंतर गांधीजी समुद्रकिनाऱ्याकडे निघाले व तेथे पडलेले मिठ उचलून त्यांनी मिठाचा कायदा मोडला. मिठ उचलल्यानंतर गांधीजींनी निवेदन केले की,

''मिठाच्या कायद्याचा तात्त्विक किंवा औपचारिक भंग आता झाला आहे. मिठाच्या कायद्यानुसार शिक्षा पत्करण्याचे साहस असेल, त्याने त्याला सोयिस्कर अशा स्थळी व वेळी मीठ तयार करण्यास हरकत नाही. कार्य व परिणाम समजून सांगावा. कायदेभंग करणे हे पूर्ण न्याय्य आहे, त्यात पाप नाही.''

**प्रसार –**

६ एप्रिलपासून मीठ सत्याग्रह करण्यास परवानगी मिळताच सर्व देशभर या चळवळीचा प्रसार झाला. सविनय म्हणजे विनयासहित, नम्रपणे जनतेने आंदोलन सुरू केले. महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालील आपण येथे प्रामुख्याने महाराष्ट्रातील चळवळीचा आढावा घेणार आहोत.

**१) वडाळा –**

मुंबईतील वडोळा येथील मिठागरावरील हल्ल्यात १५,००० हून अधिक स्वयसंसेवकांच्या तुकड्यांमागून तुकड्या पोर्टट्रस्ट रेल्वे फाटकापर्यंत जात. तेथे जमलेल्या लोकांसह सर्वांना पोलिसांनी वेढा घातला होता. 'महात्मा गांधी की जय' ही घोषणा देऊन जमावाने पोलिसांच्या वेढ्यावरच हल्ला चढविला, पोलिसांच्या लाठीमारास न जुमानता स्त्री, पुरुष, मुले यांनी मिठागरातील मीठ हाती घेऊन कायदेभंग केला.

**२) शिरोडा –**

१२ मे १९३० रोजी रत्नागिरी जिल्ह्यात शिरोडा, या गावी मिठाचा मोठा सत्याग्रह झाला. 'सरकारी कर न देता मीठ घेऊन जायचे' असे येथील सत्याग्रहाचे स्वरूप होते. स्वयंसेवकांना रोकण्यासाठी मिठागराला पोलिसांनी वेढा घातला. तरीही स्वयंसेवकांनी मिठागरात घुसून मीठ घेतले व आजूबाजूच्या गावांत वाटले. सतत चार दिवस सत्याग्रह चालूच होता. शेवटी मिठागारावर सशस्त्र शिपायांचा पहारा लावण्यात आला. तरीही सत्याग्रहींनी माघार घेतली नाही, ते आगारात घुसताच लाठीमार झाला. या आंदोलनाचे नेतृत्व अप्पासाहेब पटवर्धन, धर्मानंद कोसंबी, डॉ. आठल्ये, शं. द.

जावडेकर इ.नी केले. या सत्याग्रहात ३०० सत्याग्रहींनी भाग घेतला.

**३) दहीहंडा सत्याग्रह –**

मिठाचा सत्याग्रह करण्यास मिळाला की, ज्या ठिकाणी समुद्र नाही, अशा ठिकाणी खऱ्या पाण्याच्या विहिरी शोधण्यात आल्या. विदर्भातील अकोला जिल्ह्यातील दहीहंडा या गावचा सत्याग्रह विशेष गाजला.

१३ एप्रिल रोजी शिवाजीराव पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली हजारोंच्या समुदायाने खाऱ्या पाण्याच्या विहिरीतून पाणी काढून मीठ तयार करून कायदेभंग केला, या बेकायदेशीर मिठाच्या लहान कागदी पुड्या बांधून गावोगावी पोहचविण्यात आल्या. या सत्याग्रहासाठी गावागावातून सत्याग्रहींची नावे नोंदविण्यात आली होती. सत्याग्रहाचे सूत्रसंचालन ब्रिजलाल बियाणी, सहस्रबुद्धे, त्र्यंबकराव ढोक, गोविंदराव वाघमारे, राजाभाऊ डांगरे यांनी केले. दुर्गाबाई जोशी, यशोदाबाई आगरकर, पार्वतीबाई पटवर्धन या महिलांचा विशेष सहभाग यामध्ये होता.

**४) सोलापूर –**

६ मे १९३० या दिवशी सोलापूर येथे सार्वत्रिक हरताळ आणि कामगारांचा संप झाला. १०,००० स्वयंसेवकांनी गावात मिरवणूक काढून शहरातील दारूच्या दुकानांना आगी लावण्यात आल्या. जेथे जमेल तेथे स्वयंसेवक तिरंगा झेंडा लावत होते.

८ मे रोजी एक हजाराचा जमाव ताडाची झाडे तोडण्यास निघाला तेव्हा पोलिसांशी पोलीस चौकी पेटवून दिली, दोन पोलिसांना जिवंत जाळले तर सेशन कोर्टाच्या इमारतीस आग लावली गेली. कलेक्टर नाइट याने गोळीबाराचा आदेश दिला. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाताच मुंबई राज्याचे गृहमंत्री हॉटसन यांनी सोलापुरात 'मार्शल लॉ' लागू केला.

**५) चंद्रपूर –**

सविनय कायदेभंग आंदोलनासाठी चंद्रपूरमध्ये स्थापन झालेल्या युद्ध समितीचे सूत्रसंचालन दादासाहेब उन्नमवार यांनी केले. त्यांच्यासोबत खुशालचंद खजानची यांनी स्वयंसेवकांच्या तुकड्यांच्या माध्यमातून गडचिरोली, सावली, अहेरी या भागात कायदेभंगाचे महत्त्व खेडोपाडी समजावून सांगितले.

**६) धूंदी (पुसद) जंगल सत्याग्रह –**

सविनय कायदेभंगाची चळवळ फक्त मिठाच्या सत्यागृहापुरतीच मर्यादित नव्हती. मिठागरांवरच्या सत्याग्रही हल्ल्यांपाठोपाठ जंगलचा कायदेभंग सुरू झाला. जंगलातील 'सरकारी गवत कापणे आणि कायदा मोडून तुरुंगात जाणे' असा या चळवळीचा कार्यक्रम होता.

२० जुलै ला लोकनायक बापूजी अणे यांच्या नेतृत्वाखाली पुसदजवळ धुंदी येथील जंगलात सत्याग्रह झाला. वणी, अकोला, अमरावती, खामगाव येथील स्वयंसेवकांची पथके या जंगल सत्याग्रहात सामील झाले होते. ब्रिजलाल बियाणी, दुर्गाताई जोशी, प्रमिलाताई ओक, दादासाहेब खापर्डे यांचा प्रामुख्याने समावेश होता.

या सत्याग्रहींना जंगलाकडे जाताना निरोप देण्यासाठी पूस नदीच्या वाळवंटात हजारो लोक जमले होते, मोठी मिरवणूक काढून स्त्री-पुरुष जंगलात शिरले व त्यांनी गवत कापण्यास सुरुवात केली. गवताचे भारे डोक्यावर घेऊन 'जंगल का कानून दिया' असे म्हणत सत्याग्रही बाहेर पडले. तेव्हा त्यांना अटक करून लोकनायक अणेंसह सहा महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली.

७) **बिळाशी जंगल सत्याग्रह –**

सातारा जिल्ह्यातील बिळाशी हे गाव सागवानी लाकडासाठी प्रसिद्ध होते. येथे सत्याग्रहींनी सरकारी जंगलातील सागवानी लाकूड तोडून आणून महादेवाच्या देवळात झेंडा लावण्याचे ठरविले. चंदू धस, बाबाजी मुलानी, पांडुरंग भोसले, गोपाळ रोकडे, दत्तोपंत कुलकर्णी, विष्णू पाटील, द. म. लोहार आदींनी या सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

सत्याग्रहींनी सर्वांसमक्ष जंगलात जाऊन एक सागवानी उंच झाड तोडून मंदिराच्या परिसरात आणला व त्यावर तिरंगी झेंडा लावला. पोलिसांनी विरोध करताच सत्याग्रहींनी पोलिसांनाच पळविले. या झेंड्याच्या रक्षणासाठी ३०० स्वयंसेवक आजूबाजूच्या गावकऱ्यांसह पहारा देऊ लागले. गावकरी त्यांना जेवण देत. याचवेळी स्वयंसेवकांनी जंगलातील गवत कापणे सुरू केले, राष्ट्रगीताचे गायन सुरू केले.

सत्याग्रह मोडून काढण्यासाठी पोलिसांनी पूर्वसूचना न देता जमावावर लाठी हल्ला सुरू केला. सत्याग्रहींनीही प्रतिकार केला. पोलीस व सत्याग्रहींमध्ये तुंबळ युद्धच झाले. १८ जुलै ते ५ सप्टेंबर असे ५० दिवस या कालावधीत हे 'बिळाशीचे बंड' सुरू होते.

८) **बागलाण सत्याग्रह –**

नाशिक जिल्ह्यातील बागलाण व चणकापूर परिसरातील आदिवासींनीही सविनय कायदेभंग चळवळीत सहभाग घेतला. चणकापूर टेकडीजवळ १०,००० हून अधिक आदिवासी एकत्र जमले. येथे जंगल सत्याग्रह करण्यात आला. ठरल्याप्रमाणे हजारो आदिवासी सत्याग्रही जंगलात घुसले. इतका मोठा जमाव पाहून ब्रिटिश अधिकारी गार्डन याने गोळीबार सुरू केला, यात चार जण ठार झाले. या सत्याग्रहाचे संचालन अर्जुन श्रावण भोये, भावडू बुवाजी भुसारा, झिप्रू जगताप आदींनी केले होते.

९) **चिरनेर जंगल सत्याग्रह –**

२५ सप्टेंबर १९३० रोजी रायगड जिल्ह्यात झालेला चिरनेर सत्याग्रह प्रसिद्ध आहे. येथील अक्कादेवीच्या माळावर दहा हजार लोकांची सभा झाली व जंगलतोड सत्याग्रह करण्याचे ठरले. लोकांनी लाकडे तोडताच पोलिसांनी लाठीमार सुरू केला. सत्याग्रही हटेनात तेव्हा पोलीस अधिकाऱ्याने मामलेदाराकडे गोळीबाराची परवानगी मागितली व त्याने नकार देताच त्याचेवरच गोळी चालविली. पोलिसांवर दगडविटांचा मारा झाला, पोलिसांची हत्यारे पळवली गेली. धनाजी म्हात्रे, नामाजी मोकल यांचा यात विशेष सहभाग होता.

१०) **अकोले–संगमनेर –**

नगर जिल्ह्यातील अकोले-संगमनेर परिसरात जंगल सत्याग्रह अच्युतराव पटवर्धन, केशवराव गरुड, श्री. ग. सरदेसाई यांनी सहभाग घेतला. या सत्याग्रहात मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांचा समावेश होता. याशिवाय नगर जिल्ह्यात बाळासाहेब भारदे, अण्णासाहेब शिंदे यांनीही चळवळ उभारली.

११) **मुंबई –**

परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यात आला होता. सर्वत्र परकीय मालाच्या होळ्या करण्यात आल्या. १२ जून १९३० रोजी कापड गिरणी कामगार बाबू गेणू याने परदेशी मालाच्या ट्रकसमोर बलिदान दिले. गांधीजींनी आदेश दिल्यापासून बाबू गेणूने आपले सर्वस्व चळवळीला वाहिले नव्हते. मिठाच्या सत्याग्रहाप्रमाणे विदर्भात जंगल सत्याग्रह झाले. यात अमरावती जिल्ह्यात वडाळी येथे डॉ. भोजराज यांनी तर बुलढाणा जिल्ह्यात जनुना येथे डॉ. पारसनीस यांनी जंगल सत्याग्रह केला. तसेच अहमदाबाद, सोलापूर, नागपूर, मुंबई येथील गिरणी कामगारांनी संप केले. इतकेच काय पनामा

कालव्यात काम करणारे हिंदी लोकही संपावर गेले व सुमात्रा आणि नैरोबीत काम करणाऱ्या हिंदी मजुरांनीही गांधीजींच्या अटकेची बातमी समजताच काम बंद केले. महाराष्ट्रात कितीतरी ठिकाणी जंगल सत्याग्रह झाले, यात लोहारा (चंद्रपूर), कळवण (नाशिक) येथील सत्याग्रहांचाही उल्लेख करणे महत्त्वाचे आहे. आपणास माहीत आहे काय !

''सविनय कायदेभंग चळवळीचा एक भाग म्हणून नागपूर येथे श्रीमती अनुसयाबाई काळे यांच्या नेतृत्वाखाली 'निवडणुकीवर बहिष्कार टाकण्यात मतदारांना प्रवृत्त करणे' या प्रकारचा सत्याग्रह करण्यात आला. त्यांनी आपल्याबरोबर ४00 पुरुष व २00 महिलांसह निवडणूक केंद्रावर जाऊन निदर्शने केली व असे आवाहन केले की, ''मतदारांनो ! मतदान करू नका.'' ही घटना १0 नोव्हेंबर १९३0 ची आहे. त्यांच्या सत्याग्रहास यश येऊन २५,000 पैकी फक्त ११३७ मतदान झाले. या सत्याग्रहामुळे अनसुयाबाईंना अटक झाली.

या सत्याग्रहाचा उद्देश कायद्याने दिलेला मतदानाचा अधिकार पाळावयास न लावणे व याप्रकारे कायदा भंग करणे होय. सरहद्द प्रांतात खान अब्दुल गफार खान यांनीही पेशावर येथे चळवळीत सक्रीय भाग घेतला. त्यांच्या कार्याबद्दल 'सरहद्द गांधी' म्हणून ओळखले जाते.

**कायदेभंग चळवळीची अखेर –**

सविनय कायदेभंग चळवळीची वाढलेली व्याप्ती, जनतेचा निर्भय प्रतिकार यामुळे सरकारने तडजोडीचे प्रयत्न सुरू केले. ५ मार्च १९३१ रोजी महात्मा गांधी व व्हाईस रॉय आयर्विन यांच्यात करार होऊन सविनय कायदेभंगाची चळवळ स्थगित करण्यात आली.

सविनय कायदेभंगाची चळवळ चालू असतानाच सायमन कमिशनचा अहवाल प्रसिद्ध झाला. त्यावर चर्चा करण्यासाठी व गांधी आयर्विन कराराचा भाग म्हणून गांधीजी दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर राहिले. १ल्या व तिसऱ्या गोलमेज परिषदेवर कॉंग्रेसने बहिष्कार टाकला होता.

दरम्यान १९३२ मध्ये ब्रिटिश पंतप्रधान रॅम्से मॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला. यानुसार दलितांना स्वतंत्र मतदारसंघ दिले होते. यावरून महात्मा गांधी व डॉ. आंबेडकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. शेवटी स्वतंत्रऐवजी राखीव मतदार संघाची तडजोड होऊन उभय नेत्यांत 'पुणे करार' झाला.

या परिस्थितीत कॉंग्रेस वर्किंग कमिटीने स्थगित केलेली कायदेभंगाची चळवळ १९३२ मध्ये पुन्हा सुरू केली. म. गांधी व वल्लभभाई पटेल यांना बेमुदत अटकेत टाकले. राष्ट्रीय सभा बेकायदेशीर ठरविली. दप्तरेनिधी जप्त करण्यात आली. अनेकांनी भूमिगत राहून कार्य केले. परंतु पहिल्या टप्प्यातील आंदोलनाचा प्रभाव दुसऱ्या टप्प्यात राहिला नव्हता. शेवटी पाटणा येथे कॉंग्रेसच्या कार्यकारी समितीची बैठक होऊन १९३४ पासून हे आंदोलन मागे घेण्यात आले. सामान्य जनतेच्या सक्रीय सहभागामुळे राष्ट्रीय आंदोलन गतिमान झाले.

**(क) 'चले जाव' किंवा 'भारत छोडो' आंदोलन (१९४२) पार्श्वभूमी –**

भारतीय स्वातंत्र्य आंदोलन व गांधी पर्वातील असहकार, सविनय कायदेभंग यानंतरचा सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९४२ चे 'भारत छोडो' किंवा 'चले जाव' आंदोलन होय. हे आंदोलन ऑगस्ट क्रांती म्हणूनही ओळखले जाते. या आंदोलनास १९३५ ते १९४२ या कालखंडातील घटनांचा संदर्भ वा पार्श्वभूमी आहे, त्यांचा थोडक्यात आढावा आपण घेऊ या -

सविनय कायदेभंग चळवळ संपुष्टात आल्यानंतरची महत्त्वाची घटना म्हणजे १९३५ चा भारत सरकारचा कायदा होय. हा कायदा म्हणजे भारतीय राज्यघटनेच्या व स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासातील

महत्त्वाचे पाऊल होय. या कायद्यामुळेच भारतीय स्वातंत्र्य जवळ आले, मुख्य म्हणजे भारताच्या राज्यकारभारात हिंदी जनतेच्या प्रतिनिधींना सहभागी होण्यास संधी मिळाली. या कायद्यानुसार १९३७ च्या निवडणुका होऊन प्रांतीय सरकारे सत्तेवर आली. परंतु १९३९ मध्ये दुसरे महायुद्ध सुरू होऊन भारतही युद्धात ओढला गेला.

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने ब्रिटिशांना युद्धात सहकार्य करावे व त्याबदल्यात भारताला वसाहतीचे स्वराज्य देण्यात येईल अशी तर युद्धविरोधी मतप्रदर्शनाचा भाग म्हणून म. गांधींनी 'वैयक्तिक सत्याग्रह' सुरू केला. विनोबा भावे दुसऱ्या महायुद्धाची व्याप्ती वाढत गेली, तेव्हा पंतप्रधान चर्चिल यांनी 'क्रिप्स' यांनीही वसाहतीच्याच स्वराज्याचे गाजर भारतीयांना दाखविले. म. गांधींनी त्याचे वर्णन 'बुडत्या बँकेचा पुढील तारखेचा चेक' असे केले.

या पार्श्वभूमीवर दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारत छोडो चळवळ महात्मा गांधींनी सुरू केली. या चळवळीचा प्रसार देशभर झाला, परंतु आपण येथे महाराष्ट्राच्या विशेष संदर्भात या चळवळीचा विचार करणार आहोत -

### 'चले जाव' चळवळीचे स्वरूप –

महायुद्ध काळात डावपेचाचा भाग म्हणून सरकारवर दबाव आणण्यासाठी महात्मा गांधींनी 'चले जाव' चे अस्त्र उपसले. दि. १४ जून १९४२ च्या 'हरिजन' साप्ताहिकात गांधीजींनी लिहिले की,

''ईश्वराच्या नावे आपण भारत सोडून जा, हे शक्य नसेल तर भारतात अराजक निर्माण करून भारत सोडा; परंतु जपानसाठी भारत सोडू नका, तो भारतीयांसाठी सोडा.''

अशाप्रकारे असहकार, सविनय कायदेभंग व शेवटी 'इंग्रजांनी भारत सोडून जावे' या निर्णयाप्रत गांधीजी आले होते. या आंदोलनाने स्वातंत्र्य लढ्याच्या अखेरच्या पर्वाला सुरूवात झाली. दि. १४ जुलै १९४२ रोजी वर्धा येथे भरलेल्या काँग्रेस कार्यकारिणीच्या बैठकीत जागतिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला आणि शेवटी पुढील अर्थाचा ठराव सर्वसंमत करण्यात आला.

''रोजच्या रोज ज्या घटना घडत आहेत आणि ज्या दिव्यातून जावे लागे लागत आहे, त्याचा विचर करता हिंदुस्थानवरील इंग्रजांचा अंमल ताबडतोब संपुष्टात आला पाहिजे, अशी काँग्रेसची खात्री झाली आहे. काँग्रेसची ही मागणी मान्य करण्यात आली नाही; तर महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सरळ संघर्षाचे धोरण स्वीकारावे लागेल.''

**या ठरावाला काँग्रेस महासमितीची मान्यता मिळाल्यावर ८ ऑगस्ट १९४२ पासून लढा सुरू करण्याचे ठरले.**

### 'करा वा मरा' चा मंत्र –

काँग्रेस कार्यकर्त्यांच्या डावपेचांचा सरकारला अंदाज होताच. ७ ऑगस्टला सुरू झालेले काँग्रेस महासमितीचे संपताच वा संपण्यापूर्वी काँग्रेस कार्यकारिणीच्या सदस्यांना आणि प्रमुख कार्यकर्त्यांना अटकेत टाकण्याचा निर्णय सरकारच्या गृहखात्याने घेतला होता.

७ ऑगस्ट रोजी 'वंदे मातरम्' गीताने ऐतिहासिक अधिवेशनाला मुंबईत सुरवात झाली. ८ ऑगस्ट १९४२ रोजी आठ वाजता 'छोडो भारत' चा ठराव प्रचंड बहुमताने मंजूर केला गेला. या ठरावावर बोलताना गांधीजी म्हणाले,

''आम्हाला ताबडतोब स्वातंत्र्य पाहिजे. संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय अन्य कशानेही माझे समाधान होणार नाही. आपण एक तर स्वातंत्र्य मिळवू अन्यथा ते मिळविण्याच्या प्रयत्नात मरण पत्करू, परंतु

आपली गुलामगिरी कायमची राहिलेली पाहायला जगणार नाही. असा 'करा वा मरा' चा मंत्र गांधीजींनी भारतीयांना दिला.''

९ ऑगस्ट १९४२ ला प्रत्यक्ष आंदोलनाला प्रारंभ झाला. तत्पूर्वी बहुतांश काँग्रेस नेत्यांना सरकारने तुरुंगात डांबले होते. पहाटे चार वाजता गांधीजी, महादेवभाई देसाई यांच्यावर अटकवॉरंट बजावण्यात आले, पोलिसांसोबत जाण्यापूर्वी त्यांनी राष्ट्राला संदेश दिला की,

''स्वातंत्र्याच्या प्रत्येक अहिंसक सैनिकाने 'करेंगे या मरेंगे' हे ब्रीदवाक्य कागदाच्या वा कापडाच्या तुकड्यावर लिहून तो कागद किंवा कापडाचा तुकडा छातीवर लावावा म्हणजे सत्याग्रह करीत असताना त्या मृत्यू आलाच, तर तो स्वयंसेवक अहिंसेच्या उच्च मूल्यांचे पालन करताना मृत्युमुखी पडला, हे सिद्ध होईल.''

**ऑगस्ट क्रांतीचा कार्यक्रम –**

'चले जाव' आंदोलनाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे ९ ऑगस्टला म. गांधी, पं. नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्रप्रसाद इ. प्रमुख नेत्यांना अटक झाली होती. नेतेच तुरूगात असल्यामुळे जनतेने आपल्या कल्पनेप्रमाणे हिंसात्मक अहिंसात्मक, उघड-भूमिगत मार्गांनी चळवळ चालू ठेवली. याचवेळी अखिल भारतीय राष्ट्रसभा सदस्यांनी एक गुप्त बैठक घेऊन जनतेला क्रांतीचा एक बारा कलमी कार्यक्रम आखून दिला व तो त्वरित खेडोपाडी पोहोचेल अशी व्यवस्था केली. हा कार्यक्रम पुढीलप्रमाणे होता -

१) सायंकाळी सभा भरवून 'चले जाव'चा राष्ट्रसभेचा संदेश जनतेला कळवावा.

२) मिठासंबंधीचे कायदे मोडावेत.

३) सरकारी यंत्रणा व अधिकाऱ्यांशी पूर्णपणे असहकार करावा.

४) सोळा वर्षावरील विद्यार्थ्यांनी शाळांचा त्याग करून क्रांतिकार्यात सहभागी व्हावे.

५) सरकारी अधिकाऱ्यांनी आपल्या नोकऱ्या सोडाव्यात.

६) सैनिकांनी शांतता सभा, मिरवणुकांवर लाठीमार, गोळीबार करण्याचे सरकारचे आदेश पाळू नयेत.

७) संस्थानिकांनी चळवळीत सामील व्हावे अन्यथा तेथील प्रजेने क्रांती करावी.

८) प्रत्येक लढ्याप्रमाणे स्त्रियांनीही या लढ्यात सामील व्हावे.

९) सर्वांनी 'करेंगे या मरेंगे' या वृत्तीने चळवळीत सामील व्हावे.

१०) हिंदू, मुस्लीम, शीख, ईसाई यांनी मतभेद विसरून या लढ्यात सामील व्हावे.

११) म. गांधी व अन्य नेते तुरुंगात असल्यामुळे प्रत्येकानेच नेता बनावे, अहिंसेचे पालन करून चळवळ पुढे न्यावी.

१२) सूत कातण्याचे कर्तव्य करण्यास विसरू नये.

## चळवळीची व्याप्ती व तीव्रता –

राष्ट्रीय नेत्यांना तुरुंगात टाकल्यास आंदोलन होणार नाही हा सरकारचा अंदाज चुकला. म. गांधींच्या अटकेच्या निषेधार्थ जनतेने देशभर उत्स्फूर्त हरताळ पाळला. हरताळ, संप, निषेध मोर्चे, निदर्शने यांतून जनतेने आपला तीव्र संताप व्यक्त केला.

११ ऑगस्टपासून आंदोलन तीव्र झाले. देशभर अटकसत्र सुरू झाले. आंदोलनाचे निश्चित नियोजन करणारे नेतेच तुरुंगात असल्यामुळे आंदोलन विस्कळीत बनले. विद्यार्थ्यांनी शाळांवर

बहिष्कार टाकला, रेल्वे रूळ उखडणे, तारा तोडणे, ट्राम-बसगाड्या जाळणे, दुकाने लुटणे, पोलिसांवर हल्ले करणे, सरकारी खजिने, पोस्ट, कार्यालये, यावर हल्ले करणे असे या आंदोलनाचे सामान्यपणे स्वरूप होते. देशवासीयांचा संयम संपल्यामुळे अहिंसक आंदोलनास प्राधान्य देणाऱ्या या आंदोलनात उपरोक्त बाबींना मान्यता अगदी गांधीजींचे अनुयायी किशोरलाल मश्रूवाला यांनीही दिली. ते 'हरिजन' मध्ये म्हणतात,

''दळणवळणाची साधने जीविताला धोका न येईल अशा प्रकारे अनत्याचारी मार्गाने तोडणे शक्य आहे. संप करणे हा सर्वात श्रेष्ठ मार्ग आहे. तो जर करता येईल, तर तो पुरेसा प्रभावी होईल. त्यात अनत्याचाराच्या दृष्टीने काहीही गैर नाही. आजच्या, सारख्या लढ्यात तारा तोडणे, रूळ उखडणे, लहानसहान पूल पाडून टाकणे या गोष्टी करताना जीविताला धोका होणार नाही, याबाबत जर सावधगिरी घेण्यात आली, तर त्या करण्यात हरकत नाही.''

अशाप्रकारे मश्रूवालांच्या लेखनाने या मार्गास अधिकृतताच प्राप्त झाली.

## चळवळीची प्रमुख केंद्रे –

### १) मुंबई –

मुंबई हे या आंदोलनाचे मुख्य केंद्र व आरंभबिंदू होते. ९ ऑगस्टच्या सकाळीच आंदोलकांनी बसगाड्यांना आग लावली. शहरात पाचवेळा गोळीबार झाला. मुंबईत आंदोलनाचे भूमिगत आकाशवाणी केंद्र स्थापन झाले होते. त्यास 'आझाद रेडिओ' म्हणून ओळखले जाई. मुंबईतील आंदोलनाची तीव्रता कशी होती, ती मुंबई गव्हर्नरच्या अहवालावरून आपणास कळेल -

''शहरातील एकही कापडगिरणी किंवा कारखाना चालू नव्हता... बी.बी.सी.आय. व जी.आय.पी. रेल्वेच्या वर्कशॉपमधील कामगार संपावर गेले होते. टायर फोडून बसेस निकामी करण्यात आल्या होत्या. शाळा-कॉलेजेस ओस पडली होती. प्रचंड जमाव रस्त्यांवरून रस्त्यावर सर्वत्र अडथळे उभारण्यात आले होते. सर्व बाजारपेठांत हरताळ होते. लष्कर उपयोगी कापडाचे एक गोदाम भस्मसात केले गेले होते. कागदाचे कोठार जाळून टाकले गेले होते.''

मुंबईतील चळवळीचे हे प्रातिनिधीक चित्र होते. हजारो महिला मिरवणुकीने चौपाटीवर जात असताना ब्रिटिश सैनिकांनी त्यांच्यावर गोळीबार केला; काही स्त्रिया ठार झाल्या, रक्ताच्या थारोळ्यात पडल्या; पण मिरवणुक थांबली नाही.

### २) पुणे –

९ ते १३ ऑगस्ट या काळात पुण्यात सामान्य प्रशासनाऐवजी लष्करी प्रशासन होते. विद्यार्थी व नागरिक मोर्चे - मिरवणुका काढून पोलीस चौक्यांवर हल्ले करीत होते. या चार दिवसात सहा आंदोलक ठार झाले. तरीही पोलीस चौक्या व सरकारी इमारती जाळणे सुरूच होते. खडकी व देहूरोड येथील सरकारी दारुगोळ्यांचे कारखाने आंदोलकांचे लक्ष्य बनले. वानवडीच्या लष्करी कोठाराची आंदोलकांनी होळी केली.

पुण्याजवळ मद्रास मेल उलथवण्यात आली. दारुगोळा व इतर साहित्य घेऊन जाणारी मालगाडी खंडाळ्याच्या घाटात पाडण्यात आली. रेल्वेची मोडतोड, टेलिफोन व विजेच्या तारा तोडणे, गाड्यांवर हल्ले करणे यामुळे त्या काळात पुणे देशभर गाजले. पुण्याच्या कँप भागात असलेल्या कॅपिटॉल चित्रपटगृहात क्रांतिकारकांनी उडविलेल्या बाँबमुळे तीन गोरे सैनिक मरण पावले तर येरवडा तुरुंगात रात्री तुरुंगावरच तिरंगी झेंडा फडकविला.

३) **नागपूर –**

९ ऑगस्टपासूनच नागपुरात वातावरण तंग झाले. काँग्रेसचे पुढारी दीनदयाल गुप्ता व मदनलाल बागडी यांना अटक झाल्याने सर्वत्र हरताळ पाळण्यात आला. कामगारांनी कारखाने बंद करून संप जाहीर केला. तेव्हा सरकारने मिरवणुका, सभा यावर बंदी घातली. परंतु जनतेने जुमानले नाही. १२ ऑगस्ट रोजी एक उत्स्फूर्त मोर्चा निघाला आणि सचिवालयावर गेला. लोकांनी सचिवालयात घुसून तेथील खुर्च्या, कागदपत्रे उद्‌वस्त केली. न्यायालयाच्या इमारतीवर तिरंगा लावला तेव्हा प्रथम लाठीमार व नंतर गोळीबार झाला. काही लोकांनी नागपूर रेल्वे स्टेशनवर तिरंगा लावला, तेथील खजिनाही लुटला. सभाबंदी असूनही चिटणीस पार्थमध्ये व्ही.डी. देशपांडे, अनसूयाबाई काळे आदींनी प्रचंड सभेसमोर भाषणे केली. १५ ऑगस्टपर्यंत सतत गोळीबार सुरूच होता. तर शंकर महाले यास फाशी देण्यात आली.

४) **यावली (जि. अमरावती) –**

अमरावतीपासून चौदा मैलावर बसलेले यावली हे फक्त दोन हजार वस्तीचं गाव. वीर वामनराव जोशींनी या परिसरात मोठी जागृती घडवून आणली होती. १४ ऑगस्ट १९४२ रोजी यावली गावातील सर्व लोक सभेसाठी एकत्र आले होते. या सभेत राष्ट्रसभेकडून प्राप्त झालेल्या बारा कलमी कार्यक्रमाचे वाचन पंजाबराव यावलीकर यांनी केले. १५ ऑगस्टपासून सत्याग्रह करण्याचे ठरले.

सत्याग्रहाचा भाग म्हणून गावकऱ्यांनी जवळच असलेले माहुली पोलीस ठाणे ताब्यात घेण्याचे ठरविले. त्याप्रमाणे पोलीस ठाण्यावर हल्ला करून दप्तर, कागदपत्रे नष्ट करण्यात आली. गावावर पोलिसांचा हल्ला होऊ नये म्हणून गावकऱ्यांनी टेहळणी पथके तयार ठेवली. चावली गावात चौकात असलेल्या तिरंगा झेंड्याच्या रक्षणासाठी गावकरी व पोलीस यांच्यात मोठा संघर्ष झाला. पोलीसांच्या गोळीबारात मारोतराव कांडलकर व मोतीराम बडोने ठार झाले. तरीही झेंड्याच्या रक्षणासाठी एक एक स्वयंसेवक पुढे येत राहिले. शेवटी पोलिसांना माघार घ्यावी लागली. परंतु पोलिसांची ही तात्पुरती माघार होती, पोलिसांनी तिरंगा झेंडाच पळविला, तो परत मिळविण्यासाठी पुन्हा धुमश्चक्री झाली. शेवटी गावकऱ्यांनी पोलीसांवर हल्ला करून झेंडा परत मिळविला. राजाराम औरंगपुरे याने पोलीस अधिकारी मेल्ड्रम याचेवर तलवारीने वार केला व झेंडा डौलाने चावलीत लावला. या संघर्षात संत तुकडोजी महाराजांचे पुढील प्रेरणा गीत फार गाजले -

''अब काहे को धूम मचाने हैं, दुखवाकर भारत सारे ।
आते हैं नाथ हमारे...
पत्थर सारे बाँब बनेंगे ।
झाड झडूले शस्त्र बनेंगे...
भक्त बनेगी सेना ।''

५) **चिमूर –**

चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर हे दहा हजार वस्तीचे गाव. १६ ऑगस्ट १९४२ रोजी तिरंगा झेंड्यासहीत अटक केले. तरीही गावकऱ्यांनी प्रभातफेरी काढून त्याचे मोर्चात रूपांतर झाले. हा मोर्चा पोलीस ठाण्यावर आला तेव्हा पोलिसांनी मोर्चावर लाठीमार सुरू केला. तेव्हा चिडलेल्या जमावाने पोस्ट ऑफिसला आग लावली, डाकबंगल्याला आग लावली. दोन पोलीस अधिकारी ठार झाले. सतत तीन दिवस चिमूर हे स्वयंसेवकांच्या ताब्यात होते. या सत्याग्रहात सरकारी अधिकाऱ्यांच्या खून

प्रकरणात २५० लोकांवर खटले भरले गेले, २१ जणांना फाशीची व २८ जणांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. तसेच गावावर दहा हजार रुपये सामूहिक दंड बसविण्यात आला. फाशीच्या शिक्षा पुढे रद्द झाल्या.

**६) अष्टी –**

वर्धा जिल्ह्यातील अष्टी या गावी १६ ऑगस्टला सत्याग्रहींनी पोलीस स्टेशनवर झेंडा लावण्याचा प्रयत्न केला. नि:शस्त्र सत्याग्रहींवर पोलिसांनी गोळीबार केला. यात तीन सत्याग्रही बळी पडल्याने संतापलेल्या जमावाने पोलिसांवर हल्ला केला. यात एक पोलीस कर्मचारी मारला गेला. या सत्याग्रहाबद्दल अनेकांना फाशीची शिक्षा सुनावली गेली.

**७) महाड –**

रायगड जिल्ह्यातील वाळण खोऱ्यात शेतकऱ्यांचे आंदोलन सुरू होते. १० सप्टेंबर १९४२ रोजी महाड तालुका कचेरी ताब्यात घेण्याचे ठरले. महाडमधील या मोर्चाचे नेतृत्व नाना पुरोहित याने केले. पुल उद्‌वस्त करण्यासाठी दारुगोळा पुण्याहून पाठविण्यात आला होता. यासाठी भूमिगत चळवळीचे नेते शिरूभाऊ लिमये यांचे मार्गदर्शन लाभले. हजारो तिरंगी झेंडे घेऊन आलेल्या मोर्चावर महाडमध्ये येताच गोळीबार झाला, त्यामुळे जाळपोळ व हिंसाचार झाला.

**८) नंदुरबार –**

'चले जाव', 'करा अथवा मरा' या महात्मा गांधींनी दिलेल्या घोषणा अगदी ग्रामीण भागात पोहोचल्या. विद्यार्थीही या आंदोलनात उत्स्फूर्तपणे सामील झाले. ९ सप्टेंबर १९४२ रोजी पोलिसांच्या विरोधाला न जुमानता शिरीषकुमार मेहता, शशिधर नीलकंठ केतकर, लालदास शहा, धनशाम शहा व धनसुखलाल वाणी या विद्यार्थ्यांनी नंदुरबारला एक मिरवणूक काढली. या लहान शाळकरी मुलांवरही गोळीबार करण्यात पोलिसांनी मागेपुढे पाहिले नाही. यात हे विद्यार्थी पोलिसांच्या गोळ्यांस बळी पडले.

**९) पाथर्डी –**

अहमदनगर जिल्ह्यात पाथर्डीजवळ चिंचवड उजदे येथील स्वातंत्र्य सैनिकांना पकडण्यासाठी आलेल्या पोलिसांवर गावकऱ्यांनी हल्ला केला, यामुळे पोलिसांना शरण यावे लागले. परंतु अहमदनगर कलेक्टरने पोलिसांची मोठी फौज गावात पाठविली. पोलीस व गावकऱ्यांत मोठा संघर्ष झाला. या संघर्षात त्र्यंबक खेडकरला मरण आले.

**१०) अहमदनगर –**

२५ डिसेंबर १९४२ रोजी नगर येथील सरोष सिनेमागृहात क्रांतिकारकांनी बाँबचा स्फोट घडवून आणला. ब्रिटिश लष्करविरोधी भावनेचे हे प्रतीक होते.

**११) गारगोटी –**

कोल्हापूर जिल्ह्यात कोल्हापूर-गारगोटी मार्गावरील वेदगंगा नदीवरील पूल उडविण्याची योजना गणपती केसरकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी आखली. तसेच गारगोटी कचेरीवर तिरंगा फडकविण्याची योजना होती. परंतु पोलिसांच्या गोळीबाराने गोंधळ उडाला. सत्याग्रहींनी पोलिसांवर हल्ला चढविला, बंदुका पळविल्या. या प्रकरणात केसरकरांवर खटला चालवून त्यांना ८ वर्षे सक्तमजुरीची शिक्षा देण्यात आली.

**१२) हातकणंगले व रूकडी –**

या दोन्ही ठिकाणी सत्याग्रहींनी रेल्वे स्टेशनवर हल्ला केला. स्टेशन मास्तरला ताब्यात घेऊन टेलिग्राफ यंत्र फोडले, स्टेशनच्या इमारतींवर रॉकेल शिंपडून आगी लावण्यात आल्या.

**१३) चिंचणी –**

डहाणू तालुक्यातील समुद्रकाठच्या गावी गावकरी व विद्यार्थ्यांनी चले जाव आंदोलनात सक्रीय भाग घेतला. गावात सभा घेऊन चावडी पेटविण्यात आली. १४ ऑगस्टला चिंचणी, दांडेपाडा येथे सभेवर गोळीबार झाला. गावकरी व पोलीस यांच्या संघर्षात भाना छोटू भंगी यांनी सत्याग्रहींचे नेतृत्व केले.

१४) पालघर - विष्णू वामन दांडेकर व सखाराम भिकाजी पाटील यांनी येथील लढ्याचे नेतृत्व केले. पालघर परिसरातील पालघर, नांदगाव, मनोर, बोईसर, सालवड आदी गावांनी या सत्याग्रहात भाग घेतला होता. येथील गोळीबारात २२ जण जखमी झाले.

चिमूर ते डहाणू आणि नंदुरबार ते गारगोटी, अशा संपूर्ण महाराष्ट्रात 'चले जाव' आंदोलन विस्तारले होते. भूमिगत चळवळींनीही या आंदोलनास सक्रीय समर्थन दिले. उघड प्रतिकाराप्रमाणे भूमिगत चळवळ हे या आंदोलनाचे वैशिष्ट्य होते. जयप्रकाश नारायण, एस. एम. जोशी, राममनोहर लोहिया, अरुणा असफ अलींनी या आंदोलनाचे नेतृत्व केले. आंदोलनाच्या काळात 'सातारा' येथे प्रतिसरकारची स्थापना नाना पाटील यांनी केली व ब्रिटिश सत्ता तात्पुरती नष्ट केली.

## 'भारत छोडो' चळवळीचे महत्त्व –

'भारत छोडो' आंदोलन सरकारने बळाच्या आधारावर दडपले. या चळवळीमुळे राष्ट्रीय चळवळीस क्रांतीचे स्वरूप दिले. या चळवळीमुळे स्वातंत्र्य जवळ आले. हे आंदोलन पूर्णपणे हिंसक अथवा अहिंसक नव्हते. उघड व भूमिगत स्वरूपात आंदोलन झाले. हे आंदोलन आपल्या उद्दिष्ट पूर्तीमध्ये अयशस्वी झाले, असे प्रथमदर्शनी वाटत असले तरी, लवकरच आपण देशाचे स्वातंत्र्य मिळवू शकू हा आत्मविश्वास भारतीय जनतेत निर्माण झाला, हे महत्त्वाचे होय. ब्रिटिश सत्तेलाही सत्ता सोडण्याची चाहूल लागली. या आंदोलनाने १८५७ नंतर प्रथमच ब्रिटिश सत्तेला विरोध झाला. हे एक लोकयुद्ध आहे. जागतिक परिस्थिती पाहता ब्रिटिश साम्राज्यावर हल्ला करण्याची हीच वेळ आहे असे भारतीयांना वाटले. या चळवळीचे थोडक्यात महत्त्व पुढीलप्रमाणे -

१) या आंदोलनाने स्वातंत्र्य मिळविण्याच्या रोखाने एक भक्कम पाऊल उचलले.

२) स्वातंत्र्यासाठी संपूर्ण त्यागाची लोकांची मानसिकता बनली.

३) नेत्यांशिवाय जनतेने हा लढा चालविला.

४) भारतीयांना लवकर स्वातंत्र्य न दिल्यास येथे मोठी क्रांती होऊ शकते याची जाणीव भारतीयांना झाली.

१९२० ते ४५ या काळात म. गांधींच्या नेतृत्वाखाली राष्ट्रीय काँग्रेसने वाटचाल केली. गांधीजींनी प्रारंभी ब्रिटिशांशी सहकार्य केले परंतु जालियनवाला बाग, रौलेट कायदे यामुळे ब्रिटिशांवरील विश्वास संपुष्टात आला व गांधीजींनी त्यांना 'चले जाव'चा इशारा दिला. याच काळात आझाद हिंद सेनेने मोठा लढा इंग्रजांना दिला. १९४७ मध्ये देशाला १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य मिळाले. यात महात्मा गांधींचे योगदान मोठे आहे.

१९४२ मध्ये सुरू झालेले 'चले जाव' आंदोलन हा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील परमोच्च बिंदू होता. हे आंदोलन म्हणजे एक प्रकारची क्रांतीच होती. 'चले जाव'चा ऐतिहासिक ठराव फक्त

भारताच्या स्वातंत्र्यापुरताच मर्यादित नव्हता, या ठरावात जगातील सर्व परतंत्र राष्ट्रांतील जनतेच्या भावना प्रतिबिंबीत झाल्या होत्या. या लढ्याने भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या अखेरच्या पर्वाला सुरुवात झाली. जयप्रकाश नारायण यांनी या आंदोलनाचे महत्त्व पुढील शब्दांत वर्णन केले आहे -

**''फ्रान्समध्ये जसे फ्रेंच राज्यक्रांतीचे व रशियात जसे रशियन क्रांतीचे महत्त्व आहे तसे भारताच्या इतिहासात १९४२ च्या क्रांतीचे स्थान आहे. जगातील कोणत्याही क्रांतीत एवढ्या मोठ्या प्रमाणावर जनतेने भाग घेतला नाही.''**

## ४.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

### प्रश्न १ संज्ञा / संकल्पना स्पष्ट करा.

१. बाँबे असोसिएशन
२. सार्वजनिक काका
३. पुणे सार्वजनिक सभा
४. सनदशीर मार्ग
५. राष्ट्रीय काँग्रेस
६. ॲलन ह्यूम
७. मवाळ अथवा नेमस्त
८. जहाल
९. भारत सेवक समाज
१०. लाल-बाल-पाल
११. चतु:सूत्री
१२. वंगभंग
१३. लखनौ करार
१४. सुरत अधिवेशन
१५. होमरूल
१६. गांधी पर्व
१७. सत्याग्रह
१८. असहकार
१९. सविनय कायदेभंग
२०. मार्शल लॉ
२१. जंगल सत्याग्रह
२२. दहीहंडा सत्याग्रह
२३. राष्ट्रवाद
२४. प्रतियोगी सहकारिता

### प्रश्न २ लघुत्तरी प्रश्न

१. बाँबे असोसिएशनची उद्दिष्टे लिहा.
२. पुणे सार्वजनिक सभेचा उद्देश काय होता?
३. सार्वजनिक सभेच्या कार्याचे महत्त्व स्पष्ट करा.
४. राष्ट्रीय काँग्रेसच्या उदयास कोणती प्रमुख कारणे पूरक ठरली?
५. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापना अधिवेशनाची माहिती द्या.
६. राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेचे महत्त्व सांगा.
७. राष्ट्रीय काँग्रेसची उद्दिष्टे सांगा.
८. मवाळवादी तत्त्वज्ञान स्पष्ट करा.
९. मवाळ काँग्रेसच्या प्रमुख मागण्या कोणत्या होत्या?
१०. नेमस्त राजकारणाचे महत्त्व स्पष्ट करा.
११. जहालवादाच्या उदयाची कारणे सांगा.
१२. जहालवादी तत्त्वज्ञानाची रूपरेखा द्या.
१३. जहाल-मवाळ फरक स्पष्ट करा.
१४. होमरूल चळवळीचे महत्त्व सांगा.
१५. असहकार चळवळीचा कार्यक्रम सांगा.
१६. 'चले जाव' चळवळीचे महत्त्व सांगा.

**प्रश्न ३ दीर्घोत्तरी प्रश्न**

१. बाँबे असोसिएशनच्या कार्याचे स्वरूप व महत्त्व स्पष्ट करा.
२. 'बाँबे असोसिएशन म्हणजे राष्ट्रीय काँग्रेसची गंगोत्रीच होय.' आपला दृष्टिकोण स्पष्ट करा.
३. सार्वजनिक सभेच्या कार्याचा आढावा स्पष्ट करा.
४. राष्ट्रीय काँग्रेस स्थापनेची पार्श्वभूमी सांगा.
५. नामदार गोखल्यांच्या नेतृत्वाखालील काँग्रेसच्या कार्याचे स्वरूप व महत्त्व स्पष्ट करा.
६. 'विनंती पर्व' संपून 'चळवळ पर्व' सुरू झाले असे जहाल कालखंडाबाबत का म्हटले जाते?
७. महाराष्ट्रातील सविनय कायदेभंग चळवळीचा आढावा द्या.
८. 'चले जाव' आंदोलन एक 'जनक्रांती' होते. आपले मत नोंदवा.

## ४.४ सारांश

राष्ट्रीय काँग्रेसची १८८५ मध्ये झालेली स्थापना म्हणजे भारतातील राजकीय जागृतीची नांदीच होती. १९ व्या शतकात झालेल्या वैचारिक जागृतीमुळे राजकीय जागृतीला मोठा हातभार लागला, शहरी व मध्यम वर्गाने शासनाच्या अन्यायी धोरणावर प्रकाशझोत टाकून लोकमत जागृत केले. मुख्य म्हणजे सनदशीर मार्गाची निवड या वर्गाने केली. यातूनच बाँबे असोसिएशन अथवा सार्वजनिक सभेसारख्या संस्था महाराष्ट्रात उदयास आल्या. त्यांच्या कार्याने राष्ट्रीय काँग्रेसची पार्श्वभूमी तयार झाली.

राष्ट्रीय काँग्रेसच्या स्थापनेत ब्रिटिश सरकारची सकारात्मक भूमिका फार महत्त्वाची ठरली,

ॲलन ह्यूम, लॉर्ड डफरीन यांनी घेतलेला पुढाकार विशेष उपयुक्त ठरला. भारतीय जनता व ब्रिटिश सरकार यांच्यातील दुवा म्हणून ही संघटना प्रारंभी कार्यरत होती. १८८५ ते १९०५ हा कालखंड मवाळवादी म्हणून ओळखला जातो. या काळात नामदार गोखलेंनी काँग्रेसचे नेतृत्व केले. सनदशीर मार्ग हे काळाचे वैशिष्ट्य होते.

१९०५ ते २० या कालखंडास लोकमान्यांचे नेतृत्व लाभले. या काळात राजनिष्ठा संपून सरकारशी दोन हात करण्याची तयारी टिळकांनी केली व भारतीय जनतेत असंतोष निर्माण करण्याचे महत्त्वाचे कार्य त्यांनी केले. टिळकांच्या निधनाने काँग्रेसचे नेतृत्व म. गांधींकडे आले. सत्याग्रह, असहकार, सविनय कायदेभंग ही १९२०-४७ या काळातील चळवळीची हत्यारे होती; शेवटी गांधीजींनी ब्रिटिशांना 'चले जाव' चा इशारा दिला. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या कार्यामुळे राजकीय जागृती होऊन भारतीय स्वातंत्र्य जवळ आले.

## ४.५ पारिभाषिक शब्द / संज्ञा / संकल्पना

१. **राष्ट्रवाद –**

'राष्ट्रवाद म्हणजे राष्ट्रनिष्ठा' अशी एक व्याख्या राष्ट्रवादाची केली जाते. देशाच्या स्वतंत्र अस्तित्वाची व एकात्मतेची जाणीव असणे, ती एकात्मता व स्वातंत्र्य साध्य करण्यासाठी व टिकविण्यासाठी झटणे, आपल्या राष्ट्रबद्दल प्रेम, आपुलकी व अभिमान वाटणे म्हणजे राष्ट्रवाद होय. राष्ट्रवाद ही एक प्रकारची भावना व मानसिकता आहे.

२. **सनदशीर मार्ग –**

कायद्याच्या चौकटीत राहून पाळावयाचा मार्ग. प्रामुख्याने भारतीय राष्ट्रीय सभेने मवाळ कालखंडात या मार्गाचा अवलंब केला.

३. **जहालवाद –**

राष्ट्रीय चळवळीत लोकमान्यांच्या नेतृत्वाखाली गटाला नेमस्तांचा अर्जविनंत्यांचा मार्ग मान्य नव्हता. स्वातंत्र्य ही मागून मिळणारी गोष्ट नव्हे असे त्यांचे मत होते. प्रत्यक्ष कृती व आंदोलनाच्या मार्गावर जहालवाद्यांचा विश्वास होता. लाल-बाल-पाल या त्रयीने जहालवादी तत्त्वज्ञानाचा प्रसार केला.

४. **चतु:सूत्री –**

लोकमान्यांनी स्वातंत्र्यासाठी जनतेला स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार ही चार सूत्रे सांगितली.

५. **वंगभंग –**

लॉर्ड कर्झन याने १९०५ मध्ये बंगाल प्रांताची फाळणी करून पूर्व व पश्चिम बंगाल असे विभाजन केले. प्रशासनाच्या सोयीसाठी ही फाळणी केली असे म्हटले असले तरी खरा हेतू हिंदू व मुस्लीम जमातीत भेद निर्माण करून राष्ट्रीय चळवळ कमजोर करणे हाच होता.

६. **होमरूल –**

Home Rule म्हणजे स्वराज्य. लोकमान्य टिळक व ॲनी बेझंट यांनी ही चळवळ चालविली. पहिल्या महायुद्ध काळात जनजागृतीसाठी या चळवळीने महत्त्वाचे कार्य केले.

७. **प्रतियोगी सहकारिता –**

प्रतियोगी म्हणजे ठर्शीेपिीळींश होय. 'शक्य असेल तेथे सहकारिता व जरूर तेथे सनदशीर विरोध' यास टिळकांनी प्रतियोगी सहकारिता हे नाव दिले. प्रतिपक्षाने सहकार केल्यास सहकार्य व असहकार केल्यास विरोध हाच या प्रतियोगी सहकारितेचा खरा अर्थ होय.

८. **सत्याग्रह –**

सत् + आग्रह = सत्याग्रह. यास Passive Resistance असा पर्यायी शब्द आहे. सत्यासाठी केलेला आग्रह म्हणजे सत्याग्रह होय. नैतिकता हा सत्याग्रहाचा पाया होय. अन्याय, अत्याचार, शोषण या विरुद्धचा आत्म्यांचा प्रतिकार म्हणजे सत्याग्रह होय.

९. **असहयोग –**

असहयोग किंवा असहकार म्हणजे एखाद्या व्यक्ती अथवा संस्थेने दुसऱ्या व्यक्ती अथवा संस्थेस सहकार्य मागितले तर ते न देणे होय.

१०. **काळा कायदा –**

केवळ संशयावरून कोणासही अटक करण्याचा, खटला भरण्याचा अधिकार ब्रिटिश सरकारला या कायद्याने मिळाला होता. या कायद्यास रौलेट ॲक्ट अथवा काळा कायदा म्हणून ओळखले जाते.

११. **दहीहंडा सत्याग्रह –**

अकोला जिल्ह्यातील दहीहंडा या गावी १३ एप्रिल १९३० रोजी जनतेने प्रतिकात्मक मिठाचा सत्याग्रह केला. येथे समुद्र नसल्यामुळे विहिरीतील खाऱ्या पाण्याचे मीठ बनवून या मिठाच्या पुड्या वितरीत करून मिठाचा कायदा मोडला. शिवाजीराव पटवर्धन यांनी या सत्याग्रहाचे नेतृत्व केले.

१२. **मार्शल लॉ –**

मार्शल लॉ म्हणजे लष्करी कायदा. नियंत्रणात आणण्यासाठी सोलापूरमध्ये ४९ दिवस लष्करी राजवट लागू होती. मार्शल लॉ मोडणे हा सत्याग्रहाचा भाग होता.

# ४.६ सरावासाठी वाचनासाठी पुस्तके / संदर्भ ग्रंथ


१. Sarkar sumit (1984), Modern India (1885-1947) New Delhi, Macmillan Publication.

**२. केतकर कुमार, (१९८५), कथा स्वातंत्र्याची (महाराष्ट्र), पुणे, म. रा. पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ प्रकाशन.**

**३. सातभाई श्रीनिवास (२००८), आधुनिक भारत, औरंगाबाद, विद्या बुक्स पब्लिशर्स.**

**४. वक्काणी नि. आ. (२००३), आधुनिक विदर्भाचा इतिहास, नागपूर, मंगेश प्रकाशन.**

**५. लिमये मधु (२०१०), स्वातंत्र्य चळवळीची विचारधारा, पुणे, समाजवादी मित्र बिरादरी.**

**६. आधुनिक भारताचा इतिहास (पुस्तक क्र. १ ते ८), नाशिक, य. च. महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रकाशन.**

**७. वैद्य सुमन, कोठेकर शांता (१९९६) आधुनिक भारताचा इतिहास, नागपूर, साईनाथ प्रकाशन.**

## ४.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रिय कार्य –

१. सविनय कायदेभंग चळवळ आणि छोडो भारत चळवळीची प्रमुख केंद्रे महाराष्ट्राच्या नकाशात स्वतंत्रपणे दर्शवा.

**२. 'स्वातंत्र्याचे महाभारत' हे ग. प्र. प्रधान यांचे पुस्तक मिळवून वाचा.**

*****

# घटक क्र. ५
# क्रांतिकारी चळवळ

**अनुक्रमणिका**

**५.0 घटकाची उद्दिष्टे**

**५.१ प्रस्तावना**

**५.२ विषय – विवेचन (मुख्य मुद्दा)**

**५.२.१ चाफेकर, सावरकर आणि त्यांच्या संघटना**

**५.२.२ नाना पाटील आणि त्यांचे कार्य**

**५.२.३ संस्थानांमधील स्वातंत्र्य संघर्ष : हैद्राबाद, कोल्हापूर, सांगली, औध आणि फलटण.**

**५.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम**

**५.४ सारांश**

**५.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

**५.६ संदर्भसूची**

**५.७ सरावासाठी प्रश्न / क्षेत्रिय कार्य / प्रात्यक्षिक कार्य**

## ५.0 घटकाची उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला -

१) क्रांतिकारी चळवळीचे अंतिम उद्दिष्ट कोणते होते ते स्पष्ट करता येईल.

२) क्रांतिकारकांनी आपल्या चळवळीसाठी कोणत्या मार्गांचा अवलंब केला ते विशद करता येईल.

३) महाराष्ट्रात क्रांतिकारी चळवळीची पार्श्वभूमी तयार करण्यात कोणी योगदान दिले याची माहिती देता येईल.

४) क्रांतिवीर सावरकरांच्या क्रांतिकारी कार्याची माहिती देता येईल.

५) क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या कार्याची माहिती स्पष्ट करता येईल.

६) भारतीय संस्थानांविषयी इंग्रज सरकारचे धोरण स्पष्ट करता येईल.

७) हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्य संघर्षाविषयी माहिती देता येईल.

८) कोल्हापूर संस्थानातील स्वातंत्र्य संघर्षाविषयी माहिती देता येईल.

९) सांगली संस्थानातील स्वातंत्र्य संघर्षाविषयी माहिती देता येईल.

१0) औंध स्वातंत्र्य संघर्षाविषयी माहिती देता येईल.

११) फलटण संस्थानातील स्वांतत्र्य संघर्ष स्पष्ट करता येईल.

१२) हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्य संघर्षात पोलिस ॲक्शन का घ्यावी लागली, त्याचे परिणाम काय झाले ते विशद करता येईल.

## ५.१ प्रस्तावना

**भारतीय स्वातंत्र्य चळवळीत मवाळ, जहाल, गांधीवादी व क्रांतिकारी हे विचार प्रवाह दिसून येतात. भारतीय राष्ट्रीय लढ्यात प्रत्येक विचार प्रवाहाचे स्वतंत्र असे महत्त्व होते. हे विचारप्रवाह एकमेकांपासून पूर्णपणे वेगळे आहेत तथापि त्या सर्वांचे ध्येय मात्र स्वातंत्र्यप्राप्ती हेच होते. स्वातंत्र्य चळवळीत प्रारंभीच्या अर्थात राष्ट्रीय सभेच्या स्थापनेपासून ते १९०५ पर्यंत मवाळ नेते सनदशीर मार्गानेच इंग्रज सरकारपुढे आपल्या मागण्या मांडून त्या मान्य करून घेण्यासाठी प्रयत्न करत होते. मात्र त्यांची कार्यपद्धती ज्या तरुणांना मान्य नव्हती ते तरुण म्हणजे जहालवादी होत. लोकमान्य टिळक, लाला लजपतरॉय, बिपिनचंद पाल हे जहालवादाचे नेते होते. जहाल नेत्यांचा उदय ही इंग्रज सरकारच्या दडपशाहीची पहिली प्रतिक्रिया होती. त्यांनी इंग्रज सरकारला जागे करण्यासाठीच नव्हे तर त्यास वठणीवर आणण्यासाठी चतु:सूत्रीचा जोरदार पुरस्कार केला. तसेच सरकारच्या दडपशाही कारभाराची आणखी एक प्रतिक्रिया उमटली आणि ती म्हणजे क्रांतिकारी चळवळीची थोडक्यात स्वातंत्र्यप्राप्ती याच ध्येयाने प्रेरित होऊनही हे प्रत्येक विचारसरणीचे तरुण देशभक्त एकत्र येऊ शकले नाहीत. या सर्व पार्श्वभूमीवर भारतातील क्रांतिकारी चळवळ अभ्यासणे महत्त्वाचे आहे.**

## ५.२ विषयविवेचन

### ५.२.१ चाफेकर, सावकर आणि त्यांच्या संघटना –

ब्रिटिश सत्तेच्या जोखडातून भारताला मुक्त करण्यासाठी अनेक ज्ञात-अज्ञात देशभक्तांनी आपापल्या परीने योगदान दिलेले आहे. १८५७ च्या उठावापूर्वीच्या आद्य क्रांतिकारक उमाजी नाईक यांनी महाराष्ट्रात क्रांतिकारक म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो ते वासुदेव बळवंत फडके होय. आई मृत्यु शय्येवर असतानाही इंग्रज सरकारने त्यांना रजा दिली नाही. आणि आईची मृत्यूपूर्वी भेट झाली नाही त्यामुळे त्यांनी आपल्या रेल्वे खात्यातील कारकून पदाचा राजीनामा दिला आणि इ.स. १८७६ मध्ये महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळाच्या वेळी त्यांनी दौरा केला. त्यांनी रामोशींच्या मदतीने ब्रिटिश सत्तेविरुद्ध बंड करण्याची एक योजना हाती घेतली. ब्रिटिश सरकारच्या मार्गात अडथळे निर्माण करण्यासाठी तारायंत्र उद्ध्वस्त करणे, तुरुंगावर हल्ले करून कैद्यांना मुक्त करणे व दळणवळण यंत्रणा उद्ध्वस्त करणे हे कार्य फडके यांनी केले. शस्त्रास्त्रे मिळविण्यासाठी त्यांनी धनिकांच्या घरावर दरोडे घालून निधी / द्रव्य मिळवणे. सरकारच्या तिजोऱ्या लुटल्या. त्यामुळे त्यांना दरोडेखोरे म्हणून संबोधले जाऊ लागले. २७ जुलै १८७९ रोजी त्यांना अटक करण्यात आली आणि त्यांना ब्रिटिश सरकारने जन्मठेपेची शिक्षा ठोठावून दूर एडनच्या तुरुंगात ठेवण्यात आले. पुढे १८८३ मध्ये त्यांचा तुरुंगातच मुत्यू झाला.

वासुदेव बळवंत फडके, उमाजी नाईक यांच्याप्रमाणे सेनापती बापट, विष्णू गणेश पिंगळे, चाफेकर बंधू, अनंत लक्ष्मण कान्हेरे यांनी क्रांतिकार्यात आपले योगदान दिले.

**चाफेकर बंधू (इ.स.१८९६–९०) :**

या काळात महाराष्ट्रात पडलेल्या दुष्काळ व प्लेगने संपूर्ण महाराष्ट्राला त्रस्त केले होते. सरकारकडून दुष्काळ निवारणासाठी कोणत्याही प्रकारचे उपाय योजले जात नव्हते. तसेच प्लेगच्या साथीचे (रोगाचे) निवारण करण्यासाठी सरकारने वॉल्टर रँड नावाचा युरोपियन अधिकारी कमिशनर म्हणून नियुक्त केला होता. प्लेग निवारणाच्या नावाखाली लष्कराने पुण्यात घराघरातून झडती घेतली. प्लेगची केस शोधण्याच्या निमित्ताने सरकारी लोकांनी व शिपायांनी धडक घरात शिरून स्त्रियांवर अत्याचार केले. मालमत्तेची नासधूस केली. देवघरातही प्रवेश करून तेथील देवदेवतांच्या मूर्ती त्यांनी घराबाहेर फेकल्या. लोकमान्य टिळकांनी या अत्याचारासंदर्भात आपली लेखणी चालवून सरकारवर प्रखर टीका केली व अत्याचाराचा प्रतिबंध करण्याचे आवाहनही केले.

ब्रिटिश सरकारच्या अत्याचारामुळे जनतेत असंतोष निर्माण झाला. मग्रुर ब्रिटिश राज्यकर्ते बंदुकीच्या गोळ्यांशिवाय वठणीवर येणार नाहीत अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण झाली. दि. २२जून १८७९ रोजी भयंकर अत्याचार करणारा वॉल्टर रँड यांस दामोदर चाफेकर यांनी गोळी घालून ठार केले व रँडचा सहाय्यक चार्ल्स ईगरटन आयर्स्ट (ॲम्इर्स्ट) याचा बाळकृष्ण चाफेकर यांनी गोळी घालून खून केला. हत्या केली. ब्रिटिश सरकार या घटनेने हादरून गेले. ब्रिटिशांना मारेकऱ्यांचा शोध कित्येक दिवस लागत नव्हता. शेवटी रुपये २०,००० पारितोषिकाच्या मोबदल्यात (आर्थिक लाभापोटी) पंचमस्तंभी गणेश द्रविड व रामचंद्र द्रविड या बंधूंनी चाफेकर क्लबच्या अस्तित्वाच्या या कटाची माहिती ब्रुईन या सुपरिटेंडेडकडे (सरकारला) दिली. वासुदेव चाफेकर व महादेव रानडे यांनी द्रविड बंधूंची गोळ्या घालून हत्या केली. पुढे ब्रिटिश सरकारने चाफेकर बंधूंना व महादेव रानडेंना फाशी दिली. या घटनेने संपूर्ण देश आश्चर्यचकित झाला. त्याचप्रमाणे जागृतही झाला. रँडच्या वधाचे टिळकांनी नैतिक समर्थन केले रँडच्या हत्येनंतर सरकारने अवलंबलेल्या दडपशाहीचा निषेध म्हणून टिळकांनी 'सरकारचे डोके ठिकाणावर आहे का?' 'राज्य करणे म्हणजे सूड घेणे नव्हे' या मथळ्यांचे जळजळीत लेख 'केसरी'त लिहिले होते.

**वि. दा. सावकर आणि त्यांची संघटना –**

चाफेकर बंधूंनी हौतात्म्य पत्करले त्यावेळी विनायक दामोदर सावरकर अगदी बालवयाचे होते. भारतीयांवर होणाऱ्याअन्याय-अत्याचाराचा प्रतिकार चाफेकरांनी जुलमी ब्रिटिशांची, रँडची हत्या करून केला. या घटनेपासून स्फूर्ती घेऊन वि. दा. सावरकर यांनी 'मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती करून अखेरच्या क्षणापर्यंत मी शत्रूशी लढत राहीन' अशी आपल्या कुलदेवतेसमोर शपथ घेतली. चाफेकरांप्रमाणेच लो. टिळकांच्या जहाल विचारसरणीचाही, त्यांच्यावर प्रभाव पडला होता. याप्रेरणांतून त्यांनी राजाबापू म्हसकर व पागे या मित्रांच्या मदतीने इ. स. १८९९ मध्ये नाशिक येथे 'राष्ट्रभक्त समूहा'ची स्थापना केली होती. सावरकरांनी इ. स. १९०० मध्ये 'मित्रमेळा' या नावाची संस्था संघटना स्थापन केली. पुढे याच संघटनेचे रूपांतर इ. स. १९०४ मध्ये 'अभिनव भारत' या संघटनेत केले. 'अभिनव भारत' या संघटनेच्या सभासदांना स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करण्याची शपथ घ्यावी लागत असे. इंग्रजांची सत्ता उलथून टाकणे हे या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट होते. या संघटनेच्या महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरही असलेल्या शाखांची संख्या ३९ एवढी होती.

महाराष्ट्रातील तरुणांमध्ये सावरकरांनी एका नव्या क्रांतीची ज्योत फुलविली. त्यांनी गुप्तपत्रके, सभा व प्रचार या मार्गांनी अनेकांना भारून टाकले. बंगालच्या फाळणीच्यावेळी सावरकरांनी अनेक

ठिकाणी विदेशी मालाच्या होळ्या केल्या आणि स्वदेशीचा पुरस्कार केला. 'शस्त्राशिवाय स्वातंत्र्य नाही' अशी विचारसरणी होती.

इंग्लंडमध्ये क्रांतिकार्य करणारे श्यामजी कृष्ण वर्मा यांची सावरकरांना शिष्यवृत्ती मिळाली. ते इंग्लंडला कायद्याचा अभ्यास करण्यासाठी गेले. तेथे जाताना त्यांनी आपल्या सहकाऱ्यांना असे आश्वासन दिले की, ''इंग्लंडमधील हिंदी तरुणांच्या मनात क्रांतीचे बीजारोपण करूनच मी हिंदुस्थानात परतेन.'' इ.स. १९०६ मध्ये सावरकर लंडनला पोहोचले. तेथे त्यांना श्यामजी कृष्ण वर्मा यांचे साहाय्य झाले. श्यामजी यांनी स्थापन केलेल्या 'इंडिया हाऊस' चे सावरकर सदस्य झाले. लंडन मुक्कामी असताना त्यांनी थोर इटालियन देशभक्त मॅझिनी यांच्या चरित्राचे मराठीत भाषांतर केले. या चरित्रातून मॅझिनीचे आदर्श भारतीय तरुणांसमोर ठेवावे. जेणे करून त्यातून राष्ट्रकार्यासाठी स्फूर्ती मिळेल असा त्यामागे सावरकरांचा हेतू होता.

सावरकरांनी इंग्डलहून भारतातील क्रांतिकारकांना गुप्तपणे पिस्तुले, काडतुसे पुरविली. ८ मे १९०८ रोजी १८५७ च्या उठावाला ५० वर्षे झाली होती म्हणून सावरकरांनी १८५७ चा उठाव म्हणजे भारतीय स्वातंत्र्य समर होय असे प्रतिपादन केले. सावरकरांच्या क्रांतिकार्यात त्यांचे बंधू गणेश सावरकर यांची मोलाची मदत झाली होती. गणेश सावरकरांनी स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंडमध्ये असताना महाराष्ट्रातील क्रांतिकार्याची धुरा सांभाळली होती. तसेच त्यांनी इंग्रज द्वेषाच्या व स्वातंत्र्य प्रेमाच्या काही कविता प्रसिद्ध केल्या होत्या. त्यामुळे नाशिक येथील कलेक्टर जॅक्सन यांनी गणेश सावरकरांना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

इ. स. १९०८ मध्ये सावरकरांनी काही आक्षेपाई कागदपत्रे जवळ बाळगल्याबद्दल लंडनमध्ये त्यांना अटक करण्यात आली. त्यांच्यावर भारतात खटला चालविण्यासाठी त्यांना जहाजातून आणत असताना फ्रान्सच्या मार्सेलिस बंदरात येताच सावरकरांनी सागरात उडी मारून इंग्रजींच्या हातून निसटण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी इंग्रज शिपायांनी सागरात उड्या घेतल्या व त्यांना पुन्हा पकडून त्यांच्यावर खटला भरला आणि पुढे त्यांना दोन जन्मठेपेच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. तेव्हा सावरकरांचे वय केवळ अठ्ठावीस वर्षांचे होते. त्यांना फर्मावण्यात आलेल्या शिक्षेची वर्षे ऐकून सावरकरांनी शांतपणे बाणेदार उत्तर दिले, ''५० वर्षे भारतात ब्रिटिशांचे राज्य तरी टिकेल का?'' इ. स. १९२४ पर्यंत ते अंदमानच्या सेल्यूलर जेलमध्ये होते. तर १९२४ ते १९३७ मध्ये त्यांची मुक्तता झाली. 'अभिनव भारत' संघटनेच्या सभासदांनी ब्रिटिशांवर दहशत बसविण्यासाठी एक योजना आखली होती. त्यावेळी नाशिकचा कलेक्टर जॅक्सनचा खून अनंत लक्ष्मण कान्हेर या तरुणाने केला. त्यावेळी तो अवघा १७ वर्षाचा होता. तो वि. दा. सावकरांच्या अभिनव भारत संघटनेचा सभासद होता. जॅक्शन खून प्रकरणी ३८ जणांना कैद करण्यात आली. त्यातील तिघांना फाशी, तिघांना जन्मठेपेची शिक्षा फर्मावण्यात आली. तर इतरांना सश्रम तुरुंगवासाची शिक्षा सुनावण्यात आली. 'अभिनव भारत' या संघटनेत संघटनाद्रोही व देशद्रोही सभासद निघाले, त्यामुळे क्रांतिकारकांचे चळवळीच्याद्वारे इंग्रज सरकाच्या मनात दहशत निर्माण केली. तसेच स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाची होळी करण्याची प्रेरणाही भारतीय तरुणांना दिली. सावरकर हे सर्व भारतीय क्रांतिकारकांचे मेरुमणी होते.

### ५.२.२ नाना पाटील आणि त्यांचे कार्य –

नाना पाटील यांचा जन्म ३ ऑगस्ट १९०० रोजी त्यांचे आजोळ बहे ता. वाळवा जि. सांगली येथे झाला. त्यांचे मूळ गाव याच जिल्ह्यातील येडे मच्छिंद्र हे होय. त्यांच्या वडिलांचे नाव रामचंद्र

पिसाळ-पाटील तर आईचे नाव गोजराबाई असे होते. नाना पाटलांचे घराणे वारकरी संप्रदायाचे होते. त्यामुळे त्यांच्यावर बालपणापासून धार्मिक विचारांचे संस्कार झाले होते. त्यांच्या गावात शिक्षणाच्या सोयी जवळपास नव्हत्याच. मात्र त्या काळात बहुजन समाजात महात्मा फुले यांच्या प्रभावातून शिक्षणाचे नवे वारे सुरू झाले होते. आपल्या प्रयत्नातून नानांनी सातवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. इ. स. १९२२ मध्ये त्यांचा दुधोंडी येथील नलवडे घराण्यातील अक्काताई यांच्याबरोबर विवाह झाला. पुढे त्यांनी आजीच्या आग्रहाखातर कऱ्हाड तालुक्यातील सुर्ली येथे काही काळ तलाठ्याची नोकरी केली. त्यांच्यावर महात्मा फुले यांच्या सत्यशोधक समाजाच्या शिकवणुकीचा प्रभाव होता. सत्यशोधक समाजाच्या मार्गाने जाऊन बहुजन समाजाचा उद्धार होऊ शकेल, अशी त्यांची खात्री पटली. त्यामुळे ते सत्यशोधक चळवळीचे पूर्णवेळ प्रचारक म्हणून कार्य करू लागले.

## समाज सुधारणेच्या क्षेत्रातील कार्य –

ग्रामीण भागातील समाजात अंधश्रद्धा, देवभोळ्या समजुती, जातिभेद, हुंडापद्धती इत्यादी दोष त्यांना आढळून आले. त्यावर त्यांनी मोठ्या प्रमाणावर लोकजागृती व्हावी म्हणून कसोशीने प्रयत्न केले. सत्यशोधक समाजाचे एक प्रबोधक कार्यकर्ता म्हणून ते गावोगावी सभा गाजवू लागले होते. त्यांनी मद्यपानबंदी, कर्मकांडांना, उपास-तापासांना फाटा देण्याचा आग्रह, साक्षरता प्रसार, स्त्री शिक्षणप्रसार, अस्पृश्यता निर्मूलन, शेठजी-भटजींच्या शोषणातून बहुजनांची मुक्ती अशा विषयांवर भर देऊन ते बोलत असत. त्यांच्या भाषणांनी विलक्षण परिणाम साधला जात असे. अशा प्रकारे ग्रामीण समाजात लोकजागृती व्हावी यासाठी नाना पाटलांनी आपले योगदान दिले.

## राजकीय कार्य –

महात्मा गांधीजींनी भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे लोण अगदी सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले होते. नाना पाटीलही स्वातंत्र्य चळवळीत आकृष्ट झाले. त्यांनी ब्रिटिशसत्तेविरुद्ध स्वातंत्र्य चळवळीत सहभागी होण्याचा निर्णय घेतला आणि त्यासाठी आपल्या नोकरीचा त्याग केला. महात्मा गांधींनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली. त्या चळवळीचा एक भाग म्हणून जिथे मिठागर नव्हते, तिथे जंगल सत्याग्रह करण्यात आले. सांगली जिल्ह्यातील बिळाशी व रेठरे धरण येथे झालेल्या जंगल सत्याग्रहांत नाना पाटलांनी सहभाग घेतला. त्याचबरोबर ग्रामीण समाजात या चळवळीविषयी प्रचार केला. त्याद्वारे ग्रामीण समाजाला राजकीय दृष्टिकोनातून जागृत करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले होते. या काळात नाना पाटलांनी सातारा जिल्ह्याचा ग्रामीण भाग आपल्या प्रचाराने ढवळून काढला. सविनय कायदेभंगाच्या चळवळीतील सहभागाबद्दल त्यांना दोनदा सश्रम तुरुंगवासाची शिक्षा झाली. इ. स. १९४० मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ सुरू केली. त्या चळवळीत नाना पाटलांनी दोनदा सत्याग्रह केला आणि दोनदा त्यांना कारावासाची शिक्षाही झाली. पुढे कोल्हापूर संस्थानात अर्जुनवाड येथे दुष्काळी परिषद भरली होती. त्या परिषदेत त्यांनी बंदी हुकुमाचे उल्लंघन करून सहभाग घेतला. त्याबद्दलही त्यांना कारागृहात जावे लागले. १९३२ ते १९४२ या दहा वर्षांच्या काळात नाना पाटील आठ वेळा कारागृहात गेले होते.

## प्रतिसरकारची स्थापना –

नाना पाटलांनी चले जाव चळवळीचे प्रभावी जनसंघर्षपर्व ओसल्यानंतर आपल्या मार्गदर्शनातून, प्रभावातून सशस्त्र क्रांतिकारकांच्या मदतीने सातारा येथे पर्यायी सरकार अर्थात प्रतिसरकार सुरू केले होते. म. गांधीजींनी इ. स. १९४२ मध्ये 'चले जाव' चळवळीची घोषणा केली होती. या चळवळीला

संपूर्ण देशवासीयांचा अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. मात्र ब्रिटिश सरकारने सुरुवातीला राष्ट्रसभेच्या सर्व प्रमुख नेत्यांना कैट करून तुरुंगात पाठविले. त्यानंतर देशभर सगळीकडे इंग्रजांची प्रचंड दडपशाही सुरू झाली. परिणामी या चळवळीचा जोर ओसरला. तथापि त्याच सुमारास भारतातील निरनिराळ्या भागात भूमिगत कार्यकर्त्यांनी प्रतिकाराच्या मार्गाचा अवलंब करून ही चळवळ जिवंत ठेवली. अशा प्रकारची सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळ देशात विशेष गाजली, याचे कारण म्हणजे या चळवळीतूनच तेथे इंग्रजीसत्तेच्या विरोधात प्रतिसरकारची स्थापना झाली. या प्रतिसरकारचे प्रणेते होते, क्रांतिसिंह नाना पाटील, त्यांनी व त्यांच्या सहकाऱ्यांनी तब्बल छत्तीस महिने भूमिगत राहून इंग्रजी सत्तेशी कडवी झुंज दिली. या भूमिगत काळाने नाना पाटील यांना अनेक वेळा सुख, दु:ख, जीवन-मृत्यू यांचा पाठशिवणीचा खेळ पाहावा लागला. साताऱ्यात प्रतिसरकारची स्थापना झाल्यानंतर तर ग्रामीण भागात इंग्रज सरकारचे अस्तित्व केवळ नाममात्रच होते. तरुणांची पोलादी संघटना निर्माण करून नाना पाटलांनी इंग्रजांपुढे जबरदस्त आव्हान उभे केले. प्रतिसरकारचे प्रमुख प्रेरणादायी नेते म्हणून त्यांनी केलेल्या कार्यामुळे त्यांना क्रांतिसिंह म्हणून संबोधले जाऊ लागले.

क्रांतिसिंह नाना पाटलांनी आपल्या प्रतिसरकारच्याद्वारे समाजातील गुड-पुंड परकीय सरकारचे हस्तक यांच्या मनात दरारा निर्माण करून त्यांचा पूर्णपणे बंदोबस्त केला. अशा लोकांना शासन करण्यासाठी प्रतिसरकारच्या 'तुफान सेनेने' गुंडांना पकडून त्यांच्या तळपायांवर लाठ्यांचे तडाखे मारण्याच्या अभिनव मार्गाचा अवलंब केला. त्यावरून ग्रामीण समाज हा सरकारला पत्री सरकार म्हणून ओळखू लागला.

प्रतिसरकारच्या तुफान सेनेने आपली स्वतंत्र न्यायदान व्यवस्था निर्माण केली. त्याद्वारे गोरगरीब जनतेला जलद व कमी खर्चात न्याय मिळवून देण्याची व्यवस्था केली. गरीब कष्टकरी शेतकऱ्यांचे कर्दनकाळ असलेल्या सावकार आणि सरकारी नोकर यांना वठणीवर आणले तसेच अस्पृश्यता निर्मूलन साक्षरता प्रसार, ग्रामसफाई, मद्यपानबंदी, हुंडाबंदी, स्वदेशीचा पुरस्कार अशी विधायक कामेही प्रतिसरकारने हाती घेतली होती.

१५ ऑगस्ट १९४७ नंतर क्रांतिसिंह नाना पाटलांनी राष्ट्रसभेचा त्याग करून नव्याने स्थापन झालेल्या शेतकरी कामगार पक्षात प्रवेश केला. भांडवलदार व जमीनदार वर्गाचे हितसंबंध रक्षण करण्याची राष्ट्रसभेने भूमिका घेतली. त्यामुळे राष्ट्रसभेकडून शेतकरी, शेतमजूर, कामगार अशा कष्टकरी श्रमजीवी लोकांच्या हिताची कामे सरकारकडून होण्याची शक्यता नाही असे नाना पाटलांचे म्हणणे होते. पुढे इ.स. १९५३ मध्ये ते भारतीय कम्युनिस्ट पक्षात दाखल झाले होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर महाराष्ट्रात अनेक लढे दिले / उभारले. यामध्ये भूमिहीन शेतकऱ्यांची चळवळ, खंडकरी शेतकऱ्यांचा उठाव, धरणग्रस्त शेतकऱ्यांची चळवळ, याचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल. शेतकऱ्यांच्या मालाला योग्य दर मिळावा यासाठी नाना पाटलांनी लढा दिला. शेतकऱ्यांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यासाठी त्यांनी अखंड परिश्रम घेतले. कष्टकरी शेतकऱ्यांसाठी केलेल्या कार्याची दखल घेऊन क्रांतिसिंह नाना पाटलांची इ.स. १९५५ मध्ये अखिल भारतीय सभेच्या अध्यक्षपदी निवड झाली. कोल्हापूर संस्थानातील प्रजापरिषदेने संस्थानी कारभाराविरुद्ध जे आंदोलन चालविले, त्या आंदोलनास नाना पाटलांनी आपला सक्रिय पाठिंबा दिला होता. त्यांनी रझाकारविरोधी चळवळीस सक्रिय सहकार्य केले होते. त्यामुळे मराठवाड्यातील जनतेला दिलासा मिळाला होता. तसेच कर्नाटकमध्ये समावेश केलेल्या मराठी भाषिक प्रदेशात विलीनीकरण व्हावे यासाठी जो पाटलांनी

आपला सक्रिय सहभाग नोंदविला होता. एवढेच नव्हे तर त्यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. त्या आंदोलनातील सहभागाबद्दल त्यांनी तुरुंगवास भोगावा लागला होता. इ.स. १९५७ मध्ये व इ.स. १९६७ मध्ये क्रांतिसिंह नाना पाटलांची भारतीय लोकसभेवर दोनवेळा निवड झाली होती.

## ५.२.३ संस्थानामधील स्वातंत्र्य संघर्ष : हैद्राबाद, कोल्हापूर, सांगली, औंध आणि फलटण –

**संस्थानामधील स्वातंत्र्य संघर्ष : पार्श्वभूमी / प्रस्तावना –**

आपल्या देशात ब्रिटिश भारत व भारतीय भारत असे एकाच वेळी 'दोन भारत' या भूमीवर नांदत होते. जो भूप्रदेश ब्रिटिशांच्या ताब्यात होता तो ब्रिटिश भारत तर संस्थानिकाच्या ताब्यात असलेला भूप्रदेश संस्थानी भारत अर्थात भारतीय भारत होता. ही संस्थाने काही आठ-दहा नव्हती तर ती होती ५६२. त्यांचे क्षेत्रफळ हे भारताच्या एकूण क्षेत्रफळाच्या २० टक्के एवढे होते. ही संस्थाने छोट्या मोठ्या आकाराची होती. काही संस्थाने तर अगदी छोटी होती. काश्मीर, हैद्राबाद, ग्वाल्हेर, जुनागढ, त्रावणकोर यासारखी काही संस्थाने आकाराने सर्वात मोठी होती. हैद्राबाद संस्थानची लोकसंख्या १ कोटी ४० लक्ष. क्षेत्रफळ ८२ हजार चौरस मैल व या संस्थानात एकूण १६ जिल्हे होते. तर सर्वांत छोटे संस्थान केवळ ५० एकर क्षेत्रफळाचे व ७२ लोकसंख्येचे होते.

संस्थानी भारतात राज्यकारभार एकाच पद्धतीने चालत होता असे नाही. काही संस्थानांनी आपले प्रजेला काही अंशी का होईना लोकशाहीचे हक्क दिले होते. बडोदा, कोल्हापूर, म्हैसूर संस्थानांत आधुनिक सुधारणा करण्यात आल्या होत्या तर काही संस्थाने आपल्या प्रजेला अगदी गुलामासारखे वागवित होते. जुनागढच्या संस्थानिकाने तर आपल्या रोशन नावाच्या कुत्रीचे लग्न थाटामाटात १२ लक्ष रुपये खर्चून देश विदेशातील पाहुण्यांना आमंत्रित करून व त्यासाठी पत्रिकाही छापून लग्न लावले होते. बहुतेक संस्थानिक आपल्या प्रजेची दडपशाही करून अनिर्बंध पद्धतीने कारभार पाहत असत. एकंदरीत भारतीय संस्थानांची स्थिती अनियंत्रित राजवटीसारखीच होती.

ब्रिटिशांनी इ.स. १७५७ ते इ.स. १८५७ या शंभर वर्षांच्या काळात भारतातील अनेक राज्ये येनकेनप्रकारे जिंकून घेतली. त्यांनी स्वतंत्र्य धोरण आखून संस्थानांशी आपले संबंध टिकविले. त्यानंतर इंग्रजांनी त्यांच्या गरजेनुसार धोरणात बदल केले. इ.स. १८५८ ते १९४० या काळात ब्रिटिश पार्लमेंटचा अंमल होता. या काळात ब्रिटिश घटनात्मक प्रमुख असलेल्या सम्राट किंवा सम्राज्ञीच्या नावाने भारतावर राज्य सुरू झाले. संस्थानिकांच्या बाबतीत सम्राज्ञीने आपला जाहीरनामा काढून आपले त्यांच्याबद्दलचे उदार धोरण जाहीर केले. संस्थानिकांनी ईस्ट इंडिया कंपनीशी केलेले सर्व करारमदार राणी सरकार पाळेल त्याचबरोबर हे करारमदार संस्थानिकांनी आपल्या परीने पाळावेत असे जाहीर केले. त्यानंतर भारत पारतंत्र्यातून मुक्त झाला. स्वतंत्र भारतात संस्थानाच्या विलीनीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. संस्थानिकांनी आपल्या जबाबदाऱ्या पार पाडण्यासंबंधी इ.स. १८९९ मध्ये लॉर्ड कर्झनने म्हटले होते की, ब्रिटिशांना त्यांच्या सत्तेत एक भागीदार म्हणून सहकार्य करणे, मांडलिक असल्याची जाणीव ठेवणे, विदेश संबंध, सरंक्षणसंबंधी सहकार्य करणे, सैन्य भरतीत सहकार्य करणे, लष्करासाठी सैन्य व खर्चासाठी सहकार्य करणे यासारखी कर्तव्ये संस्थानिकांनी पार पाडावीत. पुढे उदयपूर येथील भाषणात लॉर्डमिंढी यांनी संस्थानांचे प्रश्न सहानुभूतीने सोडवण्याचे आश्वासन दिले होते. त्यामुळे संस्थानिकांना दिलासा मिळाला होता. संस्थानिकांनी ब्रिटिशांना दोन्ही जागतिक

महायुद्धांच्या वेळी मदत केली. त्यांचे सर्वभौमत्व मान्य केले होते.

## संस्थानांबाबत ब्रिटिशांचा दृष्टिकोन –

सर विल्यम वॉर्नर या ब्रिटिश इतिहासकाराने ब्रिटिश राज्यकर्ते व भारतीय संस्थाने यांच्या संबंधांचे पुढील तीन कालखंड आपल्या 'भारतीय संस्थाने' या स्वतंत्र ग्रंथात नमूद केले आहेत.

१) हस्तक्षेप न करण्याचे धोरण - इ.स. १९५७ ते १८१४ या कालखंडात हे धोरण लागू करण्यात आले होते. या कालखंडात ईस्ट इंडिया कंपनी सरकार भारतातील संस्थानिकांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप करणार नाही असे घोषित केले होते.

२) स्वामित्व प्रस्थापनेचे धोरण - इ.स. १८१४ ते १८५८ या कालखंडात हे धोरण स्वीकारण्यात आले होते. लॉर्ड हेस्टिंग्ज ते लॉर्ड डलहौसीच्या कालखंडात भारतीय राज्ये जिंकून ती ब्रिटिश साम्राज्यात जोडण्याचे धोरण आखले होते. ब्रिटिशांनी या कालखंडात भारतातील राज्ये आपल्या वर्चस्वाखाली आणली. तसेच संस्थानिक ब्रिटिशांचे मांडलिक झाले होते. त्यांना आपल्या दरबारात एक ब्रिटिश रेसिडेंट ठेवावा लागे. कोणत्याही राजाशी अथवा दुसऱ्या संस्थानिकांशी संस्थानिकांना स्वतंत्रपणे करार करता येणार नाही असेही स्पष्ट करण्यात आले होते.

३) १८५७ चा उठाव व भारतीय संस्थाने : लॉर्ड डलहौसीने आपल्या कालखंडात संस्थाने खालसा करण्याचे धोरण आखून अनेक संस्थाने खालसा केली होती व त्यांना मांडलिकत्व स्वीकारावे लागले होते. त्यामुळे संस्थानिकांमध्ये असंतोष निर्माण झाला होता. परिणामी नानासाहेब पेशवा, मोगल बादशहा बहादूर शहा जफर, तात्या टोपे, झाशीची राणी लक्ष्मीबाई, कुंवरसिंह, अयोध्येची बेगम इजतर मइल यांनी १८५७ च्या उठावाचे नेतृत्व केले. संस्थानिकांचा ब्रिटिशसत्तेला अशा प्रकारचा विरोध आणि त्यांची नाराजी लक्षात घेऊन ब्रिटिश सरकारने संस्थानिकांच्या कारभरात हस्तक्षेप न करण्याचे धोरण ठरवले. त्यांना त्यांच्या स्वातंत्र्याचे अभिवचन / ग्वाही दिली. त्यासाठी मात्र संस्थानिकांनी ब्रिटिशांचे सार्वभौमत्व मान्य करावे असे घोषित करण्यात आले.

## मोर्ले–मिंटो सुधारणा कायदा व संस्थाने –

१९०९ च्या नोव्हेंबर महिन्यात ब्रिटिश सरकारने भारतीय संस्थानांसंबंधी आपले धोरण स्पष्ट केले होते. ''परकीय आक्रमण व अतंर्गत स्वातंत्र्य यांचे सरकार रक्षण करील, मात्र संस्थान क्षेत्रातील प्रजेच्या कल्याणासाठी दुर्लक्ष करून एखादा राज्यकर्ता वागत असेल तर आम्ही ते सहन करणार नाही.'' हा संस्थानाविषयींच्या धोरणाचा महत्त्वाचा भाग लॉर्ड मिंटो यांच्या भाषणातून स्पष्ट झाला होता.

नरेंद्र मंडळाची स्थापना (संस्थानिकांचे मंडळ) व त्याची वाटचाल माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणा अहवालाने संस्थानिकांचे एक कायदा मंडळ स्थापन करण्यात आले होते. या नरेंद्र मंडळामध्ये १२० सभासद होते. अनेक संस्थाने त्यात सामील झाली नव्हती. नरेंद्र मंडळ एक सल्लागार मंडळच होते. व्हाईसरॉय हा या मंडळाचा अध्यक्ष होता. नरेंद्र मंडळाचे सभासद आपल्यातीलच एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करीत असे. उपाध्यक्ष या नरेंद्र मंडळाचे कामकाज पाहत असे. या मंडळाची सभा वर्षातून एकदा होत असे. त्याचबरोबर वर्षातून दोन-तीन वेळा कार्यकारी मंडळाची सभा होत असे. नरेंद्र मंडळाद्वारे संस्थानिकांना सामूहिकरित्या विचारविनिमय करून ब्रिटिश सरकारबरोबर सातत्याने संपर्क करणे शक्य झाले. तथापि यामंडळाच्या कार्यपद्धतीवर तसेच अधिकारांवर अनेक निर्बंध लादण्यात आले होते. उदा. ब्रिटिश सरकारबरोबर संस्थानिकांनी जे करार करण्यात आले आहेत

त्यावर चर्चा न करणे. नरेंद्र मंडळाचे अध्यक्ष म्हणून भोपाळच्या नवाबाची निवड घोषित करण्यात आली. ते मुस्लिम लीगचे चाहते व काँग्रेसचे विरोधक होते. एकूण भारतीय संस्थानांपैकी १०८ संस्थाने प्रथम दर्जाची होती. त्यापैकी ३० संस्थानांमध्ये विधिमंडळे होती. दुय्यम दर्जाची संस्थाने १२७ असून त्यांचे १२ प्रतिनिधी नरेंद्र मंडळावर होते. तर तिसऱ्या वर्गातील ३२७ संस्थानिकांमधून एकही प्रतिनिधी नरेंद्र मंडळात (Chamber of Princes) नव्हता. कोल्हापूर येथील संस्थानिक छत्रपती सभासद म्हणून सक्रिय सहभाग होत असत. बडोदा, इंदूर, हैद्राबाद, जयपूर व उदयपूर या मोठ्या संस्थानांच्या प्रमुखांनी सभासदत्व स्वीकारले नव्हते. त्यांच्यात निरनिराळ्या दर्जाच्या संस्थानिकांचा मुद्दा होता. ते आपापल्या प्रतिष्ठेसाठी एकमेकांशी कुरबुरी (भांडण) चालत होत्या.

**महाराष्ट्रातील संस्थानांची स्थिती –**

ब्रिटिश राज्यकर्त्यांनी साम्राज्य विस्ताराच्या भूमिकेतून खालसा व विलीनीकरण धोरणाचा अवलंब केला होता. त्या धोरणामुळे सर्वदेशभरातील संस्थानिकांमध्ये असंतोष पसरला होता. पुढे व्हिक्टोरिया राणीच्या जाहीरनाम्यामुळे नवे धोरण आले. ईस्ट कंपनीच्या सत्तेचा शेवट होऊन ब्रिटिश राजा किंवा राणीचा अर्थात ब्रिटिश पार्लमेंटचा अंमल भारतावर सुरू झाला. ब्रिटिशसत्तेने संस्थानांवर वर्चस्व निर्माण करून आपले अधिराजत्व विकसित केले. संस्थानी प्रजेवर संस्थानिकांचा व ब्रिटिश राज्यकर्त्यांचा असा दुहेरी अंमल होता. संस्थानिक आपल्या मर्जीप्रमाणे राज्यकारभार करीत. संस्थानी प्रजेच्या हिताच्या मुळीच विचार केला जात नसे. त्यामुळे संस्थानिक व प्रजा यांच्यात परस्पर चीड व विरोध निर्माण झाला.

महाराष्ट्रातील नागपूर, सातारा, ही संस्थाने खालसा करण्यात आली होती तर मराठवाडा ज्या संस्थानात होते ते हैद्राबाद, इचलकरंजी, गगनबावडा, कापशी, विशालगड, कागल, सावंतवाडी इत्यादी संस्थाने मांडलीक करण्यात आली होती. दक्षिण महाराष्ट्रातील कोल्हापूर, औंध, जमखंडी, अक्कलकोट, भोर, जंजिरा जत, कुरुंदवाड बुद्रक, कुरूंदवाड खुर्द, मिरजमळा, बुधगांव, मिरज, फलटण, मुधोळ, रामदुर्ग, सांगली, सावंतवाडी, सावनूर व वाडी जहागीर अशी अठरा संस्थाने होती या सर्व संस्थानांची एकूण लोकसंख्या २७,८५,४२८ एवढी होती. तर त्यांचे रुपये एक कोटी साठ लक्ष एकावन्न हजार अठुसष्ट एवढे उत्पन्न होते. त्यांचे क्षेत्रफळ १०,९०२ चौरस मैल एवढे होते.

इ.स. १९२० पर्यंत महाराष्ट्रातील संस्थानी प्रजेला कोणत्याही प्रकारचे राजकीय अधिकार देण्यात आलेले नव्हते. एवढेच नव्हे तर त्यांना सभा स्वातंत्र्यही नव्हते. भारतातील राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाचा परिणाम प्रजेवर होऊ लागला. त्यांना नेत्यांचे मार्गदर्शन घडू लागले. परिणामी त्यांच्या मनात ब्रिटिश सत्तेचे व संस्थानिकांचे असे दुहेरी जाखड झुगारून देण्याची भावना दृढ होऊ लागली.

लोकशाही हक्काची मागणी करणे, धार्मिक आणि सामाजिक स्वातंत्र्य मिळविणे आणि राजकीय घटना घडामोडीत सहभाग मिळावा तसेच त्याबाबतीत प्रशिक्षण व्हावे या भावना संस्थानीप्रजेत विकसित झाल्या. त्यातून महाराष्ट्रात संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्य संघर्षाला सुरुवात झाली.

हैद्राबाद संस्थानामधील स्वातंत्र्य संघर्ष होण्यापूर्वी हैद्राबाद संस्थानच्या कारभाराचे स्वरूप कसे होते, ते आपण प्रथम अभ्यासणार आहोत.

मध्यवर्ती केंद्रसत्ता दूरच्या प्रदेशावर आपले नियंत्रण ठेवू शकत नव्हती. त्यामुळे दुर्गम प्रदेशात सुभेदाराद्वारे अर्थात प्रशासकाद्वारे निर्धारित शेतसारा व करवसूली करून ती शासकीय तिजोरीत जमा करणे तसेच अधिकाऱ्यांवर लक्ष ठेवणे या उद्देशाने संस्थाने निर्माण झाली होती. अशा संस्थानांपैकी

हैद्राबाद एक संस्थान होते. मोगलांचा दक्षिणेकडील सुभेदार या नात्याने निजाम उल-मुल्क कारभार पाहत होता. पुढे मुघल सत्ता खिळखिळी होताच तो स्वतंत्रपणे आपला कारभार पाहू लागला. १८ व्या शतकापासून त्याने टिपू, मराठे, फ्रेंच व इंग्रज यांच्याशी अनेक युद्धे केली. त्यापैकी बऱ्याच युद्धात त्याचा पाडाव झाला होता. तथापि त्याच्या सत्तेचा विस्तार होतच होता. त्याच्या वारसांनी आपली सत्ता दोन शतकांपेक्षा अधिक काळ टिकविली होती.

हैद्राबाद संस्थानात एकूण सोळा जिल्हे होते. त्यात मराठवाड्यातील मराठी भाषिक पाच जिल्हे ,कन्नड भाषिक तीन जिल्हे, कर्नाटकतील आणि तेलुगु भाषिक आठ जिल्हे समाविष्ट होते. त्यात हैद्राबाद संस्थानातील मुसलमानांची लोकसंख्या १०%, हिंदूची ८५% व इतर अल्पसंख्याक ५% एवढी होती. हैद्राबादची उर्दू ही राजभाषा होती. याच भाषेतून शिक्षण आणि राज्यकारभार चालत असे. हैद्राबादच्या निजामाकडे अमाप संपत्ती होती. आपली संपत्ती इस्लामच्या समर्थनार्थ वापरण्याचा त्याचा कल / अट्टाहास होता. मुसलमानांची मालमत्ता कुणीही हिंदू विकत घेऊ शकणार नाही अशी स्थिती होती. मुसलमान हे हैद्राबाद संस्थानात 'प्रोटेक्टेड नेशन' म्हणून वावरत असत. भारतातील तत्कालीन संस्थानांपैकी आकाराने विस्तृत आणि मध्यवर्ती असलेले हे हैद्राबाद संस्थान होते. हे संस्थान मोगली सत्तेपासून वेगळे होऊन त्याची स्वतंत्र्य स्थापना मीर कमरूद्दीन ऊर्फ चिनकुलीजखान यांनी केली. या संस्थानचे क्षेत्रफळ ८२ हजार ४८ चौरस मैल होते. तर इ.स. १९४१ मध्ये हैद्राबादची एकूण लोकसंख्या १ कोटी ६३ लक्ष ३८ हजार ५३४ एवढी होती. हैद्राबाद संस्थानावर मुस्लिमांची सत्ता असल्यामुळे दहा टक्के मुस्लिमांना पंचाऐंशी टक्के नोकऱ्या होत्या. निजामाने मराठी सत्तेच्या आक्रमणापासून रक्षण करण्यासाठी तैनाती फौज पद्धतीचा स्वीकार केला होता आणि तिच्या खर्चासाठी इंग्रजांना वऱ्हाड प्रांत दिला होता. पुढे तो प्रांत परत मिळविण्यात राजकीय आणि सामाजिक सुधारणा घडून आल्या. त्यांचा प्रभाव हैद्राबादमधील प्रजेवर पडला. मात्र आपल्या प्रजेला कोणतेही हक्क आणि अधिकार द्यायला निजाम राजी नव्हता. त्यावेळी सुधारणांच्या प्रभावातून संपूर्ण संस्थानात प्रजेने मुद्रण, लेखन, भाषण यांच्या स्वातंत्र्याची मागणी केली. मात्र हैद्राबाद संस्थानात राजकीय पक्षाची स्थापना करण्यास मनाई होती. त्यामुळे स्वांतत्र्यासंबंधीची चळवळ असंघटित राहिली. म्हणून प्रजेच्या मागण्यांचा पाठपुरावा करता आला नाही याची परिणती निजामाचा कारभार प्रजाहितविरोधी आणि अधिकाधिक एकतंत्री होण्यात झाली.

**हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा विभागातील स्वातंत्र्यसंघर्षाच्या संदर्भात तेथील प्रजेने कशाप्रकारे आंदोलनाला सुरूवात केली. त्याचा आढावा घेणे क्रमप्राप्त ठरेल.**

हैद्राबाद संस्थानात मराठवाड्यातील औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड व उस्मानाबाद या पाच जिल्ह्यांचा अंतर्भाव होता. आता त्यात लातूर, जालना व हिंगोली या जिल्ह्यांची भर पडलेली आहे. निजाम काळात मराठवाड्यातील प्रजेने खूप काही प्रहार सोसले होते. हैद्राबाद संस्थानात निजामाचा आश्रय व मान्यता असलेल्या संघटना होत्या. त्यात खाकसार, सैन्यशक्ती, इत्तेरादुल मुसलमीन व रझाकार या संघटनांनी मोठ्या प्रमाणावर अत्याचार व दडपशाही केली. त्याचबरोबर हैद्राबादचा स्वातंत्र्य लढा चालविणाऱ्या संघटनांमध्ये आर्यसमाज, किसान दल, आर्यवीर दल, कम्युनिस्ट, हिंदुमहासभा व हैद्राबाद स्टेकाँग्रेस यांचा प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

**आर्यसमाज संघटना व त्यांचे कार्य –**

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या मिशनद्वारे प्रथम या आंदोलनाला सुरुवात झाली. त्यास आर्यसमाज असे नामाभिमान देण्यात आले. या आर्यसमाजाची इ.स. १९२० मध्ये हैद्राबाद संस्थानात स्थापना झाली होती. या समाजाच्या अडीचशे शाखा संस्थानात होत्या. या आर्य समाजाचा विस्तार हैद्राबाद संस्थानच्या तेलंगणा, कर्नाटक आणि मराठवाडा या तीनही विभागांत होता. मात्र त्याचे प्राबल्य प्रामुख्याने मराठवाड्यात अधिक होते. हैद्राबाद संस्थानात स्थापन झालेल्या आर्य समाजाचे अध्यक्ष होते. बॅ. विनायकराव कोरटकर तर श्री. बन्सीलाल हे मुख्यमंत्री होते. भाई बन्सीलाल यांनी उदगीर येथे आर्य समाजाचे मुख्य कार्यालय उघडले होते. सोलापूर येथून 'वैदिक संदेश' हे वृत्तपत्र सुरू करण्यात आले. हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाने इ.स. १९२० ते १९३० या कालखंडात अतिशय जोमाने हैद्राबाद मुक्ती लढा चालविला . पुढे १९३० ते १९४० या दुसऱ्या कालखंडात या लढ्यात आर्यसमाजाने लढ्याची तीव्रता खूप वाढविली होती. हैद्राबाद संस्थानात भाई बन्सीलाल व शामलाल या दोघांनी मोठी कामगिरी केली. हैद्राबाद संस्थानातील आर्य समाज प्रतिनिधींचे प्रधान बॅ. विनायकराव विद्यालंकार, नरेंद्र आर्य, बॅ. विनायकराव कोरटकर यांनी हिंदू समाजास स्वाभिमानाने ताठ उभे राहण्याच्या बाबतीत मोठे योगदान दिले. आपल्या संस्थानात आर्य समाजाची ही चळवळ व्यापक होत असल्याचे पाहून ती दडपून टाकण्याचे निजाम सरकारने ठरविले. इ.स. १९३५ मध्ये निलंगा येथील हवनकुंड आणि आर्य समाज मंदिर सरकारने गुंडांकरवी उद्ध्वस्त केले. आर्य समाजींचे, त्यांच्या अनुयायांचे बायबल म्हणजे 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ होय. तो ग्रंथ कोणाच्या हातात जरी दिसला तरी निजामी पोलीस त्या संबंधितास अटक करीत असत. निलंगा येथील घटनेने व्यथित होऊन संघटनाकुशल, धाडसी असलेल्या श्री. शेषराव यांनी गावोगावी शस्त्रसज्ज आर्य समाज संघटना स्थापन केल्या.

**आर्य समाजाचा धर्मांतरास प्रखर विरोध आणि कार्यकर्त्यांचे हौतात्म्य –**

इ.स. १९३२ मध्ये मुस्लिम धर्मप्रसार व धर्मांतर मोहिमेस प्रखर विरोध केला होता. त्यावेळी मुस्लिम धर्मांतर मोहिमेस आर्य समाजाच्या कार्यामुळे प्रतिबंध झाला. तथापि निजाम सरकार व मुस्लिम धर्मान्ध शक्तींनी अत्याचार व दडपशाहीचा कळसच केला होता. या परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी दिल्ली येथील सार्वदेशिक आर्य समाजाच्या प्रतिनिधी सभेची नियुक्ती करण्यात आली होती. त्या संदर्भात पाठविलेल्या शिष्टमंडळात अध्यक्ष म्हणून नारायण स्वामी तर सदस्यांत स्वामी स्वतंत्रानंद व आचार्य रामदेव होते. शिष्टमंडळ संस्थानातून जाताच तेथील प्रजेवर पुन्हा जुलूम व अत्याचार वाढू लागले.

हैद्राबाद मुक्ती लढ्यात दासप्पा शिवबसप्पा हर्के ऊर्फ वेदप्रकाश या बहादूर तरुणाने आपल्या मातृभूमीसाठी हौतात्म्य पत्करले.

निजामी सरकारच्या जुलमाला, अत्याचाराला भीक न घालता आर्य समाजी चळवळीच्या कार्याचा जोर अधिकच वाढला. वेदप्रकाशच्या बलिदानानंतर आर्य समाजीने ते धर्मवीर आर्य यांचीही भर रस्त्यात हत्या करण्यात आली. त्यानंतर आर्य समाजाच्या चळवळीला विशेष जोर चढला. प्रजेत तीव्र चीड निर्माण झाली. श्री. वेदप्रकाश व श्री. धर्मप्रकाश यांच्या हत्यांची चौकशी करण्याची मागणी भाई शामलाल यांनी लावून धरली होती. मात्र निजामी सरकारने त्यांची ती मागणी फेटाळून लावली. आणि इ.स. १९३७ मध्ये दसऱ्याच्या दिवशी सीमोल्लंघन प्रसंगी मुसलमानांना चिथावणी देऊन उदगीर येथे दंगल घडवून आणली. त्यामुळे या दंगलीसंबंधीचा आरोप श्यामलाल व त्यांचे साथीदार श्री.

अमृतराव मास्तर, श्री. मोतीलाल इत्यादींवर ठेवून त्यांना अटक करण्यात आली. त्यानंतर श्री. शामलाल यांची बीदर येथील कारागृहात रवानगी करण्यात आली.

पंडित शामलाल यांचा खटला चालविणाऱ्या बॅ. विनायकराव विद्यालंकार व पं. नरेंद्र यांचे म्हणणे निजामी सरकारने धुडकावून लावले आणि पं. नरेंद्र यांना अटक करून जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. या घटेनेने अस्वस्थ झालेल्या बॅ. विनायकराव यांनी अखिल भारतीय आर्य सभेशी विचार विनिमय केला. या दिल्लीच्या आर्यसभेच्या सूचनेनुसार पुढील कार्याची दिशा ठरविण्यासाठी सोलापूर येथे हैद्राबाद राज्यातील आर्य येथे आर्य प्रतिनिधींची बैठक बोलाविली. तसेच इ.स. १९३८ मध्ये सोलापूर येथे आर्य प्रतिनिधी सभा हैद्राबाद या संस्थेचे कार्यालय सुरू करण्यात आले आणि हैद्राबाद राज्यातील सर्व आर्य समाजी कार्यकर्त्यांना अधिवेशनासाठी सोलापूर येथे येण्याचे आवाहन करण्यात आले. त्याप्रमाणे शेकडो कार्येकर्ते नियोजित ठिकाणी येऊ लागले. या अधिवेशनासाठी अनेक नेत्यांना निमंत्रित करण्यात आले. त्यात श्री. स्वातंत्र्यानंद (दिल्ली), लोकनायक बापूजी अणे (नागपूर), स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर(पुणे), श्री. नारायण स्वामी, श्री. लाला खुशालचंद खुरचंद (संजाब) इत्यादी होते. सोलापूर अधिवेशनाचे वृत्त ऐकून निजामी सरकार संतप्त झाले व निजामी अधिकाऱ्यांनी बिदरच्या कारागृहात असलेल्या श्यामलालजींना औषधामध्ये विष मिसळून दिले. त्यातच श्यामलालजींचे निधन झाले. पं. नरेंद्रजींना खोट्या आरोपाखाली अटक करून जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली. त्यांना मन्ननरच्या कारागृहात डांबले.

पं. श्यामलालजींच्या हौतात्म्याने सोलापूर येथील नियोजित अधिवेशनात एक प्रकारची चेतना आली. या अधिवेशनात बापूजी अणे आणि वि. दा. सावरकर यांची अत्यंत प्रेरक अशी भाषणे झाली. निजाम सरकारच्या पाश्वी गुलामगिरीतून मुक्त होण्यासाठी मराठवाड्यातील प्रजेने निकराचा लढा देण्याशिवाय पर्याय नाही असे त्यांनी पटवून दिले. या अधिवेनात शेवटी असे ठरविण्यात आले की, हिंदू महासभा आणि आर्य समाज यांनी अहिंसात्मक सत्याग्रहाच्या मार्गाने लढा द्यावा. या आर्य समाज अधिवेशनात सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले.

## आर्य समाजी सत्याग्रही लढा –

आर्य समाजाने आरंभलेल्या सत्याग्रहात भारताच्या कानाकोपऱ्यातून आर्य समाज सत्याग्रही आले होते. या आर्य समाज सत्याग्रहात संस्थानाबाहेरच्या बहुतेक लोकांचा समावेश होता. त्यात स्थानिक हैद्राबाद येथील जवळपास तीन हजार लोकांचा सहभाग होता. हैद्राबादच प्रधानमंत्री असलेला सर अकबर हैदरी यांच्या अधिकृत निवेदनानुसार सत्याग्रहात १२,००० आर्य समाजींची नोंद आहे. धर्म आणि धार्मिक हक्क यांच्या बाबतीतच आर्य समाजाने आपल्या सत्याग्रहाची मर्यादा अधोरेखित केली होती. आर्य प्रतिनिधी सभेचे पहिल्या तुकडीचे सुत्रधार श्री. नारायण स्वामी यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत हैद्राबाद शहरात ३१ जानेवारी १९३९ रोजी प्रवेश केला. त्यांना अटक करण्यात येऊन गुलबर्गा येथील कारागृहात डांबण्यात आले. त्यानंतर सार्वदेशिक आर्य सभेतर्फे सत्याग्रहांना सुरूवात झाली. सर्वत्र सत्याग्रह होऊ लागले. श्री. नारायण स्वामींच्यानंतर आर्य प्रतिनिधी सभेची दुसरी तुकडी कुंवर चांदकरण सारडा, तिसरी तुकडी आनंद स्वामी ऊर्फ खुशालचंद, चौथी तुकडी राजगुरू धुरेंद्र शास्त्री, पाचवी तुकडी अभेदानंद ऊर्फ वेदव्रत तर सहावी तुकडी महोदय कृष्ण यांच्या नेतृत्वाखाली आखण्यात आली. ज्या सीमावर्ती शहरांमध्ये कायम करण्यात आली त्यात बार्शी सोलापूर, पुसद, चंद्रपूर, मनमाड, अहमदनगर, विजयवाडा यांचा समावेश होता. या केंद्रामधून

मोठ्या तुकड्या सत्याग्रहात सहभागासाठी येऊ लागल्या होत्या. मराठवाड्यातून जवळपास ८० टक्के सत्याग्रही आले होते. श्री. दिगंबरराव शिवनगीकर (लातूर, श्री. शंकरराव पाटील (अंधोरी), श्री. शेषराव वाघमारे (निलंगा), श्री. गणपतराव कथले (कळंब), श्री. निवृत्ती रेड्डी, श्री. दिगंबरराव लाटकर (अहमदापूर) या स्थानिक नेत्यांनीही लढ्याचे नेतृत्व केले.

आर्य समाजाचे सत्याग्रही मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांतून आले होते. दि. ५ मे १९३९ रोजी नांदेड येथे पाचव्या तुकडीचे नेते पं. वेदव्रत यांनी आपल्या ५१३ लोकांसह सत्याग्रह केला. स्वामी सुंदरनंद यांनी ४६ जणांसह नांदेडला येऊन सत्याग्रह केला. १४ मे १९३९ पंजाब येथील नारायण सेन यांना नऊ जणांसह औरंगाबादला असताना ५ जून १९३९ रोजी अटक करण्यात आली. त्याचदिवशी औरंगाबाद येथे चंद्रपूरच्या आर्यसमाजी शिबिरातील ६१ सत्याग्रहींनी सत्याग्रह केला. महाशय कृष्णा या सहाव्या तुकडीच्या प्रमुखासोबत औरंगाबादसह विविध प्रांतांचे मिळून जवळपास एक हजार सत्याग्रही होते. तर सातव्या तुकडीचे पं. बुद्धदेव यांनी पाचशे सत्याग्रहींवर औरंगाबाद येथे सत्याग्रह केला. २५ जून १९३९ पं. विनायकराव कोरटकर, विद्यालंकार यांच्या नेतृत्वाखाली आठवी तुकडी होती. मात्र त्याचवेळी आर्यसमाजाने केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या मागण्या निजाम सरकारने मान्य केल्याचे जाहीर केले त्यामुळे ७ ऑक्टोबर १९३९ रोजी होणारा नियोजित सत्याग्रह तहकूब करण्यात आला. इ.स. १९३९ पर्यंत एकंदरीत १२,००० सत्याग्रही कारागृहात होते. त्यापैकी स्थानिक ५००० सत्याग्रही होते. त्यात मराठवाड्यातील सत्याग्रही सर्वाधिक होते. हैद्राबाद स्वातंत्र्य संघर्षात मराठवाड्यातील विद्यार्थ्यांचाही मोठा सहभाग होता. आर्यसमाजाच्या विचाराने प्रभावित होऊन सोलापूर येथील दयानंद कॉलेजच्या विद्यार्थी वेगाने निजामाविरुद्ध झेंडा सत्याग्रह आणि वंदे मातरम् सत्यागृहात सहभाग नोंदविला होता. त्यांनी दयानंद कॉलेजमध्ये हैद्राबादच्या 'स्टुडंटन्स युनियन' नावाची संघटना स्थापन केली होती. हैद्राबाद स्वातंत्र्य संघर्षात सर्व जातींमधील जनतेचा सहभाग होता. अगदी ग्रामपातळीपर्यंत पोहोचलेल्या आर्यसमाजी सत्याग्रही चळवळीला हैद्राबाद स्वातंत्र्य संघर्षात अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

**हैद्राबाद संस्थानातील संघर्षात स्टेट काँग्रेसचे कार्य –**

२९ जून १९३८ रोजी हैद्राबादमधील नेत्यांनी हैद्राबाद स्टेट काँग्रेसची स्थापना केली. तसेच त्यासाठी एक हंगामी समितीची निवड करण्यात आली होती. श्री. रामकृष्ण धूत यांच्याकडे तिचे संयोजकत्व देण्यात आले होते. या समितीच्या सदस्यांमध्ये बी. रामकृष्णराव, पांडुरंगराव जोशी, सय्यद सिराजुल इसन तिरमिजी, महाडपाटी हनुमंतराव, जी. रामाचारी यांचा समावेश करण्यात आला होता. या समितीने पुढे श्रीधर वामन नाईक, रविनारायण रेड्डी, हरीलाल वाघमारे, हरीश्चंद्र हेडा, जनार्दनराव देसाई व गोविंदराव नानल यांना आपल्या समितीत अंतर्भूत केले. या समितीने अवघ्या एक महिन्यात स्टेट काँग्रेसचे १२०० प्राथमिक सदस्य नोंदविले होते. त्यानंतर सदस्यांची ९ सप्टेंबर १९३८ रोजी आमसभा घेऊन कार्यकारी मंडळाची अधिकृत निवडणूक घ्यावी असे ठरविण्यात आले होते. मात्र निजामी सरकारने एक फर्मान काढून स्टेट काँग्रेसवर बंदी घातली. (८ सप्टेंबर १९३८) तथापि स्वामी रामानंद तीर्थ यांनी बंदी हुकूम मोडून सत्याग्रह सुरू करण्याचा प्रयत्न केला. श्री. दिगंबर बिंदू, श्री. आ. कृ. वाघमारे, स्वामी रामानंद तीर्थ, श्री. निवास बोरीकर यांनी हैद्राबादमधील श्री. गोविंदराव नानल यांना स्टेट काँग्रेसचे अध्यक्षपद स्वीकारण्याची विनंती केली. ती मान्य करून नानल यांनी अध्यक्षपद स्वीकारले. त्यानंतर स्टेट काँग्रेसची हंगामी समिती विसर्जित करण्यात आली

आणि श्री. नानल यांच्या अध्यक्षतेखाली स्टेट काँग्रेसचे कार्यकारी मंडळ व कृतिसमिती स्थापन करण्यात आली. त्यात श्री. नानल अध्यक्षपदी, श्री. रामकृष्ण धूत (हैद्राबाद) सरचिटणीसपदी तर तेलंगणचे रविनारायण रेड्डी, कर्नाटकचे जनार्दन देसाई व परभणी येथील श्रीनिवास बोरीकर सदस्य म्हणून समाविष्ट होते.

**१९३८ चा सत्याग्रह –**

स्टेट काँग्रेसची आणि सत्याग्रहाची संपूर्ण जबाबदारी स्वामी रामानंद तीर्थ यांनी स्वीकारली होती. त्यांनी हैद्राबाद येथे हरिश्चंद्र हेडा, ग्यानकुमारी हेडा यांच्या निवासस्थानी सत्याग्रह केंद्र सुरू केलेल्या कामी स्वामी रामानंद तीर्थ यांनी श्री. दिगंबर बिंदू यांचे साहाय्य घेतले. तर ग्यानकुमारी हेडा, दिगंबर बिंदू, रीराम भांगडिया, मदगुल रामचंद्रराव, राघवेंद्र हेमाद्रि व देशपांडे व्हि. डी. यांच्यावरचा केंद्राची जबाबदारी टाकली. स्वामी रामानंद तीर्थ यांनी केलेल्या मराठवाडा दौऱ्यास त्यांना अतिशय चांगला प्रतिसाद मिळाला. २४ ऑक्टोबर १९३८ रोजी श्री. गोविंदराव नानल यांनी चार जणांसह हैद्राबाद येथे निजामबंदीचा हुकूम धुडकावून सत्याग्रह केला. या सत्याग्रहींना अटक करून शिक्षाही ठोठावण्यात आली. निजामाच्या निरंकुश व एकतंत्री राजवटीला आव्हान देणारा हा प्रथम सत्याग्रह होता. या सत्याग्रहाचा संपूर्ण संस्थानात प्रभाव दिसून आला. मोठ्या प्रमाणावर लोकांनी सत्याग्रहासाठी आपली नावे नोंदविली.

स्वामी रामानंद तीर्थ यांनी सत्याग्रहींच्या दुसऱ्या तुकडीचे नेतृत्व केले. या तुकडीत कॅ. जोशी (उस्मानाबाद), राघवेंद्रराव दिवाण (लातूर), श्री. अप्पाराव (कर्नाटक), हनुमंतराव ऊर्फ दाजीसाहेब मोहरीर (परभणी), केशवराव जमलापूर (तेलंगणा) हे कार्यकर्ते होते. या तुकडीने २७ ऑक्टोबर १९३८ रोजी हैद्राबाद येथील पुतली बावली येथे सत्याग्रह केला. एका निवेदनाद्वारे स्वामी रामानंद तीर्थ यांनी तरुणांनी स्वातंत्र्यासाठी हौतात्म्य पत्करण्यास तयार राहण्याचे आवाहन केले. या तुकडीनंतर आणखी १६ तुकड्यांनी हैद्राबाद शहरात सत्याग्रह केला. शेवटच्या अर्थात अठराव्या तुकडीचे काशीनाथ राव वैद्य यांनी नेतृत्व करून २४ डिसेंबर १९३८ रोजी सत्याग्रह केला. महात्मा गांधीजींच्या आदेशानुसार हा सत्याग्रह तहकूब केल्याचे जाहीर करण्यात आले. एकंदरीत सहाशे लोकांचा या सत्याग्रहात सहभाग होता. त्यापैकी साडेतीनशेपेक्षा अधिक सत्याग्रही मराठवाडा विभागातील होते.

औरंगाबाद येथे सत्याग्रहाचे दुसरे केंद्र २० नोव्हेंबर १९३८ रोजी सुरू करण्यात आले. या केंद्राच्या प्रथम तुकडीचे नेतृत्व औरंगाबाद येथील ॲडव्होकेट माणिकचंद पहाडे यांनी केले. उस्मानाबाद, नांदेड, परभणी, हिंगोली, वसमत इत्यादी केंद्रावरही सत्याग्रह करण्यात आले. शेकडो सत्याग्रहींनी केलेला सत्याग्रह चिरडून / दडपून टाकण्यासाठी निजामी पोलिसांनी जुलूम अत्याचाराचा, दडपशाहीचा परमोच्च बिंदू गाठला. सत्याग्रहींना हातकड्या घालून गावातून मिरवण्यात येत होते, त्यांना जबरदस्त मारझोड करून त्यांच्याकडून माफीनामे लिहून देण्याची सक्ती केली जात होती. तथापि या जुलूम जबरदस्तीचा सत्याग्रहींवर काहीही परिणाम झाला नाही. उलट या सत्याग्रही चळवळीने जनतेची संघटनात्मक शक्ती वाढली. पुढे महात्मा गांधीजींनी स्टेट काँग्रेसचा सत्याग्रह तहकूब केला. त्यामागे त्यांचा असा हेतू होता की, हैद्राबाद संस्थानातील हिंदु-मुस्लिम संबंध विकोपाला जाऊन स्वातंत्र्य चळवळीला नुकसान पोहोचेल.

निजाम सरकारने स्टेट काँग्रेसवर लादलेली बंद उठवावी यासाठी संस्थानात व संस्थानाच्या बाहेरही जोरदार प्रयत्न झाले. शेवटी जनरेट्यापुढे सरकारने ३ जुलै १९४६ रोजी स्टेट काँग्रेसवरील बंद

उठविली. त्यानंतर निर्माण करण्यात आलेल्या स्थायी समितीचे अध्यक्ष म्हणून स्वामी रामानंद तीर्थ यांची नियुक्ती झाली. त्यांनी पदाधिकारी नेमून कार्यकारिणीची निवड केली. स्टेट काँग्रेसमध्ये प्रांतिक परिषदा विलीन केल्या. संघटनात्मक बांधणी करण्याचा कार्यक्रम निश्चित करण्यात आला. त्यासाठी स्टेट काँग्रेसचे कार्यकर्ते कामास लागले. स्टेट काँग्रेसच्या स्थायी समितीची सभा दि. १ जानेवारी १९४७ रोजी हैद्राबाद कर्नाटकातील बीदर येथे बोलविण्यात आली. तीनही प्रांतांतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने बिदर येथे हजर झाले होते. त्या सभेत मवाळ-जहाल, समाजवादी, सत्यवादी, प्रतिगामी-पुरोगामी अशा संदर्भांसह वैचारिक संघर्षाला सुरु वात झाली होती. शेवटी स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैद्राबाद येथे ७-८ फेब्रुवारी १९४७ रोजी दुसरी सभा बोलविली. या सभेत १२५ सदस्य उपस्थित होते. या सभेत स्वामीजींच्या नेतृत्वावर शिक्कामोर्तब झाले. या सभेनंतर मवाळांचे आव्हान संपुष्टात आले होते. स्टेट काँग्रेसने हैद्राबाद संस्थानात सर्वत्र २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून साजरा करण्याचा आदेश दिला होता. १९४७ च्या जून महिन्यापर्यंत स्टेट काँग्रेसची सदस्य नोंदणी २,५५,000 एवढी झाली होती. त्यात १ लक्ष ३0 हजार तेलंगणातील, ६0 हजार मराठवाड्यातील, २0 हजार कर्नाटकातील, १५ हजार हैद्राबाद सिंकदराबाद या जोडशहरातील सदस्य होते.

१६ ते १८ जून १९४७ या तीन दिवसीय स्टेट काँग्रेसच्या अधिवेशनाला सरकारी अनुमानानुसार कमीत कमी एक लाख लोक आले होते. या अधिवेशनाला आलेला प्रत्येक जण भारावल्यागत होता. हैद्राबादमध्ये लोकशाही व्यवस्था प्रस्थापित करावयाची असून आता निजामी सत्ता उलथून टाकायचीच, असा दृढ निर्धार प्रत्येकाने केला होता. स्वामी रामानंद तीर्थ यांनी या अधिवेशनातील आपल्या भाषणात निजामाविरोधी संघर्ष करून स्वातंत्र्यप्राप्तीची ही अंतिम लढाई जिवाची बाजी लावून जिंकावयाचीच, यावर जोर दिला. स्वामीजींनी स्टेट काँग्रेसच्या कार्यकारिणीसाठी चौदा जणांची नावे जाहीर केली. त्यात दिगंबरराव बिंदू, स. कृ. वैशंपायन, गोविंददास श्रॉफ, माणिकचंद पहाडे, आ. कृ. वाघमारे इत्यादींचा अंतर्भाव होता. त्यानंतर २९, ३0 जुलै १९४७ रोजी सोलापूर येथे स्वामीजींनी बोलावलेल्या सभेत आंदोलनाचा तपशील निश्चित करण्यात आला. त्या दृष्टीने कर्नाटकसाठी मुरलीधरराव कामतीकर, मराठवाड्यातील गोविंदभाई श्रॉफ, तेलंगणासाठी एम. रामचंद्रराव, हैद्राबाद-सिंकदराबादसाठी डॉ. मेलकोटे यांची आंदोलने कार्याचे प्रभारी या नात्याने नियुक्ती करण्यात आली. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली हैद्राबाद संस्थानात निजामी राजवटीच्या विरोधात अभूतपूर्व अशी जनशक्ती एकवटली होती. संपूर्ण हैद्राबाद संस्थानभर हजारो कार्येकर्ते कारागृहात डांबले गेले होते. कित्येकांनी भूमीगत चळवळी चालविल्या. पुरुषांप्रमाणे स्त्रिया, विद्यार्थी यांनी वंदे मारतम् व अन्य मार्गांनी लढा दिला. अनेक संघटनांनी निजामाविरुद्ध वातावरण तयार केले. या संघर्षात दलितांनीही आपापल्या परीने मोठे योगदान दिले.

**पोलीस ॲक्शन व निजामाची शरणागती –**

ब्रिटिश सरकारच्या ३ जून १९४७ च्या घोषनेनंतर निजामाने अशी घोषणा केली की, ''सत्तांतरानंतर हैद्राबाद राज्य स्वतंत्र व सार्वभौम राहील. ते पाकिस्तान अथवा भारत या राज्यात विलीन होणार नाही.'' त्यानंतर ११ जुलै १९४७ रोजी निजामाने आपल्या शिष्टमंडळाकडून तीन अटी मांडून आपली भूमिका स्पष्ट केली. १) वऱ्हाड प्रांत परत मिळावा. २) भारत-पाक युद्ध झाल्यास निजाम निष्क्रिय राहील. ३) जगात कोठेही प्रतिनिधी नेमण्याचा अधिकार निजामाचा असेल.

त्यानंतर भारत सरकारने 'जैसे थे' करार करता येणार नाही हा संदेश दिला. निजामाने

भारतीय संघ विलीन होण्यास नकार दिला. त्यामुळे शेवटी सरकार वल्लभभाई पटेल यांनी 'पोलीस अॅक्शन' घोषित केले.

दि. १३ सप्टेंबर १९४८ रोजी लेफ्टनंट राजेंद्रसिंह यांच्या मार्गदर्शनाखाली मेजर जनरल चौधरी यांच्या नेतृत्वात भारतीय लष्कर हैद्राबाद संस्थानात आले. पोलिस अॅक्शनची प्रथम कार्यवाही मराठवाड्यातील नळदूर्गपासून सुरू झाली. रझाकार व निजामी फौजेने लष्करी कारवाईस दोन दिवस तोंड दिले. त्यानंतर ते शरण येऊ लागले. ही 'पोलिस अॅक्शन' १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत चालू राहिली. संपूर्ण हैद्राबाद संस्थानावर व संस्थानची राजधानी हैद्राबाद शहरावर भारतीय लष्कराने विजय मिळविला. त्याच दिवशी निजामाने बिनशर्त शरणागती पत्करली. त्यामुळे तो दिवस मराठवाडा मुक्तिदिन आणि भारतीय संघराज्यात सामील होण्याचा दिवस म्हणून मराठवाडा विभागात साजरा केला जातो. १८ सप्टेंबर १९४८ पासून मेजर जनरल चौधरी यांनी हैद्राबाद संस्थानची अर्थात राज्याची सूत्रे हाती घेतली. ही लष्करी राजवट १९४९ च्या डिसेंबरपर्यंत होती. १९५० मध्ये काँग्रेसचे मंत्री मंडळ स्थापन करण्यात आले. इ.स. १९५२ मध्ये निवडणुका होऊन लोकशाही सरकार निर्माण झाले. अशा प्रकारे हैद्राबाद संस्थानातील संघर्षातून हैद्राबाद संस्थानचे विलिनीकरण पूर्ण झाले.

**कोल्हापूर संस्थानातील स्वातंत्र्य चळवळ –**

दक्षिण महाराष्ट्रातील सर्व संस्थानांमध्ये कोल्हापूर सर्वांत महत्त्वाचे संस्थान होते. छत्रपतींच्या राज्याचा कारभार छत्रपती थोरले शाहू महाराज यांनी पेशव्यांकडे सुपूर्द केला होता. पेशवे आपल्या तंत्राने मराठी कारभार करत होते. पुढे कोल्हापूरच्या छत्रपतींची नाकेबंदी करण्याचे धोरण पेशव्यांनी सुरू केले. मराठी सत्तेबद्दल सातारा व कोल्हापूर येथील छत्रपतींमध्ये गृहकलह होता. पेशवाईचा शेवट झाल्यानंतर कोल्हापूरच्या छत्रपतींनी ब्रिटिश सरकारशी नरमाईचे धोरण स्वीकारले. ब्रिटिशांच्या परवानगीशिवाय दुसऱ्या राजाशी बोलणी करायची नाही. विशिष्ट मर्यादेपेक्षा अधिक असणार नाही अशा अपमानकारक शर्ती छत्रपतींनी मान्य करून आपले कोल्हापूर संस्थान टिकवून ठेवले होते. छत्रपती चौथे शिवाजी यांच्या काळात ब्रिटिश सत्तेशी त्यांचा संघर्ष झाला. त्यातून कोल्हापूर संस्थानचे छत्रपती व कारभारी यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. ब्रिटिश सरकारच्या जाचक धोरणामुळे छत्रपतींना मानहानी सहन करावी लागली. ब्रिटिश सरकारने छत्रपतीला वेडा ठरवून त्यांची अहमदनगरच्या कारागृहात रवानगी केली. तेथेच त्यांचे इ.स. १९८३ मध्ये निधन झाले. पुढे त्यांचे वारसदार म्हणून राजर्षी शाहू महाराजांनी संस्थानच्या राज्यकारभाराची सूत्रे स्वीकारली (२ एप्रिल १८९४).

राजर्षी शाहू महाराजांच्या कालखंडात कोल्हापूर संस्थानात झालेल्या सुधारणांमुळे हे संस्थान प्रसिद्धीस आले होते. शाहु महाराजांनी ब्राह्मणेतर चहवळीला एक प्रमुख आधारस्तंभ म्हणून साहाय्य केले होते. इ.स. १९२२ मध्ये राजर्षी शाहु महाराजांचे निधन झाले. त्यानंतर ब्राह्मणोत्तर चळवळीचे कार्य स्थगित झाले. शाहू महाराजांनंतर त्यांचे चिरंजीव छत्रपती राजाराम हे सत्तारूढ झाले. त्यांनी इ.स. १९२२ ते १९४० या कालखंडात संस्थानचे स्थानिक स्वराज्य संस्थांविषयक सुधारणा केल्या. मात्र या संस्थानात सुधारणांची प्रक्रिया सुरू झाली ती प्रजापरिषदेची स्थापना झाल्यानंतरच. इ.स. १९३८ पासून कोल्हापूर संस्थानात प्रजापरिषद चळवळ सुरू झाली होती. या चळवळीला श्री. माधवराव बागल यांचे समर्थ नेतृत्व लाभले. त्यावेळी कोल्हापूर संस्थानात शेतकऱ्यांच्या प्रश्नावरून तणावाची स्थिती निर्माण झाली होती. तथापि माधवराव बागल सविनय कायदेभंगाच्या तत्त्वानुसार चळवळ

ठरविली. रत्नाप्पा कुंभार यांनी कोल्हापूरमधील शेतकरी मोर्चाची आखणी केली होती. श्री. बागल कोल्हापूरला आले व तेथून १९३८ च्या मार्च महिन्यात मोर्चा सुरू झाला. यात सामान्य शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर आपला सहभाग नोंदविला. श्री. बागल यांना अटक करण्यात आली. त्यानंतर नानासाहेब जगदाळे यांनी मोर्चाचे नेतृत्व केले. त्यांनी संस्थानच्या दिवाणांना आपल्या मागण्या सादर करून दरबाराशी संबंध जोडला. या आपल्या मागण्यांची पूर्तता १९३९ च्या जानेवारीपूर्वी करू असे दरबाराने मोर्चाला आश्वासन दिले व त्यानंतर मोर्चा समाप्त झला. मात्र कोल्हापूर दरबार कडून आश्वासनानुसार ४ जानेवारी १९३९ रोजी जाहीरनामा निघाला. त्यात शेतसारा पूर्वीप्रमाणेच ठेवला होता. त्यानंतर १५ जानेवारी १९३९ रोजी दरबारकडून एक पत्रक काढून जनतेला असे आवाहन केले की, सरकारी कायदे करून शेतकऱ्यांचे प्रश्न सरकार सोडविणार आहे त्यामुळे जनतेने मोर्चात उतरू नये. तथापि या आश्वासनाने सामान्य शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. यावेळी श्री. बागल कैदेत असल्यामुळे रत्नाप्पा कुंभार यांनी मोर्चा काढला. या मोर्चात तीन हजार शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला. शेवटी छत्रपती राजाराम महाराजांनी मोर्चाला सामोरे येऊन जनतेला पुढील आश्वासने दिली.

१) ब्रिटिश इंडियाच्या क्षेत्रानुसार शेतसारा आकारणी कोल्हापूर संस्थानात केली जाईल.

२) जनतेला लवकरच अभिव्यक्ती स्वातंत्र्य देण्यात येईल.

३) राजकीय कैद्यासंबंधी सहानुभूतीचे धोरण ठेवण्यात येईल.

आश्वासनानुसार आणि दत्तोबा भोसले यांच्या प्रयत्नांमुळे श्री. बागल यांची कैदेतून मुक्तता झाली. प्रजापरिषदेची चळवळ जोरात सुरू झाली होती. त्याचवेळी २६ नाव्हेंबर १९४८ रोजी छत्रपती राजाराम महाराजांचे निधन झाले. त्यानंतर महाराणी ताराबाईंनी कोणास दत्तक घ्यावे यासंबंधीचा वाद सुरू झाला. राणीसाहेबांना आपले बंधू बडोद्याचे महाराज यांच्या पुत्रास दत्तक घ्यावयाचे होते. बडोद्याच्या राजकुमारांनाच दत्तक घ्यावे असे माधवराव बागल, रघुनाथराव सबनीस इत्यादींचे मत होते. सावंतवाडी सातारा येथील भोसले, कागल येथील घाटगे अथवा देवासचे विक्रमसिंह पवार यांच्यापैकी कोणाला तरी राणी साहेबांनी दत्तक घ्यावे असेही प्रयत्न झाले. याबद्दलचा निर्णय जवळजवळ वर्षभर घोळ घालून शेवटी घेण्यात आला होता. स्वराज्यसंस्थापक शिवछत्रपतींचे चुलते शरीफजी यांच्या वंशातील नानासाहेब शंकरराव भोसले चावरेकर यांचे द्वितीय पुत्र प्रतापसिंह यास दत्तक घेण्यास राजी असल्याचे राणीसाहेबांनी कळविल्यानंतर भारत सरकारने त्यास मान्यता दिली. त्यावेळी प्रतापसिंह हे अवघ्या एक महिन्याचे बालक पाळण्यात होते. दत्तक विधी समारंभ होऊन त्याचे सहावे शिवाजी महाराज असे नामकरण झाले (दि. १८ नोव्हेंबर १९४२).

छत्रपती राजाराम महाराजांच्या निधनामुळे कोल्हापूर संस्थानचा कारभार रेसिडेंटच्या हुकमतीखाली सुरू झाला. तसेच रेसिडेंटने रा. ब. सुर्वे यांच्या नियंत्रणात शासनमंडळ घोषित केले. या नव्या शासन व्यवस्थेने श्री. बाकल, श्री. रत्नाप्पा कुंभार यांना मुक्त केले होते. कोल्हापूरच्या संस्थानास वारस ठरला नव्हता. प्रजा परिषदेच्या कार्यकर्त्यांनी सादर केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणे -

१) जबाबदार राज्यपद्धती स्थापन करण्यात यावी.

२) थोरल्या महाराणी ताराबाईंना रीजंट नेमावे.

३) प्रजा परिषदेवरील बंदी उठवावी.

श्री. माधवराव बागल यांनी संस्थानी प्रजेनेच संस्थानबाबतचे प्रश्न सोडविण्याची भूमिका

घेतली होती. संस्थानात रा. ब. सुर्वे यांचा नऊ महिन्यांचा कार्यकाल होता. त्यानंतर श्री. पेरी हे इ.स.१९४१ मध्ये कोल्हापूर संस्थानचे पंतप्रधान झाले. पेरीसाहेबांनी परिषदेवरील बंदी उठविली. यापूर्वी बंदीमुळे तब्बल बत्तीस महिने परिषद बंद राहिली होती. पेरीसाहेबांनी कोल्हापूर विधिमंडळ स्थापन केले. परिषदेने विधिमंडळाच्या निवडणुकीवर बहिष्कार टाकला; त्यामुळे परिषदेशिवाय इतरांना विधिमंडळावर निवडून येण्याची संधी मिळाली. कोल्हापूर परिषद विधिमंडळाच्याद्वारे लोकहित करण्यापासून वंचित राहिली असे वि. अ. पटवर्धन यांचे म्हणणे होते आणि ते रास्तच होते. प्रजा परिषदेने महाराणी ताराबाईंना रीजंट म्हणून मान्यता देण्याची मागणी केली होती. ती एक मागणी सरकारकडून पूर्ण करण्यात आली.(इ.स.१९४२).

**कोल्हापूर संस्थानातील 'चले जाव' चळवळ –**

देशभर 'चलेजाव'चा कार्यक्रम सुरू होता. कोल्हापूर संस्थानातही १४ ऑगस्ट १९४२ रोजी हे आंदोलन सुरू झाले. चले जावच्या या कार्यक्रमाला कोल्हापूर संस्थानच्या प्रजापरिषदेने आपला पाठिंबा दिला. त्यामुळे श्री. माधवराव बागल यांना अटक झाली. या अटकेच्या निषेधाची सभा दि. १६ ऑगस्ट १९४२ रोजी झाली. त्या सभेवर अचानक बेछूट लाठीमार झाला. त्यात बिंदु कुलकर्णी हा विद्यार्थी हुतात्मा झाला. सर्वत्र वातावरण खूपच तप्त झाले. अखिल भारतीय संस्थान लोक परिषदेच्या नेत्यांनी या संस्थानातील प्रजा परिषद चळवळीला पाठिंबा दिला. इ.स. १९४५ मध्ये या संस्थानी प्रजापरिषदेने १९२२ मध्ये स्थापन झालेल्या अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेची संलग्नता स्वीकारली. १९४५ च्या डिसेंबर महिन्यात या संघटनेच्या उदयपूर येथे भरलेल्या अधिवेशनास म. दु. श्रेष्ठी, रा. तु. बगाडे, डी. एस. खांडेकर व बराले हजर होते.

हैद्राबाद संस्थान प्रजापरिषदेची चार अधिवेशने झाली. त्यात सांगलीजवळील कुपवाड येथे पहिले अधिवेशन १९३८ मध्ये भरले होते. दुसरे अधिवेशन कोल्हापूर येथे खासबाग मैदानावर १९४२ मध्ये भरले. दुसरे अधिवेशन कोल्हापूर येथे बाग मैदानावर १९४२ मध्ये भरले. काकासाहेब गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली गारगोटी येथे तिसरे अधिवेशन झाले तर ९ मार्च १९४८ रोजी प्रजापरिषदेचे चौथे अधिवेशन श्री. शंकरराव मोरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले.

कोल्हापूर संस्थानात इ.स. १९४0 ते १९४७ या कालखंडात रिजन्सी कौन्सिलचा कारभार चालू होता. पुढे ३१ मार्च १९४७ पर्यंत छत्रपती शहाजी महाराजांनी कारभार सांभाळला. छत्रपतींनी घडवून आणलेल्या तडजोडीनुसार संस्थानच्या मंत्रिमंडळात दरबारचे तीन, प्रजापरिषदेचे चार मंत्री समाविष्ट करण्यात आले होते. या मंत्रिमंडळात माधवराव बागल, रत्नाप्पा कुंभार, म. दु. श्रेष्ठी, डी. एस. खांडेकर, मंत्रिपदावर होते. मात्र पुढे बागल विरुद्ध कुंभार वादामुळे श्री. कुंभारांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर श्री. बागलांनी मुख्यमंत्रिपद सोडले. त्यावेळी प्रजापरिषदेने नवे मंत्री म्हणून वसंतराव बागल, त्र्यं. सी. कारखानीस, नारायणराव सरनाईक आणि डी. एस. खांडकर यांना नेमले. वसंतराव बागल मंत्रिमंडळ अवघे सव्वा चार महिने टिकले. मं. गांधीजींच्या हत्येनंतर कोल्हापुरात दंगली झाल्या. त्यामुळे केंद्र सरकारने प्रजापरिषदेस दोष दिला आणि २२ मार्च १९४८ रोजी वसंतराव बागल मंत्रिमंडळ बडतर्फ केले. कॅ. गंजाप्पांची प्रशासक म्हणून नेमणूक केली. त्यांनी संस्थानात १४४ कलम लागू केले.

कोल्हापूर प्रजापरिषदेत बागल शेतकऱ्यांचे, कामकऱ्यांचे तर कुंभार भांडवलदारांचे प्रतिनिधी मानले जात. मराठे व मराठे तर असे दोन गट कोल्हापूर प्रजापरिषदेत पडले होते. कोल्हापूर

संस्थानच्या विलीनीकरणाचा प्रश्न होता. रत्नाप्पा कुंभारांना ताबडतोब विलीनीकरण पाहिजे होते. तर बागलांना संस्थानाचे स्वतंत्र अस्तित्व टिकून राहावे असे वाटत होते. संस्थान विलीनीकरणाची अटळता पाहून बागलांनी वस्तुस्थिती मान्य केली. ३१ जानेवारी १९४९ रोजी छत्रपती शहाजी महाराजांनी व १ फेब्रुवारी १९४९ रोजी बागलांनी प्रजा परिषदेचे विसर्जन मान्य केले. कोल्हापूर संस्थान मुंबई प्रांतात विलीन झाल्यामुळे बागलांनी प्रजापरिषद विसर्जित केली.

थोडक्यात, संस्थानी प्रजेच्या स्वातंत्र्यासाठी, स्थापन झालेल्या दक्षिण संस्थान हितवर्धक सभा (१९२१), अखिल भारतीय संस्थान लोक परिषद (१९२२), या दोन संस्थांनी विविध अधिवेशने भरवून संस्थानांचे प्रश्न सोडविण्याचे सातत्याने प्रयत्न केले. त्यातून संस्थानी प्रजेच्या चळवळींना गती आली.

**सांगली संस्थानातील स्वातंत्र्य चळवळ –**

दक्षिण महाराष्ट्रातील सांगली एक महत्त्वाचे संस्थान होते. या संस्थानाचे क्षेत्रफळ ११३६ चौ. मैल. या संस्थानात मिरज प्रांत, कुची, मंगळवेढे, तेरदळ, शहापूर व शिरपट्टी असे सहा तालुके समाविष्ट होते. संस्थानची लोकसंख्या २ लक्ष ५८ हजार पाचशे बारा असून वार्षिक उत्पन्न साधारणपणे ९ लाख रुपये होईल. या संस्थानच्या लोकशाहीकरणाचा पहिला प्रयत्न कॅप्टन आर. सी. बर्क (ॲडमिनिस्ट्रेटर) यांनी केलेला दिसतो. बर्कसाहेबांनी रयत सभा स्थापन केली. त्याद्वारे प्रशासन लोकाभिमुख करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. तथापि १९१० नंतर संस्थानात असंतोष वाढू लागला. याची कारणे म्हणजे संस्थानी कारभारात डोईजड राज्यकारभार, बड्या पगाराच्या नोकऱ्या व खर्च पुन्हा त्या नोकऱ्या परस्थांना दिल्या होत्या. तसेच त्याचवेळी सभाबंदीचा कायदा लागू करण्यात आला होता.

सांगली संस्थान प्रजा परिषदांचे कार्य महत्त्वपूर्ण ठरले होते. या संस्थानात इ.स. १९२२ ते १९४० या कालखंडात पंधरा अधिवेशने झाली. सांगलीतील चळवळीत प्रा. ग. रा. अभ्यंकर, केशवराव छापखाने, वै. गोविंदराव बिनिवाले, का.ह. खाडीलकर, अश्वत्थराव महिषी व विष्णुपंत देशपांडे यांनी प्रभावीपणे कार्य केले. सांगलीचे अधिपती चिंतामणराव दुसरे हे उदारवृत्तीचे होते. त्यामुळेच सारा देणे बंद करणे, कार्यकर्त्यांना कारागृहात डांबणे इत्यादी प्रकार घडले नाहीत.

**सांगली संस्थानातील पहिली प्रजापरिषद –**

इ.स. १९२२ मध्ये श्री. मंगसुही यांच्या अध्यक्षतेखाली पहिली प्रजापरिषद भरली. या परिषदेत पुढील प्रश्नांवर चर्चा झाली.

१) परस्थांची मोठ्या पदावर होणारी नेमणूक.

२) सरकार नोकरांची कामकुचराई.

३) वाढते कर.

४) जमीन महसूल वसुलीत प्रजेवर होणार अन्याय परिषदेने चर्चेनंतर राजेसाहेबांसमोर पुढील मागण्या सादर केल्या -

१) प्रत्येक खेडेगावी ग्रामपंचायत स्थापन करावी.

२) न्यायव्यवस्था व प्रशासनात फारकत असावी.

३) जात, पंथ, धर्म यांचा विचार न करता केवळ संस्थानातील नागरिकांनाच नोकरीत घ्यावे, परस्थाना घेऊ नये.

प्रजा परिषदेने सरकारवर दोन गोष्टींबाबत टीका केली. त्या म्हणजे १) सार्वजनिक सभांवर बंदी घालण्यासंबंधी २) कीर्तने व जलसे बंदीबाबत.

या दोन्ही बंदींच्या संदर्भात बॅ. अभ्यंकर, माईणकर, छापखाने यांनी टीका केली.

**सांगली संस्थानातील प्रजा परिषदेचे दुसरे अधिवेशन –**

प्रा. ग. रा. अभ्यंकरांच्या अध्यक्षतेत प्रजा परिषदेचे दुसरे अधिवेशन शहापूर येथे भरले. या अधिवेशनात पुढील ठराव मंजूर झाले.

१) संस्थानातील जंगलांचे रक्षण करावे.

२) संस्थानामधून अस्पृश्यता नष्ट करावी.

३) कन्नड भाषेला संस्थानी राजभाषा म्हणून मान्यता मिळावी.

नव्या कर आकारणी विरुद्ध प्रजापरिषदेने इ.स. १९२८ पासून सुरू केली. जनजागृतीच्या बाबतीत साप्ताहिक विजय व साप्ताहिक दक्षिण महाराष्ट्र या वृत्तपत्रांनी प्रभावीपणे कार्य केले. या वृत्तपत्रांनीच सरकारने नियोजित केलेल्या कर, आयकर, मार्केट टॅक्स विरोधी जनमत उभे केले. शहापूर येथे झालेल्या परिषदेत संस्थानिकांनी इंग्लंडमध्ये ३ लाख ७५ हजार खर्च का केला? पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही लेजिस्लेटिव्ह असेंब्लीमध्ये समान प्रतिनिधित्व देण्याची मागणी झाली. या मागण्यांकडे सहानुभूतीने लक्ष देण्यात आले.

इ.स. १९३३ पासून केलेली मूलभूत हक्कांची मागणी विचारात घेतली नाही. दरम्यानच्या काळाने १९३८ मध्ये साबडे समितीची स्थापन व द्विदल राज्यपद्धतीचा स्वीकार लागू झाला. खालसा भूमीत चलेजाव चळवळ सुरू झाली होती. तिचा प्रभाव इतर संस्थानांवरही झाला. भाई माधवराव बागल यांनी १९४२ मध्ये लहान संस्थानांच्या अस्तित्वाऐवजी संघराज्याची कल्पना मांडली. या कल्पनेला श्री. बाळ गंगाधर खेर यांनी पाठिंबा दर्शविला होता. परिषदच्या बाराच्या अधिवेशनाचे अध्यक्ष श्री. विष्णुपंत देशपांडे होते. हे अधिवेशन शिरहट्टीजवळ मागडी येथे झाले. या अधिवेशनाला अनेक नेत्यांपैकी हिरेमठ, खाडीलकर, टिळक, मन्नूर, अॅड. एस. जी. फडके, माधराव गोडबोले, रामच्या नाईक उपस्थित होते. या परिषदेत शेतीविषयक धोरणात बदल करून नवीन तंत्र अवलंबावे तसेच जमिनीच्या साऱ्यात सूट द्यावी असे ठराव मंजूर झाले.

१९४१ च्या 'गव्हर्नमेंट ऑफ सांगली' या कायद्यान्वये लोकनियुक्त प्रतिनिधींची संख्या ३० पर्यंत वाढविण्यात आली. १९३० च्या कायद्यान्वये ती संख्या २० होती. १९४१ च्या कायद्यान्वये विधिमंडळाच्या सदस्यांना भाषण स्वातंत्र्याचा मूलभूत हक्क देण्यात आला. याच कायद्याने द्विदल राज्यपद्धतीप्रमाणे सांपीव व राखीव अशी खात्यांची विभागणी झाली. लोकनियुक्त प्रतिनिधीकडे सोपीव खात्याचा कारभार दिला. १९४६ च्या 'गव्हर्नमेंट ऑफ सांगली अॅक्ट'अन्वये संस्थानच्या प्रगतीच्या बाबतीत महत्वाच्या सुधारणा घडून आल्या. पूर्वीच्या कायद्याप्रमाणे तीन लोकनियुक्त मंत्र्यांकडे कारभार सुपूर्द केला. सांगली हायकोर्टाची स्थापना झाली. तसेच संस्थानसाठी लोकसेवा आयोग स्थापन झाला. सांगली संस्थानातील चलेजाव चळवळीत श्री. वसंतदादा पाटील यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. ५ ऑक्टोबर १९४६ रोजी सांगली संस्थानच्या राजेसाहेबांनी विजयादशमीच्या मुहूर्तावर संस्थानला जबाबदार राज्यपद्धतीची घोषणा केली. नवे मंत्रिमंडळ अॅड. बी. एस. कोरे यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत झाले. ३० जानेवारी १९४८ रोजी महात्मा गांधीजींच्या हत्येमुळे सांगली संस्थानात जाळपोळ झाली. संस्थान अधिपतींना हा सर्व प्रकार आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहावा लागला. शेवटी सरकार वल्लभभाई पटेलांनी केलेल्या आवाहनानुसार ८ मार्च १९४८ रोजी सांगली

संस्थान भारतीय संघराज्यात विलीन केले.

**औंध संस्थानातील स्वांतत्र्य चळवळ –**

औंध हे एक संस्थान होते. या संस्थानचे क्षेत्रफळ ५०१ चौ. मैल होते. त्यात अघवी ७२ गावे होती. औंध संस्थानचे अधिपती समंजस व उदारवृत्तीचे होते. त्यांच्याविरुद्ध प्रजेत फारसा असंतोष नव्हता. औंधचे संस्थानिक बाळासाहेब पंतप्रतिनिधी हे होते. ते जनतेचे प्रश्न समजावून घेण्याचा सतत प्रयत्न करीत असत. संस्थानच्या अर्थसंकल्पावर चर्चा करण्यासाठी एक प्रातिनिधिक सभा बोलावण्याची प्रथा त्यांनी इ.स. १९२१ पासून सुरू केली. इ.स. १९२४ पासून पस्तीस सदस्य संख्या असलेल्या प्रातिनिधिक सभेत १० सरकरी, ७ सरकारनियुक्त व १८ सदस्य लोकनियुक्त होते. इ.स. १९२६ मध्ये प्रातिनिधिक सभेच्या अधिकारात वाढ करण्यात आली. तिला कायदे करणे, राज्यकारभारासंबंधी सर्व साधारण ठराव मांडण्याचे अधिकार देण्यात आले. सभासद प्रश्न तसेच उपप्रश्न विचारू शकत असे. प्रातिनिधिक सभेचे अधिवेशन वर्षातून दोनदा होत असे. इ.स. १९२८ पासून प्रातिनिधिक सभेच्या सभासदांना सभाध्यक्ष निवडण्याचा अधिकार होता. पूर्वी संस्थान प्रमुख पदसिद्ध अध्यक्ष होते. १९२९ च्या मार्च महिन्यात उच्च न्यायालय संस्थानात सुरू झाले. त्याच वर्षी डिसेंबर मध्ये ५ वर्षांत प्रजेला संपूर्ण स्वराज्य देणार असे बाळासाहेब पंतप्रतिनिधींनी सांगितले.

नवीन राज्यघटना तयार करण्यासाठी एक समिती नेमली. या समितीत रावबहादूर रा. श. काळे, दादासाहेब करंदीकर, वामनराव पटवर्धन, गणपतराव अभ्यंकर व तात्यासाहेब केळकर यांचा समावेश होता. नवी घटना जबाबदार राज्यपद्धतीवर आधारलेली होती. आपल्या संस्थानातील प्रजेला अशा प्रकारे अधिकार देणारा संस्थानिक त्याकाळात अगदी विरळाच होता असे दिसते आणि त्यामुळेच स्वातंत्र्य आंदोलनाच्या कालखंडात औंधसारख्या संस्थानच्या प्रमुखाने अगदी विचारपूर्वक प्रगतीशील धोरणाचा स्वीकार केला. त्याचा किता इतर मोठ्या संस्थानिकांनी गिरवावा असे केळकर व गांधींजी इतरांना आदर्श म्हणून सांगत.

इ.स. १९३१ मध्ये औंध संस्थानात प्रजापरिषद स्थापन करण्यात आली. संस्थानच्या कारभारात अनेकांनी आपापल्या परीने सहभाग दिला. त्यात ना. गो. चापेकर, पं. सातवळेकर, वाग्भट देशपांडे, जगन्नाथ महाराज, लक्ष्मणराव किर्लोस्कर इत्यादींनी कारभारात आपला वाटा दिल्याचे दिसते. भवानकर ऊर्फ बाळासाहेब पंत प्रतिनिधींना संगीत, नाटक, चित्रकला, कीर्तन, नमस्कार यांत रुची होती. ते अनेक उपक्रमांद्वारे प्रजेचे प्रश्न सोडवत असत. फ्रांसिस वॉटमन व मॉरीस फ्रीडमन हे मित्रसुद्धा प्रयोग करीत असत. संस्थानातील प्रजेला सारा देणे कठीण झाले होते. त्यावेळी तात्या शिखरे यांच्या नेतृत्वाखाली एक मोर्चा निघाला. (मार्च १९३०). पंतप्रतिनिधींनी प्रातिनिधींना बोलावून त्यांच्याशी विचारविनिमय करून चौकशी केली. शेवटी सारा वाजवी करण्याचे आदेश देण्यात आले.

संस्थानात जबाबदार राज्यपद्धतीची घोषणा १९३८ च्या नोव्हेंबर महिन्यात स्वत: होऊन पंतप्रतिनिधी बाळासाहेबांनी आपल्या वाढदिवशी केली. त्यांनी असे प्रतिसादन केले की, ''आता माझी प्रजा औंधचा कारभार स्वत: करण्यात समर्थ आहे. लोकांनी प्रतिनिधी कसे निवडावेत, ग्रामराज्याचा स्वयंपूर्ण कारभार कसा करावा याचे नियम, वगैरे योग्य सल्ल्याने लवकरच ठरतील व जाहीर केले जातील.''

स्वत: बाळासाहेब म. गांधीजींकडे वर्धा येथे गेले. त्याआधी मॉरिस फ्रिडमन, श्री. दा. सातवळेकर यांना पाठविले होते. राजा प्रजेचा सेवक असतो. तो तसा कारभार करणार. म्हणून लोक

देतील तो तनखा घ्या असा सल्ला दिला होता. हा एक आदर्शच होता व पुन्हा जनतेपर्यंत जाईल म्हणून गांधींजींनी १७ नोव्हेंबर १९३८ रोजी इतरांसाठी लेख लिहिला. गांधीजींनी प्रजा व मतदार हे दोन्ही साक्षर करण्याची आवश्यकता प्रतिपादन केली. १४ जानेवारी १९३९ च्या पुन्हा औंधचे उदाहरण जनतेसमोर ठेवले.

औंधसंस्थानात आटपाडी, कुंडल, गुणदाळ, औंध व किन्हई असे पाच तालुके होते. अशा या चिमुकल्या संस्थानची लोकसंख्या ७५ हजार होती. या संस्थानचे क्षेत्र मोठे नसल्यामुळे अनेक न्यायाधीशांची नेमणूक न करता उच्च न्यायाधीशामार्फत न्यायनिवाडे द्यावेत. १९३१ ते १९४२ या दरम्यानच्या काळात ना. गो. चापेकर यांनी चोख न्यायदान केले. त्यात बाळासाहेबांनी हस्तक्षेप केला नाही. त्यांनी ग्रामराज्य पद्धतीवरील नव्या राज्यघटनेची २१ जानेवारी १९३९ रोजी अंमलबजावणी केली. १९३९ च्या जून महिन्यात ग्रामपंचायती, तालुका पंचायती व प्रतिनिधी सभा यांच्या निवडणुका घेतल्या.

औंधच्या बाळासाहेब पंतप्रतिनिधींचे चिरंजीव आप्पासाहेबांना लोकांनी पंतप्रधान म्हणून नियुक्त केले तथापि काही नेतेमंडळी व स्वतः आप्पासाहेबांनाही ते मान्य नव्हते. शंकरराव देव, रावसाहेब पटवर्धन, आचार्य भागवत, आण्णासाहेब पटवर्धन, धर्माधिकारी बंधू या गांधीजींच्या निष्ठावान अनुयायांनी त्यांना आपापल्या परीने साहाय्य केले. सप्टेंबर १९३९ ला दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर मंत्रिमंडळ सदस्यांनी आपापले राजीनामे दिले. औंध संस्थानावरही इतर घटनांचा प्रभाव पडला होता. महात्मा गांधीजी ब्रिटिशांनी भारतातून चालते व्हावे असे म्हणू लागलेले पाहुन ७ ऑगस्ट १९४२ ला आप्पासाहेबांनी गांधीजींना भेटून विचारले की, ''औंधने काय करावे?'' यावर गांधीजींनी असा सल्ला दिला, ''औंधच्या राजेसाहेबांनी व्हाईसरॉयला स्पष्ट लिहावे की, औंधचा हा राजा प्रजेच्या पूर्ण सहमतीने ब्रिटिशांना औंधचे संरक्षण करण्याच्या जबाबदारीतून मुक्त करीत आहे. पूर्वीचे सर्व करार-मदार आता रद्द समजावेत. औंध स्वतंत्र आहे व ते तसेच राहणार.'' (य. दि. फडके, १ मे २००८, २० व्या शतकातील महाराष्ट्र, राजकीय इतिहास, खंड ५ वा, पुणे, के. सागर पब्लिकेशन्स, पृ. २९५) पंतप्रतिनिधींनी तसे पत्र लिहिले नाही. मात्र त्यांनी आपल्या संस्थानातील भूमिगत कार्यकर्त्यांना आश्रय दिला आणि औंध, किर्लोस्करवाडी, कुंडल सोनकिरे, गोंदी रामापूर, दुशेरे, आटपाडी, आळसंद या गावांमध्ये भूमिगत चळवळीची केंद्रे होऊ दिलीत. जी. डी. लाड, त्यांच्या पत्नी विजयाताई लाड, नाथाजी लाड, श्यामराव यशवंत लाड, आकाराम पवार, ज्ञानदेव जाधव, शाहीर शंकरराव निकम, शंकरराव जाधव, आनंदराव नलावडे, भाऊराव देशपांडे इत्यादींनी भूमिगत चळवळीत महत्त्वपूर्ण कार्य केले. कुंडलच्या लक्ष्मणराव ठोंबरे उर्फ तांबट काका यांनी शोभेच्या दारूचे बॉम्ब तयार करून भूमिगतांना पुरविले. औंधचे युवराज आप्पासाहेबांवर भूमिगतांना प्रेरणा देण्याचा आरोपही झाला. मात्र कोल्हापूरच्या रेसिडेंटने २४ सप्टेंबर १९४२ रोजी दिल्लीच्या वरिष्ठांना तार पाठवून कळविले, ''आप्पासाहेब चळवळ्यांच्या कारवायांना उत्तेजन देतात हे म्हणणे मला मान्य नाही. उलट असली कृत्ये करण्यापासून इतरांना परावृत्त करण्यासाठी आपले वजन वापरण्याचे त्यांनी मला आश्वासन दिले.'' यानंतर दिल्लीच्या राजकीय खात्याच्या अधिकाऱ्यांनी आप्पासाहेबांना त्यांच्यावरील आरोपातून मुक्त ठेवले. आप्पासाहेब तुरुंगातील राजबंदींना चांगले खाऊ-पिऊ घालत असत. तुरुंगवासाच्या आठवणी सांगताना जी. डी. लाड यांनी म्हटले की, ''जेल म्हणजे सरकारी बंगला. औंधकरांना जेवू-खाऊ घालण्याची फार खोड...... आपणही राजकीय कैद्यांत जमा व्हावे. माझ्या २१

वर्षांच्या आयुष्यात एवढा सकस आहार मिळाला नव्हता. थोडक्यात राजकीय कैद्यांची अशी बडदास्त ठेवणारे औंध हे एकमेव संस्थान असावे. औंध संस्थानची स्थिती १९४२ च्या आसपास अशाच प्रकारची होती.

आप्पासाहेब व त्यांचे मित्र राजा रामेश्वरराव म. गांधीजींना भेटण्यासाठी १९४७ च्या नोव्हेंबर अखेर दिल्लीला गेले होते. त्यावेळी औंधसंस्थान विलीन करावे की नाही? या त्यांच्या प्रश्नाला गांधीजींनी उत्तर दिले की, ''हिंदुस्थान जरी स्वतंत्र झाला तरी ग्रामराज्ये जोपर्यंत निर्माण झाली नाहीत तोपर्यंत औंधने आपली ग्रामराज्ये चालूच ठेवावीत. आजूबाजूला सर्व ग्रामराज्ये होऊन सत्ता विकेंद्रित पूर्ण झाली म्हणजे इतर ग्रामराज्यांशी सहकार सोपा होईल.'' अशा प्रकारचा सल्ला गांधीजींनी औंध अधिपतींना दिला असला तरी विकेंद्रित ग्रामराज्याचा प्रयोग यशस्वी होणार नव्हता. कारण त्यावेळी स्वतंत्र भारतात केंद्रीय सत्ता प्रबळ करण्याचा प्रयत्न पं. जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल करीत होते. दक्षिण संस्थानांचा संघ अस्तित्वातही आला होता. कोणत्याही संस्थानिकास आणि त्याच्या प्रजेस आपले संस्थान मुंबई प्रांतात विलीन करण्याची इच्छा असल्यास ते सरदार वल्लभभाईंना मान्य होते. मात्र प्रजेच्या इच्छेनुसार सार्वमत घेण्याचा पायंडा पडल्यास मूळ प्रश्न सोडविणे जटील होईल असे व्ही. पी. मेनन यांचे मत होते. मुंबई प्रांतात विलीन होण्याचे दोन-तीन संस्थानांनी जाहीर केले की दक्षिणसंस्थान संघातील इतर संस्थानेही तशीच कृती करतील आणि संघ आपोआपच विसर्जित होईल असा सरदार वल्लभभाई पटेल यांचा विचार होता. त्या विचाराप्रमाणे प्रत्यक्ष इ.स. १९४८ मध्ये घडले. दक्षिण संस्थानी प्रजेने घटना परिषदेतील प्रतिनिधींनी मुंबई प्रांतात विलीन होण्याचा निर्णय घेतला. शेवटी संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाले.

**फलटण संस्थानातील लोकशाहीचा लढा –**

दक्षिण महाराष्ट्रातील अठरा संस्थानांचा यापूर्वी आपण उल्लेख केलेला आहे. त्यांची एकूण लोकसंख्या व क्षेत्रफळाचीही नोंद केली आहे. अठरा संस्थानांमध्ये थोड्याफार स्वरूपात भिन्नता असली तर सलगता व जवळीक या बाबींमुळे आंदोलनाच्या संदर्भातील भूमिका जवळजवळ सारखीच होती. इ.स. १९२१ मध्ये दक्षिण संस्थान प्रजापरिषदेची स्थापना झाली. या परिषदेने एकत्रितपणे लढा देण्यावर भर दिलेला दिसतो. महाराष्ट्रातील एक जुने संस्थान म्हणजे फलटण होय. या संस्थानाचे क्षेत्रफळ ९३६.३२ चौ. किमी. १९४१ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या सुमारे ७१,४७३ होती. या संस्थानचे वार्षिक उत्पन्न सुमारे १५ लाख होते. हे संस्थान पूर्वेस सोलापूर, पश्चिम दक्षिणेस सातारा व उत्तरेस पुणे जिल्ह्यांनी मर्यादित होते. फलटण इतिहासप्रसिद्ध निंबाळकर घराण्याच्या भूतपूर्ण संस्थानाची राजधानी होती. नीरा नदी काठच्या प्रदेशातील संस्थानचा मुळ पुरुष निंबराज पवार हे होते. त्यांनी इ.स. १२४० च्या निंबकजवळ वसाहत केली. त्यामुळे या वंशाला निंबाळकर असे म्हटले जाऊ लागले. निंबराज यांचा नातू दुसरा निंबराजाने फलटण येथे आपले ठाणे हलविले. सोळाव्या शतकात हे संस्थान आदिलशाहीच्या शिवाजी महाराज या पितापुत्रांना युद्ध करावे लागले. वास्तविक पाहता शहाजी महाराजांची मातोश्री उमा आणि शिवाजी महाराजांची पत्नी (पहिली) सईबाई या दोघी निंबाळकर घराण्यातील होत्या. फलटण हे संस्थान इ.स. १७६७ मध्ये पेशव्यांच्या नियंत्रणाखाली आले. इ.स. १८१८ मध्ये सातारा येथील अधिपतीच्या त्यानंतर इ.स. १८४८ पासून ते इंग्रजांच्या मांडलिकीत आले.

इ.स. १८५३ ते १९१६ या कालखंडात चौथे मुधोजीराव आणि १९१६ ते १९४८ या कालखंडात

चौथे मालोजीराव नाईक यांच्या कारकिर्दीत अनेक क्षेत्रांत प्रगती झाली. पाणीपुरवठा, शेतीसुधारणा, ऊस संशोधन केंद्र, स्थनिक स्वराज्य शिक्षण, मर्यादित अधिकारांचे कायदेमंडळ यासारख्या क्षेत्रातील सुधारणा महत्त्वाच्या होत्या. ७ सप्टेंबर १९२९ ला मुधोजीरावांनी एक कायदा करून कायदेमंडळ व कार्यकारी मंडळ स्थापन केले. त्यामागे संस्थानाचा कारभार लोकमनानुवर्ती व लोकप्रतिनिधीस जबाबदार करणे हा हेतू होता. मुधोजीराव यांनी सार्वजनिक सभा, डेक्कन एज्युकेशन सोसायटी तसेच मुंबई कायदेमंडळात आपला वाटा दिला. तर मालोजीराव यांनी नरेंद्र मंडळात सहभाग नोंदविला होता. म. गांधीजींनी औंध, भोर, मिरज, कुरुंदवाड, जमखंडी, तसेच फलटण या संस्थानांशी चर्चा केली होती. शेवटीत सर्व दक्षिणी संस्थानांसोबत ८ मार्च १९४८ रोजी फलटण संस्थान मुंबई राज्यात अर्थात महाराष्ट्रात विलीन झाले.

**वरीलप्रमाणे महाराष्ट्रातील काही संस्थानांतील प्रजेच्या स्वातंत्र्यलढ्याचा आढावा घेतला आहे. सर्वच संस्थानांचा परामर्श घेणे येथे शक्य नाही. हैद्राबाद संस्थानाच्या तसेच महाराष्ट्रातील सर्व संस्थानांच्या विलीनीकरणात हैद्राबाद स्टेट कॉंग्रेस, आर्य समाज, दक्षिण संस्थान, हितवर्धक सभा, अखिल भारतीय संस्थान, लोकपरिषद इत्यादी संस्था संघटनांनी योगदान दिले. तसेच स्वामी रामानंद तीर्थ, सरदार वल्लभभाई पटेल, पंडित जवाहरलाल नेहरू, व्ही. पी. मेनन, लॉर्ड माऊंटबॅटन यांच्यासारख्या मुत्सद्दी व खंबीर नेतृत्व संस्थानांच्या विलीनीकरणाचे श्रेय दिले पाहिजे.**

## ५.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न / उपक्रम –

### दीर्घोत्तरी प्रश्न –

१) महाराष्ट्रातील क्रांतिकारी चळवळीचे स्वरूप स्पष्ट करा.

२) महाराष्ट्रातील भूमिगत चळवळीतील नाना पाटील यांचे योगदान स्पष्ट करा.

३) हैद्राबाद संस्थानातील मराठवाडा विभागातील स्वांतत्र्यलढ्याचे स्वरूप विशद करा.

४) हैद्राबाद संस्थानचे विलीनीकरणात आर्य समाज संघटनेचे योगदान स्पष्ट करा.

५) हैद्राबाद संस्थानच्या स्वातंत्र्यलढ्यातील स्टेट कॉंग्रेसची कामगिरी लिहा.

६) हिंदी संस्थानांच्या विलीनीकरणाच्या संदर्भातील सरदार वल्लभभाई पटेल यांच्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

७) हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्यलढ्यातील स्वामी रामानंद तीर्थांचे योगदान स्पष्ट करा.

८) कोल्हापूर संस्थानातील स्वातंत्र्य लढ्याचा वृत्तांत लिहा.

९) सांगली संस्थानातील स्वातंत्र्य लढ्याविषयी माहिती लिहा.

१०) औंध संस्थानातील स्वातंत्र्य लढ्याविषयी माहिती लिहा.

११) मुंबई राज्यातील महाराष्ट्रात फलटणच्या विलीनीकरणाविषयी थोडक्यात लिहा.

### लघुत्तरी प्रश्न –

१) चाफेकर बंधूंविषयी थोडक्यात माहिती लिहा.

२) स्वातंत्र्यवीर सावरकरांचे क्रांतिकारी चळवळीतील कार्य स्पष्ट करा.

३) सातारा येथील प्रतिसरकारविषयी माहिती लिहा.

४) संस्थानांच्या कारभाराचे स्वरूप स्पष्ट करा.
५) स्वामी रामानंद तीर्थांचे कार्य स्पष्ट करा.
६) संस्थानी राजवटीचे स्वरूप थोडक्यात लिहा.

## ५.४ सारांश –

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला ब्रिटिश सत्तेच्या वर्चस्वातून मुक्त होण्यासाठी क्रांतिकारकांनी कसे योगदान दिले? विशेषत: महाराष्ट्रातील चाफेकर बंधू, सावरकर बंधू यांनी क्रांतिकारी चळवळ का सुरू केली? तिचा कालावधी कोणता? त्यांनी कोणत्या क्रांतिकारी संघटना स्थापन केल्या? त्या संघटनेद्वारे देशातूनच नव्हे तर विदेशातूनही आपले क्रांतिकार्य कसे चालविले? त्यांना विदेशात कोणकोणत्या क्रांतिकारकांचे सहकार्य लाभले, याची सविस्तर माहिती लक्षात येते. तसेच भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील शेवटच्या पर्वात म. गांधीजींच्या आदेशानुसार सुरू झालेले राष्ट्रव्यापी छोडो भारत चळवळ या चळवळीत भूमिगत चळवळीत अनेक देशभक्तांनी योगदान दिले. त्यात महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील प्रतिसरकारच्या स्थापनेत क्रांतिसिंह नाना पाटील यांनी कसे योगदान दिले? याचेही याच घटकात विवेचन आले आहे. त्यानंतर भारतातील संस्थानांच्या विशेषत: महाराष्ट्रातील संस्थानांच्या विलिनीकरणासाठी स्वातंत्र्यलढे दिले गेले. भारतात ब्रिटिशांची सत्ता असताना देशी संस्थानांच्या वर्चस्वा खालील प्रदेश आणि प्रत्यक्ष ब्रिटिशांच्या वर्चस्वाखालील प्रदेश अशा प्रकारे दोन भागात सत्ता होती. सुरुवातीला देशी संस्थांनिकांच्या अन्याय्य सत्तेविरुद्ध प्रजेचा स्वातंत्र्यलढा सुरू होता. नंतर तो ब्रिटिशसत्तेविरुद्धही सुरू झाला होता. त्यासाठी प्रांतिक व अखिल भारतीय स्तरावर प्रजा परिषदा, हितकारिणी सभा, भाषिक परिषदा याद्वारे स्वातंत्र्य आंदोलने झाली. भारतात असलेल्या ५६२ संस्थानांची स्थिती भिन्नभिन्न होती. काही संस्थानांकडून प्रजेच्या हिताकडे होणारे दुर्लक्ष, त्यांच्यावर होणारा अन्याय, त्यांचे होणारे शोषण यामुळे संस्थानिकांच्या विरुद्ध प्रजेत असंतोष निर्माण झाला.

ब्रिटिशांच्या प्रत्यक्ष वर्चस्वाखालील भारतात सुधारणा होऊ लागल्या. त्या सुधारणांचे आकर्षण संस्थानातील प्रजेलाही होते. ब्रिटिश भारतातील सुधारणा संस्थानी प्रजेला मिळाव्यात यासाठी संघटनात्मक रित्या प्रयत्न सुरू झाले. राजकीय परिषदा, प्रजा परिषदा, अखिल भारतीय संघटना, भाषिक परिषदा, धार्मिक-सामाजिक संघटना स्थापन झाल्या. अनेक संस्थानांमध्ये स्वातंत्र्य लढ्यासाठी नेतृत्व उभे राहिले. हा लढा भारतीय राष्ट्रीय सभेच्या लढ्यास समांतर असाच होता. सुरवातीला राष्ट्रीय सभेचा दृष्टिकोन मर्यादित होता. मात्र १९३७ पासून त्यात खूपच बदल होऊ लागला. स्वत: म. गांधी व अन्य नेत्यांचाही या संस्थानी लढ्याविषयी सकारात्मक दृष्टिकोन होता. त्यामुळे तेही त्या लढ्याला महत्त्व देऊ लागले. भारतातील हाताच्या बोटावर मोजणाऱ्या संस्थानांनी जनतेच्या सुधारणांसबंधी सहानुभूती दाखविली तथापि अनियंत्रित जुलमी संस्थानिकांना प्रजेचा प्रखर विरोध होत होता. पुढे भारताला स्वातंत्र्य प्राप्त होताच भारत सरकारने संस्थानांच्या विलीनीकरणाचे धोरण ठरविले. त्यानुसार जे संस्थानिक भारतीय संघराज्यात सामील झाले त्यांना संघराज्यात समाविष्ट करण्यात आले. हैद्राबादच्या निजामाच्या विघातक कारवायांच्या विरोधी पोलीस ॲक्शन अर्थात लष्करी कारवाई केली आणि हैद्राबाद संस्थान संघराज्यात विलीन केले. त्याबरोबर मराठवाडा त्यातून मुक्त

झाला. हा मराठवाडा मुक्तिदिन १७ सप्टेंबर रोजी साजरा केला जातो.

सर विल्यम वॉर्नर यांनी ब्रिटिशांचा संस्थानांबाबतचा दृष्टिकोन आपल्या भारतीय संस्थाने या ग्रंथात नमूद केला आहे. त्यानुसार १) हस्तक्षेप न करण्याचे धोरण २) स्वामित्व प्रस्थापनेचे धोरण ३) १८५७ चा उठाव व भारतीय संस्थाने यासंबंधीचे धोरण अशी तीन धोरणे ब्रिटिश सरकारने स्वीकारली होती. माँटेग्यू - चेम्सफोर्ड सुधारणा अहवालानुसार संस्थानिकांचे मंडळ अर्थात नरेंद्र मंडळाची स्थापना करण्यात आली. त्याद्वारे संस्थाने व ब्रिटिश सरकार यांच्यातील संबंधाचे धोरण निश्चित करण्यात आले.

भारतीय संस्थानिकांना आपल्या वर्चस्वात ठेवण्याचा ब्रिटिश सरकार प्रयत्न करीत होते. मात्र संस्थांनी प्रजेत निर्माण झालेल्या जागृतीमुळे स्वातंत्र्यलढा होऊ लागली. दक्षिण महाराष्ट्रातील अठरा संस्थानांपैकी अनेक संस्थानांनी लोकशाही हक्कांसाठी लढे दिले. प्रजेच्या हितात संस्थानाचा कारभार कसा चालवावा हे निश्चित करण्यासाठी दक्षिण संस्थान हितवर्धक सभा स्थापन करण्यात आली होती. तसेच अखिल भारतीय संस्थान लोकपरिषदेद्वारे राष्ट्रीय स्तरावरील संस्थानांच्या प्रश्नांसंबंधी अधिवेशने भरविली. महाराष्ट्रातील प्रामुख्याने दक्षिणी संस्थानातील कोल्हापूर, सोलापूर, औंध इत्यादी संस्थानांत स्वातंत्र्य लढे झाले. सर्व दक्षिणी संस्थानांसोबत फलटण संस्थानही महाराष्ट्रात विलीन झाले. हैद्राबाद येथे ही मुक्ती लढा झाला. निजामाने भारतीय संघराज्यात विलीन होण्यास नकार दिला. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांनी १९४८ मध्ये 'पोलीस अॅक्शन' अर्थात लष्करी कारवाई करण्याचे जाहीर केले. रझाकार व निजामी फौजांवर भारतीय सैन्याने अवघ्या १०८ तासांमध्ये विजय मिळविला. शेवटी निजामाने १७ सप्टेंबर १९४८ रोजी सायंकाळी आपली शरणागती घोषित केली.

# ५.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ –

**१) चाफेकर बंधू –**

पुणे येथे प्लेग निवारण अधिकाऱ्यांनी प्लेग प्रतिबंधाच्या नावाखाली जनतेवर अनन्वित अत्याचार केले. त्यामुळे संतप्त होऊन पुण्याच्या कमिशनर रँड याची दामोदर चाफेकर यांनी गोळी घालून हत्या केली तर रँड याचा सहाय्यक आयर्स्ट याचा खून बाळकृष्ण चाफेकर यांनी केला; यावेळी लोकमान्य टिळकांनी रँड या क्रूर अधिकाऱ्याच्या हत्येची तुलना अफझलखानाच्या हत्येशी करून रँडच्या हत्येचे समर्थन केले. अशा प्रकारे चाफेकर बंधूंनी जुलमी ब्रिटिश अधिकाऱ्यांची हत्या करून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

**२) अभिनव भारत –**

चाफेकर बंधूंच्या हौतात्म्यापासून प्रेरणा स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांनी स्थापन केलेली संघटना म्हणजे 'मित्र मेळा' होय. (इ.स. १९००). तिचेच रूपांतर इ.स. १९०४ मध्ये 'अभिनव भारत' या संघटनेत झाले. तिच्या अनेक शाखा महाराष्ट्रात व महाराष्ट्राबाहेरील प्रांतातही होत्या. ब्रिटिश सत्ता उलथून टाकणे हे या संघटनेचे मुख्य उद्दिष्ट होते.

**३) प्रतिसरकार –**

इ.स. १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत उघडपणे प्रतिकार करण्याबरोबच भूमिगत राहूनही भारतीयांनी ब्रिटिशांना विरोध केला. त्यात जयप्रकाश नारायण, अरुणा असफअली, एस.

एम. जोशी, नाना पाटील, या नेत्यांचा समावेश होतो. त्या काळात महाराष्ट्रात 'सातारा', बंगालमध्ये मिदनापूर, उत्तरप्रदेशात बलिया, या ठिकाणी प्रतिसरकार अथवा पर्यायी सरकारे स्थापन झाली. प्रतिसरकार हे ब्रिटिश सरकारला समांतर असे सरकार होते. या सरकारने काही काळ होईना ब्रिटिश सत्ता नष्ट केली होती. सातारा येथील प्रतिसरकारच्या तुफान सेनेने गुंडांना पकडून त्यांच्या तळपायांवर लाठ्यांचे तडाखे मारण्याचे धोरण स्वीकारले होते. याच प्रकाराला 'पत्री मारणे' असे संबोधले जात असे. म्हणूनच या प्रतिसरकारला पत्री सरकारही म्हणतात. क्रांतिसिंह नाना पाटील हे प्रतिसरकारचे उद्‌गाते होय.

**४) रेसिडेंट –**

देशी संस्थाने व ब्रिटिश सत्ता यांच्यातील दुवा म्हणून ब्रिटिश सत्तेचा प्रतिनिधी देशी संस्थानात ठेवावा असे तैनाती फौजपद्धतीनुसार धोरण ठरविण्यात आले होते. तो भारतीय संस्थानांच्या अंतर्गत व परकीय कारभारात हस्तक्षेप करीत असे.

**५) नरेंद्र मंडळ –**

माँटेग्यू-चेम्सफोर्ड सुधारणांनुसार संस्थानिकांचे एक प्रातिनिधिक मंडळ - नरेंद्र मंडळ निर्माण करण्यात आले. (इ.स. १९११). भारताच्या राजकीय भवितव्याच्या संदर्भात संस्थानांच्या अधिपतींनाही सहभागी करून घ्यावयास पाहिजे असे स्पष्ट करण्यात आले. या नरेंद्र मंडळात मोठ्या संस्थानांचे गट करून त्यांचा एक प्रतिनिधी या नरेंद्र मंडळात मोठ्या संस्थानांना स्वतंत्र प्रतिनिधित्व देण्यात आले तर छोट्या संस्थानांचे गट करून त्यांचा एक प्रतिनिधी या नरेंद्र मंडळाचा अध्यक्ष असे. त्याच्या अध्यक्षेत नरेंद्र मंडळ काम करीत असे. यामुळे संस्थानिकांना विशेष दर्जा व ब्रिटिश सरकारशी त्यांचे संबंध निश्चित झाले.

**६) हस्तक्षेप न करण्याचे धोरण –**

ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनी सरकारने इ.स. १७५७ ते १८५४ या कालावधीत आपल्या ताब्यात असलेल्या संस्थानांच्या कारभारात हस्तक्षेप न करण्याचे धोरण म्हणजे हस्तक्षेप न करण्याचे धोरण होय.

**७) माँटेग्यू–चेम्सफोर्ड सुधारणा –**

भारतमंत्री माँटेग्यू यांनी इ.स. १९१७ मध्ये हप्त्याहप्त्याने स्वराज्य देण्यासंबंधी केलेल्या घोषणेनुसार १९१९ मध्ये केलेला सुधारणा कायदा म्हणजे माँटेग्यू - चेम्सफोर्ड सुधारणा होय. कायदा करण्यास भारतमंत्री माँटेग्यू व व्हॉईसरॉय चेम्सफोर्ड यांचे योगदान होते, त्यामुळे हा सुधारणा कायदा माँट-फोर्ड सुधारणा कायदा म्हणून ओळखला जातो.

**८) हैद्राबाद स्टेट काँग्रेस –**

हैद्राबादमधील नेत्यांनी स्थापन केलेली निजामाविरोधी स्वातंत्र्य लढ्यात राजकीय स्वरूपात आंदोलन करणारी संस्थानापुरती सीमित असणारी संघटना म्हणजे हैद्राबाद स्टेट काँग्रेस होय. तिची स्थापना २९ जून १९३८ मध्ये करण्यात आली.

**९) पोलीस ॲक्शन –**

हैद्राबाद संस्थानचा निजाम आपले संस्थान भारत संघराज्यात विलीन करण्यास तयार नव्हता. त्यामुळे सरदार वल्लभभाई पटेल यांनी भारतीय लष्कर पाठवून अवघ्या १०८ तासांमध्ये हैद्राबाद संस्थान ताब्यात घेतले. या कारवाईस 'पोलीस ॲक्शन' असे म्हणतात. यातून स्वातंत्र्योत्तर

भारतापुढील मोठा मोठा प्रश्न सुटला.

**१०) मराठवाडा मुक्तिदिन –**

प्रत्यक्षात १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला तरी हैद्राबाद संस्थान व त्यात अंतर्भूत असलेला मराठवाडा १५ ऑगस्ट १९४७ पासून १७ सप्टेंबर १९४८ पर्यंत निजामी राजवटीच्या गुलामगिरीतच होता. १७ सप्टेंबर १९४८ रोजी सरदार पटेलांनी केलेल्या पोलीस ॲक्शनमुळे निजामाने भारतीय सेनेपुढे शरणागती पत्करली म्हणून १७ सप्टेंबर १९४८ हाच खऱ्या अर्थाने मराठवाड्याचा मुक्तिदिन असून तो भारतीय संघराज्यात सामील होण्याचा दिवस म्हणून साजरा केला जातो.

## ५.६ संदर्भ सूची –

१) सरदेसाई (डॉ.) बी. एन. (२०००) आधुनिक महाराष्ट्र इ.स. १८१८-१९६०, कोल्हापूर, फडके प्रकाशन, पृ. २०३ ते २११.

२) भोसले, (डॉ.) अरुण, (१९९४), कोल्हापूर संस्थानातील प्रजा परिषद आंदोलन, (कोल्हापूर, अखिल महाराष्ट्र, इतिहास परिषद, ३रे अधिवेशन).

३) पतके कृ. के. (१९३४), महाराष्ट्राच्या इतिहासात फलटण संस्थानची कामगिरी, पुणे.

४) रोडे (डॉ.) सोमनाथ (२००८), हैद्राबाद मुक्तिलढा आणि स्वामी रामानंद तीर्थ, लातूर, अश्विनी प्रकाशन, पृ. ३७ ते ५४, ९८, ९९.

५) पवार (डॉ.) जयसिंगराव, पवार वसुधा, (वर्षनोंद नाही), आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास, नागपूर, विद्या प्रकाशन, पृ. २२९ ते २३५.

६) घोडके (डॉ.) ह. म., गायधनी र. ना. (२००४), आधुनिक परिवर्तनाचा इतिहास - १, ब्रिटिश वसाहतवाद आणि महाराष्ट्र, नाशिक, य. च. म. मुक्त विद्यापीठ, पृ. ३८ ते ४३

७) व्यास (डॉ.) प्रकाशचंद (२००५), आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, ब्रिटिश वसाहत आणि महाराष्ट्र नाशिक, य.च.म.मु.का. मुक्त विद्यापीठ, पृ. ५७ ते ७३.

८) केतकर कुमार (२००३) कथा स्वातंत्र्याची, मुंबई, पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पृ. २६३ ते २८६, २९३.

९) सातभाई (डॉ.) श्रीनिवास (२००६) आधुनिक भारताचा इतिहास (इ.स. १७६२ ते १९५०) औरंगाबाद, विद्याबुक्स पब्लिशअर्स, पृ. ३३८ ते ३३८, ३४१, ३४२.

१०) फडके य. दि. (२००६), विसाव्या शतकातील महाराष्ट्र राजकीय इतिहास खंड पाचवा, पुणे, के सागर पब्लिकेशन्स, पृ. २७२ ते २९९.

११) गाठाळ (डॉ.) साहेबराव (२०००) आधुनिक भारताचा इतिहास, औरंगाबाद, कैलाश पब्लिकेशन्स, पृ. ११० ते ११४.

१२) जोशी स्मिता (२००७), भारतीय इतिहास प्राचीन ते अर्वाचीन, पुणे, डायमंड पब्लिकेशन्स, पृ. ५७२ ते ५७४.

१३) मोरे दिनेश (२००६) आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, पुणे, के. एस. पब्लिकेशन, पृ. १९६ ते २०८.

१४) के. सागर, पाटील व्ही. बी. (१९९८) महाराष्ट्रातील समाजसुधारक साहित्यिक, थोर भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती, पुणे, के'सागर पब्लिकेशन्स, पृ. १०१ ते १०५.

## ५.७ क्षेत्रीय कार्य –

१) तुमच्या गावातील व परिसरातील क्रांतिकारी-चळवळीत सहभागी झालेल्या व्यक्तींची माहिती मिळवा व तिची नोंद ठेवा.

**२) परिसरातील स्वातंत्र्य सैनिकांची सूची तयार करा. त्यांना कोणते सन्मान मिळाले, सरकारकडून पेन्शन मिळते काय, तसेच त्यांची सद्य:स्थिती संबंधीची मते नोंदवहीत टिपून ठेवा.**

*****

## घटक ६

# संयुक्त महाराष्ट्र चळवळ

**अनुक्रमणिका:-**


**६.0 उद्दिष्टे**

**६.१ प्रस्तावना**

**६.२ विषय विवेचन**

**६.२.१ उदय**

**६.२.२ विकास**

**६.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न**

**६.४ सारांश**

**६.५ पारिभाषिक शब्द/संज्ञा/संकल्पना**

**६.६ संदर्भसूची/अधिक वाचनासाठी पुस्तके**

**६.७ सरावासाठी प्रश्न/क्षेत्रीय कार्य.**


## ६.0 उद्दिष्टे :

१ मे १९६0 रोजी 'महाराष्ट्र' राज्याची निर्मिती झाली, यासाठी मोठा लढा मराठी जनतेला १९४६ ते १९६0 या कालावधीत द्यावा लागला. या लढ्यास 'संयुक्त महाराष्ट्राची चळवळ' असे म्हटले जाते. या घटकात आपण या चळवळीचा अभ्यास करणार आहोत. या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास-

संयुक्त महाराष्ट्र म्हणजे काय? हे कळेल.

भाषावार प्रांतरचनेची आवश्यकता व महत्त्व समजेल.

द्वैभाषिक राज्याची संकत्पना स्पष्ट होईल.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील विविध प्रवाह सांगता येतील.

संयुक्त महाराष्ट्र चळवळीतील प्रमुख नेत्यांचे योगदान, भूमिका स्पष्ट होईल

संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे महत्त्व सांगता येईल.

## ६.१ प्रस्तावना

आज ज्या भूप्रदेशास आपण महाराष्ट्र राज्य म्हणतो, त्यासाठी मोठा लढा मराठी जनतेला घ्यावा लागला, १0५ हुतात्म्यांचे बलिदान द्यावे लागले. हे समजण्यासाठी या लढ्याचा इतिहास

आपण समजावून घेणे आवश्यक आहे. तसेच १९३८ ते १९६० या कालखंडातील या चळवळीने पाहिलेले चढउतार समजण्यासाठी या चळवळीचे प्रमुख टप्पे पाहणे गरजेचे आहे.

आजच्या महाराष्ट्रातील विदर्भ हा प्रदेश पूर्वी मध्यप्रांताला जोडलेला होता व 'मराठवाडा' हा प्रदेश हैदराबाद राज्यामध्ये होता. उर्वरित मराठी जनता मुंबई राज्य व कर्नाटकात होती. विदर्भासह सर्व मराठी भाषिक प्रदेशाचे एकछत्री मराठी राज्य असावे असा ठराव सर्वप्रथम १९३८ मध्ये स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मुंबई येथील साहित्य संमेलनात संमत झाला. पुढे १९४६ च्या बेळगाव साहित्य संमेलनात ग. त्र्यं. माडखोलकर यांनी या कल्पनेस गती दिली.

१९५३ मध्ये आंध्रप्रदेश या भाषिक तत्त्वावर आधारित पहिल्या राज्याची निर्मिती झाली. व भाषावार प्रांतरचनेची मागणी जोर धरू लागली. भाषावर प्रांतरचनेचा अभ्यास करण्यासाठी न्या. फाजल अली यांच्या अध्यक्षतेखाली राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना १९५६ मध्ये झाली. महाराष्ट्राप्रमाणे गुजरातची मागणी होऊ लागली. तसेच या दोन्ही राज्यांमध्ये 'मुंबई' साठी संघर्ष सुरू झाला. १९५६ मध्ये द्वैभाषिक राज्याची निर्मिती व त्यास झालेला महाराष्ट्रीयांचा प्रचंड विराध यामुळे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीला गती मिळाली. आचार्य अत्रे ते यशवंतराव चव्हाण अशा सर्वच नेत्यांनी याकामी मोठे योगदान दिले; व १ मे १९६० राजी महाराष्ट्र राज्य निर्मितीचे मराठी जनतेचे स्वप्न पूर्ण झाले. यात संयुक्त महाराष्ट्र चळवळीने मोलाची भूमिका बजावली, त्याचा अभ्यास आपण या घटकात करणार आहोत.

# ६.२ विषय विवेचन

## ६.२.१ संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उदय

**उदययाची पार्श्वभूमीः-**

न्या. महादेव गोविंद रानडे मराठी राज्यपाल 'मराठा राष्ट्र' असे संबोधत, ते म्हणतात '' ज्याला राष्ट्र म्हणतात त्याच्या निर्मितीची जी प्रक्रिया प्रथम सुरू झाली तिच्यातूनच मराठी सत्तेचा उदय झाला.'' मराठी भाषिकांच्या एकीकरणाचा विचार २० व्या शतकापासून अनेक जाणकारांनी व्यक्त करण्यास प्रारंभ केला होता. इ.स. १९११ मध्ये न. चिं. केळकर यांनी 'केसरी'मधून 'मराठी भाषा बोलणाऱ्यांची सर्व लोकसंख्या एका अमलाखाली असावी' अशी मागणी केली होती व त्याचे महत्त्वही जनकेला समजावून सांगितले होते. १९१५ मध्ये लोकमान्य टिळकांनी भाषावार प्रांतरचनेची मागणी केली होती.

१ ऑक्टोबर १९३८ रोजी मध्य प्रांत व वऱ्हाड ( उउ.झ.। इशीरी ) विधानसभेत श्री. रामराव देशमुख यांनी असा ठराव मांडला की, '' या प्रांतातील मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचा प्रदेश गव्हर्नरच्या अमलाखालील प्रांतामध्ये संघटित करून ' विदर्भ' नावाचा एक प्रदेश/प्रांत शक्य तितक्या लवकर बनविण्याची उपाययोजना करण्यात यावी असे या असेंब्लीचे विचारपूर्वक झालेले मत ब्रिटिश सरकारास कळविण्याची शिफारस ही असेंब्ली करीत आहे.'' या ठरावास मुख्यमंत्री रविशंकर शुक्ल यांनीही पाठिंबा दिला होता.

'मराठी भाषिकांचा एक स्वतंत्र प्रांत असावा' या कल्पनेला येथूनच पालवी फुटू लागली.

१५ ऑक्टोबर १९३८ राजी मुंबईला ' मराठी साहित्य संमेलन' भरले होते. या अधिवेशनाचे अध्यक्ष वि. दा. सावरकर होते. या अधिवेशनात असा ठराव करण्यात आला की, '' वऱ्हाड, नागपूर व जेथे जेथे महाराष्ट्रीय बहुसंख्य आहेत ते सर्व विभाग एकत्र जोडून मराठी बोलणाऱ्यांचा निराळा विभाग करावा अशी या संमेलनाची आग्रची सूचना आहे.''

या पार्श्वभूमीवर २८ जानेवारी १९४० रोजी मुंबईत श्री. रामराव देशमुख यांनी ' संयुक्त महाराष्ट्र सभेची स्थापना केली, यावेळी 'संयुक्त महाराष्ट्र' हा शब्दप्रयोग सर्वप्रथम वापरण्यात आला, प्रचारात आला व पुढे रूढ झाला. अर्थात या संयुक्त महाराष्ट्राच्या कल्पनेत महाविदर्भ, मराठवाडा, मध्यमहाराष्ट्र, कोकण व मुंबई हे पाच मुख्य प्रांत अपेक्षित होते.

दिनांक २४ मे १९४० राजी संयुक्त महाराष्ट्र सभेतर्फे पुणे येथे ' महाराष्ट्र एकीकरण परिषद ' भरविण्यात आली. या परिषदेस डॉ. तु. ज. केदार, द. वा. पोतदार अनुक्रमे अध्यक्ष व स्वागताध्यक्ष होते. या दरम्यान दुसरे महायुद्ध सुरू असल्यामुळे ब्रिटिश सरकारने या महाराष्ट्र एकीकरणाकडे विशेष लक्ष दिले नाही. शिवाय संयुक्त महाराष्ट्र सभेने संकल्पिलेल्या महाराष्ट्र राज्याचा मराठवाडा विभाग निजामाच्या अंकित होता, तसेच मध्यमहाराष्ट्रातील कितीतरी प्रदेश कोल्हापूर, सांगली, मिरज, औंध, भोर, जत, जव्हार, इ. देशी संस्थानांत अडकलेला होता. हे सर्व संस्थानिक आपले प्रदेश सोडायला तयार नव्हते. अशा परिस्थितीत संयुक्त महाराष्ट्र सभा प्रभावीपणे कार्य करू शकली नाही.

सोलापूर येथे भरलेल्या साहित्य संमेलनात १९४१ मध्ये संयुक्त महाराष्ट्राच्या ठरावाला अशी पुस्ती जोडली की, ' नवीन संयुक्त राज्यघटनेचा विचार होण्यापूर्वीच मराठी प्रदेशाचा निराळा प्रांत करण्यात यावा.' १९४२ मध्ये ग. त्र्यं. माडखोलकर यांनी एकभाषी राज्याबाबत महात्मा गांधींशीही पत्रव्यवहार केला होता, एका पत्रात महात्मा गांधी म्हणतात,

'' महाराष्ट्र के सब विभाग एक प्रांत बने, उसमे मेरी पूर्ण संमति है। हिंदुस्थान आझाद बनेगा तो ऐसे सब प्रश्न अपने आप हल हो जायेंगे।''

१९४३ मध्ये महाविदर्भ परिषदेने अमरावती येथे परिषद घेऊन 'महाविदर्भ' राज्याची मागणी केली व महाराष्ट्र एकीकरणास साहाय्य करण्याचा संकल्पही केला. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. मुकुंदराव जयकर होते; आपल्या भाषणात ते म्हणतात,

'' संपूर्ण मराठी भाषी प्रदेशाच्या एकीकरणाच्या मागणीचा पहिला हप्ता म्हणून 'महाविदर्भ' राज्याची (वऱ्हाड व मध्य प्रदेशातील मराठी भाषिक प्रदेश) ही मागणी पुढे रेटली तरच यशस्वी होईल. अशा रीतीने ही मागणी करण्यातच तिची उपयुक्तता आहे. भाषेच्या ज्या तत्त्वावर तुम्ही ही मागणी करीत आहात ते तत्त्व जर तर्कशुद्ध व न्याय्य असेल तर महाराष्ट्र एकीकरणाच्या बाबतीत ते अधिकच प्रभावी ठरते हे उघड आहे. म्हणून कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह, संशय किंवा भीती यांना मनात थारा न देता महाराष्ट्र एकीकरणाच्या ठरावाला पाठिंबा दिला पाहिजे.''

अशा प्रकारे १९११ ते १९४३ या कालखंडात ' संयुक्त महाराष्ट्र' ही संकल्पना वैचारिक पातळीवरच होती, या प्रश्नावर चर्चा सुरू होती. मात्र या प्रश्नाने, चळवळीने अद्याप मूर्त स्वरूप घेतलेले नव्हते. एवढे मात्र निश्चित होते की, कुठे तरी समाजमनात असा विचार घर करू लागला होता की मराठी बोलणाऱ्या लोकांचा एक प्रदेश/राज्य निर्माण केले जावे. याच बीजरूपी विचारातून संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अंकुर निर्माण झाले. पुढे १९४६ ते १९६० या कालखंडात संयुक्त महाराष्ट्र

चळवळीने गती घेऊन राज्यनिर्मितीच्या दृष्टीने वाटचाल केली.

## बेळगाव साहित्य संमेलन, १९४६ः-

संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासात १९४६ मध्ये भरलेल्या बेळगाव येथील मराठी साहित्य संमेलनाला विशष महत्त्व आहे, किंबहुना हे संमेलन म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची गंगोत्रीच होय. १९४२ ते १९४५ या काळात 'चले जाव' आंदोलनाच्या काळात संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न ऐरणीवर येऊ शकला नाही. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर भारताला स्वातंत्र्य प्रदान होणार हे दिसू लागल्याबरोबर त्याच्या घटकांचा एकजिनसीपणा साधेल अशा रीतीने भाषा तत्त्वावर पुनर्रचना करावी या विचाराचा पुन्हा प्रादुर्भाव झाला व पुढे लवकरच बेळगाव येथे भरलेल्या साहित्य संमेलनात त्याने आकार धारण केला.

१२ मे १९४६ रोजी आजच्या कर्नाटक राज्यातील बेळगाव येथे महाराष्ट्र साहित्य संमेलन भरले होते. या संमेलनाच्या 'ललित साहित्य' विभागाचे अध्यक्ष म्हणून श्री. गजाननराव माडखोलकर होते. ते संयुक्त महाराष्ट्राचे पुरस्कर्ते असल्यामुळे त्यांनी आपल्या भाषणानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा खालील ठराव भाषणानंतर संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीचा खालील ठराव मांडला-

'' हिंदुस्थानान स्वतंत्र राष्ट्रीय सरकार लवकरच स्थापन होण्याचा संभव दिसत आहे व तेव्हा तसे व्हावे ही या सभेची तीव्र इच्छा आहे. सबब, तसे होण्याच्या वेळी हिंदी प्रांताची भाषा व संस्कृती यांच्या दृष्टीने पुनर्घटना करताना मुंबई अणि मध्यप्रांत व वऱ्हाड या दोन प्रांतांतील तसेच या दोनही प्रांतांच्या स्थलसीमेत मोडणाऱ्या देशी संस्थानातील सर्व सलग प्रदेश, हैदराबाद संस्थानातील मराठवाडा आणि पोर्तुगीज सत्तेखालील गोमंतक यांचा संयुक्त महाराष्ट्र प्रांत निर्माण करताना मुंबई, मध्यप्रांत, वऱ्हाड, मराठवाडा आणि गोमंतक यांच्या सरहद्दीवरचे मराठी भाषी प्रदेश आज अन्य भाषी प्रांतात सामील केले गेलेले आहेत, ते भाग संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट करण्यात यावेत, असा या परिषदेचा आग्रह आहे.''

या ऐतिहासिक ठरावाने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा बिगुल वाजविला. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे एक राज्य असावे व या संभाव्य राज्यातील कोणकोणत्या प्रदेशांचा समावेश असावा याचा आराखडाच माडखोलकरांनी तयार केला होता. याच वैचारिक पायावर संयुक्त महाराष्ट्र चळवळीची इमारत उभी राहिली. या दृष्टीने या ठरावाचे विशेष महत्त्व आहे. याच अधिवेशनात ' संयुक्त महाराष्ट्र समिती ' स्थापन करण्याचे ठरले; या समितीमध्ये १) प्रा. द. वा. पोतदार, २) श्री. शंकरराव देव ३) श्री. केशवराव जेधे ४) श्री. शं. नवरे व ५) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर हे सभासद घेण्याचे ठरले. ह्या समितीची स्थापन झाल्याबरोबर पंधरा दिवसांतच समितीची पहिली सभा २६ मे १९४६ राजी पुणे येथे झाली. या सभेत पुढील दोन महिन्यांत परिषद बोलावण्याचा ठराव केला. अशा प्रकारे बेळगाव साहित्य संमेलन हे संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे उगमस्थान ठरले.

## संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना - १९४६

पुणे येथील बैठकीत ठरवल्याप्रमाणे २८ जुलै १९४६ रोजी मुंबईत महाराष्ट्र एकीकरण परिषदेचे आयोजन करण्यात आले. या परिषेदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव देव हे होते. मराठी प्रांत निर्माण करण्यासाठी 'संयुक्त महाराष्ट्र परिषदे' ची स्थापना या परिषदेत करण्यात आली. या परिषदेने संमत केलेले ठराव पुढीलप्रमाणे होते-

१) हिंदुस्थानात लोकशाही राज्यघटना यशस्वी करण्यासाठी भाषावार प्रांतरचना करणे हेच इष्ट

आहे आणि आवश्यक आहे. असा या परिषदेचा विश्वास असल्यामुळे सर्व सलग मराठी भाषी प्रदेशांचा एक प्रांत शक्य तितक्या लवकर स्थापन करण्यात यावा.

२) या प्रांतात, मुंबई शहर, वऱ्हाड व मध्य प्रांतातील मराठी भाषी भाग, हैदराबाद व अन्य देशी संस्थानांतील मराठी भाषी भाग व गोवा या भागांचा समावेश करावा.

३) उपरोक्त विभागापैकी ब्रिटिश अमलाखाली असलेल्या मराठी भाषी प्रदेशांचा प्रथम एक मराठी प्रांत बनवावा, त्यानंतर क्रमाने राहिलेले मराठी प्रदेश समाविष्ट करावेत.

४) स्वतंत्र हिंदुस्थानची राज्यघटना तयार करण्यासाठी भरणार असलेल्या घटना समितील मुंबई व वऱ्हाड - मध्यप्रांतातील मराठी प्रतिनिधींनी भाषावार राज्यरचनेचा प्रश्न उपस्थित करून या दोन प्रांतातील मराठी भाषी प्रदेशांचा एक मराठी प्रांत बनविण्याचा प्रयत्न करावा.

५) संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना स्वतंत्रपणे करण्यात यावी.

या मुंबई अधिवेशनात स्वतंत्रपणे संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाल्यामुळे साहित्य परिषदेचा संबंध प्रत्यक्षपणे संपुष्टात आला, तरीही वेगवेगळया साहित्य संमेलनातून संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन होत होतेच. १३ व १४ एप्रिल १९४७ रोजी जळगाव येथे भरलेल्या परिषदेच्या अधिवेशनात ‘संयुक्त महाराष्ट्र परिषदेची प्रथम कार्यकारिणी निवडण्यात आली-

अध्यक्ष- श्री. शंकरराव देव

उपाध्यक्ष- ब्रिजलाल बियाणी व पूनमचंद रांका ( विदर्भाचे प्रतिनीधी )

श्री. दिगंबरराव बिंदू ( मराठवाडा)

श्री. द. वा. पोतदार व केशवराव जेथे.

मुख्य कार्यवाह- ग. त्र्यं. माडखोलकर

सहकार्यवाह- श्री. शं. नवरे, डॉ. अंत्रोळीकर,

वसंतराव नाईक, सौ. प्रमिला ओक

कोषाध्यक्ष- दा. वि. गोखले

**सदस्य संख्या– १४.**

**संयुक्त महाराष्ट्र परिषदेने मुंबईसह महाराष्ट्र, सीमाप्रश्न याबाबत ठराव संमत केला.**

## न्या. दार कमिशन– १९४८

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले, यानंतर खऱ्या अर्थाने भषावार प्रांतरचनेचा प्रश्न ऐरणीवर आला. भारताची घटना तयार करण्यासाठी एक घटना समिती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या अध्यक्षतेखाली निवडण्यात आली. डॉ. राजेंद्रप्रसाद यांनी या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेऊन दि. १७ जून १९४८ रोजी न्या. एस. के. दार यांच्या अध्यक्षतेखाली एका कमिशनची नियुक्ती केली, हे ‘ दार कमिशन ’ म्हणून प्रसिद्ध आहे.

दार कमिशन किंवा आयोगाचे अध्यक्ष होते, अलाहबाद उच्च न्यायालयामुळे हा आयोग दार आयोग म्हणून ओळखला जातो. जगत्नारायण लाल आणि पन्नालाल हे दोघे या आयोगाचे सदस्य होत. अशा या त्रिसदस्यीय आयोगाच्या शिफारशी संयुक्त महाराष्ट्र चळवळीस पुढील तीन घटक कारणीभूत ठरले-

१) भाषिक राज्यांचा प्रश्न पुढे आणावा असा आदेश संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या मुंबई

प्रांताच्या मराठी सदस्यांना दिला होता.

२) घटना तयार करताना हिन्दी संघराज्याचे घटक कोणकोणते व किती ते स्पष्ट करा अशी मसुदा समितीचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वैधानिक मागणी केली होती.

३) घटना समितीचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद यांना या प्रश्नाबद्दल वाटणारी हार्दीक सहानुभूती.

भाषावार प्रांतरचना करावी की नाही व करायची झाल्यास कोणकोणते नि कसे प्रांत बनवावे यासंबंधी चौकशी करून शक्य तितक्या लवकर अहवाल सादर करण्याचा आदेश दार कमिशनला दिला गेला.

## अकोला करार–

न्या. दार कमिशन नोव्हें. १९४८ मध्ये मुंबईस आले. तत्पूर्वी या कमिशनसमोर आपली बाजू मांडण्यासाठी व महाराष्ट्र व विदर्भातील नेत्यांची एक संयुक्त बैठक अकोला येथे ८ ऑगस्ट १९४७ ला झाली. यास 'अकोला करार' म्हटले जाते. अकोला करारातील प्रमुख तरतुदी याप्रमाणे-

संयुक्त महाराष्ट्र म्हणून मध्यप्रांत-वऱ्हाडमधील मराठी भाषा बोलणाऱ्यांचा व महाराष्ट्राचा उपप्रांत ठेवावा.

या उपप्रांतासाठी एक गव्हर्नर व एक डेप्युरी गव्हर्नर असावा.

सबंध प्रांतासाठी एक लोकसेवा आयोग असावा

या करारावर श्री. शंकरराव देव, द. वा. पोतदार, धनंजयराव गाडगीळ, ग. त्र्यं. माडखोलकर, रामराव देशमुख, शेषराव वानखेडे, मा. सा. कन्नमवार आदींच्या स्वाक्षरी होत्या.

## डॉ. आंबेडकरांचे निवेदन–

न्या. दार कमिशनसमोर अनेक व्यक्ती, संस्था, संघटनांनी आपली निवेदने सादर केली. यात डॉ. आंबेडकर यांच्या निवेदनाचा उल्लेख करणे आवश्यक आहे, त्यांच्या निवेदनाचा सारांश खालीलप्रमाणे-

१) भाषावार प्रांतरचना लांबणीवर टाकता येणार नाही

२) भाषावार प्रांतरचनेची मागणी ही स्फोटक शक्ती आहे.

३) नवीन राज्यघटनेने प्रांतांना सार्वभौम सत्ता प्राप्त झाली आहे. अशा वेळी भाषावार प्रांत रचनेचा प्रश्न अत्यंत निकडीचा होऊन राहिला आहे.

४) मुंबई आणि महाराष्ट्र हे केवळ एकमेकांवर अवलंबून नाहीत तर ते वस्तुतः एकच, अखंड व अभिन्न आहेत.

अशा प्रकारे भाषावार प्रांतरचनेचे तत्त्व उत्तरभारताप्रमाणे महाराष्ट्रालाही लागू करावे अशी मागणी डॉ. आंबेडकरांनी केली.

उपरोक्त पार्श्वभूमीवर न्या. दार कमिशनने एक प्रश्नपत्रिका प्रसिद्ध करून आपले कार्य सुरू केले. व या प्रश्नपत्रिकेला अनुसरून एकभाषी राज्याबाबत निवेदने जनतेकडून मागविली. उत्तर भारत, दक्षिण भारतात जाऊन या कमिशनने अभ्यास केला. संयुक्त महाराष्ट्राची एकमुखी मागणी मांडता यावी व तिला सर्व मराठी भागांचा पाठिंबा मिळावा या उद्देशाने अकोला करार करण्यात आला होता. १० डिसेंबर १९४८ रोजी दर कमिशनचा अहवालाचा सारांश पुढीलप्रमाणे होता. -

१) भाषिक प्रांताची मागणी संकुचित, प्रादेशिकतावादी व प्रतिगामी स्वरुपाची आहे.

२) भाषावार प्रांतरचेमुळे लोकवस्तीचे मोठ्या प्रमाणत स्थलांतर घडेल नि रक्तपात व अत्याचार माजतील.

३) भाषिक राज्याच्या मागणीच्या मुळाशी उपराष्ट्रवाद असून त्यामुळे देशाचे तुकडे होतील.

४) प्रांतांची पुनर्रचना केवळ व मुख्यतः भाषेच्या आधारे करणे व्यापक राष्ट्रहिताच्या दृष्टीने अनुचित व धोक्याचे ठरेल असे आयोगाचे मत असल्यामुळे भाषावाद प्रांताची निर्मिती करू नये.

न्या. दार कमिशनने भाषिक राज्याच्या विरोधी शिफारशी केल्यामुळे त्याविरुद्ध संपूर्ण मराठी भाषिकांत संतापाची लाट उसळली तसेच भारतीय राष्ट्रीय काँग्रेसलाही दार कमिशनच्या शिफारशी आवडल्या नाहीत. दार अहवाल प्रसिद्ध झाल्यावर थोड्याच दिवसांनी २९ डिसेंबर १९४९ रोजी जयपूर काँग्रेस अधिवेशनात भाषावार प्रांतरचनेबाबत फेर विचार सुरू झाला.

## जे. व्ही. पी. समिती – (१९४९)

भाषावार प्रांतरचनेच्या विरोधी शिफारशी न्या. दार कमिशनने केल्यानंतर यासंदर्भात जयपूर काँग्रेस अधिवेशनात जे. व्ही. पी. समिती स्थापन करण्यात आली. या समितीत जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल आणि पट्टाभी सीतारामच्या (J.V.P.) हे सदस्य होते. पट्टाभी सीतारामच्या हे या समितीचे अध्यक्ष होते. या समितीचा अहवाल ५ एप्रिल १९४९ रोजी सादर करण्यात आला. या समितीतील नेहरू व पटेल हे दोघेही भाषावार प्रांतरचनेच्या निर्मितीस अनुकूल नव्हते. या समितीच्या शिफारशी -

१) तशी प्रांतरचना काँग्रेसला तत्त्वतः मान्य आहे. पण तसे करण्याची वेळ आलेली नाही.

२) तशी वेळ येताच आंध्रप्रदेश निर्माण केला जाईल.

३) कर्नाटक प्रांत निर्मितीतील अडथळे दूर झाल्यावर त्याची निर्मिती होईल.

४) त्राचणकोर- कोचीनच्या विलीनीकरणातून केरळ प्रांत बनेल.

५) मराठी जनतेला महाराष्ट्र प्रांत हवा असल्यास यथावकाश तो होईल. मात्र मुंबईचा समावेश त्यात होणार नाही.

**६) एकट्या वऱ्हाडचा निराळा प्रांत होणार नाही.**

दार कमिशनप्रमाणे जे. व्ही. पी. समितीच्या शिफारशींमधूनही महाराष्ट्र निर्मितीसंबंधी कोणतेच ठोस पाउल उचलले गेले नाही. उलट मुंबईचा समावेश महाराष्ट्रात होणार नाही नवीनच वाद निर्माण केला. नव्या प्रांतांची निर्मिती करण्याची वेळ अजून आलेली नाही असे कारण सांगून भाषावार प्रांतांचा प्रश्न सोडवणे अनिश्चित काळासाठी लांबणीवर टाकण्यात आला. मात्र लोकभावना तीव्र असतील तर देशहितामुळे पडणाऱ्या मर्यादा लक्षत घेऊन काँग्रेसने नव्या प्रांताच्या निर्मितीच्या आड येणार नाही असे गुळमुळीत आश्वासन दिले व भाषावार प्रांतरचनेचा आग्रह धरणाऱ्यांची बोळवण करण्यात आली.

## कारवार परिषद– १९५०

भाषिक राज्याची मागणी जशी होऊ लागली तसे कर्नाटकच्या नेत्यांनी सरहद्दीच्या भागांवर आपला हक्क सांगण्यास सुरुवात केली. बेळगाव, निपाणी, खानापूर, कारवार, सुपे या भागावर आपला हक्क सांगणारे निवेदन प्रसिद्ध केले, तेव्हापासून त्या भागातील मराठी प्रदेशापासून तोडले जाऊ नयेत यासाठी चळवळ करण्याकरिता डॉ. कोवाडकर यांच्या परिश्रमाने 'महाराष्ट्र एकीकरण परिषद' या नावाची संघटना निर्माण झाली.

अशा प्रकारे १९३८ ते १९५० या काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उदय झाला. ' मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचा एक प्रदेश असावा' या कल्पनेला पोषक वातावरण निर्माण झाले. बॅ. वि. दा. सावरकर, ग. त्र्यं. माडखोलकर यांनी तात्त्विक पातळीवर मांडलेल्या विचाराचे प्रत्यक्षात रूपांतर संयुक्त महाराष्ट्र परिषदेत झाले.बेळगाव येथील साहित्य संमेलनात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा उगम झाला. व १९४६ मध्ये संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना झाली. यामुळे ' महाराष्ट्र' प्रांतात कोणकोणते प्रांत असावेत याची चर्चा झाली. तसेच मुळातच भाषावार प्रांत असावेत की नसावेत? अशा दोन्ही बाजूनी विचारमंथन झाले. यातून राष्ट्रीय स्तरावर ही चर्चा जाऊन न्या. दार कमिशनची भाषावार प्रांतरचनेबाबत नियुक्ती झाली, जे. व्ही. पी. समिती नेमली गेली; परंतु उभयतांनी भाषावार प्रांतरचनेच्या प्रतिकूलच मत दिले. एकूणच असे म्हणता येईल की, १९५० पर्यंत 'संयुक्त महाराष्ट्र ' या संकल्पनेचा उदय झाला व पुढील काळात संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा विकास झाला.

## ६.२.२ संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा विकास ( १९५०-६०)

१९५० पर्यंतचा संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा कालखंड हा संकल्पना , जागृती, प्रचार, तर्कशुद्ध विवेचन, शिष्टमंडळे इ. चा होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीची ही बाल्यावस्था होती. काँग्रेस व केंद्रसरकार दोघेही भाषावार प्रांतरचना वा महाराष्ट्र राज्य निर्मितीस अनुकूल नसल्याचे लक्षात येताच संयुक्त महाराष्ट्र चळवळीने गती घेतली, अन्य मार्गही चोखाळले.

५ जानेवारी १९५१ रोजी ठाणे येथे भरलेल्या एका परिषदेने 'संयुक्त महाराष्ट्राला' नवी चालना मिळाली. धनंजयराव गाळगीळ हे परिषदेचे अध्यक्ष होते. या परिषदेस नागपूर, बेळगाव-कारवारचे ही प्रतिनिधी होते. या परिषदेत पुढील चळवळीची दिशा ठरली. कायम स्वरूपाची संघटना उभारणे, कार्यक्रम तयार करणे, प्रचार करणे व यासाठी एक तात्पुरती समिती नेमण्याचे या बैठकीत ठरले. येथपासून १९६० म्हणजे महाराष्ट्र राज्यनिर्मितीपर्यंत अनेक अडथळे समितीला पार करावे लागले. संयुक्त महाराष्ट्र समितीतील टप्पे पुढीलप्रमाणे आहेत.-१२ ऑगस्ट १९५१ रोजी अमरावती येथे ठाण्याप्रमाणेच एका परिषदेचे आयोजन केले गेले. श्री. रामराव देशमुख व पंजाबराव बागल या परिषदेचे उद्‌घाटक होते. यातच १९५२ मध्ये पहिल्या सार्वजत्रिक निवडणुका आल्या. ७ जुलै १९५२ रोजी भाषावार राज्यसंबंधाने बंगालमधील खालील ठराव मांडला.-

'' भाषा संयुक्त महाराष्ट्राच्या पायावर राज्याची पुनर्रचना करण्याचे काम ताबडतोब हाती घ्यावे व त्याला ( भाषा तत्त्वाला ) अनुसरून सध्याच्या राज्यांच्या सीमा निश्चित कराव्यात.''

पंतप्रधान नेहरूंचा मात्र भाषेच्या आधारावर राज्यनिर्मितीला विरोध होता. काही भाग अथवा सरहद्दीवरून वाद करण्यात अर्थ नाही; त्यामुळे राज्यांच्या सीमा बदलण्यास नेहरूंचा विरोध होता. मात्र असे असले तरी आंध्रप्रदेशातून भाषिक राज्याच्या मागणीचा जोर वाढू लागला.

## आंध्रप्रदेशची निर्मिती- (१९५३)

जे. व्ही. पी. समितीने आपल्या शिफारशींमध्ये आंध्रप्रदेशच्या निर्मितीला हिरवा कंदील दाखविला होता.. त्यामुळे तेलगू लोकांमध्ये अशी आशा बळावली की, वर्षभरात निदान भारताची घटना अंमलात येईपर्यंत आपला प्रांत निर्माण होईल. याउलट महाराष्ट्रात मात्र तीव्र निराशा व संताप अशा मिश्र भावना पसरल्या.

भाषेच्या आधारे मद्रास प्रांतातून तेलगु भाषिक बहुसंख्या असलेला प्रदेश वेगळा करून आंध्र प्रांत बनवावा. अशी मागणी करणारा ठराव प्रथम १९१३ मध्ये आंध्रमहासभेने केला होता. १९४८ मध्ये

हैदराबाद संस्थान भारतीय संघराज्यात विलीन झाल्यानंतर हैदराबादसह तेलगुंणचे विशाल आंध्रची मागणी वाढली पुढे आली. जे. व्ही. पी. समितीने आंध्र निर्मितीला अनुकूलता दर्शवूनही एक वर्ष काहीच हालचाली झाल्या नाहीत. यामुळे एक गांधीवादी कार्यकर्ते श्री. पी. श्री. पामलू यांनी आंध्र प्रांतासाठी प्राणांतिक उपोषण सुरू केले. १९ ऑक्टोबरला सुरू केलेले उपोषण ५८ दिवसांच्यानंतर त्यांच्या मृत्यूनेच संपुष्टात आले. १५ डिसेंबर १९५२ ला श्री. पी. श्री. पामलू यांचे निधन झाल्यामुळे आंध्रप्रदेशात तीव्र पडसाद उमटले. परिणामी १ ऑक्टोबर १९५३ मध्ये भाषिक आधारावर भारतातील पहिल्या अशा आंध्रप्रदेशची निर्मिती झाली. पंतप्रधान जवाहरलाल नेहरूंचा विरोध असूनही या राज्याची निर्मिती झाली. व येथूनच भाषेच्या आधारावर राज्यांची मागणी वाढू लागली.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेत आंध्रच्या निर्मितीचा उल्लेख यासाठी की, आंध्रच्या निर्मितीमुळे महाराष्ट्र, केरळ, कर्नाटक हे भाषिक आधारावर प्रांत निर्माण होण्याची आशा बळावली.

## नागपूर करार – १९५३,२८ सप्टेंबर.

आंध्र प्रदेशच्या निर्मितीला चालना मिळताच महाराष्ट्रात पुन्हा हालचाली सुरू झाल्या. महाराष्ट्राची मागणी एकमुखाने मांडण्यासाठी विविध विभागाच्या नेत्यांच्या बैठका सुरू झाल्या. यामध्ये श्री. शंकरराव देव, भाऊसाहेब हिरे, धनंजयराव गाडगीळ, द. वा. पोतदार, रामराव व पंजाबराव देशमुख, स्वामी रामानंद तीर्थ, दिगंबरराव बिंदू, गोविंदभाई श्रॉफ, देवीसिंग चौहान इ. नेत्यांनी तहत्त्वाची भूमिका बजावली. गोपाळराव खेडकर यांनी या नागपूर करारासाठी विशेष प्रयत्न केले. या करारावर खालील व्यक्तींनी त्या त्या विभागातर्फे सह्या केल्या.

१) महाविदर्भ - श्री. रामराव देशमुख, गोपाळराव खेडकर, रा. कृ. पाटील, शेषराव वानखेडे, पु.का. देशमुख

२) प. महाराष्ट्र - श्री. भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नाना कुंटे, देवकीनंदन, नारायण.

३) मराठवाडा - श्री. देवीसिंग चौव्हान, लक्ष्मणराव भाटकर.

## नागपूर करारातील प्रमुख कलमे पुढीलप्रमाणे–

भारतातील राज्यांची पुनर्टना आणि पुनर्रचना करण्याच्या प्रश्नावर अहवाल सादर करण्यासाठी एक उच्चाधिकार समिती नेमणयात यावयाची असल्यामुळे मराठी भाषी मुलखाच्या निरनिराळ्या विभागांत राहणाऱ्या आम्ही लोकांनी अशा सर्व विभागांचे मिळून एक राज्य निर्माण करण्यास पायाभूत म्हणून खालील निर्णय मान्य केले आहेत.-

१) सध्याचा मुंबई, मध्यप्रदेश आणि हैदराबाद राज्यातील सर्व सलग मराठी भाषी प्रदेशांचे हे राज्य बनविण्यात यावे. या राज्याच्या सीमा कोणत्याही विलग परभाषीय प्रदेश नसावा. या राज्याला 'महाराष्ट्र' किंवा 'मराठी भाषी प्रदेश' असे नाव असेल आणि मुंबई ही त्याची राजधानी राहील.

२) सर्व प्रकारचे विकास कार्य व शासनव्यवस्था यांच्याबाबतीत या राज्याचे महाविदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित भाग असे तीन घटक मानण्यात येतील.

३) शासन एकच राहणार असल्यामुळे, त्यांच्या आवश्यकता लक्षात घेऊन, निरनिराळ्या घटकांवरील खर्च लोकसंख्येच्या प्रमाणात केला जाईल; पण मराठवाड्याची अविकसित अवस्था असल्यामुळे त्याचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याकडे विशेष लक्ष देण्यात येईल. यासंबंधात एक अहवाल प्रतिवर्षी राज्य विधानसभेला सादर करण्यात येईल.

**४) सरकारात निरनिराळ्या घटकांच्या लोकसंख्येनुसार या घटकांना स्थान मिळेल.**

५) औद्योगिक, शास्त्रीय अथवा विशेष विषयांचे प्रगत शिक्षण देण्याची व्यवस्था असलेल्या शिक्षण संस्थांत घटकातील लोकांना प्रवेशाच्या बाबतीत लोकसंख्येच्या प्रमाणात पुरेशा व योग्य सवलती देण्यात येतील.

६) नव्या राज्याच्या हायकोर्टाचे मुख्य स्थान मुंबई हे राहील व दुसरे स्थान नागपूर येथील बेंच साधारणतः विदर्भासाठी काम करील. हायकोर्ट न्यायाधिशाच्या जागेसाठी शिफारशी करताना महाविदर्भ विभागाला नोकरवर्ग व वकीलवर्ग यांच्यासंबंधात योग्य प्रतिनिधित्व मिळेल याची दक्षता बाळगण्यात येईल. हा परिच्छेद मराठवाड्याच्या बाबतीतही लागू राहील.

७) सरकारी नोकऱ्या अथवा सरकार नियंत्रित व्यावसायात सर्व दर्जाच्या सरकार नियंत्रित व्यवसायात सर्व दर्जाच्या नोकरांची भरती करताना प्रत्येकातून लोकसंख्येच्या प्रमाणात भरती केली जाईल.

८) निरनिराळ्या घटकांचा शासनाशी चांगला संबंध येण्याचे साधन या नात्याने विकेंद्रीकरणावर आमचा विश्वास आहे.

९) राज्याच्या राजधानी या नात्याने नागपूरशी महाविदर्भातील जनतेचा जो दीर्घकाल संबंध जडलेला आहे आणि त्यामुळे जे निरनिराळे लाभ तिला होत आहेत, त्यांची आम्हाला जाणीव आहे. एक राज्य या नात्याने कार्यक्षम शासन चालविण्याच्या दृष्टीने जी मर्यादा पडेल ती सांभाळून हे फायदे शक्य तेवढे कायम राखण्याची आमची इच्छा आहे.

या कलमाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने सर्व कार्यवाही (कारभार) तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार करण्यात येईल. सरकारी कचेऱ्या काही निश्चित काळासाठी नागपूरला हलविण्यात येतील; राज्य विधानसभेचे निदान एक अधिवेशन तरी प्रतिवर्षी नागपूरला भरविले जाईल.

१०) अगदी अलीकडे झालेल्या शिरगणतीच्या आधारे जिल्ह्यांच्या सीमा ठरविल्या जातील. व सर्व सलग मराठी प्रदेश नव्या राज्यात समाविष्ट व्हावा यासासठी खेडे हा घटक मानला.

श्री. ग. त्र्यं. माडखोलकरांच्या या करारातील योगदानाबद्दल श्री. भाऊसाहेब हिरेंनी त्यांना आभाराचे पत्र पाठविले. त्यात श्री. हिरे म्हणतात,

'' नागपूर कराराचे यश संपूर्णतः आपल्या नागपूरकर मंडळींना आहे. महाराष्ट्रातून आम्ही अपक्व व तरुण मंडळी आली असतांना आमच्या हिरवट बोलण्या-वागण्याकडे दुर्लक्ष करून आपण मंडळीने जे उदार अंतःकरणाने मिळते घेतलेत, त्याबद्दल उद्याचा महाराष्ट्र आपला कायमचा ऋणी राहील. विशेषतः आपण, पु. य. देशपांडे, ए. श्री. पटवर्धन व बाळासाहेब ढवळेंनी आग्रह धरला नसता तर कदाचित 'जैसे थे ' परिस्थिती निर्माण झाली असती; पण आपण मोठ्या चातुर्याने मतभेदांना कलाटणी देऊन आणलेत ते मी माझ्या आयुष्यात कधीही विसणार नाही.''

## नागपूरकर कराचे महत्त्व –

नागपूरकर कराराला संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीमध्ये विशेष स्थान आहे, नागपूर करार हा एक महत्त्वाचा टप्पा होय याबाबत श्री.ग. त्र्यं. माडखोलकर म्हणतात, '' विदर्भ प्रांतिक कमिटीचा नागपूर कराराला मान्यता देणारा ठराव झाला म्हणजे संयुक्त महाराष्ट्राची अर्धी लढाई आपण जिंकली असे मला वाटते.''

नागपूर करारास ज्याप्रमाणे महाविदर्भाने मान्यता दिली अर्थात काही अटींवर. मात्र मराठवाड्याने या कराराबाबत सहज अनुकूलता दर्शवली. या कराराचे विशेष हे की, प. महाराष्ट्र, विदर्भ, मराठवाडा हे प्रमुख मराठी भाषिक प्रदेश प्रथमच एका व्यासपीठावर आले. व एक राज्य निर्मितीच्या दृष्टीने सकारात्क पाऊल उचलले. या कराराबद्दल काकासाहेब गाडगीळ म्हणतात,

'' संयुक्त महाराष्ट्राबाबत नागपूर येथे झालेल्या कराराइतकी विधायक गोष्ट महाराष्ट्रात गेल्या दीडशे वर्षात घडलेली नाही. लोकमान्य टिळकांनी लखनौ करार केला तेच चातुर्य व दूरदृष्टी नागपूर करारात आहे.''

नागपूर करार हा संयुक्त महाराष्ट्र चळवळीला गती देणारा ठरला. या कराराचे सर्वत्र स्वागत करण्यात आले. मात्र मुंबई प्रदेश काँग्रेसचे सर्वेसर्वा श्री. स. का. पाटील यांनी या करारास विरोध दर्शविला एवढेच नव्हे तर असे विधान केले की, ''........ज्यांना निराळा भाषिक महाराष्ट्र हवा त्यांनी मुंबईचा समावेश त्यात करण्याचा आग्रह सोडून द्यावा. हा आग्रह त्यांनी सोडला नाही तर मुंबईला स्वतंत्र होण्याखेरीज दुसरा मार्गच राहणार नाही....'' श्री. स. का. पाटील यांचा अपवाद सोडता महाराष्ट्रभर नागपूर कराराचे स्वागतच झाले. हा करार म्हणजे महाराष्ट्र निर्मित मैलाचा दगड होय.

## राज्यपुनर्रचना आयोग अर्थात न्या. काझाल अली कमिशन -१९५५

**पार्श्वभूमी-**

न्या. दार कमिशनने महाराष्ट्र राज्य निर्मितीला प्रतिकूलता दर्शविली, तर नागपूर कराराने संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीला बळकटी आली. तत्पूर्वी १९४८ मध्ये ' मराठवाडा ' हा विभाग निजामाच्या वर्चस्वातून झाला होता व मराठवाड्याने हैदराबाद राज्यऐवजी महाराष्ट्रात समाविष्ट होण्यास अनुकूलता दर्शविली होती. पंतप्रधान नेहरू हे भाषावार प्रांतरचनेला केंद्र सरकारला प्राधन्य द्यावे लागले. महाराष्ट्रवादी नेते श्री. शंकरराव देव यांनी पंडित नेहरूंना असे कळविले की, राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशींना केवळ शिफारशी न समजता त्यांचा स्वीकार करून सरकारने निर्णय घ्यावेत अन्यथा भाषावार राज्यांचे समर्थक आंदोलन सुरूच ठेवतील.

राज्य पुनर्रचना आयोगाची अनिवार्यता लक्षात घेऊन शेवटी २२ डिसेंबर १९५३ रोजी पंतप्रधान नेहरूंनी राज्यपुनचच्या आयोगाच्या नियुक्तीबाबत घोषणा केली. या आयोगाचे सदस्य पुढीलप्रमाणे होते.-

अध्यक्ष - न्या. सय्यद फाझल अली

सदस्य - १) हृदयनाथ कुझरू ( राज्यसभा सदस्य )

२) के. एम. पणिक्कर (इजिप्तमध्ये राजदूत )

राज्य पुनर्रचना आयोग महाराष्ट्राला न्याय देईल या आशेने संघटनेच्या वतीने सर्वसंमत एकच निवेदन आयोगाला सादर करावे यासाठी प्रयत्न सुरू झाले. ३0 जून १९५५ पर्यंत आयोगाने आपला अहवाल सरकारला सादर करावा अशी कालमर्यादा घालण्यात आली. या आयोगाने सबंध भारताचा दौरा केला व १0४ ठिकाणी जाऊन ९000 पेक्षा जास्त लोकांच्या भेटी/ मुलाखती घेऊन आपला अंतिम अहवाल सादर केला. महाराष्ट्राच्या संदर्भात आयोगाने श्री. काकासाहेब गाडगीळ, मुंबई, बाबत श्री. होती मोदी, बेळगावबाबत श्री. गंगाधरराव देशपांडे, विदर्भाबाबत समर्थक श्री. मुकुंदराव जयकर यांच्याशी सविस्तर चर्चा केली होती.

राज्यपुनर्रचना आयोगाला संयुक्त महाराष्ट्राबाबत एकच निवेदन द्यावे अशी सूचना श्री. शंकरराव देवांनी केली. प्रजासमाजवादी पक्षाचे ना. ग. गोरे, शे. का. प. तर्फे र. के. खाडीलकर, हिंदुमहासभेतर्फे मामाराव दाते, कामगार नेते नारायणराव मल्हार जोशी यांनीही त्यास अनुकूलता दर्शविली. परिषदेतर्फे आदर करण्यात येणारे निवेदन तयार करणाऱ्या समितीचे अध्यक्ष म्हणून धनंजयराव गाडगीळांची एकमताने निवड करण्यात आली. तसेच १३ फेब्रुवारी १९९४ रोजी महाराष्ट्राच्या सीमांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी मुंबई विधानसभेचे अध्यक्ष नानासाहेब कुंटे यांच्या अध्यक्षतेखाली सीमा समिती नेमण्यात आली. पंतप्रधान नेहरूंचा रोष पत्करून स्वामी रामानंद तीर्थ यांनी हैदराबादचे विभाजन आणि मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यांचे महाराष्ट्रात विलीनीकरण याबाबत ठाम भूमिका घेमली. आणि राज्यपुनर्रचना आयोगाला ती परतून दिली. १७ ऑगस्ट १९५४ रोजी अकोला येथे विदर्भ प्रदेश कॉंग्रेस समितीची सभा भरली, यात संयुक्त महाराष्ट्र ताबडतोब स्थापन करावा या मागणीस समर्थन देण्यात आले. संयुक्त महाराष्ट्रात मध्यप्रदेशातील निमाड, बैतुल, घिंदवाड, बालघाट, बस्तर या जिल्ह्यातील सलग मराठी विभागांचाही समावेश होणे आवश्यक असल्याचे ठरावात म्हटले गेले. या सर्व पार्श्वभूमीवर आपल्या शिफारशी सादर केल्या.

## राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशी –

विविध प्रदेश, नेते, संस्था संघटना, व्यक्ती आदींच्या मुलाखती/भेटी घेऊन, चर्चा करून त्रिसदस्यीय न्या. फाझल अली कमिशनने १0 ऑक्टोबर१९५५ रोजी आपल्या शिफारशी अहवाल रूपाने प्रसिद्ध केल्या. या अहवालाने महाराष्ट्रावर वज्राघात केला. विदर्भाचे स्वतंत्र राज्य सुचवून साऱ्या गुजराथी प्रदेशासह मराठवाडा धरून द्वैभाषिक राज्याची शिफारस करण्यात आली. संपूर्ण भारतात एकभाषी राज्य सुचविताना महाराष्ट्राला मात्र निराळा न्याय लावला. यामुळे राज्यातील मराठी जनतेने, संस्थांनी, राजकीय पक्षांनी या शिफारशी म्हणजे मराठी जनतेचा अपमान होय अशी प्रतिकात्मक भावना व्यक्त करून ' नवयुग ' ने लिहिले -

" पानिपतच्या लढाईनंतर एवढा पराभव, मानहानी नि तेजोभंग कधीच झाला नसेल. दोन पार काढून व तोंडाला काळे फासून महाराष्ट्राची जवळजवळ गाढवावरून धिंड काढण्यात आली.

राज्य पुनर्रचना आयोगाने केलेल्या शिफारशी पुढीलप्रमाणे होत्या-

१) सध्याची २७ राज्यांऐवजी १६ एकभाषी राज्ये असावीत. मात्र महाराष्ट्र व गुजराती यांचे एकच द्वैभाषिक राज्य असावे.

२) विदर्भातील अकोला, अमरावती, बुलढाणा व यवतमाळ तसेच वर्धा, नागपूर, भंडारा, चंद्रपूर यांचे स्वतंत्र विदर्भ राज्य निर्माण करावे .

३) नवीन मुंबई राज्यात कच्छ, सौराष्ट्र, प. महाराष्ट्र, मराठवाड्याचा समावेश असावा.

४) केरळ राज्याची निर्मिती करावी.

५) हैदराबाद राज्याचा पुनर्रचना करताना १९६१ पर्यंत तेलंगणाचे हैदराबाद नावाचे वेगळे राज्य अस्तित्वात आणावे आणि नंतर विशाल आंध्रचा तेलंगण भाग राहील की नाही याबाबत विधानसभेने निर्णय घ्यावा.

६) पूर्वीच्या मुंबई राज्यातील चार कानडी भाषिक जिल्हे एकत्र करून कर्नाटक राज्याची निर्मिती करावी.

राज्यांची पुनर्रचना करणे म्हणजे भाषावार प्रांतांची निर्मिती करणे हे समीकरण आयोगाला

चुकीचे वाटले. राष्ट्रीय ऐक्याची भावना मजबूत करण्यासाठी राज्यपुनर्रचनेबाबत समतोल दृष्टीकोन व भूमिका स्वीकारण्याची आवश्यकता आहे असे आयोगाने अहवालात म्हटले. एकभाषी राज्यामुळे संकुचित भावना जोपासली जाते. या आयोगाच्या शिफारशींबाबत महाराष्ट्रात संतप्त प्रतिक्रिया निर्माण झाली. याची प्रमुख कारणे -

१) मुंबई राज्यात मराठवाडा व सौराष्ट्राचा समावेश केला होता.

२) बेळगाव- कारवार इ.भाग कर्नाटकला दिला.

३) मुंबईचे स्वतंत्र राज्य करावे.

५) मुंबईस महाराष्ट्रापासून वंचित ठेवले.

श्री. काकासाहेब गाडगीळांनी महाराष्ट्राच्या अशा विभाजनाला विरोध केला. त्यांनी अहवालातील अनेक विसंगती नेहरूंच्या निदर्शनास आणून दिल्या. तेव्हा नेहरूंनी शंकरराव देव, हरिभाऊ पाटसकर, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव चव्हाण, नानासाहेब कुंटे इ. काँग्रेसच्या नेत्यांशी चर्चा केली. या चर्चेतून महाराष्ट्राचे विभाजनापेक्षा मुंबई, महाराष्ट्र, विदर्भासह गुजराथचा समावेश असलेल्या द्वैभाषिक राज्यास मान्यता द्यावी. या तडजोडीवर हे नेते आले. श्री. यशवंतराव चव्हाण यांनी या द्वैभाषिक राज्याची निर्मितीचा मार्ग मोकळा झाला.

## त्रिराज्य योजना –(१९५५)

राज्य पुनर्रचना आयोगाचा अहवाल प्रसिद्ध झाल्यानंतर काँग्रेस वर्किंग कमिटीने या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी एक नवीनच पर्याय सुचविला. यानुसार विदर्भासह महाराष्ट्राचे एक राज्य, मुंबईचे स्वतंत्र राज्य व महागुजरातचे एक राज्य अशी तीन राज्ये निर्माण करावेत. या योजनेला 'त्रिराज्य योजना' असे म्हणतात. ८ नोव्हेंबर १९५५ ला काँग्रेस वर्किंग कमिटीने सादर केली. मुख्यमंत्री मोरारजी देसाई यांचा तीन राज्यासंबंधीचा ठराव मुंबई विधानसभेत दि. १८ नोव्हेंबर १९५५ रोजी मांडला गेला.

''काँग्रेस वकिंग कमिटीच्या ठरावानुसार संपूर्ण गुजराथी भाषिकांचे एकजिनसी राज्य व्हावयाचे होते; मुंबई शहर व उपनगरे यांचे १०० चौ. मैलांचे स्वतंत्र राज्य व्हावयाचे होते. मराठवाड्यासह महाराष्ट्र काँग्रेसने आणि संयुक्त महाराष्ट्र परिषदेने निर्विवाद मान्यता दिली तर विदर्भाने महाराष्ट्रात जावे अशी श्रेष्ठींनी त्याची मनधरणी करायची होती. शिवाय ठरावात एक सवलत अशीसुद्धा होती की, ठरावाने निर्माण केलेल्या स्वतंत्र मुंबई राज्याला पाच वर्षानंतर महाराष्ट्रात जावेसे वाटले तर तसे करण्याला त्याला मुभा असावी.''

मुंबई वेगळी ठेवून त्रिराज्याची योजना जाहीर करण्याची चिन्हे दिसू लागल्यावर प्रजासमाजवादी, कम्युनिस्ट, शेतकरी-कामगार पक्षाच्या नेत्यांनी विरोध केला. त्रिराज्य योजनेला संमती देणारा ठराव सरकारने आणीला तेव्हा १८ नोव्हेंबरला मोर्चे काढण्याचे ठरले. याच दिवशी एस. एम. जोशी आदींच्या नेतृत्वाखाली संयुक्त महाराष्ट्राची मागणी करण्यासाठी असेंब्ली हॉलकडे येणाऱ्या मोर्चावर पोलिसांनी गोळीबार केला. मोर्चा सभास्थानी येऊ नये म्हणून पोलीस कमिशनरांनी १४४ कलम लागू केले. व पाचपेक्षा अधिक लोकांना एकत्र येण्याला बंदी घातली.

त्रिराज्य योजना जनतेने उग्र निदर्शने करून धुडकावून लावली होती. २ जानेवारी १९५६ रोजी नेहरू- मोरारजी भेटीत कायम झालेल्या तीन राज्यांच्या पर्यायाला प्रखर विरोध दिसून आल्यामुळे तो पर्याय रद्द करण्याचे ठरले. केंद्र शासनाच्या या त्रिराज्य योजनेला महाराष्ट्रातून प्रचंड विरोध झाला.

## मुंबई गोळीबार व १०५ हुतात्मे :- (२१ नोव्हेंबर १९५५ ते २० जानेवारी १९५६)

राज्य पुनर्रचना मंडळाने सुचविलेल्या द्वैभाषिक राज्याच्या व त्रिराज्य योजनेच्या योजनेला प्रचंड विरोध महाराष्ट्रातुन होऊ लागला. त्रिराज्य योजनेला संयुक्त महाराष्ट्र समितीतर्फे निदर्शने होऊ लागली. दि. १८ नोव्हेंबरपासूनच मुंबईत फ्लोरा फाऊंटनकडे मोर्चे येऊ लागले. सर्व रस्ते विधानसभेकडे हे या दिवशीचे दृश्य होते. सेनापती बापट यांच्या नेतृत्वाखालील जमावाने बंदी रेषा ओलांडली. लाठीमार अश्रुधुराचा मारा करण्यात आला. यामुळे दि. २१ नोव्हेंबरपर्यंत विधानसभेचे अधिवेशन स्थगित झाले.

अशा सरकार विरोधी वातावरणात दि. २१ ला एक दिवसाचा संप पुकारून पुन्हा मोर्चे नेण्याचा निर्णय कृतीसमितीने केला, त्यातच भर पडली मुख्यमंत्री मोरारजी देसाई व स. का. पाटील यांच्या वक्तव्यांची .उदा. मोरारजी देसाई म्हणाले, ' आताच काय पण पाच हजार वर्षेसुद्धा मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही किंवा स. का. पाटील म्हणाले की, ''मराठी लोक राज्य करायला लायक नाहीत, दुसऱ्यांचा उत्कर्ष त्यांना सहन होत नाही, पाच हजार वर्षेच काय पण सूर्यचंद्र तळपत आहेत तोपर्यंत मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही.''

दि.२१ राजी फ्लोरा फाऊंटनला लष्करी छावणीचे रूप आले होते. लाठीमार, अश्रुधूर यास लोक जुमानीनासे झाले. अनेक दिवस चर्चा चालूनही बिल पास होण्याची आशा दिसेना, शेवटी बिल स्थगित झाले. दि.१८,१९ २० नोव्हेंबर रोजी मोर्चे, निदर्शने, लाठीमार, संप, अश्रुधूर यांनी वातावरण भारलेले होते. दरम्यान त्रिराज्य ठरावावर चर्चा सुरू होती. दि. २१ राजी लाक्षणिक संपाचा दिवस उजाडला. रस्तोरस्ती, नाक्यानाक्यांवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त होता. चार लाख कामगार या दिवशी संपावर होते. मोर्चात भाग घेण्यासाठी घोषणा देत, वातावरण तापवित झुंडीच्या झुंडी कोर्टाकडे चालल्या होत्या.

सेनापती बापट, लालजी पेंडसे आदींनी या मोर्चाचे नेतृत्व केले. पोलिसांचे कडे तोडून जमाव पुढे जाऊ लागताच लाठीमार व नंतर अश्रुधुराचा मारा करण्यात आला. तरीही जमाव मागे हटत नव्हता. लोकमान्यांच्या पुतळ्यापुढे सेनापती बापटांनी सभा घेतली. यात श्रीपाद अमृत डांगे, एस. एम. जोशी आदींची भाषणे झाली. यावेळी झालेल्या गोळीबारात १५ जण ठार तर अनेक जखमी झाले. या गोळीबाराविषयी 'नवाकाळ' ची माहिती वाचा.

''सबंध दिवसात झालेल्या गोळीबारात १५ ठार व ३०० जखमी झाले. यात ४० पोलीस व होमगार्ड्स् होते. ४०० वर लोकांना अटक झाली. गोळीबाराने चिडून आगी लावण्याचे प्रयत्न काही ठिकाणी झाले. दोन बसेस, एक पोलीस चौकी, बेस्ट कंपनीची चौभी वगैरेंना आगी लागल्याची आणि होमगार्ड्स् व पोलीस यांच्या बंदुका हिसकावण्याचेही प्रयत्न झाले अशी पोलिसांतून बातमी आहे. ''

उपरोक्त वर्णन हे प्रातिनिधीक आहे, त्यावरून आपणास तत्कालीन परिस्थितीची कल्पना येते. पहिल्याच दिवशी १५ हुतात्मे झाले. सीताराम बनाजी पवार हा संयुक्त महाराष्ट्रासाठी पहिला हुतात्मा ठरला. सीताराम पवार हा केवळ मॅट्रीकचा विद्यार्थी होता. त्याच्या अंत्ययात्रेला हजारोचा समुदाय होता. दि. २१ नोव्हेंबरच्या गोळीबाराने संयुक्त महाराष्ट्राचे बिगुल फुंकले गेले. यानंतर २१

नोव्हेंबर १९५५ ला सुरू झालेले हे गोळीबाराचे सत्र पुढे जानेवारी - फेब्रुवारी १९५६ पर्यंत चालूच होते.

२१ नोव्हेंबर झालेल्या १५ हुतात्म्यांनी मोरारजी देसाईंचा त्रिराज्य प्रस्ताव एक प्रकारे फेटाळला. यानंतर २७ ते ३० डिसेंबर १९५५ दरम्यान शंकरराव देव- मोरारजी, नेहरू- मोरारजी नेहरू-मोरारजी, गोविंदपंल्लभ पंत-देव अशा चर्चा झाल्या, परंतु त्या निष्फळ ठरल्या. मुंबईला देशाची राजधानी करणे, त्रिराज्य प्रस्ताव चर्चेत होते. संयुक्त महाराष्ट्राच्या नेत्यांना अशा प्रकारची कुठलीही तडजोड नको होती. शंकरराव देवांसारखे नेतेही द्वैभाषिकाच्या पर्यायाचा सकारात्मक दृष्टीने विचार करू लागले होते. महाराष्ट्र काँग्रेसचा द्वैभाषिक राज्याला पाठिंबा असला तरी गुजरातमधून विरोधच होता.

या सर्व चर्चेच्या गुऱ्हाळात १६ जानेवारी १९५६ रोजी पहाटेच लालजी पेंडसे, प्रबोधनकार ठाकरे, नाना पाटील, इ. महाराष्ट्रवादी नेत्यांना अटक करण्यात आली.धरपकडीचे सत्र मोरारजी सरकारने सुरू केले, दिवसभरात ३३५ लोकांना तुरूंगात टाकण्यात आले. याचवेळी पंडित नेहरुंनी भारत सरकारचा निर्णय आकाशवाणीवरून जाहीर केला-

## १) मुंबई शहर केंद्रशासित राहील.

२) विदर्भासह संपूर्ण मराठी भाषिकांचा महाराष्ट्र आणि सौराष्ट्र-कच्छसह गुजराथ अशी दोन राज्ये निर्माण केला जातील.

पंडित नेहरूंच्या या निर्णयाने महाराष्ट्रीय जनतेवर वज्राघात झाला. सर्वत्र निषेध होऊ लागला. जमलेल्या गर्दीवर पोलिसांचा गोळीबार सुरू झाला. निरपराध माणसे मारली जाऊ लागली.

१६ जानेवारीच्या गोळीबारामुळे १७ जानेवारी मुंबई शाळा, महाविद्यालये, कार्यालये , गिरण्या, कारखाने सर्वत्र संप सुरू झाला. सर्वत्र काळे झेंडे लावून निषेध करण्यात आला. मुंबईत ठाकूरद्वारा ते कांदेवादी भागास लष्करी छावणीचे रूप आले. आग्रीपाडा, परळ, गिरगावमध्ये पुन्हा गोळीबार झाला. १८ जानेवारी रेल्वेचाही संप झाला. दरम्यान धरपकडीचे सत्र सुरूच होते. ' संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे' च्या घोषणा दणाणत होत्या. मुंबईचे हे लोण नागपूर, अमरावती, पुणे, नाशिक, बेळगाव, कोल्हापूर, निपाणीपर्यंत पाहोचले. निपाणी गोळीबारात सात जण ठार झाले.

पोलिसांच्या गॅसचा मारा केल्यामुळे लहान, मुले, स्त्रिया गुदमरून बेशुद्ध पडल्या. १९ जानेवारीला तर प्रचंड गोळीबार झाला, यात कमलाबाई मोरे ठार झाल्या. मुंबईतील या गोळीबाराच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र काँग्रेसने मंत्री, विधानसभा-लोकसभा सदस्य इ. नी. राजीनामे देण्याचे आदेश दिले. १९ जानेवारीच्या गोळीबारात २० जण ठार झाले. २० जानेवारीला परळमध्ये पोलिसांच्या बंदुकांना स्त्रियाही सामोऱ्या गेल्या व 'गोळीबार थांबवा' अशा घोषणा दिल्या. या सर्व संघर्षात १०५ जण महाराष्ट्रासाठी हुतात्मे झाले. दहाहजारावर लोकांना अटक करण्यात आली. स्वकीय सरकार विरोधात करावा लागणारा हा संघर्ष होता, आपल्याच सरकारकडून जनतेला गोळ्या खाव्या लागल्या. दिनांक १६ जानेवारी ते २२ जानेवारी १९५६ चा सप्ताह आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासातील अद्वितीय घटना होती. या काळातील मुंबईतील परिस्थितीचे वर्णन डॉ. वसंत रणदिवेंच्या शब्दात वाचा.-

'' सहा दिवस मुंबईच्या लोकांना बंदुका, रॉमी गन्स व पिस्तुले यांचा मनसोक्त आस्वाद दिला जात होता. आठवड्यात घडलेल्या अनेक भेसूर घटना मी डोळ्याने पहिल्या....त्यात

माणुसकीलकलंक लावणारे काही प्रकार तर इतके किळसवाणे होते की त्यांची तुलना ब्रिटिशकालीन जालियनवाला बागेतल्या बीभत्स प्रकाराशीच होऊ शकेल.''

१५ जानेवारी १९५६ ला पंडित नेहरूंच्या भाषणातून मुंबई महाराष्ट्राला मिळणार नाही हे स्पष्ट झाल्यावर अवघ्या दोन तासाच्या आत मुंबईत गोळीबार सुरू झाला. जनतेला भयभीत करण्यात आले. मुंबईसह महाराष्ट्राच्या मागणीला हे सरकारचे उत्तर होते. १६ ते २२ जानेवारी १९५६ च्या गोळीबाराने २१ नोव्हेंबर १९५५ चा १५ हा मृतांचा आकडा १०५ वर गेला या १०५ हुतात्म्यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत-

## मुंबई संयुक्त महाराष्ट्र आंदोलनातील हुतात्मे ( संदर्भ– महाराष्ट्राचे महामंथन– लालजी पेंडसे)

१) सीताराम बनाजी पवार
२) जोसेफ डेव्हिड पेजारकर
३) चिमणलाल शेठ
४)भास्कर नारायण कामनेकर
५) रामचंद्र सेवाराम
६) शंकर खोटे
७) धर्माजी गंगाराम नागवेकर
८) रामचंद्र लक्ष्मण जाधव
९) के. जे. घेविचर
१०) पी. एस. जॉन
११) शरद जी. वाणी
१२) बेदीसिंग
१३) रामचंद्र भाडिया
१४) गंगाराम गुनाजी
१५) गजानन ऊर्फ बंडू गोखले
१६) निवृत्ती विठोबा मोरे
१७) आत्माराम पुरुषोत्तम पानवलकर
१८) बालण्णा कामाठी
१९) धोंडू लक्ष्मण पारडूल
२०) भाऊ सखाराम जाधव
२१) यशवंत बाबाजी भगत
२२) गोविंद बाबूराव जोगल
२३) पांडुरंग धोंडू धाडवे
२४) गोपाळ चिमाजी कोरडे
२५) पांडुरंग बाबाजी जाधव

२६) बाबू हरी दाते
२७) अनुप महावीर
२८) विनायक पांचाळ
२९) सीमाराम म्हदे
३०) सुभाष बोरकर
३१) गणपत तानकर
३२) सीताराम गयादीन
३३) गोरखनाथ जगताप
३४) महम्मद अली
३५) तुळशीराम बेलसरे
३६) देवाजी पाटील
३७) शामलाल जेठानंद
३८) सदाशिव भोसले
३९) भिकाजी रंगाटे
४०) वासुदेव मांजरेकर
४१) भिकाजी बांबरकर
४२) सखाराम ढमाले
४३) नरेंद्र प्रधान
४४) शंकर कुष्टे
४५) दत्ताराम सावंत
४६) बबन भरगुडे
४७) विष्णू बने
४८) सीताराम राड्ये
४९) तुकाराम शिंदे
५०) विठ्ठल मोरे
५१) राम लखन विंदा
५२) एडविन आमब्रोझ साळवी
५३) बाबा महादू सावंत
५४) वसंत कन्याळकर
५५) विठ्ठल साळुंखे
५६) रामनाथ अमृते
५७) परशुराम देसाई
५९) घनःशाम कोलार
६०) धोंडू रामकृष्ण सुतार
६१) मुनीमजी बलदेव पांडे

६२) मारुती विठोबा म्हस्के
६३) धोंडो राघो पुजारी
६३) धोंडो कोंडिबा भास्कर
६४) ह्रुदयसिंग दारजेसिंग
६५) पांडू महादेव अवरीटकर
६६) शंकर विठोबा राणे
६७) विजयकुमार भडेकर
६८) कृष्णाजी गणू शिंदे
६९) रामचंद्र चौगुले
७०) धोंडू भागू जाधव
७१) रघुनाथ बिनगुडे
७२) काशिनाथ चिंदरकर
७३) करपैया किरमल देवेंद्र
७४) चुलाराम मुंबराज
७५) बालमोहने
७६) अनंता
७७) गंगाराम गुरव
७८) रत्नू गोविंदर
७९) सय्यद कासम
८०) भिकाजी दाजी
८१) अनंत गोलतकर
८२) किसन वीरकर
८३) सुखलाल बेसकर
८४) पांडुरंग वाळके
८५) फुलवरी मगरू
८६) गुलाग कृष्णा खवले
८७) बाबूराव पाटील
८८) लक्ष्मण नरहरी थोरात
८९) माबाई विठ्ठल सूर्यभान
९०) गणपत रामा भुते
९१) मुनशी वसीर अली
९२) दौलतराम मथुरादास
९३) विठ्ठल चव्हान
९४) देवजी राठोड
९५) रावजीभाई पटेल

९६) होरमसजी करसेरजी
९७) गिरधर लाहोर
९८) सत्तू खंडू वाईकर
९९) गणपत श्रीधर जोशी
१००) माधव तुरे
१०१) मारुती बेन्नाळकर
१०२) मधुकर बांदेकर
१०३) लक्ष्मण गावडे
१०४) महादेव बारीगडी
१०५) कमळाबाई मोहिते
१०६) सीताराम घाडीगावकर

## द्वैभाषिक राज्य निर्मिती– १९५६

राज्य पुनर्रचना आयोगाने विदर्भ राज्य निर्मितीस अनुकूलता दर्शविल्यामुळे पुन्हा संयुक्त महाराष्ट्र निर्मितीला धक्का बसला. १९५६ मध्ये निर्मिती झालेले गुजरात-महाराष्ट्राचे द्वैभाषिक राज्य हे संयुक्त महाराष्ट्र निर्मितीमधील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. राज्य पुनर्रचना आयोगाने केलेल्या शिफारशींनुसार द्वैभाषिक राज्याची निर्मिती झाली. या द्वैभाषिक राज्यावरून काँग्रेस व संयुक्त महाराष्ट्रवादी यांच्यात मतभेद निर्माण झाले.

१४ ऑक्टोबर १८५५ रोजी दिल्ली येथे भरलेल्या काँग्रेस वकींग कमिटीने असा आदेशात्मक ठराव केला की, '' राज्य पुनर्रचना अहवालाचा विचार करतांना कोणत्याही आंदोलनात्मक मार्गाचा काँग्रेसजनांनी अवलंब करू नये. त्याचप्रमाणे कोणत्याही चळवळीत अगर मागण्या सादर करण्याच्या बाबतीत त्यांनी इतर पक्षांशी सहकार्य करू नये व कसलेही संघर्ष उत्पन्न करू नयेत. सहकार देण्याच्या दृष्टीने अहवालाचा विचार करावा.''

पंतप्रधान नेहरूंनी महाराष्ट्र व गुजराथ काँग्रेसच्या पुढाऱ्यांनी दिल्लीत दि.१७ ते १९ ऑक्टोबर १९५५ रोजी बोलावले होते. या चर्चेत गुजरातने महाराष्ट्राच्या मुंबईवरील जाण्यास विरोध केला. शेवटी मुंबई -विदर्भ यासह सर्व मराठी भागांच्या संयुक्त महाराष्ट्राऐवजी विशाल द्वैभाषिकांचा प्रयोग काँग्रेस पुढाऱ्यांनी स्वीकारला. द्वैभाषिक ठरावावर बोलताना श्री. यशवंतरात चव्हाण म्हणाले,

'' आज परकीय वसाहतवाद नष्ट करण्यासाठी सर्वत्र लढा चालू असताना एक नवा देशी वसाहतवाद मुंबईत डोके वर काढीत आहे. त्यांच्याशी लढा देऊन तो नष्ट केला पहिजे. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र बनविण्याच्या मार्गात मुंबईतील परकीय ( महाराष्ट्राबाहेरचे ) भांडवलदार वसाहतवाद्यांनीच खो घातला. द्वैभाषिक राज्य मान्य करण्याचेही मी धाडस करीन; पण महाराष्ट्राबाहेरच्या काही भांडवलदारांनी आपली वसाहत व मुंबईवरील आपले वर्चस्व कायम टिकवण्यासाठी चालविलेला डाव हाणून पाडल्याशिवाय राहणार नाही.''

दि. २० ऑक्टोबर १९५५ रोजी पुण्यात महाराष्ट्र प्रदेश कौंग्रेस समितीचे आशिवेधन भरले. यामध्ये १५८ सभासदांपैकी १४१ सभासदांनी द्वैभाषिकाला अनुकूल मत दिले. काँग्रेसचा हा ठराव अकल्पित नव्हता. श्री. रामराव देशमुख यांनी अशी सूचना केली होती की, ''संयुक्त महाराष्ट्र होत नसेल तर द्वैभाषिक मुंबईत तरी मुख्य मराठी भागात वऱ्हाडचा समावेश करावा.''

राज्य पुनर्रचना मंडळाने मुंबईचे द्वैभाषिक राज्य करावे हे सुचविताना असे म्हटले की, मुंबईचे विद्यमान राज्य द्वैभाषिक आहे. आता कन्नडभाषी लोकांना कर्नाटकात घालून मुंबई राज्य द्वैभाषिक होणार आहे. या राज्यास सौराष्ट्र, कच्छ व मराठवाडा हे मुलूख जोडावे. शेवटी द्वैभाषिकबाबत मोठी चर्चा पंडित नेहरू व राज्याच्या नेत्यांमध्ये होऊन १९५६ मध्ये जुलै महिन्यात संसदेसमोर आले. त्याविरोधात श्री. चिंतामणराव देशमुख यांनी केंद्रीय मंत्रिपदाचा राजीनामाही दिला. संसदेत श्री. गोविंद वल्लभ पंत यानी लोकसभेसमोर राज्यपुनर्रचना महाराष्ट्रासह विदर्भासह विशाल द्वैभाषिक राज्यास केंद्राने मान्यता दिली. १४ ऑगस्ट १९५६ रोजी राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटले की,

'' राष्ट्रीय ऐक्य अभंग राखणे ही आजची आत्यंतिक गरज आहे. द्वैभाषिक मुंबई राज्याचा निर्णय हा लोकसभेचा ओजस्वी विजय होय.''

केंद्र सरकारने मुंबईचे द्वैभाषिक राज्य निर्माण करून महाराष्ट्र, मुंबई व गुजराथ यांची एकत्रित बोट बांधली. ज्या या तीन लोकभावनांची तमा न बाळगता ते ठरविण्यात आले. विरोधी पक्षाच्या तो लादण्यात आला. या राज्याला जसा महाराष्ट्रातून पाठिंबा नव्हता सर्वत्र उठाव, निदर्शने, मिरवणुका, बंदी हुकूम, गोळीबार इ. नी या नव्या द्वैभाषिक, राज्याचे स्वागत झाले. महाद्वैभाषिक हाणून पाडण्यासाठी आगामी निवडणुकात सर्वच्या सर्व जागलढविण्याचा निर्णय संयुक्त महाराष्ट्र समितीने केला. या पार्श्वभूमीवर मोरारजी देसाई जाऊन यशवंतराव चव्हाण या द्वैभाषिकराज्याच्या मुख्यमंत्री पदावर आले.

महाराष्ट्र प्रजासोशालिस्ट पक्षाचे नेते एस. एम. जोशी द्वैभाषिक राज्याच्या निर्णय त्याज्य ठरविला. संयुक्त महाराष्ट्र समितीने विशाल द्वैभाषिक मुंबई राज्याचा निर्णय फेटाळला. समितीच्या मते हा निर्णय तत्त्वतः अन्याय्य व अव्यवहार्य असून तो जनतेवर लादणे लोकशाहीविरोधी आहे. देशातील लोकसंख्येचा एकसप्तमांश भाग असलेल्या मराठी व गुजराती जनतेच्या प्रखर विरोधास न जुमानता घेतलेला विशाल द्वैभाषिकाचा निर्णय समितीला मान्यच नव्हते. मराठवाड्याचे नेते स्वमी रामानंद तीर्थ यांनाही द्वैभाषिकाचा निर्णय आवडला नव्हता. ते म्हणतात,

'' मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र व्हायला पाहिजे हे मलाही पटते. पण लोकसभेने द्विभाषिकाचा निर्णय घेतला. आपल्याप्रमाणे मलाही ती गोष्ट पटली नाही. मी मतदानात भाग घेतलेला नाही. घेतलेला निर्णय आजच्या अवस्थेत आपण मानला पाहिजे व तो लोकशाही मार्गाने बदलून घेतला पाहिजे.''

द्वैभाषिकाचा निर्णय संयुक्त महाराष्ट्र समितीने धुडकावला होता आणि लोकसभेने केलेला निर्णय बदलता येतो आणि तो बदलून घेण्यासाठी समिती कार्यरत राहील असे एस. एम. जोशी यांनी जाहीर केले होते. अशा प्रचंड विरोधी वातावरणात दि.१ नोव्हेंबर १९५६ रोजी स्थापन झालेले मुंबई द्वैभाषिक राज्य १ मे १९६० पर्यंत टिकले. महाराष्ट्र राज्य निर्मितीतील फक्त एक टप्पा म्हणून याकडे पाहावे लागते. कारण या राज्याला कोणाचीच पसंती नव्हती. ना गुजराथची, ना महाराष्ट्राची. या राज्याच्या निर्मितीमुळे जनतेतील असंतोष कमी झाला नाही. या द्वैभाषिक राज्याला सर्वत्र विरोध होऊ लागला आणि संयुक्त महाराष्ट्र निर्मितीची चळवळ गतिमान झाली. हे नवे राज्य किती विशाल होते ते पहा -

'' क्षेत्रफळाच्या दृष्टीने विशाल द्वैभाषिक मुंबई राज्य हे भारतातील सर्वात मोठे राज्य असून त्याचे क्षेत्रफळ १ लाख ९० हजार ९१९ चौरस मैल होते. नव्या मुंबई राज्याची एकूण लोकसंख्या ४

कोटी ७२ लक्ष ६५ हजार २२१ इतकी होती. नव्या राज्याच्या एकूण ४३ जिल्ह्यांपैकी पश्चिम महाराष्ट्राचे मुंबईसह १४ जिल्हे, विदर्भाचे ८ आणि मराठवाड्याचे ५ (सध्याचे ८) असे एकूण २७ जिल्हे होते. गुजराती भाषकांचे १६ जिल्हे होते.लोकसंख्येच्या दृष्टीने उत्तरप्रदेश खालोखाल या राज्याचा भारतात दुसरा क्रमांक होता. १ नोव्हेंबर १९५६ ला मुंबई राज्याचे हंगामी राज्यपाल एम. सी. छागला यांनी विशाल मुंबई द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणुन श्री. यशवंतराव चव्हाण यांना शपथ दिली. नव्या राज्याच्या विधानसभेत ३९६ सदस्य आणि विधान परिषदेचे ७२ सदस्य तर लोकसभेत ६६ व राज्यसभेत २७ जागा देण्यात आल्या. यावरून विशालतेची कल्पना येते.''

## संयुक्त महाराष्ट्र समितीचा अंतिम लढा– (१९५६ ते १९६०)

## मुंबई द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री  श्री.यशवंतराव चव्हाण–

१९५६ मध्ये महाराष्ट्र, मुंबई व गुजरात या तीन भागांचे एकत्रीकरण विशाल द्वैभाषिकात करतांना तेथील लोकभावनांचा विचार केंद्र सरकारने केला नव्हता. महाराष्ट्र व गुजरात या दोन्ही प्रांतातून प्रचंड विरोध होता. महाराष्ट्राप्रमाणे गुजरातचाही एक भाषी राज्याची भावना या द्वैभाषिक राज्याने पायदळी तुडवली होती. त्यामुळे गुजरातमध्येही संघर्ष सुरू झाला. हे विशाल द्वैभाषिक राज्य निर्माण होण्यापूर्वीच संयुक्त महाराष्ट्र समितीचा जन्म ६ फेब्रुवारी १९५६ रोजी पुणे येथे टिळक स्मारक मंदिरात झाला होता. केशवराव जेधे या सभेचे अध्यक्ष होते. या सभेला एस.एम. जोशी, हिंदुमहासभेचे ह.भा.भिडे व जयंतराव टिळक, समाजवादी पक्षाचे केशव गोरे, प्रजा समाजवादी पक्षाचे बा.व. राजहंस, शे. का. पक्षाचे उद्धवराव पाटील, कम्युनिस्ट पक्षाचे वामन बापट, अर्थतज्ज्ञ धनंजयराव गाडगीळ, पत्रकार दा.वि.गोखले इ. सर्व पक्षीय नेते हजर होते. या सभेत संयुक्त महाराष्ट्र लढ्याचे मार्गदर्शन व नियंत्रण करण्यासाठी कृती समिती स्थापन करण्यात आली.

३१ ऑक्टोबरला मोरारजी देसाई यांनी मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून निरोप घेतला व १ नोव्हेंबर १९५६ ला यशवंतराव चव्हाण द्वैभाषिक राज्याच्या मुख्यमंत्री पदी आले., पण त्यांचा मार्ग अवघड होता. १५ ऐवजी ' संयुक्त महाराष्ट्र समिती' असा शब्द वापरला जावू लागला. समितीचे निमंत्रक श्री. द. जोशी म्हणतात-

'' महाराष्ट्र जीवनात निर्माण झालेल्या सध्याच्या अनवस्था प्रसंगातून मार्ग चोखावा लागेल. पण लढ्यासाठी आपल्याला ऐक्याची फार गरज आहे.''

१ नोव्हेंबर १९५६ राजी मुंबई द्विभाषिक राज्याची घोषणा झाली. त्यादिवशी दिवाळीचा सण होता. परंतु महाराष्ट्रात दिवाळीचा उत्सव नव्हता. १५ नोव्हेंबरला आचार्य अत्रे यांचा 'मराठा' या वृत्तपत्राचा पहिला अंक निघाला. द्वैभाषिक राज्याविषयी आचार्य अत्रे म्हणतात,

'' दैनिक मराठा हा कोणत्याही राजकीय पक्षाचा नाही. तीन कोटी जनतेचा पक्ष हाच त्याचा आवाज. सत्य सांगताना कोणताही पक्षपात तो करणार नाही.... महाराष्ट्रभिमान व भारत निष्ठेला कधीही धोका देणार नाही. तीन कोटी मराठी जनतेच्या अस्मितेवर आणि आलेल्या महाद्विभाषिकाच्या संकटाचा प्रतिकार करणे दैनिक 'मराठा' चे ब्रीद आहे.''

१९ नोव्हेंबरला नव्या द्विभाषिक मुंबई राज्याची नवी विधानसभा सुरू झाली. व २१ नोव्हेंबर १९५६ रोजी संयुक्त महाराष्ट्र समितीने पहिला हुतात्मा दिन पाळला. यावेळी जमलेल्या समुदायासमोर बोलताना श्री. एस.एम. जोशी म्हणाले, ''हुतात्म्यांच्या बलिदानाने जनतेत अधिक शक्ती संचारली आहे. येत्या निवडणुकीत ती कॉंग्रेसचा निःसंशय पराभव करील''. २८ नोव्हेंबरला संयुक्त महाराष्ट्र

समितीच्या कार्यकरिणीची सभा भरली, जनसंघानेही समितीसोबत कार्य करण्यास मान्यता दिली. द्विभाषिक राज्याला एक बाजूला असा विरोध होत असताना मुख्यमंत्री या नात्याने यशवंतराव त्याचे समर्थन करतांना ते म्हणत, ''विशाल द्विभाषिक राज्याबाबतचा निर्णय लोकसभेने दिलेला असल्यामुळे तो अंतिम समजून स्वीकारावा व त्यावर वाद घालू नये.'' त्यामुळे यशवंतरावांना आचार्य अत्रे आणि समितीतर्फे प्रचंड विरोधाला तोंड द्यावे लागले. यातच १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक आली.

## १९५७ ची सार्वत्रिक निवडणूक–

१९५७ मध्ये स्वतंत्र भारताची निवडणूक आली, ही निवडणूक संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीवर आली होती. संयुक्त महाराष्ट्र मिळविणे हे समितीचे ध्येय्य होते. ११ मार्च १९५७ रोजी झालेल्या निवडणूकीत काँग्रेस विरुद्ध संयुक्त महाराष्ट्र समिती असा सामना होता.

असा निवडणुकीत महाराष्ट्रीय जनतेने द्वैभाषिक राज्याच्या विरोधी कौल दिला. महाराष्ट्रात १३३ जागांपैकी १०१ जागा संयुक्त महाराष्ट्र समितीने जिंकल्या तर फक्त ३२ जागांवर काँग्रेसला यश मिळाले. कराड मतदार संघातील निवडणूक चुरशीची ठरली; येथे मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण विरुद्ध केशवराव पवार असा संघर्ष होता. कराडमध्ये मिळालेला श्री. यशवंतरावांचा विजयच काँग्रेसला दिलासा देणारा ठरला. मराठवाडा व विदर्भात समितीला अपेक्षित जागा मिळाल्या नाहीत. तेथे काँग्रेसला अनुक्रमे ३५ व ५५ जागा मिळाल्या तर लोकसभा निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात समितीला २२ पैकी २० जागा मिळाल्या. अशा प्रकारे संयुक्त महाराष्ट्र समितीला जनतेचा कौल मिळाला.

एकूण द्वैभाषिक राज्याच्या दृष्टीने पाहता काँग्रेसला २२३ व विरोधकांना १६१ जागा मिळाल्या होत्या. यामुळे संयुक्त महाराष्ट्र समितीला प्रत्यक्ष सत्ता स्थापन करणे शक्य नव्हते. ५ एप्रिल १९५७ रोजी श्री. यशवंतराव चव्हाण मुंबई विधिमंडळाचे काँग्रेस पक्षाचे नेते म्हणून एकमताने निवडून आले. विदर्भ व नव्याने आले होते व येथे समितीचे कार्य प्रभावी नसल्यामुळे या भागांतून काँग्रेसला यश मिळाले व समिती सत्तेपासून दूर राहिली.

## संयुक्त महाराष्ट्र समितीचा लढा (१९५७ –६०)

१९५७ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समिती सत्तेपासून दूर राहिली असली तरी जनतेच्या मनावर सत्ता मात्र मिळविली होती. पहिल्याच निवडणुकीत हे घवघवीत यश मिळाले होते. विधिमंडळाच्या निवडणुकी नंतरचे समितीचे मोठे यश म्हणजे मे १९५७ मध्ये मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत समितीला निर्विवाद विजय मिळविला. १८ वर्षांची काँग्रेसची सत्ता जशी संपली तसेच समितीच्या या विजयाने मुंबईसह महाराष्ट्राची ग्वाही दिली.

९ मे १९५७ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या मराठी साहित्य संमेलनात अध्यक्ष श्री. अनंत काणेकर यांनी संयुक्त महाराष्ट्राचे समर्थन केले. यावेळी या संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. देवीसिंह चौहान होते. जे द्विभाषिक राज्याच्या मंत्रिमंडळात होते. या संमेलनास शाहीर अमर शेख हजर होते. 'संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशा घोषणा देऊन तसेच 'आता तडजोड नाही रे' या गाव्याने संमेलनाचा परिसर दणाणून टाकला.

१७ जून १९५७ रोजी मुंबई विधानमंडळाचे निवडणुकीनंतरचे पहिले अधिवेशन सुरू होणार होते. संयुक्त महाराष्ट्र समितीच्या तिकिटावर निवडून आलेल्या सर्व आमदारांनी विधानसभेत संयुक्त महाराष्ट्र पक्षाच्या नेतेपदासाठी एक पाच सदस्यांचे मंडळ नेमले. यात एस. एम. जोशी, उद्धवराव

पाटील, व्ही. डी. देशपांडे, डॉ. नरवणे व ए. जी. पवार या पाच सदस्यांचा समावेश होता. 'संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी समितीच्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी पक्ष झटेल' असे संयुक्त महाराष्ट्र पक्षाच्या घटनेतच ठरविण्यात आले. आचार्य अत्रे या पक्षात मुख्य प्रतोद होते.

अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संयुक्त महाराष्ट्र समितीच्या सर्व आमदारांनी मोर्चा काढला, हुतात्म्यांना वंदन करूनच त्यांनी विधिमंडळात प्रवेश केला. राज्यपालांच्या भाषणाच्या ' मुंबईसह महाराष्ट्र झालाच पाहिजे' अशा सतत घोषणा समितीच्या आमदारांनी दिल्या. आचार्य अत्रेंनी राज्यपालांच्या भाषणावर जबरदस्त टीका केली. कारण राज्यपालांच्या भाषणात मुंबईतील गोळीबार, १०५ हुतात्मे यांचा साधा उल्लेखही नव्हता.

जुलै १९५६ मध्ये संयुक्त महाराष्ट्र समितीची १५ कलमी घटना प्रकाशित करण्यासाठी आली. यात समितीचे उद्देश पुढीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले -

अ) भाषावार प्रांतरचना तत्त्वानुसार हिंदी संघराज्याचा घटक असलेले संयुक्त महाराष्ट्राचे मराठी भाषिकांचे एकात्म व सलग राज्य प्रस्थापित करणे.

ब) लोकसत्ताक व समाजवादी महाराष्ट्र प्रस्थापित करणे आणि समितीने पुरस्कार केलेला कार्यक्रम पूर्ण करणे.

क) महाराष्ट्रातील आर्थिक, सांस्कृतिक व सामाजिक जीवनाची सहकारी तत्त्वावर उभारणी करणे.

उपरोक्त उद्देश साध्य करण्यासाठी समितीने लोकशाही व शांततामय मार्गाचा साधन म्हणून उपयोग करण्याचे ठरविले होते, हे महत्त्वाचे होय.

संयुक्त महाराष्ट्र समितीचे नेते एस.एम. जोशी यांनी समान हितसंबंध लक्षात घेऊन महागुजरात जनता परिषदेचे अध्यक्ष इंदूलाल याज्ञिक यांच्याशी वाटाघाटी केल्या. व पुढील चळवळीची योजना आखली. परिणामी द्विभाषिक राज्याचे विभाजन करण्याच्या हालचाली दिल्लीत वाढल्या. या परिस्थितीत दुसऱ्यांदा मुंबई राज्याचे मुख्यमंत्री झालेल्या यशवंतराव चव्हाणांनी अत्यंत बचावात्मक पवित्रा घेतला. संयुक्त महाराष्ट्र विरोधी नेहरूंचा पवित्रा व समितीचा दबाव यात त्यांची कोंडी होत होती.

## पंडित नेहरूची महाराष्ट्र भेट व समितीचा विरोध

पश्चिम महाराष्ट्रातून यशवंतराव चव्हाण निवडून आले असले तरी काँग्रेसचा पराभव झाला होता. आपल्या मुख्यमंत्री पदाच्या वर्षभराच्या कारकिर्दीनंतर त्यांनी ३० नोव्हेंबर १९५७ राजी प्रतापगडावरील छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी पंतप्रधान पंडित नेहरूंना बोलावले. या संधीचा फायदा घेण्याचे समितीने ठरविले. पंडित नेहरू हे भाषावार प्रांतरचनेच्या विरोधी होते; त्यामुळे आचार्य अत्रे व एस. एम. जोशी यांनी समितीच्या वतीने खालील ठराव संमत केला-

'' संघराज्याच्या मंत्रिमंडळापैकी काहींची शिवछत्रपतींबद्दल अनादराची भावना व्यक्त झालेली असताना त्यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यासाठी नेहरू महाराष्ट्रात येत आहेत. या समारंभाचा हेतू महाराजांबद्दल आदर व्यक्त करण्याचा नसून द्वैभाषिक मजबूत करण्याचा आहे असे समितीचे मत आहे.

म्हणून नेहरुंच्या आगमनाच्या प्रसंगी जनतेने प्रतापगडावर मोर्चा काढून द्वैभाषिकाबद्दलची

आपली तीव्र नापसंती व्यक्त करावी असा समिती नेते खासदार व आमदारांनी करावे.''

सदरील ठरावानुसार महाबळेश्वर येथे समितीने प्रचंड निदर्शने केली. पंडित नेहरूंना महाराष्ट्रीय जनतेची प्रतिक्रिया या निमित्ताने पाहायला मिळाली, त्यांना संपूर्ण मार्गामध्ये संयुक्त महाराष्ट्रवादी जनतेच्या निदर्शने व घोषणांना तोंड द्यावे लागले. यामुळे समितीला आपला उद्देश सफल झाल्याचे लक्षात आले. प्रतापगडावरील झालेल्या समारंभाची आठवण सांगताना ' ऋणानुबंध' या लेखसंग्रहात श्री. यशवंतराव चव्हाण म्हणतात, 'प्रतापगडचा समारंभ व त्यावेळी झालेली निदर्शने, या निदर्शनांचे नियंत्रण यांचा नेहरूंच्या मनावर चांगला परिणाम झाला......... नेहरूंनाही लोकांचे प्रचंड प्रदर्शन पाहता आले आणि त्यांच्या भावना ओळखता आल्या.

निदर्शन प्रचंड होते, पण लोक संयमाने वागले व त्याचाही नेहरूंच्या मनावर परिणाम झाला. आमच्या सभांतूनही ते लोकांशी बोलले. यावेळी त्यांच्या लक्षात आले की, ''आम्ही जरी द्वैभाषिक राबवित आहोत तरीही लोकांच्या मनावर काही संदेह आहे.''

प्रतापगडचा समारंभ आणि समितीची शांततापूर्ण निदर्शने यामुळे संयुक्त महाराष्ट्राच्या इतिहासाला एक नवे वळण मिळाले. महाराष्ट्रातील सामान्य माणसाचा द्विभाषिकाला विरोध असून वेळीच द्विभाषिक राज्याचे विभाजन केले नाही तर १९६२ सालच्या सार्वत्रिक निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला राज्यात सत्तेवर येणे फार अवघड होईल. कदाचित सत्ता गमवावी लागेल अशी शक्यता पं. नेहरूंना दिसू लागली. प्रतापगडच्या घटनेनंतर पं. नेहरूंच्या संयुक्त महाराष्ट्रबाबत मतपरिवर्तन झाले. १९५८ मध्ये मराठवाडा विद्यापीठाच्या उद्घाटनाच्या निमित्ताने पं. नेहरू औरंगाबादला केलेल्या भाषणात प्रथमच द्विभाषिक मुंबई राज्याच्या आपल्या निर्णयाचा फेरविचार करण्यास अनुकूलता दर्शविली. यासंदर्भात श्री. भाऊसाहेब हिरे यांना पाठविलेल्या पत्राचा सारांश पहा-

'' काही दिवसांपूर्वी मी औरंगाबादमध्ये एक जाहीर भाषण केले. त्यात मुंबई राज्याच्या द्विभाषिक प्रश्नासंबंधी मी विस्ताराने बोललो. सध्याचे द्विभाषिक मुंबई राज्य विशेषतः महाराष्ट्राच्या दृष्टीने चांगले आहे. असे माझे व्यक्तीशः मत आहे. ते बदलण्याचा प्रयत्न केल्यामुळे नवीन गुंतागुंत निर्माण होईल. महाराष्ट्राची भूमिका या द्विभाषिक राज्यात वरचढ आहे. कारण सबंध महाराष्ट्र या राज्यात समाविष्ट करण्यात आला आहे. मात्र कोणावरही माझी इच्छा मी लादणार नाही....''

## सीमा सत्याग्रह –१९५८

मुंबई द्वैभाषिक राज्य होऊन दोन वर्षांचा कालावधी लोटला होता. स्वतंत्र विदर्भाची मागणी अधूनमधून डोके वर काढीत होती. जुलै १९५८ मध्ये श्री. बापुजी अणे यांनी नागविदर्भाच्या राज्याची मागणीचे समर्थन अकोला येथे केले. दोन वर्षाच्या लोकशाही मार्गाच्या लढ्याला सरकार दाद देत नाही त्या अर्थी आपण निर्णायक लढा पुकारला पाहिजे असे समितीला वाटू लागले. २१ नोव्हेंबर १९५५ रोजी फ्लोरा फाऊंटन जे हुतात्मे झाले त्यांचे तेथे एक स्मारक उभारण्याची मागणी होऊ लागली. तो ऑक्टोबर १९५८ मध्ये मुंबई महापालिकेने मंजूर केला.

या पार्श्वभूमीवर १ नोव्हेंबर १९५८ रोजी महाराष्ट्र समितीच्या आदेशानुसार माधवराव बागलांच्या नेतृत्वाखाली सत्याग्रह लढा सुरू झाला. बेळगाव, निपाणी , खानपूर, भालकी ही पाच केंद्रे प्रारंभी सत्याग्रहासाठी निश्चित करण्यात आली. या सत्याग्रहाचे कारण म्हणजे 'बेळगाव, कारवार, बिदर मधील मराठी भाग ऐतिहासिकदृष्ट्या, भौगोलिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या कर्नाटकचा भाग आहे. त्यावर महाराष्ट्राचा हक्क नाही' अशी भूमिका कर्नाटकच्या पुढाऱ्यांनी घेतली होती. तर

मराठी भाषिकांनी सुरुवातीपासून अखेरपर्यंत खेडे हा घटक धरून सीमाप्रश्न सोडवावा अशी लोकशाही तत्त्वावर आधारलेली भूमिका घेतली होती.

सीमा लढ्याचे एक प्रमुख नेते बेळगावचे बा.रं. सुंठणकर यांनी समितीला असा आग्रह केला की, समितीने सीमा लढ्यावरच आपले लक्ष केंद्रित करावे. या संदर्भात श्री. बा. रं. सुंठणकर यांची भूमिका पाहणे गरजेचे आहे.

''म्हेसूर सरकारची आणि म्हैसुरी पुढाऱ्यांची एकंदर दुराग्रही व आडमुठी वृत्ती पाहिली म्हणजे संयुक्त महाराष्ट्र उद्या निर्माण झाला तर सीमेचा प्रश्न सुटणे सोपे होईल ही समजूत चुकीची आहे ........ मुंबईचे द्विभाषिक राज्य लवकर मोडून टाका असा लकडा हनुमंतच्या किंवा द.प. करमरकर वगैरे कन्नाडिग पुढाऱ्यांनी लावलेला आहे. हे आपण विसरता कामा नये.

याचे कारण असे की द्विभाषिक एकदा मोडले की सीमाप्रदेशाचा प्रश्न आपोआपच बारगळेल आणि घशात घातलेले बेळगाव, कारवार कायमचे पचविता येईल असे कारवाला वाटते. १९६१ खानेसुमारीपर्यंत त्यांना वेळ काढायचा आहे.'' (मराठा- ७ जानेवारी १९५१)

२७ एप्रिल १९५९ रोजी मुंबई विभागीय काँग्रेसची सभा भरली होती, त्यात म्हैसूर व मुंबई राज्य यांच्यामधील सीमेचा वाद केंद्र सरकारने सोडवावा अशी विनंती करण्यात आली. सीमा-लढा समिती व संयुक्त बैठकाही संयुक्त महाराष्ट्र समिती यांची संयुक्त बैठकही कोल्हापूर येथे भरली, त्यात सीमा भागात १ मे १९५८ पासून सुरू झालेल्या सत्याग्रहाचा आढावा घेण्यात आला. विशेष म्हणजे संयुक्त महाराष्ट्र समिती व सीमालढा समिती यांच्या संयुक्त बैठकीने दिल्ली येथे संसदेसमोर सत्याग्रहही केला. १८ व १९ डिसेंबर १९५८ रोजी दिल्लीतील संसदेसमोरील बैठ्या सत्याग्रहाने द्वैभाषिक राज्याचा पुनर्विचार करण्याच्या हालचाली सुरू झाल्या.

आचार्य अत्र्यांनीही सीमाभागाकडे दुर्लक्ष देणे महत्त्वाचे मानले. त्यांच्या मते, सीमा लढ्याकडे दुर्लक्ष झाले अगर तो रेंगाळला तर म्हैसूरी पुढाऱ्यांना या विभागाचे कानडीकरण करण्यास पुरेशी संधी मिळेल आणि त्यामुळे तो प्रश्न अधिकच बिकट बनेल.

## द्वैभाषिक राज्याचा अस्त – (१९५९–६०)

संयुक्त महाराष्ट्र समितीने दिलेला प्रखर लढा, १९६२ सालच्या निवडणुकांकडे असलेले काँग्रेसचे लक्ष, यशवंतराव चव्हाणांची सकारात्मक भूमिका हे तीन महत्त्वाचे समिती घटक द्वैभाषिक राज्याच्या अस्ताला प्रामुख्याने कारणीभूत ठरले. २१ ऑगस्ट १९५९ रोजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, पंतप्रधान पंडित नेहरु, गोविंद वल्लभ पंत व मोरारजी देसाई यांच्यात द्विभाषिक विभाजनाची चर्चा झाली. या चर्चेत यशवंतराव चव्हाणांनी असे स्पष्ट केले की, 'द्विभाषिकाचा कारभार ठीक चालला असे दिसत असले तरी मराठी- गुजराती जनतेचे भावात्मक ऐक्य साधले जात नाही असे दिसते. म्हणून या मोठ्या राज्याचे दोन भाग केले पाहिजेत.'

सप्टेंबर १९५९ मध्ये श्रीमती इंदिरा गांधी यांची काँग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्यांनी महाराष्ट्राचा दौरा करून द्वैभाषिकाच्या विभाजनाबाबत सकारात्मक भूमिका घेतली. मुंबईसह महाराष्ट्र निर्मितीबाबतच्या बातम्याही वृत्तपत्रात येऊ लागल्या होत्या. दरम्यान १९५९ मध्ये चीनने भारतावर आक्रमण केले होते. मुंबईचे राज्यपाल श्री. प्रकाश व राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांनीही द्विभाषिक राज्याचे विभाजन करावे अशी सुचना पंडित नेहरुंना गोपनिय पत्रे पाठवून केली होती. या सर्व पार्श्वभूमीवर काँग्रेसच्या नऊ सदस्यीय समितीने २३ डिसेंबर १९५९ रोजी आपल्या शिफारशी

सादर केल्या, त्या पुढीलप्रमाणे -

१) मुंबई महाराष्ट्र व गुजराथ अशी दोन राज्ये निर्माण करावीत.

**२) मराठी भागाला 'मुंबई राज्य' हे नाव कायम ठेवावे.**

३) गुजराथ राज्याची राजधानी उभारण्यासाठी संयुक्त गंगाजळीतून दहा कोटी रुपये द्यावे.

४) डांग प्रांत गुजराथला जोडावा तसेच उंबरगाव तालुक्यातील सुमारे ५० गावे गुजराथला द्यावी.

५) उकड धरणासाठी खानदेशचे काही तालुके गुजरातला द्यावेत.

जानेवारी १९६० मध्ये डांग भागातील शेतकऱ्यांची एक परिषद भरली होती, 'महाराष्ट्रापासून डांगची ताटातूट करू नका ' हीच या परिषदेची मुख्य मागणी होती. डांगचे काँग्रेस नेते नानासाहेब दीक्षित यांनीही डांगचा अंतर्भाव महाराष्ट्रात करावा अशी उपसूचना मांडली होती. परंतु डांग गुजरातला देण्याचा निर्णय जवळपास झाला होता. या निर्णयाचे समर्थन करताना यशवंतराव चव्हाण म्हणतात,

''डांगचा समावेश गुजरात राज्यात करण्याला मी मान्यता दिली आहे. डांगच्या लोकलबोर्ड निवडणुकांनी डांग गुजरातला जोडावा असा कौल दिलेला आहे.... द्विभाषिकाच्या विभाजनाची जेव्हा चर्चा सुरू झाली, तेव्हा डांगमधील काँग्रेसजनांना मी बोलावून घेतले आणि महाराष्ट्राच्या विशाल हिताच्या दृष्टीने डांग गुजरातला द्यावा लागेल असे मी त्यांना सांगितले आणि त्यांनी त्या गोष्टीला डांग गुजरातला गेला तरी नवापूर भाग आपल्याला मिळालेला आहे. मोठे मिळवायचे असेल तर थोडेसे गमवावे लागते.''

मार्च १९६० मध्ये चालू असलेले राज्य विधानसभेचे अंदाजपत्रकी अधिवेशन शेवटचे ठरले. त्याच अधिवेशनात मराठी व गुजराथी भाषेची दोन वेगळी राज्ये निर्माण करण्यासंबंधीचे विधेयक मांडण्यात येऊन द्वैभाषिक राज्याचा अस्त करण्याच्या दृष्टीने अंतिम पाऊल टाकण्यात आले. याच अधिवेशनात महाराष्ट्र म्हैसूर राज्याच्या सीमा ताबडतोब निश्चित कराव्या अशी मागणी करणारा ठराव यशवंतराव चव्हाणांनी मांडला.

दि. १४ मार्च १९६० रोजी विधानसभेत मुंबई राज्यपुनर्रचना विधेयक यशवंतराव चव्हाण यांनी मांडले. खालील मुद्द्यांच्या बाबतीत अभिवचन दिले-

१) नागपूर कराराची अंमलबजावणी केली जाईल.

२) विदर्भ, मराठवाडा येथील जनतेच्या भावना आणि त्यांच्या विशेष गरजा लक्षात घेऊन त्यांना सवलती देण्याबाबत अधिक उदार धोरण अवलंबविले जाईल.

३) मुंबई शहराचे बहुरंगी, बहुजिनसी स्वरूप जनन केले जाईल, मुंबई शहराच्या विकासाकडे विशेष लक्ष दिले जाईल.

मुंबई विधानसभेत मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी द्वैभाषिकांचा भंग करून गुजराथी व मराठी राज्यनिर्मितीचे विधेयक मांडले. यातील मुख्य कलमे-

१) सध्याच्या जोडराज्यातून गुजराथी भाविकांचा कच्छ, सौराष्ट्र व गुजराथचा प्रदेश बाजूला काढून गुजराथ राज्य करावे.

२) या गुजराथ राज्यात डांग, पश्चिम खानदेशची १५६ खेडी व उंबरगाव मालुक्याची ५० खेडी समाविष्ट करावी.

३) गुजराथ राज्याची सूट भरून काढण्यासाठी सुमारे ५६ कोटी नव्या मुंबई राज्याने द्यावे.

४) गुजराथच्या राजधानीसाठी दहा कोटी रुपये द्यावे.

तसेच 'मराठी' भाषी राज्याचे नाव 'महाराष्ट्र राज्य' हे असावे' या दुरुस्तीसह हे विधेयक केंद्र सरकारकडे पाठविण्यात आले. दि. १४ ते १८ मार्च १९६० या पाच दिवसात या विधेयकावर चर्चा करण्यात आली. तसेच ३१ मार्च १९६० रोजी लोकसभेत गृहमंत्री गोविंद वल्लभ पंत यांनी मुंबई राज्यपुनर्रचना विधेयक मांडले. हे विधेयक संसदेच्या दोन्ही सदनांच्या संयुक्त समितीकडे विचारासाठी सोपवावे असे ठरले, या संयुक्त समितीने १४ एप्रिल १९६० पर्यंत आपला अहवाल सादर करावा असे ठरले. हा अहवाल संसदेत सादर झाल्यावर दि. २१ एप्रिल १९६० ला मूळ विधेयकास लोकसभेने व २३ एप्रिलला राज्यसभेने मान्यता दिली. नव्या राज्याचे नाव मुंबईऐवजी 'महाराष्ट्र' ठेवावे या दुरुस्तीसही संसदेने मान्यता दिली. व १९५६ मध्ये निर्माण झालेल्या द्वैभाषिक मुंबई राज्याचा अस्त होऊन गुजराथ व महाराष्ट्र ही राज्ये निर्माण झाली.

**महाराष्ट्र राज्याची निर्मिती – १ मे १९६०**

महाराष्ट्र राज्य निर्मितीचे विधेयक पत्रक काढूप येऊ घातलेल्या महाराष्ट्र राज्याच्या स्वागताची जोरदार तयारी करण्याचे जनतेला अवाहन केले. दि. २७ एप्रिल १९६० रोजी शिवजयंतीपासून ३० एप्रिल १९६० पर्यंत महाराष्ट्र राज्याच्या स्वागताचा सोहळा साजरा करण्यात आला. २९ एप्रिल आपल्या भाषणात यशवंतराव चव्हाण म्हणाले,

'' नवमहाराष्ट्राचे माझे स्वप्न केवळ मुंबईसारखी मोठमोठी शहरे निर्माण करण्याचे नाही. ज्यात शेती व उद्योगधंदे यांचा समतोल विकास झाला आहे असा महाराष्ट्र निर्माण करण्याचे माझे स्वप्न आहे.''

संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीने श्रीपाद अमृत डांगे, लालजी पेंडसे, ना. ग. गोरे आदी नेत्यांनी एका निवेदनाद्वारे द्वैभाषिक मुंबई राज्याच्या विभाजनाचे व महाराष्ट्र राज्य स्थापनेचे स्वागत केले. राज्यसभेत समितीतर्फे बोलताना श्री. लालजी पेंडसे यांनी म्हटले की, '' द्वैभाषिकाच्या थडग्यावर गुजरात-महाराष्ट्र राज्यांची रचना करणाऱ्या या बिलाचे मी स्वागत करतो. जनतेच्या भावनेला एकदा तरी मान दिला जाऊन तिच्या इच्छेप्रमाणे मराठी राज्याला 'महाराष्ट्र' हे नाव दिले जात आहे. याबद्दल मी सर्वांचे आभार मानतो.''

३० एप्रिल १९६० रोजी मुंबई पंतप्रधान पंडित नेहरुंच्या सभेने राज्याच्या स्वागत सोहळ्याची सांगता झाली. रात्री बारा वाजता मुंबईच्या राजभवनाच्या दरबार हॉलमधून पंडित नेहरूंनी विजेचे बटन दाबले आणि नवमहाराष्ट्र राज्याचा नकाशा प्रकाशाने झगमगला. महाराष्ट्र राज्य स्थापना झाल्याचे पंडित नेहरुंनी घोषित केले. संयुक्त महाराष्ट्र समितीने १०५ हुतात्म्यांना फुले वाहून स्मृती जागवल्या, आदर व्यक्त केला. या कार्यक्रमास महाराष्ट्राचे राज्यपाल श्री. प्रकाश, श्रीमती इंदिरा गांधी, यशवंतराव चव्हाण प्रामुख्याने उपस्थित होते.

१ मे १९६० रोजी नवमहाराष्ट्राच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला. महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री म्हणून ना. यशवंतराव चव्हान यांनी शपथ घेतली. संध्याकाळी महाराष्ट्र राज्याच्या जन्मोत्सवाचा सोहळा शिवाजी पार्कवर पार पडला. सांस्कृतिक कार्यक्रमात 'महाराष्ट्र दर्शन' घडवण्यात आले. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्य निर्मितीचे मराठी जनतेचे स्वप्न पूर्ण झाले.

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीमध्ये अनेकांचे मोलाचे योगदान आहे. श्री. शंकरराव देव यांनी प्रारंभिक अवस्थेत संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न नेटाने पुढे रेटला. डॉ.त्र्यं.रा. नरवणे, यशवंतराव चव्हाण,

एस. एम. जोशी, श्रीपाद अमृत डांगे, चिंतामणराव देशमुख, आचार्य प्रल्हाद केशव अत्रे, ना. ग. गोरे ही प्रतिनिधी नावे सांगता येतील. हे सर्व महाराष्ट्रीय नेते व १०५ हुतात्मे यांच्या योगदानातून महाराष्ट्र राज्य निर्माण झाले. १९४३ साली बेळगाव येथे ग. त्र्यं. माडखोलकरांनी साहित्य संमेलनात मांडलेला मराठी राज्याच्या ठराव १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या रूपाने प्रत्यक्षात आला. मात्र ज्यात बेळगाव महाराष्ट्र राज्यात समाविष्ट होऊ शकले नाही. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, भालकीचा सीमा भाग महाराष्ट्राबाहेरच राहिला, ही सल आजही सर्व महाराष्ट्रीय जनतेच्या मनात कायम राहिली आहे.

## ६.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :-

**प्रश्न १- संज्ञा/संकल्पना स्पष्ट करा.**

१) संयुक्त महाराष्ट्र
२) भाषावार प्रांतरचना
३) द्वैभाषिक राज्य महाविदर्भ
४) मध्यप्रांत व वऱ्हाड (उ.झ. ु इर्शीरी)
५) संयुक्त महाराष्ट्र परिषद
६) मराठवाडा
७) न्या.दार कमिशन
८) अकोला करार
९) जे.व्ही.पी. समिती
१०) नागपूर करार
११) न्या.फाझल अली कमिशन
१२) त्रिराज्य योजना
१३) १०५हुतात्म्यांचे बलिदान
१४) सीमा सत्याग्रह

**प्रश्न २:- लघुत्तरी प्रश्न**

१) १९४५ च्या बेळगाव साहित्य संमेलनाचे महत्त्व स्पष्ट करा.
२) श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी मांडलेला ठराव कोणता?
३) संयुक्त महाराष्ट्र परिषदेच्या पहिल्या अधिवेशनातील प्रमुख ठराव कोणते?
४) दार कमिशनच्या नियुक्तीस कोणते घटक पूरक ठरले?
५) दार कमिशनच्या प्रमुख शिफारशी कोणत्या?
६) नागपूर कराराची प्रमुख कलमे सांगा.
७) नागपूर कराराचे महत्त्व स्पष्ट करा.
८) फाझल अली कमिशनच्या शिफारशी सांगा.

९) संयुक्त महाराष्ट्राबाबत डॉ. आंबेडकरांची भूमिका स्पष्ट करा.

१०) मोरारजी देसाई यांची भूमिका स्पष्ट करा.

११) द्वैभाषिक राज्य निर्मितीमागचे तत्त्वज्ञान काय होते?

१२) भाषावार प्रांतरनेला प. नेहरूंचा विरोध का होता?

१३) संयुक्त महाराष्ट्र निर्मितीबाबत आचार्य अत्रेंच्या 'मराठा' वृत्तपत्राचे योगदान स्पष्ट करा.

१४) द्वैभाषिक राज्याच्या अस्ताची प्रक्रिया स्पष्ट करा.

१५) महाराष्ट्र राज्य निर्मितीचे महत्त्व काय होते?

**प्रश्न ३:– दीर्घोत्तरी प्रश्न.**

१) संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या उदयाची पार्श्वभूमी सविस्तर स्पष्ट करा.

२) संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या विकासातील प्रमुख टप्पे सांगा.

३) संयुक्त महाराष्ट्र समितीचे महाराष्ट्र राज्य निर्मितीतील योगदान स्पष्ट करा.

४) आचार्य अत्रे व यशवंतराव चव्हाण यांच्या महाराष्ट्र निर्मितीच्या प्रक्रियेतील भूमिकेची तुलना करा.

५) द्वैभाषिक मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाणांचे कार्य महाराष्ट्र राज्य निर्मितीस कितपत पूरक ठरले? चर्चा करा.

## ६.४ सारांश

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ हा महाराष्ट्राच्या इतिहासातील एक स्वतंत्र अध्याय आहे. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेसाठी मराठी भाषिक जनतेला तीव्र संघर्ष करावा लागला. भाषावार प्रांतरचनेमुळे देशाच्या ऐक्याला तडे जातील या नावाखाली महाराष्ट्र राज्य निर्मितीला प्रारंभी मोठा विरोध झाला.

१९४६ मध्ये बेळगाव साहित्य संमेलनात ग. त्र्यं. माडखोलकरांनी मराठी भाषिक राज्य निर्मितीच्या ठरावाने या लढ्याला प्रारंभ झाला व १ मे १९६० रोजी महाराष्ट्र निर्मितीने त्याची सांगता झाली. आजच्या महाराष्ट्रातील मराठी भाषिक भूप्रदेश हैदराबाद, मध्यप्रांत या प्रदेशाशी जोडला गेला होता. मुंबई, प. महाराष्ट्र, विदर्भ मराठवाडा, बेळगाव हा सर्व मराठी भाषिक भाग उद्दिष्ट होते.

बेळगाव, मुंबई, ठाणे येथील साहित्य संमेलनाच्या माध्यमातून मराठी भाषिकांचा एक स्वतंत्र प्रांत असावा या कल्पनेला पालवी फुटली. अकोला करार, नागपूर करार यामुळे 'महाराष्ट्र' निर्मितीला आकार प्राप्त झाला. न्या. दार कमिशन, न्या. फाझल कमिशनच्या विरोधामुळे राज्य निर्मितीचे स्वप्न लांबले. परंतु संयुक्त महाराष्ट्र समितीने हा लढा अत्यंत चिकटीने चालविला व महाराष्ट्र निर्माण करण्यास केंद्राला भाग पाडले.

१९५३ मध्ये आंध्रप्रदेशच्या निर्मितीनंतर भाषावार प्रांतरचनेला चालना मिळाली त्रिराज्य योजना, मुंबईसह अथवा शिवाय महाराष्ट्र, द्वैभाषिक राज्य असे विविध पर्याय चोखाळून पाहण्यात

कालापपव्यय  झाला. या लढ्याला निर्मितीचे स्वप्न प्रत्यक्षात आले. या लढ्याला महाराष्ट्राच्या इतिहासात विशेष महत्त्व आहे.

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली. नव्या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून श्री. यशवंतराव चव्हाण यांनी शपथ घेतली. इतर कोणत्याही भाषिकांपेक्षा मराठी भाषिक जनतेला अधिक तीव्र संघर्ष करावा लागला हे वास्तव कोणीही नाकारू शकणार नाही. १ मे ला महाराष्ट्र राज्य निर्माण झाले त्यावेळी मराठी जनतेने सीमा वासीयांना असे आश्वासन दिले होते की, '' महाराष्ट्र-कर्नाटक सीमेवरील मराठी प्रदेश जोपर्यंत महाराष्ट्रात समाविष्ट केला जात नाही तोपर्यंत संयुक्त महाराष्ट्राचे स्वप्न साकार झाले असे आम्ही मानणार नाही'' त्याचा विसर पडू देता कामा नये. हीच खरी महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली होय.

## ६.५ पारिभाषिक  शब्द/संज्ञा/संकत्पना

### १.संयुक्त महाराष्ट्र–

'संयुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेत 'मराठी भाषा बोलणाऱ्यांची सर्व लोकसंख्या एका अमलाखाली असावी' हे अपेक्षित होते. यात प्रामुख्याने  गोवा, मुंबई, प. महाराष्ट्र, मध्यप्रांतास जोडलेला विदर्भ व हैदराबाद राज्यातील मराठवाडा या मराठी भाषिक प्रदेशाचे तसेच कर्नाटक सीमेवरील बेळगाव, कारवार, निपाणी, भालकी इ. या प्रदेशाचे एकत्रीकरण अपेक्षित होते.

### २. बेळगाव संमेलन १९४६–

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा ठराव १९४६ मध्ये बेळगाव येथील मराठी साहित्य संमेलनात सर्वप्रथम ग.त्र्यं. माडखोलकरांनी मांडला म्हणून या संमेलनास विशेष महत्त्व आहे. या ऐतिहासिक संमेलनातील ठरावाने संयुक्त महाराष्ट्र निर्मितीचा बिगुल वाजविला. मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांचे एक राज्य असावे व या संभाव्य राज्यात कोणकोणत्या प्रदेशांचा समावेश असावा याचा आराखडाच माडखोलकरांनी मांडला होता.

### ३. संयुक्त महाराष्ट्र परिषदः–

संयुक्त महाराष्ट्र निर्मितीसाठी २८ जुलै १९४६ रोजी मुंबईत संयुक्त महाराष्ट्र परिषदेची स्थापना करण्यात आली. या पहिल्या बैठकीत श्री. शंकरराव देव यांची परिषदेचे अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली. या परिषदेने भाषावार प्रांतरचनेची गरज प्रतिपादन करून मराठी भाषिक प्रदेश निर्मितीची मागणी केली.

### ४. दार कमिशन–

भारतीय स्वातंत्र्यानंतर भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न ऐरणीवर आला. या प्रश्नाचे महत्त्व लक्षात घेऊन डॉ. राजेंद्रप्रसाद (अध्यक्ष, घटना परिषद) यांनी न्या.एस. के.दार यांच्या अध्यक्षतेखाली एका कमिशनची नियुक्ती केली. अलाहाबाद उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश एस.के दार, जगतनारायण लाल व पन्नालाल हे या आयोगाचे सदस्य होते.

### ५. अकोला करार

मराठी भाषिकांचे संभाव्य राज्य कसे असावे याबाबत न्या.दार कमिशनला निवेदन देण्यासाठी

८ ऑगस्ट १९४७ रोजी अकोला येथे प. महाराष्ट्र व विदर्भातील मराठी भाषिक नेत्यांची एक बैठकीत उभय प्रदेशाच्या नेत्यांमध्ये जो करार झाला तो अकोला करार म्हणून ओळखला जातो.

## ६. जे. व्ही. पी. समिती–

भाषावार प्रांतरचनेच्या संदर्भात जयपूर काँग्रेस अधिवेशनात या समितीची स्थापना झाली. या समितीचे सदस्य असलेल्या जवाहरलाल नेहरू, वल्लभभाई पटेल व पट्टाभि सीतारामच्या यांच्या आद्याक्षरांवरून या समितीला जे. व्ही. पी. समिती असे नाव दिले गेले. या समितीने मुंबई महाराट्रात समावेश करण्यास प्रतिकूलता दर्शविली होती.

## ७ नागपूर करार–

आंध्रप्रदेशची निर्मिती झाल्यानंतर महाराष्ट्राची मागणी एकमुखाने मांडण्यासाठी विविध मराठी भाषिक विभागाच्या नेत्यांची बैठक दि. २८ सप्टेंबर १९५३ रोजी नागपूर येथे बोलावण्यात आली होती. या बैठकीत जो करार झाला तो नागपूर करार म्हणून ओळखला जातो. या कराराने नागपूरला उपराजधानीचा दर्जा देण्यात आला. महाराष्ट्र राज्य निर्मितीतील हा नागपूर करार एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

## ८ फायझल अली कमिशन–

दि. २२ डिसेंबर १९५३ रोजी पंतप्रधान पंडित नेहरू यांनी राज्य पुनर्रचना आयोगाची स्थापना केली. या आयोगाचे न्या. सय्यद फाझल अली हे अध्यक्ष होते तर श्री. ह्रदयनाथ कुंजरू व श्री. के. एम. पणिकर हे सदस्य होते. या आयोगाने संयुक्त महाराष्ट्राऐवजी स्वतंत्र विदर्भ राज्याची शिफारस केली होती.

## ९ त्रिराज्य योजना–

फाझल अली कमिशनला प्रचंड विरोध झाल्यानंतर काँग्रेस वर्किंग कमिटीने हा त्रिराज्य योजनेचा प्रस्ताव सुचविला. यानुसार विदर्भासह महाराष्ट्राचे एक राज्य, मुंबईचे स्वतंत्र राज्य व महागुजरातचे स्वतंत्र राज्य अशी तीन राज्ये निर्माण करण्याचे सुचविले होते. १८ नोव्हेंबर १९५५ ला हा प्रस्ताव आला होता.

## १० द्वैभाषिक राज्य–

राज्य पुनर्रचना आयोगाने केलेल्या शिफासशीनुसार १९५६ मध्ये विशाल मुंबई द्वैभाषिक राज्याची निर्मिती झाली. या राज्यात सौराष्ट्र, कच्छ, मराठवाडा, मुंबई, विदर्भ, गुजरात अशा विशाल भूप्रदेशाचा समावेश होता. मराठी भाषिकांचे २७ व गुजराती भाषिकांचे १६ अशा एकूण ४३ जिल्ह्यांचे हे राज्य होते. १९५६ ते १९६० या कालखंडात श्री. यशवंतराव चव्हाण हे या द्वैभाषिक राज्याचे मुख्यमंत्री होते.

## ११ सीमा लढा–

संभाव्य महाराष्ट्रात महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील मराठी भाषिक प्रदेशाचाही समावेश असावा यासाठी सीमा प्रांतातील जनतेने व संयुक्त महाराष्ट्र समितीने दिलेला लढा होय. माधवराव बागल यांच्या सत्याग्रहाने या लढ्याची सुरुवात १ नोव्हेंबर १९५८ रोजी झाली. बेळगाव, कारवार, निपाणी, बिदर, खानापूर हा परिसर महाराष्ट्रात सामील करावा यासाठी आजही हा लढा सुरूच आहे.

**१२ मध्यप्रांत व वऱ्हाड** ( C. P. & Berar)

इ. स.१८५३ मध्ये नागपूरकर भोसल्यांचे राज्य खालसा करून इंग्रजांनी वऱ्हाडसह नागपूर प्रांत मध्यप्रांतास जोडला. या संयुक्त प्रांताची राजधानी नागपूर ही होती. या प्रांतास ल. ि। इशीरी असे म्हटले जाई. ल.ि म्हिणजे उशर्पीरश्र झ्रीौंळपलश किंवा मध्यप्रांत होय. मध्यप्रांत किंवा आताचा मध्यप्रदेश या हिंदी भाषिक प्रांतास वऱ्हाडचा मराठी भाषिक प्रदेश इंग्रजांनी जोडला होता. संयुक्त महाराष्ट्रात वऱ्हाड, विदर्भाचा समावेश असावा अशी मराठी भाषिकांची मागणी होती.

# ६.६ संदर्भ ग्रंथसूची व अधिक वाचनासाठी पुस्तके–


१. पेंडसे लालजी. (२०१०), महाराष्ट्राचे महामंथन, मुंबई, लोकवाङ्मय गृह प्रकाशन.

२. फडके य.दि (२००७). विसाव्या शतकातील महाराष्ट्र, मुंबई, मौज प्रकाशन गृह, खंड आठवा

३. तळवलकर गोविंद ( २०१२), यशवंतराव चव्हाण व्यक्तित्व व कर्तृत्व, मुंबई, मौजे प्रकाशन गृह.

४. फडके ये.दि. (२००७), विसाव्या शतकातील महाराष्ट्र, खंड सहावा १९४८-१९६०; मुंबई, मौज प्रकाशन गृह.

५.फडके प.दि. (२००७), सातवा शतकातील महाराष्ट्र खंड सहावा १९४८-१९५६; मुंबई, मौज प्रकाशन गृह.

६. रणसुभे विलास (२०१०); संयुक्त महाराष्ट्राची ५० वर्षे, कोल्हापूर, (२००१), कोल्हापूर, श्रमिक प्रतिष्ठान प्रकाशन.

७. भालेराव अनंत(२००१), हैदराबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, मुंबई, मौज प्रकाशन गृह.


६.७ सरावासाठी प्रश्न/क्षेत्रीय कार्य.

१. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतील प्रमुख नेत्यांची यादी करा; त्यांच्याबद्दल माहीती मिळवा.

२. संयुक्त महाराष्ट्रासाठी बलिदान दिलेल्या १०५ हुतात्म्यांची सामाजिक पार्श्वभूमी, माहिती संकलित करा.

३. 'कृष्णा काठ' हे यशवंतराव चव्हाणांचे आत्मचरित्र मिळवा, वाचा.

*****

# घटक क्र.

# सामाजिक समतेकरिता संघर्ष

**अनुक्रमाणिका**

**७.0 घटकाची उद्दिष्टे**

**७.१ प्रस्तावना**

**७.२ विषय विवेचन**

**७.२.१ सत्यशोधक काळ : म.फुले–तत्त्व व कार्य**

**७.२.२ ब्राह्मणेतर काळ : शाहू महाराज, जेधे, जवळकर, मुकुंदराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे यांचे कार्य**

**७.२.३ डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ**

**७.२.४ डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळ**

**७.२.५ डॉ. आंबेडकरांच्या पश्चात दलित चळवळ**

**७.३ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न/उपक्रम**

**७.४ सारांश**

**७.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ**

**७.६ संदर्भसूची**

**७.७ सरावासाठी प्रश्न/क्षेत्रिय कार्य/प्रात्यक्षिक कार्य**

## ७.0 घटक उद्दिष्टे

१) महत्मा फुले यांनी स्थापना केलेल्या सत्यशोधक समाजाची पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.

२) सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट कोणते ते सांगता येईल.

३) सत्यशोधक समाजाची तत्त्वे सांगता येतील.

४) सत्यशोधक समाजाच्या कार्याचे टप्पे स्पष्ट करता येतील.

५) महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाद्वारे सामाजिक समतेसाठी कसा संघर्ष केला ते स्पष्ट करता येईल.

६)ब्राह्मणेतर चळवळीच्या उदयाची कारणे स्पष्ट करता येतील.

७) ब्राह्मणेतर चळवळीची वाटचाल स्पष्ट करता येईल

८) ब्राह्मणेतर चळवळीत सामाजिक समतेसाठी शाहू महाराज, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे यांनी केलेले कार्य स्पष्ट करता येईल.

९) दलितांच्या उत्थानासाठी डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्यांनी कसे योगदान दिले ते स्पष्ट करता येईल.

१०) डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली सामाजिक समतेसाठी झालेल्या दलित चळवळीची माहिती सांगता येईल.

११) डॉ. आंबेडकरोत्तर दलित चळवळीची वाटचाल स्पष्ट करता येईल.

## ७.१ प्रस्तावना

वैदिककाळात विशेषतः उत्तर वैदिककाळात भारतीय समाजात विषमता होती. भारतात हिंदू समाज ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्णांत विभागला गेला. सुरुवातीला तीन वर्ण निर्माण झाले होते. नंतर चौथा वर्ण तयार झाला. या वर्णांचे व्यवसायही निश्चित करण्यात आले होते. सुरुवातीस व्यवसाय कोणत्याही व्यक्तीला करण्याचे स्वातंत्र्य होते. मात्र काही काळानंतर वर्णव्यवस्थेत कर्मठपणा आल्यामुळे वर्ण जन्मावरून ठरू लागले. परिणामी व्यवसायही जन्माधारित होत गेले. चातुवर्ण्य व्यवस्था मानवाच्या विकासासाठी अडसर ठरू लागली. ही चातुवर्ण्यव्यवस्था हळूहळू दृढ होऊ लागली. याचा परिणाम भारतीय समाज जातीजातीत विभागण्यात झाला. कोण कोणत्या जातीत जन्मला यावरून त्या व्यक्तीची ओळख होऊ लागली. जातिधिष्ठित अशी समाजरचना निर्माण होऊन समाजावर आपल्या जातींचे व वर्णाचे निर्बंध ( कर्तव्य, नीतिनियम) दृढ होऊ लागली. धर्म ग्रंथाच्या आधारे विषमतेचे समर्थन होऊ लागले. मध्ययुगीन कालखंडात विषमतेची तीव्रता अधिकच वाढली. पुढे पेशवाईत ही विषमता पराकोटोला पोहोचली. त्याचा शूद्र ( बहुजन) व अतिशुद्र (दलित) वर्गातील समाज जीवनावर अत्यंत विपरित परिणाम झाला. हा वर्ग पुरोहितांच्या मानसिक गुलामगिरीतील जीवन जगत होता. मध्ययुगीन व नंतरच्या काळातील संतांनी आध्यात्मिक व ईश्वरी भक्तीच्या मार्गाने समाज परिवर्तनाचे कार्य सुरू केले. आधुनिक कालखंडात समाजसुधारक व विचारवंतांनी समाज परिवर्तनाच्या कार्याला प्राधान्य देऊन सामाजिक समतेसाठी लढे दिले. त्यांनी बहुजन समाजात जागृती घडवून आणण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. चळवळ करण्याची प्रेरणा मिळाली. या चळवळीचा प्रसार संपूर्ण महाराष्ट्रात व देशात झाला होता. महाराष्ट्रात विसाव्या शतकाच्या प्रारंभीच ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद सुरू झाला होता. भारतीय समाजातील उच्चवर्णीयांशी समाजसुधारकांना सामाजिक समतेसाठी लढा द्यावा लागला होता. महात्मा जोतीराव फुले यांनी प्रथमतः सामाजिक समतेसाठी संघटनात्मक पातळीवरून प्रयत्न सुरू केले. त्यासाठी त्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. बहुजन समाजाची पुरोहित वर्गाच्या, ब्राह्मणांच्या वर्चस्वातून मुक्तता करण्यासाठी सत्यशोधक समाजाद्वारे महात्मा फुले यांनी मोलाची कामगिरी केली. या सत्यशोधक समाजातून ब्राह्मणेतर चळवळीचा उदय झाला. या चळवळीत राजर्षी शाहू महाराज, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे यांनी महत्त्वाचे योगदान दिले. डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळीला म. फुले, गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जाणबा कांबळे, राजर्षी शाहू महाराज, महर्षी कि.रा. शिंदे इत्यादी समाजसुधारकांनी मोठे योगदान दिले. डॉ. आंबेडकरांच्या कालखंडात तर संपूर्ण महाराष्ट्रात दलितांमध्ये जागृती झाली. तसेच डॉ. आंबेडकरांच्या निधनानंतर दलित चळवळींचे सामर्थ्य वाढतच गेले. या चळवळींचे स्वरूप, कार्य व त्यापाठीमागील वैचारिक

भूमिका आपण समजावून घेऊ या.

## ७.२ विषय-विवेचन

### ७.२.१ सत्यशोधक काळः म.फुले तत्त्व व कार्य -

महात्मा जोतीराव फुले हे आधुनिक महाराष्ट्रातील मूलगामी समाज परिवर्तनाच्या चळवळीचे आद्यप्रवर्तक होते. हिंदू समाजातील शूद्रातिशूद्रांच्या व्यथा त्यांनी निर्भीडपणे विचारवयके, पुस्तिका, जाहीर सभा या माध्यमातून मांडल्या होत्या. देवा-धर्माच्या नावाखाली ब्राह्मण अथवा पुरोहित वर्ग या अज्ञानी अशिक्षित समाजाचे शोषण करीत असे, धर्म ग्रंथांच्याद्वारे या वर्गाच्या मानेभोवती सामाजिक व मानसिक गुलामगिरीचे पाश आवळले होते. त्यामुळे महात्मा फुले यांनी धर्मकल्पना भोळ्या भाबड्या समजुती, अंधश्रद्धा व कर्मकांड यांवर प्रहार केला. त्यांनी दलित शोषितांचा कैवार घेऊन त्यांना त्यांचे निसर्गदत्त मानवी हक्क प्राप्त करून देण्यासाठी ते आयुष्यभर संघर्ष करीत रहिले. बहुजन समाजातील लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देण्याचे कार्य ते करीत असत. त्यांनी सामाजिक विषमतेविरुद्ध सतत प्रयत्न केले. बहुजन समाजाच्या दुरावस्थेला केवळ ब्राह्मणवर्गाचा स्वार्थ व त्यांची लबाडी हीच कारणीभूत असल्याची म. फुले यांची खात्री होती. त्यामुळे बहुजन समाजाने स्वतःच संघटित होऊन पुरोहित अथवा ब्राह्मणवर्गाच्या मानसिक गुलामगिरीतून मुक्तता करून घेतली पाहिजे. त्याचबरोबर त्याने आपले हिरावले गेलेले हक्क परत मिळविण्यासाठी संघर्ष करण्याची तयारी ठेवली पाहिजे असे महात्मा फुले सांगत असत.

**सत्यशोधक समाजाची स्थापनाः-**

महात्मा जोतीराव फुले हे कृतिशील समाजसुधारक होते. त्यांनी तत्कालीन बोलघेवड्या समाजसुधारकांच्या विसंगत कृतीवर खरमरित टीका केली होती. त्यांनी आपल्या विचारांचा प्रसार व्हावा यासाठी पुणे, मुंबई, कोल्हापूर व कार्यकर्त्यांना एकत्र आणून त्यांच्यासमोर आपल्या समविचारी ५०/६० कार्यासाठी मध्यवर्ती संस्था स्थापण्याचा विचार परिणामकारकरित्या व्यक्त केला. यातून पुणे येथे म. फुलेंनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शूद्रातिशूद्रांची ब्राह्मणीधर्माच्या प्रभावाखालून मुक्तता करणे, त्यांना आपल्या नैसर्गिक मानवी हक्कांची जाणीव करून देणे, ब्राह्मण अथवा पुरोहितांकडून होणाऱ्या शोषण व अन्यायातून त्यांची सुटका करणे हे सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट होते.

सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व सर्व जातींतील लोकांना खुले होते. त्यामुळे महार, मांग, ब्राह्मण, ज्यू, मुसलमान, ख्रिस्ती, मराठा, माळी असे सर्व जातीधर्मांचे लोक संघटनेचे सदस्य बनले होते.

सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष आणि कोषाध्यक्ष महात्मा जोतीराव फुले हेच होते. सेक्रेटरी नारायण गोविंदराव कडलक हे होते. सत्यशोधक समाजाचे नियमन व पोटनियमन तयार करण्यात आले होते. रविवारी सर्व कामगारांना सुट्टी असते. त्यामुळे दर रविवारी एकत्र जमून ईश्वराची उपासना केली जात असे. तसेच दर पंधरा दिवसांनी शनिवारी उपयुक्त विषयावर व्याख्याने दिली जात असत.

**सत्यशोधक समाजाचे नियमः-**

१) शूद्रातिशूद्रांच्या भीषण परिस्थितीत सुधारणा घडवून आणणे, त्यांना त्यांच्या वास्तविक मानवी हक्कांचे भान करून देणे, शूद्रातिशूद्रांच्या दास्यमुक्तीसाठी अविरत झटणे.

२) संघटनेचे नाव निश्चित करणे.

३) संस्थेचे कार्य व्यवस्थितपणे चालविण्यासाठी क्रम ठरविणे.

४) संघटनेच्या सदस्यांना राजकीय विषयांवर चर्चा करता येणार नाही.

५) सर्व जातीधर्मांच्या लोकांना सत्यशोधक समाजाचे सदस्य होता येईल.

६) सत्यशोधक समाजाच्या अंतर्गत रचनेचा आराखडा निश्चित करता येईल.

७) सदस्याने आपल्या एका दिवसाची कमाई वार्षिक वर्गणी म्हणून द्यावी.

८) संघटनेची निवडणूक, पदाधिकार व अंतर्गत व्यवहाराचे नियम व पोटनियम करण्यात येतील आणि त्यानुसार संघटनेची निर्णय प्रक्रिया लोकशाही स्वरूपाची बहुमतावर आधारलेली असेल. कार्यकारी समितीला नित्य व्यवहार सांभाळण्याचे अधिकार असतील आणि सर्वसाधारण सभेची बैठक वर्षातून चार वेळा बोलावण्यात येईल.

९) संघटनेच्या ध्येये व उद्दिष्टांची चर्चा करण्यात येईल सत्य व विवेकनिष्ठा यांचा प्रसार करणे, वर्तमानपत्रे व व्याख्यानाच्या माध्यमातून मानवी अधिकारांचा प्रचार करणे, स्त्रिया व शूद्रातिशूद्रांच्या मुलांमध्ये शिक्षणाचा प्रसार करणे, मुंबई विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत करणे, शेतीच्या आधुनिक तंत्राचे ज्ञान सर्वदूर पोहोचवणे, सामाजिक दुष्प्रथांचा नायनाट करणे अशा कार्यांचा अंगीकार करण्यात आला होता.

१०) सदस्याला वैयक्तित, सामाजिक व धार्मिक जीवनाबाबत बांधिलकी मानणाऱ्या शपथा देण्यात आलेल्या पुढीलप्रमाणे-

१) निर्मिकाशिवाय कोणत्याही देवतेची पूजा करणार नाही.

२) निर्मिकाने सर्व मानवमात्रांना दिलेल्या मानवी हक्कांना बाधा आणणार नाही आणि कोणत्याही प्रकारचा उच्चनीच भाव बाळगणार नाही.

३) प्राणिहत्या करण्यामध्ये सहभागी होणार नाही आणि शक्यतो दारूचे सेवन नाही.

४) सत्यावर अढळ निष्ठा ठेवून अपंग, वृद्ध व लहान मुलांना करेन व मुलांच्या शिक्षण प्रसारासाठी अविरतपणे कार्य करेन.

सत्यशोधक समाजाची अठ्ठावीस नियमांची नियमावली होती. त्यातील वरील नियमांच्याद्वारे सामाजिक कार्यांची कृतीशील बांधीलकी सत्यशोधक समाजाच्या सदस्यांना बंधनकारक करण्यात आली होती. काही नियमांनुसार संघटनात्मक तरतुदींचे तपशील स्पष्ट करण्यात आले होते.

सत्यशोधक समाजाची पुढील तीन तत्त्वे होती.

१) ईश्वर एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्विकार व सत्यरूप आहे अणि सर्व मानव प्राणी एकाच देवाची लेकरे आहेत.

२) ईश्वराची भक्ती करण्याचा प्रत्येक मानवास पूर्ण अधिकार आहे. त्यासाठी कोणत्याही मध्यस्थाची अथवा दलालाची गरज नाही.

३) वरील तत्त्वे मान्य असल्यास कोणासही सदस्य होता येईल.

सत्यशोधक समाजाद्वारे सांगितले जात असे की, सर्व धर्मग्रंथ मानवनिर्मित आहेत. आणि

त्यामुळे धर्मग्रंथात नोंदविलेल्या सर्वच गोष्टी खऱ्या मानता येणार नाहीत. म्हणून त्यांच्यावर विश्वास ठेवण्याची आवश्यकता नाही. सत्यशोधक समाजाचा मूर्तिपूजेवर विश्वास नव्हता. सत्यासारखा कोणताही धर्म नाही. सत्य हेच परब्रह्म आहे. पुनर्जन्म, कर्मकांड , जपजाप्य, पाप-पुण्य, स्वर्ग-मोक्ष या गोष्टी अज्ञानमूलक आहेत. त्याचबरोबर या गोष्टी कनिष्ठवर्गाच्या शोषणाचे कारण आहे. त्यामुळे बहुजनवर्गाने त्यास बळी पडू नये ही सत्यशोधक समाजाची शिकवण होती. 'सर्वसाक्षी जगत्पती। ज्याला नकोच मध्यस्थी' हे या समाजाचे ब्रीद होते.

**सत्यशोधक समाजाचा प्रभाव :-**

सत्यशोधक समाजाचा पायाच मानवतावादावर आधारित होता. त्याची परिणती सत्यशोधक समाजाचा प्रसार मोठ्याप्रमाणावर होण्यात झाली. सत्यशोधक समाजाला अनेक अनुयायी मिळू लागले. अनेक कार्यकर्त्यांनी या समाजाचा विस्तार केला. अनेक शाखाही वाढू लागल्या. भांबुर्डा येथे कृतिशील कार्यकर्ते कृष्णराव भालेकर यांनी सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली. त्यांनी दिंड्या, अभंग इत्यादींच्या द्वारे या समाजाच्या कार्याचा विस्तार केला. नरसिंगराव वडनाळा, रामय्या व्यंकय्या अय्यावारू, जाया यल्लाप्पा लिंगु आणि व्यंकू बाळाजी कलेवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी या समाजाची एक शाखा मुंबईत सुरू केली. भिलाट येथे गोविंदराव बापूजी भिलारे यांनी या समाजाची शाखा सुरू करून तिचे कार्य चालविले. हडपसर येथे अनेकांनी या सत्यशोधक समाजाचे सदस्यत्व स्वीकारले; कार्यकर्त्यांनी महाराष्ट्रातील ब्राह्मण वर्गाचे प्राबल्य झुगारून दिले. कर्मकांडे, अंधरूढी, जातीव्यवस्था यावर टीकेची झोड उठवली. समाजातील शोषित उपेक्षितांच्यापर्यंत सत्यशोधक समाजाची शिकवण पोहचविण्याचे प्रयत्न केले. त्यामुळे ब्राह्मणी प्रभुत्वाचा प्रतिकार करण्याची प्रेरणा दलितांनी, शोषितांना, बहुजनांना मिळाली. त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण झाला. महात्मा फुले हे ब्राह्मण द्वेष्टे नव्हते. त्यांचा त्यांना विरोध नव्हता. मात्र त्यांचा ब्राह्मण्यावर रोष असल्यामुळे फुले यांनी ब्राह्मणांच्या मानवीशोषण प्रवृतीला प्रखर विरोध केला. सत्यशोधक समाज ब्राह्मणेतर वाद उदभवला.

सत्यशोधक समाजाच्या कार्यामुळे सामाजिक क्रांतीने वेग घेतला. 'विद्या हेच बळ, ज्ञान हीच शक्ती' यापासून वचनाने प्रेरित होऊन शिक्षणाचा प्रसार, स्त्री उद्धार, काबाडकष्ट करणाऱ्या शेतकरी व शूद्रातिशूद्रांच्या उत्थानाचा ध्यास घेणाऱ्या समाजसुधारकांची पुढील काळात वाटचाल सुरू झाली. महात्मा फुले यांच्या जीवितकार्याचे १८५४-१९६५ ते १८६५ ते १८९० असे दोन कालखंड पडतात. त्यांनी आपल्या वाङमयातून भटभिक्षुकांच्या, पुरोहितांच्या दांभिकतेवर अत्यंत त्वेषाने प्रहार केले. आणि बहुजन समाजात अज्ञान, दुःख व द्रारिद्रय याविरुद्ध संघर्ष करणाची मानसिकता जागवण्याची आवश्यकता महात्मा जोतीराव फुले यांना प्रखरपणे जाणवत होती. आणि म्हणूनच त्यांनी आयुष्यभर समताधिष्ठित समाजरचनेसाठी आपले जीवन खर्ची घातले. म्हणूनच ते सामाजिक क्रांतीचे अग्रदूत ठरतात.

**सत्यशोधक समाजाने केलेले कार्यः-**

अमेरिकन विदुषी डॉ. गेल ऑमव्हेट यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य तीन टप्प्यांत विभागले आहे.

१) पहिला टप्पा : इ.स. १८७३ ते १८९० सत्यशोधक समाजाच्या कार्याचा हा पहिला टप्पा म्हणजे स्वतः महात्मा सत्यशोधक फुले कार्यरत असल्याचा काळ होता. या काळात जोतीरावांनी

पुरोहितवर्गाच्या वर्चस्वाला जोरदार विरोध केला. ब्राह्मणेतर समाजाला, ब्राह्मणांच्या धार्मिक, सामाजिक हक्कांना आव्हान देण्यास प्रवृत्त केले. त्याचबरोबर स्वतःची धर्मविषयक आणि समाजविषयक कार्ये स्वतः करण्यावर भर देण्याचा उपदेश केला. ठिकठिकाणी पुरोहितवर्गाने निर्माण केलेल्या परंपरा आणि अंधश्रद्धा यांना जबरदस्त धक्का दिला. पुणे, मुंबई व अहमदनगर जिल्ह्यात सत्यशोधक समाजाचा जोरदार प्रसार झाला. तसेच त्यांच्या कार्याचा प्रचार सुरू झाला. इ. स. १८८३ मध्ये 'दिनबंधूने' शेतकऱ्याचा आसूड हा ग्रंथ प्रकाशित केला. या काळात शेतकऱ्यांनी ठिकठिकाणी आपला असंतोष व्यक्त केला. विनंती अर्ज सरकारकडे पाठवून आपल्या अस्तित्वाची जाणीव करुन देण्यात आली.

**२) दुसरा टप्पा : इ.स. १८९० ते इ.स. १९१०**

सत्यशोधक समाजाच्या या दुसऱ्या टप्प्यात या समाजाच्या कार्याला आहोटी लागली होती. सत्यशोधक समाजाचे कार्य मोठी शहरे, विदर्भातील काही खेडी व महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कोल्हापूर आणि बेळगाव एवढ्याच भागापुरते मर्यादित राहिली. या कालखंडात सत्यशोधक समाजाच्या कार्याला आहोटी लागण्यामागील प्रमुख कारण म्हणजे इ.स. १८९५-९६ या वर्षी आलेली प्लेगची साथ होय. त्याचबरोबर महाराष्ट्रातील तत्कालीन दुष्काळी परिस्थिती होय. मात्र सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे ब्राह्मण राष्ट्रवादी नेत्यांनी सत्यशोधक समाजाविरुद्ध जोरदार प्रचार मोहीम उघडली होती. त्यामुळे शहरात सत्यशोधक समाजाच्या कार्यात अडथळे निर्माण झाले. तथापि, सत्यशोधक समाजाचे कार्य अशा प्रतिकूल परिस्थितींतही टिकवून ठेवण्याचे श्रेय राजर्षी शाहू महाराज आणि बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांना दिले जाते.

**३) तिसरा टप्पा :**

इ.स.१९११ ते इ.स. १९१९ या टप्प्यात सत्यशोधक समाजाच्या कार्याचा विस्तार मोठ्या प्रमाणावर झालेला दिसतो. संपूर्ण महाराष्ट्रात नागपूर, विदर्भ, मराठवाडा या भागात सत्यशोधक समाजाच्या कार्याला व्यापकता आली. इ.स. १९११ मध्ये पुणे, इ.स. १९१२ मध्ये नाशिक, इ.स. १९१५ मध्ये अहमदनगर, इ.स. १९१६ मध्ये निपाणी व बेळगाव, इ.स. १९१७ मध्ये आडगाव-जळगाव, इ.स. १९१८ मध्ये अकोला, इ.स. १९१९ मध्ये इंदापूर येथे सत्यशोधक समाजाच्या शाखा सुरू झाल्या सत्यशोधक समाजाचे कार्य जास्तीत जास्त विस्तारत असतानाच त्याचे मूळचे धार्मिक व सामाजिक स्वरूप संपुष्टात आले. त्यामध्ये राजकीय आकांक्षांची निर्मिती झाली. १९१९ या वर्षी माँट-कोर्ड सुधारणा कायदा पारित झाला. १९१९ च्या कायद्यात सत्यशोधक समाजाने सक्रिय सहभाग घेतला. त्यातूनच १९२० यावर्षी ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना झाली.

सत्यशोधक समाजाचे दोन बालकिल्ले होते १) कोल्हापूर संस्थान २) सातारा जिल्हा. या दोन्ही ठिकाणी शिवाजी महाराजांचे वंशज राज्य करीत होते. या दोन्ही राज्यांचा एकत्रित विचार केला तर ३२,२१७ चौरस मैल आणि ८०,००० लोकांशी या सत्यशोधक समाजाचा संबंध आला होता. या समाजाच्या कार्याचा विस्तार वरील दोन्ही राज्यांना लागून असलेल्या जहागिरीत झाला. सत्यशोधक समाजाच्या कार्याचा प्रभाव म्हणजे सामाजिक व राजकीय सुधारणांचा पाया घटनात्मक प्रगतीवर आधारित घातला गेला.

## ७.२.२ ब्राह्मणेतर काळ :–

शाहू महाराज, जेधे, जवळकर, मुकुंदराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे यांचे कार्य-

ब्राह्मणेतर काळः- ब्राह्मणेतरांचा काळ या नावावरून हा ब्राह्मणाशिवाय अन्य जातींच्या

लोकांचा कार्याचा काळ असे स्पष्ट होते. महात्मा जोतीराव फुले यांनी सुरू केलेल्या सत्यशोधक चळवळीतून पुढील काळात ब्राह्मणेतर चळवळ सुरू  झाली. ब्राह्मणेतरांनी ब्राह्मणी वर्चस्वाच्या विरुद्ध सुरू केलेली चळवळ होती. इ.स. १९११ मध्ये राजर्षी शाहू महाराजांच्या प्ररणेने कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांची प्रेरणा आणि बहुजन समाजातील तरुण कार्यकर्त्यांचा उत्साह यामुळे पुर्नस्थापित सत्यशोधक समाजाला आधिक गती मिळाली. या सत्यशोधक समाजामुळे महाराष्ट्रातील अनेकविध ब्राह्मणेतर जातींचे लोक एकत्रित येऊन त्यांच्यात आपल्या समान हितसंबंधाविषयी जागृती झाली. भटभिक्षुक , उच्चवर्गीयांत्त्वे वर्चस्व नष्ट करणे सत्यशोधक समाजाचे उद्दिष्ट होते ब्राह्मण वर्गाचा कावेबाजपणा व स्थार्थवृत्ती हाच आपल्या प्रगतीच्या मार्गातील खरा अडसर आहे. अशी सत्यशोधक चळवळीच्या नेत्यांची भावना होती.

इ.स. १९११ नंतर सत्यशोधक चळवळ आणि ब्राह्मणेतर चळवळ समांतर कार्यरत होती. या दोन्ही चळवळींचे कार्यकर्ते परस्परात मिसळलेले दिसतात. समान उद्दिष्टे आणि एकच तत्त्वज्ञान असल्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीला सत्यशोधक चळवळीपासून अलग करणे काही वेळा कठीण होते. तथापि या दोन्ही चळवळींत जसे काही बाबतींत साम्य असले तरी त्यांच्यात काही वेगळेपणही आहे.

**सत्यशोधक चळवळीच्या तुलनेत चळवळीचे वेगळेपण :–**

१) ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाला विरोध हे सत्यशोधक चळवळ आणि ब्राह्मणेतर चळवळ या दोन्ही चळवळींचे समान सूत्र होते. सत्यशोधक चळवळीने ब्राह्मणी वर्चस्वाविरुद्ध संघर्षाची भूमिका घेतली असली तरी तिचा संघर्ष खऱ्या अर्थाने कोणत्याही जातीविरुद्ध नव्हे तर प्रवृत्ती विरुद्ध  होता. त्यामुळे सत्यशोधक समाजाला ब्राह्मणांचे वावडे नव्हते ; पण ब्राह्मणेतर चळवळीस ब्राह्मण वर्ज्य होता. स्वाभाविकच ब्राह्मणांना ब्राह्मणेतर चळवळीत कसलेही स्थान नव्हते.

२) ब्राह्मणेतरांचा लढा प्रामुख्याने ब्राह्मणांच्या वर्णवर्चस्वाविरुद्ध होता. त्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीच्या काळात जातीयवादी प्रचार शिगेला पोहोचला होता. अशा प्रकारच्या प्रचार दोन्ही बाजूंनी केला जात होता. तथापि ब्राह्मणेतर चळवळ जातीयवादी नव्हती असे प्रा. डॉ. नलावडे यांचे म्हणणे होते. शेठ वालचंद्र दाठोरी या ब्राह्मणेतर नेत्यांच्या मते त्यांच्या या चळवळींचा जन्म ब्राह्मण द्वेषातून झाला. असे त्यांचे विरोधक मानतात.

३) सत्यशोधक चळवळ राजकारणापासून अलिप्त होती. राजकीय घडामोडींशी सत्यशोधक चळवळच्या कार्यकर्ते त्यांनी काडीचाही संबंध ठेवला नाही. सत्यशोधक कार्यकर्त्यांची भूमिका प्रामुख्याने सामाजिक सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणे एवढा होता. मात्र ब्राह्मणेतर चळवळींचे काही नेते राजकारणात रस घेणारे होते. त्यांची राजकीय महत्त्वाकांक्षा कधीच लपून राहिली नाही. बहुजनांच्या फायद्यासाठी राजकीय सत्तेत भागीदारी करणे आवश्यक असे या सत्यशोधक नेत्यांचे मत होते.

४) सत्यशोधक चळवळ एक प्रवाही चळवळ होती. ब्राह्मणेतर चळवळी अंतर्गत असलेले मराठा-मराठेतर, स्पृश्य-अस्पृश्य, जैन-जैनेतर इत्यादी कोणत्याही प्रकारचे प्रवाह सत्यशोधक चळवळीत नव्हते. स्वीकार करून एक दिलाने कार्य करणारे सत्यशोधक होते. मात्र ब्राह्मणेतर चळवळीत काही जण आर्यसमाजाकडे आकृष्ट झालेले होते. तर काही जण सत्यशोधक समाजाकडे आकृष्ट झालेले दिसतात.

अशा प्रकारे सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर चळवळ या दोन्ही चळवळींत साम्य-भेद होते.

**ब्राह्मणेतर चळवळीच्या उदयाची कारणे पुढीलप्रमाणेः–**

**१) ब्राह्मणांचे वर्चस्व :**

जातीव्यवस्थेमुळे वरिष्ठवर्गांना विशेषतः ब्राह्मणवर्गास अमर्याद विशेषाधिकार प्राप्त झाले. त्यातूनच त्यांचे येथील समाजजीवनावर वर्चस्व प्रस्थापित झाले. समाजव्यवस्थेत ब्राह्मणांना मिळालेले अधिकार, सत्ता व सवलती यामुळे त्यांच्यात कनिष्ठ वर्गीयांचे अव्याहत शोषण करण्याची प्रवृत्ती निर्माण झाली. त्यांनी तथाकथित निम्न जातीवर धार्मिक व मानसिक गुलामगिरी लादली होती. त्यामुळे कनिष्ठ जातींच्या ब्राह्मणविरोधी भावना वाढीस लागली.

**२) बहुजन ब्राह्मणेतर अपेक्षा :–**

भारतीय समाजव्यवस्थेत ब्राह्मणेतर समाजघटकाची सातत्याने उपेक्षा झाली. हा समाज संख्येने अधिक असूनही त्यांना येथील समाजव्यवस्थेत नगण्य स्थान होते तर केवळ साडेतीन टक्के ब्राह्मणांना सर्व प्रकारचे विशेषाधिकार, सवलती प्राप्त झाल्या होत्या. पेशवाईच्या काळात तर सरकारने त्यांना सर्व प्रकारच्या लाभाचे फायदे करून दिले. मात्र काळात बहुजन समाज सामाजिक अन्याय व विषमता यांचा बळी ठरला त्यामुळे बहुजन ब्राह्मणेतर प्रतिकाराची भावना मूळ धरू लागली.

**३) ब्राह्मणेतर जातीमधील जागृती :–**

भारतात ब्रिटिश सत्ता स्थापन झाल्यानंतर बहुजन समाजाला पाश्चात्य ज्ञान विज्ञानाची ओळख झाली. आधुनिक शिक्षणाची परिणती बहुजन ब्राह्मणेतर जाती-जमातीत वैचारिक जागृती होण्यात झाली. त्यामुळे ब्राह्मणी व्यवस्थेच्या प्रभुत्वाची त्यांना जाणीव होऊ लागली. या ब्राह्मणी प्रभुत्वाचे सामाजिक व धार्मिक वर्चस्व प्राबल्य झुगारून देण्यासाठी त्यांनी ब्राह्मणवर्गाविरुद्ध संघर्ष करण्याची तयारी चालविली.

**४) वेदोक्त प्रकरणातून निर्माण झालेली कटूता :–**

महाराष्ट्रात कोल्हापूर संस्थानात १९ व्या शतकाच्या अखेरीस वेदोक्त प्रकरण उदभवले. राजर्षी शाहू महाराज हे क्षत्रिय नसून शुद्र आहेत. त्यामुळे त्यांना वैदिक मंत्र विधिचा अधिकार नाही. केवळ पुराणोक्त मंत्रानुसार त्यांची धर्मकार्येकरता येतील अशी ब्राह्मण पुरोहित वेर्गाने भूमिका घेतली. या भूमिकेस कोल्हापुरातील काही कर्मठ ब्राह्मणांनी पाठिंबा दिला. त्यामुळे छत्रपती शाहू महाराजांविषयी नितांत आदर असणाऱ्या बहुजन समाजात संतापाची लाट उसळली. छत्रपतींनी संबंधित पुरोहित वर्गात आगपाखड केली. एवढेच नव्हे तर शाहू महाराजांविरुद्ध जोरदार अपप्रचार करण्यास सुरुवात केली. ब्राह्मण वर्गाची बाजू टिळकांस अनेक ब्राह्मण पुढाऱ्यांनी उचलून धरली आणि महाराजांविरुद्ध टीका सुरू केली. या वादामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर संबंधात कटुता निर्माण झाली. ब्राह्मण वर्गाचा धार्मिक अहंकार मोडून काढण्याची भाषा ब्राह्मणेतर नेते करू लागले.

**५) उच्चवर्णीयांचा समाजसुधारणेस विरोध :–**

राजर्षी शाहू महाराज ब्राह्मणेतर चळवळींचे आधारस्तंभ बनले होते. त्यांनी राबवलेल्या सामाजिक सुधारणांच्या कार्यक्रमाच्या वेळी सनातनी वृत्तीच्या ब्राह्मणांनी अनेक प्रकारे उपद्रव सुरू केला.तसेच त्यांनी समाज सुधारकांची सर्व प्रकारे निंदानालस्ती सुरू केली. सुसंस्कृतपणाच्या सर्व

मर्यादांचे उल्लंघन करून अत्यंत अर्वाच्य भाषेत सुधारकांवर टीका करण्यात येऊ लागली. उच्चवर्णीयांच्या अशा बेताल वर्तनाला विरोध करण्यासाठी संघर्षाच्या मार्गाचा अवलंब केल्याशिवाय आपल्याला सामाजिक न्याय व प्रतिष्ठा मिळणार नाही अशी धारणा ब्राह्मणेतर नेत्यांची झाली होती.

**६) शाहू महाराजांचे नेतृत्त्व :-**

शाहू महाराजांना ब्राह्मण वर्गाच्या अहंकारी वृत्तीचा आणि वर्णश्रेष्ठत्वाचा कटू अनुभव आला होता. वेदोक्त प्रकरणात स्वतः शाहू महाराजांना त्यांच्या दरबारातील ब्राह्मणांनी त्यांनाच शूद्र ठरविले होते. तसेच महाराजांनी बहुजन व दलितोद्धारसाठी हाती घेतलेल्या कार्यक्रमांना ब्राह्मणांनी विरोध चालविला होता. त्यामुळे हा विरोध मोडून काढण्यासाठी बहुजन आणि इ.स. १९११ मध्ये कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची पुनर्स्थापना केली. शाहू महाराजांनी बहुजन समाजातील लेखक, समाजसुधारक, पुढारी अशा सर्वांना सर्व प्रकारची/तऱ्हेची मदत सुरू केली. एवढेच नव्हेतर ब्राह्मणेतरांना आपल्या संस्थानात पन्नास टक्के आरक्षण ठेवले; त्यामुळे सनातनी ब्राह्मणांची झोपच उडाली. राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतरांत आत्मप्रतिष्ठेसाठी स्वाभिमानासाठी संघर्ष करण्याची ईर्षा निर्माण केली.

**७) भारतमंत्र्यांची राजकीय घोषणा:-**

भारतमंत्री एडविन मॉंटेग्यू यांनी 'हाऊस ऑफ कॉमन्स' मध्ये २० ऑगस्ट १९१७ रोजी हिंदुस्थान विषयक इंग्लंडसरकारचे भावी धोरण कसे असेल यासंदर्भात घोषणा केली की, ''----- हिंदुस्थानला क्रमाक्रमाने जबाबदार शासनपद्धती देणे हे आमचे उद्दिष्ट राहील.'' त्यामुळे ब्राह्मणेतर नेते आपल्या राजकीय हक्कासाठी जागृत झाले. लोकनियुक्त सदस्यांची संख्या वाढणार आणि त्यांच्या हाती मर्यादित स्वरूपात का होईना हक्क दिले जाणार हे स्पष्ट झाले. सरकारच्या या धोरणामुळे ब्राह्मणेतर नेत्यांची राजकीय आकांक्षा जागी होऊन त्यांनाही सत्तेत भागीदारी मिळावी असे वाटू लागले. राजकीय सत्तेच्या माध्यमातून ब्राह्मणेतरांच्या हितसंबंधाचे रक्षण करता येईल, असे त्यांना वाटू लागले.

राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्याच्या आकांक्षेतून ब्राह्मणेतर नेत्यांनी बहुजनांना संघटित करण्यासाठी ब्राह्मणेतर चळवळींचा उपयोग केला आणि त्यातून ब्राह्मण-ब्राह्मणेतरवाद अधिकच पेटला.

## ब्राह्मणेतर चळवळीची कार्ये ( इ.स. १९१७ ते इ.स. १९३८ )

छत्रपती शाहू महाराजांनी बहुजनांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी इ.स. १९१६ मध्ये निपाणी येथे डेक्कन रयत संस्थेची स्थापना केली. या संघटनेने ब्राह्मणेतरांना राजकीय हक्कांची जाणीव करून देण्याचे महत्त्वपुर्ण कार्य केले तथापि इ.स. १९१९ मध्ये सुधारणा कायदा पास झाला. त्यानंतर खऱ्या अर्थाने ब्राह्मणेतर चळवळीला गती आली.

**१) पटेल बिल:-**

दि. ५ सप्टेंबर १९१८ राजी विठ्ठल भाई पटेल यांनी केंद्रीय कायदेमंडळात एक बिल मांडले. ते पटेल बिल म्हणून ओळखले जाते. हिंदूंतील आंतरजातीय विवाहांना कायदेशीर मान्यता देण्यासंबंधीचे हे बिल होते. कोल्हापूर संस्थानच्या हद्दीत केलेला कोणताही आंतरजातीय विवाह कायद्याच्या दृष्टीने वैध समजलाच जाईल अशी राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी कायद्यात तरतूद केली होती. असाच कायदा खालसा झालेल्या प्रदेशातील हिंदू प्रजेला लागू करावा या हेतूने विठ्ठल भाई पटेल यांनी हे बिल आणले होते.

या बिलाला ब्राह्मणेतर चळवळीतील सर्वांनीच पाठिंबा दिला. मात्र केसरी व इतर समविचारी गटाने विरोध केला. टिळकांनी केसरीच्या अग्रलेखात असे नोंदविले की, '' जे हिंदुधर्म शास्त्रसंमत नाही ते कायदेशीर ठरविण्याचा अव्यापारेषु व्यापार विठ्ठलभाईंनी करू नये------- हिंदू म्हणविणाऱ्यांनी विवाहादी संस्कार हिंदूधर्मशास्त्राप्रमाणे म्हणजे जातीतच केले पाहिजेत. नाहीतर ते हिंदू कसले.'' टिळकानुयायी शिवराम परांजपे, जर्नादन करंदीकर, सीताराम केशव दामले इत्यादींनी पटेल बिलाच्या निषेधार्थ एक निषेधसभा पुण्यात किर्लोस्कर नाट्यगृहात भरविली. या सभेचे अध्यक्ष होते डॉ. कुर्तकोटी. या सभेला उत्तर म्हणून ब्राह्मणेतरांनी २० डिसेंबर १९१८ रोजी याच नाट्यगृहात सभा बोलाविली. मात्र ही सभा परांजपे, पळसुले इत्यादींनी उधळून लावली. दिनकरराव जवळकरांनी पटेल बिलाचे समर्थन करणारे 'प्रणय प्रभाव' हे नाटक लिहिले. तथापि त्यातील संवादामुळे जाती-जातीतील वैमनस्य वाढेल असा आक्षेप घेतला गेल्यामुळे सरकारने या नाटक प्रयोगावर बंदी घातली.

**२) टिळकांच्या मानपत्राचा प्रश्न :–**

चिरोल खटल्याच्या निमित्ताने इंग्लंडला गेलेले टिळक ७ डिसेंबर १९१९ रोजी परतले, तेव्हा त्यांच्या चाहत्यांनी पुणेकरांच्या वतीने मानपत्र देण्याचा कार्यक्रम ठरविला होता. मात्र समस्त पुणेकरांच्या वतीने असे मानपत्र देण्यास रँग्लर परांजपे, आर. आर. काळे, देवधर, जेधे-जवळकर, केशवराव बगाडे, शिवराम जानबा कांबळे इत्यादींचा तीव्र विरोध होता. महर्षी शिंदे यांनी विरोध करताना असे म्हटले होते की, '' सामाजिक बाबतीत रा. टिळकांचे धोरण समतेच्या व स्वयंनिर्णयाच्या तत्त्वास विघातक असल्याकारणाने ----- ते माझ्या मते खरे राष्ट्रीय पुढारी नाहीत.'' अशा प्रकारे ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनी आपला विरोध नोंदविला असला तरी टिळकांना मानपत्र देण्यात आले तथापि हरि पिराजी धाईगुडे या युवकाने सभेतच आपली नाराजी उघडपणे प्रगट केली.

**३) प्राथमिक शिक्षण मोफत देण्याचा वादः–**

पुणे म्युन्सिपालटीने मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करावे अशी मागणी ब्राह्मणेतर चळवळीतील नेते जेधे-जवळकर व श्रीपतराव शिंदे करीत होते. मात्र पुरेशा पैशाअभावी तूर्त मुलांनाच केवळ मोफत शिक्षण देता येईल असे टिळकांसह त्यांच्या अनुयांचे मत होते. खर्चाचे कारण पुढे करून स्त्रियांना शिक्षण नाकारणे अयोग्य आहे असे रँग्लर परांजपेसारख्यांना वाटत होते. महर्षी शिंदे यांनी रमाबाई रानडे यांच्या नेतृत्वाखाली दोन हजार स्त्रियांच्या मोर्चाचे पुण्यात आयोजन केले. किर्लोस्कर नाट्यगृहात १४ वर्षाखालील मुला-मुलींची एक सभाही भरविली. त्यात महर्षी शिंदे यांनी स्त्रियांच्या मोफत शिक्षणाची बाजू उचलून धरली. ८ फेब्रुवारी १९२० रोजी टिळकनुयायांनी किर्लोस्कर नाट्यगृहातच सर्वपक्षीय सभा घेतली. त्यात केळकरांनी मांडलेल्या ठरावाला त्यांची कन्या कमलाबाई यांनी विरोध केला. याच सभेत टिळक बोलण्यास उभे राहिले असता ब्राह्मणेतर युवकांनी सभेत गोंधळ घातला. त्यामुळे टिळकांना भाषण सोडून द्यावे लागले.

**४) शिवाजी मेमोरियल्सची कल्पना :–**

ग्वाल्हेरचे पवार व बडोद्याचे जाधव या दोन्ही खासेसाहेबांनी 'छत्रपती शिवाजी मेमोरियल' स्थापन करावे अशी कल्पना मांडली.( इ.स. १९१७); त्यावेळी राजर्षी शाहू महाराजांनी गव्हर्नरची भेट घेऊन शिवाजी मेमोरियलच्या समारंभासाठी प्रिन्स ऑफ वेल्सला निमंत्रित करावे अशी इच्छा व्यक्त केली. मात्र गर्व्हनरने या कल्पनेला नकार देताना म्हटले ,'' जोपर्यंत एखाद्या विशिष्ट जातीसाठी हे स्मारक असेल तर त्याला प्रिन्स ऑफ वेल्स येणार नाहीत.'' तेव्हा राजर्षींची जी कल्पना

होती की, शिवस्मारक केवळ मराठा जातीमार्फतच बांधावे .'' शाहू महाराजांनी ती कल्पना सोडून दिली तेव्हा पुढे प्रिन्स ऑफ बिटनच्या हस्ते पायाभरणी समारंभ झाला.

इ.स. १९२२ मध्ये राजर्षी शाहू महाराजांचे निधन झाले. त्यानंतर या मेमोरियल्सची सर्व सूत्रे ग्वाल्हेरकर शिंदेंकडे गेली. त्यांनी स्मारकाची व्याप्ती वाढवली. समितीची पुनर्रचना केली व त्यामध्ये सर्व जातींचे प्रतिनिधी घेतले. गोपाळराव देवधर व सांगली संस्थानचे अधिपती चिंतामणराव पटवर्धन यांनाही या समितीवर घेतले. त्यामुळे स्वाभाविकच पुन्हा वादाला सुरुवात झाली. कारण ब्राह्मणांना समितीत प्रतिनिधित्व देणे हे राजर्षी शाहू महाराजांच्या धोरणाशी विसंगत होते. याच मुद्यावर पुढे ब्राह्मणेतर चळवळीत अर्थात पक्षात फूट पडली.

**५) गणेशोत्सवातील छत्रपती मेळा :-**

टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. त्यात विविध गुणदर्शनासाठी मेळे होत असत. अशी मेळ्यातील गाण्यातून स्वतःच्या विचारधारेचा प्रचार केला जात असे. पुण्यात असे अनेक मेळे होते., सन्मित्र समाज मेळा, रणसंग्राम मेळा, बाल संगीत मेळा, स्वातंत्र्य मेळा, इत्यादी महत्त्वाचे मेळे होते. ब्राह्मणेतर नेते जेधे-जवळकर यांनी इ.स. १९२२ मध्ये 'छत्रपती मेळा' संघटित केला. मात्र यावर सत्यशोधक छाप होती; त्यामुळे तो मेळा आक्रमक होता. '' जवळकरांनी लिहिलेल्या पदात टिळकांसह रामदास, नाना फडणीस, राघोबादादा वगैरे ब्राह्मणांची भंगड, गांजेकस, बाईल्या, दीडशहाणा अशा शब्दांनी संभावना केलेली असे. तर टिळकपंथीयांच्या मेळ्यातील पदात समाजसुधारक, मवाळनेते शिक्षित स्त्रिया यांची यथेच्छ टिंगलटवाळी असे'' गेल आव्हेट यांना एका ब्राह्मण उदारमतवाद्याचे मत उद्धृत केले आहे. इ.स. १९२५ पर्यंत उत्सवाचे आठ दिवस जणू सत्यशोधक समाजाचे राज्य पुण्यावर चालू असे---- गायकवाड वाड्यासमोर अर्थात टिळकांच्या निवासस्थानासमोर रोज रात्री मारामाऱ्या होऊ लागल्या होत्या. आणि इ.स. १९२५ ते १९२७ या काळात उत्सव शांततापूर्ण पार पाडण्याकरिता पोलिसांचा कडक बंदोबस्त ठेवावा लागत असे. ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर उभयपक्षी पोवाडे तयार करणे, गाणी तयार करणे, त्यामधून ब्राह्मण-ब्राह्मणेतर समाजाने परस्परांवर टीका सुरू केली.

**६) महात्मा फुले पुतळा वादः-**

ब्राह्मणेतर नेते केशवराव जेधे यांनी आपल्यासह नऊ सदस्यांचा एक अर्ज पुणे नगरपालिकेच्या नगराध्यक्षांकडे पाठवून महात्मा जोतीराव फुले यांचा पुतळा सार्वजनिक ठिकाणी उभारण्याविषयी मागणी केली. १९२४ च्या जुलै महिन्यात लो. टिळकांच्या पुतळ्याचे अनावरण पंडित नेहरूंनी केले तर सप्टेंबर महिन्यात विष्णुशास्त्री चिपळूनकरांचाही पुतळा बसविण्यात आला. त्याचे अनावरण म. गांधीजींनी केले; त्यामुळे महात्मा जोतीराव फुले यांच्या कर्मभूमीत त्यांचाही पुतळा असावा या उद्देशाने केशवराव जेधेंनी ४ सप्टेंबर १९२५ रोजी एक ठराव मांडला. मात्र टिळकनुयायांनी या कल्पनेला कडाडून विरोध केला. '' भालाकार'' भोपटकरांनी अशी टीका केली की, 'फुलेंच्या पुतळ्यासाठी कोल्हापूर योग्य जागा आहे. पुणे नाही.' मजूरपत्रातून दिनकरराव जवळकरांनीही प्रतिपक्षावर अपशब्दांचा वर्षाव केला. टिळकांचे अनुयायी गणपत नलावडे 'संग्राम' पत्रातून शिवराळ भाषेत लेख लिहीत. अशा प्रकारे महात्मा फुले यांचा पुतळा उभारण्याच्या प्रकरणातून ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद वाढला.

### ७) 'देशाचे दुश्मन' या ग्रंथावर खटलाः-

इ.स. १९२५ मध्ये दिनकरराव जवळकरांनी 'देशाचे दुश्मन' हा ग्रंथ लिहिला त्या ग्रंथाचा आशय टिळक व चिपळूणकर या उभयतांना देशाचे शत्रू संबोधणारा होता. चिपळूणकरांच्या संदर्भात जी भाषा जवळकरांनी वापरली ती जळजळीत/ जहाल होती. फडके असे लिहितात की, जवळकरांची शब्द कळा ही प्रबोधनकार ठाकऱ्यांच्या शब्दकळेसारखी तिखटजाळ आणि वाचताना प्रतिपक्षीयांना ठसका लागावा अशी झणझणीत होती. १७ सप्टेंबर १९२५ रोजी या ग्रंथाच्या निषेधासाठी टिळकानुयायांनी शिवाजी मंदिरात जाहीर सभा घेतली. त्यानंतर जेधे, जवळकर, बगाडे आणि लाड यांच्यावर खटले दाखल करण्यात आले. त्यांच्यावर विष्णुशास्त्री चिपळूणकरांची बदनामी केली असा आरोप करण्यात आला होता. खटला चालू असताना सरदार वावडेकर यांच्या द्वारकाबाई या मुलीवर हरि नारायण धनवडे या मराठा युवकाने हल्ला केला तर शाळेतून परतणाऱ्या ब्राह्मण कुमारिकेवर एका मराठा युवकाने भर दिवसा हात टाकला. या सर्व घटनांचा संबंध ब्राह्मणेतरांनी चालविलेल्या चळवळींशी जोडण्यात आला.

दि. १५ सप्टेंबर १९२६ रोजी फ्लेमिंग साहेबांनी 'देशाचे दुश्मन' या ग्रंथांतील नऊ उतारे आक्षेपार्ह ठरविले आणि लेखक जवळकर, मुद्रक लाड यांना आरोपी ठरवून त्यांना एक वर्षाची साधी कैदेची शिक्षा ठोठाण्यात आली. तर प्रस्तावना लिहिणारे केशव बगाडे आणि प्रकाश केशवराव जेधे यांना सहा महिन्यांची कैदेची शिक्षा फर्मावण्यात आली. तथापि, या निकालाविरुद्ध सत्र न्यायाधीशाकडे अपील करण्यात आले. डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांनी वकिलपत्र घेतले होते. त्यांनी या खटल्यातील काही उणिवा दाखवून दिल्या आणि जेधे-जवळकरांची बाजू ठासून मांडली. त्यामुळे जे. डी. लॉरेन्स या सेशन जज्जने सर्वांना दोषमुक्त केले. इतकेच नव्हे तर दंडाची रक्कमही परत करण्याचा आदेश दिला. त्यामुळे ब्राह्मण-ब्राह्मणेतर यांच्यातील दुरावा वाढतच गेला.

### ८) मराठा जातीसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी :-

मराठा जातीसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी करण्यात आली. ही मागणी करण्यात केशवराव जेधे, भास्करराव जाधव, श्रीपतराव शिंदे इत्यादींनी पुढाकार घेतला. इ.स. १९१७ मध्ये खामगाव येथे दिलेल्या भाषणात राजर्षी शाहू महाराजांनी विधिमंडळात जातवार प्रतिनिधी पाठविण्याचे समर्थन केले होते. त्यासंदर्भात त्यांचे असे म्हणणे होते, '' स्वराज्याचे रूपांतर विशिष्ट सत्तेत होऊ नये म्हणून सर्व जातींना दहा वर्षे तरी प्रतिनिधी पाठवता आले पाहिजे. त्या योगाने आमचे हक्क आम्हास समजू लागतील आणि एकदा तसे झाले म्हणजे जातवार प्रतिनिधींची जरुरी राहणार नाही.सतंग मतदार संघामुळे असोसिशनने असे प्रतिपादन केले की, '' स्वतंत्र मतदारसंघामुळेच जनतेला संरक्षण मिळेल, नाही तर ब्राह्मणी वर्चस्व व सत्ता यामुळे त्यांचेच-एकतर ब्राह्मण किंवा आवश्यक पडल्यास सनातनी ब्राह्मण वृत्तीचा ब्राह्मणेतर उमेदवार निवडून आणतील.'' मराठ्यांसाठी स्वतंत्र मतदारसंघ मिळविण्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी भास्करराव जाधव यांना इंग्लंडला पाठविले होते. मराठा कुणबी या लोकसंख्येच्या दृष्टीने मोठ्या असलेल्या गटासाठी स्वतंत्र मतदार संघ ठेवण्याची मागणी ब्रिटिशांनी फेटाळली होती. तसेच मराठयांच्या या मागणीला टिळकांसह त्यांच्या अनुयायांनी कडाडून विरोध केला होता.

### ९) अल्पभूधारणा विधेयकांस विरोधः-

इ.स. १९२७ मध्ये गृहमंत्री सर चुनिलाल मेहता यांनी अल्पभूधारणेसंबंधी एक विधेयक आणि

शेतसारा वाढीबद्दल दुसरे विधेयक विधिमंडळात आणले होते. ही दोन्ही विधेयके शेतकऱ्यांच्या हिताची नसल्याचे वाटल्यामुळे केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली विरोध करायला सुरुवात झाली होती. २५ जुलै १९२८ रोजी पुण्याच्या र मार्केटमध्ये बॉम्बे प्रिसिडन्सी रिजंट कॉन्फरन्सला पाच हजार शेतकरी उपस्थित होते. सरकारकडे या विधेयकांच्या विरुद्ध साठ हजार शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन पाठविण्यात येऊन त्यास विरोध दर्शविण्यात आला; त्यामुळे सदर विधेयके मागे घेण्यात आली.

**१०) शारदा विधेयकास पाठिंबा :-**

महात्मा जोतीराव फुले यांनी ब्राह्मणेतर चळवळीचे बीजारोपण केले. त्यांनी बालविवाहास कडाडून विरोध केला होता आणि घालणारे शारदा विधेयक केंद्रीय विधि मंडळासमोर मांडण्यात आले होते. त्यावेळी टिळकपंथीयांनी विरोध केला. टिळकपंथीयांत अणे, मुंजे, खापर्डे, केळकर इत्यादी होते. त्यावेळी ब्राह्मणेतर चळवळीच्या नेत्यांनी, कार्यकर्त्यांनी या विधेयकास जोरदार पाठिंबा दिला. शेवटी हे विधेयक पारित झाले. तथापि, ब्राह्मणेतरांतील बालविवाह बंद झाले नाहीत.

**११) जोशी वतन विधेयक :-**

दि. १९ मार्च १९२६ रोजी के.सी.बोले यांनी मांडलेले एक विधेयक मोठे खळबळजनक ठरले होते. त्या बिलात ग्रामजोशांना संस्कार करावयास बोलावले नाही तर त्यांना दक्षिणा मागण्याचा हक्क राहू नये अशी तरतूद करण्यात आली होती. १९ मार्च १९२६ रोजी या प्रस्तावाचे प्रथम वाचन झाले. बोले यांनी जोशीवृत्तीवर कडाडून हल्ला चढविला. ‘ जोशींची वतने म्हणजे न्याय आणि समता या तत्त्वांना फासलेला हरताळ आहे’ असा त्यांच्या भाषणाचा आशय होता. पूजाअर्चा, लग्नादी कार्येपार पाडण्यासाठी ग्रामजोशास दक्षिणा देण्याची शतकानुशतके प्रथा पाळली जात असे. महात्मा जोतीराव फुले यांनी आपल्या ‘तृतीयरत्न’ नाटकात भटभिक्षूकांसारख्या मध्यस्थांच्या मदतीखेरीज धार्मिक विधी करण्याचा हक्क आहे अशी भूमिका घेतली होती. कोलकाता, अलाहाबाद आणि पंजाब येथील न्यायाधिशांनी या पुरोहितवर्गाचा वतनाचा हक्क बेकायदेशीर ठरवला होता. चेन्नई येथील कोर्टाने तर स्पष्ट शब्दात जोशीवतने बेकायदेशीर ठरविली होती. शेवटी के.सी. बोले यांचा प्रस्ताव ३ ऑगस्ट १९२६ रोजी पारित झाला.

**१२) लो. टिळक पुत्र श्रीधरपंत व ब्राह्मणेतर चळवळ:-**

टिळक आयुष्यभर आपल्या प्रतिगामी धोरणाशी चिकटून होते. मात्र त्यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र श्रीधरपंत ब्राह्मणेतर चळवळीत इ.स. १९२५ ते १९२८ या कालावधीत वावरताना दिसतात. मुंबईत महात्मा फुले जन्मशताब्दी महोत्सवी वर्षात झालेले कार्यक्रम गाजले होते. त्यावेळी श्रीधरपंतांनी गिरगाव व परळ येथील तालचेरकर वाडीत भाषणे दिली. त्यांचे महत्त्व नोंदविताना ‘जागृती’कार लिहितात. ‘‘ ‘‘बाबुराव फुल्यांचा जन्म महात्मा जोतीबांच्या कुळात झाला. परंतु जोतीबाच्या कार्याचे रहस्य त्यांना समजले नाही. उलटपक्षी श्रीधरपंत चिपळूणकर-टिळक संप्रदायाच्या वातावरणात जन्मले व वाढले, परंतु त्यांना जोतीबाच्या कार्याचे रहस्य ओळखले.’’ पुणे येथे समाज संघाची शाखा स्थापन करून श्रीधरपंतांनी सहभोजन कार्यक्रम घडवून आणले. लो. टिळकांच्या हयातीत श्रीधरपंतांनी राजकीय सुधारणेबरोबरच सामाजिक व धार्मिक सुधारणा केल्या पाहिजेत हे आपले मत मांडले होते. श्रीधरपंतांनी ब्राह्मण-ब्राह्मणेतर तसेच दलितांमधील दुरावा कमी करण्याचा प्रयत्न केला. एवढेच नव्हे त्यांच्यातील दुरावा नष्ट करून सामाजिक जीवनातील तटबंधांना खिंडार पाडणारा एक नवा प्रवाह

निर्माण झाला. असल्याचे मत श्री. य. दि. फडके यांनी नोंदविले.

**ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना**

ब्राह्मणेतर चळवळीतील एक महत्त्वपूर्ण घटना म्हणून ब्राह्मणेतर पक्षाच्या स्थापनेचा उल्लेख करावा लागेल. दि. १२ डिसेंबर १९२० रोजी पुणे येथे जेधे मॅन्शनमध्ये बैठक झाली. त्या बैठकीत ब्राह्मणेतर पक्ष ( ब्राह्मणेतर लीग) या नावाने एक राजकीय पक्षाची स्थापना झाली. भास्करराव जाधव, जेधे बंधू, जवळकर, धनजी शहा कपूर, आनंद स्वामी, गंगाजी काळभोर,आनंदराव जगताप, बाबूराव जगताप, वालचंद कोठारी इत्यादींनी या पक्षाच्या स्थापनेत पुढाकार घेतला.

**ब्राह्मणेतर पक्षाच्या स्थापनेमागील उद्दिष्टे पुढीलप्रमाणेः–**

१) ब्राह्मणेतरांची ब्राह्मणांच्या सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक दास्यातून मुक्तता करणे .

२) ब्राह्मणेतरांतील सर्वजातींमध्ये जागृती घडवून आणणे आणि एकमेकांत बंधुभाव, सलोख्याची जाणीव निर्माण करणे.

३) ब्राह्मणेतरांना सरकारी नोकऱ्यांमध्ये हक्क प्राप्त करून देणे आणि प्रतिनिधी संस्थांत योग्य तो मिळवून देणे.

ब्राह्मणेतर पक्षाची कार्यकारिणी दर तीन वर्षांनी निवडली जाईल असे पक्षाच्या घटना व नियमावलीत स्पष्ट केले होते. द. भारतातील 'जस्टीस पार्टी' स्थापनेशी ब्राह्मणेतर पक्षाने सहकार्य केले. मात्र त्यास राष्ट्रीय पातळीवर नेता आले नाही.

**(अ) ब्राह्मणेतर पक्षाची कामगिरी :–**

इ.स. १९२३ निवडणुका झाल्या. त्यानंतर ब्राह्मणेतर मुसलमान प्रतिनिधींनी आपले सरकार बनविले कारण त्यावेळी काँग्रेसने असहयोग पुकारला होता. यावेळी १३ सदस्य हे ब्राह्मणेतर पक्षाचे होते. पुढे १९२६ मध्ये झालेल्या निवडणुकीत बारा जागा मिळाल्या मात्र त्यावेळी नेतृत्वाच्या मुद्यावरून वाद झाला. त्यामुळे या पक्षास एकही जागा मंत्रिमंडळात मिळाली नाही. तथापि पुढे इ.स. १९२८ मध्ये भास्कररावांची शिक्षणमंत्री नेते मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलमध्ये होते. त्यांनी ब्राह्मणेतरांच्या प्रगतीसाठी इतरांच्या साहाय्याने मुंबई विधिमंडळात ठराव मांडले होते.

**(ब) ब्राह्मणेतर पक्ष आणि अस्पृश्यता निवारणः–**

इ.स. १९१७ मध्ये कोल्हापूर संस्थानात आणि इ.स. १९२० मध्ये नागपूर येथे राजर्षी शाहू महाराजांनी अखिल भारतीय बहिष्कृत समाज परिषद भरविली होती. त्यात दोन्ही ठिकाणी अस्पृश्यतेवर आवेशपूर्ण हल्ले चढविण्यात आले. मात्र १९२० च्या नंतर महात्मा जोतीरावांनी अंगीकारलेल्या समतेच्या मूळ भूमिकेपासून कार्यकर्ते दूर जाऊ लागले अस्पृश्यांवरील सामाजिक विषमतेसंदर्भात मौनच धारण केले जाऊ लागले. माधवराव बागल या ब्राह्मणेतर तालुक्यात दौरा काढीत आहात त्याबद्दल आम्हाला फार आनंद वाटतो; पण तुम्ही अस्पृश्यतेवर जर बोलू लागला तर तुम्हाला पुढे काम करणे जड जाईल. तरी तेवढा विषय सोडून बोलावे अशी आमची विनंतीपुढे बोलायांनी एक ठराव मांडला होता. त्या ठरावावर स्पृश्यांची मने दुखावली जातील अशी ब्राम्हणेतरांनी प्रतिक्रिया दिली होती. ११ सप्टेंबर १९३४ रोजी रघुनाथ बखले यांनी अस्पृश्यता निवारण बिल मांडले होते. त्यावेळी ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीच तीव्र विरोध केला होता. या बिलावर भाष्य करताना पंढरपूर येथील बाळासाहेब मोरे म्हणाले की, '' हे बिल मंजूर झाल्यावर खेड्यात शांतताभंग होईल.

खेड्यातील सर्व लोकांचे विरोधामुळे हे बिल पास करू नये असे माझे मत आहे. तर रा. ब. भाऊसाहेब चितळे म्हणाले की, खेड्यातील लोकांचे जीवन लक्षात घेतल्यास हे बिल अत्यंत खोडसाळ असून ते पास होऊ देता कामा नये. खेड्यातील सलोख्याच्या संबंधात असल्या कायद्याने बिघाड येईल. या बिलाने डोकी फुटण्याचे प्रसंग येतील. यावरून असे सिद्ध होते की, ब्राह्मणेतर पक्षाची अस्पृश्यतेसंबंधीची भूमिका स्पष्ट नव्हती. पुढे तर ब्राह्मण-ब्राह्मणेतरांनी एकत्रितपणे अस्पृश्यता निवारण बिलाला विरोध केला. ब्राह्मणांकडून ब्राह्मणेतर पुढारी सामाजिक समतेची अपेक्षा बाळगत होते. मात्र तीच अपेक्षा निम्नस्तरातील लोकांनी बाळगणे ब्राह्मणेतरांना रुचत होते. समताधिष्ठित विचार धारेपासून फटकून राहण्याच्या भूमिकेमुळे इ.स. १९२० नंतर ब्राह्मणेतर पक्ष कमजोर होत जाऊन पुढे त्यात फूट पडली.

**(क)ब्राह्मणेतर पक्ष काँग्रेसमध्ये विलीन :-**

३ मे १९३६ मध्ये ॲडव्होकेट दौड आणि ॲडव्होकेट सावंत यांनी मुंबई इलाखा शेतकरी पक्षाची स्थापना केली. तर 'नागरिक शेतकरी पक्षाची स्थापना कपूर व नवले यांनी केली. इ.स. १९३० च्या नंतर ब्राह्मणेतर पक्षनेते व कार्यकर्ते काँग्रेसमध्ये जाऊ लागले. महात्मा गांधींचा त्यांच्यावर मोठा प्रभाव पडला होता. इ.स. १९३८ मध्ये नागपूरच्या ब्राह्मणेतर पक्षाच्या अधिवेशनात काँग्रेस प्रवेशासंदर्भात विचार करण्यात आला. यावेळी केशवराव जेधे यांनी असे आवाहन केले बहुजन समाजात जी जागृती झाली. त्यामुळे १९३० ते १९३४ सालच्या सत्याग्रहाच्या चळवळीत महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर जनता मोठ्या प्रमाणावर काँग्रेसमध्ये आली. महात्मा गांधी राजकारणात आल्यापासून सत्यशोधक समाजाच्या चळवळीच्या मागे जो कार्यक्रम होता म्हणजे सामाजिक समतेची प्रस्थापना करणे तो काँग्रेसने स्वीकारला; त्यामुळे ब्राह्मणेतर जनतेला प्रस्थापन करणे, काँग्रेसपासून अलिप्त राहण्यासारखे काहीही कारण राहिले नाही ---- म्हणून तुम्ही सर्वजन काँग्रेसमध्ये सहभागी व्हा. ब्राह्मणेतर कार्यकर्ते व नेते यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे पुढील काळात कामे लादली व दिशाही बदलली.

**राजर्षी शाहू महाराजांचे ब्राह्मणेतर चळवळीला योगदान :-**

राजर्षी शाहू महाराज (२६ जून १८७४ ते ६ मे १९२२) यांचा लोककल्याणकारी राजा म्हणून गौरव होता. ते यथोचित आहे. त्यांनी आपल्या कारकिर्दीत राजकीय, सामाजिक व शैक्षणिक चळवळीचे नेतृत्व बहुजन समाजाकडे खेचून आणण्यात मोठे योगदान दिलेले आहे. महाराष्ट्रात ब्राह्मणेतर समाजाने आपल्या राजकीय हक्कांसाठी चळवळ उभारलेली होती. त्या चळवळीचे बहुतेक पुढारी शाहू महाराजांचे अनुयायी होते. शाहू महाराजांकडून अशा प्रकारची चळवळ सुरू करावी यासाठी प्रेरणा मिळाली होती. शाहू महाराजांचे अनुयायांना प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि प्रसंगी अर्थसाहाय्यही होत होते. अनुयायी नसणारे शाहू महाराजांच्या शब्दाबाहेर जाणारे नव्हते त्यासाठी ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व करण्यात एक संस्थानिक या नात्याने त्यांच्यावर मर्यादा होत्या तथापि, या मर्यादा सांभाळून, ब्रिटिश प्रांतातील राजकीय आंदोलनात संस्थानिकांनी सहभागी होणे काहीच गैर नाही. असे शाहू महाराजांचे म्हणणे होते. ते म्हणतात की, " आमच्या रयतेशी आमचा राजेपणाचा संबंध असता, तरी आम्ही ब्रिटिश साम्राज्याचे प्रजानन असल्याने, त्याबाबतीत आमचे व ब्रिटिश अमलातील प्रजेचे हक्क व जबाबदाऱ्या जवळजवळ सारख्या आहेत व याकरिता राजे लोकांनी ब्रिटिश इंडियाच्या राजकारणात पडणे अगत्याचे आहे. असे मत आहे." ( राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, डॉ. जयसिंगराव पवार, पृ १२० ) तथानि, वुड हाऊस, फ्रेझर यासारख्या ब्रिटिश

अधिकाऱ्यांना शाहू महाराजांचे हे मत मान्य नव्हते. सुरुवातीला मुंबई सरकार यासंबंधी मौन बाळगून होते. मात्र १९२० च्या ऑक्टोबर महिन्यात पुणे येथील शाहू महाराजांच्या सभेत विरोधकांनी दंगल केली. त्यानंतर मात्र सरकार त्यांना ब्राह्मणेतरांच्या राजकीय सभांना जाण्यास प्रतिबंध करू लागले.

राजर्षी शाहू महाराजांना ब्राह्मणेतर समाजहितरक्षणाची अंतःकरणातील उर्मी त्यांना अस्वस्थ करत होती. त्यांना प्रत्यक्ष अप्रत्यक्षपणे सातत्याने चार पाच वर्षे या ब्राह्मणेतर चळवळीची सूत्रे आपल्या हाती येऊन आपले योगदान दिले. भारतमंत्री लॉर्ड माँटेग्यू यांनी ब्रिटिश पार्लमेंटमध्ये १९१७ च्या ऑगस्ट महिन्यात, हिंदुस्थानच्या राजकीय सुधारणांची ऐतिहासिक घोषणा केली. त्या घोषणेसंबंधी भारतीय नेत्यांशी चर्चा करण्यासाठी माँटग्यू हिंदुस्थानच्या भेटीवर आले त्यावेळी अर्थात १९१७ च्या नोव्हेंबर महिन्यात शाहू महाराजांनी त्यांची भेट घेतली आणि अस्पृश्यांसह सर्व ब्राह्मणेतरांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले पाहिजेत, अशी त्यांनी मागणी केली होती.

राजर्षी शाहू महाराजांनी पुढील सुधारणा -कायद्यात मागासवर्गीयांसाठी स्वतंत्र जातिनिहाय मतदार का असावेत, या संदर्भातील आपली भूमिका त्यांनी अनेक सभांद्वारे तसेच वरिष्ठ ब्रिटिश अधिकाऱ्यांशी केलेल्या पत्रव्यवहाराद्वारे स्पष्ट केलेली आहे. खामगाव येथे सभेत त्यांनी म्हटले होते की, ''जर हल्लीची जातिव्यवस्थाच कायम राहिली, तर ज्या रीतीने हल्ली स्वराज्याचा अर्थ समजला जातो, ते स्वराज्य म्हणजे मूठभर लोकांच्या हाती सत्ता जाणे हे होय! याचा अर्थ मी स्वराज्याच्या चळवळीच्या विरुद्ध आहे, असे समजावयाचा नाही, हे मी पुन्हा एकवार सांगतो. आम्हाला स्वराज्य पाहिजेच. जातिभेदापासून होणारे अनिष्ट परिणाम नाहीसे होईपर्यंत, हल्लीच्या प्रसंगी आपणास ब्रिटिश सरकारचा आश्रय व मार्गदर्शन यांची जरुरी आहे. सत्ता केवळ अल्पसंख्याक उच्च वर्गीयांच्या हातात जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये, म्हणून निदान दहा वर्षांपर्यंत तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत, याचे आम्हाला शिक्षण मिळेल. एकवार ते आम्हाला समजले, म्हणजे जातवार प्रतिनिधीत्वाची जरुरी राहणार नाही ( राजर्षी शाहु छत्रपती जीवन व कार्ये, डॉ. जयसिंगराव पवार, पृ १२१)

राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर वृत्तपत्रांना दिलेले उत्तेजन, हे त्यांचे ब्राह्मणेतर चळवळीला दिलेले मोलाचे योगदान होते. वृत्तपत्रांच्या पाठिंब्यांखेरीज कोणत्याही चळवळीची व्याप्ती वाढ घेऊ शकत नाही हे वृत्तपत्रीय सामर्थ्य महाराज जाणून होते. वृत्तपत्रांच्या क्षेत्रात आतापर्यंत ब्राह्मण वर्गाची मक्तेदारी होती. आपले आणि ब्राह्मणेतर पक्षाचे समर्थन करणाऱ्या वृत्तपत्रांची अत्यंत आवश्यकता महाराजांना वाटत होती. इ.स. १९१७ पर्यंत केवळ 'दिनमित्र' हे मुकुंदराव पाटलांचे पत्रच ब्राह्मणेतरांची बाजू समर्थपणे मांडत होते. त्यानंतर मात्र ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रचारासाठी अनेक वृत्तपत्रे निघाली. त्यात जागरूक, जागृती, डेक्कन रयत (इंग्रजी), विश्वबंधू, भगवा झेंडा, तरुण मराठे, गरिबांचा कैवारी, विजयी मराठा, संजीवन, राष्ट्रवीर शिवछत्रपती, बाहिष्कृत भारत ( गणेश आकाजी गवई यांनी सुरू केलेले) मूकनायक अशी काही विशेष महत्त्वाची वृत्तपत्रे होती. या सर्व वृत्तपत्रांना शाहू महाराजांनी आपले नैतिक व अर्थिक पाठबळ दिले होते. काही वेळा या वृत्तपत्रांमध्ये आपापसांत वाद निर्माण होत. त्यावेळी महाराजांना मध्यस्थी करावी लागत असे आणि ते सोडवावेही लागत असे. कधी कधी तर ब्राह्मणेतर नेत्यांमध्ये निर्माण झालेले वादही त्यांना मिटवावे लागत होते.

शाहू महाराज आणि जस्टिस चळवळः- इ.स. १९१९ ते १९२१ या कालखंडात दक्षिण भारतातील डॉ. माधवन नायर सर शंकरन नायरूसीन टर्श, मुदलियार, सर नी. त्यागराज चेही

इत्यादी जस्टिस चळवळीच्या नेत्यांशी महाराजांचा घनिष्ठ संबंध आला होता. डॉ. नायर यांचा भारतातच नव्हे तर इंग्लडमध्येही हिंदुस्थानातील अखिल ब्राह्मणेतर आणि पददलित यांच्या हक्कांसाठी झगडणारा निर्भय नेता म्हणून लौकीक होता. त्यांना इंग्लंडमध्ये जाऊन तेथील जनमत व राज्यकार्यांचे ब्राह्मणेतरांच्या हितसंबंधाविषयी धोरण काही अंशी का होईना अनुकूल करण्यात त्यांचा मोठा वाटा होता. डॉ. नायर हे इंग्लंडहून परतल्यानंतर मुंबईत त्यांची शाहू महाराजांनी भेट घेतली आणि येऊ घातलेल्या सुधारणांतील ब्राह्मणेतरांच्या हितसंबंधाच्या संरक्षणासंदर्भात त्यांनी चर्चा केल्याची नोंद आहे.

राजर्षी शाहू महाराजांना जसे महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीचे अग्रणी मानले जाते तसे मद्रासकडे डॉ. नायर यांना मानले जात होते.

१९२० च्या जुलै महिन्यात कर्नाटक ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेच्या, हुबळी येथील अधिवेशनात जस्टिस चळवळीचे दुसरे मोठे नेते सर पी. त्यागराज चेट्टी यांच्याशी शाहू महाराजांची भेट झाली. त्यावेळी दोन्ही नेत्यांनी दक्षिण भारतातील ब्राह्मणेतर चळवळीच्या संदर्भात विचार विनिमय केला. पुढेही महाराज चेट्टी संपर्कात राहिले. शाहू महाराजांना जस्टिस चळवळीच्या नेत्यांविषयी असलेल्या आदरामुळेच त्यांना हुबळीच्या अधिवेशनात म्हटले की, '' ब्राह्मणेतरांची चळवळ यशस्वीपणे कशी चालवावी, हे आपणास मद्रासकडून शिकले पाहिजे.'' मुंबई इलाख्यातील ब्राह्मणेतर चळवळ आणि मद्रास इलाख्यातील जस्टिस चळवळ, या दोन्ही चळवळीची उद्दिष्टे समान असल्यामुळे, त्यांच्यात संपर्क व समन्वय साधला गेला असे दिसते.

**ब्राह्मणेतर चळवळीचे काही प्रमुख नेतेः–**

महाराष्ट्रात ब्राह्मणेतर चळवळीच्या काळात अनेकांनी योगदान दिलेले आहे. या चळवळीत राजर्षी शाहू महाराजापाठोपाठ बाबुराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे, भास्करराव जाधव, वालचंद कोठारी, अणासाहेब लठ्ठे, बाबुराव यादव, महादेवराव डोंगरे, श्रीपतराव शिंदे, केशवराव बागडे, कर्मवीर भाऊराव पाटील, बाळासाहेब मोरे, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, माधवराव बागल इत्यादींनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. तथापि, ब्राह्मणेतर चळवळीसाठी ज्यांनी भरीव योगदान दिले होते, अशा काही नेत्यांच्या जीवनकार्यासंबंधी विस्तृत चर्चा करणे संयुक्तिक ठरेल. असे असले तरी या चळवळीतील अन्य नेत्यांचे कार्य गौण होते असे नाही.

**भास्करराव जाधव (१७ जून १८६९ ते २६ जून १९५०)ः–**

महाराष्ट्रातील सत्यशोधक समाजाचे आणि ब्राह्मणेतर चळवळीचे एक प्रमुख नेते म्हणून भास्करराव जाधव यांचा उल्लेख करावा लागेल. त्यांनी सत्यशोधक चळवळीप्रमाणे ब्राह्मणेतर चळवळीतही महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. या चळवळीच्या सुरुवातीपासून जाधवांनी तिच्यात आपला सहभाग नोंदविला होता. एवढेच नव्हेतर या चळवळीच्या उभारण्यात ज्यांनी योगदान दिले होते अशा नेत्यांपैकी भास्करराव जाधव, हे एक होते. ब्राह्मणेतर पक्षांच्या संस्थापक सदस्यांपैकी ते एक होते. या पक्षाचे त्यांनी अध्यक्ष म्हणूनही कार्य केले होते. याच पक्षातर्फे त्यांची मुंबई इलाख्याच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर दोनदा निवड झाली. एवढेच नव्हे तर त्यांची ब्राह्मणेतर पक्षाच्या विधिमंडळ गटाचे नेते म्हणून निवड झाली होती.

भास्करराव जाधव यांची एक विशिष्ट भूमिका होती. त्यामुळे पुढील काळात ब्राह्मणेतर चळवळीत मतभेद उद्‌भवले. सरकारविरोधी कार्यक्रमांमध्ये ब्राह्मणेतर चळवळीने सहभागी होऊ नये

असे त्यांचे म्हणणे होते. बहुजन समाजाची उन्नती व्हावी, त्यासाठी आपण ब्रिटिश सरकारशी सहकार्य केले पाहिजे, असा जाधवांचा त्याबाबतीत दृष्टीकोन होता. तथापि, या चळवळीतील युवा नेतृत्वाला त्यांची भूमिका मान्य नव्हती.

ब्राह्मणेतर चळवळीने राष्ट्रीय चळवळीशी नाते जोडावयास पाहिजे, असे केशवराव जेधे यांच्यासारख्या नेत्यांना वाटू लागले. तसेच काँग्रेसमध्ये बहुजन समाजाला योग्य स्थान मिळेल असेही त्यांना वाटत होते. मात्र भास्करराव जाधव यांची काँग्रेसशी सहकार्य करण्याची इच्छा नव्हती.

ब्राह्मणेतर चळवळीच्या काही कार्यकर्त्यांची भास्करराव जाधव यांच्या भूमिकेच्या बाबतीत अशी धारणा होती की, ब्रिटिश सरकारशी सहकार्य करण्याच्या त्यांच्या भूमिकेमागे बहुजनांच्या हिताचा विचार नव्हता. भास्करराव जाधवांना आपल्या वैयक्तिक स्वर्थाकरिता सहकार्य आवश्यकता वाटत होती. सरकारधार्जिण अशा भूमिका घेऊन जाधवांनी बरेच लाभ मिळविले होते. त्यांचा त्याग करण्याची त्यांची मानसिकता नव्हती. ब्राह्मणेतर चळवळीतील कार्यकर्त्यांची अशी मते असल्यामुळे जाधवांशी त्यांचे फार काळ सलोख्याचे संबंध राहिले नाहीत. बरेच सामान्य कार्यकर्ते या चळवळीपासून दूर गेले याचा परिणाम ब्राह्मणेतर चळवळीला उतरती कळा लागण्यात झाला.

ब्राह्मणेतर चळवळीला केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर या दोघांनी दिलेल्या योगदानामुळे या चळवळीची लोकप्रियता आणि तिचे सामर्थ्य वाढले होते. मात्र पुढे जेधे आणि जवळकर यांच्यात वितुष्ट निर्माण होऊन ह्या जोडीत फूट पडली. जेधे-जवळकर यांच्यातील दुराव्यास भास्करराव जाधव जबाबदार असल्याचे मत काही जणांचे होते. त्यांच्या मते '' जेधे जवळकरांची वाढती लोकप्रियता ब्राह्मणेतर पक्षातीलच अनेकांना सहन झाली नाही. पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांना पक्षावरील आपला प्रभाव कायम राखण्यासाठी जेधे जवळकरांशी जवळीक साधून त्यांना जेधेपासून वेगळे करण्यासाठी पद्धतशीर प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यशही मिळाले'' ब्राह्मणेतर पक्षातील गटबाजी व फाटाफुटी याबाबतीत अनेकांनी भास्करराव जाधवांना जबाबदार धरले त्यांना दोष दिला. हे दोष करणे कदाचित गैरसमजुतीवर आधारलेले असू शकेल, मात्र या पक्षनेत्यांमधील आपापसातील गैरसमजामुळे पक्षातील फूट अटळ ठरली होती.

**केशवराव जेधे अणि दिनकरराव जवळकर यांचे ब्राह्मणेतर चळवळीतील योगदान :–**

इ.स. १९२२ ते इ.स. १९३० हा कालखंड ब्राह्मणेतर चळवळीच्या दृष्टीने विशेष महत्त्वपूर्ण ठरला होता. या काळात केशवराव जेधे (इ.स. १८९६ ते इ.स.१९५९) यांचे नेतृत्व पुढे आले. त्यापूर्वी राजर्षी शाहू महाराजांनी दिलेले योगदानाचा उल्लेख केलेला आहे. जेधे-जवळकर या जोडगोळीने वरील कालखंडातील प्रारंभीची चार पाच वर्षे एकविचाराने चळवळीसाठी कार्य करून आपल्या विरोधकांना जेरीस आणले होते. त्यानंतरची तीन चार वर्षे त्यांच्यात तीव्र मतभेद निर्माण झाले होते. तथापि, सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळीतील नेत्यांचा उल्लेख करताना जेधे व जवळकर यांची कामगिरी अधोरेखित करावीच लागते. इतिहास संशोधकांच्या मते, ब्राह्मणेतर चळवळ हा एक जनलढा (जनआंदोलन) होता.

**१) ब्राह्मणेतर पक्ष स्थापनेत पुढाकार :–**

ब्राह्मणेतर चळवळीतील एक महत्त्वपूर्ण घटना म्हणजे ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना होय. या चळवळीला राजकीयदृष्टया अधिक संघटित करण्यासाठी ब्राह्मणेतर पक्षाने प्रयत्न चालविले होते. या पक्षाच्या स्थापनेत राजर्षी शाहू महाराजांनी, जेधे, जवळकर, मुकुंदराव पाटील इत्यादींनी पुढाकार

घेतला होता. पक्ष स्थापनेनंतर ब्राह्मणेतर चळवळ एक राजकीय पक्ष म्हणून अधिक सक्रिय झाली होती.

**२) ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व :–**

राजर्षी शाहू महाराजांच्या निधनानंतर ब्राह्मणेतर चळवळीचे केंद्र पुण्याकडे आले. पूर्वी शाहू महाराजांच्या काळात तिचे कोल्हापूर हे केंद्र होते. पुणे येथे चळवळीचे कार्य करावयाचे तर तेथील सनातन्यांशी संघर्ष होणे स्वाभाविकच होते. सनातन्यांशी दोन हात करण्याची जेधे-जवळकरांनी तयारी ठेवली. त्यांनी शाहू महाराजांनंतर या चळवळीचे नेतृत्व केले. त्यांनी पुणे शहरात ब्राह्मणेतर चळवळीच्या कामाचा धडाकाच सुरू केला. त्यामुळे जेधे-जवळकरांची लोकप्रियता वाढली. यांचा परिणाम बहुजन समाजातील तरुण या चळवळीकडे आकृष्ट होण्यात झाला.

**३) छत्रपती मेळ्यातील कार्यक्रमास प्रारंभ:–**

जेधे-जवळकरांनी पुण्यात छत्रपती मेळा सुरू केला. त्यातून पुण्यातील सनातन्यांवर अर्थात त्यांच्या विचारांवर जोरदार हल्ला चढविण्यात आला. त्याकाळी पुण्यात टिळकांनी सुरू केलेल्या गणेशोत्सवात करमणुकीसाठी मेळ्याचे कार्यक्रम होत असत. या मेळ्यातून बऱ्याचदा टिळकपक्षीयांचे गोडवे गायिले जात असत आणि सुधारक व नेमस्त मंडळींवर टीका केली असे. त्यामुळे पुण्यातील सनातन्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी जेधे व जवळकर यांनी सुरू केलेल्या छत्रपती मेळ्यातून पदरचनेद्वारे टिळकपक्षीय व सनातनी ब्राह्मणांवर टीका करण्यात आली होती. इ.स. १९२२ ते इ.स. १९२५ या काळात पुण्यातील गणेशोत्सवात ब्राह्मणेतरांनी मोठी धमाल उडवून दिली. सनातन्यांना वठणीवर आणण्यासाठी योजलेला हा इलाज जालीम ठरला होता.

**४) महात्मा फुले पुतळावाद :–**

इ.स. १९२५ मध्ये पुणे नगरपालिकेत महात्मा फुले यांचा पुतळा उभारण्यावरून वाद उद्‌भवला होता. त्यावेळी पुणे नगरपालिकेत टिळक पक्षीयांचे बहुमत होते. त्या पक्षीय ब्राह्मण सनातन्यांनी या पुतळा उभारणीला जोरदार/तीव्र विरोध केला. एवढेच नव्हे तर टिळक पक्षीय सदस्यांनी महात्मा फुले यांच्याबद्दल अत्यंत अवमानकारे भाषेचा वापर केला. त्याला प्रत्युत्तर ब्राह्मणेतरांनी दिले. जेधे-जवळकर यांच्या कार्यात महात्मा फुले पुतळा वाद हा एक महत्त्वाचा भाग समजला जातो.

**५) ''देशाचे दुश्मन'' या ग्रंथावरून वाद :–**

इ.स. १९२५ मध्ये सनातनवाद्यांना त्यांच्याच भाषेत उत्तर देण्यासाठी दिनकरराव जवळकर यांनी 'देशाचे दुश्मन' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाचा आशय सनातन्याची बाजू घेऊन समाजसुधारक व बहुजन समाजाचे नेते यांच्यावर सातत्याने आगपाखड करणारे विष्णुशास्त्री चिपळूणकर व टिळक हे दोघेही देशाचे दुश्मन आहेत अशा प्रकारचा होता. प्रस्तुत ग्रंथात ब्राह्मणांना उद्देशून अर्वाच्य भाषा वापरली तरी तर्क शुद्ध युक्तिवादाच्या आधारे जवळकरांनी आपले म्हणणे ठासून मांडले होते. 'देशाचे दुश्मन' या ग्रंथाच्या वादावरून जवळकरांना न्यायालयीन लढाईला सामोरे जावे लागले आणि त्यांना तुरुंगवासाचीही शिक्षा झाली.

**६) मराठा लीगच्याद्वारे जागृती :–**

सत्यशोधक समाजाने केलेल्या कार्यामुळे ब्राह्मणेतर चळवळीस मोठ्या प्रमाणात गती आली होती. तसेच ब्राह्मणेतर चळवळीकडे अनेक जण आकर्षित झाले होते. या चळवळीतील नेत्यांनी पुणे

येथे मराठा लीगच्या स्थापनेत पुढाकार घेतला होता. अण्णासाहेब लठ्ठे, श्रीपतराव शिंदे, वालचंद कोठारी इत्यादीसह मराठा लीग स्थापनेत जेधे-जवळकर या जोडगोळ महत्वाची भूमिका बजावली होती. मराठा लीगने अन्य जातींच्या प्रश्नांकडे लक्ष दिल्याचे दिसते. हित संबंधाकडेही 'मराठा लीग' या संघटनेच्याद्वारे केशवराव जेधे यांनी बहुजनसमाजात सामाजिक आणि राजकीय जागृती करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली.

**७) वृत्तपत्रांद्वारे जागृतीचे कार्य:-**

वृत्तपत्रे जाणीव जागृतीसाठी महात्त्वपूर्ण कार्य पार पाडतात. तशाच प्रकारे कार्य ब्राह्मणेतर चळवळींच्या काळात वृत्तपत्रांनी केली. 'तरुण मराठा' आणि 'छत्रपती' ही वृत्तपत्रे इ.स. १९१७ मध्ये सुरू करण्यात आली. राजर्षी शाहू महाराजांच्यानंतर ब्राह्मणेतर चळवळीचे नेतृत्व केशवराव जेधे व दिनकरराव जवळकरांनी 'तरुण मराठा' या वृत्तपत्राचे संपादक म्हणून जबाबदारी सांभाळली होती. संपादक या नात्याने त्यांनी अल्पावधीतच सर्वांवर छाप पाडली होती. त्यांनी सरकारसमोर ब्राह्मणेतरांची बाजू मांडण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर जेधे यांनी बहुजन समाजात राजकीय जाणीव जागृती करण्यात आपले योगदान दिले.

**मुकुंदराव पाटील ( इ.स. १८८५ ते इ.स. १९६७) :-**

ब्राह्मणेतर चळवळीला राजर्षी शाहू महाराजांचे पाठबळ मिळाल्यामुळे केवळ कोल्हापुरातच नव्हे संपूर्ण महाराष्ट्रातून बहुजन समाजाचे अनेक कार्यकर्ते या चळवळीकडे आकृष्ट होऊ लागले. भास्करराव जाधव, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील, अण्णासाहेब लठ्ठे, वालचंद कोठारी, केशवराव ठाकरे, सीताराम केशव बोले, यासारखे कार्यकर्ते या चळवळीचे कार्य मोठ्या जोमाने करू लागले होते. त्यांनी ब्राह्मणेतर चळवळीच्या प्रस्तारासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न केले. ती चळवळ बहुजनांमध्ये लोकप्रिय होण्यास या कार्यकर्त्यांचे परिश्रम कारणीभूत झाले होते. मुकुंदराव पाटील यांनी अनेक मार्गाने ब्राह्मणेतर चळवळीचा विस्तार महाराष्ट्राच्या विविध भागात घडवून आणण्यात महत्त्वाचा वाटा उचलला होता.

**१) 'डेक्कन रयत समाजांची स्थापना ':-**

ब्राह्मणेतर चळवळीला गती प्राप्त झाली. त्यानंतर ब्राह्मणेतरांच्या अनेक संघटना उभारण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरू झाले. इ.स. १९१६ मध्ये आण्णासाहेब लठ्ठे, वालचंद कोठारी, मुकुंदराव पाटील इत्यादींच्या पुढाकाराने 'डेक्कन रयत समाज' या संस्थेची स्थापना झाली. या संघटनेद्वारे मुकुंदराव पाटील यांनी ब्राह्मणेतरांना राजकीय हक्कांची जाणीव करून देण्यात महत्त्वपूर्ण कामगिरी केली.

**२) साप्ताहीक दीनमित्राची सुरूवात:-**

विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्रातील बहुतेक सर्व मराठी वृत्तपत्रे ब्राह्मणांच्या मालकीची होती. त्याचबरोबर त्या वृत्तपत्रांचे संपादकही ब्राह्मणच होते. ( विसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील समाज सुधारणेचा इतिहास, प्रा.व्ही.बी. पाटील, पृ.८८) यातील बऱ्याच वृत्तपत्रांनी सामाजिक समतेच्या संदर्भात संकुचित दृष्टीकोन स्वीकारला होता. त्यांनी महाराष्ट्रातील सत्यशोधक चळवळीला बदनाम केले होते. ब्राह्मणेतरांची बाजू मांडण्यासाठी आणि ब्राह्मणेतर चळवळीचा प्रचारासाठी स्वत:ची वृत्तपत्रे असावीत असे अनेक ब्राह्मणेतर नेत्यांना वाटू लागले. राजर्षी शाहू महाराजांनी या नेत्यांना प्रेरणा आणि अर्थसाहाय्य दिले. इ.स. १९१० मध्ये 'दीनमित्र' हे एकच सत्यशोधक साप्ताहीक होते. ते मुकुंदराव पाटील त्यांनी सुरू केले. २३ नोव्हेंबर १९१० रोजी राम ठाणे येथे 'दीनमित्र'चा

पहिला अंक मुकुंदराव पाटलांनी प्रकाशित केला. त्यांनी दीनमित्राचे तब्बल ५७ वर्षे नियमित अंक प्रकाशित केले.

**३) सक्तीचे शिक्षणः–**

पुणे म्युनसिपालटत मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत देण्याबाबतच विषय पुष्कळ दिवस चर्चेस जात नव्हता. या शिक्षणासाठी खूप खर्च अपेक्षित होता. त्यामुळे आधी मुलांना व त्यानंतर मुलींना शिक्षण देण्याचा निर्णय झाला. मात्र मुकुंदराव पाटील आणि ब्राह्मणेतरांनी या निर्णयास विरोध केला. तसेच महर्षी शिंदे यांनी स्त्री शिक्षणाची बाजू उचलून धरली. यांचा परिणाम दिवसेंदिवस ब्राह्मण-ब्राह्मणेतर चळवळीतील संघर्षाला जोर चढण्यात झाला.

**४) वृत्तपत्राद्वारे राजकीय जागृतीः–**

दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी साप्ताहिक वृत्तपत्र या नियतकालिकांमार्फत बहुजन समाजात राजकीय सामाजिक हक्कांविषयी जागृती केली. त्यांना ब्राह्मणेतरांमध्ये असलेल्या अनिष्ट रूढी-परंपरांवर, भोळ्यासमजुतींवर टीका केली. त्यांच्या कार्यामुळे ब्राह्मणेतर चळवळींचा प्रसार सर्व महाराष्ट्रभर झाला. त्यामुळे बहुजन समाजात जागृती होऊन सामाजिक, राजकीय, धार्मिक इत्यादी क्षेत्रातील आपले हक्क मिळविण्यासाठी त्यांनी संघर्ष करण्याची तयारी केली.

अशा प्रकारे दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांना ब्राह्मणेतर चळवळीत महत्त्वाचे कार्य केले.

**प्रबोधन ठाकरे (इ.स. १८७५ ते इ.स. १९७३) :–**

'प्रबोधन'कार अशी उपाधी मिळालेले केशव सीताराम ठाकरे यांनी ब्राह्मणेतर चळवळीला मोलाचे योगदान दिले. त्यांनी ब्राह्मणेतर मध्ये प्रबोधन घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला. महात्मा जोतीराव फुले हे त्यांचे आदर्श होते. त्यांनी सनातन्यांविरुद्ध आपल्या लेखणीद्वारे लढा चालविला होता.

प्रबोधनकार ठाकरे यांनी समाजातील बालविवाह विधवांचे प्रश्न, यातून स्त्रियांचे होणारे शोषण यावर प्रहार केला. समाजसुधारणा घडवून आणणे हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यासाठीच त्यांनी पुरोहितवर्गाच्या वर्चस्वावर परखडपणे मते मांडली. ते ब्राह्मणांच्या प्राबल्यावर सातत्याने लिखाण करत होते. तथापि त्यांना त्यांच्या या कार्यापासून पराकृत करण्याचाही प्रयत्न झाला होता. प्रबोधनकारांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी लेखनाद्वारे, भाषणाद्वारे तसेच प्रत्यक्ष आचरणाद्वारे महत्त्वाची भूमिका बजावली. बालविवाह, विधवापुनर्विवाहास मनाई याबरोबरच हुंडा बळी यासारख्या अनिष्ट प्रथेतूनही स्त्रियांवर अन्याय अत्याचार होत होते. त्यामुळे प्रबोधनकारांनी मुंबई येथे हुंडाप्रतिबंधक चळवळ सुरू केली. त्यांनी सर्व जातींची हुंडाप्रतिबंधक स्वयंसेवक सेना स्थापन केली. त्याद्वारे वधूपित्याकडून हुंडा म्हणून घेतलेल्या रकमा वर पित्यांना परत देण्यास भाग पाडण्यात आले. तसेच त्यांनी अनेक प्रेतविवाह लावले होते. प्रबोधनकार ठाकरे यांनी 'प्रबोधन' नियतकालीक सुरू केले त्यातून त्यांनी अनेक सामाजिक प्रश्न व त्यांची कारणे प्रखरपणे तीव्रपणे मांडली होती.

प्रबोधनकार ठाकरे यांच्या मते, सामाजिक वैगुण्यांचे गाथा ब्राह्मणी कर्मकांडात आहे. व्रते वैकल्ये, उपासतापास, धर्मकला ब्राह्मणांनी केवळ स्वार्थासाठी समाजात रूढ केले आहेत. अशा प्रकारच्या रूढींमुळे ब्राह्मणेतर समाज हक्कांपासून वंचित होता. त्याच्यावर धर्मांच्या नावाखाली अन्याय होत होता. त्यामुळे प्रबोधनकारांनी ब्राह्मणी वर्चस्वावर हल्ला चढवला. ते ब्राह्मण द्वेष्टे नव्हते. मात्र मनुस्मृती पुराणे आणि देवळे या तिपेडी फासांत हिंदुसमाज लटकावून भिक्षुकशाही गाजविणारे ब्राह्मण आणि त्यांचे विचार याविरुद्ध ते टीका करीत असत. त्यांनी 'खरा ब्राह्मण' या

नाटकातून ब्राह्मण-वर्चस्वावर प्रखर टीका केली.

प्रबोधकार ठाकरे यांनी सामाजिक सुधारणा कार्यात आणि ब्राह्मणेतर चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावलेली. त्यांना धर्म मार्तंडाविरुद्ध जागृती घडवून आणली. प्रबोधनकारांनी 'भिक्षुकशाहीचे बंड', 'कोदंडाचा टणत्कार', 'ग्राम धान्याचा इतिहास', 'देवाचा धर्म की, धर्माचा देवळे', 'कुमारिकांचे शाप', इत्यादी पुस्तकांचे लेखन केले. तसेच संत गाडगेबाबा 'रंगो बापूजी गुप्ते' पंडित रमाबाई यांची चरित्रे लिहिली. याशिवाय 'टाकलेले पोर', 'विधिनिषेध', 'खरा ब्राह्मण', ही नाटके व माझी 'आत्मकथा' हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले.

प्रबोधनकार ठाकरे यांनी समाजातील अनिष्ट रूढींच्या विरुद्ध जोरदार टीका केली. आणि ब्राह्मणेतर समाजात सामाजिक-राजकीय हक्कांविषयी जाणीव जागृती केली.

## ७.२.३ डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ

आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात दलित चळवळीला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, समता, राष्ट्रवादे, लोकशाही या संकल्पनांची, मूल्यांची ओळख झालेल्या नव्या मध्यमवर्गातील काही समाजधुरीणांनी दलितांच्या उन्नतीसाठी प्रयत्न केलेले दिसतात. दलितोन्नतीची ही प्रेरणा त्यांना ख्रिस्ती मिशनरी व पाश्चात्त्य शिक्षणातून मिळाली होती. महाराष्ट्रात एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते विसाव्या शतकाच्या प्रारंभीपर्यंतच्या कालखंडात बाबा पद्मनजी, महात्मा जोतीराव फुले, विष्णुबुवा ब्रह्मचारी, न्या. रानडे, नामदार गोखले, सीताराम केशव बोले, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड, राजर्षी छत्रपती शाहू महाराज इत्यादी समाज सुधारकांनी सामाजिक सुधारणा चळवळीत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तथापि , या नेत्यांपैकी काहींनी सत्यशोधक चळवळ व ब्राह्मणेतर चळवळ यांच्याप्रमाणे दलित चळवळीलाही महत्त्वाचे योगदान दिले आहे. याचे कारण म्हणजे तत्कालीन भारतीय समाजातील अत्यंत शोषित, अपेक्षित अशा दलितांमध्ये नवा आत्मविश्वास निर्माण करण्याचे कठीण कार्य त्यांनी परिणामकारकरित्या केले आहे. त्यामुळे दलित चळवळीत विशेष उल्लेखनीय भूमिका बजावणाऱ्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या कार्याची येथे दखल घेणे उचित ठरेल. तत्पूर्वी दलित म्हणजे कोण? आणि दलित चळवळीचा संकल्पना समजावून घेऊ.

'दलित ' हा शब्द काही अभ्यासकांच्या मते जातीवाचक आहे. तर काही विद्वान तो शब्द कालचा शोषित आणि आजचा संघर्षशील या अर्थाने वापरतात. तथापि, अनेकांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल असणाऱ्यांच्या संदर्भात दलित शब्द वापरलेला दिसतो. मात्र हा शब्द सामाजिकदृष्ट्या मागास असलेल्या समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. हिंदू समाजाने बहिष्कृत आणि तिरस्कार ठेवलेल्या जातींना दलित संबोधले जाते. असे असले तरी काही दलित लेखक, कार्यकर्त्यांनी व पुरोगामी विचारवंतांनी 'दलित' या शब्दाच्या केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) बाबूराव बागूल यांच्या मते '' आपल्या दलितांच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा' येतात. ऑफ्रो-आशियाई देशांतील काळा, गोरा, तांबडा येतात आपल्या देशातील अस्पृश्य, आदिवासी, शोषित, पीडित येतात.

२) म. ना. वानखेडे म्हणतात, 'दलित' या शब्दाची व्याख्या केवळ बौद्ध अथवा मागासवर्गीय नाही, तर जे जे पिळले गेलेले असे श्रमजीवी आहेत, ते सर्व 'दलित' या व्याख्येत येतात.

३) नामदेव ढसाळ यांच्या मते, 'दलित म्हणजे अनुसूचित जाती, जमाती, बौद्ध कष्टकरी,

जनता कामगार, भूमिहीन, शेतमजूर, गरीब, भटक्या जमाती, आदिवासी होय'.

४) वि.वा. शिरवाडकर यांच्या मते ब्राह्मणांपासून बौद्धांपर्यंत सर्व जातीत कमी-अधिक प्रमाणात आपला 'दलित वर्ग' पसरलेला आहे.

५) प्रा. विलास पाटील यांच्या मते, समाजातील अत्यंत दुर्बल व अन्यायाचे बळी ठरलेला घटक म्हणजे 'दलित' होय.

६) डॉ. म.स. पगारे यांच्या मते, दलित म्हणजे पिळलेले, नाडलेले, गोडलेले असे लोक होत. ज्यांचे सातत्याने शोषण झालेले दिसते, अशांना 'दलित' असे म्हणतात.

वर उद्धृत केलेल्या दलित या शब्दाच्या विविध व्याख्यांवरून दलित या शब्दाची व्यापकता लक्षात येते. दलित म्हणजे केवळ अस्पृश्य नव्हेत, तर गावकुसाबाहेरील भटक्या व विमुक्त जमाती, आदिवासी, आणि गरीब कष्टकरी यांचा या व्याख्येत अंतर्भाव केलेला आहे. तथापि 'दलित' या शब्दाला काही लेखक व विचारवंतानी विरोध केला आहे. खुद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गोलमेज परिषदेत 'दलित वर्ग' या शब्दाला विरोध केला होता. 'दलित' हा शब्द 'ओंगळ' व 'जातिवाचक' वाटतो म्हणून तो शब्द नाकारला पाहिजे असा सूर भाऊसाहेब अडसूळ, राजा ढाले इत्यादी विचारवंतानी व्यक्त केलेला आहे. त्यांचा दलित शब्दाऐवजी 'बौद्ध' शब्द वापरला पाहिजे असा आग्रह आहे. तर दलित शब्द जातिवाचक नसून तो व्यापक अर्थाने वापरलेला आहे.

अशा प्रकारे 'दलित' शब्दाला विरोध असला तरी या शब्दाला आज नवे परिमाण लाभले आहे. तो शब्द दलित चळवळीत व साहित्यात सर्वार्थाने वापरला गेलेला आहे. 'दलित' या शब्दाला एक आत्मनिष्ठा प्राप्त झाली आहे.

## दलित चळवळ म्हणजे काय?

भारतीय समाजातील उपेक्षितांच्या, शोषितांच्या, पददलितांच्या उद्धारासाठी, त्यांच्या आत्मसन्मानासाठी सुरू करण्यात आलेल्या चळवळीस 'दलित चळवळ' असे म्हणतात. सापेक्ष वंचितता सिद्धांताप्रमाणे (ढहश ींहशेीू ेष ीशश्ररींळींश वशिीळींरींळेप) एकाच समाजातील काही लोकांना त्यांच्या हक्कापासून, स्वातंत्र्यापासून वंचित केले जात असेल तर सामाजिक चळवळीचा उदय होतो. अशीच नेमकी परिस्थिती दलितांची झाल्याने दलित चळवळीचा उदय झाला. (आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास, इ.स.१८१८ ते इ.स.१९६० प्रा. दिनेश मोरे, पृ. ३६३) ही चळवळ एक सामाजिक चळवळ आहे. आणि सापेक्षवंचितता सिद्धांताचा ती आधार आहे. चळवळीची संकल्पना विशद करताना रूडॉल्फ म्हणतात, 'उेश्रश्रशलींळींश शषषेीीं ीं ीरपीषेीा शीींरलश्रळीह ीशश्ररींळेपी ुळींहळप ळप र्ीींळर्लीश्ररी ीलळशीू.'

यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे महात्मा जोतीराव फुल्यांच्या सत्यशोधक चळवळीतून ब्राह्मणेतर चळवळीचा उगम झाला. त्याचप्रमाणे ब्राह्मणेतर चळवळीचा जोर ओसरत असतानाच आंबेडकर विचारसरणीचा एक प्रवाह निर्माण झाला. त्यास दलित चळवळ असे नामाभिधान प्राप्त झाले. तथापि, दलित चळवळीचा उगम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून झाला असे नाही. तर तिला चळवळीचे खऱ्या अर्थाने स्वरूप प्राप्त झाले ते डॉ. आंबेडकरांमुळेच. मात्र डॉ. आंबेडकरांपूर्वी या दलित चळवळीचे तीन टप्पे मानले जातात. ते पुढीलप्रमाणेः-

१) डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळ

२) डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळ

### ३) डॉ. आंबेडकरांच्या पश्चात दलित चळवळ

डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळीची पायाभरणी गोपाळबाबा वलंगकर यांनी केली. ते पहिले दलित समाजसुधारक पहिले दलित क्रांतिकारक, पहिले दलित लेखक पहिले पक्षकार व कवी होय. वलंगकर यांचे मूळ गाव रावढळ हे महाडपासून जवळच आहे. इ.स. १८८६ मध्ये ब्रिटिश फौजेतून निवृत्त झाल्यानंतर ते दापोली येथे स्थायिक झाले. तेथूनच त्यांनी दलितोद्धाराच्या कार्यास प्रारंभ केला. त्यांच्यावर महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांचा व विश्लेषणाचा मोठा प्रभाव होता. महात्मा फुले यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कार्य चालूच होते. गोपाळबाबा 'दीनबंधू' व सुधारक या नियतकालिकातून जळजळीत लिखाण करीत असत. त्याद्वारे दलितांच्या प्रश्नांना त्यांनी वाचा फोडली.

विटाळ विध्वंसन पुस्तिकाः- गोपाळबाबांनी हिंदुधर्माचा साक्षेपी अभ्यास करून इ.स. १८८८ मध्ये 'विटाळ विध्वंसन' या नावाची पुस्तिका लिहून २६ मार्मिक प्रश्न उपस्थित केले. या पुस्तिकेतून एका महार दलितांच्या घरी एका पुरोहिताने वास्तुशांती केल्याने अन्य पुरोहितांनी ब्राह्मणांनी त्यास कशा प्रकारे त्रास दिला याची मांडणी केली आहे. तसेच त्यांनी 'अस्पृश्य समजले जाणारे लोक पूर्वी क्षत्रिय होते व कालांतराने ते अस्पृश्य मानले जाऊ लागले' असा विचार मांडला. गोपाळबाबांनी अस्पृश्यता आणि जातीभेद हे दोन कल्पित राक्षस मानले आहेत. अस्पृश्यता देवनिर्मिती नसून मानवनिर्मित आहे हे सत्य मांडण्याचा त्यांनी अहोरात्र प्रयत्न केला. त्यांनी मुंबई सरकारकडे अस्पृश्यता कायद्याने रद्द करावी असा विनंती अर्ज केला. मुंबईमध्ये रोहिदास चांभाराच्या सभेत गोपाळबाबांनी असे घोषित केले की, ''त्यांच्या अस्पृश्यता निवारण कार्याला यश येत आहे. अस्पृश्यता मुलांना सरकारी व मिशनरी शाळांमध्ये प्रवेश देण्यात येऊ लागला आहे.''

लष्करी भरतीचा अर्ज लिहिलाः- ब्रिटिश सरकारने लष्करात दलितांची भरती बंद केली. त्यामुळे शौर्यास वाव राहिला नाही. प्रगतीचा मार्गही रोखला गेला. तेव्हा गोपाळबाबांनी न्या. महादेव गोविंद रानडे यांच्या साह्याने अर्ज लिहून म्हटले होते की, '' अस्पृश्यांची लष्कर भरती केली पाहिजे अस्पृश्यांनी वेळोवेळी ब्रिटिशांच्या बाजूने लढून आपले शौर्य सिद्ध केलेले आहे. तेव्हा ब्रिटिश सरकारने अस्पृश्यांच्या लष्कर भरतीस बंदी करू नये'' अशा प्रकारे लष्कर भरतीची जोरदार विनंती करण्यात आली होती.

**अनार्य दोषपरिहारक मंडळी :–**

इ.स. १८९३ मध्ये दापोली येथे 'अनार्य दोष परिहारक मंडळी' या संघटनेची स्थापना केली. या संघटनेची स्थापना करून गोपाळबाबांनी महाराष्ट्रात अस्पृश्योद्धाराच्या चळवळीस प्रथम सुरुवात केली. त्या संदर्भात गोपाळबाबासंबंधी स्वतः डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या 'बहिष्कृत भारत' मध्ये आपले मत नोंदवले आहे. ते म्हणतात, ''अस्पृश्योन्नतीची चळवळ प्रथम सुरू केल्याचा मान जर कोणास द्यावयाचा असेल तर तो वलंगकरांनी स्थापन केलेल्या अनार्य दोषपरिहारक मंडळास व मुंबई प्रांतास द्यावा लागेल.'' याशिवाय गोपाळबाबांनी आपल्या लेखनाद्वारे जी जागृती केली ती अनुपम आहे. अशीही डॉ आंबेडकरांनी गोपाळबाबांची प्रशंसा केली आहे.

सामाजिक परिषद :- इ. स. १८९५ मध्ये पुणे येथे काँग्रेस अधिवेशनास जोडून परिषदेत गोपाळबाबा वलंगकरांनी प्रभावी भाषण करून हिंदूंना विनंती केली होती की, ''शाळा पाणवठे, सरकारी नोकऱ्या, धर्मशाळा, विविध व्यापारे-व्यवसाय यांमध्ये अस्पृश्यंना प्रवेश द्यावा.'' महर्षी

विठ्ठल रामजी शिंदे यांच्या मते,----अस्पृश्य, महार, चांभार, लष्करी पेन्शनवाल्यांच्या वसाहतीत गोपाळबाबांनी बरीच चळवळ केली. पण चळवळ नवीन असल्यामुळे यश आले नाही.'' तथापि, दलितांमध्ये धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक दास्यातून बाहेर पडण्याची प्रेरणा निर्माण होण्यासाठी गोपाळबाबांच्या एकूण कार्याचा प्रभाव पडला-जागृती निर्माण केली.

गोपाळबाबांच्या निधनानंतर शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बंदसोडे, गणेश आकाजी गवई आणि कालीचरण नंदा गवळी या त्रिमूर्तींनी त्यांचे दलितोद्धाराचे कार्य नेटाने चालविले.

२) शिवराम जानबा कांबळे (इ.स. १८७५ ते इ.स. १९४१) गोपाळबाबा वलंगकरांच्या नंतर अस्पृश्यतेविरुद्ध पुण्याचे शिवराम जानबा कांबळे यांनी लढा दिला. त्यांच्यावर महात्मा फुले, बाबा पद्मनजी, प्रो. राजारामशास्त्री भागवत इत्यादी समाजसुधारकांच्या विचारसरणीचा प्रभाव होता. त्यांना या सुधारकांचे साहित्य वाचून अस्पृश्यांच्या सुधारणेसंबंधीचा आपला दृष्टीकोण बनविला.

३) सासवडची पहिली महापरिषदः- इ.स. १९०३ मध्ये शिवराम जवनबा कांबळे यांनी सासवड जि. पुणे. येथे ५१ गावातील महारांची सभा भरवून त्यांनी १५८८ महार बांधवांच्या स्वाक्षऱ्यांचे निवेदन सरकारला सादर केले होते. त्या निवेदनात कांबळे यांनी अस्पृश्यांना लष्करात व पोलिसांत नोकऱ्या मिळाव्यात अशी मागणी केली. त्यांच्या तो आपल्या अस्पृश्य बांधवांच्या मागण्या व हक्कांसाठी केलेला पहिला संघटित आणि सनदशीर प्रयत्न होता.

शिवराम जानबा कांबळे यांनी अस्पृश्यांना सरकारी नोकरीत घेणे आणि सार्वजनिक शाळांत त्या मुलांना घेण्यासंबंधीचे अडथळे दूर करणे या केलेल्या दोन्ही मागण्यांसंबंधी मुंबई सरकारने गुळगुळीत उत्तरे दिली. तर अस्पृश्यांना पोलिसांत नोकरी देणे या मागणीबाबत जातीच्या निम्नस्तराची बाब पुढे केली आणि भारतीय लष्करात अस्पृश्यांना नोकरी करण्याची परवानगी देण्यासंबंधीच्या मागणीत सरकार हात घालू नाही अशी भूमिका घेतली. त्यानंतर त्यांनी अशाच आशयाचा एक विनंती अर्ज केला होता मात्र त्याचाही विचार करण्यात आला नाही.

१) वृत्तपत्राद्वारे केलेली जागृतीः- श्री. शिवराम कांबळे यांनी अस्पृश्य वर्गात व्हावी. त्यांच्या अंधश्रद्धा नष्ट व्हाव्यात, आपल्यावरील अन्यायाविरुद्ध संघर्ष करण्याची मानसिकता तयार व्हावी यासाठी ते प्रयत्नशील होते. त्यांनी सयाजीराव गायकवाड यांच्या मदतीने 'सोमवंशीय मित्र' हे मासिक सुरू केले. त्या मासिकाच्या 'सोमवंशीय मित्र' या नावाखाली इंग्रजीत '' ढहश ऋीळशपव ेष ऊशिीशीीशव लश्रीीशी ''अशी ओळ छापली जात असे. अस्पृश्य व्यक्तीने चालविलेले सोमवंशीय मित्र हे पहिले मासिक पत्र होते. हे मासिक बंद पडल्यानंतर श्री. कांबळे यांनी स्वखर्चाने सूचिपत्र या नावाचे आपले एक पुस्तक प्रकाशित केले. त्या पुस्तकाद्वारे सरकार व गावकरी हे महार लोकांवर कामानिमित्ताने कसे अन्याय करतात याचे विवेचन केले आहे.

२) जेजुरी क्षेत्रीय सोमवंशीय परिषद :- इ.स. ५ एप्रिल १९१० रोजी जेजुरी जि. पुणे. येथे पेन्शनर सुभेदार गंगाराम कृष्णाजी भातनकर यांच्या अध्यक्षतेखाली दुसरी सोमवंशीय परिषद भरविण्यात आली. त्यात बावीस कलमांचा एक अर्ज लिहून तो तत्कालीन भारतमंत्री क्यू यांच्याकडे पाठविण्यात आला. त्या अर्जाद्वारे लष्करी व पोलिस खात्यात अस्पृश्यांना भरती करावी, अशी आग्रही मागणी करण्यात आली. या सोमवंशीय परिषदेत हिंदूना इंग्रज सरकार दुखवू इच्छित नाही त्यामुळे अस्पृश्य समाजावर अन्याय करणारी भूमिका ते घेत असा आरोप करण्यात आला होता.

अस्पृश्यांच्या हक्कांबरोबरच त्यांच्यातील अनिष्ट प्रथांविरुद्ध शिवराम कांबळे यांनी चळवळ

त्यांनी महार समाजात रूढी असलेल्या मुरळी सोडण्याच्या अनिष्ट प्रथेविरुद्ध मतपरिवर्तन करण्यासाठी सातत्याने लिखाण केले. त्यांनी जेजुरी  येथील परिषदेत समाजबांधवांनी आपल्या मुलींना मुरळी म्हणून सोडू नये. त्यांच्याशी कुणाची विवाह करण्याची तयारी असेल तर त्यांना जातीने परवानगी द्यावी असे आवाहन करण्यात आले होते.

कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' च्या पहिल्या अंकात मुरळी म्हणून सोडण्याच्या अनिष्ट प्रथेविरूद्ध  लेख लिहिला होता. हा लेख अनूसयाबाई नावाच्या मुरळीस वाचून दाखविल्यामुळे ती जागृत झाली आणि तिने 'सोमवंशीय मित्र' कडे पत्र पाठवून समाजबांधवांना कळकळीची विनंती केली की, '' अज्ञानी पालकाच्या भोळ्या समजुतीमुळे ही अनिष्ट प्रथा सुरू झाली; परंतु समाजबांधवांनी या लेखाचा विचार करून माझ्यासारख्या अबलांची या दुःखातून सुटका करावी.'' अनुसयाबाईप्रमाणे मतपरिवर्तन झालेल्या शिवुबाईनेही 'सोमवंशीय मित्र' विचारप्रवर्तन अर्ज पाठवून मुरळ्या या महार जातीला कलंक असून त्यांच्या अज्ञानी पालकांकडून झालेल्या चुकांची शिक्षा त्यांच्या मुला-मुलींना करण्यात येऊ नये, या बाबतीत जाणकारांनी विचार करावा असे मत व्यक्त केले होते. या चळवळीमुळे काही स्त्रियांनी अनिष्ट रूढीतून मुक्ती करून घेऊन विवाह केला.

वाघ्या-मुरळी या अनिष्ट प्रथेबरोबरच अस्पृश्यांमध्ये बहुपत्नीत्त्वाची चाल होती. या प्रथेविरुद्ध शिवराम कांबळे यांनी सोमवंशीय मित्र या मासिकातून परखडपणे आपली मते नोंदवली तसेच दारूच्या व्यसनाविरुद्ध जनजागरण करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यासाठी कांबळे यांनी 'सोमवंशीय मित्र' च्या ०१ मार्च १९०९ अंकात 'बाटलाबाई मातेची आरती' उपहारात्मक शैलीत लिहिली आणि त्यातून दारूच्या व्यसनाचे दुष्परिणाम प्रभावीपणे मांडले. अस्पृश्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी कांबळे यांनी प्रयत्न केले. आपल्या अस्पृश्य बांधवांमध्ये शिक्षणाचा प्रसार झाल्याशिवाय त्याच बरोबर सरकारी नोकऱ्यांमध्ये स्थान मिळाल्याशिवाय अस्पृश्योद्धार होणार नाही असे त्यांचे म्हणणे होते. त्यासाठी कांबळे यांनी सोमवंशीय मित्र मधून सातत्याने लिखाण केले.

**किसन फागूजी बंदसोडे (बनसोडे) (इ.स. १८७९ ते इ.स. १९४६) :-**

किसन फागूजी बंदसोडे यांनी जनसेवा हाच जीवन धर्म मानला. त्यांनी आयुष्यभर अस्पृश्य समाजाला मनुष्यत्वाचा, समतेचा हक्क मिळवून देण्यासाठी कार्य केले. बंदसोडे यांनी १९०० च्या सुमारास समाज कार्य सुरू केल्याचे दिसते. त्यांनी अस्पृश्यांच्या समाजिक उन्नतीप्रमाणेच आर्थिक उन्नतीसाठीही प्रयत्न केले. एवढेच नव्हे तर अस्पृश्य स्त्रियांच्या उन्नतीसाठी कार्य केले. बंदसोडे यांनी इ.स. १९०१ मध्ये 'सन्मार्ग बोधक अस्पृश्य समाज' ही संस्था नागपूर येथील 'पाचपावली' भागात 'चोखामेळा कन्या शाळा' स्थापन केली. इ.स. १९१४ मध्ये संत चोखामेळा मुलींचे वसतिगृह सुरू केले. त्यांच्या शाखा अमरावती, अचलपूर, यवतमाळ, आणि चिखली येथे स्थापन केल्या.

डॉ. आंबेडकरपूर्व काळात मध्यप्रांत- वऱ्हाडात अस्पृश्यांच्या उद्धारासाठी संघटनात्मक पातळीवरील कार्यात बंदसोडे यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे दिसते. त्यांनी मध्यप्रांतवऱ्हाडात अस्पृश्य समाजिक, शैक्षणिक सुधारणेसाठी नागरसुरात स्थापन झालेल्या 'लॉयल महार सभेत' सक्रिय सहभाग नोंदविला होता.

ब्रिटिश राजवटीत महारांनी गावकी सोडली होती आणि त्यांनी मोठ्या प्रमाणात रेल्वे, रस्ते बांधणी व मिलमध्ये काम सुरू केले होते. त्यामुळे स्वभाविकच अस्पृश्य समाजाम मजूरवर्गाची वाढ झाली. त्याचबरोबर त्यांच्या समस्याही वाढल्या होत्या. त्यांच्या दुःख दारिद्र्यात भर पडली होती.

म्हणून अस्पृश्य मजुरांचे प्रश्न सोडविण्यासाठी बंदसोडे यांनी मजूरांचा संप घडवून आणला आणि त्यांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडली. मिलमालकांशी वाटाघाटी केल्या. त्याचबरोबर बंदसोडे यांनी व्हिटले कमिशनपुढे कामगारांची प्रभावीपणे गाऱ्हाणी मांडली. तसेच त्यांनी विडी कामगारांचे प्रश्न सोडविण्यातही मोलाचे कार्य केले होते. त्यांनी इ.स.१९१९ मध्ये अस्पृश्य कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी 'अत्यंत समाज' नावाची संस्था स्थापन केली.

श्री. बंदसोडे यांनी पत्रकारितेच्याद्वारे अस्पृश्य समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी सुबोधपत्रिका, मुंबई वैभव, ज्ञानप्रकाश, देशसेवक, काल, केसरी, महाराष्ट्र, राष्ट्रीवीर, मुमुक्षू, सकाळ, यासारख्या वृत्तपत्रांतून स्फुट लिहिले आणि अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. इ.स. १९०१ मध्ये त्यांनी 'मराठी दीनबंधु' या साप्ताहिक सुरू केले. हे साप्ताहिक सुरू करण्यामागचा मुख्य उद्देश म्हणजे अस्पृश्य समाजात चैतन्य निर्माण करणे हा होता. 'निराश्रित हिंद नागरिक' हे दुसरे साप्ताहिक बंदसोड यांनी इ.स. १९१० मध्ये सुरू केले. या साप्ताहिकात त्यांनी अस्पृश्य स्त्रियांच्या प्रश्नांवर भर दिला. इ.स. १९१३ मध्ये बंदसोडे यांनी 'विटाळ विध्वंसक' हे साप्ताहिक सुरू केले. या नियतकालिकात त्यांनी अस्पृश्यता सनातने अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा, कर्मकांडे इत्यादींवर कडाडून टीका केली आणि मानवता धर्माचा प्रसार केला. इ.स. १९१८ मध्ये 'मंजुर पत्रिका' आणि इ.स.१९१९ मध्ये 'चोखमेळा' हि वृत्तपत्रे त्यांनी सुरू केली.

बंदसोडे यांनी पत्रकारितेप्रमाणेच साहित्याच्याद्वारे जागृती घडवून आणण्यासाठी तळमळीने प्रयत्न केले. त्यांनी ज्ञानप्रकाश, काळ सुबोधन, पत्रिका केसरी इत्यादी वृत्तपत्राद्वारे वैचारिक लेखन केले. दलितांच्या दुःखाला काव्यातून वाचा फोडली. गांधीजींनी अस्पृश्यासाठी वापरलेला 'हरिजन' शब्द बंदसोडे यांना मान्य नव्हता. म्हणून त्यांनी गांधीजींशी चर्चाही करून 'हरिजन' शब्दास विरोध दर्शविला.

किसन फागूजी बंदसोडे यांनी आपल्या कवितेच्याद्वारे दलितांच्या दुःखांना वाचा फोडली. ते आपल्या कवितेत म्हणतात-

हरि! मज पशू कर वा पक्षी कर, परि करू नको महार
पक्षी योनी मज राघू केले तर हिंदु मज शिकवती
महार केलीया विटाळ मानती शिक्षण बंद करिती
यास्तव पशु कर वा पक्षी कर

या काव्यातुन दलितांवर होणारा अन्याय-अत्याचार प्रखरपणे प्रकट झालेला दिसतो. पुढे आत्मसन्मान जागविणारा संदेश काव्यातून कवी देतो अथवा दास्यातून मुक्तता करून घेण्यासाठी कवी उपायही सुचवितो-

पशुहीन केले। नच डर दिला कुठे सन्मान
आणि मग साहु नका कुणाचा जुलूम
होऊ नका कुणाचा गुलाम
सोडून द्या सारे बदकाम

किसन फागूजी बंदसोडे यांची कविता समाज जागृतीच्या उद्देशाने प्रकट झाली आहे. दलितोद्धारासाठी त्यांनी आपले सारे आयुष्य खर्ची घातले. 'लढल्याशिवाय मुक्ती नाही' असे त्यांचे जीवीत कार्याचे सूत्र आहे.

**कालीचरण नंदागवळी (इ.स.१८८३ ते इ.स. १९६२) :-**

विदर्भात अस्पृश्योद्धारासाठी झटणारे अनेक कार्यकर्ते होते. त्या कार्यकर्त्यांमध्ये कालिचरण नंदागवळी यांचे स्थान महत्त्वपूर्ण होते. वऱ्हाडामध्ये प्रांतात त्या काळात अस्पृश्यांतील महार समाजातील अनिष्ट रूढी परंपरा नष्ट कराव्यात, त्यांच्यात असलेल्या विटाळासंबंधीच्या कल्पना मोडून काढाव्यात म्हणजे किसन फागूजी बंदसोडे, गणेश अकाजी गवई, कालिचरण नंदागवळी हे प्रमुख नेते एकत्रितपणे काम करीत होते. या तिन्ही नेत्यांनी अस्पृश्यांमधील महारांनी आपले आचरण कसे करावे या बाबतीत केलेले 'विनंती पत्र' महात्त्वाचे आहे. त्यानुसार महारांमधील बारा पोट जातीपैकी'बावने' या जातीची विटाळाच्या कल्पनेतून सुटका व्हावी. आपल्या नाते संबंधामधील व्यवहार नीतिमान असावेत. अनैतिकता व व्यसनाधीनता यांना आळा बसावा, मांसाहार, मद्यपान इत्यादी अनिष्ट रूढी परंपरा नष्ट व्हाव्यात. या उद्देशाने बंदसोडे, गवई आणि नंदागवळी या नेत्यांनी सर्व पोटजातीच्या पंचांची सभा बोलावली आणि त्या सभेत दहा नीतिनियम जाहीर करण्यात आले आणि त्याप्रमाणे बावने महारांनी आचरण करावे असे आवाहन करण्यात आले.

वऱ्हाड-मध्यप्रांतात 'नागपूर महार सभा' या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेत कालिचरण गणूजी नंदागवळी हे उपाध्यक्ष होते. इ.स. १९१३ त्यांनी स्वखर्चाने गोंदिया येथे मुलींसाठी शाळा सुरू केली. इ.स. १९१४ मध्ये त्यांनी 'भारतीय महार पंचायत' नावाची संस्था स्थापन केली. नंदागवळींनी 'विटाळ विध्वंसक' हे वृत्तपत्र चालविण्यात किसन फागूजी बनसोडे यांना महत्त्वाचे सहकार्य केले. तसेच त्यांनी स्वतःच्या मालकीचे 'दीनबंधु' नावाचे साप्ताहिकही चालविले होते.

कालिचरण नंदागवळी यांनी अस्पृश्यांवरील सामाजिक अन्यायाला वाचा फोडली. नागपूर येथील अखिल भारतीय बहिष्कृत वर्ग परिषदेच्या वेळी स्वागताध्यक्ष या नात्याने त्यांनी भाषणात उच्चवर्णीय सनातनी लोक अस्पृश्य समाजावर कशा प्रकारे अन्याय-अत्याचार करतात त्यासंबंधी अत्यंत प्रभावीपणे आपले विचार प्रकट केले. अस्पृश्योद्धारासाठी कार्य करणाऱ्या बहिष्कृत वर्ग परिषदेच्या कार्यासाठी राजर्षी शाहू महाराजांनी ५ हजार रुपये देणगी दिली होती. त्यावेळी नंदागवळींनीही १ हजार रुपये याच कार्यासाठी दिले होते. अशा प्रकारे ते सामाजिक कार्यांसाठी आर्थिक योगदान देत होते.

कालिचरण नंदागवळी यांनी अस्पृश्यांच्या सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणेसाठी महत्त्वाची भूमिका बजावली. अस्पृश्यांना मोफत शिक्षण दिले पाहिजे. किंबहुना त्यांना शालोपयोगी सामुग्री मोफत पुरविली पाहिजे असेही त्यांचे म्हणणे होते. अस्पृश्य समाजाला औद्योगिक आणि तांत्रिक शिक्षण घेऊन आपली प्रगती करणे शक्य व्हावे यासाठी त्यांना अशा प्रकारच्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात अशी त्यांनी मागणी केली.

नंदागवळींनी अस्पृश्यांमधील सर्व जातींच्या हितासाठी कार्य केले. त्यांनी गोंदिया नगरपालिकेचे सदस्य असताना मेतर समाजासाठी भरीव कार्य केले. त्यामुळे मेहतर समाजातर्फे त्यांना त्यांना इ.स. १९२३ मध्ये मानपत्र देण्यात आले होते. शासकीय अनुदानाचा लाळा सर्व अस्पृश्य मुलांना झाला पाहिजे, या अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ झाली पाहिजे. तसेच निराधार मुलांच्या प्राथमिक शिक्षणासाठी विशेष सहाय्य मिळावे यासाठी नंदागवळींनी महत्त्वाचे कार्य केले. त्यांनी इ.स. १९२१ मध्ये वऱ्हाड-मध्यप्रांतील सार्वजनिक पाणवठे, धर्मशाळा, घाट इत्यादींचा उपयोग अस्पृश्यांनाही घेता यावा असा प्रस्ताव विधान परिषदेत मांडला होता. त्यामागे सवर्णांप्रमाणे अस्पृश्यांनाही सामाजिक समतेने वागविले जावे हा उद्देश होता. हा ठराव संमत न झाल्यामुळे नंदागवळी यांनी पुन्हा १९२३

च्या ऑगस्ट महिन्यात पुन्हा तो ठराव चर्चेला आणला. आणि सातत्याने दोनवर्षे पाठपुरावा करून तो ठराव संमत करून घेतला ते वऱ्हाड-मध्यप्रांत असेंब्लीत तीन वर्षे सदस्य होते.

नंदागवळी यांनी वऱ्हाडाच्या मध्यप्रांत विधानपरिषदेत अस्पृश्यांची न्यायाधीशपदी नियुक्ती करण्यात यावी असा ठराव मांडला होता. आणि तो संमतही झाला होता. एवढेच नव्हे तर त्यांनी अस्पृश्यांनी राजकीय सत्तेवर सहभागी व्हावे या भूमिकेचा पाठ पुरावा केला होता.

**गणेश अकाजी गवई (इ.स. १८८८ ते इ.स. १९७४) :-**

अमरावती जिल्ह्यातील भूगाव हे ग.आ. गवई यांचे जन्मगाव. डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळीला गवई यांनी महत्त्वाचे योगदान दिले. त्यांनी इ.स. १९२० मध्ये नागपूर येथे अखिल भारतीय बहिष्कृत वर्गाची परिषद भरविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. इ.स. १९१९ पासून ते मध्यप्रांत कायदेमंडळाचे सरकारनियुक्ती सदस्य होते. त्या काळात त्यांनी सार्वजनिक पाणवठे, घाट इत्यादी अस्पृश्यांसाठी खुले असावे यासाठी प्रयत्न केले. अमरावती येथील अंबादेवी मंदिर प्रवेश सत्याग्रहात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदविला होता. त्यांनी अस्पृश्यांना लष्कर व पोलिस खात्यात नोकरी मिळावी यासाठी प्रयत्न केले होते.

गवई यांनी वऱ्हाडात महार वतनदारांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. त्यांची वृत्तपत्राद्वारे जागृती करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका राहिली. इ.स.१९१४ मध्ये त्यांनी 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू केले. स्वतःचा उद्धार स्वतःच केला पाहिजे हे गवई यांच्या बहिष्कृत भारताचे धोरण होते.

गवई यांच्या अध्यक्षतेखाली, अस्पृश्योद्धारक अधिवेशन भरविण्यात आले होते. लक्ष्मणराव कैकणी न.भ. द्रविड, वि.रा. शिंदे, सौ. जनाबाई शिंदे, सौ. इंदिराबाई परचुरे, ह. ब. परचूरे, रा. वि. महाजनी, पा.स. केवळकर, गोविंदराव काणे इत्यादी महत्त्वपूर्ण पाहुण्यांसह विदर्भातील अधिवेशनात संमत झालेले काही ठराव पुढीलप्रमाणेः-

१) सर्व माता-पित्यांनी आपल्या मुला-मुलींना नियमित शिक्षण द्यावे.

२) भारत सरकारने प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे.

३) शालेय शिक्षण क्रमात करण्यात आलेल्या फी वाढी संबंधीच्या नियमांचा दलित वर्गावर अनिष्ट परिणाम होणार असल्यामुळे ते नियम अंमलात आणू नये.

४) आपण आपल्या व्यवसाय/नोकरी/उद्योग यांद्वारे आपली पत्नी वा स्वतःच पालन पोषण करण्याइतपत सक्षमता प्राप्त केल्याशिवाय कोणतीही विवाह करू नये.

५) माता-पित्याने आपल्या मुल-मुलींच्या विवाहाच्या नावाखाली हुंडा घेऊ नये.

६) बालविवाह करू नये.

७) नशा आणणाऱ्या दारू, गांजा, भांग यांचे सेवन करू नये.

८) महार समाजाने विवाहाप्रसंगी कर्ज काढून खर्च करण्याच्या सवयीचा त्याग करावा.

९) शेतकऱ्यांसाठी शासकीय बँकासाख्या सहकारी बँका सुरू कराव्यात.

१०) जाती-जातींतील द्वेषभावना नष्ट करावी आणि सर्वांशी एकोप्याने राहावे.

अशा प्रकारे अस्पृश्य समाजाच्या उत्थानासाठी व जागृतीसाठी डॉ. आंबेडकरपूर्व अस्पृश्य पुढाऱ्यांनी काही प्रमाणत जागृती झाल्यानंतर अस्पृश्य समाजात आपल्या उन्नतीसाठी प्रयत्न सुरू झालेले आढळतात, या सर्व चळवळीत जानोजी कचरू खंडारे, विठोबा मून, संभाजी संतूजी वाघमारे,

संभाजी तुकाराम गायकवाड व त्यांचे बंधू, बेळगाव येथील रावसाहेब पापण्णा, पां. नं. भठकर, रामजी पैकू शैटया, विश्रामजी सवाई थूल, दामोदर खापर्डे, बाबू एल. एन. हरदास इत्यादी अनेक कार्यकर्ते कार्य करीत होते. या सर्व व्यक्तींच्या कार्याने डॉ. आंबेडकरांच्या चळवळीची पार्श्वभूमी तयार झाली.

## ७.२.४ डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळ:-

महात्मा जोतीराव फुले यांच्यानंतर समता प्रस्थापित करणारी चळवळ ही जनआंदोलन म्हणून पुढे आली. या चळवळीचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. त्यांनी सुरू केलेली म्हणजे जात वर्ग व वर्ण यांचा अंत करणारी चळवळ होय. दलितांना माणूस म्हणून आत्मसन्मान मिळवून देणारी चळवळ म्हणून या चळवळीचे स्थान आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात दलितांना समान दर्जा प्राप्त करून दिला.

**डॉ. आंबेडकरांचा अल्पपरिचय :-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळचे संपूर्ण नाव भीमराव रामजी सपकाळ असे होते. त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेशातील महू येथे झाला. त्यांचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील आंबावडे हे होय. त्यांची आई भीमाबाई आणि वडील रामजी हे ब्रिटिश फौजेत सुभेदार होते. इ.स. १९०७ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर मॅट्रीक उत्तीर्ण झाले. इ.स. १९१३ मध्ये पर्शियन व इंग्लिश हे विषय घेऊन ते बी. ए. उत्तीर्ण झाले. डॉ. आंबेडकर लहान असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले होते. तर इ.स. १९१३ मध्येच त्यांच्या वडिलांचे निधन झाले होते. तथापि त्यांनी आपल्या शिक्षणात खंड पडू दिला नाही. पुढे बडोद्याचे नरेश सयाजीराव गायकवाड यांनी दिलेल्या शिष्यवृत्तीमुळे अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, इत्यादी विषयांचे अध्ययन केले. इ.स. १९१५ मध्ये 'भारताच्या राष्ट्रीय नफ्याचा वाटा : एक ऐतिहासिक पृथक्करणात्मक परिशीलन' या प्रबंधाबद्दल कोलंबिया विद्यापीठाने त्यांनी पी.एच. डी. पदवी बहाल केली. डी. एस्सी. ही अर्थशास्त्रातील पदवी प्राप्त करण्यासाठी त्यांनी 'रुपयांचा प्रश्न' या विषयावर प्रबंध लिहून लंडन विद्यापीठाला सादर केला. त्याबद्दल त्यांनी ती पदवी देण्यात आली. तर पुढे कायदा व राज्यशास्त्राचा अभ्यास करून त्यांनी बार-ॲट-लॉ अर्थात बॅरिस्टरीची पदवी मिळविली. अशा प्रकारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर उज्ज्वल नेत्रदीपक यश संपादन केले. अर्थातच त्यांना त्यासाठी कठोर ज्ञानोपासना करावी लागली होती.

**सामाजिक चळवळ**

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर :-**

इ.स. १९२० पासून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्त्वाखालील चळवळीचा प्रारंभ होतो. डॉ. आंबेडकर दलित व शोषित असणाऱ्या समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी मोलाचे योगदान दिले आहे. मोडेन पण वाकणार नाही असे त्यांचे ब्रीद होते. दलितांना मानवतावादी हक्क असावेत यासंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, '' मला न्याय हवा; भीक नको.'' त्यांनी भारतातील दलित समाजाच्या उत्थानासाठी, त्यांच्यात जागृती घडवून आणण्यासाठी, त्यांना संघटित करण्यासाठी, त्यांच्यात शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. डॉ. आंबेडकर दलित, उपेक्षित, शोषित यांच्यासाठी केलेले जे कार्य आहे त्याला इतिहासात तोड नाही.

**माणगावची परिषदः–**

दि. २० मार्च १९२० रोजी कागल जहागिरीतील माणगाव येथे राजर्षी शाहू महाराजांच्या प्रेरणेत आणि आप्पासाहेब दादागोंडा पाटील यांच्या मदतीने अस्पृश्यांची एक परिषद आयोजित केली होती. कोल्हापुरातील अस्पृश्य पुढाऱ्यांनी भरविलेल्या या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. या परिषदेतच शाहू महाराजांनी अस्पृश्य चळवळीचे नेतृत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. आणि डॉ. आंबेडकरांचा अस्पृश्य समाजास परिचय करून देताना शाहू महाराजांनी म्हटले होते, '' तुमचे खरे पुढारी डॉ. आंबेडकर आहेत. माझी खात्री आहे की, तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील अशी माझी मनोदेवता मला सांगत आहे.'' आपल्या दूरदृष्टीने शाहू महाराजांनी बाबासाहेबांविषयी केलेली भविष्यवाणी तंतोतंत खरी ठरली. हे इतिहासाने सिद्ध केल्याचे दिसते. ( राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, डॉ. जयसिंगराव पवार पृ.७७) या परिषदेत अनेक ठराव मंजूर करण्यात आले.

**बहिष्कृत हितकारणी सभाः–**

इ.स. १९२० ते इ.स. १९२३ या काळात 'मूक नायक' या पाक्षिकाच्या माध्यमातून अस्पृश्यांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रयत्न केला. अस्पृश्यांना जाणून घेण्यासाठी आणि संघटित करण्यासाठी संस्था स्थापन करण्याची गरज त्यांनी वाटू लागली. तसेच अपृश्य वर्गाच्या सामाजिक, राजकीय, अडचणी सरकारपुढे मांडण्यासाठी एक मध्यमवर्ती मंडळ असावे, यासाठी ९ मार्च १९२४ रोजी समाजसेवकांची दामोदर ठाकरसी सभागृह, परळ मुंबई येथे सभा बोलावली. त्या सभेतील ठरावानुसार २० जुलै १९२४ रोजी ' बहिष्कृत हितकारिणी सभा' स्थापन झाली. या सभेचे अध्यक्ष सर चिमणलाल सेटलवाड हे होते. उपाध्यक्ष म्हणून जी. के. नरिमन, र.पु. परांजपे, बाळ गंगाधर खेर इत्यादींची निवड करण्यात आली. तर सभेचे कार्याध्यक्ष स्वतः डॉ. आंबेडकर होते व सीताराम नामदेव शितरकर हे चर्मकार समाजाचे गृहस्थ या संस्थेचे सेक्रेटरी होते. या संस्थेचे मुख्य उद्देश पुढीलप्रमाणेः-

१) बहिष्कृत वर्गात जागृती निर्माण करणे.

२) बहिष्कृत वर्गाच्य मानवी हक्कांचे संरक्षण करणे.

३) बहिष्कृत वर्गाची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी औद्योगिक शेतकीविषयी शाळा सुरू करणे.

४) बहिष्कृत समाजात शिक्षणाचा प्रसार करणे.

या बहिष्कृत हितकारिणी सभेचे ब्रीदवाक्य शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा असे होते. या सभेने महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रहही घडवून आणला होता.

**सत्याग्रहः–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित वर्गाच्या न्याय हक्कासाठी सत्याग्रह करण्यात आले. महाडचा चवदार तळ्याचा सत्याग्रहः- सीताराम बोले यांनी मुंबई विधिमंडळात ४ ऑगस्ट १९२३ रोजी सार्वजनिक ठिकाणचा अस्पृश्यांना उपयोग करू द्यावा. त्यांनी शाळा, दवाखाने, कार्यालये, न्यायालये इत्यादी ठिकाणी अस्पृश्य म्हणून प्रवेश नाकारू नये अशा आशयाचा ठराव मंजूर करण्यात आला होता तथापि, तथाकथित सवर्ण हिंदूंनी चवदार तळ्यात पाणी भरण्यास अस्पृश्यांना विरोध केला. त्यामुळे या तळयावर पाणी भरण्यासही कोणी धाडस केले नाही म्हणूनच अस्पृश्यांमध्ये

आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी डॉ. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९ व २० मार्च १९२७ रोजी महाड येथे बहिष्कृत हितकारिणी सभेचे अधिवेशन आयोजित केले. त्यावेळी डॉ. बाबासाहेबांनी आपल्या भाषणात म्हटले की, ''चवदार तळे सार्वजनिक असून अस्पृश्यांना मोळे असल्याचा महाड म्युनिसिपालिटीचा ठराव आहे. तेव्हा आपण स्पृश्यास्पृश्य बंधु मिरवणुकीने तळयावर जाऊ व आपली तृष्णा शांत करू.'' त्यानंतर चवदार तळयावर सर्व सत्याग्रहींनी जाऊन पाणी पिण्याचे ठरविले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली असंख्य सत्याग्रहींनी तळयाचे पाणी प्राशन केले. हा सत्याग्रह म्हणजे आम्हीही माणसे आहोत आणि आम्हालाही जगण्याचा अधिकार आहे हे स्पष्ट करणारी प्रतिकात्मक क्रांती होय.

'मनुस्मृती' चे दहन :- दि. २५, २६ आणि २७ डिसेंबर १९२७ रोजी महाड येथे सत्याग्रह परिषद आयोजित केली होती. 'मनुस्मृती' हा हिंदूचा धर्मग्रंथ मानला जातो. या ग्रंथामुळे जातिव्यवस्था अस्पृश्यता, जातिबंधने बळकट विषमतेचा पुरस्कार करणाऱ्या मनुस्मृतीचे २५ डिसेंबर १९२७ रोजी प्रतिकात्मक दहन केले. सामाजिक समतेच्या लढ्यातील ही एक क्रांतिकारक घटना असून दलितांचे मनोबल उंचावण्यास प्रेरक ठरली.

**काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह :-**

सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी भरण्यास ज्याप्रमाणे दलितांना मज्जाव होता त्याप्रमाणे त्यांना हिंदूंच्या मंदिरातही प्रवेश करण्यास बंदी होती. दलित हे हिंदू समाजाचे घटक असूनही त्यांना अशी भेदाची वागणूक दिली जात होती. त्यामुळे त्यांच्यावरील या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३ मार्च १९३० रोजी नाशिक येथील काळाराम मंदिरात प्रवेश करण्यासाठी आपल्या असंख्य सहकाऱ्यांसह सत्याग्रह केला. या सत्याग्रहाला पुढे व्यापक चळवळीचे स्वरूप देऊन दलित पुढाऱ्यांनी हा लढा चालू ठेवला होता. तथापि पुजाऱ्याने काळाराम मंदिराचे प्रवेशद्वार बंद करून घेतले. हा सत्याग्रह इ.स. १९३४ पर्यंत लांबला होता. या चळवळीत स्त्रियाही सहभागी झाल्या होत्या. व काही तुरुंगातही गेल्या. हा सत्याग्रह केवळ मंदिरात प्रवेशासाठी होता असे नव्हे तर आम्ही हिंदू आहोत आम्हाला इतर हिंदूंप्रमाणे हिंदूंच्या मंदिरात जाण्याचा अधिकार आहे. अशी सत्याग्रह करण्यामागील भूमिका होती. अनेक वर्षे मंदिरात प्रवेश सत्याग्रह चालला. मात्र दलितांना मंदिरात प्रवेश आला नाही. शेवटी इ.स. १९३४ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर सूचनेवरून मागे घेण्यात आला.

नाशिक येथे झालेल्या सत्याग्रहानंतर सर्वत्र मंदिरप्रवेशाबरोबरच सार्वजनिक जागा, शाळा इत्यादी ठिकाणी छोटे-मोठे सत्याग्रह करण्यात आले.

**राजकीय चळवळ:-**

कोणतीही सामाजिक चळवळ राजकीय आश्रयाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही तसेच सामाजाचा विकासही राजकीय सत्तेशिवाय होत नाही. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला 'राज्यकर्ती जमात ' अर्थात 'शासनकर्ती जमात बना' असा संदेश दिला.

१) साऊथबरो कमिटी:-

इ.स. १९१९ मध्ये ब्रिटिश सरकारने राजकीय हक्क देण्यासाठी लॉर्ड साऊथबरो यांच्या अध्यक्षतेखाली मतदान कमिटी भारतात पाठविली होती. या कमिटीसमोर अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची मागणी करण्यासाठी विठ्ठल रामजी शिंदे व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सरकारने निवड

केली. त्यांनी साऊथ ब्युरो समितीसमोर साक्ष दिली आणि अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांची बाजू मांडली. या निमित्ताने राजकीय हक्कांच्या चळवळीची मुहूर्तमेढ ही रोवली गली. साऊथबरो कमिटी समोर डॉ. आंबेडकरांनी केलेल्या मागण्या पुढीलप्रमाणे :-

१) अस्पृश्यांना लोकसंख्येच्या प्रमाणात मतदार संघात जागा द्याव्यात

२) अस्पृश्यांचे अस्पृश्य प्रतिनिधी अस्पृश्य मतदारांनी निवडून द्यावेत.

३) अस्पृश्यांना मताधिकार देण्यात यावा.

४) अस्पृश्यांना निवडणुकीस उभे राहता यावे.

५) अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघ असावेत.

साऊथबरो कमिटीसमोर महर्षी शिंदे यांनीही साक्ष दिली. त्यावेळी त्यांनी ज्यांचे वार्षिक रु.१४४ असेल व जे सरकारमान्य शाळेतून इयत्ता चौथी उत्तीर्ण झाले असतील, अशा अस्पृश्यांना मताधिकार द्यावा अशी मागणी केली. तसेच अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी हे सरकारने अथवा त्यांच्या जातिनिहाय संस्थांद्वारे न घेता अस्पृश्येतरांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधीकडून नेमावेत अशी ही मागणी केली होती. महर्षी शिंदे यांच्या या मागणीमुळे अस्पृश्यंचे प्रतिनिधी बिगर अस्पृश्यांच्या प्रतिनिधींनी ठरवावेत, ही भूमिका अस्पृश्य वर्गाला मान्य होणार नव्हती. शिंदे यांचा दृष्टीकोण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना मान्य झाला नाही.

**२) अस्पृश्यांच्या हक्कांचा जाहीरनामा :–**

हिंदुस्थानला राजकीय हक्क देण्यासाठी ब्रिटिश सरकारने इ.स. १९२७ मध्ये सर जॉन सायमन यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी नेमली. या कमिटीस सायमन कमिशन म्हणून ओळखले जाते. काँग्रेसने या कमिशनला विरोध केला. बहिष्कृत हितकारिणी सभेच्यावतीने डॉ. आंबेडकरांनी दोन खलिते पाठविले. त्यांपैकी एक अस्पृश्यांच्या हक्कांसबंधी व दुसरा मुंबई प्रांतात कोणते राजकीय हक्क असावेत या बाबतीत सविस्तर माहिती दिली होती.

पहिल्या खलित्यात अस्पृश्यवर्गाच्या शिक्षणाच्यासंदर्भात मागण्या करण्यात आल्या होत्या. त्यांपैकी काही प्रमुख पुढीलप्रमाणेः-

१) अस्पृश्य वर्गात शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी शिष्यवृत्ती देण्यात यावी.

२) अस्पृश्य विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे सुरू करावीत.

३) शासकीय नोकऱ्यांमध्ये अस्पृश्यांची पृष्कळ प्रमाणात भरती करावी.

४) शिक्षण खाते स्कूलबोर्डाकडून काढून घ्यावे.

दुसऱ्या खलित्यात पुढील मागण्या केल्या-

१) सर्व स्त्री-पुरुषांस प्रौढमताधिकार असावा.

२) विधिमंडळात १४० पैकी ३३ मुस्लीम आणि १५ अस्पृश्य असावेत.

३) उमेदवारासाठी वसतिस्थान असण्याची अट नसावी.

४) वरिष्ठ कायदेमंडळात असू नये.

५) प्रांतांना संपूर्ण स्वायत्तता देण्यात यावी.

६) अस्पृश्य वर्गास अधिक राजकीय हक्क द्यावेत. सायमन कमिशनने अस्पृश्यांना राजकीय हक्क द्यावेत अशी शिफारस केली व त्यांच्या प्रश्नांविषयी अधिक विचार झाला पाहिजे हे मात्र राजकीय

हक्क कोणत्या स्वरूपात असावेत. या बाबतीत केलेल्या शिफारसीस अशी मागणी केली. तसेच अस्पृश्य वर्गाचे प्रतिनिधी हे सरकारने अथवा त्यांच्या जातनिहाय संस्थांद्वारे न घेता अस्पृश्येतरांनी निवडून दिलेल्या प्रतिनिधींकडून नेमावेत अशीही मागणी केली होती. महर्षी शिंदे यांच्या या मागणीमुळे अस्पृश्यांचे प्रतिनिधी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी विरोध केला.

दि. १९ मार्च १९२८ रोजी मुंबई कायदेमंडळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महार वतन बिल मांडले. महारांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी हे बील मांडण्यात आले. हे वतन खालसा करून त्यांच्या इच्छेप्रमाणे काम व वेतन ठरविण्याचा अधिकार देण्यात यावा; अशी मागणी करण्यात आली.

**गोलमेज परिषद आणि पुणे करार :-**

हिंदुस्थानला राजकीय हक्क देण्यासाठी सुचविलेल्या सायमन कमिशनच्या शिफारशी भारत व इंग्लंडमधील राजकीय पुढाऱ्यांनी नाकारल्या. त्यातून मार्ग काढण्यासाठी राऊंड टेबल कॉन्फरन्स (गोलमेज परिषद) लंडन येथे भरविण्यात आली. १0 नोव्हेंबर १९३0 रोजी पहिली तर ७ सप्टेंबर १९३१ रोजी दुसरी आणि १७ नोव्हेंबर १९३२ रोजी तिसरी परिषद लंछन येथे घेण्यात आली.

पहिल्या गोलमेज परिषदेस अस्पृश्यांचे पुढारी म्हणून डॉ. आंबेडकर उपस्थित होते. त्यांनी या परिषदेत अस्पृश्यांवर होण्याऱ्या अन्याय अत्याचाराची करुण कहाणी मांडली. त्यावेळी ब्रिटिशही थरारून गेले. हिंदुसमाजापासून दलित वर्ग वेगळा आहे त्यामुळे शीख, मुस्लीम दलितांनाही मिळाव्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यांसाठी स्वतंत्र मतदार संघाची मागणी केली.

दुसऱ्या गोलमेज परिषदेत महात्मा गांधी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यात मतभेद निर्माण झाले. शीख, मुस्लिमांच्या स्वतंत्र मतदार संघाच्या मागणीला गांधीजींचा पाठिंबा होता. मात्र अस्पृश्यांच्या स्वतंत्र मतदार संघाला त्यांनी प्रखरपणे विरोध केला.या परिषदेच्या आधारे ब्रिटिश प्रधानमंत्री रॅक्डोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर केला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची स्वतंत्र मतदार संघाची मागणी मंजूर केली. गांधीजी यावेळी येरवडा कारागृहात होते. ' अस्पृश्यांना हिंदूपासून फोडण्याचा इंग्रजांचा डाव आहे.' असे मत मांडून कारागृहात गांधीजींनी प्राणांतिक उपोषणाला सुरुवात केली. गांधीजींच्या प्राणाला धाका निर्माण झाला. त्यांची प्रकृती ढासळू लागली; त्यावेळी बॅरिस्टर जयकर, सप्रू, बिली इत्यादी कॉंग्रेसी नेत्यांच्या येरझरा वाढू लागल्या. शेवटी श्रेष्ठ नेत्यांनी एकत्र बसून समेट घडवून आणला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महात्मा गांधी यांच्यात इ.स. १९३२ मध्ये पुणे येथे करार झाला. तो 'पुणे करार' या नावाने ओळखला जातो.

पुणे करारानुसार अस्पृश्यांना स्वतंत्र मतदार संघाउवजी संयुक्त मतदार संघ व केंद्रीय कार्यमंडळात सर्वसाधारण मतदार संघास ज्या जागा मिळतील त्यापैकी १८% तसेच प्रांतिक कायदेमंडळात १४८ जागा राखीव ठेवण्यात आल्या. यातून अस्पृश्यांना राजकीय स्वरूपाचे फायदे मिळाले मात्र त्यानंतर ही भावी राजकीय वाटचालीत समतेचा विचार मांडणारे एक पक्षीय संघटन असणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आवश्यक वाटले आणि त्यातून त्यांनी राजकीय पक्षाची स्थापना केली.

**राजकीय पक्षाची स्थापना:-**

१९३५ च्या कायद्यान्वये प्रांतिक विधान मंडळाच्या निवडणुका होणार होत्या. दलितांच्या हक्कांचा लढा राजकीय पातळीवरून लढविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १५ ऑगस्ट १९३६

रोजी मुंबई येथे 'स्वतंत्र मजूर पक्ष' स्थापन केला. १९३७ च्या निवडणुकीत मजूर पक्षाने तेरा जागा जिंकल्या. या पक्षाच्याद्वारे त्यांनी कामगार व शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचेही प्रयत्न केले. या पक्षाच्या समोर इंग्लंडमधील मजूर पक्षाचा आदर्श होता. अस्पृश्याचा प्रश्न हा खऱ्या अर्थाने आर्थिक आहे असे डॉ. बाबासाहेबांचे मत होते.

इ.स. १९४२ मध्ये सर स्टॅफोर्ड क्रिप्स भारतात आले. त्यांनी क्रिप्स योजना जाहीर करण्यापूर्वी डॉ. आंबेडकरांनी क्रिप्स यांची भेट घेऊन त्यांच्यापुढे दलितांची बाजू मांडली होती त्यावेळी क्रिप्स यांनी अशी पृच्छ केली की, '' तुम्ही मजुरांचे पुढारी असल्यामुळे दलितांचे प्रतिनिधीत्व करण्याचा तुम्हाला कसा काय हक्क पोहोचतो? '' त्यानंतर डॉ. आंबेडकरांनी केवळ दीन दलितांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी नागपूर येथे अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लासेसच्या परिषदेत पक्षाची स्थापना केली. प्रत्येक प्रांतात या पक्षाच्या शाखा सुरू करण्यात आल्या. डॉ. आंबेडकरांना जातनिहाय पक्षाची स्थापना करणे मान्य नव्हते. म्हणून त्यांनी सर्व जाती-धर्मातील लोकांना सामावून घेणार एखाद्या नवा पक्ष असावा असे वाटू लागले. म्हणूनच ते शेडयुल्ड कास्ट फेडरेशनचे रूपांतर 'रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया' या पक्षाची स्थापना झाली. या पक्षाचे पहिले अध्यक्ष म्हणून रावबहादूर एन. शिवराज यांची निवड करण्यात आली.

**दलित चळवळीची वृत्तपत्रे :–**

प्राचीन काळापासून अस्पृश्य समाज सामाजिक-धार्मिक जीवनातील न्याय्य हक्कांपासून वंचित होता. या समाजावर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी, त्यांची गुलामगिरीतून मुक्तता करण्यासाठी अत्यंत प्रभावी साधन असलेल्या वृत्तपत्राची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना गरज वाटत होती. त्यामुळेच त्यांनी वेगवेगळी वृत्तपत्रे सुरू केली आणि चालविली.

मूकनायक : डॉ. आंबेडकरांनी ३१ जानेवारी १९२० रोजी 'मूकनायक' या पाक्षिकाची सुरुवात केली या कामात राजर्षी शाहू महाराजांनी आर्थिक साहाय्य केले होते. दलितोद्धारासाठी सुरू केलेल्या चळवळीचे 'मूकनायक' हे पहिले पाक्षिक होते. तथापि डॉ. बाबासाहेबांना विद्याअभ्यासासाठी इंग्लंडला जावे लागल्यामुळे अल्पकाळात हे वृत्तपत्रे बंद पडले.

बहिष्कृत भारतः- ३ एप्रिल १९२७ रोजी हे दुसरे पाक्षिक सुरू करण्यात आले. यावेळी चळवळीला विरोध करण्याच्या टीकेला उत्तर देण्यासाठी हे पाक्षिक सुरू झाले. मात्र पुढे आर्थिक अडचणीमुळे ते १९२९ मध्ये बंद पडले. बहिष्कृत भारताने दोन वर्षांच्या कालावधीत सर्व अस्पृश्य जातींची संघटित स्वाभिमानी चळवळ उभी करण्याची प्रेरणा दिली. 'बहिष्कृत भारत' हे पाक्षिक दलिता चळवळीचे मुखपत्र बनले होते.

समताः- ' बहिष्कृत भारत' हे पाक्षिक सुरू असतानाच डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली 'समाज समता संघाचे' मुखपत्र म्हणून समता हे पाक्षिक २९ जून १९२८ रोजी सुरू झाले.या पाक्षिकाचे संपादक श्री. देवराव नाईक हे होते. सामाजिक समतेच्या चळवळीच्या प्रसार कार्यात या पाक्षिकाने मोलाचे योगदान दिले आहे. हे पाक्षिक आर्थिकदृष्टया खडतर परिस्थित चालविले जात होते. शेवटी ते पाक्षिकही बंद पडले.

जनताः- २४ नोव्हेंबर १९३० रोजी हे पाक्षिक सुरू झाले. ३१ ऑक्टोंबर १९३१ रोजी या पाक्षिकाचे साप्ताहिकात रूपांतर झाले. 'जनता' चे संपादकत्व अनेक आंबेडकर अनुयायांनी पार पाडले होते. आर्थिक अडचणीमुळे जनता हे वृत्तपत्र बंद पडण्याची वेळ आली होती. त्यावेळी समाजबांधवांनी

वर्गणीदार होऊन, देणगी रूपाने आर्थिक साहाय्य करावे आणि कर्तव्य पार पाडावे असे आवाहन करण्यात आले होते. 'गुलामाला गुलामीची जाणीव करून द्या म्हणजे तो बंड करून उठेल' हे घोषवाक्य 'जनता' या वृत्तपत्राचेच होते.

प्रबुद्ध भारत :- ४ फेब्रुवारी १९५६ रोजी 'जनता' चे प्रबुद्ध भारत असे नामकरण करण्यात आले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महानिर्वाणानंतर अखिल भारतीय रिपब्लिकन पक्षाचे 'प्रबुद्ध भारत' मुखपत्र म्हणून कार्यरत झाले.

डॉ. आंबेडकर आणि शैक्षिणिक कार्यः- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना हे ज्ञानोपासक होते. त्यांनी महाराष्ट्राची ज्ञानोपासनेची थोर परंपरा आधुनिक काळात खऱ्या अर्थाने पुढे चालविली. त्यांनी दलित समाजाच्या दृष्टीने शिक्षणाचे महत्त्व वाटत होते. अस्पृश्यांना शिक्षण मिळाल्याशिवाय त्यांची उन्नती होऊ शकणार नाही तसेच भारतीय समाजव्यवस्थेत त्यांनी प्रतिष्ठेचे स्थान प्राप्त होऊ शकणार नाही हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनांनी ओळखले होते. त्यामुळे अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्यासाठी त्यांनी शैक्षणिक संस्था सुरू करण्याचे ठरविले. त्यांनी 'बहिष्कृत हितकारिणी' सभे द्वारे दलित समाजातील तरुण व प्रौढ व्यक्तींसाठी रात्रशाळा चालविण्यात, वाचनालये सुरू करणे यासारखे उपक्रम हाती घेतले होते.

इ.स. १९४५ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई येथे 'पीपल्स एज्यकेशन सोसायटी' स्थापन केली. या संस्थेच्या वतीने मुंबई सिद्धार्थ कॉलेज सुरू केले. तर औरंगाबाद याच संस्थेचे इ.स. १९५० मध्ये मिलिंद कॉलेज सुरू करण्यात आले. तसेच इतर शैक्षणिक संस्था सुरू करण्यात आल्या. पीपल्स एज्यकेशन सोसायटी दलित विद्यार्थ्यांसाठी काही वसतिगृहेही चालविली. आपल्या एज्युकेशन सोसायटीच्या आज या संस्थेतून लाखो दलित विद्यार्थी-विद्यार्थिनी शिक्षण घेऊन बाहेर पडत आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी गरीब होतकरू विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी परदेशात पाठविण्याचे ठरविले होते. त्यानुसार इ.स. १९४५ मध्ये वीस विद्यार्थ्यांची पहिली तुकडी उच्च शिक्षणासाठी त्यांनी इंग्लंड व अमेरिकेला पाठविली. जनतेतील दुर्बल घटक अनुसूचित जातिजमातींना इतर समाजाच्या बरोबरीला आणण्यासाठी भारतीय राज्यघटनेतील कलम ४६ नुसार शैक्षणिक व अन्य सवलतींची तरतूद केली. तसेच राज्यघटनेतील कलम २९ नुसार शासकीय अनुदानित किंवा शासकीय मदत घेणाऱ्या शैक्षणिक संस्थेत कोणत्याही नागरी कास केवळ धर्म, वंश, जात, भाषा, या कारणावरून प्रवेश नाकारला जाणार नाही असे ठरविण्यात आले. अशा प्रकारच्या तरतुदींच्या मुला-मुलांनी होत आहे. याचे फार मोठे श्रेय डॉ. बाबासाहेब आंबेडकरांकडे जाते.

**डॉ. आंबेडकर आणि भारतीय राज्यघटना :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची घटना समितीवर निवड झाली होती. त्यानंतर घटना मसुदा समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. घटनेचा मसुदा तयार करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेबांना अत्यंत परिश्रमपूर्वक केले. मसुदा समितीच्या बैठकीत त्यांनी विद्वताप्रचुर भाषणे केली आणि मसुद्यातील विविध तरतुदींसंबंधी उपस्थित करण्यात आलेल्या सर्व शंकांचे निरसन केले. स्वतंत्र भारताची राज्यघटना तयार करण्याच्या प्रक्रियेत त्यांनी सिंहाचा वाटा उचलला होता. त्यामुळेच त्यांचा 'भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार' अशा शब्दात गौरव केला जातो. डॉ. आंबेडकरांनी भारताला विविध धर्म, जाती, भाषा, आचार असलेल्या या देशाला एका सूत्रात बांधणारे लोकशाही प्रधान, स्वतंत्र्य, समता व बंधुत्वावर आधारलेली राज्यघटना बहाल केली.

धर्मांतर :- अस्पृश्य वर्गास हिंदुधर्मात माणुसकीचे हक्क मिळणार नाहीत अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खात्री पटल्यानंतर हिंदू धर्माचा त्याग केल्याशिवाय गत्यंतर नाही असे बाबासाहेबांना वाटू लागले. इ.स. १९३५ मध्ये येवला जि. नाशिक येथे त्या धर्मांतराची घोषणा केली होती की, 'मी हिंदू धर्मात जन्माला आलो; पण हिंदू धर्मात मरणार नाही.' या घोषनही हिंदूंचे ह्रदयपरिवर्तन झाले नाही. शेवटी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी आपल्या लाखो अनुयायांसह नागपूर येथे बौद्ध धर्माचा स्वीकार केला.

धर्मांतरामुळे पूर्वाश्रमीच्या अस्पृश्यांना सामाजिक समतेचा आणि धार्मिकदृष्ट्या विशेष दर्जा प्राप्त झाला. त्यांनी बौद्ध धर्माची दीक्षा घेतल्यापासून ते स्वतः ला बौद्धधर्मीय म्हणून घेतात. धर्मांतरमुळे ग्रामीण भागातील अस्पृश्य समाजात क्रांतिकारी परिवर्तन झाले. त्यांच्यातील स्वाभिमान जागा झाला त्याचप्रमाणे त्यांच्यात महत्त्वाकांक्षा निर्माण झाली.

डॉ. बाबासाहेबांची कामगिरी हीच दलित चळवळीची कामगिरी होय. स्वतंत्र्य भारताचे ते पहिले कायदामंत्री झाले होते. विविध क्षेत्रातील त्यांच्या मौलिक कार्यामुळे भारत सरकारकडून 'भारत रत्न' या नागरी पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले.

**७.२.५ डॉ. आंबेडकरांच्या पश्चात दलित चळवळ :–**

दि. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरीपण ते लवकरच सावरले आणि आंबेडकरी जादूने ते अधिकच कार्यप्रवण निर्वाण झाले. त्यानंतर काही काळ दलित जनतेला दिशाहिन झाल्यासारखे वाटेल? दलित चळवळीच्या पुढच्या टप्प्यांत अनेक कार्यकर्त्यांनी योगदान दिले. त्यात कर्मवीर दादासाहेब गायकवाड, आर. डी. भांडारे, सी. एन. शिवराज, बी. सी. कांबळे, जी. टी. मेश्राम, बॅ. खोब्रागडे, आर. एस. गवई इत्यादींचा समावेश होता. इ.स. १९५६ नंतरही दलित चळवळीचे सामर्थ्य वाढले. मात्र नंतरच्या काळात नेत्यांमधील फाटाफुटीमुळे ही शक्ती विभाजित झाली.

**१) १९५७ च्या निवडणुकीत यशः–**

१९५७ च्या सार्वमिक निवडणुकीत शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनला नेत्रदीपक यश मिळाले. यावेळी संयुक्त महाराष्ट्र चळवळीचा जोर वाढला होता. संयुक्त महाराष्ट्र समितीचा एक घटक पक्ष म्हणून शेड्यूल्ड कास्ट फेडरेशननेही लोकसभा व विधासभेच्या निवडणुका लढविल्या. यावेळी फेडरेशनचे आठ खासदार आणि सतरा आमदार निवडून एन. शिवराज हे चिंगलपूर (मद्रास राज्य) य आले होते. ते या आठ खासदारांना येऊन मिळाले.

१९५७ च्या याच निवडणुकीत शेल्ड्यूल्ड कास्ट फेडरेशनच्या तिकिटावर ५ पंजाबमधून, २ म्हैसूर राज्यातून,२ गुजरातमधून, १ आंध्रप्रदेशातून व ३ मद्रास येथून असे १३ आमदार आणि महाराष्ट्रातील १७ आमदार असे एकूण २९ आमदार निवडून आले होते.

**२) रिपब्लिकन पक्षाची स्थापनाः–**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतीय राज्यघटनेने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला. त्यानंतर व्यापक तत्त्वज्ञानावर आणि आर्थिक कार्यक्रमावर आधारित नव्या पक्षाची उभारणी करण्याची घोषण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. मात्र धर्मांतराच्या सोहळ्यामुळे पक्ष स्थापनेचा निर्णय लांबणीवर पडला होता. पुढे बाबासाहेबांचे निर्वाण झाले. त्यानंतर त्यांच्या अनुयायांनी २१ एप्रिल १९५७ रोजी नागपूर येथे बैठक घेऊन त्यात शेड्यूल्ड कास्ट फेडरेशनचे रूपांतर रिपाब्लिन पक्षात

करण्याचा निर्णय केला आणि पुढे दि. ३ ऑक्टोबर १९५७ रोजी शेड्यूल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करून मद्रासच्या एन. शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली सात लाख लोकांच्य उपस्थितीत ' रिपब्लिकन ऑफ इंडिया' ची स्थापना केली.

**३) रिपब्लिकन पक्षात फूटः–**

रिपब्लिकन पक्षाच्या रूपाने दलितांची एकसंघ शक्ती उभी राहिली होती. मात्र पुढील काळात दलित चळवळीचे नेतृत्व भावी कार्यक्रम, अन्य पक्षांशी करावयाचे सहकार्य इत्यादी मुद्द्यांवरून ती शक्ती फार काळ अभंग राहू शकली नाही. दादासाहेब गायकवाड आणि बी. सी. कांबळे यांच्यातील सत्तावृत्तीमुळे रिपब्लिकन पक्षात फूट पडली. थोडक्यात नेतृत्वाच्या वादामुळे रिपब्लिकन पक्षात फूट पडली होती. प्रत्येक नेता स्वतःला बाबासाहेबांचा खरा वारसदार समजू लागला आणि आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत असे मानू लागला. तसेच आपलाच 'रिपब्लिकन पक्ष कसा खरा' असा दावा करू लागले. त्यामुळे निराशा झालेल्या दलित सुशिक्षित तरुणांनी साहित्य निर्मिती करून सांस्कृतिक बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच दलित साहित्याची चळवळ उदयास आली.

**४) दलित साहित्य चळवळः–**

अण्णाभाऊ साठे, शंकरराव खरात, बाबूराव बागूल यांच्या कथा प्रभावी ठरलेल्या दिसून येतात. त्यांच्या कथांमधून पददलितांच्या दुःख व दैन्याची वस्तुनिष्ठ मांडणी केल्याचे दिसते. बाबूराव बागूल यांच्या 'जेव्हा मी जात चोरली होती' (१९६३) या कथेत त्यांच्या विचारातील विद्रोह प्रकट झालेला आहे. प्रा केशव मेश्रारम यांच्य कादंबऱ्यांमधून अस्पृश्य वर्गास गावकुसाबाहेर कसे फेकले आहे. याचे विदारक चित्र दिसते. तसेच राजा ढाले, प्रकाश आंबेडकर, नामदेव ढसाळ, जोगेंद्र कवाडे, गंगाधर पानतावणे, यशवंत मनोहर, दया पवार, वामन निंबाळकर, योगीराज वाघमारे, प्र. इ. सोनकांबळे अविनाश डोळस, अर्जुन डांगळे, शरणकुमार लिंबाळे इत्यादींच्या लिखाणातून दलितांच्या वास्तव जीवनाचे व चळवळीचे वास्तव चित्रण केलेले आहे. दलित चळवळीच्या वैचारिक बांधणीत दलित साहित्याचे मोलाचे योगदान आहे. दलितांवर झालेले अन्याय-अत्याचार त्यांच्या दुःख वेदनांना वाचा फोडण्याचे कार्य दलित साहित्याच्याद्वारे साहित्यांनी केलेले आहे.

**दलित पँथरची स्थापना :–**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षांतर्गत मतभेद मोठ्या प्रमाणावर वाढल्यामुळे दलित नेते व अनुयायांमध्ये असंतोष निर्माण झाला. इ.स. १९६२ मधील चिनी आक्रमण, इ.स. १९६५ मधील पाकिस्तानबरोबरचे युद्ध यामुळे संपूर्ण देशात आर्थिक आपत्तीने गंभीर स्वरूप धारण केले. त्यावेळी भारत अन्न-धान्याच्या संदर्भात स्वयंपूर्ण नसल्यामुळे परकीय मदतीकडे डोळे लावून बसावे लागत होते. याचा परिणाम भारतात अन्नधान्याची टंचाई निर्माण होण्यात झाला. त्याची झळ दलित समाजाला मोठ्या प्रमाणावर बसली. तसेच दलितांवर होणाऱ्या अत्याचारामध्ये वाढ झाली. परिणामी दलित चळवळीतील तरुणवर्ग अस्वस्थ झाला. आपल्या समाजासमोरील प्रश्नांची तड लावण्यासाठी एकत्र येऊन त्याने दि.९ जुलै १९७२ रोजी 'दलित पँथर' या संघटनेची स्थापना केली. या लढाऊ 'दलित पँथर'च्या स्थापनेत नामदेव ढसाळ, राजा ढोले, ज. वि. पवार, रामदास सोरटे , रामदास आठवले, अविनाश महातेकर, अरुण कांबळे, अर्जुन डांगळे, लतीफ खाटीक, गंगाधर गाडे, भाई संगारे, टी. एम. कांबळे, प्रल्हाद चेंदणकर, जयदेव गायकवाड, उमाकांत रणधीर, इत्यादी तरुणांचा पुढाकार होता.

दलित पँथरने दलितांच्या व्याख्येत अनुसूचित जाति जमाति, बौद्ध, कामगार, कष्टकरी जनता, भूमिहीन, गरीब शेतकरी, शेतमजूर, भटक्या जमाती, आदिवासी या सर्वांचा समावेश केला होता. पँथरने आपल्या जाहिर नाम्यात असे म्हटले होते की, आमचे लक्ष्य केवळ व्यक्ती नसून व्यवस्था आहे. तसेच पँथर अस्पृश्यता, जातिव्यवस्था, आर्थिक शोषणाची पद्धत या सर्वांवर कठोर प्रहार करेल असे अभिवचन देण्यात आले होते. थोडक्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांच्या पायावर दलित पँथर चळवळ उभारली होती. दलितांवर होत असलेल्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात दलित पँथरने लढाऊ व आक्रमक पवित्रा घेतला होता. त्यामुळे दलित तरुणांमध्ये आशेची नवी उर्मी निर्माण झाली त्यामुळे दलितांमधील तरुण वर्ग भारल्यासारखा कार्य करू लागला. अगदी छोट्या छोट्या गावांमध्येही दलित पँथरच्या शाखा सुरू करण्यात आल्या. इ.स. १९७४ च्या सुरुवातीस वरळी येथे झालेल्या दंगलीच्या काळात दलित पँथरचे आक्रमक स्वरूप सर्वांच्या निदर्शनास आले होते. त्यामुळे त्यांच्या लढाऊ वृत्तीकडे आकृष्ट होऊन दलित पँथरच्या समर्थकांच्या संख्येत अधिकच भर पडली. दलित पँथरने एक राजकीय, सामाजिक दबाव वट म्हणून महत्त्वपूर्ण कार्य केलेले आहे.

**मराठवाडा विद्यापीठ नामांतर चळवळः-**

दलित चळवळीच्या इतिहासात विद्यापीठ नामांतर चळवळ हा एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे म्हणून इ.स. १९७७ पासून नामांतर चळवळ सुरू झाली. प्रथमच अशी मागणी 'दलित पँथर' या लढाऊ संघटनेचे सरचिटणीस गंगाधर गाडे यांनी ७ जुलै १९७७ रोजी केली होती. या मागणीच्या पूर्ततेसाठी एका कृती समितीची स्थापना करण्यात आली. या कृती समितीत युवक काँग्रेस, युवक क्रांती दल, जनता युवक आघाडी, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, समाजवादी क्रांती दल एस. एफ. आय, ए. आय. एस. एक , दलित पँथर, दलित युवक आघाडी, युवा रिपब्लिकन इत्यादी विद्यार्थी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता. राज्यातील पुरोगामी व परिवर्तनवादी संघटनांनी नामांतराच्या मागणीस पाठिंबा दिला.

विद्यार्थी आंदोलनाच्या दबाबामुळे १८ जुलै १९७७ रोजी मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यकारिणीने या विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव द्यावे असा ठराव एकमताने मंजूर केला. महाराष्ट्रातील राजकीय पक्षांनीही या मागणीला पाठिंबा दिला. वसंतदादा पाटील यांचे सरकार गडगडल्यानंतर महाराष्ट्रात पुरोगामी लोकशाही दलाचे सरकार राज्यात स्थापन झाले. या सरकारमधील जनता पक्ष, शेतकरी कामगारपक्ष हे नामांतरास प्रथमपासून अनुकूल होतेच. मुख्यमंत्री नामदार शरद पवार सरकारने महाराष्ट्र विधानसभा व विधानपरिषदेत २७ जुलै १९७८ रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामांतराचा ठराव मांडला आणि तो सर्वांनुमते बिनविरोध संमत करण्यात आला.

महाराष्ट्र विधिमंडळाने नामांतराचा ठराव संमत केल्यानंतर नामांतर आंदोलनाला हिंसक वळण लागले. मराठवाडा विभागातील जातीयवादी व प्रतिगामी शक्तींनी दलितांविरुद्ध बहुजन समाजातील सामान्य जनतेला चिथावले. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील दलितांच्या व रश्रयावर सवर्ण हिंदूंकडून हल्ले करण्यात येऊ लागले. त्यांची घेरदारे पेटवून देण्यात आली. त्यांच्यावर बहिष्कार टाकण्याचे प्रकारही घडू लागले. जवळजवळ दहा-बारा दिवस मराठवाड्यात दलित विरोधी दंगलीचा

वणवा कायम राहिला. तथापि दलित पँथर तसेच दलितांच्या अन्य संघटनांनी नामांतराची मागणी सोडून दिला नाही. मात्र दंगलीचे कारण पुढे करून सरोरने माघार घेतली. महाराष्ट्र विधिमंडळात संमत झालेल्या ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासंदर्भात चालढकल सुरू झाली.

दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी नामांतराचा प्रश्न ज्वलंत ठेवण्याचे आटोकाट प्रयत्न सुरूच ठेवले. त्यांनी जाहीर सभा, उपोषणे, मोर्चे, निदर्शने, रस्ता रोको, घेराव इत्यादी मार्गांचा दलित पँथर कार्यकर्त्यानी अवलंब केला. त्यांना राज्यातील काही पुरोगामी संघटनांचीही मनापासून साथ मिळाली. महाराष्ट्र विधिमंडळाच्या अधिवेशन काळात विधिमंडळावर मोर्चे काढणे, जेल भरो आंदोलन करणे यांमध्ये अनेक परिवर्तनवादी संघटनांचा सक्रिय सहभाग होता. परिणामी नामांतर चळवळ बळकठ आणि व्यापक बनली. या चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे सरकारने नामांतर ठरावाची अंमतबजावणी करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार १४ जानेवारी १९९४ रोजी महाराष्ट्र सरकारने मराठवाडा विद्यापीठाचा 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ' असा नामविस्तार केला.

१९७८ ते १९९४ या काळात समतेच्या तत्त्वासाठी प्रदीर्घ लढा दिला होता.

## ७.२ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न/उपक्रम

१) सत्यशोधक समाजाने सामाजिक समतेच्या संदर्भात केलेल्या कार्याचे मूल्यमापन करा.

२) ब्राह्मणेतर चळवळीच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.

३) ब्राह्मणेतर चळवळीची वाटचाल विशद करा.

४) राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीला दिलेले योगदान स्पष्ट करा.

५) डॉ. आंबेडकरपूर्व दलित चळवळीतील प्रमुख कार्यकर्त्यांचे योगदान स्पष्ट करा.

६) सामाजिक समतेसाठी डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वाखालील दलित चळवळीचा सविस्तर वृत्तांत लिहा.

७) डॉ. आंबेडकरोत्तर दलित चळवळीची माहिती लिहा.

८) टिपा लिहा.

अ) सत्यशोधक समाजाचे नियम.

ब) सत्यशोधक समाजाचा प्रभाव.

क) सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळ साम्य-भेद.

ड) ब्राह्मणेतर पक्षाची स्थापना.

इ) केशवराव जेधे.

फ) दिनकरराव जवळकर.

ग) मुकुंदराव पाटील.

च) प्रबोधनकार ठाकरे.

छ) दलित चळवळ.

ज) गोपाळबाबा वलंगकर.

झ) शिवराम जानबा कांबळे.

ट) किसन फागूजी बंदसोडे.

ठ) कालिचरण नंदागवळी.

ढ) गणेश अकाजी गवई

ण) दलित पँथर.

## ७.२ सारांश

भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना झाल्यानंतर भारतीय प्रबोधनला सुरुवात झाली. ब्रिटिशपूर्व काळात भारतीय समाज अज्ञान, अंधश्रद्धा, जातिभेद, अस्पृश्यता, श्रेष्ठ-कनिष्ठता इत्यादी वैगुण्यात गुरफटला होता. भारतात ब्रिटिशांनी आपली सत्ता स्थापन केल्यानंतर त्यांनी इंग्रजी शिक्षणाचा पाया घातला. इंग्रज शिक्षण घेतलेल्या तरुण वर्गाला आपल्या समाजातील दोषांची प्रकर्षाने जाणीव झाली. म्हणून त्यांपैकी काही नवशिक्षित तरुणांनी भारतात प्रबोधनाला सुरुवात केली.

महाराष्ट्रातील बहुजन समाजाला निरक्षरता व अज्ञानाने ग्रासले होते. या समाजाचे प्रबोधन करण्याचे कार्य सत्यशोधक व ब्राह्मणेतर चळवळ यांनी पार पाडले. सत्यशोधक चळवळींच्याद्वारे महात्मा जोतीराव फुले यांनी महाराष्ट्रातील कनिष्ठ जाती व बहुजन समाज यांच्या उद्धारासाठी सर्वात आधी प्रयत्न केले. त्यांनी येथील कित्येक शतके दडपून टाकलेल्या शूद्रातिशूद्र वर्गाच्या अन्याय-अत्याचारला वाचा फोडली. महात्मा फुले यांनी समाजात समता प्रस्थापित करण्यासाठी सर्वप्रथम पाऊल उचलले, त्यासाठी त्यांनी पुरोहितशाही विरुद्ध बंडाचा झेंडा उभारला.

सत्यशोधक समाजातून ब्राह्मणेतर चळवळीचा उदय झाला. या चळवळीत राजर्षी शाहू महाराज, केशवराव जेधे, दिनकरराव जवळकर, मुकुंदराव पाटील, प्रबोधनकार ठाकरे यासारख्या सुधारकांनी महत्त्वाचे कार्य केले होते. महात्मा फुले यांच्यापासून प्रेरणा घेऊन डॉ. आंबेडकरपूर्व काळात गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागूजी बंदसोडे, कालिचरण नंदागवळी इत्यादी सुधारकांनी दलितांच्या दुःख, वेदना यांना वाचा फोडली. या काळातील दलित चळवळीचे स्वरूप अत्यंत मर्यादित होते. पुढे डॉ. आंबेडकरांच्या काळात दलित चळवळीने संपूर्ण महाराष्ट्र ढवळून निघाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत उपेक्षित शोषित असलेल्या दलित वर्गात अस्मिता निर्माण करण्याची, त्यांना स्वसामर्थ्याची जाणीव करून देण्याची ऐतिहासिक कामगिरी करून दलितोद्धारासाठी आपले सर्व आयुष्य खर्ची घातले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली दलित जनता निर्भय झाली. त्यांच्यात नवा आत्मविश्वास निर्माण झाला. त्यामुळे या परिणामी दलितांच्या उद्धारासाठीच्या कार्याला व्यापक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या निर्वाणानंतरही त्यांच्या नावाची जादू दलित जनतेला कार्यप्रवण बनविण्यास पुरेशी ठरली होती. आणि त्यामुळेच इ.स. १९५६ नंतरही दलित चळवळीचे सामर्थ्य वाढत गेले. तथापि, सध्या दलित चळवळीचे स्वरूप एकसंघ राहिले नाही. दलित नेत्यांमध्ये व्यक्तिगत स्वार्थामुळे अहंकार, तडजोडी, गटबाजी निर्माण झाली. त्यामुळे संघटितपणे लढा देण्याचे सामर्थ्य संपुष्टात येत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर निर्वाणोत्तरच्या काळात दलित चळवळीला त्यांच्यासारखे खंबीर नेतृत्व मिळाले नाही. भारतात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षिण अशा क्षेत्रात जोपर्यंत विषमता आहे तोपर्यंत दलित चळवळीची आवश्यकता आहे. म्हणून दलित चळवळीने समविचारी शक्तींना एकत्रित आणण्याची आवश्यकता आहे.

## ७.५ पारिभाषिक शब्द-शब्दार्थ

१) सत्यशोधक समाज :- महात्मा जोतीराव फुले यांनी ईश्वराला 'निर्मिक' असे म्हटले आहे. सत्य म्हणजेच निर्मिका त्याचा घेणारा समाज म्हणजे सत्यशोधक समाज होय. पुरोहितवर्गाच्या मतलबी ग्रथांपासून दास्यत्वापासून शुद्रांची मुक्तता करण्यासाठी आणि सत्यशोधिक समाजाची स्थापना करण्यात आली.

२) चळवळ :- सर्वांच्या हितात व्यक्ती अथवा समुदायाकडून केलेली प्रामाणिक कृती त्यामागे एखाद्या मार्गदर्शक व्यक्ती अथवा विचारधारा असते. त्याप्रमाणे व्यापक स्वरूप प्राप्त झालेली कृती होय.

३) प्रबोधन :- प्रबोधन म्हणजे वैचारिक जागृती. समाजात प्रचलित असलेल्या रूढी, परंपरा, अचार-विचारात जेव्हा वैगुण्य निर्माण होतात तेव्हा त्या समाजाला बुद्धिमाण्य व वैज्ञानिक दृष्टीकोनातून जागृत करण्याच्या प्रक्रियेला प्रबोधन असे म्हणतात.

४) अस्पृश्य :- स्पर्श करण्यास योग्य नाही असा.

५) बहिष्कृत :- समाजाने ज्यांच्यावर सामाजिक, आर्थिक बहिष्कार टाकला आहे असा समाज/वर्ग.

६) ब्राह्मण :- ब्राह्मण म्हणजे श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव होय. ही एक विकृत विचारप्रणाली आहे. 'ब्राह्मण' हे कोणत्याही जातीत असू शकते.

७) अस्मिता :- आत्मप्रतिष्ठा, आत्मसन्मान

## ७.६ संदर्भसूची

१) सरदेसाई, (डॉ.) बी. एन. (२०००) आधुनिक महाराष्ट्र (१८१८ -१९६०) कोल्हापूर, फडके प्रकाशन, पृ. क्र. ११९ ते १३४

२) मोरे, प्रा. दिनेश, (२००६). आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास (१८१८-१९६०), पुणे, के. एस. पब्लिकेशन, पृ. ३४९ ते ३७८

३) बगाडे, (डॉ). उमेश, (२०१०), महात्मा जोतीराव फुले, पुणे, श्री गंधर्व-वेद प्रकाशन, पृ. ७६ ते ८६

४) पवार डॉ. जयसिंगराव व पवार सुधा, (प्रकाशनवर्ष नोंद नाही), आधुनिक हिंदुस्थानचा इतिहास, नागपूर, विद्या प्रकाशन, पृ.२५७ ते २६४ पृ. २७९ ते २८४

५) पवार, (डॉ). जयसिंगराव (२०१२). राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य, कोल्हापूर, महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, पृ १०८ ते ११३, पृ ११७ ते १२३

६) ऑमव्हेट, गेल, (लेखिका) दिघे पी. डी. (भाषांतर). (१९९५) वासाहतिक सांस्कृतिक बंड, पुणे, सुगावा प्रकाशन, पृ १०९ ते ३२१

७) केतकर, कुमार. (२००३) कथा स्वातंत्र्यांची, मुंबई, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तकनिर्मितती व अभ्यासक्रमसंशोधन मंडळाचे पाठयपुस्तक निर्मिती मंडळ, पृ. १७ ते १९

८) कठारे, (डॉ). अनिल (२००७), फुले शाहू-लोकहितवादी, नांदेड, पूनम प्रकाशन, पृ .२०

ते ४०

९) पाटील, विलास, (१९९९), महाराष्ट्र शासन व राजकारण, कोल्हापूर, कडके प्रकाशन, पृ. ३४ ते ५९

१०) डोळस, प्रा. अविनाश आणि इतर, (२००२) सामाजिक चळवळी अस्पृश्यता निवारण, दलित, शेतकरी व कामगार, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, पृ १ ते ४९

११) धर्माधिकारी, अ. भ. संपादक, (२००४). महाराष्ट्रातील समाजसुधारक, पुणे, चाणक्य मंडळ परिवार प्रकाशन, हे ४५ ते ५८ पृ १३४ ते १५६ पृ. १९८ ते २१०

१२) पाटील, प्रा. व्ही बही, (२००४). विसाव्या शतकातील महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास, पुणे, के सागर पब्लिकेशनन्स, पृ.३३ ते १९०

१३)निकुंभे, डॉ. सी.एच (२००५) समाजप्रबोधनकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुणे ,सुगावा प्रकाशन, पृ.११ ते २०१

१४) कीर, धनंजय, (२००५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मुंबई पॉप्युलर प्रकाशन, पृ५४ ते ५२६

१५) निकम, श्रीराम , (२००८) गांधी-आंबेडकर अस्पृश्यमुक्ती संघर्ष, मुंबई , लोकवाङ्मय गृह, पृ.१ते १९४

१६) पाटील, व्ही. बी. (२००४) एकोणिसाव्या शतकातील महाराष्ट्रामधील पृ १४३ ते २१४

१७) डरवशीर्शे चरींहशु, (१९७६). झहळश्रीहिळलरश्र ढीशपवी ळप ोवशीप ारहरीरीहींर, ीीलरळ,

१८) लर (वी.) ऋ ।डळपसह (वी.) झीशशींळ, (२०१०). अ गेंीपशू षीा आशवङ्गरी ीं चरूरुरींळ, छशु उशश्रहळ, अळी झळलश्रळलरींळेपी, झरसशी ५७ ीं १०८.

१९) खापर्डे, डी के (२००७). आधुनिक भारत की सामाजिक सांस्कृतिक क्रान्तिके प्रणेता- महात्मा जोतिराव फुले, नवी दिल्ली, मूलनिवासी पब्लिकेशन ट्रस्ट, पृ. ६१ ते ९३

२०) फडके, य. दि, (१९८२). केशवराव जेधे, पुणे, श्रीविद्या प्रकाशन, पृ. १ ते २६७.

२१) मुळ, महावीर. (२०१०). प्रबोधनकार ठाकरे, पुणे, श्री गंधर्ववेद प्रकाशन, पृ-पृ १ ते ९२

२२) जाधव, तुकाराम (संपादक) (२०१३). महाराष्ट्र वार्षिकी २०१३, पुणे, द युनिक इन्स्टिटयूट ऑफ हाय्यर लर्निंग, पृ १०१६, १०१७

२३) पगारे (डॉ.) म. सू. (२००५). दलित साहित्याच्या इतिहास, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स, पृ.१७००

२४) चंदनशिवे, (डॉ.) सुनिल (२००५). मराठी दलित कविताः एक चिकित्सक अभ्यास, ठाणे, डिंपल पब्लिकेशन्स, पृ ३४, ३५

## ७.७ सरावासाठी प्रश्न/क्षेत्रियकार्य/प्रात्यक्षिक कार्य.

१)तुमच्या परिसरातील सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थासंघटनाची माहिती मिळवा. ती नोंदवा, त्यांच्या कार्याचे क्षेत्र व महत्त्व याचा अहवाल तयार करा.

२)तुमच्या परिसरातील धर्मसुधारणा कार्याची माहिती गोळा करा.

***

# घटक. ८
# स्त्रियांची चळवळ

**अनुक्रमाणिका–**

**८.0 उद्दिष्टे**

**८.१ प्रस्तावना**

**८.२ विषय–विवेचन स्त्रियांच्या आणि**

**८.२.१ – सामाजिक सुधारणा चळवळ**

**८.२.२ – प्रमुख स्त्री सुधारक– सावित्रीबाई फुले, ताराबाई शिंदे, पंडित रमाबाई.**

**८.२.३ – स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांच्या चळवळी**

**८.३ स्वयं– अध्ययन प्रश्न**

**८.४ सारांश**

**८.५ परिभाषिक शब्द**

**८.६ संदर्भ सूची**

## ८.0 उद्दिष्टे

१) एकोणिविसाव्या शतकारंभीचे महाराष्ट्रातील समाजजीवन कसे होते याचे वर्णन करता येईल.

२) महाराष्ट्रातील महिला चळवळींविषयी माहिती देता येईल.

३) पाश्चात्यांच्या आगमनाचा भारतीय जीवनावर पडलेला प्रभाव स्पष्ट करता येईल.

४) वैचारिक जागृतीचा स्त्री-जीवनावर झालेला परिणाम स्पष्ट करता येईल.

५) विविध कायद्यांद्वारे स्त्रियांच्या विकासाला, उन्नतीला कसा हातभार लावला ते विशद करता येईल.

६) सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेत स्त्री- शिक्षणाची भूमिका व महत्त्व स्पष्ट करता येईल.

७) सामाजिक सुधारणेच्या प्रक्रियेत स्त्रियांनी दिलेले योगदान स्पष्ट करता येईल.

८) शिक्षण प्रसारामुळे स्त्री-जीवनातील परिवर्तनाला कशी चालना मिळाली हे विशद करता येईल.

९) स्त्रियांच्या कल्याणाच्या दृष्टीने कोणकोणते कायदे अस्तित्वात आले ते स्पष्ट करता येईल.

१0) स्त्रियांच्या सवलतीकरणाच्या दृष्टीने कोणते विचार वाढीस लागले त्यांचा मागोवा घेता येईल.

११) स्त्री सुधारणा चळवळीसाठी प्रयत्न करण्याच्या समाजसुधारकांचा कार्याचा आढावा घेता येईल.

१२) स्त्रियांच्या हक्कांची जाणीव करून देणाऱ्या सुधारक स्त्रियांचे योगदान विशद करता येईल.

## ८.१ प्रस्तावना-

भारताच्या इतिहासात १९ व्या शतकाच्या प्रारंभी ख्रिस्ती मिशनऱ्यांचे कार्य व युरोपमधील उदारमतवाद यांचा प्रभाव पडलेला दिसून येतो. त्यातून सामाजिक सुधारणा चळवळी वाढीस लागल्या. त्यातून हिंदू समाजाची नीतिमूल्ये, रूढी, परंपरा आणि विशेषतः स्त्रियांच्या जीवनाशी निगडित समस्यांचा मूलगामी पुनरर्विचार सुधारकांनी केला. स्त्रियांना शिक्षण देण्याच्या दृष्टीने स्त्री शिक्षणाची सुरुवात आपल्या घरापासून केली. शिक्षणामुळे स्त्रियांच्या कर्तबगारीला वाव मिळाला. स्वतंत्र विचाराने कार्य करण्यास स्त्रियांचे प्रयत्न सुरू झाले. त्यादृष्टीने काही प्रमुख स्त्रियांचे सुधारणा कार्य या घटकांमध्ये मांडलेले आहे. तसेच स्त्री शिक्षणासाठी ब्रिटिश शासनाचे प्रयत्न समाजसुधारक व त्यांचे परिणाम पहावयाचे आहेत. शिक्षण प्रसाराबरोबरच इतर कारणांनी सामाजिक सुधारणा वाढीस लागल्या. त्यात स्त्री-जीवनाशी संबंधित अनिष्ट रूढी, परंपरा, प्रथा यांचे निर्मूलन करण्यासाठी प्रतिक्रिया कशा उमटत गेल्या यांचे विवेचन या घटकात केलेले आहे. स्त्री शिक्षणाची जशी आवश्यकता वाटत होती, तशीच स्त्रीचे आर्थिक स्वावलंबन हेही महत्त्वाचे आहे हे लक्षात घेऊन त्या दृष्टीने कशी वाटचाल होत गेली. पाश्चात्त्यांचा प्रभाव, वैचारिक जागृती, स्त्री शिक्षण, सुधारकांचे प्रयत्न, स्त्रियांच्या समस्या, त्या सोडविण्यासाठी झालेले प्रयत्न इत्यादी बाबीतून स्त्री जीवनाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात कसा बदल होत गेला, त्यासाठी कोणत्या गोष्टी करणीभूत ठरल्या हे या घटकात आपण अभ्यासणार आहोत.

## ८.२ विषय-विवेचन

### ८.२.१स्त्रियांच्या समस्या आणि सामाजिक सुधारणा चळवळ :-

१९ व्या शतकारंभापासून नव्या युगाची चाहूल लागली. नवी शासन पद्धती, इंग्रजी शिक्षण व ख्रिस्ती धर्मोपदेशक यामुळे मध्ययुगीन बेबंदशाही, अनीती, अस्थिरता, अशांतता याऐवजी ब्रिटिशांचे शांततेचे, स्थिरतेचे व सुखावह सुधारणांचे राज्य आले. त्यांचा शिस्तबद्ध कारभार दिसू लागला. ब्रिटिश राजवट जनतेला ईश्वरी वरदान वाटणारी होती. त्यामुळे ती भारतीय विचारवंतांनाही भावली. त्यातून आधुनिकीकरणाकडे वाटचाल सुरू झाली. काही सनातनी लोकांनी सामाजिक बदलांना विरोध केला. पण पाश्चात्त्य राज्य, शिक्षण, संस्कृती, बुद्धिनिष्ठता यांची जवळीक असलेले भारतीय सुशिक्षितांनी इंग्रजी संपर्कामुळे झालेला बदल स्वीकारला.

सामाजिक सुधारणा चळवळीत स्त्री सुधारणा चळवळीची आवश्यकता भासू लागली. स्त्रियांची स्थिती करुणाजनक होती. सामान्यपणे स्त्रीला स्वातंत्र्य नव्हते. ती सर्वत्र बंधनात होती. आठव्या वर्षीच विवाह, धार्मिक व कौटुंबिक क्षेत्रात दुय्यम स्थान असणे, शिक्षणापासून वंचित ठेवले जाणे, वैधव्याचे जीवन, विधवा पुनर्विवाह असामान्य, भ्रूणहत्या, हुंडा पद्धती यामुळे स्त्री जीवन असह्यच होते. बालविवाह बाला-जरठ विवाह, बहुपत्नीत्व, विधवा केशवपन इत्यादी अनिष्ट परंपरा समाजात मूळ धरून होत्या. स्त्री ही पुरुषांच्या उपभोगाची वस्तू किंवा हक्काची गुलामी बनली होती.

तिचे सामाजिक, आर्थिक स्वातंत्र्यही संपले होते. पिता, पती व पुत्र या तिघांच्या मर्जीने तिचे जीवन तिला जगावे लागत असे. स्वातंत्र्य संपले होते.

पाश्चात्त्य भौतिक प्रगती, ख्रिश्चन होते, पाश्चात्त्य शिक्षण व संस्कृतीचा महाराष्ट्रातील समाज-जीवनावर परिणाम झाला.

स्त्री अबला नाही तर सबला व्हावी म्हणून, स्त्री-जीवन सुधारावे, त्यांचे शिक्षण व्हावे, प्रौढ विवाह, जरठ-कुमारी विवाह निषेध, विधवा पुनर्विवाह, सामाजिक समता , स्त्री-पुरुष समता अधिकार इ. प्रश्न हाताळून प्रयत्न करणारे समाज सुधारकांचे कार्य उल्लेखनीय ठरते. बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, दादोबा पांडूरंग, आत्माराम पांडूरंग यांनी विधवा पुनर्विवाह, स्त्री-पुरुष समानता, स्त्री-शिक्षण, केशवपन बंदी इत्यादींसाठी प्रयत्न केले.

प्राचीन काळी स्त्रीला पुरूषांच्या बरोबरीचे स्थान होते. तिला देवी, शक्ती अशा स्वरूपात पूज्य मानले होते. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगा उद्धारी' म्हणून स्त्रीकडे भारतीय समाज पाहत असे. या पूज्य व आदरणीय स्त्री  जीवनावर समाजाची भरपूर बंधने येऊन तिची गळचेपी झाली. व्यक्तिगत जीवनात स्त्रीला सासरी त्रास सोसावा लागतो. ती अबला ठरली गेली म्हणून तिला 'सबला' करण्याचे प्रयत्न होत आहेत. तिच्या या वाटचालीत अनेक समाज सुधारकांनी प्रश्न समाजासमोर मांडले. आज स्त्रियांच्या अनेक संघटना काम करताना दिसतात. स्त्रीला उपभोग्य वस्तू न समजता आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक व सांस्कृतिक जीवनात योग्य स्थान मिळावे अशी धडपड या चळवळीतून होताना दिसते. महिला चळवळीची सुरुवात पाहता महात्मा फुले, महर्षी कर्वे, न्या. रानडे, राजर्षी शाहू महाराज, स्वामी दयानंद सरस्वती इत्यादी अनेक सुधारकांचे आणि सावित्रीबाई फुले, पंडिता ताराबाई शिंदे या स्त्री सुधारकांचे योगदान स्त्रीच्या सबळीकरणास कारणीभूत ठरले.

**स्त्रियांच्या समस्याः–**

**१) सतीची चाल :–**

पतीच्या निधनानंतर सती गेल्याने सतीच्या पूर्वजांचा उद्धार होतो, सती गेल्याने पतीच्या पातच्या पातकांचे क्षालन होते. सती गेल्याने स्वतःस व पतीस स्वर्गात स्थान मिळते इ. अदृष्य परलौकिक फळे सांगितली. पती मृत्यूनंतर खडतर जीवन जगण्यापेक्षा ती स्त्री सती जाणे पसंत करी. कित्येकदा पती प्रेमाचे प्रतीक म्हणून काही स्त्रिया सती जात. सती जाणे ऐच्छिक असे; पण व्यवहारात जबरदस्ती केली जाई. पतिनिधनाचा दुःखावेग चालू असतानाच द्रव्यासाठी हपापलेले ब्राह्मण व त्या स्त्रीचा वारसा हक्क डावलणारे स्वार्थी नातेवाईक तिची संमती न घेता तिची सती जाण्याची इच्छा आहे असे जाहीर करीत. तिला विचार करावयास फुसरतही मिळू देत नसत. तिने आपले मन बदलू नये म्हणून तिला मादक द्रव्ये पाजली जात असत. उंची वस्त्रे, अलंकार घालून मिरवणूक काढून मोठा भपका निर्माण केला जाई. त्यामुळे विधवा गोंधळून जात असे. तिने चितेवरून बाहेर पडू नये म्हणून ओल्या बांबूने तिला दाबून धरत.

**विधवा स्त्रीचे जीवन :–**

सती न जाणाऱ्या विधवेने संन्यासी वृत्तीने राहावे, पतिचरणांची आठवण करीत जीवन कंठावे, अंथरुणाऐवजी जमिनीवर झोपावे, एक वेळ जेवावे, चांगले कपडे घालू नये, केशवपन करून विद्रूप करून घ्यावे, विधवा राहणे हे अशुभ आहे असे पुराणे व धर्मशास्त्रे यांनी सांगितले. विशिष्ट

परिस्थितीत पुनर्विवाहास परवानगी देणे आवश्यक होते. परंतु प्रथेप्रमाणे पुनर्विवाह बंद पडला होता. व पुनर्विवाहापासून झालेली संतान अनौरस मानली जात होते. ब्राह्मसमाजाने पुनर्विवाहाची चळवळ हाती घेतली होती. पुनर्विवाहास परवानगी देण्यात यावी अशी मागणी करणारी भगिनींचे पत्रे वृत्तपत्रांतून छापली जाऊ लागली.

**बालहत्याः–**

'एकापेक्षा अधिक मुले झाल्यास त्यातून काही मुले गंगेत सोडू' असा नवस करीत. त्याप्रमाणे मुले झाल्यास नवस फेडण्यासाठी मुलांना गंगेच्या पाण्यात सोडत. त्यातही बालकन्या हत्यांचे प्रमाण जास्त होते. कारण अविवाहित कन्या घरात असणे कलंक आहे. अशी समजूत होती. कन्येस वर मिळत नसे. योग्य वर मिळाल्यास मोठा खर्च करावा लागे. ब्राह्मणांना, भाटांना जेवणावळी दयाव्या लागत. त्यामुळे कन्येचा विवाह हे संकट समजले जाई. हे संकट टाळण्यासाठी कन्या निपजताच कन्येचा श्वास कोंडून, अफूसारखे विष देऊन, लहान मुलीचे दूध बंद करून, मुलींना ठार मारण्याची प्रथा प्रचलित होती.

**स्त्री–पुरुष समानतेचा अभाव :–**

स्वातंत्र्यानंतर स्त्रियांच्या कार्यक्षेत्रात वाढ होत गेली. स्त्री-पुरुष समानतेच्या कल्पनेला चालना मिळाली. शिक्षण, मातृत्व व नोकरी यांसारख्या क्षेत्रांमध्ये स्त्रीला स्वातंत्र्य मिळाले. तिच्या कार्यक्षेत्राचा विस्तार होत गेला. तरी तिच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन कायमच राहिला. त्यात बदल झाला नाही. स्त्री अर्थार्जनासाठी वा इतर कारणांनी घराबाहेर पडली तरी तिचे लक्ष घराकडेच असते. संसाराच्या विवंचना तिच्या कार्यक्षमतेवर परिणाम करीत असतात. तिच्याकडून पुरुषांप्रमाणे कर्तृत्व दाखविले जाऊ शकत नाही अशी भावना असते त्यामुळे स्त्रीला समाजात आणि नोकरीच्या ठिकाणी दुय्यम स्थान दिले जाते. धर्म व समाजव्यवस्थेतील दोष व त्रुटी स्त्री-पुरुष समानतेत अडचणीच्या ठरल्या आहेत.

**विवाहित स्त्रीची समस्याः–**

भारतीय समाज व संस्कृती पुरुषप्रधान आहे. त्यामुळेच विवाहानंतर स्त्रीनेच आपल्या व्याक्तितीमत्त्वात बदल करून सासरच्या मंडळींची मर्जी राखायला हवी. हा पैसे, वस्तू, सोने इत्यादींच्या मागणीवरून विवाहितेचा छळ होतो. त्यानुसारच हुंडाबळीची संख्या वाढते. मुलगी जन्माला आली म्हणजे काहीतरी गुन्हा घडला असे नवमातांना वाटते. कायदा व वैज्ञानिक प्रगतीचा त्यात दुरुपयोग केला जातो. गर्भजल परीक्षण करून स्त्री भ्रूण हत्या केली जाते.

**सामाजिक समस्याः–**

समाजात विधवा, परित्यक्ता, कुमारी माता, फसवणूक झालेल्या, नाडलेल्या अशा अनेक उपेक्षित स्त्रिया, तरुणी, कुमारवयीन मुलींची संख्या वाढलेली आहे. व्यसन, हुंडा, अज्ञान, अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी, अनावर विषयवासना, वैवाहिक बेबनाव यामुळे सामाजिक समस्येत भर पडते. अशा स्थितीत त्यांच्या आयुष्यातील समस्या सोडवण्यासाठी मदत हवी असते. ती मदत मिळत नाही शिक्षण मिळालेले असले तरी तिला व्यक्तिस्वातंत्र्य मिळत नाही. प्रतिकूल परिस्थितीला तोंड द्यावे लागते. आपले रास्त हक्क व अधिकार मिळवण्यासाठी तिला झगडावे लागते.

**आजच्या स्त्रीची समस्याः–**

'विवाहित स्त्री एक घर सोडून दुसऱ्या घरात जाते तेव्हा पित्याच्या तावडीतून पतीच्या तावडीत जाते. म्हणजे आज्ञापालन करणारी व्यक्ती बदलते.' पतिनिष्ठा हा धर्म तिच्या माथी मारला

जातो. आज घटनेने भारतात स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिले आहे. सामाजिक, शैक्षणिक, वैवाहिक तसेच धार्मिक बाबतीत तिच्यावर लादलेली विषमता घटनेने व कायद्याने दूर झालेली आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, कला इत्यादी विविध क्षेत्रांत स्त्रियांचा केवळ सहभाग वाढला असे नव्हे तर स्त्रियांनी मोठी कामगिरी केलेली आहे. त्यांच्या वैयक्तिक गुणवत्तेचे क्षेत्र विस्तारले. आपल्या विद्वत्तेच्या, बुद्धिमत्तेच्या उच्च पातळीमुळे वरिष्ठ अधिकारांच्या जागा मिळविल्या. परंतु या वैयाक्तिक पातळीवरील प्रगतीवरून स्त्रीच्या जीवनाची पातळी उंचावली असे म्हणता येत नाही. कारण तिच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. सासरच्या छळाला कंटाळून आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या स्त्रिया, छळ झालेल्या स्त्रिया, परित्यकता, घटस्फोटिता, मारहाण, पति-पत्नींचे संबंध, बालसंगोपनाचा प्रश्न, आर्थिक निर्णय घेताना पुरुषाच्या मताला प्राधान्याने कराव्या लागतात. मुलगा जन्माला येत नाही तोपर्यंत अनेक समस्या, त्यात गर्भपात, बाळंतपण या बाबी स्त्रीवर लादल्या जातात.

स्त्री जीवनात बदल होत आहेत. समाजसुधारक स्त्री समाज सुधारक समाजातील उदारतेची भावना, आधुनिक काळाची प्रतिके, शिक्षण क्षेत्रात झालेला आमूलाग्र बदल यांचा प्रभाव निश्‍चित दिसत असला तरी आजही स्त्रियांच्या अनेक समस्या आहेत. त्यावर सोडविण्यासाठी विविध पातळ प्रयत्न होत आहेत हे तेवढेच सत्य आहे.

**सामाजिक सुधारणा चळवळः-**

सामाजिक सुधारणा चळवळीत स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी योगदान दिलेले आहे.

**१) केशवचंद्र सेन-**

केशवचंद्र सेन यांनी ब्राह्मो समाजात प्रवेश केला. थोड्याच दिवसात ते ब्राह्मो समाजाचे प्रमुख आचार्य बनले. मुंबईतील समाजसुधारक डॉ. भाऊ दाजी यांची कलकत्ता येथे सेन यांची भेट झाली. त्यावेळी डॉ. भाऊ दाजींनी त्यांना तात्त्विकतेऐवजी व्यावहारिक समाज सुधारणांवर भर देण्याची सूचना केली. डॉ. भाऊ दाजी लाड यांच्या सूचनेनुसार केशवचंद्र सेन यांनी इ.स. १८६३ पासून स्त्रियांच्या शिक्षणावर भर दिला. आंतरजातीय विवाह, विधवा, पुनर्विवाह घडवून आणले. बालविवाह, बहुपत्नीत्व पद्धत यांचा निषेध केला. केशवचंद्र सेनच्या प्रयत्नाने इ.स. १८७२ त सिव्हिल मॅरेज ॲक्ट पास झाला.

**२) पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागरः-**

कलकत्त्यातील संस्कृत कॉलेजचे प्राचार्य पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी सतीबंदीबाबत महत्त्वाची कामगिरी केली. शास्त्रांनी पुनर्विवाहास बंदी केलेली नाही असे त्यांनी शास्त्राधारे सिद्ध करून लोकांच्या सह्यांनिशी कंपनी सरकारकडे पुढील आशयाचा अर्ज पाठविला. '१८२९ मध्ये सती बंदी केल्यावर पुनर्विवाह शास्त्रमान्य आहे. तेव्हा त्यासंबंधी कायदा करण्यात यावा. पुनर्विवाहास परवानगी दयावी.' अशी विनंती करणारे अर्ज मद्रास, नागपूर वगैरे शहरांतूनही आले. कंपनी सरकारने जनहिताची दृष्टी डोळ्यांपुढे ठेवून इ.स. १८५६ त 'हिंदू पुनर्विवाहाचा कायदा' पास केला व त्या कायद्यान्वये विधवापुनर्विवाह व त्या विवाहातून निर्माण झालेली संतती कायदेशीर मानली.

१८५६ ते १८६१ पर्यंत पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी आर्थिक मदत देऊन २५ बालविधवपुनर्विवाह घडवून आणले. 'विधवा विवाह' या ग्रंथाचे लेखन केले.

### ३) बाळशास्त्री जांभेकरः– (१८१०–१८४६)

बाळशास्त्री जांभेकरांनी सरकारी नोकरी करीत असताना महाराष्ट्रात 'दर्पण' नावाचे पहिले साप्ताहिक (१८३२) व 'दिग्दर्शन' नावाचे मासिक (१८३६) सुरू केले. ह्यातून बालविधवा, पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण इ. संबंधी प्रचार केला. समाज जागृतीचे कार्य केले.

### ४) विष्णुबुवा ब्रह्मचारी :– (विष्णु भिकाजी गोखले) (१८२५ ते १८७५)

विधवा पुनर्विवाह, प्रौढविवाह, घटस्फोटित, स्त्रीशिक्षण, सार्वत्रिक साक्षरता, शुद्धीकरण चळवळ, अस्पृश्यांना मंदिर प्रवेश, न्यायालयात ब्राह्मण व अस्पृश्य यांना समानतेची वागणूक, वर्णभेदातील लष्कराची रचना इत्यादी बाबतीत विष्णुबुवा ब्रह्मचारिचे विचार पुरोगामी होते. त्यांच्या विचारांमुळे स्त्री सुधारणा चळवळीला चालना मिळाली.

### ५) सरदार गोपाळ हरी देशमुख (लोकहितवादी) – (१८२३–१८९१)

गोपाळ देशमुख यांचा १८७२ मध्ये पुणे येथे जन्म झाला. बाळशास्त्री जांभेकरांच्या मदतीने भाऊ महाजन यांनी सुरू केलेल्या 'प्रभाकर' वृत्तपत्रातुन (साप्ताहिक) लोकहितवादींनी १८४८ ते १८५० या काळात शंभर पत्रांची 'शतके' नावाची लेखमाला लिहिली. शतपत्रांतून लोकहितवादींनी बालविवाह, विधवा पुनर्विवाह जातिभेद एकत्र राहण्याची चाल, मद्यपान, स्वदेशी इ. विषयांवर लेख लिहिले. लोकहितवादीच्या अनेक पत्रांमध्ये स्त्री समस्येवर लिखाण केलेले होते.

### महात्मा जोतिबा फुलेः– ( इ.स. १८२७ ते १८९०)

महात्मा फुले यांचा जन्म इ.स. १८२७ मध्ये झाला. त्यांचे मूळ घराणे साताऱ्याजवळील कटगुण गावचे होते. महात्मा फुले यांचे पूर्ण नाव जोतिराव गोविंदराव फुले होते. जोतिरावांचे प्राथमिक शिक्षण १८३४-३८ या काळात झाले. ते अभ्यासू व चौकस बुद्धीचे होते. त्यांची शिक्षणातील प्रगती चांगली होती. परंतु जोतिबांच्या वडिलांनी ज्योतिबाचे शिक्षण बंद करून त्यांना बागकामाला लावले. १८४१ च्या सुमारास बेग व लिजीट यांच्या आग्रहाने ज्योतिबा मिशनरी शाळेत दाखल करण्यात आले. माध्यमिक शिक्षण इंग्रजी माध्यमातून झाले. १८४० मध्ये नायगावच्या खंडोजी नेवसे-पाटील यांच्या कन्या सावित्रीबाई यांच्याशी त्याचा विवाह झाला. त्यावेळी ज्योतिबांचे वय तेरा वर्षांचे, तर सावित्रीबाईचे वय नऊ वर्षांचे होते.

इ.स. १८४८ मध्ये जोतिबांनी पुण्यामध्ये मुलींसाठी पहिली शाळा बुधवार पेठेतील भिड्यांच्या वाड्यात सुरू केली. या शाळेत स्वतः ज्योतिबा शिक्षक म्हणून काम करीत असत. त्यांनी शिक्षका म्हणून नेमणूक केली. सावित्रीबाई शाळेत जात-येत असताना लोक त्यांना अपमानास्पद भाषा वापरत आणि निंदानालस्ती करीत.

काही कर्मठ लोक त्यांच्या अंगावर चिखल-शेण फेकीत. त्यांना दगड मारीत. पण सावित्रीबाईंनी आपले काम निष्ठेने चालू ठेवले. ज्योतिबाच्या वडिलांना आपली सून सावित्रीबाई हिने शिक्षका म्हणून काम करावे हे मानवले नाही. म्हणून १८४९ मध्ये त्यांनी ज्योतिबा व सावित्रीबाई यांना घराबाहेर काढले.

इ.स. १८५१ मध्ये बुधवार पेठेतील चिपळूकरांच्या वाड्यात मुलींची दुसरी शाळा त्यांनी उघडली. त्यानंतर रास्ता पेठ वेताळ पेठ, येथे मुलींच्या शिक्षणासाठी शाळा सुरू केल्या.

इ.स. १८५२ मध्ये त्यांनी पुण्याच्या वेताळ पेठेत अस्पृश्यांच्या मुलांसाठी दोन शाळा उघडल्या. इ.स. १८५३ मध्ये आपल्या काही मित्रांच्या सहकार्याने 'महार, मांग' इत्यादी लोकांस

विद्या शिकविण्याकरिता 'मंडळी' नावाची संस्था स्थापन करून शिक्षणाची व्यवस्था केली.

विधवा स्त्रिया बदनामीच्या भीतीने गर्भपात किंवा बालहत्या करत; तसेच त्यांच्याकडून इतर स्वरूपाचे गुन्हे होत. तेव्हा म. फुल्यांनी 'बालहत्याप्रतिबंधक गृह' आपल्या घरात सुरू केले. विधवा स्त्रिया म.फुल्यांच्या घरात प्रसूतिसाठी येऊन मुले तेथे ठेवून जात. ही योजना पुण्यातील ब्रह्मण विधवांना मोठी उपकारक ठरली. काशीबाई या ब्राह्मण विधवेचा मुलगा म. फुल्यांनी स्वतःचा मुलगा समजून वाढविला. त्यास डॉक्टर बनविले. तोच डॉ. यशवंत फुले बनला. म. फुल्यांचे बालहत्याप्रतिबंधक गृह पाहून व समाजाची गरज ओळखून न्या. रानडे, लोकहितवादी, लाल शंकर, उमियाशंकर त्रिवेदी यांनी पंढरपूर येथे अनाथ बालकाश्रम सुरू केले. (इ.स. १८७४) बालहत्येचे मूळ कारण नष्ट करण्यासाठी म. फुल्यांनी विधवापुनर्विवाहाची तरफदारी केली व इ.स. १८६४ त पुण्यात शेणवी जातीत पुनर्विवाह घडवून आणला.

**सत्यशोधक समाजाची स्थापना(१८७३):-**

'सार्वजनिक सत्यधर्म' व 'गुलामगिरी' या दोन पुस्तकांतून म. फुल्यांनी ब्राह्मणांवर हल्ला चढविला. ब्राह्मणांच्या सामाजिक व राजकीय वर्चस्वाविरुद्ध संघटित चळवळ करण्यासाठी 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली. मनुष्याचे श्रेष्ठत्व जन्मावर नसून कर्मावर आहे. पूर्नजन्म, कर्मकांड, जपतप वगैरे थोतांड आहे. परमेश्वर भक्तीसाठी भट दलालाची आवश्यकता नाही. अशी सत्यशोधक समाजाचीच तत्त्वे आहेत. म. फुल्यांचा लढा विषमतेविरूद्ध होता. मानवतेसाठी लढा होता. म्हणूनच मुंबईच्या नागरीकांनी इ.स. १८८८ त मुल्यांचा सत्कार करून 'महात्मा' ही पदवी अर्पण केली.

**९) रा. गो. भांडारकरः- (इ.स. १८३७ ते १९२५)**

रामकृष्ण गोपाळ भांडारकर, यांचा जन्म ६ जुलै, १८३७ रोजी मालवण येथे झाला. मुंबई विद्यापीठातून एम. ए. ची पदवी त्यांनी संपादन केली. मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजामध्ये व पुण्याच्या डेक्कन कॉलेजात संस्कृत प्राध्यापक म्हणून कार्यरत झाले.

इ.स. १८६७ मध्ये मुंबई येथे प्रार्थना समाजाची स्थापना झाली. त्यात भांडारकरांचा सहभाग महत्त्वाचा होता. डॉ. भांडारकरांनी बालविवाह प्रतिबंध, विधवा पुनर्विवाह, अस्पृश्यता निवारण, स्त्री-शिक्षण, मद्यपानबंदी, देवदासी प्रथाबंदी इत्यादी सामाजिक सुधारणांचाही पुरस्कार केला. भांडारकरांनी स्वतःच्या विधवा मुलींचा पुनर्विवाह घडवून आणला.

**१०) न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे :-(१८४२-१९०१)**

न्या. रानडे यांचा जन्म नाशिक जिल्ह्यातील निफाड येथे १८ जानेवारी १८४२ रोजी झाला. १८६२ मध्ये बी. ए आणि इ.स. १८६४ मध्ये एम. ए आणि एलएल. बी. झाल्यानंतर जिल्हा न्यायाधीश झाले.

इ.स. १८६२ मध्ये निघालेल्या 'इंदूप्रकाश' या वृत्तपत्रातून त्यांनी समाजसुधारणेविषयी लेख लिहिला. विधवा विवाहाचे समर्थन केले.

इ.स. १८६५ मध्ये स्थापन झालेल्या 'विधवाविवाह उत्तेजक मंडळा' चे ते एक प्रमुख सभासद होते. संमती वय विधेयकालाही त्यांनी पाठिंबा दिला.

इ.स. १८६७ मध्ये स्थापन झालेल्या 'प्रार्थना समाजाचे' ते एक प्रमुख सभासद होते. इ.स. १८७१ मध्ये त्यांची जिल्हा न्यायाधीश म्हणून नियुक्ती झाली होती. पुढे ते १८९३ मध्ये मुंबई उच्च न्यायालयात न्यायाधीश झाले.

**११) महर्षी धोंडो केशव कर्वेः– (१८५८–१९६२)**

धोंडो केशव कर्वे यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील शेरवली या गावी १८ एप्रिल १८५८ रोजी झाला. प्राथमिक शिक्षण मुरूड येथे झाले. पुढे इंग्रजी शिक्षणासाठी रत्नागिरीला गेले. त्यांना शिष्यवृत्ती मिळत होती. ते १८८१ मध्ये मॅट्रिक पास झाले.

इ.स. १८९१ मध्ये धोंडो कर्वे यांच्या पत्नीचे निधन झाले. व त्यास सुमारास नामदार गोखले यांनी त्यांची फर्गसन कॉलेजामध्ये गणिताचे प्राध्यापक म्हणून नेमणूक केली. इ.स. १८३२ मध्ये पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्य झाले. इ.स. १९९३ मध्ये त्यांनी गोदुबाई या बालविधवेशी पुनर्विवाह केला. इ.स. १८९३ मध्ये त्यांनी 'विधवाविवाहोत्तेजक मंडळी' या संस्थेची स्थापना केली. विधवाविवाहांचा पुरस्कार करणे व विधवाविवाहासंबंधी सामाजिक जागृती निर्माण करणे. हे या संस्थेचे प्रमुख कार्य होते. विधवा स्त्रिया सर्वस्वी परावलंबी असत. त्यांना स्वावलंबी जीवन लाभावे, त्यांची मानसिक व बौद्धिक समर्थता वाढावी म्हणून त्यांनी इ.स. १८९६ मध्ये पुणे येथे 'अनाथ बालिकाश्रम' नावाची संस्था स्थापन केली. पुढे इ.स. १८९९ मध्ये पुण्यात प्लेगची साथ आली. त्याकाळात श्री. गोखले नावाच्या गृहस्थांनी 'हिंगणे' येथे सहा एकर जमीन आश्रमासाठी दिली. तेथे कर्वे यांनी चार खोल्यांची इमारत बांधून आश्रम सुरू केले.

इ.स. १७०७ मध्ये स्त्रियांना त्यांच्या दैनंदिन जीवनात उपयोगी पडेल असे शिक्षण देण्याच्या उद्देशाने महर्षी कर्वे यांनी हिंगणे येथे 'महिला विद्यालयाची' स्थापना केली. पुढे इ.स. १९१६ मध्ये 'महिला विद्यापीठा'ची स्थापना केली. प्रपंचशास्त्र, आरोग्यशास्त्र, पाककला, चित्रकला इत्यादी स्त्री जीवनाला उपयुक्त ठरतील अशा विषयांचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश करण्यात आला होता.

इ.स. १९२० मध्ये शेठ विठ्ठलदास ठाकरसी यांनी आपल्या मातोश्री यांच्या स्मरणार्थ १५ लाख रुपयांची देणगी दिली. पुढे हे विद्यापीठ श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ (डछऊढ) या नावाने ओळखण्यात येऊ लागले.

इ.स. १९५५ मध्ये भारत सरकारतर्फे 'पद्मविभूषण', इ.स. १९५८ मध्ये 'भारतरत्न' हा सर्वोच्च बहुमान देण्यात आला.

**१२) महर्षी विठ्ठल रामजी शिंदे :–(१८७३–१९४४)**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांचा जन्म कर्नाटकातील जमखिंडी येथे २३ एप्रिल,१८७३ रोजी झाला. महर्षी शिंदे यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जमखिंडीतच झाले. पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून इ.स.१८९८ मध्ये त्यांनी बी. ए. ची पदवी संपादन केली. इ.स.१९०६ मध्ये अस्पृश्यांचे प्रश्न सोडविणे व त्यांचा उद्धार करण्यासाठी महर्षी शिंदे यांनी मुंबई येथे 'डिस्प्रेस्ड क्लासेस मिशन' (निराश्रित साहाय्यकारी मंडळ) ही संस्था स्थापन केली.

**मुरळी प्रतिबंधक चळवळः–**

देवाच्या नावाने लहानपनापासून कोवळ्या मुलींना मुरळी म्हणून सोडून देण्याची पद्धत समाजास लांळनास्पद होती. म. शिंद्यांनी अशा मुलींना शोधून काढून त्यांना शिक्षण दिले. व काहींची लग्ने लावून दिली. त्यांनी १९१० मध्ये जेजुरी येथे मुरळी प्रतिबंधक सभा भरवून मुरळ्यांकडे समाजाचे लक्ष वेधले.

१९ व्या आणि विसाव्या शतकात झालेल्या समाज सुधारणेच्या चळवळीत अनेक चालीरिती,

परंपरांवर अघात करण्यात आला. तत्कालीन समाजात स्त्रीविषयी असलेला दृष्टिकोन आणि स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी अनेक सुधारकांनी प्रयत्न केले. त्यामुळे स्त्री जीवनात परिवर्तनास सुरुवात झाली.

## ८.२.२ प्रमुख स्त्री सुधारकः-

सुधारणा चळवळीत सुधारकांनी स्त्रियांच्या समस्येला वाचा फोडली. स्त्री शिक्षण, सतीची पद्धत, विधवाविवाह यात सुधारकांच्या प्रयत्नात स्त्री सुधारकांनी केलेली कामगिरी मोठे धाडसी पाऊल होते.

### १) सावित्रीबाई फुले :- (१८३१-१८९७)

सावित्रीबाईंचा जन्म ३ जानेवारी १८३१ रोजी झाला. वडील खंडोजी पाटील हे गावाचे पाटील होते. त्या काळातील रितिरीवाजाप्रमाणे सावित्रीबाईंचा विवाह नऊ वर्षांची असतानाच झाला. जोतिबांनी सावित्रीबाईना प्रथम साक्षर केले. फुल्यांच्या समाजकार्यातील शिक्षणप्रसार विशेषतः स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करण्याचे जोतिबांचे स्वप्न होते. ते साकार होण्यासाठी सावित्रीबाईंचा हातभार लागला. सावित्रीबाईंनी मिसेस मिचेल यांच्या नॉर्मल ट्रेनिंग स्कूलमध्ये शिक्षिकेचे ट्रेनिंग घेतले. स्त्री-शिक्षण यासाठी त्यांनी अपार कष्ट केले.

समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, अंधश्रद्धा दूर करावयाच्या असतील तर प्रथम स्त्रियांना शिक्षण दिले पाहिजे. स्त्री साक्षर झाली पाहिजे. एक स्त्री साक्षर झाली म्हणजे तिच्या सान्निध्यात व सहवासात येणारी घरातील सर्व मंडळी साक्षरतेचे महत्त्व ओळखतील, साक्षर होतील. त्यातून समाज साक्षर होईल. समाज सुधारला म्हणजे समाज सुधारणेला गती येईल. हे उद्दिष्ट जोतिबांच्या समोर होते. ते त्यांनी सावित्रीबाईंसमोर ठेवले. स्त्री सुधारण्याच्या दृष्टीने त्यांनी पाऊल उचलले. १८४८ मध्ये पुण्यात पहिली मुलींची शाळा सुरू केली. एका भारतीयाने भारतीय स्त्रियांसाठी काढलेली ही पहिली मुलींची शाळा होती. मुलींच्या शाळेतील भारतातील पहिल्या स्त्रीशिक्षिका सावित्रीबाई होत्या. त्यांना समाजाचा प्रखर विरोध सहन करावा लागला. पुढे फुले दाम्पत्याने मुलींसाठी तीन शाळा काढल्या. कार्याचे क्षेत्र व्यापक झाले. मुली साक्षर होत गेल्या. मुलींसाठी असलेल्या शाळेत संख्या वाढू लागली. सावित्रीबाईंच्या कामाचा व्याप वाढला. सहकारी शिक्षकांची गरज भासू लागली.

मेरी कार्पेंटर या शिक्षणतज्ज्ञ असलेल्या महिलेने स्त्री-शिक्षित करण्याच्या दृष्टीने पुढाकार घेतला. सरकारी अधिकाऱ्यांच्या बायका सार्वजनिक समारंभात पतीच्या बरोबरीने कशा वागतात याचे दर्शनही एतद्देशीय उच्च आणि सुधारणावादी कुटुंबांतील स्त्रियांना होऊ लागले.

स्त्री शिक्षकांच्या संख्येतही सतत वाढ होत राहिली. अँग्लो इंडियन, इंडियन, ख्रिश्चन, पारशी, बेने इस्त्रायली, सारस्वत, शेणवी, पाठोरे, प्रभु, ब्राह्मण अशा कुटुंबातून वाढत्या संख्येने स्त्रिया शिक्षणक्षोत कार्यरत झाल्या.

स्त्री शिक्षणाला सुरूवात करणाऱ्यांपैकी पहिले एतद्देशीय फुले होते. त्यांनी अस्पृश्य मुला-मुलींसाठी शाळा काढल्या. यानंतर स्त्रीचे विविध क्षेत्रांतील शिक्षण सुरू झाले. स्त्री शिक्षणाच्या कार्यामुळे सावित्रीबाई फुल यांचे नाव अजरामर झाले.

### २) पंडिता रमाबाई- ( १८५८-१९२२)

पंडिता रमाबाईंचा जन्म २३ एप्रिल  १८५८ रोजी कर्नाटकातील मंगळूर जिल्ह्यातील गंगामूळ या गावी चित्पावन ब्राह्मण कुटुंबात झाला. ते मूळचे कोकणातील होते. त्यांच्या वडिलांचे नाव अनंत

शास्त्री, आईचे नाव-लक्ष्मीबाई होते. अनंत शास्त्री हे वेदशास्त्रसंपन्न, संस्कृती भाषेचे गाढे अभ्यासक होते. त्याकाळी स्त्रियांनी संस्कृत शिकू नये, एवढेच नव्हे तर शिक्षणसुद्धा घेऊ नये अशा प्रकारची समाजात समजूत होती. अशा काळात रमाबाईंनी संस्कृत भाषा शिकून 'सिद्धांत कौमुदी', 'अमरकोष' यासारखे ग्रंथ समजून घेतले. संस्कृत भाषेच्या अध्ययनामुळेच रमाबाई उच्च साहित्याचे संस्कार झालेवर स्त्रियांना शिक्षण न घेऊ देणाऱ्या त्या काळातील रूढिप्रिय समाजाने अनंत शास्त्रींच्या क्रांतिकारक निर्णयामुळे त्यांना समाजातून बहिष्कृत केले.

रमाबाईंनी बिपिन बिहारी मेधावी ब्राह्मण तरुणाशी विवाह केला. रमाबाईंच्या या पतीचे दीड वर्षात निधन झाले. यानंतर त्या कन्या 'मनोरमा' हिला घेऊन १८८२ मध्ये पुण्यात आल्याशी येथूनच सामाजिक कार्यास प्रारंभ केला. त्यांनी बालविवाह पुनर्विवाहास बंदी, समाजातील रूढी व परंपरापासून मुक्तीचे कार्य केले. यासाठी 'आर्य महिला समाजाची' स्थापना केली. पुणे, नगर, सोलापूर, ठाणे, पंढरपूर इ. हे पुस्तक लिहिले.

रमाबाई हिंदू धर्मीय होत्या. पण सनातनी ब्राह्मणांच्या त्रासाने कंटाळून त्यांनी हिंदू धर्माचा त्याग केला. २९ सप्टेंबर १८८३ रोजी ख्रिश्चन धर्माचा स्वीकार केला. कडेगाव येथे 'मुक्तिसदन' नावाची संस्था स्थापन करून धर्मप्रसाराचे कार्य उघडपणे सुरू केले. रमाबाई अमेरिकेत आनंदीबाई जोशींच्या वैद्यकिय शिक्षणाच्या पदवीदान समारंभाच्या प्रसंगी हजर होत्या. तेथे त्यांनी हिंदुस्थानातील स्त्रियांच्या परिस्थितीबद्दल व्याख्याने दिली. परिणामी या व्याख्यांनामुळे अमेरिकन जनतेला हिंदुस्थानातील विधवा परिस्थितीची जाणीव झाली. विधवा स्त्रियांची परिस्थिती बदलावी म्हणून अमेरिकेतील बोस्टन शहरात त्यांनी 'रमाबाई असोसिएशन' नावाची संस्था स्थापन केली. हिंदुस्थानातील बाल विधवांना स्वयंभू बनवले. यासाठी 'बालविधवांची माहिती अमेरिकन जनतेला व्हावी यासाठी 'द हायकास्ट हिंदू वुमन' नावाचा ग्रंथ लिहिला.

पंडित रमाबाई अमेरिकेतून हिंदुस्थानात परतल्यावर विधवा उद्धारासाठी ११ मार्च १८८९ रोजी त्यांना मुंबईत 'शारदा सदन' नावाची संस्था स्थापन केली. या संस्थेत पहिली बालविधवा म्हणून शारदा गद्रे दाखल झाली. नोव्हेंबर १८९० मध्ये शारदा सदनचे पुण्यात स्थलांतर झाले. या संस्थेचे स्त्री स्वावलंबी व्हावी, तिची गुलामगिरी नष्ट व्हावी इ. मुख्य उद्देश होते. ख्रिश्चन धर्माच्या प्रसारासाठी अहमदनगर, जवळील कडेगाव येथे २४ सप्टेंबर १८९८ रोजी 'मुक्तिसदन' चे उद्‌घाटन केले. हिंदुस्थान हा शेतीप्रधान देश आहे. निसर्गाच्या लहरीपणाने वारंवार दुष्काळाची स्थिती निर्माण होते. अशा दुष्काळांमुळे अनेक कुटुंबे उद्‌ध्वस्त होतात. तेव्हा दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी रमाबाईंनी 'कृपासदन' नावाची स्वतंत्र संस्था स्थापन केली.

रमाबाईंनी स्त्रियांच्या स्वावलंबनावर भर दिला. शारीरिक श्रमांचे महत्त्व, विणकाम, मुद्रणकला, शिवणकाम इ.विषयांचे शिक्षण मुक्ती सदन मार्फत दिले. कलकत्याच्या त्यांचा जनतेने ' पंडिता' व 'सरस्वती' या दोन पदव्या स्त्रियांनी 'भारत वर्षीय स्त्रियांचे भूषण' हा किताब दिला. १९१९ मध्ये ब्रिटिश सरकारने 'कैसर ए हिंद' सुवर्ण पदक बहाल करून या स्त्री सुधारकाच्या कार्याचा गौरव केला होता.

**३) ताराबाई शिंदे :-**

१८ व्या शतकातील स्त्री जीवनाच्या चौकटीबाहेर पडून कार्य करणाऱ्या अनेक स्त्रिया दिसून येतात. त्यात पडद्याआड राहिलेल्या ताराबाई शिंदे यांचा उल्लेख करता येईल. सौ. ताराबाई शिंदे

या वऱ्हाड प्रांतातील बुलढाण्यातील होत्या. १८८२ मध्ये प्रसिद्ध झालेले 'स्त्री-पुरुष तुलना' हे ताराबाई शिंदे यांचे एकमेव पुस्तक उपलब्ध आहे. त्या पुस्तकात त्यांनी त्या काळातील स्त्री-पुरुषांतील विषमतेबद्दल अत्यंत परखडपणे आपली चीड व्यक्त केलेली आहे. पुरूष श्रेष्ठत्वाच्या कल्पनेवर त्यांनी हल्ला चढवलेला आढळतो. स्त्रीला समाज , कुटुंबातून मिळणाऱ्या तुच्छ व अपमानास्पद वागणुकीचा त्यांनी विचार यासंदर्भात किती परखड होते. त्या संदर्भात त्यांनी केलेल्या लेखनात त्या म्हणतात, '' स्त्री धर्म म्हणजे काय? निरंतर पतीची आज्ञा पाळणे, त्यांनी लाथा मारल्या, --- दारू पिऊन, जुवा खेळून ---- लाच खाऊन जरी घरी आले तरी स्त्रियांनी आपले हे कोणी --- असे समजून परमात्म्याप्रमाणे यांची मोठ्या हसतमुखाने देवासारखी पूजा करावी -- --- हा स्त्री धर्म जर बायकोला नवराच देव वाटतो तर नवऱ्याची वागणूकदेखील देवाप्रमाणेच पाहिजे ......... नवरा कसाही दुर्गुणी असला तरी त्याला देवाप्रमाणे मानून कोण वागेल बरे? हा वास्तव पण क्रांतिकारी प्रश्न त्यांनी उपस्थित केला होता. त्यांचे वडील बापूजी हरी शिंदे हे म. फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे सभासद होते. त्यांनी ताराबाईंना मराठी, संस्कृत, इंग्रजी भाषेचे उत्तम ज्ञान होते. त्यांच्या जडणघडणीत म. फुलेंच्या विचार, भाषा, सुधारणावादी, व्यापक समानतेचा पुरस्कार त्याबरोबरच आक्रमक वृत्तीचा प्रभाव दिसतो. स्त्रियांच्या वाट्याला पराधीन जीवन, अमानुष रूढींचा जाच सहन करावा लागत होता. या स्थितीच ताराबाईंना तीव्रतेने जाणीव होत गेली. त्याहीपेक्षा त्यांच्या मुळाशी असणाऱ्या पुरुष श्रेष्ठत्वाच्या अहंकारी वृत्तीची त्यांना मोठी चीड होती. स्त्रियांना लावली जाणारी दूषणे, बालविधवांवर होणारी सक्ती त्यांना मान्य नव्हती. 'फक्त स्त्रियांसाठी पातिव्रत्य' ही कल्पना पटणारी नव्हती. स्त्री-पुरुष समानतेसंबंधीचा त्यांनी आग्रह धरला होता. स्त्रियांची स्थिती सुधारावयाची असेल, पुरुषवर्चस्वाच्या भावनेचा बिमोड व्हायला हवा असे स्पष्टपणे त्यांनी मांडलेले दिसते. इतक्या स्पष्टपणे व प्रभावीपणे मांडण्याचा प्रयत्न तत्कालीन स्थितीत कोणत्याही सुधारकाने किंवा विचारवंताने केलेला दिसत नाही. ताराबाई शिंदे यांनी समाजातील अंधश्रद्धेवर प्रहार केलेला दिसतो. तर पुनर्विवाहाचा पुरस्कार केलेला होता. त्यांच्या लिखाणातून स्त्रीमुक्ती चळवळीचा सूर उमटतो. तो सूर काळाच्या कितीतरी आधी होता. त्यातून स्त्रीवादाची पार्श्वभूमी तयार होऊन त्यांच्या विचारांना चालना मिळाली.

**४) रमाबाई रानडे :– (१८६२ –१९२४)**

रमाबाई ह्या न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांच्या पत्नी होत. स्त्री-जागृतीसाठी त्यांनी मोठ्या निष्ठेने कार्य केले. रमाबाईचा जन्म १८६२ मध्ये सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्र या गावी कुर्लेकर सरदार घराण्यात झाला. रमाबाईंचा विवाह वयाच्या अकराव्या वर्षी झाला होता. रमाबाईंना लिहिता-वाचता येत नाही हे लक्षात आल्यावर न्या. रानडे यांनी त्यांना मुळाक्षरे, बाराखडी शिकविण्यास सुरूवात केली. नवऱ्याच्या इच्छेप्रमाणे वागून रमाबाई शिकत गेल्या. इंग्रजीही शिकू लागल्या, हे तत्कालीन स्त्री-जीवनाच्या चौकटीबाहेरचे होते. ती चौकट रमाबाईंनी ओलांडल्यामुळे त्यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला.

न्या. रानडे यांच्या फिरतीच्या सुशिक्षित घरातील सुसंस्कृत स्त्रियांचा सहवास लाभत गेला. त्यामुळे त्यांच्याच विचारसरणीवर त्यांचा परिणाम होत गेला. त्या जेथे जात तेथील मुलींच्या शाळांना भेटी देत. स्त्री-शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगत. १८८१ मध्ये त्यांना 'स्त्रियांना अवश्य विद्या कोणती?' व 'स्त्रियांचे संसारातील कर्तव्य' हे दोन निबंध लिहिले. त्यात त्या म्हणतात, 'प्रत्येक

स्त्रीला बहुतकरून मुलींची आई व्हावे लागते. आईस जर चांगले शिक्षण नसेल तर मुलास कोठून येईन ? मूल चांगले किंवा वाईट निपजणे हे बहुतकरून आईच्या सुशिक्षितपणावर अवलंबून आहे, म्हणून स्त्रियांना उत्तम शिक्षण मिळणे आवश्यक आहे.'

पं. रमाबाईंनी स्त्रियांच्या जागृतीसाठी स्थापन केलेल्या 'आर्य महिला समाजा' मुळे कुटुंबाबाहेरील स्त्री-समुदायाशी स्त्रीची काही बांधिलकी असू शकते हा विचार समाजात हळूहळू रुजण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे अशा सभांना व भाषणांना रमाबाई रानडे जाऊ लागल्या. त्यातून समाजकार्याची सुरुवात झाली. पं. रमाबाईंनी स्थापन केलेल्या शाळेचा भार ते 'आपलेच काम आहे' असे समजून त्यांनी हाती घेतले.

न्या. रानडेंच्या निधनानंतर रमाबाईंनी स्त्री उद्धाराचे कार्य हाती घेतले. स्त्रियांमध्ये ज्ञानप्रसार करून त्यांच्यात सामाजिक कर्तव्याची जाणीव निर्माण करून देणे हा हेतू होता. १९०४ मध्ये 'भारत महिला परिषद' स्थापन केली. या परिषदेचे अध्यक्षस्थान रमाबाई रानडे यांना देण्यात आले. रमाबाई या परिषदेची आवश्यकता सांगताना म्हणतात, 'आता बऱ्याच स्त्रिया सुशिक्षित झाल्या असल्या तरी पुष्कळ प्रांतात स्त्रियांमध्ये पुरुषांसमोर जाण्याची रीत नसेल. ज्या स्त्रिया परिषदेस जातात, त्यानाही मर्यादेच्या पलीकडे जाऊन आपले विचार येथे मोकळ्या मनाने मांडता येत नाहीत. शिवाय स्त्री विशिष्ट नाजूक विषयावर आपले विचार पुरुषांच्या समोर व्यक्त करणे शक्य होत नाही. म्हणून स्त्रियांसाठी वेगळी परिषद भरविणे अवश्य आहे.' यावरून असे लक्षात येते की, घराच्या उंबरठ्याच्या आत असलेली स्त्री घराबाहेर पडली. धीट बनत गेली .आपली मते परखडपणे मांडण्याइतपत धीटपणा तिच्यामध्ये येत गेला. हे स्त्री-जीवनातील स्थित्यंतर घडत गेले.

१९०८ मध्ये मुंबईत आणि १९०९ मध्ये पुण्यात सेवासदनाची स्थापना झाली. या संस्थेच्या स्थापनेमागे मुंबईचे सुधारक श्री. मलबारी व श्री. गिडूमल यांचा मोठा हातभार लागला. सेवासदनची योजना रमाबाईंनी मांडली, आणि सर्वांच्या विनंतीनुसार त्यांनी या संस्थेचे व सल्लागार समितीचे तहहयात अध्यक्षपद स्वीकारले. १९०८ मध्ये या समितीच्या कार्यासाठी अनेक महिला नियुक्त केलेल्या होत्या. त्यात लक्ष्मीबाई चंदावरकर, श्रीमती दोराबजी टाटा, श्रीमती अली अकुबर खान, श्रीमती विठ्ठलदास ठाकरसी, गुळबाई डॉक्टर, बिबी दिलशाह बेगम व काही मराठी महिलांचा समावेश होता.

स्त्री शिक्षण, स्त्री-स्वावलंबन, स्त्री-जीवन विकासाची सुरुवात सेवासदनाद्वारे झाली. ही संस्था कार्यामुळे केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात एक अनुकरणीय संस्था बनली. त्यातून स्त्री सुधारणा चळवळीचे स्वरूप व्यापक होऊन स्त्रियांनी स्त्री उन्नतीसाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे याची जाणीव होऊ लागली.

**जनाक्का शिंदेः– (१८७८–१९५६)**

महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या भगिनी. त्यांचा जन्म १८७८ कर्नाटकातील जमखिंडी येथे झाला. त्या सधन व सुखवस्तू अशा शिंदे घराण्यातील होत्या. जनाक्का शिंदे यांचा विवाह वयाच्या पाचव्या वर्षी झाला. त्यामुळे दहा-बारा वर्षांच्या होईपर्यंत जनाक्का माहेरी राहिल्या. जनाक्काला घरातच शिकविण्यात येऊ लागले. जनाक्कांनी आपल्या आठवणीत सांगितले आहे की, 'मला सांगण्यास अतिशय अभिमान वाटतो की जमखिंडीत पहिली मुलींची शाळा स्थापण्याचे कामी कुणी पुढाकार घेतला असेल तर तो आमच्या बाबांनीच.'

जनाक्का ज्या वेळी शाळेत जाऊ लागल्या, त्या वेळी पटावर मुलींची संख्या सतरा-अठरा असे. त्यात 'सात-आठ ब्राह्मण, तीन-चार मराठा, दोन-तीन मुसलमान, कोळी, वडार, महार, वगैरे होत्या. त्या मुली बाबांच्या शब्दाखातर भरती होत असत. पण प्रत्यक्ष शाळेत पाच-सहाच मुली हजर असत, असेही त्यांनी लिहिलेले आहे.

जनाक्काला वाचता येत होते हे जेव्हा तिच्या सासऱ्यांच्या लक्षात आले तेव्हा त्यांची प्रतिक्रिया चांगली झाली. ते म्हणाले, 'आता दिवाणजीची कशाला जरुरी ? माझी पोरच घरचा सगळा हिशेब-टिशेब पाहीलं' तिच्या नवऱ्याला मात्र आवडत नव्हते. त्यातून त्यांचा मत्सरभाव भडकत असे. नवरा आणि सासरा यांच्यात त्या कारणावरून तेढ वाढत गेली. जनाक्काला सासर चांगले मिळाले होते. परंतु नवरा बदफैली होता. कुकर्माकडे वळालेला होता. त्यामुळे घरातील वातावरण बदलत गेले. तिच्या जिवाला अपाय घडवण्याचे प्रसंग वरचेवर येऊ लागल्याने विठ्ठल रामजी शिंदेंनी आपल्या या बहिणीच्या प्रकरणात लक्ष घातले. तिला घरी परत आणले. जनाक्का सासरला कायमची अंतरली.

जनाक्का शिंदे १९९६ ते १९०५ या काळात पुण्यातील हुजुरपागेत राहत होत्या. तेथील वातावरणाचाही त्यांच्यावर परिणात होत गेला. शाळेतील कडक शिस्तीमुळे त्या सुधारक मताच्या बनत गेल्या.

१९०६-०६ मध्ये जनाक्का पनवेलला म्युनिसिपल शाळेत शिक्षिका म्हणून काम करू लागल्या. परंतु भाऊ म. शिंदे यांनी नोकरी सोडून त्यांच्याकडे येण्यास सांगितले कारण 'अस्पृश्यांच्या स्त्रियांमध्ये जागृती करण्यासाठी तुला पुढे मोठे कार्य करावे लागणार आहे. अस्पृश्य मुलींकरिता ज्या शाळा संस्थेतर्फे निघणार आहेत, त्यासाठी तुझी जरूरी आहे.' त्यामुळे जनाक्का आपली पनवेलची नोकरी सोडून मुंबईला अस्पृश्यांच्या उद्धारासाठी महर्षी शिंदे यांनी ' निराश्रित साहाय्यकारी मंडळी' ( डिप्रेस्ड क्लास मिशन ) नावाची संस्था स्थापन केली होती. या संस्थेद्वारे आरोग्य, स्वच्छता, शिक्षण या दृष्टीने जनाक्कांचे कार्य चालू झाले. अस्पृश्य स्त्रियांना शाळेत बोलावून आणून चैत्रगौरी, संक्रातीसारख्या, समारंभाच्या निमित्ताने हळदी-कुंकवासारखे कार्यक्रम आयोजित केले जाऊ लागले. यातून स्पृश्य-अस्पृश्य महिलांना एकत्र आणण्यासाठी त्यांचा प्रयत्न असे. यातूनच दयाराम गिडूमल यांच्या मदतीने १९०७ मध्ये 'निराश्रित सेवासदन ' ची स्थापना झाली. त्याची जबाबदारी जनाक्कांकडे आली. त्यांच्या सहकार्यातून श्रीमती वेणूताई, द्वारकाबाई, कल्याणीबाई अशा महिला तयार होत गेल्या.

जनाक्कांनी केलेले दुसरे महत्त्वाचे कार्य म्हणजे देवदासींचे प्रश्न सोडविले. वाट चुकलेल्या तरुण मुलींना आधार देताना त्यांना संकटानाही तोंड द्यावे लागे.

तळागाळातल्या सामान्य स्त्रीलादेखील चांगले ऐहिक व उच्च आध्यात्मिक जीवन जगायला मिळावे यासाठी त्यांची धडपड चालू होती. त्या काळात स्त्री सुधारक म्हणून त्यांना करावे लागणारे दिव्य भविष्यातील स्त्री सबलीकरणाचा पायाच होता.

**आनंदीबाई जोशीः– (१८६५–१८५७)**

३१ मार्च १८६५ रोजी पुणे येथील श्री. बाळशास्त्री माटे यांच्या घरी आनंदीबाईंचा जन्म झाला. त्यांचे लहानपणीचे नाव 'यमुना' होते. ती देखणी, सशक्त आणि ठसठशीत अंगकाठीची होती. त्यामुळे यमुनेचे लग्न लवकर करावे अशी घरात चर्चा होती. परंतु तत्कालीन परिस्थितीनुसार

वयाच्या नवव्या वर्षी तिचा विवाह श्री. गोपाळराव जोशी यांच्याशी झाला. गोपाळरावांचे हे दुसरे लग्न होते. त्यांनी आनंदीबाईला शिक्षण देण्यास सुरुवात केली. आणि आनंदीबाईंना शिक्षणाविषयी ओढ होतीच. गोपाळरावांनी आनंदीबाईंना इंग्रजी, मराठी, संस्कृत या भाषांबरोबरच गणित, इतिहास, भूगोल इत्यादी विषय शिकविले. त्यासाठी त्यांना समाजाकडून मनस्तापही सोसावा लागला. त्या परिस्थितीला दोघांनीही खंबीरपणे तोंड दिले.

आनंदीबाईंना शिक्षण घेण्याची इच्छा होती. परंतु सामाजिक अडचणी होत्या, मात्र शिक्षणाची जिद्द असलेल्या आनंदीबाईंना पुढील शिक्षणासाठी मिसेस टी. ई. कार्पेन्टर यांनी मदत केली. वयाच्या १७ व्या वर्षी सौ. आनंदीबाई अमेरिकेस गेल्या. तेथे फिलाडेल्फिया येथील वुमेन्स मेडिकल कॉलेजामध्ये प्रवेश घेतला. शिक्षणाविषयी तीव्र इच्छा, महत्त्वांकांक्षा, चिकाटीचे प्रयत्न, परिस्थितीवर मात करण्याची तयारी, व्रतस्थ दिनक्रम सांभाळून त्यांनी अखंडित ज्ञानसाधना केली. संस्कृतीचा अभिमान ठेवला. ११ मार्च १८८६ रोजी पेनसिल्वानिया विद्यापीठातून एम.डी. ची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्या. डॉ. सौ. आनंदीबाई जोशी या हिंदुस्थानातील पहिल्या डॉक्टर झाल्या. आपल्या ज्ञानाचा देशाला उपयोग व्हावा अशी प्रबळ इच्छा होती. त्याप्रमाणे १६ नोव्हेंबर १८८६ रोजी त्या भारतात परतल्या. परंतु त्यांना क्षयाची बाधा झाली व त्यातच २६ फेब्रुवारी १८८७ रोजी पुणे येथे त्यांचे निधन झाले.

गोपाळरावांच्या स्त्री- शिक्षणासंबंधीच्या भूमिकेला आनंदीबाईने चांगला प्रतिसाद दिला. एकमेकांच्या विश्वासाच्या पाठिंब्यावर वैद्यकीय शिक्षणासाठी सौ. आनंदीबाई एकट्या अमेरिकेस गेल्या. समाजातील स्त्रीविषयक स्थित्यंतराची अशी सुरुवात केली. ही एक सुरुवात होती.

**७) लक्ष्मीबाई टिळक ( १८६८–१९३६)**

१८६८ मध्ये नाशिक येथे लक्ष्मीबाई टिळकांचा जन्म झाला. लक्ष्मीबाईंचा विवाह अकराव्या वर्षी झाला. नाशिकमधील नारायण वामन टिळक यांच्याबरोबर लक्ष्मीबाईंचा विवाह झाला. लक्ष्मीबाईंना लिहिता-वाचता यावे म्हणून नारायण टिळकांचे प्रयत्न सुरू झाले. त्यासाठी घरीच पुस्तके आणून टिळक त्यांना शिकवीत असत; त्यामुळे लक्ष्मीबाईंना लिहिता-वाचता येऊ लागले.

टिळक ख्रिस्ती झाल्याने ब्राह्मणी संस्कृतीचा पगडा असलेल्या लक्ष्मीबाईंना प्रारंभी खूप वाईट वाटले. परंतु त्यानंतर त्यांचा डॉ. ज्युलिया बिसेल, मिस हॉर्वे, डॉ. ह्यूम यांसारख्या ख्रिस्ती मंडळींशी संपर्क येत गेल्याने त्यांच्या विचारात बदल होत गेला.

अहमदनगरला 'ऐक्यसभा' भरली. या सभेला नगर, सातारा, सोलापूर वगैरे जिल्ह्यातून ख्रिस्ती लोक येत असत. त्यात नगरचे एक दीड हजार स्त्री-पुरुष व बाहेरचे चार-पाचशे असा दोन हजार लोकांचा समुदाय जमत असे. जुलै १९०० मध्ये लक्ष्मीबाईने या सभेत भाषण केले होते. या भाषणाने लक्ष्मीबाई सभाधीट बनल्या. यानंतर त्यांना शिकावे असे वाटू लागले. कविता करू लागल्या. सन १९३३ साली नाशिक येथे कविसंमेलन भरले होते. त्यांच्या त्या स्वागताध्यक्ष होत्या. अध्यक्षस्थानी माधव ज्यूलियन होते. या संमेलनात महिलांचाही मोठा सहभाग होता. त्यात आनंदीबाई शिर्के, लीलादेवी चौधरी, शरदिनी वेदक इत्यादी लक्ष्मीबाईंनी समाजसेवा करता जे काव्य रचले होते. त्यातील काही कविता मासिकांतून प्रसिद्ध झाल्याने त्यांनी कवयित्री म्हणून प्रसिद्धी मिळाली होती. पण त्याहीपेक्षा कविसंमेलनात केलेल्या स्वागताध्यक्षीय भाषणाने जास्त प्रसिद्धी मिळाली होती. त्यांचे १९३४ मधील नागपूर येथील साहित्य संमेलनातील भाषण गाजले होते. प्रिन्सिपल अत्र्यांनी लक्ष्मीबाई टिळकांचा १९३५ मध्ये 'साहित्यलक्ष्मी' म्हणून गौरव केला.

नारायण टिळकांना नेहमी वाटत असे की बायकोने कोणीतरी मोठ्ठे व्हावे. लेखिका, कवयित्री, व्यक्ती बनावे. म्हणून ते त्या दृष्टीने नेहती प्रयत्न करीत असत. पतीच्या या प्रोत्साहनाने लक्ष्मीबाई कवी व लेखिका म्हणून प्रसिद्धीस आल्या. लक्ष्मीबाई टिळकांच्या लेखनसंपदेतील गाजलेले पुस्तक म्हणजे 'स्मृतिचित्रे'. त्यांच्या लेखनात जिवंतपणा होता. लेखनातील त्यांचे विचार, भावना, कल्पना थेट अंतः करणापर्यंत जाऊन भिडणारे होते. त्यांच्या लेखनातून त्यांनी स्वतःचे अनुभव लिहिलेले असल्यामुळे त्या काळी स्त्री- जीवन कसे होते हे समजू शकते. तसेच समाजातील काही अंधश्रद्धा, अनिष्ट रूढी कशा रुजलेल्या होत्या हे लक्षात घेऊन त्या दूर करण्यासाठी त्यांनी प्रथमतः आपल्यात बदल घडवून आणला. म्हणूनच स्त्री जीवनातील समस्यांचा बोध होऊ लागला. ही बाब स्त्रीवादी चळवळीला पोषक ठरली.

१९ व्या शतकात समाज प्रबोधनाची चळवळ अनेक अंगानी वैशिष्ट्यपुर्ण ठरली. समाजसुधारकांनी तत्कालीन परिस्थितीतील वैगुण्यांवर प्रहार केला. त्यात स्त्री सुधारकांची भूमिका एक आव्हान असतानाही अनेक धुरिणांनी ते आव्हान स्वीकारून स्त्री सबलीकरणासाठी अथक परिश्रम घेतले.

### ८.२.३ स्वातंत्र्योत्तर कालखंडातील स्त्रियांच्या चळवळीः-

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्री जीवनात स्थित्यंतर घडून येण्यास सुरुवात झाली होती. सामाजिक सुधारणांच्या काळात स्त्री जागृतीला सुरुवात झाली. सुधारणेच्या समाजकारणांप्रमाणेच स्वातंत्र्याच्या राजकारणात व खादी ग्रामोद्योग, हरिजनोद्धार इत्यादी विधायक कार्यक्रमांमध्ये स्त्रियांनी पुरुषांच्या बरोबरीने समानतेच्या पायावर सहभागी व्हावे असा महात्मा गांधींचा आग्रह होता. त्यातूनच अनेक स्त्रियांनी सत्याग्रहात व अन्य राजकीय चळवळी व त्यासंबंधी अन्य कृतीतून सहभाग घेतला. स्त्री जीवनातील स्थित्यंतरे राजकीय जीवनात दिसून आली. तशीच वैवाहिक, कौटुंबिक, शैक्षणिक, व्यावसायिक जीवनातही होत गेली. स्त्रीचा सर्वच क्षेत्रांत जसा सहभाग वाढत गेला तशाच तिच्या समस्या वाढत गेल्या. स्त्री जीवनातील समस्या सोडविण्यासाठी समाजसुधारकांनी प्रयत्न केले. पुढे त्याला कायदयाची जोड दिली. गेली स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रीला सोडविण्यासाठी स्त्रियांनी प्रयत्न केले. स्त्रियांनी संघटना स्थापन केल्या. आपल्या हक्कांसाठी संघर्षाची तयारी ठेवली. त्यातून स्त्री स्वातंत्र्य चळवळी वाढीस लागल्या. सामाजिक जीवनात मोठे परिवर्तन घडून येण्यास सुरुवात झाली. त्याचेच स्वरूप म्हणजे पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीचे कार्यक्षेत्र विस्तारले. समानतेचा हक्क मिळविण्यासाठी स्त्रियांना संघर्ष करावा लागला. स्त्री सबलीकरणासाठी प्रयत्न झाले. स्त्री पुरुषापेक्षा सामर्थ्यवान म्हणून प्रत्येक पुरुषाला स्त्रीचे पाठवळ आवश्यक असते अशी भावना निर्माण आता निर्माण होऊ लागलेली आहे.

स्त्रियांच्या सबलीकरणाचा प्रयत्न करत असताना १९ व्या शतकातील समाजसुधारकांनी प्रथमच स्त्रियांना दिल्या जाणाऱ्या विषम दर्जा व वागणुकीचा प्रश्न उपस्थित केला. स्त्रीचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न केले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी झालेल्या राष्ट्रीय चळवळीत स्त्रियांचा सहभाग वाढत गेला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर राज्यघटनेनुसार कायद्यासमोर स्त्री-पुरुषांना समानता देण्यात आली. राज्यघटनेची तरतूद झाल्यामुळे विषमता, अन्याय, उच्चनीच भेद, भेदभाव या समस्या सुटल्याची भावना निर्माण झाली.

१९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून साजरे झाले, तसेच १९७५ ते १९८५ हे दशक महिला दशक म्हणून साजरे केले. १९७१ मध्ये भारतातील स्त्रियांच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी

नेमलेल्या समितीने अहवालातील निष्कर्षामध्ये स्त्रियांना भोगाव्या लागणाऱ्या भीषण विषमतेबाबत नोंद केलेली आहे. याच्या परिणामातून स्त्रियांच्या आंदोलनकारी गटांचा उदय झाला. उद्दिष्ट महिलांचा दर्जा उंचावणे. अमानुष रूढीला विरोध करणे हा उद्देश होता. स्त्रीचा छळ, पिळवणूक व स्त्री - शोषणाविरुद्ध आणि मुक्तीसाठी लढे उभारले जाऊ लागले. स्त्री समस्यांकडे व्यापक प्रमाणात लक्ष वेधून घेण्यासाठी सातत्याने प्रयत्न चालवले. स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडून निदर्शने केली. त्या स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराविरुद्ध संघटितपणे आवाज उठविला. १९७५ पासूनच्या दोन दशकांच्या अभ्यासातून स्त्रियांवर होणारे अत्याचार व स्त्रियांचे कर्तेपण लक्षात घेऊन मूलभूत स्त्रीवादी संकल्पनांची सैद्धांतिक मांडणी करण्यात आली. बदलत्या परिस्थितीत स्त्रियांवर होणारे अन्याय दूर केले जावेत म्हणून प्रयत्न झालेत. सतीबंदी, बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाह, इत्यादी प्रश्न सुटले. परंतु स्त्री जीवनासंदर्भात नवीन समस्या वाढीस लागल्या. विवाहाचे वय, बालविवाहामुळे दिसून येणारे अनिष्ट परिणाम, हुंडाबळी, सासरकडून होणारा छळ या समस्यांच्या संख्येत घट होताना दिसत नाही. यातूनच स्त्री-मुक्ती चळवळ वाढीस लागली.

''स्त्री-मुक्तीची चळवळ ही पुरुषांविरुद्ध नाही किंवा ही पुरुषांबरोबरची स्पर्धाही नाही, तर हा संघर्ष पुरुषी अरेरावी, पुरुषी अहंमता, पुरुषी प्रवृत्तीविरुद्ध'' असलेला संघर्ष आहे. या विचारातूनच स्त्री मुक्ती चळवळ कार्यान्वित झालेली होती.

१९७५ पूर्वी महाराष्ट्रात स्त्री संघटना कार्यरत होत्या. प्रश्न मांडले जात होते. स्त्री संघटनेची नियतकालिके होती. त्यात 'अनुसया', 'बायजा', 'आवाज औरत की', 'महिला आंदोलन पत्रिका', 'ललकारी' इत्यादी नियतकालिकांमधून स्त्री प्रश्न मांडण्यात येत होते. स्त्री चळवळीमुळे समाज व सरकार स्त्री स्वातंत्र्याकडे पाहू लागले. त्यातून विविध कायदे करण्यात आले.

स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांसाठी केलेले कायदे -

स्वातंत्र्यपूर्व काळात सामाजिक कायद्यांनी तत्कालीन अनिष्ट रूढींवर आघात केले. स्त्रीवरील अन्याय दूर करण्याचा दृष्टिकोन त्यात होता. स्त्रीला पारंपरिक जखडलेल्या बंधनांतून मुक्त करणे ही काळाची गरज होती. स्वातंत्र्योत्तर काळातील हिंदू कायद्याचा टप्पा क्रांतिकारक म्हटला जातो. स्त्रीचे कुटुंबातील, समाजातील दुय्यम स्थान, तिच्यावर लादली गेलेली बंधने, होणारा अन्याय याची दखल घेऊन स्त्री-जीवनात सुधारणा करण्यासाठी प्रयत्न सुरू होते. त्याला न्याय्य हक्क, समाजातील तिचे स्थान, कौटूंबिक अधिकार मिळवून देण्यासाठी कायद्याची आवश्यकता होती.

**हिंदू कोड बिल –**

१९४१ साली तयार करण्यात आलेल्या बिलात काळाला अनुसरून अनेक सुधारणा केल्या. तेच 'हिंदू कोड बिल' होय. या बिलाला त्यावेळी मोठा विरोध झाला. पं. नेहरू, डॉ. आंबेडकर यांनी या बिलासाठी प्रयत्न केले. हिंदू स्त्रियांच्या हक्कासाठी आग्रह धरला. भारतीय घटना परिषदेने जात, धर्म किंवा लिंगभेद करणार नाही, न्यायाच्या तराजूत सर्व एकाच मापाने तोलले जातील अशी घोषणा करून स्वातंत्र्य व समता या तत्त्वांचा स्वीकार केलेला होता. अशा परिस्थितीत हिंदू स्त्रीला तिचे न्याय्य हक्क देण्यास विरोध करावा ही घटना योग्य वाटत नव्हती, डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल संमत करण्यासाठी खूप प्रयत्न केले; पण ते रेंगाळत राहिले.

'हिंदू कोड बिलाचे' चार निरनिराळे भाग करून हे चारही कायदे निरनिराळ्या वेळी पंडित नेहरू यांना संमत करून घ्यावे लागले. १९५५-१९५६ मध्ये संमत झालेले चार हिंदू कायदे म्हणजे

कायद्याच्या इतिहासातील एक क्रांतिकारक घटना म्हटली जाते.

हिंदू विवाह कायदा

हिंदू वारसा हक्क कायदा

हिंदू अज्ञान व पालकत्व कायदा आणि

हिंदू दत्तक व पोटगी कायदा

असे चार कायदे संमत करण्यात आले. या कायद्याचे एक विशेष म्हणजे हा हिंदू कायदा सर्व देशभर लागू करण्यात आला.

**१) हिंदू विवाह कायदा – (१९५५)**

'विवाह म्हणजे संस्कार होय' ही सनातन कल्पना झुगारून देऊन 'एक सामाजिक करार' म्हणून त्याचा स्वीकार केला.

या कायद्यानुसार हिंदू पुरुषाला प्रथम पत्नी जिवंत असताना दुसरे लग्न करणे गुन्हा असून या गुन्ह्याला तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते.

एखाद्याने अज्ञान मुलीशी तिच्या इच्छेनुसार परंतु पालकांच्या संमतीशिवाय विवाह केला तर त्याला दंड होऊ शकतो.

विवाह वय वराचे २१ वर्षे तर वधूचे १८ वर्षे पूर्ण असले पाहिजे.

विवाह कायद्याने विवाहासाठी कोणताच विधी नेमून दिलेला नाही. कोणत्याही प्रचलित चालीरितीप्रमाणे विवाह करण्याची मोकळीक ठेवली आहे. हिंदू कायद्याप्रमाणे सामाजिक पद्धतीनुसार झालेले लग्न नोंदणीबुकात नोंदविण्याची सोय आहे. त्यामुळे विवाह झाल्याचा पुरावा म्हणून ती नोंदणी उपयुक्त ठरू शकते.

**२) पालकत्वाचा कायदा (१९५६) –**

वैवाहिक दाव्यात मुले आपल्याच जवळ असावीत असा दोन्ही पक्षांचा आग्रह असतो तर कधीकधी दुराग्रहही असतो. अशा वेळी अज्ञान व अल्पवयीन मुलांच्या भवितव्याचा, शिक्षणाचा आणि पालन पोषणाचा प्रश्न निर्माण होतो. त्यासाठी १९५६ मध्ये अज्ञान व पालकत्वाचा कायदा संमत झाला. यासंबंधी काही नियम केले. त्यात पालकाच्या पाल्यावरील अधिकाराचा, पाल्याची काही मालमत्ता असली तर मालकत्तेचा प्रश्न या बाबी निश्चित केल्या आहेत. या कायद्याने स्त्रीचे पालकत्वाचे अधिकार वाढवून आता स्त्रीला पुरुषाच्या बरोबरीने आपल्या अज्ञान मुलांच्या बाबतीत पालकाचे हक्क लाभले आहेत.

**३) हिंदू वारसा हक्क कायदा (१९५६) –**

या कायद्याने प्रथमच स्त्रीला पुरुषांच्या बरोबरीने वारसा हक्क देण्यात आला. हिंदू समाजाच्या दृष्टीने ही क्रांतिकारक घटना होती.

या कायद्याने स्त्रीला इस्टेटीत हक्क प्राप्त झाले. स्वयंपादित मालमत्तेवर अविवाहित व विधवा स्त्रीचा पूर्ण मालकी हक्क असल तरी विवाहित स्त्रीचा नव्हता. विवाहित स्त्रीच्या स्वकष्टार्जित मालमत्तेवर तिच्या पतीचा अधिकार चाले. घटनेतील स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व प्रत्यक्षात आखले. कुटुंबाची एक घटक म्हणून हिंदू स्त्रीला कन्या, पती, माता या विविध नात्याने वारसा हक्क प्राप्त झाला. मुलीलादेखील मुलाइतकाच या कायद्याने हक्क दिला आहे. मृत पतीच्या मालमत्तेत पत्नीलाही वारस हक्क आहे.

स्त्री-पुरुष भेद नसल्यामुळे स्त्री इस्टेटीची पूर्ण मुखत्यार आहे. विवाहित स्त्रीच्या व्यक्तिगत इस्टेटीवर पतीचा अधिकार नाही. स्वतःच्या वारसदारांना तिची इस्टेट मिळते. स्त्री मृत्युपत्रान्वये आपल्या पश्चात आपल्या इच्छेनुसार आपल्या संपत्तीची व्यवस्था लावू शकते. विधवा स्त्रीने जर पुनर्विवाह केला तर वारसा हक्काने मिळालेल्या संपत्तीवर हक्क कायम राहतो.

एवढेच नव्हे तर १९५६ च्या कायद्यान्वये स्त्रीचे वर्तन अनैतिक आहे या कारणावरून तिचा वारसा हक्क रद्द होऊ शकत नाही.

**४) हिंदू दत्तक –**

१९५६ च्या हिंदू दत्तक कायद्याने दत्तक घेण्याचा व्यक्तिगत अधिकार स्त्रियांना मिळाला. अविवाहित पुरुषांप्रमाणेच अविवाहित स्त्रीदेखील दत्तक घेऊ शकते. त्यात मुलाप्रमाणे मुलीलाही दत्तक घेता येते. दत्तक कुणाला घेता येते, दत्तक कोण होऊ शकते याचप्रमाणे वडील हयात असताना मुलांना दत्तक देण्याचा आईला स्वतंत्रपणे हक्क नाही. वडिलांना हक्क असता तरी त्यासाठी त्याला आपल्या पत्नीची - मुलाच्या आईची - परवानगी घ्यावी लागते.

**५) पोटगीचा कायदा –**

पोटगी मागण्याचा अधिकार फक्त स्त्रीलाच पण या स्त्री-पुरुष भेद नष्ट केल्यामुळे पत्नीची ऐपत व परिस्थिती असेल तर पतीलाही तिच्याकडून पोटगी मागण्याचा हक्क १९५५ च्या हिंदू विवाह कायद्याने दिलेला आहे. स्त्रीवर या कायद्याने तिच्या औरस व अनौरस मुलांच्या व वृद्ध मातापित्यांच्या चरितार्थाची जबाबदारी टाकलेली आहे.

**६) गर्भपाताचा कायदा –**

'मेडिकल टर्मिनेशन ऑफ प्रेग्नन्सी बिल १९७१' हा कायदा १९७२ पासून अंमलात आला आहे. या कायद्यानुसार भारतातील सर्व धर्मीय स्त्रियांना प्रथमच काही विशिष्ट परिस्थितीत गर्भपात करून घेण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. १९७२ पूर्वी गर्भपाताला कायद्याने बंदी होती. तरी अनधिकृतपणे किंवा बेकायदेशीरपणे गर्भपात करत असत. अशा वेळी स्त्रीला हा धोक्याचा मार्ग पत्करावा लागे. आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत गर्भपात बंदी करणारा कायदा अन्यायकारक होता. त्यात सुधारणा करून काही विशिष्ट कारणांसाठी गर्भपात करून घेण्याचा हक्क स्त्रीला देण्यात आला. त्यात स्त्रीचे जीवित धोक्यात असेल तर तिचे प्राण वाचविण्यासाठी, बलात्कार झाल्यामुळे आपत्तीत सापडलेल्या स्त्रीला, स्त्रीच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला असेल, कुटुंब-नियोजनाच्या उद्देशाने पति-पत्नीपैकी कुणीही संतति, नियमनाच्या कोणत्याही साधनांचा वापर करीत असूनही त्यात ती अयशस्वी झाली तर स्त्रीला गर्भपात करण्याची कायद्याने मोकळीक आहे.

**७) गर्भजल परीक्षा विरोधक कायदा –**

कोणत्याही सज्ञान स्त्रीला स्वतःच्या इच्छेनुसार गर्भपात करून घेता येतो. मात्र मुलगाच हवा या दृष्टिकोनातून केल्या जाणाऱ्या गर्भपातावर नियंत्रण व्हावे म्हणून १९८८ मध्ये गभजल परीक्षा विरोधक कायदा संमत करण्यात आला.

स्त्रियांना मिळालेला एक नवा हक्क, स्त्री मुक्तीतील एक टप्पा, मूल हवे की नको हे ठरविण्याचा स्त्रीचा अधिकार या बाबी लोकशाहीप्रधान समाजव्यवस्थेत सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी कायदा हे एक प्रभावी हत्यार ठरू शकते. कायदा केला म्हणून लोकांचे हृदयपरिवर्तन

होत नाही असा सूर जरी असला तरी प्राप्त परिस्थितीत हे कायदे आवश्यक होते.

**८) हुंडाविरोधी कायदा**

हुंडाविरोधी कायदा प्रथम १९६१ मध्ये करण्यात आला. १९८४ मध्ये सुधारण करण्यात आली. या कायद्यानुसार हुंडा घेणारा व देणारा यांना दंड किंवा तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते. १९८६ मध्ये या कायदयामध्ये दुरुस्ती करण्यात आली. त्यानुसार हुंडा देणारा किंवा हुंडा घेणारा या दोन्ही पक्षांना शिक्षा पाच वर्षांपर्यंत आणि दंड १५ हजार रुपयांपर्यंत वाढविण्यात आल्या. 'हुंडा बळी' चा गुन्हा 'इंडियन पिनल कोड' च्या कायद्याखाली समाविष्ट करण्यात आलेला आहे. त्यानुसार शिक्षा होऊ शकते. हा अजामीनपात्र गुन्हा आहे.

**९) फॅक्टरी अॅक्ट**

या कंपनी कायद्यानुसार संध्याकाळी ७ वाजेपासून ते सकाळी ६ वाजेपर्यंतच्या काळात स्त्रियांना कारखाने, खाणी, शेतमळे यांमध्ये कामावर येण्यास कायद्यान्वये बंदी करण्यात आलेली आहे. स्त्रियांची सुरक्षितता आणि कल्याण लक्षात घेऊन ही वेळेची मर्यादा घालण्यात आलेली आहे.

फॅक्टरी अॅक्टमध्ये १९७६ मध्ये सुधारणा करण्यात आली त्यानुसार जेथे ३० महिला किंवा अधिक महिला कामावर असतील तेथे पाळाघराची सोय करण्याची तरतूद करण्यात आली. तसेच स्त्री पुरुष समान कामासाठी समान वेतन कायदा करण्यात आला. तसेच महिला कामगारांच्या बाळंतपणासाठी पगारी रजा देण्याची तरतूद करण्यात आली.

**१०) फॅमिली कोर्ट**

१९८४ साली फॅमिली कोर्टाची स्थापना करण्यात आली. ज्या विवाहित दाम्पत्यांमध्ये काही कारणांमुळे विभक्त होण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यास त्यांच्यात तडजोड घडवून आणून सामंजस्य प्रस्थापित करण्यात भर देण्यात येतो. या कायद्यानुसार दाम्पत्यांना सामंजस्याने एकत्रित आणले जाते.

१९८६ मध्ये 'इनडिसेंट रिप्रेझेंटेशन ऑफ वुमन' कायदा करण्यात आला. त्यानुसार कुठल्याही जाहिरातीमध्ये स्त्रियांच्या अंगप्रदर्शनाचे बीभत्स प्रदर्शन करण्यावर या कायद्याने बंदी घालण्यात आली.

१९८७ मध्ये सतीबंदीचा कायदा करून कडक कारवाई करण्याच्या दृष्टीने संमत करण्यात आला. या कायद्याद्वारे स्त्रीला जबरदस्तीने तिच्या पतीबरोबर जाळणे अथवा पुरणे व त्यात भाग घेतल्यास त्या व्यक्तीला फाशीची किंवा जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

स्त्रियांवर होत गेलेले अत्याचार, सामाजिक रूढी, परंपरा, धार्मिक अंधश्रद्धामुळे स्त्रियांचे समाजातील स्थान पुरुषांच्या बरोबरीने न राहता दुयम राहिले. स्त्रियांवर अनेक बंधने घातली. स्त्रीला व्यक्ती म्हणून सामाजिक न्याय मिळवून द्यावयाचा असेल तर त्याला वैधानिक आधार पाहिजे त्या शिवाय स्त्रियांना न्याय मिळणार नाही याबद्दलही विचारवंतांमध्ये दुमत नाही. कायदे करण्याबरोबरच त्याची अंमलबजावणीही काटेकोरपणे होणे महत्त्वाचे ठरते. त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे स्त्रीसाठी दिलेले हक्क आणि पुरविलेले संरक्षण आणि त्यातून निर्माण होणारी कर्तव्ये याविषयी स्त्रियांना तसेच पुरुषांनाही जाणीव होणे आवश्यक ठरते.

**स्त्रियांच्या विकासासाठी सरकार योजना :-**

स्वातंत्र्य मिळाल्यावर असे नियोजन होते की, घटनेत मूलभूत हक्क व कर्तव्ये स्पष्टपणे अधोरेखित केल्यामुळे स्त्रियांच्या हिताचे रक्षण होईल. पण घटनाकारांनी स्त्री-पुरुष समानतेची दिलेली

हमी प्रत्यक्षात स्त्रियांच्या विकासासाठी पुरेशी नव्हती. शोषित समुदायांसाठी घटनेत काही सवलती देण्याची त्यांना गरज वाटली. त्यानुसार या समुदायांचे शैक्षणिक व आर्थिक हित जपण्याच्या दृष्टीने काही खास तरतुदी करण्यावर त्यांनी घटनेत जोर दिला आहे. आर्थिक परालंबित्व व सामाजिक रूढी परंपरांच्या हिताच्या रक्षणाकरता व राष्ट्रीय विकासात त्यांनाही योग्य भूमिका बजावता यावी या दृष्टीने काही उपाययोजना करण्यात आल्या.

**पंचवार्षिक योजना आणि स्त्रियांचा विकासः–**

भारताच्या नियोजन महामंडळाने स्त्रियांच्या विकासासंदर्भात १) शिक्षण २) आरोग्य ३) कल्याण या मुद्याचा विचार करून पंचवार्षिक योजनेत क्रमाक्रमाने समाविष्ट केला. पन्नासच्या दशकाच्या सुरुवातीपासून ते ऐंशीच्या दशकाच्या मध्यापर्यंत नियोजनकर्त्यांनी स्त्रियांच्या कल्याणावर भर दिला. पहिल्या पंचवार्षिक योजनेत (१९५१-५६) याच कल्याण दृष्टिकोणाचा पुरस्कार केला होता. १९५३ मध्ये याच दृष्टीने 'कल्याण मंडळ' ची स्थापना झाली. सामाजिक संदर्भाच्या दृष्टिकोणातून स्त्रियांचे प्रश्न समजून घेणे ही या मंडळाची महत्त्वाची जबाबदारी होती. स्त्रियांनी बांधलेल्या संघटनांवर यात भर देण्यात आला होता. हे उद्दिष्ट गाठण्यासाठी स्त्रियांच्या कल्याणाची जबाबदारी अखिल भारतीय महिला काँग्रेस (अखथउ), राष्ट्रीय महिला समिती (छउथ) अशा खाजगी संघटनांकडे सोपविण्यात आली. दुसऱ्या योजनेत (१९५६-६१) सुद्धा कल्याण दृष्टिकोणावरील जोर कायम राहिला. सामाजिक नैतिक प्रश्न तसेच आरोग्य व आरोग्यसेवा हे महत्त्वाचे विषय होते. पहिल्या पंचवार्षिक योजनेत स्त्रियांच्या 'कामगार' या भूमिकेकडे साफ दुर्लक्ष करण्यात आलेले होते. पण दुसऱ्या योजनेत त्यांचा कामगार म्हणून विचार झालेला दिसतो. व औद्योगिक क्षेत्रातील कामगार म्हणून त्यांच्या समस्यांकडे लक्ष दिलेले दिसते. श्रमाच्या बाजारपेठेमध्ये स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाचे भान या योजनेत ठेवलेले आहे. विषम वेतन, बढती मिळविण्यासाठी किंवा चांगली नोकरी मिळविण्याच्या दृष्टीने आवश्यक प्रशिक्षणाचा अभाव, अर्धवेळ काम मिळविण्यातील अडचणी यासारख्या समस्यांकडे या योजनेत लक्ष वेधले आहे.

शिक्षण हा तिसऱ्या पंचवार्षिक योजनेतील (१९६१-६६) महत्त्वाचा मुद्दा होता; पण स्त्रियांच्या व मुलांच्या कल्याणासाठी आवश्यक कार्यक्रम राबविण्यात ही योजना असफल ठरली. कारण बत्तीस कोटींची तरतुद असूनही फक्त एकोणीस कोटी रुपये प्रत्यक्षात वापरले गेले. तिसऱ्या, चौथ्या (१९६९-७४) आणि पाचव्या (१९७४-७९) योजनेत कुटुंब या घटकाला केंद्रस्थानी ठेवण्यात आले. कल्याण दृष्टिकोणातील त्रुटीही आतापर्यंत स्पष्ट झाल्या होत्या. म्हणून कुटुंबनियोजन आणि गर्भवती अथवा बाळंतपणात महिलांच्या पोषणाचा मुद्दाही त्यात अंतर्भूत करण्यात आला.

सत्तरच्या दशकाच्या काळात महिलांच्या दर्जावरील राष्ट्रीय समितीने नमूद केले की नियोजन आणि झपाट्याने होणारे सामाजिक बदल या दोहोंचाही स्त्रियांच्या स्थितीवर वाईट परिणाम झाला आहे. या समितीने स्पष्टपणे सांगितले की ब्रिटिश परिस्थिती जास्तच खालावली आहे. काही महत्त्वाच्या प्रश्नांकडे समितीने लक्ष वेधले.

१) पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची घटती संख्या

२) निरक्षरता

३) कमी आयुमर्यादा

४) बालमृत्यूचे

५) बाळंतपणात होणाऱ्या स्त्रियांच्या मृत्यूंचे वाढते प्रमाण

६) उत्पादनातील स्त्रियांच्या सहभागात घट.

सहाव्या पंचवार्षिक योजनेत (१९८०-८५) स्त्रियांशी निगडित कार्यक्रमात काही महत्त्वाचे बदल केले.

सातव्या पंचवार्षिक योजनेत (१९८५-९०) स्त्रियांच्या प्रश्नांकडे पहिल्यांदा सर्वंकष दृष्टिकोनातून पहाण्यास सुरुवात झाली. स्त्रियांच्या सक्षमीकरणाचा मुद्दा उचलून धरण्यात आला. या योजनेअंतर्गत स्त्रियांसाठी प्रशिक्षण व रोजगार साहाय्य कार्यक्रम , जवाहर रोजगार योजना (डढएझ), महिला विकास महामंडळ यासारखे उपक्रम हाती घेण्यात आले.

आठव्या पंचवार्षिक योजनेतसुद्धा स्त्रियांच्या सक्षमीकरणावर जोर देण्यात आला.

**७३ वा घटनात्मक बदल आणि स्त्रिया –**

एप्रिल १९९३ मध्ये ७३ व्या घटनात्मक बदलाबाबत कायदा संत झाला. या कायद्यानुसार सर्व राज्यांनी आपल्या शासनविषयक कायद्यात बदल केला. या घटनात्मक बदलानुसार स्त्रियांसाठी ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या आहेत व अशा पद्धतीने स्त्रियांना संपूर्ण अधिकार दिल्याचा दावाही करण्यात आला आहे. पण बारकाईने अभ्यास करता या कायद्यात त्रुटी स्पष्ट होत. स्त्रियांना वर्तमान राजकीय प्रणालीमध्ये आणि तेही फक्त स्थानिक पातळीवरील राजकारणात संधी देणे हे पुरेसे नाही. त्यांना खरेखुरे प्रतिनिधीत्व व अधिकार मिळवून देण्यासाठी सर्वप्रथम सार्वजनिक आणि खाजगी स्तरांवर आपल्या समाजात असणाऱ्या पुरुषसत्ताक नियंत्रणावर प्रखर टीका व परीक्षण झाले पाहिजे. एवढेच नव्हे तर पुरुष नियंत्रण मुक्त स्त्रीला अधिकार उपभोगता आले पहिजेत...

स्त्रियांसाठी रोजगार सहाय्य योजना (डढएझ)

ग्रामीण भागातील स्त्रिया आणि मुलांसाठी विकास योजना

महिलामंडळ कार्यक्रम

राजस्थान सरकारतर्फे चालविला जाणारा महिला विकास कार्यक्रम

ग्रामीण युवक / युवतींसाठी स्वयंरोजगार शिक्षण

स्त्रियांसाठी व्यावसायिक प्रशिक्षण

स्त्रियांसाठी सुरू झालेल्या विकास व कल्याण योजनांचा कुणी अभ्यास केला तर असे दिसून येते की, योजना म्हणून त्या चांगल्या आहेत, पण प्रत्यक्षात उतरविताना खरा प्रश्न उभा राहतो.

स्त्रियांच्या चळवळीतून स्त्री सक्षमीकरणासाठी प्रयत्न झाले असले तरी स्त्रियांचा विकास आणि कल्याणाबरोबर स्त्री पुरुषी वर्चस्वातून मुक्त झाली पाहिजे.

## ८.३ स्वयं–अध्ययन प्रश्न

### ८.३.१ गाळलेल्या जागी योग्य शब्द लिहा.

१)--- यांनी कायद्याने सती जाण्यास बंदी केली.

२) ---- हिंदी पुनर्विवाहाचा कायदा पास झाला.

३) विष्णुशास्त्री पंडीत यांनी १८६५ मध्ये मुंबई येथे ---- मंडळ स्थापन केले.

४) म. फुले यांनी---- समाजाची स्थापना केली.

५) ----- यांनी आर्य महिला समाजाची स्थापना केली.
६) ---- हिंदुस्थानातील पहिल्या डॉक्टर होत्या.
७) ---- हे आंतरराष्ट्रीय वर्ष म्हणून साजरे झाले.
८) पाळणाघराची सोय ---कायद्याद्वारा करण्यात आली.

**८.३.२ एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बाळशास्त्री जांभेकरांनी कोणती वृत्तपत्रे सुरू केली?
२) शतपत्रे ही लेखमाला कोणी लिहिली
३) म. फुले यांनी पहिली मुलींची शाळा कोठे सुरू केली?
४) 'द हाय कास्ट हिंदु वुमेन' हा ग्रंथ कोणी लिहिला?
५) 'स्त्री पुरुषतुलना' हे पुस्तक कोणी लिहिले?
६) 'स्मृती चित्रे' हे पुस्तक कोणी लिहिले?
७) 'हिंदु कोड बिल' द्वारा कोणते कायदे अस्तित्वात आले?

## ८.४ सारांश–

१९ व्या शतकाच्या प्रारंभी ब्रिटिशांच्या संपर्कात शिक्षण व सामाजिक क्षेत्रात परिवर्तन कारणीभूत ठरल. समाजात अनेक अनिष्ट चालीरिती, रूढी परंपरा होत्या. स्त्रियांना अनेक बंधने होती. याची जाणीव झालेल्यांनी त्यात सुधारण किंवा परिवर्तन करण्याचा प्रयत्न केला. त्यातूनच समाज सुधारणेची चळवळ सुरू झाली. सतीची चाल, विधवा पुनर्विवाह, बालहत्या स्त्री-पुरुष, विवाहित स्त्रीचे जीवन वगैरे स्त्रियांच्या समस्या होत्या.

सामाजिक सुधारणा चळवळीत सामाजिक सुधारणांमध्ये स्त्री समस्या सोडविण्यासाठी अनेक समाज सुधारकांनी प्रयत्न केले. त्यात केशवचंद्र सेन, पंडीत ईश्वरचंद्र विद्यासागर, बाळशास्त्री जांभेकर, विष्णुबुवा ब्रम्हचारी, लोकहितवादी, विष्णुशास्त्री पंडीत, म.फुले, महर्षी शिंदे ,डॉ. भांडारकर, न्या. रानडे अशा अनेक समाज सुधारकांनी योगदान दिले होते. त्यामुळे सतीची चाल कायद्याने बंद करण्यात आली. विधवा पुनर्विवाह कायदा झाली. स्त्री-पुरुष समानतेची मागणी होऊ लागली. स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त ठरल्या.

समाज सुधारणेच्या चळवळीत समाज सुधारकांमध्ये स्त्री समाज सुधारकांची कामगिरी वैशिष्टयपूर्ण ठरली. त्यात पहिल्या सावित्रीबाई फुले, स्त्रियांसाठी अनेक संस्था स्थापन करणाऱ्या, कैर ए हिंद हा बहुमान मिळविणाऱ्या पंडीत रमाबाई, स्त्री -पुरूष तुलना करून परवड विचार मांडणाऱ्या ताराबाई शिंदे, जनाक्का शिंदे, डॉ. आनंदीबाई जोशी, लक्ष्मीबाई टिळक वगैरे स्त्रियांची भूमिका देणारी होती.

स्वातंत्र्य व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या समस्या होत्याच. याची जाणीव झालेल्या स्त्रियांनी स्त्रीवादी चळवळ उभारली. स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांसाठी कायदे करण्यात आले. पंचवार्षिक योजनांद्वारे स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी योजना राबविण्यात आल्या. थोडक्यात स्त्री सबलीकरण, सक्षमीकरण करण्यासाठी सामाजिक आणि राजकीय पातळीवर झालेले कार्य भविष्यात

स्त्री आणि पुरुष समानता प्रस्थापित होऊन स्त्रीकडे पाहण्याच्या भूमिकेत बदल होईल.

## ८.५ पारिभाषिक शब्द, शब्दार्थः-

१) प्रबोधन- समाजात प्रचलित असलेल्मा आचार विचार व व्यावहारात जेव्हा दोष उत्पन्न होतात तेव्हा समाजाला बुद्धिनिष्ठ व विज्ञाननिष्ठ पद्धतीने जागृती करण्याच्या प्रक्रियेला प्रबोधन म्हणतात.

२) चळवळ- विशिष्ट व्यक्ती किंवा समुदामाने एकत्र येऊन सर्वांच्मा हितार्थ केलेला प्रामाणिक प्रयत्न असतो. परंपरेने झालेल्मा प्रयत्नास चळवळ म्हणता येईल.

३) डिप्रेस्ड क्लासेस मिशन- समाज सेवा व अस्पृर्याद्धार कार्य करताना म. शिंदे यांनी १९०६ मध्ये स्थापन केलेले मिशन.(संस्था)

४) स्त्री-मुक्ती-स्त्री-पुरुष विषमता लिंगाधिष्ठित मानणाऱ्या प्रवृत्तीविरुद्ध उभी केलेली वैचारिक आणि कृतिशील चळवळ

५) समानता- सामाजिक, आर्थिक, राजकीय यासह सर्व घटकांत समानता प्राप्त करण्याचे अधिकार राज्मघटनेने दिलेले आहे.

६) पितृसत्ताक- ज्या समाजात मालमत्तेचा वारसा हक्क पितृपरंपरेने चालतो ती सत्ता आहेत.

## ८.६ संदर्भ सूची

१) सहस्रबुद्धे पु. ग.-महाराष्ट्र संस्कृत.

२) सरदार गं. बा.- महाराष्ट्र जीवन.

३) पाध्ये टिकेकर -आजकालचा महाराष्ट्,

४) धनंजम किर-म. जोतिबा फुले मांचे चरित्र.

५) मालशे -आपटे-विधवा विवाह चळवळ

६) शिंदे ताराबाई -स्त्री-पुरुष तुलना

७) टिळक लक्ष्मीबाई- स्मृती चित्रे

८) पाटील सुशीला- स्त्री मुक्तीः केव्हा व कशी?

९) भागवत कमल व इतर - स्त्री चळवळीची वाटचाल

१०) भागवत विद्युत व रेजे शर्मिला - भारतातील समकालीन काळाचे प्रश्न (स्त्रीवादी चर्चा)

# घटक ९. आर्थिक परिवर्तन

## ९.१.०. घटकाची उद्दिष्टे

१. सन १९२० नंतर भारताबरोबर महाराष्ट्रात कारखानदारी वाढू लागली.

२. कापडगिरणीच्या तंत्रामध्ये बदल झाले.

३. जलविद्युत प्रकल्प हाती घेण्याची गरज निर्माण झालीआहे.

४. उसाची लागवड करण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन मिळाले

५. तेलाच्या गिरण्या, विडी, सिगारेट, तपकीर, रासायनिक, आगपेट्यांचे इ. कारखाने व उद्योगधंदे महाराष्ट्रात सुरु झाले.

## ९.१.१.प्रस्तावना

लॉर्ड डलहौशीच्या काळात अंतर्गत भारताच्या औद्यागीकरणाला चालना मिळाली खरी ; परंतु या औद्योगिकरणाचा विकास अत्यंत मंदगतीने व असंतुलित झाला. याचे मुख्य कारण म्हणजे उद्योग धंद्यांबाबतची आणि संपूर्ण अर्थव्यवस्थेबद्दलची इंग्रजी राज्यकर्त्यांची उदासीन वृत्ती हे होय. शिवाय इंग्लंडमधील उद्योगांना पोषक होईल अशी शोषक नीती या काळात ब्रिटिश राज्यकर्त्यांनी या देशात राबविली. ब्रिटिश मालाची स्पर्धा करतील असे उद्योगधंदे स्थापन करण्यास भारतीयांना परवानगी नाकारण्यात आली. भारतात कच्च्या मालाच्या उत्पादनावर अधिक भर देण्यात आला आणि ब्रिटिश भांडवल किफायतशीरपणे गुंतविण्याचे क्षेत्र म्हणून भारताचा उपयोग करुन घेण्यात आला. परंतु विसाव्या शतकापर्यंत युरोपमधील इतर राष्ट्रांतही औद्योगिक वाढून त्यांचा माल भारतीय बाजारपेठेत येऊन ब्रिटिश मालाची स्पर्धा करु लागताच भारतीय उद्योगधंदे वाढविण्याची विशेष निकड सरकारला जाणवली. त्यामुळे सन १९१४ नंतर उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने आखले. सन १९२० नंतर भारतात आणि त्याचबरोबर महाराष्ट्रात कारखानदारी वाढू लागली.

## ९.१.२.महाराष्ट्रातील औद्योगीकरण :

### ९.१.२.१.कापड उद्योग :

कापड उद्योगास महाराष्ट्रात अनुकूलता आहे हे कंपनी सरकारच्या लक्षात येताच प्रथम कंपनीने कापूस लागवडीस शेतक- यांना प्रोत्साहन दिले. युरोपियन देशातून कापसाच्या विविध वाणांचे बियाणे मागविले. याच दरम्यान शेतीच्या व्यापारीकरणासही सुरुवात झाली होती. यामुळे पुणे, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, अहमदनगर, खानदेश व व- हाड या भागांत कापसाची लागवड मोठ्या प्रमाणात सुरु होऊन उत्पादनात भरमसाट वाढ झाली. यानंतरच कापड व्यवसायाला महाराष्ट्रात सुरुवात झाली.


प्रा.संजय तुळशिराम शेलार महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

कापडाच्या गिरणी व्यवसायाची सुरुवात १८५३ साली झाली. कासवजी दावर यांनी कापडाची पहिली गिरणी मुंबईत ताडदेव येथे सुरु केली. तिचे नाव 'बॉम्बे स्पिनिंग ॲण्ड विव्हिंग कंपनी' असे होते. सन १८६१ पर्यंत कापड उद्योगातील गिरण्यांची संख्या १२ झाली. सन १८७४ नंतर कापड व्यवसायात विश्वास निर्माण झाल्याने गिरण्यांची संख्या हळूहळू वाढू लागली. सन १८७८ पर्यंत मुंबई इलाख्यात गिरण्यांची संख्या ४२ वर जाऊन पोहोचली. मुंबईतील कापड उद्योगाची सन १८९२ पर्यंत सतत भरभराट होत राहिली. मुंबई इलाख्यात कापड गिरण्यांची मालकी इंग्रज, पारशी, भाटिया व खोजा वगैरे बिगरमराठी भाषिकांच्या हाती होती तर या गिरण्यांतील बहुतेक सारे कामगार मराठी भाषिक होते.

स्पिनिंग व विव्हिंग मिलच्या जोडीलाच जिनिंग व प्रेसिंग ही उद्योगही पुढे येत होता. मुंबईमध्ये इतर भागांतून येणारा कापूस कच्चा व अस्वच्छ असे. तो साफ करुन गिरण्यांमध्ये उपयोगास उपयुक्त करुण घेण्यासाठी जिनिंग व प्रेसिंग मिलचा उपयोग चांगलाच होत असे. सन १८८० ते १८९५ हा काळ शेतीच्या दृष्टीने हितकारक होता. कापूस उद्योगाने या काळात चांगली प्रगती केली. कापडगिरणी व्यवसायाला स्थिरता आली. कापडगिरणीच्या तंत्रामध्ये खूप बदल झाले. रिंग-स्पिनिंगच्या पध्दतीमुळे सूक्ष्म धागा निर्माण होऊ लागला. त्यामुळे कापड व्यवसायाला स्थिरता आली.  सन १८९५ ते १९१४ या काळात मात्र देशात पडलेले दुष्काळ, १८९६ साली मुंबईत आलेली प्लेगची साथ, इत्यादी कारणांमुळे भारतीय कापडाची मागणी कमी झाली. तथापि अशा प्रतिकूल परिस्थितीतही भारतीय कापड व्यवसाय टिकून राहिला.

### ९.१.२.२.युध्दामुळे सरकारचे बदललेले औद्योगिक धोरण :

१९१४ साली पहिले महायुध्द सुरु झाल्यानंतर अनेक वस्तूंची आयात करणे अवघड झाल्याने हिंदुस्थानातील उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारण्याची सरकारला गरज वाटू लागली. मे १९१६ मध्ये हिंदुस्थान सरकारने टी.एच.हॉलंड यांच्या अध्यक्षतेखाली एक औद्योगिक आयोग नेमला. या आयोगाच्या भारतीय सदस्यांमध्ये पंडित मदनमोहन मालवीय आणि दोराब टाटा यांचा समावेश करण्यात आला. हिंदुस्थानच्या औद्योगिक वाढीत सरकारचा सक्रीय सहभाग असावा आणि त्यादृष्टीने वैज्ञानिक व तांत्रिक सल्ला मिळेल अशी सरकारने व्यवस्था करावी आणि आवश्यक ती प्रशासकीय यंत्रणा उभारावी अशा आयोगाच्या शिफारशी भारतमंत्र्याने स्वीकारल्या आणि त्यानंतर उद्योगधंद्यांच्या विकासाला चालना देण्यात आली.

सरकारच्या धोरणामुळे १९२० पर्यंत कापड उत्पादनात ४६% ने वाढ झाली. हातमागांची संख्या वाढली. सन १९१४ पर्यंत कापडगिरण्या मुंबईमध्ये केंद्रित झाल्या होत्या. २५ वर्षांत कापडगिरण्या मुंबईबाहेर महाराष्ट्राच्या इतर भागातही पसरल्या. महाराष्ट्रात मुंबईच्या खालोखाल सोलापूर हे कापड व्यवसायाचे मुख्य केंद्र बनले. सन १८७६ मध्ये मुंबईचे शेठ मुरारजी गोकूळदास यांनी सोलापुरात पहिली कापडगिरणी उभारली

होती. त्यानंतर ही संख्या वाढत जाऊन पाचपर्यंत पोहोचली. सोलापूरप्रमाणेच खानदेशाचे क्षेत्र या व्यवसायाला सोयीचे असल्याने धुळे, जळगाव, चाळीसगाव व अंमळनेर येथे कापडगिरण्या सुरु झाल्या. नागपूर, औरंगाबाद येथेही कापडाच्या गिरण्या सुरु झाल्या. पूर्वीच्या दक्षिणी संस्थानात राजाश्रयाने खास सवलतीखाली काही गिरण्या उभारल्या. भोर, मिरज, सांगली, इचलकरंजी, बुधगाव व कोल्हापूर येथे उभारल्या गेलेल्या गिरण्या बाल्यावस्थेत असतानाच ही संस्थाने विलीन झाल्याने तेथील गिरण्यांची अवस्था पोरक्या मुलांसारखी झाली.

### ९.१.२.३.जलविद्युत निर्मितीत टाटांचा पुढाकार :

हिंदुस्थानातील उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी प्रथम मोठ्या प्रमाणावर उर्जानिर्मिती करावी लागेल त्यासाठी जलविद्युत प्रकल्प हाती घेण्याची निकड आहे. सोयीच्या जागांची देशभर पहाणी करुन प्रकल्प हाती घ्यावेत असे औद्योगिक आयोगाच्या सदस्यांनी प्रतिपादन केले होते. सर्वेक्षणाचे काम १९१८ साली हाती घेण्यात आले. सन १९२१ मध्ये या सर्वेक्षणाचा अहवाल तीन भागांत प्रसिध्द झाला.

आपल्या कापडगिरण्यांसाठी जलविद्युतशक्तीचा वापर करण्याची कल्पना टाटा उद्योग समुहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांना सुचली. डेव्हिड गोस्टलिंग या तज्ञाने जलविद्युत निर्मितीसाठी लोणावळ्याचा परिसर फार उपयुक्त ठरेल असे टाटांना सुचविले. तेव्हा त्यांनी भारतमंत्री जॉर्ज हेमिल्टन यांची लंडनमध्ये भेट घेऊन त्यांचा पाठिंबा मिळविला. १९०४ साली जमशेदजी टाटा मरण पावल्यानंतर पुढे १९१० साली त्यांचा मुलगा दोराब यांनी 'टाटा हायड्रोइलेक्ट्रिक पॉवर सप्लाय कंपनी' स्थापन केली आणि फेब्रुवारी १९११ मध्ये मुंबईचे गव्हर्नर सिडनहॅम यांच्या हस्ते लोणावळ्याच्या धरणाची पायाभरणी करण्याचा समारंभ पार पाडला. सन १९१३ पर्यंत लोणावळा व वळवण ही धरणे बांधून तयार झाली. शिरवटा तलावाचे बांधकाम पूर्ण झाल्यावर १९१५ मध्ये विद्युत निर्मितीला सुरुवात होऊन मुंबईस वीजपुरवठाही सुरु झाला. कोळशाऐवजी मुंबईचे कापडगिरणी मालक विजेचा वापर करु लागले. त्यामुळे उत्पादन खर्च कमी झाला आणि उत्पादनात वाढही झाली. मुंबई-पुणे मार्गावरच्या रेल्वेगाड्याही विजेवर धावू लागल्या. १९१६ साली एच. पी. गिब्ज या अभियंत्याच्या साह्याने लोणावळ्यापासून उत्तरेस १२ मैलावर असलेल्या आंदर खो־ यात जलविद्युत निर्मितीचा आणखी एक प्रकल्प टाटांनी हाती घेतला आणि त्यासाठी 'आंदर व्हॅली पॉवर सप्लाय कंपनी' ही दुसरी कंपनी स्थापन केली.

### ९.१.२.४.साखर उद्योग :

सन १८६३ पासून भारतात यंत्राच्या साह्याने उसापासून साखर तयार करण्याची प्रक्रिया सुरु झाली. १९२० साली अहमदनगर जिल्ह्यात बेलापूर येथे खाजगी क्षेत्रात पहिला साखर कारखाना उभा करण्यात आला. मुंबई इलाख्यात आणखी तीन साखर कारखाने सुरु करण्यात आले. त्यापैकी दोन कारखाने उस उत्पादनाचा खर्च जास्त असल्यामुळे बंद पडले. उत्तर भारतात साखर उत्पादनाला जी अनुकूलता लाभली ती सुरुवातीच्या

काळात महाराष्ट्रात साखर उद्योगाला लाभली नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे गुळाला साखरेपेक्षा अधिक किंमत मिळत असल्याने शेतकऱ्यांचा कल गुळनिर्मितीकडेच असे. त्यामुळे नवे साखर कारखाने उभारणे जिकरीचे होत असे. सन १९२४ नंतर साखरेची किंमत सतत घसरत गेली. त्यामुळे सरकारला साखर उद्योगाला संरक्षण देण्याशिवाय पर्याय उरला नाही. १९३२ साली देशातला साखर उद्योगाला संरक्षण देणारा पहिला कायदा अस्तित्वात आला. १९३२ सालीच बी.सी.कामत या नेमस्त नेत्याच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीच्या अहवालात सरकारने साखर उद्योग विकसित करावा अशी शिफारस केली. याच दरम्यान निरा, प्रवरा व गोदावरी या नद्यांचे पाणी धरणे बांधून व कालवे खोदून शेतीसाठी उपलब्ध करुन देण्यात आले. त्यामुळे उसाची लागवड करण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन मिळाले. या दरम्यानच जागतिक मंदीचा तडाखा जगभरच्या साखर उद्योगाला बसल्याने साखर कारखान्यासाठी आवश्यक त्या यंत्रसामग्रीच्या किमतीही विलक्षण घटल्या. मंदीमुळे गोरे साखर कारखानदार काही काळ साखर उत्पादन कमी प्रमाणात करु लागले. त्यांची अडचण ही आपली संधी समजून वालचंद हिराचंदसारख्या उद्योगपतींनी या धंद्यात लक्ष घालण्यास सुरुवात केली. पुणे, सोलापूर आणि अहमदनगर जिल्ह्यातील कालव्यांच्या प्रदेशात जुनीपुराणी यंत्रसामग्री पडत्या भावाने खरेदी करुन साखर उद्योगाची पायाभरणी केली. सन १९३३ ते १९४० या काळात महाराष्ट्रात फलटण, वालचंदनगर, श्रीरामपूर, कोपरगाव, बेलवंडी, रावळगाव, कोल्हापूर व श्रीपूर इत्यादी ठिकाणी १२ साखर कारखाने सुरु झाले.

सन १९४८ मध्ये विखे पाटलांनी 'प्रवरा सहकारी साखर कारखाना' हा देशातील पहिला सहकारी तत्त्वावर सुरु केलेला कारखाना होता. या कारखान्यावर संपूर्ण मालकी ही शेतकऱ्यांची होती. त्यातील सर्व नफा शेतकऱ्यांना वाटला जातो. यानंतर महाराष्ट्रात सहकारी क्षेत्रात साखर उद्योगाने वेगळे स्थान निर्माण केले. डॉ. धनंजयराव गाडगीळ, अण्णासाहेब शिंदे व यशवंतराव चव्हाण यांनी साखर उद्योगासंबंधीच्या धोरणाचे महत्त्व राष्ट्रीय स्तरावर पटवून दिले. सन १९५० नंतर महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची झपाट्याने प्रगती झाली. परिणामी उस उत्पादनात वाढ होऊन सहकारी कारखान्यांची संख्या वाढू लागली. सन १९६१ पर्यंत सहकारी साखर कारखान्यांची संख्या १ वरुन २० वर गेली.

### ९.१.२.५.बड्या उद्योग समूहांचा उदय :

महाराष्ट्रात उद्योगपतींच्या घराण्यांचा उत्कर्ष होऊ लागला. वालचंद हिराचंद आणि त्यांचे बंधू गुलाबचंद, रतनचंद व लालचंद यांच्या कर्तृत्वामुळे स्वातंत्र्योत्तर काळात बड्या २० उद्योगसमूहांमध्ये वालचंद समूहाची तसेच किर्लोस्कर समूहाची गणना होऊ लागली. वालचंद शेठजी हे एक द्रष्टे उद्योगपती होते. विमाने, जहाजे व मोटारी वगैरे वाहतुकीच्या साधनांची निर्मिती करण्याचे महत्त्वाकांक्षी प्रकल्प त्यांनी हाती घेतले. युध्द

काळातील ब्रिटनचा विमान खात्याचा अर्थमंत्री बीव्हर ब्रुक याचा हिंदुस्थानात विमान कारखाना काढण्यास विरोध होता. म्हैसूरच्या महाराजांनी बंगळूरच्या पूर्वेस ७ मैल अंतरावर विमान कारखान्यासाठी ३०० एकर जागा उपलब्ध करुन दिल्यामुळे डिसेंबर १९४० मध्ये वालचंद शेठनी तेथे विमाने तयार करण्याचा कारखाना सुरु केला. परंतु ब्रिटिश सरकारने या उद्योगाचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन तो कारखाना आपल्या ताब्यात घेतला. विशाखापट्टणम येथ वालचंद उद्योगसमूहाने नौका बांधणीचा उद्योग 'सिंदिया स्टीम नेव्हिगेशन' कंपनीमार्फत जून १९४१ मध्ये सुरु केला. यानंतर मोटारी तयार करण्याचा कारखाना काढण्याची परवानगी मिळावी म्हणून वालचंद शेठजींना बरेच प्रयत्न करावे लागले. जून १९४४ मध्ये 'प्रिमियर ऑटोमोबाईल्स लि.' या कंपनीच्या स्थापनेस सरकारने परवानगी दिली. हिंदुस्थान कन्स्ट्रक्शन कंपनी आणि इंडियन ह्यूम पाईप कंपनी या कंपन्याही वालचंद समूहाने युध्दापूर्वीच स्थापन केल्या होत्या.

किर्लोस्कर उद्योगसमूहाचे संस्थापक लक्ष्मणराव काशिनाथ किर्लोस्कर आणि त्यांचे चिरंजीव शंतनुराव, राजारामपंत आणि रवि यांच्या कल्पकतेमुळे आणि कर्तबगारीमुळे युध्दकाळात किर्लोस्कर उद्योगसमूहाची वाढ होऊ लागली. शेतकऱ्यांसाठी लोखंडी नांगर, पंप, डिझेल इंजिने वगैरेंचे उत्पादन करणारा कारखाना किर्लोस्करांनी औंध संस्थानच्या हद्दीत प्रथम सुरु केला. तेथे किर्लोस्करवाडी हे शहर वसविण्यात आले. युध्द सुरु असताना संरक्षण विभागास आवश्यक असणाऱ्या अनेक वस्तू किर्लोस्कर उद्योगसमूह पुरवू लागला. म्हैसूर संस्थानात हरिहर येथे या उद्योगसमूहाने यांत्रिक उपकरणे तयार करण्याचा कारखाना सन १९४१ मध्ये सुरु केला. १९४६ साली पुण्याजवळ खडकी येथे किर्लोस्कर इंजिन्सचे उत्पादन सुरु करण्यात आले.

### ९.१.२.६.अन्य उद्योगधंदे :

कागद ही महत्त्वाची उपभोग्य वस्तू आहे. महाराष्ट्रातील पहिली कागदाची गिरणी सन १८८७ मध्ये पुण्याजवळ मुंढवे येथे सुरु झाली. तिचे नाव 'डेक्कन पेपर मिल्स लि.' असे होते. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात वृत्तपत्रांच्या कागदाच्याअभावी महाराष्ट्रातील वृत्तपत्रे बंद पडण्याची पाळी आली असता या गिरणीने त्यांना कागद पुरविला.

गुळाचा धंदा महाराष्ट्रात पुरातन काळापासून चालत आलेला आहे. उसापासून गूळ तयार करण्याचे शेतकऱ्यांचे प्रयत्न वैयक्तिक पातळीवर चालू होते. परंतु यांत्रिक शक्तीवर व कंपनीच्या स्वरुपात हा उद्योग मोठ्या प्रमाणावर सुरु करण्याचे श्रेय चितळेनगरच्या (ता.माळशिरस) चितळे बंधूंना आहे. त्यांच्या चितळेनगरच्या कारखान्यात मुख्यत्वे गुळाचेच उत्पादन होत असे. दक्षिणी संस्थानातील कोल्हापूर, सांगली व फलटण ही ठिकाणे व संस्थाने गुळाच्या उत्पादनात फार पुढे आली. २०व्या शतकात मुंबई प्रांतात सिमेंटचे

उत्पादन सुरु झाले. अनेक वर्षे देशातील सिमेंटच्या उत्पादनापैकी जवळजवळ ५०% सिमेंटचे उत्पादन ए.सी.सी ही एकच कंपनी करीत असे. स्वातंत्र्य मिळेपर्यंत या उद्योगात फारशी वाढ झाली नाही.

महाराष्ट्रातील औषधांचा पहिला कारखाना पनवेल येथे श्री. पुराणिक यांनी १९७२ साली सुरु केला. औद्योगिक वाढीमुळे शहरांची व रोगांची संख्या वाढू लागली व औषधांना मोठ्या प्रमाणात मागणी येऊ लागली. त्याबरोबर औषध कारखानेही वाढू लागले. मुंबई येथे झंडू फार्मास्युटिकल वर्क्स व चेंबूर येथे सांडू ब्रदर्सचा कारखाना सुरु झाला. पुणे येथे १९२३ साली आयुर्वेद रसशाळा, १९२४ साली अहमदनगर येथे आयुर्वेद फार्मसी लि., व सातारा येथे आयुर्वेदीय अर्कशाळा इत्यादी औषध निर्मितीचे कारखाने सुरु झाले.

## **९.१.३. स्वयं अध्ययनासासाठी प्रश्न** (अभ्यासासाठी प्रश्न)**:**

### ९.३.१.दीर्घोत्तरी प्रश्न :

(१) १९ व्या व २० व्या शतकातील महाराष्ट्रातील औद्योगीकरणाची वाटचाल थोडक्यात सांगा.

(२) महाराष्ट्रातील बड्या उद्योग समूहांचा उदय  आढावा घ्या.

(३) महाराष्ट्रातील उद्योगधंदे  प्रगतीचा आढावा घ्या.

### ९.३.२.लघुत्तरी प्रश्न :

(१) महाराष्ट्रात गुळ उद्योगाच्या प्रगतीचा आढावा घ्या.

(२) महाराष्ट्रात कापड उद्योगाच्या प्रगतीचा आढावा घ्या.

(३) महाराष्ट्रातील साखर उद्योग यावर टीप लिहा.

### ९.३.३.वस्तुनिष्ठ प्रश्न :

(१) महाराष्ट्रात कापडाची पहिली गिरणी कोणी व कोठे सुरु केली?

(२) महाराष्ट्रातील जलविद्युत निर्मितीचा पहिला प्रयत्न कोणी केला?

(३) दुसऱ्या महायुध्दाच्या काळात महाराष्ट्रात उदयास आलेल्या दोन बड्या उद्योगसमूहांची नावे सांगा?

(४) महाराष्ट्रात पहिली कागदाची गिरणी कोठे सुरु झाली?

(५) महाराष्ट्रातील औषध निर्मितीचा पहिला कारखाना कोणी व कोठे सुरु केला?

## ९.१.४. सारांश

१९१४ नंतर उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने आखले. सन १९२० नंतर भारतात आणि त्याचबरोबर महाराष्ट्रात कारखानदारी वाढू लागली. त्याचा आढावा पुढीलप्रमाणे घेता येईल.साखर

धोरणातील अस्थिरता काढून टाकण्यासाठी सरकारने लेव्ही साखर, बफर स्टॉक, साखरेच्या दुहेरी किंमती, आयात-निर्यात धोरण, कोटा पध्दत व टेंडरपध्दत यासारख्या मार्गांचा अवलंब करुन उसाच्या किंमती निर्धारित केल्या. त्यामुळे शेतक-याच्या उसला निश्चित दर मिळू लागला. परिणामी उस उत्पादनात वाढ होऊन सहकारी कारखान्यांची संख्या वाढू लागली. सन १९६१ पर्यंत सहकारी साखर कारखान्यांची संख्या १ वरुन २० वर गेली.शेतक-यांसाठी लोखंडी नांगर, पंप, डिझेल इंजिने वगैरेंचे उत्पादन करणारा कारखाना किर्लोस्करांनी औंध संस्थानच्या हद्दीत प्रथम सुरु केला.स्वातंत्र्योत्तर काळात तेलाच्या गिरण्या, विडी, सिगारेट व तपकीर तयार करण्याचे कारखाने, रासायनिक कारखाने व आगपेट्यांचे कारखाने असे अनेक उद्योगधंदे महाराष्ट्रात सुरु झाले.

## ९.१.५. पारिभाषीक शब्द शब्दार्थ

१. **यादवी** :- देशार्तंगत युद्ध

२. **स्पिनिंग** :- सुत तयार करणे

३. **विव्हिंग** :-धागा विणणे

४.**जिनिंग व प्रेसिंग** :- कापूस कच्चा व अस्वच्छ  तो साफ करणे

५.**रिंग-स्पिनिंगच्या** :-कापडाचा पातळ धागा

## ९.१.६.संदर्भ ग्रंथ


**१.** Gadgil D.R., IEIRT. Pg64-65

**२.** Ibid:Pg’76-77

**३.** कर्वे चि.ग.व इतर ,महाराष्ट्र परिचय,पुणे,खंड-१ पृ.२४८

**४.** कुलकर्णी पी.बी., नाना शंकरशेठ यांचे चरित्र

**५.** जाधव वसंत :आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,विद्या पृ-२३१-२३३

**६.** सरदार गं.बा. (संपादक), महाराष्ट्र जीवन, खंड १, पृ. ३९२-३९३


## ९.१.७. क्षेत्रीय कार्य

१. कापड उद्योगाच्या प्रगतीचा आढावा घ्या. आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपायोजना सुचवा.

२. तुमच्या परिसरातील उद्योग-व्यवसायांची नोंद करा.

## ९.२.०. घटकाची उद्दिष्टे

**१.** मुक्त व्यापाराच्या धोरणाने समाजाचा विकास कसा होईल.

**२.** भारतामध्ये शेती व्यवसायात सुधारणा होण्यासाठी प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्या शेतकऱ्याला मालकी हक्क देणे.

**३.** इंग्रज राजवटीने हे नवे पाऊल टाकले नव्हते; तर आपल्या तिजोरीत जादा भर पडावी.

**४.** म. फुल्यांनी शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडली.

**५.** प्रत्येक शेतकऱ्याची जमीन व तिची प्रतवारी यांचा विचार करुन आणि प्रत्यक्ष पीक पहाणी करुन सारा निश्चित केला जात असे.

## ९.२.१.प्रस्तावना

१९ व्या शतकापर्यंत भारत हा ब्रिटिशांची एक वसाहत बनला. भारताची शेती ही इंग्लंडच्या समृध्दीसाठी राबविली गेली. मुक्त व्यापाराच्या धोरणाने समाजाचा विकास होईल. डेव्हिड रिकार्डोचा खंड सिध्दांत भारतामध्ये लागू करावा, खुद्द शेतकऱ्यांशी चर्चा करुन जमीन महसूल ठरवावा असा विचार जेम्स मिल या विचारवंताने मांडला. महाराष्ट्राचा गव्हर्नर एलफिन्स्टनवर या विचारसरणीचा प्रभाव पडला होता. अर्थात एलफिन्स्टन परंपरावादी विचारसरणीचा पुरस्कर्ता होता. भारतामध्ये ब्रिटिशांनी 'पितृभाव शासनप्रणाली' लागू करावी असे विचारवंतांना वाटत होते.महाराष्ट्रीय जनतेच्या इच्छा, सवयी व स्वभाव यांच्या विरोधी शासन महाराष्ट्रात सुरु केले तर ते यशस्वी होणार नाही. येथील जनतेला मानवेल रुचेल व पचेल असेच शासन निर्माण करावे व या सरकारने पितृभावाने येथील जनतेचे पालनपोषण करावे.

## ९.२.२. कृषी क्षेत्राचा विकास

### ९.२.२.१. कंपनी सरकारचे धोरण :

भारत हा कृषीप्रधान देश असल्यामुळे जमीन महसुल हाच सरकारी उत्पन्नाचा प्रमुख भाग असे. त्यामुळे ब्रिटिशांनी या देशाचे अधिकाधिक शोषण करण्यासाठी भारतात स्वतःला अनुकूल असे पण महाराष्ट्रीयांना नवखे धोरण आखले. हे धोरण जित प्रदेशाप्रमाणे बदलले. ज्या शेतकऱ्यांकडून आणि शेतीतून महसूल गोळा करण्यात येत होता त्यांच्या भल्यासाठी या महसुलात कोणत्याच प्रकारचा राखीव वाटा नव्हता. याच महसुलातून कंपनीचा प्रशासकीय खर्च भागविण्यात आला. अतिरिक्त पैसा इंग्लंडला नेण्यात आला. १७६५ च्या सुमारास बंगालमधील दिवाणी अधिकार कंपनी सरकारला मिळाले. पण ते महाराष्ट्रातील महसुली

पध्दतीविषयी अनभिज्ञ असल्याने रॉबर्ट क्लाइव्हने महसुल वसुलीचे काम भारतीय अधिकाऱ्याला दिले. वॉरन हेस्टिंग्ज गव्हर्नर झाल्यावर या पध्दतीचा पुर्नविचार सुरु झाला. इंग्लंडमधील कृषी पध्दतीनुसारच भारतीय कृषी व्यवस्था आहे, असा त्याचा समज व महसूल वाढविणे हे उद्दिष्ट्य असल्याने हेस्टिंग्जने रोगापेक्षा जालिम उपाय केला. त्याच्या मते सर्व जमीन सरकारी मालकीची असल्याने शेतकरी शेती करणारे खंडकरी तर कर गोळा करणारे जमीनदार मध्यस्थ म्हणून शेतकऱ्याला मेहनताना, जमीनदाराला कमिशन तर उत्पन्नाच्या उरलेला वाटा सरकारला मिळावा अशी त्याची अपेक्षा त्यामुळे जास्त महसूल गोळा करण्यासाठी लिलाव सुरु झाले. जमीनदारांऐवजी नवे लोक लिलावाच्या माध्यमातून शेती क्षेत्रात घुसले. १७७२ साली त्यांना ५ वर्षांसाठी हे अधिकार मिळाले.

### ९.२.२.२. रयतवारी पध्दती :

रयत म्हणजे प्रजा. त्यामुळे भूमीकाराच्या बाबतीत सरकार व रयत यांचा प्रत्यक्ष संपर्क असणारी पध्दत म्हणजे रयतवारी पध्दत होय. ही पध्दत थॉमस मन्रोने प्रथम मद्रास प्रांतात प्रायोगिक तत्त्वावर सुरु केली होती. तीच पध्दत एलफिन्स्टनने महाराष्ट्रात मराठ्यांकडून जिंकलेल्या प्रदेशात लागू केली.

### ९.२.२.३. रयतवारी पध्दत महाराष्ट्रात लागू करण्यामागील सरकारची भूमिका :

लॉर्ड कॉर्नवालीस याने भारतात कायमधारा पध्दत लागू केली होती. परंतु तिच्यात असलेल्या दोषामुळे ती पध्दती अयशस्वी ठरली होती. त्यामुळे महाराष्ट्रात कायमधाॅ याऐवजी रयतवारी पध्दत लागू करण्याचा एलफिन्स्टन सरकारचा पक्का विचार झाला.

### ९.२.२.४. जमीनदाराला आळा घालण्याचा हेतू :

जमीनदारांचा प्रभाव कमी करुन शेतकऱ्यांकडे जमिनीचे मालकी हक्क द्यावयाचे असतील तर त्याला सैध्दान्तिक जोड दिली पाहिजे असे अर्थतज्ज्ञ प्रतिपादन करु लागले होते. असे सैध्दान्तिक रुप देण्यासाठी रयतवारी हाच पर्याय आहे असे विद्वानांचेही मत बनले होते. जेम्स मिल यानेही 'भारतामध्ये शेती व्यवसायात सुधारणा होण्यासाठी प्रत्यक्ष जमीन कसणाॅ या शेतकॅ याला मालकी हक्क देणे क्रमप्राप्त आहे'

### ९.२.२.५. कायमधारा पध्दतीमधील दोष दूर करण्याचा हेतू :

ब्रिटिश सरकारने १८०९ साली नेमलेल्या 'सिलेक्ट कमिटी'ने कायमधारा पध्दतीवर कडक शब्दात ताशेरे ओढले होते. शेतकॅ याला मुक्त करावयाचे असेल तर रयतवारीचा अवलंब करावा असा विचार या

कनिटीने मांडला. शिवाय कायमधारा पध्दतीमुळे महसुलाच्या एकूण उत्पन्नापैकी ८९% उत्पन्न जमीनदारांना व ११% उत्पन्न सरकारला मिळत असे. ही तर गोष्ट उघड होती. ही स्थिती बदलणे आवश्यक होते.

### ९.२.२.६. जनसंपर्कासाठी रयतवारी पध्दत :

भावी काळात सरकारला अल्पसंख्य जमीनदारांशी संबंध प्रस्तापित करण्यापेक्षा हजारोंच्या संख्येने असणाऱ्या शेतकऱ्यांशी रयतवारीमुळे संबंध प्रस्थापित होतील, त्यामधून सरकारचा जनसंपर्क वाढेल, सरकारची धोरणे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचविता येतील असाही एक हेतू रयतवारी महाराष्ट्रात सुरु करण्यामागे होता. शेतकऱ्यांची परिस्थिती सुधारली म्हणजे, जरी त्यांच्यावर ज्यादा कर आकारले तरी ते कर त्यांना सुसह्य होतील, म्हणून रयतवारी पध्दतीचा पुरस्कार करण्यात आला असेही एकमत **ताराचंद** यांनी व्यक्त केले आहे.

### ९.२.२.७. रयतवारी पध्दतीची प्रमुख वैशिष्ट्ये :

रयत शेतकऱ्यांना जमिनीची मालकी व भोगवट्याचे अधिकार देण्यात आले व जमीन महसूल थेट सरकरजमा करावा असे ठरविण्यात आले.

(१) प्रत्यक्ष जमीन कसणाऱ्याच्या कुवतीनुसार महसूल आकारणी ठरविण्यात आली.

(२) जमिनीची मोजणी त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नाचा अंदाज करुन सारा निश्चित करण्याची पध्दत ठरविण्यात आली.

(३) जमिनीच्या उत्पन्नाच्या ५५% सारा निश्चित करण्यात आला.

### ९.२.२.८. एलफिन्स्टनने सांगितलेली तत्त्वे :

(१) प्रत्यक्ष लागवडीखाली असलेल्या जमिनीचे क्षेत्रफळ पाहून तेवढ्याच जमिनीवर शेतसारा बसवावा. लागवड न केलेली जमीन शेतसाऱ्यामधून वगळावी.

(२) शेतसारा शक्यतो कमी व शेतकऱ्यांना झेपण्यासारखा असावा.

(३) कर रकमेचे मूल्य व जमीन महसुलाची आकारणी शक्य तो समान असावी.

(४) कोणताही नवा कर बसवू नये. अन्यायकारक व जाचक कर चालू ठेवू नयेत.

(५) रयतेमध्ये ब्रिटिशांबद्दल विश्वास निर्माण होईल असे वर्तन ठेवावे.

## ९.२.२.९.रयतवारीची कार्यपध्दती :

शेतसारा निश्चित करण्यापूर्वी प्रथम तज्ज्ञ मोजणीदाराकडून लागवडीखाली असलेल्या जमिनीची मोजणी केली जात असे. त्यानंतर जमिनीचे वर्गीकरण केले जात असे. त्यासाठी जमिनीची खोली (Depth), स्वरुप, आर्द्रता राखण्याची क्षमता व उपजाऊपणा यांचा विचार करुन आणेवारीच्या स्वरुपात गट पाडले जात असत. उदा. १६ आणे, ८ आणे व ४ आणे या स्वरुपात उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी जमिनीची वर्गवारी केली जात असे. यानंतर जमिनीची वरीलप्रमाणे केलेली वर्गवारी, तालुक्याचे हवामान, पाऊस व मशागतीची परिस्थिती हे घटक विचारात घेऊन संपूर्ण तालुक्याचा आढावा घेतला जात असे. नंतर तालुक्यातून पूर्वीची जमाबंदी विचारात घेतली जात असे. प्रत्येक शेतकरी, त्याच्याकडे असणारी जमीन व तिची प्रतवारी यांचा विचार करुन आणि प्रत्यक्ष पीक पहाणी करुन सारा निश्चित केला जात असे.

## ९.२.२.१०. रयतवारी पध्दतीचे गुणदोष :

**गुण :**

(१) रयतवारी पध्दतीमुळे जमीन कसणारे व सरकार यांच्यात प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाला.

(२) रयतवारी पध्दतीत जमिनीची मालकी शेतकऱ्याकडे आल्याने शेतकरी स्वतःच्या मालकीच्या शेतात मनापासून कष्ट करु लागल. त्यामुळे शेतीच्या उत्पन्नात वाढ झाली.

(३) छोटे छोटे मालक स्वतःच शेती करीत असल्यामुळे बेकारी, वर्गयुध्द व जुलूम हे दोष कमी झाले.

**दोष :**

(१) जमिनीची मोजणी योग्यप्रकारे झाली नाही.

(२) जमिनीतून मिळणाऱ्या उत्पादनाच्या अंदाजाचे आकडे चुकीचे होते.

(३) शेतकरी मालक झाला तरी त्याची परिस्थिती सुधारली नाही.

(४) रयतवारी पध्दती शेतकऱ्याचे कंबरडे मोडणारी पध्दती ठरली.

(५) रयतवारीमध्ये जमीन महसुलाच्या रकमेत ३० वर्षांनी बदल केला जाणार होता.

(६) वाढीव उत्पादनाचा फारसा फायदा शेतकऱ्यांना मिळत नव्हता.

(७) रयतवारी पध्दतीने सर्व मध्यस्थांचे उच्चाटन केले.

ग्रामीण अधिकाऱ्यांकडून पार पाडल्या जाणाऱ्या उपयुक्त भूमिकेकडे दुर्लक्ष झाले. त्यामुळे परकीय शासन व हतबल शेतकरी यांच्यामध्ये न्याय मिळवून देणारा दुवा राहिला नाही.

### ९.२.२.११. सारा आकारणीचा प्रिंगलचा इंदापूर प्रयोग :

प्रिंगल हा 'पोलिटिकल इकॉनॉमी' या विषयातील तज्ज्ञ समजला जात असे. तसेच तो डेव्हिड रिकार्डोचा प्रत्यक्ष शिष्य होता. त्याच्याकडे इंदापूर व पाबळ हे दोन तालुके रयतवारीचा नवा प्रयोग राबविण्यासाठी देण्यात आले. प्रिंगलने रिकार्डोचा खंड सिध्दांत महाराष्ट्रात लागू करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी प्रथम त्याने इंदापूर तालुक्याची निवड केली. पुणे जिल्ह्याच्या इंदापूर तालुक्यात रिकार्डोच्या सिध्दान्तानुसार नवी सारा आकारणी लागू करावी, तेथे त्या पध्दतीला किती व कसा प्रतिसाद मिळतो, सरकारचा किती फायदा होतो, हे पडताळून मग तो प्रयोग टप्प्याटप्प्याने महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यात करावा, या हेतूने सन १८२८ मध्ये प्रिंगलच्या नेतृत्वाखाली 'दि रेव्हिन्यू सर्व्हे ॲण्ड असेसमेंट ऑफ दि डेक्कन' या नावाचे स्वतंत्र निर्माण करण्यात आले. या खात्यात प्रिंगलने अनेक ब्राह्मण व्यक्तींच्या मोजणीदार म्हणून नेमणुका केल्या. 'हुजूर कचेरी' हा आणखी एक नवाने विभाग निर्माण करुन त्यात जमिनीचा सारा निश्चित करण्यासाठी उपयुक्त ठरतील अशा १२ सल्लागार ब्राह्मण व्यक्तींच्या नेमणुका करण्यात आल्या. हुजूर कचेरीचे दप्तर सांभाळण्यासाठी आणि भाषांतरासाठी म्हणून सिध्देश्वर शास्त्री टोकेकर यांची नियुक्ती करण्यात आली. तसेच या हुजूर कचेरीच्या नियंत्रणाखाली काम करणारे तीन मोजणीदार व कर निश्चित करणाऱ्या तज्ज्ञ अशा व्यक्तींच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

### ९.२.२.१२ प्रिंगलच्या पध्दतीचे फायदे :

प्रिंगलची पध्दती जरी अयशस्वी ठरली तरी त्या पध्दतीमुळे काही फायदेही झाले. ते पुढीलप्रमाणे :

(१) इंग्लंडमधील एकर हे जमीन मोजण्याचे माप महाराष्ट्रात लागू करण्यात आले.

(२) जमीन महसूल ठरवीत असताना जमिनीची किंमत हा आधार घ्यावा असे ठरविण्यात आले.

(३) जमिनीवर आकारले जाणारे इतर सर्व कर रद्द करण्यात आले.

(४) फक्त जमीन महसूल हा एकच कर जमिनीवर बसविण्याची प्रथा सुरु झाली.

### ९.२.२.१३. प्रिंगलच्या इंदापूर प्रयोगानंतर महसूल व्यवस्थेत झालेले बदल व परिणाम :

सन १८४० ते १८५३ या काळात ले. नॅश, गोल्डस्मिडट व विंगेट यांनी सुचविलेली सारा पध्दती सर्व महाराष्ट्रात क्रमाक्रमाने लागू करण्यात आली. महाराष्ट्रातील रयतेचे ऐहिक कल्याण करण्याच्या हेतूने इंग्रज राजवटीने हे नवे पाऊल टाकले नव्हते; तर आपल्या तिजोरीत जादा भर पडावी या एकमेव उद्देशाने ही सुधारित पध्दत राबविण्यात आली. रयतवारीने शेकऱ्याला सुखाचे दिवस आले आहेत, शेतीत नफा मिळू लागला आहे. यावरुन फ्रॅन्सिससाहेबाने सारा आकारणीत पन्नास टक्क्यांनी वाढ केली. शेतजमिनी अशा सोडून देऊन

लोकांनी स्थलांतर केले. काही गावात तर फक्त १/३ जमीन लागवडीखाली होती. २/३ जमीन सुपीक व लागवडीयोग्य असूनही कोणी कसणारे उरले नाही, म्हणून ती नापीक राहिली.

### ९.२.२.१४. म. ज्योतिबा फुले :

म. फुल्यांनी सन १८८३ मध्ये 'शेतकऱ्यांचा आसूड' हा ग्रंथ लिहून शेतकऱ्यांच्या दुःखाला वाचा फोडली. म.फुले शेतकऱ्यांच्या शोषणाचे प्रत्ययकारी वर्णन करुन त्याच्या शोषणाला भटभिक्षूक, जंगल व महसूल इत्यादी विविध खात्यांतील भट कामगार, पोलिस पाटील, सावकार, मारवाडी व भटब्राह्मणांच्या नोकरशाहीवर विसंबणारे इंग्रज अधिकारी व ब्रिटिशांचे धोरण हे घटक कारणीभूत आहेत असे ते सांगतात व या घटकांवर आसुडाचे कोरडे ओढतात. शेतकऱ्यांच्या दैन्याला ते शेतकऱ्यालाही जबाबदार धरतात. शेतकऱ्यांचे अज्ञान, त्याचे अनेक बायका करणे व बालविवाह या सर्व गोष्टी त्यांना अहितकारक वाटतात. म.फुले फक्त दोष दाखवून थांबत नाहीत तर परिस्थिती सुधारण्यासाठी उपायही सुचवितात. शेतकरी सुधारण्यासाठी प्रथम शेतकऱ्यास ज्ञानी होण्याची म्हणजे शिक्षण घेण्याची आवश्यकता ते सांगतात. शेतकरी सुधारण्यासाठी ज्या शेतीवर तो अवलंबून आहे तिच्यात सुधारणा होणे महत्त्वाचे आहे असे फुल्यांना वाटते. त्यामुळे ते पुढील सुधारणा सुचवितात.

१. शेतीला खात्रीशीर पाणीपुरवठा होण्यासाठी सरकारने धरणे बांधावीत, कालवे खोदावेत, पावसाचे पाणी वाहून जाऊ नये म्हणून जागोजाग ताली, बंधारे बांधण्याचा कार्यक्रम शासनाने आखावा, ठिकठिकाणी असणाऱ्या पाण्याचा शोध घ्यावा, विहिरी खोदण्याचा धडक कार्यक्रम राबवावा.
२. पिकांचे संरक्षण होण्यासाठी पिकावर पहारे बसवावेत. जंगली जनावरांपासून पिकांचे संरक्षण करण्याची जबाबदारी शासनाने घ्यावी.
३. शेतकी प्रदर्शने भरवून उत्तम पीक काढणाऱ्या शेतकऱ्यास बक्षिसे द्यावीत, शेतीत आवश्यक पशूधन रक्षणासाठी गोवधबंदी करावी. सुधारलेल्या राष्ट्रात शेती कशी केली जाते याचे शिक्षण देऊन ती पाहण्यासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना परदेशात पाठवावे.

### ९.२.३. <u>स्वयं अध्ययनासासाठी प्रश्न</u> (अभ्यासासाठी प्रश्न):

### दीर्घोत्तरी प्रश्न :

१.सारा आकारणीचा प्रिंगलचा 'इंदापूर प्रयोग' यावर टीप लिहा.

२.महाराष्ट्रात कायमधारा व रयतवारी पध्दती लागू करण्यामागील कंपनीची भूमिका स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न :**

१.प्रिंगलरच्या इंदापूर प्रयोगाच्या अपयशानंतर महसूल व्यवस्थेत झालेले बदल व परिणामांची चर्चा करा.

२. रयतवारी पध्दतीचे परिणाम सांगा.

३. म.फुले यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी सुचविलेले उपाय सांगा.

४. ब्रिटिशकालीन शेती सुधारण्याचे उपाय सांगा.

५. ब्रिटिशकालीन सारा पध्दतीतील बदलांचे परिणाम लिहा.

६. सारा निश्चितीची एलफिन्स्टनने सांगितलेली तत्त्वे लिहा.

**वस्तुनिष्ठ प्रश्न :**

१. 'शेतकऱ्यांचा आसूड' या ग्रंथाचे लेखक कोण?

२. एलफिन्स्टनने महाराष्ट्रात कोणती जमीन महसूल पध्दत राबविली?

३. रयतवारी म्हणजे काय?

४. सारा आकारणीसंबंधीचा 'इंदापूर प्रयोग' कोणी राबविला?

५. रयतवारी पध्दतीचे प्रमुख वैशिष्ट्ये सांगा?

६. रयत पध्दतीचे गुण व दोष सांगा?

## ९.३.४. सारांश

शेतकऱ्यांच्या प्रश्नावर भर देऊन त्यांची गाऱ्हाणी सरकार दरबारी पोहोचविण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपाय सुचविणारे महाराष्ट्रातील पहिले विचारवंत म्हणून म.फुले यांचा निर्देश करावा लागेल. त्यांच्या कार्यामुळे शेतकरी चळवळीचा पाया घातला.

## ९.३.५. पारिभाषीक शब्द शब्दार्थ

१. **रयत** :- जनता ,शेतकरी.
२. **जमिनदारी** :-शेतीची मालकी ज्यांच्याकडे असते.
३. **सारा** :-शेतमालावरील कर,
४. **पशूधन** :- जनावरे.

## ९.२.३.६. संदर्भ ग्रंथ

१. खरे वा.वा., नाना फडणवीस यांचे चरित्र, पृ. २१९

2. Mill James, The History of British India, Vol. V, P.490.
3. Tarachand, History of Freedom Movement in India, Vol. I, P. 278
4. Datta R.C., Economic History of India, P.P. 41-43
5. Sunthankar B.R., British Paramountacy and Indian Renaissance, part I, Vol. 9, P.364
6. Ravindra Kumar, Western India in the 19th Century, P.108
7. Mujumdar R.C., British Paramountey and Indian Renaissance, Part I, Vol. 9, P. 364
८. कीर धनंजय आणि मालशे, समग्र फुले वाङ्मय, पृ. १८९

## ९.२.७. क्षेत्रीय कार्य

(१) शेतक-यांच्या प्रश्नावर भर देऊन त्यांची गा-हाणी सरकार दरबारी पोहोचविण्यासाठी आणि त्यांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपाय

## ९.३.०. घटकाची उद्दिष्टे

१ सहकारी संस्थेच्या सभासदाला सहकारी तत्त्वप्रणालीची ओळख व्हावयास हवी सहकारामध्ये समाजातील सर्व घटकांच्या उन्नतीमध्येच समाजाची उन्नती आहे

२ शेतक-यांप्रमाणेच नागरी लोकांच्या हितासाठी, त्याचप्रमाणे उत्पादन, जीवनमान सुधारणे

३ शेतीसाठी भांडवल पुरवठा करणे या उद्देशाने प्रथम शेतकी सहकारी पतपेढ्यांनी स्थापना झाली.

४ घरगुती उद्योगधंद्यांची सहकारी तत्त्वावर वाढ करण्यासाठी हा संघ लक्ष पुरवितो.

५ सहकारी संस्थेच्या सभासदाला शिक्षण देण्याची सोय हवी.

## ९.३.१.प्रस्तावणा

भांडवलशाहीचा समाजरचनेला पर्याय म्हणून जे अनेक 'वाद' निर्माण झाले त्यामध्ये सहकारवाद हा अत्यंत सात्त्विक व सोज्वळ असा वाद आहे. सहकारवादाची सुरुवात १८४४ साली रॉबर्ट ओवेन याने इंग्लंडमध्ये केली. संघटीतरित्या स्वसामर्थ्याने स्वतःचा उत्कर्ष साधावयाच्या प्रयत्नाला सहकार चळवळ म्हणतात किंवा जेव्हा स्वखुशीने काही लोक समपातळीवर एकत्र येतात व काही आर्थिक प्रश्न सोडवितात तेव्हा अशा सांघिक प्रयत्नाला सहकारी चळवळ म्हणता येईल.

## ९.३.२.सहकार चळवळ

### ९.३.२.१.सहकार चळवळीचा अर्थ व तत्त्वप्रणाली :


**प्रा.संजय तुळशिराम शेलार** महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

सहकारी तत्त्वप्रणालीमध्ये सर्वच लोक समपातळीवर येतात. दरडोई एक मत या लोकशाही सिध्दांताप्रमाणे व्यवहार चालतात व म्हणून गरिबांच्या मतालाही येथे किंमत राहते. सामूहिक प्रश्न सामूहिकरित्या सोडविल्यामुळे ज्यात अधिकांचे अधिक हित होईल अशाच रीतीने सोडविले जातात. याच कारणामुळे भांडवलशाहीत येणाऱ्या तेजी-मंदीच्या लाटा सहकारी समाजरचनेत उठूच नयेत अशी दक्षता घेता येते.

सहकारामध्ये स्पर्धेचा अभाव असतो. भांडवलशाहीमध्ये स्पर्धा हा प्रमुख घटक असतो, स्पर्धेमुळे एकमेकांना पायदळी तुडविण्याची प्रवृत्ती सहजच होते. याउलट सहकारामध्ये सलोखा आहे. तसेच सहकारामध्ये समाजातील सर्व घटकांच्या उन्नतीमध्येच समाजाची उन्नती आहे असा ठाम विश्वास आहे. नफ्याची विषम हिस्सेरशी काढून टाकून प्रत्येकाला आपल्या कामाचा योग्य मोबदला देणे हे सहकाराचे दुसरे तत्त्व आहे. बाजारात दिसणाऱ्या असंख्य अडत्यांची उचलबांगडी करुन दलाली वाचवून ग्राहकाला स्वस्त माल पुरविणे हे सहकाराचे तिसरे तत्त्व आहे. हे साध्य करण्याचे साधन म्हणजे 'उत्पादन सहकारी संघटना' आणि 'ग्राहक सहकारी संघटना' यांनी एकमेकांशी संबंध ठेवणे होय.

सहकारी तत्त्वप्रणालीनुसार परहितासाठी स्वतःचे संकुचित हित दृष्टिआड करावे लागते व सहकारामध्ये हे जे आवाहन केले जाते त्यामुळे प्रत्येक घटकाला एक नवीनच जीवन जगण्याचे शिक्षण दिले जाते. भांडवलशाहीप्रमाणे जीवनकलह हा व्यक्तीव्यक्तींमध्ये न राहता तो वरच्या पातळीवरुन लढला जातो. सहकारवादामध्ये कटुता निर्माण होत नाही. कारण त्याची उभारणी द्वेषावर नसून स्वसामर्थ्यावर आहे. यामुळेच सहकारवाद हा इतर वादांपेक्षा श्रेष्ठ आहे.

### ९.३.२.२.महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची वाटचाल :

सहकारी चळवळ १९०४ पासून हिंदुस्थानात सुरु झाली. ब्रिटिश राजवटीमुळे समाजजीवनात व आर्थिक क्षेत्रात जी उलथापालथ झाली ती निस्तरण्यासाठी ही चळवळ परकीय सत्ताधाऱ्यांनी सुरु केली व वाढविली. तत्पूर्वीच सन १८८२ मध्ये न्या. रानडे व सर विल्यम वेडरबर्न यांनी पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्ज पुरविण्यासाठी एक सहकारी बँक स्थापण्याचा प्रयत्न केला होता. परंतु भारतमंत्र्यांनी त्याऐवजी शेती सुधारणेसाठी कर्ज देण्याच्या सन १८८४ च्या कायद्याला संमती दिली व तगाई देण्याची व्यवस्था केली.

पुढे मद्रास सरकारने ग्रामीण कर्ज निवारण करण्यासाठी काय उपाययोजना आखावी याचा अभ्यास करण्यासाठी फ्रेडरिक निकोलसन यांना युरोपात पाठविले व त्यांच्या अहवालावरच सहकारी पध्दतीचा या

देशात पाया रोवला गेला. यानंतर सहकारी संस्थांना कायदेशीरपणा आणण्यासाठी ग.ज.लॉर्ड कर्झनने लॉर्ड लॉ यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली व त्या समितीच्या शिफारशीनुसार सन १९०४ चा सहकारी संस्थांचा कायदा मंजूर झाला.

सन १९०४ च्या कायद्याप्रमाणे सहकारी संघ हे दोन प्रकारांनी स्थापण्याची सोय झाली. एक ग्रामीण संघ याची स्थापना 'अमर्यादित' जबाबदारी तत्त्वावर करावयाची. दुसरा नागरी संघ याची स्थापना 'मर्यादित' जबाबदारी तत्त्वावर करावयाची. प्रथमतः एक प्रयोग म्हणूनच सरकारने ही चळवळ सुरु केली. परंतु अपेक्षेपेक्षा या चळवळीची वाढ चांगली झाली. म्हणून १९१२ च्या दुरुस्ती कायद्याप्रमाणे नुसत्या कर्जासाठीच नव्हे तर कोणतीही आर्थिक गरज भागविण्यासाठी सहकारी संघ स्थापन करता येऊ लागले. ग्रामीण व नागरी संघ या भेदाऐवजी यापुढे शास्त्रशुध्द पायावर जबाबदारी 'मर्यादित' किंवा 'अमर्यादित' यावर ही विभागणी आधारली गेली. याच वर्षी शेतकरी सहकारी संघटनांना भांडवल पुरविणाऱ्या संस्था स्थापण्याच्या कामी कायदेशीर स्वरुप देण्यात आले.

१९१९ साली सहकारी चळवळ ही मध्यवर्ती सरकारने प्रांताकडे सुपूर्द केली व यापुढील कायदे ज्या त्या प्रांतांनी आपापल्या सोयीप्रमाणे करण्यास सुरुवात झाली. मुंबई प्रांताने या बाबतीत आघाडी घेतली आणि चळवळीची व्याप्ती वाढविण्यासाठी १९२५ साली एक दुरुस्ती कायदा केला. या कायद्यान्वये शेतकऱ्यांप्रमाणेच नागरी लोकांच्या हितासाठी, त्याचप्रमाणे उत्पादन, जीवनमान सुधारणे इत्यादी गोष्टींसाठी सहकारी संस्था स्थापन करणे सुकर झाले. सहकारी सोसायट्या स्थापनेसाठी लोकमत तयार करण्याचे काम मानसेवी जिल्हा संघटक करीत असत.

### ९.३.२.३.शेतकी सहकारी पतपेढ्या :

सहकारी चळवळीची या देशातील सुरुवात शेतकी सहकारी पतपेढ्यांनीझाली.शेतकऱ्यांना सावकाराच्या पाशातून मुक्त करणे व त्याला शेतीसाठी भांडवल पुरवठा करणे या उद्देशाने प्रथम शेतकी सहकारी पतपेढ्यांनी स्थापना झाली. महाराष्ट्रात सहकारी पतपेढ्यांची सुरुवात सोलापूर जिल्ह्यातील तळवडे येथील सोसायटीच्या स्थापनेपासून सन १९०५ मध्ये झाली. सन १९१५ पर्यंत या पतपेढ्यांची वाढ प्राथमिक स्वरुपाची होती. या काळात १९१० साली गोपाळराव देवधर यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली पुण्याजवळ हडपसर येथे स्थापन झालेली सहकारी सोसायटी ही आदर्श मानली जात असे. म.फुल्यांचे सहकारी ग्यानोबा ससाणे, सीताराम तारकुंडे व गोविंदराव काळे वगैरे सत्यशोधकांच्या परिश्रमामुळे या सोसायटीचा नावलौकीक सर्वत्र पसरला होता. आरंभी या सोसायटीचे अवघे ३० सभासद होते. त्यांची संख्या सन १९२७ मध्ये १४२

झाली. सभासदांमध्ये ८० मराठे, ३६ माळी सदस्यांबरोबरच ब्राह्मण, परीट, शिंपी, न्हावी, महार व चांभार या हिंदू जातीच्या सदस्यांप्रमाणे काही मुसलमान व ख्रिस्ती सभासद होते. सदस्यांमध्ये १५ स्त्रियाही होत्या. अवघ्या २०० रुपये देणगीच्या जोरावर सुरु केलेल्या या सोसायटीकडे १९२६ साली दोन लाख रुपयांचे खेळते भांडवल होते. सभासदांना दिल्या जाणाऱ्या कर्जावर ९ टक्के व्याज आकारले जात असे. १९२९ साली मात्र या सोसायटीची फार दुर्दशा झाली.

१९२५ साली मुंबई सरकारचा सहकारी संस्थांचा कायदा झाल्यापासून महाराष्ट्रात सहकारी चळवळ फारच फोफावली. १९२५ साली महाराष्ट्रात एकंदर १२०९ सहकारी पतपेढ्या होत्या. नंतर फक्त सहाच वर्षात १९३१ साली त्यांची संख्या २०५७ वर गेली. १९३५ साली मंदीमुळे व त्यात झालेल्या शेतकऱ्यांच्या दुरावस्थेमुळे ही संख्या रोडावून २०११ वर गेली ती परत युध्दजन्य परिस्थितीमुळे सावरुन १९४० साली पूर्वपदावर आली. यापुढील युध्दकाळात, युध्दोत्तर काळात व स्वातंत्र्योत्तर काळात सहकारी पतपेढ्यांची संख्या सतत वाढतच राहिली आणि १९५१ साली त्यांची संख्या ५२१५ झाली. या वाढीमध्ये सहकारा खात्याचे निबंधक (रजिस्ट्रार) ऑटो रॉथफेल्ड (कार्यकाळ १९२१-२३), जर्नादन मदन (१९२३-२६), जी.एफ.एस.कॉलीन्स (१९२६-२७) आणि विठ्ठल शिवराम भिडे (१९२७-३०) यांचा वाटा उल्लेखनीय आहे.

### ९.३.२.४.विविध कार्यकारी सहकारी संस्था :

शेतकी सहकारी पतपेढ्यांच्या स्थापनेमुळे शेतकऱ्यांना अल्पमुदतीची योग्य व्याजदरात कर्जे मिळू लागली होती; परंतु तेवढ्याने शेतकऱ्याचे दारिद्र्य संपणारे नव्हते. त्याच्या दारिद्र्याची इतर कारणे तशीच राहिली होती. त्या प्रत्येक कारणासाठी स्वतंत्र संस्था काढणे शक्य नव्हते. त्यामुळे कारणे तशीच राहिली होती. १९३७ साली रिझर्व्ह बँकेने शेतकी सहकारी पतपेढ्यांचे रुपांतर विविध कार्यकारी सहकारी संस्थेत करावे अशी सूचना केली व त्यासाठी पुढील योजना सादर केली.

प्रथमतः अल्पमुदतीची कर्जे देता देता जमिनीच्या तारणावर कर्जे देण्यास सुरुवात करुन पूर्वीची कर्जफेड करुन घ्यावी. सहकारी संस्थामार्फतच पिकांची विक्री करुन शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला योग्य मोबदला मिळवून द्यावा. चांगले बी-बियाणे पुरवावे, घरगुती लागणाऱ्या मालाची आगावू नोंद करवून घेऊन घाऊक दरात विकत आणून तो ज्याचा त्याला पुरवावा, नवीन हत्यारे व अवजारे आणून सामुदायिकरित्या त्यांचा उपयोग करण्यास शेतकऱ्यांना प्रोत्साहन द्यावे व शेती आधुनिक पध्दतीने करण्यास शेतकऱ्यांना उत्तेजन द्यावे व अशा तऱ्हेने सर्वांगीण सहकारी तत्त्व शेतकऱ्यांच्या गळी उतरवावे.

नियंत्रित माल काळा बाजार न होता सर्वांनाच सारख्या प्रमाणात मिळेल यासाठी विश्वासू यंत्रणा हवी होती. सरकारने त्यावेळी या कामासाठी सहकारी यंत्रणा निवडली. अर्थातच विविध कार्यकारी संस्थांना यावेळी हुकमी ग्राहक मिळाले. संपूर्ण मुंबई प्रांतामध्ये १९३९ साली विविध कार्यकारी सोसायट्यांची संख्या ६५ होती १९४५-४६ मध्ये २६४ पर्यंत गेली आणि १९५१ साली ती २८०७ वर गेली.

उमरखेडा वि.का.स. संस्था (जिल्हा पूर्व खानदेश) हिने जनावरांना सतत हिरवा चारा मिळावा म्हणून एक हवाबंद खोली बांधून घेतली. या संस्थेचे मालक बि-बियाणे व खते आणून सभासदांना माफक दरात पुरवितात. लोणी वि.का.स. संस्था (जिल्हा अहमदनगर) ही पेंडीचे खत, लोखंडी व पोलादी अवजारे शेतकऱ्यांना परविते. गुळ विकते. लोखंडी कारखाना चालविला असून त्यामध्ये लोखंडी हत्यारे, तराजू व बादल्या तयार करुन सभासदांना पुरविल्या जातात. याशिवाय मुल्हेर वि.का.स. संस्था (जि. नाशिक), पुणे जिल्ह्यातील खेड येथील वि.का.स संस्था, पश्चिम खानदेशातील कापदाने येथील वि.का.स संस्था यासुध्दा वरील प्रकारची विविध कामे करुन शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचा व आर्थिक स्थिती सुधारण्याचा प्रयत्न करतात.

### ९.३.२.५.जमीन तारणावर कर्जे देणाऱ्या बँका :

शेतकी सहकारी पतपेढ्यांचा शेतकऱ्यांना लांब मुदतीची कर्जे देण्यासाठी उपयोग नव्हता. मुळात त्यांचे भांडवल थोडे, तसेच जमिनीची किंमत करणे व तिच्यावरील इतर बोजा पाहणे यासाठी तज्ज्ञ लोक प्रत्येक ठिकाणी असणे शक्य नव्हते. शिवाय 'अमर्यादित' जबाबदारी तत्त्वावर संस्था असताना अशी लांब मुदतीची मोठ्या रकमेची कर्जे काही थोड्या लोकांना देऊन त्यासाठी सर्व लोकांना जबाबदार धरणे योग्य होत नाही. म्हणून १९२६ साली त्यावेळचे सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार जनार्दन मदन यांनी यासाठी स्वतंत्र यंत्रणा असावी म्हणून केलेली सूचना सरकारने कर्जरोखे विक्रीस काढण्यास परवानगी दिली. याप्रमाणे मुंबई राज्य सहकारी बँकेने ५ लाखाचे कर्जरोखे विकून त्यासाठी स्वतंत्र खाते उघडून जमीन तारणावर कर्जे देणाऱ्या बँकांना कर्ज देण्यास सुरुवात केली.

जमिनीच्या तारणावर कर्जे देणारी पहिली सहकारी बँक १९२८ साली पूर्व खानदेश जिल्ह्यात पाचोरा येथे स्थापन करण्यात आली. १९३५ साली जमीन तारणावर कर्जे देणारी प्रांतिक अशी एक स्वतंत्र बँक स्थापन करण्यात आली. भांडवल पुरविण्यास सुरुवात केली. त्यामुळे अशा बँकांची संख्या वाढत जाऊन सन १९५०-५१ मध्ये ती २० पर्यंत गेली. बँका तोट्यात जाऊ लागल्याने नानावटी समितीने अशा नवीन बँका उघडूच नयेत अशी सूचना केली. सरकारनेही अशा बँका जिल्हा सहकारी बँकांमध्ये सामावून टाकण्याचे धोरण अवलंबिले.

### ९.३.२.६.जिल्हा सहकारी बँका :

या बँकांचे मुख्य काम शहरातील मध्यमवर्गीय व इतरांकडून ठेवी रुपाने पैसे गोळा करुन ते शेतकी सहकारी पतपेढ्यांना पुरविणे. शहरातच या बँका असल्याने नागरी लोकांनाही त्यांचा फायदा मिळतो.जिल्हा मध्यवर्ती बँका ही एका बाजूला राज्य सहकारी बँकेकडून कर्ज काढून ते जिल्ह्यातील शेतकी पतपेढ्यांना पुरविणारी यंत्रणा आहे. ठेवी जमा करुन स्वतःला लागणारे भांडवल स्वतः जमा करावयाचे हे शेतकी पतपेढ्यांना शक्य न झाल्याने ती उणीव या बँका भरुन काढतात व त्यांना सतत पैशाचा पुरवठा करतात.

### ९.३.२.७.सहकारी खरेदी-विक्री संघ :

सहकारी चळवळ प्रथमतः जरी कर्जवाटप करणाऱ्या शेतकी पतपेढ्यांपुरती मर्यादित होती तरी सन १९१२ च्या कायद्यापासून त्याव्यतिरिक्त इतरही अनेक कारणांसाठी त्या स्थापन झाल्या. त्यामध्ये प्रामुख्याने सहकारी खरेदी-विक्री संघ हे येतात.

शेतकऱ्याला जोपर्यंत आपल्या मालाला योग्य मोबदला मिळत नाही तोवर त्याचे जीवनमान सुधारणार नाही. अडते व दलाल शेतकऱ्यांना कमी मोबदला देऊन ग्राहकाला त्याप्रमाणात बऱ्याच वरच्या किंमतीत माल विकतात व मधल्यामध्ये विनाकष्ट मलई खातात. काही वेळा हे दलाल चांगल्या व हलक्या मालाची भेसळ करतात. त्यामुळे ग्राहकालाही चांगला माल मिळत नाही. यावर उपाय म्हणून सहकारी खरेदी-विक्री संघ स्थापन करुन या असंख्य दलालांची उचलबांगडी करावयाची व दलाली वाचवावयाची. त्यामुळे नुसती दलालीच वाचत नाही तर मालामध्ये होणारी भेसळ थांबून त्याला दर्जाही प्राप्त होतो व एकदा दर्जा राखला गेला की निश्चित बाजारपेठ देशातच नव्हे तर परदेशातही निर्माण होते.

वरील तत्त्वावर आधारित असे राज्यात अनेक खरेदी-विक्री संघ स्थापन झाले. हे खरेदी-विक्री संघ मालाची प्रतवारी लावून सभासदांचा माल खरेदी करतात व विकतात. १९४९-५० साली नागपूर व वऱ्हाड प्रांतात अशा खरेदी-विक्री संघांनी दीड कोटी रुपयांचा माला खरेदी केला व १ कोटी ६४ लाख रुपयांचा माल विकला. मुंबई-महाराष्ट्रातील खरेदी-विक्री संघांनी १९५०-५१ साली ७ कोटी ६१ लाख रुपयांचा माल खरेदी करुन ८ कोटी २५ लाख रुपयांचा माल विकला. मुंबई-महाराष्ट्रात सन १९५०-५१ मध्ये खरेदी-विक्री संघ ६२६ होते.

सर्व खरेदी-विक्री संघाचे सर्वश्रेष्ठ केंद्र मुंबई हे आहे. मुंबई राज्य सहकारी खरेदी-विक्री संघ राज्यातील खालच्या संघांना माल पुरवितो व त्यांच्याकडून माल खरेदी करुन विक्री करतो. या संघाचे विशेष

काम म्हणजे बाजारातील चढउतार, त्याची दिशा इत्यादी माहिती घटक संघांना पुरविणे हे आहे. या संघाने विक्री केलेल्या मालात केळी, मोसंबी, भाजीपाला, द्राक्षे, विड्याची पाने, गुळ व मसाल्याचे पदार्थ हे पदार्थ होते. पुरवठा केलेल्या मालात मुख्यतः मित्रखत, सल्फेट ऑफ अमोनिया व सुपर फॉस्फेट इत्यादी रासायनिक खतांचा समावेश होता.

### ९.३.२.८. इतर व्यावसायिकांच्या सहकारी संस्था :

वरील प्रमुख सहकारी संस्थांशिवाय अनेक व्यावसायिकांनी सहकारी संस्था स्थापन करून आपली आर्थिक उन्नती साधण्याचा प्रयत्न केला. २८ जून १९४५ रोजी मुंबईतील मच्छीमारांनी प्रथमच 'अखिल कोळी समाज मासळी उत्पादक सहकारी संस्था' स्थापन केली.याच दरम्यान हातमाग व्यावसायिकांनी मुंबई प्रांतात ९ औद्योगिक सहकारी संघ स्थापन केले. १९४७ मध्ये जंगलात काम करणाऱ्या कामगारांनी जंगल सहकारी संस्था स्थापन केली.

विणकर सहकारी संस्थांची वाढ सर्वांत जास्त झाली. मुंबई प्रांतात १९५०-५१ साली ३६८ प्राथमिक विणकर संस्था होत्या. त्यांच्यावर जिल्हा औद्योगिक संघ काम करीत असतो. या संघावर सूत वाटपाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. या सर्व संघाचे एकीकरण करणारा 'राज्य औद्योगिक संघ' १९४७ साली स्थापन करण्यात आला. घरगुती उद्योगधंद्यांची सहकारी तत्त्वावर वाढ करण्यासाठी हा संघ लक्ष पुरवितो. जेथे जिल्हा औद्योगिक सहकारी संघ नसतील तर अशा जिल्ह्यातील व्यापार व उत्पादन याकडेही हा संघ विशेष लक्ष पुरवितो.

### ९.३.२.९. सहकारी शिक्षण :

सहकार चळवळ ही मूलतः लोकशाहीप्रधान आहे. सहकारी चळवळीचा प्रत्येक सभासद हा या चळवळीचा आधारस्तंभ आहे. साहजिकच यातील प्रत्येक सभासद घटकाला जोपर्यंत आपले ध्येय, धोरण, साध्य व साधन यांचा पूर्ण उलगडा होत नाही तोपर्यंत सहकार चळवळीचा उभारलेला हा डोलारा स्थिरावणार नाही. यासाठी प्रत्येक सहकारी संस्थेच्या सभासदाला सहकारी तत्त्वप्रणालीची ओळख व्हावयास हवी आणि त्यासाठी त्याचे शिक्षण देण्याची सोय हवी.

१९४६ सालापासून सहकारी शिक्षणाची एक योजना श्री. जनार्दन मदन यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आखली. 'मुंबई सहकारी संस्था' या संस्थेकडे या समितीने शिक्षणाचे काम सोपविले, या नवीन योजनेनुसार सहकारी शिक्षणाची पुढीलप्रमाणे व्यवस्था करण्यात आली.

सहकारी संस्थांच्या चिटणीसांना व कार्यकारी समितीच्या सभासदांना शिक्षण देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याला मुंबई सहकारी संस्थेकडून एक निरीक्षक नेमला जातो. तोच सहकारी चळवळीचा प्रचारक व सहकारी शिक्षणाचा आधारस्तंभ असतो. महाराष्ट्र विभागासाठी पुणे व मुंबई येथे प्रत्येकी एक शाळा सुरु करुन त्यात सहकारी खात्यातील खालचा नोकरवर्ग व सुपरवायझर, बँक इन्स्पेक्टर, दुय्यम सहकारी संस्थांचे अधिकारी व मोठ्या विविध कार्यकारी सहकारी संस्थेचे चिटणीस यांना शिक्षण दिले जाते. येथे चार महिने तात्त्विक व दोन महिने प्रात्यक्षिक शिक्षण दिले जाते. राज्यनिहाय सहकारी संस्थांच्या उच्च पदाधिकाऱ्यांना शिक्षण देण्यासाठी पुणे येथे एक सहकारी महाविद्यालय मुंबई सहकारी संस्थेने सुरु केले. सहकारवादाचे उच्च शिक्षण देणारे हे भारतातील पहिले महाविद्यालय आहे.

## **९.३.३. स्वयं अध्ययनासासाठी प्रश्न** (अभ्यासासाठी प्रश्न)**:**

### दीर्घोत्तरी प्रश्न :

१.महाराष्ट्रातील सहकार चळवळीच्या प्रगतीचा आढाव घ्या.

### लघुत्तरी प्रश्न :

१ सहकार चळवळीचा अर्थ व तत्त्वप्रणाली याविषयी माहिती द्या.

२ शेतकी सहकारी पतपेढ्या यावर टिप लिहा.

### वस्तुनिष्ठ प्रश्न :

१ ‘शेतकऱ्यांचा आसूड’ या ग्रंथाचे लेखक कोण?

२ महाराष्ट्रात कापडाची पहिली गिरणी कोणी व कोठे सुरु केली?

३ महाराष्ट्रातील जलविद्युत निर्मितीचा पहिला प्रयत्न कोणी केला?

४ दुसऱ्या महायुध्दाच्या काळात महाराष्ट्रात उदयास आलेल्या दोन बड्या उद्योगसमूहांची नावे सांगा?

५ महाराष्ट्रात पहिली कागदाची गिरणी कोठे सुरु झाली?

६ मच्छीमारांनी प्रथमच ’अखिल कोळी समाज मासळी उत्पादक सहकारी संस्था’ कोठे स्थापन केली

## **९.३.४. सारांश** (सहकार चळवळीचे समालोचन)**:**

सहकार चळवळीची सुरुवात जरी परकीय सरकारने केली असली तरी आज ती आपल्या सरकारकडून उचलून धरली जात आहे. त्यामुळे सामान्य माणसालाही तिच्याविषयी आत्मियता वाटत आहे. आजपर्यंत सहकार चळवळ कर्जवाटपावरच केंद्रित झालेली होती. ती परिस्थिती हळूहळू बदलू लागली आहे. खरेदी-विक्री

संघ, जिल्हा मध्यवर्ती बँका व गृहबांधणी संस्था यांचीही वाढ झालेली आहे. मुंबईच्या सर्वोच्च कचेरीत काम करणाऱ्या यापासून जंगल तोडणाऱ्या या मजुरापर्यंत सहकार चळवळीने आपले क्षेत्र वाढविले आहे. सामुदायिक शेतीपासून ते साखर तयार करणारे कारखाने चालविणाऱ्या यांपर्यंर सहकार चळवळीने मजल मारली आहे. व्यापार, लहान मोठे कारखाने, वाहतूक व किरकोळ व्यापार यामध्ये सहकारी चळवळीला अनुभवाने जोर येऊ लागला आहे. लहान प्रमाणावर थोड्या भांडवलाच्या जोरावर जर धंदे उभारावयाचे तर त्याला कंपनी कायद्याप्रमाणे मर्यादित भांडवल पध्दतीवर संस्था स्थापन करणे फार जिकीरीचे व व्यवहारात उतरविण्यास कठीण म्हणून सर्वांनाच त्याला पर्याय म्हणून, सहकारी संस्था लोकांत प्रिय होऊ लागल्या आहेत. या दिशेने पाऊले पडली तरी देखील सहकारी जीवनाचे खरेखुरे दर्शन महाराष्ट्रात होऊ शकेल.

सहकार चळवळीत काही दोष निर्माण झाले आहेत. थकबाकी वाढविण्याची सभासदांची प्रवृत्ती, भ्रष्टाचार व ठराविक लोकांची या क्षेत्रातील मक्तेदारी हे सहकारातील दोष काढून टाकल्यास सहकार चळवळीचे भवितव्य उज्ज्वल होईल या शंका नाही. शिक्षणाचा अभाव हेही एक कारण सहकार चळवळीच्या प्रगतीच्या आड येत आहे. जसजसा शिक्षणाच प्रसार होईल तसतसा या चळवळीला जास्त पाठिंबा मिळेल व ही चळवळ निकोप पायावर उभी राहील.

## **९.३.५. पारिभाषीक शब्द शब्दार्थ**

1. **पतपेढ्या** :- शेतीसाठी भांडवल पुरवठा करणे
2. **संघ** :- संघटनां
3. **निबंधक** :-
4. **तारण** :- गहान ठेवने
5. **हातमाग** :-हस्त व्यवसाय

## **९.२.३.६. संदर्भ ग्रंथ**


१. Gadgil D.R., IEIRT. Pg64-65

२. Ibid:Pg’76-77

३. कर्वे चि.ग.व इतर ,महाराष्ट्र परिचय,पुणे,खंड-१ पृ.२४८

४. कित्ताःपृ-२६५

५. जाधव वसंत :आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,विद्या पृ-२३१-२३३

६. गायधनी रं ना.(संपा.):आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास,HIS ३१० य.च.म. मु.वि. पुस्तक दु.पृ-२३१-२३३

७. कर्वे चि.ग. व इतर, महाराष्ट्र परिचय, खंड- १, पृ. ६३९

## ९.३.७. क्षेत्रीय कार्य

(१) तुमच्या परिसरातील सहकार व्यवसायांची नोंद करा.

(२) परिसरातील एखाद्या शेतीसाठी भांडवल पुरवठा करणाऱ्या शेतकी सहकारी पतपेढ्या मुलाखती घेऊन प्रश्नांची यादी करा.

## ९.४.०. घटकाची उद्दिष्टे

**१.** रयतवारी पध्दतीमुळे शेतकरी-सावकार, शेतकरी-सरकार यांच्या संबंधात बदल घडून आले.

**२.** ग्रामीण भागातील शेतकरी कर्जबाजारी झाले.

**३.** शेतकऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र कायदा करणे

**४.** महाराष्ट्रातील शेतकऱ्यांनी संघटितपणे केलेली ही देशातील पहिली चळवळ होती.

**५.** संघटना व प्रतिकारशक्ती यामुळे आदिवासींमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्यातील स्वाभिमान उफाळून आला."

## ९.४.१.प्रस्तावना

एलफिन्स्टन उदारमतवादाचा पुरस्कर्ता होता. जनतेला रुचेल व पचेल असेच प्रशासन निर्माण करण्याचा त्याने प्रयत्न केला. परंतु सन १८२८ मध्ये रॉबर्ट कीथ प्रिंगल याने, सन १८३६ मध्ये ले.नॅश, गोल्ड स्टिडम व विंगेट आणि १८६७ साली फ्रॅन्सिस व वॅडिंग्टन या अधिकाऱ्यांनी रयतवारी पध्दतीमध्ये जे बदल केले. प्रिंगलच्या उपयुक्तता वादाचा पहिला फटका खेड्यातील सावकार-शेतकरी संबंधाला बसला. ब्रिटिशपूर्व काळात शेतकरी गावच्या सावकारांकडून कर्ज घेत असे. गावात त्यावेळी पंचायत व्यवस्था कार्यरत असे. त्यामुळे अल्पसंख्य सावकारांचे गावकऱ्यापुढे काही चालत नसे. १८१८ नंतर ही स्थिती पालटली. रयतवारी पध्दतीमुळे शेतकरी-सावकार, शेतकरी-सरकार यांच्या संबंधात बदल घडून आले. या पध्दतीमुळे ग्रामीण रचनेतील एकसंघपणा कमी झाला. ब्रिटिशपूर्व काळात पाटलाला असलेले महत्त्व नव्या पध्दतीत संपले. शेतकरी वैयक्तिकरित्या सरकारला जबाबदार झाल्याने शेतकऱ्याचे पूर्वीचे सामाजिक संरक्षण संपले. नव्या कायद्याने सावकारांना संरक्षण मिळाले. शेतकऱ्यांची आर्थिक दुरावस्था कधी संपली नाही. तो पूर्वीप्रमाणे गावच्या सावकाराकडून कर्जे घेतच राहिला. १८४० मध्ये ठाण्याच्या रयतेने सरकारकडे तक्रार करुन सावकार

आपल्याकडून ३० ते ६० टक्क्यांपर्यंत व्याज घेतात अशी तक्रार केली होती. त्याच सुमारास इंदापूरचा असिस्टंट कलेक्टर सर बार्टल फ्रियर याने एक अहवाल पाठवून सरकारला जागे करण्याचा प्रयत्न केला होता.(सर बार्टल फ्रियर पुढे सन १८६३ मध्ये मुंबई प्रांताचा गव्हर्नर झाला.) परंतु सरकारने तिकडे दुर्लक्ष केले. नव्या कायद्यानुसार सावकार जमिनीची गहाणखते लिहून घेत. पैसा परत न आल्यास कोर्टातून हुकुमनामा आणून जमिनीचा लिलाव करुन पैसा वसूल करीत. सन १८४४ मध्ये पुण्याचा असिस्टंट कलेक्टर मायकेल रोझ याला चौकशीअंती सावकारी कर्जाचा प्रकार लक्षात आला. **नील चार्ल्सवर्थ** यांच्या 'पीझंटस् ॲण्ड इंपीरियल रुल' या पुस्तकात मारवाडी सावकारांनी कर्जापोटी किती जमिनी ताब्यात घेतल्या होत्या त्याची आकडेवारी दिली आहे. त्यावरुन इंदापूर तालुक्यातील (इंदापूर, भावडी, निमगाव, कळस, लासुर्णे व पळसदेव) ६ खेड्यांतून एकूण ७४६५४ एकर जमिनींपैकी ४९८९ एकर जमीन सावकारांच्या ताब्यात गेली होती. पुरंदर तालुक्याच्या ६ खेड्यांतील ४०१९२ एकरांपैकी २४७० एकर आणि हवेली तालुक्याच्या ६ खेड्यांतील ३९७९७ एकरांपैकी २६३२ एकर जमीन सावकारांच्या ताब्यात गेल्याचे नमूद आहे. ग्रामीण भाग अस्वस्थ झाला. ग्रामीण भागातील जवळजवळ ७५% शेतकरी कर्जबाजारी झाले होते; तर एकट्या पुणे जिल्ह्यात ९०% शेतकरी कर्जात बुडाले होते. इंग्लंडमध्ये सुध्दा या परिस्थितीची माहिती पार्लमेंटच्या सभासदांकडे पोहोचली होती. विल्यम वेडरबर्न यांनी सुध्दा या परिस्थितीबद्दल येथील सरकारलाच दोष दिला. याच वेळेस सरकारने सन १८५९ मध्ये 'मुदतीचा कायदा' लागू केला. परिणामी शेतकरी कर्जातून मुक्त होणार नाही अशी स्थिती निर्माण झाली.

## <u>९.४.२. शेतकरी चळवळ</u> :

### ९.४.२.१.सन १८७५ चा शेतकऱ्यांचा उठाव किंवा दख्खनचे दंगे :

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात वारंवार पडणाऱ्या दुष्काळांनी अधिकाधिक उग्रस्वरुप धारण केले. इंदापूर तालुक्यात १८७१ व १८७२ साली पाऊस कमी झाल्याने पीक जेमतेम आठ-बारा आणे आले होते. तरीही जबर सारा वसूल करण्यात महसूल अधिकारी दयामाया दाखविण्यास तयार नव्हते. तेव्हा १८७३ च्या जुलैमध्ये इंदापूर तालुक्यातील वतनदार गोपाळ नरसिंग देशमुख यांनी अडीच हजार शेतकऱ्यांच्या सह्यांनिशी मुंबई सरकारकडे एक अर्ज पाठविल्याचा उल्लेख **रविंद्र कुमार** यांनी 'वेस्टर्न इंडिया इन दि नाइंटिथ सेंच्युरी' या पुस्तकात केला आहे. आपले हक्क सावकारांनी व सरकारने हिरावून घेतल्याने आपली स्थिती भूदासासारखी झाली असल्याचे गाऱ्हाणे या अर्जात मांडले होते.

शेतक= यांची कड घेऊन पुण्याची सार्वजनिक सभाही फ्रॅन्सिस व वॅडिंग्टन साहेबांनी १९६७ साली केलेल्या जमाबंदीचा फेरविचार करावा अशी मागणी करु लागली. फ्रॅन्सिस साहेबांच्या जमाबंदीतील उणिवा व दोष दाखविणारा एक अहवाल सार्वजनिक सभेच्या एका उपसमितीने तयार केला. शेतक= यांची सुस्थिती नसून हलाखीची परिस्थिती असल्याचे सार्वजनिक सभेने दाखवून दिले होते. सार्वजनिक सभेच्या कार्यकर्त्यांनी ठिकठिकाणच्या शेतक= यांमध्ये फ्रॅन्सिसच्या जमाबंदीविरुध्द प्रचार केल्याने शेतकरी पूर्वी विंगेटसाहेबांनी ठरविल्याप्रमाणेच सारा देणार असे म्हणू लागले होते. बार्शी तालुक्यात फ्रॅन्सिसचा सहकारी वॅडिंग्टन याने शेतक= यांची सभा घेतली तेव्हा बहुतेक शेतक= यांनी उभे राहून साहेबाला तसे ठणकावून सांगितले असे वॅडिंग्टनने फ्रॅन्सिसला लिहिलेल्या पत्रावरुन दिसते. शेतक= यांचा असंतोष लक्षात न घेता फ्रॅन्सिस साहेबाच्या जमाबंदीनुसार सारा वसुल करण्याचा हेका सरकारने सोडला नाही.

एकीकडे लोभी राज्यकर्ते आणि दुसरीकडे निष्ठूर सावकार यांच्या कैचीत सापडलेल्या व चिडलेल्या शेतक= यांनी नगर, पुणे व सोलापूर वगैरे जिल्ह्यांत सावकाराकडे आपला मोहरा वळविला. बंडाची पहिली ठिणगी शिरुर तालुक्यात पडली. शिरुर तालुक्यातील कर्धे गावात काळूराम नावाचा एक जुलमी सावकार होता. त्याने बाबासाहेब देशमुख या शेतक= याविरुध्द कोर्टातून हुकूमनामा मिळवून त्यांच्या वाड्याचा लिलाव केला. तो लिलाव काळूराम सावकाराने १५० रुपयाला घेतला.बाबासाहेबांनी विनंती करुनही काळूरामने वाडा पाडण्यास सुरुवात केली. या लहानशा घटनेतूनच दख्खनच्या शेतक= यांच्या बंडाची ठिणगी पडली. कारण हे प्रकरण एकटेदुकटे नव्हते ; ते प्रतिनिधिक होते.

काळूरामने इतरही गावकऱ्यांना असेच छळले होते. आता सर्व गावकरी त्याच्याविरुध्द एक झाले. गावक= यांनी काळूरामबरोबर इतर सर्वच सावकारांवर बहिष्कार टाकला. त्यामुळे या सावकारांना गाव सोडून शिरुरला पळून जावे लागले. पुढे १२ मे रोजी सुपे येथे बाजाराच्या दिवशी शेतक= यांनी सावकारांच्या घरावर मोर्चाने जाऊन घरातील गहाणखताच्या हुकूमनाम्याच्या कागदपत्रांची मागणी केली. ती ताब्यात मिळाल्यानंतर शेतक= यांनी त्यांची होळी केली व शांततेने ते परत गेले. सुप्याला झालेल्या घटनेचे पडसाद अहमदनगर, सातारा, सोलापूर, रत्नागिरी व पुणे या जिल्ह्यात उमटले. तरी पुणे व अहमदनगर या जिल्ह्यात या उठावाचा जोर जास्त होता. पुणे जिल्ह्यातील भीमथडी तालुक्यात १७ गावे, शिरुर तालुक्यात १० गावे, इंदापूर हवेलीमध्ये ३ गावे असा उठाव पसरला. अहमदनगर जिल्ह्यात पारनेर तालुक्यात ६ गावे, श्रीगोंदा तालुक्यात ११ गावे व कर्जत तालुक्यात १ गावात उठाव पसरला. अहमदनगर जिल्ह्यात शेतक= यांनी सावकारांच्या घरावर हल्ले केले. सावकारांची मालमत्ता लुटणे व गहाणखते जाळून टाकणे असे प्रकार सर्रास घडले. पुणे जिल्ह्यातही २४ ठिकाणी सावकारावर हल्ले झाले, ८ ठिकाणी चो= या झाल्या तर अनेक ठिकाणी जाळपोळ झाली.

यापूर्वीच्या सावकारांचे शेतकऱ्यांवर सर्रास अन्याय चालू असताना सरकार मूग गिळून बसले होते. परंतु शेतकऱ्यांनी मोर्चेबांधणी सुरु केल्यावर सरकारने कायदा व सुव्यवस्थेच्या नावाखाली हालचाली सुरु केल्या. शेतकऱ्यांना सरकार कोणत्या थरापर्यंत जाईल याची कल्पना नव्हती. शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारा संघटित राजकीय पक्ष त्यावेळी अस्तित्वात नव्हता किंवा शेतकऱ्यांची संघटनाही अस्तित्वात नव्हती. शेतकऱ्यावरील अन्यायाचा कळस झाल्यामुळे स्वयंस्फूर्तीने शेतकरी बंड करुन उठले होते. सरकारने प्रथम मोठ्या प्रमाणावर पोलीस पथके गावोगावी पाठविली परंतु नंतर लष्करी तुकड्याही बोलावून घेतल्या व शेतकऱ्यांची धरपकड सुरु केली. जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत शेतकऱ्यांचा उठाव चिरडून टाकण्यात सरकारला यश आले तरीही शेतकऱ्यांच्या असंतोषाचा उद्रेक अधूनमधून चालूच राहिला.

## ९.४.२. उठावाचे स्वरुप :

**आय.जे.कॅटनॉच** यांनी दक्षिणेतील दंग्यांसंबंधी लिहिताना म्हटले आहे की, शेतकऱ्यांनी सावकारांचे धान्य लुटले, घरांना आगी लावल्या व करारपत्रे जाळली; पण रक्तपात झाला नाही. दंगलीत भाग घेतल्याबद्दल अटक झालेल्यात मोचीकाम करणारे, लोहारकाम करणारे होते. त्यांनी दंगलीत भाग घेतला असे सिध्द करणे कठीण होते; पण त्यांच्याकडे लुटीचा माल सापडला होता. ९५१ लोकांना दंगलीच्या कारणास्तव अटक झाली व ५०१ लोकांना शिक्षा झाल्या.

उठावानंतर सरकारने दंगलीची चौकशी करण्यासाठी 'डेक्कन रॉयट्स कमिशन' नेमले. या कमिशनने काढलेल्या निष्कर्षावरुनही या उठावाचे स्वरुप लक्षात येते. या कमिशनने काढलेले निष्कर्ष असे. "मध्यमवर्गीय शेतकऱ्यांनी जरी या उठावाला पाठिंबा दिला असता तरी सुरुवात मात्र श्रीमंत शेतकऱ्यांनी केली. कारण नवा कायदा, ब्रिटिश राजवट यामुळे समाजातील प्रतिष्ठित वर्गाला आव्हान प्राप्त झाले होते. तेव्हा आपले महत्त्व टिकविण्यासाठी श्रीमंत वर्गाने मध्यमवर्गीय शेतकऱ्यांना पाठिंबा देऊन हा उठाव घडवून आणला. या उठावात इतर सामान्य व्यक्तीला कोणताही त्रास झाला नाही."

## ९.२.४.३.दि डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस् रिलिफ ॲक्ट (१८७९) :

शेतकरी बंडाचे स्वरुप गंभीर आहे व अशाप्रकारचे दंगे पुन्हा होऊ नयेत म्हणून चौकशीसाठी सरकारने नेमलेल्या 'डेक्कन रॉयट्स कमिशन'ने सावकारांकडून शेतकऱ्यांची अमानुष पिळवणूक होत होती व त्यापासून शेतकऱ्यांना कायदेशीर संरक्षण देण्याची गरज होती. तथापि असे संरक्षण न मिळाल्यानेच बंड झाले असा निष्कर्ष काढला आणि असे संरक्षण देण्यासाठी स्वतंत्र कायदा करावा अशी सरकारला शिफारस केली. या

शिफारशीवरुन तसा कायदा सरकारने केला. तो कायदा 'दि डेक्कन ॲग्रिकल्चरिस्टस् रिलिफ ॲक्ट' या नावाने ओळखला जातो. कर्जबाजारी शेतकऱ्यांचे कर्ज सावकाराला एकदम वसूल करता येणार नाही त्यासाठी सावकाराने दिवाणी कोर्टात खटला दाखल केला पाहिजे.

(१) दिवाणी कोर्टाने संबंधित सर्व कागदपत्रे पाहून प्रत्यक्ष तपास करावा व निकाल द्यावा.

(२) दिवाणी कोर्टाला जर गरज भासली तर कर्जावरील व्याजाचा दर कमी करण्याचा अधिकार कोर्टाला राहील.

(३) कर्जदाराला कर्ज एकदम देणे शक्य नसल्यास त्याची हप्तेबंदी कोर्टाने करावी.

(४) अत्यंत निकडीच्या प्रकरणात जर गरज भासली तरच शेतकऱ्याची जमीन सावकाराला खरेदी करता येईल अन्यथा अशा प्रकारचा व्यवहार सावकाराला करता येणार नाही.

(५) प्रत्येक खेड्यात जमिनीसंबंधी होणाऱ्या सर्व प्रकरणांची नोंद एका रजिस्टरमध्ये करावी.

जमिनीवरील कर्ज, जमीन तारण प्रकरण किंवा विशिष्ट तत्त्वावर एखाद्याला जमीन कसावयास द्यावयाची असेल तर अथवा विकावयाची असेल तर त्यासंबंधी गावच्या रजिस्टरमध्ये त्याची स्पष्ट नोंद असावी. ही नोंद गावच्या कुलकर्ण्याने ठेवावी.

शेतकरी उठावापूर्वी महाराष्ट्रात जो असंतोष निर्माण झाला होता त्याला भावी काळात पायबंद घालण्याचा मुंबई सरकारने प्रयत्न केला. हा कायदा पास करुन सरकार गप्प बसले नाही; तर शेतकऱ्यांची आर्थिक दुरावस्था कमी करण्यासाठी कोणती कायमची उपाययोजना आखावी, यासंबंधी चर्चा चालू होती. **प्रो. इयान कॅटनॉच** म्हणतात की, 'डेक्कन रॉयट्स कमिशन' ने शेतकऱ्यांना तगाई देण्याची व्यवस्था करावी असे सुचविले होते. त्याचप्रमाणे 'शेतकी बँका' स्थापन करुन शेतकऱ्यांना कर्जपुरवठा करावा अशी सूचनाही कमिशनने केली होती. कमिशनच्या दोन्ही सूचनांचा स्वीकार केला; परंतु त्यांची अंमलबजावणी लवकर होऊ शकली नाही.

१९०१ साली सरकारने 'लँड रेव्हेन्यू कोड' अमलात आणले. या कायद्याने कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या जमिनी सावकाराकडे सहजासहजी हस्तांतरित होणार नाहीत अशा प्रकारची तरतूद करण्यात आली.

### ९.२.४.४.लोकमान्य टिळक आणि शेतकरी चळवळ :

सन १८७६ मध्ये दुष्काळ पडला त्यावेळी सरकारने 'फॅमिन रिलिफ कोड' तयार केला व त्यानुसार 'दुष्काळ निवारण फंड' करुन दुष्काळात लोकांना कशी मदत करावी, सारासूट, तहकुबी इत्यादीसंबंधीचे नियम

केले. १८९६ साली महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला. त्यावेळी लो. टिळकांनी शेतकऱ्यांना फॅमिन रिलिफ कोडची माहिती देऊन आपल्या हक्कांविषयी जागृत केले. सार्वजनिक सभेचे प्रचारक टिळकांच्या सूचनेवरुन गावोगावी जाऊन याबाबत लोकांना माहिती सांगत. पीक आले नसल्यास सारा भरु नका. सारा न भरल्यास जमीन किंवा जनावरे विकण्याचा हक्क सरकारला नाही हे गावोगाव सभा घेऊन सांगण्यात येऊ लागले. सभांना शेतकऱ्यांची होणारी गर्दी पाहून इंग्रज अधिकाऱ्यांचे धाबे दणाणले. उंबरगा तालुक्यातील खत्तलवाढ येथे दोन हजारांवर लोकांची मोठी सभा झाली. या सभेत दंगा होईल या समजुतीने सरकारने बंदूकधारी पोलीस फौज तयार ठेवली होती परंतु सभा शांततेने पार पडली. दुसऱ्या दिवशी केसरीतून टिळकांनी 'पोलीसांच्या पेरलेल्या बंदुकीच्या टप्प्यात भरलेली रयतेची जंगी सभा' या मथळ्याखाली अग्रलेख प्रसिध्द करुन त्यांनी कायदेशीर हक्कांसाठी स्वतःच जागृत होऊन सरकारशी भांडण्याचे लोकांना आवाहन केले. "लक्षात ठेवा, की हे राज्य कायद्याचे आहे, दांडगाईचे नव्हे. भांडण झाले तरी कायदेशीर रीतीने भांडावयास पाहिजे, तसे आपण भांडू तेव्हाच आपणास काही हक्क मिळतील." असे आपल्या अग्रलेखात सांगून टिळकांनी शेतकऱ्यांना जागृत केले.

### ९.२.४.५.मुळशी सत्याग्रह :

टाटा कंपनीने लोणावळा परिसरात जलविद्युत निर्मितीसाठी दोन प्रकल्प हाती घेतले. या दोन्ही प्रकल्पांसाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेण्यात आल्या. हे शेतकरी संघटित नसल्याने त्यांच्या पुनर्वसनाचा, तसेच त्यांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न निर्माण झाला नाही. विस्थापित शेतकरी बिचारे देशोधडीला लागले आणि मुंबईत मोलमजुरी करुन पोट भरु लागले.

पुणे जिल्ह्याच्या हवेली तालुक्यातील मुळशी पेट्यात निळा व मुठा नद्यांच्या संगमावर धरण बांधून जलविद्युतनिर्मिती करण्याची तिसरी महत्त्वाकांक्षी योजना टाटा कंपनीने हाती घेतली. मुळशी धरणाखाली ५४ गावांतील जमिनी पाण्याखाली जाणार होत्या आणि १०-१५ हजार लोकांना त्याचे परिणाम भोगावे लागणार होते. १९१९ च्या जूनमध्ये सरकारने भूसंपादन कायद्यातील चौथ्या कलमानुसार शेतकऱ्यांना नोटिसा दिल्या परंतु शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सरकारला देण्याचे नाकारले. आवळस व मुळशी या गावी २६ व २७ डिसेंबर १९१९ रोजी शेतकऱ्यांनी सभा घेतल्या व एक मंडळ स्थापन केले. या मंडळाचे चिटणीस अप्पासाहेब गद्रे व गुप्ते यांनी जिल्हाधिकारी, गव्हर्नर व मुख्य सचिव यांच्या भेटी घेतल्या. परंतु अर्ज विनंत्यांचे, भेटीगाठीचे प्रयत्न निष्फळ ठरले.

फेब्रुवारी १९२० मध्ये केसरीने मुळशी पेट्यातील शेतकऱ्यांची बाजू घेऊन त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडण्यास सुरुवात झाली. १९२० नंतर देशभर सत्याग्रहाचे वारे वाहू लागले. मुळशी धरणाला विरोध

करण्यासाठी सत्याग्रह करण्याची भाषा बोलली जाऊ लागली. आवळस गावातले शाळा मास्तर गोखले, दत्तू साठे व शंकर रानडे यांनी पायपीट करीत निरक्षर मावळ्यांनी एकजुटीने सत्याग्रहाचा अवलंब करावा असे त्यांना सांगितले. कंपनीचे गोरे अधिकारी शेतक-यांना दमदाटी करु लागले. तेव्हा ताम्हीण खो-यातील दावडी गावातील बोगद्याचे काम शेतक-यांनी संघटित होऊन बंद पाडले. 'लोकसंग्रह' पत्राचे वार्ताहर विनायक महादेव भुस्कुटे यांनी तात्यासाहेब केळकरांच्या मुळशी खोऱ्यात तीन सभा आयोजित करुन मुळशी धरणाविरुध्द प्रचार केला. त्यामुळे शेतकऱ्यांत जागृती निर्माण होऊ लागली. १५ डिसेंबर १९२० रोजी मुळशीला तात्यासाहेब केळकरांची आणखी सभा झाली. याच सभेत आवळसच्या विठू महाराने 'उद्या सर्व पेटा बुडाल्यावर पोरबाळं घेऊन कुठं जावं?' असा प्रश्न जाहीररित्या विचारला. डिसेंबर १९२० मध्ये नागपूरला भरलेल्या काँग्रेसच्या वार्षिक अधिवेशनात तात्यासाहेब केळकरांनी मुळशी धरणग्रस्तांचे गाऱ्हाणे मांडले. याबाबत केळकरांनी मांडलेला ठराव बहुमताने पास झाला. काँग्रेसने हा ठराव मंजूर केल्यानंतर लवकरच मुळशी सत्याग्रहाचे रणशिंग फुंकले जाणार याची सरकारला, टाटा कंपनीला व मुळशीतील शेतकऱ्यांना कल्पना आली. १९२१ साली सेनापती बापटांनी मुळशीत सत्याग्रह करण्याचा निर्णय घेतला. त्यांना शंकरराव देव, केळकर व बाळूकाका कानिटकर या काँग्रेस नेत्यांनी मदत केली. प्रथम सत्याग्रह शांततेने सुरु झाला होता पण सरकार व टाटा कंपनी ऐकत नाही असे पाहून बापटांनी मुळशीच्या धरणाच्या बांधकामासाठी सामान वाहून नेणा-या एका मालगाडीच्या ड्रायव्हरवर गोळी झाडली. ती कमरेला लागून तो जखमी होईल पण मरणार नाही एवढी सावधगिरी सेनापती बापटांनी बाळगली होती. याच आंदोलनामुळे बापट यांना लोकांनी 'सेनापती' ही पदवी बहाल केली.

### ९.२.४.६.काँग्रेसच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळ :

प्रारंभीच्या काळात शेतक-यांच्या प्रश्नांकडे काँग्रेसने फारसे गांभीर्य पाहिले नाही परंतु सन १९१५ नंतर म. गांधींचा भारतीय राजकारणात प्रवेश झाल्यानंतर देशव्यापी चळवळ चालविण्याच्या भूमिकेतून त्यांनी शेतक-यांचे प्रश्न उचलून धरले. म. गांधींनी चंपारण्य, खेडा व बार्डोली या तीन ठिकाणी शेतक-यांच्या चळवळीचे नेतृत्व व मार्गदर्शन केले; परंतु किसान चळवळ ही त्यांनी प्रधान मानली नव्हती. राजकीय स्वातंत्र्याच्या चळवळीस त्यांनी अग्रस्थान दिले. स्वातंत्र्य मिळाल्यावर इतर प्रश्न हाताळता येतील असे त्यांचे मत असावे.

### ९.२.४.७.शेतकऱ्यांचे जंगल सत्याग्रह :

सन १८६६ च्या कायद्याने जंगलाबाबत अनेक जाचक निर्बंध लादण्यात आले होते. त्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांच्या उदरनिर्वाहाच्या साधनांवर गदा आली होती. म.गांधींनी कायदेभंगाची चळवळ सुरु केल्यावर महाराष्ट्रातील आदिवासी शेतकऱ्यांनी जंगल सत्याग्रहाची चळवळ हाती घेतली. २२ जुलै १९३० रोजी संगमनेर तालुक्यात एक लाख लोकांनी तर नाशिकच्या बागलाण तालुक्यातील आदिवासी जंगल सत्याग्रह केला व जंगलाचे कायदे तोडले. या सत्याग्रहाचे नेतृत्व काँग्रेस नेत्यांनी केले. बागलाणशिवाय सटाणा, कळवण या तालुक्यांतही जंगल सत्याग्रह झाले. वनचराईसाठी लादलेले कर लोकांच्याकडून वसूल करणेही सरकारी नोकरांना अवघड झाले. बागलाण तालुक्यातील शिलवड येथील जंगल सत्याग्रहात तर हजारो शेतकरी सहभागी झाले होते. मंदीच्या लाटेमुळे गांजलेल्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर सत्याग्रह आंदोलनात जसा भाग घेतला तस यापूर्वीच्या चळवळीत कधीही घेतला नव्हता.

## ९.२.४.८.काँग्रेसचे शेतीविषयक धोरण व शेती क्षेत्रातील सुधारणा :

सन १९३६ मध्ये फैजपूर येथे झालेले काँग्रेसचे अधिवेशन शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे ठरले. जमीन महसुलात कपात, पाणी पट्‌टीमध्ये कपात, सहकारी शेतीचा पुरस्कार, प्रथम कर्ज वसुलीस स्थगिती देऊन नंतर कर्जमाफी अशा अनेक तरतुदी या अधिवेशनात मंजूर केलेल्या ठरावात समाविष्ट करण्यात आल्या. १९३७ ते १९३९ या काळात प्रांतात सत्तेवर आलेल्या काँग्रेस मंत्रिमंडळाने कायदे करुन यापैकी काही आश्वासनांना मूर्त रुप देण्याचा प्रयत्न केला.

कुळांना संरक्षण देण्याच्या दृष्टीने ३ ऑक्टोबर १९३९ रोजी मुंबई प्रांताच्या विधानसभेने **'कुळकायदा'** मंजूर केला. या कायद्यात वेळोवेळी दुरुस्त्या करुन कुळांना जमीनदारांपासून पूर्ण संरक्षण देण्यात आले. कोकण विभागातील खोती पध्दत नष्ट करण्यासाठी मात्र बराच काळ जावा लागला. खोत म्हणजे कोकणातील जमीनदार. १९२१ ते १९२९ या काळात कोकणातील खोतांविरुध्द त्यांच्या कुळांनी केलेल्या तक्रारींना मुंबई विधिमंडळात वाचा फोडण्याचे काम आनंदराव सुर्वे, सी.के.बोले या ब्राह्मणेतर पक्षाच्या आमदारांनी केले. कुळांच्या गाऱ्हाण्याबद्दल सरकारने चौकशी करुन शहानिशा करावी अशी मागणी खोती सभेचे अध्यक्ष व रत्नागिरी जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्ते भास्करराव नानल यांनीही केली. सरकारनेही याची दखल घेऊन दक्षिण विभागाचे आयुक्त माऊंटफोर्ड यांच्याकडे चौकशीचे काम सोपविले. आयुक्तांच्या अहवालानंतर सरकारने कोकणातील कुळांच्या हक्कांचे संरक्षण करण्याच्या हेतूने काही नवे आदेश जारी केले, तरी खोती पध्दत नष्ट करण्याचा आपला विचार नाही असे सरकारतर्फे जाहीर करण्यात आले. रत्नागिरी व कुलाबा या दोन्ही जिल्ह्यांच्या काँग्रेस समित्यांवर खोतांचे वर्चस्व असल्यामुळे खोती पध्दत नष्ट करण्याची कल्पना मान्य होणे

शक्यच नव्हते. १९३७ सालच्या प्रांतिक निवडणुकीदरम्यान कॉँग्रेस पक्षाने खोती पध्दत नष्ट करण्याचे आश्वासन दिले. परंतु १९३७ साली अधिकारावर आलेल्या खेर मंत्रिमंडळाला खोतांच्या दडपणामुळे त्या आश्वासनांची पूर्ती करता आली नाही. अखेर खोती पध्दत नष्ट झाली ती १९४९ साली खेर मंत्रिमंडळाच्या दुसऱ्या कारकीर्दीत. हा कायदा पास होतानाही बराच विरोध झाला.

## ९.२.४.९.कम्युनिष्टांच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळ :

२० व्या शतकात काही कॉँग्रेस नेत्यांनी शेतकऱ्यांना संघटित करण्याचा प्रयत्न केला. त्या प्रयत्नांमधून 'अखिल भारतीय किसान संघटना' स्थापन झाली. परंतु कॉँग्रेस श्रेष्ठींकडून त्याला फारसा प्रतिसाद मिळाला नाही. कम्युनिष्टांनी कामगार क्रांतीचे ध्येय ठेवून शेतकऱ्यांना संघटित करण्यास सुरुवातीला प्राधान्य दिले नाही. परंतु कॉँग्रेसप्रणित किसान संघटनेत अनेक कम्युनिस्ट कार्यकर्ते कार्य करीत होते. कम्युनिस्टांनी बंगाल, बिहार व उत्तरप्रदेश येथे शेतकऱ्यांना संघटित करुन चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात १९४२ नंतर कम्युनिस्ट कार्यकर्ते शामराव परुळेकर व श्रीमती गोदावरी परुळेकर यांनी ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागात काम सुरु केले. जानेवारी १९४५ मध्ये टिटवाळा येथे 'महाराष्ट्र प्रांतिक किसान सभेचे' पहिले अधिवेशन भरविण्यात येऊन डहाणू-उंबरगाव, तलासरी या भागातील आदिवासी लोकात कामास त्यांनी सुरुवात केली. आदिवासी शेतकरी व पिढ्यानपिढ्या वेठबिगारी करीत होता. जमीनदार, जंगलाचे कंत्राटदार इत्यादींनी आदिवासींचा अमानुषपणे छळ चालविला होता. गोदावरीबाई व त्यांच्या सहकाऱ्यांनी आदिवासींना संघटित केले. या संघटना कार्यात अनेक अडचणी आल्या. आदिवासींना प्रतिकारही करावा लागला. त्यात थोडीफार हिंसा झाली पण ती मर्यादित राहिली.

कॉँग्रेसचे सरकार अधिकारावर आल्यावर आदिवासींच्या मुख्य आर्थिक व कायदेविषयक मागण्या प्रथम दुर्लक्षित राहिल्या. आदिवासी भागात कम्युनिस्टांचे बस्तान बसू नये हे सरकारचे उद्दिष्ट असल्यामुळे दडपशाहीचा मार्ग अवलंबण्यात आला. याच दरम्यान गांधीवादाच्या मार्गाने काम करणाऱ्या 'आदिवासी सेवा मंडळा'ने कल्याणकार्य हाती घेतले होते. परंतु आदिवासींची संघटना करुन त्यांच्या न्याय्य मागण्या जमीनदार व सरकार यांच्याकडून मान्य करुन घेण्याचे काम गोदावरी परुळेकर यांच्या 'लाल बावटा किसान सभे'ने केले. त्याचे फलित वर्णन करताना गोदावरीबाई लिहितात, ''जमीनदार-सावकारांच्या विरोधाचा काही उपयोग झाली नाही. वेठबिगार रद्द झाली. शेतीकामाची आदिवासींना मजुरी मिळू लागली. लग्नाचे गडी मुक्त झाले. गवतकापणीची, जंगलतोडीची मजुरी वाढली. खंड कमी झाले. इतकेच नव्हे तर धान्याचे खंड कायद्याने बंद करण्यात आले. साऱ्याच्या पाचपट पैशाच्या स्वरुपात खंड नक्की झाले. जमिनीच्या किंमती ठरविण्यात

आल्या. जमिनीची किंमत बारा हप्त्यात देणाऱ्या या आदिवासी शेतकऱ्याला जमिनीची मालकी मिळावी असा कायदा करण्यात आला. या सवलती मिळविताना आदिवासींना अनंत जखमा सहन कराव्या लागल्या. संघटना व प्रतिकारशक्ती यामुळे आदिवासींमध्ये आत्मविश्वास निर्माण झाला. त्यांच्यातील स्वाभिमान उफाळून आला."

## **९.४.०. घटकाची उद्दिष्टे**

१. कामगार चळवळ प्रभावी करण्यासाठी उपाययोजना स्पष्ट करता येतील,.
२. महाराष्ट्रातील कामगार चळवळींमधील अडसर स्पष्ट करता येतील.
३. कामगार संघांची कार्ये सांगता येतील.
४. महाराष्ट्रातील कामगार चळवळींचा प्रारंभ कसा झाला ते स्पष्ट करता येईल.
५. भारतातील कामगार चळवळींची पार्श्वभूमी स्पष्ट करता येईल.

## **९.४.१.प्रस्तावना**

औद्योगिक क्रांतीने कामगारवर्ग निर्माण केला त्याचबरोबर कामगारांना विपन्नावस्थेत ठेवणारी एक विषम समाजव्यवस्था प्रस्थापित केली. कामगार चळवळ जन्माला आली ती या समाजव्यवस्थेला विरोध करण्यासाठी व तिच्या जागी समतेची, संपन्नतेची व भ्रातृभावाची नवी समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी.

भारतात साधारणतः १९ व्या शतकाच्या शेवटी कामगार चळवळीस सुरुवात झाली. तिचे बरेचसे श्रेय मुंबईतील तत्कालीन थोर कामगार नेते नारायण मेघजी लोखंडे यांच्याकडे जाते. त्या काळातील भारतीय कामगार अशिक्षित व अडाणी होते. संघटना बनविणे ही गोष्ट त्यांना परिचित शिवाय कारखानदार, वरिष्ठ अधिकारी किंवा सरकारी अधिकारी यांच्याशी बोलणी करण्यासाठी इंग्रजी भाषेचे जे ज्ञान हवे होते ते त्यांच्याकडे नव्हते. त्यामुळे कामगार संघटना स्थापन करणे, त्या वाढविणे त्यांना शक्य नव्हते. त्यामुळे त्यांना वकील, डॉक्टर किंवा राजकीय पुढारी अशा बाहेरच्या कार्यकर्त्यांची मदत घ्यावी. लागत असे. अशा अनेक अडचणींतून भारतात कामगार संघटनांची वाटचाल सुरु झाली. महाराष्ट्रातही हीच परिस्थिती होती.

## **९.४.२. कामगार चळवळ :**

### **९.४.२.१. कामगार संघटनांची पूर्वतयारी : (पार्श्वभूमी)**

कामगार संघटना व कामगारांची चळवळ भारतात लवकर उभी राहू शकली नाही. याचे कारण येथील औद्योगिकरण संथ गतीने होत होते. शिवाय कामगारांचे अज्ञान, स्थलांतर करण्याची वृत्ती, त्यांच्यात असलेले

जात, धर्म व भाषा याबाबतचे भेदभाव या कारणांमुळेही कामगार संघटना आकार घेऊ शकत नव्हत्या. पहिल्या महायुध्दानंतरच्या काळात मात्र कामगार चळवळीला योग्य वातावरण निर्माण झाले. मात्र ही चळवळ सुरु होण्यास तत्पूर्वीचा फॅक्टरी ॲक्ट बऱ्याच प्रमाणात कारणीभूत झाला.

कामगारांच्या हितासाठी फॅक्टरी ॲक्ट लागू करावा अशी मागणी सन १८७४ मध्ये इंग्लंडहून आली. पण या मागणीत कामगारांच्या कळवळ्यापेक्षा मुंबईच्या गिरण्यांची मँचेस्टरच्या गिरणी उद्योगाशी जी स्पर्धा होऊ लागली होती तिला आळा घालणे हा उद्देश होता. मुंबईच्या भरभराटीला रोखून धरण्याचा हा उद्देश होता. मुंबईतील गिरणी मालक मात्र त्यामुळे जागे झाले. त्यांनी 'बॉम्बे मिल ओनर्स असोसिएशन' ही संघटना स्थापन केली. गिरणी मालकांच्या हिसंबंधांचे रक्षण करणे हे तिचे प्रमुख उद्दिष्ट होते. कामगारांच्या हिताचा कोणालाही विचार नव्हता.

सन १८७८ मध्ये येथल्या कापड उद्योगाला शह देणारी घटना घडली. इंग्लंडहून भारतात आयात केले जाणारे जाडेभरडे कापड व सूत यावरील कर सरकारने रद्द केला. यामुळे विचारवंतांमध्ये मोठा असंतोष पसरला. आर्थिक राष्ट्रवाद वाढू लागला. तत्कालीन विचारवंत न्या. तेलंग, मेहता व तय्यबजी यांनी पुढाकार घेऊन गिरणी मालकासह कामगारांची सभा घेतली. ब्रिटिशांच्या धोरणाचा विरोध करण्यात आला. नोव्हेंबर १८७९ मध्ये फॅक्टरी बील सरकारपुढे मंजुरीसाठी आल्यावर गिरणी मालकांच्या 'मिल ओनर्स असोसिएशन'ने त्याचा विरोध केला. गिरणी मालकांनी कामगार कपात करणे, गिरण्या बंद ठेवणे अशा गोष्टींनी सरकारवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला.

याच दरम्यान १८७५ साली साहेराबजी शापुरजी बेंगालीच्या नेतृत्वाखाली कामगारांचे विशेषतः स्त्रिया व मुलांची स्थिती सुधारण्यासाठी कायदे करावेत अशी मागणी करण्यात आली. पुण्याची डेक्कन सभाही फॅक्टरी ॲक्ट पास व्हावा म्हणून प्रयत्न करीत होती. मँचेस्टरचा दबावही सतत वाढत होता. त्यामुळे मुंबईचा कलेक्टर अर्बथ नॉट याच्या अध्यक्षतेखाली फॅक्टरी ॲक्टच्या निर्मितीसाठी एक कमिशन नेमले गेले. या कमिशनच्या अहवालाच्या आधारावर १८८१ साली  फॅक्टरी ॲक्ट पास करण्यात आला.

फॅक्टरी ॲक्ट पास झाल्यानंतर वृत्तपत्रांनीही यात लक्ष घातले. 'नेटीव ओपिनियन' गिरणी मालकांच्या बाजूने लिहू लागले तर 'राफ्त गोफ्तर' या वृत्तपत्राने कामगारांच्या हिताचा विचार केला. कामगारांची बाजू हिरीरीने मांडण्यात 'दिनबंधू' हे वृत्तपत्र सर्वांत पुढे होते. त्याचे संपादक सत्यशोधक चळवळीचे नेते व म.फुले यांचे सहकारी नारायण मेघजी लोखंडे हे होते. लोखडेंनी कापड गिरणीत स्टोअरकिपरचे काम केल्याने कामगारांचे शोषण त्यांनी जवळून पाहिले होते. 'दिनबंधू' मधून त्यांनी याला वाचा फोडली व कामगारांचे

संघटन सुरु केले. सुधारित फॅक्टरी ॲक्टची मागणी जोर धरु लागली तर दुसरीकडे गिरणीमालक अशा कायद्याला विरोध करीत होते. सन १८८१ चा फॅक्टरी ॲक्ट कामगारांच्या पिळवणुकीस आळा घालण्यास फारसा उपयोगी नव्हता. त्यामुळे या कायद्याला विरोध करण्यासाठी आणि नवीन सुधारित असा कामगारांच्या हिताचा फॅक्टरी ॲक्ट तयार करावा ही मागणी करण्यासाठी लोखंडे यांना कामगार संघटनेची आवश्यकता भासू लागली. या सर्वांचा परिणाम म्हणून लोखंडे यांनी 'बॉम्बे मिल हॅण्ड असोसिएशन' या नावाची भारतातील पहिली कामगार संघटना स्थापन केली. म्हणून कामगार चळवळीच्या इतिहासात नारायण मेघजी लोखंडे यांना कामगार चळवळीचे आद्य जनक मानले जाते. कामगारांची संघटना बांधण्याच्या कामी लोखंडे यांना रघू भिकाजी, नारायण सुर्कोजी या जॉबर्सनी आणि विठ्ठलराव कोरगावकर, कृष्णाजी अर्जून केळुसकर, रामचंद्र शिंदे व नारायण पवार या सत्यशोधक सभासदांचे बहुमोल साहाय्य झाले.

### ९.४.१.२. कामगार संघटनेचा मागण्यांचा विनंती अर्ज :

मुंबई सरकारने सन १८८४ मध्ये मुंबईचा कलेक्टर डब्ल्यू.बी.मूलक याच्या अध्यक्षतेखाली फॅक्टरी कमिशन नेमले. सन १८८१ च्या फॅक्टरी ॲक्टमधील उणिवांचा अभ्यास करुन सुधारणा सुचविणे हा या कमिशनच्या नेमणुकीचा उद्देश होता. या कमिशनमध्ये एकही कामगार प्रतिनिधी नव्हता. लोखंडे यांनी या कमिशनवर दोन प्रतिनिधी असावेत अशी मागणी केली. कामगारात जागृती निर्माण करण्यासाठी लोखंडे यांनी कामगारांची पहिली सभा २३ फेब्रुवारी १८८४ रोजी सुपारी बाग परळ येथे घेण्यात आली. या सभेला ४ हजार कामगार उपस्थित होते. श्री. लोखंडे यांनी कामगारांच्या विविध अडचणींवर व त्यांच्या निराकरणासाठी उपाय सुचविणारे भाषण केले. २६ सप्टेंबरला भायखळा येथे कामगारांची दुसरी सभा झाली. सभेत ठराव मांडले गेले. याचवेळी ५५०० कामगारांच्या सह्यांनी मूलक यांना कामगारांच्या मागण्यांचा विनंती अर्ज सादर करण्यात आला. यातील प्रमुख मागण्या पुढीलप्रमाणे होत्या.

(१) गिरणी कामगारांना आठवड्यातून एक दिवस रविवारी सुट्टी देण्यात यावी.

(२) दुपारी अर्धा तास कामगारांना सुट्टी असावी.

(३) गिरणीतील काम सकाळी ८.३० वाजता सुरु व्हावे व सूर्यास्ताला थांबवावे.

(४) कामगारांचा पगार पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत व्हावा.

(५) कामावर असताना जर कामगाराला दुखापत झाली तर बरा होईपर्यंत त्याला पूर्ण पगार देण्यात यावा.

(६) एखाद्या कामगाराचा तो कामावर असताना मृत्यू झाला तर त्याच्या कुटुंबाला पेन्शन देण्यात यावी.

## ९.४.१.३. कामगार शक्तीचा वाढता दबाव व सन १८९१ चा फॅक्टरी ॲक्ट :

कामगारांच्या वरील मागण्या विचाराधीन असतानाच मुंबईमध्ये कामगारांनी आपली एकजूट दाखविण्यासाठी सन १८८५ मध्ये मुंबईतील दोन गिरण्यांत संप केला. कामगारांच्या पगारात केलेली कपात व पगार देण्यास मालकांनी केलेला उशीर हे संपाचे कारण होते. मूलक कमिशनमध्ये अनेक गिरणी मालक होते. त्यांच्या मतात कोणताही फरक पडत नव्हता. १८८७ साली कुर्ला येथील 'स्वदेशी' मिलमध्ये संप झाला. मराठी माणसांच्या या संपांना उत्तर म्हणून गिरणी मालक जे.एन.टाटा यांनी उत्तरेतून कामगार आणून शह देण्याचा प्रयत्न केला पण तो फसला. ३ जून १९८९ रोजी लोखंडे यांनी मुंबई सरकारला पत्र लिहून फॅक्टरी ॲक्ट लवकर पास करण्याबाबत विनंती केली. साप्ताहिक सुट्टीचा वार असावा की नसावा यावर आता चर्चा होऊ लागल्या. दरम्यानच्या काळात गिरणी मालकांनी महिन्यातून आठ दिवस गिरण्या बंद ठेवल्या. २४ एप्रिल १८९० रोजी महालक्ष्मी रेसकोर्सवर लोखंडे यांनी कामगार सभा बोलावली. या सभेला दहा हजार कामगार होते. या सभेत दोन स्त्रियांनीही भाषणे केली. या सभेत कामगारांना आठवड्यातून एक दिवस तीही रविवार सुट्टी असावी अशी पुन्हा मागणी करण्यात आली. या वाढत्या कामगार शक्तीचा योग्य तो परिणाम झाला. मुंबई सरकारने कलेक्टर मूलकचा अहवाल बाजूला ठेवला व २५ सप्टेंबर १८९० रोजी सर्वसमावेशक फॅक्टरी लेबर कमिशनची नेमणूक केली. या कमिशनमध्ये कामगारांचे प्रतिनिधी म्हणून नारायण मेघजी लोखंडे, सोराबजी शापूर्जी बेंगाली, मोहन मुखर्जी व मुहम्मद हुसेन यांची निवड करण्यात आली. त्यामुळे पूर्वीसारखा गिरणी मालकांचा दबाव कमिशनवर राहिला नाही. या कमिशनने गिरणी मालक व कामगार संघटना यांची मते जाणून घेतली. कामगारांचीही मते जाणून घेतली आणि मुंबई, अहमदाबाद येथील कामगारांची प्रत्यक्ष पहाणी केली. त्यावर आधारित असा नवा फॅक्टरी ॲक्ट सन १८९१ मध्ये मंजूर करण्यात आला व १८९२ पासून तो अमलात आणला गेला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या.

(१) ५० किंवा जास्त मजूर येथे चार महिने किंवा अधिक काळ काम करतात अशा ठिकाणाला 'फॅक्टरी' म्हणावे अशी व्याख्या करण्यात आली.

(२) स्त्रियांच्या कामाचे तास ११ असावेत. त्यांना दुपारी १२ ते १.३० या काळात अर्धा तास विश्रांती असावी.

(३) कोणत्याही स्त्रीला सकाळी सहापूर्वी कामावर बोलाविले जाऊ नये. सायंकाळ ६.३० नंतर कामावर थांबविले जाऊ नये.

(४) ९ ते १४ वर्षापर्यंतच्या मुलांना साडेसहा तासापेक्षा जास्त काम देऊ नये. त्यांच्या शाळांच्या वेळा लक्षात घेऊन त्यांना दोन शिफ्टमध्ये काम द्यावे. त्यांच्या शिक्षणात खंड पडू नये याची काळजी घेण्यात यावी.


**प्रा.संजय तुळशिराम शेलार** महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

(५) सर्व गिरण्यांना दुपारी १२ ते २ या वेळेत काम बंद ठेवावे. आठवड्यातून एक दिवस रविवारी सुट्टी असावी.

(६) सांडपाण्याची व्यवस्था, स्वच्छता, पुरेशी हवापाण्याची सोय व पाणीपुरवठा यांची सोय गिरणीमध्ये असावी. ही जबाबदारी स्थानिक सरकारने पार पाडावी.

हा कायदा तयार करण्यामध्ये लोखंडे यांनी केलेल्या सहकार्याबद्दल कमिशनने त्यांचा गौरव केला. कायदा तयार झाल्यावर गिरणी मालक संघानेही लोखंडे यांचा सत्कार केला.

### ९.४.१.४. कामगारांची रॉयल कमिशन :

भारतीय कामगारांची खरी परिस्थिती समजावून घेण्यासाठी ब्रिटिश सरकारने सन १८९१ मध्ये 'रॉयल कमिशन ऑन लेबर' स्थापन केले. या कमिशनने तीन समित्या नेमून, कामगार संघटना, मालक व मालक संघटना यांच्याशी चर्चा केली. या कमिशनपुढे लोखडेंची साक्ष झाली. या साक्षीत त्यांनी कामगारांची बाजू परखडपणे मांडली. कामगारांना आवश्यक विश्रांती मिळत नाही. सुट्टीच्या दिवशी सुध्दा अर्धा दिवस काम करावे लागते. त्याचा कामगारांना मोबदला मिळत नाही.

(१) गिरणीतील एजंट किंवा मॅनेजर यांना नको असलेल्या माणसास केव्हाही काढून टाकतात. याविरुध्द जाब विचारता येईल अशी यंत्रणा नाही.

(२) कोणत्याही चुकीसाठी नोकरीवरुन काढून टाकणे, पगार गोठविणे असे प्रकार घडतात.

(३) पगाराचे वाटप दोन महिन्यांनी किंवा त्यापेक्षाही उशिरा केले जाते.

१८९३ साली मुंबईमध्ये हिंदू-मुस्लिम दंगा झाला. त्यामध्ये शांतता प्रस्थापित करण्याकरिता लोखडेंनी केलेल्या कार्याचा गौरव म्हणून सरकारने १८९५ साली त्यांना 'रावबहादूर' पदवी दिली. याच दरम्यान कामगारांच्या एका प्रातिनिधिक खटल्याचा निकाल विरोधी लागल्यामुळे जमाव खवळला व त्यांनी गिरणी व्यवस्थापकावर हल्ला केला. याबाबत लोखंडे यांनी दिनबंधूमधून अग्रलेख लिहून 'जे काही करावयाचे असेल ते कायदेशीर रीतीने करावे, कायदा हातात घेऊन नव्हे', असे कामगारांना सुनावले. असा हा भारतीय कामगार चळवळीचा जनक ९ फेब्रुवारी १८९७ रोजी प्लेगच्या साथीत मरण पावला.

### ९.४.१.५. सन १९११ चा फॅक्टरी ॲक्ट :

सन १८९२-९३ व १९०१ या काळात मुंबईमध्ये अनेक संप घडवून आणण्यात मुंबई कामगार संघ यशस्वी झाला. सन १८९७ मध्ये 'अमलगमेटेड सोसायटी ऑफ रेल्वे सर्व्हंटस् ऑफ इंडिया' ही संघटना

मुंबईमध्ये स्थापन झाली. कामगार संघटनांची लाट पोस्ट खात्यात जाऊन पोहोचली. १९०७ साली 'बॉम्बे पोस्टल युनियन' स्थापन झाली. १९०८ साली टिळकांना ६ वर्षांची कारावासाची शिक्षा झाली. दुसऱ्या दिवशी म्हणजे २३ जुलैपासून कामगारांनी सहा दिवसांचा संप केला. कामगारांनी केलेला हा पहिला राजकीय संप होता. यानंतर कामगारांची वाढती ताकद पाहून कामगारांच्या समस्या सोडविण्यासाठी १९०८ साली सरकारने श्री.स्मिथ यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिशन नेमले. या कमिशनने सादर केलेल्या अहवालावर आधारित असा १९११ साली नवा फॅक्टरी ॲक्ट सरकारने पास केला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे होत्या.

(१) वर्षातून ४ महिन्यापेक्षा सुध्दा कमी काळ चालू असणाऱ्या कारखान्यांना सुध्दा हा कायदा लागू करण्यात आला.

(२) वयाचा दाखला कामगारांना आवश्यक करण्यात आला.

(३) कापड गिरणीमधील मुलांचे कामाचे तास ६ करण्यात आले.

(४) स्त्रियांना रात्रीच्या वेळी काम करण्यास बंदी घालण्यात आली.

(५) कापड गिरणीमधील पुरुष कामगारांचे कामाचे तास १२ ठेवण्यात आले.

(६) पहाटे पाच पूर्वी व रात्री सात नंतर कोणत्याही कामगाराला काम सांगता येणार नाही.

(७) अपघात, स्वच्छता व प्रकाशासंबंधी काही नवीन नियम कायद्यात समाविष्ट करण्यात आले.

### ९.४.१.६.कामगार हितवर्धक व सोशल सर्व्हिस लीग या संस्थांचे कामगार चळवळीतील योगदान :

सन १९०९ मध्ये रावबहादूर सी.के.बोले यांनी 'कामगार हितवर्धक' ही संस्था स्थापन केली तर ना.म.जोशी यांनी 'सोशल सर्व्हिस लीग' ही संस्था सन १९११ मध्ये स्थापन केली. कामगारांनी निर्व्यसनी व्हावे व काटकसरीने राहावे यासाठी या संघटना प्रचार करीत. शिक्षण प्रसार व आरोग्य सेवा यावरही या संस्थांचा भर होता. गरज पडेल तेव्हा सोशल सर्व्हिस लीग कामगारांना आर्थिक मदत करीत असे. सन १९२४ मध्ये संप झाल्यावर टाटा मिल्सने लीगची मदत थांबविली. तोच मार्ग करिमभॉय व ससून यांनी स्वीकारला. तेव्हा विशिष्ट कल्याणकारी कामाकरिता तुम्ही मदत देता, त्याच्या बदल्यात तुम्हाला सर्वतोपरी पाठिंबा द्यावा अशी अपेक्षा तुम्हास करता येणार नाही व तसा तो मिळणार नाही हे ना.म.जोशी यांनी गिरणी मालकांना लेखीच कळविले. तात्पर्य, कामगार चळवळ विधायक पायावर उभी राहावी या दृष्टीने या कल्याणकारी संस्थांनी केलेले कार्य महत्त्वाचे ठरले.

### ९.४.१.७ सन १९२२ चा फॅक्टरी ॲक्ट :

१९२० 'ऑल इंडिया ट्रेड युनियन कार्पोरेशन' स्थापन झाली. तिचे अध्यक्ष लाला लजपतराय होते. अखिल भारतीय ट्रेड युनियनचे एक चिटणीस दिवाण चमनलाल यांनी अशी माहिती दिली आहे की, जिनेव्हा येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेच्या बैठकीसाठी हिंदी प्रतिनिधी निवडावयाचा होता म्हणून अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना झाली. पण भाई डांगे यांनी अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसच्या ५० वर्षांच्या इतिहासास प्रदीर्घ प्रस्तावना लिहिली असून लोकमान्य टिळक हे ट्रेड युनियन काँग्रेसच्या स्थापनेतील मुख्य प्रेरक होते असे म्हटले आहे. देशपातळीवर संघटना स्थापन झाल्याने कामगारांची शक्ती वाढली. त्यामुळे सरकारने १९२२ साली नवा फॅक्टरी ॲक्ट पास केला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

(१) तांत्रिक शक्ती वापरणाऱ्या आणि २० पेक्षा जास्त कामगार असणाऱ्या कारखान्यांना हा कायदा लागू करण्यात आला.

(२) प्रांतिक सरकारांना योग्य वाटल्यास १० पेक्षा जास्त कामगार नसणाऱ्या कारखान्यांनाही तो लागू करण्यात येईल.

(३) १२ वर्षांवरील मुलांनाच कामावर घ्यावे. मुलांना दररोज ६ तास काम द्यावे.

(४) प्रौढ स्त्री-पुरुष कामगारांचे कामाचे तास दर आठवड्यास ६० आणि दर दिवशी ११ तास असे असावेत.

(५) कारखान्यात स्वच्छता, प्रकाश व हवा यांच्या पुरेशा तरतुदी आहेत किंवा नाहीत हे पाहण्यासाठी तपासणी अधिकारी नेमण्यात यावा.

### ९.४.१.८. कामगार चळवळीत राजकीय पक्षांचा प्रवेश :

सन १९२६ पर्यंत 'ऑल इंडिया ट्रेड युनियन' वर काँग्रेसचा प्रभाव होता. १९२७ साली साम्यवादी लोकांनी या चळवळीत भाग घेतला. कामगार संघटनांनी राजकारणात भाग घेऊ नये, कामगारांचे हित साधेल असे राजकारण कामगारांनी केले पाहिजे असे कामगार नेते ना.म.जोशी यांचे मत होते. कम्युनिस्टांना हे मत मान्य नव्हते. त्यामुळे कम्युनिस्टांनी कामगार चळवळ पक्ष वाढीसाठी वापरण्याचा निर्णय घेतला व आपल्या हालचाली सुरु केल्या. समाजवादी पक्षानेही हेच धोरण अवलंबिले. परंतु कामगार चळवळीत राजकीय पक्षांच्या प्रवेशामुळे कामगार चळवळ अधिक तीव्र स्वरुपाची बनली असली तरी त्यामुळे कामगार व मालक यांच्यातील संबंध बिघडले. त्यात कडवटपणा आला. या कडवटपणामुळे अनेक मागण्या न्याय्य असल्याचेही लक्षात घेतले गेले नाही आणि निकडीच्या गरजा भागविल्या गेल्या नाहीत.

### ९.४.१.९. कामगार चळवळीतील फूट :

साम्यवाद्यांनी कामगार चळवळीत प्रवेश केल्यावर अधिक जहाल भूमिका घेण्यास सुरुवात केली. १९२४ साली मुंबईत झालेला गिरणी कामगारांचा संप चार महिने चालला. दीर्घकाळ संप न करता तडजोड करावी अशी नेमस्त नेते ना.म.जोशी, आर.आर.बखले इत्यादींनी भूमिका घेतली. ती जहाल नेत्यांनी अमान्य केली. कामगारांचा संप बोनससाठी होता. पुढे सरकारची दडपशाही व उपासमार या दुहेरी संकटांमुळे कामगारांनी संप मागे घेतला. कम्युनिस्टांनी कामगार संघटना चालविण्याची व संप हाताळण्याची पध्दत ना.म.जोशींसारख्या नेमस्त नेत्यांना मान्य नव्हती. त्यामुळे १९२७ साली कामगार चळवळीत फूट पडली. मुंबईत त्याच वर्षी सुधारक व साम्यवादी असे दोन गट कामगारात निर्माण होऊन वेगवेगळ्या 'गिरणी कामगार संघा'ची स्थापना झाली. १९२९ साली 'अखिल भारतीय ट्रेड युनियन' च्या नागपूर अधिवेशनात कामगार संघटनेत देशपातळीवर फूट पडली. कम्युनिस्टांनी लहानमोठ्या कामगार संघटनांत असेच संघर्ष निर्माण करुन फूट पाडली. कामगारांचे सर्व देशभर संप घडवून आणले. त्यामुळे सरकारने कम्युनिस्टांवर बंदी घातली. अनेक कम्युनिस्टांची धरपकड केली. तात्पर्य, कामगार संघटना ताब्यात घेण्याच्या कम्युनिस्टांच्या कृतीमुळे कामगार चळवळीची मोठी हानी झाली.

### ९.४.३.स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

### दिर्घोत्तरी प्रश्न

(१) महाराष्ट्रातील शेतकरी चळवळीचा थोडक्यात आढावा घ्या.

(२) महाराष्ट्रातील कामगार चळवळीचा उदय व विकास थोडक्यात सांगा.

### लघुत्तरी प्रश्न

(१) सन १८७५ च्या महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या उठावाची कारणमीमांसा करुन त्याची व्याप्ती सांगा.

(२) मुळशी सत्याग्रह टीप लिहा.

(३) महाराष्ट्रातील काँग्रेसच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळीची माहिती द्या.

(४) कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील शेतकरी चळवळ यावर टीप लिहा.

(५) कामगार संघटनांच्या स्थापनेची पार्श्वभूमी सांगा.

(६) नारायण मेघजी लोखंडे यांचे कामगार चळवळीतील कार्य सांगा.

(७) सन १८९१ व १९११ च्या फॅक्टरी ॲक्टमधील तरतुदींची चर्चा करा.

(८) सन १९२२ च्या फॅक्टरी ॲक्टबद्दल माहिती द्या.

(९) कामगार चळवळीतील फूट यावर टीप लिहा.

**वस्तुनिष्ठ प्रश्न :**

(१) सन १८७५ चा महाराष्ट्रातील शेतक-यांचा उठाव कोणत्या नावाने ओळखला जातो?

(२) सन १८७५ च्या शेतकरी उठावाची सुरुवात महाराष्ट्रात सर्वप्रथम कोठे झाली?

(३) शेतक-यांना सावकारांच्या कर्जवसुलीच्या त्रासापासून संरक्षण देण्यासाठी ब्रिटिश सरकारने पास केलेला पहिला कायदा कोणता?

(४) मुळशी सत्याग्रह का करण्यात आला?

(५) मुळशी सत्याग्रहाचे नतृत्व कोणी केले?

(६) सन १९३६ च्या फैजपूर काँग्रेसचे शेतक-यांच्या दृष्टीने महत्त्व काय?

(७) महाराष्ट्रात शेतकरी चळवळ चालविण्याचा कोणत्या कम्युनिस्ट नेत्यांनी प्रयत्न केला?

(८) खोती कायदा काँग्रेसला लवकर का करता आला नाही?

(९) 'महाराष्ट्र प्रांतिक किसान सभेचे पहिले अधिवेशन कोठे भरविण्यात आले?

(१०) महाराष्ट्रातील आदिवासी शेतक-यांची संघटना बांधण्याचा कोणी प्रयत्न केला?

(११) भारतातील पहिली कामगार संघटना महाराष्ट्रात कोणी स्थापन केली? तिचे नाव काय?

(१२) कामगार चळवळीचे आद्य जनक कोण?

(१३) सन १८८१ च्या फॅक्टरी ॲक्टमधील महत्त्वाच्या दोन तरतुदी सांगा?

(१४) कामगारांनी केलेला पहिला राजकीय संप कोणता व तो का करण्यात आला?

(१५) 'कामगार हितवर्धक' या संस्थेचे संस्थापक कोण?

(१६) 'सोशल सर्व्हिस लीग' ही संस्था कोणी स्थापन केली व तिच्या स्थापनेला उद्देश कोणता होती?

(१७) कामगार चळवळीतील राजकीय पक्षांच्या प्रवेशाचे कोणते परिणाम झाले?

(१८) कामगार चळवळीत फूट का पडली ? कामगार चळवळीत कोणते दोन गट निर्माण झाले?

## ९.४.४.सारांश

शेतक-यांचा कर्जबाजारीपणा, दुष्काळ, अतिवृष्टी, त्याच्याभोवतीचे सावकारी पाश, पतपुरवठ्याचा अभाव, जमीनदारी पध्दती व ब्रिटिशांनी वाढविलेला जबरदस्त शेतसारा यामुळे महाराष्ट्रातील शेतकरी अगदी

पिचून गेला होता. याविरुध्द शेतकऱ्यांनी अनेक वेळा उठाव केले खरे; परंतु शेतकऱ्यांना संघटित करुन त्यांची संघटना बांधून संघटितपणे त्यांच्या समस्या सोडविण्याचा फारसा प्रयत्न झाला नाही. शेतकऱ्यांना नेतृत्वही लाभले नाही. काँग्रेस नेत्यांनी सरकारी पातळीवर शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचा २० शतकात प्रयत्न केला तरी त्या प्रयत्नांना स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक मर्यादा पडल्या होत्या. कम्युनिस्टांनी आदिवासींना संघटित करुन चळवळ चालविण्याचा प्रयत्न केला परंतु त्यांचे प्रयत्न फारच अपुरे होते. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र शेतकऱ्यांच्या समस्यांकडे सरकारने बरेच लक्ष पुरवून शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केल्याचे दिसते.

१९२९ साली मि.व्हिटले यांच्या अध्यक्षतेखाली भारतमंत्र्याने लेबर कमिशन नेमले. या कमिशनच्या शिफारशीवर आधारित १९३४ सालचा फॅक्टरी ॲक्ट पास झाला. त्यातील तरतुदीनुसार कामगारांना बऱ्यापैकी सवलती मिळाल्या. त्यांच्या कामाचे तास कमी झाले. सन १९४७ मध्ये भारत स्वतंत्र झाल्यावर सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली मुंबई येथे 'इंडियन नॅशनल ट्रेड युनियन काँग्रेस' ची स्थापना झाली. १९४८ साली 'हिंद मजदूर पंचायत' ची स्थापना झाली. या संघटनेमध्ये एम्.एन्.रॉय यांची 'इंडियन फेडरेशन लेबर' ही संघटना विलीन झाली व या संघटनेचे नाव 'हिंद मजदूर सभा' असे ठेवण्यात आले. सन १९४८ मध्ये नवा फॅक्टरी ॲक्ट पास करण्यात आला. त्याच वर्षी किमान वेतन कायदा पास झाला आणि कामगारांच्या जवळजवळ सर्व मागण्या पूर्ण झाल्या.

## ९.४.५. पारिभाषीक शब्द शब्दार्थ

**कामगार चळवळी :** उद्योगधंद्यांत काम करणाऱ्या विविध कुशल-अकुशल कामगारांच्या जीवनाचे अंतर्गत व बाह्य प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करणारी चळवळ.

**ऑल इंडिया युनियन :** अखिल भारतीय स्तरावर व्यापार क्षेत्रातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९२० मध्ये स्थापन केलेली संघटना.

**फॅक्टरी ॲक्ट :** औद्योगिक विकास रोखण्यासाठी, कामगारांच्या प्रश्नासाठी हा कायदा १८९२ मध्ये मान्य केला.

**बॉम्बे पोस्टल युनियन :** पोस्ट खात्यातील कामगारांचे प्रश्न सोडविण्यासाठी १९०७ मध्ये झालेली संघटना.

**ऑल इंडिया ट्रेड युनियन कार्पोरेशन :** अखिल भारतीय कामगार चळवळीला गती देण्यासाठी १९२० मध्ये स्थापन झालेली संघटना.

**ऑल इंडिया ट्रेड युनियन काँग्रेस :** कम्युनिस्ट व कम्युनिस्टेतर यांच्या संघर्षामुळे ही डाव्या पक्षाची संघटना बनली.

**नॅशनल ट्रेड फेडरेशन :** कम्युनिस्टेतरांची कामगार संघटना.

**शेतकरी कामगार पक्ष (शेकाप) :** १९४८ मध्ये महाराष्ट्रात हा राजकीय पक्ष स्थापन झाला.

## ९.४.६. संदर्भ ग्रंथ


1. Neil Charlesworth, Peasants and Imperial Rule, p. 105

Ibid : p. 83

2. Ravindra Kumar, Western India in the Century, p. 169

3. Catnatch Ian, Indian Economy and Social History Review, Vol. 3, March 1966

४. भुस्कुटे वि.म., मुळशी सत्याग्रह, पृ. १३, १९६८

५. तळवलकर गोविंद, सत्तांतर : १९४७, खंड ३, पृ. ४४-४५

६. परुळेकर गोदावरी, जेव्हा माणूस जागा होतो, पृ ६७, १४५

७. कदम मनोहर, कामगार चळवळीचे आद्य प्रवर्तक : नारायण मेघजी लोखंडे यांचे चरित्र.

८. डांगे एस.ए., ऑल इंडिया ट्रेड युनियन कॉंग्रेस, प्रस्तावना, पृ. ५५, ६८-७०

९. तळवलकर गोविंद, सत्तांतर : १९४७, खंड ३, पृ. ६५-६६


## ९.४.७. क्षेत्रीय कार्य

(१) तुमच्या परिसरातील उद्योग-व्यवसायांची नोंद करा.

(२) परिसरातील एखाद्या साखर कारखान्यातील दहा कामगारांच्या मुलाखती घेऊन प्रश्नांची यादी करा.

# घटक १०.सांस्कृतिक वारसा

**१०:२:१ शिक्षणाचा विस्तार**

**१०:२:२ मराठी साहित्य**

**१०:२:३ रंगभूमी अणि चित्रपट उद्योग**

## १०.१.०. घटकाची उद्दिष्टे (Objectives)

**१.** शिक्षणाची द्वारे समाजातील सर्व जातींच्या लोकांना खुली झाली

**२.** जातवार वसतिगृहे ही त्या काळाची गरज होती.

**३.**समाजातील दुर्बल घटकांना सवलती देणे.

**४.**शाहू महाराजांचे धोरण सामाजिक भेदभावाची करत नव्हते.

**५.** सामाजिक भेदभाव दूर करण्यासाठी उचलले गेलेले पाऊल होते.

**६.**शिक्षणाची गंगा महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील गरीब शेतकऱ्यांच्या पद्दलित जनतेच्या झोपडीपर्यंत नेऊन पोहोचविली.

**८.**घरोघरी ज्ञानदीप प्रज्वलित करुन बहुजनांच्या जीवनात त्यांनी प्रकाश निर्माण केला.

## १०.१.१. प्रस्तावनाः

१९ व्या शतकात बहुजन समाजाची आर्थिक स्थिती इतकी हलाखीची होती. म. फुले यांच्यासारखा एखादा ठळक अपवाद वगळला तर बहुजन समाजाच्या शिक्षणाची फारशी काळजीही कुणी केल्याचे दिसत नाही. स्वातंत्र्यपूर्व काळात सरकारी पातळीवर आणि खाजगी पातळीवर बहुजन समाजाच्या शिक्षणाचे प्रयोग सुरु झाले आणि शिक्षणाचा सामाजिक विस्तार होत गेला.

## १०.१.२.शिक्षणाचा विस्तार

### १०.१.२.१. स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळातील शिक्षणाची प्रगती व प्रसार :

### १०.१.२.१.सरकारी पातळीवर झालेले प्रयत्नः

१९२०-२१ साली मॉंटफर्ड सुधारणा कायद्यानुसार मुंबई इलाख्याचे पहिले शिक्षणमंत्री म्हणून फर्ग्युसन कॉलेजचे प्राचार्य रँगलर परांजपे यांची नियुक्ती झाली. सन १९२३ मध्ये प्राथमिक शिक्षणाचा कायदा

केला. तसेच विश्वेश्वरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून तांत्रिक शिक्षणाचा विकास केला. सन १९३५ च्या कायद्याने प्रांतांना मर्यादित स्वरुपात स्वायत्तता मिळाली. मुंबई राज्यात काँग्रेस मंत्रिमंडळ स्थापन होऊन बा. गं. खेर हे मुख्यमंत्री झाले व तेच शिक्षणमंत्रीही झाले. त्यांनी शिक्षणाची पुनर्रचना करण्यास सुरुवात केली. शिक्षणाच्या विविध क्षेत्रांत करावयाच्या सुधारणाबाबत सरकारला सल्ला देण्याकरिता त्यांनी समित्या नेमल्या. तसेच सन १९२३ च्या प्राथमिक शिक्षणाच्या कायद्यातील जे दोष अनुभवाने प्रत्ययास आले होते ते लक्षात घेऊन त्यात १९३८ साली सुधारणा केल्या.

### १०.१.२.२.शिक्षण प्रसाराच्या दृष्टिने खेर सरकारने पुढील योजना राबविल्याः

वर्धा शिक्षण योजनेवर आधारलेली मूलोद्योग पध्दती प्राथमिक शाळात सुरु करण्यात आली. तांत्रिक शिक्षणाची सोय करण्याच्या दृष्टिने प्रांतातील सात सरकारी माध्यमिक शाळांचे रुपांतर तांत्रिक शिक्षण विद्यालयात करुन त्यात शेतकी, व्यापार व सुतारी वगैरेंचे प्रत्यक्ष तांत्रिक शिक्षण देण्याची सोय करण्यात आली. या विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरिता मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेप्रमाणेच एक सरकारी शालांत परीक्षा (एस.एल.सी.परीक्षा) सुरु करण्यात आली.

### १०.१.२.३.प्राथमिक शिक्षणः

भारताच्या घटनेतील तरतुदींप्रमाणे सन १९६० पर्यंत सर्व मुंबई राज्यात ६ ते ११ या वयाच्या मुलामुलींकरिता प्राथमिक शिक्षण मोफत, सार्वत्रिक आणि सक्तीचे करावयाचे अशा धोरणाने या कायद्याची अंमलबजावणी करुन शिक्षणाचा प्रसार करण्याचे धोरण मुंबई सरकारने आखले. परंतु तरीही १९६० पर्यंत सार्वत्रिक प्राथमिक शिक्षणाचे अंतिम उष्टि गाठणे सरकारला शक्य झाले नाही.

### १०.१.२.४..माध्यमिक शिक्षणः

१९२० सालापर्यंत प्रत्येक जिल्ह्याला एकेक सरकारी माध्यमिक शाळा असत. १९३७ सालापासून मुलांकरिता असणारी सरकारी हायस्कूले पूर्णपणे बंद करुन त्यांचे रुपांतर व्यावसायिक शाळेत अथवा मूलींच्या हायस्कुलात किंवा प्राथमिक शिक्षकांच्या अध्यापन विद्यालयात करण्यात आले. माध्यमिक शिक्षणावर सरकारी नियंत्रण ठेवण्यात आले.माध्यमिक शाळांकरिता शिक्षक तयार करण्याकरिता पुणे, मुंबई, सातारा, सोलापूर, कोल्हापूर, नागपूर, औरंगाबाद व अमरावती इत्यादी ठिकाणी सेकंडरी ट्रेनिंग कॉलेजेस स्थापन करण्यात आली. ही सर्व कॉलेजेस विद्यापीठांना जोडण्यात आली.

### १०.१.२.१.उच्च शिक्षणः

मुंबई राज्यातील पहिले विद्यापीठ मुंबई येथे सन १८५७ मध्ये स्थापन झाले. १९४७ सालापासून प्रादेशिक विद्यापीठे स्थापन करण्याचे धोरणानुसार पहिले प्रादेशिक विद्यापीठ पुणे येथे १९४८ साली स्थापन झाले. मुंबई सोडून पूर्वीच्या मुंबई राज्यातील १२ मराठी जिल्हे या विद्यापीठास जोडण्यात आले. मराठवाड्यात औरंगाबाद येथे जून १९५८ पासून नवीन विद्यापीठ स्थापन झाले. शिवाय नागपूर येथे स्वातंत्र्यपूर्व काळापासून विद्यापीठ अस्तित्वात होते. केंद्र सरकारने 'युनिव्हर्सिटी ग्रँट्स कमिशन' (यु.जी.सी.) या समितीची स्थापना केली

### १०.१.२.१.तांत्रिक शिक्षणः

तांत्रिक शिक्षणात स्थापत्य, शेतकी, वैद्यकीय व व्यापारी या शिक्षणक्षेत्रांचा अंतर्भाव होतो. माध्यमिक शाळांतही तांत्रिक शिक्षणाची सोय केली.रेडिओशास्त्र, शिवणकला, छायाचित्र शिक्षण, विणकाम, टंकलेखन व लघुलिपीशास्त्र इत्यादी व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या खाजगी शाळांना सरकारने बरेच प्रोत्साहन दिले.

### १०.१.२.१.शिक्षणाचा सामाजिक विस्तार व बहुजनांच्या शिक्षणाचे प्रयोगः

२० च्या शतकाच्या आरंभी महाराष्ट्रातील शिक्षणाची अवस्था किती बिकट होती आणि समाजात शिक्षणाचा प्रसार करणे किती कठिण बाब होती.विशेषतः ग्रामीण भागातील बहुजन समाजात शिक्षणाचा विचार रुजविणे आणि मुलींना शिक्षण देण्याची मानसिकता पालकात निर्माण करणे हे फार मोठे आव्हान होते. तथापि बहुजन समाजाच्या हितासाठी हे आव्हान स्विकारण्यासाठी काही जण सिध्द झाले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच महाराष्ट्रात २० व्या शतकात बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार होऊन शिक्षणाचा सामाजिक विस्तार झाला. महाराष्ट्रातील ज्या समाजसुधारकांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले.

### १०.१.२.१.राजर्षी शाहू महाराजांचे कार्य (१८७४-१९२२) :

म. ज्योतिबा फुले यांच्यानंतर त्यांचे अपूर्ण राहिलेले कार्य तितक्याच समर्थपणे पुढे चालविण्याचा मान राजर्षी शाहू महाराजांकडे जातो. परंतु त्यांच्या कर्तृत्वाने संस्थानच्या मर्यादा ओलांडल्या. ते खऱ्या अर्थाने महाराष्ट्रातील बहुजन समाजाचे नेते बनले.

### १०.१.२.१..सक्तीचे मोफत शिक्षण :

सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाच्या योजनेची कार्यवाही १९१८ पासून सुरु झाली. लहान वयातील मुलामुलींना शाळेत पाठविण्यासंबंधी मुलांचे पालक तसेच गावकामगार यांना सक्त आदेश देण्यात आले. या योजनेतील **पहिली प्राथमिक शाळा चिखली** येथे काढण्यात आली. या योजनेसाठी शाहू महाराजांनी **पाऊण लाख** रुपये खर्च केले. १९२२ पर्यंत हा दरवर्षीचा खर्च जवळजवळ तीन लाखांपर्यंत गेला. सन १९१७-१८ मध्ये करवीर संस्थानात प्राथमिक शाळांची संख्या फक्त २७ होती. सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणासंबंधीचा आपला दृष्टिकोन विशद करताना शाहू महाराजांनी असे म्हटले होते की, "खालच्या वर्गाच्या लोकांच्या बुध्दीवर, ज्ञानावर जे जुलमी 'जू' लादले गेले आहे ते झुगारुन देण्याची शक्ती समाजाच्या अंगी येण्यास, सक्तीच्या मोफत प्राथमिक शिक्षणाची फार जरुरी आहे. यामुळे पुढील पिढी तरी लिहिणारी - वाचणारी होईल अशी मला खात्री आहे."

### १०.१.२.१.दुय्यम व उच्च शिक्षणः

प्राथमिक शिक्षण बरोबरच दुय्यम व उच्च शिक्षणाची बैठक तयार करणे हा एक उद्देश शाहू महाराजांचा होता. इंग्रजी शिक्षणाला 'वाघिणीचे दूध' समजले जात असे. तेव्हा ते 'शेळीच्या दुधासारखे' सर्वांना सहज उपलब्ध होईल अशी व्यवस्था केली. शाहू महाराजांनी सक्तीच्या व मोफत प्राथमिक शिक्षणाची अंमलबजावणी सुरु केली होती. कोल्हापुरातील **राजाराम हायस्कूल आणि राजाराम महाविद्यालया**कडेही दुर्लक्ष केले नव्हते. परंतु दिवसेंदिवस राजाराम महाविद्यालयातील विद्यार्थी संख्या कमी होऊ लागल्याने खर्च वाढू लागला. तेव्हा शाहू महाराजांनी डॉ. कुर्तकोटी यांच्या विनंतीवरुन एक समिती नेमून बंद पडण्याच्या मार्गावरील राजाराम महाविद्यालयाला सावरुन धरले. पुण्यामध्ये गुरुवर्य बाबुराव जगताप यांनी अल्प प्रमाणात शिक्षणाचे जे कार्य केले होते ते संस्थेच्या रुपाने चिरंजीव राहावे म्हणून शाहू महाराजांनी श्री शिवाजी मराठा सोसायटीची स्थापना करुन **'श्री शिवाजी मराठा हायस्कूल'** सुरु करण्यात सिंहाचा वाटा उचलला.

### १०.१.२.१.वसतिगृहांची स्थापना :

सन १८९४ मध्ये शाहू महाराजांनी जातीजमातींच्या विद्यार्थ्यांसाठी कोल्हापुरात वसतिगृह सुरु केले. महाराजांनी प्रत्येक जातीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र वसतिगृहे स्थापन करण्याचा निर्णय घेतला. महाराजांनी सन १९०१ मध्ये मराठा जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु केले. त्यास **'व्हिक्टोरिया मराठा बोर्डिंग हाऊस'** असे नाव देण्यात आले. इतर जातींच्या विद्यार्थ्यांनाही वसतिगृहात प्रवेश दिला जात होता. जैनधर्मीय विद्यार्थ्यांसाठी **'दिगंबर जैन बोर्डिंग'** सुरु करण्यात आले. लिंगायत, सारस्वत, पांचाल, नामदेव शिंपी, वैश्य,ढोर-चांभार, नाभिक इत्यादी जातींच्या विद्यार्थ्यांकरिता स्वतंत्र वसतिगृहे स्थापन झाली.

कोल्हापूराबाहेरील पुणे, नाशिक, नागपूर व अहमदनगर इत्यादी शहरांतील वसतिगृहे व शैक्षणिक संस्था यांनाही शाहू महाराजांनी मदत केली.

### १०.१.२.१..विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्त्या :

छत्रपती शाहू महाराजांचे जातवार वसतिगृहे स्थापन करण्याचे आणि बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती देण्याचे धोरण त्या काळातील काही लोकांच्या टिकेचा विषय झाले होते. या धोरणामुळे जातीयवादाला चालना मिळून सामाजिक भेदभाव वाढीस लागेल असा या टिकाकारांचा आक्षेप होता. शाहू महाराजांना त्यांच्या मनातील ही चुकीची समजूत पुसून टाकावयाची होती. प्रत्येक जातीचे मतपरिवर्तन करुन त्यांना शिक्षणाकडे वळविणे हे काम त्या कठीण काळात महाराजांना करावयाचे होते. म्हणूनच त्यांनी सर्व जाती-जमातींची वसतिगृहे कोल्हापुरात सुरु केली. जातिव्यवस्थेच्या निर्बंधाचे काटेकोरपणे पालन करण्याबाबत सर्वच जातीचे लोक आग्रही असत. त्या काळातील लोकांची ही मानसिकता लक्षात घेता सर्व जातिधर्मांच्या विद्यार्थ्यांसाठी एकच वसतिगृह स्थापन केले असते तर त्यास लोकांचा पुरेसा प्रतिसाद मिळाला नसता.

### १०.१.२.१..कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्याची सुरुवात (१८८७-१९५९) :

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन १९१० च्या सुमारास सांगली जिल्ह्यातील दुधगाव येथून आपल्या कार्याची सुरुवात केली.दुधगाव येथील स्थानिक लोकांच्या मदतीने **‘दुधगाव विद्याप्रसारक मंडळ’** या नावाची शिक्षण संस्था स्थापन करुन तिच्यामार्फत **‘दुधगाव विद्यार्थी आश्रम’** हे वसतिगृह सुरु केले. या वसतिगृहात सर्व जातीजमातींचे विद्यार्थी एकत्र राहत असत. या वसतिगृहाच्या धर्तीवर भाऊरावांनी पुढे **नेर्ले** व **काले** याठिकाणी वसतिगृहे सुरु केली.

#### (अ)रयत शिक्षण संस्थेची स्थापनः

सन १९१९ मध्ये सत्यशोधक समाजाच्या जिल्हा शाखेची एक परिषद कराड तालुक्यातील काले या गावी आयोजित करण्यात आली होती. त्यानुसार भाऊरावांनी **२५ सप्टेंबर १९१९ रोजी रयत शिक्षण संस्थेच्या स्थापनेची घोषणा** काले येथेच केली.संस्थेचे मध्यवर्ती कार्यालयही सातारा येथेच ठेवण्यातच आले.सन १९२४ मध्ये कर्मवीरांनी रयत शिक्षण संस्थेच्या वतीने सातारा येथे **‘छत्रपती शाहू बोर्डिंग हाऊस’** हे वसतिगृह सुरु केले. सन १९३५ मध्ये रयत शिक्षण संस्थेच्या वतीने प्राथमिक शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी सातारा **‘सिल्व्हर ज्युबिली ट्रेनिंग कॉलेज’** सुरु केले. रयत शिक्षण संस्थेची पहिली माध्यमिक

शाळा सातारा येथे 'महाराजा सयाजीराव हायस्कूल' या नावाने सन १९४० मध्ये सुरु करण्यात आली होती. संस्थेने उच्च शिक्षणाकडेही लक्ष दिले. सन १९४७ मध्ये संस्थेने सातारा येथे 'छत्रपती शिवाजी कॉलेज' हे पहिले कॉलेज सुरु केले.

**(ब) स्वावलंबी शिक्षण :**

आपल्या विद्यार्थ्याने ताठ मानेने व स्वाभिमानाने जगता आले पाहिजे 'स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद' (Education through selfhelp is our motto) हे रयत शिक्षण संस्थेचे घोषवाक्य बनले. विद्यार्थ्यांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे यासाठी कर्मवीरांनी 'कमवा व शिका' योजना सुरु केली. ती कामे करुन विद्यार्थ्यांनी आपल्या शिक्षणाचा खर्च भागवावा अशी व्यवस्था या योजनेत करण्यात आली होती.

**(क) श्रमाची प्रतिष्ठा :**

कर्मवीरांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानात श्रमाच्या प्रतिष्ठेला महत्त्वाचे स्थान होते. विद्यार्थ्यांनी कोणत्याही प्रकारचे श्रम करण्यात कमीपणा मानू नये अशी त्यांची शिकवण होती.

**(ड) सामाजिक समता :**

रयत शिक्षण संस्थेच्या वसतिगृहात विविध जातिधर्मांचे विद्यार्थी एकत्र राहत असत, स्वतःच्या हातांनी सामुदायिकरित्या स्वयंपाक करीत असत आणि एकत्रच जेवण घेत असत. अशा प्रकारच्या सहजीवनातून समतेची जी शिकवण विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवली जात होती.

### १०.१.२.१.महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे कार्य (१८५८-१९६२) :

भारतीय समाजाने स्त्रियांना बंधनाच्या विळख्यात जखडून टाकले होते. स्त्रियांच्या शिक्षणाची सोय व्हावी यासाठी महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी अविश्रांत श्रम घेतले.

**अनाथ बालिकाश्रमः**

महर्षी कर्वे यांनी १४ जून १८९६ रोजी पुण्यात 'अनाथ बालिकाश्रम मंडळी' नावाची संस्था स्थापन केली. पुढे १९०० मध्ये ही संस्था पुण्याजवळ असलेल्या हिंगणे या गावी हलविण्यात आली. हिंदूंच्या ज्या जातीत विधवा विवाह रुढ नाही, त्या जातीतील अल्पवयीन विधवांना शिक्षण देऊन त्यांची मने सुशिक्षित करुन त्यांना स्वावलंबी होता येईल असे साधन त्यांना हस्तगत करुन देणे व आपले जिवित उपयोगी असून ते

कोणत्या तरी कार्याला लावता येईल असा विश्वास त्यांच्यामध्ये उत्पन्न करणे आश्रमाचे उद्देश आहेत व ते चांगल्या रीतीने तडीस जात आहेत." सन १९४६ मध्ये अनाथ बालिकाश्रमाचे **'हिंगणे-स्त्री शिक्षण संस्था'** असे नामांतर करण्यात आले.

- **महिला विद्यालयाची स्थापना :**

स्त्रियांना शिक्षण देण्याच्या उद्देशाने कर्व्यांनी ४ मार्च १९०७ रोजी हिंगणे येथे 'महिला विद्यालयाची' स्थापना केली. या विद्यालयात गृहजीवनशास्त्र, शिशुसंगोपनशास्त्र यांसारखे विषय शिकविण्याची सोय करण्यात आली होती.

- **महिला विद्यापीठाची स्थापना :**

मुंबईतील धनिक विठ्ठलदास ठाकरसी यांनी कर्व्यांच्या महिला विद्यापीठाला मोठी देणगी दिली. त्यामधूनच २० जून १९१६ रोजी स्त्रियांसाठी महिला विद्यापीठ सुरु केले. या विद्यापीठास विठ्ठलदास यांच्या मातोश्री श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एस.एन.डी.टी.) यांचे नाव देण्यात आले. डॉ. भांडारकर हे या विद्यापीठाचे पहिले कुलगुरु बनले. या विद्यापीठास संलग्न असे महाविद्यालयही सुरु करण्यात आले. हळूहळू पुणे, मुंबई, सातारा, बेळगाव, वाई, सांगली व सोलापूर येथील मुलींच्या शाळा या महिला विद्यापीठास जोडण्यात आल्या. अंकगणित, प्रपंचशास्त्र व आरोग्यशास्त्र हे आवश्यक विषय या अभ्यासक्रमात आहेत.बागबागीचा बनविणे, शास्त्रीय पध्दतीने कपडे धुणे, स्वयंपाक करणे व खोल्यांची व्यवस्था राखणे इ.अभ्यासक्रमही सुरु करण्यात आले होते.

## १०.१.२.१.. डॉ. आंबेडकरांचे योगदान :

अस्पृश्य समाजात शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून डॉ. आंबेडकरांनी सन १९४६ मध्ये **'पीपल्स एज्युकेशन सोसायटी** ' या संस्थेची स्थापना केली. तिच्या वतीने मुंबईत 'सिध्दार्थ कॉलेज' आणि औरंगाबादमध्ये 'मिलींद कॉलेज' ही महाविद्यालये सुरु करण्यात आली. सन १९२३ च्या कायद्यात दलित विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे करण्याची व शिष्यवृत्त्या देण्याची तरतूद करण्यात आली होती. डॉ. आंबेडकरांनी या तरतुदींचा फायदा घेऊन शाहू महाराजांचा कित्ता गिरविला. डॉ. आंबेडकरांनी जिवाप्पा ऐदाळे यांच्या मदतीने ४ जानेवारी १९२५ रोजी सोलापूरला सर्वप्रथम १५ विद्यार्थ्यांचे मोफत वसतिगृह सुरु केले. सन १९२८ पासून बेळगावात सुरु केलेल्या वसतिगृहाच्या कारभाराबाबत तक्रारी आल्यामुळे ते बंद करुन डॉ. आंबेडकरांनी

धारवाडला वसतिगृह चालू केले व त्याची जबाबदारी बळवंत हणमंत वराळे यांच्यावर सोपविली. नाशिकमध्ये १९२० सालापासून सुरु झालेल्या वसतिगृहाची जबाबदारी भाऊराव कृष्णराव गायकवाड पहात होते.[९]

### १०.१.२.१.. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कार्य (१८९८-१९६५):

म.फुले, शाहू महाराज यांचा शैक्षणिक वारसा डॉ. पंजाबराव देशमुख यांनी विदर्भात चालविला. सन १९२६ मध्ये त्यांनी अमरावती येथे '**श्रध्दानंद छात्रालय**' सुरु केले व त्याठिकाणी सर्व जाती-जमातींच्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केली. सन १९३२ मध्ये डॉ. पंजाबराव देशमुखांनी अमरावती येथे '**श्री शिवाजी शिक्षण संस्थे**'ची स्थापना केली. विदर्भात अनेक विद्यालये, महाविद्यालये आणि वसतिगृहे सुरु करण्यात आली. बहुजन समाजातील मुलांना शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध झाली.

### १०.१.२.१.. भाऊसाहेब हिरे यांचे कार्य :

नाशिक जिल्ह्याचे लोकनेते भाऊसाहेब हिरे यांनी 'अदिवासी सेवा समीती'(1948) व 'महात्मा गांधी विद्यामंदिर'(1952) या शैक्षणिक संस्था उभ्या केल्या . महाराष्ट्रात '**साक्षरता परिषदे**'ची स्थापना करुन व अधिवेशने भरवून त्यांनी मोठी जनजागृती केली. सन १९४९ साली या साक्षरता परिषदेचे अधिवेशन नाशिक येथे भरवून भाऊसाहेबांनी साक्षरतेचा संदेश महाराष्ट्रातील खेड्यापाड्यापर्यंत पोहोचविला. जवाहर संस्थान, धरमपूर, ठाणे, डांग, औरंगाबाद, नाशिक, धुळे व नगर इत्यादी विभागांत सुमारे १५०० प्राथमिक शाळा व आश्रमशालाळा सुरु केल्या. मालेगाव येथे प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी ट्रेनिंग कॉलेज व विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु केले.

### <u>१०.१.३. स्वयं अध्ययनासासाठी प्रश्न</u> (अभ्यासासाठी प्रश्न):

### १०.३.१.दीर्घोत्तरी प्रश्न :

१. २० व्या शतकात स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती व प्रसारासाठी सरकारी पातळीवर झालेल्या प्रयत्नांचा सन १९६० पर्यंतचा आढावा घ्या.

२. २० व्या शतकात बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी झालेल्या प्रयत्नांचा सन १९६० पर्यंतचा मागोवा घ्या.

### **१०.३.२.लघुत्तरी प्रश्न :**

१. शाहू महाराजांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य सांगा.
२. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान स्पष्ट करा.
३. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे स्त्रीशिक्षणविषयक कार्य सांगा.
४. डॉ. आंबेडकरांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान सांगा.
५. डॉ. पंजाबराव देशमुख व भाऊसाहेब हिरे यांचे शैक्षणिक कार्य सांगा.

### **१०.३.३.वस्तुनिष्ठ प्रश्न :**

१. स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात पहिले प्रादेशिक विद्यापीठ कोठे व केव्हा स्थापन झाले?
२. स्वातंत्र्योत्तर काळात सर्वप्रथम आपल्या संस्थानात सक्तीची व मोफत प्राथमिक शिक्षणाची योजना राबविणारा राज्यकर्ता कोण?
३. रयत शिक्षण संस्थेची स्थापना कोणी केली?
४. कर्मवीर भाऊराव पाटील यांची 'कमवा व शिका' या योजनेची संकल्पना स्पष्ट करा?
५. महाराष्ट्रात पहिले महिला विद्यापीठ स्थापन करण्याचा मान कोणाकडे जातो?
६. अमरावती येथे 'श्रध्दानंद छात्रालय' कोणी स्थापन केले?
७. 'पीपल्स एज्युकेशन' या शैक्षणिक संस्थेचे संस्थापक कोण?
८. अनाथ बालिकाश्रमाची स्थापना कोणी व कोठे केली?

### **१०.१.४. सारांश**

जातवार वसतिगृहे ही त्या काळाची गरज होती. समाजातील दुर्बल घटकांना सवलती देण्याचे शाहू महाराजांचे धोरणही सामाजिक भेदभावाची कृती नव्हती, उलट सामाजिक भेदभाव दूर करण्यासाठी उचलले गेलेले ते पाऊलक होते.कर्मवीर भाऊराव पाटील हे आधुनिक भगीरथ होते. त्यांनी शिक्षणाची गंगा महाराष्ट्राच्या खेड्यापाड्यातील गरीब शेतकऱ्यांच्या व पददलित जनतेच्या झोपडीपर्यंत नेऊन पोहोचविली. घरोघरी ज्ञानदीप प्रज्वलित करुन बहुजनांच्या जीवनात त्यांनी प्रकाश निर्माण केला.

## **९.१.५. पारिभाषीक शब्द शब्दार्थ**

१. **डांग** :- गुजरात मधील आदिवासी भाग.
२. **एस.एन.डी.टी.** **:-** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी

## १०.१.६.संदर्भ ग्रंथ

१. धनंजय कीर, राजर्षी शाहू महाराजांचे समग्र वाङ्मय,

२. धनंजय कीर, राजर्षी शाहू महाराजांचे समग्र वाङ्मय,

3. द.ता. भोसले ,कर्मवीर भाऊराव पाटील ,मॅकमिलन,२००३

4. द.ता. भोसले ,कर्मवीर भाऊराव पाटील ,मॅकमिलन,२००३

5. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे कार्य

६. वाय. डी. फडके, सोशल रिफॉर्मर्स ऑफ महाराष्ट्र, पुणे, १९७५,

७. य. दि. फडके, विसाव्या शतकातील महाराष्ट्र : १९०१-१९१४ : खंड पहिला, पुणे, १९८९,

८. य. दि. फडके, बी. आर. आंबेडकरी चळवळ,१९९०,

९. य. दि. फडके, बी. आर. आंबेडकरी चळवळ,श्रीविद्या प्रकाशनः १९९०.

१०. बाबूराव पवार ,सोनहिरा ,नाशिक, १९९९.

११. बाबूराव पवार ,सोनहिरा ,नाशिक, १९९९.

## १०.१.७. क्षेत्रीय कार्य

१. २१ व्या शतकातील शिक्षण प्रगतीचा आढावा घ्या. आणि त्यांच्या शिक्षण संस्थेची समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपायोजना सुचवा.

२. तुमच्या परिसरातील शिक्षण संस्थेची नोंद करा.

## १०.२.०. घटकाची उद्दिष्टे (Objectives)

**१.** मराठी भाषेतील लेखन व संशोधनात झालेली प्रगती स्पष्ट करता येईल.

**२.** व्यक्तीचे जीवन, तत्कालीन परिस्थिती व त्यांच्या अनुभवांना या वाङ्मय प्रकारातून स्पष्ट करता येईल

३. साहित्याअंतर्गत निबंधग्रंथ, वृत्तपत्रे, नियतकालिके, यांचा विचार येतो.

४. समीक्षा, आत्मचरित्रे व चरित्रे यांची साक्षेप स्वरुपात प्रगती स्पष्ट करता येईल..

## १०.२.१. प्रस्तावनाः

इतिहास पुरातत्त्व याप्रमाणेच मराठी भाषेतील लेखन व संशोधन प्रभावी झाले. ल. रा. पांगारकर यांनी ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, यांचे चरित्र व वाङ्मय संशोधन केले. प्राचीन मराठा वाङ्मयाचा इतिहास लिहिला. शं.श्री.देव यांनी 'समर्थ वाग्देवता मंदिर' स्थापन केले. समर्थ वाङ्मय संशोधन केले. य.खु.देशपांडे व डॉ. वि. भि. कोलते महानुभावी साहित्य संशोधन व लेखनात अग्रगण्य होते. वि.ल.भावेंनी महानुभावी गुप्त लिपींचा उलगडा केला. दुर्मिळ हस्तलिखित गोळा केली. महंतांकडील दुर्मिळ कागदपत्रे उजेडात आली. य. खु. देशपांडे यांनी स्वित्सर्लंडमध्ये जाऊन प्राच्य विद्या परिषदेत लेख वाचला (१९८८). सेतू माधवराव पगडी यांनी 'इतिहासाचा मागोवा', 'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम', 'शिवचरित्र', इत्यादी ग्रंथ लिहिले. 'काव्येतिहास संग्रह' हे मासिक का. ना. साने यांनी चालविले. त्यांनी शिवकालीन व पेशवेकालीन बखरी, चरित्रे यांचे प्रथम मराठीत संपादन केले व छापले. त्यांनी 'ऐतिहासिक पत्रे' आदी ग्रंथांचे संपादन केले. तात्यासाहेब केळकर यांनी 'मराठे व इंग्रज' ग्रंथ लिहिला. 'मराठेशाहीचे शतसांवत्सरिक श्राध्द' हा ग्रंथही त्यांनी लिहिला. द. बा. पारसनीस, डॉ. पु. ग. जोशी, चांदोरकर, पांडोबा पटवर्धन, इत्यादींनी संशोधन कार्य केले. प्रो. ओतूरकर यांचे इतिहासावरील लेखन प्रेरणादायी व दिशासूचक ठरले. द.वि.आपटे यांचे लेख 'द.वि.आपटे लेख संग्रह' या ग्रंथात उपलब्ध आहेत. त्यांनी 'चित्रमय जगत्' चे संपादन केले होते. तसेच 'शिवचरित्र प्रदिप', 'पत्रे', 'मराठी इतिहासाची साधने' यांसारखे ग्रंथ लिहून पुढील इतिहास संशोधक व लेखकांना दिशा दाखविली. समाजशास्त्रीय संशोधनपूर्ण लेखन व सामाजिक इतिहास म्हणून इंग्रज अधिकाऱ्यांचा 'कास्टम ॲण्ड ट्राइब्ज' तसेच विविध नगरे, गावे घेऊन ग्रंथ लिहिले. अत्रेंचा 'गावगाडा' चाफेकर ना. गो. चा 'आमचं गाव'. डॉ. धुर्ये यांचे समाजशास्त्रीय प्रश्नावरील ग्रंथलेखन महत्त्वाचे ग्रंथ होत. महाराष्ट्रीय शब्दकोश, मराठी विश्वकोश, संस्कृती कोश, समाजशास्त्रीय कोश, शास्त्रज्ञ कोश व महाराष्ट्र सारस्वत, मराठवाडा सारस्वत (भाग १) सारखे ग्रंथ मराठीचे उत्तम संदर्भ ग्रंथ होत.


**प्रा.संजय तुळशिराम शेलार** महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

## १०.२.३.मराठी साहित्य

### १०.२.३.१. (अ) ललित साहित्य

साहित्यासाठी 'ललित साहित्य'हा पर्यायी शब्द वापरला जातो.तसेच 'वाङ्मय', 'ललित वाङ्मये', 'वैचारिक साहित्य', 'शास्त्रीय साहित्य', 'व्यवहारोपयोगी साहित्य' हे मराठी पर्यायी शब्द वापरले जातात. संस्कृतमध्ये 'काव्य' शब्द येतो.

### १०.२.३.२.काव्य

मराठी काव्य दोन प्रकारचे आहे. एक जुने काव्य व दुसरे नवे काव्य. काव्य म्हणजे कविता. जुनी कविता कुसुमाग्रजांपर्यंत तर नवी म्हणजेच कुसुमाग्रजांपासून मानता येईल. जुन्या कवितेची उदाहरणे म्हणजे भा. रा. पाळंदेंची **'रत्नमाला'**, गोडबोले लिखित कविता म्हणजे **'सीता विवाह', 'नामार्थ दिपिका'**, पांडुरंगशास्त्री पारखींची **'षडऋतुवर्णने', 'बोधामृत'**, कीर्तीकरांची **'भक्तसुधा'**, शि.रा.निजसुरे, राजा माधवराव, कृष्णशास्त्री चिपळूणकर, पेठकर, लोंढे, इत्यादींचे काव्य यात येते. मात्र यात सौंदर्यशून्यता, बोजडपणा, भावहीनता, उत्कटतेची कमतरता, सृष्टिवर्णनाची जिवंतता नसणे हे दोष दिसतात. कीर्तीकरांनी इंग्रजीच्या काही ग्रंथांची रुपांतरे केली.

नव कविता अभ्यासताना केशवसुतांचे नाव अग्रणी ठरते. ते अर्वाचीन 'कवि कुलगुरु' व 'तुतारी मंडळाचे' उद्गाते होत. त्यांनी लेखनात जुनी पठडी वापरली पण पाश्चात्य प्रभावही घेतला. 'व्यक्तिवाद' हे नवयुग लक्षण त्यांच्या आत्मविष्कारात दिसते. त्यांची कविता 'तुतारी', 'स्फूर्ती', 'गोफण', इत्यादी जग उलथून टाकणारी भाषा बोलते. दाही दिशा गुंजायमान करणारी तुतारी असते. ते म्हणतात ...

**'एक तुतारी द्या मज आणून**
**फूंकीन ती मी स्वप्रणाने,**
**भेदून टाकीन सगळी गमने'**

'झुपूर्झा', 'सतारीचे बोल','म्हातारी','वातचक्रे' इत्यादी काव्यग्रंथांतून त्यांनी क्रांतीची हाक दिली आहे. त्यांची प्रेरणा घेऊन रेव्हरंड टिळक, रेंदाळकर, गोविंदाग्रज, भा.रा.तांबे, बालकवी, दत्त कवि गोविंद, सावरकर हे सर्व लिहू लागले. रेव्ह. टिळकांनी 'वनवासी फूल', 'सुशीला', 'बापाचे अश्रू', 'माझी भार्या' ही दीर्घ काव्ये लिहिली. काही भावगीते रचली. कवी विनायक राष्ट्रीय वृत्तीचे कवी होत. त्यांची कविता 'पन्ना', 'दुर्गावती', 'संयोगिता', 'वीरमती', इत्यादी उल्लेखनीय आहेत. काही उत्कृष्ट भावगीतेही त्यांनी रचली. तुतारी मंडळात गोविंदाग्रज व गडकरींचा समावेश आहे. ते बरेच वेगळेपण ठेवून लिहितात. बालकवी तर निसर्ग कवी होत.

'संध्या तारके', 'संध्या रजनी', 'निर्झर', 'फुलराणी' या काव्यांतून त्यांचे निसर्गप्रेम दिसते. रुढविरोध, गूढगुंजन, विचारप्रधान, इत्यादी बाबी इतर काव्यांतून व्यक्त होता.

'मरणात खरोखर जग जगत ', 'घट भरे प्रवाही' व इतर काव्ये भा.रा.तांब्यांची आठवण करुन देतात.

स्फूर्ती व ओजस्वपूर्ण काव्यांसाठी सावरकर प्रसिध्द आहेत. 'स्वतंत्रते भगवती', 'सागरास', 'माझे मृत्युपत्र', 'मी घेतलेले व्रत', 'आम्ही अंधतेने' या कवितांतून भव्य-दिव्य-राष्ट्रप्रेमाने भारवलेले ओतप्रोत काव्याचे कवी सावरकर अवतरतात. केशवसुत संप्रदाय १९२० पर्यंत प्रभावी राहिला. सावरकर मित्रमंडळाचे एक कवी गोविंद 'रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले' असे लिहून स्वातंत्र्य प्रेम जागे करतात.

रविकिरण मंडळात तसा सात कवींचा अंतर्भाव आहे, पण त्यातील माधव ज्यूलियन, यशवंत व गिरीश हे तीन महत्त्वाचे होत. त्यांनी केशवसुतांचे वळण वेगळीकडे नेले. पहिले कवी प्रेम, निसर्ग, जानपद, विडंबन, गूढगुंजन, फारसी प्रभावाकडे वळतात. गजल, रबाया लिहितात. 'तुटलेले दुवे', 'स्वप्नरंजन', 'मधु लहरी', इत्यादी स्फुटलेखन करतात.

यशवंत हे राष्ट्रीय विचारांचे कवी. भावविश्वाचे कवी. संशोधन, भावमंथन, यशोगंध, यशोनिधी, ही स्फुट गीते तर जानपदी, शिशु ही निसर्गगीते लिहिली. कवी गिरीशांची 'कांचनगंगा', 'मानसमेध' ही स्फुट व 'अंबराई', 'कला', 'अभागी कमळ' ही दीर्घ काव्ये लिहिली.

१९३५ पासून मराठीत समाजाभिमूख काव्यरचना दिसते. क्रांती, स्वातंत्र्य, धनिकांचा जुलूम, यांकडे काव्याचे वळण झाले. कुसुमाग्रज, कवि अनिल, कांत, बापट, पु.शि.रेगे या धाटणीचे कवी होत. 'गर्जा जय जयकार क्रांतीचा' ही कविता मानवतावादी कुसुमाग्रजांना राष्ट्रीय पातळीवर नेते. 'हिमलाट', 'बळी', 'लिलाव', इत्यादी काव्यांतून ते समाजाभिमूख होतात. कवी अनिल 'फुलवान', 'निर्वासित चिनी मुलास', 'पेरते व्हा', इत्यादी काव्यांतून व्यक्तिगत प्रेम व वेगळे विचार मांडताना दिसतात, 'भग्नमूर्ती' हे त्यांचे राष्ट्रीय वृत्तीने रचलेले खंडकाव्य होय. वा.रा. कांत, कुसुमाग्रजांप्रमाणे क्रांतीचे अग्रदूत ठरतात. विं.दा.करंदीकरांची 'खेदगंगा', केशवसुतांची तुतारी आठवून देते. काव्याचे भव्यदिव्यचे आकर्षण कमी झाले. बा.भ.बोरकर तसे सौंदर्यवादी कवी पण संत वाङ्मय, लोकगीत, संस्कार, गेयता, अध्यात्माचे वळण ठेवून कोमलता, माधुर्य या गुणांना काव्यातून व्यक्त करतात. ग.दि.माडगूळकर इतर काव्यांपेक्षा 'गीत रामायण' मुळे सर्वश्रुत झाले.

कवयित्रींचा विचार केला तर लक्ष्मीबाई टिळक, संजीवनी मराठे, बहिणाबाई चौधरी, इंदिरा संत, शांता शेळके, पद्मा गोळे ही नावे आठवतात. स्त्री जीवनाकडे लेखनाचा ओढा वाढला.

## १०.२.३.३.कादंबरी

बाबा पद्मजी (ख्रिश्चन) यांची 'यमुना पर्यटन' ही कादंबरी स्त्रीचे विधवा जीवन मांडणारी होती. हरिभाऊ आपटेंचे युग आले व कादंबरी लेखनाला गती आली. त्या आगोदर मुक्तामाला, मंजूघोषा, मित्रचंद्र,


**प्रा.संजय तुळशिराम शेलार** महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

विश्वासराव या परंपरावादीच; पण 'आजकालच्या गोष्टी' म्हणजे हरिभाऊंच्या दहा कादंब-या. त्यातून मानवी जीवन, स्वभाव वर्णन, चटकदार संवाद, वेधक कथन, घरगुती भाषा, यांमुळे लेखन वेगळ्या वळणाचे वाटते. 'गणपतराव', 'मी', 'मायेचा बाजार', 'पण लक्षात कोण घेतो', इत्यादींमधून हे गुण आढळतात. वामन मल्हार जोशींनी 'रागिणी', 'नलिनी', 'इंदू काळे', 'सुशीलेचा देव' यांमधून गंभीर विषय मांडले. लालित्याकडे लक्ष कमी दिले. ना.सी.फडकेंनी 'जादुगार', 'दौलत', 'उध्दार', अटकेपारसारख्या साठ-सत्तर कादंब-या लिहून कथानक, रचना, स्वभावर्णन, प्रसंगनिर्मिती, भाषा सौष्ठव, चित्त वेधकता हे गुण वाढवले. १९३० पासून खांडेकरांची लेखणी बहरली. 'हृदयाची हाक', 'कांचनमृग' चे लेखन उत्तम आहे. माडखोलकर यांनी 'मुक्तात्मा', 'भंगलेली देवळे', 'कांता', इत्यादींतून स्त्री- जीवनाचे प्रश्न उभे केले व क्रांतिकारक चितारले. श्री. व्यं.केतकर यांनी 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' लिहिला. 'गारंबीचा बापू' लिहिणारे श्री. ना. पेंडसे, 'श्यामची आई' लिहिणारे साने गुरुजी यांची नावे उल्लेखनीय होत. वि.वि.बोकील, ना.वि.कुळकर्णी, ह.ना.आपटे, पु.भा.भावेंची नावेही महत्त्वाची ठरतात. स्त्री कादंबरीकार म्हणून गीता साने, विभावरी शिरुरकर, मालतीबाई दांडेकर, शांताबाई नाशिककर, कुमुदिनी प्रभावळकर यांनी लेखन केले. विभावरी शिरुरकर यांच्या 'हिंदोळ्यावर', 'कळ्यांचे निश्वास', 'बळी', 'शबरी' या कादंब-यांतून प्रामुख्याने स्त्रिया व पददलित वर्गाच्या व्यथांचे प्रभावी चित्रण आढळते.

### १०.२.३.४. ऐतिहासिक कादंबरी

ऐतिहासिक कादंबरी लेखनात 'मोचनगड' ही गुंजकरांची १८७१ ची कादंबरी, हरिभाऊ आपटे 'उषःकाल' कादंबरीद्वारे क्रांतीकडे नेतात. 'गड आला पण सिंह गेला' , 'सूर्योदय', 'सूर्यास्त' ही प्रभावी ऐतिहासिक कादंबरी होय. नाथ माधव यांच्या शिवशाहीवरील 'स्वराज्याचा श्रीगणेशा', 'स्वराज्यावरील संकट', इत्यादी कादंब-या, ना.ह.आपटेंची 'अजिंक्य तारा', हडपांच्या पेशवाई, आंग्लाईवरील कांदब-या, परांजपे, चि.वि.वैद्य, रणजीत देसाई, इनामदार, इत्यादींचे लेखन महत्त्वाचे आहे. अलीकडील काळात छावा, स्वामी, मृत्युंजय, इत्यादी गाजलेल्या कादंब-या असून या ऐतिहासिक कादंब-या आहेत.

### १०.२.३.५.लघुकथा

लघुकथा या प्रांतात स.का.छत्रेंच्या बालमित्रामधील बोधकथा व इतरांच्या 'बकासुराची बखर', 'नलराजाची बखर', इत्यादी पौराणिक व सामाजिक चित्रण करणा-या लघुकथा आहेत. उपदेशपर लेखन होत होते. १९२६ ते १९४५ फडके, खांडेकर युग राहिले. वि.सी.गुर्जरांचे वेगळे लेखन व अनुवाद परंपरा आली. गोखले, जोशी, कानिटकर, काशीबाई, गिरिजाबाई केळकर, दिवाकर कृष्ण यांनी स्वभावप्रधान लेखन केले. ना.सी.फडकेंच्या लघुकथा तंत्रशुध्द, रेखीव व आकर्षक आहेत. दांडेकरांच्या लेखनात विविधता, जिव्हाळा व समृध्दता आहे. जिवंत अनुभूती देणारे 'उपेक्षितांचे अंतरंग' श्री.म.माटे यांनी लिहिले. महादेवशास्त्री जोशी,

कुमठेकर, शांताबाई नाशिककर, ग.ल.ठोकळ, द.बा.दिघे, मुक्ताबाई दिक्षित, अनंत काणेकरांचे लेखन दर्जेदार आहे. स्त्री-जीवनाचे प्रश्न लघुकथांमधून हाताळले गेले. १९४५ नंतर अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, शांता शेळके, द.मा.मिरासदार, शंकर पाटील, सरोजिनी बाबर, मोकाशी, अग्निहोत्री, जयवंत दळवी, वि.शं.पारगावकर, शंकरराव खरातांच्या कथा त्यातील मनोविश्लेषणासाठी गाजल्या. मनोरंजन, किर्लोस्कर, रत्नाकर इत्यादी मासिकांनी त्यांचे प्रकाशन केले.

## १०.२.३.६.विनोदी वाङ्मय

विनोदी वाङ्मय ही एक महत्त्वाची मराठी साहित्यविधा होय. श्री.कृ.कोल्हटकरांनी विनोदी वाङ्मयाचा प्रारंभ मराठीत केला. त्यांच्या लेखनाचे त्रिविध हेतू दिसतात. ते म्हणजे लोकभ्रमनिरास, धर्मभोळेपणाचे उच्चाटन व रुढींचे विघटन. मनोरंजन व हास्य हा विनोदाचा स्थायी भावच असतो. मी, (सुदामा), 'बंडू नाना' व 'पांडू तात्या' हे तीन त्यांचे मानसपुत्र होत. ते सामाजिक व्यंग्यांवर प्रहार करतात. 'शिमगा', 'गणेश चतुर्थी', 'श्रावणी', 'निर्जळी एकादशी', हे त्यांचे दर्जेदार लेखन होय. गडकरी - बालकराम त्यांचे शिष्य. चि.वि.जोशींचे स्थान सर्वश्रेष्ठ ठरते. त्यांचे विनोद प्रासंगिक, सात्त्विक, स्वभानुकूल आहेत. 'स्टेट गेस्ट', 'लग्नसराई', 'वरसंशोधन', 'गुंड्याभाऊंचे दुखणे' इत्यादी त्यांचे लेखन उत्तम ठरले. डॉ. वर्टी, गो.ल.आपटेंचे लेखनही विनोदी आहे. आचार्य अत्रे तर विनोद सम्राट होते. नवयुग साप्ताहिक व मराठाचे त्यांचे लेखन रसरसलेले असायचे. विडंबन, अतिशयोक्ती, स्वभावनिष्ठता, प्रसंगानुकूलता व शब्दाशब्दांतून विनोद हे त्यांचे विशेष, वि.आ.बुवा, रमेश मंत्री, बाळ गाडगीळ, सामंत यांचे लेखन तसेच अधिक लोकप्रिय ठरले ते पु.ल.देशपांडे यांचे लेखन. दर्जेदार शाब्दिक कोट्या व विनोदाबरोबरच अंतर्मुख करणारी वैचारिकता या लेखनात प्रकर्षाने आढळते.

## १०.२.३.७.लघुनिबंध

कमी शब्दांत व पानांत अधिक सांगताना तात्त्विक चर्चा, शास्त्रीय सिध्दांत, गंभीर विचार, तर्कशुध्द विवेचन, खंडन, इत्यादींचा विचार करुन हितगुजशैलीत लघुनिबंध लेखन हा उत्तम गद्याविष्कार होय. फडकेंच्या 'गुजगोष्टी', 'धुम्रवलये', खांडेकरांचे 'वायुलहरी', 'सायंकाळ', 'मझधार' याची उत्तम उदाहरणे होत. खेळकर विचारशैलीत अनंत काणेकर म्हणतात- 'वि.दा.दांडेकर, ना.मा.संत, कुसुमावती देशपांडे, म.ना.अवदंत, कवी यशवंत, कुसुमाग्रज, र.गो.देसाई, भागवत, गाडगीळ, करंदीकर, मंगेश पाडगावकर यांनी लघुकथेला रमणीयता व काव्यात्मकता ही देणगी दिली.'


**प्रा.संजय तुळशिराम शेलार** महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

## १०.२.३.८.निबंध

मराठीत १८३० नंतर निबंध हा प्रकार रुढ झाला. बाळशास्त्री, लोकहितवादी, भाऊ महाजन, विष्णुशास्त्री, टिळक, राजवाडे, आगरकर, न.चि.केळकर, सावरकर, माटे, द.के.केळकर, महर्षी शिंदे यांचे निबंधग्रंथ प्रसिध्द आहेत. ते 'दर्पण', 'दिग्दर्शन', 'प्रभाकर', इत्यादी नियतकालिकांतून प्रकाशित होत लोकहितवादींची 'शतपत्रे' अशीच निबंध स्वरुपात आहेत. 'निबंधसंग्रह' या ग्रथाचे ११०० पृष्ठांत लेखन झाले आहे. दादोबा पांडूरंग, म.फुले, रामकृष्ण विश्वनाथ, आगरकर, टिळक यांचे लेखन दर्जेदार होते. सामाजिक सुधारणा, ज्ञानोपासना, कायदा, धर्म, वेद, उपनिषदे, महाकाव्ये, राजकारण, राष्ट्रीय शिक्षण, इत्यादी संदर्भात त्यात आले आहेत. तात्यासाहेब केळकरांचे शेकडो निबंध असून त्याचे १० खंड बनले आहेत. वि.वा.राजवाडे, चि.वि. वैद्य, महामहोपाध्याय वा.वि.मिराशी, पंडित सातवळेकर, डॉ.केतकर, द.वा.पोतदार, साने गुरुजींचे निबंध चांगलेच ठरले. तिस~ या पिढीत श्री.म.माटे अस्पृश्य दलितांवर लिहू लागले. त्यांनी बुध्दिनिष्ठ व वैचारिकही लिहिले. द.के.केळकर, आचार्य जावडेकर, लक्ष्मणशास्त्री जोशी, दुर्गाबाई भागवत, इरावती कर्वे, वि.स.वाळिंबे, गं.बा.सरदार, बाळशास्त्री हरदास, नरहर कुरुंदकर, शिवाजीराव भोसले, डॉ. प्र.न.जोशी हे सर्वश्रेष्ठ निबंधकार होत. या सर्वांनी अनेकांविध विषयांवर व्यासंगपूर्ण लेखन करुन मराठीचा वैचारिक वारसा अधिक समृध्द केला.

## १०.२.३. ९. वृत्तपत्रे

जांभेकरांच्या 'दर्पण' ने ही परंपरा मराठीत रुजवली. त्यानंतर त्यांचे 'दिग्दर्शन' आणि भाऊ महाजनांचे 'प्रभाकर' सुरु झाले. लोकहितवादींच्या शतपत्रांतून, निबंधांतून प्रथम इंग्रजांवर टीका झाली. १८४२ मध्ये ख्रिस्ती 'ज्ञानोदय' मधून धर्मप्रसार सुरु झाला. कृ.मा.रानडेंचे 'ज्ञानप्रकाश' (१८४९), चिपळूणकर, छत्रे, रानडे, इत्यादींचे लेख प्रसिध्द होऊ लागले. 'इंदुप्रकाश' (विष्णुशास्त्रींचे), 'नेटिव्ह ओपिनियन' (मंडलिकांचे) यातून सुधारणा, स्त्रीविषयी अन्यायी प्रथांचा विरोध, कर, उद्योग, इत्यादींवर लेख छापले गेले. ठाण्याहून का.धो.फडकेंचे 'अरुणोदय' (विनोदी हिंदू पत्र) राजकीय लेखन देऊन सरकारी क्रोधाला बळी पडले. आगरकर-टिळकांचे 'केसरी' महत्त्वाचे ठरले. शि.म.परांजपेंचा 'काळ', भोपटकर बंधूंचा 'भाला', 'व~ हाडातील महाराष्ट्र', 'संदेश', टिळकांचा 'मराठा' तसेच 'वैनतेय', आंबेडकरांचे 'मूकनायक', इत्यादींतून समाईक विषयांवर लेखन झाले. जागृती कार्याला हातभार लागला, संघटन होण्यास मदत झाली.

## १०.२.३.१०. नियतकालिके

१८६१ मध्ये गुंजीकरांनी 'विविध ज्ञानविस्तार' मासिक सुरु केले, कीर्ती मिळवली. हरिभाऊ आपटेंचे 'करमणूक' (१८९०) साप्ताहिक, दर्जेदार कादंब~ या, उद्‌बोधक चरित्रे, टीका लेख, बोधकथा, स्फुट

गोष्टी छापू लागले. १८९१-१९०० दरम्यान 'कोकिळ', 'दीनमित्र', 'मराठी शाळा पत्रक', 'केरळ कोकिळ', 'रत्नाकर', 'स्त्री', 'किर्लोस्कर', 'मनोहर', 'मनोरंजन', 'मौज', 'चित्रा', 'सत्यकथा', 'सह्याद्री', 'धनुर्धर', 'मराठा वैभव', 'हंस', 'समाजवस्वास्थ्य', 'सह्यादी' यातून जीवनाच्या विविध पैलूंवर दर्जेदार लेखन होत राहिले.

## १०.२.३.११ समीक्षा

या वाङ्मय प्रकाराअंतर्गत प्रथम विष्णुशास्त्री चिपळूणकरांचा मान आहे. त्यांनी मराठीला पाश्चात्त्य समीक्षा पध्दती दिली. 'संस्कृत कविता ग्रंथ' लिहून नव्या पध्दतीने समीक्षण सादर केले. वास्तवता, निसर्ग-स्वभाव वर्णने, कल्पनारम्यता, आत्माविष्कार व जीवनदर्शन प्रगटले. यापूर्वी ते दिले जात नव्हते यावर त्यांनी टीकात्मक लिहिले. शेक्सपिअरची नाटके, मोरोपंतांची कविता यावरही लिहिले. नंतर कोल्हटकर, वा.मा.जोशींचे मोजके टीकात्मक लेख मार्मिक व रसग्रहण दृष्ट्या महत्त्वाचे आहेत. तात्यासहेब केळकरांचा ग्रंथ 'हास्यविनोद मीमांसा' अतिशय चांगला आहे. इतर परीक्षणेही उत्तम आहेत. रा.श्री.जोग, श्री.के.क्षीरसागर, द.के.केळकर, वि.ल.भावे, डॉ. अ.ना.देशपांडे, प्रा.रा.शं.वाळिंबे, बा.सी,मर्ढेकर, प्रभाकर पाध्ये, कुसुमावती देशपांडे, पु.शि.रेगे, दि.के.बेडेकर, शरच्चंद्र, मुक्तिबोध, द.ग.गोडसे, गंगाधर गाडगीळ, डॉ.वा.ल.कुळकर्णी, डॉ.यू.म.पठाण, इत्यादींनी मराठी समीक्षेचा विविध अंगानी दर्जेदार विस्तार केला. नवीन व आधुनिक प्रवाह परिचित करुन दिले.

## १०.२.३.१२. चरित्र - आत्मचरित्र

व्यक्तीचे जीवन, तत्कालीन परिस्थिती व त्यांच्या अनुभवांना वाङ्मय प्रकारातून चितारले जाते. इतिहासाएवढे महत्त्व या लेखन प्रकाराला आहे. कारण त्यातून लेखकांच्या काळाचे सांगोपांग दर्शन घडते. मराठीचे पहिले चरित्र लेखक विष्णुशास्त्री ज्यांनी आधुनिक पध्दतीचे 'जॉन्सनचे चरित्र' लिहिले. शास्त्रींचे चरित्र त्यांच्या बंधूंनी लिहून गुणदोषांवर प्रकाश टाकला. खाजगी पत्रव्यवहार वापरुन, काशीबाई कानिटकरांनी डॉ. आनंदीबाईंचे चरित्र लिहिले. ल.रा.पांगारकरांनी अनेक चरित्रे (ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर, तुकाराम,इत्यादी) लिहिली. न.चि.केळकरांनी टिळकांचे त्रिखंडात्मक चरित्र लिहिले. गं.दे.खानोलकरांनी चार खंडांतून साहित्यिकांची चरित्रे लिहिली. नौरोजी, तेलंग, आगरकर, मॅझिनी, लेनिन, नेपोलियनची चरित्रे लिहिण्यात आली.

दादोबा पांडुरंगांनी आत्मचरित्र लिहिले. १८८४ मध्ये बा.वा.पद्मजींनी आत्मचरित्र लिहिले. वा.ब.फडके, महर्षी कर्वे, वि.रा.शिंदे, माधवराव बागल, धर्मानंद कोसंबींची आत्मचरित्रे प्रसिध्द आहेत. या वाचनीय आत्मचरित्रांतून समाजसुधारणेचा इतिहास डोळ्यासमोर तरळतो. सावरकर, केळकर, काकासाहेब गाडगीळ, ना.ग.गोरेंची आत्मचरित्रे प्रेरणादायी आहेत. श्री.कृ.कोल्हटकर, ग.दि.माडगूळकर, लक्ष्मीबाई टिळक,


**प्रा.संजय तुळशिराम शेलार** महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

रमाबाई रानडे, पार्वतीबाई आठवले यांचीही आत्मचरित्रे आहेत. लक्ष्मीबाई टिळक यांची 'स्मृतिचित्रे' जागतिक दर्जावरही श्रेष्ठ ठरली आहेत.

## १०.२.३. १३ दलित साहित्य

अस्पृश्य गणलेल्या जाती यांनी लिहिलेले साहित्य दलित साहित्य होय असे डॉ.पु.ग.सहस्त्रबुध्दे मानतात. (ग्रंथ - महाराष्ट्र संस्कृती) प्रा. गंगाधर पानतावणेंनी 'अमृत' मध्ये १९७५-७६ मध्ये १०-१२ लेख लिहून या संदर्भात वेगळी भूमिका मांडली. किसन भागू बनसोड, अण्णाभाऊ साठे, बंधू माधव,केसुबुवा गायकवाड यांचे लेखन व कार्य उल्लेखनीय होय. १९५६ नंतर डॉ. आंबेडकरांनी धर्मांतर केले त्यामुळे अनेकांना प्रेरणा मिळाली. 'दलित साहित्य वेदना व विद्रोह' हा ग्रंथ या साहित्य लेखनाची भूमिका व स्थिती मांडतो. या दलित साहित्याअंतर्गत काव्य, कथा, कादंबरी, नाटक इत्यादींचे सतत लेखन होत आहे. 'हा हिंद देश माझा' कवितेत बनसोड यांनी माणसाला पशूपेक्षाही हीन दर्जाने वागवले जाते याचा उपहास केला आहे. वर्णव्यवस्था, विषमता, प्रथा, रुढी, हिंदू धर्म व समाज, अस्पृश्यता पाळणे यांवर प्रहार केले. दलितांचे संघटन, संघर्ष व प्रबोधन व्हावे यासाठी या साहित्यातून आक्रोश ऐकू येतो.

## १०.२. ३. स्वयं अध्ययनासासाठी प्रश्न (अभ्यासासाठी प्रश्न):

**दीर्घोत्तरी प्रश्न**

१. महाराष्ट्रातील  मराठी साहित्य याविषयी सविस्तर माहिती द्या.
२. महाराष्ट्रातील समाज परिवर्तनात मराठी साहित्याचे योगदान स्पष्ट करा.
३. महाराष्ट्रातील ललित साहित्याविषयी सविस्तर वर्णन करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१. मराठी साहित्यातील निबंध वाङमयाने महाराष्ट्रातील समाजपरिवर्तनाला कसा हातभार लावला.
२. महाराष्ट्रातील नाट्य वाङमय यावर टीप लिहा.
३. मराठी कादंबरी वाङमयाने समाज परिवर्तनाला कोणते योगदान दिले ते सांगा.
४. दलित साहित्याविषयी माहिती द्या.
५. विनोदी वाङमयाने समाज परिवर्तनाला कोणते योगदान दिले ते सांगा.

**वस्तुनिष्ठ प्रश्न :**

१. 'प्रभाकर' हे साप्ताहिक कोणी सुरु केले?
२. 'विविध ज्ञान विस्तार' हे मासिक कोणी सुरु केले?

३. 'तुतारी मंडळ' कोणी स्थापन केले?

४. 'रविकिरण मंडळ' कोणी स्थापन केले?

५. ह.ना.आपटे यांची गाजलेली सामाजिक कादंबरी कोणती?

## १०.२.४. सारांश

साहित्यात काव्याचीही प्रगती झाली. पाळंदे यांची 'रत्नमाला' गोडबोले लिखित 'सीताविवाह' प्रसिध्द आहे. केशवसुत, कुसुमाग्रज, रेव्हरंड टिळक, भा.रा.तांबे, आदींनी श्रेष्ठ काव्यरचना केली. कादंबरीच्या क्षेत्रात बाबा पद्मजी यांचे 'यमुना पर्यटन' हरिभाऊ आपटेंचे लेखन प्रसिध्द पावले. ऐतिहासिक कांदबरीतही हरिभाऊ आपटे, ह.ना.आपटे, रणजित देसाई, इनामदार, आदींचे लेखन गाजले. सामाजिक चित्रण करणाऱ्या लघुकथांचाही विकास झाला. स्त्री-जीवनाचे प्रश्न त्यातून मांडण्यात आले. अरविंद गोखले, गंगाधर गाडगीळ, शांता शेळके हे या क्षेत्रातील ख्यातकीर्द डॉ. वर्टी, गो.ल.आपटे यांनी विनोदी लेखन केले.

कमी शब्दांत अधिक तात्त्विक चिंतन व्यक्त करणारे लघुनिबंधही लिहिण्यात आले. फडकेंच्या 'गुजगोष्टी', खांडेकरांचे वायुलहरी आदी या क्षेत्रातील आहेत. वृत्तपत्रे व नियकालीकेही प्रसिध्द झाली. त्यांनी समाजजागृतीस मोठा हातभार लावला. याबरोबरच समीक्षा, चरित्र-आत्मचरित्र, दलित साहित्य निर्माण झाले.

## १०.२.५. पारिभाषीक शब्द शब्दार्थ

**कला** : हृदयातील (अंतःकरणातील) विविध भावनांचा आविष्कार करणे म्हणजे कला होय.

**ललित साहित्य** : जे बोलले जाते व लिहिले जाते ती संपूर्ण लिखित निर्मिती साहित्य होय. साहित्याला 'ललित साहित्य' असा पर्यायी शब्द आहे. कविता, कथा, कादंबरी, लेख इत्यादी अनेक प्रकारच्या ललित माध्यमांतून हे साहित्य आकार घेत असते.

## १०.२.६.संदर्भ ग्रंथ


१. सरदार गं.बा. (संपादक), महाराष्ट्र जीवन, खंड २, पृ. ३०३-३०४

२. क्षीरसागर श्री.के., केशवसूत आणि तांबे. पृ.३८

३. सरदार गं.बा. (संपादक) उपरोक्त, पृ. ३३५-३३६

४. मुजूमदार शं.बा., महाराष्ट्रीयन नाटककार यांची चरित्रे, भाग १, पृ. १४१.

५. Dr. Raina Motilal, Literary and Social Change : Between the Devil and Dragon, Punjab University Journal of Mediaeval Indian Literature

## १०.२.७. क्षेत्रीय कार्य

१. २१ व्या शतकातील चरित्र-आत्मचरित्र, दलित साहित्य प्रगतीचा आढावा घ्या.
२. काव्य साहित्याची समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपायोजना सुचवा.
३. तुमच्या परिसरातील कवीची नोंद करा

## १०.३.०. घटकाची उद्दिष्टे

**१.** प्रथम आपण कला म्हणजे काय हे समजून घेणे

**२.** कला निर्मितीसाठी काही साधनांची व माध्यमांची आवश्यकता आहे.

**३.** संगीताच्या क्षेत्रात महाराष्ट्रात आधुनिक काळात झालेली परिवर्तने समजून घेणे.

**४.** मराठी रंगभूमी पालटणारे युग सुरु झाले.

**५.** चित्रकलेला आंतराराष्ट्रीय कीर्ती मिळविली.

## १०.३.१.प्रस्तावना

प्रथम आपण कला म्हणजे काय हे समजून घेऊ त्यानंतर त्याचे प्रकार व महाराष्ट्रातील कलाविष्काराची माहिती घेऊ. कलेच्या विद्वानांनी कलेच्या भिन्न भिन्न व्याख्या केल्या आहेत.

**कोंचे :** 'कला म्हणजे कलाकाराच्या अंतरंगात प्रतीत झालेल्या अनुभूतींचा बाह्य आविष्कार, आत्माविष्कार होय'

**फ्रोबेल :** 'कला स्वयं निसर्ग आहे. क्रीडा ही एक मुक्त अभिव्यक्ती आहे. कला हीदेखील एक क्रीडा आहे.'

**महात्मा गांधी :** 'खरी कला आत्म्याची अभिव्यक्ती असते आणि तिच्या बाह्यरुपाला आंतरिक चैतन्याच्या अभिव्यक्तीपर्यंतच मूल्य असते.'

**ज्ञानकोशकार श्री.व्यं.केतकर**

'ललित कला म्हणजे भावना अभिव्यक्त करणे व ती उद्दीपित करण्याकरिता स्वतंत्रपणे विचारपूर्वक तालबध्द गती किंवा ध्वनी किंवा नियमबध्द आवृत्ती काढण्याचे नियम पाळून कृती करणे. प्रत्यक्ष उपयोगाची दृष्टी न ठेवता केवळ अनेकांना चिरकालिक व निरपेक्ष आनंद प्राप्त करुन देण्याकरिता केलेली मानवाची प्रत्येक कृती 'ललित कला' या संज्ञेला पात्र ठरते'.

थोडक्यात, कला म्हणजे कलावंतांच्या भावनांचे प्रगटीकरण. यामुळे आत्माविष्काराच्या निर्मिती रुपामुळे कलाकाराला आनंद होतो तसा निर्मिती पाहण्यामुळे आस्वादकालाही आनंद मिळतो.

## १०.३.३.. रंगभूमी आणि चित्रपट उद्योग


**प्रा.संजय तुळशिराम शेलार** महाराजा सयाजीराव गायकवाड, महाविद्यालय मालेगांव कॅम्प, ता-मालेगांव, जि-नाशिक

### १०.३.३.१. कलांचे वर्गीकरण

(१) कालाभिमुख कला (संगीत). याउलट अवकाशाभिमुख कला (शिल्पकला, चित्रकला) तर काही वेळा काळ व अवकाश दोन्ही घटकांचा आधार असतो. त्यास कालावकाशाभिमुख कला (नृत्य, नाटक) म्हणता येईल.

(२) माध्यमानुसार कलेचे वर्गीकरण होते. इंद्रिय ग्राह्यतेनुसार वर्गीकरण करता येते. कारण चित्र व शिल्प यांना पाहता येते. त्यात दृक व संगीत श्राव्य म्हणता येईल.

(३) आकार व आशयानुसार वर्गीकरण करता येते.

(४) प्रयोग शरणतेनुसार नृत्य, नाट्य प्रयोगशील तर शिल्पचित्र, साहित्य, अप्रयोग शरण.

(५) आकार व आशयानुसार - यात शिल्प, चित्रकला आशयप्रधान तर साहित्य, नाट्य आकारप्रधान. त्यात दोन्ही घटक असतात. ते संगीत नाट्य, नृत्य आकाराशय प्रधान कला होत.

### १०.३.३.२. कला व्यवहार

कला व्यवहाराचे तीन घटक असतात. त्यामुळे निर्मितीचा आनंद, उपयोगिता मूल्य व उद्दिष्टांची पूर्तता करता येते. (अ) कलाकार (आ) कला/कलाकृती (इ) आस्वादक (सामान्य प्रेक्षक, रसिक, समीक्षक)

### १०.३.३.३. कलेची माध्यमे व साधने

कला निर्मितीसाठी काही साधनांची व माध्यमांची आवश्यकता असते. त्या आधारे त्या कलेला प्राप्त होऊन विशिष्ट आशय मिळतो.

### १०.३.३.४. कलेची सांस्कृतिक वर्गीकरणे

कलेचे तीन प्रकारे सांस्कृतिक वर्गीकरण केले जाते. ते पुढीलप्रमाणे-

(१) **अभिजात कला**

चिरकाल टिकणाऱ्या स्वरुपात बदल न होणाऱ्या शास्त्रशुध्द संगीत, शास्त्रशुध्द नृत्य, गुरु संप्रदाय असतात. समजदार आस्वादक हवा.

(२) **जनप्रिय कला**

लोकांची गरज, आवड, निवड व रुचीवरुन जन्मते. तमाशा, वगनाट्य, सिनेसंगीत, वासुदेव, गोंधळ, भारुड, जागरण, रामलीला, कथाकथन, इत्यादी तसेच लोककला म्हणून लोकभाषेत व लोकांसाठीची कला असते.

(३) **भक्तीकला**

शिल्पकला, चित्रकला, संगीत, नृत्य, साहित्य.

कलेच्या स्वतंत्र अभ्यासासाठी वर्गीकरण वापरले जाते. येथे आपण ऐतिहासिक दृष्ट्या कलेची महत्त्वाची दालने व त्यांचा ऐतिहासिक आढावा घेऊ.

### १०.३.३.५. महाराष्ट्रातील संगीत

सुख, दुःख, शृंगार, वीर, करुण, भक्ती, वात्सल्य,राग,द्वेष, इत्यादी भावनांचा निर्हेतुक आविष्कार म्हणजे कला. या दृष्टीने आपण संगीताच्या क्षेत्रात महाराष्ट्रात आधुनिक काळात झालेली परिवर्तने समजून घेणार आहोत.

### १०.३.३.६. महाराष्ट्राचे सात स्वरश्री

अल्लाउद्दीनने गोपाल नायक व पंडितास मध्ययुगात दिल्लीला नेले. आधुनिक संगीताचा इतिहास मात्र उत्तर हिंदुस्थानातून महाराष्ट्रात आलेल्यांनी विस्तारित केला. त्याच्या कर्तृत्वामुळे महाराष्ट्राला राष्ट्रीय किर्ती लाभली आहे. उत्तरेतून काही जण इथे येऊन राहिले. अशा सात स्वरश्रींपैकी पहिले नाव आद्यगुरु गायनाचार्य बालकृष्ण इचलकरंजीकर यांचे आहे. वासुदेव बुवा जोशी, देवाजी बुवा परांजपे हे त्यांचे गुरु उत्तरेत राहिले १८८३ साली त्यांनी 'संगीतदर्पण' मासिक सुरु केले. गायन समाजही स्थापन केला. डॉ. भांडारकर, म.चि.आपटे, कुंटे, न्या. तेलंग समाजाशी संबंध ठेवून होते. बालकृष्ण बुवांचे कार्य महान होते.

महाराष्ट्राचे दुसरे स्वरश्री बालकृष्णबुवांचे शिष्य पं. विष्णू दिगंबर पलुस्कर होत. त्यांनी जनतेत संगीत विद्येचा प्रसार करण्याचे महत्त्वाचे कार्य केले. लाहोर, नागपूर, मुंबई, पुणे येथे गांधर्व महाविद्यालये स्थापन करुन नंतर संगीत शिक्षणाची सोय केली. त्यांचे दुसरे कार्य म्हणजे संगीताचे नोटेशन व स्वरलेखन पध्दती सुरु केली हे होय. त्यांच्यानंतर हे कार्य शिष्य नारायणराव व्यास, पटवर्धन बुवा, ओंकारनाथ ठाकूर, पाध्ये बुवांनी पुढे चालवले.

तिसरे स्वरश्री, पं.विष्णू नारायण भातखंडे यांनी वकिलीची कमाई सोडून हा व्यवसाय केला. देशभर हिंडून राग, दुर्मिळ चीजा व त्यांचे ग्रंथ मिळवून नोटेशनपूर्वक चीजा प्रसिध्द केल्या. याआधारे त्यांनी 'हिंदुस्थानी संगीत पध्दती' हा ग्रंथ लिहिला. क्रमिक पुस्तकांचेही लेखन केले.

चौथे स्वरश्री म्हणजे लोकांना अवतारी पुरुष वाटणारे भास्कर बुवा बखले, जन्मजात मधुर कंठ लाभल्यामुळे त्यांनी या क्षेत्राला मोलाची देणगी दिली. अनेक शिष्य तयार केले. मास्टर कृष्णराव व बालगंधर्व त्यांनीच घडवले. गंधर्व कंपनीच्या नाटकांना त्यांनी संगीत दिग्दर्शन केले. मराठी संगीताला रंगभूमीवर आणले. पुण्यातील भारत गायन समाज संस्था व त्यांनी तयार केलेल्या चाली त्यांच्या आठवणी देत राहतील.

पाचवे स्वरश्री हा मान अब्दुल करीम खाँ यांचा होय. त्यांचे मूळ घराणे 'किराणा' होते. शास्त्रीयता, रंजकता व परिपोष यामुळे त्यांचे गायन महाराष्ट्रीयांच्या अंतःकरणावर परिणाम करणारे होते. त्यांनी पुण्यात 'आर्य संगीत विद्यालय' सुरु केले. मुंबईत शाखा सुरु केली. विद्यार्थ्यांचा पूर्ण खर्च भागविण्यासाठी ते जलसे

करुन पैसे गोळा करत व त्याचा वापर विद्यालयासाठी करीत. महाराष्ट्रात ग्वाल्हेर व किराणा घराणे प्रचलित आहेत. त्यांचे शिष्य किराणा घराण्याचे दिसतात. ते महाराष्ट्रातच रमले म्हणून त्यांच्या घरण्याला मिरज घराणे म्हणता येईल. सवाई गंधर्व, कुंदगोळकर, शंकरराव सरनाईक, भीमसेन जोशी, रोशन आरा बेगम, गंगूबाई हनगल, इत्यादींनी त्यांची परंपरा टिकवली.

सहावे स्वरश्री रामकृष्णबुवा वझे होत. ते ग्वाल्हेर घराण्याचे होते. नेपाळमध्ये काही दरबारी गायक म्हणून राहिले. त्यांनी अनेक स्वतंत्र चीजा व राग घेऊन स्वतंत्र पध्दती निर्माण केली. मास्टर दीनानाथ, केशवराव भोसले, चाफेकर, कागलबुवा, इत्यादी त्यांचे शिष्य. 'संगीत कला प्रकाश' हा त्यांचा प्रसिध्द ग्रंथ होय. 'ललित कला दर्शन' व 'बळवंत संगीत मंडळी' च्या नाटकांना त्यांनी संगीत दिग्दर्शन केले.

सातवे स्वरश्री अल्लादिया खाँ हे होत. त्यांनी जयपूर घराणे चालवले. संपूर्ण भारतात त्यांनीच महाराष्ट्राला या क्षेत्रात अग्रस्थान मिळवून दिले. 'संगीत पर्व', 'संगीत भागीरथ' व बॅरिस्टर जयकरांच्या शब्दांत 'कलेतील गौरीशंकर' अशा गौरवाची पात्रता त्यांना लाभली होती. त्यांनी अनेक राग महाराष्ट्रात आणले.

विष्णुशास्त्री पलुस्करांच शिष्य प्रा.बी.आर.देवधर होत. इंडियन स्कूल ऑफ म्युझिक ही त्यांची संस्था. कुमारगंधर्व तेथे शिकले. या प्रांतातील विद्वानांनी इतर प्रांतातील विद्वानांपेक्षा अधिक ग्रंथ (संगीतावर) लिहिले.

### १०.३.३.७. गायिका

बावलीबाई पालकर, अंजलीबाई मालपेकर, केसरबाई केरकर, मोगुबाई कुर्डीकर, हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा इत्यादींची नावे भारतभर प्रसिध्द आहेत. बडोदेकर १९४७ च्या स्वातंत्र्य प्राप्ती वेळचे वंदे मातरम रेडिओवरुन गायले होते. गाणाऱ्या स्त्रियांना जी सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त झाली त्याचे मूळ हिराबाई आहेत. गायन क्षेत्रात सध्या लता मंगेशकर, आशा भोसले, अनुराधा पौडवाल यांच्या गायनाचा दर्जा श्रेष्ठ आहे. लता मंगेशकर तर यात सर्वांत श्रेष्ठ ठरतात. त्यांची ३०,००० गाणी ध्वनिमुद्रित झाली तर २,००० पेक्षा जास्त चित्रपटांना पार्श्वसंगीत दिले आहे. त्या लोकप्रिय पार्श्वगायिका म्हणून जगाला ज्ञात आहेत. लता दीदी 'गानकोकिळा' असून आंतरराष्ट्रीय कीर्ती प्राप्त आहेत. तसेच त्यांच्या गळ्यातील गंधार ही खरोखरीच अलौकीक ईश्वरी देणगी होय.

### १०.३.३.८. कीर्तन

नारदमुनींपासून कीर्तन परंपरेचा आरंभ मानतात. पुराण सांगणारे नारद आद्य प्रवर्तक होय. संत मंडळींपैकी नामदेवांचे नाव कीर्तनासाठी घेतले जाते. समर्थ रामदासांच्या मते, 'संगीत, नृत्य, तानमान' कीर्तनाचे आवश्यक अंग हे मत सर्वश्रुत आहे. कीर्तनाचे भजन कीर्तन आणि कथा कीर्तन असा विचार अलीकडे विकसित झाला आहे. असे शास्त्रीय ज्ञान घेऊन देवजी बुवा गोगटे, चिलुबुवा फलटणकर, नाना बुवा बडोदेकर,

ताहराबादकर, व- हाडकर, सांगलीकर, नाशिककर, राम जोशी, इत्यादींची नावे उल्लेखनीय होत. अखिल भारतीय कीर्तन संमेलन व उत्तम प्रशिक्षणाने आज कीर्तन परंपरेला नवे रुप येत आहे.

### १०.३.३.९. लोकसंगीत

बरीच कौटुंबिक गीते, बालगीते, स्त्रीगीते, सणसमारंभाची गीते, इत्यादी प्रचलित आहेत. त्यांना शास्त्रीय दर्जा नसला तरी लोकअभिरुची वाढविणारी म्हणून परंपरागत रुपात गायले जाते. तसेच अनेक प्रकारे लोकसंगीत व लोककला सादर होतात.

**लोकसंगीत (लोककला) :**

वासुदेव, गोंधळी, बहुरुपी, भुत्या, चित्रकथी, वाघ्या-मुरळी, भराडी, पोतराज, जोगती, जागरण, ताकिते (जोगती - जोगतिणी, जागरण- लातुर जिल्हा, ललिते - नगर जिल्हा येथील बोहाडा, दशावतारी)

महाराष्ट्रात वरील विविध प्रकारांतून लोकसंगीताचा वापर लोककला सादर करण्यासाठी होतो. परंपरागत लोकसंगीताची साधने त्यात वापरतात. याव्यतिरिक्त नाट्यसंगीत, सीने संगीतही विकसित झाले आहे. वाद्य संगीताअंतर्गत सनई, सतार, सारंगी, पेटीवादन, व्हायोलिन, तबला, पखवाज वादन, इत्यादींचा उल्लेख क्रमप्राप्त ठरतो. संगीत वाद्यांचा हा गट मूळ संगीताला आधारभूत असतो. साथ देऊन संगीतात आकर्षण व प्राण ओतला जातो. सिनेमामुळे मराठी रंगभूमी (नाट्यसृष्टी) मागे पडली. सिनेसंगीतात अलीकडे पाश्चात्त्य प्रभावाची गीते, गायन व साधने यांचाही वापर होत आहे.

### १०.३.३.१०. नाट्यकला

नाट्यकला महाराष्ट्रातील एक लोकप्रिय कला आहे. अर्वाचीन काळात म्हणजे १८८० मध्ये अण्णासाहेब किर्लोस्करांनी 'संगीत शाकुंतल' हे नाटक लिहून नाट्य रंगभूमीची सुरुवात केली. ते आधुनिक रंगभूमीचे जनक होत. 'सौभद्र', 'रामराज्यवियोग' लिहिले. शेवटचे नाटक अपूर्ण लिहून झाले.देवलांनी 'बिक्रमोर्वशीय', 'मृच्छकटिक' ची भाषांतरे केली. त्यांना 'शारदा' नाटकाने कीर्ती मिळाली. कोल्हटकर युग १८९६ पासून सुरु झाले. 'वीरतनय', 'मूकमायक', 'गुप्तमंजूषा', 'प्रेमशोधन', इत्यादी नाटके त्यांनी लिहिली. कल्पनारम्यता व वास्तवापासून दूर नेणारी ही नाटके त्यांनी लिहिली. कल्पनारम्यता व वास्तवापासून दूर नेणारी ही नाटके १८९६ -१९१० काळात किर्लोस्कर मंडळींनी सर्वांपर्यंत नेली. पुढचे युग आले ते विनोदी नाटकांचे ; ज्यात कृत्रिमता हा मुख्य आधार आहे. कोल्हटकरांप्रमाणे त्याच वेळी खाडिलकरांचे 'सवाई माधवरावाचा मृत्यू', 'कांचनगडची मोहना', 'भाऊबदकी', 'कीचक वध' (कर्झनशाही विरोधी) नाटके त्यांनी लिहिली. प्रा. फडकेंच्या मते 'कीचक वध' ने त्यांना जागतिक कीर्ती लाभली इतके ते दर्जेदार होते. त्यांची संगीत नाटके बालगंधर्वांनी करुन त्यांना कीर्ती मिळवून दिली.

गडकरींचे गुरु कोल्हटकर, गडकरींनी त्यांचे अनुकरण केले. तसेच बरेच वेगळे लेखन केले. वास्तवतेवर आधारित 'एकच प्याला' व 'पुण्य प्रभाव', विधवा विवाहावर 'प्रेम संन्यास' ही नाटके महत्त्वाची होत. गडकरी कारुण्य व हास्यामुळे मराठी लोकांच्या स्मृतीत राहतील. वरेरकर यांनी 'कुंजविहारी', 'हाच मुलाचा बाप', 'सन्याश्याचा संसार', इत्यादी नाटके लिहिली.

'साष्टांग नमस्कार' लिहून मराठी रंगभूमी पालटणारे आचार्य प्र.के.अत्रे (१९३०नंतर) यांचे युग सुरु झाले. 'लग्नाची बेडी', 'भ्रमाचा भोपळा', 'वंदे मातरम' सारखी नाटके लिहून त्यांनी मराठी रंगभूमीला सावरले. सामाजिक समस्या हाताळताना विनोद हा स्थायी भाव त्यांच्या नाटकात आढळून येतो. मोतीराम गजानन रांगणेकरांनीही मराठी रंगभूमीला सावरले. 'कुलवधू' खूप गाजले होते. 'आशीर्वाद', 'नंदनवन', 'माझे घर', 'वहिनी' ही दर्जेदार नाटके होत. माधव नारायण जोशींनी 'प्रो. शहाणे', 'वऱ्हाडचा पाटील', 'गिरणीवाला' सारखी नाटके लिहिली. 'स्थानिक स्वराज्य' हे चांगले नाटक होय. त्यांनी सामाजिक दोष मांडले.

### १०.३.३.११. रंगभूमी

संगीत नाटकात साखळी तुटते. प्रसंगांचा वेग संपतो, अभिनयाची हानी होते. गद्य नाटकात हे दोष नसतात. म्हणून गद्य रंगभूमीने जास्त यश मिळविले. १८८० मध्ये शंकरराव पाटकर व देवल यांनी 'आर्योध्दारक नाट्य संस्था' स्थापन केली. त्यानंतर 'शाहू नगरवासी' ही गद्य नाटक मंडळी बनली. तिने 'हॅम्लेट', 'मानाजीराव', 'झुंजारराव', 'त्राटिका' ही शेक्सपियरची अनुवादित नाटके रंगभूमीवर आणली. 'तुकाराम', 'नामदेव', 'राणा भीमदेव' ही क्रमशः संत चरित्रावरील व वीरसयुक्त नाटके रंगभूमीवर आली. बाळाभाऊ जोग अद्‌भूत नट, गणपतरावांएवढे ते यशस्वी झाले. दोघांनी तीस वर्षे यशस्वी वाटचाल केली.

दुसरी नाटक मंडळी १९०४ मध्ये 'महाराष्ट्र नाटक मंडळी' या नावाने स्थापन झाली. 'कीचक वध', 'भाऊबदकी', 'हॅम्लेट', इत्यादी खाडिलकरांची नाटके या संस्थेने करुन कीर्ती मिळवली कारखानीस, टिपणीस बंधू, त्र्यंबकराव प्रधान, गणपतराव भागवत, गणपतराव जोशी या नटांचा या यशात खरा वाटा होता. यानंतरच्या नाटकातही यश मिळविले. केशवराव दाते हे उल्लेखनीय व लोकोत्तर अभिनयाचे नट होते.

ऐतिहासिक नाटकांची परंपरा 'थोरले माधवराव पेशवे' या कीर्तने लिखित नाटकाने झाली. वासुदेव शास्त्री खरे ('शिवसंभव', 'गुणोत्कर्ष', 'तारामंडल'), खाडिलकर ('सवाई माधवराव पेशवे' व 'भाऊबदकी'), औंदकर (बेबंदशाही), गडकरी (राजअभ्यास), केळकर ('अमात्य माधव', 'चंद्रगुप्त', 'तोतयाचे बंड', इत्यादी), सावरकर ('सन्यस्त खड्‌गे, उत्तरक्रिया') या लेखकांची नाटके दर्जेदार व लोकप्रिय ठरली. पण करमणूक हाच हेतू नाटकांनी जोपासला यानंतर हा हेतू व्यापक झाला. शतसांवत्सरिक नाट्यकला महोत्सवानंतर, वसंत कानेटकर, पु.ल.देशपांडे, बाळ कोल्हटकर, विजय तेंडुलकर, इत्यादींची नाटके प्रभावोत्पादक ठरली. सुहासिनी मुळगावकर व पु.ल.देशपांडेंचे एकपात्री प्रयोग प्रभावी ठरले. मुंबई मराठी साहित्य संघ व प्रोग्रेसिव्ह ड्रामेटिक

असोसिएशनने भरपूर महत्त्वाचे काम केले. 'प्रेमा तुझा रंग कसा?', 'रायगडाला जेव्हा जाग येते', 'गारंबीचा बापू', 'शांतता, कोर्ट चालू आहे' चे प्रयोग प्रभावोत्पादक ठरले.

### १०.३.३.१२. चित्रपट

चित्रपट क्षेत्रात दादासाहेब फाळके आद्यप्रवर्तक असून त्यांनी पाश्चात्त्य चित्रपटांपासून स्फूर्ती घेतल्याचे दिसते. १९१३ मध्ये 'राजा हरिश्चंद्र' हा पहिला मराठी चित्रपट काढला. पौराणिक चित्रपटाने खूप प्रसिध्दी झाली. 'भस्मासुर मोहिनी', व 'सावित्री' हे दोन चित्रपट त्यांनी काढले. त्यांनी १७ चित्रपट व 'हिंदुस्थान फिल्म कंपनी' सुरु केली. ते चित्रपट निर्माते, रंगभूषाकार, छायाचित्रकार, नेपथ्यकार व तंत्रज्ञ होते तसेच ते भारतीय चित्रपटांतील 'युगप्रवर्तक' ही होते.

बाबूराव पेंटर चित्रपटकार होते. त्यांनी 'सैरंध्री' चित्रपट काढला. टिळक त्यासाठी बाबूराव यांना 'सिनेकेसरी' म्हणत. चित्रपट दिग्दर्शन, छायालेखन, नेपथ्य, इत्यादीही त्यांनी सांभाळले. हरिभाऊ आपटेंच्या कादंबरीआधारे 'सिंहगड' हा चित्रपट सुरु केला. १९२४ मध्ये 'प्रभात फिल्म कंपनी' बाबूरावांनी स्थापन केली. 'गोपाळकृष्ण' चित्रपटाने त्यांना प्रसिध्दी लाभली.

### १०.३.३.१३. बोलपट

चित्रपट क्षेत्रात बोलपट युग आले. 'अयोध्येचा राजा', प्रभातचा 'माया मच्छिंद्र' (१९८३), 'धर्मात्मा' (एकनाथांच्या जीवनावर), शांताराम बापूंचा 'अमरज्योती' प्रभातच्या चिरस्मरणीय चित्रपट, 'तुकाराम', 'कुंकु', 'माणूस', 'शेजारी' असे सामाजिक चित्रपट निर्माण झाले. शांताराम बापू, राजा नेने, दामले व फत्तेलालसारखे दिग्दर्शक, संगीत दिग्दर्शक केशवराव भोळे, कथासंवाद शिवराम वाशीकर, गीतलेखक शांताराम आठवले, मुख्य कलाकार विष्णुपंत पारसनीस यांनी भारतीय व जागतिक कीर्ती मिळविली. 'माझा मुलगा', 'ज्ञानेश्वर' नंतर प्रधान ऐवजी 'राजकमल' कंपनी मुंबईतर्फे 'रामशास्त्री' सरस्वती सिनेटोन कोल्हापूर , हंस चित्र कंपनीचा 'छाया' चित्रपट गाजला. नवयुग, अत्रे पिक्चर्स, अरुण स्टुडिओ अशा अनेक कंपन्या आज आहेत. ऐतिहासिक चरित्रे, समाजसुधारक, इत्यादींवर चित्रपट निघाले. 'श्यामची आई' (साने गुरुजी) या आचार्य अत्रे यांच्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त झाला. आज या व्यवसायाने दिग्दर्शक, कलावंत, गायक, साथ देणारे व काम करणारे लोक यांना काम दिले आहे.

### १०.३.३.१४. नृत्य

वैदिक काळापासून भारतात सातवाहन काळापासून महाराष्ट्रात ही परंपरा आहे. प्राचीन नृत्य परंपरेत कथ्थक, मणिपूरी, भरतनाट्यम, कथकलीपैकी दोन उत्तरेतील व दोन दक्षिणेतील आहेत. त्या १३व्या शतकापासून वेगवेगळ्या आहेत. महाराष्ट्राची स्वतंत्र अशी नृत्य पध्दती नाही. गोमंतक कलांचे माहेरघर आहे. म्हणूनच तेथे गायिका, नर्तिका जन्मल्या. ताराबाई कुमठेकर यांचे नाव या क्षेत्रात गाजले. जनाबाई साखळकर,

चंद्रकलाबाई, चंपाबाई वाकळीक ही नावे महत्त्वाची आहेत. नर्तक म्हणून धर्माजी जांबवलीकर, राजाराम मांजरेकरांनी कीर्ती मिळवली. सिनेसृष्टित नाव मिळवले. मुंबईच्या जव्हेरी भगिनी व कनक रेळे मणिपुरी नृत्यात निष्णात आहेत. लच्छू महाराज, सुंदर प्रसाद, गौरीशंकर, बिपिन सिंह, कृष्णन कट्टी, गोविंदराज पिल्ले, इत्यादी नृत्य क्षेत्रातील कलाकारांनी अस्सल भारतीय व शास्त्रीय नृत्ये सादर करुन रसिकांना मंत्रमुग्ध केले. पार्वतीकुमार, मोहनराव कल्याणपूरकर, दमयंती जोशी, रोहिणी भाटे, सारख्यांचे कार्य उल्लेखनीय होय. रोहिणी भाटेंनी पुणे येथे नृत्य अभिरुची वाढवणारी संस्था स्थापन केली आहे.

### १०.३.३.१५. चित्रकला

महाराष्ट्राची ही अतिशय प्राचीन कला आहे. अजिंठा, पितळखोर चित्रकलेने संपूर्ण जगाला भुरळ घातली आहे. आधुनिक काळात विकसित मुंबई महानगरीने या कलेला पुनरज्जीवित केले. जे.जे.स्कूल ऑफ आर्ट्सची स्थापना १८५७ मध्ये सर जमशेदजी जी.जी.भाई यांच्या देणगीतून झाली. देशी चित्रकला शिकण्याची परंपरा राहिली नव्हती. पाश्चात्त्य चित्रकलेचा अभ्यास सुरु झाला. जुनी भारतीय कला संपली. तिला जाणणारे रसिकही राहिले नाहीत. इंग्लंडची छाया प्रकाशच्या शैलीत निर्मिती सुरु झाली. हळूहळू कलाकारांची नावे उजेडात येऊ लागली. केरळचे राजा रवि वर्मा महाराष्ट्रात राहिले. देवी, आसरा महाराष्ट्रीय नऊवारी लुगडे व चोळी या पोषाखात चितारुन ते लोकप्रिय बनले. म.वि.धुरंदर (१८६७-१९१४) यांनी महाराष्ट्रीय असून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवली. देशीविदेशी सुवर्ण पदक मिळवली व चित्रकलेत उंची लाभली. या क्षेत्रात आबालाल रहिमान धुरंधर, नी.म.केळकर यांची नावे व कला क्षेत्रातील योगदान उल्लेखनीय होय. व्हॉईसरॉय सुवर्णपदक मिळवणारे नी.म.केळकर होते. 'बॉम्बे आर्ट सोसायटी' व 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थांचे ते आजन्म सभासद राहिले. बाबूराव पेंटर एक सिध्दहस्त कलाकार व अष्टपैलू कलावंत होते. मुरलीधर आचरेकरांनी परदेशात चित्र प्रदर्शने भरवली. त्यांनी 'आचरेकर ॲकेडमी ऑफ आर्ट्स' संस्था स्थापन केली. ते बॉम्बे आर्ट सोसायटीचे सदस्य व काही काळ आर्ट सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्षही होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. ना.श्री.बेंद्रे सुंदर मांडणी व आकर्षक रंगभरणी करणारे श्रेष्ठ कलाकार होते.

मकबुल फिदा हुसेन, पद्मश्री वि.ना.आडारकर, ज.द.गोंधळेकर, के.के.हेब्बार, देऊसकर, प्रो. माधव सातवळेकर, एस.एल.हळदणकर (जलतरंग चित्रकार) त्रिंदादसारखे व दीनानाथ दलाल, सोलेगावकर (भित्ती चित्रकार) मुरली लाहोटी व लहरीकांत शहा जातिवंत कलाकार होत. चित्रकलेच्या क्षेत्रात आंतरराष्ट्रीय मान्यता व कीर्ती मिळवून दर्जेदार परंपरा त्यांनी कायम राखली.

### १०.३.३.१६. शिल्पकला

महाराष्ट्रात शिल्पकलेच्या क्षेत्रात प्राचीन काळी खूप कीर्ती लाभली. सिध्दहस्त कलाकर शिल्पी होते. आधुनिक काळात पुन्हा एकदा ही कला आपले उच्च स्थान व श्रेष्ठ दर्जा मिळवण्यात अग्रेसर आहे. गणपतराव

म्होत्र, विनायक पांडुरंग करमरकर, र.कृ.फडके, वा.व.तालीम यांनी आज शिल्पकला क्षेत्राला जी देणगी दिली आहे ती त्यांचे नाव अमर करणारी व शिल्पकलेची उंची वाढवणारी आहे.

म्होत्र यांच्या 'मंदिरपथगामिनी' ची जगातील अनेक जाणकार कलाकारांनी प्रशंसा केली. रवि वर्मा म्हणतात, 'इतकी सुंदर कलाकृती यापूर्वी झाली नाही व पुढेही होईल की नाही याविषयी शंका वाटते.' देश विदेशांतून प्रतिक्रिया आल्या. पुतळ्याप्रमाणे त्यांचे तयार झालेले पुतळेही हुबेहुब व जिवंत वाटतात. करमरकरांनी शिवछत्रपतींचा ब्रांझचा पुतळा घडवला तो पुण्यात आहे. ३०० शिल्पकृती करणारे तालीम आठवणीत राहतील. र.कृ.फडके लंडन, शिकागो, फिलाडेल्फियात प्रदर्शने करुन आले होते. पाश्चात्त्य तंत्राचा आधुनिक प्रयोग करुन शिल्पकलेला त्यांनी कालसापेक्ष बनवून त्यात प्राण ओतले. शंकू चौधरी, राम किंकर, धनराज भगत, इत्यादींनी नवे प्रयोग करुन शिल्पकला जी कालबाह्य झाली होती तिला गतिमान बनवली आहे.

## १०.३.३. स्वयं अध्ययनासासाठी प्रश्न (अभ्यासासाठी प्रश्न):

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

**१.** महाराष्ट्रातील कलेच्या सांस्कृतिक वर्गीकरणाची माहिती द्या.

**२.** सप्त स्वरश्री कोणते ते स्पष्ट करुन त्यांचे कार्य विशद करा

**३.** गद्य रंगभूमीविषयी माहिती द्या.

**लघुत्तरी प्रश्न :**

१. मराठी काव्याचा विकास विशद करा.

२. संगीत क्षेत्रातील महाराष्ट्राची प्रगती स्पष्ट करा.

३. चित्रकलेच्या विकासाची माहिती लिहा.

४. कादंबरी लेखनातील विविध टप्पे व लेखन यांची प्रगती स्पष्ट करा.

५. मराठी नाट्य लेखनाविषयी सविस्तर माहिती लिहा.

**वस्तुनिष्ठ प्रश्न**

१. कीर्तनाचे दोन प्रकार सांगा?

२. दादासाहेब फाळके यांचा पहिला चित्रपट कोणता?

३. साने गुरुजींच्या कोणत्या चित्रपटाला राष्ट्रपती पुरस्कार मिळाला?

४. भारताची 'गानकोकिळा' म्हणून कोणाला संबोधिले जाते?

५. जे.जे.स्कूल ऑफ आर्टसची स्थापना कोणी केली?

६. 'यमुना पर्यटन' ही कादंबरी कोणी लिहिली?

## **१०.३.४. सारांश**

कलेच्या क्षेत्रातही साहित्य, संगीत, नाटक, शिल्पकला, चित्रकला आदी क्षेत्रांत प्रगती झाली. बाळकृष्ण इचलकरंजीकर, पं.विष्णू दिगंबर पलुस्कर आदींनी संगीत क्षेत्रात भरीव कार्य केले. लोकसंगीत, वाद्यसंगीत, आदी क्षेत्रांत प्रगती झाली. नाट्यक्षेत्रात अण्णासाहेब किर्लोस्करांचे 'संगीत शांकुतल', देवलांचे 'संगीत शारदा' आदी नाटकांची नावे घेतली जातात. संगीत नाटकांप्रमाणे गद्य रंगभूमीतही मोठी प्रगती झाली. 'भाऊबदकी', 'कीचक वध' आदी नाटके गाजली. ऐतिहासिक नाटकेही निर्माण झाली. राजसंन्यास, बेबंदशाही, ही त्यातील काही उदाहरणे आहेत. नाटकांनी नंतर करमणूक हा हेतू जोपासला. वसंत कानेटकर, पु.ल.देशपांडे, विजय तेंडुलकर आदींची नाटके प्रभावी ठरली.

दादासाहेब फाळके हे चित्रपटांचे आद्य जनक, प्रारंभी राजा हरिश्चंद्र हा पहिला चित्रपट, प्रारंभी मुक चित्रपट होते. बोलपटात अयोध्येचा राजा, माया मच्छिंद्र आदी चित्रपट गाजले. नृत्य कलेतही कथ्थक, मणीपूरी, भरतनाट्यम् आदी नृत्य प्रकार प्रसिध्द आहेत. जव्हेरी भगिनी, कनक देवे, लच्छू महाराज आदी अधिकारी नावे. अलीकडच्या काळात रोहिणी भाटे, सुचित्रा जोशी यांची नावे या क्षेत्रात प्रसिध्द आहेत.

चित्रकलेत म.वि.धुरंधरांनी आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळविली. जे.जे.स्कूल ऑफ आर्टची स्थापना १८५७ मध्ये सर जमशेदजी जीजी भाई यांच्या देणगीत झाली. शिल्पकलेत विनायक करमरकर, र.कृ.फडके आदींनी शिल्पकला क्षेत्रात आपल्या कार्याद्वारे मोठी देणगी दिली. म्होत्र यांची 'मंदिरपथगामिनी' याची जगातील अनेक कलाकारांनी प्रशंसा केली आहे. अलीकडच्या काळात शंकु चौधरी, शाम किंकर आदींनी नवनवीन प्रयोग या क्षेत्रात केले आहेत.

## **१०.३.५. पारिभाषीक शब्द शब्दार्थ**

**लोककला** : 'लोक' विषयक कला. लोक परंपरेने जिचे स्वरुप निर्मित झाले व जोपासले ती कला. वासुदेव, गोंधळी, जागरण, भृत्या, भराडी, वाघ्या-मुरळी, इत्यादी लोककला आहेत. या कलेचे व्यवहारोपयोगी कला, धर्मनिगडीत कला, मनोरंजनात्मक कला प्रकार असून त्यात विविध कला प्रकार येतात.

**लोक संगीत** : लोककलांशी संबंधित विद्या. यात भारतात भारतीय संदर्भातील संशोधन सुरु झाले. हे संशोधन, प्राचीन साहित्य, कला, पुरातत्त्व, इतिहास, संस्कृतीशी संबंधित आहे जे ब्रिटिश काळात सुरु झाले.

**स्वरश्री** : गायनाच्या क्षेत्रातील सात गणमान्य व्यक्ती. यात बाळकृष्ण इचलकरंजीकर, विष्णू दिगंबर

पलुस्कर, विष्णु नारायण भातखंडे, भास्कर बुवा, अब्दुल करीम खाँ, रामकृष्ण बुवा वझे व सातवे  स्वरश्री अल्लादियाँ खाँ होत.

## **१०.३.६.संदर्भ ग्रंथ**


१. धनंजय कीर,  राजर्षी शाहू महाराजांचे समग्र वाङ्मय,

२. द.ता. भोसले ,कर्मवीर भाऊराव पाटील ,मॅकमिलन,२००३

३. महर्षी धोंडो केशव कर्वे यांचे कार्य.

४. सरदार गं.बा. (संपादक) उपरोक्त, पृ. ३३५-३३६

५.  क्षीरसागर श्री.के., केशवसूत आणि तांबे. पृ.३८


## **१०.३.७.क्षेत्रीय कार्य**

(१) तुमच्या परिसरातील एका साहित्यिकाची मुलाखत घेऊन लेखी नोंद करा.

(२) तुम्हाला आवडणाऱ्या कलेविषयी परिसरातील एका उपलब्ध प्रकाराची माहिती मिळवा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके**

(१) शिवाजी सावंत, मृत्युंजय.

(२) ल.द.जोशी, संगीत शास्त्रकार व कलावंतांचा इतिहास.

(३) र.न.पाटकर, कलेचा इतिहास : भारतीय व पाश्चात्त्य.

## **१०.२.७.  क्षेत्रीय कार्य**

४. २१ व्या शतकातील लोकसंगीत च्याप्रगतीचा आढावा घ्या.

५. कला साहित्याची समस्या सोडविण्यासाठी त्यावर उपायोजना सुचवा.

६. तुमच्या परिसरातील लोककलेची नोंद करा .